



सुंदर ते ध्यान उभा विटेवरी । करकटावरी ठेवोनियां ॥ १ ॥
तुळशीहार गळां कासे पितांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ २ ॥
मकरकुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणि विराजित ॥ ३ ॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥

वारकरी संप्रदायाने गौरविलेली गाथा

सार्थ श्रीतुकारामाची गाथा

संपादक आणि अनुवादक : विष्णुबुवा जोग महाराज
प्रस्तावना : जगन्नाथ रघुनाथ आजगावकर

या गाथेत ४१४१ अभंग प्रासादिक आणि सांप्रदायिक अर्थासह दिलेले आहेत. शिवाय ४१० क्षेपक अभंग दिलेले आहेत. ल. रा. पांगारकरांनी लिहिलेले श्रीतुकाराम महाराजांचे चरित्र, सर्व अभंगांची अकारानुसार दिलेली यादी, जोगमहाराजांचे चरित्र इत्यादि अनेक वैशिष्टचांनी नटलेली ही आवृत्ती प्रत्येक पांडुरंग भक्ताकडे अगदी हवीच.

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई.

किंमत २५० रुपये

पहिली आवृत्ती	:	१९०९	सातवी आवृत्ती	:	१९९०
दुसरी आवृत्ती	:	१९२६	आठवी आवृत्ती	:	१९९३
तिसरी आवृत्ती	:	१९७०	नववी आवृत्ती	:	१९९४
चौथी आवृत्ती	:	१९८२	दहावी आवृत्ती	:	१९९५
पाचवी आवृत्ती	:	१९८६	अकरावी आवृत्ती	:	१९९६
सहावी आवृत्ती	:	१९८८	बारावी आवृत्ती	:	१९९८

मौज प्रिंटिंग ब्यूरो, मुंबई ४ यांनी छापलेल्या
मूळ प्रतीचे प्रतिरूप मुद्रण केलेले आहे.

मुद्रक
सदाशिव गणेश परुळकर
जस्मिन आर्टस्
वडाळा उद्योग भवन
वडाळा, मुंबई ४०० ०३१.

प्रकाशक
ज्योती धनंजय ढवळे
केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी,
गिरगाव, मुंबई ४०० ००४.

श्री पांडुरंग समर्थ

प्रस्तावना

धर्म रक्षावयासाठीं, करणें आटी आम्हांसी ॥ १ ॥
वाचा बोलों वेदनीति, करूं संतीं केलें तें ॥ २ ॥

—तुकाराममहाराज

आत्मोन्नति व राष्ट्रोन्नति ह्या एका स्वधर्मानेंच होतात. येथें कोणी असें म्हणतील, कीं आत्मोन्नति स्वधर्मानें होते हें एका दृष्टीनें बरोबर आहे; कारण वेद, शास्त्रें, ऋषि, मुनि व साधु-संत ह्या सर्वांचें, आत्मोन्नति स्वधर्मानें होते, ह्याविषयीं एकमत आहे असें त्यांच्या वचनांवरून दिसतें; परंतु राष्ट्रोन्नति स्वधर्मानें होते, हें म्हणणें असंगत आहे; हल्लींच्या सुधारलेल्या राष्ट्रांच्या नवीन शास्त्रज्ञानानें ज्यांची विवेकदृष्टि दिपून जाऊन मंद झाली आहे, त्यांचें म्हणणें असें आहे, कीं "आमच्या देशाचा जो ऱ्हास झाला, तो धर्मवेडामुळेंच होय. आज जीं सुधारलेलीं राष्ट्रें जगाच्या पुढें आलीं आहेत, त्यांच्यामध्यें एक वेळ धर्माचें वेड होतें; त्या वेळेस तीं अवनतावस्थेंत होतीं व त्या वेळेस त्यांच्यांत कोणत्याहि प्रकारची क्रांति घडून आलेली नव्हती. पण हळुहळू त्यांच्यांत विचारी माणसें निर्माण होऊन त्यांनीं धर्मवेड नाहींसें केलें. त्यामुळें हळुहळू त्यांच्यामध्यें सर्व प्रकारची क्रांति घडून येऊन, आज तीं उन्नतावस्थेच्या शिखरावर येऊन बसलीं आहेत. तेव्हां आपला देश उन्नतावस्थेस येण्यास आपल्यांतील धर्मवेड नाहींसें केलें पाहिजे, त्याखेरीज आपला देश इतर राष्ट्रांप्रमाणें वर येणार नाहीं." पण हें त्यांचें म्हणणें अदूरदृष्टीचें आहे, कारण इतर राष्ट्रांप्रमाणें आपल्या हिंदुस्थानची स्थिति नाहीं. आपला देश एक वेळ उन्नतावस्थेंत होता, हें सनातन धर्माभिमान्यांना व हल्लींच्या शास्त्रज्ञानानें दृष्टि दिपून गेलेल्या वर्गांनाहि कबूल केलें पाहिजे. जर धर्मवेडानें देशाचा ऱ्हास होतो असें असेल, तर ज्या वेळीं आपला देश उन्नतावस्थेंत होता, त्या वेळींहि धर्मवेड हें सर्वत्र जागृत होतें असें ऐतिहासिक दृष्टीनें स्पष्ट होतें. म्हणून धर्मवेड हें देशऱ्हासाचें मूळ नाहीं, तर उन्नतीचेंच कारण आहे. तें कसें, ह्याविषयीं यथामति पुढें सांगण्यांत येईल. प्रथम जीवात्मा हा अवनतावस्थेंत कशानें आला आहे, ह्याचा विचार करूं.

जीवात्म्याच्या मागें भय, दुःख, शोक, आणि दीनता व कामक्रोधादि षड्विकार हे अनर्थ कशानें लागले आहेत? तर जीवात्म्याच्या स्वराज्यापासून भ्रष्टतेनें व परतंत्रतेनें. जीवाला स्वकीय राज्यांत भय नाहीं, कारण जीवाचें स्वकीयत्व एवढें मोठें आहे, कीं त्याच्या अस्तित्वांतच हीं पिंडब्रह्मांडें स्फुरत आहेत. अर्थात् जीवाच्या नित्यस्फुरद्रूप तात्त्विक स्वरूपाहून भिन्न अशी एकहि वस्तु नाहीं. तेथें भय कोठून असणार? कारण भयाची उत्पत्ति द्वितीय संबंधांत होते. यदाह्येवैष एतस्मिन्नुदरमंतरं कुरुते ॥ अथ तस्य भयं भवति ॥ —तैत्तिरीयोपनिषत् अनुवाक ७. भयं द्वितीयाभिनिवेशतः स्यात् ॥ —श्रीमद्भागवत, एकादशस्कंध, अध्याय २ श्लोक ३७.

दुजें जंव जंव घडे। तंव तंव संसारभय जोडे। हें देवो आपुलेनि तोंडें। बोलती वेदें॥ –ज्ञानेश्वरी अ. १७ ओंवी ३७६. त्याचप्रमाणें वर सांगितलेल्या जीवाच्या तात्त्विक स्वरूपांत दुःखहि नाहीं, कारण हें एकदेशी अनात्मशरीराचें तंत्र होण्यांत प्राप्त होतें. एरवीं तरी सहजें। सुख दुःख तईंचि सेविजे। देहजळीं होईजे। मासोळी जैं॥ –ज्ञानेश्वरी, अध्याय १४ ओंवी ३५२. ती देहतंत्रता जीवाला स्वकीय राज्यांत नाहीं. तेथें वर निर्दिष्ट केलेल्या आपल्या पूर्ण तात्त्विक स्वरूपाचीच एक अहंता असते. अर्थात् अशा पूर्ण स्थितींत शोकहि नाहीं. तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः॥ –ईशावास्योपनिषत् ७. व दैन्यहि नाहीं. कामादि षड्विकारांचाहि पण तेथें संबंध नाहीं, कारण कामना ही अप्राप्त वस्तुविषयीं होते. वर सांगितलेल्या जीवाच्या स्वराज्यांत अप्राप्त असें कांहींच नाहीं, यावत् पिंडब्रह्मांड माझा मी एक आहें, अशी तेथें नित्य स्फूर्ति असते, मग अशा स्थितींत कामना कशाची असणार? "अवघेंचि आपुलेंपणें। नुरेचि जया अभिलाषणें। जैसें येथून परा जाणें। आकाशा नाहीं॥ –ज्ञानेश्वरी अध्याय १५ ओंवी ३००. जेथें काम नाहीं त्या ठिकाणीं क्रोधहि पण नाहीं, कारण कामाच्या अपूर्णतेमध्यें क्रोधाची उत्पत्ति आहे. जेथ कामाचें अपूर्ण काज। तेथ क्रोधाचें खवळे तेज। जेव्हां कामाचें पूर्ण निज। तेव्हां नाचे भोज लोभाचें॥ जेवीं दीपाची दीपकळा। सवें वागवी तेज काजळा। तेवीं क्रोध लोभांचा सोहळा। कामाजवळां संतत। जेथ कामाचा नाहीं पांगू। तोचि क्रोधलोभांचा त्यागू। हा समूळ उपाव चांगू। स्वयें श्रीरंगू बोलिला॥ –एकनाथी भागवत, अध्याय १७ ओंव्या. २५०–५३. उदाहरणार्थ—एका गृहस्थास पन्नास रुपयांची जरूर होती, म्हणून तो आपल्या मित्राकडे ते मिळतील अशा आशेनें गेला आणि पन्नास रुपये मागूं लागला. मित्रानें सांगितलें, कीं मजजवळ पन्नास रुपये आहेत, पण मी ते तुला देत नाहीं, कारण तूं ते माझे रुपये बुडविशील. हें ऐकून त्याला अतिशय राग आला आणि तो आपले मनांत म्हणाला, "हा माझा मित्र असून, ह्यानें माझी गरज पूर्ण केली नाहीं. कांहीं हरकत नाहीं. वर्षाचे दिवस ३६० आहेत. कधीं तरी ह्याला दाखवीन." सारांश, मित्राकडून त्याची पन्नास रुपयांची कामना पूर्ण झाली नाहीं म्हणून त्याच्यासंबंधानें क्रोध उत्पन्न झाला; आणि इच्छिलिया सांगडें। इंद्रिया आमिष न जोडे। ऐसा जो डाव पडे। तोचि द्वेष॥ –ज्ञानेश्वरी, अध्याय १३ ओंवी १२६. तसेंच कामनेच्या पूर्णतेंत लोभाची उत्पत्ति होते. वर दिलेल्या उदाहरणांत मागितल्याबरोबर मित्रानें पन्नास रुपये दिले असते, तर त्याच्याविषयीं लोभ उत्पन्न झाला असता, आणि मागणारा असें म्हणूं लागला असता, कीं मित्रांत मित्र एक माझाच आहे. ह्याप्रमाणें क्रोध आणि लोभ ह्यांची उत्पत्ति एका कामनेपासूनच आहे. जेथें कामना नाहीं, तेथें क्रोधलोभ हे सहजींच नाहींत. "मूळाचें तोडणें जैसें। होय कां शाखोदेशें। काम नाशिलेनि नाशे। तैसा क्रोध॥ –ज्ञानेश्वरी, अध्याय १८ ओंवी १०६०; आणि जेथें काम, क्रोध, लोभ नाहींत तेथें मोहमदमत्सरहि पण नाहींत; आणि अनात्म्याच्या ठिकाणीं आत्मबुद्धि, मिथ्याच्या ठिकाणीं सत्यबुद्धि आणि दुःखाच्या ठिकाणीं सुखबुद्धि हेंच मोहाचें स्वरूप आहे. जीवाच्या स्वकीय राज्यांत अनात्म्याची कल्पनाच जर नाहीं, तर तेथें अनात्म्याच्या ठिकाणीं आत्मबुद्धि तरी कशी असेल? त्याप्रमाणें तेथें दुःखच नाहीं, तर दुःखाच्या ठिकाणीं सुखबुद्धि कशी असेल? तसेंच तेथें आपल्या तात्त्विक सच्चिदानंदस्वरूपावांचून असत् असें कांहीं नाहीं, तर तेथें असदाच्या ठिकाणीं सद्बुद्धि आहे काय? अर्थात् ती अवस्था मोहशून्य आहे. तसेंच मदमत्सरहि तेथें नाहींत, कारण मदमत्सर हे तर द्वैतकल्पनेचा अत्यंत अभाव आहे; अर्थात् तेथें मदमत्सरादि असणें शक्य नाहीं. अशा प्रकारें सर्वानर्थशून्य जीवाचें स्वस्वरूपसाम्राज्य आहे.

पण अशा ह्या नित्य कल्याणरूप स्वराज्यापासून जीव भ्रष्ट कशानें झाला, असा साहाजिक प्रश्न निघतो. त्याचें उत्तर हें आहे, कीं जीव आपल्या मूर्खत्वानें स्वराज्यापासून भ्रष्ट झाला. मूर्खत्व म्हणजे, जसे आपण आहोंत, तसें आपण आपणाला न जाणणें, हें होय; पण हें उत्तर ऐकून घटकाभर बहिर्मुख जीवांना आश्चर्य वाटेल. तें कसें म्हणाल, तर बहिर्मुख जीव असें समजतील, कीं मनुष्य हा आपल्याला मनुष्यच समजत आहे; त्यांत ब्राह्मण असला तर मी ब्राह्मण आहें, असेंच जाणतो; क्षत्रिय असला तर मी क्षत्रिय आहें, वैश्य असला तर मी वैश्य आहें,

व शूद्र असला तर मी शूद्र आहें, असें जाणतो; असें आपणाला याथातथ्य सर्व जाणत असून, आपण आपल्याला न जाणल्यामुळें जीव हा स्वराज्यापासून भ्रष्ट झाला, हें जें वर उत्तर दिलें आहे, तें असंगत आहे असें त्यांना वाटेल; पण खालीं दिलेला खुलासा पाहून वर दिलेलें उत्तरच यथायोग्य आहे, असें दिसेल. जीव हा "देह मी आहें," असें समजतो; परंतु समजण्याचा विषय, समजणाराहून भिन्न आहे, हें अगदीं उघड आहे. दुसरें असें, कीं देह हा ज्ञानशून्य म्हणजे जड आहे; आणि जीव हा सर्व समजणारा असा चित् आहे; अमूक एक विषय मी समजलों, असें ज्या वेळीं मनुष्य म्हणतो, त्या वेळीं त्याची अहंता, समजण्याचा धर्म जेथें आहे, तेथें असते. आतां समजण्याचा धर्म देह, इंद्रियें, प्राण ह्यांचे ठिकाणीं नाहीं. जर देह, इंद्रियें व प्राण ह्यांच्या ठिकाणीं समजण्याचा धर्म आहे असें मानिलें, तर झोंप लागल्यावर देहाच्या जवळ कोणी आलें तरी त्यास तें कळत नाहीं. तसेंच कित्येकांचे झोंपेंत डोळे उघडे असतात, तरी त्यांना पुढे आलेलें दिसत नाहीं व त्वचेला स्पर्श केला तरी कळत नाहीं, ह्यावरून देहेंद्रियांच्या ठिकाणीं ज्ञानधर्म नाहीं, असें ठरतें. तसेंच सुषुप्तिअवस्थेंत प्राण असूनहि त्याला समजत नाहीं, म्हणून तोहि ज्ञानशून्य आहे. आतां जाणण्याचा धर्म एका बुद्धीमध्यें आहे व ती सर्व विषयाला जाणते, असें श्रुतिस्मृति व साधुसंत ह्यांच्या प्रमाणांवरून दिसतें. जरी बुद्धि ही जाणणारी आहे, तरी जाणणें हें तिच्या स्वरूपगत नसून (कारण ती जड आहे) तिच्या आश्रयानें आत्माच जाणतो. जसें भाजणें हा धर्म पाण्याचा नाहीं, तें स्वरूपानें थंड आहे, तरी आधणाच्या पाण्यानें पाय भाजतो. आतां तो भाजण्याचा व्यवहार जो होतो, तो जलाश्रयानें असलेल्या उष्णतेकडून होतो. तसें बुद्धिद्वारा आत्माच सर्व विषयाला समजतो. ह्यावरून समजण्याचा धर्म एका आत्म्याच्याच ठिकाणीं आहे. अर्थात् "मी समजलों" असें ज्या वेळेला मनुष्य म्हणतो, त्या वेळेस त्याची अहंता आत्मत्वाचे ठिकाणींच असते, परंतु ती आत्मभावाला न जाणून असते; म्हणूनच पुन्हां मन, प्राण, इंद्रियें ह्यांच्याशीं तो तादात्म्य करितो. सारांश, जीवात्म्याचें स्वकीय स्वरूप चित्स्वरूप आहे. त्या स्वकीय चित्स्वरूप आत्म्याला जीव हा न जाणतां "जड देह मी आहें" असें समजतो. अशा स्थितींत देह व देहाश्रित असणाऱ्या ब्राह्मणक्षत्रियादि जाति वगैरे सर्व मी आहें, असें जीवात्म्याचें जाणणें योग्य होईल काय? अर्थात् नाहीं, हें कोणीहि विचारी पुरुष सांगेल.

असो, अशा प्रकारें आपण आपल्याला न जाणल्यामुळें, परकीय व जड अशा देहाच्या स्वाधीन जीवात्मा झाला, म्हणजे "देहच मी आहें" असा त्यानें निश्चय केला. त्या योगानें वर दर्शविलेले सर्व अनर्थ जीवात्म्याच्या मागें लागले. हा जीवात्म्याच्या संबंधाचा विचार झाला. आतां राष्ट्राच्या संबंधाचा विचार करूं.

आपणां हिंदुस्थानवासीयांच्या मागें सद्यःस्थितींत भय, शोक, दुःख व दीनता हीं कां लागलीं आहेत? ह्या प्रश्नाचें उत्तर वरील प्रश्नाच्या उत्तराप्रमाणेंच आहे, म्हणजे स्वराज्यापासून भ्रष्टता व परतंत्रता हें होय. हल्लीं जें भय आपल्यामागें लागलें आहे, तें आपण स्वावलंबी असतांना नव्हतें. हल्लीं ज्या दुःखशोकांत आपण आहोंत, तो दुःखशोक आपण स्वावलंबी असतांना नव्हता; हल्लीं जी दीनता आपल्यामागें लागली आहे, ती दीनता आपण स्वावलंबी असतांना नव्हती, कारण भय, दुःख, शोक व दीनता हीं परावलंबी असणाऱ्यांच्या ठिकाणीं असतात. आपल्या स्वराज्यांत आपलीच सत्ता असते. किंबहुना, आपलीच सत्ता आपल्या राष्ट्रावर असणें, हेंच स्वराज्य होय. अशा प्रकारचें आपलें स्वराज्य असतांना आपण स्वतंत्र होतों. स्वराज्यांत आपल्याला व्यवहारांत लागणाऱ्या वस्तु आपणच निर्माण करीत होतों; म्हणजे कापड, धातूचे पत्रे, व त्यांचीं भांडीं, लोखंड व पोलाद, त्यांचे खिळे, पट्ट्या वगैरे सर्व जिनसा आपण आपल्या देशांत निर्माण करीत होतों. ह्यासंबंधानें आपणांस परकीयांच्या तोंडाकडे पाहाण्याची बिलकूल जरूर नव्हती. फार काय सांगावें? कापड तर आम्ही आमच्या देशाला पुरवून इतर देशांनाहि पुरवीत होतों. अशी स्थिति आपल्या स्वराज्यांत होती. त्यामुळें देशांतला पैसा देशांतच राहून तो वाढत असे. धान्यहि देशांतले देशांत राहात असे. त्यायोगानें व्यवहारांत

लागणारें अन्न, वस्त्र व धन ह्यांची सर्वत्र सुबत्ता असून सर्व राष्ट्र आनंदी असे. हल्लींसारखीं आगगाड्या, मोटारी, दोन चाकी गाड्या वगैरे सुखोत्पादक साधनें त्या वेळीं नव्हतीं, म्हणून ही एक त्या वेळेला उणीव होती, असें भासेल; पण हीं सुखसाधनें स्वतंत्रावस्थेंत जितकीं सुखकर आहेत, तितकीं पारतंत्र्यांत सुखकर नाहींत, कारण तीं एका बाजूनें सुख देऊन दुसऱ्या बाजूनें आपल्या देशाला दुःखदारिद्र्यांत कायमचीं घालणारीं आहेत. अशा प्रकारचें सर्वतोपरि सुखकर असें आपलें स्वराज्य जाऊन आपण इतके परावलंबी झालों, कीं सामान्य टांचणी–सुईकरितांहि आपणास दुसऱ्याकडे पाहावें लागतें. येथेंहि असा प्रश्न उत्पन्न होतो, कीं आमचें उत्तम स्वराज्य कशानें गेलें व आम्ही परावलंबी कशानें झालों ? ह्याचेंहि उत्तर वरील उत्तराप्रमाणेंच, म्हणजे मूर्खत्व हेंच होय. ह्या मूर्खत्वाचें विशेष स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाहीं, कारण तें इतिहासप्रसिद्ध आहे.

सारांश, जीवात्मा आपल्या तात्त्विक स्वराज्यापासून व प्रवृत्तींतील स्वराज्यापासून एकाच कारणानें, म्हणजे मूर्खत्वानें, भ्रष्ट होऊन परतंत्र झाला आहे. आतां आपलें हें उभय बाजूंचें स्वराज्य प्राप्त होण्याला एक **स्वधर्मच** साधन आहे, कारण स्वराज्य प्राप्त होण्याला व असलेलें स्वराज्य टिकण्याला शरीरसामर्थ्य, स्वार्थत्याग, कर्तव्यासक्ति, निर्मात्सर्य, खरा स्वदेशाभिमान, नीतिधैर्य, परस्पर विश्वास, योग्य उदारबुद्धि, बंधुप्रेम इत्यादि सद्गुण त्या राष्ट्रांतील व्यक्तींच्या अंगीं असावे लागतात. हे सद्‌गुण अंगीं येण्यास माझ्या मतानें एकच मुख्य साधन आहे व तें **ईश्वरनिष्ठा** हें होय. ईश्वरावर ज्यांची पूर्ण निष्ठा आहे, त्यांच्या अंगीं हे सद्‌गुण यावयाचेच, किंवा ज्यांच्या अंगीं हे सद्‌गुण सत्यत्वानें वास करीत आहेत, त्यांची ईश्वराच्या ठिकाणीं पूर्ण निष्ठा असावयाचीच. जर कोणी ईश्वरावर निष्ठा न ठेवून वरील सद्‌गुण प्राप्त करून घेण्याची इच्छा करील, तर त्यास ते कधींहि प्राप्त व्हावयाचे नाहींत. कित्येक प्रसंगीं ते आढळून येतील, परंतु ते सत्य न समजतां मुलाम्याप्रमाणें समजावेत. ईश्वरावर निष्ठा ठेवणें हेंच स्वधर्माचें लक्षण आहे. ईश्वर हा सर्वज्ञ आहे, व त्यानें श्रुतिस्मृतिद्वारा ज्या आज्ञा केलेल्या आहेत व ज्या साधुसंतांनीं वारंवार स्पष्ट सांगितल्या आहेत, त्या आज्ञांप्रमाणें वागणें व तसें आपण वागलों तर आपलें निःसंशय कल्याण होईल असा दृढ विश्वास असणें, हेंच ईश्वरनिष्ठेचें स्वरूप होय व स्वधर्महि हाच होय. स्वधर्माचरणानें वर सांगितलेले सद्‌गुण प्राप्त होतात, म्हणजे त्यांचा व स्वधर्माचा कार्यकारणभाव आहे, हें पुढील विवेचनावरून दिसून येईल.

स्वधर्माचरणानेंच शरीर सुदृढ राहातें. इंद्रियांना लळा दिल्यानें अनेक प्रकारच्या दुर्व्यसनांपासून शरीरामध्यें अनेक प्रकारचे रोग उत्पन्न होऊन शरीर क्षीण होतें; स्वधर्मानें वागणाऱ्यांच्या ठिकाणीं इंद्रियांचे लाड नसतात व दुर्व्यसनेंहि साहाजिकच नसतात, त्यामुळें शरीरबल चांगलें असतें. तसेंच स्वार्थत्यागादि वर दर्शविलेले सद्‌गुण हे ज्यांचे अंतःकरणास कोणत्याहि प्रकारचा मळ लागलेला नाहीं व जे निर्मळ सत्त्वसंपन्न आहेत, त्यांच्याच ठिकाणीं असतात. सत्त्वसंपन्न अंतःकरण होण्याचें मूळ एका प्रवृत्तीनें ईशचिंतन करणें हें आहे आणि स्वधर्मबीजहि हेंच होय. ह्याविषयीं एक वेळ धर्मराजानें भीष्माचार्यांस प्रश्न केला होता. तो असा, कीं सर्व धर्मांमध्यें परम धर्म आपण कोणता मानितां ? त्यावर भीष्माचार्यांनीं सांगितलें, कीं प्रेमपूर्वक भगवंताचें स्मरण करणें व स्तवन करणें हाच सर्व धर्मांत श्रेष्ठ धर्म आहे. युधिष्ठिर उवाच–को धर्मः सर्वधर्माणां भवतः परमो मतः । भीष्म उवाच—एष मे सर्वधर्माणां धर्मोऽधिकतमो मतः । यद्‌भक्त्या पुंडरीकाक्षं स्तवैरर्चेन्नरः सदा ॥–श्रीमन्महाभारत, विष्णुसहस्रनाम. अर्थात् अशा जातीचा जो परमधर्म, ह्या परमधर्मानेंच अंतःकरण सत्त्वसंपन्न होतें. आतां अंतःकरण हें स्वधर्मानें सत्त्वसंपन्न कसें होतें, हें पुढें स्पष्ट केलें आहे.

ईश्वर हा शुद्धसत्त्वविशिष्ट आहे. अर्थात् मनानें त्याचें ध्यान केल्यानें मनांतील रज, तम हे गुण नाहींसे होऊन, मन शुद्धसत्त्वसंपन्न होतें, कारण असा नियम आहे कीं ज्या विषयाचे मन ध्यान करिते, त्या विषयाशीं तें तदाकार होतें. "तें (मन) स्वलाभ लाभलेपणें । मन मनपणाही धरूं नेणें । शिवतलें जैसें लवणें । आपलें निज ॥ तेथ कें उठती ते भाव । जिहीं इंद्रियमार्गीं धांव । घेऊनि ठाकावे गांव । विषयाचे ते ॥ म्हणोनि तिये

मानसीं । भावशुद्धीचि असे अपैसी । रोमशुचि जैसी । तळ हाताची ॥"–ज्ञानेश्वरी, अध्याय १७ ओंव्या २३३–३५. तुकाराम महाराज म्हणतात–"जया जैसें ध्यान । तैसें होय त्याचें मन ॥" ह्या नियमाला अनुसरून शुद्धसत्त्वसंपन्न भगवंताचें मनानें ध्यान केल्यानें, तें मन शुद्धसत्त्वसंपन्न होणें शक्य आहे. अशा तऱ्हेनें ज्यांचें मन शुद्धसत्त्वसंपन्न झालें आहे ते नित्यानित्यविवेकी आहेत; ते स्वार्थत्यागी, निर्मत्सर, कर्तव्यासक्त, परस्परविश्वासु, खरे स्वदेशाभिमानी, नीतिधैर्ययुक्त, व बंधुप्रेमाविषयीं तत्पर असेहि पण असायचेच. ह्याचा अनुभव आपल्याला पूर्वींच्या लोकस्थितीवरून चांगला येईलें.

पूर्वीं धर्मराजा राज्य करीत असतांना त्याच्या प्रजेपैकीं एकानें आपली जमीन दुसऱ्यास विकली. ती विकत घेणारास त्या जमिनींत पुष्कळसें धन सांपडलें; पण हें धन आपलें नाहीं, आपण फक्त जमिनीची किंमत देऊन ती विकत घेतली आहे, अर्थात् तींत सांपडलेल्या धनावर आपला वारसा पोंचत नाहीं, असें समजून त्यानें तें धन जमिनीच्या पूर्वींच्या मालकाकडे नेलें व तो त्यास तें देऊं लागला; परंतु त्यानें तें घेण्याचें नाकारिलें व तो त्यास उलट असें म्हणूं लागला, कीं ज्या वेळेस मीं तुला जमीन विकली, त्या वेळेस तींतील सर्व मालमत्तेची सत्ता तुजकडेसच आली, म्हणूनच माझा त्या धनावर कांहीं एक हक्क राहिला नाहीं. अर्थात् तें मी घेत नाहीं. अशा प्रकारची ही उभयतांची सत्यनिष्ठा व स्वार्थत्यागबुद्धि त्या वेळीं सर्व लोकांच्या अंगीं होती.

तसेंच एके प्रसंगीं कौरवांचा शत्रु कोणी एक राजा होता. तो कौरवांशीं युद्ध करण्याचे बाबतींत, पांडवांची आपणांस मदत मिळावी अशा बुद्धीनें धर्मराजाकडे आला व त्यानें आपला हेतु धर्मराजास दर्शविला. जरी कौरवपांडवांचें आपापसांत वैर होतें, तरीसुद्धां धर्मराजानें त्यास असें निक्षून उत्तर दिलें, कीं "ते शतं हि वयं पंच स्वकीये विग्रहे सति । अन्यैश्च कलहे प्राप्ते वयं पंचोत्तरं शतम् ॥" आम्ही आपसांत लढण्याचे प्रसंगीं, कौरव शंभर व आम्ही पांच, पण परकीयांशीं लढण्याचे प्रसंगीं आम्ही एकशें पांच आहोंत. ह्यावरून परकीय संबंधांत एकी कशी होती हें दिसून येईल आणि हीच एकी स्वराज्य मिळविण्याकरितां आणि मिळविलेलें रक्षण करण्याकरितां असली पाहिजे. हल्लींच्या सुधारलेल्या राष्ट्रांत देखील आपआपसांत वैर व मत्सर हीं आहेत. परंतु परकीयांच्या संबंधांत तीं सर्व विसरून जाऊनहि राष्ट्रें एक होतात. वर सांगितलेले सद्गुण आपल्या पूर्वींच्या लोकांत होते व हेच सद्गुण जीवाचे पारमार्थिक स्वराज्याच्या प्राप्तीकरितां अवश्य लागतात, म्हणजे परमार्थप्राप्तीकरितांहि स्वार्थत्याग करावा लागतो व शरीरांत सामर्थ्य असावें लागतें आणि परस्पर विश्वासहि असावा लागतो. त्याचप्रमाणें कर्तव्यासक्ति, नीतिधैर्य, उदारबुद्धि, निर्मात्सर्य इत्यादि आम्हीं वर दर्शविलेले सद्गुणहि असावे लागतात.

प्रवृत्तींतील आणि निवृत्तींतील स्वराज्याच्या प्राप्तीकरितां ज्या सद्गुणांची आवश्यकता आहे, ते सद्गुण मनुष्यांच्या अंगीं एका स्वधर्मानेंच कसे उत्पन्न होतात, तो विचार येथपावेतों सांगितला. अशा प्रकारें स्वधर्म हा इहपरलोकीं कल्याणकारक आहे, हें जाणूनच श्रुतींनीं "सत्यं वद धर्मं चर।" अशी आज्ञा केली आहे. अशा प्रकारची पात्रता ज्या धर्मानें येते, त्या धर्माविषयीं सर्वत्र उदासीनता दिसत असून चहूंकडून आपला देश वर आणण्याविषयीं देशांतील पुढारी मंडळी प्रयत्न करीत आहेत, म्हणून त्यांचे प्रयत्नांस यावें तसें यश येत नाहीं. जर आपला यत्न सफल व्हावा अशी त्यांची निरपेक्ष बुद्धि असेल, तर त्यांनीं धर्माचें साहाय्य घेऊन आपल्या आंगीं पात्रता आणली पाहिजे. निष्काम धर्माचरण करणाऱ्या व निरपेक्ष बुद्धीनें आपलें कर्तव्य करणाऱ्या पुरुषांचें समाजावर वजन पडलेंच पाहिजे. स्वधर्मानें वागण्यांतच जय आहे. "यतो धर्मस्ततो जयः।" इतर देशांत ऐहिक भोगप्राप्तीच लोकांचें इष्ट असेल; पण **ह्या भरतखंडांत धर्माचरण हेंच नेहमींचें इष्ट आहे** व हें इष्टच अनादिकालापासून ह्या देशाचें बलाचें व तेजाचें मूळ आहे. धर्माचीं अंतरंग व बहिरंग अशीं दोन लक्षणें आहेत. बहिरंगलक्षणें कालमानाप्रमाणें व परिस्थितीप्रमाणें बदलतील, पण अंतरंगलक्षणें हीं सत्य व त्रिकालाबाधित नीति यांचेवर अवलंबून असल्यामुळें, त्यांचें महत्त्व कायमचें आहे. अंतरंगलक्षणांची हयगय व्हावयास लागली, कीं अवनति यावयाचीच व अंतरंगलक्षणें बरोबर पाळलीं गेलीं,

कीं तेथें उन्नति असावयाचीच. ह्याकरितां जर आम्हां भारतवासीयांस आपली उन्नति करणें असेल, तर आम्ही धर्माचीं अंतरंग लक्षणें, जीं हल्लीं बहुतेक गतप्राय झालीं आहेत तीं, पुनः आपल्या ठायीं आणण्यास मनापासून झटलें पाहिजे. ही अंतरंगलक्षणें ठिकठिकाणीं आपल्या धर्मग्रंथांत दिलेलीं आहेत. उदाहरणार्थ, श्रीमद्भगवद्गीतेंत अठराव्या अध्यायांत श्लोक ४२ ते ४५ पर्यंत चार वर्णांचीं कर्में म्हणून सांगितलीं आहेत. हीं लक्षणें अंगीं आणण्याचा यत्न करावयास लागल्याबरोबर, तीं एकदम पूर्णपणें येतील असें नाहीं, पण ह्या बाजूनें जितका प्रयत्न होईल, तितका कल्याणकारकच होईल. कांहीं उत्तम पुरुषांच्या अंगीं तीव्र प्रयत्नानें कदाचित हीं लक्षणें लवकर येतील. पण जसजसा आम्हां हिंदु लोकांचा ह्या दिशेनें, कृतीनें व आचरणानें प्रयत्न होईल, तसतशी आमची उन्नति होईल. तेव्हां ह्या मार्गानें आर्यभूमिपुत्रानें यथाशक्ति इमानानें व ईश्वरास स्मरून यत्न करणें, हें त्याचें कर्तव्य होय. "धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति नित्यशः॥ तस्माद्धर्मो न हन्तव्यो मा नो धर्मोऽहतोऽवधीत्॥ १५॥" – मनुस्मृति, अध्याय ८ श्लोक १५. धर्माचरणाच्या कामांत ईश्वराची मदत मिळते. इतकेंच नव्हे, तर धर्मरक्षणाकरितां ईश्वर स्वतः अवतार घेतो व धर्मविरुद्ध आचरणानें ईश्वराचा क्षोभ होतो. "यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत॥ अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥" – श्रीभगवद्गीता, अध्याय ४ श्लोक ७; आणि त्याचविषयींची म्हणजे सर्वत्र **धर्मजागृताची** कामगिरी संतांनीं बजाविली, हें प्रस्तावनेच्या मथळ्यावरील अभंगाच्या कडव्यावरून कळेलच

अलीकडील पाश्चिमात्य विद्येनें अलंकृत झालेले व आपणास मोठे संशोधक असें समजणारे आमच्यांतीलच कांहीं लोक–ज्यांची कर्तबगारी संतांच्या राष्ट्रोद्धाराच्या कर्तबगारीशीं ताडून पाहिली तर हिमालयापुढें मोहरीयेवढीदेखील भरणार नाहीं, व असें असूनसुद्धां जे साधुसंतांना राष्ट्रोद्धारासंबंधानें निव्वळ पंगु मानितात, त्यांचें आम्हांस मोठें आश्चर्य वाटतें. त्यांतल्या त्यांत त्यांचा इतर साधूंवर कटाक्ष नसून वारकरी पंथांतील ज्ञानेश्वरमहाराज, नामदेवराय, एकनाथमहाराज, तुकाराम वगैरे जे प्रमुख साधु होऊन गेले त्यांच्यावर फार कटाक्ष आहे.

त्यांचें असें म्हणणें आहे, कीं ह्या संतांच्या नामर्द उपदेशानें आमचें राष्ट्र २०० वर्षें पंगु होऊन राहिलें होतें. ह्यावरून असें दिसतें, कीं ज्ञानेश्वर महाराजांपासून तुकाराममहाराजांपर्यंत वारकरी पंथांत जे साधु होऊन गेले त्यांच्या कारकीर्दींत देश पंगु झाला; कारण ज्ञानेश्वरमहाराज व तुकाराममहाराज ह्यांच्यांत जवळजवळ तीनशें सव्वातीनशें वर्षांचें अंतर होतें, आणि देशाची पंगु-अवस्था तितकाच कालपावेतों होती, असें त्यांच्या म्हणण्यावरून दिसतें. आतां हें त्यांचें म्हणणें कितपत खरेंखोटें आहे, ह्याचा विचार करूं.

वारकरी पंथांतील अध्वर्यु जे ज्ञानेश्वर महाराज त्यांनीं इतर कोणत्याहि ग्रंथावर टीका न करितां भगवद्गीतेवरच कां केली, ह्याचा जर आपण विचारानें शोध करूं लागलों, तर त्यांतील इंगित हेंच आढळून येईल, कीं गीता हें शास्त्र स्वधर्मापासून अथवा स्वकर्तव्यापासून पराङ्मुख झालेल्यांना स्वधर्माची अथवा स्वकर्तव्याची जागृति देऊन योग्य मार्गाकडे लावणारें आहे. हें, ज्या अर्जुनाला भगवंतांनीं गीता सांगितली त्या अर्जुनाच्या गीताश्रवणानंतरच्या वर्तनावरून, कळून येईल.

कौरवांशीं लढण्याच्या पूर्वीं अर्जुनाच्या मनांत स्वधर्मजागृति कशी होती, हें, त्यानें श्रीकृष्णास आपला रथ युद्धाच्या ठिकाणीं मध्यभागीं ने, असें सांगितल्यावरून स्पष्ट कळेलच; व त्याप्रमाणें श्रीकृष्णानें समरांगणांत रथ नेल्यावर, अर्जुनास आपल्या इष्टमित्रांना, सोयऱ्याधायऱ्यांना व गुरुवर्यांना पाहून प्रबल मोह उत्पन्न झाला हें सर्वांना माहीत आहेच. ह्या मोहानें तो स्वधर्मापासून पराङ्मुख होऊन, आपलें स्वकर्तव्य जें युद्ध करणें तें करीनासा झाला. त्याचा सर्व मोह श्रीकृष्णांनीं गीताख्य शास्त्राचा उपदेश करून नाहींसा केला, हें

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाऽच्युत।
स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव॥ १॥

ह्या श्लोकावरून उघड होतें. जो अर्जुन मोहग्रस्त झाल्यामुळें मला ऐश्वर्य नको व राज्य नको, मी खुशाल भीक मागेन परंतु कौरवांशीं युद्ध करणार नाहीं, असें म्हणत होता, तोच अर्जुन गीतेच्या शेवटीं, "तुझ्या प्रसादानें माझ्यांतील मोह नष्ट झाला व मी आत्मज्ञानसंपन्न झालों व आतां माझ्यांत कोणत्याहि प्रकारचा संशय राहिला नाहीं, म्हणून तुझ्या आज्ञेप्रमाणें मी वागावयास तयार आहें; म्हणजे दुर्योधनादि चुलतबंधूंना जो मी पूर्वीं मारण्यास तयार नव्हतों, तोच मी आतां सख्खे बंधू जे धर्म, भीम त्यांनाहि जरी तूं मारावयास सांगशील तरीसुद्धां मारीन, असें 'करिष्ये वचनं तव' ह्या वाक्यानें सुचवीत आहे. अशा प्रकारें नामर्द झालेल्याला जें शास्त्र मर्द करितें, त्याच शास्त्राची ज्ञानेश्वर महाराजांनीं प्राकृत टीका करून, त्याचें रहस्य सर्वसामान्य जनसमूहापर्यंत सर्वांना कळेल, व त्यायोगानें जनसमूह आपल्यांतील मोह टाकून कर्तव्यदक्ष होईल असें केलें. त्यांनीं आपल्या ज्ञानेश्वरी नामक ग्रंथाच्या शेवटीं जें आपल्या गुरूजवळ मागणें मागितलें, त्यावरून आपल्या देशबांधवांविषयींची त्यांच्यांत किती कळकळ होती हें स्पष्ट समजेल.

"आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें। तोषोनि मज द्यावें। पसायदान हें ॥ १७९४ ॥ जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मीं रती वाढो। भूतां परस्पर पडो। मैत्र जीवाचें ॥ ९५ ॥ दुरिताचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्यें पाहो। जो जें वांछिल तो तें लाहो। प्राणिजात ॥ ९६ ॥ वर्षत सकळमंगळीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाळि। अनवरत भूतळीं। भेटो तया भूतां ॥ ९७ ॥ चलां कल्पतरूंचे अरव। चेतना चिंतामणीचें गांव। बोलते जे अर्णव। पीयुषाचे ॥ ९८ ॥ चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन। ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु ॥ ९९ ॥ किंबहुना सर्व सुखी। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं। भजिजो आदिपुरुषीं। अखंडित ॥ १८०० ॥ आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं इयें। दृष्टादृष्टविजयें। होआवें जी ॥ १८०१ ॥ येथ म्हणे श्रीविश्वेशरावो। हा होईल दानपसावो। येणें वरें ज्ञानदेवो। सुखिया झाला ॥ २ ॥" ह्या ओंव्यांतून ज्या मागण्या केल्या आहेत, त्या त्यांनीं आपल्या श्रीगुरूजवळ केल्या. हे गुरुराया, मीं जो हा ज्ञानेश्वरीनामक ग्रंथ केला आहे, तो माझा ग्रंथ नसून वाग्यज्ञ आहे; ह्या वाग्यज्ञानें आपण संतुष्ट होऊन मला प्रसादाची देणगी द्यावी. ती कोणती म्हणाल, तर ह्या वरील ओंव्यांत जी मागितली आहे ती. आतां ह्या ओंव्यांतील **प्रथम ओंवींत** अशी मागणी मागितली आहे, कीं जे दुष्ट दुर्जन आहेत, त्यांच्यांत असणारा परस्पर मत्सर व द्वेष नाहींसा होऊन, त्यांची सत्कर्मावर प्रीति जडावी आणि सर्व लोकांची आपापसांत मैत्री असावी. ह्या मागण्यावरून आपल्या देशबांधवांत एकी असावी, एकीनेंच देशकार्य होतें ही कल्पना त्यांच्यामध्यें चांगली होती हें उघड होतें. म्हणूनच इतर, म्हणजे बायकापोरें, घरदार अगर कांहीं ऐहिक ऐश्वर्य किंवा पारत्रिक ऐश्वर्य हें न मागतां, त्यांनीं वरील मागणी केली. **दुसऱ्या ओंवींत** आपल्या राष्ट्रांत स्वधर्मसूर्याचा उदय होवो, म्हणजे स्वकर्तव्याविषयींची जागृति सर्वांत येवो, व कर्तव्यपराङ्मुख झाल्यानें जें पातक झालें आहे तें सर्व नाहींसें होवो आणि स्वकर्मतत्पर जे झाले आहेत ते जी इच्छा करतील ती त्यांची इच्छा पूर्ण होवो, असें मागणें मागितलें. ह्याचें रहस्य असें आहे, कीं स्वकर्तव्यनिष्ठ पुरुषांत अधिकारपरत्वेंकरून बहुशः दोनच इच्छा असतात; कोणांत राष्ट्रोन्नतीची इच्छा असते, कोणांत आत्मोन्नतीची इच्छा असते व कांहींत उभय इच्छा असतात. ह्यांपैकीं ज्यांची जशी इच्छा असेल तशी ती त्यांची पूर्ण होवो, असें (जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात) ह्या मागणीवरून सुचवीत आहेत आणि **पुढील ३।४।५ ह्या ओंव्यांतून** ज्यांचीं लक्षणें सांगितलीं आहेत, असल्या लक्षणांनीं युक्त असणाऱ्या साधूंचा जीवांना नित्य योग व्हावा ही मागणी मागितली आहे आणि **सहाव्या ओंवींत** तर अशी मागणी मागतात, कीं सर्वांनीं सर्वसुखसंपन्न होऊन, आदिपुरुष जो परमात्मा त्याचे भजनीं रत असावें. **७ व्या ओंवींत** असें म्हणणें आहे, कीं माझा ज्ञानेश्वरीनामक भगवद्गीतेवरील टीकेचा ग्रंथ हा सर्वांचें जीवनच होऊन बसावें. असें मागण्याचें कारण, भगवद्गीतेच्या उपदेशानें अर्जुन जसा स्वकर्तव्याविषयीं जागृत झाला, तसे "ज्ञानेश्वरी" हा ग्रंथ भगवद्गीतेची टीका आहे, तिचा नित्य विचार करून, ज्यांची संस्कृतांत गति नाहीं, अशा प्राकृत जनांसहि जागृति येईल व त्या योगानें

अर्जुन जसा इहपरलोकीं विजयी झाला तसे हेहि विजयी होवोत, असें (दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी) ह्या मागणीनें सुचवीत आहेत.

अशा प्रकारच्या ह्या मागण्या मागितल्यावर, तुझ्या म्हणण्याप्रमाणें घडून येईल असें श्रीगुरूकडून आशीर्वचन मिळालें; त्या योगानें ज्ञानेश्वरमहाराजांस मोठा आनंद झाला. अशा प्रकारच्या ह्या ज्ञानेश्वरमहाराजांच्या मागणीप्रमाणेंच नाथमहाराज, तुकाराममहाराज, रामदासस्वामी वगैरे महा साधु निर्माण होऊन, त्यांनीं लोकांचीं मनें धर्माकडे वळवून धर्मजागृति करण्याचा यत्न केला, परंतु ह्या गोष्टीला राजसत्तेचें पाठबळ असल्यावांचून धर्मजागृतीचें काम पूर्ण यशस्वी होणार नाहीं, असें त्यांस भासलें, हें तुकाराम महाराजांच्या खालील उक्तीवरून स्पष्ट दिसेल :

"काय करूं देवा ऐशी नाहीं शक्ति । दंडुनि पुढती वाटे लावूं ॥" अशा ह्या त्यांच्या संकल्पानेंच श्रीशिवबारायांसारखे महाधर्मनिष्ठ वीर पुरुष निर्माण झाले, व त्यांना तुकाराममहाराज व रामदासस्वामी ह्यांनीं, ज्या योगानें राजसत्ता पूर्ण आपल्या हातांत येईल, असाच उपदेश केला. अलीकडील कांहीं लोकांचें म्हणणें असें आहे, कीं "ह्या संतमंडळास खाणें नको, पिणें नको, वस्त्रप्रावरण नको, कांहीं एक नको. एक विठोबा मिळाला म्हणजे सर्व कांहीं मिळालें." पण ऐहिक उपभोग, ऐहिक व्यवहार ह्यांत मन घालणें, हें संतांचें काम नव्हे. व्यावहारिक आत्महिताविषयीं केवळ उदासीन असणें व परोपकारार्थ झटणें हें तर संतांचें ब्रीद आहे. खरोखर वर दाखविलेल्या गोष्टी संतांना नकोत, हें खरें आहे.

ह्या जर हव्याशा वाटतील तर ते संतच नव्हत; तर इतर संसारी जनांसारखेच ते होतील. संतांना नकोत, म्हणून त्या राष्ट्राला नकोत, असें त्यांचें मुळींच म्हणणें नव्हतें. हें प्रत्यक्ष शिवाजीमहाराजांस केलेल्या उपदेशावरून समजेलच. राजा कोणी असो, सारा कोणी घेवो ह्यासंबंधीं संतांना त्याची परवा नसते, हें जें विधान केलें आहे तें अगदीं असंगत दिसतें. कारण धर्माचें रक्षण व्हावें अशी त्यांची बुद्धि होती व त्यांचें हृदय राष्ट्राची विपन्नावस्था पाहून कळवळत असे. एके ठिकाणीं तुकाराममहाराज देवास म्हणतात, "न घडे यावरी न धरवे धीर। पीडितां राष्ट्र देखोनि जग॥" व त्याविषयीं ते यत्नहि करीत असत; परंतु सत्तेच्या पाठबळानेंच म्हणजे स्वराज्य असण्यानेंच धर्मरक्षण होतें, हें तत्त्व ते पूर्ण जाणत होते, हें वर आम्हीं दाखविलेंच आहे. असें असून त्या महासाधुसंतमंडळासंबंधानें व तदनुयायी जे वारकरी संत त्यांसंबंधानें पूर्ण विचार न करितां कांहीं तरी कुत्सित दृष्टीनें खोटा आरोप करणें, हें निदान विचारी व सुशिक्षित लोकांना शोभत नसून, उलट तें त्यांच्यांतील अविचाराचेंच निदर्शक होतें.

असो. आधुनिक काळच्या आमच्या कांहीं लोकांनीं जे कांहीं वारकरी साधुसंतांबद्दल वेडगळपणाचे आक्षेप घेतले होते, त्यासंबंधानें थोडक्यांत उत्तर देण्याचा यत्न करून, आम्हीं जें काम (म्हणजे तुकाराममहाराज ह्यांच्या गाथ्यांतील अभंगांच्या अर्थाचें) हातीं घेतलें आहे त्याविषयीं दोन शब्द लिहितों. सांप्रदायी गाथ्यांतील २१०० अभंगांच्या अर्थाचें काम पुरें होऊन पहिला भाग तयार झाला आहे व दुसरा भाग लवकरच तयार होईल. आजपर्यंत जे गाथे छापून प्रसिद्ध झाले आहेत त्यांतून पुष्कळसे पाठ चुकीचे राहिले आहेत. ते वारकरी संप्रदायाप्रमाणें शुद्ध नाहींत. आम्हीं पूर्वी अभंगांचें वर्गीकरण करून विषयवार गाथा तयार केला होता, तो रा. रा. त्र्यंबक हरि आवटे यांनीं छापून प्रसिद्ध केलाच आहे. त्यांतहि सांप्रदायी पाठासंबंधाच्या चुका राहिल्याच आहेत. त्या सर्व दुरुस्त करून आम्हीं हा पहिला भाग अर्थासह छापिला आहे. तुकाराम महाराज ह्यांचे अभंग सुलभ आहेत अशी लोकांची समज आहे, पण मला असें वाटतें, कीं तितके ते सोपे नाहींत. हें जे कोणी नित्य गाथा वाचणारे असतील व त्यांचा अर्थविचार करणारे असतील तेहि कबूल करतील.

ज्ञानेश्वरी, अमृतानुभव ह्या ग्रंथांची जरी भाषा निराळी भासते, तरी त्यांच्या अर्थाची समजूत तुकाराम बुवांच्या गाथ्यापेक्षां लवकर पटते, कारण त्यांत एक वेळ विषयसरणी, किंवा कोणत्या विषयावर तें लिहिलें आहे,

हें कळलें म्हणजे अर्थज्ञान होण्यास साधारण मनुष्यांससुद्धां सोपें पडतें आणि त्यांचे परंपरेनें अर्थ ठरले आहेत. परंतु तुकाराम बुवांच्या गाथ्यासंबंधानें तसें नाहीं. त्यांत मुळींच अभंग स्फुट आहेत. अभंगांत जरी विषयवारी लाविली, तरी ती संगतवार जुळत नाहीं. एकाचा अर्थ पुढच्याच्या अर्थास जुळत नाहीं, म्हणून अर्थ समजण्यास पुष्कळ कठिण पडतें. कांहीं कांहीं रूपकें फारच कठिण आहेत. जशी त्यांची वृत्ति असे तसे अभंग होत असत. त्यांच्या वाणींत अभंग प्रकट होत असतांना त्यांची वृत्ति कशी असावी हें ज्यास ताडितां येईल, त्यासच त्यांच्या अभंगाचें खरें रहस्य कळेल. आम्हीं केलेला अर्थ सर्वतोपरी खराच असेल, असा आमचा आग्रह नाहीं, तरी कोणास कोठें अर्थ चुकीचा वाटला, अगर कमी वाटला किंवा दुसरा कोणताहि दोष आढळून आला तर त्यांनीं तो आम्हांस कळविण्याची कृपा करावी; म्हणजे पुढील आवृत्तीच्या प्रसंगीं त्याचा योग्य विचार करण्यांत येईल. ह्या गाथ्यांत, क्षेपक म्हणून कांहीं वारकरी समजत असलेले कांहीं अभंग, दुसऱ्या भागाच्या शेवटीं देण्यांत येतील; त्यांचा अर्थ मात्र देण्यांत येणार नाहीं.

पुणें, आषाढ शुद्ध ११,
शके १८३१.

—विष्णु नरसिंह जोग
पंढरीचा वारकरी

द्वितीयावृत्तीविषयीं दोन शब्द

संतशिरोमणि तुकारामबुवांचा गाथा म्हणजे महाराष्ट्र शारदासुंदरीच्या मुकुटांतला एक अत्यंत देदीप्यमान् हिरा आहे. त्याच्या प्रकाशानें गेल्या अडीचशें वर्षांत सहस्रावधि मुमुक्षूंना परमार्थाचा सुलभ मार्ग दाखवून दिला आहे. ज्ञानोबारायासारख्या महान् अवतारी पुरुषांच्या काव्यतेजानें किंवा वामनासारख्या पंडितप्रवरांच्या पांडित्यप्रकर्षानें सामान्य संसारी जनांचे डोळे जसे दिपून जातात तसा प्रकार तुकोबांच्या अभंगवाणीनें होत नाहीं, कारण स्वतः तुकोबा हे संसारांतलीं सगळीं सुखदुःखें भोगून आणि संसारी जनांचे निंदाघात सोसून पायरीपायरीनें संतपदास पोंचले होते; त्यामुळें त्यांचा उपदेश मनावर ताबडतोब ठसतो आणि त्यांच्या उद्गारांशीं आपल्या अनुभवाचा मेळ पडून त्यांनीं उपदेशिलेल्या आणि स्वतः आक्रमिलेल्या मार्गाचें जर आपण अवलंबन केलें तर आपलाहि उद्धार खचित होईल अशी खात्री वाटते. तुकारामबुवांच्या अभंग वाणीचा सर्व महाराष्ट्रभर जो इतका प्रसार झाला आहे त्याचें कारण हेंच होय.

पन्नास साठ वर्षांपूर्वी मुद्रणकलेचा प्रवेश आपल्या देशांत झाला तेव्हांपासून निरनिराळ्या अनेक प्रकाशकांनीं तुकारामबुवांच्या गाथ्याच्या अनेक आवृत्त्या प्रसिद्ध केल्या आहेत, परंतु त्या गाथ्यांतील अभंगांचा संप्रदायशुद्ध अर्थ सांगण्याचा पहिला प्रयत्न वै. ह. भ. प. विष्णुबुवा जोग ह्यांनीं केला व वारकरी मंडळांत त्यांची मोठी मान्यता असल्यामुळें, त्यांनीं छापलेला हा 'तुकारामबुवांचा सार्थ गाथा' गेल्या दहापंधरा वर्षांत बराच लोकप्रिय होऊन, त्याच्या पहिल्या आवृत्तीच्या सर्व प्रती संपून गेल्या, त्यामुळें अर्थातच दुसऱ्या आवृत्तीची आवश्यकता उत्पन्न झाली व ती भागविण्यासाठीं, माझे मित्र रा. केशव भिकाजी ढवळे ह्यांनीं आपल्या सद्ग्रंथप्रकाशनाच्या नेहमींच्या प्रवृत्तीस अनुसरून, सदर गाथ्याची ही द्वितीयावृत्ति चांगल्या ग्लेज कागदावर सुंदर रीतीनें छापून तयार केली आहे. ग्रंथाची पहिली आवृत्ति यूरोपीय महायुद्धापूर्वीं, कागदाचे व छपाईचे दर फार स्वस्त होते त्या वेळीं रफ् कागदावर छापली होती, परंतु हल्लीं कागद व छपाई ह्यांचे भाव दिढी दुपटीनें वाढले असल्यामुळें, पहिल्या आवृत्तीपेक्षां ह्या आवृत्तीची किंमत थोडी अधिक ठेवावी लागली आहे. तरी, ही अपरिहार्यता लक्षांत घेऊन महाराष्ट्रांतील सर्व प्रकारचे वाचक ह्या बहुमोल ग्रंथाचा यथोचित आदर करून प्रकाशकांस पूर्ण उत्तेजन देतील अशी खात्री वाटते.

मुंबई
७।७।२६

—ज. र. आजगांवकर

श्रीतुकाराम महाराज

(अल्प चरित्र)

भक्तिज्ञानें आणि वैराग्यें आगळा । ऐसा नाहीं डोळां देखियेला ॥ १ ॥
जप तप यज्ञ लाजविलीं दानें । हरिनामकीर्तनें करोनियां ॥ २ ॥
म्हणे रामेश्वर सकळां पुसोनी । गेला तो विमानीं बैसोनियां ॥ ३ ॥

—रामेश्वरभट्ट

१. श्रीतुकाराममहाराजांच्या चरित्रांतील बहुतेक ठळक गोष्टी महाराष्ट्रांतील आबालवृद्धांस चांगल्याच माहीत आहेत, त्यामुळें त्या येथें देऊन वाचकांचा वेळ घेणें योग्य दिसत नाहीं. मराठींत तुकोबारायांचीं गद्यपद्यात्मक चरित्रें दहापांच झालीं आहेत, पण व्यवस्थित मांडणी करून महाराजांच्या अंतःस्वरूपाची यथार्थ ओळख करून देणारें असें एकहि चरित्र आजवर प्रसिद्ध झालेलें नाहीं. महात्म्याचें चरित्र लिहिण्याचें काम महात्म्यावांचून होणार नाहीं. "तुका म्हणे अंगें व्हावें जैं आपण । तरीच महिमान कळों येई ॥" ह्या महाराजांच्याच उक्तीप्रमाणें त्यांच्याच योग्यतेच्या संतानें हें काम आंगावर घेतल्याशिवाय होणार नाहीं. संत होऊनच संतास पाहावें लागतें. तसा अधिकारी चरित्रकार निर्माण होईपर्यंत असलेल्या चरित्रग्रंथांवरच आपणास आपली भूक भागवून घेतली पाहिजे, व जे गद्यपद्यात्मक ग्रंथ आहेत त्या सर्वांत **महिपतिकृत तुकारामचरित्रासच अग्रस्थान दिलें पाहिजे.** भाविकांनीं आपली तृषा त्यावरच भागवून घ्यावी. खरें म्हटलें तर तुकाराम महाराजांचें खरें चरित्र त्यांच्या अभंगांतच आपणांस पाहाण्यास सांपडेल. महाराज अनिवार भगवत्स्फूर्तीनें जे चार कोटींवर अभंग बोलून गेले ते सगळे जर आज उपलब्ध असते तर ते अभंगच त्यांचें सर्वोत्कृष्ट चरित्र मानतां आलें असतें ! पण सारे साडेचार हजार अभंगच आज उपलब्ध आहेत व तेवढ्यावरच सारी मदार ठेवून राहाणें भाग आहे. कोणत्या प्रसंगीं कोणत्या अवस्थेंत त्यांच्या मुखांतून कोणकोणते अभंग बाहेर आले ते संगतवार पद्धतीनें देणारा गाथा जर छापतां आला असता तर किती बहार झाली असती बरें ? पण एवढें भाग्य आम्हां मर्त्यांचें नाहीं, त्यामुळें परंपरागत आलेल्या साडेचार हजार अभंगांवरच सारी भिस्त ठेवून आम्हीं राहिलें पाहिजे. महाराजांनीं 'धर्म रक्षावयासाठीं' व 'बोलिले जे ऋषि तें साचभावें वर्तायासाठीं' अवतार घेतला व पांडुरंगानें ज्या निरोपासाठीं त्यांना ह्या जगांत धाडलें तो भक्तीचा डांगोरा पिटून 'मारग हा सोपा सुखरूप' जगाला दाखवून देण्याचें थोर काम केलें व प्राप्त झालेली नरतनु जगाच्या उपकारार्थ झिजविली, हेंच त्यांचें चरित्र होय. चरित्र म्हणजे आचरून—वर्तून—दाखविलेलें. चर म्हणजे वर्तणें, आचरण करणें. जो 'करूनि दावी' त्याचेंच चरित्र 'चरित्र' ह्या संज्ञेला पात्र होतें. महाराजांचे अभंग करून दाखविल्यानंतरचे असल्यामुळें तेच त्यांचें

चरित्र होय. वेद जसे अनादि आहेत तसे अभंग हे अभंगच आहेत. त्यांना भंग नाहीं. ते स्वरूप-स्थितींतून निघालेले सहजोद्गार असल्यामुळें त्यांना कल्पांतींही भंगभय नाहीं. महाराजांचे सर्वच अभंग पूर्णावस्थेंतले आहेत. त्यांचे कांहीं अभंग कच्चेपणांतले आहेत व कांहीं पक्केपणांतले आहेत असें 'प्रार्थनासमाजिष्ट' म्हणतात, पण तें चुकीचें आहे. त्यांनींच संतांना जें आत्मचरित्र सांगितलें त्यांत स्पष्ट सांगितलें आहे, कीं 'सद्‌गुरूंनीं स्वप्नांत उपदेश देऊन कृतार्थ केल्यानंतरच मला कवित्वाची स्फूर्ति झाली.' सद्गुरूचा प्रसाद झाल्यावर कच्चेपणा राहाणें शक्यच नाहीं. ह्यावर कोणी शंका घेईल, कीं 'तर मग पुष्कळ अभंगांत कच्चेपणा दिसतो तो कां?' ह्याला उत्तर असें आहे, कीं जगदुद्धारासाठीं महाराजांनीं अभंग केले, म्हणजे लोकांना मार्ग दाखविण्यासाठीं त्या त्या वृत्ति अंगावर घेऊन त्यांनीं त्या त्या वृत्तीला उचित असेच ते ते उद्गार काढले आहेत. आम्हीं जडजीवांनीं देवाला कसें आळवावें, आपल्या अंतःकरणांतले दुर्विकार कसे मारावे, सर्वस्व देवाला कसें वाहावें हें आम्हांला शिकविण्यासाठीं त्यांनीं ते ते उद्गार काढले आहेत. मुलांच्या अधिकाराप्रमाणें पंतोजी ज्याप्रमाणें लहानमोठ्या अक्षरांचीं वळणें त्यांना काढून देतो, त्याप्रमाणेंच आपण तृप्त झाल्यावरच संत हे जनांच्या कल्याणासाठीं त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणें लहानमोठे होऊन, त्यांना बोध करीत असतात.

अर्भकाचे साठीं । पंतें हातीं धरिली पाटी ॥ १ ॥
तैसे संत जगीं । क्रिया करूनि दाविती अंगीं ॥ २ ॥

असें तुकोबाच म्हणतात.

सांगावयाचें तात्पर्य हेंच, कीं महाराजांचें खरें चरित्र म्हणजे त्यांचे अभंग हेंच होय व 'विश्वासानें आणि आदरानें' जो त्यांच्या अभंगांचें नित्य श्रवण-मनन करील त्याला महाराजांच्या अंतरंगाची कांहींशी ओळख होऊन दृढाभ्यास झाल्यावर महाराज शुद्धचित्त पुरुषावर पूर्ण कृपा करितील ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. त्याचप्रमाणें हेंहि पूर्ण लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं त्यांचे सर्व अभंग पूर्णावस्थेंतले असल्यामुळें म्हणजे अखंड विठ्ठलरूप होऊन 'उपकारापुरतें उरल्या' नंतरचेच असल्यामुळें त्या सर्वांची योग्यता सारखीच वेदतुल्य मानायला पाहिजे. 'तयांचे बिसाट शब्द, सुखें म्हणो येती वेद' अशी ज्ञानोबारायांची उक्ति आहे.

२. तुकाराममहाराजांचें खरें चरित्र त्यांच्या अभंगांत सांपडेल हें वर सांगितलेंच आहे, तथापि लोकाचारास अनुसरून व अर्वाचीन शोधकांच्या शोधांचा पूर्ण उपयोग करून घेऊन येथें त्याविषयीं चार शब्द मी लिहीत आहें. आधीं महाराजांचा जन्म कधीं झाला, त्यांना गुरूपदेश कधीं झाला व त्यांचें प्रयाण कधीं झालें ह्याबद्दल निश्चित कांहींच ठरलेलें नाहीं. त्यांचें प्रयाण शके १५७१ मध्यें झालें ह्याविषयीं मात्र संशय नाहीं. महिपतिबाबांनीं आपल्या भक्तविजयांत :—

एकविसाव्यांत विपरीत काळ । तुकयासी पातला तात्काळ ॥

असें म्हणून पुढें म्हटलें आहे, कीं—

पूर्वार्ध संपलें पेशा रीती । दुःखें देखिलीं नाना रीती ॥

यावरून तुकोबारायांच्या आयुष्याचें पूर्वार्ध संपलें तेव्हां ते एकवीस वर्षांचे होते असें दिसतें. म्हणजे त्यांचा जन्म शके १५३० हा ठरतो. वारकऱ्यांच्या मार्फत मिळणाऱ्या तुकोबांच्या वंशावळीवरून नगरचे रा. 'भारदे' ह्यांनीं त्यांचा जन्मकाळ माघ वद्य ५ गुरुवार शके १५२० हा निश्चित केल्यासारखा आहे. महाराजांना गुरूपदेश झाला त्याबद्दल ते स्वतःच आपली परंपरा देऊन सांगतात :—

केशव चैतन्य राघव चैतन्य । सांगितली खूण माळिकेची ॥ १ ॥
पाबाजी आपुलें सांगितलें नाम । मंत्र दिला रामकृष्ण हरि ॥ २ ॥
माघ शुद्ध दशमी पाहोनि गुरुवार । केला अंगिकार तुका म्हणे ॥ ३ ॥

माघ शुद्ध दशमीला गुरुवार होता. असा शकहि १५४१ हाच आहे असें जंत्रीवरून ठरतें. म्हणजे महिपतिबाबांच्या व ह्यांच्या जन्मकाळांत जरी दहा वर्षांचें अंतर दिसतें तरी बाबांनीं जन्मशक मुक्रर दिला नाहीं व २१ व्या वर्षी सांसारिक आपत्तींची शिकस्त होऊन तुकोबांच्या आयुष्याचें सामान्यतः पूर्वार्ध संपलें असें त्यांनीं म्हटलें आहे ह्यावरूनहि त्यांचा जन्मशक १५२० हाच मानण्यास हरकत दिसत नाहीं. म्हणजे तुकोबारायांचा जन्मकाळ शके १५२० माघ वद्य ५ गुरुवार हा धरून शके १५४१ माघ शुद्ध १० गुरुवार हा त्यांचा गुरूपदेशाचा दिवस धरावा असा भारद्यांच्या लिहिण्याचा मतितार्थ आहे. रा० राजवाडे ह्यांनीं वाई प्रांतीं एका वारकऱ्याच्या घरच्या तुकोबाच्या वंशावळीवरून असें ठरविलें आहे, कीं तुकोबारायांचा जन्म शके १४९० मध्यें झाला व त्यांस गुरूपदेश शके १५२० विलंबसंवत्सरीं माघ शुद्ध १० गुरुवार ह्या दिवशीं झाला. भारद्यांच्या मतें तुकोबा ५० वर्षे ह्या मृत्युलोकीं राहिले व राजवाडे ह्यांच्या मतें ते ८० वर्षे राहिले. तुकाराम महाराज शके १५७१ मध्यें विरोधीनाम संवत्सरीं फाल्गुन वद्य ३ शनिवार ह्या दिवशीं सदेह वैकुंठास गेले. त्यांची गोधडी आणि टाळ सोमवार वद्य ५ रोजीं सांपडलीं व ह्याच दिवशीं ते आपल्या भागीरथी नामक कन्येस भेटायला पुन्हां आले, म्हणून ही तीथ देखील वारकरी लोकांत पाळली जाते. जंत्रीवरून पाहातां वद्य ५ ला सोमवारच येतो. महाराजांचा जन्मशक अद्याप अनिश्चित समजला तरी निर्याणकाळ तरी निश्चित आहे ह्यांत शंका नाहीं.

३. पुण्याच्या उत्तरेस दहा कोसांवर इंद्रायणीच्या तीरीं देहू नामक गांवीं तुकोबारायांचे पूर्वज राहात असत. त्यांचें उपनांव मोरे हें होय. ते जातीचे 'कुणबी शूद्र' असून किराणा जिन्नस व धान्य वगैरेची खरेदीविक्री करून वाणीपणाच्या धंद्यांत प्रतिष्ठेनें आपली गुजराण करीत असत. त्यांचा कुळदेव पंढरीचा राणा पांडुरंग हा असून त्यांची पंढरीची वारी होती. तुकोबारायांपासून त्यांचा आठवा पूर्वज विश्वंभरबोवा हा मोठा भक्त होता व हल्लीं देहूस जें विठोबाचें देऊळ आहे, तें त्यानें प्रथम बांधलेलें आहे. त्याच्याकरितांच देव तेथें पंढरीहून आले. त्यानें दर पंधरवड्याची पंढरीची वारी धरली होती. त्याची स्त्री आमाबाई हीहि भाविक होती. तिचे दोघे पुत्र हरि व मुकुंद हे लढाईंत मारले गेले व मुकुंदाची बायको सती गेली! हरीची बायको पतिनिधनकाळीं गर्भार होती ती प्रसूत झाली व तिला मुलगा झाला. त्याचें नांव विठोबा ठेवलें. विठोबाचा मुलगा पदाजी, पदाजीचा शंकर, शंकराचा कान्होबा, कान्होबाचा बोल्होबा व **बोल्होबाचा पुत्र आपले तुकारामबोवा** हे होत. तुकारामबोवांचे सातआठ पूर्वज तरी आषाढी-कार्तिकीची नियमानें वारी करणारे श्रीपंढरीनाथाचे एकनिष्ठ भक्त होते; (तुकोबा म्हणतात–"सहज वडिलां होती सेवा । म्हणूनी पूजितों या देवा"). सर्वांच्या पुण्याईनें 'शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं' ह्या न्यायानें मोऱ्यांच्या सर्व वंशाचा उद्धार करून तिन्ही लोकीं सत्कीर्तीचा झेंडा मिरवणारा **सत्पुत्र बोल्होबास कनकाईच्या पोटीं झाला!** अहाहा! धन्य त्या कनकाई माउलीचा कुसवा, कीं ज्यांतून असें दिव्य रत्न जगताला मिळालें! धन्य तो देहू गांव, कीं जेथें असा परम भगवद्भक्त जन्मास आला! व धन्य आमची ही महाराष्ट्रभूमि, कीं जेथें ज्ञानेश्वरमहाराजांनी पाया रचलेल्या, नामदेवांनी विस्तारविलेल्या, नाथांनी भागवताची पताका फडकावून जगभर गाजवलेल्या भागवतरूपी लोकोत्तर दिव्य इमारतीवर कळस चढवून ती पुरी करायला त्यांच्याच तोलाचा तुकाराममहाराजांसारखा अमोल हिरा मिळाला! बोल्होबा व कनकाई ह्यांच्या विठ्ठलभक्तीचें पूर्ण फळ त्यांना सावजी, तुकोबा व कान्होबा असे तीन सत्पुत्र होऊन मिळालें. परंपरेचे शुद्ध संस्कार ज्या घराण्याला

लागलेले असतात त्या घराण्यांत असेच शुद्धात्मे जन्माला यावयाचे. **आठ पिढ्यांच्या विठ्ठलभक्तीचा उत्कर्ष तुकोबांत झाला.**

४. तुकोबारायांच्या चरित्राचें पूर्वार्ध त्यांनींच स्वतः सांगितलें आहे. इतरांनीं दिलेल्या हकीगतीपेक्षां त्यांनींच संतांना एकदां जी आपली हकीगत स्वमुखानें सांगितली आहे ती आपण त्यांच्याच मुखानें साग्र ऐकूं या :—

याती शूद्रवंश केला वेवसाव । आदि तो हा देव कुळपूज्य ॥ १ ॥
नये बोलों परी पाळिलें वचन । केलियाचा प्रश्न तुम्हीं संतीं ॥ २ ॥
संवसारें जालों अतिदुःखें दुःखी । मायबापें सेखीं क्रमिलिया ॥ ३ ॥
दुष्काळें आटिलें द्रव्य नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली ॥ ४ ॥
लज्जा वाटे जीवा त्रासलों या दुःखें । वेवसाय देखें तुटी येतां ॥ ५ ॥
देवाचें देऊळ होतें तें भंगलें । चित्तासी तें आलें करावेंसें ॥ ६ ॥
आरंभीं कीर्तन करीं एकादशी । नव्हतें अभ्यासीं चित्त आधीं ॥ ७ ॥
कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें । विश्वासें आदरें करोनियां ॥ ८ ॥
गाती पुढें त्यांचें धरावें ध्रुपद । भावें चित्त शुद्ध करोनियां ॥ ९ ॥
संतांचें सेविलें तीर्थ पायवणी । लाज नाहीं मनीं येऊं दिली ॥ १० ॥
ठाकला तो कांहीं केला उपकार । केलें हें शरीर कष्टवूनी ॥ ११ ॥
वचन मानीलें नाहीं सुहृदांचें । समूळ प्रपंचें वीट आला ॥ १२ ॥
सत्य असत्यासी मन केलें ग्वाही । मानीयेलें नाहीं बहुमतां ॥ १३ ॥
मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ॥ १४ ॥
यावरी या जाली कवित्वाची स्फूर्ती । पाय धरिले चित्तीं विठोबाचे ॥ १५ ॥
निषेधाचा कांहीं पडिला आघात । तेणें मध्यें चित्त दुखविलें ॥ १६ ॥
बुडविल्या वह्या बैसलों धरणें । केलें नारायणें समाधान ॥ १७ ॥
विस्तारीं सांगतां बहुत प्रकार । होईल उशीर आतां पुरे ॥ १८ ॥
आतां आहे तैसा दिसतो विचार । पुढील प्रकार देव जाणे ॥ १९ ॥
भक्तां नारायण नुपेक्षी सर्वथा । कृपावंत ऐसा कळों आलें ॥ २० ॥
तुका म्हणे माझें सर्व भांडवल । बोलविले बोल पांडुरंगें ॥ २१ ॥

५. ह्या उत्कृष्ट अभंगांचा नीट विचार केला पाहिजे : **(अ)** संसारतापानें तप्त झाल्यावर तुकोबांस दृढतर वैराग्य प्राप्त झालें. लहानपणीं आईबाप वारले, वडील बंधु सावजी विरक्त होऊन संसार तुकोबांच्या आंगावर टाकून परागंदा झाले, दुष्काळामुळें द्रव्य व प्रतिष्ठा ह्यांचें वाटोळें होऊन पहिली बायको रखमाई अन्नान्न करून मेली, शिवाजी नांवाचें पहिलें पोर होतें तेंहि मेलें; दुसरी बायको म्हणजे पुण्यांतील आप्पाजी गुळवे ह्यांची कन्या अवलाई ऊर्फ जिजाबाई ही खाष्ट म्हणून निवडून आली; धंदा आंतबट्टयाचा होऊन दिवाळें निघालें. इतक्या आपत्ति एकविशीच्या आंतच तुकोबांच्या आंगावर येऊन कोसळल्यामुळें त्यांचें मन संसाराविषयीं उदास झालें. त्यांस पूर्ण निर्वेद प्राप्त झाला. सामान्य मनुष्य ह्या आपत्तींखालीं चेंगरूनच जाता, पण तुकोबांनीं

ह्या आपत्तींचा उपयोग आत्मकार्याकडे करून घेतला. झाल्या गोष्टींबद्दल त्यांस खेद तर झालाच, परंतु स्थितप्रज्ञाप्रमाणें त्यांनीं आपत्ति ह्या आपल्या कल्याणासाठींच देवानें पाठविल्या आहेत असें मानलें. 'बरें झालें देवा निघालें दिवाळें' ह्या अभंगांत त्यांनीं पुन्हां सांगितलें आहे, कीं :—

बरें झालें देवा बाईल कर्कशा । बरी हे दुर्दशा जनांमध्यें ॥ ३ ॥
अनुतापें तुझें राहिलें चिंतन । जाला हा वमन संवसार ॥ ४ ॥

शिवाय—

जें कांहीं करीतों तें माझें स्वहित । आलीसे प्रचीत कळों चित्ता ॥

अनुताप ह्या परमार्थाची पहिली पायरी होय. (**आ**) संसार वमनप्राय वाटूं लागला व मग चित्त परमार्थाकडे ओढलें. तुकोबांनीं आपली परमार्थबुद्धि दृढ करण्यासाठीं विठ्ठल-मंदिराचा जीर्णोद्धार करावयास प्रारंभ केला, एकादशीव्रत धरिलें, कीर्तनाचा परिपाठ ठेवला. हें प्रथम जड जाऊं लागलें (नव्हतें अभ्यासीं चित्त आधीं!) विश्वासानें व आदरानें ज्ञानेश्वर, कबीर, एकनाथ इत्यादि संतांचीं वचनें पाठ करावयाचा व मननपूर्वक तद्रूप होण्याचा व हरिदासांच्या मागें उभें राहून 'भावें चित्त शुद्ध करून' ध्रुपद धरूं लागण्याचा अभ्यास ठेवला, संतांचें पायवणी सेविलें (व लाज नाहीं मनीं येऊं दिली!). समूळ प्रपंचाचा वीट आल्यामुळें आतेष्टांच्या कानगोष्टी न ऐकतां 'चित्तीं एक रखुमाईचा पति' धरिला. ह्याप्रमाणें चित्तशुद्धीचा मार्ग निश्चयानें त्यांनीं कायम धरिल्यामुळें उपदेशक्षमता सिद्ध झाली. भंगलेलें देऊळ दुरुस्त करणें, कीर्तन करणें, एकादशीव्रत धरणें, लौकिकाला पायांतळीं दाबून संतसेवा मनोभावें करणें व शरीर कष्टवून यथाशक्ति तें परकार्यीं झिजवणें ह्या सर्व प्रकारांमुळें तुकोबारायांची देहबुद्धि जळून खाक झाली व अंतर्बाह्य शुद्धता झाली. (**इ**) हा अधिकार पाहातांच **बाबाजी चैतन्य** ह्यांनीं त्यांस स्वप्नांत 'रामकृष्ण हरि' हा आवडीचा सोपा मंत्र सांगितला. मग नामाचा घोष करीत भंडारा डोंगरावर एकांतांत कांहीं काळ काढला. 'तुका म्हणे रामनामीं । कृतकृत्य झालों आम्ही॥' (**ई**) स्वतः कृतार्थ झाल्यावर 'यावरीयां झाली कवित्वाची स्फूर्ति.' मग लोकोपकारार्थ तुकोबा अभंग करूं लागले, पण त्याला लगेच एक मोठें विघ्न आलें. वाघोलीचे रामेश्वरभट्ट हे विद्वान्, राजमान्य व वजनदार होते. तुकोबा वाणी असून वेदार्थ मराठींत बोलतो म्हणून त्यांनीं देहूच्या पाटलाकडून त्यास गांवाबाहेर घालविलें व अभंगाच्या वह्या इंद्रायणीच्या डोहांत बुडविल्या! पूर्वीं खतें बुडवून संसार बुडविला व आतां कवित्व बुडवून परमार्थ बुडविला म्हणून लोकांनीं बुवांची फजीती मांडली! त्या समयीं तुकोबा देहूस नदीतीरावर शिळेवर शोकग्रस्त होऊन पडले! इकडे पुण्यांत नागनाथाच्या मंदिरांत अनघडसिद्ध नामक अवलिया राहात असे, तेथें रामेश्वरभट्ट गेले. तेथील विहिरींत स्नान करतांच त्यांच्या आंगाचा दाह झाला. तो शमेना म्हणून ते आळंदीस गेले. इकडे चवदाव्या दिवशीं सकाळीं त्या देहूस बुडालेल्या वह्या डोहाच्या पाण्यावर तरंगूं लागल्या! तुकोबांस आनंद झाला व 'थोर अन्याय केला तुझा अंत म्यां पाहिला' हे सात अभंग त्यांनीं तेव्हां केले. रामेश्वरभट्ट तुकोबांच्या भेटीस येतांच 'चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती' हा अभंग ते म्हणाले, तेव्हां दाह शांत झाला व रामेश्वरभट्ट तुकोबांस शरण येऊन त्यांचे शिष्य झाले. ही सर्व हकीगत तुकोबांनीं स्वमुखानें येथें सांगितली आहे. ह्या अभंगांत तुकोबांनीं स्वतःच्या अनुभवाचा जो एक सिद्धांत सांगितला आहे, कीं "भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा । कृपावंत ऐसें कळों आलें" तो पाहातांच मननशील वाचकाचें चित्त पार विरघळून जातें; व कृपावंत नारायण भक्ताची उपेक्षा करीत नाहीं असें मला कधीं प्रचीतीनें कळून येईल असें मनांत येऊन अंतर्यामीं कालवाकालव होऊन डोळे पाण्यानें भरून येतात!! हा एकच तुकोबांचा आत्मचरित्रपर अभंग मुमुक्षूंना पुढील मार्ग दाखविण्यास अत्यंतात्यंत उपयोगाचा आहे.

६. तुकोबा स्थितप्रज्ञ झाले. इंद्रियें व मन हीं त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतलीं. सर्व जगाला मोहांत पाडायला सिद्ध असणाऱ्या दोन वस्तु–**कनक आणि कांता**–यांचा मोह त्यांनी जिंकला. मग जिंकायचें जगांत काय राहिलें? कांता म्हणजे स्त्री. परस्त्रीलोभ म्हणजे पातकच, पण स्वस्त्रीलोभहि कांहीं कमी अनर्थावह नाहीं! तुकोबारायांची स्त्री जिजाबाई ही 'बाईल कर्कशा असल्यामुळें माझी जनांत दुर्दशा' झाली असें त्यांनींच सांगितलें आहे! तथापि जिजाबाई ही पतिव्रता होती. नवऱ्यास जेवूं घातल्याशिवाय आपण अन्नग्रहण करायची नाहीं. भाकरीचें गांठोडें घेऊन रोज त्याच्या शोधासाठीं रानोमाळ हिंडायची! जिजाबाई व तुकोबा ह्यांच्यांतलें भांडण हें प्रवृत्ति व निवृत्ति ह्यांच्या भांडणासारखेंच आहे. दोघांनाहि दोष देतां येत नाहीं.

"गोणी आली घरा। दाणे खाऊं नेदी पोरां ॥ १ ॥
भरी लोकांची पांटोरी। मेला चोरटा खाणोरी" ॥ २ ॥

ह्याप्रमाणें जिजाबाई संतापे व 'काय तरी देऊं तोडितील पोरें। मरतीं तरी बरें होतें आतां!' ह्याप्रमाणें वैतागून जाई. तिची अशी स्थिति झाली, कीं 'तुका म्हणे खोटा। रांडे संचिताचा सांठा!' जिजाबाईला पोराबाळांची व्यवस्था पाहावी लागे तेव्हां तिचा तडफडाट होई तोहि स्वाभाविक आहे, व 'प्रसंगीं या नाहीं देहाची भावना' अशा निस्सीम भगवत्प्रेमानें देहबुद्धिशून्य होऊन स्वस्वरूपीं रंगलेल्या तुकोबांना 'अवधीं भूतें साम्या आलीं' ह्या अनुभवामुळें व देह प्रारब्धाहातीं देऊन घडीनें घडी परमात्मा जोडण्याच्या उदात्त हव्यासामुळें तिची कटकट वृथा वाटावी हेंहि साहाजिक आहे! जिजाबाईनें :—

उठितें तें कुटितें टाळ। अवघा मांडिला कोल्हाळ ॥ १ ॥
जीवंतचि मेले। लाजा वाटूनियां प्याले ॥ २ ॥

असें म्हणून तुकोबांभोंवतीं जमलेल्या वैष्णवांकडे पाहून गडगडाटावें व तुकोबारायानें :—

कोण घरा येतें आमुच्या काशाला। काय ज्याचा त्याला नाहीं धंदा? ॥ १ ॥
देवासाठीं झालें ब्रह्मांड सोईरें। कोमळ्या उत्तरें काय वेंचे? ॥ २ ॥
मानें पाचारितां नव्हे आराणूक। पेसे येती लोक प्रीतीसाठीं ॥ ३ ॥

ह्याप्रमाणें तिची कधीं प्रेमळ शब्दांनीं समजूत काढावी, किंवा 'तुका म्हणे रांड न करितां विचार। वाहूनियां भार कुंथे माथां!' ह्याप्रमाणें तिला एखादा कठोर शब्दाचा तडाखा द्यावा! दोघांचीहि कृति सहज आहे हें खरें, पण ह्या मायबापांच्या भांडणांत तुम्हांआम्हांसारख्या त्यांच्या लेंकरांना पडण्याचा कांहीं अधिकारच पोंचत नाहीं! तेव्हां आपण स्वस्थ बसावें हेंच बरें! ह्याप्रमाणें स्वतःच्या संसाराकडे आणि स्वस्त्रीकडे लक्ष द्यायला ज्या तुकोबारायांना पळाची फुरसत नव्हती ते परस्त्रीकडे ढुंकून पाहातात कशाला? एकदां एक लावण्यवती स्त्री तुकोबांना एकटे पाहून कांहीं कुटाळांच्या सांगीवरून त्यांजजवळ पापबुद्धीनें गेली, तेव्हां तिला 'मातोश्री' म्हणून त्यांनीं परत लावून दिलें. त्या प्रसंगीं :

(१) स्त्रियांचा तो संग नको नारायणा।
काष्ठा या पाषाणा मृत्तिकेच्या ॥ २ ॥

....

(२) परावीया नारी रखुमाईसमान।
हें गेलें नेमून ठायींचेंची ॥ ३ ॥

हे दोन वैराग्यपर अभंग त्यांनीं केले, त्यांवरून 'कांता' विषय त्यांचा कसा पार सुटला होता हें सिद्ध होतें. आतां 'कनका' वर त्यांनीं कशी लाथ मारिली होती हें त्यांनीं शिवाजी महाराजांस धाडलेल्या पत्रावरून सिद्ध होतें. श्रीसमर्थ रामदासस्वामींचा अनुग्रह घेतल्यावर शिवाजीराजानें कारकून, घोडे, अबदागिऱ्या वगैरे लवाजमा तुकोबांस पुण्यास आणण्यासाठीं देहूस त्यांच्याकडे पाठविला. तेव्हां :—

निराशेचा गांव दिधला आम्हांसी । प्रवृत्तीभागासी सांडियेलें ॥ १ ॥

ह्याप्रमाणें सांगून :—

सांगणें न लगे सर्वज्ञ तूं राजा । अनाथांच्या काजा साह्य व्हावें ॥ १ ॥

असा त्यांनीं त्याला निरोप पाठविला. तुकोबांची निःस्पृहता व वैराग्य पाहून शिवराय थक्क झाले. जडजवाहीर नजराणा बरोबर घेऊन ते स्वतः देहूस त्यांच्या दर्शनास आले, तेव्हां 'तुका म्हणे धन । आम्हां गोमांसासमान' ही आपली प्रतिज्ञा सांगून तुकोबाराय स्पष्ट म्हणतात :—

मुंगी आणि राव । आम्हां सारिखाचि जीव ॥ १ ॥
गेला मोह आणि आशा । कळिकाळाचा हा फांसा ॥ २ ॥
सोनें आणि माती । आम्हां समान हें चित्तीं ॥ ३ ॥
तुका म्हणे आलें । घरा वैकुंठ सगळें ॥ ४ ॥

शिवराय परत पुण्यास गेले पण तुकोबांची अमृतवाणी कानानें ऐकून व त्यांची विठ्ठलरूप झालेली मूर्ति पाहून ते इतके आनंदित झाले, कीं पुण्यास दिवसा राज्यकारभाराचीं जोखमीचीं कामें आटपून त्यांनीं रात्रीं भोजनोत्तर घोड्यावर बसून देहूस किंवा लोहगांवास जेथें तुकोबांचें कीर्तन असेल तेथें मोठ्या हर्षानें दौडत जावें ! तुकोबा आणि शिवबा ह्यांची भेट म्हणजे स्वधर्म व स्वराज्य ह्यांचें ऐक्य होय. असो. ह्या दोनतीन गोष्टींवरून 'कनक-कांता' ह्यांचा मोह तुकोबांनीं पूर्णपणें जिंकला होता हें सिद्ध होतें. शिवाय ते स्वतः म्हणतात :—

एक धरिला चित्तीं । आम्हीं रखुमाईचा पती ॥ १ ॥
तेणें जालें अवघें काम । निवारिला भवभ्रम ॥ २ ॥
परद्रव्य परनारी । जालीं विषाचिये परी ॥ ३ ॥
तुका म्हणे फार । नाहीं लागला व्यवहार ॥ ४ ॥

तुकोबांनीं म्हटलें आहेच, कीं 'मान दंभ चेष्टा । हे तों शूकराची विष्ठा !' ह्याप्रमाणें बायका, पैका व प्रतिष्ठा किंवा दारेषणा, वित्तेषणा व लोकेषणा ह्या तीन ईषणा त्यांनीं पार जिंकल्या होत्या.

७. तुकोबारायांच्या आंगीं भक्तिज्ञानवैराग्यादि संतलक्षणें जसजशीं स्पष्ट उमटूं लागलीं तसतसें भक्तमंडळ त्यांच्या भोंवतीं गोळा होऊं लागलें. तुकोबांचा धाकटा भाऊ कान्होबा, गंगाधर मवाळ कडुसकर, संतोबा तेली, जगनाडे चाकणकर, नावजी माळी, कोंडभट पुराणिक वगैरे सर्व जातींचे भाविक सज्जन तुकोबांचे निस्सीम भक्त झाले. रामेश्वर भट्टांसारखे जे विद्वान् शास्त्री प्रथम छळक होते, तेच पुढें तुकोबांची उत्कट भक्ति व आंगीं मुरलेलें ज्ञान पाहून शरण आले व त्यांचे शिष्य झाले. संतोबा तेल्यांच्या हातची अभंगांची वही मीं स्वतः

पाहिली आहे. तुकोबांची कीर्तनाची पद्धति पराकाष्ठेची प्रेमळ व स्फूर्तिदायक होती. देवधर्माविषयीं ज्याच्या मनांत पक्की अढी बसली होती असा एक पूर्ण प्रापंचिक मनुष्य आठ दिवस त्यांचीं कीर्तनें ऐकून घरावर तुळशीपत्र ठेवून तुकोबांचा शिष्य झाला, अशी एक गोष्ट प्रसिद्ध आहे. 'जनरंजवणें बोल' बोलून त्यांना काय करायचें होतें ? त्यांनीं देवाला आळवण्यासाठीं भक्तिभावानें कथाकीर्तनें केलीं व जनांना जिव्हाळ्याचा बोध करून परमात्मस्वरूपाकडे वळवण्यासाठीं कवित्व केलें. त्यांच्या कवितेंत पराकाष्ठेची कळकळ आहे. जीवांच्या कळकळीमुळें त्यांनीं धूर्त, पाखंडी, नास्तिक, तर्कटी, दांभिक, धर्मलंड, आचारभ्रष्ट, शाक्त इत्यादिकांवर अत्यंत तीव्र कोरडे ओढले आहेत. "आम्हां हें उचित जगा द्यावी नीत । करावे फजीत चुकती ते" असें त्यांनीं म्हटलें आहे. पिंडपोषकांची त्यांनीं दयामाया ठेवली नाहीं :—

होईल तैसें बळ । फजीत करावे ते खळ ॥ १ ॥
तुका म्हणे त्यांचें । पाप नाहीं ताडनाचें ॥ २ ॥

आपल्या तोंडून कठोर शब्द बाहेर पडतात पण ते जीवांच्या उद्धाराच्या कळकळीनें पडतात असें त्यांनीं म्हटलें आहे :—

जग तरी आम्हां देव । परि हे निंदितों स्वभाव ॥ १ ॥
येतो हिताचा कळवळा । पडती हातीं म्हणुनि काळा ॥ २ ॥

काळाच्या हातीं जीव पडतात हें मला पाहावत नाहीं, म्हणून त्यांच्या हितासाठींच त्यांच्या स्वभावांची हा मी निंदा करीत आहें, एरवीं 'जग तरी आम्हां देव आहे !' 'विष्णुमय जग' हाच ज्या महावैष्णवाचा परमधर्म त्याला कठोर बोलतांना फार वाईट वाटत असेल, पण त्याची जीवांची कळकळ पडली अनिवार. तुकाराममहाराजांसारखी जीवांची कळकळ बाळगणारा परम प्रेमळ, परम दयाळु संत क्वचितच आढळेल. हितकर्त्यांचे प्रहार हे पुष्पांचे झेले आहेत. एकनिष्ठता, निस्सीम भगवत्प्रेम, समबुद्धि व कळकळ हे गुण तुकोबांच्या प्रत्येक अभंगांत दृष्टीस पडतात.

८. श्रीतुकाराममहाराजांनीं ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, कबीर इत्यादि संतांचे ग्रंथ **'विश्वासें आदरें'** वाचले होते हें वर सांगितलेंच आहे. त्यांची श्रवणभक्ति मोठी होती. गीता, ज्ञानेश्वरी, भागवत, नाथभागवत, रामायण, भारत, पुराणें इत्यादि ग्रंथ त्यांनीं शतशः वाचले होते, त्यांवर पुराणें ऐकलीं होतीं, त्यांचें भंडारा डोंगरावर एकांतांत मनन केलें होतें. श्रवण–मनन–निदिध्यास ह्या मार्गानें जाऊन चित्तशुद्धीनंतर सद्गुरुकृपा होते तेव्हांच साक्षात्काराची पात्रता येते. भक्तिरसानें ओथंबलेला मराठींतला अनुपम ग्रंथ जो एकनाथी भागवत त्याचीं त्यांनीं एक हजार पारायणें केलीं होतीं अशी प्रसिद्धि आहे. ज्ञानेश्वरी व एकनाथी भागवत ह्या ग्रंथांशीं तुकोबांचा अत्युत्कट परिचय होता ह्याबद्दल त्यांच्या अभंगांत पुष्कळ प्रमाणें सांपडतात. तुकोबांच्या अभंगांतून पुराणांतील अनेक कथांचेहि उल्लेख आलेले आहेत. शिवाय त्यांनींच म्हटलें आहे :—

पुराणींचा इतिहास । गोड रस सेविला ॥ १ ॥
नव्हती हे आहाच बोल । मोकळे फोल कवित्व ॥ २ ॥

आपलें वैराग्य दृढ करण्यासाठीं भर्तृहरीचें नीतिशतक व वैराग्यशतकहि त्यांनीं पाहिलें होतें. **'ऐसा हा लौकिक कदा राखवेना'** हा अभंग भर्तृहरीच्या एका सुप्रसिद्ध श्लोकाचें उत्तम रूपांतर आहे. पुढील अभंग पाहा :—

क्षमाशस्त्र जया नराचिये हातीं । दुष्ट तयाप्रती काय करी ॥
तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि । जाय तो विझोनी आपसया ॥ २ ॥
तुका म्हणे क्षमा सर्वांचें स्वहित । धरा अखंडित सुखरूप ॥ ३ ॥

हा अभंग पुढील श्लोकाशीं अक्षरशः ताडून पाहावा :—

क्षमा शस्त्रं करे यस्य दुर्जनः किं करिष्यति ।
अतृणे पतितो वह्निः स्वयमेवोपशाम्यति ॥ १ ॥

सर्व संतांप्रमाणें 'गीता-भागवता'वर तुकोबांचा मुख्य भर आहे. भक्तांचा नित्यक्रम :—

गीता भागवत करिती श्रवण । आणिक चिंतन विठोबाचें ॥

असा असतो असें त्यांनींच म्हटलें आहे. तुकोबारायांना लिहितां वाचतां उत्तम येत होतें, ह्याविषयीं शंका बाळगायला नको. त्र्यंबकेश्वरास त्यांच्या उपाध्यायाच्या घरच्या वहीवर त्यांच्या हातची सही आहे. प्रथम प्रथम वाचन, पठण, श्रवण, मनन हें तुकोबांचें अखंड चाललें होतें. संतांच्या वचनांचा खरा उपयोग मात्र त्यांनींच करून घेतला. नुसते ग्रंथ वाचणारे सुशिक्षित लोक तेव्हांहि कांहीं थोडे नव्हते. दिव्याबरोबर जशी काजळी असते, तसा बहुधा विद्येबरोबर मद असतो ! पण म्हणूनच विद्वान् लोकांहून भक्तांची पायरी फार वरची असते, कारण कीं भक्त हे आपलें सर्वस्व देवाला वाहून आपण नाहींसे होऊन राहातात. त्यांचा 'अवघा विठ्ठल धन वित्त.' ते परमात्मरूप होऊन राहातात. एकदेशीपणाचा अहंकार सोडून ते सर्वात्मकपणाचा भोग भोगतात.

९. तुकोबाराय सगुण व निर्गुण दोन्ही मिळून एकच सच्चिदानंद पांडुरंग सघन भरला आहे असें अनुभवीत. "सगुण निर्गुण जयाचीं हीं अंगें । तोचि आम्हांसंगें क्रीडा करी." विटेवरी उभा राहून कटावरी कर ठेवणारा पांडुरंग हा त्यांचा उपास्य होता व ह्याच्या चिंतनांत मग्न होतां होतां ते स्वरूपाप्रत जाऊन पोहोंचले. जें सगुण तेंच निर्गुण अशी त्यांची दृढ निष्ठा होती. प्रेमाचें सुख घोंटण्यासाठीं 'नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितिभाव । मी भक्त तूं देव ऐसें करीं' असें त्यांनीं कोठें कोठें म्हटलें आहे, पण 'मीचि मज व्यालों । पोटा आपुलिया आलों ॥' असे अद्वैतपरहि त्यांचे कित्येक अभंग आहेत. सर्व संतांप्रमाणें तुकोबाहि पूर्ण अद्वैती आहेत. मोक्षाचें गांठोडें जवळ ठेवून त्यांनीं प्रेमामृतानें देवाला आळवलें आहे. खऱ्या संताला जात नाहीं तरी वर्णसंकर करूं नये व कर्म सोडूं नये असेंच त्यांचें निक्षून सांगणें आहे. आपला वेदधर्म, आपली परंपरा व आपलीं समाजबंधनें ह्यांचें त्यांनीं चरित्रांत व काव्यांत बिलकूल उल्लंघन केलें नाहीं; इतकेंच काय, पण 'वाचा बोलूं वेद नीती । करूं संतीं केलें तें ॥' अशी त्यांची प्रतिज्ञा आहे. त्यांनीं एकनाथांप्रमाणें महाराष्ट्रांतील लोकांस भगवद्भक्तीला लावून त्यांची नीति सुधारली व त्यांना शीलवंत केलें, म्हणून पुढें शिवरायांस त्यांचें स्वतःचें स्वराज्य मिळविण्यास लायक अशीं योग्य माणसें महाराष्ट्रांत मिळालीं. धर्मोद्धार झाला कीं सहजच राष्ट्रोद्धार होतो.

१०. प्रेमाच्या अमृतानें तुकोबांनीं 'रसना ओलावल्यावर' त्यांनीं अभंग केल्यामुळें किंवा अभंगरूप सहजोद्गार बाहेर पडल्यामुळें त्यांत अमृताहून जास्त गोडी आली आहे. तुकोबांच्या वाणींत प्रतिपदीं त्यांची प्रेमळ मूर्ति रेखल्यासारखी स्पष्ट दिसते. त्यांच्या अभंगांतला एखादा चरण घेऊन एकांतांत त्याचें मनन करीत बसावें, 'म्हणजे अंतपार नाहीं असें दिव्य सुख' प्राप्त होतें. ह्या कलियुगांत भक्तिमार्गच जीवांना सुकर आहे असा संतांनीं निवाडा केला आहे. परमात्मा प्राप्त करून घेण्याची ज्यांना तळमळ लागली असेल त्यांनीं

तुकोबांच्या अभंगांत आपलें चित्त शिरकवावें. "एक एक अक्षरांत। आहे माझ्या रमाकांत!" अभंगांची गाथा ही भवसागरांतून यच्चयावत् सर्व जीवांना तारून नेणारी नौका आहे. पूर्वभाग्ययोगानें ज्यांच्यावर भगवदनुग्रह होण्याचा समय आला असेल ते ह्या नौकेचा आधार धरितील ह्यांत संशय नाहीं. असो. दया, क्षमा, शांति, वैराग्य, निःस्पृहता, निरिच्छता, समचित्तता, एकनिष्ठता व निस्सीम भगवत्प्रेम हे गुण जगाला शिकवून तुकाराम महाराजांनीं फाल्गुन वद्य २ शके १५७२ सालीं प्रयाण केलें. श्रीविठ्ठलरूप तुकोबारायांस माझे सहस्र प्रणाम असोत.

मुमुक्षु कचेरी, पुणें.
आषाढ शु० ११ शके १८३१

साधुसंतांचा दासानुदास,
लक्ष्मण रामचंद्र पांगारकर



साधकाची दशा उदास असावी । उपाधि नसावी अंतर्बाहीं
लोलुप्यता काय निद्रेसी जिंकावें । भोजन करावें परिमित ॥
एकांतीं लोकांतीं स्त्रियांशीं भाषण । प्राण गेल्या जाण बोलों नये ॥

वै० जोगमहाराज ह्यांची थोर कामगिरी

जोग घराण्याचें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील जयगड बंदरापासून दोन मैलांवर असलेलें नांदिवडें हें लहानसें खेडें.

पेशवाईंत कोंकणांतील अनेक घराणीं घाटावर आलीं त्यांत या जोगांचेंहि घराणें होतें. कांहीं मंडळी सातारा-सांगली-मिरजेकडे गेली तर कांहीं पेशव्यांच्या खुद्द राजधानींत म्हणजे पुण्यांत आली.

पुण्यास आल्यानंतर यादव गोपाळ जोग हे लवकरच सावकार जोग म्हणून प्रसिद्धि पावले. ह्यांचे पणतू नरसोपंत हेच आपल्या चरित्र-नायकाचे वडील होत. बोवांचा जन्म दि. १४-९-१८६७ रोजीं झाला. ह्या घराण्यांत संस्कृति आणि सदाचार हीं दोन्ही जुळ्या भावंडांप्रमाणें नांदत होतीं.

विष्णुबोवांना तीन वडील बंधु आणि एक धाकटी बहीण अशीं चार भावंडें होतीं. चारी भावांना तालमीचा व पोहण्याचा अतिशय नाद.

बोवांचें शरीर मूळचेंच सुदृढ. त्यांत दोन वडील भाऊ पुण्यांतील सुप्रसिद्ध नगरकर तालमीचे वस्ताद. घरची सांपत्तिक स्थिति चांगल्यापैकीं. तेव्हां तालीम करणें, यथेच्छ दूध-तूप खाणें, पोहोणें, कुस्त्या पाहाणें, डाव शिकणें, सायंकाळीं देवदर्शन करणें, असा बोवांचा लहानपणीं कार्यक्रम असे.

तो काळच असा होता, कीं सुखवस्तु कुटुंबांतील मुलें फारशीं शिकलीं नाहींत तर त्याबद्दल त्यांस कोणी हंसत नसे. शरीर कसें, आचार कसा, ह्याला विशेष महत्त्व असे. तेव्हां बोवांचें शिक्षण जेमतेम मराठी चौथ्या इयत्तेपर्यंत झालें हेंच फार झालें म्हणावयाचें!

लवकरच बोवांना परमार्थाचा छंद लागला, तरी मुळांत जें पहिलवानकीचें वळण, तें कांहीं सुटलें नाहीं. त्यांचे वडील बंधु पांडोबा महाराज अगदीं अल्पवयांत वारले तेव्हां सहजच नगरकर तालमीचें त्यांचें वस्तादपण बोवांकडे आलें. कुस्त्यांच्या फडाविषयीं बोवांना फार प्रेम. जितक्या कौतुकानें ते कीर्तना-प्रवचनांना जात, तितक्याच आपुलकीनें कुस्त्यांचें मैदानहि चुकवीत नसत.

शरीर सुदृढ ठेवण्यासाठीं मांसाहार करावा लागतो, ह्यावर बोवांचा अजिबात विश्वास नव्हता. त्यांनीं स्वतः मांसाहार कधींहि केला नाहीं. ते म्हणत, 'पिंटो इत्यादि नांवें धारण करणारे गोव्याच्या बाजूचे बबर्जी नेहमींच मांसाहार करतात. तेवढ्यानें त्यांचीं शरीरें सुदृढ होतात काय? शरीर बलसंपन्न होण्यासाठीं निष्ठेनें ब्रह्मचर्य पाळलें पाहिजे. तें नसलें आणि पुष्टिवर्धक पदार्थांचा रतीब चालू असला तर कांहींएक उपयोग होणार नाहीं. मोरीला बोळा आणि दिल्ली दरवाजा मोकळा, तसें तें होईल!!'

देशी खेळांवर आणि व्यायामपद्धतीवर बोवांचें फार प्रेम होतें. टेनिससारख्या विदेशी खर्चिक खेळांचा ते तिटकारा करीत. कुणाला हातांत टेनिसची रॅकेट घेऊन जातांना पाहिलें, कीं ते थट्टेनें म्हणत, 'हे चालले हातांत झारा घेऊन बुंदी पाडायला!'

'मी अमूक ऐसें करूं नये,' ही बोवांची वृत्ति. तुकाराम महाराजांच्या गाथ्याचा त्यांचा गाढा अभ्यास. त्यांच्या अभंगांवर ते कीर्तनें करीत, पण बोवांनीं आपल्या साधनेची किंवा साधनकाळाची माहिती कोणास सांगितली नाहीं अथवा लिहून ठेवली नाहीं.

बरें, त्यांना विचारून ती माहिती काढावी तर तितके ते वृत्तीचे ठिसूळ नव्हते. शिवाय, त्यांच्यासंबंधीं किंचित् आदरयुक्त भीतिच वाटत असल्यामुळें त्यांना 'आपण साधन काय केलेंत?' असें विचारण्याचें धैर्यहि कोणास होत नसे.

बोवा साधकाचे सिद्ध झाले. ते केवळ जिज्ञासु नव्हते. साधक ही अवस्था जिज्ञासूहून अधिक वरची. जिज्ञासु हा केवळ तत्त्व जाणण्याची इच्छा करतो, तर साधकामध्यें ती दशा अंतर्भूतच असते आणि त्याहूनहि पुढें तो साधनें निश्चित करतो आणि शरीर धगधगत्या आगींत धरून त्यांचें अनुष्ठान करण्याची पराकाष्ठा करतो.

बोवा साधनदशेकडे कशासाठीं वळले? आर्थिक परिस्थितीचा विचार करतां त्यांची स्थिति उत्तमच म्हटली पाहिजे. शीलसंपन्न व सधन कुलांत जन्म, सामाजिक प्रतिष्ठा असावी तशी, शरीरप्रकृति लाखांत एक, रूप राजस, मित्रपरिवार नामांकित! अशा सर्व बाजूंनीं अनुकूल परिस्थितींत त्यांची प्रवृत्ति साधनमार्गाकडे कां झाली?

सामान्यतः माणसें त्रिविध तापांनीं पोळलीं म्हणजे मग तीं परमार्थाकडे वळतात. आधिभौतिक, आधिदैविक, आध्यात्मिक ह्यांपैकीं कोण्या एका तापाचा ज्वर वाढला, अथवा हे त्रिदोष एकत्र झाले म्हणजे मनुष्य विरक्त होतो, परमार्थाचा विचार अधिक तीव्रतेनें करूं लागतो. किंबहुना शास्त्रामध्यें अशाच पायऱ्या वर्णिलेल्या आहेत. अशाहि रीतीनें मनुष्य साधनापंथाकडे कलला, तरी त्यांत खंत करण्याजोगें कांहींच नाहीं. कित्येक नामवंत साधक असेच त्रिविध तापांनीं पोळून निघून मग साधक झाले आणि 'क्षुरस्य धारा' म्हणून प्रसिद्ध असलेला साधनामार्ग क्रमून शेवटीं सिद्धावस्थेला पावते झाले.

गौतम बुद्धाची कथा प्रसिद्धच आहे. वार्धक्य, दुःख, मृत्यु ह्या व्यथांच्या दर्शनानंतरच तो सावध होऊन, प्रपंचाचा त्याग करून, परमार्थसाधनेस लागला. तुकाराम महाराजांनीं तर आत्मचरित्रांत लिहून ठेवलें आहे, कीं 'संसारदुःखानें पोळल्यावरच मग मी परमार्थाचा विचार करूं लागलों.'

पण बोवांना या त्रिविध तापांशीं झुंजावें लागलें नाहीं. कोणत्याहि दुःखाशीं त्यांना टक्कर द्यावी लागली नाहीं. मंडूकप्लुतीप्रमाणें हा कष्टकर प्रवास टाळून ते एकदम साधकदशेच्या महाद्वाराशीं जाऊन उभे राहिले.

वैराग्य हें साधकाच्या दशेवर अवलंबून असतें. कांहींना दुर्बळ मनाशीं दोन हात करून त्यावर विजय मिळवावा लागतो, तर कुणी जन्मतांक्षणींच त्या विजयपत्रांचीं बाळलेणीं मिरवूं लागतो. त्यांचें मन अत्यंत निरोगी असतें. किंबहुना 'निरोगी' या शब्दांतहि रोग ही कल्पना गृहीत धरली आहे. ह्या कल्पनेचाहि स्पर्श ह्या साधकाच्या मनाला होत नाहीं.

साधनेसाठीं कष्ट करावे लागतात म्हणजे काय, हें बोवांना कधीं कळलेंच नाहीं. ते जन्मतःच साधक होते. इतरांसाठीं परमार्थसाधना ही एक लढाईच असते. ती किती दिवस चालेल ह्याचाहि कांहीं भरंवसा नसतो. अनेक घाव द्यावे-घ्यावे लागतात. अनेक खुणा शरीरावर शिल्लक राहातात. एका बाजूला असतात विकार—दुसरीकडे विचार. दोघांचें तुमुल युद्ध होतें. कधीं ह्याचा जय होत असतो तर कधीं त्याचा! हें सगळें त्या त्या साधकाच्या आंगिक प्रवृत्तीवर अवलंबून असतें. बोवा एकदां म्हणाले होते, 'कळूं लागल्यापासून मीं माझी वृत्ति कधीं कामाच्या आधीन केलीच नाहीं!'

एकदां नाशिकला स्नानासाठीं गोदावरी नदींतील रामकुंडावर ते उभे असतांना तीर्थोपाध्याय संकल्प सांगूं लागला,

पापोऽहं पापकर्माऽहं पापात्मा पापसंभवः ।

त्याबरोबर बोवा त्याच्यावर एकदम खेंकसले, म्हणाले, 'मी पापीहि नाहीं किंवा पापकर्माहि नाहीं! दुसरें काय म्हणायचें असेल तें म्हणा, पण हा संकल्प उच्चाराल तर खबरदार!'

बोवांचें वैराग्य जातिवंत कवीसारखें होतें. अभिजात कवि हा जन्मावाच लागतो. बोवांचेंहि तसेंच होतें. विकारांचा अडथळा आणि त्यांच्यावर विजय मिळवून मग साधकदशा हा प्रकार तर दूरच, पण साधनापंथांत प्रवेश होण्यासाठीं ज्या कांहीं तांत्रिक गोष्टी कराव्या लागतात, त्यासुद्धां त्यांनीं कधीं केल्या नाहींत. एका ज्योतीनें दुसरी ज्योत पेटवावी, त्याप्रमाणें त्यांची बाल्यावस्था संपून तारुण्यास प्रारंभ झाला आणि जमिनीवरून पाऊल उचलून रथांत ठेवतांक्षणीं रथांत आरूढ झाल्याचें अनुभवास यावें, तसे बोवा अगदीं सहजच साधकदशेप्रत प्राप्त झाले. फार तर असें म्हणावें, कीं जें कांहीं त्यांनीं केलें तेंहि फार लवकर आटोपलें.

ते म्हणत, 'गतजन्मीं मी कोण होतों माहीत आहे? माउलीच्या पालखीचा भोई! जन्मभर त्यांची पालखी वाहिली, त्यामुळें ह्या जन्मीं साधन असें फारसें करावेंच लागलें नाहीं!'

तुकाराम महाराजांनीं साधकाचीं लक्षणें सांगितलीं आहेत तीं अशीं—

'साधकाची दशा उदास असावी । उपाधी नसावी अंतर्बाह्य ॥
लोलुप्यता काय निद्रेसी जिंकावें । भोजन करावें परिमित ॥
एकान्तीं लोकान्तीं स्त्रियांशीं भाषण । प्राण गेल्या जाण करूं नये ॥'

हीं सगळीं लक्षणें बोवांच्या अंगीं जन्मतःच होतीं, असें म्हटलें तरी चालेल. ते अंतर्बाह्य उपाधिशून्य होते. जेवायला बसत, तर किती जेवलों आणि काय जेवलों, ह्याचें त्यांना भान नसे. परस्त्रीशीं भाषण तर वर्ज्यच असे. स्त्री-नातलगांशींहि अगदीं जरूरीपुरतें. ह्यांचें कारण सांगतांना ते एकदां म्हणाले होते,

'तित्तिर पत्थर चूमत उसको न छोडे काम ।
घीशक्कर खावत जो उसकी जाने राम ॥'

'दगड माती खाणारे तित्तिरपक्षीहि जर आपल्याला कामक्षुधेपासून दूर ठेवूं शकत नाहींत, तर मग तूपसाखर खाणाऱ्या मानवाची काय कथा?'

परस्त्रीशीं बोलण्यापुरताहि संबंध न ठेवण्यांत त्यांचे गुरु होते त्यांचे थोरले बंधु पांडोबा महाराज!

आपल्या तालमींत कुण्या पठ्ठयाची कुस्ती ठरली, कीं पांडोबा महाराज त्याला ज्ञानेश्वर माउलीच्या पायावर घालण्यासाठीं आळंदीस आणीत. त्यांच्याबरोबर बोवाहि आळंदीस येत. अशा रीतीनें आळंदीस जाण्याचा बोवांना छंद जडला. ह्यापरता दुसरा कोणताहि गुरु बोवांनीं केला नाहीं, त्याची गरजहि भासली नाहीं. गळ्यांत माळ घातली तीहि माउलीच्या समाधीवर ठेवून, त्यांचा प्रसाद म्हणून, आपल्याच हातानें!

अशा रीतीनें पूर्वजन्मींच्याच तपश्चर्येनें परिपक्व झालेलें हें आम्रफल—त्याला माउलीच्या शरणतेचा गंध आणि वर्ण लाभला. बोवांनीं आळंदीस अजान वृक्षाखालीं ज्ञानेश्वरीचीं पारायणें सुरू केलीं. मनन, चिंतन होऊं लागलें, पण तेथें लोकांची गर्दी होऊं लागल्यावर ते भंडारा डोंगरावर जाऊन राहिले. तेथें तुकाराम महाराजांच्या गाथ्याचीं पारायणें आणि ज्ञानेश्वरीचें पठण, अशा रीतीनें बोवांचा काळ व्यतीत होऊं लागला. सोनें कसास चढत चाललें. बोवांची साधनापथावरील चाल सुरू झाली.

एकदां बोवा थोरल्या बंधूंबरोबर इगतपुरीस गेले होते. तेथून त्र्यंबकेश्वर जवळ. तेथें श्रीज्ञानेश्वरांच्या गुरुदेवांची समाधि. तेथें वारंवार जाऊन बोवा तेथील मनस्वी एकान्त वातावरणांत रमूं लागले. वृत्ति अधिकाधिक अंतर्मुख होऊं लागली. वैराग्य परमळूं लागलें.

बोवांची साधना तर चालली होतीच; पण ती अगदीं सहजसाधना होती. तिचा दर्जा फार उच्च होता. इतर साधकांना जो बाह्य साधनांचा खटाटोप करावा लागतो, त्याचा संपर्कहि बोवांस कधीं झाला नाहीं. त्यांना देवपूजेचा पसारा मांडून बसलेलें अथवा माळ घेऊन जप करीत बसलेलें कोणीं कधीं पाहिलें नाहीं. बोवांचा कल वृत्ति शून्य करण्याकडे असल्यानें, त्यांना बाह्य उपाधि अजिबात नव्हती.

ते जपहि करीत तो विष्णुसहस्रनामाचा. राहुरीस एका योग्याकडे जाऊन बोवांनीं कांहीं दिवस योगमार्गाचे पाठ गिरवले हें खरें असलें तरी ती साधना करीत असतां कुंभकाचा त्यांच्या प्रकृतीवर विपरीत परिणाम झाला. त्यांच्या नाडीचा एक ठोका कमी पडत असे. तेव्हां मग त्यांनीं योगसाधनाहि फारशी केली नाहीं.

सारांश, बोवांच्या साधनेसंबंधीं थोडक्यांत असें सांगतां येईल, कीं त्यांच्या साधनाकाळांत किंवा सिद्धावस्थेंत त्यांनीं पंढरपूर–आळंदीची वारी केल्यापरतें साधन दिसत नाहीं. त्याचप्रमाणें ज्ञानेश्वरमहाराजांच्या साक्षात्काराशिवाय देहधारी गुरूचाहि त्यांच्या जीवनांत आढळ होत नाहीं. ह्याचें कारण ज्ञानेश्वरींत जिला 'सोऽहंसिद्धि' म्हटलें आहे आणि जिचा परिपाक निर्विकल्प सहजसमाधींत होतो, तिचे ते ज्ञानमार्गी साधक होते. ह्या मार्गांत गुरूपेक्षांसुद्धां शिष्यप्रज्ञेला महत्त्व आहे.

ह्याचा अर्थ गुरूची आवश्यकता नाहीं असा नाहीं. आत्म्याचें परोक्षत्वानें ज्ञान होण्यास गुरु आणि शास्त्राभ्यास ह्यांची आवश्यकता आहे, पण शिष्य जर अनधिकारी असला तर ह्या दोहोंचा उपयोग होत नाहीं, आणि अधिकारी असला तर दोहोंपैकीं एकाकडूनहि साधकास आत्म्याचें परोक्षज्ञान झालें, तर तो मननिदिध्यासानें आत्मसाक्षात्कार करून घेऊं शकतो. शास्त्रोक्त उपायांचा अभ्यास केल्यानें चित्त शुद्ध होत जातें आणि सर्व भोगेच्छांचा त्याग करून लवकरच आत्मस्वरूपाचें ज्ञान करून घेण्याविषयीं समर्थ होतें. शास्त्राभ्यासामुळें सत्त्वाचा उत्कर्ष होतो आणि तामसभाग क्षीण होतो. अशा रीतीनें मुमुक्षूला शास्त्राच्या अभ्यासानें आत्मज्ञान संपादन करतां येतें. बोवा हे पूर्वजन्माभ्यासी विरक्त असल्यानें ज्ञानेश्वरीचें आणि वेदांतग्रंथांचें श्रवण त्यांना मार्गदर्शनास पुरेसें झालें. 'ध्यान-ध्याता-ध्येय' एक करणाऱ्या ध्यानमार्गाचें बोवांनीं अवलंबन केलें आणि 'सिद्धि' गांठली. त्यांना ज्ञानेश्वरमहाराजांचा दृष्टान्त झाला होता. बोवा आळंदी येथें अजानवृक्षाखालीं बसले असतांना माउलीनें मस्तकावर हात ठेवून सांगितलें, 'तूं कीर्तन-प्रवचन करीत जा.'

आणि अशा रीतीनें उत्कट भक्तीनें ओतप्रोत भरलेल्या प्रखर तेजस्वी, परम सत्यवादी, निःस्पृह, निरिच्छ अशा एका महान् कीर्तनकाराच्या भजन-कीर्तनांनीं पंढरीचें वाळवंट दुमदुमून जाऊं लागलें. बोवा म्हणत, 'मी संतांचा निरोप्या आहें. त्यांचा निरोप सर्वसामान्य माणसांपर्यंत पावता करणें हें माझें काम आणि तें मी निष्ठेनें करीत राहाणार!'

धर्म शब्दाचा अर्थ काय? ह्याचा उकल करतांना श्रीशंकराचार्यांनीं म्हटलें आहे त्याचा अर्थ असा : ज्यामुळें जगाची स्थिति उत्तम राहील असा, आणि प्राण्यांच्या इहपरलोकींच्या भल्याची चिंता करणारा नियमांचा समूह, त्याला धर्म म्हणतात. परमेश्वरानें निर्माण केलेलें हें विश्व सुस्थितींत राहिलें पाहिजे, हें धर्माचें साध्य.

संत आणि सामान्य माणसें ह्यांच्या विचारामध्यें हाच महत्त्वाचा फरक आहे. संतांची धारणा अशी असते, कीं धर्माचा योग्य प्रसार चोहींकडे झाला तरच जग सुखी होईल, एरवीं नाहीं. सामान्य माणसें केवळ भौतिक सुखांच्या मागें धांवतात. तीं लाभल्याचा त्यांना भासहि होतो पण त्या सुखांच्या भोगानंतर जीवनामध्यें जी प्रचंड पोकळी निर्माण होते, तीच अतिशय दुस्सह असते. म्हणून संतांचा आग्रह असा, कीं सुखें तर भोगावींत, पण तीं धर्माशीं अविरुद्ध अशीं असावींत. ह्यासाठींच 'उत्तम व्हेहारानें हवें तितकें द्रव्य मिळवा आणि मग त्याचा वेंच उदास विचारानें करा', असा संतांचा आग्रह असतो.

संत जन्मभर ह्याच एका विचाराच्या प्रसारासाठीं श्रमत असतात. ज्ञानेश्वर माउलींनीं एवढा मोठा

ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहिला, त्याच्या आशयासंबंधीं उल्लेख करतांना त्यांनीं ‘हें धर्मसंकीर्तन’ असे शब्द वापरले आहेत. ज्ञानेश्वरांनीं आपल्या प्रवचनांत सांगितलें आहे : “तुम्हांला सांगितलेला ह्या स्वधर्म—ह्याचें आचरण केलेंत, कीं तुमच्या सर्व इच्छा परिपूर्ण होतील. त्यावेगळीं व्रतें-कैवल्यें इत्यादि करायची गरज नाहीं. शरीराला पीडा देणें नको. कामनायुक्त आराधनांच्या तर वाटेसहि जाऊं नका. इतर दैवतांची उपासनाहि करणें टाकून ह्याचें निष्ठेनें अनुष्ठान करा. पतिव्रता ज्याप्रमाणें एकनिष्ठेनें पतीचें अनुकरण करते, त्याप्रमाणें तुम्ही धर्माची पाळणूक केलीत कीं पुरे!”

बोवांचें जीवनकार्यहि ह्यावेगळें कांहीं नव्हतें. ते जन्मभर ह्यासाठींच श्रमत आले. ज्ञानेश्वरांनीं त्यांना जो आदेश दिला, तो त्यांनीं अत्यंत निष्ठेनें पाळला. भोंगळ एकात्मतेवर बोवांचा विश्वास नव्हता. कमीअधिकपणा हा भेद ईश्वरनिर्मित आहे आणि मनुष्यानें अत्यंत यत्नपूर्वक सत्कृत्यें करून स्वतःचा उद्धार करून घेतला पाहिजे, असें त्यांचें प्रतिपादन होतें. विश्वव्यापी विश्वंभराला क्लेश देणाऱ्या परपीडकावर शस्त्र उचलण्याचें संतांनीं समर्थन केलें आहे, असें बोवा आग्रहपूर्वक प्रतिपादन करीत. बोवांची धारणा होती, कीं वैदिक धर्माचें रक्षण करायचें असेल तर भक्ति, नीति, आचार ह्यांच्यावर अधिक भर दिला पाहिजे. ह्यांच्याविना नुसता धर्माचा प्रचार म्हणजे बाष्कळ बडबड! लाकडी फळें जशीं केवळ दिसायला तेवढीं चांगलीं, प्रत्यक्ष खाण्यासाठीं त्यांचा कांहींच उपयोग नाहीं, तसें ह्या धर्मप्रचाराचें. तेव्हां वैदिक धर्माचा उत्कर्ष करणें असेल तर नीतियुक्त भक्तीचा ध्वज उंच उभवला पाहिजे, असा बोवांचा आग्रह असे.

बोवांनीं जन्मभर भागवतसंप्रदायाचा प्रसार केला. आपण हिंदु आहोंत, ह्याविषयीं खंत वाटायला बोवांच्या काळांत प्रारंभ झाला होता. ह्या खंतीविरुद्ध ते दंड थोपटून उभे ठाकले, हें त्यांचें फार मोठें कार्य. त्यांनीं समाजाचें स्वत्व जागें केलें. त्याला जागें करून त्याला मंत्र दिला, कीं आपल्या धर्माची लाज वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. अशा सर्वसमावेशक धर्ममध्यें आपला जन्म झाला, ह्याबद्दल खरोखरी गौरवानें मन भरून आलें पाहिजे. आपलें जीवन हें केवळ एकट्याच्या भल्यासाठीं नाहीं. ती समाजानें आपल्या स्वाधीन केलेली बहुमोल ठेव आहे. तेव्हां योग्य आचार, श्रद्धायुक्त भक्ति, उदात्त नीति, अशा स्वर्णपंचकांनीं मंडित करून ती समाजरूपी सर्वेश्वराच्या चरणीं समर्पित केली पाहिजे. अशा रीतीनें बोवांनीं व्यक्तीचा आणि समाजाचा समन्वय करण्याचें महत्तम कार्य साधलें.

बोवांना स्वतःचा एक स्वतंत्र फड उभारतां आला असता. फड निर्माण करणें, मठ बांधणें त्यांना सहज शक्य होतें. वारकरी संप्रदायामध्यें त्यांना तेवढी प्रतिष्ठा खचितच लाभली होती. मठस्थापनेसाठीं द्रव्याचा पूर त्यांच्या पायांपाशीं वाहात आला असता, पण हें त्यांनीं कटाक्षानें टाळलें. ‘न मांडी स्वतंत्र फड’ हें नाथांचें वचन त्यांच्यामध्यें पुरेपूर मुरलें होतें. मठनिर्मिति करून, फड उभारून स्वतःचा बडिवार माजविण्याऐवजीं त्यांनीं निर्मिली ती वारकरी शिक्षणसंस्था! परम आचारवंत, अनुशासनशील, व्रती, निःस्पृह असे प्रचारक निर्माण करायची शाळा.

म्हणूनच आपणामागें संस्थेचा अध्यक्ष कोण, ह्याचीहि त्यांनीं मुळींच चिंता केली नाहीं, कीं कसलाहि आदेश देऊन ठेवला नाहीं. उत्तम कर्मे करावींत आणि तीं सर्वेश्वराच्या चरणीं वाहावींत ह्यांतच जीवनाची इतिकर्तव्यता आहे, अशी निष्ठा हृदयाशीं बाळगून बोवा जन्मभर श्रमत राहिले—हेंच त्यांचें जीवनकार्य!

बोवा वारकरी असल्यानें भागवतधर्मीय नामदेवादि संतांनीं ज्या हरिकथेचा अवलंब केला, त्याच साधनांचा आश्रय त्यांनीं धर्माचा आणि नीतीचा प्रसार करण्यासाठीं केला. त्यांचीं मुख्य साधनें होतीं ज्ञानेश्वरीवरील प्रवचनें आणि जिला भजनी निरूपण म्हणतात, ती हरिकथा. हरिकथा ही केवळ अंतःकरणांतील दोष घालवून तें शुद्ध करीत नाहीं, तर ती कीर्तनकाराची प्रत्यक्ष आराध्यदेवाशीं गांठ घालून देते. कीर्तनाचा परिणाम कीर्तनकाराच्या योग्यतेवर निरतिशयपणें अवलंबून असतो. सांगणारा जर बोलेल तसा वागणारा असेल तर

त्याच्या प्रवचनाचा परिणाम ऐकणाऱ्यावर निर्विशेषपणें होईल. तसेंच, ज्याला जगाला मार्गदर्शन करावयाचें असेल त्याला जगाचें हित कशांत आहे तें निश्चितपणें ठाऊक असावें लागतें. खरें हित म्हणजे शाश्वत वस्तु काय, अशाश्वत काय, ह्याचा विवेक त्याच्या ठिकाणीं असणें अत्यंत आवश्यक असतें. 'विवेक' म्हणजे आपण सामान्य माणसें ज्याला विचारशक्ति म्हणतों, ती नव्हे. ती तर सर्वांजवळच कमीअधिक प्रमाणांत असते, पण 'विवेक' सर्वांजवळ असतो असें मात्र म्हणतां येणार नाही.

विवेक म्हणजे आत्मज्ञान. जो जगाला मार्गदर्शन करूं इच्छितो, तो आत्मज्ञानसंपन्न असला पाहिजे. जगाला बोध द्यायला निघणाऱ्याजवळ देण्यासाठीं बोधाचें भांडवल हवें. जितक्या प्रमाणांत कीर्तनकाराजवळ ही बोधशक्ति असेल, तितक्या प्रमाणांत त्याला मार्गदर्शन करतां येईल.

पण नुसता बोध असूनहि भागणार नाहीं. उपदेशकाजवळ वैराग्यहि हवें. वक्ता वैराग्यसंपन्न नसेल आणि तोच श्रोत्यांकडून कांहीं अपेक्षा करीत असेल तर मग त्याच्याकडून यथार्थ मार्गदर्शन होणारच कसें? आपलें तिसरें लग्न उरकून घेणाऱ्याच्या ब्रह्मचर्यावरील व्याख्यानावर कोण विश्वास ठेवील?

वारकरी कीर्तनांमधून ज्ञानेश्वरीचा व गाथेचा वापर करण्याचा प्रघात भाऊसाहेब कारीकर व नानामहाराज साखरे ह्या दोन वारकरी संतांनीं सुरू केला. मात्र तिला कीर्तनामध्यें मानाचें स्थान बोवांनीं मिळवून दिलें. बोवा प्रथम अभंगाचा भावार्थ सांगत आणि मग पूर्वपक्ष करून अभंगाचें मर्म श्रोत्यांना समजावून देत. कित्येकदां ते प्रारंभींच अभंगाची भूमिकाहि सांगत, कारण अभंगाचें मोल समजायला ती उमजणें आवश्यक असे. तिचा बोध झाल्याविना अभंगाचें स्थान कळणें शक्य नसे. ज्ञानेश्वरीसारखा टीकाग्रंथ समजावून घ्यायला मूळचा ग्रंथ उपयोगीं पडतो. अभंगाचे बाबतींत तें शक्य नसतें. ह्यामुळें त्यांची भूमिका जर प्रारंभीं सांगितली तर त्याच्या अर्थावर चटकन् प्रकाश पडतो.

भावार्थ सांगतांना बोवांचें एक वैशिष्ट्य म्हणजे अभंगाचीं सगळीं कडवीं साखळीप्रमाणें एकांत एक कशीं गुंतलीं आहेत, हें ते मोठ्या चतुरपणें दाखवीत. एकांतून दुसरें निघतें कसें, हें सांगतांना त्यांच्या प्रज्ञेचें कौशल्य प्रकर्षानें प्रकट होई. अभंगांतील मुख्य प्रमेय कोणतें आणि त्याच्या भोंवतीं बाकीच्या कडव्यांची रचना कशी, हें सागणें सोपें नाहीं. इथें बुद्धीचा कस लागतो. ती बोवांजवळ फार मोठ्या प्रमाणांत होती. कमळाच्या पाकळ्या जशा एकीमधून एक अशा फुटून निघतात, तशीं बोवांच्या कीर्तनामध्यें कडवीं एकामागून एक उमलून येत. तसेंच, अभंगांतील प्रमेयाशीं सुसंबद्ध असेल तोच वेदान्ताचा भाग बोवांच्या विवेचनांत असे.

बोवांच्या वैशिष्ट्यांपैकीं महत्त्वाचा विशेष म्हणजे त्यांची निरपेक्षता. कोणाजवळ कांहीं मागायचें नाहीं आणि कोणाचीहि भीडभाड ठेवून बोलायचें नाहीं. त्यांचा दुसरा विशेष म्हणजे भक्ति-कर्म-ज्ञान ह्यांचा उत्कृष्ट समन्वय. त्यांनीं भक्तीची वाट मोडून ज्ञान किंवा अद्वैतज्ञान सांगून भक्तीचा निरास कधींच केला नाहीं. मात्र पाखांडी ज्ञानी, पाखांडी भक्त, पाखांडी कर्मनिष्ठ, ढोंगी, पैसे घेऊन कीर्तनें करणारे ह्यांच्यावर ते टीकेची अतिशय झोड उठवीत.

ह्या सर्वांच्या जोडीला जें शारीरिक व्यक्तिमत्त्व लागतें, तसें तें त्यांच्याजवळ भरपूर प्रमाणांत होतें. त्यांची उंची पुरेपूर साडेसहा फूट! कुठल्याहि समाजांत गेले तरी सर्वांहून ते उंच दिसायचे. गोरे, भव्य, पीळदार शरीर, रुबाबदार सुंदर मुद्रा, अंतरांतलें समाधान व्यक्त करणारें तीव्ररचें सदाप्रसन्न स्मितहास्य, अशा ह्या रुबाबदार शरीरास शोभणारा पहिलवानी थाटाचा शुभ्र मलमलीचा सदरा, डोईस स्वच्छ रेशमी कोशा, अंगावर नागपुरी रुईकांठी उपरणें, जुन्या पद्धतीप्रमाणें काळा दोरा लावलेलें खिशांतील घड्याळ, असे हे बोवा कीर्तनाला उभे राहिले, कीं 'दर्शनाचिये प्रशस्ती पुण्यपुरुष' ह्या ज्ञानोबांनीं केलेल्या वर्णनाचा प्रत्यय येऊन श्रोते सुखावत आणि कीर्तनाला गर्दी करीत.

चारचार, पांचपांच हजार श्रोते कीर्तनास असावयाचे. खेड्यापाड्यांतून दहादहा कोसांवरून मुलांबायांसहित खेडूत गाड्या भरभरून यायचे. कीर्तन चारचार पांचपांच तास चालायचें. एवढा प्रचंड समाज, पण चित्रासारखा तटस्थ असायचा. टांचणी पडली तर ऐकूं येईल अशी निखळ शांतता असायची. कीर्तनांतून ते कोणालाहि उठूं देत नसत. ते म्हणत, कीं कीर्तनांतून उठून गेलांत तर पुण्यसंचयासाठीं आलेले तुम्ही पाप घेऊन जाल. सरकारी अधिकारी उपस्थित असलेली सभा सोडून कोणी उठून गेलें तर जसा त्या अधिकाऱ्याचा अपमान होतो त्याचप्रमाणें कीर्तन मध्येंच सोडून जाणें हा देवाचा अपमान आहे, अशी त्यांची शिस्त असे आणि ते ती कठोरपणें पाळवून घेत.

बोवा हे राष्ट्रीय वृत्तीचे संत, पण ते कोणाहि देशभक्ताचें कथानक कथेंत सांगत नसत. तसेंच, बोवांना संस्कृत मुळींच येत नसे. गायनहि बेताचेंच. सुरज्ञानापुरतें. पण ते वेदाचा अभिप्राय जाणून तो विठ्ठलाच्या आणि ज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपेनें बोलत. त्याला जोड त्यांच्या आध्यात्मिक मानसिक निजानंदाच्या भूमिकेची. ह्यामुळेंच त्यांच्या कीर्तनाला बहारीचा रंग येई.

बोवांनीं संतवाङ्मयाच्या अनुवादाच्या क्षेत्रांत केवढी मोलाची कामगिरी केली आहे, ह्याची अनेक लोकांना कल्पना नाहीं. १९०१ सालीं संतवाङ्मयाचे तत्कालीन विख्यात प्रकाशक श्री. आवटे ह्यांच्याकरवीं बोवांनीं वर्गीकरण केलेली तुकारामबुवांची गाथा प्रसिद्ध करविली आणि एका अर्थानें गाथेच्या अर्थाकडे जाण्याची 'सोपी पायवाट' तयार केली. त्यांनीं स्थिति, करुणा, उपदेश, देवाशीं संवाद इत्यादि कित्येक प्रकरणें पाडलीं असल्यानें बोवांच्या ह्या प्रयत्नामुळें अभंगांचा आशय ध्यानीं येण्यास फार मदत झाली आहे.

असें करतांना बोवांना प्रत्येक अभंग प्रज्ञेच्या ताजव्यांत तोलावा लागला असला पाहिजे. ह्या वर्गीकरणावरून बोवांची कुशाग्रबुद्धि, शब्दांचें मोल जाणण्यास लागणारी कल्पकता, प्रतिपाद्य विषयावरील प्रभुत्व, आध्यात्मिक विषयाचा सखोल अभ्यास, परमार्थांतील अपरोक्षानुभूति, मननपरता इत्यादि गुणांचा प्रकर्ष ध्यानीं येऊन त्यांची थोरवी कळूं लागते. बोवा पुरते मराठी चार इयत्ताहि न शिकलेले, संस्कृतचा तर गंधहि नाहीं, मार्गदर्शन करायलाहि कोणी नाहीं. अशा स्थितींत हें दुर्घट काम त्यांनीं केलें, ह्याचें कारण तुकारामबोवांची त्यांच्यावर असलेली कृपा हेंच म्हटलें पाहिजे. भंडारा डोंगरावर कित्येक दिवस एकान्तांत राहून त्यांनीं गाथ्याचा जो चिंतनपूर्वक अभ्यास केला त्याचाच परिणाम ह्या वर्गीकरणाच्या रूपानें प्रत्ययास आला. तुकारामबुवांचे अभंग दिसायला सोपे पण अर्थ लावायला ते तितकेच कठिण आहेत. अभंगांचें वर्गीकरण आणि संपूर्ण गाथेचा अर्थ ही सन्त–वाङ्मय–प्रकाशन कार्यास बोवांची एक अमोल देणगीच आहे. तावत्कालपर्यंत संतवाङ्मयाकडे पाहाण्याचे जे दोन दृष्टिकोन महाराष्ट्रांत रूढ होते, त्यांपैकीं संतवाङ्मय हें समाजाला तेजोहीन करणारें आहे, ह्या दृष्टिकोनाला बोवांनीं आपल्या ह्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत अत्यंत समर्पक उत्तर दिलें आहे. किंबहुना पुढील वारकरी सांप्रदायिकांच्या दृष्टीनें ही प्रस्तावना म्हणजे एक वैचारिक अभयपत्रच म्हटलें पाहिजे.

ह्या बाबतींत महत्त्वाची गोष्ट अशी, कीं बोवांनीं हें ग्रंथसंपादनाचें काम केवळ 'बहुजनहिताय' केलें. त्यासाठीं त्यांनीं एक कपर्दिकाहि घेतली नाहीं.

ह्या खालोखाल बोवांचा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे सार्थ अमृतानुभव हा होय. ह्या ग्रंथांत ओंवी समजण्यासाठीं म्हणून आवश्यक अशीं पूरक प्रमाणें देऊन बोवांनीं वेदान्ताची सुलभ चर्चा केली आहे. हा ग्रंथ १९०५ सालीं प्रकाशित झाला.

नामदेव–मंदिराचा ताबा नामदेव समाजाकडे आला आणि हें मंदिर आज सुस्थितींत भव्य स्वरूपांत उभें आहे, पण ह्या घटनेमागची प्रेरणा बोवांची होती; एवढेंच नव्हे तर त्यांनीं जातीनें लक्ष घातलें, म्हणूनच हें घडून आलें. ह्या मंदिराचा ताबा श्रीकेशवराज कमिटीकडे होता. बोवांच्या सांगण्यावरून त्या कमिटीच्या चिटणिसांनीं

मंदिराचे सर्व कागदपत्र नामदेव समाजानें स्थापन केलेल्या नवीन समितीच्या स्वाधीन केले आणि मंदिराचा ताबा नामदेव बंधूंकडे आला.

वारकरी पंथांतील लोकांस पद्धतशीर शिक्षण मिळावें म्हणून दि. २३-३-१९१७ रोजीं बोवांनीं 'वारकरी शिक्षण संस्था' आळंदीस स्थापन केली. ह्या संस्थेंत शिक्षणासाठीं एका पैचाहि खर्च येत नसे. विद्यार्थ्यांना कीर्तनाच्या शिक्षणाबरोबरच शेती, शिवणकाम इत्यादि विषयहि शिकविण्यांत येत असत. सदर संस्थेचें काम अजूनहि सुव्यवस्थित चालू आहे.

मानभाव हा पंथ जरी हिंदूंमधीलच एक उपपंथ असला तरी त्यांची आचारपद्धति अगदीं वेगळी. अभिनिवेशाच्या भरीस पडून वैदिक देवतांची निंदा वगैरे प्रकार त्यांच्या धर्मप्रचारकांकडून घडत असत. त्याची प्रतिक्रिया म्हणून वैदिक मतानुयायांनाहि तेंच शस्त्र वापरून कांहीं जाबसाल करावे लागत. बोवांनीं एकदां आपल्या कीर्तनांत ह्या शस्त्राचा वापर केल्यावरून मानभावांनीं त्यांच्यावर फिर्याद केली. बोवांवर मुख्य चार आरोप होते : (१) बोवांनीं मानभाव पंथाच्या उत्पत्तीविषयीं जो इतिहास सांगितला तो खोटा आणि विकृत आहे. (२) त्यांनीं मानभावांस अस्पृश्य म्हटलें. (३) त्यांनीं मानभावांस भिक्षा घालूं नये असें सांगितलें. (४) जो कोणी मानभावास शिवेल त्याच्या बेचाळीस पिढ्या नरकांत जातील, असें विधान त्यांनीं केलें.

पण निकाल बोवांच्या बाजूचा लागून बोवा दोषमुक्त सुटले.

बोवांच्या कीर्तन-प्रवचनांच्या श्रवणानें ज्यांच्या जीवनांत क्रांति झाली अशीं शेंकडों माणसें आहेत. दारू, गांजा अशांसारख्या व्यसनांपासून केवळ बोवांच्या उपदेशामुळें मुक्त झालेल्यांची संख्या शेंकड्यांनीं भरेल. कित्येक घराण्यांचें समूळ रूपच पालटून गेलें.

बोवा अकलंक ब्रह्मचारी होते, परम बुद्धिमान् होते, प्रत्युत्पन्नमति होते, थोडे थट्टेखोर होते, निःस्पृह होते, थोडे तापट पण परम दयाळु, कडक शिस्तीचे आणि उज्ज्वल देशभक्त होते. त्यांनीं ज्ञानेश्वरी नानामहाराज साखऱ्यांजवळ श्रवण केली, पण जें नानामहाराजांनीं सांगितलें तेथेंच बोवा थांबले नाहींत तर त्यांनीं ज्ञानेश्वरीचा स्वतंत्रपणें विचार केला. अत्यंत रसोत्कट अशी प्रवचनाची अगदीं नवीन रीत बोवांनीं परिपुष्ट केली; पण ह्याहून वेगळा बोवांचा महाराष्ट्रावर उपकार म्हणजे त्यांनीं तुकाराम महाराजांच्या अभंगांचें चिंतन करून केलेलें वर्गीकरण. बोवांनीं अभंगांचें वर्गीकरण करून तुकारामबुवांचा गाथा प्रसिद्ध केला. त्या अभंगांच्या प्रासंगिकत्वामुळें-स्फुटत्वामुळें त्यांचा आशय स्पष्ट करणें महाकर्म कठिण ! कोणत्या अभंगाच्या प्रगटीकरणाच्या वेळीं तुकारामबुवा कोणत्या भावावेशांत होते हें समजण्याजोगी तरल प्रतिभा आणि परकायाप्रवेशशक्ति अंगीं असणें आवश्यक आहे. बोवांच्या अंगीं ती भरपूर होती.

ह्या मार्गींतले पहिले पथिक ते. त्यांनीं प्रथम ही दुर्गम पायवाट शोधून इतर जनांसाठीं मोकळी केली. ह्या त्यांच्या कार्याचें महत्त्व ध्यानीं येण्यासाठीं साहित्यसम्राट् तात्यासाहेब केळकरांचें एक वाक्य ध्यानीं घेतलें कीं पुरे. ते म्हणाले होते, 'बोवांची इतकी खोल बुद्धि ! तुकारामांच्या अभंगांचा अर्थ त्यांनीं केला म्हणून समजतो, एरवीं तो कळला नसता !'

त्यानंतर हुरूप येऊन बोवांनीं ज्ञानेश्वरमाउली आणि निळोबा ह्यांचेहि गाथे असेच वर्गीकरण करून प्रकाशित केले. ज्ञानेश्वरी-भागवत इत्यादींचीं प्रवचनें जीं इतकीं रससमृद्ध होतात, तेंहि बोवांच्या प्रज्ञेचेंच फळ. एवढेंच नव्हे तर अमृतानुभवाचा त्यांनीं लावलेला स्वतंत्र अर्थ, हेंहि त्यांच्याच परिपक्व प्रज्ञेचें फळ.

गीतेचा अगदीं वेगळा अर्थ लावण्याचा जो एक महान् यत्न त्या काळांत झाला, त्याचाहि बोवांनीं केवळ वारकरी संतांच्या वाङ्मयाच्या अध्ययनांतच मग्न न राहातां, साकल्येंकरून विचार केला.

आपली सहा वर्षांची शिक्षा भोगून लोकमान्य टिळक मंडालेहून परतले ते बरोबर गीतारहस्य हा अमोल ग्रंथ घेऊन. ते पुण्यास आल्याबरोबर ज्यांनीं त्यांचें अत्यंत उत्साहानें स्वागत केलें, त्या मंडळीमध्यें बोवा पहिल्या रांगेंत होते. त्यानंतर गीतारहस्य प्रकाशित झालें. अनुकूल-प्रतिकूल टीकांचीं वादळें उसळलीं. बोवांनीं कवडेशास्त्री, पांगारकर इत्यादि सहकाऱ्यांसह नित्यनियमानें गीतारहस्य घेऊन बसून त्याचाहि सखोल अभ्यास केला. ह्याचें कारण इतकेंच, कीं इष्ट आणि न्याय्य असेल त्या नवीनाचा प्रकटपणें सत्कार करण्याला अवश्य असणारी निर्मळ बुद्धि त्यांच्याजवळ होती.

बोवा स्मरणाचे मोठे पक्के होते. कोण्या एका गोष्टीवर त्यांचें ध्यान केंद्रित झालेलें असलें, कीं मग त्यांच्या स्मरणशक्तीविषयीं नवल वाटे. त्यांचें पाठांतर अपार होतें आणि त्यांतला विषयानुकूल तो नेमका चरण आणि ती नेमकी ओंवी त्यांना पटकन् आठवत असे. कीर्तनाला उभे राहिल्यावर एकामागून एक प्रमाणें जणूं त्यांच्यासमोर उभीं ठाकत. कुठल्याहि अभंगावर बोलायला ते उभे राहिले, कीं इतकीं मोजकीं आणि नवीं नवीं प्रमाणें ते सांगत, कीं दररोजचे ऐकणारेहि आश्चर्यचकित होत.

हरिकीर्तन करून कुणी पैसे घेऊं लागला, कीं बोवा त्याच्यावर संतापत. 'तर मग पोट भरण्यासाठीं मी काय करूं?' ह्या प्रश्नावर ते लगेच उत्तर करीत, 'वाटेल तें कर! भंग्याचा धंदा केलास तरी चालेल, पण हरिनाम असें विक्रीस काढूं नकोस!'

बोवांची शिस्त अतिशय कठोर असे. बोलला शब्द पाळला गेलाच पाहिजे, ह्याविषयीं ते अतिशय दक्ष असत. इगतपुरीला असतांना एकदां त्यांनीं कीर्तन ठरविलें संध्याकाळीं चार वाजतां. चाराला पांचदहा मिनिटें कमी असतांना बोवा कीर्तनाच्या ठिकाणीं येऊन हजर झाले. पाहातात तों तेथें कोणीच नाहीं. ह्या अशा आडवेळीं श्रोते कीर्तनाला जमणार कसे?

बोवांच्या बरोबर जो मनुष्य होता तो हिरमुसून म्हणाला, 'आतां कसें बोवा?'

बोवा निग्रहानें म्हणाले, 'तूं भजन सुरू कर आणि नंतर श्रोता म्हणून पुढें बस. तुला एकट्याला कीर्तन ऐकवतों आज!'

आणि त्या एका श्रोत्यासमोर बोवांनीं त्या सायंकाळीं दोन अडीच तास कीर्तन केलें! बोवांचीं प्रवचनें आणि कीर्तनें ठरल्या वेळीं सुरू होणारच. श्रोता असो वा नसो!

बोवांच्या काळाच्या पूर्वीं वारकरी म्हणजे गबाळ्या अशीच सर्वसाधारण समजूत असे. शिक्षितांमध्यें तर वारकऱ्यांविषयीं नाकेंच मुरडलीं जात, पण बोवांचें कर्तृत्व असें, कीं आपलें प्रखर वैराग्य, अमोघ वक्तृत्व, एकान्तिक ज्ञाननिष्ठा इत्यादि गुणांमुळें त्यांनीं वारकऱ्यांना समाजांत उत्तम प्रतिष्ठा मिळवून दिली. तोंपर्यंत सुशिक्षितांमध्यें वारकऱ्यांचा जो अधिक्षेप होत असे, त्या जागीं टिळेमाळा लेणें हें मानाचें गणलें जाऊं लागलें.

बोवांच्या अंगच्या इतर सद्गुणांबरोबरच त्यांची प्रखर राष्ट्रभक्ति हेंहि त्या घटनेचें एक कारण होतें. त्या काळीं महाराष्ट्रांत राजकारणामध्यें दोन पक्ष होते, जहाल आणि मवाळ. लो. टिळक हे जहाल पक्षाचे पुढारी आणि बोवांचा पक्ष जहाल पक्ष. जन्मभर त्यांनीं स्वदेशी कपड्यावेगळा इतर कपडा वापरला नाहीं. आहारांतहि ते वर्तकी—म्हणजे देशी साखरेचाच उपयोग करीत. केवळ त्यांचे विचारच देशप्रेमानें ओथंबलेले नव्हते तर ते त्यांच्या आचारावाटेहि प्रगट होत असत. लोकमान्यांच्या अंतरंग मित्रांमध्यें बोवांची गणना होत असे. मंडालेहून परत आल्यानंतर ज्या कांहीं मित्रांना लोकमान्यांनीं वाड्यांत बोलाविलें, त्यांत बोवाहि होते. मद्यपाननिषेध, गोरक्षण इत्यादि त्या काळच्या राष्ट्रीय चळवळींत बोवा आणि त्यांचा शिष्यपरिवार मोठ्या उत्साहानें भाग घेत असत. लोकमान्यांनीं महाराष्ट्रास गणेशोत्सव दिला. त्या उत्सवांत लोकमान्यांबरोबर कित्येकदां त्यांच्या अध्यक्षतेखालींहि बोवांचीं व्याख्यानें होत असत.

ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, तुकोबांची गाथा इत्यादि उच्च आध्यात्मिक अनुभवांनीं समृद्ध ग्रंथांवर बोवांनीं एवढें प्रभुत्व मिळविलें होतें, कीं त्यांच्या प्रवचनांस ह. भ. प. पांगारकरांसारखे विद्वान् लोकदेखील आवर्जून उपस्थित राहावयाचे.

बोवांच्या चरित्रांतील एक अलौकिक भाग असा, कीं स्वतः बोधसंपन्न होऊन आपणास प्राप्त झालेला हा बोध, हा साधुसंतांचा निरोप त्यांनीं मुक्तहस्तानें जे जे त्यांच्याकडे शिकायला येत, त्यांना त्यांना शिकविला. जाहीर प्रवचनें, कीर्तनें करून आणि ग्रंथ लिहून जगाला दिला. संतांच्या निरोपाप्रमाणें ते स्वतः जन्मभर वागले. जरी बोवा नैष्ठिक ब्रह्मचारी, तरी खुशाल त्यांना जगाचे 'वडील' म्हणावें!

बोवांनीं आळंदी येथें जी वारकरी शिक्षणसंस्था स्थापन केली होती, तिला प्रापंचिक व्यापामध्यें आपल्या वांट्यास आलेला पंचवीस हजार रुपयांचा हुकूमनामा देणगी म्हणून देऊन टाकला! बोवांचा नेहमींच आग्रह असे, कीं भीक मागणारा आशाबद्ध वक्ता यथार्थ मार्गदर्शन करूं शकत नाहीं!

बोवा जबरदस्त सोशीक होते. त्यांना भगेंद्राचें दुखणें झालेलें असतांहि त्यांची पंढरपूरची वारी आणि तिथलीं कीर्तनें चुकलीं नाहींत. त्या काळीं बार्शी लाईट रेल्वेचा दगदगीचा प्रवास, पण त्यालाहि ते जुमानीत नसत. शिवाय त्यांना मधुमेहाचीहि व्यथा होतीच!

बोवांना शेवटचें दुखणें झालें कफक्षयाचें. ह्या तापानें त्यांना फारच छळलें, पण आजारांतहि ते आत्मविश्वासानें म्हणत, 'आम्ही आळंदीशिवाय दुसरीकडे मरणारच नाहीं!' बोवांचें ज्ञानेश्वरमाउलींवर अनन्यसाधारण—किंबहुना देवापेक्षांहि अधिक प्रेम! त्यामुळें आपला देह आळंदीस ज्ञानेश्वरांजवळ पडावा, अशी त्यांची इच्छा असणें स्वाभाविक होतें.

१९२० सालची माघ शुद्ध दशमी जवळ आली. बोवा आळंदीला जायच्या गोष्टी बोलूं लागले. पौर्णिमा उजाडली आणि दुसऱ्या दिवशीं पहांटे पुणें सोडण्याचा बोवांचा निश्चय जाहीर झाला. दोन घोड्यांच्या गाडींतून त्यांना आळंदीला नेण्यांत आलें.

बोवा त्यांच्या वारकरी शिक्षणसंस्थेंत उतरले. इंद्रायणीचें व ज्ञानेश्वरमहाराजांचें तीर्थ त्यांना आणून दिलें तोंपर्यंत साडेआठ वाजून गेले. मग बोवांच्या आज्ञेवरून त्यांना बसविण्यांत आल्यावर ते उत्तरेकडे तोंड करून बसले—आणि म्हणाले, 'जातों—'

त्यांनीं देह ठेवला, श्रीक्षेत्र आळंदींत–त्यांच्या प्रिय उपास्यदैवताशेजारीं, गुरुवारीं, उत्तरायणांत, माघ वद्य प्रतिपदा म्हणजे गुरुप्रतिपदा, सकाळीं नऊ वाजतां. गीतेंत योग्याच्या मरणाला जी शुभ वेळ सांगितली आहे, ती नेमकी त्यांनीं साधली. तेंहि मरण कसें? तर ते म्हणत त्याप्रमाणें, 'झांकिलिये घटींचा दिवा कुणाला न जाणवतां मालवावा,' तसें! ह्या महान् ज्ञानेश्वरभक्ताच्या जीवनाची इतिश्री ही अशी भाग्याची झाली!!

✤ ✤ ✤

सार्थ श्रीतुकारामाची गाथा

॥ सार्थ श्रीतुकारामाची गाथा ॥

सुंदर तें ध्यान उभा विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ॥ १ ॥ तुळशीहार गळां कासे पीतांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ २ ॥ मकर कुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणि विराजित ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥ [१]

समचरणदृष्टि विटेवरी साजिरी । तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥ १ ॥ आणीक नलगे मायिक पदार्थ । तेथें माझें आर्त नको देवा ॥ २ ॥ ब्रह्मादिक पदें दुःखाची शिराणी । तेथें चित्त झणी जडो देसी ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याचें कळलें आम्हां वर्म । जे जे कर्मधर्म नाशिवंत ॥ ४ ॥ [२]

सदा माझे डोळां जडो तुझी मूर्ती । रखुमाईच्या पती सोयरिया ॥ १ ॥ गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्व काळ ॥ २ ॥ विठो माऊलिये हाचि वर देईं । संचरोनि राहीं हृदयामाजीं ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं न मागें आणिक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥ ४ ॥ [३]

राजस सुकुमार मदनाचा पुतळा । रविशशिकळा लोपलिया ॥ १ ॥ कस्तुरी मळवट चंदनाची उटी । रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ २ ॥ मुकुट कुंडलें श्रीमुख शोभलें । सुखाचें ओतलें सकळही ॥ ३ ॥

विटेवर पांडुरंगाचें जें ध्यान उभें आहे, तें सुंदर असून कमरेवर हात ठेविले आहेत १. तुळशीचा हार गळ्यांत आहे आणि कंबरेला पीतांबर धारण केला आहे, असें हें ध्यान मला नेहमीं आवडतें २. माशाच्या आकाराप्रमाणें ज्याच्या कानांत कुंडलें झळकत आहेत आणि गळ्यामध्यें कौस्तुभ मणी धारण केला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें ध्यानच माझें सर्व सुख आहे. त्याचें सुशोभित मुख मी आवडीनें पाहीन ४. [१]

विटेवर ज्याचे सारखे जोडलेले चरण व दृष्टी सरळ असून सुशोभित आहे त्या ठिकाणीं हे हरी, माझी वृत्ति राहो १. हे देवा, ह्याहून जे निराळे मायिक पदार्थ आहेत त्या ठिकाणीं माझी इच्छा न जावो २. ब्रह्मादिकरून जीं पदें आहेत तीं सर्व दुःखाचीं आगरें आहेत. पण त्या पदांस भुलून कदाचित् मन तेथें जडेल, पण तसें होऊं देऊं नको ३. कारण त्याचें वर्म आम्हांस कळलें आहे; तें हें कीं, जीं कर्मै व धर्म आहेत ते सर्व नाशवंत आहेत, असें तुकाराम महाराज म्हणतात. ४. [२]

हे प्रियकरा, रखुमाईच्या वरा, सर्वकाळ माझे डोळे तुझ्या मूर्तीच्या ठिकाणीं लागून राहावेत १. देवा, तुझें रूप गोड (चांगलें) आहे व तुझें नामही चांगलें आहे. त्याविषयीं सर्वकाळ माझ्या मनांत प्रेम असूं दे २. हे विठाबाई आई, हाच वर मला दे, कीं निरंतर माझ्या हृदयांत प्रवेश करून राहावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्या पायांच्या ठिकाणीं सर्व सुख आहे. म्हणून दुसरें कांहीं मागत नाहीं ४. [३]

सुशोभित व नाजूक केवळ मदनाचा पुतळाच, ज्याच्या तेजांत सूर्यचंद्राच्या प्रभा लोपून गेल्या आहेत १. कपाळीं कस्तूरीचा मळवट भरलेला आहे व चंदनाची उटी अंगास लाविलेली आहे, ज्याच्या कंठांत वैजयंती माळ डोलत आहे २. मस्तकावर मुगुट व कानांत कुंडलें येणेंकरून श्रीमुख शोभलें आहे, जणूं काय सर्व सुखाचा रस करून तें श्रीमुख ओतलेलें आहे ३.

कासे सोनसळा पांघरे पाटोळा। घननीळ सांवळा बाइयांनो ॥ ४ ॥ सकळही तुम्हीं व्हा गे एकीसवा। तुका म्हणे जीवा धीर नाहीं ॥ ५ ॥ [४]

कर कटावरी तुळशीच्या माळा। ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥ १ ॥ ठेविले चरण दोन्ही विटेवरी। ऐसें रूप हरी दावीं डोळां ॥ २ ॥ कटीं पीतांबर कास मिरवली। दाखवीं वहिली ऐसी मूर्ती ॥ ३ ॥ गरुडपारावरी उभा राहिलासी। आठवे मानसीं तेंचि रूप ॥ ४ ॥ झुरोनि पांजरा होऊं पाहे आतां। येईं पंढरीनाथा भेटावया ॥ ५ ॥ तुका म्हणे माझी पुरवावी आस। विनंती उदास करूं नये ॥ ६ ॥ [५]

गरुडाचें वारिकें कासे पितांबर। सांवळें मनोहर कें देखेन ॥ १ ॥ बरविया बरवंटा घनमेघसांवळा। वैजयंती माळा गळां शोभे ॥ २ ॥ मुगुट माथां कोटी सूर्यांचा झल्लाळ। कौस्तुभ निर्मळ शोभे कंठीं ॥ ३ ॥ ओंतीव श्रीमुख सुखाचें सकळ। वामांगीं वेल्हाळ रखुमादेवी ॥ ४ ॥ उद्धव अक्रूर उभे दोहींकडे। वर्णिती पवाडे सनकादिक ॥ ५ ॥ तुका म्हणे नव्हे आणिकां सारिखा। तोचि माझा सखा पांडुरंग ॥ ६ ॥ [६]

नये जरी तुज मधुर उत्तर। दिधला सुस्वर नाहीं देवें ॥ १ ॥ नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल। येईल तैसा बोल रामकृष्णा ॥ २ ॥ देवापाशीं मागे आवडीची भक्ति। विश्वासेंशीं प्रीति भावबळें ॥ ३ ॥ तुका म्हणे मना सांगतों विचार। धरावा निर्धार दिसेंदिस ॥ ४ ॥ [७]

सावध झालों सावध झालों। हरिच्या आलों जागरणा ॥ १ ॥ पळोनिया गेली झोंप। होतें पाप आड तें ॥ २ ॥ तेथें वैष्णवांचे भार। जयजयकार गर्जतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे तया ठाया। ओळे छाया कृपेची ॥ ४ ॥ [८]

आपुलिया हिता जो होय जागता। धन्य मातापिता तयाचिया ॥ १ ॥ कुळीं कन्यापुत्र होती

कंबरेला जरीकांठी पीतांबर धारण केला आहे आणि अंगावर भरजरी शेला घेतला आहे, अहो बायांनो, मेघासारखा ज्याचा नीलवर्ण आहे ४. असें त्याचें श्रीमुख पाहिल्याखेरीज माझ्या जीवाला धीर निघत नाहीं म्हणून सर्व तुम्हीं एके बाजूस व्हा, असें तुकाराम महाराज म्हणतात ५. [४]

हे हरी, कंबरेवर हात आहेत आणि गळ्यांत तुळशीच्या माळा आहेत, असें तुझें रूप माझ्या डोळ्यांना दाखवावें १. आणि हे हरी, दोन्ही पाय विटेवर ठेविले आहेत असें रूप माझ्या डोळ्यांना दाखवावें २. कमरेला पीतांबराची कास शोभत आहे अशी तुझी मूर्ति त्वरेनें दाखीव ३. गरुडाच्या पारावर उभें राहिलेलें असें तुझें रूप माझ्या मनांत आठवतें ४. त्याच विषयींच्या झुरणीनें शरीर अस्थिपंजर होऊं पाहात आहे. ह्याकरितां हे पंढरीचे स्वामी, भेटावयास या ५. तुकाराम महाराज म्हणतात, माझी एवढी आशा पूर्ण करावी. ह्या प्रार्थनेचा अव्हेर करूं नये ६. [५]

गरुडरूपी घोड्यावर आरूढ झालेलें, कांसेला पितांबर कसलेलें, मनाला हरण करणारें असें हें श्यामसुंदर रूप मी केव्हां पाहीन? १. उत्तमांत उत्तम, मेघासारखें श्याम असणारें व वैजयंती माळ गळ्यांत शोभते असें २. मस्तकावर कोटीसूर्यांच्या तेजाप्रमाणें चकाकणारा असा मुगुट घातला आहे आणि गळ्यामध्यें निर्मळ कौस्तुभ शोभत आहे ३. श्रीमुख सर्व सुखाच्या रसाचें केवळ ओतलें आहे आणि डाव्या हाताला अति सुंदर रखुमाईदेवी आहे. ४. व दोन्ही बाजूंस उद्धव, अक्रूर उभे आहेत आणि सनकादिक कीर्ति वर्णन करीत आहेत ५. तुकाराम महाराज म्हणतात, अन्य कोणाहीसारखा ज्याला म्हणतां येत नाहीं असा जो तोच माझा प्रिय सखा पांडुरंग आहे ६. [६]

मधुर शब्दानें तुला गातां येत नसेल, देवानें तुला जरी उत्तम स्वर दिला नसला १. तरी त्यावांचून विठ्ठल भुकेला नाहीं. जसें तुला ज्या स्वरानें रामकृष्ण भजन करितां येईल तसें कर २. विश्वासानें, प्रीतीनें, भावबळानें देवापाशीं आवडीची भक्ति माग ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे मना, तुला हा विचार सांगतों ह्याविषयीं दिवसेंदिवस निर्धार धर ४. [७]

सावध झालों असें द्विरुक्तीनें सांगतात आणि हरीजागरा आलों १. त्या योगानें माझ्या आड जी पापरूपी झोंप होती ती पळून गेली २. तेथें वैष्णवांचा समुदाय असून हरिनामाच्या जयजयकाराची गर्जना होत आहे. ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या ठिकाणीं कृपेची छाया वळते ४. [८]

जो आपले हिताविषयीं जागा आहे त्याचे आईबाप धन्य आहेत १. कुळामध्यें जीं कन्यापुत्र सात्त्विक होतात त्यांचा

जीं सात्विक। तयाचा हरिख वाटे देवा ॥ २ ॥ गीता भागवत करिती श्रवण। अखंड चिंतन विठोबाचें ॥ ३ ॥ तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा। तरी माझ्या दैवा पार नाहीं ॥ ४ ॥ [९]

अंतरींची घेतो गोडी। पाहे जोडी भावाची ॥ १ ॥ देव सोयरा देव सोयरा। देव सोयरा दीनाचा ॥ २ ॥ आपुल्याच वैभवें। शृंगारावें निर्मळ ॥ ३ ॥ तुका म्हणे जेवी सवें। प्रेम द्यावें प्रीतीचें ॥ ४ ॥ [१०]

सुखें वोळंबा दावी गोहा। माझें दुःख नेणा पहा ॥ १ ॥ आवडीचा मारिला वेडा। होय होय कैसा म्हणे भिडा ॥ २ ॥ अखंड मज पोटाची व्यथा। दूधभात साखर तूप पथ्या ॥ ३ ॥ दोपाहरा मज लहरी येती। शुद्ध नाहीं पडे सूपति ॥ ४ ॥ नीज नये खालीं घालीं फुलें। जवळीं न साहती मुलें ॥ ५ ॥ अंगीं चंदन लाविलें भाळीं। सदा शूळ माझे कपाळीं ॥ ६ ॥ निपट मज न चले अन्न। पायली गहूं सांजा तीन ॥ ७ ॥ गेले वारीं तुम्ही आणिली साकर। सात दिवस गेली साडे दहा शेर ॥ ८ ॥ हाड गळोनि आलें मास। माझें दुःख तुम्हां नेणवे कैसें ॥ ९ ॥ तुका म्हणे जिता गाढव केला। मेलियावरि नरका गेला ॥ १० ॥ [११]

पावलें पावलें तुझें आम्हां सर्व। दुजा नको भाव होऊं देऊं ॥ १ ॥ जेथें तेथें देखें तुझींच पाउलें। त्रिभुवन संचलें विठ्ठला गा ॥ २ ॥ भेदाभेद मतें भ्रमाचे संवाद। आम्हां नको वाद त्याशीं देऊं ॥ ३ ॥ तुका म्हणे अणु तुजविण नाहीं। नभाहुनि पाहीं वाड आहे ॥ ४ ॥ [१२]

पुढें गेले त्यांचा शोधीत मारग। चला जाऊं माग घेत आम्हीं ॥ १ ॥ वंदूं चरणरज सेवूं उष्टावळी। पूर्वकर्मा होळी करुनी सांडूंया ॥ २ ॥ अमुप हें गांठी बांधू भांडवल। अनाथा विठ्ठल आम्हां जोगा ॥ ३ ॥ अवघे होती लाभ एका या चिंतनें। नामसंकीर्तनें गोविंदाच्या ॥ ४ ॥

देवाला आनंद वाटतो २. जे निरंतर गीताभागवत श्रवण करितात आणि सदासर्वकाळ विठोबाचें चिंतन करितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर मला त्यांची सेवा घडेल तर माझ्या दैवाला पार नाहीं. ४. [९]

देव हा आपल्याविषयीं भक्ताच्या अंतःकरणांत असणाऱ्या गोडीचें ग्रहण करतो आणि आपल्याविषयीं त्याच्या अंतःकरणांत भावाची जोड किती आहे हें पाहातो १. देव हा दीनाचा दयाळ आहे २. देव हा आपले ऐश्वर्यानें त्याला स्वच्छ श्रृंगार करतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव त्याच्याबरोबर जेवतो आणि आपल्याविषयींचें प्रेम देतो ४. [१०]

एक स्त्री सुखी असून आपले नवऱ्यास सोंग दाखविते. ती म्हणते अहो, माझें दुःख तुम्ही जाणत नाहीं व पाहातही नाहीं १. तिचा पती तिच्या आवडीनें वेडा झाल्यामुळें तिच्या भिडेनें होय होय असें म्हणतो २. अहो मला पोटाची व्यथा आहे. दूधभात साखर तूप मला पथ्याला लागतें ३. दोनप्रहरीं मला लहरी येतात आणि मीं आंथरुणावर बेशुद्ध झोंपेंत पडतें ४. मला झोंप येत नाहीं म्हणून अंगाखालीं शय्येवर फुलें घालितें. जवळ हीं मुलें किरकिर करितात हें मला सहन होत नाहीं ५. रोज मी अंगाला व कपाळाला चंदन लावितें कारण माझ्या कपाळाला नेहमीं शूळ असतो ६. अहो, हाड गळून मला मास आलें आणि एवढें हें माझें दुःख तुम्हांस कसें कळत नाहीं ७. अहो, गेल्यावारीं तुम्ही साडेदहा शेर साखर आणली होती ती सात दिवसांत संपली ८. ती त्याला म्हणते, मला मुळींच अन्न चालत नाहीं. तीन वेळेला मिळून पायलीभर गव्हांचा सांजा लागतो ९. तुकाराम महाराज म्हणतात, तिनें नवऱ्याला जिवंत असतांना गाढव केला म्हणून तो मेल्यावर नरकास गेला १०. [११]

अहो देवा, तुमचें सर्व कांहीं आम्हांस प्राप्त झालें. आतां एवढेंच मागणें कीं दुसरा कांहीं भाव माझे अंतःकरणांत होऊं देऊं नका १. अगा विठ्ठला, जेथें पाहातों तेथें तुमचींच पावलें भासतात. सर्व त्रैलोक्य तुमच्या स्वरूपानें भरलें आहे २. भेद व अभेद ह्या मताविषयींचे संवाद भ्रमांतले आहेत, म्हणून त्या मतवाद्यांशीं आम्हांला वाद करण्याचा प्रसंग येऊं देऊं नका ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या स्वरूपाहून अणूरेणू देखील वेगळा भासत नाहीं. आकाशाहीपेक्षा तुमचें स्वरूप मोठें आहे ४ १२]

जे पुढें गेले आहेत त्यांचा आपण माग घेत व मार्ग शोधीत जाऊं चला १. त्यांचे पायाच्या रजःकणांचें सेवन करूं आणि उच्छिष्ट सेवन करूं. त्यायोगेंकरून केलेलें पूर्वकर्म जाळून टाकूं. २. आम्हां अनाथांजोगा विठ्ठल आहे म्हणून तें असंख्य भांडवल पदरीं बांधूं ३. कारण ह्या एका गोविंदाच्या चिंतनानें व नामसंकीर्तनानें संपूर्ण लाभ होतात ४.

जन्म मरणाच्या खुंटतील खेपा। होईल हा सोपा सिद्ध पंथ ॥ ५ ॥ तुका म्हणे घालूं जीवपण चिरा। जाऊं त्या माहेरा निजाचिया ॥ ६ ॥ [१३]

जेविले ते संत मागें उष्टावळी। अवघ्या पत्रावळी करुनि झाडा ॥ १ ॥ सोंवळ्या ओंवळ्या राहिलों निराळा। पासूनि सकळां अवघ्या दूरी ॥ २ ॥ परें परतें मज न लगे सांगावें। हें तो देवें बरें शिकविलें ॥ ३ ॥ दुसऱ्यातें आम्ही नाहीं आतळत। जाणोनि संकेत उभा असे ॥ ४ ॥ येथें कोणी कांहीं न धरावी शंका। मज चाड एका भोजनाची ॥ ५ ॥ लांचावला तुका मारीतसे झड। पुरविलें कोड नारायणें ॥ ६ ॥ [१४]

देवाच्या प्रसादें करा रे भोजन। व्हाल कोण कोण अधिकारी ते ॥ १ ॥ ब्रह्मादिकांसि हें दुलर्भ उच्छिष्ट। नका मानूं वीट ब्रह्मरसीं ॥ २ ॥ अवघियांपुरतें वोसंडलें पात्र। अधिकार सर्वत्र आहे येथें ॥ ३ ॥ इच्छादानी येथें वळला समर्थ। अवघेचि आर्त पुरवितो ॥ ४ ॥ सरे येथें ऐसें नाहीं कदा काळीं। पुढती वाटे कवळीं घ्यावें ऐसें ॥ ५ ॥ तुका म्हणे पाक लक्ष्मीच्या हातें। कामारी सांगातें निरुपम ॥ ६ ॥ [१५]

अवगुणांचे हातीं। आहे अवघीच फजीती ॥ १ ॥ नाहीं पात्रासवें चाड। प्रमाण तें फिकें गोड ॥ २ ॥ विष तांब्या वाटी। भरली लावूं नये होटीं ॥ ३ ॥ तुका म्हणे भाव। शुद्ध बरा सोंग वाव ॥ ४ ॥ [१६]

हरिच्या जागरणा। जातां कां रे नये मना ॥ १ ॥ कोठें पाहासील तुटी। आयुष्य वेंचे फुकासाटीं ॥ २ ॥ ज्यासी तुज गुंती। ते तों मोकलिती अंतीं ॥ ३ ॥ तुका म्हणे बरा। लाभ कोण तो विचारा ॥ ४ ॥ [१७]

धर्माची तूं मूर्ति। पाप पुण्य तुझे हातीं ॥ १ ॥ मज सोडवीं दातारा। कर्मापासूनि दुस्तरा ॥ २ ॥ करिसी अंगीकार। तरी काय माझा भार ॥ ३ ॥ जिवींच्या जीवना। तुका म्हणे नारायणा ॥ ४ ॥ [१८]

आणखी जन्ममरणाच्या येरझारा त्याही कुंठित होतात आणि अशा प्रकारचा हा सर्व पंथांत सिद्ध पंथ सोपा होईल ५. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या जीवपणावर चिरा (दगड) घालून निजात्मरूपीं माहेराला जाऊं ६. [१३]

जे संत जेविले आहेत त्यांच्या अवघ्या पत्रावळींचा झाडा करून उच्छिष्ट मी मागतों १. सर्व सोंवळ्या ओंवळ्यापासून मी निराळा झालों आहें २. परावाणीच्या परतें जें तत्त्व आहे तें मला आतां सांगूं नये, कारण देवानें तें मला उत्तम शिकविलें आहे. ३. आम्ही दुसरेपणाला स्पर्श करीत नाहीं हा आमचा संकेत जाणून तो उभा आहे ४. ह्या ठिकाणीं कोणीं कांहींही शंका धरूं नये. माझ्या ठिकाणीं तर एक जेवणाचीच इच्छा आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, मी ह्या जेवणाला लालचावलों आहें म्हणून मी त्या भोजनावर झडप मारीत आहें, हें पाहून नारायणानें माझी इच्छा पूर्ण केली ६. [१४]

जे कोणी अधिकारी असाल ते देवाच्या प्रसादानें जेवा १. कारण हें उच्छिष्ट ब्रह्मादिकांना दुर्मिळ आहे म्हणून ब्रह्मरसाचा तुम्ही वीट मानूं नका २. सर्वांना पुरेल असा पात्र भरून रस उचंबळला आहे आणि तो सेवन करण्याचा सर्वांना अधिकार आहे ३. आणि जो इच्छा करील ती त्यास देण्यास समर्थ असा दाता येथें प्राप्त झाला आहे म्हणून तो सर्वांची सर्व इच्छा पूर्ण करितो ४. आणि हा रस कोणी कितीही सेवन केला तरी कोणत्याही काळीं तो रस संपत नाहीं आणि कितीही सेवन केला तरी त्याचा वीट न येतां पुन्हां त्याचा ग्रास घ्यावासा वाटतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, हा स्वयंपाक जो आहे तो जगन्माता लक्ष्मी जी निरुपम व देवाच्या बरोबर असणारी स्वयंपाकीण तिच्या हातें घ्यावा ६. [१५]

अवगुणाचे हातांतच संपूर्ण फजीती आहे १. चांगल्या वाईट धातूचें भांडें पाहाण्याची जरूरी नाहीं, त्यांतील चांगला वाईट रस हा ग्राह्य त्याज्य आहे २. एक तांब्याची वाटी विषानें भरली आहे. जरी तें तांबें पवित्र आहे तरी त्यांतील विष पिऊं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, भाव हा शुद्धच चांगला. सोंगाड्या भाव उगीच पोकळ आहे. [१६]

अरे हरीच्या जागरणाला जाण्याविषयीं तुझ्या मनाला कां येत नाहीं ? १. या प्रपंचसंगतीनें जें तुझें आयुष्य फुकट गेलें तें नुकसान तूं कोठें भरून काढशील ? २. तर ज्या स्त्रीपुत्रांच्या मोहाला तूं गुंतला आहेस ते तुला प्रयाणकाळीं सोडून देतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो उत्तम लाभ आहे त्याचा तुम्हीं विचार करा ४. [१७]

अहो देवा, तुम्हीं केवळ धर्माचीच मूर्ति आहांत आणि पापपुण्य हें तुमच्याच हातीं आहे. १. ह्यास्तव हे दातारा, संपूर्ण पापपुण्यात्मक दुस्तर कर्मापासून मला सोडवा २. जर देवा तुम्हीं माझा अंगीकार कराल तर तुम्हाला माझें काय ओझें होईल ? ३. हें जीवींचा जीवन जो नारायण त्याजवळ तुकाराम महाराज म्हणतात ४. [१८]

ब्रह्मादिक जया लाभासि ठेंगणे। बळिये आम्ही भले शरणांगत॥१॥ कामनेच्या त्यागें भजनाचा लाभ। झाला पद्मनाभ सेवाऋणि ॥ २ ॥ कामधेनुचिया क्षीरा पार नाहीं। इच्छेचिये वाही वरुपावें॥ ३ ॥ बैसलिया ठायीं लागलें भरतें। त्रिपुटीवरतें भेदी ऐसें ॥ ४ ॥ हारि नाहीं आम्हां विष्णुदासां जगीं। नारायण अंगीं विसावला॥५॥ तुका म्हणे बहु लाटें हें भोजन। नाहीं रिता कोण रहात राहों॥६॥ [१९]

दुजे खंड तरी। उरला तो अवघा हरि। आपणाबाहेरि। नलगे ठाव धुंडावा ॥ १ ॥ इतुलें जाणावया जाण। कोड तरी मनें मना। पारधीच्या खुणा। जाणे तेणेंचि साधाव्या ॥ २ ॥ देह आधीं काय खरा। देहसंबंध पसारा। बुजगावणें चोरा। रक्षणसें भासतसे ॥ ३ ॥ तुका करी जागा। नको वासपूं वाउगा। आहेसि तूं अंगा। अंगीं डोळे उघडी ॥ ४ ॥ [२०]

विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ ॥ १ ॥ आइका जी तुम्हीं भक्त भाग-वत। कराल तें हित सत्य करा ॥ २ ॥ कोणाही जिवाचा न घडावा मत्सर। वर्म सर्वेश्वर-पूजनाचें ॥ ३ ॥ तुका म्हणे एका देहाचे अवयव। सुख दुःख जीव भोग पावे ॥ ४ ॥ [२१]

आम्ही तरी आस। जालों टाकोनि उदास ॥ १ ॥ आतां कोण भय धरी। पुढें मरणाचें हरी ॥ २ ॥ भलते ठायीं पडो। देह तुरंगीं हा चढो ॥ ३ ॥ तुमचें तुम्हांपाशी। आम्हीं आहों जैसीं तैसीं ॥ ४ ॥ गेले मानामान। सुखदुःखाचें खंडन ॥ ५ ॥ तुका म्हणे चित्तीं। नाहीं वागवीत खंती ॥ ६ ॥ [२२]

निंदी कोणी मारी। वंदी कोणी पूजा करी॥१॥ मज हेंही नाहीं तेंही नाहीं। वेगळा दोहींपासूनी॥२॥ देहभोग भोगें घडे। जें जें जोडे तें तें बरें॥३॥ अवघें पावे नारायणीं। जनार्दनीं तुकयाचें ॥ ४॥ [२३]

ज्या लाभाला ब्रह्मादिक सुद्धां लहान आहेत त्या विषयीं आम्हीं शरणागत चांगले बळी आहोंत १. आम्हाला भजनाचा लाभ जो झाला आहे तो केवळ कामनेच्या त्यागानें आणि त्यायोगानें आमचा पद्मनाभ, आमच्या सेवेचें ऋण घेतलें आहे असा ऋणकरी झाला आहे. २. कामधेनु जी असते तिच्या दुभत्याला पार नाहीं. इच्छेच्या ओघाप्रमाणें ती दुग्धाचा वर्षाव करिते. ३. त्रिपुटीच्यावर भेद करून जाईल असें आम्हांला बसल्या ठिकाणीं भरतें लागलें आहे ४. आम्हां विष्णुदासांना जगतामध्यें पराजय नाहीं, कारण आमचे अंगीं नारायण स्थिर झाला आहे. ५. तुकाराम महाराज म्हणतात, हें भोजन मोठें बळकट आहे. येथें कोणीही उपाशी राहात नाहीं ६. [१९]

द्वैताचा निरास झाला म्हणजे खालीं अवशेष एक हरीच राहातो. त्याला शोधण्यास आपल्या बाहेरच्या ठिकाणीं जावयास नको १. एवढेंच जाणण्याची जर इच्छा असेल तर मनानेंच मनाला जाणा. पारध्याच्या खुणा ज्या आहेत त्या पारध करणारांनींच जाणाव्या २. आधीं देह हाच मुळीं खरा नाहीं, तर देहासंबंधीं स्त्रीपुत्रगृहादिक हें कोठून खरें असणार? त्याचें दिसणें शेतांतील बुजगावणें जसें चोरास रक्षक आहे असें सत्य भासतें त्याप्रमाणें होय ३. आपल्या स्वरूपाच्या विस्मृतीरूप निद्रेनें निजलेल्या जीवास तुकाराम महाराज जागें करितात, म्हणजे यास सांगतात कीं अरे तूं व्यर्थ भिऊं नकोस. तूं अंगानेंच परमात्मरूप आहेस हें तुला तुझ्या अंगची म्हणजे आत्मिक दृष्टी आहे ती उघडून पाहशील तर तुला समजून येईल ४. [२०

सर्व जगत् विष्णुमय जाणणें हाच वैष्णवांचा धर्म आहे. भेदाभेद, मतविचार हा केवळ अमंगळ भ्रम आहे १. अहो तुम्ही भागवत भक्त ऐका, आणि जें हित करावयाचें असेल तें खरें करा २. कोणाच्याही जीवाचा मत्सर करूं नये. हेंच सर्वेश्वरपूजनाचें वर्म आहे ३ तुकाराम महाराज म्हणतात, ज्ञानेंद्रियें कर्मेंद्रियें हीं एकाच देहाचे अवयव आहेत आणि त्यांनी सेवन केलेल्या विषयाचें सुखदुःख भोगणारा अंतर्यामीं एक जीवच आहे ४. [२१]

आम्ही तर सर्व आशा टाकून उदास झालों १. अहो हरी, आतां मरणाचें भय कोण धरतो? २. पाहिजे तेथें देह पडो किंवा घोड्यावर बसो ३. होणारे सुखःदुखादि भोग हे सर्व तुमचेच आहेत ते तुम्हापाशींच असोत. आम्हीं त्यांचा संबंध न घेतां जसेच्या तसेच आहोंत ४. मान आणि अपमान हे दोन्हीं जाऊन सुखदुःखाचा नाश झाला. ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यासंबंधाची चित्तांत बिलकूल तळमळ वागवीत नाहीं ६. [२२]

आमची कोणी निंदा करोत अगर आम्हांला कोणी मारोत, कोणी आमचें वंदन करोत अगर कोणी आमची पूजा करोत १. मला पहिल्याचें दुःख नाहीं व दुसऱ्याचें सुखही नाहीं. ह्या दोहींहून मी वेगळा आहें २. जे जे म्हणोन सुखदुःखादि भोग होतात ते सारे देहप्रारब्धानें देहालाच होतात, म्हणून ज्या वेळेला जे भोग होतात ते आम्हांला बरेच आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, कारण ते आम्हांला प्राप्त न होतां आमचा स्वामी जो जनार्दन त्याच्याकडे जातात ४. [२३]

जन विजन झालें आम्हां । विठ्ठलनामाप्रमाणें ॥ १ ॥ पाहें तिकडे बापमाय । विठ्ठल आहे रखुमाई ॥ २ ॥ वन पट्टण एकभाव । अवघा ठाव सरता झाला ॥ ३ ॥ आठव नाहीं सुखदुःखा । नाचे तुका कौतुकें ॥ ४ ॥ [२४]

हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं ॥ १ ॥ तोचि मोल पावे खरा । करणीचा होय चुरा ॥ २ ॥ मोहरी तोचि अंगें । सूत न जळे ज्याच्या संगें ॥ ३ ॥ तुका म्हणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ॥ ४ ॥ [२५]

आलिंगन घडे । मोक्ष सायुज्यता जोडे ॥१॥ ऐसा संतांचा महिमा । जाली बोलायाची सीमा ॥२॥ तीर्थें पर्वकाळ । अवघीं पायांपें सकळ ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । त्यांची केली पावे सेवा ॥ ४ ॥ [२६]

माझिया मीपणा । झाला यावरी उगाणा ॥ १ ॥ भोगी त्यागी पांडुरंग । त्यानें वसविलें अंग ॥ २ ॥ टाळिलें निमित्त । फार थोडें घात हित ॥ ३ ॥ यावें कामावरी । तुका म्हणे नाहीं उरी ॥ ४ ॥ [२७]

सकळ चिंतामणी शरीर । जरी जाय अहंकार समूळ आशा । निंदा हिंसा नाहीं कपट देहबुद्धि । निर्मळ स्फटिक जैसा ॥ १ ॥ मोक्षाचें तीर्थ नलगे वाराणसी । येती तयापाशीं अवघीं जनें । तीर्थांसी तीर्थ झाला तोचि एक । मोक्ष तेणें दर्शनें ॥ २ ॥ मन शुद्ध तया काय करिसी माळा । मंडित सकळा भूषणांसी । हरिच्या गुणें गर्जताती सदा । आनंद तयां मानसीं ॥ ३ ॥ तन मन धन दिलें पुरुषोत्तमा । आशा नाहीं कवणाची ॥ तुका म्हणे तो परिसाहूनि आगळा । काय महिमा वर्णू त्याची ॥ ४ ॥ [२८]

जन अगर जनरहित सर्व आम्हांला विठ्ठलनामाप्रमाणेंच झाले आहेत १. जिकडे पाहातों तिकडे विठ्ठल बाप व रखुमाबाई आई भरलेली आहे असें दिसतें २. वन असो अगर शहर असो आमचेमध्यें तत्संबंधीं एकच भाव आहे. सर्व ठिकाणीं योग्य असें पांडुरंगरूपच भासतें. ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही ह्या ऐक्यभावाच्या आनंदांत कौतुकानें नाचतों. यामुळें आमचें चित्त सुखदुःखाच्या अनुभवाला विसरलें आहे ४. [२४]

हिरा हा ऐरणीवर ठेवून मोठ्या हातोड्यानें त्याजवर मारलें असतांही तो फुटत नाहीं १. तोच खऱ्या किंमतीला उतरतो; दुसरे जे बनावट असतात त्यांचें घावाबरोबर पीठ होतें २. ज्याला सूत गुंडाळून अग्नींत टाकिलें असतां सूत जळत नाहीं तोच खरा मोहरा आहे असें ठरतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अनेक प्रकारचे जगाचे उपद्रव शांतपणानें जो सहन करितो त्यालाच संत म्हणावें ४. [२५]

संतांना भेटल्याबरोबर मोक्षसायुज्याचा लाभ होतो १. एवढा हा संतांचा अधिकार आहे. ही त्यांच्या अधिकाराच्या वर्णनाची परमावधीच आहे २. जेवढे म्हणून पर्वकाळ व तीर्थें तीं सर्व ज्याच्या पायाशीं सर्वकाळ नांदतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या पुरुषाची सेवा केली असतां देवाला पोहोंचते ४. [२६]

देहाविषयींचा माझा मीपणा जो आजपावेतों होता त्याचा येथून पुढें सर्व निरास झाला १. आतां आमच्या अंगामध्यें तोच राहातो आहे आणि भोगणें आणि टाकणें हें जें सर्व कांहीं होत आहे, तें पांडुरंगच करीत आहे २. थोडे फार घात अगर हित होण्याचें जें कारण तें टाकून दिलें ३. आतां कामादिक वृत्ति वर येण्याइतका आमचेमध्यें अवशिष्ट भाव राहिला नाहीं, असें तुकाराम महाराज म्हणतात ४. [२७]

ज्याचा सर्व अहंकार गेला आहे आणि निंदा, हिंसा, कपटादिक व्यवहार ज्याचेमध्यें नाहीं आणि देहबुद्धीही नाहीं तो निर्मळ स्फटिकासारखा स्वच्छ आहे. फार काय सांगावें त्याचें सर्व शरीर चिंतामणिरूपच आहे १. मोक्ष देणारें तीर्थ जी काशी तिची त्यांना जरूरी राहिली नाहीं. सर्व जग वरतीं निर्दिष्ट केलेल्या पुरुषापाशींच येतें; कारण जेवढीं म्हणून पावन करणारीं तीर्थें आहेत त्या सर्व तीर्थांना पावन करणारा हा तीर्थच झाला आहे. आणि ज्याच्या दर्शनांत मोक्षलाभ होतो २. ज्याचें मन शुद्ध झालें आहे त्याला बाह्य माळादिक चिन्हांची कांहीं जरूरी राहिली नाहीं. एक मन शुद्ध असल्यानेंच सर्व भूषणानें तो मंडित होतो. आणि जे निरंतर हरीच्या गुणानुवादाची गर्जना करितात त्यांच्या मनांत निरंतर आनंद आहे ३. आणि ज्यानें आपला देह, मन व द्रव्य हें पुरुषोत्तमास अर्पण केलें आहे आणि ज्याला कोणाचीही अशा नाहीं, तुकाराम महाराज म्हणतात, असा जो पुरुष आहे तो परिसापेक्षांही अधिक आहे. त्याचा महिमा किती वाणीनें वर्णन करावा ? ४. [२८]

आहे तें सकळ कृष्णासी अर्पण । न कळतां मन दुजें भावी ॥ १ ॥ म्हणऊनी पाठी लागतील भूतें । येती शिवसीत पांच जणें ॥ २ ॥ ज्याचें त्या वंचलें आठव न होतां । दंड या निमित्ताकारणें हा ॥ ३ ॥ तुका म्हणे काळें चेंपियेला गळा । मी मी वेळोवेळा करीतसे ॥ ४ ॥ [२९]

महारासी शिवे । कोपे ब्राम्हण तो नव्हे ॥ १ ॥ तया प्रायश्चित्त कांहीं । देहत्याग करितां नाहीं ॥ २ ॥ नातळे चांडाळ । त्याचा अंतरीं विटाळ ॥ ३ ॥ ज्याचा संग चित्तीं । तुका म्हणे तो ते याती ॥ ४ ॥ [३०]

तेलणीशीं रुसला वेडा । रागें कोरडें खातो भिडा ॥ १ ॥ आपुलें हित आपण पाही । संकोच तो न धरी कांहीं ॥ २ ॥ नाडिलें लोकां टाकिला गोहो । बोडिलें डोकें सांडिला मोहो ॥ ३ ॥ शेजारणीच्या गेली रागें । कुतऱ्यांनीं घर भरिलें मागें ॥ ४ ॥ पिसारागें भाजिलें घर । नागविलें तें नेणें फार ॥ ५ ॥ तुका म्हणे वाच्या रागें । फेडिलें सावलें देखिलें जगें ॥ ६ ॥ [३१]

मज दास करी त्याचा । संत दासाच्या दासाचा ॥ १ ॥ मग होत कल्पवरी । सुखें गर्भवास हरी ॥ २ ॥ नीच वृत्ति काम । परी मुखीं तुझें नाम ॥ ३ ॥ तुका म्हणे सेवे । माझे संकल्प वेंचावे ॥ ४ ॥ [३२]

सदा तळमळ । चित्ताची हे हळहळ ॥ १ ॥ त्याचें दर्शन न व्हावें । शव असतां तो जिवें ॥ २ ॥ कुशब्दाची घाणी अमंगळविली वाणी ॥ ३ ॥ नेणें शब्द पर । तुका म्हणे परउपकार ॥ ४ ॥ [३३]

जेवढीं कांहीं कर्मे होत आहेत, तीं सर्व कृष्णाच्याच सत्तेनें होत असून कृष्णालाच अर्पण होत आहेत, परंतु अविवेकी जे जीव आहेत त्यांना हें वर्म कळत नाहीं. तीं सर्व मीं केलीं अशी द्वैतभावना धरितात १. त्यामुळें त्यांच्या मागें भूतें लागलीं आहेत. म्हणजे पंचमहाभूतात्मक देह त्यांना शोधीत येतो २. सर्व कर्मे हरीचींच असून तीं हरीचीं हरीला अर्पण करण्याविषयींची आठवण न धरिल्यामुळें वारंवार पंचभूतांचा देह घेऊन जन्मावें व मरावें हा दंड मागें लागला ३. तुकाराम महाराज म्हणतात, काळानें ह्या मूर्खाचा गळा जरी चेपला आहे तरी तो मी मी असें वेळोवेळीं म्हणतच आहे ४. [२९]

क्रोधरूपी महाराला ज्याचें हृदय शिवतें तो ब्राह्मण नाहीं. १. त्या ब्राह्मणानें देहांतप्रायश्चित्त जरी घेतलें तरी त्याची शुद्धी होत नाहीं २. ज्या क्रोधरूपी चांडाळाला कधींही शिवूं नये त्याचा निरंतर विटाळ ज्यांनीं अंतरांत बाळगला आहे ३. ज्याचा निरंतर संग चित्तांत असतो त्याची जाती तीच आहे, असे तुकाराम महाराज म्हणतात ४. [३०]

कोणी एक मूर्ख पुरुष तेलणीशीं भांडला आणि तिच्यावर रुसला त्यामुळें तिच्याविषयींच्या रागानें तिच्या घरीं तेल आणण्यास कसें जावें या भिडेनें कोरडेंच अन्न खात बसला १. अरे मूर्खा, असें करूं नको. ज्यामध्यें आपलें हित आहे तें तूं पहा. त्यासंबंधीं मनांत कांहीं संकोच धरूं नकोस. २. कोणी एक आचरट स्त्री दुसऱ्याला अपशकून करण्याच्या हेतूनें आपल्या जिवंत असलेल्या नवऱ्यास सोडून व आपल्या डोक्यावरच्या केसाचा मोह टाकून तिनें केस बोडून घेतले ३. त्याचप्रमाणें दुसरी एक मूर्ख स्त्री आपल्या शेजारणीशीं भांडून तिच्या रागानें आपलें घर उघडें टाकून तशीच चालती झाली. पश्चात् तिच्या घरांत कुत्रीं शिरलीं ४. एका मनुष्याच्या घरांत फार पिसवा झाल्या. त्यामुळें त्यांच्या त्रासानें आपलें घरच जाळून टाकिलें त्यापासून जें पुष्कळ नुकसान झालें तें त्याला कळलेंच नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, एका अमंगळ स्त्रीच्या लुगड्यांत अतिशय उवा झाल्या त्यांच्या रागानें तिनें आपलें लुगडें फाडून टाकिलें, त्यामुळें तिला सर्व लोकांनीं नागवें पाहिलें ६. [३१]

जे कोणी संताचे दास असतील त्यांच्या दासाचा मला तुम्ही दास करा १. अहो हरी, मग कल्पपर्यंत मला खुशाल गर्भवास होवोत २. नीच काम जरी मला करण्याचा प्रसंग आला तरी मी करीन, पण मुखामध्यें तुमचें नाम असावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या सेवेंतच माझ्या संकल्पाचा व्यय व्हावा ४. [३२]

सर्वकाळ ज्याचे चित्ताला हळहळ लागली आहे व जें चित्त नेहमीं तळमळ करतें आहे १. त्याचें मला दर्शन होऊं नये. तो जरी जिवंत आहे तरी प्रेताप्रमाणें आहे २. वाईट शब्दाच्या घाणीनें त्याची वाचा अमंगळ झाली आहे ३. परतत्त्वाविषयींचा शब्द तो जाणत नाहीं व त्याचप्रमाणें परोपकारही जाणत नाहीं, असें तुकाराम महाराज म्हणतात ४. [३३]

नेम जया नाहीं एकादशी व्रत । जाणावें तें प्रेत सर्व लोकीं ॥ १ ॥ त्याचें वय नित्य काळ लेखिताहे । रागें दांत खाय कराकरा ॥ २ ॥ जयाचिये द्वारीं तुळसीवृंदावन । नाहीं तें स्मशान गृह जाण ॥ ३ ॥ विठोबाचे नाम नुच्चारी जें तोंड । प्रत्यक्ष तें कुंड चर्मकाचें ॥ ४ ॥ तुका म्हणे त्याचे काष्ठ हात पाय । कीर्तना नव जाय हरिचिया ॥ ५ ॥ [३४]

आम्हीं सदैव सुडके । जवळीं येतां चोर धाके । जाऊं पुढे भिके । कुतरीं घर राखती ॥ १ ॥ नांदणूका ऐसी सांगा । नाहीं तरी वाया भागा । थोरपणा अंगा । तरी ऐसें आणावें ॥ २ ॥ अक्षय साचार । केलें सायासांनीं घर । एरंड सिंहार । दुजा भार न साहती ॥ ३ ॥ धनकण घरोघरीं । पोट भरे भिकेवरी । जतन तीं करी । कोण गुरें वांसरें ॥ ४ ॥ जाली सकळ निश्चिंती । भांडवल शेण माती । झळझळीत भिंती । वृंदावनें तुळशीचीं ॥ ५ ॥ तुका म्हणे देवा । अवघा निरविला हेवा । कुटुंबाची सेवा । तोचि करी आमुच्या ॥ ६ ॥ [३५]

पराविया नारी माउली समान । मानिलिया धन काय वेंचे ॥ १ ॥ न करितां परनिंदा परद्रव्य अभिलाष । काय तुमचें वेंचे सांगा ॥ २ ॥ बैसलिये ठायीं म्हणतां राम राम । काय होय श्रम ऐसें सांगा ॥ ३ ॥ संतांच्या वचनीं मानितां विश्वास । काय तुमचें यास वेंचे सांगा ॥ ४ ॥ खरें बोलतां कोण लागती सायास । काय वेंचे यास ऐसें सांगा ॥ ५ ॥ तुका म्हणे देव जोडे याजसाठीं । आणिक ते आटी न लगे कांहीं ॥ ६ ॥ [३६]

शुद्धबीजा पोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥ १ ॥ मुखीं अमृताची वाणी । देह देवाचे कारणीं ॥ २ ॥ सर्वांग निर्मळ । चित्त जैसें गंगाजळ ॥ ३ ॥ तुका म्हणे जाती । ताप दर्शनें विश्रांती ॥ ४ ॥ [३७]

ज्या पुरुषाला एकादशीच्या व्रताचा नेम नाहीं तो पुरुष सर्व लोकांत प्रेतवत् आहे असें समजावें १. त्या पुरुषाचे जाणाऱ्या आयुष्याचे दिवस काळ नेहमीं मोजीत राहातों, आणि अतिशय रागानें त्याजवर करकरा दांत खातो २. ज्याच्या दारांत तुळशीचें वृंदावन नाहीं तें घर स्मशानवत् आहे असें समजा ३. ज्याच्या कुळामध्यें एकही विष्णुउपासक नाहीं त्याचा भवनदींतून तरून जाण्याचा पेटा भवनदींत बुडून जातो ४. ज्याचें तोंड विठ्ठलनामाचा उच्चार करीत नाहीं तें तोंड नाहीं, तर तें चांभाराचें कातडें भिजविण्याचें कुंडच आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, जो पुरुष हरिकीर्तनाला जात नाहीं, त्याचे हातपाय लांकडेंच आहेत असें समजावें ६. [३४]

जरी आम्ही सामान्य आहोंत तरी मोठे दैववान् आहोंत. आमच्याजवळ येण्याला चोर भितात. आम्ही बाहेर भिक्षा मागण्यास गेलों असतां आमच्या घराचें रक्षण कुत्रीं करितात १. अशी कोणाची नांदणूक आहे हें सांगा. नाहीं तर व्यर्थ कष्टी व्हा. मोठेपणा जर अंगाला आणावयाचा असेल तर आमच्यासारखा आणा २. आम्ही मोठ्या कष्टानें अक्षय आणि खरें असें घर केलें आहे. त्यास लांकडे एरंडाचीं व शेराचीं, जीं दुसऱ्याचा भार सहन करीत नाहींत. ३. आमचें द्रव्य आणि धान्य लोकांच्या घरोघरीं भरलें आहे आणि आम्ही आपलें पोट भिक्षेवर भरतों. गुरें आणि वासरें कोण जतन करीत बसतो? ४. आमची सर्वांविषयीं निश्चिंती झाली आहे. आम्हांजवळ शेण व माती हें भांडवल आहे. या योगानें सारवलेल्या भिंती आणि तुळसीवृंदावनें स्वच्छ आहेत ५. तुकाराम महाराज म्हणतात, देवानें आमची सर्व विषयांची हाव नाहींशी करून टाकली आणि आमच्या कुटुंबाची सेवा तोच करीत आहे ६. [३५]

परस्त्री आईप्रमाणें मानल्यानें काय द्रव्याचा वेंच होतो? १. दुसऱ्याची निंदा केली नाहीं व दुसऱ्याच्या द्रव्याचा अभिलाष केला नाहीं तर त्यांत तुमचा काय वेंच होतो तें सांगा २. बसल्या ठिकाणीं राम राम म्हटल्यानें तुम्हांस कोणते श्रम होतील तें सांगा ३. संतांचे वचनावर विश्वास ठेवल्यानें त्यांत तुमचा काय खर्च होतो तें सांगा ४. खरें बोलण्यांत तुम्हांस कोणते कष्ट होतात व खरें बोलल्यास त्यांत तुमचा काय खर्च होतो तें सांगा ५. तुकाराम महाराज म्हणतात, वर सांगितलेल्या नियमानें वागल्यास एवढ्याच उपायानें देवाची प्राप्ति होते. ह्याशिवाय दुसरी खटाटोप करावयास नको. [३६]

बीज शुद्ध असलें म्हणजे त्यापासून रसभरीत व उत्तम अशीं फळें उत्पन्न होतात. १. मुखांत अमृततुल्य गोड शब्द आहेत आणि ज्याचा देह देवाच्याच कारणीं लागला आहे २. जो पुरुष सर्वांगानें निर्मळ व ज्याचें चित्त गंगेच्या पाण्याप्रमाणें पवित्र आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याचे दर्शनानें तापत्रय जातें व विश्रांति मिळते ४. [३७]

चित्त समाधान । तरी विष वाटे सोनें ॥ १ ॥ बहु खोटा अतिशय । जाणा भले सांगों काय ॥ २ ॥ मनाचे तळमळें । चंदनेंही अंग पोळे ॥ ३ ॥ तुका म्हणे दुजा । उपचार पीडा पूजा ॥ ४ ॥ [३८]

परिमळ म्हूण चोळूं नये फूल । खाऊं नये मूल आवडतें ॥ १ ॥ मोतियाचें पाणी चाखूं नये स्वाद । यंत्र भेदुनी नाद पाहूं नये ॥ २ ॥ कर्मफळ म्हणुनि इच्छूं नये काम । तुका म्हणे वर्म दाऊं लोकां ॥ ३ ॥ [३९]

माया तेंचि ब्रह्म ब्रह्म तेंचि माया । अंग आणि छाया जयापरी ॥ १ ॥ तोडितां न तुटे सारितां निराळीं । लोटांगणातळीं हारपते ॥ २ ॥ दुजें नाहीं तेथें बळ कोणासाठीं । आणिक ते अटी विचाराची ॥ ३ ॥ तुका म्हणे उंच वाढे उंचपणें । ठेंगणीं लवणे जैसीं तैसीं ॥ ४ ॥ [४०]

दुर्जनासि करी साह्ये । तोही लाहे दंड हे ॥ १ ॥ शिंदळीच्या कुंटणी वाटा । संग खोटा खोट्याचा ॥ २ ॥ येर येरा कांचणी भेटे । आगी उठे तेथूनी ॥ ३ ॥ तुका म्हणे कापूं नाकें । पुढें आणिकें शिकविती ॥ ४ ॥ [४१]

वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती । जाणा त्या निश्चिती देव नाहीं ॥ १ ॥ भाडेकरी वाहे पाठीवरी भार । अंतरींचें सार लाभ नाहीं ॥ २ ॥ देवपूजेवरी ठेवूनियां मन । पाषाणा पाषाण पूजी लोभें ॥ ३ ॥ तुका म्हणे फळ चिंतिती आदरें । लाघव हे चार शिंदळीचे ॥ ४ ॥ [४२]

पवित्र सोंवळीं । एक तींच भूमंडळीं ॥ १ ॥ ज्यांचा आवडता देव । अखंडित प्रेमभाव ॥ २ ॥

चित्ताचें जर समाधान असेल तर विषवत् असणारें जें दुःख तें सोन्यासारखें म्हणजे सुखासारखें भासतें १. सज्जनहो, विषयाची हांव अतिशय असणें हें फार खोटें आहे असें तुम्हीं जाणा. मी काय सांगूं ? २. मन जर तळमळ करीत असेल तर चंदनाच्या उटीनेंही अंग भाजतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मन अस्वस्थ असेल तर अन्य सुखोपचाराची पूजा केल्यानें पीडा होते ४. [३८]

पुष्प हें सुगंधी आहे म्हणून त्याला हातानें चोळूं नये. आपलें मूल फार आवडतें आहे म्हणून तें खाऊं नये १. मोत्याचे ठिकाणीं असणाऱ्या पाण्याचा स्वाद चाखून पाहूं नये. भांड्यावर भांडीं आपटून त्याचा नाद ऐकूं नये २. जीं जीं कर्में करावीं तीं तीं फलदायक होत, परंतु त्यांची कामेच्छा धरूं नये. तुकाराम महाराज म्हणतात, हें वर्म आम्हीं लोकांना दाखवूं ३. [३९]

जसे देह आणि त्याची छाया हीं जरी दोन आहेत तथापि तीं दोन नसून तात्त्विकदृष्ट्या एकच आहेत, तसें माया आणि ब्रह्म हीं दोन नसून माया तेंच ब्रह्म व ब्रह्म तेंच माया अशी त्यांची तात्त्विकदृष्टीनें एकताच सिद्ध होते १. छाया जी आहे ती शस्त्रानें तोडिली असतां तुटत नाहीं, हातानें दूर सारिली असतां निराळी होत नाहीं, मात्र जमिनीवर लोटांगण घातल्यानें ती वेगळी न राहातां आपल्या खालीं नाहींशी होते २. छाया ही दुसरेपणानें जर खरी नाहीं तर तिच्या नाशाकरितां बळ करणें अगर विचाराची खटाटोप करणें व्यर्थ आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपण उंच झालों तर आपल्याबरोबर तीही उंच होते, आपण जर लवलों तर आपल्याबरोबर तीही ठेंगणी होते ४. [४०]

दुर्जनास मदत करणारे जे कोणी आहेत त्यांसही दुर्जनाप्रमाणें दंड मिळतो १. कोणताही पदार्थ छिनाल स्त्रीच्या जाराला वश करण्याविषयींचा मार्ग कुंटिण आहे. खोटे जे असतात त्यांना संशयही खोट्याचाच असतो २. कोणताही पदार्थ कोणत्याही पदार्थावर घर्षण केल्याकारणानें त्यापासून अग्नि उत्पन्न होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे जे दुर्जन आहेत त्यांची नाकें आम्हीं कापूं, कारण पुढें ते इतरांना कुबुद्धि शिकवितील ४. [४१]

एखादि वृत्ति प्राप्त करून घेणारे अगर भूमि, द्रव्य, राज्य, प्राप्त करून घेणारे जे परमार्थी आहेत त्यांस निश्चयेंकरून देवाची प्राप्ती होणार नाहीं १. भाडेकरी आपल्या पाठीवर भाड्याचें ओझें नेतो परंतु ओझ्यांतील साराचा लाभ त्याला होत नाहीं २. कांहींएक विषयाचा लोभ चित्तांत धरून देवपूजेवर मन ठेवणारा तो पाषाण (दगड) आहे आणि ज्या देवाची पूजा करीत आहे तोही दगड आहे. अशा प्रकारें दगडाचीच दगड लोभानें पूजा करीत आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, अनेक प्रकारचीं कर्में करून मोठ्या आदरानें त्यांची जे फलेच्छा करणारे आहेत त्यांचें सर्व लाघव वेश्येच्या आचाराप्रमाणें होय ४. [४२]

सर्व पृथ्वींत पवित्र व सोंवळे असे तेच आहेत १. कोण तर देवाविषयीं ज्यांच्यामध्यें अखंड प्रेमभाव आहे व

तींच भाग्यवंतें । सरतीं पुरतीं धनवित्तें ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । त्यांची केली पावे सेवा ॥ ४ ॥ [४३]

आशाबद्ध जन । काय जाणे नारायण ॥ १ ॥ करी इंद्रियांची सेवा । पाहे आवडीचा हेवा ॥ २ ॥ भ्रमलें चावळे । तैसें उचित न कळे ॥ ३ ॥ तुका म्हणे विषें । अन्न नाशियेलें जैसें ॥ ४ ॥ [४४]

ढेंकर जेवण दिसे साचें । नाहीं तरि काचें कुंथाकुंथी ॥ १ ॥ हेही बोल तेही बोल । कोरडे फोल रुचीविण ॥ २ ॥ गव्हांचिया होती परी । फकेवरी खाऊं नये ॥ ३ ॥ तुका म्हणे असे हातींचें कांकण । तयासी दर्पण विल्हाळक ॥ ४ ॥ [४५]

करावी ते पूजा मनेंचि उत्तम । लौकिकाचें काम काय असे ॥ १ ॥ कळावें तयासि कळे अंतरींचें । कारण तें साचें साचा अंगीं ॥ २ ॥ अतिशयाअंतीं लाभ किंवा घात । फळ देतें चित्त बीजा ऐसें ॥ ३ ॥ तुका म्हणे जेणें राहे समाधान । ऐसें तें भजन पार पावी ॥ ४ ॥ [४६]

एकादशी सोमवार न करिती । कोण त्यांची गति होईल नेणों ॥ १ ॥ काय करूं बहु वाटे तळमळ । आंधळीं सकळ बहिर्मुख ॥ २ ॥ हरिहरां नाहीं बोटभरी वाती । कोण त्यांची गति होईल नेणों ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं नारायणीं प्रीति । कोण त्यांची गति होईल नेणों ॥ ४ ॥ [४७]

नव्हे आराणूक संवसारा हातीं । सर्व काळ चित्तीं हाचि धंदा ॥ १ ॥ देवधर्म सांदीं पडिले सकळ । विषयीं गोंधळ गाजतसे ॥ २ ॥ रात्रि दीस न पुरे कुटुंबाचें समाधान । दुर्लभ दर्शन

ज्यांना देवच एक आवडतो आहे २. जगांत तेच भाग्यवान् आहेत व धनवित्तानें परिपूर्ण तेच आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या पुरुषांनीं जी सेवा केली आहे ती सर्व देवाला पोहोंचते ४. (अशाच जातीचें मागें २६ व्या अभंगांतील शेवटचें कडवें आहे तेथें जो अर्थ केला आहे तसाही या कडव्याचा होईल.) [४३]

जे लोक आशेनें बद्ध झाले आहेत ते नारायणाला काय जाणूं शकतील १. ते नेहमीं इंद्रियांचीच सेवा करितात, त्यांच्यांत आवडीच्या विषयांसंबंधीं हांव असते. २. ज्याप्रमाणें एखादा भ्रमिष्ट झालेला मनुष्य बरळतो त्याप्रमाणें ह्या आशाबद्धाला योग्य काय तें कळत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसें उत्तम अन्नांत विष मिळविलें असतां तें नासतें ४. [४४]

खरोखर तृप्ति झाल्यावर जी ढेंकर येते त्यावरून हा तृप्ति होईपर्यंत जेवला आहे असें समजतें. मुळींच न जेवतां कुंथाकुंथीच्या ढेंकरेनें तृप्तीचा भाव घालणाऱ्या मनुष्याचा काचेपणा (कच्चेपणा) दिसतो १. पोटभर जेवून मी तृप्त झालों आहें असें म्हणणाऱ्याचे शब्दच आहेत व कांहीं न जेवितां मी तृप्त झालों आहें असें म्हणावयाचेही शब्दच आहेत; पण ते पहिल्यासारखे अनुभविक नसून उगीच कोरडे फोलकटाप्रमाणें आहेत २. शेवया, लाडू, सांजा, शिरा वगैरे सर्व प्रकार गव्हाचेच होतात, म्हणून नुसत्या गव्हाचेच फक्के मारून खाऊं नयेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हातामध्यें असणारें जें कंकण त्याला पाहाण्याकरितां आरसा घेणें हें व्यर्थ आहे ४. [४५]

देवाची मानसपूजा करणें हें चांगलें. बाहेरच्या बाजूला देव्हारा मांडून देवाच्या पूजेकरितां उपकरणीं भांडीं व गंधपुष्प व धूपदीप यांचा देखावा दाखविणें हा सर्व लौकिक आहे. त्याचें या परमार्थांत काय काम आहे? १. आपली पूजा ज्या देवास समजावयास पाहिजे त्याला अंतरीं केलेली मानसपूजाही समजते. खरें फल हें सत्कृत्याच्याच अंगानें मिळणारें आहे २. कांहींतरी आचरटपणानें केलें तर त्यापासून कदाचित् लाभ अथवा घातही होईल. ज्या जातीचें बीज असतें तद्वतच तें फळ देतें. ह्याप्रमाणेंच उपासकाचें ज्या जातीचें चित्र असतें तद्वतच त्याला त्या उपासनेचें फळ मिळतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या भजनानें चित्ताचें समाधान असतें तेंच भजन याला संसारांतून पार करतें. ४. [४६]

एकादशी व सोमवार हीं व्रतें जे करीत नाहींत ते कोणत्या गतीला जातील हें मला कळत नाहीं १. काय करावें, असल्या सांसारिक लोकांविषयीं बहुत तळमळ वाटते, कारण हे सर्व आंधळे व बहिर्मुख आहेत २. हरि अगर हर ह्यांना जे बोटभर वातीनेंही ओंवाळीत नाहींत ते कोणत्या गतीला जातील हें मला कळत नाहीं. ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांची प्रीति नारायणावर नाहीं ते कोणत्या गतीला जातील हें मला कळत नाहीं ४. [४७]

यांसाराच्या हातीं सांपडलेल्या जीवांना विश्रांति नाहीं. सर्वकाळ त्यांच्या चित्तांत खालीं सांगितलेला धंदाच भरलेला असतो १. देव आणि धर्म हे सर्व त्यांचे सांदडीला पडले आहेत आणि निरंतर त्यांचेकडून विषयाचें सेवन व अर्जन याच गोंधळाची गर्जना चालली आहे २. कुटुंबांतील माणसांचें समाधान करण्यास त्यांस दिवसरात्र पुरत नाहीं त्यामुळें त्यांना

ईश्वराचें ॥ ३ ॥ तुका म्हणे आत्महत्यारे घातकी । थोर होते चुकी नारायणीं ॥ ४ ॥ [४८]

स्मशान ते भूमि प्रेतरूप जन । सेवाभक्तिहीन ग्रामवासी ॥ १ ॥ भरतील पोट श्वानाचिया परी । वस्ति दिली घरीं यमदूतां ॥ २ ॥ अपूज्य लिंग तेथें अतित नेघे थारा । ऐसी वस्ती चोरां कंटकांची ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं ठावी स्थिती मती । यमाची निश्चिती कुळवाडी ॥ ४ ॥ [४९]

अहाकटा त्याचे करिती पितर । वंशीं दुराचार पुत्र झाला ॥ १ ॥ गळेचिना गर्भ नव्हेच कां वांझ । माता त्याची लाज लावी पापी ॥ २ ॥ परपीडे परद्वारीं सावधान । सादरचि मन अभाग्याचें ॥ ३ ॥ न मिळतां निंदा चाहडी उपवास । संग्रहावे दोष सकळही ॥ ४ ॥ परउपकार पुण्य त्या वावडें । विषाचे ते किडे दुग्धीं मरे ॥ ५ ॥ तुका म्हणे विटाळाचीच तो मूर्ति । दया क्षमा शांति नातळे त्या ॥ ६ ॥ [५०]

श्वान शीघ्रकोपी । आपणा घातकर पापी ॥ १ ॥ नाहीं भीड आणिक धीर । उपदेश न जिरे क्षीर ॥ २ ॥ माणसांसि भुंके । विजातीनें द्यावे थुंके ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्त । मळिण करा तें फजित ॥ ४ ॥ [५१]

देखोनि हरखली अंड । पुत्र झाला म्हणे रांड । तंव तो झाला भांड । चाहाड चोरटा शिंदळ ॥ १ ॥ जाय तिकडे पीडी लोकां । जोडी भांडवल थुंका । थोर झाला चुका । वर कां नाहीं घातली ॥ २ ॥ भूमि कांपे त्याच्या भारें । कुंभपाकाचीं शरीरें । निष्ठुर उत्तरें । पापदृष्टी मळिण चित्त ॥ ३ ॥ दुराचारी तो चांडाळ । पाप सांगातें विटाळ । तुका म्हणे खळ । म्हणोनिया निषिद्ध तो ॥ ४ ॥ [५२]

देवाचें दर्शन दुर्लभ झालें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे हे प्राणी आत्मघात करणारे आहेत. नारायणाचे भक्तीविषयीं त्यांची मोठी चूक होत आहे ४. [४८]

ज्या गांवांतील माणसें हरिभक्तिहीन व सेवाहीन आहेत त्या गांवांतील जमीन स्मशान आहे व त्या गांवांतील माणसें प्रेतें आहेत १. जरी त्यांनीं धंद्या करून पोटें भरलीं तरी तें त्यांचें पोट भरणें श्वानवत् आहे व त्यांनीं आपल्या घरांत यमाच्या दूतांना वस्ती दिली आहे २. जें लिंग पूज्य नाहीं त्या ठिकाणीं अतिथि (पाहुणा, मार्गस्थ) वस्ती करीत नाहीं, त्याप्रमाणें त्या गांवांतील भक्तिहीन कंटक, चोर लोकांची वस्ती आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांना आपली स्थिति व बुद्धि हीं कशीं तें ठाऊक नाहीं, तीं केवळ यमाचीं व्यापार करण्याचीं कुळें आहेत ४. [४९]

ज्याचे वंशांत दुराचरण करणारा पुत्र जन्मला आहे त्याचे पूर्वज पितृलोकीं हाहाःकार करितात १. अहो हा पितरांना दुःख करण्यास लावणारा पुत्र आईच्या गर्भांत असतां तो गर्भपात कां झाला नाहीं किंवा आई वांझ कां राहिली नाहीं ? अशा ह्या दुराचारी व पापी पुत्राची लज्जा आईला लावा म्हणजे असल्या दुराचरणी कार्ट्याला कां प्रसवलीस असें तिला म्हणा. २. दुसऱ्यांना पीडा देण्याविषयीं व परस्त्रीगमन करण्याविषयीं त्या करंट्याचें मन दक्ष आहे ३. एक दिवस जर त्यानें कोणाची निंदा केली नाहीं अगर चाहाडी करण्यास सवड मिळाली नाहीं तर त्याला तो दिवस उपासाचा जातो. जेवढे दोष आहेत तेवढ्यांचा नेहमीं संग्रह करावा हेंच त्याचें कर्तव्य ४. परोपकारानें होणारें पुण्य त्या दुर्जनाला मुळींच आवडत नाहीं, तें त्यास कुपथ्य आहे. विषामध्यें जगणारे किडे ते गोड दुधांत टाकिले असतां मरतात ५. तुकाराम महाराज म्हणतात, तो पुरुष केवळ विटाळाचीच मूर्ति आहे. दया, क्षमा, शांति ह्या सात्विक वृत्ती त्यास कधींही शिवत नाहींत ६. [५०]

त्वरित रागावणारा मनुष्य कुत्रा आहे आणि आपला आपण आत्मघात करणारा पापी आहे १. ज्याला दुसऱ्याची भीड नाहीं आणि ज्याच्यामध्यें धैर्य नाहीं त्याला कोणीं सदुपदेशरूपी दूध पाजलें तर तें त्यास जिरत नाहीं २. माणसावर भुंकतो म्हणजे कोणालाही कांहीं वाईट बोलतो त्या योगानें त्याच्या विरुद्ध स्वभावाचे जे सज्जन ते त्याजवर थुंकतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे हे मलीन चित्ताचे प्राणी ह्यांना फजीत करावें ४. [५१]

पुत्राविषयीं लोभ असणारी बाई बाळंत झाली. आपणास काय झालें आहे म्हणून ती मुलाकडे पाहूं गेली तों त्याची अंडुकली दृष्टीस पडली. आपणास पुत्र झाला आहे असें समजून तीस मोठा हर्ष झाला आणि जवळच्या सुइणीस ती रांड म्हणाली, मला पुत्र झाला आहे. परंतु मुलगा पुढें मोठा दिग्विजयी निघाला म्हणजे भांडखोर, चाहाडी, चोरी व छिनाळी करूं लागला १. जिकडे त्यानें जावें तिकडे लोकांना पीडाच द्यावी, त्यामुळें लोकांकडून त्याला थुंक्याचे भांडवलाची जोड झाली. पण त्याच्या आईची केवढी चूक झाली कीं जन्मल्याबरोबर अशा पोराच्या तोंडांत वार घालून तिनें त्याला पुरून टाकला नाहीं २. ज्या दुष्टाच्या भारानें भूमि थरथर कांपते आहे त्याचें शरीर केवळ नरकरूपच आहे. जो दुसऱ्याला नेहमीं निष्ठुर उत्तरानें बोल तो, ज्याची पापदृष्टी व चित्त मलीन आहे ३. केवळ दुराचारी तो माहारच आहे. त्याच्याबरोबर पापाचा विटाळ असतो आणि तो खळ आहे म्हणूनच निषिद्ध आहे, असें तुकाराम महाराज म्हणतात. ४ [५२]

नेणें गाणें कंठ नाहीं हा सुस्वर। घालूं तुज भार पांडुरंगा ॥ १ ॥ नेणें राग वेळ काळ घात मात। तुझे पायीं चित्त ठेवीं देवा ॥ २ ॥ तुका म्हणे मज चाड नाहीं जना। तुज नारायणा वांचूनियां ॥ ३ ॥ [५३]

माझी पाठ करा कवी। उठ लावी दारोदार ॥ १ ॥ तंव तया पारखी सिव। लाजे ठाव सांडितां ॥ २ ॥ उष्टावळी करूनि जमा। कुंथुनि प्रेमा आणितसे ॥ ३ ॥ तुका म्हणे बाहेरमुदी। आहाच गोविंदीं न सरती ॥ ४ ॥ [५४]

उपाधीच्या नांवें घेतला सिंतोडा। नेदूं आतां पिडा आतळों ते ॥ १ ॥ काशासाठीं हात भरूनि धुवावे। चालतिया गांवें मारगासि ॥ २ ॥ काय नाहीं देवें करूनि ठेविलें। असे ते आपुलें ते ते ठायीं ॥ ३ ॥ तुका म्हणे जव्हां गेला अहंकार। तेव्हां आपपर बोळविले ॥ ४ ॥ [५५]

योगाचें तें भाग्य क्षमा। आधीं दमा इंद्रियें ॥ १ ॥ अवघीं मान्यें येती घरा। देव सोयरा झालिया ॥ २ ॥ मिरासीचें म्हूण सेत। नाहीं देत पीक उगें ॥ ३ ॥ तुका म्हणे उचित जाणा। उगीं सिणा काशाला ॥ ४ ॥ [५६]

नये नेत्रीं जळ। नाहीं अंतरीं कळवळ ॥ १ ॥ तों हे चावटीचे बोल। जन रंजवणें फोल ॥ २ ॥ न फळे उत्तर। नाहीं स्वामी जो सादर ॥ ३ ॥ तुका म्हणे भेटी। जंव नाहीं दृष्टादृष्टी ॥ ४ ॥ [५७]

बाइल सवासिण आई। आपण पितरांचे ठायीं ॥ १ ॥ थोर वेच झाला नष्टा। अवघ्या अपसव्य

मी गाणें तें कसें जाणत नाहीं. माझा गळा सुस्वर नाहीं. अहो पांडुरंगा, मी सर्वस्व भार तुमचेवर घालतों १. कोणत्या रागाच्या कोणत्या वेळा आहेत, त्याचे घात व त्याची हकीगत मी जाणत नाहीं २. अहो देवा, तुमच्या पायीं मीं चित्त ठेविलें आहे. ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो नारायणा तुमच्यावांचून मला इतर जनांची इच्छा नाहीं ४. [५३]

कला क, टला ट जोडून प्रसादाचें कांहीं अंग नसतांना कविता करणारे जे आहेत ते आपली कविता दुसऱ्यानें पाठ करावी म्हणून दारोदार जाऊन लोकांचे पाठीमागें हुटहूट लावितात आणि ते त्यांना म्हणतात, आमची कविता पहा आणि पाठ करा १. पण शहाणे जे आहेत ते त्याची परीक्षा करून त्यास फजीत करितात. मग तो तें ठिकाण सोडून जाण्याचे वेळेस मोठा लज्जित होतो २. ह्याचे कवितेंतील उष्टीं चार अक्षरें, त्याचे कवितेंतील उष्टीं चार अक्षरें गोळा करून कविता करितो, त्यामध्यें बळेंच प्रासादिक प्रेम दाखवितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अंतरीं हरिविषयीं प्रेमाचा लेश नसतांना बाहेरच्या बाजूनें टांकटिका करणारे जे आहेत ते गोविंदाच्या ठिकाणीं सरते होत नाहींत ४. [५४]

देहादि प्रपंचउपाधीविषयीं मीं शिंतोडा घेतला आहे, म्हणजे एखाद्याला विटाळ झाला असतां तो गाईचे गोमूत्राचा शिंतोडा घेऊन जसा शुद्ध होतो तद्वत् समजावें. आतां ही प्रपंचरूपी पीडा मी आपल्या अंगाला शिऊं देणार नाहीं १. एखाद्या घाणेरड्या वस्तूनें हात भरवून धुवावे कशाला? असें करण्यांत ज्या मार्गानें आपण जात आहों त्यामध्यें विनाकारण गुंतागुंत मात्र होते २. ज्या ठिकाणीं जें जें कांहीं देवानें निर्माण केलें आहे त्या ठिकाणीं तें तें सर्व आपलेंच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, एक देहाविषयींचा अहंकार गेला म्हणजे हें आपलें आणि हें परकें ह्या द्वैतभावाची त्याच वेळेला बोळवण होते ४. [५५]

योगाचें भाग्य क्षमा आहे, पण तें प्राप्त होण्याकरितां आधीं इंद्रियांचें दमन करावें १. यापासून देव हा आपला सोयरा होतो आणि त्यायोगानें संपूर्ण भाग्यें घरास येतात. २. मिरासीचें शेत असलें तरी त्याची मेहनतमशागत, पेरणी केली नाहीं तर तें आपण होऊन पीक देत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, याकरितां योग्य जें असेल तें तुम्ही जाणा. व्यर्थ शीण कशाला करतां? ४. [५६]

ज्याचे डोळ्यांना पाणी येत नाहीं आणि जोंपर्यंत अंतरांत हरीविषयीं कळवळा नाहीं १. तोंपर्यंत भक्तिविषयीं जे बोल आहेत ते सर्व चावटपणाचे आहेत आणि जनाला रंजविणारे केवळ फोलच आहेत २. जोंपर्यंत आपला स्वामी आपणावर प्रसाद करण्यास तयार नाहीं तोंपर्यंत आपलीं करुणेचीं उत्तरें फलद्रूप होत नाहींत ३. जोंपर्यंत एकमेकांचें पाहाणें एकमेकांकडे झालें नाही तोंपर्यंत भेट नाहीं, असें तुकाराम महाराज म्हणतात. ४. [५७]

कोण्या एका अविधीनें वागणाऱ्या गृहस्थानें आपल्या आईबापांचे पक्ष केले. त्यामध्यें आईच्या ठिकाणीं सवाष्ण आपल्या बायकोस बसविलें आणि बापाच्या ठिकाणीं पितृस्थानीं आपणच बसला १. अरे नष्टा, असें करण्यांत तुझी मोठी

चेष्टा ॥ २ ॥ विषयांचे चरवणीं । केली आयुष्याची गाळणी ॥ ३ ॥ तुका म्हणे लंडा । नाहीं दया देव धोंडा ॥ ४ ॥ [५८]

दानें कांपे हात । नावडे तेविशीं मात ॥ १ ॥ कथी चावटीचे बोल । हिंग क्षीर मिथ्या फोल ॥ २ ॥ न वजती पाय । तीर्था म्हणे वेंचों काय ॥ ३ ॥ तुका म्हणे मनीं नाहीं । नये आकारातें कांहीं ॥ ४ ॥ [५९]

वळितें जें गाई । त्यासि फार लागे काई ॥ १ ॥ निवे भावाचे उत्तरीं । भलते एके धणीवरी ॥ २ ॥ न लगती प्रकार । कांहीं मानाचा आदर ॥ ३ ॥ सांडी थोरपणा । तुका म्हणे सवें दीना ॥ ४ ॥ [६०]

मैत्र केला महा बळी । कामा नये अंतकाळीं ॥ १ ॥ आधीं घे रे रामनाम । सामा भरीं हा उत्तम ॥ २ ॥ नाहीं तरी यम । दांत खातो करकरा ॥ ३ ॥ धन मेळविल्या कोडी । काळ घेतल्या न सोडी ॥ ४ ॥ कामा न ये हा परिवार । सैन्य लोक बहु फार ॥ ५ ॥ तंववरी तुमचें बळ । जंव आला नाहीं काळ ॥ ६ ॥ तुका म्हणे बापा । चुकवी चौऱ्यांशींच्या खेपा ॥ ७ ॥ [६१]

कानडीनें केला मऱ्हाटा भ्रतार । एकाचें उत्तर एका नये ॥ १ ॥ तैसें मज नको करूं कमळापति । देईं या संगति सज्जनांची ॥ २ ॥ तिनें पाचारिलें इल बा म्हणोन । येरु पळे आण झाली आतां ॥ ३ ॥ तुका म्हणे येरा येरा जें विच्छिन्न । तेथें वाढे शीण सुखा पोटीं ॥ ४ ॥ [६२]

नुकसानी झाली आहे; कारण ह्या सगळ्या तुझ्या चेष्टा शास्त्रविधीबाह्य झाल्या आहेत २. अरे तूं आपलें सगळें आयुष्य विषय चघळण्यामध्येंच घालवून दिलेंस ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे जे लंड आहेत त्यांच्यामध्यें बिलकूल दया नाहीं आणि केवळ धोंड्यालाच ते देव मानितात ४. [५८]

ज्याचा हात कांहीं दानधर्म करण्याचे वेळेस थरथर कांपतो, दानधर्म करा असें कोणीं त्याला सांगितलें तर त्याला ती गोष्टही आवडत नाहीं १. नेहमीं चावटपणाचीं भाषणें कथन करतो, ज्याप्रमाणें हिंग दुधामध्यें घालणें तद्वत् तीं भाषणें खोटीं व फोलकट आहेत २. ज्याचे पाय तीर्थाकडे जातही नाहींत त्यास कोणीं म्हटलें, तूं तीर्थयात्रा कां करीत नाहींस, तर त्याचें कारण तो हें सांगतो कीं, मजजवळ खर्च करण्यास कांहीं पैसा नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, एखादी गोष्ट एखाद्याचे मनांत जर नसेल तर त्याप्रमाणें ती कधींही त्याचेकडून घडणार नाहीं ४. [५९]

जे केवळ गाई वळणारे परम भाविक गोपाळ त्यांना देवाला प्रसन्न करण्याविषयीं फारसें द्रव्य, गंध, फुलें वगैरे अलंकाराची जरूर पडली नाहीं १. केवळ त्यांच्या भावानें भरलेल्या प्रेमपर शब्दानें हरि शांत होतात. जसें एखाद्याला पोटभर जेवण घातलें असतां तो जसा तृप्त होतो तद्वत् त्यांच्या शब्दानें हरि अतिशय तृप्त होतात २. देवाला संतुष्ट करण्याला मान करणें किंवा आदर-आतिथ्य क[illegible]णें हे सर्व प्रकार त्यांना कांहीं करावें लागत नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव आपल्यामधला मोठेपणा टाकून या दिनांच्या बरोबर असतात ४. [६०]

मोठमोठे बलवान् पराक्रमी असे जरी तूं मित्र केलेस तरी मरणप्रसंगीं तुझ्या उपयोगीं ते बिलकूल येणार नाहींत १. एवढ्याकरितां अगोदर उत्तम रामनामरूपी माल आपल्याजवळ भरून ठेव. तसें जर न करशील तर तुझ्यावर यम करकरां दांत खात राहील. २. कोट्यावधि धन तूं जरी मिळविलेंस तरी काळ तुझें हरण केल्यावांचून कधींही सोडणार नाहीं ३. आईबाप, स्त्रीपुत्र, बंधुजन, इष्टमित्र हे लोक अगर याहून अधिक तुझ्याजवळ पुष्कळ सैन्य असलें तरी तें मृत्युसारख्या प्रसंगीं तुझ्या कांहीं उपयोगास येणार नाहीं ४. तूं आपली शक्ति, बळ, पराक्रम जोंपर्यंत काळ तुजजवळ आला नाहीं तोंपर्यंत मिरवशील ५. तुकाराम महाराज म्हणतात, बापा, तुझ्यामागें लागलेल्या ज्या चौऱ्यांशीं लक्ष योनींतून जन्म-मृत्यूच्या येरझारा त्या तूं चुकीव ६. [६१]

एका कानड्या देशांतील स्त्रीनें मराठा नवरा केला पण तिनें कानडींत बोललें असतां त्यानें भलतेंच समजावें व हा कांहीं मराठींत बोलला असतां तिनें भलतेंच समजावें १. (अहो देवा) त्याप्रमाणें तुम्ही मला करूं नका. या संतांची संगती द्या २. एक वेळेला त्या कानड्या बायकोनें कानडी भाषेमध्यें इल बा म्हणजे इकडे या असें म्हटलें आणि तिचा तो मराठी नवरा त्याचा अर्थ भलताच समजला. म्हणजे हिनें आपणास बावा असें म्हटलें, ही तिनें शपथच घेतली असें जाणून तो तिजपासून दूर पळूं लागला ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा विसंगत नवराबायकोंच्या जोडप्यांत सुखाऐवजीं शीणच वाढेल. [६२]

सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ॥ १ ॥ धरीं धरीं आठवण । मानीं संतांचें वचन ॥ २ ॥ नेलें रात्रीनें तें अर्ध । बाळपण जराव्याध ॥ ३ ॥ तुका म्हणे पुढा । घाणा जुंतीजसी मूढा ॥ ४ ॥ [६३]

बोलायाचा त्याशीं । नको संबंध मानसीं ॥ १ ॥ जया घडली संतनिंदा । तुज विसरुनि गोविंदा ॥ २ ॥ जळो त्याचें तोंड । नको दृष्टीपुढें भांड ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । तया दुरी मज ठेवा ॥ ४ ॥ [६४]

तीळ जाळिले तांदुळ । काम क्रोध तैसेचि खळ ॥ १ ॥ कां रे सिणलासी वाउगा । न भजतां पांडुरंगा ॥ २ ॥ मानदंभासाठीं । केली अक्षरांची आटी ॥ ३ ॥ तप करूनि तीर्थाटन । वाढविला अभिमान ॥ ४ ॥ वांटिलें तें धन । केली अहंता जतन ॥ ५ ॥ तुका म्हणे चुकलें वर्म । केला अवघाचि अधर्म ॥ ६ ॥ [६५]

संसारतापें तापलों मी देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥ १ ॥ म्हणऊनि तुझे आठविले पाय । ये वो माझे माय पांडुरंगे ॥ २ ॥ बहुतां जन्मींचा झालों भारवाही । सुटीजे हें नाहीं वर्म ठावें ॥ ३ ॥ वेढियेलों चोरीं अंतर्बाह्यात्कारीं । कणव न करी कोणी माझी ॥ ४ ॥ बहु पांगविलों बहु नागविलों । बहु दिवस झालों कासाविस ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां धांव घाली वेगीं । ब्रीद तुझें जगीं दीनानाथा ॥ ६ ॥ [६६]

भक्तऋणी देव बोलती पुराणें । निर्धार वचनें साच खरीं ॥ १ ॥ मागें काय जाणों आइकिली

संसारामध्यें सुख जवाप्रमाणें किंचित् आहे आणि दुःख मात्र पर्वताएवढें मोठें आहे १. एवढ्याकरितां संतांचें वचन तूं मान व त्याची नेहमीं आठवण ठेव, असें द्विरुक्तीनें सांगतात २. अरे, ह्या मृत्युलोकांत मनुष्याच्या आयुष्याची मर्यादा शंभर वर्षें आहे. त्यांमध्यें रात्रीचे बारा तास निद्रेंत जातात. म्हणजे शंभरांतील पन्नास गेलीं, बाकी राहिलीं पन्नास त्यांत बारा वर्षें बाळपणांत गेलीं. कांहीं राहिलेलीं तारुण्याच्या मस्तींत गेलीं व कांहीं रोगांत व बाकी राहिलेलीं शेवटचीं म्हातारपणांत गेलीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे मूर्खा, अशा रीतीनें हा देह व्यर्थ जाऊन पुन्हां जन्ममृत्युरूपी घाण्याला तू जुंपला जाशील ४. [६३]

जीं दुर्जन माणसें आहेत त्यांच्याशीं बोलण्याचा मनांत देखील संकल्प येऊं नये १. अहो गोविंदा, तुम्हाला विसरून ज्याचेकडून संतांची निंदा झाली आहे २. त्याचे तोंडाला आग लागो. असला तो भांडखोर माझे दृष्टीपुढें सुद्धां नको ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, असल्या दुर्जनापासून मला दूर ठेवा ४. [६४]

अग्नींत तिळातांदुळांचें हवन करणाऱ्या साधकांना सांगतात, अरे, मुख्य पीडक जे कामक्रोधादिक विकार ह्या खळांना जसेचे तसेच ठेवून बाहेरचे गरीब तीळतांदूळ यांना कां जाळतोस ? १. अरे, एका पांडुरंगाला न स्मरतां ह्या व्यर्थ खटाटोपाचा कां शीण घेतोस ? २. ग्रंथाक्षरांचे जे पाठ पाठांतर केलेस ते केवळ आपल्यास मान मिळावा व दंभ वाढवावा एवढ्याचकरितां ३. नानाप्रकारचें तपतीर्थाटन करून त्या विषयींचा अभिमान तूं आपल्या ठिकाणीं वाढता केलास ४. त्याचप्रमाणें दुसऱ्याला द्रव्यदान देऊन मी मोठा दाता अशा अहंतेचें मात्र रक्षण केलेंस ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा ह्या मार्गानें जाणारे साधक खरोखर आत्मप्राप्तीच्या मार्गास चुकले म्हणून त्यांनीं जें कांहीं केलें तें अधर्म होय ६. [६५]

अहो देवा, संसाराच्या त्रिविध तापानें मीं अतिशय तापलों आणि कुटुंबाची सेवा करण्यानेंही तापलों १. ह्याकरितां मी तुझ्या पायांचा आठव केला. हे माझे आई पांडुरंगे, तूं लवकर ये २. अनेक जन्में संसाराचा भार वाहाणारा हेलकरी झालों. ह्यांतून कसें सुटावे हें वर्म मला समजत नाहीं ३. आंतून कामक्रोधादि चोरांनीं मी वेढला गेलों आणि बाहेरून स्त्रीपुत्र, बंधु, मित्र या चोरांनीं वेढला गेलों. ह्यांच्या तडाख्यांतून सुटण्यासाठीं माझी कोणीही कींव करीत नाहीं ४. ह्यांच्या योगानें मी फार अस्ताव्यस्त होऊन सर्वस्वीं नागवलों व यांच्या योगानें मी बहुत दिवस तळमळ करीत राहिलों ५. तुकाराम महाराज म्हणतात, आतां देवा, तुम्ही मोठ्या त्वरेनें धांव घ्या, कारण दीनाचा उद्धार करणारे तुम्ही स्वामींच आहांत व हेंच तुमचें ब्रीद आहे ६. [६६]

भक्तजनांकडून होणाऱ्या सेवेचें कर्ज देवानें घेतलें म्हणून तो त्यांचा ऋणी आहे, असें पुराणें म्हणतात. हें पुराणांचें म्हणणें निश्चयानें खरें आहे असें द्विरुक्तीनें सांगतात. १. पूर्वींचें काय कळतें म्हणा, पण अशी एक हकीगत ऐकण्यांत आली होती कीं, कबीर आपले जवळ विणलेलें सणंग घेऊन बाजारांत जात असतांना कोणी एक वस्त्रहीन दरिद्री वस्त्राकरितां

वार्ता । कबिरासातें जातां घडिया वांटी ॥ २ ॥ माघारिया धन आणिलें घरासि । न घे केला त्यासि त्याग तेणें ॥ ३ ॥ नामदेवाचिया घरासि आणिलें । तेणें लुटविलें द्विजां हातीं ॥ ४ ॥ प्रत्यक्षासि काय द्यावें हें प्रमाण । एकोबाचें ऋण फेडियलें ॥ ५ ॥ बीज दळोनियां केली आराधना । लागे नारायणा पेरणें तें ॥ ६ ॥ तुका म्हणे ऐसा नाहीं जया निर्धार । नाडला साचार तोचि एक ॥ ७ ॥ [६७]

भोगें घडे त्याग । त्यागें अंगा येती भोग ॥ १ ॥ ऐसें उफराटें वर्म । धर्मा अंगींच अधर्म ॥ २ ॥ देव अंतरे तें पाप । खोटे उगवा संकल्प ॥ ३ ॥ तुका म्हणे भीड खोटी । लाभ विचाराचे पोटीं ॥ ४ ॥ [६८]

भोरप्यानें सोंग पालटिलें वरी । बकध्यान धरी मत्स्या जैसें ॥ १ ॥ टिळे माळा मैंद मुद्रा लावी अंगीं । देखों नेदी जगीं फासे जैसे ॥ २ ॥ ढीवर या मत्स्या चारा घाली जैसा । भीतरील फांसा कळों नेदी ॥ ३ ॥ खाटिक हा स्नेहवादें पशु पाळी । कापावया नळी तयासाठीं ॥ ४ ॥ तुका म्हणे तैसा भला मी लोकांत । परी तूं कृपावंत पांडुरंगा ॥ ५ ॥ [६९]

गेली वीरसरी । मग त्यासि रांड मारी ॥ १ ॥ मग नये तैसी सत्ता । गेली मागील आणितां ॥ २ ॥ भंगलिया चित्ता । न ये काशानें सांधितां ॥ ३ ॥ तुका म्हणे धीर । भंगलिया पाठीं कीर ॥ ४ ॥ [७०]

दुसऱ्याजवळ कींवकाकुळतीस आलेला पाहिला, तेव्हां कबिरानें आपल्याजवळील अर्धें सणंग फाडून त्यास दिलें. राहिलेलें अर्धें सणंग तेंही देवानें ब्राह्मणाचा वेष धारण करून कबिराजवळ येऊन मला वस्त्राची गरज आहे अशी सबब सांगून त्याच्यापासून घेतलें २. पुढें त्या सर्व सणंगांची किंमत परत देवानें कबिराच्या घरीं पोहोंचविली, परंतु ती कबिरानें न घेतां तिचा त्याग केला ३. त्याचप्रमाणें नामदेव हे एक वेळ आपल्याजवळ कापडाचे बस्ते घेऊन बाहेरगांवीं विक्रीस गेले. त्यांनीं मार्गीनें जातांना एके ठिकाणीं पुष्कळसे धोंडे पाहिले. त्या धोंड्यांना आपल्याजवळील बस्तांतलें कापड वांटून दिलें. त्याची सर्व किंमत देवानें नामदेवाचे घरीं आणून दिली, परंतु त्यांनीं ती न घेतां ब्राह्मणांच्या हातून लुटविली ४. प्रत्यक्ष एकनाथाचें कर्ज भगवंतानें फेडिलें. यापुढें आतां दुसरें प्रमाण काय द्यावें ? ५. तसेंच दुसरें–भानुदास महाराज यांनीं आपल्याजवळचें पेरण्याचें बीं दळून संतांस भोजन घातलें, ह्याकरितां त्यांच्या शेताची पेरणी भगवंतानें आपण स्वतः केली ६. तुकाराम महाराज म्हणतात, असा भक्ताविषयीं देव कनवाळू आहे, पण त्या भगवंताविषयीं ज्याच्या मध्यें श्रद्धा नाहीं, तोच काय तो एक खरोखर या मनुष्यतनूंत येऊन फसला ७. [६७]

विवेकानें भोग भोगिले असतां त्याग होतो. अविचारानें भोगाचा त्याग केला असतां त्याग न होतां भोग घडतो. १. असें हें दिसण्याला वरकांतीं उलटें आहे, म्हणजे वास्तविक भोगत्याग करणें हा धर्म असून तसें करूं गेलें असतां अधर्म होतो आणि भोग भोगणें हा अधर्म असतां तसें केल्यानें धर्म होतो याचें कारण वर सांगितलें आहे. २. ज्या कर्मीनें देवाच्या भेटीस अंतराय येतो तीं कर्में कितीही चांगलीं असलीं तरी पापच आहेत. एवढ्याकरितां त्या विषयींचा चित्तांत जो संकल्प आहे तो खोटा आहे, म्हणून त्याचा नाश करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, जी गोष्ट वाईट आहे ती करण्याविषयींची भीड खोटी. विचारानें भिडेचा त्याग करण्यांतच लाभ आहे ४. [६८]

बहुरूपी नानाप्रकारच्या सोंगानें वरचा देह पालटतो. बगळा अंतरांतून माशाला पकडण्याचे हेतूनें ध्यानस्थ बसतो १. त्याप्रमाणें मैंदभक्त जो आहे तो द्वादश टिळे लावितो, गळ्यांत माळा घालतो आणि चांगल्या कोरून मुद्रा लावितो. असा बाहेर थाट करून जगाला लुटण्याचे जे त्याचे आंतील फांसे ते तो लोकांना दिसूं देत नाहीं २. ज्याप्रमाणें मासेपारधी गळाला कणीक वगैरेचें आमिष लावून माशांना चारा घालतात, परंतु त्या आमिषाचे आंत असणारा नरडेंफाड्या गळ तो माशांना दिसूं देत नाहीं ३. खाटीक जो आहे तो मोठ्या प्रीतीनें मेंढा अगर बोकड ह्यांचें पालन करितो, पण त्याच्या आंतला हेतु बकऱ्याला धष्टपुष्ट करून गळा कापावयाचा असतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें वरच्या बाजूनें मी लोकांमध्यें भला चांगला साधु असा आहें, पण अहो पांडुरंगा, आपलेकडून माझा अव्हेर होणार नाहीं, कारण तुम्ही कृपावंत आहांत ५. [६९]

मनुष्यांतली वीरश्री गेल्यावर त्याला एखादी सामान्य रांड मारते १. अशा प्रकारें त्याची फजिती झाल्यावर मग पूर्वींप्रमाणें जरी तो वीरश्री दाखवूं लागला तरी त्याची गेलेली इभ्रत पुन्हां येत नाहीं २. एखाद्या मनुष्याचें एखाद्या मित्राविषयीं चित्त भंगलें म्हणजे मग तें पुन्हां नीट करतां येत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, माणसातला धीर नाहींसा झाल्यावर मग त्याला कीर करावी लागते म्हणजे जेथें तेथें पीछेहाट घ्यावी लागते ४. [७०]

युक्ताहार न लगे आणिक साधनें। अल्प नारायणें दाखविलें ॥ १ ॥ कलियुगामाजीं करावें कीर्तन। तेणें नारायण देईल भेटी ॥ २ ॥ न लगे लौकिक सांडावा वेव्हार। घ्यावें वनांतर भस्म दंड ॥ ३ ॥ तुका म्हणे मज आणिक उपाव। दिसती ते वाव नामेंविण ॥ ४ ॥ [७१]

कंठीं कृष्णमणी। नाहीं अशुभ ते वाणी ॥ १ ॥ हो का नर अथवा नारी। रांड तया नांवें खरी ॥ २ ॥ नाहीं हातीं दान। शूरपणाचें कांकण ॥ ३ ॥ वाळियेली संतीं। केली बोडोनि फजिती ॥ ४ ॥ तुका म्हणे ताळा। नाहीं त्याची अवकळा ॥ ५ ॥ [७२]

माया ब्रह्म ऐसें म्हणती धर्मठक। आपणासरिसे लोक नागविले ॥ १ ॥ विषयाचा लंपट शिकवी कुविद्या। मनामागें नांद्या होउनि फिरे ॥ २ ॥ करूनि खातां पाक जीरे सुरण राई। करितां अतित्याई दुःख पावे ॥ ३ ॥ औषध द्यावया चाळविलें बाळा। दावूनियां गुळा दृष्टीपुढें ॥ ४ ॥ तरावया आधीं शोधा वेदवाणी। वांजट बोलणीं वारा त्यांचीं ॥ ५ ॥ तुका म्हणे जयां पिंडाचें पाळण। न घडे नारायण भेटे तया ॥ ६ ॥ [७३]

मृगजळ दिसे साचपण ऐसें। खोटियाचे पिसें ऊर फोडी ॥ १ ॥ जाणोनि कां करा आपुलाले घात। विचारा रे हित लवलाही ॥ २ ॥ संचित सांगातीं बोळवण सवें। आचरलें द्यावें फळ तेणें ॥ ३ ॥ तुका म्हणे सेखीं स्मशान तें वरी। संबंध गोवरी आगीसवें ॥ ४ ॥ [७४]

गौळियांची ताकपिरें। कोण पोरें चांगलीं ॥ १ ॥ येवढा त्याचा छंद देवा। काय सेवा

युक्ताहारादिक कांहीं साधनें करावयास नकोत, तरून जाण्याला थोडकें वर्म नारायणांनीं दाखविलें आहे १. तें हें कीं या कलियुगामध्यें निरंतर हरीचें कीर्तन करावें, तेणेंकरून नारायण हा भेट देतो २. लौकिकव्यवहार टाकण्याचें कांहीं कारण नाहीं आणि वनामध्यें जाऊन भस्मदंड घेण्याचें कांहीं कारण नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका हरीच्या नामावांचून हरीच्या दर्शनाविषयीं इतर उपाय व्यर्थ भासतात ४. [७१]

ज्याच्या कंठामध्यें कृष्णाचें नाम नाहीं त्याची वाणी किती गोड असली तरी ती अशुभ आहे १. मग तो पुरुष असो अगर स्त्री असो, ती खरोखर रांडच आहे आणि तो रंडका आहे २. ज्याच्या हातामध्यें दानाविषयीं शूरपणाचें कंकण नाहीं ३. असल्या दुर्जनाची संत बोडणी करून फजिती करतात व त्याला आपल्या संतमेळ्यांतून बाहेर घालवितात ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या वागण्यांत ताळमेळ नाहीं त्याची सर्व फजिती आहे. ५. [७२]

कार्यरूप जो देहादि प्रपंच त्या रूपानें असणारी व त्याच्या कारणरूपानें असणारी जी माया आहे ती सर्व ब्रह्म आहे, असें धर्मठक लोक म्हणतात आणि ह्या समजुतीनें आपण अवाच्या सवा वागून नागविले जातात आणि आपल्याबरोबर आपल्या संगतीनें असलेल्या लोकांस नागवितात १. विषयासक्त मनुष्य दुसऱ्याला वाईट बोध करितो आणि आपण मनाच्या मागें पांगुळाच्या नंदीबैलाप्रमाणें जिकडे मन नेईल तिकडे जातो २. सुरण आणि मोहरी यांचा पाक करून खाल्ल्यानें त्यांचें पाचन होतें आणि तसें न करितां दांडगाईनें जर कच्चींच खाईल तर त्याला दुःख भोगावें लागेल ३. एखाद्या रोगी मुलानें कडू औषध घ्यावें म्हणून आई त्याच्यापुढें गुळाचा खडा करते ४. जर तुम्हांला तरावयाचें असेल तर वेदाज्ञेविषयींचा विचार करून योग्य अशा त्याच्या ज्या (आज्ञा) असतील त्याप्रमाणें वागावें आणि त्याचीं जीं वायफळ भाषणें असतील त्यांचा त्याग करावा ५. तुकाराम महाराज म्हणतात, जे पुरुष सर्व ब्रह्म गमावून देहाचें पालन करणारे आहेत त्यांना नारायणाची भेट कधींही होत नाहीं ६. [७३]

मृगजळ हें खोटें असून तृषित हरणांना खऱ्यासारिखें दिसतें आणि त्या भ्रमानें ते पिण्याकरितां ऊर फुटेपर्यंत त्याकडे धांव घेतात. १. अहो मूर्खहो, त्याचप्रमाणें हा देहादिक प्रपंच खोटा आहे असें जाणत असतां त्याचेठिकाणीं सक्ती ठेवून आपले घात कां करून घेतां ? तर तसें करूं नका. आपले हिताचा त्वरित विचार करा. २. जें आपलें संचितकर्म आहे तें आपल्याबरोबर या जन्मांतून त्या जन्मांत पोहोंचवीत येतें आणि जें कांहीं आपण पूर्वजन्मांत आचरण केलें आहे त्याप्रमाणें तें पुढें फल देतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या प्राण्याचा देह सरते शेवटीं स्मशानाचा अंगीकार करतो आणि तेथें गोवऱ्यांशीं व अग्नीशीं त्याचें लग्न लागतें ४. [७४]

गोकुळांतील गवळ्यांचीं ताक पिणारीं तीं पोरें काय चांगलीं होतीं? १. पण त्यांचा देवाला अतिशय छंद असे.

भक्ती ते ॥ २ ॥ काय उपास पडिले होते । कण्याभोंवते विदुराच्या ॥ ३ ॥ तुका म्हणे कुब्जा दासी । रूपरासी हीनकळा ॥ ४ ॥ [७५]

आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥ १ ॥ सकळांच्या पायां माझे दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥ २ ॥ हित तें करावें देवाचें चिंतन । करूनिया मन एकविध ॥ ३ ॥ तुका म्हणे हित होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥ ४ ॥ [७६]

भक्ताविण देवा । कैचें रूप घडे सेवा ॥ १ ॥ शोभविलें येर येरां । सोनें एके ठायीं हिरा ॥ २ ॥ देवाविण भक्तां । कोण देता निष्कामता ॥ ३ ॥ तुका म्हणे बाळ । माता जैसें स्नेहजाळ ॥ ४ ॥ [७७]

विश्वाचा जनिता । म्हणे यशोदेसि माता ॥ १ ॥ ऐसा भक्तांचा अंकित । लागे तैसी लावी प्रीत ॥ २ ॥ निष्काम निराळा । गोवी लावियेल्या चाळा ॥ ३ ॥ तुका म्हणे आलें । रूपा अव्यक्त चांगलें ॥ ४ ॥ [७८]

काय दिनकरा । केला कोंबड्यानें खरा ॥ १ ॥ कां हो ऐसा संत ठेवा । भार माझे माथां देवा ॥ २ ॥ आडविलें दासीं तरि । कां मरती उपवासी ॥ ३ ॥ तुका म्हणे हातीं । कळा सकळ अनंतीं ॥ ४ ॥ [७९]

जेवितांही धरी । नाक हागतिया परी ॥ १ ॥ ऐसियाचा करी चाळा । आपुलीच आवकळा ॥ २ ॥ सांडावें मांडावें । काय ऐसें नाहीं ठावें ॥ ३ ॥ तुका म्हणे करी । ताक दुधा एक सरी ॥ ४ ॥ [८०]

हो कां पुत्र पत्नी बंधु । त्यांचा तोडावा संबंधु ॥ १ ॥ कळों आलें खस्याळसे । शिवों नये

अशी भक्ति किंवा सेवा तरी त्यांनीं कोणाची केली होती? २. विदुराच्या कण्या देव खाऊं लागले तेव्हां देवाला काय उपास पडले होते? ३. तुकाराम महाराज म्हणतात, कुब्जादासी जी होती ती काय चांगली होती? तिचा देह तीन ठिकाणीं वांकडा झालेला होता आणि कुरूपतेची आणि हीनकलेची तर ती रास होती ४. [७५]

आतां सर्व मनुष्यप्राण्यांना हाच उपदेश आहे. त्याप्रमाणें तुम्ही वागा. आपल्या आयुष्याचा नाश करूं नका १. सर्वांच्या पायांवर मस्तक ठेवून मी ही विनंती करितों कीं सर्वांनीं आपलें चित्त शुद्ध करावें २. सर्वांचें हित एकनिष्ठ मन करून देवाचें चिंतन करण्यांतच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां तुम्हांला फार काय सांगावें? ज्यामध्यें आपलें हित आहे असा व्यापार तुम्ही करा ४. [७६]

भक्ताखेरीज देवाला साकारत्व कसें येईल व भक्तावांचून त्याची सेवा तरी कोण करील? १. जसें सोन्याची आंगठी आणि त्यांतील हिऱ्याचें कोंदण हीं एकमेकांच्या योगानें सुशोभित आहेत, तसे देव आणि भक्त हे परस्परांच्या योगानें शोभिवंत आहेत २. देवाखेरीज भक्ताला निष्कामपद देणारा कोण आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसा मुलाचा आणि आईचा परस्पर संबंध आहे. ह्या दृष्टांताचा संबंध ध्रुव पदाशीं आहे ४. [७७]

विश्व निर्माण करणारा परमात्मा सामान्य यशोदेला आई म्हणतो १. ह्याप्रमाणें हा भक्ताचा अंकित आहे. जशी भक्तामध्यें त्याच्याविषयीं प्रीति असेल तसें तो देव आपल्यामध्यें भक्ताविषयींचें प्रेम ठेवतो २. जो परमात्मा सर्व कामनारहित आणि सर्व उपाधींहून वेगळा असूनही त्यानें आपल्याविषयींचा छंद गोपिकांना लाविला ३. तुकाराम महाराज म्हणतात, अव्यक्त परमात्मस्वरूप उत्तम साकार रूप धारण करतें झालें ४. [७८]

प्रातःकालीं जर कोंबडा ओरडला तरच सूर्य उदयाला आला असें समजावें, नाहींतर नाहीं? १. अहो देवा, माझेमध्यें संतपणाचा अधिकार नसतां संतपणाचा भार माझे मस्तकावर कां ठेवतां, म्हणजे मला संत कां म्हणतां? २. एखाद्या यजमानाला स्वयंपाक करणाऱ्या नोकरानें अडविलें म्हणजे स्वयंपाक केला नाहीं, तर तो का उपाशी मरेल? ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व कला अनंताचे हातांत आहेत ४. [७९]

माणसें हागण्याचे वेळेला घाण येते म्हणून नाक धरतात, त्याप्रमाणें कांहीं आचरट जेवायला बसले असतां नाक धरतात १. अशा चेष्टा करण्यांत आपलीच फजिती होते २. कोणत्या वेळीं कोणती गोष्ट करावी, कोणती टाकावी हें त्या मूर्खांना कळत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे असे पुरुष ताक आणि दूध ह्यांची सारखीच किंमत करतात ४. [८०]

पुत्र असोत अगर पत्नी असो अगर बंधु असोत, त्यांचा संबंध तोडून टाकावा १. जर हे सर्व खट्याळ आहेत असें

लिंपो दोषें ॥ २ ॥ फोडावें मडकें । मेलें लेखीं घायें एकें ॥ ३ ॥ तुका म्हणे त्यागें। विण चुकीजेना भोगें ॥ ४ ॥ [८१]

व्यालयाविण करी शोभनतांतडी । चार ते गधडी करीतसे ॥ १ ॥ कासया पाल्हाळ आणिकाचे देखी । सांगतां नव्हे सुखी साखरेसि ॥ २ ॥ कुंथाच्या ढेकरें न देवेल पुष्टी । रूप दावी कष्टी मळिण वरी ॥ ३ ॥ तुका म्हणे अरे वाचाळा हो ऐका । अनुभवेंविण नका वाव घेऊं ॥ ४ ॥ [८२]

जेणें घडे नारायणीं अंतराय । होत बाप माय वर्जावीं तीं ॥ १ ॥ येर प्रिया पुत्र धना कोण लेखा । करिती तीं दुःखा पात्र शत्रु ॥ २ ॥ प्रल्हादें जनक बिभीषणें बंधु । राज्य माता निंदु भरतें केली ॥ ३ ॥ तुका म्हणे सर्व धर्म हरिचे पाय । आणिक उपाय दुःखमूळ ॥ ४ ॥ [८३]

मान अपमान गोवें । अवघें गुंडूनी ठेवावें ॥ १ ॥ हेंचि देवाचें दर्शन । सदा राहे समाधान ॥ २ ॥ शांतीची वसती । खुंटे काळगती ॥ ३ ॥ आली ऊर्मी साहे । तुका म्हणे थोडें आहे ॥ ४ ॥ [८४]

थोडें आहे थोडें आहे । चित्त साहे जालिया ॥ १ ॥ हर्षामर्ष नाहीं अंगीं । पांडुरंगीं सरलें तें ॥ २ ॥ अवघ्या साधनांचें सार । न लगे फार शोधावें ॥ ३ ॥ तुका म्हणे लटिकें पाहें । सांडीं देह अभिमान ॥ ४ ॥ [८५]

आतां उघडीं डोळे । जरी अद्यापि न कळे । तरी मातेचिये खोळे । दगड आला पोटाशीं ॥ १ ॥

आपणांस कळलें तर त्यांच्याशीं संबंध करून आपण दोषानें लिप्त होऊं नये २. एखादें मनुष्य मेलें म्हणजे त्याच्या नांवानें मडकें फोडून आपण जसे त्याजविषयीं निराश होतो, त्याचप्रमाणें हीं सर्व मेलीं आहेत असें समजून त्यांच्या नांवानें मडकें एका तडाख्यांत फोडून टाकावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्यागावांचून भोग कधींही चुकत नाहीं ४. [८१]

कोणी एक स्त्री बाळंतीण न होतां बाळंतपणाचा डौल लोकांना दाखवूं लागली, अशी ही गधडी किती चार करणारी आहे १. दुसऱ्या खऱ्या बाळंतीण झालेल्या स्त्रियांचा सर्व प्रकार पाहून आपणही त्याप्रमाणें करावें म्हणजे बाज, शेक शेगडी, सुईणीकडून अंगास तेल वगैरे चोळून घेणें, पण असें दुसऱ्याचें पाहून आपण तसा पाल्हाळ कशासाठीं करावा ? साखरेच्या खाण्याची गोडी काय व सुख कसें आहे हें दुसऱ्याला सांगतां यावयाचें नाहीं २. खरोखर भोजन करून तृप्तीचे ढेंकरानें जशी तुष्टिपुष्टि येते त्याचप्रमाणें न जेवतां उगीच कुंथून खोटेंच मी जेवलों आहे असें म्हणून तृप्तीची ढेंकर देण्यापासून पुष्टि न येतां उलट चेहरा मात्र अति कष्टी आणि म्लान दिसेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, वाचाळ लोकहो, तुम्ही ऐका. खरोखर अनुभवावांचून कांहीं बडबड करूं नका ४. [८२]

आईबापांच्या आज्ञेप्रमाणें वागणें हा धर्म आहे, पण अशी जर त्यांची आज्ञा असेल कीं ज्याप्रमाणें वागलें असतां नारायणाचा आणि आपला वियोग होतो आहे, तर तीं संसारामध्यें अति पूज्य अशीं मातापितरें कां होईनात परंतु त्यांचा त्याग करावा १. बाकीचीं स्त्रिया, पुत्र, धन ह्यांचा तर काय हिशोब आहे ? इतर सर्व आपल्याला दुःखाविषयीं पात्र करणारे शत्रूच आहेत २. अहो, नारायणाकरितां आईबापांचा त्याग करावा असें म्हणतां तर असा पूर्वीं कोणीं केला आहे का, तर आहे. ते हे–प्रल्हादानें आपल्या पित्याचा, बिभीषणानें आपल्या वडील बंधूचा आणि श्रीरामाचा बंधू जो भरत त्यानें आईचा आणि राज्याचा देखील त्याग केला. ३. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, सर्व धर्म हरीचेच पाय आहेत. ह्यावांचून इतर उपाय आहेत ते दुःखमूळ होत ४. [८३]

मान आणि अपमान ह्या विषयींची गुंती संपूर्ण गुंडाळून बाजूला ठेवावी १. जेणेंकरून अंतःकरण सर्व काळ समाधानानें राहातें तेंच देवाचें दर्शन आहे २. ज्या ठिकाणीं शांतीची वस्ती आहे तेथें कालचक्र कुंठित होतें ३. ह्यास्तव जी जी म्हणून अंतःकरणामध्यें उर्मी म्हणजे वृत्ति उत्पन्न होईल ती ती शांतपणें सहन करणें. तुकाराम महाराज म्हणतात, असें होण्यांत परमार्थ अगदीं सुलभ आहे ४. [८४]

जर खरोखर परमार्थामध्यें आपल्याला चित्त मदत देईल तर परमार्थ अगदीं सुलभ आहे, असें द्विरुक्तीनें सांगतात १. ज्यांच्या हृदयांत हर्ष (आनंद) व विषयसंबंधी खेद हीं दोन्हींही नाहींत तेच खरोखर पांडुरंगस्वरूपीं मान्य होतात २. संपूर्ण साधनांचें हेंच सार आहे, ह्यावांचून दुसरा कांहीं फार शोध करण्याचें कारण नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा संपूर्ण प्रपंच खोटा आहे असें तूं जाण आणि देहविषयक अभिमानाचा त्याग कर ४. [८५]

आतां तरी तूं डोळे उघड. अजूनपर्यंतही तुला कांहीं कळलें नाहीं, तर मला असें वाटतें कीं, तूं खरोखर आपल्या

मनुष्यदेहा ऐसा निध। साधिलें तें साधे सिद्ध। करूनि प्रबोध। संत पार उतरले ॥ २ ॥ नाव चंद्रभागे तीरीं। उभी पुंडलिकाचे द्वारीं। कट धरूनिया करीं। उभाउभी पालवी ॥ ३ ॥ तुका म्हणे फुकासाठीं। पायीं घातली या मिठी। होतो उठाउठी। लवकरीच उतार ॥ ४ ॥ [८६]

न करीं रे संग राहें रे निश्चळ। लागों नेदी मळ ममतेचा ॥ १ ॥ या नांवें अद्वैत खरें ब्रह्मज्ञान। अनुभवावांचून बडबड ते ॥ २ ॥ इंद्रियांचा जय वासनेचा क्षय। संकल्पाही न ये वरी मन ॥ ३ ॥ तुका म्हणे न ये जाणीव अंतरा। अंतरीं या थारा आनंदाचा ॥ ४ ॥ [८७]

पंढरीचा महिमा। देतां आणिक उपमा ॥ १ ॥ ऐसा ठाव नाहीं कोठें। देव उभाउभी भेटे ॥ २ ॥ आहेति सकळ। तीर्थें काळें देती फळ ॥ ३ ॥ तुका म्हणे पेठ। भूमिवरी हें वैकुंठ ॥ ४ ॥ [८८]

तीर्थी धोंडा पाणी। देव रोकडा सज्जनीं ॥ १ ॥ मिळालिया संतसंग। समर्पितां भलें अंग ॥ २ ॥ तिर्थी भाव फळे। येथें अनाड ते वळे ॥ ३ ॥ तुका म्हणे पाप। गेलें गेल्या कळे ताप ॥ ४ ॥ [८९]

घेऊनियां चक्र गदा। हाचि धंदा करीतो ॥ १ ॥ भक्त राखे पायांपासीं। दुर्जनासी संहारी ॥ २ ॥ अव्यक्त तें आकारलें। रूपा आलें गुणवंत ॥ ३ ॥ तुका म्हणे पुरवी इच्छा। जया तैसा विठ्ठल ॥ ४ ॥ [९०]

देखोनि पुराणिकाची दाढी। रडे फुंदे नाक ओढी ॥ १ ॥ प्रेम खरें दिसे जनां। भिन्न अंतरीं

आईच्या पोटीं दगडच जन्मलास १. अरे, मनुष्यदेहासारखा तुला ठेवा प्राप्त झाला आहे. ह्या देहांत तूं जी सिद्धी करून घेशील ती साधण्यासारखी आहे. ह्याप्रमाणें सर्वांना बोध करून आपणही स्वतः विचार करून संत ह्या संसाराच्या पार झाले २. तुला ह्या संसारसिंधूंतून तरावयाचें असेल तर नाव चंद्रभागेच्या तीरीं पुंडलिकाच्या द्वारामध्यें कंबरेवर हात ठेवून उभी आहे आणि ती सर्वांना उभ्या उभ्याच आपल्याकडे बोलावीत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या नावेला कांहीं पैसा द्यावा लागत नाहीं. अगदीं फुकट, मात्र एकनिष्ठ भावानें देवाच्या पायाला मिठी घातल्यास ह्या भवसिंधूंतून लगेच पार पडतां येतें ४. [८६]

तूं कोणताही संग करूं नकोस आणि स्थिर राहा, व ममतेचा मळ आपल्या वृत्तीला किंचित्‌ही लागूं देऊं नकोस १. अशा ह्या स्थितीसच यथार्थ भेदशून्य ब्रह्मज्ञान म्हणतात, आणि ह्याखेरीज अनुभवरहित केवळ बडबड आहे ! २. इंद्रियांना जिंकणें, वासनेचा समूळ नाश करून टाकणें आणि देहादिक प्रपंचाचा संकल्पही मनामध्यें येऊं न देणें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याच्या अंतःकरणांत जाणिवेच्या अहंकाराचा उठाव नसून केवळ आनंदाचीच वस्ती आहे ४. [८७]

पंढरीच्या श्रेष्ठत्वाला दुसरी उपमाच देतां येत नाहीं १. कारण ह्यासारखें त्रैलोक्यांत दुसरें ठिकाण नाहीं. येथें देव तत्क्षणींच भेटतो २. बाकीचीं सर्व तीर्थें कालांतरानें फळ देणारीं आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, ही पंढरी पेठ पृथ्वीवर साक्षात्‌ वैकुंठच आहे ४. [८८]

ज्या ज्या तीर्थास जावें तेथें तीर्थ म्हणजे पाणी, देव म्हणजे धोंडा. आतां खरोखर देव जर पाहिजे असेल तर तो सज्जनांचे ठिकाणीं आहे १. एवढ्याकरितां संतांची संगती जर प्राप्त झाली तर तेथें देह अर्पण करणें हेंच उत्तम आहे २. तीर्थामध्यें स्नान केलें असतां पापताप दूर होतात. पण तेथें भाव पाहिजे, अभाविक असेल तर फळ नाहीं. पण संतांचे ठिकाणीं कसाही अडाणी, अभाविक, नास्तिक, कुतर्की असला तरी त्याला ते दुरुस्त करतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, मनुष्य निष्पाप झाला हें त्याच्यांतील त्रिविधताप नाहींसे झाल्यानें कळतें ४. [८९]

देव हा नेहमीं हातांमध्यें चक्र, गदाइत्यादिकआयुधें घेऊन निरंतर हाच धंदा करितो १. तो भक्तजनांचा सांभाळ करून दुर्जनांचा संहार करितो २. जें परमात्म्याचें अव्यक्त निराकार स्वरूप तेंच सगुण साकार झालें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीविठ्ठल हा ज्या भक्ताची जशी इच्छा असेल तशी पूर्ण करतो ४. [९०]

कोणी एक वृद्ध पुराणिक देवळामध्यें नित्यशः पुराण सांगत असत. त्यांना दाढी होती. तेथें बहुत श्रोते श्रवणास येत असत. त्यांमध्यें एक धनगर येत असे. पुराणिक बुवा पुराण सांगूं लागले म्हणजे त्यांची दाढी हालत असे. ती पाहून तो धनगर श्रोता ढळढळां रडूं लागे १. व मधून मधून हुंदके देत असे आणि नाक चोळीत असे. तें पाहून पुराणिक व इतर श्रोते ह्यांना असें वाटलें कीं खरोखर हा प्रेमळ आहे. पण त्या गुलामाची (धनगराची) रडण्याची अंतःकरणांतील

भावना ॥ २ ॥ आवरितां नावरे । खुर आठवी नेवरे ॥ ३ ॥ बोलों नये मुखावाटां । म्हणे होता त्यांचा तोटा ॥ ४ ॥ दोन्हीं सिंगें चारी पाय । खुणा दावी म्हणे होय ॥ ५ ॥ मना आणितां बोकड । मेला त्याची चरफड ॥ ६ ॥ होता भाव पोटीं । मुखा आलासे सेवटीं ॥ ७ ॥ तुका म्हणे कुडें । कळों येतें तें रोकडें ॥ ८ ॥ [९१]

दुर्जनाची गंधी विष्टेचिया परी । देखोनियां दुरी व्हावें तया ॥ १ ॥ आइका हो तुम्ही मात हे सज्जन । करूं संघट्टन नये बोलों ॥ २ ॥ दुर्जनाचे अंगीं अखंड विटाळ । वाणी रजस्वला स्रवे तैशी ॥ ३ ॥ दुर्जनाचें भय धरावें त्यापरी । पिसाळलेवरी धावे श्वान ॥ ४ ॥ दुर्जनाचा भला नव्हे अंगसंग । बोलिलासे त्याग देशाचा त्या ॥ ५ ॥ तुका म्हणे किती सांगावें पृथक । अंग कुंभपाक दुर्जनाचें ॥ ६ ॥ [९२]

अतिवादी नव्हे शुद्ध या बीजाचा । ओळखा जातीचा अंत्यज तो ॥ १ ॥ वेद श्रुति नाहीं ग्रंथ ज्या प्रमाण । श्रेष्ठाचें वचन न मानी तो ॥ २ ॥ तुका म्हणे मद्यपानाचें मिष्टान्न । तैसा तो दुर्जन शिवों नये ॥ ३ ॥ [९३]

शब्द नाहीं धीर । ज्याची बुद्धि नाहीं स्थिर ॥ १ ॥ त्याचें न व्हावें दर्शन । खळा पंगती भोजन ॥ २ ॥ संतास जो निंदी । अधम लोभासाटीं वंदी ॥ ३ ॥ तुका म्हणे पोटीं । भाव आणीक जया होटीं ॥ ४ ॥ [९४]

भावना वेगळी होती २. तें त्याचें रडें त्याला आवरत नसे, कारण त्याच्या प्रीतीचा एकुलता एक बोकड मेला होता. त्याचे खूर व नख्या त्याला क्षणोक्षणीं आठवत असत. ३. तो म्हणे, आतां मुखानें काय बोलावें! ह्या हजारों शेरड्यांमध्यें माझा बोकड ज्याचा म्हणजे बेण्याचा असा एकुलता एक होता ४. पुराणिक बोवा पुराण सांगतांना एक पुरुष व दुसरी प्रकृति असें दोन बोटें करून श्रोत्यांना सांगत. पुराणिक बुवांनीं दोन बोटें पुढें केलेलीं पाहून तो धनगर श्रोता म्हणे, 'होय हो, माझ्या बोकडाला दोनच शिंगें होतीं. तुम्ही बरोबर त्याच्या खुणा दाखवितां, पुराणिकबुवा'. हे ईशाचे देह चार आहेत असें चार बोटें पुढें करून सांगूं लागले तें पाहून तो धनगर श्रोता म्हणे, 'होय हो, त्याला चारच पाय होते. तुम्ही त्याच्या बरोबर खुणा दाखवितां' ५. त्या धनगराचें अंतःकरण जें तळमत होतें तें केवळ मेलेला बोकड मनांत आणल्यानें होय ६. शेवटीं आपल्या रडण्याविषयींचा पोटांतील बोकडासंबंधीं भाव पुराणिक बुवांजवळ तो धनगर ओकला ७. तुकाराम महाराज म्हणतात अंतःकरणांतली खोटी गोष्ट छपून न राहातां लोकांना ती स्पष्ट कळून येते ८. [९१]

जीं माणसें दुर्जन असतात त्यांच्या अवगुणांची घाण नरकाप्रमाणें भोंवतालून येत असते. एवढ्या करितांच सज्जनांनीं त्यांना पाहून त्यांच्यापासून दूर व्हावें १. अहो सज्जनहो, एवढी माझी गोष्ट तुम्ही ऐका. तुम्ही त्यांच्याशीं कधींही संघटन करूं नका. फार काय सांगावें? त्यांच्याशीं बोलूंही पण नका २. दुर्जनाच्या अंगांत निरंतर विटाळ भरलेला असतो आणि त्याच्या मुखांतून बाहेर पडणारे शब्द तर विटाळशीच्या रक्तस्रावाप्रमाणेंच आहेत ३. दुर्जन माणसांचें भय पिसाळलेल्या धांवणाऱ्या कुत्र्याप्रमाणें धरावें ४. दुर्जन जे आहेत त्यांची अंग-संगतीही चांगली नाहीं. ते ज्या देशांत असतील त्या देशाचाही त्याग करावा, असें शास्त्रांत बोललें आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, आतां निराळें कोठपर्यंत सांगूं? ह्या दुर्जनांचें अंग नरक आहे ६. [९२]

अति वितंड वाद करणारे जे आहेत त्यांचें खरोखर बीज शुद्ध नाहीं. तो जरी ब्राह्मण आणि मोठा विद्वान् असला तरी त्याला तसें न समजतां तो जातीचा महार असें समजावें १. वेद, उपनिषदादिक ह्यांचीं प्रमाणें तो मानीत नाहीं आणि व्यासादिक जे श्रेष्ठ आहेत त्यांचीं वचनें तो मानीत नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, जसे दारू पिणाऱ्या गृहस्थाचें गोड अन्नही असेव्य आहे तसें वर निर्दिष्ट केलेल्या दुर्जनाला शिवूं नये ३. [९३]

क्षणोक्षणीं ज्याचें बोलणें बदलतें व ज्याची बुद्धि क्षणभरही स्थिर नसते १. त्याचें दर्शनही मला होऊं नये. असल्या खळाच्या पंक्तीचें भोजनही मला घडूं नये २. जो संताची निंदा करतो आणि अति अधम अति नीच असा श्रीमंत गृहस्थापासून आपल्याला कांहीं द्रव्याचा लाभ होईल अशा लोभानें त्याच्या पायां पडतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच्या हृदयांतील भाव एक आहे व बोलण्याचा भाव दुसरा आहे ४. [९४]

चोरें चोरातें करावा उपदेश। आपुला अभ्यास असेल तो ॥ १ ॥ शिंदळीच्या मागें वेंचितां पाउलें। होईल आपुलें तिच्या ऐसें ॥ २ ॥ तुका म्हणे भितो पुढिलीया दत्ता। म्हणऊनि चिंता उपजली ॥ ३ ॥ [९५]

मांडवाच्या दारा। पुढें आणिला म्हातारा॥ १ ॥ म्हणे नवरी आणा रांड। जाळा नवऱ्याचें तोंड ॥ २ ॥ समय न कळे। काय उपयोगी ये वेळे॥ ३ ॥ तुका म्हणे खरा। येथूनिया दूर करा ॥ ४ ॥ [९६]

कांहीं नित्यनेमाविण। अन्न खाय तोचि श्वान। वायां मनुष्यपण। भार वाहे तो वृषभ ॥ १ ॥ त्याचा होय भूमी भार। नेणे यातीचा आचार। झाला दावेदार। भोगवी अघोर पितरांसि ॥ २ ॥ अखंड अशुभ वाणी। खरें न बोलेचि स्वप्नीं। पापी तयाहुनी। आणीक नाहीं दुसरा ॥ ३ ॥ पोट पोसी एकला। भूतीं दया नाहीं ज्याला। पाठीं लागे आल्या। अतिथाचे दाराशीं ॥ ४ ॥ नाहीं संतांचें पूजन। न घडे तीर्थाचें भ्रमण। यमाचा आंदण। सीण थोर पावेल ॥ ५ ॥ तुका म्हणे त्यांनीं। मनुष्यपणा केली हानी। देवा विसरूनी। गेलीं म्हणतां मी माझें ॥ ६ ॥ [९७]

कन्या गौ करी कथेचा विकरा। चांडाळ तो खरा तया नांवें ॥ १ ॥ गुण अवगुण हे दोन्ही प्रमाण। यातिशीं कारण नाहीं देवा ॥ २ ॥ आशाबद्ध करूं नये तें करिती। तुका म्हणे जाती नरकामधीं ॥ ३ ॥ [९८]

हरिहरां भेद। नाहीं करूं नये वाद ॥ १ ॥ एक एकाचे हृदयीं। गोडी साखरेच्या ठायीं ॥ २ ॥

चोरांनीं दुसऱ्या चोराला अशा तऱ्हेनें घर फोडावें अगर अशा तऱ्हेनें खिसा कातरावा असा निरंतर आपल्या अभ्यासाचा उपदेश करावा १. जी स्त्री स्वतः छिनाल आहे तिच्यामागें तिच्या संगतीला जर साध्वी स्त्री चालेल तर तीही पण तिच्यासारखी कालांतरानें छिनाल होईल २. तुकाराम महाराज म्हणतात, असा दुर्जनाच्या संगतीनें पुढें होणारा जो परिणाम त्याचें मला फार भय व चिंता वाटते ३. [९५]

कोणी एकानें लग्नगृहांतील मांडवाच्या दारामध्यें लग्नांतील कारभार करण्याकरितां म्हाताऱ्याला आणिलें १. तो म्हातारा अति मूर्ख होता. तो त्या ठिकाणीं अप्रासंगिक भाषणें बोलूं लागला, तीं अशीं. कोणीकडे ती नवरी रांड आहे तिला घेऊन या आणि नवऱ्याचें तोंड जाळा २. कोणत्या वेळेला काय बोलावें हें त्या मूर्खाला कळेना, म्हणून तो जरी म्हातारा असला तरी त्याचा कांहीं उपयोग नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या गाढवाला ह्या असल्या शुभ कार्यांतून दूर घालवून द्या ४. [९६]

भोजनाचे पूर्वी हरीची पूजा अगर गीता अगर विष्णुसहस्रनामाचा पाठ अगर कांहीं हरिनामाचा जप ह्याचा कांहीं एक नियम न टेवितां जो मनुष्य अन्न खातो तो कुत्रा आहे. तो मनुष्यपणाचा भार व्यर्थ वाहातो. तो केवळ बैलच आहे १. त्याचा केवळ पृथ्वीला भार आहे. ज्या जातींत जन्मला आहे त्या जातीचा आचारविचार कांहीं जाणत नाहीं, तो खरोखर आपल्या पितृलोकीं असणाऱ्या पूर्वजांचा केवळ दावेदारच आहे, कारण आपल्या कृतीनें तो त्यांना नरक भोगवितो २. त्याची वाणी नेहमीं अशुभ बोलते. तो स्वप्नांतही खरें बोलत नाहीं. जगतांत त्याच्याहून दुसरा कोणीही पापी नाहीं ३. आपलें व आपल्या बायकापोरांचें जो पोट भरतो, दुसऱ्या प्राण्यांची ज्याला बिलकूल दया नाहीं आणि जो कोणी आपल्या द्वाराशीं आलेल्या अतिथीच्या मागें हातांत काठी घेऊन लागतो ४. ज्याला कधींही संतांची पूजा व तीर्थयात्राही कधीं घडत नाहीं तो केवळ यमाला आंदण दिलेली दासीच आहे आणि तो यमाचे हातून अति दुःख पावेल ५. तुकाराम महाराज म्हणतात, असे हे प्राणी ह्यांनीं मनुष्यपणाची हानी केली. हा देह मी आणि ही स्त्री, पुत्र व धन माझें आहे असें म्हणण्यांतच हे देवाला विसरून वायां गेले ६. [९७]

आपली मुलगी, गाय आणि हरिकथा ह्यांची जो विक्री करतो तो जातीचा ब्राह्मण जरी असला तरी महार आहे असें समजावें १. जो गुणी आहे म्हणजे ज्याच्यांत परमार्थाचा गुण आहे तोच देवाला प्रिय आहे आणि जो अवगुणी आहे तो अप्रिय आहे. मग जरी त्याची जात कोणतीहि असली तरी तिकडे देव पाहात नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, जीं मनुष्यें आशाबद्ध आहेत तीं जी गोष्ट करूं नये ती करितात आणि शेवटीं नरकास जातात ३. [९८]

शिव आणि विष्णु ह्यांच्यामध्यें भेद नाहीं. अहो मूर्ख उपासकहो, तुम्ही आपसांत विनाकारण तंटा करूं नका १. कारण शिवाच्या हृदयांत विष्णु आहे आणि विष्णूच्या हृदयांत शिव आहे. ज्याप्रमाणें साखरेंत गोडी आहे व गोडींत साखर आहे

भेदकासी नाड। एक वेलांटीच आड ॥ ३ ॥ उजवें वाम भाग। तुका म्हणे एकचि अंग ॥ ४ ॥ [९९]

वक्त्या आधीं मान। गंध अक्षता पूजन। श्रोता यति झाला जाण। तरी त्या नादीं उचित ॥ १ ॥ शीर सर्वांगा प्रमाण। यथाविधि कर चरण। धर्माचें पाळण। सकळीं सत्य करावें ॥ २ ॥ पट्ट पुत्र सांभाळी। पिता त्याची आज्ञा पाळी। प्रमाण सकळीं। ते मर्यादा करावी ॥ ३ ॥ वरासनीं पाषाण। तो न मानावा सामान्य। येर उपकरणें। सोनियाचीं परी नीच ॥ ४ ॥ सोनियाचा पैंजण। मुगुटमणि केला हीण। जयाचें कारण। तयाठायीं अळंकार ॥ ५ ॥ सेवका स्वामीसाठीं मान। त्याचें नाम त्याचें धन। तुका म्हणे जाण। तुम्ही संत यद्र्थी ॥ ६ ॥ [१००]

घरीं रांडा पोरें मरती उपवासी। सांगे लोकांपासी थोरपण ॥ १ ॥ नेऊनियां घरा दाखवावें काय। काळतोंडा जाय चुकावूनी ॥ २ ॥ तुका म्हणे आम्ही जाणों त्या प्रमाण। टकावे हे जन तैसे नहों ॥ ३ ॥ [१०१]

शुकसनकादिकीं उभारिला बाहो। परिक्षितीला हो दिसां सातां ॥ १ ॥ उठाउठीं करी स्मरणाचा धांवा। धरवत देवा नाहीं धीर ॥ २ ॥ त्वरा जाली गरुड टाकियेला मागें। द्रौपदीच्या लागें नारायणें ॥ ३ ॥ तुका म्हणे करी बहुच तांतडी। प्रेमाची आवडी लोभा फार ॥ ४ ॥ [१०२]

तद्वत् २. जर कोणी भेददृष्टीनें पाहिलें तर हरि व हर ह्या नामांमध्यें जो भेद कांहीं दिसेल तो एका वेलांटीचाच ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे दोघेही स्वरूपानें एक आहेत, ज्याप्रमाणें डावें अंग आणि उजवें अंग मिळून एक देह तद्वत् ४. [९९]

परमार्थाचें निरुपण करणाऱ्यास गंध, फूल, अक्षतादिक पूजेचा जो मान तो त्यास आधीं केला पाहिजे. मग तो गृहस्थ जरी आहे आणि श्रोता जरी संन्यासी आहे तरी त्याला वक्त्याच्या आधीं पूजा घेण्याचा अधिकार नाहीं १. ज्याप्रमाणें सर्वांगांमध्यें मस्तक हें श्रेष्ठ आहे म्हणून त्याची आधीं पूजा करावयाची; मग क्रमानें हातांची व पायांची असा हा खरा धर्म आहे. ह्याचें पाळण सगळ्यांनीं करावें २. ज्याप्रमाणें मुलगा हा बापापेक्षां जरी लहान आहे तरी तो जर राजाच्या गादीवर असेल तर त्याच्या आज्ञेप्रमाणें बापानेंही वागलें पाहिजे. सर्वांनीं श्रेष्ठांना जी गोष्ट मान्य आहे त्या मर्यादेनें वागावें ३. दगडाचा देव केला आहे तर त्याला देव्हाऱ्यांतच ठेविलें पाहिजे आणि त्याच्यापेक्षां बहुत मूल्यवान् सुवर्ण आहे आणि त्याचीं उपकरणीं केलीं आहेत तरी तीं कमीच आहेत. तीं देवाच्या खालींच ठेविलीं पाहिजेत ४. एका राजानें सोन्याचा तोडा केला आणि मस्तकावर घालण्याच्या मुकुटावरील मणी कांचेचा केला. आतां त्या सोन्याच्या तोड्यापेक्षां मुकुटावरील कांचेचा मणी हीन आहे तरी तो तोडा मस्तकावर घेतां येणार नाहीं व तो मुकुटमणी पायांत घालतां येणार नाहीं, तर जेथला अलंकार तेथेंच घातला पाहिजे ५. जे सेवक आहेत त्यांची मानमान्यता केवळ त्यांच्या मालकामुळेंच होते. त्या मालकाचें नांव हेंच त्या सेवकाचें धन आहे, म्हणजे मी अमुक मालकाचा सेवक आहें असें मिरवणें. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हीं संत त्याप्रमाणेंच आहांत असें समजा ६. [१००]

घरामध्यें बायकापोरें उपाशीं मरत आहेत आणि लोकांमध्यें मी मोठा श्रीमान् आहें असें मोठेपण सांगतो. १. ज्या मनुष्याजवळ आपल्या श्रीमंतीच्या गप्पा मारल्या होत्या त्या इसमाला आकस्मिक आपल्या गांवामध्यें पाहिलें. आतां हा आपल्याला भेटल्यास विचारील, कीं तुमचा वाडा आणि तुमचें ऐश्वर्य काय आहे तें आम्हांला दाखवा. असें त्यानें म्हटल्यावर मग त्याला घरीं नेऊन काय दाखवावें! वास्तविक आपल्याजवळ खावयास अन्न देखील नाहीं, म्हणून तो काळतोंड्या त्याला न भेटतां चुकवून जातो २. तुकाराम महाराज म्हणतात, अशा लफंग्याची लफंगेगिरी आम्ही जाणतों, पण आम्हीं मात्र जनाला फसविणाऱ्यांपैकीं नाहीं ३. [१०१]

परीक्षिती हा मोठ्या त्वरेनें म्हणजे सात दिवसांत कृतार्थ झाला, असें शुकसनकादिकांनीं हात वर करून सांगितलें १. म्हणून तुम्हीं त्वरेनें हरीचें स्मरण करा. तसें केल्यानें तुम्हांला भेट देण्याविषयीं देवाला दम धरवणार नाहीं २. पूर्वी एक वेळ संकटाचे प्रसंगीं द्रौपदीनें हरीचा धांवा केला होता, त्या वेळेस हरी मनोवेगापेक्षांही ज्याचा वेग जास्त अशा गरुडावर बसून द्रौपदीकरितां जात होते. त्या वेळीं त्यांना गरुडाची गति मंद वाटून त्यांनीं त्याच्यावरून उडी टाकली व अति वेगानें धांव घेऊन गरुडास मागें टाकलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाला भक्तांमध्यें असणाऱ्या आपल्या प्रेमाविषयीं आवड असल्यामुळें त्यांच्याविषयींचा देवाला अति लोभ आहे, म्हणून भक्तकार्य करण्याविषयीं भगवंताला मोठी त्वरा आहे ४. [१०२]

बोलिलों तें कांहीं तुमचिया हिता। वचन नेणतां क्षमा कीजे ॥ १ ॥ वाट दावी तया नलगे रुसावें। अतित्याई जीवें नाश पावे ॥ २ ॥ निंब दिला रोग तुटाया अंतरीं। पोभाळितां वरी आंत चरे ॥ ३ ॥ तुका म्हणे हित देखण्यासि कळे। पडती आंधळे कूपामाजी ॥ ४ ॥ [१०३]

माकडें मुठीसी धरिले फुटाणे। गुंतले ते नेणें हात तेथें ॥ १ ॥ काय तो तयाचा लेखावा अन्याय। हित नेणें काय आपुलें तें ॥ २ ॥ शुकें नळिकेशीं गोवियेले पाय। विसरोनि जाय पक्ष दोन्ही ॥ ३ ॥ तुका म्हणे एक ऐसे पशु जीव। न चले उपाव कांहीं तेथें ॥ ४ ॥ [१०४]

हरि तूं निष्ठुर निर्गुण। नाहीं माया बहु कठिण। नव्हे तें करिसी आन। कवणें नाहीं केलें तें ॥ १ ॥ घेऊनि हरिश्चंद्राचें वैभव। राज्य घोडे भाग्य सर्व। पुत्र पत्नी जीव। डोंबाघरीं वोपविलीं ॥ २ ॥ नळ दमयंतीचा वियोग। विघडिला त्यांचा संग। ऐसें जाणे जग। पुराणेंही बोलती ॥ ३ ॥ राजा शिबी चक्रवर्ती। कृपाळु दयाळु भूपती। तुळविलें अंतीं। तुळें मास तयाचें ॥ ४ ॥ कर्ण भिडतां समरंगणीं। बाणी व्यापियेला रणीं। मागसी पाडोनी। तेथें दांत तयाचे ॥ ५ ॥ बळी सर्वस्वें उदार। जेणें उभारिला कर। करुनी काहार। तो पाताळीं घातला ॥ ६ ॥ श्रियाळाच्या घरीं। धरणें मांडिलें मुरारी। मारविलें करीं। त्यांचें बाळ त्या हातीं ॥ ७ ॥ तुज भावें जे भजती।

मीं जो कांहीं उपदेश केला तो केवळ तुमचें हित व्हावें म्हणूनच. पण माझ्या बोलण्याचा उद्देश न कळल्यामुळें जर तुम्हांला राग आला असेल तर क्षमा करावी १. मार्ग चुकला असतां खरा मार्ग दाखविणाऱ्यावर कोणीं कधींही रागावूं नये. त्याच्या बोलण्याला न मानून दांडगाईनें आपलाच हेका चालविला म्हणजे सरळ मार्ग टाकून आडमार्गाला गेलें तर जीवाचा नाश मात्र होईल २. वैद्य कडूलिंबवत् कडू औषध आंतला रोग नाहींसा होण्याकरितां देतो. तें औषध पोटांत न घेतां बाहेरच्या आंगाला सारवलें तर रोगाचा नाश न होतां उलट आंतल्या बाजूनें तो रोग वाढेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे विवेकदृष्टीनें पाहातात त्यांना आपलें हित कशांत आहे हें कळतें; ह्याहून उलट म्हणजे जे ज्ञानांध आहेत ते अंधतम नरकांत पडतात ४. [१०३]

पारध्यानें माकडास धरण्याकरितां एका बारीक तोंडाच्या पुरलेल्या मापांत फुटाणे घालून ठेविले होते. त्या फुटाण्यांच्या लालुचीनें एका माकडानें त्या मापल्यामध्यें हात घातला आणि तो फुटाण्यांनीं मूठ भरून हात बाहेर काढूं लागला. परंतु फुटाण्यांनीं मूठ भरल्यामुळें हात फुगला म्हणून बाहेर काढतांना तो त्या बारीक तोंडांतून निघेना. अशा तऱ्हेनें हात गुंतून पडलेल्या माकडाला फुटाण्यांची मूठ सोडून हात बाहेर काढून घेण्याचें कळेना १. तो काय त्या माकडाचा अपराध जाणावा ? आपलें काय हित आहे तें तो मूर्ख जाणतच नाहीं २. पारध्यानें बांधलेल्या नळीवर कांहीं खाण्याच्या लालसेनें राघू येऊन बसतो. त्या नळीचें भोंक मोठें असतें व आंतील ओंवलेली दोरी बारीक असते ह्यामुळें राघू त्या नळीवर बसल्यानें नळिका त्याच्या भारानें उलटी फिरते, तिजबरोबर तोही उलटा होतो. मग नेहमीं फिरण्यानें तें आकाश त्याला अति खोल भासतें. या नळीवरून जर माझे पाय सुटले तर या खोल आकाशांत पडून माझे तुकडे होतील, अशा ह्या विपरीत समजुतीनें आपल्याजवळ उडण्याला दोन्ही पंख असूनही तो त्यांस विसरून गेला ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे कितीएक जीव पशूंप्रमाणें मूर्ख आहेत. त्यांच्यापुढें कांहीं उपाय चालत नाहीं ४. [१०४]

अहो हरी, तुम्हीं फार निर्दय आहांत, कारण तुम्हीं निर्गुण आहांत. तुम्हांला ममता नाहीं. तुम्ही फार कठोर आहांत. जी गोष्ट कधीं होणारी नाहीं व जी जगतामध्यें कोणीं केलेली नाहीं, अशी निर्दयपणाची गोष्ट तुम्ही करतां १. ती ही कीं, हरिश्चंद्राचें सर्व राज्यवैभव हरण केलें व शेवटीं त्याच्या मुलाला, त्याच्या बायकोला व त्याला स्वतःला त्याच्याकडूनच डोंबाला म्हणजे नदीवरील महाराला विकविलेंत २. त्याचप्रमाणें नलदमयंती ह्या स्त्रीपुरुषांचा वियोग केलात. मीच असें म्हणतो असें नाहीं. सर्व जग असें म्हणतें आणि पुराणेंही असें बोलतात ३. त्याचप्रमाणें चक्रवर्ती शिबी राजा ह्याच्याकडून त्याचेंच मांस कापून तें त्याच्याकडूनच वजन करविलेंत ४. त्याचप्रमाणें कर्ण अर्जुनाशीं समरांगणांत युद्ध करतांना बाणानें गतप्राण स्थितींत पडला असतां त्याचे सोन्यानें बांधलेले दांत त्याच्याच हातून पाडून मागितलेत. ५. त्याचप्रमाणें महान् उदार राजा बळी, ज्यानें आपण दाते आहोंत अशा अभिमानानें दातृत्वपणाचा हात निरंतर उभारला आहे, त्याच्याजवळही कपट करून म्हणजे त्रिपाद भूमी मागून त्याच्या मस्तकावर पाय देऊन अखेरीस त्यालाही पाताळामध्यें घातलें ६. त्याचप्रमाणें श्रियाळ राजाचे घरीं धरणें घेऊन त्याच्या हातानेंच त्याचें पोर मारविलेंत ७. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तुला जे भावानें भजणारे

त्यांच्या संसारा हे गती । ठाव नाहीं पुढती । तुका म्हणे करिसी तें ॥ ८ ॥ [१०५]

चाल केलासी मोकळा । बोल विठ्ठल वेळोवेळां ॥ १ ॥ तुज पापाचि नाहीं ऐसें । नाम घेतां जवळीं वसे ॥ २ ॥ पंच पातकांच्या कोडी । नामें जळतां न लगे घडी ॥ ३ ॥ केलीं मागें नका पाहों । तुज जमान आम्ही आहों ॥ ४ ॥ करीं तुजसी करवतीं । आणिक नामें घेऊं किती ॥ ५ ॥ तुका म्हणे काळा । रीग नाहीं निघती ज्वाळा ॥ ६ ॥ [१०६]

बाळ बापा म्हणे काका । तरी कां निप्राध पारिखा ॥ १ ॥ जैसा तैसा भाव गोड । पुरवी कोड विठ्ठल ॥ २ ॥ साखरेसि म्हणतां धोंडा । तरी कां तोंडा न रुचे ॥ ३ ॥ तुका म्हणे आरुष बोल । नव्हे फोल आहाच ॥ ४ ॥ [१०७]

चित्तीं नाहीं तें जवळीं असोनि काय । वत्स सांडी माय तेणें न्याये ॥ १ ॥ प्रीतीचा तो वायु गोड लागे मात । जरी जाय चित्त मिळोनियां ॥ २ ॥ तुका म्हणे अवघें फिकें भावाविण । मीठ नाहीं अन्न तेणें न्यायें ॥ ३ ॥ [१०८]

काय काशी करिती गंगा । भीतरीं चांगा नाहीं तो ॥ १ ॥ अधणीं कुचर बाहेर तैसा । नये रसा पाकासी ॥ २ ॥ काय टिळे करिती माळा । भाव खळा नाहीं त्या ॥ ३ ॥ तुका म्हणे प्रेमेंविण । अवघा बोले भुंके शीण ॥ ४ ॥ [१०९]

शिंदळा साल्याचा नाहीं हा विश्वास । बाईल तो त्यास न विसंबे ॥ १ ॥ दुष्ट बुद्धि

त्यांच्या संसाराचा परिणाम तूं पुढें काय करशील ह्याचा कांहीं ठाव ठिकाण लागणार नाहीं ८. [१०५]

अरे, तुला सर्व अडचणींपासून मोकळा केला आहे. आतां तूं विठ्ठल विठ्ठल मात्र वेळोवेळां म्हणत जा १. तुझ्याजवळ पापच राहाणार नाहीं, असें नाम घेतल्यानें होईल २. जरी कोट्यावधी पंचमहापातकें असलीं तरी हरीचें नाम घेतल्यानें तीं जळण्याला घटकादेखील लागणार नाहीं ३. तूं मागें पातकें केलीं असशील तीं पहात बसूं नको. तुला त्या पातकांपासून कांहीं बाधा होणार नाहीं ह्याविषयीं आम्ही जामीन आहों ४. अरे, तुझ्याकडून जितकीं पातकें करवतील तितकीं तूं कर, आतां त्या पातकांची नावें किती घेऊं ? ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या हरीच्या नामाच्या ठिकाणीं काळाचा देखील प्रवेश नाहीं, कारण तेथें सर्वांचें भस्म करणाऱ्या अशा ज्वाळा निघत आहेत ६. [१०६]

वास्तविक चुलत्याला काका म्हणावयाचें पण एखादें लहान मूल आपल्या बापालाच काका म्हणतें, तर अशा चुकीमुळें हा आपला मुलगा नाहीं असें बापास वाटेल काय ? १. तसेंच भक्तानें परम भावानें देवाचें नांव वेडेंवांकडें जरी घेतलें तरी तें देवाला मोठें गोड वाटून देव त्याची इच्छा पूर्ण करतात २. कोणी खडीसाखरेला दगडाचा खडा असें समजून ती तोंडामध्यें घातली तर ती जिव्हेला गोड रुचि देणार नाहीं काय ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, भक्तांचे वेडेवांकडे बोल वरवरचे नाहींत, तर भगवंताच्या प्रेमरसानें भरलेले ओले आहेत ४. [१०७]

जें आपल्या चित्तामध्यें नाहीं तें रात्रंदिवस जरी जवळ असेल तरी कांहीं उपयोग नाहीं. एखादें मोठें झालेलें वासरूं रात्रंदिवस आपल्या आईजवळ जरी बांधलेलें असलें तरी तिच्या चित्तांत त्याजविषयीं बिलकूल प्रेम नसतें. तें स्तनपान करावयास आलें तरी ती त्याला हुंदाडून देते १. दोघांचें चित्त मिळालेलें असून त्यांपैकीं एक दुसऱ्यापासून जरी दूर असला तरी त्याच्याकडून आलेला प्रेमपूर्वक वारा बरा लागतो आणि त्याचें भाषणही बरें वाटतें २. तुकाराम महाराज म्हणतात, हरीविषयीं चांगला भावच पाहिजे. जर तो नसेल तर त्याचा सर्व परमार्थ फिका. ज्याप्रमाणें उत्तम अन्न आहे परंतु त्यात मीठ नसलें तर तें जसे फिकें म्हणजे अळणी तद्वतच ३. [१०८]

जर तुझें अंतःकरण शुद्ध नाहीं तर काशी आणि गंगा हीं तुला काय करतील ? १. ज्याप्रमाणें कुचर दाणा बाहेर अपक्व असतो त्याप्रमाणें तो आधणांत टाकला तरी तसाच राहातो, त्याचा पाकरस होत नाहीं म्हणजे तो शिजत नाहीं २. ज्या खळामध्यें हरीविषयींचा भाव नाहीं त्याला टिळेमाळा हीं परमार्थांतील बाहेरील भूषणें काय करतील ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, खरोखर प्रेमावांचून बोलणें तें कुत्र्याचें भुंकणें. त्यापासून सर्व शीणच आहे ४. [१०९]

कोणी एका जार मनुष्याच्या बायकोस नेण्याकरितां तिचा भाऊ म्हणजे त्याचा मेहुणा हा आला होता. परंतु त्याला त्या मेहुण्याचा विश्वास येईना. आपण जर ह्याच्याबरोबर कदाचित् बायको पाठविली तर हा तिच्याबरोबर जारकर्म करील असें तो स्वतः जार असल्यामुळें त्यास वाटूं लागलें, म्हणून तो तिला त्याजबरोबर पाठवीना १. त्याप्रमाणें दुष्ट बुद्धीचीं

चोरी करी निरंतर। तो म्हणे इतर लोक तैंसे ॥ २ ॥ तुका म्हणे जया चित्तीं जे वासना। तयाची भावना तयापरी ॥ ३ ॥ [११०]

धाकुट्याचे मुखीं घांस घाली माता। वरी करी सत्ता शहाणिया ॥ १ ॥ ऐसें जाणपणें पडिलें अंतर। वाढे तों तों थोर अंतराय ॥ २ ॥ दोन्ही उभयतां आपणचि व्याली। आवडीची चाली भिन्न भिन्न ॥ ३ ॥ तुका म्हणे अंगापासूनि निराळें। निवडिलें बळें रडतें स्तनीं ॥ ४ ॥ [१११]

देवाचे म्हणोनी देवीं अनादर। हें मोठें आश्चर्य वाटतसे ॥ १ ॥ आतां येरा जना म्हणावें तें काई। जया भार डोई संसाराचा ॥ २ ॥ त्यजुनी संसार अभिमान सांठा। जुलूम हा मोटा दिसतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे आळस करूनियां साह्य। बळें कैसे पाहें वाया जाती ॥ ४ ॥ [११२]

उपदेश तो भलत्या हातीं। झाला चित्तीं धरावा ॥ १ ॥ नये जाऊं पात्रावरी। कवटी सार नारळी ॥ २ ॥ स्त्री पुत्र बंदीजन। नारायण स्मरविती ॥ ३ ॥ तुका म्हणे रत्नसार। परि आधार चिंधीचा ॥ ४ ॥ [११३]

संतांचे गुणदोष आणितां या मना। केलिया उगाणा सुकृताचा ॥ १ ॥ पिळोनियां पाहे पुष्पाचा परिमळ। चिरोनि केळी केळ गाढव तो ॥ २ ॥ तुका म्हणे गंगे अग्नीसि विटाळ। लावी तो चांडाळ दुःख पावे ॥ ३ ॥ [११४]

माणसें नेहमीं चोऱ्या करितात आणि त्यांना इतर सर्व लोक आपल्याप्रमाणें चोर आहेत असें वाटतें २. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या चित्तामध्यें जशी वासना असते त्याचप्रमाणें त्याची भावना असते ३. [११०]

आई लहान मुलाला आपल्या हातानें जेवावयास घालते आणि दुसऱ्या जाणत्या मुलाला अनेक प्रकारचीं कामें सांगते १. एकाला हातानें जेवावयास घालावें व एकाला कामें सांगावींत असा जो फरक दिसतो तो केवळ शहाणपणामुळेंच होय. जों जों मूल शहाणें होत जातें तों तों आईच्या प्रेमांत पुष्कळ फरक पडत जातो २. जाणतें आणि नेणतें ह्या दोघांनाही तिनेंच जन्म दिला तरी वर सांगितल्याप्रमाणें तिच्या प्रीतींत फरक असतो ही पाहा काय मौज आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जाणत्या मुलानें येऊन आईच्या आंगास मिठी मारली असतां त्याच्या हाताला हिसडा देऊन ती त्याला दूर करते आणि तान्हें मूल पाळण्यांत रडत असेल तर ती मोठ्या प्रेमानें धांवत जाऊन त्यास बुद्धिपुरःसर स्तनपान देते. ४. [१११]

आम्ही देवाचे भक्त आहोंत असें जे सांगतात आणि देवाच्या भजनपूजनाविषयीं अनादर दाखवितात त्यांचें हें करणें फार आश्चर्यकारक वाटतें १. आतां इतर म्हणजे ज्यांनीं संसाराचें ओझें मस्तकावर घेतलें आहे आणि जे आम्ही संसारच करणार अशा कृतनिश्चयानें बद्ध झाले आहेत ते लोक परमार्थास विन्मुख असल्यास त्यांना काय म्हणावयाचें? २. ज्यानें सर्व संसार सोडून देहाभिमान जवळ ठेवला आहे त्याचें हें करणें फार जुलमाचें दिसतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्याला आळसाची मदत घेऊन भक्त म्हणविणारे मूर्ख आग्रहानें वायां जातात ४. [११२]

खरोखर हिताचा उपदेश जरी कोणी सामान्य जन करीत असला तरी तो चित्तामध्यें घ्यावा. हा सामान्य आहे, ह्याचें बोलणें काय ऐकावयाचें आहे, असें केवळ वरवर पाहून त्याचा अव्हेर करूं नये १. ज्याप्रमाणें एखादें नारळाचें फळ हातांत घेऊन त्याच्या वरच्या करवंटीकडे दृष्टी देऊन ह्यांत कांहीं हांशील नाहीं, हें केवळ लांकडासारखें निरस आहे, असें समजून नारळाचा जर कोणी त्याग करील तर आंतील सारभूत आणि मधुर खोबऱ्याला तो मुकेल, म्हणून तसें करूं नये २. आपल्या अंकीत असणारी स्त्री, मुलगा, चाकर हीं आपल्याकडून नारायणाचें स्मरण करवितील तर त्यांचें खुशाल मानावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, रत्न हें जरी मौल्यवान आहे तरी सामान्य चिंधींत बांधल्यामुळें तिचे त्याच्यावर उपकार आहेत ४. [११३]

खरोखर संतजन असतील तर त्यांच्यामधील गुण आणि त्यांच्याबरोबर त्यांच्यांतील दोष हे जर कोणी मनांत आणील तर त्यानें जेवढें कांहीं सुकृत केलें असेल त्याचा नाश होईल १. फूल चोळून त्याचा सुगंध जो पाहातो तो गाढव आहे व केळीचें झाड चिरून त्याच्या केळीचें फळ पाहाणाराही गाढव आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, ही शूद्राचे घरांतली गंगा आहे, व हा शूद्राचे चुलींतील अग्नि आहे, ह्यास्तव हीं दोन्हीं विटाळलेलीं आहेत, असा कोणी त्यांच्यावर विटाळपणाचा आरोप करील तर त्या चांडाळास दुःख प्राप्त होईल ३. [११४]

चुंबळीचा करी चुंबळीशीं संग। अंगीं वसे रंग क्रियाहीन ॥ १ ॥ बीजा ऐसें फळ दावी परिपाकीं। परिमळ लौकिकीं जाती ऐसा ॥ २ ॥ माकडाच्या गळां रत्न कुळांगना। सांडुनियां सुना बिदी धुंडी ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसा व्याली ते गाढवी। फजिती ती व्हावी आहे पुढें ॥ ४ ॥ [११५]

सांपडला संदीं। मग बळिया पडे बंदीं ॥ १ ॥ ऐसी कोणी वाहे वेळ। हातीं काळाच्या सकळ ॥ २ ॥ दाता मागे दान। जाय याचका शरण ॥ ३ ॥ तुका म्हणे नेणां। काय सांगों नारायणा ॥ ४ ॥ [११६]

सर्प विंचू दिसे। धन अभाग्या कोळसे ॥ १ ॥ आला डोळ्यांसी कवळ। तेणें मळलें उजळ ॥ २ ॥ अंगाचे भोवंडी। भोय झाडें फिरे धोंडी ॥ ३ ॥ तुका म्हणे नाड। पाप ठाके हिता आड ॥ ४ ॥ [११७]

न देखोन कांहीं। म्यां पाहिलें सकळही ॥ १ ॥ झालों अवघियापरी। मी हें माझें ठेलें दुरी ॥ २ ॥ न घेतां घेतलें। हात पाय उसंतिलें ॥ ३ ॥ खादलें न खातां। रसना रस झाली घेतां ॥ ४ ॥ न बोलोनी बोलें। केलें प्रगट झांकिलें ॥ ५ ॥ नाइकिलें कानीं ॥ तुका म्हणे आलें मनीं ॥ ६ ॥ [११८]

इहलोकींचा हा देहे। देव इच्छिताती पाहे ॥ १ ॥ धन्य आम्हीं जन्मा आलों। दास विठोबाचे झालों ॥ २ ॥ आयुष्याच्या या साधनें। सच्चिदानंद पदवी घेणें ॥ ३ ॥ तुका म्हणे पावठणी। करूं स्वर्गाची निशाणी ॥ ४ ॥ [११९]

जो बटकीचा असेल तोच दुसऱ्या बटकीशीं संग करील, त्याच्या आंगीं क्रियाहीनतेचा (वाईट कर्मांचा) रंग राहील. १. ज्याप्रमाणें बीज असेल, त्याप्रमाणें परिणामीं फळें येतात आणि जशी ज्याची व्यावहारिक जात असेल तसाच त्याचा परिमळ येतो (लोकांत प्रसिद्धी होते) २. माकडाच्या गळ्यामध्यें रत्न बांधलें असतां तो तें तोडून टाकतो, त्याचप्रमाणें श्वानवृत्तिवत् असणाऱ्या दुर्जनाच्या गळ्यांत कुलस्त्री घातली असतां तो तिचा त्याग करून गल्लोगल्लीं फिरतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या त्या दुष्ट दुर्जनाला ती त्याची गाढवी माता कशाकरितां प्रसवली ? मला असें वाटतें कीं आपली पुढें फजिती व्हावयास पाहिजे आहे म्हणून ४. [११५]

मोठा बलवान् पुरुष पेंचांत सांपडला म्हणजे बंदींत पडतो १. असाही एखादा प्रसंग येतो, कीं तो त्या वेळीं असणाऱ्या परिस्थितीच्याच पूर्णपणें अधीन असतो. २. जो पुरुष निरंतर दान करणारा असतो तो कांहीं प्रसंगीं याचकाच्या पायां पडून त्याच्याजवळ दान मागतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो नारायणा, हें काय तुम्हांला कळत नाहीं ? मी काय सांगावें ? ४. [११६]

अभागी मनुष्यानें पुरलेलें धन उकरून काढलें तरी तें त्याला धन असें न दिसतां सर्प, विंचू व कोळसे दिसतात १. ज्याच्या डोळ्याला कावीळ झाली आहे त्याला स्वच्छ वस्तु जरी असली तरी ती पिंवळी मळकट अशी दिसते २. आपल्या आंगाभोंवतीं गरगर फिरून ज्याला भोंवळ आली आहे त्याला घर, दार, डोंगर, दरी हीं सर्व आपल्याभोंवतीं फिरताहेत असें दिसतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, पूर्वार्जित पाप हें मनुष्याला मोठें नाडणारें आहे; तें त्याच्या हिताच्या आड येतें ४. [११७]

मी माझ्या ह्या स्थूल देहाच्या चर्मदृष्टीनें सर्व कांहीं न पाहातां ज्ञानदृष्टीनें पाहिलें आहे १. विश्वामध्यें सर्व भिन्न भिन्न प्रकार यथार्थ आत्मदृष्टीनें मीच झालों आहें. अन्यथा देहदृष्टीनें असणारें देहविषयक मीपण आणि तत्संबधिक स्त्री-पुत्र, गृहादिकांविषयींचें माझेंपण ह्या वृत्ती नाहींशा झाल्या आहेत. २. माझ्या ह्या स्थूल देहाच्या हातानें व पायानें जें न घेतां टाकलें तें सर्व पारमार्थिक आत्मदेहानें घेतलें ३. माझ्या त्या स्थूल देहाच्या मुखानें जें मीं खालें नाहीं किंवा स्थूल देहाच्या मुखांतील जिव्हेनें जे रस चाखले नाहींत ते सर्व ह्या पारमार्थिक आत्मसुखानें खाल्ले व आत्मरसनेनें चाखले ४. जें झांकलेलें आहे तें माझ्या ह्या स्थूल देहाच्या वाणीनें न बोलून तें पारमार्थिक परवाणीनें सर्व प्रगट केलें. ५. तुकाराम महाराज म्हणतात, जें माझ्या स्थूल देहाच्या कानानें ऐकण्यांत आलें नाहीं तें तत्त्व माझ्या अंतर्मुख मनामध्यें आलें ६. [११८]

पाहा, ह्या मृत्युलोकांतल्या नरदेहाची देव इच्छा करितात १. आम्ही मोठे धन्य आहोंत, कारण आम्ही मृत्युलोकांत मनुष्यजन्माला आलों आहोंत आणि विठोबाचे सेवक झालों आहोंत २. ह्या मनुष्यजन्मांतील आयुष्यानें सच्चिदानंदरूप ब्रह्मपदाची मनुष्यास प्राप्ति करून घेतां येते ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही खुणेच्या स्वर्गाची पाय देऊन चढून जाण्याची पायरी करूं ४. [११९]

पंडित वाचक जरी झाला पुरता । तरी कृष्णकथा ऐके भावें । क्षीर तुपा साकरे झालिया भेटी । तैसी पडे मिठी गोडपणें ॥ १ ॥ जाणोनियां लाभ घेई हा पदरीं । गोड गोडावरी सेवीं बापा । जाणिवेचें मूळ उपडोनी खोड । जरी तुज चाड आहे तुझी ॥ २ ॥ नाना परीमळ द्रव्य उपचार । अंगीं उटी सार चंदनाची । जेविलियाविण शून्य ते शृंगार । तैसी गोडी हरिकथेविण ॥ ३ ॥ ज्याकारणें वेदश्रुति हीं पुराणें । तेंचि विठ्ठल नाणें तिष्ठे कथे । तुका म्हणे येर दगडाचीं पेवें । खळखळोंचि आघवें मूळ तेथें ॥ ४ ॥ [१२०]

आणिकांच्या कापिती माना । निष्ठुरपणा पार नाहीं ॥ १ ॥ करिती वेटे उसणवारी । यमपुरीं भोगावया ॥ २ ॥ सेंदराचें दैवत केलें । नवस बोलें तयासी ॥ ३ ॥ तुका म्हणे नाचती पोरें । सोडितां येरें अंग दुखे ॥ ४ ॥ [१२१]

गंधर्व अग्नि सोम भोगिती कुमारी । कोटें चराचरीं त्याग केला ॥ १ ॥ गायत्री स्वमुखें भक्षीतसे मळ । मिळाल्या वोहाळ गंगाओघ ॥ २ ॥ कागाचिये विष्ठें जन्म पिंपळासी । पांडवकुळासी पाहतां दोष ॥ ३ ॥ शकुंतला सूत कर्ण शृंगी व्यास । यांच्या नामें नाश पातकांसी ॥ ४ ॥ गणिका अजामेळ कुब्जा तो विदुर । पाहातां विचार पिंगळेचा ॥ ५ ॥ वाल्हा विश्वामित्र वसिष्ठ नारद । यांचें पूर्व शुद्ध काय आहे ॥ ६ ॥ न व्हावीं तीं झालीं कर्में नरनारी । अनुतापें हरी स्मरतां मुक्त ॥ ७ ॥ तुका म्हणे पूर्व नाठवे श्रीहरी । मूळ जो उच्चारी नर्क त्यासी ॥ ८ ॥ [१२२]

तूं जरी पंडित असलास किंवा मोठा वाचणारा असलास तरी श्रीकृष्णाची कथा भक्तिभावानें ऐक. जसा दूध, तूप आणि साखर ह्यांचा एकत्र योग अधिक गोड होतो तसा पंडितानें कृष्णकथा केल्यानें गोडीचा योग होईल १. असें जाणून तूं हा मोठा लाभ पदरांत घे. तुझ्यामध्यें पूर्ण पंडिताचा गोडपणा आहे. जर तुला आत्मप्राप्तीची इच्छा असेल तर त्या गोडपणावर आमच्या श्रीकृष्णाची गोड कथा आहे ती सेवन कर. तुझ्यामध्यें मी शास्त्रज्ञ आहें असें ज्ञानरूप अहंकाररूपी जें खोड आहे तें मुळासकट उपटून टाक. नानाप्रकारचे सुगंधी द्रव्याचे जे उपचार त्या सर्वांमध्यें सार, आंगाला चंदनाची उटी लावणें, हें आहे २. पण हे सगळे विलास जर पोटांत अन्न नसेल तर सर्व शून्य आहेत. तशी हरिकथेवांचून तुजमध्यें पांडित्याची गोडी आहे ती व्यर्थ होय ३. ज्याकरितां वेद, श्रुति व पुराणें आहेत तोच विठ्ठल देव कथेंत उभा असतो. तुकाराम महाराज म्हणतात, एका विठ्ठलाला सोडून बाकी सर्व दगडाच्या पेवाप्रमाणें आहे. तें केवळ घालतांना व काढतांना खळखळीचें मूळ आहे ४. [१२०]

आपल्या उदरनिर्वाहाकरितां जे दुसऱ्याच्या माना कापतात त्यांच्या निर्दयपणाला पार नाहीं १. पण ते लेकाचे असें समजत नाहींत, कीं आपण यमपुरी भोगण्याला ही उसनवारीच करीत आहोंत. एखादी मूर्ख स्त्री दगडाला शेंदूर लावून त्याच्या पुढें नवस करून म्हणते, कीं मला मूल होऊं दे; मी तुझ्यापुढें कोंबडे किंवा गाभणी मेंढी कापीन २. तुकाराम महाराज म्हणतात, जीं पोरें दुसऱ्याच्या खोड्या करणारीं व बागडणारीं आहेत त्यांचें आंग दुखावयाचेंच ३. [१२१]

शास्त्रामध्यें आठ वर्षांची मुलगी लग्नास योग्य आहे असें सांगितलें आहे. परंतु त्या मर्यादेस येईपर्यंत तिला दोन वर्षें गंधर्व, दोन वर्षें अग्नि, दोन वर्षें सूर्य व दोन वर्षें चंद्र भोगतो. अशीं आठ वर्षें झाल्यावर तिची लग्नाची तयारी होते. त्या वेळेस ह्यापूर्वी ही व्यभिचारी आहे. हिनें चौघांशीं व्यभिचार केला आहे, असें म्हणून जगतांत तिला वरणाऱ्यानें तिचा त्याग केला काय? १. गाय ही आपल्या तोंडानें गू खाते, ओढे हे शुद्ध गंगेस जाऊन मिळतात. २. वड आणि पिंपळ हे कावळ्याच्या गुवापासून जन्मले आहेत आणि पांडवकुळ पाहिलें असतां सर्व दोषी आहेत, म्हणजे ते पांचांपासून जन्मले असून पांचांत एक बायको आहे ३. शकुंतला ही विश्वामित्राचे योगानें मेनकेपासून झाली, शृंग ऋषि हरणीपासून आणि व्यास ऋषि कोळणीपासून जन्मले असें जरी ह्यांचें कूळ आहे तरी त्यांचीं नांवें घेतलीं असतां पातकांचा नाश होतो ४. त्याचप्रमाणें अजामेळ, गणिका, कुब्जा दासी, विदुर, पिंगळा ह्यांचा कुलविचार वरप्रमाणेंच आहे ५. त्याचप्रमाणें वाल्हा कोळी, विश्वामित्र, वसिष्ठ, नारद ह्यांचीं पूर्वीची कुळें काय शुद्ध होतीं? ६. ह्या सांगितलेल्या स्त्री-पुरुषांकडून न होणारीं पातकें जरी घडलीं तरी त्यांनीं हरीचें अनुतापानें स्मरण केलें म्हणून तीं मुक्त झालीं ७. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यांचे पूर्वकूळ देवसुद्धां मनांत आणीत नाहींत आणि ह्यांच्या मुळाचा उच्चार जे कोणी करतील ते नरकास जातील ८. [१२२]

सोनियाचें ताट क्षीरीनें भरिलें । भक्षावया दिलें श्वानालागीं ॥ १ ॥ मुक्ताफळहार खरासी घातला । कस्तुरी सुकराला चोजविली ॥ २ ॥ वेदपारायण बधिरा सांगे ज्ञान । तयाची ते खूण काय जाणे ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्याचें तोचि एक जाणें । भक्तीचें महिमान साधु जाणे ॥ ४ ॥ [१२३]

ऐसा हा लौकिक कदा राखवेना । पतितपावना देवराया ॥ १ ॥ संसार करितां म्हणती हा दोषी । टाकितां आळसी पोटपोसा ॥ २ ॥ आचार करितां म्हणती हा पसारा । न करितां नरा निंदिताती ॥ ३ ॥ संतसंग करितां म्हणती हा उपदेशी । येरां अभाग्यासी ज्ञान नाहीं ॥ ४ ॥ धन नाहीं त्यासी ठायींचा करंटा । समर्थासी ताठा करिताती ॥ ५ ॥ बहु बोलों जातां म्हणती हा वाचाळ । न बोलतां सकळ म्हणती गर्वी ॥ ६ ॥ भेटीसी न वजतां म्हणती हा निष्ठुर । येतां जातां घर बुडविलें ॥ ७ ॥ लग्न करूं जातां म्हणती हा मातला । न करितां जाला नपूंसक ॥ ८ ॥ निपुत्रिका म्हणती पहा हो चांडाळ । पातकाचें मूळ पोरवडा ॥ ९ ॥ लोक जैसा ओक धरितां धरवेना । अभक्ता जिरेना संतसंग ॥ १० ॥ तुका म्हणे आतां ऐकावें वचन । त्यजूनियां जन भक्ति करा ॥ ११ ॥ [१२४]

धर्म रक्षणासाठीं । करणें आटी आम्हांसी ॥ १ ॥ वाचा बोलों वेदनीती । करूं संतीं केलें तें ॥ २ ॥ न बाणतां स्थिति अंगीं । कर्म त्यागी लंड तो ॥ ३ ॥ तुका म्हणे अधम त्यासी । भक्ति दूषी हरीची ॥ ४ ॥ [१२५]

सोन्याचें ताट दुधानें भरलें आणि खाण्याकरितां कुत्र्यापुढें ठेविलें १. मोत्यांचा हार गाढवाला घातला आणि डुकराचे नाकास कस्तूरी लाविली २. वेदज्ञ मनुष्य बहिऱ्यास ज्ञान सांगूं लागला परंतु त्याच्या सांगण्याचें वर्म त्या बहिऱ्यास काय कळणार? ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें खरें वर्म आहे तें ज्याचा तोच जाणतो आणि भक्तीचा महिमा साधु जाणतात ४. [१२३]

अहो देवा, हा लौकिक केव्हांही रक्षण केला जाणार नाहीं १. कारण एकादा मनुष्य व्यवस्थित संसार करूं लागला, तर त्यास कित्येक लोक असें म्हणतात, कीं हा देवाचें भजनपूजन कधींही करीत नाहीं, सदासर्वकाळ संसारांत निमग्न असतो म्हणून दोषी आहे. ह्या जनापवादाकडे लक्ष देऊन संसार करण्याचें टाकलें तर हा आळशी, केवळ आपलें पोट भरणारा आहे असें म्हणतात २. आपल्या वर्णाश्रमाला उचित अशा आचारविचारानें वागूं लागला, देवपूजा करूं लागला तरी त्याला निकडूनही लोक नांवें ठेवितात. देवपूजेचा पसारा मांडून गोमुखींत हात घालून तो बसतो, म्हणून अलीकडे मोठा साधु झाला असें म्हणतात. कोणी ह्या लोकापवादाकडे लक्ष देऊन आचार सोडला तरी त्याला तिकडूनही कर्मभ्रष्ट आहे असें म्हणतात ३. त्याचप्रमाणें संताचे संगतीनें वागूं लागला तर त्याला लोक असें म्हणतात, कीं अलिकडे यानें साधुबोवांचा उपदेश घेतला आहे. जर कोणी साधूची संगती केली नाहीं तर, अहो! तो करंटा आहे, त्याला कसचा सत्संग, त्याला कसचें ज्ञान, असें म्हणतात ४. त्याचप्रमाणें ज्याच्याजवळ पैसा नसेल त्याला म्हणतात, हा निर्दैवी मूळचाच करंटा, ह्याला कसचे पैसे मिळतात. जर कोणी श्रीमान् असला तर त्याला म्हणतात, हा आपल्याच ताठ्यांत असतो. ह्याला मोठा श्रीमंतीचा डौल आहे. हा कसचा गरीबाकडे बघतो ५. त्याचप्रमाणें पुष्कळ बोलूं लागला तर वाचाळ म्हणतात. मुळींच बोलला नाहीं तर सर्व लोक त्याला गर्विष्ठ म्हणतात ६. त्याचप्रमाणें आपल्या इष्टमित्रांचे भेटीस गेला नाहीं तर हा मोठा निर्दय आहे व वरचेवर त्यांच्या भेटीला जाऊं लागला तर आमचेकडे येऊन येऊन उंबऱ्याची साल नाहींशी केली असें म्हणतात ७. त्याप्रमाणें दोन चार लग्नें केलीं तर मरत झाला, बरें मुळींच लग्न केलें नाहीं तर नपुंसक म्हणतात ८. ज्याला मूल नसेल त्याला हा निपुत्रिक, चांडाळ, ह्याचें तोंड पाहूं नये; असें म्हणतात. एखाद्याला पुष्कळ पोरें असतील तर गुलामाला खायला मिळेना आणि वर्षाचे वर्षाला पोरें होतात व अति पोरें होणें हें पातकच आहे असें लोक म्हणतात ९. लोक वांतीप्रमाणें आहेत. ती जशी हातांत धरवत नाहीं त्याप्रमाणें लोकापवादही रक्षण होत नाहीं आणि अभक्त जे आहेत त्यांना सत्संग पचत नाहीं १०. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, अहो सर्वजण हो, तुम्ही माझी एक गोष्ट ऐका. ह्या लौकिकाचा त्याग करून हरीची भक्ति करा ११. [१२४]

धर्मरक्षण करण्याकरितांच आम्हांला खटाटोप करावा लागतो १. आम्ही वाचेनें वेदनीति बोलूं आणि पूर्वीं संत ज्याप्रमाणें वागत आले त्याप्रमाणें आम्ही वागूं २. ब्रह्मस्थिति अंगांत जोंपर्यंत बाणली नाहीं तोंपर्यंत आपलें विहित कर्म टाकणें हा केवळ लंडपणा आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो पुरुष अधम आहे तोच हरीच्या भक्तीला दोष देतो ४. [१२५]

चवदा भुवनें जयाचिये पोटीं । तोचि आम्हीं कंठीं सांठविला ॥ १ ॥ काय एक उणें आमुचिये घरीं । वोळंगती द्वारीं रिद्धिसिद्धि ॥ २ ॥ असुर जयानें घातले तोरडीं । तो आम्हांसि जोडी कर दोन्ही ॥ ३ ॥ रूप नाहीं रेखा जयासी आकार । आम्हीं तो साकार भक्तीं केला ॥ ४ ॥ अनंत ब्रह्मांडें जयाचिये अंगीं । समान तो मुंगी आम्हांसाठीं ॥ ५ ॥ तुका म्हणे आम्ही देवाहूनि बळी । झालों हे निराळीं ठेवुनी आशा ॥ ६ ॥ [१२६]

केला मातीचा पशुपति । परि मातीसी काय महंती । शिवपूजा शिवासी पावे । माती मातीमाजी समावे ॥ १ ॥ तैसे पूजिती आम्हां संत । पूजा घेतो भगवंत । आम्ही किंकर संतांचे दास । संत पदवी नकों आम्हांस ॥ २ ॥ केला पाषाणाचा विष्णु । परि पाषाण नव्हे विष्णु । विष्णुपूजा विष्णूसी अर्पे । पाषाण राहे पाषाणरूपें ॥ ३ ॥ केली कांशाची जगदंबा । परि कांसें नव्हे अंबा । पूजा अंबेची अंबेला घेणें । कांसें राहे कांसेपणें ॥ ४ ॥ ब्रह्मानंद पूर्णामाजी । तुका म्हणे केले कांजी । ज्याची पूजा तेणेंचि घेणें । आम्हां पाषाणरूप राहणें ॥ ५ ॥ [१२७]

ते माझे सोयरे सज्जन सांगाती । पाय आठविती विठोबाचे ॥ १ ॥ येरा मान विधि पाळणापुरतें । देवाचीं तीं भूतें म्हणोनियां ॥ २ ॥ सर्वभावें जाला वैष्णवांचा दास । करीन त्यांच्या आस उच्छिष्टाची ॥ ३ ॥ तुका म्हणे जैसे आवडती हरिदास । तैशी नाहीं आस आणिकांची ॥ ४ ॥ [१२८]

दया तिचें नांव भूतांचें पाळण । आणिक निर्दळण कंटकांचें ॥ १ ॥ धम नीतीचा हा ऐक वेव्हार । निवडीलें सार असार तें ॥ २ ॥ पाप त्याचें नांव न विचारी मीत । भलतेंचि उन्मत्त करी सदा ॥ ३ ॥ तुका म्हणे धर्म रक्षावयासाठीं । देवासही आटी जन्म घेणें ॥ ४ ॥ [१२९]

खालचे सात आणि वरचे सात मिळून चवदा लोक ज्याच्या पोटांत आहेत अशाही हरीला आम्ही आपल्या कंठांत सांठविला आहे १. आमचे घरीं कांहीं कमी नाहीं; आमच्या दारांत रिद्धि-सिद्धि निरंतर सेवेला तत्पर आहेत २. ज्यांनीं संपूर्ण राक्षस बंदींत घातले असा प्रभु आमच्या पुढें दोन्ही हात जोडतो. ३. ज्या देवाला रूप-आकारादि चिन्हें नाहींत त्याला आम्ही आपल्या भक्तीच्या जोरानें सगुण साकार केला आहे ४. ज्याच्या अंगामध्ये अनंत ब्रह्मांडें आहेत तो आमच्याकरितां मुंगीप्रमाणें देहांत अल्प सगुण झाला आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही आशा बाजूला ठेवून देवापेक्षां बलवान झालों आहों ६. [१२६]

मातीचें पार्थिव लिंग करून त्याची पूजा केली तरी ती पूजा मातीची न होतां शिवाला पोंचते आणि पार्थिव-विसर्जनानें माती मातीपणानेंच राहाते. तिला कोणी शिव म्हणत नाहीं १. त्याप्रमाणें संत जी आमची पूजा करितात ती पूजा आम्हाला न मिळवां देव घेतो. आम्ही संतांचे अंकित, केवळ संतांचे दासच आहोंत. आम्हांस संताची पदवी नको २. दगडाची विष्णुमूर्ती करून त्याची पूजा केली तरी ती पूजा दगडाला न पोंचतां विष्णुदेवतेला पोंचते, दगड दगडपणानेंच राहातो. त्याला कोणी विष्णु म्हणत नाहीं ३. कांसें नामक धातूची देवीची मूर्ती करून तिची पूजा केली तरी ती पूजा कांश्याची न होतां देवीस पोंचते, कांसें कांसेंपणानेंच राहातें. त्याला कोणी देवी म्हणत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, पूर्ण ब्रह्मानंदाचे ठिकाणीं माझें करणें म्हणजे माझा भक्तिभाव, ही कांजी (पेज) प्रमाणें आहे. भावनेनें आमची जी पूजा करण्यांत येते ती ज्याची तो घेतो; आम्ही पाषाणरूपाप्रमाणेंच राहातों ५. [१२७]

जे पाडुरंगाच्या चरणाचें चिंतन करतात ते सज्जन माझे प्रिय सोबती आहेत १. बाकीच्यांना मी शास्त्रविधिरक्षणापुरते मानतों, कारण तीं सर्व देवाचीं भूतें आहेत २. कायेनें, वाचेनें वैष्णवाचा दास झालों. निरंतर त्याच्या उच्छिष्टाची इच्छा करीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें मला हरीचे दास आवडतात तसे इतर आवडत नाहींत ४. [१२८]

सर्व प्राण्यांचें रक्षण करणें हीच दया आहे आणि कठोर, दुष्ट ह्यांना शासन करणें ह्याचाही दयेंत अंतर्भाव होतो १. सशास्त्र धर्मनीति श्रवण करून मीं सार असार ह्याची निवड केली आहे २. उन्मत्त पुरुषानें नीतिन्यायाकडे न पाहातां मनाला वाटेल तसें वागणें त्यासच पाप म्हणतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, धर्मरक्षण करण्याकरितां देवालाही जन्म घेऊन खटाटोप करावी लागते ४. [१२९]

करावे गोमटें । बाळा मातें तें उमटे ॥ १ ॥ आपुलीया जीवाहूनी । असे वाल्हें तें जननीं ॥ २ ॥ वियोग तों तिस । त्याच्या उपचारें तें विष ॥ ३ ॥ तुका म्हणे पायें । डोळा सुखावे ज्या न्यायें ॥ ४ ॥ [१३०]

कन्या सासुऱ्यासी जाये । मागें परतोनी पाहे ॥ १ ॥ तैसें झालें माझ्या जिवा । केव्हां भेटसी केशवा ॥ २ ॥ चुकलिया माये । बाळ हुरुहुरु पाहे ॥ ३ ॥ जीवना वेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥ ४ ॥ [१३१]

हातीं होन दावीती बेना । करिती लेंकीच्या धारणा ॥ १ ॥ ऐसे धर्म झाले कलीं । पुण्य रंक पाप बळी ॥ २ ॥ सांडिले आचार । द्विज चाहाड झाले चोर ॥ ३ ॥ टिळे लपविती पातडीं । लेती विजारा कातडीं ॥ ४ ॥ बैसोनिया तक्तां । अन्यायेविण पिडिती लोकां ॥ ५ ॥ मुद्‍बख लिहिणें । तेलतुपसावण केणे ॥ ६ ॥ नीचाचे चाकर । चुकलिया खाती मार ॥ ७ ॥ राजा प्रजा पीडी । क्षेत्री दुश्चितासी तोडी ॥ ८ ॥ वैश्यशूद्रादिक । हें तों सहज नीच लोक ॥ ९ ॥ अवघा बाह्य रंग । आंत हिरवे वरी सोंग ॥ १० ॥ तुका म्हणे देवा । काय निद्रा केली धांवा ॥ ११ ॥ [१३२]

साळंकृत कन्यादान । पृथ्वीदानाच्या समान ॥ १ ॥ परि तें न कळे या मूढा । येईल कळों भोग पुढां ॥ २ ॥ आचरितां कर्म । भरे पोट राहे धर्म ॥ ३ ॥ सत्या देव साहे । ऐसें करूनिया पाहें ॥ ४ ॥ अन्न मान धन । हें तों प्रारब्धा आधीन ॥ ५ ॥ तुका म्हणे सोसें । दुःख आतां पुढें नासे ॥ ६ ॥ [१३३]

दिवस्या वाद्यें लावूनि खाणें । करूनि मंडण दिली हातीं ॥ १ ॥ नवरा नेई नवरी घरा ।

मुलाचें चांगलें करण्याविषयींची भावना आईच्या मनांत उत्पन्न होते १. आईला आपल्या जीवापेक्षां आपलें एकुलतें एक पोर प्रिय असतें. २. त्याच मुलाच्या वियोगांत तिला कितीही सुखोपचार केले तरी तिला ते विषवत् वाटतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें पायांना थंड लोणी लावण्यानें जसें डोळ्याला सुख होतें तद्वत् ४. [१३०]

एखादी मुलगी सासरीं जाऊं लागली म्हणजे वरचेवर माहेराकडे पाहात असते १. त्याप्रमाणें अहो केशवा, माझ्या जिवाची स्थिति होत आहे. तुम्ही कधीं भेट द्याल असें झालें आहे २. आई चुकली म्हणजे मुलास हुरहूर लागून तें चहूंकडे पाहात असतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, पाण्यावेगळा मासा जसा तडफड करतो त्याप्रमाणें मीं तुमच्या भेटीविषयीं तळमळ करतों आहें ४. [१३१]

लग्नाकरितां जे कोणी मुलीस पाहावयास आले असतील त्यांना मुलींचे बाप आपल्या मुली दाखवितात व त्यांच्यापासून लेकींचे पैसे हातांत घेऊन त्यांना ती देतात. १. अशा प्रकारचे कलियुगामध्यें उलटे धर्म झाले आहेत. ह्यापासून पुण्य क्षीण होऊन पाप बलाढ्य झालें आहे २. ब्राह्मण हे आपला आचार टाकून चाहाड्या चोऱ्या करूं लागले आहेत ३. ब्राह्मणांनीं गंधाचे द्वादश टिळे व पंचांग हें टाकून ते विजार व कातड्याचे पट्टे अंगावर घालूं लागले आहेत ४. न्यायाच्या तक्तावर बसून अन्यायावांचून ते लोकांना पीडा करितात ५. पाकशाळेंत लागणाऱ्या तेल, तूप, साबण ह्या मालाचा जमाखर्च लिहितात ६. नीचाचे चाकर होतात आणि काम चुकलें म्हणजे मार खातात ७. क्षत्रिय राजे दुःखी प्रजेस लुटतात व पीडा देतात ८. वैश्यशूद्रादिक हे तर स्वभावतःच हलके आहेत, त्यांचेबद्दल काय सांगावयाचें आहे? ९. अशा प्रकारें ज्यांचा सर्व बाह्य देखावा आहे ते अंतःकरणाचे वाईट असून वरील वागणें हें त्यांचें केवळ सोंग आहे १०. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, तुम्ही काय निजलां आहांत? तर असें करूं नका, लवकर धांव घ्या ११. [१३२]

कन्येच्या अंगावर सर्व दागिने घालून जांवयास दान दिल्यानें सर्व पृथ्वी दान दिल्याप्रमाणें होते १. तरी तें त्या मूर्खाला कोठें कळतें आहे? उलट तो लेकीचे पैसे घेतो पण त्याचें फळ काय आहे हें त्याला पुढें कळून येईल २. स्वकर्माचें आचरण करण्यांत आपलें पोट भरतें व धर्म घडतो ३. खऱ्या गोष्टीला देव साह्य असतो. तूं खरें वागून तर पहा! ४. अन्न मिळणें, मान होणें, द्रव्य मिळणें हें सर्व प्रारब्धाच्या स्वाधीन आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, कोणत्याही गोष्टीचा सोस करतेवेळीं दुःख आहे आणि शेवट नाश आहे ६. [१३३]

लग्नघरीं दिवळ्या वाजंत्रीं लावून जेवतात आणि अलंकार घालून नवरी सुशोभित करून नवऱ्याच्या हातीं देतात १. मग पालखीमध्यें बसवून नवरा आपल्या बायकोला घरीं नेतो, त्या वेळीं नवऱ्याच्या पायाचें

पूजन वरा पाद्याचें ॥ २ ॥ गौरविली विहिण व्याही । घडलें कांहीं ठेवूं नका ॥ ३ ॥ करूं द्यावें व्हावें वरें । ठार्यीचें कां रे न कळेचि ॥ ४ ॥ वऱ्हाडियांचे लागे पाठीं । जैसी उंटि कातेली ॥ ५ ॥ तुका म्हणे जोडिला थुंका । पुढें नरका सामुग्री ॥ ६ ॥ [१३४]

ब्रह्महत्या मारिल्या गाई । आणिक कांहीं पाप केलें ॥ १ ॥ ऐका जेणें विकिली कन्या । पवाडे त्या सुन्याचे ॥ २ ॥ नरमांस खादली भाडी । हाका मारी म्हणोनि ॥ ३ ॥ अवघें पाप केलें तेणें । जेणें सोनें अभिलाषिलें ॥ ४ ॥ उच्चारितां मज तें पाप । जिव्हे कांप सुटतसे ॥ ५ ॥ तुका म्हणे कोरान्न रांड । बेटा भांड मागेना कां ॥ ६ ॥ [१३५]

याचा कोणी करी पक्ष । तोही त्याशीं समतुल्य ॥ १ ॥ फुकासाटीं पावे दुःखाचा विभाग । पूर्वजांसि लाग निरयदंडीं ॥ २ ॥ ऐके राजा न करी दंड । जरि या लंड दुष्टासि ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याचें अन्न । मद्यपानाचे समान ॥ ४ ॥ [१३६]

कपट कांहीं एक । नेणें भुलवायाचे लोक ॥ १ ॥ तुमचें करितों कीर्तन । गातों उत्तम ते गुण ॥ २ ॥ दाऊं नेणें जडीबुटी । चमत्कार उठाउठी ॥ ३ ॥ नाहीं शिष्यशाखा । सांगों अयाचित लोकां ॥ ४ ॥ नव्हे मठ-पति । नाहीं चाहुरांची वृत्ति ॥ ५ ॥ नाहीं देवार्चन । असे मांडिलें दुकान ॥ ६ ॥ नाहीं वेताळ प्रसन्न । कांहीं सांगों खाण खुण ॥ ७ ॥ नव्हे पुराणिक । करणें सांगणें आणीक ॥ ८ ॥ नेणें वाद घटा पटा । करितां पंडित करंटा ॥ ९ ॥ नाहीं जाळीत भणदीं । उदो म्हणोनि आनंदीं ॥ १० ॥ नाहीं हालवीत माळ । भोंवतें मेळवुनि गबाळ ॥ ११ ॥ आगमींचें नेणें । स्तंभन मोहन

पूजन करतात २. व्याह्याला पागोटें व विहिणीला लुगडें नेसवून सुशोभित करतात व म्हणतात, कीं त्यांच्या सन्मानाकरितां जी कांहीं तयारी केली आहे त्यांत कांहीं वगळूं नका ३. जें कांहीं नवऱ्यासाठीं करणें अवश्य आहे तें त्यासाठीं करूं द्यावें ही मूळापासून चालत आलेली रूढी तुम्हांस कशी कळत नाहीं ४. विहीण पिसाळलेल्या कुत्र्यासारखी वऱ्हाड्यांच्या मागें लागते ५. तुकाराम महाराज म्हणतात, असे जे मूर्ख आहेत त्यांनीं लोकांकडून आपल्याला खरोखर नरकाला जाण्याकरितां थुंक्याची जोड करून घेतली ६. [१३४]

ब्रह्महत्या केल्या, गोहत्या केल्या; त्याच्यावर आणखी काय पाप करावयाचें राहिलें ! १. अहो पण तें कोणीं ? तर ऐका. ज्यानें आपली मुलगी नवऱ्याला देऊन त्याजपासून पैसे घेतले अशी ज्या कुत्र्याची कीर्ति आहे २. त्यानें आपल्या मुलीचा खरोखर पैसा घेतला नाहीं, तर त्यानें तें नरमांस आणि भाड खाली. ह्याकरितांच त्याच्या नावानें हांका मारतों ३. ज्यानें सोन्याची चोरी केली अगर तें बळकावलें असेल त्यानें संपूर्ण पातकें केलीं ४. त्या पापाच्या वाणीचा उच्चार करण्याच्या वेळीं कंप सुटतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, कन्येचें द्रव्य अगर सोनें ह्यांचा अभिलाष करण्यापेक्षां तो बेटा भांडखोर व त्याची ती रांड (बायको) भिक्षा कां मागत नाहीं ? ६. [१३५]

असल्या (१३५ व्या) अभंगांत ज्याचें वर्णन केलें आहे त्या दुष्टाचा जे कोणी पक्ष घेतील तेही त्याच्या बरोबरीचे गुन्हेगार समजले जातील १. फुकट पक्ष (बाजू) घेतल्यानें तो दुःखाचा विभागी मात्र होतो आणि आपल्या पूर्वजांनाही नरकवासाचा दंड भोगवितो २. ऐका, असे जे लंड दुष्ट त्यांना राजा दंड न करील तर ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याचें अन्न खाणें म्हणजे दारू पिण्यासारखें आहे ४. [१३६]

मी लोकांना फसविण्याचें कांहींही कपट जाणत नाहीं १. अहो देवा, केवळ तुमचें कीर्तन करतों (म्हणजे) तुमचे गुण गातों २. लोकांना आपल्या नादीं लावण्याकरतां त्वरीत एखादी जडीबुटी अगर चमत्कार मला दाखवत येत नाहीं ३. मी अयाचित आहें असें सांगण्याकरितां मजजवळ शिष्यशाखा नाहींत ४. एखाद्या मठाचा मी मालक नाहीं किंवा एक चाहूरही इनामी जमीन मला नाहीं ५. देव्हाऱ्यांत उपकरणीं, भांडीं, धूप, दीप, गंध, पुष्प ह्यांचा कासाराच्या दुकानाप्रमाणें पसारा घालून मी देवाचें पूजन करीत नाहीं ६. कांहीं लोकांच्या खाणाखुणा सांगतां याव्या असा मला वेताळ प्रसन्न नाहीं ७. लोकांना पुराणांत सांगावें एक आणि करावें दुसरें असा मी पुराणिक नाहीं ८. अंबाबाईचा उदो म्हणून डोक्यावर भदें (आंत अग्नि असलेलें खापर) घेऊन मी जाळीत नाहीं ९. किंवा घटाकाश, पटतंतु हा जो वेदांतांतील विचार आहे ह्याचा अनुवाद करणारा करंटा पंडित मी नाहीं १०. चार मूर्ख आपल्या भोंवतालीं जमवून त्यांच्यांत बसून गोमुखींत हात घालून माळ हालवीत मी बसत नाहीं. ११. आथर्व वेदांतील जारण मारण,

उच्चाटणें ॥ १२ ॥ नव्हे यांच्या ऐसा । तुका निरयवासी पिसा ॥ १३ ॥ [१३७]

रडोनियां मान । कोण मागतां भूषण ॥ १ ॥ देवें दिलें तरी गोड । राहे रुचि आणि कोड ॥ २ ॥ लावितां लावणी । विकें भिके केज्या दानी ॥ ३ ॥ तुका म्हणे धीरा । विण कैसा होतो हिरा ॥ ४ ॥ [१३८]

पूज्या एकासनीं आसनीं आसन । बैसतां गमन मातेशीं तें ॥ १ ॥ सांगतों ते धर्म नीतीचे संकेत । सावधान हित व्हावें तरी ॥ २ ॥ संतां ठाया ठाव पूजनाची इच्छा । जीवनींच वळसा सांपडला ॥ ३ ॥ तुका म्हणे एकाएकीं वरासन । दुजें तेथें भिन्न अशुभ तें ॥ ४ ॥ [१३९]

जेणें मुखें स्तवी । तेंचि निंदेपाठीं लावी ॥ १ ॥ ऐशी अधमाची याती । लोपी सोनें खाय माती ॥ २ ॥ गुदद्वारां वाटे । मिष्टान्नाचा नरक लोटे ॥ ३ ॥ विंचू लाभेंविण । तुका म्हणे वाहे शिण ॥ ४ ॥ [१४०]

अधमाची यारी । रंग पतंगाचे परि ॥ १ ॥ विटे न लगतां क्षण । मोल जाय वांयांविण ॥ २ ॥ सर्पाचिया परी । विषें भरला कल्हारीं ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । मज झणीं ऐसें दावा ॥ ४ ॥ [१४१]

आणिकांची स्तुति आम्हां ब्रह्महत्या । एकावांचूनि त्या पांडुरंगा ॥ १ ॥ आम्हां विष्णुदासां एकविध भाव । न म्हणो या देव आणिकांसी ॥ २ ॥ शतखंड माझी होईल रसना । जरी या वचना पालटेन ॥ ३ ॥ तुका म्हणे मज आणिका संकल्पें । अवघींच पापें घडतील ॥ ४ ॥ [१४२]

उच्चाटण, मोहन हा खोटा प्रकार मीं जाणत नाहीं १२. तुकाराम महाराज म्हणतात, हरीच्या भक्तीवांचून ह्या वर सांगितलेल्या इतर प्रकारांत जे गुंतलेले आहेत ते नरकवासी आहेत, त्यांच्यासारखा मी वेडा नाहीं १३. [१३७]

लोकांजवळ रडून मला तुम्ही मान द्या असें मागण्यानें जरी तो मान मिळाला तरी त्यांत काय भूषण आहे? १. देवानें दिलें असेल तेंच गोड असतें आणि खरें समाधान व सुख त्यांतच आहे २. शेतांत लावणी लावून पिकविलेलें धान्य अगर विकत घेतलेलें धान्य दान करणें कोणीकडे आणि भीक मागून आणलेलें अन्नदान करणें कोणीकडे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, उतावळेपणानें मोठेपणा मिळत नाहीं. धीर पाहिजे आणि असा जो धैर्यवंत त्यालाच हिऱ्याची योग्यता येते ४. [१३८]

ज्या आसनावर आपली पूज्य वस्तु आहे त्या आसनावर आपण आसन घालून बसलें, तर आईशीं गमन करण्याचा दोष आहे १. जर तुम्हाला आपलें हित व्हावेंसें वाटत असेल, तर मी ह्या नीतीच्या धर्माच्या खुणा सांगतों त्या सावध चित्तानें ऐका २. ज्या ठिकाणीं जशी पूजा संतांची होत आहे, त्या ठिकाणीं तशी पूजा माझी व्हावी अशी, आपल्या अंगीं संतत्व नसतां, जो कोणी इच्छा करील, तो खरोखर भवजलाच्या भोंवऱ्यांतच सांपडला असें समजावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, श्रेष्ठ आसनीं संत असतां, त्या आसनावर जर हा एकदम जाऊन बसेल, तर तो संताहून भिन्न म्हणजे वेगळा असल्यामुळें, तेथें शोभणार नाहीं ४. [१३९]

ज्या तोंडानें हा स्तवन करतो त्याच तोंडानें हा निंदा करूं लागतो. १. अशी अधमाची जात आहे; तो जवळचें सोनें पुरून ठेवून माती खात असतो २. जसें कोणी चांगल्या मिष्टान्नाचें भोजन करतो आणि त्याचाच गुदद्वारानें नरक होऊन पडतो. ३. तुकाराम महाराज म्हणतात, विंचवाला कांहीं एक लाभ नसतां त्यानें आपल्या नांगींत विष वागवावें, तशा प्रकारचा हा शीण आहे ४. [१४०]

अधम लोकांची प्रीति पतंगाच्या रंगाप्रमाणें म्हणजे क्षणिक असते १. तसल्या रंगाचें तेज एका क्षणांत विटून जातें आणि त्याला दिलेली किंमत व्यर्थ होते २. सर्पाप्रमाणें विषानें त्याचें हृदयकमळ भरलेलें असतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, मला असा प्रकार चुकूनही कधीं दाखवूं नका ४. [१४१]

एका पांडुरंगावांचून दुसऱ्याची स्तुति करणें हें आम्हाला ब्रह्महत्येच्या पातकासमान आहे १. आम्हां विष्णुदासांचा एकविध भाव आहे म्हणून आम्ही दुसऱ्याला देव कधींही म्हणणार नाहीं २. जर ह्या वचनाला मी बदलेन, तर माझ्या जिव्हेचे शतशः तुकडे होतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर मी मनांत दुसरा कोणी देव आहे असा संकल्प आणीन, तर जगांतील संपूर्ण पातकें मला घडतील ४. [१४२]

तान्हेल्याची धणी । फिटे गंगा नव्हे उणी ॥ १ ॥ माझे मनोरथ सिद्धी । पाववावे कृपानिधी ॥ २ ॥ तूं तो उदारांचा राणा । माझी अल्पचि वासना ॥ ३ ॥ कृपादृष्टीं पाहें । तुका म्हणे होइं साह्य ॥ ४ ॥ [१४३]

संतांचा अतिक्रम । देव पूजी तो अधर्म ॥ १ ॥ येती दगड तैसे वरी । मंत्रपुष्पें देवा शिरीं ॥ २ ॥ अतीतासी गाळी । देवा नैवेद्यासी पोळी ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । ताडण भेदकांची सेवा ॥ ४ ॥ [१४४]

करणें तें देवा । हेंचि एक पावे सेवा ॥ १ ॥ अवघें घडे येणें सांग । भक्त देवाचें तें अंग ॥ २ ॥ हेंचि एक वर्म । काय बोलिला तो धर्म ॥ ३ ॥ तुका म्हणे खरें । खरें त्रिवाचा उत्तरें ॥ ४ ॥ [१४५]

मागें नेणपणें घडलें तें क्षमा । आतां देतों सीमा करूनियां ॥ १ ॥ परनारीचें जया घडलें गमन । दावितो वदन जननीरत ॥ २ ॥ उपदेशावरी मन नाहीं हातीं । तो आम्हां पुढती पाहूं नये ॥ ३ ॥ तुका म्हणे साक्षी असों द्यावें मन । घातली ते आण पाळावया ॥ ४ ॥ [१४६]

आणिकांच्या घातें । ज्यांचीं निवतील चित्तें ॥ १ ॥ तेचि ओळखावे पापी । निरयवासी शीघ्रकोपी ॥ २ ॥ जे कान पसरोनी । ऐके वदे दुष्ट वाणी ॥ ३ ॥ तुका म्हणे भांडा । धीर नाहीं ज्याचे तोंडा ॥ ४ ॥ [१४७]

कुंभ अवघा एक आंवा । पाकीं एकी गू फेडावा ॥ १ ॥ ऐसे भिन्न भिन्न साटे । केले प्रारब्धानें वांटे ॥ २ ॥ हिरे दगड एक खाणी । कैचें विजातीला पाणी ॥ ३ ॥ तुका म्हणे शिरीं । एक एकाची पायरी ॥ ४ ॥ [१४८]

गंगेमध्यें तृषित जाऊन पाणी प्याल्यानें त्याची तृषा शमन होऊन तृप्ति होते, परंतु गंगा किंचितही उणी होत नाहीं १. अहो कृपानिधी देवा, माझ्या मनींच्या इच्छा पूर्ण करा २. तुम्ही तर उदारांचे राजे आहांत आणि माझी वासना थोडी आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्याकडे कृपादृष्टीनें पाहा आणि मला साह्य व्हा ४. [१४३]

आपल्या घरीं देवपूजा करीत असतांना संत आले, तर त्यांचा आदरसत्कार न करितां देवाची पूजा करीत राहाणें हा अधर्म आहे १. तो देवाला जें गंधफूल वाहातो व तें वाहातेवेळीं जो मंत्र म्हणतो तें गंधफूल व तो मंत्र नसून, देवाच्या डोक्यावर दगडच टाकल्यासारखें आहे २. आपल्या दाराशीं अतिथि आला असतां त्याचा त्याग करतो आणि देवाला नैवेद्याला पुरणपोळी करतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा भेदबुद्धीनें जो देवाची सेवा करतो ती सेवा नसून तें देवालाच मारणें होय ४. [१४४]

मनुष्यांनीं संतांचीच सेवा करावी, कारण ती देवाला पोहोंचते १. त्या योगानें सर्व गोष्टी सांग (पूर्ण) घडतात; कारण भक्त हे देवाचेंच एक आंग आहे २. धर्म म्हणून जो सांगितला आहे, त्याचें वर्म हेंच आहे ३. हेंच खरें खरें खरें असें तुकाराम महाराज त्रिवार सांगतात ४. [१४५]

आजपर्यंत अजाणपणानें तुमच्या हातून परस्त्रीगमनाचे दोष घडले असतील, पण तुम्ही भक्तीकडे लागल्यामुळें त्याची तुम्हाला आतां क्षमा आहे. एथून पुढें मात्र तुम्हांला मर्यादा करून देतों १. ती ही, कीं परस्त्रीशीं गमन करून तोंड दाखवील त्याला आईशीं गमन घडलें आहे, असें समजावें २. आम्ही हा उपदेश केल्यावरही त्याचें मन हातीं न राहील, तर त्याचें तोंडही पुन्हां आम्ही पाहाणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, कीं आम्ही घातलेली शपथ बरोबर पाळली जाण्याकरितां आपलें मन तुम्हीं नेहमीं साक्ष ठेवलें पाहिजे ४. [१४६]

दुसऱ्याचा घातपात केल्यानें ज्यांच्या चित्ताचें समाधान होतें १. ते पापी नरकवासी आणि शीघ्रकोपी आहेत असें जाणावें २. जो वाईट गोष्टी कान टवकारून ऐकतो आणि त्याप्रमाणें बोलतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो केवळ भांड आहे, त्याच्या तोंडाला स्थिरता नाहीं ४. [१४७]

मडकीं हीं कुंभाराच्या एका आव्यांतच तयार होतात, परंतु एक स्वयंपाक करण्याकडे जातें आणि दुसरें "गू भरून टाकण्याकडे जातें" १. त्याचप्रमाणें प्रारब्धानें निरनिराळीं माणसें केलीं आहेत २. हिरे आणि दगड एकाच खाणींत जन्मतात, पण हिऱ्याहून निराळ्या जातीचे जे दगड, त्यांत बिलकूल पाणी नसतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हिरा राजाच्या शिरीं बसतो आणि दगड पाय देण्याच्या पायरीला लागतो ४. [१४८]

मांडे पुऱ्या मुखें सांगूं जाणे मात। तोंडीं लाळ हात चोळी रिते ॥ १ ॥ ऐसियाच्या गोष्टी फिक्या मिठेंविण। रुचि नेदी अन्न चवी नाहीं ॥ २ ॥ बोलों जाणें अंगीं नाहीं शूरपण। काय तें वचन जाळावें तें ॥ ३ ॥ तुका म्हणे बहु तोंडें जे वाचाळ। तंग तेंचि मूळ लटिक्याचें ॥ ४ ॥ [१४९]

न लगे चंदना पुसावा परिमळ। वनस्पति मेळ हाकारुनी ॥ १ ॥ अंतरींचें धांवे स्वभावें बाहेरी। धरितां ही परी आवरेना ॥ २ ॥ सूर्य नाहीं जागें करीत या जना। प्रकाश किरणा कर म्हूण ॥ ३ ॥ तुका म्हणे मेघ नाचवी मयूरें। लपवितां खरें येत नाहीं ॥ ४ ॥ [१५०]

चंदनाचे हात पायही चंदन। परिसा नाहीं हीन कोणी अंग ॥ १ ॥ दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार। सर्वांगें साकर अवघी गोड ॥ २ ॥ तुका म्हणे तैसा सज्जनापासून। पहातां अवगुण मिळेचि ना ॥ ३ ॥ [१५१]

मन करा रे प्रसन्न। सर्व सिद्धीचें कारण। मोक्ष अथवा बंधन। सुख समाधान इच्छा ते ॥ १ ॥ मनें प्रतिमा स्थापिली। मनें मना पूजा केली। मनें इच्छा पुरविली। मन माउली सकळांची ॥ २ ॥ मन गुरु आणि शिष्य। करी आपुलेंचि दास्य। प्रसन्न आपआपणास। गति अथवा अधोगती ॥ ३ ॥ साधक वाचक पंडित। श्रोते वक्ते ऐका मात। नाहीं नाहीं आन दैवत। तुका म्हणे दुसरें ॥ ४ ॥ [१५२]

किती एक मांडेपुऱ्यांची कथा तोंडानें सांगतात, पण त्या वेळेस पुरी, अगर मांडे तोंडांत नसून लाळ मात्र असते. अशा पुऱ्या कराव्या, असे मांडे करावे असे हात मात्र रिकामे नाचवीत असतात १. अशा ह्या शब्दज्ञान्याच्या गोष्टी मीठरहित रुचि न देणाऱ्या अन्नाप्रमाणें फिक्या आहेत २. तोंडानें मात्र शूरपणाची बडबड पुष्कळ करतो (अंगावर झुरळ आलें तर घाबरगुंडी होते) परंतु अंगांत मुळींच शूरपण नाहीं, तर त्याच्या शूरपणाच्या गोष्टीस काय आग लावायची आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, तोंडानें वाचाळपणाचा जे बहु तोरा बाळगतात, तेच खोटेपणाचें मूळ आहेत ४. [१४९]

वनांतील चंदनाला भोंवतालीं असणाऱ्या बोरीबाभळीला आपल्या जवळील सुगंध देण्याकरितां हांका माराव्या लागत नाहींत; कारण ज्याचा अंतरामध्यें जो स्वभाव आहे तो बाहेर धांवावयाचाच; तो त्याच्यानें कधीं आंवरला जाणार नाहीं २. सूर्य स्वतः प्रातःकाळीं लोकांना जागें करीत नाहीं, अगर सर्व लोकांना जागें करा अशी किरणांसही आज्ञा करीत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आकाशामध्यें आलेले मेघ पाहून मोर नाचावयाला लागावयाचेच; कारण मोरांना नाचावयास लावावें हा मेघांचा स्वभाव आहे. खरी गोष्ट कोणालाच छपवितां येत नाहीं ४. [१५०]

चंदन वृक्षाचे हात पाय म्हणजे, मुळापासून शेंड्यापर्यंत, तो सर्व चंदनच आहे. त्याचप्रमाणें परिसाची कोणतीही बाजू परिसाहून भिन्न नाहीं १. दिवा प्रकाशरूप आहे, त्याला पुढें मागें कोठेंही अंधकार नाहीं, त्याचप्रमाणें साखरही सर्वांगांनीं गोड आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, वर सांगितलेल्या दृष्टांतांप्रमाणें सज्जनांच्या ठिकाणीं दुर्गुण दृष्टीस पडतच नाहींत ३. [१५१]

अहो साधकजन हो, तुम्ही आपलें मन प्रसन्न करा म्हणजे तें आपल्याला अनुकूल असें करा. जेवढ्या म्हणून कांहीं सिद्धि आहेत त्या सर्वांचें कारण हेंच आहे. मोक्ष मिळणें अगर सुख होणें अगर बंधन होणें किंवा समाधान मिळणें, ह्या सर्वांस तें इच्छारूपी मन मूळ आहे १. दगडाच्या स्थापन केलेल्या प्रतिमेच्या ठिकाणीं देवाची कल्पना मनानेंच केली आहे. मी या देवाचा भक्त आहें ही कल्पना मनानेंच केली. आतां त्या देवाची ह्यानें पूजा केली तरी वास्तविक पाहिलें तर, मनानेंच मनाची पूजा केली असें होतें. सर्वांची इच्छा पूर्ण करणारें मनच आहे. मन हें सर्वांची आई आहे, २. एखाद्या व्यक्तीच्या ठिकाणीं गुरूची सेवा मन आपणच करितें. मी ह्यांचा शिष्य आहें, असें मानून मन आपली सेवा आपणच करितें. आपल्याला परमार्थांत मन अनुकूल झालें तर सद्गति देतें, प्रतिकूल झालें तर अधोगति देतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, साधक, पंडित, वाचक जन हो, श्रोतेवक्ते हो, तुम्ही ही माझी गोष्ट ऐका—कीं मनाशिवाय दुसरें दैवत नाहीं ४. [१५२]

मायबापें जरी सर्पीण कीं बोका। त्यांचें संगें सुखा न पवे बाळ ॥ १ ॥ चंदनाचा शूळ सोनियाची बेडी। सुख नेदी फोडी प्राण नाशी ॥ २ ॥ तुका म्हणे नरकीं घाली अभिमान। जरी होय ज्ञान गर्व ताठा ॥ ३ ॥ [१५३]

शिकल्या बोलाचे सांगतील वाद। अनुभव भेद नाहीं कोणा ॥ १ ॥ पंडित हे ज्ञानी करितील कथा। न मिळती अर्था निजसुखा ॥ २ ॥ तुका म्हणे जैसी लाचासाठीं ग्वाही। देतील हे ठावी नाहीं वस्तु ॥ ३ ॥ [१५४]

प्रारब्ध क्रियमाण। भक्तां संचित नाहीं जाण ॥ १ ॥ अवघा देवची जाला पाहीं। भरोनियां अंतर्बाहीं ॥ २ ॥ सत्वरजतमबाधा। नव्हे हरिभक्तांसि कदा ॥ ३ ॥ देवभक्तपण। तुका म्हणे नाहीं भिन्न ॥ ४ ॥ [१५५]

शास्त्रांचें जें सार वेदांची जो मूर्ति। तो आम्हां सांगाती प्राणसखा ॥ १ ॥ म्हणउनी नाहीं आणिकांचा पांग। सर्व जालें सांग नामें एका ॥ २ ॥ सगुण निर्गुण जयाचीं हीं अंगें। तोचि आम्हांसंगें क्रीडा करी ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही विधीचे जनिते। स्वयंभू आइते केले नव्हों ॥ ४ ॥ [१५६]

ऐका महिमा आवडीची। बोरें खाय भिल्लटीचीं ॥ १ ॥ थोर प्रेमाचा भुकेला। हाचि दुष्काळ तयाला ॥ २ ॥ पोहे सुदाम देवाचे। फके मारी कोरडेच ॥ ३ ॥ न म्हणे उच्छिष्ट अथवा थोडें। तुका म्हणे भक्तीपुढें ॥ ४ ॥ [१५७]

कोणें तुझा सांग केला अंगिकार। निश्चिंति त्वां थोर मानियेली ॥ १ ॥ कोणें ऐसा तुज उपदेश केला। नको या विठ्ठला शरण जाऊं ॥ २ ॥ तेव्हां तुज कोण घालील पाठीसी।

सर्पीण आई, बाप बोका ह्यांच्या संगतीनें मुलास सुख होत नाहीं; कारण बोका पिलें खातो; सर्पीण अंडीं खाते १. एकाला चंदनाच्या सुळावर दिलें तर, थंड न लागतां (सुख न होतां), प्राणनाशच होईल; सोन्याची बेडी पायांत घातली तर क्षणभर सुख न होतां दुःखच देईल २. तुकाराम महाराज म्हणतात, जर ज्ञानाचा गर्वताठा (ताठरपणा) होईल, तर तो अभिमान नरकास घालवील ३. [१५३]

शिकलेले शास्त्रीय शब्दांचा अनुवाद करतात, परंतु शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें त्यांच्यामध्यें अनुभव नसतो १. ज्ञानी पंडित कथा करतील (ब्रह्मनिरूपण करतील) पण निरूपणाचा अर्थ जें सुखरूप ब्रह्म, त्याच्याशीं ते जीवानें मिळत नाहींत २. तुकाराम महाराज म्हणतात, लांचलुचपत घेऊन खरी स्थिति ठाऊक नसतांना खोटी साक्ष द्यावी, त्याचप्रमाणें अशा अनुभवशून्यांचा हा प्रकार समजावा ३. [१५४]

पूर्वकृत कर्म, ज्याच्या भोगास आम्ही प्रारंभ केला आहे, तें प्रारब्ध होय; जें कांहीं पूर्वकृत मोघम, त्यास संचित म्हणतात, आणि जें मरेपर्यंत आपल्या हातून कर्म होतें, त्यास क्रियमाण म्हणतात. पण हीं सर्व कर्मे भक्ताला नाहींत १. कारण, त्या भक्तांना आंत बाहेर एक देवाचा अनुभव असल्यामुळें, त्याचें सर्व तोच झाला आहे २. सत्त्व रज, तम ह्या गुणांची बाधा कव्हांही हरीच्या भक्ताला होत नाहीं ३. देव व भक्त ह्यांच्यामध्यें कांहीं भेद नाहीं, असें तुकाराम महाराज म्हणतात ४. [१५५]

जें संपूर्ण शास्त्रांचें सार, जो केवळ वेदाचीच मूर्ति, तो माझा प्राणमित्र माझ्या संगतीला आहे १. म्हणून मी दुसऱ्याचा अंकित नाहीं. आमची हरीच्या नामानें सर्व सांगता झाली आहे २. सगुण आणि निर्गुण हीं दोन्हीं ज्याचीं अंगें आहेत, तोच आमच्याबरोबर क्रीडा करितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही ब्रह्मदेवाचे बाप आहोंत, आम्ही स्वतःसिद्ध असल्यामुळें आम्हांस कोणीं केलें नाहीं ४. [१५६]

अहो, भक्तावरील भगवंताच्या आवडीची महती ऐका. ती ही, कीं केवळ नीच जी भिलीण तिचीं उष्टीं बोरें साक्षात् परब्रह्म रामानें खालीं १. राम हा अतिशय प्रेमाचा भुकेला आहे, कारण ह्याचाच त्याचे घरीं दुष्काळ आहे २. देव हा सुदामदेवाच्या कोरड्या पोह्याचे फके मारतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, उष्टें अथवा थोडें हें एका भक्तीपुढें तो जाणतच नाहीं ४. [१५७]

या संसारामध्यें तूं मोठी निश्चिंती मानिलीस, अशा तुझा कोणीं अंगीकार केला तें सांग १. पतिताला पावन करणाऱ्या विठोबाला तूं शरण जाऊं नकोस, असा तुला कोणीं उपदेश केला ? २. ज्या वेळेस पापकर्माबद्दल मानगूट धरून

घांसील भूमीसी वदन यम ॥ ३ ॥ कांरे नागवसी आयुष्य खातो काळ। दिसेंदिस बळ क्षीण होतें ॥ ४ ॥ तुका म्हणे यासि सांगा कोणी तरी। विसरला हरी मायबाप ॥ ५ ॥ [१५८]

साधूनी बचनाग खाती तोळा तोळा। आणिकातें डोळां न पाहवे ॥ १ ॥ साधूनी भुजंग धरितील हातीं। आणिकें कांपती देखोनियां ॥ २ ॥ असाध्य तें साध्य करितां सायास। कारण अभ्यास तुका म्हणे ॥ ३ ॥ [१५९]

आमची गोसावी अयाचित वृत्ति। करवी शिष्याहातीं उपदेश ॥ १ ॥ दगडाची नाव आधींच ते जड। ते काय दगड तारूं जाणे ॥ २ ॥ तुका म्हणे वेष विटंबिला त्यांनीं। सोंगसंपादणी करिती परी ॥ ३ ॥ [१६०]

मृगजळा काय करावा उतार। पावावया पार पैलथडी ॥ १ ॥ खापराचें होन खेळती लेकुरें। कोण त्या वेव्हारें लाभ हानी ॥ २ ॥ मंगळदायके करिती कुमारी। काय त्यांची खरी सोयरीक ॥ ३ ॥ स्वप्नींचें जें सुख दुःख झालें कांहीं। जागृतीं तो नाहीं साच भाव ॥ ४ ॥ सारीं झालीं मेलीं लटिकें वचन। बद्धमुक्त शीण तुका म्हणे ॥ ५ ॥ [१६१]

आंधळ्यासि जन अवघेचि आंधळे। आपणासि डोळे दृष्टी नाहीं ॥ १ ॥ रोग्या विषतुल्य लागे हें मिष्टान्न। तोंडासि कारण चवी नाहीं ॥ २ ॥ तुका म्हणे शुद्ध नाहीं जो आपण। तया त्रिभुवन अवघें खोटें ॥ ३ ॥ [१६२]

बोलविसी तैसें आणीं अनुभवा। नाहीं तरी देवा विटंबना ॥ १ ॥ मिठेंविण काय करावें मिष्टान्न। शव जीवेंविण श्रृंगारिलें ॥ २ ॥ संपादणीविण विटंबिलें सोंग। गुणेंविण चांग

तुझें तोंड यम भूमीला घांशील, त्या वेळेस तुला कोण पाठीशीं घालील ? ३. अरे, तुझें आयुष्य काळ खात आहे, दिवसेंदिवस तुझें बळ क्षीण होत आहे, ह्यास्तव तूं कां नागवला जातोस ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही कोणी तरी ह्याला सांगा. केवळ मायबाप जो हरी त्याला हा विसरला आहे ५. [१५८]

हळुहळू अभ्यास केल्यानें कित्येक लोक एक एक तोळा बचनाग पचवितात. कित्येकांना त्याकडे डोळ्यानेंही पाहावत नाहीं १. त्याचप्रमाणें किती एक अभ्यासानें जिवंत नाग हातीं धरतात, इतर त्याला पाहून थरथर कांपतात २. तुकाराम महाराज म्हणतात, सतत प्रयत्नानें न होणाऱ्या गोष्टी होतात; त्यास कारण अभ्यास हेंच आहे ३. [१५९]

कित्येक गुरू आपल्या शिष्यांकडून लोकांस उपदेश करितात, कीं आमचे गुरूची अयाचित वृत्ति आहे, म्हणजे न मागतां आयता शिधा कोणी दिला असतां ते घेतात १. पण जी दगडाची नाव स्वभावतांच जड आहे, ती काय दुसऱ्या दगडाला तारील ? २. तुकाराम महाराज म्हणतात, त्याचप्रमाणें घेतलेल्या अशा साधुवेषाची ते जरी संपादणी करितात, तरी खरोखर त्यांनीं आपल्या साधुवेषाची ही विटंबनाच केली आहे असें समजावें ३. [१६०]

मृगजळाची नदी उतरून पलीकडे जाण्यास पायउताराची मुळींच जरूर नाहीं १. खापरखुंड्या ह्याच होन आहेत, अशी कल्पना करून खेळणाऱ्या पोरांस व्यवहारांत काय लाभ आहे, अगर काय हानी आहे; म्हणजे ते होन मिळाल्यास काय लाभ अगर काय हानी आहे ? २. मुली आरसांत बाहुलाबाहुलींचीं लग्ने लावितात त्यायोगानें त्यांचा खरोखर सोईरसंबंध झाला काय ? ३. स्वप्नांत झालेलें सुखदुःख त्याचा जागृतींत खरेपणा नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, सोंगट्या खेळतांना कांहीं सोंगट्या मेल्या व कांहीं जिवंत होऊन पुन्हां पटावर बसल्या तर असें म्हणण्याचे वेळीं कोणीं खरें मेलें नाहीं अगर जिवंत झालें नाहीं म्हणून हे शब्द खोटे आहेत, त्याप्रमाणें आत्म्याचे ठिकाणीं बद्धता, मुक्तता म्हणणें हा केवळ शीण आहे ५. [१६१]

जन्मांधाला सर्व जग आंधळें भासतें, कारण त्याला दृष्टि नाहीं १. त्याचप्रमाणें रोग्याला गोड अन्न विषाप्रमाणें कडू वाटतें, कारण तोंडाला चव नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, जो स्वतः शुद्ध नाहीं त्याला सर्व त्रिभुवन खोटें वाटतें ३. [१६२]

अहो देवा, ज्याप्रमाणें माझ्या तोंडानें बोलवितां त्याप्रमाणें मला अनुभव द्यावा, नाहीं तर सर्व विटंबना आहे १. मिठाशिवाय गोड अन्न काय करावयाचें आहे ? प्राणावांचून शृंगारलेलें मढें जसें व्यर्थ आहे २. संपादणीवांचून सोंग जसें

रूपहीन ॥ ३ ॥ कन्यापुत्रेंविण मंगळदायकें। वेंचिलें हें फिकें द्रव्य तरी ॥ ४ ॥ तुका म्हणे तैसी होतें मज परी। न देखे अंतरीं प्रेमभाव ॥ ५ ॥ [१६३]

धिग जिणें तो बाईले आधीन। परलोक मान नाहीं दोन्ही ॥ १ ॥ धिग जिणें ज्याचें लोभावरी मन। अतीतपूजन घडेचिना ॥ २ ॥ धिग जिणें आळस निद्रा जया फार। अमित आहार अघोरिया ॥ ३ ॥ धिग जिणे नाहीं विवेक वैराग्य। झुरे मानालागीं साधुपणा ॥ ४ ॥ तुका म्हणे धिग ऐसे झाले लोक। निंदक वादक नरका जाती ॥ ५ ॥ [१६४]

अरे हें देह व्यर्थ जावें। ऐसें जरी तुज व्हावें। द्यूतकर्म मनोभावें। सारीपाट खेळावा ॥ १ ॥ मग कैंचें हरिचें नाम। निजेलिया जागा राम। जन्मोजन्मींचा अधम। दुःख थोर साधिलें ॥ २ ॥ विषयसुखाचा लंपट। दासीगमनीं अतिधीट। तया तेचि वाट। अधोगती जावया ॥ ३ ॥ आणीक एक कोड। नरका जावयाची चाड। तरी संतनिंदा गोड। करी कवतुकें सदा ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐसें। मना लावी रामपिसें। नाहीं तरी आलिया सायासें। फुकट जासी ठकोनी ॥ ५ ॥ [१६५]

अवघें ब्रह्मरूप रिता नाहीं ठाव। प्रतिमा तो देव कैसा नव्हे ॥ १ ॥ नाहीं भाव तया सांगावें तें किती। आपुल्याला मतीं पाखंडिया ॥ २ ॥ जया भावें संत बोलिले वचन। नाहीं अनुमोदन शाब्दिकांसी ॥ ३ ॥ तुका म्हणे संतीं भाव केला बळी। न कळतां खळीं दुषिला देव ॥ ४ ॥ [१६६]

एक तटस्थ मानसीं। एक सहजचि आळसी ॥ १ ॥ दोन्ही दिसती सारिखीं। वर्म जाणे तो पारखी ॥ २ ॥ एक ध्यानीं करिती जप। एक बैसुनि घेती झोंप ॥ ३ ॥ एका सर्वस्वाचा त्याग।

व्यर्थ आहे, तसें चांगलें स्वरूप गुणावांचून व्यर्थ आहे ३. हजारों रुपये खर्च करून बाहुलाबाहुलीचें लग्न केलें परंतु तें मंगलकार्य व्यर्थ आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझाही भक्तीचा भाव तसाच आहे, कारण अंतरांत प्रेमभाव दिसत नाहीं ५. [१६३]

संसारामध्यें बायकोच्या आधीन असेल त्यास इहलोकीं आणि परलोकीं मान नाहीं १. धिक्कार असो त्याचे जगण्याला, कीं ज्याचें मन लोभिष्ट आहे, ज्याच्याकडून अतीतअभ्यागत पूजिले जात नाहींत २. धिक्कार असो त्याचे जगण्याला, कीं ज्याला अतिशय झोंप आणि आळस आहे आणि जो अतिशय खादाड असा अघोरी आहे ३. ज्याच्या अंगीं विवेक, वैराग्य नसून मला लोकांनीं साधु मानावें ह्याविषयीं ज्यांचें अंतःकरण तळमळ करीत असतें त्याच्या जन्माला धिक्कार असो ४. तुकाराम महाराज म्हणतात, जे निंदा करतात अगर वाद करतात ते व्यर्थ जन्माला आले. परिणामीं त्यांच्या कपाळीं नरकच आहे ५. [१६४]

जर तुला हा नरदेह व्यर्थ जावा असें वाटत असेल तर सुखानें सोंगट्या, बुद्धिबळें खेळ १. असें झाल्यावर मग हरीचें नाम कसलें तोंडास येतें! जो मूर्ख हरिस्वरूपीं निजला आहे त्याला नित्य जागृत रामाचा कसला लाभ होतो? तो अनेक जन्मांचा अधम आहे. पुष्कळ दुःख त्यानें साध्य करून घेतलें २. विषयसुखाविषयीं अतिशय आसक्त व परस्त्री भोगण्याविषयीं मोठा धीट असें आचरण हाच अधोगतीला जाण्याचा नीट मार्ग आहे ३. आणि जर तुला नरकास जाण्याची इच्छा असेल तर संतांची निंदा तूं मोठ्या आवडीनें सर्व काळ करीत जा ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशीं हीं नरकदायक कामें न करतां मनाला रामाचें वेड लाव, नाहीं तर मोठ्या सायासानें मिळालेली नरतनु व्यर्थ जाईल ५. [१६५]

सर्व ब्रह्मरूप आहे. जर ब्रह्मावांचून कोठें ठावच नाहीं तर पाषाणाची केलेली प्रतिमा देव कां होणार नाहीं? १. जे पाखांडी आपापल्या मताप्रमाणें वागणारे अभाविक त्यांना किती बोध करावा? २. ज्या अनुभवानें संतांनीं प्रतिपादन केलें आहे ते शब्द ज्ञान्यांना कबूल नाहीं. ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांनीं सगुणाविषयींचा बळकट भाव धरून आपला तरणोपाय केला; पण तें खळांना न कळतां त्यांनीं सगुण देवाचा निषेधच केला ४. [१६६]

एक आसनावर बसून हरीचें ध्यान करीत असतां तटस्थ झाला. दुसरा शेजारींच अंगांत अति आळस आल्यामुळें पहिल्यासारखाच तटस्थ बसला आहे १. बाहेरच्या बाजूनें पाहाणारास दोन्ही सारखेच म्हणजे तटस्थ दिसले, तरी परीक्षा करणारा खरा मर्मज्ञ, एक आळसानें कांहीं करावयास नको म्हणून निश्चेष्ट बसला आहे आणि दुसरा हरीची मूर्ती ध्यानांत आणून निश्चेष्ट झाला आहे, असेंच जाणेल २. एक आसनावर बसून खुशाल झोंप घेतात आणि दुसरे डोळे मिटून ध्यानामध्यें हरीचा जप करतात ३. किती एक हरि सुखरूप आहे आणि सत्य आहे, त्याहून इतर खोटें आणि दुःखरूप

एका पोटासाठीं जोग ॥ ४ ॥ एका भक्ती पोटासाठीं। एका देवासवें गांठी ॥ ५ ॥ वर्म पोटीं एका। फळें दोन म्हणे तुका ॥ ६ ॥ [१६७]

काय कळे बाळा। बाप सदैव दुबळा ॥ १ ॥ आहे नाहीं हें न कळे। हातीं काय कोण्या वेळे ॥ २ ॥ देखिलें तें दृष्टी। मागे घालूनियां मिठी ॥ ३ ॥ तुका म्हणे भावें। माझ्या मज समजावें ॥ ४ ॥ [१६८]

भजन घाली भोगावरी। अकर्तव्य मनीं धरीं ॥ १ ॥ धिग त्याचें साधुपण। विटाळूनि वर्ते मन ॥ २ ॥ नाहीं वैराग्याचा लेश। अर्थचाड जीवें आस ॥ ३ ॥ हें ना तैसें झालें। तुका म्हणे वायां गेलें ॥ ४ ॥ [१६९]

एकादशीस अन्न पान। जे नर करिती भोजन। श्वानविष्ठेसमान। अधम जन तो एक ॥ १ ॥ ऐका व्रताचें महिमान। नेमें आचरती जन। गाती ऐकती हरिकीर्तन। ते समान विष्णूशीं ॥ २ ॥ अशुद्ध विटालशीचें खळ। विडा भक्षितां तांबूल। सांपडे सबळ। काळाहातीं न सुटे ॥ ३ ॥ शेज बाज विलास भोग। करी कामिनीशीं संग। तया जोडे क्षयरोग। जन्मव्याधी बळिवंत ॥ ४ ॥ आपण न वजे हरिकीर्तना। आणिकां वारी जातां जना। त्याच्या पापा जाणा। ठेंगणा महामेरु तो ॥ ५ ॥ तया दंडी यमदूत। झाले तयाचे अंकित। तुका म्हणे व्रत। एकादशी चुकलीया ॥ ६ ॥ [१७०]

करवितां व्रत अर्ध पुण्य लाभे। मोडवितां दोघे नरका जाती ॥ १ ॥ शुद्धबुद्धि दोघां

आहे असें समजून हरीच्या लाभाकरितां सर्वांचा त्याग करून जोगी होतात. कित्येक आपलें ख्यालीखुशालीनें पोट भरावें, पुष्कळ लोकांनीं आपल्या नादीं लागावें, आपल्यास साधु मानावें म्हणून सर्वस्वाचा त्याग करून जोगी बनतात ४. कित्येक देवप्राप्तीकरितांच देवाची भक्ति करितात. कित्येक आपलें व आपल्या कुटुंबाचें पोट भरण्याकरितां भक्ति करितात. तुकाराम महाराज म्हणतात, बाहेरून दोघांचे प्रकार एकच दिसतात, तरी परिणामाला फळें निरनिराळीं आहेत ५. [१६७]

लहान बालकास आपला बाप श्रीमंत आहे अगर गरीब आहे हें कळत नाहीं १. आपण जी वस्तु मागत आहोंत ती बापाजवळ द्यावयास आहे किंवा नाहीं हें कोणत्याही वेळेला त्याला कळत नाहीं २. त्यानें एखादे ठिकाणीं एखादी वस्तु पाहिली, कीं लगेच आपल्या बापास मिठी मारून ती वस्तु मागावयाची एवढेंच त्याला कळतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या हृदयांत जशी इच्छा आहे तशी ती देवानें जाणावी ४. [१६८]

हरीचें भजन करणें माझ्या प्रारब्धांतच नाही असें समजून न करण्याची जी गोष्ट (म्हणजे संसार) ती करण्याविषयीं मनांत निरंतर हेतु ठेवतो १. असा जर साधु असेल तर त्याचे साधुपणास धिक्कार असो. जो आपली मनोवृत्ति विषय-वासनेच्या दोषानें दोषी करून वागतो २. ज्याच्यामध्ये वैराग्याचा लेश सुद्धां नाहीं, निरंतर आपणास द्रव्य मिळावें हीच आशा आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यांना अखेरीस परमार्थलाभ तर नाहींच, पण संसारसुख देखील नाहीं. अशा तऱ्हेनें हे प्राणी व्यर्थ जातात ४. [१६९]

जीं मनुष्यें एकादशीस अन्न खातात तीं वास्तविक पाहिलें असतां अन्न खात नसून कुत्र्याची विष्ठा खाणाऱ्याप्रमाणें आहेत, म्हणून तसें करणारे ते अधम आहेत १. अहो, या एकादशीव्रताचें माहात्म्य ऐका. जे लोक हें व्रत मोठ्या नेमानें आचरणांत आणून त्या दिवशीं हरिकथा करतात अगर ऐकतात ते साक्षात् विष्णूप्रमाणें आहेत २. जर एकादशीस कोणी विडा खाईल तर त्यानें विटाळशीच्या अशुद्ध रक्ताचा स्रावच मुखांत घेतल्यासारखें आहे. त्यायोगानें महा बलाढ्य जो काळ त्याच्या हातीं लागून कधीं त्याची सुटका होत नाहीं ३. त्या दिवशीं जो कोणी उत्तम गादीची शय्या पलंगावर अगर खाटेवर घालून निजेल अगर कानांत अत्तराचे बोळे, हातांत उत्तम फुलांचे गजरे वगैरे विलासभोग जर करील अगर त्या दिवशीं स्त्रीशीं संग करील तर त्याला रक्तपितीसारखी मरेतोंपर्यंत न जाणारी अशी जन्मव्याधी मोठी बलाढ्य होईल ४. स्वतः आपण हरिकीर्तनास न जातां दुसरा कोणी जाणारा असेल त्यासही जाऊं देत नाहीं त्याच्या पापापुढें मोठा मेरूदेखील लहान आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, वर सांगितलेल्या व्रतभ्रष्टांना यमदूत शिक्षा करतात, कारण ते त्यांच्या स्वाधीन पूर्ण झाले आहेत ६. [१७०]

एकादशी व्रत स्वतः आपण करून दुसऱ्याकडून करविल्यास त्यापासून मिळणारें अर्धें पुण्य करविणाऱ्यास मिळतें आणि तें व्रत दुसऱ्याकडून मोडविलें तर मोडणारा व मोडविणारा या दोघांनाही नरकवास होतो १. दोघेही जर शुद्ध

होय एक मान । चोरासवें कोण जिवें राखे ॥ २ ॥ आपुलें देऊनी आपुलाचि घात । न करावा थीत जाणोनियां ॥ ३ ॥ देऊनियां वेंच धाडी वाराणसी । नेदावें चोरासी चंद्रबळ ॥ ४ ॥ तुका म्हणे तप तीर्थ व्रत याग । भक्ति हे मार्ग मोडूं नये ॥ ५ ॥ [१७१]

इनामाची भरली पेठ । वाहती दाट मारग ॥ १ ॥ अवघेची येती वाण । अवघे शकुन लाभाचे ॥ २ ॥ अडचणी केल्या दुरी । देण्या उरी घेण्याच्या ॥ ३ ॥ तुका म्हणे जोडी झाली । ते आपुली आपणा ॥ ४ ॥ [१७२]

वेदाचें गव्हर न कळे पाठकां । अधिकार लोकां नाहीं येरां ॥ १ ॥ विठोबाचें नाम सुलभ सोपारें । तारी एकसरें भवसिंधु ॥ २ ॥ जाणत्या असाध्य मंत्र तंत्र काळ । येर तो सफळ मूढ लोक ॥ ३ ॥ तुका म्हणे विधि निषेध लोपला । उच्छेद या झाला मारगाचा ॥ ४ ॥ [१७३]

विधीनें सेवन । विषयत्यागातें समान ॥ १ ॥ मुख्य धर्म देव चित्तीं । आदि अवसान अंतीं ॥ २ ॥ बहु अतिशय खोटा । तर्कें होती बहु वाटा ॥ ३ ॥ तुका म्हणे भावें । कृपा करीजेते देवें ॥ ४ ॥ [१७४]

येथींचिया अळंकारें । काय खरें पूजन ॥ १ ॥ वैकुंठींच्या लावूं वाटा । सर्व साटा ते ठायीं ॥ २ ॥ येथींचिया नाशवंतें । काय रीतें चाळवूं ॥ ३ ॥ तुका म्हणे वैष्णव जन । माझे गण समुदाय ॥ ४ ॥ [१७५]

उजळावया आलों वाटा । खरा खोटा निवाड ॥ १ ॥ बोलविले बोलें बोल । धनी विठ्ठल सन्निध ॥ २ ॥ तरी मनीं नाहीं शंका । बळें एका स्वामीच्या ॥ ३ ॥ तुका म्हणे नव्हे आम्हां पुढें कामा गबाळ ॥ ४ ॥ [१७६]

बुद्धीचे असतील तर दोघांचीही मान व योग्यता एकच आहे; एक चांगला व दुसरा चोर असेल तर त्याच्या संगतीनें चांगल्याचा जीवघात होईल. तेथें रक्षण करणारा कोण आहे? २ आपल्या जवळचें देऊन आपला घात होतो आहे असें जर कळेल तर आपण तसें न करणें ह्यांतच हित आहे ३. एखाद्याला द्रव्याची मदत देऊन काशीयात्रेस पाठवावें, पण चोर जर चोरी करावयास जात असेल तर त्याला चंद्रबल म्हणजे अनुकूल चंद्र ज्योतिष्यानें सांगूं नये ४. तुकाराम महाराज म्हणतात, तप, तीर्थ, व्रत, यागादि भक्तिमार्ग मोडूं नये ५. [१७१]

पंढरी ही भक्तजनांना इनाम दिलेली पेठच आहे. ही भक्तजनांच्या समुदायानें भरलेली असून त्या पेटेकडे जाण्याचे मार्गही भक्तजनांच्या समुदायानें दाट वाहात आहेत १. त्या पेठेमध्यें सर्व कांहीं वस्तु येतात. सर्व लाभाचे शकुन होतात २. त्या पेठेंतील देण्याघेण्याच्या अडचणी दूर केलेल्या आहेत. त्याची कांहीं बाकी राहिली नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा लाभ ज्यानें करून घेतला आहे तो त्याचा त्यालाच झाला आहे ४. [१७२]

जे ब्राह्मण वेदपाठ करणारे आहेत त्यांना वेदांतील अर्थरहस्य कळत नाहीं आणि इतर लोकांना वेदाविषयीं मुळींच अधिकार नाहीं १. विठोबाचें नाम मोठें सुलभ आहे आणि तें सरसकट सर्वांना भवसिंधूंतून तरून नेतें २. जे कोणी मंत्रतंत्रांचे जाणते आहेत त्यांना त्या मंत्रतंत्रसाधनाचे काळ म्हणजे वेळ असाध्य आहे. इतर सर्व लोक तर मूर्ख आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, विधिनिषेधाचा मार्ग लोपल्यामुळें तो नाहींसा झाला आहे ४. [१७३]

शास्त्रानें सांगितलेल्या नियमाप्रमाणें विषयाचें सेवन केल्यानें त्यागाप्रमाणें होतें १. सर्व धर्मांमध्यें श्रेष्ठ धर्म असा आहे, कीं आरंभापासून अखेरपर्यंत म्हणजे देहांत होईपर्यंत हरीला चित्तांत ठेवणें २. एखाद्या विषयींचा बुद्धीनें अतिआग्रह धरणें हें वाईट आहे, कारण बुद्धि तर्क करीत राहिली तर त्या योगानें एक निश्चय न होतां अनेक मार्गांकडे तिची धांव होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरीविषयीं एकनिष्ठ भाव ठेवल्यानेंच तो कृपा करितो. ४ [१७४]

येथील नाशवंत अलंकारानें केलेलें पूजन खरें नाहीं १. ह्यास्तव वैकुंठाचे मार्गाकडे लोकांना लावूं, कारण सर्व संग्रह त्या ठिकाणीं आहे २. येथील सर्व प्रकार नाशवंत आहेत म्हणून त्यांच्या लोभानें लोकांना व्यर्थ कशाला फसवूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, वैष्णवजनसमूह हा माझा प्रिय समुदाय आहे ४. [१७५]

मी खऱ्या वाटा आणि खोट्या वाटा ह्यांची निवडणूक करण्याकरितां येथें आलों आहें १. विठ्ठल धनी जसे माझ्याकडून बोल बोलवीत आहेत त्याप्रमाणें त्यांचे सन्निध मी बोलतों आहें २. आमच्या स्वामींचें आम्हाला बळ असल्यामुळें आमच्यामध्यें कांहीं एक शंका नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, येथून पुढें इतर जीं कांहीं गबाळ (खोटींनाटीं) साधनें आहेत तीं आम्हाला खपणार नाहींत ४. [१७६]

बोलावें तें धर्मा मिळे। बरे डोळे उघडूनी ॥ १ ॥ काशासाठीं खावें शेण । जेणें जन थुंके तें ॥ २ ॥ दुजें ऐसें कोण बळी । जें या जाळी अग्नीसि ॥ ३ ॥ तुका म्हणे शूर रणीं । गांढें मनीं बुरबुरी ॥ ४ ॥ [१७७]

बरा देवा कुणबी केलों । नाहीं तरि दंभें असतों मेलों ॥ १ ॥ भलें केलें देवराया । नाचे तुका लागे पायां ॥ २ ॥ विद्या असती कांहीं । तरी पडतों अपायीं ॥ ३ ॥ सेवा चुकतों संतांची । हेची नागवण फुकाची ॥ ४ ॥ गर्व होता ताठा । जातों यमपंथें वाटा ॥ ५ ॥ तुका म्हणे थोरपणें । नरक होती अभिमानें ॥ ६ ॥ [१७८]

दाता नारायण । स्वयें भोगिता आपण ॥ १ ॥ आतां काय उरलें वाचे। पुढें शब्द बोलायाचे ॥ २ ॥ देखती जे डोळे। रूप आपलें तें खेळे ॥ ३ ॥ तुका म्हणे नाद। जाला अवघा गोविंद ॥ ४ ॥ [१७९]

कृपा करुनीयां देवा। मज साच तें दाखवा ॥ १ ॥ तुम्ही दयावंत कैसे। कीर्ति जगामाजी वसे ॥ २ ॥ पोहोनियां डोळां । हातीं ओढवाल काळा ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा। माझा करावा कुढावा ॥ ४ ॥ [१८०]

ठायींची ओळखी । येईल टाकूं टाका सुखीं ॥ १ ॥ तुमचें जाईल इमान। माझे कपाळीं पतन ॥ २ ॥ ठेविला तो ठेवा। अभिलाषें बुडवावा ॥ ३ ॥ मनीं न विचारा। तुका म्हणे हे दातारा ॥ ४ ॥ [१८१]

तुझें वर्म ठावें। माझ्या पाडियलें भावें ॥ १ ॥ रूप कांसवाचे परी। धरूनि राहिलों अंतरीं ॥ २ ॥

जें आपल्यास बोलावयाचें आहे तें धर्मानुकूल आहे असें चांगली ज्ञानदृष्टी उघडून पाहावें व तसें असल्यास त्याचें प्रतिपादन करावें १. तसें न करितां जें बोलणें व वागणें हें शेण खाल्ल्याप्रमाणेंच आहे, म्हणून ज्या योगानें जन थुंकतात असें शेण कशाकरितां खावें २. दुसरा असा बलाढ्य कोण आहे, कीं जो सर्वांना जाळणारा जो अग्नि त्यास जाळील ३. तुकाराम महाराज म्हणतात, खरा शूर आपलीं आयुधें घेऊन रणांगणांत शत्रूचे छातीवर उभा असतो. भित्रा घरीं बसून आपल्या मनांतच पुटपूट करीत राहातो ४. [१७७]

हे देवा, मला ब्राह्मणाचा जन्म न देतां कुणब्याचा जन्म दिला हें चांगलें केलें. असें न करितां ब्राह्मणजन्म दिला असता तर मी ब्राह्मण आहें, सर्वांत श्रेष्ठ आहें अशा डौलांतच मेलों असतों १. अहो देवराजा, ही फार चांगली गोष्ट केलीत, म्हणून मी तुमच्या पायां पडून आनंदानें तुमचें नांव गाऊन नाचत आहें २. कांहीं थोडीबहुत मजजवळ विद्या असती तर मी अनेक अपायांमध्यें पडलों असतों ३. आणि संतांची सेवाही मजकडून घडली नसती. असें होणें हेंच देहीं घेऊन व्यर्थ जाणें होय ४. माझ्यामध्यें पुष्कळ गर्वताठा आला असता व त्यामुळें यमलोकाच्या वाटेला लागलों असतों ५. तुकाराम महाराज म्हणतात, थोरपणाच्या अभिमानानेंच नरकवास मिळतो ६. [१७८]

सर्व प्राण्यांना सर्व कांहीं देणारा दाता नारायण आहे आणि त्यांना मिळालेल्या सर्व वस्तूंचा भोगणाराही तोच आहे १. आतां खरोखर मी मिळविलें आणि भोगलें असें बोलण्याला इथून पुढें कांहीं जागा आहे काय ? २. जिकडे जिकडे म्हणून माझी दृष्टि पाहात आहे तिकडे तिकडे माझेंच रूप भासत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जेवढा म्हणून शब्द नाद आहे तेवढा गोविंदच झाला आहे असें भासतें ४. [१७९]

अहो देवा, मजवर कृपा करा आणि खरें काय आहे तें मला दाखवा १. जर तुम्ही तसें न कराल तर तुम्ही दयावंत कसले ? पण तुम्ही दयावंत आहांत अशी सर्व जगतामध्यें कीर्ति आहे २. आपल्या दृष्टीसमोर आम्हाला जर तुम्ही काळाच्या हातीं द्याल तर हें बरें नाहीं ३. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, तुम्ही माझें रक्षण करा ४. [१८०]

देवा, तुमची व माझी जी मूळची ओळख आहे ती जर तुम्ही सुखानें टाकली १. तर त्यामध्यें तुमचा इमानीपणा जाईल आणि माझ्या कपाळीं मात्र पतन येईल २. एखाद्याजवळ ज्यानें कांहीं ठेवा ठेविला आहे त्याचा अभिलाष धरून तो बुडविल्यासारखें होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे दात्या, ह्या गोष्टीचा तुम्ही मनांत विचार कसा करीत नाहीं ? ४. [१८१]

देवा, तुझें खरें जें वर्म आहे, तें मजमध्यें असणारा तुजविषयींचा भाव त्यायोगानें मला समजलें आहे १. ज्याप्रमाणें कांसव आपले संपूर्ण अवयव पोटामध्यें घेऊन राहातें त्याप्रमाणें तुझें रूप मी अंतःकरणांत धरून राहीन २.

नेदी होऊं तुटी । मेळवीन दृष्टादृष्टी ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । चिंतन हे तुझी सेवा ॥ ४ ॥ [१८२]

गहूं एक जाती । परी त्या पाधाणी नासती ॥ १ ॥ वर्म जाणावें तें सार । कोठें काय थोडें फार ॥ २ ॥ कमाईचें सार । जाती दाविती प्रकार ॥ ३ ॥ तुका म्हणे मोल । गुणा मिथ्या फिके बोल ॥ ४ ॥ [१८३]

पुण्यवंत व्हावें ॥ घेतां सज्जनांचीं नांवें ॥ १ ॥ नेघे माझी वाचा तुटी । महा लाभ फुकासाठीं ॥ २ ॥ विश्रांतीचा ठाव । पायीं संतांचिया भाव ॥ ३ ॥ तुका म्हणे पापें । जाती संतांचिया जपें ॥ ४ ॥ [१८४]

देव होईजेत देवाचे संगती । पतन पंगती जगाचिया ॥ १ ॥ दोहींकडे दोन्ही वाहातील वाटा । करितील सांठा आपुलाला ॥ २ ॥ दाखविले परी नाहीं वर्जिजेतां । आला तो तो चित्ता भाग भरा ॥ ३ ॥ तुका म्हणे अंगीं आवडीचें बळ । उपदेश मूळ बीजपात्र ॥ ४ ॥ [१८५]

शोधिसील मूळें । त्याचें करीसी वाटोळें ॥ १ ॥ ऐसे संतांचे बोभाट । तुझे बहु झाले तंट ॥ २ ॥ लौकिका बाहेरी । घाली रोंखी जया धरी ॥ ३ ॥ तुका म्हणे गुण । तुझा लागलिया शून्य ॥ ४ ॥ [१८६]

वैद्य वांचविती जीवा । तरी कोण ध्यातें देवा ॥ १ ॥ काय जाणों कैसी परी । प्रारब्ध तें ठेवी उरी ॥ २ ॥ अंगीं दैवत संचरे । मग तेथें काय उरे ॥ ३ ॥ नवसें कन्यापुत्र होती । तरी कां करणें लागे पती ॥ ४ ॥ जाणे हा विचार । स्वामी तुकयाचा दातार ॥ ५ ॥ [१८७]

मारगीं बहुत । याचि गेले साधुसंत ॥ १ ॥ ऐसीं गर्जती पुराणें । नका जाऊं आडरानें ॥ २ ॥

तें मी वेगळे होऊं देणार नाहीं. सदासर्वकाळ त्याच्या दृष्टीशीं मी आपली दृष्टि मिळवून राहीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, तुमचें चिंतन हीच खरी सेवा आहे ४. [१८२]

एका गव्हाचे पुष्कळ प्रकार होतात, परंतु मूर्ख स्वयंपाकिणीचे हातीं पडल्यानें ती त्याचा नाश मात्र करते १. म्हणून ज्या ठिकाणीं जें फार थोडें वर्म आहे हें जाणणें हेंच सार आहे २. एखादा माल चांगला कमावणें ह्यांत सार आहे, तर त्यापासून होणारे प्रकारही त्याच जातीप्रमाणे चांगलेच होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, खरें मोल गुणाचेंच आहे; त्याखेरीज बोलणें तें खोटें फोलकट आहे ४. [१८३]

साधुसंतांचीं नांवें घेतल्यानें मनुष्य पुण्यवान् होतो १. म्हणून माझी वाचा त्यांचें नाम घेण्यास अंतर करीत नाहीं. एवढ्यानेंच मोठा लाभ फुकट मिळतो २. संतांच्या पायीं भाव ठेवणें हेंच विश्रांतीचें ठिकाण आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांच्या जपानें सर्व पापें जातात ४. [१८४]

देवाच्या संगतीनें राहाणारा देव होतो आणि जगताच्या संगतींत राहिल्यानें पतन मिळतें १. अशा ह्या दोन्ही बाजूला दोन वाटा वाहात आहेत. जसें ज्याचें सुकृत किंवा दुष्कृत असेल त्याप्रमाणें ते त्यांचा संग्रह करतील २. वरील प्रकार मी दाखविले आहेत परंतु ह्या ठिकाणीं देव उपेक्षा करणार नाहीं, म्हणून दैवयोगानें तुमचे वांट्याला जो परमार्थ येईल त्याचें तुम्ही चित्तानें ग्रहण करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, मूळचेंच हृदयामध्यें हरीविषयींचें प्रेमबळ असावें लागतें. अंगामध्ये आवडीचें बळ पाहिजे. उपदेश हा निमित्तमात्र आहे ४. [१८५]

अहो देवा, ज्याची तुम्ही मूळें शोधितां त्यांचें सर्व वाटोळें तुम्ही करितां १. आजपर्यंत असे संतांचे बोभाट पुष्कळ आहेत. त्या संबंधानें तुमचे तट (फळ्या) झाले आहेत २. ज्याला उघड हातांत धरितां त्याला तुम्ही सर्व लौकिकाच्या बाहेर घालतां ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, ज्याला तुमचा गुण लागेल तो सर्वधर्मशून्य ब्रह्म होतो ४. [१८६]

जर वैद्य औषध देऊन जिवाला वांचवितील तर देवाचें भजन अगर ध्यान कोण करील ? १. खरोखर कसा प्रकार आहे हें कळत नाहीं, पण जसें प्रारब्ध असेल तसें होतें २. जर खरोखर अंगामध्यें दैवताचा संचार होईल तर तेथें कांहीं उरणार नाहीं ३. जर नवसानें मुली मुलगे होते, तर नवरा करण्याचें काय कारण असतें ? ४. तुकयाचा स्वामी श्रीविठ्ठल ह्याचा खरोखर काय विचार आहे हें सर्व जाणतो ५. [१८७]

हरीची वारी व भजनपूजन करणें ह्याच मार्गानें साधुसंत पुष्कळ गेले आहेत १. एवढ्याकरितां तुम्हीही आडमार्गानें

चोखाळिल्या वाटा। न लगे पुसाव्या धोपटा ॥ ३ ॥ झळकती पताका। गरुड टके म्हणे तुका ॥ ४ ॥ [१८८]

एक नेणतां नाडलीं। एका जाणिवेची भुली ॥ १ ॥ बोलों नेणें मुकें। वेडें वाचाळ काय निकें ॥ २ ॥ दोहीं सवा नाड। विहिर एकीकडे आड ॥ ३ ॥ तुका म्हणे कर्म। तुझें कळों नेदी वर्म ॥ ४ ॥ [१८९]

म्हणवितों दास। मज एवढीच आस ॥ १ ॥ परी तें अंगीं नाहीं वर्म। करीं आपला तूं धर्म ॥ २ ॥ बडबडितों तोंडें। रितें भावेंविण धेंडें ॥ ३ ॥ तुका म्हणे बरा। दावूं जाणतों पसारा ॥ ४ ॥ [१९०]

पूजा समाधान। अतिशय वाढे सीण ॥ १ ॥ हें तों जाणां तुम्ही संत। आहे बोलिली ते नीत ॥ २ ॥ पाहिजे ते केलें। सहज प्रसंगीं घडलें ॥ ३ ॥ तुका म्हणे माथा। माझा पायीं तुम्हां संतां ॥ ४ ॥ [१९१]

स्वप्नींचिया गोष्टी। मज धरिलें होतें वेठीं। झालिया सेवटीं। जागें लटिकें सकळ ॥ १ ॥ वायां भाकिली करुणा। मूळ पावावया सिणा। राव रंक राणा। कैंचे स्थानावरी आहे ॥ २ ॥ सोंसिले तें अंगें। खरें होतें नव्हतां जागें। अनुभवही सांगे। दुःखें डोळे उघडिले ॥ ३ ॥ तुका म्हणे संतीं। सावचित केलें अंतीं। नाहीं तरी होती। टाळी बैसोनि राहिली ॥ ४ ॥ [१९२]

आसुरी स्वभाव निर्दय अंतर। मानसीं निष्ठुर अतिवादी ॥ १ ॥ याति कुळ येथें असे अप्रमाण। गुणांचें कारण असे अंगीं ॥ २ ॥ काळकूट पितळ सोनें शुद्ध रंग। अंगाचेंच अंग

जाऊं नका, अशी पुराणें गर्जना करीत आहेत २. वाट स्वच्छ केलेली आहे. आतां कोणास विचार करण्याचें कारण नाहीं, असा हा धोपटमार्ग आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या मार्गांत वैष्णव जनांनीं घेतलेल्या पताका झळकत आहेत आणि त्यांवर गरुडचिन्हेंही झळकत आहेत ४. [१८८]

कितीएक जीव अज्ञानानें फसले, कितीएक जीव ज्ञानाच्या घमेंडीनें वायां गेले १. मुक्यास बोलतां येत नाहीं म्हणून त्याचें जिणें व्यर्थ, पण बोलणारा जर अति वेडा आणि वाचाळ असेल तर तोही चांगला नाहीं २. दोन्ही बाजूनें फसलें जाण्याचाच प्रसंग येतो. ज्याप्रमाणें विहिरीच्या व आडाच्या संधींत सांपडलेल्या मनुष्याची स्थिति होते, म्हणजे एकीकडे जावें तों आड आणि दुसरीकडे जावें तों विहीर! तद्वत् हें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, कर्म हें तुझ्या खऱ्या वर्मास समजूं देत नाहीं ४. [१८९]

देवा, मी तुमचा दास आहें असें म्हणवितों आणि मला आशाही एवढीच आहे १. परंतु खरोखरच दास्यत्वाचें जें वर्म आहे तें माझे आंगीं मुळींच नाहीं. देवा, तुमचा जो पतितास तारण्याचा धर्म आहे त्याप्रमाणें तुम्ही करा २. मी आपले तोंडानें पोकळ बडबड मात्र भावावांचून करितों ३. तुकाराम महाराज म्हणतात, साधुपणाचा पसारा दाखविण्याचें मात्र मी चांगलें जाणत आहें ४. [१९०]

अंतःकरणाची समाधानस्थिति असणें हीच देवाची पूजा आहे आणि अंतःकरण हावभरी (लोभी) असण्यांत दुःख वृद्धिंगत होतें १. अहो संत हो, ह्याप्रमाणें तुम्ही जाणा. अशी ही नीति सांगितली आहे २. जें सहज प्रसंगानें घडण्यासारखें आहे तें तुम्ही केलें पाहिजे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हां संतांच्या पायांवर मी मस्तक ठेवितों ४. [१९१]

स्वप्नामध्यें एखाद्या राजास वेठीस धरल्याप्रमाणें माझी ह्या जन्ममृत्यूनें स्थिति झाली होती. पण मी आपल्या आत्मस्वरूपीं जागृत झाल्यामुळें सर्व कांहीं मिथ्या झालें १. ह्या विश्वस्वप्नामध्यें जन्ममृत्यूचे तडाक्यांतून सुटण्याकरितां व्यर्थ हरीची करुणा भाकिली. खरोखर नित्यबोधरूप अशा ब्रह्मस्थानीं राव, रंक राजे कसले आहेत? २. जोंपर्यंत ह्या जन्ममृत्युरूपी स्वप्नांतून आत्मस्वरूपीं जागे झालों नव्हतों तोंपर्यंत ह्या स्वप्नाचे संगतीनें बहुत दुःख भोगिलें, असा जागृत कालीं अनुभवही सांगतो आणि दुःखानें डोळे उघडतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या जन्ममृत्युरूप स्वप्नस्थितींतून मला अखेरीस संतांनींच जागें केलें; नाहीं तर हरिनामाविषयीं माझी दांतखिळी बसली होती ४. [१९२]

ज्याचा स्वभाव तमोगुणी आहे व अंतःकरण अतिनिर्दय निष्ठुर असून जो अतिवाद करणारा आहे १. अशा ठिकाणीं चांगल्या जातीचा व कुळाचा चांगुलपणा व्यर्थ समजला पाहिजे. ज्याच्या अंगांत जो गुण असेल तोच तेथें योग्य आहे २. पितळ हें जरी पिवळें आहे तरी कलंकानें काळेंकुट्ट होतें; आणि सोनें हें पिवळेंच असून निरंतर शुद्ध असतें, अशीं हीं

साक्षी देती ॥ ३ ॥ तुका म्हणे बरी जातीसवें भेटी । नवनीत पोटीं सांठविलें ॥ ४ ॥ [१९३]

वीट नेघे ऐसें रांधा । जेणें बाधा उपजेना ॥ १ ॥ तरीच तें गोड राहे । निरें पाहे स्वयंभ ॥ २ ॥ आणिकां गुणां पोटीं वाव । दावी भाव आपुला ॥ ३ ॥ तुका म्हणे शुद्ध जाती । तें मागुती परतेना ॥ ४ ॥ [१९४]

नव्हतों सावचित । तेणें अंतरलें हित ॥ १ ॥ पडिला नामाचा विसर । वाढविला संसार ॥ २ ॥ लटिक्याचे पुरीं । वाहोनियां गेलों दूरी ॥ ३ ॥ तुका म्हणे नाव । आम्हां सांपडला भाव ॥ ४ ॥ [१९५]

अन्नाच्या परिमळें जरि जाय भूक । तरि कां हे पाक घरोघरीं ॥ १ ॥ आपुलालें तुम्ही करा रे स्वहित । वाचे स्मरा नित्य राम राम ॥ २ ॥ देखोनी जीवन जरि जाय तान । तरि कां सांठवण घरोघरीं ॥ ३ ॥ देखोनियां छाया सुख न पावीजे । जंव न बैसीजे तया तळीं ॥ ४ ॥ हित तरी होय गातां आईकतां । जरि राहे चित्ता दृढ भाव ॥ ५ ॥ तुका म्हणे होसी भावेंचि तूं मुक्त । काय वारिशी युक्त जाणिवेचि ॥ ६ ॥ [१९६]

काय उणें आम्हां विठोबाचे पायीं । नाहीं ऐसें काई येथें एक ॥ १ ॥ तो हे भोंवताले ठायीं वाटूं मन । बराडी करून दारोदारीं ॥ २ ॥ कोण बळी माझ्या विठोबा वेगळा । आणिक आगळा दुजा सांगा ॥ ३ ॥ तुका म्हणे मोक्ष विठोबाचे गांवीं । फुकाचीं लुटावीं भांडारें तीं ॥ ४ ॥ [१९७]

सेवितों हा रस वांटितों आणिकां । घ्या रे होऊं नका रानभरी ॥ १ ॥ विटेवरी ज्याचीं पाउलें समान । तोचि एक दानशूर दाता ॥ २ ॥ मनाचे संकल्प पाववील सिद्धि । जरी राहे बुद्धि याचे पायीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मज धाडिलें निरोपा । मारग हा सोपा सुखरूप ॥ ४ ॥ [१९८]

उभयतांचींच अंगें आपापल्या योग्यायोग्यतेबद्दल साक्ष देतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरीविषयींचा नवनीत-तुल्य सारभूत भाव ज्यानें आपल्या पोटांत सांठविला आहे अशा चांगल्या जातिवंताशीं माझी भेट व्हावी ४. [१९३]

जो सेवन करण्यांत वीट येणार नाहीं व बाधा होणार नाहीं असा स्वयंपाक करा १. तरच तो स्वयंभू स्थितीनें शुद्ध आणि गोड असा राहील २. इतरांचे वरून दिसण्यांतच गुण, पण पोटांत पोकळ खोटे असे पदार्थ खरोखर आपले आंगीं असणारा तो खोटाच भाव दाखवितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे जातीचे खरे शुद्ध आहेत ते कधीं पालटत नाहींत ४. [१९४]

मी ह्या संसारांत हरिचिंतनाविषयीं सावध चित्तानें नव्हतों, म्हणून माझ्या खऱ्या हितास विघ्न आलें १. म्हणूनच हरिनामाचा विसर पडला आणि उत्तरोत्तर संसार वाढविला २. खोट्या मायिक संसाराच्या पुरांत मी वाहून दूर गेलों ३. तुकाराम महाराज म्हणतात, कीं आतां मात्र हरिविषयींचा भाव हीच कोणी एक नाव आम्हांस सांपडली आहे ४. [१९५]

शिजलेल्या अन्नाच्या वासानेंच जर भुकेची शांति होती तर लोक घरोघर स्वयंपाक कशाकरितां करिते? १. म्हणून अहो पोकळ परमार्थी जन हो, तुम्हीं आपलें खरें हित वाणीनें नित्य रामाचें स्मरण करून साधून घ्या २. जर पाणी पाहूनच तृषा शांत होती, तर लोकांनीं घरोघर पाणी कशाकरितां सांठविलें असतें? ३ एखाद्या वृक्षाची छाया पाहून जोंपर्यंत त्याच्या आश्रयाखालीं बसलें नाहीं तोंपर्यंत सुख होत नाहीं ४. हरीचे गुणानुवाद गाणें व ऐकणें ह्याविषयीं चित्तांत दृढ भाव धरणें ह्यांतच हित आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, खरोखर एका हरीविषयींच्या दृढ भावानेंच तूं मुक्त होशील. तो जर नसेल तर जाणीवेचा संबंध कांहीं उपयोगी पडणार नाहीं ६. [१९६]

आम्हांला विठोबाच्या पायांचे ठिकाणीं कांहीं उणें नाहीं, कारण तेथें कोणत्याही गोष्टीची कमतरता नाहीं १. म्हणून तूं आपलें मन अशा लाभाला सोडून, ज्याप्रमाणें एखादा अन्नानें दुकाळलेला बराडी (आशाळभूत) अन्नाकरितां दारोदार हिंडतो, तद्वत् इतर ठिकाणीं जाऊं देऊं नये २. अहो, माझ्या विठोबावांचून दुसरा कोणी बलाढ्य आहे काय? असेल तर सांग ३. तुकाराम महाराज म्हणतात, विठोबाच्या गांवीं मोक्षाचीं भांडारें भरलीं आहेत; तीं पाहिजे त्यांनीं फुकट लुटावीं ४. [१९७]

आम्हीं ब्रह्मरसाचें सेवन करितों आणि दुसऱ्यासही वाटतों तो तुम्ही घ्या. कोणीही रानोरान भटकूं नये १. विटेवर ज्याचीं पाउलें सारखीं आहेत तोच दान देण्यांत शूर दाता आहे २. आपल्या मनाचा संकल्प सिद्धीस जाईल, जर ह्या विठोबाचे पायीं बुद्धि स्थिर राहील तर ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें लोकांना सुचविण्याकरितां देवानें मला निरोप देऊन पाठविलें आहे. हा मार्ग सोपा असून सुखाचा आहे ४. [१९८]

ऐसे ऐसियानें भेटती ते साधु । ज्यांच्या दर्शनें तुटे भवबंधु । जे कां सच्चिदानंदीं नित्यानंदू । जे कां मोक्षसिद्धी तीर्थां वंदु रे ॥ १ ॥ भाव सर्व कारण मूळ बंदु । सदा समबुद्धि नास्तिक्यभेदु । भूतकृपा मोडी द्वेषकंदु । शत्रु मित्र पुत्र सम करी बंधु रे ॥ २ ॥ मन बुद्धि काया वाचा शुद्ध करीं । रूप सर्वत्र देखोनि नमस्कारीं । लघुत्व सर्वभावें अंगिकारीं । सांडीमांडी मीतूंपण ऐसी थोरी रे ॥ ३ ॥ अर्थकामचाड नाहीं चित्ता । मानामान मोह माया मिथ्या । वर्ते समाधानी जाणोनी नेणता । साधु भेटी देती तया अवचिता रे ॥ ४ ॥ मनीं दृढ धरीं विश्वास । न करीं सांडीमांडीचा सायास । साधुदर्शन नित्यकाळ त्यास । तुका म्हणे जो विटला जाणीवेस रे ॥ ५ ॥ [१९९]

भवसागर तरतां । कां रे करीतसां चिंता । पैल उभा दाता । कटीं कर ठेवुनियां ॥ १ ॥ त्याचे पायीं घाला मिठी । मोल नेघे जगजेठी । भाव एकासाठीं । खांदां वाहे आपुल्या ॥ २ ॥ सुखें करावा संसार । न सांडावे दोन्ही वार । दया क्षमा घर । चोजवीत येतील ॥ ३ ॥ भुक्तिमुक्तीची चिंता । दैन्य नाहीं दरिद्रता । तुका म्हणे दाता । पांडुरंग वोळगिल्या ॥ ४ ॥ [२००]

जे कां रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ॥ १ ॥ तोचि साधु वोळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥ २ ॥ मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनांचें चित्त ॥ ३ ॥ ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥ दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥ ५ ॥ तुका म्हणे सांगूं किती । त्याचि भगवंताच्या मूर्ति ॥ ६ ॥ [२०१]

अरे, ज्यांचीं लक्षणें आतां पुढें सांगण्यांत येत आहेत असे साधु खालीं सांगितलेल्या उपायानें भेटतात. ज्यांचें दर्शन झाल्यानें जीवाच्या मागचें संसारबंधन तुटतें, जे सच्चिदानंदरूप ब्रह्माचे ठिकाणीं नित्य आनंदानें आहेत, मोक्षसिद्धि देणाऱ्या तीर्थांस वंदनीय आहेत [म्हणजे तीर्थें त्यांना वंदन करितात.] १. अरे, अशांच्या भेटीविषयीं सर्वथैव भावाचें बंधन हेंच एक कारण आहे. सर्वकाळ सर्वांविषयीं सारखी बुद्धि ठेव. नास्तिकपणाचा नाश, भूतांविषयीं दया, हृदयांत असणारा जो द्वेषाचा कांदा त्याचा नाश करून टाक. शत्रु, मित्र, पुत्र, भाऊ ह्यांच्याविषयीं सारखी बुद्धि ठेव २. अरे, आपलें मन, बुद्धि, काया व वाणी हीं सर्व शुद्ध कर. हरीचें रूप सर्व ठिकाणीं पाहून त्यास नमस्कार करीत जा, आणि आपल्याकडे कायावाचामनानें लहानपणा घे. मी मोठा, तूं लहान अशा प्रकारची जी थोरी, जो अहंकार मोठेपणाचा आहे तिचा नाश कर ३. अरे, द्रव्यइच्छा ज्याचे चित्तांत नाहीं आणि मान, अपमान, मोह, माया हीं सर्व ज्यास खोटीं भासत आहेत, सर्व तत्वज्ञान संपादन करून समाधानानें जाणिवेचा अभिमान टाकून जो वागतो, अशा ह्या पुरुषास साधु अकस्मात् भेटतात ४. अरे, ज्यानें आपले मनांत संत व देव ह्यांविषयीं दृढ विश्वास ठेवला आहे, इतर खटाटोपांचा जो सायास करीत नाहीं, जो खरोखर आपले ठिकाणीं असणाऱ्या जाणीवेच्या अहंकारास विटला आहे, त्यास साधूचें दर्शन नित्य होतें, असें तुकाराम महाराज म्हणतात ५. [१९९]

साधकजन हो, संसारसिंधूतून तरण्याविषयीं उगीच चिंता कां करितां? हा पलीकडे सर्वांस तारून नेणारा समर्थ दाता कटीवर कर ठेऊन उभा आहे १. त्याच्या पायांस तुम्ही आपल्या जीवानें बळकट मिठी घाला, यापेक्षां तो जगजेठी तुमच्यापासून कांहीं मोल घेत नाहीं. मात्र त्याजविषयीं हृदयांत एक दृढ भाव ठेवा, एवढ्यानेंच तो तुम्हांस खांद्यावर घेऊन संसारसिंधूतून पलीकडे घेऊन जाईल २. एवढें झालें म्हणजे पुरे. मग तुम्ही खुशाल संसार करा (पण आषाढी व कार्तिकी एकादशीस त्याच्या दर्शनास जाण्याचें मात्र सोडूं नका.) ह्या योगानें आपोआप परमपवित्र अशा दया, क्षमा इत्यादि सत्ववृत्ती तुमच्या हृदयरूपी घराचा शोध करीत येतील ३. ऐहिक व पारत्रिक (परलोकींचे) भोग अगर मुक्ती ह्यांविषयीं तुम्हांस कांहीं चिंता करण्यास नको. तुमच्यामध्यें दैन्य, दारिद्य हीं, एका पांडुरंग दात्याचा आश्रय केल्यानें, राहाणार नाहींत, असें तुकाराम महाराज म्हणतात ४. [२००]

जीव सुखानें रंगलेले असोत, अगर ते दुःखानें गांजलेले असोत, त्यांना हे सर्व आपले आहेत असें जो मानतो १. तोच साधु आहे असें समजावें आणि त्याच ठिकाणीं देव आहे असें जाणावें २. ज्याप्रमाणें लोणी अंतर्बाह्य मऊ आहे त्याप्रमाणें सज्जनाचें चित्त असतें ३. ज्यांस कोणाचाही आश्रय नाहीं अशा निराश्रितांस जो आपल्या हृदयांत धरतो ४. ज्याप्रमाणें पुत्रावर दया करितो त्याचप्रमाणें जो आपणाजवळ असणाऱ्या दासदासींवर दया करितो ५. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच्याबद्दल आतां काय सांगूं, तो साक्षात् भगवंताची मूर्तीच आहे ६. [२०१]

याजसाठीं भक्ति। जगीं रूढवावया ख्याति ॥ १ ॥ नाहीं तरी कोठें दुजें। आहे बोलाया सहजें ॥ २ ॥ गौरवासाठीं। स्वामीसेवेची कसोटी ॥ ३ ॥ तुका म्हणे अळंकारा। देवभक्त लोकीं खरा ॥ ४ ॥ [२०२]

अमंगळ वाणी। नये आयकों ते कानीं ॥ १ ॥ जो हे दूषी हरिची कथा। त्यासि क्षयरोग-व्यथा ॥ २ ॥ याति वर्ण श्रेष्ठ। परि तो चांडाळ पापिष्ठ ॥ ३ ॥ तुका म्हणे पाप। माय नावडे ज्या बाप ॥ ४ ॥ [२०३]

कैसा सिंदळीचा। नव्हे ऐसी ज्याची वाचा ॥ १ ॥ वाचे नुच्चारी गोविंदा। सदा करी परनिंदा ॥ २ ॥ कैसा निरयगांवा। जाऊं न पवे विसांवा ॥ ३ ॥ तुका म्हणे दंड। कैसा न पवे तो लंड ॥ ४ ॥ [२०४]

आचरणा ठाव। नाहीं अंगीं स्वतां भाव ॥ १ ॥ करवी आणिकांचे घात। खोडी काढूनि पंडित ॥ २ ॥ श्वानाचिया परि। मिष्टान्नासि विटाळ करी ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसा। सटवेचि ना पांचां दिसां ॥ ४ ॥ [२०५]

गर्भाचें धारण। तिनें वागविला सीण ॥ १ ॥ व्याली कुऱ्हाडीचा दांडा। वर न घालीच तोंडा ॥ २ ॥ उपजला काळ। कुळा लाविला विटाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे जाय। नरका अभक्ताची माय ॥ ४ ॥ [२०६]

पतनासि नेती। तिचा खोटा स्नेह प्रीती ॥ १ ॥ विधिपुरतें कारण। बहु वारावें वचन ॥ २ ॥ सर्वस्वासि नाडी। ऐसी लाघवाची बोडी ॥ ३ ॥ तुका म्हणे दुरी। राखतां हे तेंचि बरी ॥ ४ ॥ [२०७]

जगतामधील मूढ जीवांना तरण्याकरितांच भक्तीची कीर्ति प्रसिद्ध करणें आहे १. नाहीं तर सहजरीत्या बोलण्यासारखें परब्रह्मस्वरूपीं द्वैत आहे कोठें? २. लोकांत ह्या भक्तीचा मोठेपणा होण्याकरितां स्वामिसेवेचा व्यवहार आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, लोकांमध्यें देवभक्त हा एक अलंकारच आहे ४. [२०२]

ती वाणी केवळ अमंगळ आहे, ती कानानें मुळींच ऐकूं नये १. ती ही कीं जो हरीच्या कथेस दोष देतो त्यास क्षयरोगाची व्यथा होते २. त्याची जाती श्रेष्ठ (ब्राह्मण) जरी असली तरी तो खरोखर अति पापिष्ठ महार आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यास आई आणि बाप आवडत नाहींत, त्या ठिकाणीं पापच आहे असें जाणावें ४. [२०३]

ज्याची वाणी खालीं म्हटल्याप्रमाणें उच्चार करीत नाहीं, तो जारिणीचे पोटचा नाहीं असें कसें म्हणावें? १. वाणीनें गोविंदाचा उच्चार कधींही करीत नाहीं, सदा दुसऱ्याची निंदाच करितो २. तो पुरुष नरकांत विश्रांति घेण्यास कसा जाणार नाहीं? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा या लंडास दंड कां म्हणून होणार नाहीं? ४. [२०४]

शुद्ध आचरणाचा स्वतः ज्यांचे ठिकाणीं पत्ता नाहीं व देवाविषयीं भाव पण नाहीं १. असे हे पंडित, शुद्ध आचरणानें वागणाऱ्याच्या आचारांत कांहीं तरी दोष काढून, त्याचा घात मात्र करितात २. ज्याप्रमाणें एखादें कुत्रें गोड अन्नास शिवून तें भ्रष्ट करितें तद्वत् ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा हा दुर्जन इतके दिवस वांचला कसा? तो जन्मल्यापासून पांच दिवसांचे आंतच कां सटवला (सटवीच्या स्वाधीन झाला, मेला) नाहीं? ४. [२०५]

अशा ह्या दुर्जनाच्या गर्भधारणेचा शीणच आईनें घेतला १. खरोखर ती मुलास जन्म न देतां कुऱ्हाडीचा दांडाच जन्मली आहे. त्याच्या तोंडांत जन्मल्याबरोबर वार दडपून त्यास मारून कां टाकिलें नाहीं? २. खरोखर कुळांत काळाप्रमाणें जन्मून त्यानें आपल्या सर्व कुळास दोष लाविला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा ह्या अभक्ताची आई नरकास जाते ४. [२०६]

जी स्त्री आपल्या पतीस पतनास नेते तिच्यावर प्रीतिस्नेह ठेवणें हें अगदीं खोटें आहे १. शास्त्रविधीपुरताच तिच्याशीं संबंध ठेवावा. फार बोलूं नये २. ती नवऱ्यास सर्वतोपरी फसविणारी आहे. खरोखर ती गोड गोड भाषण करून संसारांत गुंतविणारी आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तिला दूर टेवण्यांतच आपलें कल्याण आहे ४. [२०७]

देव आड आला । तो भोगितो मी उगला । अवघा निवारिला । शीण शुभाअशुभाचा ॥ १ ॥ जीवशिवाचें भातुकें । केलें क्रीडाया कौतुकें । कैंची येथें लोकें । हा आभास अनित्य ॥ २ ॥ विष्णुमय खरें जग । येथें लागतसे लाग । वांटिले विभाग । वर्णधर्म हा खेळ ॥ ३ ॥ अवघी एकाचीच वीण । तेथें कैंचें भिन्नाभिन्न । वेदपुरुष नारायण । तेणें केला निवाडा ॥ ४ ॥ प्रसादाचा रस । तुका लाधला सौरस । पायापाशीं वास । निकट नव्हे निराळा ॥ ५ ॥ [२०८]

ध्यानीं योगीराज बैसले कपाटीं । लागे पाठोवाटी तयांचिया ॥ १ ॥ तान भूक त्याचें राखे शीत उष्ण । झाले उदासीन देहभाव ॥ २ ॥ कोण सखे तया आणिक सोयरें । असे त्यां दुसरें हरीविण ॥ ३ ॥ कोण सुख त्यांच्या जीवासि आनंद । नाहीं राज्यमद घडी तया ॥ ४ ॥ तुका म्हणे विष अमृतासमान । कृपा नारायण करितां होय ॥ ५ ॥ [२०९]

न व्हावें तें झालें देखियेले पाय । आतां फिरूं काय मागें देवा ॥ १ ॥ बहु दिस होतों करीत हे आस । तें आलें सायासें फळ आजि ॥ २ ॥ कोठवरि जिणें संसाराच्या आशा । उगवो हा फांसा एथुनियां ॥ ३ ॥ बुडालीं तयांचा मूळ ना मारग । लागला तो लाग सोडूनियां ॥ ४ ॥ पुढें उल्लंघितां दुःखाचे डोंगर । नाहीं अंतपार गर्भवासा ॥ ५ ॥ तुका म्हणे कास धरीन पीतांबरीं । तूं भवसागरीं तारूं देवा ॥ ६ ॥ [२१०]

वैकुंठा जावया तपाचे सायास । लागे जिवा नाश करणें बहु ॥ १ ॥ तया पुंडलिकें केला उपकार । फेडावया भार पृथिवीचा ॥ २ ॥ तुका म्हणे सोपी केली पायवाट । पंढरी वैकुंठ भूमीवरी ॥३॥ [२११]

आतां देव आमचे पुढें होऊन सर्व भोक्तृत्व तोच भोगीत आहे. मी सर्व कर्तृत्वभोक्तृत्वरहित उगाच बसलों आहें. आजपर्यंत माझ्या मागें लागलेल्या शुभाशुभ कर्मांचें, सुखदुःख सर्व करणारा व भोगणारा देव आहे अशा समजुतीनें, निरसन केलें १. मुलीनें खेळावयाच्या भातुकलीप्रमाणेंच जीवाचें आणि शिवाचें भातुकें क्रीडा करण्याकरितांच कर्त्यानें लीलेनें केलें आहे. वास्तविक पाहिलें तर येथें लोक, लोकांतर (स्वर्ग, मृत्यु, पाताळ हा भेद) आहेत कोठें? कारण सर्वच आभास अनित्य आहे २. खरोखर तात्त्विक दृष्टीनें सर्व जगताकडे पाहिलें तर सर्व जग विष्णुमयच आहे असेंच म्हणावें लागतें, बाह्य दृष्टीनें वर्णधर्मांची जी वांटणी दिसते ती केवळ कर्त्याचा खेळ आहे ३. खरोखर सर्व हें एकाचपासून निर्माण झालेलें आहे तेथें भिन्नाभिन्नतेचा व्यवहार कसला आहे? असा हा निर्णय साक्षात् वेदपुरुष जो नारायण त्यानें केला आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, तोच प्रसादाचा रसानंद मला प्राप्त झाला. म्हणून, निरंतर हरीच्या पायांपाशींच माझें निकट वास्तव्य आहे. तेथून मी कधींही निराळा होणार नाहीं ५. [२०८]

परम विरक्त साधक हृदयांत हरीचें ध्यान करीत गिरिकपाटांत बसले आहेत, त्यांच्या मागें निरंतर देव असतो १. आणि त्यांचें ताहान, भूक व शीतोष्ण ह्यांपासून तो रक्षण करितो; कारण ते आपल्या देहभावावर निरंतर उदासीन असतात २. तसल्या त्या निर्जन स्थळीं हरीवांचून त्यास दुसरे सखे कोण आहेत? ३. त्या स्थळीं त्या योगिराजांना वैषयिक सुख कोणतें आहे? एक क्षणभर देखील त्यांच्यामध्यें राजैश्वर्याचा मद नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, एक नारायणानें कृपा केली म्हणजे विषवत् दुःख, अमृतवत् सुख समान होतें ५. [२०९]

अहो देवा, ज्या तुमच्या पायाचें दर्शन कोणत्याही जन्मांत कोणत्याही साधनानें होणारें नाहीं, त्याचें परम भाग्यानें आज मला दर्शन झालें आहे. आतां ह्या असल्या लाभापासून मी माघारी वळेन काय? १. पुष्कळ दिवस ज्याची मी आशा करीत होतों त्याचें फळ मोठ्या आयासानें आज मला मिळालें २. कोठपर्यंत संसाराच्या आशेनें जगावें? ह्या पांडुरंगाच्या चरणाच्या आश्रयानें हा संसारपाश तोडून टाकूं ३. नरदेहासारखें उत्तम ठिकाण प्राप्त होऊनही असल्या आधाराचा त्याग करून भवनदींत कितीएक बुडून गेले, त्यांचा मागमूस देखील नाहीं ४. एक वेळ नरदेहासारखा आश्रय सुटल्यावर पुढें दुःखाचे डोंगर उलंघन करतेवेळीं अपार गर्भवास भोगावयास पाहिजे ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मी तुमच्या पीतांबराची कांस धरीन, कारण तुम्ही या भवसागरांतून तारून नेणारे आहांत ६. [२१०]

वैकुंठास जाण्याकरितां जीवाचा नाश होण्याइतके तपानुष्ठानाचे कष्ट सोसावे लागतात १. पण पृथ्वीस पापी जनांचें जें ओझें आहे तें नाहींसें करण्याकरितां (तिसऱ्या कडव्यांत दर्शविलेला) पुंडलिकानें सर्वांवर उपकार केला आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, पंढरी हें साक्षात् पृथ्वीवरील वैकुंठ आहे, म्हणून सर्वांना वैकुंठाची वाट सोपी झाली आहे ३. [२११]

शोकें शोक वाढे । हिमतीचे धीर गाढे ॥ १ ॥ येथें केलें नव्हे काई । लंडीपण खोटें भाई ॥ २ ॥ करिती होया होय । परी नव्हे कोणी साह्य ॥ ३ ॥ तुका म्हणे घडी । साधिलिया एक थोडी ॥ ४ ॥ [२१२]

म्हणउनि खेळ मांडियेला ऐसा । नाहीं कोणी दिशा वर्जियेली ॥ १ ॥ माझिया गोतें हे वसले सकळ । न देखिजे मूळ विटाळाचें ॥ २ ॥ करूनि ओळखी दिली एकसरें । न देखों दुसरें विषमासी ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं काळापाशीं गोवा । स्थिति मति देवा वांचूनियां ॥ ४ ॥ [२१३]

वैष्णव तो जया । अवघी देवावरी माया ॥ १ ॥ नाहीं आणीक प्रमाण । तन धन तृण जन ॥ २ ॥ पडतां जड भारी । नेमा न टळे निर्धारीं ॥ ३ ॥ तुका म्हणे याती । हो कां तयाची भलती ॥ ४ ॥ [२१४]

करोत तपादि साधनें । कोणी साधोत गोरांजनें ॥ १ ॥ आम्ही न वजों तया वाटा । नाचूं पंढरी चोहटां ॥ २ ॥ पावोत आत्मस्थिति । कोणी म्हणोत उत्तम मुक्ति ॥ ३ ॥ तुका म्हणे छंद । आम्हां हरिच्या दासां निंद्य ॥ ४ ॥ [२१५]

देव सखा जरी । जग अवघें कृपा करी ॥ १ ॥ ऐसा असोनि अनुभव । कासावीस होती जीव ॥ २ ॥ देवाची जतन । त्यासी बाधूं न शके अग्न ॥ ३ ॥ तुका म्हणे हरी । प्रऱ्हादासि यत्न करी ॥ ४ ॥ [२१६]

भले म्हणवितां संतांचे सेवक । आइत्याची भीक सुखरूप ॥ १ ॥ ठसावितां बहु लागती सायास । चुकल्या घडे नाश अल्प वर्म ॥ २ ॥ पाकसिद्धी लागे संचित आइतें । घडतां सोई तें

रडण्यानें रडणेंच वाढतें, ह्या करितां हिंमतवान् व्हा, मोठें धैर्य धरा १. या मनुष्यदेहांत कोणती गोष्ट न घडण्यासारखी आहे? अहो जन हो, लंडी (भित्रे) पणा मात्र ह्या ठिकाणीं खोटा आहे २. कितीएकांस, 'तुम्ही परमार्थ करण्याविषयीं मदत कराल काय?' असें म्हटलें तर, करूं हो, असें होला हो म्हणणारे पुष्कळ आहेत. परंतु खरोखर साह्य करण्याच्या प्रसंगीं कोणीही मदत करीत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या मनुष्यदेहामध्यें परमार्थ थोडा एक घटकाभर साधला तरी पुरे ४. [२१२]

(खालील कडव्यांत सांगितलेल्या अनुभवावर महाराजांची वृत्ति येऊन आरंभींच्या कडव्याचे उद्गार काढले आहेत.) म्हणूनच मी अशा खेळाला आरंभ केला आहे, कीं ज्यामध्यें कोणतीही दिशा वगळली जात नाहीं १. माझे सर्व गोत जो पांडुरंग त्यानेंच हें सर्व जगत् व्यापिलें आहे. विटाळाचें मूळ जो भेद तो मला येथें दिसत नाहीं २. त्या पांडुरंगानें सर्वत्र एक मीच भरलों आहें अशा आपल्या स्वरूपाची ओळख करून दिली म्हणून मीं एक त्याच्या स्वरूपावांचून दुसरें कांहीं पाहात नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां माझें हृदय काळाच्या कल्पनेंत अडकलें नाहीं. माझी स्थिति, बुद्धि ही देवाहून निराळी नाहीं ४. [२१३]

ज्याची प्रीति इतर कोणावरही नसून ती सर्व एका देवावर आहे तोच एक वैष्णव आहे १. ज्याला एक देवच मान्य; इतर देह, द्रव्य, लोक हे केवळ तृणवत् आहेत २. कितीही दुःखें व संकटें प्राप्त झालीं तरी जो आपल्या उपासनेच्या नियमांत निश्चयानें व्यत्यय येऊं देत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याची जात पाहिजे ती का असेना? ४. [२१४]

तपादिकरून साधनें आहेत तीं कोणी करोत, कोणी ईश्वराप्रीत्यर्थ आपला देह अग्नींत जाळून घेवोत १. आम्ही त्या वाटेला कधींही जाणार नाहीं. पंढरीच्या चोहट्यावर हरीचें नाम घेत नाचत राहूं २. कोणीही आत्मस्थितिभाव पावोत अगर मुक्ति ही उत्तम आहे असें म्हणोत ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका हरीच्या भजनावांचून आम्हां हरीच्या दासांना हे इतर छंद निंद्य आहेत ४. [२१५]

ज्याचा देव सखा आहे त्याच्यावर सर्व जग कृपा करतें १. असा सगळ्यांना अनुभव असून हरीची कृपा संपादन न करितां सर्व जीव विषयाकरितां तळमळ करीत राहातात २. ज्याचें रक्षण देव करितो त्याला अग्नीपासूनही बाधा होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याप्रमाणें अग्नीपासून, शस्त्रांपासून, विषापासून प्रऱ्हादाचें रक्षण हरीनें केलें ४. [२१६]

संतांचे आम्हीं सेवक आहोंत असें म्हणविणें उत्तम. ह्यापासून संतानें मिळविलेल्या लाभाची आयती भीक सुखानें आपल्या हाताला येते १. कोणतीही गोष्ट ठसविण्याला मोठे श्रम लागतात आणि त्यांत थोडकें वर्म चुकलें तर सर्वच नाश होतो २. स्वयंपाक करण्याला सर्व साहित्याची आयती तयारी लागते. इतकेंही असून स्वयंपाक

तेव्हां गोड ॥ ३ ॥ तुका म्हणे ब-या सांगतांचि गोष्टी । रणभूमी दृष्टी न पडे तों ॥ ४ ॥ [२१७]

संतसमागम एखादिया परी । राहावें त्याचे द्वारीं श्वानयाती ॥ १ ॥ तेथें रामनाम होईल श्रवण। घडेल भोजन उच्छिष्टाचें ॥ २ ॥ कामारी बटीक सेवेचा सेवक । दीनपण रंक तेथें भलें ॥ ३ ॥ तुका म्हणे सर्व सुख त्या संगती । घडेल पंगती संतांचिया ॥ ४ ॥ [२१८]

कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता । बहिणी बंधु चुलता कृष्ण माझा ॥ १ ॥ कृष्ण माझा गुरु कृष्ण माझें तारूं । उतरील पैलपारु भवनदीची ॥ २ ॥ कृष्ण माझें मन कृष्ण माझें जन । सोईरा सज्जन कृष्ण माझा ॥ ३ ॥ तुका म्हणे माझा श्रीकृष्ण विसांवा । वाटे न करावा परता जीवा ॥ ४ ॥ [२१९]

जातों वाराणसी । निरवी गाई घोडे म्हैसी ॥ १ ॥ गेलों येतों नाहीं ऐसा । सत्य माना र भरंवसा ॥ २ ॥ नका काढूं माझीं पेवें । तुम्हीं वरळा भूस खावें ॥ ३ ॥ भिकारियाचे पाठीं । तुम्ही घेउनि लागा काठी ॥ ४ ॥ सांगाल जेवाया ब्राह्मण । तरी कापाल माझी मान ॥ ५ ॥ वोकलिया वोका । म्यां खर्चिला नाहीं रुका ॥ ६ ॥ तुम्ही खावें ताकपाणी । जतन करा माझें लोणी ॥ ७ ॥ नाहीं माझें मनीं । पोरें रांडा नागवणी ॥ ८ ॥ तुका म्हणे नष्ट । होतें तैसें बोले स्पष्ट ॥ ९ ॥ [२२०]

कास घालोनी बळकट । झालों कळिकाळावरी नीट । केली पायवाट । भवसिंधूवरूनि ॥ १ ॥ या रे या रे लहान थोर । याति भलते नारी नर । करावा विचार । न लगे चिंता कोणाची ॥ २ ॥ कामीं गुंतले रिकामे । जपी तपी येथें जमे । लाविले दमामे । मुक्त आणि मुमुक्षा ॥ ३ ॥ एकंदर शिक्का । पाठविला याही लोका । आलों म्हणे तुका । मी नामाचा धारक ॥ ४ ॥ [२२१]

व्यवस्थित होईल तर गोड लागेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, जोंपर्यंत रणभूमी दृष्टीस पडली नाहीं तोंपर्यंत युद्धाच्या गोष्टी सांगणें गोड आहे ४. [२१७]

संतांची संगति एखाद्या हलक्या प्रकारानें आली तरी करावी म्हणजे त्यांच्या दारांत कुत्रें होऊन देखील राहावें १. कारण त्या ठिकाणीं रामनामाचें निरंतर श्रवण होईल आणि संत जें भोजन करतील त्यांच्या उच्छिष्टाचें सेवन घडेल २. त्या ठिकाणीं आपण काम करणारी बटीक (केवळ सांगितलेली सेवा करणारी) अशा दीन रंकपणानें तेथें राहाणें चांगलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांच्या संगतीनें, पंगतीनें सर्व सुखाचें भोजन घडेल ४. [२१८]

कृष्ण माझी आई, बाप, बहीण, भाऊ, चुलता आहे १. माझा गुरु कृष्ण, मला तारणारा कृष्ण, संसारसिंधूंतून पार पाडणारा कृष्णच आहे २. माझें मन कृष्ण, ध्यान कृष्ण, सोयरा, मित्र कृष्णच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, कृष्ण हेंच माझें विश्रांतीचें ठिकाण आहे. ह्याला जिवापासून वेगळा करूं नये असें मला वाटतें ४. [२१९]

कोणीएक गृहस्थ आपल्या कुटुंबांतील माणसांना म्हणूं लागला कीं मी काशीला जातों; माझी गाय, घोडे, म्हशी ह्या तुम्ही संभाळा अशी निरवानिरव करूं लागला १. तुम्ही कांहीं काळजी करूं नका, मी अशा तडक्यानें जाऊन येतों, कीं जसा गेलोंच नाहीं. ह्या माझ्या बोलण्यावर भरंवसा ठेवा २. माझे पश्चात् माझे पेवांतील धान्य खाण्याकरितां तुम्ही काढूं नका. तुम्ही भूसमिश्रित फोलकट दाणे खावेत ३. घरीं कोणी भीक मागण्यास आलें असतां त्यास भीक न घालतां हातांत काठी घेऊन त्याचे मागें लागून त्यास हांकून द्या ४. तुम्हीं जेवावयास जर एखादा ब्राह्मण सांगाल तर तुम्हांस माझी मान कापल्याचा दोष लागेल ५. आजपर्यंत मी धनधान्याचें रक्षण मोठ्या काळजीकष्टानें केलें आहे. एखादे वेळेस जर मला वांती झाली तर दमडीची देखील सुंठ आणून खाल्ली नाहीं ६. पाण्यासारखें पातळ ताक तुम्हीं खा आणि माझें तूप लोणी सांभाळून ठेवा ७. माझे मनांत रांडापोरांविषयीं प्रेम नाहीं, कारण हीं सर्व मला लुटणारीं आहेत ८. तुकाराम महाराज म्हणतात, हा नष्ट मनांत जसें होतें तसें वाणीनें स्पष्ट बोलतो ९. [२२०]

बळकट कांचा मारून कळिकाळाशीं लढण्याकरितां मी नीट उभा राहिलों आहें व संसारसमुद्र पार उतरून जाण्याकरितां पायवाट केली आहे १. अहो लहान मोठे भलते जातीचे पुरुष बायका, या हो या. येथें कोणास विचार करण्यास नको व कोणाची कसलीही फिकीर करण्यास नको २. कामांत गुंतलेले, रिकामे, जप तप करणारे येथें चालतात. मुक्त झालेले, मोक्षाची इच्छा करणारे ह्या सर्वांस कळण्याकरितां नौबती लाविल्या आहेत ३. ह्या लोकांत सरसकट हरीच्या नामाचा शिक्का पाठविला आहे. तुकाराम महाराज म्हणतात, जो मी नामाचा धारक तो मी आलों आहें ४. [२२१]

आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी । बोलिले जे ऋषि । साच भावें वर्ताया ॥ १ ॥ झाडूं संतांचे मारग । आडरानीं भरलें जग । उच्छिष्टाचा भाग । शेष उरला तो सेवूं ॥ २ ॥ अर्थे लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें । विषयलोभी मनें । साधनें बुडविलीं ॥ ३ ॥ पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा । तुका म्हणे करा । जयजयकार आनंद ॥ ४ ॥ [२२२]

बळियाचे अंकित । आम्ही जालों बळिवंत ॥ १ ॥ लाथाळिला संसार । केला षडूर्मीचा मार ॥ २ ॥ जन धन तन । केलें तृणाही समान ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां । आम्हीं मुक्तीचिया माथां ॥ ४ ॥ [२२३]

मृत्युलोकीं आम्हां आवडती परि । नाहीं एका हरिनामाविण ॥ १ ॥ विटलें हें चित्त प्रपंचापासूनि । वमन तें मनीं बैसलेंसे ॥ २ ॥ सोनें रुपें आम्हां मृत्तिकेसमान । माणिकें पाषाण खडे तैसे ॥ ३ ॥ तुका म्हणे तैशा दिसतील नारी । रिसाचियापरि आम्हांपुढें ॥ ४ ॥ [२२४]

भक्तप्रतिपाळे दीन वो वत्सले। विठ्ठले कृपाळे होसी माये॥ १ ॥ पडिला विसर माझा काय गुणें । कपाळ हें उणें काय करूं॥ २॥ तुका म्हणे माझें जाळुनि संचित । करीं वो उचित भेट देई ॥ ३ ॥ [२२५]

तुजविण मज कोण वो सोयरे । आणीक दुसरे पांडुरंगा ॥ १ ॥ लागलीसे आस पाहतूसे वास। रात्रीं वो दिवस लेखी बोटें ॥ २ ॥ काम गोड मज नलगे हा धंदा। तुका म्हणे सदा हेंचि ध्यान ॥ ३ ॥ [२२६]

पाठियंते आम्हीं तुजपाशीं मागावें । जीवींचें सांगावें हितगुज ॥ १ ॥ पाळशील लळे दीन वो वत्सले । विठ्ठले कृपाळे जननिये ॥ २ ॥ जीवभाव तुझ्या ठेवियेला पायीं। तूंचि सर्वां ठायीं

आम्हीं वैकुंठांत वास्तव्य करणारे आहोंत, पण पूर्वी ऋषींनीं जें प्रतिपादन केलें आहे, त्याप्रमाणें खरोखर वर्तन करण्याकरितां आम्ही मृत्युलोकांत आलों आहोंत १. जे मार्ग ऋषि, मुनि, साधुसंतांनीं पूर्वी घातले आहेत ते झाडून स्वच्छ करूं [आम्ही आबाल वृद्धांस स्पष्ट कळतील असे समजावून देऊं], कारण सर्व जग ऋषि, मुनि, साधु, संतप्रणीत मार्ग सोडून आडरानांतून भरले आहे व ऋषि, मुनि, साधुसंतांनीं ज्या परमार्थमार्गाचें सेवन केलें आहे त्याचाच अवशिष्ट उच्छिष्ट भाग आम्हीं सेवन करूं २. पुराणांतील रहस्यार्थाचा लोप झाला, कारण शब्दज्ञान्यांनीं त्याचे भलतेच अर्थ करून नाश केला. सर्वांचीं मनें विषयलोभी झाल्यामुळें त्यांनीं परमार्थिक साधनें नाहींशीं केलीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही भक्तीचा डंका (भक्तीची ख्याती) करूं. ज्यायोगेंकरून कळिकाळास भय उत्पन्न होतें त्या हरीच्या नामाचा आनंदानें जयजयकार करा ४. [२२२]

महान् बलाढ्य अशा हरीचे सेवक झाल्यामुळे आम्हींही बलाढ्य झालों १. म्हणून संसारास लायांनीं मारून कामक्रोधादिक षडूर्मीचा नाश केला २. जन, द्रव्य, शरीर हें तृणाप्रमाणें करून टाकिलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आम्हीं मोक्षाच्या मस्तकावर आहोंत ४. [२२३]

ह्या मृत्युलोकांत आम्हांला हरीच्या नामावांचून दुसरे कांहीं प्रकार आवडत नाहींत १. माझें चित्त सर्व प्रपंचाविषयीं वांतीप्रमाणें विटलें आहे २. सोनें, रुपें हें आम्हांस मातीप्रमाणें आहे. त्याचप्रमाणें हिरे, माणकें हीं आम्हांस दगडाप्रमाणें आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व जगास भुलविणाऱ्या स्त्रिया आम्हांस अस्वलींसारख्या दिसतात ४. [२२४]

हे विठ्ठला, भक्तांचा सांभाळ करणारी व दीनांचे रक्षण करणारी अशी तूं केवळ कृपाळू आई आहेस १. तुला माझा कोणत्या कारणानें विसर पडला ? माझेंच कपाळ फुटकें आहे ह्याला काय करूं ? २. तुकाराम महाराज म्हणतात, माझें सर्व संचित जाळून टाक आणि मला भेट देणें हें योग्य कर्तव्य तूं बजाव ३. [२२५]

अहो पांडुरंगा, तुमचेवांचून मला दुसरे जगतांत सखेसोयरे कोण आहेत ? १. तुमची मला मोठी आशा लागली आहे म्हणून मी रात्रंदिवस तुमची वाट पाहात आहें व तुमच्या दर्शनावांचून एक दिवस गेला व दुसरी रात्रही गेली असें बोटानें मोजीत आहें. २. काम गोड लागत नाहीं व धंदाही गोड लागत नाहीं. रात्रंदिवस तुझें ध्यान लागलें आहे, असें तुकाराम महाराज म्हणतात ३. [२२६]

देवा, तुम्हांजवळ आम्हांला जें आवडतें आहें तें आम्हीं मागूं. आमचे जीवांतील जी गुह्य गोष्ट आहे ती आम्हीं तुम्हांजवळ सांगूं १. आमचे लाड पुरविणारी, दीनाचें रक्षण करणारी, हे दीनदयाळ विठ्ठले, विठाबाई माउली २. आम्हीं

एक आम्हां ॥ ३ ॥ दुजियाचा संग लागों नेदी वारा। नाहीं जात घरा आणिकांच्या ॥ ४ ॥ सर्व सत्ता एकी आहे तुजपाशीं। ठावें आहे देसी मागेन तें ॥ ५ ॥ म्हणउनी पुढें मांडियेली आळी। थिंकोनियां चोळी डोळे तुका ॥ ६ ॥ [२२७]

कोण पर्वकाळ पहासील तीथ। होतें माझें चित्त कासावीस ॥ १ ॥ पाठवीं भातुकें प्रेम झडकरी। नको राखों उरी पांडुरंगा ॥ २ ॥ न धरावा कोप मजवर कांहीं। अवगुणी अन्यायी म्हणोनियां ॥ ३ ॥ काय रडवीसी नेणतीया पोरां। जाणतिया थोरांचिये परी ॥ ४ ॥ काय उभी कर ठेवुनियां कटीं। बुझावीं धाकुटीं लडिवाळें ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां पदरासी पिळा। घालोनि निराळा नव्हे मग ॥ ६ ॥ [२२८]

कां हो देवा कांहीं न बोलाचि गोष्टी। कां मज हिंपुटी करीतसां ॥ १ ॥ कंठीं प्राण पाहें वचनांसी वास। तों दिसे उदास धरिलें ऐसें ॥ २ ॥ येणें काळें बुंथी घेतलीसे खोल। कां नये विटाळ होऊं माझा ॥ ३ ॥ लाज वाटे मज म्हणवितां देवाचा। न पुससी फुकाचा तुका म्हणे ॥ ४ ॥ [२२९]

उचित तें काय जाणावें दुर्बळें। थोरिवेचें काळें तोंड देवा ॥ १ ॥ देतों हाका कोणी नायकती द्वारीं। ओस कोणी घरीं नाहीं ऐसें ॥ २ ॥ आलिया अतीता शब्दें समाधान। करितां वचन काय वेंचे ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्हां साजे हें श्रीहरी। आम्ही निलाजरीं नाहीं ऐसीं ॥ ४ ॥ [२३०]

आम्ही मागों ऐसें नाहीं तुजपाशीं। जरी तूं भीतोसी पांडुरंगा ॥ १ ॥ पाहें विचारुनि आहे तुज ठावें। आम्ही धालों नांवें तुझ्या एका ॥ २ ॥ ऋद्धिसिद्धि तुझें भव्य भांडवल। हें तों आम्हां फोल भक्तीपुढें ॥ ३ ॥ तुका म्हणे जाऊं वैकुंठा चालत। बैसोनी निवांत सुख भोगूं ॥ ४ ॥ [२३१]

आपला जीवभाव तुमचे चरणीं ठेविला आहे. सर्व ठिकाणीं आम्हांस तूंच एक आहेस ३. आम्हाला दुसऱ्या कोणाच्या संगाचा वाराही लागूं देऊं नकोस. मी दुसऱ्या कोणाच्याही घरास जात नाहीं ४. अहो हरि, सर्व सत्ता तुमचेच हातीं आहे. मी जें कांहीं मागेन तें तुम्हीं मला द्याल हें मला पक्कें ठाऊक आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमचे पुढें मी हट्ट घेतला आहे, रडतों आहें आणि डोळे चोळतों आहें ६. [२२७]

हे देवा, तूं मला भेट देण्यास उशीर लाविला आहेस, त्याचें कारण मला असें वाटतें कीं, तूं एखादी चांगली तिथी पाहात आहेस किंवा पर्वकाळ पाहात आहेस. पण तुझ्या अशा करण्यानें माझें चित्त तुझ्या वियोगामुळे कासावीस होत आहे १. हे पाडुरंगा, तुझा प्रेमरूपी खाऊ मजकडे लवकर पाठीव, ह्यांत कांहीं कसूर करूं नकोस २. मी अवगुणी आहें, अन्यायी आहें म्हणून मजवर राग करूं नकोस ३. मला नेणत्या मुलास जाणत्या मुलाप्रमाणें कां रडवितोस? ४. हे आई, कटीवर कर ठेवून तूं कशाला उभी राहिली आहेस? आम्हां लाडक्या लहान मुलांची समजूत कर ५. तुकाराम महाराज म्हणतात, आतां तुमचे पदरास पिळा घालून धरीन (पदर घट्ट धरून ठेवीन). मग मी निराळा होणार नाहीं ६. [२२८]

अहो देवा, माझ्याशीं तुम्ही कांहीं गोष्ट बोलत नाहीं, मला असें तुम्ही कष्टी कां करितां? १. माझा प्राण कंठांत आला आहे. आपल्या वचनाची मी सारखी वाट पाहात आहें, पण मला तुम्हीं माझी निराशा करणार असें दिसतें २. देवा, आपण ह्या वेळीं मोठी खोळ घेऊन बसलां आहांत काय? आपणांस माझा विटाळ होऊं नये असें वाटतें काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, मी तुमचा आहें असें म्हणविण्यास मला मोठी लाज वाटते, कारण आपण मला फुकाचे विचारीतसुद्धां नाहीं ४. [२२९]

हे देवा, योग्य काय तें मीं अज्ञानी दुर्बलानें काय जाणावें आणि परमार्थांत थोरीवेचें तोंड तर काळेंच आहे १. एखाद्या ओस घरांतील द्वारांत हांक मारली असतां ज्याप्रमाणें कोणी ओ देत नाहीं त्याप्रमाणें तुम्हांस मी हांक मारीत असतांही आपण बोलत नाहीं २. दाराशीं आलेल्या अतिथीचें नुसतें गोड बोलून समाधान करण्यास खर्च काय होतें? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, जें कांहीं कराल तें थोरपणामुळें तुम्हांस शोभतें, पण आम्हीं मात्र निलाजरे नाहीं ४. [२३०]

हे पांडुरंगा, जें काहीं आम्हीं तुझ्याजवळ मागूं तें देण्यास तुझ्याजवळ नाहीं म्हणूनच तूं भीत आहेस १. हे देवा, तूं विचारानें पाहा. तुलाही तें ठाऊक आहे, तें हें कीं आम्हीं तुझ्या एका नामचिंतनानेंच तृप्त आहोंत २. तुझ्याजवळ एखाद्या भक्तास देण्यास मोठें भांडवल काय तें ऋद्धिसिद्धी हेंच आणि तें तर आम्हांस तुझ्या भक्तीपुढें फोलकट आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आहीं चालत वैकुंठास जाऊं आणि निश्चिंत होऊन निरंतर सुख भोगीत राहूं ४. [२३१]

न लगे हें मज तुझें ब्रह्मज्ञान । गोजिरें सगुण रूप पुरे ॥ १ ॥ लागला उशीर पतितपावना । विसरोनि वचना गेलासि या ॥ २ ॥ जाळोनि संसार बैसलों अंगणीं । तुझे नाहीं मनीं मानसीं हें ॥ ३ ॥ तुका म्हणे नको रागेजूं विठ्ठला । उठीं देईं मला भेटी आतां ॥ ४ ॥ [२३२]

कुमुदिनी काय जाणे परिमळ ॥ भ्रमर सकळ भोगितसे ॥ १ ॥ तैसें तुज ठावें नाहीं तुझें नाम । आम्हीच तें प्रेम सुख जाणों ॥ २ ॥ मातें तृण बाळा दुधाची ते गोडी । ज्याची नये जोडी त्यासी कामा ॥ ३ ॥ तुका म्हणे मुक्ताफळ शिंपी पोटीं । नाहीं त्याची भेटी भोग तिथें ॥ ४ ॥ [२३३]

काय सांगों तुझ्या चरणांच्या सुखा । अनुभव ठाऊका नाहीं तुज ॥ १ ॥ बोलतां हें कैसें वाटे खरेपण । अमृताचे गुण अमृतासी ॥ २ ॥ आम्ही एकएका ग्वाही मायपुतें । जाणों तें निरुतें सुख दोघे ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां मोक्षाचा कांटाळा । कां तुम्ही गोपाळा नेणां ऐसें ॥ ४ ॥ [२३४]

देखोनियां तुझ्या रूपाचा आकार । उभा कटीं कर ठेवूनियां ॥ १ ॥ तेणें माझ्या चित्ता होय समाधान । वाटतें चरण न सोडावे ॥ २ ॥ सुखें गातों गीत वाजवितों टाळी । नाचतों राउळीं प्रेमसुखें ॥ ३ ॥ तुका म्हणे मज तुझ्या नामापुढें । तुच्छ हें बापुडें सकळही ॥ ४ ॥ [२३५]

आतां येणेंविण नाहीं आम्हां चाड । कोण बडबड करी वायां ॥ १ ॥ सुख तेंचि दुःख पुण्यपाप खरें । हें तों आम्हां बरें कळों आलें ॥ २ ॥ तुका म्हणे वाचा वाहिली अनंता । बोलायचें आतां काम नाहीं ॥ ३ ॥ [२३६]

बोलों अबोलणें मरोनियां जिणें । असोनि नसणें जनीं आम्हां ॥ १ ॥ भोगीं त्याग जाला संगींच असंग । तोडियेले लाग माग दोन्ही ॥ २ ॥ तुका म्हणे नव्हे दिसतों मी तैसा ।

आम्हांला तुमचें ब्रह्मज्ञान नको. तुमचें लहानसें सुंदर सगुण स्वरूपच पुरे आहे. १. देवा, मी पतितास पावन करीन असें जें तुमचें वचन आहे तें आपण विसरून गेलां आहांत असें वाटतें, कारण मला भेट देण्यास वेळ लागला आहे. २. सर्व संसार जाळून बाहेर येऊन बसलों आहें पण ही गोष्ट तुमचे मनींमानसीं देखील नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, आतां आपण रागावूं नका. उठा, लवकर मला भेटी द्या. ४ [२३२]

कमलपुष्प आपल्यामधील परिमळास कांहीं जाणत नाहीं. त्याचा भोग भ्रमरच घेतात १. तसें देवा, तुमच्या नामाची गोडी तुम्हांस ठाऊक नाहीं. त्याचें खरें प्रेमसुख आम्हीं जाणतों २. आई-गाय तृण (गवत) खाते आणि त्यापासून उत्पन्न होणाऱ्या दुधाची गोडी वासरूंच जाणतें. ज्याची कमाई त्याच्या कामास येत नाहीं. ३. तुकाराम महाराज म्हणतात मोतीं हें शिंपल्याच्याच पोटीं जन्मतें, पण तें एकदां बाहेर काढलें म्हणजे त्याचें सुख दुसरीं माणसेंच भोगीत असतात, पुनः त्या शिंपल्यास त्याचा योग होत नाहीं व भोगही मिळत नाहीं ४. [२३३]

अहो देवा, तुमच्या चरणाच्या सुखासंबंधानें काय सांगावें, कारण त्याचा अनुभव तुम्हांस नाहीं १. कितीही तुमच्या चरणसुखासंबंधानें तुमच्याजवळ वर्णन केलें तरी तें तुम्हांस खरें वाटणार नाहीं, कारण ज्याप्रमाणें अमृताच्या गोडीचें सुख अमृतास कळत नाहीं तद्वत् २. तुमचें चरणसुख किती गोड आहे, ह्याविषयीं आम्हांस साक्षीदार एक आमची आई लक्ष्मी ही आहे, आणि तिला साक्षीदार आम्हीं तिचीं मुलें आहोंत, म्हणून तें सुख आम्हीं दोघें जाणत आहोंत. ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो गोपाळा, आम्हांस मोक्षाचा कंटाळा आहे हें तुम्ही कां जाणत नाहीं ? ४. [२३४]

कमरेवर हात ठेवून समचरणानें जे तुम्ही विटेवर उभे आहांत ती तुमची रूपाकृति मी पाहातों १. त्या योगानें माझ्या चित्तास फार समाधान होतें आणि मनांत असें वाटतें कीं, कधींही आपले चरण सोडूं नयेत २. मी सुखानें तुमचे गुण गातों, हातानें टाळी वाजवितों आणि मोठ्या प्रेमसुखानें तुमच्या राउळांत नाचतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, नामापुढें मला सर्व तुच्छ वाटत आहे ४. [२३५]

आतां व्यर्थ बडबड कोण करितो ? त्याची कांहीं आतां आम्हांला जरूरी नाहीं. १. जें सुख आहे तें केवळ दुःख आहे आणि पुण्य हें खरोखर पापच आहे हें आम्हांस चांगलें कळून आलें आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही आपली वाणी अनंतास वाहिली आहे. आतां बोलावयाचें काम राहिलें नाहीं ३. [२३६]

निःशब्द जें ब्रह्म त्याचेंच आम्हीं प्रतिपादन करूं. आम्हीं देहबुद्धीनें मरून जगलों आहोंत. देहस्थितीनें जगांत असून आत्मस्थितीनें जगांत नाहीं असे आहोंत. १. सर्व विषयभोगांविषयीं त्याग झाला. सर्वसंगांत असून असंग आहोंत.

पुसणें तें पुसा पांडुरंगा ॥ ३ ॥ [२३७]

अधिकार तैसा दवियेला मार्ग । चालतां हें मग कळों येतें ॥ १ ॥ जाळूं नये नाव पावलेनि पार । मागील आधार बहुतांचा ॥ २ ॥ तुका म्हणे रोग वैद्याचे अंगीं । नाहीं करी जगीं उपकार ॥ ३ ॥ [२३८]

संवसार तींहीं केला पाठमोरा । नाहीं द्रव्य दारा जया चित्तीं ॥ १ ॥ शुभाशुभ नाहीं हर्षामर्ष अंगीं । जनार्दन जगीं होउनि ठेला ॥ २ ॥ तुका म्हणे देह दिला एकसरें । जयासि दुसरें नाहीं मग ॥ ३ ॥ [२३९]

देहबुद्धि जयां वसे लोभ चित्तीं । आपुलें जाणती परावें जे ॥ १ ॥ तयासी चालतां पाहिजे सिदोरी । दुःख पावे करी असत्य तो ॥ २ ॥ तुका म्हणे धर्म रक्षाया कारणें । छाया इच्छी उन्हें तापला तो ॥ ३ ॥ [२४०]

काळें खादला हा अवघा आकार । उत्पत्तिसंहारघडामोडी ॥ १ ॥ बीजें तो अंकूर आच्छादिला पोटीं । अनंता शेवटीं एकाचिया ॥ २ ॥ तुका म्हणे शब्दें व्यापिलें आकाश । गुढार हें कैसें कळों नये ॥ ३ ॥ [२४१]

आणीक या काळें न चले उपाय । धरावे ते पाय विटोबाचे ॥ १ ॥ अवघेंचि पुण्य असे तया पोटीं । अवघिया तुटी होय पापा ॥ २ ॥ अवघे मोकळे अवघिया काळें । उद्धरती कुळें नरनारी ॥ ३ ॥ काळ वेळ नाहीं गर्भवास दुःखें । उच्चारितां मुखें नाम एक ॥ ४ ॥ तुका म्हणे कांहीं नलगे सांडावें । सांगतसें भावें घेती तयां ॥ ५ ॥ [२४२]

संगांत अगर भोगांत घालविणारी जी देहबुद्धि तिचा आमच्या ठिकाणीं मागमूसही नाहीं. २ तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें तुम्हांस दिसतों आहें त्याप्रमाणें मी नाहीं. खरोखर माझें वास्तविक स्वरूप तुम्हांस समजावें असें वाटत असेल तर तुम्हीं पांडुरंगास विचारा ३. [२३७]

ज्याचा जसा अधिकार असेल त्याप्रमाणें त्यास मार्ग दाखविले आहेत; आणि त्याप्रमाणें वागलें असतां त्यास कळून येईल १. आपण नौकेंत बसून नदीचे पलीकडे गेलों म्हणून नौकेस जाळूं नये, कारण आपल्या पश्चात् पुष्कळ लोकांस उतरून पलीकडे जाण्यास ती आधार आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, कोणताही रोग वैद्याच्या अंगीं नसतांही जगतामध्यें असणाऱ्या रोग्यांस बरें करण्याकरितां सर्व रोगांवरील औषधें तो आपणाजवळ ठेवितो ३. [२३८]

ज्याच्या चित्तांत द्रव्य व स्त्री ह्यांची इच्छा नाहीं त्यानें संसार पाठमोरा केला म्हणजे तो संसारास विन्मुख झाला १. चांगल्या वाईटाविषयीं ज्याच्या मनांत सुख किंवा दुःख नाहीं तो जगतांत जनार्दन होऊन राहिला आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यानें आपला देह देवास निरंतर अर्पण केला आहे, त्यास मग जगतामध्यें दुसरें कांहीं राहिलें नाहीं ३. [२३९]

ज्याच्यामध्यें देहबुद्धि असून चित्तांत विषयलोभ आहे आणि हे आपले, हे परके असें जे समजतात १. त्याला जन्ममृत्यूचे मार्गांत प्रवास करितांना पुण्याची शिदोरी पाहिजे आहे, म्हणून त्यानें सत्कर्मच करावें; तें न करितां जर तो असत्कर्म करील तर त्यास दुःख मिळेल २. तुकाराम महाराज म्हणतात, सुख पाहिजे असेल तर धर्मरक्षणाकरितां खटाटोप केला पाहिजे. ज्याप्रमाणें उन्हानें तप्त झालेला पुरुष छायेची इच्छा करितो आणि ती मिळविण्याविषयीं खटपटही करितो ३. [२४०]

उत्पत्तीच्या आणि संहाराच्या घडामोडींत आलेला सर्व आकार काळानें खाल्ला आहे १. ज्याप्रमाणें बीजापासून अंकूर उत्पन्न होऊन अखेर बीजाचे पोटांतच झाकला जातो, त्याप्रमाणें कल्पांतीं सर्व सृष्टि एका अनंताचे पोटांतच लीन होते २. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व आकाश शब्दानें व्यापिलें आहे, हें गुह्य कसें कळून येईल अगर कसें कळूं नये? ३. [२४१]

ह्या कलियुगांत दुसरा कांहीं उपाय चालत नाहीं. एका विठोबाचेच पाय धरावे १. सर्व पुण्यें त्याच्या पोटांत आहेत आणि सर्व पातकांचा नाश ह्यानें होतो २. एका पांडुरंगाचें चिंतन करणारे सर्वकाळ मुक्त आहेत, कारण स्त्रीपुरुषांचे समुदाय त्यामुळें उद्धरले जातात ३. हरीचें एक नाम मुखानें घेण्यानें गर्भवासादि दुःखें नाहींशीं होतात व तें घेण्यास चांगली वेळ अगर काळ पाहाण्याची जरूरी नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, कांहीं टाकण्यास नको. जे कोणी भावानें नाम घेतील त्यांस मी हें सांगत आहें ४. [२४२]

कां रे माझा तुज नये कळवळा। असोनि जवळा हृदयस्था ॥ १ ॥ अगा नारायणा निष्ठुरा निर्गुणा। केला शोक नेणां कंठस्फोट ॥ २ ॥ कां हें चित्त नाहीं पावत विश्रांती। इंद्रियांची गती कुंठेचिना ॥ ३ ॥ तुका म्हणे कां हो धरियेला कोप। सरलें नेणों पाप पांडुरंगा ॥ ४ ॥ [२४३]

दीनानाथा तुझीं ब्रिदें चराचर। घेसील कैवार शरणागता ॥ १ ॥ पुराणीं जे तुझे गर्जती पवाडे। ते आम्हां रोकडे कळों आले ॥ २ ॥ आपुल्या दासांचें न साहासी उणें। उभा त्या कारणें राहिलासी ॥ ३ ॥ चक्र गदा हातीं आयुधें अपार। न्यून तेंची पुरें करूं धांवे ॥ ४ ॥ तुका म्हणे तुज भक्तीचें कारण। करावया पूर्ण अवतार ॥ ५ ॥ [२४४]

वर्णूं महिमा ऐसी नाहीं मज वाचा। न बोलवे साचा पार तुझा ॥ १ ॥ ठायींची हे काया ठेविली चरणीं। आतां ओंवाळुनि काय सांडूं ॥ २ ॥ नाहीं भाव ऐसा करूं तुझी सेवा। जीव वाहूं देवा तोही तुझा ॥ ३ ॥ मज माझें कांहीं न दिसे पाहतां। तें तुज अनंता समर्पावें ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां नाहीं मज थार। तुझे उपकार फेडावया ॥ ५ ॥ [२४५]

नव्हे सुख मज न लगे हा मान। न राहें हें जन काय करूं ॥ १ ॥ देह उपचारें पोळतसे अंग। विषातुल्य चांग मिष्टान्न तें ॥ २ ॥ नाइकवे स्तुति वर्णितां थोरीव। होतो माझा जीव कासावीस ॥ ३ ॥ तुज पावे ऐसी सांग कांहीं कळा। नको मृगजळा गोवूं मज ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां करीं माझें हित। काढावें जळत आगींतूनि ॥ ५ ॥ [२४६]

न मिळो खावया न वाढो संतान। परि हा नारायण कृपा करो ॥ १ ॥ ऐशी माझी वाचा मज उपदेशी। आणीक लोकांसी हेंचि सांगें ॥ २ ॥ विटंबो शरीर होत कां विपत्ती। परि राहो चित्तीं नारायण ॥ ३ ॥ तुका म्हणे नाशिवंत हें सकळ। आठवे गोपाळ तेंचि हित ॥ ४ ॥ [२४७]

अरे देवा, तूं अगदीं माझ्याजवळ म्हणजे हृदयांत असतांना तुला माझी करुणा कां येत नाहीं? १. तूं देव असून गुणातीत आहेस. मी तुझ्यापुढें घसा फुटेतोंपर्यंत रडलों तरी तें कांहीं जाणलेंच नाहींस २. माझें चित्त विश्रांतीप्रत कां पावत नाहीं? इंद्रियांची विषयाकडे जी धांव आहे ती कां कुंठित होत नाहीं? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे देवा, तूं मजवर एवढा कां कोप केलास? काय, माझें जवळील पाप संपलें नाहीं म्हणून? [२४३]

देवा, तुम्ही दीनांचे स्वामी आहांत असें चराचर जगतांत तुमचें ब्रीद आहे आणि तुम्हास शरण आलेले जे आहेत त्यांचा तुम्ही पक्ष घेतां १. पुराणें जीं तुमच्या कीर्तीची गर्जना करीत आहेत तें आम्हांला उघड कळून आलें आहे २. तुम्हांला आपल्या दासांची व्यंगता सहन होत नाहीं. ह्याकरितां तुम्ही निरंतर उभे आहांत ३. चक्रगदादि तुमच्याजवळ अपार आयुधें आहेत. भक्तांना कांहीं कमी पडेल तें पूर्ण करण्याकरितां तुम्ही नेहमीं धांव घेतां ४. तुकाराम महाराज म्हणतात, भक्तांचें कार्य पूर्ण करण्याकरितांच तुमचा अवतार आहे ५. [२४४]

तुमची महती वर्णन करण्याइतकी माझी वाणी नाहीं; कारण खरोखर तिचा शेवट बोलण्यानें होत नाहीं १. मुळांतच तुमच्या चरणांवर आम्ही देह ठेविला आहे. आतां तुमच्यावरून ओंवाळून काय टाकूं? २. तुमची सेवा करण्यास भावच नाहीं. जीव तुम्हांस अर्पण करावा तर तोहीं तुमचाच आहे ३. तुम्हांस समर्पण करण्यासारखें मजजवळ माझें म्हणून कांहीं नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही केलेले उपकार फिटण्यासारखा मजजवळ कांहीं आधार नाहीं ५. [२४५]

मला मान नको त्यापासून मला किंचित्‌ही सुख नाहीं. परंतु हे लोक माझा मान केल्यावांचून राहात नाहींत, त्याला मी काय करूं? १. देहास सुखोपचार केल्यानें माझें शरीर पोळत आहे. गोड अन्न मला विषाप्रमाणें कडू वाटतें २. कोणी माझी थोरवी वर्णन केली (माझी स्तुति केली) तर ती मला ऐकवत नाहीं. त्यायोगानें माझा जीव कासावीस होतो ३. देवा, तुझ्या ठिकाणीं मी प्राप्त होईन असें कांहीं ज्ञान तूं मला सांग. मला ह्या मृगजळवत् संसारांत गुंतवूं नकोस ४. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, आतां तुम्हीं माझें हित करा म्हणजे जाळणाऱ्या त्रिविधतापरूपी अग्नींतून मला बाहेर काढा ५. [२४६]

मला खावयास मिळूं नये, माझी संतती वाढूं नये, पण नारायणानें मजवर कृपा करावी १. अशी माझी वाणी मला उपदेश करिते आणि लोकांसही हेंच सांगते २. शरीराची विटंबना होवो अगर विपत्ती येवो पण माझ्या चित्तांत नारायण राहो ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व प्रपंच हा नाशवंत आहे, करितां गोपाळाची नेहमीं आठवण करणें ह्यांतच हित आहे ४. [२४७]

पिंड पोसावें हें अधमाचें ज्ञान । विलास मिष्टान्न करूनियां ॥ १ ॥ शरीर रक्षावें हा धर्म बोलती । काय असे हातीं तयांचिया ॥ २ ॥ क्षणभंगुर हें जाय न कळतां । ग्रास गिळी सत्ता नाहीं हातीं ॥ ३ ॥ कर्वतिलीं देहें कापियेलें मांसा । गेले वनवासा शुकादिक ॥ ४ ॥ तुका म्हणे राज्य करितां जनक । अग्नीमाजी एक पाव जळे ॥ ५ ॥ [२४८]

जरी माझी कोणी कापितील मान । तरी नको आन वदों जिव्हे ॥ १ ॥ सकळां इंद्रियां हे माझी विनंती । नका होऊं परतीं पांडुरंगा ॥ २ ॥ आणिकांची मात नायकावी कानीं । आणीका नयनीं न पाहावें ॥ ३ ॥ चित्ता तुवां पायीं रहावें अखंडित । होउनी निश्चित एकविध ॥ ४ ॥ चाला हात पाय हेंचि काम करा । माझ्या नमस्कारा विटोबासी ॥ ५ ॥ तुका म्हणे तुम्हां भय काय करी । आमुचा कैवारी नारायण ॥ ६ ॥ [२४९]

करिसी तें देवा करीं माझें सुखें । परी मी त्यासी मुखें न म्हणे संत ॥ १ ॥ जया राज्य द्रव्य करणें उपार्जना । वश दंभमाना इच्छे झाले ॥ २ ॥ जग देव परी निवडीन निराळे । ज्ञानाचे आंधळे भारवाही ॥ ३ ॥ तुका म्हणे भय न धरीं मानसीं । ऐशियाचे विशीं करितां दंड ॥ ४ ॥ [२५०]

म्हणविती ऐसें आइकतों संत । न देखिजे होत डोळां कोणी ॥ १ ॥ ऐसियांचा कोण मानितो विश्वास । निवडे तो रस घाईंडाई ॥ २ ॥ पर्जन्याचे काळीं वोहळाचे नद । ओसरतां बुंद न थारेचि ॥ ३ ॥ हिऱ्या ऐशा गारा दिसती दुरोन । तुका म्हणे घण न भेटे तों ॥ ४ ॥ [२५१]

अतिवादी लावी । एक बोट सोंग दावी ॥ १ ॥ त्याचा बहुरूपी नट । नव्हे वैष्णव तो चाट ॥ २ ॥ प्रतिपादी वाळी । एका पुजी एका छळी ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं । भूतदया ज्याचे ठायीं ॥ ४ ॥ [२५२]

मिष्टान्नादि विलासांच्या उपभोगानें आपला देह पुष्ट करावा असें अधमास वाटतें १. ते अधम, देहाचें रक्षण करावें हाच धर्म आहे, असें बोलतात. पण विचारानें पाहिलें तर देहाचें रक्षण करणें हें जीवाच्या हातांत आहे काय? २. क्षणामध्यें न कळतांच शरीर पडेल. हातांत घेतलेला घास मी गिळीनच इतकी देखील सत्ता माझ्या हातीं नाहीं ३. कित्येकांनीं देवाकरितां करवतीनें आपल्या देहाचें मांस कापलें आणि शुकादिकांनीं तर देवाकरितां वनवास स्वीकारला ४. तुकाराम महाराज म्हणतात, जनक राजा राज्य करीत असतांना त्याचा एक पाय अग्नीमध्यें जळत होता तरी त्याचें ज्ञान त्याच्या हृदयाला झालें नाहीं, असे ते भगवंतीं रत झाले ५. [२४८]

हे जिव्हे, माझी कोणी मान जरी कापली तरी तूं पांडुरंगावांचून दुसरें कांहीं बोलूं नकोस १. सर्व इंद्रियांस माझी हीच विनंति आहे, कीं तुम्ही पांडुरंगाहून निराळी होऊं नका २. माझ्या कानांनीं पांडुरंगाखेरीज इतरांची हकीगत ऐकूं नये. त्याप्रमाणें डोळ्यांनींही दुसरें कोणाला पाहूं नये ३. हे चित्ता, तूं पांडुरंगाचे पायीं सर्व चिंता टाकून एक नेमानें सर्वकाळ राहावें ४. अहो हातापायांनो, तुम्ही चाला आणि माझ्या विठोबास नमस्कार करण्याचें काम करा ५. तुकाराम महाराज म्हणतात, मग तुम्हांस भय काय करणार आहे? कारण आमचा कैवारी नारायण आहे ६. [२४९]

हे देवा, तुला जें माझें करावयाचें असेल तें सुखानें कर. पण मी ज्यांची कृति ध्रुवपदांत सांगितली आहे, त्यांना मुखानें संत म्हणणार नाहीं १. जे राज्य व द्रव्य मिळविण्याविषयीं यत्न करून दंभमानाविषयींच्या इच्छेला वश झाले आहेत २. सर्व जग जरी देव आहे, तरी ह्यांना मी वेगळेच निवडीन. हे ज्ञानांध व भार वाहाणारे आहेत. ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यांना मी शिक्षा करण्याविषयीं किंचित्‌ही मनांत भय धरणार नाहीं ४. [२५०]

किती एकदुसऱ्याकडून आपणास संत म्हणवून घेतात असें मी कानानें ऐकतों पण असे संत आमच्या दृष्टीस कोणी पडत नाहींत १. अशांचा कोण विश्वास धरितो? तर अनेक प्रकारच्या दुःखसंकटांच्या प्रसंगांत ज्यांची शांती बिघडत नाहीं, तेच खरे संत निवडले जातात २. पर्जन्यकाळामध्यें ओढे नदीसारखे भासतात, पण थोडक्याच काळानें ओसरून गेल्यावर तेथें डोळ्यांस लावण्याला पाण्याचा थेंब देखील राहात नाहीं ३. हिऱ्याप्रमाणेंच गारा दुरून चमकतात व त्या हिरे आहेत असेंच भासतें; पण तें कोठपर्यंत, तर घणाची गांठ पडली नाहीं तोंपर्यंत, असें तुकाराम महाराज म्हणतात ४. [२५१]

अति वाद करणारा आणि कपाळाला बोटासारखी नीट काळी रेघ लावून सोंग दाखविणारा १. तो वैष्णव नाहीं, तो चावट आहे. त्याचा तो बहुरूपी वेष आहे २. कारण तो एकाची स्तुति करितो, एकाचा धिक्कार करितो व एकाची पूजा करितो आणि एकास छळितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच्या ठिकाणीं भूतदया नाहीं. [२५२]

पोटाचे ते नट पाहों नये छंद। विषयांचे भेद विपयरूप ॥ १ ॥ अर्थी परमार्थ कैसा घडों शके। चित्त लोभीं भीकें सोंग वायां ॥ २ ॥ देवाचीं चरित्रें दाखविती लीळा। लाघवाच्या कळा मोहावया ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्तीं राहे अभिलाष। दोघां नरकवास सारिखाचि ॥ ४ ॥ [२५३]

भुंकतीं तीं द्यावीं भुंकों। आपण त्यांचे नये शिकों ॥ १ ॥ भाविकांनीं दुर्जनाचें। मानूं नये कांहीं साचें ॥ २ ॥ होईल तैसें बळ। फजीत करावे ते खळ ॥ ३ ॥ तुका म्हणे त्यांचे। पाप नाहीं ताडणाचें ॥ ४ ॥ [२५४]

जप करितां राग। आला जवळी तो मांग ॥ १ ॥ नको भोंवताले जगीं। पाहों जवळी राख अंगीं ॥ २ ॥ कुड्याची संगती। सदा भोजन पंगती ॥ ३ ॥ तुका म्हणे ब्रह्म। साधीं विरहित कर्म ॥ ४ ॥ [२५५]

कांहींच मी नव्हे कोणिये गांवींचा। एकटा ठायींचा ठायीं एक ॥ १ ॥ नाहीं जात कोठें येत फिरोनियां। अवघेंचि वायांविण बोलें ॥ २ ॥ नाहीं मज कोणी आपुलें दुसरें। कोणाचा मी खरें कांहीं नव्हे ॥ ३ ॥ नाहीं आम्हां ज्यावें मरावें लागत। आहों अखंडित जैसे तैसे ॥ ४ ॥ तुका म्हणे नांव रूप नाहीं आम्हां। वेगळा त्या कर्मा अकर्मासी ॥ ५ ॥ [२५६]

आमचा विनोद तें जगा मरण। करिती भावहीन देखोवेखी ॥ १ ॥ न कळे सतत हिताचा विचार। तों हे दारोदार खाती फेरे ॥ २ ॥ वंदिलें वंदावें निंदिलें निंदावें। एक गेलें जावें त्याचि वाटा ॥ ३ ॥ तुका म्हणे कोणी नाइके सांगतां। होती यमदूतां वरपडे ॥ ४ ॥ [२५७]

पोटाकरितां नाटकांत नानाप्रकारचीं बायकापुरुषांचीं जे सोंगें घेतात, ते वेष पाहूं नयेत, कारण ते सर्व विषयाचे प्रकार असल्यामुळें विषय हेंच त्यांचें रूप आहे. १. जेथें द्रव्य मिळविण्याचाच उद्देश आहे तेथें परमार्थ कसा घडेल? त्याचें चित्त लोभानें भिकारी झालें असतें, म्हणून देवाचें तें घेतलेलें सोंग व्यर्थ आहे २. देवाचें सोंग घेऊन खोटेंच लीलाचरित्र लोकांना मोहित करण्याकरितां चतुराईनें ते दाखवितात. ३ तुकाराम महाराज म्हणतात, पाहाणारे व दाखविणारे ह्या दोघांच्याही चित्तांत लोभ आहे, म्हणून त्या उभयतांस नरकवास सारखाच मिळतो ४. [२५३]

जे दुर्जन कुत्र्याप्रमाणें भुंकत असतील त्यांस भुंकूं द्यावें; त्यांचें आपण कांहीं शिकूं नये १. हरीसंबंधानें जे भाविक असतील त्यांनीं दुर्जनाचें कांहीं खरें मानूं नये. २. उलट त्या नष्टांना आपल्या शक्तीनें होईल तितकें फजितच करावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांना मारल्याचेंही पातक नाहीं ४. [२५४]

कोणाला देवाचा जप करिताना जर राग येईल तर तो त्याच्याजवळ मांगच आला आहे १. (हा शूद्र आहे, हा ओंवळा आहे, हा महार आहे, हा मांग आहे, ह्याला शिवूं नये, ह्याची सावलीही घेऊं नये, व त्याचा शब्दही ऐकूं नये. हे आपल्या जवळ येतील, अशा समजुतीनें जो आपल्या सभोंवतीं पाहाणारा आहे त्यास तुकाराम महाराज असें सांगतात, कीं) अरे, तूं आपल्या भोंवतालीं पाहूं नकोस. तुझ्या जवळच जो क्रोधरूपी मांग आहे त्याला जप. तो अंतःकरणांत न येण्याविषयीं खबरदारी ठेव. २. क्रोधरूपी वाईट मांगाच्या संगतीनें अगर पंगतींत तुझें भोजन होत आहे ३ तुकाराम महाराज म्हणतात, नैष्कर्म्य ब्रह्म जें आहे त्याला तूं साध्य करून घे ४. [२५५]

मी कांहींच नाहीं आणि मी कोणाच्या गांवाचाही नाहीं. जागच्या जागीं असणारें जें अद्वय ब्रह्म तेंच मी एक आहें १. मी कोठें जात नाहीं आणि फिरून येतही नाहीं, हेंही माझें सर्व बोलणें व्यर्थ आहे २. मला कोणी आपलें नाहीं आणि दुसरेंही नाहीं. मी हा खरोखर कोणाचा कांहीं एक नाहीं ३. आम्हांला जगावें लागत नाहीं, मरावें लागत नाहीं. सर्व काळ आम्ही जसेच्या तसे आहोंत ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हांला नांव नाहीं, रूप नाहीं; व या कर्माकर्मापासून आम्ही वेगळे आहोंत ५. [२५६]

आमचें परमार्थ करणें हा एक विनोद आहे, त्यायोगानें जगाचें मरण आहे; कारण अंगीं भाव नसतां आमचें पाहून ते परमार्थ करितात १. सतत हिताचा विचार कशांत आहे, हें जोंपर्यंत त्यांस कळत नाहीं तोंपर्यंत ते जन्ममृत्यूच्या दारीं फेरेच घेतील २. एकानें वंदिलें तें पाहून दुसऱ्यानें वंदावें, एकानें निंदिलें तें पाहून दुसऱ्यानें निंदावें व एक कोणी पुढें गेलें तें पाहून त्याच्याच वाटेनें जावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं कितीही सांगितलें तरी ते ऐकत नाहींत, म्हणून ते यमदूतांच्या स्वाधीन होतील ४. [२५७]

दीप घेउनियां धुंडिती अंधार। भेटे हा विचार अघटित ॥ १ ॥ विष्णुदास आम्ही न भ्यों कळिकाळा। भुलों मृगजळा न घडे तें ॥ २ ॥ उधळितां माती रविकळा मळे। हें कैसें न कळे भाग्यहीना ॥ ३ ॥ तुका म्हणे तृण झांके हुताशन। हें तव वचन वाउगेंचि ॥ [२५८]

नटनाट्य अवघें संपादिलें सोंग। भेद दाऊं रंग न पालटे ॥ १ ॥ मांडियेला खेळ कौतुकें बहुरूप। आपुलें स्वरूप जाणतसों ॥ २ ॥ स्फटिकाची शिळा उपाधि न मिळे। भाव दावी पिवळे लाल संगें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही या जना विरहित। होऊनि निश्चिंत क्रीडा करूं ॥ ४ ॥ [२५९]

तुजविण वाणीं आणिकांची थोरी। तरी माझी हरी जिव्हा झडो ॥ १ ॥ तुजविण चित्ता आवडे आणीक। तरी हा मस्तक भंगो माझा ॥ २ ॥ नेत्रीं आणिकांसी पाहीन आवडी। जातु तेचि घडी चांडाळ हे ॥ ३ ॥ कथामृत पान न करिती श्रवण। काय प्रयोजन मग यांचें ॥ ४ ॥ तुका म्हणे काय वांचून कारण। तुज एक क्षण विसंवतां ॥ ५ ॥ [२६०]

भाव धरी तया तारील पाषाण। दुर्जना सज्जन काय करी ॥ १ ॥ करितां नव्हे नीट श्वानाचें हें पुच्छ। खापरा परीस काय करी ॥ २ ॥ निंबाचिया झाडा साखरेचें आळें। बीज तैसीं फळें येती तया ॥ ३ ॥ तुका म्हणे वज्र भंगे एक वेळ। कठीण हा खळ तयाहूनी ॥ ४ ॥ [२६१]

इच्छावें तें जवळी आलें। काय बोलें कारण ॥ १ ॥ नामरूपीं पडिली गांठ। अवघ्या गोष्टी सरल्या ॥ २ ॥ मुकियाचे परी जीवीं। साखर जेवीं खादली ॥ ३ ॥ तुका म्हणे काय बोलें। आतां भलें मौन्यचि ॥ ४ ॥ [२६२]

हातांत दिवा घेऊन अंधकार पाहाणाऱ्याला तो दिसतो हें म्हणणें अघटित आहे १. आम्हीं विष्णुदास कळिकाळाला भिणार नाहीं. मृगजलवत् प्रपंचास भुलले जाऊं हें कधीं घडणार नाहीं २. हातांत माती घेऊन रस्त्यांत जरी उधळली तरी त्यापासून रवीचीं किरणें मळतील काय, हें भाग्यहीनास (अविवेक्यास) कसें कळत नाहीं? ३. तुकाराम महाराज म्हणतात, गवतानें मोठा अग्नि झांकला जातो असें म्हणणें व्यर्थ आहे. [२५८]

नृत्य करणाऱ्या नटाप्रमाणें आम्हीं वेष धरून सर्व व्यवहार दाखवितों, तरी त्यायोगानें आमचा स्वात्मबोध बदलत नाहीं १. बहुरूप्याप्रमाणें कौतुकानें आम्हीं संसाराचा खेळ मांडिला आहे, तरी आमचें खरें स्वरूप काय आहे, तें आम्हीं जाणतों २. दुसऱ्या अनेक रंगांच्या योगानें आपले लाल, पिवळे वगैरे धर्म आपल्या अंगीं दाखवितो, तरी स्फटिकाचा दगड कोणत्याही रंगांत मिसळत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं स्वात्मबोधानें ह्या जनावेगळे होऊन शांतपणें क्रीडा करूं ४. [२५९]

हे हरी, तुझ्यावांचून इतरांची थोरवी जर माझी वाणी वर्णन करील, तरी ती जिव्हा झडून जावो १. तुझ्यावांचून माझ्या चित्तास दुसरें कांहीं आवडेल तर माझें मस्तक भंगून जावो २. मी डोळ्यानें इतरांस प्रीतीनें जर पाहीन तर त्याच घटकेला हे चांडाळ डोळे जावोत ३. माझे कान हरीच्या कथामृताचें पान अगर श्रवण न करतील तर ह्यांच्या असण्याचें काय फळ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, एक क्षणभर तुला मी विसरलों तर माझें हे जगणें निष्कारण होय ५. [२६०]

शुद्ध भावानें पूजा करणाऱ्याला पाषाणाची केलेली ईश्वराची प्रतिमाच तारते; जरी मोठा सज्जन असला तरी दुर्जनापुढें त्याचें काय चालेल? १. जसें कुत्र्याची शेंपूट कोणत्याही उपायानें सरळ करितां येणार नाहीं. खापराला परीस लाविला तर परिसाकडून खापरांत काय बदल होईल? २. कडुलिंबाच्या वृक्षास साखरेचें आळें केलें तरी त्यापासून काय उपयोग होईल? जसें ज्याचें बीज असतें तशींच त्या वृक्षास फळें येतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, इंद्राच्या हातांतील वज्राचे एक वेळ तुकडे करवतील पण ह्या नष्टापुढें कांहीं चालणार नाहीं. त्याचें हृदय वज्रापेक्षांही कठीण आहे ४. [२६१]

आम्ही ज्याची इच्छा करावी तेंच जवळ आलें आहे, आतां बोलावयाचें कांहीं कारण नाहीं १. हरीच्या नामरूपाची गांठ पडल्यामुळें सर्व गोष्टी सरल्या २. ज्याप्रमाणें एखाद्या मुक्या माणसानें साखर खाली आणि तिची गोडी त्यास कळली असली तरी त्यास ती मुखानें सांगतां येत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें आतां हरिस्वरूपाच्या अनुभवासंबंधानें काय बोलावें? तर आतां मौन धरावें हें चांगलें ४. [२६२]

साधनें तरी हींच दोन्ही। जरी कोणी साधील॥ १ ॥ परद्रव्य परनारी । यांचा धरी विटाळ ॥ २ ॥ देव भाग्यें घरा येती। संपत्ती त्या सकळा ॥ ३ ॥ तुका म्हणे तें शरीर। गृह भांडार देवाचें ॥ ४ ॥ [२६३]

आम्हासाठीं अवतार । मत्स्यकूर्मादि सूकर ॥ १ ॥ मोहें धांवे घाली पान्हा । नांव घेतां पंढरीराणा ॥ २ ॥ कोठें न दिसे पाहतां । उडी घाली अवचिता ॥ ३ ॥ सुख ठेवी आम्हांसाठीं । दुःख आपणचि घोंटी ॥ ४ ॥ आम्हां घाली पाठीकडे । आपण कळिकाळासी भिडे ॥ ५ ॥ तुका म्हणे कृपानिधी । आम्हां उतरी नावेमधीं ॥ ६ ॥ [२६४]

रवि रश्मिकळा । नये काढितां निराळा ॥ १ ॥ तैसा आम्हां झाला भाव । अंगीं जडोनि ठेला देव ॥ २ ॥ गोडी साखरेपासूनी । कैसी निवडते दोन्ही ॥ ३ ॥ तुका म्हणे नाद उठी । निगेनि जाय नभापोटी ॥ ४ ॥ [२६५]

थोडें परि निरें । अविट तें घ्यावें खरें ॥ १ ॥ घ्यावें जेणें नये तुटी । बीज वाढे बीजा पोटीं ॥ २ ॥ चित्त ठेवीं ग्वाही । उपचारें चाड नाहीं ॥ ३ ॥ आपलें तें हित फार । तुका म्हणे खरें सार ॥ ४ ॥ [२६६]

अवघे देव साध । परी या अवगुणांचा बाध ॥ १ ॥ म्हणउनी नये सरी । राहे एकाएकी दुरी ॥ २ ॥ ऊंस कांदा एक आळां । स्वाद गोडीचा निराळा ॥ ॥ ३ ॥ तुका म्हणे नव्हे सरी । विष अमृताची परी ॥ ४ ॥ [२६७]

शांतीपरतें नाहीं सुख । येर अवघेंचि दुःख ॥ १ ॥ म्हणउनी शांति धरा । उतराल पैल तीरा ॥ २ ॥ खवळलिया कामक्रोधीं । अंगीं भरती आधी व्याधी ॥ ३ ॥ तुका म्हणे त्रिविध ताप । जाती मग आपोआप ॥ ४ ॥ [२६८]

परमार्थ इच्छिणाऱ्यानें पुढील दोन साधनें साधावींत १. तीं हीं, कीं दुसऱ्याचें धन व दुसऱ्याची स्त्री ह्या दोहोंचा विटाळ धरावा २. मग त्याच्या घरीं देवाचें भाग्य आणि सकळ संपत्ती येतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा पुरुषाचा देह केवळ देवाचें भांडारगृह आहे ४. [२६३]

मत्स्य, कूर्म, वराह आदिकरून अवतार आमच्या करितांच आहेत १. हे पंढरिनाथा अशा नांवाने हांका मारिल्याबरोबर, त्वरेनें धांव घेऊन विठ्ठलमाउली परमप्रीतीचा पान्हा सोडते २. एरवीं तिला पाहूं गेलें, तर ती कोठेंही दिसत नाहीं, पण भक्तानें हांका मारिल्याबरोबर त्याच्या कार्यार्थ अकस्मात् उडी घालिते ३. आम्हां भक्तजनांकरितां सुख ठेविते व आमच्या भागाला आलेलें दुःख गिळिते ४. मोठ्या संकटप्रसंगीं आम्हां भक्तजनांना पाठीशीं घेऊन, आपण कळिकाळाशीं झगडण्यास तयार होते ५. तुकाराम महाराज म्हणतात, कृपेचा केवळ ठेवाच जो पांडुरंग, तो आम्हांला जन्ममृत्युरूपी संसारनदींतून आपल्या नामनौकेनें पार उतरून नेतो ६. [२६४]

सूर्याचीं किरणें त्याच्यापासून वेगळीं निवडतां येत नाहींत किंवा सूर्याला त्याच्या किरणांच्या समुदायापासून वेगळा निवडतां येत नाहीं १. अशी सूर्यकिरणवत् देवाची व आमची अभेद स्थिति झाली आहे आणि आमच्या सर्व अंगांत देवच जडून गेला आहे २. साखरेपासून गोडी निराळी कशी निवडतां येईल ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो शब्दनाद उत्पन्न होतो तो आकाशाच्या पोटांत नाहींसा होतो ४. [२६५]

थोडकेंच, पण स्वच्छ व न विटणारें आणि यथार्थ असें जें असेल तेंच घ्यावें १. असें घ्यावें, कीं ज्याचा तोटा कधीं येणार नाहीं. उत्तरोत्तर बीजापासून बीजाची वाढच होत जाईल २. ह्या ठिकाणीं आपलें चित्त साक्षी ठेवावें. दुसऱ्या कृतींची कांहीं गरज नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपलें पुष्कळ हितच करावें, हेंच खरोखर सार आहे ४. [२६६]

सर्वव्यापी एकसिद्ध देव आहे, पण जवळ असलेले अवगुणच बाधक होतात १. म्हणून एकासारखें एक नसून एकाहून दुसरें निराळेंच असतें २. एका आळ्यांतच ऊंस व कांदे जन्मतात, पण त्यांचा स्वाद व गोडी निरनिराळी असते ३. तुकाराम महाराज म्हणतात, विष व अमृत, हे उभय पदार्थ एकसारखे नाहींत ४. [२६७]

जगतांत शांतीच्या पलीकडे सुखच नाहीं, बाकी सर्व दुःखच आहे १. म्हणून सर्वांनीं शांतीच धरावी. त्यायोगानें जन्ममृत्युरूपी भवनदींतून तुम्ही पलीकडे जाल २. जर हृदयामध्यें काम, क्रोध खवळतील, तर मनांत चिंता आणि अंगांत नानाप्रकारच्या व्याधी उत्पन्न होतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, एकवार शांतीची वस्ती देहांत झाली, म्हणजे तीन प्रकारचे ताप देहांतून आपोआप चालते होतात ४. [२६८]

गोडपणें जैसा गूळ। तैसा देव झाला सकळ॥ १॥ आतां भजूं कोणे परी। देव सबाह्य अंतरीं॥ २॥ उदका वेगळा। नव्हे तरंग निराळा॥ ३॥ हेम अलंकार नामी। तुका म्हणे तैसे आम्ही॥ ४॥ [२६९]

परमेष्ठिपदा। तुच्छ मानिती सर्वदा॥ १॥ हेंचि ज्यांचें धन। चिंतन सदा हरीचें॥ २॥ इंद्रपदादिक भोग। भोग नव्हे तो भवरोग॥ ३॥ सार्वभौम राज्य। त्यांसि कांहीं नाहीं काज॥ ४॥ पाताळींचें आधिपत्य। तें तों मानिती विपत्य॥ ५॥ योगसिद्धिसार। त्यांसि वाटे तें असार॥ ६॥ मोक्षायेवढें सुख। सुख नव्हेचि तें दुःख॥ ७॥ तुका म्हणे हरिविण। त्यासी वाटे अवघा सीण॥ ८॥ [२७०]

मोहोराच्या संगें। सुत नव्हे आगीजोगें॥ १॥ नाहीं तरी त्याचें भक्ष। काय सांगणें ते साक्ष॥ २॥ स्वामीचिया अंगें। रूप नव्हे कोणाजोगें॥ ३॥ तुका म्हणे खोडी। देवमणी न देती दडी॥ ४॥ [२७१]

मजसवें नको चेष्टा। नव्हे साळी कांहीं कोष्टा॥ १॥ बैसे सांडोनि दिमाख। जाय काळें करीं मुख॥ २॥ येथें न सरे चार। हीण आणीक व्यापार॥ ३॥ तुका म्हणे विष्णुदास। रस जाणतों नीरस॥ ४॥ [२७२]

भाव देवाचें उचित। भाव तोचि भगवंत॥ १॥ धन्य धन्य शुद्ध जाती। संदेह कैंचा तेथें चित्तीं॥ २॥ बहुत बराडी। देवावरी ते आवडी॥ ३॥ तुका म्हणे हें रोकडें। लाभा अधिकारी चोखडें॥ ४॥ [२७३]

गौरव गौरवापुरतें। फळ सत्याचे संकल्पें॥ १॥ कठिण योगाहूनि क्षेम। ओकलिया होतो

गोडीच्या रूपानें सर्व गूळच आहे. त्याप्रमाणें नानारूपात्मक जगताच्या रूपानें सर्व देवच आहे १. आतां मी भजन कसें करूं? कारण माझ्या मनांत आंत बाहेर सर्व देवच भरला आहे २. पाण्याहून लाट निराळी नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, सोनें आणि दागिने हीं नांवेंच दोन आहेत. अर्थात् म्हणजे सोन्यांत कांहीं भेद नाहीं त्याप्रमाणें देव आणि आम्ही भक्त अशीं हीं नावें दोन आहेत, पण दोहींचा अर्थ देव हा एकच आहे ४. [२६९]

खरे भक्त ब्रह्मदेवाच्या पदालाही निरंतर तुच्छ मानतात १. सर्व काळ हरीचें स्मरण करणें हेंच त्यांचें धन आहे २. इंद्रपदादिकरून जे दिव्य भोग आहेत ते भक्तांच्या दृष्टीनें भोग नसून केवळ भवरोगच आहेत ३. सार्वभौम पदाशीं भक्तजनांना कांहीं कारण नाहीं ४. पाताळाच्या स्वामित्वाला ते केवळ दरिद्री मानतात ५. योग आणि योगानें मिळणाऱ्या सिद्धी भक्तजनांना असार वाटतात ६. मोक्षासारिखें मोठें सुख त्यांच्या दृष्टीनें सुख नसून, तें केवळ दुःखच आहे ७. तुकाराम महाराज म्हणतात, एका हरीवांचून त्यांना सर्व शीणच वाटतो ८. [२७०]

मोहरा हा एक जातीचा पदार्थ (मणि) आहे. त्यास गुंडाळून सूत अग्नींत टाकिलें असतां जळत नाहीं १. एरवीं तें सूत अग्नीचें भक्ष्य होय, यास पुरावा नको २. स्वामी जो परमात्मा त्याचा आश्रय करून भक्त तदंगभूत झाला म्हणजे त्याचें रूप कालादिकांस नाश करण्याजोगें नसतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, घोड्याच्या गळ्यास एक देवपणाचें चिन्ह असलें, म्हणजे त्या घोड्याच्या इतर खोडी त्याच्या खालीं दडून जात नाहींत का? ४. [२७१]

हे दुर्जना, तूं माझ्याशीं चेष्टामस्करी करूं नकोस, कारण साळीकोष्ट्यांप्रमाणें मी हलकट नाहीं १. अरे मोठेपणाची घमेंड टाकून उगीच बैस, व तसें करावयाचें नसेल तर आपलें तोंड काळें कर जा २. येथें कांहीं वेडेचार अथवा एखादा वाईट व्यवहार चालणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही विष्णुदास, रस कशांत आहे व नीरस काय आहे, तें जाणतों ४. [२७२]

देवाचे भक्तीस भावच योग्य आहे. फार काय सांगावें, भाव हाच देव होय १. ज्या जाती शुद्ध असतील त्या धन्य आहेत, कारण त्यांचे चित्तांत संशयास जागा नाहीं २. त्यांची देवावर इतकी प्रीति असते, कीं ते त्याविषयीं अतिशय हावभरी (प्रेमळ) असतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें उघड आहे, कीं देवाचा लाभ होण्याला वर सांगितलेले अधिकारी आहेत ४. [२७३]

सन्मान हा सन्मानाच्या प्रसंगापुरताच आहे आणि सत्यस्वरूप जो पांडुरंग त्याच्याविषयींचा निश्चय हृदयांत असणें

श्रम ॥ २ ॥ पावलें मरे सिंवेपाशीं । केश उरत ते केशीं ॥ ३ ॥ तुका म्हणे बहु आणि । कठिण निघालीया रणीं ॥ ४ ॥ [२७४]

न खंडी अवगुण । वर्मे मानीतसे सिण ॥ १ ॥ भोग देतां करिता काई । फुटतां यमदंडें डोई ॥ २ ॥ पापपुण्य झाडा । देतां तेथें मोठी पीडा ॥ ३ ॥ तुका म्हणे बोला । माझ्या सिणती विठ्ठला ॥ ४ ॥ [२७५]

पावे ऐसा नाश । अवघियां दिला त्रास ॥ १ ॥ अविटाचा केला संग । सर्व भोगी पांडुरंग ॥ २ ॥ आइताची पाक । संयोगाचा सकळिक ॥ ३ ॥ तुका म्हणे धणी । सीमा राहिली होऊनी ॥ ४ ॥ [२७६]

दुर्बळ हे अवघे जन । नारायणीं विन्मुख ॥ १ ॥ सांडोनियां हीत जाती । पात्र होती दंडासी ॥ २ ॥ सिदोरी तें पापपुण्य । सवें सिण भिकेचा ॥ ३ ॥ तुका म्हणे पडिला वाहो । कैसा पाहा हो लटिक्याचा ॥ ४ ॥ [२७७]

वाजतील तुरें । येणें आनंदें गजरें ॥ १ ॥ जिंकोनियां अहंकार । पावठणी केलें शिर ॥ २ ॥ काळा नाहीं वाव । परिश्रमा कोठें ठाव ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां । सोपें वैकुंठासी जातां ॥ ४ ॥ [२७८]

झाड कल्पतरु । न करी याचकीं आव्हेरु ॥ १ ॥ तुम्ही सर्वां सर्वोत्तम । ऐसे विसरतां धर्म ॥ २ ॥ परिसा तुमचें देणें । तो त्या जागे अभिमानें ॥ ३ ॥ गाऱ्हाण्यानें तुका । गर्जे मारुनियां हाका ॥ ४ ॥ [२७९]

हें फळ आहे १. प्राप्तीपेक्षां रक्षण करणें हें फार कठीण आहे. एखाद्यास चांगल्या भोजनाचा योग येईल, पण तें न पचतां वांती झाल्यास फार श्रम होतात २. एक गृहस्थ वनांतील मार्गानें चोराच्या तावडींतून सुटण्याकरितां, मोठ्या वेगानें धांव घेऊन गांवाच्या शिवेपाशीं प्राप्त झाला व नंतर तेथें तो मेला. आतां गांवाच्या शिवेपर्यंत धांवत येण्याचे जे श्रम त्याला झाले, त्याचें फळ त्याला श्रम हेंच मिळालें ३. तुकाराम महाराज म्हणतात, कोणी आपल्यामध्यें पुष्कळ शूरत्व जरी आणलें तरी रणांत जाण्याचे वेळीं फार कठीण वाटतें ४. [२७४]

दुष्ट दुराचारी मनुष्य आपल्यांतील अवगुण टाकीत नाहीं. कोणी त्याचें वर्म काढलें, म्हणजे दोष दाखविले तर त्याचा त्याला त्रास येतो १. पण केलेल्या कर्माची यमाकडून शिक्षा जेव्हां मिळेल म्हणजे यमाच्या दंडप्रहारानें ह्याचें डोकें जेव्हां फुटेल तेव्हां हा काय करील? २. यमलोकीं पापपुण्याचा झाडा देतांना मोठें दुःख भोगावें लागतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो विठ्ठला, हा जो माझा उपदेशरूपी बोल त्याचा ते दुराचारी शीण मानतात ४. [२७५]

आजपर्यंत सर्वांना जो मीं त्रास दिला त्याचा सर्व नाश होईल १. कारण ज्याचा कधींही वीट येत नाहीं अशा पांडुरंगाची मीं संगति केली आहे. सुखदुःखादिक होणारे सर्व भोग तोच पांडुरंग भोगीत आहे २. (ध्रुवपदांत दर्शविल्याप्रमाणें पांडुरंगाच्या) संगतीचें सर्व भोजन आयतेंच प्राप्त झालें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हांला त्या योगानें सीमेची तृप्ति झाली आहे ४. [२७६]

सर्व लोक हे नारायणाचे ठिकाणीं विन्मुख असल्यामुळें निर्बल आहेत १. मृत्युलोकामध्यें नरदेहाला येऊन स्वहित न करतां ते मरतात म्हणून यमाच्या शिक्षेस पात्र होतात २. त्या भक्तिहीनांच्या बरोबर त्यांनीं केलेल्या पापपुण्याची शिदोरी असते, म्हणून त्यांना ह्या योनींतून त्या योनींमध्यें फिरण्याचें दरिद्रदुःख सोसावें लागतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, खोट्याचा ओघ कसा पडला आहे तो पाहा. [२७७]

ह्या ब्रह्मानंदाच्या गजरानें डंके वाजतील १. अहंकाराला जिंकून त्याचें डोकें चढून जाण्याची पायरी केलें २. ह्या ठिकाणीं काळाला व परकीय देहाश्रित आश्रमाला ठिकाण उरलें नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां वैकुंठाला जाणें सोपें आहे, म्हणजे वैकुंठनामक श्रीहरीस मिळणें सोपें आहे ४. [२७८]

कल्पतरुवृक्ष याचकाचा कधींच अव्हेर करीत नाहीं, व देवा तुम्हीं तर सर्वांत सर्वोत्तम आहां, म्हणून हा जो तुमच्या ठिकाणचा धर्म त्याला तुम्हीं विसरत आहांत २. लोखंडादि धातूला स्पर्श कल्यानें सुवर्णत्व देण्याचा धर्म परिसाच्या अंगीं तुम्हींच दिला आहे व तो आपल्या कर्तव्याभिमान विषयीं जागृत आहे ३. तुकाराम महाराज ही वरील हकीगत देवाजवळ मोठ्या गर्जनेनें सांगत आहेत ४. [२७९]

वसवावें घर। देवें बरें निरंतर ॥ १ ॥ संग आसनीं शयनीं। घडे भोजनीं गमनीं ॥ २ ॥ संकल्प विकल्प। मावळोनि पुण्यपाप ॥ ३ ॥ तुका म्हणे काळ। अवघा गोविंद सुकाळ ॥ ४ ॥ [२८०]

येथील हा ठसा। गेला पडोनियां ऐसा ॥ १ ॥ धरी देवाचा अबोला। त्यासि तेचि सवे त्याला ॥ २ ॥ नाहीं पाहावें लागत। एकाएकींच तें रितें ॥ ३ ॥ तुका म्हणे जन। तयामध्यें एवढें भिन्न ॥ ४ ॥ [२८१]

करितां देवार्चन। घरा आले संतजन ॥ १ ॥ देव सारावे परते। संत पूजावे आरते ॥ २ ॥ शाळिग्राम विष्णुमूर्ती। संत हो कां भलते याती ॥ ३ ॥ तुका म्हणे संधी। अधिक वैष्णवांची मांदी ॥ ४ ॥ [२८२]

ज्याची खरी सेवा। त्याच्या भय काय जीवा ॥ १ ॥ करितां स्वामीसवें वाद। अधिक अधिक आनंद ॥ २ ॥ असावा तो धर्म। मग साहों जातें वर्म ॥ ३ ॥ वंदे वाग्देवी। तुका विठ्ठलीं गौरवी ॥ ४ ॥ [२८३]

देवें जीव धाला। संसार तो कडू झाला ॥ १ ॥ तेचि येतील ढेकर। आनंदाचे हरिहर ॥ २ ॥ वेधी आणिकांस। ऐसा जया अंगीं कस ॥ ३ ॥ तुका म्हणे भूक। येणें न लगे आणीक ॥ ४ ॥ [२८४]

नाम साराचेंही सार। शरणागत यमकिंकर ॥ १ ॥ उत्तमा उत्तम। वाचे बोला पुरुषोत्तम ॥ २ ॥ नाम जपतां चंद्रमौळी। नामें तरला वाल्हा कोळी ॥ ३ ॥ तुका म्हणे वर्णूं काय। तारक विठोबाचे पाय ॥ ४ ॥ [२८५]

आपल्या देहरूपी घरांत अखंड देवाची वस्ती ठेवावी हें उत्तम १. म्हणजे देवाची संगती आसनावर बसलें असतांना अगर निजलें असतांना, जेवीत असतांना व चालत असतांना सहज घडेल २. त्या योगानें अंतःकरणांतील संकल्पविकल्पादि धर्म मावळून पुण्यपापही नाहींसें होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वकाळ गोविंदाच्या योगाचा सुकाळ होईल ४. [२८०]

देव आणि जन या उभयतांमध्यें असा एक साहजिक ओघ पडून गेला आहे १. तो हा, कीं त्याला म्हणजे जनाला देवाशीं अबोला धरावा हीच संवय आहे, त्याचप्रमाणें म्हणजे देवाला जनांशीं अबोला धरावा हीच संवय आहे २. हें कांहीं पाहावें लागत नाहीं. हें हृदय एकमेकांचे ठिकाणीं असूनही शून्य असल्यासारखें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जनामध्यें व त्यामध्यें म्हणजे देवामध्यें केवढा हा भेद आहे! ४. [२८१]

देवाची पूजा करीत असतां जर आपल्या घरीं संत मंडळी आली १. तर देवाची पूजा बाजूला ठेवून संतांस आसन देऊन त्यांची यथासांग पूजा करावी २. मग तो देव शाळिग्राम असो, अगर विष्णुमूर्ती असो. संत कोणत्याही जातीचा असेना तो पूजनीय आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या वेळेस देवपूजेपेक्षां वैष्णवसमुदायाची पूजा हें अधिक आहे ४. [२८२]

जो देवाची खरी सेवा करीत आहे, त्याच्या जिवाला भय कोणतें असणार? १. त्यानें देवाबरोबर वाद केल्यानें उत्तरोत्तर अधिक आनंद होतो २. आपण खऱ्या धर्मानें वागत असून दुसऱ्यास मर्मस्पर्श केला (दोष दाखविले) तर तो तें सहन करतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी वाणी जी बोलते तिचा विठ्ठलाच्या ठिकाणीं सन्मान होतो ४. [२८३]

देवाच्या योगानें माझा जीव तृप्त झाला व संसार कडू वाटूं लागला १. आतां आनंदानें हरिहरांच्या चिंतनाचेच ढेकर येत आहेत २. ज्याच्या आंगांत दुसऱ्यास वेधून घेण्याचें सामर्थ्य आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या देवाच्या सेवेनें मिळालेली जी तृप्ती होईल ती नाहींशी होणार नाहीं, म्हणजे पुन्हां भूक लागणार नाहीं ४. [२८४]

हरीचें नाम साराचेंही सार होय, म्हणून जो नेहमीं त्याच्या नामाचें चिंतन करितो, त्याला यम शरण येऊन त्याचा दास होतो १. नाम हें चांगल्यांत चांगलें आहे, म्हणून तुम्ही वाचेनें पुरुषोत्तमाचें चिंतन करा २. नामजपानें शिव तरले, तसाच वाल्हा कोळीही तरला ३. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, आतां किती वर्णन करावें? खरोखर विठोबाचे पायच मुक्त करणारे आहेत ४. [२८५]

गातों भाव नाहीं अंगीं । भूषण करावया जगीं ॥ १ ॥ परि तूं पतितपावन । करीं साच हें वचन ॥ २ ॥ मुखें म्हणवितों दास । चित्तीं माया लोभ आस ॥ ३ ॥ तुका म्हणे दावी वेश । तैसा अंतरीं नाहीं लेश ॥ ४ ॥ [२८६]

द्रव्य असतां धर्म न करी । नागवला राजद्वारीं ॥ १ ॥ माय त्यासि व्याली जेव्हां । रांड सटवी नव्हती तेव्हां ॥ २ ॥ कथाकाळीं निद्रा लागे । कामीं श्वानापरी जागे ॥ ३ ॥ भोग स्त्रियेसी देतां लाजे । वस्त्र दासीचें घेउनि निजे ॥ ४ ॥ तुका म्हणे जाण । नर गाढवाहूनी हीन ॥ ५ ॥ [२८७]

मुखें बोले ब्रह्मज्ञान । मनीं धन आणि मान ॥ १ ॥ ऐसियाची करितां सेवा । काय सुख होय जीवा ॥ २ ॥ पोटासाठीं संत । झाले कलींत बहुत ॥ ३ ॥ विरळा ऐसा कोणी । तुका त्यासि लोटांगणीं ॥ ४ ॥ [२८८]

एक वेळे प्रायश्चित्त । केलें चित्त मुंडण ॥ १ ॥ अहंकारा नांवें दोष । त्याचें ओस पाडिलें ॥ २ ॥ अनुतापें स्नानविधि । यज्ञ सिद्धि देहहोम ॥ ३ ॥ जीवशिवा होतां चुका । तेथें तुका विनटला ॥ ४ ॥ [२८९]

त्रैलोक्य पाळितां उबगला नाहीं । आमचें त्या काई असेल ओझें ॥ १ ॥ पाषाणाचे पोटीं बैसला दर्दुर । तया मुखीं चारा कोण घाली ॥ २ ॥ पक्षी अजगर न करी संचित । तयासी अनंत प्रतिपाळी ॥ ३ ॥ तुका म्हणे तया भार घातलीया । उपेक्षीना दयासिंधु माझा ॥ ४ ॥ [२९०]

मी हरीला गातों पण तसा योग्य भाव माझ्या अंगीं नाहीं. ह्यावरून जगतांत आपला लौकिक व्हावा अशाकरितां हें मी करीत आहें १. परंतु देवा, तूं पापी जनांना पावन करणारा आहेस, म्हणून तशी तूं आपली खरी क्रिया टेव २. मुखानें मी आपला दास म्हणवतों पण चित्तांत माया, लोभ, आशा आहेतच ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी जसें बाहेरून भक्तपणाचें सोंग दाखवितों तसा माझ्या अंतःकरणांत भावभक्तीचा लेशही नाहीं ४. [२८६]

जो जवळ पैसा असूनही धर्म करीत नाहीं, फिर्यादीच्या निमित्तानें, दंड देण्याच्या निमित्तानें राजद्वारांत नागवला जातो म्हणजे राजानें स्थापिलेल्या कोर्टांत हजारों रुपये घालवितो १. त्याला ज्या वेळेस आईनें जन्म दिला, त्या वेळेस सटवी रांड त्या ठिकाणीं नव्हती म्हणून हें पोर जगलें असावें २. हरिकथेच्या वेळेस ज्याला झोंप लागते, ज्याप्रमाणें रात्रीच्या वेळेस आपल्या मालकाच्या गृहरक्षणार्थ कुत्रा जागृत राहतो, त्याप्रमाणें मैथुनादि स्त्रीप्रसंगसमयीं जो जागृत असतो ३. स्त्रियेशीं भोग देण्यास जो लज्जित होतो आणि ठेवलेल्या दासीच्या बिछान्यावर परम प्रीतीनें निजतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, असे हे नर गाढवापेक्षांही नीच आहेत असें जाणा ५. [२८७]

जो तोंडानें पुष्कळ ब्रह्मज्ञान सांगतो पण मनांत धनाची व मानाची इच्छा करितो १. अशा पुरुषाची सेवा केली असतां जीवाला काय सुख होईल? २. पोट भरण्याकरितां सोंगाडे संत कलियुगांत बहुत झाले आहेत ३. खरा संत क्वचित् एखादा असतो. तुकाराम महाराज म्हणतात, मी त्याला साष्टांग नमस्कार घालतों ४. [२८८]

चित्तामध्यें नानाप्रकारच्या विषयवासनारूपी ज्या जटा होत्या त्यांचें एक वेळ मी मुंडणरूपी प्रायश्चित्त केलें १. देह अहंकार हाच खरा दोष आहे. त्याचें मी निर्मूळ करून टाकलें २. विषयाविषयीं पुनः पुनः होणाऱ्या अनुतापरूपी जलांत मी स्नान केलें. नंतर मी यज्ञसिद्धि केली, म्हणजे आत्मज्ञानरूपी अग्नीमध्यें देहरूपी हुत द्रव्यानें हवन केलें ३. ज्या योगानें जिवाशिवाचा भेद झाला होता, त्या अज्ञानाचा त्याग करून उभयतांचें (जिवाशिवांचें) तात्त्विक स्वरूप जें ब्रह्मचैतन्य, तद्रूप मी झालों, असें तुकाराम महाराज म्हणतात ४. [२८९]

त्रैलोक्याचें रक्षण करितांना जो देव कधीं त्रासला नाहीं त्याला आमचें रक्षण करण्याचें मोठें ओझें आहे काय? १. दगडाच्या पोटांत असणाऱ्या बेडकाच्या तोंडांत चारा कोण घालितो? २. नाना प्रकारचे पक्षी आणि अजगर प्राणी हे आपल्या खाण्याचे पदार्थांचा जरी संचय करीत नाहींत, तरी देव त्यांचें रक्षण करितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपला सर्वस्वभार त्याच्यावर घातला असतां, दयेचा केवळ समुद्र असा जो माझा देव, तो कधींही आपली उपेक्षा करणार नाहीं ४. [२९०]

दोष पळती कीर्तनें । तुझ्या नामसंकीर्तनें ॥ १ ॥ हें कां करूं आदरिलें। खोटें वचन आपुलें ॥ २ ॥ तुम्ही पापा भितां। आम्हां उपजावया चिंता ॥ ३ ॥ तुका म्हणे सेवा। कळिकाळा जिंकी देवा ॥ ४ ॥ [२९१]

करा नारायणा । माझ्या दुःखाची खंडणा ॥ १ ॥ वृत्ति राखा पायांपाशीं । वस्ती धरुनि मानसीं ॥ २ ॥ पाळोनियां लळा । आतां पाववावें फळा ॥ ३ ॥ तुका म्हणे दीन । त्यांचा हरतिया सीण ॥ ४ ॥ [२९२]

मी तों दीनाहूनी दीन । माझा तुज अभिमान ॥ १ ॥ मी तों आलों शरणागत । माझें करावें स्वहित ॥ २ ॥ दीनानाथा कृपाळुवा । सांभाळावें आपुल्या नांवा ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां । भलें नव्हे मोकलितां ॥ ४ ॥ [२९३]

नाहीं दुकाळलों अन्ना । परि या मान जनार्दना ॥ १ ॥ देव केला सकळसाक्षी । काळीं आणि शुद्धपक्षीं ॥ २ ॥ भोगी भोगवीतां । बाळासवें तोची पिता ॥ ३ ॥ कर्म अकर्म जळालें । प्रौढ तुका तें उरलें ॥ ४ ॥ [२९४]

संत मागे पाणी नेदी एक चूळी। दासीस आंघोळी ठेवी पाणी ॥ १ ॥ संतांसी देखोनी होय पाठमोरा । दासीचिया पोरा चुंबन देतो ॥ २ ॥ संतांसी देखोनी करितो टवाळ्या । भावें धुतो चोळ्या दासीचिया ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याच्या तोंडावरी थुंका। जातो यमलोका भोगावया ॥ ४ ॥ [२९५]

आशाबद्ध वक्ता । धाक श्रोतियाच्या चित्ता ॥ १ ॥ गातो तेंही नाहीं ठावें। तोंड वासी कांहीं द्यावें ॥ २ ॥ झालें लोभाचें मांजर। पोट भरे दारोदार ॥ ३ ॥ वायां गेलें तें भजन।

अहो देवा, तुमचें नामसंकीर्तन केल्यानें सर्व दोष नाहींसे होतात १. असें तुम्हीच भागवतादि ग्रंथांतून सांगितलें आहे, त्या आपल्या वचनाला बाध कां आणतां ? २. तुम्ही पापाला भितां; आम्हांला जन्म घेण्याची भीति आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, तुमची सेवा कळिकाळाला जिंकते ४. [२९१]

अहो नारायणा, तुम्ही माझें दुःख नाहींसें करा १. माझे मनांत तुम्ही वस्ती करून रहा, आणि माझी वृत्ति सतत तुमच्या चरणीं राहील असें करा २. आमचे हे लाड पूर्ण करा, म्हणजे वर सांगितलेलें फळ द्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे दीन आहेत त्यांचें आपण दुःख नाहींसें करणारे आहांत ४. [२९२]

देवा, मी दीनापेक्षांही दीन जरी आहें तरी माझा अभिमान तुला आहे. १. मी तुम्हांला शरण आलों आहें. माझें जें खरें हित तें तुम्ही करा, २. कृपाळु, दीनाचे स्वामी असें हें तुमचें नांव आहे, त्याचें रक्षण करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आम्हाला टाकून देणें हें कृत्य चांगलें नाहीं ४. [२९३]

मी अन्नाविषयीं बुभुक्षित झालों आहें, म्हणून तें सेवन करतों, असें नाहीं, तर सर्वसाक्षी जो जनार्दन त्याला मान देण्याकरितांच होय १. मी शुद्ध (चांगल्या) आणि अशुद्ध (वाईट) पक्षीं (प्रसंगीं) देव साक्षी केला आहे २. भोजनादिकाच्या वेळेस बालकाचे बरोबर भोजनादि करविणारा तोच पिता आहे ३. ज्या ठिकाणीं चांगलीं वाईट कर्में गेलीं, जळालीं असें जें श्रेष्ठ आत्मपद, तेंच माझ्या ठिकाणीं उरलें आहे, असें तुकाराम महाराज म्हणतात ४. [२९४]

संतांनीं पाणी मागितलें तरी जो एक चूळभर देखील देत नाहीं पण दासीच्या अंघोळीकरितां पाणी ठेवितो १. संतांना पाहून त्यांच्याकडे पाठ करतो व दासीच्या मुलाचा मुका घेतो २. जो संतांना पाहून टवाळ्या करतो व दासीच्या चोळ्या श्रद्धेनें धुतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच्या तोंडावर थुंका. केल्या कर्मांची शिक्षा भोगावयास तो यमपुरींत जात आहे ४. [२९५]

जेथें वक्तृत्व करणारा आशाबद्ध आहे, तेथें ऐकणाऱ्याचे चित्तांत हा वक्ता आपल्याजवळ कांहीं मागेल असें भय उत्पन्न होतें १. आपण काय प्रतिपादन करतों हें ज्ञान त्यास नाहीं, पण सांगण्याच्या वेळेस तो जें तोंड वासतो तें आपल्याला ऐकणाऱ्यांकडून कांहीं द्रव्यप्राप्ति व्हावी अशा लोभानें होय २. अशा ह्या लोभी वक्त्याची वृत्ति मांजराप्रमाणें आहे. तें जसें घरोघर फिरून आपलें पोट भरतें, तसाच हा वक्ता घरोघर फिरून आपलें पोट भरतो ३. त्याचें भजन व्यर्थ गेलें, कारण

उभयतां लोभी मन ॥ ४ ॥ बाहिरे सुके एके टायीं । तैसें झालें तया दोहीं ॥ ५ ॥ माप आणि गोणी । तुका म्हणे रितीं दोन्ही ॥ ६ ॥ [२९६]

विठ्ठला रे तूं उदारांचा राव । विठ्ठला तूं जीव या जगाचा ॥ १ ॥ विठ्ठला रे तूं उदाराची रासी । विठ्ठला तुजपाशीं सकळ सिद्धी ॥ २ ॥ विठ्ठला रे तुझें नाम बहू गोड । विठ्ठला तूं कोड पुरविसी ॥ ३ ॥ विठ्ठला रे तुझें श्रीमुख चांगलें । विठ्ठला लागलें ध्यान मनीं ॥ ४ ॥ विठ्ठला रे वाचे बोला बहू रस । विठ्ठला रे सोस घेतला जीवें ॥ ५ ॥ विठ्ठला रे शोक करीतसे तुका । विठ्ठला तूं ये कां झडकरी ॥ ६ ॥ [२९७]

बाहिर पडलों आपलया कर्तव्यें । संसारासी जीवें वेटाळिलों ॥ १ ॥ एकामध्यें एक नाहीं मिळों येत । ताक नवनीत निवडिलें ॥ २ ॥ जालीं दोन्हीं नामें एकाचि मथनीं । दुसरिया गुणीं वेगळालीं ॥ ३ ॥ तुका म्हणे दाखविल्या मुक्ताफळीं । शिंपलेचि स्वस्थळीं खुंटलिया ॥ ४ ॥ [२९८]

बरवा बरवा बरवा रे देवा तूं । जीवाहूनि आवडसी जीवा रे देवा तूं ॥ १ ॥ पाहातां वदन संतुष्ट लोचन। जाले आइकतां गुण श्रवण रे देवा ॥ २ ॥ अष्ट अंगें तनु त्रिविध ताप गेला सीण। वर्णितां लक्षण रे देवा ॥ ३ ॥ मन जालें उन्मन अनुपम ग्रहण । तुकया बंधु म्हणे महिमा नेणें रे ॥ ४ ॥ [२९९]

सोईऱ्यासी करी पाहुणेर बरा । कांडितो ठोंबरा संतालागीं ॥ १ ॥ गाईसी देखोनि बदबदा मारी । घोड्याची चाकरी गोड वाटे ॥ २ ॥ फुलें पानें नेतो वेश्येसी उदंड । ब्राह्मणासी खांड देऊं नेदी ॥ ३ ॥ बाइलेच्या गोता आवडीनें पोसी । मातापितयांसी दवडोनि ॥ ४ ॥ तुका म्हणे त्याच्या थुंका तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ॥ ५ ॥ [३००]

उभयतांचें म्हणजे श्रोता आणि वक्ता ह्यांचें मानस लोभी आहे ४. बहिऱ्या मुक्याचा योग म्हणजे समागम जसा व्यर्थ, त्याप्रमाणें त्या दोघांची स्थिती झाली. ५. तुकाराम महाराज म्हणतात, गोणींतून धान्य मोजून टाकल्यावर मोजण्याचें माप आणि गोणी हीं दोन्ही रिकामीं राहातात ६. [२९६]

हे पांडुरंगा, तूं जे कोणी उदार आहेत त्यांचा राजा आहेस. हे पांडुरंगा, तूं सर्व जगाचा जीव आहेस १. हे पाडुरंगा, तूं औदार्याची मूर्ती आहेस. हे पांडुरंगा, तुझ्याजवळ अणिमादि सर्व सिद्धि आहेत २. हे पांडुरंगा, तुझें नांव घेण्याला फार गोड आहे. हे पांडुरंगा, तूं भक्तांची इच्छा पूर्ण करतोस ३. हे पांडुरंगा, तुझें मुख सुशोभित असें उत्तम आहे. हे पांडुरंगा, तुझें ध्यान माझ्या मनाला लागलें आहे ४. हे पांडुरंगा, तुझें नाम वाणीनें घेणें हें फार रसाळ आहे. हे पांडुरंगा, तुझा ध्यास माझ्या जीवानें घेतला आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, तुझा योग व्हावा म्हणून मी रडत आहें, म्हणून तूं लवकर ये ६. [२९७]

मी जीवदशेमुळें जन्ममृत्युरूप संसारांत जो गुंतलों होतों तो आपल्या स्वतःच्या पराक्रमानें बाहेर पडलों १. आतां ज्याप्रमाणें घुसळलेल्या ताकापासून निघालेलें लोणी, तें जरी पुन्हां ताकांत घातलें तरी, पूर्ववत् मिसळत नाहीं, त्याप्रमाणें आम्ही कधींही संसारांत लिप्त होणार नाहीं २. एकाच्याच मंथनापासून निरनिराळ्या गुणांमुळें सार असार हीं दोन नामें झालीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, एकदां मोतीं शिंपल्यांतून वेगळें काढून दाखविल्यावर, शिंपला हें जरी त्याचें जन्मस्थान आहे तरी तें मोतीं शिंपल्याशीं पूर्ववत् जडलें जात नाहीं ४. [२९८]

देवा, तूं फारच चांगला आहेस, असें आम्ही त्रिवार म्हणतों; म्हणून प्राणाला जीवाहीपेक्षां अधिक आवडतोस १. तुझें मुख पाहिल्यानें डोळ्यांचें समाधान होतें व गुण ऐकल्यानें कानांचें समाधान होतें २. तुमचीं सर्व लक्षणें वर्णन करूं लागल्यानें अष्टांगांतील त्रिविध ताप नाहींसा होऊन सर्व शीण जातो ३. तुझ्या अनुपमेय स्वरूपाच्या अनुभवामुळें मन उन्मनी झालें ४. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तुमचा महिमा कळत नाहीं ४. [२९९]

जो सोयऱ्यांना चांगली मेजवती करितो आणि संतांकरितां जाडीं भातें कांडतो १. जो गाईला बदाबद मारतो आणि घोड्याची चाकरी करणें ज्यास बरें वाटतें २. जो ब्राह्मणास सुपारीचें खांडही देत नाहीं आणि वेश्येला विड्याचीं पानें, फुलें पुष्कळ देतो ३. जो आईबापांना घरांतून घालवून देऊन, बायकोचे नातेवाईक मोठ्या आनंदानें पोसतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्याचे तोंडावर थुंका. तो केलेल्या कर्माचीं फळें भोगण्यास यमपुरीस जात आहे ५. [३००]

सोलीव जें सुख अतिसुखाहुनी । उभें तें अंगणीं वैष्णवांच्या ॥ १ ॥ वृंदावन सडे चौक रंग माळा । नाचे तो सोहळा देखोनियां ॥ २ ॥ भूषण मंडित सदा सर्वकाळ । मुद्रा आणि माळ तुळसी कंठीं ॥ ३ ॥ नाम ओघ मुखीं अमृताचें सार । मस्तक पवित्र सहित रजें ॥ ४ ॥ तुका म्हणे मोक्ष भक्ताचिया मना । नये हे वासना त्यांची करी ॥ ५ ॥ [३०१]

तीर्थें केलीं कोटिवरी । नाहीं देखिली पंढरी ॥ १ ॥ जळो त्याचें ज्यालेंपण । न देखेचि समचरण ॥ २ ॥ योग याग अनंत केले । नाहीं समचरण देखिले ॥ ३ ॥ तुका म्हणे विठ्ठलपायीं अनंत तीर्थें घडलीं पाहीं ॥ ४ ॥ [३०२

कोणतें कारण राहिलें यामुळें । जें म्यां तुज बळें कष्टवावें ॥ १ ॥ नाहीं जात जीव नाहीं होत हानी । सहज तें मनीं आठवलें ॥ २ ॥ नाहीं कांहीं चिंता मरतों उपवासी । अथवा त्या म्हैसी गाई व्हाव्या ॥ ३ ॥ हें तों तुज कळों येतसे अंतरीं । लापणीक वरी साच भाव ॥ ४ ॥ तुका म्हणे देवा नासिवंतासाटीं । पायांसवें तुटी करिती तुझ्या ॥ ५ ॥ [३०३]

आमिषाचे आसे गळ गिळी मासा । फुटोनियां घसा मरण पावे ॥ १ ॥ मरणाचे वेळे करी तळमळ । आठवी कृपाळ तये वेळीं ॥ २ ॥ अंतकाळीं ज्याच्या नाम आलें मुखा । तुका म्हणे सुखा पार नाहीं ॥ ३ ॥ [३०४]

तुजवरी ज्याचें मन । दरुशन दे त्याचें ॥ १ ॥ कैसा जाती शुद्ध भाव । हात पाव ना वृत्ती ॥ २ ॥ अवघियांचा करूनि मेळा । तुज डोळां रोंखिलें ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज आड । लपोनि कोड दावीं देवा ॥ ४ ॥ [३०५]

जो अतिसुखाचा अंतर्गाभा तो देव वैष्णवांच्या आंगणांत उभा आहे १. विष्णुभक्तांच्या आंगणांत तुळसीवृंदावन आहे. शुद्ध सडासंमार्जन केलेलें आहे. नाना प्रकारच्या रंगीबेरंगी रांगोळ्यांचे पट्टे चोहोंकडे काढिलेले आहेत. तो सर्व थाट पाहून देव मोठ्या हर्षभरानें नाचतो २. ते विष्णुभक्त नेहमीं गळ्यांत तुळशीच्या माळा व अंगावर द्वादश (बारा) टिळे व मुद्रा इत्यादि भूषणांनीं सुशोभित असतात ३. अमृताचें सारभूत जें हरीचें नाम त्याचा घोष नेहमीं त्यांचे मुखांत असतो. भगवंताच्या पायांचा स्पर्श ज्या रजःकणांस झाला आहे असे रजःकण त्यांनीं मस्तकावर घेतल्यामुळे त्यांचें मस्तक पवित्र झालेलें असतें ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशा भक्तांना मोक्षप्राप्तीची तर इच्छा नाहींच पण मोक्षच त्यांची इच्छा करितो ५. [३०१]

कोट्यावधी तीर्थयात्रा केल्या पण पंढरी पाहिली नाहीं १. आग लागो त्यांच्या जगण्याला! कारण त्यानें विटेवरील पांडुरंगाचे समचरण अवलोकन केले नाहींत २. त्यानें योगयाग पुष्कळ केले पण पांडुरंगाचे समचरण पाहिले नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका पांडुरंगाच्या चरणदर्शनानें अनंत तीर्थें केल्याचें पुण्य आहे ४. [३०२]

देवा, मी तुम्हाला बुद्धिपुरःसर कष्ट द्यावे, असें माझें कोणतें कारण खोळंबलें आहे ? १. आज माझा जीव जात नव्हता किंवा हानी होत नव्हती. हें सहज माझे मनांत आठवलें २. खरोखर विचार करून पाहिलें तर कोणतीच काळजी नव्हती. उपाशी मरत नव्हतों अथवा गाई, म्हशी हव्या असेंही वाटत नव्हतें ३. हें सर्व आपल्याला कळतच आहे, कीं माझ्या अंतर्यामीं खरा भाव आहे किंवा लबाडीचा आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व मनुष्य प्राणी नाशवंत वस्तूच्या लोभानें तुझ्या पायांपासून दुरावतात ५. [३०३]

मासेपारधी हे गळाला कांहीं खाण्याचा पदार्थ लावून तो पाण्यांत टाकतात. त्या खाण्याच्या पदार्थाच्या आशेनें तो मासा गळ गिळतो व त्या योगानें त्याचा घसा फाटून तो मरतो १. पण नरड्यांत गळ अडकल्यामुळें तो मोठ्या तळमळीनें देवाचें स्मरण करितो २. तुकाराम महाराज म्हणतात, मरणप्रसंगीं जो देवाचें नांव घेतो त्या योगानें त्याला अपार सुख मिळतें ३. [३०४]

अहो देवा, ज्याचें तुमच्यावर प्रेम आहे त्याचें मला दर्शन द्या १. कशी त्याची जात शुद्ध आहे व भावही शुद्ध आहे, कीं त्याचे हात, पाय व मन ह्यांचे स्वतंत्र व्यापार राहिले नाहींत २. सर्व इंद्रियांच्या वृत्ति एकवट करून ज्यांनीं आपले डोळे तुमच्याचकडे लाविले आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, तुमच्यामागें उभा राहून मी ही इच्छा दाखवितों ४. [३०५]

विश्वव्यापी माया । तिनें झाकुळिलें छाया ॥ १ ॥ सत्य गेलें भोळ्यावरी । अविद्येची चाली थोरी ॥ २ ॥ आपुलेंचि मन । करी आपणा बंधन ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । तुम्हीं कोडीं हीं उगवा ॥ ४ ॥ [३०६]

पोटीं जन्मती रोग । तरि कां म्हणावे आप्तवर्ग ॥ १ ॥ रानीं वसती औषधी । तरि कां म्हणाव्या नि(र)पराधी ॥ २ ॥ तैसें शरीराचें नातें । तुका म्हणे सर्व आप्तें ॥ ३ ॥ [३०७]

नव्हे शब्द एकदेशी । सांडी गिवशी कोणाला ॥ १ ॥ झाली माझी वैखरी । विश्वंभरीं व्यापक ॥ २ ॥ मोकलिलें जावें बाणें । भाता जेणें वाहिला ॥ ३ ॥ आतां येथें कैचा तुका । बोले सिका स्वामीचा ॥ ४ ॥ [३०८]

गायनाचे रंगीं । शक्ति अद्भुत हे अंगीं ॥ १ ॥ हें तों देणें तुमचें देवा । घ्यावी अखंडित सेवा ॥ २ ॥ अंगीं प्रेमाचें भरतें । नेघे उतार चढतें ॥ ३ ॥ तुका म्हणे वाणी । परम अमृताची खाणी ॥ ४ ॥ [३०९]

माप म्हणे मी मवितें । भरी धणी ठेवी रितें ॥ १ ॥ देवा अभिमान नको । माझे ठायीं देऊं सकों ॥ २ ॥ देशी चाले सिका । रितें कोण लेखी रंका ॥ ३ ॥ हातीं सूत्रदोरी । तुका म्हणे त्याची थोरी ॥ ४ ॥ [३१०]

कोण सांगायास । गेलें होतें देशोदेश ॥ १ ॥ झालें वाऱ्या हातीं माप । समर्थ तो माझा बाप ॥ २ ॥ कोणाची हे सत्ता । झाली वाचा वदविता ॥ ३ ॥ तुका म्हणे या निश्चयें । माझें निरसलें भय ॥ ४ ॥ [३११]

अंगाच्या छायेप्रमाणें असणारी, जी ब्रह्माची विश्वाला व्यापून असणारी माया, तिनें सत्यब्रह्माला झांकून टाकिलें आहे १. म्हणून जगांतील खरें न कळल्यानें नाहींसें झालें आहे, म्हणून मिथ्याभूत अविद्येचा ओघ मोठा वाढला आहे २. आपलें मनच आपल्याला या संसारांत बांधीत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, हे मिथ्यामायेचे गुंताडे सोडवा ४. [३०६]

पोटामध्यें रोग उत्पन्न होतात म्हणून त्यांना आप्तवर्ग म्हणावें काय? अथवा हे रोग आर्यांच्या पोटीं जन्म घेणारीं मुलें आहेत असें म्हटलें तर त्या रोगांस आप्त कसें म्हणतां येईल? १. रानामध्यें अनेक जातीच्या वनस्पती असतात, म्हणून त्या काय निष्फळ झाल्या? २. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें शरीराचा संबंध असल्यामुळें सर्व एकमेकांचे आप्तच आहेत ३. [३०७]

माझा शब्द हा एखाद्या अर्थाला सुचविणारा अगर टाकणारा असा एकदेशी नाहीं १. तर माझी वैखरी विश्वंभराचे ठाईं व्यापली गेली आहे, म्हणजे ती विश्वंभराला सुचवीत आहे २. ज्यानें आपल्या भात्यामध्यें बाण ठेविले आहेत तो ते बाण धनुष्यास लावून जिकडे सोडील तिकडे ते बाण जातात ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां ह्या न्यायानें मी बोलत नसून जीं कांहीं माझ्या मुखांतून अक्षरें निघतात तीं सर्व देवाचा शिक्का आहे ४. [३०८]

हरीचे गुणानुवाद गाण्याचे रंगांत अद्भुत शक्ति आहे अथवा हरीच्या रंगांत गाणें व नाचणें ही अंगांत मोठी अद्भुत शक्ति आहे १. अहो देवा, हें तुमचें देणें आहे, म्हणून तुम्ही अशा प्रकारची सेवा आमच्याकडून सर्वकाळ घ्यावी २. त्या सेवेमुळें अंगामध्यें हरीच्या प्रेमाविषयीं जो भर असतो तो कमी होत नाहीं तर उत्तरोत्तर वाढतच असतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरीचें चिंतन करणारी वाचा ही परमामृताची खाण आहे ४. [३०९]

माप म्हणतें मी मोजणारें आहें, पण मोजणारा जो धनी आहे तो तें भरतो आणि ओतून रिकामें ठेवतो १. अहो देवा, माझ्या ठिकाणीं अभिमान देऊं नका २. देशामध्यें स्वामीचा शिक्का चालतो, नाहीं तर राजाचे शिक्क्याशिवाय रंकास कोणी फुकट देखील विचारीत नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या हातांत सत्तेचें सूत्र आहे तोच मोठा आहे ४. [३१०]

देशदेशांतरीं कोण उपदेश करावयास गेलें होतें? १ जो माझा बाप समर्थ विठ्ठल त्याच्याच सत्तेनें आम्हीं उपदेश वाऱ्याच्या हातानें (त्याच्याच कृपेनें) सर्व देशोदेश पसरून दिला, म्हणजे आम्ही एका देशांत केलेला उपदेश सर्व देशांत सर्व लोकांना कळला २. मीं जो उपदेश केला तो कोणाच्या सत्तेनें तर एका देवाच्याच, कारण सर्वांमध्यें बोलण्याची शक्ति त्याचीच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या निश्चयानें माझें भय नाहींसें झालें ४. [३११]

सकळिकांच्या पायां माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥ अहो श्रोते वक्ते सकळही जन । बरें पारखून बांधा गांठीं ॥ २ ॥ फोडिलें भांडार धन्याचा हा माल । मी तंव हमाल भारवाही ॥ ३ ॥ तुका म्हणे चाली झाली चहूं देशीं । उतरला कसीं खरा माल ॥ ४ ॥ [३१२]

कोण त्याचा पार पावली धुंडितां । पुढें विचारितां विश्वंभरा ॥ १ ॥ अणुरेणु सूक्ष्म स्थुळा पार नाहीं । श्रुति नेती त्याही खुंटलिया ॥ २ ॥ फळांत कीटक येवढें आकाश । ऐसी तरुवरास अनेक किती ॥ ३ ॥ दाविलें अनंतें अर्जुनासि पोटीं । आणीक त्या सृष्टि कृष्ण लोक ॥ ४ ॥ तुका म्हणे लागा संतांचिया कासे । ठाव घेतां कैसे वांचा जीवें ॥ ५ ॥ [३१३]

जें जें कांहीं करितों देवा । तें तें सेवा समर्पे ॥ १ ॥ भेद नाहीं सर्वात्मना । नारायणा तुज मज ॥ २ ॥ आम्ही दुजें नेणों कोणा । हेंचि मना मन साक्ष ॥ ३ ॥ तुका म्हणे जगन्नाथा । हें अन्यथा नव्हे कीं ॥ ४ ॥ [३१४]

स्तुति करूं तरी नव्हेचि या वेदा । तेथें माझा धंदा कोणीकडे ॥ १ ॥ परी हे वैखरी गोडावली सुखें । रसना रस मुखें इच्छीतसे ॥ २ ॥ रूप वर्णावया कोठें पुरे मती । रोमीं होतीं जातीं ब्रह्मांडें हीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तूंच ऐसा एक साचा । ऐसी तंव वाचा जाली नाहीं ॥ ४ ॥ [३१५]

तुज वर्णी ऐसा तुजविण नाहीं । दुजा कोणी तिहीं त्रिभुवनीं ॥ १ ॥ सहस्रमुखें शेष सिणला बापुडा । चिरलिया धडा जिव्हा त्याच्या ॥ २ ॥ अव्यक्ता अलक्षा अपारा अनंता । निर्गुणा सच्चिदानंदा

सगळ्यांच्या पायांवर मस्तक ठेऊन मी ही विनंति करितों, कीं १. अहो ऐकणारे, बोलणारे सर्व जनहो, जी गोष्ट उत्तम असेल तीच परीक्षा करून आपले पदरीं बांधा २. मी परमार्थाचा भांडारखाना फोडिला आहे. हा सर्व माल धन्याचा (देवाचा) आहे. मी तर येथील ओझें वाहाणारा हमाल आहें. ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा नामचिंतनाचा माल खऱ्या कसाला उतरल्यामुळें सर्व देशांत चालूं लागला, म्हणजे त्याची किंमत सगळीकडे झाली, म्हणजे भगवन्नामचिंतन सर्व करूं लागले. [३१२]

विश्वंभराचा विचार करणारे व शोध करणारे ह्यांपैकीं कोणाला त्याचा पार लागला? १. तो अणुरेणूइतका सूक्ष्म आहे, आणि त्याच्या स्थूलपणास तर पारच नाहीं. श्रुति (वेद) "नेति नेति" ह्या वचनानें तर कुंठित झाल्या २. अनंत ब्रह्मांडें ज्याचे पोटांत आहेत एवढें जें आकाश, तें तर उंबरांतील एका कीटकाप्रमाणें त्याच्या स्वरूपामध्यें आहे. ह्या मानानें पाहिलें तर एका उंबरास किती उंबरें (फळें) असतात? एकेका उंबराच्या फळांत कीटक किती असतात? ३. अनंतानें आपले पोटांत अनेक सृष्टी, अनेक कृष्ण, अनेक लोक असे अर्जुनास दाखविले. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां संतांच्या कांसेला लागा (त्यांची संगती धरा). तसें न करितां जर तुम्ही भगवत्स्वरूपाचा ठाव घ्यावयास जाल तर तुमचा जीव कसा वांचेल? (वांचणार नाहीं.) दुसरा अर्थ–तुम्ही संतांच्या कांसेला लागा आणि भगवत्स्वरूपाचा ठाव घ्या, मग तुमची जीवदशा कशी राहील? ४. [३१३]

अहो देवा, मी जीं जीं म्हणून कर्में करितों तीं तीं सर्व तुमची सेवा आहे व ती तुम्हालाच समर्पण होत आहे १ कारण हे सर्वात्मना (सर्वांचे अंतर्यामीं असणाऱ्या) नारायणा, तुझ्या व माझ्यामध्यें भेद नाहीं २. कारण आम्ही तुमच्या-वांचून दुसऱ्या कोणालाही जाणत नाहीं, ह्याविषयीं मनाला साक्षी मनच आहे. ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे जगन्नाथा (जगाच्या स्वामी), मीं हें जें वर म्हटलें तें कांहीं खोटें नाहीं ४. [३१४]

तुमची स्तुति करण्यास जावें तर ती वेदांकडून देखिल होत नाहीं! त्या ठिकाणीं हे देवा, मी तुमची स्तुति करणें हें योग्य होईल काय? १. पण माझी वाणी तुमच्या स्तुतीच्या सुखाला चटावली आहे, म्हणून माझी जिव्हा तुमचा स्तुतिरस सेवन करण्याची इच्छा करीत आहे २. तुमच्या रूपाच्या समग्र वर्णनाविषयीं माझी अल्प बुद्धि कशी पुरी पडेल? कारण, आपल्या स्वरूपाचे एका रोमावर (केसावर) हजारों ब्रह्मांडांची घडामोड होत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तूं खरोखर अमूक एक प्रकारचा आहेस असा कोणाच्याही वाणीनें निर्णय झाला नाहीं ४. [३१५]

हे देवा, तुझें वर्णन करील असा तुझ्यावांचून त्रैलोक्यांत दुसरा कोणी नाहीं. हजारों मुखांनीं वर्णन करितां करितां शेष बिचारा थकला व त्याच्या धड जिभा फाटून गेल्या. २. हे सच्चिदानंदरूप नारायणा, तूं न दिसणारा, लक्षांत

नारायणा ॥ ३ ॥ रूप नाम घेसी आपुल्या स्वइच्छा । होसी भाव तैसा त्याकारणें ॥ ४ ॥ तुका म्हणे जरी दाविसी आपणा । तरिच नारायणा कळों येसी ॥ ५ ॥ [३१६]

पूर आला आनंदाचा । लाटा उसळती प्रेमाच्या ॥ १ ॥ बांधूं विठ्ठल सांगडी । पोहुनि जाऊं पैल थडी ॥ २ ॥ अवघे जन गडी । घाला उडी भाईंनो ॥ ३ ॥ हें तों नाहीं सर्वकाळ । अमुप आनंदाचें जळ ॥ ४ ॥ तुका म्हणे थोरा पुण्यें । ओघ आला पंथें येणें ॥ ५ ॥ [३१७]

आणिक दुसरें मज नाहीं आतां । नेमिलें या चित्ता पासूनियां ॥ १ ॥ पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं । जागृतीं स्वप्नीं पांडुरंग ॥ २ ॥ पडिलें वळण इंद्रियां सकळां । भाव तो निराळा नाहीं कोणा ॥ ३ ॥ तुका म्हणे नेत्रीं केली ओळखण । तटस्थ तें ध्यान विटेवरी ॥ ४ ॥ [३१८]

आतां मी अनन्य येथें अधिकारी । होईल कोणे परी नेणों देवा ॥ १ ॥ पुराणींचे अर्थ आणितां मनास । होय कासाविस जीव माझा ॥ २ ॥ इंद्रियांची आम्ही पांगिलों अंकितें । त्यांचे रंगें चित्त रंगलेंसे ॥ ३ ॥ एकाचेंही मज न घडे दमन । अवघींच नेमून कैसीं राखों ॥ ४ ॥ तुका म्हणे जरी मोकलिशी आतां । तरी मी अनंता वायां गेलों ॥ ५ ॥ [३१९]

लक्षूनियां योगी पाहाती आभास । तें दिसे आम्हांस दृष्टी पुढें ॥ १ ॥ कर दोनी कटीं राहिलासे उभा । सांवळी हे प्रभा अंगकांती ॥ २ ॥ व्यापूनि वेगळें राहिलेंसे दुरी । सकळां अंतरीं निर्विकार ॥ ३ ॥ रूप नाहीं रेखा नामही जयासी । आपुल्या मनासीं शिव ध्याये ॥ ४ ॥ अंत नाहीं पार वर्णा नाहीं थार । कुळ याति शिर हस्त पाद ॥ ५ ॥ अचेत चेतलें भक्तीचिया सुखें । आपुल्या कौतुकें तुका म्हणे ॥ ६ ॥ [३२०]

न येणारा, अमर्याद, अंत नाहीं असा व सत्त्वरजतमादिगुणरहित आहेस ३. ज्याचा जसा भाव असेल तसा त्याकरितां तूं आपल्या इच्छेनें नामरूप धारण करून सगुण होतोस ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, जर तूं आपलें स्वरूप दाखवशील तर तें आम्हांला कळेल ५. [३१६]

हरीच्या भजनानें आनंदाचा मोठा पूर आला आहे व हरीविषयींच्या प्रेमाच्या लाटा उसळत आहेत १. विठ्ठल-नामाची सांगड बांधून संसारसागराच्या पार तरून जाऊं २. अहो जन हो, तुम्ही माझे संवगडी आहां पण ह्या ठिकाणीं उडी घालून मजबरोबर भवसिंधूंतून पार व्हा ३. कारण हरिनामानंदाचें बहुत पाणी सर्व काळ तुम्हाला प्राप्त होणारें नाहीं, म्हणजे मनुष्यजन्माखेरीज दुसऱ्या जन्मांत हा आनंद मिळणार नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, जन्मजन्मांतरींच्या थोर पुण्याईमुळें ह्या भक्तिमार्गाचा ओघ आला आहे ५. [३१७]

पांडुरंगाचे स्वरूपीं चित्ताची स्थापना केल्यापासून एका पांडुरंगावाचून मला दुसरें कांहीं राहिलें नाहीं १. मनामध्यें पांडुरंग, ध्यानामध्यें पांडुरंग, जागें असतां पांडुरंग व स्वप्नामध्यें पांडुरंग, म्हणजे जागृत असतांना ध्यानांत पांडुरंग वा स्वप्नामध्यें मनांत पांडुरंग आहे २. माझ्या सर्व इंद्रियांना पांडुरंगाकडे धावण्याचें वळण पडलें आहे. कोणत्याही इंद्रियाला पांडुरंगावांचून दुसरा विषय राहिला नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, डोळ्यांनी विटेवरच्या शांत अशा पांडुरंगध्यानाची पक्की ओळख मला करून दिली आहे ४. [३१८]

हे देवा ! तुमची अनन्य सेवा करण्यास मी कोणत्या उपायानें अधिकारी होईन हें मला कळत नाहीं १. पुराणांमध्यें सांगितलेल्या गोष्टींचा अर्थ मनांत आला म्हणजे माझा जीव मोठा कासावीस होतो २. आम्ही इंद्रियांचे अधीन झालों आहोंत, त्यांच्या प्रेमानें माझें चित्त रंगून गेलें आहे ३. एकाही इंद्रियाचा निग्रह जर मजकडून होत नाहीं, तर सगळीं इंद्रियें स्वाधीन कशीं ठेवूं ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, माझा जर तुम्हीं त्याग कराल तर माझा जन्म व्यर्थ जाईल ५. [३१९]

योगी लक्ष लावून कोणताही जेथें भास नाहीं, असें अभासतत्त्व पाहातात. तें स्वरूप आम्हाला साक्षात् चर्मदृष्टी-पुढें दिसत आहे १. जें दोन्ही हात कमरेवर ठेवून उभें राहिलें आहे, ज्याची प्रभा व अंगकांतीही सांवळी आहे २. जें सकळांचे अंतःकरणांत व्यापून निर्विकारपणानें वेगळें राहिलें आहे ३. ज्या स्वरूपाला रूपनामआदिकरून चिन्हें नाहींत, अशा स्वरूपाचें शिव आपल्या मनांत ध्यान करीत आहे ४. ज्या स्वरूपाचा अंत नाहीं, पार नाहीं, जेथें रंगाला थारा नाहीं, जेथें कुल नाहीं, जाति नाहीं, हात नाहीं, पाय नाहीं, डोकें नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, जें स्वरूप चेतनधर्मरहित चिन्मात्र असून भक्तीच्या सुखाकरितां आपल्या कौतुकानें तें सचेतन प्रगट झालें ६. [३२०]

केसें करूं ध्यान कैसा पाहों तुज । वर्म दावीं मज याचकासी ॥ १ ॥ कैसी भक्ति करूं सांग तुझी सेवा । कोण्या भाव देवा आतुडसी ॥ २ ॥ कैसी कीर्ति वाणूं कैसा लक्षा आणूं । जाणूं हा कवणू कैसा तुज ॥ ३ ॥ कैसा गाऊं गीतीं कैसा ध्याऊं चित्तीं । कैसी स्थिती मती दावीं मज ॥ ४ ॥ तुका म्हणे जैसें दास केलें देवा । तैसें हें अनुभवा आणीं मज ॥ ५ ॥ [३२१]

निगमाचें वन । नका शोधूं करूं सीण ॥ १ ॥ या तें गौळियाचे घरीं । बांधलेंसे दावें वरी ॥ २ ॥ पडिलेती भ्रमें । वाट न कळतां वर्मे ॥ ३ ॥ तुका म्हणे भार । माथां टाका अहंकार ॥ ४ ॥ [३२२]

मन वोळी मना । बुद्धि बुद्धी क्षणक्षणां ॥ १ ॥ मीच मज राखण झालों । ज्याणें तेथेंचि धरिलों ॥ २ ॥ जें जें जेथें उठी । तें तें तया होतें कुंटी ॥ ३ ॥ भांजिली खांजनीं । तुका साक्ष उरला दोन्ही ॥ ४ ॥ [३२३]

ब्रह्म न लिंपे त्या मेळें । कर्माअकर्मा वेगळें ॥ १ ॥ तोचि एक तया जाणे । पावे अनुभविलें खुणें ॥ २ ॥ शौच अशौचाचे संधी । तन आळा तना मधीं ॥ ३ ॥ पापपुण्य नाहीं ठाव । तुका म्हणे सहज भाव ॥ ४ ॥ [३२४]

काय दरा करील वन । समाधान नाहीं जंव ॥ १ ॥ तरी काय तेथें असतीं थोडीं । काय जोडी तयांसी ॥ २ ॥ रिघतां धांवा पेंवामधीं । जोडे सिद्धि ते ठार्यां ॥ ३ ॥ काय भस्म करील राख । अंतर पाक नाहीं तों ॥ ४ ॥ वर्णाश्रमाचे धर्म । जाती श्रम जालिया ॥ ५ ॥ तुका म्हणे सोंग पाश । निरसे आस तें हित ॥ ६ ॥ [३२५]

अहो देवा, तुमचें ध्यान मी कसें करूं, व कसें तुम्हाला पाहूं, याचें काय मर्म आहे तें तुम्हीं मला ह्याच कालीं दाखवा १. तुमची भक्ति व सेवा कशी करूं, हें समजावून सांगा. अहो देवा, तुम्ही कोणत्या भावानें आम्हांस आकळले जाल, हेंही सांगा २. कशी तुमची कीर्ति वर्णन करूं, कसें तुम्हाला लक्षांत आणूं, तुम्हीं कोण कसे आहांत म्हणून जाणूं ३. कोणत्या शब्दानें तुमचे गुण गाऊं व कसें तुमचें चित्तांत ध्यान करूं ? तुमची कशी स्थिति आहे हें माझ्या बुद्धीला मला दाखवा ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, ज्या अर्थीं तुम्हीं आपले सेवक आम्हांला केलें आहे त्या अर्थी तसा अनुभव द्या ५. [३२१]

वेदरूपी वनांत तुम्ही हरीला शोधण्याचा शीण घेऊं नका १. तुम्ही सर्व हरीला पाहावयास गोकुळांतील गवळ्याचे (नंदाचे) घरीं या. तेथें हरीला गवळ्यांनीं दाव्यानें बांधलें आहे २. खरोखर हरी सांपडण्याचा मार्ग तुम्हांला न कळल्यामुळें तुम्ही इतर साधनांचे श्रमांत पडलां ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही आपल्या डोक्यावर देहअहंकाराचा जो भार घेतला आहे तो टाका ४. [३२२]

क्षणोक्षणीं माझ्या मनाचें रक्षण मनच करीत आहे व माझ्या बुद्धीचें रक्षण बुद्धीच करीत आहे १. अशा तऱ्हेनें माझा रक्षक मीच झालों. ह्या योगानें तेथल्या तेथेंच (स्वरूपींच) मीच धरला गेलों (राहिलों) २. जे जे भाव जेथें म्हणजे मनाच्या ठिकाणीं उठताहेत ते ते 'तया' म्हणजे मनाच्या हातानें कुंठित होत आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, मनाची ओहटी भरती या दोन्ही धर्मांचा मी साक्षी राहिलों ४. [३२३]

ब्रह्म हें कर्माकर्माच्या योगानें लिप्त न होतां वेगळें राहातें १. अशा ह्या ब्रह्मस्थितीच्या अनुभवानें जो ब्रह्मरूप झाला आहे, तोच एक त्याला जाणतो २. तें ब्रह्म शुद्धाशुद्धाचे संधीमध्यें आहे. ज्याप्रमाणें गवताच्या आळ्यांत गवत असतें त्याप्रमाणें समजावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, सहज ब्रह्मभावाच्या ठिकाणीं पापपुण्याची कांहीं वार्ता नाहीं ४. [३२४]

जोंपर्यंत अंतःकरण सर्व वासनारहित होऊन समाधान स्थितीला पावलें नाहीं, तोंपर्यंत मोठ्या वनांत अगर गुहेंत जाऊन बसला तरी त्याला त्या वनापासून अगर गुहेपासून काय उपयोग होईल ? १. तेथें राहाणारीं पशुपक्ष्यादि श्वापदें काय थोडीं आहेत ? त्यांना कोणता लाभ झाला आहे ? २. पेंवामध्यें धान्य काढण्याकरितां त्वरेनें शिरलें असतां त्या ठिकाणीं सिद्धीची प्राप्ति होते काय ? ३. जर अंतःकरण ज्ञानानें अगर भक्तीनें पाक (शुद्ध) झाले नाहीं तर सर्व आंगाला लावलेली राख अगर भस्म काय उपयोग करील ? ४. वर्णाश्रमधर्मासंबंधानें जर श्रम मानले, तर तें करणें व्यर्थ जाईल ५. तुकाराम महाराज म्हणतात, बाकी सर्व सोंगें बंधनकारक आहेत. आशेचा निरास होण्यांतच हित आहे ६. [३२५]

तेंही नव्हे जें करितां कांहीं। ध्यातां ध्यायीं(नीं) तेंही नव्हे ॥ १ ॥ तेंही नव्हे जें जाणवी जना। वाटे मना तेंही नव्हे ॥ २ ॥ त्रास मानिजे कंटाळा। अशुभ वाचाळ तेंही नव्हे ॥ ३ ॥ तेंही नव्हे जें भोंवतीं भोंवे। नागवें धांवे तेंही नव्हे ॥ ४ ॥ तुका म्हणे एकचि आहे। सहजीं पाहें सहज ॥ ५ ॥ [३२६]

बोल बोलतां वाटे सोपें। करणी करितां टीर कांपे ॥ १ ॥ नव्हे वैराग्य सोपारें। मज बोलतां न वाटे खरें ॥ २ ॥ विष खावें ग्रासोग्रासीं। धन्य तोचि एक सोसी ॥ ३ ॥ तुका म्हणे करूनि दावी। त्याचे पाय माझे जीवीं ॥ ४ ॥ [३२७]

होईन भिकारी। पंढरीचा वारकरी ॥ १ ॥ हाचि माझा नेमधर्म। मुखीं विठोबाचें नाम ॥ २ ॥ हेचि माझी उपासना। लागे संतांच्या चरणां ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा। हीच माझी भोळी सेवा ॥ ४ ॥ [३२८]

सांठविला हरी। जींहीं हृदयमंदिरीं ॥ १ ॥ त्यांची सरली वेरझार। झाला सफळ व्यापार ॥ २ ॥ हरी आला हातां। मग कैंची भयचिंता ॥ ३ ॥ तुका म्हणे हरी। कांहीं उरों नेदी उरी ॥ ४ ॥ [३२९]

मोक्ष तुमचा देवा। तुम्ही दुर्लभ तो ठेवा ॥ १ ॥ मज भक्तीची आवडी। नाहीं अंतरीं ते गोडी ॥ २ ॥ आपुल्या प्रकारा। करा जतन दातारा ॥ ३ ॥ तुका म्हणे भेटी। पुरे एकचि शेवटीं ॥ ४ ॥ [३३०]

नामपाठ मुक्ताफळांच्या ओवणी। हें सुख सगुणीं अभिनव ॥ १ ॥ तरी आम्हीं झालों उदास निर्गुणा। भक्तांचिया मना मोक्ष नये ॥ २ ॥ द्यावें घ्यावें ऐसा येथें उरे भाव। काय ठाया ठाव पुसोनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां अभयदान करा। म्हणा विश्वंभरा दिलें ऐसें ॥ ४ ॥ [३३१]

जें कांहीं तूं करशील ती भक्ति नाहीं. ध्यात्यानें ध्येयाचें ध्यान करण्यांतही भक्ति नाहीं १. सर्व जनांना परमार्थ समजाविणें हेंही भक्ति नाहीं. मनाला जें कांहीं भासत आहे ती भक्ति २. सर्वांचा त्रास किंवा कंटाळा मानण्यांत भक्ति नाहीं. अशुभ वाचाळपणा (बीभत्स भाषण) करण्यांत भक्ति नाहीं ३. एखाद्या गांवाच्या सभोंवतीं फिरण्यांतही भक्ति नाहीं. नागवें धांवण्यांत भक्ति नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, एकच आहे, तें हें कीं सर्व धर्मांचा परित्याग करून म्हणजे कोणताही धर्म आपणाकडे न घेतां सहजपणानें सहजसा पाहाशील, तर सहज भक्ति घडेल ५. [३२६]

वैराग्याच्या गोष्टी बोलायला सोप्या आहेत, पण त्याप्रमाणें आचरण करतांना घाबरगुंडी उडते १. सहज वैराग्य-स्थितींत राहातां येईल, इतकें तें सोपें नाहीं. कोणी आम्ही वैराग्यशील आहोंत, असें सांगूं लागले तर त्यांचें बोलणें आम्हांला खरें वाटत नाहीं २. जसें कोणीएकास विषाचा प्रत्येक घास खाण्यांत दुःख होतें, तद्वत् वैराग्यस्थितींत राहाण्यांत क्षणोक्षणीं दुःख आहे. तरी तें जो सहन करितो तो धन्य होय ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो खरोखर वैराग्यस्थितीमध्यें राहून दाखवील, त्याचे पाय मी आपल्या चित्तांत ठेवीन ४. [३२७]

सर्व वैभव टाकून पंढरीची वारी करण्याकरितां मी भिकारी होईन १. हाच माझा नेम आहे आणि माझा धर्मही पण हाच आहे, कीं नेहमीं मुखानें विठोबाचें नाम घ्यावें २. संतचरणांवर मस्तक ठेवणें ही माझी उपासना आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, अशा प्रकारची माझी भोळी सेवा आहे ४. [३२८]

ज्यानें आपल्या हृदयांत हरी सांठविला आहे १. त्याची जन्ममृत्युरूपी येरझारा (जाणें येणें) संपली; आणि त्यानें केलेला परमार्थाचा व्यवहार फलद्रूप झाला २. हरी हस्तगत झाल्यावर मग भय किंवा चिंता कांहीं नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरि भक्तांच्या ठिकाणीं कोणतेही विकार ठेवीत नाहीं ४. [३२९]

हे देवा, तुमचा मोक्ष हा ठेवा मोठा दुर्लभ आहे, म्हणून तो तुमच्यापाशींच असूं द्या १. त्याची मला प्रीति नाहीं, तर मग मला भक्तीची आवड आहे २. अहो दात्या देवा, आपले मोक्षादि जे प्रकार आहेत ते सर्व तुम्हीं सांभाळून ठेवा ३. तुकाराम महाराज म्हणतात, अखेर तुमची भेट होणें येवढेंच पुरे आहे ४. [३३०]

हरीच्या नामाचा पाठ करणें हीच एक मोत्यांची ओंवलेली माळ आहे. तिचें सुख हरीच्या सगुण रूपाचे ठिकाणीं उत्तम आहे १. म्हणून आम्ही निर्गुण स्वरूपाविषयीं उदास झालों, कारण भक्तांच्या मनांत वर सांगितलेल्या गोष्टीमुळें मोक्षेच्छा येत नाहीं २. देवघेव करतां येईल अशा ह्या सगुण स्वरूपाचे ठिकाणीं भाव राहातो, म्हणून इतर ठिकाणांचा विचार करण्यांत काय अर्थ आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याविषयीं मला अभय देणगी द्या, म्हणजे अहो विश्वंभरा, माझ्या म्हणण्याप्रमाणें मी तुला दिलें असें एकदां मुखानें म्हणा ४. [३३१]

भवसिंधूचें काय कोडें। दावी वाट चाले पुढें ॥ १ ॥ तारूं भला पांडुरंग। पाय भिजों नेदी अंग ॥ २ ॥ मागें उतरिले बहुत। पैल तिरीं साधुसंत ॥ ३ ॥ तुका म्हणे लागवेगें। जाऊं तयाचिया मागें ॥ ४ ॥ [३३२]

नाहीं साजत हा मोठा। मज अळंकार खोटा ॥ १ ॥ असे तुमचा रजरेण। संतां पायींची वाहाण ॥ २ ॥ नाहीं स्वरूपीं ओळखी। भक्तिभाव करीं देखीं ॥ ३ ॥ नाहीं शून्याकारीं। क्षर ओळखी अक्षरीं ॥ ४ ॥ नाहीं विवेक या ठायीं। आत्मा अनात्मा तें काई ॥ ५ ॥ कांहीं नव्हे तुका। पायां पडणें हें ऐका ॥ ६ ॥ [३३३]

सत्य साच खरें। नाम विठोबाचें बरें ॥ १ ॥ येणें तुटती बंधनें। उभयलोकीं कीर्ति जेणें ॥ २ ॥ भाव ज्याचे गांठीं। त्यासी लाभ उठाउठी ॥ ३ ॥ तुका म्हणे भोळा। जिंकूं जाणे कळिकाळा ॥ ४ ॥ [३३४]

सत्य तो आवडे। विकल्पानें भाव उडे ॥ १ ॥ आम्ही तुमच्या कृपादानें। जाणों शुद्ध मंद सोनें ॥ २ ॥ आला भोग अंगा। न लावूं उशीर त्या त्यागा ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा। अंजन ते तुझी सेवा ॥ ४ ॥ [३३५]

करावें चिंतन। तेंचि बरें न भेटून ॥ १ ॥ बरवा अंगीं राहे भाव। तेंच तोचि जाणा देव ॥ २ ॥ दर्शनाची उरी। अवस्थाचि अंग धरी ॥ ३ ॥ तुका म्हणे मन। तेथें सकळ कारण ॥ ४ ॥ [३३६]

जें जें जेथें पावे। तें तें समर्पावें सेवे ॥ १ ॥ सहजपूजा याचि नांवें। गळित अभिमानें व्हावें

जन्ममृत्युरूपी संसारसमुद्रांतून पार होण्याचें काय कठीण आहे ? कारण, स्वतः पांडुरंगच पुढें चालून वाट दाखवीत आहेत १. हातापायांस भवसमुद्राचें पाणी न लागूं देतां या संसाररूपी सागरांतून तारून नेणारा पांडुरंगच उत्तम तारूं आहे २. ह्याच तारवाच्या आश्रयानें पूर्वी बहुत साधुसंत भवसिंधूच्या पार उतरून गेले ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं त्याच धोरणानें व मोठ्या त्वरेनें त्यांचे मागें जाऊं ४. [३३२]

(एका प्रसंगीं तुकाराम महाराजांची संतांनीं तूं मोठा भक्त आहेस, साधुमहात्मा आहेस अशी स्तुति केली, त्या वेळेस तुकाराम महाराज म्हणाले अहो संतजनहो,) तुम्ही स्तुतिरूपी मोठा अलंकार मला घातला तो मला शोभत नाहीं, कारण माझा अधिकार तितका नाहीं १. मी तुमच्या पायांची धूळ आहें अगर तुमच्या पायींची वहाण आहें २. मला परमेश्वराची ओळख नाहीं व हरीविषयीं जो भक्तिभाव आहे, तो केवळ दुसऱ्या संतांचा भाव पाहून मी दाखवितों ३. शून्य स्वरूपाची आणि क्षराक्षर स्वरूपाची मला ओळख नाहीं ४. आत्मा कशाला म्हणतात व अनात्मा कशाला म्हणतात ह्याचें ज्ञान मला नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या ठिकाणीं कोणताही अधिकार नाहीं. मात्र भक्तिभावानें तुमच्या मी पायां पडावें हा माझा अधिकार आहे, हें माझें म्हणणें ऐका ६. [३३३]

विठोबाचें नाम हेंच एक चांगलें आहे व तेंच खरें असें त्रिवार सांगतात १. ज्या नामाचा आश्रय केल्यानें संसार-बंधन तुटून इहपरलोकीं कीर्ति होते २. ज्याच्यामध्यें हरीविषयींची श्रद्धा आहे, त्यानें हरीचें चिंतन केलें तर त्याला तात्काळ हरीची प्राप्ति होते. ३. तुकाराम महाराज म्हणतात, भोळ्या भावानें विठोबाचें नाम गाणारा जो भोळा भक्त तो कळिकाळाला कसें जिंकावें हें जाणतो ४. [३३४]

जी गोष्ट खरी तीच आवडते. त्याजविषयीं संशय धरल्यानें भाव मात्र उडतो १. अहो देवा, तुमच्या कृपाप्रसादानें खरें कोणतें व खोटें कोणतें हें आम्हीं चांगलें जाणतों २. प्रारब्धवशात् आम्हांला जो भोग भोगण्याचा प्रसंग येईल, त्याचा त्याग करण्याविषयीं किंचितही वेळ लागणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, ज्या ज्ञानाला खरें खोटें कळतें, तें ज्ञानांजन बुद्धीच्या डोळ्यांत ठेवणें, हीच तुझी सेवा आहे ४. [३३५]

देवाला न भेटतां त्याच्या स्वरूपाचें चिंतन करणें, हेंच उत्तम आहे १. ह्या योगानें आपल्या ठिकाणीं देवाविषयींचा भाव उत्तम राहातो व तो टिकतो, अशा स्थितीचा मनुष्यच देव आहे, असें जाणावें २. जर देवाचें दर्शन घेणें शिलक राहील तर देवाची भेट मला केव्हां होईल असा ध्यास हृदय सारखा करीत राहातें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा तऱ्हेनें मनाच्या ठिकाणीं देवाची वस्ती झाली म्हणजे सर्व कार्य घडतें ४. [३३६]

प्रारब्धयोगेंकरून ज्या ज्या ठिकाणीं म्हणून जे जे भोग प्राप्त होतील, ते ते सर्व हरीच भोगतो आहे, अशा

॥ २ ॥ अवघें भोगितां गोसावी । आदीं अवसानीं जीवीं ॥ ३ ॥ तुका म्हणे सीण । न धरितां नव्हे भिन्न ॥ ४ ॥ [३३७]

नसे तरी मनीं नसो । परी वाचे तरी वसो ॥ १ ॥ देह पडो या चिंतनें । विठ्ठलनामसंकीर्तनें ॥ २ ॥ दंभस्थिती भलत्या भावें । मज हरिजन म्हणावें ॥ ३ ॥ तुका म्हणे काळें तरी । मज सांभाळील हरी ॥ ४ ॥ [३३८]

नये जरी कांहीं । तरी भलतेंचि वाही ॥ १ ॥ म्हणविल्या दास । कोणी न धरी वेठीस ॥ २ ॥ समर्थाच्या नांवें । भलतैसें विकावें ॥ ३ ॥ तुका म्हणे सत्ता । वरी असे ते बहुतां ॥ ४ ॥ [३३९]

न संडवे अन्न । मज न सेववे वन ॥ १ ॥ म्हणउनी नारायणा । कींव भाकितों करुणा ॥ २ ॥ नाहीं अधिकार । कांहीं घोकाया अक्षर ॥ ३ ॥ तुका म्हणे थोडें । आयुष्य अवघेंचि कोडें ॥ ४ ॥ [३४०]

एकाचीं उत्तरें । गोड अमृत मधुरें ॥ १ ॥ ऐशा देवाच्या विभूती । भिन्न प्रारब्धाची गती ॥ २ ॥ एकाचीं वचनें । कडू अत्यंत तीक्ष्णें ॥ ३ ॥ प्रकाराचे तीन । तुका म्हणे केले जन ॥ ४ ॥ [३४१]

वचन(नें) ही नाड । न बोले तें मुकें खोड ॥ १ ॥ दोहीं वेगळें तें हित । बोली अबोलणी नीत ॥ २ ॥ अंधार प्रकाशीं । जाय दिवस पावे निशी ॥ ३ ॥ बीज पृथ्वीचे पोटीं । तुका म्हणे दावी दृष्टी ॥ ४ ॥ [३४२]

विचारा वांचून । न पवीजे समाधान ॥ १ ॥ देह त्रिगुणांचा बांधा । माजी नाहीं गुण सुधा ॥ २ ॥ देवाचिये चाडे । देवा द्यावें जें जें घडे ॥ ३ ॥ तुका म्हणे होतें । बहु गोमटें उचितें ॥ ४ ॥ [३४३]

समजुतीनें हरीच्या सेवेकडे समर्पण करावे १. ह्यालाच (क्रियेवांचून होणारी) सहजपूजा म्हणतात. ही घडण्याला आपण मात्र देहाभिमानानें गलित व्हावें (देहाभिमान सोडावा) २. जीवामध्यें वास्तव्य करून सर्व कांहीं भोग आत्माराम जन्मापासून मरेतोंपर्यंत भोगीत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जीवानें कर्तृत्व भोक्तृत्व अभिमान घेतला नाहीं, तर देव त्याच्याहून निराळा नाहीं ४. [३३७]

देवाविषयींचें प्रेम मनांत नसेल तर नसूं दे, परंतु वाणीमध्यें निदान त्याचें नांव सदोदित राहूं दे १. विठ्ठलनामाचें चिंतन करण्यांतच देहावसान व्हावें (मरण यावें) २. मग तें देवाचें नांव दंभानें म्हणजे मला लोकांनीं हरिभक्त म्हणावें, अशा भावनेनें कां होईना ! ३. तुकाराम महाराज म्हणतात, एवढ्यानेंच हरि माझा कांहीं काळानें तरी सांभाळ करील ४. [३३८]

तुला जरी कांहीं येत नाहीं तरी कोणत्याही प्रकारानें १. तूं आपणास 'मी हरीचा दास आहें,' असें म्हणविल्यानें तुला कोणीही वेठीस धरणार नाहीं, म्हणजे जन्ममृत्युरूपी संसार अगर कामक्रोधादिकांचे तावडींत तूं सांपडणार नाहींस २. समर्थाच्या नांवानें पाहिजे तसें खपलें जातें ३. तुकाराम महाराज म्हणतात, कारण समर्थाची सत्ता बहुतांवर असते ४. [३३९]

माझ्याकडून अन्नाचा त्याग होत नाहीं व वनवासही करवत नाहीं १. म्हणून हे नारायणा, तुला काकुळती येतों २. कां तर वेदाक्षरें जीं आहेत तीं घोकण्याविषयीं मला अधिकार नाहीं. तुकाराम महाराज म्हणतात, आयुष्य तर थोडें व ह्याचप्रमाणें सर्व गोष्टींची अडचण आहे ४. [३४०]

कांहीं एक माणसांची बोलणीं अमृतासारखीं गोड असतात १. अशा प्रकारें ह्या देवाच्या विभूति प्रारब्धगतीनें भिन्न भिन्न आहेत २. कित्येक माणसांचीं बोलणीं कडू हृदयभेदक अशीं कठीण असतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, सात्त्विक राजस तामस असे तीन प्रकारचे जन देवानें निर्माण केले आहेत ४. [३४१]

पुष्कळ बोलणाराला वाचाळ म्हणतात व न बोलणाराला मुखस्तंभ म्हणतात १. म्हणून बोलणें आणि न बोलणें यांहून वेगळें जें स्वरूपबोधांत बोलणें तें न बोलण्यासारखें आहे व त्यालाच नीति म्हणतात. ह्या दोहींहून वेगळें होण्यांत हित आहे, म्हणजे बोलण्यामध्यें न बोलणेंच असावें २. अंधकार प्रकाशांत जातो. संध्याकाळचे समयाला दिवस संपून रात्र येते ३. तुकाराम महाराज म्हणतात, पृथ्वीच्या पोटांत असणारें बीज भूमी वृक्षद्वारा प्रगट दाखविते. (ह्या अभंगांतील बाकीच्या कडव्यांच्या अर्थाचा संबंध ध्रुवपदाच्या अर्थाशीं आहे) ४. [३४२]

आत्मा व प्रपंच ह्यांविषयींच्या सत्यमिथ्याविचाराखेरीज समाधान कधींही प्राप्त होणार नाहीं १. रज, तम, सत्त्वांचा केवळ देह बनला आहे. देहामध्यें सरळ गुण एकही नाहीं २. जें जें कांहीं म्हणून आपणास करावयाचें आहे, तें तें सर्व देवाचे इच्छेनें करून देवासच अर्पण करावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें करणें योग्य असून फार चांगलें आहे ४. [३४३]

तुटे भवरोग । संचितक्रियमाणभोग ॥ १ ॥ ऐसें विठोबाचें नाम । उच्चारितां खंडे जन्म ॥ २ ॥ वसो न सके पाप । जाय त्रिविध तो ताप ॥ ३ ॥ तुका म्हणे माया । होय दासी लागे पायां ॥ ४ ॥ [३४४]

मुसावलें अंग । रंगीं मिळविला रंग ॥ १ ॥ एकीं एक दृढ झालें । मुळा आपुलिया आलें ॥ २ ॥ सागरीं थेंबुटा । पडिल्या निवडे कोण्या वाटा ॥ ३ ॥ तुका म्हणे नवें । नव्हे जाणावें हें देवें ॥ ४ ॥ [३४५]

अनुतापें दोष । जाय न लगतां निमिष ॥ १ ॥ परि तो राहे विसावला । आदीं अवसानीं भला ॥ २ ॥ हेंचि प्रायश्चित्त । अनुतापीं न्हाय नित्य ॥ ३ ॥ तुका म्हणे पापा । शिवों नये अनुतापा ॥ ४ ॥ [३४६]

चहूं आश्रमांचे धर्म । न राखतां जोडे कर्म ॥ १ ॥ तैसी नव्हे भोळी सेवा । एक भावचि कारण देवा ॥ २ ॥ तपें इंद्रियां आघात । क्षण एका वाताहात ॥ ३ ॥ मंत्र चळे थोडा । तरि धडचि होय वेडा ॥ ४ ॥ व्रतें करितां सांग । तरी एक चुकतां भंग ॥ ५ ॥ धर्म सत्वचि कारण । नाहीं तरी केला सिण ॥ ६ ॥ भूतदयेसि आघात । उंचनीच वाताहात ॥ ७ ॥ तुका म्हणे दुजें । विधिनिषेधाचें ओझें ॥ ८ ॥ [३४७]

सोडिला संसार । माया तयावरि फार ॥ १ ॥ धांवे चाले मागें मागें । सुखदुःख साहे अंगें ॥ २ ॥ यानें घ्यावें नाम । तींसी करणें त्याचें काम ॥ ३ ॥ तुका म्हणे भोळी । विठाई कृपेची कोंवळी ॥ ४ ॥ [३४८]

भवरोगाचा (जन्ममृत्युरूपी संसाराचा) निरास होतो आणि संचित (प्रारब्ध) आणि क्रियमाण कर्मांनें होणाऱ्या भोगाचाही नाश होतो १. असें विठोबाचें नाम आहे. तें मुखानें उच्चारलें असतां, जन्ममृत्यूचा नाश होतो २. जो नित्य नेमानें नाम घेणारा आहे, त्याचेजवळ पाप राहात नाहीं व त्रिविध ताप त्याच्यापासून दूर पळतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा भक्ताची मायाही दासी होते व त्याच्या चरणीं लागते ४. [३४४]

अंग ब्रह्मभावानें भरून गेलें, कारण आत्मरंगामध्यें जीवरंग मिळविला १. जीवशिवाचें मूळ स्वरूप जें भेदशून्य परब्रह्म, त्याचे ठिकाणीं जीवशिवाची समरसता झाली २. आत्म्याचें व जीवाचें ऐक्य हें कधींही निवडलें जाणार नाहीं. सागरामध्यें पडलेल्या पाण्याच्या थेंबास सागरापासून निवडण्यास अगर वेगळा होण्यास मार्ग आहे काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, ही गोष्ट म्हणजे नवी झाली आहे, असें मात्र आपण समजूं नये, कारण जीवपरमात्मा हें मूळचेंच एक रूप आहे ४. [३४५]

कोणत्याही वाईट कर्माचा पश्चात्ताप झाल्यानें घडलेले दोष एका क्षणांत जातात १. पण तो अनुताप आरंभापासून मरेतोंपर्यंत जर चांगला टिकेल तर २. खरोखर अनुतापामध्यें नेहमीं स्नान करणें, हेंच खरें प्रायश्चित्त आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, खऱ्या अनुतापस्थितीस पाप स्पर्श करीत नाहीं ४. [३४६]

चार आश्रमांस (ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ, संन्यास) उचित जें विहितकर्म, तें चारी आश्रमी रक्षण न करतील, तर त्यांना धर्माचा लाभ होईल काय? १. त्याप्रमाणें भोळ्या भावानें होणारी देवाची सेवा नाहीं. तेथें एका शुद्ध भावाचीच अपेक्षा आहे २. तप करण्यानें इंद्रियनिग्रह राहात नाहीं, त्या योगानें एका क्षणांत सर्व तपाची वाताहात होते ३. नाना प्रकारचे मंत्र जप करण्यांत जर किंचित् चूक झाली, तर जप करणारा शहाणा जरी असला तरी तो एका क्षणांत वेडा होईल ४. सर्व व्रतें यथासांग करीत असतां एखादी चूक झाली तर त्यांचा नाश होतो ५. धर्म करण्यास सत्त्वगुणाची अपेक्षा आहे. तो जर नसेल तर धर्म करणें श्रमदायक होईल ६. हा लहान व हा मोठा असें भेदज्ञान भूतदयेचा नाश करणारें आहे ७. तुकाराम महाराज म्हणतात, एक हरीच्या भजनावांचून दुसरें सर्व विधिनिषेधाचें ओझें आहे ८. [३४७]

ज्यानें देवाकरितां सर्व संसाराचा त्याग केला आहे, त्याच्यावर देवाचें प्रेम अतिशय असतें १. देव अशा भक्ताचे मागें धांवत जातो आणि त्याला होणारीं सुखदुःखें आपण अंगानें सहन करितो २. भक्तांनीं सर्व काळ हरीचें नामच घ्यावें व हरीनें सर्वकाळ त्या भक्ताचें काम करीत राहावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, विठ्ठल माउली ही फार भोळी असून भक्तांविषयींच्या कृपेनें कोंवळी आहे ४ [३४८]

बैसूं खेळूं जेवूं । तेथें नाम तुझें गाऊं ॥ १ ॥ रामकृष्णनाममाळा । घालूं ओवुनियां गळां ॥ २ ॥ विश्वास हा धरूं । नाम बळकट करूं ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां । आम्हां जीवन शरणागता ॥ ४ ॥ [३४९]

पाठीं पोटीं देव । कैंचा हरिदासा भेव ॥ १ ॥ करा आनंदें कीर्तन । नका आशंकित मन ॥ २ ॥ येथें कोठें काळ । करील देवापाशीं बळ ॥ ३ ॥ तुका म्हणे धनी । सपुरता काय वाणी ॥ ४ ॥ [३५०]

मनोमय पूजा । हेचि पढिये केशीराजा ॥ १ ॥ घेतो कल्पनेचे भोग । न मानिती बाह्य रंग ॥ २ ॥ अंतरींचें जाणें । आदिवर्तमान खुणें ॥ ३ ॥ तुका म्हणे कुडें । कोठें सरे त्याच्या पुढें ॥ ४ ॥ [३५१]

जाणें भक्तीचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पुतळा ॥ १ ॥ आणीक नये माझ्या मना । हो का पंडित शहाणा ॥ २ ॥ नामरूपीं जडलें चित्त । त्याचा दास मी अंकित ॥ ३ ॥ तुका म्हणे नवविध । भक्ति जाणे तोचि शुद्ध ॥ ४ ॥ [३५२]

याजसाठीं वनांतरा । जातों सांडुनियां घरा ॥ १ ॥ माझें दिठावेल प्रेम । बुद्धि होईल निष्काम ॥ २ ॥ अद्वैताची वाणी । नाहीं ऐकत मी कानीं ॥ ३ ॥ तुका म्हणे अहंब्रह्म । आड येऊं नेदी भ्रम ॥ ४ ॥ [३५३]

बुडतां आवरीं । मज भवाचे सागरीं ॥ १ ॥ नको मानूं भार । पाहों दोषांचे डोंगर ॥ २ ॥ आहे तें सांभाळीं । तुझी कैसी ब्रिदावळी ॥ ३ ॥ तुका म्हणे दोषी । मी तों पातकाची राशी ॥ ४ ॥ [३५४]

जेथें बसूं अगर कांहीं खेळ खेळूं अथवा जेवण जेवूं त्या वेळेस तुझें नामच आम्ही गात राहूं १. रामकृष्णनामाची माळा ओंवून आम्ही आपल्या गळ्यांत घालूं, म्हणजे एकामागून एक सतत रामकृष्णनामाचा जप करीत राहूं २. पूर्णपणें हरीच्या नामाविषयीं विश्वास ठेवूं आणि हरीचें नाम मुखामध्यें दृढ धरूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही हरीला शरण आलेले आहोंत, म्हणून आतां त्याचें नामचिंतन करणें हेंच आम्हां शरणागतांचें जीवन आहे ४. [३४९]

मागें, पुढें, आंत, बाहेर, वर, खालीं सर्वच जर देव आहे, तर हरीच्या दासांना भय कोठें राहिलें आहे ? १. म्हणून अहो हरिजनहो, तुम्ही मोठ्या आनंदानें हरीकीर्तन करा. त्याविषयीं मनांत कांहींएक संशय ठेवूं नका २. ह्या ठिकाणीं म्हणजे देवाजवळ काळाचें बळ कसें चालेल ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर धनी सर्व शक्तिमान् आहे तर तेथें तोटा कशाचा ? ४. [३५०]

मनानें होणारी जी मानसिक पूजा तीच भगवंताला आवडते १. अंतःकरणामध्यें हरीविषयीं असणाऱ्या शुद्ध कल्पनांचा तो हरि भोग घेतो; बाहेरून केलेला पूजेचा अगर भक्तीचा थाटमाट देवाला आवडत नाहीं २. हरि हा भूत, भविष्य वर्तमान या तिन्ही कालीं अंतःकरणांतील भाव जाणतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अंतःकरणांतील खोटा भाव हरीला कसा खपला जाईल ! ४. [३५१]

जिव्हाळ्याची भक्ति म्हणजे अखंड भक्ति जो जाणतो तोच साक्षात् देवाचा बनलेला पुतळा आहे १. त्यावांचून इतर मोठे शहाणे अगर पंडित जरी असले तरी ते मोठे दैववान् आहेत असें माझ्या मनाला वाटत नाहीं २. हरीच्या नामरूपाचे ठिकाणीं ज्याचें मन गढून गेलें आहे, त्याचे आधीन असणारा मी त्याचा सेवक आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, श्रवणकीर्तनादि नऊ प्रकारची भक्ति जो जाणतो तोच पुरुष शुद्ध आहे ४. [३५२]

खालीं सांगितलेल्या कारणाकरितां मी घरदार सोडून वनामध्यें जात आहें १. हरीच्या सगुण रूपाविषयीं माझ्यामध्यें असणाऱ्या प्रेमास दृष्ट लागेल. त्या योगानें हरीच्या भजनपूजनाविषयींच्या माझ्या कामना जाऊन, माझी बुद्धि निष्काम होईल २. म्हणून अद्वैत शास्त्रपर गोष्टी मी आपल्या कानांनीं ऐकत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी ब्रह्म आहें, अशा भावनेचा भ्रम मी आपल्यामध्यें येऊं देणार नाहीं ४. [३५३]

हे देवा, ह्या जन्ममृत्युरूपी भवसागरामध्यें मीं बुडत आहें, ह्याकरितां माझें रक्षण कर १. मजकडून घडलेले पर्वतप्राय दोष तूं पाहूं नकोस आणि माझा उद्धार करण्यासंबंधीं बोजा मानूं नकोस २. कारण पतितांना पावन करणें, हें तुझें ब्रीद आहे, त्याचा तूं सांभाळ कर ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी तर मोठा दोषी आहें. फार काय सांगावें ! मी केवळ पातकांची राशीच आहें ४ [३५४]

अक्षई तें झालें । आतां न मोडे रचिलें ॥ १ ॥ पाया पडिला खोले ठायीं । तेथें पुढें चाली नाहीं ॥ २ ॥ होतें विखुरलें । ताळा जमे झडती आलें ॥ ३ ॥ तुका म्हणे बोली । पुढें कुंटितचि जाली ॥ ४ ॥ [३५५]

तुझे थोर थोर । भक्त करिती विचार ॥ १ ॥ जपतपादि साधनें । मज चिंतवेना मनें ॥ २ ॥ करुणावचनें । म्यां भाकावीं तुम्हां दीनें ॥ ३ ॥ तुका म्हणे घेई । माझें थोडें फार ठायीं ॥ ४ ॥ [३५६]

लावुनि काहाळा । सुखें करितों सोहळा ॥ १ ॥ सादवीत गेलों जना । भय नाहीं सत्य जाणा ॥ २ ॥ गात नाचत विनोदें । टाळ घागऱ्यांच्या छंदें ॥ ३ ॥ तुका म्हणे भेव । नाहीं पुढें येतो देव ॥ ४ ॥ [३५७]

मुक्त कासया म्हणावें । बंधन तें नाहीं ठावें ॥ १ ॥ सुखें करितों कीर्तन । भय विसरलें मन ॥ २ ॥ देखिजेना नाश । घालूं कोणावरी कास ॥ ३ ॥ तुका म्हणे साहे । देव आहे तैसा आहे ॥ ४ ॥ [३५८]

ओनाम्याच्या काळें । खडे मांडविले बाळें ॥ १ ॥ तेंचि पुढें पुढें काई । मग लागलिया सोई ॥ २ ॥ रज्जु सर्प होता । तोंवरीचि न कळतां ॥ ३ ॥ तुका म्हणे साचें । भय नाहीं बागुलाचें ॥ ४ ॥ [३५९]

आतां पुढें धरीं । माझे आठव वैखरी ॥ १ ॥ नको बडबडूं भांडे । कांहीं वाउगें तें रांडे ॥ २ ॥ विठ्ठल विठ्ठल । ऐसे सांडोनिया बोल ॥ ३ ॥ तुका म्हणे आण । तुज स्वामीची हे जाण ॥ ४ ॥ [३६०]

आम्हीं परमार्थाची जी इमारत रचिली आहे, ती कधींही न मोडतां निरंतर टिकणारी आहे. १. आमच्या इमारतीचा पाया खोल गेला आहे, म्हणजे सर्वांना आधार असलेल्या ब्रह्मापर्यंत जाऊन पोंहचला आहे. ज्याप्रमाणें खडकाला पाया लागला असतां खणण्याची गति कुंठित होते, तद्वत् समजावें २. हिशोब जो चुकत होता, त्याचा ताळा तपासणीमध्यें बरोबर मिळाला ३. तुकाराम महाराज म्हणतात, परमार्थाविषयीं येथून पुढें आमचें बोलणें कुंठित झालें ४. [३५५]

अहो देवा, तुमचे मोठमोठे भक्त तुमच्या स्वरूपाचा विचार करितात १. आणि जपतपादि साधनेंही करीत आहेत, परंतु मी इतका अनधिकारी आहें कीं माझ्या मनानें त्यांचा विचार देखील होत नाहीं २. मी सर्व प्रकारें दीन आहें, म्हणून काकुळती येऊन तुमची प्रार्थना करावी. ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, मजकडून होणारी जी थोडीफार वेडीवाकडी सेवा तिचा आपण स्वीकार करावा ४. [३५६]

मोठ्या झांजा वाजवून मी भजनाचा सोहळा सुखानें करीत आहें १. व ह्या संबंधानें जगालाही सांगत जात आहें, कीं अहो, तुम्हीं जर हरीचें भजन केलें, तर खरोखरच तुम्हाला भय नाहीं, असें तुम्ही समजा २. हरीचे गुणानुवाद गातांना पायांत बांधिलेले चाळ, व हातांत घेतलेले टाळ ह्यांच्या तालाचे छंदांत मी मोठ्या कौतुकानें नाचत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें करण्यांत किंचितही भय नसून देव सामोरा येत आहे ४. [३५७]

खरोखर बंधन काय आहे हें ज्याच्या पुढें येत नसून, त्यासंबंधानें ज्याच्यामध्यें ज्ञानही नाहीं, असा ब्रह्मनिष्ठ जो मी त्याला मुक्त कशाला म्हणावें, हें कसें कळणार ? १. अशा परम सुखरूप स्थितीमध्यें मी कीर्तन करीत आहें. माझें मन पूर्णपणें भयाला विसरून गेलें आहें २. नाश करण्याला योग्य अशी वस्तूच जर मला दिसत नाहीं, तर कोणाचा नाश करण्याविषयीं कास घालूं (सिद्ध होऊं)? ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वतोपरी साह्य करणारा देव अद्वैतपणें जसाचा तसा आहे ४. [३५८]

लहान मुलांना ओनामाचा धडा शिकविण्याचे वेळेस शिक्षक जसा तो धडा समजण्याकरतां ओळीनें अक्षरावर खडे मांडितो १. व अशा रीतीनें जशीजशी मुलांना अक्षराची ओळख होत जाते, तसतसे तो खडे टाकून देतो. मग खड्यावांचून त्या मुलांना अक्षराचा परिचय होतो २. जोंपर्यंत ही दोरी आहे असें कळलें नाहीं तोंपर्यंत दोरी हा सर्प आहे, असें भासतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, बागुलबुवा हा पदार्थच नाहीं असें ज्या वेळेस खरोखर कळून येतें, त्या वेळेस त्या बागुलबुवाचें भय राहात नाहीं ४. [३५९]

हे माझे वाचे, येथून पुढें तरी हरिनामाचा आठव सतत धर १. हे भांडखोर, देवाचे नामावांचून कांहीं वावगी बडबड करूं नकोस २. विठ्ठल हें नाम घेण्याचें सोडून राहूं नकोस ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुला माझा स्वामी जो विठ्ठल त्याची शपथ आहे ४. [३६०]

काय नव्हे करितां तुज । आतां राखें माझी लाज ॥ १ ॥ मी तो अपराधाची राशी । शिखा अंगुष्ठ तों पाशीं ॥ २ ॥ त्राहे त्राहे त्राहे । मज कृपादृष्टीं पाहे ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । सत्य घ्यावी आतां सेवा ॥ ४ ॥ [३६१]

वंदीन मी भूतें । आतां अवघींचि समस्तें ॥ १ ॥ तुमची करीन भावना । पदोपदीं नारायणा ॥ २ ॥ गाळुनियां भेद । प्रमाण तो ऐसा वेद ॥ ३ ॥ तुका म्हणे मग । नव्हे दुजयाचा संग ॥ ४ ॥ [३६२]

पूजा पूज्यमान । कथे उभे हरिजन ॥ १ ॥ ज्याची कीर्ति वाखाणिती । तेथें ओतली ते मूर्ति ॥ २ ॥ देहाचा विसर । केला आनंदें संचार ॥ ३ ॥ गेला अभिमान । लाज बोळविला मान ॥ ४ ॥ शोक मोह चिंता । यांची नेणती ते वार्ता ॥ ५ ॥ तुका म्हणे सखे । विठोबाचे ते सारिखे ॥ ६ ॥ [३६३]

भाव तैसें फळ । न चले देवापाशीं बळ ॥ १ ॥ धांवे जातीपाशीं जाती । खुण येरयेरां चित्तीं ॥ २ ॥ हिरा हिरकणी । काढी आंतुनि अहिरणीं ॥ ३ ॥ तुका म्हणे केलें । मन शुद्ध हें चांगलें ॥ ४ ॥ [३६४]

वरी बोला रस । कथी ज्ञान माजी फोस ॥ १ ॥ ऐसे लटिके जे ठक । तयां इह ना परलोक ॥ २ ॥ परिसे एक सांगे । अंगा धुळी हे नलगे ॥ ३ ॥ तुका म्हणे हाडें । कुतऱ्या लाविले झगडे ॥ ४ ॥ [३६५]

हेचि तुझी पूजा । आतां करीन केशीराजा ॥ १ ॥ अवघीं तुझींच हीं पदें । नमस्कारीन अभेदें ॥ २ ॥ न वर्जित दिशा । जाय तेथेंचि सरसा ॥ ३ ॥ नव्हे एकदेशी । तुका म्हणे गुणदोषी ॥ ४ ॥ [३६६]

हे देवा, तुम्ही करूं लागलां असतां कोणती गोष्ट होणार नाहीं? ह्याकरितां माझी लज्जा रक्षण करा १. नखशिखांत मी तर केवळ अपराधी मूर्ति आहें २. देवा, माझ्याकडे तुम्हीं कृपादृष्टीनें पाहा व माझें रक्षण करा, असें त्रिवार सांगतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आतां मजकडून खरी सेवा घ्यावी ४. [३६१]

सर्व प्राणिमात्राला मी नमस्कार करीन १. अहो नारायणा, सर्व प्राणिमात्र तुम्हीच आहांत, अशी पावलोपावलीं कल्पना करीन २. सर्व लहान मोठा हा भेद बाजूला सारून मी तुम्हांला पाहीन. ह्याविषयीं मला वेद प्रमाण आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें झाल्यावर दुसऱ्याचा (द्वैताचा) संबंध कधीं होणार नाहीं ४. [३६२]

पूजा करण्याला योग्य जे हरिभक्त, ते कथेमध्यें उभे आहेत १. ज्या हरीची कीर्ति ते वर्णन करीत आहेत, तो हरीच त्यांच्या अंगांमध्यें मूर्तिमंत वास करीत आहे २. अशा हरिभक्तांमध्यें देहाविषयींची विस्मृति असून केवळ आनंद त्यांच्या हृदयांत प्रगट झाला आहे ३. ज्यांच्यामधील देहाभिमान समूळ नाहींसा झाला आहे, आणि लज्जा व मान ज्यांनीं आपल्यामधून घालवून दिला आहे ४. ते शोक, मोह, चिंता ह्यांचें नांवही जाणत नाहींत ५. तुकाराम महाराज म्हणतात, असे सखे हरिजन केवळ विठोबासारखेच आहेत ६. [३६३]

ज्याप्रमाणें भक्तामध्यें देवाविषयींचा भाव असेल, तसेंच त्याला फळ मिळेल. ह्यावांचून देव स्वाधीन होण्याला दुसरें बळ चालणार नाहीं १. जो ज्या जातीचा आहे, तो त्या जातीपाशींच जाईल, कारण परस्परांमधील एकमेकांची खूण एकमेकांच्या चित्ताला पटते २. खरा हिरा ऐरणीवर ठेवून त्याच्यावर हातोड्याचा घाव जरी घातला, तरी तो न फुटतां जशाचा तशाच ऐरणींत शिरतो व हिरकणी दाखविल्याबरोबर तो बाहेर येतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, मन शुद्ध करणें हें उत्तम ४. [३६४]

वर वर ज्ञानाचें कथन करणाऱ्यांचे बोल, बाहेरच्या बाजूनें मोठे रसभरित दिसतात, परंतु आंतले बाजूस तशी स्थिति नसून, ते केवळ पोकळ असतात १. असे जे खोटे ठकबाज लोक, त्यांना इहलोकाचें सुख न मिळतां परलोकाचीही प्राप्ति होत नाहीं. २. जो ऐकतो एक आणि सांगतोही तेंच आणि परमार्थासंबंधानें आपल्या अंगाला किंचित् धूळही लागूं देत नाहीं (पुढें ध्रुवपद वाचावें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हाडकाकरितां कुत्र्याचें भांडण लागतें ४. [३६५]

हे देवा, आतां मी पुढें सांगितल्याप्रमाणें तुझी पूजा करीन १. जें कांहीं दिसत आहे तें तुझें स्वरूप आहे, असें पक्कें समजून, अभेदबुद्धीनें त्यास नमस्कार करीन २. कोणतीही दिशा न गाळतां जिकडे जाईन, तिकडे तुझ्या एकसारख्या रसभरित स्वरूपाला जाणीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, एकदेशी गुणदोषांकडे कधींही लक्ष देणार नाहीं ४. [३६६]

आपलें तों कांहीं। येथें सांगिजेसें नाहीं॥ १ ॥ परि हे वाणी वायचळे। छंद करवित बरळे ॥ २ ॥ पंचभूतांचा हा मेळा। देह सत्यत्वें निराळा ॥ ३ ॥ तुका म्हणे भुली। इच्या उफराट्या चाली ॥ ४ ॥ [३६७]

विठ्ठल नावाडा फुकाचा। आळविल्या साटीं वाचा ॥ १ ॥ कटी कर जैसे तैसे। उभा राहिला न बैसे ॥ २ ॥ न पाहे सिदोरी। जाती कुळ न विचारी ॥ ३ ॥ तुका म्हणे भेटी। हाक देतां उठाउठी ॥ ४ ॥ [३६८]

कृपावंत किती। दीनें बहु आवडती ॥ १ ॥ त्यांचा भार वाहे माथां। करी योगक्षेम चिंता ॥ २ ॥ भुलों नेदी वाट। करीं धरुनि दावी नीट ॥ ३ ॥ तुका म्हणे जीवें। अनुसरल्या एका भावें ॥ ४ ॥ [३६९]

नेणती वेद श्रुति कोणी। आम्हां भाविकां वांचोनि ॥ १ ॥ रूप आवडे आम्हाशी। तैसे जोडी हृषीकेशी ॥ २ ॥ आम्हीं भावें बळिवंत। तुज घालूं हृदयांत ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज धाक। देतां पावशील हाक ॥ ४ ॥ [३७०]

मन गुंतलें लुलयां। जाय धांवोनि त्या ठायां ॥ १ ॥ मागें परतवी तो बळी। शूर एक भूमंडळीं ॥ २ ॥ येऊनियां घाली घाला। नेणों काय होईल तुला ॥ ३ ॥ तुका म्हणे येणें। बहु नाडिले शाहाणे ॥ ४ ॥ [३७१]

घेई घेई माझे वाचे। गोड नाम विठोबाचें ॥ १ ॥ तुम्ही घ्या रे डोळे सुख। पाहा विठोबाचें मुख ॥ २ ॥ तुम्ही ऐका रे कान। माझ्या विठोबाचे गुण ॥ ३ ॥ मना तेथें धांव घेई।

ह्या प्रपंचांतील अमूक एक तत्त्व आपण आहोंत, अगर तें आपलें आहे, असें सांगण्यासारखें कांहीं नाहीं १. परंतु हें तत्त्व न समजून माझा देह, माझें घर, माझीं पोरें, असा वाणीला व्यर्थ बरळण्याचा छंद ल गला आहे २. पंचभूतांच्या कर्दमानें (चिखलानें) बनलेला हा देह आत्मतत्त्वापासून खरोखर वेगळा आहे ३. पण तुकाराम महाराज म्हणतात, ही वाचा अगदीं भुलून गेली आहे, म्हणून देह मी, व देहसंबंधी माझें, असें विरुद्ध बडबडण्याची तिला संवय झाली आहे ४. [३६७]

पहा, देव किती कृपाळु आहे! दीन जीव भवनदींतून तारून नेणारा तो फुकट नावाडी आहे. मात्र शुद्ध भावानें वेळोवेळीं त्याचें नाव वाचेनें घेतलें पाहिजे १. तो देव कमरेवर हात ठेवून उभा राहिलेला जशाचा तसाच आहे. तो खालीं बसत नाहीं २. देव हा भक्तांच्या पापपुण्याच्या शिदोरीकडे पाहात नाहीं व जात चांगली अगर वाईट, किंवा कूळ चांगलें अगर वाईट, ह्याचाही तो विचार करीत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाच्या नांवानें हांक मारली कीं तो ताबडतोब भेट देतो ४. [३६८]

देव हा भक्तांविषयीं इतका कृपाळू आहे, कीं त्याला आपले दीन भक्त अतिशय आवडतात १. त्यांचा सर्व संसाराचा भार आपण घेऊन, त्यांच्या योगक्षेमाची तो काळजी करतो २. ते एखादे वेळ चुकभुलीनें परमार्थाचा मार्ग सोडून आड वाटेनें जाऊं लागले, तर त्यांना तो हात धरून सरळ मार्ग दाखवितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव आपल्या ठिकाणीं एकनिष्ठपणानें अनुसरलेल्या भक्तांच्या ह्या सर्व गोष्टी करितो ४. [३६९]

आम्हां परमभाविकांखेरीज वेदश्रुति जाणणारे कोणी नाहींत, अथवा आम्हां परमभाविकांखेरीज, वेदश्रुति अगर दुसरे कोणी, हरीला जाणणारे नाहींत १. हरीचें रूप आम्हांला मोठें प्रिय आहे आणि आम्ही त्याचा तसा लाभही करून घेतला आहे २. आम्ही हरीविषयींच्या भावानें मोठे बलाढ्य झालों आहों, म्हणून देवा, तुला हृदयांत घालून ठेवूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमचें तुला मोठें भय आहे, म्हणून आम्हीं तुला हांक मारल्याबरोबर तूं प्राप्त होशील ४. [३७०]

मन हें विषयाचे ठिकाणीं मोठें लोलुप झालें आहे व वारंवार धांवत तिकडेच जात आहे १. ह्या मनाला विषया-'पासून जो मागें परतवितो तोच बलाढ्य होय व ह्या भूमंडळामध्यें तोच एक शूर आहे २. हें मन ज्या वेळेस घाला घालील, त्या वेळेस तुझें काय होईल तें कळणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आजपर्यंत ह्या मनानें पुष्कळ शहाण्या लोकांना फसविलें आहे ४. [३७१]

हे माझे वाचे, तूं विठोबाचें गोड नांव निरंतर घेत जा १. अहो डोळे हो, तुम्ही विठोबाचें गोड मुखं पाहा आणि याचें सुख घ्या २. अहो कान हो, तुम्ही विठोबाचे नेहमीं गुणानुवाद ऐकत जा ३. हे मना, तूं निरंतर तिकडेच धांव घे

राहें विठोबाचे पायीं ॥ ४ ॥ तुका म्हणे जीवा । नको सोडूं या केशवा ॥ ५ ॥ [३७२]

धणी न पुरे गुण गातां । रूप दृष्टीं न्याहाळितां ॥ १ ॥ बरवा बरवा पांडुरंग । कांति सांवळी सुरंग ॥ २ ॥ सर्व मंगळाचें सार । मुख सिद्धींचें भांडार ॥ ३ ॥ तुका म्हणे सुखा । अंतपार नाहीं लेखा ॥ ४ ॥ [३७३]

जरि मी नव्हतों पतित । तरि तूं पावन कैंचा येथ ॥ १ ॥ म्हणोनि माझें नांव आधीं । मग तूं पावन कृपानिधी ॥ २ ॥ लोहो महिमान परिसा । नाहीं तरी दगड तैसा ॥ ३ ॥ तुका म्हणे याचक भावें । कल्पतरु मान पावे ॥ ४ ॥ [३७४]

एक भाव चित्तीं । तरी न लगे कांहीं युक्ती ॥ १ ॥ कळों आलें जीवें । मज माझियाची भावें ॥ २ ॥ आठवचि पुरे । सुख अवघें मोहोरे ॥ ३ ॥ तुका म्हणे मन । पूजा इच्छी नारायण ॥ ४ ॥ [३७५]

मज संतांचा आधार । तूं एकलें निर्विकार ॥ १ ॥ पहा विचारूनि देवा । नको आम्हांसवें दावा ॥ २ ॥ तुज बोल न बोलवे । आम्हां भांडायाची सवे ॥ ३ ॥ तुका म्हणे तरी । ऐक्यभाव नुरे उरी ॥ ४ ॥ [३७६]

तुज मागणें तें देवा । आम्हां तुझी चरणसेवा ॥ १ ॥ आन नेघों देसी तरी । रिद्धि सिद्धि मुक्ति चारी ॥ २ ॥ संतसंगति सर्वकाळ । थोर प्रेमाचा सुकाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे नाम । तेणें पुरे माझें काम ॥ ४ ॥ [३७७]

तुझा शरणागत । जन्मोजन्मींचा अंकित ॥ १ ॥ आणीक कांहीं नेणें हेवा । तुजवांचूनि केशवा ॥ २ ॥ हेंचि माझें गाणें । तुझें नामसंकीर्तन ॥ ३ ॥ तुझ्या नामाचीं भूषणें । तुका म्हणे ल्यालों लेणें ॥ ४ ॥ [३७८]

आणि विठोबाचे पायापाशीं सतत राहा ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या जीवा, तूं केशव देवाला टाकूं नकोस ५. [३७२]

अहो देवा, तुमचे गुण गाण्यानें व रूप पाहाण्यानें माझी तृप्ति होत नाहीं. हा पांडुरंग उत्तमोत्तम आहे. याचें स्वरूप श्यामसुंदर आहे २. भगवंताचें रूप हें सर्व मंगलाचें सार असून, सर्व सिद्धि राहाण्याचा भांडारखाना आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरीचें सुख अनंत अपार आहे व त्यास मर्यादा नाहीं. ४ [३७३]

हे देवा, जर मी पतित नसतों, तर तूं कोणाला पावन करणारा झाला असतास ? १. म्हणून माझें पतिताचें नांव आधीं आहे, नंतर अहो कृपानिधी, तुम्ही पावन आहांत २. लोखंडामुळें परिसाचा महिमा वाढलेला आहे व जर लोखंड नसतें, तर तो इतर दगडांतच जमा असता ३. तुकाराम महाराज म्हणतात, याचना करणाऱ्यामुळें कल्पतरूला हा कल्पिलेलें देतो असा मोठा मान मिळाला आहे ४. [३७४]

देवाविषयीं चित्तांत एक शुद्ध भाव असेल, तर दुसऱ्या कांहीं युक्ति नकोत १. हें मर्म माझ्या शुद्ध भावामुळें माझ्या जीवाला कळून आलें २. एक देवाविषयीं सतत आठवण ठेवणें एवढेंच पुरे होईल, त्यायोगानें संपूर्ण सुखाचा योग होतो ३ तुकाराम महाराज म्हणतात, नारायण हा मानसिक पूजेची इच्छा करतो ४. [३७५]

मला संतांचा आधार आहे. देवा, तुम्ही तर एकटे विकाररहित आहांत १. अहो देवा, तुम्ही ह्याविषयीं थोडा तरी विचार करून पाहा. आमच्याबरोबर दावा धरूं नका २. तुम्हाला एकही शब्द बोलवत नाहीं व आम्हांस नित्य भांडावयाची संवय आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या भेदशून्य स्वरूपांत (जीव-ब्रह्म-) एकपणाची कल्पना उरत नाहीं ४. [३७६]

अहो देवा, तुमच्याजवळ एवढें मागणें आहे, कीं आम्हाला तुमची निरंतर चरणसेवा घडावी १. ह्याहून चारी मुक्ति अथवा रिद्धिसिद्धि दिल्या, तरी आम्ही घेणार नाहीं २. सदा सर्वकाळ संतसंगतीचें प्रेमसुख द्यावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या भावानेंच (भक्तीनेंच, नामाच्या आवडीनें) माझ्या कामना पूर्ण होतात ४. [३७७]

अहो देवा, मी तुम्हांला शरण आलेला असून, जन्मोजन्मीं तुमच्या आधीन असणारा सेवक आहें १. अहो देवा, तुमच्यावांचून मजमध्यें कांहीं हांव नाहीं २. तुमचें नामसंकीर्तन करणें, हेंच माझें गाणें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या नामांचीं अलंकर भूषणें मीं धारण केलीं आहेत ४. [३७८]

उतरलों पार । सत्य झाला हा निर्धार ॥ १ ॥ तुझें नाम धरिलें कंठीं । केली संसाराची तुटी ॥ २ ॥ आतां नव्हे बाधा । कोणेविशीं कांहीं कदा ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं । आतां उरलें ऐसें नाहीं ॥ ४ ॥ [३७९]

क्रियामतिहीन । एक मी गा तुझें दीन ॥ १ ॥ देवा करावा सांभाळ । वारीं माझी तळमळ ॥ २ ॥ नको माझे ठायीं । गुणदोष घालूं कांहीं ॥ ३ ॥ अपराधाच्या कोटी । तुका म्हणे घाला पोटीं ॥ ४ ॥ [३८०]

नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ॥ १ ॥ तैसें चित्तशुद्धि नाहीं । तेथें बोध करील काई ॥ २ ॥ वृक्ष न धरि पुष्पफळ । काय करील वसंत काळ ॥ ३ ॥ वांजे न होतीं लेंकुरें । काय करावें भ्रतारें ॥ ४ ॥ नपुंसका पुरुषासी । काय करील बाईल त्यासी ॥ ५ ॥ प्राण गेलिया शरीर । काय करील वेव्हार ॥ ६ ॥ तुका म्हणे जीवनेंविण । पीक नव्हे नव्हे जाण ॥ ७ ॥ [३८१]

नवां नवसांचीं । झालों तुम्हासी वाणीचीं ॥ १ ॥ कोण तुझें नाम घेतें । देवा पिंडदान देतें ॥ २ ॥ कोण होतें मागें पुढें । दुजें बोलाया रोकडें ॥ ३ ॥ तुका म्हणे पांडुरंगा । कोणा घेतासी वोसंगा ॥ ४ ॥ [३८२]

एका बीजा केला नास । मग भोगलें कणीस ॥ १ ॥ कळे सकळां हा भाव । लहानथोरावरी जीव ॥ २ ॥ लाभ नाहीं फुकासाटीं । केल्याविण जीवासाटीं ॥ ३ ॥ तुका म्हणे रणीं । जीव देतां लाभ दुणी ॥ ४ ॥ [३८३]

आयुष्य गेलें वायांविण । थोर झाली नागवण ॥ १ ॥ आतां धांवाधांव करीं । काय पाहातोसि हरी ॥ २ ॥ माझे तुझे याचि गति । दिवस गेले तोंडीं माती ॥ ३ ॥ मन वाव घेऊं नेदी । बुडवूं पाहे

खरोखर मी या संसारसिंधूंतून पार उतरलों, असा माझा निश्चय झाला आहे १. सर्व संसाराचा त्याग करून तुझें नाम कंठामध्यें ठेविलें आहे २. आतां कोणत्याही विषयासंबंधानें केव्हांही बाधा नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका हरीवांचून ह्या वेळेस दुसरें कांहीं राहिलें नाहीं ४. [३७९]

सत्कृत्यहीन व बुद्धिहीन असा मी एक तुझा दीन दास आहें १. अहो देवा, तुम्हीं माझें संरक्षण करा व मनांतील तळमळ दूर करा २. माझ्या ठिकाणीं कोणताही गुणदोष येऊं देऊं नका ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझे असंख्य अपराध झाले आहेत, त्याबद्दल क्षमा करा ४. [३८०]

खरोखर पाणी जर स्वच्छ नसेल, तर कितीही साबण वस्त्राला लाविला, तरी तो त्या वस्त्राला काय स्वच्छ करील? १. त्याप्रमाणें चित्त शुद्ध नसेल, तर त्याला आत्मबोधाचा उपयोग काय होईल? २. वृक्षाला जर फूल फळ येत नाहीं, तर वसंतऋतु काय करील? ३. वांझ स्त्रीला मुलें होत नाहींत तर पतीनें काय करावें? ४. नपुंसक नवऱ्यापुढें बायकोनें काय करावें? ५. जीव गेल्यावर शरीर कोणता व्यवहार करील? ६. तुकाराम महाराज म्हणतात, पाण्यावांचून धान्य पिकणार नाहीं ७. [३८१]

अहो देवा, आम्ही मोठ्या नवससायासानें तुम्हांला दुर्मिळ मुलें झालों आहोंत १. आमच्यावांचून तुमचें नांव तरी कोण घेतें? देवा, तुम्हाला कोणीं पिंडदान दिलें असतें? २. आमच्याखेरीज मागें पुढें तुम्हांला स्पष्ट बोलणारें असें कोण आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, आम्ही जर तुम्हांला झालों नसतों तर आपण कोणाला पदरांत घेतलें असतें? ४. [३८२]

शेत पेरणारा, एका बीजाचा नाश करून, (म्ह० मातींत घालून) त्यापासून आलेलें शेंकडोंशें दाण्यांनीं युक्त कणीस, त्याचा उपभोग घेतो १. लहानापासून मोठ्यांपर्यंत जीवांना ही गोष्ट कळत आहे २. आपला जीव खर्चीं घातल्यावांचून फुकट लाभ होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, रणामध्यें शूरानें जीव देण्यांत दुप्पट लाभ होतो. (म्हणजे इहलोकीं कीर्ति होते व परलोकाची प्राप्ति होते.) ४. [३८३]

आजपर्यंत आयुष्य व्यर्थ गेलें. त्यामुळें मोठें नुकसान झालें आहे १. अहो हरी, आतां तरी आमचा उद्धार करण्याविषयीं धांव घ्या. काय पाहात बसलांत? २. हें माझें, हें तुझें, असें म्हणण्यांतच आयुष्याचे दिवस जाऊन, अखेर तोंडांत

भवनदी ॥ ४ ॥ पडिला विषयाचा घाला । तेणें नागविलें मला ॥ ५ ॥ शरण आलों आतां धांवें । तुका म्हणे मज पावें ॥ ६ ॥ [३८४]

सोसोनि विपत्ती । जोडी दिली तुझे हातीं ॥ १ ॥ त्याचा हाचि उपकार । अंतीं आम्हाशीं वेव्हार ॥ २ ॥ नामरूपा केला ठाव । तुज कोण म्हणतें देव ॥ ३ ॥ तुका म्हणे हरी । तुज ठाव दिला घरीं ॥ ४ ॥ [३८५]

आपुलें मागतां । काय नाहीं आम्हां सत्ता ॥ १ ॥ परि या लौकिकाकारणें । उरी ठेविलें बोलणें ॥ २ ॥ येचि आतां घडी । करूं बैसों तेचि फडी ॥ ३ ॥ तुका म्हणे करितों तुला । ठाव नाहींसा विठ्ठला ॥ ४ ॥ [३८६]

असो आतां किती । तुज यावें काकुलती ॥ १ ॥ माझें प्रारब्ध हें गाढें । तूं बापुडें तयापुढें ॥ २ ॥ सोडविन आतां । ब्रीदें तुझी पंढरिनाथा ॥ ३ ॥ तुका म्हणे बळी । तो गांढ्याचे कान पिळी ॥ ४ ॥ [३८७]

काय नव्हे केलें । एका चिंतितां विठ्ठलें ॥ १ ॥ सर्वसाधनांचें सार । भवसिंधु उतरी पार ॥ २ ॥ योग याग तपें । केलीं तयानें अमुपें ॥ ३ ॥ तुका म्हणे जपा । मंत्र त्रिअक्षरी सोपा ॥ ४ ॥ [३८८]

हो कां दुराचारी । वाचे नाम जो उच्चारी ॥ १ ॥ त्याचा दास मी अंकित । कायावाचामनेंसहित ॥ २ ॥ नसो भाव चित्तीं । हरिचे गुण गातां गीतीं ॥ ३ ॥ करी अनाचार । वाचे हरिनाम उच्चार ॥ ४ ॥ हो कां मलतें कूळ । शुचि अथवा चांडाळ ॥ ५ ॥ म्हणवी हरीचा दास । तुका म्हणे धन्य त्यास ॥ ६ ॥ [३८९]

मार्ग पडायची २. मन तर क्षणभरही फुरसत घेऊं देत नाहीं. तें जन्ममृत्युरूपी भवनदींत बुडवीत आहे ४. पंचविषयरूपी दरोडेखोरानें मला लुटून घेतलें आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, मी तुम्हांला शरण आलों आहें, आतां तुम्हीं मजवर कृपा करावी ६. [३८४]

हे देवा, आजपर्यंत दारिद्र्यदुःख भोगून खालीं दर्शविलेली प्राप्ती तुला करून दिली १. त्या संबंधानें आमचे काय हेंच उपकार फेडिलेस, कीं अखेरीस आम्हांला तूं टाकून दिलेंस? २. आम्ही आपल्या भक्तिभावानें नामरूपात्मक सगुण तुला केलें. नाहीं तर तुला देव कोणीं म्हटलें असतें? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे हरी, तुला नामरूपाच्या घरांचा आश्रय आम्हीं दिला ४. [३८५]

आमची वस्तु मागावयास आम्हांला हक्क नाहीं काय? १. पण देवा, ती जर आम्ही मोठ्या जोरानें मागितली असती, तर आपला मोठा दुर्लौकिक झाला असता, म्हणून तसें बोललों नाहीं २. आम्ही आपले आतां या घटकेसच बसून तुमच्या आमच्या व्यवहाराचा निकाल करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, तुमचा ठावठिकाण नाहींसा करून टाकितों ४. [३८६]

हे देवा, असो. आतां तुझ्याजवळ किती काकुळती करावी? १. माझें प्रारब्ध जबरदस्त आहे, त्यापुढें तूं दीन आहेस २. अहो पंढरीनाथा, मी पतितपावन आहें वगैरे तुम्ही स्वीकारलेलीं ब्रीदें मी तुम्हांला टाकावयास लावीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो बळी असतो तो निर्बळी गांढ्याचे (दुर्बळाचे) कान पिळतो, असा नियम आहे ४. [३८७]

एका विठ्ठलाचें चिंतन करण्यांत कोणती गोष्ट घडत नाहीं? सर्व कांहीं घडतें १. विठ्ठलचिंतन हें सर्व साधनांचें सार आहे व तें संसारसमुद्रांतून पार उतरून नेतें २. विठ्ठलचिंतन करण्यानें असंख्य तपें केल्याचें आणि असंख्य याग केल्याचें श्रेय मिळतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, विठ्ठल हा तीन अक्षरी जप तुम्ही करा ४. [३८८]

दुराचरण करणारा कां असेना, परंतु हरीच्या नामाचा जर उच्चार करीत आहे १. तर त्याचा मी कायावाचामनानें दास आहें २. हरीचे गुण गाण्यामध्यें चित्तांत भाव नसला तरी चालेल ३. अनाचार करीत आहे, पण वाचेनें हरिनामाचा उच्चार करीत आहे ४. त्याचें कुळ शुद्ध अगर चांडाळ पाहिजे तें असो ५. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्याला हरीचा दास म्हणवितो आहे तो धन्य आहे ६. [३८९

हाकेसरशी उडी । घालूनियां स्तंभ फोडी ॥ १ ॥ ऐसी कृपावंत कोण । माझे विठाईवांचून ॥ २ ॥ करितां आठव । धांवोनियां घाली कव ॥ ३ ॥ तुका म्हणे गीतीं गातां । नामें द्यावी सायुज्यता ॥ ४ ॥ [३९०]

लोह चुंबकाच्या बळें । उभें राहिलें निराळें ॥ १ ॥ तैसा तूंचि आम्हाठायीं । खेळतोसी अंतर्बाहीं ॥ २ ॥ भक्ष अग्नीचा तो दोरा । त्यासि वांचवी मोहरा ॥ ३ ॥ तुका म्हणे अश्लीलपणें । नेली लांकडें चंदनें ॥ ४ ॥ [३९१]

डोई वाढवूनि केश । भूतें आणिती अंगास ॥ १ ॥ तरी ते नव्हती संतजन । तेथें नाहीं आत्मखुण ॥ २ ॥ मेळवूनि नरनारी । शकुन सांगती नानापरी ॥ ३ ॥ तुका म्हणे मैंद । नाहीं त्यांपासीं गोविंद ॥ ४ ॥ [३९२]

गाढवाचें घोडें । आम्ही करूं दृष्टीपुढें ॥ १ ॥ चवळी वाहाणा । मावारिया बांडा सुना ॥ २ ॥ सोंगसंपादणी । तरि करूं शुद्ध वाणी ॥ ४ ॥ तुका म्हणे खेळ । करूं समयीं निर्मळ ॥ ४ ॥ [३९३]

बाप मेला न कळतां । नव्हती संसाराची चिंता ॥ १ ॥ विठो तुझें माझें राज्य । नाहीं दुसऱ्याचें काज ॥ २ ॥ बाईल मेली मुक्त झाली । देवें माया सोडविली ॥ ३ ॥ पोर मेलें बरें झालें । देवें मायाविरहित केलें ॥ ४ ॥ माता मेली मज देखतां । तुका म्हणे हरली चिंता ॥ ५ ॥ [३९४]

योग तप याचि नांवें । गळित व्हावें अभिमानें ॥ १ ॥ करणें तें हेंचि करा । सत्यें बरा व्यापार ॥ २ ॥ तरि खंडे येरझारा । निघे भार देहाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे मानामान । हें बंधन नसावें ॥ ४ ॥ [३९५]

प्रल्हादानें नारायणनामानें हांक मारल्याबरोबर देव त्याकरितां धांव घेऊन खांब फोडून प्रगट झाले १. अशी कृपावंत माझ्या विठाई माऊलीवांचून कोण आहे? २. तिचा आठव केल्याबरोबर मोठ्या प्रेमानें धांव घेऊन ती आठव करणारास मिठी घालते ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरीचें नाम गाण्यानें सायुज्यता मिळते ४. [३९०]

चुंबकाच्या आकर्षणानें लोखंड निराळें उभें राहातें १. त्याप्रमाणें आमच्या आंतबाहेर देवा, तुम्ही खेळत आहांत २. दोरा हा अग्नीचा भक्ष्य आहे, पण तो मोहरा या नांवाच्या खड्यास गुंडाळून टाकिला असतां जळत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, चंदनाच्या वृक्षाचे योगानें, इतर वृक्षांचे पूर्वीचे गुणधर्म जाऊन, त्यांत चंदनाचा सुगंधी गुण येतो ४. [३९१]

डोक्यावर केंस वाढवून कित्येक ढोंगी आपल्या अंगांमध्यें भूतें आणतात १. पण तेवढ्यानें ते संत होत नाहींत, कारण आत्मानुभवाची खूण तेथें नसते २. कांहीं मूर्ख पुरुष व कांहीं बायका जमवून कित्येक नाना प्रकारचे शकुन सांगतात. ३. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या मैंदांजवळ (लबाड-ढोंग्याजवळ) खरोखर गोविंद राहात नाहीं ४. [३९२]

मनइंद्रियांचे आधीन झालेला जो मनुष्य गाढव, त्यास आम्ही आपले समक्ष मूल्यवान घोडें, म्हणजे जितेंद्रिय असा साधु, करूं १. बांड्या कुत्र्याप्रमाणें तो पुनः पुनः वहाणा चघळतो म्हणजे पुनःपुनः नीच कर्म करितो २. जरी तो सोंगसंपादणीनें (ढोंगीपणाने) वागत असला तरी त्याची वाचा शुद्ध करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जरी कोणी खळ (नष्ट) असला तरी प्रसंगीं आम्ही त्याला शुद्ध करूं ४. [३९३]

जेव्हां मला कळत नव्हतें व संसाराची काळजीही नव्हती तेव्हां बाप वारला १. अहो पांडुरंगा, तुमचें माझेंच राज्य आहे, आतां दुसऱ्याचें कांहीं कारण राहिलें नाहीं २. बायको वारली ती सुटली. हें फार बरें झालें; देवानें मायेपासूनच सोडविलें ३. मुलगा मेला. फार बरें झालें; देवानें मायेपासून निराळे केलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्यासमक्ष आई वारल्यामुळें मीं चिंतेपासून दूर झालों ५. [३९४]

आपण सर्वतोपरी देहाभिमानानें गलित होणें, ह्याच स्थितीला तप व योग म्हणतात १. जर कांहीं तुम्हाला परमार्थ कर्तव्य असेल, तर तुम्ही हेंच करा. हा व्यापार खरा असून उत्तम आहे २. तरच जन्ममृत्युरूपी येरझार नाहींशी होऊन देहसंबंधाचा भार दूर होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, मान-अपमानाचें बंधन नसावें, म्हणजे त्याविषयीं प्रीती-अप्रीति ठेवूं नये ४. [३९५]

करी संध्यास्नान। वारी खाउनियां अन्न ॥ १ ॥ तया नाहीं लाभहानी। आदा वेंचाचिये मानी ॥ २ ॥ मजुराचें धन। विळा दोरचि जतन ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं। अधीरासी देव कांहीं ॥ ४ ॥ [३९६]

वाखर घेउनि आलें। त्यासी तरवारेनें हालें ॥ १ ॥ नव्हे आपुलें उचित। करूनि टाकावें फजित ॥ २ ॥ अंगुळियां मोडी। त्यासी काय सिलें घोडी ॥ ३ ॥ नपुंसकासाठीं। तुका म्हणे नलगे जेठी ॥ ४ ॥ [३९७]

प्रेमसूत्र दोरी। नेतो तिकडे जातो हरी ॥ १ ॥ मनें सहित वाचा काया। अवघें दिलें पंढरीराया ॥ २ ॥ सत्ता सकळ तया हातीं। माझी कींव काकुलती ॥ ३ ॥ तुका म्हणे ठेवी तैसें। आम्ही राहों त्याचे इच्छें ॥ ४ ॥ [३९८]

पाववील ठायां। पांडुरंग चिंतिलिया ॥ १ ॥ त्यासी चिंतिलिया मनीं। चित्ता करी गंवसणी ॥ २ ॥ पावावया फळ। अंगीं असावें हें बळ ॥ ३ ॥ तुका म्हणे तईं। सिद्धि वोळंगती पायीं ॥ ४ ॥ [३९९]

धन्य भावशील। ज्याचें हृदय निर्मळ ॥ १ ॥ पूजी प्रतिमेचे देव। संत म्हणती तेथें भाव ॥ २ ॥ विधिनिषेध नेणती। एक निष्ठा धरुनी चित्तीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तैसें देवा। होणें लागे त्यांच्या भावा ॥ ४ ॥ [४००]

आधींच आळशी। वरी गुरूचा उपदेशी ॥ १ ॥ मग त्या कैंची आडकाठी। विधिनिषेधाची भेंटी ॥ २ ॥ नाचरवे धर्म। न करवे विधि कर्म ॥ ३ ॥ तुका म्हणे ते गाढव। घेती मनासवें धांव ॥ ४ ॥ [४०१]

स्नानसंध्या वेळचे वेळीं करितो व परान्न खाऊन ती निष्फळ करितो १. असल्या पुरुषाला कांहीं लाभही होत नाहीं व त्याचें नुकसानही होत नाहीं, तर जमाखर्च बरोबर होतो २. मजुरानें मजुरी करून मिळविलेलं धन सर्व जाऊन खालीं शिल्लक गवत कापावयाचा विळा व त्यास बांधण्याचा दोर एवढेंच राहातें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्यामध्यें सात्त्विक धैर्य नाहीं, त्याला कधींहि देव मिळत नाहीं ४. [३९६]

कोणीएक सामान्य न्हावी एका शूर शिपायाचे अंगावर वस्तरा घेऊन धांवला; तें पाहून ते शिपाई त्यावर तरवार उपसून मारावयास धांवला १. अरे गृहस्था, त्याजवर तरवार घेऊन धांवणें हें तुला योग्य नाहीं. "तेथें बस. मूर्खा, काय गडबड लावली आहेस?" अशा भाषणानें त्याला फजीत करावें इतकेंच २. केवळ अतिरागानें दुसऱ्यावर बोटें मोडणारा जो हिजडा, त्याचें पारिपत्य करण्यास शिपाई व घोडेस्वार काय करावयाचे आहेत? ३. तुकाराम महाराज म्हणतात, नामर्दाचे पारिपत्याकरितां मल्लाची जरूरी नाहीं ४. [३९७]

हरीविषयीं असणारें भक्तामध्यें जें एक प्रेम, तोच भगवंताला बांधलेला दोरा आहे; या दोऱ्यानें जिकडे भक्त हरीला ओढून नेईल तिकडे तो जातो १. भक्तांनीं देवाला मनासहवर्तमान काया आणि वाचा हीं अर्पण केलीं आहेत २. सर्व सत्ता देवाच्या हातीं आहे त्या ठिकाणीं मी कींवकाकुळती येतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो जसा ठेवील त्याप्रमाणें आम्ही राहूं ४. [३९८]

ज्या पदाची आपण इच्छा करूं, त्या ठिकाणीं पांडुरंग आपल्याला नेऊन पोंचवील १. मनामध्यें त्याचें चिंतन केल्यानें, तो चित्ताला आपल्या स्वरूपानें वेढून टाकतो २. इच्छिलेलें फळ प्राप्त होण्यास अंगामध्ये भगवच्चिंतनाचें बळ पाहिजे ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या काळीं सिद्धि त्याची चरणसेवा करतात ४. [३९९]

ज्याचें हृदय शुद्ध आहे तो भाविक धन्य आहे १. जो देवाची प्रतिमा करून मोठ्या प्रेमानें तिचें पूजन करतो, संत सांगतात, त्याच ठिकाणीं त्याचा भाव आहे २. विधिनिषेध न जाणतां केवळ हरीविषयींची निष्ठा चित्तांत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाला त्यांचे भावासारिखें व्हावें लागतें ४. [४००]

जो शिष्य मूळचाच आळशी आहे, त्यावर त्याला गुरूचाही उपदेश त्याचे आळसाला अनुकूल असाच मिळाला १. मग विधिनिषेधाचे संबंधाचा अडथळा त्याला राहिला कोठें? २. आपल्या धर्माप्रमाणें आचरण करूं नये, विधियुक्त कर्मेंही करूं नये (असें त्याला वाटतें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे आपल्या मनोगताप्रमाणें वागतात ते मनुष्य नसून गाढव आहेत ४. [४०१]

नाचे टाळी पिटी। प्रेमें अंग धरणी लोटी ॥ १ ॥ माझे सखे ते सज्जन। भोळे भाविक हरिजन ॥ २ ॥ न धरिती लाज । नाहीं जनासवें काज ॥ ३ ॥ तुका म्हणे दाटे । कंठ नेत्रीं जळ लोटे ॥ ४ ॥ [४०२]

कथा करुनियां दावी प्रेमकळा । अंतरीं जिव्हाळा कुकर्माचा ॥ १ ॥ तुळसी खोवी कानीं दर्भ खोवी शेंडीं । लटिकी धरी बोंडी नासिकाची ॥ २ ॥ टिळा टोपी माळा देवाचें गवाळें । वागवी वोंगळें पोटासाठीं ॥ ३ ॥ गोसाव्याच्या रूपें हेरी परनारी । तयाच्या अंतरीं काम लोभ ॥ ४ ॥ कीर्तनाचे वेळे रडे पडे लोळे । प्रेमेंविण डोळे गळताती ॥ ५ ॥ तुका म्हणे ऐसे मावेचे मइंद । त्यापाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥ ६ ॥ [४०३]

पाखांड्यांनीं पाठी पुरविला दुमाला । तेथें मी विठ्ठला काय बोलों ॥ १ ॥ कांद्याचा खाणारा चोजवी कस्तुरी । आपण भिकारी अर्थ नेणे ॥ २ ॥ न कळे तें मज पुसती छळूनी । लागतां चरणीं न सोडिती ॥ ३ ॥ तुझ्या पायांविण दुजें नेणें कांहीं । तूंचि सर्वांठायीं एक मज ॥ ४ ॥ तुका म्हणे खीळ पडो त्यांच्या तोंडा । किती बोलों भांडा वादकांशीं ॥ ५ ॥ [४०४]

कलियुगीं कवित्व करिती पाखांड । कुशल हे भांड बहू झाले ॥ १ ॥ द्रव्य दारा चित्तीं प्रजांची आवडी। मुखें बडबडी कोरडेचि ॥ २ ॥ दंभ करी सोंग मानावया जग। मुखें बोले त्याग मनीं नाहीं ॥ ३ ॥ वेदाज्ञे करोनी न करिति स्वहित । नव्हती अलिप्त देहाहुनि ॥ ४ ॥ तुका म्हणे दंड साहील यमाचे । न करी जो वाचे बोले तैसें ॥ ५ ॥ [४०५]

विषयाचें सुख येथें वाटे गोड । पुढें अवघड यमदंड ॥ १ ॥ मारिती तोडिती झोडिती निष्ठुर । यमाचे किंकर बहुसाल ॥ २ ॥ असिपत्री तरुवर खैराचे इंगळ । निघतील ज्वाळ तैलपाकीं ॥ ३ ॥

जो मोठ्या प्रेमानें हरीचें नाम घेऊन नाचतो व टाळीही वाजवितो व त्या भरांत जमिनीवर लोटांगणें घालतो १. असे भोळे भाविक हरिभक्त मला प्रिय आहेत २. ते बिलकूल लाज धरीत नाहींत, कारण त्यांचें लोकांशींही कांहीं काम नसतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरीच्या प्रेमभरानें ज्याचा कंठ सद्गदित होऊन नेत्रांतून आनंदाश्रु येत आहेत (पुढें ध्रुवपद वाचावें) ४. [४०२]

जो देवाची कथा करून मोठें प्रेम दाखवितो आणि अंतःकरणामध्यें पापकर्म करण्याची प्रीति ठेवतो १. जो कानामध्यें तुळशीपत्र घालून शेंडीला दर्भ बांधतो व खोटेंच नाक धरून बसतो २. जो नीच द्वादश (बारा) टिळे लावतो, डोक्याला टोपी घालतो व गळ्यांत माळ घालतो व देवाची संबळी (वेताची करंडी, पेटी) आपल्याजवळ पोट भरण्याकरितां वागवितो ३. जो गोसाव्याचे (कयेकऱ्याचे) मिषानें दुसऱ्यांच्या बायकांवर पापदृष्टी ठेवितो ४. जो कथा करीत असतांना लोळतो, रडतो, पडतो; ज्याच्या डोळ्यांतून श्रीहरिप्रेमाखेरीज पाणी गळत असतें ५. तुकाराम महाराज म्हणतात, असले मायिक ढोंगी जे असतात त्यांच्याजवळ देव नाहींच नाहीं ६. [४०३]

हे देवा, नास्तिक लोकांनीं तर माझी पाठ पुरविली. त्यांच्याशीं मी काय बोलूं? १. केवळ कांदे खाणारा कस्तुरीचा विचार करूं लागला असतां, स्वतः भिकारी असल्यामुळें त्यास ती समजत नाहीं २. जी गोष्ट मला कळत नाहीं, ती पुनः मला त्रास देऊन विचारतात, न सांगितलें तर माझे पाय घट्ट धरतात, ते सोडीत नाहींत ३. देवा तुमच्या पायांवांचून मी कांहीं जाणत नाहीं. सर्व ठिकाणीं तुम्हीच मला एक आहां ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशा लोकांची वाचा बंद होवो. असल्या भांडखोर वाद करणाऱ्यांशीं मी किती बोलूं? ५. [४०४]

कलियुगामध्यें कविता करणारे पाखांडी आहेत. असे भांडखोर पुष्कळ कुशल कवि झाले आहेत १. आणि पैसा, बायको व मुलें ह्यांजविषयीं इच्छा मनांत ठेऊन तोंडानें पोकळ वैराग्याची बडबड करतात २. लोकांनीं आपल्याला मानावें म्हणून दांभिक साधुत्व मिरवितात, व तोंडानें त्यागाच्या गोष्टीही पुष्कळ बोलतात. पण त्यांपैकीं मनामध्यें एकही नसतें ३. वेदांनीं देहेंद्रियातीत सांगितलेल्या आत्मस्थितीनें देहाहून अलिप्त राहाण्याचें जें आपलें स्वहित, तें ते करीत नाहींत ४. तुकाराम महाराज म्हणतात, असले हे पुरुष यमदंड सहन करतील, कारण ज्याप्रमाणें वाणीनें बोलत आहेत त्याप्रमाणें ते वागत नाहींत ५. [४०५]

स्त्री-पुत्र-गृह-दारादिक विषय भोगण्याचें सुख येथें मोठें बरें वाटतें; पण पुढें यमाची शिक्षा भोगणें, हें मोठें कठीण आहे १. ते यमाचे दूत अशा ह्या विषयासक्तांना मोठ्या निर्दयपणानें मारतात, झोडतात, तोडतात. असें पुष्कळ वेळां

तप्तभूमीवरि चालविती पायीं । अग्निस्तंभ बाहीं कव(टा)ळविती ॥ ४ ॥ म्हणवूनि तुका येतो काकुलती। पुरे यातायाती गर्भवास ॥ ५ ॥ [४०६]

अल्प माझी मती । म्हणोनि येतों काकुलती ॥ १ ॥ मज दाखवा दाखवा । तुमचीं पाउलें केशवा ॥ २ ॥ धीर माझ्या मना । नाहीं नाहीं नारायणा ॥ ३ ॥ तुका म्हणे दया । मज करा अभागिया ॥ ४ ॥ [४०७]

वाटुली पाहातां सिणले डोळुले । दाविसी पाउलें कैं वो डोळां ॥ १ ॥ तूं माय माउली कृपेची साउली । विठ्ठले पाहिली वास तुझी ॥ २ ॥ कां बा मोकलिलें कोणा निरविलें । कठीण कैसें झालें हृदय तुझें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझ्या आसावल्या बाह्या । तुज क्षेम द्याया पांडुरंगा ॥ ४ ॥ [४०८]

देह हा सादर पाहावा निश्चित । सर्व सुख येथें नाम आहे ॥ १ ॥ ब्रह्म जें देखणें द्वैत जेव्हां गेलें । शरीर तें झालें ब्रह्मरूप ॥ २ ॥ यजन याजन तप व्रत करिती । विकल्पें नागवती शुद्ध पुण्या ॥ ३ ॥ तुका म्हणे सर्व सुख येथें आहे । भ्रांति दूर पाहें टाकुनियां ॥ ४ ॥ [४०९]

तुझे वर्णूं गुण ऐसी नाहीं मती । राहिल्या त्या श्रुती मौन्यपणें ॥ १ ॥ मान्यपणें वाचा थोंटावल्या चारी । ऐसें तुझें हरी रूप आहे ॥ २ ॥ रूप तुझें ऐसें डोळां न देखवे । जेथें हें झकवे ब्रह्मादिक ॥ ३ ॥ ब्रह्मादिक देवां कर्माची कचाटी । म्हणोनि आटाआटी फार त्यांसी ॥ ४ ॥ तुका म्हणे तुझें गुण नाम रूप । आहेसी अमूप वाणूं काय ॥ ५ ॥ [४१०]

मनवाचातीत तुझें हें स्वरूप । म्हणोनियां माप भक्ति केलें ॥ १ ॥ भक्तीचिया मापें मोजितों

करितात २. (यमलोकांत) ज्या वृक्षाचीं पानें तरवारीच्या धारेप्रमाणें आहेत, असे वृक्ष आहेत, खैरकाष्ठाचे इंगळ (निखारे) आहेत, व तापलेल्या तेलांतून ज्वाळा निघत आहेत. असल्या वृक्षांस आलिंगन द्यावयास लावतात, विस्तवावरून चालवितात व तापलेल्या तेलांत बुडवितात ३. अतिशय तापलेल्या जमिनीवर पायीं चालवितात. अग्नीप्रमाणें तप्त अशा लोखंडी खांबाला आलिंगन द्यावयाला लावितात ४. तुकाराम महाराज म्हणतात, असें आहे म्हणून अशा या विषयासक्तांना काकुळतीनें सांगतों, कीं अरे आतां गर्भवास देणाऱ्या खटाटोपींत पडूं नका. ती पुरे झाली ५. [४०६]

अहो देवा, मी अल्प बुद्धीचा आहें, म्हणून आपल्यालापुढें काकुळतीला येतों १. अहो केशवा, मला तुमचे चरण दाखवा, दाखवा (असें द्विरुक्तीनें म्हणतात) २. अहो नारायणा, ह्याविषयीं माझ्या मनाला दम नाहीं नाहीं (असें द्विवार सांगतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी अति करंटा आहें, म्हणून तुम्हीं मजवर दया करा ४. [४०७]

अहो देवा, तुमची वाट पाहून माझे डोळे श्रमी झाले. कधीं तुम्हीं माझ्या डोळ्यांना आपले चरण दाखवाल? १. हे विठाबाई, तूं आमची आई आहेस आणि कृपेची छाया आहेस, म्हणून तुझी वाट पाहात आहें २. देवा, तुम्ही कशा-करितां मला टाकिलें? तुम्हीं मला कोणाच्या स्वाधीन केलें? असें तूं आपलें हृदय कठीण कां केलेंस? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, तुम्हांला आलिंगन देण्याविषयीं माझे बाहु उत्सुक झाले आहेत ४. [४०८]

मोठ्या दक्षतेनें ह्या देहाविषयींचा विचार केला, तर येथें हरीचें नाम हेंच सर्व सुखाला आधार आहे १. ज्या काळीं द्वैतबुद्धीचा निरास होतो, त्या काळीं ब्रह्मसाक्षात्कार होऊन शरीरहि ब्रह्मरूप होतें २. कित्येक याग करतात अगर करवितात, नाना प्रकारचीं तपें व व्रतें करितात, परंतु आंत फलाचा हेतु व मी देह आहें अशी अहंता असल्यामुळें ते शुद्ध पुण्याईला अंतरतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, एक हरीच्या नामामध्येंच सर्व सुख आहे. देह, स्त्री, पुत्र, धन ह्यांच्यापासून मला सुख होईल अशी ही भ्रांति टाकून जर पाहाशील तर कळून येईल ४. [४०९]

अहो देवा, तुमचे गुण वर्णन करील अशी माझी बुद्धि नाहीं. जेथें वेद वर्णन करितां करितां स्तब्ध झाले १. त्याच-प्रमाणें परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी ह्या चारी वाणी कुंठित झाल्या, दे देवा, अशा प्रकारचें तुमचें स्वरूप आहे २. तुमच्या रूपाला डोळ्यांनीं देखील पाहावत नाहीं. जेथें ब्रह्मादिक फसले गेले (तेथें माझी काय कथा?) ३. ब्रह्मादिक देवांना सृष्टिनिर्माण करण्याची कर्मकचाटी लागली आहे, म्हणून त्यांनाहि (तुझी कृपा संपादन करण्याचा) खटाटोप फार आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुमचें नांव, तुमचे गुण, तुमचें रूप हीं असंख्य आहेत, म्हणून त्यांचें वर्णन कसें करूं? ५. [४१०]

हे देवा, तुझें स्वरूप काया, वाचा आणि मन ह्या तत्त्वांच्या पलीकडचें आहे. ह्याकरितां तुझ्या प्रेमलक्षण भक्तीचें माप केलें आहे १. तूं देशकालवस्तुपरिच्छेदशून्य असा अनंत आहेस, तरी मी तुला घर निर्दिष्ट केलेल्या भक्तीच्या मापानें

अनंता । इतरानें तत्वतां न मोजवे ॥ २ ॥ योग याग तपें देहाचिया योगें । ज्ञानाचिया लागें न सांपडसी ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही भोळ्याभावें सेवा । घ्यावी जी केशवा करितों ऐसी ॥ ४ ॥ [४११]

जंववरी नाहीं देखिली पंढरी । वर्णीतील थोरी वैकुंठीची ॥ १ ॥ मोक्षसिद्धि तेथें हिंडे दारोदारीं । होऊनि कामारी दीनरूप ॥ २ ॥ वृंदावन सडे चौक रंगमाळा । अभिनव सोहळा घरोघरीं ॥ ३ ॥ नाम घोष कथापुराणकीर्तनीं । ओंविया कांडणीं पांडुरंग ॥ ४ ॥ सर्व सुख तेथें असे सर्वकाळ । ब्रह्म तें केवळ नांदतसे ॥ ५ ॥ तुका म्हणे जें न साधे सायासें । प्रत्यक्ष तें दिसे विटेवरी ॥ ६ ॥ [४१२]

दुःख वाटे ऐसी ऐकोनियां गोष्टी । जेणें घडे तुटी तुझ्या पायीं ॥ १ ॥ येतो कळवळा देखोनियां घात । करितों फजित नाइकती ॥ २ ॥ काय करूं देवा ऐसी नाहीं शक्ति । दंडुनि पुढती वाटे लावूं ॥ ३ ॥ तुका म्हणे मज दावूं नको ऐसे । दृष्टीपुढें पिसे पांडुरंगा ॥ ४ ॥ [४१३]

शूकरासी विष्ठा माने सावकास । मिष्टान्नाची त्यास काय गोडी ॥ १ ॥ तेवीं अभक्तांसी आवडे पाखांड । न लगे त्यां गोड परमार्थ ॥ २ ॥ श्वानासी भोजन दिलें पंचामृत । तरी त्याचें चित्त हाडावरि ॥ ३ ॥ तुका म्हणे सर्पा पाजिलीया क्षीर । वमितां विखार विष झालें ॥ ४ ॥ [४१४]

रासभ धुतला महातीर्थामाजीं । नव्हे जैसा तेजी शामकर्ण ॥ १ ॥ तेवीं खळा काय केल्या उपदेश । नव्हेचि मानस शुद्ध त्याचें ॥ २ ॥ सर्पासी पाजिलें शर्करापीयुष । अंतरींचें विष जाऊं नेणे ॥ ३ ॥ तुका म्हणे श्वाना क्षिरीचें भोजन । सवेंचि वमन जेवीं तया ॥ ४ ॥ [४१५]

जेवीं नवज्वरें तापलें शरीर । लागे तया क्षीर विषतुल्य ॥ १ ॥ तेवीं परमार्थ जीहीं दुराविला । तयालागीं झाला सन्निपात ॥ २ ॥ कामीन जयाच्या जाहाली नेत्रासी । देखी तो चंद्रासी पीतवर्ण ॥ ३ ॥ तुका म्हणे मद्यपानाची आवडी । न रुचे त्या गोडी नवनीताची ॥ ४ ॥ [४१६]

समजतों (तुला सगुणाकार मानतों). इतर कोणत्याही साधनानें तुझी मोजदाद होणार नाहीं २. देहसंबंधानें योगयाग-तपादि साधनांनीं अथवा ज्ञानानें तूं हस्तगत होणार नाहींस ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं भोळ्या भावानें जशी तुमची सेवा करीत आहोंत तिचा तूं केशवा, स्वीकार कर ४. [४११]

जोंपर्यंत तूं पंढरी पाहिली नाहींस, तोंपर्यंत वैकुंठाचा मोठेपणा तूं वर्णन करशील १. तेथें मोक्ष आणि सिद्धि सांगितलेले काम करणारे चाकर होऊन दीनपणानें दारोदारीं फिरतात २. तेथें घरोघरीं तुळशीवृन्दावनें आहेत. सडासंमार्जन करून रांगोळ्यांचे पट्टे काढिले आहेत. असा हा उत्तम सोहळा आहे ३. तेथें कथा, पुराण, कीर्तन, नामघोष होत आहे, कांडण्यांत दळण्यांत पांडुरंगाला ओंव्या गात आहेत ४. तेथें सर्व सुख सर्व वेळेला असून तेथें साक्षात् ब्रह्म आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, मोठ्या सायासानें ज्याची प्राप्ती होत नाहीं, तें ब्रह्म पंढरीस प्रत्यक्ष विटेवर आहे ६. [४१२]

अहो देवा, ज्या योगानें तुमच्या पायांचा वियोग होत आहे, असली गोष्ट ऐकून मला दुःख होतें १. ह्या सर्व मनुष्यांचा प्रपंचसंगतीनें घात होत आहे, हें पाहून मला मोठा कळवळा येतो. ह्यामुळें मी त्यांची वेळोवेळीं फजिती करितों, परंतु ते ऐकत नाहींत २. हे देवा, काय करावें ? ह्यांना शिक्षा करून सन्मार्गाला लावावें, असें मजमध्यें सामर्थ्य नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, असे केवळ संसाराच्या प्रेमानें भकलेले, वेडे झालेले माझ्या दृष्टीपुढें येऊं देऊं नका ४. [४१३]

डुकराला स्वस्थपणानें विष्ठा खाणें आवडतें. त्याला मिष्टान्नाची कसली गोडी असणार ? १. त्याप्रमाणें अभक्तांना (नास्तिकपणा) पाखांड आवडतें, त्याला परमार्थ आवडत नाहीं २. पंचामृताचें जेवण कुत्र्यास घातलें, तरी त्याचें लक्ष हाडावर असतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्पाला दूध जरी पाजलें, तरी त्याचें सर्पानें वमन केलें असतां विष होतें ४. [४१४]

गाढव भागीरथीसारख्या तीर्थांत जरी धुतला, तरी तो मोठा तेजस्वी श्यामकर्ण घोडा होणार नाहीं १. त्याचप्रमाणें दुर्जनाला किती जरी उपदेश केला तरी तो निष्फळ आहे, कारण त्याचें मन शुद्ध नाहीं २. सापाला दुधांत साखर घालून जरी पाजलें, तरी त्याच्या आंतलें विष जाणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, कुत्र्यास दूध पाजलें तरी तें तत्क्षणींच ओकतें ४. [४१५]

ज्याचा देह नवज्वरानें तप्त झाला आहे, त्याला दूध विषासारखें कडू लागतें १. त्याचप्रमाणें ज्यानें परमार्थाचा त्याग केला, त्याला खरोखर सन्निपात झाला आहे २. ज्याच्या डोळ्याला कावीळ झाली आहे, तो चंद्राला पिवळा पाहातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याला दारू पिण्याची आवड आहे, त्याला लोण्याची रुचि नाहीं ४. [४१६]

आतां असो मना अभक्ताची कथा। न होई दुश्चिता हरिनामीं ॥ १ ॥ नये त्याची कदा गोष्टी करूं मात। जिव्हे प्रायश्चित्त त्याच्या नांवें ॥ २ ॥ प्रभातें न घ्यावें नांव माकडाचें। तैसें अभक्तांचें सर्वकाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां आठवूं मंगळ। जेणें सर्व काळ सुखरूप ॥ ४ ॥ [४१७]

नाम आठवितां सद्गदित कंठीं। प्रेम वाढे पोटीं ऐसें करीं ॥ १ ॥ रोमांच जीवन आनंदाश्रु नेत्रीं। अष्टांगही गात्रीं प्रेम तुझें ॥ २ ॥ सर्वही शरीर वेंचो या कीर्तनीं। गाऊं निशिदिनीं नाम तुझें ॥ ३ ॥ तुका म्हणे दुजें न करीं कल्पांतीं। सर्वदा विश्रांति संतां पायीं ॥ ४ ॥ [४१८]

जननी हे जाणे बाळकाचें वर्म। सुखदुःख धर्म जें जें कांहीं ॥ १ ॥ अंधापुढें जेणें दिधला आधार। त्याचा हा विचार तोचि जाणे ॥ २ ॥ शरणागता जेणें घातलें पाठीशीं। तो जाणे तेविशीं राखों तया ॥ ३ ॥ कासे लागे तया न लगती सायास। पोहणार त्यास पार पावी ॥ ४ ॥ तुका म्हणे जीव विठ्ठलाचे हातीं। दिला त्याची गति तोचि जाणे ॥ ५ ॥ [४१९]

नका वाटूं मन विधिनिषेधांसी। स्मरावा मानसीं पांडुरंग ॥ १ ॥ खादलिया अन्ना मासी बोलों नये। अवघेंचि जाय एका घांसें ॥ २ ॥ जोडी होते परी ते बहु कठिण। करितां जतन सांभाळावें ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें न मना विषाद। निंबेंविण व्याध तुटों नये ॥ ४ ॥ [४२०]

नको होऊं देऊं भावीं अभावना। याचि नांवें जाणा बहु दोष ॥ १ ॥ मेघवृष्टि येथें होते अनिवार। जिव्हाळ्या उखर लाभ नाड ॥ २ ॥ उत्तमा विभागें कनिष्ठाची इच्छा। कल्पतरु तैसा

आतां हे मना, अभक्ताची गोष्ट राहूं दे. तूं मात्र हरिनामचिंतनाविषयीं उदास होऊं नकोस १. तूं त्याच्याशीं बोलूं नकोस, कारण त्याचें नांव घेतलें तर जिव्हेस प्रायश्चित्त द्यावें लागतें २. सकाळचे प्रहरीं माकडाचें नांव जसें घेऊं नये, तसें अभक्ताचें सर्वकाळ घेऊं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मंगलाचाच निरंतर आठव करूं. त्या योगानें सर्व काळ सुखाचा असतो ४. [४१७]

हे देवा, तुमच्या नामाचें स्मरण केल्याबरोबर कंठ सद्गदित व्हावा, अशा प्रकारचें प्रेम आमच्या हृदयांत वाढेल असें तूं कर १. सर्वांगावर रोमांच उभे राहावेत, आणि घर्मबिंदु यावेत व नेत्रांतून आनंदाश्रु चालावेत आणि अष्टांगासहित सर्व इंद्रियांमध्यें तुझें प्रेम असावें २. माझ्या सर्व शरीराचा व्यय तुमचें कीर्तन करण्याकडे व्हावा, ह्याकरितां तुमचें नांव रात्रंदिवस गाऊं ३. तुकाराम महाराज म्हणतात, कल्पांत जरी झाला तरी याहून निराळें कांहीं करूं नकोस. सर्व काळ विश्रांति संतांचे पायीं आहे ४. [४१८]

बालकाला होणारे सुखदुःखादि जे जे कांहीं प्रकार ते ते सर्व आई जाणते १. ज्याप्रमाणें आंधळ्याला हातांत धरून चाललेला डोळस पुढें येणारे खाचखळगे, कांटेकुटे, मार्गआडमार्ग हे सर्व जाणतो, आणि ह्या सर्व संकटांतून आंधळ्याला चुकवून नेतो २. ज्याप्रमाणें एखाद्या मोठ्या शूराला कोणी एखादा संकटांत सांपडलेला निराश्रित शरण आला, आणि त्यानें त्याला आपले पाठीशीं घातलें, तर त्याचें सर्व संकटांतून रक्षण कसें करावें, ह्याविषयीं तो रक्षण करणारा जाणतो ३. पुरांतून नदीपलीकडे जाणाऱ्यानें एखाद्या पोहणाऱ्याची जर कांस धरली, तर त्याला पलीकडे जाण्याचे कांहीं कष्ट पडत नाहींत, कारण त्याला अनायासें पोहणारा पार घेऊन जातो ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही आपला जीव पांडुरंगाचे हातीं दिला आहे. आतां त्याची (जीवाची) चांगलीवाईट स्थिति तोच (पांडुरंग) जाणत आहे ५. [४१९]

विधि अगर निषेधाकडे आपल्या मनास फांकूं देऊं नका. एका पांडुरंगालाच मनामध्यें स्मरत जा. १. सगळें जेवण होत आलें आहे. मात्र शेवटचा घास खात असतांना घासामध्यें तुमच्या पोटांत माशी गेली, असें कोणी म्हणूं नये, कारण तसें म्हटल्यानें, त्या एका घासामुळें पोटांत गेलेलें सर्व अन्न उमळून बाहेर पडेल २. कोणत्याही गोष्टीचा लाभ होतो, पण त्याचें रक्षण करण्याचें काम मोठें कठीण आहे, म्हणून तें दक्षपणें रक्षण करावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्या ह्या बोलण्याविषयींचा विषाद मानूं नका. खरोखरच कडुलिंबाप्रमाणें कडु काढा दिल्यावांचून आंतली व्याधी दूर होत नाही ४. [४२०]

अहो देवा, तुमच्याविषयींचा जो मजमध्यें शुद्धभाव आहे, त्याविषयीं अभावना (अश्रद्धा) होऊं देऊं नका, कारण असें होण्यांतच मोठा दोष घडतो १. अनिवार मेघवृष्टीनें सुपीक जमिनीमध्यें लाभ होतो आणि उखर जमिनीमध्यें तोटा होतो २. कल्पतरूच्या खालीं बसून चांगली इच्छा केली, तर चांगलेंच फळ मिळेल आणि वाईट इच्छा केली, तर त्याप्रमाणें

फळे त्यासी ॥ ३ ॥ तुका म्हणे जिणें बहु थोडें आहे । आपुलिया पाहें पुढें बरें ॥ ४ ॥ [४२१]

त्याग तंव मज न वजतां केला । कांहींच विठ्ठला मनांतूनि ॥ १ ॥ भागलिया आला उबग सहज । न धरितां काज झालें मनीं ॥ २ ॥ देह जड झालें ऋणाच्या आभारें । केलें सं(व)सारें कासावीस ॥ ३ ॥ तुका म्हणे गेला आळस किळस । अकर्तव्य दोष निवारले ॥ ४ ॥ [४२२]

मढें झांकूनियां करिती पेरणी । कुणबियाचे वाणी लवलाहो(ही) ॥ १ ॥ तयापरी करीं स्वहित । आपुलें । जयासी फावलें नरदेह ॥ २ ॥ ओटीचया परिस मुठीचें तें वाढे । यापरी कैंवाड(डें) स्वहिताचें ॥ ३ ॥ नाहीं काळसत्ता आपुलिये हातीं । जाणते हे गुंती उगविती ॥ ४ ॥ तुका म्हणे पाहे आपुली सूचना । करि तो शहाणा मृत्युलोकीं ॥ ५ ॥ [४२३]

राजा चाले तेथें वैभव सांगातें । हें काय लागतें सांगावें त्या ॥ १ ॥ कोणी कोणा येथें न मनीजे फुका । कृपेंविण एका देवाचिया ॥ २ ॥ श्रृंगारिलें नाहीं तगों येत वरि । उमटे लौकरी जैसें तैसें ॥ ३ ॥ तुका म्हणे घरीं वसे नारायण । कृपेचि ते खूण साम्या येते ॥ ४ ॥ [४२४]

वत्स पळे धेनु धांवे पाठीलागीं । प्रीतीचा तो अंगीं आविर्भाव ॥ १ ॥ शिकविलें काय येईल कारण । सूत्र ओढी मना आणिकाच्या ॥ २ ॥ सांडिलें तें नाहीं येत मेळवितां । म्हणऊनि लाता

त्याला कल्पतरु फलद्रूप होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे हें आपलें आयुष्य फार थोडें आहे. एवढ्याकरितां ज्यांत आपलें खरोखरच पुढें कल्याण आहे, अशा गोष्टीचा तूं विचार कर ४. [४२१]

अहो देवा, कोणत्याही गोष्टीचा माझ्या मनांतून वीट न येतां सहजीं त्याग झाला १. प्रपंचाच्या दुर्दशेनें मी अति कष्टी झाल्यामुळें सहज सर्व गोष्टींचा त्रास आला; त्यामुळें मनांत त्याग करण्याचें न येतां, सहज तो झाला २. प्रपंचामध्यें सावकाराचें अतिशय ऋण झाल्यामुळें त्याच्या भारानें मला कांहीं सुचेनासें होऊन माझा देह सहजीं सर्वकर्तव्यशून्य असा जड झाला आणि या संसारआपदेनें मला तळमळायला लावलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा ह्या योगानें परमार्थाविषयींचा सर्व आळस व तिटकारा जाऊन अकर्तव्य (त्याज्य) जो संसार, त्यापासून होणाऱ्या सर्व दोषांचें निवारण झालें ४. [४२२]

शेतकी करणाऱ्या कुणबी लोकांची जात वाफशाच्या वेळेला पेरणीविषयीं इतकी दक्ष असते, कीं तशा त्या समयांत घरांतील मुलगा, अगर बाप, बायको कोणीही जरी मेलें, तरी त्याचें मढें झाकून, पेरणी करण्याकरितां मोठ्या तऱ्हेनें धांव घेतात १. त्याप्रमाणें ज्याला नरदेहाची प्राप्ती झाली आहे, त्यानें सर्व संसारांतील गोष्टी बाजूला ठेवून, ज्यामध्यें आपलें खरोखर हित आहे, असा परमार्थ करण्याविषयीं त्वरा करावी २. पेरणी करण्याकरितां ओटीमध्यें बीं घेऊन त्यांतील मूठभर दाणे पाभरीच्या चाड्यावर टेवतो. तेव्हां ते जमिनीमध्यें पडून ओटींतल्या दाण्यांपेक्षां अधिक वाढतात. त्याप्रमाणें उत्तरोत्तर आपलें स्वहित वाढविण्याविषयींचा तूं निर्धार टेव म्हणजे आपलें हित करण्याला कधींही उशीर करूं नकोस ३. कारण कोणत्या वेळेला काळ घाला घालील व आपल्याला मारील ह्याविषयी कांहीं नियम नाही. त्याचे हातून बचणें आपले स्वाधीन नाहीं, असें विचारी पुरुष पूर्णपणें जागून, ह्या संसाराच्या गुंताड्यांतून आपली सुटका त्वरित करून घेतात. ४. तुकाराम महाराज म्हणतात, ही जी मीं सर्व मनुष्यांना सूचना केलेली आहे, हिच्याकडे लक्ष देऊन अति त्वरेने ह्या मृत्युलोकांत जो आपलें हित करून घेतो, तो शहाणा आहे ५. [४२३]

जिकडे जिकडे म्हणून राजा जाईल, तिकडे तिकडे त्याचें सैन्यछत्रचामरादि सर्व वैभव साहाजिकच त्याचेबरोबर असतें. त्या राजाला मी देशांतराला जातों आहें, माझ्याबरोबर हें सर्व वैभव घेऊन तुम्ही चला, असें सांगावें लागतें काय? १. कोणी कोणाला देवाच्या कृपेवांचून उगीच थोर मानीत नाहीं २. कोणत्याही सामान्य वस्तूला बाहेरून पुष्कळ सुशोभित केलें, तरी तो सुशोभितपणा फार वेळ न राहातां, त्याचें खरें रूप काय आहे, हें थोडक्याच वेळांत प्रगट होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या हृदयरूपी घरांत नारायणाची वस्ती झाली आहे त्याचेवर नारायणाची पूर्ण कृपा आहे व ती समजण्याची खूण इतकीच, कीं त्याच्यामधील सर्व भूतभेद जाऊन त्याचा सर्वत्र अभेदभाव होतो ४. [४२४]

एखाद्या गाईचें वासरूं जर पुढें पळूं लागलें, तर त्याच्या पाठीमागें गायही धांवत जाते; त्याचें कारण त्या गाईमध्यें आपल्या वासराविषयींचा प्रेमभाव प्रगट असतो १. वासराच्या मागें जावें, असें गाईला शिकविलें, तर त्याचा काय उपयोग होईल? प्रेमतंतु हा दुसऱ्याच्या मनाला ओढतो २. आपलेंच वासरूं एकवार मोठें झाल्यावर गाय त्याला दूर करते. मग

मागें सारी ॥ ३ ॥ तुका म्हणे आग्रह करावा न लगे । सांगतसे हा गे अनुभव ॥ ४ ॥ [४२५]

देवाच्या संबंधें विश्वचि सोयरें । सूत्र ओढे दोरें एका एक ॥ १ ॥ आहाच ते नव्हे विटाया-सारिखें । जीव जीवनीं देखे सामावले ॥ २ ॥ आणिकांचें सुखदुःख उमटे अंतरीं । एथील इतरीं तेणें न्यायें ॥ ३ ॥ तुका म्हणे ठसावलें शुद्ध जाती । शोभाचि पुढती विशेषता ॥ ४ ॥ [४२६]

अवघा वेंचलों इंद्रियांचे ओढी । झालें तें तें घडी निरोपिलें ॥ १ ॥ असावा जी ठावा सेवेसी विचार । आपुला म्यां भार उतरिला ॥ २ ॥ काया वाचा मनें तोचि निजध्यास । येथें झालों ओस भक्तिभावें ॥ ३ ॥ तुका म्हणे करूं येईल धांवणें । तरि नारायणें सांभाळावें ॥ ४ ॥ [४२७]

राहो आतां हेंचि ध्यान । डोळा मन लंपट ॥ १ ॥ कोंडकोंडुन धरीन जीवें । देहभावें पूजीन ॥ २ ॥ होईल येणें कळसा आलें । स्थिरावलें अंतरीं ॥ ३ ॥ तुका म्हणे गोजिरिया । विठोबा पायां पडों द्या ॥ ४ ॥ [४२८]

आदि मध्य अंत दावियला दीपें । हा तो आपणापें यत्न बरा ॥ १ ॥ दासत्वें दाविलें धन्याचें भांडार । तो तो नव्हे सार येथूनियां ॥ २ ॥ उपायानें सोस नासला सकळ । सर्व सत्ताबळ अंगा आलें ॥ ३ ॥ तुका म्हणे दृष्टी सकळांचे शिरीं । वचनचि करी बैसोनियां ॥ ४ ॥ [४२९]

सांठविला वाण । पैस घातला दुकान ॥ १ ॥ जें ज्या पाहिजे जे काळीं । आहे सिद्धचि जवळी

तें वासरूं आणून कितीही बलात्कारानें तिच्या स्तनाला लाविलें, तरी ती त्याला पिऊं न देतां लाथ मारून दूर करते ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या अशा गोष्टींचा आग्रह कधींही करावा लागत नाहीं. हे अनुभवाचे उद्गार आहेत ४. [४२५]

एका देवाशीं खरोखर संबंध झाला, म्हणजे संपूर्ण विश्वाशीं त्याचा सोईरसंबंध होतो, कारण सर्वांतर्यामीं देव असल्यामुळें, साहाजिक एकमेकांच्या प्रेमसूत्रदोरीची ओढ एकमेकांना लागते १. अशा तऱ्हेची मैत्री वरवर दिसणारी व वीट येणारी नसून जीव, आपलें जीवन जो आत्माराम, त्या ठिकाणीं सामावले जातात, असें समजा २. दुसऱ्यांना झालेलें सुखःदुख ह्याच्या अंतःकरणामध्यें येतें. त्याच न्यायानें ह्याला झालेलें सुखदुःख इतर सर्वांना होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा तऱ्हेचा शुद्ध सर्वात्मभाव ब्रह्मनिष्ठाच्याच अंतःकरणांत ठसला जातो आणि त्या योगानें उत्तरोत्तर विशेष शोभाच वाढते ४. [४२६]

मी सर्व इंद्रियांच्या ओढीनें विषय सेवन करण्यांतच खर्ची पडलों. ह्याविषयीं ज्या ज्या घटकेला जें जें कांहीं घडलें तें तें मीं सर्व सांगितलें १. अहो देवा, अशा प्रकारच्या आमच्या ह्या सर्व सेवेसंबंधाचा विचार आपल्याला ठाऊक असावा. वास्तविक जो कांहीं असणारा प्रकार, जो जशाचा तसा आपल्याला कळविल्यामुळें, आतां माझ्यावरचा सर्व भार दूर झाला २. कायावाचामनानें विषयांचाच (ध्यास घेतला होता) निजध्यास केला, त्यामुळें आपल्याविषयींचा भक्तिभाव नाहींसा झाला ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, आपल्या मनांत रक्षण करण्याची इच्छा असेल तर माझें रक्षण करा ४. [४२७]

हें पांडुरंगाचें विटेवरील ध्यान माझ्या डोळ्यांपुढें जसेंचें तसें राहो, आणि माझें मन त्या ठिकाणीं सक्त (रत) होवो १. मग आपल्या जीवामध्यें त्या ध्यानाला कोंडून धरीन आणि मजमध्यें असणारा जो देहभाव, तो मी त्याला वाहून पूजा करीन २. अशा प्रकारें तें ध्यान माझ्या अंतःकरणामध्यें स्थिर झालें, म्हणजे ही गोष्ट कळसाला आल्यासारखी होईल (म्हणजे पूर्ण होईल.) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे गोजिरवाण्या देवा, मला तुमच्या पायां पडूं द्या ४. [४२८]

कोणत्याही अंधारांतील वस्तूचा आदि, अंत, मध्य दिवा दाखवितो; म्हणून आणि दीपाश्रयाचाच यत्न करावा हें बरें १. धन्याचा भांडारखाना आपण त्याचे सेवक झाल्यानें दिसतो. असें जोंपर्यंत झालें नाहीं, तोंपर्यंत आपल्या ठिकाणींच राहून सारभूत भांडारखाना गोचर होणार नाहीं २. मी हरीच्या भजनभक्तीचे उपाय केल्यानें, माझ्यामधील सर्व वैषयिक हांव नाहींशी होऊन, हरीच्या सत्तेचें बळ माझ्या ठिकाणीं पूर्ण आलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आमची दृष्टि सर्वांवर असून बसल्याजागीं आम्हीं सर्वांना आज्ञा करितों ४. [४२९]

भक्तिरूपी माल आम्ही आपल्या दुकानामध्यें सांठविला आहे. असें मोठें दुकान आम्हीं घातलें आहे १. ज्याला

॥ २ ॥ निवडिलें साचें । उत्तम मध्यम कनिष्ठाचें ॥ ३ ॥ तुका बैसला दुकानीं । दावी मोला ऐसी वाणी ॥ ४ ॥ [४३०]

लागलिया मुख स्तनां । घाली पान्हा माउली ॥ १ ॥ उभयतां आवडी लाड । कोडें कोड पुरतसे ॥ २ ॥ मेळवितां अंगें अंग । प्रेमरंग वाढतो ॥ ३ ॥ तुका म्हणे जड भारी । अवघें शिरीं जननीचे ॥ ४ ॥ [४३१]

अवगुण तों कोणी नाहीं प्रतिष्ठिले । मागें होत आले शिष्टाचार ॥ १ ॥ दुर्बळाच्या नांवें पिटावा डांगोरा । हा तो नव्हे बरा सत्यवाद ॥ २ ॥ मद्य आणि मधु एकारासी नांवे । तरि कां तें खावें आंधारें त्या ॥ ३ ॥ तुका म्हणे माझा उच्छिष्ट प्रसाद । निवडी भेदाभेद वृष्टिन्याय ॥ ४ ॥ [४३२]

भूतीं भगवंत । हा तों जाणतों संकेत ॥ १ ॥ भारी मोकलितो बाण । ज्याचा त्यासी कळे गुण ॥ २ ॥ करावा उपदेश । निवडोनि तरी दोष ॥ ३ ॥ तुका म्हणे वाटे । चुकतां आडरानें कांटे ॥ ४ ॥ [४३३]

आम्हां हें कौतुक जना द्यावी नीत । करावे फजीत चुकती ते ॥ १ ॥ कासयाचा बाध एकाच्या निरोपें । काय व्हावें कोपें जगाचिया ॥ २ ॥ अविद्येचा येथें कोठें परिश्रम । रामकृष्णनाम ऐसे बाण ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें खऱ्याचा विकरा । न सरती येरा खोट्या परी ॥ ४ ॥ [४३४]

दर्पणासी नखटें (नकटें) लाजे । शुद्ध खिजे देखोनि ॥ १ ॥ ऐसें अवगुणाच्या बाधें । दिसे सुधें विपरीत ॥ २ ॥ अंधळ्यासी काय हिरा । गाराचि तो सारिखा ॥ ३ ॥

ज्या वेळेस जी वस्तु पाहिजे असेल, ती त्या काळीं आमच्या दुकानीं सिद्धच आहे २. आमच्या दुकानीं उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ (सात्त्विक, राजस, तामस) प्रकारच्या भक्तीचा माल खरा खरा निवडून ठेविला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी या दुकानीं बसून जो कोणी जशी किंमत (भाव) देईल तसा त्याला माल दाखवितों ४. [४३०]

आईच्या स्तनाला बालकाचें मुख लागल्यावरोबर दुधाचा पान्हा आई सोडते १. व आईची बालकावर व बालकाची आईवर आवड असल्यामुळे परस्परांची परस्परांविषयीं लाडांची इच्छा पूर्ण होते २. बालकाचें आंग कुरवाळून आईनें प्रेमानें बालकाला मिठी मारल्याने प्रेमानंद अधिक वाढतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या बालकावर दुखणें बाणें वगैरे जें संकट येईल त्याची सर्व काळजी आईला असते ४. [४३१]

अवगुणाची स्थापना पूर्वी कोणीही केली नाहीं. पूर्वीपासून योग्य आचारच चालत आले १. असें असतांना एखाद्या गरीब निर्बलाच्या नांवाची उगीच दवंडी पिटविणें ही गोष्ट बरी नसून खरी नाहीं २. मध आणि मद्य या दोघांचीं नांवें एकाच वर्गांतलीं आहेत, तर मग दारू अंधारांत कां प्यावी? (अथवा "आधारें" असा पाठ घेतला तर तेवढ्या आधारानें दारू कां प्यावी?) ३. तुकाराम महाराज म्हणतात, व्यासादिक संतांनीं मेघवृष्टीप्रमाणें केलेल्या सहज उपदेशाचा उच्छिष्ट-प्रसाद मला प्राप्त झाला आहे (त्यांनीं सांगितलेल्या आधारांनींच मीं बोलत आहें), त्या योगानें गुण व अवगुण ह्यांची निवड होत आहे ४. [४३२]

सर्व भूतांमध्यें एका भगवंताची व्याप्ती आहे, ही खूण मी जाणतों १. म्हणून बाणवत् तीक्ष्ण उत्तरें बोलतों. हें ज्याच्यांत जसा गुण आहे तसें त्याला कळतें; अथवा ज्याच्या सत्तेनें वाग्बाण निघत आहेत, तो त्याचा गुण जाणतो २. दोषगुणांची निवड करून याथातथ्य उपदेश करावा ३. तुकाराम महाराज म्हणतात, वाट चुकून जर आडरानांत जाल तर कांटेच बोंचतील ४. [४३३]

आमचें हें कौतुक आहे, कीं अनीतीच्या मार्गानें चालणाऱ्या जीवांना नीतिमार्ग दाखवावा, आणि जे कोणी चुकत असतील त्यांची फजिती करावी १. एका परमात्म्याचा खराखुरा निरोप सांगण्यामध्यें काय बाध आहे? त्या संबंधानें कितीही जरी जन कोपले तरी त्यापासून काय व्हावयाचें आहे? २. ज्या ठिकाणीं रामकृष्णनामासारखे बाण सुटत आहेत तेथें अविद्येला थारा कोठें मिळेल? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं सत्य वस्तूचाच उपदेश होत आहे, म्हणून खोटा प्रकार येथें खपला जाणार नाहीं ४. [४३४]

नकटें मनुष्य आरशाला पाहून लज्जित होतें. तो आरसा जरी शुद्ध आहे, तरी त्याला पाहून नकटा लाजतोच १. अवगुणाची बाधा ज्याला आहे. त्याला वरील दृष्टांताप्रमाणें जें सरळ आहे तें वाकडें भासतें २. आंधळ्या माणसाला मोठा

तुका म्हणे भुंके सुनें(णें) । ठाया नेणें ठाव तो ॥ ४ ॥ [४३५]

नावडे तरी कां येतील हे भांड । घेउनियां तोंड काळें येथें ॥ १ ॥ नासोनियां जाय रस या संगतीं । खळाचे पंगती नारायणा ॥ २ ॥ तोंडावाटे नर्क काढी अमंगळ । मिष्टान्ना विटाळ करी सुनें(णें) ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं संतांची मर्यादा । निंद्य तोचि निंदा मायझवा ॥ ४ ॥ [४३६]

लेंकरा आइतें पित्याचें जतन । दावी निजधन सर्व जोडी ॥ १ ॥ यापरि आमचा जालासे सांभाळ । देखिलाचि काळ नाहीं आड ॥ २ ॥ भुकेचे सन्निध वसे स्तनपान । उपायाची भिन्न चिंता नाहीं ॥ ३ ॥ आळवूनि तुका उभा पैल थडी । घातली या उडी पांडुरंगें ॥ ४ ॥ [४३७]

शुद्ध चर्या हें संतांचें पूजन । लागतचि धन नाहीं वित्त ॥ १ ॥ सगुणाचे सोई सगुण विश्रांती । आपणचि येती चोजवीत ॥ २ ॥ कीर्तनींच वोळे कृपेचा ओरस । दूरीपणें वास संनिधता ॥ ३ ॥ तुका म्हणे वर्म सांगतों सवेगें । मन लावा लगें स्वहिताच्या ॥ ४ ॥ [४३८]

जीवींचें जाणावें या नांवें आवडी । हेंकड तें ओढी अमंगळ ॥ १ ॥ चित्ताच्या संकोचें कांहींच न घडे । अतिशय वेडे चार तेचि ॥ २ ॥ काळाविण कांहीं नाहीं रुचों येत । करूनि संकेत ठेवियेला ॥ ३ ॥ तुका म्हणे कळे वचनें चांचणी । काय बोलवुनि वेळोवेळां ॥ ४ ॥ [४३९]

कामातुर चवी सांडी । बरळ तोंडीं बरळे ॥ १ ॥ रंगलें तें अंगीं दावी । विष देववी आसडे ॥ २ ॥ धनसोसें लागे वेड । ते बडबड शमेना ॥ ३ ॥ तुका म्हणे (व्य)वेसनें दोन्ही । नर्कखाणी भोगावया ॥ ४ ॥ [४४०]

तेजस्वी मूल्यवान जरी हिरा असला, तरी त्याला तो निस्तेज गारेसारखाच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, कोणतेही योग्यायोग्य ठिकाण न जाणतां कुत्रें भुंकूं लागतें ४. [४३५]

परमार्थ जर ह्यांना आवडत नाहीं, तर हे असले भांडखोर काळें तोंड घेऊन आमच्याकडे पुनः पुन्हां येतात तरी कशाला? १. अहो नारायणा, परमार्थरस ह्या दुर्जनांच्या संगतीनें नासला जातो २. जे भ्रष्ट अमंगळ जीव असतात, ते नरकाप्रमाणें तोंडांतून शब्द काढतात. कुत्रें चांगल्या गोड अन्नाला तोंड लावून तें अन्न विटाळून टाकतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो संतांची मर्यादा राखीत नाहीं, तो निंद्य आहे. त्या मात्रागमन्याची तुम्हीं निंदा करा ४. [४३६]

लहान लेंकराला मातापित्यांचें आयतें संरक्षण मिळतें. पित्यानें जें द्रव्य व गृहवस्त्रादिक मिळवून ठेविलें असतें तें तो सर्व आपल्या मुलाला त्याच्या योग्यपणीं दाखवितो (त्याच्या स्वाधीन करितो) १. त्याप्रमाणें अहो देवा, तुम्हांकडून आमचा प्रतिपाळ झाला आहे. आम्हीं काळाला पाहिलेंच नाहीं २. बालकाला भूक लागल्याबरोबर जर स्तनपानाचा योग जवळच असेल, तर पोट भरण्याकरितां निराळा उपाय करण्याची कांहीं गरज नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी अशा प्रकारें पांडुरंगाला आळवून पलीकडील तीरावर उभा राहिलों. तें पाहून मला आश्रय देण्याकरितां पांडुरंगानें उडी टाकली ४. [४३७]

शुद्ध आचारविचारानें वागणें, हीच संतांची पूजा आहे. खरोखर ह्या पूजेला द्रव्यपुष्पादि सामुग्रीची जरूरी नाहीं १. हरीच्या सगुणरूपाच्या भक्तिमार्गानें गेलें तर विश्रांतिस्थान जें हरीचें सगुणरूप, तें आपलें आपण भक्ताला शोधीत येतें २. जरी हरि दूर आहे, तरी त्याच्या कीर्तनानें त्याचा कृपाप्रसाद होतो, म्हणजे त्यायोगानें तो जवळच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी हें मर्म तुम्हाला त्वरेनें सांगतों आहे, कीं तुम्ही आपलें मन स्वहिताच्या मार्गाकडे लावा ४. [४३८]

जीवांतील हेतु जाणणें, ह्यालाच प्रेम म्हणावें. जे हट्टी असतात त्यांची ओढ अमंगळाकडे असते १. चित्ताच्या अप्रसन्नतेनें कोणतेंही कार्य होत नाहीं. दुराग्रहानें कांहीं करणें हेच वेडेचार होत २. योग्य कालावांचून कोणतीही गोष्ट मान्य होत नाहीं, असा कर्त्यानें नियम करून ठेविला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, एखाद्याचा शब्दानेंच मला अदमास कळतो. त्याला वेळोवेळीं बोलविण्यांत काय अर्थ आहे? ४. [४३९]

कामासक्त पुरुष मर्यादा टाकतो, काय हवेंतसें तो मुखानें बरळतो १. ज्या रंगानें हृदय रंगलें असेल, तो तशीं चिन्हें अंगामध्यें दाखवितो. विष खालें आणि तें अंगांत भिनलें, म्हणजे तें माणसाला बेशुद्ध करून आचके द्यायला लावितें २ एखाद्याला द्रव्याच्या लोभानें वेड लागतें. मग त्याची बडबड थांबत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, स्त्री आणि धन हीं दोन्ही व्यसनें नरकखाणी भोगावयास लावणारीं आहेत ४. [४४०]

कृष्णांजनें झाले सोज्वळ लोचन । तेणें दिलें वान निवडूनि ॥ १ ॥ निरोपाच्या मापें करीं लडबड । त्याचें तेणें गोड नारायणें ॥ २ ॥ भाग्यवंता घरीं करितां विश्वासें । कार्य त्यासरिसें होईजेतें ॥ ३ ॥ तुका म्हणे पोट भरे बऱ्या वोजा । निज ठाव निजा निजस्थानीं ॥ ४ ॥ [४४१]

मैंद आला पंढरीस । हातीं घेऊनि प्रेमपाश ॥ १ ॥ पुढें नाडियलें जग । नेतो लागों नेदी माग ॥ २ ॥ उभारोनि बाहे । दृष्टादृष्टी वेधीताहे ॥ ३ ॥ वैकुंठींहुनि पेणें । केलें पंढरीकारणें ॥ ४ ॥ पुंडलिकें थारा । देऊनि आणिलें या चोरा ॥ ५ ॥ तुका म्हणे चला । तुम्ही आम्ही धरूं त्याला ॥ ६ ॥ [४४२]

भांडवी माउली कवतुकें बाळा । आपणा सकळा साक्षित्वेंसी ॥ १ ॥ माझी माझी म्हणे एक(ए)मेकां मारी । हें तों नाहीं दुरी उभयतां ॥ २ ॥ तुझें थोडें भातें माझें बहु फार । छंद करकर वाद मिथ्या ॥ ३ ॥ तुका म्हणे एके ठायीं आहे वर्म । हेंचि होय श्रम निवारितें ॥ ४ ॥ [४४३]

लटिकियाच्या आशा । होतों पडिलों वोळसा । होउनियां दोषा । पात्र मिथ्या अभिमानें ॥ १ ॥ बरवी उघडली दृष्टी । नाहीं तरी होतों कष्टी । आक्रंदसे (ते) सृष्टी । मात्र या चेष्टांनीं ॥ २ ॥ मरणाची नाहीं शुद्धी । लोभीं प्रवर्तली बुद्धी । परती तों कधीं । घडेचि ना मावारीं ॥ ३ ॥ सांचूनि मरे धन । लावी पोरांसी भांडण । नाहीं नारायण । तुका म्हणे स्मरीला ॥ ४ ॥ [४४४]

जवळी मुखापाशीं । असतां नेघे अहर्निशीं ॥ १ ॥ भवनिर्दाळण नाम । विठ्ठल विठ्ठल नासी काम ॥ २ ॥ सुखाचें शेजार । करूं कां नावडे घर ॥ ३ ॥ तुका म्हणे ठेवा । कां हा न करीच बरवा ॥ ४ ॥ [४४५]

कृष्ण परमात्म्याचें रूप हेंच कोणी अंजन त्यांनीं आपल्या बुद्धिरूपी डोळ्यांत घातल्यामुळें ते डोळे शुद्ध झाले, व त्या योगानें त्यांनीं खऱ्या व खोट्या पदार्थांची निवड केली १. नारायणाचे निरोप सांगण्याचीच मी खटपट करीत आहें, त्या योगानें नारायणाला ती खटपट गोड आहे २. भाग्यवानाच्या घरीं विश्वासानें नोकरी केल्याबरोबर त्या नोकराचें कार्य होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, पोट चांगल्या व्यवस्थेनें भरतें (इच्छा तृप्त होते) आणि जीवात्म्याला निजात्मठाव मिळतो (तो ब्रह्मरूप होऊन त्याला विदेहमुक्ति मिळते.) ४. [४४१]

हातामध्यें प्रेमाचा पाश घेऊन पांडुरंग हा मैंद (लबाड चोर) पंढरीमध्यें आला १. व तो जगाला फसवून ज्या ठिकाणचा कांहीं मागमूस लागत नाहीं त्या ठिकाणीं घेऊन जातो २. आणि आपले बाहू वर करून त्यानें दुसऱ्याच्या दृष्टीकडे दृष्टि दिली, कीं त्याला आपला वेध लावितो ३. ह्याकरितांच त्यानें वैकुंठाहून येऊन पंढरीस मुक्काम केला आहे. ४. ह्या चोराला पुंडलिकानें आणून आधार दिला आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, चला तुम्ही आम्ही जाऊ व त्याला धरूं ६. [४४२]

मोठ्या कौतुकानें आपापसांत आई आपल्या मुलांचें भांडण लावून आपण साक्षित्वानें राहून मजा पाहाते १. एका मुलाला माझें म्हणते व दुसऱ्याला मारिते, तथापि त्या उभयतांविषयींच्या प्रेमांत कांहीं अंतर नाहीं २. तुझा खाऊ थोडा आहे व माझा पुष्कळ आहे, अशीं तीं मुलें आपापसांमध्यें हट्ट घेऊन उगीच भांडण करितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याचें सर्व वर्म एक आईच्या ठिकाणींच आहे. त्यांना होणारे जे श्रम त्यांचें ती निवारण करिते ४. [४४३]

खोटा देह, स्त्री, पुत्र व घर इत्यादिकांच्या आशेमुळे मी जन्ममृत्यूच्या भोंवऱ्यामध्यें पडलों होतों. या अशा खोट्याचा अभिमान घेतल्यामुळें सर्व दोषांना मी पात्र झालों होतों १. पण इतक्यामध्यें माझी उत्तम आत्मदृष्टि उघडली. नाहीं तर मी या मिथ्याच्या संगतीनें फार दुःखी झालों असतों, असा, ह्या मिथ्या देहाभिमानाच्या चेष्टेनेंच, सर्व जग आक्रोश करीत आहे २. मरणाची आठवण नाहीं. नाना प्रकारच्या विषयलोभाकडे बुद्धीची प्रवृत्ति झाली आहे. तेथून परत माघारीं तिचें येणें घडत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, एखादा द्रव्य पुष्कळ मिळवून सांठवतो आणि आपण अखेरीस मरून जातो व पश्चात् त्या पैशाकरितां आपापसांत पोरांचें भांडण लागतें. तो जिवंत असतांना, त्यानें एक घटकाभरदेखील नारायणाचें स्मरण केलें नाहीं ४. [४४४]

हरीचें नाम तुझ्याजवळच म्हणजे तुझ्या तोंडापाशीं आहे. मग तूं तें रात्रंदिवस कां घेत नाहींस? १. विठ्ठलनाम हें संसाराचा निरास करून अनेक प्रकारच्या कामनांचा नाश करणारें आहे २. हें नाम सुखाचें शय्यागृह करण्याचें ह्याला कां आवडत नाहीं? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या हरीच्या नामाचा उत्तम ठेवा तूं आपल्याजवळ कां करून ठेवीत नाहींस? ४. [४४५]

वरवें देशाव(उ)र झालें। काय बोलें बोलावें ॥ १ ॥ लाभें लाभ दुणावला। जीव धाला दर्शनें ॥ २ ॥ भाग्यें झाली संतभेटी। आवडी पोटीं होती ते ॥ ३ ॥ तुका म्हणे श्रम केला। अवघा आला फळासी ॥ ४ ॥ [४४६]

सांगतां हें नये सुख। कीर्ति मुख न पुरे ॥ १ ॥ आवडीनें सेवन करूं। जीवींचें धरूं जीवींच ॥ २ ॥ उपमा या देतां लाभा। कासया (काशा) शोभा सारिखी ॥ ३ ॥ तुका म्हणे नुचलीं डोई। ठेविली पायीं संतांचे ॥ ४ ॥ [४४७]

आपुलाला लाहो करूं। केणें भरूं हा विठ्ठल ॥ १ ॥ भाग्य पावलों या ठायां। आतां काया कुरवंडी ॥ २ ॥ पुढती कोठें घडे ऐसें। बहुतां दिसें फावलें ॥ ३ ॥ तुका म्हणे जाली जोडी। चरण घडी न विसंबें ॥ ४ ॥ [४४८]

उजळलें भाग्य आतां। अवघी चिंता वारली ॥ १ ॥ संतदर्शनें हा लाभ। पद्मनाभ जोडला ॥ २ ॥ संपुष्ट हे हृदयपेटी। करूनि पोटीं सांठवूं ॥ ३ ॥ तुका म्हणे होता ठेवा। तो या भावा सांपडला ॥ ४ ॥ [४४९]

आम्हांसी आपुलें नावडे संचित। चरफडी चित्त कळवळ्यानें ॥ १ ॥ न कळतां झाला खोळंबा मारगा। जगीं झालों जगा बहुरूपी ॥ २ ॥ कळों आलें बरें उघडले डोळे। कर्णधार मिळे तरी बरें ॥ ३ ॥ तुका म्हणे व्हाल ऐकत करुणा। तरी नारायणा उडी घाला ॥ ४ ॥ [४५०]

बरगासाठीं खादलें शेण। मिळतां अन्न न संडी ॥ १ ॥ फजित तो केला आहे। ताडण साहे

प्रतिग्रहाचा (घेण्याचा, प्राप्तीचा) व्यवहार चांगला झाला, तो शब्दानें काय सांगावा ? १. मनुष्यदेहाच्या लाभानें संतदर्शनाचा लाभ झाला व त्या योगानें जीव समाधान पावला २. व माझ्या हृदयामध्यें संतांची भेट व्हावी अशी आवडी होती, त्याप्रमाणें माझ्या भाग्योदयानें ती गोष्ट घडून आली ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी आजपर्यंत जो परमार्थाचा श्रम केला तो पूर्ण सफल झाला ४. [४४६]

संतप्रसादानें जें मला सुख जाहलें आहे तें सांगतां येत नाहीं व त्याची महती वर्णन करण्याला माझें मुख पुरें पडत नाहीं १. आम्ही त्या सुखाचा प्रीतीनें भोग घेऊं व तें जीवांतच धरून राहूं २. हा जो लाभ झाला आहे, त्याला उपमा द्यावयास गेलें, तर त्याचा चांगलेपणा कशासारखा आहे म्हणून सांगावें ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी जें संतांच्या चरणावर मस्तक ठेविलें आहे, तें कधींही उचलणार नाहीं ४. [४४७]

आपण त्वरा करून हा विठ्ठरूपी माल भरूं. ह्या ठिकाणीं मी प्राप्त झालों हें मोठें भाग्य आहे १. म्हणून त्यावरून देह ओंवाळून टाकीन २. कारण कीं, पुनः असा लाभ कोठें मिळणार आहे ? हा लाभ पुष्कळ दिवसांनीं प्राप्त झाला आहे. ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरिचरणाचा जो लाभ झाला आहे, तो मी घटकाभरदेखील विसंबणार (दूर करणार) नाहीं ४. [४४८]

आतां माझें भाग्य उदयाला आलें आहे, त्यामुळें माझ्या हृदयांतली संपूर्ण चिंता नाहींशी झाली १, मला जो देवाच्या भेटीचा योग झाला, तो केवळ संतदर्शनानेंच होय २. मी आपल्या हृदयरूपी लहानशा पेटींत देवाला सांठवून ठेवीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवरूपी ठेव मुळचीच माझ्या ठिकाणीं होती, ती मजमधील असणाऱ्या शुद्ध भावाच्या हातीं लागली ४. [४४९]

देवा, आम्हांला आमचें संचित (प्रारब्ध) कर्म आवडत नाहीं. ह्या तळमळीनें आमचें चित्त रात्रंदिवस चरफडत आहे! १. खरोखर अज्ञानानें परमार्थाचे मार्गांत खोळंबा झाला, आणि जगामध्यें ज्याच्या त्याच्या स्वभावाप्रमाणें वागणारा मी एक बहुरूपी झालों २. ह्या सर्व गोष्टी चांगल्या तऱ्हेनें कळून येऊन विचाराची दृष्टि उघडली. आतां ह्या भवनदींतून पार करणारा श्रीगुरु कर्णधार मिळेल, तर बरें होईल. ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, जर आमची ही करुणा तुम्ही ऐकत असाल तर आमच्याकरितां धांव घ्या ४. [४५०]

कोणी एका गृहस्थानें दुष्काळांत अन्न मिळेना म्हणून शेण खाल्लें, पुढें दुष्काळ जाऊन सुकाळ झाला तरी शेण खाणें सोडीना १. असल्या ह्या मूर्खाला फजीत करून त्याला मारण्याचा सत्कार केला (मारही मिळाला). तर तो

गौरव ॥ २ ॥ ओढाळाची ओंगळ ओढी । उगी खोडी नवजाय ॥ ३ ॥ तुका फजीत करी बुच्या । विसरे कुच्या खोडी तेणें ॥ ४ ॥ [४५१]

धांव घालीं आई । आतां पाहातेसी काई ॥ १ ॥ धीर नाहीं माझे पोटीं । झालों वियोगें हिंपुटी ॥ २ ॥ करावें सीतळ । बहु झाली हळहळ ॥ ३ ॥ तुका म्हणे डोई । कधीं ठेवीन हे पायीं ॥ ४ ॥ [४५२]

तुम्हां ठावा होता देवा । माझे अंतरींचा हेवा ॥ १ ॥ होती काशानें सुटका । तरी हे वैकुंठनायका ॥ २ ॥ नसतें सांभाळिलें । जरी तुम्ही आश्वासिलें ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपाळुवा । बरवा केला सावाधावा ॥ ४ ॥ [४५३]

दर्शनाची आस । आतां न साहें उदास ॥ १ ॥ जीव आला पायांपाशीं । येथें असें कलिवरेसीं ॥ २ ॥ कांहींचि नाठवे । ठायीं बैसलें नुठवे ॥ ३ ॥ जीव असतां पायीं । तुका ठकावला ठायीं ॥ ४ ॥ [४५४]

भोगावरी आम्हीं घातला पाषाण । मरणा मरण आणियेलें ॥ १ ॥ विश्व तूं व्यापक काय मी निराळा । काशासाठीं बळा येऊं आतां ॥ २ ॥ काय सारूनियां काढावें बाहेरी । आणूनि भीतरीं काय ठेवूं ॥ ३ ॥ केला तरी उरे वादचि कोरडा । बळें घ्यावी पीडा स्वपनींची हे ॥ ४ ॥ अवघेचि वाण आले तुम्हां घरा । मजूरी मजुरा रोजकीर्दी ॥ ५ ॥ तुका म्हणे कांहीं नेणें लाभ हानी । असेल तो धनी राखो वाडा ॥ ६ ॥ [४५५]

सहन करतो. २. ओढाळ जनावराला इरड (विष्ठा खाणें व इतर नासधूस करणें) करण्याची वाईट संवय असते. त्याची खोड आपल्या आपण जात नाहीं. ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे जे निलाजरे कोडगे आहेत, ते फजीत केल्यामुळें आपली खोड विसरतात ४. [४५१]

हे विठाबाई, आई, मज बालकाविषयीं धांव घे. काय पाहात बसली आहेस? १. माझ्या हृदयांत किंचितही धीर नाहीं. तुझ्या वियोगानें मी फार कष्टी झालों आहें. २. मला अतिशय ताप होत आहे, तो शांत कर ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी आपलें डोकें तुमच्या पायांवर कधीं ठेवीन असें मला झालें आहे ४. [४५२]

अहो देवा, माझ्या अंतःकरणांतील हांव तुम्ही जाणतां १. तरी वैकुंठनायका, माझी सुटका कशानें होईल? २. जर तुम्हीं माझा संभाळ केला नसता व मला अंगीकारलें नसतें, (अभयाचें आश्वासन दिलें नसतें, तर माझी सुटका कधींच झाली नसती.) (ह्या अर्थाचा संबंध ध्रुवपदाशीं आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे कृपाळू देवा! मला साह्य करण्याकरितां धांव घेतलीत हें फार चांगलें केलेंत ४. [४५३]

अहो देवा, मला तुमच्या दर्शनाची आशा आहे, ह्याविषयीं मला तुम्ही निराश केलें तर तें सहन होणार नाहीं १. माझा जीव आपल्या पायांपाशीं आला आहे आणि माझें शरीरही येथेंच आहे २. दुसरें मला कांहीं आठवत नाहीं आणि बसल्या जाग्यावरून उठवत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, पाहा, माझा जीव तुमच्या चरणाजवळ असतांना सुद्धां मी फसलों गेलों ४. [४५४]

सुखदुःखादिक जे कांहीं भोग होत आहेत, ते सर्व देहद्वारा जीवालाच होत आहेत. देहइंद्रियजीवाहून वेगळा जो मी, त्या माझ्या ठिकाणीं सुखदुःखादिक नसून, मी नित्य सुखरूप आहें. अशा यथार्थ ज्ञानाचा दगड आम्ही भोगावर टाकून दिला आणि देहादिकाला येणाऱ्या मरणाला ह्याच यथार्थ ज्ञानानें मारिलें १. अहो देवा, जर तुम्ही सर्व विश्वाला व्यापून आहांत, तर त्या विश्वांतील मी एक निराळा कोठें आहें? वास्तव, नसता संबंध मी आपल्याकडे घेऊन कशाकरितां बळकटीला येऊं? (कशाची प्राप्ती करून घेण्याकरितां अंगांत बळ आणूं?) २. जर अंतर्बाह्य केवळ तूंच भरला आहेस, तर आंतून बाहेर काय काय काढून टाकूं? आणि बाहेरून आंत काय आणून घालूं? ३. कितीही वाद केला तरी तो कोरडाच राहातो, असें जर आहे, तर स्वप्नवत् देहादिक प्रपंचाची पीडा बळानें कोणीं घ्यावी? ४. सर्व प्रकार (पंच कोशांचा व पापपुण्याचा माल) तुमच्या घरीं आला आहे. येथें मजुराच्या मजुरीचा रोजमेळ आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, मी कांहीं लाभहानी जाणत नाहीं. जो कोणी देहाचा धनी असेल, तो देहरूपी वाडा रक्षण करील ६. [४५५]

कां हो येथें काळ आला आम्हां आड । तुम्हापाशीं नाड करावया ॥ १ ॥ कां हो विचाराचें पडिलें सांकडें । काय ऐसें कोडें उपजलें ॥ २ ॥ कां हो उपजेना द्यावी ऐशी भेटी । काय द्वैत पोटीं धरिलें देवा ॥ ३ ॥ पाप फार किंवा जालासी दुर्बळ । मागिल तें बळ नाहीं आतां ॥ ४ ॥ काय झालें देणें (नेणें) निघालें दिवाळें । कीं बांधिलासि बळें ऋणेंपायीं ॥ ५ ॥ तुका म्हणे कां रे ऐसी केली गोवी । तुझी माझी ठेवी निवडूनियां ॥ ६ ॥ [४५६]

काय देह घालूं करवतीं कर्मरीं । टाकूं या भीतरीं अग्नीमाजी ॥ १ ॥ काय सेवूं वन शीत उष्ण तान । साहों कीं मोहन (मौन) धरुनी बैसों ॥ २ ॥ काय लावूं अंगीं भस्म उधळण । हिंडूं देश कोण खुंट चारी ॥ ३ ॥ काय त्यजूं अन्न करूनि उपास । काय करूं नास जीवित्वाचा ॥ ४ ॥ तुका म्हणे काय करावा उपाव । ऐसा देईं भाव पांडुरंगा ॥ ५ ॥ [४५७]

दंभें कीर्ति पोट भरे मानी जन । स्वहित कारण नव्हे कांहीं ॥ १ ॥ अंतरती तुझे पाय मज दुरी । धरितां ये थोरी जाणिवेची ॥ २ ॥ पिंडाच्या पाळणें धांवती विकार । आहे दावेदार मजमाजीं ॥ ३ ॥ कैसा करूं घात आपुला आपण । धरूनि गुमान लोकलाज ॥ ४ ॥ तुका म्हणे मज दावीं तो सोहळा । देखे पाय डोळां तुझे देवा ॥ ५ ॥ [४५८]

धिग् जिणें त्याचा स्वामी हीन वर । मरण तें बरें भलें मग ॥ १ ॥ आइका जी देवा ऐसी आहे नीति । काय तें उचित सांभाळावें ॥ २ ॥ देशोदेशीं धाक जयाच्या उत्तरें । तयाचे कुतरें परि भलें ॥ ३ ॥ तुका म्हणे हें कां सुचलें उत्तर । जाणोनि अंतर ओळखावें ॥ ४ ॥ [४५९]

आतां गाऊं तुज ओंविया मंगळी । करूं गदारोळी हरिकथा ॥ १ ॥ होसी निवारिता आमुचें

अहो देवा, तुमच्या आमच्यामध्यें अडथळा करणारा हा काळ येथें कशाला आला? १. अहो देवा, आम्हांला भेट देण्याविषयीं तुम्हांला विचाराचें मोठें संकट कां पडलें? अशी कोणती अडचण तुम्हांला उत्पन्न झाली? २. अहो देवा, आम्हांला भेट द्यावी असें तुमच्या अंतःकरणांत कां येत नाहीं? आमच्याविषयीं तुम्हीं मनांत द्वैत धरलेंत काय? ३. काय आमचें पाप फार आहे, म्हणून तूं आम्हांस भेट देत नाहींस किंवा तूं शक्तिहीन झाला आहेस व आतां तुझ्यांत पूर्वीचें सामर्थ्य राहिलें नाहीं? ४. अहो देवा, तुम्हांला देणें झाल्याकारणानें तुमचें दिवाळें निघालें, असें कांहीं झालें काय? किंवा सावकारानें मोठ्या बळजबरीनें ऋणाकरतां तुम्हांला बांधिलें काय? ५. तुकाराम महाराज म्हणतात, अरे अशी गुंती कां केलीस? तुझ्या माझ्या हक्काचा प्रकार निवडून ठेव ६. [४५६]

अहो देवा, तुमच्या भेटीकरतां मी आपला देह करवतीनें कापून घेऊं अगर दुसऱ्या एखाद्या शस्त्रानें तोडून घेऊं, किंवा एखाद्या धगधगीत अग्नींत टाकून जाळून घेऊं? १. का वनामध्यें जाऊं; शीत, उष्ण, तहान ह्यांचे ताप सहन करूं, अगर मौन घेऊन बसूं? २. का सर्व अंगाला भस्म लावूं, कोणत्या देशाला हिंडूं अगर चारी खुंट फिरूं? ३. का उपाशी राहून अन्न टाकून देऊं, का मी आपल्या जिवाचा नाश करून टाकूं? ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, तुझ्या भेटीकरतां कोणता उपाय करावा, ह्याविषयीं मला तूं ज्ञान दे ५. [४५७]

दंभानें परमार्थ (भक्ति) केल्यानें पोट भरतें, कीर्ति होते, व जगांत मान मिळतो; परंतु ह्यामध्यें आपलें स्वहिताचें कांहीं कार्य होत नाहीं १. मी मोठा जाणता आहें, अशा जाणीवेच्या थोरवीचा अभिमान घेतल्यानें तुझ्या चरणांचा वियोग होतो २. देहाचें पालनपोषण केल्यानें देहांतील कामक्रोधादिक विकार फार धांव घेतात, व हे शत्रु माझ्या ठिकाणींच आहेत ३. लोकांची पर्वा व लज्जा धरून मी आपला घात करून घेऊं? ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझे पाय मी डोळ्यांनीं पाहीन, असा सोहळा मला तूं दाखीव ५. [४५८]

ज्याचा धनी वाईट आहे, त्याच्या जगण्याला धिक्कार असो; असें जगण्यापेक्षां मरणें बरें १. अहो देवा, ऐका. अशा तऱ्हेची नीति आहे म्हणून जें योग्य असेल त्याचा तुम्हीं सांभाळ करावा २. ज्याच्या शब्दाचा धाकदरारा देशदेशांतरामध्यें आहे त्याचें कुत्रें होणें फार बरें. ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो पांडुरंगा, अशा तऱ्हेचें कठोर उत्तर मला कां सुचलें, हें माझें अंतःकरण जाणून तुम्हीं समजावें ५. [४५९]

अहो देवा, आतां तुम्हांला मंगल ओंव्यांनीं गाऊं आणि मोठ्या अट्टाहासानें हरिकथा करूं १. कारण आमच्यावर

सकळ । भय तळमळ पापपुण्य ॥ २ ॥ भोगिले ते भोग लावूं तुझे अंगीं । अलिप्त या जगीं होउनि राहों ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही लाडिकीं लेंकुरें । न राहों अंतरें पायांविण ॥ ४ ॥ [४६०]

सर्व सुखें आजी येथेंचि वोळलीं । संतांचीं देखिलीं चरणांबुजें ॥ १ ॥ सर्व काळ होतों आठवीत मनीं । फिटली ते धणी येणें काळें ॥ २ ॥ तुका म्हणे वाचा राहिली कुंठित । पुढें झालें चित्त समाधान ॥ ३ ॥ [४६१]

विठ्ठल सोयरा सज्जन सांगाती । विठ्ठल हा चित्तीं बैसलासे ॥ १ ॥ विठ्ठलें हें अंग व्यापिली हे काया । विठ्ठल हे छाया माझी मज ॥ २ ॥ बैसला विठ्ठल जिव्हेचिया माथां । न वदे अन्यथा आन दुजें ॥ ३ ॥ सकळ इंद्रियां मन हें प्रधान । तेंही करी ध्यान विठोबाचें ॥ ४ ॥ तुका म्हणे या हो विठ्ठलासी आतां । नये विसंबतां माझें मज ॥ ५ ॥ [४६२]

होय होय वारकरी । पाहें पाहें रे पंढरी ॥ १ ॥ काय करावीं साधनें । फळ अवघेंचि येणें ॥ २ ॥ अभिमान नुरे । कोड अवघेंचि पुरे ॥ ३ ॥ तुका म्हणे डोळां । विठो बैसला सांवळा ॥ ४ ॥ [४६३]

पंढरीसी जाय । तो विसरे बापमाय ॥ १ ॥ अवघा होय पांडुरंग । राहे धरूनियां अंग ॥ २ ॥ न लगे धन मान । देहभावें उदासीन ॥ ३ ॥ तुका म्हणे मळ । नासी तात्काळ हें स्थळ ॥ ४ ॥ [४६४]

बळें बाह्यात्कारें संपादिलें सोंग । नाहीं झाला त्याग अंतरींचा ॥ १ ॥ ऐसें येतें नित्य माझ्या अनुभवा । मनासी हा ठावा समाचार ॥ २ ॥ जागृतीचा नाहीं अनुभव स्वप्नीं । जातों विसरुनि सकळही ॥ ३ ॥ प्रपंचाबाहेरी नाहीं आलें चित्त । केलें करीं नित्य वेवसाय ॥ ४ ॥ तुका म्हणे मज भोरप्याचि परी । झालें सोंग वरी आंत तैसें ॥ ५ ॥ [४६५]

येणारे जे जे कांहीं संकटप्रसंग ते ते सर्व निवारण करणारा तूं आहेस. भय, तळमळ, पापपुण्य हींही सर्व तूं निवारण करणारा आहेस २. आजपर्यंत आम्हीं जे जे भोग भोगले आहेत ते ते सर्व हरीच भोगतो आहे, जशा समजुतीनें ते भोग तुझ्याकडे लावून ह्या जगतामध्यें आम्हीं अलिप्त होऊन राहूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं तुझीं लाडकीं मुलें आहोंत म्हणून तुझे पाय सोडून आम्हीं निराळे राहाणार नाहीं ४. [४६०]

संतांची चरणकमलें पाहिल्यानें, जगांतील सर्व सुखें मला प्राप्त झालीं आहेत १. ज्या (संतदर्शना) विषयींचा निरंतर आठव मनामध्यें होता, त्याचें दर्शन झाल्यामुळे ह्या वेळेस इच्छा तृप्त झाली २. तुकाराम महाराज म्हणतात, आतां ह्यासंबंधाने कांहीं बोलतां येत नाहीं. शब्द कुंठित झाला आहे, व माझें चित्त समाधानाला पावलें आहे ३. [४६१]

विठ्ठल हा माझा आवडता असून त्या सज्जनाचीच निरंतर मला संगति आहे, आणि तोच माझ्या चित्तांत वास करीत आहे १. विठ्ठलानें माझें सर्व अंग व माझी काया व्यापून टाकिली, आणि माझी छायाही मला विठ्ठलच भासूं लागली २. माझ्या जिव्हेवर विठ्ठलाचेंच चिंतन आहे म्हणून ती विठ्ठलावांचून दुसरें कांहींएक बोलत नाहीं ३. सगळ्या इंद्रियांमध्यें मन हें श्रेष्ठ आहे आणि तेंच विठोबाचें ध्यान करीत आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, आतां ह्या विठ्ठलाला मला विसंबतां येत नाहीं. [४६२]

अरे (नरा) वारकरी हो, आणि पंढरी पाहा (असें द्विरुक्तीनें सांगतात) १. बाकीचीं साधनें काय करावयाचीं आहेत? सर्व कांहीं फल ह्यानेंच मिळतें २. अभिमान राहात नाहीं व सर्व इच्छा पूर्ण होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, डोळ्यांमध्यें सांवळा जो विठ्ठल तो बसून राहातो ४. [४६३]

जो पंढरीस जातो. तो आपल्या आईबापादि गणगोताला विसरतो १. तो सर्व पांडुरंगरूप होतो व त्याच स्थितीनें राहातो २. द्रव्य व मान ह्यांची इच्छा त्याच्यामध्यें राहात नाहीं, कारण तो देहाविषयीं उदास असतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, पंढरपूर हें ठिकाण त्रिगुणमळाचा तात्काळ नाश करणारें आहे ४. [४६४]

साधुपणाचें वरकांती बळेंच सोंग घेतलें आहे. खरोखर विषयांचा त्याग अंतःकरणापासून झाला नाहीं १. असें हें माझ्या नित्य अनुभवाला येत आहे, आणि खरा काय प्रकार आहे तो माझे मनाला माहीत आहे २. खरोखर जो अनुभव जागृतींत असतो तो अनुभव स्वप्नामध्यें नाहीं, त्या अवस्थेंत मी सर्व विसरून जातों ३. माझें चित्त खरोखर प्रपंचाच्या बाहेर आलें नाहीं. पूर्वी प्रपंचाचे केलेले व्यवसाय पुढेंही करीत आहें ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझा प्रकार बहुरुप्यासारखा झाला. वरच्या बाजूनें साधुपणाचें सोंग मात्र जनाला दिसत आहे, परंतु आंत जशाचा तसाच आहें ५. [४६५]

म्हणवितों दास ते नाहीं करणी । आंत वरी दोन्ही भिन्न भाव ॥ १ ॥ गातों नाचतों तें दाखवितों जना । प्रेम नारायणा नाहीं अंगीं ॥ २ ॥ पाविजे तें वर्म न कळेचि कांहीं । बुडालों या डोहीं दंभाचिया ॥ ३ ॥ भांडवल काळें हातोहातीं नेलें । माप या लागलें आयुष्यासी ॥ ४ ॥ तुका म्हणे वायां गेलों ऐसें दिसे । होईल या हांसें लौकिकाचें ॥ ५ ॥ [४६६]

न कळे तो काय करावा उपाय । जेणें राहे भाव तुझ्या पायीं ॥ १ ॥ येऊनियां वास करिसी हृदयीं । ऐसें घडे कई कासयानें ॥ २ ॥ साच भावें तुझें चिंतन मानसीं । राहे हें करिसी कैं गा देवा ॥ ३ ॥ लटिकें हें माझें करूनियां दुरी । साच तूं अंतरीं येउनि राहें ॥ ४ ॥ तुका म्हणे मज राखावें पतिता । आपुलिया सत्ता पांडुरंगा ॥ ५ ॥ [४६७]

चिंतिलें तें मनींचें जाणे । पुरवी खुणे अंतरींचे ॥ १ ॥ रात्री न कळे दिवस न कळे । अंगीं खेळे दैवत हें ॥ २ ॥ नवसियाचे पुरवी नवस । भोगी त्यास भिन्न नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे समचि देणें । समचरणीं उभा असे ॥ ४ ॥ [४६८]

उद्धाराचा संदेह नाहीं । याच्या कांहीं सेवकां ॥ १ ॥ पांडुरंग अभिमानी । जीवदानीं कें वसा (कोंवसा) ॥ २ ॥ बुडतां जळीं जळतां आगीं । ते प्रसंगीं राखावें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हांसाठीं । कृपा पोटीं वागवी ॥ ४ ॥ [४६९]

काय ते विरक्ति न कळेची आम्हां । जाणों एका नामा विठोबाच्या ॥ १ ॥ नाचेन मी सुखें वैष्णवांचे मेळीं । दिंडी टाळघोळीं आनंदें या ॥ २ ॥ शांति क्षमा दया हे मी काय जाणें । विठ्ठल कीर्तनें वांचूनियां ॥ ३ ॥ कासया उदास होऊं देहावरी । अमृतसागरीं बुडोनियां ॥ ४ ॥

ज्याप्रमाणें मी आपल्यास हरीचा दास म्हणवीत आहें, त्याप्रमाणें माझी कृति नाहीं. माझा आंतला भाव वेगळा आणि बाहेरचा भाव वेगळा आहे १. मी जे काय हरीचे गुण गातों व हरिरंगगीं नाचतों, तें सर्व लोकांना दाखवितों. खरोखर नारायणा, तुमच्याविषयींचें प्रेम माझ्या अंगीं नाहीं २. ज्या मर्माचें ज्ञान पाहिजे आहे, तें मला कळत नाहीं. ह्या भक्तीनें दंभाच्या डोहांत मात्र मी बुडून गेलों आहें ३. माझेजवळ जी आयुष्याची जमा होती ती मोठ्या त्वरेनें काळानें नाहींशी केली, कारण तो आयुष्याचें माप टाकीत आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, खरोखर मी वायां गेलों असें भासत आहे. असें झाल्यानें देवा, तुमचा मी दास आहें, अशा झालेल्या लौकिकाचें हंसें होईल ५. [४६६]

ज्या योगानें तुझ्या चरणाचे ठिकाणीं माझी श्रद्धा बसेल असा कोणता उपाय करावा, हें मला कळत नाहीं १. जेणेंकरून तूं माझ्या हृदयांत येऊन वास्तव्य करशील, अशी गोष्ट कशानें घडेल? २. हे देवा, खऱ्या भावानें मनामध्यें तुमचें चिंतन व्हावें, असें तुम्हीं कधीं कराल? ३. माझ्या ठिकाणीं असणारा खोटा भाव दूर करून, खरोखर तुम्ही माझ्या अंतःकरणामध्यें येऊन राहावें ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, आपल्या सत्तेनें माझें पतिताचें रक्षण करावें ५. [४६७]

मनामध्यें जी जी कांहीं इच्छा केली आहे, ती सर्व पांडुरंग जाणतो आणि सेवकाच्या अंतःकरणांतील इष्ट हेतु पूर्ण करितो १. रात्रही कळत नाहीं. दिवस कळत नाहीं. आंगामध्यें हें पांडुरंग दैवत एकसारखें खेळत राहातें २. आपल्याला परमार्थ साध्य व्हावा म्हणून ज्या कोणाचे नवस असतील त्यांचे नवस तो पूर्ण करितो, व त्यांच्याहून आपण निराळा न राहातां सर्वांगानें तो भोग घेतो (भक्ताचें सर्वांगच तो बनतो) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो देव सम चरणांनीं उभा आहे तो समब्रह्माचाच अनुभव (सर्व भक्तांना एकसारखी मुक्त) देतो ४. [४६८]

देव आपला उद्धार करीलच ह्याविषयीं सेवकांना कांहीं संशय नाहीं. १. कारण पांडुरंग हा भक्तजनांचा अभिमानी असून, त्यांना शुद्ध जीवदान करण्याचें तर तो केवळ घरच आहे. २. अग्नींत जाळण्याचे प्रसंगीं व पाण्यांत बुडण्याचे प्रसंगीं देव हा भक्तांचें रक्षण करितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्याविषयीं देव निरंतर अंतःकरणांत दया वागवितो ४. [४६९]

विरक्तीचें काय स्वरूप आहे, हें आम्ही जाणत नाहीं. आम्हीं एक श्रीविठ्ठलनाम जाणतों १. विष्णुभक्तांच्या मेळ्यांत व वीणा आणि टाळ्यांच्या गजरांत आम्हीं आनंदानें नाचतों २. श्रीपांडुरंगकीर्तनावांचून शांति, क्षमा, दया मी कांहीं जाणत नाहीं ३. अमृताचे सागरामध्यें बुडून मी देहाविषयीं उदास कशाकरतां राहूं? ४. कशाकरतां

कासया एकांत सेवूं तया वना । आनंद या जनामाजी असे ॥ ५ ॥ तुका म्हणे मज आहे हा भरंवसा । विठ्ठल सरिसा चालतसे ॥ ६ ॥ [४७०]

जेथें वैष्णवांचा वास । धन्य भूमि पुण्यदेश ॥ १ ॥ दोष नाहीं ओखदासी । दूत सांगे यमापाशीं ॥ २ ॥ गरुडटकयांच्या भारें । भूमि गर्जे जयजयकारें ॥ ३ ॥ सहज तया जना छंद । वाचे गोविंद गोविंद ॥ ४ ॥ तुळसी वनें रंगमाळा । अवघा वैकुंठ सोहळा ॥ ५ ॥ तुका म्हणे भेणें । काय नये तेणें रानें ॥ ६ ॥ [४७१]

माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपणचि देव होय गुरु ॥ १ ॥ पढियें देहभाव पुरविता वासना । अंतीं तें आपणापाशीं न्यावें ॥ २ ॥ मागें पुढें उभा राहे सांभाळीत । आलिया आघात निवारावे ॥ ३ ॥ योगक्षेम त्याचें जाणे जडभारी । वाट दावी करीं धरूनियां ॥ ४ ॥ तुका म्हणे नाहीं विश्वास ज्या मनीं । पहावें पुराणीं विचारूनी ॥ ५ ॥ [४७२]

सकळ धर्म मज विठोबाचें नाम । आणीक तें वर्म नेणें कांहीं ॥ १ ॥ काय जाणों संतां निरविलें देवें । करिती या भावें कृपा मज ॥ २ ॥ तुका म्हणे माझा कोण अधिकार । तो मज विचार कळों यावा ॥ ३ ॥ [४७३]

उदंड शाहणे होत तर्कवंत । परि या नेणवे अंत विठोबाचा ॥ १ ॥ उदंड अक्षरां करोत भरोवरी । परि नेणवेचि थोरी विठोबाची ॥ २ ॥ तुका म्हणे नाहीं भोळेपणाविण । जाणींव ते सिण रितें माप ॥ ३ ॥ [४७४]

आधारावांचूनि । काय सांगशी कहाणी ॥ १ ॥ ठावा नाहीं पंढरीराव । तोंवरी अवघेंचि वाव ॥ २ ॥ मानिताहे कोण । तुझें कोरडें ब्रह्मज्ञान ॥ ३ ॥ तुका म्हणे ठेवा । जाणपण एक सवा ॥ ४ ॥ [४७५]

वनांत जाऊन एकांतवास करूं ? मला जगामध्यें राहून आनंद आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्याबरोबर विठ्ठल हा चालत आहे, असा आम्हाला भरंवसा आहे ६. [४७०]

ज्या ठिकाणीं विष्णुभक्तांची वस्ती आहे, ती भूमी धन्य आहे व तो देश पुण्यरूप आहे १. त्या ठिकाणीं औषधास देखील दोष मिळत नाहीं, असें यमाला यमाचे दूत सांगतात २. गरुडटक्याचे समुदायानें आणि हरिनामाच्या घोषानें त्या ठिकाणची भूमीसुद्धां जयजय अशी गर्जना करते ३. त्या लोकांना सहज वाचेनें 'गोविंद गोविंद' म्हणण्याचा छंद आहे ४. तेथें तुळशीचे बाग आहेत व रांगोळ्यांचे पट्टे ओढिले आहेत. तेथील संपूर्ण सोहळे वैकुंठाप्रमाणें आहेत ५. तुकाराम महाराज म्हणतात, काळ त्या बाजूस भयानें येत नाहीं ६. [४७१]

माझ्या विठोबाचा प्रेमभाव कसा आहे, तो पाहा. तोच माझा देव आणि तोच माझा गुरु झाला आहे १. आम्हांला जें प्रिय आहे, तद्विषयींच्या वासना तो पूर्ण करितो आणि शेवटीं तो आपणापाशीं घेऊन जातो २. भक्तरक्षणाकरितां तो त्यांच्या मागें पुढें उभा राहून भक्तांवर येणारीं संकटें दूर करितो ३. कोणत्या वस्तूविषयींची त्यांना अडचण आहे, कोणती वस्तू मिळण्याबद्दल त्यांना संकट वाटत आहे तें जाणून, तो त्यांना ती वस्तू देतो व तिचें रक्षणही करितो. कदाचित् परमार्थमार्गांत त्यांच्याकडून कांहीं चूक झाल्यास तो त्यांना सावध करून बरोबर परमार्थमार्गाला लावतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, असें देव करतो कीं नाहीं, ह्याबद्दल ज्या कोणास संशय असेल त्यांनीं पुराणें पाहावीं ५. [४७२]

एक विठ्ठलनामचिंतन करण्यांतच सर्व धर्म घडतात, असा माझा निश्चय आहे. ह्याखेरीज मी इतरसाधनें जाणत नाहीं १. देवांनीं मला संतांच्या स्वाधीन केलें, म्हणून मजवर ते कृपा करतात कीं काय, हें मला कळत नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, असा माझा अधिकार काय आहे कीं हा परमार्थमार्ग मला कळावा ? ३. [४७३]

पुष्कळ शाहाणे नाना प्रकारचे तर्क करणारे होवोत, पण विठोबाच्या स्वरूपाचा अंत त्यांस लागणार नाहीं १. पुष्कळ पाठ–पाठांतर करोत व त्याचे अर्थाचाही विचार करोत, पण विठोबाचा मोठेपणा त्यांस कळणार नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, भोळेपणावांचून पांडुरंगाचा लाभ होणार नाहीं. ज्ञानाच्या मापानें पांडुरंगाला कितीही मोजलें, तरी तें रिकामेंच राहून त्यानें श्रम मात्र होतो ३. [४७४]

वेदशास्त्र, साधुसंत ह्यांच्या प्रमाणावांचून जें बोलणें, तें बायकांच्या काहाणीप्रमाणें आहे १. जोंपर्यंत तुला पंढरीचा राजा ठाऊक नाहीं तोंपर्यंत सर्व व्यर्थ आहे २. तूं मोठा ब्रह्मज्ञानी असलास तरी तें ब्रह्मज्ञान कोरडें आहे. तें तुझें ब्रह्मज्ञान कोण मानतो ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो ज्ञाते, तुम्ही आपलें जाणपण बाजूला ठेवा ४. [४७५]

अनाथांची तुम्हां दया । पंढरीराया येतसे ॥ १ ॥ ऐसी एकोनियां कीर्ति । बहु विश्रांति पावलों ॥ २ ॥ अनाथांच्या धांवा घरा । नामें करा कुडावा ॥ ३ ॥ तुका म्हणे सवघड हित । ठेवूं चित्त पायां पें ॥ ४ ॥ [४७६]

येथें नाहीं उरों आले अवतार । येर ते पामर जीव किती ॥ १ ॥ विषयांचे झणी व्हाल लोलिंगत । चेवलिया अंत न लगे मज ॥ २ ॥ वाहोनियां भार कुंथसील ओझें । नव्हे तोंचि माझें थीता त्याग ॥ ३ ॥ तुका म्हणे कैसी नाहीं त्याची लाज । संतीं केशीराज साधियेला ॥ ४ ॥ [४७७]

हींच त्यांचीं पंचभूतें । जीवन भातें प्रेमाचें ॥ १ ॥ कळवळा धरिला संतीं । ते निगुतीं कैवाड ॥ २ ॥ हाच काळ वर्तमान । समाधान ही संपत्ती ॥ ३ ॥ तुका म्हणे दिवस रातीं । हेंचि खाती अन्न ते ॥ ४ ॥ [४७८]

दीप न देखे अंधारा । आतां हेंचि जतन करा ॥ १ ॥ नारायण नारायण । गाठीं धन बळकट ॥ २ ॥ चिंतामणीपाशीं चिंता । तत्वता ही न येल ॥ ३ ॥ तुका म्हणे उभयलोकीं । हेंचि निकी सामुग्री ॥ ४ ॥ [४७९]

धन्य काळ संतभेटी । पायीं मिठी पडिली तो ॥ १ ॥ संदेहाची सुटली गांठी । झालों पोटीं शीतळ ॥ २ ॥ भवनदीचा झाला तारा । या उतारा प्रसादें ॥ ३ ॥ तुका म्हणे मंगळ आतां । कोण दाता याहूनी ॥ ४ ॥ [४८०]

दिनरजनीं हाच धंदा । गोविंदाचे पवाडे ॥ १ ॥ संकल्पिला देह देवा । सकळ हेवा तयेठायीं ॥ २ ॥ नाहीं अवसान घडी । सकळ जोडी इंद्रियां ॥ ३ ॥ कीर्ति मुखें गर्जे तुका । करी लोकां सावध ॥ ४ ॥ [४८१]

अहो पंढरीनाथा, निराश्रित दीनांची दया तुम्हांला येते १. अशी आपली कीर्ति ऐकून माझें मन स्वस्थ झालें २. जे कोणी अनाथ जीव असतील त्यांच्या घरीं तुम्ही धावतां व आपलें नामचिंतन करणाराचें रक्षण करतां ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, तुमच्या पायीं आम्ही चित्त ठेऊं. त्यांतच आमचें उघड हित आहे ४. [४७६]

येथें मच्छकच्छादिक अवतार उरले नाहींत मग इतर सामान्य प्राण्यांची काय किंमत आहे १. विषयासक्त होऊं नका. विषयसेवनाविषयीं तुमच्यामध्यें स्फूर्ति वाढली म्हणजे ती कोठपर्यंत जाईल हें मला कळत नाहीं २. जे वास्तविक आपलें नाहीं, तें आपले आहे असें मानून त्याचे भारानें तुम्ही कुंथत बसाल व जें आपलें स्वतःसिद्ध आहे त्याचा त्याग होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांनीं केशवराज जो परमात्मा तो साध्य करून घेतला, त्याची तुम्हाला लाज कशी वाटत नाहीं? ४. [४७७]

हरीविषयींचें प्रेम हेंच ज्यांचें जीवन अन्न आहे आणि तेंच ज्यांचें पंचभूतात्मक शरीर आहे, अथवा ज्यांच्या पंचभूतात्मक देहाचें हरीचें प्रेम हेंच अन्न जीवन आहे १. संतांनीं हरीविषयीं यथार्थ कळवळा धरला आहे आणि त्याचविषयींचा त्यांच्यामध्यें निर्धार आहे २. हरीविषयींचा कळवळा व प्रेम हीच त्यांची चालू स्थिति आहे आणि हीच त्यांची समाधानसंपत्ति आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, रात्रंदिवस ते हेंच (हरिप्रेमाचें) अन्न खातात ४. [४७८]

दीप अंधाराला पाहात नाहीं; तो सर्वकाळ प्रकाशयुक्त असतो, त्याप्रमाणें तुम्ही हेंच जतन करा १. तें कोणतें म्हणाल तर नारायण नारायण, हेंच धन, तुम्ही आपल्या जीवाचे बळकट गांठीं बांधा २. ज्याचे पाशीं चिंतामणि आहे, त्याचेपाशीं चिंता कधींही येत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, इहपरलोकांमध्यें हीच उत्तम सामुग्री आहे ४. [४७९]

ज्या वेळीं संतांची भेट होऊन त्यांच्या पायांना मिठी पडली तो काळ धन्य आहे १. त्या योगानें हृदयांतील सर्व संशयाच्या ग्रंथी सुटल्या, म्हणजे सर्व संशय गेले, हृदय समाधानाला पावलें २. मला बुडविणारी जी संसाररूपी नदी तीच संतांच्या प्रसादानें तारणारी नौका होऊन मला तिनें पार उतरिलें (तीच नाहींशी झाली) ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांपेक्षां मंगल दान करणारा कोण अधिक आहे? ४. [४८०]

रात्रंदिवस गोविंदाची कीर्ति वर्णन करावी, हाच आम्हाला धंदा आहे १. आम्ही आपला देह देवाला अर्पण केला. त्या ठिकाणींच आमची सर्व हाव आहे २. आमच्या सर्व इंद्रियांचीं जोड हीच आहे. ह्यामध्यें घटकाभर देखील अंतराय नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी हरीच्या कीर्तीची मुखानें गर्जना करून लोकांना सावध करतों ४. [४८१]

खरें ना नवट निक्षेपींचें जुनें । काढिलें ठेवणें समर्थाचें ॥ १ ॥ मजुराच्या हातें मापाचा उकल । मी तों येथें फोल सत्ता त्याची ॥ २ ॥ कुलालाच्या हातें घटाची (च्या) उत्पत्ती । पाठवी त्या जाती पाकस्थळा ॥ ३ ॥ तुका म्हणे जीवन तें नारायणीं । प्रभा ते कीर्णीं प्रकाशाची ॥ ४ ॥ [४८२]

गंगेचिया अंतेंविण काय चाड । आपुलें तें कोड तृषेपाशीं ॥ १ ॥ विठ्ठल हे मूर्ति साजिरी सुंदर । घालूं निरंतर हृदयपुटीं ॥ २ ॥ कारण तें असे नवनीतापाशीं । गवाळ तें सोसी येर कोण ॥ ३ ॥ बाळाचे सोईतें घांस घाली माता । अट्टाहास चिंता नाहीं तया ॥ ४ ॥ गाऊं नाचूं करूं आनंद सोहळा । भावचि वेगळा नाहीं आतां ॥ ५ ॥ तुका म्हणे अवघें झालें एकमय । परलोकीची काय चाड आतां ॥ ६ ॥ [४८३]

स्त्रीपुत्रादिकीं राहिला आदर । विषयीं पडिभर अतिशय ॥ १ ॥ आतां सोडवणें धांवा नारायणा । मज हे वासना अनावर ॥ २ ॥ येउनियां आड ठाके लोकलाज । तों हें दिसे काज अंतरलें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां जेथें जेथें गोवा । तेथें तुम्हीं देवा सांभाळावें ॥ ४ ॥ [४८४]

पडिलों भोवणीं । होतों बहु चिंतावणीं ॥ १ ॥ होतों चुकलों मारग । लाहो केला लागवेग ॥ २ ॥ इंद्रियांचे संदी । होतों सांपडलों बंदी ॥ ३ ॥ तुका म्हणे बरें झालें । विठ्ठलसें वाचे आलें ॥ ४ ॥ [४८५]

बरें जालें आलीं ज्याचीं त्याच्या घरा । चुकला पान्हेरा ओढाळांचा ॥ १ ॥ बहु केलें दुःखी त्यांचिया सांभाळें । आतां तोंड काळें तेणें लोभें ॥ २ ॥ त्यांचिया अन्यायें भोगा माझें अंग । सकळहीं लाग द्यावा लागे ॥ ३ ॥ नाहीं कोठें स्थिर राहों दिलें क्षण । आजिवरी सिण पावलों तो ॥ ४ ॥

समर्थ संतांचें विठ्ठलरूपी जुनें व खरें नाणें आच्छादिलेलें होतें. तें मीं बाहेर काढिलें १. मजुराच्या हातानें म्हणजे मापाड्याच्या हातानें मापाचा हिशोब होतो. मी तर ह्या ठिकाणीं केवळ फोलकटांप्रमाणें आहें. सर्व सत्ता स्वामीची (देवाची) आहे २. कुंभाराच्या हातानें घटाची उत्पत्ती होते. जो कोणी खरेदी घेऊन आपल्या मालकी हक्कानें तीं मडकीं ज्या पाकशाळेकडे पाठवितो तेथें तीं जातात ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें सूर्यप्रकाशाची प्रभा किरणाचे ठिकाणीं जाते, म्हणजे सर्व किरणांचें व प्रभेचें जीवन सूर्य आहे, त्याप्रमाणें सर्वांचें जीवन नारायण आहे ४. [४८२]

तृषित पुरुषाला गंगेची खोली कळण्याची कांहीं जरूरी नाहीं, कारण त्याचें कार्य तृषा निवृत्त होण्यांत आहे. तें कार्य गंगेची खोली न कळली तरी होतें १. विठ्ठलमूर्ती ही सुंदर सुशोभित आहे. ती आपल्या निरंतर हृदयसंपुष्टामध्यें घालून ठेवूं २. लोण्याप्रमाणें सारभूत जी वस्तु तिच्याशीं सर्वांचें कारण आहे. साराहून इतर असाररूपी जें गबाळ त्याला कोण विचारतो ? ३. जसजसे बालकाकडून घास गिळले जातील तसतसे आई त्यास घास करून भरविते. त्यासंबंधानें खटाटोप व चिंता बाळाला कांहीं करावी लागत नाहीं ४. आम्ही हरीचें नाम गाऊं, नाचूं, आनंदसोहळा करूं. ह्याखेरीज आमच्यामध्यें दुसरी भावना नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व एकमय झालें, (म्हणजे) हरिरूपानें भरलें गेलें. आतां आम्हांला परलोकाची इच्छा नाहीं ६. [४८३]

स्त्रीपुत्रादिककरून सर्वांच्या ठिकाणीं माझा आदर आहे आणि विषयाचे ठिकाणीं अतिशय भर आहे. माझ्यामध्यें विषयवासना अति अनावर झाल्यामुळें, अहो नारायणा, यांतून माझी सोडवणूक करण्याकरतां धांवा २. जर लोकलज्जा आड येऊन उभी राहिली, तर आमचे कार्यामध्यें अंतर येईल असें दिसतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, ज्या ज्या ठिकाणीं आम्हाला गुंतून पडण्याचा प्रसंग येतो, त्या त्या ठिकाणीं तुम्हीं सांभाळावें ४. [४८४]

प्रपंचाच्या अतिशय चिंतेच्या फेऱ्यांत मी पडलों होतों १. खरोखर माझा मार्ग चुकला होता, परंतु यांतून निसटण्याचा प्रयत्न करून खऱ्या मार्गाला लागलों २. इंद्रियांच्या पेंचामध्यें सांपडून बंदींत पडलों होतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या वाचेनें विठ्ठल हें नाम आलें म्हणून बरें झालें ४. [४८५]

ज्याचीं इंद्रियें (म्हणजे सर्वेंद्रियांचा स्वामी जो हृषीकेश देव) त्याच्या घराकडे आलीं, हें फार चांगलें; आतां ओढाळतुल्य जीं इंद्रियें ह्यांचा संबंध तुटला १. आजपर्यंत ह्या इंद्रियांचा सांभाळ करण्यामध्यें त्यांनीं बहुत दुःख दिलें. आतां ह्यांच्या विषयींच्या लोभाचें तोंड काळें झालें २. त्या इंद्रियांपासून कांहीं अन्याय झाला असतां, त्या अन्यायाचीं फळें भोगण्याकडे माझें आंग द्यावें लागतें ३. ह्या इंद्रियांनीं कोठेंही क्षणभर स्थिर राहूं दिलें नाहीं. आजपर्यंत ह्यांच्या

वेगळाल्या खोडी केली ताडातोडी । सांगावया घडी नाहीं सुख ॥ ५ ॥ निरवूनि तुका चालिला गोवार(रें) । देवापाशीं भार सांडवूनि ॥ ६ ॥ [४८६]

न करावी आतां पोटासाठीं चिंता । आहे त्या संचिता माप लावूं ॥ १ ॥ दृष्टि ते घालावी परमार्थाठायीं । क्षुल्लका उपायीं सीण झाला ॥ २ ॥ येथें तंव नाहीं घेइजेसें सवें । कांहीं नये जीवें वेंचों मिथ्या ॥ ३ ॥ खंडणेंचि नाहीं उद्वेग वेरझारीं । बापुडे संसारीं सदा असों ॥ ४ ॥ शेवटा पाववी नावेचें बैसणें । भुजाबळें कोणें कष्टी व्हावें ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां सकळांचें सार । करावा व्यापार तरी ऐसा ॥ ६ ॥ [४८७]

आमच्या हें आलें भागा । जिव्हार या जगाचें ॥ १ ॥ धरूनियां ठेलों जीवें । बळकट भावें एकविध ॥ २ ॥ आणूनियां केला रूपा । उभा सोपा जवळी ॥ ३ ॥ तुका म्हणे अंकित केला । खालीं आला वचनें ॥ ४ ॥ [४८८]

खरें भांडवल सांपडलें गांठीं । जेणें नये तुटी उदिमासी ॥ १ ॥ सवंगाचें केणें सांपडलें घरीं । भरूनि वैखरी सांठविलें ॥ २ ॥ घेतां देतां लाभ होतसे सकळां । सदैवा दुर्बळा भाव तैसा ॥ ३ ॥ फडा आलिया तो न वजे निरास । जरि कांहीं त्यास न कळतां ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां झालीसे निश्चिंती । आणीक तें चित्तीं न धरूं दुजें ॥ ५ ॥ [४८९]

पदोपदीं दिलें अंग । झालें सांग कारण ॥ १ ॥ रुधवूनि ठेलों ठाव । जागा वाव सकळ ॥ २ ॥ पुढती चाली मना लाहो । वाढे देहो संतोषें ॥ ३ ॥ तुका म्हणे क्षरभागीं । जाला जगीं व्यापक ॥ ४ ॥ [४९०]

संगतीनें अति शीण झाला ४. ह्यांच्या वेगळाल्या खोड्यांनीं ह्यांनीं माझी देवाशीं ताडातोड केली. ह्यांनीं आपल्या संगतीनें एक घटकाभर देखील सांगण्यासारखें सुख दिलें नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, मी सर्व आसक्ति टाकून इंद्रियांचा समुदाय देवापाशीं ठेवून चालता झालों ६. [४८६]

आतां पोटाकरितां चिंता करावयास नको. जें जवळ धनधान्य शिल्लक आहे तेंच खाऊन सारूं (संपवूं) १. आपली दृष्टि परमार्थाचे ठिकाणीं ठेवावी, कारण बाकीच्या सामान्य खटाटोपानें शीण मात्र जाहला २. ह्या ठिकाणीं आपल्याबरोबर घेण्यासारखें कांहीं नाहीं. जीवाचा व्यय मिथ्या लाभाकडे करूं नये ३. जन्ममृत्यूच्या येरझारांत आमच्या काळजीनें कधींहीं खंड येणार नाहीं. संसारामध्यें सदा सर्वकाळ दीन आहोंत ४. नौकेमध्यें बसलों असतां, ती कडेला सुखरूप नेऊन पोंचवते. तिचा अव्हेर करून आपल्या बाहूनें पोहून जाण्याचे कष्ट कोणीं घ्यावेत? ५. तुकाराम महाराज म्हणतात, सगळ्याचा सारभूत असा हरिनामाचाच व्यापार करावा ६. [४८७]

सर्व प्राण्यांचें जीवन जो पांडुरंग तो आमच्या वांट्याला आला आहे १. त्याला मी आपल्या जीवाशीं एकनिष्ठ-भावानें बळकट धरून राहिलों आहें २. निर्गुण निराकार हरि, त्याला रूपामध्यें आणून सर्वांना सुलभ असा करून जवळ उभा केला ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याला मी आपले अधीन केला म्हणून आमच्या बोलावण्यानें तो उच्च निर्गुण स्थितींतून नीच सगुण स्थितीला आला आहे ४. [४८८]

आमच्या व्यवहाराला कधींही तूट येणार नाहीं, अशा तऱ्हेचें विठ्ठलनामरूपी खरें भांडवल आमच्या गांठीं सांपडलें १. अति स्वस्ताईचा विठ्ठलरूपी माल आमच्या घरांत सांपडल्यामुळें आम्ही वैखरी वाणींत भरून सांठवला २. हें भांडवल देण्याघेण्यांत सर्वांना लाभ होत आहे. मग तो दैववान् असो अगर दुर्बळ असो, ज्याचा जसा भाव असेल तसा त्याला लाभ होतो ३. एकवार विष्णुभक्तांच्या मेळ्यांत आला, म्हणजे तो कधींही निराश होऊन जाणार नाहीं. मग तो अज्ञानी, न कळणारा कां असेना? ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही चिंतारहित झालों. आतां या विठ्ठलनामरूपी भांडवला वांचून चित्तांत दुसरें कांहीं धरणार नाहीं ५. [४८९]

पावलोपावलीं मी आपलें अंग हरीला दिल्यामुळें माझें संपूर्ण कार्य झालें १. आतां जेवढी म्हणून पैस जागा होती, तो सर्व ठाव (ती सर्व जागा) मीं व्यापून राहिलों २. मनाला पुढें चालण्यांत आनंद आहे, आणि संतोषानें देह वाढत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, क्षणोक्षणीं क्षरणाऱ्या (नश्वर) जगताच्या मी आंत बाहेर व्यापक असा झालों आहें ४. [४९०]

निवडुनि दिलें नवनीत। संचित ते भोगिते ॥ १ ॥ आतां पुढें भाव सार। जीवना थार पाहावया ॥ २ ॥ पारखियाचे पडिलें हातीं। चांचपती आंधळीं ॥ ३ ॥ तुका म्हणे सेवन घडे। त्यासी जोडे लाभ हा ॥ ४ ॥ [४९१]

उचित न कळे इंद्रियांचे ओढी। मुखें बडबडी शिकलें तें ॥ १ ॥ आपण जाऊन न्यावें नरकास। बळें बेताळीस कुळें जग ॥ २ ॥ अबोलणें बोले डोळे झांकुनियां। बडबडी वायां दंभासाठीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही तेथील पारखी। नाचे दखोवेखीं जाणों खरें ॥ ४ ॥ [४९२]

एक मन तुझ्या अवघ्या भांडवला। वांटितां तें तुला येईल कैसें ॥ १ ॥ म्हणउनि दृढ धरीं पांडुरंग। देहा लावीं संग प्रारब्धाचा ॥ २ ॥ आणिक संकल्पा नको गोऊं मन। तरीच कारण साध्य होय ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसें जाणावें उचित। तरी सहजस्थित येईल कळों ॥ ४ ॥ [४९३]

गावें म्हणूनि गीत। धरुनि राहे तैसें चित्त ॥ १ ॥ हेंचि थोर अवघड आहे। अन्न देखोनि भूक राहे ॥ २ ॥ ऐकावी म्हूण कथा। राहे तैसें धरुनि चित्ता ॥ ३ ॥ तुका म्हणे धणी। नव्हे जेविल्यावांचुनि ॥ ४ ॥ [४९४]

कळेल हे खूण। तरि दावी नारायण ॥ १ ॥ सत्य संतापाशीं राहे। येरां भय आड आहे ॥ २ ॥ अणूचिया ऐसें। असे भरलें प्रकाशें ॥ ३ ॥ इंद्रियांचे धनी। ते हे जाती समजूनि ॥ ४ ॥ तर्क कुतर्क वाटा। नागवण घटापटा ॥ ५ ॥ तुका म्हणे ल्यावें। डोळां अंजन बरवें ॥ ६ ॥ [४९५]

जातो न येतिया वाटा। काय निरवितो करंटा ॥ १ ॥ कैसा जालासे बेश्रम। लाज नाहीं

आम्ही तर हरिनामरूपी लोणी हें सर्वांना निवडून दिलें आहे. ज्यांच्या प्रारब्धांत असेल, ते त्याचा भोग घेतील १. आतां ह्यापुढें जीवनाला जर कांहीं आधार पाहावयाचा असेल, तर भाव हेंच सार आहे २. जे कोणी परीक्षावंत आहेत, त्यांच्या हातीं निवडून दिलेलें हरिनामरूपी लोणी लागलें. विवेकाची दृष्टी नसल्यामुळें जे आंधळे असतील ते चाचपडत राहातील ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी ह्याचें सेवन करतील, त्यांनाच हा लाभ होईल ४. [४९१]

जे कोणी इंद्रियांचे आधीन झाले आहेत, त्यांना योग्य काय हें कळत नाहीं. जें कांहीं आपल्या गुरूंजवळ ते शिकले असतील त्याची कोरडी बडबड मात्र ते करतात १. असे जे कोणी आहेत ते आपण स्वतः नरकांत जातात व आपल्या बेचाळीस पूर्वजांसहित जगालाही नरकांत नेतात २. दंभानें डोळे झांकून, शब्दांच्या पलीकडची जी ब्रह्मवस्तु आहे, त्या ब्रह्मवस्तूचा मी अनुभवी आहें, असा आव घालून तिजविषयीं व्यर्थ बडबड करितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही तिथले परिक्षावंत आहोंत. जो दुसऱ्याचें पाहून ढोंगानें नाचतो, त्याच्या सर्व नाचण्याचा वास्तविक प्रकार आम्हीं जाणतों ४. [४९२]

सर्व व्यवहाराकडे एका काळींच तुला मनाची वांटणी कशी करतां येईल? १. देह हा प्रारब्धाचे स्वाधीन करून एक पांडुरंग चित्तामध्यें ठेव २. ह्यावांचून इतर गोष्टींच्या संकल्पाकडे मनाला गुंतवूं नकोस. असें जर होईल, तरच तुझें परमार्थकार्य साधलें जाईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा हा योग्य प्रकार जाणल्यानें सहज असणारा आत्मभाव कळेल ४. [४९३]

हरिनामाचें गीत म्हणूनच गायचें. जसें आपण गात आहोंत तसें चित्तांत धरावें १. हेंच मोठें अवघड आहे. भुकेलेल्या माणसानें शिजलेलें अन्न पाहूनच त्याची शांति होईल काय? २. हरीची कथा चित्तांत धरण्याकरितांच ऐकावयाची आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तृप्ति ही खरोखरच जेवल्यावांचून होणार नाहीं ४. [४९४]

ध्रुवपदामध्यें सांगितलेलें वर्म नारायण दाखवील तरच कळेल १. खरें संतांपाशीं असतें. इतर लोक भयदायक आहेत २. परमात्मा हा अणुपरमाणूचे अंतरीं असूनहि प्रकाशानें भरलेला आहे ३. ज्यांनीं आपलीं इंद्रियें स्वाधीन ठेविलीं आहेत, ते मात्र हें वर्म खरें खरें समजतात ४. अनेक प्रकारच्या तर्कांच्या किंवा कुतर्कांच्या वाटा आणि घटाकाश व पटतंतु इत्यादि वेदांत-दृष्टान्तांचे वाटाघाटींत नागवण आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, उत्तम ज्ञानांजन बुद्धीच्या डोळ्यामध्यें घालावें ६. [४९५]

कोणी एखादा मरायला टेकलेला मनुष्य आपल्या घरादारादि मालमत्तेची व्यवस्था करतो (म्हणजे) आपले बायकोस सांगतो कीं तूं अमूक घे. भावास सांगतो कीं तूं अमूक घे व आप्तांस सांगतो कीं तुम्ही अमूक घ्या. असा

न म्हणे राम ॥ २ ॥ पाहे वैरियाकडे । डोळे वासुनियां रडे ॥ ३ ॥ बांधुनियां यमा हातीं । दिला नाहीं त्याची खंती ॥ ४ ॥ नाहीं यांपें काम । ऐसें जाणतो अधम ॥ ५ ॥ अझुन तरी मुका । कां रे झालासि म्हणे तुका ॥ ६ ॥ [४९६]

वांटा घेईं लवकरी । मागें अंतरसी दुरी । केली भरोवरी । सार नेती आणीक ॥ १ ॥ ऐसीं भांबावलीं किती । काय जाणों नेणों किती । समय नेणती । माथां भार वाहोनी ॥ २ ॥ नाहीं सरिलें तोंवरी । धांव घेईं वेग करीं । घेतलें पदरीं । फावलें तें आपुलें ॥ ३ ॥ फट लंडी म्हणे तुका । एक न साहावे धक्का । तरिचि या सुखा । मग कैसा पावसील ॥ ४ ॥ [४९७]

चालावा पंथ तो पाविजे त्या ठाया। ऐकिल्या वायां वारता त्या ॥ १ ॥ ऐका जी वोजें पडतसे पायां । भावाचि ते जाया वाट नव्हे ॥ २ ॥ व्याली कुमारीचा अनुभवें अनुभव । सांगतां तो भाव येत नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें पाहिजे आरालें। बिंबीं निवळलें तरि भासे ॥ ४ ॥ [४९८]

काय नाहीं लवत झाडें । विसरे वेडें देहभाव ॥ १ ॥ जया न फळे उपदेश । धस ऐसें त्या नांव ॥ २ ॥ काय नाहीं असत जड । दगड तो अबोलणा ॥ ३ ॥ तुका म्हणे कुचर द्राणा । तैसा म्हणा डेंग हा ॥ ४ ॥ [४९९]

देखीचा दिमाख शिकोनियां दावी । हिऱ्याऐसी केवीं गारगोटी ॥ १ ॥ मर्यादा ते जाणे अरे अभागिया । देवाच्या ऐसिया सकळ मूर्ति ॥ २ ॥ काय पडिलाशी लटिक्याचे भरी । वोंवाळुनी थोरी परती सांडीं ॥ ३ ॥ तुका म्हणे पुढें दिसतसे घात । करितों फजित म्हणऊनी ॥ ४ ॥ [५००]

विनियोग करतो. पाहा काय आश्चर्य आहे ! जिकडून आपलें परत येणें कधींहि होणार नाहीं, अशा मृत्यूच्या वाटेला जात असतांही, मागच्या चीजवस्तूच्या व्यवस्थेची किती करंटा काळजी घेतो ! १. हा किती बेशरम झाला आहे. ह्या मूर्खाला बिलकूल लज्जा नसल्यामुळें, हा राम म्हणत नाहीं २. आपल्या वैऱ्याकडे रागानें डोळे वटारून पाहातो व रडतोही ३. ह्या सर्व स्त्री, पुत्र, आप्तवर्गांनीं यमाच्या हातीं त्याला बांधून दिला त्याचा ह्याला खेदही नाहीं ४. (नामस्मरण, दानधर्म इ०) ह्यांच्याशीं माझें कांहीं काम नाहीं असें तो अधम समजतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, असें तुझें सर्व आयुष्य गेलें, तरी अजून हरिनाम घेण्याविषयीं तूं मुका कसा आहेस ? ६. [४९६]

अरे, परमार्थाचा वांटा लवकर घे. नाहींतर दूर अंतरला जाशील. कितीही खटाटोप केलीस, तरी सार दुसरेच घेऊन जात आहेत १. अशीं कित्येक भ्रमामध्यें पडलीं, तें कळत नाहीं. तीं फुकट प्रपंचभार मात्र मस्तकावर वाहातात, आणि प्रसंग जाणत नाहींत २. जोंपर्यंत आयुष्य सरलें नाहीं तोंपर्यंत त्वरेनें धांव घे. जें पदरांत घेतलें आहे, त्याचा जेव्हां उपयोग होईल, तेव्हां तें आपलें होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे फटलंडी (नीचा), तुला परमार्थाचा एकही धक्का सहन होत नाहीं, असें जर आहे तर तूं ह्या परमार्थसुखाला कसा प्राप्त होशील ? ४. [४९७]

अशा मार्गानें जावें, कीं ज्या ठिकाणीं जावयाचें आहे, तेथें तो मार्ग बिनचूक नेऊन पोंचवील. त्या ठायीं प्राप्त होण्याचे पूर्वीच्या ज्या कांहीं हकीगती ऐकल्या असतील त्या तेथें प्राप्त झाल्यावर व्यर्थ आहेत १. अहो, मी काय पायां पडून सांगतों तें सरळ ऐका. भाव ही तेथें जाण्याची वाट नाहीं काय ? २. कुमारिका मुलीस, जी कोणी बाळंतीण झाली आहे, तिच्या बाळंतपणाचा अनुभव सांगतां येत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, येथें मन उत्कंठित पाहिजे, कारण जर बिंबाच्या ठिकाणीं आलेले ढग निवळले असतील तर बिंब भासेल (स्पष्ट दिसेल) ४. [४९८]

वारा आला म्हणजे झाडें वांकत नाहींत काय ? वेडा मनुष्य आपले देहाला विसरत नाहीं काय ? १. ज्याच्या ठिकाणीं उपदेश बिंबत नाहीं, त्यास धसाळ (म्हणजे अविचारी, जड) म्हणतात ३. दगड हा न बोलणारा जड असत नाहीं काय ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें कुचर दाणा शिजलेल्या अन्नांत मिळत नाहीं, त्याप्रमाणें हा मूर्ख परमार्थांत मिळत नाहीं ४. [४९९]

गारगोटी जरी हिऱ्यासारखी चमकली, तरी ती जशी हिरा होत नाहीं, त्याप्रमाणें दुसऱ्याचें पाहून शिकून डौल दाखविला, तर तें खरें नाहीं १. अरे करंट्या, सर्व भूतें हीं देवच आहेत, अशी शास्त्रमर्यादा आहे २. तूं खोट्याच्या भरीं काय पडलास ? आपल्या ठिकाणची थोरवी पलीकडे टाकून दे ३. तुकाराम महाराज म्हणतात, पुढें तुझा घात दिसतो, म्हणून मी तुला फजीत करतों ४ [५००]

संसाराचा माथां भार। कांहीं पर न ठेवी ॥ १ ॥ भक्तीची ते जाती ऐसी। सर्वस्वासी मुकावें ॥ २ ॥ भिक्षा आणि वेवसाव। काला करी तो गाढव ॥ ३ ॥ करुनि वस्ती बाजारीं। म्हणसी कासया निस्पृही ॥ ४ ॥ प्रसादा आडुनि कवी। केलें तूप पाणी तेवीं ॥ ५ ॥ तुका म्हणे होईं शूर। किंवा निसुर मजूर ॥ ६ ॥ [५०१]

तेज्या इशारती। तटा फोकावरी वेती ॥ १ ॥ काय सांगावें त्याहुनी। ऐका रे धरा मनीं ॥ २ ॥ नव्हे भांडखोर। धरूं ओढूनि पदर ॥ ३ ॥ तुका म्हणे तोंड। काळें करा खालीं मुंड ॥ ४ ॥ [५०२]

मागें संतीं होतें जें जें सांगितलें। तें येऊं लागलें अनुभवा ॥ १ ॥ आचारभ्रष्ट होती लोक कलीं। पुण्य क्षीण बळी झालें पाप ॥ २ ॥ वर्ण धर्म कोणी न धरिती विटाळ। घालिती गोंधळ एके ठायीं ॥ ३ ॥ वेदाचे पाठक सेवितील मद्य। न देखतो भेद विषयीं भांड ॥ ४ ॥ तुका म्हणे किती करावे फजित। तेचि छंद नित्य बहु होती ॥ ५ ॥ [५०३]

अक्षरांचा श्रम केला। फळा आला तेणें तो ॥ १ ॥ अवधियाचा तळ धरी। जीवा उरी नुरवूनी ॥ २ ॥ फळलें तें लवे भारें। पिक खरें आलें तईं ॥ ३ ॥ तुका म्हणे हा गे देव। पुढें भाव सारावा ॥ ४ ॥ [५०४]

उचित जाणावें मुख्य धर्म आधीं। चित्त शुद्ध बुद्धि ठायीं स्थीर ॥ १ ॥ न घालावी धांव मनाचिये ओढी। वचन आवडी संतांचिये ॥ २ ॥ अंतरीं या राहे वचनाचा विश्वास। न लगे उपदेश तुका म्हणे ॥ ३ ॥ [५०५]

जीवनन्मुक्त ज्ञानी जरी झाले पावन। त्यजावी दुर्जन संगतिही ॥ १ ॥ बहुत अन्न विष

(प्रत्येक मनुष्य) संसाराचा माथ्यावर असलेला भार कांहीं पलीकडे ठेवीत नाहीं १. भक्तीची तर जाति अशी आहे, कीं तिच्याकरतां सर्वस्वाचा त्याग केला पाहिजे २. भिक्षा मागणें आणि धंदा करणें, ह्यांचा काला (मिश्रण) करितो, तो गाढव आहे ३. लोभानें भरबाजारांत वस्ती करतोस आणि मी निरिच्छ आहें असें म्हणतोस ४. एखाद्या प्रासादिक कवीच्या कवितेंतील वाक्यें घेऊन आपल्या कवित्वांत मिसळून प्रासादिकपणाचा रंग दाखवितो. हें त्याचें करणें तुपांत पाणी मिसळल्याप्रमाणें आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, एक शूर तरी हो, नाहीं तर निवळ मजूर तरी हो ६. [५०१]

तेजी (अतिचपळ, जातिवंत) घोड्याला इशारत केल्याबरोबर तो त्याप्रमाणें वागतो, परंतु तट्टास कितीही फोक मारिले तरी तें ऐकत नाहीं १. काय सांगावें ! तुम्हीं त्या तट्टापेक्षां का नीच आहांत ? अरे, मी सांगतों तें ऐका व मनीं धरा २. मी तसा भांडखोर नाहीं कीं तुमचा पदर ओढून धरीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, खालीं मान घालून तोंड काळें करा ४. [५०२]

पूर्वी संतांनीं पुढें जें जें होणारें म्हणून सांगितलें होतें, तें तें माझ्या अनुभवास येऊं लागलें १. कलियुगामध्यें लोक आचारहीन होतील. त्या योगानें पुण्य कमी होऊन पाप अधिक वाढेल २. वर्णधर्माचा कोणी विटाळ धरणार नाहीं; एके ठिकाणीं चारी वर्ण न करण्याचे व्यवहार करतील ३. वेदपाठ करणारे दारू सेवन करतील; ते भांडखोर, विषयांच्या ठिकाणीं भेद पाहाणार नाहींत ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांची किती जरी फजिती केली, तरी त्यांचे निरंतर पुष्कळ तेच छंद आहेत ५. [५०३]

अक्षरांचें जें कांहीं पाठ-पाठांतर केलें आहे, तें (ध्रुवपदांत सांगितल्या स्थितीच्या योगानें) सफळ झालें १. जीवदशा नाहींशी करून सर्व प्राणिमात्राचे ठिकाणीं जो नम्र आहे २. वृक्षाला फळें लागलीं म्हणजे त्या फळांच्या भारानें तें झाड खालीं लवतें व अशी वृक्षाची स्थिति झाली, म्हणजे खूप पीक आलें असें समजावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो, तुम्ही आपला भाव देवापुढें ठेवा ४. [५०४]

चित्त शुद्ध होऊन, बुद्धि पांडुरंगचरणीं स्थिर होणें, हाच धर्म श्रेष्ठ व योग्य आहे, असें जाणावें १. मनाच्या ओघांकडे आपण कोणी कधींही धावूं नये आणि संतांच्या वचनांवर प्रेम ठेवावें २. तुकाराम महाराज म्हणतात, संतवचनाचा विश्वास अंतःकरणांत राहील तर त्यास उपदेश करणें नलगे ३. [५०५]

कितीएक आत्मज्ञानी पुरुष जरी जीवन्मुक्त होऊन पावन झाले, तरीही त्यांनीं दुर्जनांची संगति टाकावी (कितिहि मनुष्य चांगला असला तरी दुर्जनाचे संगतीनें त्याचा नाश होतो.) १. ज्याप्रमाणें अन्न पुष्कळ चांगलें असलें, तरी

मोहरीच्या मानें। अवघेंचि तेणें विष होय ॥ २ ॥ तुका म्हणे जेणें आपुलें स्वहित। तैसी करा नीत विचारूनि ॥ ३ ॥ [५०६]

द्रव्याचा तो आम्हीं धरितों विटाळ। तयापाठीं काळ लाग करी ॥ १ ॥ करोनियां हेंचि राहिलों जीवन। एक नारायण नाम ऐसें ॥ २ ॥ तुका म्हणे हेंचि करुनि जतन। आलिया ही दान याचकासी ॥ ३ ॥ [५०७]

द्रव्याचिया मागें कळिकाळाचा लाग। म्हणोनियां संग खोटा त्याचा ॥ १ ॥ निरयाचें मूळ घालुनियां मागें। मांडिली प्रसंगें कथा पुढें ॥ २ ॥ आजिच्या प्रसंगें हाचि लाभ घ्यावा। पुढील भार देवावरी घाला ॥ ३ ॥ प्रारब्ध कांहीं न पालटे सोसें। तृष्णेचें हें पिसें वायांविण ॥ ४ ॥ तुका म्हणे घेईं राहे ऐसें धन। सादर श्रवण करोनियां ॥ ५ ॥ [५०८]

रडे अळंकार दैनाचिये कांती। उत्तमा विपत्तिसंग घडे ॥ १ ॥ एकाविण एक अशोभ्य [भ] दातारा। कृपेच्या सागरा पांडुरंगा ॥ २ ॥ रांधूं नेणें तया पुढील आइतें। केलें तें सोइतें वायां जाय ॥ २ ॥ तुका म्हणे चिंतामणि शेळी गळां। पावे अवकळा म्हणऊनी ॥ ४ ॥ [५०९]

दुःखाचे डोंगर लागती सोसावे। ऐसें तंव ठावें सकळांसी ॥ १ ॥ कांहीं न करिती विचार हिताचा। न करिती वाचा नामघोष ॥ २ ॥ तुका म्हणे येथें झांकितील डोळे। भोग देतेवेळे येइल कळों ॥ ४ ॥ [५१०]

सदैव तुम्हां अवघें आहे। हातपाय चालाया ॥ २ ॥ मुखीं वाणी कानीं कीर्ति। डोळे मूर्ति

मोहरीएवढें विष त्यांत घातल्यानें तें सर्व विष होतें २. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांत आपलें स्वहित आहे तीच गोष्ट नीतीचा विचार करून करा ३. [५०६]

द्रव्याचा आम्हीं विटाळ मानला आहे, कारण त्याच्या मागें काळ पाठलाग करतो १. एक नारायणाचें नाम हेंच जीवन मी धरून राहिलों २. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं हेंच जतन करून आमचेकडे जे याचक येतील त्यांस हेंच दान देऊं ३. [५०७]

द्रव्याचे मागें काळाचा पाठलाग आहे, म्हणून त्याचा संग करणें खोटें आहे १. नरकाचें मूळ जें द्रव्य त्याचा त्याग करून, मी येथून पुढें प्रसंगविशेषीं कथा करीत आहें २. अहो, आजच्या प्रसंगीं कथेचा लाभ घ्या आणि पुढच्या योगक्षेमाचा भार देवावर ठेवा ३. आपलें चांगलें व्हावें व आपणास दुःख मिळूं नये, अशाविषयीं आपण कितीहि सोस केला, तरी त्यानें आपल्या प्रारब्धांत दुःख मिळावयाचें असेल, व आपलें वाईट व्हावयाचें असेल, तर तें कधींहि बदलावयाचें नाहीं; म्हणून कोणत्याही गोष्टीसबंधानें तृष्णा करण्याचें, (लोभ धरण्याचें) वेड व्यर्थ आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, मोठ्या दक्षतेनें परमार्थाचें श्रवण करून नित्य टिकेल अशा परमार्थधनाचें ग्रहण कर ५. [५०८]

अलंकार घालणाऱ्यामध्यें तेज व सौंदर्याचें दैन्य असेल, तर त्यानें अंगावर घातलेले अलंकार रडके म्हणजे विशोभित आहेत; कारण ते अलंकार जरी उत्तम आहेत, तरी ज्याचा संग त्यांना घडला आहे, ते कुरूप व दरिद्री आहेत १. अहो देवा, कृपेच्या सागरा, एकासारखें दुसरें योग्य नसेल तर तें विशोभित आहे २. ज्याला स्वयंपाक करतां येत नाहीं, त्याचे पुढें स्वयंपाकाची सामुग्री जरी आयती यथास्थित करून ठेविली तरी ती व्यर्थ जाते ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर शेळीच्या गळ्यांत कोणीं चिंतामणी बांधला तर तें विशोभित होतें ४. [५०९]

ह्या संसारामध्यें दुःखाचे डोंगरच डोंगर भोगावे लागतात, हें सर्वांना माहीत आहे १. असें जरी आहे तरी आपल्या हिताचा विचार कांहींच करीत नाहींत, व हरीच्या नामाचा वाचेनें घोष करीत नाहींत २. हलीं आपल्याला होणारे सुखदुःखाचे भोगावरून आपला मागील जन्म उत्तम होता, किंवा मध्यम होता, अगर कनिष्ठ होता हें सर्व समजतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे मूर्ख ह्या ठिकाणीं बळेंच डोळे झाकीत आहेत, परंतु परिणामीं कृतकर्माच्या फलभोगकालीं आपण मोठी चुकी केली, हें त्यांना समजेल ४. [५१०]

अहो तुम्हीं मोठे दैववान् आहांत, तुम्हांला हस्तपादादिक इंद्रियें म्हणजे देण्याघेण्याला हात व चालण्याला पाय आहेत १. हरीची कीर्ति वर्णन करण्याला व्यवस्थित मुख व ती श्रवण करण्याला व्यवस्थित कान आहेत. हरीची मूर्ति

देखाया ॥ २ ॥ अंध बहिर ठकलीं किती । मुकीं होती पांगुळ ॥ ३ ॥ घरा आगी लावुनि जागा । न पळे तो गा वांचेना ४ तुका म्हणे जागा हिता । कांहीं आतां आपुलया ॥ ५ ॥ [५११]

ऐसे पुढती मिळतां आतां । नाहीं सत्ता स्वतंत्र ॥ १ ॥ म्हणउनि फावलें तें घ्यावें । नाम गावें आवडी ॥ २ ॥ संचित प्रारब्ध गाढें । धांवे पुढें क्रियमाण ॥ ३ ॥ तुका म्हणे घुबडा ऐसें । जन्म सरिसें शुकराचें ॥ ४ ॥ [५१२]

सर्वविशीं माझा त्रासलासे जीव । आतां कोण भाव निवडूं एक ॥ १ ॥ संसाराची मज न साहेचि वार्ता । आणीक म्हणतां माझें कोणी ॥ २ ॥ देहसुख कांहीं बोलिले उपचार । विष तें आदर बंद (ध) वाटे ॥ ३ ॥ उपाधि दाटणी प्रतिष्ठा गौरव । होय माझा जीव कासावीस ॥ ४ ॥ तुका म्हणे कांहीं आणीक न साहे । आवडती पाय वैष्णवांचे ॥ ५ ॥ [५१३]

आणीक कांहीं या उत्तराचें काज । नाहीं आतां मज बोलावया ॥ १ ॥ भिन्न भेद हे भावना स्वभाव । नव्हे कांहीं देव एकविध ॥ २ ॥ गुण दोष कोणें निवडावे धर्म । कोण जाणे कर्म अकर्म तें ॥ ३ ॥ तरिच भलें आतां न करावा संग । दुःखाचा प्रसंग तोडावया ॥ ४ ॥ तुका म्हणे गुण गाईं या देवाचे । घेईं माझे वाचे हेंचि धणी ॥ ५ ॥ [५१४]

आपुला विचार करीन जिवाशीं । काय या जनाशीं चाड मज ॥ १ ॥ आपुलें स्वहित जाणती सकळ । निरोधितां बळें दुःख वाटे ॥ २ ॥ आइको नाइको कथा कोणी तरी । जाऊनिया घरीं निजो सुखें ॥ ३ ॥ माझी कोण वोज जाला हा शेवट । देखोनियां वाट आणिकां लागे ॥ ४ ॥ तुका म्हणे भाकूं आपुली करुणा । जयाची वासना तया फळे ॥ ५ ॥ [५१५]

पाहाण्याला व्यवस्थित डोळे आहेत २. आजपर्यंत आंधळे, बहिरे, मुके, पांगळे होऊन कितीएक हरिभजनाला मुकले आहेत ३. आपल्या घराला आग लावून आपण घरामध्यें जागृत आहे, अशा स्थितीमध्यें जो तेथून पळणार नाहीं, तो कधींहि वांचणार नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, अजून तरी आपल्या हिताविषयीं जागृत राहा ५. [५११]

नरदेहासारखें उत्तम धन पुढें मिळण्याइतकी आपल्या अंगीं ह्या प्रसंगीं (हल्लींच्या मनुष्यदेहांत) स्वतंत्र सत्ता नाहीं १. ह्याकरितांच आपल्याला हा जो नरदेह सहज मिळाला आहे, त्यामध्यें हरीचें नाम मोठ्या आवडीनें गावें २. कारण संचित व प्रारब्ध हीं मोठीं जबरदस्त आहेत, आणि क्रियमाणाची गति सारखी जोरानें पुढें चालली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, पुढें घुबडाचे, डुकराचे हीन जन्म मिळतील ३. [५१२]

सर्व ऐहिक व पारत्रिक विषयांसंबंधानें माझा जीव अति त्रासला आहे. आतां कोणत्या वस्तूचा त्रास आला आहे म्हणून निवडून सांगूं? १. संसाराची तर गोष्टही मला सहन होत नाहीं, आणि दुसऱ्यानें, हा माझा आहे असें म्हटलें असतां, तें मला सोसत नाहीं २. (चांगली मऊ गादी, आंगाला चंदन लावणें, पुष्पमाला इत्यादिक) देहाला सुख देणाऱ्या उपचारांपासून मला सुख न होतां त्यांचा आदर अगर ते भोगणें हें विषवत् वाटतें, अथवा बंधनवत् वाटतें. ३. माझा कोणी मोठेपणा वर्णन केला अगर मला कोणी मोठा मान दिला तर ह्या उपाधीनें मला संकोच होऊन माझा जीव अतिशय कासावीस होतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, मला दुसरें कांहीं सोसत नाहीं. एक विष्णुभक्तांचे पाय फार आवडतात ५. [५१३]

दुसरें कांहीं बोलण्याचें कारण मला उरलें नाहीं १. नाना प्रकारचा भेद हा केवळ आपल्या निरनिराळ्या भावनेचा प्रकार नाहीं काय? खरोखर देव हा एकविध (एकच) नाहीं काय? २. गुण आणि दोष आदिकरून धर्माची कोणी निवड करावी? कर्म कशाला म्हणावें व अकर्म कशाला म्हणावें, हें कोणीं जाणावें? ३. खरोखर जर दुःखाचा संबंध तोडावयाचा असेल, तर कोणत्याही गोष्टीचा संग न करणें हें उत्तम ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे माझे वाणी, तूं देवाचे गुण गा आणि त्याच्याच चिंतनानें तृप्त हो ५. [५१४]

मला जो कांहीं परमार्थासंबंधानें विचार करणें आहे, तो मी जीवाशीं करीन. मला जनांची काय जरूर आहे? १. सर्व प्राणी आपापलें स्वहित जाणत आहेत, त्यांचा कृतकर्मांपासून बलात्कारानें निरोध करूं गेलें असतां, त्यांना दुःख वाटतें २. माझी कथा ऐकोत अगर न ऐकोत, अगर आपल्या घरीं सुखानें जाऊन निजोत ३. ह्या परमार्थामध्यें माझा काय चांगला शेवट लागला, कीं तो पाहून दुसऱ्यांना हा परमार्थाचा मार्ग चांगला लागेल! ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही आपल्या स्वतःविषयीं मात्र देवाजवळ काकुळती येऊं (त्याची करुणा भाकूं). ज्याची जशी वासना असेल तशी ती त्याला फलद्रूप होईल ५. [५१५]

धाई [ध्याई] अंतरींच्या सुखें । काय बडबड वाचा मुखें ॥ १ ॥ विधि निषेध उर फोडी । जंव नाहीं अनुभव गोडी ॥ २ ॥ वाढे तळमळ उभयतां । नाहीं देखिलें अनुभवितां ॥ ३ ॥ आपुलाल्या मतें पिसें । परि तें आहे जैसें तैसें ॥ ४ ॥ साधनाची सिद्धि । मौन करा स्थिर बुद्धि ॥ ५ ॥ तुका म्हणे वादें । वाया गेलीं ब्रह्मवृंदें ॥ ६ ॥ [५१६]

कुशळ गुंतले निषेधा । वादी प्रवर्तले वादा ॥ १ ॥ कैसीं ठकलीं बापुडीं । दंभविषयांचे सांकडीं ॥ २ ॥ भूस उपणुनि केलें काय । हारपले दोन्ही ठाय ॥ ३ ॥ तुका म्हणे लागे हातां । काय मथिलें घुसळितां ॥ ४ ॥ [५१७]

संतांचीं उच्छिष्टें बोलतों उत्तरें । काय म्यां गव्हारें जाणावें हें ॥ १ ॥ विठ्ठलाचें नाम घेतां नये शुद्ध । तेथें मज बोध काय कळे ॥ २ ॥ करितों कवित्व बोबड्या उत्तरीं । झणी मजवरि कोप धरा ॥ ३ ॥ काय माझी याति नेणां हा विचार । काय मीं तें फार बोलों नेणें ॥ ४ ॥ तुका म्हणे मज बोलवितो देव । अर्थ गुह्य भाव तोचि जाणे ॥ ५ ॥ [५१८]

चंदनाच्या वासें धरितील नाक । नावडे कनक न घडे हें ॥ १ ॥ साकरेची गोडी सारिखी सकळां । थोरां मोठ्यां बाळां धाकुटियां ॥ २ ॥ तुका म्हणे माझें चित्त शुद्ध होतें । तरि कां निंदिते जन मज ॥ ३ ॥ [५१९]

तुज ऐसा कोण उदाराची रासी । आपुलेंचि देसी पद दासा ॥ १ ॥ शुद्ध हीन कांहीं न पाहासी कुळ । करिसी निर्मळ वास देहीं ॥ २ ॥ भावें हें कदान्न खासी त्याचे घरीं । अभक्तांच्या परी नावडती ॥ ३ ॥ नवजासी जेथें दुरी दवडितां । न येसी जो चित्ता योगियांच्या ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐसीं ब्रिदें तुझीं खरीं । बोलतील चारी वेद मुखें ॥ ५ ॥ [५२०]

अंतःकरणामध्यें हरीचें ध्यान करून त्यामध्यें तृप्त असा; मुखानें काय बडबड करतां ? १. जोंपर्यंत हरीच्या सुखानुभवाची गोडी नाहीं २. तोंपर्यंत विधिनिषेधाची उरस्फोड करावी लागते ३. जोंपर्यंत अनुभवाला आलें नाहीं, तोंपर्यंत अंतर्बाह्य तें तत्त्व जसेंच्या तसेंच आहे ४. तुम्ही आपली बुद्धि स्थिर करून वाणी मौन करा. हीच साधनाची सिद्धि आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, वाद करकरून ब्राह्मणसमुदाय वायां गेला ६. [५१६]

शास्त्रामध्यें जे चतुर आहेत ते विधिनिषेधामध्यें गुंतले आहेत. वादी हे वादाकडे प्रवृत्त झाले २. दंभाच्या व विषयांच्या संकटामध्यें हीं दीन बापुडीं कशीं फसलीं गेलीं पाहा ! २. असार भुसाच्या उपणण्यांत (वारावण्यांत, पाखडण्यांत) काय मिळालें ? तर भूस व दाणे ह्या दोन्हीलाहि उपणणारा मुकला. ३. तुकाराम महाराज म्हणतात, मंथन करून ज्याच्यांतील लोणी काढिलें आहे, अशा ताकास पुन्हां घुसळलें असतां हाताला काय लागणार ? ४. [५१७]

मी जें कांहीं बोलतों ते सगळे (व्यासादिक) संतांचे उष्टे शब्द आहेत. एरवीं मला, मूर्खाला काय कळत आहे ? १. मला विठोबाचें नाम देखील चांगलें शुद्ध घेतां येत नाहीं. अशा मज जडाला आत्मबोध (शास्त्रार्थ) काय कळणार ? २. जें कांहीं मी कवित्व करतों, तें बोबड्या शब्दांनीं करीत आहें, ह्यासंबंधानें तुम्ही मजवर रागावूं नका ३. माझी जात कोण आहे, काय आहे, हें तुम्ही जाणत नाहीं ? ह्याविषयीं मला फार बोलतां येत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी जें बोलतों तें सर्व देव मजकडून बोलवितो. त्याचा गुह्यार्थभाव काय, हाही तोच जाणत आहे ५. [५१८]

चंदनाचा सुगंध आल्यानें कोणी नाक धरील काय ? सोनें कोणाला आवडत नाहीं, असें कधींही घडणार नाहीं १. साखरेची गोडी थोरांना, मध्यमांना, लहानांना, सर्वांना सारखी लागते २. तुकाराम महाराज म्हणतात, माझें जर चित्त शुद्ध असतें, तर लोकांनीं माझी निंदा कां केली असती ? ३. [५१९]

तुझ्यासारखा औदार्यामध्यें श्रेष्ठ कोण आहे ? साक्षात् आपलें स्वतःचेंच पद तूं आपल्या दासांना देतोस; चांगलें कूळ, वाईट कूळ हें कांहीं तूं पाहात नाहींस १. ज्या कोणाचा कामक्रोधरहित निर्मळ देह झाला असेल, त्या देहामध्यें तूं वास्तव्य करितोस २. मोठ्या प्रीतीनें असल्या भक्तांच्या घरीं जाऊन तूं निरस अन्नाचें सेवन करितोस. अभक्तांचे लाडू, जिलब्यादि प्रकारही तुला आवडत नाहींत ३. भक्तांच्या घरांतून त्यांनीं जरी तुला हांकून दिलें तरी तूं जात नाहींस; पण तूं इतका दुर्लभ आहेस, कीं रात्रंदिवस तुझें ध्यान करीत बसलेल्या योग्यांच्या ध्यानांत (चित्तांत) देखील तूं येत नाहींस ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशीं तुझीं खरीं खरीं ब्रीदें आहेत असें चार वेद सांगतात ५. [५२०]

तरि कां नेणते होते मागें ऋषि । तींहीं या जगासी दुराविलें ॥ १ ॥ वोळगती जया अष्ट महा सिद्धी । ते या जनबुद्धी नातळती ॥ २ ॥ कंद मुळें पाला धानूच्या पोषणा । खाती वास राना तरी केला ॥ ३ ॥ लावुनियां नेत्र उगेचि बैसले । न बोलत ठेले मौन्यरूप ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐसें करीं माझ्या चित्ता । दुरावीं अनंता जन दूरी ॥ ५ ॥ [५२१]

कोणाच्या आधारें करूं मी विचार । कोण देईल धीर माझ्या जीवा ॥ १ ॥ शास्त्रज्ञ पंडित नव्हे मी वाचक । यातिशुद्ध एक ठाव नाहीं ॥ २ ॥ कलियुगीं बहु कुशल हे जन । छळितील गुण तुझे गातां ॥ ३ ॥ मज हा संदेह झाला दोहीं सवा । भजन करूं देवा किंवा नको ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां दुरावितां जन । किंवा हें मरण भलें दोन्ही ॥ ५ ॥ [५२२]

काय उणें झालें तुज समर्थासी । ऐसा मजपाशीं कोण दोष ॥ १ ॥ जो तूं माझा न करिसी अंगीकार । सांगेन वेव्हार संतांमधीं ॥ २ ॥ तुजविण रत आणिकाचे ठायीं । ऐसें कोण ग्वाही दावीं मज ॥ ३ ॥ तुका म्हणे काय धरुनि गुमान । सांग उगवून पांडुरंगा ॥ ४ ॥ [५२३]

काय करूं आन दैवतें । एकाविण पंढरीनाथें ॥ १ ॥ सरिता मिळाली सागरीं । आणिका नांवा कैंची उरी ॥ २ ॥ अनेक दीपींचा प्रकाश । सूर्य उगवतां नाश ॥ ३ ॥ तुका म्हणे नेणें दुजें । एकाविण पंढरीराजें ॥ ४ ॥ [५२४]

काय करूं कर्माकर्म । बरें सांपडलें वर्म ॥ १ ॥ होसी नामाची सारिखा । समजाविली नाहीं लेखा ॥ २ ॥ नाहीं वेंचावेंच झाला । उरला आहेसी संचला ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें ।

पूर्वीं ऋषि का अज्ञानी होते ? त्यांनीं ह्या सर्व जगाचा त्याग केला १. अणिमादिक अष्ट सिद्धी ज्यांच्या सेवेविषयीं निरंतर तत्पर आहेत, ते देखील संसारी जनांच्या बुद्धीनें वागले नाहींत २. त्यांनीं आपल्या शरीरपोषणाकरितां कंद, मुळें, पाला हीं खाऊन निरंतर वनामध्यें वास्तव्य केलें ३. त्या ठिकाणी कांहीं न बोलतां केवळ मौनपणा घेऊन डोळे झांकून ते स्वस्थ बसले ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे अनंता, ह्याप्रमाणें माझ्याही चित्ताची स्थिति तूं कर, आणि हे सर्व जन मजपासून दूर कर ५. [५२१]

कोणाच्या आश्रयानें मीं विचार करूं ? कोण मला धैर्य देईल ? १. मी शास्त्र जाणणारा नाहीं, अगर पांडित्य करणारा नाहीं, आणि मोठा वाचकही नाहीं. माझी जातही शुद्ध नाहीं. मला कोणताही एक आधार नाहीं २. कलियुगामध्यें लोक फार कुशल आहेत. अहो देवा, तुमचे गुण गाऊं लागलें असतां ते माझा छळ करितात ३. मला दोन्हींही बाजूंनीं संशय उत्पन्न झाला आहे; आतां मी तुमचें भजन करूं कीं नको ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, एक सर्व जनाचा त्याग करून जावें अगर मरावें, ह्या दोन गोष्टी मला बऱ्या दिसतात ५. [५२२]

अहो देवा, तुम्ही समर्थ आहांत. तुमच्या ठिकाणीं कोणती उणीव आली व माझ्या आंगीं असा कोणता दोष आहे १. कीं ज्यामुळें तूं माझा अंगीकार करीत नाहींस; पण हा सर्व व्यवहार मी संतांना सांगेन २. तुमच्यावांचून मी अन्य कोणाच्या ठिकाणीं सक्त आहें ३. ह्याविषयीं कोण साक्षीदार आहे तो मला दाखवा. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, येथें भीड धरून काय उपयोग आहे ? जो खरोखर प्रकार आहे, तो तुम्हीं उलगडून सांगा ४. [५२३]

एका पंढरीनाथावांचून मला दुसऱ्या देवतांना भजून काय करावयाचें आहे ? १. नदी समुद्रांत मिळाल्यावर मग ती वेगळ्या नांवानें कोठें उरते ? २. अनेक दिव्यांचा प्रकाश सूर्य उगवतांच नाहींसा होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका पंढरीरायावांचून मी दुसरें कांहीं जाणत नाहीं ४. [५२४]

कर्म-अकर्म ह्यांना घेऊन काय करूं ? ह्या सर्वांचें जें मुख्य वर्म तें माझ्या हातीं चांगलें लागलें आहे १. (तुझें दीनदयाळु नाम आहे) त्याप्रमाणें तूं होतोस. आजपर्यंत ज्यांनीं ज्यांनीं म्हणून तुझ्या नामाचा आश्रय केला अशा असंख्य जीवांना तूं समजाविलेंस, म्हणजे त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांना दिलेंस २. आजपर्यंत तुझ्या स्वरूपांतला वेंच (खर्च) अगर अवेंच (जमा) असा प्रकार कांहींच झाला नाहीं. जसेचे तसेच तुम्ही आहांत ४. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, माझा तुम्ही अंगीकार केल्यानें तुम्हांला ओझें होईल काय ? ४ [५२५]

कितीएक बलाढ्य साधुसंत हातावर हात मारून पांडुरंगपदाच्या ठिकाणीं प्राप्त झाले १. पण देवा, तशी शक्ति आमच्या अंगीं नाहीं; आम्ही निःशक्त आहोंत, म्हणून तुमच्याजवळ करुणा भाकीत राहूं २. ज्यांच्या अंगीं बळ होतें,

काय होईल तुम्हां ओझें ॥ ४ ॥ [५२५]

एकीं केली हातोफळी । ठाया बळी पावले ॥ १ ॥ आम्ही देवा शक्तिहीनें । भाकूं तेणें करुणा ॥ २ ॥ पावटणी केला काळ । जया बळ होतें तें ॥ ३ ॥ तुका म्हणे वीर्यावीर । संत धीर समुद्र ॥ ४ ॥ [५२६]

पुढिलांचें इच्छी फळ । नाहीं बळ तें आंगीं ॥ १ ॥ संत गेले तया ठाया । देवराया पाववीं ॥ २ ॥ ज्येष्ठांचीं कां आम्हां जोडी । परवडी न ला(ल)भों ॥ ३ ॥ तुका म्हणे करीं कोड । पुरवीं लाड आमुचा ॥ ४ ॥ [५२७]

कैवल्याच्या तुम्हां घरीं । रासी हरी उदंड ॥ १ ॥ मजसाठीं कां जी वाणी । नव्हे धणी विभागा ॥ २ ॥ सर्वा गुणीं सपुरता । ऐसा पिता असोनी ॥ ३ ॥ तुका म्हणे पांडुरंगा । झालों सांगा सन्मुख ॥ ४ ॥ [५२८]

आपुलाल्या तुम्ही रूपासी समजा । कासया वरजा अ(आ)रसिया ॥ १ ॥ हें नव्हे देहबुद्धीचें कारण । होईल नारायणें दान केलें ॥ २ ॥ बब्रू(अब्रू)चिया बाणें वर्मासि स्पर्शावें । हें तों नाहीं ठावें मोकलित्या ॥ ३ ॥ तुका म्हणे बहु सुख (सुखें) या वचना । सत्याविण जाणा चाली नाहीं ॥ ४ ॥ ॥ ५२९ ॥

न मानावी चिंता तुम्हीं संतजनीं । हिरा स्फटिकमणी केविं होय ॥ १ ॥ पडिला प्रसंग स्थळा त्यासारिखा । देखिला पारिखा भाव कांहीं ॥ २ ॥ बहुतांसी भय एकाचिया दंडें । बहुत या तोंडें वचनासी ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं वैखरी बासर । करायाचे चार वेडे वेडे ॥ ४ ॥ [५३०]

यथाविधि पूजा करी । सामोग्री तोंवरि हे नाहीं ॥ १ ॥ आतां माझा सर्व भार । तूं दातार चालविता ॥ २ ॥ मंगळ तें तुम्हीं जाणा । नारायणा काय तें ॥ ३ ॥ तुका म्हणे समर्पिला । तुज विठ्ठला देहभाव ॥ ४ ॥ [५३१]

अशा समर्थ संतांनीं काळाची पाय टेवण्याची पायरी केली (काळाच्या डोक्यावर पाय देऊन तुझें स्थान मिळविलें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, संत हे सगळ्या शूरांतले शूर असून धैर्याचे केवळ सागरच आहेत ४. [५२६]

आमच्या पुढें जाऊन ज्या फळाची संतांनीं प्राप्ति करून घेतली, त्याच फळाची मीही इच्छा करीत आहें. तें फळ आपल्या कमाईनें मिळवावें अशी माझ्या अंगीं शक्ति नाहीं १. म्हणून ज्या ठिकाणीं संत जाऊन पोंचले आहेत, त्या ठिकाणीं मला नेऊन पोंचवा २. आमचे वडील जे संत, त्यांनीं करून घेतलेला लाभाचा वांटा आम्हाला कां मिळूं नये? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, तुम्ही एवढे आमचे कोडकौतुकानें लाड पुरवा ४. [५२७]

अहो हरी, तुमच्या घरीं मोक्षाच्या पुष्कळ राशी आहेत १. असें असून माझ्या करितांच काय एवढा तोटा झाला? त्याच्या विभागाविषयीं मी कां मालक नाहीं? २. सर्व गुणांनीं परिपूर्ण असा पिता असूनही (पुढें ध्रुवपद वाचावें.) ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो पांडुरंगा, मी तुमच्या समोर आलों आहें. आतां काय सांगणें असेल तें सांगा (मीं असा दरिद्री, हीन कां राहूं?) ४. [५२८]

अहो लोकहो, आपलें नाक नकटें आहे, त्या योगानें आपलें स्वरूप कुरूप आहे असें तुम्ही जाणा. विनाकारण आरशावर रागावून त्याचा त्याग कां करितां? १. देहलोभ धरल्यानें नाकीं डोळीं नीटस असा सौंदर्यपणा येत नाहीं. तो जर नारायणानें दिला असेल, तरच मिळेल २. बब्रूनें (अब्रू–दुर्जनानें) सोडलेल्या (वाग्) बाणानें शत्रूचा (अब्रूदार माणसाचा) मर्मभेद करावा, पण बाण सोडणाऱ्या बब्रूस (दुर्जनास) तें कांहीं कळत नाहीं. ३. तुकाराम महाराज म्हणतात, खऱ्या शब्दामध्यें (सत्यवचनामुळें) पुष्कळ सुख आहे. (पाठभेद : 'सुखें'–हें सर्वतोमुखीं आहे कीं परमार्थांत सत्याचा विचार केल्यांवाचून प्रवेश नाहीं,) त्यावांचून कोठेंही मार्ग नाहीं, असें समजा ४. [५२९]

अहो संतजन हो, तुम्ही कांहीं चिंता करितां कामा नये; कारण, स्फटिकाचा दगड हिरा कसा होईल? १. ज्या ठिकाणीं आपण आहोंत, त्या स्थलानुरूप प्रसंग आला आहे, म्हणून कांहीं परका भाव पाहाण्यांत आला २. एकाच्या (एका दुर्जनाच्या) शिक्षेनें पुष्कळांना भय असतें. शब्दांनांही पुष्कळ तोंडें असतात (हें वचन पुष्कळांच्या तोंडीं आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, वेडे वेडे प्रकार करण्यासारखी (संतांची) वाणी स्वैर नाहीं. ४. [५३०]

यथास्थित पूजा करण्याइतकी मजजवळ सामुग्री नाहीं १. अहो दात्या देवा, माझें सर्व ओझें तुम्हीं चालविणारे आहांत २. हे नारायणा, मंगळ म्हणून जें कांहीं आहे तें तुम्हींच जाणणारे आहांत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठ्ठला आम्ही आपली देहबुद्धि तुम्हांला समर्पण केली आहे ४. [५३१]

भवसिंधूचें हेंचि तारूं । मज विचारूं पाहातां ॥ १ ॥ चित्तीं तुझे धरिन पाय । सुख काय तें तेथें ॥ २ ॥ माझ्या खुणा मनापाशीं । तें या रसीं बुडालें ॥ ३ ॥ तुका म्हणे वर्म आलें । हातां भलें हें माझ्या ॥ ४ ॥ [५३२]

पाहतां श्रीमुख सुखावलें सुख । डोळियांची भूक न वजे माझ्या ॥ १ ॥ जिव्हे गोड तीन अक्षरांचा रस । अमृत जयास फिकें पुढें ॥ २ ॥ श्रवणाची वाट चोखाळली शुद्ध । गेले भेदाभेद निवारोनी ॥ ३ ॥ महामळें मन होतें जें गांदलें । शुद्ध चोखाळलें स्फटिक जैसें ॥ ४ ॥ तुका म्हणे माझ्या जीवाचें जीवन । विठ्ठल निधान सांपडलें ॥ ५ ॥ [५३३]

हाचि परमानंद आलंगीन बाहीं । क्षेम देतां ठायीं द्वैत तुटे ॥ १ ॥ बोलायासि मात मन निवे हर्षे चित्त । दुणी वाढे प्रीत प्रेमसुख ॥ २ ॥ जनांत भूषण वैकुंठीं सरता । फावलें स्वहिता सर्वभावें ॥ ३ ॥ तुटला वेव्हार माया लोकाचार । समूळ संसार पारुषला ॥ ४ ॥ तुका म्हणे तो हा विठ्ठलचि व्हावा । आणिकी या जीवा चाड नाहीं ॥ ५ ॥ [५३४]

आमुची कृपाळू तूं होसी माउली । विठ्ठले साउली शरणागता ॥१॥ प्रेमपान्हा स्तनीं सदा सर्वकाळ । दृष्टि हे निर्मळ अमृताची ॥ २ ॥ भूक तान दुःख वाटों नेदीं सीण । अंतरींचा गुण जाणोनियां ॥ ३ ॥ आशा तृष्णा माया चिंता दवडीं दुरी । ठाव आम्हां करीं खेळावया ॥ ४ ॥ तुका म्हणे लावीं संतांचा सांगात । जेथें न पवे हात कळिकाळाचा ॥ ५ ॥ [५३५]

जेथें जावें तेथें कपाळ सरिसें । लाभ तो विशेषें संतसंगें ॥ १ ॥ पूर्व पुण्यें जरि होतीं सानकूळ । अंतरायमूळ नुपजे तेथें ॥ २ ॥ भाग्य तरी नव्हे धन पुत्र दारा । निकट वास बरा संतांपायीं ॥ ३ ॥

मीं विचार करून पाहिलें तर मला असें समजलें, कीं तुमचे चरण हेंच संसारसमुद्रांतून तारणारें तारूं आहे, १. म्हणून अहो देवा, मी तुमचे पाय चित्तांत धरीन. सुख म्हणून जें कांहीं आहे, तें त्यांतच आहे २. माझ्या मनाजवळ परमार्थाच्या खुणा आहेत. (म्हणजे तें परमार्थाच्या खुणा जाणतें) आणि तें हरीच्या आनंदरसांत बुडालें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें वर्म माझ्या हातीं फार चांगलें लागलें ४. [५३२]

हरीचें श्रीमुख पाहाण्यानें सुखाला सुख झालें. तें सुख पाहण्याविषयीं माझ्या डोळ्यांना भूक लागली आहे, ती जात नाहीं १. विठ्ठल हा तीन अक्षरांचा रस माझ्या जिव्हेला गोड लागला आहे, त्याच्यापुढें अमृतही फिकें आहे २. श्रवणाची वाट स्वच्छ केली आहे, त्यामुळें भेद आणि अभेद या दोन्हींचें निवारण झालें ३. मन मोठ्या मळानें भरलें होतें, तें स्फटिकाप्रमाणें स्वच्छ केलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या जिवाचें जीवन बिठ्ठल हाच कोणी एक ठेवा, तो मला सांपडला ५. [५३३]

परमानंद हरीस मी आपल्या बाहूंनीं अलिंगन देईन, कारण त्याला अलिंगन देण्यांत द्वैताचा निरास होतो १. त्याच्याविषयीं गोष्टी बोलण्यांत मन शांत होतें, चित्त आनंदित होतें आणि प्रेमसुखांत दुपटीची वाढ होते २. लोकांमध्यें भूषण होतें, एवढेंच नाहीं तर अखेर वैकुंठाचा लाभ होतो. सर्व भावानें पूर्णपणें स्वहित प्राप्त होतें ३. संपूर्ण मायिक लोकव्यवहारादि समूळ संसार नाहींसा झाला ४. तुकाराम महाराज म्हणतात, मला एक विठ्ठलच पाहिजे. त्यावांचून माझ्या जीवाला दुसरी इच्छा नाहीं ५. [५३४]

हे विठ्ठले, आमची तूं कृपा करणारी आई आहेस आणि तुला शरण आलेल्यांची तर तूं सांवली आहेस १. तुझ्या स्तनामध्यें सदा सर्वदा प्रेमाचा पान्हा असतो आणि तुझी दृष्टि स्वच्छ अमृताची आहे २. तूं आपल्या मुलाला भूक-ताहानेचें दुःख होऊं देत नाहींस, असें त्याचें अंतःकरण जाणून करतेस ३. आमची आशा, तृष्णा, माया, चिंता दूर घालीव आणि आम्हांला तुझ्या स्वरूपीं खेळण्याकरितां जागा कर ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हांला तूं संतांची संगत दे, ज्या ठिकाणीं काळाचा हात पोहोंचत नाहीं ५. [५३५]

जेथे जेथें म्हणून जावें तेथें तेथें आपलें प्रारब्ध बरोबर असतें म्हणजे प्रारब्धानुरूपच लाभ होतो. विशेष लाभ हा संतसंगतीनेंच होतो १. पूर्वपुण्यें जर अनुकूल होतील तर संतसंगांत वियोग करणारें बीजच उत्पन्न होणार नाहीं २. द्रव्य, पुत्र, बायको हें खरोखर भाग्य नाहीं. एवढ्याकरितां संतांच्या पायापाशीं निकट वास्तव्य करावें, हें बरें ३.

तुका म्हणे हेचि करावी मिरासी । बळी संतांपाशीं द्यावा जीव ॥ ४ ॥ [५३६]

आतां कांहीं सोस न करीं आणीक । धरीन तें एक हेंचि दृढ ॥ १ ॥ जेणें भवसिंधु उतरिजे पार । तुटे हा दुस्तर गर्भवास ॥ २ ॥ जोडीन ते आतां देवाचे चरण । अविनाश धन परमार्थ ॥ ३ ॥ तुका म्हणे बरा जोडला हा देह । मनुष्यपणें इहलोका आलों ॥ ४ ॥ [५३७]

जतन करीन जीवें । शुद्धभावें करूनी ॥ १ ॥ विठ्ठल विठ्ठल हें धन । जीवन अंतकाळींचें ॥ २ ॥ वर्दळ हें संचित सारूं । बरवा करूं उदिम हा ॥ ३ ॥ तुका म्हणे हृदयपेटी । ये संपुटीं सांठवूं ॥ ४ ॥ [५३८]

एवढा प्रभु भावें । तेणें संपुष्टीं राहावें ॥ १ ॥ होय भक्ती केला तैसा । पुरवी धरावी ते इच्छा ॥ २ ॥ एवढा जगदानी । मागे तुळसीदळ पाणी ॥ ३ ॥ आला नांवा रूपा । तुका म्हणे झाला सोपा ॥ ४ ॥ [५३९]

भाग्यें ऐशी झाली जोडी । आतां घडी न विसंबें ॥ १ ॥ विटेवरी समचरण । संतीं खूण सांगितली ॥ २ ॥ अवघें आतां काम सारूं । हाचि करूं कैवाड ॥ ३ ॥ तुका म्हणे खंडूं खेपा । पुढें पापपुण्याच्या ॥ ४ ॥ [५४०]

पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । आम्हां नारायण तैशापरी ॥ १ ॥ सर्व भावें लोभ्या आवडे तें धन । आम्हां नारायण तैशापरी ॥ २ ॥ तुका म्हणे एकविध झालें मन । विठ्ठलावांचून नेणें दुजें ॥ ३ ॥ [५४१]

विठ्ठल गीतीं गावा विठ्ठल चित्तीं ध्यावा । विठ्ठल उभा पहावा विटेवरी ॥ १ ॥ अनाथाचा बंधु विठ्ठल कृपासिंधु । तोडी भवबंधु यमपाश ॥ २ ॥ तोचि शरणागतां विठ्ठल मुक्तिदाता । विठ्ठल या संतां

तुकाराम महाराज म्हणतात, संतांचे पाय हेंच मिराशीचें (वतनदारीचें) ठिकाण करून त्यांच्या पायांपाशीं जीवाला बळी द्यावें (जीव अर्पण करावा) ४. [५३६]

आतां मी आणखी कांहीं सोस (हव्यास) करणार नाहीं. एक विठोबारायाचे चरण बळकट धरीन १. ज्या योगानें साधक संसारसागरांतून पार उतरून पलीकडे जातो आणि ज्या योगानें अति कठिण गर्भवासाचा निरास होतो २. असें जें अविनाश परमार्थधन देवाचे पाय, त्यांची मी आतां प्राप्ति करून घेईन ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला हा देह फार चांगला मिळाला आहे आणि मी मनुष्यजन्म घेऊन या लोकामध्यें आलों आहें हें फार चांगलें आहे ४. [५३७]

ध्रुवपदांत जें दर्शविलें आहे, तें (धन) चांगल्या भावाच्या योगानें मी जतन करीन १. विठ्ठल हें (नाम) धन अंतकाळाचें परम जीवन आहे २. (क्षुद्र) वरकड संचय घालवून हा उत्तम व्यवहार करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, तें धन, हृदय हीच कोणी लहान पेटी, तीमध्यें सांठवूं ४. [५३८]

प्रभु हा फार मोठा आहे, पण भक्ताच्या भावामुळें अतिसंकोचित अशा हृदयस्थलीं राहातो १. भक्तीच्या जोरानें त्याला जसा करावा तसा होऊन तो भक्तांनीं धरलेली इच्छा पूर्ण करितो २. सर्वच जग दान करणारा सामर्थ्यवान् जो देव तो भक्ताच्या जवळ तुळशीचें पान आणि पाणी मागतो ३. नामरूपात्मक सगुण स्वरूपांत तो आला आहे, म्हणून सोपा झाला आहे, असें तुकाराम महाराज म्हणतात ४. [५३९]

मोठ्या भाग्यानेंच पांडुरंगचरणाची प्राप्ति झाली आहे. ह्या लाभाला मी आतां घटकाभर देखील विसरणार नाहीं १. विटेवर असणाऱ्या पांडुरंगाच्या सम चरणाची खूण मला संतांनीं सांगितली आहे २. सर्व कामें बाजूला ठेवून चरणचिंतनाचाच निर्धार करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, पुण्यपापामुळें पुढें होणाऱ्या जन्ममृत्यूच्या खेपा ह्या योगानें नाहींशा करूं ४. [५४०]

ज्याप्रमाणें पतिव्रता स्त्रीस आपला पतीच परम पूज्य असतो, त्याप्रमाणें आम्हांला नारायण परम पूज्य आहे १. ज्याप्रमाणें कायावाचामनें लोभी मनुष्याला धन अत्यंत आवडतें त्याप्रमाणें आम्हांला नारायण आवडत आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, माझें मन एकनिष्ठ झालें आहे. तें विठोबावांचून दुसरें कांहीं जाणत नाहीं ३. [५४१]

विठ्ठलच गाण्यांत गावा. चित्तामध्यें विठ्ठलाचेंच ध्यान करावें आणि विटेवर उभा आहे असा विठ्ठल डोळ्यांनीं पाहावा १. विठ्ठल अनाथ जीवांचा बंधु आहे आणि कृपेचा तर केवळ सागर आहे. तो संसारबंधन आणि यमपाश

समागमें ॥ ३ ॥ विठ्ठल गुणनिधि विठ्ठल सर्व सिद्धि । लागली समाधि विठ्ठलनामें ॥ ४ ॥ विठ्ठलाचें नाम घेतां झालें सुख । गोडावलें मुख तुका म्हणे ॥ ५ ॥ [५४२]

विठो सांपडावया हातीं । ठावी झाली एक गती । न धरीं भय चित्तीं । बळ किती तयाचें ॥ १ ॥ लागे आपणचि हातीं । कींव भाकावी काकुलती । करी मग चित्तीं । असेल तें तयाचें ॥ २ ॥ एकलिया भावबळें । कसा सांपडे तो काळें । वैष्णवांच्या मेळें । उभा ठाके हांकेसी ॥ ३ ॥ बांधा माझिया जिवासी । तुका म्हणे प्रेमपाशीं । न सोडीं तयासी । सर्वस्वासी उदार ॥ ४ ॥ [५४३]

वाट वैकुंठीं पहाती । भक्त कैं पा येथें येती । तयां जन्ममरणखंती । नाहीं चित्तीं परलोक ॥ १ ॥ धन्य धन्य हरिचे दास । तयां सुलभ गर्भवास । ब्रह्मादिक करिती आस । तीर्थें वास भेटीची ॥ २ ॥ कथाश्रवण व्हावयास । यमधर्मा थोर आस । पाहे रात्रंदिवस । वाट कर जोडोनियां ॥ ३ ॥ रिद्धिसिद्धी न पाचारितां । त्या धुंडिती हरिभक्तां । मोक्षसायुज्यता । वाट पाहे भक्तांची ॥ ४ ॥ असती जेथें उभे ठेले । सदा प्रेमसुखें धाले । आणीकही उद्धरिले । महादोषी चांडाळ ॥ ५ ॥ सकळ करिती त्यांची आस । सर्वभावें ते उदास । धन्य भाग्य त्यांस । तुका म्हणे दरुषणें ॥ ६ ॥ [५४४]

सोनें दावी वरी तांबें तयापोटीं । खरियाचेसाटीं विकूं पाहे ॥ १ ॥ पारखी तो जाणे तयाचे जीवींचें । निवड दोहींचें वेगळालें ॥ २ ॥ क्षीरा नीरा कैसें होय एकपण । स्वादी तोचि भिन्न भिन्न काढी ॥ ३ ॥ तुका म्हणे थीता आपणचि खोटा । अपमान मोठा पावईल ॥ ४ ॥ [५४५]

फोडुनि सांगडी बांधली माजासी । पैल थडी कैसी पावे सहजीं ॥ १ ॥ आपला घात आपणचि

तोडतो २. विठ्ठल हा शरण आलेल्या जीवांना मुक्ति देणारा आहे. विठ्ठल संतांच्या संगतीनें असतो ३. विठ्ठल हा गुणांचा ठेवा आहे आणि सर्व प्रकारची सिद्धि हा विठ्ठलच आहे. मला विठ्ठलनामानें समाधि लागली ४. तुकाराम महाराज म्हणतात, विठ्ठलाचें नाम घेण्यानें मला सुख झालें व त्या योगानें माझें मुख गोड झालें ५. [५४२]

विठोबा हातीं सापडण्याचा मार्ग मला कळला. आतां त्याजविषयीं मी आपल्या चित्तांत भय धरणार नाहीं. (माझ्यापुढें) त्याची शक्ति कितीशी आहे ! १. त्याच्याजवळ काकळूत केली म्हणजे तो आपल्या आपण हातीं लागतो. मग त्याच्या चित्तांत येईल तसें त्या भक्तांचें तो करितो २. एकट्याला भावाच्या बळानें तो केव्हां तरी कालांतरानें सांपडतो, पण विष्णुभक्तांच्या समुदायामध्यें हांक मारल्याबरोबर तो येऊन उभा राहातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या देवाला प्रेमाच्या पाशानें माझ्या जिवाशीं बांधून टाका. मी त्याला कधींहि सोडणार नाहीं, कारण सर्वभावानें (सर्वस्वाचा त्याग करण्याविषयीं) मी उदार आहें ४. [५४३]

भक्त ह्या ठिकाणीं कधीं येतील, ह्याविषयीं वैकुंठांतील जन वाट पाहातात, पण भक्त लोकांच्या चित्तांत परलोकाविषयींची इच्छा नाहीं आणि जन्ममरणाविषयीं त्यांच्या चित्तांत तळमळ नाहीं १. हरीचे दास धन्य आहेत. त्यांना गर्भवास हा मोठा सुलभ आहे. ब्रह्मदेवादिक त्यांची आशा करितात. तीर्थें त्यांच्या भेटीची इच्छा करीत आहेत २. त्यांच्या मुखानें आपल्याला हरिकथा श्रवण व्हावी म्हणून यमधर्म देखील मोठी इच्छा करीत आहे आणि रात्रंदिवस हात जोडून त्यांची वाट पाहात आहे ३. रिद्धीसिद्धींना जरी हरिभक्त बोलावीत नाहींत तरी त्या आपण होऊनच हरिभक्तांची भेट होण्याविषयीं शोध घेत आहेत. मोक्ष, सायुज्य भाव देखील त्या भक्तांची वाट पाहात आहेत ४. ज्या ठिकाणीं ते हरिभक्त उभे असतात, त्या ठिकाणीं ते हरीच्या प्रेमसुखानें नेहमीं तृप्त असतात. आपल्या संगतीनें सहज इतर महादोषी चांडाळादिकांचा ते उद्धार करितात ५. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वांनीं त्यांची आशा करावी, पण ते हरिदास सर्व भावानें उदास असतात. त्यांचें दर्शन ज्यांना होतें, त्यांचें भाग्य धन्य आहे ६. [५४४]

वरच्या बाजूनें सोनें लाविलेला व पोटामध्यें तांबें असलेला असा जिन्नस जर एखादा गृहस्थ खऱ्या सोन्याच्या किंमतीनें विकावयास गेला १. तर परीक्षावान् सराफ आंतील तांबें जाणतात आणि दोन्हीं वेगळालीं निवडून काढितात २. पाण्याचें आणि दुधाचें ऐक्य कसें होईल ? वरच्या बाजूनें तें जरी मिसळलेलें दिसलें, तरी स्वाद जाणणारा पुरुष त्यांस वेगळें वेगळें समजतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो आपण स्वतः खोटा आहे, त्याचा मोठा अपमान होईल ४. [५४५]

भोपळ्याची सांगड फोडून ती बाजेला बांधली व ती बाज पाण्यांत टाकली, तर ती पलीकडच्या तीराला सहजपणें

करी। आणिक सांगतां नाइके तरी ॥ २ ॥ भुकेभेणें विष घेऊं पाहे आतां। आपल्याचि घाता करूं पाहे ॥ ३ ॥ तुका म्हणे एक चालतील पुढें। तयांसी वांकडें जातां ठके ॥ ४ ॥ [५४६]

उपकारासाठीं केले हे उपाय। येणेंविण काय चाड आम्हां ॥ १ ॥ बुडतां हे जन न देखवे डोळां। येतो कळवळा म्हणउनि॥ २ ॥ तुका म्हणे माझे देखतील डोळे। भोग देतेवेळे येईल कळों॥ ३ ॥ [५४७]

आठवे देव तो करावा उपाय। येर त्यजीं वाव खटपटा ॥ १ ॥ होईं बा जागा होईं बा जागा। वाउगा कां गा सिणसील॥ २ ॥ जाणिवेच्या भारें भवाचिये डोहीं। बुडसी तों कहीं निघेसि ना ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा पावसील भावें। जाणतां तें ठावें कांहीं नव्हे ॥ ४ ॥ [५४८]

माझ्या मुखावाटा न यो हें वचन। व्हावें हें संतान द्रव्य कोणा ॥ १ ॥ फुकाचा विभाग पतन दुःखासी। दोहींमुळें त्यासी तेंचि साध्य ॥ २ ॥ नाइकावी निंदा स्तुति माझ्या कानें। सादर या मनें होऊनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे देव असाध्य यामुळें। आशामोहजाळें गुंतलिया ॥ ४ ॥ [५४९]

चित्त ग्वाही तेथें लौकिकाचें काई। स्वहित तें ठायीं आपणापें ॥ १ ॥ मनासी विचार तोचि साच भाव। व्यापक हा देव अंतर्बाहीं ॥ २ ॥ शुद्ध भावा न लगे सुचावा परिहार। उमटे साचार आणिके ठायीं ॥ ३ ॥ भोगित्यासी काज अंतरींचें गोड। बाहिरल्या चाड नाहीं रंगें ॥ ४ ॥ तुका म्हणे भाव शुद्ध हें कारण। भाट नारायण होईल त्यांचा ॥ ५ ॥ [५५०]

नव्हती माझे बोल। अवघें करितो विठ्ठल ॥ १ ॥ कांहीं न धरावी खंति। हित होईल धरा चित्तीं ॥ २ ॥ खोटी ते अहंता। वाट टाकिली सांगतां ॥ ३ ॥ ज्याचें तोचि जाणे।

कशी पोंहचेल? १. त्याप्रमाणें हे जीव आपला घात आपण करणारे आहेत, त्यांना दुसऱ्यांनीं कितीही सदुपदेश केला, तरी ते ऐकत नाहींत २. कोणी एकास भूक लागली म्हणून तो विष खाऊं लागला, तर तो त्या योगानें कसा जगेल? अर्थात् आपला घात आपणच करतो ३. तुकाराम महाराज म्हणतात जे पुढें चालणारे आहेत, त्यांच्याविरुद्ध वांकडे (वाकड्या वाटेनें) जाणारे फसतात ४. [५४६]

परमार्थाचे उपाय जे आम्हीं सांगितले ते केवळ दुसऱ्यावर उपकार होण्याकरितां. नाहीं तर ह्यावांचून आम्हाला काय गरज होती? १. जन संसारामध्ये बुडत आहेत हें आमच्यानें पाहावेना, म्हणून त्यांचा कळवळा आमच्या हृदयांत येऊं लागला २. तुकाराम महाराज म्हणतात, अशा ह्या पातकी संसारी जीवाला कृतकर्माचें फळ भोगण्याचे वेळेस आम्हीं सांगितलेल्या गोष्टी कळून येतील. त्या वेळेस आमचेच डोळे पाहातील ३. [५४७]

ज्या योगानें देवाचा आठव होईल तो उपाय योजावा. बाकीच्या व्यर्थ खटाटोपी टाकून द्याव्या १. अरे बापा, जागा हो, जागा हो; म्हणजे वर सांगितलेल्या गोष्टीचा विचार कर. व्यर्थ कशाला श्रमी होतोस? २. तूं ज्ञानाच्या ओझ्यानें एकदां संसाराच्या डोहांत बुडालास, तर वर निघणें कधीं होणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवापाशीं तूं भावानें प्राप्त होशील. ज्ञानानें तुला तिथलें कांहीं कळणार नाहीं ४. [५४८]

माझ्या तोंडावाटे कोणाला द्रव्य मिळावें अगर संतती व्हावी, असे शब्द कधींही निघूं नयेत १. कारण वर सांगितलेल्या उभय गोष्टींमुळें फुकट दुःखाचा भागीदार होऊन पतनास जावें लागेल २. माझ्या मनानें तत्पर होऊन कानानें कोणाची निंदास्तुती ऐकूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, आशा व मोह ह्यांच्या जाळ्यामध्यें गुंतल्यामुळें देव प्राप्त होत नाहीं ४. [५४९]

ज्या ठिकाणीं चित्त साक्षी आहे, तेथें लौकिकाचा काय संबंध आहे? स्वहित हें आपल्याजवळच आहे १. आंत बाहेर देव सर्व ठिकाणीं व्यापक आहे, असा विचार मनाला असणें, हाच खरा भाव २. आपल्या ठिकाणचा शुद्ध भाव सांगण्याचें कारण नाहीं, कारण तो दुसऱ्याला खरोखर भासतो ३. भोगणाऱ्या मनुष्याला अंतर (आंतल्या) गोडीशीं कारण आहे, बाहेरच्या रंगाची जरूर नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, शुद्ध भावानेंच कार्य होणारें आहे, म्हणन तो शुद्धभाव ज्याच्यामध्यें आहे त्याचा नारायण हा वर्णन करणारा भाट होईल ५. [५५०]

मी जे बोल बोलत आहें, ते माझे नसून सर्व विठ्ठलच बोलत आहे १. ह्याविषयीं तुम्हीं यावत् जन्म कांहीं काळजी करूं नका. आपल्या हृदयांत ते माझे बोल धरा. त्यांत तुमचें हित होईल २. कोणी सांगितलेली सरळ वाट अहंकारानें

मी मापाडें तुका म्हणे ॥ ४ ॥ [५५१]

वासनेच्या मुखीं अदळूनि भीतें। निर्वाहापुरतें कारण तें ॥ १ ॥ या नांव अंतरा आला नारायण। चित्त समाधान खूण त्याची ॥ २ ॥ सर्वकाळ हाचि करणें विचार। विवेकीं सादर आत्मत्वाचे ॥ ३ ॥ तुका म्हणे जों जों भजनासी वोळे। अंगें तों तों कळे सन्निधता ॥ ४ ॥ [५५२]

चिंतेनें अचिंत राहिलों निश्चळ। तेंचि किती काळ वाढवावें ॥ १ ॥ अबोल्याचा काळ आतां ऐशावरी। वचनाची उरी उरली नाहीं ॥ २ ॥ करुं आला तों तों केला लवलाहो। उरोंच संदेहो दिला नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मोहो परतेचि ना मागें। म्हणउनि त्यागें त्याग झाला ॥ ४ ॥ [५५३]

निर्गुणाचें घ्यावें गुणासि दर्शन। एकाएकीं भिन्न भेद घडे ॥ १ ॥ आम्हां तुम्हां आतां न पडे यावरी। आहों तेंचि बरी जेथें तेथें ॥ २ ॥ आपणापासुनी नसावें अंतर। वेंचिलें उत्तर म्हणउनी ॥ ३ ॥ तुका म्हणे अंगा आली कठिणता। आमच्या अनंता तुम्हां ऐसी ॥ ४ ॥ [५५४]

तुज पासावें हे झालोंसे निर्माण। असावें तें भिन्न कासयानें ॥ १ ॥ पाहावा जी ठायीं करूनि विचार। न्यून कोठें फार असेचि ना ॥ २ ॥ ठेविलिये ठायीं आज्ञेचें पाळण। करूनि जतन राहिलोंसें ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां बोलतसें स्पष्ट। झालों क्रियानष्ट तुम्हांऐसा ॥ ४ ॥ [५५५]

प्रीतिभंग माझा केला पांडुरंगा। भक्तिरस सांगा कां जी तुम्हीं ॥ १ ॥ म्हणउनि कांहीं न ठेवींचि उरी। आलों वर्मावरी एकाएकीं ॥ २ ॥ न देखोंचि कांहीं परती माघारी। उरली ते उरी नाहीं मुळीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आला अंतरासी खंड। तरि माझें तोंड खवळिलें ॥ ४ ॥ [५५६]

टाकील तर तो अहंकार खोटा आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या मुखावाटे जो विठ्ठल बोलला आहे, तोच त्याच्या खऱ्या प्रकाराला जाणणारा आहे. मी केवळ माप टाकणारा मापाडी आहें ४. [५५१]

मनुष्यानें आपल्या निर्वाहापुरतें कार्य करून वासनेच्या तोंडांत भत्ता टाकून द्यावा. १. चित्ताचें सर्वकाळ समाधान असणें, हीच नारायण अंतःकरणांत आल्याची खूण आहे. २. आत्मविवेकाच्या ठिकाणीं नेहमीं तत्पर असावें, म्हणजे सर्वकाळ तोच विचार करीत राहावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसजसा हा अंगानें हरिभजनाकडे वळेल, म्हणजे विषय–इंद्रियांचा परित्याग करून जसजसी याची अंतर्मुख वृत्ति होत जाईल, तसतसें, पारमार्थिक स्वात्मस्वरूपाची सन्निधता प्राप्त होऊन, तें कळूं लागेल ४. [५५२]

भगवत्‌चिंतनानें अचिंत्य (चिंतारहित) आत्मपदाच्या ठिकाणीं मी स्थिर राहिलों. आतां तें चिंतन किती वेळ वाढवावें ? १. इतोत्तर न बोलण्याचा काळच आला आहे. शब्दाची कांहीं एक बाकी राहिली नाहीं २. मजकडून जितकी परमार्थ–उपायाची त्वरा होईल, तितकी त्वरा करून, मीं आपल्यामध्यें कोणताही संशय उरूं दिला नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देह, स्त्री, पुत्र, इत्यादिक विषयींचा मोह जो नाहींसा झाला आहे, तो पुन्हां परत माघारा त्या ठिकाणीं येत नाही; म्हणून सर्व प्रपंचाचा याथातथ्य (खरोखर) त्याग झाला ४. [५५३]

निर्गुण हरिस्वरूपाचें सगुण दर्शन घेऊं गेल्यानें, भेदरहित जो ऐक्यभाव त्या ठिकाणीं भेदसिद्धि होते १. अहो देवा, तुमचें व आमचें इतोत्तर पटणार नाहीं; म्हणून तुम्ही आम्ही ज्या ज्या ठिकाणीं आहोंत तेथेंच बरे आहोंत २. आपल्यापासून आम्ही वेगळें नसावें, म्हणून आजपर्यंत पुष्कळ विनवणी केली ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा आमच्या अंगीं तुमच्याप्रमाणें काठिण्य आलें आहे ४. [५५४]

देवा तुमच्यापासूनच आम्ही उत्पन्न झालों. आतां तुम्हाला सोडून वेगळे कसे असूं ? १. ह्याचा विचार आपल्या ठिकाणीं तुम्हीच करून पहा. ह्यामध्यें कमीअधिक कांहींच नाहीं २. ज्या ठिकाणीं तुम्ही ठेविलें, तेथेंच तुमच्या आज्ञेप्रमाणें राहिलों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्याप्रमाणें आम्ही क्रियानष्ट झालों आहोंत, असें आतां उघड बोलतों ४. [५५५]

अहो पांडुरंगा, तुम्ही माझा भक्तिरस म्हणजे प्रीतिनाश केला आहे कीं नाहीं तें तुम्हीं सांगा १. असा तुम्हीं माझा नाश केल्यामुळें, मी तुमच्या मोठेपणाची पर्वा ठेवीत नाहीं, एकदम तुमची मर्मे काढूं लागलों २. आतां आम्हीं कांहीं मागेंपुढें पाहाणार नाहीं, कारण आतां मुळींच तुमचें आमचें नातें उरलें नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या अंतःकरणामध्यें तुमच्या आमच्यासंबंधाचा निकाल व्हावा, म्हणूनच माझें तोंड खवळलें आहे ४ [५५६]

लटिका देव म्हणतां ऐसा । संदेहसा वाटतसे ॥ १ ॥ ऐसें आलें अनुभवा । मजही सेवा करितां ॥ २ ॥ शून्याकारी बहु मोळा । भेंडोळा हे पवाडे ॥ ३ ॥ तुका म्हणे ताळी नाहीं । एके ठायीं चपलत्वें ॥ ४ ॥ [५५७]

जैशासाटीं तैसें व्हावें । हें बरवें कळलेंसे ॥ १ ॥ उदास तूं नारायणा । मीही म्हणा तुम्हीच ॥ २ ॥ ठका महाठका जोडा । हे धडफुडा लागासी ॥ ३ ॥ एकांगीच भांडे तुका । नाहीं धोका जीवित्वें ॥ ४ ॥ [५५८]

बहुतां रीतीं काकुलती । आलों चित्तीं न धराच ॥ १ ॥ आतां कशासाठीं देवा । मिथ्या हेवा वाढवूं ॥ २ ॥ तुम्हां आम्हां झाली तुटी । आतां भेटी चिंतनें ॥ ३ ॥ तुका म्हणे लाजिरवाणें। अधीर जिणें इच्छेचें ॥ ४ ॥ [५५९]

आश्चर्य तें एक झालें । मना आलें माझिया ॥ १ ॥ मढयापाशीं करुणा केली । तैसी गेली वृथा हे ॥ २ ॥ न यावा तो कैसा राग । खोटें मग देखोनि ॥ ३ ॥ तुका म्हणे कैंचा बोला । शोध विठ्ठला माझिया ॥ ४ ॥ [५६०]

मागायाची नाहीं इच्छा । जो मी ऐसा संकोचूं ॥ १ ॥ लटकियाची न करूं स्तुति । इच्छा चित्तीं धरूनि ॥ २ ॥ हिशोबें तें आलें द्यावें । हें तों ठावें सकळांसी ॥ ३ ॥ तुका म्हणे स्वामिसेवा । येथें देवा काशाची ॥ ४ ॥ [५६१]

पावटणे पडणें पायां । उद्धार वायां काशाचा ॥ १ ॥ घडेल तें भेटी सवें । दिसेल बरवें सकळां हें ॥ २ ॥ न घडत दृष्टादृष्टी। काय गोष्टी कोरड्या ॥ ३ ॥ अबोल्यानें असे तुका। अंतर एका साक्षी तें ॥ ४ ॥ [५६२]

देव खोटा आहे, असें म्हणण्याइतका माझ्यांतही संशय आहे १. कारण सेवा करण्यानें माझ्या असें अनुभवाला आलें आहे २. शून्य स्थितीनें असण्याची तुमची अशी पुष्कळ रीत आहे. तुमचे कीर्तीची डिंडिमा (ख्याति) झाली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही चपळ असल्यामुळें तुमच्या कोणत्याहि गोष्टीचा एक ताळमेळ बसत नाहीं ४. [५५७]

जशास तसें व्हावें हें आम्हांला उत्तम तऱ्हेनें कळलें आहे १. अहो नारायणा, तुम्ही सर्व गोष्टींविषयीं उदास आहांत, तसा मीहि पण तुमच्याप्रमाणें उदास आहें २. ठकाला महाठकाप्रमाणें धडधडीत तुमचा आमचा योग आला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, बिनधोक जिवानें व एका पक्षानें (निर्गुणपणाचा पक्ष घेऊनच) मी देवापाशीं भांडत आहें ४. [५५८]

देवा, पुष्कळ प्रकारानें तुम्हांला मी काकुळती आलों, पण तुम्ही चित्तामध्यें त्यासंबंधीं कांहीं वागविलें नाहीं १. अहो देवा, आतां कशाकरतां मी खोटी हाव वाढवूं? २. तुमच्या आमच्यामध्यें ताटातूट झाली. आतां तुमची आमची भेट केवळ चिंतनानेंच व्हावयाची ३. कांहीं (तुमच्या सगुणदर्शनाची) इच्छा (मनांत) धरून जगणें हें मोठें लाजिरवाणें आणि अधीरपणाचें आहे, असें तुकाराम महाराज म्हणतात ४. [५५९]

माझ्या मनाला एक आश्चर्य वाटत आहे तें हें, १. कीं ज्याप्रमाणें एखाद्या प्रेताजवळ त्याच्या आप्तसंबंधांनीं "ऊठ रे बाबा, तूं बोल रे बाबा," अशी करुणा भाकल्यास ती जशी व्यर्थ जाते, त्याप्रमाणें अहो देवा, तुमच्याजवळ केलेली काकुळती व्यर्थ गेली २. एखाद्याचें खोटें कृत्य पाहिल्यावर मग त्याचा राग कसा येऊं नये बरें? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, माझ्या शब्दांना शोध कसला ? (माझ्या बोलण्याचा थोडा तरी विचार कर) ४. [५६०]

मला कोणतीहि वस्तु मागण्याची इच्छा नाहीं, मग मी एवढा संकोच कशाकरितां करूं ? १. चित्तामध्यें कांहीं इच्छा धरून मी खोट्याची स्तुति कधीं करणार नाहीं २. कोणतीहि गोष्ट हिशेबानें येईल ती द्यावी, हें सर्वांना कळत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, ह्या ठिकाणीं स्वामिसेवा कशाची? (आमच्या भक्तीच्या हिशेबाप्रमाणें भेट तरी द्याल कीं नाहीं? जर भेट देखील देत नसाल तर तुमची भक्ति तरी कां करायची?) ४. [५६१]

देवाला पायरीपासून नमस्कार करणें व्यर्थ आहे; त्यायोगानें उद्धार कशाचा होतो ? १. साक्षात् भेटींत जें घडेल तें सगळ्यांना बरें दिसतें २. एकमेकांनीं एकमेकांकडे दृष्टीनें पाहाणें न होतां ज्या गोष्टी बोलणें त्या कोरड्या असतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणूनच मीं न बोलतां एक अंतःकरण साक्षी ठेवून मौन धरिलें आहे ४. [५६२]

अभयाचें स्थळ। तें हें एक अचळ ॥ १ ॥ तरि धरिला विश्वास। ठेलों होउनियां दास ॥ २ ॥ पुरली आवडी। पायीं लागलीसे गोडी ॥ ३ ॥ तुका म्हणे कंठीं नाम। अंगीं भरलेंसे प्रेम ॥ ४ ॥ [५६३]

संदेह निरसे तरि रुचिकर। फिक्यासी आदर चवी नाहीं ॥ १ ॥ आतां नको मज खोट्यानें फटवूं। कोठें येऊं जाऊं वेळोवेळां ॥ २ ॥ गेला तरी काय जीवाचें सांकडें। वांचउनि पुढें काय काज ॥ ३ ॥ तुका म्हणे कसीं निवडा जी बरें। केलीं तैसीं पोरें आळी पायीं ॥ ४ ॥ [५६४]

वदे वाणी परि दुर्लभ अनुभवो। चालीचाचि वाहो बहुतेक ॥ १ ॥ आम्ही ऐसें कैसें राहावें निश्चळ। पाठिलागा काळ जिंकितसे ॥ २ ॥ वाढवितां पोट दंभाचे पसारे। येतील माघारे मुदला तोटे ॥ ३ ॥ तुका म्हणे बरें जागवितां मना। तुमच्या नारायणा अभयें करें ॥ ४ ॥ [५६५]

उगेंचि हें मन राहतें निश्चळ। तरि कां तळमळ साट होती ॥ १ ॥ काय तुमचीं नेणों कवतुक विंदानें। सर्वोत्तमपणें खेळतसां ॥ २ ॥ नानाछंदें आम्हां नाचवावें जीवां। वाढवाव्या हांवा भलत्यापुढें ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्हीं आपुली प्रतिष्ठा। वाढवावया चेष्टा करीतसां ॥ ४ ॥ [५६६]

आम्ही बळकट झालों फिराउनी। तुमच्या वचनीं तुम्हां गोऊं ॥ १ ॥ झालें तेव्हां झालें मागील तें मागें। आतां वर्म लागे ठावीं झालीं ॥ २ ॥ तोडावया अवघ्या चेष्टांचा संबंध। शुद्ध त्याशीं शुद्ध बुद्ध व्हावें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां आतमत्वाची सोय। आपणचि होय तैसाचि तूं ॥ ४ ॥ [५६७]

तुम्ही साच नुपेक्षाल हा भरंवसा। मज जाणतसां अधीरसें ॥ १ ॥ कासया घातला लांबणी उद्धार। ठेवा करकर वारुनियां ॥ २ ॥ सुटों नये ऐसें कळलें निरुतें। कां घ्यावें मागुतें आळवूनि ॥ ३ ॥

न चळणारें निर्भयाचें स्थान असे एक देवाचे चरण आहेत १. म्हणून मी त्या ठिकाणीं विश्वास ठेवून उदास होऊन राहिलों आहें २. माझ्यामध्यें हरीच्या पायांविषयीं गोडी आहे म्हणून माझी आवडी पूर्ण झाली ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या कंठामध्यें हरीचें नाम असून अंगामध्यें हरीचें प्रेम भरलें आहे ४. [५६३]

जर संशयाचें निरसन होईल, तरच तें रुचकर आहे. जें रुचिहीन फिकें आहे त्याविषयीं कोणाचाहि आदर नसतो व तें कोणालाहि आवडत नाहीं १. अहो देवा, आतां मला खोट्या वस्तूच्या मोहानें फसवूं नका? आणि मी तुमचेकडे वेळोवेळीं कोठवर येत जात बसूं ? २. तुमच्या प्राप्तीच्या लाभावांचून पुढें वांचण्यांत काय कारण आहे ? म्हणून माझा जीव गेला तरी त्याचें कांहीं संकट नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें (तुमच्या) पोरानें आपले पायापाशीं हट्ट केला आहे, तसा त्याला कसाला लावून तुम्ही त्याची निवड (परीक्षा) करा बरें ४. [५६४]

वाचा पुष्कळ बडबड करते, पण त्याप्रमाणें अनुभव मात्र दुर्लभ असतो. जिकडे पाहावें तिकडे एकाची चाल पाहून दुसऱ्यानें त्याप्रमाणें वागत जावें, असें दिसतें १. पण आम्ही एवढ्यानें कसें निश्चळ राहावें ? कारण आमच्या पाठीमागें काळ लागला आहे व तो सारखा आम्हांला जिंकीत आहे २. पोट भरण्यासाठीं दांभिक परमार्थाचा पसारा वाढविल्यानें उलट मुदलांत तोटा मात्र येईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो नारायणा, तुमच्या अभय वरद हस्तानें मनाला जागविणें हेंच बरें ४. [५६५]

जर हें मन स्थिर राहातें, तर एवढी तळमळ कां होती ? अहो देवा, तुमचें कौतुक व चातुर्य हीं कांहीं कळत नाहींत. (पुढें सांगितल्या ह्या) तुमच्या मोठेपणाच्या क्रीडा आहेत २. पण अनेक प्रकारचा सोस जीवांमध्यें उत्पन्न करून त्यांना नाचवितां, आणि त्यांच्यामध्यें पुढें भलभलत्या हांवा वाढवितां ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, तुम्हीं आपला मोठेपणा वाढविण्याकरितां ही जगाची चेष्टा चालविली आहे ४. [५६६]

पुन्हां आम्ही मोठे बलाढ्य झालों आहोंत, म्हणून "मी पतिताला पावन करीन" या तुम्हीं दिलेल्या वचनानें मी तुम्हांला गुंतवून टाकीन १. ह्यापूर्वी झालें तें झालें, पण आतां तुम्हांला कैचींत धरण्याचीं अनेक वर्में मला कळलीं आहेत २. तुमच्या सर्व चेष्टांचा संबंध तोडून टाकण्याकरितांच आम्ही सरसावलों आहोंत. अहो देवा, आम्ही शुद्ध आहोंत, त्याचप्रमाणें आपण आमच्यापाशीं शुद्धबुद्ध व्हावें (चांगलेपणानें वागावें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्यामध्यें आत्मस्थितीची (तुझ्याविषयीं आत्मत्वाची) भावना आहे, तसाच तूं आपण स्वतःही होशीलच ४. [५६७]

तुम्हीं खरोखर आमचा अव्हेर करणार नाहीं अशी खात्री आहे. पण देवा, मला तुम्हीं अधीर असें समजतां १. असें जर आहे तर आमचा उद्धार करण्याचें तुम्हीं लांबणीवर कां टाकलेंत ? एकदाची आमची तुमच्यामागें लागलेली किरकिर

तुका म्हणे तुम्ही सभाग्य जी देवा । माझा तुम्हां केवा काय आला ॥ ४ ॥ [५६८]

तुम्हां होईल देवा पडला विसर । आम्ही ते उत्तर यत्न केले ॥ १ ॥ पतितपावन ब्रीदें मिरविसी । याचा काय देसी झाडा सांग ॥ २ ॥ अहाच मी नव्हें अर्थाचें भुकेलें । भलत्या एका बोलें वारेन तें ॥ ३ ॥ तुका म्हणे देह देईन सांडणें । सहित अभिमानें ओंवाळूनि ॥ ४ ॥ [५६९]

जडलों अंगा अंगीं । मग ठेवीं न प्रसंगीं । कांहीं उरीजोगी । लोकीं आहे पुरती ॥ १ ॥ ठेवीं निवारूनि आधीं । अवकाश तोचि बुद्धी । सांपडली संधी । मग बळ कोणासी ॥ २ ॥ गळा बांधीन पायीं । हालों नेदीं ठायींच्या ठायीं । निवाड तो तईं । अवकळा केलिया ॥ ३ ॥ तुका म्हणे ठावे । आम्हां असां जी बरवे । बोभाटाची सवे । मुळींहुनी विठोबा ॥ ४ ॥ [५७०]

आम्ही शक्तिहीनें । कैसें कराल तें नेणें । लिगाडाच्या गुणें । खोळंबला राहिलों ॥ १ ॥ माझें मज देई देवा । असे ठेविला तो ठेवा । नाहीं करीत हेवा । कांहीं अधिक आगळा ॥ २ ॥ नाहीं गळां पडलों झोंड । तुमचें तेंचि माझें तोंड । चौघां चार खंड । लांबणी हे अनुचित ॥ ३ ॥ नाहीं येत बळा । आतां तुम्हासी गोपाळा । तुका म्हणे गळा । उगवा पायां लागतों ॥ ४ ॥ [५७१]

काय कृपेविण घालावें सांकडें । निश्चिंती निवाडें कोण्या एका ॥ १ ॥ आहों तैसीं पुढें असों दीनपणें । वेंचुनि वचनें करुणेचीं ॥ २ ॥ धरुनि भय आतां काय वाहों चिंता । काय करूं आतां आप्तपण ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही भावहीन जीव । म्हणउनी देव दुरे दूरी(र) ॥ ४ ॥ [५७२]

निवारून टाका २. आमच्या किरकिरीपासून तुमची सुटका व्हावयाची नाहीं, असें जर तुम्हांला खरोखर कळलें आहे, तर आमच्याकडून तुम्हीं काकुळती कां करून घेतां ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, तुम्ही मोठे भाग्यवान् आहांत. माझा उद्धार करण्याची तुम्हांला काय मोठीशी बाबत (कठीण गोष्ट) आहे ? ४. [५६८]

अहो देवा, आमचा खरोखर तुम्हांला विसर पडला आहे, असें दिसतें. आम्ही एकसारखी तुमच्या ठिकाणीं वटवट केली आहे १. देवा, तुम्हीं पतिताला पावन करणारे, असें ब्रीद मिरवितां; ह्याचा तुम्हीं कसा जबाब द्याल तें सांगा ? २. मी द्रव्याचा भुकेलेला असा वरवर भक्ति करणारा नाहीं, म्हणून भलत्या एखाद्या तुमच्या थापेला फसला जाणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी अभिमानासहित देह तुमच्यावरून ओंवाळून टाकीन ४. [५६९]

अहो देवा, मी तुमच्या अंगाला येऊन भिडलों आहें. ह्या प्रसंगीं तुमचा मोठेपणा ठेवणार नाहीं. ह्याकरितां तुमची आमची अब्रू लोकांमध्यें पूर्णपणानें आहे १. तोंपर्यंत विचार करा. आमच्या बुद्धीनें जोंपर्यंत दम धरला आहे, तोंपर्यंत तुमच्या आमच्यामधील भांडणाचें कारण निवारून ठेवा. एक वेळ तुम्हांला पेंचांत धरण्याची वेळ आमच्या हातीं लागली, म्हणजे मग बळी कोण आहे, हें तुम्हाला कळेल २. खरोखरच अशा ह्या निकराच्या वेळीं मी आपला गळा तुमच्या पायांशीं बांधून टाकीन आणि तुम्हाला जागच्या जागींहि हालचाल करूं देणार नाहीं. अशा तऱ्हेनें तुमची फजिती केल्यावर, आपल्या कर्तव्याला कोण चुकला आणि कोण बरोबर आहे, ह्याची निवड होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो विठोबा, तुम्हीं आम्हांला फार चांगले ठाऊक आहांत. पहिल्यापासून जो कोणी तुमची सेवा करून तुमच्या दाराशीं मागावयास येईल, त्याला असेंच ओरडत ठेवण्याची तुम्हांला संवय आहे ४. [५७०]

आम्हीं निःशक्त आहोंत. देवा, आमचें पुढें तुम्हीं कसें कराल तें कळत नाहीं. तुम्हांला आपल्यामागें अशीच कटकट ठेवण्याची संवय असल्यामुळें मी येथें थांबून राहिलों आहें १. देवा, मीं जो तुमच्याजवळ ठेविलेला ठेवा आहे तो माझाच मला द्या. मी कांहीं निःशेष मिळावें म्हणून हांव धरीत नाहीं २. तुमच्या गळ्यामध्यें कांहीं संबंधावांचून आगांतूक येऊन पडलों नाहीं. जसें तोंडानें तुम्हीं येथें बोलाल तसेंच मी बोलेन. ह्यामुळें चारचौघे मिळून दोघांच्या तंट्याचा निकाल करण्याचा प्रसंग येईल, म्हणून हें लांबणीवर टाकणें योग्य नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो गोपाळा, मी कांहीं आतां निकरावर येत नाहीं. तुमच्या पायां पडून तुम्हांला सांगतों, कीं या तंट्यांतून माझी सोडवणूक करा ४. [५७१]

आम्हीं चिंतारहित बसावें, अशा तऱ्हेचें कर्तृत्व आपल्याकडून कांहींच दिसत नाहीं व आपली कृपाही माझ्यावर नाहीं, म्हणून आपल्यावर संकट घालणें अयोग्य वाटतें १. देवा, तुमच्यापुढें आम्हीं पूर्वींप्रमाणें दीन स्थितीनें काकुळत करीत राहूं २. भय धरून चिंता कशाकरितां करीत बसूं ? आप्तपणाचा संबंध घेऊन काय करावयाचें आहे ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही जीव अभाविक (श्रद्धाभक्तिहीन) आहोंत म्हणून आमच्यापासून देव दूर झाला आहे ४. [५७२[

नाहीं उल्लंघिलें कोणाचें वचन । मज कां नारायण दुरी झाला ॥ १ ॥ आशंकितें मनें करीं आळवण । नाहीं समाधान निश्चिंतीचें ॥ २ ॥ दासाचा विसर हें तों अनुचित । असे सर्व नीत पायापाशीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्हां लाज येत नाहीं । आम्हां चिंताडोहीं बुडवितां ॥ ४ ॥ [५७३]

जीव जायवरी सांडी करी माता । हें तों आश्चर्यता बाळकाची ॥ १ ॥ दुर्बळ कीं नाहीं आइकत कानीं । काय नारायणीं न्यून झालें ॥ २ ॥ क्षणाक्षणा माझा न घ्यावा सांभाळ । अभाग्याचा काळ ऐसा आला ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं वचनासी रुचि । फलकट वेंचि तें तें होय ॥ ४ ॥ [५७४]

म्हणऊनी दास नव्हे ऐसा झालों । अनुभवें बोलों स्वामीपुढें ॥ १ ॥ कां नाहीं वचन प्रतिउत्तराचें । मीच माझ्या वेचें अट्टाहासें ॥ २ ॥ कासयानें गोडी उपजावा विश्वास । प्रीती कांहीं रस वांचुनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे अगा चतुरा शिरोमणी । विचारावें मनीं केशीराजा ॥ ४ ॥ [५७५]

काय आम्हीं आतां पोटचि भरावें । जग चाळवावें भक्त म्हूण ॥ १ ॥ ऐसा तरि एक सांगा जी विचार । बहु होतों फार कासावीस ॥ २ ॥ काय कवित्वाची घालूनियां रूढी । करूं जोडाजोडी अक्षरांची ॥ ३ ॥ तुका म्हणे काय गुंपो(फो)नि दुकाना । राहों नारायणा करुनी घात ॥ ४ ॥ [५७६]

वर्म तरी आम्हां दावा । काय देवा जाणें मी ॥ १ ॥ बहुतां रंगीं हीन झालों । तरि आलों शरण ॥ २ ॥ द्याल जरी तुम्हीं धीर । होईल स्थिर मन ठायीं ॥ ३ ॥ तुका म्हणे सत्तावळें । लडिवाळें राखावीं ॥ ४ ॥ [५७७]

सांगों देवा नेणां काय । बोलाचिये आवडी ॥ १ ॥ वायां मज चुकूर करा । विश्वंभरा विनोदें ॥ २ ॥

मी कोणत्याहि शास्त्राज्ञेचें उल्लंघन केलें नाहीं, असें असतां आमच्यापासून नारायण दुरावला कां गेला १. ह्या संशयानें माझें मन नारायणाला आळवीत आहे. आमचे मनाचे ठिकाणीं चिंतारहित समाधानस्थिति नाहीं २. अहो देवा, तुम्हीं आपल्या दासांना विसरतां हें तुमचें करणें अयोग्य आहे. तुमच्याजवळ सर्व नीति आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आम्हांला चिंतेच्या डोहामध्यें बुडविण्यांत तुम्हाला लाज वाटत नाहीं का ? ४. [५७३]

बालकाचा जीव जाईतोंपर्यंत आईकडून त्याचा त्याग व्हावा, हें मोठें आश्चर्य आहे १. अहो नारायणा, तुम्हीं दुर्बल आहां किंवा आम्हीं बोलतों तें कानानें ऐकत नाहीं. तुमच्या ठिकाणीं कोणता कमीपणा झाला आहे ? २. क्षणोक्षणीं तुम्हीं माझें रक्षण करूं नये, अशी आम्हां भाग्यहीनांची वेळ आली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, फोलकटाप्रमाणें आमचें वचन निरस रुचिरहित झालें आहे ४. [५७४]

अहो देवा, तुमचा मी दास नाहीं, असें अनुभवानें तुमच्यापुढें मीं बोलतों १. अहो, तुमच्याजवळ जी कांहीं आम्हीं बडबड केली, त्याचे प्रत्युत्तरादाखल आपल्याकडून शब्द कां येत नाहींत ? २. आपल्या ठिकाणीं मीच मात्र मोठ्या अट्टाहासानें बडबड करीत आहें. देवा, तुमच्या ठिकाणीं आमचा विश्वास कसा बसावा ? कारण तुमच्यामध्यें आमच्या संबधानें किंचित्‌ही प्रेम दिसत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, आपण सर्व चतुरांचे मुगुटमणि आहांत, म्हणून आम्हीं जें कांहीं म्हणतों ह्याचा आपल्या मनाशीं विचार करा ४. [५७५]

अहो देवा, भक्तपणाचा अगर साधुपणाचा डौल दाखवून साध्या भोळ्या जनाला फसवून आम्हीं काय पोटच भरीत राहावें ? १. अहो देवा, वर म्हटल्याप्रमाणें आम्हीं नेहमीं करीत राहावें असें तुमचें मत असल्यास तसें आम्हांला सांगा. आमचा जीव फार कासावीस होत आहे २. टला ट पला प जोडून नानाप्रकारच्या कविता करीतच आम्हीं राहावें का ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा ह्या दुकानदारींतच गुंतून अहो नारायणा, आम्हीं आपला घात करून घ्यावा काय ? ४. [५७६]

अहो देवा, खरें वर्म काय आहे, हें तरी आम्हांला दाखवा, कारण मला कांहीं समजत नाहीं १. अनेक विषयांच्या रंगानें मी अगदीं दीन झालों आहें, म्हणून देवा, मी आपल्याला शरण आलों आहें २. तुम्हीं जर कांहीं धैर्य द्याल, तरच माझें मन स्थिर होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या सत्तासामर्थ्यानें लाडक्या जीवांचे तुम्हीं रक्षण करावें ४. [५७७]

अहो देवा, मी तुम्हांला सांगावयास पाहिजे काय ? मला तुमच्या बोलण्याची आवड आहे, हें तुम्हाला कळत नाहीं का ? १. अहो विश्वंभरा, माझ्याविषयीं चुकवाचुकव करण्याची मस्करी करूं नका २.

आवडीच्या करा ऐसें। अंतर्वासें जाणतसां ॥ ३ ॥ तुका म्हणे समाधानें। होइन मनें मोकळा ॥ ४ ॥ [५७८]

निर्धाराचें अवघें गोड। वाटे कोडकौतुक ॥ १ ॥ बैसलिया भाव पायीं। बरा तईं नाचेन ॥ २ ॥ स्वामी कळे सावधान। तरि मन उल्हासे ॥ ३ ॥ तुका म्हणे आश्वासावें। प्रेम द्यावें विठ्ठलें ॥ ४ ॥ [५७९]

झाली ताडातोडी। अवघीं पडिलों उघडीं ॥ १ ॥ नव्हों कोणाचीं ते कांहीं। तुझे भरलिया वाहीं ॥ २ ॥ पारुषला संवसार। मोडिली बैसण्याची थार ॥ ३ ॥ आतां म्हणे तुका। देवा अंतरें राखों नका ॥ ४ ॥ [५८०]

आधार तो व्हावा। ऐसी आस करीं देवा ॥ १ ॥ तुम्हांपाशीं काय उणें। काय वेंचे समाधानें ॥ २ ॥ सेवेच्या अभिलाषें। मन बहु झालें पिसें ॥ ३ ॥ अरे भक्तपराधीना। तुका म्हणे नारायणा ॥ ४ ॥ [५८१]

तुमचा तुम्हीं केला गोंवा। आतां चुकवितां देवा ॥ १ ॥ कैसें सरे चाळवणें। केलें काशाला शाहाणें ॥ २ ॥ कासया हो रूपा। नांवा आलेति गा बापा ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां। न सरे हवाले घालितां ॥ ४ ॥ [५८२]

माझी भक्ती भोळी। एकविध भाव बळी ॥ १ ॥ मी कां पडेन निराळा। ऐसा सांडूनि सोहळा ॥ २ ॥ आतां अनारिसा। येथें न व्हावें सहसा ॥ ३ ॥ तुका म्हणे जोडुनि पाय। पुढें उगा उभा राहें ॥ ४ ॥ [५८३]

आहे तरी सत्ता। ऐशा करितों वारता ॥ १ ॥ अंगसंगाचीं उत्तरें। सलगीसेवेनें लेंकरें ॥ २ ॥ तरी निकटवासें। असों आशंकेच्या नासें ॥ ३ ॥ तुका म्हणे रुची। येथें भिन्नता कैंची ॥ ४ ॥ [५८४]

जी आम्हांला आवड आहे त्याचप्रमाणें आपण कांहीं करावें, हें तुम्हांस सांगावयास पाहिजे असें नाहीं. तुम्हीं अंतःकरणांत राहून सर्व कांहीं जाणतां ३. तुकाराम महाराज म्हणतात, मग मी समाधानानें आणि मनानें मोकळा होईन ४. [५७८]

निश्चयानें कोणती गोष्ट करणें हें मोठें गोड असून त्याचें कोडकौतुक वाटतें १. देवा, तुमच्या पायीं माझा भाव ज्या वेळेस बसेल, त्या वेळेस तुमच्या पुढें मी चांगला नाचेन २. आपला स्वामी मोठा सावध आहे, दक्ष आहे असें ज्या वेळेस समजून येईल त्या वेळेस माझें मन मोठें प्रसन्न होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आम्हांला आधार देऊन आपल्याविषयींचें प्रेम द्यावें ४. [५७९]

सर्व संबंध तुटला, म्हणून आम्हीं सगळे उघडे पडलों १. आतां आम्हीं कोणाचे कांहीं संबंधी नाहीं; कारण, हे देवा, आम्हीं तुझ्या भक्तिमार्गांत पडलों २. संसार नष्ट झाला; कारण, त्याचें आश्रयाचें स्थान जो देहाहंकार, तोच नाहींसा झाला ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, आतां मला आपल्यापासून दूर ठेवूं नका ४. [५८०]

अहो देवा, आपला कांहीं तरी मला आश्रय असावा, अशी मी इच्छा करीत आहें १. तुमच्या जवळ कांहीं कमी आहे काय? आमचें समाधान करण्यांत काय तुमचें खर्चीं पडतें? २. माझ्या अंतःकरणामध्यें सेवेविषयीं अभिलाषा असल्यामुळें माझें मन अगदीं वेडें झालें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो, भक्ताच्या स्वाधीन असणारे नारायण (तुम्हीं माझ्या मनाचें समाधान करा.) (पुढें ध्रुवपद वाचावें) ४. [५८१]

अहो देवा, तुमची तुम्हींच गुंतागुंत केलीत, आतां चुकवाचुकची कां करितां? १. आतां तुमच्या फसविण्याच्या सबबी पुऱ्या होणार नाहींत. तुम्ही आम्हांला शहाणे कशाकरितां केलेंत? २. अहो बापा! तुम्ही कशाकरितां नांवारूपाला आलांत? ३. तुकाराम महाराज म्हणतात, दुसऱ्याकडे आतां हवाले घालण्यानें भागणार नाहीं ४. [५८२]

माझी भक्ति भोळसट असून एकनिष्ठ आणि बळकट भावाची आहे १. अशा प्रकारचा सोहळा टाकून मीं कशाकरितां भक्तिसोहळ्यापासून वेगळा होऊं? २. ह्या ठिकाणीं सहसा कधीं वेगळें होऊं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, तुम्हीं पाय जुळवून आमच्या पुढें उगाच उभे राहा ४. [५८३]

माझी तुमच्यावर सत्ता आहे, म्हणून मीं असे शब्द बोलतों १. आम्ही सेवक मुलें असल्यामुळें आमचें बोलणें विशेष सलगीचें आहे २. सर्व शंका टाकून आम्हीं तुमच्या जवळ राहूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं रुचीमध्यें वेगळेपणा नाहीं ४. [५८४]

काळ सारावा चिंतनें । एकांतवासीं गंगास्नानें । देवाचे पूजनें । प्रदक्षणा तुळसीच्या ॥ १ ॥ युक्त आहार वेव्हार । नेम इंद्रियांसी सार । नसावी बासर । निद्रा बहु भाषण ॥ २ ॥ परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण । व्हावया जतन । हे उपाय लाभाचे ॥ ३ ॥ देह समर्पिजे देवा । भार कांहींच न घ्यावा । होईल अवघा । तुका म्हणे आनंद ॥ ४ ॥ [५८५]

मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं ऐसे ॥ १ ॥ मेले जित असों निजोनियां जागे । जो जो जें जें मागे तें तें देऊं ॥ २ ॥ भले तरी देऊं गांडीची लंगोटी । नाठ्या(ठा)ळाचे काठी देऊं माथां ॥ ३ ॥ मायबापाहूनि बहु मायावंत । करूं घातपात शत्रूहूनि ॥ ४ ॥ अमृत तें काय गोड आम्हांपुढें । विष तें बापुडें कडू किती ॥ ५ ॥ तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड । जया पुरे कोड त्याचेपरि ॥ ६ ॥ [५८६]

गाढवाचें तानें(न्हें) । पालटतें क्षणक्षणें ॥ १ ॥ तैसे अधमाचे गुण । एकविध नाहीं मन ॥ २ ॥ उपजतां बरें दिसे । रूप वाढे तों तों नासे ॥ ३ ॥ तुका म्हणे भुंकते वेळे । वेळ अवेळ न कळे ॥ ४ ॥ [५८७]

विटाळ तो परद्रव्य परनारी । येथुनि जो दुरी सोवळा तो ॥ १ ॥ गद्य पद्य कांहीं न धरावी उपाधी । स्वाधीनचि बुद्धि करुनी ठेवा ॥ २ ॥ विचाराचें कांहीं करावें स्वहित । पापपुण्यातीत भांडवल ॥ ३ ॥ तुका म्हणे न लगे जावें वनांतरा । विश्व विश्वंभरा सारिखेंचि ॥ ४ ॥ [५८८]

कल्पतरु रुया नव्हती बाभुळा । पुरवती फळा इच्छितया ॥ १ ॥ उदंड त्या गाई म्हैसी आणि शेळ्या । परि त्या निराळ्या कामधेनु ॥ २ ॥ तुका म्हणे देव दाखवील दृष्टी । तयासवें भेटी थोर पुण्य ॥ ३ ॥ [५८९]

सर्व काळ हरीच्या चिंतनांत व एकांतवास करून गंगास्नान, देवाचें पूजन व तुळशीच्या प्रदक्षिणा करण्यांत घालवावा १. नियमित आहार असावा, नियमित विश्रांति असावी. इंद्रियांचा नियमितपणा हेंच सार आहे. झोंप फाजील नसावी आणि बोलणेंहि पुष्कळ नसावें २. परमार्थ हें मोठें धन आहे. त्या योगानें देवाच्या चरणांची प्राप्ति करून घे व ते प्राप्त होण्याचे व रक्षण करण्याचे उपाय वर सांगितलेले आहेत ३. आपला देह देवाला अर्पण कर. त्याविषयींचा भार आपल्याकडे घेऊं नको. त्या योगानें सर्व आनंद होईल, असें तुकाराम महाराज म्हणतात. [५८५]

आम्हीं विष्णुदास मेणाहीपेक्षां मऊ आहोंत आणि इंद्राच्या हातांतील वज्र फोडून टाकण्याइतके कठिण आहोंत १. आम्हीं देहबुद्धीनें मरून आत्मस्थितीनें जिवंत आहोंत. देहसंबंधानें निद्रिस्त असून आत्मसंबंधानें जागे आहोंत. जो ज्या वेळेला जें आमच्याजवळ मागेल तें त्या वेळेला त्यास आम्ही देऊं २. जे कोणी चांगले आहेत त्यांना नेसलेली लंगोटी सुद्धां देऊं आणि नाठाळ असतील त्यांच्या डोक्यांत काठी घालूं ३. आईबापांपेक्षां आम्हीं पुष्कळ माया करणारे आहोंत. शत्रूपेक्षां देखील अधिक घातपात करणारे आहोंत ४. आमच्यापुढें अमृताची गोडी कितीशी ? आणि आमच्यापुढें विष तर दीन आहे. त्याचा कडूपणा कितीसा असणार ? ५. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं संपूर्ण चांगले आहोंत, ज्याची जशी इच्छा असेल तशी आमच्याकडून पूर्ण होईल ६. [५८६]

गाढवाचे लहान शिंगरांत क्षणोक्षणीं फेरबदल होत जातो १. त्याप्रमाणें अधम मनुष्याचे गुण आहेत. त्याचें मन कधींही एका नेमानें राहात नाहीं २. गाढवाचें पोर उपजतांच चांगलें दिसतें व जसजसें वाढत जातें तसतसें त्याचें रूप बिघडत जातें ३. तुकाराम महाराज म्हणतात, भुंकण्याचे वेळेस त्याला वेळ अवेळ ही मुळींच कळत नाहीं ४. [५८७]

दुसऱ्याचा पैसा, दुसऱ्याची बायको हाच विटाळ आहे. ह्यापासून जो दूर राहातो तो सोंवळा आहे १. कांहीं गद्य ग्रंथ करून व कांहीं पद्य ग्रंथ करून दुसऱ्याचा पैसा हरण करण्याची उपाधि करूं नये. त्यापासून आपली बुद्धि आपल्या स्वाधीन ठेवावी २. आत्मानात्मविवेकानें पापपुण्यातीत स्वात्मसुखाचें भांडवल जोडावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, कोठें वनामध्यें जाऊं नये, कारण संपूर्ण विश्वांत व्यापून असणारा परमात्मा हाच विश्व आहे ४. [५८८]

बाभळीचीं झाडें व रुईचीं झाडें हीं इच्छिलेलें फळ देणारीं कल्पतरु नाहींत १. पुष्कळ गाई आहेत, म्हशी आहेत, शेळ्या आहेत, पण ह्यांच्याहून कामधेनु त्या वेगळ्याच आहेत २. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या डोळ्यांना जो देव दाखवील, त्याची भेट होणें हें मोठें पुण्य समजावें ३. [५८९]

जळो तैसा प्रेमरंग । जाय भुलोनि पतंग ॥ १ ॥ सासूसाठीं रडे सून । भाव अंतरींचा भिन्न ॥ २ ॥ मैंद मुखींचा कोंवळा । भाव अंतरीं निराळा ॥ ३ ॥ जैशी वृंदावनकांती । उत्तम धरूं नये हातीं ॥ ४ ॥ बक ध्यान धरी । दावी सोंग मत्स्य मारी ॥ ५ ॥ तुका म्हणे सर्प डोले । तैसा कथेमाजी खुले ॥ ६ ॥ [५९०]

वेशा नाहीं बोल अवगुणा दूषिले । ऐशा बोला भले झणें क्षोभा ॥ १ ॥ कोण नेणे अन्न जीवाचें जीवन । विषमेळवण विष होय ॥ २ ॥ सोनें शुद्ध नेणे कोण हा विचार । डांकें हीनवर केलें त्यासी ॥ ३ ॥ याती शुद्ध परि अधम लक्षण । वायां गेलें तेणें सोंगही तें ॥ ४ ॥ तुका म्हणे शूर तोचि पावे मान । आणिक मंडण भार वाही ॥ ५ ॥ [५९१]

धन्य आजि दिन । झालें संतांचें दर्शन ॥ १ ॥ झाली पापातापा तुटी । दैन्य गेलें उठाउठी ॥ २ ॥ झालें समाधान । पायीं विसांवलें मन ॥ ३ ॥ तुका म्हणे आले घरा । तोचि दिवाळी दसरा ॥ ४ ॥ [५९२]

हेंचि माझें धन । तुमचे वंदावे चरण ॥ १ ॥ येणें भाग्यें असों जीत । एवढें समर्पुनी चित्त ॥ २ ॥ सांभाळिलें देवा । मज अनाथा जी जीवा ॥ ३ ॥ जोडूनियां कर । तुका विनवितो किंकर ॥ ४ ॥ [५९३]

फजितखोरा मना किती तुज सांगों । नको कोणा लागों मागेंमागें ॥ १ ॥ स्नेहवादें दुःख जडलेंसे अंगीं । निष्ठुर हें जगीं प्रेमसुख ॥ २ ॥ निंदास्तुति कोणी करो दयामाया । न धरीं चाड या सुखदुःखा ॥ ३ ॥ योगिराज कां रे न राहती बैसोनी । एकिये आसनीं याचि गुणें ॥ ४ ॥ तुका म्हणे मना पाहें विचारून । होईं रे कठिण वज्राऐसें ॥ ५ ॥ [५९४]

पतंगामध्यें दिव्याविषयींचें मोठें प्रेम असतें. त्या योगानें तो भुलून जाऊन दिव्यावर उडी टाकतो. अशा प्रेमाला आग लागो ! १. सासू मेली म्हणजे सून रडते, पण तिच्या अंतःकरणांतील भाव वेगळा असतो २. कपटी हा चांगलें बोलतो, पण त्याच्या अंतःकरणांतील भावना वेगळी असते ३. ज्याप्रमाणें कडु वृंदावनफळ बाहेरून गोजिरवाणें दिसतें, पण आंत कडू असतें म्हणून तें हातांत धरूं नये ४. नदीच्या तीरावर बगळा ध्यानस्थ बसल्याचें सोंग करून मासे मारतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, गारुड्यानें पुंगी वाजविल्याबरोबर ज्याप्रमाणें नाग डोलतो, त्याप्रमाणें हा रजोगुणी ढोंगी हरिकथेमध्यें बाहेरच्या बाजूनें (हरिकथा करीत किंवा ऐकत असतां बाह्यात्कारीं) खुलतो ६. [५९०]

साधूंनीं घेतलेल्या वेषाला मी दोष देत नाहीं, तर त्यांच्यामधील असणाऱ्या अवगुणांस दोष देतों. ह्या माझ्या बोलण्याचा सद्‌गृहस्थहो, तुम्हीं राग मानूं नका १. सर्व जीवांचें जीवन अन्न आहे, असें कोण समजत नाहीं? पण त्याच्यामध्यें जर विष मिळविलें तर तें सर्व अन्न विष होऊन मारक होईल २. सोनें हें चांगलें शुद्ध आहे, असें कोण जाणत नाहीं? पण सराफांनीं त्याला इतर धातूचा डाग दिल्यानें तें मंदत्वाला येतें ३. एखाद्याची जात जरी शुद्ध चांगली आहे, तरी त्याच्यामध्यें वाईट लक्षण असेल तर त्यायोगानें तो स्वहिताला आंचवला जातो व सु--जातपणा व्यर्थ होतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, खरोखर रणामध्यें शत्रूवर चाल करून जाण्यांत शूराचाच मान होतो. बाकीच्यांनीं शूराचा पोषाख घालून कितीहि हत्यारें आपल्याजवळ बाळगलीं, तरी तीं सर्व शोभा--ओझें--आहे, असें समजावें ५. [५९१]

संतांचें दर्शन झाल्यामुळें आजचा दिवस धन्य आहे १. त्या योगानें पाप आणि त्रिविध ताप ह्यांचा नाश झाला व दैन्य तत्क्षणींच गेलें २. संतांच्या पायांपाशीं मन विश्रांति पावल्यामुळें समाधान झालें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे दिवशीं संत घरीं येतात तो दिवस दसरा दिवाळी समजावा ४. [५९२]

अहो देवा, तुमच्या चरणीं मस्तक ठेवणें, हेंच माझें द्रव्य आहे १. आपलें चित्त हरीला समर्पण करूं ह्या भाग्यानें आम्ही जिवंत राहूं २. देवा, तुम्ही माझ्या अनाथ जीवाचा सांभाळ केलात ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी तुमचा दास हात जोडून अशा प्रकारची विनंति करितों ४. [५९३]

हे माझ्या फजीतखोरा मना, तुला किती शिकवावें ? तूं कोणाच्या मागें मुळींच जाऊं नकोस १. दुसऱ्याविषयीं असणाऱ्या स्नेहामुळें आम्हांला दुःख होत आहे, म्हणून जगतामध्यें निष्ठुर असण्यांतच हरीचें प्रेमसुख आहे २. कोणी निंदा करोत अगर स्तुति करोत, मजवर दया माया करोत, पण त्याच्या सुखदुःखाची इच्छा मी कधीं करणार नाहीं ३. अरे मना, ह्याकरितांच योगिराज एका आसनावर एकांतामध्यें बसून राहात नाहीं काय ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे मना, तूं ह्याचा विचार करून पाहा आणि इंद्राच्या वज्राप्रमाणें कठिण हो ५. [५९४]

जळो माझी ऐसी बुद्धी । मज घालीं तुजमधीं । आवडी हे विधि । निषेधींच चांगली ॥ १ ॥ तूं स्वामी मी सेवक । उंच पद निंच एक । ऐसें करावें कौतुक । नको करूं खंडणा ॥ २ ॥ जळ न खाती जळा । वृक्ष आपुलिया फळा । भोक्ता तो निराळा । तेणें गोडी निवडिली ॥ ३ ॥ हिरा शोभला कोंदणें । अळंकारीं मिरवे सोनें । एक असतां तेणें । काय दुजें जाणावें ॥ ४ ॥ उष्णें छाये सुख वाटे । बाळें माते पान्हा फुटे । एका एक भेटे । कोण सुख ते काळीं ॥ ५ ॥ तुका म्हणे हित । हेंचि मानी माझें चित्त । नव्हे आतां मुक्त । ऐसा झाला भरंवसा ॥ ६ ॥ [५९५]

मनीं वसे त्याचें आवडे उत्तर । वाटे समाचार घ्यावा ऐसें ॥ १ ॥ जातीचें तें झुरे येरयेरासाठीं । वियोगेंही तुटी नेघे कधीं ॥ २ ॥ भेटीची अपेक्षा वारता आदर । पुसे नव्हे धीर मागुताले ॥ ३ ॥ तुका म्हणे माझ्या जीवाचें जीवन । सोईरे हरिजन प्राणसखे ॥ ४ ॥ [५९६]

नव्हे आराणूक परि मनीं वाहे । होईल त्या साहे पांडुरंग ॥ १ ॥ पंढरीसि जावें उद्वेग मानसीं । धरिल्या पावसी संदेह नाहीं ॥ २ ॥ नसो बळ देह असो पराधीन । परी हें चिंतन टाकों नको ॥ ३ ॥ तुका म्हणे देह पडो या चिंतनें । पुढें लागे येणें याजसाठीं ॥ ४ ॥ [५९७]

कोठें देवा अंगा आलें थोरपण । बरें होतें दीन होतों तरी ॥ १ ॥ साधन ते सेवा संतांची उत्तम । आवडीनें नाम गाईन तें ॥ २ ॥ न पुसतें कोणी कोठेंही असतां । समाधान चित्ताचिया सुखें ॥ ३ ॥ तुका म्हणे जन अव्हेरितें मज । तरी केशीराज सांभाळिता ॥ ४ ॥ [५९८]

चतुर मी झालों आपुल्या भोंवता । भावेंविण रिता स्फुंद अंगीं ॥ १ ॥ आतां पुढें वायां जावें हें तें काई । कामक्रोधें ठायीं वास केला ॥ २ ॥ गुणदोष आले जगाचे अंतरा ।

देवा, तुमच्या स्वरूपामध्यें जीवाभावानें मिळून जावें, अशाविषयींच्या बुद्धीला आग लागो. ह्याच ऐक्यबुद्धीच्या निषेधांतच चांगली आवड आहे १. तुम्ही आमचे स्वामी व्हावेत, मी तुमचा सेवक असावें, अशी ही तुमची उंच पदवी आणि माझी नीच पदवीच ठेवावी, असेंच कौतुक करावें; ह्यामध्यें कधींहि भेद येऊं देऊं नये २. कारण पाणी पाण्याला पीत नाहीं, वृक्ष आपलें फळ खात नाहीं; त्याहून वेगळा जो भोक्ता असतो, तोच त्याची गोडी अनुभवितो ३. हिरा कोंदणांत शोभा देतो, दागिन्यांच्या रूपानें सोनें शोभतें. जर मुळांत एकच असेल तर त्यानें दुसरें कसें जाणावें ? ४. उन्हामुळें सावलीचें सुख वाटतें. बालकाच्या योगानें आईला पान्हा फुटतो. एकाला दुसरें न भेटतां एकाला एकच जर भेटेल, म्हणजे एकचें एकच जर राहील, तर त्या वेळेस सुख कोणतें आहे ? ५. तुकाराम महाराज म्हणतात, असें वेगळें राहाण्यांतच माझें चित्त हित मानीत आहे. मी मुक्त होणार नाहीं, असा माझा निश्चय झाला आहे ६. [५९५]

मनांत ज्याच्याविषयींची प्रीति आहे त्याचें बोलणें आवडतें. त्याचा समाचार घ्यावासा वाटतो १. एका जातीचे जे असतात, ते परस्परांचे वियोगांत परस्परांविषयीं निरंतर झुरतात २. ते एकमेक रात्रंदिवस आपल्या प्रियकराच्या भेटीची इच्छा करितात. त्याच्याकडून कांहीं हकीगत आली तर मोठ्या आदरानें व त्वरेनें पुन्हां पुन्हां विचारतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या जीवाचें जीवन असे हरिभक्त माझे आप्त व प्राणसखे आहेत (त्यामुळें त्यांच्याविषयीं मला साहाजिकच जिव्हाळा वाटतो) ४. [५९६]

जो कोणी अस्वस्थचित्त असूनहि निरंतर मनामध्यें पांडुरंगाच्या भेटीची इच्छा करतो त्याला पांडुरंग साह्य होतात १. पंढरीला जावें अशी मनामध्यें तळमळ धरशील, तर निःसंशय तूं पांडुरंगाच्या ठिकाणीं प्राप्त होशील २. तुझ्यामध्यें बळ नसून तुझा देह जरी पराधीन असेल, तरी देवाचें चिंतन सोडूं नकोस ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाच्या चिंतनांतच देहपात व्हावा, कारण पुढें ह्याचकरितां मनुष्यदेहास यावयास पाहिजे आहे ४. [५९७]

देवा, माझ्या अंगाला मोठेपणा कशाला आला ? मी दीन झालों असतों तर बरें झालें असतें १. संतांची सेवा करणें हें साधन फार चांगलें आहे आणि मीं मोठ्या प्रेमानें हरीचें नाम गाईन २. कोठेंही राहिलों तरी कोणी विचारीत नाहीं. चित्त सुखी असल्यामुळें नेहमीं समाधानच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, लोक जर माझा अव्हेर करतील, तर देव ह्या माझा सांभाळ करील ४. [५९८]

मी आपल्या भोंवतींच मोठा चतुर झालों, पण हरीच्या भावावांचून चतुरपणाचा अंगामध्यें फुंज (गर्व) पोकळ आहे १ ह्यानंतर व्यर्थ जाणें तें काय आहे ? कामक्रोधांनीं आमच्या ठिकाणीं वास्तव्य केलें आहे २. लोकांमधील असणारे गुणदोष

भूताच्या मत्सरावरी बुद्धि ॥ ३ ॥ तुका म्हणे करूं उपदेश लोकां । नाहीं झालों एका परता दोषा ॥ ४ ॥ [५९९]

धन्य ते संसारीं । दयावंत जे अंतरीं ॥ १ ॥ येथें उपकारासाठीं । आलें घर ज्या वैकुंठीं ॥ २ ॥ लटिकें वचन । नाहीं देहीं उदासीन ॥ ३ ॥ मधुरा वाणी ओठीं । तुका म्हणे वाव पोटीं ॥ ४ ॥ [६००]

कुटल्याविण नव्हे मांडा (कांडिल्या कुटिल्या होतो मांडा)। अळसें धोंडा पडतसे ॥ १ ॥ राग नको धरूं मनीं । गांडमणी सांगतों ॥ २ ॥ तरटापुढें बरें नाचे। सुते काचें मुसळ ॥ ३ ॥ तुका म्हणे काठी सार। करी फार शहाणें ॥ ४ ॥ [६०१]

कळों येतें तरि कां नव्हे । पडती गोवे भ्रमाचे ॥ १ ॥ जाणतांचि होतो घात । परिसा मत देवा हें ॥ २ ॥ आंविसासाटीं(ठीं) फासा मान । पाडी धनइच्छा ते ॥ ३ ॥ तुका म्हणे होणार खोटें । कर्म मोटें बळिवंत ॥ ४ ॥ [६०२]

मोकळें मन रसाळ वाणी । याचि गुणीं संपन्न ॥ १ ॥ लक्ष्मी ते ऐशा नांवें। भाग्यें ज्यावें तरि त्यांनीं ॥ २ ॥ नमन तें नम्रता अंगीं । नेघे रंगीं पालट ॥ ३ ॥ तुका म्हणे त्यांच्या नांवें। घेतां व्हावें संतोषी ॥ ४ ॥ [६०३]

शेवटची विनवणी । संतजनीं परिसावी ॥ १ ॥ विसर तो न पडावा । माझा देवा तुम्हांसी ॥ २ ॥ पुढें फार बोलों काय । अवघें पायां विदित ॥ ३ ॥ तुका म्हणे पडिलों पायां । करा छाया कृपेची ॥ ४ ॥ [६०४]

करितों कवित्व म्हणाल हें कोणी । नव्हे माझी वाणी पदरींची ॥ १ ॥ माझीये युक्तीचा नव्हे हा प्रकार । मज विश्वंभर बोलवितो ॥ २ ॥ काय मी पामर जाणें अर्थभेद ।

माझ्या अंतःकरणामध्यें येऊं लागले. भूतांचा मत्सर करण्याकडेच माझी बुद्धि लागली ३. तुकाराम महाराज म्हणतात, लोकांना मी उपदेश मात्र करितों, पण मी एखाद्या दोषापासून देखील वेगळा झालों नाहीं. [५९९]

ज्यांच्या अंतःकरणामध्यें दया आहे, ते संसारिक प्राणी धन्य आहेत १. ते केवळ ह्या लोकामध्यें उपकार करण्याकरितांच आलेले आहेत. त्यांचें स्वतःचें घर वैकुंठांत आहे २. त्यांचे जवळ खोटें भाषण नसून ते देहावर उदास असतात. ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांच्या ओठांत मधुर शब्द असून त्यांच्या पोटांत अनेकांचे गुणदोष सांठविण्याइतकी पुष्कळ जागा (अवकाश) आहे. (पुढें ध्रुवपद वाचावें) ४. [६००]

हे भांडखोरा, मांडा हा पदार्थ चांगला होण्यास कणीक चांगली मळावी लागते, त्याखेरीज तो होत नाहीं. त्याविषयीं आळस केला तर पदरामध्यें धोंडा पडतो १. हे मूर्खा, आम्हीं सांगितलेल्या गोष्टींचा मनांत राग धरूं नकोस २. स्वारानें हातामध्यें चाबूक घेतला म्हणजे त्याच्या हुकमाप्रमाणें घोडें नाचतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, कोणीही अडाणी शहाणा होण्याला हातांतील काठी हें साधन आहे ४. [६०१]

जीवांना खरें कळत असूनहि ते आपली सुटका करून न घेतां भ्रमाच्या गुंतण्यांत (जाळ्यांत) कां पडतात? १. खरें काय आहे, हें जाणत असूनहि त्यांचा घात होत आहे. अहो देवा, अशी ही हकीकत ऐका २. मासा आमिषाच्या आशेनें आपला गळा फांसांत अडकवून घेतो. त्याचप्रमाणें मनुष्य धनाच्या आशेनें आपण अडकून पडतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, कर्म हें मोठें बलाढ्य आहे. त्यापासून खोटें होणार असेल तर होतें ४. [६०२]

ज्याचें मन कपटरहित मोकळें आहे, आणि वाणीहि मोठी रसभरीत अशा गुणानें युक्त आहे १. ह्यालाच लक्ष्मी (ऐश्वर्य) असें म्हणतात. त्याच भाग्यवानांनीं जगावें २. नमन हीच नम्रता ज्यांच्या अंगीं असून कधींहि त्या स्थितींत बदल होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांचें नांव घेण्यानें कोणीहि संतुष्ट होतो ४. [६०३]

अखेरची विनंति संतांनीं ऐकावी १. माझा विसर देवाला कधींहि पडूं नये आणि तुम्हांलाहि पण पडूं नये २. ह्याच्यापुढें अधिक काय बोलावयाचें आहे? तुम्हांला सर्व कळत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी तुमच्या पायां पडलों आहें. मजवर दयेची सांवली करा ४. [६०४]

मी कविता करीत आहें असें कोणीं म्हणाल, तर कवितेची वाणी माझ्या पदरची नाहीं १. हा सर्व कवितेचा प्रकार माझ्या युक्तीचा नाहीं. मला विश्वंभरच बोलवीत आहे २. मीं यःकश्चित् पामर अनेक प्रकारचें अर्थज्ञान काय जाणावें?

वदवी गोविंद तेंचि वदें ॥ ३ ॥ निमित्त मापासी बैसविलों आहें । मी तों कांहीं नव्हे स्वामिसत्ता ॥ ४ ॥ तुका म्हणे आहें पाईकचि खरा । वागविता मुद्रा नामाची हे ॥ ५ ॥ [६०५]

आम्हीं गावें तुम्हीं कोणीं कांहीं न म्हणावें। ऐसें तंव आम्हां सांगितलें नाहीं देवें॥ १ ॥ म्हणा राम राम टाळी वाजवा हातें । नाचा डोला प्रेमें आपुलिया स्वहितें ॥ २ ॥ सहज घडे तया आळस करणें तें काई । अग्नीचें भातुकें हात पाळितां कां पायीं ॥ ३ ॥ येथें नाहीं लाज भक्तिभाव लौकिक। हांसे तया घडे ब्रह्महत्यापातक ॥ ४ ॥ जया जैसा भाव निरोपण करावा। येथें नाहीं चाड ताल विताल या देवा ॥ ५ ॥ सदैव ज्या कथाकाळीं घडे श्रवण । तुका म्हणे येर जन्मा आले ते पाषाण॥ ६ ॥ [६०६]

देव घ्या कोणी देव घ्या कोणी । आइता आला घर पुसोनि ॥ १ ॥ देव न लगे देव न लगे । सांठवणेचे रुधले जागे ॥ २ ॥ देव मंदला देव मंदला । भाव बुडाला काय करूं ॥ ३ ॥ देव घ्या फुका देव घ्या फुका । न लगे रुका मोल कांहीं ॥ ४ ॥ दुबळा तुका भावहीन[ण] । उधारा देव घेतला ऋण ॥ ५ ॥ [६०७]

विष्णुमय सर्व वैष्णवांसीं ठावें । येरांनीं वाहावे भार माथां ॥ १ ॥ साधनें संकटें सर्वांलागीं सीण । व्हावा लागे क्षीण अहंमान ॥ २ ॥ भाव हा कठीण वज्र हें भेदवे । परि न छेदवे मायाजाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे वर्म भजनेंचि सांपडे । येरांसी तों पडे ओस दिशा ॥ ४ ॥ [६०८]

कीर्तनाची गोडी । देव निवडी आपण ॥ १ ॥ कोणी व्हारे अधिकारी । त्यासी हरि देईल ॥ २ ॥ आंगीं वैराग्याचें बळ । साही खळ जिणावे ॥ ३ ॥ उरेल ना उरी । तुका करी बोभाट ॥ ४ ॥ [६०९]

जसें गोविंद माझ्याकडून बोलवीत आहे, तसें मी बोलतों. ३. एकामागून एक कविता करणें, हें माप घालण्यास निमित्तमात्र मला बसविलें आहे. ह्या ठिकाणीं मी म्हणून कांहीं नाहीं. सर्व कांहीं देवाच्या सत्तेनें होत आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी खरोखर भगवंताचा सेवक असून त्याच्याच नांवाचें चिन्ह (शिक्का) वागवीत आहें ५. [६०५]

देवाचें नांव हें आम्हींच गावें. तुम्हीं कोणीं ऐकणारांनीं तें म्हणूं नये, अशी कांहीं देवांनीं आम्हाला आज्ञा केली नाहीं १. ह्याकरितां रामराम तुम्हीं म्हणा आणि हातानें टाळी वाजवा, आणि त्या प्रेमांत स्वहित होण्याकरितां नाचा आणि डोला २. जी गोष्ट सहज होत आहे, त्याविषयीं आळस काय म्हणून करावा? हात, पाय हे केवळ अग्नीचेंच खाजें (भक्ष्य) आहे. ह्याकरितां हरिभजनाला सोडून ह्यांचें पोषण कां करितां? ३. भक्तिभावाचे ठिकाणीं लाज आणि लौकिक हीं नाहींत; येथें जो कोणी हंसेल, त्याला ब्रह्महत्येचें पातक लागेल ४. जसा ज्याच्यामध्यें भाव असेल, त्याप्रमाणें त्यानें प्रतिपादन करावें. ह्या ठिकाणीं देवाला तालाची किंवा बेतालाची इच्छा नाहीं ५. कथेच्या वेळेस ज्याला कथाश्रवण घडतें तो दैववान् आहे. तुकाराम महाराज म्हणतात, बाकीचे दगड जन्माला आले आहेत ६. [६०६]

तुम्हीं कोणी देवाला घ्या (असें द्विरुक्तीनें सांगतात). तो आयता घर विचारीत आला आहे १. देव नको असें लोक (द्विरुक्तीनें) सांगतात, कारण सांठविण्याची जागा (अंतःकरण पंच विषयांनीं) भरून गेली आहे २. देव मंदावला असें (द्विरुक्तीनें) सांगतात, कारण भाव नाहींसा झाला, काय करावें? ३. देव फुकट घ्या असें (द्विरुक्तीनें) म्हणतात, कारण त्याला दमडी देखील किंमत लागत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी दुर्बळ असल्यामुळें देवाच्या भावाखेरीज देव उधार घेतला ५. [६०७]

सर्व जग विष्णूनें भरलें आहे, हें केवळ विष्णुभक्त वैष्णव जाणतात. बाकीच्यांनीं व्यर्थ ज्ञानाचें ओझें मात्र डोक्यावर वाहावें. १ नानाप्रकारचीं साधनें हीं संकटें आहेत. हीं सर्व करण्यांत शीण मात्र आहे. मुख्यत्वेंकरून अभिमान गलित झाला पाहिजे. २. अभिमानाचा नाश करणें, हें साधणें फार कठिण आहे. एक वेळ इंद्राच्या हातांतल्या वज्राचा नाश करवेल, परंतु मायाजाळाचें छेदन होणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याचें वर्म केवळ हरीच्या भजनानेंच सांपडेल. बाकीच्यांना दिशा मात्र ओस हो ल, म्हणजे कांहींएक कळणार नाहीं ४. [६०८]

कीर्तनाचें माधुर्य स्वतः देव निवडीत आहेत. १. तें घेण्याकरितां कोणी अधिकारसंपन्न व्हा, म्हणजे त्यांना हरि तें देईल २. अंगीं असलेल्या वैराग्याच्या जोरानें शरीरामध्यें असणारे कामक्रोधादिक षड्रिपूंस जिंकावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, येथें खाली (संचित, प्रारब्ध, क्रियमाण ह्यांपैकीं) कांहीं उरणार नाहीं, म्हणून अधिकारी होऊन तें माधुर्य लवकर घेण्याची त्वरा करावी, अशी मी ओरड करीत आहें ४. [६०९]

काया वाचा मन ठेविलें गहाण । घेतलें तुझें रिण जोडीलागीं ॥ १ ॥ अवघें आलें आंत पोटा पडिलें थीत । सारूनि निश्चिंत झालों देवा ॥ २ ॥ द्यावयासी आतां नाहीं तोळामासा । आधील मवेशा तुज ठावी ॥ ३ ॥ तुझ्या रिणें गेले बहुत बांधोनि । झाले मजहूनि थोरथोर ॥ ४ ॥ तुका म्हणे तुझे खतीं जे गुंतले । करूनी आपुले घेईं देवा ॥ ५ ॥ [६१०]

आलें भरा केणें । येरझार चुके जेणें ॥ १ ॥ उभें केलें विटेवरी । पेठ इनाम पंढरी ॥ २ ॥ वाहती मारग । अवघें मोहरलें जग ॥ ३ ॥ तुका म्हणे माप । खरें आणा माझे बाप ॥ ४ ॥ [६११]

लक्ष्मीवल्लभा । दिनानाथा पद्मनाभा ॥ १ ॥ सुख वसे तुझे पायीं । मज ठेवीं तेचि ठायीं ॥ २ ॥ माझी अल्प हे वासना । तूं तों उंदारांचा राणा ॥ ३ ॥ तुका म्हणे भोगें । पीडा केली धांव वेगें ॥ ४ ॥ [६१२]

करीं ऐसें जागें । वेळोवेळीं पायां लागें ॥ १ ॥ प्रेम झोंबे कंठीं । देह धरणिये लोटी ॥ २ ॥ राहे लोकाचार । पडे अवघा विसर ॥ ३ ॥ तुका म्हणे ध्यावें । तुज व्यभिचारभावें ॥ ४ ॥ [६१३]

टाळ दिंडी हातीं । वैकुंठीचे सांगाती ॥ १ ॥ जाल तरी कोणी जा गा । करा सिदोरी ते वेगा ॥ २ ॥ जाती सादावीत । तेथें असों द्यावें चित्त ॥ ३ ॥ तुका म्हणे बोल । जाती बोलत विठ्ठल ॥ ४ ॥ [६१४]

वायां जातों देवा । नेणें भक्ति करूं सेवा ॥ १ ॥ आतां जोडोनियां हात । उभा राहिलों निवांत ॥ २ ॥ करावें तें काय । न कळे अवलोकितों पाय ॥ ३ ॥ तुका म्हणे दान । दिलें पदरीं घेईन ॥ ४ ॥ [६१५]

हे देवा, मी आपलें काया वाचा मन तुमच्याजवळ गहाण ठेवून तुमच्यापासून परमार्थाचा लाभ होण्याकरितां कर्ज घेतलें आहे १. आतां आमच्या पोटामध्यें सर्व कांहीं आलें आहे. सर्व (स्त्रीपुत्रादिकांचीं) लिगाडें बाजूला ठेवून हे देवा, मी निश्चिंत झालों २. तुला आतां परत देण्याला आपल्याजवळ तोळामासा धन नाहीं. पूर्वीचा प्रकार देवा, तुला तर ठाऊक आहे ३. माझ्यापेक्षां मोठी मोठी मंडळी तुझ्या कर्जानें बद्ध झालेली आहेत ४. तुकाराम महाराज म्हणतात, देवा कर्जरोख्यामध्यें जे गुंतले आहेत, त्यांना तुम्ही आपलेसे करून घ्या ५. [६१०]

ज्याच्या योगानें जन्ममृत्यूची येरझार चुकली जाते असा माल ह्या बाजारांत आहे, तो तुम्हीं घ्या १. भक्तजनांना पंढरी हें इनामगांव दिलेलें आहे आणि ह्या ठिकाणीं पांडुरंगरूपी माल विटेवर उभा आहे २. तो घेण्याकरितां सर्व जग सरसावलें आहे. त्या योगानें बाजाराच्या मार्गांत लोकांची जाण्याची गर्दी झाली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझे बापहो, हा माल घेण्याकरितां खरें माप पात्र घेऊन या ४. [६११]

हे लक्ष्मीपति, हे दीनांच्या स्वामी, हे पद्मनाभा १. तुझ्या पायांपाशीं सुख आहे. मला त्या ठिकाणीं ठेव २. माझी हीच वासना आहे, आणि तूं तर उदारांचा राजा आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या प्रारब्धभोगानें मोठी पीडा केली आहे. ह्याकरितां त्वरेनें धांव ४. [६१२]

अहो देवा, तुमच्या वारंवार पायां पडून तुम्हाला जागें करतों १. तुमच्या विषयींचें प्रेम माझ्या कंठामध्यें निरंतर झोंबलेलें राहो आणि माझा देह भूमीवर तुम्हांला लोटांगण घालो २. माझा संपूर्ण लोकव्यवहार थांबून मला सर्वांचा विसर होवो ३. तुकाराम महाराज म्हणतात, व्यभिचारभावानें जारिणी जसें जाराचें ध्यान करिते, त्याप्रमाणें आम्हीं तुझें ध्यान करावें ४. [६१३]

ज्यांच्या हातामध्यें आतां टाळवीणा आहे असे हे विष्णुभक्त वैकुंठमार्गानें जाण्याचे सोबती आहेत १. ज्यांना कोणाला त्यांच्याबरोबर जावयाचें असेल त्यांनीं त्वरेनें जावें. ह्यांच्याबरोबर मार्गांत लागणारी पुण्याची शिदोरी लवकर तयार करावी २. ते सर्वांना सूचना देत जात आहेत, तेथें सर्वांनीं आपलें चित्त ठेवावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ते विष्णुभक्त विठ्ठलनाम घेत जात आहेत ४. [६१४]

अहो देवा, मी खरोखर व्यर्थ जात आहें. मला भक्ति, सेवा करण्याची कळत नाहीं १. तुमच्यापुढें दोन्ही हात जोडून स्वस्थ उभा राहिलों आहें २. काय करावें, तें मला कळत नाहीं, म्हणून तुमचे पायांकडे मी पाहात आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तुम्ही जें दान द्याल, तें मी पदरांत घेईन ४. [६१५]

जीव खादला दैवतें । माझा येणें महाभूतें । झोंबलें निरुतें । कांहीं करितां न सुटे ॥ १ ॥ आतां करूं काय । न चले करितां उपाय । तुम्हां आम्हां सये । विघडाविघड केली ॥ २ ॥ बोलतां दुश्चिति । मी वो पडियलें भ्रांतीं । आठव हा चित्तीं । न ये म्हणतां मी माझें ॥ ३ ॥ भलतेंचि चावळे । जना अवघिया वेगळे । नाठवती बाळें । आपपर सारिखें ॥ ४ ॥ नको बोलूं सये । मज वचन न साहे । बैसाल त्या राहें । उग्या वाचा खुंटोनी ॥ ५ ॥ तुम्हां आम्हां भेटी । नाहीं झाली जीवेंसाठीं । तुका म्हणे दृष्टी । पाहा जवळी आहे तों ॥ ६ ॥ [६१६]

जीवींचा जिव्हाळा । पाहों आपुलिया डोळां ॥ १ ॥ आम्हां विठ्ठल एक देव । येर अवघेंचि वाव ॥ २ ॥ पुंडलिकाचे पाठीं । उभा हात ठेउनि कटीं ॥ ३ ॥ तुका म्हणे चितीं । वाहूं रखुमाईचा पती ॥ ४ ॥ [६१७]

माझें आराधन । पंढरपुरींचें निधान ॥ १ ॥ तया एकाविण दुजें । कांहीं नेणें पंढरीराजे ॥ २ ॥ दास विठ्ठलाचा । अंकित अंकिला ठायींचा ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां । नव्हे पालट सर्वथा ॥ ४ ॥ [६१८]

आतां आम्हां हेंचि काम । वाचे गाऊं तुझें नाम । वाहुनियां टाळी प्रेम। सुखें आनंदें नाचावें ॥ १ ॥ झाली आराणूक । मागें पुढें सकळीक । त्रिपुटीचें दुःख । प्रारब्ध सारिलें ॥ २ ॥ गोदातटें निर्मळें । देवदेवांचीं देवळें । संतमहंतमेळें । दिवस जाय सुखाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे पंढरीनाथा । आणिक नाहीं मज चिंता । योगक्षेम माथां । भार तुझ्या घातला ॥ ४ ॥ [६१९]

चोरटें सुनें मारिलें टाळें । केऊं करी परि न संडी चाळे ॥ १ ॥ ऐसें एक दुराचारी गा देवा ।

महाभूत जें विष्णुदैवत त्यानें माझा जीव खाल्ला, म्हणजे खरोखर तें माझ्या जीवाला इतकें झोंबलें आहे, कीं कांहीं केलें असतां तें वगळें होत नाहीं १. आतां ह्याला मीं काय करावें ? कांहींही उपाय चालत नाहीं. हे सखे (भेदात्मक बुद्धे), ह्यानें तुझा आमचा वियोग केला आहे २. असें बोलतां बोलतां मी दुश्चित्त होऊन भ्रांतीमध्यें पडलें. माझ्या चित्तामध्यें मी, माझें म्हणण्याचा देखील आठव येत नाहीं ३. सर्वलोकव्यवहारावेगळें भलतेंच मी बरळत आहें. मला मुलेंबाळें कांहीं आठवत नाहींत. मला परकें आणि आपलें सगळें सारखेंच झालें आहे ४. हे सखे, तूं कांहीं बोलूं नकोस. कारण मला एक शब्द सुद्धां खपत नाहीं. वाणी बंद करून उगीच ज्यांना येथें बसावयाचें असेल त्यांनीं येथें राहावें ५. तुकाराम महाराज म्हणतात, आतां हे द्वैतबुद्धे, तुमची आमची भेट होणार नाहीं, अशी स्थिति झाली आहे, कारण माझ्या जीवाची आणि महाभूत देवाची अदलाबदल झाली आहे, (माझा जीव विष्णुरूप झाला आहे) आतां तो सारखा माझ्याजवळ आहे, हें तुम्ही दृष्टीनें पहा ६. [६१६]

आमच्या जीवाच्या जीवनास आम्ही आपल्या डोळ्यानें पाहूं १. आम्हाला विठ्ठलच हा देव आहे. बाकी सगळें व्यर्थ आहे २. तो पुंडलीकाच्या पाठीमागें कंबरेवर हात ठेवून उभा आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा जो पांडुरंग तो आम्ही आपल्या चित्तामध्यें निरंतर धरून राहूं ४. [६१७]

माझें पूजेचें दैवत पांडुरंग हाच आहे १. त्या पंढरीराजावांचून मी दुसरें कांहीं जाणत नाहीं २. मी त्या विठोबाचा दास त्याच्या आज्ञेंत असणारा मूळचाच आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यामध्यें सर्वथैव कधीं बदल होणार नाहीं ४. [६१८]

आतां ह्यापुढें निरंतर तुझें नाम घ्यावें, हेंच एक काम आहे. ह्याला कधीं अंतर पडूं देणार नाहीं. नाम घेतांना टाळी वाजवून तुझ्या प्रेमसुखानें नृत्य करूं १. ह्यापासून पुढें मागें संपूर्ण विश्रांति झाली आहे. आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक ह्या त्रिविध दुःखास मूळ जें प्रारब्ध त्याचा क्षय केला २. गोदेच्या (गोदावरीच्या) स्वच्छ तीरीं अनेक देवांच्या देवळांतून संतमहंतांच्या समुदायामध्यें सुखानें काल जात आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीच्या स्वामी, आतां मला दुसरी कांहीं चिंता नाहीं. मिळविण्याचा आणि रक्षणाचा भार तुझ्यावर टेविला आहे ४. [६१९]

चोरणाऱ्या कुत्र्यास जर डोक्यावर जोड्याच्या खालच्या तळव्यानें मारिलें, तर तें कुई कुई, असें ओरडतें, पण आपला चोरीचा व्यवहार टाकीत नाहीं १. हे देवा, अशा प्रकारचीं कित्येक दुराचरण करणारीं माणसें आहेत,

आपुलिया जीवा घात करी ॥ २ ॥ नाक गेलें तरि लाज ना विचार । हिंडे फजितखोर दारोदारीं ॥ ३ ॥ तुका म्हणे कर्म बळीवंत गाढें । नेदी तया पुढें मागें सरों ॥ ४ ॥ [६२०]

मुनि मुक्त जाले भेणें गर्भवासा । आम्हां विष्णुदासां सुलभ तो ॥ १ ॥ अवघाचि संसार केला ब्रह्मरूप । विठ्ठलस्वरूप म्हणोनियां ॥ २ ॥ पुराणीं उपदेश साधन उद्धट । आम्हां सोपी वाट वैकुंठींची ॥ ३ ॥ तुका म्हणे जनां सकळांसहित । घेऊं अखंडित प्रेमसुख ॥ ४ ॥ [६२१]

न करावी स्तुति माझी संतजनीं । होईल या वचनीं अभिमान ॥ १ ॥ भारें भवनदी नुतरवे पार । दुरावती दूर तुमचे पाय ॥ २ ॥ तुका म्हणे गर्व पुरवील पाठी । होईल माझ्या तुटी विठोबाची ॥ ३ ॥ [६२२]

तुमचिये दासी(सां)चा दास करूनि ठेवा । आशीर्वाद द्यावा हाचि मज ॥ १ ॥ नवविधा काय बोलिली जे भक्ती । घ्यावी माझ्या हातीं संतजनीं ॥ २ ॥ तुका म्हणे तुमच्या पायांच्या आधारें उतरेन खरें (पार) भवनदी ॥ ३ ॥ [६२३]

चोरटें काचें निघालें चोरी । आपलें तैसें पारखें घरीं ॥ १ ॥ नाहीं नफा नागवे आपण । गमाविले कान हात पाय ॥ २ ॥ बुद्धिहीन नये कांहींचि कारणा । तयासवें जाणा तेंचि सुख ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं ठाउकें वर्म । तयासी तें कर्म वोढवलें ॥ ४ ॥ [६२४]

समर्थाचें बाळ कि(के)विलवाणें दिसे । तरी कोणा हांसे जन देवा ॥ १ ॥ अवगुणी जरी झालें तें वोंगळ । करावा सांभाळ लागे त्याचा ॥ २ ॥ तुका म्हणे तैसा मी एक पतित । दास (परि) मुद्रांकित झालों तुझा ॥ ३ ॥ [६२५]

तीं खरोखर आपल्या जीवाचीं घातक आहेत २. असल्या ह्या दुर्जनांचें नाक गेलें तरी त्यासंबंधाची त्यांच्यामध्यें लाज नाहीं; असे हे विचारशून्य फजीतखोर लोक दारोदर हिंडतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांचें प्रारब्धकर्म मोठें बलाढ्य आहे. तें त्यांना मागें पुढें हालूं देत नाहीं ४. [६२०]

रात्रंदिवस हरिस्वरूपाचें मनन करणारे मुनि, गर्भवासदुःखाच्या भीतीनें, मुक्तदशेस गेले; पण तो गर्भवास आम्हांला म्हणजे विष्णुदासांना फार सोपा आहे. १. सर्व संसार विठ्ठलस्वरूप आहे असें जाणून आम्हीं त्याला ब्रह्मरूप केलें २. वैकुंठाला जाण्याचें साधन मोठें कठिण आहे, असें पुराणांमध्यें सांगितलें आहे; परंतु आमची वैकुंठाला जाण्याची वाट फार सोपी आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही सर्व जनांसहवर्तमान नेहमीं हरीचें प्रेमसुख घेऊं ४. [६२१]

तुम्हीं संतजनांनीं माझी स्तुति करूं नये, कारण तुमच्या ह्या स्तुतीनें माझ्यामध्यें, मी मोठा संत आहें असा अभिमान येईल १. आणि त्याचे भारानें ह्या जन्ममृत्युरूपी संसारनदींतून उतरून पलीकडे जातां येणार नाहीं. एवढेंच नव्हे, तर तुम्हां संतांचे पाय अंतरले जातील २. तुकाराम महाराज म्हणतात, गर्व तर माझी पाठ पुरवील आणि त्या योगानें माझा जो विठोबा, त्याचा वियोग होईल ३. [६२२]

अहो संतजनहो, जे कोणी तुमचे सेवक असतील, त्यांचा मला तुम्ही दास करा. एवढेंच मला आशीर्वचन द्यावें १. शास्त्रामध्यें नऊ प्रकारची जी भक्ति सांगितली आहे, ती तुम्ही माझ्या हातून करवा २. तुकाराम महाराज म्हणतात, खरोखर तुमच्या पायांच्या आश्रयानें मी संसारनदींतून पलीकडे उतरून जाईन ३. [६२३]

कच्चा चोर ज्याप्रमाणें आपण आपल्या घरांत निःशंकपणें वावरतो, त्याप्रमाणें दुसऱ्याच्या घरांत चोरी करावयास गेला १. तेथें त्याला धनलाभ झालाच नाहीं, पण उलट घरांतील मालक सावध होऊन त्यानें त्याचे कान, हात, पाय कापले; त्यामुळें तो चोर आपण मात्र फसला गेला २. त्याप्रमाणें बुद्धिहीन मनुष्य कांहींच उपयोगाला येत नाहीं. त्याच्याबरोबर असणाराचीही तीच गति आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याला खरोखर कोणत्याहि गोष्टीचें मर्म समजत नाहीं, त्याचें कर्म ओढवलें म्हणजे त्याच्या कर्मानें त्याची दैना होते ४. [६२४]

अहो देवा, एखाद्या समर्थ राजाचें मूल जर दीन, केंवीलवाणें दिसत असेल तर त्या संबंधानें लोक कोणाला हंसतील, ह्याचा विचार करा १. तें कितीहि अवगुणी असलें, घाणेरडें असलें, तरी त्याचें रक्षण पित्याला केलेंच पाहिजे २. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें मी पातकी आहें व तुमच्या सेवेच्या चिन्हानें तुमच्या अंकित झालों आहें (स्वाधीन झालों आहें) ३. [६२५]

गाढवाचे अंगीं चंदनाची उटी । राखेसवें भेटी केली तेणें ॥ १ ॥ सहज गुण जयाचिये देहीं । पालट ते (तो) कांहीं नव्हे तया ॥ २ ॥ माकडाचे गळां मोलाचा तो मणि । घातला चावुनि थुंकोनि टाकी ॥ ३ ॥ तुका म्हणे खळा नावडे हित । अविद्या वाढवीत आपुले मतें ॥ ४ ॥ [६२६]

नेणें सुनें चोर पाहुणा मागता । देखून भलता भुंकतसे ॥ १ ॥ शिकविलें कांहीं न चले तें तया । बोलियेले वायां बोल जाती ॥ २ ॥ क्षीर ओकुनियां खाय अमंगळ । आपुली ते ढाळ जाऊं नेदी ॥ ३ ॥ वंदूं निंदूं काय अभक्त दुराचार । खळाचा विचार तुका म्हणे ॥ ४ ॥ [६२७]

जन मानवलें वरी बाह्यात्कारीं । तैसा मी अंतरीं नाहीं झालों ॥ १ ॥ म्हणउनि पंढरीनाथा वाटतसे चिंता । प्रगट बोलतां लाज वाटे ॥ २ ॥ संतां ब्रह्मरूप झालें अवघें जन । ते माझे अवगुण न देखती ॥ ३ ॥ तुका म्हणे मी तों आपणांसी ठावा । आहें बरा देवा जैसा तैसा ॥ ४ ॥ [६२८]

काम क्रोध माझे जीताती शरीरीं । कोवळें तें वरी बोलतसें ॥ १ ॥ कैसा सरता झालों तुझ्या पायीं । पांडुरंगा कांहीं न कळे हें ॥ २ ॥ पुराणींची ग्वाही वदतील संत । तैसें नाहीं चित्त शुद्ध झालें ॥ ३ ॥ तुका म्हणे मज आणूनि अनुभवा । दाखवीं हें देवा साच खरें ॥ ४ ॥ [६२९]

स्तुति करीं तैसा (करीजेसा) नाहीं अधिकार । न कळे विचार योग्यतेचा ॥ १ ॥ तुमचें मी दास संतांचें दुर्बळ । करूनि सांभाळ राखा पायीं ॥ २ ॥ रामकृष्णहरि मंत्र उच्चारणा । आवडी चरणा विठोबाच्या ॥ ३ ॥ तुका म्हणे तुमचें सेवितों (लों) उच्छिष्ट । क्षमा करा धीट होऊनियां ॥ ४ ॥ [६३०]

बहु दूरवरी । वेठी ओझें होतें शिरीं ॥ १ ॥ आतां उतरला भार । तुम्हीं केला अंगीकार ॥ २ ॥

एखाद्या गाढवाच्या अंगाला जरी चंदनाची उटी लाविली, तरी तें उकिरड्यांत, राखाडींत जाऊन लोळून सर्वांगाला राख लावून घेतें १. ज्याच्या देहांत जो स्वाभाविक गुण आहे, तो कधींहि बदलत नाहीं २. एखाद्या माकडाच्या गळ्यामध्यें एखादें मौल्यवान् मोतीं बांधलें, तर तें चावून त्याचे तुकडे करून थुंकून टाकील ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो कोणी नष्ट आहे त्याला ज्यांत आपलें हित होतें अशी गोष्ट आवडत नाहीं. तो आपल्या मतानें अज्ञानालाच वाढवितो ४. [६२६]

दारामध्यें बांधलेलें कुत्रें हें घरामध्यें येणारा पाहुणा अगर चोरी करावयास येणारा चोर, अगर भीक मागावयास आलेला भिकारी हें ओळखीत नाहीं. कोणीहि येऊं लागला तरी त्याचे अंगावर भुंकतें १. त्या कुत्र्याला ह्या पाहुण्यावर भुंकूं नये, असें कितीहि इशारतीनें शिकविलें, तरी ते सर्व शब्द व्यर्थ जातात २. त्या कुत्र्याला दूध पाजलें, तर तें ओकून टाकून अति वाईट असा नरक सेवन करितें; तें आपला स्वभाव टाकीत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, भक्तिहीन दुराचारी जीवांची कितीहि निंदा केली अगर स्तुति केली, तरी त्यांच्यामध्यें दुराचाराचा विचार असतो ४. [६२७]

मी बाहेरच्या बाजूनें जनास मान्य झालों आहें तसा मी अंतःकरणांतून योग्य झालों नाहीं १. म्हणून हे पंढरीच्या राजा, ह्याची मला चिंता लागली आहे. ही गोष्ट तुमच्याजवळ सर्व लोकांत प्रगट बोलण्याविषयीं मला मोठी लाज वाटत आहे २. संतजन सर्व जगत् ब्रह्मरूप पाहातात, म्हणून माझ्यामध्यें असणारे गुणदोष ते पाहात नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मी जसा आहें तसें मला आपणच जाणत आहां ४. [६२८]

कामक्रोध हे माझ्या शरीरामध्यें जिवंत नांदत असून वरच्या बाजूनें मी जे कांहीं शब्द बोलतों ते मात्र मृदु आहेत १. आतां पांडुरंगा, मी तुमच्या पायांजवळ कसा मान्य झालों, हें कांहीं मला कळत नाहीं २. ज्याप्रमाणें पुराणांतील दाखल्यांनीं चित्त शुद्ध असावयास पाहिजे असें सांगितलें आहे, किंवा ज्याप्रमाणें संतांनीं चित्तशुद्धीचा विचार सांगितला आहे, त्याप्रमाणें माझें चित्त शुद्ध झालें नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, जी कांहीं म्हणून खरी गोष्ट आहे, ती माझ्या अनुभवाला आणून दाखवा ४. [६२९]

अहो संतजनहो, तुमची मीं स्तुति करावी असा माझ्यामध्यें अधिकार नाहीं, कारण तुमची योग्यता किती आहे ह्याचें मला ज्ञान नाहीं १. तुमचा मी बलहीन दास आहें. ह्याकरितां आपल्या पायांपाशीं माझें संरक्षण करावें २. राम कृष्ण हरि ह्या मंत्राचा मी उच्चार करितों, आणि विठोबाचे चरणाविषयीं माझ्या मनांत आवड आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मीं मोठ्या धिटाईनें तुमच्या उच्छिष्टाचें सेवन केलें आहे. तुम्ही मला क्षमा करा ४. [६३०]

अनादिकालापासून मी जन्ममृत्यूच्या बिगारीमध्यें सांपडलों होतों, आणि देहाकाराचें ओझेंही माझ्या मस्तकावर होतें १. पण देवा, तुम्हीं माझा स्वीकार केल्यामुळें माझ्या मस्तकावरील संपूर्ण ओझें उतरलें, म्हणजे देहाकारापासून

बहु काकूलती। आलों असें मागें किती ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा। आजि सकळ झाली सेवा ॥ ४ ॥ [६३१]

बुद्धीचा पालट धरा रे कांहीं। मागुता हा नाहीं मनुष्यदेह ॥ १ ॥ आपुल्या हिताचे नव्हती सायास। गृहदारा आस धनवित्त ॥ २ ॥ अवचितें निधान लागलें हें हातीं। भोगावी विपत्ती गर्भवास ॥ ३ ॥ यावें जावें पुढें ऐसेंचि कारण। भोगावें पतन नरकवास ॥ ४ ॥ तुका म्हणे धरीं आठव या देहीं। नाहीं तरी कांहीं बरें नव्हे ॥ ५ ॥ [६३२]

आम्हीं पतितांनीं घालावें सांकडें। तुम्हां लागे कोडें उगवणें ॥ १ ॥ आचरतां दोष न धरूं सांभाळ। निवाड उकल तुम्हां हातीं ॥ २ ॥ न घेतां कवडी करावा कुढावा। पाचारितां देवा नामासाठीं ॥ ३ ॥ दयासिंधु नाम पतितपावन। हें आम्हां वचन सांपडलें ॥ ४ ॥ तुका म्हणे करूं अन्यायाच्या कोटी। कृपावंत पोटीं तुम्ही देवा ॥ ५ ॥ [६३३]

जो भक्तांचा विसांवा। उभा पाचारितो धांवा ॥ १ ॥ हातीं प्रेमाचें भातुकें। मुखीं घाली कवतुकें ॥ २ ॥ भवसिंधु सुखें। उतरी कासे लावूनी ॥ ३ ॥ थोर भक्तांची आस। पाहे भोंवताली वास ॥ ४ ॥ तुका म्हणे कृपादानी। फेडी आवडीची धणी ॥ ५ ॥ [६३४]

अखंड जयां तुझी प्रीति। मज दे तयांचि संगति। मग मी कमळापति। तुज बा नाणीं कंटाळा ॥ १ ॥ पडून राहेन तये ठायीं। उगीच संतांचिये पायीं। न मागें न करीं कांहीं। तुझी आण गा विठोबा ॥ २ ॥ तुम्ही आम्ही पीडों जेणें। दोन्ही वारती एकानें। बैसलों धरणें।

आणि जन्ममृत्यूच्या येरझारीपासून मी मुक्त झालों २. पूर्वीपासून तुमची पुष्कळ कींव काकळूत करीत आलों ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, माझी सेवा आज फलद्रूप झाली ४. [६३१]

अहो जनहो, तुम्ही आपल्या बुद्धीमध्यें कांहीं फरक करा, म्हणजे विषयांतून काढून ती देवाकडे लावा. तुम्हांला फिरून असा हा उत्तम मनुष्यदेह मिळणार नाहीं १. खरोखर ज्यामध्यें आपलें हित आहे अशा संबंधाची खटपट तुमच्या हातून बिलकूल होत नाहीं. तुम्ही रात्रंदिवस घर, बायको आणि पैसा ह्यांची आशा करीत आहां २. अकस्मात् मनुष्यदेहासारखा ठेवा लाभला असून कशाकरितां गर्भवासासारिखें दारिद्र्य भोगावें? ३. एकदां मनुष्यदेहासारखा आश्रय सुटला म्हणजे पुढें गर्भवासाला यावें, पुन्हां मरावें हें कर्तृत्व राहील आणि अखेरीस नरकवासासारखें पतन भोगावें लागेल ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या उत्तम नरदेहामध्यें भगवंताचा आठव ठेव, नाहींतर पुढें कांहीं बरें होणार नाहीं ५. [६३२]

हे देवा, आम्ही पातक्यांनीं तुमच्यावर संकट घालावें आणि त्या संकटांतून तुम्हीं आम्हांस मोकळें करावें १. आम्ही निरंतर दोष आचरीत जाऊं. त्याविषयीं मुळीं जपणार नाहीं. त्यांतून मुक्त करण्याचें काम तुमचेंच आहे २. देवा, संकटसमयीं तुमचें नांव घेऊन कोणीं हाका मारिल्या तर आपल्या नामाकरितां त्याच्या जवळून कवडी न घेतां तुम्हीं त्याचें रक्षण करितां ३. तुम्हीं भक्ताला दिलेलें वचन आमचे हाताला लागलें ४. तुकाराम महाराज म्हणतात आम्ही कोट्यावधि अन्याय करूं, तरी तुम्ही नेहमीं कृपावंत आहांत ५. [६३३]

जो देव केवळ भक्तांचें विश्रांतिस्थान आहे, म्हणून तो उभ्यानेंच भक्तजनांस आपणाकडे बोलावीत आहे, ह्याकरितां तुम्ही सर्व त्याच्याकडे धांव घ्या १. देवानें आपल्याविषयींचा प्रेमरूपी खाऊ भक्तजनांस देण्याकरितां हातीं घेतला आहे २. तो ह्या संसारसमुद्रांतून सुखानें आपल्या कांसेस लावून भक्तजनांना पार उतरून नेतो ३. ह्याला मोठी भक्तांची इच्छा आहे, ह्याकरितां तो आपल्या भोंवतालीं भक्तजनांची मार्गप्रतीक्षा करीत राहातो ४. तुकाराम महाराज म्हणतात, देव भक्तांवर कृपा करून त्यांच्यामधील असणाऱ्या आवडीची तृप्तता करितो ५. [६३४]

देवा, तुमच्याविषयींची प्रीति ज्यांच्यामध्यें निरंतर आहे, अशा भक्तांची संगति निरंतर मला द्या; अहो लक्ष्मीपति, मग तुमच्याजवळ अधिक कांहीं मागण्याचा मी तुम्हाला कधीं त्रास देणार नाहीं १. त्या संतांच्या पायांजवळ मी उगाच पडून राहीन. दुसरें कांहीं मागणार नाहीं आणि करणारही नाहीं, ह्याबद्दल अहो विठोबा, तुमचीच शपथ वाहातों २. आम्ही निरंतर तुमच्या द्वाराजवळ येऊन कांहीं मागण्याची कटकट लावितों. त्यापासून तुम्हाला पीडा होते व वारंवार तुमच्या द्वाराजवळ येऊन आम्हांला ही वटवट करण्याची पीडा होते. आमचें एक जें कांहीं मागणें आहे, त्याप्रमाणें दिलेंत

हाका देत दाराशीं ॥ ३ ॥ तुका म्हणे या या बोला । चित्त द्यावें बा विठ्ठला । न पाहिजे केला । अवघा माझा अव्हेर ॥ ४ ॥ [६३५]

पुनीत केलें विष्णुदासीं । संगें आपुलिया दोषी ॥ १ ॥ कोण पाहे तयांकडे । वीर विठ्ठलाचे गाढे । अशुभ त्यापुढें । शुभ होउनियां ठाके ॥ २ ॥ प्रेम सुखाचिया रासी । पाप नाहीं ओखदासी ॥ ३ ॥ तुका म्हणे त्यांनीं । केली वैकुंठ मेदिनी ॥ ४ ॥ [६३६]

जन देव तरी पायांचि पडावें । त्याचिया स्वभावें चाड नाहीं ॥ १ ॥ अग्नीचें सौजन्य शीतनिवारण । पालवीं बांधोन नेतां नये ॥ २ ॥ तुका म्हणे विंचू सर्प नारायण । वंदावें दुरोन शिवों नये ॥ ३ ॥ [६३७]

भूत भविष्य कळों यावें वर्तमान । हें तों भाग्यहीन त्याची जोडी ॥ १ ॥ आम्हीं विष्णुदासीं देव ध्यावा चित्तें । होणार तें होतें प्रारब्धेंचि ॥ २ ॥ जगरूढीसाठीं घातलें दुकान । जातो नारायण अंतरूनि ॥ ३ ॥ तुका म्हणे हा हो प्रपंच गाढा । थोरली ते पीडा रिद्धिसिद्धि ॥ ४ ॥ [६३८]

सर्प भुलोन गुंतला नादा । गारुडिये फांदा घातलासे । हिंडवुनि पोट भरी दारोदारीं । कोंडुनि पेटारीं असे रया ॥ १ ॥ तैसी परी मज झाली पांडुरंगा । गुंतलों तो मी गा सोडवीं आतां । माझें मज कांहीं न चलेसें झालें । कृपा हे तुज न करितां ॥ २ ॥ आमिसें मीन लावियला गळीं । भक्ष तो गिळी म्हणउनियां । काढूनि बाहेरी प्राण घेऊं पाहे । तेथें बापमाये कवण तया ॥ ३ ॥ पक्षी पिलयां पातले आशा । देखोनियां फांसा गुंते बळें । मरण नेणें सायासें धांवोनि वोरसे ।

तर आपल्या उभयतांच्या पीडा दूर होतील; आणि तें मिळावें म्हणून तुमच्या दाराशीं सारखें धरणें घेऊन हांका मारीत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो विठ्ठला, ह्या माझ्या बोलण्याकडे लक्ष द्यावें व आमचा त्याग आपणाकडून होतां कामा नये ४. [६३५]

विष्णुदासांनीं आपल्या संगतीनें अनेक पातकी पातकांपासून मुक्त केले १. त्या विष्णुदासांकडे कोण पाहील ? कारण ते विठोबाचे भक्त शूर वीर आहेत. वाईट त्यांच्यासमोर आलें तर तें तात्काळ चांगलें होतें २. त्यांचे ठिकाणीं हरीविषयींच्या प्रेमसुखाचे अनेक ढीग आहेत. ज्या गांवांत ते असतात त्या गांवांत औषधाला देखील पातक मिळत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, विष्णुभक्तांनीं ही भूमि प्रति वैकुंठ केली आहे ४. [६३६]

सर्व जग देव आहे असा जर न्याय आहे तर त्याच्या स्वभावाकडे न पाहातां त्याच्या पायां पडावें १. अग्नीच्या ठिकाणीं प्रेम थंडीचें निवारण करण्यापुरतेंच करावें. तो अग्नि धोतराच्या पदरीं बांधून नेऊं नये २. तुकाराम महाराज म्हणतात, सर्प, विंचू हे सर्व नारायण जरी आहेत तरी दुरूनच त्यांना नमस्कार करावा. त्यांच्या आंगास हात लावण्याचे भानगडींत पडूं नये ३. [६३७]

भूतकाळाचें ज्ञान, भविष्यकाळाचें ज्ञान, वर्तमानकाळाचें ज्ञान होणें ही निर्दैवी माणसाची जोड आहे १. आम्ही विष्णुदासांनीं चित्तामध्यें देवाचें ध्यान करीत राहावें. जें कांहीं व्हावयाचें असेल तें प्रारब्धानुरूप होईल २. वर सांगितलेल्या कालत्रयाच्या ज्ञात्या लोकांनीं जगरूढीकरितांच दुकान घातलें आहे, पण त्या योगानें नारायण दुरावतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, प्रपंच हा मोठा आहे, पण त्याच्याहिपेक्षां रिद्धिसिद्धींची पीडा फारच मोठी आहे ४. [६३८]

गारुडी लोक साप धरण्याच्या वेळेस पुंगी वाजवितात. त्या पुंगीच्या नादानें तो साप भुलून जातो त्या वेळेस गारुडी त्याच्यावर पाश टाकून त्याला धरतो आणि आपल्या पेटाऱ्यांत कोंडून पोट भरण्याकरितां त्याला दारोदार हिंडवितो १. त्याप्रमाणें हे पांडुरंगा, मीहि पण ह्या प्रपंच्यामध्यें गुंतलों आहें. तूं येऊन मला ह्यांतून सोडीव. तुझ्या कृपेवांचून ह्या ठिकाणीं माझा कांहीं उपाय चालेनासा झाला आहे २. धीवरानें (कोळ्यानें) गळास लाविलेल्या आमिषाला मासा भुलून, तें खाण्याच्या इच्छेनें त्यानें तो गळ गिळला. त्यामुळें तो घशांत अडकून तो तेथें गुंतून पडला. इतक्यांत त्याला त्या पाण्याच्या बाहेर गळ ओढून धीवरानें काढलें आणि तो त्याचा प्राण घेऊं लागला. मग तेथें त्याचें रक्षण करण्याला कोणी आईबाप आहेत काय ? ३. पक्ष्याचा नर-मादीचा जोडा आपल्या पिलांस घरट्यामध्यें सोडून चारा आणावयास वनामध्यें गेला. इतक्यांत पारध्यानें त्या पिलांच्या घरट्यावर जाळें टाकून त्यांना जाळ्यामध्यें पकडलें. कांहीं वेळानें रानांत चरण्यास गेलेले त्याचे आईबाप घरट्याजवळ येऊन पाहातात, तों आपलीं पिलें जाळ्यामध्यें सांपडून फडफड करीत आहेत.

जीवित्वा नाश झालीं बाळें ॥ ४ ॥ गोडपणें मासी गुंतली लिगाडीं। सांपडे फडफडी अधिकाधिक। तुका म्हणे प्राण घेतला आशा। पंढरीनिवासा धांव धालीं ॥ ५ ॥ [६३९]

यातिहीन मज काय तो अभिमान। मानी तुज जन नारायणा ॥ १ ॥ काय सुख मज तयाची हे खंती। आपुलाला घेती गुण भाव ॥ २ ॥ द्रव्यामुळें माथां वाहियेली चिंधी। होन जयामधीं होता गांठीं ॥ ३ ॥ तुका म्हणे जन वंदितो वेगळा। मजसी दुर्बळा काय चाड ॥ ४ ॥ [६४०]

शीतळ साउली आमुची माउली। विठाई वोळली प्रेमपान्हा ॥ १ ॥ जाऊनि वोसंगा रिघेन वोरसे। लागलें तें इच्छें पीयीन वरी ॥ २ ॥ कृपा तनु माझी सांभाळी दुभोनि। अमृतसंजीवनी लोटलीसे ॥ ३ ॥ आनंदाचा ठाव झाला माझे चित्तीं। सागर तो किती उपमेसी ॥ ४ ॥ सैर जाये पडे तयेसी सांकडें। सांभाळीत पुढें मागें असे ॥ ५ ॥ तुका म्हणे चिंता कैसी ते मी नेणें। लडिवाळ तान्हें विठाईचें ॥ ६ ॥ [६४१]

सुटायाचा कांहीं करितों उपाय। तों हे देखें पाय गोंवियेले ॥ १ ॥ ऐसिया दुःखाचे सांपडलों संदीं। हरपली बुद्धि बळ माझें ॥ २ ॥ प्रारब्ध क्रियमाण संचिताचें। वोढते ठायींचें आलें साचें ॥ ३ ॥ विधिनिषेधाचे सांपडलों चपे। एकें एका लोपे निवडेना ॥ ४ ॥ सारावें तें वाढे त्यांचियाचि अंगें। तृष्णेचिया संगें दुःखी झालों ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां करीं सोडवण। सर्वशक्तिहीन झालों देवा ॥ ६ ॥ [६४२]

भय वाटे पर। न सुटे हा संसार ॥ १ ॥ ऐसा पडिलों कांचणी। करीं धांवा म्हणउनी ॥ २ ॥

तो प्रकार पाहून त्या पिलांच्या आईबापांनीं मरणाचें भय कांहीं न धरितां पिलांच्या लोभानें त्या जाळ्यामध्यें उडी घातली. तेथें ते आपल्या जिवास व पिलांसहि अंतरले (मुकले) ४. गोडीच्या लोभानें चिकट अशा पातळ गुळावर माशी जाऊन बसते व तेथें तिचे पाय चिकटतात. तेथून ती उडूं लागली म्हणजे तिच्या त्या पंखांच्या फडफडीनें अधिकच चिकट अशा पातळ गुळामध्यें ती चिकटून जाते. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें आशा ही माझा प्राण घेत आहे. ह्याकरितां पंढरीमध्यें राहाणाऱ्या पांडुरंगा, तूं धांव घे ५. [६३९]

मी हीन जातीचा आहें. मला अभिमान कशाला? अहो नारायणा, तुम्हांला लोक मान देतात १. मला त्याचें सुख अगर तळमळ कसली आली आहे! जसा ज्याचा गुण भाव असेल, त्याला त्याप्रमाणें ते मान देतात २. आणि चिंधीमध्यें होन बांधल्यावर तिच्यामध्यें द्रव्य असल्यामुळें लोक त्या चिंधीस आपल्या मस्तकावर घेतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, लोक ज्याला नमस्कार करितात तो तूं वेगळा आहेस. मला दुर्बळाला कशाला मानाची इच्छा पाहिजे! ४. [६४०]

थंड छाया देणारी आमची विठाई आई आमच्याविषयींचा प्रेमपान्हा सोडूं लागली आहे १. मी तिच्या कुशीमध्यें जाऊन स्तनाला मुख लावून मनाच्या इच्छेप्रमाणें हवें तितकें पिईन २. विठाबाई आई कृपेनें प्रेमपान्हा सोडून माझ्या शरीराचा सांभाळ करिते. (ती जणूं) अमृतसंजीवनीच लोटीत आहे ३. माझ्या चित्तामध्यें आनंदाला जागा मिळत नाहीं, इतकें चित्त परिपूर्ण आनंदानें भरलें आहे. तेथें समुद्राची उपमा कितीशी होईल? ४. मीं जरी वांकडातिकडा चाललों अगर पडलों तरी ती माझ्या मागें पुढें राहून माझें रक्षण करीत आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, चिंता कशी ती मीं जाणत नाहीं, कारण मी विठाईचें लाडकें तान्हें मूल आहें ६. [६४१]

ह्या संसारांतून सुटण्याविषयीं कांहीं उपाय करूं लागतों तों माझे पाय अधिकच संसारामध्ये गुंतले जातात १. अशा दुःखाच्या पेंचामध्यें मी सांपडलों आहें. माझें बळ, माझी बुद्धि सर्व नाहींशी झाली आहे २. प्रारब्ध-क्रियमाण-संचिताचे जे म्हणून कांहीं मूळचे खरेखरे भोग होते ते धांव घेत आले ३. विधिनिषेधाच्या चपेटीमध्यें (पेंचांत) मी सांपडलों. विधीमध्यें निषेध लोपला आहे. निषेधामध्यें विधि लोपला आहे, ह्यामुळें मला त्याची निवड करतां येत नाहीं ४. निषेधाला दूर सारावें तर सारण्याच्या क्रियेनें निषेध वाढतो. मी तृष्णेचे (आशेचे) संगतीनें अति दुःखी झालों आहें ५. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, आतां तुम्ही माझी ह्या संसारातून सुटका करा, कारण मी सर्वशक्तिहीन झालों आहें ६. [६४२]

ह्या संसाराचें मला मोठें भय वाटतें, परंतु हा सुटत नाहीं १. असा मी मोठा पेचांत सांपडलों आहे.

विचारितां कांहीं । तों हें मन हातीं नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । येथें न पुरे रिघावा ॥ ४ ॥ [६४३]

येगा येगा पांडुरंगा । घेईं उचलुनि वोसंगा ॥ १ ॥ ऐसी असोनियां वेसी । दिसतों मी परदेशी ॥ २ ॥ उगवूनि गोवा । सोडवूनि न्यावें देवा ॥ ३ ॥ तुज आड कांहीं । बळ करी ऐसें नाहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे हृषीकेशी । काय उशीर लाविलासी ॥ ५ ॥ [६४४]

माझी विठ्ठल माउली । प्रेमपान्हा पान्हायली ॥ १ ॥ कुर्वाळुनि लावीं स्तनीं । न वजें दुरी जवळूनि ॥ २ ॥ केली पुरवी आळी । नव्हे निष्ठुर कोंवळी ॥ ३ ॥ तुका म्हणे घांस । मुखीं घालीं ब्रह्मरस ॥ ४ ॥ [६४५]

आम्ही उतराई । भाव निरोपुनि पायीं ॥ १ ॥ तुम्ही पुरवावी आळी । करावी ते लडिवाळी ॥ २ ॥ आमुचा हा नेम । तुम्हां उचित हा धर्म ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । जाणों सांगितली सेवा ॥ ४ ॥ [६४६]

केलें पाप जेणें दिलें अनुमोदन । दोघांसि पतन सारिखेंचि ॥ १ ॥ विष नवनीता विष करी संगें । दुर्जनाच्या त्यागें सर्व हित ॥ २ ॥ देखिलें ओढाळ निघालिया सेता । टाळावें निमित्या थैक म्हूण ॥ ३ ॥ तुका म्हणे जोडे केल्याविण कर्म । देखतां तो श्रम न मानितां ॥ ४ ॥ [६४७]

विठ्ठल गीतीं विठ्ठल चित्तीं । विठ्ठल विश्रांति भोग जया ॥ १ ॥ विठ्ठल आसनीं विठ्ठल शयनीं । विठ्ठल भोजनीं ग्रासोग्रासीं ॥ २ ॥ विठ्ठल जागृति स्वप्नसुषुप्तीं । आन दुजें नेणती विठ्ठलेंविण ॥ ३ ॥ भूषण अळंकार सुखाचे प्रकार । विठ्ठलीं निर्धार जया नरा ॥ ४ ॥ तुका म्हणे तेही विठ्ठलचि झाले । संकल्प मुराले दुजेपणें ॥ ५ ॥ [६४८]

एवढ्याकरितां देवा, मजविषयीं धांव घ्या २. मी आपल्या ठिकाणीं पुष्कळ विचार करितों, परंतु माझें हें मन माझ्या हातीं लागत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, ह्या मुक्त होण्याच्या विचारांत माझा प्रवेश होत नाहीं ४. [६४३]

अगा पांडुरंगा, तूं ये (असें द्विरुक्तीनें सांगतात). मला आपल्या पदरामध्यें उचलून घे १. तुझ्यासारख्याच्या आश्रयानें मी असून परदेशी दिसत आहें २. देवा, माझा सगळा हा प्रपंचाचा गुंताडा सोडवून मला आपल्याकडे घेऊन जावें ३. ह्या संसाराचा पराक्रम तुझ्यापुढें चालेल असें नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, अहो हृषिकेशी, तुम्ही कशाकरितां उशीर करीत आहां ? ५. [६४४]

माझी विठ्ठल आई आहे ती मजविषयींच्या प्रेमपान्ह्यानें पान्हावली आहे १. मला कुरवाळून तिनें आपल्या स्तनीं लाविलें आहे. ती माझ्या जवळून दूर जात नाहीं २. मी जो जो म्हणून हट्ट करीत आहें, तो तो ती पुरवीत आहे, कारण ती निष्ठुर नसून कनवाळु आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ती माझ्या तोंडामध्यें ब्रह्मरसाचा घांस घालीत आहे ४. [६४५]

तुमच्याजवळ आम्हीं आपला सर्व प्रकार सांगून उत्तीर्ण झालों आहोंत १. आतां आम्हीं लाडके जो हट्ट धरूं तो तुम्हीं पूर्ण केला पाहिजे २. हट्ट करणें हा आमचा नियम आहे, आणि तो तुम्ही पूर्ण करणें हा तुमचा धर्म आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तुम्हीं जी कांहीं सेवा सांगितली आहे ती आम्हीं जाणतों ४. [६४६]

एकानें पापकर्म केलें आणि तें करण्याविषयीं दुसऱ्यानें त्यास सल्ला दिला, तर दोघांनाहि पतन म्हणजे नरकवास सारखाच आहे १. लोण्यामध्यें विष घातलें तर तें आपल्या संगतीनें सर्व लोणीं विषमय करतें, म्हणून दुर्जनाचा त्याग करण्यामध्यें सर्व हित आहे २. एखादें ओढाळ जनावर एखाद्याच्या शेतामध्यें जातांना पाहिलें तर हैक असें म्हणून आपल्यावरची जबाबदारी दूर करावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, एखादी गोष्ट करण्यामध्यें श्रम आहेत, असें पाहून त्याला न जुमानतां तें कर्म केल्यावांचून कर्मलाभ होईल काय ? ४. [६४७]

ज्यांच्या गाण्यांत विठ्ठल, चित्तांत विठ्ठल, विठ्ठल हें ज्यांचें विश्रांतीचें स्थान आहे व ज्याना निरंतर भोगही त्याचाच होत आहे १. आसनावर बसल्या विठ्ठल, आंथरुणावर निजल्या विठ्ठल, जेवण जेवतांना घासा घासास विठ्ठल २. जागृतीं, स्वप्नीं, सुषुप्तीमध्यें विठ्ठल, जे विठ्ठलावांचून दुसरें कांहीं जाणत नाहींत ३. अलंकारादि भूषणें व सुखाचे प्रकार विठ्ठल, हाच ज्या नरांचा निर्धार आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, असे जे आहेत ते विठ्ठलरूपच झाले आहेत. द्वैतसंकल्प त्यांचे जिरून गेले आहेत ५. [६४८]

दास झालों हरिदासांचा । बुद्धि काया मनें वाचा ॥ १ ॥ तेथें प्रेमाचा सुकाळ । टाळमृदंगकल्लोळ ॥ २ ॥ नासे दुष्टबुद्धि सकळ । समाधि हरिकीर्तनीं ॥ ३ ॥ ऐकतां हरिकथा । भक्ति लागे त्या अभक्तां ॥ ४ ॥ देखोनि कीर्तनाचा रंग । कैसा उभा पांडुरंग ॥ ५ ॥ हें सुख ब्रह्मादिकां । नाहीं नाहीं म्हणे तुका ॥ ६ ॥ [६४९]

गति अधोगति मनाची हे युक्ति । मन लावीं एकांतीं साधुसंगें ॥ १ ॥ जतन करा जतन करा । धांवतें सैरा ओढाळ तें ॥ २ ॥ मान अपमान मनाचें लक्षण । लाविलिया ध्यान तेंचि करी ॥ ३ ॥ तुका म्हणे मन उतरी भवसिंधु । मन करी बंधु चौऱ्यांशीचा ॥ ४ ॥ [६५०]

पंढरीस दुःख न मिळे ओखदा । प्रेमसुख सदा सर्वकाळ ॥ १ ॥ पुंडलिकें हाट भरियेली पेठ । अवघें वैकुंठ आणियेलें ॥ २ ॥ उद(दि)मासी तुटी नाहीं कोणा हानि । घेऊनियां धणी लाभ घेती ॥ ३ ॥ पुरलें देशासी भरलें सिगेसी । अवघी पंचक्रोशी दुमदुमीत ॥ ४ ॥ तुका म्हणे संतां लागलीसे धणी । बैसली(ले) राहोनि पंढरीस ॥ ५ ॥ [६५१]

द्वारकेचें केणें आलें याचि ठाया । पुढें भक्तराया चोजवीत ॥ १ ॥ गोंविलें विसारें माप केलें खरें । न पाहे माघारें अद्यापवरी ॥ २ ॥ वैष्णव मापारी नाहीं झाली सळे । पुढेंही न कळे पार त्याचा ॥ ३ ॥ लाभ झाला त्यांनीं धरिला तो विचार । आहिक्य परत्र सांठविलें ॥ ४ ॥ तुका म्हणे मज मिळाली मजुरी । विश्वास या घरीं संतांचिया ॥ ५ ॥ [६५२]

सुरवर येती तीर्थे नित्य काळ । पेठ ती निर्मळ चंद्रभागा ॥ १ ॥ साक्षभूत नव्हे सांगितली मात । महिमा अत्यद्भुत वर्णवेना ॥ २ ॥ पंचक्रोशीमाजी रीघ नाहीं दोषां । जळती आपैसा अघोर ते ॥ ३ ॥ निर्विषय नर चतुर्भुज नारी । अवघा घरोघरीं ब्रह्मानंदु ॥ ४ ॥ तुका म्हणे ज्यापें नाहीं

हरिभक्तांचा मी काया-वाचा-मन-बुद्धीनें दास झालों आहें १. त्या ठिकाणीं हरिप्रेमाचा सवंग सुकाळ आहे. टाळ-मृदंगाच्या गजराच्या लाटा उसळत आहेत २. वाईट बुद्धि नाहींशी होते, हरिकीर्तनामध्यें समाधि लागते ३. हरिकथा ऐकण्यानें भक्तिहीनास भक्ति लागते ४. कीर्तनाचा रंग पाहून पांडुरंग तेथें कसा उभा राहात आहे पाहा ५. अशा प्रकारचें सुख ब्रह्मादिकांनाही नाहीं, असें तुकाराम महाराज म्हणतात ६. [६४९]

चांगली-वाईट गति ही मनाचीच कल्पना आहे, म्हणून एकांतामध्यें असणाऱ्या साधूंच्या संगतीला मन लाव १. अहो तुम्हीं ह्या मनाचें रक्षण करा (असें द्विरुक्तीनें सांगतात). एखाद्या ओढाळ जनावराप्रमाणें तें इतस्ततः धांवत आहे २. मानापमान ह्या सर्व मनाच्या कल्पना आहेत. जें ध्यान मनाला लावावें तेंच तें करितें ३. ह्या भवसागरांतून मनच उतरून पार नेतें व मनच चौऱ्यांशीं योनींच्या बंधनांत घालतें, असें तुकाराम महाराज म्हणतात ४. [६५०]

पंढरींत औषधाला देखील दुःख मिळत नाहीं. तेथें निरंतर पांडुरंगाचें प्रेमसुखच वास्तव्य करीत आहे १. पंढरपूर पेठबाजार पुंडलिकानें भरविला आहे. त्या ठिकाणीं त्यानें पूर्ण परमात्मा वैकुंठसहित पांडुरंग आणिला आहे २. त्या ठिकाणीं धंद्याला तूट येत नाहीं. कोणत्याहि तऱ्हेनें नुकसान नाहीं. त्या ठिकाणीं सर्व लाभाची पूर्ण प्राप्ति होते ३. त्या बाजारामध्यें पांडुरंग हा माल सर्व देशाला पुरेल असा शीग लागेतोंपर्यंत भरला आहे. पंढरीची पंचक्रोशी त्या मालानें सर्व दुमदुमून गेली आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, संतांना त्या ठिकाणीं तृप्ति होईल असा माल हाताला लागला आहे, म्हणून ते पंढरींतच बसून राहिले आहेत ५. [६५१]

द्वारकेंत राहाणारा श्रीकृष्णपरमात्मरूपी माल हा पंढरीच्या ठिकाणीं आला आहे. असा भक्तराज (पुंडलिक) हा बोध करीत आहे १. हा माल भक्तांनीं विसाऱ्यानें गुंतवून टाकिला आहे व खरें माप घेतलें आहे म्हणून तो देव अजूनपर्यंत देखील माघारीं द्वारकेकडे पाहात नाहीं २. वैष्णव जन त्याचें माप करणारे आहेत, पण मापानें त्याची मोजमाप झाली नाहीं आणि किती शिलक आहे त्याचा पार लागत नाहीं ३. ज्यांनीं तो माल हातीं धरला त्यांना लाभ झाला तो इहपरलोकीं सांठविला ४. तुकाराम महाराज म्हणतात, मला मजुरी मिळाली त्याविषयींचा विश्वास एक संतांच्या ठिकाणीं मात्र आहे ५. [६५२]

चंद्रभागारूपी पेठ शुद्ध आहे म्हणून तेथें देव व तीर्थे सतत येतात १. ही गोष्ट सांगोसांगी अगर ऐकींव नाहीं, तर प्रत्यक्ष अनुभवाची आहे. ह्याचा महिमा फार मोठा आहे. त्याचें वर्णन सुद्धां करतां येत नाहीं २. पंचक्रोशीमध्यें दोषांचा रिघाव होत नाहीं; जे कांहीं पूर्वींचे महत् दोष असतील ते आपोआप जळतात ३. पुरुष व स्त्रिया विषयरहित

पुण्यलेश । जा रे पंढरीस घेईं कोटी ॥ ५ ॥ [६५३]

विचार नाहीं नर खर तो तैसा । वाहे ज्ञान पाठीं भार लगड जैसा ॥ १ ॥ वादावाद करणें त्यासी तोंचि वरी । गुखाडीची चाड सरे तोंचि बाहेरी ॥ २ ॥ सौभाग्यसंपन्न हो कां वृद्ध प्रतिष्ठा । चिकरुनि सांडी पायां लागली ते विष्ठा ॥ ३ ॥ नाहीं याति कूळ फांसे ओढी तयासी । तुका म्हणे काय मुद्रासोंग जाळिसी ॥ ४ ॥ [६५४]

देव होसी तरी आणिकांतें करिसी । संदेह येविशीं करणें न लगे ॥ १ ॥ दुष्ट होसी तरी आणिकांतें करिसी । संदेह येविशीं करणें न लगे ॥ २ ॥ तुका म्हणे जें दर्पणीं बिंबलें । तें तया बाणलें निश्चयेंसीं ॥ ३ ॥ [६५५]

कलिधर्म मागें सांगितले संतीं । आचार सांडिती द्विजलोक ॥ १ ॥ तेचि कळों जातां येतसे प्रचिती । अधर्मा टेंकती धर्म नव्हे ॥ २ ॥ तप व्रत करितां लागती सायास । पाळितां पिंडास गोड वाटे ॥ ३ ॥ देव म्हणऊनि न येती देऊळा । संसारा वेगळा तरी कां नव्हे ॥ ४ ॥ तुका म्हणे मज धरितां गुमान । ऐसे कोणी जन नरका जाती ॥ ५ ॥ [६५६]

नमो विश्वरूपा विष्णुमायबापा । अपारा अमूपा पांडुरंगा ॥ १ ॥ विनवितों रंक दास मी सेवक । वचन तें एक आइकावें ॥ २ ॥ तुझी स्तुति वेद करितां भागला । निवांतचि टेला नेति नेति ॥ ३ ॥ ऋषि मुनि बहु सिद्ध कविजन । वर्णितां तुझे गुण न सरती ॥ ४ ॥ तुका म्हणे तेथें काय माझी वाणी । जे तुझी वाखाणी कीर्ति देवा ॥ ५ ॥ [६५७]

देवाप्रमाणें चतुर्भुज आहेत. घरोघरीं ब्रह्मानंद आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्याजवळ पुण्याचा लेशदेखील नाहीं त्यांनीं पंढरीस जाऊन लागेल तेवढें पुण्य घ्यावें ५. [६५३]

जो मनुष्य आत्मानात्मविचारशून्य आहे, तो गाढवाप्रमाणें आहे. त्याच्यामध्ये ब्रह्मज्ञान जरी असलें तरी तें एखाद्या लगड वाहाणाऱ्या बैलाचे पाठीवर लगडीचा भार असल्याप्रमाणें आहे १. त्याला बाहेरील गूळाडींत "गू" खाण्याची जोंपर्यंत संवय आहे, तोंपर्यंत तो वाद करीत राहातो २. अशा प्रकारचा मग तो मोठा भाग्यशील, श्रीमान्, सभाग्य, संभावित जरी असला, तरी तूं त्याचा, पायाला लागलेला "गू" जमिनीवर पायानें घसटून टाकल्याप्रमाणें, त्याग कर. ३. जो जुगारी फांसे आपल्याकडे ओढण्याचा धंदा करतो, त्याची उत्तम जात अगर उत्तम कूळ नाहीं, मग त्याच्या बाह्य संतपणाचीं जीं माळामुद्रादि चिन्हें आहेत त्यांना काय आग लावावयाची आहे, असें तुकाराम महाराज म्हणतात ४. [६५४]

खरोखर तूं देव होण्याचे मार्गानें जाऊन जर देव होशील तर आपल्या संगतीनें पुष्कळ जीवांस तूं देव करशील, ह्यांत कांहीं संशय नाहीं १. जर तूं दुष्ट होशील तर आपल्याप्रमाणेंच तूं बहुत जनांस दुष्ट करशील ह्यांत संशय नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचें जसें रूप असतें त्याप्रमाणेंच तें दर्पणांत [आरशांत] प्रतिबिंबित होतें ३. [६५५]

ब्राह्मण लोक आपला आचारविचार टाकतील असा हा कलियुगांत अधर्म होईल असें पूर्वींच संतांनीं सांगितलें आहे १. तोच अनुभव तूर्त आतां येत आहे. सर्व अधर्माचाच आश्रय करीत आहेत, धर्म कांहीं कोणाकडून होत नाहीं २. शास्त्रांनीं सांगितलेलीं तपव्रतादि साधनें करण्यामध्यें मोठे कष्ट होतात, म्हणून देहाचें पालनपोषण करण्यांतच त्यांना मौज वाटते ३. मीच स्वतः देव आहें, असें ते आपल्याला समजतात. ह्या योगानें ते देवळांत जात नाहींत. अशी जर त्यांची खरोखर स्थिति आहे, तर ते संसारापासून निराळे कां होत नाहींत? ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी जर ह्यांची पर्वा केली तर असे जे प्राणी आहेत, ते खरोखर नरकगतीला जातील ५. [६५६]

संपूर्ण विश्वरूप असणाऱ्या आणि आईबाप असणाऱ्या देवा, तूं अपार आणि अनंत आहेस १. तुला माझें नमन आहे. मी तुझा रंक सेवक विनंती करीत आहें, माझी एक गोष्ट आपण ऐकावी २. देवा, तुमची स्तुति करण्यांत वेद देखील थकला म्हणून 'नेति, नेति' असा शब्द करीत स्वस्थ बसला ३. ऋषि, मुनि, पुष्कळ कविलोक आणि सिद्ध हे तुझे गुण जरी वर्णन करीत आहेत तरी ते संपत नाहींत ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमची कीर्ति वर्णन केली जाईल, अशी माझी वाचा कसली आली आहे! ५ [६५७]

अंतरींचा भाव जाणोनियां गुज । तैसें केलें काज पांडुरंगें ॥ १ ॥ घातलें वचन न पडेचि खालीं । तूं आम्हां माउली अनाथांची ॥ २ ॥ मज याचकाची पुरविली आशा । पंढरीनिवासा मायबापा ॥ ३ ॥ नाशिली आशंका माझिया जीवाची । उरली भेदाची होती कांहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां केलों मी निर्भर । गाईन अपार गुण तुझे ॥ ५ ॥ [६५८]

उदार कृपाळु अनाथांचा नाथ । ऐकसी मात शरणागतां ॥ १ ॥ सर्व भार माथां चालविसी त्यांचा । अनुसरलीं वाचाकायामनें ॥ २ ॥ पाचारितां उभा राहासी जवळी । पाहिजे ते काळीं पुरवावें ॥ ३ ॥ चालतांही पंथ सांभाळीसी वाटे । वारिसील कांटे खडे हातें ॥ ४ ॥ तुका म्हणे चिंता नाहीं तुझ्या दासां । तूं त्यांचा कोंवसा सर्वभावें ॥ ५ ॥ [६५९]

काय कीर्ती करूं लोक दंभ मान । दाखवीं चरण तुझे मज ॥ १ ॥ मज आतां ऐसें नको करूं देवा । तुझा दास जावा वांयांविण ॥ २ ॥ होईल थोरपणें(णा) जाणीवेचा भार । दुरावेन दूर तुझ्या पायीं ॥ ३ ॥ अंतरींचा भाव काय कळे लोकां । एक मानी एका देखोवे(दे)खीं ॥ ४ ॥ तुका म्हणे तुझे पाय आतुडती । त्या मज विपत्ति गोड देवा ॥ ५ ॥ [६६०]

मानावया जग व्हावी द्रव्यमाया । नाहीं हे माझिया जीवा चाड ॥ १ ॥ तुझ्या पायांसाठीं केली आराणूक । आतां कांहीं एक नको दुजें ॥ २ ॥ करूनियां कृपा करीं अंगीकार । न लावीं उशीर आतां देवा ॥ ३ ॥ नव्हे साच कांहीं कळों आलें मना । म्हणोनि वासना आवरिली ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां मनोरथ सिद्धी । माझे कृपानिधी पाववावे ॥ ५ ॥ [६६१]

आतां सर्वभावें हा माझा निर्धार । न करीं विचार आणिकांसी ॥ १ ॥ सर्वभावें नाम गाईन

माझ्या अंतःकरणांतला गुह्य भाव जाणून त्याप्रमाणें पांडुरंगानें कृति केली १. आम्हीं आपले शब्द जे कांहीं खर्चीं घातले ते आमचे शब्द व्यर्थ गेले नाहींत, कारण हे देवा, तूं आम्हां अनाथ जीवांची आई आहेस २. पंढरींत राहाणाऱ्या आईबापा, याचना करणारा जो मी त्या माझी वासना पूर्ण करावी ३. कांहीं भेदभावाची जी मजमध्यें शंका राहिली होती ती सर्व नष्ट झाली ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हीं आपल्या कृपेनें मला पूर्ण केलेंत. आतां तुमचे अमर्यादित गुण मी गाईन ५. [६५८]

तूं मोठा उदार आहेस, कृपाळु आहेस, तुला जे कोणी शरण आहेत त्यांचें तूं म्हणणें ऐकतोस १. तूं त्यांचें सर्व ओझें आपले मस्तकावर वाहातोस. ते तुझ्या ठिकाणीं कायावाचामनानें अनन्य झाले आहेत २. त्यांनीं तुला हांका मारल्याबरोबर तूं त्यांच्याजवळ येऊन उभा राहातोस आणि त्यांना ज्या वेळेस ज्या गोष्टीची इच्छा असेल ती तूं त्यांची पूर्ण करितोस ३. ते मार्गानें चालूं लागले म्हणजे तूं त्यांचा सांभाळ करितोस आणि त्यांच्या पायांना ताप देण्यासारखे कांहीं कांटे, खडे मार्गामध्यें जर तुला दिसले तर ते तूं हातानें दूर करतोस ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्या दासांना कोणतीहि चिंता नाहीं, कारण हे देवा, सर्वभावानें रक्षण करणारा तूं त्यांचें घरच आहेस ५. [६५९]

देवा, लौकिक, कीर्ति, दंभ, मान ह्यांना घेऊन काय करावयाचें आहे? तूं आपले चरण आम्हांला दाखीव १. हे देवा, मला आतां असें करूं नका कीं जेणेंकरून मी तुमचा दास व्यर्थ जाईन २. ज्ञानाच्या थोरपणाचें ओझें होऊन मी तुमच्या पायांपासून लांब दुरावलों जाईन ३. अंतःकरणांतील भावना खरोखर लोकांना काय कळणारी आहे? एक, आम्ही साधु आहोंत असें समजून, आमच्या पायाला लागतांच तें पाहून, दुसराही हा साधु आहे असें समजून आमच्या पायां पडूं लागतो; असा हा परंपरेनें जिकडे तिकडे मान वाढतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या योगानें तुझे पाय आमच्या स्वाधीन होतील असें कर, मग ती दरिद्रता जरी असली तरी आम्हांला चांगलीच आहे ५. [६६०]

लोकांकडून मान मिळण्याला मजजवळ कांहीं द्रव्याची माया पाहिजे, परंतु त्याची मला बिलकूल इच्छा नाहीं १. तुमच्या पायांकरितां मीं साऱ्या इच्छा शांत केल्या. आतां मला दुसरी कोणतीही गोष्ट नको २. मजवर कृपा करून माझा तुम्हीं स्वीकार करा. ह्याविषयीं कांहीं वेळ लावूं नका ३. हे देवा, माझ्या मनाला एक तुमच्यावांचून दुसरें कांहीं एक खरें नाहीं, असें समजून आलें म्हणून मी आपली वासना आवरून घेतली ४. तुकाराम महाराज म्हणतात, आतां माझी इच्छा तुम्हीं दयावंतांनीं पूर्ण करावी. ५. [६६१]

आतां माझ्या सर्वभावानें हा निश्चय झाला आहे. दुसऱ्यासंबंधानें मी विचार करणार नाहीं. सर्व भावांनीं व

आवडीं । सर्व माझी जोडी पाय तुझे ॥ २ ॥ लोटांगण तुझ्या घालीन अंगणीं । पाहीन भरोनि डोळे मुख ॥ ३ ॥ निर्लज्ज होऊनि नाचेन रंगणीं । येऊं नेदीं मनीं शंका कांहीं ॥ ४ ॥ अंकित अंकिला दास तुझा देवा । संकल्प हा जीवा तुका म्हणे ॥ ५ ॥ [६६२]

जनीं जनार्दन ऐकतों हे मात । कैसा तो वृत्तांत न कळे आम्हां ॥ १ ॥ जन्म जरा मरण कवण भोगी भोग । व्याधि नाना रोग सुखदुःखें ॥ २ ॥ पापपुण्यें शुद्धाशुद्ध आचरणें । हीं कोणाकारणें कवणें केलीं ॥ ३ ॥ आम्हां मरण नाश तूं तंव अविनाश । कैसा हा विश्वास साच मानूं ॥ ४ ॥ तुका म्हणे तूंचि निवडीं हें गुढार । दाखवीं साचार तेंचि मज ॥ ५ ॥ [६६३]

यथार्थ वाद सांडूनि उपचार । बोलती ते अघोर भोगितील ॥ १ ॥ चोरा धरितां सांगे कुटा(ठा)ऱ्याचें नांव । दोघांचेही पाव(य) हात जाती ॥ २ ॥ तुका म्हणे असे पुराणीं निवाड । माझी हे बडबड नव्हे कांहीं ॥ ३ ॥ [६६४]

धीर तो कारण । साह्य होतो नारायणा । नेदी होऊं सीण । वाहों चिंता दासांसी ॥ १ ॥ सुखें करावें कीर्तन । हर्षे गावे हरिचे गुण । वारी सुदर्शन । आपणचि कळिकाळ ॥ २ ॥ जीव वेंची माता । बाळा जडभारी होतां । तो तों नव्हे दाता प्राकृतां यांसारिखा ॥ ३ ॥ हें तों माझ्या अनुभवें । अनुभवा आलें जीवें । तुका म्हणे सत्य व्हावें । आहाच नये कारणा ॥ ४ ॥ [६६५]

पुढें आतां कैंचा जन्म । ऐसा श्रम वारेसा ॥ १ ॥ सर्वथाही फिरों नये । ऐसी सोय लागलिया ॥ २ ॥ पांडुरंगा ऐसी नाव । तारूं भाव असतां ॥ ३ ॥ तुका म्हणे चुकती बापा । पुन्हा खेपा सकळा ॥ ४ ॥ [६६६]

प्रीतीनें मी हरीचें नाम गाईन. माझी सर्व प्राप्ति हरीचे एक पायच आहेत २. देवा, तुमच्या आंगणांत मी लोटांगण घालीन आणि तुमचें मुख डोळे भरून पाहीन ३. तुमचे आंगणांत निर्लज्ज होऊन नाचेन व त्या विषयींची मनांत कोणत्याहि तऱ्हेची शंका येऊं देणार नाहीं ४. तुमच्या स्वाधीन झालेला असा मी केवळ तुमचा दास आहें आणि हाच संकल्प माझ्या मनामध्यें नांदत आहे, असें तुकाराम महाराज म्हणतात ५. [६६२]

जगाच्या अंतर्बाह्यरूपानें जनार्दन आहे, अशी हकीगत ऐकतों पण खरें काय वर्तमान आहे तें आम्हांस समजत नाहीं १. असें कां जर म्हणाल, तर जन्म घेतो कोण, मरतो कोण, म्हातारा होतो कोण आणि नाना प्रकारचे व्याधि, रोग, आणि सुखदुःखें हीं कोण भोगीत आहे ? २. पापपुण्यात्मक चांगलीं वाईट कर्मे कोणाकरितां आणि कोणीं केलीं आहेत ? ३. आम्हांला मृत्यु येत आहे म्हणजे आमचा नाश होतो आहे आणि तुम्हीं तर देवा, अविनाशी आहांत. ह्याच्यावर विश्वास ठेवून हें खरें कसें मानावें ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, असलें जें कांहीं गूढ आहे त्याचा तुम्हींच उलगडा करा आणि आम्हांला खरें काय आहे तें दाखवा ५. [६६३]

खरें सांगायाचें सोडून लोकांना बरें वाटण्याकरितां औपचारिक भाषण जे बोलतात ते वक्ते अघोर नरकांत जातात १. चोराला पकडला असतां तो आपल्या नाईकाचें नांव सांगतो. ह्या योगानें दोघांच्या हातापायांत बेडी पडते २. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याप्रमाणें पुराणांमध्यें निर्णय केला आहे, केवळ माझीच ही बडबड आहे असें नाहीं ३. [६६४]

परमार्थाविषयीं धीर धरल्यानें नारायण साह्य होतो व आपले जे सेवक आहेत त्यांना श्रम पडूं देत नाहीं आणि चिंताही करूं देत नाहीं १. आपण मात्र आनंदानें कीर्तन करावें, हरीचे गुण गावे, म्हणजे त्यायोगानें देवाचें सुदर्शन आपल्या आपण काळाचें निवारण करितें २. लहान मुलाला कांहीं दुखणेंबाणें आलें असतां त्याची आई आपला जीव देखील देण्यास तयार होते. ही प्राकृत आईची गोष्ट झाली आणि हा तर दाता प्राकृतासारखा नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ही माझ्या अनुभवाला आलेली गोष्ट मीं सांगितली. मात्र निःसीम भक्त बनलें पाहिजे. वरवर भक्ति केली असतां कांहीं उपयोग होत नाहीं ४. [६६५]

आतां येथून पुढें आपल्यामागें लागलेल्या जन्ममृत्यूच्या श्रमाचा परिहार होण्यासारखा असा जन्म कसा मिळेल ? १. म्हणून मनुष्यजन्म प्राप्त झाला असतां आपण सर्वथैव आपल्या कर्तव्यास चुकूं नये २. पांडुरंगासारखी भवनदींतून तारून नेणारी नाव, आपल्याभावानें प्राप्त झाली असतां ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे बापा, पांडुरंगाच्या ठिकाणीं अनन्य झाल्यानें पुन्हां जन्ममरणाच्या फेऱ्यांत मनुष्य पडत नाहीं ४. [६६६]

दूध दहीं ताक पशूचें पाळण । त्यामध्यें कारण घृतसार ॥ १ ॥ हेंचि वर्म आम्हां भाविकांचे हातीं । म्हणऊनि चित्तीं धरिला राम ॥ २ ॥ लोह कफ गारा अग्निचिया काजें । येऱ्हवी तें ओझें कोण वाहे ॥ ३ ॥ तुका म्हणे खोरीं पाहारा जतन । जोंवरी हें धन हातीं लागे ॥ ४ ॥ [६६७]

वीर विठ्ठलाचे गाढे । कळिकाळ पायां पडे ॥ १ ॥ करिती घोष जयजयकार । जळती दोषांचे डोंगर ॥ २ ॥ दया क्षमा शांति । बाण अभंग हे हातीं ॥ ३ ॥ तुका म्हणे बळी । तेचि एक भूमंडळीं ॥ ४ ॥ [६६८]

ऐकें रे जना । तुझ्या स्वहिताच्या खुणा । पंढरीचा राणा । मनामाजीं स्मरावा ॥ १ ॥ मग कैंचें रे बंधन । वाचे गातां नारायण । भवसिंधु तो जाण । येचि तीरीं सरेल ॥ २ ॥ दास्य करील कळिकाळ । बंद तुटेल मायाजाळ । होतील सकळ । रिद्धिसिद्धी म्हणियाऱ्या ॥ ३ ॥ सकळ शास्त्रांचें सार । हें वेदांचें गव्हर । पाहतां विचार । हाचि करिती पुराणें ॥ ४ ॥ ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र । चांडाळांही अधिकार । बाळें नारीनर । आदिकरोनि वेश्याही ॥ ५ ॥ तुका म्हणे अनुभवें । आम्हीं पाडियलें ठावें । आणीकही दैवें । सुख घेती भाविकें ॥ ६ ॥ [६६९]

न करीं तळमळ राहें रे निश्चळ । आहे हा कृपाळ स्वामी माझा ॥ १ ॥ अविनाश सुख देईल निर्वाणीं । चुकतील खाणी चौऱ्यांशीच्या ॥ २ ॥ आणिकीया जीवा होईल उद्धार । तेही उपकार घडती कोटी ॥ ३ ॥ आहिक्य परत्रीं होसील सरता । वाचे उच्चारितां राम राम (नाम) ॥ ४ ॥ तुका म्हणे सांडीं संसाराचा छंद । मग परमानंद पावसील ॥ ५ ॥ [६७०]

दूध, दहीं, ताक ह्यांच्या प्राप्तीकरतां गाई-म्हशींचें रक्षण करितात, परंतु ह्या सगळ्याचें सार तूप हें आहे १. आम्हां भाविक भक्तांच्या हातांमध्यें तुपासारखें सारभूत असणारें वर्म राम हें आहे, म्हणून आम्हीं त्याला चित्तांत धरिला आहे २. लोखंड, गारगोटी, कापूस हीं अग्नीच्या सिद्धीकरितां संग्रहास ठेवावीं लागतात. नाहीं तर ह्यांचें ओझें कोण बाळगीत बसलें आहे ! ३. तुकाराम महाराज म्हणतात, भूमिगत धन हस्तगत होईपर्यंत खोरें, टिकाव आणि पाहार ह्यांचें रक्षण करावें लागतें ४. [६६७]

विठ्ठलाचे सेवक हे मोठे शूर आहेत, म्हणून काळ हा त्यांच्या पायां पडतो १. ते निरंतर विठ्ठलनामाच्या जयजयकाराचा घोष करितात, त्या योगानें मोठमोठे पापांचे डोंगरही जळून जातात २. त्या वीरांच्या हातांमध्यें शांति, दया, क्षमा हे न तुटणारे बाण आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या पृथ्वीमध्यें तेच एक बलाढ्य आहेत ४. [६६८]

अहो जन हो, तुम्हीं आपलें स्वहित होण्याच्या खुणा ऐका. त्या ह्या, कीं पंढरीचा स्वामी जो पांडुरंग त्याचें सर्वांनीं मनामध्यें स्मरण करीत राहावें १. वाणीनें नारायणाचें चिंतन केलें असतां मग संसारबंधन कशाचें ? ह्या संसारसमुद्र अलीकडल्या कांठींच नाहींसा होईल. २. काळ हा तुझें दास्यत्व करील. मायाजाळाचें बंधन तुझ्या मागचें तुटून जाईल. संपूर्ण रिद्धि, सिद्धि, तुझ्या म्हणण्याप्रमाणें वागणारे तुझे चाकर होतील ३. सर्व शास्त्रांचें हेंच सार आहे. वेदांचाही मुख्यार्थ हाच आहे. खरोखर पाहिलें तर ह्याचाच विचार पुराणें करीत आहेत ४. सांगितलेलें साधन करण्याविषयीं ब्राह्मणांना, क्षत्रियांना, वैश्यांना, शूद्रांना, चांडाळांना, बालकांना, स्त्रियांना, पुरुषांना, फार काय सांगावें, कसबिणींना देखील अधिकार आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं हें आपल्या स्वतःच्या अनुभवानें सर्वांना माहीत केलें आहे. ह्या नामाचें जे कोणी दैववान् भाविक आहेत ते सुख घेतात ६. [६६९]

तूं तळमळ करूं नको. आपलें मन स्थिर करून शांत राहा. माझा स्वामी हा मोठा कृपालु आहे १. वर सांगितल्याप्रमाणें आपले मनाला निश्चल करून त्याचें चिंतन करशील तर तो तुला अखेरीस अविनाशी सुख देईल व त्यायोगानें चौऱ्यांशीं लक्ष योनींतून फिरावयाचें तुझें चुकेल २. ह्या तुझ्या करण्यानें अनेक मूर्ख जीवांना परमार्थाचा मार्ग लागेल. त्या योगानें त्यांचाही उद्धार होईल. अशा प्रकारचे तुझ्याकडून कोट्यावधी उपकार होतील ३. आणि इह-परलोकीं तूं मान्य होशील, म्हणून वाचेनें राम राम म्हण ४. तुकाराम महाराज म्हणतात, तूं संसाराचा छंद टाक म्हणजे परमानंदपदास पावशील ५. [६७०]

कां रे दास होसी संसाराचा खर। दुःखाचे डोंगर भोगावया ॥ १ ॥ मिष्टान्नाची गोडी जिव्हेच्या अगरीं। मसक भरल्यावरी स्वाद नेणे ॥ २ ॥ आणीकही भोग आणिकां इंद्रियांचें। नाहीं ऐसे साचे जवळी कांहीं ॥ ३ ॥ रूप दृष्टी धाय पाहातां पाहातां। न घडे सर्वथा आणि तृष्णा ॥ ४ ॥ तुका म्हणे कां रे नाशिवंतासाठीं। देवासवें तुटी करितोसी ॥ ५ ॥ [६७१]

बैसोनि निश्चळ करीं त्याचें ध्यान। देईल तो अन्नवस्त्र दाता ॥ १ ॥ काय आम्हां करणें अधिक सांचुनी। देव झाला ऋणी पुरविता ॥ २ ॥ दयाळ मायाळ जाणे कळवळा। शरणांगतां लळा राखों जाणे ॥ ३ ॥ नलगे मागणें सांगणें तयासी। जाणें इच्छा तैसी पुरवी त्याची ॥ ४ ॥ तुका म्हणे लेईं अळंकार अंगीं। विठ्ठल हा जगीं तूंचि होसी ॥ ५ ॥ [६७२]

सोनियाचा कळस। माजी भरिला सुरारस ॥ १ ॥ काय करावें प्रमाण। तुम्ही सांगा संतजन ॥ २ ॥ मृत्तिकेचा घट। माजी अमृताचा सांट(ठ) ॥ ३ ॥ तुका म्हणे हित। तें मज सांगावें त्वरित ॥ ४ ॥ [६७३]

नका घालूं दूध जयामध्यें सार। ताकाचे उपकार तरी करा ॥ १ ॥ नेदा तरी हें हो नका देऊं अन्न। फुकाचें जीवन तरी पाजा ॥ २ ॥ तुका म्हणे मज सगुणाची चाड। पुरवा कोणी कोड दुर्बळाचें ॥ ३ ॥ [६७४]

म्हणसी नाहीं रे संचित। न करीं न करीं ऐसी मात ॥ १ ॥ लाहो घेईं हरिनामाचा। जन्म जाऊं नेदीं साचा। गळां पडेल यमफांसा। मग कैंचा हरि म्हणसी ॥ २ ॥ पुरलासाठीं देहाडा। ऐसें न म्हणें न म्हणें मूढा ॥ ३ ॥ नरदेह दुबळा। ऐसें न म्हणें रे चांडाळा ॥ ४ ॥ तुका म्हणे सांगों किती। सेकीं तोंडीं पडेल माती ॥ ५ ॥ [६७५]

अरे गाढवा, तूं संसाराचा चाकर कशाकरतां होत आहेस, त्या योगानें दुःखाचे डोंगर भोगावे लागतात १. गोड अन्नाची रुचि जिव्हेच्या शेंड्यावर आहे. एकवार पोट भरलें म्हणजे स्वाद कळत नाहीं २. त्याचप्रमाणें इतर इंद्रियांचे (अनित्य) विषय इतर इंद्रियांना भोगण्यांत खऱ्या सुखाचा लाभ जवळ असत नाहीं ३. हरीचें रूप दृष्टीनें वारंवार पाहाण्यांत दृष्टि तृप्त होते व तिच्या ठिकाणीं विषयाची तृष्णा सर्वथैव राहात नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, अरे तूं नाशिवंत देहादि प्रपंचाच्या लोभास्तव देवापासून दुरावला कां जातोस? ५. [६७१]

तूं निश्चळ बसून त्या हरीचें ध्यान कर. तो दाता तुला अन्न वस्त्र देईल १. आम्हांला अधिक संचय करून काय करावयाचें आहे? सर्व पुरविणारा असा देव आमचा ऋणी झाला आहे २. तो मोठा दयाळू व मायाळू असून भक्ताची कळकळ करणारा आहे व जे कोणी शरण आलेले आहेत त्यांचे लाड पुरविण्याचेंही जाणतो ३. त्या हरीला कांहीं सांगावयास नको. कांहीं मागावयास नको, कारण ज्यांची जशी इच्छा आहे तशी तो साहाजिक जाणून पूर्ण करितो ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां तूं आपले वाणीचे आंगावर विठ्ठल हा अलंकार घाल. त्या योगानें जगामध्यें तूं विठ्ठलच होशील ५. [६७२]

सोन्याच्या पात्रामध्यें दारू भरली आहे १. तें सोन्याचें पात्र जरी चांगलें आहे, तरी आंत दारू भरली असल्यामुळें त्याचे चांगुलपणाचा कांहीं उपयोग आहे काय, तें तुम्हीं संतजन मला सांगा २. मातीचें मडकें आहे, परंतु त्यामध्यें अमृत साठविलें आहे (म्हणून तें अपवित्र आहे काय, तें सांगा) ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांत हित आहे तें तुम्ही मला त्वरित सांगा ४. [६७३]

अहो, तुम्हीं कोणाला दूध देऊं नका, कारण तें सारभूत असून मोठ्या किंमतीचें आहे; परंतु असारभूत जें ताक त्याचा तरी उपकार करा, म्हणजे तें लोकांना द्या १. तुम्ही अन्न कोणाला देत नाहीं, तर नका देऊं; पण फुकटचें पाणी तरी पाजा २. तुकाराम महाराज म्हणतात, मला हरीच्या सगुणरूपाची इच्छा आहे. एवढ्याकरितां मज दुर्बळाची ती इच्छा कोणी तरी पूर्ण करा ३. [६७४]

अरे, हरीचें भजन माझ्या प्रारब्धामध्यें नाहीं असे शब्द बोलूं नकोस १. तर त्वरा कर आणि हरीचें नाम घे. आपला हा मनुष्यजन्म खरोखर व्यर्थ जाऊं देऊं नकोस. अंतकाळीं तुझा गळा यमाच्या पाशानें दाबला गेल्यावर मग तुला हरि कसें म्हणतां येईल? २. मूर्खा, माझा देह हा विषयोपभोगासाठीं आहे असें तूं म्हणूं नकोस ३. त्याचप्रमाणें हे चांडाळा, नरदेह हा परमार्थाविषयीं शक्तिहीन आहे असें तूं म्हणूं नकोस ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या मूर्खांना कोठपर्यंत सांगूं? माझें न ऐकतील, तर अखेरीस त्यांच्या तोंडांत माती पडेल ५. [६७५]

संतांचा महिमा तो बहु दुर्गम। शाब्दिकांचें काम नाहीं येथें ॥ १ ॥ बहु दुधड जरी झाली म्हैस गाय। तरी होईल काय कामधेनु ॥ २ ॥ तुका म्हणे अंगें व्हावें तें आपण। तरीच महिमान येईल कळों ॥ ३ ॥ [६७६]

नाहीं संतपण मिळत हें हाटीं। हिंडतां कपाटीं रानीं वनीं ॥ १ ॥ नये मोल देतां धनाचिया राशी। नाहीं तें आकाशीं पाताळीं तें ॥ २ ॥ तुका म्हणे मिळे जिवाचिये साटीं। नाहीं तरी गोष्टी बोलूं नये ॥ ३ ॥ [६७७]

नामाची आवडी तोचि जाणा देव। न धरीं संदेह कांहीं मनीं ॥ १ ॥ ऐसें मी हें नाहीं बोलत नेणतां। आणोनि संमता संतांचिया ॥ २ ॥ नाम म्हणे तया उरलें (आणीक) साधन। ऐसें हें वचन बोलों नये ॥ ३ ॥ तुका म्हणे सुख पावे या वचनीं। ज्याचीं शुद्ध दोन्ही मायबापें ॥ ४ ॥ [६७८]

सुखें होतों कोठें घेतली सुती। बांधविला गळा आपुले हातीं ॥ १ ॥ काय करूं बहु गुंतलों आतां। नये सरतां मागें पुढें ॥ २ ॥ होतें गांठीं तें सरलें आतां। आणीक माथां ऋण जालें ॥ ३ ॥ सोंकरलियाविण गमाविलें पिके(कें)। रांडापोरें भिके लावियेलीं ॥ ४ ॥ बहुतांचीं बहु घेतलीं घरें। न पडे पुरें कांहीं केल्या ॥ ५ ॥ तुका म्हणे कांहीं न धरावी आस। जावें हें सर्वस्व टाकोनियां ॥ ६ ॥ [६७९]

न मानावें तैसें गुरूचें वचन। जेणें नारायण अंतरे तें ॥ १ ॥ आड आला म्हून फोडियेला डोळा। बळिनें आंधळा शुक्र केला ॥ २ ॥ करी देव तरी काय नव्हे एक। कां तुम्ही पृथक सिणां वायां ॥ ३ ॥ उल्लंघुनियां भ्रतारांची आज्ञा। अन्न ऋषिपत्न्या घेउनि गेल्या ॥ ४ ॥ अवघेंचि त्यांचें

संतांचें माहात्म्य समजण्यास मोठें कठिण आहे. शब्दानें तें वर्णन केलें जाणार नाहीं, म्हणून कोरडी बडबड करणारांचा येथें कांहीं उपयोग नाहीं १. म्हैस अथवा गाय ही मोठी चांगली व पुष्कळ दूध देणारी असली तरी ती काय कामधेनु होईल? २. तुकाराम महाराज म्हणतात, स्वतः अंगानें आपण संत झालों म्हणजे संताचा मोठेपणा कळून येतो ३. [६७६]

संतपणाचा अधिकार बाजारांत विकत मिळत नाहीं किंवा रानांत, वनांत, गिरिकपाटांत हिंडण्यानेंहि मिळत नाहीं १. द्रव्याच्या राशीच्या राशि जरी किंमत दिली तरी तें संतपण मिळत नाहीं, व तें आकाशांत अगर पाताळांत कोठेंहि मिळत नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, हरीला आपला जीव अर्पण करण्यांत तें संतपण मिळत असतें. अशी जर स्थिति नसेल तर संतपणाची गोष्ट बोलूंहि नये ३. [६७७]

भगवंताच्या नामाची ज्याला आवड आहे तो देव आहे, असें समजा. ह्याविषयीं मनामध्यें कांहीं संशय धरूं नका १. असें मी मूर्खपणानें बोलत नाहीं, तर ह्याविषयीं संतांचीहि संमति आहे २. हरीचें नाम जो घेत आहे, त्यास संसारांतून मुक्त होण्याकरितां इतर साधनें करण्याची जरूरी आहे, असें म्हणूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या म्हणण्याचें सुख, ज्यांचे आईबाप हे दोन्ही शुद्ध आहेत, त्यांनाच होणारें आहे ४ [६७८]

मी सुखी होतों, पण देहादि प्रपंचाचा लोभ धरून मीं आपल्या हातानें आपला गळा बांधून घेतल्यासारखें झालें आहे १. काय करावें? मी ह्या प्रपंचामध्यें इतका कांहीं गुंतून गेलों आहें, कीं त्या योगानें मागें पुढें सरण्याची सोय नाहीं २. माझे पदरीं जो कांहीं संचय होता, तो सर्व प्रपंच अंगावर येतांच सरला व माझे मस्तकावर आणखी ऋण झालें ३. शेताचें रक्षण न केल्यामुळें पीक गमाविलें, त्यायोगें रांडापोरें भिकेस लाविलीं ४. व्यवहारामध्यें पुष्कळांचीं घरें अनेक लटपटीनें घेतलीं, तथापि संसारांत पुरें पडेना ५. तुकाराम महाराज म्हणतात, आतां कशाचीहि आशा न धरितां ह्या सवर्स्वाचा त्याग करून (हरीला शरण) जावें असें वाटतें ६. [६७९]

ज्या वचनाच्या योगानें भगवंत अंतरेल तें वचन गुरूचें जरी असेल तरी मानूं नये १. ह्याविषयीं पुराणांतील उदाहरण : बळी हा भगवंतास त्रिपाद भूमि दान देण्याकरितां भगवंताच्या हातावर उदक सोडीत होता. इतक्यांत झारीच्या मुखाशीं त्याचे गुरु शुक्र ते सूक्ष्म रूपानें येऊन बसले. त्या वेळेस बळीनें हातांत दर्भ घेऊन झारीच्या मुखांत घातला; त्यामुळें गुरूंचा डोळा फुटून ते एका डोळ्यानें आंधळे झाले २. देवानें मनांत आणिल्यावर अमुक गोष्ट होणार नाहीं असें नाहीं, मग भगवंतास सोडून निरनिराळ्या साधनानुष्ठानांचे व्यर्थ श्रम कां करतां? ३. भ्रतार जे ऋषि त्यांची आज्ञा

देवें केलें काज। धर्म आणि लाज राखियेली ॥ ५ ॥ पितयासीं पुत्रें केला वैरकार। प्रल्हादें असुर मारविला ॥ ६ ॥ बहुत विघ्नें केलीं तया आड। परि नाहीं कैवाड सांडियेला ॥ ७ ॥ गौळणी करिती देवाशीं व्यभिचार। सांडुनी आचार भ्रष्ट तोही ॥ ८ ॥ तयांसी दिलें तें कवणासी नाहीं। अवघा अंतर्बाहीं तोचि झाला ॥ ९ ॥ देव जोडे ते करावे अधर्म। अंतरे तें कर्म नाचरावें ॥ १० ॥ तुका म्हणे हा तो जाणतो कळवळा। म्हणोनि अजामेळा उद्धरिलें ॥ ११ ॥ [६८०]

अरे गिळिलें हो संसारें। कांहीं तरि राखा खरें। दिला करुणाकरें। मनुष्यदेह सत्संग ॥ १ ॥ येथें न घलीं न घलीं आड। संचितसा शब्द नाड। उठाउठी गोड। बीजें बीज वाढवी ॥ २ ॥ केलें तें क्रियमाण। झालें तें संचित म्हण। प्रारब्ध जाण। उरवरित उरलें तें ॥ ३ ॥ चित्त खोटें चालीवरी। रोग भोगाचे अंतरीं। रसने(ना) अनावरी। तुका म्हणे ढुंग वाहे ॥ ४ ॥ [६८१]

अग्नि तापलिया कायाचि होमे। तापत्रयें संतप्त होती। संचित क्रियमाण प्रारब्ध तेथें। न चुके संसारस्थिति। राहाटघटिका जैसी फिरतांचि राहिली। भरली झाली एकी रितीं। साधीं हा प्रपंच पंचाय अग्न। तेणें पावसील निजशांती रे ॥ १ ॥ नारायणनाम नारायणनाम। नित्य करीं काम जिव्हामुखें। जन्मजराव्याधि पापपुण्य तेथें। नासती सकळही दुःखें रे ॥ २ ॥ शीत उष्ण वन सेवितां कपाट। आसनसमाधी साधीं। तप तीर्थ दान व्रत आचरण। यज्ञ नाना मन बुद्धी। भोगाभोग तेथें न चुकती प्रकार। जन्म जरा दुःख व्याधि। साहोनि काम क्रोध अहंकार। आश्रमीं अविनाश साधीं रे ॥ ३ ॥ घोकितां अक्षरें अभिमानविधि। निषेध लागला पाठीं। वाद करितां निंदा घडती दोष। होत वज्रलेपो भविष्यति। दूषणाचें मूळ भूषण तुका म्हणे। सांडीं मिथ्या खंती।

उलंघन करून त्यांच्या पत्न्या भगवंताकडे अन्न घेऊन गेल्या ४. त्यांचें सर्व काम भगवंतांनीं केलें, म्हणजे धर्म आणि लज्जा हीं त्यांचीं रक्षण केलीं ५. पुत्रानें पित्याशीं वैर करून आपला पिता जो (हिरण्यकश्यप) असुर त्यास प्रल्हादानें मारविला ६. प्रल्हादाच्या भजनामध्यें त्या असुरानें पुष्कळ विघ्नें केलीं, तथापि भगवद्भजनाविषयींचा निर्धार प्रल्हादानें सोडला नाहीं ७. गवळणींनीं देवाशीं व्यभिचार केला व स्व-आचार (स्त्रीधर्म) सांडून त्या भ्रष्ट झाल्या ८. अशा ह्या व्यभिचारभावनेनें भगवंताच्या ठिकाणीं रत झालेल्या गवळणींस (रासक्रीडेच्या वेळीं) जें भगवंतांनीं दिलें तें कोणासही दिलें नाहीं त्यांचा अंतर्बाह्य भाव साक्षात् देवच झाला ९. म्हणून देवाचा लाभ होण्यांत अधर्म होत असल्यास करावा, परंतु देवाशीं अंतर ज्या कर्मानें होईल असें कर्म कधींहि आचरूं नये १०. तुकाराम महाराज म्हणतात, भगवंत हे भक्ताच्या हृदयांतील कळवळा जाणतात, म्हणूनच अति पातकी अजामिळाचा त्यांनीं उद्धार केला ११. [६८०]

अरे, तुम्हांला ह्या संसारानें गिळून टाकिलें आहे. एवढ्याकरितां कांहीं तरी खऱ्याचें रक्षण करा, कारण दयावंत भगवंतानें तुम्हांला मनुष्यदेह व सत्संग दिला आहे १. अशा प्रसंगीं माझे प्रारब्धांत हरिभजन नाहीं, असा प्रतिबंध पुढें आणूं नका. त्वरेनें बीजानें बीज वृद्धिंगत करा २. जें कांहीं कर्म तुमच्याकडून घडत आहे तें क्रियमाण आहे व जें पूर्वी होऊन गेलें आहे, तें संचित असें समजा; आणि अवश्य भोगण्याचें जें उर्वरित आहे, तें प्रारब्ध जाणा ३. चित्त खोट्या चालीनें चालतें. रोग हा जे भोग आपण भोगतों त्यानेंच होणारा आहे. जिव्हा रससेवनाविषयीं अनावर झाली, तर त्याचा परिणाम अपचन होऊन हगवण लागते ४. [६८१]

(मेल्यानंतर) अग्नीच्या तापानें देहाचा होम होतो, पण जिवंतपणीं देह-मन-बुद्धि तापत्रयानें संतप्त झालीं आहेत. संचित, क्रियमाण व प्रारब्ध हीं संसारस्थितींत चुकत नाहींत. रहाटगाडग्याच्या माळेमध्यें सांपडलेलीं मडकीं फिरतच राहातात. त्या फिरण्यांत एक पाण्यानें भरत असतें व एक रिकामें होत असतें. ह्याकरितां हा प्रपंचरूपी पंचाग्नि तूं साध्य करून घे (जिंक). त्या योगानें आत्मशांति प्राप्त होईल १. जिव्हेनें नित्य नारायणाचें नाम घेण्याचें काम करीत जा. त्या योगानें जन्म, जरा, व्याधि, पाप, पुण्य हीं सकळ दुःखें नाश पावतील २. वनांतील गुहेचा आश्रय करून शीतोष्णादि सहन कर व आसनादि समाधि साध्य करून घे. तप, तीर्थ, दान, व्रतादिक आचरण व यज्ञ इत्यादिक अनेक साधनांच्या योगानीं भोगाभोग हे कधींहि चुकणार नाहींत. जन्म, जरा, दुःख आणि व्याधि हीं तूं सहन कर व काम-क्रोध-अहंकार ह्या ऊर्मी सहन करून अविनाशी आत्मसुख आपल्या निजाश्रमीं साध्य करून घे ३. वेदाक्षरें घोकण्यामध्यें अहंकार व विधिनिषेध पाठीमागें लागतात. वाद करण्यामध्यें निंदादि दोष वज्रलेप होतात, म्हणून

रिघोनि संतां शरण सर्वभावें । राहें भलतिया स्थिती रे ॥ ४ ॥ [६८२]

नव्हे गुरुदास्य संसारियां । वैराग्य तरी भेणें कांपे विषयां । तैसें नाम नोव्हे पंढरीराया जया सायास न लगती ॥ १ ॥ म्हणोनि गोड सर्वभावें । आंघोळी न लगे तोंड धुवावें । अर्थचाड जीवें न लगे भ्यावें संसारा ॥ २ ॥ कर्म तंव न पुरे संसारिक । धर्म तंव फळदायक । नाम विठ्ठलाचें एक । नाशी दुःख भवाचें ॥ ३ ॥ न लगे सांडणे मांड(ग)णें । आगमनिगमाचें देखणें । अवघें तुका म्हणे । विठ्ठलनामें आटलें ॥ ४ ॥ [६८३]

नये इच्छूं सेवा स्वइच्छा जगाची । अवज्ञा देवाची घडे तेणें ॥ १ ॥ देहाचा निग्रही त्याचें तो सांभाळी । मग नये कळि अंगावरी ॥ २ ॥ आपलिया इच्छा माता सेवा करी । न बाधी ते थोरी येणें शो(क्षो)भें ॥ ३ ॥ तुका म्हणे सांडा देखीचे दिमाख । मोडसीचें दुःख गांड फाडी ॥ ४ ॥ [६८४]

सत्य सत्यें देतें फळ । नाहीं लागतचि बळ ॥ १ ॥ ध्यावे देवाचे ते पाय । धीर सकळ उपाय ॥ २ ॥ करावीच चिंता । नाहीं लागत तत्वता ॥ ३ ॥ तुका म्हणे भावें । शरण म्हणवितां बरवें ॥ ४ ॥ [६८५]

साधक झाले कळीं । गुडगुडीची लांब नळी ॥ १ ॥ पचीं पडे मद्यपान । भांगभुर्का हें साधन ॥ २ ॥ अभेदाचें पाठांतर । अति विषयीं पडिभर ॥ ३ ॥ चेल्यांचा सुकाळ । पिंडदंड भ(भं)गपाळ ॥ ४ ॥ सेवा मानधन । बरे इच्छेनें संपन्न ॥ ५ ॥ सोंगाच्या नरकाडी । तुका बोडोनियां सोडी ॥ ६ ॥ [६८६]

मज पाहतां हें लटिकें सकळ । कोठें मायाजाळ दावीं देवा ॥ १ ॥ कोणाचा कोणाशीं

हीं भूषणें दूषणांचीं मुळें आहेत. ह्याकरितां ह्या विषयींची खोटी तळमळ टाक आणि संतांना सर्वभावानें शरण जाऊन पाहिजे त्या (ज्या स्थितींत राहातां येईल त्या) स्थितीमध्यें राहा, असें तुकाराम महाराज म्हणतात ४. [६८२]

गुरूचें दास्यत्व हें संसारी जीवांना (अंगीं वैराग्य नसल्यामुळें) होणारें नाहीं आणि एखाद्याला वैराग्य असलें तर तो संसाराला फार भितो आणि विषयांना पाहून थरथर कांपतो. तसें पंढरीनाथाचें नाम नाहीं. तें घेण्याविषयीं कोणतेही सायास करावे लागत नाहींत १. तें सर्व दृष्टीनें चांगलें आहे. तें घेण्याला आंघोळ करणें व तोंड धुणें ह्यांची गरज नाहीं. जीवांनीं द्रव्याची इच्छा धरिली तरी चालेल. संसाराला भिण्याचें कांहीं कारण नाहीं २. कर्मकथा पूर्ण करण्याला सांसारिक कधींहि पुरे पडणार नाहींत आणि धर्म तर फळ देणारा आहे, म्हणून एक विठ्ठलाचें नाम हें भवदुःखाचें नाश करणारें आहे ३. वेदशास्त्रें पाहाण्याची खटपट करावयास नको. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व कांहींएक विठ्ठल नामामध्यें आटलेलें आहे, म्हणजे सर्वांचा एका विठ्ठल नामांत समावेश झाला आहे ४. [६८३]

स्वच्छंदानें वागणाऱ्या जगाच्या सेवेची इच्छा करूं नये, कारण त्यानें देवाची अवज्ञा होते १. देहाचा निग्रह करणार जो देव, त्याचे स्वाधीन देह करावा. मग कोणत्याहि तऱ्हेचें लचांड आपल्यावर येत नाहीं २. आई ही आपल्या इच्छेनें पुत्राची सेवा करिते, ह्या थोरवीचा क्षोभ तिला बाधक होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देखोदेखीचा डौल टाका, मोडशीच्या दुःखानें गांड फाटली जाते ४. [६८४]

खरें हें खरेंच फल देतें. तें मिळण्याकरितां कांहीं शक्तीची जरूरी नाहीं १. धैर्यानें देवाच्या पायांचें ध्यान करावें, हाच सर्व उपाय आहे २. खरोखर कोणत्याही प्रकारची चिंता करावी लागत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, परम श्रद्धेनें आम्ही देवाचे शरणांगत आहोंत, असें म्हणणें हें चांगलें ४. [६८५]

कलियुगामध्यें गुडगुडीची लांब नळी तोंडामध्यें धरून ती ओढणारे पारमार्थिक साधक पुष्कळ झाले आहेत १. जे निरंतर घोटा अगर सुकी भांग सेवन करण्याचें साधन करीत आहेत व दारू पिणें हेंहि ज्यांच्या पचनीं पडलें आहे २. अभेद परमात्म्याच्या स्थितीचें विवेचन ज्यांत केलें आहे अशा वाक्यांचें पाठांतर करूनहि विषयांविषयींचा ज्यांच्या हृदयांत प्रेमभर अतिशय आहे ३. चेल्यांचा व पिंडदंडादि (देहाचा आडदांडपणा) ऐश्वर्य समूहांचा सुकाळ ज्या ठिकाणीं आहे ४. व जे गुरु आपल्याला शिष्यांकडून धन व मान मिळावा अशा प्रकारच्या इच्छेनें चांगले संपन्न (भारलेले) आहेत ५. तुकाराम महाराज म्हणतात, असे सोंगाडे जे साधु आहेत त्यांची मी फजिती करून सोडतों ६. [६८६]

हे देवा, मीं जें पाहूं गेलों तें सर्व खोटें दिसलें. ह्याकरितां तुझें मायेचें जाळें कोठें आहे, तें दाखीव १. ह्या प्रवृत्तीमध्यें

न धरे संबंध। आहे शुद्धबुद्ध ठायींचे ठायीं ॥ २ ॥ काढा जी आपुलें मोह बुंथी जाळें। नका लावूं बळें वेड आम्हां ॥ ३ ॥ जीव शिव कांहीं ठेवियेलीं नांवें। सत्य तुम्हां ठावें असोनिया ॥ ४ ॥ सेवेच्या अभिलाषें न धराचि विचार। आम्हां दारोदार हिंडविलें ॥ ५ ॥ आहे तैसें आतां कळलियावरी। परतें सांडा दुरी दुजेपण ॥ ६ ॥ तुका म्हणे काय छायेच्या अभिलाषें। हंस पावे नाश तारांगणीं ॥ ७ ॥ [६८७]

पंचभूतांचा गोंधळ। केला एके ठायीं मेळ। लाविला सबळ। अहंकार त्यापाठीं ॥ १ ॥ तेथें काय मी तें माझें। कोण वागवी हें ओझें। देहा केवीं रिझे। हें काळाचें भातुकें ॥ २ ॥ जीव न देखे मरण। धरी नवी सांडी जीर्ण। संचित प्रमाण। भोग शुभा अशुभा ॥ ३ ॥ इच्छा वाढवी ते वेल। खुंटावा तो खरा बोल। तुका म्हणे मोल। झांकलें तें पावेल ॥ ४ ॥ [६८८]

पुसावेंसें हेंचि वाटे। जें जें भेटे तयासी ॥ १ ॥ देव कृपा करील मज। काय लाज राखील ॥ २ ॥ अवघियांचा विसर झाला। हा राहिला उद्योग ॥ ३ ॥ तुका म्हणे चिंता वाटे। कोण भेटे सांगेसें ॥ ४ ॥ [६८९]

जाळा तुम्ही माझें जाणतें मीपण। येणें माझा खून मांडियेला ॥ १ ॥ खादलें पचे तरी तें हित। ओकलिया थीत पिंड पीडी ॥ २ ॥ तरि भलें भोगे जोडिलें तें धन। पडिलिया खानें जीवनासी ॥ ३ ॥ तुका म्हणे मज तारीं गा विठ्ठला। नेणताचि भला दास तुझा ॥ ४ ॥ [६९०]

कोणाचा कोणाशीं तत्त्वतः संबंध नसून जागच्या जागीं एक शुद्धबुद्ध स्वरूप आहे २. अहो देवा, तुम्हीं आमच्यावर घातलेलें मोहरूपी जाळ्याचें वस्त्र काढून टाका. आम्हांला ह्या मिथ्या प्रपंचाचें वेड बळेंच लावूं नका. ३. अहो देवा, वास्तविक असणारी भेदशून्य स्थिति तुम्हांला ठाऊक असतांना एक जीव व एक शिव अशीं नांवें कां ठेविलींत ? ४. आमच्याकडून सेवा घेण्याविषयींची इच्छा तुमच्यामधें असल्यामुळें तुम्हीं कांहीं ह्याचा विचार करीत नाहीं व आम्हांला अनेक योनिरूपी (जन्ममरणांच्या) दारोदार हिंडावयास लाविलें ५. आतां जी स्थिति खरोखर आहे ती कळल्यानंतर जो कांहीं मिथ्याच द्वैतभाव धरला आहे, तो पलीकडे दूर टाका ६. तुकाराम महाराज म्हणतात, थोडक्याशा उदकांत पडलेल्या तान्यांच्या आभासाचे ठिकाणीं मोत्यांचा मोह पावून त्याच्या अभिलाषानें हंस हा चोंच कुटून नाशाप्रत जातो ७. [६८७]

भिन्न भिन्न पंचभूतें एके ठिकाणीं मिळून देह तयार झाला व देवाच्या मायेनें तो देह मी आहें अशा प्रकारचा दृढ अहंकार जीवात्म्याच्या मागें लावला १. देहाशीं अर्थाअर्थी जीवात्म्याचा कांहीं संबंध नसून हा देह मी आणि देहसंबंधीं माझें हें ओझें हा जीवात्मा काय म्हणून वागवितो ? काळाचें खाजें (खाद्य) जो देह त्याविषयींचा हा मोह कां धरतो ? २. वास्तविक जीव हा अमर आहे. तो जुनें वस्त्र टाकून नवें वस्त्र घ्यावें त्याप्रमाणें जीर्ण देह टाकून नूतन देह स्वीकारितो, कारण पूर्व जन्मामध्यें केलेल्या शुभाशुभ कर्माचा भोग घेण्याकरितां ३. अनेक जन्मांना हेतुभूत जें कर्म त्या कर्माचा वेलविस्तार इच्छेमुळें होतो, म्हणून त्या इच्छेला कुंठित करावें, हा बोल सत्य (हेंच साधन सत्य आहे). तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांनीं आपली इच्छा नाहींशी केली तेच गुह्य ब्रह्मस्थितीला प्राप्त होतील ४. [६८८]

जे जे कोणी मला भेटतील त्यांना हेंच विचारावेंसें वाटतें १. देव मजवर कृपा करून माझी लज्जा रक्षण करील काय ? २. मला सर्व विषयांविषयींचा विसर होऊन हाच उद्योग राहिला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, (ध्रुवपदांत उल्लेख केलेल्या) माझ्या प्रश्नाचें उत्तर देणारे मला कोण भेटतील, ह्याविषयीं मी चिंता करीत आहें ४. [६८९]

अहो देवा, जाणतेपणाचा अभिमान माझा घात करीत आहे म्हणून तुम्ही तो जाळावा १. जो पदार्थ सेवन करितों त्याचें पचन होण्यांत हित आहे (तुष्टि पुष्टि होते), पण तो पदार्थ जर पचला नाहीं तर वांती होईल व चांगल्या देहास मात्र पीडा होईल (तसें ज्ञानाभिमानाच्या योगानें परपार्थापासून होणारा लाभ न होतां हानि मात्र होईल) २. मिळविलेल्या धनाचा उपभोग घेतला तरच चांगलें. नाहीं तर दरोडा पडून उपजीविकेचें साधन जें धन तें नाहींसें होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, तुमचा मी अज्ञानी दासच भला आहें, म्हणून मला तुम्ही तारा ४. [६९०]

यातो मतिहीन रूपें लीन दीन । आणीक अवगुण जाणोनियां ॥ १ ॥ केला त्या विठ्ठलें माझा अंगीकार । ऐसा हा विचार जाणोनियां ॥ २ ॥ जें कांहीं करितों तें माझें स्वहित । आली हे प्रचित कळों चित्ता ॥ ३ ॥ झालें सुख जीवा आनंद अपार । परमानंदें भार घेतला माझा ॥ ४ ॥ तुका म्हणे यासी नांवाचा अभिमान । म्हणोनि शरण तारी बळें ॥ ५ ॥ [६९१]

बहु उतावीळ भक्तीचिया काजा । होसी केशीराजा मापबाप ॥ १ ॥ तुझ्या पायीं मज जालासे विश्वास । म्हणोनियां आस मोकलिली ॥ २ ॥ ऋषि मुनि सिद्ध साधक अपार । कळला विचार त्यांसी तुझा ॥ ३ ॥ नाहीं नास तें सुख दिलें तयांस । झाले जे उदास देह(सर्व)भावें ॥ ४ ॥ तुका म्हणे सुख न मावे(ये) मानसीं । धरिले जीवेंसी पाय तुझे ॥ ५ ॥ [६९२]

मायामोहजाळीं होतों सांपडलों । परि या विठ्ठला कृपा आली ॥ १ ॥ काढूनि बाहेरी ठेविलों निराळा । कवतुक डोळां दाखविलें ॥ २ ॥ नाचे उडे माथा करी कवतुक । नाशिवंत सुखें साच केलीं ॥ ३ ॥ रडे फुंदे दुःखें कुटितील माथा । एकासी रडतां तेंही मरे ॥ ४ ॥ तुका म्हणे मज वाटतें नवल । मी माझे हे बोल ऐकोनियां ॥ ५ ॥ [६९३]

देहभाव आम्ही राहिलों ठेवूनि । निवांत चरणीं विठोबाच्या ॥ १ ॥ आमुच्या हिताचा जाणोनि उपाव । तेंचि पुढें देव करितसे ॥ २ ॥ म्हणउनी नाहीं सुख दुःख मनीं । ऐकिलिया कानीं वचनाचें ॥ ३ ॥ जालों मी निःसंग निवांत एकला । भार त्या विठ्ठला घालूनियां ॥ ४ ॥ तुका म्हणे जालों जयाचे अंकित । तोचि माझें हित सर्व जाणे ॥ ५ ॥ [६९४]

आलें फळ तेव्हां राहिलें पिकोन । जरि तें जतन होय देठीं ॥ १ ॥ नामेंचि सिद्धि नामेंचि सिद्धि ।

मी हलक्या जातीचा व मंदबुद्धीचा असून रूपानें कुरूप असा सर्वतोपरी दीन आहें; ह्याशिवाय आणीकहि अवगुण माझ्या ठिकाणीं असलेले जाणून १. आणि मग मी अशा प्रकारचा आहें हा सर्व विचार करून पांडुरंगांनीं माझा अंगीकार केला २. पांडुरंग जें कांहीं करीत आहेत तें माझे स्वहिताचें आहे हा अनुभव माझ्या चित्ताला पूर्णपणें आला आहे ३. माझ्या जिवाला अपार सुख व आनंद झाला, कारण परमानंदस्वरूप जो हरि त्यानें माझा सर्व भार घेतला आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, देवाला आपल्या नांवाचा अभिमान आहे, म्हणून शरण आलेल्या जिवांना स्वसामर्थ्यानें ते तारितात ५. [६९१]

अहो केशीराजा, मायबापा, भक्तकार्य करण्याविषयीं तुम्ही फार उतावळे आहांत १. तुमच्या चरणीं माझा विश्वास आहे म्हणून मी सर्व आशा टाकली २. ऋषि, मुनि, आदिकरून अपार सिद्धसाधकांना तुमच्या स्वरूपाचा विचार समजला ३. म्हणून ते देहाविषयीं उदास झाले हें जाणून कालत्रयीं ज्या सुखाचा नाश नाहीं असें सुख तुम्हीं त्यांना दिलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणून मी तुमचे पाय जिवाशीं धरिले. त्यायोगानें माझ्या मनामध्यें सुख मावेनासें झालें ५. [६९२]

मी मायामोहाच्या जाळ्यामध्यें सांपडलों होतों पण पांडुरंगांना माझी दया आली १. म्हणून त्यांनीं मला त्यांतून बाहेर काढून ठेविलें व मायामोहाच्या जाळ्यांत सांपडलेल्या जिवांचें आश्चर्य दाखविलें २. मायेनें सर्वांना देहाभिमानाच्या योगानें नाचावयास लावून नाशिवंत विषयसुखें हीं खरीं भासविण्याचीं कौतुकें केलीं ३. त्यायोगानें सर्व जीव रडतात, स्फुंदतात व विषयसुखाकरितां डोकेफोड करितात व एखादा आपला जिवलग मेला तर त्याच्याकरितां रडणारा तोही मरतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशा मिथ्या देहादि प्रपंचाविषयीं जीवांचे 'मी' आणि 'माझें' हे बोल ऐकून मजला नवल वाटतें ५. [६९३]

आम्ही आपला देहभाव विठोबाच्या चरणीं ठेवून निवांत राहिलों १. आतां आमचें हित ज्या योगानें होईल तें जाणून तोच उपाय देव करितो २. असें वचन आम्हीं कानानें ऐकलें, म्हणून आमच्या मनामध्यें कोणत्याहि प्रकारचें सुखदुःख नाहीं ३. मीं आपला सर्व भार देवावर घालून निःसंग असा एकटा राहिलों ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही ज्याच्या अंकित झालों आहों तोच आमचें सर्व हित जाणतो ५. [६९४]

जें फळ आलेलें आहे, तें जर देठास जतन होईल तर तें पिकेल १. त्याप्रमाणें नामानेंच परमार्थसिद्धि होईल पण

व्यभिचार बुद्धि न पवतां ॥ २ ॥ चालिला पंथ तो पाववील ठाया । जरि आड तया न ये कांहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मध्यें पडती आघात । तेणें होय घात हानि लाभा ॥ ४ ॥ [६९५]

विरोधाचें मज न साहे वचन । बहु होतें मन कासावीस ॥ १ ॥ म्हणऊनि जीव न साहे संगति । बैसतां एकांतीं गोड वाटे ॥ २ ॥ देहाची भावना वासनेचा संग । नावडे उबग आला यांचा ॥ ३ ॥ तुका म्हणे देव अंतरे यामुळें । आशामोहजाळें दुःख वाढे ॥ ४ ॥ [६९६]

तुजशीं संबंधचि खोटा । परता परता रे तूं थोटा ॥ १ ॥ देवा तुझें काय घ्यावें । आपआपणां ठकावें ॥ २ ॥ जेथें मुदल न ये हातां । व्याजें मरावें लेखितां ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसा । त्रिभुवनीं तुझा ठसा ॥ ४ ॥ [६९७]

याचि हाका तुझे द्वारीं । सदा देखों ऋणकरी ॥ १ ॥ सदा करिसि खंड दंड । देवा बहु गा तूं लंड ॥ २ ॥ सुखें गोंविसी भोजना । लपवूनियां आपणां ॥ ३ ॥ एकें एक बुझाविसी । तुका म्हणे ठक होसी ॥ ४ ॥ [६९८]

आम्ही जाणों तुझा भाव । दृढ धरियेले पाव ॥ १ ॥ फांकों नेदूं चुकावितां । नेघों थोडें बहु देतां ॥ २ ॥ बहुतां दिसांचें लिगाड । आलें होत होत जड ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां नेघों सर्वस्वही देतां ॥ ४ ॥ [६९९]

ऋण वैर हत्या । हें तो न चुके न देतां ॥ १ ॥ हें कां नेणां पांडुरंगा । तुम्ही सांगतसां जगा ॥ २ ॥ माझा संबंध तो किती । चुकवा लोकांची फजिती ॥ ३ ॥ तुका म्हणे याचि साठीं । मज घेतां नये तुटी ॥ ४ ॥ [७००]

तें नाम व्यभिचारबुद्धिरहित (संसाराकडे मनाला जाऊं न देतां) घेतलें पाहिजे २. ज्या गांवाचा जो पंथ आहे, त्या पंथाचा आश्रय केल्यास तो त्या ठिकाणीं पोंचवील, पण मध्यंतरीं कांहीं विघ्न न येईल तर ३. तुकाराम महाराज म्हणतात, परमार्थमार्गामध्यें विघ्नें येतात, म्हणून होणाऱ्या लाभाची हानि होते ४. [६९५]

जें वचन परमार्थाच्या विरोधी आहे तें मला सहन होत नाहीं, म्हणजे तो शब्द ऐकिल्याबरोबर माझें मन फार कासावीस होतें १. ह्याकरितां माझ्या जिवास कोणाचीही संगति सहन होत नाहीं. एकांतीं राहाण्यांतच मनास आनंद वाटतो २. देहबुद्धि धरणें व वासनेचा संग करणें मला आवडत नाहीं. त्याचा सर्वपरी त्रास झाला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा मोहाच्या जाळ्यांत सांपडल्यानें दुःख वाढतें व देवामध्यें अंतराय येतो (देव अंतरतो) ४. [६९६]

अरे थोट्या देवा, तुझ्याशीं संबंध करणें हें खोटें आहे. तूं आमच्यापासून दूर असावें हें बरें १. कारण तुझ्या संगतीनें कांहीं फायदा नसून आम्ही मात्र फसले जातों २. जसें बोऱ्या (कफल्लक) कुळाशीं व्यवहार केला तर तेथें मुद्दल तर प्राप्त होत नाहीं, पण व्याजाचा हिशोब करितां मरण्याचा प्रसंग येतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याप्रमाणें भक्तजनांना फसविण्याविषयीं तुझी प्रसिद्धि आहे ४. [६९७]

(पूर्वोक्त संबंध–)देवा, तुझ्या द्वारांत सर्वकाळ भक्त ह्या ऋणकऱ्यांना(सावकारांना) तूं टकविणारा आहेस अशा भक्तांच्या आरोळ्या चालू आहेत १. अगा देवा, तूं नेहमीं कोणाशीं करार (वायदा) ‘आषाढीला या, कार्तिकीला या’ असे करतोस व दंडही करतोस असा तूं मोठा लंड आहेस २. कोणी भक्त धनको तुझ्याकडे इच्छित मागण्याकरितां आल्यास त्यांस भोजन म्हणजे कोणत्याही एकाद्या फलाशेंत गुंतवून आपण लपून राहातोस ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांचें इच्छित त्यांना न देतां कांहीं तरी देऊन त्यांची समजूत घालतोस, असा तूं ठक आहेस ४. [६९८]

देवा, तूं वर सांगितल्याप्रमाणें मोठा ठक आहेस हा तुझा भाव आम्ही जाणून तुझे पाय बळकट धरले आहेत १. आतां थोडें फार कांहीं देऊन तूं चुकवाचुकवी करूं लागल्यास आम्ही तें न घेतां तुला हालूं देणार नाहीं २. आमचे सेवारूपी कर्जाचें लचांड तुझ्यामागें बहुत दिवस असल्यामुळें तें फार तुला जड झालें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां तें कर्ज फेडण्याकरितां तूं आपलें सर्वस्व जरी दिलें तरी आम्ही घेणार नाहीं ४. [६९९]

एखाद्याचें कर्ज, एखाद्याशीं जोडलेलें शत्रुत्व आणि एखाद्याला जीवें मारण्याची हत्या ह्या तिहींचा मोबदला दुसऱ्या जन्मांत दिल्याशिवाय सुटका होणार नाहीं १. हा निवाडा तुम्हीं जगतांत प्रसिद्ध अशा शास्त्रमुखानें केला आहे, तो तुम्हीं जाणत नाहीं काय ? २. हें सुचविण्यांत माझाच संबंध फारसा आहे असें नाहीं, तर तुमच्या वागण्यानें लोकांत तुमची फजिती होत आहे ती चुकवा अगर संसारानें होणारी लोकांची फजिती चुकवा ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां मला मागें सरतां येत नाहीं ४. [७००]

नाहीं मागितला । तुम्हां मान म्यां विठ्ठला ॥ १ ॥ जे हे करविली फजिती । माझी एवढी जनांहातीं ॥ २ ॥ नाहीं केला पोट । पुढें घालूनि बोभाट ॥ ३ ॥ तुका म्हणे धरुनि हात । नाहीं नेलें दिवाणांत ॥ ४ ॥ [७०१]

तूं पांढरा स्फटिक मणी । करिसी आणिकां त्याहुनी ॥ १ ॥ म्हणोनि तुझ्या दारा । न येचि ठकती दातारा ॥ २ ॥ तुझी ठावी नांदणूक । अवघा बुडविला लौकिक ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्याचें वेसी । त्यासी हेंचि दाखविसी ॥ ४ ॥ [७०२]

बोलतों निकुरें । नव्हती सलगीचीं उत्तरें ॥ १ ॥ माझें संतापलें मन । परपीडा ऐकोन ॥ २ ॥ अंगावरि आलें । तोंवरि जाईल सोसिलें ॥ ३ ॥ तुज भक्ताची आण देवा । जरि तुका येथें ठेवा ॥ ४ ॥ [७०३]

बुद्धीचा जनिता लक्ष्मीचा पति । आठवितां चित्तीं काय नव्हे ॥ १ ॥ आणिकां उपायां कोण वांटी मन । सुखाचें निधान पांडुरंग ॥ २ ॥ गीतीं गावों नाचों छंदें वाहों टाळी । वैष्णवांचे मेळीं सुखरूप ॥ ३ ॥ अनंत ब्रह्मांडें एक रोमावळीं । आम्हीं केला भोळीं भावें उभा ॥ ४ ॥ लटिका हा केला संवसारसिंधु । मोक्ष करी बंधु नाहीं पुढें ॥ ५ ॥ तुका म्हणे ज्याच्या नामाचे अंकित । राहिलों निश्चिंत त्याच्या बळें ॥ ६ ॥ [७०४]

न लगे मायेसी बाळ निरवावें । आपुल्या स्वभावें ओढे त्यासी ॥ १ ॥ मज कां लागला करणें विचार । ज्याचा जार भार त्याचे माथां ॥ २ ॥ गोड धड त्यासी ठेवी न मागतां । समाधान खातां नेदी मना ॥ ३ ॥ खेळतां गुंतलें उमगूनी आणी । बैसोनियां स्तनीं लावी बळें ॥ ४ ॥

अहो विठ्ठला, तुमच्याजवळ मीं कांहीं मान मागितला नाहीं १. असें असून जनांकडून मला जो मान मिळत आहे ही माझी फजिती तुम्हीं कां करविली? २. पोट भरण्याचें निमित्त पुढें करून तुमच्याकडे मीं गाऱ्हाणें केलें नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी तुमचा हात धरून तुम्हांला कधीं दिवाणी कचेरींत नेलें नाहीं (संतांकडे नेलें नाहीं) ४. [७०१]

देवा, तूं (वाटोळ्या) पांढऱ्या स्फटिक मण्यासारखा आहेस. त्याचप्रमाणें तुझ्याकडे जे कोणी येतात त्यांचें वाटोळें आपल्याहिपेक्षां जास्त करितोस १. हे दात्या, असे हे फसले जातात म्हणून तुझ्या दाराशीं कोणी येत नाहींत २. तूं सर्व लौकिकबुडव्या आहेस. ही तुझी रीत आम्हांस ठाऊक आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचें सेवारूपी कर्ज तुम्हीं घेतां त्याला तुम्हीं ही आपली ठकविण्याची रीत दाखवितां ४. [७०२]

देवा, निकराला येऊन मी तुझ्याशीं भाषणें करीत आहें. हीं माझीं उत्तरें सलगीचीं नाहींत १. कारण तुझ्या कृतीनें दुसऱ्या भक्तांना त्रास झालेला ऐकून माझ्या मनास संताप झाला आहे २. कोणत्याहि प्रकारचा त्रास मला होत होता, तोंपर्यंत सोसला ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा जर येथें मला ठेवशील तर तुला तुझ्या भक्तांची शपथ आहे ४. [७०३]

सुबुद्धिदाता लक्ष्मीचा पति विष्णु आहे. त्याचा चित्तांत आठव केल्यावर काय प्राप्त होणार नाहीं? १. सुखाचा ठेवा जो पांडुरंग त्यास सोडून अन्य उपायांचे ठिकाणीं मनाची वांटणी कोणीं करावी? २. वैष्णवांच्या समुदायामध्यें आनंदानें गाऊं, नाचूं आणि तालछंदांत टाळी वाजवूं ३. अनंत ब्रह्मांडें ज्याच्या एका रोमावर आहेत अशा श्रीहरीस आम्हीं वर निर्दिष्ट केलेल्या भोळ्या भावानें विटेवर उभा केला आहे ४. हा भवसागर आम्हीं मिथ्या जाणला म्हणून ह्यापुढें मोक्ष-बंधावस्था आमचे ठिकाणीं वास्तविक नाहींत ५. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या नामाच्या अंकित आम्ही झालों आहों त्याच्याच बलानें आम्ही चिंताविरहित आहों ६. [७०४]

बालकांचें रक्षण कर अशी सूचना आईस करण्याचें कारण नाहीं. तिला स्वभावतःच मोहानें रक्षणाची ओढ असते १. ज्याच्यापासून आम्ही उत्पन्न झालों, त्याच्या शिरीं सर्व भार आहे; म्हणून मला काळजी करण्याचें काय कारण आहे? २. मातोश्री जे कांहीं गोड पदार्थ करिते ते बालकानें न मागतां त्याच्याकरितां ठेविते. त्याला सोडून खाण्यानें तिच्या मनास समाधान वाटत नाहीं ३. तें बालक बाहेर कोठें खेळत असलें तर त्याचा शोध करून घरीं आणते आणि आग्रहानें

त्याच्या दुःखें पडे आपण खापरीं। लाही तळीं वरी होय जैसी ॥ ५ ॥ तुका म्हणे देह विसरे आपुला। आघात तो त्याला लागो नेदी ॥ ६ ॥ [७०५]

ब्राह्मण तो नव्हे ऐसी ज्याची बुद्धि। पाहा श्रुतीमधीं विचारुनि ॥ १ ॥ जयासी नावडे हरिनामकीर्तन। आणीक नर्तन वैष्णवांचें ॥ २ ॥ सत्य त्याचे वेळे घडला व्यभिचार। मातेशीं वेव्हार अंत्यजाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें मानी आनसारिखें। तात्काळ तो मुखें कुष्ठ होय ॥ ४ ॥ [७०६]

ब्राह्मण तो याती अंत्यज असतां। मानावा तत्वतां निश्चयेंसी ॥ १ ॥ रामकृष्णनाम उच्चारी सरळ। आठवी सांवळें रूप मनीं ॥ २ ॥ शांति क्षमा दया अलंकार अंगीं। अभंग प्रसंगीं धैर्यवंत ॥ ३ ॥ तुका म्हणे गेल्या षडउर्मी अंग। सांडुनियां मग ब्राह्मण तो ॥ ४ ॥ [७०७]

एका करिती गुरु गुरु। भोंवता भारु शिष्यांचा ॥ १ ॥ पूंस नाहीं पाय चारी। मनुष्य परी कुतरीं तीं ॥ २ ॥ परस्त्री मद्यपान। पेंडखाण माजविलें ॥ ३ ॥ तुका म्हणे निर्भर चित्तीं। अधोगती जावया ॥ ४ ॥ [७०८]

एका पुरुषा दोघी नारी। पाप वसे त्याचे घरीं ॥ १ ॥ पाप न लगे धुंडावें। लागेल तेणें तेथें जावें ॥ २ ॥ कांहीं दुसरा विचार। न लगे करावाचि फार ॥ ३ ॥ असत्य जे वाणी। तेथें पापाचीच खाणी ॥ ४ ॥ सत्य बोले मुखें। तेथें उचंबळती सुखें ॥ ५ ॥ तुका म्हणे दोन्ही। जवळीच लाभ हानी ॥ ६ ॥ [७०९]

जळतें संचित। ऐसी आहे धर्मनीत ॥ १ ॥ माझ्या विठोबाचे पाय। वेळोवेळां मनीं ध्याय ॥ २ ॥ नेदी कर्म घडो। कोठें आडरानें पडो ॥ ३ ॥ तुका म्हणे मळ। राहों नेदी ताप जाळ ॥ ४ ॥ [७१०]

त्यास स्तनपान करविल्ये ४. बालकास कांहीं दुःख झालें तर त्यायोगानें, भाजण्याच्या खापरांत लाही तडफडते, तसें तिचें चित्त कासावीस होतें ५. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच्या मोहानें आई आपल्या देहाला देखील विसरल्ये, पण ज्यायोगें त्याला ताप न होईल तो उपाय करल्ये ६. [७०५]

ज्यांची बुद्धि (ध्रुवपदांत सांगितल्याप्रमाणें) आहे तो ब्राह्मण नव्हे ह्या संबंधानें वेदश्रुतीमधील वाक्याचा विचार करून पाहा (म्हणजे तुम्हांस कळेल) १. ज्यास हरिनामाचें कीर्तन आवडत नाहीं आणि वैष्णवांचें नृत्य आवडत नाहीं (तो ब्राह्मण नाहीं) २. तो जरी ब्रह्मकुलांत जन्मास आला तरी त्याच्या गर्भधारणेच्या वेळेस त्याच्या आईशीं खरोखर अंत्यजाचा संबंध झाला असावा ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यांत कोणी अन्यथा मानील त्याच्या मुखाला तात्काळ कोड फुटेल ४. [७०६]

जातीचा जरी महार तरी (ध्रुवपदांत सांगितल्याप्रमाणें) जर त्याची वागणूक आहे तर निश्चयानें तो ब्राह्मण आहे असें मानावें १. सरळ राम कृष्ण नामाचा जो उच्चार करितो व श्रीहरीचें सांवळें रूप मनांत आठवितो (तो ब्राह्मण होय) २. शांति, क्षमा, दया इत्यादि वृत्तींचे अलंकार ज्याच्या अंगावर आहेत व विशेष प्रसंगीं ज्याचें धैर्य न भंगणारें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, कामादि षड्ऊर्मि हृदयास सांडून गेल्यावर तो ब्राह्मण आहे असें समजावें ४. [७०७]

कित्येक आपल्याभोंवतीं शिष्यांचा समुदाय जमवून आपणास गुरु म्हणवितात १. शेंपूट व चार पाय-रहित मनुष्यरूपानें तीं कुत्रींच आहेत २. परस्त्रीगमन व मद्यपान हेंच कोणी जनावरांचें खाणें त्यांनीं वाढविलें तें ते खाऊं लागले ३. तुकाराम महाराज म्हणतात, अधोगतीला जाण्याविषयीं त्यांचें चित्त निष्काळजी आहे (अधोगतीचें भय बाळगीत नाहीं) ४. [७०८]

ज्या मनुष्यास दोन बायका आहेत त्याच्या घरीं पापाची वस्ति आहे १. ज्यास पाप पाहिजे असेल त्यानें दुसरीकडे शोध न करितां त्याचे घरीं जावें (म्हणजे पाप मिळेल) २. ह्याविषयीं दुसरा कांहीं फार विचार करावयास नको ३. जो नेहमीं खोटें बोलतो तो पाप निर्माण होण्याची खाणच आहे ४. जो मुखानें नेहमीं खरें बोलतो तेथें सर्व सुखाचा पूर येतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, लाभ आणि हानि हीं दोन्हीं खरें खोटें वागणाराजवळ आहेत ६. [७०९]

संचित कर्म जळून जातें अशी धर्मनीति आहे १. म्हणून माझ्या विठोबाच्या पायांचें वेळोवेळां मनांत ध्यान करावें २. त्या योगानें कोणतेंहि पापकर्म घडणार नाहीं व आडरानामध्यें पडण्याचा प्रसंग येणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, विठोबाचें चिंतन हें पापमळ व तापजाळ राहूं देत नाहीं ४. [७१०]

संतांपाशीं बहु असावें मर्यादा । फलकटाचा धंदा उर फोडी ॥ १ ॥ बासर तो भुंके गाढवाचे परी । उडे पाठीवरी दंड तेणें (यमदंड) ॥ २ ॥ समय नेणें तें वेडें चाहाटळ । अवगुणाचा ओंगळ मान पावे ॥ ३ ॥ तुका म्हणे काय वायां चाळवणी । पिटपिट घाणी हागवणीची ॥ ४ ॥ [७११]

घेसी तरी घेईं संतांची हे भेटी । आणीक ते गोष्टी नको मना ॥ १ ॥ सर्वभावें त्यांचें देव भांडवल । आणीक ते बोल न बोलती ॥ २ ॥ करिशील तो करीं संतांचा सांगात । आणीक ते मात नको मना ॥ ३ ॥ बैससी तरी बैस संतांचे मधीं । आणीक ते बुद्धि नको मना ॥ ४ ॥ जासी तरी जाईं संतांचिया गांवा । होईल विसावा तेथें मना ॥ ५ ॥ तुका म्हणे संत सुखाचे सागर । मना निरंतर धणी घेईं ॥ ६ ॥ [७१२]

संतांचिया(ये) गांवीं प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःखलेश ॥ १ ॥ तेथें मी राहीन होऊनि याचक । घालितील भीक तेचि मज ॥ २ ॥ संतांचिया गांवीं वरो भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त ॥ ३ ॥ संतांचें भोजन अमृताचें पान । करिती कीर्तन सर्वकाळ ॥ ४ ॥ संतांचा उदीम उपदेशाची पेंठ । प्रेमसुख साटीं घेती देती ॥ ५ ॥ तुका म्हणे तेथें आणीक नाहीं परी । म्हणोनि भिकारी झालों त्यांचा ॥ ६ ॥ [७१३]

संतांचें सुख झालें या देवा । म्हणउनि सेवा करी त्यांची ॥ १ ॥ तेथें माझा काय कोण तो विचार । वर्णावया पार महिमा त्यांचा ॥ २ ॥ निर्गुण आकार झाला गुणवंत । घाली दंडवत पूजोनियां ॥ ३ ॥ तीर्थें त्यांची इच्छा करिती नित्यकाळ । व्हावया निर्मळ आपणांसी ॥ ४ ॥ अष्टमा(महा) सिद्धींचा कोण आला पाड । वागों नेदी आड कोणी तया ॥ ५ ॥ तुका म्हणे ते हे बळिया शिरोमणी । राहिले चरणीं निकटवासें ॥ ६ ॥ [७१४]

संतांच्याजवळ मोठ्या मर्यादेनें असावें, हलकटपणानें वागल्यास घात होईल १. स्वैराचारी जे आहेत त्यांचें बोलणें गाढवाच्या भुंकण्याप्रमाणें आहे, त्याचें फळ त्याला अंतीं पाठीवर यमदंडानें मिळेल २. ज्यास प्रसंग कळत नाहीं तो मूर्ख चावट आहे. असा जो ओंगळ आहे त्यास अवगुणाची वाईट पदवी मिळते ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याचे चाळे व्यर्थ आहेत, म्हणजे पोराला लागलेल्या हगवणीचे पिटपिटीप्रमाणें त्याचें वागणें घाणेरडें आहे ४. [७११]

हे मना, तुला भेट घ्यावीशी वाटली तर संतांची घे आणि दुसऱ्या कथा सोडून दे १. कारण त्या संतांच्या सर्वभावास देवच एक भांडवल आहे. ते दुसरे शब्द बोलत नाहींत २. हे मना, जर तुला संगति करावीशी वाटली तर संतांची कर, दुसरी वार्ता नको ३. हे मना, तुला बसावेंसें वाटले तर संतांमध्यें बैस; ह्याखेरीज दुसरी बुद्धि धरूं नको ४. हे मना, तुला जावेंसें वाटलें तर संतांच्या गांवीं जा, कारण तेथें तुला विश्रांति मिळेल ५. तुकाराम महाराज म्हणतात, संत हे सुखाचे समुद्र आहेत, ह्याकरितां हे मना, तेथें निरंतर तूं तृप्ति घे ६. [७१२]

संतांच्या गांवामध्यें भगवत्प्रेमाला सुकाळ आहे. तेथें दुःख व तळमळ ह्यांचा लेशहि नाहीं १. त्या ठिकाणीं मी भिकारी होऊन राहीन, म्हणजे त्यांच्याजवळ असलेल्या प्रेमाची मला भिक्षा मिळेल २. संतांच्या गांवामध्यें धनवित्त हें सर्व भांडवल विठ्ठल आहे; म्हणजे त्याचेंच ते नित्य सेवन करितात ३. संत हे नित्य कीर्तनरूपी अमृतपानाचें भोजन करितात ४. संत नेहमीं उपदेशरूपी पेठेमध्यें प्रेमसुखाच्या देवघेवीचा व्यवहार करितात ५. तुकारम महाराज म्हणतात, त्या ठिकाणीं ह्याशिवाय दुसरा कोणताहि प्रकार नाहीं, म्हणून मी त्यांच्याचजवळ याचना करणारा भिकारी आहें ६. [७१३]

संतांच्या संगतीचें सुख देवाला झालें म्हणून तो त्यांची सेवा करितो १. तेथें त्यांचा संपूर्ण महिमा वर्णन करण्याइतका माझा अधिकार काय आहे? २. निर्गुण देव सगुण साकार होऊन संतांची पूजा करितो व त्यांना नमस्कार घालतो ३. अन्य जीवांचें पाप हरण केल्यामुळें तीर्थें मलिन झालीं आहेत, तीं पावन होण्याकरितां त्या संतांच्या चरणस्पर्शाची इच्छा करितात ४. असा ह्या संतांचा अधिकार आहे, म्हणून तेथें अष्ट महासिद्धींची काय किंमत आहे? त्यांना कोणीं समोर फिरकूं देखील देत नाहींत ५. तुकाराम महाराज म्हणतात, ते संत बलवानांमध्यें शिरोमणि आहेत, तथापि त्यांनीं विठोबारायाचे चरणीं निकट वास्तव्य केलें आहे ६. [७१४]

जो मानी तो देईल काई । न मनी तो नेईल काई ॥ १ ॥ आम्हां विठ्ठल सर्वभूतीं । राहो चित्तीं भलतैसा ॥ २ ॥ आधीन तें जना काई । जल्पें वायांविण ठायीं ॥ ३ ॥ वंदी निंदी तुज तो गा । तुका म्हणे पांडुरंगा ॥ ४ ॥ [७१५]

भावबळें कैसा झालासी लहान । मागें संतीं ध्यान वर्णियेलें ॥ १ ॥ तें मज उचित करूनियां देवा । दाखवीं केशवा मायबापा ॥ २ ॥ पाहोनियां डोळां बोलेन मी गोष्टी । आलिंगूनि मिठी देईन पायीं ॥ ३ ॥ चरणीं दृष्टि उभा राहेन समोर । जोडोनियां कर पुढें दोन्ही ॥ ४ ॥ तुका म्हणे उत्कंठित हे वासना । पुरवीं नारायणा आर्त माझें ॥ ५ ॥ [७१६]

कृपाळु म्हणोनि बोलती पुराणें । निर्धार वचनें यांचीं मज ॥ १ ॥ आणीक उपाय नेणेंचि मी कांहीं । तुझें वर्म ठायीं पडे तैसें ॥ २ ॥ नये धड कांहीं बोलतां वचन । रिघालों शरण सर्वभावें ॥ ३ ॥ कृपा करिसी तरी थोडें तुज काम । माझा तरि श्रम बहु हरे ॥ ४ ॥ तुका म्हणे मज दाखवीं श्रीमुख । हरेल या भूक डोळियांची ॥ ५ ॥ [७१७]

सर्वभावें आलों तुजचि शरण । कायावाचामनसहित देवा ॥ १ ॥ आणीक दुसरें नये माझ्या मना । राहिली वासना तुझ्या पायीं ॥ २ ॥ माझिये जीवींचें कांहीं जडभारी । तुजविण वारी कोण दुजें ॥ ३ ॥ तुझे आम्ही दास आमुचा तूं ऋणी । चालत दुरूनी आलें मागें ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां घेतलें धरणें । हिशोबाकारणें भेट देई ॥ ५ ॥ [७१८]

कई मात माझे ऐकती कान । बोलतां वचन संतांमुखीं ॥ १ ॥ केला पांडुरंगें तुझा अंगिकार । मग होईल धीर माझ्या जीवा ॥ २ ॥ म्हणऊनि मुख अवलोकितों पाय । हेचि मज आहे थोरी

जो कोणी आम्हांला मानील तो काय देईल? व जो न मानील तो आमचें काय नेईल? १. सर्व उपाधींहून विलक्षण जो विठ्ठल तो सर्व भूतांच्या ठिकाणीं एक आहे; तो आमच्या चित्तीं कसातरी राहो २. जनांच्या स्वाधीन कांहीं नसतांना ते आपल्या ठिकाणीं व्यर्थ बरळतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, कोणी वंदन करोत अथवा निंदा करोत, तें सर्व माझ्याकडे नसून तुझ्याकडे आहे ४. [७१५]

हे देवा भक्तांच्या भावाच्या बळानें तूं कसा रे लहान झाला आहेस? त्याच ध्यानाचें वर्णन पूर्वी संतांनीं केलें आहे १. हे केशवा मायबापा, तें ध्यान मला कृपा करून दाखवा २. मग मीं आपणांस डोळे भरून पाहीन व हितगुजाच्या गोष्टी सांगेन आणि आलिंगन देऊन चरणांस मिठी घालीन ३. चरणांवर दृष्टि ठेवून दोन्ही हात जोडून मी तुमच्या समोर उभा राहीन ४. तुकाराम महाराज म्हणतात, ही वासना मला अतिशय आहे, म्हणून अहो नारायणा, माझी ही इच्छा पूर्ण करा ५. [७१६]

अहो देवा, तुम्ही कृपाळू आहांत असें पुराणें बोलत आहेत, ह्या वचनाविषयींचा माझ्या ठिकाणीं निश्चय आहे १. ह्यावांचून तुझें वर्म कळेल असे उपाय मी जाणत नाहीं २. मला एकही शब्द धड बोलतां येत नाहीं, म्हणून सर्वभावानें मीं तुला शरण आलों ३. मजवर कृपा करणें हें तर तुला थोडें काम असून त्यांत माझ्या बहुत श्रमाचा परिहार होत आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, मला तूं आपलें श्रीमुख दाखवशील तर माझ्या डोळ्यांची भूक निवारण होईल (डोळ्यांना समाधान होईल). [७१७]

हे देवा, तुला काया, वाचा, मन ह्या सर्व भावानें मी शरण आलों १. तुझ्यावांचून दुसरें कांहीं माझ्या मनास येत नाहीं, म्हणून माझी वासना तुझ्या पायांच्या ठिकाणींच राहिली आहे २. तुझ्यावांचून दुसरें माझ्या जीवाचें जडभारी (संकट) कोण निवारण करील? ३. आम्ही तुझे दास आहों, म्हणून तूं आमचा ऋणी आहेस, हा तुझा आमचा संबंध पूर्वीपासून चालत आला आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आमचें ऋण तुझ्याकडे पुष्कळ दिवसांचें आहे; त्याचा हिशोब मागण्याकरितां आम्ही तुझ्या दारांत धरणें घेतलें आहे, ह्याकरितां तुम्हीं भेट दिलीच पाहिजे. [७१८]

(ध्रुवपदांत दर्शविल्याप्रमाणें) हकीगत संतांच्या मुखानें माझे कान कधीं ऐकतील असें झालें आहे १ ती हकीगत अशी, कीं पांडुरंगानें तुझा अंगीकार केला आहे. असें ऐकिल्यानंतर माझ्या जीवास धीर येईल २. ह्याकरितां आपल्या श्रीमुखाकडे व चरणांकडे मी पाहात आहें, कारण ही आशा मला मोठी लागली आहे ३.

आशा ॥ ३ ॥ माझिया मनाचा हाचि पैं विश्वास । न करीं सायास साधनांचे ॥ ४ ॥ तुका म्हणे मज होईल भरंवसा । तरलों मी ऐसा साच भावें ॥ ५ ॥ [७१९]

दोन्ही हात ठेवुनि कटीं । उभा भीवरेच्या तटीं । कष्टलासी साठीं । भक्तिकाजें विठ्ठला ॥ १ ॥ भागलासी मायबापा । बहु श्रम केल्या खेपा । आम्हांलागीं सोपा । दैत्यां काळ कृतांत ॥ २ ॥ होतासी क्षीरसागरीं । मही दाटली असुरीं । म्हणोनियां घरीं । गौळियाचे अवतार ॥ ३ ॥ केला पुंडलिकें गोवा । तुज पंढरीये(सी) देवा । तुका म्हणे भावा- । साठीं हातीं सांपडसी ॥ ४ ॥ [७२०]

गोड झालें पोट धालें । अवचित वाचे आलें । म्हणतां पाप गेलें । विठ्ठलसें वाचेसी ॥ १ ॥ सत्य माना रे सकळ । उद्धरिला अजामेळ । महापातकी चांडाळ । नामासाठीं आपुलिया ॥ २ ॥ चित्त पावलें आनंदा । सुखसमाधीतें सदा । म्हणतां गोविंदा । वेळोवेळां वाचेसी ॥ ३ ॥ हें जाणती अनुभवी । जया चाड तो चोजवी । तुका म्हणे दावी । रूप तेंचि अरूप ॥ ४ ॥ [७२१]

रवि दीप हिरा दाविती देखणें । अदृश्य दर्शनें संतांचेनी (संताचिया) ॥ १ ॥ त्यांचा महिमा काय वर्णू मी पामर । न कळे साचार ब्रह्मादिकां ॥ २ ॥ तापली चंदन निववितो कुडी । त्रिगुण तो काढी संतसंग ॥ ३ ॥ मायबापें पिंड पाळियेला माया । जन्ममरण जाया संतसंग ॥ ४ ॥ संतांचे वचन वारी जन्मदुःख । मिष्टान्न तें भूक निवारण ॥ ५ ॥ तुका म्हणे जवळी न पाचारितां जावें । संतचरणीं भावें रिघावया ॥ ६ ॥ [७२२]

हरि हरि तुम्ही म्हणा रे सकळ । तेणें मायाजाळ तुटतील ॥ १ ॥ आणिक नका कांहीं गाबाळाचे भरीं । पडों येते थोरी नागवण ॥ २ ॥ भावें तुळसीदळ पाणी जोडा हात । म्हणावें पतित

माझ्या मनाचा विश्वास ह्याविषयींचा आहे, म्हणून मी अन्य साधनांचे सायास करीत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, (ध्रुवपदांत सांगितल्याप्रमाणें) संतांच्या मुखानें हकीगत ऐकिल्यावर मी खरोखर तरलों असा मला भरंवसा येईल ५. [७१९]

हे विठ्ठला, भक्तकार्य करण्याचे कष्ट झाले म्हणून भीमेच्या तीरावर कमरेवर दोन्ही हात ठेवून तूं उभा राहिलास १. हे मायबापा, तूं दैत्यांना काळकृतांत आहेस, आम्हां भक्तांना तूं सोपा आहेस (सदय आहेस), आमचें कार्य करण्याकरितां येरझारा घेण्यांत फार श्रमी झाला आहेस २. तूं क्षीरसागरवासी असतेवेळीं असुरांनीं पृथ्वी भरली म्हणून गवळ्याच्या घरीं अवतार घेतलास ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा! तुला पंढरीस पुंडलिकानें गुंतविलें, कारण तूं भावबळानें हातीं लागतोस ४. [७२०]

अकस्मात् विठ्ठल नाम वाचेस आल्यामुळें गोड लागलें, पोट भरलें, आणि पापहि निवृत्त झालें (गेले) १. अहो सर्व जन हो! हें तुम्ही खरें माना; कारण अजामेळ महापातकी चांडाळ असूनहि आपल्या नामाकरितां देवांनीं त्याचा उद्धार केला २. गोविंद हें नाम वाचेनें वेळोवेळीं घेतल्यानें चित्ताला आनंद मिळून, तें सर्व काळ सुखसमाधिस्थ झालें ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव अरूप असून रूपास येतो, हें अनुभवी जाणतात आणि ज्याला गरज आहे, तो हें रूप शोधीत येतो ४. [७२१]

सूर्य, दिवा आणि हिरा हे तेजस्वी पदार्थ दृश्य (दिसणारे) पदार्थ उजेडांत आणतात पण न दिसणारें जें विठोबारायाचें रूप त्याचें दर्शन संत करून देतात १. अशा ह्या संतांचें माहात्म्य ब्रह्मादिकांना खरोखर कळत नाहीं. त्याचें वर्णन म्यां पामरानें काय करावें? २. चंदन आपल्या शीतळपणानें तप्त तनूस शांत करितें, पण त्रिगुणाची बाधा दूर करणें चंदनाच्या अंगीं नसून संतसंगानें दूर होते ३. जन्म देणारे आईबाप पुत्राचें मायेनें पालन करितात, पण जन्ममरणाचें निवारण त्यांचेकडून न होतां संतसंगानें होतें ४. मिष्टान्नानें भुकेचें निवारण होतें, पण जन्मदुःखाचें होत नाहीं, तें संतांच्या वचनांनीं होतें ५. तुकाराम महाराज म्हणतात, संतांनीं बोलाविल्यावांचून श्रद्धेनें त्यांच्यापाशीं जावें ६. [७२२]

अहो सकळ जनहो, तुम्ही हरि हरि म्हणा, त्या योगानें सकळ मायाजाळाचा नाश होईल १. हरिचिंतनावांचून अन्य गबाळ (क्षुद्र) साधनांच्या भरीस पडूं नका, तेथें मोठी नागवण आहे २. हरीस भावार्थानें तुळशीदळ व पाणी अर्पण

वेळोवेळां ॥ ३ ॥ तुका म्हणे हा तंव कृपेचा सागर । नामासाठीं पार पाववील ॥ ४ ॥ [७२३]

ऐसे कुळीं पुत्र होती । बुडविती पूर्वजां ॥ १ ॥ चाहाडी चोरी भांडवला । वांटा आला भागासी ॥ २ ॥ त्याचियानें दुःखी मही । भार तेही न साहे ॥ ३ ॥ तुका म्हणे ग्रामपशु । केला नाशु आयुष्या ॥ ४ ॥ [७२४]

गांठोळीस धन भाकावी करुणा । दावूनि सज्जना कींव पीडी ॥ १ ॥ नाठेळाची भक्ति कुचराचें बळ । कोरडें वोंगळ मार खाय ॥ २ ॥ सांडोव्यासी घाली देवाची करंडी । विल्हाळ त्या धोंडी पूजा दावी । तुका म्हणे ऐसे माकडाचे छंद । अवघे धिंद धिंद सिंदळीचे ॥ ४ ॥ [७२५]

आतां जागा रे (भाई) जागा रे । चोर निजल्या नाडूनि भागा रे ॥ १ ॥ कैसें असोनि टाउकें नेणां । दुःख पावाल पुढिले पेणा ॥ २ ॥ आतां नका रे भाई नका रे । आहे गांठीं तें लुटवूं लोकां रे ॥ ३ ॥ तुका म्हणे एकाच्या घायें । कां रे जाणोनि न धरा भय ॥ ४ ॥ [७२६]

मुदल जतन झालें । मग लाभाचें काय आलें ॥ १ ॥ घरीं देउनि अंतर गांठी । राखा पारिख्यां न सुटे मिठी ॥ २ ॥ घाला पडे थोडेंच वाटे । काम मैंदाचे चपेटे ॥ ३ ॥ तुका म्हणे वरदळ खोटें । फांसे अंतरींच्या कपटें ॥ ४ ॥ [७२७]

मज अंगाच्या अनुभवें । कांहीं वाईट बरें ठावें ॥ १ ॥ झालों दोहींचा देखणा । न ये मागें पुढेंही मना ॥ २ ॥ वोस वसती ठावी । परि हे चाली दुःख पावी ॥ ३ ॥ तुका म्हणे घेऊं देवा । सवें करूनि बोळावा ॥ ४ ॥ [७२८]

करून हात जोडून "मी पतित आहें" असें वेळोवेळां म्हणा ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरि हा कृपेचा सागर आहे, म्हणून आपल्या नामाकरितां आपल्या भक्तांना भवसमुद्रांतून पार करील ४. [७२३]

(ध्रुवपदांत दर्शविल्याप्रमाणें) कुळामध्यें जे पुत्र होतात, ते पूर्वजांना अधोगतीला नेतात १. निरंतर चहाडी-चोरी करणें, हेंच भांडवल ज्यांच्या वांट्यास आलें आहे २. त्यांच्या योगानें पृथ्वी दुःखी असते, म्हणून त्यांचा भार तिला सहन होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे हे नर कुत्र्याप्रमाणें असून त्यांनीं आपल्या सर्व आयुष्याचा नाश केला ४. [७२४]

पदरीं धन असून जो दुसऱ्याजवळ, मजजवळ कांहीं नाहीं, अशी करुणा भाकून सज्जनांस पीडा करितो १. ढोंग्याची भक्ति व कामांत कुचराई करणाऱ्याच्या आंगची शक्ति निरुपयोगी व ओंगळ असल्यामुळें त्यास मार खावा लागतो २. रस्त्यावर देवाची संबळी मांडून, आंतील दगडाच्या देवांच्या पूजेचा पसारा दाखवितो (घरच्या देवाची संबळी कोपऱ्यांत टाकून देतो आणि रस्त्यावरच्या एखाद्या दगडाची पूजा करून त्याची शोभा दाखवितो) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे सर्व मर्कटाचे छंद आहेत, अथवा छिनाल स्त्रीचे निंद्य ढंग आहेत ४. [७२५]

अरे बाबांनो, आतां तुम्ही सावध राहा, कारण कामक्रोधादि वृत्तिरूपी चोर निजलेले आहेत (लीन आहेत) तोंपर्यंत त्यांना चुकवून देवाकडे पळा १. पुढच्या जन्मांत दुःख आहे हें तुम्हांस ठाऊक असून कसें कळत नाहीं ? २. अरे बाबांनो, तुमचे शिलकेस असलेलें आयुष्य लोकव्यवहारांत घालवूं नका (असें द्विरुक्तीनें सांगतात) ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या प्रपंचांत कित्येकांना दुःख होत आहे, हें जाणून तुम्हीं कां भय धरीत नाहीं ? ४. [७२६]

अहो जनहो, जर मुद्दलाचें जतन होईल, तर लाभ होणें हें काय सहज आहे १. हृदयमंदिरांत भावाच्या भांडवलास आंतली गांठ देऊन कामक्रोधादि परक्या चोरांच्या हातीं तें लागूं नये असें रक्षण करा २. ह्या कामरूपी मैंदाचा (लबाडाचा) घाला सूक्ष्म मार्गानें तुमच्यावर पडेल, तेव्हां सावध राहा (म्हणून ध्रुवपदांत दर्शविल्याप्रमाणें रक्षण करा) ३. तुकाराम महाराज म्हणतात, अंतःकरणांत कपटाचे फांसे ठेवून बाह्यात्कारी दंभ मिळविणें (वर वर भक्ति करणें) खोटें आहे ४. [७२७]

मला स्वतःच्या अनुभवानें एक वाईट, एक बरें असें कळून आलें १. ह्या दोहींचा साक्षी झालों, ह्याकरितां मागें झालेलें व पुढें होणारें माझ्या मनास येत नाहीं २. (हें जगरूपी) गांव ओस आहे, असें ठाऊक असून त्या गांवास जाणें हें दुःखप्रद आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां मार्गानें सुरक्षित पोंचविणारा देव बरोबर घेऊं ४. [७२८]

पाववावें ठाया । ऐसें सवें बोलों तया ॥ १ ॥ भावा ऐसी क्रिया राखे । खोट्या खोटेपणें वाखे ॥ २ ॥ न ठेवूं अंतर । कांहीं भेदाचा पदर ॥ ३ ॥ तुका म्हणे जीवें भावें । सत्य मानविजे देवें ॥ ४ ॥ [७२९]

मोल देऊनियां सांठवावे दोष । नटाचे ते वेश पाहोनियां ॥ १ ॥ हरिदासां मुखें हरिकथाकीर्तन । तेथें पुण्यापुण्य विशेषता ॥ २ ॥ हरितील वस्त्रें गोपिकांच्या वेशें । पाप त्या सरिसें मात्रागमन ॥ ३ ॥ तुका म्हणे पाहा कैसे झाले जन । सेवाभक्तिहीन रसीं गोडी ॥ ४ ॥ [७३०]

बहु खेद क्षीण । आलों सोसुनियां वन ॥ १ ॥ विठोबा विसांविया विसांविया । पडों देई पायां ॥ २ ॥ बहुतां काकुलती । आलों सोसिली फजिती ॥ ३ ॥ केली तुजसाठीं । तुका म्हणे येवढी आटी ॥ ४ ॥ [७३१]

कां गा धर्म केला । असोन सत्तेचा आपुला ॥ १ ॥ उभाउभीं पाय जोडीं । आतां फांकों नेदीं घडी ॥ २ ॥ नको सोडूं (सांडूं) ठाव । आतां घेऊं नेदीं वाव ॥ ३ ॥ तुका म्हणे इच्छा । तैसा करीन सरिसा ॥ ४ ॥ [७३२]

तुमची तों भेटी नव्हे ऐसी झाली । कोरडीच बोली ब्रह्मज्ञान ॥ १ ॥ आतां न बोलावें ऐसें वाटे देवा । संग न करावा कोणासवें ॥ २ ॥ तुम्हां निमित्यासी सांपडलें अंग । नेदावा हा संग विचारिलें ॥ ४ ॥ तुका म्हणे माझी राहिली वासना । आवडी दर्शनाचीच होती ॥ ४ ॥ [७३३]

आहे तेंचि आम्हीं मागों तुजपाशीं । नव्हों तुज ऐशीं क्रियानष्टें ॥ १ ॥ न बोलावीं वर्में तोंच बरें दिसे । प्रकट ते कैसे गुण करूं ॥ २ ॥ एका ऐसें एका द्यावयाचा मोळा । कां तुम्हां गोपाळा नाहीं ऐसा ॥ ३ ॥ तुका म्हणे लोकां नाहीं कळों आलें । करावें आपुलें जतन तों ॥ ४ ॥ [७३४]

आम्हांस मुक्कामास सुरक्षित पोंचवावें असें देवाशीं बोलूं १. जसा ज्याचा भाव असेल, तसें वर्तन देव त्याच्याशीं ठेवतो; आणि खोट्याचें वाटोळें खोटेपणानेंच होतें २. म्हणून आम्हीं देवाशीं थोडा देखील भेद टेवणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, खरें हें देवाला मनापासून मान्य आहे ४. [७२९]

नाटकांत व तमाशांत स्त्रियांचा वेष घेणाऱ्या नटास (कधींहि पाहूं नये) जे पैसे देऊन पाहातात ते द्रव्यद्वारा दोष विकत घेतात १. देवांनीं केलेलीं चरित्रें विरक्त हरिदासाच्या मुखानें श्रवण करणें, हें विशेष पुण्य आहे २. नाटकी लोक कृष्ण–गोपींचे वेष घेऊन वस्त्रहरणाचे खेळ करितात. ह्यांत मातृगमनाचा दोष आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, पहा बरें, हे जन कसे सेवा-भक्तिरहित असून विषयरसाचे ठिकाणीं चटावले आहेत ४. [७३०]

हे देवा, आजपर्यंत अविद्या-वनांतील दु:ख सोसून, बहु कष्टी झालों १. ह्याकरितां हे विश्रांति देणाऱ्या विठोबा, तुमच्या पायांवर मस्तक ठेवूं द्या. (त्या योगानें सर्व दुःखांचा परिहार होईल) २. आजपर्यंत पुष्कळ फजिती सोसली, बहुतांस काकुलती आलों ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्याकरितां एवढी आटाआट केली ४. [७३१]

अगा देवा, आमची सत्ता तुझ्यावर असून तुजजवळ कांहीं मागणें हें तूं आम्हाला धर्माचें केलेंस १. त्वरित पाय जोड. आतां तुला घटकाभर देखील हालूं देणार नाहीं २. तूं आपलें ठिकाण सोडूं नकोस. मी तुला अवकाश (विसांवा) घेऊं देणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मीं आपल्या इच्छेप्रमाणें तुला करावयाला लावीन ४. [७३२]

हे देवा, तुमची भेट होत नाहीं असें झालें. आतां कोरडें ब्रह्मज्ञान प्रतिपादन करणें व्यर्थ आहे १. म्हणून देवा, कोणाबरोबर संगति करूं नये व बोलूं नये असें मला वाटतें २. मी असंग आहें, ह्या निमित्ताचें अंग तुम्हांला सांपडल्या-मुळें कोणाला आपली संगति देऊं नये, असा तुम्हीं विचार केला कीं काय ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला तुमच्या दर्शनाची प्रीति असल्यामुळें वारंवार तीच वासना होत आहे ४. [७३३]

हे देवा, जें तुझ्यापाशीं आहे तेंच आम्ही मागतों. तुझ्याप्रमाणें जवळ असून न देणारे क्रियानष्ट आम्ही नाहीं. १ हें तुमचें वर्म जनामध्यें काढूं नये हेंच मला बरें दिसतें, कारण तुमच्यासारख्या मोठ्याचे हे गुण प्रकट कसे करावे? २. गोपाळा, एकाला दिलें त्याप्रमाणें दुसऱ्याला द्यावें, हा तुमचा रिवाज कां नसावा? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे आपले गुण लोकांत प्रकट झाले नाहींत तोंपर्यंत आपला मोठेपणा रक्षण करा ४. [७३४]

आम्हीं याची केली सांडी । कोठें तोंडीं लागावें ॥ १ ॥ आहे तैसा असो आतां । चिंतें चिंता वाढते ॥ २ ॥ बोलिल्याचा मानी सीण । भिन्न भिन्न राहावें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हांपाशीं । धीराऐसी जतन ॥ ४ ॥ [७३५]

आम्हांपाशीं याचें बळ । कोण काळवरी तो ॥ १ ॥ धरूनि ठेलों जीवेंसाठीं । होय भेटी तोंवरी ॥ २ ॥ लागलों ते न फिरें पाठीं । पडिलिया गांठीं वांचूनि ॥ ३ ॥ तुका म्हणे अवकाशें । तुमच्या ऐसें व्हावया ॥ ४ ॥ [७३६]

बोलिलेंचि बोलें पडपडताळूनि । उपजत मनीं नाहीं शंका ॥ १ ॥ बहुतांची माय बहुत कृपाळ । साहोनि कोल्हाळ बुझाविसी ॥ २ ॥ बहुतांच्या भावें वांटिसी भातुकें । बहुकवतुकें खेळविसी ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसें जाणतसों वर्म । करणें तो श्रम न वजे वायां ॥ ४ ॥ [७३७]

कोठें भोग उरला आतां । आठवितां तुज मज ॥ १ ॥ आड कांहीं नये दुजें । फळ बीजें आणिलें ॥ २ ॥ उद्वेग ते वायांविण । कैंचा सीण चिंतनें ॥ ३ ॥ तुका म्हणे गेला श्रम । तुमच्या धर्मे पायांच्या ॥ ४ ॥ [७३८]

संसार तो कोण देखे । आम्हां सखे हरिजन ॥ १ ॥ काळ ब्रह्मानंदें सरे । आवडी उरे संचली ॥ २ ॥ स्वप्नीं तेही नाहीं चिंता । रात्री जातां दिवस ॥ ३ ॥ तुका म्हणे ब्रह्मरसें । होय सरिसें भोजन ॥ ४ ॥ [७३९]

येईं गा विठ्ठला येईं गा विठ्ठला । प्राण हा फुटला आळवितां ॥ १ ॥ पडियेलों वनीं थोर चिंतवनीं । उशीर कां अझूनि लावियेला ॥ २ ॥ काय तुज नाहीं लौकिकाची शंका । आपुल्या बाळका

आम्हीं ह्या देवाचा संबंध सोडला, कारण ह्याच्या तोंडीं कोठें लागत बसावें ? १. आतां तो (देव) जसा असेल तसा असो, त्या संबंधाच्या काळजीनें काळजी वाढते २. आम्हीं जें कांहीं त्यास बोललों त्याचा आमच्या मनांत शीण मात्र झाला, म्हणून देवानें व आम्ही वेगवेगळें राहावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्याजवळ धीराचें जतन आहे (धीर आहे) ४. [७३५]

आमच्याविषयीं ह्या देवाचें बळ कोठपर्यंत चालणार ? १. आम्हीं आपला जीव अर्पण करून देवाला हृदयांत धरून ठेविलें आहे, आतां भेट होईल तोंपर्यंत सोडणार नाहीं २. आम्हीं ह्याच्यामागें लागलों आहोंत. ह्याची गांठ पडल्यावांचून कधींही माघारी फिरणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आम्हीं तुमच्या बरोबरीचे कांहीं कालांतरानें होण्याचा प्रयत्न करूंच करूं (होण्याकरितां ध्रुवपदांत दर्शविलेली क्रिया करूं) ४. [७३६]

हे देवा, पूर्वी जें भक्त बोलिले त्याचा पडताळा (अनुभव) घेऊन मी बोलत आहें, म्हणून माझ्या मनांत शंका (भीति) उत्पन्न होत नाहीं १. देवा, तूं बहुतांची आई आहेस व अतिशय कृपाळु आहेस, म्हणून त्यांची कटकट (भक्तांची कटकट) सहन करून त्यांची समजूत करत्येस २. अनेक भक्तांच्या भावाप्रमाणें तूं त्यांना खाऊ देतेस व मोठ्या कौतुकानें खेळवितेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें तुझें वर्म आम्हीं पूर्णपणें जाणत आहों, म्हणून जो श्रम आम्हीं करूं तो वायां जाणार नाहीं ४. [७३७]

हे देवा, मीं तुला आठविलें आहे, आतां माझा भोग (प्रारब्ध) कोठें उरला (हें सांगा) १. आतां कोणत्याहि प्रकारचा प्रतिबंध राहिला नाहीं. हें तुझ्या स्मरणरूपी बीजानें फळ दिलें २. तुझ्या चिंतनाच्या योगानें काळजीचा व्यर्थ शीण राहील काय ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या पायांच्या प्रसादानें माझा संसारश्रम गेला. ४. [७३८]

आमचे सखे वैष्णवजन आहेत, म्हणून संसाराकडे कोण पाहातो ? १. आमचा सर्व काळ ब्रह्मानंदांत जात आहे आणि त्याविषयींची आवड आमच्या हृदयांत भरली आहे २. रात्रंदिवस जात आहेत तरी आमच्या स्वप्नांत देखील चिंता येत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हांला हरिभक्तांच्या संगतीनें ब्रह्मरसाचें भोजन होत आहे ४. [७३९]

अगा विठ्ठला, तूं ये (असें द्विरुक्तीनें म्हणतात). माझा प्राण तुला आळविण्यानें फुटत आहे म्हणून तूं ये १. मी तुझ्यावांचून या संसारवनामध्यें पडलों आहें. असें असून तूं अजून उशीर कां लाविलास ? २. हे आई, आपल्या मुलाला

मोकलितां ॥ ३ ॥ तुका म्हणे बहु खंति वाटे जीवा । धरियेलें देवा दुरी दिसे ॥ ४ ॥ [७४०]

आपुलें गांवींचें न देखेसें झालें। परदेशी एकलें किती कंटूं ॥ १ ॥ म्हणऊनि पाहें मूळ येतां वाटे । जीवलग भेटे कोणी तरी ॥ २ ॥ पाहतां अवघ्या दिसतील दिशा । सकळही वोसा दृष्टी पुढें ॥ ३ ॥ तुका म्हणे कोणी न सांगे वारता । तुझी वाटे चिंता पांडुरंगा ॥ ४ ॥ [७४१]

जन तरी देखें गुंतलें प्रपंचें । स्मरण तें त्याचें त्यांसी नाहीं॥ १ ॥ म्हणउनि मागें परतलें मन। घालणीचें रान देखोनियां ॥ २ ॥ इंद्रियांचा गाजे गोंधळ ये ठायीं । फोडितसे डोई अहंकार ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा वासनेच्या आटें । केलीं तळपटें बहुतांचीं ॥ ४ ॥ [७४२]

धांवे त्यासी फावे । दुजे उगवूनि गोवे ॥ १ ॥ घ्यावें भरूनियां घर । मग नाहीं येरझार ॥ २ ॥ धणीं उभें केलें । पुंडलिकें या उगलें ॥ ३ ॥ तुका म्हणे ठसा । गेला पडोनियां ऐसा ॥ ४ ॥ [७४३]

लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥ १ ॥ ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ॥ २ ॥ ज्याचे अंगीं मोठेपण । तया यातना कठीण ॥ ३ ॥ तुका म्हणे जाण । व्हावें लहानाहूनि लहान ॥ ४ ॥ [७४४]

नीचपण बरवें देवा । न चले कोणाचाही दावा(हेवा) ॥ १ ॥ महापुरें झाडें जाती । तेथें लव्हाळे राहाती(वांचती) ॥ २ ॥ येतां सिंधूच्या लहरी । नम्र होतां जाती वरी ॥ ३ ॥ तुका म्हणे कळ । पाय धरिलिया न चले बळ ॥ ४ ॥ [७४५]

उष्ट्या पत्रावळी करूनियां गोळा। दाखविती कळा कवित्वाची ॥ १ ॥ ऐसे जे पातकी ते नरकीं

टाकून देण्याविषयीं तुला लोकलज्जा वाटत नाहीं काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तूं आम्हांला दूर धरलेंस म्हणून जीवाला फार तळमळ लागली आहे ४. [७४०]

आपल्या गांवीं वैष्णवजन जेथें दृष्टीस पडत नाहींत अशा प्रदेशांत मी एकट्यानें किती काळ कंठावा? १. म्हणून आपलें बोलावणें केव्हां येईल, ह्याविषयीं वाट पाहात आहें, कारण कोणी तरी माझा जिवलग सखा भेटेल २. पाहूं लागलों तों दृष्टीपुढें सर्व दिशा ओस दिसूं लागल्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्याकडील हकीगत कोणीं सांगेना, म्हणून हे पांडुरंगा, मला तुझी चिंता लागली आहे ४. [७४१]

जन (लोक) तर प्रपंचांत गुंतले आहेत, तें पाहा. तें असें, कीं त्यांना आपलेपणाचें (आपण कोण आहों ह्याचें) स्मरण नाहीं १. म्हणून असें हें घातक संसार-वन पाहून माझें मन हरीकडे परतलें २. ह्या जनांमध्यें इंद्रियांच्या गोंधळाची गर्जना होत आहे व अहंकार सर्वांचीं डोकीं फोडीत आहे (घात करीत आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, प्रपंचाच्या वासनेनें बहुतांचें वाटोळें केलें आहे ४. [७४२]

भेदात्मक प्रपंचाच्या गुंताड्यांतून (मोहांतून) आपली सुटका करून जो हरीकडे धांव घेईल, त्यालाच स्वरूपप्राप्ति होईल (मोक्ष मिळेल) १. आपलें हृदयरूपी घर देवाच्या चिंतनानें भरून टाकावें म्हणजे पुनः जन्ममृत्यूची येरझार राहात नाहीं २. ह्याच चिंतनाच्या जोरावर पुंडलिकरायानें पांडुरंगस्वामीला विटेवर (पुष्कळ दिवस) उगाच उभें केलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारची प्रसिद्धि (त्रैलोक्यांत) झाली आहे ४. [७४३]

अगा देवा, लहानपण दे, कारण मुंगी लहान आहे, म्हणून तिला साखर खावयास मिळते १. हत्ती (ऐरावत) हें रत्न (चौदा रत्नांमध्यें) मोठें असून त्यास साखर खावयास तर मिळत नाहीं, पण उलट अंकुशाचा मार मिळतो २. ह्यावरून असें सिद्ध झालें, कीं ज्याच्या अंगीं थोरपणा आहे, त्याला भयंकर यातना सोसाव्या लागतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां लहानापेक्षांही लहान (नम्र) व्हावें (हें बरें) असें समजावें ४. [७४४]

हे देवा, लहानपण चांगलें कारण त्या स्थितींत कोणी वैर धरीत नाहीं १. नदीला महापूर आला तर त्या योगानें मोठमोठीं झाडें वाहून जातात, पण त्याच ठिकाणीं उगवलेले लव्हाळे (जिवंत) राहातात २. त्याप्रमाणें समुद्रांत होणाऱ्या मोठमोठाल्या लाटा पोहोणारा नम्र झाल्यानें त्याच्यावरून निघून जातात ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व अवयवांत खालीं असणाऱ्या बलवानाच्या पायांस नम्र होऊन मिठी मारल्यास त्याचें कांहीं चालत नाहीं, हें मुख्य वर्म आहे ४. [७४५]

कित्येक कवि दुसऱ्या प्रासादिक कवितेंतील उष्टे शब्द घेऊन आपल्या कवित्वाचें कौशल्य दाखवितात १. असे हे

पचती । जोंवरी भ्रमती चंद्रसूर्य ॥ २ ॥ तुका म्हणे एका नारायणा ध्यायीं(ई) । वरकडा वाहीं शोक असे ॥ ३ ॥ [७४६]

आवडीच्या मतें करिती भोजना । भोग नारायणा म्हणती केला ॥ १ ॥ अवघा देव म्हणे वेगळें तें काय(इ) । अर्थासाठीं डोय(ई) फोडूं पाहे ॥ २ ॥ लाजे कमंडलु धरितां भोपळा । आणीक थीगळा प्रावर्णासी ॥ ३ ॥ शाला गडवे धातुद्रव्यइच्छा चित्तीं । नै(न)श्वर बोलती अवघें मुखें ॥ ४ ॥ तुका म्हणे तया देवा नाहीं भेटी । ऐसे कल्पकोटि जन्म घेतां ॥ ५ ॥ [७४७]

म्हणवितां हरिदास कां रे नाहीं लाज । दीनासी महाराज म्हणसी हीना ॥ १ ॥ काय ऐसें पोट न भरेसें जालें । हालविसी कुले सभेमाजी ॥ २ ॥ तुका म्हणे पोटें केली विटंबना । दीन झाला जना कींव भाकी ॥ ३ ॥ [७४८]

रिद्धिसिद्धी दासी कामधेनु घरीं । परि नाहीं भाकरी भक्षावया ॥ १ ॥ लोडें बालिस्तें पलंग सुपत्ती । परि नाहीं लंगोटी नेसावया ॥ २ ॥ पुसाल तरि आम्हां वैकुंठींचा वास । परि नाहीं राह्यास ठाव कोठें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही राजे त्रैलोक्याचे । परि नाहीं कोणाचें उणें पुरें ॥ ४ ॥ [७४९]

घरोघरीं अवघें झालें ब्रह्मज्ञान । परि मेळवण बहु माजी ॥ १ ॥ निरें कोणापाशीं होय एक रज । तरि द्या रे मज दुर्बळासी ॥ २ ॥ आशा तृष्णा माया कालवूनि दोन्ही । दंभ तो दुरोनि दिसतसे ॥ ३ ॥ काम क्रोध लोभ सिणवी बहुत । मेळवूनि आंत काळकूट ॥ ४ ॥ निंदा अहंकार द्वेष बहु फार । माजिवरी धूर सारियेला ॥ ५ ॥ तुका म्हणे तेथें कांहीं हातां नये । आयुष्य मोलें जाये वांयांविण ॥ ६ ॥ [७५०]

पातकी, चंद्रसूर्य फिरत आहेत तोंपर्यंत, नरकामध्यें पचतात (खितपत पडतात) २. तुकाराम महाराज म्हणतात, एका नारायणाचें ध्यान करावें. अन्य ओघांत (दंभाच्या ओघांत) वाहात गेल्यानें दुःखशोकाची प्राप्ति होते ३. [७४६]

कित्येक शब्दज्ञानी, जीव ब्रह्म आहे, असें समजून यथेष्ट भोजनादि करितात व हा सर्व भोग नारायणानें भोगला असें म्हणतात १. सर्व देव आहे, त्यावांचून वेगळें कांहीं नाहीं असें प्रतिपादन करितात पण द्रव्याकरितां डोकें फोडूं पाहातात २. त्यागी जनांचें जें वस्त्रपात्र, भोपळ्याचा कमंडलु, ठिगळांची गोधडी ह्यांचें ग्रहण करितांना वर सांगितलेल्या पोकळ ब्रह्मज्ञान्यांस लज्जा वाटते ३. मायादि जगत् सर्व नाशिवंत आहे, असें प्रदिपादन करितात; पण शालजोडी, चांदीचे गडवे आणि द्रव्य मिळविण्याची इच्छा हृदयांत ठेवितात ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारच्या ज्ञान्यांनीं कोट्यावधि कल्पांपर्यंत जन्म घेतले तरी त्यांस देवाची भेट होणार नाहीं ५. [७४७]

अरे हीना (नीचा), आपल्याला हरिदास म्हणवितोस आणि हरीला सोडून इंद्रियांनीं दीन केलेल्या लोकांस पोटाकरितां महाराज म्हणतोस, ह्याची तुला लाज वाटत नाहीं काय? १. विषयी जनांच्या सभेमध्यें जाऊन ढुंगण वांकडें करितोस. ह्यावांचून तुझें पोट भरत नाहींसें झालें काय? २. तुकाराम महाराज म्हणतात, स्वार्थी मनुष्य दीन होऊन जनांस काकुलती येतो त्याची अशा प्रकारची विटंबना पोटानें केली आहे ३. [७४८]

आमच्या घरीं रिद्धिसिद्धि कामधेनु ह्या दासी आहेत, परंतु आम्हीं उदास असल्यामुळें वेळेवर खाण्याला भाकरी मिळत नाहीं १. लोड, तक्क्ये, पलंग हे सुखोपचार असूनही आम्हीं निरिच्छ आहोंत, म्हणून वेळेस लंगोटी नेसावयाला नसते २. विचारलें तर आमचें वास्तव्य वैकुंठांत आहे आणि आम्ही स्वरूपस्थितीनें सर्वव्यापक आहोंत, म्हणून राहावयास कोठेंहि ठिकाण नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही स्वरूपस्थितीनें सर्व त्रैलोक्याचे राजे आहोंत, पण कोणाच्या कमीजास्त स्थितीचा संबंध आमच्याकडे नाहीं (म्हणजे आम्हीं अलिप्त आहोंत) ४. [७४९]

घरोघरीं सर्व ब्रह्मज्ञानी झाले आहेत, परंतु त्यांचेमध्यें खालील कडव्यांतून दर्शविलेल्या दोषांचें बहुत मिश्रण आहे १. म्हणून शुद्धज्ञान कोणाजवळ असेल तर मला दुर्बळाला रजमात्र (अल्पसें) द्या २. सर्व ठिकाणीं जें ब्रह्मज्ञान दिसत आहे, तें आशा, तृष्णा, माया ह्या दोषांनीं युक्त असल्यामुळें पाहाणाराला तें दांभिक आहे असें दुरून दिसतें ३. आणि काम-क्रोध-लोभरूपी विष त्यांत मिसळल्यामुळें तें बहुत श्रम देत आहे ४. निंदा, अहंकार, द्वेषादिकांच्या काजळानें तें ज्ञान थांत बाहेर बहुत माखलें गेलें आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारच्या ज्ञानानें कांहींएक प्राप्त न होतां मूल्यवान् आयुष्य व्यर्थ जातें ६. [७५०]

अवघ्या भूतांचें केलें संतर्पण । अवघीच दान दिली भूमि ॥ १ ॥ अवघाचि काळ दिनरात्रशुद्धी । साधियला विधी पर्वकाळ ॥ २ ॥ अवघींच तीर्थें व्रतें केले याग । अवघेंचि सांग झालें कर्म ॥ ३ ॥ अवघेंचि फळ आलें आम्हां हाता । अवघेंचि अनंता समर्पिलें ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां बोलों अबोलणें । कायावाचामनें उरलों नाहीं ॥ ५ ॥ [७५१]

महुरा ऐसीं फळें नाहीं । आलीं कांहीं गळती ॥ १ ॥ पक्कदशे येती थोडीं । नास आढी वेंचे तों ॥ २ ॥ विरळा पावे विरळा पावे । अवघड गोवे सेवटींचे ॥ ३ ॥ उंच निंच परिवार देवीं । धन्या ठावी चाकरी ॥ ४ ॥ झळके तेथें पावे आणी । ऐसे क्षणीं बहु थोडे ॥ ५ ॥ पावेल तो पैलथडी । म्हणों गडी आपुला ॥ ६ ॥ तुका म्हणे उभाऱ्यानें । खरें कोण मानितसे ॥ ७ ॥ [७५२]

अवघ्या उपचारा । एक मनचि दातारा ॥ १ ॥ घ्यावी घ्यावी माझी सेवा । दीन दुर्बळाची देवा ॥ २ ॥ अवघियाचा ठाव । पायावरि जीवभाव ॥ ३ ॥ चित्ताचें आसन । तुका करितो कीर्तन ॥ ४ ॥ [७५३]

आली सलगी पायांपाशीं । होईल तैशी करीन ॥ १ ॥ आणीक आम्ही कोठें जावें । येथें जीवें वेंचलों ॥ २ ॥ अवघ्या निरोपणा भाव । हाचि ठाव उरलासे ॥ ३ ॥ तुका म्हणे पाळीं लळे । कृपाळुवे विठ्ठले ॥ ४ ॥ [७५४]

देह आणि देह(हा)संबंधें निंदावीं । इतरें वंदावीं श्वानशूकरें ॥ १ ॥ येणे नांवें झाला मी माझ्याचा झाडा । मोह नांवें खोडा गर्भवास ॥ २ ॥ गृह आणि वित्त स्वदेशा विटावें । इतरां भेटावें श्वापदाझाडां ॥ ३ ॥ तुका म्हणे मी हें माझें न यो वाचे । येणें नांवें साचे साधुजन ॥ ४ ॥ [७५५]

आम्हीं सर्व भूतांना (प्राणिमात्रांना) अन्नसंतर्पण केलें व सर्व दानांमध्यें श्रेष्ठ जें भूमिदान तें आम्हीं सर्व केलें १. दिवस आणि रात्र ह्या सर्व काळाची शुद्धि करून पर्वकाळविधि साधला २. संपूर्ण तीर्थें, व्रतें, यागादि कर्में केलीं. आतां सर्व सांगता झाली ३. सर्व साधनांचें फळ हस्तगत होऊन तें आम्हीं हरीला अर्पण केलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आम्ही जे बोल बोलत आहोंत ते सर्व अबोलणें होय; कारण काया–वाचा–मनानें आम्ही श्रीहरीपासून वेगळे उरलों नाहीं ५. [७५१]

आंब्याच्या झाडास जितका मोहोर येतो तितकीं फळें येत नाहींत. त्यांतून जीं येतात, त्यांपैकीं कांहीं गळतात १. राहिलेल्या फळांपैकीं आढीमध्यें कांहींचा नाश होऊन परिपक्वदशेस येणारीं थोडीं असतात २. त्याप्रमाणें भक्तिमार्गास लागलेले पुष्कळ असतात, पण अंतिम साध्य जें श्रीहरीचें स्वरूप, त्या ठिकाणीं एखादाच प्राप्त होतो. बाकी सर्व साधनांच्या कठिणपणामध्यें गुंतून पडतात ३. देवाच्या ठिकाणीं लहान मोठा सेवकांचा परिवार आहे. त्यांच्याकडून होणाऱ्या सेवेला जाणणारा देव आहे ४. ज्या वेळीं रणभूमीवर एकमेकांना मारण्यास शस्त्रें चमकत असतात, त्या वेळी धैर्यानें युद्ध करून जय मिळविणारे असे फार थोडे ५. भगवत्प्राप्तिरूपी पलीकडच्या कांठास जो जातो, तो आमचा मित्र आहे ६. तुकाराम महाराज म्हणतात, नुसत्या बाहेरच्या पोकळ अवसानास खरें कोण मानतो ? ७. [७५२]

हे दात्या देवा, सर्व भोगोपचाराऐवजीं माझें मनच तुला अर्पण केलें आहे १. हे देवा, आम्ही गरीब, दीन आहोंत, म्हणून हीच आमच्याकडून सेवा घ्यावी २. सर्वांचें ठिकाण तूं आहेस, म्हणून तुझ्या चरणीं जीवदशा अर्पण केली ३. तुकाराम महाराज म्हणतात, स्वरूपीं (तुझ्याच रूपाचे ठिकाणीं) चित्ताचें आसन घालून मीं कीर्तन करीत आहें ४. [७५३]

देवा, आपल्या पायांशीं सलगीनें जसा छंद (हट्ट) करवेल तसा करीन १. तुमच्यावांचून अन्य ठिकाणीं आम्ही कोठे जावें ? कारण ह्याच ठिकाणीं आम्ही जीवानें अर्पण झालों आहोंत २. आमचें हितगुज विदित करण्यास हेंच एक ठिकाण आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे कृपाळु देवा, आमचे लाड तुम्हीं पूर्ण करा ४. [७५४]

देह आणि देहसंबंधी मातापितर, स्त्रीपुत्रादि हीं सर्व निंद्य मानावीं आणि ह्यांहून इतर श्वान–शूकरादिकांस नमस्कार करावा १. अशा स्थितीलाच मी व माझें ह्या भावनारूपी द्वंद्वाचा निरास झाला असें समजावें. देहादि परिग्रहाचे मोहास गर्भवासाच्या बेडींत अडकून पडावें लागतें २. आपलें घर व पैसा आणि स्वदेश या सर्वांचा वीट मानावा व वनांतील श्वापदांची व झाडांची भेट घ्यावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, देह मी व देहसंबंधी माझे असे शब्द वाणीनें सुद्धां येऊं नयेत. अशी स्थिति ज्याची असेल ते खरे संतजन समजावे ४. [७५५]

देवाचिया(ये) माथां घालुनियां भार । सांडीं कलेवर ओवाळूनि ॥ १ ॥ नाथिला हा छंद अभिमान अंगीं । निमित्याचे वेगीं सारीं ओझें ॥ २ ॥ करुणा वचनीं लाहो एकसरें । नेदावें दुसरें आड येऊं ॥ ३ ॥ तुका म्हणे सांडीं लटिक्याचा संग । आनंद तो मग प्रगटेल ॥ ४ ॥ [७५६]

देह नव्हे मी हें सरे । उरला उरे विठ्ठल ॥ १ ॥ म्हणऊनि लाहो करा । काळ सारा चिंतनें ॥ २ ॥ पाळणाची नाहीं चिंता । टाव रिता देवाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे जीवासाठीं । देव पोटीं पडेल ॥ ४ ॥ [७५७]

पृथक मी सांगों किती । धर्म नीती सकळां ॥ १ ॥ अवघियांचा एक ठाव । शुद्ध भाव विठ्ठलीं ॥ २ ॥ क्षराअक्षराचा भाग । करा लाग पंढरीये ॥ ३ ॥ तुका म्हणे आगमींचें । मथिलें साचें नवनीत ॥ ४ ॥ [७५८]

पुण्यविकरा तें मातेचें गमन । भाडी ऐसें धन विटाळ तो ॥ १ ॥ आत्महत्यार(रा) हा विषयांचा लोभी । म्हणावें तें ना भी करवी दंड ॥ २ ॥ नागवला अल्प लोभाचिये सांठीं । घेऊनि कांचवटि परिस दिला ॥ ३ ॥ तुका म्हणे हात झाडिले परत्रीं । श्रम तोचि श्रोत्रीं वेठी(ठेवी) केली ॥ ४ ॥ [७५९]

अंतरींचें ध्यान । मुख्य या नांवें(नांव) पूजन ॥ १ ॥ उपाधि तें अवघें पाप । गोड निरसतां संकल्प ॥ २ ॥ आज्ञा पाळावी हा धर्म । जाणते हो जाणा वर्म ॥ ३ ॥ तुका म्हणे वृत्ति । अविट हे सहजस्थिति ॥ ४ ॥ [७६०]

मूळ कारण सत्ता । नाहीं मिळत उचिता ॥ १ ॥ घडे कासयानें सेवा । सांग ब्रह्मांडाच्या जीवा ॥ २ ॥

देवाचे माथीं आपला सर्वस्वीं भार घालून त्याच्यावर देह ओंवाळून टाकावा १. देह मी आहें, ह्या अभिमानाचा छंद आपल्या अंगीं खोटा आहे असें समजून सर्व संसारभारास निमित्त असणाऱ्या अभिमानाचा तूं त्याग कर २. एकसारखा करुणावचनानें देवाला आळविण्याचा टाहो फोड, ह्याशिवाय आपल्या हृदयांत दुसरें कांहीं येऊं देऊं नकोस ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या खोट्या देहादि प्रपंचाचा संग टाक, म्हणजे तुझ्या ठिकाणीं भगवदानंद प्रकट (ब्रह्मानंद) होईल ४. [७५६]

देह मी आहें, असा अहंकार नाहींसा झाल्यावर जीव विठ्ठलरूपानें उरेल १. म्हणून त्याचा छंद घेऊन सर्वकाळ चिंतनांत घालीव २. देवाच्या व्याप्तीवांचून एकही ठिकाण रितें नाहीं, म्हणून आपल्या रक्षणाविषयीं काळजी नको ३. तुकाराम महाराज म्हणतात, जीव अर्पण केल्यानें हृदयांत देव प्रकट होईल ४. [७५७]

सर्वांना निरनिराळी धर्म-नीति कोठपर्यंत सांगूं ? १. सर्वांनीं विठ्ठलाच्या ठिकाणीं शुद्धभाव ठेवणें हें धर्म-नीतीचें तात्पर्य आहे २. तो क्षराक्षरात्मक विठ्ठल पंढरीस आहे, म्हणून तिकडे सर्वांनीं जावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व शास्त्ररूपी दह्यांतून घुसळून काढलेलें सारभूत नवनीत हेंच विठ्ठल दैवत आहे ४. [७५८]

भगवत्कथा व गायत्रीमंत्रादि पुण्य कर्मांचा विक्रय करून मिळवलेलें धन हें भाडें घेतल्याप्रमाणें होतें आणि मात्रागमनाचा दोष घडतो १. विषयांविषयीं लोभी जो आहे, तो आत्मघातकी आहे; त्याला (आश्रय देऊन) भिऊं नको म्हणणें हें (यम) दंडाला पात्र करवितें २. जसें एखादा परीस देऊन मोबदला कांच घ्यावी, तसें अल्पविषयाच्या लोभानें परमार्थमहालाभाचा विक्रा करणारे नागविले जातात ३. ह्याप्रमाणें तुकाराम महाराज म्हणतात, ह्या लोभी श्रोत्रियांनीं (वेदवेत्त्या याज्ञिकांनीं यज्ञ करून) स्वर्गलोकीं जाऊन तेथील दिव्य भोग भोगून आपलें पुण्य नाहींसें केलें. हे त्यांचे श्रम बिगारीला धरल्याप्रमाणें (भाडोत्री) होत ४. [७५९]

भगवंताचें ध्यान अंतःकरणांत करणें हेंच त्याचें मुख्य पूजन आहे १. ह्यावांचून इतर सर्व उपाधि पापमूलक आहेत. ह्याकरितां त्यांच्या संकल्पाचा नाश करणें हेंच उत्तम आहे २. अहो शहाणे ! (श्रुति-स्मृतिरूप भगवंताच्या) आज्ञेप्रमाणें वागणें हा धर्म आहे. हें वर्म तुम्हीं समजा ३. तुकाराम महाराज म्हणतात, सहज स्वरूपस्थिति असणें ही अवीट स्थिति आहे. ४. [७६०]

सर्व जगाला मूळ कारण एक चैतन्य सत्ता आहे. तेथें योग्य असा सेव्यसेवक भावाचा व्यवहार होत नाहीं १.

सागर सागरीं । सामावेसी कैंची थोरी ॥ ३ ॥ तुका म्हणे भावें । शरण म्हणवितां बरवें ॥ ४ ॥
[७६१]

बरवी नामावळी । तुझी महादोषां होळी ॥ १ ॥ झालें आम्हांसी जीवन । धणीवरि हें सेवन ॥ २ ॥ सोपें आणि गोड । किती अमृताही वाड ॥ ३ ॥ तुका म्हणे अच्युता । आम(मु)चा कल्पतरु दाता ॥ ४ ॥
[७६२]

तृषाकाळीं उदक भेटी । पडे मिठी आवडीची ॥ १ ॥ ऐसियाचा हो कां संग । जिवलग संतांचा ॥ २ ॥ मिष्टान्नाचा योग भुके । म्हणतां चुके पुरेसें ॥ ३ ॥ तुका म्हणे माते बाळा । कळवळा भेटीचा ॥ ४ ॥
[७६३]

कुचराचें श्रवण । गुणदोषांवरि मन ॥ १ ॥ असोनियां नसे कथे । मूर्ख अभागी ते तेथें ॥ २ ॥ निरर्थक कारणीं । कान डोळे वेंची वाणी ॥ ३ ॥ पापाचे सांगाती । तोंडी ओढाळांचे माती ॥ ४ ॥ हिताचिया नांवें । वोस पडिले देहभावें ॥ ५ ॥ फजीत करूनि सोडी । तुका करी बोडाबोडीं ॥ ६ ॥
[७६४]

जग तरि आम्हां देव । परि हे निंदितों स्वभाव ॥ १ ॥ येतो हिताचा कळवळा । पडती हातीं म्हूण(म्हणुनि) काळा ॥ २ ॥ नाहीं कोणी सखा । आम्हां निपराध परिखा ॥ ३ ॥ उपक्रमें वंदे । तुका वर्मासी तें भेदे ॥ ४ ॥
[७६५]

सोपें वर्म आम्हां सांगितलें संतीं । टाळ दिंडी हातीं घेउनि नाचा ॥ १ ॥ समाधीचें सुख साडा ओवाळून । ऐसा या कीर्तन ब्रह्मरस ॥ २ ॥ पुढती चंढे चढतें सेवन आगळें । भक्तिभाग्यबळें निर्भरता ॥ ३ ॥ उपजोंचि नये संदेह चित्तासी । मुक्ति चारी दासी हरिदासांच्या ॥ ४ ॥

ह्याकरितां हे ब्रह्मांडाच्या जीवा देवा, तुझी सेवा कशी घडेल तें सांग २. सागरामध्यें दुसरा सागर सामावला जाईल एवढा मोठा सागर कोठें आहे? (तसे तुम्ही आम्ही एक ब्रह्म झाल्यावर सेवा कशी होईल?) ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां तुम्ही देव आणि आम्ही भक्त ह्या भावानें तुमचे शरणागत म्हणविणें हें बरें ४.
[७६१]

देवा, तुझी रामकृष्णादि नामावळी आहे तिच्या योगानें महापातकें जळून जातात १. म्हणून आमचें ती जीवनच झाली आहे. तिचें सेवन आम्हीं तृप्त होईतोंपर्यंत करूं २. ती फार सोपी आहे व अमृतापेक्षां गोड आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे अच्युता, तूं आमचा कल्पतरूप्रमाणें दाता आहेस ४.
[७६२]

अतिशय तहानेच्या वेळीं पाण्याची गांठ पडल्यावर त्याचें सेवन आवडीनें होतें १. तसें परम प्रिय जिवलग संतांची संगति मिळो २. अतिशय भुकेच्या वेळीं मिष्टान्नाचा लाभ पुरे म्हणेतोंपर्यंत (तृप्त होईतोंपर्यंत) होणें प्रिय आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आईच्या भेटींत प्रीति आहे ४.
[७६३]

कुचर श्रोत्यांचें मन वक्त्याच्या गुणदोषांकडे असतें १. अशा प्रकारचे मूर्ख अभागी श्रोते त्या कथेमध्यें असून नसल्यासारखे आहेत २. (ते मुर्ख) निष्कारण नैसर्गिक व्यवहाराकडे आपले कान, डोळे आणि वाणी व्यर्थ खर्च करितात ३. पापांच्या संगतीनें असलेल्या ओढाळ श्रोत्याच्या तोंडामध्यें अंतीं मातीच पडते ४. देहबुद्धीमुळें ते हितशून्य झाले आहेत (त्यांच्या हिताचें वाटोळें झालें) ५. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही असल्यांचे पांच पाट काढून त्यांना फजित करून सोडतों ६.
[७६४]

सर्व जग आम्हांला देव आहे; पण जे वाईट स्वभावाचे आहेत, त्यांचा आम्ही धिक्कार करतों १. कारण ते काळाच्या मुखीं पडतात, म्हणून त्यांच्या हिताविषयीं कळकळ उत्पन्न होते २. आमचा कोणी सखा नाहीं आणि कोणी परका शत्रु नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमची वाणी सरळ रीतीनें बोलते, पण ज्यांच्या अंगीं दोष असतील त्यांच्या वर्मीं तें लागतें ४.
[७६५]

आम्हांला टाळ, वीणा हातांत घेऊन हरीचे नामचिंतनानें नाचावें हेंच सुलभ वर्म संतांनी सांगितलें आहे १. अशा ह्या कीर्तनामध्यें होणाऱ्या ब्रह्मरसावरून समाधीचें सुख ओवाळून टाका, असेंहि ते सांगत आहेत २. ह्या ब्रह्मरसाचें सेवन पुनः पुनः अधिक झाल्यानें व ह्या भक्तिभाग्याच्या बळानें आम्ही तृप्त आहों ३. ह्या योगानें आमच्या चित्तांत संशय उत्पन्न

तुका म्हणे मन पावोनि विश्रांती । त्रिविध नासती ताप क्षणें ॥ ५ ॥ [७६६]

गंगा न देखे विटाळ । तेंचि रांजणींही जळ ॥ १ ॥ अल्प महदा नव्हे सरी । विटाळ तो भेद धरी ॥ २ ॥ काय खंडिली भूमिका । वर्णा पायरिकां लोकां ॥ ३ ॥ तुका म्हणे आगीविण । बीजें(ज) वेंगळीं(ळें) तों भिन्न ॥ ४ ॥ [७६७]

थुंकोनियां मान । दंभ करितों कीर्तन ॥ १ ॥ झालों उदासीन देहीं । एकाविण चाड नाहीं ॥ २ ॥ अर्थ अनर्थासारखा । करुनि ठेविला पारिखा ॥ ३ ॥ उपाधि वेगळा । तुका राहिला सोवळा ॥ ४ ॥ [७६८]

देवावरिल भार । काढूं नये कांहीं पर ॥ १ ॥ तानभूके आठवण । घडे तें बरें चिंतन ॥ २ ॥ देखावी निश्चिंती । तेचि अंतर श्रीपती ॥ ३ ॥ वैभव सकळ । तुका मानितो विटाळ ॥ ४ ॥ [७६९]

काय ह्याचें घ्यावें । नित्य नित्य कोणें गावें ॥ १ ॥ केलें हरिकथेनें वांझ । अंतरोनि जाते निज ॥ २ ॥ काम संसार । अंतरीं हे करकर ॥ ३ ॥ तुका म्हणे हेंड । ऐसें मानिती ते लंड ॥ ४ ॥ [७७०]

वदे साक्षत्वेंसीं वाणी । नारायणीं मिश्रित ॥ १ ॥ नलगे कांहीं चांचपावें । जातों भावें पेरीत ॥ २ ॥ भांडार त्या दातयाचें । मी कैंचें ये ठायीं ॥ ३ ॥ सादावीत गेला(जातो) तुका । येथें एकाएकीं तो ॥ ४ ॥ [७७१]

ऐसी जिव्हा निकी । विठ्ठल विठ्ठल कां न घोकी ॥ १ ॥ जेणें पाविजे उद्धार । तेथें राखावें अंतर ॥ २ ॥ गुंफोनि चावटी । तेथें कोणे लाभ भेटी ॥ ३ ॥ तुका म्हणे काळ । देवाविण अमंगळ ॥ ४ ॥ [७७२]

होत नाहीं व चारी मुक्ति आम्हां हरिदासांच्या दासी आहेत ४. तुकाराम महाराज म्हणतात, संतांनीं सांगितलेल्या वर्मानें मनाला विश्रांति मिळून त्रिविधतापांचा नाश एका क्षणांत होतो ५. [७६६]

गंगेच्या प्रवाहास विटाळ नाहीं, पण तेंच पाणी रांजणामध्यें असलें तर ओंवळयाच्या स्पर्शानें विटाळलें जातें १. म्हणून थोडें व फार हें एकसारखें नाहीं. पुष्कळांतून थोडें निवडलें गेलें, कीं तें विटाळास पात्र होतें २. निरनिराळ्या जातीचे लोक एका पृथ्वीवर राहातात. त्यांच्या योगानें तिच्यांत भेद होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अग्नीपासून बीज निराळें आहे, तोपर्यंत तें भिन्न आहे [अग्नीशीं संबंध झाला कीं त्याचा दोष जातो] (तें अग्निरूप होतें) ४. [७६७]

मीं मान, दंभ ह्या वृत्ती थुंकून टाकून कीर्तन करितों १. मी देहाविषयीं उदास झालों, म्हणून एका देवावांचून मला दुसरी इच्छा नाहीं २. अर्थ [द्रव्य] अनर्थाप्रमाणें मानून तें दूर टाकिलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मीं (देह-स्त्री-पुत्रादि) सर्व उपाधींपासून वेगळा असा सोंवळा राहिलों आहें ४. [७६८]

देवावर असलेला आपला सर्वस्वभार बाजूला काढूं नये १. तहान, भूक लागते त्या वेळीं देवाचें चिंतन करणें बरें, अथवा ज्या चिंतनांत तहानभुकेची आठवण होते (देवा, माझी तहान–भूक निवारण कर अशी आठवण होते) तें चिंतन बरें २. देवाच्या चिंतनाविषयीं निष्काळजी असण्यानें (चिंतन न करण्यानें) लक्ष्मीपति अंतरतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी देवावांचून सर्व वैभव विटाळ मानितों ४. [७६९]

कित्येक दुर्जन असें म्हणतात, कीं देवाचें काय घ्यावें आणि वारंवार त्याला कोणीं गावें १. हरिकथा करणें व ऐकणें हें व्यर्थ आहे. त्यापासून झोंप अंतरते व २. हरिकथेची करकर संसारामध्यें अंतराय–अडथळा–आणिते ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें मानणारे लोक हेड [पशु] आणि लंड आहेत ४. [७७०]

माझी वाणी नारायणाशीं संबद्ध होते आणि साक्षित्वानें बोलते १. आतां कोणीं चांचपडण्याचें [चिवडण्याचें] काम नाहीं, मी भावार्थानें उपदेश करीत आहें २. हें सर्व ऐश्वर्य दात्या देवाचें आहे. मी ह्या ठिकाणीं यःकश्चित् आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारें मी एकटा सर्व लोकांना सावध करीत आलों ४. [७७१]

जिव्हा ही चांगली असून विठ्ठल विठ्ठल ह्या नामाची आवृत्ति कां करीत नाहीं ? १. ज्यापासून आपला उद्धार होतो, तेथें अंतःकरण ठेवावें २. चावटपणाचे शब्द बोलण्यामध्यें कोणता लाभ होतो ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाच्या चिंतनावांचून जो काळ जात आहे तो अमंगळ आहे ४. [७७२]

साजे अळंकार। तरी भोगितां भ्रतार ॥ १ ॥ व्यभिचारीचा टाकमटिका। उपहास होती लोकां ॥ २ ॥ शूरत्वाची वाणी । रूप मिरवे मंडणीं ॥ ३ ॥ तुका म्हणे जिणें। शर्तीविण लाजिरवाणें ॥ ४ ॥ [७७३]

मानामान किती। तुझ्या क्षुल्लका संपत्ती ॥ १ ॥ जा रे चाळवीं बापुडीं। कोण्ही धरितील ते गोडी ॥ २ ॥ रिद्धिसिद्धि देसी । आम्ही चुंभळीं नव्हों तैसीं ॥ ३ ॥ तुका म्हणे ठका। ऐसें नागविलें लोकां ॥ ४ ॥ [७७४]

पाहातोसी काय। आतां पुढें करीं पाय ॥ १ ॥ वरि ठेवूं दे मस्तक। ठेलों जोडून हस्तक ॥ २ ॥ बरवें करी सम। नको भंगों देऊं प्रेम ॥ ३ ॥ तुका म्हणे चला। पुढती सामोरे विठ्ठला ॥ ४ ॥ [७७५]

भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास। गेले आशापाश निवारूनि ॥ १ ॥ विषय तो त्यांचा जाला नारायणा। नावडे जन धन माता पिता ॥ २ ॥ निर्वाणीं गोविंद असे मागें पुढें। कांहींच सांकडें पडों नेदी ॥ ३ ॥ तुका म्हणे सत्य कर्मा व्हावें साह्य। घातलिया भय नर्का जाणें ॥ ४ ॥ [७७६]

तोंचि हीं क्षुल्लकें सखीं सहोदरें। नाहीं विश्वंभरें वोळखी तों ॥ १ ॥ नारायण विश्वंभर विश्वपिता। प्रमाण तो होतां सकळ मिथ्या ॥ २ ॥ रवि नुगवे तों दीपकांचें काज। प्रकाशें तें तेज सहज लोपे ॥ ३ ॥ तुका म्हणे देहसंबंध संचितें। कारण निरुतें नारायणीं ॥ ४ ॥ [७७७]

यज्ञ भूतांच्या पाळणा। भेद कार्य कारणा। पावावया उपासना। ब्रह्मस्थानीं प्रस्थान ॥ १ ॥ एक परी पडिलें भार्गी। फळ बीजाचिये अंगीं। धन्य तोचि जगीं। आदि अंत सांभाळी ॥ २ ॥

जर भ्रतार उपभोग घेत असेल तरच त्या स्त्रीनें घातलेले अलंकार शोभतील १. नाहीं तर वेश्येनें थाटमाट केल्यासारखें होऊन लोकांत छीःथु होईल २. जसें बोलण्यांत शूरत्व आहे, तसें ज्याचें रूपहि भव्य सुशोभित आहे तो शोभत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, निर्धारावांचून जगणें लाजिरवाणें आहे ४. [७७३]

हे देवा, मान आणि अपमान ह्या तुझ्या क्षुल्लक संपत्ति आहेत १. जे कोणी इंद्रियांनीं दीन केले असतील ते ह्या तुझ्या क्षुल्लक संपत्तीची गोडी धरितात. अरे, त्यांना तूं चाळीव २. ऋद्धिसिद्धि देशील, पण आमच्याकडून त्यांचा स्वीकार होईल, असे आम्ही बटकीचे नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे ठका, असें कितीक लोकांना फसविलेंस ? ४. [७७४]

हे देवा, पाहातोस काय, आतां पाय पुढें कर १. दोन्ही हात जोडून त्यावर मला मस्तक ठेवूं दे २. पण ते पाय सारखे जोड. त्या विषयाचें माझें प्रेम नष्ट होऊं देऊं नको ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो विठ्ठला, पुनः माझ्यासमोर चला या (समोर येऊन उभे राहा) ४. [७७५]

ज्यांची आशा नाहींशी झाली आहे व जे देहावर उदास आहेत, ते भक्त आहेत असें समजा १. त्यांचा नारायणच एक विषय आहे. त्यावांचून लौकिक धन, आईबाप आवडत नाहींत २. अशा भक्तांचें निर्वाणप्रसंगीं गोविंद मागें पुढें राहून रक्षण करतो, म्हणजे त्यांच्यावर कोणतेंहि संकट येऊं देत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, सत्कर्माला सर्वांना साह्य करावें. त्याविषयीं भय घातलें (चांगल्या कार्यांत विघ्न आणलें) तर नरकवास मिळेल असें समजा ४. [७७६]

विश्वव्यापी श्रीहरीची जोंपर्यंत ओळख नाहीं तोंपर्यंतच क्षुल्लक मित्र व भाऊबंद आवडत असतात ! हा नारायण विश्वाचा पिता आणि विश्वाचें पालन पोषण करणारा आहे, असें यथार्थ ज्ञान झाल्यास मायादि जगत् मिथ्याच आहे असें भासेल २. सूर्य उदयास आला नाहीं तोंपर्यंत दिव्याचें कारण आहे. सूर्यप्रकाशामध्यें सर्व निस्तेज होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, देहसंबंध जो आहे, तो प्रारब्धानें होतो. देहामध्यें येऊन खरें कार्य नारायणाचे ठिकाणीं आहे ४. [७७७]

यज्ञापासून पर्जन्यद्वारा सर्व भूतांचें पालन होतें. हा साध्य–साधन प्रकारचा भेद कार्यकारणापुरता आहे. ह्यापासून हरीची उपासना होत नाहीं. खरी हरीची उपासना ही ब्रह्मस्वरूपीं प्रस्थान ठेवल्यानें म्हणजे जीवात्म्याचें ब्रह्माशीं ऐक्य होण्यानें प्राप्त होते १. एकच ईश्वराचें स्वरूप बीज अज्ञान व फल स्थूल सूक्ष्मात्मक जगत् ह्या रूपानें वाटलें गेलें आहे. या बीजफलाचे आदिअंतीं असणारें जें श्रीहरीचें स्वरूप, त्याचें आपल्या हृदयांत जो रक्षण करतो तो धन्य आहे २.

आवश्यक तो शेवट । येर अवघी खटपट । चालों जाणे वाट । ऐसा विरळा एखादा ॥ ३ ॥ तुका होवोनि निराळा । क्षरअक्षर वेगळा । पाहे निगमकळा । बोले विठ्ठलप्रसादें ॥ ४ ॥ [७७८]

वेदपुरुष तरि नेति कां वचन । निवडूनि भिन्न दाखविलें ॥ १ ॥ तुझीं वर्में तूंचि दावूनि अनंता । होतोसि नेणता कोण्या गुणें ॥ २ ॥ यज्ञाचा भोक्ता तरि कां नव्हे सांग । उणें पडतां अंगक्षोभ घडे ॥ ३ ॥ वससील तूं या भूतांचे अंतरीं । तरि कां भेद हरी दावियेला ॥ ४ ॥ तपतीर्थाटणें तुझी मूर्ति दान । तरि कां अभिमान आड येतो ॥ ५ ॥ आतां क्षमा कीजे विनवितो तुका । देऊनियां हाका उभा द्वारीं ॥ ६ ॥ [७७९]

अभक्त ब्राह्मण जळो त्याचें तोंड । काय त्यासी रांड प्रसवली ॥ १ ॥ वैष्णव चांभार धन्य त्याची माता । शुद्ध उभयतां कूळयाती ॥ २ ॥ ऐसा हा निवाडा झालासे पुराणीं । नोहे माझी वाणी पदरींची ॥ ३ ॥ तुका म्हणे आगी लागो थोरपणा । दृष्टि त्या दुर्जना न पडो माझी ॥ ४ ॥ [७८०]

त्रिपुटीच्या योगें । कांहीं नव्हे कोणाजोगें । एक जातां लागे । एक पाठी लागतें ॥ १ ॥ मागें पुढें अवघा काळ । पळों नये न चले बळ । करितां कोल्हाळ । कृपें खांदीं हरि वाहे ॥ २ ॥ पापपुण्यात्म्याच्या शक्ती । असती योजिल्या श्रीपती । यावें काकुलती । तेथें सत्तानायका ॥ ३ ॥ तुका उभा पैल थडी । तरि हे प्रकार निवडी । घातल्या सांगडी । ताफे पेटे हाकारी ॥ ४ ॥ [७८१]

देखण्याच्या तीन जाती । वेठी वार्ता अत्यंतीं ॥ १ ॥ जैसा भाव तैसें फळ । स्वाती तों(तोय)

(क्षराक्षरांचा) शेवट जो हरि त्याला जाणणें आवश्यक आहे. त्यावांचून बाकीची सर्व व्यर्थ खटपट आहे. त्या हरीची वाट चालणें, हें जाणणारा असा एखादाच आहे. ३. तुकाराम महाराज म्हणतात, क्षराक्षर या सोपाधिक पुरुषाहून मी वेगळा झालों आहें व वेदाचें ज्ञान विठ्ठलप्रसादें जाणून बोलत आहें ४. [७७८]

हे देवा, वेदरूपी पुरुष तुम्हीं आहां, तर तुमच्याविषयीं वेदानें नेति (न इति, हें नाहीं, हें नाहीं) ह्या शब्दानें तुम्हांला निवडून दर्शविलें १. हे अनंता, तुम्हीं मीं सर्वगत, सर्वव्यापी आहें असें वर्म दाखवून कोणत्या कारणानें नेणतेपण घेतां ? २. यज्ञाचे भोक्ते आपण आहांत, तर यज्ञ तो सांग कां होत नाहीं ? त्यांत कांहीं उणीव आल्यास क्षोभ कां होतो ? सर्व भूतांच्या अंतर्यामीं जर एक तुमची वस्ती आहे, तर हा बाह्यभूत भेद कां दाखविला ? ४. तप, तीर्थयात्रा व दान करणें हीं जर मूर्तिमंत तूं आहेस, तर कर्त्यांच्या मागें अभिमान कां लागतो ? ५. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या दारांत उभा राहून वरील गार्‍हाणें करीत आहें. ह्याविषयीं क्षमा असावी ६. [७७९]

जो ब्राह्मण भक्तिहीन आहे, त्याच्या तोंडास आग लागो. त्याची रांड आई त्याला कां प्रसवली ? १. चांभार आहे, पण तो विष्णुउपासक आहे, तर त्याची आई धन्य समजावी व त्याच्या आईबापाचीं याति-कुळेंहि शुद्ध होत २. ह्या प्रमाणें पुराणांनींच निर्णय दिला आहे. हें मीं आपल्या पदरचें बोलत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरीच्या भक्तीवांचून असणार्‍या थोरपणाला आग लागो. असल्या दुर्जनांचें मला दर्शनहि नको ४. [७८०]

जग अनेक प्रकारच्या [कर्ता, कर्म आणि करण, भोक्ता, भोग आणि भोगाचे साधन असें] त्रिपुटी-आत्मक आहे, म्हणून कांहीं कोणाच्या अधिकारांत नाहीं, कारण त्यांपैकीं एक नाहींशी केली तर दुसरी मागें लागते १. पाहूं गेलों तर मागेंपुढें सर्व काळानें व्यापलें आहे. त्यामधून पळून [सुटून] जाण्याचा इलाज चालत नाहीं. म्हणून देवाच्या नामस्मरणाचा गजर केल्यानें तो देव भक्ताला काळापासून सोडवून कृपेनें खांद्यावर घेईल [संसारांतून पार करील] २. हरीनें पापपुण्यात्मक योजिलेल्या शक्तीच्या पेंचांत सर्व जग सांपडलें आहे, म्हणून त्यांतून सुटण्याविषयीं सत्तानायक देवास काकुळतीला यावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी पलीकडच्या तीरीं उभा राहिलों आहें, म्हणून ह्या सर्व प्रकारची निवडानिवड करितों व तारण्याचीं साधनें म्हणजे हरिनामाची सांगडी, ताफे व पेटे घालून लोकांस हांका मारतों ४. [७८१]

देवास पाहाण्याचे प्रकार तीन. ते असे, कीं दुसर्‍याच्या सांगण्यावरून समजणें, बिगार्‍यासारखें पाहाणें व प्रत्यक्ष वारकाईनें पाहाणें १. जसें एका स्वातीच्या पाण्याचे परिणाम तीन. ते असे कीं शिंपल्यांत पडल्यास मोतीं, कापशीच्या पिकावर पडल्यास पिकाचा नाश, व सर्पाच्या मुखीं पडल्यास विष होतें. तसें जसा ज्याचा भाव देवाच्या ठिकाणीं असेल

एक जळ ॥ २ ॥ पाहे सांगे आणि जेवी । अंतर महदंतर तेवीं ॥ ३ ॥ तुका म्हणे हिरा । पारखिया मूढां गारा ॥ ४ ॥ [७८२]

अनुभवें अनुभव अवघाचि साधिला । तरि स्थिरावला मनु (न) ठायीं ॥ १ ॥ पिटूनियां मुसे आला अळंकार । दग्ध तें असार होऊनियां ॥ २ ॥ एकचि उरलें काया वाचा मना । आनंद भुवनामाजी त्रयीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हीं जिंकला संसार । होऊनि किंकर विठोबाचे ॥ ४ ॥ [७८३]

ऐशिया संपत्ती आम्हां संवसारीं । भोगाचिया परी काय सांगूं ॥ १ ॥ काम तो कामना भोगीतसे देवा । अलिंगनें हेवा चरण चुंबी ॥ २ ॥ शांतीच्या संयोगें निरसला ताप । दुसरें या (तें) पाप भेदबुद्धि ॥ ३ ॥ तुका म्हणे पाहें तिकडे सारिखें । आपुलें पारिखें निरसलें ॥ ४ ॥ [७८४]

राम राज्य राम प्रजा लोकपाळ । एकचि सकळ दुजें नाहीं ॥ १ ॥ मंगळावांचूनि उमटेना वाणी । अखंडची खाणी एकी रासी ॥ २ ॥ मोडलें हें स्वामी ठायाठाव सेवा । वाढवावा हेवा कोणा अंगें ॥ ३ ॥ तुका म्हणे अवघें दुमदुमिलें देवें । उरलें तें गावें हेंचि आतां ॥ ४ ॥ [७८५]

निवडोनियां वाण काढिले निराळे । प्रमाण डोहळे यावरि ते ॥ १ ॥ जयाचा विभाग तयासीच फळे । देखणें निराळें कौतुकासी ॥ २ ॥ शूर तो ओळखे घायडायहात । येरां होइल मात सांगायासी ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी केळवते वाणी । केला निजस्थानीं जाणवसा ॥ ४ ॥ [७८६]

याजसाठीं केला होता अट्टाहास । शेवटचा दिस गोड व्हावा ॥ १ ॥ आतां निश्चिंतीनें पावलों विसांवा । खुंटलिया धांवा तृष्णेचिया ॥ २ ॥ कवतुक वाटे जालिया वेंचाचें । नांव मंगळाचें तेणें

तसें त्यास फळ मिळतें २. अन्न पाहाणें, अन्नाची हकीगत सांगणें अथवा कानांनीं ऐकणें व प्रत्यक्ष जेवणें, ह्यांत फारच अंतर आहे. तेव्हां जसा ज्याचा भात्र असेल, तशी फलप्राप्ति होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, हिरा हा परीक्षकासच कळतो व तोच हिरा मूर्खांस गारेसारखा दिसतो ४. [७८२]

आमचें मन विठोबाच्या चरणाचे ठायीं स्थिरावलें आहे, म्हणून ह्या अनुभवानें सर्व अनुभव प्राप्त झाला १. मुशीमध्यें सोनें घातल्यावर अग्नीच्या आंचीनें त्यांतील हिणकस जळून तें शुद्ध निवडलें आणि तेंच हातोड्यानें ठोकल्यावर अलंकारअवस्थेस आलें २. तसें काया-वाचा-मनास लोकत्रयामध्यें एक परमानंद उरला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं विठोबारायाचे दास होऊन सकल संसार जिंकिला ४. [७८३]

संसारामध्यें सर्वच ब्रह्मरूप आहे, अशा अनुभवांचें ऐश्वर्य आम्ही भोगतों, त्याचे प्रकार काय सांगावे ? १. आमचा काम [इच्छा] हा देवासच भोगीत आहे, आणि देवाच्या आलिंगनाची हांव धरून तो चरणाचें चुंबन घेतो. २ शांतस्वरूप जो हरि त्याच्या संयोगानें त्रिविधतापाचा नाश केला आहे. आतां द्वैतबुद्धि उत्पन्न होणें पाप होय ३. तुकारा ममहाराज म्हणतात, मला जिकडे पहावें तिकडे एक हरीचें स्वरूप भासत आहे, म्हणून आपले आणि परके हा भेदभाव नाहींसा झाला ४. [७८४]

राजा, प्रजा, व राज्य हें सर्व रामरूप झालें आहे, आतां दुसरें कांहीं नाहीं १. वाणी ही एक राम ह्या मंगलनामाच्या राशींची खाण असल्यामुळें त्या वाणींतून मंगलावांचून दुसरा शब्द उमटत नाहीं २. व त्यास अशा स्थितींत स्वामिसेवक हें भान नाहींसें झालें. आतां ही हांव कोणत्या मार्गानें वाढवावी ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व जगच देवाच्या स्वरूपानें भरून जें पंढरीस उरलें आहे, तें आम्ही निरंतर गाणार ४. [७८५]

[भक्तीचे] निरनिराळे प्रकार निवडून ठेविले आहेत. ह्यावर जसे ज्याचे डोहाळे [वासना] असतील तसें तो त्याचें ग्रहण करील १. अधिकारपरत्वानें जो भाग ज्याच्या वांटणीस आला आहे, तो त्याला फलद्रूप होईल. हें कौतुक पाहाणारे वेगळे राहतात [त्यांना ह्याचा लाभ नाहीं] २. खरा शूर जो आहे, तो शत्रूला घावडावाच्या पेंचामध्यें कसें आणावें, हें जाणतो व त्याचे घावडाव ओळखतो. दुसऱ्यांना ती हकीगत एकमेकांस सांगण्यापुरती होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या वाणीनें निजस्वरूपीं वास्तव्य केल्यामुळें माझी वाणी सुशोभित दिसते ४. [७८६]

शेवटचा दिवस चांगला व्हावा म्हणजे अंतकाळीं हरीच्या चिंतनांत देह पडावा, एवढ्याकरितांच भगवद्भक्तीचा खटाटोप केला होता १. आतां निष्काळजीपणानें विश्रांति पावलों व तृष्णेची धांव नाहींशी झाली २. हरीच्या मंगल

गुणें ॥ ३ ॥ तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिवस चारी खेळीमेळीं ॥ ४ ॥ [७८७]

भक्तीचिया पोटीं रत्नाचिया खाणी । ब्रह्मींची ठेवणी सकळ वस्तु ॥ १ ॥ माउलीचे मागें बाळकांची हारी । एका सूत्रें दोरी ओढतसे ॥ २ ॥ जेथील जें मागे तें रायासमोर । नाहींसें उत्तर येत नाहीं ॥ ३ ॥ सेवेचियें सत्ते धनीच सेवक । आपुलें तें एक न वंची कांहीं ॥ ४ ॥ आदि अंता ठाव असे मध्यभाग । भोंवतें भासे जग उंचासनीं ॥ ५ ॥ भावारूढ तुका झाला एकाएकीं । देवचि लौकिकीं अवघा केला ॥ ६ ॥ [७८८]

सांगतां दुर्लभ ज्ञानाचिया गोष्टी । अनुभव तो पोटीं कैंचा घडे ॥ १ ॥ भजनाचे सोई जगा परिहार । नेणत्यां सादर चित्त कथे ॥ २ ॥ नाईकवे कानीं साधन उपाय । ऐके तो गाय हरुषें गीत ॥ ३ ॥ नव्हे आराणूक जावयासी वना । वेध कामिमना हरिकथेचा ॥ ४ ॥ काळाच्या साधना कोणा अंगीं बळ । चिंतनें मंगळ अष्टप्रहर ॥ ५ ॥ तुका म्हणे आम्ही खेळों भातुकुलें । विभागासी मुलें भोळीं येथें ॥ ६ ॥ [७८९]

जाणपण बरें देवाचे ते शिरीं । आम्ही ऐशीं बरी नेणतींच ॥ १ ॥ देखणीयांपुढें रुचे कवतुक । उभयतां सुख वाढतसे ॥ २ ॥ आशंकेची बाधा नाहीं लडिवाळां । चित्त वरि खेळा समबुद्धि ॥ ३ ॥ तुका म्हणे दिशा मोकळ्या सकळां । अवकाशीं खेळा ठाव जाला ॥ ४ ॥ [७९०]

वचनांचे मांडे दावावे प्रकार । काय त्या साचार कौतुकाचे ॥ १ ॥ जातां घरा मागें उरों नेणे खंती । मिळाल्या बहुती फांकलिया ॥ २ ॥ उदयींच अस्त उदयो(ये) संपादला । कल्पनेचा

नामाच्या चिंतनांत आयुष्य घालविलें, त्याचें मोठें कौतुक वाटत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मीं मुक्तीशीं लग्न लावलें. आतां तिच्याच योगांत व तिच्याशीं क्रीडा करण्यांत राहिलेले चार दिवस जात आहेत ४. [७८७]

भक्तीच्या उदरीं ब्रह्म आदिकरून सर्व वस्तुरूपी रत्नांच्या खाणी आहेत १. आईच्या मागें एकमेकांच्या प्रेमसूत्राच्या ओढीनें बाळकांची रांग चालते २. उदार राजाचे पुढें जें कोणीं कांहीं मागेल त्यास राजाकडून नाहीं असें उत्तर मिळत नाहीं ३. अनन्य सेवेच्या जोरानें सेवकच धन्याचे पदवीस येतो; कारण धनी आपला सर्वस्व अधिकार त्याला देण्यास कांहीं अंतर करीत नाहीं ४. एकवार धन्याच्या उंचासनावर सेवकाची बैठक झाली, कीं भोंवतालीं उत्तम, मध्यम व कनिष्ठ असें जगत् भासतें ५. तुकाराम महाराज म्हणतात, ऐक्यभावाच्या सिंहासनीं माझी बैठक झाली, म्हणून सर्व लोक देव झाले आहेत ७. [७८८]

ज्ञानविषय सांगण्यास जर कठीण आहे, तर त्याचा हृदयांत अनुभव येणें हें कसें घडेल ? १. म्हणून अज्ञ जीवांनी हरिभजनाच्या व हरिकथेच्या ठिकाणीं दक्षतेनें चित्त ठेविल्यास त्यांच्या दुःखाचा परिहार होईल. २. इतर साधनोपायाचें श्रवण कठीण आहे. [मग करणें कोठून ?] जो हरिकथा ऐकतो तो हरीला आनंदानें गातो [इतकी ती सुलभ आहे] ३. वनामध्यें जाण्यांत समाधान होत नाहीं, आणि हरिकथा ऐकली असतां रजोगुणी मनासहि वेध लागतो ४. जीं साधनें करण्यास योग्य काळ लागतो, तीं करण्याचें बळ कोणाच्या अंगीं आहे ? आणि ही अडचण हरिचिंतामध्यें नसून तेथें आठहि प्रहर शुभ आहेत ५. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं हरीच्या चिंतनाचें भातुकलें खेळतों. ह्यांत वांटेकरी जीं कोणीं भोळीं मुलें आहेत तीं होतील [इतर लोक अवघड साधनें करण्यास प्रवृत्त होतात] ६. [७८९]

ज्ञानीपणा हा देवाच्या मस्तकीं [देवाकडेच असलेला] बरा. आम्ही अज्ञानीच बरे आहों १. शाहाण्यापुढें अज्ञान्यांनी क्रीडा करणें हें शाहाण्यांना मानलें जातें आणि उभयतांमध्यें सुख वाढतें २. लाडक्या मुलांना भीतीची बाधा कधींहि होत नाहीं व त्यांचें चित्त आणि बुद्धि खेळाच्या ठिकाणीं सम असते ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व दिशा व सर्व काल त्यांना खेळण्याचें ठिकाण झालें आहे ४. [७९०]

मुली भातुकलें खेळण्यास एके ठिकाणीं जमल्या, म्हणजे शब्दांचेच मांडे आदिकरून प्रकार दाखवितात. त्यांच्या ह्या कौतुकाचा काय खरेपणा आहे ? १. त्यांचा भातुकलीचा खेळ आटोपल्यावर पुष्कळ जमलेल्या मुली आपापल्या घराकडे जातांना त्यांना मागची तळमळ राहात नाहीं. २. भरदिवसा दोनप्रहरीं खेळत असतां कल्पनेनेंच रात्र झाली असें समजून खोट्या निजतात, व लगेच उजाडलें अशी कल्पना करून उठतात. हा त्यांचा व्यवहार जागृतींत

केला जागेपणें ॥ ३ ॥ जाणोनियां (जाणवूनि) गेला हांडोरिया पोरां । सावध इतरां करुनि तुका ॥ ४ ॥ [७९१]

बीजापोटीं पाहे फळ । विध न करितां सकळ ॥ १ ॥ तया मूर्ख म्हणावें वेडें । कैसें तुटेल सांकडें ॥ २ ॥ दावितिया वाट । वेठीं धरूं पाहे चाट ॥ ३ ॥ पुढिल्या उपाया । तुका म्हणे राखें(खा) काया ॥ ४ ॥ [७९२]

मातेचीं जो थानें फाडी । तया जोडी कोण ते ॥ १ ॥ वेदां निंदी तो चांडाळ । भ्रष्ट सुतकीया खळ ॥ २ ॥ आगी लावी घरा । मग वसती कोठें थारा ॥ ३ ॥ तुका म्हणे वर्म । येरा नाचविती भ्रम ॥ ४ ॥ [७९३]

वेष वंदा(व)या पुरते । कोण ब्राह्मण निरुते ॥ १ ॥ ऐसें सांगा मजपाशीं । संतां निरवितों येविशीं ॥ २ ॥ असा जी प्रवीण । ग्रंथीं कळे शुद्ध हीण ॥ ३ ॥ तुका म्हणे लोपें । सत्याचिया घडती पापें ॥ ४ ॥ [७९४]

ज्या ज्या आम्हांपाशीं होतील ज्या शक्ति । तेणें हा श्रीपती अळंकारूं ॥ १ ॥ अवघा पायांपाशीं दिला जीवभाव । जन्ममरण ठाव पुसियेला ॥ २ ॥ ज्याचें देणें त्यासी घातला संकल्प । बंधनाचें पाप चुकविलें ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें उरला विठ्ठल । खाये बोले बोल गायनाचे ॥ ४ ॥ [७९५]

आम्ही आळीकरें । प्रेमसुखाची लेंकुरें ॥ १ ॥ पायीं गोविली वासना । तुच्छ केलें ब्रह्मज्ञाना ॥ २ ॥ येतां देखे मूळा । वाट(वास) पंढरीचीं(च्या) डोळां ॥ ३ ॥ तुका म्हणे स्थळ । मग मी पाहेन सकळ ॥ ४ ॥ [७९६]

आइत्याची राशी । आली पाकसिद्धीपाशीं ॥ १ ॥ आतां सांडोनी भोजन । भिके जावें

होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी ह्या मूर्ख पोरांना व इतरांना हा सर्व प्रपंच खोटा असें समजावून जागृत करीत गेलों आहें ४. [७९१]

शेतामध्यें बीं पेरणें व राखणें, वगैरे विधि कांहीं एक न करितां जो केवळ बीजाच्या ठिकाणीं पीक पाहातो १. अशा मनुष्याला मूर्ख अगर वेडा म्हणावें. अशा ह्या त्याच्या करण्यानें सरकारसारा देणें, हें संकट कसें दूर होईल? २. मार्ग दाखविणारास बिगारीला धरूं इच्छिणारा हा चावट आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, पुढें नरदेह मिळेल असे परमार्थाचे उपाय करण्याकरितां देहरक्षण कर ४. [७९२]

आपल्या मातोश्रीचे स्तन फाडणारास काय लाभ आहे? १. तसेंच वेदांची निंदा करणारा हा महार असून भ्रष्ट सुतक्याप्रमाणें नीच आहे २. ज्यानें आपल्या घरास आग लावून तें जाळलें, मग त्यास राहाण्यास जागा कोठें आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वांना भ्रम नाचवीत आहे, आणि वेदांचें मीं मात्र वर्म जाणत आहें ४. [७९३]

ब्राह्मणाची क्रिया अंगीं नसून ज्याचा नमस्कार करण्यापुरता बाह्य वेष आहे, असे हे खरे ब्राह्मण आहेत काय? १. ह्याचें उत्तर मला सांगा. ह्याविषयीं मीं तुम्हां संतांना विनंति करतों २. अहो ब्राह्मणांनो, सर्व ग्रंथांमध्यें तुम्हीं प्रवीण असून तुम्हांला चांगलें–वाईट कळत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, खरें लोपलें म्हणजे सकळ पापें घडतात ४. [७९४]

जें जें म्हणून आमच्या अंगीं सामर्थ्य आहे, त्या योगानें ह्या लक्ष्मीपतीस अलंकार घालूं १. सर्व जीवभाव देवाच्या पायीं अर्पण करून जन्ममरणाचें ठावठिकाण आम्हीं नाहींसें केलें २. देवाचें जें कांहीं देणें होतें, तें सर्व आम्हीं त्याला अर्पण करून देहबुद्धिबंधनाचें पाप नाहींसें केलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आम्हांला सर्व कांहीं एक विठ्ठलच आहे. त्याचेंच आम्हीं सेवन करतों, तेच बोल बोलतों, त्यालाच गातों आणि त्याच्याच छंदानें नाचतों ४. [७९५]

ह्या देवाचीं आम्हीं लेंकुरें भगवंताविषयींचें प्रेमसुख मागण्याचा हट्ट करणारीं आहोंत. १. देवाच्या पायीं वासना ठेवून ब्रह्मज्ञान आम्हीं तुच्छ मानिलें २. आतां पंढरीहून आम्हांस न्यावयास मूळ कधीं येईल ह्याविषयीं दृष्टिहि वाट पाहात आहे. ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवांनीं मला बोलावून नेल्यावर मी सर्व क्षेत्रांसह पांडुरंगस्वरूप पाहीन ४. [७९६]

जेवणारापाशीं तयार झालेल्या अन्नाचें ताट वाढून आलें १. त्याचा त्याग करून भीक मागावयास जाणें हें वेडेपण

वेडेपण ॥ २ ॥ उसंतिली वाट । मागें परतावें फुकट ॥ ३ ॥ तुका म्हणे वाणी । वेंचों बैसोन ठाकणीं ॥ ४ ॥ [७९७]

धन्य शुद्ध जाती । धरीं लौकरी परती ॥ १ ॥ ऐकिलें तेंचि कानीं । होय परिपाक मनीं ॥ २ ॥ कळवळा पोटीं । सावधान हितासाठीं ॥ ३ ॥ तुका म्हणे भाव । ज्याचा तोचि जाणा देव ॥ ४ ॥ [७९८]

जीवित्व तें किती । हेंचि धरितां बरें चित्तीं ॥ १ ॥ संत सुमनें उत्तरें । मृदु रसाळ मधुरें ॥ २ ॥ विसांवतां कानीं । परिपाक घडे मनीं ॥ ३ ॥ तुका म्हणे जोडी । होय जतन रोकडी ॥ ४ ॥ [७९९]

अभिमानाची स्वामिनी शांती । महत्व घेती सकळ ॥ १ ॥ कळोनि हें (कळोनिही) न कळे वर्म । तरि श्रम पावती ॥ २ ॥ सर्व सत्ता धरितां धीर । वीर्यां वीर्य(वीर) आगळा ॥ ३ ॥ तुका म्हणे तिखट तिखें । मृदु सखे आवडी ॥ ४ ॥ [८००]

भोजन पा शांतीचें । उंच नीचें(नीच) उसाळी ॥ १ ॥ जैशी कारंज्याची कळा । तो जिव्हाळा स्वहिताचा ॥ २ ॥ कल्पना ते देवाविण । न करीं भिन्न इतरीं ॥ ३ ॥ तुका म्हणे पावे भूतीं । ते निश्चिती मापली ॥ ४ ॥ [८०१]

पोटापुरतें काम । परि अगत्य तो राम ॥ १ ॥ कारण तें हेंचि करीं । चित्तीं पांडुरंग धरीं ॥ २ ॥ प्रारब्धीं हेवा । जोडी देवाची ते सेवा ॥ ३ ॥ तुका म्हणे बळ । बुद्धी वेंचुनि सकळ ॥ ४ ॥ [८०२]

बहुतां जन्मां अंतीं । जोडी लागली हे हातीं ॥ १ ॥ मनुष्यदेहा ऐसा ठाव । धरीं पांडुरंगीं भाव ॥ २ ॥ बहु झाला(केला) फेरा । येथें सांपडला थारा ॥ ३ ॥ तुका म्हणे जाणे । ऐसे दुर्लभ ते शाहाणे ॥ ४ ॥ [८०३]

आहे. २. चालून आलेली वाट पुनः मागें परतून जाणें व्यर्थ आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं एका ठिकाणीं बसून प्रीतीनें नामचिंतनांत वाणी वेंचूं ४. [७९७]

भगवंताकडे त्वरेनें वळणारी मनुष्याची जात शुद्ध असून धन्य आहे १. परमार्थ विचार ऐकल्यावरोबर ज्याच्या मनांत त्याची परिपाकता होते (त्याच्या मनावर लवकर परिणाम होतो) २. हरिविषयींचें प्रेम ज्याच्या हृदयांत असून जो स्वहिताविषयीं जागत राहातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा ज्याचा भाव आहे, तोच देव आहे, असें समजावें ४. [७९८]

(मनुष्याचें) आयुष्य हें किती आहे? (ध्रुवपदांत सांगितल्याप्रमाणें) हेंच चित्तामध्यें धरावें हें बरें १. (तें असें कीं) संतानें बोध केलेले शब्द हीं पुष्पें कोमळ, रसभरित आणि गोड अशीं आहेत २. तीं जर ऐकिलीं तर मन हें परिपक्वदशेस येतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो रोकड लाभ होतो तो संग्रहीं ठेवावा हें बरें ४. [७९९]

शांतवृत्ति अभिमानादि वृत्तींपेक्षां श्रेष्ठ आहे. त्याच्योगानें सर्व महत्वाला येतात १. हें वर्म सर्वांना कळत असूनहि न कळल्यासारखे वागतात, म्हणून श्रम पावतात २. परमार्थांत धैर्य धरल्यानें मनुष्य सर्व सत्तेचा अधिकारी होतो. असा जो आहे, तो सर्व बलवानांत महाबली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतजन हे तीक्ष्णांत तीक्ष्ण असून परमार्थाच्या ठिकाणीं मऊ आहेत, असे जे ते माझे आवडते मित्र आहेत ४. [८००]

कमीजास्त आवेशानें शांतीचें सेवन करावें १. ज्याप्रमाणें कारंज्याच्या धारा एकापेक्षां एक उंच उडत असतात, त्याप्रमाणें स्वहित साधण्यास अंतःकरणांत प्रेमाचा जिव्हाळा पाहिजे २. देवावांचून अन्य कांहीं कल्पना करूं नका ३. तुकाराम महाराज म्हणतात, जी शांति भूतांच्या ठिकाणीं प्राप्त व्हावी ती मीं मोजली (तिचा विचार सांगितला) ४. [८०१]

उदरपोषणापुरतें काम करावें! परंतु विशेष अगत्य रामचिंतनाविषयीं असावें १. चित्तामध्यें पांडुरंगाला धरणें हेंच कार्य करावें २. देवाच्या सेवेची जोड करून घेणें हीच हांव प्रारब्धवानांनीं धरावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, ही जोड सर्व बळाचा आणि बुद्धीचा व्यय करून करावी ४. [८०२]

पुष्कळ जन्मांच्या शेवटीं (ध्रुवपदांत दर्शविलेली) प्राप्ति झाली आहे (तुला हा ठेवा हाताला लागला आहे) १. मनुष्यदेहासारखें (सर्वोत्कृष्ट) ठिकाण प्राप्त झालें आहे. पांडुरंगाचे ठिकाणीं श्रद्धा ठेव २. आजपर्यंत अनेक योनींतून पुष्कळ फेऱ्या घालून शेवटीं ह्या नरदेहाचा तुला आधार मिळाला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें ह्याचें दुर्लभत्व जाणणारे शाहाणे दुर्मिळ आहेत ४. [८०३]

रूप नांव माया बोलावया ठाव । भागा आले भाव तयावरि (तयापरी) ॥ १ ॥ सींव वांटे परी न खंडे पृथिवी । शाहाणे ते जीवीं समजती ॥ २ ॥ पोटा आलें तिच्या लोळे मांडीवरी । पारखी न करी खंती चित्तीं ॥ ३ ॥ तुका म्हणे भक्तिसाठीं हरिहर । अरूपींचें क्षर विभाग हे ॥ ४ ॥ [८०४]

लेंकराची आळी न पुरवी कैसी । काय तयापाशीं उणें झालें ॥ १ ॥ आम्हां लडिवाळां नाहीं तें प्रमाण । कांहीं ब्रह्मज्ञान आत्मस्थिति ॥ २ ॥ वचनाचा घेईन अनुभव पदरीं । जें हें जनाचारीं मिरविलें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी भोळिवेची आटी । दावीन शेवटीं कौतुक हें ॥ ४ ॥ [८०५]

आर्तभूतांप्रति । उत्तम योजाव्या त्या शक्ति ॥ १ ॥ फळ आणि समाधान । तेथें उत्तम कारण ॥ २ ॥ अल्पें तो संतोषी । स्थळीं सांपडे उद्देसीं ॥ ३ ॥ सहज संगम । तुका म्हणे तो उत्तम ॥ ४ ॥ [८०६]

मुळाचिया मुळें । दुःखें वाढती सकळें ॥ १ ॥ ऐसा योगियांचा धर्म । नव्हे वाढवावा श्रम ॥ २ ॥ न कळे आवडी । कोण आहे कैसी घडी ॥ ३ ॥ तुका म्हणे थीतें । दुःख पाववावें चित्तें ॥ ४ ॥ [८०७]

भाग्यवंता हेंचि काम । मापी नाम वैखरी ॥ १ ॥ आनंदाची पुष्टि अंगीं । श्रोते संगीं उद्धरती ॥ २ ॥ पिकलें तया खाणें किती । पंगतीस सुकाळ ॥ ३ ॥ तुका करी प्रणिपात । दंडवत आचारियां ॥ ४ ॥ [८०८]

लटिकें तें रुचे । साच कोणाही न पचे ॥ १ ॥ ऐसा माजल्याचा गुण । भोगें कळों येईल सीण ॥ २ ॥ वाढवी ममता । नाहीं वरपडला तो दूतां ॥ ३ ॥ न मनी माकड । कांहीं उपदेश हेकड ॥ ४ ॥ [८०९]

नामरूपरहित परब्रह्माचे ठिकाणीं नामरूपात्मक मायिक सगुण रूप झालें, म्हणून भक्तजनांना त्याच्या ठिकाणीं भाव ठेवण्यास व त्याच्याशीं बोलण्यास आधार मिळाला १. पृथ्वीच्या ठिकाणीं अमूक गांवची अमुक शीव अशी कल्पना जरी होत आहे, तरी पृथ्वीच्या अखंडपणांत कांहीं भंग झाला नाहीं. हा प्रकार विचारी जनांचे जीवात्मे जाणतात २. जिच्या उदरीं जन्म घेतला आहे, तिच्या मांडीवर तें बालक लोळतें. ह्याविषयीं परीक्षक चित्तांत कांहीं संशय निर्माण होऊं देत नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, जीवांच्याकडून भक्ति होण्याकरितांच अरूप परमात्मा हरि व हर ह्या सगुण रूपानें विभागास आला (साकार झाला) ४. [८०४]

विठ्ठल आई बालकाचा हट्ट कां पूर्ण करीत नाहीं? तिच्याजवळ कांहीं कमी आहे? १. आम्हां लडिवाळ बालकांना ब्रह्मज्ञान व आत्मस्थिति हें कांहीं कबूल नाहीं (आवडत नाहीं) २. देवांनीं, मजकडे येणाऱ्या पतितांचा मीं अंगीकार करीन, असें हें वचन जगांत प्रसिद्ध केलें आहे, त्याचा अनुभव मी पदरांत घेईन ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी ही खटपट भोळेपणाची आहे. ह्याचें कौतुक अखेरीस (तुम्हांस) दाखवीन ४. [८०५]

अहो देवा, जे पीडित व इच्छा धरणारे भक्त आहेत, त्यांच्या ठिकाणीं तुमच्या ज्या उत्तम शक्ति (ऋद्धि, सिद्धि आदिकरून) असतील त्यांची योजना करावी (त्या द्याव्या) १. त्या योगानें त्यांना फळ मिळून समाधानाची प्राप्ति होण्याचें उत्तम कार्य घडेल २. कांहींएक उद्देश धरून तुमच्या ठिकाणीं जो आला आहे, तो अल्प देणगीनें संतुष्ट होणारा आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा हा सहज उत्तम योग आहे ४. [८०६]

कारणाच्या योगानें सर्व दुःख वाढतें (अष्टांग योगांत समाधीचें कारण ध्यान, ध्यानाचें कारण धारणा, धारणेचें कारण प्राणायाम आहे. अशा कठिण कार्यकारणपरंपरेमुळें साधकाला सर्व दुःखच प्राप्त होतें) १. तसें ज्यायोगेंकरून श्रम वाढतील असा योग्यांचा धर्म नाहीं काय? २. कोणत्या वेळेला कशी घटका आहे हें आवडीच्या भरामुळें कळत नाहीं (आसक्तीच्या भरांत ऋद्धि-सिद्धीमध्यें गुंतण्याची शक्यता असते) ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा योगानें चित्तास व्यर्थ दुःखाचा भोग होतो ४. [८०७]

भाग्यवानाला वाणीरूपी मापानें श्रीहरीचें नाम एकसारखें मोजणें हेंच काम आहे १. ज्याच्या अंगीं परमानंदाची पुष्टि असून संगतीनें असणाऱ्या श्रोत्यांचा उद्धार होतो २. ज्यानें धान्य पिकविलें आहे त्याला त्याचें सेवन कितीसें होणार? त्याचा खरा सुकाळ महंतांच्या पंगतीस होणार आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचे जे आचार्य आहेत त्यांना मी साष्टांग दंडवत करीत आहें ४. [८०८]

खोटें सर्वांना आवडतें तसें खरें कोणाला पटत नाहीं १. हा सर्व मस्तीचा गुण आहे. तो त्यांना यमलोकीं दुःख भोगतेवेळीं कळून येईल २. जोंपर्यंत यमदूतांच्या स्वाधीन झाला नाहीं तोंपर्यंत खोट्या देह-स्त्री-पुत्राची ममता वाढवितो ३. अशा ह्या हट्टी माकडास कांहीं उपदेश केला तरी तो मानीत नाहीं. ४. [८०९]

कौतुकाची सृष्टी । कौतुकेंच केलें कष्टी ॥ १ ॥ मोडे तरी भलें खेळ । फांके फांकिल्या कोल्हाळ ॥ २ ॥ जाणणियासाठीं । भय सामावलें पोटीं ॥ ३ ॥ तुका म्हणे चेता । होणें तें तूंचि आइता ॥ ४ ॥ [८१०]

भोंवडीसरिसें । अवघें भोंवतचि दिसे ॥ १ ॥ ठायीं राहिल्या निश्चळ । आहे अचळीं अचळ ॥ २ ॥ एक हाकेचा कपाटीं । तेथें आणीक नाद उठी ॥ ३ ॥ अभ्रें (भ्र) धांवे शशी । असे तेथें दुसरें भासी ॥ ४ ॥ [८११]

नव्हों आम्ही आजिकालीचीं । काचीं कुचीं चाळवणी ॥ १ ॥ एके ठायीं मूळडाळ । ठावा सकळ अहेसी ॥ २ ॥ तुमचें आमचेंसें कांहीं । भिन्न नाहीं वांटलें ॥ ३ ॥ तुका म्हणे जेथें असें । तेथें दिसें तुमचासा ॥ ४ ॥ [८१२]

योगियाची संपदा त्याग आणि शांति । उभयलोकीं कीर्ति सोहळा मान ॥ १ ॥ येरयेरांवरी जयांचें उसणें । भाग्यस्थळीं देणें झाडावेसीं ॥ २ ॥ केलिया फावला ठायींचा तो लाहो । तृष्णेचा तो काहो काहाविती ॥ ३ ॥ तुका म्हणे लाभ अकर्तव्या नांवें । शिवपद जीवें भोगिजेल ॥ ४ ॥ [८१३]

मरणा हातीं सुटली काया । विचारें या निश्चयें ॥ १ ॥ नासोनियां गेली खंती । सहजस्थिति भागाचीचे ॥ २ ॥ न देखेसे झाले श्रम । आलें वर्म हातां हें ॥ ३ ॥ तुका म्हणे कैंची कींव । कोठें जीव निराळा ॥ ४ ॥ [८१४]

नव्हे ब्रह्मचर्य बाइलेच्या त्यागें । वैराग्य वाउगें देशत्यागें ॥ १ ॥ काम वाढे भय वासनेच्या द्वारें ।

सर्व सृष्टि हें मायेचें कौतुक आहे. त्या कौतुकानेंच ती दुःखी होते (प्रत्येक जीवाला मिथ्या दुःखी केलें आहे) १. तेव्हां असा हा मिथ्या देहादि प्रपंचखेळ विचारानें मोडून टाकणें हें बरें, कारण (स्त्री-पुत्रादिकांचा) गलबला मोडल्यानें मोडतो २. विपरीत समजण्यानें (द्वैताच्या ज्ञानानें) अंतःकरणांत भय उत्पन्न होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या आत्मजागृतीवर यावयास पाहिजे ती तूं स्वतःसिद्ध स्वरूपानेंच आहेस (तूं परब्रह्म आहेसच) ४. [८१०]

आपल्या अंगाभोंवतीं फेऱ्या घातल्यानें भोवंड येते, त्या योगानें सभोंवतीं असणारीं दरींखोरीं फिरत आहेत असें दिसतें १. ती भोंवळ थांबली कीं भोंवतालच्या दऱ्याखोऱ्यांचें स्थिरत्व भासूं लागतें २. एखाद्या कड्याखालीं उभें राहून आरोळी दिली कीं तिचे अनेक प्रतिध्वनि होतात. ३. आकाशामध्यें ढग धावूं लागले म्हणजे त्यांहून वेगळा असणारा चंद्र धांवतो असें दिसतें ४. [८११]

आम्हीं आजकाल कोंपऱ्यांत जन्माला आलेलीं अशीं सामान्य नसून फसलीं जाणारीं नाहींत १. तुमचें आमचें मूळडाळ एके ठिकाणीं आहे. (मूळ स्वरूप एक परब्रह्मच आहे.) त्या योगानें तूं आम्हांला संपूर्ण माहीत आहेस २. तुमचें आणि आमचें कांहीं वेगळें वांटलेलें नाहीं (तुमच्यांत आणि आमच्यांत स्वरूपतः भेद नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या ठिकाणीं मी आहें, तेथें हे देवा, मी तुझाच दिसत आहें (तुमच्या स्वरूपासारखाच नित्यमुक्त दिसत आहें) ४. [८१२]

योग्यांची संपत्ति त्याग व शांति आहे. त्या योगानें इहपरलोकीं कीर्ति व मान ह्यांचा सोहळा होतो. १ अशा प्रकारें त्यागादि संपत्तीचा मोबदला मिळाल्यामुळें एकमेकांच्या उसनवारी देण्याघेण्याप्रमाणें होतें. वैभवाच्या जागीं गेला कीं त्या वेळीं त्याचा झाडा घेतात. (टांकसाळ वगैरे ठिकाणीं जसा झाडा घेतात तसा) २. मूळ स्वरूपाचा ज्यानें टाहो घेतला तो मूळ स्वरूपस्थितीस येतो. ज्याच्यामध्यें तृष्णा (संसाराचा हव्यास) आहे तो त्यायोगानें कष्टी होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व कर्तव्य–बुद्धीचा त्याग करण्यांत जीवास शिवपदाच्या भोगाचा लाभ होतो (जीव ब्रह्मसुख भोगतो) ४. [८१३]

मी देहत्रयाहून भिन्न सच्चिदानंदरूप आहें अशा विचारपूर्वक निश्चयानें ही काया मरणाच्या हातून सुटली १. सर्व तळमळ नाहींशी झाली व सहजस्थितीचा भोग होत आहे २. आतां हें वर्म हस्तगत झाल्यानें दुःखदर्शन कालत्रयीं नाहीं. ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा स्थितींत देवाजवळ कींव भाकावयास नको, कारण जीव परब्रह्माहून वेगळा कोठें आहे ? ४. [८१४]

बायकोच्या त्यागानें ब्रह्मचर्याची प्राप्ति होत नाहीं व स्वदेशांतून परदेशांत जाण्यांत खरें वैराग्य नव्हे १.

सांडावें तें धीरें आचावाचा ॥ २ ॥ कांपवूनि टिरी शूरत्वाची मात । केलें वाताहात उचित काळें ॥ ३ ॥ तुका म्हणे करी जिव्हेसी विटाळ । लटिक्याची मूळ स्तुति हातां ॥ ४ ॥ [८१५]

नको सांडूं अन्न नको सेवूं वन । चिंतीं नारायण सर्व भोगीं ॥ १ ॥ मातेचिये खांदीं बाळ नेणें सीण । भावना त्या भिन्न मुंडाविया ॥ २ ॥ नको गुंफों (गुंतों) भोगीं नको पडों त्यागीं । लावुनि सरें अंगीं देवाचीया ॥ ३ ॥ तुका म्हणे नको पुसूं वेळोवेळां । उपदेश वेगळा उरला नाहीं ॥ ४ ॥ [८१६]

अवघी मिथ्या आटी । राम नाहीं जंव कंठीं ॥ १ ॥ सावधान सावधान । उगवीं संकल्पीं हें मन ॥ २ ॥ सांडिलें तें मांडे । आग्रह उरल्या काळ दंडे ॥ ३ ॥ तुका म्हणे आलें भागा । देउनि चिंतीं पांडुरंगा ॥ ४ ॥ [८१७]

न सांगावें वर्म । जनीं असों द्यावा भ्रम ॥ १ ॥ उगीच लागतील पाठीं । होती रितींच हिंपुटीं ॥ २ ॥ शिकविल्या गोष्टी । शिकोनि न धरिती पोटीं ॥ ३ ॥ तुका म्हणे सीण । होईल अनुभवाविण ॥ ४ ॥ [८१८]

जातिविजातीची व्हावयासि भेटी । संकल्प तो पोटीं वाहों नये ॥ १ ॥ होणार तें घडो होणाराच्या गुणें । होईल नारायणें निर्मिलें तें ॥ २ ॥ व्याघ्राचिये भुके वधावी ते गाय । याचें नांव काय पुण्य असे ॥ ३ ॥ तुका म्हणे न करी विचार पुरता । गरज्याची माता पिता खर ॥ ४ ॥ [८१९]

वासनेच्या मुळें काम आणि भय हीं मनांत वाढतात, म्हणून धैर्यानें वायफळ वासनांचा त्याग करावा २. शूरत्वाच्या गोष्टी सांगतांना टीर कांपतें (ढुंगण फाटतें) अशा शूराची लढाईच्या प्रसंगीं धांदल होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, खोट्या स्तुतीमुळें (खोटें वैराग्य असणाऱ्यांची जिव्हेनें स्तुति केली तर) वाणीला विटाळ होतो ४. [८१५]

अन्न टाकूं नकोस, वनवास करूं नकोस आणि सर्व भोगकालीं नारायणाचें चिंतन कर १. आईच्या खांद्यावर असलेल्या बालकास चालण्याचे श्रम नाहींत (कारण त्यास आईविषयीं परकेपणाची भावना नसते, त्याप्रमाणें संसारांतील भेदाच्या भावना नष्ट कराव्यात), त्या बालकानें आईवांचून भिन्नभावाचें मुंडन करावें २. भोगांत गुंतूं नकोस, त्याग करण्याच्या भानगडींत पडूं नकोस आणि प्रसंगोपात्त जें जें भोगशील तें तें देवाला अर्पण करून नाहींसें कर (म्हणजे तें बाधक होत नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां ह्यावांचून दुसरें कांहीं वारंवार विचारूं नकोस, कारण ह्या उपदेशाहून वेगळें सांगणें उरलें नाहीं ४. [८१६]

जोंपर्यंत मुखामध्यें राम नाहीं तोंपर्यंत सर्व खटपट खोटी आहे १. ह्याकरितां अनेक संकल्पांपासून (वासनांपासून) मनाची सुटका करून घे आणि सावध हो (असें द्विवार सांगतात) २. जी गोष्ट टाकली आहे ती आग्रहानें ग्रहण केल्यास काळ दंड करील ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे भोग तुझ्या भागाला येतील ते भोग पांडुरंगाला अर्पण करून त्याचें चिंतन कर ४. [८१७]

जगांत खरें वर्म (आपण ब्रह्मज्ञानी किंवा अनुभवी उपदेशक असल्याचें गुह्य) सांगूं नये. त्याविषयींचा (आपल्याविषयीं अज्ञानीपणाचा) भ्रम ठेवावा १. खरें वर्म दाखविल्यानें आमच्यामागें (लोक) लागतील आणि वर्म न दाखविल्यास व्यर्थ शिणतील. २. त्यांना कांहीं विचार सांगितला तर त्याप्रमाणें हृदयांत धरून ते वागत नाहींत (असे अनधिकारी आहेत) ३. तुकाराम महाराज म्हणतात, अनुभवावांचून केलेला उपदेश श्रोत्याच्या अनुभवास न उतरला तर सांगण्याचा व्यर्थ शीण आहे ४. [८१८]

एका जातीशीं दुसऱ्या भिन्न जातीची भेट करण्याविषयींचा संकल्प हृदयांत धरूं नये. (उदा० गाईला वाघाची किंवा कसायाची भेट करून देऊं नये) १. जी गोष्ट व्हावयाची ती स्वभावानेंच होते, नारायणानें जसें निर्मिलें असेल त्याप्रमाणें २. वाघाची भूक निवारण करण्याकरितां गाईचा वध करणें हें पुण्यकर्म होईल काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो मनुष्य गरजवान आहे तो कोणत्याही कामाचा पुरता विचार करीत नाहीं (व आपल्या बुद्धीनें उतावळेपणानें भलतेंच करतो), त्याचे आईबाप गाढव आहेत ४. [८१९]

शाहाणिया पुरे एकचि वचन । वि(इ)शारती खुण तेचि त्यासी ॥ १ ॥ उपदेश असे बहुतांकारणें । घेतला तो मनें पाहिजे हा ॥ २ ॥ फांसावेना तरि दुःख घेतें वाव । मग होतो जीव कासावीस ॥ ३ ॥ तुका म्हणे नको राग धरूं झोंडा । नुघडितां पीडा होईल डोळे ॥ ४ ॥ [८२०]

अभिनव सुख तरि या विचारें । विचारावें बरें संतजनीं ॥ १ ॥ रूपाच्या आठवे दोन्हींही आपण । वियोग तो क्षण होत नाहीं ॥ २ ॥ पूजा तरि चित्तें कल्पावें ब्रह्मांड । अहाच तो खंड एकदेसी ॥ ३ ॥ तुका म्हणे माझा अनुभव यापरि । डोई पायांवरि ठेवीतसें ॥ ४ ॥ [८२१]

नटनाट्य तुम्हीं केलें याचसाठीं । कवतुकें दृष्टी निववावी ॥ १ ॥ नाहीं तरि काय कळलेंचि आहे । वाघ आणि गाय लांकडाची ॥ २ ॥ अभेदचि असे मांडियेलें खेळा । केल्या दीपकळा बहुएकी ॥ ३ ॥ तुका म्हणे रूप नाहीं दर्पणांत । संतोषाची मात दुसरी ते ॥ ४ ॥ [८२२]

रवीचा प्रकाश । तोचि निशीं घडे नाश । झाल्या बहुवस । तरि त्या काय दीपिका ॥ १ ॥ आतां हाचि वसो जीवीं । माझे अंतरीं गोसावी । होऊं येती ठावीं । काय वर्में त्याच्यानें ॥ २ ॥ सवें असतां धणी । आड येऊं न सके कोणी । न लगे विनवणी । पृथकाची करावी ॥ ३ ॥ जन्माचिया गति । येणें अवघ्या खुंटती । कारण ते प्रीती । तुका म्हणे जवळी ॥ ४ ॥ [८२३]

ऐसे सांडुनियां धुरे । किविलवाणी दिसां कां रे । कामें उर भरे । हातीं नुरे मृत्तिका ॥ १ ॥ उदार हा जगदानी । पांडुरंग अभिमानी । तुळसीदळ पाणी । चिंतनाचा भुकेला ॥ २ ॥

जो मनुष्य शाहाणा आहे त्यास एखाद्या विषयासंबंधानें इशारतीदाखल उपदेशपर एखादें वाक्य बोललें म्हणजे पुरे होतें १. संत हे बहुतांना उपदेश करितात, पण त्यांचें ऐकणारानें ग्रहण केलें पाहिजे २. एखाद्यास बेंड (गळूं) झालें तर तें फुटण्याकरितां फासण्या घालणें (तें कापून टाकणें) बरें. नाहींपेक्षां तें अधिक वाढून जीव कासावीस होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे दांडग्या, मीं केलेल्या उपदेशाचा राग मानूं नको. जर तूं डोळे उघडणार नाहींस तर तुला अंतीं यमाची जांचणी होईल ४. [८२०]

ध्रुवपदांत दर्शविलेल्या विचारानें अपूर्व सुखाची प्राप्ति होते. ह्याचा विचार संतजनांनीं करावा १. स्वरूपाचा (हरीचा) आठव केल्यानें आठव करणारा जीव व स्वरूप (हरि) दोन्हीं एकच होतात. त्यांच्यामध्यें क्षणभर देखील वियोग होत नाहीं २. सर्व ब्रह्मांड परमात्म्याचें स्वरूप आहे असें चित्तानें निश्चित जाणणें हीच पूजा होय. एकदेशी हरीला मानून पूजा करणें व्यर्थ आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, (हरि व्यापक आहे) अशा प्रकारच्या अनुभवानें मीं विठोबारायाच्या चरणावर मस्तक टेवितों ४. [८२१]

जगद्रूपी नाटकाचें कौतुक तुम्हीं आपली दृष्टि संतुष्ट होण्याकरितां केलें १. नाहींपेक्षां खरोखर पाहिलें तर वाघ आणि गाय एकाच काष्ठाचीं आहेत, त्याप्रमाणें जगत् हें केवळ तुमचें स्वरूपच आहे २. (मुळांत अभेद असूनहि तुम्हीं स्वतःच्या खेळाकरितां भेद मांडला आहे.) जसें एका दिव्याच्या ज्योतीपासून अनेक ज्योति निर्माण करितात तसें तुम्हीं आपल्या अभेद स्वरूपस्थितीनें जगद्रूप खेळ मांडला आहे. ३. तुकाराम महाराज म्हणतात, आरशामध्यें प्रतिबिंबस्वरूप मुळींच नाहीं, तथापि दुसरेपणाचा भास आहे म्हणून संतोष होतो ४. [८२२]

सूर्यप्रकाश झाल्याबरोबर रात्र नाहींशी होते. त्यावांचून पुष्कळ दिवे लावल्यानें रात्र नाहींशीं होईल काय? १. त्याप्रमाणें सर्वांमध्यें श्रेष्ठ जो श्रीहरि तोच आतां माझ्या जीवीं राहो. त्या योगानें जेवढ्या न कळणाऱ्या गोष्टी आहेत त्या कळून येतील २. राजा बरोबर असल्यानें मार्गांत कोणताही अडथळा येत नाहीं आणि निरनिराळ्या अधिकाऱ्यांची विनवणी करावी लागत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जन्मादि बंधनाचा नाश ह्या योगानें होतो, कारण आपल्याजवळ श्रीहरीविषयीं प्रेम आहे ४. [८२३]

ध्रुवपदांत दर्शविलेल्या श्रेष्ठ देवास सोडून तुम्ही दीनवाणे कां झालां? अनेक विषयांच्या कामनेनें हृदय भरलें तर अखेर हातांत मातीदेखील राहाणार नाहीं १. जगताचें इच्छित पूर्ण करणारा असा उदार आणि शरणागतांविषयीं अभिमानी पांडुरंग आहे. त्यास तुळशीपत्र आणि पाणी अर्पण करून त्याचें चिंतन करावें. एवढीच त्याला भूक आहे. २. ह्या ठिकाणीं चिंतनरूपी सेवा किती झाली हें कोणीं विचारणारा नाहीं आणि स्वामीची भेट घेण्यास मध्यस्थ वकिलाची जरूरी नाहीं.

न लगे पुसावी चाकरी । कोणी वकील ये घरीं । त्याचा तोचि करी । पारपत्य सकळां ॥ ३ ॥ नाहीं आडकाठी । तुका म्हणे जातां भेटी । न बोलतां मिठी । उगीच पायीं घालावी ॥ ४ ॥ [८२४]

उपकारी असे आरोणि(नी) उरला । आपुलें तयाला पर नाहीं ॥ १ ॥ लाभावरि घ्यावें सांडपलें काम । आपला तो श्रम न विचारी ॥ २ ॥ जीवा ऐसें देखे आणिकां जीवांसी । निखळचि रासी गुणांचीच ॥ ३ ॥ तुका म्हणे देव तयांचा पांगिला । न भंगे संचला धीर सदा ॥ ४ ॥ [८२५]

कोण्या (ण) पुण्यें त्यांचा होईन सेवक । जीहीं द्वंद्वादिक दुराविलें ॥ १ ॥ ऐसीं वर्मे मज दावीं नारायणा । अंतरींच्या खुणा प्रकटोनी ॥ २ ॥ बहु अवघड असे संतभेटी । तरि जगजेठी करुणा केली ॥ ३ ॥ तुका म्हणे मग न यें वृत्तीवरी । सुखाचे शेजारीं पहुडेन ॥ ४ ॥ [८२६]

क्षणाक्षणां सांभाळितों । साक्षी होतों आपुला ॥ १ ॥ न घडावी (घडवीं) पायीं तुटी । मनें मिठी घातली ॥ २ ॥ विचारतों (विचार तो) वचना आधीं । धरूनि शुद्धी ठेविली ॥ ३ ॥ तुका म्हणे मागें भ्यालों । तरी झालों जागृत ॥ ४ ॥ [८२७]

आणोनियां मना । अवघ्या धांडोळिल्या खुणा । देखिला तो राणा । पंढरपूरनिवासी ॥ १ ॥ यासी अनुसरल्या काय । घडे ऐसें वायां जाय । देखिले ते पाय । सम जीवीं राहाती ॥ २ ॥ तो देखावा हा विध । चिंतनें तें कार्य सिद्ध । आणिकां संबंध । नाहीं पर्वकाळासी ॥ ३ ॥ तुका म्हणे खळ । होती क्षणेंचि निर्मळ । जाऊनियां मळ । वाळवंटीं नाचती ॥ ४ ॥ [८२८]

धरितां पंढरीची वाट । नाहीं संकट मुक्तीचें ॥ १ ॥ वंदूं येती देव पदें । त्या आनंदें उत्साहें ॥ २ ॥

सर्वांचें दुःख तो स्वतः निवारण करितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाच्या भेटीस जाण्यास कांहीं प्रतिबंध नाहीं म्हणून सर्वांनीं मुकाट्यानें त्याच्या पायीं घट्ट मिठी मारावी ४. [८२४]

जो परोपकारी आहे तो दुसऱ्यावर उपकार करण्याविषयीं उत्कंठित उतावळा असतो. आपले आणि परके हे भाव त्याच्या ठिकाणीं नाहींत १. ज्यांत परोपकार होत आहे असें कार्य करण्याच्या प्रसंगीं तो मोठा लाभ मानतो. त्या ठिकाणीं आपणास कितीहि कष्ट झाले तरी तो पर्वा करीत नाहीं २. आपल्या जीवाप्रमाणें इतर जीवांना मानतो, असा पुरुष निवळ गुणांचीच रास आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव अशा (परोपकारी) पुरुषांचा अंकित आहे व त्यांचें धैर्य कधींहि भंगत नाहीं ४. [८२५]

जे संत निर्द्वंद्व झाले आहेत, त्यांचा सेवक मीं कोणत्या पुण्यानें होईन ? १. अहो नारायणा, हें वर्म अंतरांतील खुणा प्रकट करून दाखवा २. संतांची भेट फार दुर्लभ आहे, म्हणून हे जगजेठी, मीं ह्याविषयीं करुणा भाकली ३ तुकाराम महाराज म्हणतात, एकवार त्यांचा लाभ झाल्यावर मी निजसुखशय्येवर (ब्रह्मसुखाच्या शय्येवर) खुशाल पडून राहीन, तो पुनः दुःखवृत्तीवर (मी, माझें ह्या वृत्तीवर) येणार नाहीं ४. [८२६]

क्षणोक्षणीं साक्षी होऊन मीं आपल्या अंतर्मुखवृत्तीचें रक्षण करितों १. कारण प्रभूच्या चरणीं माझ्या मनानें मिठी घातली, ह्यांत अंतराय येऊं नये २. देवा, अशा प्रकारें आपणांस सुचविण्याचे पूर्वीं, विचारानें मीं सावधगिरी ठेविली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, पूर्वीं कित्येक भक्तांना (दंभ-मानामुळें व हरीच्या आज्ञेच्या विस्मरणामुळें) हरिचरणामध्यें अंतराय आला (हरिचरणाचा वियोग झाला), हें पाहून भयानें मी सावध झालों ४. [८२७]

सर्व खुणेच्या ठिकाणांचा मनानें शोध करून, शरण जाण्याला योग्य असा पंढरपूरचा स्वामी पांडुरंग मीं पाहिला १. त्याच्या ठिकाणीं अनन्य झाल्यास कोणी वायां जाईल काय? त्याचे समचरण पाहिल्याबरोबरच अंतःकरणांत बिंबले जातात २. त्याला पाहावें हाच विधि आहे, आणि त्याचें चिंतन केल्यास सर्व कार्यसिद्धि होते व ह्यावांचून कोणत्याहि पर्वकालाशीं संबंध ठेवण्याचें कारण राहात नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अतिशय पातकी जरी सहज पंढरीला गेला, तरी तो, एका क्षणांत सर्व पापमल नाहींसे होऊन, वाळवंटांत हरिनामाचे छंदानें नाचूं लागतो ४. [८२८]

पंढरीचा मार्ग धरणारास मुक्तीचें दुर्लभत्व नाहीं १. त्याच्या चरणास नमस्कार करण्यास स्वर्गींचे देव येतात, कारण तेथें हरिनामाच्या उत्साहाचा सोहळा असतो २. वैष्णवजनांच्या हरिनामाच्या छंदांत नाचण्यानें व चालण्यानें

नृत्यछंदें उडती रज। जे सहज चालतां ॥ ३ ॥ तुका म्हणे गरुडटके। वैष्णव निके संभ्रम ॥ ४ ॥ [८२९]

नाम घेतां मन निवे। जिव्हे अमृतचि स्त्रवे। होताती बरवे। ऐसे शकुन लाभाचे ॥ १ ॥ मन रंगलें रंगलें। तुझ्या चरणीं स्थिरावलें। केलीया विठ्ठलें। ऐसी कृपा जाणावी ॥ २ ॥ झालें भोजनसें दिसे। चिरा पडोनि ठेला इच्छे। धालियाच्या ऐसे। अंगा येती उद्गार ॥ ३ ॥ सुख भेटों आलें सुखा। निध सांपडला मुखा। तुका म्हणे लेखा। आतां नाहीं आनंदा ॥ ४ ॥ [८३०]

रुची रुची घेऊं गोडी। प्रेमसुख झाली जोडी ॥ १ ॥ काळ जाऊं नेदूं वायां। चिंतूं विठोबाच्या पायां ॥ २ ॥ करूं भजन भोजन। धणी घेऊं नारायण ॥ ३ ॥ तुका म्हणे जीव धाला। होय तुझ्यानें विठ्ठला ॥ ४ ॥ [८३१]

वेळोवेळां हेंचि सांगें। दान मागें जनासी ॥ १ ॥ विठ्ठल हे मंगळवाणी। घेऊं धणी पंगती(सी) ॥ २ ॥ वेंचतसे पळें पळ। केलें बळ पाहिजे ॥ ३ ॥ तुका म्हणे दुश्चित नका। राहों फुका नाड हा ॥ ४ ॥ [८३२]

आणीक ऐसें कोठें सांगा। पांडुरंगासारिखें ॥ १ ॥ दैवत ये भूमंडळीं। उद्धार कली पाववितें ॥ २ ॥ कोठें कांहीं कोठें कांहीं। शोध ठायीं स्थळासी ॥ ३ ॥ अन्यत्रींचें तीर्थीं नासे। तीर्थीं वसे वज्रलेप ॥ ४ ॥ पांडुरंगींचें पांडुरंगीं। पाप अंगीं राहेना ॥ ५ ॥ ऐसें हरें गिरिजेप्रति। गुह्य स्थिति सांगितली ॥ ६ ॥ तुका म्हणे तीर्थ क्षेत्र। सर्वत्र हें दैवत ॥ ७ ॥ [८३३]

पुराणींचा इतिहास। गोड रस सेविला ॥ १ ॥ नव्हती हे आहाच बोल। मोकळें फोल कवित्व ॥ २ ॥ भावें घ्या रे भावें घ्या रे। एकदां जा रे पंढरीये ॥ ३ ॥ भाग्यें आलेति मनुष्यदेहा। तो हा

साहाजिक जे रजःकण उडतात (त्या लाभाकरितां देव येतात) ३. तुकाराम महाराज म्हणतात, गरुडटके आदिकरून उपलक्षणानें (गरुडचिन्हांकित पताका घेऊन) भजनसमारंभ करतात ते वैष्णव उत्तम होत ४. [८२९]

हरीचें नाम घेण्यानें मन हें त्रिविधतापांपासून शांत होतें व जिव्हेनें हरिनामामृताचा स्त्रव होतो, अशा प्रकारचे उत्तम लाभदायक शकुन होतात १. माझें मन तुमच्या चरणांच्या ठिकाणीं स्थिर झालें आहे (असें द्विवार सांगतात). हें सर्व ह्या विठोबारायाचे कृपेचें फळ आहे असें समजावें २. (हें नाम घेतल्यानें) जेवण झालें असें भासतें, कारण विषयसेवनाविषयींची सर्व इच्छा नष्ट झाली म्हणजे तिचेवर निरिच्छेचा दगड पडलाच, तृप्तीचीं चिन्हें अंगाच्या ठिकाणीं प्रगट होऊं लागलीं आणि तृप्तीचे उद्गार मुखावाटे निघतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, पांडुरंग हा निधि आमच्या वाणीला सांपडला. त्या योगानें सुखीं सुख सामावलें (जणूं भक्तिसुखाला ब्रह्मसुख भेटलें, असें वाटलें), आतां अपार आनंद झाला आहे ४. [८३०]

हे देवा, प्रेमसुखाचा लाभ झाला म्हणून त्याच गोडीचें सेवन वारंवार करूं १. एक क्षणदेखील व्यर्थ जाऊं न देतां सारखें विठोबारायाच्या चरणाचें चिंतन करूं २. नारायणनामाचें भजनरूपी भोजन करून तृप्त होऊं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठ्ठला, तुझ्या चिंतनानें आमचा जीव तृप्त झाला आहे ४. [८३१]

सर्व जगास वेळोवेळीं हेंच (खालील कडव्यांत सांगितल्याप्रमाणें) सांगत आहें व असें त्यानें वागावें हें दान मागत आहें १. विठ्ठलचिंतन हें मंगल आहे, त्या विठ्ठलनामाचें सेवन संतांच्या संगतीनें तुम्हीं आम्हीं करूं २. क्षणाक्षणानें आयुष्यकाल व्यर्थ जात आहे, ह्याकरितां हरीचें चिंतन जोरानें केलें पाहिजे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो जनहो, तुम्हीं हरिभजनाविषयीं उदास राहूं नका; उदास राहाल (आळस कराल) तर फुकट फसाल ४. [८३२]

पांडुरंगासारखें दैवत अन्य ठिकाणीं कोठें आहे तें सांगा ? १. ह्या पृथ्वीवर कलियुगांत जीवांचा उद्धार करण्याविषयीं हेंच एक दैवत समर्थ आहे २. अन्य दैवतांच्या ठिकाणीं पाहूं जातां कोठें कांहीं न्यून आहे असें दिसून येतें ३. इतर देशांत केलेल्या पातकाचें क्षालन तीर्थानें होतें, पण तीर्थांत केलेलें पातक हें वज्रलेप (कधींहि जात नाहीं असें) होतें. ४. पंढरीमध्यें झालेल्या पातकाचें क्षालन होऊन कर्ताहि निष्पाप होतो ५. हें गुह्यज्ञान शिवानें पार्वतीस सांगितलें ६. तुकाराम महाराज म्हणतात, पंढरीक्षेत्र व चंद्रभागा तीर्थ हें सर्व पांडुरंगाचें रूपच आहे ७. [८३३]

अठरा पुराणांतील गोड रसभरित इतिहासाचें ग्रहण मीं केलें आहे १. माझे कवित्वरूपानें बाहेर येणारे बोल (शब्द) इतर कवितेप्रमाणें पोकळ असे फलकट व्यर्थ नाहींत २. म्हणून अहो जन हो, मी जें सांगत आहें त्याचें भावार्थानें ग्रहण करा, म्हणजे एकवार पंढरीस जा (असें द्विवार सांगत आहें) ३. परम भाग्यानें मनुष्यदेह प्राप्त झाला आहे म्हणून

पाहा विठ्ठल ॥ ४ ॥ पापपुण्या होईल(करील) झाडा ।जाईल पीडा जन्माची ॥ ५ ॥ घ्यावी हातीं टाळ दिंडी । गावे तोंडीं गुणवाद ॥ ६ ॥ तुका म्हणे घंटापटा । न लगे वाटा शोधाव्या ॥ ७ ॥ [८३४]

कर्म धर्म नव्हती सांग । उण्या अंगें पतन ॥ १ ॥ भलत्या काळें नामावळी । सुलभ भोळी भाविकां ॥ २ ॥ प्रायश्चितें पडती पायां । गाती तयां वैष्णवां ॥ ३ ॥ तुका म्हणे नुपजे दोष । करा घोष आनंदें ॥ ४ ॥ [८३५]

पाहा रे हें दैवत कैसें । भक्तिपिसें भाविक(का) ॥ १ ॥ पाचारिलिया सरिसें पावे । ऐसी सवे बराडी ॥ २ ॥ शुष्ककाष्टीं गुरगुरी । लाज हरि न धरितां ॥ ३ ॥ तुका म्हणे अर्धनारी । ऐसीं धरी रूपडीं हा ॥ ४ ॥ [८३६]

बहुत सोसिले मागें न कळतां । पुढती काय आतां अंध व्हावें ॥ १ ॥ एकाचिये अंगीं हें ठेवावें लावून । नये भिन्न भिन्न (भिन्नाभिन्न) चाचपडों ॥ २ ॥ कोण होईल तो ब्रह्मांडचालक । आपणचि हांक देईल हांके ॥ ३ ॥ तुका म्हणे दिलीं चेतवूनि सुनीं । कौतुकावांचूनि नाहीं स्थळ(छळ) ॥ ४ ॥ [८३७]

आश्चर्य हें (या) वाटे नसत्या छंदाचें । कैसें दिलें साचें करोनियां ॥ १ ॥ दुजियासी तंव अकळ हा भाव । करा तो जीव साक्षी येथें ॥ २ ॥ एकीं अनेकत्व अनेकीं एकत्व । प्रकृतिस्वभाव(त्व) प्रमाणेंचि ॥ ३ ॥ तुका म्हणे करूं उगवूं जाणसी । कुशळ येविशीं तुम्ही देवा ॥ ४ ॥ [८३८]

अस्त नाहीं आतां एकचि मोहोरा । पासूनि अंधारा दुरि जालों ॥ १ ॥ साक्षत्वें या जालों

श्रीविठ्ठलाला पाहा ४. त्या योगानें अनेक जन्मांना हेतुभूत जें पापपुण्य तें नाहींसें होऊन जन्मादि पीडा नाहींशी होईल ५. हातामध्यें टाळवीणा घेऊन मुखानें श्रीहरीचे गुण गावेत ६. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याखेरीज घटाकाश व पटतंतु ह्या वेदांतांतील चिकित्सारूप मार्गांचा आश्रय करण्याचें कारण नाहीं ७. [८३४]

(वेद-शास्त्रांत सांगितलेलीं नित्य, नैमित्तिक व काम्य कर्में) कर्म-धर्म ह्यांचें आचरण शास्त्रानें सांगितल्याप्रमाणें यथासांग होत नाहीं. त्यांत कांहीं उणें झाल्यास कर्ता पतित होतो १. अशा प्रकारचा दोष नामाच्या ठिकाणीं नाहीं, भोळ्याभाविकांना हवें त्या वेळेस घेण्यास प्रत्यवाय–अडथळा–नाहीं असें तें सुलभ आहे २. ह्या नामाच्या ठिकाणीं निष्ठ जे वैष्णव आहेत त्यांच्या पायां प्रायश्चित्तें पडतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरिनामाचा आनंदानें घोष केल्यास दोष उत्पन्न होत नाहींत ४. [८३५]

अरे पाहा, हें विठ्ठल दैवत भाविक असून ह्याला भक्तीचें वेड आहे १. कोणीहि भक्तांनीं बालाविलें कीं बराड्या-सारखा (दुकाळल्यासारखा) धांवून येण्याची ह्याला संवय आहे २. प्रल्हादाच्या वेळेस कोरड्या काष्ठाचे खांबातून गुरगूर करतांना हरीनें (नरसिंहानें) लज्जा धरली नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा देव अर्धनारीनटेश्वराप्रमाणें भक्ताकरितां अनेक रूपें धरितो. ४. [८३६]

पूर्वीं अज्ञानदशेमुळें जन्ममृत्यूचें दुःख पुष्कळ सोशिलें असें असून आतां येथून पुढें अज्ञानानें अंध कां व्हावें? १. जीं म्हणून कांहीं सुखदुःखें होतील तीं देवाच्याच अंगीं लावावीं. ह्यावांचून निरनिराळी कांहीं खटपट करूं नये २. जो कोणी ह्या ब्रह्मांडाचा चालक आहे, त्यास हाक मारली असतां त्याचें प्रत्युत्तर तोच देईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, कामक्रोधादि वृत्तिरूपी कुत्रीं आमच्या ठिकाणीं (ब्रह्मांडनायक) जागृत करितो, हा सर्व प्रकार देवाच्या कौतुकाखेरीज होत नाहीं ४. [८३७]

प्रभूच्या कौतुकाचें मोठे आश्चर्य वाटतें, कारण देहादि प्रपंच हा मिथ्या असून, त्यानें तो सर्व जीवांना खरा भासविण्यास लाविला १. हा प्रकार दुसऱ्याला न कळण्यासारखा आहे. ह्या मिथ्या प्रपंचाचा मोह न धरितां जीवांनीं साक्षित्वानें राहावें २. एका परमात्म्याच्या ठिकाणीं अनेकनामरूपात्मक जगद्भास होतो व त्या जगतामध्यें परमात्मा एकत्वानें असतो. ह्या उभय प्रकारांस साधन प्रकृतिस्वभाव आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, अशा प्रकारचा हा प्रपंचगुंताडा निर्माण करण्याविषयीं व नाहींसा करण्याविषयीं तुम्हीं चतुर आहां ४. [८३८]

आत्म्याला ज्ञानस्वरूप प्रकाशाचा जो उदय झाला त्यास आतां अस्तमान नाहीं. अशा स्थितीनें आम्हीं अज्ञानाच्या अंधकारापासून वेगळे झालों १. आत्मस्थितीनें आम्ही साक्षी आहोंत म्हणून (सत्त्व-रज-तम) त्रिगुण-द्रष्टत्व आमच्याकडे

गुणाचा देखणा । करीं नारायणा तरी खरें ॥ २ ॥ आटवें विसरु पडियेला मागें । आलें तेंचि भागें यत्न केलें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझा विनोद देवासी । आम्ही तुम्हां ऐसीं दोन्ही नव्हों ॥ ४ ॥ [८३९]

क्षर अक्षर हे तुमचे विभाग । कामयानें जग दुरी धरा ॥ १ ॥ तैसें आम्ही नेणों पालटोंच कांहीं । त्यागिल्याची नाहीं मागें चाड ॥ २ ॥ प्रतिपादिता तूं समविषमाचा । प्रसाद तो याचा पापपुण्य ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्हां नाना अवग(गु)णीं । लागे संपादणी लटिक्याची ॥ ४ ॥ [८४०]

सर्व रसीं मीनलें चित्त । अखंडित आनंदु ॥ १ ॥ गोत पति विश्वंभरी । झाला हरि सोयरा ॥ २ ॥ वो(ओ)ळखी ते एका नांवें । इतर वाव खंडणा ॥ ३ ॥ तुका म्हणे नांवें रूपें । दुसरीं पापें हारपलीं ॥ ४ ॥ [८४१]

मी हें ऐसें काय जाती । अवघड किती पाहतां ॥ १ ॥ नाहीं होत उलंघन । नसतां भिन्न दुसरे ॥ २ ॥ अंधारानें तेज नेलें । दृष्टीखालें अंतर ॥ ३ ॥ तुका म्हणे सवें देव । घेतां ठाव दावील ॥ ४ ॥ [८४२]

कवीश्वरांचा तो आम्हांसी विटाळ । प्रसाद वों(ओं)गळ चिवडिती ॥ १ ॥ दंभाचे आवडी बहिरट आंधळे । सेवटासि काळें होईल तोंड ॥ २ ॥ सोन्यासेजारीं तो लाखेची जतन । संतत ते गुण जैसे तैसे ॥ ३ ॥ सेव्यसेवकता न पडतां ठावी । तुका म्हणे गोंवी पावती हीं ॥ ४ ॥ [८४३]

वाढलिया मान न मनावी निश्चिंती । भूतांचिये प्रीती भूतपण ॥ १ ॥ म्हणऊनि मना लावावी

आलें (ह्या संसारांत देहेंद्रियांचा आणि त्यांच्या व्यवहारांचा द्रष्टा झालों आहें). हे नारायणा, हा आमचा बोध दृढ कर २. तुमच्या स्वरूप-अनुभवाच्या योगानें देहादि प्रपंचाचा विसर झाला. आतां जो बोध आमच्या भागाला आला त्याचेंच जतन केलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा माझा विनोद देवाशीं आहे. हे देवा आम्हीं तुम्हांसारखे मायाविशिष्ट शिवहि नाहीं आणि अविद्याविशिष्ट जीवहि नाहीं, असे ह्या उभय भावांहून वेगळे आहोंत ४. [८३९]

अहो देवा, क्षर (कार्य जीव) आणि अक्षर (कारण माया) ह्या रूपानें तुम्हींच विभागलेले असून (जग आणि जगाला कारण असलेली माया हे तुमचेच दोन भाग आहेत) सर्व जगाला आपल्याहून भिन्न कां ठेवतां? १. असा जरी तुमचा प्रकार आहे तथापि आम्हीं ज्या जीवदशेचा त्याग केला त्याची पुन्हां इच्छा करून आम्हीं वस्तुस्थितींत पालट होऊं देणार नाहीं २. पाप-पुण्य ह्या सम-विषमाचा प्रतिपादन करणारा ज्या अर्थी तूं आहेस, त्या अर्थी हा तुझा प्रसाद आहे. (असें असून जीवांना जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत कां ठेविलें?) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्हीं नानाप्रकारचीं सोंगें घेऊन खोट्याचें खरें भासवितां ४. [८४०]

सर्व रूपानें असणाऱ्या हरिरसाच्या ठिकाणीं चित्त समरस झालें म्हणून अखंड आनंद प्राप्त झाला आहे १. आमचे गोत्रज, पति आदिकरून देहसंबंधीं सर्व कांहीं विश्वंभरभावानें हरिच झाला आहे २. एक विठोबारायाचीच ओळख झाली आहे. ह्यावांचून इतर भावना नाहींशा झाल्या आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमच्यावांचून असणारें नामरूपात्मक जगत् हें पाप नाहींसें आलें (आमचा जगताविषयींचा भ्रम नाहींसा झाला) ४. [८४१]

अहो जन हो, ह्या देहाला मीं असें म्हणतों हा प्रकार पाहिलें असतां कळायला किती तरी अवघड आहे? १. आपल्या स्वरूप-स्थितीहून निराळें असें कांहीं नसतांना देहाच्या ठिकाणच्या मीपणाचा निरास होत नाहीं २. अहंपणाच्या अंधारानें स्वरूपज्ञानाचा प्रकाश नाहींसा होऊन आत्मदृष्टीस अंधत्व आलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशी स्थिति प्राप्त होण्याला देवाची संगति केली पाहिजे म्हणजे तो हें स्वरूपस्थितीचें ठिकाण दाखवील ४. [८४२]

अनेक प्रकारच्या कविता करणारे जे कोणी कविराज आहेत, त्यांचा आम्हांला विटाळ आहे; कारण ते प्रासादिक कवितेंतील वाक्यें घेऊन निराळी कविता करण्याचा ओंगळ व्यवहार करितात १. ज्यांना आपला सर्वत्र लौकिक व्हावा अशी आवड असते, असल्या ह्या बहिरट आंधळ्यांचें तोंड अखेरीस काळें होईल (ते नरकाला जातील) २. सोन्याच्या दागिन्यास लाखेचा संबंध असतो म्हणून लोक लाखेचें रक्षण करितात, पण तिचे गुण जसेच्या तसेच असतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, जोंपर्यंत सेव्य-सेवकतेचा (हरि हा स्वामी, सेव्य आणि आपण त्याचे सेवक ह्याचा) विचार कळला नाहीं तोंपर्यंत त्यांना संसारबंधनांतच राहावें लागेल ४. [८४३]

जनलोकांमध्यें आपली मानमान्यता वाढली तरी त्यासंबंधानें स्वतःला धन्य मानून स्वस्थ असूं नये, कारण भूतांच्या आदरानें भूत (जन) गतीस जावें लागेल (मृत्युलोकांत जन्म मिळेल) १. ह्याकरितां आपले मनास

कांचणी। इंद्रियांचे झणीं ओढी भरे ॥ २ ॥ एका एकपणें एकाचिये अंगीं। लागे रंग रंगीं मिळालिया ॥ ३ ॥ तुका म्हणे देव निष्काम निराळा। जीवदशे चाळा चळणाचा ॥ ४ ॥ [८४४]

माया साक्षी आम्ही नेणों भीड भार। आप आणि पर नाहीं दोन्ही ॥ १ ॥ सत्याचियेसाठीं अवघाचि भर। नावडे व्यापार तुटीचा तो ॥ २ ॥ पोभाळितां चेरे अंतरींचें दुःख। लांसें फांसें मुख उघडावें ॥ ३ ॥ तुका म्हणे नव्हे स्फीतीचा हा ठाव। निवाड्यासी देव साक्षी केला ॥ ४ ॥ [८४५]

संतां आवडे तो काळाचाही काळ। समर्थाचें बाळ जेवीं समर्थ ॥ १ ॥ परि सत्ता तेथें नाहीं एकेविण। मोहें न पवे सीण ऐसें राखे ॥ २ ॥ केले अन्याय ते सांडवी उपचारें। न देखे दुसरें नाशा मूळ ॥ ३ ॥ तुका म्हणे मुख्य कल्पतरु छाया। काय नाहीं दया तये ठायीं ॥ ४ ॥ [८४६]

संतांच्या धिक्कारें अमंगळ जिणें। विश्वशत्रु तेणें सांडी परि ॥ १ ॥ कुळ आणि रूप वायां संसार (संवसार)। गेला भरतार मोकलितां ॥ २ ॥ मूळ राखे तया फळा काय उणें। चतुर लक्षणें राखों जाणे ॥ ३ ॥ तुका म्हणे सायास तो एके ठायीं। दीप हातीं तईं अवघें बरें ॥ ४ ॥ [८४७]

ओलें मूळ भेदी खडकाचें अंग। अभ्यासासी सांग कार्यसिद्धि ॥ १ ॥ नव्हे ऐसें कांहीं नाहीं अवघड। नाहीं कईवाड तोंच वरि ॥ २ ॥ दोरें चिरा कापे पडिला कांचणीं। अभ्यासें सेवनीं विष पडे ॥ ३ ॥ तुका म्हणे कैंचा बैसण्यासी ठाव। जठरीं बाळा वाव एकाएकीं ॥ ४ ॥ [८४८]

भगद्भक्तीची जांचणी लावावी, नाहीं तर कदाचित् तें मन इंद्रियांच्या ओढीनें बहिर्मुख होईल २. एका परमात्म्याच्या स्वरूपाकडे तें मन लावावें. मनाचा स्वभाव असा आहे, कीं ज्या रंगाकडे त्यास लावावें तो रंग तें बनतें, म्हणून ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव हा सर्व कर्मांत असा निष्काम आहे आणि त्याउलट जीवअवस्थेस कर्म करण्याचा चाळा आहे (जीव जीवदशेंत असतांना विषयाची आसक्ति वाढवितो) ४. [८४४]

मायादि प्रपंचाचे आम्ही साक्षी आहोंत. त्याची आम्हांला भीड नाहीं. तरीपण ब्रह्मदृष्टीनें, हा आपला आणि हा परका, हा भेदभाव आमच्या ठिकाणीं नाहीं. १. म्हणून आम्हीं सत्य परमात्म्याकरितां सर्व ओझें घेतलें आहे, त्याखेरीज दुसरा नुकसानीचा (आमचें व लोकांचें अहित होईल असा कोणताहि) व्यापार आम्हांला पसंत नाहीं २. गळवाच्या दुःखास वरवरून गोंजारलें तर तें आंतल्या बाजूनें जोरावतें. त्याकरितां त्यास फांसण्या घालून त्याचें तोंड मोकळें करावें (लोकांना ओंजारून गोंजारून चालत नाहीं, त्यांचे गुणदोष आम्हीं त्यांच्या हिताकरितांच उघड करितों) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें ठिकाण लौकिकाचें नाहीं; वर जो मीं निवाडा केला त्यास साक्षी देव आहे ४. [८४५]

जो संतांना प्रिय आहे तो काळाचाहि काळ आहे, जसें समर्थ राजाचें बालक समर्थच असतें १. त्या बालकावर एका समर्थ राजाचीच सत्ता असते. त्याला ताप न होईल असें परम प्रीतीनें त्याचें तो रक्षण करितो २. त्या बालकानें कांहीं अपराध केला तर क्षमा करून सामोपचारानें (चार विचाराच्या गोष्टी सांगून) तो बालक पुनः अपराध न करील, असें तो समर्थ पिता करतो. ज्या योगानें त्या बालकाचा घात होईल असा व्यवहार करीत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, कल्पतरुछाया ही श्रेष्ठ आहे. त्या ठिकाणीं दया नाहीं काय? (संत तसेच आहेत) ४. [८४६]

संतांनीं ज्याचा धिःकार केला आहे त्याचें जगणें ओंगळ आहे. विश्व-शत्रूप्रमाणें त्याचा त्याग करावा १. ज्या स्त्रीचा नवऱ्यानें त्याग केला आहे तिचें कुळ, रूप, संसारादि सर्व व्यर्थ आहे २. ज्यानें मूळाचें रक्षण केलें त्यास फळाला काय कमी आहे? म्हणून त्याप्रमाणें रक्षण करणें इत्यादि लक्षणें चतुराचीं आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, योग्य असा एका ठिकाणींच यत्न करावा. अंधकारप्रसंगीं दिव्याचा आश्रय करणें सर्वोत्तम आहे (संतांची कृपा संपादन करावी) ४. [८४७]

वृक्षाचें जिवंत मूल जसजसें जोरावतें तसतसें तें खडकाचें अंग फोडून भूमींत शिरत असतें, त्याप्रमाणें अभ्यासाच्या बलानें सर्व कार्यसिद्धता होते १. अभ्यासानें अमूक एक गोष्ट साध्य होत नाहीं असें कांहीं अवघड नाहीं, पण जोंपर्यंत ह्यानें अभ्यास करण्याचा निश्चय केला नाहीं तोंपर्यंत कठिण आहे २. दोराच्या घर्षणानें मोठा दगड देखील कापला जातो व संवयीनें विषाचें सेवन देखील पचतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आईच्या पोटामध्यें नऊ महिन्यांचें मूल राहाण्याएवढी जागा आरंभीं असते काय? पण हळुहळू तें मूल राहाण्याइतका अवकाश होत जातो ४. [८४८]

अमर आहां अमर आहां । खरें कीं पाहा खोटें हें ॥ १ ॥ न म्हणा देह माझा ऐसा । मग भरंवसा कळेल ॥ २ ॥ कैंचा धाक कैंचा धाक । सकळिक हें आपुलें ॥ ३ ॥ देवचि बरें देवचि बरें । तुका म्हणे खरे तुम्ही ॥ ४ ॥ [८४९]

काम नाहीं काम नाहीं । झालों पाहीं रिकामा ॥ १ ॥ फावल्या करूं चेष्टा । निश्चळ द्रष्टा बैसोनि ॥ २ ॥ नसत्या छंदें नसत्या छंदें । जग विनोदें विव्हळतसे ॥ ३ ॥ एकाएकीं एकाएकीं । तुका लोकीं निराळा ॥ ४ ॥ [८५०]

हातीं घेऊनियां काठी । तुका लागला कळिवरापाठी ॥ १ ॥ नेऊनि निजविलें स्मशानीं । माणसें जाळी ते ठिकाणीं ॥ २ ॥ काढिले ते ओंढे । मागील उपचाराचे पुढें ॥ ३ ॥ नाहीं वाटों आला भेव । सुख दुःख भोगिता देव ॥ ४ ॥ याजसाटीं हें निर्वाण । केलें कसियेलें मन ॥ ५ ॥ तुका म्हणे अनुभव बरा । नाहीं तरी हस्तपाद चोरा ॥ ६ ॥ [८५१]

कीर्तन चांग कीर्तन चांग । होय अंग हरिरूप ॥ १ ॥ प्रेमें छंदें नाचे डोले । हरपले देहभाव ॥ २ ॥ एकदेशी जीवकळा । हा सकळां सोयरा ॥ ३ ॥ तुका म्हणे उरला देव । गेला भेव त्या काळें (ते काळीं) ॥ ४ ॥ [८५२]

न बोलेसी करा वाचा । उपाधीचा संबंध ॥ १ ॥ एक तुमच्या नामाविण । अवघा सीण कळतसे ॥ २ ॥ संकल्पाचे ओढी मन । पापपुण्य सवेंचि(समाचि) ॥ ३ ॥ तुका म्हणे नारायणीं । पावो वाणी विसांवा ॥ ४ ॥ [८५३]

अहो जन हो, तुम्हीं अमर आहांत (असें द्विवार सांगतात.) हें खरें आहे किंवा खोटें आहे ह्याचा (खालीं दिलेल्या ध्रुवपदांत दर्शविल्याप्रमाणें) विचार करून पाहा १. पंचभूतात्मक देह मीं नाहीं, अशा विचारानें पाहिलेंत म्हणजे तुमची खात्री होईल २. सर्व जगत् आपणच आहोंत अशा स्वरूपस्थितींत भय कोठें आहे? (असें द्विवार सांगतात) ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमचें तात्त्विक स्वरूप देवच आहे असें द्विवार सांगतों. [८४९]

मला कोणतेंहि कर्तव्य राहिलें नाहीं, असा सर्वकर्तव्यरहित मी अकर्ता आहें (असें द्विवार सांगतों) १. अवशिष्ट प्रारब्धाच्या योगानें होणारीं कर्मे अक्रिय साक्षी अशा स्वात्मस्वरूपस्थितीनें करितों (मुक्तांच्या प्रारब्धयोगानें देहक्रिया सहज होतात) २. देह व देहसंबंधी ह्यांचेविषयीं मी व माझेपणाच्या विपरीत छंदाच्या थट्टेनें सर्व जग दुःखानें तडफडत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या लोकांहून निराळा (मी आणि माझें हा भेद टाकून) भेदशून्य असा, एका एका स्वरूपस्थितीनें मी एकटा आहें (सर्व लोकांपेक्षां निराळा, कर्तव्य-अभावस्थितीला प्राप्त झालेला) (असें द्विवार सांगतों) ४. [८५०]

तुकाराम महाराज म्हणतात, मीं हातामध्यें विवेकाची काठी घेऊन पंचभूतात्मक देहाचे मागें लागलों १. चारी देह ज्या स्मशानांत जळून जातात अशा ब्रह्मस्मशानांत देहास निजविलें (निरसिलें) २. ह्या देहानें पूर्वीं अनेक सुखदुःख-उपचार भोगविले त्याचा सूड घेतला ३. असें करण्यांत मला कांहीं भय वाटलें नाहीं, कारण सुखदुःखाचा भोक्ता देव आहे ४. ह्याकरितां विवेकानें मनाचा निग्रह करून (ध्रुवपदांत दर्शविलेलें) निर्वाण केलें ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा (देहाला तादात्म्यनाशरूपी मृत्यु आणून आत्मरूपानें अमर होण्याचा) अनुभव चांगला. नाहींपेक्षां हस्तपादादि अवयवांचा निग्रह करा (त्यांना वाईट कर्मांकडे जाऊं देऊं नका) ६. [८५१]

हरीचें कीर्तन हें उत्तम आहे (असें द्विरुक्तीनें सांगतात). कीर्तन करणाराचा देह हरिरूप होतो १. म्हणून परम प्रेमानें त्याच्याच छंदानें नाचावें व डोलावें म्हणजे देहभाव नाहींसा होईल २. जीवदशा ही एकदेशी आहे आणि श्रीहरि हा सर्वव्यापकत्वानें सर्वांचा संबंधी आहे, अथवा ह्या स्थितीला पावलेला वैष्णवहि सर्वांचा संबंधी आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हृदयांतील द्वैताचें भय नाहींसें झालें कीं, त्याच काळीं तो हरिभक्त देवरूपानें अविशिष्ट राहातो ४. [८५२]

अहो देवा, कोणाशीं बोलण्याचा प्रसंग येऊं नये असें करा, कारण ही सर्व उपाधि आहे १. एक तुमच्या नाम-चिंतनावांचून सर्व शीण आहे असें निश्चयानें वाटतें २. मन अन्य संकल्पाधीन झाल्याबरोबर पापपुण्य उत्पन्न होते (मनांत विषयाचा संकल्प निर्माण होतांच तें त्या विषयाकडे धांवतें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणून वाणी ही नारायणाच्या ठिकाणींच विसांवा घेवो ४. [८५३]

प्रारब्धाहातीं जन । सुख शीण पावतसे ॥ १ ॥ करितां घायाळाचा संग । अंगें अंग माखावें ॥ २ ॥ आविसा अंगें(गीं) पीडा वसे । त्यागें असे बहु सुख ॥ ३ ॥ तुका म्हणे जीव भ्याला । अवघ्या आला बाहेरी ॥ ४ ॥ [८५४]

आशा ते करविते बुद्धीचा तो लोप । संदेह तें पाप कैसें नव्हे ॥ १ ॥ आपला आपण करावा विचार । प्रसन्न तें सार मन ग्वाही ॥ २ ॥ नांवें रूपें अंगीं लाविला विटाळ । होतें तें निर्मळ शुद्ध बुद्ध ॥ ३ ॥ आंधळ्याशीं न ये देखण्याची चाली । चालो ऐसी बोली तुका बोले ॥ ४ ॥ [८५५]

जळो आतां नांव रूप । माझें पाप गांठींचें ॥ १ ॥ संतांच्या चरणरजें । उतरूं ओझें मातीचें ॥ २ ॥ लटिक्याचा अभिमान । होतां शीण पावविता (होता सीण पाववीत) ॥ ३ ॥ तुका म्हणे अरूपीचें । सुख साचें निनांवें ॥ ४ ॥ [८५६]

निंदा स्तुती करवी पोट । सोंग दाखवी बोभाट ॥ १ ॥ जटा राख विटंबना । धीर नाहीं क्षमा मना ॥ २ ॥ शृंगारिलें मढें । जीवेंवीण जैसें कुडें ॥ ३ ॥ तुका म्हणे रागें । भलतें चावळे वाउगें ॥ ४ ॥ [८५७]

भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें । ऐसियासी नारायणें । उपेक्षीजे सर्वथा ॥ १ ॥ देवापायीं नाहीं भाव । भक्ति वरी वरी वाव । समर्पिला जीव । नाहीं तो व्यभिचार ॥ २ ॥ जगा घालावें सांकडें । दीन होऊनि बापुडें । हेंचि अभाग्य रोकडें । मूळ हा अविश्वास ॥ ३ ॥ काय न करी विश्वंभर । सत्य करितां निर्धार । तुका म्हणे सार । दृढ पाय धरावे ॥ ४ ॥ [८५८]

भाव बळें विष्णुदास । नाहीं नाश पावत ॥ १ ॥ योगभाग्य(ग्यें) घरा येती ।

प्रारब्धाच्या योगानें सर्व जन सुखदुःखें भोगतात १. जखमी मनुष्यास आलिंगन देणाराचें अंग रक्तपुवानें भरेल २. आमिषाच्या संगतीनें मत्स्यादि प्राण्यांना पीडा होते, म्हणून आशेच्या त्यागांतच सुख आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा सर्व प्रकार जाणून माझा जीव भयभीत झाला, म्हणून मी सर्व उपाधींच्या बाहेर पडलों. [८५४]

विचारी बुद्धीस विषयआशा झांकून टाकते म्हणजे बुद्धि संशयी होते. असें असणें हेच पाप नाहीं काय? १. ह्याकरितां आपल्या स्वरूपाचा विचार आपणच करावा, कारण आत्मस्थितिरूपी प्रसन्नता हें सार आहे. ह्याविषयीं मन साक्षी आहे २. जें आत्मस्वरूप निर्मळ शुद्धबुद्ध होतें, त्यास अविवेक्यानें नामरूपात्मक देहात्मबुद्धीचा विटाळ लाविला ३. तुकाराम महाराज म्हणतात, आंधळ्याला डोळसाच्या चालीप्रमाणें चालतां येत नाहीं (डोळस मनुष्य जसें मार्गदर्शन करील त्याप्रमाणें तो चालतो. आम्हीं मूढ लोकांना जसा उपदेश करूं तसे ते वागतात) असें मीं सांगतो ४. [८५५]

नामरूपात्मक देह मी आहें, अशा भावनेनें माझ्या पदरीं पडलेलें पातक जळून जावो १. पार्थिव देहबुद्धीचें देहरूपी मातीचें अभिमानरूपी ओझें संतांच्या चरणरजानें डोक्यावरून खालीं टाकून देऊं २. खोटा देहाभिमान आत्म्यास बहुत दुःख भोगवितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, नामरूपरहित अरूप परमात्मा हेंच खरें सुख आहे ४. [८५६]

अनेक प्रकारचीं सोंगें दाखविणें व निंदा स्तुति-करणें हा सर्व बोभाट (प्रसिद्धि) पोट करवितें १. मनांत धैर्य, क्षमा ह्या वृत्ति नसून जटा वाढवून अंगास राख लावणें ही सर्व देहविटंबना आहे २. जसें, अनेक प्रकारच्या वस्त्रालंकारांनीं प्रेत सुशोभित करणें वाईट आहे (दांभिकाचा परमार्थ वाईट दिसतो) ३. तुकाराम महाराज म्हणतात, रागानें भलभलतें बरळतो असा हा ढोंगी आहे ४. [८५७]

पोथीपुराण वाचून जे भिक्षा मागतात, त्यांचें जगणें लाजीरवाणें आहे. त्यास आग लागो. असल्या प्राण्यांची सर्वथैव नारायण उपेक्षा करितो १. देवाच्या पायीं भाव नसून बाह्यात्कारानें पोकळ भक्ति करितो पण तो जोंपर्यंत जीव हरीला समर्पण करीत नाहीं, तोंपर्यंत त्याचें हें करणें व्यभिचारवत् आहे २. विषयेच्छेनें दीन होऊन बापुडा द्रव्य मिळविण्याकरितां जगतावर भार घालतो, हेंच उघड अभाग्य आहे, ह्याचें कारण त्याच्या ठिकाणीं देवाविषयींचा अविश्वास आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, विश्वपालक अशा देवाच्या ठिकाणीं खरोखर विश्वास ठेवून त्याचे पाय धरणें हें सार आहे. ह्यापासून काय काय होणार नाहीं ? ४. [८५८]

श्रीहरीच्या भावबळानें विष्णुदास हे अविनाश असतात १. त्यामुळें देवाचें सर्व भाग्य, योग व शक्ति त्यांचे घरीं

सर्व शक्ति चालत ॥ २ ॥ पित्याचें जें काय धन । पुत्रा कोण वंचील ॥ ३ ॥ तुका म्हणे कडे बेसों । तेथें (णें) असों निर्भर ॥ ४ ॥ [८५९]

कोरड्या गोष्टी चावट्या बोल । शिकल्या सांगे नाहीं ओल ॥ १ ॥ कोण याचें मना आणी । ऐकों कानीं नाइकोनी ॥ २ ॥ घरोघरीं सांगती ज्ञान । भूस सीण कांडिती ॥ ३ ॥ तुका म्हणे आपुल्या मती । काय रिती पोकळ ॥ ४ ॥ [८६०]

नव्हतियाचा सोस होता। झडो आतां पदर ॥ १ ॥ देखणें तें देखियेलें। आतां भलें साक्षित्वें ॥ २ ॥ लाभें कळों आली हानि। राहों दोन्हीं निराळीं ॥ ३ ॥ तुका म्हणे एकाएकीं। हा कां लोकीं पसारा ॥ ४ ॥ [८६१]

सोसें वाढे दोष। झाला न पालटे कस ॥ १ ॥ ऐसें बरवें वचन। करिता(तां) तो नारायण ॥ २ ॥ असे प्रारब्ध नेमें। श्रमचि उरे श्रमें ॥ ३ ॥ सुख देते शांति। तुका म्हणे धरितां चित्तीं ॥ ४ ॥ [८६२]

काय शरीरापें काम । कृपा साधावया प्रेम। उचिताचे धर्म। भागा आले ते करूं ॥ १ ॥ देईन हांक नारायणा। तें तों नाकळे बंधना । पंढरीचा राणा । आईकोन धांवेल ॥ २ ॥ सातांपांचांचें गोठलें। प्रारब्धें आकारलें। आतां हें संचलें। असो भोगा सांभाळीं ॥ ३ ॥ फावली ते बरवी संधि। सावधान करूं बुद्धि। तुका म्हणे मधीं। कोठें नेथें विसांवा ॥ ४ ॥ [८६३]

न लगे देशकाळ। मंत्रविधान सकळ। मनचि निश्चळ। करूनि करुणा भाकावी ॥ १ ॥ येतो बैसलिया ठायां। आसनें व्यापी देवराया। निर्मळ ते काया। अधिष्ठान तयाचें ॥ २ ॥

चालत येतात २. पित्यानें मिळविलेल्या धनाचा मालक पुत्र आहे, त्याला हरकत कोण करील? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं देवाच्या कडेवर बसून तृप्त असूं ४. [८५९]

हरिविषयींचें अंतःकरणांत प्रेम नसून, जें कांहीं शिकला आहे त्याच शुष्क गोष्टी व चावटपणाचे शब्द जो लोकांना सांगतो १. असल्या ह्या मूर्खाचें सांगणें कोण मनावर घेतो? जरी त्याचें बोलणें ऐकिलें तरी तें न ऐकिल्यासारखें मानावें २. पोकळ ब्रह्मज्ञान प्रतिपादन करणारे घरोघर आहेत. तें त्यांचें करणें कोंडा कांडल्याप्रमाणें निरर्थक श्रमदायक आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा ह्या अल्पमती ज्ञान्यांचें ज्ञान निरर्थक व पोकळ आहे ४. [८६०]

नसणाऱ्या (खोट्या) देहादि प्रपंचाचा आजपर्यंत सोस होता, पण आतां त्याचा संबंध (पदर) सुटला १. देहादि प्रपंचाचें मिथ्यात्व व आत्म्याचें सत्यत्व स्वकीयत्व जें कांहीं पाहायचें तें पाहिलें. आतां आम्हीं साक्षित्वानें राहूं २. प्रपंचांतील लाभ-हानीचें स्वरूप आम्हांला समजलें, म्हणून ह्या दोहींहून वेगळे राहूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं स्वभावतः एकटे असून, हानि-लाभात्मक हा पसारा लोकांमध्यें कां असावा? (लोकांमध्यें ब्रह्मज्ञान सांगण्याचा पसारा कां करीत बसूं?) ४. [८६१]

प्रपंचाचे सोसानें (हव्यासानें रागद्वेषादि) अनेक दोष वाढतात त्या सोसाचा निरास झाला. आतां आत्मस्वरूपाचा रंग पालटत नाहीं १. आपल्याकडे कर्तव्य (कर्तृत्वाचा अभिमान) न घेतां सर्व कांहीं कर्ता नारायण आहे हें म्हणणें बरें २. सहजरीत्या पाहिजे तर नियमित प्रारब्धाच्या योगानें सर्व कांहीं होत आहे. असें असतां प्रपंचाच्या श्रमानें श्रमच प्राप्त होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, चित्तामध्यें शांति धरली असतां सर्व सुखाची प्राप्ति होते ४. [८६२]

(एक हरिभजन करण्यावांचून ह्या) शरीराशीं आमचें कांहीं काम नाहीं. हरीची कृपा व प्रेम साध्य करून घेणें हे योग्य धर्म आमच्या वांट्यास आले आहेत, त्याप्रमाणें आम्हीं वागूं १. ते असे, कीं हे नारायणा, अशा अट्टाहासानें हांका मारूं. त्या योगानें संसारबंधन होणार नाहीं, कारण त्या हांका ऐकून पंढरीचा राजा पांडुरंग धांवत येईल २. सप्त धातूंचें व पंच भूतांचें बनलेलें हें शरीर प्रारब्धयोगानें आकारदशेस आलें आहे. आतां हें शरीर प्रारब्धयोगानें होणाऱ्या सुख-दुःखाच्या आधीन राहो ३. तुकाराम महाराज म्हणतात, नरदेहाचा योग उत्तम आहे. ह्या ठिकाणीं आपली बुद्धि सावध ठेवून देवास अविश्रांत हांका मारूं ४. [८६३]

देशशुद्धि, कालशुद्धि व मंत्रविधान हें कांहीं नको; एक मन स्थिर करून हरीला आळवावें १. म्हणजे तो बसल्या-ठिकाणींच येतो व ज्या जागेंत भक्त राहातात तें स्थळ व्यापून टाकतो (जिकडे तिकडे दिसतो). हरीच्या चिंतनानें जो देह शुद्ध झाला आहे तेथें हरीची वस्ती होते २. हृदयांत उत्पन्न होणाऱ्या कल्पनेचा तो श्रीहरि साक्षी आहे व

कल्पनेचा साक्षी। तरि आदरेंचि लक्षी। आवडीनें भक्षी। कोरडें धान्य मटमटां ॥ ३ ॥ घेणें तरि भाव। लक्षी दासांचा उपाव। तुका म्हणे जीव। जीवीं मेळविल अनंत ॥ ४ ॥ [८६४]

नाहीं आलें भक्तिसुख अनुभवा (भक्तिसुख आलें नाहीं अनुभवा)। तो (तों) मी ज्ञान देवा काय करूं ॥ १ ॥ नसावें जी तुम्ही कांहीं निश्चिंतीनें। माझिया वचनें अभेदाच्या ॥ २ ॥ एकाएकीं मन नेदी समाधान। देखिल्या चरण वांचूनिया ॥ ३ ॥ तुका म्हणे वाचा गुणीं लांचावली। न राहे उगली मौन्य मज ॥ ४ ॥ [८६५]

मागतां विभाग। कोठें लपाल जी मग ॥ १ ॥ संत साक्षी या वचना। त्यांसी ठाऊकिया खुणा ॥ २ ॥ होईन धरणेकरी। मग मी रिघों नेदीं बाहेरी ॥ ३ ॥ तुका म्हणे मी अक्षर। तुज देवपणाचा भार ॥ ४ ॥ [८६६]

मिट(ठ)वण्याचे धनी। तुम्ही व्यवसाय जनीं ॥ १ ॥ कोण पडे ये लिगाडीं। केलीं तैसीं उगवा कोडीं ॥ २ ॥ केलें सांगितलें काम। दिले पाळूनियां धर्म ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां। असो तुमचें तुमचे माथां ॥ ४ ॥ [८६७]

समर्पिली वाणी। पांडुरंगीं घेते धणी ॥ १ ॥ पूजा होत मुक्ताफळीं। रस वोविया मंगळीं ॥ २ ॥ धार अखंडीत। ओघ चालियेला नित्य ॥ ३ ॥ पूर्णाहुनि जीव। तुका घेऊनि ठेला भाव ॥ ४ ॥ [८६८]

अवघाचि आकार ग्रासियेला काळें। एक तें निराळें हरिचें नाम ॥ १ ॥ धरूनि राहिलों अविनाश कंठीं। जीवन हें पोटीं सांठविलें ॥ २ ॥ शरीरसंपत्ति मृगजळभान। जाईल नासोन

तो भक्तांच्या ठिकाणीं आपलेविषयींचा आदर पाहातो व प्रेमळ भक्ताचें कोरडें धान्य प्रीतीनें मटामटा खातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अनंत हा आपल्या दासांच्या ठिकाणीं असणाऱ्या भावाचें ग्रहण करितो आणि जेणेंकरून आपल्या दासांचें रक्षण होईल असा उपाय जाणून शेवटीं आपल्या स्वरूपीं त्यांना मिळवून घेतो ४. [८६४]

अहो देवा, भक्तिसुख जोंपर्यंत अनुभवाला आलें नाहीं तोंपर्यंत ब्रह्मज्ञान घेऊन काय करूं? १. अहो महाराज, माझें अभेदकथन ऐकून तुम्ही निष्काळजी राहूं नये २. तुमचे चरण प्रत्यक्ष पाहिल्यावांचून एकाकी स्वरूपस्थितीनें राहाण्यांत मला समाधान वाटत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, माझी वाणी तुमचे गुण गाण्यासाठीं लाचावली आहे म्हणजे अनावर झाली आहे ४. [८६५]

अहो देवा, तुमच्याजवळ आम्हीं स्वरूपबोधाचा विभाग (वांटा) मागूं लागल्यावर तुम्हीं कोठें लपून राहाल? १. तुमच्याकडे आमचा विभाग आहे, ह्याबद्दल संत साक्षी आहेत. त्यांना ह्या सर्व खुणा ठाऊक आहेत २. तुमच्या दारांत धरणें घेऊन बसेन व तुम्हांला बाहेर जाऊं देणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, खरा अक्षरस्वरूप मीं आहें. तुझ्या मस्तकावर देवपणाचा बोजा आहे (माझ्यापुढें तुझें कांहीं चालणार नाहीं) ४. [८६६]

हे देवा, चांगल्याचे मालक तुम्हीं होतां, आणि दुःखमय प्रपंचव्यवहार जनाच्या मार्गे लाविला आहे १. असें जर आहे, तर ह्या तुमच्या लचांडामध्यें कोण पडतो? हा संसाराचा गुंताडा तुम्हींच केला, तर त्याचा उलगडा तुम्हींच करा २. धर्मप्रतिपाळण करण्याविषयीं जें काम तुम्हीं मला सांगितलें तें मीं केलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां तुमच्या कर्तृत्वाची जबाबदारी तुमच्या मस्तकीं आहे ४. [८६७]

पांडुरंगचिंतनाकडे मी आपली वाणी समर्पण केली. आतां ती त्याचाच भोग घेत आहे १. रसभरित ओव्यांनीं मीं तुमचे गुण गातों, हेंच कोणीं मोतीं ह्या योगानें तुमची मंगल पूजा होते २. तुमच्या चिंतनाचा अखंड धाराभरित ओघ नित्य वाहात आहे (माझ्याकडून पांडुरंगावर नामगंगेचा अभिषेक सतत चाललेला आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा चिंतनरूपी यज्ञ सांग झाल्यावर जीवाची पूर्णाहुती देऊन मीं आत्मभावरूपी प्रसाद सेवन करून राहिलों आहें ४. [८६८]

जेवढा म्हणून दृश्य आकार आहे, तेवढा सर्व काळानें ग्रासला आहे. एक हरीचें नाम तेवढें वेगळें आहे १. म्हणून तें अविनाश नाम कंठीं धरून राहिलों व हेंच नामरूपी जीवन हृदयांत सांठविलें २. शरीरादि संपत्ति मृगजळाच्या

खरें नव्हे ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां उपाधीच्या नांवें । आणियेला देवें वीट मज ॥ ४ ॥ [८६९]

बोलणेंचि नाहीं । आतां देवाविण कांहीं ॥ १ ॥ एकसरें केला नेम । देवा दिले क्रोध काम ॥ २ ॥ पाहेन ते पाय । जोंवरि हे दृष्टी धाय ॥ ३ ॥ तुका म्हणे मनें । हेचि संकल्प वाहाणें ॥ ४ ॥ [८७०]

येथूनियां ठाव । अवघे लक्षायाचे भाव ॥ १ ॥ उंच देवाचे चरण । तेथें झालें अधिष्ठान ॥ २ ॥ आघातावेगळा । असे ठाव हा निराळा ॥ ३ ॥ तुका म्हणे स्थळ । धरूनि राहिलों अचळ ॥ ४ ॥ [८७१]

भरला दिसे हाट । अवघी वाढली खटपट । संचिताचे वाट । वाटा होऊनि फांकती ॥ १ ॥ भोगा ऐसे ठाया ठाव । कर्मा त्रिविधाचे भाव । द्रष्टा येथें देव । विरहित संकल्पा ॥ २ ॥ दिला पाडोनियां धडा । पापपुण्याचा निवाडा । आचरती गोडा । आचरणें आपुलाल्या ॥ ३ ॥ तुका म्हणे पराधीनें । झाली ओढलीया ऋणें । तुटती बंधनें । जरि देवा आळविती ॥ ४ ॥ [८७२]

आला भागासी तो करीं व्यवसाव । परि राहो भाव तुझ्या पायीं ॥ १ ॥ काय चाले तुम्हीं बांधलें दातारा । वाहिलिया भारा उसंतितों ॥ २ ॥ शरीर तें करी शरीराचे धर्म । नको देऊं वर्म चुकों मना ॥ ३ ॥ चळण फिरवी ठाव बहुवस । न घडो आळस चिंतनाचा ॥ ४ ॥ इंद्रियें करोत आपुले व्यापार । आवडीसी थार देई पायीं ॥ ५ ॥ तुका म्हणे नको देऊं काळा हातीं । येतों काकुलती म्हणऊनि ॥ ६ ॥ [८७३]

आम्हां अवघें भांडवल । एक विठ्ठल एकला ॥ १ ॥ कायावाचामनोभावें । येथें जीवें वेंचलों ॥ २ ॥

भासाप्रमाणें क्षणमात्रांत नष्ट होणारी आहे, म्हणून ती खरी नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मला देहादि प्रपंचउपाधींविषयींचा देवानें वीट आणला ४. [८६९]

आतां देवावांचून आम्हांला दुसरें बोलावयाचें नाहीं १. असा एकदम नियम करून देवास कामक्रोध अर्पण केले २. माझी दृष्टि तृप्त होईतोंपर्यंत मी देवाचे पाय पाहीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचे संकल्प माझें मन नित्य करीत आहे ४. [८७०]

(ध्रुव पदांत दर्शविलेल्या ठिकाणापासून) सृष्टीला मूळ जे ११ भाव ते सर्व येथून उत्पन्न झाले आहेत असें समजावें १. म्हणून देवाचे चरण हे श्रेष्ठ आहेत. त्या ठिकाणीं मायादि जगाचें अधिष्ठानत्व-वास्तव्य–आहे २. सर्व आघातांपासून हें ठिकाण निराळें आहे (म्हणजे तापत्रयरहित आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचें अढळ स्थान मी धरून राहिलों ४. [८७१]

संसार-बाजार जीवांनीं भरला आहे आणि त्यामध्यें सर्व क्रियमाणाची (क्रियमाण कर्म करण्याची) खटपट वाढलेली आहे असें दिसतें आणि ज्यांचें जसें जसें संचित असेल त्या त्या गतीला ते जातात १. जसें ज्याचें पूर्वकृत संचित व प्रारब्ध असेल, तसें त्याला भोगस्थान मिळतें. ह्या सर्वांचा निर्विकल्प देव साक्षी आहे २. देवानें पापपुण्यात्मक कर्मांचा ओघ लावून दिला त्याप्रमाणें ज्यांना ज्या कर्माची गोडी असेल, त्याप्रमाणें ते आचरण करितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, प्रारब्धकर्माच्या ऋणानें सर्व जीव पराधीन झाले आहेत. जर ते देवास आळवितील तर सर्व कर्मबंधनांपासून मुक्त होतील ४. [८७२]

हे देवा, माझ्या वांट्याला जो व्यवहार आला आहे तो मी करितों, पण माझा भाव तुझ्या पायीं राहो १. अहो दातारा, तुम्हीं आम्हांला कर्मसूत्रानें बांधल्यामुळें आमचें शरीर चालणार आहे. आम्हीं तें प्रारब्धाचें ओझें मस्तकावर घेऊन मार्गक्रमण करितों (भोगतों) २. देह धर्माप्रमाणें वागत आहे, पण तुझ्या चिंतनाचें वर्म मनाकडून चुकूं देऊं नको [मनाकडून तुझें चिंतन होऊं दे] ३. देहचेष्टेमुळें शरीर बहुत ठिकाणीं फिरो, पण तुमच्या चिंतनाचा आळस न येवो ४. ज्या इंद्रियांचे जे व्यापार आहेत ते तीं करोत, पण माझ्या प्रीतीला तुमच्या पायीं आश्रय द्यावा ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मला तूं काळाच्या स्वाधीन करूं नकोस, ह्याकरितां मी करुणा भाकीत आहें ६. [८७३]

एक विठोबाराय हेंच आमचें सर्व भांडवल आहे १. काया-वाचा-मनासहित जीवानें ह्याच ठिकाणीं आम्हीं अर्पण झालों (मीं आपल्यास्वतःची काया, वाचा आणि मन विठ्ठलाला समर्पण केलीं आहेत) २. सर्व तत्वांचें बीज जे तुमचे चरण आहेत,

परतें कांहीं नेणें दुजें। तत्त्वबीज पाऊलें ॥ ३ ॥ तुका म्हणे संतसंगें। येणें रंगें रंगलों ॥ ४ ॥ [८७४]

साहोनियां टोले उरवावें सार। मग अंगीकार खऱ्या मोलें ॥ १ ॥ भोगाचे सांभाळीं द्यावें कळि(ले)वर। संचिताची थार मोडूनियां ॥ २ ॥ महत्त्वाचे ठायीं भोगावी अप्रतिष्ठा। विटंबावें (विटवावें) नष्टां पंचभूतां ॥ ३ ॥ तुका म्हणे मग कैंचा संसार। जयाचा आदर तेंचि व्हावें ॥ ४ ॥ [८७५]

निर्वैर होणें साधनाचें मूळ। येर ते विल्हाळ सांडीमांडी ॥ १ ॥ नाहीं चालों येत सोंगसंपादणी। निवडे अवसानीं शुद्धाशुद्ध ॥ २ ॥ त्याग नांव तरी निर्विषयवासना। कार्यकारणापुरते विधि ॥ ३ ॥ तुका म्हणे राहे चिंतनीं आवडी। येणें नांवें जोडी सत्यत्वेशीं ॥ ४ ॥ [८७६]

पशु ऐसे होती ज्ञानी। चर्वणीं विषयांचे ॥ १ ॥ ठेवूनियां लोभीं लोभ। झाला क्षोभ आत्मत्वीं ॥ २ ॥ केला आणिकां वाढी पाक। खाणें ताक मूर्खासी ॥ ३ ॥ तुका म्हणे मोठा घात। वाताहात हा देह ॥ ४ ॥ [८७७]

कां जी धरिलें नाम। तुम्ही असोनि निष्काम ॥ १ ॥ कोणां सांगतसां ज्ञान। ठकाठकीचें लक्षण ॥ २ ॥ आवडीनें नाचे। आहे तरी पुढें साचें ॥ ३ ॥ तुका म्हणे प्रेम। नाहीं भंगायाचें काम ॥ ४ ॥ [८७८]

खरें बोले तरी। फुकासाठीं जोडे हरी ॥ १ ॥ ऐसे फुकाचे उपाय। सांडुनियां वायां जाय ॥ २ ॥ परउपकार। एका वचनाचा फार ॥ ३ ॥ तुका म्हणे मळ। मनें सांडितां शीतळ ॥ ४ ॥ [८७९]

त्याखेरीज दुसरें मीं कांहीं जाणत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतसंगामुळें ह्या चरणारविंदांच्या सुखरंगानें रंगलों ४. [८७४]

जो हिरा घणाच्या मारानें न फुटतां राहातो, त्याचा योग्य किंमतीनें अंगीकार होतो. तसेंच जो जगाचे आघात सहन करितो, त्याचा देव अंगीकार करितो १. प्रारब्धाच्या स्वाधीन देह दिल्यानें क्रियमाणानें होणाऱ्या संचिताचें ठिकाण मोडलें जातें (ज्ञानानें संचित-क्रियमाणाचा अविचाररूपी आधार मोडून शरीराला प्रारब्धाच्या स्वाधीन करावें, म्हणजे कोणतीहि सुखदुःखें शरीराला झाली तरी चित्तांत त्या योगानें खेद होत नाहीं) २. जेथें आपली मानमान्यता आहे त्या ठिकाणीं आपली अप्रतिष्ठा करून, पंचभूतात्मक नष्ट देहाची विटंबना करून घ्यावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें केल्यानें मग संसार कशाला राहाणार? श्रीहरीचें ज्याला प्रेम आहे, तो तद्रूप होतो ४. [८७५]

सर्व प्राणिमात्रांविषयीं निर्वैर होणें हें सर्व साधनांचें मूळ कारण आहे, ह्यावांचून इतर खटाटोप हा लहान आहे (इतर सर्व विधि-निषेध पाळणें म्हणजे नुसती शोभा आहे) १. ढोंगाचा कोणताहि व्यवहार निभावत नाहीं. अखेरीस खऱ्याखोट्याचा निवाडा होतो २. निर्विषय परमात्म्याविषयींची एक वासना आहे व अशा स्थितीस खरा त्याग म्हणतात ज्याचें कार्यकारणापुरतें शास्त्रविधीनें विषयाचें सेवन आहे (शास्त्रांतील विधि व्यवहारांतील कार्यकारणभाव सांगण्यापुरताच मर्यादित आहे, परंतु विषयसेवनानें विषय भोगण्याची वासना नष्ट होते असें नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका प्रभूच्याच चिंतनाविषयींचेंच ज्याला प्रेम आहे त्यालाच खरा लाभ झाला असें समजावें ४. [८७६]

वारंवार विषयाचें सेवन करणारे जे कोणी ज्ञानी आहेत, ते पशुतुल्य होत १. विषयलोभाविषयीं ज्यांच्यामध्यें प्रीति आहे, त्यांची आत्मस्थिति क्षोभास पावली [आत्मस्थितींत बिघाड झाला] २. मूर्ख हे चांगला स्वयंपाक करून दुसऱ्याला वाढतात आणि आपण असार ताकाचें सेवन करितात (जो शब्दज्ञानी स्वतः अनुभव न घेतां दुसऱ्याला ज्ञान सांगण्यांतच आयुष्य घालवितो त्याच्या नशिबीं शेवटीं संसारच राहातो) ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारच्या ज्ञान्यांचा मोठा घात होऊन त्यांच्या देहाची वाताहात होते ४. [८७७]

अहो देवा, तुम्हीं कामनारहित असंग जर आहांत तर तुम्हीं विठ्ठल ह्या नामाचा (व समचरण ह्या रूपाचा) स्वीकार कां केलात? १. मी नाम-रूपरहित असंग शुद्धबुद्ध आहें, असें ज्ञान तुम्हीं कोणाला सांगतां हें सर्व ठकबाजीचें लक्षण आहे २. आमच्या पुढें तुमचें खरें स्वरूप आहे त्याच्याच नामचिंतनाच्या छंदांत मी प्रेमानें नाचेन ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, असल्या कोरड्या ब्रह्मज्ञानानें सगुणाविषयींचें आमचें प्रेम भंगण्याचें कांहीं कारण नाहीं ४. [८७८]

मनुष्यानें जन्मभर नुसतें खरें बोलण्याचें व्रत पाळलें तरी हरीची प्राप्ति फुकट होते १. असे फुकट उपाय सोडून मनुष्य कांहीं तरी करीत व्यर्थ जात आहे २. एका सत्य वचनानेंच पुष्कळ परोपकार होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, कुवासनेचा (असत्याचा) मळ मनानें टाकून दिल्यास तें शांत होईल ४. [८७९]

दया क्षमा शांति । तेथें देवाचि वसति ॥ १ ॥ पावे धांवोनियां घरा । राहे धरोनियां थारा ॥ २ ॥ कीर्तनाचे वाटे । वराडिया ऐसा लोटे ॥ ३ ॥ तुका म्हणे घडे । पूजा नामें देव जोडे ॥ ४ ॥ [८८०]

शिष्याचा जो नेघे सेवा । मानी देवासारिखें ॥ १ ॥ त्याचा फळ उपदेश । आणिकां दोष उफराटे ॥ २ ॥ त्याचें खरें ब्रह्मज्ञान । उदासीन देहभावीं ॥ ३ ॥ तुका म्हणे सत्य सांगें । येवोत रागें येतील ते ॥ ४ ॥ [८८१]

माझीं मेलीं बहुवरी । तूं कां जैसा तैसा हरी ॥ १ ॥ विठो कैसा वांचलासी । आतां सांग मजपाशीं ॥ २ ॥ तुज देखतांचि माझा । बाप गेला आजा पणजा ॥ ३ ॥ आम्हां लागली हे (लागलेंसे) पाठी । बालत्व तारुण्य काठी ॥ ४ ॥ तुज फावलें तें मागें । कोणी नसतां वादी लागें ॥ ५ ॥ तुका म्हणे तुझ्या अंगीं । मज देखिल (देखतां) लागलीं अवघीं ॥ ६ ॥ [८८२]

आणीक कोणाचा न करीं मी संग । जेणें होय भंग माझ्या चित्ता ॥ १ ॥ विठ्ठलावांचूनि आणीक जे वाणी । नाइकें मीं कानीं आपुलिया ॥ २ ॥ समाधानासाटीं बोलावी हे मात । परि माझें चित्त नाहीं कोठें ॥ ३ ॥ जिवाहूनि मज तेचि आवडती । आवडे ज्यां चित्तीं पांडुरंग ॥ ४ ॥ तुका म्हणे माझें तोचि जाणे हित । आणिकांच्या चित्त नेदीं बोला ॥ ५ ॥ [८८३]

आशा हे समूळ खाणोनि काढावी । तेव्हांचि गोसावी व्हावें तेणें ॥ १ ॥ नाहीं तरी सुखें असावें संसारीं । फजिति दुसरी करूं नये ॥ २ ॥ आशा मारुनियां जयवंत व्हावें । तेव्हांचि निघावें सर्वांतूनि ॥ ३ ॥ तुका म्हणे जरी योगाची तांतडी । आशेची वीबुडी करीं आधीं ॥ ४ ॥ [८८४]

ज्या ठिकाणीं दया, क्षमा व शांति या वृत्ति आहेत, तेथें देवाची वस्ती आहे १. त्याच्या घरीं देव धांवत जाऊन त्याचें हृदय हें निरंतर वस्तीचें ठिकाण करितो २. कीर्तनाच्या मार्गानें, अन्नाला दुकाळल्या आगांतुकाप्रमाणें (दुष्काळग्रस्त भिकाऱ्यासारखा) देव धांव घेतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाचें नांव घेतल्यानें त्याची पूजा होते व तो भेटहि देतो ४. [८८०]

जो गुरु शिष्याची सेवा न घेतां त्यास देवाप्रमाणें मानतो १. त्याच गुरूचा उपदेश शिष्यास फलद्रूप होतो. बाकीच्या गुरूंना दोष मात्र लागतो २. जे देहाविषयीं उदास आहेत त्यांचें ब्रह्मज्ञान खरें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें मीं खरें बोलत आहें. ह्यापासून कोणाला राग येत असेल तर तो खुशाल येवो ४. [८८१]

देवा, आजपर्यंत माझीं देहसंबंधी (नात्यांगोत्यांतलीं) पुष्कळ माणसें मेलीं. तूं जशाचा तसा आहेस १. हे विठोबा, तूं आजपर्यंत कसा वांचलास हें मला सांग २. तुझ्या देखत माझा बाप, आजा, पणजा हे सर्व मेले ३. आमच्या मागें बाल्य अवस्था, तरुण अवस्थारूपी काठी लाविली आहे ४. ह्या पूर्वीं तुझ्याशीं वाद घालणारा कोणी वादी नसल्यामुळें तुला चांगली सवड मिळाली ५. तुकाराम महाराज म्हणतात, हीं सर्व माझ्यासह तुझ्या स्वरूपाकडे आलीं (तुझ्या दृष्टी-समोर माझ्या अंगीं बाल्यादि अवस्था, जन्म, मरण ही सर्व उपाधि लागली आहे, पण तूं मात्र जसाच्या तसा अविकारी आहेस, ह्यांतील रहस्य मला एकांतांत सांग) ६. [८८२]

ज्यांच्या योगानें माझ्या चित्ताची एकाग्रता मोडते, असे जे देवाहून वेगळे त्यांची मी संगति करणार नाहीं १. विठ्ठलनामस्मरणावांचून जे शब्द आहेत ते मीं आपल्या कानांनीं देखील ऐकणार नाहीं २. मीं जें कांहीं सर्व बोलतों तें दुसऱ्याच्या समाधानाकरितां बोलतों, पण माझें चित्त कोठेंच गुंतलेलें नाहीं ३. ज्यांच्या चित्तांत पांडुरंगाविषयीं परम प्रेम आहे, ते मला माझ्या जीवापेक्षांहि जास्त आवडतात ४. तुकाराम महाराज म्हणतात, देव आणि संत हेच माझ्या हिताचे जाणते आहेत, म्हणून त्यांच्यावांचून इतरांच्या बोलण्याकडे मी लक्ष देत नाहीं ५. [८८३]

चित्तांतील आशा समूळ खणून काढून तिचा त्याग करावा, व मगच त्यानें गोसावी व्हावें १. नाहीं तर सुखानें संसारामध्यें राहावें. ह्या योगानें अखेरीस यमलोकांत एकच फजिती होईल पण त्यागिलेल्या संसाराची आशा धरण्यानें इहलोकांत दुसरी फजिती होते ती करून घेऊं नये २. चित्तांतील आशेला ठार मारून ज्या वेळेस विजयी व्हावें त्या वेळेस संसारपरिग्रहांतून बाहेर निघावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर तुला योग साध्य करून घेण्याची त्वरा असेल तर तूं आधीं आशा निर्बीज कर ४. [८८४]

निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म । निर्धार हें वर्म चुकों नये ॥ १ ॥ निष्काम निश्चळ विठ्ठलीं विश्वास । पाहों नये वास आणिकांची ॥ २ ॥ तुका म्हणे ऐसा कोणें(ण) उपेक्षिला । नाहीं ऐकिला ऐसा कोणी ॥ ३ ॥ [८८५]

नामाचें चिंतन प्रगट पसारा । असाल तें करा जेथें तेथें ॥ १ ॥ सोडवील माझा स्वामी निश्चयेंसीं । प्रतिज्ञा हे दासीं केली आम्हीं ॥ २ ॥ गुण दोष नाहीं पाहात कीर्तनीं । प्रेमें चक्रपाणी वश्य होय ॥ ३ ॥ तुका म्हणे कडु वाटतो प्रपंच । रोकडे रोमांच कंठ दाटे ॥ ४ ॥ [८८६]

नाम म्हणतां मोक्ष नाहीं । ऐसा उपदेश करितील कांहीं । बधिर व्हावें त्यांचे ठायीं । दुष्ट वचन वाक्य तें ॥ १ ॥ जयाचे राहिलें मानसीं । तेचि पावले तयासी । चांचपडतां मेलीं पिसीं । भलतैसीं वाचाळें ॥ २ ॥ नवविधी(धा)चा निषेध । जेणें मुखें करिती वाद । जन्मा आले निंद्य । सूकर याती संसारा ॥ ३ ॥ काय सांगों वेळोवेळां । आठव नाहीं रे (त्या) चांडाळा । नामासाठीं बाळा । क्षीरसागरीं कोंडिलें ॥ ४ ॥ आपुलिया नामासाठीं । लागे शंखासुरापाठीं । फोडोनियां पोटीं । वेद चारी काढले ॥ ५ ॥ जगीं प्रसिद्ध बोली । नामें गणिका तारिली । आणिकेंही उद्धरिलीं । पातकी महादोषी ॥ ६ ॥ जे हे पवाडे गर्जती । नाम प्रल्हादाच्या चित्तीं । जळतां बुडतां घातीं । राखे हातीं विषाचे ॥ ७ ॥ काय सांगूं ऐशी किर्ती । तुका म्हणे ख्याती । नरकाप्रती जाती । निषेधिती तीं एकें ॥ ८ ॥ [८८७]

किती या काळाचा सोसावा वोळसा । लागला सरिसा पाठोपाठीं ॥ १ ॥ लक्ष चौऱ्यांशीची करा सोडवण । रिघा या शरण पांडुरंगा ॥ २ ॥ उपजल्या पिंडा मरण सांगातें । मरतें उपजतें

हरीच्या ठिकाणीं दृढ भाव ठेवणें हाच भक्तांचा स्वधर्म आहे, अशा प्रकारच्या निश्चयाचें वर्म भक्तजनांनीं नेहमीं हृदयांत बाळगावें. त्यांत अंतराय (विसर) येऊं देऊं नये १. सर्व कामना टाकून विठोबारायाच्या ठिकाणीं अढळ विश्वास ठेवावा. दुसऱ्या कोणाचीहि वाट पाहूं नये २. तुकाराम महाराज म्हणतात, अशा अनन्य भक्ताचा त्याग कोणीं केला ? (पाठभेद-कोण उपेक्षिला – अशा कोणत्या अनन्य भक्ताची विठ्ठलानें उपेक्षा केली आहे ?) माझ्या ऐकण्यांत तर असा कोणी आलाच नाहीं ४. [८८५]

अहो जन हो, जेथें तुम्ही राहात असाल तेथें नामाच्या चिंतनाचा उघड प्रसार करा १. त्या योगानें माझा स्वामी पांडुरंग तुम्हांला खात्रीनें संसारबंधनांतून सोडवील. हें आम्हीं सेवक प्रतिज्ञापूर्वक सांगतों २. चक्रपाणि हा कीर्तन करणाराचे गुणदोष न पाहातां प्रेमानें त्याच्या आधीन होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरीच्या चिंतनानें (कीर्तनानें) प्रपंच कडु वाटूं लागतो आणि रोमांच उभे राहाणें, कंठ दाटणें इत्यादि अष्ट सात्त्विक भावांचा उदय होतो ४. [८८६]

देवाचें नांव घेण्यानें मोक्ष प्राप्त होत नाहीं असा जर कोणीं उपदेश करतील तर तो वाईट समजून ऐकण्याविषयीं कानानें बहिरें व्हावें [त्याकडे दुर्लक्ष करावें] १. ज्याच्या मनामध्यें जी गोष्ट असते, ती त्याला हरिनामानें प्राप्त होते. ह्या नामाच्या ठिकाणीं विन्मुख राहून ज्ञानाच्या गोष्टींचा वाचाळपणा करण्यांत कित्येक मूर्ख मेले २. जे लोक तोंडानें अनेक वाद करून श्रवणादि नवविधा भक्तींचा निषेध करतात त्यांचा जन्म संसारामध्यें डुकराप्रमाणें निंद्य आहे ३. वेळोवेळीं ह्यांना कोठपर्यंत सांगावें ? श्रीहरीनें आपल्या नामाकरितां उपमन्यूस (उपमन्यु नांवाच्या लहान बालकास दूध पिण्याकरितां) क्षीरसिंधूमध्यें कोंडून ठेविलें. ह्या गोष्टीचा आठव नामीं विन्मुख असलेल्या चांडाळास नाहीं ४. शंखासुरानें ब्रह्मदेवाचे वेद चोरून नेले [गिळिले होते] तेव्हां त्याचा पाठलाग करून व त्याचें पोट फाडून ते बाहेर काढले, आणि ब्रह्मदेवास दिले. हें सर्व कृत्य प्रभूनें आपल्या नामाकरितां केलें ५. नामचिंतनानें गणिका वेश्या तरली. त्याचप्रमाणें कित्येक पंचमहापातकी नामचिंतनानें तरले. ही हकीगत जगांत पुराणप्रसिद्ध आहे ६. हेंच नाम प्रल्हादानें चित्तीं धरल्यामुळें अग्नीपासून, पाण्यापासून आणि विषापासून त्याचें रक्षण झालें. अशा प्रकारच्या कीर्तीची पुराणानें गर्जना केली आहे ७. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारची नामाची ख्याति मीं कोठपर्यंत सांगूं ? ह्या नामाचा जे निषेध करतात ते नरकाला जातात ८. [८८७]

हें कालचक्र कोठपर्यंत सोसावें ? (हे जन्ममरणाचे भोंवरे किती काळ सोसावेत ?) जिकडे जावें तिकडे तें पाठीमागें लागलें आहे १. म्हणून पांडुरंगास शरण जाऊन चौऱ्यांशीं लक्ष योनींतून आपली सुटका करून घ्या २. जन्मलेल्या

सर्वांचि तें ॥ ३ ॥ तुका म्हणे माळ गुंतली राहाटीं । गाडग्याची सुटी फुटलिया ॥ ४ ॥ [८८८]

गासी तरि एक विठ्ठलचि गाई । नाहीं तरि ठायीं राहें उगा ॥ १ ॥ अद्वैतीं तों नाहीं बोलाचें कारण । जाणिवेचा सीण करिसी वायां ॥ २ ॥ तुका म्हणे किती करावी फजिती । लाज नाहीं चित्तीं निलाजिरा ॥ ३ ॥ [८८९]

जयाचिये वाचे न ये हा विठ्ठल । त्याचे मज बोल नावडती ॥ १ ॥ शत्रु तो म्यां केला न म्हणें आपुला । जो विन्मुख विठ्ठला सर्वभावें ॥ २ ॥ जयासी नावडे विठोबाचें नाम । तो जाणा अधम तुका म्हणे ॥ ३ ॥ [८९०]

आम्हांसी तों नाहीं आणीक प्रमाण । नामासी कारण विठोबाच्या ॥ १ ॥ घालुनियां कांस करितों कैवाड । वागों नेदीं आड कळिकाळासी ॥ २ ॥ अबद्ध वांकडें जैशा तैशा परी । वाचे हरि हरि उच्चारावें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां सांपडलें निज । सकळ हें बीज पुराणांचें ॥ ४ ॥ [८९१]

जीव तोचि देव भोजन ते भक्ति । मरण ते मुक्ति पापां(खां)ड्याची ॥ १ ॥ पिंडाच्या पोषकीं(णें) नागविले जन । लटिके पुराण केले वेद ॥ २ ॥ मना आला तैसा करिती विचार । म्हणती संसार नाहीं पुन्हां ॥ ३ ॥ तुका म्हणे पाठीं उठती यमदंड । पापपुण्य लंड न विचारिती ॥ ४ ॥ [८९२]

भक्तांचा महिमा भक्तचि जाणती । दुर्लभ या गति आणिकांसी ॥ १ ॥ जाणोनि नेणते झाले तेणें सुखें । न बोलोनि मुखें बोलताती ॥ २ ॥ अभेदूनि भेद राखियेला अंगीं । वाढावया जगीं प्रेमसुख ॥ ३ ॥

देहाच्या मागें मरण लागलें आहे. मेल्यावर पुनः लगेच जन्म आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे जन्म-मृत्यु रहाटगाडग्याच्या माळेप्रमाणें आहेत. ह्यांतून सुटका रहाटगाडग्याच्या माळेंतील गाडगें फुटल्याप्रमाणें विठोबारायांना शरण गेल्यानें होते ४. [८८८]

तुला गावयाचें असेल तर एक विठोबारायाचेंच नांव गा. नाहीं तर आपल्या ठिकाणीं उगीच बैस (नाहींतर शुद्ध अद्वैत स्थितींत राहा) १. परमात्म्याच्या अद्वैत स्वरूपाविषयीं बोलण्याचें कांहीं कारण नाहीं. तें निःशब्द आहे, म्हणून त्याला जाणण्याविषयींचे श्रम व्यर्थ आहेत २. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या शब्दज्ञान्याची किती फजिती करावी? हा निलाजरा आहे, ह्याच्या चित्तास लाज नाहीं ३. [८८९]

ज्याच्या वाचेस विठोबारायाचें नाम येत नाहीं त्याचे शब्द मला आवडत नाहींत १. काया, वाचा, मन ह्या सर्व भावानें विठोबारायाच्या ठिकाणीं जो विन्मुख आहे त्यास मीं शत्रु मानतों. त्याला कधींहि आपला म्हणत नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याला विठोबारायाचें नाम आवडत नाहीं, तो अधम व पापी आहे असें समजा ३. [८९०]

आमचें काम विठोबारायाच्या नामाशींच आहे, अन्य कांहीं आम्हांस मान्य नाहीं १. असें मी भक्तीची कांस घालून निश्चय करून कलिकाळाला समोर फिरकूं देणार नाहीं २. हरि हरि हें नाम अशुद्ध, वांकडें, जसें येईल तसें वाचेनें उच्चारावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, विठोबारायाचें नाम हें सर्व पुराणांचें बीज व आमचेंहि निजरूप (आत्मतत्त्व) तें आम्हांला सांपडलें ४. [८९१]

नास्तिक हे जीव [देह] हाच देव मानतात आणि भोजनादिकांचें सेवन ही भक्ति मानतात व मरण्यास मुक्ति समजतात १. अशा प्रकारच्या पिंडपालन करणाऱ्यांनीं जनांस फसविलें [आपल्या मताचें केलें] आणि वेदांस व पुराणांस खोटें मानिलें (वेद-शास्त्र-पुराणें खोटीं ठरविलीं) २. पुनर्जन्म नाहीं असा ते मनानें विचार करून ठरवितात (जिवंत असे-पर्यंत सुखानें जगावें; कर्ज काढूनसुद्धां खाण्यापिण्याची चंगळ करावी; मेल्यानंतर देहाचें भस्म झाल्यावर तो पुन्हां कसला येणार ?–नास्तिकांचें मत) ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे हे पापपुण्याचा विचार न करणारे लंड (नास्तिक) त्यांच्या पाठीवर अखेरीस यमाचे दंड बसतात ४. [८९२]

भक्तांचें महत्त्व भक्तांनाच कळावयाचें, इतरांना त्यांची स्थिति कळणें कठिण आहे १. जे श्रीहरीच्या स्वरूपास जाणून त्या सुखभरांत जाणीव वृत्ति (ज्ञानाचा अभिमान) टाकून नेणते झाले आहेत, ते जें कांहीं मुखानें बोलतात तें न बोलणें होय (परमार्थ दृष्टीनें कांहींच न बोलतांहि मुखानें व्यवहारापुरतें बोलतात) २. देवाचा व आपला अभेद जाणून सेव्य-सेवकपणाचा भेद त्यांनीं आपल्या ठिकाणीं ठेविला आहे; कारण, जगतामध्यें भक्ति-प्रेमसुख वाढलें जावें ३.

टाळ घोळ कथा प्रेमाचा सुकाळ । मूढ लोकपाळ तरावया ॥ ४ ॥ तुका म्हणे हें तों आहे तयां ठावें । जीहीं एका भावें जाणीतलें ॥ ५ ॥ [८९३]

आशा तृष्णा माया अपमानाचें बीज । नासिलिया पूज्य होईजेतें ॥ १ ॥ अधीरासी नाहीं चालों जातां मान । दुर्लभ दर्शन धीर त्याचें ॥ २ ॥ तुका म्हणे नाहीं आणिकांसी बोल । वायां जाय मोल बुद्धीपाशीं ॥ ३ ॥ [८९४]

चिंतनें सरे तो धन्य धन्य काळ । सकळ मंगळ मंगळाचें ॥ १ ॥ संसारसिंधु नाहीं हरी(च्या) दासां । गर्भवास कैसा नेणती ते ॥ २ ॥ जन वन ऐसें कृपेच्या सागरें । दाटला आभारें पांडुरंग ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा भक्तांचें बंधन । दाखविलें भिन्न परी एक ॥ ४ ॥ [८९५]

मोक्षाचें आम्हांशी नाहीं अवघड । तो असे उघड गांटोळी(डी)स ॥ १ ॥ भक्तीचे सोहळे होतील जीवासी । नवल तेविशीं पुरवितां ॥ २ ॥ ज्याचें त्यासी देणें कोण तें उचित । मानूनियां हित घेतों सुखें ॥ ३ ॥ तुका म्हणे सुखें देईं संवसार । आवडीसी थार करीं माझे ॥ ४ ॥ [८९६]

चिंतनासी न लगे वेळ । सर्व काळ करावें ॥ १ ॥ सदा वाचे नारायण । तें वदन मंगळ ॥ २ ॥ पढिये सर्वोत्तमा भाव । येर वाव पसारा ॥ ३ ॥ ऐसें उपदेशी तुका । अवघ्या लोकां सकळां ॥ ४ ॥ [८९७]

अंतरायें पडें गोविंदीं अंतर । जो जो घ्यावा भार तो तो बाधी ॥ १ ॥ बैसलिये ठायीं आठवीन पाय । पाहीन तो ठाय तुझा देवा ॥ २ ॥ अखंड तें खंडे संकल्पीं विकल्प । मनोजन्य पाप रज्जुसर्प ॥ ३ ॥ तुका म्हणे विश्वीं विश्वंभर वसे । राहों ऐसे दशे सुखरूप ॥ ४ ॥ [८९८]

मूढ लोकांचा समुदाय तारण्याकरितां त्यांनीं टाळांच्या घोषानें हरिकथेचा प्रेमसुकाळ केला आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांनीं ऐक्यभावनेनें हरीला जाणलें आहे, त्यांनाच हा प्रकार (ही भक्तांची स्थिति) ठाउक आहे ५. [८९३]

(विषयाची) आशा, तृष्णा, माया (प्रेम) हें अपमान होण्याचें बीज आहे, त्यांचा नाश (त्याग) केल्यानें तो लोकांत पूज्य होतो १. ज्याच्या ठिकाणीं ह्या त्यागाविषयींचा धीर नाहीं, तो कोठेंहि गेला तरी त्यास मान नाहीं. ज्यांच्यामध्यें ह्या त्यागांविषयींचा धीर आहे त्यांचें दर्शन दुर्लभ आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, बुद्धिमानांना उपदेशाची किंमत आहे. इतरांच्या ठिकाणीं ते बोल व्यर्थ जातात. त्यांत त्यांचा कांहीं दोष नाहीं ३. [८९४]

हरीच्या चिंतनांत जो काळ जात आहे तो सर्व मंगलांमध्यें मंगल (शुभकालांमध्यें शुभ) असा धन्य आहे (असें द्विरुक्तीनें सांगतात) १. हरीच्या दासांना संसाराचा (संसारसागराचा) संबंध नाहीं, म्हणून ते गर्भवासादि दुःख जाणत नाहींत २. जन, वन हें सर्व त्यांना कृपेचा सागर जो पांडुरंग त्याच्या स्वरूपानें भरलें आहे. असा त्यांचा अनुभव आहे म्हणून पांडुरंगहि त्यांच्या उपकारानें दाटला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव हा भक्तरूपी पाशामध्यें बद्ध झाला आहे. देव व भक्त हा भिन्न व्यवहार त्यांनीं कौतुकानें दाखविला आहे, पण वस्तुतः ते एकच आहेत ४. [८९५]

मोक्षप्राप्ति ही आम्हांस कठीण नाहीं. जवळ असलेल्या गांठोड्यांतील वस्तूप्रमाणें मोक्ष हा आमचे स्वाधीन आहे १. हे देवा, भक्तीचें सुख जीवास भोगावयास मिळेल पण तें तुम्हीं पुरविणें हें नवल आहे २. मोक्ष हें आमचें स्वरूप आहे, अर्थात् तो आमचा आम्हांस देणें ह्यांत काय पुरुषार्थ आहे, तरीपण आम्ही त्यांत आनंदानें हित मानून घेतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हांला सुखानें तूं जन्म दे; पण माझ्या प्रीतीला तुझे चरणाचे ठिकाणीं आश्रय दे ४. [८९६]

भगवंताचें चिंतन करण्यास शुद्ध काळवेळेची आवश्यकता नको. तें सर्वकाळ करावें १. ज्याच्या मुखामध्यें सतत नामस्मरण आहे तें मुख मंगल आहे २. ज्याच्या ठिकाणीं हरीविषयींची श्रद्धाच प्रिय आहे व बाकी सर्व व्यर्थ पसारा वाटत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याप्रमाणें सर्व लोकांस मीं उपदेश करीत आहें ४. [८९७]

गोविंदाच्या ठिकाणीं वियोग होऊन जो जो व्यवहार करावा, तो तो बाधक होतो १. हे देवा, ज्या ठिकाणीं मीं बसलों आहें त्या ठिकाणीं मीं तुमचे पायाचा आठव करीन, व तुमचें स्थान अवलोकन करीन (तुझ्या स्वरूपाची ओळख करून घेईन) २. अखंड स्वरूपनिश्चयाचे ठिकाणीं प्रपंच हा विकल्प उभा राहिल्यानें त्यांत खंड होतो. दोरीच्या ठिकाणीं मनाच्या कल्पनेनें ज्याप्रमाणें सर्प भासतो तद्वत् मनानें स्वरूपीं प्रपंच विकल्प करणें हें पाप होय ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा विश्वपालक हा संपूर्ण विश्वाच्या अंतर्बाह्य आहे, ह्या स्थितीनेंच आम्ही आनंदानें राहूं ४. [८९८]

एकाचिया धांस्या टोके । एका फिके उपचार ॥ १ ॥ ऐसी सवे गोवळिया । भाव तया पढियंता ॥ २ ॥ एकाचें तें उच्छिष्ट खाय । एका जाय ठकवूनि ॥ ३ ॥ तुका म्हणे बहु सोपें । बहु रूपें अनंत(ता) ॥ ४ ॥ [८९९]

कोठें नाहीं अधिकार । गेले नर वायां ते ॥ १ ॥ ऐका हें सोपें वर्म । न लगे श्रम चिंतना ॥ २ ॥ मृत्याचिया अंगीं छाये । उपाय(ये)चि खुंटतां ॥ ३ ॥ तुका म्हणे अवघे जन । येथें मन असों द्या ॥ ४ ॥ [९००]

ज्यानें ज्यानें जैसें ध्यावें । तैसें व्हावें कृपाळें ॥ १ ॥ सगुणनिर्गुणांचा ठाव । विटे पाव धरियेले ॥ २ ॥ अवघे साकरेचें अंग । नये व्यंग निवडीतां ॥ ३ ॥ तुका म्हणे जें जें करी । तें तें हरी भोगिता ॥ ४ ॥ [९०१]

आचरती कर्मे । तेथें काळें धर्माधर्मे ॥ १ ॥ खेळे गोवळियांसवें । करिती तें त्यांचें साहावें ॥ २ ॥ यज्ञमुखें घांस । मंत्रपूजेसी उदास ॥ ३ ॥ तुका म्हणे चोरी । योगियांही सवें करी ॥ ४ ॥ [९०२]

नामाचे पवाडे बोलती पुराणें । होऊनि कीर्तनें तोचि ठेला ॥ १ ॥ आदिनाथा कंठीं आगळा हा मंत्र । आवडीचें स्तोत्र सदा घोकी ॥ २ ॥ आगळे हें सार उत्तमा उत्तम । ब्रह्मकर्मा नाम एक तुझें ॥ ३ ॥ तिहीं त्रिभुवनीं गमन नारदा । हातीं विणा सदा नाम मुखीं ॥ ४ ॥ परिक्षिती मृत्यु सातां दिवसांचा । मुक्त झाला वाचा उच्चारितां ॥ ५ ॥ कोळियाची कीर्ति वाढली गहन । केलें रामायण रामा आधीं ॥ ६ ॥ सगुण निर्गुण तुज म्हणे वेद । तुका म्हणे भेद नाहीं नामीं ॥ ७ ॥ [९०३]

देव हा भक्तांच्या रांधलेल्या कण्याकरितां टोकत बसतो व इतरांनीं अनेक सुखोपचार जरी अर्पण केले तरी ते त्यास फिके वाटतात १. अशा प्रकारची संवय श्रीकृष्ण गोपाळास आहे. त्याला एक शुद्धभाव प्रिय आहे २. भक्तांचें उष्टें खातो व दुसऱ्यांस (याज्ञिकांस) फसवितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, बहुवेषधारी अनंत भाविकांस सुलभ आहे ४. [८९९]

ज्यांचे ठिकाणीं कोणत्याच प्रकारचा यज्ञ, दान, तप, समाधि, विवेक, वैराग्य, ज्ञान ह्यांपैकीं अधिकार नाहीं, असे अनधिकारी नर वायां गेले आहेत १. अशा प्रकारच्या लोकांस एवढेंच सांगणें आहे, कीं श्रीहरीचें चिंतन करणें हेंच सुलभ साधन आहे. ह्यांत कांहीं श्रम नाहीं. २. मरणप्रसंग आल्यावर सर्व उपाय कुंठित होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो सर्व जनहो, हरिचिंतनाचे ठिकाणीं तुम्हीं आपलें मन ठेवा ४. [९००]

जे जे भक्त जसें जसें ध्यान करितील त्या त्याप्रमाणें कृपाळु श्रीहरि रूप घेतो १. सगुण निर्गुणाचें वसतिस्थान पांडुरंग समचरण ठेवून विटेवर उभा आहे २. साखरेचें सर्व अंग गोड आहे. तेथें कांहीं व्यंगता निवडतां येणार नाहीं. (त्याप्रमाणें हरीच्या पारमार्थिक स्वरूपांत सगुण-निर्गुण असा न्यून-अधिक भाव दाखवितां येणार नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जीव जें जें कांहीं सेवन करितात, तें तें सर्व हरि भोगतो ४. [९०१]

जे धर्मकर्म यथाकाळीं आचरण करितात (पण त्यांच्या मनांत देवाविषयीं भाव नसेल तर) त्यांच्याकडे हा देव पाहात देखील नाहीं १. तो भोळ्या गोपाळांबरोबर खेळतो व ते जें कांहीं करितील तें सहन करतो २. जे यज्ञद्वारा समंत्रक हवन करतात, त्या ठिकाणीं देव उदास असतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा हरि योग्यांस देखील ठकवितो (त्यांचे हृदयांत हरि येत नाहीं) ४. [९०२]

श्रीहरीच्या नांवाची कीर्ति पुराणांनीं वर्णन केलेली आहे आणि त्या नांवाचें जो कीर्तन करतो तो श्रीहरिरूप होऊन राहातो १. आदिनाथ शिवाच्या मुखामध्यें (तुझें नाम) हा श्रेष्ठ मंत्र आहे. शिव हे त्याचें परमप्रीतीनें सर्वकाळ पठण करतात २. हा श्रेष्ठ मंत्र उत्तमांत उत्तम असून सर्वांचें सार आहे. देवा, तुझें एक नाम ब्रह्मकर्म आहे (वेदप्रतिपादित ब्रह्मकर्मे तुझ्या नामामुळें सांग व सफळ होतात.) ३. नारद त्रैलोक्यांत गमन करीत असतां सर्वकाळ हातांत वीणा घेऊन हेंच नाम गातात ४. परिक्षिती हा सात दिवसांचे आंत ह्याच नामाचे चिंतनानें मृत्यूपासून मुक्त झाला. ५. ह्याच नामाचे चिंतनानें वाल्मीकि हा पूर्वीं कोळी असून ऋषि झाला, आणि रामअवताराच्या पूर्वीं त्यानें रामायण केलें (रामायण ग्रंथ रचिला), अशा मोठ्या कीर्तिप्रत पावला. ६. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तुम्हांस वेद सगुण व निर्गुण असें म्हणतात, तथापि तुमचे नांवामध्यें कोणताहि भेद नाहीं ७. [९०३]

भूतदयापरत्वें जया तया परी । संत नमस्कारीं सर्वभावें ॥ १ ॥ शिकल्या बोलाचा धरीसील ताठा । तरी जासी वाटा यमपंथें ॥ २ ॥ हिरा परिस मोहरा आणीक पाषाण । नव्हे परी जन संतां तैसी ॥ ३ ॥ सरिता वाहाळां गंगे सागरा समान । लेखी तयाहून अधम नाहीं ॥ ४ ॥ आणीक अमुप होती तारांगणें । रविशशिमानें लेखूं नये ॥ ५ ॥ तुका म्हणे नाहीं नम्रता अंगीं । नव्हे तें फिरंगी कठिण लोह ॥ ६ ॥ [९०४]

आणीक कांहीं मज नावडे हे मात । एका पंढरीनाथावांचूनियां ॥ १ ॥ त्याचीच कथा आवडे कीर्तन । तें मज श्रवण गोड लागे ॥ २ ॥ तुका म्हणे संत म्हणोत भलतें । विठ्ठलापरतें न मानी (मनीं) कांहीं ॥ ३ ॥ [९०५]

ठेवा जाणीव गुंडून । येथें भावचि प्रमाण ॥ १ ॥ एका अनुसरल्या काज । अवघें जाणे पंढरिराज ॥ २ ॥ तर्कवितर्कासि । वाव(ठाव) न लगे सायासी ॥ ३ ॥ तुका म्हणे भावें विण । अवघा बोलती तो सीण ॥ ४ ॥ [९०६]

येथें दुसरी न सरे आटी । देवा भेटी जावया ॥ १ ॥ तोचि ध्यावा एक चित्तें । करूनि रितें कलेवर ॥ २ ॥ षडउर्मी हृदयांत । यांचा अंत पुरवूनि ॥ ३ ॥ तुका म्हणे खुंटे आस । तेथें वास करी तो ॥ ४ ॥ [९०७]

मुक्त तो आशंक नाहीं जया अंगीं । बद्ध मोह(हो) संगीं लज्जा चिंता ॥ १ ॥ सुख पावे शांती धरूनि एकांत । दुःखी तो लोकांत दंभ करी ॥ २ ॥ तुका म्हणे लागे थोडाच विचार । परी हे प्रकार नागविती ॥ ३ ॥ [९०८]

कानीं धरी बोल बहुतांचीं मतें । चाट त्यापरतें आणीक नाहीं ॥ १ ॥ पावेल गौरव

सर्व भूतांच्या ठिकाणीं अधिकारपरत्वें (त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें) दया करावी, पण संतांच्या ठिकाणीं मात्र सर्वभावानें शरण—नम्र—असावें १. जें कांहीं तूं शिकला आहेस त्याविषयींचा जर अभिमान धरशील तर यमलोकाचे मार्गानें जाशील २. हिरा, परिस, मोहरा, माणिक ह्या वस्तू पाषाणासमान नव्हेत, त्याप्रमाणें संत हे सामान्यजनांसारखे नाहींत ३. नद्या, ओढे हे गंगा व समुद्राप्रमाणें जो मानतो त्याच्यापेक्षां जगतांत दुसरा कोणी अधम नाहीं ४. आकाशामध्यें असंख्य तारे आहेत, ते चंद्रसूर्यासमान मानूं नयेत ५. तुकाराम महाराज म्हणतात, जिच्या अंगीं नरमपणा नाहीं ती तरवार नव्हे, तर तें कठीण लोखंड आहे ६. [९०४]

एका पंढरीनाथावांचून दुसरें बोलणें मला आवडत नाहीं १. त्याचेंच कथाकीर्तन व श्रवण करणें मला आवडत आहे, म्हणून रुचत आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, विठ्ठल देवापरतें मी कांहीं मानणार नाहीं. ह्याबद्दल संत मला हवें तें म्हणोत ३. [९०५]

अहो ज्ञात्यांनों, तुम्हीं आपलें शहाणपण गुंडाळून ठेवा. देवाचे ठिकाणीं एक भावाचेंच कारण आहे १. कायावाचामनें श्रीपांडुरंगाचेच ठिकाणीं अनन्यभावें शरण जा, म्हणजे तो सर्व कांहीं कार्य करील (तुमच्या मनांतील सर्व कांहीं पंढरीनाथ जाणतो) २. तर्ककुतर्क करण्याचे व्यर्थ सायास करूं नयेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, एक हरीचे ठिकाणीं भाव ठेविल्यावांचून जे बोलतात तो शीण आहे ४. [९०६]

देवाची भेट घेण्यास दुसऱ्या साधनांची खटाटोप उपयोगी पडणार नाहीं (एक प्रेम पाहिजे) १. (हा देह कामक्रोधादिकांनीं रिकामा करून) हृदय मोकळें करून एकाग्रचित्तानें त्याचेंच ध्यान केलें पाहिजे २. कामक्रोधादि ह्या षड्वृत्ति अंतःकरणांत आहेत. त्या नाहींशा करून टाकाव्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या हृदयांतील (संसाराची) आशा नाहींशी झाली आहे, तेथेंच (त्या हृदयांत) देव वास्तव्य करतो ४. [९०७]

ज्याच्या चित्तामध्यें कोणताच संशय नाहीं तोच मुक्त आहे व लज्जा, (संसाराच्या) चिंतेचा मोह ज्याचे चित्तांत आहे तो बद्ध आहे १. ज्यानें एकांताचें सेवन केलें आहे, त्यास शांतिसुख प्राप्त होतें आणि लौकिकांत दंभ मिरविण्याचें दुःख प्राप्त होतें २. तुकाराम महाराज म्हणतात, दुःखांतून सुटून सुखप्राप्ति होण्याचा उपाय थोडाच आहे, परंतु तो न जाणतां अन्य व्यवसायानेंच लोक फसवतात ३. [९०८]

अनेक भिन्न मतवादी ह्यांचा उपदेश जे कानांनीं ऐकतात त्यांच्यासारखे दुसरे चावट कोणी नाहींत १.

वोढाळाचे परी। दंड पाठीवरी यमदूतांचे ॥ २ ॥ शब्दज्ञानी एक आपुलाले मतें। सांगती वेदांत भिन्नभावें ॥ ३ ॥ तुका म्हणे एक भाव न धरिती। पडिली हे माती त्यांचे तोंडीं ॥ ४ ॥ [९०९]

देवा ऐकें हे विनंती। मज नको रे हे मुक्ति। तया इच्छा गति। हेंचि सुख आगळें ॥ १ ॥ या या वैष्णवांचे घरीं। प्रेमसुख इच्छा करी। रिद्धिसिद्धि द्वारीं। कर जोडुनि तिष्ठती ॥ २ ॥ नको वैकुंठींचा वास। असे तया सुखा नाश। अद्भुत हा रस। कथाकाळीं नामाचा ॥ ३ ॥ तुझ्या नामाचा महिमा। तुज न कळे मेघश्यामा। तुका म्हणे आम्हां। जन्म गोड यासाठीं ॥ ४ ॥ [९१०]

न पूजीं आणिकां देवां न करीं त्यांची सेवा। न मनीं या केशवाविण दुजें ॥ १ ॥ काय उणें झालें मज तयापाशीं। तें मी मागों काई कवणासी ॥ २ ॥ आणिकांची कीर्ति नाइकें न बोलें। चाड या विठ्ठलेंविण नाहीं ॥ ३ ॥ न पाहें लोचनीं श्रीमुखावांचूनि। पंढरी सांडूनि न वजें कोठें ॥ ४ ॥ न करीं कांहीं आस मुक्तीचे सायास। न भें संसारास येतां जातां ॥ ५ ॥ तुका म्हणे कांहीं व्हावें ऐसें जीवा। नाहीं या केशवाविण दुजें ॥ ६ ॥ [९११]

नव्हे खळवादी मताचि पुरता। सत्याची हे सत्ता उपदेश ॥ १ ॥ साक्षत्वेंसि मना आणावीं उत्तरें। परिपाकीं खरें खोटें कळे ॥ २ ॥ नव्हे एकदेशी शब्द हा उखता। ब्रह्मांडापुरता घेईल त्यासी ॥ ३ ॥ तुका विनवणी करी जाणतियां। बहुमतें वायां श्रमूं नये ॥ ४ ॥ [९१२]

याचि नांवें दोष। राहे अंतरीं किलिमिष ॥ १ ॥ मना अंगीं पुण्य पाप। शुभ उत्तम संकल्प ॥ २ ॥ विजाऐसीं फळें। उत्तम कां अमंगळें ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्त। शुद्ध करावें तें हित ॥ ४ ॥ [९१३]

ओढाळ जनावराप्रमाणें यमदूतांकडून मार खाण्याचा त्यांना मोटेपणा (सत्कार) मिळेल २. कित्येक शब्दज्ञानी भेदबुद्धीनें आपापल्या मताप्रमाणें वेदाचें प्रतिपादन करतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, एक हरीविषयींचा जे भाव न धरतील त्यांचे तोंडांत अखेर माती पडेल ४. [९०९]

देवा, तुम्हीं माझी एक विनंति ऐका. मला मोक्ष नको, त्या गतीची मला इच्छा नाहीं, व ध्रुवपदांत दर्शविलेले स्थितींतच मला अधिक सुख वाटतें (सर्वांत श्रेष्ठ असें भक्ति-प्रेमसुखच मला हवें आहे) १. वैष्णवांचे घरीं वस्ती होण्याविषयीं प्रेमसुख इच्छा करीत आहे. त्यांच्या द्वारीं ऋद्धि-सिद्धि हात जोडून उभ्या आहेत २. वैकुंठामध्यें आम्हांस वास्तव्य नको, कारण त्या सुखाला नाश आहे. कीर्तनकालीं हरिनामाचे चिंतनाचा रस अपूर्व आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे मेघश्यामा, तुमचे नामाचा महिमा तुम्हांस कळत नाहीं. त्याचें सुख आम्हीं पूर्णपणें घेत आहों, म्हणून आम्हांला जन्म घेणें बरें वाटतें ४. [९१०]

एका केशवावांचून अन्य देवांची पूजा व सेवा मी करणार नाहीं व त्यांना मानणारहि नाहीं १. देवाच्या ठिकाणीं मला काय कमीं पडलें आहे म्हणून मीं तें दुसऱ्या कोणाजवळ मागूं? २. दुसऱ्यांची कीर्ति मी ऐकणारहि नाहीं व वर्णनहि करणार नाहीं. एक विठ्ठल देवावांचून मला दुसरी कसलीहि इच्छा नाहीं ३. दृष्टीनें श्रीमुखावांचून कांहीं पाहाणार नाहीं व पंढरी सोडून अन्य कोणत्याहि देवाकडे जाणार नाहीं ४. मोक्षाविषयींची आशा करणार नाहीं व तो प्राप्त होण्याविषयीं यत्नहि करणार नाहीं आणि जन्म-मृत्यूच्या येरझारांचें भय धरणार नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, एक केशवावांचून माझ्या जीवाला दुसरें कांहीं हवें असें वाटत नाहीं ६. [९११]

जे कोणी (चार्वाकादि) खलमतवादी आहेत, ते आपलें मत स्थापित करण्यापुरतेंच बोलतात; पण माझा उपदेश तसा नाहीं, तर तो सत्यत्वाच्या सत्तेनें आहे (माझ्या उपदेशाला सत्याचा आधार आहे) १. माझे शब्द व मतवाद्यांचे शब्द ह्या दोहोंचा मनाच्या साक्षित्वानें विचार केल्यास अखेरीस खरें-खोटें कोणतें हें कळून येईल २. माझा शब्द हा एकदेशी मोजका नाहीं. जो कोणी त्याचें विचारानें ग्रहण करील त्यास तो ब्रह्मांडापुरता आहे असें दिसून येईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, ही माझी सर्व विनवणी शाहाण्यांना आहे, कीं अनेक मतांचा विचार करण्याचा श्रम घेऊं नका ४. [९१२]

अंतःकरणामध्यें कोणत्याहि प्रकाराचा संशय ठेवणें हाच दोष आहे १. पुण्य, पापें हीं मनाच्या चांगल्या वाईट संकल्पानें होतात, म्हणून शुभ संकल्प करणें हेंच उत्तम २. जसें बीज असेल तशीं त्याला चांगलीं वाईट फळें येतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणून प्रथम चित्त शुद्ध करणें ह्यांतच हित आहे. ४. [९१३]

कुशळ वक्ता नव्हे जाणीव तो श्रोता। राहें भाव चित्ता धरूनियां ॥ १ ॥ धन्य तोचि जगीं धन्य तोचि जगीं। ब्रह्म तया अंगीं वसतसे ॥ २ ॥ न धोवी तोंड न करी अंघोळी। जपे सदाकाळीं रामनाम ॥ ३ ॥ जप तप ध्यान नेणे योग युक्ति। कृपाळु जो भूतीं दयावंत ॥ ४ ॥ तुका म्हणे होय जाणोनि नेणता। आवडे अनंता जीवाहूनि ॥ ५ ॥ [९१४]

काळाचिये सत्ता ते नाहीं घटिका। पंढरीनायका आठवितां ॥ १ ॥ सदा काळ गणना करी आयुष्याची। कथेचे वेळेची आज्ञा नाहीं ॥ २ ॥ याकारणें माझ्या विठोबाची कीर्ति। आहे हे त्रिजगतीं थोर वाड ॥ ३ ॥ तुका म्हणे जन्मा आलियाचें फळ। स्मरावा गोपाळ तेंचि खरें ॥ ४ ॥ [९१५]

घरोघरीं झाले कवि। नेणे प्रसादाची चवी ॥ १ ॥ लंडा भूषणाची चाड। पुढें न विचारी नाड ॥ २ ॥ काढावें आइतें। तेंचि जोडावें स्वहितें ॥ ३ ॥ तुका म्हणे कळे। आहाच झांकतील डोळे ॥ ४ ॥ [९१६]

नये पाहों मुख मात्रागमन्याचें। तैसें अभक्ताचें गुरुपुत्रा ॥ १ ॥ म्हणऊनि बरें धरितां एकांत। तेणें नव्हे घात भजनासी ॥ २ ॥ नये होऊं कदा निंदकाची भेटी। जया द्वैत पोटीं चांडाळाच्या ॥ ३ ॥ तुका म्हणे नका बोलों त्यासी गोष्टी। जयाचिया दृष्टीं पाप वाढे ॥ ४ ॥ [९१७]

कथा करोनियां द्रव्य घेती देती। तयां अधोगति नरकवास ॥ १ ॥ रवरव कुंभ(भी)पाक भोगिती यातना। नये नारायणा करुणा त्यांची ॥ २ ॥ असिखड्गधारा छेदिती सर्वांग। तप्तभूमीं अंग लोळविती ॥ ३ ॥ तुका म्हणे तयां नरक चुकती। सांपडले हातीं यमाचिया ॥ ४ ॥ [९१८]

तूं चतुर वक्ताहि होऊं नको व जाणता श्रोताहि होऊं नको. चित्ताच्या ठिकाणीं हरिविषयींचा भाव धरून राहा १ जगतामध्यें तोच धन्य आहे, असें द्विवार सांगतों. परब्रह्माची वस्ती त्याच्याच हृदयांत आहे २. तोंड धुऊं नकोस व आंघोळ करूं नकोस. सदासर्वकाल तूं जर रामनामाचा जप करशील तर तूं धन्य आहेस ३. जो सर्व भूतांच्या ठिकाणीं कृपाळु असणारा असा दयावंत आहे तो जप, ध्यान, योग आणि ज्ञान ह्यांपैकीं कांहींहि जाणत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, जो सर्व कांहीं जाणून जाणीवेची ऊर्मि टाकून नेणता होतो, तो अनंताला जीवापेक्षां आवडतो ५. [९१४]

ज्या घटकेमध्यें पांडुरंगाचें चिंतन होतें, त्या घटकेवर काळाची सत्ता नाहीं १. म्हणजे काळ हा नेहमीं आयुष्य मोजीत असतो; पण जो वेळ कथेंत गेला आहे तो मोजण्याचा त्याला हुकूम (देवाची आज्ञा) नाहीं २. ह्याकरितांच माझ्या विठोबाच्या कीर्तीची वाट त्रैलोक्यांत श्रेष्ठ आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, गोपाळाचें स्मरण करणें हेंच जन्माला आल्याचें खरें फळ आहे ४. [९१५]

घरोघर कविता करणारे कवि झाले आहेत, पण त्यांच्या कवितेंत प्रसादाची (प्रसाद ह्या काव्यगुणाची) चव नाहीं १. अशा ह्या लंड (लबाड) कवींना जगतांत भूषण मिळविण्याचीच इच्छा असते, पण ह्यापासून आपण अखेरीस फसले जाऊं हा विचार ते करीत नाहींत. २. प्रासादिक कवितेंतलीं आयतीं वाक्यें घेऊन आपल्यास अनुकूल अशा कविता ते करितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याचा परिणाम वाईट आहे हें त्यांना समजत असतें, तथापि ते मुद्दाम डोळेझांक करतात ४. [९१६]

आईशीं जाणाराचें तोंड (मातृभक्तानें) कधींहि पाहूं नये. त्याचप्रमाणें सद्गुरु–अनुगृहीतांनीं (गुरु-निंदकाचें व हरिभक्तानें अभक्ताचें) भक्तिहीनाचें तोंड पाहू नये. १. म्हणून एकांत सेवन करणें चांगलें. त्यापासून भजनास विघ्न येणार नाहीं २. निंदा करणाराची भेट केव्हांहि होऊं नये, कारण त्या चांडाळाच्या पोटांत (कपट) विषमता असते ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो सज्जन हो, ज्यास दृष्टीनें पाहिल्याबरोबर पाप वाढतें, त्याच्याशीं कधींहि (कांहींहि) गोष्टी बोलूं नयेत ४. [९१७]

भगवंताची कथा करून जे कोणीं द्रव्य घेतात व त्यांना जे कोणी देतात त्या दोघांना एकच नरकप्राप्ति आहे १. ते रौरव कुंभीपाकाच्या यातना भोगतात. त्यांना त्यांतून सोडविण्याची दया नारायणाला केव्हांहि येत नाहीं २. तरवारी-प्रमाणें ज्या वृक्षांचीं पानें आहेत, अशा वृक्षांच्या योगानें त्यांचें सर्वांग छेदलें जातें आणि त्यांना तापलेल्या भूमीवर लोळवितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारच्या लोकांची नरकयातना चुकत नाहीं, कारण ते यमाच्या हातीं पूर्ण लागले आहेत (यमाच्या तावडींत सांपडले आहेत) ४. [९१८]

नाइकावे कानीं तयाचे ते बोल। भक्तीवीण फोल ज्ञान सांगे ॥ १ ॥ वाखाणी अद्वैत भक्तिभावेंविण। दुःख पावे सीण श्रोता वक्ता ॥ २ ॥ अहं ब्रह्म म्हणोनी पाळीतसे पिंडा। नये बोलों भांडा तयासवें ॥ ३ ॥ वेदबाह्य लंड बोले तो पाषांड। त्याचें काळें तोंड संतांमध्यें ॥ ४ ॥ तुका म्हणे खंडी देवभक्तपण। वरिष्ठ त्याहूनि श्वपच तो ॥ ५ ॥ [९१९]

वेदविहित तुम्ही आइका हो कर्मे। बोलतों तीं वर्मे संतांपुढें ॥ १ ॥ चारी वर्ण झाले एकाचिये अंगीं। पापपुण्य भागीं(जगीं) विभागिलें ॥ २ ॥ प्रथम पाऊलीं पावविला पंथ। आदि मध्य अंत भेद नाहीं ॥ ३ ॥ आंबे बोरी वड बाभुळा चंदन। गुणागुणीं भिन्न अग्नि एक ॥ ४ ॥ तुका म्हणे मन उन्मन जो होय। तोंवरी हे सोय विधि पाळी ॥ ५ ॥ [९२०]

तीर्थाचें जें मूळ व्रतांचें जें फळ। ब्रह्म तें केवळ पंढरिये ॥ १ ॥ तें आम्हीं देखिलें आपुल्या नयनीं। फिटलीं पारणीं डोळियांचीं ॥ २ ॥ जीवाचें जीवन सुखाचें शेजार। उभें कटीं कर ठेवूनियां ॥ ३ ॥ जगाचा जनिता कृपेचा सागर। दीनां लोभपर दुष्टां काळ ॥ ४ ॥ सुरवरां चिंतनीं मुनिवरां ध्यानीं। आकार निर्गुणीं तेंचि असे ॥ ५ ॥ तुका म्हणे नाहीं श्रुती आतुडलें। आम्हां सांपडलें गीतीं गातां ॥ ६ ॥ [९२१]

माझे मनोरथ पावले जैं सिद्धी। तई पायीं बुद्धि स्थिरावली ॥ १ ॥ समाधान जीव राहिला निश्चळ। गेली हळहळ स्मरण(णें) हे ॥ २ ॥ त्रिविध तापाचें झालेंसे दहन। सुखावलें मन प्रेमसुखें ॥ ३ ॥ महालाभ वाचे वसे पांडुरंग। अंगोअंगीं संग अखंडित ॥ ४ ॥ जीवनाचा झाला ओलावा अंतरीं। विश्व विश्वंभरीं मावळलें ॥ ५ ॥ तुका म्हणे माप भरुं आलें सिगे। धारवोळ गंगे पूर वाहे ॥ ६ ॥ [९२२]

जो श्रीहरीच्या भक्तिभावावांचून फोलकट ज्ञान–विषय प्रतिपादन करितो त्याचे ते शब्द कानानें कधींहि ऐकूं नयेत १. कारण हरीविषयींच्या भक्तीवांचून केवळ अद्वैताचेंच विवरण करितो तो वक्ता व त्याचें तें भाषण ऐकणारा श्रोता हे दोघे श्रमी होतात २. मी ब्रह्म आहें, असें म्हणून जो देहाचें पालन करितो त्या भांडखोराबरोबर कधींहि बोलूं नये ३. जो नास्तिक लंड वेदबाह्य बोलतो, तो संतांमध्यें काळतोंड्या आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, ब्रह्मनिरूपण करून देव व भक्त ह्यासंबंधाचें खंडण करितो त्याच्यापेक्षां कुत्रीं खाणारे अंत्यज श्रेष्ठ आहेत ५. [९१९]

वेदप्रणीत जीं कर्मे आहेत तीं तुम्हीं ऐका. त्याचा विचार मी संतांपुढें सांगतों १. एका देवापासून ब्राह्मणादि चार वर्ण निर्माण झाले आहेत ते आपापल्या पापपुण्याच्या भागानें वांटले गेले २. आरंभीं सर्वांच्या उत्पत्तीचें साधन एकच (श्रीहरि) आहे. त्या हरीच्या ठिकाणीं आदि, मध्य व अंत हे भेद नाहींत ३. जसें आंबे, बोरी, वड, बाभूळ, चंदन ह्या वृक्षांतील गुणावगुणांचे अनेक भेद आहेत. त्या सर्वांचा अग्नीशीं संयोग झाल्यावर ते सर्व एक आहेत (अग्नींत जाळलीं असतां एकरूप होतात) (तसें मूळ हरीच्या ठिकाणीं आद्यंतादि–कर्ता, कर्म, फळ असा–भेद नाहीं) ४. तुकाराम महाराज म्हणतात, जोंपर्यंत मन उन्मन अवस्थेस आलें नाहीं, तोंपर्यंत शास्त्रानें सांगितलेल्या विधिमार्गानेंच मनुष्यमात्रानें वागलें पाहिजे ५. [९२०]

सर्व तीर्थांचें मूळ, सर्व व्रतांचें फळ असें जें केवळ ब्रह्म तें पंढरीस आहे १. तें आम्हीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलें. त्यायोगानें तें रूप न पाहाण्याविषयींचें आजपर्यंत डोळ्यांना उपोषण होतें त्यांचें पारणें फिटलें २. सर्व जीवांचें जीवन जें केवळ सुखाचें आंथरूण तें कंबरेवर हात ठेऊन उभें आहे ३. जो सर्व जगाचा उत्पन्नकर्ता, जो केवळ कृपेचा समुद्र व दीनांविषयीं लोभाविष्ट (अति दयाळु) असून दुष्टाविषयीं जो कृतांत काळ आहे ४. ज्याचें नेहमीं देव चिंतन करितात, त्याचप्रमाणें जो मुनिश्रेष्ठांच्या ध्यानांत असतो तेंच श्रीहरीचें रूप निर्गुणाच्या ठिकाणींहि आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, जें श्रुतीला देखील आकळलें गेलें नाहीं तें आम्हांला नामस्मरणाचें गायन गाइल्यानें सांपडलें ६. [९२१]

ज्या वेळेस देवाच्या पायीं माझी बुद्धि स्थिर झाली त्या वेळेस माझे मनोरथ सिद्धीस गेले १. माझा जीव अक्रिय-स्थितीनें (कर्तव्य संपल्यामुळें) समाधान पावला व (संसारविषयक) तळमळीचें स्मरण सुद्धां राहिलें नाहीं २. देवाच्या प्रेमसुखानें मन सुखसंपन्न झाल्यामुळें त्रिविधताप–दुःख जळालें ३. सर्व लाभांमध्यें श्रेष्ठ लाभ जो पांडुरंग त्याची वस्ती जिव्हेच्या ठिकाणीं झाली आहे व हृदयामध्यें त्याचा निरंतर अंगसंग (अखंड संबंध) आहे ४. परमात्मस्वरूपाच्या जीवनाचा अंतःकरणामध्यें झरा प्रकट झाल्यामुळें सकल विश्व हें विश्वपालक परमेश्वराच्या ठिकाणीं लयास गेलें ५. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें अनेक मार्गांनीं पाण्याच्या धारा गंगेस येऊन मिळाल्यामुळें तिला पूर येतो, त्याप्रमाणें हृदयरूपी माप हें परमात्मबोधानें शिगेला लागेपर्यंत भरलें ६. [९२२]

कृपेचीं उत्तरें देवाचा प्रसाद। आनंदी आनंद वाढवावा ॥ १ ॥ बहुतांच्या भाग्यें लाधलें जहाज। येथें आतां काज लवलाहो ॥ २ ॥ अलभ्य तें आलें दारावरी फुका । येथें आतां चुका न पाहिजे ॥ ३ ॥ तुका म्हणे जिव्हा श्रवणाच्या द्वारें। माप भरा बरें सिगेवरी ॥ ४ ॥ [९२३]

पापपुण्य सुखदुःखाचीं मंडळें। एक एका बळें धांव घेती ॥ १ ॥ कवतुक डोळां पाहिलें सकळ। नाचवितो काळ जीवासी तो ॥ २ ॥ स्वर्गीचिया भोगें सरतां नरक। मागें पुढें एक एक दोन्ही ॥ ३ ॥ तुका म्हणे भय उपजलें मना। घेईं नारायणा कडिये मज ॥ ४ ॥ [९२४]

वचना फिरती अधम जन। नारायण तो नव्हे ॥ १ ॥ केला असतां अंगीकार। न मनी भार समर्थ ॥ २ ॥ संसाराचा नाहीं पांग। देव सांग सकळ ॥ ३ ॥ तुका म्हणे कीर्ती वाणूं। मध्यें नाणूं संकल्प ॥ ४ ॥ [९२५]

कथा करोनियां मोल ज्यापें घेती। तेही दोघे जाती नरकामध्यें ॥ १ ॥ ब्रह्म पूर्ण करा ब्रह्म पूर्ण करा। अखंड स्मरा रामराम ॥ २ ॥ मधुरवाणीच्या नका पडूं भरी। जाल यमपुरी भोगावया ॥ ३ ॥ तुका म्हणे करीं ब्रह्मांड ठेंगणें। हात पसरी जिणें धिग त्याचें ॥ ४ ॥ [९२६]

गोड नांवें क्षीर। परी साकरेचा धीर ॥ १ ॥ तैसें जाणा ब्रह्मज्ञान। बापुडें तें भक्तीविण ॥ २ ॥ रुची नेदी अन्न। ज्यांत नसतां लवण ॥ ३ ॥ अंधळ्याचे श्रम। शिकविल्याचेंचि नाम ॥ ४ ॥ तुका म्हणे तारा। नांव तंबुऱ्याच्या सारा ॥ ५ ॥ [९२७]

नम्र जाला भूतां। तेणें कोंडिलें अनंता ॥ १ ॥ हेंचि शूरत्वाचें अंग। हारी आणिला श्रीरंग ॥ २ ॥

देवानें कृपेनें बोलणें हाच प्रसाद होय. (लोक हो, तुम्हीं आतां देवाला कृपेची याचना करून देवाचा प्रसाद मिळवा). ह्या आनंदानें आनंदच वृद्धिंगत करावा १. बहुत जनांच्या भाग्यानें हें परमार्थाचें (विठ्ठलरूप) जहाज येथें लागलें आहे. आतां त्वरेनें आपलें कार्य करून घ्यावें २. जें मिळण्यास दुर्लभ तें फुकट दारावर आलें आहे. आतां ह्या ठिकाणीं असेवनाची (त्यांचा लाभ न घेण्याची) चूक करूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, परमार्थरूपी माल जिव्हा, श्रवण ह्यांच्या द्वारानें (विठ्ठलाच्या नामाचा आणि गुणाचा माल) हृदयरूपी माप शिगेला लागेपर्यंत भरा ४. [९२३]

पापपुण्य, सुखदुःखादि द्वंद्वांचे फेरे एकाच्या बलानें एक धांव घेतात १. अशा प्रकारचें हें सर्व कौतुक डोळ्यांनीं पाहिलें. ह्या सर्व जीवांस काळ नाचवीत आहे २. स्वर्गामध्यें दिव्य भोग भोगून पुण्यक्षय झाला कीं नरकप्राप्तिरूप पापभोग होतो. असे एकामागून एक दोघे धांव घेतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा सर्व प्रकार पाहून माझ्या मनास भय उत्पन्न झालें आहे. हे नारायणा, तुम्हीं मला कडेवर घ्या. [९२४]

एखाद्यास दिलेलें वचन बदलणारे जन अधम होत. तशा प्रकारचा नारायण नाहीं १. नारायणानें माझा अंगीकार केला आहे, तो समर्थ त्याविषयीं माझें ओझें मानीत नाहीं २. संसाराचें उपाधित्व आतां आम्हांस राहिलें नाहीं. देवाच्या योगानें सर्व कांहीं पूर्ण झालें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आम्हीं त्याचीच कीर्ति वर्णन करूं. त्यामध्यें दुसरा कोणताहि संकल्प येऊं देणार नाहीं ४. [९२५]

हरीची कथा करून जे लोक पैसे घेतात व जे त्यांना देतात त्या दोघांनाहि नरकवास प्राप्त होतो १. निरंतर रामनामाचें स्मरण करून पूर्णब्रह्माचा अनुभव घ्या २. हरिनामाशिवाय इतर गोड लागणाऱ्या शब्दांच्या भरीस पडूं नका. त्यायोगानें तुम्हांस शिक्षा भोगण्यास यमलोकास जावें लागेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व जगताला यःकश्चित् समज. (असें न करितां) जो लोभानें जगापुढें हात पसरतो त्याचें जिणें धिग्-व्यर्थ-होय ४. [९२६]

दुधाची खीर ही गोड आहे, पण तिला साहाय्य साखरेचें आहे १. ब्रह्मज्ञान हें भक्तीखेरीज साखरविरहित दुधाप्रमाणें फिकट आहे २. ज्या अन्नामध्यें मीठ नाहीं तें अन्न रुचि देत नाहीं ३. आंधळा हा जें श्रमानें शिकवावें तें नाममात्र (नांवापुरतेंच) जाणतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, तंबोऱ्याच्या ठिकाणीं सारभूत तारा आहेत (त्याप्रमाणें ब्रह्मज्ञान्याला मधुर भक्तीची जोड असणें, हें भूषण आहे) ५. [९२७]

जो सर्व भूतमात्रांच्या ठिकाणीं भगवद्बुद्धीनें नम्र झाला आहे, त्यानें आपल्या हृदयांत परमात्म्यास कोंडिलें १.

अवघा झाला पण । लवण सकळां कारण ॥ ३ ॥ तुका म्हणे पाणी । पातळपणें तळा आणी ॥ ४ ॥ [९२८]

आपुल्या महिमानें। धातु परिसें केलें सोनें ॥ १ ॥ तैसें न मनीं माझें आतां। गुणदोष पंढरीनाथा ॥ २ ॥ गांवामागील वोहोळ । गंगा न मनीं अमंगळ ॥ ३ ॥ तुका म्हणे माती। केली कस्तुरीनें सरती ॥ ४ ॥ [९२९]

तक्र शिप्या मान । दुग्ध म्हणे नारायण ॥ १ ॥ ऐशीं ज्ञानाची डोंबडें । आशा विटंबिली मूढें ॥ २ ॥ उपदेश तो जगा। आपण सोंवळा इतका मांगा ॥ ३ ॥ रसना शिश्नाचे अंकित। तुका म्हणे वरदळ स्फीत ॥ ४ ॥ [९३०]

ब्रह्मचारी धर्म घोकावीं अक्षरें । आश्रमीं विचार पटकर्मे (र्मी) ॥ १ ॥ वानप्रस्थ तरी संयोगीं वियोग। संन्यास तो त्याग संकल्पाचा ॥ २ ॥ परमहंस तरी जाणे सहज वर्म। तेथें याति धर्म कूळ नाहीं ॥ ३ ॥ बोले वर्म जो चाले या विरहित। तो जाणा पतित श्रुति बोले ॥ ४ ॥ तुका म्हणे कांहीं नाहीं नेमाविण। मोकळा तो सीण दुःख पावे ॥ ५ ॥ [९३१]

आम्ही क्षेत्रींचे संन्यासी। देहभरित हृषीकेशी। नाहीं केली ऐशी। आशाकामबाहेरी ॥ १ ॥ आलें अयाचित अंगा। सहज तें आम्हां भागा। दाता पांडुरंगा। ऐसा करितां निश्चिती ॥ २ ॥ दंड धरिला दंडायमान। मुळीं मुंडिलें मुंडण। बंदीं बंदाची कौपीन। बहिरवास औटडें ॥ ३ ॥

अशा प्रकारें श्रीरंगास जिंकणें हेंच खरें शूरत्व आहे. २. सगळ्यांच्या ठिकाणीं नम्र असणें हेंच पूर्णत्वाला कारण आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, पाणी हें जसें पातळ असल्याकारणानें खोल तळापर्यंत जातें, तसें (तो नम्रपणामुळे पूर्णत्वास पोंचतो त्याप्रमाणें आपल्यांतील भूतमात्राविषयींच्या नम्रभावानें दुर्लभ असलेल्या हरीची प्राप्ति करून घ्यावी) ४. [९२८]

आपल्या सामर्थ्यानें लोखंडादि धातूंस परिसानें सोनें केलें १. त्याप्रमाणें हे पंढरीनाथा, माझे गुणदोष मानूं नकोस २. गांवाच्या पाठीमागें असणारा ओढा अतिशय गलिच्छ असतो, पण त्याच्या अमंगळपणाकडे न पाहातां गंगा त्याचा स्वीकार करते ३. तुकाराम महाराज म्हणतात, कस्तुरीच्या संगतीनें मातीला कस्तुरीचा सुगंधपणा येतो (पंढरीनाथा, तूं आपल्या प्रभावानें हीन दीन असलेल्या मला कृतार्थ कर) ४. [९२९]

जे गुरु ताकाचा मान शिष्यांस देतात, आणि दूध वाढावयास आणिलें तर नारायण असें म्हणून तें मला घाला, अशी सुचना करितात १. अशा प्रकारचे जे ज्ञानी आहेत ते केवळ महाराप्रमाणें होत. ज्या मूढांनीं विषयाच्या आशेनें आपली विटंबना करून घेतली आहे २. आपण स्वतः मांगाइतका सोंवळा असून जगतास परमार्थाचा उपदेश करीत आहे. (मांग जसा गांवापासून दूर राहातो, त्याप्रमाणें त्या उपदेशापासून तो दूर राहातो). ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे केवळ रसना-शिश्नाचे अंकित झाले आहेत असल्या गुरूंचें हें कृत्य बाह्यात्कारी असून केवळ कीर्तीकरितां आहे ४. [९३०]

ब्रह्मचर्याश्रमामध्यें वेदादिकांचें पठण करावें. गृहस्थाश्रमामध्यें यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान आणि प्रतिग्रह ही षट्कर्मे करावीं १. वानप्रस्थ आश्रमांत स्त्रीमध्यें व आपल्यामध्यें दंड ठेवून एका शय्येवर संयोगांत वियोगस्थितीनें राहावें व संन्यास आश्रमामध्यें सर्व संकल्पांचा त्याग करावा २. परमहंसस्थितीमध्यें जातिकुलधर्माचा संबंध टाकून सहज-स्थितीनें असावें ३. अशा प्रकारचा विचार सांगून जो ह्या वर्णाश्रमाविरहित वागतो, तो पतित आहे असें श्रुति सांगते हें समजा ४. तुकाराम महाराज म्हणतात, विधिनियमावांचून कांहीं लाभ होणार नाहीं. अनियमितपणानें वागतो त्यास दुःख व कष्ट होतात ('वेदविहित तुम्हीं आइका हो कर्मे०' ह्या ९२० व्या अभंगांतील कल्पना ह्या अभंगांत पूर्ण केली आहे.) ५. [९३१]

आम्हीं देहक्षेत्रांतील संन्यासी आहोंत. आमचा देह श्रीहरीचे रूपबोधानें भरलेला आहे. आशा व कामना हीं अंतःकरणाबाहेर काढून टाकिलीं १. पांडुरंग हा सर्व कांहीं देणारा आहे, असा निश्चय झाल्यमुळें आमच्या वांटणीस सहजच अयाचित वृत्ती आली आहे २. आम्ही अखंडदंडायमानस्वरूपानुसंधानरूपी दंड धारण केला आहे, मूळ अज्ञानादि वृत्तींचें मुंडण केलें आहे, (शम, दम, उपरति ह्या) बंधत्रयाची कौपीन (लंगोटी) घालून देहबुद्धीचे बाहेर (ब्रह्मरूपानें) वास्तव्य केलें आहे. ३. स्वरूपाच्या ठिकाणीं मन निःश्चळ करण्याचे काळानें काळ साधला (वर्तमानकाळांत मनाला आत्मनिष्ठ करून पुढें येणाऱ्या काळांत देखील मन आत्मनिष्ठच राहील असें साध्य साधलें आहे). लोकांचा विटाळ धरून

काळें साधियेला काळ। मन करूनि निश्चळ। लौकिकीं विटाळ। धरूनि असों एकांत ॥ ४ ॥ कार्यकारणीचा चाली। वाचा वाचत्वें नेमिली। एका नेमें केली। स्वरूपींच ओळखी ॥ ५ ॥ नव्हे वेषधारी। तुका म्हणे आहाच वरवरी। आहे तैसीं बरीं। खंडें निवडी वेदांचीं ॥ ६ ॥ [९३२]

निर्वाहापुरतें अन्नआच्छादन। आश्रमासी स्थान कोंपी गुहा ॥ १ ॥ कोठेंही चित्तासी नसावें बंधन। हृदयीं नारायण सांठवावा ॥ २ ॥ नये बोलों फार बैसों जनामधीं। सावधान बुद्धी इंद्रियें दमन (इंद्रिय दमीं) ॥ ३ ॥ तुका म्हणे घडी घडीनें साधावी। त्रिगुणांची गोवी उगवूनि ॥ ४ ॥ [९३३]

जैसीं तैसीं तरी। तुझीं शरणागतें हरी ॥ १ ॥ आतां न पाहिजे केलें। ब्रीद लटिकें आपुलें ॥ २ ॥ शुद्ध नाहीं चित्त। परी म्हणवितों भक्त ॥ ३ ॥ मज कोण पुसे रंका। नाम सांगे तुझें तुका ॥ ४ ॥ [९३४]

नाश(शि)वंत देह नासेल हा जाणा। कां रे उच्चाराना वाचे नाम ॥ १ ॥ नामेंचि तारिलें कोट्यान हे कोटी। नामें हे वैकुंठीं बैसविले ॥ २ ॥ नामापरतें सार नाहीं त्रिभुवनीं। ते कां तुम्हीं मनीं आठवाना ॥ ३ ॥ तुका म्हणे नाम वेदांसी आगळें। तें दिलें गोपाळें फुकासाठीं ॥ ४ ॥ [९३५]

आळवितीं (तां) बाळें। मातें तें सुख आगळें ॥ १ ॥ द्यावें आवडी भातुकें। पाहे निवे कवतुकें ॥ २ ॥ लेववूनि अळंकार। दृष्टी करावी सादर ॥ ३ ॥ आपुलिये पदीं। बैसवूनि कोडें वंदी ॥ ४ ॥ नेदी लागों दिठी। उचलोनि लावी कंठीं ॥ ५ ॥ तुका म्हणे लाभा। वारि (वरी) घ्या हो (घ्यावी) पद्मनामा ॥ ६ ॥ [९३६]

तप तीर्थ दान व्रत आचरण। गातां हरिगुण वारूं नये ॥ १ ॥ कोटि कुळें त्यांची वाटुली

एका भावाचे एकांतांतच वास्तव्य केलें आहे ४. वाणी ही वाच्य श्रीहरीच्या स्वरूपीं नेमिली, आतां कार्यकारणापुरतीच तिची चाली (व्यवहार) आहे. आणि एकनेमाच्या निश्चयानें भगवत्स्वरूपास जाणलें आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, मीं वर वर वेषधाऱ्याप्रमाणें पोकळ संन्यासी नाहीं. वेदविभाग जसे आहेत, त्यांतील चांगले विभाग तेच मीं निवडून घेतों ६. [९३२]

आपल्या शरीराचा निर्वाह होण्यापुरतें अन्नवस्त्र मिळवून गुहेंत अगर खोपटींत राहावें १. कोणत्याहि विषयासंबंधानें चित्तास मोहबंधन न ठेवितां अंतःकरणांत नारायण सांठवावा २. लोकांशीं फार बोलूं नये व त्यांच्याशीं फार संघटण ठेवूं नये. आपली बुद्धि स्वाधीन ठेऊन इंद्रियदमन करावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, रज-तमादि गुणांचा निरास करून नामस्मरण करून घडीनें घडी साधावी (वर्तमानकाळाप्रमाणें भविष्यकाळांतहि अखंड चिंतन करावें) ४. [९३३]

अहो श्रीहरि, आम्ही जसे आहोंत तसे तुमचे शरणागत म्हणवितों १. आतां तुम्हीं आपलें पतितास पावन करण्याचें ब्रीद अन्यथा करूं नये २. जरी माझें चित्त शुद्ध नाहीं, तरी मी तुमचा भक्त आहें असें म्हणवितों ३. तुकाराम महाराज म्हणतात, मज गरिबास तुझे नांवावांचून कोण विचारतो? म्हणून मीं तुझें नांव सांगतों ४. [९३४]

अहो जन हो, हा देह नाशवंत असल्याकारणानें नष्ट होणार असें समजून तुम्हीं श्रीहरीचे नामाचा वाणीनें कां उच्चार करीत नाहीं? १. आजपर्यंत नामस्मरणानें कोट्यावधि जीव तरून गेले व कित्येकांस वैकुंठलाभ झाला आहे २. ह्यावरून त्रैलोक्यांत नामासारखें दुसरें सारभूत साधन नाहीं. त्याचा आठव तुम्हीं आपल्या मनांत कां करीत नाहीं? ३. तुकाराम महाराज म्हणतात, नाम हें वेदांहूनही श्रेष्ठ आहे. तें तुम्हांस अनायासें श्रीहरीनें फुकट दिलें आहे ४. [९३५]

मुलें हीं आईजवळ काकुळती येऊं लागलीं म्हणजे त्याचें सुख तिला फार होतें १. ती प्रीतीनें मुलांस खाऊ देऊन त्यांचें कौतुक पाहून समाधान पावते २. त्यांस दागिने वगैरे घालून तत्पर दृष्टीनें पाहाते ३. आपल्या जागीं त्या मुलास बसवून कौतुकानें वंदन करते. (बस रे माझ्या बाबा, तुझ्या पाया पडतें असें म्हणते.) ४. त्यांस कोणत्याहि प्रकारची दृष्ट न लागूं देतां उचलून कडेवर घेते ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे पद्मनाभा, वर सांगितलेला सुखलाभ जसा ती माता घेते तसें तुम्हीं माझें कौतुक करून घ्या ६. [९३६]

तप, तीर्थ, दान, व्रत आचरणारे व हरिगुण गाणारे ह्यांस त्या त्या साधनांपासून भ्रष्ट करूं नये १. कारण हीं साधनें करणारांचे कोट्यावधि पूर्वज, आपल्या कुळामध्यें कोणी परमार्थी उपजून त्यानें आपला उद्धार करावा म्हणून, वाट पाहात बसले आहेत. अर्थात् ह्या परमार्थापासून त्यास भ्रष्ट केल्यानें त्याचे कोट्यावधि पूर्वजांस अधोगतीस आणल्या-

पाहाती । त्या तया घडती ब्रह्महत्या ॥ २ ॥ आपुलिया पापें न सुटे सायासें । कोणा काळें ऐसें निस्तरेल ॥ ३ ॥ व्हावें साह्य तया न घालावें भय । फुकासाठीं पाहे लाभ घात ॥ ४ ॥ तुका म्हणे हित माना या वचना । सुख दुःख जाणा साधे फुका ॥ ५ ॥ [९३७]

देवासाठीं जाणा तयासीच आटी । असेल ज्या गांठीं पुण्यराशी ॥ १ ॥ निर्बळा पाठवी बळें वाराणशी । मेला आला त्यासी अर्ध पुण्य ॥ २ ॥ कथे निद्राभंग करावा भोजनीं । तया सुखा धणी पार नाहीं ॥ ३ ॥ यागीं ऋण घ्यावें द्यावें सुख लाहीं । बुडतां चिंता नाहीं उभयतां ॥ ४ ॥ तुका म्हणे वर्म जाणोनि करावें । एक न घालावें एकावरी ॥ ५ ॥ [९३८]

अग्नीमाजी पडे धातु । लीन होउनि राहे आंतु । होय शुद्ध न पावे धातु । पटतंतुप्रमाणें ॥ १ ॥ बाह्यरंगाचें कारण । मिथ्या अवघेंचि भूषण । गर्व ताठा हें अज्ञान । मरण सवें वाहातसे ॥ २ ॥ पुरें मातलिया नदी । लव्हाळा नांदे जीवनसंधी । वृक्ष उन्मळोनि भेदी । पार तो कधीं भंगेना ॥ ३ ॥ हस्ती परदळा जो भंगी । तया पायीं न मरे मुंगी । कोण जाय संगीं । पाणोवाणी तयाच्या ॥ ४ ॥ पिटितां घणें वरि सैरा । तया पोटीं राहे हिरा । तैशा काय तगती गारा । तया थोरा होऊनि ॥ ५ ॥ लीन दीन हेंचि सार । भव उतरावया पार । बुडे माथां भार । तुका म्हणे वाहोनि ॥ ६ ॥ [९३९]

आम्ही वीर झुंझार । करूं जमदाढे मार । थापटिले भार । मोड जाला दोषांचा ॥ १ ॥ जाला हाहाकार । आले अंकित जुंझार । शंखचक्रांचे शृंगार । कंठीं हार तुळसीचे ॥ २ ॥ रामनामांकित बाण । गोपी लाविला चंदन । झळकती निशाण । गरुडटके पताका ॥ ३ ॥

बद्दल तितक्या ब्रह्महत्यांच्या पातकास तो (भ्रष्ट करणारा) धनी होईल २. आपण केलेल्या पातकांतून मोठ्या कष्टानें सुटका होत नाहीं, तर मग हें वर निर्दिष्ट केलेलें पातक कशानें व कोणत्या काळीं नाहींसें होईल ? ३. म्हणून अशा प्रकारच्या परमार्थी लोकांस साहाय्य करावें, भय घालूं नये. साहाय्य करण्यांत अनायासें लाभ व भय घालण्यांत व्यर्थ हानि होते. ४. तुकाराम महाराज म्हणतात, मीं हें जें कांहीं सांगितलें, तें हिताचें आहे असें माना. त्यांतच सुख आहे. वर सांगितलेल्या प्रकाराप्रमाणें वागण्यांत दुःख आहे असें समजा ५. [९३७]

ज्याच्या जवळ पुण्याच्या राशी आहेत, तोच देवप्राप्तीविषयीं खटाटोप करतो १. सामर्थ्यहीनास जो कोणी स्वसामर्थ्यानें काशीयात्रेत पाठवितो, त्यास त्या यात्रेचें अर्धें पुण्य तो यात्रेकरू तिकडे मेला तरी मिळतें. मग तो परत आल्यास तें मिळेल ह्यांत नवल काय ? २. कोणीं जेवणाचे अगर कथेचे वेळेस झोंप घेत असला तर त्याचा निद्राभंग करावा. त्या योगानें अपार सुख मिळेल ३. यज्ञयाग करणाराला कर्जाऊ पैसे देणाऱ्यानें सुखानें द्यावे व घेणाऱ्यानें सुखानें घ्यावे. त्यांत जरी बूड आली (ते पैसे जरी बुडाले) तरी त्याची उभयतांस दोषप्राप्तीची चिंता नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, हें जें (पाप-पुण्याचें) वर्म मीं वर सांगितलें आहे, तें बरोबर समजून त्याप्रमाणें करावें. एकाचे मोबदला दुसरें करूं नये (पुण्याचे नियम पापावर व पापाचे नियम पुण्यावर लादूं नयेत). [९३८]

अग्नीमध्यें पडलेली धातु (अत्यंत मूल्यवान सोनें) जळत नाहीं, तर तशी लीनपणानें त्यांतच राहून शुद्ध होत जाते. (परंतु वस्त्र किंवा त्यांचा तंतु अग्नींत पडला तर त्यांचा नाश होतो, तीं जळून जातात, तसें सोनें अग्नींत जळत नाहीं) १. बहिरंगपणाचें सर्व खोटें भूषण असतें. गर्व, ताठा हें अज्ञान आहे. तें जीव गेला तरी त्याच्या बरोबर राहातें २. नदीस पूर आल्यानें पुष्कळ पाणी येतें त्यामध्यें लोहाळे (लव्हाळे) बचाव धरून राहातात आणि वृक्ष हे उन्मळून पडतात, तसे लोहाळे भंगत नाहींत ३. हत्ती शत्रूच्या समुदायाचा विध्वंस करितो, पण त्याच्या पायाखालीं मुंगी मरत नाहीं. अशा हत्तीच्या पाठोपाठ (त्याच्याशीं झुंज खेळण्याकरितां) कोणीं जावें ? ४. हवें तसें घणानें ठोकलें तरी न फुटतां त्या घणाच्याच पोटांत हिरा शिरून राहातो, त्याप्रमाणें घणाच्या माऱ्याखालीं गारा ह्या मोठ्या आहेत, तरी टिकतील काय ? ५. तुकाराम महाराज म्हणतात, दीनपणानें नम्र होणें हेंच भवसमुद्रांतून पार होण्याचें सारभूत साधन आहे. थोरपणाचा भार जो मस्तकावर घेईल तो भवसमुद्रांत बुडून जाईल ६. [९३९]

आम्ही वीर लढवय्ये (योद्धे) आहोंत, म्हणून यमावर मारा करून त्याचे दांत पाडूं त्याचप्रमाणें अनेक दोषांच्या समुदायावर मारा केल्यामुळें त्यांचा मोड झाला १. त्या योगानें हाहाकार झाला व आधीन असणारे सर्व योद्धे एका ठिकाणीं जमले. ज्यांनीं शंखचक्रादि मुद्रा, गळ्यामध्यें तुळशीहार इत्यादिक शृंगार केले आहेत २. व ज्यांचे हातीं

तुका म्हणे काळ । झालों जिंकोनि निश्चळ । पावला सकळ । भोग आम्हां आमचा ॥ ४ ॥ [९४०]

आशाबद्ध तो जगाचा दास । पूज्य तो उदास सर्वजना ॥ १ ॥ आहे तें आधीन आपुले हातीं । आणीकां ठेविती काय बोल ॥ २ ॥ जाणतिया पाठीं लागेल उपाध । नेणता तो सिद्ध भोजनासी ॥ ३ ॥ तुका म्हणे भय बांधलेंसे गांठीं । चोर लागे पाठीं दुम तया ॥ ४ ॥ [९४१]

आणिकांसी तारी ऐसा नाहीं कोणी । घडे तें नासोनि भलता टाकी ॥ १ ॥ सोनें शुद्ध होतें अविट तें घरीं । नासिलें सोनारीं अळंकारीं ॥ २ ॥ ओल शुद्ध काळीं काळें जिरें बीज । कैंचें लागे निज हातीं तेथें ॥ ३ ॥ एक गहुं करिती अनेक प्रकार । सांजा दिवसीं क्षीर घुघरिया ॥ ४ ॥ तुका म्हणे विषा रुचि एका हातीं । पाधानी नासिती नवनीत ॥ ५ ॥ [९४२]

वाटे या जनाचें थोर बा आश्चर्य । न करिती विचार कां हिताचा ॥ १ ॥ कोण दम ऐसा आहे यांचे पोटीं । येईल शेवटीं कोण कामा ॥ २ ॥ काय मानुनियां राहिले निश्चिंती । काय जाब देती यमदूतां ॥ ३ ॥ कां हे (हीं) विसरली मरण बापुडीं । काय यांसी गोडी लागलीसे ॥ ४ ॥ काय हातीं नाहीं करील तयासी । काय झालें यांसी काय जाणे ॥ ५ ॥ कां हे (हीं) नाठविती देवकीनंदना । सुटाया बंधनापासूनियां ॥ ६ ॥ काय मोल यासी लाभे धन वित्त । कां हें यांचें चित्त घेत नाहीं ॥ ७ ॥ तुका म्हणे कां हे (हीं) भोगतील खाणी । कां त्या चक्रपाणी विसरलीं ॥ ८ ॥ [९४३]

रामनामांकित बाण आहेत, व ज्यांनीं गोपीचंदनाचे द्वादश टिळे लाविले आहेत व ज्यांचे हातांत गरुडचिन्हांकित पताका इत्यादि चमकत आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा तऱ्हेनें आम्हीं काळाला जिंकून शांत झालों व (भक्तिज्ञानाचा पूर्ण आनंद) आमचें ऐश्वर्य आम्हांला प्राप्त झालें ४. [९४०]

जो कोणीं आशेनें बांधला आहे, तो सर्व जगाचा दास समजावा आणि नैराश्य असेल तो सर्व जनांस पूज्य आहे असें समजावें १. हे दोन्ही उपाय आपले स्वाधीन असून दुसऱ्यावर निमित्त देणें (दुसऱ्यावर दोषारोप करणें) हें उपयोगी आहे काय? २. जो कोणी जाणतेपणाच्या स्फुंदानें (ताठ्यांत) असतो, त्याचे मागें अनेक प्रकारच्या उपाधि लागतात आणि नेणतेपणाला कोणताहि त्रास नसून सिद्ध असलेला पाक भोजनास मिळतो (एखादा सुशिक्षित, श्रीमंत मनुष्य पूर्वी आमंत्रण दिलें नसतां ऐन वेळीं 'जेवायला बसा' असें म्हटलें तर बसणार नाहीं, त्याच्या मागें अभिमानाची उपाधि असते. नेणत्या मनुष्याचें तसें नसतें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचे मागें धरण्याकरितां कामक्रोधादिक चोर लागले आहेत, त्याचे पदरीं मोठें भय बांधलेलेंच असतें ४. [९४१]

अनेक लोकांचा उद्धार करणारा कोणी मिळत नाहीं. चांगलें असलेलें बिघडवून टाकणारे पुष्कळ असतात जसें आपले घरीं शुद्ध असलेलें सोनें सोनाराकडे नेल्यावर त्याचा ते डाकलगी (डाक लावून हिणकस) अलंकार करितात. त्या योगानें त्या सोन्याचा नाश होतो (तसें चांगले लोकांस बिघडविणारे पुष्कळ) २. ज्या जमिनीमध्यें चांगली ओल झाली आहे ते वेळीं काळें जिरें पेरलें तर त्या पेरणाराचे हाताला उत्तम लाभ देणारें पीक लागेल काय? ३. जी स्त्री सुगरण असेल ती एका गव्हाचे सांजा, दिवे, खीर, घुगऱ्या आदिकरून पुष्कळ प्रकार करिते ४. तुकाराम महाराज म्हणतात, जी चतुर असेल तिच्या हातानें विषवत् कडू असलेले पदार्थ गोड होतात आणि घामट मूर्ख स्वयंपाकिणीचे हातून अमृतवत् पदार्थांचा देखील नाश होतो ५. [९४२]

ह्या संसारी जनांचें मला मोठें आश्चर्य वाटतें, कारण हे तरणोपाय होण्याविषयीं आपल्या हिताचा विचार कां करीत नाहींत? १. ह्यांचे अंतःकरणांत कोणाचा भरंवसा आहे आणि शेवटीं ह्यांच्या उपयोगास कोण येणार आहे? २. हे लोक कोणत्या निश्चयानें निष्काळजी राहिले आहेत? अंतकाळीं यमदूतांपुढें हे काय जबाब देतील? ३. जीं विषयाच्या आसक्तीनें दीन झालेलीं आहेत, तीं पुढें येणाऱ्या मृत्यूस कां विसरलीं? व विषयांची गोडी ह्यांना कशी लागली? ४. कोणती एक गोष्ट करावयाची ह्यांचे हातीं नाहीं! अशा तऱ्हेची स्वतंत्रता असून हे स्वहिताचा विचार कां करीत नाहींत? ह्यांना काय झालें आहे हें कळत नाहीं ५. संसारबंधनांतून सुटण्याकरितां देवकीनंदन श्रीकृष्णाचें कां चिंतन करीत नाहींत? ६. तें चिंतन करण्याविषयीं कांहीं द्रव्यादि किंमत पडत नाहीं असें असून ह्यांचे चित्तास तें चिंतन कां करवत नाहीं? ७. तुकाराम महाराज म्हणतात, अशा योगानें अनेक योनींतून ते दुःख भोगतील. तर मग त्या चक्रपाणीला हीं बापुडीं कां विसरलीं ८. [९४३]

काय एकां झालें तें कां नाहीं ठावें। काय हें सांगावें काय म्हूण ॥ १ ॥ देखतील डोळां ऐकतील कानीं। बोलिलें पुराणीं तेंही ठावें ॥ २ ॥ काय हें शरीर साच कीं जाणार। सकळ विचार जाणती हा ॥ ३ ॥ कां हें कळों नये आपुलें आपणां। बाल्यत्व तारुण्य वृद्धदशा ॥ ४ ॥ कां हें आवडलें प्रियापुत्रधन। काय कामा कोण कोणा आलें ॥ ५ ॥ कां हें जन्म वायां घातलें उत्तम। कां हे रामराम न म्हणती ॥ ६ ॥ काय भुली यांसी पडली जाणतां। देखती मरतां आणिकांसी ॥ ७ ॥ काय करिती हे बांधलिया काळें। तुका म्हणे बळें वज्रपाशीं ॥ ८ ॥ [९४४]

जुंझार ते एक विष्णुदास जगीं। पापपुण्य अंगीं नातळे त्यां ॥ १ ॥ गोविंद आसनीं गोविंद शयनीं। गोविंद त्यां मनीं बैसलासे ॥ २ ॥ ऊर्ध्व पुंड्र भाळीं कंठीं शोभे माळ। कांपिजे कळिकाळ तया भेणें ॥ ३ ॥ तुका म्हणे शंखचक्रांचे श्रृंगार। नामामृतसार मुखामाजीं ॥ ४ ॥ [९४५]

जेणें नाहीं केलें आपुलें स्वहित। पुढिलांचा घात इच्छीतसे ॥ १ ॥ संचितासी जाय मिळोनियां खोडी। पतनाची जोडीवरी हांव ॥ २ ॥ बांधलें गांठीं तें लागतें भोगावें। ऐसियासी देवें काय कीजे ॥ ३ ॥ तुका म्हणे जया गांवा जाणे जया। पुसोनियां तया वाट चाले ॥ ४ ॥ [९४६]

मानी भक्तांचे उपकार। ऋणीया म्हणवी निरंतर। केला निर्गुणीं आकार। कीर्तीमुखें वर्णितां ॥ १ ॥ म्हणोनि जया जे वासना। ते पुरवितो पंढरीराणा। झाला भक्तांचा आंदणा। ते उपकार फेडावया ॥ २ ॥ अंबऋपीकारणें। जन्म घेतले नारायणें। एवढें भक्तीचें लाहाणें।

संसाराच्या संगतीनें कित्येकांची गति (दुर्दशा) काय झाली, ह्याचा आठव त्यांना कसा नाहीं ? ह्यांना काय काय म्हणून सांगावें ? १. प्रपंचसंगतीनें जीवांची कशी स्थिति होते, हें डोळ्यानें पाहातात, कानानें ऐकतात, आणि पुराणांतहि सांगितलेलें ठाऊक आहे २. हें शरीर खरें आहे किंवा मरणारें आहे ह्याविषयींचा विचार ते पूर्ण जाणतात ३. आपल्या देहाच्या मागें बालत्व, तारुण्य व वृद्धावस्था ह्या लागलेल्या आहेत, हें त्यांचें त्यांना कसें कळत नाहीं ? ४. बायको, मुलें, पैसा ह्यांविषयींची प्रीति ह्यांच्यामध्यें कां आहे ? हीं अखेरीस कोणाच्या उपयोगी पडलीं आहेत काय ? ५. उत्तम नरजन्म हे व्यर्थ कां घालवीत आहेत ? रामनामाचें चिंतन कां करीत नाहींत ? ६. कितीएक मरत आहेत हें पाहून तसें आपल्याला मरावें लागेल असें जाणत असतां हे कां भुलले ? ७. तुकाराम महाराज म्हणतात, काळानें स्वबलानें वज्रपाशांनीं ह्यांना बांधल्यावर हे काय करतील ? (सारांश, मृत्यूची व भोगांच्या नाशिवंतपणाची जाणीव ठेवून हरिभजन करणें हितकारक आहे.) ८. [९४४]

जगतामध्यें एक विष्णुदासच प्रपंचाशीं युद्ध करणारे योद्धे आहेत. त्यांना पापपुण्याची बाधा होत नाहीं १. आसनावर बसले असतांना जे गोविंदचिंतन करितात व अंथरुणावर निजले असतांनाहि जे गोविंदचिंतन करितात, अशा प्रकारें सर्व वेळ गोविंदाचें चिंतन असल्यामुळें त्यांच्या मनांत गोविंदाची वसति झाली आहे. २. ज्यांनीं कपाळाला उभा त्रिपुंड्र लाविला आहे व ज्यांच्या गळ्यामध्यें तुळशीची माळ शोभत आहे, तें पाहून कळिकाळसुद्धां भयभीत होऊन थरथरां कांपत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, शंखचक्र ह्या मुद्रांचे शृंगार ज्यानीं केले आहेत व ज्यांच्या मुखांत हरीचें नामामृत हें सार आहे (ते विष्णुदास प्रपंचाशीं युद्ध करण्यास समर्थ आहेत) ४. [९४५]

जो आपलें स्वहित न करितां दुसऱ्याच्या घाताची इच्छा करतो १. त्याच्या ठिकाणीं ही असली वाईट खोड प्रारब्धानुसार असून त्यापासून होणारें क्रियमाण संचितांत मिळतें, आणि ज्या साधनांपासून अधोगति मिळते त्यांविषयीं त्यांची हांव असते २. जसें प्रारब्धाचे गांठोडींत असतें (जें संचित पदरीं बांधलें असतें) तसें त्याला भोगावें लागतें. त्याला देवांनीं काय करावें ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याला ज्या गांवास जावयाचें असेल त्यानें त्या गांवाच्या वाटेचा शोध करून चालावें (त्याप्रमाणें हिताच्या गांवाला जावयाचें असेल तर हिताचा कोणता मार्ग आहे, तो वेदांना व संतांना विचारूनच अनुसरावा) ४. [९४६]

देव आपल्या भक्तांचे उपकार मानतो आणि त्यांचा ऋणी म्हणवितो, कारण त्यांनीं (भक्तांनीं) आपल्या मुखांनीं हरीची कीर्ति वर्णन करून हरीला निर्गुणस्वरूपांतून सगुणस्थितीला आणलें १. ह्याकरितां ज्या भक्ताची जशी वासना असेल तशी पंढरीराय पुरवितो आणि त्याचे उपकार फेडण्याकरितां तो त्यांच्या स्वाधीन झाला आहे २. अंबऋषीकरितां

दास्य करी दासाचें ॥ ३ ॥ म्हणिये करितां शंका न धरी । रक्षपाळ बळिच्या द्वारीं । भक्तीचा आभारी । रीग न पुरे जावया ॥ ४ ॥ अर्जुनाचे रथवारू । ते वागवी सर्वेश्वरू । एवढे भक्तीचे उपकारु । मागें मागें हिंडतसे ॥ ५ ॥ पुंडलिकाचे द्वारीं । सम पाउलीं (लें) विटेवरी । न वजे कट करीं । धरूनि तेथें राहिला ॥ ६ ॥ भावभक्तीचा अंकित । नाम साजे दिनानाथ । म्हणोनि राहिला निवांत । तुका चरण धरोनि ॥ ७ ॥ [९४७]

सांगों जाणती शकून । भूत भविष्य वर्तमान ॥ १ ॥ त्यांचा आम्हांसी कंटाळा । पाहों नावडती डोळां ॥ २ ॥ रिद्धिसिद्धींचे साधक । वाचासिद्ध होती एक ॥ ३ ॥ तुका म्हणे जाती । पुण्यक्षयें अधोगती ॥ ४ ॥ [९४८]

ठाकलोंसें द्वारीं । उभा याचक भिकारी ॥ १ ॥ मज भीक कांहीं देवा । प्रेम बाहेरी (प्रेम भातुकें) पाठवा ॥ २ ॥ याचकाचा भार घेऊं नये येरझार ॥ ३ ॥ तुका म्हणे दान । सेवा घेतल्यावांचून ॥ ४ ॥ [९४९]

ऐसें कां झालें तें मजही न कळे । कीर्तनाचे रळेपळे जगीं ॥ १ ॥ कैसें तुम्हां देवा वाटतसे बरें । संतांचीं उत्तरें लाजविलीं ॥ २ ॥ भाविकां कंटक करिताती पीडा । हा तंव रोकडा अनुभव ॥ ३ ॥ तुका म्हणे नाम निर्वाणीचा बाण । याचा अभिमान नाहीं तुम्हां ॥ ४ ॥ [९५०]

तुम्ही बैसलेती निर्गुणाचे खोळे । आम्हांसी कां डोळे कान दिले ॥ १ ॥ नायकवे तुझी अपकीर्ति

नारायणांनीं दहा गर्भवास सोसिले (जन्म-अवतार-घेतले) आणि दासांचें दास्यत्व केलें. भक्तीचा स्वीकार (देवानें) केला आहे ३. भक्तांचें काम करितांना देव मनामध्यें कसलीहि शंका धरीत नाहीं आणि पाताळवासी बळीचे दारांत द्वारपाळ होऊन राहिला आहे. तो भक्तांचा आभारी (ऋणी) झाला आहे व म्हणून त्याला (भक्तांचें घर सोडून) कोठेंहि बाहेर जाणें आवडत नाहीं आणि भक्तहि जाऊं देत नाहींत. ४ अर्जुनाच्या रथावर सर्वेश्वर श्रीहरि सारथी होऊन घोड्यांची चाकरी करितो आणि त्याचे उपकार मानून त्याचे मागें मागें हिंडतो ५. पुंडलिकाचे द्वारीं चरण जोडून कटावर (कंबरेवर) कर टेवून विटेवर उभा राहिला आहे, तो कोठेंहि जाण्याची इच्छा करीत नाहीं ६. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवाला दीनानाथ हें नांव शोभत आहे आणि ज्याचे जवळ भक्तिभाव असेल त्याच्या तो अंकित होतो. ह्याकरितां त्याचे चरण धरून मी निवांतपणानें राहिलों आहें ७. [९४७]

जे कोणी (ज्योतिषी भूत, वर्तमान व भविष्य ह्या तिन्ही काळांतील) मागील झालेले, सांप्रत काळाचे व पुढील होणारे शकुन सांगतात १. अशा लोकांचा आम्हांला त्रास आहे, त्यांस दृष्टीनें पाहाणें सुद्धां आवडत नाहीं. २ कांहीं लोक सिद्धि प्रसन्न करून ऐश्वर्याचा भोग घेतात व वाणीनें जें बोलावें तें खरें व्हावें (वाचासिद्ध) असेंहि कित्येक साध्य करून घेतात. (त्यांचा आम्हांला त्रास आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारच्या लोकांनीं जीं साधनें केलीं असतील त्यांचें पुण्य क्षीण होऊन ते अधोगतीला जातील ४. [९४८]

अहो देवा, तुमचे दरवाजामध्यें मी याचक होऊन भीक मागण्याकरितां उभा राहिलों आहें १. कांहीं तरी भिक्षा मला द्यावी. आपणांविषयींचे प्रेम मजकडे बाहेर पाठवा २. भीक मागण्यास आलेल्या समुदायाच्या येरझारा (हेलपाटे) दात्यांनीं घेऊं नयेत, त्यांस तत्क्षणीं दान द्यावें हें उत्तम ३. तुकाराम महाराज म्हणतात, याचकाच्या हातून कोणत्याहि प्रकाराची सेवा न घेतां त्यास धर्म केल्यास तो दाता उत्तम ४. [९४९]

अहो देवा, ह्या जगामध्यें कीर्तनाची थट्टा-मस्करी झाली आहे, त्याचें कारण मलाहि समजत नाहीं असें कां झालें असेल बरें ? १. पूर्वी संतांनीं कीर्तनाचें माहात्म्य वर्णन केलेल्या (देव कीर्तनप्रिय व भक्तप्रिय आहे ह्या) वचनास तुम्हीं लाज आणिली. देवा, हें तुम्हांला बरें कसें वाटतें ? २. भाविक लोकांना दुर्जनांनीं त्रास द्यावा हा प्रत्यक्ष अनुभव आम्हांस आला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमचें नांव निर्वाणीच्या (शेवटच्या राखीव) बाणाप्रमाणें आहे, परंतु ह्याविषयींचा अभिमान तुम्हांला नाहीं (ह्याचें आश्चर्य वाटतें. नामाचा अभिमान धरून तुम्हीं अशा कीर्तनाच्या निंदकांना व भाविकांना त्रास देणाऱ्यांना शिक्षा केली पाहिजे) ४. [९५०]

अहो देवा, तुम्ही निर्गुणाची खोळ घेऊन बसलां आहांत व आम्हांला डोळे, कान आदिकरून इंद्रियें कां दिलीं ? १.

देवा । अव्हेरिली सेवा न देखवे ॥ २ ॥ आपुले पोटीं तो राखियेला वाव। आम्हांसी कां भाव अल्प दिला ॥ ३ ॥ तुका म्हणे दुःखी ऐसें हें कळों द्या । पुढलिया (आपुलिया) धंद्या मन नेघे ॥ ४ ॥ [९५१]

सोंगें छंदें कांहीं । देव जोडे ऐसें नाहीं ॥ १ ॥ सारा अवघें गाबाळ । डोळ्या आडील पडळ ॥ २ ॥ शुद्ध भावाविण । जो जो केला तो तो सीण ॥ ३ ॥ तुका म्हणे कळे । परि होताती अंधळे ॥ ४ ॥ [९५२]

सत्यसंकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥ १ ॥ येथें अळंकार शोभती सकळ । भावबळें फळ इच्छेचें तें ॥ २ ॥ अंतरींचें बीज जाणे कळवळा । व्यापक सकळा ब्रह्मांडाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं चालत तांतडी । प्राप्तकाळ घडी आल्याविण ॥ ४ ॥ [९५३]

काय वाणूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥ थोरीव सांडिली आपुली परिसें । नेणें सिवों कैसें लोखंडासी ॥ २ ॥ जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती (पर) उपकारें ॥ ३ ॥ भूतांची दया हें भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्रवतसे ॥ ५ ॥ [९५४]

जन्मां आलों त्याचें । आजि फल जालें साचें ॥ १ ॥ तुम्हीं सांभाळिलें संतीं । भय निरसली खंती ॥ २ ॥ कृतकृत्य जालों । इच्छा केली ते पावलों ॥ ३ ॥ तुका म्हणे काळ । आतां करूं न शके बळ ॥ ४ ॥ [९५५]

अशा प्रकारची (दुष्टानें केलेली) अपकीर्ति देवा, तुमची होईल तें मला ऐकवत नाहीं व लोक तुमच्या सेवेचा धिक्कार करतील तें पाहावत नाहीं २. तुम्ही आपल्या पोटामध्यें (दुष्टांचे अपराध) सहन करण्याविषयींचा अवकाश पुष्कळ ठेविला आहे आणि आम्हांला थोडा (संकुचित) भाव कां दिला? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्ही निर्गुण होण्याचा विचार केला. त्या योगानें मी फार दुःखी आहें असें आपण समजा. आतां तुमचें पुढील जगदुद्धाराचें काम करण्याविषयीं (किंवा, नामसंकीर्तन करण्याविषयीं) माझें मन घेत नाहीं ४. [९५१]

नानाप्रकारचे वेष घेणारे ढोंगी लोक अनेक छंद करितात, पण त्या योगानें देवाची प्राप्ति होते असें कांहीं नाहीं १. अविद्यात्मक (सारा) पडळ तुमचे दृष्टीवर आलें आहे, तें काढून प्रपंचरूपी कचरा हा सर्व नाहींसा करा २. देव प्राप्त होण्याला एक शुद्धभाव पाहिजे; त्यावांचून जें कराल ते व्यर्थ श्रम आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे सर्व प्रकार कळून मुद्दाम लोक आंधळे होतात ४. [९५२]

जे कोणी देवावर भार घालून खरा संकल्प करतील तर त्यांचे सर्व इच्छित मनोरथ पूर्ण करणारा दाता नारायण आहे १. अशाच ठिकाणीं सर्व अलंकार शोभतात, आणि आपलें इच्छित फळ भावार्थाच्या बळानें मिळतें २. हा देव सर्व ब्रह्मांडास व्यापक असल्यामुळें अंतःकरणांतील आपणाविषयींच्या खऱ्या कळवळ्याचें बीज जाणत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, लाभ प्राप्त होण्याचा काळ आल्याखेरीज उतावळेपणा करणें चालत नाहीं ४. [९५३]

आतां संतांची कीर्ति मीं काय वर्णन करूं? कारण माझी वाणी अपुरती आहे (त्यांचें वर्णन करण्यास पुरेशी नाहीं), म्हणून मीं त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवितों १. लोखंड अति हीन असून त्यास मीं कसा स्पर्श करूं, असें न जाणतां व मनांत न आणतां व आपल्या थोरपणाकडे न पाहातां, परिसानें त्याचें सोनें केलें (त्याप्रमाणें संतांनीं आपल्या थोरवीकडे न पाहातां मज हीनाचा अंगीकार केला.) २. कारण संतांचे अवतार जगाच्या कल्याणाकरितां आहेत. ते आपला देह परोपकार करण्यांत कष्टवितात ३. भूतमात्रांवर दया करणें हें संतांचें भांडवल आहे, त्यांना आपल्या देहाची ममता नाहीं. ४. तुकाराम महाराज म्हणतात, ते संत लोकांच्या सुखानें सुखी होतात आणि त्यांच्या मुखांतून सत्य व मधुर उपदेशामृताचा किंवा हरीच्या नामामृताचा ओघ वाहातो ५. [९५४]

मीं मनुष्यजन्माला आलों, त्याचें खरें फळ आज प्राप्त झालें १. कारण तुम्हीं संतांनी जन्ममरणाचें भय व त्याजविषयींचा खेद नाहींसा करून माझा सांभाळ केला [म्हणून त्या योगानें मी कृतार्थ झालों] २. ज्याची इच्छा केली होती, तें मला मिळालें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आम्हांवर काळ सत्ता करूं शकणार नाहीं, आणि त्याचें बळहि चालणार नाहीं ४. [९५५]

काय पुण्यराशी । गेल्या भेदूनि आकाशीं ॥ १ ॥ तुम्ही झालेती कृपाळ । माझा केला जी सांभाळ ॥ २ ॥ काय वोळलें संचित । ऐसें नेणें अगणित ॥ ३ ॥ तुका म्हणे नेणें । काय केलें नारायणें ॥ ४ ॥ [९५६]

असें येथीचिया दीनें । भाग्यहीन सकळां ॥ १ ॥ भांडवल एवढें गांठीं । नाम कंठीं धरियलें ॥ २ ॥ आणीक तें दुजें कांहीं । मज नाहीं यावरी ॥ ३ ॥ तुका म्हणे केला कोणें । एवढा नेणें लौकिक ॥ ४ ॥ [९५७]

गाये नाचे वाहे टाळी । साधन कली(कळीं) उत्तम हें ॥ १ ॥ काय जाणों तरले किती । नांव आइती या बैसा ॥ २ ॥ सायासाचें नाहीं काम । घेतां नाम विठोबाचें ॥ ३ ॥ तुका म्हणे निर्वाणीचें । शस्त्र साचें हें एक ॥ ४ ॥ [९५८]

सर्वकाळ माझे चित्तीं । हेचि खंती राहिली ॥ १ ॥ बैसलें तें रूप डोळां । वेळोवेळां आठवे ॥ २ ॥ वेव्हाराची सरली मात । अखंडित अनुसंधान ॥ ३ ॥ तुका म्हणे वेध झाला । अंगा आला श्रीरंग ॥ ४ ॥ [९५९]

जैसें दावी तैसा राहे । तरि कां देव दुरी आहे ॥ १ ॥ दुःख पावायाचें मूळ । रहणी(राहाणी) ठाव नाहीं ताळ ॥ २ ॥ माळामुद्रांवरी । कैंचा सोंगें जोडे हरि ॥ ३ ॥ तुका म्हणे देखें । ऐसे परीचीं बहुतेकें ॥ ४ ॥ [९६०]

अवघा तो शकुन । हृदयीं देवाचें चिंतन ॥ १ ॥ येथें नसतां वियोग । लाभा उणें काय मग ॥ २ ॥ छंद हरिच्या नामाचा । शुचिर्भूत सदा वाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे हरिच्या दासा ।

माझ्या जन्मजन्मांतरींच्या पुण्यराशी आकाशाचा भेद करून गेल्या कीं काय हें कळत नाहीं १. अहो, तुम्हीं संत कृपाळू होऊन माझा सांभाळ केला २. जन्मजन्मांतरींचें अपार संचित वोळलें (माझ्याकडे वळलें) कीं काय हें समजत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा योग घडवून नारायणांनीं आणिला कीं काय हेंही मला समजत नाहीं ४. [९५६]

येथील पारमार्थिक (परमार्थविषयांत) पूर्ण भाग्यहीन असा मी दीन आहें १. ह्याकरितां देवाचें नाम मीं कंठांत धरिलें आहे. हेंच भांडवल माझेजवळ आहे २. ह्यावांचून मी दुसरें कांहीं साधन–प्रकार जाणत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा एवढा लौकिक कोणीं केला, हें मीं जाणत नाहीं ४. [९५७]

ह्या कलियुगामध्यें हरीचें नाम गाणें, त्या छंदानें नाचणें आणि टाळी वाजविणें हीं देव प्राप्त करून घेण्याचीं उत्तम साधनें आहेत १. ह्या नावेमध्यें बसून भवसमुद्रांतून कित्येक तरून गेले हें नकळे, अशी ही नामरूपी नौका सिद्ध आहे तर तुम्हीं सर्व जन या आणि बसा (नामाचा आश्रय करा) २. विठोबारायाचें नाम जे कोणी घेतील त्यांस अन्य साधनांचे सायास करण्याचें कारण नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, संकटकाळीं [अंतकाळीं] हरीचें नाम हेंच एक खरें निर्वाणीचें शस्त्र आहे ४. [९५८]

माझ्या चित्तामध्यें सर्वकाळ (हरि केव्हां भेटेल) हीच एक काळजी लागली आहे १. श्रीहरीचें रूप जें डोळ्यानें पाहिलें, तें डोळ्यांमध्यें भरलें म्हणून वारंवार त्याचाच आठव होतो २. हरिस्वरूपाचें अखंड अनुसंधान असल्यामुळें प्रापंचिक व्यवहाराची गोष्ट बोलावयाचें संपलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा मला श्रीरंगाचा वेध लागल्यामुळें मी तद्रूप झालों ४. [९५९]

जसा भक्तपणाचा डामडौल बाहेर लोकांत दाखवितो तसा आंतून शुद्ध भावानें जर राहील तर त्याजपासून देव काय दूर आहे? १. पण खऱ्या भक्तपणाच्या वागणुकीचा त्याचे ठिकाणीं मेळ नसल्यामुळें तो दुःखी होतो २. माळा, मुद्रा ह्या बाह्य चिन्हांच्या सोंगानें हरीची प्राप्ति कशी होईल? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचे ढोंगीच भक्त बहुतेक असतात, असें समजा (खरा भक्त एकहि दिसत नाहीं) ४. [९६०]

हृदयामध्यें सतत देवाचें चिंतन असणें हाच संपूर्ण शुभ शकुन आहे १. ह्या स्थितीमध्यें जर कधीं अंतराय (अडथळा) येणार नाहीं, तर मग तेथें लाभाची उणीव काय आहे? २. वाणीला निरंतर एक हरिनामाचाच छंद आहे व

शुभ काळ अवघ्या दिशा ॥ ४ ॥ [९६१]

ब्रह्मरूपाचीं कर्मे ब्रह्मरूप। विरहित संकल्प होती जाती ॥ १ ॥ ठेविलिया दिसे रंगाऐसी शिळा। उपाधि निराळा स्फटिक मणि ॥ २ ॥ नानाभाषामतें आळवितां बाळा । प्रबोधी तो मूळा जननीठायीं ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें नमन जाणतियां । लागतसें पायां वेळोवेळां ॥ ४ ॥ [९६२]

नाहीं सुगंधाची लागत लावणी । लावावी ते मनीं शुद्ध होतां ॥ १ ॥ वाऱ्या हातीं माप चाले सज्जनाचें । कीर्ति मुख त्याचें नारायण ॥ २ ॥ प्रभा आणि रवि काय असे आन । उदयीं तंव जन सकळ साक्षी ॥ ३ ॥ तुका म्हणे बरा सत्याचा सायास । नवनीता नाश नाहीं पुन्हा ॥ ४ ॥ [९६३]

तीर्थाटणें एक(एकें) तपें हुंबरती । नाथिले धरिती अभिमान ॥ १ ॥ तैसे विष्णुदास नव्हती सावडे । एकाचिया पडे पायां एक ॥ २ ॥ अक्षरें आणिती अंगासी जाणीव । इच्छा ते गौरव पूज्य व्हावें ॥ ३ ॥ तुका म्हणे विधिनिषेधाचे डोहीं । बुडाले त्यां नाहीं देव कधीं ॥ ४ ॥ [९६४]

पटे(पट्टे) ढाळूं आम्ही विष्णुदास जगीं । लागों नेदूं अंगीं पापपुण्य ॥ १ ॥ निर्भर अंतरीं सदा सर्वकाळ । घेतला सकळ भार देवें ॥ २ ॥ बळिवंत जेणें रचिलें सकळ । आम्हां त्याचें बळ अंकितासी ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही देखतचि नाहीं । देवाविण कांहीं दुसरें तें ॥ ४ ॥ [९६५]

कथेचा उलंघ तो अधमा अधम । नावडे ज्या नाम ओळखा तो ॥ १ ॥ कासया जीऊन झाला भूमी भार । अनउपकार माते कुसी ॥ २ ॥ निद्रेचा आदर जागरणीं वीट । त्याचें पोटीं कीट

त्या योगानें ती सर्वकाळ शुचिर्भूत झाली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरीच्या दासास सर्व दिशा व सर्व काळ सदा शुभच आहेत ४. [९६१]

जो स्वतः ब्रह्मरूप झाला आहे, त्याचेकडून जीं कर्में होत आहेत, तीं संकल्पपूर्वक नसून सहज होत-जात आहेत म्हणून तीं कर्मेंहि ब्रह्मरूपच आहेत १. स्फटिकाचा दगड ज्या रंगापाशीं ठेविला असेल, तद्नुरूप तो भासतो; तथापि तो आपल्या शुद्धपणानें त्या रंगापासून भिन्न आहे २. अनेक शब्दांनीं लहान बालकास हांक मारितात, (जसें लहान मुलाला त्याची आत्या, मावशी किंवा काकी निरनिराळ्या आवडत्या नांवानें हांक मारतात) पण तें तितक्यांना न ओळखतां त्याची ओळख फक्त एक मातुःश्रीचेच ठिकाणीं असते (तें मूल मुळांत आईलाच ओळखीत असतें, त्याप्रमाणें आत्मज्ञानी मुक्त पुरुष ब्रह्माशिवाय कोणालाहि ओळखीत नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, खऱ्या अनुभविक आत्मज्ञानी लोकांस मीं नमस्कार करून वेळोवेळीं त्यांचेच पाय धरीत आहें ४. [९६२]

गुणाची पेरणी सुगंधवत् होत नाही. (कोणत्याहि सुगंधाची स्वतंत्रपणें लावणी किंवा पेरणी करावी लागत नाहीं. चंदन, गुलाब, शेवंती ह्यांच्या बरोबरच सुगंधाची उत्पत्ति होत असते तसेंच) मनाच्या शुद्धतेनें त्या गुणांचें बीजारोपण होतें. १. जे कोणी सज्जन आहेत, त्यांच्या सुगुणांचा व त्यांच्या कीर्तीचा फैलाव, वायूचे द्वारा जसा पुष्पगंधाचा होतो, त्याप्रमाणें नारायणाचे द्वारा होतो २. सूर्य व प्रकाश हे कांहीं वेगळे आहेत काय ? ह्याविषयीं सूर्योदय होण्याबरोबर सर्व जग साक्षी आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, खऱ्याविषयीं यत्न करणें चांगलें. जसा अमृतास नाश नाहीं, तद्वत् सत्यास नाश नाहीं ४. [९६३]

एकेक तीर्थयात्रा करून व तपें करून गुरगुरतात आणि खोटा अभिमान धरितात १. त्याप्रमाणें भोळे विष्णुदास नव्हेत. ते निरभिमानानें एकमेकांच्या पायां पडतात २. वेदाध्ययनाचे योगानें कित्येक आपणांस ज्ञाते समजतात आणि आपली महती जगांत वाढावी अशी इच्छा करतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कर्ममार्गांतील विधिनिषेधाच्या डोहांत पडले आहेत, ते त्यांतच बुडतात; त्यांस देवाची प्राप्ति कधींहि होणार नाहीं ४. [९६४]

ह्या जगामध्यें आम्ही विष्णुदास (दांड) पट्टा खेळणारे आहोंत. त्यायोगानें आपल्या आंगीं पापपुण्य लागूं देणार नाहीं १. सदा सर्वकाळ अंतराचे ठिकाणीं आनंदित आहोंत, आमचा सर्व योगक्षेमाचा भार परमेश्वरानें घेतलेला आहे २. जो सर्वांत बलवान् व ज्यानें ही सृष्टि उत्पन्न केली आहे त्याचा आधार आम्हां अंकितांस आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही देवावांचून दुसरें कांहीं पाहात नाहीं ४. [९६५]

जो हरिकथेचा अनादर करतो व ज्यास हरीचें नांव आवडत नाहीं, तो अधमांमध्यें अधम आहे असें समजावें १. आईच्या पोटीं जन्म घेऊन हा कृतघ्न व्यर्थ भूमीला भार कशास झाला ? २. त्याचे पोटांत कुपथ्याची भावना आहे,

कुपथ्याचें ॥ ३ ॥ तुका म्हणे दोन्ही बुडविलीं कुळें । ज्याचें तोंड काळें कथेमाजी ॥ ४ ॥ [९६६]

सांडोनियां दों अक्षरां । काय करूं हा पसारा । विधिनिषेधाचा भारा । तेणें दातारा नातुडसी ॥ १ ॥ म्हणोनि बोबड्या उत्तरीं । वाचे जपें निरंतरीं । नाम तुझें हरी । भवसागरीं तारूं तें ॥ २ ॥ सर्वमय ऐसें वेदांचें वचन । श्रुति गर्जती पुराणें । नाहीं आणिक ध्यान । साधनें मज चाड ॥ ३ ॥ शेवटीं ब्रह्मार्पण । याचि मंत्राचें कारण । काना मात्रा वायांविण । तुका म्हणे विंदुलीं ॥ ४ ॥ [९६७]

हरिनामाचें करूनि तारूं । भवसिंधुपार उतरलों ॥ १ ॥ फावलें फावलें आतां । पायीं संतां विनटलों ॥ २ ॥ हरिनामाचा शस्त्र घोडा । संसार गाडा छेदिला ॥ ३ ॥ हरिनामाचें धनुष्यकांडें । विन्मुख तोंडें कळिकाळ ॥ ४ ॥ येणेंचि बळें सरते आम्ही । हरिच्या(चे) नामीं लोकीं तिहीं ॥ ५ ॥ तुका म्हणे झालों साचे । श्रीविठ्ठलाचे डिंगर ॥ ६ ॥ [९६८]

नव्हे हें गुरुत्व मेघवृष्टि वाणी । ऐकावी कानीं संतजनीं ॥ १ ॥ आरुष हा शब्द देवाचा प्रसाद । करविला वाद तैसा केला ॥ २ ॥ देहपिंड दान दिला एकसरें । मुक्तिचें तें खरें टांकसाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे झरा लागला नवनीत । सेविलिया हित पोट धाय ॥ ४ ॥ [९६९]

घटीं अलिप्त असे रवि । अग्नि काष्ठामाजी जेवीं । तैसा नारायण जीवीं । जीवसाक्षी वर्तनें ॥ १ ॥ भोग ज्याचे तया अंगीं । भिन्न प्रारब्ध जगीं । विचित्र ये रंगीं । रंगें रंगला गोसावी ॥ २ ॥ देह संकल्पासारिखें । एक एकांसी पारिखें । सुख आणि दुःखें । अंगीं कर्मे त्रिविध ॥ ३ ॥

म्हणून त्यास हरिजागरणाचा कंटाळा व निद्रेविषयीं भर आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो हरिकथेला विन्मुख झाला, त्या काळतोंड्यानें आपल्या आईबापांचीं दोन्हीं कुळें खास बुडविलीं ४. [९६६]

'रा म' हीं दोन्हीं अक्षरें सोडून हा पसारा काय करावयाचा आहे? विधिनिषेधात्मक बाकीचा सर्व समुदाय आहे, ह्या योगानें हे दातारा, तुझी प्राप्ति होणार नाहीं १. हे श्रीहरि, ह्याकरतां बोबड्या शब्दांनीं तुझ्या नामाचा निरंतर जप करतों व तें तुझें नांव भवसमुद्रांतून पार करणारें आहे २. वेद, श्रुति व पुराणें हीं तूं सर्वव्यापी आहेस म्हणून गर्जनेनें सांगत आहेत, म्हणून तुजवांचून दुसरें ध्यान नाहीं व इतर साधनांची इच्छाहि नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, (कोणत्याहि वैदिक कर्माचे शेवटीं 'ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु' ह्या नाममंत्राची आवश्यकता आहे, कारण तप-यज्ञादि क्रिया सांग झाल्या नाहींत किंवा वेदमंत्र म्हणत असतांना काना, मात्रा, अनुस्वार चुकले तर व्यर्थ होतात, ह्याकरितां हरि-नामानें न्यून असलेलें पूर्ण होऊन सर्व कर्मे यथासांग व सफळ होतात, म्हणून) ब्रह्मार्पण ह्या शब्दांशींच अखेर सर्वांचें प्रयोजन आहे; बाकीचे कानामात्रादिक जे व्यर्थ वर्ण आहेत त्यांस शून्य पडो ४. [९६७]

हरिनामचिंतनरूपी जहाजाचे आश्रयानें जन्ममृत्युसंसारसिंधूंतून पार तरून गेलों १. संतांच्या चरणीं विशेष रंगल्यामुळें सर्व कांहीं आतां आम्हांस प्राप्त झालें आहे, असें द्विवार सांगतों २. हरिनामचिंतनरूपी घोडा व शस्त्र ह्यांचा आश्रय करून जबरदस्त संसाराचा नाश केला ३. हरिनामचिंतनाचे धनुष्यबाण केल्यामुळें कळिकाळ विन्मुख होऊन पळाला ४. हरीच्याच नामचिंतनाच्या बळानें त्रैलोक्यामध्यें आम्ही श्रेष्ठ झालों आहोंत ५. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही श्रीविठोबाचे निश्चयपूर्वक लाडके सेवक झालों आहोंत ६. [९६८]

आम्हीं जो हा उपदेश करीत आहोंत, तो आमच्याकडे गुरुत्व न घेतां मेघवृष्टीप्रमाणें करीत आहोंत, तो तुम्हीं संतजनांनीं ऐकावा १. माझा शब्द हा बालकाप्रमाणें बोबडा आहे. तो देवाचा प्रसाद आहे म्हणून त्यानें मजकडून जसें बोलविलें तसें बोललों २. मी आपल्या देहरूपी पिंडाचें दान हरिचरणीं एकदांच केलें आहे. ह्या मूळच्या भगवत्प्रसादरूपी टांकसाळींतून शब्दरूपी खरें नाणें बाहेर पडत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, सारभूत हरिनामामृताचा माझे मुखांतून झरा लागला आहे त्याचें जे सेवन करतील ते तृप्त होतील ४. [९६९]

पाण्यानें भरलेल्या मडक्यामध्यें जरी सूर्यप्रतिबिंब दिसतें, तरी सूर्य त्याहून अगदीं भिन्न आहे व सामान्य काष्ठामध्यें जो सामान्य अग्नि आहे तो त्याहून निराळा आहे. त्याप्रमाणें सर्व भूतमात्रांचे जीवांमध्यें जरी श्रीनारायण आहे तरी तो त्याहून भिन्न साक्षित्वानें आहे (सारांश, त्याला जीवाच्या कर्तृत्व-भोक्तृत्वाचा लेप लागत नाहीं) १. निरनिराळ्या प्रारब्धकर्मांच्या योगानें जे भोग प्राप्त होतात, त्याचा भोक्ता तो जीव आहे. ह्या सर्व भिन्नभावाच्या रंगानें माझा स्वामी नटला आहे २. मरणाचे वेळेस ज्यास जसा संकल्प होतो तसा त्यास देह प्राप्त होतो, म्हणून एकासारखे एक देह नाहींत.

तुका म्हणे कोडें । न कळे तयासी सांकडे । त्याचिया निवाडें । उगवे केलें विंदान ॥ ४ ॥ [९७०]

सद्गदित कंठ दाटो । येणें फुटो हृदय ॥ १ ॥ चिंतनाचा एक लाहो । तुमच्या अहो विठ्ठला ॥ २ ॥ नेत्रीं जळ वाहो सदा । आनंदाचे रोमांच ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपादान । इच्छी मन हे जोडी ॥ ४ ॥ [९७१]

जेथें देखें तेथें उभा । अवघ्या गगनाचा गाभा ॥ १ ॥ डोळां बैसलें बैसलें । ध्यान राहोनि संचलें ॥ २ ॥ सरसावलें मन । केले सोज्वळ लोचन ॥ ३ ॥ तुका म्हणे सवें । आतां असिजेत देवें ॥ ४ ॥ [९७२]

तान्हें तान्ह प्याली । भूक भुकेनें खादली ॥ १ ॥ जेथें तेंच नाहीं झालें । झाडा घेतला विठ्ठलें ॥ २ ॥ वास वासनेसी नाहीं । मन पांगुळलें पायीं ॥ ३ ॥ शेष उरला तुका । जीवीं जीवा झाला चुका ॥ ४ ॥ [९७३]

पाणिपात्र दिगंबरा । हस्त करा सारिखे ॥ १ ॥ आवश्यक देव मनीं । चिंतनींच सादर ॥ २ ॥ भिक्षा कामधेनुऐशी । अवकाशीं शयन ॥ ३ ॥ पांघरोनि तुका दिशा । केला वास अलक्षीं ॥ ४ ॥ [९७४]

विषयीं विसर पडिला निःशेष । अंगीं ब्रह्मरस ठसावला ॥ १ ॥ माझी मज झाली अनावर वाचा । छंद या नामाचा घेतलासे ॥ २ ॥ लाभाचिया सोसें पुढें चाले मन । धनाचा कृपण लोभी जैसा ॥ ३ ॥ तुका म्हणे गंगा सागरसंगमीं । अवघ्या झाल्या उर्मि एकमय ॥ ४ ॥ [९७५]

सुखदुःखें हीं पुण्यकर्म व पुण्यपापमिश्रकर्म व पापकर्म अशा तीन प्रकारच्या कर्मांनें होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा गुंताडा ज्यास कळत नाहीं त्यालाच ह्या पापपुण्याचें मोठें संकट वाटतें, पण हरिसाक्षित्व ज्यास कळेल तो त्या योगानें ह्या सर्व गुंताड्यांतून (बंधनांतून) पार पडेल ४. [९७०]

(ध्रुवपदांत दर्शविलेल्या स्थितीच्या योगानें) माझा कंठ सद्गदित होवो व त्याच प्रेमभरानें हृदयस्फोट होवो १. अहो श्रीविठ्ठला, तुमच्या चिंतनाचाच टाहो वाणीस करूं दे २. डोळ्यांमध्यें आनंदाश्रु सर्वदा येत असोत व त्याच आनंदानें सर्व आंगावर रोमांच उभे राहोत ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारच्या कृपादानरूपी लाभाची मीं इच्छा करीत आहें ४. [९७१]

सर्व गगनाचा अंतरात्मा जो श्रीहरि तो जेथें पाहावा तेथें उभा दिसत आहे १. तेंच ध्यान माझे डोळ्यांत भरून राहिलें आहे (असें द्विवार सांगतात) २. व त्याच्याच चिंतनाविषयीं माझें मन तत्पर झालें आहे व डोळेहि शुद्ध केले आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आमच्याबरोबर जिकडे तिकडे देवच आहे ४. [९७२]

तहानेनेंच तहानेला पिऊन टाकलें व भुकेनेंच भुकेला खालें १. तहान, भूक ज्या प्राणाचे धर्म आहेत तो प्राणहि जागचे जागींच गुरला, ह्या सर्वांचा झाडा श्रीविठोबारायानें घेतला २. ज्या मनावर वासनादि विकार होतात, तें मन (हरीच्या चरणीं) लीन झाल्यामुळें, वासनेला आश्रयास जागा उरली नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जीवाच्याच तात्त्विक स्वरूपांत जीव नाहींसा होऊन मीं (कूटस्थ ब्रह्मरूपानें) उरलों आहें ४. [९७३]

जे कोणी दिगंबर आहेत त्यांचे हात (अन्न खाण्याकरितां व पाणी पिण्याकरितां) हेच पात्र (भांडें) आहेत (असें त्रिवार सांगतात) १. ज्यांचे मन परमेश्वराचे चिंतनाविषयीं सदा तत्पर आहे २. व बगलेंत जो झोळी घेऊन भिक्षा मागत आहे व ज्याचें निजणें मोकळ्या मैदानामध्यें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, दशदिशा पांघरून ज्यानें अलक्ष्य परमेश्वराचे ठिकाणीं वास्तव्य केलें आहे (तो खरा भाग्यवान् होय) ४. [९७४]

सर्व विषयाविषयींचा समूळ विसर, माझे अंगीं ब्रह्मरस ठसल्यामुळें, पडला आहे १. ज्या माझ्या वाणीनें हरिनामाचा इतका छंद घेतला आहे, ती माझी वाणी मजला अनावर झाली आहे २. जसें धनाविषयीं जो कृपण, लोभी आहे, त्याचें मन लाभाविषयीं सोस करितें. त्याप्रमाणें (माझी वाणी) परमात्म्याचे चिंतनाविषयीं अनावर झाली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, गंगा ही सागराच्या संगमानें समरस होते, त्याप्रमाणें माझ्या सर्व वृत्ति श्रीहरीशीं एकरूप झाल्या आहेत ४. [९७५]

रामकृष्णनाम मांडीं पा वोळी (पां ओळी)। तेणें होईल होळी पापा धुनी ॥ १ ॥ ऐसा मना छंद लावीं रे अभ्यास। जया नाहीं नाश ब्रह्मरसा ॥ २ ॥ जोडी तरी ऐसी करावी न सरे। पुढें आस उरे मागुताली ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसें धरा कांहीं मनीं। यातायाती खाणी चुकतील ॥ ४ ॥ [९७६]

परमार्थी तो न म्हणावा आपुला। सलगी धाकुला हेळूं नये ॥ १ ॥ थोडाचि स्फुलिंग बहुत दावाग्नि। वाढतां इंधनीं वाढविला ॥ २ ॥ पितयानें तैसा वंदावा कुमर। जयाचें अंतर(रीं) देव वसे ॥ ३ ॥ तुका म्हणे शिरीं वाहावें खापर। माजी असे सार नवनीत ॥ ४ ॥ [९७७]

ऐसा ज्याचा अनुभव। विश्व देत सत्यत्वें ॥ १ ॥ देव तया जवळी असे। पाप नासे दर्शनें ॥ २ ॥ कामक्रोधा नाहीं चाली। भूतीं जाली समता ॥ ३ ॥ तुका म्हणे भेदाभेद। गेले वाद खंडोनि ॥ ४ ॥ [९७८]

सेवा ते आवडी उच्चारावें नाम। भेदाभेद काम सारूनियां (निवारुनि) ॥ १ ॥ न लगे हालावें चालावें बाहेरी। अवघेंचि घरीं बैसलिया ॥ २ ॥ देवाचींच नामें देवाचिये शिरीं। सर्व अलंकारीं समर्पावें ॥ ३ ॥ तुका म्हणे होय भावेंचि संतोषी। वसे नामापाशीं आपुलिया ॥ ४ ॥ [९७९]

ज्ञानियांचे घरीं चोजवितां देव। तेथें अहंभाव पाठी लागे ॥ १ ॥ म्हणउनि (म्हणोनि) अवघे सांडिले उपाय। धरियेले पाय दृढ तुझे ॥ २ ॥ वेदपरायण पंडित वाचक। न मिळती एक एकांमधीं ॥ ३ ॥ पाहों गेलों भाव कैसी आत्मनिष्ठा। तेथें देखें चेष्टा विपरीत ॥ ४ ॥ आपुलिया नाहीं निवाले

रामकृष्णनामाचा सारखा उच्चार करा (आपल्या जिभेंत राम-कृष्ण ह्या नामांच्या ओळी बसवा). त्या योगानें तुमचे ठिकाणीं असलेल्या पापांचा समूळ नाश होईल १. करितां अभ्यासानें हाच छंद मनास लावा. त्या ब्रह्मरसास कधींहि नाश नाहीं असा तो अवीट आहे २. असा लाभ करून घ्यावा कीं तो कधींहि संपणार नाहीं. पुढेंमागें त्याचीच आशा जन्मजन्मांतरीं राहावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यापासून अनेक योनींतून जन्ममरणाचे फेरे चुकतील असें कांहींतरी तुम्हीं मनांत धरा ४. [९७६]

जो कोणी परमार्थी (ब्रह्मनिष्ठ, हरिभक्त) आहे तो लहान असला तरी तो आपलें मूल आहे, म्हणून त्याची अवहेलना करूं नये १. ज्याप्रमाणें अग्नीची ठिणगी लहान असली म्हणून लांकडाच्या योगानें वाढविल्यास मोठ्या अग्नीच्या स्वरुपास येते, त्याप्रमाणें परमार्थ्याची स्थिति होते २. ज्याचे अंतःकरणांत सदा देवाची वसति झाली आहे अशा मुलास बापानें नमस्कार करावा ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या भांड्यामध्यें सारभूत लोणी आहे असें भांडें (मग तें खापराचें असलें तरी हरकत नाहीं) डोक्यावर घेतलें पाहिजे (त्याप्रमाणें ब्रह्मनिष्ठा व हरिभक्ति परमार्थांत श्रेष्ठ असल्यामुळें देह जरी वयानें, कुलानें व जातीनें हीन असला तरी तो सर्वांना पूज्य आहे) ४. [९७७]

सर्व जग हें खरोखर देवच आहे असें ज्याच्या अनुभवास आलें १. त्याचे पाशीं सदैव परमेश्वराची वसति असते व त्याचे दर्शनानें पापाचा नाश होतो २. त्याचे हृदयांतील कामक्रोधादि वृत्तींचा उठाव झाला व सर्व भूतमात्रांच्या ठिकाणीं भगवत्प्रत्ययाची समता झाली आहे असें समजावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, भेद-अभेद हे मतवाद त्याचे ठिकाणीं नाहींसे झाले आहेत ४. [९७८]

भेदात्मक जगताविषयींची व अभेदात्मक परमेश्वराविषयींची वाटाघाट सोडून देवाचे नामाचा आवडीनें उच्चार करणें हीच देवाची सेवा होय १. आपल्या घराबाहेर कोठेंहि जाऊं नये; एका नामाच्या चिंतनानेंच घरच्या घरीं सर्व लाभ होतात २. देवाचीं नामें हींच कोणी पुष्पें व अलंकार समजून त्यास तीं अर्पण करावीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव हा एकनिष्ठभावानेंच संतुष्ट होऊन नित्य नामधारकापाशीं राहातो ४. [९७९]

जे कोणी ज्ञानी आहेत त्यांचे घरीं देवाविषयीं शोध केला तर तेथें देव नसून तेथें केवळ ज्ञानाभिमानच त्यांचे मागें लागलेला आहे असें दिसतें १. हे देवा, ह्याकरितां मी सर्व उपाय टाकून तुझेच पाय बळकट धरले आहेत २. जे कोणी वेदपारंगत वक्ते, पंडित व ग्रंथांचे वाचक आहेत त्यांचें एकमेकांशीं पटत नाहीं ३. जे कोणी आत्मनिष्ठ आहेत यांची भावना पाहूं गेलें असतां तेथें सर्वच व्यवहार भलत्या सवा दिसूं लागला ४. जे कोणी योगी आहेत

जे अंगें । योगी करती रागें गुरगुरु ॥ ५ ॥ तुका म्हणे मज कोणाचा पांगिला । नको बा विठ्ठला करूं आतां ॥ ६ ॥ [९८०]

पंढरीची वाट पाहें निरंतर । निढळावरी कर ठेवूनियां ॥ १ ॥ जातियां निरोप पाठवीं माहेरा। कां मज सासुरा सांडियेलें ॥ २ ॥ पैल कोण दिसे गरुडाचे वारिकें । विठ्ठला सारिखें चतुर्भुज ॥ ३ ॥ तुका म्हणे धीर नाहीं माझ्या जीवा । भेटशी (सी) केधवां पांडुरंगा ॥ ४ ॥ [९८१]

ऐसी जोडी करा राम कंठीं धरा । जेणें चुके फेरा गर्भवास ॥ १ ॥ नासिवंत आटी प्रियापुत्रधन। बीज त्याचा सीण तेंचि फळ ॥ २ ॥ नाव धड करा सहस्र नामांची । जे भवसिंधूची थडी पावे ॥३॥ तुका म्हणे काळा हाणा तोंडावरी । भाता भरा हरि रामबाणें ॥ ४ ॥ [९८२]

पाहें मजकडे भरोनियां दृष्टी। बहुत हिंपुटी झालों माते ॥ १ ॥ करावेंसें वाटे जीवा स्तनपान। नव्हे हें वचन शृंगारिक ॥ २ ॥ सत्यासाठीं माझी शब्दाविवंचना । जोडल्या वचनाचें तें नव्हे ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी कळवळ्याची कींव । भागलासे जीव कर्तव्यानें ॥ ४ ॥ [९८३]

तुज म्हणताती कृपेचा सागर । तरि कां केला धीर पांडुरंगा ॥ १ ॥ आझुनि कां नये तुज माझी दया। काय देवराया पाहातोसि ॥ २ ॥ आळवितों जैसें पाडस कुरंगिणी। पीडिलिया वनीं तानभूके (तहानभूकें) ॥ ३ ॥ प्रेमरस पान्हा पाजीं माझे आई। धांवें वो विठाई वोरसोनि ॥ ४ ॥ तुका म्हणे माझें कोण हरील दुःख । तुजविण एक पांडुरंगा ॥ ५ ॥ [९८४]

भक्ति तों कठिण शुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ॥ १ ॥ जेथें पाहें तेथें देखीचा पर्वत । पायाविण भिंत तांतडीची ॥ २ ॥ कामाविलें तरि पाका ओज घडे । रुचि आणि जोडे

ते स्वरूपशांतीच्या योगानें शांत झालेले न दिसतां उलट क्रोधानें दुसऱ्यावर गुरगुरतांना दिसतात ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे श्रीविठ्ठला, मला ह्या कोणाचे आतां अंकित करूं नको ६. [९८०]

कपाळावर हात ठेवून सर्व काळ मीं पंढरीची वाट पाहात आहें १. जे कोणी पंढरपूर–माहेराकडे जाणारे आहेत, त्यांचेबरोबर मला सासुरवाडीं कां टेविलें, म्हणून निरोप पाठवीत आहें २. पलीकडे विठ्ठल–देवासारखें चतुर्भुज व गरुड वाहनावर बसलेलें कोण बरें दिसत आहे ? ३, तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, तुम्हीं मला केव्हां बरें भेट द्याल? तुमचेवांचून माझे जिवास धीर निघत नाहीं ४. [९८१]

ज्यापासून कंठामध्यें निरंतर राम राहील अशी जोड करा. ह्या जोडीपासून गर्भवासाच्या फेरींतून सुटाल १. स्त्री, पुत्र, धनादिकांच्या रक्षणाची खटपट नाशवंत आहे. जेथें दुःखांचें बीज आहे तेथें त्याचीं फळेंही दुःखाचींच असावयाचीं २. विष्णुसहस्रनामाच्या नौकेचा दृढ आश्रय करा म्हणजे भवसिंधूंतून पार व्हाल ३. तुकाराम महाराज म्हणतात, हृदयरूपी भाता हरिनामाच्या रामबाणांनीं भरून काळाच्या तोंडावर मारा करा ४. [९८२]

हे माते विठाबाई, मी अतिशय कष्टी झालों आहें, म्हणून मजकडे कृपादृष्टी करून पहा १. माझ्या जीवास तुझें प्रेमस्तनपान करावेंसें वाटतें. हें माझें वचन भूषणाचें (अलंकारिक किंवा नाटकीपणाचें) नव्हे २. माझे हे शब्द-विचार खरें प्राप्त होण्याकरितां आहेत. शब्दाला शब्द जोडून अन्य कवींप्रमाणें शब्दाला शब्द जोडलेले असे केवळ वरवरचे शब्द नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, मोठ्या कळवळ्यानें तुझ्याजवळ कींव करण्यानें माझा जीव फार कष्टी झाला आहे ४. [९८३]

हे पांडुरंगा, तुम्हीं कृपेचे सागर आहांत असें म्हणतात. असें असून तुम्हीं मला भेट देण्यास विलंब कां लाविलात? १. हे देवराया, तुला अजून माझी दया कशी येत नाहीं ? तूं काय पाहात आहेस ? २. ज्याप्रमाणें वनांत पाडस चुकलें असतां तहानभुकेनें पीडित झाल्यावर आपल्या आईस हांक मारितें, त्याप्रमाणें मी तुला आळवितों ३. हे विठाबाई आई, तूं मोठ्या प्रेमभरानें धांवून ये व मला प्रेमपान्हा पाज ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, तुजवांचून माझे दुःखाचा परिहार कोण करील ? [९८४]

शूळावरील पोळीप्रमाणें भगवद्भक्ति फार कठिण आहे. तिचा अंगीकार करण्यासारखा बलवान् शूर एखादा निपजतो १. ज्याप्रमाणें खडकापर्यंत खोल पाया नसतांना भिंत तातडीनें रचतात त्याप्रमाणें दुसऱ्याचे देखोदेखीच्या दिमाखानें बाह्यात्कारी भक्ति पोकळ असते २. (डाळ, तांदूळ, इत्यादि) साहित्याची मेहनत करून पाकसिद्धि ओजेनें (चांगली,

श्लाघ्यता हे ॥ ३ ॥ तुका म्हणे मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दिस जागृतीचा ॥ ४ ॥ [९८५]

पापी म्हणों तरि आठवितों पाय । दोष बळी काय तयाहूनि ॥ १ ॥ ऐशा विचाराची घालूनि कोंडणी । काय चक्रपाणी निजलेती ॥ २ ॥ एकवेळ जेणें पुत्राच्या उद्देशें । घेतल्याचें कैसें नेलें दुःख ॥ ३ ॥ तुका म्हणे वैकुंठनायका । चिंता कां सेवका तुमचिया ॥ ४ ॥ [९८६॥

उगविल्या गुंती । ऐशा मागें नेणों किती ॥ १ ॥ ख्याती केली अजामेळें । होतें निघालें दिवाळें ॥ २ ॥ मोकलिला प्रायश्चितीं । कोणी न धरिती हातीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मुक्त वाट । वैकुंठीची घडघडाट ॥ ४ ॥ [९८७]

सरळ (ळीं) हीं नामें उच्चारावीं सदा । हरि वा गोविंदा रामकृष्णा ॥ १ ॥ पुण्य पर्वकाळ तीर्थेंही सकळ । कथा सिंधूजळ न्हाऊं येती ॥ २ ॥ अवघेंचि लाभ बैसलिया घरा । येती भाव घरा एके ठायीं ॥ ३ ॥ शेळ्या मेंढ्या गाई सेवा घेती म्हैसी । कामधेनु तैसी नव्हे एक ॥ ४ ॥ तुका म्हणे सुखें पाविजे अनंता । हें वर्म जाणतां सुलभाचि ॥ ५ ॥ [९८८]

पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जो वदे अच्युत सर्व काळ ॥ १ ॥ तयाच्या चिंतनें तरतील दोषी । जळतील रासी पातकांच्या ॥ २ ॥ देव इच्छी रज चरणींची माती । धांवत चालती मागें मागें ॥ ३ ॥ काय त्यां उरलें वेगळें आणीक । वैकुंठनायक जयां कंठीं ॥ ४ ॥ तुका म्हणे देव भक्तांचा संगम । तेथें ओघ नाम त्रिवेणीचा ॥ ५ ॥ [९८९]

मनःपूर्वक) केली तर त्या अन्नास गोडी येते आणि पाक करणारास श्रेष्ठत्वाचा लाभ मिळतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें गजास अंकुशाचा मार असतो तसा भक्ति करणारानें आपले मनास (विचारजागृतीच्या अंकुशाचा) मार करून नित्य नवा दिवस सावधपणाचा ठेवावा ४. [९८५]

अहो देवा, मीं पातकी आहें असें म्हणावें, तर तुमचे पायाचा आठव करितों, त्या योगानें पापाचा नाश साहाजिकच व्हावयाचा असून होत नाहीं. तेव्हां तुमचे पायाच्या सामर्थ्याहून माझें पाप मोठें आहे कीं काय? १. अशा प्रकारच्या उभय विचारांच्या योगानें माझें मन कोंडल्यासारखें झालें आहे. हे चक्रपाणी, तुम्ही काय निजलांत? २. अजामिळानें पुत्राच्या निमित्तानें नारायण नाम एक वेळ घेतलें त्यायोगानें त्याचें सर्व दुःख नाहींसें करून तुम्हीं त्याचा उद्धार केला ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो वैकुंठनायका, मी तुमचा सेवक असून माझे मनास चिंता उत्पन्न होणें हें वाजवी आहे काय? ४. [९८६]

(ध्रुवपदांत दर्शविल्याप्रमाणें) कित्येक जीवांच्या प्रपंचाचे गुंताडे तुम्हीं उलगडून त्यांचा पूर्वीं उद्धार केला १. सर्व पुण्याईचें दिवाळें निघालें होतें, तरी अजामिळानें मोठा पुरुषार्थ केला २. त्यास सर्व प्रायश्चित्तांनीं टाकून दिलें. तीं त्याचा अंगीकार करीनाशीं झालीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा जो अजामिळ त्यानें नामाचा उच्चार केल्याबरोबर एकवार वैकुंठाचा रस्ता त्यास पायींच जाण्याजोगा मोकळा झाला. ४. [९८७]

अहो जन हो, हरि, गोविंद, रामकृष्ण ह्या नामांचा उच्चार सरळपणें सर्व काळ करावा १. हरिकथारूपी सागरामध्यें स्नान करण्याकरितां सकळ पुण्य, पर्वकाल व तीर्थें येतात. २. एका देवाच्या ठिकाणीं भाव धरिला असतां सर्व लाभ घरचे घरीं बसल्या प्राप्त होतात. ३. ज्याप्रमाणें गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या सेवा घेतात तशी (हरिनामरूपी) कामधेनूची सेवा करावी लागत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, देवाचे नामस्मरणाचें वर्म सोपें आहे. हें जाणल्यानें अनंताची प्राप्ति सहज होते ५. [९८८]

जो कोणी अच्युत नामाचा सर्वकाळ उच्चार करितो त्याचा देह पवित्र आणि वाणी पुण्यवंत जाणावी १. अशा वैष्णवांच्या चिंतनानें दोषी लोकांचा उद्धार होईल आणि त्यांच्या सर्व पातकांच्या राशी दहन होतील २. वैष्णवांचे चरणरज आपणांस मिळावे अशी इच्छा देव करितो आणि त्या रजाकरितां त्याच्या मागें मागें हिंडतो ३. ज्याच्या कंठामध्यें वैकुंठनायक आहे त्या वैष्णवांना आणि देवांना कांहीं वेगळेपणा उरला आहे कीं काय? ४. तुकाराम महाराज म्हणतात, गंगा-यमुनांचा संगम होऊन त्यामध्यें सरस्वतीचा गुप्त ओघ जसा असतो तसा देवभक्तांच्या ऐक्यत्वांत नामस्मरणाचा तिसरा ओघ आहे ५. [९८९]

पाप ताप दैन्य जाय उठाउठीं । झालिया भेटी हरिदासांची ॥ १ ॥ ऐसे बळ नाहीं आणिकांचे अंगीं । तपें तीर्थें जगीं दानें व्रतें ॥ २ ॥ चरणींचें रज वंदी शूळपाणी । नाचती कीर्तनीं त्यांचे माथां ॥ ३ ॥ भव तरावया उत्तम हे नाव । भिजों नेदी पाव हात कांहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे मना झालें समाधान । देखिल्या चरण वैष्णवांचे ॥ ५ ॥ [९९०]

येणें बोधें आम्ही असों सर्वकाळ । करूं हे निर्मळ हरिकथा ॥ १ ॥ आम्ही भूमीवरी एक (पैं)दैवाचे । निधान हें वाचे सांपडलें ॥ २ ॥ तरतील कुळें दोन्ही उभयतां । गातां आईकतां सुखरूप ॥ ३ ॥ न चळे हा मंत्र न म्हणों (णे) यातीकुळ । न लगे काळ वेळ विचारावी ॥ ४ ॥ तुका म्हणे माझा विठ्ठल विसांवा । सांठवीन हांवा हृदयांत ॥ ५ ॥ [९९१]

बहुतां जन्मींचें संचित । सबळ होय जरि बहुत । तरिचि होय हरिभक्त । कृपावंत मानसीं ॥ १ ॥ म्हणवी म्हणियारा तयांचा । दास आपुलया दासांचा । अनुसरले वाचा । काया मनें विठ्ठलीं ॥ २ ॥ असे भूतदया मानसीं । अवघा देखेल हृषीकेशी । जीवें न विसंबे त्यासी । मागें मागें हिंडतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे निर्विकार । शरणागतां वज्रपंजर । जे जे अनुसरले नर । तयां जन्म चुकलें ॥ ४ ॥ [९९२]

तारूं लागलें बंदरीं । चंद्रभागेचिये तिरीं ॥ १ ॥ लुटा लुटा संतजन । अमुप हें रासी धन ॥ २ ॥ झाला हरिनामाचा तारा । सीड लागलें फरारा ॥ ३ ॥ तुका जवळी हमाल । भार चालवी विठ्ठल ॥ ४ ॥ [९९३]

हरिदासाची भेटी झाली असतां सर्व पाप व त्रिविध ताप आणि सर्व दारिद्र्य तात्काळ जातात १. ह्या जगतामध्यें अनेक तीर्थें व तप, दान, व्रतादि साधनें आहेत, पण वैष्णवांच्या सामर्थ्याप्रमाणें ह्यांचे ठिकाणीं सामर्थ्य नाहीं २. नामसंकीर्तनामध्यें आनंदानें जे नृत्य करितात, त्यांचे चरणरज महादेव मस्तकानें वंदन करितो ३. ही वैष्णवरूपी नौका भवसमुद्र तरून जाण्याकरितां उत्तम आहे, हिचा कोणी आश्रय करतील त्यांचे हातपाय देखील ओले होणार नाहींत ४. तुकाराम महाराज म्हणतात, वैष्णवांचे चरण पाहिल्यावरोबर त्रिविध तापानें गांजलेलें माझें मन समाधान पावलें ५. [९९०]

आम्हीं सर्वकाळ निर्मळ हरिकथा करूं आणि ह्याच बोधानें सर्वकाळ राहूं १. ह्या पृथ्वीवर आम्हींच एक भाग्यवंत आहोंत, कारण आमच्या वाणीला विठ्ठल हाच महानिधीचा ठेवा सांपडला आहे २. ही हरिकथा जे कोणी गातील व जे कोणी ऐकतील त्यांच्या आईबापांचीं उभय कुळें उद्धरून सुखी होतील ३. हा विठ्ठलनाममंत्र अचळ आहे, ह्याचा उच्चार करणाराचें यातीकूळ ह्यांचा आणि उच्चार करण्याला काळ–वेळेविषयींचा विचार करण्याचें कारण नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, हा विठ्ठल माझें विश्रांतिस्थान आहे, म्हणून त्याला मोठ्या सोसानें मीं आपल्या हृदयांत सांठवीन ५. [९९१]

अनेक जन्मजन्मांतरींचें संचित पुष्कळ बलवान् असेल, तर मनामध्यें भूतमात्राविषयीं कृपा उत्पन्न होऊन तोच हरिभक्त होईल १. विठ्ठलाच्या ठिकाणीं कायावाचामनानें जे कोणी अनुसरले आहेत, त्यांचें दास्यत्व देव करितो आणि त्या दासांचा मी म्हणविणारा (म्हटल्याप्रमाणें वागणारा) सेवक आहें असें म्हणवितो २. ज्याच्या मनामध्यें सर्व भूतांविषयींची दया असते आणि सर्व भूतांचे ठिकाणीं हृषीकेशी व्यापक आहे असें आपल्याशीं जो पाहातो, त्यास देव क्षणभरदेखील विसंबत नाहीं, म्हणजे त्याचे मागें देव सर्वकाळ फिरत असतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो देव सर्वविकाररहित आहे तो पूर्णपणें शरणागतांचा रक्षण करणारा वज्राचा (वज्रासारखा अभेद्य) पिंजरा आहे. त्यास कोणी नर अनुसरले असतां त्यांचीं जन्ममरणें नाहींशीं होतात (त्यांचें जन्ममरण चुकतें) ४. [९९२]

ह्या चंद्रभागेच्या नगराला पंढरी बंदराचे ठिकाणीं विठ्ठलरूपी जहाज लागलें आहे १. अहो संतजन हो, ह्या जहाजामध्यें पारमार्थिक धनाच्या राशी अपार आहेत त्या तुम्हीं लुटा (असें द्विवार सांगतात) २. ह्या जहाजावर हरिनामरूपी शीड मोठ्या फरार्‍यानें लागलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मीं त्या ठिकाणीं जवळ हमाल होऊन विठ्ठलरूपी मालाचें ओझें वाहात आहें ४. [९९३]

आळवीन स्वरें । कैशा मधुरा उत्तरें ॥ १ ॥ ये वो ये वो पांडुरंगे । प्रेमपान्हा मज दे गे ॥ २ ॥ पसरूनि चोंची । वचनें ही करुणेचीं ॥ ३ ॥ तुका म्हणे बळी । आम्हीं लडिवाळें आळीं ॥ ४ ॥ [९९४]

सकळिकांचें समाधान । नव्हे देखिल्यावांचून ॥ १ ॥ रूप दाखवीं रे आतां । सहस्रभुजांच्या मंडिता ॥ २ ॥ शंख चक्र पद्म गदा । गरुडासहित ये गोविंदा ॥ ३ ॥ तुका म्हणे कान्हा । भूक लागली नयनां ॥ ४ ॥ [९९५]

पतितपावना । दिनानाथा नारायणा ॥ १ ॥ तुझें रूप माझे मनीं । राहो नाम जपो वाणी ॥ २ ॥ ब्रह्मांडनायका । विश्वजनांच्या पाळका ॥ ३ ॥ जीवांचिया जीवा । तुका म्हणे देवदेवा ॥ ४ ॥ [९९६]

करीं हेंचि काम । मना जपें राम राम ॥ १ ॥ लागो हाचि छंद । मना गोविंद गोविंद ॥ २ ॥ तुका म्हणे मना । मज भीक द्यावी दीना ॥ ३ ॥ [९९७]

आपुलिया लाजा । धांवे भक्तांचिया काजा ॥ १ ॥ नाम धरिलें दिनानाथ । सत्य करावया व्रत ॥ २ ॥ घात आघात निवारी । छाया पीतांबरें करी ॥ ३ ॥ उभा कर कटीं । तुका म्हणे याजसाठीं ॥ ४ ॥ [९९८]

साधावया भक्ति(क्त)काज । नाहीं लाज धरीत ॥ १ ॥ ऐसियासी शरण जावें । शक्ती जीवें न वंची ॥ २ ॥ भीष्मपण केला खरा । धनुर्धरा रक्षीलें ॥ ३ ॥ तुका म्हणे साक्ष हातीं । तो म्यां चित्तीं धरियेला ॥ ४ ॥ [९९९]

हे देवा, मधुर वचनानें व दीर्घ स्वरानें मीं तुला आळवीन १. तें असें, कीं हे पांडुरंगे, धांवून ये आणि मला प्रेमाचा पान्हा पाज, अशा प्रकारें करुणा भाकीन २. जशीं पक्ष्यांचीं पिलें पंख येण्याच्या पूर्वी भूक लागली म्हणजे आईकरितां चोंची पसरून ओरडतात, तशीं माझीं करुणेचीं वचनें आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा हट्ट आम्हीं करीत आहोंत, त्या योगानें आम्हीं लडिवाळें बळिवंत झालों ४. [९९४]

देवा, तुला पाहिल्यावांचून सकळ इंद्रियांचें समाधान होत नाहीं. १ ह्याकरितां तुम्हीं सहस्र भुजांनीं शोभायमान आहांत तें रूप आतां मला दाखवावें २. सहस्रभुजायुक्त रूप पाहाण्याची शक्ति मला नाहीं, म्हणून हे गोविंदा, तुम्हीं चतुर्भुज होऊन शंख, चक्र, गदा व पद्म ह्या चार आयुधांसहवर्तमान गरुडावर बसून मजकरितां धांवून यावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे कान्होबा, तुम्हांला पाहाण्याविषयींची भूक माझ्या नेत्रांस फार लागली आहे ४. [९९५]

हे नारायणा, पतित व इंद्रियांचे स्वाधीन असणारे दीन अशांचा उद्धार तुम्हीं करितां, म्हणून तुम्हांला दीनानाथ व पतितपावन हीं नांवें आहेत १. माझी विनंती अशी आहे, कीं तुझें रूप मनामध्यें आणि नाम वाचेमध्यें सर्वकाळ राहो २. सर्व ब्रह्मांडाचे स्वामी तुम्ही असून सर्व जीवांचें रक्षण करणारे आहांत ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हीं सर्व जीवांचे जीव आणि देवांमध्यें श्रेष्ठ देव आहांत ४. [९९६]

हे मना, राम ह्या नामाचा अखंड जप करणें हेंच काम कर १. हे मना, गोविंदा गोविंद ह्या नामाचा तुला सर्व काळ छंद लागूं दे २. तुकाराम महाराज म्हणतात, हे मना, हें दान मागण्याविषयीं मी दीन झालों आहें म्हणून जप-तप करण्याची भिक्षा मला दे ३. [९९७]

हा देव आपल्या नामास लाज येईल म्हणून भक्तांचीं अनेक कामें करण्याकरितां धांवून जातो १. त्याचें कारण त्यानें दीनानाथ हें नांव धारण केलें आहे तें व्रत खरें करण्याकरितां होय २. भक्तास कोणत्याहि प्रकारचे घात आघात पडतील, तर तो ते निवारण करितो, आणि त्याचेवर आपले पीतांबराची सांवली करितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याच कारणाकरितां तो कटीवर (कंबरेवर) हात ठेवून विटेवर उभा राहिला आहे ४. [९९८]

हा देव आपल्या भक्तांचें काम साध्य होण्याकरितां काहीं लाज धरीत नाहीं १. जो आपल्या जीवानें व शक्तीनें वंचना करीत नाहीं (दीनानाथ हें नांव व भक्तपालनाचें व्रत खरें करून दाखविलें) अशा देवास शरण जावें हें उत्तम २. ज्या देवानें भारतीय युद्धसमयीं भीष्माची प्रतिज्ञा खरी करून अर्जुनाचें रक्षण केलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याबद्दलचा पुरावा माझे हस्तगत आहे, म्हणून त्या देवास मीं चित्तामध्यें धारण केलें आहे ४. [९९९]

धेनु चरे वनांतरीं। चित्त बाळकापें घरीं ॥ १ ॥ तैसें करीं वो माझे आई। ठाव देउनि राखें पायीं ॥ २ ॥ काढितां तळमळी। जीवनावेगळी मासोळी ॥ ३ ॥ तुका म्हणे कुडी। जीवा प्राणाची आवडी ॥ ४ ॥ [१०००]

हरिजनाची कोणा न घडावी निंदा। साहात गोविंदा नाहीं त्याचें ॥ १ ॥ रूपा येऊनियां धरी अवतार। भक्तां अभयंकर खळां कष्ट ॥ २ ॥ दुर्वास हा छळों आला अंबऋषी। सुदर्शन त्यासी जाळित फिरे ॥ ३ ॥ द्रौपदीच्या क्षोभें कौरवांची शांति। होऊनि श्रीपति साह्य केली ॥ ४ ॥ न साहेचि बभ्रु(भ्रु) पांडवां पारिखा। धुंडाविला सखा बळिभद्र ॥ ५ ॥ तुका म्हणे अंगीं राखिली दुर्गंधि। अश्वत्थामा वधी पांडवपुत्रां ॥ ६ ॥ [१००१]

ज्यासी आवडी हरिनामाची। तोचि एक बहु शुचि ॥ १ ॥ जपतो हरिनाम बीज। तोचि वर्णांमाजी द्विज ॥ २ ॥ तुका म्हणे वर्ण धर्म। अवघें आहे सम ब्रह्म ॥ ३ ॥ [१००२]

विठ्ठल हा चित्तीं। गोड लागे गातां गीतीं ॥ १ ॥ आम्हां विठ्ठल जीवन। टाळ चिपूळिया (चिपळिया) धन ॥ २ ॥ विठ्ठल विठ्ठल वाणी। अमृत हें संजीवनी ॥ ३ ॥ रंगला या रंगें। तुका विठ्ठल सर्वांगें ॥ ४ ॥ [१००३]

विठ्ठल विठ्ठल मंत्र सोपा। करी पापा निर्मूळ ॥ १ ॥ भाग्यवंता छंद मनीं। कोड कानीं ऐकती ॥ २ ॥ विठ्ठल हें दैवत भोळें। चाड काळें न धरावी ॥ ३ ॥ तुका म्हणे भलते याती। विठ्ठल चित्तीं तो धन्य ॥ ४ ॥ [१००४]

म्हणे विठ्ठल ब्रह्म नव्हे। त्याचे बोल नाइकावे ॥ १ ॥ मग तो हो कां कोणी एक।

गाय ही वनांत चरत असते, तरी तिचें चित्त घरीं असलेल्या वांसराच्या ठिकाणीं असतें १. त्याप्रमाणें हे विठाबाई आई, मला तूं आपले चरणीं आश्रय देऊन माझें रक्षण कर २. ज्याप्रमाणें पाण्याच्या बाहेर मासोळी काढली म्हणजे ती तळमळ करते त्याप्रमाणें तुझे वियोगानें माझी स्थिति झाली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, देहाला जीव-प्राणांची आवड आहे (तुझें दर्शन होत असेल तर मला ह्या देहाची व प्राणांची गरज नाहीं) ४. [१०००]

कोणत्याहि हरिभक्ताची निंदा करूं नये (कोणीहि हरिभक्ताची निंदा करूं नये), कारण ती गोविंदास सहन होत नाहीं १. हरि हा सगुण साकार अवतार घेऊन भक्तांस अभय देतो व जे कोणी खळ आहेत त्यांस दुःख देतो २. ज्या वेळीं दुर्वास अंबऋषीस छळावयास गेले त्या वेळीं प्रभूनें त्यांचे मागें आपलें सुदर्शन लाविल्यामुळें तें त्यांस ताप देऊं लागलें ३. द्रौपदीची विटंबना कौरवांनीं केल्यामुळें त्यांच्यावर तिचा क्षोभ झाला व त्यामुळें प्रभूनें पांडवांस साहाय्य करून त्यांचेकडून कौरवांचा नाश करविला ४. पांडवांच्या विरुद्ध असणारा त्रिकांड्या बभ्रु भगवंतास सहन झाला नाहीं व आपला सख्खा वडीलबंधू बळिराम पांडवांच्या विरुद्ध असल्यामुळें (दुर्योधनावर प्रेम करीत असल्यामुळें) त्यास प्रभूंनीं पृथ्वीप्रदक्षिणेस हुसकून दिलें (हरीनें त्याला मानिलें नाहीं) ५. तुकाराम महाराज म्हणतात, अश्वत्थाम्यानें छापा घालून पांडवांचे पांच पुत्र मारिले म्हणून भगवंतांनीं त्याचे मस्तकीं सदैव दुर्गंधि ठेविली ६. [१००१]

ज्याला हरीचें नाम अतिशय प्रिय आहे तोच एक फार पवित्र होय १. जो हरिनामाचा निरंतर जप करतो तोच सर्व वर्णांमध्यें श्रेष्ठ द्विज जाणावा २. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व वर्णधर्म हे वस्तुतः एक ब्रह्मच आहेत ३. [१००२]

श्रीविठ्ठलाचें नांव गाणें हें चित्तास गोड लागतें १. आमचें जीवन एक विठ्ठलच असून टाळ व चिपळ्या हेंच काय तें आमचें धन आहे २. श्रीविठ्ठल हे शब्द केवळ संजीवनी अमृतच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या विठ्ठलरंगानेंच मी सर्वांगानें रंगून गेलों (तद्रूप झालों) ४. [१००३]

विठ्ठल हा मंत्र सोपा आहे असें द्विवार सांगतों आणि तोच समूळ पाप नाहींसें करतो १. जे कोणी भाग्यवान् आहेत त्यांच्याच मनास त्याचा छंद असतो व त्यांचेंच कोड-कवतुक ते कानांनीं ऐकतात २. विठ्ठल हें दैवत फार भोळें आहे, त्यासंबंधीं कोणतीहि इच्छा काळ धरीत नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचे चित्तामध्यें विठ्ठल आहे तो पाहिजे त्या जातीचा जरी असला तरी तोच धन्य आहे ४. [१००४]

जो हें विठ्ठल दैवत ब्रह्म नाहीं असें म्हणतो त्याचे शब्द ऐकूं नयेत. १. मग तो कोणी ब्रह्मदेवादिक कां

आदि करोनि ब्रह्मादिक ॥ २ ॥ नाहीं विठ्ठल जया ठावा । तोही डोळां न पाहावा ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं । त्याची भीड मज कांहीं ॥ ४ ॥ [१००५]

एक पाहातसां एकाचीं दहनें । सावध त्या गुणें कां रे नव्हां (व्हाना) ॥ १ ॥ मारा हांक देवा भय अट्टाहासें । जंव काळाऐसें झालें नाहीं ॥ २ ॥ मरणाची तंव गांठोडी पदरीं । जिणें तोंचि वरि माप भेरे ॥ ३ ॥ तुका म्हणे धिग वाहाती मारग । अंगा आलें मग हालों नेदी ॥ ४ ॥ [१००६]

संतांसीं तों नाहीं सन्मानाची चाड । परि पडे द्वाड अव्हेरी तो ॥ १ ॥ म्हणऊनि तया न वजावें ठाया । होतसे घात या दुर्बळाचा ॥ २ ॥ भावहीना आड येतसे आशंका । उचितासी चुका घालावया ॥ ३ ॥ तुका म्हणे जया संकोच दर्शनें । तया ठाया जाणें अनुचित ॥ ४ ॥ [१००७]

संसारसंगें परमार्थ जोडे । ऐसें काय घडे जाणतेनो ॥ १ ॥ हेंडग्याच्या आळां अवघीं चिपाडें । काय तेथें गोडें निवडावीं ॥ २ ॥ ढेकणाचे बाजे सुखाची कल्पना । मुर्खत्व वचना येऊं पाहे ॥ ३ ॥ तुका म्हणे मद्य सांडवी लंगोटी । सांगितला सेटीं विचार त्या ॥ ४ ॥ [१००८]

जातीचें तें चढे प्रेम । पक्षी स्मरे राम राम ॥ १ ॥ ते काय गुण लागतां येरां । कागा शोभे न पिंजरा ॥ २ ॥ शिकविलें तें सुजात सोसी । मग मोल चढे त्यासी ॥ ३ ॥ तुका म्हणे वेषधारी । हिजड्या न होती त्या नारी ॥ ४ ॥ [१००९]

वसोनि(बसणें) थिल्लरीं । बेडुक सागरा धिक्कारी ॥ १ ॥ नाहीं देखिला ना ठावा । तोंड पिटी

असेना २. ज्यास विठ्ठल माहीत नाहीं त्यास डोळ्यांनीं पाहूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे जे कोणी आहेत त्यांची मला भीड मुळींच नाहीं ४. [१००५]

एक चितेमध्यें जळतो आहे व त्यास कित्येक पाहात असूनहि त्या योगानें ते सावध कां होत नाहीत? १. अरे तुम्हीं मोठ्या भयानें व अट्टाहासानें चितेंत जळण्याच्या स्थितीस आलां नाहींत तोंपर्यंत देवास हांका मारा २. मरणाचें बोचकें प्रत्येक उपजलेल्याच्या पदरीं आहे, ह्याकरितां जोंपर्यंत आयुष्य आहे, तोंपर्यंत आपलें हृदयरूपी माप देवाचे चिंतनानें भरा ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवास सोडून हे जे सर्व प्रपंचमार्गानें जात आहेत त्यांना धिक्कार असो. एकदां मरणप्रसंग आला म्हणजे तो ह्यांना हालूं देखील देणार नाहीं ४. [१००६]

आपला कोणी सन्मान करावा अशी इच्छा संतांना नाहीं, तथापि त्यांचा कोणी सत्कार न करतां जे कोणी अव्हेर करतील, त्यांचें वाईट होईल १. म्हणून त्यांचे घरीं संतांनीं जाऊं नये, कारण त्यांचेकडून त्यांचा योग्य सन्मान न झाल्यामुळें त्या गरिबांचा (विचारानें दुर्बळ असणाऱ्यांचा) घात होतो २. जो कोणी भावहीन आहे त्याच्या योग्य कर्तव्यामध्यें (संत घरीं आले असतां त्यांना मान न देण्याची) चूक घडविणारी अशी त्याची संतांविषयीं शंका आड येते ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांच्या दर्शनाबरोबर ज्यास संकोच होतो त्याजकडे संतांनीं जाणें, हें अयोग्य आहे ४. [१००७]

हे जाणते लोक हो, देहादि प्रपंचाच्या संगतीमुळें परमार्थाचा लाभ होईल काय ? १. पशूंनीं चघळलेल्या चिपाडाच्या भाऱ्यांत सर्व चिपाडेंच असावयाचीं, तेथें गोड ताटांची निवड कशी होईल ? २. जी बाज ढेंकणांनीं भरलेली आहे त्या बाजेवर सुखानें निद्रा आली असें कोणीं बोलला तर त्याचें तें बोलणें मूर्खपणाचें आहे असें ठरेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, दारू सेवन केली असतां ती नेसलेल्या लंगोटीचेंहि स्मरण राहूं देत नाहीं. असें असतां त्या दारूबाजास विचाराची गोष्ट कोणीं सांगितली असतां ती गोष्ट शेंटावर टेवतो (तुच्छ मानतो) ४. [१००८]

जातिवंताच्या ठिकाणींच प्रेम उत्पन्न होतें. उदाहरणार्थ, राघूपक्षी ह्यास रामराम म्हणावयास शिकविलें तर तो तसें म्हणतो १. हा गुण कमी जातीच्या कावळ्यास लागणार नाहीं व तो पिंजऱ्यास शोभाही देणार नाहीं २. जी चांगली जात आहे, त्या जातीस जें शिकवावें तें ती ग्रहण करते व मग ती किंमतीस चढते ३. तुकाराम महाराज म्हणतात, हिजडे हे बायकांचा वेष जरी धारण करितात तरी ते बायका होऊं शकत नाहींत ४. [१००९]

थिल्लर अशा ओढ्याचे पाण्यांत राहून बेडूक हा समुद्राचा धिःकार करतो १. जें पाहिलें नाहीं व माहीतहि नाहीं

करी हांवा ॥ २ ॥ फुगतें काउळें । म्हणे मी राजहंसा आगळें ॥ ३ ॥ गजाहूनि खर । म्हणे चांगला मी फार ॥ ४ ॥ मुलाम्याचें नाणें । तुका म्हणे नव्हे सोनें ॥ ५ ॥ [१०१०]

मुक्त होता परि बळें झाला बद्ध । घेऊनियां छंद माझें माझें ॥ १ ॥ पाप पुण्य अंगीं घेतलें जडून । वर्म नेणे कोण करिता तो ॥ २ ॥ तुका म्हणे गेलें व्यर्थ वायां विण । जैसा मृग शीण मृगजळीं ॥ ३ ॥ [१०११]

पंढरीये माझें माहेर साजणी । ओंवियें(त्या) कांडणीं गाऊं गीतीं ॥ १ ॥ राही रखुमाई सत्यभामा माता । पांडुरंग पिता माहियेर ॥ २ ॥ उद्धव अक्रूर व्यास अंबऋषि । भाई नारदासी गौरवीन ॥ ३ ॥ गरुड बंधु लडिवाळ पुंडलिक । यांचे कवतुक वाटे मज ॥ ४ ॥ मज वहु गोत संत आणि महंत । नित्य आठवित ओंवियेसी ॥ ५ ॥ निवृत्ति ज्ञानदेव सोपान चांगया । जिवलगा माझिया नामदेवा ॥ ६ ॥ नागो जगमित्रा नरहरि सोनारा । रोहिदास कबिरा सोईरिया ॥ ७ ॥ परिसा भागवता सुरदास सांवता । गाईन नेणतां सकळांसी (सकळिकांसी) ॥ ८ ॥ चोखामेळा संत जिवाचे सोईरे । न पडे विसर यांचा घडी ॥ ९ ॥ जीवींच्या जीवना एका जनार्दना । पाठक हा कान्हा मिराबाई ॥ १० ॥ आणीकही संत महानुभाव मुनि । सकळां चरणीं जीव माझा ॥ ११ ॥ आनंदें ओंविया गाईन मी त्यांसी । जाती पंढरीसी वारकरी ॥ १२ ॥ तुका म्हणे माझा बळिया बापमाय । हर्षे नांदे सये घराचारी ॥ १३ ॥ [१०१२]

जाती पंढरीस । म्हणे जाईन तयास ॥ १ ॥ तया आहे संवसार । ऐसें बोले तो माहार ॥ २ ॥

त्याचेबद्दल हेवा धरून धिःकारपूर्वक (डरांव डरांव करीत) बटवट करतो २. कावळा आपल्या ठिकाणींच फुगारा धरून (गर्वानें फुगून) मी राजहंसापेक्षां श्रेष्ठ आहें असें म्हणतो ३. हत्तीपेक्षां मी पुष्कळ चांगलें आहें असें गाढव म्हणतें ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या नाण्यास सोन्याचा मुलामा दिला आहे तें नाणें खऱ्या सोन्याची बरोबरी करूं शकत नाहीं (ह्या दृष्टान्तांप्रमाणें धन, सत्ता, विद्वत्ता इत्यादिकांच्या मोठेपणामुळें स्वतःला मोठे समजून, परमार्थ करणाऱ्या आणि अनुभवी संतांना तुच्छ लेखितात, पण हा लौकिक मोठेपणा मुलाम्याच्या नाण्यासारखा आहे, हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं) ५. [१०१०]

जीवात्मा हा पूर्वी मुक्त असा शिव होता, पण पंचभूतात्मक देह मी आहें व देहसंबंधी माझे आहेत अशा आग्रहानें बद्ध झाला १. पापपुण्याचा कर्ता कोण आहे हें खरोखर न जाणतां त्याचा कर्ता मी आहें असें मानून आपण पापपुण्यात्मक कर्मांच्या ठायीं बद्ध होऊन राहिला २. तुकाराम महाराज म्हणतात, हरिण हें जसें खोट्या मृगजळास खरें जळ मानून त्याकरितां व्यर्थ श्रमी होतें (तसें देहादि मिथ्या प्रपंचाच्या मोहानें वर सांगितलेले मूर्ख लोक व्यर्थ जातात) ३. [१०११]

हे सखे साजणी बुद्धे, पंढरी हें माझें माहेर आहे. आतां आपण दळतां-कांडतांना (माझ्या माहेरच्या माणसां-संबंधींच ओंव्या) गाऊं १. माझ्या माहेरीं राही, रखमाबाई व सत्यभामा ह्या माझ्या माता आहेत व पिता पांडुरंग आहे २. उद्धव, अक्रूर, व्यास, अंबऋषि व नारद हे माझे बंधु आहेत. त्यांचा मीं गौरव करीन ३. गरुड व लाडका पुंडलिकराय हे माझे बंधु आहेत. ह्याचें मला कौतुक वाटतें ४. संत–महंतांचा मला पुष्कळ गोतावळा आहे त्यास मी नित्य ओव्यांनीं गाईन ५. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, चांगदेव व नामदेव हे माझे जिवलग आहेत ६. नागो जगमित्र (जगमित्र नागा), नरहरि सोनार, कबीर व रोहिदास हे माझे आवडते सोयरे आहेत ७. परिसा भागवत, सूरदास, सांवता माळी ह्या सर्वांना मी नेणतेपणानें (ह्या सर्वांचा अधिकार न जाणतां) गाईन ८. चोखामेळा हा संत माझे जिवाचा आवडता आहे. ह्याचा विसर एक घटकाभरहि पडूं नये ९. एकनाथ, जनार्दनस्वामी हे माझे जिवाचें जीवन आहे. तसेंच कान्हो पाठक व मिराबाई हीं आहेत १०. आणखींहि महानुभवी मुनि–संत आहेत; त्यांच्या सर्वांच्या चरणीं माझा जीव आहे ११. जे वारकरी पंढरीस जाणारे आहेत, त्यांना मीं आनंदानें ओंव्या गाईन १२. तुकाराम महाराज म्हणतात, हे सये बुद्धे, माझे आईबाप पांडुरंग बलाढ्य आहेत, त्यांचे गुण आनंदानें गाऊन मी घरांत सुखानें राहीन (माझा मायबाप पांडुरंग अस्ति-भाति-प्रियरूपानें चराचरामध्यें आनंदानें नांदत आहे) १३. [१०१२]

जे पंढरीस जातात अथवा न जातां पंढरीस जाऊं असें म्हणतात १. त्यांना संसार आहे असें जे म्हणतील ते महार

असो नसो भाव । जो देखे पंढरिराव ॥ ३ ॥ चंद्रभागे न्हाती । तुका म्हणे भलते याती ॥ ४ ॥ [१०१३]

धरियेलीं सोंगें । जेणें अवघीं पांडुरंगें ॥ १ ॥ तें हें ब्रह्म विटेवरी । उभें चंद्रभागे तीरीं ॥ २ ॥ अंतर्व्याप्य(पी) बाही । धांडोळितां कोठें नाहीं ॥ ३ ॥ योगयागतपें । ज्याकारणें दानजपें ॥ ४ ॥ दिलें नेदीजती । भोग सकळ ज्या होती ॥ ५ ॥ अवघी लीला पाहे । तुका म्हणे दासां साहे ॥ ६ ॥ [१०१४]

ज्याचे गर्जतां पवाडे । कळिकाळ पायां पडे ॥ १ ॥ तो हा पंढरीचा राणा । पुसा साहा चौं अठरां जणां ॥ २ ॥ चिंतितां जयासी । भुक्ति मुक्ति कामारी दासी ॥ ३ ॥ वैकुंठासी जावें । तुका म्हणे ज्याच्या नांवें ॥ ४ ॥ [१०१५]

ज्याचे गर्जतां पवाडे । श्रुतिशास्त्रां मौन्य (मौन) पडे ॥ १ ॥ तेथें माझी वाचा किती । पुरे करावया स्तुती ॥ २ ॥ शिणलीं सहस्र तोंडें । शेषफणीऐसें धेंडें ॥ ३ ॥ तुका म्हणे मही । पत्र सिंधु न पुरे शाई ॥ ४ ॥ [१०१६]

देव राखे तया मारील कोण । न मोडे कांटा हिंडतां वन ॥ १ ॥ न जळे न बुडे नव्हे कांहीं । विष तेंही अमृत पाही ॥ २ ॥ न चुके वाट न पडे फंदीं । नव्हे कधीं यमबाधा ॥ ३ ॥ तुका म्हणे नारायण । येतां गोळ्या वारी बाण ॥ ४ ॥ [१०१७]

कोठें गुंतलासी द्वारकेच्या राया । वेळ कां सखया लावियेला ॥ १ ॥ दिनानाथ ब्रीद सांभाळीं आपुलें । नको पाहों केलें पापपुण्य ॥ २ ॥ पतितपावन ब्रीदें चराचर । पातकी अपार उद्धरीले ॥ ३ ॥

आहेत. २. भाव असो अगर नसो, परंतु जो पांडुरंगास पाहातो त्यास संसार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, चंद्रभागेमध्यें पाहिजे त्या जातीचे जन स्नान करतात त्यांस संसार नाहीं ४. [१०१३]

ह्या पांडुरंगानें नानाप्रकारचे अवतार घेतले आहेत १. तेंच ब्रह्म चंद्रभागेच्या तीरीं विटेवर उभें आहे २. तेंच सर्वांच्या अंतर्बाह्य भरलेलें असून शोधूं लागलें असतां मुळींच कोठेंहि सांपडत नाहीं ३. योग, यज्ञ, तप, दान व जप इत्यादि साधनें त्याच्या प्राप्तीकरतां आहेत ४. कोणीं अर्पण केलेले व अर्पण न केलेले सर्व भोग तोच भोगीत आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, (तो जगांतील सर्व हालचाली पाहातो. जगाची उत्पत्ति, स्थिति आणि प्रलय ही त्याची लीला आहे व भक्तांना तो साह्य करतो) आपल्या दासांना साह्य करणें हीच त्याची संपूर्ण लीला आहे असें समज ६. [१०१४]

ज्या श्रीहरीच्या कीर्तीची वाणीनें गर्जना केली असतां त्याच्या पायां कळिकाळ पडतो १. असा हा पंढरीचा राजा आहे हें तुम्हीं सहा शास्त्रें, चारी वेद व अठरा पुराणें ह्यांस विचारा (व खात्री करून घ्या) २. ज्याचें चिंतन करण्यानें भोग व मोक्ष हे भक्ताचें दास्यत्व पत्करतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचें नांव घेतल्यानें वैकुंठ प्राप्त होतो ४. [१०१५]

श्रुति (वेद) व शास्त्रें हीं श्रीहरीची कीर्ति वर्णन करतां करतां मुकीं (स्तब्ध) झालीं १. त्या ठिकाणीं स्तुति करण्यास माझी वाणी किती पुरी पडेल? २. शेषाचीं हजार तोंडें ज्याचें वर्णन करतां करतां जेथें थकलीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या श्रीहरीचें यश लिहावयास लागलें तर पृथ्वीएवढा कागद व समुद्राएवढी शाई पुरणार नाहीं ४. [१०१६]

ज्याचें रक्षण करण्यास देव तयार आहे त्याला कोण मारणार आहे? कांट्यांनीं भरलेल्या वनांतून अनवाणी फिरला तरीहि त्याचे पायास कांटा मोडणार नाहीं? १. तो अग्नीनें जाळला जाणार नाहीं व पाण्यानें बुडला जात नाहीं. त्यास मारण्याचा हेतूनें कोणी त्यास विष दिलें तरी तें त्यास अमृतवत्च होतें २. तो वाट चुकत नाहीं व कोणत्याही फंदांत पडत नाहीं व त्यास यमबाधा केव्हांहि होत नाहीं. ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांच्यावर येणाऱ्या (शत्रूच्या) गोळ्या व बाणांचें विघ्न नारायण निवारण करतो ४. [१०१७]

हे द्वारकेच्या राजा, सखया, मला भेटण्यास विलंब कां लाविलास? असा तूं कोठें गुंतला आहेस? १. दीनांचें उद्धरण करणें हें आपलें ब्रीद सांभाळ. माझें पापपुण्य पाहूं नको २. पतितांस पावन करणें हें चराचर जगतांत तुझें ब्रीद आहे.

तुकयाबंधु म्हणे द्रौपदीचा धांवा । केला तैसा मला पावें आतां ॥ ४ ॥ [१०१८]

कोठें गुंतलासी कोणाच्या धांवया । आली देवराया निद्रा तुज ॥ १ ॥ कोठें गुंतलासी भक्तिप्रेमसुखें । न सुटती मुखें गोपिकांचीं ॥ २ ॥ काय पडिलें तुज कोणाचें संकट । दुरी पंथ वाट न चालवे ॥ ३ ॥ काय माझे तुज गुण दोष दिसती । म्हणोनि श्रीपती कोपलासि ॥ ४ ॥ काय झालें सांग माझिया कपाळा । उरला जीव डोळां तुका म्हणे ॥ ५ ॥ [१०१९]

परस्त्रीतें म्हणतां माता । चित्त लाजवितें चित्ता ॥ १ ॥ काय बोलोनियां तोंडें । मनामाजी कानकोंडें ॥ २ ॥ धर्मचारिष्ट गोष्टी सांगे । उष्ट्या हातें नुडवी काग ॥ ३ ॥ जें जें कर्म वसे अंगीं । तें तें आठवे प्रसंगीं ॥ ४ ॥ बोले तैसा चाले । तुका म्हणे तो अमोल ॥ ५ ॥ [१०२०]

असत्य वचन होतां सर्व जोडी । जरी लक्षघडी परउपकार ॥ १ ॥ जाईल पतना यासि संदेह नाहीं । साक्ष आहे कांहीं सांगतों ते ॥ २ ॥ वदविलें मुखें नारायणें धर्मा । अंगुष्ठ त्या कर्मासाठीं गेला ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां सांभाळा रे पुढें । अंतरींचें कुडें देईल दुःख ॥ ४ ॥ [१०२१]

जळो तिचें तोंड । ऐसी कां ते व्याली रांड ॥ १ ॥ सदा भोवयांसी गांठी । क्रोधें धडधडीत पोटीं ॥ २ ॥ फोडिली गोंवरी । ऐसी दिसे तोंडावरी ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं । चित्ता समाधान कांहीं ॥ ४ ॥ [१०२२]

तोंडें खाये फार । पादे बोचा करी मार ॥ १ ॥ एक ऐसे ते शहाणे । आपुलें अधीन तें नेणे ॥ २ ॥ कुले घालूनि उघडे । रागें पाहे लोकांकडे ॥ ३ ॥ खेळे द्यूतकर्म । मग बोंबली जुलूम ॥ ४ ॥

त्याप्रमाणें तूं आजवर अनेक पातकी उद्धरले आहेस ३. तुकाराम महाराजांचा बंधु कान्होबा म्हणतो, ज्याप्रमाणें तुम्ही द्रौपदीच्या धांव्यास धांवून गेलांत तसे मजकरतां धांवून या ४. [१०१८]

हे देवराजा, तूं कोणाचा धांवा मनांत घेऊन धांवलास अथवा तुला झोंप लागली कीं काय? १. किंवा भक्तांच्या प्रेमांत गुंतलास कीं काय? अथवा गोपींचीं मुखें पाहाण्यांत गुंग झालास कीं काय? २. देवा, तूं कोणाच्या संकटाचें उद्धरण करण्यांत गुंतलास? अथवा माझी भेट घेण्याकरितां तुला दूर यावें लागतें म्हणून तुला चालवत नाहीं कीं काय? ३. किंवा माझे गुणदोष पाहून श्रीपति, तूं रागावलास काय? ४. तुकाराम महाराज म्हणतात, तूं भेट देऊं नयेस असें माझें प्रारब्ध (दैव) हीन आहे कीं काय तें सांग. तुझी वाट पाहातां पाहातां माझा जीव डोळ्यांत आला आहे ५. [१०१९]

दुसऱ्याचे बायकोस आपली माता म्हणतांना ज्याचें चित्तच चित्तास लाजवितें १. मनांत कपट धरून तोंडानें परस्त्री माता म्हणण्यांत काय अर्थ आहे? २. धर्माविषयीं मोठ्या धैर्याच्या गोष्टी सांगतो पण स्वतः नुसत्या उष्ट्या हातानें कावळाहि हांकीत नाहीं ३. त्याचें कारण, केलेलें पापकर्म प्रसंगीं उभें राहातें (त्याला आठवतें) ४. तुकाराम महाराज म्हणतात, जो बोलल्याप्रमाणें वर्तन ठेवितो तो नर अमोल आहे (त्याची योग्यता फार मोठी आहे) ५. [१०२०]

जरी लक्षासारखी परोपकारादिकाची जोड लाभत आहे अगर सर्व लाभ होत आहेत, तरी खोटें बोलूं नये १. कारण खोटें बोलणारा हा निःसंशय पतनास जाईल ह्याविषयींचा पूर्वींचा पुरावा सांगतों २. स्वतः नारायणानें (अश्वत्थामा मेला–माणूस असेल किंवा हत्ती असेल–) नरो वा कुंजरो वा असें धर्माकडून द्रोणाचार्यापाशीं खोटें बोलविलें, त्यायोगानें धर्म स्वर्गीं जात असतां त्याचा एक आंगठा गळून पडला ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे जन हो, आतां ह्यापुढें तरी खऱ्याचा सांभाळ करा. अंतःकरणांतील खोटा भाव अखेर तुम्हांस दुःख देईल ४. [१०२१]

तिच्या तोंडास आग लागो, कारण अशा ह्या दुष्टास त्या रांडेनें कां जन्म दिला? १. सदा ज्याचे भुंवयांस आंठ्या आहेत आणि हृदयांत क्रोधाग्नि भडकत आहे २. ज्याच्या तोंडावर फुटलेल्या गोवरीची कळा आली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या दुष्टाचे चित्तास कधींहि समाधान असत नाहीं ४. [१०२२]

जो तोंडानें आपल्या अदमासाबाहेर खातो त्याचें ढुंगण पादण्याचा मारा करतें १. कित्येक असे शाहाणे आहेत कीं स्वतःचीं इंद्रियें आपले स्वाधीन ठेवावींत हें ते जाणत नाहींत २. आपले कुले उघडे टाकतो व तें पाहून कोणीं हंसला तर त्याजवर तो रागावतो ३. द्यूतकर्म खेळून पैसे गमावल्यावर अन्याय झाला म्हणून बोंबलत बसतो ४.

निजतां आला मोहो । वीतां म्हणे मेला गोहो ॥ ५ ॥ तुका म्हणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी ॥ ६ ॥ [१०२३]

पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती । सर्व भावें पति ध्यानीं मनीं ॥ १ ॥ तैसें माझें मन एकविध झालें । नावडे विठ्ठलेविणें दुजें ॥ २ ॥ सूर्यविकासिनी नेघे चंद्रकळा । गाय ते कोकिळा । वसंतेसी ॥ ३ ॥ तुका म्हणे बाळ मातेपुढें नाचे । बोल आणिकांचे नावडती ॥ ४ ॥ [१०२४]

पंडित म्हणतां थोर सुख । परि तो (पाहतां) अवघाचि मूर्ख ॥ १ ॥ काय करावें घोकिलें । वेदपठण वायां गेलें ॥ २ ॥ वेदीं सांगितलें तें न करी । सम ब्रह्म नेणे दुराचारी ॥ ३ ॥ हाच देखे जीव शिव । तुका तेथींचा अनुभव (हा वेदींचा अनुभव । तुका देखे जीव शिव) ॥ ४ ॥ [१०२५]

पंडित तो (तोचि एक) भला । नित्य भजे जो विठ्ठला ॥ १ ॥ अवघें सम ब्रह्म पांहे । सर्वां भूतीं विठ्ठल आहे ॥ २ ॥ रिता नाहीं कोणी ठाव । सर्वां भूतीं वासुदेव ॥ ३ ॥ तुका म्हणे तोचि दास । त्या देखिल्या जाती दोष ॥ ४ ॥ [१०२६]

ऐका पंडितजन । तुमचे वंदितों चरण ॥ १ ॥ नका करूं नरस्तुती । माझी परिसा हे विनंति ॥ २ ॥ अन्न आच्छादन । हें तों प्रारब्धा आधीन ॥ ३ ॥ तुका म्हणे वाणी । सुखें वेंचा नारायणीं ॥ ४ ॥ [१०२७]

विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी । विठ्ठल तोंडीं उच्चारा ॥ १ ॥ विठ्ठल अवघ्या भांडवला । विठ्ठल बोला विठ्ठल ॥ २ ॥ विठ्ठल नाद विठ्ठल भेद । विठ्ठल छंद विठ्ठल ॥ ३ ॥ विठ्ठल सुखा विठ्ठल दुःखा । तुकया मुखा विठ्ठल ॥ ४ ॥ [१०२८]

पतिसुखाच्या समयीं ज्या स्त्रीस सुख वाटतें व प्रसूतिसमयास ती (पति कां मेला नाहीं, काय हा त्यानें त्रास करून ठेवला, अशा प्रकारें) पतीस शिव्या देते ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा मनुष्यांनीं आपले जन्माचा नाश केला ६. [१०२३]

पतिव्रता स्त्री ही पतीवांचून दुसऱ्यांची स्तुति जाणत नाहीं. ती सर्वभावानें पतीच्या ठिकाणीं अनन्य असते १. त्याप्रमाणें माझें मन अनन्य झालें असून मला एका विठ्ठलावांचून दुसरें कांहीं प्रिय नाहीं २. सूर्यविकासी कमलें चंद्राच्या प्रकाशानें विकसित होत नाहींत. कोकिळा अन्य ऋतूंचा त्याग करून फक्त वसंत ऋतूमध्येंच गायन करतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, बालक हें मातेपुढें प्रेमानें नाचतें. त्यास मातेवांचून इतरांचे शब्द मुळींच आवडत नाहींत ४. [१०२४]

सर्व जाणतेपणा अंगांत आणून त्यास जर कोणी पंडित म्हटलें तर फार सुख वाटतें, परंतु विचार करून पाहिलें असतां तो सर्वतोपरी मूर्ख जाणावा १. त्या पंडितानें वेद घोकून पाठ केले, परंतु त्यांतील गव्हर (अर्थ) तो जाणत नाहीं, म्हणून त्याचें वेदपठण करणें व्यर्थ गेलें २. कारण वेदांनीं सांगितलें आहे कीं सर्व भूतांचे ठिकाणीं सम ब्रह्म पाहावें, आणि तो तर वेदांचा पूर्ण अर्थ जाणत नाहीं म्हणून त्यास दुराचारी असें म्हणावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, वेदांतील मुख्य अनुभव जीव-शिव एकरूप मानावे, तो अनुभव मला प्रत्यक्ष आहे ४. [१०२५]

विठोबारायाला जो नित्य भजतो त्यालाच भला पंडित असें म्हणावें १. सर्व भूतांचे ठिकाणीं विठ्ठल हें ब्रम्ह व्यापलेले आहे असें जो समत्वानें पाहातो २. वासुदेवावांचून रिकामें ठिकाण कोणतेंच नाहीं; सर्व भूतांचे ठिकाणीं त्याचें वास्तव्य आहे असें जो जाणतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, तोच विठ्ठलाचा खरा दास आहे. त्याचें दर्शन झालें असतां दोषी लोकांचे दोष जातात ४. [१०२६)

अहो पंडित जन, मी तुमचे चरण वंदन करून जें सांगतों तें ऐका १. एका देवावांचून इतरांची (केवळ उदर-निर्वाहासाठीं क्षुद्र मनुष्यांची) स्तुति करूं नका, ही माझी विनंति तुम्हांला आहे. २ अन्नवस्त्र प्रारब्धकर्माप्रमाणें मिळत असतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, नारायणाच्या नामस्मरणामध्यें तुम्हीं आपले वाणीचा व्यय करा ४. [१०२७]

अहो जन हो, तुम्हीं हातांमध्यें टाळ वीणा घेऊन विठ्ठलनामाचा उच्चार मुखानें करा आणि टाळवीणा विठ्ठलरूप माना १. सर्व भांडवलाला कारण एक विठ्ठल आहे म्हणून तुम्हीं वाचेनें विठ्ठल विठ्ठल असें म्हणा २. नाद व भेद जेवढे आहेत तेवढे विठ्ठलरूप माना आणि विठ्ठलाचा छंद लागूं द्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, सुखाचे वेळीं व दुःखाचे वेळीं मी विठ्ठलाला आठवितों म्हणून सर्व काळ माझे मुखांत विठ्ठल आहे ४. [१०२८]

काय तुझें वेंचे मज भेटी देतां । वचन बोलतां एक दोन ॥ १ ॥ काय तुझें रूप घेतों मी चोरोनि । त्या भेणें लपोनि राहिलासी ॥ २ ॥ काय तुझें आम्हां करावें वैकुंठ । भिवों नको भेद आतां मज ॥ ३ ॥ तुका म्हणे तुझी न लगे दसोडी । परि आहे आवडी दर्शनाची ॥ ४ ॥ [१०२९]

संतनिंदा ज्याचे घरीं । नव्हे घर ते यमपुरी ॥ १ ॥ त्याच्या पापा नाहीं जोडा । संगें जना होय पीडा ॥ २ ॥ संतनिंदा आवडे ज्यासी । तो जिताची नर्कवासी ॥ ३ ॥ तुका म्हणे नष्ट । जाणा गाढव तो स्पष्ट ॥ ४ ॥ [१०३०]

आलें देवाचिया मना । तेथें कोणाचें चालेना ॥ १ ॥ हरिश्चंद्र ताराराणी । वाहे डोंबा घरीं पाणी ॥ २ ॥ पांडवांचा साहाकारी । राज्यावरूनि केलें दुरि ॥ ३ ॥ तुका म्हणे उगेचि राहा । होईल तें सहज पाहा ॥ ४ ॥ [१०३१]

निजल्यानें गातां उभा नारायण । बैसल्या कीर्तन करितां डोले ॥ १ ॥ उभा राहोनियां मुखीं नाम वदे । नाचे हा गोविंद नाना छंदें ॥ २ ॥ मारगीं चालतां मुखीं नाम वाणी । उभा चक्रपाणी मागें पुढें ॥ ३ ॥ तुका म्हणे यासी कीर्तनाची गोडी । प्रेमें घाली उडी नामासाटीं ॥ ४ ॥ [१०३२]

काम क्रोध आम्हीं वाहिले विठ्ठलीं । आवडी धरिली पायांसवें ॥ १ ॥ आतां कोण पाहे मागें परतोनि । गेले हारपोनि देहभाव ॥ २ ॥ रिद्धिसिद्धी सुखें हाणितल्या लाता । तेथें या प्राकृता कोण मानी ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही विठोबाचे दास । करूनि ठेलों ग्रास ब्रह्मांडाचा ॥ ४ ॥ [१०३३]

हे देवा! तूं मला भेट दिलीस व माझ्याबरोबर एक दोन गोष्टी बोललास तर तुझें कांहीं वेंचेल काय? १. तुझें रूप मीं पाहिलें असतां त्यांतील कांहीं चोरून घेईन असें भय वाटून तूं लपून राहिलास कीं काय? २. तुझें मुख्य स्थान वैकुंठ मीं मागत नाहीं. तें मला काय करावयाचें आहे? तूं भिऊं नको. मला भेट दे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझी आम्हांला एक दशी सुद्धां नको, पण तुझ्या दर्शनाची मला विशेषेंकरून आवड आहे ४. [१०२९]

जो कोणी संतनिंदा करितो त्याचें घर प्रत्यक्ष यमपुरी आहे असें समजावें १. त्या पाप्याला दुसरा पातक करणारा जोडीदार मिळणार नाहीं आणि त्याच्या संगतीनें सर्व जनांस पीडा होते २. ज्या इसमाला संतनिंदेची आवड आहे तो जिवंत असून नरकवास भोगतो असें जाणावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा जो निंदा करणारा तो केवळ नष्ट, गाढव आहे असें मीं उघड सांगतों ४. [१०३०]

कोणतीही गोष्ट करण्याचें जर देवाच्या मनास आलें तर त्या ठिकाणीं कोणाचें चालणार नाहीं १. ह्यास मागील पुरावा असा, कीं हरिश्चंद्र राजा व तारामती राणी हीं मोठीं सत्वशील असून अंत्यज डोंबाचे घरीं त्यांना देवांनीं पाणी वाहायास लावलें २. हा देव पांडवांचा साह्य करणारा सखा असूनहि त्यांस त्यानें राज्यभ्रष्ट केलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां अहो जन हो, तुम्हीं देवावर विश्वास ठेवून निश्चळपणें असा व त्याचे इच्छेनें जें काय सहज होईल तें पाहा ४. [१०३१]

निजलें असतां नामस्मरण करील, तर नारायण आपल्याजवळ उभा राहातो व आसनावर बसून चिंतन केलें असतां तो आनंदानें डोलूं लागतो १. जो कोणी उभा राहून मुखानें नामोच्चार करितो, त्या योगानें नाना छंदानें हा गोविंद नाचूं लागतो २. मार्गानें चालत असतां मुखानें अखंड नामस्मरण करणाऱ्यांच्या मागेंपुढें रक्षणाकरितां चक्रपाणि उभा असतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाला कीर्तनाची फार आवड आहे म्हणून त्या ठिकाणीं तो आपल्या नामाकरितां प्रेमानें उडी घालतो ४. [१०३२]

आम्हीं आपले कामक्रोध विठ्ठलाचे ठिकाणीं समर्पण करून त्याच्या पायांची आवड धरली आहे १. त्या कारणानें आमचें देहभान नाहींसें झालें. आतां आम्हांला मागें परतून संसाराकडे पाहाण्याचें काय कारण? २. हरीच्या सुखामध्यें निमग्न झाल्यामुळें जर ऋद्धिसिद्धीलादेखील तुच्छ केलें, तर ह्या प्राकृत संसासाराला कोण मानतो? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं विठोबारायाचे दास झालों आहोंत, म्हणून सर्व ब्रह्मांडाचा ग्रास करून आनंदानें राहिलों ४. [१०३३]

उठाउठीं अभिमान । जाय ऐसें स्थळ कोण ॥ १ ॥ तें या पंढरीस घडे । खळां पाझर रोकडे ॥ २ ॥ नेत्रीं अश्रूंचिया धारा । कोठें रोमांच शरीरा ॥ ३ ॥ तुका म्हणे काला । कोठें अभेद देखिला ॥ ४ ॥ [१०३४]

पंढरी पंढरी । म्हणतां पापाची बोहरी ॥ १ ॥ धन्य धन्य जगीं ठाव । होतो नामाचा उत्साव ॥ २ ॥ रिद्धिसिद्धी लोटांगणीं । प्रेमसुखाचिया खाणी ॥ ३ ॥ अधिक अक्षरानें एका । भूवैकुण्ठ म्हणे तुका ॥ ४ ॥ [१०३५]

भार घालीं देवा । न लगे देश डोई घ्यावा ॥ १ ॥ देह प्रारब्धा आधीन । सोसें अधिक वाढे सीण ॥ २ ॥ व्यवसाय निमित्त । फळ देतसे संचित ॥ ३ ॥ तुका म्हणे फिरे । भोवंडीनें दम जिरे ॥ ४ ॥ [१०३६]

भोग भोगावरी द्यावा । संचिताचा करूनी ठेवा ॥ १ ॥ शांती धरणें जिवासाठीं । दशा उत्तम गोमटी ॥ २ ॥ देह लेखावा असार । सत्य पर उपकार ॥ ३ ॥ तुका म्हणे हे मिरासी । बुडी द्यावी ब्रह्मरसीं ॥ ४ ॥ [१०३७]

येथें बोलोनियां काय । व्हावा गुरु तरि जाय ॥ १ ॥ मज न साहे वांकडें । ये विठ्ठलकथेपुढें ॥ २ ॥ ऐकोनी मरसी वृथा । जंव आहेसि तूं जिता ॥ ३ ॥ हुरमतीची चाड । तेणें न करावी बडबड ॥ ४ ॥ पुसेल कोणी त्यास । जा रे करीं उपदेश ॥ ५ ॥ आम्ही विठ्ठलाचे वीर । फोडूं कळिकाळाचें शीर ॥ ६ ॥ घेऊं पुढती जन्म । वाणूं कीर्त मुखें नाम ॥ ७ ॥ तुका म्हणे मुक्ती ।

उभाउभीं (तात्काळ) अभिमान जाणारें असें एखादें स्थळ आहे काय? १. तें स्थळ पंढरपूर आहे. त्या ठिकाणीं गेलें असतां तात्काळ अभिमान जातो आणि दुष्टांच्या हृदयाला प्रत्यक्ष द्रव येतो २. नेत्रांमधून आनंदाश्रु वाहाणें व सर्व अंगावर रोमांच उभे राहाणें हे प्रकार दुसरीकडे आहेत काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरिचिंतनाचा अभेदानें (अभेदरूप) काला तुम्हीं कोठें पाहिला काय? ४. [१०३४]

जो कोणी पंढरीच्या नामाचा उच्चार करील त्याच्या सर्व पापांचें दहन होईल १. जगतामध्यें पंढरी हें स्थळ धन्य आहे (असें द्विवार सांगतों.) त्या ठिकाणीं सतत नामाचा उत्साह होत आहे २. पंढरपूर हें केवळ प्रेमसुखाची खाण आहे, तेथें वास करणाऱ्याला ऋद्धिसिद्धि लोटांगण घालतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें पंढरपूर भूमीवर प्रत्यक्ष वैकुंठ आहे आणि वैकुंठापेक्षां त्याचे नांवांत एक अक्षर जास्त आहे (म्हणून त्यास भूवैकुंठ म्हणतात) ४. [१०३५]

अहो जन हो, तुम्हीं आपला सर्व भार देवावर घालून राहा. निर्वाहाकरितां देशोधडी होऊं नका १. हा देह प्रारब्धकर्माचे स्वाधीन आहे म्हणून जों जों सोस कराल तों तों अधिक श्रमी व्हाल २. व्यापार करणें हें निमित्ताला कारण आहे, पण फल मिळावयाचें तें प्रारब्धाप्रमाणें मिळतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हीं देशोधडी फिराल तर ज्याप्रमाणें (आपल्याभोंवतीं हौसेनें गरगर फिरण्यानें) भोंवंड येऊन दम नाहींसा होतो, त्याप्रमाणें तुम्हांस होईल (प्रपंचामध्यें जो काबाडकष्ट करतो त्याची हौस परिणामीं जिरून जाते) ४. [१०३६]

अहो जन हो, जसें प्रारब्ध असेल त्याप्रमाणें भोग मिळतो तो प्रारब्धाचा भोग प्रारब्धाकडे लावावा १. जीवाचा मोबदला करून (जीवभाव नाहींसा करून ब्रह्मस्थितीनें असणें) शांति धरावी ही अवस्था उत्तम आहे २. लोकांवर उपकार करणें हेंच खरें आहे आणि आपल्या देहाला नाशिवंत आहे असें समजावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, शांति हीच आपली मिरास आहे असें जाणून ब्रह्मरसाचे ठिकाणीं बुडी घ्यावी ४. [१०३७]

(कोणीं एकानें मला उपदेश करा म्हणून कीर्तनांत विनंति केली. त्यास तुकोबाराय उत्तर देतात)—तुला जर गुरु पाहिजे तर तूं येथून निघून चालता हो. ह्या कीर्तनामध्यें बोलून काय उपयोग आहे? १. ह्या विठोबारायाच्या कथेपुढें तुझा असा वांकडा शब्द मला सहन होत नाहीं २. आजपर्यंत त्वां श्रवण करून जर त्याचा उपयोग झाला नाहीं तर तूं जिवंत असून व्यर्थ मेल्यासारखा आहेस ३. ज्याला आपल्या अब्रूची चाड आहे त्यानें अशा प्रकारची बडबड करूं नये ४. अरे, तुला कोणीं ब्रह्मज्ञान पुसेल त्यास तूं उपदेश करण्याकरितां जा ५. आम्हीं विठोबारायाचे प्रतापी वीर आहोंत. आमच्यापुढें जरी कळिकाळ आला तरि त्याचें मस्तक फोडूं ६. आम्हीं सर्व काळ मुखानें हरिकीर्तन करितों

नाहीं आसचि ये चित्तीं ॥ ८ ॥ [१०३८]

अनुहातीं गुंतला नेणे बाह्य रंग । वृत्ति येतां मग बळ लागे ॥ १ ॥ मदें माते तया नाहीं देहभाव । आपुले अवयव आवरितां ॥ २ ॥ आणिकांची वाणी वदे तेणें मुखें । उपचारदुःखें नाठवती ॥ ३ ॥ तें सुख बोलतां आश्चर्य या जना । विपरीत मना भासतसे ॥ ४ ॥ तुका म्हणे बाह्य रंग ते विटले (रंग जो विटला) । अंतरीं निवाले (निवाला) ब्रह्मरसें ॥ ५ ॥ [१०३९]

ब्रह्मरसगोडी तयासी फावली । वासना निमाली सकळ ज्याची ॥ १ ॥ नाहीं त्या विटाळ अखंड सोंवळा । उपाधि वेगळा जाणिवेच्या ॥ २ ॥ मन हें संचलें (निश्चळ) झालें एके ठायीं । तया उणें काई निजसुखा ॥ ३ ॥ पुण्यवंत तेच (तेचि पुण्यवंत) परउपकारी । प्रबोधी त्या नारी नर लोकां ॥ ४ ॥ तुका म्हणे त्यांचे पायीं पायपोस । होऊनियां वास करिन तेथें ॥ ५ ॥ [१०४०]

जैसें तैसें राहे देवाचें हें देणें । यत्न करितां तेणें काय नव्हे ॥ १ ॥ दासां कृपासिंधु नुपेक्षी सर्वथा । अंतरींची व्यथा कळे त्यासी ॥ २ ॥ मागों नेणे परी माय जाणे वर्म । बाळा नेदी श्रम पावों कांहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मज अनुभव अंगें । वचन वाउगें मानेना हें ॥ ४ ॥ [१०४१]

आम्हां हरिच्या दासां कांहीं । भय नाहीं त्रैलोकीं ॥ १ ॥ देव उभा मागें पुढें । उगवी कोडें संकट ॥ २ ॥ जैसा केला तैसा होय । धांवे सोय धरोनि ॥ ३ ॥ तुका म्हणे असों सुखें । गाऊं मुखें विठोबा ॥ ४ ॥ [१०४२]

ह्या सुखाकरितां आम्हीं वारंवार जन्म घेऊं आणि हेंच कर्तव्यकर्म करूं ७. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्या चित्तामध्यें मुक्तीची आशा नाहीं ८. [१०३८]

हृदयामध्यें एकसारखा सोहं सोहं असा जो ध्वनि होत आहे, त्यासच अनुहत ध्वनि म्हणतात. त्या ध्वनीच्या ठिकाणीं विचारानें ज्याची वृत्ति अंतर्मुख होऊन रंगली आहे, तिला बाह्य देहादि प्रपंचस्थितीवर आणण्यास कष्ट पडतात १. आनंदभराचे मदांत जो मस्त होऊन नाचत आहे, त्याला आपला देह व अवयव आवरण्याविषयींचा आठव नाहीं (ब्रह्मानंदांत ज्याची वृत्ति तद्रूप झाली असेल, त्याला देहाची प्रतीति येत नाहीं) २. ज्याच्या मुखानें सर्व प्रपंचविरहित असणाऱ्या परब्रह्माचेंच चिंतन होत आहे, त्याला बाह्य दुःखोपचारादिकांचा आठव होत नाहीं ३. ज्या सुखाच्या अनुभवांत वैषयिक सुखदुःखांचा संस्कार नाहींसा होतो त्या सुखाचें वाणीनें वर्णन केलें असतां जनांचे मनाला तें विपरीत भासून त्याचें आश्चर्य वाटतें ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्याला सर्व देहादि बाह्य रंगाचा वीट आला आहे व त्याचें अंतःकरण परब्रह्माच्या रसानें निवालें आहे ५. [१०३९]

ज्याची हृदयांतील प्रपंचाविषयींची समूळ वासना नाहींशी झाली आहे त्यालाच ब्रह्मरसाचे गोडीची प्राप्ति होते १. तो सर्व भेदभावाच्या विटाळांतून मुक्त होऊन स्वरूपस्थितीनें जाणीवेच्या उपाधिरहित होऊन सोंवळा झाला आहे २. ज्याचें मन एका परमात्म्याच्या ठिकाणीं स्थिर झालें आहे, त्याला निजात्मसुखाची काय उणीव आहे? ३. स्त्रीपुरुषांना परमार्थाची जागृति देतात तेच पुण्यवंत व परोपकारी आहेत ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच्या (अशा मुक्त पुरुषाच्या) पायांतील पायपोस होऊन मी तेथें वास्तव्य करीन ५. [१०४०]

आपण जशी भावना करूं, तसें देवाचें देणें असतें म्हणून सद्भावनेनें यत्न केला तर काय होणार नाहीं? १. कृपासिंधु देव दासांची सर्वथैव उपेक्षा करीत नाहीं; त्याला दासांचे अंतःकरणांतील होणारी व्यथा समजते २. आपल्यास जें पाहिजे असेल तें आईजवळ मागण्याचें लहान बालकास कळत नाहीं; तरी त्याचा हृदयभाव आई जाणते व त्याला कोणत्याहि तऱ्हेचें दुःख न होईल असें करिते ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा अनुभव मला स्वतःला आहे. ह्याविषयीं कोणी अन्यथा बोलेल तर तें मला कबूल होणार नाहीं ४. [१०४१]

आम्हां हरीच्या दासांना त्रैलोक्यामध्यें भय राहिलें नाहीं १. कारण आमच्या मागें व पुढें देव अनेक संकटांतून आमची सुटका करण्यासाठीं उभा आहे २. आपल्या भावनेनें देवाला जसें करावें (ज्या रूपानें चिंतावें) तसा तो होतो व भक्तांचें कार्य करण्याकरितां त्यांच्याकडे तो धांवत जातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं विठोबारायालाच मुखानें गाऊन ह्या जगांत सुखानें, निर्भयपणानें निरंतर राहूं ४. [१०४२]

परद्रव्य परनारीचा अभिलाष । तेथूनिया ऱ्हास सर्वभाग्या ॥ १ ॥ घटिका दिवस मास वर्षें लागती (लागे) तीन । बांधलें पतन गांठोडीस ॥ २ ॥ पुढें घात त्याचा रोकडा शकून । पुढें करी गुण निश्चयेंसी ॥ ३ ॥ तुका म्हणे एका त(थ)डताथवड । काळ लागे नाड परी खरा ॥ ४ ॥ [१०४३]

समर्थाचें केलें । कोणा जाईल मोडिलें ॥ १ ॥ वायां करावी ते उरे । खटपट सोस पुरे ॥ २ ॥ ठेविला जो ठेवा । आपुलाला तैसा खावा ॥ ३ ॥ ज्याचें त्याचे हातीं । भुंके तयाची (सी) फजिती ॥ ४ ॥ तुका म्हणे कोटी । वाळे (बाळे) झाले शूळ पोटीं ॥ ५ ॥ [१०४४]

देवा हे माझी मिराशी । ठाव तुझ्या पायांपाशीं ॥ १ ॥ याचा धरीन अभिमान । करीन आपुलें जतन ॥ २ ॥ देऊनियां जीव । वडिलें (लीं) साधिला हा ठाव ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । जुनाट हे माझी सेवा ॥ ४ ॥ [१०४५]

नेणें गति काय कवण अधोगति । मानिली निश्चिंती तुझ्या पायीं ॥ १ ॥ कर्म धर्म कोण नेणें हा उपाव । तुझ्या पायीं भाव ठेवियेला ॥ २ ॥ नेणें निरसूं पाप पुण्य नेणें काय । म्हणऊनि पाय धरिले तुझे ॥ ३ ॥ वेडा मी अविचारी न कळे विचार । तुज माझा भार पांडुरंगा ॥ ४ ॥ तुका म्हणे तुज करितां नव्हे काय । माझा तो उपाय कवण तेथें ॥ ५ ॥ [१०४६]

तुझा म्हणउनि झालों उतराई । त्याचें वर्म काई तें मी नेणें ॥ १ ॥ हातीं धरोनियां दावीं मज वाट । पुढें कोण नीट तेंचि देवा ॥ २ ॥ देवभक्तपण करावें जतन । दोन्हीं पक्षीं जाण तूंचि बळी ॥ ३ ॥ अभिमानें तुज लागलीसे (हे) लाज । शरणागता काज करावया ॥ ४ ॥

जो परद्रव्याचा, परनारीचा अभिलाष करतो त्याच्या सर्व भाग्याचा ऱ्हास होतो १. एका घटकेच्या अगर एका दिवसाच्या अथवा एका महिन्याच्या अगर तीन वर्षांच्या अवधींत पतनास जाणें हें तर त्याच्या पदरीं बांधलेलेंच आहे २. त्याचा पुढें घात होईल असें उघड चिन्ह दिसत आहे, कारण त्यानें जें कांहीं केलें त्याचें फळ त्याला पुढें निश्चयानें मिळालें पाहिजे ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका क्षणांत एखाद्याचा घात होतो, व कित्येकांचा नाश होण्यास कालांतर लागतें हें खरें, पण शेवटीं सर्वांचा नाश हा व्हायचाच ! ४. [१०४३]

जें समर्थांनीं केलें आहे, त्याचें उलंघन कोण करूं शकेल ? १. त्याचेविरुद्ध खटपट करण्याची इच्छा (हांव) केल्यास त्याप्रमाणें न घडतां अखेरीस श्रम फुकट होतात २. जशी आपण प्रारब्धकर्माची ठेव ठेविली असेल त्याप्रमाणेंच सुखदुःखाचा भोग घेतला पाहिजे ३. ज्याची जी वस्तु आहे ती त्याच्या हातांतच आहे. त्याचे विरुद्ध कोणी बडबडेल त्याची फजिती आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, (ज्यांनीं ज्यांनीं समर्थांची आज्ञा मोडली असे कोट्यवधि लोक बहिष्कृत–वाळे–झाले;) असे हे (बाळे) आपल्या आईबापाचे पोटीं शूळच जन्मले आहेत ५. [१०४४]

हे देवा ! तुझ्या पायांजवळ सदैव राहाणें ही माझी मिरास (वतन, हक्क) आहे १. मीं ह्याचा अभिमान धरून आपली मिरास जतन करीन २. आमच्या वडिलांनीं आपला जीव देऊन हा मिराशीचा ठाव मिळविला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमच्या पायांची सेवा करणें ही माझी वडिलार्जित जुनाट मिरास आहे ४. [१०४५]

हे देवा, उत्तम गति कोणत्या प्रकारची व अधोगति कोणत्या प्रकारची हें मीं जाणत नाहीं. तुझ्या पायांजवळ निश्चिंतपणें राहिलों आहें (म्हणजे निश्चिंती मानिली आहे) १. कर्म, धर्म कोणत्या प्रकारचीं आहेत व त्याविषयींचा उपाय काय आहे तें मीं जाणत नाहीं, पण मीं तुझ्या चरणारविंदीं भाव ठेविला आहे २. पापाचें निरसन करणें व पुण्य कोणत्या प्रकारचें आहे तें मला समजत नाहीं, म्हणून मीं तुझे पाय धरले आहेत ३. मी केवळ वेडा अविचारी आहें म्हणून मला तुमची प्राप्ति होण्याचा विचार कळत नाहीं. ह्याकरितां हे पांडुरंगा, मीं सर्व भार तुम्हांवर टाकिला आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्हीं केलें असतां काय होणार नाहीं ? त्या ठिकाणीं माझा उपाय काय चालणार आहे ? ५. [१०४६]

हे देवा, तुझे उपकार फेडण्यासाठीं म्हणून तुझा उतराई झालों. ह्यावांचून उपकार फेडण्याचें वर्म मीं जाणत नाहीं १. आतां मला हाताला धरून पुढें चांगली वाट असेल ती कृपा करून दाखवा २. स्वामिसेवकपणा हा तुम्हीं जतन करा, कारण उभयपक्षीं साहाय्यकारी तुम्हींच आहांत, असें समजा ३. आपल्या शरणागतांचें कार्य करण्याचाच

तुका म्हणे बहु नेणता मी फार । म्हणउनि विचार जाणविला ॥ ५ ॥ [१०४७]

मारगीं चालतां पाउलापाउलीं । चिंतावी माउली पांडुरंग ॥ १ ॥ सर्व सुख लागे घेउनियां पाठी । आवडीचा कंठीं रस ओती ॥ २ ॥ पीतांबर छाया करी लोभापर । पाहे तें उत्तर आवडीचें ॥ ३ ॥ तुका म्हणे हेंचि करावें जीवन । वाचे नारायण तान भूक ॥ ४ ॥ [१०४८]

झालों आतां दास । माझे तोडोनियां पाश ॥ १ ॥ ठाव द्यावा पायापाशीं । मी तों पातकांची राशी ॥ २ ॥ सकलही गोवा । माझा उगवूनि देवा ॥ ३ ॥ तुका म्हणे भय । करा जवळी तें नये ॥ ४ ॥ [१०४९]

अंतरींचें जाणां । तरि कां येऊं दिलें मना ॥ १ ॥ तुमची करावी म्यां सेवा । आतां अव्हेरितां देवा ॥ २ ॥ नव्हती मोडामोडी । केली मागें तेचि घडी ॥ ३ ॥ तुका म्हणे दिला ठाव । पायीं लागों दिला भाव ॥ ४ ॥ [१०५०]

पवित्र होईन चरित्रउच्चारें । रुपाच्या आधारें गोजिरिया ॥ १ ॥ अपुरती बुद्धि पुण्य नाहीं गांठीं । पायीं घालीं मिठी पाहें डोळां ॥ २ ॥ गाईन ओंविया शिष्टांच्या आधारें । सारीन विचारें आयुष्या या ॥ ३ ॥ तुका म्हणे तुझें नाम नारायणा । ठेविन मी मना आपुलिया ॥ ४ ॥ [१०५१]

काय ऐसा जन्म जावा वायांविण । कांहीं तरी ऋण असो माथां ॥ १ ॥ कोणे तरी काळें होईल आठव । नाहीं जरी भाव भार खरा ॥ २ ॥ शता एका तरी जन्माच्या शेवटीं । कृपाळुवा पोटीं येईल दया ॥ ३ ॥ तुका म्हणे तरी नाहीं फांकों देत । सर्वांचें उचित सांपडलें ॥ ४ ॥ [१०५२]

अभिमान तुम्हीं धरला आहे, म्हणून त्यांत कांहीं कमी पडल्याची लाज तुम्हांला आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी फार फार नेणता आहें म्हणून अशा प्रकारचा विचार तुम्हांला कळविला ५. [१०४७]

मार्गानें चालत असतां पावलों पावलीं पांडुरंग माउलीचें चिंतन करावें १. म्हणजे तो देव आपलें सर्व सुख घेऊन चिंतन करणाऱ्याच्या मागें लागतो आणि आपले आवडीचा रस (नाम) त्याचे कंठामध्यें ओततो २. त्या भक्तावर आपल्या पीतांबराची छाया लोभानें करितो आणि त्याच्या मुखावाटे आवडीचीं उत्तरें काय येतात तें ऐकण्याविषयीं त्याच्या मुखाकडे पाहातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, वाचेनें सर्वकाळ नारायण गावा व त्याचेंच नाम आपलें जीवन करावें म्हणजे तहान-भुकेची आठवण होणार नाहीं ४. [१०४८]

हे देवा, मी तुझा दास झालों आहें, आतां माझे संसारासंबंधीं सर्व पाश तोडून टाका १. आणि मी पातकाची राशी आहें म्हणून मला तुमचे पायांजवळ आश्रय द्या २. हे देवा, प्रपंचगुंताडा सर्व उलगडून मला मोकळें करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, जन्ममृत्यूचें भय माझ्याजवळ कधींच येऊं नये असें करा ४. [१०४९]

हे देवा, माझे मनांतील सर्व तुम्हीं जाणत आहांत; तर तुम्हीं तुमचे मनांत असें कां येऊं दिलें? १. मी तुमची सेवा करीत असतांना, आतां माझा अव्हेर कां केला? २. पूर्वी एकत्वामध्यें असून सेव्यसेवकपणा निर्माण केला, त्याच घटकेला मोडातोडी (मोडतोड) केली असती तरी बरें होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमचा भाव तुमचे पायांजवळ लागूं दिला, आणि आम्हांला तेथें ठाव दिला (आतां अव्हेर करणें उचित नाहीं) ४. [१०५०]

हे देवा, तुमच्या सगुण सुंदर स्वरूपाचें चरित्र गाईन व त्या योगानें मी पवित्र होईन १. माझी बुद्धि अपूर्ती आहे व कोणत्याहि प्रकारचें पुण्य माझे पदरीं नाहीं, म्हणून तुमचे पायांस मिठी घालून श्रीमुख डोळे भरून पाहातों २. पूर्वीचे जे शिष्ट होऊन गेले त्यांच्या ग्रंथांच्या आधारानें मीं तुम्हांला ओंव्या गाईन आणि ह्या विचारामध्यें आयुष्य घालवीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, तुमचें नाम मीं आपल्या मनामध्यें ठेवीन ४. [१०५१]

असा मनुष्यजन्म व्यर्थ जावा काय? म्हणून आपल्या मस्तकावर कांहीं तरी देवाचें सेवाऋण असावें १. म्हणजे देवाला कोणत्या तरी काळीं मजविषयी आठवण होईल. माझा भाव जरी खरा नाहीं, तरी मीं देवावर खरोखर भार घातला आहे २. माझी दया आज जरी आली नाहीं, तरी शंभर जन्मांचे शेवटीं ती कृपाळु देवाचे पोटीं येईल असा भरंवसा आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वांमध्यें योग्य (श्रेष्ठ) जी भगवत्-उपासना ती सांपडली आहे, तरी तिजपासून मीं आपलें चित्त फांकूं देणार नाहीं (इकडे तिकडे जाऊं देणार नाहीं) ४. [१०५२]

नाहीं कोणी दिस जात वायांविण । साध्य नाहीं सीण लटिकाची ॥ १ ॥ एकाचिये माथां असावें निमित्त । नसो नाहीं हित कपाळीं तें ॥ २ ॥ कांहीं एक तरी बोलायाचा(ची) जागा । नेदिती वाउगा उभा ठाकों ॥ ३ ॥ तुका म्हणे वर्म कळों येतें कांहीं । ओळखी जे ठाईं होईल ते ॥ ४ ॥ [१०५३]

करील तें काय नव्हे विश्वंभर । सेवकां द्रिद्र लाज नाहीं ॥ १ ॥ मजपासूनि हें पडिलें अंतर । काय तो अव्हेर करूं जाणें ॥ २ ॥ नामाच्या चिंतनें नासी गर्भवास । नेदी करूं आस आणिकांची ॥ ३ ॥ तुका म्हणे नेणों किती वायां गेले । तयां उद्धरिलें पांडुरंगें ॥ ४ ॥ [१०५४]

संध्या करितोसी केशवाच्या नांवें । आरंभी तें ठावें नाहीं कैसें ॥ १ ॥ किती या सांगावें करूनि फजित । खळ नेणें हित जवळी तें ॥ २ ॥ माजल्या न कळे उचित तें काय । न घ्यावें तें खाय घ्यावें सांडी ॥ ३ ॥ तुका म्हणे घेती भिंतीसवें डोकें । वावसी तें एकें अंधारलीं ॥ ४ ॥ [१०५५]

दुधाचे घागरीं मद्याचा हा बुंद । पडिलिया शुद्ध नव्हे मग ॥ १ ॥ तैसें खळां मुखें न करावें श्रवण । अहंकारें मन विटाळलें ॥ २ ॥ काय करावीं तीं बत्तीस लक्षणें । नाक नाहीं तेणें वाया गेलीं ॥ ३ ॥ तुका म्हणे अन्न जिरों नेदी माशी । आपुलिया जैशी सं(व)सर्गें ॥ ४ ॥ [१०५६]

सांगावें तें बरें असतें हें (जें) पोटीं । दुःख देते खोटी बुद्धि मग ॥ १ ॥ आपला आपण करावा वेव्हार । जिंकोनि अंतर मन ग्वाही ॥ २ ॥ नाहीं मागें येत बोलिलें वचन । पावावा तो सीण बरा मग

कोणताहि दिवस व्यर्थ जात नाहीं. आज जरी देवाची प्राप्ति झालेली दिसत नाहीं व केलेले श्रम व्यर्थ वाटत आहेत १. तरी तेवढ्यानें एकाच्या (देवाच्या) मस्तकावर त्यानें (देवानें) आपलें कर्तव्य केलें नाहीं असें दूषण ठेवितां येईल. आपले कपाळीं हित होण्याचें नसलें तर नसो ! २. पण आपल्याकडून आपण कांहीं तरी तक्रार करण्यास जागा करून ठेवावी; तसें जर केलें नाहीं तर ते आपल्यास दारांत देखील उभें राहूं देणार नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसजशी त्या ठिकाणीं ओळख होत जाते, (सेवेच्या योगानें देवाचा अधिक परिचय होतो), तसतसें कांहीं मर्मज्ञान होतें (देवाच्या आत्मत्वानें होणाऱ्या प्राप्तीचें वर्म कशांत आहे, हें कळून येतें) ४. [१०५३]

सर्व विश्वाचा पालक विश्वंभर ह्यानें केलें असतां काय होणार नाहीं ? पण सेवकांच्या ठिकाणीं त्याचे सेवेविषयीं असलेल्या दारिद्र्याची त्यांना (सेवकांना) लाज नाहीं १. माझ्याकडूनच प्रभुसेवेंत अंतर पडलें. जर मी अनन्य झालों असतों तर तो माझा अव्हेर कां करता ? २. त्याच्या नामाचें चिंतन केलें असतां गर्भवासादि दुःखांचा नाश होतो व त्या योगानें तर इतर कोणाचीहि आशा करण्याचा प्रसंग येत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आजपर्यंत कित्येक लोक (पापाचरणामुळें) वायां गेले असतां (अजामिळासारख्यांचाहि) त्यांचाहि पांडुरंगानें उद्धार केला ४. [१०५४]

ज्या केशवाचे नांवानें संध्येचा आरंभ होतो (ती संध्या करतोस) त्या केशवाचें ज्ञान तुला कसें नाहीं ? १. किती फजीत करून सांगावें ? हा नष्ट कांहीं केल्या जवळ असणारें हित जाणत नाहीं ? २. जो मस्त झाला आहे त्यास योग्य कर्तव्य कळत नाहीं. जें घेऊं नये त्याचा तो स्वीकार करतो व जें घ्यावें त्याचा तो अव्हेर करतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, कित्येक अंधकारामध्यें सांपडून चांचपडतात व भिंतीच्याच ठिकाणीं द्वाराची कल्पना करून भिंतीस डोक्याच्या टकरा देतात (त्याप्रमाणें ज्याला देव आणि शास्त्र कळत नाहीं त्याच्या सर्व क्रिया भ्रमरूप असल्यामुळें त्यांचें फळ त्याला मिळत नाहीं) ४. [१०५५]

घागरभर दुधामध्यें जर दारूचा एखादा थेंब पडला तर तें दूध जसें शुद्ध राहात नाहीं म्हणजे अपेय होतें १. त्याप्रमाणें ज्याचें मन अहंकारानें विटाळलें आहे त्या खळाच्या मुखानें (भक्ति, ज्ञान, वैराग्यादि) परमार्थाच्या गोष्टी ऐकूं नयेत २. सुंदरपणाचीं बत्तीस लक्षणें आहेत, पण जर एक नाक नाहीं तर (नकटेपणामुळें) तीं सर्व व्यर्थ आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, जशी माशी आपल्या संगतीनें अन्न कधींहि पचूं देणार नाहीं (तसें खळाच्या मुखानें पारमार्थिक विचार श्रवण करणें हितकर होणार नाहीं). [१०५६]

जें आपल्या अंतःकरणामध्यें आहे तें (देवाजवळ, गुरूजवळ किंवा इतर आप्तेष्टांजवळ) स्पष्ट सांगावें, बुद्धीमध्यें कांहीं कपट ठेविलें तर (परिणामीं) दुःख होतें १. अशा प्रकारचा धर्म-नीतीनें व्यवहार आपण आपला करावा व मनास जिंकून त्यास ह्याविषयीं साक्षी ठेवावें २. जे शब्द आपण कपटबुद्धीनें बोललों आहोंत ते परत येत नाहींत, म्हणून

॥ ३ ॥ तुका म्हणे बहु भ्यालों खटपटे । आतां देवा खोटे शब्द पुरे ॥ ४ ॥ [१०५७]

मथुरेच्या राया । माझें दंडवत पायां ॥ १ ॥ तुमचे कृपेचें पोसणें । माझा समाचार घेणें ॥ २ ॥ नाम धरियेलें कंठीं । असें आर्तभूत पोटीं ॥ ३ ॥ जीवींचें तें जाणा । तुका म्हणे नारायणा ॥ ४ ॥ [१०५८]

जाय तिकडे लागे पाठीं । नाहीं तुटी आठवाची ॥ १ ॥ हिरोनियां नेलें चित्त । माझें थीत भांडवल ॥ २ ॥ दावूनियां रूप डोळां । मन चाळा लावियेलें ॥ ३ ॥ आणीक तोंडा पडिली मिठी । कान गोष्टी (गोठी) नाइकती ॥ ४ ॥ बोलिल्याचा आठव न घडे । वाणी ओढे ते सोई ॥ ५ ॥ तुका म्हणे प्रेमधगी । भरली अंगीं अखंड ॥ ६ ॥ [१०५९]

नको ऐसें जालें अन्न । भूक तान ते गेली ॥ १ ॥ गोविंदाची आवडी जीवा । करीन सेवा धणीवरी ॥ २ ॥ राहिलें तें राहो काम । सकळ धर्म देहींचे ॥ ३ ॥ देह धरिल्या (ला) त्याचें फळ । आणीक काळ धन्य हा ॥ ४ ॥ जाऊं नेदीं करितां सोस । क्षमा दोष करवीन ॥ ५ ॥ तुका म्हणे याचे पाठीं । आतां साटी जीवाची ॥ ६ ॥ [१०६०]

वाट पाहें हरि कां नये आझूनि । निष्ठुर कां मनीं धरियेलें ॥ १ ॥ काय करूं धीर होत नाहीं जीवा । काय आड देवा उभा ठेला ॥ २ ॥ नाहीं माझा धांवा पडियेला कानीं । कोठें चक्रपाणी गुंतलेती ॥ ३ ॥ नाहीं आलें कळों अंतरा अंतर । कृपावंत फार ऐकतों ॥ ४ ॥ बहुतां दिसांचें राहिलें भातुकें । नाहीं कवतुकें कुरवाळिलें ॥ ५ ॥ तुका म्हणे देई एकवेळा भेटी । शीतळ हे पोटीं होईल मग ॥ ६ ॥ [१०६१]

त्यापासून बरेंच दुःख प्राप्त होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, अशा ह्या संसाराच्या खटपटीविषयीं मी फार भ्यालों, आतां हे खोटे अभिमानाचे शब्द पुरे असें वाटत आहे ४. [१०५७]

हे मथुरेच्या राजा (कृष्णा), तुझे पायांस माझा दंडवत-नमस्कार-आहे १. तुमच्या कृपेनें पोशिला जाणारा असा मी आहें, म्हणून तुम्हीं माझा समाचार घ्या २. तुमचें नाम कंठीं धरून मी आर्तभूत हृदयानें राहिलों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, माझ्या जीवाचा भाव तुम्हीं जाणा (मथुरेची यात्रा करणाऱ्या बरोबर हा अभंग पत्ररूपानें पाठविला होता, अशी आख्यायिका आहे) ४. [१०५८]

जिकडे जावें तिकडे हा देव माझ्या पाठीमागें लागलेला आहे, ह्याचे आठवावांचून एक क्षणहि जात नाहीं १. मजजवळ असलेलें भांडवल जें चित्त हें त्यानें हरण करून नेलें २. तुमचें रूप डोळ्यांस दाखवून त्याजविषयींचा छंद तुम्हीं माझ्या मनास लाविला आहे ३. इतर शब्द बोलण्याविषयीं दांतखीळ बसली आहे व बाकीच्या कथाहि कान ऐकत नाहींत ४. जें कांहीं बोललों आहें त्याचें स्मरणहि होत नाहीं; वाणी हरीचे नामाकडे सारखी ओढ घेत आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, अखंड हरीच्या प्रेमाविषयींची धग (ऊब) माझ्या आंगांत भरली आहे ६. [१०५९]

अन्न नको असें मला वाटत आहे, भूक व तहान दोन्हीं नाहींशा झाल्या १. माझ्या जीवास गोविंदाची आवड आहे, त्याची सेवा तृप्ति मिळेपर्यंत करीन २. जें देहनिर्वाहाचें अवश्य कार्य आहे तें राहिलें तरी राहो, व सर्व (मलमूत्रविसर्जनादि) देहधर्म राहिले तरी चालेल ३. नरदेह धारण केल्याची हीच सफलता आहे. सबब हा काळ धन्य आहे ४. अन्य सोसाकडे मीं आपल्या मनास जाऊं देणार नाहीं. मजकडून घडलेल्या दोषांची क्षमा हरीकडून करवीन ५. तुकाराम महाराज म्हणतात, मीं हरीला जीव अर्पण करून आतां देवाची सारखी पाठ पुरवीन ६. [१०६०]

मीं सारखी वाट पाहात आहें, तरी हरि अजून कां बरें येत नाहीं ? असें त्यांनीं आपलें मन कां निष्ठुर केलें आहे ? १. काय करावें, त्यांचे भेटीवांचून जीवास चैन पडत नाहीं. माझें कोणतें कृत्य त्यांचे भेटीचे आड आलें ? २. मी जो कांहीं त्यांचा धांवा करीत आहें, तो त्यांच्या कांहीं कानीं पडला नाहीं असें वाटतें. चक्रपाणि हे कोणत्या भक्तकार्याकडे गुंतले आहेत ? ३. श्रीहरि हे फार कृपावंत आहेत, असें मीं ऐकत होतों, परंतु त्यांच्या अंतःकरणाचा परिचय माझे अंतःकरणास नाहीं ४. माझा देवाकडे पुष्कळ दिवसांचा खाऊ राहिला आहे, त्यांनीं कौतुकानें मला कुरवाळिलें नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, एक वेळ मला भेट द्या, म्हणजे मग माझें मन शांत होईल ६. [१०६१]

नाहीं दिलें कधीं कठिण उत्तर । तरी कां अंतर पडियेलें ॥ १ ॥ म्हणऊनि आतां वियोग न साहे । लांचावलें देहे संघट्टणें ॥ २ ॥ वेळोवेळां वाचे आठवितों नाम । अधिकचि प्रेम चढे घेतां ॥ ३ ॥ तुका म्हणे पांडुरंगे जननिये । घेऊन कडिये बुझाविलें ॥ ४ ॥ [१०६२]

आतां न करीं सोस । सेवीन हा ब्रह्मरस ॥ १ ॥ सुखें सेवीन अमृत । ब्रह्मपदींचें निश्चित ॥ २ ॥ तुमचा निज ठेवा । आम्हीं पाडियेला ठावा ॥ ३ ॥ तुका म्हणे देवराया । आतां लपालेती वायां ॥ ४ ॥ [१०६३]

जेथें जेथें जासी । तेथें मजचि तूं पाहसी ॥ १ ॥ ऐसा पसरीन भाव । रिता नाहीं कोणी ठाव ॥ २ ॥ चित्त जडलें पायीं । पाळती हें ठायीं ठायीं ॥ ३ ॥ तुका म्हणे पोटीं । देवाघालुनि सांगें गोष्टी ॥ ४ ॥ [१०६४]

सांपडला हातीं । तरी झाली हे निश्चिंती ॥ १ ॥ नाहीं धांवा घेत मन । इंद्रियांचें समाधान ॥ २ ॥ सांडियेला हेवा । अवघा संचिताचा ठेवा ॥ ३ ॥ तुका म्हणे काम । निरसुनियां घेतों नाम ॥ ४ ॥ [१०६५]

मुक्तिपांग नाहीं विष्णुचिया दासां । संसार तो कैसा न देखती ॥ १ ॥ बैसला गोविंद जडोनियां चित्तीं । आदि तेचि अंतीं अवसानीं ॥ २ ॥ भोग नारायणा देऊनि निराळीं । ओवियां मंगळीं तोचि गाती ॥ ३ ॥ बळ बुद्धि त्यांची उपकारासाठीं । अमृत हे पोटीं सांठविलें ॥ ४ ॥ दयावंत तरी देवाच सारिखीं । आपुलीं पारखीं नोळखती ॥ ५ ॥ तुका म्हणे त्यांचा जीव तोचि देव । वैकुंठ तो ठाव वसती ते ॥ ६ ॥ [१०६६]

सेवीन उच्छिष्ट लोळेन अंगणीं । वैष्णवांचे न्हाणीं होईन कीडा ॥ १ ॥ ऐसें जन्म आतां मज देईं

आजपर्यंत मीं देवास कठिण शब्दानें बोललों नसतां त्याचें मला अंतर (देवांत व माझ्यांत) कां पडलें? १. ह्याकरितां त्याचा वियोग मला सहन होत नाहीं, माझें मन त्यांच्या देहाशीं संघटण करण्याविषयीं लांचावलें आहे २. वेळोवेळीं त्यांच्या नांवाचा आठव करण्यांत व तें मुखानें घेण्यांत अधिक प्रेम वाढत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगे आई, मला कडेवर घेऊन समजवा (माझी समजूत काढ) ४. [१०६२]

आतां मीं दुसरा कांहीं सोस करणार नाहीं. ह्या एका ब्रह्मरसाचेंच सेवन करीन १. ब्रह्मस्वरूपाचें अमृत मीं निश्चयानें मुखानें सेवन करीन २. तुमचें निजस्थान आम्हीं जाणिलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, (तुमचें आम्हांला सर्व कांहीं कळलें आहे) आतां तुम्हीं आम्हांस भेट न देतां लपलांत तें व्यर्थ आहे ४. [१०६३]

देवा, ज्या ज्या ठिकाणीं तुम्ही जाल त्या त्या ठिकाणीं मलाच पाहाल १. अशा प्रकारचें स्वरूप मीं आपल्या ब्रह्मभावनेनें पसरवीन. त्याच्या व्याप्तीवांचून कोणतेंहि ठिकाण रितें ठेवणार नाहीं २. माझें चित्त तुमच्या पायांच्या ठिकाणीं जडलें आहे, तें ठिकठिकाणीं स्वस्वरूपाची पाळत करीत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवास मी आपल्या ब्रह्मभावनेच्या पोटांत सांठवून ह्या गोष्टी सांगेन ४. [१०६४]

देव आमच्या हस्तगत झाल्यामुळें आम्ही चिंतारहित-निष्काळजी-झालों आहोंत १. आमचें मन कोणीकडे धांव घेत नसून सर्व इंद्रियें संतुष्ट आहेत २. पूर्वसंचित पापपुण्यात्मक कर्मांचा सर्व ठेवा टाकला व संसाराचा सोसहि सोडून दिला ३. तुकाराम महाराज म्हणतात, कामवासनेचा सर्वस्वीं त्याग करून मी विठोबाचें नाम घेतों ४. [१०६५]

वैष्णवांना मुक्तीचें दारिद्र्य नाहीं व ते संसाराकडेहि पाहात नाहींत १. सर्व काळ विष्णूचें दास्यत्व त्यांनीं स्वीकारल्यामुळें त्यांच्या चित्तामध्यें गोविंद जडून राहिला आहे. म्हणून ते अखंड नामोच्चार करतात त्यास आदि, मध्य व अंतीं विसावा नाहीं २. त्यांनीं आपला सर्व भोग नारायणास अर्पण करून ते मंगल ओव्यांनीं त्यालाच गातात ३. त्यांचें बळ, बुद्धि व नीति हीं परोपकाराकरितांच आहेत आणि त्यांनीं आपल्या पोटामध्यें नामामृत सांठविलें आहे ४. देवासारखेच ते दयावंत आहेत आणि हे आपले व हे परके असें ते ओळखीत नाहींत ५. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांचा जीव केवळ देवच बनला आहे, म्हणून त्याचें वास्तव्य ज्या ठिकाणीं आहे, तें वैकुंठच समजावें ६. [१०६६]

मी वैष्णवांचे घरीं राहून त्यांचें उच्छिष्ट स्वीकारीन (सेवन करीन). त्यांचे अंगणामध्यें लोळण घेऊन व त्यांच्या घरांतील न्हाणींत किडा होऊन राहीन १. हे देवा, अशा प्रकारचे जन्म मला द्या; आतां माझ्या जीवाला हीच सदा

देवा । आवडी हे जीवा सर्व काळ ॥ २ ॥ त्यांचे चरणरज येती अंगावरी । वंदीन ते शिरीं जाइन मागें ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें राहिलासे भाव । सकळही वाव जाणोनियां ॥ ४ ॥ [१०६७]

क्षेम देयाला हो । स्फुरताती दंड बाहो ॥ १ ॥ आतां झडाझडां चालें । देईं उचलूनि पाउलें ॥ २ ॥ सांडीं हंसगती । बहु उत्कंठा हे चित्तीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आई । श्रीरंगे विठाबाई ॥ ४ ॥ [१०६८]

जेणें वेळ लागे । ऐसें सांडीं पांडुरंगे ॥ १ ॥ कंठा कंठा मिळों देईं । माझा वोरस तूं घेईं ॥ २ ॥ नको पितांबर । सांवरूं हे अळंकार ॥ ३ ॥ टाकीं वो भातुकें । लौकिकाचीं (चें) कवतुकें ॥ ४ ॥ हातां पायां नको । कांहीं वेगळालें राखों ॥ ५ ॥ तुका म्हणे यावरी । मग सुखें अळंकारीं ॥ ६ ॥ [१०६९]

कृपेचा ओलावा । दिसे वेगळाचि देवा ॥ १ ॥ मी हें इच्छितसें साचें । न लगे फुकटसाई काचें ॥ २ ॥ जेणें जाय कळसा । पाया उत्तम तो तैसा ॥ ३ ॥ तुका म्हणे घरीं । तुझ्या अवघिया परी ॥ ४ ॥ [१०७०]

दावूनियां कोणा कांहीं । तोचि वाहीं चाळविलीं ॥ १ ॥ तैसें नको करूं देवा । शुद्धभावा माझिया ॥ २ ॥ रिद्धिसिद्धी ऐसीं आड । येती नाड नागवूं ॥ ३ ॥ उदकाऐसी दावुनि ओटी । उर फोडी झळई ॥ ४ ॥ दर्पणींचे दिलें धन । दिसे पण चरफडी ॥ ५ ॥ तुका म्हणे पायासाठीं । करितो आटी कळों द्या ॥ ६ ॥ [१०७१]

आवड आहे २. त्यांच्या चरणाची धूळ माझ्या अांगावर येईल, ती मी शिरसावंद्य करीन आणि ते जिकडे जातील तिकडे त्यांच्यामागें जाईन ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व प्रपंचाचा पसारा व्यर्थ आहे असें जाणून ह्याच्याच ठिकाणीं माझा भाव राहिला आहे ४. [१०६७]

हे देवा, तुम्हांला आलिंगन देण्याविषयीं माझे बाहु स्फुरण पावतात (उतावळे झाले आहेत) १. आतां तूं लवकर लवकर पाऊल टाकून चाल २. हंसाप्रमाणें चालण्याची गति टाक, कारण तुला भेटण्याकरितां माझें चित्त फार उत्कंठित झालें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे श्रीरंगे विठाबाई, तूं माझी आई आहेस (म्हणून लवकर ये) ४. [१०६८]

हे पांडुरंगे, ज्या योगानें भेटी देण्याला विलंब लागेल अशीं कारणें टाकून दे १. माझ्या कंठाला तुझा कंठ मिळूं दे आणि माझा प्रेमभरित स्नेह तूं घे २. तुझ्या अांगावरील अलंकार आणि पीतांबर तूं सावरूं नको ३. तुझ्या ठिकाणीं देवपणाचें लौकिकरूपी खाजें (खाद्य पदार्थ) आहे, तें कौतुकानें टाकून दे ४. मला आलिंगन देण्याकरितां तूं आपल्या हातापायांस कांहीं वेगळें वेगळें राखूं नको (अंगचोरपणा करूं नकोस), तर माझ्या सर्व अवयवांना तुझे अवयव मिळूं देत ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मला भेटी देऊन मग सुखानें तूं सर्व अलंकार घालीत बैस ६. [१०६९]

हे देवा, तुम्हीं कित्येकांवर कृपा करितां पण ह्यामध्यें जिव्हाळा कांहीं वेगळाच दिसतो १. मला तुमच्या खऱ्या स्वरूपाची इच्छा आहे, ह्यावांचून तुमचें मायाची खोटें स्वरूप मला फुकट देखील नको २. जें काम सुरक्षितपणें कळसाला जाईल, तशा प्रकारचा पाया रचणें उत्तम आहे (ज्यामुळें शाश्वत सुखाची प्राप्ति होईल अशीच कृपा तुजजवळ मागितली पाहिजे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमच्या घरीं पुष्कळ प्रकार आहेत (त्यांपैकीं मला खऱ्याची इच्छा आहे) ४. [१०७०]

कोण्या भक्ताला कांहीं आमिष दाखवून या रीतीनें तुम्हीं फसविलें आणि तीच रीत तुम्ही माझ्या करितांहि अंगीकारीत आहां १, माझा शुद्ध भाव तुमच्या ठिकाणीं आहे म्हणून, अहो देवा, मला तसें फसवूं नका २. ऋद्धिसिद्धीसारखीं नाडणारीं नागविण्याकरितां (साधकाच्या परमार्थाची हानि करण्याकरितां) समोर येतात २. मृगजळ हें खऱ्या उदकाचा भास हरणास दाखवून, त्याच्याकडून ऊर फुटेपर्यंत धांववितें ४. धनाचें प्रतिबिंब आरशामध्यें दिसतें तें एखाद्या बालकास घ्यावयास सांगितलें तर तें घेण्याकरितां तळमळ करतें ५. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें तुमच्या पायांकरितां मी आटाआटी करीत आहें हें तुम्हीं जाणावें ६. [१०७१]

काय माता विसरे बाळा । कळवळा प्रीतिचा ॥ १ ॥ आवडीनें गळां मिठी । घाली उठी बैसवी ॥ २ ॥ लावूं धांवे मुख स्तना । न ये मना निराळें ॥ ३ ॥ भावंडाचें भातें दावी । आपुलें लावी त्यास जी ॥ ४ ॥ माझें थोडें त्याचें फार । उत्तर हें वाढवी ॥ ५ ॥ तुका म्हणे नारायणा । तुम्ही जाणा बुझावूं ॥ ६ ॥ [१०७२]

तरी आम्हीं तुझी धरियेली कास । नाहीं कोणी दास वायां गेला ॥ १ ॥ अगा पंढरीशा उभा विटेवरी । येईं लवकरी धांवें नेटें ॥ २ ॥ पालवितों तुज उभारोनि बाहे । कृपावंता पाहें मजकडे ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज बहु कान डोळे । कां हें माझे वेळे ऐसी परी ॥ ४ ॥ [१०७३]

करावा कांटाळा नव्हे हें उचित । आधींच कां प्रीत लावियेली ॥ १ ॥ जाणतसां तुम्हीं रूपाचें लाघव । आपुलाले जीव घेतें ऐसा ॥ २ ॥ काय म्हणऊनि आलेती आकारा । आम्हां उजगरा करावया ॥ ३ ॥ तुका म्हणे भीड होती आजिवरी । आतां देवा उरी कोण ठेवी ॥ ४ ॥ [१०७४]

धरूनि पालव असुडीन करें । मग काय बरें दिसे लोकीं ॥ १ ॥ काय तें विचारा ठायींचें आपणा । जों हा नारायणा अवकाश ॥ २ ॥ अंतर पायांसी तोंवरी या गोष्टी । पडिलिया मिठी हालों नेदीं ॥ ३ ॥ रुसलेती तरी होईल बुझावणी । तांतडी करूनि साधावें हें ॥ ४ ॥ सांपडलिया आधीं कारणासी ठाव । येथें करूं भाव दृढ आतां ॥ ५ ॥ तुका म्हणे तुझे ठाऊके बोभाट । मग खटपट चुकली ते ॥ ६ ॥ [१०७५]

आईमध्यें बालकांच्या प्रीतीचा कळवळा आहे, त्याला ती विसरते काय? १. तें बालक आपल्या आईच्या गळ्याला मोठ्या प्रीतीनें मिठी घालून तिला उठाबशी करावयास लावतें २. तें बालक आईच्या स्तनाला मुख लावण्याकरितां धांवतें, ह्यावांचून त्याच्या मनास दुसरें कांहीं येत नाहीं ३. माझ्या भावाचा खाऊ किती आहे असें म्हणून आपला खाऊ त्याच्याजवळ ठेऊन, माझा केवढासा आहे पाहा असें तें म्हणतें ४. माझा तर थोडा आहे आणि त्याचा पुष्कळ आहे असें शब्दानें शब्द वाढवितें ५. तुकाराम महाराज म्हणतात, अहो नारायण, अशा बालकवत् भक्ताची तुम्हीं समजूत घालण्याचें जाणतां ६. [१०७२]

आजपर्यंत तुमचा कोणी दास वायां गेला नाहीं (भक्तांचा तूं उद्धार केलास) म्हणून हे देवा, तुमची कांस मीं धरली १, हे पंढरपूरवासी विटेवर उभा राहाणाऱ्या देवा, तूं लवकर अति त्वरेनें धांवून ये २. हे कृपावंता, मीं आपला हात वर करून तुला बोलावितों. तूं धांवून ये आणि मजकडे कृपेनें अवलोकन कर ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुला पुष्कळ डोळे व कान आहेत असें श्रुतींत-वेदांत म्हटलें आहे. तर मग माझी विनंति कानावर घेऊन (ऐकून) धांवून कां येत नाहींस? माझ्याच वेळेला असा प्रकार कां करितोस? ४. [१०७३]

हे देवा, माझा कंटाळा तुम्हीं करितां हें तुम्हाला योग्य नाहीं; तुमचें रूप पाहाण्याची प्रीति तुम्हीं मला अगोदर कां लाविली? १. तुमच्या रूपाचें लाघव (कौशल्य) आमचा जीव घेण्यासारखें आहे हें तुम्हीं जाणत आहां २. तुमच्या निजध्यासानें जागृतपणाचा शीण आम्हांला होत आहे, आणि तुम्हीं भेट तर देत नाहीं तर तुम्हीं आकाराला काय म्हणून आलां? आतां सांगितल्याप्रमाणें आम्हांला दुःख देण्याला काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आजपर्यंत आम्हीं भीड धरिली, पण आतां हे देवा, तुझी परवा कोण करितो? ४. [१०७४]

हे देवा, मीं आपल्या हातानें तुझा पदर धरून ओढीन, मग हें लोकांमध्यें बरें दिसेल काय? १. हे नारायणा, त्याकरितां अगोदरच वर सांगितलेल्या कर्तव्याला उशीर आहे तोंपर्यंत तुम्हीं काय तो विचार करा २. मला तुमच्या पायांचा वियोग आहे तोंपर्यंत विचाराच्या गोष्टी सांगतों; आणि एक वेळ मीं तुमचे पायाला मिठी घातली म्हणजे मग तुम्हांला हालूं देणार नाहीं ३. हें कर्तव्य त्वरेनें साधीन, मग ह्याबद्दल तुम्हीं जरी रुसलां तरी तुमची समजूत घालतां येईल ४. एक वेळ तुमच्या पायांचा लाभ झाला, त्या योगानें सर्व कार्य होण्याला आधार झाला; म्हणून ह्याच ठिकाणीं आतां आम्हीं बळकट भाव धरूं ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तूं आकाराला आला असतां, त्याच वेळीं निराकार होतोस, असे तुझे मागील बोभाट आहेत. म्हणून मी तुझ्या पायांस बळकट मिठी दिली आहे, त्यामुळें तुझ्या प्राप्तीकरितां सर्व खटपट चुकली ६. [१०७५]

निष्ठुरा उत्तरीं न धरावा राग । आहे लागभाग ठायींचाचि ॥ १ ॥ तूं माझा जनीता तूं माझा जनीता । रखुमाईच्या कांता पांडुरंगा ॥ २ ॥ मुळींच्या ठेवण्या आहे अधिकार। दुरावोनि दूर गेलों होतों ॥ ३ ॥ पोटींच्या आठवा पडिला विसर । कांहीं आला भार माथां तेणें ॥ ४ ॥ राखिला हा होता बहु चौघां चार । साक्षीनें वेव्हार निवाडिला ॥ ५ ॥ तुका म्हणे कांहीं बोलणें न लगे । आतां पांडुरंगे तूं मी ऐसें ॥ ६ ॥ [१०७६]

सांगतां गोष्टी लागती गोडा । हा तों रोकडा अनुभव ॥ १ ॥ सुख झालें सुख झालें । नये बोलें बोलतां ॥ २ ॥ अंतर तों नये दिसों । आतां सोस कासया ॥ ३ ॥ तुका म्हणे जतन करूं । हेंचि धरूं जीवेंसी ॥ ४ ॥ [१०७७]

मजशीं पुरें न पडे वादें । सुख दोहींच्या संवादें ॥ १ ॥ तूंचि आगळा काशानें । शिर काय पायांविणें ॥ २ ॥ वाहों तुझा भार । दुःख साहोनि अपार ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं भेद । देवा करूं नये वाद ॥ ४ ॥ [१०७८]

तुज नाहीं शक्ति । काम घेसी आम्हां हातीं ॥ १ ॥ ऐसें अनुभवें पाहीं । उरलें बोलिजेसें नाहीं ॥ २ ॥ लपोनियां आड । आम्हां तुझा कैंवाड ॥ ३ ॥ तुका म्हणे तुजसाटीं । आम्हां संसारें तुटी ॥ ४ ॥ [१०७९]

तुझ्या ठायीं ओस । दोन्हीं पुण्य आणि दोष ॥ १ ॥ झडलें उरलें किती । आम्ही धरियेलें चित्तीं ॥ २ ॥ कळ्लासी नष्टा । यातिक्रिया कर्मभ्रष्टा ॥ ३ ॥ तुका म्हणे बोला । नाहीं ताळा गा विठ्ठला ॥ ४ ॥ [१०८०]

हे देवा, तुम्हांशीं मी निष्ठुर भाषणें केलीं त्याचा तुम्हीं राग मानूं नये, कारण हा तुमचा आमचा संबंध मूळचाच आहे १. हे रुक्माबाईच्या कांता पांडुरंगा, तूं मला निर्माण करणारा, माझा बाप आहेस (असें द्विवार सांगतों) २. तुमचे जवळ मीं ठेवा ठेविला आहे. त्याचा अधिकारी मी मूळचाच आहें, पण मध्यें द्वैतासंबंधानें (काल्पनिक भेदानें) दूर गेलों होतों ३. मी-माझेपणाचा मस्तकावर कांहीं भार आला त्या योगानें मूळची आठवण (हृदयांतील आत्मबोध) विसरलों ४. कांहीं दिवसपर्यंत आम्हीं तुमचा बराच लौकिक राखिला होता, पुढें तोच व्यवहार संतांचे साक्षीनें निवडला ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, आतां भांडणासंबंधीं मी-तूं असें बोलण्याची कांहीं जरूरी नाहीं (कोणतेंच बोलणें नको आहे) ६. [१०७६]

देवाच्या कीर्तीच्या सुखकर गोष्टी सांगतांना अतिशय गोड वाटतात हा मला प्रत्यक्ष अनुभव आहे १. त्या अनुभवानें माझ्या अंतःकरणास सुख झालें आहे (असें द्विवार सांगतों). तो अनुभव मुखानें वर्णन करितां येत नाहीं २. आतां देव व मी यांमध्यें अंतर राहिलें नाहीं म्हणून बाकीचा सोस करण्याचें कारण नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हेंच सुख जिवाशीं धरून जतन करूं ४. [१०७७]

हे देवा, तूं माझ्याबरोबर वाद करण्याला टिकणार नाहींस. पण दोघांच्या संवादामध्यें सुख आहे (म्हणून मी वाद करितों) १. तुझ्या जवळचा थोरपणा कोणत्या कारणानें आला ? चरणावांचून मस्तक नुसतें उपयोगीं पडेल काय ? २. अनेक प्रकारचीं अपार दुःखें सहन करून तुझ्या सेवेचा भार आम्हीं वाहात आहोंत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्हांआम्हांमध्यें मुळींच भेद नाहीं, ह्याकरितां आमच्या बरोबर वाद करूं नका ४. [१०७८]

तुला कोणत्याहि प्रकारची शक्ति नाहीं म्हणून तूं आमच्याकडून सर्व काम करून घेतोस १. मीं म्हणतों हें खरें आहे कीं नाहीं हें तूं स्वतःच्या अनुभवानें विचार करून पाहा, मीं बोलावें असें उरलें नाहीं २. तूं आमच्या आड लपतोस, आणि आम्ही तुझें महत्त्व वाढविण्याविषयींचा निर्धार करितों ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्याकरितांच आम्हीं सर्व संसाराचा त्याग केला आहे ४. [१०७९]

हे देवा, पाप व पुण्य हीं दोन्ही तुझ्या (पारमार्थिक स्वरूपाचे) ठिकाणीं ओस आहेत (त्यांची वस्ती नाहीं) १. पाप व पुण्य किती झडलें व किती उरलें, हे दोन्ही प्रकार तुझे स्वरूपीं नाहींत म्हणून ते आम्ही चित्तांत धरले आहेत(पुरतेपणीं जाणले आहेत) २. तूं यातिहीन व क्रियारहित व विकारशून्य असा आहेस, हें आम्हांला निश्चयात्मक कळलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठ्ठला, असें तुझे ठिकाणीं बोलण्यास कांहीं जागा नाहीं, असा तूं निःशब्द आहेस ४. [१०८०]

भांडावें तों हित । ठायीं पडतें उचित ॥ १ ॥ नये खंडों देऊं वाद । आम्हां भांडवल भेद ॥ २ ॥ शब्दासरसें भेटी । नये पडों देऊं तुटी ॥ ३ ॥ तुका म्हणे आळस । तोचि कारणांचा नाश ॥ ४ ॥ [१०८१]

नव्हों गांढे आळसी । जो तूं आम्हां पुढें जासी ॥ १ ॥ अरे दिलें आम्हां हातीं । वर्म वेवादाचें संतीं ॥ २ ॥ धरोनियां वाट । झालों शिरोमणि थोंट ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । वादें करीन खरी सेवा ॥ ४ ॥ [१०८२]

तुझा विसर नको माझिया हो जिवा । क्षण एक केशवा मायबापा ॥ १ ॥ जावो राहो देह आतां येचि घडी । कायसी आवडी याची मज ॥ २ ॥ कुश्चिळ इंद्रियें आपुलिया गुणें । यांचिया पाळणें कोण हित ॥ ३ ॥ पुत्र पत्नी बंधु सोयरीं खाणोरीं । यांचा कोण धरी संग आतां ॥ ४ ॥ पिंड हा उसना आणिला पांचांचा । सेकीं लागे ज्याचा त्यासीं देणें ॥ ५ ॥ तुका म्हणे नाहीं आणिक सोईरें। तुजविण दुसरें पांडुरंगा ॥ ६ ॥ [१०८३]

ऐसें सत्य माझें(माझ्या) येईल अंतरा । तरिच मज करा कृपा देवा ॥ १ ॥ वचनासारिखें तळमळी चित्त । बाहेरि तो आंत होईल भाव ॥ २ ॥ तरिच मज ठाव द्यावा पायांपाशीं । सत्यत्वें जाणसी दास खरा ॥ ३ ॥ तुका म्हणे सत्य निकट सेवक । तरिच भातुकें प्रेम द्यावें ॥ ४ ॥ [१०८४]

आदि वर्तमान जाणसी भविष्य । मागें पुढें नीस संचिताचा ॥ १ ॥ आतां काय देऊं पायापें परिहार । जाणा तो विचार करा देवा ॥ २ ॥ आपुलें तें येथें काय चाले केलें । जोडावे ते भले हात

देवाशीं भांडण्यांत हित आहे, कारण त्या योगानें योग्य काय आहे हें कळतें १. ह्याकरितां वादाचें खंडन होऊं देऊं नये, कारण देवांत व आमच्यांत कल्पित भेद असणें हेंच आमचें भांडवल आहे २. सारसपक्ष्यांचे नरमादीचा जोडा रात्रीच्या वेळीं वियोगस्थितीनें नदीच्या किनारीं असतो, व तीं जशीं एकमेकांना हांका मारतात, तसें आम्हीं तुमच्याशीं भांडण्याविषयीं अंतर येऊं देणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यांत आळस झाल्यानें कार्यनाश होणार आहे ४. [१०८१]

हे देवा, तूं आम्हांपासून पुढें पळून जाशील तर आम्हीं जाऊं देणार नाहीं, कारण आम्हीं वाद घालण्याविषयीं आळशी व गांढ्याळ असे नव्होंत, बळवंत आहोंत १. अरे देवा, हें विवाद करण्याचें वर्म संतांनीं आमचे हातांत दिलें आहे २. तुझी पळून जाण्याची वाट मीं रोखून धरली आहे. तुला त्या वाटेनें जाऊं देणार नाहीं. मीं केवळ कुभांड्या (उद्धटांतील) शिरोमणि आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, असा पुष्कळ प्रकारचा वाद घालून मी आपली सेवा खरी करीन ४. [१०८२]

हे केशवा, मायबापा, तुझा विसर माझ्या जिवाला एक क्षणभर देखील पडूं देऊं नको १. हा माझा देह ह्याच घटकेस जावो अथवा राहो, त्याची मला आवडी नाहीं २. देहसंबंधी इंद्रियें आपापल्या गुणांनीं अति वाईट आहेत, तर त्यांचें प्रतिपालन केल्यानें कोणतें हित होणार आहे ? ३. ह्याच प्रकारें देहसंबंधीं बायका, पोरें, भाऊबंद हीं केवळ चोर आहेत, ह्यांची संगति मीं आतां कधींहि धरणार नाहीं ४. हा देह पंचभूतांचा तयार झाला आहे तो अंतकाळीं त्यांचा त्यांना द्यावा लागेल ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, तुझ्यावांचून मला आणिक दुसरे कोणी सोयरे ह्या जगतामध्यें नाहींत ६. [१०८३]

पूर्वीचे अभंगांत सांगितलेला प्रकार माझे अंतःकरणामध्यें जर खरा असेल तरच हे देवा, तुम्ही मजवर कृपा करा १. जशीं वचनें मीं मुखानें बोलत आहें त्याचप्रमाणें चित्तांत तळमळ असेल व जसा बाहेर भाव आहे तोच अंतःकरणांत असेल, तर तुम्हीं कृपा करा २. मी तुमचा दास सत्यत्वानें आहें असें तुम्हीं जाणत असाल तरच तुमच्या पायांजवळ मला आश्रय द्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमचा मी जवळचा सेवक सत्यत्वानें जर असेन तरच मला प्रेमाचें भातुकें खाऊं द्या ४. [१०८४]

हे देवा, तुम्हीं भूत, भविष्य, वर्तमान जाणत असल्यामुळें सर्व संचिताचें मागील पुढील स्वरूप तुम्हांला कळतें १. हे देवा, आतां मीं तुमच्या पायाजवळ काय गाऱ्हाणें सांगूं ? तुम्हाला वाटेल तो मजविषयीं विचार करा २. आम्हीं कांहीं

पुढें ॥ ३ ॥ तुका म्हणे फिके बोल माझे वारा । कराल दातारा होईल तें ॥ ४ ॥ [१०८५]

सुखें न मनी अवगुण । दुःख भोगी त्याचें कोण ॥ १ ॥ हें कां ठायींचें न कळे । राती करा झांकुनि डोळे ॥ २ ॥ चालोनियां आड वाटे । पायीं मोडविले कांटे ॥ ३ ॥ तुका म्हणे कोणा । बोल ठेवितो शहाणा ॥ ४ ॥ [१०८६]

आम्ही न देखों अवगुणां । पापी पवित्र शहाणा ॥ १ ॥ अवघीं रूपें तुझीं देवा । वंदूं भावें करूं सेवा ॥ २ ॥ मज भक्ती सवें चाड । नेणें पाषाण धातु वाड ॥ ३ ॥ तुका म्हणे घोटीं । विष अमृत तुजसाठीं ॥ ४ ॥ [१०८७]

मज नाहीं तुझ्या ज्ञानाची ते चाड । घेतां वाटे गोड नाम तुझें ॥ १ ॥ नेणतें लेंकरूं आवडीचें तान्हें । बोलतो वचनें आवडीनें ॥ २ ॥ भक्ती नेणें कांहीं वैराग्य तें नाहीं । घातला विठाई भार तुज ॥ ३ ॥ तुका म्हणे नाचें निर्लज्ज होऊनि । नाहीं माझे मनीं दुजा भाव ॥ ४ ॥ [१०८८]

काय माझी संत पाहाती जाणीव । सर्व माझा भाव त्यांचे पायीं ॥ १ ॥ कारण सरतें करा पांडुरंगीं । भूषणाची जगीं काय चाड ॥ २ ॥ बोबड्या उत्तरीं म्हणे हरिहरि । आणीक भीकारी नेणें दुजें ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही विठ्ठलाचे दास । करितों मी आस उच्छिष्टाची ॥ ४ ॥ [१०८९]

जीवाचें जीवन अमृताची तनु । ब्रह्मांड भुषणू नारायण ॥ १ ॥ सुखाचा सांगात अंतकासी अंत । निजाचा निवांत नारायण ॥ २ ॥ गोडाचेंही गोड हर्षाचेंही कोड । प्रीतिचाही लाड नारायण ॥ ३ ॥

केलें तरी येथें आमचें काय चालणार आहे ? म्हणून तुमचे पुढें हात जोडावे हेंच बरें वाटतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे दातारा, माझे शब्द तुम्ही कानावर घेत नसल्यामुळें माझ्या शब्दास चव नाहीं, म्हणून त्याचें तुम्ही निवारण करा; कारण, तुम्ही कराल तें होणार आहे (माझें संचित नाहींसें करा) ४. [१०८५]

मी सुखानें (ब्राह्याकारी) कोणाचे अवगुण मानीत नाहीं, कारण त्याचें दुःख कोण भोगतो ? १. हें तुम्हांला मूळचेंच कळत नाहीं काय ? डोळे झांकून व्यर्थ रात्र कां करितां ? २. आम्हांला मुद्दाम आडवाटेनें चालवून विकल्परूपी कांटे आमच्या पायांमध्यें तुम्ही मोडविले (म्हणजे, बुद्धींत विकल्प उत्पन्न केला) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो कोणी शहाणा आहे तो कोणावर शब्द ठेवील काय ? ४. [१०८६]

हे देवा, आम्हीं कोणाचे अवगुण पाहात नाहीं आणि पापी किंवा पवित्र अगर शहाणा हेंहि पाहात नाहीं १. ह्याचें कारण देवा, सर्व रूपें तुझीं आहेत अशा भावनेनें आम्ही सर्व जनांस वंदन करून तुझी सेवा करूं १. मला फक्त भक्तीची गरज आहे, त्यावांचून लहान, थोर, जड, पाषाण, धातु हें मीं कांहीं जाणत नाहीं ३ तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्याकरितां मी विष अमृतासारखें मानून सेवीत आहें ४. [१०८७]

तुझ्या ज्ञानाची मला इच्छा नाहीं, कारण तुझें नाम घेतल्यानें मला फार गोड वाटतें १. मी तुझें आवडीचें नेणतें तान्हें लेंकरूं आहें, म्हणून तुझ्यापुढें आवडीनें वेडेंवाकडें भाषण करितों २. हे विठाबाई, मीं आपला सर्व भार तुझ्यावर घातला आहे. मला भक्ति अथवा वैराग्य ह्यांपैकीं कांहीं कळत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मीं निर्लज्जपणानें हरिनामाच्या छंदांत नाचत आहें, ह्यावांचून माझे मनांत दुसरा भाव नाहीं (लोक मला काय म्हणतील ह्याची शंकाहि माझ्या मनांत येत नाहीं) ४. [१०८८]

माझे अंगीं कोणत्या प्रकारचें ज्ञान आहे हें संत पाहातील काय ? कारण मीं सर्व भाव त्यांचे पायापाशीं ठेविला आहे १. वैष्णव जन हो, ह्या जगतामध्यें मला भूषण मिळावें अशी का माझी इच्छा आहे ? पांडुरंग माझा अंगीकार करील असें करा. हेंच माझें मुख्य कार्य आहे २. मीं सर्वकाळ हरि हरि उच्चार बोबड्या शब्दांनीं करितों, ह्यावांचून मी रंक दुसरें कांहीं जाणत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही विठोबारायाचे दास आहांत म्हणून तुमचा उच्छिष्ट प्रसाद मिळावा अशी मी आशा करितों ४. [१०८९]

हा नारायण सर्व जीवांचा जीव (जीवांना जगविणारा) आहे व अमृताचें साक्षात् रूपच आहे आणि जगताचें भूषण (शोभा) आहे १. ह्याची संगति सुखदायक आहे, तसेंच हा काळाचा काळ आहे आणि निजभक्तांचें (वास्तव्याचें) निरुपाधिक (निरुपद्रव) स्थान आहे २. हा नारायण सर्व गोडांची गोडी आहे आणि आनंदाचें कौतुक

भावाचा निजभाव नांवांचाही नांव । अवघा पंढरीराव अवतरलासे ॥ ४ ॥ तुका म्हणे जें हें साराचेंही सार । माझा अंगीकार तेणें केला ॥ ५ ॥ [१०९०]

आतां मी सर्वथा नव्हें गा दुर्बळ । यातिहीन कूळ दैन्यवाणा ॥ १ ॥ माय रखुमाई पांडुरंग पिता । शुद्ध उभयतां पक्ष दोन्ही ॥ २ ॥ बापुडा मी नव्हें दुर्बळ टेंगणा । पांगिला हा कोणा आणिकांसी ॥ ३ ॥ दुष्ट नव्हों आम्ही अभागी अनाथ । आमुचा समर्थ कैवारी हा ॥ ४ ॥ संवसार आम्हां सरला सकळ । लपोनियां काळ ठेला धाकें ॥ ५ ॥ तुका म्हणे झालों निर्भर मानसीं । जोडलिया रासी सुखाचिया ॥ ६ ॥ [१०९१]

केलें नाहीं मनीं तया घडे त्याग । उबग उद्वेग नाहीं चित्तीं ॥ १ ॥ देवचि हा जाणे अंतरींचा भाव । मिथ्या तो उपाव बाह्य रंग ॥ २ ॥ त्यागिल्याचें ध्यान राहिलें अंतरीं । अवघी ते परी विटंबना ॥ ३ ॥ तुका म्हणे आपआपणां विचारा । कोण हा दुसरा सांगे तुम्हां ॥ ४ ॥ [१०९२]

हित व्हावें तरी दंभ दुरी ठेवा । चित्तशुद्धि सेवा देवाची हे ॥ १ ॥ आवडीं विठ्ठल गाईजे एकांतीं । अलभ्य ते येती लाभ घरा ॥ २ ॥ आणीका अंतरीं न द्यावी वसति । करावी हे शांती वासनेची ॥ ३ ॥ तुका म्हणे बाण हाचि निर्वाणींचा । वाउगी हे वाचा वेंचूं नये ॥ ४ ॥ [१०९३]

हो कां नर अथवा नारी । ज्यांचा आवडता हरी ॥ १ ॥ ते मज विठोबा समान । नमूं आवडीं ते जन ॥ २ ॥ ज्यांचें अंतर निर्मळ । त्यांचें सबाह्य कोमल ॥ ३ ॥ त्यांचा संग सर्वकाळ । घडी मज तें मंगळ ॥ ४ ॥ तुका म्हणे प्राण । काया कुरवंडी करीन ॥ ५ ॥ [१०९४]

आहे व प्रीतीची प्रीति आहे ३. हा देव निष्ठेची निष्ठा आहे, व नावांचेंहि नांव (सर्व वस्तूंच्या नांवांना अधिष्ठान) आहे, ह्या सर्व रूपांनीं पंढरीनाथ अवतीर्ण झाला आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, हा देव सर्व सारांचें सार (सत्य) आहे. त्यानें माझा अंगीकार केला आहे ५. [१०९०]

अहो जन हो, आतां मी सर्वथैव हीन, यातिकुळाचा दरिद्री व दुर्बळ असा नाहीं १. त्याचें कारण, आमचे आईबाप रुक्माई-पांडुरंग आहेत, म्हणून आमचे उभयपक्ष (मातृपक्ष व पितृपक्ष) शुद्ध आहेत २. त्या योगानें मी गरीब, दीन व बलहीन असा लहान नाहीं आणि कोणाच्या तंत्रानें असणारा नाहीं ३. आम्ही दुष्ट, भाग्यहीन व अनाथ असे नाहीं, कारण आमचा सहकारी देव समर्थ आहे ४. ह्याकरितां आमच्या मागें असणारा संसार नाहींसा झाला; आणि आम्हांला भिऊन, काळ धाकानें लपून बसला ५. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व सुखाच्या राशी आम्हांला प्राप्त झाल्यामुळें आम्ही मनामध्यें आनंदभरित झालों ६. [१०९१]

ज्याच्या चित्तामध्यें कर्तव्याचा अहंकार नाहीं आणि प्रपंचाचा त्रास व त्याजविषयींची खंती हे सर्व प्रकार ज्याचेपासून नाहींसे झाले, तो खरोखरी त्यागी आहे असें जाणावें १. हा सर्व प्रकार अंतःकरणांतील देव जाणतो, त्यावांचून बाह्यात्कारी त्यागाचें भूषण मिरविणें, हा उपाय खोटा आहे २. ज्या विषयांचा त्याग केला त्यांचा ध्यास जर अंतःकरणानें घेतला, तर ती सर्व विटंबना आहे असें समजावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, खऱ्या खोट्याचा विचार आपला आपण करावा, त्याबद्दल तुम्हांला सांगणारा कोण मिळेल ? ४. [१०९२]

जर आपलें हित व्हावें असें वाटत असेल, तर (ढोंग) दंभ नाहींसा करून शुद्ध चित्तानें तुम्हीं देवाची सेवा करा १. विठोबाचें नाम मोठ्या प्रीतीनें, एका भावानें एकांतामध्यें गा. त्या योगानें जे लाभ मिळण्यास कठिण ते लाभ तुमच्या घरीं चालून येतील २. अंतःकरणांत देवावांचून इतर गोष्टींना थारा देऊं नये. समूळ वासना नाहींशी करावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, (संसार जिंकण्याकरितां) श्रीविठोबाचें चिंतन हा बाण अखेरचा (शेवटचा निश्चित उपाय) आहे, म्हणून त्याला विसरून वाणीचा व्यर्थ व्यय करूं नये ५. [१०९३]

ज्यांना हरि प्रिय आहे ते पुरुष असोत किंवा स्त्रिया असोत १. ते मला विठोबासारखे आहेत; परम प्रेमानें अशा जनांस मी नमस्कार करीन २. ज्यांचें अंतःकरण निर्मळ आहे, त्यांचेंच बाह्य शरीर देखील शुद्ध आहे ३. त्यांच्या संगतीमध्यें माझा सर्व काळ जात आहे व त्या कालांतील घटका मला मंगलरूप आहेत ४ तुकाराम महाराज म्हणतात, मीं माझा देह प्राणांसह त्यांजवरून ओंवाळून टाकीन ५. [१०९४]

हरिची हरिकथा नावडे जया । अधम म्हणतां तया वेळ लागे ॥ १ ॥ मनुष्यदेहीं तया नाट पैं लागलें । अघोर साधिलें कुंभ(भी) पाक ॥ २ ॥ कासया जन्मा आला तो पाषाण । जंत कां होऊन पडिला नाहीं ॥ ३ ॥ उपजे मरोनि वेळोवेळां भांड । परि न धरी लंड लाज कांहीं ॥ ४ ॥ ऐसियाची माता कासया प्रसवली । वर नाहीं घातली मुखावरी ॥ ५ ॥ देवधर्माविण तो हा चांडाळ (हा नर) । न साहे भूमि भार क्षणभरी ॥ ६ ॥ राम म्हणतां तुझें काय रे वेंचेल । कां हित आपुलें न विचारसी ॥ ७ ॥ जन्मोजन्मींचा होईल नरकीं । तुका म्हणे चुकी जरी यासी ॥ ८ ॥ [१०९५]

उपेक्षिला येणें कोणी शरणागत । ऐसी नाहीं मात आईके(कि)ली ॥ १ ॥ आतां काय ब्रीद सांडील आपुलें । टाईचें धरिलें जाणोनियां ॥ २ ॥ माझ्या दोषासाटीं होईल पाटमोरा । ऐसा कोण पुरा भोग बळी ॥ ३ ॥ तुका म्हणे रूप आमुच्या कैवारें । धरिलें गोजिरें चतुर्भुज ॥ ४ ॥ [१०९६]

आवडीसारिखें संपादिलें सोंग । अनंत हीं मग जालीं नामें ॥ १ ॥ कळे ऐशा वाटा रचिल्या सुलभा । दुर्गम या नभाचाही साक्षी ॥ २ ॥ हातें जेवी एक मुखीं मागे घांस । माउली जयास तैसी बाळा ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें ध्यान विटेवरी । तैसीच गोजिरी दिसे मूर्ति ॥ ४ ॥ [१०९७]

धन्य मी मानीन आपुलें संचित । राहिलीसे प्रीत तुझे नामीं ॥ १ ॥ धन्य जालों आतां यासी संदेह नाहीं । न पडो या वाहीं काळा हातीं ॥ २ ॥ ब्रह्मरस करूं भोजन पंगती । संतांच्या संगतीं सर्वकाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे पोट धालेंचि न धाये(य) । खादलेंची खाये(य) आवडीनें ॥ ४ ॥ [१०९८]

आवडी न पुरे सेवितां न सरे । पडियेली धुरे सवें गांठी ॥ १ ॥ न पुरे हा जन्म हें सुख सांठीतां । पुढतीही आतां हेंचि मागों ॥ २ ॥ मारगाची चिंता पालखीं बैसतां । नाहीं उसंतितां

ज्याला हरीची कथा आवडत नाहीं तो अधम आहे हें म्हणण्यास देखील वेळ लागतो १. मनुष्यदेहामध्यें येऊन तो फसला गेला, कारण त्यानें अखेरीस अघोर नरक मिळविला २. अशा प्रकारचा दगड जन्मास कशाला आला? जंत होऊन कां पडला नाहीं? ३. वारंवार अशा प्रकारचा हा भांडखोर जन्मास येतो व मरतो, पण ह्यासंबंधाची लाज, हा धर्मलंड मुळींच बाळगीत नाहीं ४. अशा ह्या दुष्टास त्याचे आईनें जन्म कां दिला? जन्मास येतांच तिनें त्याच्या तोंडांत वार कोंबून मारिलें असतें तरी बरें झालें असतें ५. देवधर्मभ्रष्ट हा चांडाळ आहे, ह्याचा भार पृथ्वीस क्षणभर सुद्धां सहन होत नाहीं ६. श्रीरामाचें स्मरण केल्यानें तुझें काय खर्च होईल? आपल्या हिताचा विचार तूं कां करीत नाहींस? ७. तुकाराम महाराज म्हणतात, देवाला व धर्माला विन्मुख होशील तर जन्मोजन्मीं नरकवासी होशील ८. [१०९५]

अमूक एका शरण आलेल्याची उपेक्षा हरीनें केली अशी हकीकत आजपर्यंत ऐकली नाहीं १. आतां ह्या देवानें आपलें पतितपावनाचें ब्रीद काय टाकिलें! जें मूळचें ब्रीद आहे तेंच त्यानें जाणून धरिलें आहे २. असे काय माझ्या पदरीं दोष आहेत किंवा असा काय माझा बलाढ्य प्रारब्धभोग आहे कीं तें पाहून मजविषयीं तो पाठमोरा होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा उद्धार करण्याकरतांच त्यानें सांवळें गोजिरें चतुर्भुज रूप धारण केलें आहे ४. [१०९६]

आवडीप्रमाणें हरीनें रूप (मत्स्यकूर्मादि) घेतल्यावर त्याचीं अनंत नामें झालीं १. जसें ज्यास समजेल तसे त्यानें सुलभ मार्ग स्थापिले. तो हरि कळण्यास कठिण असून आकाशाचा साक्षी आहे २. एक मूल आपल्या हातानें जेवत असतें, व दुसरें आईजवळ मला घांस दे म्हणून म्हणत असतें, व आईचें वर्तनहि जसें बालक असेल असेंच असतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, विटेवर जें पांडुरंगाचें रूप आहे तेंच आमचें निरंतर ध्यान आहे, म्हणून तशीच गोजिरी मूर्ति मला दिसत आहे ४. [१०९७]

हे देवा, तुझ्या नामाच्या ठिकाणीं आमची प्रीति आहे त्या योगानें माझें प्रारब्ध धन्य आहे असें मीं मानतों १. निःसंशय मी आतां धन्य झालों आहें म्हणून काळाच्या जबड्यांत मी सांपडणार नाहीं २. संतांच्या संगतीनें मीं त्यांच्या पंक्तीस बसून ब्रह्मरसाचें नेहमीं भोजन करीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमचें पोट ब्रह्मरस सेवन केल्यानें भरून न भरल्यासारखें आहे, म्हणून मीं ज्याचें आवडीनें सेवन केलें आहे तेंच पुन्हा सेवन करतों ४. [१०९८]

परमश्रेष्ठ श्रीहरीची गांठ पडल्यामुळें त्याच्या विषयींचें प्रेम नष्ट होत नाहीं व त्याचें चिंतनरूपी सेवन करण्याचें बंद पडत नाहीं १. ह्या हरीचें सुख हृदयांत सांठविण्यास हा जन्म पुरेसा होत नाहीं, म्हणून देवाजवळ पुनः असाच जन्म

कोसपेणी ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी विठ्ठल माउली । जाणे ते लागली भूक तान ॥ ४ ॥ [१०९९]

नाहीं त्रिभुवनीं सुख या समान । म्हणऊनि मन स्थिरावलें ॥ १ ॥ धरियेलीं जीवीं पाउलें कोम(व)ळीं । कंठीं एकावळी नाममाळा ॥ २ ॥ शीतळ होऊनि पावलों विश्रांती । न साहें पुढती चाली चित्ता ॥ ३ ॥ तुका म्हणे झाले सकळ सोहळे । पुरविले डोहळे पांडुरंगे ॥ ४ ॥ [११००]

मायबापापुढें लाडिकें लेंकरूं । तैसें बोल करूं कवतुकें ॥ १ ॥ कृपावंता घालीं प्रेमपान्हा रस । वोळवीं वोरस पांडुरंगे ॥ २ ॥ नाहीं धीर खुंटी जवळी हुंबरे । ठायींच पाखरे कवळिते ॥ ३ ॥ तुका म्हणे मज होऊ नेदीं सीण । कळों नेदी भिन्न आहे ऐसें (तैसें) ॥ ४ ॥ [११०१]

आठवींची नेदी आवडी आणीक । भरूनियां लोक तिन्ही राहे ॥ १ ॥ मन धांवे तेथें तिचेंचि दुभतें । संपूर्ण आइतें सर्वकाळ ॥ २ ॥ न लगे वळावीं इंद्रियें धांवतां । ठाव नाहीं रिता उरों दिला ॥ ३ ॥ तुका म्हणे सम पाउलांचा खुंट । केला बळकट हालों नेदीं ॥ ४ ॥ [११०२]

उत्तम घालावें आमुचिये मुखीं । निवारावें दुःखी होऊं नेदी ॥ १ ॥ न बैसे न वजे जवळुनि दूरी । मागें पुढें वारी घातपात ॥ २ ॥ नाहीं शंका असो भलतिये ठायीं । मावळले पाहीं द्वैताद्वैत ॥ ३ ॥ तुका म्हणे भार घेतला विठ्ठलें । अंतरीं भरलें बाह्य रूप ॥ ४ ॥ [११०३]

आम्हां अळंकार मुद्रांचे शृंगार । तुळसीचे हार वाहूं कंठीं ॥ १ ॥ लाडिके डिंगर पंढरिरायाचे । निरंतर वाचे नामघोष ॥ २ ॥ आम्हां आणिकांची चाड चित्तीं नाहीं । सर्व सुख पायीं

मागूं २. जो पालखीमध्यें बसला आहे, त्यास दूर जावयाचें असलें तरी कोस व मजल ह्याची त्यास चिंता नाहीं (त्याप्रमाणें गर्भवासाचें दुःख आम्हांस नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, विठाबाई माझी आई आहे, ती माझी तहानभूक न सांगतां जाणते आणि तिचें निवारण करते) ४. [१०९९]

श्रीहरिचरणासारखें त्रैलोक्यांत सुख नाहीं म्हणून माझें मन त्याच्या ठिकाणीं स्थिर झालें आहे १. श्रीहरीचे कोमल चरण मीं आपल्या जीवामध्यें धारण केले आहेत व गळ्यांत त्याच्या नामाची एकेरी माळ घातली आहे. त्या योगानें त्रिविध तापापासून मुक्त होऊन शांत झालों. आतां ह्या स्थितीपासून चित्ताची पुढील गति खुंटली ३. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीपांडुरंगांनीं माझी सर्व इच्छा पूर्ण केल्यामुळें मला सर्व सुखसोहळ्यांचा लाभ झाला ४. [११००]

आईबापापुढे लाडकें मूल जसें क्रीडा करतें तसें हे कृपावंता, आम्ही तुझ्यापुढें बोलूं १. हे कृपासागर पांडुरंगा, मोठ्या प्रेमभरानें आपले प्रेमाचा पान्हा पाज (आणि ब्रह्मरसाचें दूध माझ्याकडे वळवून तोंडांत घाल) २. जसें, खुंट्यास बांधलेल्या वांसरास आईवांचून धीर धरवत नसल्यामुळें तें आईकरतां सारखें हंबरतें, व आईला पाखराचें प्रेम असल्यामुळें ती हंबरडा फोडून त्यास चाटते ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें मला तुझ्या वियोगापासून होणारें दुःख समजूं देऊं नकोस, म्हणजे मी तुझ्याहून निराळा (परका) आहें असें वाटूं देऊं नकोस ४. [११०१]

श्रीहरीविषयीं असणारी अत्यंत आवड ही हृदयावर दुसरा आठव मुळींच येऊं देत नाहीं. सर्व त्रैलोक्यांत तीच भरून राहिली आहे १. जिकडे मन धांवतें तिकडे सर्व स्वरूपप्रेमाचें दुभतेंच आहे. तें सर्व काळ संपूर्ण व सिद्ध आहे २. आतां त्या स्वरूपसिद्ध दुभत्यानें आपल्या व्याप्तीशिवाय जागाच राहूं दिली नाहीं, म्हणून इंद्रियें कोणीकडेहि धावूं लागलीं तरी तीं आम्हांस आवरावीं लागत नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा सर्वत्र सर्वव्यापी समान असणारा देव पुनः न हालेल असा स्थिरवर दृढ केला आहे ४. [११०२]

विठ्ठल माउली ही चांगलें तेवढें आमच्या तोंडांत घालते व वाईटाचें निवारण करिते (आमच्यावर आलेलीं संकटें आम्हांला दुःख होऊं न देतां निवारण करिते) १. ती आई आमचे रक्षणाकरतां सारखी उभी आहे. ती बसत नाहीं व दूर जात नाहीं आणि मागून पुढून येणाऱ्या आघातांचें निवारण करते २. आम्हांला आतां कोणत्याच गोष्टीचें भय उरलें नाहीं म्हणून आम्हीं कोठेंहि वास करूं. आमचे ठिकाणीं असणारे द्वैताद्वैत भाव नाहींसे झाले आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमचा सर्व योगक्षेमाचा भार विठोबारायानें घेतलेला आहे व त्याचेंच रूप आमचे अंतर्बाह्य भरलें आहे, अथवा बाह्य रूपच आमच्या अंतःकरणांत भरलें आहे ४. [११०३]

मुद्रा लावणें व गळ्यामध्यें सर्व काळ तुळसीचे हार घालणें हेच आमचे अलंकार व शृंगार आहेत १. आम्हीं पंढरीनाथाचे लाडके सेवक आहोंत. आम्हीं वाणीनें त्याच्याच नामाचा निरंतर घोष करूं २. आम्हांला सर्व सुखांचा लाभ

विठोबाच्या ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही नेघोंचि या मुक्ती । एकाविण चित्तीं दुजें नाहीं ॥ ४ ॥ [११०४]

चला पंढरीसी जाऊं । रखुमादेवीवरा पाहूं ॥ १ ॥ डोळे निवतील कान । मना तेथें समाधान ॥ २ ॥ संतां महंतां होतील भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं ॥ ३ ॥ तेथें (तें) तीर्थांचें माहेर । सर्वसुखाचें भांडार ॥ ४ ॥ जन्म नाहीं रे आणीक । तुका म्हणे माझी भाक ॥ ५ ॥ [११०५]

पैल घरीं झाली चोरी । देहा करी बोंब मारी ॥ १ ॥ हांवा हांवा करिसी काय । फिराऊनि नेस्या वाव ॥ २ ॥ सांडुनियां शुद्धी । निजलासी गेली बुद्धि ॥ ३ ॥ चोरीं तुझा काढिला बुर । वेगळें भावा घातलें(ला) दूर ॥ ४ ॥ भलतियासी देसी वाव । लाहसि तूं एवढा ठाव ॥ ५ ॥ तुका म्हणे अझुनि तरी । उरलें तें जतन करीं ॥ ६ ॥ [११०६]

किती वेळां खाला दगा । अझून कां गा जागसी ना ॥ १ ॥ लाज नाहीं हिंडतां गांवें । दुःख नवें नित्य नित्य ॥ २ ॥ संवचोरां हातीं फांसे । देखतां कैसे न देखसी ॥ ३ ॥ तुका म्हणे सांडिती वाट । तळपट करावया ॥ ४ ॥ [११०७]

मुदलामध्यें पडे तोटा । ऐसा खोटा उदीम ॥ १ ॥ आणिकांची कां लाज नाहीं । आळस जींहीं जिंतीले ॥ २ ॥ एके सांते सारिखीं वित्तें । हानि हितें वेगळालीं ॥ ३ ॥ तुका म्हणे हित धरा । नव्हे पुरा गांवढळ ॥ ४ ॥ [११०८]

निरोप सांगतां । न धरीं भय न करीं चिंता ॥ १ ॥ असो ज्याचें त्याचे माथां ।

श्रीविठोबाच्या पायींच प्राप्त होत आहे. ह्यामुळें आमच्या चित्तांत दुसरी कोणतीहि इच्छा राहिली नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमचे चित्तांत एका पंढरीनाथावांचून दुसरें कांहीं नसल्यामुळें आम्हीं मुक्तीची देखील पर्वा बाळगीत नाहीं ४. [११०४]

चला, आपण सर्व मिळून पंढरीस जाऊं व रुक्मिणीपति श्रीविठ्ठल पाहूं १. त्यास पाहिल्यानें डोळे व कान शांत होऊन मनास समाधान होईल २. संतमहंतांच्या तेथें गांठी पडतील व त्यांचे समागमांत आनंदानें वाळवंटांत नाचूं ३. पंढरी ही सर्व तीर्थांची जन्मभूमि असून सर्व सुखांचें केवळ भांडारच आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, पंढरीस गेल्यावर पुनः जन्म नाहीं असें मीं शपथेवर (प्रतिज्ञेनें) सांगतों ५. [११०५]

मायेचे पलिकडील असणारा आत्मस्वरूप भाव हा देहबुद्धीकडून चोरला गेल्यामुळे देहास रडत बसावें लागलें (हा जीव देहाच्या द्वारें मी आणि माझें अशी सारखी बोंब मारीत आहे) १. अरे, दुःखानें देहसंबंधी मी व माझें ह्या उद्गारांची बोंब मोठ्यानें कां करीत आहेस? फिरून हा योग तुला येणार नाहीं, म्हणून वायां जाशील २. आत्मबुद्धि टाकून देहभावाच्या निद्रेनें निजलास (मी कोण आहें हें तूं विसरलास), म्हणून तुझी आत्मबुद्धि नष्ट झाली ३. (अज्ञानादि) चोरांनीं तुझी दुर्दशा केली व स्वरूपस्थितीपासून तुला वेगळें करून प्रकृतिभावांत दूर लोटून दिलें ४. अविवेकादि विकारांना तूं आपल्या हृदयांत जागा दिल्यामुळें अशा अनर्थांच्या ठिकाणीं (वाईट स्थितीला) तूं प्राप्त झालास ५. तुकाराम महाराज म्हणतात, आतां ह्यापुढें तरी सावध होऊन राहिलेल्या आयुष्याचा सदुपयोग कर ६. [११०६]

अनेक वेळां तुला जन्ममृत्यूच्या गचांड्या बसल्या तरी अद्याप तूं कां जागा होत नाहींस? १. अनेक योनिरूप गांवें जन्ममृत्युद्वारें फिरतांना नित्य नित्य नव्या दुःखानें तूं कष्टी होत आहेस त्याची तुला शरम कशी वाटत नाहीं? २. कामक्रोधादि व त्रिगुणरूपी चोर हे आपले पाश घेऊन तुझेबरोबर आहेत. त्यांस जाणून तूं त्यांजकडे कसें लक्ष देत नाहींस? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे त्रिगुणादि चोर तुला भुलवून तुझा नायनाट करण्याकरितां तुला चांगली वाट सोडावयास लावून भलत्याच मार्गानें तुला नेतील ४. [११०७]

ज्यापासून (सुखाच्या) मुद्दलांत तोटा आहे, असला व्यवहार खोटा आहे १. ज्यांनीं आळसास जिंकलें आहे तें पाहून तरी तुला लाज कशी वाटत नाहीं? (तूं कां आळशी झालास?) २. एका बाजारांत आलेले व ज्या सर्वांचें भांडवल एकसारखेंच असून एकास नफा व एकास तोटा होत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, सावध होऊन आपलें स्वहित करून घे. पूर्ण खेडवळ होऊं नको ४. [११०८]

दुसऱ्याचा (देव, वेद, गुरु, संत ह्यांचा) निरोप सांगतांना चिंता व भय मुळींच धरणार नाहीं १.

आपण करावी ते कथा ॥ २ ॥ उतरावा भार । किंवा न व्हावें सादर ॥ ३ ॥ तुका म्हणे वाहे धाक । तया इह ना परलोक ॥ ४ ॥ [११०९]

शूरत्वासी मोल । नये कामा फिके बोल ॥ १ ॥ केला न संडी कैवाड । जीवेंसाठीं तो हें कोड ॥ २ ॥ धीर तो कारण । साह्य होतो नारायण ॥ ३ ॥ तुका म्हणे हरि । दासा रक्षितो निर्धारीं ॥ ४ ॥ [१११०]

हरिच्या दासां भये । ऐसें बोलों तेंही नये ॥ २ ॥ राहोनियां आड । उभा देव पुरवी कोड ॥ २ ॥ हरिच्या दासां चिंता । अघटित हे वार्ता ॥ ३ ॥ खावें ल्यावें द्यावें । तुका म्हणे पुरवावें ॥ ४ ॥ [११११]

दासां सर्व काळ । तेथें सुखाचा कल्लोळ ॥ १ ॥ जेथें वसती हरिचे दास । पुण्य पिके पापा नास ॥ २ ॥ फिरे सुदर्शन । घेऊनियां नारायण ॥ ४ ॥ तुका म्हणे घरीं । होय म्हणियारा कामारी ॥ ४ ॥ [१११२]

आमचा स्वदेश । भुवनत्रयामध्यें वास ॥ १ ॥ मायबापाचीं लाडकीं । कळों आलें हें लौकिकीं ॥ २ ॥ नाहीं निपराद । कोणां आम्हांमध्यें भेद ॥ ३ ॥ तुका म्हणे नाम । अवघें आमचें हें धाम ॥ ४ ॥ [१११३]

काय ढोरांपुढें घालुनि मिष्टान्न । खरासी विलेपन चंदनाचें ॥ १ ॥ नको नको देवा खळाचि संगति । रस ज्या पंगती नाहीं कथे ॥ २ ॥ काय सेज बाज माकडा विलास । अळंकारा नाश करूनि टाकी ॥ ३ ॥ तुका म्हणे काय पाजूनि नवनीत । सर्पा विष थीत अमृताचें ॥ ४ ॥ [१११४]

ज्यानें निरोप सांगितला त्या निरोपाची जबाबदारी त्याच्या मस्तकावर आहे अथवा निरोपांत सांगितल्याप्रमाणें वागण्याची जबाबदारी ऐकणाराचे मस्तकावर आहे, असें जाणून आम्हीं कथा करतों २. आमची कथा ऐकण्याविषयीं श्रोते सादर असोत किंवा नसोत, भूमीचा भार हरण होवो किंवा न होवो, आम्हांस त्याची काळजी वाहाण्याचें मुळींच कारण नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी (हरिकथेच्या द्वारा देवाचा) निरोप सांगण्याचें भय बाळगतात ते इहपरलोकींच्या सुखास मुकतात ४. [११०९]

वायफळ बोलण्यानें कार्यसिद्धि होत नाहीं. शूरत्वास (कर्तृत्वाला) फक्त मोल (किंमत) आहे १. जिवावर उदार होऊन प्रतिज्ञापूर्वक निर्धार कधींहि टाकूं नये २. धैर्य हेंच यशप्राप्तीस कारण आहे. धैर्यानेंच नारायण साहाय्यक होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरि हे निश्चयानें आपल्या धैर्यशाली दासाचें रक्षण करितात ४. [१११०]

हरीचे दासांस भय आहे, असें कोणींहि बोलूं नये १. कारण देव त्यांच्यापुढें उभा राहून त्यांची इच्छा पूर्ण करतो २. हरीच्या दासांना कोणत्याहि प्रकारें चिंता आहे हे म्हणणें असंभवनीय आहे (ही गोष्टच अशक्य आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव त्यांना अन्न आदि देऊन सर्व कांहीं पुरवितो (त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण करतो) ४. [११११]

सर्व काळ हरीचे दास हे सुखाच्याच पुरांत असतात १. ज्या ठिकाणीं हरीचे दास राहातात तेथें पुण्याचा उदय होऊन पापांचा अस्त होतो २. त्यांच्या रक्षणास्तव श्रीहरि हातांत सुदर्शन घेऊन (हरिदासाच्या रक्षणासाठीं त्याच्या) सभोंवती फिरतो. ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरिदासांच्या घरीं काम करण्याकरतां देव हा भारण होऊन सेवकत्व पत्करतो ४. [१११२]

आमचा स्वदेश त्रैलोक्य आहे म्हणून आम्ही त्यांत (त्या त्रैलोक्यांत ब्रह्मरूपानें) वास्तव्य करतों १. आम्ही आपल्या आईबापांचे लाडके आहोंत, हें सर्वांस माहीत आहे २. आम्हांला (आमच्या दृष्टीनें जगांत) कोणी दुष्ट नाहीं. आमच्यांत व दुसऱ्यांत भेद नाहीं (कोणाविषयीं आमच्या मनांत भेदभाव नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरीचें नाम हेंच आमचें वसतिस्थान होय ४. [१११३]

जनावरांस गोड अन्न घालणें व गाढवास चंदनाची उटी लावणें ह्यापासून काय उपयोग होणार आहे? १. हे देवा, ज्यांच्या योगानें कथेचा रसभंग होतो (ज्यांना कथेंतील रस कळत नाहीं) असल्या दुष्टांची संगति मला देऊं नको २. चांगल्या मंचकावर चांगली शय्या व चांगले अलंकारादि अष्ट भोगविलास माकडास दिले तर काय उपयोग आहे? कारण त्यांचा तो नाश करून टाकील ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्पाला दूध पाजून काय उपयोग होईल? कारण त्यास कोणीं अमृत जरी पाजलें तरी त्याचें विष होतें ४. [१११४]

आनंदें एकांती प्रेमें ओसंडत। घेऊं अगणित प्रेमसुख ॥ १ ॥ गोप्य धन नये वारा लागों यास। पाहों नेदूं वास दुर्जनासी ॥ २ ॥ झणीं दृष्टि लागे आवडीच्या रसा। सेवूं जिरे तैसा आपणासी ॥ ३ ॥ तुका म्हणे हें बहु सकुमार। न साहावे भार वचनाचा ॥ ४ ॥ [१११५]

मोक्षपद तुच्छ केलें याकारणें। आम्हां जन्म घेणें युगायुगीं ॥ १ ॥ विटे ऐसें सुख नव्हे भक्तिरस। पुढतापुढती आस सेवावें हें ॥ २ ॥ देवा हातीं रूप धर(वि)ला आकार। नेदूं निराकार होऊं त्यासी ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्त निवांत राहिलें। ध्याई तीं पाउलें विटेवरि ॥ ४ ॥ [१११६]

नको बोलों भांडा। खीळ घालून बैस तोंडा ॥ १ ॥ ऐक विठोबाचे गुण। करीं सादर श्रवण ॥ २ ॥ प्रेमसुखा आड। काय वाजतें चाभाड ॥ ३ ॥ तुका म्हणे हिता। कां रे नागवसी स्थिता(थिता) ॥ ४ ॥ [१११७]

अति झालें उत्तम वेश्येचें लावण्य। परि ते सुवासीन न म्हणावी ॥ १ ॥ उचित अनुचित केलें ठाया ठाव। गुणा मोल वाव थोरपण ॥ २ ॥ शूरत्वावांचूनि शूरांमाजी ठाव। नाहीं आविर्भाव आणिलिया ॥ ३ ॥ तुका म्हणे सोंग पोटाचे उपायी (ई)। कारण कमाईविण नाहीं ॥ ४ ॥ [१११८]

शूरां साजती हतियारें। गांढ्या हांसतील पोरें ॥ १ ॥ काय केली विटंबण। मोतीं नासिका-वांचून ॥ २ ॥ पतिव्रते रूप साजे। सिंदळ काजळ लेतां लाजे ॥ ३ ॥ दासी पत्नी सुता। नव्हे सरी

एकांतामध्यें प्रेमभरित अशा आनंदानें हरीचें असंख्य प्रेमसुख भोगूं १. हरीचें प्रेमसुख हें गुह्य धन आहे. ह्यास बाहेरील देह-अहंकृतीचा ('मला प्रेमसुख मिळालें') असा वारा लागूं नये आणि कामादि दुष्टवृत्तींसहि तें मीं पाहूं देणार नाहीं (दुर्जनाला तर हें सुख पाहूंसुद्धां देणार नाहीं) २. कारण माझ्या आवडीच्या रसाला एखादी कोणाची (कोणा दुष्टाची बाहेरच्या अहंकाराची) दृष्ट लागेल म्हणून आम्हीं एकांतामध्यें त्याचें पचन होईल तसें सेवन करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमचा हा प्रेमरस फार नाजूक आहे. ह्याला कोणाचा शब्दभार (हें प्रेमसुख असें आहे, तसें आहे अशा शाब्दिक वर्णनाचा भार) सोसत नाहीं ४. [१११५]

जन्माभावरूप मोक्षपद आम्हीं तुच्छ मानिलें आहे, कारण आम्हांला युगायुगांचे ठिकाणीं भगवत्-चिंतनाकरितां जन्म घ्यावयाचा आहे १. हरीविषयींचा जो भक्तिरस आहे तो न विटणारा असा आनंदरूप आहे. पुनः पुनः त्याचें सेवन करावें असें वाटतें २. (आम्हीं भक्तिबळावर) निराकार देवाला सगुण साकार रूप धारण करावयास लाविलें आहे. आतां आम्हीं त्याला पुनः निराकार होऊं देणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, विटेवर जीं पाउलें आहेत त्या ठिकाणीं माझें चित्त स्थिर होऊन त्यांचेंच ध्यान मीं करीत आहें ४. [१११६]

हे भांडखोरा, हरिकथेमध्यें व्यर्थ बडबड करूं नको, आपल्या तोंडाला खिळ घालून बैस १. चित्त एकाग्र करून विठोबारायाचे गुण ऐक २. कथेच्या प्रेमसुखाच्या आड येणारी व्यर्थ बडबड तुझें तोंड कां करीत आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या सिद्ध निश्चित असलेल्या हिताला तूं कां आंचवला जातोस? ४. [१११७]

कसबिणीचें रूप अति उत्तम जरी असलें तरी तिला अहेव (सुवासिनी) म्हणूं नये १. अशा प्रकारचीं योग्य अयोग्य स्थानें आहेत, पण त्यांतील बाह्य थोरपणा व्यर्थ आहे, आणि उत्तम गुणास किंमत आहे २. पुरुषार्थावांचून वरवर आविर्भाव आणला असतां शूरांमध्यें त्याची गणना होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, बाह्यात्कारी वेष धरल्यानें पोट भरण्याविषयींचा उपाय होईल, पण अंतःकरण शुद्ध करून परमार्थाविषयीं कमाई केल्यावांचून (दैवी संपत्ति मिळविल्याशिवाय) कार्य होणार नाहीं ४. [१११८]

हातांमध्यें शस्त्र धारण करणें शूराला शोभतें. तेंच शस्त्र नामर्दानें घेतल्यास त्याला मुलें हंसतात १. एखाद्या स्त्रीचें नाक चांगलें नसून तिनें जर मोतीं नाकांत घातलें (मोत्यांची नथ नाकांत घातली) तर तें शोभा न देतां लोकांमध्यें तिची व्यर्थ फजिती होईल २. जी कोणी स्त्री रूपवान् असून पतीच्या ठिकाणीं कायावाचामनानें रत असेल तर त्या पतिव्रतेचें रूप तिला शोभा देतें आणि व्यभिचारिणी स्त्रीला डोळ्यांत काजळ घालतांना लाज वाटते (कारण ते पतिव्रतेचे

एकाचि पिता ॥ ४ ॥ मान बुद्धिमंता । थोर न मानिती पिता ॥ ५ ॥ तुका म्हणे तरी । आंत शुद्ध दंडे वरी ॥ ६ ॥ [१११९]

काय केलें जल(ळ)चरीं । ढी(धी)वर त्यांच्या घातावरी ॥ १ ॥ हा तों ठायींचा विचार । आहे याति वैराकार ॥ २ ॥ श्वापदांतें वधी । निरपराधें पारधी ॥ ३ ॥ तुका म्हणे खळ । संतां पीडिती चांडाळ ॥ ४ ॥ [११२०]

वाईटानें भलें । हीनें दाखविलें चांगलें ॥ १ ॥ एकाविण एका । कैंचें मोल होतें फुका ॥ २ ॥ विषें दा (ख) विलें अमृत । कडु गोड घातें हित ॥ ३ ॥ काळिमेनें ज्योति । दिवसें कळों आला राती ॥ ४ ॥ उंच निंच(नीच)गारा । हिरा परिस मोहरा ॥ ५ ॥ तुका म्हणे भले । ऐसे नष्टांनीं कळले ॥ ६ ॥ [११२१]

असो खळ ऐसे फार । आम्हां त्यांचे उपकार ॥ १ ॥ करिती पातकांची धुणी । मोल न घेतां साबणीं ॥ २ ॥ फुकाचे मजूर । ओझें वागविती भार ॥ ३ ॥ पार उतरुन म्हणे तुका । आम्हां आपण जाती नरका ॥ ४ ॥ [११२२]

संत पंढरीसी जाती । निरोप धाडीं तयां हातीं ॥ १ ॥ माझा न पडावा विसर । तुका विनविती किंकर ॥ २ ॥ केरसुणी महाद्वारीं । तें मी असें निरंतरीं ॥ ३ ॥ तुमचे पायीं पाइतन । मोचे माझें तन मन ॥ ४ ॥ तांबुलाची पिकधरणी । ते मी असें मुख पसरूनि ॥ ५ ॥ तुमची विष्ठा पंढरीराया । ते सारसुवी माझी काया ॥ ६ ॥ लागती पादुका । ते मी तळील मृत्तिका ॥ ७ ॥

अलंकार आहेत) ३. दासीपुत्र आणि औरस (धर्मपत्नीचा) पुत्र हे दोन्ही एका बाईच्याच पोटीं जन्मतात, पण औरसपुत्राप्रमाणें श्रेष्ठत्वाचा मान दासीपुत्रास मिळत नाहीं ४. जो कोणी बुद्धिमान् आहे, त्यास महत्त्वाचा अधिकार मिळतो, आणि त्याचाच बाप वयानें थोर जरी असला, तरी बुद्धिहीन असल्यामुळें त्याला कोणीं विचारीत नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचें अंतःकरण शुद्ध आहे, त्याला बाहेरील वेष अतिशय शोभा देईल (हें दूषण किंवा भूषण व्यक्तीच्या योग्यतेवर आहे) ६. [१११९]

पाण्यामध्यें मत्स्य वगैरे असतात त्यांना विनाकारण मासे मारणारे कोळी लोक मारतात. त्या जळचरांनीं त्यांचा कांहीं अपराध केला आहे काय ? १. हा प्रकार अनादिसिद्ध चालत आला आहे. कांहीं जातींचें कांहीं जातींशीं स्वभावतः वैर असतें २. पारधी लोक हरिण वगैरे श्वापदांचा वध करतात, त्या श्वापदांनीं त्यांचा कांहीं अपराध केला आहे काय ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें जे कोणी दुर्जन आहेत, ते संतांना विनाकारण त्रास देतात, ते चांडाळ आहेत, असे जाणावें ४. [११२०]

अति वाईट हीन पदार्थांचे योगानें उत्तम पदार्थांची परीक्षा होते १. एकावांचून एकाची किंमत फुकट देखील होणार नाहीं २. विष आहे म्हणून अमृताचे ठिकाणीं श्रेष्ठत्व आहे. त्याचप्रमाणें कडु पदार्थ आहेत म्हणून गोड पदार्थ समजतात आणि घातावरून हित समजतें ३. अंधकारानें प्रकाश समजतो व प्रकाशानें रात्र समजते ४. गारा वगैरे क्षुल्लक आहेत त्यायोगानें हिरा, परिस, मोहरा ह्यांस श्रेष्ठत्व येतें ५. तुकाराम महाराज म्हणतात, जगांत अति नष्ट दुष्ट आहेत त्या योगानें श्रेष्ठ सज्जन समजले जातात ६. [११२१]

निंदक दुर्जन असे पुष्कळ असोत, कारण त्यांचे आम्हांवर फार उपकार आहेत १. कारण ते आमच्याकडून मजुरी व साबण न घेतां आमच्या सर्व पातकांचें क्षालन करितात २. असे दुर्जन फुकटचे चाकर आहेत. ते आमच्या सर्व पातकांचें ओझें वागवितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, ते दुर्जन आमचा उद्धार करून आपण मात्र नरकाला जातात ४. [११२२]

वारकरी पंढरीला जातात त्यांच्याबरोबर मीं आपल्या माहेरास निरोप पाठवितों १. तो असा, कीं मीं तुमचा सेवक तुका विनंती करीत आहें, कीं हे पंढरीराया, माझा विसर तुम्हांला कधींहि होऊं नये २. तुमचे महाद्वारामध्यें मीं केरसुणी होऊन केर झाडण्याकरितां निरंतर राहीन ३. माझी तनु आणि मन हें तुमचें पायतन (जोडा) आहे ४. तुमचे मुखांतील तांबूलाचें पींक टाकण्याची माझें मुख पिकदाणी आहे, ती मीं सदा पसरून आहें ५. तुम्हीं जो मलविसर्जन कराल त्या मलाचें ग्रहण करणारें माझें शरीर आहे ६. तुम्ही ज्या ठिकाणीं उभे राहाल त्या ठिकाणीं

तुका म्हणे पंढरिनाथा । दुजें न धरावें सर्वथा ॥ ८ ॥ [११२३]

इच्छेचें पाहिलें । डोळीं अंतीं मोकालिलें ॥ १ ॥ यांचा विश्वास तो काई । ऐसें विचारूनि पाहीं ॥ २ ॥ सुगंध अभ्यंगें पाळितां । केश फिरले जाणतां ॥ ३ ॥ पिंड पाळितां ओसरे । अवघे(घी) घेऊनि मागें सरें ॥ ४ ॥ करितां उपचार । कोणा नाहीं उपकार ॥ ५ ॥ अल्प जीवन करीं । तुका म्हणे साधीं हरी ॥ ६ ॥ [११२४]

यज्ञनिमित्त शरिरासी बंधन । कां रे तृष्णा वायांवीण वाढविली ॥ १ ॥ नव्हे ते भक्ति परलोकसाधन । विषयांनीं बंधन केलें तुज ॥ २ ॥ आशा धरुनि फळाची । तीर्थी व्रतीं मुक्ति कैंची ॥ ३ ॥ तुका म्हणे सिणसी वायां । शरण न वजतां पंढरीराया ॥ ४ ॥ [११२५]

संध्या कर्म ध्यान जप तप अनुष्ठान । अवघें जोडे नाम उच्चारितां । न वेंचे मोल कांहीं न लगती सायास । तरी कां आळस करिसी झणीं ॥ १ ॥ ऐसें हें सार कां न घेसी (नेघेसी) फुकाचें । काय तुझें वेंचे मोल तया ॥ २ ॥ पुत्रस्नेहें शोक करी अजामेळ । तंव तो कृपाळ जवळी उभा । अनाथांच्या नाथें घातला विमानीं । नेला उचलूनि परलोका ॥ ३ ॥ अंतकाळीं गणिका पक्षियाच्या छंदें । राम राम पदें उच्चारिलें । तंव त्या दिनानाथा कृपा आली कैशी । त्यानें तियेसि वैकुंठासी नेलें ॥ ४ ॥ अवचिता नाम आलिया हे गती । चिंतितां चित्तीं जवळी असे । तुका म्हणे भावें स्मरतां राम राम । कोण जाणें (वर्म) तये दशे ॥ ५ ॥ [११२६]

पायाखालील माती मी होईन ७. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा, तुमच्यावांचून मला वेगळें निश्चयानें ठेवूं नका (म्हणजे तुमचेजवळ ठेवा) ८. [११२३]

ह्या नेत्रांच्या इच्छेप्रमाणें पदार्थ पाहिले पण अखेरीस त्या नेत्रांनीं मला सोडून दिलें १. ह्याकरितां विचारानें पाहून ह्या इंद्रियांचा विश्वास मुळींच धरूं नका २. सर्वांगाच्या केंसांना सुगंधी उटणें, तेल लावून प्रतिपाळण केलें; पण ते अखेरीस फिरून काळ्याचे पांढरे झाले हें मीं जाणत आहें ३. ह्या देहपिंडाचें सर्वतोपरि उपचारानें प्रतिपाळण केलें पण तो पिंड सर्व इंद्रियांस घेऊन अखेरीस जरावस्थेंत आला (म्हणजे कृश झाला) ४. नाना प्रकारचे उपचार देहसंबंधीं सर्व इंद्रियांस जरी केले तरी त्यांना त्याचे उपकार वाटत नाहींत (शेवटीं भोग देणाऱ्याला सोडून देतात, त्याची दुर्दशा करतात, अशी हीं देह व इंद्रियें कृतघ्न आहेत) ५. तुकाराम महाराज म्हणतात, आपलें अल्प जीवन सार्थकीं लावून हरीस साध्य करून घे (देहेंद्रियांना अधिक सुखोपभोग देण्याच्या भरीस न पडतां देहनिर्वाहाला आवश्यक तेवढेच थोडे भोग भोगीत जा, पण मुख्यत्वें हरीची प्राप्ति करून घे) ६. [११२४]

यज्ञादि कर्में करण्यानें तूं त्याविषयींची वासना व्यर्थ कां वाढवितोस ? १. त्यायोगानें जीवात्मा बंधनांत पडतो, ह्याकरितां मोक्षसाधन जी भक्ति ती होत नाहीं. व्यर्थ विषयानें तुला बांधून टाकिलें आहे २. तीर्थाचें पर्यटण अथवा कोणत्याहि व्रताचें आचरण जर फलाशा धरून केलें तर मुक्ति मुळींच मिळणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका पंढरीरायाला शरण गेल्यावांचून अन्य साधनादिकांचे व्यर्थ श्रम कां करितोस ? ४. [११२५]

एका श्रीहरीच्या नामाचा उच्चार केला असतां संध्या, कर्म, ध्यान, जप, तप, अनुष्ठानादि सर्व साधनें केल्याचा लाभ होतो. तें नाम घेण्याला कांहीं मोल द्यावें लागत नाहीं व फारसे सायासहि करावे लागत नाहींत. असें आहे तर तूं विनाकारण आळस कां करावा ? १. अशा प्रकारचें हें सारभूत नाम फुकटचें असून तें तूं कां घेत नाहींस ? त्यास तुझा कांहीं खर्च होतो कीं काय ? २. अजामिळानें अंतकाळीं पुत्राच्या उद्देशानें नारायण या नांवाचा उच्चार केल्याबरोबर कृपावंत देव त्याच्याजवळ येऊन उभा राहिला आणि अनाथाचा नाथ जो देव त्यानें त्या पातक्याला विमानामध्यें घालून परलोकास (वैकुंठास) नेलें ३. व्यभिचारिणी गणिका ही पातकी असून तिनें अंतकाळीं राघुपक्ष्याच्या छंदानें राघव नांवाचा उच्चार केला, त्यायोगानें दीनांचा नाथ जो देव, त्यास तिची दया येऊन त्या गणिकेला त्यानें वैकुंठास नेलें ४. सहज अनिच्छेनें हरिनामोच्चार केला तर वर सांगितल्याप्रमाणें गति मिळते. तेंच नामचिंतन सदोदित श्रद्धापूर्वक केलें, तर देव जवळ येऊन राहातो. तुकाराम महाराज म्हणतात, जो कोणीं भावार्थानें राम या नांवाचें स्मरण करील, त्याची स्थिति कोणाला कळेल ? ५. [११२६]

दुष्टाचें चिंतन भिन्न अंतरीं । जरी जन्मवरी उपदेशिला । पालथे घागरीं घातलें जीवन । न धरीच जाण तेंही त्याला ॥ १ ॥ जन्मा येउनि तेणें पतनचि साधिलें । तमोगुणें व्यापिलें जया नरा । जळो जळो हें त्याचें ज्यालेपण । कासया हें आलें संवसारा ॥ २ ॥ पाषाण जीवनीं असतां कल्पवरी । पाहतां अंतरीं कोरडा तो । कुचर मुग नयेचि पाका । पाहतां सारिखा होता तैसा ॥ ३ ॥ तुका म्हणे असे उपाय सकळां । न चले या खळा प्रयत्न कांहीं । म्हणउनि संग न करितां भला । धरितां अबोला सर्व हित ॥ ४ ॥ [११२७]

कासयानें पूजा करूं केशीराजा । हाचि संदेह माझा फेडीं आतां ॥ १ ॥ उदकें न्हाणूं तरी स्वरूप तें तुझें । तेथें काय माझें वेंचे देवा ॥ २ ॥ गंधाचा सुगंध पुष्पाचा परिमळ । तेथें मी दुर्बळ काय करूं ॥ ३ ॥ फळदाता तूंच तांबो(बू)ल अक्षता । तरी काय अनंता वाहूं तुज ॥ ४ ॥ वाहूं दक्षिणा तरी धातु नारायणा । ब्रह्म तेंची अन्न दुजें नाहीं (काई) ॥ ५ ॥ गातां तो (तूं) ओंकार टाळी नादेश्वर । नाचावया थार नाहीं कोठें ॥ ६ ॥ तुका म्हणे मज अवघें तुझें नाम । धूप दीप रामकृष्णहरी ॥ ७ ॥ [११२८]

गातां आइकतां कांटाळा जो करी । वास त्या अघोरीं कुंभपाकीं ॥ १ ॥ रागें यमधर्म जाचविती तया । तुज दिलें कासया मुख कान ॥ २ ॥ विषयांच्या सुखें अखंड जागसी । न वजे एकादशी जागरणा ॥ ३ ॥ वेंचूनियां द्रव्य सेवी मद्यपान । नाहीं दिलें अन्न अतीतासी (अतिथींसीं) ॥ ४ ॥ तीर्थाटण नाहीं केले उपकार । पाळिलें शरीर पुष्ट (ष्टी) लोभें ॥ ५ ॥ तुका म्हणे मग केला साहे दंड । नाइकती लंड सांगितलें ॥ ६ ॥ [११२९]

जे कोणी खळ आहेत, त्यांना चांगला उपदेश जरी जन्मभर केला, तरी त्यांच्या चित्तांत निराळें असें प्रपंचाचें चिंतन असतें. जसें पालथ्या घागरीवर पाणी घातलें असतां ती आंत पाण्याचा लेशहि ग्रहण करीत नाहीं, तसें समजा. १. ज्या मनुष्याला तमोगुणानें व्यापिलें आहे, त्यानें जन्माला येऊन अधोगति साधली. त्याच्या जगण्याला आग लागो! असले दुष्ट जन्माला कां आले? २. पाण्यामध्यें दगड कल्पपर्यंत जरी असला, तरी तो फोडून पाहातां आंत कोरडा असतो. कुचर मूग जो असतो तो जरी पुष्कळ शिजविला तरी पक्क दशेला न येतां (न शिजतां) पूर्वीप्रमाणेंच कायम राहातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वांच्या ठिकाणीं उपाय चालतो, पण दुष्टास वळविण्याचा कोणत्याहि प्रकारचा प्रयत्न चालत नाहीं, म्हणून त्याची कधीं संगति करूं नये हेंच बरें, आणि त्याच्याबरोबर बोलूंहि पण नये; त्यायोगानें आपलें सर्व हित होतें ४. [११२७]

अहो देवा, तुमची पूजा कोणत्या उपचारानें (कशानें) करावी, ह्याबद्दल मला संशय आहे. तो तुम्हीं आतां दूर करा १. तुम्हांला उदकानें स्नान घालावें तर तें उदक तत्त्वतः तुमचें स्वरूप आहे, त्यांत माझें असें काय अर्पण होतें? २. गंधाचा सुगंध व पुष्पांचा परिमळ तूंच आहेस. मग म्यां गरिबानें तुला काय समर्पण करावें? ३. फल, तांबूल व अक्षता हीं तुझीं स्वरूपें आहेत व त्यांचा दाताहि तूंच आहेस. तर आतां मीं तुला काय वाहावें? ४. दक्षिणा अर्पण करावी तर धातुही नारायणरूप आहे आणि नैवेद्य समर्पण करावा तर अन्न ब्रह्मरूप आहे, तें तुझ्याहून निराळें नाहीं ५. ओंकाराचा उच्चार करून त्याच छंदानें टाळी वाजवून जर तुमच्या पुढें नाचावें तर नादब्रह्म (नादाचा ईश्वर) तूंच आहेस व ज्या पृथ्वीवर नाचावें ती तुमचेंच रूप आहे म्हणून नाचण्याला ठिकाण कोठेंच उरलें नाहीं ६. तुकाराम महाराज म्हणतात, माझी धूप, दीप, तांबूलादि षोडशोपचारपूजा 'रामकृष्ण हरि' ह्या तुझ्या नामोच्चारांतच आहे (कारण, हेंच एक भांडवल माझें असें आहे) ७. [११२८]

हरिकथा गाण्यास व ऐकण्यास जो कंटाळा करील त्याला कुंभ(भी)पाकांत (अघोर नरकामध्यें) पचावें-पडावें-लागेल १. त्या दुष्टांना यमधर्म मोठ्या रागानें जाच करितात आणि तुला तोंड व नाक कशाकरितां दिलें होतें असें विचारतात २. अरे, तूं विषयाच्या सुखानें नेहमीं जागृत राहातोस आणि हरिदिनीचे दिवशीं हरिजागरणाला जाण्याला कंटाळा करितोस (हें फार वाईट आहे) ३. तूं जवळील द्रव्य खर्च करून दारू पितोस पण (घरीं आलेल्या) अतिथीला एक दिवस सुद्धां अन्न घातलें नाहींस ४. कधीं तीर्थास गेला नाहींस व कोणावर उपकार केला नाहींस, पण द्रव्य खर्च करून लोभानें शरीराचें पालन करून त्यास पुष्ट केलेंस ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचे हे लंड सांगून सुद्धां ऐकत नाहींत पण अखेरीस यमदंड सहन करतील ६. [११२९]

तुझें म्हणवितां काय नाश झाला । ऐकें बा विठ्ठला कीर्ती तुझी ॥ १ ॥ परी तुज नाहीं आमुचे उपकार । नामरूपा थार केलियाचे ॥ २ ॥ समूळीं संसार केला देशधडी । सांडिली आवडी ममतेची ॥ ३ ॥ लोभ दंभ काम क्रोध अहंकार । यासी नाहीं थार ऐसें केलें ॥ ४ ॥ मृत्तिका पाषाण तैसें केलें धन । आपले ते कोण पर नेणों ॥ ५ ॥ तुका म्हणे झालों देहासी उदार । आणीक विचार काय तेथें ॥ ६ ॥ [११३०]

जाऊनियां तीर्था काय तुवां केलें । चर्म प्रक्षाळिलें वरी वरी ॥ १ ॥ अंतरींचें शुद्ध कासयानें झालें । भूषण त्वां (तें) केलें आपणया ॥ २ ॥ वृंदावन फळ घोळिलें साकरा । भीतरील थारा मोडेचिना ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं शांति क्षमा दया । तोंवरी कासया फुंदा तुम्ही ॥ ४ ॥ [११३१]

बैसोनि निवांत शुद्ध करीं चित्त । तया सुखा अंतपार नाहीं ॥ १ ॥ येऊनि अंतरीं राहील गोपाळ । सायासाचें फळ बैसलिया ॥ २ ॥ रामकृष्ण हरि मुकुंद मुरारी । मंत्र हा उच्चारीं वेळोवेळां ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसें देईन मी दिव्य । जरी होईल भाव एकविध ॥ ४ ॥ [११३२]

धन्य पुंडलिका बहु बरें केलें । निधान आणिलें पंढरीये ॥ १ ॥ न करीं आळस आलिया संसारीं । पाहें पां पंढरी भूवैकुंठ ॥ २ ॥ न पवीजे केल्या तपाचिया रासी । तें जनलोकांसी दाखविलें ॥ ३ ॥ सर्वोत्तम तीर्थ क्षेत्र आणि देव । शास्त्रांनीं हा भाव निवडिला ॥ ४ ॥ विष्णुपद गया रामनाम काशी । अवघीं पायापाशीं विठोबाच्या ॥ ५ ॥ तुका म्हणे मोक्ष देखिल्या कळस । तात्काळ हा नाश अहंकाराचा ॥ ६ ॥ [११३३]

हे विठ्ठला, आम्ही तुझे आहोंत असें म्हटल्यानें आमचा काय काय नाश झाला आहे ही तुझीच कीर्ति आहे ती तूं ऐक १. आम्हीं तुला नामरूपात्मक स्थितीस आणिलें हे आमचे उपकार तूं कांहीं मानीत नाहींस २. आम्हीं (तुझ्या भक्तीकरितां अविद्येसह) समूळ प्रपंच देशोधडीस नेला व त्यासंबंधीं (स्त्रीपुत्रादिविषयक) प्रीतीचा त्याग केला ३. काम, क्रोध, लोभ व अहंकार ह्यांस माझ्या ठिकाणीं राहाण्याला मुळींच थारा राहिला नाहीं असें केलें ४. आम्हांला द्रव्य मृत्तिकेसारखें व पाषाणासारखें दिसतें आणि मी आपले व परके असें कांहीं जाणत नाहीं. ५. तुकाराम महाराज म्हणतात, मी आपल्या देहावर उदार झालों आहें, मग त्या ठिकाणीं अन्य विचार काय राहिला ? (आतां ह्यापेक्षां आमचा कोणता नाश व्हावयाचा राहिला आहे, तें तूंच सांग) ६. [११३०]

अरे, तूं तीर्थास जाऊन काय केलेंस ? तर वरील चर्मांचें प्रक्षालन केलेंस (वरवर कातडें मात्र धुतलेंस) १. त्या योगानें अंतःकरण काय शुद्ध झालें ? अनेक तीर्थें केल्यानें लोकांत भूषण मात्र तूं मिळविलेंस २. ज्याप्रमाणें कडुवृंदावन फळ साखरेंत घोळलें असतां त्याचा कडुपणा मुळींच जात नाहीं त्याप्रमाणें तीर्थानें अंतःकरणांतील मलाचें वास्तव्य नाहींसें होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, शांति, क्षमा, दया हीं जोंपर्यंत तुमचेपाशीं नाहींत तोंपर्यंत (तीर्थयात्रा केल्याच्या) उगीच गर्वानें तुम्हीं कां स्फुंदत आहां ? ४. [११३१]

हे मानवा, तूं एका ठिकाणीं बसून निवांतपणें जर चित्त शुद्ध केलेंस तर ज्या सुखाला अंतपार नाहीं असें सुख तुला मिळेल १. तें हें कीं तुझ्या अंतःकरणामध्यें गोपाळ येऊन वास्तव्य करील. त्या योगानें पुष्कळ यत्नानें मिळणारें फळ बसल्या ठिकाणीं प्राप्त होईल २. राम कृष्ण हरि मुकुंद मुरारि ह्या मंत्राचा उच्चार सर्वकाळ करावा ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर तुझा भाव हरीविषयीं एकविध होईल तर तुला ध्रुवपदांत दर्शविलेलें फळ मिळेल असें मीं शपथेवर सांगतों ४. [११३२]

पुंडलिकरायांनीं फार बरें केलें. तें असें कीं कोणास प्राप्त न होणारें निधान पंढरीस आणलें, म्हणून आज पुंडलिकराय धन्य आहेत १. ह्याकरितां अहो जन हो, तुम्हीं जन्माला आले असतां आळस करूं नका. लवकर जाऊन पंढरीभूवैकुंठ पाहा २. जी वस्तु अनेक तपादि साधनांच्या राशीच्या राशी केल्यानें प्राप्त होणार नाहीं ती वस्तु पुंडलिकरायांनीं सर्व लोकांस प्रत्यक्ष दाखविली ३. पंढरीक्षेत्र, चंद्रभागा तीर्थ आणि विटेवरील देव हे तिन्ही सर्वोत्तम आहेत हें शास्त्रानें निवडून सांगितलें आहे ४. विष्णुपद, गया, रामनाम व काशी हीं सर्व विठोबारायाच्या पायांजवळ आहेत ५. तुकाराम महाराज म्हणतात, विठोबारायाच्या देवालयाचा कळस लांबून पाहिला असतां तात्काळ अहंकाराचा नाश होऊन (मोक्ष मिळतो) (असें ह्या पंढरीक्षेत्राचें महत्त्व आहे) ६. [११३३]

धन्य ते पंढरी धन्य भीमातीर । आणियेलें सार पुंडलिकें ॥ १ ॥ धन्य तो हा लोक अवघा दैवाचा । सुकाळ प्रेमाचा घरोघरीं ॥ २ ॥ धन्य तेहि भूमि धन्य ते तरुवर । धन्य तें सरोवर तीर्थरूप ॥ ३ ॥ धन्य त्या नरनारी मुखीं नाम ध्यान । आनंदें भुवन गर्जतसे ॥ ४ ॥ धन्य पशु पक्षी कीटक पाषाण । अवघा नारायण अवतरलासे ॥ ५ ॥ तुका म्हणे धन्य संसारा तीं आलीं । हरिरंगीं रंगलीं सर्वभावें ॥ ६ ॥ [११३४]

मायबाप करिती चिंता । पोर नाइके सांगतां ॥ १ ॥ नको जाऊं देउळासी । नेतो बागुल लोकांसी ॥ २ ॥ वैष्णवांसंगतीं । हातीं पडलीं नेणों किती ॥ ३ ॥ कर्णद्वारें पुराणिक । भुलवी शब्दें लावी भीक ॥ ४ ॥ आम्हां कैंचा मग । करिसी उघडियांचा संग ॥ ५ ॥ तुका म्हणे जाणें नरका । त्यांचा उपदेश आइका ॥ ६ ॥ [११३५]

मन माझें चपळ न राहे निश्चळ । घडी एकी पळ स्थिर नाहीं ॥ १ ॥ आतां तूं उदास नव्हें नारायण । धांवे मज दीना गांजियेलें ॥ २ ॥ धांव घालीं पुढें इंद्रियांचे ओढी । केलें तडातोडी चित्त माझें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझा न चले सायास । राहिलों मी आस धरूनी तुझी ॥ ४ ॥ [११३६]

मागतियाचे दोनचि कर । अमित भांडार दातियाचें ॥ १ ॥ काय करूं आतां कासयांत भरूं । हा मज विचारू पडला देवा (पडियेला) ॥ २ ॥ एक सांठवण प्रेमें ओसंडली । जिव्हा हे भागली करितां माप ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां आहे तेथें असों । अखंडुनि बैसों पायांपाशीं ॥ ४ ॥ [११३७]

जिचें पीडे बाळ । प्राण तियेचा विकळ ॥ १ ॥ ऐसा मातेचा स्वभाव । सूत्र दोरी

तें पंढरपूर व तें भीमातीर धन्य आहेत, कारण त्या ठिकाणीं पुंडलिक रायांनीं सर्व सारांतील सार आणलें आहे १ येथील राहाणारे सर्व लोक धन्य असून दैववान् आहेत; कारण, तेथें घरोघर देवाविषयींच्या प्रेमाचा सुकाळ आहे २. तेथील भूमी धन्य आहे व वृक्ष धन्य आहेत आणि तीर्थरूप चंद्रभागासरोवर धन्य आहे ३. तेथील स्त्रिया व पुरुष ह्यांच्या चित्तामध्यें हरीचें ध्यान व मुखामध्यें हरीचें नाम असून आनदानें त्यांचीं घरें दुमदुमलीं आहेत, म्हणून तीं सर्व धन्य आहेत ४. तेथील पशु, पक्षी, किडे, पाषाण इत्यादिरूपानें नारायण अवतीर्ण झाले आहेत ५. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वभावानें (काया-वाचा-मनानें) हरिरंगीं जीं रंगलीं आहेत तीं जन्माला येऊन धन्य झालीं आहेत ६. [११३४]

(परमार्थ करीत असलेलें) मूल सांगितलेलें ऐकेना म्हणून त्याचे आईबाप चिंता करितात, 'काय करावें? कितीहि सांगितलें तरी हें मूल ऐकत नाहीं.' १. देवाचे देवळांत जाऊं नकोस, तेथें बागुलबोवा लोकांस (मुलांस) नेतो, असें मुलास सांगतात २. पुराणिकबोवा हे कानांत कांहीं उपदेश करतात. पुराणांतील भूलथापा सांगून लोकांस भिकेस लावतात ३. आजपर्यंत विष्णुभक्तांच्या हातामध्यें अगणित माणसें सांपडलीं (त्यायोगानें ते संसारास आंचवले) ४. सर्वसंगपरित्याग करून उघड्या झालेल्या संतांची तुला संगति लागल्यावर आमच्या उपयोगीं तूं कसा पडशील? ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा आईबापांचा उपदेश ऐकल्यानें मुलास नरकास जावें लागेल ६. [११३५]

हे देवा, माझें मन अतिशय चंचल झालें आहे, एक घटका किंवा पळभर सुद्धां स्थिर राहात नाहीं १. हे नारायणा, आतां तुम्ही उदास बसूं नये, धांव घाला आणि माझे मनास आंवरा. त्यानें मला फार गांजिलें आहे २. इंद्रियांची ओढ मनास लागली असल्याकारणानें तें तिकडेच धांव घेत आहे, त्यायोगें माझ्या चित्ताची ओढाताण झाली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यासंबंधानें माझे कांहीही यत्न चालत नाहींत, म्हणून मीं तुझी आशा धरून राहिलों आहें. [११३६]

माणसास (दान घ्यायला) दोन हात आहेत परंतु देणाऱ्याचें भांडार असंख्य आहे. १. हे देवा, घेतलेलें दान कशांत भरून ठेवावें ह्याबद्दल मला मोठा विचार पडला आहे २. अंतःकरण हें एक जागा होती परंतु ती तुजविषयींच्या प्रेमानें झरून गेली आणि तुझ्या नामाचें-प्रेमाचें माप करतां करतां जिव्हा थकून गेली ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां जसे आम्हीं आहोंत त्या ठिकाणींच असून तुमचे आज्ञाधारक होऊन तुमचे चरणांजवळ बसूं ४. [११३७]

जिच्या बालकास पीडा होत आहे त्या माउलीचा प्राण कासावीस होतो १. अशा प्रकारचा आईचा स्वभावच आहे.

एक जीव ॥ २ ॥ सुखाची विश्रांति । उमटे मातेचिये चित्तीं ॥ ३ ॥ तुका म्हणे संत । तुम्ही बहु कृपावंत ॥ ४ ॥ [११३८]

यावें माहेरास । हेच सर्वकाळ आस ॥ १ ॥ घ्यावी उचिष्टाची धणी । तीर्थें इच्छी पायवणी ॥ २ ॥ भोग उभा आड । आहे तोंवरीच नाड ॥ ३ ॥ तुका म्हणे देवें । माझें सिद्धी पाववावें ॥ ४ ॥ [११३९]

लेंकुराचें हित । जाणे (वाहे) माउलीचें चित्त ॥ ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीति ॥ २ ॥ पोटीं भार वाहे । त्याचें सर्वस्वही साहे ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें । तुम्हां संतांवरी ओझें ॥ ४ ॥ [११४०]

आम्हां गांजी जन । तरि कां मेला नारायण ॥ १ ॥ झालीं पोरटीं निढळें । ठाव नाहीं बुड आळें ॥ २ ॥ आम्हीं जना भ्यावें । तरि कां न लाजिजे देवें ॥ ३ ॥ तुका म्हणे देश । झाला देवाविण ओस ॥ ४ ॥ [११४१]

तुम्हीं पाय संतीं । माझे ठेवियेले चित्तीं ॥ १ ॥ आतां बाधूं न शके काळ । जालीं विषम शीतळ ॥ २ ॥ भय नाहीं मनीं । देव वसे घरीं रानीं ॥ ३ ॥ तुका म्हणे भये(य) । आतां (आम्हां) स्वप्नीं(तें)ही नये ॥ ४ ॥ [११४२]

काळाचे ही काळ । आम्ही विटोबाचे लडिवाळ ॥ १ ॥ करूं सत्ता सर्वां ठायीं । वसों निकट-वास(सें) पायीं ॥ २ ॥ ऐसी कोणाची वैखरी । वदे आमुचे समोरी ॥ ३ ॥ तुका म्हणे बाण । हातीं हरिनाम तीक्ष्ण ॥ ४ ॥ [११४३]

सूत्राच्या वळलेल्या दोरीप्रमाणें आईचा व तिचे बालकाचा जीव एक आहे २. मुलाच्या दुःखाचा परिहार होऊन त्यास विश्रांतीचें सुख मिळालें कीं तें आईच्या चित्तांत उमटतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा ह्या आईप्रमाणें तुम्हीं सर्व संत कृपावंत आहांत ४. [११३८]

संत-आईबापांच्या घरीं जावें हीच सर्वकाळ आशा आहे १. माहेरीं येऊन सर्वकाळ उच्छिष्टाच्या सेवनानें तृप्त व्हावें. ज्यांच्या चरणतीर्थाची इच्छा सकळ तीर्थें करतात त्यांच्या चरणांचें तीर्थ घ्यावें २. जोंपर्यंत प्रारब्धभोग आड आहेत तोंपर्यंत आईबापांचे ठिकाणीं अंतराय आहे (संतांच्या भेटीला अडथळा आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवानें माझे हे मनोगत सिद्धीस न्यावेत (संतभेटीची इच्छा पूर्ण करावी) ४. [११३९]

मुलाचें हित व्हावें हेंच आईचे चित्तास वाटत असतें १. मुलाकडून लाभ होण्याची कांहीं इच्छा मनांत न धरितां आई त्याजवर प्रीति करते २. अशी तिच्या कळकळीची (प्रेमाची) विलक्षण जाति आहे. ज्या मुलाचें नऊ महिने पोटांत ओझें बाळगलें आहे त्याचा ती सर्वस्वीं सांभाळ करते व त्यापासून होणारे कष्ट सोसते ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या बालकाचें सर्वस्वीं ओझें जसें मातेवर असतें त्याप्रमाणें माझें ओझें तुम्हां संतांवर आहे ४. [११४०]

आम्हांस जग गांजीत आहे. ह्यावरून असें वाटतें कीं (आमचा रक्षक) नारायण मेला कीं काय? १. आतां आम्हीं पोरके निर्दैव झालों. आमचें रक्षण करणारें, आश्रय देणारें असें कोणी आम्हांस राहिलें नाहीं २. जनांचें भय जर आम्हीं धरलें तर त्याची लाज देवास नाहीं काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा देश देवावांचून ओस पडला ४. [११४१]

तुम्हीं संतांनीं आपले चरण माझ्या चित्तामध्यें ठेविले १. त्यायोगानें हृदयांतील विषम भाव नाहींसा झाला, आतां काळाची सुद्धां बाधा आम्हांस राहिली नाहीं २. घरांत व रानांत सर्वत्र एक देवाचा प्रत्यय असल्यामुळें (एक देव राहातो असा प्रत्यय येत असल्यामुळें) मन भयरहित झालें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां भय हें माझ्या स्वप्नांत देखील वाटत नाहीं ४. [११४२]

आम्हीं विठोबाचे लाडके सेवक असल्यामुळें काळाचेहि काळ झालों आहोंत १. आतां सर्व ठिकाणीं आम्हीं सत्ता करूं आणि विठोबाच्या पायांजवळ राहूं २. कोणाची वैखरी (वाणी) आमचे समोर व आमचे विरुद्ध बोलूं शकेल? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अति तीक्ष्ण असे हरिनामाचे बाण आमचे हातांत आहेत ४. [११४३]

जन्मा येऊन उदार झाला । उद्धार केला वंशाचा । मेळवूनि धन मेळवी माती । सदा विपत्ती भोगीतसे ॥ १ ॥ नाम घेतां न मिळे अन्न । नव्हे कारण देखिलिया । धर्म करितां ऐके कानीं । बांधे निजोनि डोकियासी ॥ २ ॥ घरा व्याही पाहुणा आला । म्हणे त्याला बरें नाहीं । तुमचे गांवीं वैद्य आहे । बैसोनि काय प्रयोजन ॥ ३ ॥ उजवूं किती होतील पोरें । मरतां बरें म्हणे यांसी । म्हणऊनि देवा नवस करी । दावी घरींहुनि बोनें ॥ ४ ॥ पर्वकाळीं भट घरासी आला । बोंब घाला म्हणे पोरां । तुमचा उणा होईल वांटा । काळ पिठासी पैं आला ॥ ५ ॥ दाढी करितां अडका गेला । घरांत आला बाइलेपें । म्हणे आतां उगवीं मोडी । डोई बोडीं आपुली ॥ ६ ॥ तीर्थ स्वप्नीं नेणें गंगा । पूजन लिंगा गांविंचिया । आडकुनि दार बैसे द्वारीं । आल्या घरीं (घर) म्हणे ओस ॥ ७ ॥ माझ्या भय वाटे चित्तीं । नरका जाती म्हणोनि । तुका म्हणे ऐसे आहेत गा हरी । यांही तारीं जिवांसी ॥ ८ ॥ [११४४]

जाणे वर्तमान । परि तें न वारे त्याच्यानें ॥ १ ॥ तोही कारणाचा दास । देव म्हणवितां पावे नास ॥ २ ॥ वेंची अनुष्ठान । सिद्धी कराया प्रसन्न ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याचें । मुद्दल गेलें हाटवेंचें ॥ ४ ॥ [११४५]

घातला दुकान । पढीये तैसा आहे वान ॥ १ ॥ आम्ही भांडारी देवाचे । द्यावें घ्यावें माप वाचे

(श्रीमंत पण नास्तिक आणि विशेषतः कृपण असलेला) असा एक मनुष्य जन्मास येऊन मोठा उदार झाला आणि खालीं सांगितल्याप्रमाणें कृति करून त्यानें वंशाचा उद्धार केला, ज्यानें पुष्कळ धन मिळवून मातीमध्यें पुरून टाकिलें व जो सर्व काळ आपण दारिद्र्यांत काढतो १. असल्या ह्या नष्टाचें नांव घेणारास अन्न मिळत नाहीं. एखादें कार्य करण्याचे आरंभीं जर तो दिसला तर तें कार्यहि होत नाहीं. दुसऱ्यानें कोणीं धर्म केलेला ह्याचे कानावर आल्यास त्याचें डोकें उठतें व तें तो बांधून निजून राहातो २. त्याचे घरीं कोणीं त्याचा व्याही पाहुणा आला तर सांगतो कीं मला चैन नाहीं. ह्याकरितां येथें न बसतां गांवी जाऊन एखादा वैद्य घेऊन यावें (त्याला औषध विचारून कळवावें) ३. (मनांत म्हणतो) किती तरी हीं पोरें झालीं ? आतां ह्यांचीं लग्नें कोठपर्यंत करूं ? हीं मरतील तर बरें असें म्हणतो व त्याजबद्दल देवाला नवसहि करतो व तो नवस जेवणाच्या ताटाचा नैवेद्य दाखवून फेडतो ४. एखाद्या पर्वणीस कोणी भटभिक्षुक घरीं आला तर तो आपल्या मुलांना असें सांगतो कीं त्या भिक्षुकापुढें जाऊन (आमच्या घरीं चोरी झाली) आमच्याजवळ कांहीं नाहीं, असें त्यांस सांगून बोंब मारा; कारण हा भिक्षुक आला नाहीं तर तुमच्या घरांतील पीठ नाहींसें करण्याला काळ आला आहे. त्याला जर तुम्हीं पीठ घातलें तर तुमच्याजवळचें कमी होईल ५. एके वेळेस त्याला दाढी सुद्धां सर्व हजामत करण्याचा प्रसंग आला त्या वेळेस त्यानें आपल्या हजामतीबद्दल न्हाव्यास अधेला देण्याचें ठरविलें; परंतु तो जवळ नसल्यामुळें एक पैसा देणें भाग पडलें, तेव्हां आपला जास्त गेलेला अधेला वसूल व्हावा म्हणून तो घरांत असलेल्या आपल्या बायकोजवळ आला आणि तिला सांगूं लागला, कीं न्हाव्याकडे आपला अधेला जास्त गेला, तर तूं आपलें डोकें भादरून घे ६. गंगादि तीर्थयात्रा करण्याचें व गांवांतील महादेवाची पूजा करण्याचें ह्याच्या स्वप्नांतहि येत नाहीं. तो सदा दार अडवून बसतो. त्याच्या घरी कोणी पाहुणा आल्यास त्याला तो सांगतो, कीं घरांत कोणी नाहीं. तें ओस पडलें आहे ७. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, येथपर्यंत सांगितलेलें वर्णन करणारे जीव आहेत, तरी पण तूं त्या जीवांचा उद्धार कर, कारण त्यांना नरकगति मिळेल म्हणून माझ्या जीवाला भय वाटत आहे ८. [११४४]

(एखादा ज्योतिषी भूत-भविष्य वर्तमान जाणणारा असला तरी) सांप्रतकाळीं काय होईल हें तो जाणतो पण तें दूर करण्याचें सामर्थ्य त्याचे अंगीं नसतें १. असा मनुष्य पूर्वसंचित कर्माचा दास आहे (प्रारब्धाधीन आहे), त्यानें आपणास मी देव आहे असें म्हटलें तरी तो नष्ट होईलच २. जो अष्टमहासिद्धि आपणांस प्रसन्न व्हाव्या म्हणून आपण केलेल्या अनुष्ठानाचा व्यय करितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यांनीं कमावलेलें पुण्याईचें भांडवल हें विषयांच्या लोभानें गमावलें अथवा मनुष्यदेहरूपी भांडवल हें विषयांच्या लोभानें प्रवृत्तीच्या बाजारांत (मायिक विषयांची खरेदी करण्यांत) गमावलें ४. [११४५]

आम्हीं जें (परमार्थाचें) दुकान घातलें आहे, त्यांत ज्याला जसा आवडेल तसा माल आहे १. आम्हीं श्रीविठोबा-

॥ २ ॥ उगवूं जाणों मोडी । जाली नव्हे त्याची जोडी ॥ ३ ॥ तुका म्हणे पुडी । मोला तैसी खरी कुडी ॥ ४ ॥ [११४६]

सादाविलें एका । सरे अवघियां लोकां ॥ १ ॥ आतां आवडीच्या हातीं । भेद नाहीं ये पंगती ॥ २ ॥ मोकळींच पोतीं । नाहीं पुसायाची गुंती ॥ ३ ॥ तुका म्हणे बरा । आहे ढसाळ वेव्हारा ॥ ४ ॥ [११४७]

तडामोडी करा । परि उत्तम तें भरा ॥ १ ॥ जेणें खंडे एके खेपे । जाय तेथें लाभें वोपे ॥ २ ॥ दाविलिया सारिखें । मागें नसावें पारिखें ॥ ३ ॥ मागें पुढें ऋण । तुका म्हणे फिटे हीण ॥ ४ ॥ [११४८]

नसावें ओशाळ । मग मानिती सकळ ॥ १ ॥ जाय तेथें पावे मान । चाले बोलिलें वचन ॥ २ ॥ राहों नेदी बाकी । दान ज्याचें त्यासी टाकी ॥ ३ ॥ होवा (व्हावा) वाटे जना । तुका म्हणे साठीं गुणा ॥ ४ ॥ [११४९]

लाज वाटे मज मानिती हे लोक । हें तों नाहीं एक माझे अंगीं ॥ १ ॥ मोजुनि झिजलों मापाचिया परी । जाळावी ते (हे) थोरी लाभाविण ॥ २ ॥ कोमळ कंटक तीक्षण अगरीं । पोचट ते वरी अंगकांति ॥ ३ ॥ चित्रींचें तें लेप शृंगारिलें निकें । जीवेंविण फिकें रूप त्याचें ॥ ४ ॥ तुका म्हणे दिसें वायां गेलों देवा । अनुभव ठावा नाहीं तेणें ॥ ५ ॥ [११५०]

बोलविसी माझे मुखें । परी या जनां वाटे दुःख ॥ १ ॥ जया जयाची आवडी । तया लागीं तें

रायाचे खजीनदार आहोंत त्या कारणानें जो जशी इच्छा करून येईल त्यास आम्हीं वाणीच्या (हरिनामाच्या) मापानें देतों व घेतों २. कोणाची मोड (वागणूक) कशी असेल ती उगवूं (स्पष्ट करूं) व कोणास हरिनामाची जोड झाली किंवा न झाली हें सर्व आम्ही जाणत आहों ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसें कोणीं मोल देईल तसें त्यांस आम्ही सरस निरस जिन्नस देतों (अधिकारपरत्वें उपदेश करतों) ४. [११४६]

सर्व लोकांना एकदम हांक मारून मीं ताकीद दिली १. ती अशी, कीं परमार्थाविषयीं ज्याची जशी प्रीति असेल तसें त्यास आमचे पंक्तीचें भोजन मिळेल, कारण आमचेपाशीं पंक्तिभेद नाहीं २. आम्हीं दुकानामध्यें परमार्थानें भरलेलीं पोतीं तोंड न बांधतां मोकळीं ठेविलीं आहेत. त्यांतील माल घेण्याची इच्छा असल्यास कोणास विचारण्याची आडकाठी नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या व्यापारामध्यें आमचा हात उत्तम सढळ आहे ४. [११४७]

अहो जन हो, तुम्हीं आपलेजवळचे (देहेन्द्रियादि किडुक-मिडुक हरीला) विका परंतु त्या द्रव्यानें (परमार्थाचा) उत्तम माल भरा १. ज्या योगानें कोट्यावधि जन्ममरणाचे फेरे एका जन्मानें चुकतील व जाईल त्या ठिकाणीं आपला माल नफ्यानें विकला जाईल अशी सांठवण करा २. जसे तुम्हीं वेष दाखवाल तसे ते खरे पाहिजेत, पश्चात् (परमार्थ हस्तगत झाल्यानंतर) वेगळी वागणूक उपयोगी नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मागील संचितकर्माचें व पुढें होणाऱ्या क्रियमाणाचें ऋण–दारिद्य दूर होईल (व तुम्हीं मुक्त व्हाल) ४. [११४८]

जो कोणाचा कांहीं मिंधा नाहीं त्यास सर्व लोक मानतात १. तो जाईल त्या ठिकाणीं त्यास मान मिळतो. तो बोलेल त्याप्रमाणें लोक वागतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचे गुण उत्तम आहेत तोच जगाला हवासा वाटतो ४. [११४९]

लोकांनीं मला मान द्यावा, असे गुण माझे आंगीं नाहींत; म्हणून लोक जो माझा मान करतात, त्या योगानें माझे मनास लाज वाटते १. ज्याप्रमाणें माप मोजणी करून झिजतें, त्याप्रमाणें मी परमार्थांत झिजलों आहे; मोजण्यांत मापास जसा लाभ नाहीं, तसा मलाहि परमार्थाचा लाभ नाहीं, असें असून, माझी थोरवी वाढली आहे तिला आग लागो २. कोंवळ्या कांट्याचें अग्र तीक्ष्ण दिसतें, परंतु तसें तें खरोखर नसून, त्यावर पाय दिला तर तें पोंचट आहे असें अनुभवास येतें ३. भिंतीवर काढलेलीं चित्रें उत्तम शृंगारलेलीं दिसतात, परंतु त्यांत एक जीव नसल्यानें व्यर्थ आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमच्या स्वरूपाचा मला अनुभव नाहीं, म्हणून माझा जन्म फुकट गेला, असें वाटतें ५. [११५०]

हे देवा, मीं जो कांहीं उपदेश करीत आहें, तो तूंच माझ्या मुखानें करीत आहेस; पण तो ऐकून या जनांस दुःख

चरफडी ॥ २ ॥ कठीण देतां काढा । जल्पे रोगी मेळवी दाढा ॥ ३ ॥ खाऊं नये तेंचि मागे । निवारितां रडों लागे ॥ ४ ॥ वैद्या भीड काय । अतित्याई (आतताई) जीवें जाय ॥ ५ ॥ नये भिडा सांगों आन। पथ्य औषधा कारण ॥ ६ ॥ धन माया पुत्र दारा । हे तों आवडी नरका थारा ॥ ७ ॥ तुका म्हणे यांत । आवडे ते करा मात ॥ ८ ॥ [११५१]

पतिव्रते आनंद मनीं । सिंदळ खोंचे व्यभिचारवचनीं ॥ १ ॥ जळो वर्म लागो आगी । शुद्धपण भलें जगीं ॥ २ ॥ सुख पुराणीं आचारशीळा । दुःख वाटे अनर्गळा ॥ ३ ॥ शूरा उल्हास अंगीं । गांढ्या मरण ते प्रसंगीं ॥ ४ ॥ शुद्ध सोनें उजळे आगीं । हीन काळें धांवे रंगीं ॥ ५ ॥ तुका म्हणे तोचि हिरा। घनघायें निवडे पुरा ॥ ६ ॥ [११५२]

चालती आडवाटा । आणिकां दाविती जे नीटा ॥ १ ॥ न मनीं तयांचे उपकार । नाहीं जोडा तो गव्हार ॥ २ ॥ विष सेवूनि वारी मागें । प्राण जातां जेणें संगें ॥ ३ ॥ बुडतां हांकामारी । ठाव नाहीं आणिकां वारी ॥ ४ ॥ तुका म्हणे न करीं हेका । गुण घेऊन अवगुण टाका ॥ ५ ॥ [११५३]

कुळींचें दैवत ज्याचें पंढरीनाथ । होईन दासीसुत त्याचे घरीं ॥ १ ॥ शुद्ध यातिकुळवर्णा चाड नाहीं । करीं भलते ठायीं दास तुझा ॥ २ ॥ पंढरीसी कोणी जाती वारकरी । होईन त्यांचे घरीं पशुयाति ॥ ३ ॥ विठ्ठल चिंतन दिवसरात्रीं ध्यान । होईन पायतन त्याचे पायीं ॥ ४ ॥ तुळसीवृंदावन जयाचे अंगणीं । होईन केरसुणी त्याचे घरीं ॥ ५ ॥ तुका म्हणे हाचि भाव माझ्या चित्तीं। नाहीं आणिकां गती चाड मज ॥ ६ ॥ [११५४]

वाटत आहे १. ज्याला ज्या विषयाची आवड असते, त्या विषयाकरितां तो तडफडत असतो २. रोग्यास कडु काढा दिला असतां तो त्याचा तिरस्कार करून तोंड मिटतो ३. जें त्यास खाऊं नये असें वैद्यानें सांगितलें आहे, तें तो मागतो; व कोणी खाऊं नको म्हटलें तर रडतो ४. वैद्यास भीड कसली? तो खरें सांगणार; त्यासंबंधानें दुराग्रह केल्यास, रोगी जीवास मुकतो ५. रोग्याचे भिडेनें त्यास कुपथ्य होईल असें भलभलतें खाणें खावयास सांगूं नये; कारण औषध घेतल्याची सफलता पथ्यानेंच होते ६. धन, पुत्र व स्त्री इत्यादिकांची माया करण्यानें नरकप्राप्ति होईल ७. तुकाराम महाराज म्हणतात, हे जन हो, अहो तुम्हांस हे सर्व (चांगले व वाईट) उपाय सांगितले आहेत; ह्यांत तुम्हांस पसंत होतील ते करा ८. [११५१]

व्यभिचाराचा (निषेधपर) शब्द ऐकून (व्यभिचार करणें वाईट आहे ह्या उपदेशानें) पतिव्रतेस आनंद वाटतो व त्यानेंच व्यभिचारणीचे मनास धक्का बसतो १. म्हणून अशुद्धपणाच्या वर्तनास आग लागो! जगामध्यें शुद्धपणानें राहावें, हेंच उचित होय २. सदाचारसंपन्न लोकांस पुराणें ऐकल्यापासून आनंद होतो व दुराचारी लोकांस त्याचा विषाद वाटतो ३. युद्धाच्या प्रसंगीं वीरांचे बाहु स्फुरण पावतात व नामर्दास तो केवळ मरणप्रसंगच होय ४. शुद्ध सोनें जास्त पुटें देऊन त्यास अग्नीच्या आंची दिल्यानें अधिकच उजळ होतें व हिणकस असेल तर तें काळें पडतें ५. तुकाराम महाराज म्हणतात, जो घणाच्या घावानें न फुटतां टिकतो तोच खरा हिरा असें समजावें ६. [११५२]

आपण स्वतः आडवाटेनें जातात पण दुसऱ्यास जे सरळ मार्ग दाखवितात १. असल्यांचे उपकार जो न मानील तो अनुपम्य मूर्ख होय (त्याच्या मूर्खपणाला जोड नाहीं) २. आपण विषसेवन करून प्राण जाण्याच्या अवस्थेंत जो दुसऱ्यास विष सेवन करूं नये असें सांगतो ३. आपण स्वतः पाण्यांत बुडत असतांना दुसऱ्यास ह्या ठिकाणीं पाण्याचा अंत नाहीं, तिकडे कोणी येऊं नका, म्हणून जो सांगतो त्याचे उपकार मानावे, ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्यासंबंधानें कांहीं हट्ट मनांत धरूं नये. जो कोणी चांगलें हितांचें सांगत असेल तर 'उपदेश करणारा दुर्गुणी आहे, त्याचें काय ऐकायचें?' असला हट्ट सोडावा; त्याचे गुण घेऊन अवगुण टाकावे ५. [११५३]

ज्याचें कुळदैवत पंढरीनाथ आहे त्याच्या घरीं मी त्याचा दासीपुत्र होईन १. हे देवा, शुद्धजाति-कुळ-वर्णाची मला इच्छा नाहीं. पाहिजे त्या ठिकाणीं मला जन्म दे; पण मला आपला दास कर २. जे कोणी वारकरी पंढरीस जाणारे असतील, त्यांच्या घरीं मी पशु होऊन राहीन ३. रात्रंदिवस ज्यास श्रीविठ्ठल-चिंतनाचेंच ध्यान आहे, त्याचे पायाचा मी जोडा सुद्धां बनेन ४. ज्याच्या अंगणामध्यें तुळसीवृंदावन आहे, त्याच्या घरीं केरसुणी होऊन राहीन ५. तुकाराम महाराज म्हणतात, हीच एक भावना माझ्या चित्तांत आहे, ह्यावांचून इतर गतीची मला इच्छा नाहीं ६. [११५४]

अवघिया चाडा कुंठित करुनि । लावीं आपुलीच गोडी । आशा मनसा तृष्णा कल्पना । करुनियां देशधडी । मीतूंपणापासाव गुंतलों मिथ्या । संकल्प तो माझा तोडीं ॥ तुझिया चरणीं माझे दोन्ही पक्ष । अवघी करुनि दाखवीं पिंडीं रे रे ॥ १ ॥ माझें साच काय केलें मृगजळें । वर्ण याती कुळ अभिमान ॥ कुमारी भातुकें खेळती कवतुकें । काय त्यांचें साचपण ॥ २ ॥ वेगळाल्या भावें चित्ता तडातोडी । केलों देशधडी मायाजाळें ॥ गोत वित्त माय बाप बहिणी सुत । बंधुवर्ग माझीं बाळें ॥ एका एक न धरी संबंध पुरलिया । पातलि जवळी काळें ॥ जाणोनियां त्याग सर्वस्वें केला । सांभाळीं आपुलें जाळें ॥ ३ ॥ एका जवळी धरीं आणिका अंतरीं । तीं काय सोयरीं नव्हतीं माझीं ॥ एकाचे पाळण एकासी भांडण । चाड कवणिये काजीं ॥ अधिक असे उणें । कवण कवण्या गुणें । हे माव न कळेचि तुझी ॥ म्हणोनि चिंतनीं राहिलों श्रीपती । तुका म्हणे भाक माझी ॥ ४ ॥ [११५५]

आणिकां छळावया झालासी शाहणा । स्वहिता घातलें खान । आडिके पैके करुनि सायास । कृपणें सांचलें धन ॥ न जिरे क्षीर श्वानासी भक्षितां । याती तयाचा गुण ॥ तारुण्यदशे अधम मातले(ला) । दवडी हात पाय कान ॥ १ ॥ काय झालें यांस वायां कां ठकले । हातीं सांपडलें टाकीतसे ॥ घेऊनि स्फटिकमणी टाकी चिंतामणी । नागवले आपुले इच्छे ॥ २ ॥ सिद्धीं सेविलें सेविती अधम । पात्रासारिखें फळ ॥ सिंपिला तो मोतीं जन्मलें स्वातीचें । वर्षलें सर्वत्र जळ ॥ कापूस पट न येचि कारणा । तयासि पातला काळ ॥ तेंचि भुजंगें धरिलें कंठीं । मा विष जालें त्याची गरळ ॥ ३ ॥ भक्षुनि मिष्टान्न घृतसाखर । सहित सोलुनि केळें ॥ घालोनियां घसां अंगोळिया ।

हे देवा, माझी सर्व इच्छा नाहींशी करून माझ्या हृदयाला तूं आपली प्रीति लाव; आशा, तृष्णा, कल्पना, भावना ह्या देशोधडीस नेऊन टाक; देह मी, व देहासंबंधीं माझें, अशा खोट्या संकल्पांत जो मीं बद्ध झालों आहें त्यांतून मला मुक्त कर; तुझ्या चरणाचे ठिकाणीं माझे अहं इदं (मी, हें असा) वृत्तिरूपी उभयपक्ष ऐक्याला पावतील, असें ह्या देहाचे ठिकाणीं करून दाखीव १. जाति-कुळ-वर्णअभिमान हे वास्तविक मृगजलासारखे मिथ्या असून खऱ्यासारखे कां भासविले? लहान मुली ज्याप्रमाणें भातुकली खेळतात त्यामध्यें खरेपणा काय आहे? २. वेगवेगळ्या भावनेनें चित्ताची ओढाताण केली, म्हणून ह्या मायाजाळानें मला देशोधडी केलें; गोत, धन, मायबाप, बहिणी, मुलेंबाळें, बंधुवर्ग हे सर्व माझे आहेत, असें म्हणतों; पण काळाचा घाला आल्यावर एकमेकांचा एकमेकांशीं संबंध राहात नाहीं, हें जाणून मीं सर्वांचा त्याग केला. हे देवा, आतां हें आपलें मायाजाल आटोपावें ३. कित्येकांना मी आपले असें समजून जवळ करितों आणि कित्येकांना परकी समजून दूर करतों; खरोखर विचारानें पाहिलें असतां, तीं माझीं सोयरीं नाहींत काय? कित्येकांचें पालन करणें व कित्येकांशीं भांडणें ह्याची मला काय जरूरी आहे? कोणी अधिक, कोणी कमी, असा प्रकार कोणत्या गुणानें होतो? ही तुझी माया मला कळत नाहीं, तुकाराम महाराज म्हणतात, हे श्रीपति म्हणून मीं तुझ्या चिंतनांत राहिलों हें मीं तुला वचन देऊन सांगतों ४. [११५५]

अरे जना, तूं दुसऱ्याचा छळ करण्याविषयीं मोठा शाहाणा आहेस, पण तूं आपल्या हिताचा विचार न करितां तें चोरीस घालविलेंस; कृपणानें एका पैशापासून पुष्कळ धनाचा संचय मोठे सायास करून केला. जसें कुत्र्याला दूध घातलें असतां तें खातें, पण तें त्याला जिरत नाहीं, हा त्याचा जातिस्वभाव आहे, तसे हे अधम जन तारुण्यावस्था असल्यामुळें विषयानें उन्मत्त होऊन, हातपायकानादि इंद्रियें वायां घालवितात १. ह्या लोकांना काय झालें असावें? असे हे व्यर्थ कां फसले? हातामध्यें सांपडलेली वस्तु [मनुष्यदेह] ह्यांनीं टाकावी काय? ज्याप्रमाणें आपल्याजवळ असलेला चिंतामणि देऊन, त्याचे मोबदला स्फटिकमणि घ्यावा त्याप्रमाणें आपापल्या वाईट इच्छेनें लोक नागवले-फसले २. पूर्वीं कोणीं सिद्ध पुरुषांनीं सेवन केलेले पदार्थ अधम लोक सेवन करितात, पण फलप्राप्ति अधिकाराप्रमाणें होते. जसें सर्वत्र वर्षलेल्या स्वाती नक्षत्राचे पाण्यानें शिंपल्यामध्यें मोतीं होतात व तेंच पाणी कापसाचे पिकावर पडलें असतां त्याचा नाश होतो, आणि तेंच सर्पांनीं प्यालें असतां विष होतें; तशी आपापल्या अधिकाराप्रमाणें प्राप्ति होते ३. तूपसाखर-मिश्रित उत्तम प्रकारचें पक्वान्न व सोललेलीं केळीं, असे पदार्थ भक्षण केल्यावर जे मुद्दाम घशामध्यें बोटें घालून

हातें वांती करूं पाहे बळें ॥ कुंथावयाची आवडी वोवा (ओवा)। उन्हवणी रडवी बाळें ॥ तुका म्हणे जे जैसें करिती। ते पावती तैसींच फळें ॥ ४ ॥ [११५६]

चंदनाचे गांवीं सर्पांची वसति। भोगिती ते होती द्विपांतरीं ॥ १ ॥ एका ओझें एका लाभ घडे देवा। संचिताचा ठेवा वेगळाला ॥ २ ॥ क्षीराची वसति अशुद्ध सेवावें। जवळी तें जावें भोगें दुरी ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसी बुद्धि ज्याची जड। त्याहुनि दगड बरे देवा ॥ ४ ॥ [११५७]

तुज दिलें आतां करीं यत्न याचा। जीव भाव वाचा काया मन (नें) ॥ १ ॥ भागलों दातारा सीण झाला भारी। आतां मज तारीं शरणांगता ॥ २ ॥ नेणतां सोशिली तयाची आटणी। नव्हतांही कोणी कांहीं माझीं ॥ ३ ॥ वर्म नेणें दिशा हिंडती मोकाट। इंद्रियें सुनाट दाही दिशा ॥ ४ ॥ येरझारी फेरा शिणलों सायासीं। आतां हृषीकेशी अंगिकारीं ॥ ५ ॥ तुका म्हणे मन इंद्रियांचे सोई। धांवे यासी काई करूं आतां ॥ ६ ॥ [११५८]

स्वयें पाक करी। संशय तोचि धरी। संदेह सागरीं। आणीक (कां) परी बुड(वि)ती ॥ १ ॥ जाणे विरळा एक। झालें तेथींचें हें सुख। देखिलें बहुतेक। पुसतां वाट चुकले ॥ २ ॥ तोचि जाणे सोंवळें। शोधी विकल्पाचीं मुळें। नाचती पाल्हाळें। जे विटाळें कोंडिलें ॥ ३ ॥ तोचि साधी संधी। सावध त्रिकाळ जो बुद्धि। संदेहाचा संधी। वेठी आणीक धरियेली(ले) ॥ ४ ॥ अखंड तें ध्यान। समबुद्धि समाधान। सोंग वायांविण। ते झांकून बैसती ॥ ५ ॥ करणें जयासाठीं। जो नातुडे

वांती करूं पाहातात, कारण त्यांना कुंथायची आवड असते. जें मूल भुकेनें रडत असतें, त्याचें पोट दुखत आहे असें समजून त्यास ऊन पाण्यांत ओंवा देऊन जास्त रडवितात. तुकाराम महाराज म्हणतात, जे लोक जशी करणी करितील तशी त्यांना फळाची प्राप्ति होईल ४. [११५६]

चंदनाच्या झाडाजवळ (चंदनाच्या वनांत) सर्प राहातात पण त्यांना सुगंधाचा लाभ नाहीं, आणि दूर द्वीपांतरीं असणारे लोक त्या सुगंधाचा उपभोग घेतात १. हे देवा, एकानें ओझें वाहावें आणि त्याचा उपभोग दुसऱ्यानें घ्यावा हा प्रकार ज्याच्या त्याच्या निरनिराळ्या प्रारब्धकर्माप्रमाणें घडत असतो २. गाईच्या स्तनाजवळ राहाणारे गोचीड, दुधाचें सेवन न करतां, रक्त सेवन करितात; आणि तेंच दूध कांसेपासून दूर असणाऱ्या इतर प्राण्यांस मिळतें (ह्यामध्यें जवळ असलेले भोगापासून दूर होतात व दूरच्यांना भोग घडतो) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा गोचिडाप्रमाणें व सर्पाप्रमाणें ज्यांची बुद्धि आहे, त्यापेक्षां दगड होणें बरें ४. [११५७]

देवा, काया, वाचा, मन आणि जीवभाव मीं तुम्हांला दिलीं आहेत, त्यांचें रक्षण तुम्हीं करा १. संसारसंगतीनें मीं अतिशय श्रमी झालों आहें. आतां मला शरणागताला तुम्हीं (संसारसागरांतून) तारा २. कोणीं कांहीं (स्त्री-पुत्रादि) माझें नसतांना त्यांच्या रक्षणाविषयींचा आजपर्यंत न कळून मीं खटाटोप केला व त्यासंबंधाचे श्रम सोसले ३. तुझ्या भक्तीचें मर्म न समजल्यामुळें इंद्रियें स्वैरपणानें व्यर्थ दाही दिशा हिंडूं लागलीं ४. जन्ममृत्यूच्या येरझाऱ्यानें मी फार श्रमलों आहें. हे हृषीकेशा, आतां माझा तुम्हीं अंगीकार करा ५. तुकाराम महाराज म्हणतात, मन हें इंद्रियद्वारानें धांवतें, ह्याविषयीं आतां देवा काय करूं ? (ह्याकरितां देवा, तूंच मला ह्या दुःखसागरांतून तार) ६. [११५८]

स्वहस्तें पाकनिष्पत्ती करणारा स्वयंपाकी (आचारी) जर ह्या स्वयंपाकामध्यें कांहीं विष पडलें आहे, असा संशय घेईल, तर तो जेवणास आलेल्या इतरांनाहि संशयाच्या सागरांत बुडवील १. जें श्रीहरीचें सुख आहे, त्यास क्वचित् एखादा जाणून अनुभवतो; बहुतेक विचार करण्याची वाट चुकले आहेत असें मीं पाहिले २. जो हृदयांतील विकल्पाचीं (संकल्प-विकल्पांचें मूळ जी अविद्या तिचीं) पाळें-मुळें खणून काढतो तोच सोंवळा आहे; इतर जे (सोंवळ्याचा) बाह्य पसारा दाखवून नाचतात, ते विटाळानें भरले आहेत ३. ज्याची बुद्धि त्रिकाल (बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य ह्या तिन्हीं अवस्थेंत) सावध आहे, तोच संधिप्रकाशरूप जो आत्मा त्यास साध्य करून घेईल (किंवा, ह्या देहांत आत्मज्ञानाची संधि साधीत असतो), जे संशयाचे संधींत (अडचणींत) सांपडले आहेत, त्यांना प्रकृतीनें (देहाभिमानानें आणि अंतःकरणाच्या कर्तृत्वभोक्तृत्वाने) वेठीला धरलें आहे ४. विषमभावनारहित समबुद्धीनें जें देवाचें समाधानरूप आहे त्याचें ध्यान ज्यांना अखंड आहे, त्याचें खरें ध्यान आहे. जे खोलीमध्यें कोंडून डोळे मिटून गुप्तपणें ध्यान करतात, तें व्यर्थ सोंग आहे ५.

कवणे आटी । तुका म्हणे साटी । वित्तवित्तेंवांचूनि ॥ ६ ॥ [११५९]

माझिया संचिता । दृढ देखोनि बळिवंता । पळसी पंढरिनाथा । भेणें आतां तयाच्या ॥ १ ॥ तरि मज कळलासी । नव्हतां भेटी जाणीवेसी । एक संपादिसी । मान करिसी एकातें (एकाचा) ॥ २ ॥ तरि हें प्रारब्ध जी गाढें । कांहीं न चले तयापुढें । काय तुज म्यां कोडें । रे सांकडें घालावें ॥ ३ ॥ भोगाधिपति क्रियमाण । तें तुज नागवे अझून । कां वायांविण । तुज म्यां सीण करावा ॥ ४ ॥ तुज नव्हतां(न होतां) माझें कांहीं । परि मीं न संडीं भक्तिसोई । हो कां भलते ठायीं । कुळीं जन्म भलतैसा ॥ ५ ॥ तूं भितोसि माझिया दोषां । कांहीं मागणें ते आशा । तुका म्हणे ऐसा । कांहीं न धरीं संकोच ॥ ६ ॥ [११६०]

लोकमान देहसुख । संपत्ति उपभोग अनेक । विटंबनादुःख । तुझिये भेटिवांचूनि ॥ १ ॥ तरि मज ये भेट ये भेट । काय टाकलासी नीट । थोर पुण्यें वीट । तुज दैवेंचि लाधली ॥ २ ॥ काय ब्रह्मज्ञान करूं कोरडें । रितें मायेचें मापाडें । भेटीविण कुडें । तुझिया अवघें मज वाटे ॥ ३ ॥ आत्मस्थितीचा विचार । काय करूं हा उधार(उद्धार) । न देखतां वीर । चतुर्भुज मज नाहीं ॥ ४ ॥ रिद्धिसिद्धी काय करूं । अथवा आगम विचारु । भेटीविण भारु । तुझिया वाटे मज यांचा ॥ ५ ॥ तुजवांचूनि कांहीं व्हावें । ऐसें नको माझिया जीवें । तुका म्हणे द्यावें । दरुषण पायांचें ॥ ६ ॥ [११६१]

तुझा म्हणवून तुज नेणें । ऐसें काय माझें जिणें ॥ १ ॥ तरि मज कवणाचा आधार । करोनियां राहों धीर ॥ २ ॥ काय शब्दची ऐकिला । भेटी नव्हतां गा विठ्ठला ॥ ३ ॥

तुकाराम महाराज म्हणतात, जो कांहीं परमार्थ म्हणून करावयाचा आहे, तो श्रीहरीकरितां आहे. आपलें चित्त व वित्त त्याला अर्पण केल्यावांचून कोणत्याही उपायानें तो श्रीहरि आकळत (प्राप्त होत) नाहीं ६. [११५९]

माझें प्रारब्ध अतिबलाढ्य आहे, हें पाहून पंढरीनाथा, त्याच्या भीतीनें तूं पळत आहेस १. जोंपर्यंत मला ज्ञानाचा योग नव्हता, तोंपर्यंत तूं मला समजला नव्हतास; परंतु आतां कळून आलास. एकाची संपादणी करतोस (एका संचिताला महत्त्व देतोस) व एकाचा मान करतोस (आपलें महत्त्वहि मिरवितोस) २. माझें प्रारब्ध हें बळकट आहे, त्याच्यापुढें तुझें कांहीं चालत नाहीं; आतां मीं तुझ्यावर संकट काय म्हणून घालावें ? ३. हें भोगाधिपति जें क्रियमाण अजून तुझ्या स्वाधीन होत नाहीं, असें जर आहे, तर मीं तुला व्यर्थ शीण कशाला द्यावा ? ४. तुझ्याकडून माझें जरी कांहीं होत नाहीं, तरी मीं तुझ्या भक्तीचा मार्ग टाकणार नाहीं. मला पाहिजे त्या कुळांत पाहिजे त्या ठिकाणीं जन्म मिळो ५. तूं माझे ठिकाणीं असणारे दोषांस भीत आहेस व मीं तुझ्याजवळ कांहीं मागेन अशा कल्पनेनें भीत आहेस. तुकाराम महाराज म्हणतात, पण ह्याविषयींचा मनांत कांहीं संकोच तूं धरूं नकोस (मीं तुझ्यापाशीं कांहीं मागणार नाहीं. मी आपली निष्काम भक्ति करीन) ६. [११६०]

लोकांकडून मान मिळण्याचें व अनेक संपत्तीच्या उपयोगानें देहाला होणारें जें सुख तें तुझ्या भेटीवांचून विटंबनादुःख आहे १. तर देवा, या आणि मला भेट द्या (असें द्विवार सांगतों). विटेवर तुम्ही नीट (ताठ) कां उभे राहिलांत ? तुमच्या दैवानें व थोर पुण्याईनेंहि ही वीट तुम्हांला मिळालेली आहे २. हे देवा, तुझे भेटीवांचून ब्रह्मज्ञान हें कोरडें व रिकामें मायेचें माप आहे, त्याला घेऊन मी काय करूं ? जर तुम्हीं मला भेटत नाहीं तर मला हें तुझें सर्व वाईट आहे ३. आत्मस्थितीसंबंधाचा विचार व त्यायोगानें होणारा आत्मनिश्चय हें सर्व उधार (उसनें) आहे, त्याला घेऊन काय करूं ? (अनुभव नसतांना आत्मस्थितीचा विचार मीं कां करूं ? जन्ममरणांतून उद्धार झाला तरी काय करूं ?) तुमचें चतुर्भुज स्वरूप पाहिल्यावांचून मला धीर निघत नाहीं ४. ऋद्धि व अष्टसिद्धि अथवा शास्त्रविचार घेऊन काय करूं ? जर तुझी भेट नसेल, तर मला हा सर्व भार वाटत आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्याभेटीवांचून मला कांहीं मिळावें, असें वाटत नाहीं ? ह्याकरितां देवा, तुमच्या पायांचें दर्शन द्या (एवढीच मला इच्छा आहे.) ६. [११६१]

देवा, मी तुझा आहें असें म्हणवीत असून तुला जाणत नाहीं, असें माझें जगणें कशाला झालें आहे ? १. एवढ्याकरितां ह्या ठिकाणीं मीं कोणाच्या आश्रयानें धैर्य धरून राहूं ? २. अगा विठ्ठला, तुझी भेट न होतां, तूं सर्वगत व

तुका म्हणे आतां । अभय देईं पंढरीनाथा ॥ ४ ॥ [११६२]

उद्धवअक्रूराशी । आणीक व्यासअंबऋषी । रुक्मांगदप्रल्हादाशीं । दाविलें तें दाखवीं ॥ १ ॥ तरि मी पाहेन पाहेन । तुझे श्रीमुखचरण । उताविळ मन । तयाकारणें तेथें ॥ २ ॥ जनकश्रुतदेवा करीं । कैसा शोभलासी हरी । विदुराच्या घरीं । कण्या धरी कवतुकें ॥ ३ ॥ पांडवां आकांतीं । तेथें पावसी स्मरती । घातलें द्रौपदी । लागीं बिरडें चोळिचें ॥ ४ ॥ करी गोपींचें कवतुक । गाईगोपाळांसी सुख । दावीं तेंचि मुख । दृष्टी माझ्या आपुलें ॥ ५ ॥ तरि तूं अनाथाचा दाता । मागतिया शरणागतां । तुका म्हणे आतां । कोड पुरवीं हें माझें ॥ ६ ॥ [११६३]

मागता भिकारी झालों तुझे द्वारीं । देईं मज हरी कृपादान ॥ १ ॥ प्रेम प्रीति नाम उचित करावें । भावें संचारावें हृदयामाजीं ॥ २ ॥ सर्वभावें शरण आलों पांडुरंगा । कृपाळु तूं जगामाजीं एक ॥ ३ ॥ तापत्रयें माझी तापविली काया । शीतळ व्हावया पाय तुझे ॥ ४ ॥ संबंधीं जनवाद पीडलों परोपरी । अंतरलों दुरी तुजशी तेणें ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां तुझा शरणांगत । करावें सनाथ मायबापा ॥ ६ ॥ [११६४]

न मनीं नाम न मानीं त्यासी । वाचाळ शब्द पिटी भासी ॥ १ ॥ भाव नाहीं काय मुद्रा वाणी । बैसे बगळा निश्चळ ध्यानीं ॥ २ ॥ नाहीं चाड देवाची कांहीं । छळणें टोंके तस्करयाई ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याचा संग । नको शब्द स्पर्श अंग ॥ ४ ॥ [११६५]

दिनदिन (दिनें दिनें) शंका वाढे । आयुष्य नेणवतां गाढें ॥ १ ॥ कैसीं भुललीं बापुडीं ।

सर्वव्यापी आहेस, असे शब्द पुराणांतून ऐकून काय उपयोग? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा, आतां तूं मला अभयाचें दान दे ४. [११६२]

उद्धव, अक्रूर, व्यास, अंबऋषि, रुक्मांगद व प्रल्हाद अशा अनेक भक्तांना जें तुम्हीं आपलें स्वरूप दाखविलें, तें मला दाखवा १. तें तुम्हीं दाखविल्यावर तुमचें श्रीमुख व चरण मी पाहीन, ह्याकरितां माझें मन उतावीळ होऊन तेथेंच जडलें आहे २. श्रुतदेव ब्राह्मण आणि जनकराजा ह्या उभयतांकडे हे हरि, तुम्ही गेलां त्या वेळीं त्यांच्या हातांत हात दिल्यामुळें, दोहींकडे तुम्ही शोभलां; व विदुराच्या घरीं जाऊन तुम्हीं कौतुकानें कण्या सेवन केल्या ३. संकटाचे वेळीं पांडवांनीं स्मरण केल्याबरोबर तुम्ही त्यांना प्राप्त होतां आणि राजसूययज्ञाचे वेळीं, द्रौपदी सर्वांना वाढीत असतां, तिचें चोळीचें बिरडें सुटलें, तें तुम्हीं लावलें ४. गोपिकांचें कौतुक तुम्हीं केलें व गाई–गोपाळ ह्यांना जें तुमचें श्रीमुख पाहून अतिशय सुख झालें तें तुमचें श्रीमुख माझ्या डोळ्यांना दाखवावें ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्हांला जे शरण येतात ते याचक अनाथ आहेत, त्यांचे तुम्ही स्वामी दाते आहांत म्हणून आतां माझी इच्छा पूर्ण करा ६. [११६३]

हे हरि, मी तुमच्या दारामध्यें याचक होऊन भीक मागण्यास आलों आहें, तर मला तुम्ही कृपादान द्या १. तुमचें नामस्मरणाचें प्रेम व त्याचीच आवडी ही योग्य देणगी मला द्या, आणि श्रद्धेनें आमच्या हृदयांत तुम्ही येऊन राहा २. हे पांडुरंगा, ह्या जगतामध्यें तुम्हीच एक कृपाळु आहांत, म्हणून तुम्हांला मी सर्वभावानें शरण आलों ३. त्रिविधतापानें माझी काया संतप्त झाली आहे, ती शांत होण्याला तुझे पायच योग्य आहेत ४. देहसंबंधीं (स्त्री-पुत्रादिकांचें पालनपोषण) व जनापवाद ह्या योगानें मी पीडित झालों आहें, त्यामुळें मला तुमचा वियोग झाला आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे मायबापा, आतां मी तुम्हांस शरण आलों आहें, तर तुम्ही मला सनाथ करा (आपलासा करा) ६. [११६४]

जो कोणी शाब्दिक वाचाळपणा करून हरिनामास मानीत नाहीं, त्याला मी कधींहि मानणार नाहीं १. ज्याच्या अंतःकरणांत देवाविषयींचा भाव नाहीं आणि जो बाह्यात्कारी मुद्रा लावून शृंगार करितो, आणि ज्याप्रमाणें बगळा माशाकरितां ध्यान धरून बसतो, तसा हा निवांत बसतो २. त्याला देवाची गरज मुळींच नाहीं. जसा चोर कोणाचें छळण करून गाठोडें चोरतो, तसा हा विषयाकरितां टुकत असतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या लोकांची मला संगति होऊं नये व त्यांच्याबरोबर बोलण्याचा सुद्धां कधींहि प्रसंग येऊं नये ४. [११६५]

हें (आपलें अमोल) आयुष्य वायां जातें, असें न जाणतां दिवसेंदिवस शंका (लोभ) वाढत आहे १. असे हे

दंभविषयांचे सांकडीं ॥ २ ॥ विसरलीं मरण । त्याची नाहीं आठवण ॥ ३ ॥ देखत देखत पाहीं । तुका म्हणे आठव नाहीं ॥ ४ ॥ [११६६]

माझें मज आतां न देखें निरसतां । म्हणऊन आधार केला ॥ संसाराची आस सांडुनि लौकिक । जीवभाव तुज दिला ॥ नव्हतीं माझीं कोणी मी कवणांचा । अर्थ मोहो सांडवला ॥ तारीं मारीं करीं भलतें दातारा । होऊन तुझा आतां ठेलों रे ॥ १ ॥ असो माझें कोडें तुज हें सांकडें । मी असेन निवाडें सुखरूप ॥ बाळकासी चिंता काय पोटवेथा । जया शिरीं मायबाप ॥ २ ॥ पापपुण्यें(ण्य) श्रुति आटिल्या । शास्त्रांस न लगेचि ठाव ॥ विधिनिषेधें गोविलीं पुराणें । वेदांसी तो अहंभाव ॥ ओंकाराचें मूळ व्यापिलें माया । तेथें न धरीच भाव ॥ म्हणऊन कावाड सांडिलें उपसतां । धरिलें तुझेंचि नांव ॥ ३ ॥ तनमनइंद्रियें ठेवूनि राहिलों । सर्व आशा तुझे पायीं ॥ तप तीर्थ दान करवूं कवणा हातीं । आधीन तें मज काई ॥ आहिक्यें परत्रें चाड नाहीं सर्वथा । जन्म सदा मज देईं ॥ मायामोहपाश करीं विष तैसें । तुका म्हणे माझ्या ठायीं ॥ ४ ॥ [११६७]

नाम गोड नाम गोड । पुरे कोड सकळही ॥ १ ॥ रसना येरां रसां विटे । घेतां घोट अधिक हें ॥ २ ॥ आणिकां रसें मरण गांठीं । येणें तुटी संसारा ॥ ३ ॥ तुका म्हणे आहार झाला । हा विठ्ठल आम्हांसी ॥ ४ ॥ [११६८]

धालों सुखें ढेंकर देऊं । उमटे जेवूं तोंवरी ॥ १ ॥ क्रीडा करूं निरंजनीं । न पुरे धणी हरिसवें ॥ २ ॥

दीन लोक विषयांच्या ओढीनें व दांभिकत्वानें कसे भुलले आहेत? २. आपल्यास पुढें निश्चयानें मरण येईल, अशी आठवणसुद्धां त्यांना होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, कित्येक लोक मरतात तें पाहून, हे लोक आपल्या विषयांचे छंदांतून जागे कसे होत नाहींत? पाहा बरें? (तात्पर्य, आपलें मरण अगदीं जवळ आहे अशी आठवण ठेवूनच माणसानें लवकर परमार्थमार्गाला लागावें व मरणापूर्वी त्वरित इरिप्राप्ति करून घ्यावी व कृतार्थ व्हावें) ४. [११६६]

हे देवा, माझ्या मीपणाचा निरास करण्याचें मी जाणत नाहीं, म्हणून मीं तुझा आश्रय केला आहे. सर्व संसाराची आशा व लौकिक टाकून देऊन मीं आपला जीवभाव तुम्हांला अर्पण केला, आतां देहसंबंधीं (स्त्री-पुत्रादिक) हीं माझीं कोणी नव्हेत, आणि मीहि कोणाचा नव्हे; त्याविषयींची इच्छा व मोह (धनाविषयीं लोभदेखील) टाकला. आतां मी तुमचा होऊन राहिलों आहें, तर हे दातारा, माझा उद्धार करा (तारा) अगर मारा, पाहिजे तें करा १. आतां मजविषयींचें हें सर्व तुमचे मस्तकीं असो; मी तुमचे जिवावर निश्चयानें सुखरूप राहीन, ज्याप्रमाणें बालकाच्या शिरावर आईबाप असल्यावर त्याला पोटाची आणि व्यथेची चिंता करण्याचें कारण नाहीं त्याप्रमाणें २. तुमच्या स्वरूपाचा शोध वेदश्रुतींच्या आधारानें जर करावा तर त्या श्रुति पापपुण्याच्या वाटाघाटींत आटल्या आहेत, व शास्त्रालाहि तुमच्या स्वरूपाचा शोध लागत नाहीं. विधिनिषेधाच्या वाटाघाटींत सर्व पुराणें गुंतलीं आहेत व वेदांचे ठिकाणीं जाणिवेचा (सर्वज्ञतेचा) अहंभाव आहे, आणि ओंकाराचें मूलस्थान (ब्रह्म) मायेनें व्यापिलें आहे, म्हणून तेथें श्रद्धा बसत नाहीं; ह्याकरितां हे सर्व कावाडकष्ट टाकून देऊन मीं निश्चयानें तुमचें नामच कंठीं धरिलें आहे ३. माझी तनु व सर्व इंद्रियांसहित मन हीं तुमच्या पायांवर ठेवून, तुमच्या पायांचीच आशा धरली आहे. आतां तप, तीर्थ, दानादि साधनें मी कोणाचे हातून करूं? माझे स्वाधीन काय राहिलें आहे? मला इहलोकाची अगर परत्राची (परलोकाची) गरज राहिली नाहीं. तुमची सेवा करण्यासाठीं मला सर्व काळ जन्म द्या. तुकाराम महाराज म्हणतात, मोहमायासंबंधीं जे पाश आहेत ते माझ्या ठिकाणीं विषासारखे त्याज्य करा ४. [११६७]

देवाचें नाम अति गोड आहे (असें द्विवार सांगतात). त्या नामाचे योगानें सकळ इच्छा पूर्ण होतील १. जसे नामामृताचे घोंट अधिक घ्यावेत, म्हणजे इतर रसांचें (विषयांचें) सेवन केल्यानें रसनेला वीट येतो २. इतर रस सेवन करण्यांत पदरीं मरण बांधलेलेंच आहे, ह्या नामरसाच्या योगानें जन्ममृत्युरूपी संसार नाहींसा होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा विठ्ठल (–नाम-रस) आमचा आहार झाला आहे ४. [११६८]

हरिनामाच्या सुखानें (ज्ञानामृताच्या सेवनानें) आम्ही तृप्त झालों आहोंत, त्यानेंच ढेकर देऊं, आणि तृप्तत्वाचा अनुभव येईतोंपर्यंत त्याचेंच भोजन करूं १. हरीबरोबर एकांतामध्यें क्रीडा करूं; त्याच्याशीं ते खेळ खेळतांना आमची

अवघें खेळों अवघ्यामधीं । डाईं न पडों ऐसी बुद्धि ॥ ३ ॥ तुका म्हणे वांचविता । आम्हां सत्ता समर्थ ॥ ४ ॥ [११६९]

एकल्या नव्हे खेळ चांग । धरिला संग म्हणऊनि ॥ १ ॥ उमटे तेव्हां कळे नाद । भेदाभेद निवडेना ॥ २ ॥ दुसरा(ऱ्या) परी एक ऐसा । न वजे रिसा निकुरेंही ॥ ३ ॥ तुका म्हणे कळल्यां कळे । येरा खेळे खेळ म्हूण(म्हणों) ॥ ४ ॥ [११७०]

बोलविलें जेणें । तोचि त्याचें गुह्य जाणे ॥ १ ॥ मी कावाडाचा धनी । जेवूं मागावें थिंकोनि ॥ २ ॥ मजुराच्या हातें । माप केलें झालें रितें ॥ ३ ॥ झाला पुरविता । पांडुरंग माझा पिता ॥ ४ ॥ मायबापासवें । बाळें कौतुकें खेळावें ॥ ५ ॥ जैसा करिती धंदा । तैसा पडोनियां छंदा ॥ ६ ॥ त्यांच्या साच गाई म्हैसी । येणें खेळावें मातीशीं ॥ ७ ॥ तुका म्हणे बोल । माझा बोल तो विठ्ठल ॥ ८ ॥ [११७१]

कां हो तुम्ही माझी वदविली वाणी । नेदा हे निवडूनि पांडुरंगा ॥ १ ॥ आणीक म्यां कोणां पुसावा विचार । समुळीं संसार दुराविला ॥ २ ॥ स्वामिसेवा म्हूण घेतली पदरीं । सांगितलें करीं कारण तें ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं शिकविलें जेणें । तो याच्या वचनें उगा राहे ॥ ४ ॥ [११७२]

सेवकासी आज्ञा स्वामीची प्रमाण । जोंवरी हा प्राण जाय त्याचा ॥ १ ॥ आणिकांचा धाक न धरावा मनीं । निरोपावचनीं ढळों नये ॥ २ ॥ समय सांभाळूनी आगळें उत्तर । द्यावें भेदी वज्र तयापरी ॥ ३ ॥ तुका म्हणे तरी म्हणवावें सेवक । खादलें तें अन्न हक्क होय (खादलें तें हाक अन्न होय) ॥ ४ ॥ [११७३]

इच्छा तृप्त होत नाहीं २. आम्ही सर्व मुलें मिळून अभेदभावानें खेळ खेळूं, पण प्रपंचाच्या (जन्म-मरणाच्या) डावामध्यें सांपडणार नाहीं, असा आमचा निश्चय आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, समर्थ देव आपल्या सत्तेनें काळाच्या हातांत आम्हांस न देतां आमचें रक्षण करील ४. [११६९]

एकत्वामध्यें असतांना (एकव्यानें भक्तीचा) चांगला खेळ होत नाहीं, म्हणून एका भावाचे जे वैष्णव आहेत त्यांची आम्हीं संगति केली आहे १. कोणतेंहि वाद्य वाजल्यावर जो नाद उमटतो, त्यायोगानें तें समजतें; त्याखेरीज वाद्यांचे निरनिराळे प्रकार कळत नाहींत २. एक दुसऱ्यासारखा असतो पण मोठ्या पराकाष्ठेनेंहि एकाची बरोबरी दुसरा करूं शकत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा प्रकार शहाण्याला कळतो, बाकीचे खेळ म्हणून खेळतात (पण त्यांत जन्म-मरणांचे डाव त्यांच्या आंगशीं येतात) ४. [११७०]

ज्या पांडुरंगानें मला कवित्वरूपानें बोलायला लाविलें आहे तो माझे बोलण्यांतील हृद्गत जाणतो १. मी केवळ ओझें वाहाण्याचा मालक आहें आणि म्यां लेंकरानें रडून आईबापाजवळ खावयास मागावें २. एखादे मजुराचे हातून धान्याची मापानें मोजदाद केली म्हणजे माप व मजूर दोन्ही रितेच असतात ३. माझा पांडुरंग बाप माझी सर्व इच्छा पुरवीत आहे ४. आम्ही बालकांनीं आईबापांबरोबर कौतुकांनीं खेळ खेळावा ५. ते आईबाप जो धंदा करीत असतील त्या छंदांत पडून तसा खेळ आम्ही खेळतों ६. आईबापांचे प्रपंचांतील गाई व म्हशी खऱ्या असतात आणि मुलें त्या मातीच्या करून खेळतात ७. तुकाराम महाराज म्हणतात, माझा सर्व बोल विठोबाराय बोलतात ८. [११७१]

अहो पांडुरंगा, तुम्हीं माझी वाचा कोणत्या कारणाकरितां वदविली हें मला समजावून देत नाहीं काय? १. आम्हीं समूळ प्रपंचाचा त्याग केला आहे, आतां तुमच्यावांचून अन्य कोणाला विचार पुसावा? २. ह्या वाचेनें स्वामीची सेवा होत आहे, असें जाणून आम्हीं तिला पदरांत घेतली आहे, आणि आम्ही आपण सांगितलेलें काम करीत आहों ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्यानें आम्हांला शिकवलें नाहीं (जोंपर्यंत पांडुरंगानें आम्हांला बोध केला नाहीं) तोंपर्यंत त्याच्या वचनावर विश्वास ठेवून निवांत (शांत) राहूं ४. [११७२]

सेवकांनीं स्वामीची (मालकाची) आज्ञा जोंपर्यंत प्राण आहे तोंपर्यंत मान्य केली पाहिजे १. दुसऱ्या कोणाचाहि धाक त्यानें मनांत बाळगूं नये, व आपल्या स्वामींच्या निरोपाप्रमाणें वागण्यांत कधीं अंतर पडूं देऊं नये २. स्वामींच्या सेवेचे प्रसंग सांभाळून एखादे प्रसंगीं स्वामीकडून कांहीं चूक झाल्यास वज्रभेदक उपदेशपर शब्द त्यांना बोलावेत (त्यांना सन्मार्गावर आणावें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा असेल त्यानेंच आपणाला सेवक म्हणवून घ्यावें व अशा सेवकाला स्वामीचें अन्न खाण्याचा हक्क आहे ४. [११७३]

नये पुसों आज्ञा केली एकसरें । आम्हांसी दुसरें आतां नाहीं ॥ १ ॥ ज्याचा तो बळिवंत सर्व निवारिता । आम्हां काय चिंता करणें लागे ॥ २ ॥ बुद्धिचा जनिता विश्वाचा व्यापक । काय नाहीं एक अंगीं तया ॥ ३ ॥ तुका म्हणे मज होईल वारता । तरी काय सत्ता नाहीं हातीं ॥ ४ ॥ [११७४]

बळिवंत आम्हीं समर्थाचे दास । घातलिया कास कळिकाळासी ॥ १ ॥ तेथें मा(ण)नसाचा कोण आला पाड । उलंघोनि जड गेलों आधीं ॥ २ ॥ संसाराचे बळी साधिलें निधान । मारिले दुर्जन षडवर्ग ॥ ३ ॥ तुका म्हणे एक उरला धरिता ठाव । येर केलें वाव तृणवत ॥ ४ ॥ [११७५]

एक गावें आम्ही विटोबाचें नाम । आणिकांचे (आणिकांपें) काम नाहीं आतां ॥ १ ॥ मोडूनियां वाटा सूक्ष्म दुस्तर । केला राज्यभार चाले ऐसा ॥ २ ॥ लावूनि मृदंग श्रुतिटाळघोष । सेवूं ब्रह्मरस आवडीनें ॥ ३ ॥ तुका म्हणे महापातकी पतित । ऐसियांचे हित हेळामात्रें (होती जीवन्मुक्त हेळामात्रें) ॥ ४ ॥ [११७६]

वाचा चापल्यें बहु जालों कुशल । नाहीं बीजमूळ हातां आलें ॥ १ ॥ म्हणोनि पंढरिराया दुःखी होतें मन । अंतरीचें कोण जाणे माझें ॥ २ ॥ पूज्य जालों अंगा आला अभिमान । पुढील कारण खोळंबलें ॥ ३ ॥ तुका म्हणे खूण न कळेचि निरुती । सांपडलों हातीं अहंकाराचे ॥ ४ ॥ [११७७]

आतां काढाकाढी करीं गा पंढरीराया । नाहीं तरी वायां गेलों दास ॥ १ ॥ जाणतां बैसलों दगडाचे नांवें । तिचा तो स्वभाव प्राण घ्यावा ॥ २ ॥ मनाचा स्वभाव इंद्रियाची ओढी ।

अहो श्रीहरि, तुम्हीं जी आज्ञा केली आहे त्याबद्दल आम्ही तुम्हांला परत न विचारतां त्याप्रमाणें वागूं, कारण आतां तुमच्यावांचून आम्हांस दुसरें कोणी नाहीं १. श्रीहरीच्या आज्ञेप्रमाणें वागण्याबद्दल आतां आम्हांला चिंता करण्याचें कारण नाहीं; कारण त्याचें तो सर्व निवारण करण्यास समर्थ आहे २. सुबुद्धि देणाऱ्या अशा श्रीविश्वात्म्याचे अंगीं कोणती शक्ति नाहीं? ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझें दुःख निवारण करण्याइतकी त्याच्या हातीं सत्ता नाहीं काय? (तो सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् आहे म्हणून मी त्याची आज्ञा प्रमाण मानीत आहें) ४. [११७४]

आम्ही समर्थ श्रीहरीचे दास असल्यामुळें महान् बलवान आहोंत म्हणून आम्ही काळाबरोबर युद्ध करण्यासाठीं कांचा मारला आहे (कंबर कसली आहे) १. आतां मनाची किंमत काय आहे? आम्ही आधीं जड प्रकृतिभागाचा विचार सोडून दूर राहिलों आहोंत (पाठभेदः माणसाचा०—तेथें सामान्य माणसांची काय किंमत? सर्वांच्या आधीं आम्हींच फक्त संकटांचें उलंघन केलें आहे) २. देहाहंकारादि संसारास बळी देऊन आम्हीं परमार्थनिधानास [ठेव्यास] साध्य करून घेतलें व दुर्जन कामादि षड्रिपु ह्यांचा नाश केला ३. तुकाराम महाराज म्हणतात, परमात्म्याहून इतर सर्व तृणवत् तुच्छ मानलें व परमार्थाचा आश्रय केला म्हणून एक उरलेली परमार्थस्थितिच कायम राहिली ४. [११७५]

आम्ही एका विठोबाचेंच नाम गाऊं, त्यावांचून इतरांशीं (इतर देव व इतर साधनें ह्यांच्याशीं) आमचें कांहीं काम नाहीं १. सूक्ष्म (न समजण्यासारखे) आणि दुस्तर (उलंघन करून जाण्यास कठीण) असे मार्ग (परमार्थाचीं साधनें) मोडून टाकून राजाचें चतुरंग सैन्य चालेल अशा प्रकारचा एक सरळ भक्तिरूप राजमार्ग तयार केला २. वीणा, मृदंग ह्यांचे सूर लावून टाळांचे घोषांत ब्रह्मरसाचें सेवन प्रीतीनें करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या योगानें, जे कोणी पंचमहापातकी पतित असतील, त्यांचें हित एका क्षणांत होईल (पाठभेदः पंचमहापातकी एका क्षणांत जिवंतपणीं मुक्ति प्राप्त करून घेतात) ४. [११७६]

वाचेच्या चपळपणानें मीं कुशल वक्ता झालों आहें, पण परमार्थाचें खरें मूळ बीज माझे हस्तगत झालें नाहीं १. म्हणून हे पंढरीराजा, माझें मन फार दुःखी होत आहे, पण ही माझी अंतःकरणांतील स्थिति जाणतो कोण? २. लोकांमध्यें माझी पूज्यता वाढल्यामुळें अंगीं पोकळ अभिमान मात्र आला. त्या योगानें पुढील परमार्थकार्यसिद्धि थांबून राहिली ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी देहाहंकाराच्या पूर्ण स्वाधीन झाल्यामुळें खऱ्या परमार्थाची खूण (हरिप्राप्तीचें खरें वर्म) मला कळत नाहीं ४. [११७७]

हे पंढरीराया, ह्या देहादि प्रपंचांतून मला बाहेर काढ, नाहीं तर तुझा दास मी व्यर्थ जाईन १. जाणून-बुजून मी दगडाच्या नावेंत बसलों आहें व तिचा तर बुडवून प्राण घेणें हा स्वभाव आहे. (ह्याप्रमाणें संसारांत दुःख आहे, हें माहीत असूनहि मीं त्याच्या नादीं लागलों आहें) २. मनाचा स्वभाव इंद्रियांकडे धांव घेण्याचा आहे व तें नेहमीं

पतनाचे जोडी वरी हांव ॥ ३ ॥ तुका म्हणे झाली अंधळ्याची परी । आतां मज हरी वाट दावीं ॥ ४ ॥ [११७८]

सज्जन तो शब्द सत्य जो मानी । छळी दुर्जन आणिकांसी ॥ १ ॥ एक गुण तो केलासे दों ठायीं । ज्याचा त्यास पाहीं जैसा तैसा ॥ २ ॥ भाविक तो शब्द बोले वाणीचा । लटिका वाचा वाचाळ तो ॥ ३ ॥ परउपकार घडे तोचि भला । नाठ्याळ तयाला दया नाहीं ॥ ४ ॥ जाणी (ती) वंत तोचि पायरी जाणे । अधम तो नेणे खुंट जैसा ॥ ५ ॥ हित तें अनहित केलें कैसें । तुका म्हणे पिसें लागलें त्यासी ॥ ६ ॥ [११७९॥

तुझें नाम मुखीं न घेतां आवडी । जिव्हा तेचि घडी झडो माझी ॥ १ ॥ हेंचि मज देईं हेंचि मज देईं । आणिक दुजें कांहीं न मागें तुज ॥ २ ॥ बहिर कान तुझी कीर्ति नाइकतां । पाय न देखतां जावो (त) डोळे ॥ ३ ॥ मना तुझें ध्यान नाहीं नित्य काळ । धिग तें चांडाळ जळो जळो ॥ ४ ॥ हातपाय तेणें पंथें न चालतां । जावोत अनंता गळोनियां ॥ ५ ॥ तुजविण जिणें नाहीं मज चाड । तुका म्हणे गोड नाम तुझें ॥ ६ ॥ [११८०]

म्हणसी होऊनि निश्चिंता । हरूनि (यां) अवघी चिंता । मग जाऊं एकांता । भजन करूं । संसारसंभ्रमें आशा लागे पाठी । तेणें जीवा साटी होईल तुझ्या ॥ १ ॥ सेकीं नाडसील नाडसील । विषयसंगें अवघा नाडसील । मागुता पडसील । भवडोहीं ॥ २ ॥ शरीर सकळ मायेचा बांधा । यासी नाहीं कदा आराणूक । करिती ताडातोडी अंतर बाह्यात्कारीं । ऐसें जाती चारी दिवस वेगीं ॥ ३ ॥ मोलाची घडी जाते वायांविण । न मिळे मोल धन देतां कोडी । जागा होईं करीं हिताचा उपाय । तुका म्हणे हाय करिसी मग ॥ ४ ॥ [११८१]

अधोगतीच्या लाभाची हांव करीत असतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी स्थिति आंधळ्याप्रमाणें झाली आहे. हे हरि, तुम्हीच मला आतां वाट दाखवा ४. [११७८]

जो खऱ्या भाषणास (वेद, शास्त्र, पुराणें व संत ह्यांचे शब्दांस) मानतो तो सज्जन होय आणि जो इतरांस छळतो तो दुर्जन समजावा १. एक गुण हा दोन ठिकाणीं वांटला गेला. तो ज्याचा जसा स्वभाव असेल त्याप्रमाणें त्याच्या ठिकाणीं परिणामास पावतो (त्याचें हित किंवा अनहित करतो) २. जे सात्त्विक असतात ते थोडें बोलतात व जे लबाड असतात त्यांची वाचा नेहमीं बडबड करते ३. ज्याचे हातून परोपकार घडतात तो चांगला. ज्यास दया नाहीं तो नाठाळ समजावा ४. जो अधिकार जाणतो तोच खरा जिवंत. लांकडाच्या खुंट्याप्रमाणें जो कांहीं जाणत नाहीं तो अधम आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या मूर्खानें हिताचें अनहित कसें केलें? खरोखर त्यास वेडच लागलें ६. [११७९]

हे देवा, तुझें नाम मुखानें प्रीतीनें न घेईन तर त्याच वेळेस माझी जीभ झडून जावो. १. हीच देणगी तुम्ही मला द्या [असें द्विवार सांगतात]. ह्यावांचून मी दुसरें कांहीं मागत नाहीं २. तुझी कीर्ति माझे कान श्रवण न करतील तर ते बहिरे होवोत व तुमचें रूप डोळे न पाहातील तर ते जावोत ३. मनाला तुझें ध्यान जर सर्व काळ नसेल तर त्या चांडाळास धिःकार असो व तें जळो ४. हातपाय तुझ्या मार्गाकडे चाल न करतील तर ते गळून पडोत. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्यावांचून जगण्याची मला इच्छा नाहीं. तुझें नामच मला प्रिय आहे ६. [११८०]

सर्व चिंता नाहींशी करून निष्काळजी होऊन एकांतामध्यें जाऊन श्रीहरीचें भजन करीन असें म्हणशील तर संसाराच्या (संसार खरा ह्या) भ्रमांत राहाण्यानें तुझ्यामागें (धनादिकांची) आशा लागेल व ती तुझा जीव घेईल १. शेवटीं विषयाच्या संगतीनें फसशील, साफ फसशील (असें त्रिवार सांगतों) आणि पुनः जन्ममृत्यूच्या संसारडोहांत पडशील २. शरीर हें केवळ मायेचेंच बनलेलें आहे म्हणून त्यास केव्हांहि विश्रांति नाहीं. अंतर्बाह्य असणारे (कामक्रोधादि हे शरीरांतले व स्त्री-पुत्रादि हे बाहेरचे) हे चोरहि तुझी ओढाताण करतील व अशा स्थितींत तुझे आयुष्याचे चार दिवस तेव्हांच निघून जातील ३. मोठी मौल्यवान् आयुष्याची वेळहि व्यर्थ जाईल. त्यापैकीं एक क्षण कोट्यवधि धन दिलें तरी परत मिळणार नाहीं. तुकाराम महाराज म्हणतात, तूं सावध होऊन कांहीं आपल्या हिताचा उपाय कर, नाहीं तर मग अखेरीस धाय धाय रडत बसशील (देह आणि भोग गेल्यावर हाय हाय करीत बसशील) ४. [११८१]

कनवाळू कृपाळू भक्तांलागीं मोही। गजेंद्राचा धावा तुवां केला विठाई ॥ १ ॥ पांडुरंगे ये वो पांडुरंगे। जीवाचे जिवलगे येई वो पांडुरंगे ॥ २ ॥ भक्तांच्या कैवारें कष्टलीस विठ्ठले। आंबऋषिकारणें जन्म दहा घेतले ॥ ३ ॥ प्रल्हादाकारणें स्तंभीं अवतार केला। विदारूनि दैत्य प्रेमपान्हा पाजिला ॥ ४ ॥ उपमन्याकारणें कैसी धांवसी लवलाहीं। पाजीं प्रेमपान्हा क्षीरसागराठायीं ॥ ५ ॥ कौरवें (वीं) पांचाळी सभेमाजी आणिली। वस्त्रहरणीं वस्त्रें कैसी झाली माउली ॥ ६ ॥ दुर्वास पातला धर्मा छळावया वनीं। धांवसी लवलाहीं शाकादेंठ घेऊनि ॥ ७ ॥ कृपाळु माउली भुक्तिमुक्ति भांडार। करीं माझा अंगिकार तुका म्हणे विठ्ठले ॥ ८ ॥ [११८२]

कवणाचें कारण न लगेचि कांहीं। सर्वी सर्वा ठायीं तूं मज एक ॥ १ ॥ कायावाचामन ठेविलें तुझ्या पायीं (पाशीं)। आतां उरलें कांहीं न दिसे देवा ॥ २ ॥ कवणा पाषाणासी धरूनियां भाव। कवणावरी पाव ठेवूं आतां ॥ ३ ॥ म्हणऊनि निश्चिंत राहिलों मनीं। तूंचि सर्वां खाणीं देखोनियां ॥ ४ ॥ जळें जळ काय धोवियेलें एक। कवण तें पातक हरलें तेथें ॥ ५ ॥ पापपुण्य हे वासना सकळ। ते तुज समूळ समर्पिली ॥ ६ ॥ पितरस्वरूपी तूंचि जनार्दन। सव्य तें कवण अपसव्य ॥ ७ ॥ तुका म्हणे जीत पिंड तुझ्या हातीं। देऊनि निश्चिंती मानियेली ॥ ८ ॥ [११८३]

सिणलों दातारा करितां वे(ये)रझारा। आतां सोडवीं संसारापासोनियां ॥ १ ॥ न सुटेचि बाकी नव्हे झाडापाडा। घातलोंसें खोडा हाडांचिया ॥ २ ॥ मायबापें माझीं जीवाचीं सांगाती। तीं देखील हातीं काळाचिया ॥ ३ ॥ पडताळूनि सुरी बैसले शेजारीं। यमफाश करीं घेऊनियां ॥ ४ ॥ पाठीं पोटीं

हे विठाबाई आई, तूं भक्तांविषयीं कृपाळु व कनवाळु आहेस, म्हणून त्यांस मोहून टाकतेस. तूंच गजेंद्राचा धांवा ऐकून त्यास मुक्त केलेंस १. हे जीवाचे जीवलगे, पांडुरंगे आई, माझ्यासाठीं तूं धांवून ये (अशी मी द्विवार विनवणी करतों) २. हे विठ्ठला, भक्तांस साहाय्य केल्यानें तुला फार श्रम झाले; कारण अंबऋषीकरितां तुला दहा जन्म (अवतार) घ्यावे लागले ३. त्याप्रमाणेंच भक्त प्रल्हादाकरितां खांबामध्यें अवतार घेऊन सर्व दैत्यांचा तुला नाश करावा लागला व तूं आपल्या भक्तास प्रेमाचा पान्हा पाजलास ४. उपमन्यूकरितां कसा लगबगीनें धांवलास व त्यास क्षीरसागरामध्यें स्थापून प्रेमाचा पान्हा कसा पाजलास ? ५. ज्या वेळीं दुर्योधनादि कौरवांनीं द्रौपदीस सभेमध्यें वस्त्रहरण करून छळिलें त्या वेळीं तूंच वस्त्रांचें रूप धरून कसें रक्षण केलेंस ? ६. दुर्वास ऋषि धर्माला छळावयाकरितां वनांत आला त्या वेळीं द्रौपदीनें तुझा धांवा केला. तो ऐकून तूं धांवत गेलास आणि द्रौपदीजवळ भाजीचा देंठ मागितलास व त्यायोगानें तृप्त झालास आणि मग धर्मराजाचें रक्षण केलेंस ७. तुकाराम महाराज म्हणतात, हे कृपावंत आई, तूं स्वर्गसुखादि भोगांचें व चारी मुक्तींचें आगर (भूमि) आहेस, म्हणून माझा अंगीकार तूं कर ८. [११८२]

हे देवा, तूं मला सर्व ठिकाणीं आहेस म्हणून एका तुजवांचून कोणाचें मला कांहींच कारण नाहीं (मला आतां कोणाचीच गरज नाहीं) १. हे देवा, तुझे पायाचे ठिकाणीं मी आपलें काया, वाचा, मन ठेविलें आहे म्हणून आतां मला दुसरें कांहीं उरलें असें दिसत नाहीं २. आतां मी कोणत्या पाषाणाच्या ठिकाणीं देव असा भाव धरून कोणते दगडावर पाय ठेवूं ? ३. सर्व खाणींमध्यें (योनींमध्यें) तुझी व्याप्ति आहे, असा मला प्रत्यक्ष अनुभव आला म्हणून मी मनामध्यें निष्काळजी होऊन राहिलों आहें ४. ह्या देहामध्यें पाण्याचा अंश आहे त्याला पाण्यानें धुवून काय होणार आणि कोणतें पातक त्या ठिकाणीं नाहींसें झालें असें समजावें ? ५. म्हणून मी पापपुण्य उत्पन्न करणारी सकळ वासना मुळासुद्धां तुला अर्पण केली आहे. ६. तूं जनार्दन प्रत्यक्ष पितरस्वरूपी आहेस तर सव्य कोणतें आणि अपसव्य कोणतें (या चेष्टा करणें नको) ७. तुकाराम महाराज म्हणतात, मी आपला जिवंत देह-पिंड तुला अर्पण करून निष्काळजी झालों ८. [११८३]

हे दातारा पांडुरंगा, चौऱ्यांशी लक्ष योनीद्वारें (जन्ममरणाच्या) येरझारा करून मी फार श्रमी झालों, आतां मला जन्ममृत्यूच्या संसारापासून सोडव १. संचित कर्माची बाकी सुटत नाहीं, (त्याचा निःशेष झाडाहि होत नाहीं,) त्या योगानें ह्या देह-हाडांच्या खोड्यामध्यें मी सांपडलों आहें २. प्रत्येक योनींतील आईबाप माझे जिवाचे सोबती आहेत पण माझा कांहीं एक उपयोग न करितां मला काळाचे स्वाधीन करून देतात ३. यमाचे दूत हे हातामध्यें सुरी पाजळून

ऐकें लागलीं सरसीं। नेती नरकापाशीं ओढूनियां ॥ ५ ॥ जन साह्यभूत असे या सकळां। मी एक निराळा परदेशी ॥ ६ ॥ कोणां काकुलती नाहीं कोणें परी। तुजविण हरी कृपाळुवा ॥ ७ ॥ तुका म्हणे मज तुझाचि भरंवसा। म्हणऊनि आशा मोकलिली ॥ ८ ॥ [११८४]

देवाचा भक्त तो देवासीच गोड। आणिकांसी चाड नाहीं त्याची ॥ १ ॥ कवणाचा सोइरा नव्हेचि सांगाती। अवघीयां हातीं अंतरला ॥ २ ॥ निष्काम वेडें म्हणतील बापुडें। अवघियां सांकडें जाला कैसा ॥ ३ ॥ माझें ऐसें तया न म्हणती कोणी। असे रानीं वनीं भलते ठायीं ॥ ४ ॥ प्रातःस्नान करी विभूतिचर्चन। देखोनियां जन निंदा करी ॥ ५ ॥ कंठीं तुळशीमाळा बैसोनि निराळा। म्हणती या चांडाळा काय जालें ॥ ६ ॥ गातां शंका नाहीं बैसे भलते ठायीं। शिव्या देती आईबाप भाऊ ॥ ७ ॥ घरीं बाइल म्हणे कोठें व्याली रांड। बरें होतें षंढ मरता तरी ॥ ८ ॥ जन्मोनि झाला अवघियां वेगळा। म्हणोनि गोपाळा दुर्लभ तो ॥ ९ ॥ तुका म्हणे जो संसारा रुसला। तेणेंचि ठाकिला सिद्धपंथ ॥ १० ॥ [११८५]

कस्तुरी भिनली जये मृत्तिकेसी। तये आणिकेसी कैसी सरी ॥ १ ॥ लोखंडाचे अंगीं लागतां परिस। तया आणिकास कैसी सरी ॥ २ ॥ तुका म्हणे मी न वजें यातीवरी। पूज्यमान करीं वैष्णवांसी ॥ ३ ॥ [११८६]

अनुहात ध्वनि वाहे सकळां पिंडीं। राम नाहीं तोंडीं कैसा तरे ॥ १ ॥ सकळां जीवांमाजी देव आहे खरा। देखिल्या दुसरा विण न तरे ॥ २ ॥ ज्ञान सकळांमाजी आहे हें साच। भक्तीवीण तेंच ब्रह्म नव्हे ॥ ३ ॥ काय मुद्रा कळल्या कराव्या सांगतां। दीप न लागतां उन्मनीचा ॥ ४ ॥

व यमपाश घेऊन माझे जवळ नेहमीं बसले आहेत ४. कामक्रोधादि विकार पोटीं व प्रारब्धादि कर्मेंहि पाठीस लागलीं आहेत तीं मला ओढून नरकाकडे नेतात ५. बाकीचे सर्व जन ह्यांनाच साह्य होतात; फक्त मी वेगळा परदेशी आहें (मला कोणी साह्य नाहीं) ६. हे हरि कृपाळुवा, तुजवांचून माझी कींव कोणत्याहि प्रकारची कोणालाच येत नाहीं ७. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मला तुझाच भरंवसा आहे, म्हणून त्या सर्वांची आशा मीं टाकून दिली आहे ८. [११८४]

देवाचा (अनन्य) भक्त देवालाच आवडतो. त्याच्यावांचून दुसरे कोणाला त्या भक्ताची गरज नसते (पर्वा वाटत नाहीं) १. तो भक्त कोणाचा सोबती व साहाकारी–स्नेही नाहीं, तो सर्वांपासून दूर झाला आहे २. त्या भक्तास निष्काम, वेडा व दीन असें म्हणतात. सर्व लोकांना तो अडचण करणारा कसा झाला आहे? ३. त्याचें वास्तव्य रानांत, वनांत हव्या त्या ठिकाणीं असतें, म्हणून तो आम्हांस प्रिय आहे असें कोणी म्हणत नाहीं ४. तो सर्वांगाला विभूति लावतो आणि सकाळीं उठून स्नान करितो. तें पाहून सर्व जन त्याची निंदा करितात ५. गळ्यामध्यें तुळशीची माळ घालून जगावेगळा असा एकांतीं बसतो. ह्या चांडाळाला काय झालें असें जन म्हणतात ६. भलत्याच ठिकाणीं बसून देवाचीं गाणीं गातांना ह्याला भय वाटत नाहीं असें म्हणून त्याचे आईबाप, भाऊ त्याला शिव्या देतात ७. घरांत त्याची बायको असें म्हणते, कीं रांडेनें (त्याच्या आईनें) ह्याला कां जन्म दिला? हा नपुंसक लहानपणींच मरता तर एकपरी बरें झालें असतें ८. जन्माला येऊन तो भक्त सर्व लौकिकाच्या वेगळा झाला आहे, म्हणून गोपाळाला तो फार दुर्लभ आहे ९. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यानें सर्व संसाराचा त्याग केला आहे तोच पुरुष सिद्धस्थितीला पावेल १०. [११८५]

कस्तुरी ज्या मातीशीं मिळाली आहे, त्या मातीशीं दुसरे पदार्थ कसे बरोबरी करूं शकतील? १. लोखंडाला परिसाचा स्पर्श झाला, कीं त्याची बरोबरी दुसरें कोण करील? २. तुकाराम महाराज म्हणतात, मी जातीकडे दृष्टि देणार नाहीं, मी विष्णुभक्तांस पूज्य मानीन (मी जातीकडे बघत नाहीं. वैष्णव कोणत्याहि जातीचे असले तरी ते मला पूज्य आहेत. वैष्णवांची इतर जातींच्या लोकांशीं तुलना कशी होईल?) ३. [११८६]

सगळ्यांच्या हृदयांत एकसारखा सोहं सोहं असा अनुहत (एकसारखा) ध्वनि होत आहे; परंतु रामनामाचें भजन केल्यावांचून कसा तरणोपाय होईल? १. सर्व जीवांमध्यें खरोखर देवाची व्याप्ति आहे, पण दुसऱ्या सगुण देवाचा साक्षात्कार झाल्यावांचून तरणोपाय होणार नाहीं २. सर्वांमध्यें ज्ञान खरोखर आहे, पण सगुण भक्ति केल्यावांचून तें कधींहि ब्रह्मज्ञान व्हावयाचें नाहीं ३. योगाच्या अनेक मुद्रा दुसऱ्याच्या सांगण्यानें जरी समजल्या, तरी काय करावयाच्या

तुका म्हणे नका पिंडाचें पाळण । स्थापूं नारायण आतुडेना ॥ ५ ॥ [११८७]

नेणें अर्थ कांहीं नव्हती माझे बोल । विनवितों कोपाल संत झणीं ॥ १ ॥ नव्हती माझे बोल बोले पांडुरंग । असे अंगसंगें व्यापुनियां ॥ २ ॥ मज मूढा शक्ति कैंचा हा विचार । निगमादिकां पार बोलावया ॥ ३ ॥ राम कृष्ण हरी मुकुंदा मुरारी । बोबड्या उत्तरीं हेंचि ध्यान ॥ ४ ॥ तुका म्हणे गुरुकृपेचा आधार । पांडुरंगें भार घेतला माझा ॥ ५ ॥ [११८८]

देवासी लागे सकळांसी पोसावें । आम्हां न लगे खावें काय चिंता ॥ १ ॥ देवासी विचारावें लागे पापपुण्य । आम्हांसी हे जन अवघे भले ॥ २ ॥ देवासी उत्पत्ति लागला संहार । आम्हां नाहीं फार थोडें कांहीं ॥ ३ ॥ देवासी काम लागला धंदा । आम्हांसी ते सदा रिकामीक ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्ही भले देवाहून । विचारितां गुण सर्वभावें ॥ ४ ॥ [११८९]

घेईन मी जन्म याजसाठीं देवा । तुझी चरणसेवा साधावया ॥ १ ॥ हरिनामकीर्तन संतांचें पूजन । घालीन लोटांगण महाद्वारीं ॥ २ ॥ आनंदें निर्भर असों भलते ठायीं । सुखदुःखा नाहीं चाड आम्हां ॥ ३ ॥ आणीक सायास न करीं न धरीं आस । होईन उदास सर्व भावें ॥ ४ ॥ मोक्ष आम्हां घरीं कामारी ते दासी । होय सांगों तैसी तुका म्हणे ॥ ५ ॥ [११९०]

देवा तुज मज पण । पाहों आगळा तो कोण ॥ १ ॥ तरी साच मी पतित । तूंचि खोटा दीनानाथ । ग्वाही साधुसंत जन । करुनि अंगीं लावीन ॥ २ ॥ आम्ही धरिले भेदाभेद । तुज नव्हे त्याचा छेद ॥ ३ ॥ न चले कांहीं तुझें त्यास । आम्ही बळकाविले दोष ॥ ४ ॥ दिशा भरल्या माझ्या

आहेत ? जोंपर्यंत उन्मनीचा प्रकाश हृदयांत झाला नाहीं (तोंपर्यंत त्या व्यर्थ आहेत) ४. तुकाराम महाराज म्हणतात, देहरक्षण करावें अशा (देहाचें पोषण करा असें सांगणाऱ्या चार्वाक–नास्तिक) मताची स्थापना करूं नका. त्या योगानें नारायणाची प्राप्ति होणार नाहीं ५. [११८७]

मला कसलेंहि अर्थज्ञान नाहीं. मी जे कांहीं शब्द बोलत आहें ते माझे नाहींत, ह्याबद्दल मीं तुम्हां संतांस विनंति करीत आहें. कदाचित् ह्या योगानें तुम्हांस राग येईल १. जे बोल मी बोलत आहें ते माझ्या मुखानें पांडुरंग बोलत आहे. तो माझ्या देहाला व्यापून आहे २. मी मूढ आहें; माझ्या ठिकाणीं अशा प्रकारचा म्हणजे वेदादिकांचें प्रतिपादन करण्याइतका विचार (इतकें सामर्थ्य) कोठें आहे ? ३. रामकृष्णहरि मुकुंदामुरारी या मंत्राचें बोबड्या शब्दांनीं मी चिंतन करीत आहें ४. तुकाराम महाराज म्हणतात, मला गुरुकृपेचा आश्रय असल्यामुळें पांडुरंगानें माझा योगक्षेमाचा सर्व भार घेतला आहे ५. [११८८]

देवाला सर्वांचें पालनपोषण करावें लागतें; आम्हांला स्वतःचे खाण्याचीहि चिंता करावी लागत नाहीं १. देवाला प्राणिमात्रांच्या पापपुण्याचा विचार करावा लागतो. आम्हांला सर्व जन शुद्धच आहेत (आम्हांला तर सर्व लोक चांगलेच दिसतात) २. देवाच्या पाठीमागें जगाचा उत्पत्ति–संहार लागला आहे. आम्हांला थोडें फार देखील काम नाहीं ३. देवाच्या मागें पुष्कळ कामधंदा लागला आहे. आम्ही सदा रिकामे आहोंत ४. तुकाराम महाराज म्हणतात, विचार केला तर आम्ही सर्वभावेंकरून देवापेक्षां पुष्कळ गुणानें (सर्व दृष्टीनें) चांगले आहोंत ५. [११८९]

हे देवा, तुमची चरणसेवा साधण्याकरितां मी जन्म घेईन १. हरिनामाचें कीर्तन व संतांचें पूजन करून तुमच्या महाद्वारीं लोटांगण घालीन २. आनंदानें परिपूर्ण भरलेले आम्ही कोठेंहि राहूं. बाह्य वैषयिक सुखदुःखाची आम्हांला इच्छा नाहीं ३. दुसरे कांहीं उपाय करणार नाहीं व त्यांची (स्त्री-पुत्र-धनादिकांची इच्छा) करणार नाहीं. सर्व भावानें त्यांविषयीं (संसाराविषयीं) उदासीन राहीन ४. तुकाराम महाराज म्हणतात, मोक्ष हा आमच्या घरीं आम्ही जसें सांगूं तसें काम करणारी दासी होईल ५. [११९०]

देवा, तुमच्या व आमच्यामध्यें श्रेष्ठ कोण आहे हें पाहूं. हें पाहा, मी खरोखर पतित आहें पण तूं पतितपावन दीनानाथ मात्र खोटा आहेस (कारण पतित अशा माझा तूं उद्धार केला नाहींस) १. साधुसंतांचे पुराव्यानें, मी म्हणतों, हें तुझ्या माथीं मारीन २. आमच्या हृदयांत भेदाभेद कल्पना आहेत त्याचें छेदन तुझ्याकडून होत नाहीं ३. आम्हीं दोषांचा अंगीकार केला आहे, पण ते तुझ्यानें नाहींसे करवत नाहींत ४. माझ्या मनानें सर्व दिशा भरल्या आहेत

मनें । लपालासी त्याच्या भेणें ॥ ५ ॥ तुका म्हणे चित्त । करी तुझी माझी नीत ॥ ६ ॥ [११९१]

लापनिकशब्दें नातुडे हा देव । मनिंचा गुह्य भाव शुद्ध बोला ॥ १ ॥ अंतरिंचा भेद जाणे परमानंद । जयासी संवाद करणें लागे ॥ २ ॥ तुका म्हणे जरी आपुलें स्वहित । तरी करीं चित्त शुद्धभावें ॥ ३ ॥ [११९२]

नव्हे ब्रह्मज्ञान बोलतां हें शुद्ध । जव आत्मबोध नाहीं चित्तीं ॥ १ ॥ काय करिसी वायां लटिकाची पाल्हाळ । श्रम तो केवळ जाणिवेचा ॥ २ ॥ मीच देव ऐसें सांगसी या लोकां । विषयांच्या सुखा टोंकोनियां ॥ ३ ॥ अमृताची गोडी पुढिला सांगसी । आपण उपवासी मरोनियां ॥ ४ ॥ तुका म्हणे जरि राहील तळमळ । ब्रह्म तें केवळ सदोदित ॥ ५ ॥ [११९३]

गंगाजला (ळा) पाहीं पाठी पोटी नाहीं । अवगुण तो कांहीं अमृतासी ॥ १ ॥ रवि दीप काळिमा काय जाणे हिरा । आणिका तिमिरा नाश तेणें ॥ २ ॥ कर्पूरकांडणीं काय कोंडा कणी । सिंधू मिळवणीं काय चाले ॥ २ ॥ परिस चिंतामणी आणिकांच्या गुणीं । पालटे लागोनि नव्हे तैसा ॥ ४ ॥ तुका म्हणे तैसे जाणा संतजन । सर्वत्र संपूर्ण गगन जैसें ॥ ५ ॥ [११९४]

परिस काय धातु सोनें न करितु । फेडितो निभ्रांतु लोहपांगु ॥ १ ॥ काय तयाहुनि झालासी बापुडें । फेडितां सांकडें माझें एक ॥ २ ॥ कल्पतरु कोड पुरवितो रोकडा । चिंतामणि खडा चिंतिलें तें ॥ ३ ॥ चंदनाच्या वासें वसतां चंदन । होती काष्ठ आन वृक्षयाति ॥ ४ ॥ काय त्यांचें उणें झालें त्यासी देतां । विचारीं अनंता तुका म्हणे ॥ ५ ॥ [११९५]

तोडुनि पुष्पवटिका फळवृक्षयाती । बाभळा राखती करूनि सार ॥ १ ॥ कोण हित तेणें देखिलें

(सर्व दिशांकडे माझें मन धांवत आहे) त्या भीतीनें तूं लपला आहेस ५. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्यामाझ्यामधील नीतिसंबंधाचा विचार माझें चित्त करीत आहे ६. [११९१]

बाहेरील कपटी भाषणानें देवाची प्राप्ति होत नाहीं. जो मनामध्यें गुह्य शुद्ध भाव असेल तो स्पष्ट बोला १. ज्या परमानंद प्रभूशीं संवाद करावयाचा आहे तो अंतःकरणांतील भावना जाणतो २. तुकाराम महाराज म्हणतात, जर तुला आपलें स्वहित करून घ्यावयाचें असेल, तर हरीचें भजन शुद्ध चित्तानें कर ३. [११९२]

जोंपर्यंत आत्मबोध चित्तामध्यें दृढ झाला नाहीं, तोंपर्यंत कितीहि ब्रह्मज्ञानाचें प्रतिपादन केलें तरी तें शुद्ध होत नाहीं १. आत्मानुभवावांचून खोटा शब्दपाल्हाळ काय करावयाचा आहे? केवळ शब्दज्ञानानें (आपली विद्वत्ता दाखविण्यानें) श्रमच होणार आहेत २. मी देव आहें असें लोकांना सांगतोस आणि तुझें अंतःकरण तर विषयसुखाकरितां टुकत बसलें आहे ३. तूं आपण स्वतः उपाशीं मरून अमृताच्या गोडीचे विचार दुसऱ्यास सांगतोस ४. तुकाराम महाराज म्हणतात, जर तुझ्या हृदयांतील तळमळ नाहींशी होईल, तर तूंच निरंतर केवळ ब्रह्म आहेस ५. [११९३]

गंगेच्या पाण्याला पाठ पोट नाहीं व अमृताचे ठिकाणीं एकहि दोष नाहीं १. रवि व दिवा आणि हिरा हे काळोखास जाणतात काय? उलट ह्यांच्या योगानें असलेल्या काळोखाचा नाश होतो २. कापूर किती कांडला तरी त्यांतून कणीकोंडा निघेल काय? समुद्रांत काय मिळविलें असतां खपेल? (कांहीं खपणार नाहीं, कारण समुद्रांत कोणताहि पदार्थ टाकला, तर तो त्यास कडेला टाकतो) ३. परिस आणि चिंतामणि हे दुसऱ्या कोणाच्याहि स्पर्शानें बदलत नाहींत ४. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वत्र परिपूर्ण जसें आकाश (सर्वत्र व्यापूनहि सर्वांहून अलिप्त) आहे तसे संतजन आहेत, (संतजन जगाच्या गुणदोषांनीं लिप्त होत नाहींत) हें समजा ५. [११९४]

परिस धातूला स्पर्श करून त्याचें सोनें करीत नाहीं काय? तो निःसंशय लोखंडाचें दारिद्र्य दूर करितो १. देवा, त्याच्यापेक्षां माझें संकट दूर करण्यास तूं शक्तिहीन झालास कीं काय? २. कल्पतरु हा कल्पिलेला-इच्छिलेला विषय लगेच देतो आणि चिंतामणि (दगड)हि चिंतिलेला अर्थ लगेच देतो ३. उत्तम चंदनाच्या सहवासानें बोरी, बाभळी इत्यादि अन्य जातींचे वृक्षांसहि चंदनाप्रमाणें सुगंध येतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे अनंता, अशा प्रकारच्या दात्यांना हें इच्छिलेलें देण्यांत कोणता कमीपणा आला आहे, ह्याचा तूं विचार कर ५. [११९५]

जे (सुगंधी) फुलांचीं व मधुर फळांचीं झाडें तोडतात व बाभळी रक्षण करितात १. त्यांनीं असें करण्यांत आपलें

आपुलें । आणीक पाहिलें सुख काई ॥ २ ॥ धान्य बीजें जेणें जाळिलीं सकळें । पेरितो कारळें जिरें बीज ॥ ३ ॥ मोडोनियां वाटा पुढिलांची सोय । आडरानें जाय घेउनि लोकां ॥ ४ ॥ विषाचें अमृत ठेवूनियां नाम । करितो अधम ब्रह्महत्या ॥ ५ ॥ तुका म्हणे त्यास नाइके सांगतां । तया हाल करितां पाप नाहीं ॥ ६ ॥ [११९६]

संसाराच्या भेणें । पळों न लाहेसें केलें ॥ १ ॥ जेथें तेथें आपण आहे । आम्ही करावें तें काये (काय) ॥ २ ॥ एकांतासी ठाव । तिहीं लोकीं नाहीं वाव ॥ ३ ॥ गांवा जातों ऐसें । नलगे म्हणावें तें कैसें ॥ ४ ॥ स्वप्नाचे (स्वप्नाचिये) परी । जागा पाहे तंव घरीं ॥ ५ ॥ नुका म्हणे काये । तुझें घेतलें म्यां आहे ॥ ६ ॥ [११९७]

आपण काय सादर । विशीं आम्हां कां निष्ठुर ॥ १ ॥ केलें भक्त तैसें देईं । तुझें प्रेम माझ्याठायीं ॥ २ ॥ काय पंगतीसि कोंडा । एकांतासी साकरमांडा ॥ ३ ॥ काय एकपण । पोतां घालूनि गांठीं खूण ॥ ४ ॥ काय घ्यावें तैसें । तया आपण अनारिसें ॥ ५ ॥ तुका म्हणे मधीं । आतां तोडूं भेदबुद्धि ॥ ६ ॥ [११९८]

चित्त तुझ्या पायीं । ठेवुनि झालों उतराई ॥ १ ॥ परि तूं खोटा केशिराजा । अंतपार न कळे तुझा ॥ २ ॥ आम्ही सर्वस्वें उदार । तुज देऊनि वेव्हार ॥ ३ ॥ इंद्रियांची होळी । संवसार दिला बळी ॥ ४ ॥ न पडे विसर । तुझा आम्हां निरंतर ॥ ५ ॥ प्रेम एकासाटीं । तुका म्हणे न वेंचे गांठीं ॥ ६ ॥ [११९९]

आम्ही पतित म्हणोनि तुज आलों शरण । करितों चिंतन दिवस रात्रीं । नाहीं तरी मज काय होती चाड । धरावया भीड तुझी चित्तीं ॥ १ ॥ आम्हां न तारावें तुम्हीं काय करावें । सांगीजे जी भावें

कोणतें हित पाहिलें आहे ? व त्यांत सुख तरी काय बघितलें आहे ? २. (गहूं, तांदूळ इत्यादि) धान्यांचें सर्व बीज जाळून टाकलें व कडू कारल्याच्या व जिऱ्याच्या बीजाची पेरणी केली ३. पुढें जाणारांच्या सोईचे मार्ग मोडून टाकून जो सर्वांना आडरानांत घेऊन जातो ४. विषाला अमृताचें नांव देऊन तें ब्राह्मणाला पाजून जो अधम ब्रह्महत्या करितो ५. तुकाराम महाराज म्हणतात, असा मनुष्य जर सांगितलेलें न ऐकेल तर त्याची हालअपेष्टा करण्यांत पाप नाहीं ६. [११९६]

संसाराच्या भीतीनें कोठें पळून जाण्यास देवानें अवकाश ठेविला नाहीं १. ज्या ज्या ठिकाणीं आम्ही जावें तेथें आपण स्वतः भरलेला आहे, आतां आम्हीं काय करावें ? २. एकांतास त्रैलोक्यांतहि कोठें ठाव राहिला नाहीं ३. आम्ही गांवाला जातों असें म्हणावयास देखील नको ४. कारण स्वप्नामध्यें किती दूर गेलें तरी जागा होऊन पाहावें तों आपल्या घरींच असतों ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझें मीं काय घेतलें आहे (तो तूं मला असें कोंडलेंस?) ६. [११९७]

देवा, आपण पतितांना तारण्याविषयीं किती तत्पर असतां, असें असून आमच्याविषयीं तुम्ही असे निष्ठुर कां झालांत? १. जसें तुम्हीं आपल्या भक्तांना केलें, तसें तुमच्याविषयीं माझ्यामध्यें प्रेम द्या २. एकांतामध्यें बसून साखरमांडा खाणें व दहाजणांचे पंगतीस कोंडा वाढणें हें काय योग्य आहे? ३. पदरीं असलेल्या धनास गांठ देऊन तुम्ही आम्ही एक आहोंत असें नुसतें म्हणणें हें काय? ४. आपल्याला एक व दुसऱ्याला एक हें तुमचें करणें बरोबर नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तुमच्या आमच्यामधील असणारी भेदबुद्धि आतां नाहींशी करूं ६. [११९८]

देवा, तुमच्या पायीं चित्त ठेवून (तुझ्या उपकारांतून) उत्तीर्ण झालों आहें १. पण, अहो केशीराजा, तुम्ही खोटे आहांत; तुमचा अंतपार कळत नाहीं २. आम्ही सर्व व्यापार तुला अर्पण करून सर्वस्वी उदार झालों आहों ३. इंद्रियांची होळी करून संसार तुझ्या पायीं बळी दिला ४. तुझा विसर आम्हांला केव्हांहि होत नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्याशिवाय दुसऱ्या एकासाठीं आम्हीं आपल्या पदरींचें प्रेम खर्च केलें नाहीं. [तुझ्यावांचून एकावरहि प्रेम ठेविलें नाहीं] ६. [११९९]

हे देवा, आम्ही पतित आहोंत, म्हणून तुला शरण येऊन रात्रंदिवस तुझें चिंतन करीत आहोंत; नाहीं पेक्षां तुझी भीड धरण्याची मला काय जरूर होती? १. आमचा तरणोपाय न करितां तुम्ही (आमचें) काय करणार तें नारायणा,

नारायणा ॥ २ ॥ अन्याय कोणाचा अंगीकार करणें । तया हातीं देणें लाज तेचि । काय तें शूरत्व मिरवूनि बोलणें । जनांमाजी दावणें बळ रया ॥ ३ ॥ पोह्या अन्नछत्र घालूनियां घरीं । दंडितो बाहेरी आलियासी । नव्हे कीर्त कांहीं न मानेचि लोकां । काय विटंबणा (जैसी) तैसी तैसी ॥ ४ ॥ प्रत्यक्षासी काय द्यावें हें प्रमाण । पाहतां दर्पण साक्ष काई । तुका म्हणे तरी आम्हां कां न कळे । तरलों किंवा आम्ही नाहीं ॥ ५ ॥ [१२००]

काग बग रिठा मारिले बाळपणीं । अवघी दैत्यखाणी बुडविली ॥ १ ॥ तो मज दावा तो मज दावा । नंदा(द)नंदन जीवा आवडे तो ॥ २ ॥ गोवर्धन गिरी उचलिला करीं । गोकूळ भीतरी राखियेलें ॥ ३ ॥ वधुनि भौमासुरा आणिल्या गोपांगना । राज्य उग्रसेना मथुरेचें ॥ ४ ॥ पांडव जोहरीं राखिले कुसरीं । विवराभीतरीं चालविले ॥ ५ ॥ तुका म्हणे हा तो भक्तांचा कृपाळ । दुष्टजनां काळ नारायण ॥ ६ ॥ [१२०१]

तुजविण देवा । कोणा म्हणे माझी जिव्हा ॥ १ ॥ तरि हो कां शत खंड । पडो झडोनियां रांड ॥ २ ॥ कांहीं इच्छेसाठीं । करील वळवळ करंटी ॥ ३ ॥ तुका म्हणे कर । कटीं तयाचा विसर ॥ ४ ॥ [१२०२]

आम्हां सर्वभावें हेंचि काम । न विसंबावें तुझें नाम ॥ १ ॥ न लगे करावी हे चिंता । तरणें करणें काय आतां ॥ २ ॥ आसनीं भोजनीं शयनीं । दुजें नाहीं ध्यानीं मनीं ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपानिधी । माझी तोडिली उपाधी ॥ ४ ॥ [१२०३]

नव्हे कांहीं कवणाचा । भाव जाणवला साचा ॥ १ ॥ म्हणोनि तुझ्या पायीं । जीव ठेविला

श्रद्धापूर्वक मला सांगा २. एखाद्याचा अंगीकार करून त्याला दुसऱ्याचे हातीं देणें हें लाजिरवाणें आहे, तसें तुम्ही माझा अंगीकार करून माझा अव्हेर करितां, हा अन्याय कोणाचा आहे ? अशा प्रकारचें शाब्दिक शूरत्व व बल जगामध्यें मिरविणें काय उपयोगी ? ३. आपल्या घरीं पाणपोई व अन्नछत्र घालून तेथें येणारास जो दंड करितो त्या योगानें त्याची जगतांत कधींहि कीर्ति होणार नाहीं. लोकांनाहि तें पटणार नाहीं. त्याप्रमाणें ही विटंबना काय करितां ? ४. प्रत्यक्षाला प्रमाण द्यावें लागतें काय ? आरशांत पाहिल्यावर दुसऱ्याच्या डोळ्याला मान देण्याची (दुसऱ्याच्या साक्षीची) जरूरी आहे काय ? तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही तरलों किंवा नाहीं हें आम्हांला कां कळत नाहीं ? ५. [१२००]

देवानें बाल्यावस्थेंतच काक, बग, रिठा इत्यादि दैत्य मारून त्यांची खाण नाहींशी केली (संपूर्ण दैत्यांचा वंश बुडवून, नाश करून टाकला) १. तो मला दाखवा (असें द्विवार सांगतों). नंदाचा मुलगा श्रीकृष्ण हा माझ्या जिवास फार प्रिय आहे २. ज्यांनीं आपल्या हाताच्या करंगळीवर गोवर्धन पर्वत उचलला आणि त्याच्याखालीं गोकुळाचें रक्षण केलें ३. भौमासुर असुराला मारून त्यापासून गोपी परत आणल्या व मथुरेचें राज्य उग्रसेनास दिलें ४. मोठ्या चातुर्यानें पांडवांचें जळणाऱ्या लाक्षागृहापासून रक्षण केलें व त्यांना विवरांतून बाहेर काढून नेलें ५. तुकाराम महाराज म्हणतात, तो हा देव नंदनंदन भक्तांविषयीं मोठा कृपाळु आहे आणि तोच दुष्टजनांचा नाश करणारा काळ आहे ६. [१२०१]

हे देवा, तुजवांचून माझी जिव्हा कोणास देव म्हणेल १. तर ती रांड झडून पडो आणि तिचे शंभर तुकडे होवोत २. कांहीं इच्छा धरून कोणास कांहीं मागण्याकरितां जर ती वळवळ करील तर ती जिव्हा करंटी जाणावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, कमरेवर हात ठेवून जो देव उभा आहे त्याचा मला विसर पडल्यास [पुढें ध्रुवपद वाचावें] ही दुष्ट जिव्हा झडून पडून जावो ४. [१२०२]

हे देवा, तुझें नामस्मरण सर्वभावानें आम्ही करतों, त्याला कधींहि विसंबत नाहीं, हेंच आमचें काम आहे १. आतां आम्हांला कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं व तरणोपाय होण्याविषयीं आम्ही चिंताहि करीत नाहीं २. आम्ही आसनावर बसलों असतांना अगर निजलों असतांना व भोजनाचे वेळीं हरिनामावांचून दुसरें कांहींहि आमचे ध्यानांत अगर मनांत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे कृपानिधि, प्रपंचसंबंधीं माझी सर्व उपाधी तुम्हीं नाहींशी केली ४. [१२०३]

मी कोणत्याच कारणानें कोणाचाच नाहीं, हा भाव मला खरोखरी कळून आला १. हे देवा, ह्याकरितां निश्चयानें

निश्चयीं ॥ २ ॥ शरीर जायाचें कोंपट । याची काय खटपट ॥ ३ ॥ तुका म्हणे वायांविण । देवा कळों आला सीण ॥ ४ ॥ [१२०४]

रज्जु धरूनियां हातीं । भेडसाविलीं नेणतीं । कळों येतां चित्तीं । दोरी दोघां सारिखी ॥ १ ॥ तुम्हां आम्हांमध्यें हरी । झाली होती तैसी परी । मृगजळाचे पुरीं । ठाव पाहों तरावया ॥ २ ॥ सरी चितांक भोंवरी । अलंकाराचिया परी । नामें झालीं दुरी । एक सोनें आटितां ॥ ३ ॥ पिसांचीं पारवीं । करोनि बाजेगिरी दावी । तुका म्हणे तेवीं । मज नको चाळवूं ॥ ४ ॥ [१२०५]

नेघें तुझें नाम । न करीं सांगितलें काम ॥ १ ॥ वाढे वचनें वचन । दोष उच्चारितां गुण ॥ २ ॥ आतां तुझ्या घरा । कोण करी येरझारा ॥ ३ ॥ तुका म्हणे ठायीं । मजपाशीं काय नाहीं ॥ ४ ॥ [१२०६]

व्यवहार तो खोटा । आतां न वजों तुझ्या वाटा ॥ १ ॥ एका नामा नाहीं ताळा । केली सहस्त्रांची माळा ॥ २ ॥ पाहों जातां ठायीं । खेळसील लपंडाई ॥ ३ ॥ तुका म्हणे चार । बहु करितोसी फार ॥ ४ ॥ [१२०७]

लटिकाची केला । सोंग पसारा दाविला ॥ १ ॥ अवघा बुडलासी ऋणें । बहुतांचें देणें घेणें ॥ २ ॥ लाविंयेला चाळा । बहु दावूनि पूतळा ॥ ३ ॥ तुका म्हणे हात । आम्हीं अवरिली मात ॥ ४ ॥ [१२०८]

दाखउनि (दावूनियां) आस । केला बहुतांचा नास ॥ १ ॥ थोंटा झोंडा शिरोमणी । भेटलासी नागवणी ॥ २ ॥ सुखाचें उत्तर । नाहीं मुदलासी थार ॥ ३ ॥ तुका म्हणे काय । तुझें घ्यावें उरे हाय ॥ ४ ॥ [१२०९]

तुझ्या पायांच्या ठिकाणीं मी आपला जीव समर्पण केला २. हें पंचभूतात्मक शरीर केवळ गवताच्या खोपटाप्रमाणें मोडून जाईल असें आहे, म्हणून हें जतन होण्याविषयीं उपाय करण्याचें काय कारण आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, हा सर्व मायिक पसारा व्यर्थ असून ह्यांत शीण आहे असें मला कळून आलें ४. [१२०४]

एखाद्यानें दोरी हातांत धरून, हा सर्प आहे, असें म्हणून अज्ञान मुलास भेडसाविलें. ती दोरी आहे, सर्प नव्हे, असें अज्ञान्याला समजल्यावर त्याचें भय जाऊन दोघांस दोरीचा अनुभव सारखाच होतो १. हे हरि, तसा प्रकार तुम्हांआम्हांमध्यें झाला होता. केवळ मृगजळामध्यें बुडतों असें वाटून तरण्याचा उपाय करीत होतों २. सरी, चितांक, बुगडी हे अलंकारांचे वेगळाले प्रकार आहेत. ते सर्व पण सोन्याचेच आहेत. ते मुशींत घालून आटले असतां, त्यांचीं भिन्न नामरूपें जाऊन एक सोनें मात्र राहातें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें गारोडी परांचा खोटा पारवा खऱ्याप्रमाणें भासवितो, त्याप्रमाणें देवा, तुम्ही मला फसवूं नका ४. [१२०५]

हे देवा, (मी मुक्त झालों आहें, आतां मला कर्तव्य उरलें नाहीं) तुझें नाम मी घेणार नाहीं, आणि त्वां सांगितलेलें कामहि करणार नाहीं १. त्याचें कारण, तुझ्या गुणदोषांचा उच्चार केला असतां बोलण्यानें बोलणें उगीच वाढतें २. आतां तुझ्या घराकडे कोण येरझारा करितो? ३. तुकाराम महाराज म्हणतात, बसल्या ठिकाणीं माझ्याजवळ काय एक नाहीं? (मी सर्वदृष्टीनें परिपूर्ण आहें) ४. [१२०६]

हे देवा, तुझा सर्व व्यवहार खोटा आहे, म्हणून आतां आम्ही तुझ्या वाटेस जाणार नाहीं १. कारण तुला एकच नाम आहे, असा कांहीं मेळ नाहीं. सहस्त्रावधि नामें तूं आपल्यास ठेवून घेतलीं आहेस २. एके ठिकाणीं तुला पाहूं गेलें असतां तूं सांपडत नाहींस, लपंडाव खेळतोस ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मजविषयीं तूं फार फार चेष्टा करितोस ४. [१२०७]

देवा, तूं पतितपावनपणाचें खोटेंच सोंग दाखविलें आहेस १. स्वस्थ बसून भक्तांच्या सेवाऋणानें तूं सर्व बुडून गेला आहेस. तुझ्यावर पुष्कळांचें देणें घेणें आहे २. हे देवा, पुतळ्या, तूं बहुतांना लोभ दाखवून फसविलेंस ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्या व्यवहारासंबंधीं आम्हीं हात आवरिला व भाषणहि आवरिलें ४. [१२०८]

हे देवा, तूं आजपर्यंत पुष्कळांना आशा लावून त्यांचा नाश केलास १. असा तूं कुभांड्या, लबाडशिरोमणि आहेस. सर्वांना फसविणारा असा तूं आम्हांला भेटलास २. आमचें सेवाऋणाचें जें तुजकडे (मोक्षरूप) मुद्दल आहे, त्याच्याविषयीं आधार वाटण्यासारखे सुखाचे शब्द देखील तूं बोलत नाहींस ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझें बोन्याचें (नागव्याचें) काय घ्यावें? अखेरीस हाय हाय करावें लागणार ४. [१२०९]

लाज ना विचार । बाजारी तूं भांडखोर ॥ १ ॥ ऐसें ज्यानें व्हावें । त्याची गांठी तुजसवें ॥ २ ॥ फेडिसी लंगोटी । घेसी सकळांसी तुटी ॥ ३ ॥ तुका म्हणे चोरा । तुला आप ना दुसरा ॥ ४ ॥ [१२१०]

ठाव नाहीं बुड । घरें वसविसी कूड ॥ १ ॥ भलते ठायीं तुझा वास । सदा एरवीं (येऱ्हवीं) उदास ॥ २ ॥ जागा ना निजेला । होशी धाला ना भुकेला ॥ ३ ॥ न पुसतां भलें । तुका म्हणे तुझें बोलें ॥ ४ ॥ [१२११]

श्वाना दिली सवे । पायांभोंवतें तें भोंवे ॥ १ ॥ तैसी जाली मज परी । वसे निकट सेजारीं ॥ २ ॥ जेवितां जवळी । येऊनियां पूच्छ (पुस) घोळी ॥ ३ ॥ कोपेल तो धनी । तुका म्हणे नेणें मनीं ॥ ४ ॥ [१२१२]

वटवट केली । न विचारितां मना आली ॥ १ ॥ मज कराल तें क्षमा । कैसें नेणों पुरुषोत्तमा ॥ २ ॥ उचित न कळे । जिव्हा भलतेंचि बरळे ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं । लौकिकाची चाड नाहीं ॥ ४ ॥ [१२१३]

जीवें व्हावें साटी । पडे संसारासी तुटी ॥ १ ॥ ऐशीं बोलिलों वचनें । सवें घेउनि नारायण ॥ २ ॥ येणें नाहीं जाणें । केलें कोणा न मागणें ॥ ३ ॥ नाहीं जन्मा आलों । करील ऐसें नेदी बोलों ॥ ४ ॥ ठाव पुसीला सेणें । तुका म्हणे खुंटो येणें ॥ ५ ॥ [१२१४]

आतां पंढरीराया । माझ्या निरसावें भया ॥ १ ॥ मनीं राहिली आशंका । स्वामिभयाची सेवका ॥ २ ॥ ठेवा माथां हात । कांहीं बोला अभयमात ॥ ३ ॥ तुका म्हणे लाडें । खेळें ऐसें करा पुढें ॥ ४ ॥ [१२१५]

हे देवा, तुला लाज नाहीं व विचार नाहीं. भर बाजारांत भांडण करणारा असा तूं भांडखोर आहेस १. ज्यानें तुझ्यासारखें नागवें व्हावें, त्याची तुझी गांठ पडेल २. तूं लंगोटी फेडून नागवा होऊन सगळ्यांचें खाऊन जाणारा आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे चोरा, तुला आपलें आणि परकें हें कांहीं नाहीं ४. [१२१०]

हे देवा, तुझ्या मूळाचा शोध करावा तर सर्व जगांत घरें, झोंपड्या वसविल्यामुळें तुझा ठिकाणा लागत नाहीं १. पाहिजे त्या ठिकाणीं तुझें वास्तव्य सर्वकाळ आहे, तथापि तूं उदास आहेस २. तूं जागाहि नाहींस व निजलेलाहि नाहींस, तृप्तहि नाहींस व भुकेलेलाहि नाहींस ३. तुकाराम महाराज म्हणतात, तूं कोणाला कांहीं न विचारितां समजतोस व बोलतोस (तुझ्या वेदगीतादि वचनांनीं, कोणाला न विचारतां देखील, लोकांचें कल्याण होतें) ४. [१२११]

ज्या कुत्र्याचे मालक लाड करितो (आपली संवय लावून देतो), तें नेहमीं त्या मालकाच्या पायांभोंवती फिरत असतें १. त्याप्रमाणें हे देवा, माझा प्रकार झाला आहे; मीं तुमच्या अगदीं जवळ वास्तव्य केलें आहे २. मालक जेवावयास बसला असला, तरी तें कुत्रें त्याच्या जवळ शेपूट हालवीत येतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें आपण केलें, तर आपल्या धन्याचे मनांत राग येईल, हें तें कुत्रें समजत नाहीं (हे देवा, तीच स्थिति माझी झाली आहे.) ४. [१२१२]

अविचारबुद्धीनें जसें माझ्या मनाला वाटलें, तशी मी तुमच्या द्वारीं वटवट केली १. हे पुरुषोत्तमा, ह्याची मला क्षमा कशी कराल, हें मला कांहीं कळत नाहीं २. योग्य प्रसंग (योग्य, अयोग्य कांहींच) न कळल्यामुळें ही माझी जिव्हा हवी तशी बरळते ३. तुकाराम महाराज म्हणतात, किंचित् देखील लौकिकलज्जेची गरज (लौकिकाची लाज) मला राहिली नाहीं ४. [१२१३]

परमार्थाकडे जीव अर्पण करावा, म्हणजे सर्व संसार नाहींसा होतो १. अशा प्रकारचें मी नारायणाचे संगतीनें बोलत आहें २. आतां मला जन्ममरणाचें येणें जाणें नाहीं व कोणास कांहीं मागण्याचें कारण नाहीं ३. आतां मी जन्माला आलों नाहीं, असें तो देव मी कांहीं न बोलतां करील (जन्मदुःख नाहींसें करील) ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझें जन्ममृत्यूचें मूळ शेणगोळ्यानें पुसून टाकलें. (अविद्या–तिचा ठावच ज्ञानरूपी गोमयानें पुसून टाकला) आतां पुनः जन्माला येण्याचें खुंटलें ५. [१२१४]

हे पंढरीराया, आतां माझें भय नाहींसें करा १. हे स्वामि, तुमचा मी सेवक असून माझ्या मनामध्यें भय, शंका राहिलीं आहेत (त्यांचें निरसन करा) २. ह्याकरितां तुम्ही माझ्या मस्तकीं हात ठेवून कांहीं अभयाचें वचन बोला ३. मी तुमच्यापुढें कौतुकानें लाड करून खेळेन, असें करा ४. [१२१५]

कवतुकवाणें । बोलों बोबड्या वचनें ॥ १ ॥ हें तों नसावें अंतरीं । आम्हां धरायाचें दुरी ॥ २ ॥ स्तुति तैशी निंदा । माना समचि गोविंदा ॥ ३ ॥ तुका म्हणे बोलें । मज तुम्हीं शिकविलें ॥ ४ ॥ [१२१६]

असो मागें झालें । पुढें गोड तें चांगलें ॥ १ ॥ आतां माझे मनीं । कांहीं अपराध न मनीं ॥ २ ॥ नेदीं अवसान । करितां नामाचें चिंतन ॥ ३ ॥ तुका म्हणे बोलें । तुज आधींच गोंविलें ॥ ४ ॥ [१२१७]

मातेविण बाळा । आणीक न माने सोहळा ॥ १ ॥ तैसें झालें माझ्या चित्ता । तुजविण पंढरिनाथा ॥ २ ॥ वाट पाहे मेघा बिंदू । नेघे चातक सरिता सिंधु ॥ ३ ॥ सारसांसी निशीं । ध्यान रवीच्या प्रकाशीं ॥ ४ ॥ जीवनाविण मत्स्य । जैसें धेनुलागीं वत्स ॥ ५ ॥ पतिव्रते जिणें । भ्रताराच्या वर्तमानें ॥ ६ ॥ कृपणाचें धन । लोभा (भ्या) लागीं जैसें मन ॥ ७ ॥ तुका म्हणे काय । तुजविण प्राण राहे ॥ ८ ॥ [१२१८]

तुज ऐसा कोणी न देखें उदार । अभयदानशूर पांडुरंगा ॥ १ ॥ शरण येती त्यांचे न विचारिसी दोष । न मागतां त्यांस अढळ देसी ॥ २ ॥ धांवसी आडणी ऐकोनियां धांवा । कैवारें (कइवारें) देवा भक्तांचिया ॥ ३ ॥ दोष त्यांचे जाळीं कल्पकोटिवरी । नामासाटीं हरि आपुलिया ॥ ४ ॥ तुका म्हणे तुज वाणूं कैशा परी । एक मुख हरी आयुष्य थोडें ॥ ५ ॥ [१२१९]

काय तुझे उपकार पांडुरंगा । सांगों मी या जगामाजीं आतां ॥ १ ॥ जतन हें माझें करूनि संचित । दिलें अवाचित आणूनियां ॥ २ ॥ घडलया दोषांचे न घालीच भरी । आली यास थोरी कृपा देवा ॥ ३ ॥ नव्हतें टाउकें आइकिलें नाहीं । न मागतां पाहीं दान दिलें ॥ ४ ॥

तुमच्याजवळ कौतुकानें बोबड्या उत्तरानें (शब्दानें) मी बोलत आहें १. पण तुम्ही आम्हांला दूर करण्याचें अंतःकरणांत येऊं देऊं नका २. हे गोविंदा, मी तुमची स्तुति अथवा निंदा जरी केली तरी तुम्ही दोन्ही सारखींच माना ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याचें कारण तुम्हीं मला जें शिकविलें तें मी बोलत आहें. [१२१६]

आजपर्यंत जें झालें तें असो. आतां येथून पुढें चांगलें मधुर भाषण करीन १. आतां माझे अपराध तुम्ही कांहीं मनांत आणूं नका. २. तुमच्या नामाचें चिंतन करतांना मला कांहीं विसांवा घेऊं देऊं नका ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या वचनानें मीं तुम्हांला पूर्वींच गुंतवून टेविलें आहे ४. [१२१७]

आईवांचून बालकास दुसरे सुखोपचार पटत नाहींत १. हे पंढरीनाथा, तुझ्यावांचून माझ्या चित्ताची तशी स्थिति झाली आहे २. चातकपक्षी स्वाती नक्षत्राच्या जलबिंदूची इच्छा करितो, त्यावांचून तो समुद्रनद्यादिकांचें जलपान करीत नाहीं ३. रात्रीं सारस पक्ष्यांना सूर्यप्रकाशाचें ध्यान लागतें ४. पाण्यावांचून जसा मासा तळमळतो किंवा धेनूवांचून जसें वत्स तडफडतें ५. पतीच्या वियोगानें पतिव्रतेची हृदयस्थिति जशी होते ६. कृपण मनुष्याचें मन जसें धनलोभानें तळमळ करतें ७. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, त्याप्रमाणें तुजवांचून माझे प्राण राहातील काय? ८. [१२१८]

हे पांडुरंगा, भक्तजनांना अभयदान देणारा तुझ्या तोडीचा शूर मीं कोणी पाहिला नाहीं १. जे कोणी तुला अनन्य शरण आले आहेत, त्यांच्या दोषांचा तूं विचार करीत नाहींस व त्यांस न मागतां अढळपद देतोस २. भक्तजनांनीं संकट-समयीं केलेला धांवा ऐकून, देवा, तुम्ही त्यांचा कैवार घेऊन धांव घेतां ३. जे कोणी तुमचें नामचिंतन करीत आहेत, हे देवा, त्यांचे दोष अगणित असले तरी आपल्या नांवाकरितां ते तुम्ही नाहींसे करतां ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुझें वर्णन कोणत्या प्रकारानें करूं? कारण तुझी कीर्ति मोठी व माझें तोंड एक असून आयुष्य फार थोडें आहे ५. [१२१९]

हे पांडुरंगा, तुझे उपकार मी आतां जगतामध्यें काय सांगूं? १. माझें संचित जन्मजन्मांतरींचें पुण्य जतन करून माझे हातीं अकस्मात् दिलें २. माझे हातून जे दोष घडले असतील, त्यांच्या भरीला माझी पुण्याई घातली नाहीं; हे देवा, अशी तुम्हांला मजविषयीं मोठी दया आली ३. तें माझें पुण्य संचित कोणत्या प्रकारचें होतें तें मीं ऐकलें नाहीं व मला

तुका म्हणे याच्या उपकारासाठीं । नाहीं माझें गांठीं कांहीं एक ॥ ५ ॥ [१२२०]

वाळुनियां जन सांडी मज दुरी । करिशील हरी ऐसें कधीं ॥ १ ॥ आठवीन पाय धरूनि अनुताप । वाहे जळ झोंप नाहीं डोळां ॥ २ ॥ नावडती जीवा आणीक प्रकार । आवडी ते फार एकांताची ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसी धरितों वासना । होईं नारायणा साह्य मज ॥ ४ ॥ [१२२१]

सांगतों या मना तें माझें नाइके । घातावरी टेंके चांडाळ हें ॥ १ ॥ म्हणऊनि पाहे तरतें बुडतें । न लाहे पुरतें बळ करूं ॥ २ ॥ काय तें संचित न कळे पाहतां । मतिमंद चिंता उपजतें ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसें बळ नाहीं अंगीं । पावोनियां वेगीं पार ठाकीं ॥ ४ ॥ [१२२२]

आतां नको चुकों आपुल्या उचिता । कृपाळुवा कांता रखुमाईच्या ॥ १ ॥ आचरावे दोष हें आम्हां उचित । तारावे पतित तुमचें तें ॥ २ ॥ आम्ही तों आपुलें केलेंसे जतन । घडो तुम्हांकून घडेल तें ॥ ३ ॥ तुका म्हणे विठो चतुराच्या राया । आहे तें कासया मोडों देसी ॥ ४ ॥ [१२२३]

मुखें बोलावें तें जीवीचें जाणसी । विदित पायापाशीं सर्व आहे ॥ १ ॥ आतां हेंचि भलें भाकावी करुणा । विनियोग तो जाणा तुम्ही त्याचा ॥ २ ॥ आपलें तों येथें केलें नव्हे कांहीं । साधनाच्या वाहीं पडों नये ॥ ३ ॥ तुका म्हणे देह दिला पिंडदान । वेळोवेळां कोण चिंता करी ॥ ४ ॥ [१२२४]

कामातुरा भय लाज ना विचार । शरीर असार तृणतुल्य ॥ १ ॥ नवल हे लीळा करी त्याचें लाघव । प्रारब्धें भाव दाखविले ॥ २ ॥ लोभालोभ एका धनाचिये ठायीं । आणिकांची सोई चाड

ठाऊकहि नाहीं. तें (कैवल्य–मोक्ष–दान) मला न मागतां आणून दिलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, हा जो तुम्हीं उपकार केला त्याचा मोबदला देण्यास माझ्या पदरीं कांहीं एक नाहीं ५. [१२२०]

अहो श्रीहरि, लोक माझा धिक्कार करून दूर त्याग करतील (लोटतील), असें तुम्ही कधीं कराल ? १. असें झाल्यावर अनुतापयुक्त होऊन तुमचे पायाचें चिंतन मी करीन २. ह्या अवस्थेनें रात्रंदिवस माझ्या डोळ्यांतून पाणी वाहात असून त्या योगानें मला झोंप येत नाहीं ३. दुसरे कांहीं विषय जीवास आवडत नाहींत. मला एकांताची फार आवड आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, अशी माझ्या चित्तानें वासना धरली आहे. ह्याबद्दल तुम्ही मला सहाय (जोडीदार, मदतनीस) व्हा ५. [१२२१]

माझ्या मनास मी पुष्कळ उपदेश करीत आहें, परंतु तें ऐकत नाहीं. माझा घात करण्याविषयीं तें चांडाळ मन प्रवृत्त झालें आहे १. मी तरेन किंवा बुडेन ह्याचा विचार पाहातों; पण त्या बलवान् मनापुढें माझा कांहीं इलाज चालत नाहीं २. माझें पूर्वजन्मार्जित संचित कर्म कसें आहे, हें पाहूं गेलों तर कांहीं कळत नाहीं: आणि मी बुद्धिहीन झाल्यामुळें तरणोपायाची चिंता उत्पन्न झाली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या भवसागरांतून लवकर पार पडेन अशा प्रकारचे गुण माझे अंगांत नाहींत ४. [१२२२]

हे कृपाळु रुक्मिणीच्या कांता, आतां (मी कसाहि वागलों तरी) तूं आपल्या योग्य कर्तृत्वास चुकूं नको १. दोषांचें (पापांचें) आचरण करावें हें आमचें कर्तव्य आहे, व पतितांस तारावें हें तुमचें योग्य कर्तव्य आहे २. आम्हीं आपल्या कर्तव्याचें रक्षण केलें आहे, तुमचेकडून काय घडेल तें घडो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे चतुरांच्या राजा पांडुरंगा, पूर्वीपासून चालत आलेला जुना मार्ग मोडूं नकोस (तुझें कर्तव्य तूं कर) ४. [१२२३]

हे देवा, तुमच्यापुढें आम्हीं काय बोलावें ? तुम्ही जीवींचें सर्व जाणत आहांतच, आमचा सर्व प्रकार तुमचे पायांशी विदित आहेच १. आतां आम्हीं तुमची करुणा भाकावी हेंच उत्तम होय. ह्यापासून काय उपयोग होईल तो तुम्ही जाणावा (ह्याचें फळ पुढें काय मिळेल हें तुम्हीच जाणतां) २. ह्या ठिकाणीं आमचें कर्तव्य कांहीं चालत नाहीं (आम्हीं स्वतंत्रपणें कांहीं केलें तर त्याचा कांहींच उपयोग होत नाहीं), म्हणून आम्ही साधनाच्या भरीस पडत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा देहपिंड, हे देवा, तुम्हांस अर्पण केला. आतां त्याचेविषयीं वेळोवेळीं काळजी कोण करितो ? ४. [१२२४]

कामी पुरुषास भय, लज्जा व (पुढच्या परिणामाचा) विचार नसून काम साध्य होण्याकरितां तो आपलें शरीर हें असार तृणासारखें मानतो १. ही त्या कामातुराची स्वकार्यसाधनाची लीला नवलदायक आहे, व हा सर्व प्रकार

नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे भूक न विचारी प्रकार। योजे तें तें (तेंचि) सार यथाकाळीं ॥ ४ ॥ [१२२५]

बांधी सोडी हें तों धन्याचीये हातीं । हेंकड गोंविती आपणां बळें ॥ १ ॥ भुललियासी नाहीं देहाचा आठव । धोतऱ्यानें भाव पालटिला ॥ २ ॥ घरांत रिघावें दाराचिये सोई । भिंतीसवें डोई घेऊनि फोडी ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा गेलीं विसरोन । आतां वर्म कोण दावी यांसी ॥ ४ ॥ [१२२६]

कवण जन्मता कवण जन्मविता । न कळे कृपावंता माव तुझी ॥ १ ॥ कवण हा दाता कवण हा मागता । न कळे कृपावंता माव तुझी ॥ २ ॥ कवण भोगता कवण भोगविता । न कळे कृपावंता माव तुझी ॥ ३ ॥ कवण ते रूपता कवण अरूपता। न कळे कृपावंता माव तुझी ॥ ४ ॥ सर्वां ठायीं तूंचि सर्वही झालासी । तुका म्हणे यासी दुजें नाहीं ॥ ५ ॥ [१२२७]

जेथें देखें तेथें तुझींच पाउलें । विश्व अवघें कोंदाटलें । रुपगुण नाम अवघा मेघशाम । वेगळें तें काय उरलें । जातां लोटांगणीं अवघीच मेदिनी । सकळ देव पाट झाले । सदा सर्वकाळ सुदिन सुवेळ । चित्त प्रेमें असे धालें ॥ १ ॥ अवघा आम्हां तूंच झालासी देवा। संसार हेवा काम धंदा ॥ न लगे जाणें कोठें कांहींच करणें । मुखीं नाम ध्यान सदा ॥ २ ॥ वाचा बोले ते तुझेचि गुणवाद । मंत्र जप कथा स्तुति । भोजन सारूं ठायीं फल तांबोल कांहीं । पूजा नैवेद्य तुज होती । चालतां प्रदक्षिणा निद्रा लोटांगण। दंडवत तुजप्रति । देखोन दृष्टी परस्परें गोष्टी। अवघ्या तुझ्या मूर्ति ॥ ३ ॥ झाल्या तीर्थरूप बावी नदी कूप । अवघें गंगाजळ झालें । महाल मंदिरें नाड्या तनघरें । झोपड्या

(चाळे, युक्त्या) त्याचे प्रारब्धानें प्रगट केला आहे २. कृपणाचा लोभ फक्त द्रव्याच्याच ठिकाणीं असतो, त्यास इतरांची गरज नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, भूक लागली म्हणजे बुभुक्षित (भुकेलेला) चांगल्या-वाईट प्रकारचा विचार न करतां ऐन वेळीं जें मिळेल तें अन्न खातो ४. [१२२५]

(जीवाला) बांधणें अगर सोडणें हें सर्व धन्याचे स्वाधीन असतें (ब्रह्मांडाचा धनी जो पांडुरंग त्याच्या हातीं आहे.) असें असतां, हट्टी लोक व्यर्थ आग्रहानें गुंतून पडतात १. धोतऱ्याचें बीज (बी) खाऊन जे कोणी भुलले, त्यांस देहाविषयींचें स्मरण राहात नाहीं. धोतऱ्याचे बियांनीं त्यांची सर्व स्थिति बदलून टाकिली २. कोणास घरांत दरवाज्यानेंच गेलें पाहिजे; तसें न केलें तर भिंतीवर डोकें आपटून फुटेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे सर्व लोक देवास विसरून गेले. आतां ह्यांना खरें मर्म (परमार्थाचें रहस्य) कोण दाखवील? ४. [१२२६]

हे कृपावंता, जन्मणारा कोण व जन्म देणारा कोण! ही तुझी माया मला कळत नाहीं १. तसेंच हे कृपावंता, देणारा कोण व मागणारा कोण! ही तुझी माया मला कळत नाहीं २. हे कृपावंता, सुखदुःखभोक्ता कोण व भोगविता कोण! ही तुझी माया मला कळत नाहीं ३. हे कृपावंता, रूपवान् कोण व रूपरहित कोण! ही तुझी माया मला कळत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वांच्या ठायीं तुझी व्याप्ति आहे. तुजवांचून किंचित्सुद्धां दुसरें स्थान नाहीं. ५. [१२२७]

हे देवा, जिकडे मी पाहीन, तिकडे तुझे पाय माझ्या दृष्टीस पडतात. सर्व विश्व तुझ्या योगानें (रूपानें) भरलें आहे. रूप, गुण, नाम हें सर्व तुझें मेघश्यामस्वरूप मला भासत आहे, त्यावांचून दुसरें उरलें नाहीं. मीं कोठें लोटांगण घातलें असतांहि सर्व पृथ्वी देवरूप दिसत आहे; त्या योगानें दिवस, वेळ धन्य होऊन सदा सर्वकाळ माझें चित्त प्रेमानें तृप्त झालें आहे १. हे देवा, चहूंकडे आम्हांला तूंच झाला आहेस; आतां तुझ्यावांचून संसाराची हाव व दुसरा कांहीं उद्योग राहिला नाहीं. आम्हांला कोठें जाणें नको व कांहीं करणें नको. एका ठिकाणीं बसूनदेखील मुखामध्यें तुझें नाम व चित्तामध्यें तुझें रूप सर्वकाळ धरून राहिलों आहोंत २. जें आम्ही वाचेनें बोलतों, ते तुझे गुणानुवाद व मंत्रजप व कथा आणि तुझी स्तुति होत आहे. एके ठिकाणीं बसून आम्ही जेवूं व फलतांबूलादि पदार्थ सेवन करूं, त्या योगानें तुमची पूजा होऊन तुम्हांला नैवेद्य अर्पण होत आहे; आणि आम्ही वाटेनें चालत असतां तुम्हांला प्रदक्षिणा होत आहे व निजलों असतां दंडाप्रमाणें लोटांगण तुम्हांस होतें. जे कोणी प्राणी आमच्या दृष्टीस पडतात व त्यांच्या आमच्यामध्यें जें बोलणें होतें, तें सर्व तुझें रूप आहे, असें आम्ही मानतों ३. विहिरी, व नद्या आड ह्या सर्वांचें पाणी आम्हांस तीर्थरूप प्रत्यक्ष

अवघीं देव देवाइलें (देवालयें) । ऐकें कानीं त्या हरिनामध्वनी । नाना शब्द होते झाले । तुका म्हणे आम्ही या विठोबाचे दास । सदा प्रेम सुखें धालों रे ॥ ४ ॥ [१२२८]

जे दोष घडले न फिटे करितां कांहीं । सरते तुझ्या पायीं झाले तैसे ॥ १ ॥ माझा कां हो करूं नये अंगिकार । झालेती निष्ठुर पांडुरंगा ॥ २ ॥ यातिहीन नये ऐकों ज्या वेद । तया दिलें पद वैकुंठींचें ॥ ३ ॥ तुका म्हणे कां रे एकाचा आभार । घेसी माथां भार वाहोनियां ॥ ४ ॥ [१२२९]

हरिकथेची आवडी देवा । करितो सेवा दासांची ॥ १ ॥ म्हणोनि हिंडे मागें मागें । घरटी जागे घालितसे ॥ २ ॥ निर्लज्ज भोजें नाचत रंगीं । भरतें अंगीं प्रेमाचें ॥ ३ ॥ तुका म्हणे विकलें देवें । आपण भावें संवसाटी ॥ ४ ॥ [१२३०]

साधनसंपत्ति हेंचि माझें धन । सकळ चरण विठोबाचे ॥ १ ॥ शीतळ हा पंथ माहेराची वाट । जवळीच नीट सुखरूप ॥ २ ॥ वैष्णवांचा संग रामनाम गाणें । मंडित भूषणें अळंकार ॥ ३ ॥ भवनदी आड नव्हतीसी झाली । कोरडीच चाली जावें पायीं ॥ ४ ॥ मायबाप दोघें पाहतील वाट । ठेवूनियां कटीं कर उभीं ॥ ५ ॥ तुका म्हणे केव्हां देखेन कळस । पळाली आळस निद्रा भूक ॥ ६ ॥ [१२३१]

वेदश्रुति तुज नेणती कोणी । चोवीस ठेंगणी धांडोळितां ॥ १ ॥ आतां मज क्षमा करावें ते देवा । सलगी ते केशवा बोलियेलों ॥ २ ॥ तो आम्ही भावें केलासी लहान । ठेवूनियां नांवें पाचारितों ॥ ३ ॥ सहस्रमुखें शेष सीणला स्तवितां । पार न कळतां ब्रह्मा ठेला ॥ ४ ॥ यथार्थवादें तुज न वर्णवे कदा । बोलतों ते निंदा करितों तुझी ॥ ५ ॥ सगुण कीं साकार निर्गुण कीं निराकार । न कळे हा

गंगाजळ आहे असें वाटतें. चांगले महाल व घरें व गवताच्या झोपड्या हीं सर्व देवालयें आहेत, असें घाटून त्यांत मी देवच पाहातों. नानाप्रकारचे शब्द जरी कोणीं बोलले, तरी तो हरीच्या नामाचा ध्वनिच मला ऐकूं येतो. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं ह्या विठोबारायाचे दास झाल्यामुळें सदा सर्वकाळ प्रेमानें तृप्त झालों आहोंत ४. [१२२८]

जे कोणत्याहि उपायानें दोष जाणार नाहींत असले दोष आचरणारे दोषी तुझ्या पायांजवळ मान्य झाले १. हे पांडुरंगा, असें असून तुम्ही माझा अंगीकार कां करीत नाहीं? मजविषयीं तुम्ही निष्ठुर कसे झालां? २. ज्यांनीं वेद ऐकूं नये असे कमी जातीचे जे आहेत, त्यांना तुम्हीं आपलें वैकुंठाचें पद दिलेंत ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तूं कित्येकांचे आभार मानून त्यांचा (योग–क्षेमाचा) भार मस्तकावर वाहात आहेस ४. [१२२९]

हरीला आपल्या कथेविषयींची अति प्रीति आहे म्हणून जे कोणीं कथा करीत असतील अशा दासांची तो सेवा करीत असतो १. आणि ते दास जिकडे जातील तिकडे त्यांच्या मागें हिंडतो २. व ते ज्या जागीं बसतील तेथें घिरव्या घालतो व निर्लज्जपणानें आनंदाचे प्रेमभरांत तो नाचतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरिदासाच्या अनन्यभावामुळें देव आपण स्वतः विकला गेला ४. [१२३०]

विठोबारायाचे पाय हेंच काय तें एक आमचें साधन आहे व तीच सर्व धनसंपत्ति आहे १. हा (पंढरीचा) मार्ग शांत आहे व ही माहेरची वाट सुखाची असून जवळची व नीट आहे २. वैष्णवांच्या संगतीनें रामनाम गाणें ह्या अलंकार-भूषणानें सुशोभित असणें ३. ह्या योगानें ही पुढील भवनदी नाहींशी झाली म्हणजे कोरडी पडली. आतां ती पायानें उतरून जावें. ४. विठोबाराया हे बाप व रखुमाई माता, हीं दोघें कमरेवर हात ठेवून आमची वाट पाहात आहेत ५. तुकाराम महाराज म्हणतात, मी पंढरीच्या देवाच्या मंदिराचा कळस केव्हां पाहीन असें झालें आहे. त्या अवस्थेनें माझी निद्रा, आळस व भूक नाहींशी झालीं आहेत ६. [१२३१]

वेदश्रुति ह्या तुला कांहीं देखील जाणत नाहींत; अठरा पुराणें व सहा शास्त्रें हीं चोवीस तुझा शोध करण्याविषयीं अपुरीं झालीं १. हे देवा, ह्यांबद्दल तूं मला क्षमा कर. हे केशवा, मीं जी तुझी स्तुति केली ती सलगीनें केली २ असा जो तूं त्या तुला आम्हीं भावबलानें अति लहान असा सगुण केला व अनेक नांवें ठेवून तुला हांका मारूं लागलों ३. हजार मुखानें तुझें वर्णन करितांना शेष थकला व तुझ्या स्वरूपाचा पार न लागल्यामुळें ब्रह्मदेवहि स्वस्थ बसला ४. हे देवा, शब्दानें तुझें यथार्थ वर्णन केव्हांहि होत नाहीं. आम्ही जी स्तुति म्हणून करतों ती तुझी निंदा होते ५

पार वेदश्रुती ॥ ६ ॥ तेथें माझी देहबुद्धि ते काई । थोर मी अन्यायी तुका म्हणे ॥ ७ ॥ [१२३२]

कृष्ण गातां गीतीं कृष्ण ध्यातां चित्तीं । तेही कृष्ण होती कृष्णध्यानें ॥ १ ॥ आसनीं शयनीं भोजनीं जेवितां । म्हणा रे भोगितां नारायण ॥ २ ॥ ओंविया दळणीं गावा नारायण । कांडितां कांडण करितां काम ॥ ३ ॥ नर नारी याति हो कोणीं भलतीं । भावें एका प्रीतीं नारायणा ॥ ४ ॥ तुका म्हणे एका भावें भजा हरी । कांति ते दुसरी रूप एक ॥ ५ ॥ [१२३३]

डोळियां पाझर कंठ माझा दाटी । येईं (गा) वो देईं भेटी पांडुरंगे ॥ १ ॥ बहु दिस टाकिलें निरास कां केलें । कोठें वो गुंतलें चित्त तुझें ॥ २ ॥ बहु धंदा तुज नाहीं वो आठव । राहिलासे जीव माझा कंठीं ॥ ३ ॥ पंढरीस जाती वारकरी संतां । निरोप बहुतां हातीं धाडीं ॥ ४ ॥ तुजविण कोण सांवा धांवा करी । येईं वो झडकरी पांडुरंगे ॥ ५ ॥ काय तुझी वाट पाहों कोठवरी। कृपाळुवा हरी (परी) विसरलासी ॥ ६ ॥ एक वेळ माझा धरूनि आठव । तुका म्हणे ये वो न्यावयासी ॥ ७ ॥ [१२३४]

काय करूं या मना आतां । कां विसरतें पंढरीनाथा । करी संसाराची चिंता । वेळोवेळां मागुती ॥ १ ॥ अधिक कोंडितां चरफडी । भलतीकडे घाली उडी ॥ २ ॥ भजन नावडे श्रवण । धांवे विषय अवलोकून ॥ ३ ॥ बहुत चंचळ चपळ । जातां येतां न लगे वेळ ॥ ४ ॥ किती राखों दोनी काळ । निजलिया जागे वेळ ॥ ५ ॥ मज राखें आतां । तुका म्हणे पंढरीनाथा ॥ ६ ॥ [१२३५]

कंथा प्रावर्ण । नव्हे भिक्षेचें तें अन्न ॥ १ ॥ करीं यापरी स्वहित । विचारूनि धर्म नीत ॥ २ ॥

तूं सगुण किंवा साकार, निर्गुण किंवा निराकार आहेस ह्या विषयींचा श्रुतीकडून एकहि निर्णय झाला नाहीं ६. तुकाराम महाराज म्हणतात, त्या ठिकाणीं ह्या देहबुद्धीनें तुझें वर्णन करण्यास माझी योग्यता ती काय, ह्या संबंधानें मी मोठा अन्यायी आहें ७. [१२३२]

कृष्णाला गीतांत गाइल्यानें आणि कृष्णाचें चित्तांत ध्यान केल्यानें भक्ताला कृष्णरूपता येते १. आसनावर बसलें असतांना, अंथरुणावर निजलें असतांना व अनेक भोग भोगीत असतांना, अरे, तूं नारायणाचे स्मरण कर २. दळीत असतांना नारायणाच्या ओंव्या गा; कांडीत असतांना व अनेक कामें करतांना नारायणालाच गावें ३. पुरुष व स्त्रिया, त्या कोणत्याहि जातीच्या असोत, त्यांनीं एकनिष्ठभावानें नारायणावर प्रीति ठेवावी ४. तुकाराम महाराज म्हणतात, एकनिष्ठभावानें तुम्ही हरीचें भजन करा, म्हणजे तुमची हरीशीं, सूर्य व त्याची कांति हे दिसण्यांत दोन असून ज्याप्रमाणें एकच आहेत त्याप्रमाणें, एकरूपता होईल ५. [१२३३]

हे पांडुरंगे, तुझ्या भेटीविषयीं माझें मन उत्कंठित होऊन डोळ्यांतून आनंदाश्रु येत असून कंठ दाटून आला आहे, म्हणून तूं ये आणि मला भेट दे १. मला फार दिवस टाकून देऊन तुझ्या प्राप्तीची आशा नाहींशी कां करतोस ? तुझें चित्त दुसरीकडे कोठें गुंतलें आहे काय ? २. तुला काम फार असल्याकारणानें माझा आठव होत नाहीं आणि माझा प्राण तुझ्या भेटीविषयीं कंठीं उरला आहे ३. पंढरीला जे कोणी वारकरी संत जाणारे आहेत त्यांपैकीं पुष्कळांच्या बरोबर मीं तुला निरोप पाठविला आहे (पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं) ४. हे पांडुरंगे, तुझ्यावांचून मला धावून येऊन कोण साह्य करील, म्हणून तूं लवकर ये ५. हे हरि, तूं कृपाळू असून माझा विसर तुला कां पडला ? मीं तुझी वाट कोठपर्यंत पाहावी ? ६. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, आतां एक वेळ माझी आठवण करून मला नेण्यासाठीं तूं लवकर ये ७. [१२३४]

आतां ह्या मनाला मी काय करूं ? तें पंढरीनाथाला कां विसरतें ? आणि वारंवार संसाराविषयीं चिंता पुनः पुन्हां कां करतें ? १. मी मनास कोंडलें असतां तें जास्त चरफडतें आणि भलतीकडे उडी घालावयाला पाहातें २. ह्या मनाला हरीचें भजन करणें व त्याची कथा ऐकणें आवडत नाहीं; विषय पाहून मन तिकडे धावून जातें ३. हें मन फार चंचल असून चपळ आहे म्हणून त्याला कोणीकडे जाण्यास व परत येण्यास अगदीं वेळ लागत नाहीं ४. निजलें असतांना व जागृतसमयीं या दोन्ही अवस्थेंत ह्या मनाचें रक्षण कोठपर्यंत करावें ? ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा, आतां तूं माझें (मनाच्या ह्या दोषांपासून) रक्षण कर ६. [१२३५]

(संन्याशाची) गोधडी हें वस्त्र इतर वस्त्रांप्रमाणें नाहीं व भिक्षा मागून आणलेलें अन्न इतर अन्नाप्रमाणें (रुचकर

राउळ (देऊळ) नव्हे घर। प्रपंच परउपकार ॥ ३ ॥ विधिसेवन काम। नव्हे शब्द रामराम ॥ ४ ॥ हत्या क्षात्रधर्मे। नव्हे निष्काम तें कर्म ॥ ५ तुका म्हणे संतीं। करुनि ठेविली आइती ॥ ६ ॥ [१२३६]

पडोनियां राहीं। उगाच संतांचिये पायीं ॥ १ ॥ न लगे पुसणें सांगावें। चित्तशुद्ध करीं भावें ॥ २ ॥ सहज ते स्थिति। उपदेश परयुक्ति ॥ ३ ॥ तुका म्हणे भाव। जवळी धरूनि आणी देव ॥ ४ ॥ [१२३७]

देवाचे घरीं देवें केली चोरी। देवें देव नागवूनि केला भिकारी ॥ १ ॥ धांवणिया धांवा धांवणिया धांवा। मागचि नाहीं जावें कवणिया गांवा ॥ २ ॥ सर्वेचि होता चोर घरिचिया घरीं। अवघें केलें वाटोळें फांवलियावरी ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें कोणीच नाहीं। नागवलें कोण गेलें कोणाचें काई ॥ ४ ॥ [१२३८]

जतन करा रे जतन करा। घालूं पाहे घरावरी घाला चोरटे ॥ १ ॥ अवघेचि निजों नका अवघिये ठायीं। वेळ अवेळ तरी सांभाळावी कांहीं ॥ २ ॥ सींतरिलीं फार खाती भोंवताले फेरे। गेलें नये हातां सेकीं तळमळ उरे ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही करूं आपलें जतन। न लगे कांहीं कोणां द्यावें उघडा रे कान ॥ ४ ॥ [१२३९]

काळोखी खाऊन कैवाड केला धीर। आपुलिया हितें झाले जनामध्यें शूर ॥ १ ॥ कां रे तुम्ही नेणां कां रे तुम्हीं नेणां। अल्पसुखासाठीं पडशी विपत्तीचे घाणां ॥ २ ॥ नाहीं ऐसी लाज काय

अन्न) नाहीं १. ह्याप्रमाणें धर्मनीतीचा विचार करून आपलें स्वहित करून घे. २. देवाचें देऊळ इतर घरांप्रमाणें घर नव्हे व लोकांवर उपकार करून संसार करीत असतां इतर लोकांप्रमाणें तो संसारी नव्हे ३. शास्त्रानें सांगितलेल्या विधीप्रमाणें विषयसेवन केल्यास इतरांप्रमाणें तो विषयी नव्हे व राम हा शब्द इतर शब्दांप्रमाणें नव्हे ४. क्षत्रिय लोकांनीं युद्धसमयीं शत्रूचा वध केला असतां ती हत्या इतर हत्येप्रमाणें नाहीं, कारण त्यांचा तो धर्मच आहे आणि निष्कामबुद्धीनें कोणतेंहि कर्म केल्यास तें इतर कर्मांप्रमाणें नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या प्रकारची नीति पूर्वीच संतांनीं सांगितली आहे (त्याप्रमाणें आपण वागावें) ६. [१२३६]

अहो जन हो, तुम्ही संतांचे पायांजवळ निवांतपणें उगाच पडून राहा १. त्यांना (ज्ञानासंबंधीं) कांहीं पुसणें नको व सांगणेंहि नको; पण त्यांचे ठिकाणीं भाव धरून चित्त शुद्ध केलें पाहिजे २. त्या संतांची साहजिक वागणूक लोकांना युक्तीनें उपदेश करण्याची आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तूं भाव धरून संतांजवळ राहिल्यास ते देवाला धरून तुझ्याजवळ आणतील ४. [१२३७]

हें देहरूपी घर देवाचें असून त्यांतील अज्ञान व सर्व कामक्रोधादि विकाररूपी द्रव्याची चोरी देवानेंच केली, म्हणून देवानेंच देवाला लुटून भिकारी केला १. आतां कोणी धांवणारे लोक हो, धांवा (असें द्विवार सांगतो). त्या चोराचा शोध-तपास लागत नाहीं. आतां कोणत्या गांवास जाऊन त्याचा शोध करावा ? २. हा चोर माझ्याबरोबर असून देहरूपी घरांतच राहात होता. त्यानें संधि पाहून सर्व नाश करून टाकला. (चित्तशुद्धीची संधि सांपडतांच त्यानें जीवाचें वाटोळें केलें, देहादि उपाधींचा निरास केला) ३. तुकाराम महाराज म्हणतात, विचार करून पाहिलें असतां ह्या ठिकाणीं कोणीच नाहीं. (जीवरूपी देवाची ईश्वररूपी देवानें चोरी केली. जीव आणि ईश्वर ह्यांचें परम ऐक्य झालें. अशा अद्वैत स्थितींत,) आतां नागवला कोण व कोणाचें काय चोरीस गेलें हें सांगतां येईल काय ? ४. [१२३८]

अहो जन हो, (परमार्थरूपी धनाचें) रक्षण करा (असें द्विवार सांगतो). (देहरूपी) घरावर (काळरूपी) चोर घाला घालतील १. तुम्ही सर्व जण सर्व ठिकाणीं (सर्वकाळ) निजूं नका. कांहीं तरी वेळ अवेळेचा सांभाळ करा (प्रसंगीं सावध राहा) २. आजपर्यंत बहुत फसलीं गेलीं तीं अनेक योनींतून (रहाटगाडग्याप्रमाणें) फिरत आहेत. ह्याकरितां आपल्या हातांतून नरदेहरूपी धन निघून गेलें म्हणजे तें पुन्हां मिळणार नाहीं; तळमळत बसावें लागेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही आपलें परमार्थ धन जतन करूं. कुणाला कांहीं भ्यायचें कारण नाहीं. अरे, तुम्ही आपले कान उघडा (हें लक्ष देऊन श्रवण करा) ४. [१२३९]

(संतांनीं साधकावस्थेंत असतांना) मोठ्या धैर्यानें निर्धार केला व अंधकारवत् असणारें (हरिविषयींचें) अज्ञान नाहींसें केलें. अशा प्रकारें आपलें हित साधून संत लोकांमध्यें शूर झाले १. हें तुम्हांला कां कळत नाहीं ? (असें द्विवार विचारतो). क्षणिक विषयसुखाकरितां जन्ममरणाच्या आपत्ति-चक्रांमध्यें कां पडतोस ? २. तुमच्यापेक्षां संतांजवळ

तयांपें आगळें । काय नव्हे केलें आपुलिया बळें ॥ ६ ॥ तुका म्हणे तरी सुख अवघेंचि बरें । जतन करूं हीं आपुलीं ढोरें ॥ ४ ॥ [१२४०]

जाय परतें काय आणिला कांटाळा । बोला एक वेळां ऐसें तरी ॥ १ ॥ कां हो केली तुम्हीं निष्ठुरता देवा । मानेना हे सेवा करितों ते ॥ २ ॥ भाग्यवंत त्यांसी सांगितल्या गोष्टी । तें नाहीं अदृष्टीं आमुचिया ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्हांपासूनि अंतर । न पडे नाहीं स्थिर बुद्धि माझी ॥ ४ ॥ [१२४१]

अनुभवें कळों येतें पांडुरंगा । रुसावें तें कां गा तुम्हांवरी ॥ १ ॥ आवरितां चित्त नावरे दुर्जन । घात करी मन माझें मज ॥ २ ॥ अंतरीं संसार भक्ति बाह्यात्कार । म्हणोनि अंतर तुझ्या पायीं ॥ ३ ॥ तुका म्हणे काय करूं नेणें वर्म । आलें तैसें कर्म सोसूं पुढें ॥ ४ ॥ [१२४२]

तुज करितां होतें आनाचें आन । तारिले पाषाण उदकीं देवा ॥ १ ॥ कां नये कैवार करूं अंगिकार । माझा बहु भार जड झाला ॥ २ ॥ चुकलासी म्हणों तरी जीवांचाही जीव । रिता नाहीं ठाव उरों दिला ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसें काय सत्ताबळ । माझे परी कृपाळ आम्हां तुम्ही ॥ ४ ॥ [१२४३]

फळ देंठीहून झडे । मग मागुतें न जोडे ॥ १ ॥ म्हणउनि तांतडी खोटी । कारण उचिताचे पोटीं ॥ २ ॥ पुढें चढे हात । त्याग मागिला उचित ॥ ३ ॥ तुका म्हणे रणीं । नये पाहों परतोनि ॥ ४ ॥ [१२४४]

कांहीं अधिक होतें काय ? ह्याची तुम्हांला लाज कशी वाटत नाहीं ? आपल्या स्वसामर्थ्यानें केली असतां कोणती गोष्ट होणार नाहीं ! ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वतोपरि सुख हें फार चांगलें आहे. येवढ्याकरितां आपापल्या इंद्रियरूपी गुरांचें रक्षण करूं (निग्रह करूं) ४. [१२४०]

'तूं येथून चालता हो. मला किती त्रास देत आहेस ?' असे त्रासाचे उद्गार तरी एक वेळ देवा, तुम्ही काढा १. अहो देवा, तुम्हीं एवढी मजविषयीं निष्ठुरता कां केली ? मी तुमची सेवा करितों ती तुम्हांला मान्य होत नाहीं काय ? २. जे कोणी भाग्यवान् होते त्यांच्याशीं हे देवा, तुम्ही गोष्टी बोलत होतां; तें सुख आमच्या प्रारब्धांत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्याकडून मजवर कृपा करण्याविषयीं अंतर पडणार नाहीं पण तितका धीर माझ्या बुद्धीला निघत नाहीं ४. [१२४१]

हे पांडुरंगा, (तुझी प्राप्ति कां होत नाहीं, ह्याचें कारण माझ्यांत दोष आहेत हें) मला स्वतःचे अनुभवानें कळून आलें आहे, तर तुमचेवर विनाकारण कशाकरितां रुसावें ? १. माझें चित्त फार वाईट आहे. त्यास कितीहि आवरलें तरी तें आवरलें जात नाहीं आणि माझें मन माझ्याच घातावर उठलें आहे २. अंतःकरणांत संसार असून बाह्यात्कारीं भक्तीचें भूषण मिरवितों, म्हणून तुझे पायाशीं अंतर होत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्या प्राप्तीचें वर्म मला कळत नाहीं त्यास मी काय करूं ? आतां पूर्वीचें संचितकर्म जसें असेल तसें पुढें सोसावें लागेल (ह्याशिवाय त्याच्या परिहाराचा उपाय मला सुचत नाहीं) ४. [१२४२]

हे देवा, तुम्ही करूं लागलां तर कांहींच्या कांहींच करतां. राम—अवतारीं तुम्हीं पाण्यावर दगड तारले १. असें असून तुम्ही मला साह्य कां करीत नाहीं ? माझें ओझें जड असें तुम्हांला वाटल्यावरून माझा अंगीकार करीत नाहीं काय ? २. मजविषयीं तुला विसर झाला असें म्हणावें तर सर्व जीवांमध्यें तुझी वस्ती आहे. तुझ्यावांचून एकहि रिकामें ठिकाण नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझें असें काय सामर्थ्य आहे (कीं मी तुम्हांला आकळीन); पण तुम्हीच कृपाळु आहांत (त्यामुळें अंगीकार करालच, ह्यांत शंका नाहीं) ४. [१२४३]

कोणतेंहि फळ देंठापासून सुटलें म्हणजे तें पूर्ववत् देंठास मिळत नाहीं १. ह्याकरितां उतावीळपणा हा खोटा आहे; योग्य करण्यांतच कार्यसिद्धि आहे (म्हणून परमार्थांत तांतडी करणें चांगलें नसतें. कोणतेंहि कार्य योग्य व पूर्ण विचाराच्या पोटीं जन्माला येत असतें. म्हणून आत्मस्थिति प्राप्त होईपर्यंत धर्माचा आणि भक्तीचा त्याग करणें योग्य नाहीं) २. उत्तरोत्तर वरचे लाभ हस्तगत होऊं लागले म्हणजे खालच्यांचा त्याग होणें योग्यच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, शूरांनीं रणामध्यें मागें पाहूं नये ४. [१२४४]

आगी देखोनि सती। अंगीं रोमांच उठती ॥ १ ॥ हा तो नव्हे उपदेश। सुख अंतरीं उल्हास ॥ २ ॥ वित्तगोताकडे। चित्त न घाली न रडे ॥ ३ ॥ आठवूनि एका। उडी घाली म्हणे तुका ॥ ४ ॥ [१२४५]

फळ पिके देंठीं। निमित्य वारियाची भेटी ॥ १ ॥ हा तो अनुभव रोकडा। कळों येतो खरा कुडा ॥ २ ॥ तोडिलिया बळें। वायां जाती काचीं फळें ॥ ३ ॥ तुका म्हणे मन। तेथें सकळ कारण ॥ ४ ॥ [१२४६]

हालवूनि खुंट। आधीं करावा बळकट ॥ १ ॥ मग तयाच्या आधारें। करणें तें अवघें बरें ॥ २ ॥ सुख दुःख साहे। हर्षामर्षीं भंगा नये ॥ ३ ॥ तुका म्हणे जीवें। आधीं मरोनि राहावें ॥ ४ ॥ [१२४७]

धांवे माते सोई। बाळ न विचारतां कांहीं ॥ १ ॥ मग त्याचें जाणे निकें। अंग वोडवी कौतुकें ॥ २ ॥ नेणे सर्प दोरी। आगी भलतें हातीं धरी ॥ ३ ॥ तीविणें तें नेणें। आणीक कांहीं तुका म्हणे ॥ ४ ॥ [१२४८]

भोग द्यावे देवा। त्याग भोगींच बरवा ॥ १ ॥ आपण व्हावें एकीकडे। देव कळेवरी जोडे ॥ २ ॥ योजे यथाकाळें। उत्तम पाला कंद मुळें ॥ ३ ॥ वंचकासी दोष। तुका म्हणे मिथ्या सोस ॥ ४ ॥ [१२४९]

जी कोणी पतिव्रता आहे ती पतीसह गमन करतेवेळीं मोठा धगधगीत अग्नि (चिता) पाहून तिचे अंगावर आनंदानें रोमांच उभे राहातात १. हे प्रकार (अशी निष्ठा, असें धैर्य) उपदेश केल्यानें होत नाहींत. त्यास खरोखरी अंतःकरणाचा उल्हास पाहिजे २. ती आपल्या गोत्राकडे व घरांत असलेल्या द्रव्याकडे मुळींच लक्ष देत नाहीं व रडत सुद्धां नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, एक आपल्या पतीची आठवण करून ती आनंदानें अग्नीमध्यें उडी घालते (तशी भक्ताची देवाविषयीं निष्ठा असावी) ४. [१२४५]

कोणतेंहि फळ देंठाचे ठिकाणीं पक्कदशेला आलें म्हणजे त्याला खालीं पडण्यास एक वाऱ्याची झुळूक पुरी होते १. हा सर्वांना प्रत्यक्ष अनुभव आहे, तो खरा किंवा खोटा हें सहज समजतें २. पक्व दशेस न येतां कच्चीं फळें जर तोडलीं तर तीं नासून वायां जातात ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या एका मनाचे योगानेंच सर्व कार्यसिद्धि होते (धर्माच्या आणि भक्तीच्या योगानें स्थिर झालेल्या मनाला हरि–गुरु–कृपेचें निमित्त मिळालें कीं आत्मसाक्षात्कार होतो; आणि स्वैराचारी मन कच्च्या फळाप्रमाणें फुकट जातें. आपलें मनच कार्यसिद्धीला कारण होतें.) ४. [१२४६]

ज्या खुंटाच्या आधारानें आपणास कांहीं करावयाचें आहे तो अगोदर हालवून बळकट आहे कीं नाहीं तें पाहावें १. व त्याच्या बळकटपणाची खात्री झाल्यावर मग त्याच्या आधारानें जें काहीं कराल तें सर्व उत्तम होईल २. (त्याप्रमाणें आपलें मन बळकट झालें आहे कीं नाहीं तें पाहावें. बळकट मनाचा असेल) तो अनेक प्रकारचीं सुखदुःखें सहन करतो व त्यांच्या हर्षशोकानें त्याचा मनोभंग होत नाहीं. ३ तुकाराम महाराज म्हणतात, आपली जीवदशा अगोदर नाहींशी करून पूर्णत्वानें राहावें (ब्रह्मरूपानें जगांत राहावें) ४. [१२४७]

बालक हें आपल्या आईस पाहून तिच्याकडे धांव घेतें तेव्हां उंचवट्यावरून मी खालीं पडेन हें ज्ञान त्या बालकास नसतें १. मग ती मातोश्री त्याचे बऱ्याकरितां हातचें काम टाकून कौतुकानें त्याचें रक्षण करते २. तें बालक सर्प, दोरी किंवा अग्नि हें कांहीं जाणत नाहीं, म्हणून भलताच पदार्थ हातीं धरतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका मातोश्रीवांचून तें आणखी कांहीं जाणत नाहीं (त्याप्रमाणें आत्मसाक्षात्कारी भक्तानें बालभावानें जगांत राहावें, म्हणजे देव, मातेप्रमाणें, त्याचा सांभाळ करतो) ४. [१२४८]

भोग भोगण्याचे वेळीं ते कृष्णार्पण करून भोगले तर त्या योगानें भोगाचा त्याग घडतो १. ह्या भोगांचा सर्व भोक्ता देव आहे असें निश्चयानें जाणून आपण निराळें व्हावें म्हणजे देवाची ह्या देहांतच प्राप्ति होते २. भुकेच्या वेळीं (ऋतुमानाप्रमाणें होणाऱ्या) कंद-मुळें-पाल्याची योजना (देवाला समर्पण करून) खाण्याकडे करावी हें उत्तम ३. तुकाराम महाराज म्हणतात, (देवाला समर्पण न करतां भोग भोगणाऱ्या) आत्मवंचकास दोष लागतात, म्हणून ह्याबद्दल सोस धरणें (देवाला समर्पण न करण्याचा आग्रह धरणें) व्यर्थ आहे ४. [१२४९]

पायांच्या प्रसादें। कांहीं बोलिलों विनोदें ॥ १ ॥ मज क्षमा करणें संतीं। नव्हे अंगभूत युक्ति ॥ २ ॥ नव्हे हा उपदेश। तुमचें बडबडिलों शेष ॥ ३ ॥ तुमचे कृपेचें पोसणें। जन्मोजन्मीं तुका म्हणे ॥ ४ ॥ [१२५०]

जायाचें अंगुलें लेतां नाहीं मान। शोभा नेदी जन हांसविलें ॥ १ ॥ घुसळितां ताक कांडितां भूस। साध्य नाहीं क्लेश जाती वायां ॥ २ ॥ तुका म्हणे नाहीं स्वता भांडवल। भिकेचें तें फोल बीज नव्हे ॥ ३ ॥ [१२५१]

न बोलावें परी पडिला प्रसंग। हाकलितें जग तुझ्या नामें ॥ १ ॥ लटिकेची सोंग मांडिला पसारा। भिकारी तूं खरा कळों आलें ॥ २ ॥ निलाजिरीं आम्ही करोनियां धीर। राहिलों आधार धरूनियां ॥ ३ ॥ कैसा नेणों आतां करिसी शेवट। केली कटकट त्याची पुढें ॥ ४ ॥ तुका म्हणे कांहीं न बोलसी देवा। उचित हे सेवा घेसी माझी ॥ ५ ॥ [१२५२]

नाहीं झालें मोल कळे देतां काळीं। कोण पाहों बळी दोघांमध्यें ॥ १ ॥ आम्ही तरी झालों जिवाशीं उदार। कैंचा हा धीर तुम्हापाशीं ॥ २ ॥ बहु चाळविलें मागें आजिवरी। आतां पुढें हरी जाऊं नेदीं ॥ ३ ॥ नव्हती जों भेटी नामाची ओळखी। म्हणऊनि दुःखी बहु झालों ॥ ४ ॥ तुका म्हणे कांहीं राहों नेदीं बाकी। एक वेळां चुकी झाली आतां ॥ ५ ॥ [१२५३]

कैसा कृपाळु हें न कळसी देवा। न बोलसी सेवा घेसी माझी ॥ १ ॥ काय ऐसें बळ आहे तुजपाशीं। पाहों हारि घेसी (हा रिघसी) कोणा आड ॥ २ ॥ पाडियेला ठायीं तुझा थारा माग।

अहो संतजन हो, तुमच्या पायाच्या प्रसादानें आणि लडिवाळपणानें मी आपल्यासमोर बोललों आहें १. ही कांहीं माझ्या स्वमताची उक्ति नाहीं, म्हणून तुम्हीं संतांनीं माझे अपराध क्षमा करावे २. कांहीं उपदेश करावा ह्या हेतूनें मी बोललों नाहीं व तुमच्या बोलण्यांतील उच्छिष्टाचा शेष स्वीकारून त्याची मीं बडबड केली आहे. (तुमचेंच बोलणें मी बोललों) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जन्मजन्मांतरीं तुमच्या कृपेनें माझें पालन(पोषण) केलें आहे ४. [१२५०]

कांहीं (अलंकार, दागिने) भूषणें लोकांचीं मागून घेतलेलीं अंगावर घातलीं असतां लोकांत मान होत नाहीं व तीं शोभतहि नाहींत आणि तीं पाहून जन हंसतात, कारण तीं भूषणें कधीं तरी जाणारीं आहेत १. जसे ताक घुसळण्यांत व फलकट भूस कांडण्यांत कांहीं सारप्राप्ति न होतां व्यर्थ श्रम होतात २. तुकाराम महाराज म्हणतात, (ज्याच्याजवळ स्वतःचें भांडवल नाहीं) त्यानें भीक मागून आणलेलें जें पोचट धान्य तें पेरण्यास योग्य असें बीं होत नाहीं (दुसऱ्याची उसनी मागून आणलेली संपत्ति प्रतिष्ठेला कारण होत नाहीं) ३. [१२५१]

हे देवा, तुझ्याबरोबर बोलूं नये, पण प्रसंग पडला म्हणून बोलतों तें असें, कीं सर्व जग रडत, ओरडत आहे १. त्याचें कारण (भक्त–काम–कल्पद्रुम इत्यादि स्वतःला म्हणविणारा) सोंगाड्या खोटा असा तूं सर्व पसारा मांडला आहेस, म्हणून तूं भिकारी आहेस (तुझ्याजवळ कांहीं नाहीं) असें आम्हांला निश्चयानें समजलें २. तुझ्या आश्रयानें आम्ही धीर धरून राहिलों ते केवळ निलाजरे म्हणून ३. तुझ्यापुढें आम्हीं आजपर्यंत जी कटकट केली तिचा शेवट तूं कसा करशील हें आम्हांला कांहीं कळत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, माझ्या हातून योग्य सेवा घेतोस पण माझ्याबरोबर कांहीं बोलत नाहींस (ह्याला म्हणावें तरी काय ?) [१२५२]

हे देवा, मीं तुमची सेवा आजपर्यंत केली त्याचा मुशाहिरा तुम्हीं दिला नाहीं, पण हिशेब देतेवेळीं कळून येईल; आम्ही तुझ्याशी भांडावयास लागलों, म्हणजे दोघांमध्यें कोण बलवान् आहे तें पाहूं १. आम्ही तर आपल्या जिवावर उदार झालों आहोंत. तसें धैर्य तुम्हांजवळ नाहीं २. पुष्कळ दिवसांपासून आजपर्यंत बहुत जनांस त्वां फसविलें; पण हे हरि, आतां (आपलें घेतल्याशिवाय) मी तुला पुढें जाऊं देणार नाहीं ३. जोंपर्यंत तुझ्या (हरि ह्या) नामाची ओळख नव्हती तोंपर्यंत आम्ही फार दुःखी झालों होतों ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्याकडून एक वेळ चुकी झाली, आतां मीं आपली सेवा केली त्याची कांहीं बाकी राहूं देणार नाहीं ५. [१२५३]

हे देवा, तुला कृपाळु कसें म्हणावें हें कळत नाहीं; कारण माझ्याकडून तूं सेवा घेतोस आणि माझ्याबरोबर बोलत नाहींस १. अशा प्रकारचें बळ तुझ्याजवळ काय आहे तें सांग, मी रागावलों म्हणजे हे हरि, तूं कोणाच्या मागें लपशील ? २.

अवघा दातारा लपसी तो ॥ ३ ॥ आतां तुम्हां आम्हां उरी तोंचि बरें । काय हीं उत्तरें वाढवूनि ॥ ४ ॥ तुका म्हणे मज साह्य झाले संत । म्हणऊनि मात फावली हे ॥ ५ ॥ [१२५४]

चुकलिया आम्हां करितसां दंड । हक्कासी कां खंड पांडुरंगा ॥ १ ॥ चाळविली एके रिद्धि-सिद्धिवरी । तैसा मी भिकारी नव्हे देवा ॥ २ ॥ कां मी येथें गुंतों मांडुनि पसारा । मागुता दातारा दंभासाठीं ॥ ३ ॥ केलें म्यां जतन आपुलें वचन । राहिलों धरून होतों पोटीं ॥ ४ ॥ तुका म्हणे ताळा घातला आडाखीं । ठावें होतें सेकीं (शेखीं) आडवसी ॥ ५ ॥ [१२५५]

कृपावंता कोप न धरावा चित्तीं । छळूं वक्रोक्ति स्तुती करूं ॥ १ ॥ आम्ही तुझा पार काय जाणों देवा । नेणों कैसी सेवा करावी तें ॥ २ ॥ अनंता अरूपा अलक्षा अच्युता । निर्गुणा सच्चित्ता सर्वोत्तमा ॥ ३ ॥ चांगलीं हीं नामें घेतलीं ठेवूनि । झालासी लहान भक्तिकाजा ॥ ४ ॥ तुका म्हणे तुझ्या पायांवरी सदा । मस्तक गोविंदा असो माझा ॥ ५ ॥ [१२५६]

आतां तुझा भाव कळों आला देवा । ठकूनियां सेवा घेसी माझी ॥ १ ॥ टाकूनि सांकडें आपुलिये माथां । घातला या संतांवरी भार ॥ २ ॥ स्तुति करवूनि (करूनियां) पिटिला डांगोरा । तें कोण दातारा साच करी ॥ ३ ॥ जातीचें वाणी मी पोटींचें हें कुडें । नका मजपुढें ठकाठकी ॥ ४ ॥ तुका म्हणे नाहीं आलें अनुभवा । आधींच मी देवा कैसा नाचूं ॥ ५ ॥ [१२५७]

जन पूजी याचा मज कां आभार । हा तुम्ही विचार जाणा देवा ॥ १ ॥ पत्र कोण मानी वंदितील सिक्का । गौरव सेवका त्याचि मुळें ॥ २ ॥ मी मीपणें होतों जनामधीं आधीं ।

हे दातारा, तुझीं लपण्याचीं सर्व ठिकाणें मला माहीत झालीं आहेत ३. आतां तुमच्यांत व आमच्यांत कांहीं अंतर आहे तेंच बरें; कारण समोर आल्यावर बोलण्यानें बोलणें वाढतें तें काय उपयोगी? ४. तुकाराम महाराज म्हणतात, भांडण करण्याविषयीं मला संत साह्य आहेत म्हणून हें बोलणें प्राप्त झालें आहे ५. [१२५४]

हे पांडुरंगा, आमच्याकडून कांहीं सेवेविषयीं चुका झाल्यास तुम्ही आम्हांला दंड करितां आणि जें आमचें हक्काचें येणें आहे, तें तुम्ही कां देत नाहीं? १. कित्येक मागणारे तुम्हांकडे आले त्यांस प्रेमसुख न देतां रिद्धिसिद्धि देऊन फसविलें, पण हे देवा, तशा प्रकारचा मी भिकारी नाहीं. २. हे दातारा, दंभ वाढवावयाकरितां (लोकांमध्यें धन-मान मिळविण्याठीं) पसारा मांडून मी या ठिकाणीं व्यर्थ गुंतून कां राहूं? ३. आपलें वचन मी हृदयांत धरून होतों, त्याचें रक्षण केलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, तूं आम्हांला शेवटीं (आम्हीं कांहीं मागितलें तर तुमची सेवा सकाम आहे असें म्हणून) अडविशील, हें ठाऊक होतें म्हणूनच तर्कानें त्याचा (पुढील भविष्याशीं अचूक) मेळ बसविला ५. [१२५५]

हे कृपावंता, आम्ही तुम्हांला वाकड्या शब्दानें छळूं व सरळ शब्दानें स्तुति करूं. ह्याचा कांहीं तुम्ही आपले चित्तांत राग मानूं नये १. हे देवा, तुझा पार (अंत) आम्हांला कसा समजेल व तुझी सेवा (भक्ति) कशी करावी हें आम्ही जाणत नाहीं २. अनंत, अरूप, अलक्ष, अच्युत, निर्गुण, सच्चिदानंद, सर्वोत्तम अशीं तुला विशेषणें आहेत ३. ही चांगलीं नांवें तूं आपल्याला ठेवून घेतलींस आणि तूं मोठा असून भक्ताच्या कामाकरितां लहान झाला आहेस ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे गोविंदा, माझें मस्तक तुमच्या पायांवर सदासर्वकाळ असावें ही माझी विनंती आहे ५. [१२५६]

हे देवा, तूं आपली सेवा माझ्या हातून फसवून घेतोस हा तुझा सर्व भाव मला कळून आला १. आपली सर्व अडचण तुमचे मस्तकीं ठेवून ह्या संतांवर भार घालून मी राहिलों आहें २. हे दातारा, सर्व जगामध्यें तुमच्या स्तुतीच (तूं पतितपावन, भक्तवत्सल, दीनानाथ आहेस असा) डांगोरा पिटला आहे तो तुमच्यावांचून कोण खरा करील? ३. मी जातीचा वाणी असल्यामुळें मनाचा वाईट आहें (चांगला पारखून घेणारा आहें), म्हणून माझ्यापुढें तुम्ही ठकवाठकी करूं नका ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमचे खरे प्रकार (तुमच्या ब्रीदवचनांचे अनुभव) जोंपर्यंत माझ्या अनुभवास आले नाहींत तोंपर्यंत मी तुमच्यापुढें आनंदानें कसा नाचूं? ५. [१२५७]

हे देवा, सर्व जनांनीं मला मानून पूजा करावी हा त्यांचा मजवर आभार आहे. ह्याचा सर्व विचार तुम्ही जाणत आहां १. ज्याप्रमाणें लिहिलेल्या कागदास कोणी मानीत नाहींत पण तुमचा समर्थांचा शिक्का असला तर तो कागद शिरसावंद्य मानितात, त्याप्रमाणें मी तुमचा सेवक असल्यामुळें सर्व मला मानितात २. पूर्वीं मी देही ह्या अहंकारानें जनामध्यें

कोणें दिलें कधीं काय तेव्हां ॥ ३ ॥ आतां तूं भोगिता सर्व नारायणा । नको आम्हां दीना पीडा करूं ॥ ४ ॥ आपुलिया हातें देशील मुशारा । तुका म्हणे खरा तोचि आम्हां ॥ ५ ॥ [१२५८]

आमची कां नये तुम्हांसी करुणा । किती नारायणा आळवावें ॥ १ ॥ काय जाणां तुम्ही दुर्बळाचें जिणें । वैभवाच्या गुणें आपुलिया ॥ २ ॥ देती घेती करिती खटपट आणिकें । निराळा कौतुकें पाहोनियां ॥ ३ ॥ दिवस बोटीं आम्हीं धरियेलें माप । वाहातों संकल्प स्वहिताचा ॥ ४ ॥ तुका म्हणे मग देसी कोण्या काळें । चुकुर दुर्बळें होतों आम्ही ॥ ५ ॥ [१२५९]

तुम्हां आम्हां तुटी होईल यावरी । ऐसें मज हरी दिसतसे ॥ १ ॥ वचनाचा कांहीं न देखों आधार । करावा हा धीर कोठवरी ॥ २ ॥ सारिलें संचित होतें गांठीं कांहीं । पुढें ऋण तेंही नेदी कोणी ॥ ३ ॥ जावेंचि न लगे कोणाचिया घरा । उडाला पातेरा तुझ्या संगें ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्हां हाचि लाभ झाला । मनुष्य धर्म गेला पांडुरंगा ॥ ५ ॥ [१२६०]

देव मजूर देव मजूर । नाहीं उजूर सेवेपुढें ॥ १ ॥ देव गांढ्याळ देव गांढ्याळ । देखोनियां बळ लपतसे ॥ २ ॥ देव तर काई देव तर काई । तुका म्हणे राई तरी मोठी ॥ ३ ॥ [१२६१]

देव दयाळ देव दयाळ । साहे कोल्हाळ बहुतांचा ॥ १ ॥ देव उदार देव उदार । थोड्यासाठीं फार देऊं जाणे ॥ २ ॥ देव चांगला देव चांगला । तुका लागला चरणीं ॥ ३ ॥ [१२६२]

देव बासर देव बासर । असे निरंतर जेथ तेथें ॥ १ ॥ देव खोळंबा देव खोळंबा । मज झळंबा

वागत होतों त्या वेळीं कोणीं मला कधीं तरी कांहीं दिलें काय ? ३. हे नारायणा, कोणतेहि उपचार मला कोणीं केले त्याचा सर्व भोक्ता तूं आहेस, म्हणून त्या उपचारांविषयींची पीडा आम्हां दीनांना करूं नका ४. तुकाराम महाराज म्हणतात, तूं आपल्या हातानें आम्हांस कांहीं पगार देशील तोच आम्हांस खरा आहे. त्याचा मी उपभोग घेईन (लोकांनीं दिलेला बेगडी सन्मान आम्ही इच्छीत नाहीं) ५. [१२५८]

हे नारायणा, तुम्हांस काकुळती किती यावें ? तुम्हांला माझी दया कशी येत नाहीं ? १. तुम्ही आपल्या ऐश्वर्य-संपन्नतेनें गरिबाची स्थिति कशी जाणाल ? २. कित्येक देणें-घेणें आदिकरून अनेक प्रपंचाच्या खटाटोपी करीत आहेत. तो प्रकार तुम्ही कौतुकानें पाहून असंग राहिलां आहांत ३. एक दिवस गेला, दोन दिवस गेले असें आम्ही बोटानें मोजीत आहोंत व अहोरात्र स्वहिताचा संकल्प करीत आहोंत ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तूं (आमच्या सेवेची मजुरी) पुढें कोणत्या वेळेला देणार ? (मजुरी नाहीं दिली) तर आम्ही सेवेविषयीं चुकार दुर्बळ राहूं. म्हणून (तुम्ही वेळेवर दिल्याचा उपयोग आहे) ५. [१२५९]

हे हरि, (तुम्ही जर माझी मजुरी दिली नाहीं तर) तुमचा आमचा आतां वियोग होईल असें आम्हांला वाटत आहे १. तुमच्या दाराशीं आम्ही कोठपर्यंत धीर धरून राहावें ? आम्ही जें कांहीं तुम्हांशीं बोलत आहों त्याचें तुम्ही कांहींच प्रत्युत्तर देत नाहीं २. आजपर्यंत जो पदरीं संचय होता तो सर्व नाहींसा केला. येथून पुढें ऋण कांहीं कोणी देत नाहीं ३. कोणाच्या घरीं जाऊं नये अशी स्थिति झाली आहे, कारण तुझ्या संगतीनें जनांतील पतच उडाली आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, तुझ्याशीं संबंध केल्यानें आमचा मनुष्यपणा गेला (आम्ही व्यवहारांतून उठलों) हाच काय तो लाभ झाला ५. [१२६०]

देव हा भक्तजनांचा मजूर आहे. भक्तजनांकडून होणाऱ्या सेवेमुळें त्यांची मजुरी करण्याची देवास शंका वाटत नाहीं १. देव हा मोठा भित्रा व नामर्द आहे (असें द्विवार सांगतों). बलवानाचें बळ (भक्तांचें भावबळ) पाहून तो लपतो २. तुकाराम महाराज म्हणतात, देव कसा आहे असें कोणी जर म्हणेल तर त्याच्यापेक्षां मोहरी देखील मोठी आहे (तात्पर्य, इतका तो सूक्ष्म आहे) ३. [१२६१]

देव हा दयाळु आहे (असें द्विवार सांगतों), कारण तो बहुत जीवांचा (त्यांच्या गाऱ्हाण्यांचा) उपद्रव सहन करितो १. देव हा उदार आहे (असें द्विवार सांगतों), कारण तो भक्तांनीं थोडें दिलें तर तो त्यांना त्याचा मोबदला पुष्कळ देतो २. तुकाराम महाराज म्हणतात, देव चांगला आहे (असें द्विवार सांगतों), म्हणूनच मी त्याच्या चरणाला लागलों आहें ३. [१२६२]

देव अमर्यादित (स्वच्छंदी व भटक्या) आहे (असें द्विवार सांगतों), कारण तो सर्व काळ सर्व टिकाणीं व्याप्त आहे १.

म्हूण कोंडी ॥ २ ॥ देव लागट देव लागट । लाविलिया चट जीवीं जडे ॥ ३ ॥ देव बावळा देव बावळा । भावें जवळा लुडबुडा(डी) ॥ ४ ॥ देव न व्हावा देव न व्हावा । तुका म्हणे गोवा करी कामीं ॥ ५ ॥ [१२६३]

देव निढळ देव निढळ । मूळ नाहीं डाळ परदेशी ॥ १ ॥ देव अकुळी देव अकुळी । भलते ठायीं सोयरीक ॥ २ ॥ देव लिगाड्या देव लिगाड्या । तुका म्हणे भाड्या दंभें ठकी ॥ ३ ॥ [१२६४]

देव बराडी देव बराडी । घाली देंठासाठीं उडी ॥ १ ॥ देव भाविक देव भाविक । होय दासांचा सेवक ॥ २ ॥ देव भ्याड देव भ्याड । राखे बळीचें कवाड ॥ ३ ॥ देव होया देव होया । जैसा म्हणे तैसा तया ॥ ४ ॥ देव लहान देव लहान । तुका म्हणे अणुरेणु ॥ ५ ॥ [१२६५]

देव भला देव भला । मिळोनि जाय जैसा त्याला ॥ १ ॥ देव उदार देव उदार । देतां नाहीं थोडें फार ॥ २ ॥ देव बळी देव बळी । जोडा नाहीं भूमंडळीं ॥ ३ ॥ देव व्हावा देव व्हावा । आवडे तो सर्वां जीवां ॥ ४ ॥ देव चांगला देव चांगला । तुका चरणाशीं लागला ॥ ५ ॥ [१२६६]

देव पाहों देव पाहों । उंचे (उंच) ठायीं उभे राहों ॥ १ ॥ देव देखिला देव देखिला । तो नाहीं कोणा भ्याला ॥ २ ॥ देवासी कांहीं मागों मागों । जीव भाव त्यासी सांगों ॥ ३ ॥ देव जाणे देव जाणे । पुरवी मनींचिये खुणे ॥ ४ ॥ देव कातर देव कातर । तुका म्हणे अभ्यंतर ॥ ५ ॥ [१२६७]

देव स्वतः अक्रिय आहे (असें द्विवार सांगतों), त्यानें आपली माया सत्य भासवून त्या मायेंत मला कोंडलें आहे २. देव हा लोंचट आहे (असें द्विवार सांगतों), कारण त्याला भक्तांनीं सेवेची चट लाविली कीं तो त्यांच्या जीवामध्यें (हृदयांत) जडून राहातो ३. देव हा बावळा आहे (असें द्विवार सांगतों), ज्याच्या ठिकाणीं दृढभाव आहे त्याचे ठिकाणीं तो लुडबूड करतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, देव मला नको (असें द्विवार सांगतों), कारण तो आपल्या कामनेंत मला गुंतवितो (किंवा, संसाराच्या कामांत अडथळा आणतो) ५. [१२६३]

देव फुटक्या कपाळाचा आहे (असें द्विवार सांगतों), कारण त्याला कोठें मूळ डाळ नाहीं (आई, बाप, भाऊ वगैरे कोणी नाहीं) असा तो प्रकृतीपलीकडील देशांत राहाणारा आहे १. देव कुळरहित – कुळहीन आहे (असें द्विवार सांगतों), कारण त्याचा पाहिजे त्याशीं सोईरसंबंध होतो २. तुकाराम महाराज म्हणतात, देव हा मोठा लचांडखोर (जगाच्या उत्पत्ति-स्थिति-लयांचें लचांड) आहे; तो सर्वांना दंभानें फसवितो असा तो भांडखोर आहे ३. (किंवा, तो भक्तांचें सेवारूपी भाडें घेतो, आपला संभावितपणा मिरवून लोकांना फसवितो) ३. [१२६४]

देव हा मोठा बराडी (दुकाळलेला) आहे, कारण भक्तांच्या भाजीचें देंठ सेवन करण्याकरितां तो धांव घेतो १. देव भाविक आहे (असें द्विवार सांगतों), कारण आपल्या दासांचा तो सेवक बनतो. २. देव हा भितरा आहे. (असें द्विवार सांगतों), कारण बळीचे भीतीनें त्याचें दार तो रक्षण करीत आहे ३. जो कोणी जशी भावना करील तसा तो होणारा आहे (असें द्विवार सांगतों) ४. तुकाराम महाराज म्हणतात, देव हा अति सूक्ष्म आहे (असें द्विवार सांगतों), कारण तो परमाणूंचाहि गाभा (अणुरेणूपेक्षांहि लहान) आहे ५. [१२६५]

देव हा भला आहे (असें द्विवार सांगतों), कारण जो जसा भक्त मिळेल तसा तो त्याच्याशीं मिळून जातो १. देव हा उदार आहे (असें द्विवार सांगतों), कारण तो आपल्या भक्तजनांना देऊं लागला म्हणजे फार-थोड्याचा विचार करीत नाहीं २. देव हा बलाढ्य आहे (असें द्विवार सांगतों). त्रैलोक्यांत ह्याच्या तुलनेचा दुसरा कोणी नाहीं ३. देव पाहिजे (आपल्याला हवा) (असें द्विवार सांगतों), कारण तो सर्व जीवांना प्रिय आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, देव चांगला आहे (असें द्विवार सांगतों) आणि म्हणूनच मी त्याच्या चरणीं लागलों आहें ५. [१२६६]

(आपण) देव पाहूं (असें द्विवार सांगतों) व त्याला पाहाण्याकरितां उच्च सत्त्ववृत्तीचा आश्रय करूं (देव पाहाण्याकरितां निष्काम कर्म, निष्काम भक्ति, विवेक, वैराग्य, शमदमादि सहा गुण, जिज्ञासा, गुरुशरणागति आणि महावाक्यश्रवण अशा क्रमानें अधिकाराची उंची वाढवून त्यावर आपण उभे राहूं) १. ज्यानें देव पाहिला तो कशालाहि भीत नाहीं (असें द्विवार सांगतों) २. देवाजवळ मागूं (असें द्विवार सांगतों). जीवानें भावानें जें कांहीं सांगावयाचें आहे तें त्याच्याजवळ सांगूं ३. देव हा जाणणारा आहे (असें द्विवार सांगतों), कारण भक्तजनांच्या मनांतील खूण न सांगतां तो ओळखतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, देव हा कात्री आहे (असें द्विवार सांगतों), कारण तो भक्तजनांच्या अंतःकरणांतील चित्-रूपी जड ग्रंथी कातरून टाकतो (किंवा, देव हा मायेंत लपून आंगचोरपणा करतो, म्हणून त्याचें अभ्यंतर–खरें मनांतलें–खरें स्वरूप कोणाला कळत नाहीं) ५. [१२६७]

देव आमुचा देव आमुचा । जीव सकळ जीवांचा ॥ १ ॥ देव आहे देव आहे । जवळी आम्हां अंतर बाहे ॥ २ ॥ देव गोड देव गोड । पुरवी कोडाचेंही कोड ॥ ३ ॥ देव आम्हां राखे राखे । घाली कळिकाळासी काखे ॥ ४ ॥ देव दयाळ देव दयाळ । करी तुकयाचा सांभाळ ॥ ५ ॥ [१२६८]

जाऊं देवाचिया गांवा । देव देईल विसांवा ॥ १ ॥ देवा सांगों सुख दुःख । देव निवारील भूक ॥ २ ॥ घालूं देवासीच भार । देव सुखाचा सागर ॥ ३ ॥ राहों जवळी देवापाशीं । आतां जडोनि पायांसी ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्ही बाळें । या देवाचीं लडिवाळें ॥ ५ ॥ [१२६९]

प्रेम तेथें वास करी । मुखीं उच्चारितां हरी ॥ १ ॥ प्रेमें यावें तया गांवा । चोजवीत या वैष्णवां ॥ २ ॥ प्रेम पाटी लागे बळें । भक्त देखोनियां भोळे ॥ ३ ॥ प्रेम न वजे दवडितां । शिरे बळें जेथें कथा ॥ ४ ॥ तुका म्हणे थोर आशा । प्रेमा घरीं विष्णुदासां ॥ ५ ॥ [१२७०]

संत मानितील मज । तेणें वाटतसे लाज ॥ १ ॥ तुम्हीं कृपा केली नाहीं । चित्त माझें मज ग्वाही ॥ ३ ॥ गोविलों थोरिवा । दुःख वाटतसे जीवा ॥ ३ ॥ तुका म्हणे माया । आवरा हे पंढरीराया ॥ ४ ॥ [१२७१]

नाहीं तुम्हीं केला । अंगिकार तो विठ्ठला ॥ १ ॥ सोंगें न पवीजे थडी । माजी फुटकी सांगडी ॥ २ ॥ प्रेम नाहीं अंगीं । भलें म्हणविलें जगीं ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । मज वायां कां चाळवा ॥ ४ ॥ [१२७२]

आतां चक्रधरा । झणीं आम्हासी अव्हेरा ॥ १ ॥ तुमचीं म्हणविल्यावरी । जैसीं तैसीं

देव आमचा आहे (असें द्विवार सांगतों), कारण तो सर्व जीवांचा जीव आहे १. देव हा आमच्या जवळ अंतर्बाह्य भरलेला आहे (असें द्विवार सांगतों) २. देव हा गोड आहे (असें द्विवार सांगतों), कारण तो भक्तजनांच्या अंतःकरणांतील इच्छा पूर्ण करितो ३. कळिकाळाला बगलेंत मारून त्याच्यापासून देव आमचें रक्षण करितो (असें द्विवार सांगतों) ४. तुकाराम महाराज म्हणतात, देव हा दयाळु आहे (असें द्विवार सांगतों), कारण तो माझा सांभाळ करीत आहे ५. [१२६८]

आपण देवाच्या गांवाला (पंढरीला) जाऊं, कारण देव आपल्याला विश्रांति देईल १. आपलें सुखदुःख देवाला सांगूं, म्हणजे देव आपली भूक (इच्छा, तळमळ) निवारण करील २. देव हा सुखाचा सागर आहे म्हणून त्याच्यावर आपला सर्वस्वभार (संसाराचा भार) घालूं ३. आतां देवाच्या पायांशीं अगदीं जडून राहूं ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही देवाचीं लाडकीं बालकें आहोंत ५. [१२६९]

मुखानें हरिस्मरण केलें असतां त्या ठिकाणीं (हरिविषयक) प्रेम वास्तव्य करितें १. प्रेम हें वैष्णवांच्या गांवांत त्यांचा शोध करीत येतें २. भोळ्या भक्तांना पाहून प्रेम हें बळेंच त्यांच्या मागें लागतें ३. ज्या ठिकाणीं हरीची कथा चाललेली आहे तेथें प्रेम बळेंच शिरतें व तेथून हांकलून दिलें तरी तें बाहेर जात नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, विष्णुदासांच्या घरीं वास करण्याची प्रेमाला मोठी आशा आहे (म्हणून तें त्यांच्या घरीं आपण होऊन येतें) ५. [१२७०]

संत हे माझा मोठा मान करितात त्यामुळें मला मोठी लाज वाटते १. कारण, हे देवा, तुम्हीं मजवर कृपा केली नाहीं ह्याविषयीं माझें चित्त साक्ष देत आहे २. लौकिकाच्या थोरीवेंत मला गुंतविलें त्या योगानें माझ्या जीवास दुःख होत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीराया, ही आपली माया तुम्ही नाहींशी करा (व मला मुक्त करा) ४. [१२७१]

हे विठ्ठला, तुम्हीं जोंपर्यंत माझा अंगीकार केला नाहीं १. तोंपर्यंत भक्तपणाच्या सोंगानें भवनदीच्या पार जाणें होणार नाहीं. जसें फुटक्या सांगडीच्या आश्रयानें नदीपार जाणें होत नाहीं (तद्वत् समजावें) २. तुमच्याविषयींचें प्रेम माझ्या अंगीं नाहीं. जगताकडून मात्र पोकळ भलेपण मीं घेतलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मला असें व्यर्थ कां फसवितां ? ४. [१२७२]

हे चक्र धारण करणाऱ्या देवा, आतां कदाचित् तुम्ही आमचा अव्हेर कराल तर उपयोगी नाहीं १. त्याचें कारण

तरी हरी ॥ २ ॥ काळ आम्हां खाय । तरी तुझें नांव जाय ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । आतां पण सिद्धी न्यावा ॥ ४ ॥ [१२७३]

मज ऐसे कोण उद्धरिले सांगा । ब्रीदें पांडुरंगा बोलतसां ॥ १ ॥ हातींच्या कांकणां कासया आरसा । उरलों मी जैसा तैसा आहें ॥ २ ॥ धन्वंतरी हरी रोग्याचिये वेथें । तें तों कांहीं येथें न देखिजे ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं अनुभव अंगें । वचन वाउगें कोण मानी ॥ ४ ॥ [१२७४]

काय तें सामर्थ्य न चले या काळें । काय झालें बळें शक्तिहीण ॥ १ ॥ काय गमाविली सुदर्शन गदा । त्या भेणें गोविंदा लाजतसां ॥ २ ॥ माझिया संचितें आणिलासी हरी (हारी) । झालें तुजवरि वरिष्ठ तें ॥ ३ ॥ तुका म्हणे काय ब्रिदाचें तें काम । सांडीं परतें नाम दीनानाथा ॥ ४ ॥ [१२७५]

बळ बुद्धि वेंचुनियां शक्ती । उदक चालवावें युक्ती ॥ १ ॥ नाहीं चळण तया अंगीं । धांवे लवणामागें वेगीं ॥ २ ॥ पाट मोट कळा । भरित पखाला सागळा ॥ ३ ॥ बीजा ज्यासी द्यावें । तुका म्हणे तैसें व्हावें ॥ ४ ॥ [१२७६]

न म्हणे साना थोर । दुष्ट पापी अथवा चोर ॥ १ ॥ सकळां द्यावी एक चवी । तान हरूनि निववी ॥ २ ॥ न म्हणे दिवस राती । सर्व काळ सर्वांभूतीं ॥ ३ ॥ तुका म्हणे झारीं । घेतां तांब्यानें खापरीं ॥ ४ ॥ [१२७७]

इच्छा चाड नाहीं । न धरी संकोचही कांहीं ॥ १ ॥ उदका नेलें तिकडे जावें । केलें तैसें सहज

जसे आम्ही आहोंत तसे हे हरि, तुमचे म्हणविले जात आहोंत २. जगाचा ग्रास करणारा जो काल तो आम्हांस खाईल तर त्यांत तुझें नांव जाणार आहे (तुझी अपकीर्ति होईल) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, पतितांना रक्षण करण्याचा जो तुमचा पण आहे तो तुम्हीं शेवटास न्यावा ४. [१२७३]

हे पांडुरंगा, पातकी लोकांचा उद्धार करण्याचें ब्रीद माझें आहे असें तुम्ही सांगतां, पण माझ्यासारख्या पातक्याचा केव्हां उद्धार केला हें सांगा १. आपल्या हातांत असलेलीं कांकणें पाहाण्यास आरसा कशाला पाहिजे? (प्रत्यक्षास प्रमाण नको) तसा मी पातकी जशाचा तसाच राहिलों आहें (तो तुम्ही तारा म्हणजे माझ्या अनुभवाला येईल) २. सर्व रोग्यांची व्यथा नाहींशी करण्याचें सामर्थ्य जसें वैद्याचे अंगीं असतें तसें येथें (पतिताला पावन करण्याचें सामर्थ्य कांहींच दिसत नाहीं.) ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला स्वतःला अनुभव जोंपर्यंत आला नाहीं तोंपर्यंत पतितपावन असें तुमचें वावगें (कोरडें) वचन कोण मानतो? ४. [१२७४]

हे देवा, तुमचें पूर्वींचें असलेलें सामर्थ्य ह्या काळांत चालत नाहीं काय व तूं असा बळहीन झालास काय? १. तुझे हातीं असलेलीं गदासुदर्शन हीं शस्त्रें गमाविल्यामुळें त्या भयानें हे गोविंदा, तुम्हांस लाज वाटते काय? २. मला असें वाटतें, कीं माझ्या संचित कर्मानें तुला जिंकलें म्हणून तें तुझ्यापेक्षां श्रेष्ठ आहे असें झालें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमच्या हातून जर माझा उद्धार करणें होत नाहीं तर तुमच्या ब्रीदाचा काय उपयोग? तें तुम्ही सोडा (दीनानाथ हें नांव टाकून द्या) ४. [१२७५]

आपलें बळ, बुद्धि व सामर्थ्य खर्च करून युक्तीनें पाणी हें वाटेल तिकडे न्यावें १. त्या पाण्याच्या आंगीं मुळींच चलन नाहीं पण जिकडे सखल जमीन असेल तिकडे तें त्वरेनें धांवत जातें २. आपल्या युक्तीनें पाण्याचा पाट काढून द्यावा अगर तें मोटेनें किंवा पखालीनें अगर झारीनें भरावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तें पाणी ज्या बीजांस द्यावें त्या स्वभावाचें तें होतें (तें पाणी मिरचीला दिल्यास तिखट व उंसाला दिल्यास गोड होतें) ४. [१२७६]

पाण्याच्या आंगीं तृषा हरण करण्याचा गुण असल्यामुळें तें लहानथोर, दुष्टपापी, अथवा चोर असें जाणत नाहीं १. ह्या सर्वांना तें एकच गोडी देतें आणि त्यांची तहान नाहींशी करून त्यांना शांत करतें २. तृषित लोकांना दिवसा येऊन प्राशन करा आणि रात्रीं करूं नका असें तें पाणी म्हणत नाहीं, सर्व प्राणिमात्राला सर्व काळ शांत करितें ३. तुकाराम महाराज म्हणतात, कोणत्याहि धातूच्या झारीनें अगर तांब्यानें अथवा मातीच्या भांड्यांत तें पाणी घेऊन प्यालें असतां तें एकच गोडी देतें ४. [१२७७]

कोणीं आपणाला अमकीकडे न्यावें अशी इच्छा अगर गरज पाण्यांत नाहीं व कोणी त्याला कोठें नेलें असतां

व्हावें ॥ २ ॥ मोहरी कांदा ऊंस । एक वाफा भिन्न रस ॥ ३ ॥ तुका म्हणे सुख । पीडा इच्छा पावे दुःख ॥ ४ ॥ [१२७८]

तरले ते मागें आपुलिया सत्ता । कमाई अनंता करूनियां ॥ १ ॥ उसणें फेडितां धर्म तेथें कोण । ते तुज अनन्य तुम्ही त्यांसी ॥ २ ॥ मज ऐसा कोण सांगा वायां गेला । तो तुम्हीं तारिला पांडुरंगा ॥ ३ ॥ तुका म्हणे नामासारिखी करणी । न देखेंची (न देखें हें) मनीं समजावें ॥ ४ ॥ [१२७९]

कवणाशीं भांडों कवण माझें साहे । कोण मज आहे तुजविण ॥ १ ॥ धरिलें उदास दुरदुरांतरें । सांडीं एकसरें केली माझी ॥ २ ॥ आइकोन माझे नाइकसी बोल । देखोनियां खोळ बुंथी घेसी ॥ ३ ॥ तुका म्हणे एके गांवींची वसती । म्हणऊनि खंती वाटे देवा ॥ ४ ॥ [१२८०]

आळवितां कंठ शोक(ष)ला भीतर । आयुष्य वेंचे धीर नाहीं मना ॥ १ ॥ अझून कां नये हें तुझ्या अंतरा । दीनाच्या माहेरा पांडुरंगा ॥ २ ॥ धन दिसे डोळां दगडाचे परी । भोग ते शरीरीं विष झालें ॥ ३ ॥ चुकलों काय तें मज क्षमा करीं । आलिंगूनि हरी प्रेम द्यावें ॥ ४ ॥ अवस्था राहिली रूपाची अंतरीं । बाहेर भीतरीं सर्व काळ ॥ ५ ॥ तुका म्हणे माझे सकळ उपाय । पांडुरंगा पाय तुझे आतां ॥ ६ ॥ [१२८१]

नाहीं काष्ठाचा गुमान । गोवी भ्रमरा सुमन ॥ १ ॥ प्रेम प्रीतीचें बांधलें । तें न सुटे कांहीं केलें ॥ २ ॥ पदरीं घाली पिळा । बाप निर्बळ सांटीं बाळा ॥ ३ ॥ तुका म्हणे भावें ।

नें संकोचहि धरीत नाहीं १. तें पाणी जिकडे जो नेईल तिकडे जातें व जसें करावें तसें तें सहज होतें २. एकाच वाफ्यामध्यें ऊंस, कांदा, मोहरी असें लावितात त्यांस तें पाणी दिलें असतां त्यांचे रस गोड, दुर्गंधी आणि तीक्ष्ण असे वेगळे वेगळे होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या पाण्यापासून आपापल्या इच्छेप्रमाणें प्राणी सुख अथवा दुःख पावतात (पाणी जसें सुख-दुःखांच्या पलीकडचें अलिप्त असतें तशीच हरिभक्त संतांचीहि स्थिति असते) ४. [१२७८]

हे अनंता, मागें आपापल्या शक्तीनें कमाई करून लोक तरले (त्यांचा मीं उद्धार केला असें हें तुमचें म्हणणें मला योग्य वाटत नाहीं) १. कारण जे कोणी अनन्य भक्ति करितात त्यांचा तुम्ही अनन्य भावानें अंगीकार करितां. जसें एखाद्याचें कांहीं उसनें घेऊन तें परत दिल्यावर त्यायोगानें धर्म घडत नाहीं तसें लोक तारले हें तुमचें म्हणणें आहे २. हे पांडुरंगा, मजप्रमाणें कोणी पातकी अगदीं वायां गेला असून तो तुम्हीं तारला असेल तर मला सांगा ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पतितपावना, तुझ्या (पतितपावन, दीनानाथ ह्या) नामासारखें तुझें कर्तृत्व आहे असें मला कोठेंच दिसत नाहीं, हें तुम्ही मनांत समजावें ४. [१२७९]

हे देवा, तुजवांचून मी कोणाबरोबर भांडण करूं? माझें सहन तरी कोण करील ? तुजवांचून मला दुसरें कोण आहे तें सांग १. असें असून तुम्ही मला दूर आणि उदास ठेविलें. अशा प्रकारें तुम्हीं माझा एकदम त्याग केला २. माझें बोलणें ऐकून न ऐकण्यावारी नेतां आणि मला पाहून तोंडावर वस्त्राचा बुरखा घेतां (व स्वस्थ बसतां) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमची आमची वस्ती एका गांवांतील (ब्रह्म–गांवचे राहाणारे) असून तुम्ही आमच्यापाशीं अशी प्रतारणा करतां म्हणून फार तळमळ वाटते (राहून राहून दुःख होतें) ४. [१२८०]

हे देवा, तुमची विनवणी करण्याच्या योगानें माझें अंतःकरण व कंठ शोषून गेलीं. माझें आयुष्य व्यर्थ जात असल्यामुळें मनास धीर येत नाहीं १. हे दीनाच्या माहेरा पांडुरंगा, तुझ्या अंतःकरणांत मला तारण्याचें (दर्शन देण्याचें) अजून कां येत नाहीं ? २. मला द्रव्य दगडाप्रमाणें दिसत आहे व अष्टभोगादि उपचार जरी शरीरास केले तरी ते विषाप्रमाणें वाटत आहेत ३. हे हरि, माझे कांहीं अपराध असतील ते क्षमा करावे आणि तुम्हीं मला आलिंगन देऊन प्रेम द्यावें ४. तुमचें रूप पाहाण्याविषयींची आस्था मला लागली आहे. ती सर्वकाळ अंतर्बाह्य व्यापली आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, आतां तुझ्या पायांचा आठव करणें हेच माझे सर्व उपाय आहेत (त्यावांचून मी अन्य कांहीं जाणत नाहीं) ६. [१२८१]

ज्या भ्रमरास मोठीं लांकडें कोरण्याची पर्वा नसते त्या भ्रमरास सुगंधी कमल आपणामध्यें गुंतवून ठेवितें १. त्याचें कारण जें प्रेमानें बांधलें जातें तें कोणत्याहि प्रयत्नानें सुटत नाहीं २. जें बालक प्रीतीनें (आपल्या बापाच्या) पदरास पिळा घालून त्याला थोपवून उभा करितें तो बाप जरी शक्तिमान् असला तरी त्याच्या प्रेमानें निर्बल होतो

भेणें देवें आकारावें ॥ ४ ॥ [१२८२]

भावापुढें बळ । न चले कोणाचें सबळ ॥ १ ॥ करी देवावरी सत्ता । कोण त्याहूनि परता ॥ २ ॥ बैसे तेथें येती । न पाचारितां सर्व शक्ति ॥ ३ ॥ तुका म्हणे राहे । तयाकडे कोण पाहे ॥ ४ ॥ [१२८३]

भावाचिया बळें । आम्ही निर्भर दुर्बळें ॥ १ ॥ नाहीं आणिकांची सत्ता । सदा समाधानें चित्ता ॥ २ ॥ तर्का नाहीं ठाव । येथें रिघावया वाव ॥ ३ ॥ एकछत्री राज्य । तुकया पांडुरंगीं काज ॥ ४ ॥ [१२८४]

सत्ता वर्ते मन । पाळी विठ्ठलाची आण ॥ १ ॥ आज्ञा वाहोनियां शिरीं । सांगितलें तेंचि करीं ॥ २ ॥ सरलीसे धांव । न लगे वाढवावी हांव ॥ ३ ॥ आहे नाहीं त्याचें । तुका म्हणे कळे साचें ॥ ४ ॥ [१२८५]

खावें ल्यावें द्यावें । जमाखर्च तुझ्या नांवें ॥ १ ॥ आतां चुकली खटपट । झाड्यापाड्याचा बोभाट ॥ २ ॥ आहे नाहीं त्याचें । आम्हां काम सांगायाचें ॥ ३ ॥ तुका म्हणे चिंता । भार वाही (वाहे) तुझ्या माथां ॥ ४ ॥ [१२८६]

आतां बरें जालें । माझे माथांचें निघालें ॥ १ ॥ चुकली हे मरमर । भार माथांचे डोंगर ॥ २ ॥ नसतां कांहीं जोडी । केली बहुतें तडातोडी ॥ १ ॥ जाला झाडापाडा । तुका म्हणे गेली पीडा ॥ ४ ॥ [१२८७]

(मुलाला बाजूला सारून पुढें जाऊं शकत नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें भक्ताच्या शुद्ध भावाच्या बळानें देव निराकार आहे तो भिऊन आकारास येतो. ४. [१२८२]

एखादा कोणी भाविक भक्त असेल त्याच्या पुढें मोठ्या बलवानाचें बळ चालत नाहीं १. त्याची सत्ता देवावर होते. त्या भाविकावांचून सत्ता करणारा देवास कोणी नाहीं २. तो भाविक ज्या ठिकाणीं बसेल त्या ठिकाणीं सामर्थ्य (ऋद्धिसिद्धि) न बोलावितां येतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो ज्या ठिकाणीं राहील त्याच्याकडे कोण पाहाणार आहे ? (हा भाविक भक्त नेहमींच भजनानंदामध्यें निमग्न असतो) ४. [१२८३]

आम्ही गरीब आहोंत तरी भावार्थाच्या बलानें आनंदरूप आहोंत १. आमचें चित्त सर्वकाळ समाधानी आहे म्हणून आमच्यावर दुसऱ्या कोणाची सत्ता चालणार नाहीं २. अनेक प्रकारच्या कुतर्कास आमचेपाशीं आश्रय मिळणार नाहीं, कारण त्याचा प्रवेश होण्यास आमचे चित्तांत मुळींच अवकाश नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझें सर्व कार्य पांडुरंगाचे स्वरूपयोगांत आहे व माझे ठिकाणीं त्याच्याच सत्तेचें एकछत्री राज्य आहे (मला पूर्ण स्वातंत्र्य मिळालें आहे) ४. [१२८४]

माझें मन माझ्या सत्तेनें वर्तन करीत आहे म्हणून त्यास ज्या स्थितींत राहाण्याकरितां विठोबाची शपथ घातली आहे त्या स्थितींत तें राहातें १. त्याला जी आज्ञा करीन ती शिरसावंद्य मानून तें मन त्याप्रमाणें वागतें २. आतां ह्या मनाची अनेक विषयांविषयींच्या सोसाची (प्रपंचाकडची) धांव संपली, म्हणून ती वाढवावी असें त्याला वाटत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां त्या मनाचा आस्तिकपणा व नास्तिकपणा हा सर्व आम्हांला कळून आला ४. [१२८५]

हे देवा, आम्ही खाणें, घेणें, देणें हे सर्व व्यवहार करितों, पण ह्याचा जमाखर्च तुझ्या नांवानें करितों १. आतां आम्हांला कोणतीहि खटपट करणें नको व रोजचा आढावा झडतीची (रोजचा हिशेब पुरा करण्याची) कामगिरी आम्हांकडे नाहीं २. आतां अमूक आहे, अमूक नाहीं हें सांगण्याचेंच काय तें आमचें काम आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मीं आपला सर्व भार तुमचे मस्तकीं घातल्यामुळें आम्हांस कांहीं चिंता करणें नको ४. [१२८६]

माझ्या मस्तकावरील सर्व गोष्टींची जबाबदारी निघाली (संसाराचा भार खालीं उतरला) हें फार बरें झालें १. अनेक प्रकारचे डोंगराएवढे (कर्तव्याचे) भार मजवरचे निघाल्यामुळें (संसाराची) करकर चुकली २. कांहीं प्राप्ति नसून ह्या कामक्रोधादि विकारांनीं माझी फार ताडातोडी केली होती (ती चुकली) ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी सर्व पीडा निवारण झाली म्हणून रोजचा खटाटोप संपला (आतां संचित-क्रियमाणांचा हिशेब संपला आहे, त्यामुळें जन्ममरणरूप संसाराचीहि पीडा संपली आहे) ४. [१२८७]

संचितचि खावें। पुढें कोणाचें न घ्यावें ॥ १ ॥ आतां पुरे हे चाकरी। राहों बैसोनियां घरीं ॥ २ ॥ नाहीं कामा हातीं। आराणुक दिवसराती ॥ ३ ॥ तुका म्हणे सत्ता। आतां पुरे पराधीनता ॥ ४ ॥ [१२८८]

ज्याचें गांवीं केला वास। त्यासी नसावें उदास ॥ १ ॥ तरीच जोडिलें तें भोगे। कांहीं आघात न लगे ॥ २ ॥ वाढवावी थोरी। मुखें म्हणे तुझे हरी ॥ ३ ॥ तुका म्हणे हे गोमटी। दासा न घालावी तुटी ॥ ४ ॥ [१२८९]

माझा तुम्हीं देवा केला अंगिकार। हें मज साचार कैसें कळे ॥ १ ॥ कां हो कांहीं माझ्या नये अनुभवा। विचारितां देवा आहें तैसा ॥ २ ॥ लौकिकाचा मज लाविसी आभार। शिरोरत्नभार दुःखाचा हा ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं पालट अंतरीं। येथें दिसे हरी टकाटकी ॥ ४ ॥ [१२९०]

तोंडें बोलावें तें तरी वाटे खरें। जीवें येरयेरें वंचिजे ना ॥ १ ॥ हें तुम्हां सांगणें काय उगवूनि। जावें समजोनि पांडुरंगा ॥ २ ॥ जेवित्याची खुण वाढल्या अंतरीं। प्रीतीनें हे घरीं चाली तेथें ॥ ३ ॥ तुका म्हणे बहु परीचे आदर। अत्यंत वेव्हार संपादणी ॥ ४ ॥ [१२९१]

न पालटे एक। भक्त भोळाचि भाविक ॥ १ ॥ येरां नाश आहे पुढें। पुण्य सरतां उघडें ॥ २ ॥ नेणें गर्भवास। एक विष्णूचाचि दास ॥ ३ ॥ तुका म्हणे खरें। नाम विटोबाचें बरें ॥ ४ ॥ [१२९२]

मना एक करीं। म्हणें मी जाईन पंढरीं। उभा विटेवरी। तो पाहेन सांवळा ॥ १ ॥

पूर्वीचें जें संचित कर्म असेल तेंच भोगून सारावें. आतां पुढें कोणाचें कर्ज करूं नये १. आतां आम्ही मूळचे आत्मस्वरूपस्थितीचे घरीं बसून राहूं. आजपासून दुसरे कोणाची चाकरी करणें नको २. आजपर्यंत विषय-कामाचे हातांत (संसाराच्या कामाच्या तावडींत) आम्ही सांपडलों होतों त्या योगानें रात्रंदिवस आम्हांला कधींहि विसावा मिळाला नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां (संसाराच्या) परस्वाधीन राहाणें पुरे. आम्ही आपले सत्तेनें वर्तणूक करूं ४. [१२८८]

आपण ज्या (प्रमुख व्यक्तीच्या) गांवीं राहावें त्याच्यावर उदास होऊं नये (त्याच्याशीं उपेक्षाबुद्धीनें राहूं नये) १. असें होईल तरच आपण मिळविलेल्या वस्तूंचा उपयोग होईल व कोणत्याहि प्रकारचा आघात लागणार नाहीं २. हे हरि, तुमचे गांवीं आम्ही राहून तुमचा थोरपणा वर्णन करूं व मुखानें तुमचे आहोंत असें म्हणूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, दासाचें नुकसान होऊं न देणें हें उत्तम (तुझ्या गांवांत राहून आनंद भोगण्याचा जो उत्तम लाभ झाला त्याचा नाश होऊं देऊं नका) ४. [१२८९]

हे देवा, तुम्हीं माझा अंगीकार केला हें खरोखरी मला कसें कळेल? १. हे देवा, माझ्या अनुभवाला कांहीं येत नाहीं. विचार करून पाहिलें असतां मी पूर्वीचा आहें तसा कायम आहें २. पारमार्थिकसंबंधीं माझा लौकिक तुम्हीं कां वाढविला? ह्याचें ओझें मस्तकावर झालें तें असें कीं पुष्कळ रत्नें एका ठिकाणीं बांधून जर मस्तकावर घेतलीं तर त्यापासून दुःख होतें (तद्वत् हें आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जोंपर्यंत माझें अंतःकरण पालटलें नाहीं, तोंपर्यंत ह्या ठिकाणीं तुमची मला फसवाफसवी दिसते ४. [१२९०]

जीवांनीं एकमेकांशीं अवंचकबुद्धीनें (न फसविण्याच्या निष्कपट बुद्धीनें) बोललें तरच तें खरें वाटतें. १. हे पांडुरंगा, हें तुम्हांला उघड करून सांगावयास पाहिजे काय? तुम्हीं आपल्या मनांत सर्व कांहीं समजून जावें. २. जे कोणी पदार्थ वाढणारे आहेत त्यांना जेवणारांची खूण ठाऊक असते, म्हणजे एक पदार्थ ह्याला प्रिय आहे असें तो समजतो अर्थात् तो पदार्थ घेऊन जेवणाराकडे तो प्रीतीनें धांव घेतो, अथवा वाढणाराचे ठिकाणीं जेवणारांनीं प्रेमाची वागणूक ठेवावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, पुष्कळ प्रकारचे आदरसत्कार असतात. कांहीं आत्यंतिकपणाचे खरे व कांहीं लौकिक संपादणीचे खोटे असतात. ४. [१२९१]

जो भाविक भोळा भक्त आहे त्याची स्थिति केव्हांहि बदलत नाहीं. १ बाकीच्यांचा पुण्यक्षय झाला म्हणजे ते आपले स्थितीपासून भ्रष्ट होतात २. विष्णुदास हेच एक गर्भवासादि दुःखें जाणत नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, (भक्तांच्या ह्या स्थिर—न बदलणाऱ्या स्थितीला) विठोबाचें नांव हें उत्तम असून सत्य आहे ४. [१२९२]

हे मना, आम्ही जें तुला सांगत आहों तें एक कर. तें कोणतें म्हणशील तर पंढरीला जाऊन विटेवर उभा असलेल्या

करीन सांगसी तें काम। जरी जपसी हें नाम। नित्य वाचे राम। हरी कृष्ण गोविंद ॥ २ ॥ लागे संतांचिया पायां। कथे उल्हास गावया। आलों मागावया। शरण देईं उचित ॥ ३ ॥ नाचें रंगीं वाहें टाळी। होय सादर ते काळीं। तुका म्हणे मळी। सांडूनियां अंतरींची ॥ ४ ॥ [१२९३]

न राहे क्षण एक वैकुंठीं। क्षीरसागरीं (र) त्रिपुटीं। जाय तेथें दाटी। वैष्णवांची धांवोनि ॥ १ ॥ भाविक गे माये भोळें गुणाचें। आवडे तयाचें नाम घेतां तयासी ॥ २ ॥ जो नातुडे कवणेपरी। तपें दानें व्रतें थोरी। म्हणतां वाचे हरी। राम कृष्ण गोविंद ॥ ३ ॥ चौदा भुवनें जया पोटीं। तो राहे भक्तांचिये कंठीं। करूनियां साटी। चित्त प्रेम दोहींची ॥ ४ ॥ जया रूप ना आकार। धरी नाना अवतार। घेतलीं हजार। नांवें ठेवूनि आपणां ॥ ५ ॥ ऐसा भक्तांचा ऋणि। पाहतां आगमीं पुराणीं। नाहीं तुका म्हणे ध्यानीं। तो कीर्तनीं नाचतसे ॥ ६ ॥ [१२९४]

स्वल्प वाटे चला जाऊं। वाचे गाऊं विठ्ठल ॥ १ ॥ तुम्ही आम्ही खेळींमेळीं। गदारोळीं आनंदें ॥ २ ॥ ध्वजा कुंचे गरुडटके। शृंगार निके करोनि ॥ ३ ॥ तुका म्हणे हेंचि नीट। जवळी वाट वैकुंठा ॥ ४ ॥ [१२९५]

आनंदाच्या कोटी। सांठवल्या आम्हां पोटीं ॥ १ प्रेम चालिला प्रवाहो। नामओघ लवलाहो ॥ २ ॥ अखंड खंडेना जीवन। राम कृष्ण नारायण ॥ ३ ॥ थडी आहिक्य परत्र। तुका म्हणे सम तीर ॥ ४ ॥ [१२९६]

चाहाडाची माता। व्यभिचारीण तत्वता ॥ १ ॥ पाहे संतांचें उणें। छिद्र छळावया सुनें ॥ २ ॥

श्यामसुंदर हरीस पाहीन असें म्हणत जा १. जर तूं वाणीनें नित्य राम, कृष्ण, हरि, गोविंद ह्या नामांचा जप करशील तर मग तूं मला जें काम सांगशील तें मी करीन २. संतांच्या पायांला लाग व हरिकथेमध्यें गाण्याविषयीं उल्हास ठेव. हें मी तुला शरण येऊन मागत आहें. ह्याकरितां तूं ही योग्य देणगी दे ३. भजनामध्यें मोठ्या प्रेमभावानें नाच व टाळी वाजविण्याविषयीं तत्पर अस व आपले अंतःकरणांतील सर्व मळ काढून टाक, असें तुकाराम महाराज म्हणतात ४. [१२९३]

हरि हे क्षणभर देखील वैकुंठांत राहात नाहींत व शेष, गरुड व लक्ष्मी ही त्रिपुटी ज्या ठिकाणीं आहे तेथेंहि राहात नाहींत. तर ज्या ठिकाणीं वैष्णवांचा अति दाट समुदाय असतो त्या ठिकाणीं हरि हे धांवत जातात १. हरि हे मोठे भाविक आहेत. हरि हे भोळे असून गुणसंपन्न आहेत व भक्तानें त्यांचें नांव घेणें हेंच त्यांना प्रिय आहे २. जो देव तप, व्रत, दानादि मोठमोठ्या साधनांनीं देखील अथवा कोणत्याहि उपायांनीं सांपडत नाहीं तो वाचेनें 'राम कृष्ण हरि गोविंद' असें म्हटल्यानें धांवत येतो ३. ज्यांच्या पोटामध्यें चौदा भुवनें आहेत ते (आपल्या नामाच्या रूपानें) भक्तांच्या कंठामध्यें आपलें प्रेम व त्यांचें चित्त ह्याचा मोबदला करून राहातात ४. ज्याला रूप नाहीं व आकारहि नाहीं, अशा हरीनें नानाप्रकारचे अवतार घेऊन आपल्याला हजार नांवें ठेवून घेतलीं आहेत ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारें हरि हे भक्तांचे ऋणी आहेत. शास्त्रांत व पुराणांत किंवा योगिजनांचे ध्यानांत त्यांना पाहूं लागलें तर जे सांपडत नाहींत ते कीर्तनांत मोठ्या प्रेमानें नाचतात ६. [१२९४]

आपण सोप्या वाटेनें जाऊं व मुखानें विठ्ठलनाम गाऊं १. तुम्ही आम्ही सर्व खेळगडी समुदायानें आनंदांत मोठ्या अट्टाहासानें हरीला गाऊं २. झेंडे व कुंचे (मोरचेल) व गरुडटके (गरुडचिन्हांकित पताका) हे उत्तम शृंगार करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारें ही वैकुंठास जाण्याची वाट नीट असून जवळची आहे ४. [१२९५]

मनुष्यापासून ब्रह्मदेवापर्यंत जे म्हणून आनंदाचे प्रकार आहेत ते आमच्या हृदयांत भरले आहेत १. आमचे मुखांतून हरिनामचिंतनाच्या प्रेमाचा ओघ मोठ्या वेगानें चालला आहे २. राम, कृष्ण, नारायण ह्या चिंतनरूपी पाण्यास (नामरूपी जीवनाच्या ओवास) खंड नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, नामसंकीर्तनाचा पूर ऐहिक व पारत्रिक (पारलौकिक) ह्या दोन्हीहि थड्या सारख्या भरून वाहात आहे ४. [१२९६]

चहाडी करणाराची आई ही खरोखर व्यभिचारीण आहे १. चहाडखोर हा संतांचें उणें (छिद्र) त्याचा छळ

जाणों त्याच्या बाचें। कांहीं सोडिलें गांटीचें ॥ ३ ॥ तुका म्हणे घात। व्हावा ऐसी जोडी मात ॥ ४ ॥ [१२९७]

सापें ज्यासी खावें। तेणें प्राणासी मुकावें ॥ १ ॥ काय लाधला दुर्जन। तोंडावरी थुंकी जन ॥ २ ॥ विंचू हाणी नांगी। अग्न लावी आणिकां अंगीं ॥ ३ ॥ तुका म्हणे जाती। नरका पाउलीं चालती ॥ ४ ॥ [१२९८]

खडा खाळी साखर। झाला नामाचाचि फेर। न दिसे अंतर। गोडी ठायीं निवाडितां ॥ १ ॥ तुम्ही आम्ही पांडुरंगा। भिन्न ऐसें काय सांगा। चाळविलें जगा। मी हें माझें यासाठीं ॥ २ ॥ पायीं हातीं नाकीं शिरीं। हेम राहे अळंकारीं। मुसें आल्यावरी। काय निवडे वेगळें ॥ ३ ॥ निजलिया लाभ हानी। तोंच खरी ते स्वप्नीं। तुका म्हणे दोन्ही। निवारलीं जागतां ॥ ४ ॥ [१२९९]

आम्ही जाणों तुझा भाव। कैंचा भक्त कैंचा देव। बीजा नाहीं ठाव। कैंचें फळ सेवटीं ॥ १ ॥ संपादिलें बहु रूप। कैंचें पुण्य कैंचें पाप। नव्हतों आम्ही आप। आपणा(सी) जी देखिलें ॥ २ ॥ एके ठायीं घर(रि)च्या घरीं। न कळतां जाली चोरी। तेथें तेंचि दुरी। जाणें येणें खुंटलें ॥ ३ ॥ तुका म्हणे धरूनि हातीं। उरी ठेविली मागुती। एकांतीं लोकांतीं। देवभक्ति सोहळा ॥ ४ ॥ [१३००]

कांहीं बोलिलों बोबडें। मायबाप तुम्हापुढें। सलगी लाडें कोडें। मज क्षमा करावी ॥ १ ॥ काय जाणावा महिमा। तुमचा म्यां पुरुषोत्तमा। आवडीनें सीमा। सांडविली मज हातीं ॥ २ ॥ घडे अवज्ञा सख्यत्वें। बाळें बापासी न भ्यावें। काय म्यां सांगावें। आहे ठावें तुम्हांसी ॥ ३ ॥

करण्याकरितां पाहातो. तो (पूर्वजन्मींचा) कुत्रा आहे २. जणुं काय संतांनीं त्याच्या बापाच्याच पदरचें कांहीं हिसकावून घेतलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या योगानें आपला घात होईल असें तो दुर्जन चहाडखोर बोलत असतो ४. [१२९७]

ज्यास साप चावला आहे तो प्राणास मुकतो १. परंतु त्या सर्वांचा घात करणाऱ्या दुर्जनाला काय लाभ झाला? सर्व जन मात्र त्याच्या तोंडावर थुंकतात २. विंचू ज्याला नांगी मारतो त्याच्या आंगाची अग्नि लागल्यासारखी आग होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचे दुर्जन नरकाकडेच पावलें टाकीत जातात ४. [१२९८]

खडी साखर, पिठी साखर हा नामभेदच आहे. दोन्हींचे गोडीमध्यें कांहीं फरक नाहीं १. त्याप्रमाणें हे पांडुरंगा, तुमचे आमचेमध्यें भेद काय आहे तो सांगा. नेहमीं देहसंबंधीं माझें ह्या भ्रमानें तुम्ही सर्व जनांना फसवितां २. (स्त्रियांच्या) पायांत तोड्यांच्या रूपानें, हातांत पाटल्यांच्या रूपानें, नाकांत नथीचे रूपानें व डोकीस दागिन्याचे रूपानें एक सोनेंच आहे. तें सर्व एका मुशीमध्यें घालून तापविल्यावर निरनिराळे अलंकार निवडले जातील काय? (दागिन्यांत भेद राहील काय?) ३. तुकाराम महाराज म्हणतात, निद्रित पुरुष स्वप्नांत असेतोंपर्यंत लाभहानीचा खरेपणा त्याला वाटतो. जागा झाल्यावर दोन्हीहि मिथ्या ठरतात ४. [१२९९]

देवा, आम्ही तुझा स्वरूपभाव जाणतों. तेथें भक्त व देव हे कसले आहेत! जेथें बीजाचाच ठिकाणा नाहीं तेथें अखेरीस फळ हातास कसें लागेल? १. हें बहुरूपानें असणारें जगताचें (माया शक्तीच्याद्वारें राम-कृष्णादि अनेक रूपांचें) सोंग तुम्हीं घेतलें आहे. तेथें (पारमार्थिक स्वरूपाचे ठिकाणीं) पुण्य कोठें आहे व पाप कोठें आहे? जोंपर्यंत आमचा आपलेपणा आम्हीं पाहिला नव्हता तोंपर्यंत हें सर्व खरें भासत होतें २. एकाच घरांत एके ठिकाणीं तुमचें आमचें वास्तव्य होतें तें न कळल्यामुळें आत्मभाव चोरला गेला, त्या अज्ञानाची निवृत्ति झाल्याबरोबर जन्ममृत्यूच्या येरझारांचा व्यवहार खुंटला ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारें आम्ही हरीशीं ऐक्याला पावलों, तरी एकांतांत व लोकांतांत देव व भक्त ह्या नात्याचा सोहळा चालण्याकरितां पुन्हां द्वैतभावाचा आश्रय करून राहिलों ४. [१३००]

हे मायबापा, तुमच्यापुढें सलगीनें व लाडानें मीं बालक बोबडे बोल बोललों आहें त्याची क्षमा करावी १. अहो पुरुषोत्तमा, तुमचा महिमा मीं काय जाणावा, असें असून ह्या मर्यादेचें उलंघन, तुमचेविषयीं असणाऱ्या प्रेमानें, मजकडून करविलें. २. पुत्राचें पित्याशीं सख्य असल्यामुळें पित्याची अवज्ञा (आज्ञेविरुद्ध वागणें) निर्भयपणानें बालक करितो.

तुका म्हणे देवा । प्रेम लोभ न संडावा । पाळिला पाळावा । ळळा पुढती आगळा ॥ ४ ॥ [१३०१]

बहु भितों जाणपणा । आड न यो नारायणा । घेईन प्रेमपान्हा । भक्ति सुख निवाडें ॥ १ ॥ यासी तुळे ऐसें कांहीं । दुजें त्रिभुवनीं नाहीं । काला भात दहीं । ब्रह्मादिकां दुर्लभ ॥ २ ॥ निमिषार्ध संतसंगति । वास वैकुंठीं कल्पांतीं । मोक्षपदें येती । ते विश्रांती बापुडी ॥ ३ ॥ तुका म्हणे हेंचि देईं । मीतूंपणा खंड नाहीं । बोलिलों त्या नाहीं । अभेदाची आवडी ॥ ४ ॥ [१३०२]

देवा आतां ऐसा करीं उपकार । देहाचा विसर पाडीं मज ॥ १ ॥ तरीच हा जीव सुख पावे माझा । बरें केशीराजा कळों आलें ॥ २ ॥ ठाव देईं चित्ता राखें पायांपाशीं । सकळ वृत्तींसी अखंडित ॥ ३ ॥ आस भय चिंता लाज काम क्रोध । तोडावा संबंध यांचा माझा ॥ ४ ॥ मागणें तें एक हेंचि अहे आतां । नाम मुखीं संतांसंग देईं ॥ ५ ॥ तुका म्हणे नको वरपंग देवा । घेईं माझी सेवा भावशुद्ध ॥ ६ ॥ [१३०३]

तुज न करितां काय नव्हे एक । हें तों सकळीक संतवाणी ॥ १ ॥ घेईं माझा भार करीं कइवार । उतरीं हा पार भवसिंधु ॥ २ ॥ उचित अनुचित पापपुण्यकाला । हा तों नये मला निवडितां ॥ ३ ॥ कुंठित राहिली बोलतां बोलतां । पार न पावतां वाणी पुढें ॥ ४ ॥ पुसतांही कोणा न कळे हें गुज । राखें आतां लाज पांडुरंगा ॥ ५ ॥ तुका म्हणे बहु पाहिलें या जीवें । वर्म झालें ठावें नाम तुझें ॥ ६ ॥ [१३०४]

मज त्याची भीड नुलंघवे देवा । जो म्हणे केशवा दास तुझा ॥ १ ॥ मज आवडती बहु तैसे जन । करिती कीर्तन कथा तुझी ॥ २ ॥ सांडुनियां लाज नाचेन त्यांपुढें । आइकती कोडें नाम तुझें

देवा, हें आपल्याला काय सांगावें ? आपण जाणतच आहांत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मजविषयींचें प्रेम व लोभ टाकूं नये. आजपर्यंत माझा लाड पुरविला तसा अथवा त्याहिपेक्षां विशेष येथून पुढें पुरवा ४. [१३०१]

ज्ञानावस्थेस मी फार भितों. ह्याकरितां हे नारायणा, माझे ठिकाणीं ती येऊं नये. मीं तुमचा प्रेमपान्हा भक्तिसुखाच्या अंगानें घेईन १. तुमचे प्रेमाशीं तुलना करील असें दुसरें त्रैलोक्यांत कांहीं नाहीं. तुमच्या भक्तसमुदायांत दहींभात काल्याचा जो आनंद आहे तो ब्रह्मादि देवांना देखील दुर्लभ आहे २. अर्धनिमिष संतसंगति करण्यांत जें सुख होतें तें कल्पपर्यंत स्वर्गांत राहिल्यानें मिळतें. संतसंग करणाराचे ठिकाणीं मोक्षादि पदें (सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता ह्या चार मुक्ति) दीन होऊन विश्रांतीस येतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, तूं देव व मी भक्त ह्यांमध्यें खंड न पडेल हीच देणगी मजला दे. पूर्वीं अभेदासंबंधानें जें कांहीं मी बोललों त्याची मला आवड नाहीं ४. [१३०२]

हे देवा, मला देहाचा विसर पाडा, येवढाच उपकार तुम्ही मजवर करा १. हे केशीराजा, तरच माझ्या जीवास सुख प्राप्त होईल, हें मला चांगलें कळलें आहे २. सर्व इंद्रियवृत्तींसहवर्तमान माझ्या चित्ताला तुमचे पायांपाशीं आश्रय द्या व सर्व काळ त्या ठिकाणीं रक्षण करा ३. आशा, भय, चिंता, लज्जा, काम व क्रोध ह्या वृत्तींचा व माझा संबंध तोडा ४. तुमचेजवळ आतां एवढेंच मागणें आहे कीं आमच्या मुखानें नाम यावें व आम्हांला संतसंगति घडावी, इतकी देणगी द्या ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, माझ्याकडून बहिरंग सेवा (वरपांगी, दांभिकपणाची) न घेतां शुद्धभावाची अशी अंतरंग (अंतःकरणापासून) सेवा घ्या ६. [१३०३]

देवा, तूं करूं लागलास तर काय होणार नाहीं ? सर्व कांहीं होईल, असें सर्व संतांचें म्हणणें आहे १. ह्याकरितां देवा, तुम्ही माझा पक्ष घेऊन माझें (योगक्षेमाचें) सर्व ओझें घ्या व या संसारसिंधूंतून मला पार करा २. योग्य पुण्यकर्म व अयोग्य पापकर्म ह्यांची जी सळमिसळ झाली आहे ती माझे मतानें निवड करितां येत नाहीं ३. माझी वाणी तुझें वर्णन करीत असतां तुझ्या कीर्तीचा पार न लागल्यामुळें कुंठित झाली ४. हें गुह्य कोणालाहि विचारलें तरी त्यांना कळत नाहीं; ह्याकरितां पांडुरंगा, माझी लज्जा रक्षण करा ५. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या जीवानें-मनानें-पुष्कळ शोध केला, त्यायोगानें तूं हस्तगत होण्याचें मर्म तुझें नाम आहे असें मला कळलें ६. [१३०४]

हे केशवा, मी तुझा दास आहें असें जो आपणास म्हणवितो त्याची भीड मला उलंघन करवत नाहीं १. हे देवा, तुझी कथा व तुझें कीर्तन जे जन करतात, ते मला फार आवडतात २. जे तुझें नाम श्रद्धेनें ऐकतात त्यांच्यापुढें

॥ ३ ॥ न लगे उपचार होईन भिकारी । वैष्णवांच्या घरीं उष्टावळी ॥ ४ ॥ तुका म्हणे जाणों उचित अनुचित । विचारूनि हित तेंचि करूं ॥ ५ ॥ [१३०५]

तुझे पाय माझे राहियले चित्तीं । ते मज दाविती वर्म देवा ॥ १ ॥ आम्हां अंधां तुझ्या पायांचा आधार । जाणसी विचार चालवितां ॥ २ ॥ मन स्थिर ठेलें इंद्रियें निश्चळ । हें तों माझें बळ नव्हे देवा ॥ ३ ॥ पापपुण्य भेद नासिलें तिमिर । त्रिगुणें शरीर सांडियेलें ॥ ४ ॥ तुका म्हणे तुझा प्रताप हा खरा । मी जाणें दातारा शरणागत ॥ ५ ॥ [१३०६]

जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनियां ॥ १ ॥ चालों वाटे आम्ही तुझाचि आधार । चालविसी भार सवें माझा ॥ २ ॥ बोलों जातां बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों देवा ॥ ३ ॥ अवघे जन मज झालें लोकपाळ । सोइरे सकळ प्राणसखे ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें । झालें तुझें सुख अंतर्बाहीं ॥ ५ ॥ [१३०७]

जालें पीक आम्हां अवघा सुकाळ । घेऊं अवघा काळ प्रेमसुख ॥ १ ॥ झाली आराणूक अवघियांपासून । अवघा गेला सीणभाग आतां ॥ २ ॥ अवघा झाला आम्हां एक पांडुरंग । आतां नाहीं जग माझें तुझें ॥ ३ ॥ अवघेचि आम्हीं ल्यालों अळंकार । शोभलोंहि फार अवघ्यांवरी ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्ही सदैवाचे दास । करणें न लगे आस आणिकांची ॥ ५ ॥ [१३०८]

साधनें आमुचीं आज्ञेचीं धारकें । प्रमाण सेवकें स्वामिसत्ता ॥ १ ॥ प्रकाशिलें जग आपुल्या प्रकाशें । रवि कर्मरसें अलिप्त त्या ॥ २ ॥ सांगणें तें नाहीं करणें आपण । मोलाही वचन वाढ झालें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां भांडवल हातीं । येरझारा खाती केवढीये ॥ ४ ॥ [१३०९]

मी निर्लज्ज होऊन नाचेन ३. मला दुसरे कांहीं सुखोपचार नकोत. वैष्णवांचे घरीं उच्छिष्ट सेवन करणारा मी भिकारी होईन ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी योग्यायोग्याचा विचार करून ज्यांत आपलें हित आहे तें करीन ५. [१३०५]

देवा, तुझे पाय माझ्या चित्तांत राहिले आहेत ते तुझ्या प्राप्तीचें (परमार्थाचें) मर्म दाखवितात १. आम्हां ज्ञानचक्षुरहित अंधांना तुझे पायांचाच एक आश्रय आहे. तूंच आम्हांला परमार्थमार्गांत वागविण्याचें जाणतोस २. हे देवा, माझें मन स्थिर होऊन इंद्रियें शांत झालीं आहेत हें कांहीं माझें सामर्थ्य नव्हे ३. पापपुण्याचें द्वंद्व म्हणजे भेदरूपी अंधकार नाहींसा झाला व सत्त्वादि तिन्ही गुणांनीं आमचे हृदयाचा त्याग केला ४. तुकाराम महाराज म्हणतात, हा सर्व प्रताप खरोखर तुझा आहे हें मी तुझा शरणागत जाणतों ५. [१३०६]

देवा, जेथें जावें तेथें तूं माझ्या बरोबर राहून माझा हात धरून मला वागवितोस १. आम्ही परमार्थाचे मार्गानें जे चालत आहोंत ते केवळ तुझ्याच आधारानें होय. तूं आमचेबरोबर राहून आमचे योगक्षेमाचा (संसाराचा) भार वागवीत आहेस २. आमच्या मुखावाटें कांहीं बरळल्याप्रमाणें शब्द निघाले तर ते तूं सरळ करतोस. हे देवा, त्याजबद्दलची आमची लज्जा नाहींशी करून तूं आम्हांस धीट केलें आहेस ३. सर्व जन, लोक हे सर्व माझे प्राणसखे सोयरे झाले आहेत ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझें सुख आम्हांला अंतर्बाह्य झालें म्हणून आतां आम्ही कौतुकानें खेळतों ५. [१३०७]

हरिनामचिंतनाचें (भक्तिप्रेमाचें) पीक पुष्कळ पिकल्यामुळें आम्हांला सुकाल झाला आहे. तेंच प्रेमसुख सर्व काळ आम्ही घेऊं १. सर्वांपासून (प्रपंचाच्या कटकटींतून) मी निवांत असा झालों आहें आणि माझा सर्व शीणभाग नाहींसा झाला २. आतां आम्हांस सर्व ठिकाणीं पांडुरंगच आहे असें भासतें. त्या योगानें जगतांतील माझें तुझें हा भेद नाहींसा झाला आहे ३. हरिनामाचे (भक्तिज्ञानवैराग्याचे) सर्व अलंकार आम्हीं घातले. त्या योगानें आम्ही सर्वांहून अति सुशोभित झालों ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही विठोबारायाचे दैववान् दास आहोंत म्हणून आम्हांला कोणाची आशा करण्याचें कारण नाहीं ५. [१३०८]

ज्याप्रमाणें स्वामीच्या सत्तेंत सेवक वागतात त्याप्रमाणें सर्व जगतांतील साधनें आमचीं आज्ञाधारक आहेत १. ज्याप्रमाणें सूर्य आपले प्रकाशानें जग प्रकाशित करून त्यांतील कर्मांपासून वेगळा राहातो त्याप्रमाणें मी साधनांहून वेगळा आहें २. आम्हांस सांगणें व करणें ह्याची जरूर नाहीं, पण वचनाची किंमत अधिक झाली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें सर्व भांडवल आमचे स्वाधीन आहे व बाकीचे किती तरी लोक जन्ममृत्यूचे येरझाऱ्यांत सांपडले आहेत ४. [१३०९]

शुभ जाल्या दिशा अवघाचि काळ । अशुभ मंगळ मंगळाचें ॥ १ ॥ हातींचिया दीपें दुराविली निशी । न देखिजे कैसी आहे तेही ॥ २ ॥ सुख दुःखाहूनि नाहीं विपरीत । देतील आघात हितफळें ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां आम्हांसी हे भले । अवघेचि झाले जीवजंत ॥ ४ ॥ [१३१०]

पाप पुण्य दोन्ही वाहती मारग । स्वर्ग नर्क भोग यांचीं पेणीं ॥ १ ॥ एका आड एक न लगे पुसावें । जेविल्या देखावें मागें भूक ॥ २ ॥ रहाटीं पडिलीं भरोनियां रितीं । होतील मागुती येतीं जाती ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही खेळतों यामधीं । नाहीं केली बुद्धि स्थिर पाहों ॥ ४ ॥ [१३११]

आमुचीं जिवलगें सज्जन सोयरीं । नांदतील तीरीं भिंवरेच्या ॥ १ ॥ तींच माझ्या चित्तीं वसती दिवसराती । भेटावया खंती वाटतसे ॥ २ ॥ संपदा सोहळे सर्व सुख वसे । वैकुंठीं जें नसे सुरवरांसी ॥ ३ ॥ ज्याच्या नामें पाप दुःख नासे भय । विठ्ठल बाप माय रखुमाई ॥ ४ ॥ माझा जीव जीतो अमृत ते कळा । कंठीं वेळोवेळां ध्यात असें ॥ ५ ॥ तुका म्हणे वाट पाहतां शिणले । त्या पंथें डोळुले पंढरीच्या ॥ ६ ॥ [१३१२]

न्यावयासी मूळ पाठवील कधीं । मज कृपानिधि पांडुरंग ॥ १ ॥ प्राण फुटे माझा त्याचिया वियोगें । घडी जाय युगें येकी येकी ॥ २ ॥ त्याचिये गांवींची आवड ती जीवा । जीव हा सांडावा वोंवाळुनी ॥ ३ ॥ दिने दिन चिंता वाटते बहूत । नावडे संचित करावेंसें ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां आहे तेंचि सरो । कोण करी भरोवरी मग ॥ ५ ॥ [१३१३]

पाळिला विधि तो आजि फळा आला । ऐसा हा कळला साच भाव ॥ १ ॥ नामाची आवडी

आम्हांला सर्व दिशा व सर्व काळ शुभ झाला आहे व जें अशुभ, अमंगल तें मंगलांतलें मंगल झालें आहे १. आत्मज्ञानाचा दिवा आमचे हातांत असल्यानें (आत्म्याचे अपरोक्षज्ञानानें) आत्मविषयक अज्ञानरूपी रात्र नाहींशी झाली ती आतां कशी आहे हें दिसत सुद्धां नाहीं २. दुःखाहून सुख विपरीत आहे असें वाटत नाहीं म्हणजे दुःखच सुख भासतें. अनहित हें हितकारक फळ देणारें होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां हे सर्व जीवजंतु आम्हांस उत्तम (प्रेमाचे विषय) वाटत आहेत ४. [१३१०]

ह्या जगतामध्यें पापपुण्याचे दोन मार्ग वाहातात. त्यांतील पापमार्गानें जाणाराचा मुक्काम नरकाचे ठिकाणीं आणि पुण्यमार्गानें जाणाराचा मुक्काम स्वर्गाचे ठिकाणीं होतो १. ज्याप्रमाणें जेवणाराचे मागें भूक व भुकेच्या मागें जेवण हें नेहमीं चालू असतें, त्याप्रमाणें स्वर्ग व नरक एकामागून एक येत आहेत २. जसें रहाटगाडग्यास असलेलीं गाडगीं हीं क्रमानें पाण्यानें भरतात व रिकामीं होतात असें हें चक्र चालू असतें, तशी पापपुण्यात्मक कर्मानें जन्ममृत्यूची येरझार चालू आहे. ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही ह्यामध्यें (पापपुण्याच्या व्यवहारांत) खेळत आहोंत, परंतु त्यामध्यें आम्हीं आपली बुद्धि स्थिर केली नाहीं ४. [१३११]

चंद्रभागेच्या तटाकीं विठोबा-रखुमाई नांदत आहेत; तीं दोघें सज्जन, आमचीं जिवलग सोयरीं आहेत १. तींच माझ्या चित्तामध्यें रात्रंदिवस राहात आहेत; म्हणून त्यांना भेटण्याविषयीं मला तळमळ लागली आहे २. जे सुखसोहळे वैकुंठीं नाहींत व स्वर्गलोकींहि देवांना मिळत नाहींत तें सर्व सुखैश्वर्य माझ्या ठिकाणीं आहे ३. ज्याच्या नामानें पाप. दुःख व भय यांचा नाश होतो, तो विठ्ठल माझा बाप आहे आणि रखुमाई माझी आई आहे ४. जिच्या योगानें माझा जीव जगतो ती नामामृतकळा कंठामध्यें धारण करून तिचेंच मी वारंवार ध्यान करितों ५. तुकाराम महाराज म्हणतात, पंढरीच्या मार्गाकडे माझे डोळे लागल्यामुळें ते श्रमी झाले आहेत ६. [१३१२]

मला न्यावयाकरितां कृपानिधि पांडुरंग बोलावणें कधीं पाठवील ? १. त्याच्या वियोगानें माझें हृदय फुटत आहे आणि एक एक घटका युगासमान वाटत आहे २. त्याच्या गांवाकडील कोणी आले तर ते मला फार आवडतात. आपला जीव त्यांच्यावरून ओवाळून टाकावा असें वाटतें ३. दिवसेंदिवस पांडुरंगाची भेटी होण्याविषयींची चिंता वाढत आहे. म्हणून कांहीं क्रियमाण संचित करावें तर तेंहि मला आवडत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मागील संचितकर्म जें असेल तें संपून जावो. मग त्याचा खटाटोप कोण करितो ? ५. [१३१३]

पूर्वीं जन्मजन्मांतरीं (जें कांहीं धर्माचरण केलें होतें तें) जो कांहीं विधि मीं पाळिला होता तो आज फलद्रूप झाला

लागलीसे चित्ता । पाय आठवितां सुख वाटे ॥ २ ॥ धरिल्या देहाचें लाधलें कारण । पुढिल्या खंडण गर्भवासा ॥ ३ ॥ तुका म्हणे लाभ झाला एकसरें । आणिक दुसरें नाहीं आतां ॥ ४ ॥ [१३१४]

हित तेंचि एक नाम कंठीं राहे । नाठविती देहभाव देहीं ॥ १ ॥ हाचि एक धर्म निज बीजवर्म । हेंचि जाळी कर्में केलीं महा ॥ २ ॥ चित्त राहे पायीं रूप बैसे डोळां । जीवें कळवळा आवडीचा ॥ ३ ॥ अखंड न खंडे अभंग न भंगे । तुका म्हणे गंगे मिळणी सिंधु ॥ ४ ॥ [१३१५]

माझिये जातीचे मज भेटो कोणी । आवडीची धणी फेडावया ॥ १ ॥ आवडे ज्या हरि अंतरापासूनि । ऐसियांचे मनीं आर्त माझें ॥ २ ॥ तयालागीं जीव होतो कासावीस । पाहातील वास नयन हे ॥ ३ ॥ सुफळ हा जन्म होईल तेथून । देतां आलिंगन वैष्णवांसी ॥ ४ ॥ तुका म्हणे तोचि सुदिन सोहळा । गाऊं या गोपाळा धणीवरि ॥ ५ ॥ [१३१६]

आमुचें जीवन हें कथा अमृत । आणिकही संत समागम ॥ १ ॥ सारूं एके ठायीं भोजन परवडी । स्वादरसें गोडी पदोपदीं ॥ २ ॥ धालिया ढेकर येती आनंदाचे । वोसंडलें वाचे प्रेमसुख ॥ ३ ॥ पिकलें स्वरूप आलिया घुमरी । रासी ते अंबरीं न समाये ॥ ४ ॥ मोजितां तयाचा अंत नाहीं पार । खुंटला व्यापार तुका म्हणे ॥ ५ ॥ [१३१७]

जोडिलें तें आतां न सरे सारितां । जीव बळी देतां हाता आलें ॥ १ ॥ संचित सारूनि बांधिलें धरणें । तुंबिलें जीवन साक्षेपें (आक्षेपें) हें ॥ २ ॥ शीतउष्ण तेथें सुखदुःख नाहीं । अंतर सबाही एक झालें ॥ ३ ॥ बीज तो अंकुर पत्र शाखा फळ । प्रात्पबीज मूळ अवघें नासे ॥ ४ ॥ तुका म्हणे नामीं

असें मला खरोखरी कळून चुकलें १. तें असें, कीं माझ्या चित्तास देवाचें नांव घेण्याची आवडी लागली आणि त्याचे पायांचा आठव केल्यानें सुख होऊं लागलें २. जो आम्हीं मनुष्यदेह धारण केला त्याची सफळता आज झाली आणि येथून पुढें गर्भवास संपला ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा लाभ मला एकदम मिळाला. आतां दुसरें कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं ४. [१३१४]

श्रीहरीचें नाम कंठामध्यें राहिलें हेंच एक हित आहे. त्यायोगानें देही असून देहाचा आठव होत नाहीं (भूक-तहान इत्यादि देहधर्मांची आठवणसुद्धां होत नाहीं) १. सर्व धर्मांपेक्षां (नाम घेणें) हाच एक श्रेष्ठ धर्म आहे आणि श्रीहरिप्राप्तीचें मर्म (बीज) हेंच आहे आणि ह्याच योगानें महान् संचित कर्मांचें दहन होत आहे २. श्रीमंत पांडुरंगाच्या पायांजवळ चित्त राहावें व त्याचें रूप डोळ्यांमध्यें वसावें आणि त्याचा कळवळा प्रीतीनें जीवीं असावा ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें गंगेचा ओघ समुद्रास मिळून पुनः मागून चालू असतो, त्याला कधींहि खंड पडत नाहीं, त्याप्रमाणें देवाचें अनुसंधान (हरिविषयींचें प्रेम) अखंड आहे ४. [१३१५]

हे देवा, माझ्या प्रीतीची इच्छा पूर्ण होण्याकरितां माझ्या जातीचे मला कोणीतरी भेटोत १. ज्यांना अंतःकरणापासून हरीची आवड आहे, त्यांची भेट व्हावी अशी इच्छा माझ्या मनांत आहे २. त्यांच्याकरितां माझा जीव कासावीस होत आहे आणि ते भेटीस कधीं येतील म्हणून माझे डोळे तिकडे लागले आहेत ३. त्या वैष्णवांना मीं आलिंगन दिलें असतां माझा हा जन्म सफळ होईल ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांची भेट होईल तो सुदिन, असें वाटून त्यांच्या संगतीनें तृप्ति होईपर्यंत गोपाळाला (गोपाळाचें नांव) गाऊन सोहळा करूं ५. [१३१६]

हरिकथामृत हें आमचें जीवन आहे. तसेंच संतसमागम करणें हेंहि आमचें जीवन आहे १. एके ठिकाणीं संतांच्या पंक्तीला बसून नामामृताचें भोजन करूं व त्यांतील रसाची गोडी पदोपदीं घेऊं २. त्यायोगानें तृप्त झालों म्हणजे आनंदाची ढेंकर येईल व वाचेनें भगवच्चिंतनाच्या प्रेमसुखाचा लोट चालेल ३. ह्या कर्तव्यानें परमात्मस्वरूपभावाचें पीक दाट आलें. तें इतकें, कीं त्याच्या राशि आकाशांत मावेनाशा झाल्या ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्या राशि मोजाव्या तर त्या अनंत आहेत, म्हणून मोजण्याचा व्यापार कुंठित झाला ५. [१३१७]

आम्हीं आपला जीव (हरीच्या पायातळीं) बळी देऊन (जो ठेवा) जें निधान हस्तगत करून घेतलें, त्याचा व्यय केला असतां कधींहि संपत नाहीं; जें कांहीं पूर्वीचें (पापांचें) संचित होतें तें नाहींसें करून (नामरूपी नदीला) बांधारा घातला; त्यामध्यें श्रीहरीचें स्वरूपजीवन दक्षतेनें तुंबवून ठेवलें २. आतां त्या ठिकाणीं शीतोष्ण व सुखदुःखादि विकार नाहींत, [illegible] हरीचें रूप अंतर्बाह्य भरलें आहे ३. एका बीजापासून अंकुर फुटतो व त्यास फांद्या, पानें, फळें येतात; व

राहिलीसे गोडी । बीजाच्या परवडी होती जाती ॥ ५ ॥ [१३१८]

भक्तिभाव आम्हीं बांधिलासे गांठीं । सादावितों हाटीं घ्या रे कोणी ॥ १ ॥ सुखाचिया पेठे घातला दुकान । मांडियेलें वान रामनाम ॥ २ ॥ सुखाचें फुकाचें सकळांचें सार । तरावया पार भवसिंधु ॥ ३ ॥ मागें भाग्यवंत जाले थोर थोर । तिहीं केला फार हाचि सांटा ॥ ४ ॥ खोटें कुडें तेथें नाहीं घातपात । तुका म्हणे चित्त शुद्ध तरी ॥ ५ ॥ [१३१९]

पर्जन्यें पडावें आपुल्या स्वभावें । आपुल्याला दैवें पिके भूमि ॥ १ ॥ बीज तेंचि फळ येईल शेवटीं । लाभ हानि तुटी ज्याची तया ॥ २ ॥ दीपाचिये अंगीं नाहीं दुजा भाव । धणी चोर साव सारिखेचि ॥ ३ ॥ काउळें ढोंपरा कंकर तित्तिरा । राजहंसा चारा मुक्ताफळें ॥ ४ ॥ तुका म्हणे येथें आवडी कारण । पिकला नारायण जया तैसा ॥ ५ ॥ [१३२०]

धीर तो कारण एकविध भाव । पतिव्रते नाहो सर्वभावें ॥ १ ॥ चातक हे जळ न पाहती दृष्टी। वाट पाहे कंठीं प्राण मेघा ॥ २ ॥ सूर्यविकसिनी नेघे चंद्रामृत । वाट पाहे अस्त उदयाची ॥ ३ ॥ धेनु येऊं नेदी जवळी आणीकां । आपुल्या बाळकाविण वत्सा ॥ ४ ॥ तुका म्हणे नेम प्राणां संवसाटीं । तरीच माझ्या गोष्टी विठोबाच्या ॥ ५ ॥ [१३२१]

नामें स्नानसंध्या केलें क्रियाकर्म । त्याचा भवश्रम निवारला ॥ १ ॥ आणिकें दुरावलीं करितां खटपट। वाउगे बोभाट वर्माविण ॥ २ ॥ रामनामीं जीहीं धरिला विश्वास। तीहीं भवपाश तोडियेले ॥ ३ ॥

त्याचें मूळबीज हस्तगत झाल्यावर त्या सर्वांचा सहजच नाश होतो (नामबीजापासून पापनिवृत्ति, पुण्यप्राप्ति, चित्तशुद्धि संतसंगति, हरीचा आत्मत्वानें साक्षात्कार असा विस्तार होऊन पुनश्च नाम हें फळ मिळतें व मधला विस्तार नष्ट होतो) ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें एका नामबीजाच्या ठिकाणीं गोडी राहिली, म्हणजे कित्येक बीजांचे विस्तार होतील व लयास जातील ५. [१३१८]

आम्हीं आपले पदरीं भक्तिभाव बांधला आहे. तो ह्या संसारबाजारामध्यें कोणीं घेणारा आहे काय, म्हणून लोकांस हांका मारतों १. परमानंदस्वरूपी सुखाच्या पेठेमध्यें आम्हीं दुकान घातलें आहे, त्यांत रामनामरूपी माल ठेविला आहे २ तें नाम सुखकर असून सर्वांचें सार आहे व तें घेणारास किंमत लागत नाहीं आणि तो नामरूपी माल सर्वांना संसारसिंधूंतून पार करण्याकरितां (ठेविला आहे) ३. पूर्वीं झालेल्या मोठमोठ्या भाग्यवानांनीं ह्या आमच्या मालाचाच पुष्कळ संचय केला ४. तुकाराम महाराज म्हणतात, तो माल खोटा नाहीं अथवा वाईट नाहीं व त्यायोगानें कोणत्याहि तऱ्हेचा घातपात होणार नाहीं. तो माल घेण्याकरितां चित्त शुद्ध कर ५. [१३१९]

पर्जन्य सहज आपल्या स्वभावानें पडतो पण आपआपल्या प्रारब्धानें जमिनीस पीक येतें १. जें बीज पेरावें तसेंच अखेरीस फल येतें. लाभ अथवा हानि ज्याच्या त्याच्या प्रारब्धानेंच होते २. आपला धनी अगर दुसरा कोणी साव मनुष्य अथवा चोर हे वेगळाले भाव दिव्याच्या ठिकाणीं नसून तो सर्वांना सारखा प्रकाश देतो ३. कावळ्याचें खाणें जनावराचें ढोंपर होय व तित्तरपक्ष्याचें खाणें खडे आहे आणि मोत्यांचें खाणें राजहंसाचें आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, वर सांगितल्याप्रमाणें ह्या ठिकाणीं मुख्य कारण आवड आहे. जसा ज्याचा भाव असेल, तसा नारायण त्याला फल देतो ५. [१३२०]

ज्याप्रमाणें पतिव्रतेस कायावाचामनेंकरून पतिच प्रिय असतो, त्याप्रमाणें देवाच्या ठिकाणीं एकविधभाव ठेवून धीर धरावा म्हणजे सर्व कार्य होतें १. चातक पक्षी पृथ्वीवरील भरलेल्या (नद्या–समुद्रांतील) पाण्याकडे पाहात नाहीं; तो आपला प्राण कंठात ठेवून मेघाचा वर्षाव कधीं होईल, अशी वाट पाहातो २. ज्या सूर्यविकासिनी कमळिणी आहेत, त्या रात्रीच्या समयीं चंद्रोदय जरी झाला, तरी त्याचें अमृत न घेतां, त्या चंद्राचा अस्त होऊन सूर्योदय केव्हां होईल अशी वाट पाहातात ३. आपल्या वत्सावांचून दुसऱ्या वत्साला धेनु आपल्याजवळ येऊं देत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, वर सांगितलेल्या चार दृष्टांतांप्रमाणें एकविधभावानें जो नेम करावा, तो प्राण गेला तरी सोडूं नये. असा निर्धार होईल तरच माझ्या विठोबारायाच्या गोष्टी बोलाव्या ५. [१३२१]

जे कोणी हरीचें नामस्मरण सर्व काळ करतील त्यांना स्नानसंध्यादि क्रियाकर्मांची प्राप्ति होऊन, त्यांच्या संसारश्रमाचा परिहार होईल १. हें मुख्य मर्म न जाणतां अन्य साधनांची खटपट करून पुष्कळ लोक देवापासून दुरावले.

तुका म्हणे केलें कळिकाळ ठेंगणें । नामसंकीर्तनें भाविकांनीं ॥ ४ ॥ [१३२२]

वैष्णवांची कीर्ती गाइली पुराणीं । साही अठराजणीं चहूं वेदीं ॥ १ ॥ ऐसे कोणी दावा ग्रंथांचे वाचक । कर्मठ धार्मिक पुण्यशील ॥ २ ॥ आदिनाथ शंकर नारद मुनीश्वर । शुका ऐसा थोर आणीक नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मुगुटमणी हरिभक्ति । आणीक विश्रांति आरातिया ॥ ४ ॥ [१३२३]

बोलिलों जैसें बोलविलें देवें । माझें तुम्हां ठावें जातिकुळ ॥ १ ॥ करा क्षमा कांहीं नका धरूं कोप । संत मायबाप दीनावरी ॥ २ ॥ वाचेचा चाळक झाला दावी वर्म । उचित ते धर्म मजपुढें ॥ ३ ॥ तुका म्हणे पुढें अपराध नेणतां । द्यावा मज आतां ठाव पायीं ॥ ४ ॥ [१३२४]

संतांचे घरींचा दास मी कामारी । दारीं परिवरीं लोळतसें ॥ १ ॥ चरणींचे रज लागती अंगास । तेणें बेता (चा) ळीस उद्धरती ॥ २ ॥ उच्छिष्ट हें जमा करूनि पत्रावळी । घालीन कवळी मुखामाजी ॥ ३ ॥ तुका म्हणे मी आणीक विचार । नेणें हेंचि सार मानीतसें ॥ ४ ॥ [१३२५]

एक शेरा अन्ना चाड । येर वाउगी बडबड ॥ १ ॥ कां रे तृष्णा वाढविसी । बांधवूनि मोहपाशीं ॥ २ ॥ औट हात तुझा जागा । येर मिणमी वाउगा ॥ ३ ॥ तुका म्हणे श्रम । एक विसरतां राम ॥ ४ ॥ [१३२६]

आलें भरा येच पेंठे । पुढें मागुतें न भेटे ॥ १ ॥ नाहीं कोणाचा सांगात । दुःख भोगितां आघात ॥ २ ॥ होसी फजित वरपडा । लक्ष चौऱ्यांसीचा वेढा ॥ ३ ॥ एका पाउलाची वाट ।

त्यांचे साधनश्रम व्यर्थ गेले २. ज्यांनीं रामनामाचे ठिकाणीं विश्वास धरला त्यांनीं संसारसंबंधी सर्व पाश तोडून टाकले ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी भाविक आहेत त्यांनीं नामसंकीर्तनानें कळिकाळाला नम्र करून त्याला आपले स्वाधीन ठेविलें ४. [१३२२]

सहा शास्त्रें, अठरा पुराणें व चार वेद ह्यांनीं वैष्णवांची कीर्ति वर्णन केली आहे १. अहो ग्रंथवाचक पंडित हो, कर्म करणारे व धार्मिक, व पुण्यवान व शास्त्रज्ञ लोक हो, वैष्णवांप्रमाणें थोर कोण आहेत ते तुम्हीं मला दाखवावे २. आद्य स्वामी शंकर व मुनींमध्यें श्रेष्ठ जो नारद व शुकाचार्य यांच्याप्रमाणें थोर दुसरे कोणी नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, एक हरीची भक्ति ही सर्व साधनांत श्रेष्ठ आहे. हिच्याखेरीज बाकीचीं श्रमपरिहार करण्याचीं साधनें अलीकडचीं आहेत (हरिभक्तांना मरणाच्या आधीं मोक्षरूपी विश्रांति—जीवन्मुक्ति मिळते) ४. [१३२३]

जसें देवानें मला बोलविलें तसें मी (अभंगांच्या रूपानें) बोललों. एरवीं पाहिलें असतां माझें जातिकुळ कसें आहे, तें तुम्हांला ठाऊक आहे १. अहो संत मायबाप, मज दीनावर कांहीं राग न धरितां ह्या सर्व बोलण्याची क्षमा करा २. जो देव वाचेचा चालक आहे, तो योग्य असलेले धर्म व त्यांचें मर्म दाखवितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझे पुढील होणारे अपराध तुम्ही मनास न आणतां मला आतां तुमच्या पायांजवळ जागा द्या. ४ [१३२४]

मी संतांचे घरचा काम करणारा सेवक होऊन त्यांचे दारांत व अंगणांत लोळत आहें १. त्याचें कारण संतचरणरज माझे सर्व आंगाला लागतील. त्यायोगानें बेचाळीस कुळांचा उद्धार होईल २. ते भोजन करतील त्यांच्या पत्रावळी जमा करून त्यांतील उच्छिष्टांचे घांस मी सेवन करीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यावांचून मी दुसरे विचार जाणत नाहीं. माझ्या मनानें (सेवा करणें) हेंच (सर्व साधनांचें) सार मानिलें आहे ४. [१३२५]

अरे, तुला (प्रत्येक माणसाला जगण्याकरितां) एक शेरभर अन्न लागतें, त्याचीच गरज ठेव; त्यावांचून दुसरी बडबड व्यर्थ आहे १. देहसंबंधीं स्त्रीपुत्रांच्या मोहपाशानें बांधून घेतलेंस आणि त्यांच्या संबंधीं मिळविण्याची आशा कशाकरितां वाढविलीस ? २. तुला राहावयास जागा कायमची साडेतीन हात आहे, त्यावांचून (घरें, वाडे बांधण्याचे) जागा मिळण्याचे श्रम व्यर्थ आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका रामाचा विसर झाल्यास बाकीचे सर्व श्रम आहेत ४. [१३२६]

अहो जन हो, तुम्ही मनुष्यरूपी देहाच्या पेठेमध्यें आलां आहां, ह्याकरितां ह्या पेठेत रामनामाचा माल तुम्ही भरून ठेवा. नाहींपेक्षां पुढें ह्या पेठेचा योग तुम्हांला होणार नाहीं. अन्य योनींतून फिरतांना तुम्हांला जें दुःख सोसावें लागेल, तेथें तुम्हांला कोणीहि सहकारी नाहीं २. एकवार चौऱ्यांशीं लक्ष योनींच्या फेऱ्यांत तुम्ही सांपडलां, म्हणजे तुमची

कोणा सांगावा बोभाट ॥ ४ ॥ जुंतिजेसी घाणां । नाहीं मारित्या करुणा ॥ ५ ॥ तुका म्हणे हित पाहें । जोंवरि हें हातीं आहे ॥ ६ ॥ [१३२७]

लाभ झाला बहुतां दिसीं । लाहो करा पुढें नासी । मनुष्यदेहा ऐसी । उत्तम जोडी जोडिली ॥ १ ॥ घेई हरिनाम सादरें । भरा सुखाचीं भांडारें । जालिया व्यापारें । लाहो हेवा जोडीचा ॥ २ ॥ घेउनी माप हातीं । काळ मोवी दिवस राती । चोर लाग घेती । पुढें तैसें पळावें ॥ ३ ॥ हित सावकाशें । म्हणे करीन तें पिसें । हातीं काय ऐसें । तुका म्हणे नेणसी ॥ ४ ॥ [१३२८]

सुखाचें ओतलें । दिसे श्रीमुख चांगलें ॥ १ ॥ मनें धरिला अभिलाष । मिठी घातली पायांस ॥ २ ॥ होतां दृष्टादृष्टी । ताप गेला उठाउठीं ॥ ३ ॥ तुका म्हणे झाला । लाभें लाभ दुणावला ॥ ४ ॥ [१३२९]

झरा लागला सुखाचा । ऐसा मापारी कइंचा ॥ १ ॥ जो हें माप तोंडें धरी । सळे जाली ते आवरी ॥ २ ॥ जाले बहु काळ । कोणा नाहीं ऐसें बळ ॥ ३ ॥ तुका म्हणे तळ । नाहीं पाहेसा सकळ ॥ ४ ॥ [१३३०]

आम्हीं बोलों तें तुज कळे । एक दोहीं ठायीं खेळे ॥ १ ॥ काय परिहाराचें काम । जाणे अंतरींचें राम ॥ २ ॥ कळोनियां काय चाड । माझी लोकांसी बडबड ॥ ३ ॥ कारण सर्वे एका । अवघें आहे म्हणे तुका ॥ ४ ॥ [१३३१]

फार फजिती होईल ३. त्या योनींतून फिरण्याचा मार्ग रानांतील पाऊलवाटेप्रमाणें बिकट असतो, पण ही अडचण कोणाला सांगावयाची ? ४. जसें तेल्याच्या घाण्यास जुंपलेला बैल पुष्कळ फेऱ्या घालून दमला म्हणून हळू चालूं लागला, तरी त्याची दया न करितां तेली त्याला मारतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां जोंपर्यंत तुम्ही आपले स्वाधीन आहांत, तोंपर्यंत कांहीं स्वहिताचा विचार करा ७. [१३२७]

मनुष्यदेहासारखा उत्तम लाभ फार दिवसांनीं झाला आहे, ह्याकरितां परमार्थाची त्वरा करा, नाहीं तर अखेर तो नष्ट होईल १. हरिनाम मोठ्या तत्परतेनें (श्रद्धेनें) घ्या व सुखाचीं भांडारें भरा. ज्याप्रमाणें व्यापारी लाभ होण्याकरितां व्यापाराची मोठी त्वरा करितो आणि त्याविषयीं हांव ठेवितो २. काळ हा आयुष्याच्या दिवसरात्रींची मोजदाद करीत आहे. ज्याप्रमाणें एखाद्याच्या पाठीमागें चोर लागले, म्हणजे तो मोठ्या जोरानें पळतो, तशी परमार्थाविषयीं त्वरा करावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी आपलें हित म्हातारपणीं सावकाश करून घेईन हें म्हणणें वेड्यासारखें आहे; कारण जगणें हें आपले हातीं आहे काय ? हें तुला कसें कळत नाहीं ? ४. [१३२८]

श्रीहरीचें मुख हें सुखाचेच (मुर्तीत) ओतलेलें असें चांगलें दिसत आहे १. म्हणून माझ्या मनानें त्या स्वरूपा-विषयींचा मोह धरिला आहे. त्याचे पायीं मीं मिठी घातली आहे २. श्रीमुखाची दृष्टादृष्टि होतांच त्वरेनें तापनिवृत्ति झाली ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारच्या (पायीं मिठी मारल्याच्या) लाभानें (दर्शनाचा) लाभ दुणावला आहे ४. [१३२९]

हें जें मला हरीचें सुख प्राप्त झालें आहे, त्याचा चित्तांत अखंड झरा लागला आहे. त्याची मोजदाद करणारा मापाड्या कसा मिळेल ? १. त्याचें माप तोंडानें करून झालेली मोजदाद कोण आवरील (देऊं शकेल ?) २. ह्याची मोजदाद करण्यांत पुष्कळ काळ गेला, पण त्याचा शेवट लावील अशी शक्ति कोणाचे आंगीं नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याचा सर्व ताळा बसवील असा कोणी नाहीं (किंवा, त्या सुखाचा तळ-खोली कोणालाहि पाहणें शक्य नाहीं) ४. [१३३०]

हे देवा, आम्हीं जें कांहीं बोलावें, तें तुला पूर्वींच कळतें, कारण आमच्यांत व आपल्यांत ह्या दोन्ही ठिकाणीं एकाच अंशानें तूं खेळतोस १. असें आहे, म्हणून आम्हांला आमची स्थिति तुला सांगण्याचें काय कारण आहे ? तूं आत्माराम अंतःकरणांतलें जाणत आहेस २. मी जी बडबड करतों, ती लोकांना कळावी अशी मला काय जरूर आहे ? (लोकांकडून माझ्या दुःखाचा परिहार होणार नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझें सर्व कार्य एका श्रीहरीच्या योगांत आहे (मला एकट्या तुझ्याशींच कर्तव्य आहे) ४. [१३३१]

उमटे तें ठायीं । तुझें निरोपावें पायीं ॥ १ ॥ आम्हीं करावें चिंतन । तुझें नामसंकीर्तन ॥ २ ॥ भोजन भोजनाच्या काळीं । मागों करूनियां आळी ॥ ३ ॥ तुका म्हणे माथां । भार तुझ्या पंढरिनाथा ॥ ४ ॥ [१३३२]

केला पण सांडी । ऐसियासी म्हणती लंडी ॥ १ ॥ आतां पहा विचारून । समर्थासि बोले कोण ॥ २ ॥ आपला निवाड । आपणचि करितां गोड ॥ ३ ॥ तुम्ही आम्ही देवा । बोलिला बोल सिद्धी न्यावा ॥ ४ ॥ असे धुरे उणें । मागें सरे तुका म्हणे ॥ ४ ॥ [१३३३]

न व्हावें तें झालें । तुम्हां आम्हांसी लागलें ॥ १ ॥ आतां हालमाकलमें । भांडोनिया काढूं वर्मे ॥ २ ॥ पाटोळ्यासंवसाटी । दिली रगट्याची गांठी ॥ ३ ॥ तुका म्हणे हारी । आणूनियां करिन सरी ॥ ४ ॥ [१३३४]

पतित मिरासी । ते म्यां धरिली जीवेंसी ॥ १ ॥ आतां बळिया सांग कोण । ग्वाही तुझें माझें मन ॥ २ ॥ पावनाचा ठसा । दावीं मज तुझा कैसा ॥ ३ ॥ तुका म्हणे वाव झालें । रोख पाहिजे दाविलें ॥ ४ ॥ [१३३५]

करितां वेरझारा । उभा न राहासी वेव्हारा ॥ १ ॥ हे तों झोंडाईचे चाळे । काय पोटीं तें न कळे ॥ २ ॥ आरोगुनी मुग । बैसलासी जैसा बग ॥ ३ ॥ तुका म्हणे किती । बुडविलीं आळवितीं ॥ ४ ॥ [१३३६]

नाहीं देणें घेणें। गोवी केली अभिमानें ॥ १ ॥ आतां कां हो निवडूं नेदां । पांडुरंगा येवढा धंदा

हे देवा, आमचे अंतःकरणाचे ठिकाणीं जे भाव उत्पन्न होतील ते तुझ्या पायांजवळ आम्ही सांगूं १. तुझें नामसंकीर्तन सर्व काळ आम्हीं करावें आणि त्याचेंच चिंतन करावें २. भूक लागेल त्या वेळीं हट्टानें आम्ही तुझ्याजवळ जेवावयास मागूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा, माझा सर्व भार तुझे मस्तकीं आहे ४. [१३३२]

हे देवा, प्रतिज्ञा करून त्याप्रमाणें जो वागत नाहीं, त्याला लंडी असें म्हणतात. १. ह्याविषयींचा तुम्ही विचार करून पाहा. आपण समर्थ आहांत, म्हणून तुमचे बरोबर कोणी बोलावें ? २. आपला आपण निकाल करणें हें चांगलें ३. हे देवा, जें कांहीं आरंभीं वचन दिलें आहे तें तुम्ही आम्ही मिळून सिद्धीस नेलें पाहिजे (आमची प्रतिज्ञा 'आम्ही नामाचे धारक। नेणों प्रकार आणिक।' आणि तुमची प्रतिज्ञा 'भक्तांचा योगक्षेम मी चालवितों' ह्या आपण दोघांनीं सिद्धीस नेल्या पाहिजेत) ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यासंबंधानें जर मी मागें हटलों, तर आपल्या थोरपणाला उणीव येणार आहे, अथवा स्वामी मागें सरले, तर ती त्यांचे मोठेपणाला उणीव आहे ५. [१३३३]

हे देवा, तुमचें आमचें भांडण लागलें आहे, ही कधीं न होणारी गोष्ट घडून आली आहे १. आतां तुमच्याशीं हुमरीतुमरीला येऊन आम्ही भांडूं व तुमचा मर्मभेद करूं २. तुझ्या अंगावर पुष्कळ मोलाचा पीतांबर आहे, त्याची आणि माझ्या अंगावरील रगड्याची मीं गांठ बांधिली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मी तुला जिंकून तुझ्याशीं बरोबरी करीन. [तूं भांडखोर आहेस व मीहि भांडखोर आहें, असें लोकांच्या निदर्शनास आणीन] ४. [१३३४]

माझी पापीपणाची मिरास आहे ती म्यां जीवानें जतन केली आहे १. आतां जास्ती बलवान कोण आहे (तूं श्रेष्ठ का मी श्रेष्ठ) हें सांग. ह्याला साक्ष परस्परांच्या मनाची आहे २. तुझी पतितपावनपणाची प्रसिद्धि कशा प्रकारची आहे, ती मला दाखीव ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझी मागील पावनपणाची कीर्ति व्यर्थ झाली असें वाटतें. जर ती कीर्ति असेल तर माझ्या प्रत्ययास आणून दे (मला प्रत्यक्ष दाखीव) ४. [१३३५]

हे देवा, आम्हीं तुझ्या घरास पुष्कळ येरझारा घातल्या (हेलपाटे घातले), पण तूं आमचे समोर हिशेब देण्यास उभा राहात नाहींस १. अशा प्रकारचें फसविणें दांडगेपणाचें आहे. तुमचे मनांत आमच्याविषयीं काय (काळेंबेरें) आहे तें समजत नाहीं २. जसा एखादा कोणी मूग गिळून बसतो (मुकाट्यानें बसतो) अगर बगळा माशाकरितां स्वस्थ ध्यान धरून बसतो [तसा तूं बसला आहेस असें दिसतें] ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुला आळविणाऱ्या लोकांना तूं आजपर्यंत किती बुडविलेंस [हें सांग] ४. [१३३६]

हे देवा, तुला कांहीं द्यावें घ्यावें लागत नाहीं, पण तूं (उदारांचा राजा, अनाथांचा दाता अशा) कीर्तीच्या

॥ २ ॥ पांचांमधीं जावें। थोड्यासाठीं फजित व्हावें ॥ ३ ॥ तुज ऐसीं नाहीं। पांडुरंगा आम्ही कांहीं ॥ ४ ॥ टाकूं तो वेव्हार। तुज बहू करकर ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां। निवडूं संतां देखतां ॥ ६ ॥ [१३३७]

सिंचन करितां मूळ। वृक्ष ओलावे सकळ ॥ १ ॥ नको पृथकाचे भरी। पडों एक सार धरीं ॥ २ ॥ पाणचोऱ्याचें दार। वरिल दाटावें तें थोर ॥ ३ ॥ वश झाला राजा। मग आपलया त्या प्रजा ॥ ४ ॥ एक आतुडे चिंतामणी। फिटे सर्व सुखधणी ॥ ५ ॥ तुका म्हणे धांवा। आहे पंढरी विसांवा ॥ ६ ॥ [१३३८]

करूं याची कथा नामाचा गजर। आम्हां संसार काय करी ॥ १ ॥ म्हणवूं हरिचे दास लेऊं तीं भूषणें। कांपे तयाभेणें कळिकाळ ॥ २ ॥ आशा भय लाज आड नये चिंता। ऐसी तया सत्ता समर्थाची ॥ ३ ॥ तुका म्हणे करूं ऐसीयांचा संग। जेणें नव्हे भंग चिंतनाचा ॥ ४ ॥ [१३३९]

काय सर्प खातो अन्न। काय ध्यान बकाचें ॥ १ ॥ अंतरींची बुद्धि खोटी। भरलें पोटीं वाईट ॥ २ ॥ काय उंदीर नाहीं धांवी। राख न लावी गाढव ॥ ३ ॥ तुका म्हणे सुसर जळीं। काउळीं कां न न्हाती ॥ ४ ॥ [१३४०]

मदें मातलें तें नागवेंचि नाचे। अनुचित वाचे बडबडी ॥ १ ॥ आतां शिकवावा कोणासी विचार। कर्म तें दुस्तर करवी धीट ॥ २ ॥ आलें अंगासी तें बळिवंत गाढें। काय वेड्यापुढें धर्मनीत

अभिमानानें गुंतला गेला आहेस १. अहो पाडुरंगा, आतां तुम्ही या कामाचा निवाडा कां करीत नाहीं? २. आमचें मागणें फारसें नाहीं. थोडक्याकरितां पंचांमध्यें जाऊन फजीत व्हावें लागेल (ह्याचा विचार तुम्ही करा) ३. हे पांडुरंगा, तुझ्याप्रमाणें आम्ही नाहीं ४. ज्या योगानें तुम्हांला त्रास होईल तो व्यापार आम्ही सोडून देऊं ५. तुकाराम महाराज म्हणतात, आतां ह्याचा निकाल संतांचे समक्ष करूं ६. [१३३७]

झाडाचे वेगळ्या वेगळ्या फांट्यांस पाणी न घालतां मुळास घातलें तर तें सर्व झाडास पोहोंचतें १. त्याप्रमाणें वेगळाल्या देवांच्या भरीं न पडतां (सारभूत जो एक देव) आहे तो चित्तानें बळकट धरावा २. गारुड्याजवळ पाणचोर म्हणून एक पात्र (भांडें) असतें. त्यास पुष्कळ भोंकें असतात. त्यांतील भरलेलें पाणी राहाण्याकरितां वेगवेगळ्या भोंकांस हात न लावतां त्याचें वरील एक तोंड दाबून धरल्यास पाणी कायम राहातें ३. एक राजा वश करून घेतला म्हणजे सर्व प्रजा आपल्या स्वाधीन असल्यासारखी आहे! ४. इच्छिलेले पदार्थ देणारा जो चिंतामणि तो सांपडल्यास सर्व सुख मिळण्याची इच्छा पूर्ण होते ५. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें (सर्वांना मूलभूत जो सकळ ब्रह्मांडाचा स्वामी) तो पंढरीस आहे. ह्याकरितां तुम्ही तेथें त्वरेनें जा, म्हणजे तुम्हांला विश्रांति मिळेल ६. [१३३८]

आम्ही ह्या देवाची (श्रीहरीची) कथा करूं आणि त्याच्याच नामाचा घोष करूं. त्या योगानें (ह्या भक्तीपुढें) आम्हांला संसार काय करणार? १. आम्ही हरीचे दास म्हणवूं आणि त्याच्याच नामाचे अलंकार धारण करूं. त्या योगानें कळिकाळास भय उत्पन्न होऊन तो थरथरां कांपेल २. आशा, भय, लज्जा, चिंता ह्या उर्मी आमचे समोर येणार नाहींत अशी आमच्या ह्या समर्थ देवाची सत्ता आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या योगानें आमचे उपासनापर चित्ताचा भंग न होईल अशांची (अशा वैष्णव संतांची) संगति आम्ही करूं ४. [१३३९]

(कित्येक दांभिक लोक) देवाच्या प्राप्तीकरितां निराहारी राहून ध्यानस्थ बसतात पण त्याप्रमाणें अन्न न खाणारे सर्प आहेत व ध्यान धरून बसणारे बगळे आहेत १. अंतःकरणाची बुद्धि खोटी असल्यामुळें ज्यांच्या अंतरीं वाईट वासना भरल्या आहेत (ते काय उपयोगी?) २. कित्येक आंगास राख लावून दरींत बसणारे आहेत, तसे बिळांत राहाणारे उंदीर व राखेंत लोळणारे गाढव नाहींत काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, कित्येक पाण्यांत बसून अनुष्ठान करितात व कित्येक नुसतें गंगेंत स्नान करितात, तसें गंगेच्या पाण्यांत राहाणाऱ्या सुसरी व स्नान करणारे कावळे नाहींत काय? (दांभिकपणानें कांहींहि केलें तरी तें निष्फळ होतें) ४. [१३४०]

जो कोणी दारू पिऊन उन्मत्त होतो तो नागवा नाचतो व तोंडानें अवाच्य (अश्लील) बडबडतो १. त्याचें अघोर कर्म त्याला धीटपणा देतें. मग विचार कोणाला शिकवावा? (सदुपदेश कोणाला करावा?) जी स्थिति

॥ ३ ॥ तुका म्हणे कळों येईल तो भाव । अंगावरि घाव उमटतां ॥ ४ ॥ [१३४१]

भाविकां हें वर्म सांपडलें निकें । सेवती कवतुकें धणीवरी ॥ १ ॥ इच्छितील तैसा नाचे त्यांचे छंदें । वंदिती तीं पदें (वंदितील पदें) सुकुमार ॥ २ ॥ विसरले मुक्ती भक्तिच्या अभिलासें । ओढत सरिसें सुख आलें ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं मागायाची आस। पांडुरंग त्यास विसंबेना ॥ ४ ॥ [१३४२]

भक्त समागमें सर्वभावें हरि । सर्व काम करी न सांगतां ॥ १ ॥ सांटवला राहे हृदयसंपुष्टीं । बाहेर धाकुटी मूर्ति उभा ॥ २ ॥ मागण्याची आस पाहे मुखाकडे । चिंतिल्या रोकडे मनोरथ ॥ ३ ॥ तुका म्हणे जीव भाव देवापायीं । ठेवूनि ते कांहीं न मागती ॥ ४ ॥ [१३४३]

प्रेम अमृतें (परम अमृतें) रसना ओलावली । मनाची राहिली वृत्ति पायीं ॥ १ ॥ सकळही तेथें वोळलीं मंगळें । वृष्टि केली जळें आनंदाच्या ॥ २ ॥ सकळ इंद्रियें जालीं ब्रह्मरूप । ओतलें स्वरूप माजी तया ॥ ३ ॥ तुका म्हणे जेथें वसे भक्तराव । तेथें नांदे देव संदेह नाहीं ॥ ४ ॥ [१३४४]

कासया गुणदोष पाहों आणिकांचे । मज काय त्यांचें उणें असे ॥ १ ॥ काय पाप पुण्यें पाहों आणिकांचें । मज काय त्यांचें उणें असे ॥ २ ॥ नष्टदुष्टपण कवणाचें वाणूं । तयाहून अणु अधिक माझें ॥ ३ ॥ कुचर खोटा मज कोण असे आगळा । तो मी पाहों डोळां आपुलिये ॥ ४ ॥ तुका म्हणे मी भांडवलें पुरता । तुजसी पंढरीनाथा लावियेलें ॥ ५ ॥ [१३४५]

काळ जवळिच उभा नेणां । घाली झांपडी खुंटी कानां ॥ १ ॥ कैसा हुंपार सावध राहीं । आपुला तूं आपुले ठायीं ॥ २ ॥ काळ जवळिच उभा पाहीं । नेदी कोणासि देऊं कांहीं ॥ ३ ॥

आंगीं भरते ती मोठी बलाढ्य असते. मग असल्या वेड्यापुढें धर्मनीति सांगणें काय उपयोगी आहे ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अखेरीस यमदंडाचे घाव आंगावर बसले म्हणजे आपल्या वागणुकीचें स्वरूप त्यांना कळून येईल ४. [१३४१]

हरीच्या प्राप्तीचें भक्ति हें चांगलें वर्म भाविक लोकांना सांपडलें म्हणून त्याचेंच सेवन, मोठ्या कौतुकानें तृप्त होईतोंपर्यंत, ते करितात १. ते जशी इच्छा करतील तसा त्यांच्या छंदानें देव नाचतो आणि त्या देवाचीं सुकुमार पावलें भाविक वंदन करितात २. त्या भाविकांना भक्तीचा अभिलाष असल्यामुळें ते मुक्तीला विसरले आणि तें भक्तिसुखच त्याचेबरोबर ओढीनें आलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांना कांहीं मागण्याची इच्छा नसते त्यांच्याजवळ पांडुरंग राहातो व त्यांस तो कधीं विसंबत (विसरत) नाहीं ४. [१३४२]

हरि हा कायावाचामनानें भक्तांच्या बरोबर राहातो आणि त्यांचीं सर्व कामें त्यांनीं न सांगतां करतो १. तो त्यांच्या संकुचित हृदयस्थळीं राहातो आणि लहानशा सगुण रूपानें बाहेर त्यांच्या समोर उभा राहातो २. भक्त कांहीं मागतील काय म्हणून तो त्यांचे मुखाकडे पाहातो आणि त्यांनीं आपल्या मनांत कांहीं इच्छा धरल्यास ती तो तात्काळ पुरवितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, भक्त आपला जीवभाव देवाचे पायीं अर्पण करून ते त्याच्याजवळ कांहींहि मागत नाहींत ४. [१३४३]

हरीचे नामरूपी परमामृतानें ज्याची जिव्हा ओली झाली आहे आणि ज्याच्या मनाची वृत्ति देवाच्या पायीं राहिली आहे १. त्या ठिकाणीं सर्व मंगलाची प्राप्ति झाली आहे व आनंदाश्रु वाहात आहेत २. आतां त्याचीं सर्व इंद्रियें ब्रह्मरूप झालीं, कारण त्यांमध्यें भगवंताचें रूप ओतून भरल्यासारखें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा भक्तराज ज्या ठिकाणीं राहातो त्या ठिकाणीं प्रत्यक्ष देव नांदत आहे, ह्यांत संशय नाहीं ४. [१३४४]

मी दुसऱ्याचे गुणदोष कशाला पाहूं ? माझ्यापाशीं ते कांहीं कमी आहेत काय ? १. मी दुसऱ्याचें पापपुण्य कशास पाहूं ? त्याची काय मजपाशीं उणीव आहे ? २. कोणाचा नष्टपणा व दुष्टपणा वर्णन करूं ? त्यापेक्षां अणुभर माझेपाशीं जास्तीच आहे ३. कुचर व खोटा माझ्याहून जास्ती कोण आहे म्हणून त्यास मी आपले डोळ्यांनीं पाहूं ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा, अवगुणांचें भांडवल माझ्यापाशीं पूर्ण आहे तें मीं तुला समर्पण केलें आहे ५. [१३४५]

अरे, तुझ्याजवळ काळ नेहमीं उभा आहे, तो तुला माहीत नाहीं. तो अखेरीस तुझ्या डोळ्यांवर झांपड घालील व कानांत खुंट्या मारील [तुला न ऐकूं येण्यासारखें करील] १. ह्याकरितां हुशारीनें तूं आपल्या ठिकाणीं सावध राहा कसा! २. तुझ्याजवळच काळ नेहमीं उभा आहे, म्हणून तूं कांहीं अखेरीस दान करशील तर तो कांहीं कोणाला तुझ्याकडून

काळें पुरविली पाठी । वरुषें झालीं तरी साठी ॥ ४ ॥ काळ भोंवताला भोंवे । राम येऊं नेदी जिव्हे ॥ ५ ॥ तुका म्हणे काळा । कर्म मिळतें तें जाळा ॥ ६ ॥ [१३४६]

दुष्ट भूषण सज्जनाचें । अलभ्य लाभ पुण्य त्याचें ॥ १ ॥ धन्य ऐसा परउपकारी । जाय नरका आणिकां वारी ॥ २ ॥ मळ खाये संवदणी । करी आणिकांची उजळणी ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याचा । प्रीति आदर करा साचा ॥ ४ ॥ [१३४७]

साहोनियां टाकी घाये । पाषाण देवचि झाला पाहें ॥ १ ॥ तया रीतीं दृढ मन । करीं साधाया कारण ॥ २ ॥ बाण शस्त्र साहोनि गोळी । शूरा ठाव उंच स्थळीं ॥ ३ ॥ तुका म्हणे सती । अन्न देखे ज्या रीती ॥ ४ ॥ [१३४८]

तेणें वेशें माझीं चोरिलीं अंगें । मानावया जग आप्तपणें ॥ नाहीं चाड भीड संसाराचें कोड । उदासीन सर्व गुणें ॥ भय मोह लज्जा निरसली शंका । अवघियां एकचि पणें ॥ विठ्ठलाच्या पायीं बैसोनि राहिलीं । भागलीं त्रुटित तेणें ॥ १ ॥ आतां त्यासीं काय चाले माझें बळ । झालोंसें दुर्बळ सत्वहीन ॥ दग्ध पट दिसे संगति (संगीत) बरवंट । काय त्याचें कारण ॥ २ ॥ आळस दृष्टी न पाहे आपुलें । एकचि देखिलें सर्वरूप ॥ मानामान तेथें खुंटोनि राहिले । पिशुन तो कोण बाप ॥ ज्योति ना अंधार अवघा एकंकार । तेथें काय पुण्यपाप ॥ विठ्ठलावांचुनि कांहींच नावडे । वेगळाल्या भावें रूप ॥ ३ ॥ बळ बडिवार लौकिक वेव्हार । गेली आशा तृष्णा माया ॥ सुखदुःखाची वार्ता नाइके ।

देऊं देणार नाहीं. [म्हणजे दानाविषयींची बुद्धि उत्पन्न होऊं देणार नाहीं] ३. तुझे देहाला जरी साठ वर्षें झालीं तरी तुझी काळानें पाठ पुरविली आहे ४. तुझ्या भोंवतीं काळ नेहमीं फिरत आहे, तो तुझे जिव्हेनें रामनाम येऊं देणार नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, असें तुझें वाईट कर्म आहे, कीं तें काळाला साह्य होत आहे. त्याचें तूं हरिनामाचे योगानें दहन कर ६. [१३४६]

वाईट लोक हे सज्जनांचें भूषणच आहे, कारण ते सज्जनांची निंदा करितात. त्या योगानें त्यांच्या ठिकाणीं असलेलें पुण्य सज्जनांस मिळतें व सज्जनांचें पाप त्यांस मिळतें. ह्यालाच त्यांचे पुण्याचा अलभ्य लाभ होतो असें म्हटलें आहे १. अशा प्रकारें दुसऱ्यावर उपकार करणारे जे ते दुसऱ्यास निष्पाप करून आपण नरकास जातात (धन्य त्यांची !) २. सौंदणी (परटाची कपडे धुण्याची दोण) वस्त्रांचा मळ घेऊन तीं वस्त्रें स्वच्छ करते ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे जे दुष्ट, त्यांचा खरोखर प्रीतीनें आदर करा (त्यांना मोठेपणा द्या) ४. [१३४७]

पाहा, टाकीचे घाव सहन करून दगड हा देवपणास आला १. त्याप्रमाणें आपलें कार्य साधण्याकरितां मन बळकट ठेव २. बाण-शस्त्रांचे घांव व गोळीचा मारा सहन केल्यानें शूराला उच्च पदवी मिळते ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें सती ही (सहगमन करतांना) अग्नीची पर्वा करीत नाहीं त्याप्रमाणें (साधकानें मोक्षरूपी कार्य साधण्याकरितां दुष्टांच्या निंदा-द्वेषांचे आघात निर्विकार वृत्तीनें सहन करावेत) ४. [१३४८]

श्रीहरीच्या स्वरूपवेषानें माझ्या स्थूल-सूक्ष्म देहांचें हरण केलें, कारण मी सर्व जगत् आप्त मानावें. आतां मला कशाची इच्छा व भीड आणि संसाराचें कौतुकहि नाहीं. सर्वांविषयीं मी उदासीन आहें. माझ्यांतील भय, मोह, लज्जा व संशय ह्या सर्वांचा निरास झाला आहे आणि सर्व कांहीं मला एकच झालें आहे. सर्वच इंद्रियें विषयसंगतीनें दमल्यामुळें तीं विठोबाच्या पायीं विश्रांतीस पावलीं तीं आतां तेथून हालत नाहींत १. आतां ह्या इंद्रियांचे ठिकाणीं माझी कांहीं शक्ति चालत नाहीं. तीं इंद्रियें विषयांकडे आणण्याची मला शक्ति राहिली नाहीं. जळलेल्या वस्त्राची घडी जशीच्या तशी दिसते परंतु त्याचा कांहीं उपयोग नाहीं (माझे देह ज्ञानाची बाधा झाल्यामुळें कोणतेंहि कार्य करण्यास समर्थ राहिले नाहींत.) २. मी पूर्वीचा प्रापंचिक पसारा आळसदृष्टीनें देखील पाहात नाहीं. फक्त एक परमात्मस्वरूप भासत आहे. ह्या स्थितीमध्यें मान व अपमान हीं सर्व नाहींशीं झालीं. तेथें बाप आदिकरून शरीरसंबंध्यांची काय किंमत आहे ? ज्या स्थितींत प्रकाश व अंधार ही कल्पना नाहीं, सर्व कांहीं एक ज्ञान मात्र आत्मतत्त्वच आहे; तेथें पापपुण्य ह्या कल्पना कोठून असतील ? भिन्न भिन्न रूपेंहि एका विठ्ठलस्वरूपाहून निराळीं भासत नाहींत ३. बळाचा मोठेपणा व लौकिक व्यवहारादि आशा, तृष्णा, माया, हीं सर्व नाहींशीं झालीं. तुकाराम महाराज म्हणतात, सुखदुःखाची गोष्ट देखील

अंतरलों दुरी तया । मीनूंपणा निष्काम होऊनि । राहिलों आपुलिया टाय ठायां ॥ तुजविण आतां मज नाहीं कोणी । तुका म्हणे देवराया ॥ ४ ॥ [१३४९]

कथा पुराण ऐकतां । झोंपें नाथिलें तत्त्वतां । खाटेवरि पडतां । व्यापी चिंता तळमळी ॥ १ ॥ ऐसी गहन कर्मगति । काय तयासी रडती । झाले जाणते जे चित्तीं । कांहीं नेघे आपुल्या ॥ २ ॥ उदक लाविता न धरे । चिंता करी केव्हां सरे । जाऊं नका धीरें । म्हणे करितां ढवाळ्या ॥ ३ ॥ जवळी गोचिड क्षीरा । जैशी कमळणी दर्दुरा । तुका म्हणे दुरा । देशत्यागें तयासी ॥ ४ ॥ [१३५०]

संदेह बाधका आपआपणातें । रज्जुसर्पवत भासतसे ॥ भेऊनियां काय देखिलें येणें । मारें घायेंविण लोळतसे ॥ १ ॥ आपणाचि तारी आपणचि मारी । आपण उद्धरी आपणया ॥ शुकनळिकेन्यायें गुंतलासी काय । विचारुनि पाहें मोकळिया ॥ २ ॥ पापपुण्य कैसे भांजिले अंक । दशकाचा एक उरविला ॥ जाणोनियां काय होतोसि नेणता । शून्य टाव रिता नाहीं नाहीं ॥ ३ ॥ दुरा दृष्टी पाहें न्याहाळुनि । मृगजळा पाणी न म्हणे चाडा ॥ धांवतांचि फुटे नव्हे समाधान । तुका म्हणे जाण पावे पीडा ॥ ४ ॥ [१३५१]

कथे उभा अंग राखेल जो कोणी । ऐसा कोण गणी तया पापा ॥ १ ॥ येथें तो पातकी न येतांच भला । रणीं कुचराला काय चाले ॥ २ ॥ कथे बैसोनी आणीकाची(आणीक) चर्चा ।

ऐकण्यांत येत नाहीं, इतका मी त्यांच्यापासून दुरावलों गेलों. मी व तूं ह्या भावनेपासून मी मुक्त झालों आहें व आपले स्वरूपस्थितींतच राहिलों आहें. हे देवराया, आतां मला तुझेवांचून कोणी नाहीं ४. [१३४९]

हरीची कथा आणि पुराण ऐकण्याचे वेळीं मी निद्रेनें व्यापला जातों; आणि घरीं रात्रीच्या वेळीं खाटेवर पडलों असतां अनेक प्रकारच्या चिंतेनें हृदय तळमळत असतें १. अशी ही प्रारब्धगति मोठी कठीण आहे. त्याविषयीं ते (हीं पामर माणसें) काय रडतील ? [करतील ?] मोठे ज्ञाते जरी असले तरी ते आपले चित्तांत सद्विचारांचें ग्रहण करीत नाहींत. २. कथेंत झोंप येत असतां त्याचे डोळ्यांस कोणी पाणी लावलें तरी ती जात नाहीं, म्हणून तो आपले मनांत कथा केव्हां संपेल अशी चिंता करीत असतो. आपले स्नेह्यासहवर्तमान दुसऱ्याच्या टवाळ्या करीत असतां तेथून कोणी उठून जाऊं लागला तर त्याचा हात धरून खालीं बसवितो आणि जाऊं नको म्हणतो ३. गोचीडहि दुधानें भरलेल्या गाईचे स्तनास चिकटलेला असतो परंतु दूध पीत नाहीं तर रक्ताचें सेवन करतो; अथवा जसें ज्या चिखलांत कमळाचा कांदा असतो, तेथेंच जवळ बेडूक असतो, परंतु त्याला कमळांतील परागाचा लाभ नसतो. तुकाराम महाराज म्हणतात, तसें तो मूर्ख कथेमध्यें असून त्याला कथेचा लाभ नाहीं. तो देशत्याग करून दूर गेल्यासारखा आहे ४. [१३५०]

दोरीवर सर्पाप्रमाणें जें कांहीं भासतें हा संशय आपला आपणालाच बाधक होतो. त्या ठिकाणीं भिऊन काय उपयोग आहे ? कारण त्याचे खरोखर पाहाण्यांत काय आलें ? (त्यानें खरा सर्प पाहिला असतो काय ?) तर हें मार लागल्यावांचून तळमळल्यासारखें आहे १. जन हे आपणच आपला तरणोपाय विचारानें करतात व अविचारानें आपण आपल्यास मारितात; म्हणून आपला आपणच उद्धार करावा. राघू भ्रमानें जसा नळिकेच्या ठिकाणीं गुंतून पडतो त्याप्रमाणें ह्या देहादि प्रपंचाचे ठिकाणीं तूं आत्मबुद्धीनें गुंतला आहेस. आपल्या स्वरूपाचा विचार करून पाहाशील तर तूं मुक्तच आहेस, असें तुला दिसून येईल २. पापपुण्याची वजावाट केली असतां बाकी राहिलें शून्य. जसें दहावरचें शून्य पुसलें असतां बाकी एकाचा आंकडा राहातो, तसें पापपुण्याचे वजावाटीनंतर जें शून्य राहातें तें आकाशासारखें पोकळ नसून केवळ ज्ञानानें भरलेलें असतें. अशी ही अवशिष्ट स्थिति (निर्विशेष आत्मा) तुला ठाऊक असून तूं बळानेंच मूर्ख कां होतोस ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, बारकाईनें व दूरदृष्टीनें पाहा. गरजवंत बुद्धीनें मृगजल हें पाणी आहे असें समजूं नको. मृगजलाच्या ठिकाणीं सत्यबुद्धीनें हरिण हा धांव घेतो. त्या योगानें छाती फुटून तो अति दुःखित होतो ! (त्याप्रमाणें विषयरूपी मृगजलाचे मागें लागल्यानें दुःखच होतें. सुख मिळत नाहीं हें लक्षांत ठेवावें) ४. [१३५१]

जर कोणी कथेला उभा राहून भजनाला कसूर करील तर त्याच्या पापाची गणती करणारा असा कोण आहे ? १. अशा प्रकारचा पातकी कथेमध्यें न आला तर बरें ! जसें लढाईच्या वेळेला कुचर मनुष्य काय उपयोगी ? (तसा कथेंत [illegible] उपयो[illegible] नाहीं.) २. कथेमध्यें बसून जो कोणी दुसऱ्याच्या गोष्टी सांगतो त्याच्या वाणीस धिक्कार असो,

धिग त्याची वाचा कुंभ(भी)पाक ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐलपैल ते थडीचे । बुडतील साचे मध्यभागीं ॥ ४ ॥ [१३५२]

नावडे ज्यां कथा उठोनियां जाती । ते यमा फावती बरे वोजा ॥ १ ॥ तो असे जवळी गोचिडाच्या न्यायें । देशत्यागें ठाय तया दुरी ॥ २ ॥ नव्हे मला कोणी नावडे दुसरा । पाहुणा किंकरा यमा होय ॥ ३ ॥ तुका म्हणे तया करावें तें काई । पाषाण कां नाहीं जळामध्यें ॥ ४ ॥ [१३५३]

जवळीं नाहीं चित्त । काय मांडियेलें प्रेत ॥ १ ॥ कैसा पाहे चंद्री दृष्टी । दीप स्नेहाच्या शेवटीं ॥ २ ॥ कांतेलेसें श्वान । तैसें दिशा हिंडे मन ॥ ३ ॥ त्याचे कानीं हाणे । कोण बोंब तुका म्हणे ॥ ४ ॥ [१३५४]

दुर्बळा वाणीच्या एक दोनि सिद्धि । सदैवां समाधि विश्वरूपीं ॥ १ ॥ काय त्याचें वायां गेलें तें एक । सदा प्रेमसुख सर्व काळ ॥ २ ॥ तीर्थ देव दुरी तया भाग्यहीना । विश्व त्या सज्जना दुमदुमिलें ॥ ३ ॥ तुका म्हणे एक वाहाती मोळिया । भाग्यें आगळिया घरा येती ॥ ४ ॥ [१३५५]

परिमळें काष्ठ ताजवां तुळविलें । आणीक नांवांचीं थोडीं ॥ एक तीं कांतिवें उभविलीं धवलारें । एकाचिया कुडमेडी ॥ एक दीनरूप आणिती मोळिया । एक ते बांधोनि माडी । अवघियां बाजार एकचि जाला । मां विकलीं आपुलाल्या पाडीं ॥ १ ॥ गुण तो सार रूपमध्यकार । अवगुण तो फार

ती नरकरूप जाणावी (त्याला कुंभीपाक नरक प्राप्त होतो) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी भवनदीच्या अलीकडच्या कडेचे जड जीव अथवा पलीकडच्या कडेचे ज्ञानाभिमानी असतील आणि वर सांगितल्याप्रमाणें वागतील तर ते खरोखर नदीच्या मध्यभागींच बुडतील ४. [१३५२]

जे कोणी हरीची कथा आवडत नाहीं म्हणून उठून जातील ते यमाच्या हातीं व्यवस्थित अचूक सांपडतील १. जो मनुष्य कथेच्याजवळ आहे, पण जसें गोचीड गाईच्या स्तनास चिकटलेला असून त्यास दुधाचा लाभ नाहीं तसा त्या मनुष्याला कथेचा लाभ नसून तो दूर देशांत गेल्याप्रमाणें आहे (तो उलट त्या जागेला सोडून दूर जाऊन बसतो) २ तो मनुष्य चांगला नव्हे व दुसरा कोणी चांगला त्याच्या जवळ आला तर तोहि त्याला आवडत नाहीं, असा जो तो यमदूतांचा पाहुणा होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा मनुष्याला काय बरें करावें ? पाण्यामध्यें पुष्कळ दगड नाहींत काय ? (त्यांतलाच तो. हरिकथेंत बसून तो कोरडाच राहातो) ४. [१३५३]

कथेमध्यें बसून चित्त जर तेथें नसेल तर तो मनुष्य प्रेतवत् आहे असें समजावें १. जसा तेल सरते वेळीं दिव्याचा प्रकाश एकाएकीं मोठा व लहान होतो तसा तो (कथेंतील प्रतिपाद्य विषय न समजल्यामुळें) मृत्युप्रसंगीं होणाऱ्या तारवटलेल्या दृष्टीनें पाहातो २. जसें पिसाळलेलें कुत्रें चोहोंकडे धांवतें तसें ह्याचें मन दशदिशांना धांवतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा मनुष्याचे कानीं कोणीं बोंब मारावी ? (त्याला काय उपयोग होणार ?) ४. [१३५४]

जे कोणी सिद्धीविषयीं अनुष्ठान करून (योगाभ्यासाचे कष्ट करून) अल्प अशा एकदोन सिद्धि मिळवितात ते गरीब आहेत, आणि विश्वरूप परमात्म्याच्या ठिकाणीं जे समाधिस्थ झाले आहेत ते दैववान् आहेत १. त्यांचें कांहींएक व्यर्थ न जातां सदा सर्व काळ ते श्रीहरीचें प्रेमसुख भोगतात २. जे भक्तिभाग्यहीन आहेत त्यांची कल्पना आपल्यापासून देव व तीर्थें दूर आहेत अशी होते आणि जे कोणी सज्जन आहेत, ते सर्व विश्वांत देव ओतप्रोत भरलेला आहे असें पाहातात. तुकाराम महाराज म्हणतात, कित्येक लांकडाच्या मोळ्या डोकीवर वाहून पोट भरतात व कित्येकांना कष्ट न करतां मोठे लाभ घरीं बसल्या होतात. (त्याप्रमाणें योग्यापेक्षां ज्ञानी भक्त भाग्यवान् असतो. त्याला विनासायास सर्व कांहीं मिळतें) ४. [१३५५]

लांकूड या दृष्टीनें सर्व लांकडें एका जातीचीं असून गुणावगुणांच्या योगानें त्यांचें वेगळालें मोल होतें तें येणेंप्रमाणें : चंदनाचे काष्ठास सुगंध गुण असल्यामुळें ताजव्यानें वजन करून त्याची किंमत करितात. इतर काष्ठ या नांवाचीं थोडीं आहेत काय ? कांहीं लांकडांचीं कातून उत्तम प्रकारचीं घरें करितात व कांहीं लांकडांच्या कूड घालण्यास मेढी करितात. कांहीं लांकडांच्या मोळ्या बांधून थोड्या किंमतीस विकतात व कांहीं माडी बांधण्याचे उपयोगी पडतात. अशा प्रकारचीं हीं लांकडें एकाच बाजारामध्यें आलीं असतां तीं आपापल्या किमतीनेंच विकलीं जातात १. येथें गुण हें

पीडीतसे ॥ २ ॥ एक गुणें आगळे असती । अमोलय नांवांचे खडे ॥ एक समर्थ दुर्बळा घरीं । फार मोलाचे थोडे ॥ एक झगझग करिती वाळवंटीं । कोणी न पाहाती तयांकडे ॥ सभाग्य संपन्न आपुलाले परी । मा येक दैन्यवाणें बापुडें ॥ ३ ॥ एक नामें रूपें सारिख्या असती । अनेक प्रकार याती । ज्याचिया संचितें जैसें आलें पुढें । तयाची तैसीच गति । एक उंचपदीं बैसोनि सुखें । दास्य करवी एका हातीं ॥ तुका म्हणे कां मानिती सुख । चुकलिया वायां खंती ॥ ४ ॥ [१३५६]

नाहीं आम्हां शत्रु सोयरे पिशुन । दाटलें हें घन माहियेर ॥ १ ॥ पाहें तेथें पांडुरंग रखुमाई । सत्यभामा राही जननिया ॥ २ ॥ लज्जा भय कांहीं आम्हां चिंता नाहीं । सर्वसुखें पायीं वोळंगती ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हीं सदैवाचीं बाळें । झालों लडिवाळें सकळांचीं ॥ ४ ॥ [१३५७]

गर्भी असतां बाळा । कोण पाळी त्याचा लळा ॥ १ ॥ कैसा लाघवी सूत्रधारी । कृपाळुवा माझा हरी ॥ २ ॥ सर्प पिलीं वितांचि खाय । वांचलिया कोण माय ॥ ३ ॥ गगनीं लागला कोसरा । कोण पुरवी तेथें चारा ॥ ४ ॥ पोटीं पाषाणाचे जीव । कवण जीव त्याचा भाव ॥ ५ ॥ तुका म्हणे निश्चळ राहें । होईल तें सहज पाहें ॥ ६ ॥ [१३५८]

न म्हणे कवणा सिद्ध साधक गव्हार । अवघा विश्वंभर वांचूनियां ॥ १ ॥ ऐसें माझे बुद्धि काया वाचा मन । लावीं तुझें ध्यान पांडुरंगा ॥ २ ॥ गातां प्रेमगुण शंका माझ्या मनीं । नाचतां रंगणीं नाठवावीं ॥ ३ ॥ देईं चरणसेवा भूतांचें भजन । वर्ण अभिमान सांडूनि ॥ ४ ॥ आशापाश माझी तोडीं माया चिंता । तुजविण व्यथा नको कांहीं ॥ ५ ॥ तुका म्हणे सर्व

सार (उत्तम) आहे व सुरूपता ही मध्यम आहे आणि अवगुण हा फार पीडादायक असल्यामुळें तो कनिष्ठ आहे २. खड्यांच्या जातींमध्यें (हिरे, माणिक, पाचू असे) गुणवान् खडे जे आहेत ते अमोलिक असतात. ते श्रीमंतांचे घरीं असतात. असे बहुत किंमतीचे खडे गरिबाच्या घरीं क्वचितच असतात. त्याचप्रमाणें वाळवंटामध्यें गारगोटीचे खडे पुष्कळ असून सूर्याचे प्रकाशानें चकाकतात पण त्यांच्याकडे कोणीहि पाहात नाहीं. भाग्यसंपन्नता आपापल्या परीनें असते पण कित्येक गरीब दीन असतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, कित्येक नांवानें व रूपानें एकसारखे असतात परंतु त्यांत अनेक प्रकारच्या जाती असतात; पूर्वीचे ज्याचें जसें संचित कर्म असेल त्याप्रमाणें त्यांना चांगली–वाईट गति पुढें मिळते. एक सुखानें उच्च पदावर बसून एकाचे (दुसऱ्याचे) हातून सेवा घेतो. ह्यामध्यें हे लोक सुख आहे असें कां मानतात आणि तेंच सुख नाहींसें झाल्यावर व्यर्थ तळमळ कां करितात? (हें कांहीं कळत नाहीं) ४. [१३५६]

आम्हांला जिकडे तिकडे माहेर (पांडुरंग) घनदाट भरलेलें दिसतें. त्या योगानें कोणी सोयरे, कोणी दायाद, कोणी शत्रु असे उरले नाहींत १. जिकडे मी पाहातों तिकडे पांडुरंग, रखुमाई, सत्यभामा, राही हीं मायबापच दिसतात २. त्या कारणानें लाज, भय, चिंता आम्हांस कांहीं नाहीं. सर्व सुखें आमचा आश्रय करतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही दैववान् विठोबारायाचीं बालकें झालों आहोंत, म्हणून आम्ही सर्वांचे लाडके आहोंत ४. [१३५७]

आईच्या गर्भामध्यें जें बालक असतें त्याचे लाड कोण पुरवितो? १. माझा कृपाळु हरि कशा प्रकारचा सूत्रधारी व कुशल आहे तें पाहा २. सर्पीण आपलीं पिलें उत्पन्न झाल्याबरोबर खाते, त्यांना तिच्या तडाक्यांतून वांचविणारी आई कोण आहे? (देव) ३. कोष्टी (कोळी) ह्या जातीचा किडा आपले अंगांतील तंतूंचें घर उंच स्थानीं (आकाशांत) करून त्यामध्यें राहातो त्याला चारा कोण पुरवितो हें पाहा ४. जमिनीमध्यें खोल असणाऱ्या एखाद्या दगडाचे पोटांत बेडूक असतो त्याचा जीव जगविणारा कोण आहे? ५. तुकाराम महाराज म्हणतात, अहो जन हो, तुम्ही निवांत राहून देवाच्या सत्तेनें ज्या वेळीं जें होईल तें सहजगतीनें पाहा ६. [१३५८]

सर्व ठिकाणीं विश्वंभराची व्याप्ति आहे म्हणून त्याच्याखेरीज मी कोणाला सिद्ध व साधक व मूर्ख असें म्हणणार नाहीं १. पांडुरंगा, अशा प्रकारचें माझ्या बुद्धीला व कायावाचामनाला तुझेंच ध्यान लाव २. हरीच्या प्रेमानें त्याचे गुण गातांना व त्या छंदानें हरिरंगीं नाचताना माझे मनास शंका येऊं नये ३. वर्णाभिमानाचा विसर होऊन सर्वांभूतीं भगवंत आहे अशा भावनेनें मला भजन घडावें. अशा प्रकारच्या तुमच्या चरणसेवेची देणगी मला द्या. ४. माझे सर्व आशेचे पाश तोडून चिंता व माया हीं नाहींशीं करा आणि तुमचेवांचून दुसरी व्यथा माझे जीवाला नको (तुमचेविषयींची माझे

भाव तुझे पायीं । राहे ऐसें देईं प्रेम देवा ॥ ६ ॥ [१३५९]

अग्निमाजी गेलें । अग्नि होऊन तेंच ठेलें ॥ १ ॥ काय उरलें तया पण । मागिल तें नाम गुण ॥ २ ॥ लोह लागे परिसा अंगीं । तोही भूषण जाला जगीं ॥ ३ ॥ सरिता ओहळा ओघा । गंगे मिळोनि जाल्या गंगा ॥ ४ ॥ चंदनाच्या वासें । तरु चंदन जाले स्पर्शे ॥ ५ ॥ तुका जडला संतां पायीं । दुजेपणा ठाव नाहीं ॥ ६ ॥ [१३६०]

ऐशा भाग्यें ज्यालों । तरी धन्य जन्मा आलों ॥ १ ॥ रुळें तळील पायरी । संत पाय देती वरी ॥ २ ॥ प्रेमामृतपान । होईल चरणरजें स्नान ॥ ३ ॥ तुका म्हणे सुखें । तया हरतील दुःखें ॥ ४ ॥ [१३६१]

करितां या सुखा । अंतपार नाहीं लेखा ॥ १ ॥ माथां पडती संतपाय । सुख कैवल्य तें काय ॥ २ ॥ ऐसा लाभ नाहीं । दुजा विचारितां कांहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे गोड । तेथें पुरे माझें कोड ॥ ४ ॥ [१३६२]

वेद जया गाती । आम्हां तयाची संगति ॥ १ ॥ नाम धरियेलें कंठीं । अवघा सांठविला पोटीं ॥ २ ॥ ॐकाराचें बीज । हातीं आमुचें तें निज ॥ ३ ॥ तुका म्हणे बहु मोटें । अणुरेणुयां धाकुटें ॥ ४ ॥ [१३६३]

तुम्ही तरी वो श्रीपती । माझी बहु हीन याती ॥ १ ॥ दोघे असों एके ठायीं । माझा माथा तुझे पायीं ॥ २ ॥ माझ्या दीनपणा पार । नाहीं बहू तूं उदार ॥ ३ ॥ तुका म्हणे पांडुरंगा । मी ओहोळ तूं गंगा ॥ ४ ॥ [१३६४]

मी याचक तूं दाता । काय सत्य पाहों आतां ॥ १ ॥ म्यां तों पसरिला हात ।

ठिकाणीं आवड असूं द्या) ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, माझे सर्व भाव तुझ्या पायांजवळ राहातील असें तुमच्याविषयींचें प्रेम मला द्या ६. [१३५९]

जो पदार्थ अग्नींत टाकावा तो अग्निरूप होऊन राहातो १. मग त्या पदार्थाचें पूर्वीचें नाम व गुण हे उरतात काय? २. लोखंड परिसाला लागलें म्हणजे (त्याचें सोनें होतें व) तें जगतामध्यें भूषण होतें ३. नद्या, ओढे, नाले हे गंगेला मिळाल्यानें ते गंगारूप होतात ४. चंदनाचे सुगंधगुणस्पर्शानें सभोंवतालचे वृक्ष चंदनरूप होतात ५. तुकाराम महाराज म्हणतात, मी संतांच्या चरणीं अनन्य झालों आहें. त्या योगानें माझ्या ठिकाणीं द्वैताला (संतांत आणि माझ्यांत भेदाला) थारा राहिला नाहीं ६. [१३६०]

(ध्रुवपदांत दर्शविलेल्या) अशा भाग्यानें माझें जगणें झालें तरच जन्माचें सार्थक १. सर्वांच्या खालचे पायरीनें राहाणें हें बरें, कारण तिच्यावर संत पाय देतील २. संतसमागमानें श्रीहरीच्या प्रेमाचें पान होईल व संतचरणरजानें स्नान होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या सुखानें सर्व दुःखें नाहींशीं होतील ४. [१३६१]

(ध्रुवपदांत दर्शविलेल्या) ह्या सुखाच्या अंतपाराची मोजदाद होत नाहीं १. मस्तकावर संतचरण पडत आहेत. त्याचेपुढें कैवल्यसुखाची किंमत काय आहे? (माझें मस्तक संतांच्या पायांना अनन्यभावानें नमस्कार करील, तर मला कैवल्यसुख मिळणें काय अशक्य आहे?) २. विचार केला असतां अशा प्रकारचा लाभ त्रैलोक्यांतहि नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें फार गोड आहे व तेथें (संतांजवळ) माझी इच्छा पूर्ण होते. ४. [१३६२]

वेद ज्याची कीर्ति वर्णन करीत आहेत, त्याची संगति आम्हांला आहे १. त्याचें नाम आम्हीं कंठामध्यें धरलें आहे आणि त्याला आम्हीं संपूर्ण हृदयामध्यें सांठविलें आहे २. ॐकाराचें बीजभूत जें निजस्वरूप (हरि) तें आमचे हातामध्यें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तें स्वरूप फार मोटें असून अणुपरमाणूपेक्षांहि लहान आहे ४. [१३६३]

तुम्ही लक्ष्मीचे पति आहांत व मी फार कमी जातीचा आहें १. आपण दोघे एका ठिकाणीं आहोंत, म्हणून माझें मस्तक तुमचे चरणांवर आहे २. माझ्या दीनपणास पार नाहीं व तूं फार उदार आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, मी ओढा असून तूं पवित्र गंगा आहेस ४. [१३६४]

देवा, मी याचक आहें व तूं दाता आहेस. आतां खरें काय तें पाहूं १. मीं तुमच्यापुढें हात पसरला आहे.

करीं आपुलें उचित ॥ २ ॥ आम्ही घ्यावें नाम । तुम्हां समाधान काम ॥ ३ ॥ तुका म्हणे देवराजा । वाद खंडीं तुझा माझा ॥ ४ ॥ [१३६५]

तुझे पोटीं ठाव (वाव)। व्हावा ऐसा माझा भाव ॥ १ ॥ करीं वासनेसारिखें। प्राण फुटे येणें दुःखें ॥ २ ॥ अहंकार खोटे । वाटे श्वापदांचीं थाटें (श्वापदांचे थाटे) ॥ ३ ॥ तुका म्हणे आई। हातीं धरूनि संग देई ॥ ४ ॥ [१३६६]

दारीं परोवरी । कुडीं कवाडीं मी घरीं ॥ १ ॥ तुमच्या लागलों पोपणा । अवघे ठायीं नारायणा ॥ २ ॥ नेदीं खावूं जेवूं । हातींतोंडीचेंही घेऊं ॥ ३ ॥ तुका म्हणे अंगीं । जडलों ठायींचा सलगी ॥ ४ ॥ [१३६७]

मज कोणी कांहीं करी । उमटे तुमचे अंतरीं ॥ १ ॥ व्याला वाढविलें म्हूण । मज सुख तुज सीण ॥ २ ॥ माझें पोट धालें। तुझे अंगीं उमटलें ॥ ३ ॥ तुका म्हणे खेळें। तेथें तुमचिया बळें ॥ ४ ॥ [१३६८]

जोडोनियां कर । उभा राहिलों समोर ॥ १ ॥ हेंचि माझें भांडवल । जाणे कारण विठ्ठल ॥ २ ॥ भाकितों करुणा । आतां नुपेक्षावें दीना ॥ ३ ॥ तुका म्हणे डोई । ठेवीं वेळोवेळां पायीं ॥ ४ ॥ [१३६९]

आम्हीं घ्यावें तुझें नाम । तुम्हीं आम्हां द्यावें प्रेम ॥ १ ॥ ऐसें निवडिलें मुळीं । संतीं बैसोनि सकळीं ॥ २ ॥ माझी डोई पायांवरी । तुम्हीं न धरावी दुरी ॥ ३ ॥ तुका म्हणे कला । खंड दोघांचा विठ्ठला ॥ ४ ॥ [१३७०]

वारिलें लिगाड । बहु दिसांचें हें जाड ॥ १ ॥ न बोलवे ऐसें केलें । कांहीं वाउगें तितुलें ॥ २ ॥

आमच्या इच्छेप्रमाणें देणगी देणें, हें तुम्ही आपलें योग्य कर्तव्य करा २. आम्हीं तुझें नांव घ्यावें व तुम्हीं आमचें समाधान करावें हें तुमचें कर्तव्य आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवराया, तुम्ही आपलें योग्य कर्तव्य बजावून तुमच्या-आमच्यामधील वाद नाहींसा करा ४. [१३६५]

हे देवा, तुझे पोटामध्यें आम्हांला आश्रय मिळावा अशी आमची वासना आहे १. आमच्या ह्या वासनेप्रमाणें तूं देणगी दे, कारण या तुझ्या वियोगदुःखानें आमचा प्राण व्याकुळ होत आहे २. ह्या संसारमार्गांत अहंकारादि श्वापदांचे मोठे वाईट समुदाय आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठाबाई आई, तूं आमचे हाताला धरून आपली संगति दे ४. [१३६६]

द्वारांत, घरांत अगर कुडाचे दारांत अगर कुडाचेच घरांत, जेथें तुम्ही असाल, तेथें मी आहें १. हे नारायणा, सर्व ठिकाणीं माझ्या पोषणाचें काम तुमचे मागें लागलें आहे २. तोंडांत घातलेला व हातांत घेतलेला घांस (मला दिल्यावांचून) तुम्हांला खाऊं देणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मूळच्या सलगीनें मी तुमच्या अंगीं चिकटलों आहें ४. [१३६७]

हे देवा, मला कोणीं सुखदुःख दिलें, तर त्याचा परिणाम तुमचे अंतःकरणांत होतो १. कारण तुम्ही आम्हांला जन्म दिलात व वाढविलेंत म्हणून (तुमच्या आधारावर) आम्हांला सुख होऊन तुम्हांला (माझ्या पालन-पोषणाच्या कष्टामुळें) दुःख होतें (कष्ट पडतात) २. माझें पोट भरलें, तर त्या तृप्तीचा आनंद तुम्हांला होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या ठिकाणीं आम्ही खेळत आहोंत, त्या ठिकाणीं आम्ही तुमचींच मुलें आहोंत ४. [१३६८]

दोन्ही हात जोडून मी देवाचे समोर उभा राहिलों आहें १. हेंच माझें भक्तीचें परमार्थभांडवल आहे. ह्याचें कारण विठ्ठल देव जाणत आहे २. मी दीन काकुळती येत आहें. आतां माझी उपेक्षा होऊं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी वेळोवेळां तुमचे पायांवर डोकें ठेवीत आहें ४. [१३६९]

देवा, आम्हीं तुमचें नाम घ्यावें व तुम्हीं आम्हांला आपलेविषयींचें प्रेम द्यावें १. असा सर्व संतांनीं बसून पूर्वींच ठराव केला आहे २. मीं आपलें डोकें तुमचे पायांवर ठेविलें आहे, तर तुम्हीं आम्हांला दूर करूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठ्ठला, असा तुमचे-आमचेमधील करार झाला आहे ४. [१३७०]

बहुत दिवसांचे सेवेचें जड झालेलें लचांड दूर केलें (तुमच्या-आमच्यांत भेद-अभेदाचें भांडण फार दिवसांपासून चालू होतें तें तुम्हीं मिटवून टाकलें, हें बरें झालें) १. आतां वाउगें कांहीं बोलूं नये, असें तुम्हीं केलें आहे २.

झाला चौघाचार। गेला खंडोनि वेव्हार ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा। करीन ते घ्यावी सेवा ॥ ४ ॥ [१३७१]

पायरवें अन्न। मग करी खेदक्षीण ॥ १ ॥ ऐसे होती घातपात। लाभेंविण संगें थीत ॥ २ ॥ जन्माची जोडी। वाताहात एके घडी ॥ ३ ॥ तुका म्हणे शंका। हिता आड या लौकिका ॥ ४ ॥ [१३७२]

आम्हां वैष्णवांचा। नेम काया मनें वाचा ॥ १ ॥ धीर धरूं जिवासाठीं। येऊं नेदूं लाभा तुटी ॥ २ ॥ उचित समय। लाज निवारावें भय ॥ ३ ॥ तुका म्हणे कळा। जाणों नेम नाहीं बाळा ॥ ४ ॥ [१३७३]

उल्लंघिली लाज। तेणें साधियेलें काज ॥ १ ॥ सुखें नाचों पैलतीरीं। गेलों भवाचे सागरीं ॥ २ ॥ नामाची सांगडी। सुखें बांधली आवडी ॥ ३ ॥ तुका म्हणे लोकां। उरली वाचा मारी हांका ॥ ४ ॥ [१३७४]

बैसलोंसें दारीं। धरणें कोंडोनि भिकारी ॥ १ ॥ आतां कोठें हालों नेदीं। बरी सांपडली संदी ॥ २ ॥ किती वेरझारा। मागें घातालिया घरा ॥ ३ ॥ माझें मज नारायणा। देतां कां रे नये मना ॥ ४ ॥ भांडावें तें किती। बहु सोसिली फजिती ॥ ५ ॥ तुका म्हणे नाहीं। लाज तुझे अंगीं कांहीं ॥ ६ ॥ [१३७५]

झालों द्वारपाळ। तुझें राखिलें सकळ ॥ १ ॥ नाहीं लागों दिलें अंगा। आड टाकलों मी जगा ॥ २ ॥ करूनियां नीति। दिल्याप्रमाणें चालती ॥ ३ ॥ हातीं दंड काठी। उभा जिवाचिये साठीं ॥ ४ ॥ बळ बुद्धी युक्ती। तुज दिल्या सर्व शक्ती ॥ ५ ॥ तुका म्हणे खरा। आतां घेईना मुशारा ॥ ६ ॥ [१३७६]

चारचौघांची बैठक होऊन तुमच्याआमच्यामधील तंटा मिटला ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मी जी तुमची सेवा करीन ती तुम्हीं मान्य करावी ४. [१३७१]

जेवतांना कोणाचा पायरव झाला (कोणाची दृष्ट लागली) तर त्या योगानें अतिशय ताप होतो १. अशा ह्या योगानें लाभावांचून घात होतो २. जन्मभर जी जोड करावी, त्याची एखाद्या वाईट प्रसंगीं एका घटकेंत वाताहात होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, लोकांच्या खऱ्या (मनुष्याच्या मोक्षरूप) हिताच्या आड हा संशय आला आहे ४. [१३७२]

आमचा वैष्णवांचा कायावाचामनानें हा नियम आहे १. कीं आम्हीं परमार्थाकरितां धैर्य धरून जीव अर्पण करूं, परंतु लाभामध्यें अंतर येऊं देणार नाहीं २. योग्य प्रसंगीं लज्जा व भय नाहींशीं करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे नियम अज्ञानाला माहीत नाहींत, ते (परमार्थांतील) नियम व कला आम्ही जाणतों ४. [१३७३]

(हरिसेवा करण्याविषयीं) सर्व लज्जा टाकल्यामुळें आमचें परमार्थकार्य साधलें १. भवसागराच्या पैलतीरीं जाऊन सुखानें हरिनामाचे छंदानें नाचूं २. आम्हीं हरिनामाची सांगड फार प्रेमानें व सुखानें बांधली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमची वाणी ही लोकांना हांका मारण्याकरितां उरली आहे ४. [१३७४]

देवा, आम्ही भिकारी तुझ्या दारीं धरणें धरून तुला कोंडण्याकरितां बसलों आहों १. आतां तुला आम्ही कोठें हालचाल करूं देणार नाहीं. आम्हांला ही संधि मोठी चांगली साधली आहे २. ह्यापूर्वीं तुझ्या घरीं आम्हीं किती तरी खेपा केल्या ३. हे नारायणा, माझेंच मला देण्याविषयीं तुझ्या मनांत संकोच कां येतो? ४. तुझ्याशीं आतां किती भांडावें? आजपर्यंत पुष्कळ (जन्ममरणांची) फजिती सोसली ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझ्या ठिकाणीं कांहीं देखील लज्जा नाहीं. [१३७५]

देवा, मी तुझें द्वार रक्षण करणारा (द्वारपाळ) होऊन तुझें सर्व रक्षण केलें १. तुमच्या व सर्व जगाच्या मध्यें उभा राहून, मी तुम्हांस कांहीं धक्का लागूं दिला नाहीं (उपदेशद्वारा 'देव' आहे असें जगाला मीं सांगितलें) २. मीं जगाला जी नीति घालून दिली आहे, त्याप्रमाणें तें चालत आहे ३. हातामध्यें चोपदाराची काठी घेऊन, तुम्हांस जीव अर्पण करून उभा आहें ४. आम्हीं आपलें बळ, बुद्धि व युक्ति ह्या सर्व शक्ति तुला दिल्या. ५. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मी या चाकरीबद्दलचा खरा मुशाहिरा (चांगलें बक्षीस) तुमचे जवळून घेईन ६. [१३७६]

फळाची तों पोटीं । घडे वियोगेंही भेटी ॥ १ ॥ करावें चिंतन । सार तेंचि आठवण ॥ २ ॥ चित्त चित्ता ग्वाही । उपचारें चाड नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । पावे अंतरींची सेवा ॥ ४ ॥ [१३७७]

दुर्बळाचें कोण । ऐके घालुनियां मन । राहिलें कारण । तयावांचूनि काय तें ॥ १ ॥ कळों आलें अनुभवें । पांडुरंगा माझ्या जीवें । न सांगतां ठावें । पडे चर्या देखोनि ॥ २ ॥ काम क्रोध माझ्या देहीं । भेदाभेद गेले नाहीं । होतें तेथें कांहीं । तुज कृपा करितां ॥ ३ ॥ हें तों नव्हे उचित । नुपेक्षावें शरणागत । तुका म्हणे रीत । तुमची आम्हां न कळे ॥ ४ ॥ [१३७८]

आम्ही भाव जाणों देवा । न कळती तुझिया भावा । गणिकेचा कुढावा । पतना न्यावा दशरथ ॥ १ ॥ तरी म्यां काय गा करावें । कोण्या रीती तुज पावें । न संगतां ठावें । तुम्हांविण न पडे ॥ २ ॥ दोनी फाकालिया (फांकविल्या) वाटा । गोवी केली घटापटा । नव्हे धीर फांटा । आड रानें भरती ॥ ३ ॥ तुका म्हणे माझे डोळे । तुझे देखती हे चाळे । आतां येणें वेळे । चरण जीवें न सोडीं ॥ ४ ॥ [१३७९]

वेरझारीं झाला सीण । बहु केलें खेदक्षीण । भांडणासी दिन । आजी येथें फावला ॥ १ ॥ आतां काय भीड भार । धरूनियां लोकाचार । बुडवूनि वेव्हार । सरोबरी करावी ॥ २ ॥ आलें बहुतांच्या मना । कां रे न होसी शाहाणा । मुळींच्या वचना । आम्ही जागों आपुल्या ॥ ३ ॥ तुका म्हणे चौघांमधीं । तुज नेलें होतें आधीं । आतां नाहीं मधीं । उरी कांहीं राहिली ॥ ४ ॥ [१३८०]

कल्पतरुखालीं । फळें येती मागितलीं ॥ १ ॥ तेथें बैसल्याचा भाव । विचारूनि बोले ठाव ॥ २ ॥

खऱ्या फलाचा योग तुमच्या वियोगांतच होत आहे (वियोगांत जसें तुझें चिंतन घडतें तसें संयोगांत घडत नाहीं) १. तो असो, सारभूत असें तुमचें चिंतन नेहमीं करावें २. ह्याबद्दल चित्तच चित्तास साक्षी आहे. इतर उपचार हरीला अर्पण करण्याची गरज नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अंतःकरणापासून होणारी सेवाच देवाला पोहोंचते ४. [१३७७]

गरिबाची हकीगत (गाऱ्हाणें) लक्ष देऊन कोण ऐकतो ? त्यावांचून थोरांचें काय खोळंबलें आहे ? १. हे पांडुरंगा, हें माझ्या अनुभवानेंच मला समजलें. तुम्हीं जरी सांगितलें नाहीं तरी तुमचें मुखचिन्ह पाहून मी समजलों २. माझ्या अंतःकरणांतील कामक्रोध व भेदाभेद हे भाव गेले नाहींत. अशा स्थितींत तूं कृपा करून काय होणार ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्हीं शरणागताची उपेक्षा करूं नये. कराल, तर हें कांहीं तुम्हांला योग्य नाहीं. ह्यावर तुमच्या घरची काय रीत आहे, ती आम्हांला कळत नाहीं ४. [१३७८]

हे देवा, तुझी माया कळत नाही, हा भाव आम्हीं जाणतों. जन्मभर व्यभिचारकर्म करणाऱ्या गणिकेचा सांभाळ तुम्हीं केला; पुत्रप्रेमानें दशरथानें 'राम राम' म्हणून प्राण सोडला, तो पतनाला तुम्हीं नेला १. असें जर आहे तर आम्हीं काय करावें ? कोणत्या मार्गानें तुझें ठिकाण प्राप्त व्हावें ? हें तुम्हीं सांगितल्यावांचून कळणार नाहीं २. स्वर्ग व नरक ह्या दोन वाटा तुम्हीं फोडल्या आहेत, व घटाकाश व पटतंतु ह्या तर्ककर्कश विचाराचा गुंताडा केला आहे. ह्या योगानें लोकांस धैर्य उत्पन्न न होतां ते आडरानांत शिरतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारच्या तुझ्या चेष्टा माझे डोळे पाहातात, म्हणून आतां ह्या वेळेला मी तुझे पाय जीव गेला तरी सोडणार नाहीं ४. [१३७९]

आजपर्यंत मी तुझ्या घरास येरझारा–हेलपाटे घालून फार श्रमी झालों. आतां तुझी गांठ पडली आहे, म्हणून भांडण करण्याला आज मला दिवस सांपडला १. आतां लोकाचाराची भीड धरून काय उपयोग आहे ? तुझ्या–आमच्या-मधील मर्यादेचा व्यवहार नाहींसा करून, तुझ्याशीं बरोबरीनें वागावेंसें (तुझ्यासारखें सच्चिदानंद व्हावेंसें) वाटतें २. हा प्रकार बहुतांचे मनाला आला असून, अरे, तूं कां शहाणा होत नाहींस ? तुझें–आमचें मूळचें जें वचन आहे ('आम्ही नामाचे धारक' हें आमचें वचन व 'तेषामहं समुद्धर्ता' हें तुमचें वचन) तें धरून आम्ही सावध आहोंत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुला पूर्वीं चौघांमध्यें नेऊन ठराव केला होता. त्यासंबंधानें आतां कांहीं भानगड राहिली नाहीं ४. [१३८०]

कल्पतरूचे झाडाखालीं बसलें असतां जी जी इच्छा करावी तें फळ मिळतें १. परंतु त्या ठिकाणीं बसलें असतां,

द्यावें हें उत्तर । येतो प्रीतीचा तो फेर ॥ ३ ॥ तुका म्हणे मनीं । आपुल्याची लाभहानि ॥ ४ ॥ [१३८१]

रंगलिया रंग पालट न धरी । खेवलें अंतरीं पालटेना ॥ १ ॥ सांवळें निखळ कृष्णनाम ठसे । अंगसंगें कैसे शोभा देती ॥ २ ॥ पवित्र झालें तें न लिंपे विटाळा । नेदी बैसों मळा आडवरी ॥ ३ ॥ तुका म्हणे काळें काळें केलें तोंड । प्रकाश अभंड देखोनियां ॥ ४ ॥ [१३८२]

जगा काळ खाय । आम्हीं माथां दिले पाय ॥ १ ॥ नाचों तेथें उभा राहे । जातां व्यंग करी साहे ॥ २ ॥ हरीच्या गुणें धाला । होता खातची भुकेला ॥ ३ ॥ तुका म्हणे हळू । झाला कढत शितळू ॥ ४ ॥ [१३८३]

ब्रह्मरस घेई काढा । जेणें पीडा वारेल ॥ १ ॥ पथ्य नाम विटोबाचें । आणीक वाचे न सेवीं ॥ २ ॥ भवरोगा ऐसें जाय । आणीकें (क) काय क्षुल्लकें ॥ ३ ॥ तुका म्हणे नव्हे बाधा । आणीक कदा भूतांची ॥ ४ ॥ [१३८४]

अंगें अनुभव झाला मज । संतरजचरणांचा (संतचरणरजांचा) ॥ १ ॥ सुखी झालों या सेवनें । दुःख नेणें यावरी ॥ २ ॥ निर्माल्याचें तुळसीदळ । विष्णुजळ चरणींचें ॥ ३ ॥ तुका म्हणे भाव सार । करूनि फार मिश्रित ॥ ४ ॥ [१३८५]

वैद्य एक पंढरीराव । अंतर्भाव तो जाणे ॥ १ ॥ रोगाऐशा द्याव्या वल्ली । जाणे झाली बाधा ते ॥ २ ॥ नेदी रुका वेंचों मोल । पाहे बोल प्रीतीचे ॥ ३ ॥ तुका म्हणे दयावंता । सदा चिंता दीनांची ॥ ४ ॥ [१३८६]

हा कल्पतरु आहे असें जाणून, विचारानें जें कांहीं योग्य असेल, तें तेथें बोलावें २. ज्याप्रमाणें तुम्ही बोलाल त्याप्रमाणें तुमचा प्रिय विषय क्रमाक्रमानेंच मिळेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, लाभ अथवा हानि हीं आपापल्या मनांतील इच्छेप्रमाणें होतात. ४. [१३८१]

भगवच्चिंतनांत अंतःकरण रंगलें म्हणजे तें पालटत नाहीं, कारण चिंतनानें एकदां हरीचें स्वरूप अंतःकरणामध्यें बिंबलें म्हणजे तें हालत नाहीं १. शुद्ध श्यामवर्ण कृष्णरूप हृदयांत ठसल्यामुळें, वाणीवर कृष्णनामाचा ठसा उमटला आहे. त्याचा योग आंगाच्या ठिकाणीं कशी शोभा देत आहे २. जें शुद्ध झालें आहे, तें कधीं विटाळलें जात नाहीं, आणि तें कोणत्याहि प्रकारचा मळ आपल्यावर घेत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, भक्तांच्या अंतःकरणांत श्रीहरि-स्वरूपाचा प्रकाश बिंबलेला पाहून, काळानें तोंड काळें केलें ४. [१३८२]

सर्व जगाचा ग्रास करणारा तो काळ, त्याच्या मस्तकावर आम्हीं पाय दिले आहेत १. आम्ही हरिनामछंदानें ज्या ठिकाणीं नृत्य करूं, त्या ठिकाणीं तो काळ उभा राहून कांहीं कमी पडल्यास साह्य करतो २. सर्व विश्वाचा ग्रास केला तरी तो तृप्त होणारा नसून हरीच्या गुणानुवादानें तो तृप्त झाला ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो काळ अग्नीप्रमाणें प्रखर होता, तो आमच्याविषयीं थंड झाला (तो हरिनामानें गंगेप्रमाणें शीतळ झाला) ४. [१३८३]

अरे, तूं ब्रह्मरसाचा काढा घे म्हणजे त्या योगानें तुझी जन्मादि पीडा निवारण होईल १. त्याला पथ्य विठोबा-रायाचें नाम वाचेनें घेणें हें होय. त्यावांचून दुसरें कांहीं वाचेला येऊं देऊं नको २. त्या योगानें संसारासारखी व्यथा जाईल. त्यापुढें इतर किरकोळ रोगांची काय किंमत आहे ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, कोणत्याहि भूतांची बाधा तुला कधींहि होणार नाहीं ४. [१३८४]

संतचरणरजांचा अनुभव मला स्वतःला आला आहे १. त्या चरणरजसेवनानें मी सुखी झालों. येथून पुढें मी दुःख जाणत नाहीं २. निर्माल्यांतील तुळसीपत्र व विष्णुचरणाचें तीर्थ यांचे सेवनानें मी त्यांचा मोठेपणा अनुभविला (ध्रुवपदांत सांगितलेला प्रकार घडला) ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या ठिकाणीं असणाऱ्या भक्तिभावाचें पुष्कळ मिश्रण करून मीं वर सांगितलेलें सेवन केलें ४. [१३८५]

जगांत एक पंढरीनाथ पांडुरंगच वैद्य आहे. तो सर्व रोग्यांची अंतःस्थिति जाणतो १. ज्याला जो रोग झाला असेल तो समजून घेऊन त्याला तो बरोबर औषध देतो २. तो एक पैसा अगर कांहींएक किंमत खर्च होऊं देत नाहीं. फक्त आपलेविषयींचे प्रेमचिंतनाची तो इच्छा करितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव हा दयावंत असल्यामुळें सर्व काळ आपल्या दीन दासांची काळजी करितो ४ [१३८६]

करितां कोणाचेंही काज । नाहीं लाज देवासी ॥ १ ॥ बरें करावें हें काम । धरिलें नाम दीनबंधु ॥ २ ॥ करूनि आरागूक पाहे । भलत्या साह्य व्हावया ॥ ३ ॥ बोले तैसी करणी करी । तुका म्हणे एक हरि ॥ ४ ॥ [१३८७]

उभें चंद्रभागे तीरीं । कट धरोनियां करीं । पाउलें गोजिरीं । विटेवरी शोभलीं ॥ १ ॥ त्याचा छंद माझ्या जीवा । काया वाचा मनें हेवा । संचिताचा ठेवा । जोडी हातीं लागली ॥ २ ॥ रूप डोळियां आवडे । कीर्ति श्रवणीं पवाडे । मस्तक नावडे । उठों पायांवरोनि ॥ ३ ॥ तुका म्हणे नाम । ज्याचें नाशी क्रोध काम । हरी भवश्रम । उच्चारितां वाचेसी ॥ ४ ॥ [१३८८]

आम्हां हेंचि भांडवल । म्हणों विठ्ठल विठ्ठल ॥ १ ॥ सुखें तरों भवनदी । संगें वैष्णवांची मांदी ॥ २ ॥ बाखराचें वाण । सांडूं हें जेवूं जेवण ॥ ३ ॥ नलगे वारंवार । तुका म्हणे वे(ये)रझार ॥ ४ ॥ [१३८९]

आतां माझ्या भावा । अंतराय नको देवा ॥ १ ॥ आलें भागा तें करितों । तुझें नाम उच्चारितों ॥ २ ॥ दृढ माझें मन । येथें राखावें बांधोन ॥ ३ ॥ तुका म्हणे वाटे । नको फुटों देऊं फाटे ॥ ४ ॥ [१३९०]

काय देवापाशीं उणें । हिंडे दारोदारीं सुनें ॥ १ ॥ करी अक्षरांची आटी । एके कवडीच साटीं ॥ २ ॥ निंदी कोणा स्तवी । चिंतातुर सदा जीवीं ॥ ३ ॥ तुका म्हणे भांड । जळो जळो त्याचें तोंड ॥ ४ ॥ [१३९१]

मागणें तें मागों देवा । करूं भक्ति त्याची सेवा ॥ १ ॥ काय उणें तयापाशीं । रिद्धिसिद्धि ज्याच्या दासी ॥ २ ॥ काया वाचा मन । करूं देवा हें अर्पण ॥ ३ ॥ तुका म्हणे विश्वंभर । ज्याच्यानें हें चराचर ॥ ४ ॥ [१३९२]

कोणत्याहि दासाचें कोणतेंहि काम करण्याविषयीं देव लज्जा धरीत नाहीं १. दीनांचें चांगलें करणें हेंच त्याचें काम आहे, कारण त्यानें आपल्याला 'दीनबंधु' असें नांव घेतलें आहे २. सर्वांना समाधान देण्याची इच्छा धरून त्याकरितां पाहिजे त्याला तो साह्य होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें बोलतो त्याप्रमाणें वागणारा एक हरिच आहे ४. [१३८७]

चंद्रभागेचे कांठीं तें सुंदर ध्यान कमरेवर हात ठेवून उभें आहे. त्याचीं गोजिरवाणीं पावलें विटेवर शोभत आहेत १. माझ्या जीवाला कायावाचामनेंकरून त्याचाच ध्यास व त्याचीच हांव आहे. हा लाभ प्रारब्धाचे योगानें हातीं लागला २. त्याचें रूप डोळ्यांस आवडतें व ज्यांत कीर्ति वर्णन केली आहे असे पोवाडे ऐकणें कानांस आवडतें; त्याच्या पायांवरून मस्तक बाजूला करावें असें वाटत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या श्रीहरीच्या नामानें कामक्रोधादि विकार नाहींसे होतात त्याच्या चिंतनानें संसारश्रमाचा परिहार होतो ४. [१३८८]

विठ्ठलनाम सुखानें घेणें हेंच आमचें भांडवल आहे १. तें नांव आम्ही वैष्णवसमुदायासह घेऊन आनंदानें संसार-नदींतून तरून जाऊं २. ह्यावांचून बासराचें (निषिद्धाचें, पक्वान्नांचें) सेवन न करतां विठ्ठलनाम हेंच जेवण जेवूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या योगानें पुनःपुनः अनेक जन्ममृत्यूच्या खेपा घालावयास नकोत ४. [१३८९]

हे देवा, तुमचेविषयीं माझ्या ठिकाणीं जो भाव आहे त्यांत अंतर येऊं देऊं नका १. माझ्या वांट्यास तुमच्या नामाचें चिंतन करणें आलें आहे. तें मी करीत आहें २. त्या ठिकाणीं माझें मन दृढ राहील असें करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या (श्रद्धापूर्वक धरलेल्या) मार्गास कुतर्काचे फांटे फुटूं देऊं नका ४. [१३९०]

देवाला सोडून कितीएक कुत्र्यासारखे दारोदार हिंडतात, त्यांचें इच्छित पुरविण्यास देवाजवळ काय कमी आहे? १. एका कवडीचे प्राप्तीकरितां अक्षरांची आटाआट करितो (पाठपाठांतर करतो, विद्यासंपादन करतो) २. लाभाकरितां कोणाची निंदा करतो व कोणाची स्तुति करतो आणि अंतःकरणांत सदासर्वदा चिंतातुर असतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या मूर्खाचे (कवडीसाठीं भांडण करणाऱ्याचे) तोंडास आग लागो (असें द्विवार सांगतात) ४. [१३९१]

आम्हांस कांहीं मागणें असेल तें देवाजवळ मागूं व त्याचीच भक्तीनें सेवा करूं १. ज्याच्या रिद्धिसिद्धि दासी आहेत, त्याच्याजवळ कांहीं कमी आहे काय ? २. आम्ही काया, वाचा आणि मन देवास अर्पण करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या योगानें स्थावरजंगमादि विश्वाचें पोषण होत आहे, त्याचेजवळ सर्व कांहीं आहेच ४. [१३९२]

चित्तीं नाहीं आस । त्याचा पांडुरंग दास ॥ १ ॥ असे भक्तांचिये घरीं । काम न सांगतां करी ॥ २ ॥ अनाथाचा बंधु । असे अंगीं हा संबंधु ॥ ३ ॥ तुका म्हणे भावें । दिवा सत्ता राबवावें ॥ ४ ॥ [१३९३]

कर्कशे संगति । दुःख उदंड फजिती ॥ १ ॥ नाहीं इह ना पर लोक । मजुर दिसे जैसें रंक ॥ २ ॥ वचन सेंटावरी । त्याचें ठेवूनि धिक्कारी ॥ ३ ॥ तुका म्हणे पायीं बेडी । पडिली कपाळीं कुऱ्हाडी ॥ ४ ॥ [१३९४]

बीज पेरे (पेरी) सेतीं । मग गाडेवरी वाहाती ॥ १ ॥ वायां गेलें ऐसें दिसे । लाभ त्याचे अंगीं वसे ॥ २ ॥ पाल्याची जतन । तरि प्रत्यया येती कण ॥ ३ ॥ तुका म्हणे आळां । उदक देतां लाभे फळा ॥ ४ ॥ [१३९५]

जाणावें तें सार । नाहीं तरी दगा फार ॥१॥ डोळे झांकिलिया रवि । नाहीं ऐसा होय जेवीं ॥२॥ बहुथोड्या आड । निवारितां लाभें जाड ॥ ३ ॥ तुका म्हणे खरें । नेलें हातींचें अंधारें ॥ ४ ॥ [१३९६]

मुळीं नेणपण । झाला तरी अभिमान ॥ १ ॥ वायां जावें हेंचि खरें । केलें तेणेंचि प्रकारें ॥ २ ॥ आराणूक नाहीं कधीं । झाली तरी भेदबुद्धि ॥ ३ ॥ अंतरली नाव । तुका म्हणे न लगे ठाव (नाहीं ठाव) ॥ ४ ॥ [१३९७]

संवसारसांतें आले हो आइका । तुटीचें तें नका केणें भरूं ॥ १ ॥ लाभाचा हा काळ अवघे विचारा । पारखी ते खरा साह्य येथें ॥ २ ॥ शृंगारिलें दिसे न कळे अंतर । गोंविचा (गोविला)

ज्याच्या चित्तांतील समूळ (संसाराची) आशा गेली आहे, त्याची सेवा पांडुरंग करितो १. भक्तांच्या घरीं नेहमीं राहून तो त्यांचीं कामें न सांगतां करितो २. कारण अनाथ जीवाचा साह्यकारी असा संबंध त्याच्याकडे येतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, भावबळाच्या सत्तेनें देवास आपलेंसें करून राबवावें (काम करावयास लावावें) ४. [१३९३]

जी स्त्री कर्कश (द्वाड, भांडखोर, उद्धट) आहे तिच्या संगतीनें नवऱ्याची फजिती होते व त्यास पुष्कळ दुःख भोगावें लागतें १. त्यास इहलोकीं सुख नाहीं व परलोकींहि नाहीं; तो एखाद्या दरिद्री मजूरदारासारखा (मजुरासारखा) दिसतो २. ती स्त्री आपल्या नवऱ्याचें बोलणें कस्पटाप्रमाणें समजून त्याचा तिरस्कार करते ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्यानें तिच्याशीं लग्न लाविलें नाहीं, तर ती एक त्याच्या कपाळीं कुऱ्हाडच पडली, अथवा त्याच्या पायांत बेडी पडली असें समजावें ४. [१३९४]

जे कोणी शेतांत थोडें बीं पेरतात, त्यांचें उत्तम पीक आल्यावर तें गाड्यावर भरून घरास आणावें लागतें १. बीं पेरलें त्या वेळीं जमिनींत टाकून तें वायां घालविलेंसें दिसतें; पण असें करण्यांतच लाभ आहे २. पेरलेल्या बीजापासून मोड उगवल्यावर त्या शेताचें पानासुद्धां जतन केलें असतां धान्य हातीं लागतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या बीजाच्या वाफ्यास वेळच्या वेळीं पाणी घातलें तर फळाची प्राप्ति होईल (योग्य प्रयत्नावांचून कोणतेंहि फळ मिळत नाहीं) ४. [१३९५]

मुख्य सार काय आहे तें समजून घ्यावें, नाहींपेक्षां मोठा दगा होईल १. सूर्योदय झालेला असून जर आपण डोळे झांकले तर तो प्रकाश जसा असून नाहींसा वाटतो २. तसें अविद्यामय पडळ अल्प डोळ्यावर पुष्कळ आलें आहे; (आपल्या अल्प ज्ञानाला गडद अज्ञान झांकून टाकतें); तें नाहींसें केल्यास मोठा लाभ होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, अविद्यामय अंधारानें हस्तगत (प्राप्त) असलेलें देवाचें खरें स्वरूप नाहींसें केलें ४. [१३९६]

मी देही आहें असा अभिमान उत्पन्न होणें हेंच मुळीं अज्ञान आहे १. अशा प्रकारानें खऱ्याचा लोप होऊन प्राणी वायां गेले २. ज्या वेळेला भेदाची बुद्धि उत्पन्न झाली तेव्हांपासून प्रापंचिक लोकांना विसांवा कधींच मिळत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, भवसागरांतून तारून नेणारी नौका जर अंतरली तर पैलथडीस जाणें मुळींच होणार नाहीं ४. [१३९७]

अहो जन हो, तुम्ही या देहरूपी संसाराच्या बाजारांत आलेले आहांत, तर नुकसान देणाऱ्या मालाची तुम्ही खरेदी करूं नका. हें जें मी सांगतों तें तुम्ही ऐका १. हा काळ तुम्हांला लाभ होण्याचा आहे. तर तुम्ही अवघे लोक विचार करा व मालाची परीक्षा करणाऱ्या लोकांस साह्य करून घ्या २. (ह्या संसाराच्या बाजारांत स्वर्गासारखा) कांहीं

पदर उगवेना ॥ ३ ॥ तुका म्हणे खोटें गुंफतां विसारें । हातिंचिया खरें हातीं घ्यावें ॥ ४ ॥ [१३९८]

सारावीं लिगाडें धरावा सुपंथ । जावें उसंतीत हळुहळू ॥ १ ॥ पुढें जातियाचे उमटले माग । भांबावलें जग आडरानें ॥ २ ॥ वेंचल्याचा पाहे वरावरि झाडा । बळाचा निधडा पुढिलिया ॥ ३ ॥ तुका म्हणे जैसी दाखवावी वाणी । ते द्यावी भरोनी शेवट तो ॥ ४ ॥ [१३९९]

बुद्धिमंदा शिरीं । भार फजिती पदरीं ॥ १ ॥ जाय तेथें अपमान । पावे हानि थुंके जन ॥ २ ॥ खरियाचा पाड । मागें लावावें लिगाड ॥ ३ ॥ तुका म्हणे करी । वर्म नेणें भरोवरी ॥ ४ ॥ [१४००]

पूर्वजांसी नरका । जाणें तें एक आइका ॥ १ ॥ निंदा करावी चाहाडी । मनीं धरुनि आवडी ॥ २ ॥ मात्रागमना ऐसी । जोडी पातकांची रासी ॥ ३ ॥ तुका म्हणे वाट । कुंभ (भी) पाकाची ते नीट ॥ ४ ॥ [१४०१]

वेडी ते वेडी बहुतच वेडी । चाखतां गोडी चवी नेणें ॥ १ ॥ दिहा लावी वात । पालव घाली जाली रात ॥ २ ॥ कडिये मूल भोंवतें भोये । मोकलुनि रडे धाये ॥ ३ ॥ लेंकरें वीत पुसे जगा । माझा गोहो कोण तो सांगा ॥ ४ ॥ आपुली शुद्धि जया नाहीं । आणिकांची ते जाणे काई ॥ ५ ॥ तुका म्हणे ऐसे जन । नरका जातां राखे कोण ॥ ६ ॥ [१४०२]

माल वरच्या बाजूनें चांगला श्रृंगारलेला दिसतो परंतु त्याची आंतील बाजू दिसत नाहीं, म्हणून फसविणारा असा जो (वासनेचा) पदर तो उलगडला जात नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, पेटेमध्यें पुढें घेण्याचे बुद्धीनें विसार देऊन माल गुंतवून ठेवण्याचा व्यवहार खोटा आहे; तर मालाची परीक्षा करून खरा (देवरूपी) माल रोकडीनें हातच्या हातीं घ्यावा ४. [१३९८]

संसारासंबंधीं अनेक लचांडें संपवून चांगला मार्ग धरावा, आणि त्या मार्गानें शक्तीप्रमाणें हळूहळू चालावें १. चांगल्या मार्गानें सत्पुरुष पुढें गेले आहेत. त्यांच्या पावलांचा जो मार्ग उमटला आहे, तो पाहून चालावें. हें सोडून बाकीचें जग भांबावल्याकारणानें आडरानांत गेलें २. जो आपले आयुष्याचा खर्च होत आहे त्याचा वरचेवर हिशेब पाहावा (आपल्यांतील दोष किती गेले व आपल्यांत गुण किती आले ह्याविषयीं निरीक्षण करावें) आणि होईल तेवढ्या सामर्थ्यानें चालण्याचा वेग करावा, आणि सर्वांच्या पुढें जो जाईल तो मोठा बलवान् व धीट आहे असें समजावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें वाणीनें बोलून दाखवावें त्याप्रमाणें शेवटपर्यंत तेंच माप भरून द्यावें (म्हणजे बोलण्याप्रमाणें वागावें हीं परमार्थ करणाऱ्या साधकाचीं लक्षणें होत) ४. [१३९९]

जो कोणी परमार्थाविषयीं बुद्धिहीन आहे, त्याचे शिरावर देह मी व देहसंबंधीं माझें ह्या प्रपंचाचें ओझें आहे म्हणून त्याच्या पदरामध्यें जन्ममृत्युरूपी फजिती बांधलेलीच आहे १. तो जेथें जाईल तेथें अपमान पावेल आणि पारमार्थिक जन त्याच्या तोंडावर थुंकतील २. जसें खऱ्या मालाचा भाव करून मागून वाईट माल भरीला घालतात, तसें शुद्ध परमार्थ दाखवून खोटी वागणूक करितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा तो खटाटोप करतो, पण देवाच्या प्राप्तीचें मर्म जाणत नाहीं ४. [१४००]

अहो जन हो, तुमच्या पूर्वजांना नरकास घालवावयाचें असेल तर मी सांगतों तें एक ऐका; तें असें १. मनांत मोठी प्रीति धरून दुसऱ्याची (विशेषतः वेदांची व संतांची) निंदा करावी व चहाडी सांगावी २. त्या योगानें मात्रागमनासारख्या पातकांच्या राशींचा बोजा त्याजवर होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ही वाट कुंभीपाक नरकाकडे जाण्याची आहे ४. [१४०१]

जी कोणी स्त्री, कांहीं पदार्थ भक्षण केले तर त्याची गोडी व चव जाणत नाहीं, ती फार वेडी आहे (असें त्रिवार सांगतात) १. दिवसा दिवा लावून ठेविते आणि रात्र झाल्यावर तो दिवा पदरानें फटकारून घालविते (विझविते) २. आपल्या मुलास कडेवर घेऊन माझें मूल कोठें चुकलें म्हणून सभोंवतीं शोध करीत फिरते व मोठ्यानें हंबरडा फोडून रडते ३. आपल्या मुलांना (एकामागून एक) जन्म देऊन माझा नवरा कोणता तो सांगा असें जगाला विचारते ४. जिला आपलेपणाची शुद्धि नाहीं ती दुसऱ्याची काय जाणेल? ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचे मूर्ख लोक आपल्या कर्मानें नरकांत जातात; त्यांचें रक्षण कोण करील ? ६. [१४०२]

आवडीचें दान देतो नारायण। बाहे उभारोन राहिलासे ॥ १ ॥ जें जयासी रुचे तें करी समोर। सर्वज्ञ उदार मायबाप ॥ २ ॥ ठायीं पडिलिया तेंचि लागे खावें। ठायींचेंचि घ्यावें विचारूनि ॥ ३ ॥ बीज पेरूनियां तेंचि घ्यावें फळ। डोरलीस केळ कैचें लागे ॥ ४ ॥ तुका म्हणे देवा बोल कांहीं नाहीं। तुझा तूंचि पाहीं शत्रू सखा ॥ ५ ॥ [१४०३]

अडचणीचें दार। बाहेर माजी पैस फार ॥ १ ॥ काय करावें तें मौन्य। दाही दिशा हिंडे मन ॥ २ ॥ बाहेर दावी वेश। माजी वासनेचा लेश ॥ ३ ॥ नाहीं इंद्रियां दमन। काय मांडिला दुकान ॥ ४ ॥ सारविलें निकें। वरि माजीं अवघें फिकें ॥ ५ ॥ तुका म्हणे अंतीं। कांहीं न लगेचि हातीं ॥ ६ ॥ [१४०४]

लय लक्षुनियां झालों म्हणती देव। तोही नव्हे भाव सत्य जाणा ॥ १ ॥ झालों बहुश्रुत न लगे आतां कांहीं। नको राहूं तेहीं निश्चितीनें ॥ २ ॥ तपें दानें काय मानिसी विश्वास। बीज फळ त्यास आहे पुढें ॥ ३ ॥ कर्म आचरण यातीचा स्वगुण। विशेष तो गुणी काय तेथें ॥ ४ ॥ तुका म्हणे जरी होईल निष्काम। तरिच होय राम देखे डोळां ॥ ५ ॥ [१४०५]

पुरली धांव कडिये घेईं। पुढें पायीं न चलवे ॥ १ ॥ कृपाळुवे पांडुरंगे। अंगसंगे जिवलगे ॥ २ ॥ अवघी निवारावी भूक। अवघ्या दुःख जन्माचें ॥ ३ ॥ तुका म्हणे बोलवेना। लावीं स्तना ईश्वरे ॥ ४ ॥ [१४०६]

ज्याची जशी आवड आहे तसें दान त्याला देऊन ती पूर्ण करण्याकरितां हात वर करून नारायण उभा राहिला आहे १. असा जो सर्वज्ञ उदार मायबाप, तो ज्याला जें आवडेल तें त्याच्यापुढें करून, आवडी पुरवितो २. आपलें संचित कर्म मूळचें जसें असेल तशी आवड होते. मग त्याप्रमाणें (पदरांत पडलेलें) खावें लागतें, भोगावें लागतें, म्हणून जें मूळचें तेंच विचारानें ग्रहण करावें ३. (देवापाशीं पहिल्यांदाच विचारानें दान मागावें, नंतर पश्चात्ताप करणें व्यर्थ.) जें बीज पेरावें त्याचेंच फळ शेवटीं घ्यावें लागतें; डोरलीचे झाडाला (रानवांग्याच्या झाडाला) केळीं कशीं येतील ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यासंबंधीं देवावर शब्द मुळींच देतां येत नाहीं; तुझा वैरी तूंच व तुझा मित्रहि तूंच असें विचारानें पाहिलें असतां तुला दिसेल ५. [१४०३]

कोणीं एकानें घर बांधलें व आंतील जागा पैस ठेविली आणि बाहेरहि जागा पैस ठेविली; मात्र घरांत जाण्याचें द्वार मनुष्यास जाण्यास अडचण होईल इतकें लहान केलें (तर त्या घराचा काय उपयोग आहे?) १. तसें आंतल्या बाजूनें मध्यम वाणीमध्यें बडबड सुरू आहे आणि बाहेरहि लोकांचें बोलणें ऐकतो आहे, तोंड मात्र बंद ठेविलें आहे व दशदिशा मन धांवत आहे. असलें मौन काय उपयोगाचें आहे ? २. बाह्यात्कारी परमार्थाचा वेष, पण अंतरांत वासनेचा लेश कायम आहे ३. बाहेरील इंद्रियांचें जर दमन केलें नाहीं तर तूं परमार्थाचें दुकान कां मांडलेंस ? ४. वरवर बाह्यात्कारीं चांगलें क्षालन केलें पण आंत सर्व मलिन आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या योगानें तुझ्या हातीं अखेरीस कांहींच लागणार नाहीं ६. [१४०४]

जेथें सर्व कल्पनेचा लय होतो तें अनुमानवृत्तीनें लक्षून (योगी समाधीमध्यें कोणता तरी प्रकाशाचा आभास पाहून) आम्ही देव आहोंत असें जे म्हणतात, तो भाव खरा नाहीं असें समजावें १. आम्हीं पुष्कळांचें पुष्कळ श्रवण करून बहुश्रुत झालों आहों, आतां आम्हांला कांहीं करणें राहिलें नाहीं, अशा समजुतीनें तूं निष्काळजी राहूं नको २. मीं पुष्कळ तप केलें आहे व दानहि केलें आहे, आतां मला मोक्ष मिळेल असा विश्वास तूं कां मानतोस ? त्याचें तर फल पुढें प्राप्त व्हावयाचें आहे. (तें भोगण्याकरितां पुनः जन्म घेतला पाहिजे) ३. वर्णाश्रमाला उचित अशीं जीं कर्में आहेत तीं आचरण करण्यांत विशेष काय आहे ? तें तर त्या जातीचें कर्तव्य आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, लोक जर निष्काम होतील तरच ते स्वतः राम होतील आणि आपल्या डोळ्यांनीं सगुण रामाला पाहून किंवा ज्ञानदृष्टीनें सर्व राममय आहे असें जाणून ते रामरूप होतील ५. [१४०५]

आमचे पाय धांवून दमले म्हणून हे विठाबाई आई, आम्हांला कडेवर घे. येथून पुढें पायांनीं चालवत नाहीं १. हे अंगसंगानें (माझ्या सान्निध्यांत) असणारे जिवलगे पांडुरंगे आई, तूं कृपाळु आहेस २. सर्व प्रकारची आमची क्षुधा व सर्व जन्माचें दुःख ह्यांचें तूं निवारण कर ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगे माते, आतां माझ्याच्यानें बोलवत नाहीं, तूं मला आपले स्तनाला लाव व प्रेमपान्हा पाज ४. [१४०६]

जें जें मना वाटे गोड । तें तें कोड पुरविसी ॥ १ ॥ आंत तूंचि बाह्याकारीं । अवघ्यापरी झालाशी (सी) ॥ २ ॥ नाहीं सायासाचें काम । घेतां नाम आवडी ॥ ३ ॥ तुका म्हणे सर्व सांगें (संगें) । पांडुरंग दयाळे ॥ ४ ॥ [१४०७]

जेथें माझी दृष्टी जाय । तेथें पाय भावीन ॥ १ ॥ असेन या समाधानें । पूजा मनें करीन ॥ २ ॥ अवघाच अवघें देसी । सुखरासी संपन्न ॥ ३ ॥ तुका म्हणे बंधन नाहीं । ऐसें कांहीं तें करूं ॥ ४ ॥ [१४०८]

भला भला पुंडलिका । मानलासी जन लोकां । कोण्या काळें सुखा । ऐशा कोण पावत ॥ १ ॥ नातुडे जो कवणे परी । उभा केला विटेवरी ॥ २ ॥ अवघा आणिला परिवार । गोपी गोपाळांचा भार ॥ ३ ॥ तुका म्हणे धन्य झालें । भूमीं वैकुंठ आणिलें ॥ ४ ॥ [१४०९]

अवघे चुकविले सायास । तप रासी जीवा नास ॥ १ ॥ जीव देऊनियां बळी । अवघीं तारिलीं दुर्बळीं । केला भूमंडळीं । माजी थोर पवाडा ॥ २ ॥ कांहीं न मगे याची गती । लुटविती जगा हातीं ॥ ३ ॥ तुका म्हणे भक्तराजा । कोण वर्णी पार तुझा ॥ ४ ॥ [१४१०]

प्रमाण त्याच्या बोला । देव भक्तांचा अंकिला ॥ १ ॥ न पुसतां जातां न ये । खालीं बैसतांही भिये । अवघा त्याचा होय । जीव भावासहित ॥ २ ॥ वदे उपचारें वाणी । कांहीं माग म्हणऊनि ॥ ३ ॥ उदासीनाच्या लागें । तुका म्हणें धांवे मागें ॥ ४ ॥ [१४११]

कांहीं न मागती देवा । त्यांची करूं धावे सेवा ॥ १ ॥ हळूहळू फेडी ऋण । होऊनियां रुपें दीन

जें जें माझ्या मनाला चांगलें वाटत आहे तें तें तूं कौतुकानें पूर्ण करतोस (पुरवितोस) १. आतां आंत वा बाहेर ह्या सर्व बाजूंनीं तूंच भरला आहेस २. तुझें नाम प्रीतीनें घेतलें म्हणजे अन्य सायासाची जरूर नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे दयाळु पांडुरंगे, आतां आमचें सर्व कांहीं यथासांग झालें आहे (मला तूं आपलें गुह्य ज्ञान सांग) ४. [१४०७]

जेथें जेथें माझी दृष्टि जाईल तेथें तेथें देवा, मी तुझ्या पायांची (तुझे पाय आहेत अशी) भावना करीन १. व त्या समाधानानें राहून मी तुझी पूजा मनानेंच करीन २. सर्वसंपन्न असा तूं सर्वच कांहीं देतोस. तूं अनेक सुखराशीनें संपन्न आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यायोगेंकरून संसारबंधन प्राप्त होणार नाहीं तें साधन आम्ही करूं ४. [१४०८]

हे पुंडलिकराया, तूं चांगला आहेस (असें द्विवार सांगतात), कारण तूं लोकांना मान्य झाला आहेस, तुझ्या योगानें देवाचे चरण जोडले; नाहींतर त्या सुखास कोणत्या काळीं बिनचूक पावला आहे असा कोण आहे? १. जो देव कोणालाहि आकळला जात नाहीं (कोणालाहि वश होत नाहीं) तो तूं विटेवर उभा केला आहेस २. गोपी-गोपाळांच्या सर्व परिवारासह (राही, रुक्मिणी, सत्यभामा, गरुड, हनुमंत इत्यादि परिवार आणि गोपी–गोपाळ या परिवारासह) तूं देवाला पंढरीस आणलेंस ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या मृत्युलोकावर साक्षात् वैकुंठ आणिलें, हें तुझें कार्य धन्यवाद गाण्यासारखें झालें ४. [१४०९]

अनेक तपें करून साधकांना आपल्या जिवाला जो त्रास द्यावा लागत असे तो सर्व त्रास वैष्णवांनीं चुकविला १. त्यांनीं आपला जीव पांडुरंगाचे चरणीं बळी देऊन (अर्पण करून) सर्व दुर्बळ जीव तारले व सर्व पृथ्वीमध्यें लोकांना गाण्याकरितां आपली मोठी कीर्ति करून ठेविली २. कोणाजवळ कांहीं न मागतां सर्व जगाकडून हरीचें प्रेम लुटविणें हा ह्यांचा व्यवहार होय ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे भक्तराजा, तुझा संपूर्ण महिमा कोण वर्णन करील (कोण बरें वर्णन करूं शकेल?) ४. [१४१०]

देव भक्तांच्या इतका स्वाधीन आहे, कीं त्यांचा शब्द हा त्याला परम प्रमाण आहे १. त्या भक्तांच्या सांगण्यानें, जो विटेवर उभा राहिला आहे, त्याला त्यांना न विचारतां कोठें जातां येत नाहीं व खालीं बसण्यासहि तो भितो. सर्वप्रकारें जीवभावासहवर्तमान त्यांच्या ठिकाणीं तो अनन्य झाला आहे २. तुम्ही (इतके दिवस सेवा केलीत आतां) कांहीं तरी मागा, अशा औपचारिक शब्दानें त्या भक्तांना तो बोलतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी उदासीन —निरिच्छ आहेत त्यांच्या मागें देव धांवतो (आणि मागणाऱ्या भक्तांकडे बघतहि नाहीं) ४. [१४११]

जे कोणी देवाजवळ कांहींहि मागत नाहींत त्यांची सेवा करण्याकरितां देव धांवतो १. दीन रूप धारण करून,

॥ २ ॥ होऊं न सके वेगळा । क्षण एक त्या निराळा ॥ ३ ॥ तुका म्हणे भक्तिभाव । तोचि देवाचाही देव ॥ ४ ॥ [१४१२]

जाणें अंतरींचा भाव । तोचि करितो उपाय (उपाव) ॥ १ ॥ न लगे सांगावें मागावें । जीवें भावें अनुसरावें । अविनाश घ्यावें । फळ धीर धरोनि ॥ २ ॥ बाळा न मागतां भोजन । माता घाली पाचारून ॥ ३ ॥ तुका म्हणे तरी । एकीं लंघियेले गिरी ॥ ४ ॥ [१४१३]

आम्ही नाचों तेणें सुखें । वाजऊं (वाहूं) टाळी गातों मुखें ॥ १ ॥ देव कृपेचा कोंवळा । शरणागता पाळी लळा ॥ २ ॥ आम्हां जाला हा निर्धार । मागें तारिले अपार ॥ ३ ॥ तुका म्हणे संतीं । वर्म दिलें आम्हां हातीं ॥ ४ ॥ [१४१४]

झालों निर्भर मानसीं । म्हणऊनि कळलासी ॥ १ ॥ तुझे म्हणविती त्यांस । भय चिंता नाहीं आस ॥ २ ॥ चुकवितां पाश । गर्भवास यातना ॥ ३ ॥ तुझें जाणोनियां वर्म । कंठीं धरियेलें नाम ॥ ४ ॥ तुका म्हणे सुखें । विसरलों जन्म दुःखें ॥ ५ ॥ [१४१५]

नको दुष्टसंग । पडे भजनामधीं भंग ॥ १ ॥ काय विचार देखिला । सांग माझा तो विठ्ठला ॥ २ ॥ तुज निषेधितां । मज न साहे सर्वथा ॥ ३ ॥ एका माझ्या जीवें । वाद करूं कोणासवें ॥ ४ ॥ तुझे वर्णूं गुण । कीं हे राखों दुष्ट जन ॥ ५ ॥ काय करूं एका । मुखें सांग म्हणे तुका ॥ ६ ॥ [१४१६]

विठ्ठल माझी माय । आम्हां सुखा उणें काय ॥ १ ॥ घेतों अमृताची धणी । प्रेम वोसंडलें स्तनीं ॥ २ ॥ क्रीडों (क्रीडा) वैष्णवांच्या मेळीं । करूं आनंदाच्या जळीं ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपावंत । ठेवी आम्हांपाशीं चित्त ॥ ४ ॥ [१४१७]

भक्तांच्या सेवेचें ऋण, उलट त्यांची सेवा करून, हळूहळू तो फेडतो २. त्या भक्तांना सोडून एक क्षणभर देखील तो वेगळा राहात नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाविषयीं ज्याचे मनांत भक्तिभाव आहे तो देवाचाहि देव आहे ४. [१४१२]

भक्तांच्या अंतःकरणांतील (इच्छा) भाव जाणून तो पूर्ण करण्याचे उपाय देव करितो १. देवाला कांहीं सांगूं नये व त्याच्याजवळ कांहीं मागूंहि नये. आपण जीवाभावानें त्याच्या ठिकाणीं अनन्य होऊन त्याचेपासून सावकाश अविनाशी (मोक्षरूपी) फळ घ्यावें २. मुलानें जेवावयास न मागतां आईच त्याला बोलावून आणून जेवावयास घालते ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या देवाच्या आश्रयानें कित्येक पंगूंनीं गिरीचेंहि (पर्वताचेंहि) उल्लंघन केलें ४. [१४१३]

(आम्ही त्या निष्काम भक्तिसुखानें) विठोबारायाचें नाम गाऊं, टाळी वाजवूं व नृत्य करूं १. देवाचें हृदय कृपेच्या योगानें मोठें कोंवळें आहे; म्हणून तो शरणागतांच्या इच्छा पूर्ण करितो २. ह्या देवानें पूर्वी अनंत जीवांचा उद्धार केला, तसा आम्हांलाहि तो तारील असा आमचा निश्चय झाला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें विठ्ठलनामाचें वर्म आमचे हातीं संतांनीं दिलें आहे ४. [१४१४]

तुझा स्वभाव आम्हांला कळला म्हणून आम्ही मनाचे ठिकाणीं निर्भय (आनंदभरित) झालों १. हे देवा, आम्ही तुला शरणागत आहोंत असें जे म्हणतात, त्यांचे ठिकाणीं भय, चिंता व आशा राहात नाहीं. ह्या सर्व पाशांतून व गर्भवासादि यातनांतून त्यांची तुम्ही मुक्तता करतां २. हा तुझा स्वभाव जाणून मीं आपले कंठीं तुझें नाम ठेविलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या नामाच्या सुखानें माझा जन्मदुःखाचा निरास झाला (मी जन्ममरणाचीं दुःखें विसरलों) ४. [१४१५]

मला दुष्टाची संगति नको. त्याच्या योगानें भजनांत अंतर पडतें १. हे विठ्ठला, तुम्हीं माझ्याबद्दल काय विचार केला आहे तो सांगा २. दुष्ट जन हे तुझा निषेध करितात हें मला सर्वथैव सहन होत नाहीं ३. माझ्या एकट्या जीवानें कोणाच्या बरोबर वाद करावा? ४. तुझे मी गुणानुवाद वर्णन करूं, का या दुष्ट जनांचें खंडण करूं? ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यांपैकीं कोणती एक गोष्ट करूं हें तुम्ही आपल्या मुखानें मला सांगा ६. [१४१६]

विठ्ठल ही आमची आई असल्यामुळें आम्हांला सुख कमी आहे काय? १. तिच्या स्तनांतून जें प्रेमदुग्ध ओसंडत आहे त्या अमृताच्या सेवनाचे योगानें आम्ही तृप्त होतों २. वैष्णवांच्या संगतीनें आनंदाच्या जळांत आम्ही क्रीडा करतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, कृपावंत देव आमच्यापाशीं आपलें चित्त ठेवीत आहे (देव आमच्यावर नेहमीं लक्ष ठेवतो) ४. [१४१७]

भक्तिसुखें जे मातले । ते कळिकाळा शूर झाले ॥ १ ॥ हातीं बाण हरिनामाचे । वीर गर्जती विठ्ठलाचे ॥ २ ॥ महा दोषां आला त्रास । जन्ममरणां केला नास ॥ ३ ॥ सहस्रनामाची आरोळी । एक एकाहूनी बळी ॥ ४ ॥ नाहीं आणिकांचा गुमान । ज्याचें अंकित त्यावांचून ॥ ५ ॥ तुका म्हणे त्यांच्या घरीं । मोक्षसिद्धी या कामारी ॥ ६ ॥ [१४१८]

पंधरा दिवसां एक एकादशी । कां रे न करिशी व्रतसारा ॥ १ ॥ काय तुझा जीव जातो एका दिसें । फराळाच्या मिसें धणी घेसी ॥ २ ॥ स्वहित कारण मानवेल जन । हरिकथा पूजन वैष्णवांचें ॥ ३ ॥ थोडे तुज घरीं होती उजगरे । देउळासी कां रे मरसी जातां ॥ ४ ॥ तुका म्हणे कां रे सुकुमार झालासी । काय जाब देसी यमदूतां ॥ ५ ॥ [१४१९]

कथा हें भूषण जनामध्यें सार । तरले अपार बहुत येणें ॥ १ ॥ नीचिये कुळींचा उंचां वंद्य होय । हरीचे गुण जो गाय गुणवाद ॥ २ ॥ देव त्याची माथां वंदी पायधुळी । दीप झाला कुळीं वंशाचिये ॥ ३ ॥ त्याची निंदा करी त्याची कुष्टवाणी । मुख संवदणी रजकाची ॥ ४ ॥ तुका म्हणे नाहीं चोरीचा व्यापार । विठ्ठलाचें सार नाम घ्यावें ॥ ५ ॥ [१४२०]

टाळघोळ सुख नामाचा गजर । घोषें जयजयकार ब्रह्मानंदु ॥ १ ॥ गरुडटके दिंडी पताकांचे भार । आनंद अपार ब्रह्मादिकां ॥ २ ॥ आनंदें वैष्णव जाती लोटांगणीं । एक एकाहुनि भद्रजाति ॥ ३ ॥ तेणें सुखें सुटे पाषाणा पाझर । नष्ट खळ नर लुब्ध होती ॥ ४ ॥ तुका म्हणे सोपें वैकुंठासी जातां । रामकृष्ण कथा हेचि वाट ॥ ५ ॥ [१४२१]

हरीच्या भक्तिसुखानें जे मस्त झाले ते कळिकाळाचा नाश करण्यास शूर झाले १. हातामध्यें हरिनामाचिंतनाचे बाण घेऊन विठ्ठलाचे योद्धे गर्जना करीत आहेत २. त्या योगानें (महापातकें) महादोष त्रस्त होऊन नाहींसे झाले व जन्ममरणादि दुःख नाहींसें झालें ३. भक्त हे एकाहून एक बलाढ्य असल्यामुळें विष्णुसहस्रनामाच्या आरोळ्या देत आहेत ४. ज्या देवाचे ते आज्ञाधारक दास झाले आहेत त्या देवावांचून ते इतर कोणाचीहि परवा करीत नाहींत ५. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांच्या घरीं मोक्ष व अष्ट महासिद्धि ह्या सांगितल्याप्रमाणें काम करणाऱ्या दासी झाल्या आहेत ६. [१४१८]

पंधरा दिवसांनीं एकदां येणारी एकादशी हें सारभूत व्रत तूं कां रे करीत नाहींस? केलीस तर जेवल्याप्रमाणें पोटभर फराळ करून तृप्त होतोस. असें न केल्यानें व एक दिवस उपाशी राहिल्यानें काय तुझा जीव जाईल? २. त्या दिवशीं हरीची कथा व वैष्णवजनांचें पूजन केल्यानें स्वहितकार्य साधतें व जनामध्यें मान्यताहि होते ३. तुला घरच्या कामामुळें थोडीं जागरणें होतात काय? मग हरिजागराकरितां तूं देवळांत गेलास तर काय मरशील? ४. तुकाराम महाराज म्हणतात, एकादशी व जागरण करणें हें बाधेल असें तूं मानतोस त्या अर्थी तूं किती नाजुक झाला आहेस; पण शेवटीं यमदूत (आजवर कोणतें पुण्य केलें असें) विचारतील तेव्हां तूं त्यांस काय जबाब देशील? ५. [१४१९]

जगतामध्यें हरीची कथा करणें हें भूषण असून सर्व साधनांचें सार आहे. ह्या योगानें अनंत जीव तरले आहेत १. जो हरीचे गुणानुवाद गातो तो जरी नीच कुळांतला असला तरी उंच कुळींत असणाऱ्यांना (उच्च कुळांतील लोकांनाहि) वंद्य होतो २. देव त्याची पायधुळी मस्तकावर वंदन करितो. तो आपल्या वंशामध्यें कुलदीपक जन्मला आहे ३. त्याची जो कोणी निंदा करील त्याचे तोंडास रक्तपिती होईल व त्याचें मुख परटाचे सतालीप्रमाणें (सौंदणी—कपडे धुण्याची दोण—त्याप्रमाणें) समजावें ४. तुकाराम महाराज म्हणतात, विठ्ठलाचें सारभूत नाम घेणें हा व्यवहार चोरीचा (झांकलेला) नाहीं ५. [१४२०]

नामाच्या गजरसुखानें व टाळांच्या गजरानें व हरिनामाच्या जयजयकाराच्या घोषानें ब्रह्मानंद होतो १. गरुडटके (गरुडचिन्हांकित पताका), वीणा व अनेक पताकांचे समुदाय पाहून ब्रह्मादि देवांनाहि अपार आनंद होतो २. हत्तीप्रमाणें एकापेक्षां एक बलाढ्य असणारे वैष्णवजन आनंदानें एकमेकांस लोटांगण घालितात ३. त्या हरिनामगजराच्या सुखाचे योगानें पाषाणालाहि पाझर फुटतो व कोणी नष्ट दुष्ट लोक आहेत ते त्यायोगानें लुब्ध—तल्लीन होतात ४. तुकाराम महाराज म्हणतात, रामकृष्णाची कथा करणें हीच वैकुंठाला जाण्याची सोपी वाट आहे ५. [१४२१]

देखोंवेखी करिती गुरु। नाहीं ठाउका विचारु ॥ १ ॥ वर्म तें न पडे ठायीं। पांडुरंगाविण कांहीं ॥ २ ॥ (शिकों) कळा शिकों येती। प्रेम नाहीं कोणा हातीं ॥ ३ ॥ तुका म्हणे सार। भक्ति नेणती गव्हार ॥ ४ ॥ [१४२२]

भाग्यवंत म्हणों तयां। शरण गेले पंढरिराया ॥ १ ॥ तरले तरती हा भरंवसा। नामधारकांचा ठसा ॥ २ ॥ भुक्तिमुक्तीचें हें (तें) स्थळ। भोळे भाविकां निर्मळ ॥ ३ ॥ गाइलें पुराणीं। तुका म्हणे वेदवाणी ॥ ४ ॥ [१४२३]

जैसें चित्त जयावरी। तसें जवळी तें दुरी ॥ १ ॥ न लगे द्यावा परिहार। या कोरडें उत्तर ॥ २ ॥ असे अभ्यंतर। साक्षभूत जवळी ॥ ३ ॥ अवघें जाणें सूत्रधारी। कोण नाचे कोणेपरी ॥ ४ ॥ तुका म्हणे बुद्धि। ज्याची तेच तया सिद्धि ॥ ५ ॥ [१४२४]

नाहीं पाइतन भूपतीशीं दावा। धिग त्या कर्तव्या आगी लागो ॥ १ ॥ मुंगिचिया मुखा गजाचा आहार। न साहावे भार जाय जीवें ॥ २ ॥ तुका म्हणे आधीं करावा विचार। शूरपणें तीर मोकलावा ॥ ३ ॥ [१४२५]

तिन्ही लोक ऋणें बांधिले जयानें। सर्वसिद्धि केणें तया घरीं ॥ १ ॥ पंढरी चोहोटां घातला दुकान। मांडियेले वान आवडीचे ॥ २ ॥ आषाढी कार्तिकी भरियेले हाट। इनाम हे पेठ घेतां देतां ॥ ३ ॥ मुक्ति कोणी तेथें हातीं नेघे फुका। लुटतील सुखा प्रेमाचिया ॥ ४ ॥ तुका म्हणे संतसज्जन भाग्याचे। अनंता जन्मींचे सांटेकरी ॥ ५ ॥ [१४२६]

एकानें गुरु केलेला पाहून दुसरा गुरु करतो, पण त्यांतील खरा विचार कांहीं माहीत नसतो १. खरें परमार्थाचें मर्म पांडुरंगावांचून (पांडुरंगाच्या कृपेवांचून) कधींहि कोणास कळणार नाहीं २. कोणत्याहि कला शिकल्यानें येतात, पण श्रीहरिविषयींचें प्रेम देण्याचें (निर्माण करण्याचें) मात्र कोणाचे हातांत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरिविषयींची सारभूत भक्ति ही मूर्खाला कळत नाहीं. (परमार्थाच्या नांवाखालीं मूर्ख लोक भलतेंच कांहींतरी करतात) ४. [१४२२]

जे पंढरीनाथास शरण गेले आहेत, तेच भाग्यवंत आहेत असें आम्ही म्हणूं १. तेच खरोखर तरले व पुढें जे शरण जातील तेहि तरतील ह्यांत संशय नाहीं, कारण नाम घेणारांचा असा ओघच पडला आहे (नामधारक भक्तांची तशी प्रसिद्धिच आहे) २. हरीचें चिंतन हें भोळ्याभाविक निर्मळांना भोग-मोक्षाचें स्थान आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, वेदांनीं व पुराणांनीं असेंच प्रतिपादन केलें आह ४. [१४२३]

ज्याचें चित्त ज्यावर जसें असतें त्याप्रमाणें ती वस्तु जवळ किंवा दूर असते १. अशा प्रकारचें हें सांगावयास नको व जे सांगतात त्यांची कोरडी बडबड आहे, कारण सर्वांच्या अंतर्यामीं साक्षीभूत देव आहे २. सर्व जगाचीं सूत्रें धारण करणारा जो देव तो कोणत्या प्रकारानें कोण नाचतो हें सर्व जाणत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याची बुद्धि जशी (सदोष किंवा निर्दोष) असेल तशी त्याला सिद्धि प्राप्त होते ४. [१४२४]

ज्याला पायांत घालावयास जोडा (पायतण) मिळत नाहीं त्यानें राजाबरोबर वैर करणें व्यर्थ आहे व अशा प्रकारच्या त्याच्या करण्याला आग लागो १. हत्तीला जी चंदी घालावयाची आहे ती मुंगीस घातली असतां त्याचें ओझें तिला सहन न होतां ती मरून जाईल २. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या अंगांत सामर्थ्य किती आहे ह्याचा विचार अगोदर करून शूरपणानें युद्धास उभें राहून बाण सोडावा. ४. [१४२५]

ज्यानें आपल्या सामर्थ्याच्या ऋणांत त्रैलोक्य बांधलें आहे त्याचे घरीं सर्व सिद्धिरूपी माल आहे १. त्या वैष्णवांनीं पंढरीमध्यें उघड्या जाग्यावर दुकान घातलें आहे. त्या दुकानांत ज्याला जे आवडतील ते पदार्थ मांडले आहेत २. त्या ठिकाणीं आषाढी व कार्तिकी एकादशीस मोठे बाजार भरतात आणि ही पेठ हरिनामाची देवघेव करणारांना (श्रीपांडुरंगानें) बक्षीस दिली आहे. ३. त्या ठिकाणीं चार मुक्ति मिळतात पण त्या मुक्तींस कोणी फुकट देखील विचारीत नाहींत आणि सर्व श्रीहरीचें प्रेमसुख लुटतात ४. तुकाराम महाराज म्हणतात, येथील वैष्णव जन परम भाग्यवान् आहेत. त्यांनीं अनंतावधि जन्म घेऊन देवच सांठविला आहे (पुण्याचा सांठा केला आहे) ५. [१४२६]

दुःखाचिये साटीं तेथें मिळे सुख । अनाथाची भूक दैन्य जाय ॥ १ ॥ उदाराचा राणा पंढरीस आहे । उभारोनि बाहे पालवितो ॥ २ ॥ जाणतियाहुनी नेणत्याची गोडी । आलिंगी आवडी करूनियां ॥ ३ ॥ शीण घेऊनियां प्रेम देतो साटी । न विचारी तुटी लाभा कांहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे असों अनाथ दुबळीं । आम्हासी तो पाळी पांडुरंग ॥ ५ ॥ [१४२७]

आणीक मात माझ्या नावडे जीवासी । काय करूं यासी पांडुरंगा ॥ १ ॥ मुखा तेचि गोडी श्रवणां (णीं) आवडी । चित्त माझें ओढी तुझे पायीं ॥ २ ॥ जये पदीं नाहीं विठ्ठलाचें नाम । मज होती श्रम आइकतां ॥ ३ ॥ आणिकाचें मज म्हणवितां लाज । वाटे हें सहज न बोलावें ॥ ४ ॥ तुका म्हणे मज तूंच आवडसी । सर्व भावेंविसीं पांडुरंगा ॥ ५ ॥ [१४२८]

कळेल हें तैसें गाईन मी तुज । जनांसवें काज काय माझें ॥ १ ॥ करीन मी स्तुती आपुले आवडी । जैसी माझ्या गोडी वाटे जीवा ॥ २ ॥ होऊनि निर्भर नाचेन मी छंदें । आपुल्या आनंदें करूनियां ॥ ३ ॥ काय करूं कळा युक्ती या कुसरी । जाणिवेच्या परी सकळिका ॥ ४ ॥ तुका म्हणे माझें जयासवें काज । भोळा तो सहज पांडुरंग ॥ ५ ॥ [१४२९]

तयासी (स) नेणतीं बहु आवडती । होय जयां चित्तीं एक भाव ॥ १ ॥ उपमन्यु धुरू हे काय जाणती । प्रल्हादाच्या चित्तीं नारायण ॥ २ ॥ कोळी भिल्ली पशु श्वापदें अपारें । कृपेच्या सागरें तारियेलीं ॥ ३ ॥ काय तीं गोपाळें चांगलीं शाहाणीं । तयां चक्रपाणी जेवी सवें ॥ ४ ॥ तुका म्हणे भोळा भाविक हा देव । आम्ही त्याचे पाव धरुनी ठेलों ॥ ५ ॥ [१४३०]

जे कोणी अनाथ पंढरीस जातील त्यांना त्या ठिकाणीं सर्व दुःख, दारिद्र्य जाऊन तृप्त होईतोंपर्यंत सुख मिळतें १. त्या ठिकाणीं उदारांचा राजा जो पंढरीनाथ राहात आहे तो बाहु उभारून सर्वांना मजकडे या म्हणून बोलावीत आहे २. त्या देवाला शहाण्यापेक्षां नेणत्याची (भोळ्या भाविकाची) फार प्रीति आहे. त्या नेणत्या भक्ताला तो आवडीनें आलिंगन देतो ३. त्याचा सर्व शीण हरण करून त्याच्या मोबदला प्रेम देतो. त्याविषयीं लाभतोट्याचा विचार करीत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही अनाथ दुर्बळ आहों म्हणून पांडुरंग आमचें प्रतिपालन करितो ५. [१४२७]

हे पांडुरंगा, तुजवांचून दुसरी गोष्ट माझ्या जिवाला आवडत नाहीं ह्याला मी काय करूं ? १. तुझीच कीर्ति वर्णन करावी ही माझ्या मुखाला गोडी आहे व तीच कीर्ति ऐकावी अशी कानांस आवड आहे (मुखाला तुझें नामच गोड वाटतें व कानालाहि त्याचीच आवड आहे) आणि माझें चित्त तुझ्या पायांकडे ओढ घेत आहे २. ज्या शब्दामध्यें विठ्ठल हें नांव नाहीं तो शब्द ऐकल्याबरोबर मोठा त्रास होतो ३. मी तुझा आहें असें म्हणवितों आणि म्हणून तुजवांचून दुसऱ्याचा म्हणविण्याविषयीं मला लाज वाटते, म्हणून सहजसुद्धां हें (लोकांपुढें) बोलावें असें वाटत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, सर्वभावानें (काया–वाचा–मनानें) मला तूंच आवडतोस ५. [१४२८]

हे देवा, जसें मला कळेल तसें तुला गाईन. तुजवांचून लोकांशीं माझें काय काम आहे ? १. माझ्या जिवाला जसें गोड लागेल आणि मनाला जशी आवडेल तशी मी तुझी स्तुति करीन २. हरिनामछंदानें आनंदभरित होऊन त्याच छंदांत नाचेन ३. ह्यावांचून अन्य ज्ञानचातुर्य व जाणतेपणाचे प्रकार हीं सर्व घेऊन मला काय करावयाचें आहे ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या बरोबर माझें काम आहे तो पांडुरंग सहज भोळा आहे (त्याला कलाकौशल्याची अपेक्षाच नाहीं) ५. [१४२९]

ज्याच्या चित्तामध्यें देवाविषयींचाच एक भाव आहे, अशा प्रकारचे अज्ञ लोक (भोळीं भाविक माणसें) देवाला फार आवडतात १. उपमन्यु, ध्रुव, प्रल्हाद हीं बाळें जाणतीं नसून, चित्तामध्यें एकभावानें नारायणाचें स्मरण केल्यामुळें (त्याला तीं फार आवडतीं झालीं) २. वाल्या कोळी व शबरी भिलीण व चतुष्पाद अशीं अगणित जनावरें (गजेंद्र, नक्र, जांबुवान्) या कृपासागर देवानें आपल्या स्मरणाबरोबर तारलीं ३. गोकुळामध्यें गाई राखणारे गोपाळ हे चांगले शहाणे (विद्वान्) होते काय ? पण चक्रपाणी देव त्यांच्याबरोबर जेवीत होता ४. तुकाराम महाराज म्हणतात, हा देव केवळ भोळा भाविक आहे म्हणून त्याचे पाय धरून आम्ही राहिलों आहों ५. [१४३०]

न लगे पाहावें अबद्ध वांकडें । उच्चारावें कोडें नाम तुझें ॥ १ ॥ नाहीं काळ वेळ पंडितांचा धाक। होत कां वाचक वेदवक्ते ॥ २ ॥ वेदीं जें प्रतिपाद्य न कळे पाहातां । तैशीं या अनंता ठेवूं नामें ॥ ३ ॥ आपुलिया मना उपजे आनंद । तैसे करूं छंद कथाकाळीं ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्ही आनंदेंचि धालों। आनंदाचि ल्यालों अळंकार ॥ ५ ॥ [१४३१]

दैन्य दुःख आम्हां न येती जवळी । दहन हे होळी होती दोष ॥ १ ॥ सर्व सुखें येती मानें लोटांगणीं । कोण यांसी आणी दृष्टीपुढें ॥ २ ॥ आमुची आवडी संतसमागम । आणीक त्या नाम विठोबाचें ॥ ३ ॥ आमुचें मागणें मागों त्याची सेवा। मोक्षाची निर्देवा कोण चाड ॥ ४ ॥ तुका म्हणे पोटीं सांठविला देव । न्यून तो हा भाव कोण आम्हां ॥ ५ ॥ [१४३२]

काळतोंडा सुना । भलतें चोरुनि करी जना ॥ १ ॥ धिग त्याचें साधुपण। विटाळुनि वर्ते मन ॥ २ ॥ मंत्र ऐसे घोकी । वश व्हावें जेणें लोकीं ॥ ३ ॥ तुका म्हणे थित । नागवला नव्हे हित ॥ ४ ॥ [१४३३]

विठ्ठल मुक्तिदाता । नव्हे मरो हें बोलतां ॥ १ ॥ मज न साहावे कानीं । विष उत्तर लागे मनीं ॥ २ ॥ हरिकथेतें धिक्कारी । शत्रु माझा तोची वैरी ॥ ३ ॥ सुना काळतोंडा । जो या देवा म्हणे धोंडा ॥ ४ ॥ अहं म्हणे ब्रह्म। नेणें भक्तीचें तें वर्म ॥ ५ ॥ तुका म्हणे क्षण । नको तयाचें दर्शन ॥ ६ ॥ [१४३४]

यमपुरी त्यांनीं वसविली जाणा । उच्छेद भजना विधि केला ॥ १ ॥ अवघड कोणी न करी

हे देवा, आम्ही कौतुकानें तुझ्या नामाचा उच्चार करतों तो अबद्ध आहे, कीं वांकडा आहे हें आम्ही पाहात नाहीं १. तें नाम घेण्याला चांगल्या काळवेळाची जरुरी नाहीं व अध्ययन करून वेदाचे वक्ते असणाऱ्या पंडितांचें आम्हांला भय नाहीं (कारण तें नाम सर्वतोपरी निर्दोषच आहे) २. वेदामध्यें जें प्रतिपादन केलें आहे त्याचा शोध करून पाहातां जीं देवाचीं नांवें सांपडणार नाहींत, तीं नामें आम्ही आपल्या मनाच्या आवडीनें ह्या अनंताला ठेवूं ३. ज्या योगानें आपल्या मनाला आनंद होईल तसे छंद आम्ही हरीची कथा करतांना करूं ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही ह्या आनंदानेंच तृप्त झालों आहोंत व ह्याच आनंदाचे सर्व अलंकार आम्हीं अंगावर धारण केले आहेत ५. [१४३१]

आमच्याजवळ कोणत्याही प्रकारचीं दुःखें व दारिद्र्य येत नाहींत; आणि सर्व दोष जळून राख (खाक) होतात १. त्रिभुवनांतील सर्व सुखें मोठ्या मानानें आम्हांला लोटांगणें घालतात पण त्यांना तुच्छ मानून आम्ही आपल्या दृष्टीसमोर देखील तीं येऊं देत नाहीं २. संतांच्या संगतीनें विठोबारायाचें नाम वाचेनें गावें हीच आम्हांला आवड आहे ३. आम्हांस जें कांहीं मागावयाचें आहे तें विठोबारायाची सेवा करावी हेंच मागूं. ह्यावांचून मोक्ष मागणारे करंटे कोणी असतील ते असोत ४. तुकाराम महाराज म्हणतात, सकळ ब्रह्मांडनायक जो देव तो आम्हीं आपले हृदयांत सांठविला आहे. आतां कोणती गोष्ट आम्हांला कमी आहे? ५. [१४३२]

लोकांना कळूं न देतां सांदी कोंदीनें भलतेंच आचरण करणारा मनुष्य असला तरी तो काळतोंड्या कुत्रा आहे असें समजावें १. व्यभिचार–कर्मानें मन ओंवळे करून साधुपणाची वर्तणूक बाहेर दाखवितो त्याच्या साधुत्वाला धिःकार असो २. ज्या योगानें आपणाला लोक वश होतील असे वशीकरणादि मंत्र तो घोकून पाठ करतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याचेजवळ सिद्ध वस्तु जी होती तिच्याविषयीं (सिद्ध असलेल्या देवाविषयीं पूर्ण) नागवला म्हणून त्याचें हित कधींहि होणार नाहीं ४. [१४३३]

विठ्ठल हा मुक्ति देणार नाहीं असें जर कोणी बोलतील तर ते तात्काळ मरून जावेत १. तें बोलणें मला कानानें ऐकणें सहन होत नाहीं व मनास तें विषासारखें वचन आहे असें वाटतें २. हरिकीर्तनाचा जो धिःकार करील तो माझा केवळ पूर्ण शत्रुत्वानें वैरी झाला आहे ३. पांडुरंग हा दगडाचा आहे असें कोणी म्हणेल तर तो मनुष्य असला तरी तो काळतोंड्या कुत्रा आहे ३. मीच ब्रह्म आहें असें जो म्हणतो त्याला खऱ्या भक्तीचें मर्म मुळींच कळलें नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, अशा लोकांचें दर्शन मला क्षणभर देखील होऊं देऊं नको ६. [१४३४]

जे कोणी देवाच्या भजनविधीचा उच्छेद करतील ते अखेरीस यमपुरीमध्यें वस्ती करतील असें समजावें १. कोणाला

सांगतां । सुलभ बहुतां गोड वाटे ॥ २ ॥ काय ते नेणते होते मागें ऋषी । आचार लोकांसी ग्रंथ केले ॥ ३ ॥ द्रव्य दारा कोणें स्थापियेलें धन । पिंडाचें पाळण विषयभोग ॥ ४ ॥ तुका म्हणे दोहीं ठायीं फजित । पावे यमदूत जना हातीं ॥ ५ ॥ [१४३५]

न कळतां कोणीं मोडियेलें व्रत । तया प्रायश्चित्त चाले कांहीं ॥ १ ॥ जाणतियां वज्रलेप झालें थोर । तयास अघोर कुंभपाक ॥ २ ॥ जातां तरी कोणी नाइके सांगतां । तया शिकवितां तेंचि पाप ॥ ३ ॥ काय करूं मज देवें बोलविलें । माझें खोळंबलें काय होतें ॥ ४ ॥ तुका म्हणे जना पहा विचारूनी । सुख वाटे मनीं तेंचि करा ॥ ५ ॥ [१४३६]

वाचे विठ्ठल नाहीं । तोचि प्रेतरूप पाहीं । धिग त्याचें ज्यालेपण । भार न साहे मेदिन (नी) ॥ २ ॥ न बैसे कीर्तनीं । गुण नाइके जो कानीं ॥ ३ ॥ जातां कंटाळे देउळा । तोचि सुना मुख काळा ॥ ४ ॥ हरिभक्तीविण । त्याचें जळो शहाणपण ॥ ५ ॥ तुका म्हणे तेणें । वंशा आणियेलें उणें ॥ ५ ॥ [१४३७]

तारिलीं बहुतें चुकवूनि घात । नाम हें अमृत स्वीकारितां ॥ १ ॥ नेणतां सायास शुद्ध आचरण । यातीकुळहीन नामासाठीं ॥ ३ ॥ जन्म नांव धरी भक्तीच्या पाळणा । आकार कारणा याचसाठीं ॥ ३ ॥ असुरीं दाटली पाप होतां फार । मग फेडी भार पृथिवीचा ॥ ४ ॥ तुका म्हणे देव भक्तपणा सार । कवतुक वेव्हार तयासाठीं ॥ ५ ॥ [१४३८]

याचिया आधारें राहिलों निश्चिंत । ठेवूनियां चित्त पायीं सुखें ॥ १ ॥ माझें सुख दुःख जाणें

कठीण गोष्ट (धर्माप्रमाणें वाग, हरिभक्ति कर, ही गोष्ट) सांगितली असतां ते ती करीत नाहींत; बहुतेक लोकांना सोपें असेल तें (स्वैर वर्तन) बरें वाटतें २. लोकांना कसें वागावें, कर्तव्य–अकर्तव्य कोणतें हें सांगणारे आधारभूत असे जे ग्रंथ पूर्वी ऋषींनीं करून ठेविले आहेत, ते ऋषी वेडे होते काय? ३. द्रव्य मिळवून स्त्रीपुत्रादि विषयांचा उपभोग घ्यावा व आपल्या देहाचें रक्षण करावें असें मत कोणत्या ऋषीनें स्थापित केलें आहे? ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा जो मनुष्य तो परमार्थ केला नाहीं म्हणून संतजनांकडून व पापी म्हणून यमदूतांकडून, अशा दोन्हींकडून फजीत होतो ५. [१४३५]

एकादशी व्रत न समजून कोणीं मोडलें तर त्याला कांहीं प्रायश्चित्त चालेल १. पण तें व्रत जाणूनबुजून मोडलें तर तें पाप वज्रलेपाप्रमाणें होऊन त्याला अखेरीस अघोर कुंभ (भी) पाक नरक भोगावा लागेल २. अशा पापाच्या वाटेनें कोणी जात असल्यास त्याला कोणी जाऊं नको म्हणून सांगितलें तर तें तो ऐकत नाहीं. अशाला कांहीं शिकविलें तर तें शिकविणारास पाप लागतें ३. हे प्रकार सांगण्यावांचून माझा खोळंबा नव्हता पण मला देवानें बोलविलें (लोकांना उपदेश कर म्हणून सांगितलें तर) त्याला मी काय करूं? ४. तुकाराम महाराज म्हणतात, अहो जन हो, ह्याचा तुम्ही विचार करून पाहा, मग तुमच्या मनाला ज्याच्या योगानें सुख वाटेल तेंच करा ५. [१४३६]

ज्याच्या वाचेला विठ्ठल नाम येत नाहीं तो मनुष्य जिवंत असून प्रेताप्रमाणें आहे असें जाणावें १. त्याच्या जीवित्वाला धिःकार असो! कारण, त्याचा भार पृथ्वीला सहन होत नाहीं २. हरीचे गुणानुवाद हरिकीर्तनांत बसून कधींहि कानानें ऐकत नाहीं ३. देवाचे दर्शनाकरितां देवालयास जाण्याचा ज्याला कंटाळा आहे तो मनुष्य असला तरी काळतोंड्या कुत्र्याप्रमाणें समजावा ४. ज्याला हरीची भक्ति ठाऊक नाहीं, त्याच्या शहाणपणाला आग लागो ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा मनुष्यानें आपल्या सर्व वंशाला लांछन आणलें ६. [१४३७]

जे कोणी हरिनामामृताचें सेवन करणारे आहेत त्यांना देवानें अनेक आघातांपासून रक्षण करून तारलें १. ते यातिकुलहीन आहेत किंवा शुद्धाचरणानें वागतात कीं नाहीं हें कांहीं न पाहातां केवळ आपलें नित्य नाम घेणारांस देवानें तारलें २. आपल्या भक्तांचें रक्षण करण्याकरितां देव आकाराला येऊन विठ्ठल हें जन्मनाम धारण केलें (अजन्मा असून जन्म घेतो; अनाम असून नाम धारण करतो) ३. ज्या वेळीं दैत्य उन्मत्त होऊन फार पातक होतें, त्या वेळीं तो भार पृथ्वीला सहन होत नाहीं म्हणून देव अवतार घेऊन भूभार हरण करितो ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवाला देवभक्तपणा सारभूत वाटल्यामुळें तो कौतुकानें भक्तीचा व्यवहार वाढवितो ५. [१४३८]

ह्या देवाच्या पायांजवळ आम्ही सुखानें चित्त ठेवून ह्याच्याच आश्रयानें चिंताविरहित होऊन राहिलों १.

हित फार । घातलासे भार पांडुरंगा ॥ २ ॥ कृपेचीं पोसणीं ठायींचीं अंकिलीं । म्हणवुनी लागली यास चिंता ॥ ३ ॥ मन राखे हातीं घेऊनियां काठी । इंद्रियें थापटी फांकों नेदी ॥ ४ ॥ तुका म्हणे यासी अवघड नाहीं । शरणागता कांहीं रक्षावया ॥ ५ ॥ [१४३९]

उभाउभी फळ । अंगीं मंत्रांचें या बळ ॥ १ ॥ म्हणा विठ्ठल विठ्ठल । गोड आणि स्वल्प बोल ॥ २ ॥ कळिकाळाची बाधा । नव्हे उच्चारितां सदा ॥ ३ ॥ तुका म्हणे रोग । वारे भवा ऐसा भोग ॥ ४ ॥ [१४४०]

जैसा अधिकार । तैसें बोलावें उत्तर ॥ १ ॥ काय वाउगी घस घस । आम्ही विटोबाचे दास ॥ २ ॥ आम्ही जाणों एका देवा । जैसी तैसी करूं सेवा ॥ ३ ॥ तुका म्हणे भावें । माझें पुढें पडेल ठावें ॥ ४ ॥ [१४४१]

न वजतां घरा । आम्ही कोणाच्या दातारा ॥ १ ॥ कां हे छळूं येती लोक । दाट बळेंचि कंटक ॥ २ ॥ नाहीं आम्ही खात । कांहीं कोणाचें लागत ॥ ३॥ कळे तैसी सेवा । तुका म्हणे करूं देवा ॥ ४ ॥ [१४४२]

मोहरोनी चित्ता । आणूं हळूचि वरि हिता ॥ १ ॥ तों हे पडती आघात । खोडी काढिती पंडित ॥ २ ॥ संसारा भेणें । कांहीं उसंती तो पेणें ॥ ३ ॥ एकादिया भावें । तुका म्हणे जवळी यावें ॥ ४ ॥ [१४४३]

काय जाणों वेद । आम्ही आगमाचे भेद ॥ १ ॥ एक रूप तुझें मनीं । धरूनि राहिलों चिंतनीं ॥ २ ॥ कोठें अधिकार । नाहीं रानट विचार ॥ ३ ॥ तुका म्हणे दीना । नुपेक्षावें नारायणा ॥ ४ ॥ [१४४४]

आम्हीं आपला सर्व भार पांडुरंगावर घातला आहे, म्हणून आमचें सुखःदुःख जाणून ज्यांत आमचें अति हित आहे तें तो करतो २. आम्ही मुळांतच त्याचे आज्ञाधारक असून त्याच्या कृपेनें आमचें पोषण होत आहे, म्हणून आमची सर्व चिंता त्यालाच करावी लागते ३. तो देव हातामध्यें विवेकाची काठी घेऊन आमच्या मनाचें रक्षण करतो व सर्व इंद्रियांस कोठें धावूं न देतां वरचेवर त्यांना सावध करितो ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या सर्वसमर्थ देवाला शरणागताचें रक्षण करणें कांहीं अवघड नाहीं ५. [१४३९]

उभ्या उभ्या फलप्राप्ति करून देण्याचें सामर्थ्य (ध्रुवपदांत दर्शविलेल्या) (विठ्ठलनाम) मंत्राचे अंगीं आहे १. म्हणून तुम्ही गोड आणि सुलभ अशा विठ्ठल नाममंत्राचा उच्चार करा २. ह्या मंत्राचा सर्वकाळ उच्चार केला असतां कळिकाळाची बाधा होणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या मंत्रानें संसारासारख्या रोगाच्या भोगाचें निवारण होतें ४. [१४४०]

ज्याचा जसा अधिकार आहे त्याप्रमाणें उपदेशाची योजना करावी १. आम्ही विठोबारायाचे दास आहोंत म्हणून तुमची (उपदेशाची) व्यर्थ कटकट आमचेपुढें काय उपयोगी ? २. आम्ही एक देवच जाणतों आणि त्याचीच सेवा जशी जमेल तशी, यथाशक्ति यथामति, करितों ४. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी भावार्थानें घेतील त्यांना हें माझें करणें (माझी पुढें होणारी गति, सदेह वैकुंठाला जाणें) अखेरीस कळून येईल ४. [१४४१]

हे दातारा, आम्ही कोणाच्याहि घरीं जात नाहीं १. असें असून हे दुर्जन लोक बळेंच आम्हांला छळण्याकरितां कां येतात ? २. आम्ही कोणाचें कांहीं खात नाहीं व कोणाचें कांहीं लागत नाहीं. ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, जशी आम्हांला कळेल तशी आम्ही तुझी सेवा करूं ४. [१४४२]

आम्ही आपलें चित्त आकर्षण करून हळुहळू स्वहिताच्या मार्गाकडे त्याला आणतों १. तितक्यामध्यें पंडित जन कांहीं तरी आमची चुकी काढतात व त्या योगानें आशंकेचे आघात पडतात (शंका उत्पन्न होते) २. संसाराचें भय वाटून परमार्थमार्गानें हळुहळू चालून आम्ही वरचेवर मुक्काम गांठतों ३. तुकाराम महाराज म्हणतात. कोणत्यातरी एखाद्या भावानें देवाजवळ यावें अशी आमची इच्छा आहे ४. [१४४३]

हे देवा, आम्ही वेदांतील गुह्य जाणत नाहीं व शास्त्रांचेंहि तात्पर्य जाणत नाहीं १. एक तुझें रूप मनामध्यें धरून अखंड नामचिंतन करितों २. आम्ही कोणत्याहि विषयीं अधिकारी नाहीं. आम्ही केवळ रानटी आहों ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, आम्ही केवळ इंद्रियांधीन झालेले दीन आहोंत म्हणून आमची उपेक्षा करूं नका ४. [१४४४]

धर्माचें पाळण। करणें पापांड (पाखांड) खंडण ॥ १ ॥ हेंचि आम्हां करणें काम। बीज वाढवावें नाम ॥ २ ॥ तीक्ष्ण उत्तरें। हातीं घेऊनि बाण फिरे ॥ ३ ॥ नाहीं भीड भार। तुका म्हणे साना थोर ॥ ४ ॥ [१४४५]

निवडावे खडे। तरी दळण वोजें (वोज) घडे ॥ १ ॥ नाहीं तरि नासोनि जाय। कारण आळस उरे हाय ॥ २ ॥ निवडावें तन। सेतीं करावें राखण ॥ ३ ॥ तुका म्हणे नीत। न विचारितां नव्हे हित ॥ ४ ॥ [१४४६]

दुर्जनाचा मान। सुखें करावा खंडन(ण) ॥ १ ॥ लाता हाणोनियां वारी। गुंडा वाट शुद्ध करी ॥ २ ॥ बहुतां पीडी खळ। त्याचा धरावा विटाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे नखें। काढुनि टाकिजेती सुखें ॥ ४ ॥ [१४४७]

नका धरूं कोणी। राग वचनाचा मनीं ॥ १ ॥ येथें बहुतांचें हित। शुद्ध करोनि राखा चित्त ॥ २ ॥ नाहीं केली निंदा। आम्हीं दूषिलेंसे भेदा ॥ ३ ॥ तुका म्हणे मज। येणेंविण काय काज ॥ ४ ॥ [१४४८]

कांहीं जडभारी। पडतां ते अवसरीं ॥ १ ॥ तुझे आठवावे पाय। आम्हीं मोकलूनि धाय ॥ २ ॥ तान पीडी भूक। शीत उष्ण वाटे दुःख ॥ ३ ॥ तुका म्हणे देहयोगें। वारंवार पिडितां भोगें ॥ ४ ॥ [१४४९]

होऊनि कृपाळ। भार घेतला सकळ ॥ १ ॥ तूंचि चालविसी माझे। भार सकळही ओझें ॥ २ ॥ देह तुझ्या पायीं। ठेवुनि झालों उतराई ॥ ३ ॥ कायावाचामनें। तुका म्हणे दुजें नेणें ॥ ४ ॥ [१४५०]

सर्व पाषांड मताचें खंडण करून (वेदप्रतिपादित) धर्म रक्षण करावा १. तो असा, कीं सर्व धर्माचें बीज जें भगवंताचें नाम तें वाढवावें. त्याचा सर्वत्र प्रसार करावा हेंच काम आम्हांला करणें जरूर आहे २. ह्याविषयीं कठोर शब्दरूपी बाण हातामध्यें घेऊन आम्ही फिरत असतों (कठोर शब्दांनीं उपदेश करतों) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें काम करण्यास आम्हांला लहान अथवा थोर ह्यांची भीड नाहीं ४. [१४४५]

खडे निवडून धान्य दळलें असतां व्यवस्थित दळण होतें १. तसें आळसानें न केलें तर दळण बिघडून (भाकरी खातांना दांताला खडे लागून) हाय हाय करावें लागेल २. जें शेत पेरलें आहे त्यांतील गवत खुरपून पिकाचें रक्षण करावें म्हणजे लाभ होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, धर्मनीतीचा विचार केला नाहीं तर आपलें हित होणार नाहीं ४. [१४४६]

दुर्जनाची मानखंडणा सुखानें करावी (त्यायोगानें मुळींच पाप लागत नाहीं) १. ज्याप्रमाणें वाटेवर पडलेला दगड लाथ हाणून वेगळा काढला म्हणजे वाट साफ होते २. बहुतांना त्रास देणारा जो दुर्जन त्याचा अवश्यमेव विटाळ मानावा ३. तुकाराम महाराज म्हणतात, जशीं आपल्या हातापायाचीं नखें आपण सुखानें काढून टाकतों (तसा दुर्जनांचा त्याग करावा.) [१४४७]

ह्या माझ्या उपदेशाचा कोणी राग मानूं नका १. तुम्हीं आपलें चित्त शुद्ध करून माझा उपदेश ऐकलात तर त्यापासून बहुतांचें हित होणार आहे २. आम्हीं कोणाची निंदा केली नाहीं पण ज्याच्याजवळ भेददृष्टीचा अवगुण आहे त्याचा मात्र निषेध केला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, नाहीं तर ह्यावांचून माझें काय खोळंबलें आहे ? ४. [१४४८]

आम्हांला ज्या वेळेस कांहीं संकट येईल त्या वेळेस १. हे देवा, तुझ्या पायांची आठवण करून आम्ही मोठ्यानें हंबरडा फोडूं २. आम्हांला कांहीं तहान-भुकेची पीडा झाली अगर शीतउष्णादि दुःख वाटलें तरी तुझा आठव करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देहाच्या योगानें वरचेवर प्रारब्धभोगाची पीडा होईल (व्याधि आणि इतर दुःखें होतील) तर तुझे पायांचा आठव करूं ४. [१४४९]

हे देवा, तूं कृपाळु होऊन माझा सर्व भार घेतला आहेस १. माझ्या योगक्षेमाचें ओझें (माझ्या संसाराचा आणि परमार्थाचा सर्व भार) नेहमीं तूंच वाहातोस २. मी आपला देह तुझे पायीं अर्पण करून (तुझ्या उपकारांतून) उत्तीर्ण झालों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्यावांचून कायावाचामनानें मी दुसरें जाणत नाहीं ४. [१४५०]

आतां होईं माझे बुद्धीचा जनिता । आवरावें चित्ता पांडुरंगा ॥ १ ॥ येथूनियां कोठें न वजें बाहेरी । ऐसें मज धरीं सत्ताबळें ॥ २ ॥ अनावर गुण बहुत (तां) जातींचे । न बोलावे वाचे ऐसें करीं ॥ ३ ॥ तुका म्हणे हित कोणिये जातीचें । तुज ठावें साचें मायबापा ॥ ४ ॥ [१४५१]

नित्य मनासी करितों विचार । तों हें अनावर विषयलोभी ॥ १ ॥ आतां मज राखें आपुलिया बळें । न देखें हें जाळें उगवतां ॥ २ ॥ सांपडला गळीं नाहीं त्याची सत्ता । उगळी मागुता घेतला तो ॥ ३ ॥ तुका म्हणे मी तों अज्ञानची आहें । परि तुझी पाहें वास देवा ॥ ४ ॥ [१४५२]

दुर्बळाचे हातीं सांपडलें धन । करितां जतन नये त्यासी ॥ १ ॥ तैसी परि मज झाली नारायणा । योगक्षेम जाणा तुम्ही आतां ॥ २ ॥ खातां लेतां नये मिरवितां वरी । राजा दंड करी जनराग ॥ ३ ॥ तुका म्हणे मग तळमळ उरे । देखिलें तें झुरे पाहावया ॥ ४ ॥ [१४५३]

मागें जैसा होता माझे अंगीं भाव । तैसा एक ठाव नाहीं आतां ॥ १ ॥ ऐसें ग्वाही माझें मन मजपाशीं । तुटी मुद्लेंसी दिसे पुढें ॥ २ ॥ पुढिलांचे मना आणीं गुणदोष । पूज्य आपणांस करावया ॥ ३ ॥ तुका म्हणे जाली कोंबड्याची परी । पुढेंचि उकरी लाभ नेणें ॥ ४ ॥ [१४५४]

किती तुजपाशीं देऊं परिहार । जाणसी अंतर पांडुरंगा ॥ १ ॥ आतां माझे हातीं देईं माझें हित । करी माझें चित्त समाधान ॥ २ ॥ राग आला तरी कापूं नये मान । बाळा मायेविण कोण दुजें ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसा होईल लौकिक । मागे बाळ भीक समर्थाचें ॥ ४ ॥ [१४५५]

हे पांडुरंगा, आतां तूं सद्बुद्धीचा दाता होऊन माझें चित्त विषयांपासून आंवरून ठेव १. तुझ्या पायांपासून चित्तानें कोठें बाहेर जाऊं नये असें तूं सत्तासामर्थ्यानें माझें रक्षण कर २. माझे ठिकाणीं पुष्कळ प्रकारचे दुर्गुण अनावर झाले आहेत. ते माझ्या तोंडांतून निघूं नयेत असें तूं कर (म्हणजे ते घालीव) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे मायबापा, हिताचें खरें स्वरूप तूं जाणतोस ४. [१४५१]

नेहमीं मी मनाच्या ठिकाणीं विचार करतों (कीं आपण अखंड भजन करावें, विषयसेवन करूं नये), पण तें मन मुळांत अनिवार व विषयलोभी आहे १. हे देवा, आतां तूं आपल्या सामर्थ्यानें माझें रक्षण कर. मनाच्या जाळ्यांतून (मायाजाळांतून) सुटका करून घेण्याची शक्ति माझ्यांत नाहीं २. ज्या माशानें गळ गिळिला आहे त्याला तो परत ओकून टाकण्याची शक्ति नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी अज्ञानी आहें; पण हे देवा, मी तुझी वाट पाहात आहें ४. [१४५२]

दरिद्र्याला आणि अशक्ताला मिळालेल्या धनाचें रक्षण करतां येत नाहीं १. तसाच हे नारायणा, माझा प्रकार झाला आहे. (तुम्ही मला भुक्ति, भक्ति आणि मुक्ति ह्यांपैकीं कांहींहि दिलेंत तरी त्याचें रक्षण करण्यास मी असमर्थ आहें.) ह्या योगक्षेमाची (आजवर न मिळालें तें मिळणें म्हणजे योग, आणि मिळालेल्याचें जतन करणें म्हणजे क्षेम ह्यांची) व्यवस्था आतां तुमच्याकडे आहे २. दरिद्र्याला मिळालेल्या धनाचा उपभोग, त्यालाच वस्त्र, अलंकार वगैरे भूषणें मिरवून घेतां येत नाहीं. त्याचें धन चोरीचें असें समजून राजा दंड करून तें हरण करितो व त्याजवर जनाचाहि रोष (द्वेष, मत्सर) असतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारें सर्व धन नाहींसें झाल्यावर त्याविषयीं (तें परत मिळावें व पाहावें अशी) तळमळ मात्र उरते ४. [१४५३]

ह्यापूर्वी देवाविषयीं माझ्यामध्यें जो भाव होता, त्याचा एक अंश देखील आतां माझ्यामध्यें राहिलेला नाहीं १. ह्याविषयीं माझें मनच मला साक्ष देत आहे, पूर्वीच्या भावरूपी मुद्लांत नुकसान आल्याचें दिसतें २. दुसऱ्यांचे गुणदोष माझे मनास भासतात, त्या योगानें मी पूज्य आहें असें मला वाटतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, कोंबडें हें कांहीं खावयास मिळावें म्हणून पंजानें पुढें उकरतें त्यांत त्याचें खाद्य निघून जातें, म्हणून त्याला त्याचें खरें खाद्य दिसत नाहीं (तसा माझा प्रकार झाला आहे) ४. [१४५४]

देवा, माझी स्थिति मी तुझे जवळ किती सांगूं? हे पांडुरंगा, तूं सर्वांच्या अंतःकरणांतील जाणत आहेस १. ह्याकरितां आतां माझें हित माझ्या हातीं देऊन (माझ्या अनुभवास आणून देऊन) माझ्या चित्ताचें समाधान कर २. बालकाचा कितीहि राग आला तरी आईनें त्याची मान कापूं नये; कारण, आईवांचून बालकास दुसरा कोणाचा आश्रय आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी तुमचें—समर्थांचें बालक भीक मागत आहें, असा तुमचा दुर्लौकिक होईल ४. [१४५५]

लाज वाटे पुढें तोंड दाखवितां । परि जाऊं आतां कोणापाशीं ॥ १ ॥ चुकलिया काम मागतों मुशारा । लाज फजितखोरा नाहीं मज ॥ २ ॥ पाय सोडुनियां फिरतों बासर । स्वामिसेवे (वा) चोर होऊनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे मज पाहिजे दंडिलें । पुढें हें घडलें न पाहिजे ॥ ४ ॥ [१४५६]

पुढिलिया सुखें निंब देतां भलें । बहुत वारलें होय दुःख ॥ १ ॥ हें तों वर्म असे माऊलीचे हातीं । हाणी मारी प्रीती हितासाठीं ॥ २ ॥ खेळतां विसरे भूक तान घर । धरूनियां कर आणी बळें ॥ ३ ॥ तुका म्हणे पाळी तोंडिचिया घांसें । उदार सर्वस्वें सर्वकाळ ॥ ४ ॥ [१४५७]

आतां गुण दोष काय विचारिसी । मी तों आहें रासी पातकांची ॥ १ ॥ पतितपावनासवें समागम । आपलाला धर्म चालवीजे ॥ २ ॥ घनघायें भेटी लोखंड परिसा । तरी अनारिसा न पालटे ॥ ३ ॥ तुका म्हणे माती कोण पुसे फुका । कस्तुरीच्या तुका समागमें ॥ ४ ॥ [१४५८]

कृपावंत दुजें नाहीं तुम्हां पोटीं । लाडें बोलें गोठी सुख मातें ॥ १ ॥ घेवोनि भातुकें लागशील पाठीं । लाविशील ओठीं ब्रह्मरस ॥ २ ॥ आपुलिये पांखें घालिसी पाखर । उदार मजवर कृपाळू तूं ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हांकारणें गोविंदा । वागविसी गदा सुदर्शन ॥ ४ ॥ [१४५९]

पाळिलों पोसिलों जन्मजन्मांतरीं । वागविलों करीं धरोनियां ॥ १ ॥ आतां काय माझा घडेल अव्हेर । मागें वहु दूर वागविलें ॥ २ ॥ नेदीं वारा अंगीं लागों आघाताचा । घेतला ठायींचा भार माथां ॥ ३ ॥ तुका म्हणे बोल करितों आवडी । अविट तेचि गोडी अंतरींची ॥ ४ ॥ [१४६०]

देवा, येथून पुढें माझ्याकडून कोणतीच सेवा न घडल्यामुळें तुम्हांला तोंड दाखविण्याची मला लाज वाटते, पण आतां तुम्हांखेरीज कोणीकडे जावें ? १. मी तुमची सेवा करावयाची चुकलों असून त्याच्याबद्दलचा मुशारा (बक्षीस) मागत आहें, असा मी निर्लज्ज फजीतखोर आहें २. फांटा फुटल्यासारखा अंगचोरपणानें मी पायानें सैरावैरा फिरतों. त्यामुळें स्वामीचे सेवेविषयीं मी चोर झालों आहें म्हणजे स्वामीची सेवा न करणारा आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां येथून पुढें माझ्या हातून अशा प्रकारचा व्यवहार न होईल अशी तुम्ही मला शिक्षा करा ४. [१४५६]

आपल्यापुढें असणाऱ्या रोग्यास कडुलिंबाप्रमाणें कडु औषध देणें हें चांगलें आहे. त्यापासून रोगदुःखाची निवृत्ति होऊन सुखलाभ होतो १. मुलाचे हिताकरितां अंतरीं प्रीति ठेवून वरवरच्या रागानें त्याला मारहाण करणें हा एक प्रकार आईच जाणते २. बालक हें दुसऱ्या मुलांमध्यें खेळण्याच्या नादामध्यें आपल्या घरीं जाण्याचें व तहानभुकेलाहि विसरतें. तथापि आई ही त्यास शोधून बळजोरीनें हात धरून घरीं आणते ३. तुकाराम महाराज म्हणतात, आई ही तोंडच्या घासानें सर्वतोपरी मुलाचें सर्वकाळ रक्षण करते. अशी ती (काया-वाचा-मनानें मुलाकरितां) उदार आहे ४. [१४५७]

हे देवा, मी पातकांची राशि आहें, आतां तुम्ही माझ्या ठिकाणीं असलेल्या पातकांचा विचार काय करितां ? १. आम्हांस नेहमीं पतितपावन अशा तुझा समागम आहे. अर्थात् आम्हीं व तुम्हीं आपला धर्म राखावा २. लोखंडाच्या घणानें परिसाच्या शिळेवर घाव मारण्याच्या निमित्तानें जरी परिसाशीं त्याचा संबंध झाला तरी त्याचें अन्य रूप न होतां तें सुवर्ण होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मातीला फुकटहि कोणी पुसत नाहीं, पण तिलाच कस्तुरीच्या समागमानें किंमत येते ४. [१४५८]

हे देवा, कृपावंता, तुमच्या पोटांत दुजा भाव नाहीं ह्याकरितां तुम्ही आम्ही मोठ्या प्रेमानें गोष्टी बोलूं. त्या योगानें मला सुख होईल १. तूं हातांत खाऊ घेऊन आपले बालकांचे मागें लागतोस व त्यांचे मुखीं ब्रह्मरस घालतोस २. आपले असोत अगर परके असोत, त्यांच्यावर तूं कृपेची छाया करितोस. अशा प्रकारचा तूं कृपाळू असून मजविषयीं उदार आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे गोविंदा, तूं आमचे रक्षणाकरितां सुदर्शन व गदा हीं आयुधें धारण करीत आहेस ४. [१४५९]

पूर्वी अनेक जन्मीं तुम्हीं आम्हांला हातांत धरून वागवून आमचें पालनपोषण केलें १. अशा प्रकारें फार प्राचीन कालापासून आजपर्यंत आम्हांला वागवीत आलांत. आतां हे देवा, माझा अव्हेर तुमच्याकडून होईल काय ? २. आमचे अंगास कोणतेहि प्रकारच्या आघाताचा वाराहि लागूं नये अशाविषयींचा भार तुम्हीं आपले मस्तकावर मूळचाच घेतला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या अवीटासंबंधींची गोडी माझ्या अंतःकरणांत आहे त्याच्याच विषयीं मी प्रीतीनें आपणांशीं बोलत आहें ४. [१४६०]

पांडुरंगा कांहीं आइकावी मात। न करावें मुक्त आतां मज ॥ १ ॥ जन्मांतरें मज तैशीं देईं देवा। जेणें चरणसेवा घडे तुझी ॥ २ ॥ वाखाणीन कीर्ति आपुलिया मुखें। नाचेन मी सुखें तुजपुढें ॥ ३ ॥ करुनि कामारी दास दीनाहूनि। आपुल्या अंगणीं ठाव मज ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्ही मृत्युलोकीं भले। तुझेचि अंकिले पांडुरंगा ॥ ५ ॥ [१४६१]

माझे अंतरींचें तोचि जाणे एक। वैकुंठनायक पांडुरंग ॥ १ ॥ जीवभाव त्याचे ठेवियेला पायीं। मज चिंता नाहीं कवणेविशीं ॥ २ ॥ सुखसमारंभें संतसमागमें। गाऊं वाचें नाम विठोबाचें ॥ ३ ॥ गातां पुण्य होय आइकतां लाभ। संवसार बंद तुटतील ॥ ४ ॥ तुका म्हणे जीव तयासी विकिला। आणीक विठ्ठलाविण नेणें ॥ ५ ॥ [१४६२]

कथा दुःख हरी कथा मुक्त करी। कथा याचि बरी विठोबाची ॥ १ ॥ कथा पाप नासी उद्धरिले दोषी। समाधि कथेसी मूढजना ॥ २ ॥ कथा तप ध्यान कथा अनुष्ठान। अमृत हें पान हरिकथा ॥ ३ ॥ कथा मंत्र जप कथा हरी ताप। कथाकाळीं कांप कळिकाळासी ॥ ४ ॥ तुका म्हणे कथा देवाच हें ध्यान। समाधि लागोन उभा तेथें ॥ ५ ॥ [१४६३]

काय ऐसा सांगा। धर्म मज पांडुरंगा ॥ १ ॥ तुझे पायीं पावें ऐसा। जेणें उगवे हा फांसा ॥ २ ॥ करीं कृपादान। तैसें बोलवी वचन ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा। माझें हृदय वसवा ॥ ४ ॥ [१४६४]

भला म्हणे जन। परि नाहीं समाधान ॥ १ ॥ माझें तळमळी चित्त। अंतरलें दिसे हित ॥ २ ॥ कृपेचा आधार। नाहीं दंभ झाला फार ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपे। अंतराय कोण्या पापें ॥ ४ ॥ [१४६५]

हे पांडुरंगा, तुम्ही आतां मला मुक्त करूं नये, ही माझी विनंती ऐकावी १. ज्या योगानें तुमचे चरणांची सेवा मला घडेल असा जन्म मला द्या २. मग मी तुमची कीर्ति आपल्या मुखानें वर्णन करीन व मी तुमचे पुढें (विठ्ठल विठ्ठल म्हणत) आनंदानें नाचेन ३. दीनापेक्षांहि दीन असा तुमच्या आंगणांत राबणाऱ्या दासाचा मला जन्म देऊन तुमचे आंगणांत आश्रय द्या ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, ह्या मृत्युलोकांत आम्ही तुझे आज्ञाधारक दासच आहोंत ५. [१४६१]

वैकुंठनायक पांडुरंग हाच एक माझे अंतःकरणांतील भाव जाणत आहे १. त्याच्याच चरणीं मीं आपला जीवभाव ठेवला आहे. आतां मला कोणत्याहि विषयींची चिंता राहिली नाहीं २. संतसमागमानें आनंदांत विठोबाचें नाम वाणीनें गाऊं ३. तें गाण्यानें पुण्य होतें व ऐकण्यांतहि लाभच होतो व अखेरीस संसारबंधनांतून सुटका होते ४. तुकाराम महाराज म्हणतात, मीं आपला जीव हा विठ्ठलाला विकला आहे. त्यावांचून मी अन्य कांहीं जाणत नाहीं ५. [१४६२]

हरिकथा ही दुःख नाहींसें करून संसारांतून मुक्त करिते. अशा प्रकारची ह्या विठोबाची कथा चांगली आहे १. कथा ही पातकांचा नाश करून अनेक दोषी जन हिनें उद्धरले आहेत. जे कोणी मूढ जीव आहेत त्यांना कथेनें समाधि लागते २. कथा हें तप व ध्यान आहे, कथा हें अनुष्ठान आहे व हरीची कथा हें अमृताचें सेवनहि आहे ३. कथा हाच मंत्रजप आहे, कथा त्रिविधतापाचें हरण करिते, कथा चालली असतांना कळिकाळाला कांपरें सुटतें ४. तुकाराम महाराज म्हणतात, कथा हें देवाचेंहि ध्यान आहे. कथेमध्यें देव समाधिस्थ होऊन उभा असतो ५. [१४६३]

हे पांडुरंगा, (ध्रुवपदांत जो धर्म विचारीन) तो धर्म कसा आहे तो मला सांगा १. ज्या योगेंकरून तुझ्या चरणीं मी प्राप्त होईन व संसारपाशांतून माझी सुटका होईल २. जेणेंकरून तूं मजवर कृपा करशील असे शब्द तूं माझ्याकडून बोलव ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, माझ्या हृदयांत तूं वस्ती कर ४. [१४६४]

जग मला चांगलें (साधु) म्हणतें पण त्या योगानें माझ्या चित्तास समाधान होत नाहीं १. आणि माझे स्वहितास अंतर पडलेलें दिसतें. त्यामुळें माझें चित्त तळमळ करीत आहे २. तुमचे कृपेविषयीं कांहीं आधार नाहीं. जनामध्यें मात्र माझ्या साधुपणाचा मोठा दंभ वाढला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या कृपेंत कोणत्या पापानें अंतर पडलें आहे (हें कळत नाहीं) ४. [१४६५]

शिकलों ते बोल। बोलें तैसी नाहीं ओल ॥ १ ॥ आतां देवा संदेह नाहीं। वायां गेलों यासी कांहीं ॥ २ ॥ एकांताचा वास। नाहीं संकल्पाचा नाश ॥ ३ ॥ बुद्धि नाहीं स्थिर। तुका म्हणे शब्दा धीर ॥ ४ ॥ [१४६६]

उचिताचा दाना। कृपावंता तूं अनंता ॥ १ ॥ कां रे न घालिसी धांव। तुझें उच्चारितां नांव ॥ २ ॥ काय बळयुक्ति। नाहीं तुझे अंगीं शक्ति ॥ ३ ॥ तुका म्हणे तूं विश्वंभर। ओस माझें कां अंतर ॥ ४ ॥ [१४६७]

वाहावतों पुरीं। आतां उचित तें करीं ॥ १ ॥ माझी शक्ति नारायणा। कींव भाकावी करुणा ॥ २ ॥ आम्हां ओढी काळ। तुझें क्षीण झालें बळ ॥ ३ ॥ तुका म्हणे गोडी। जीवा मातेचिया ओढी ॥ ४ ॥ [१४६८]

आतां वेईं माझें। भार सकळही ओझें ॥ १ ॥ काय करिसी होई वाड। आलों पोटासी दगड ॥ २ ॥ तूंचि डोळे वाती। होईं दीपक सांगातीं ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं। विचाराया चाड नाहीं ॥ ४ ॥ [१४६९]

असोत हे बोल। अवघें तूंचि भांडवल ॥ १ ॥ माझा मायबाप देवा। सज्जन सोयरा केशवा ॥ २ ॥ गाळियेले भेद। सारियेले वादावाद ॥ ३ ॥ तुका म्हणे मधीं। आतां न पडे उपाधि ॥ ४ ॥ [१४७०]

करीन कोल्हाळ। आतां हाचि सर्वकाळ ॥ १ ॥ आतां ये वो माझे आई। देईं भातुकें विठाई ॥ २ ॥ उपायासी नाम। दिलें याच पुढें क्षेम ॥ ३ ॥ बीज आणि फळ। हेंचि तुका म्हणे मूळ (तुका म्हणे हेंचि मूळ) ॥ ४ ॥ [१४७१]

जे मीं शिकलों आहें, तेच शब्द बोलत आहें; परंतु जसें बोलतों तशी अंतःकरणाची स्थिति नाहीं १. हे देवा, आतां माझा जन्म व्यर्थ गेला ह्यांत कांहीं संशय नाहीं २. द्वैतसंकल्पाचा (विषयवासनेचा) नाश होऊन आत्मस्वरूप-स्थितीच्या एकांताचा वास नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी बुद्धिहि स्थिर नाहीं व बोलण्यांतहि निश्चय नाहीं ४. [१४६६]

हे कृपावंत अनंता, तूं इष्टदान (अपेक्षित व हितकारक) देणारा दाता आहेस १. म्हणून तुझें नाम मी घेत आहें. आतां तूं मजकडे धांवत कां येत नाहींस ? २. (माझी इच्छा पूर्ण करण्याचें) तुझ्याजवळ काय बळ, युक्ति अगर शक्ति नाहीं ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, संपूर्ण विश्वाचा पालन करणारा असा तूं विश्वंभर (विश्वव्यापक) आहेस, असें असून माझें अंतःकरण तुझ्यावांचून कां ओस पडलें ? ४. [१४६७]

हे देवा, मी संसारपुरांत वाहात चाललों आहें, आतां तुला काय योग्य दिसेल तें कर १. हे नारायणा, तुम्हांला कींवकाकुळती यावें एवढीच काय ती माझी शक्ति आहे २. आम्हांला काळ ओढून नेऊं लागला, कारण तुझी शक्ति क्षीण झाली ३. तुकाराम महाराज म्हणतात, बालकाचा जीव मातेच्या गोडीकडे ओढतो अथवा मातेच्या जिवास बालकाची गोडी ओढते (माझ्याविषयींचें प्रेम तुम्हांला अवश्य आकर्षण करील व त्यायोगें माझ्या अपेक्षा पूर्ण होतील) ४. [१४६८]

हे देवा, आतां तुम्ही माझ्या योगक्षेमाचें सर्वस्वीं ओझें आपले मस्तकावर घ्या १. काय करतोस ? मी तुझ्या पोटीं असा दगड आलों आहें, ह्याकरितां तूंच आपलें हृदय मोठें कर २. आमचे डोळेहि तूंच हो व प्रकाश देणारा दीपहि तूंच होऊन आमचेबरोबर चल ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हांला कांहीं देखील विचार करण्याची गरज नाहीं ४. [१४६९]

असो. जें कांहीं मी बोललों असेन तें आमचें (परमार्थाचें) सर्वस्वीं भांडवल तूं आहेस १. हे केशवा देवा, आमची आई, बाप, सज्जन, सोयरे हे सर्व कांहीं एक तूंच आहेस २. सर्व (जीव-ब्रह्मांतील, जीव-जडांतील, जीव-जीवांतील, जड-जडांतील व ब्रह्म-जडांतील) भेदकल्पना टाकून वादावादहि नाहींसा केला ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मी कोणत्याहि उपाधींत पडणार नाहीं ४. [१४७०]

आतां मी सर्वकाळ हाच (ध्रुवपदांत दर्शविलेला) अट्टाहास करीन १. हे विठाईमाते आई, आतां तूं लौकर ये व मला खाऊ दे २. योगक्षेमाचें साधन (माझ्या कल्याणाचा उपाय) तूं आपलें नाम आम्हांला दिलें आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, बीज आणि फळ ह्या सर्वांचें मूळ हें नामच आहे ४. [१४७१]

धनासींच धन । करी आपणा जतन ॥ १ ॥ तुज आळवितां गोडी । पांडुरंगा खरी जोडी ॥ २ ॥ जेविलयाचें खरें । वरी उमटे ढेंकरें ॥ ३ ॥ तुका म्हणे धाय । तेथें कोठें उरे हाय ॥ ४ ॥ [१४७२]

अनुभवा आलें । माझें चित्तींचें क्षरलें ॥ १ ॥ असे जवळी अंतरे । फिरे आवडीच्या फेरें ॥ २ ॥ खादलेंचि वाटे । खावें भेटलेंचि भेटे ॥ ३ ॥ तुका म्हणे उभें । आम्हीं राखियेलें लोभें ॥ ४ ॥ [१४७३]

पोटीं शूळ अंगीं उटी चंदनाची । आवडी सुखाची कोण तया ॥ १ ॥ तैसें मज कां गा केलें पंढरीराया । लौकिक हा वायां वाढविला ॥ २ ॥ ज्वरिलियापुढें वाढिलीं मिष्टान्नें । काय चवी तेणें घ्यावी त्यांची ॥ ३ ॥ तुका म्हणे मढें श्रृंगारिलें वरी । तेचि झाली परी मज देवा ॥ ४ ॥ [१४७४]

बेगडाचा रंग राहे कोण काळ । अंगें हें पितळ न देखतां ॥ १ ॥ माझें चित्त मज जवळीच ग्वाही । तुझी मज नाहीं भेटी ऐसें ॥ २ ॥ दासीसुतां नाहीं पितियाचा ठाव । अवघेंचि वाव सोंग त्याचें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी केली विटंबना । अनुभवें जना येईल कळों ॥ ४ ॥ [१४७५]

मजपुढें नाहीं आणीक बोलता । ऐसें कांहीं चित्ता वाटतसे ॥ १ ॥ याचा कांहीं तुम्हीं देखावा परिहार । सर्वज्ञ उदार पांडुरंगा ॥ २ ॥ कामक्रोधें नाहीं सांडिलें आसन । राहिले बसोन देहामध्यें ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां झालों उतराई । कळों यावें पायीं निरोपिलें ॥ ४ ॥ [१४७६]

सावित्रीची विटंबना । रांडपणा करीतसे ॥ १ ॥ काय जाळावें तें नांव । अवघें वाव असे तें ॥ २ ॥ कुबेर नांव मोळी पाहे । कैसी वाहे फजिती ॥ ३ ॥ तुका म्हणे ट्रणगुण देखें ।

(व्यवहारांत जसें) द्रव्य हें आपलें स्वतःचें रक्षण आपणच करितें, म्हणजे द्रव्यानेंच द्रव्याचें रक्षण होतें १. त्याप्रमाणें हे पांडुरंगा, तुला आळविण्यांत गोडी वाटते व त्या योगानें तुझी खरी प्राप्ति होते २. पोटभर जेवण झालें हें ढेकर येण्यानें समजतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो तृप्त झाला आहे त्याच्या ठिकाणीं तळमळ राहील काय ? ४. [१४७२]

जें माझ्या चित्तामध्यें व्यापक होतें तें हरीचें स्वरूप अनुभवाला आलें १. त्याच्याविषयींचें आवडीचें चक्र फिरत आहे म्हणजे त्याच्या आवडीनें एकदां उपभोग घेतला तरी पुन्हां घेण्याची आवड असते २. जें खाल्लें आहे तेंच वारंवार खावेंसें वाटतें आणि जें भेटलें आहे त्यासच प्रीतीनें भेटावेंसें वाटतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं आपल्या भावार्थाच्या लोभानें तुम्हांला जवळ (विटेवर) उभें केलें आहे ४. [१४७३]

ज्याच्या पोटामध्यें शूळाची व्यथा आहे त्याच्या अंगास उत्तम चंदनाची उटी लाविल्यानें त्याला काय सुख होणार आहे ? १. त्याप्रमाणें हे पंढरीराया, मला तूं कां केलेंस ? तुझे प्राप्तीवांचून माझा भक्तपणाचा लौकिक व्यर्थ कां वाढविलास ? २. ज्यास मोठा ज्वर आला आहे त्यास उत्तम पक्वान्नें जरी घातलीं तरी त्यांची गोडी त्यानें काय घ्यावी ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें मढ्यांला शृंगार करावा तसा प्रकार हे देवा, तुझे प्राप्तीवांचून माझा झाला आहे ४. [१४७४]

बेगडाची चकाकी उत्तम दिसते पण ती पितळेच्या चकाकीप्रमाणें फार वेळ राहात नाहीं १. त्याप्रमाणें जर तुझें दर्शन मला न होईल तर माझें शृंगारणें व्यर्थ दिसतें. ह्याविषयीं साक्ष माझें चित्तच मला देत आहे. २. जो कोणी दासीपुत्र आहे त्याचा बाप कोण आहे ह्याविषयीं शोध लागत नाहीं म्हणून त्यानें कोणत्याहि याति-आचाराचें आचरण केलें तर तें सोंगाप्रमाणें व्यर्थ होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें तूं माझीं फजिती केली आहेस. तें सर्व जनांस अनुभवानें समजून येईल ४. [१४७५]

माझ्याप्रमाणें बोलका प्राणी कोणी नाहीं असें जें कांहीं माझ्या चित्तास वाटत आहे १. तें नाहींसें करण्याचा हे पांडुरंगा, तुम्ही कांहीं विचार पाहा. तुम्ही सर्व जाणणारे उदार आहां २. माझ्या देहाचे ठिकाणीं काम-क्रोधांनीं वास्तव्य केलें आहे. ते तें आसन सोडून कोठें जात नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या अंतःकरणाची जी स्थिति आहे ती तुमचे पायांजवळ ठेवून मी उत्तीर्ण झालों आहें हें आपल्याला कळावें ४. [१४७६]

कोणे एके स्त्रीचें नांव सावित्री ठेविलें होतें पण ती विधवा झाल्यावर त्या नांवाची फजिती होते १. कर्तृत्व असल्याशिवाय नुसतें नांव काय जाळावयाचें आहे ? अशीं नांवें ठेवलेलीं व्यर्थ जातात २. कोणाचें नांव कुबेर असतें

उगीच मूर्ख फुंदतां (उगीच मुखें स्फुंदती) ॥ ४ ॥ [१४७७]

न गमेसी झाली दिवसरजनी । राहिलों लाजोनी न बोलवे ॥ १ ॥ रुचिविण काय शब्द वाऱ्या माप । अनादरें कोप येत असे ॥ २ ॥ आपुलिया रडे आपुलेंचि मन । दाटे समाधान पावतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही असा जी जाणते । काय करूं रिते वादावाद ॥ ४ ॥ [१४७८]

मेल्यावरि मोक्ष संसारसंबंध । आरालिया बन्द्ध ठेवा आम्हां ॥ १ ॥ वागवित संदेह राहों कोटवरी । मग काय थोरी सेवकाची ॥ २ ॥ गाणें गीत आम्हां नाचणें आनंदें । प्रेम कोठें भेदें अंगा येतें ॥ ३ ॥ तुका म्हणे किती सांगावे दृष्टांत । नसतां तूं अनंत सानुकूल (ळ) ॥ ४ ॥ [१४७९]

एकाएकीं आतां असावेंसें वाटे । तरिच हे खोटे चाळे केले ॥ १ ॥ वाजवूनि तोंड घातलें बाहेरी । कुलप करूनी दारीं माजी वसा ॥ २ ॥ उजेडाचा केला दाटोनि अंधार । सवें हुद्देदार चेष्टविला ॥ ३ ॥ तुका म्हणे भय होतें तोंचि वरी । होती कांहीं उरी स्वामिसेवा ॥ ४ ॥ [१४८०]

काय नव्हेसी तूं एक । देखों कासया पृथक ॥ १ ॥ मुंग्या कैंचे मुंगळे । नटनाट्य तुझे चाळे ॥ २ ॥ झाली तरी मर्यादा । किंवा त्रासावें गोविंदा ॥ ३ ॥ तुका म्हणे साचा । कोठें जासी हृदयींचा ॥ ४ ॥ [१४८१]

कां जी वाढविलें । न लगतां हें उगलें ॥ १ ॥ आतां मानितां कांटाळा । भोंवतीं मिळालिया बाळा

पण तो पोटाकरितां लांकडाच्या मोळ्या विकतो ही केवढी फजिती आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो मूर्ख हो, बाहेर भक्तीचा दांभिकपणा दाखवून तुम्ही व्यर्थ कां फुंदतां (अभिमान मिरवितां)? ४. [१४७७]

रात्रंदिवस तुजवांचून करमेनासें झालें आहे पण हें माझ्यानें लज्जेमुळें बोलवत नाहीं १. जे शब्द मी बोलतों त्याचा तुम्ही आदर करीत नाहीं म्हणून त्या शब्दांत गोडी नाहीं व वाऱ्यास मोजल्याप्रमाणें होत आहे म्हणून मला तुमचा राग येत आहे २. मन हें आपल्या ठिकाणींच आपलेपणाविषयीं रडतें आणि तें बळानें समाधान पावतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्ही सर्व जाणत आहां तर अहो देवा, तुमचे बरोबर पोकळ वादविवाद कशाला करावा? ४. [१४७८]

हे देवा, आम्ही तुमचे ठिकाणीं स्थिर झालों असून आम्हांला बंधनांत ठेवितां आणि मेल्यावर उद्धार होईल असें म्हणतां पण त्या वेळीं संसाराचा संबंध आहे कीं मोक्ष मिळतो हें आम्हीं काय जाणावें? १. अशा प्रकारचा संशय मी कोठपर्यंत वागवीत राहूं? मग ह्यांत तुमच्या सेवकाचा थोरपणा काय? २. आम्ही तुमचें गीत गाऊन तुमचे पुढें आनंदानें नाचावें असें असून तुमचें प्रेम वर सांगितलेल्या संशयभेदामुळें आमच्या आंगांत येईल काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे अनंता, तूं जर आम्हांला अनुकूल नाहींस तर आमचा उपयोग काय होणार ह्याविषयीं कितीतरी दृष्टांत सांगावे? ४. [१४७९]

हे देवा, आतां तुम्हांला एकटें असावेंसें वाटतें म्हणूनच तुम्ही हा फसविण्याचा खोटा मार्ग स्वीकारला १. देव निराकार आहे असें तुम्ही आपले वेदमुखानें सांगून आम्हांस सगुण कल्पनेच्या बाहेर घालविलें आणि मायेचें कुलूप दारास लावून तुम्ही आंत लपून बसतां २. तुमचे घरांत ज्ञानदीपाचा प्रकाश होता तो तुम्ही मुद्दाम घालवून अज्ञानअंधकार पाडला व आमचे बरोबर (संसारी जीवांबरोबर संतरूपी हुद्देदार किंवा) वेद हा हुद्देदार व्यवहार करावयास लावला, विधिनिषेधाचे नियम करते झालां ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमचें आमचें स्वामिसेवकपणाचें नातें जोंपर्यंत होतें तोंपर्यंत आम्हीं तुमचें भय धरलें (आतां तुम्ही–आम्ही एकरूप झाल्यानंतर भयाचें कारण नाहीं) ४. [१४८०]

हे देवा, यावत् वस्तुरूपानें तूं एक नव्हेस काय? असें जर आहे तर तुझ्यावांचून निराळें कशाकरितां राहूं? १. मुंग्या, मुंगळे असे अनेक प्रकारचे प्राणी कसले आहेत? हें सर्व तुझेंच नाटक आहे २. हे गोविंदा, ह्या तुझ्या कर्तृत्वाची सीमा झाली म्हणून आम्ही त्रासावें कीं काय? (आम्हीं किती दिवस त्रास सोसावा?) ३. तुकाराम महाराज म्हणतात, तूं खरा आमच्या हृदयांत आहेस. तूं आतां कोठें जाशील बरें? ४. [१४८१]

अहो महाराज, हे परमार्थाचे खेळ (सगुणरूपाचे) तुम्हांला नको होते मग उगीच कां वाढविलेत? १. आतां

॥ २ ॥ लावूनियां सवे। पळतां दिसाल बरवे ॥ ३ ॥ तुका म्हणे बापा। येतां न कळाचि रूपा ॥ ४ ॥ [१४८२]

क्षुधेलिया अन्न । द्यावें पात्र न विचारून ॥ १ ॥ धर्म आहे वर्मा अंगीं । कळलें पाहिजे प्रसंगीं ॥ २ ॥ द्रव्य आणि कन्या। येथें कूळ कर्म सो(शो)धण्या ॥ ३ ॥ तुका म्हणे पुण्य गाठीं। तरिच उचितासी (ची) भेटी ॥ ४ ॥ [१४८३]

वेंचावें तें जीवें। पूजा घडे ऐशा नांवें ॥ १ ॥ बिगारीची ते बिगारी। साक्षी अंतरींचा हरी ॥ २ ॥ फळ बीजाऐसें। कार्यकारणासरिसें ॥ ३ ॥ तुका म्हणे मान । लवणासारिखें लवण ॥ ४ ॥ [१४८४]

मज नाहीं धीर । तुम्ही न करा अंगीकार ॥ १ ॥ ऐसें पडिलें विषम । बळी देवाहूनि कर्म ॥ २ ॥ चालों नेणें वाट। केल्या न पवाचि बोभाट ॥ ३ ॥ वेंचों नेणें जीवें। तुका उदास धरिला देवें ॥ ४ ॥ [१४८५]

तळमळे (ळी) चित्त दर्शनाची आशा । बहु जगदीशा करुणा केली ॥ १ ॥ वचनींच संत पावले स्वरूप । माझें नेदी पाप योगा येऊं ॥ २ ॥ वेठीऐसा करीं भक्तिवेवसाव । न पवेचि जीव समाधान ॥ ३ ॥ तुका म्हणे कई देसील विसांवा। पांडुरंगे धांवा घेतें मन ॥ ४ ॥ [१४८६]

हागतांही खोडी । चळण मोडवितें काडी ॥ १ ॥ ऐसे अनावर गुण । आवरावे काय म्हूण ॥ २ ॥

आम्ही मुलें तुमच्या भोंवते मिळालों असून तुम्ही आमचा कंटाळा करितां हें योग्य नाहीं २. आम्हांला सगुण रूपाच्या योगानें तुमची संवय लावली आणि तुम्ही निराकारांत निर्गुण रूपांत पळून जावयाचें पाहातां हें लौकिकांत बरें दिसेल काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे बापा, तूं रूपाला (आकाराला) ज्या वेळेस आलास त्या वेळीं तूं अज्ञान होतास काय? ४. [१४८२]

क्षुधेनें पीडिलेला, अन्नार्थी, कोणत्याहि जातीचा मागावयास आला तर पात्रापात्रतेचा विचार न करितां तो तृप्त होईपर्यंत त्यास अन्न द्यावें १. दात्यांनीं तारतम्यानें धर्म करावा हेंच प्रसंगानुसार नीट समजलें पाहिजे २. द्रव्यदान अथवा कन्यादान करण्यास चांगलें वाईट कूळ व कर्म, आचार ह्यांचा शोध करून दान करावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचे पदरीं शुद्ध पुण्य असेल त्याला योग्य समय येऊन वर सांगितलेल्या गोष्टी त्याच्याकडून घडतात ४. [१४८३]

आपला जीव देवाला समर्पण करणें ह्याचें नांव देवपूजा १. ह्यावांचून सर्व करणें बिगारीचें होतें. ह्यास अंतरसाक्षी हरि आहे २. जसें बीज तसें फळ प्राप्त होतें व कारणासारखें कार्य साध्य होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या अंगीं जशी नम्रता असेल तसा देव त्याच्या ठिकाणीं नम्र होऊन त्याला मान देतो (मिठाचें कार्य खारटपणा आणणें, त्याप्रमाणें आपली पूजा जशी असेल तसें फळ मिळतें) ४. [१४८४]

हे देवा, तुम्ही माझा अंगीकार करीत नाहीं, त्यामुळें मला तर तुमचे वियोगांत धीर निघत नाहीं १. अशा प्रकारचें वैषम्य उभयतांमध्यें वाढलें आहे तर माझें संचितकर्म देवापेक्षां बलवान् आहे काय? २. तुमच्याविषयींचा मार्ग कसा चालावा हें मी जाणत नाहीं व तुमच्या नांवानें आरोळ्या दिल्या असतां तुम्हीहि प्राप्त होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मीं आपल्या जीवाचा व्यय तुमच्या सेवेकडे कसा करावा हें मला कळत नाहीं. म्हणून तुम्ही मला आपले दर्शनाविषयीं निराश केलें आहे ४. [१४८५]

हे जगदीशा, तुमच्या दर्शनाच्या आशेनें माझें चित्त फार तळमळत आहे, म्हणून तुमच्याजवळ मीं फार कींवकाकुळती केली १. ह्या करुणावचनाच्या योगानें तुमच्या स्वरूपाची प्राप्ति पुष्कळ संतांना झाली, पण माझ्या पापामुळें तो योग घडून येत नाहीं २. भक्तीचा व्यापार करीत आहें पण जिवास समाधान होत नसल्यामुळें तें सर्व करणें बिगारीचें वाटतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, माझें मन तुझ्याकडे धांव घेत आहे, तरी त्याला तूं विश्रांति कधीं देशील? ४. [१४८६]

(शरीराच्या चेष्टा नेहमीं चालू असतात,) एखादा कोणी जरी परसाकडेस बसला तरी त्या ठिकाणीं सहज काड्या मोडण्याचा चाळा लागतो १. अशा कित्येकांना अनावर वाईट खोडी असतात. त्यांपैकीं कोणत्या म्हणून आंवराव्या? २.

नाहीं जरी संग । तरी बडबडविती रंग ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । तुमची न घडेचि सेवा ॥ ४ ॥ [१४८७]

देह निरसे तरी । बोलावया नुरे उरी ॥ १ ॥ येर वाचेचें वाग्जाळ । अळंकारापुरते बोल ॥ २ ॥ काचें तरी कढे । जाती ऐसें चित्त ओढे ॥ ३ ॥ विष्णुदास तुका । पूर्ण धनी जाणे चुका ॥ ४ ॥ [१४८८]

खोट्याचा विकरा । येथें नव्हे कांच हिरा ॥ १ ॥ काय दावायाचें काम । उगाच वाढवावा श्रम ॥ २ ॥ परीक्षकावीण । मिरवों जाणे तें तें हीण ॥ ३ ॥ तुका पायां पडे । वाद पुरे हे झगडे ॥ ४ ॥ [१४८९]

पंढरीस घडे अतित्यायें मृत्य । तो जाय पतित अधःपाता ॥ १ ॥ दुराचाऱ्या मोक्ष सुखाची वसति । भोळी बाळमूर्ति पांडुरंग ॥ २ ॥ केला न सहावे तीर्थ उपवास । कथेविण दोष साधन तें ॥ ३ ॥ कालियापें भेद मानितां निवडे । श्रोत्रियांसी जोडे अंत्यजता ॥ ४ ॥ माहेरीं सलज्ज ते जाणा सिंदळी । काळिमा काजळी पाववील (पाववीते) ॥ ५ ॥ तुका म्हणे येथें विश्वास जतन । पुरे भीमास्नान सम पाय ॥ ६ ॥ [१४९०]

चातुर्याच्या अनंतकळा । सत्या विरळा जाणता ॥ १ ॥ हांसत्यासवें हांसे जन । रडतां भिन्न पालटे ॥ २ ॥ जळो ऐसे वांजट बोल । गुणां मोल भूस मिथ्या ॥ ३ ॥ तुका म्हणे अंधळ्याऐसें । वोंगळ पिसें कौतुकें ॥ ४ ॥ [१४९१]

दुसरें कोणीहि संगतीला जवळ नसतां एखादा आपल्याशींच रंगांत येऊन बडबड करतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, अशा प्रकारच्या अवगुणानें जड जीवास तुमची सेवा घडत नाहीं ४. [१४८७]

ज्याच्या देहाचा (देहावरील अहंभावाचा) निरास झाला आहे त्यास बोलावयाचें असें कांहीं उरत नाहीं १. त्यावांचून इतरांचें बोलणें हें अलंकारिक शब्दजाल आहे (देहाभिमान ठेवून जें कांहीं ज्ञानासंबंधीं बोलणें तें सर्व वाणीचें शब्दजाल असून रसनिष्पत्तीपुरताच त्याचा उपयोग) २. तुपामध्यें जोंपर्यंत कच्च्या लोण्याचा भाग असतो तोंपर्यंत तें चुलीवर कडकडत असतें [तें तूपपणाला आल्यावर निश्चळ होतें], तसें ज्याची जशी जाति असेल तशी त्याचे चित्ताला ओढ असते ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी विष्णुदास आहें म्हणून माझे ठिकाणीं पूर्णपणा आहे किंवा त्यांत कांहीं चुका आहेत हें माझा धनी पांडुरंग जाणत आहे ४. [१४८८]

जर कोणी हातामध्यें कांच घेऊन हिरा म्हणून विकावयास आला तर ह्या ठिकाणीं हें खोटें विकलें जाणार नाहीं १. त्याप्रमाणें तुम्ही माझ्यापुढें साधुपणाचा वेष दाखविण्याचें काय काम आहे, व्यर्थ कां श्रम वाढवितां ? २. परीक्षा करून घेतल्याशिवाय अंगावर घातलेले दागिने खोटे आहेत असें समजावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्याशीं वाद करणें अगर भांडणें हें पुरे, ह्याबद्दल मी तुमच्या पायां पडतों ४. [१४८९]

पंढरीमध्यें मोठ्या दुराग्रहानें कोणीं जीव दिला तर तो पातकी नरकाला जाईल १. त्या ठिकाणीं ह्यापेक्षां वाईट आचरणाचे लोक जरी असले तरी त्यांस शेवटीं मोक्ष मिळेल. अशा प्रकारची ही सुखदायक वस्ती आहे; कारण ह्या ठिकाणीं भोळ्या बाळवेषानें पांडुरंगाची मूर्ति आहे २. ह्या ठिकाणीं कोणीं तीर्थउपवास केला तर तो देवास सहन होत नाहीं (उपाशीं राहून मुंडण करणें). ह्या ठिकाणीं हरिकथेवांचून इतर साधनाचें अनुष्ठान केलें तर दोषदायक होतें ३. हरिनामसंकीर्तनाचा काला नीच यातीनें करूं नये व उच्च यातीनें करावा असा भेद कोणी मानील तर ते मोठे आचारशील श्रोत्रिय जरी असले तरी ते महाराच्या जन्मास जातील ४. जी स्त्री माहेरीं आईबापाचे ठिकाणीं लाज धरते ती शिंदळ आहे असें समजावें. अशा प्रकारच्या वर्तनाची जी स्त्री तिला काजळासारखी काळिमा लागते (त्याप्रमाणें पंढरींत येऊन जो तेथील संप्रदायाप्रमाणें वागणार नाहीं तो नरकास जातो.) ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं चंद्रभागेचें स्नान करून देवाचे समचरणावर मस्तक ठेवावें एवढेंच करणें पुरे ह्याविषयींचा बळकट विश्वास ठेवावा ६. [१४९०]

चातुर्यज्ञान जाणणारे लोक अनंतावधि आहेत पण खरें जाणणारा क्वचित् एखादा असतो १. कोणी एखाद्या हांसणाऱ्याच्या संगतीनें दुसरे हांसतात पण रडणाऱ्याच्या तोंडाकडे पाहूनच चेहरा फिरवितात २. ज्या बोलण्यांत खरेपणा नाहीं अशा बोलास आग लागो; कारण चांगल्या गुणास किंमत आहे, भुसकटास कोणी देखील फुकट पुसत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी वेडे आहेत ते कौतुकानें डोळे झांकून आंधळ्यासारखे चाळे पाहातात (व फसतात) ४. [१४९१]

न यो वाचे अनुचित वाणी। नसो मनीं कुठी (कुडी) बुद्धि ॥ १ ॥ ऐसें मागा अरे जना। नारायणा विनवूनि ॥ २ ॥ कामक्रोधां पडो चिरा। ऐसा बरा सायास ॥ ३ ॥ तुका म्हणे नानाछंदें। या विनोदें न पडावें ॥ ४ ॥ [१४९२]

माझिया देहाची मज नाहीं चाड। कोठें करूं कोड आणिकांचें ॥ १ ॥ इच्छितातीं मान मागा देवापासीं। असा संचितासी गुंतले हो ॥ २ ॥ देह आम्ही केला भोगाचे सांभाळीं। राहिलों निराळीं मानामाना ॥ ३ ॥ तुका म्हणे कोणें वेंचावें वचन। नसता तो सीण वाढवावा ॥ ४ ॥ [१४९३]

धरितां इच्छा दुरी पळे। पाठीं सोहळे उदासा ॥ १ ॥ म्हणऊनि असट मन। नका खूण सांगतों ॥ २ ॥ आमिषापाशीं अवघें वर्म। सोसें श्रम पाववी ॥ ३ ॥ तुका म्हणे बीज न्यावें। तेथ यावें फळानें ॥ ४ ॥ [१४९४]

वेद शास्त्र नाहीं पुराण प्रमाण। तयाचें वदन नावलोका ॥ १ ॥ तार्किकाचें अंग आपणा पारिखें। माजिऱ्यासारिखें वाईचाळे ॥ २ ॥ माता निंदी तया कोण तो आधार। भंगलें खापर याचे नांवें ॥ ३ ॥ तुका म्हणे आडरानें ज्याची चाली। तयाचि ते बोली मिठेंविण ॥ ४ ॥ [१४९५]

कस्तुरीचे अंगीं मीनली मृत्तिका। मग वेगळी का येईल लेखूं ॥ १ ॥ तयापरि भेद नाहीं देवभक्तीं। संदेहाच्या युक्ति सरों द्याव्या ॥ २ ॥ इंधनें ते आगी संयोगाच्या गुणें। सागरा दरुषणें वोहोळ तोचि ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें साक्षीचें वचन। येथें तों कारण शुद्ध भाव ॥ ४ ॥ [१४९६]

आमच्या वाचेनें कधीं अयोग्य शब्द येऊं नयेत व मनामध्यें वाईट बुद्धि उत्पन्न होऊं नये १. अहो जन हो, नारायणास विनंति करून वर सांगितल्याप्रमाणें तुम्ही मागा २. कामक्रोधावर दगड पडावा अशा प्रकारचा सायास करावा तो बरा ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही नानाप्रकारच्या छंदामध्यें थट्टेनें सुद्धां (गंमत म्हणून) पडूं नका ४. [१४९२]

माझ्या देहाची मला गरज नाहीं. तेथें मी दुसऱ्यांचें कोडकौतुक कोठें करीत बसूं ? १. अहो जन हो, तुम्ही आपापल्या संचितामध्यें (प्रारब्धाच्या भोगांत) गुंतलेले आहांत आणि तुम्हांला मानाची इच्छा असेल तर तो तुम्ही देवापाशीं मागा (आमच्यापासून मानाची अपेक्षा करूं नका) २. आम्ही आपला देह प्रारब्धभोगाचे स्वाधीन करून मान-अपमानाच्या वेगळे होऊन राहिलों आहों ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां त्याविषयीं कोणीं शब्द खर्च करावेत आणि नाहीं ते श्रम कशाकरितां वाढवावेत ? ४. [१४९३]

कोणत्याहि विषयांची इच्छा धरली असतां ते दूर पळतात आणि सर्व विषयांची इच्छा टाकून उदासीन राहिल्यानें अनेक सुखसोहळे पाठीस लागतात १. म्हणून तुम्ही आपलें मन अनेक प्रकारच्या विषयेच्छेनें बहकूं देऊं नका. ही सर्व सुख प्राप्त होण्याची खूण आहे ती तुम्हांला सांगतों २. अनेक प्रकारचे विषय—आमिषांचा सोस करणें हेंच सर्व दुःखप्राप्तीचें साधन आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जिकडे बीं न्यावें तिकडे फळ येतें ४. [१४९४]

वेदशास्त्रपुराणांनीं जें सांगितलें आहे तें ज्याला मान्य नाहीं त्याचें तोंडहि पाहूं नका १. जे कोणी अनेक तर्कवादी आहेत (त्यांना 'आपले अंग आपलेंच कशावरून' असा कदाचित् संशय आला तर) त्यांचें अंग त्यांना परकें आहे. एखाद्या अमली पदार्थाचें सेवन करून तो जसा बेशुद्धींत बरळतो तद्वत् तें जाणावें २. आईची निंदा करणारास कोणाचा आधार आहे ? ह्या त्याच्या करण्यानें अपयशाचें खापर त्याच्या डोक्यावर फुटेल असें समजावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचें वागणें शास्त्रबाह्य आडमार्गाचें आहे त्याचें बोलणें मिठाशिवाय असलेल्या अन्नाप्रमाणें बेचव आहे ४. [१४९५]

कस्तुरीमध्यें माती मिसळली तर ती कस्तुरीहून काय वेगळी समजली जाईल ? १. त्याप्रमाणें देव-भक्तांमध्यें भेद नाहीं. त्या संबंधानें (त्याच्या अभेदाविषयीं) संशयजनक तर्क असतील ते नाहींसे करावे २. अग्नीच्या आणि लांकडाच्या संयोगांत लांकडें अग्नि होतात. अनेक ओढ्यांची समुद्राशीं गांठ पडल्यावर ते समुद्र होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें माझें अनुभवाचें बोलणें आहे. ह्या ठिकाणीं एका शुद्ध भावाचेंच प्रयोजन आहे (ही अभेदस्थिति प्राप्त होण्याला वेद-शास्त्र-पुराणें व गुरुवचन ह्यांवरील शुद्ध विश्वासच कारण आहे) ४. [१४९६]

भक्ति तें नमन वैराग्य तो त्याग । ज्ञान ब्रह्मीं भोग ब्रह्म तनु ॥ १ ॥ देहाच्या निरसनें पाविजे या ठाया । माझी ऐसी काया जंव नव्हे ॥ २ ॥ उदक अग्नि धान्य झाल्या घडे पाक । एकाविण एक कामा नये ॥ ३ ॥ तुका म्हणे मज कळते चांचणी । बडबडीची वाणी अथवा सत्य ॥ ४ ॥ [१४९७]

श्रीसंतांचिया माथा चरणांवरी । साष्टांग हे करी दंडवत ॥ १ ॥ विश्रांती पावलों सांभाळा उत्तरीं । वाढलें अंतरीं प्रेमसुख ॥ २ ॥ डौरली हे काया कृपेच्या वोरसें । नव्हे अनारिसें उद्धरलों ॥ ३ ॥ तुका म्हणे मज न घडतां सेवा । पूर्वपुण्यठेवा वोढवला ॥ ४ ॥ [१४९८]

नेणों काय नाड । आला उचित काळ आड ॥ १ ॥ नाहीं जाली संतभेटी । येवढी हानी काय मोठी ॥ २ ॥ सहज पायांपासीं । जवळी पावलिया ऐसी ॥ ३ ॥ चुकी झाली आतां काय । तुका म्हणे उरली हाय ॥ ४ ॥ [१४९९]

आणीक कांहीं नेणें । असें पायांच्या चिंतनें ॥ १ ॥ माझा न व्हावा विसर । नाहीं आणीक आधार ॥ २ ॥ भांडवल सेवा । हाचि ठेवियेला ठेवा ॥ ३ ॥ करीं मान भावा । तुका विनंती करी देवा ॥ ४ ॥ [१५००]

आरुष माझी वाणी बोबडीं उत्तरें । केलीं तें लेंकुरें सलगी पायीं ॥ १ ॥ करावें कवतुक संतीं मायबापीं । जीवन देउनि रोपीं विस्तारिजे ॥ २ ॥ आधारें बदली प्रसादाची वाणी । उच्छिष्टसेवनीं तुमचिया ॥ ३ ॥ तुका म्हणे हेचि करितों विनंति । मागेन पुढती सेवादान ॥ ४ ॥ [१५०१]

सर्व भूतें हीं भगवद्रूप आहेत असें समजून सर्वांना नमन करणें ही भक्ति होय व ब्रह्मरूप होऊन ब्रह्माचा उपभोग घेणें हें ज्ञान होय व सर्वस्वाचा त्याग करणें हें वैराग्य होय १. मी देह नाहीं अशी विवेकानें समजूत होऊन जो देहनिरास (अहंभाव नाहींसा) होतो त्यायोगानें वर सांगितलेल्या (भक्ति, ज्ञान, वैराग्य ह्या) अवस्थांची प्राप्ति होते २. पाणी, अग्नि, धान्य इतक्यांचा योग झाल्यानें पाकनिष्पत्ति होते; त्यांपैकीं एक नसेल तर कांहीं उपयोग होणार नाहीं (त्याप्रमाणें भक्ति, ज्ञान, वैराग्य हीं तिन्ही पाहिजेत, तर संत होतां येतें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, ही पोकळ बडबड आहे किंवा खरी आहे ह्याची मला चांचणी (अंदाज) कळते ४. [१४९७]

आत्मज्ञानानें सुशोभित असलेल्या संतांच्या पायांवर मस्तक टेऊन मी त्यांना साष्टांग नमस्कार करतों १. तुम्हीं केलेल्या बोधानें मी विश्रांतीस पावलों आहें व त्या योगानें स्वकीय आत्म्याविषयींचें प्रेम वृद्धिंगत झालें आहे त्याचा तुम्हीं संभाळ करावा २. तुमच्या कृपेनें माझा देह शृंगारला गेला. आतां खरोखर माझा उद्धार झाला ह्यांत अन्यथा नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझेकडून संतांची सेवा न होतां जो लाभ झाला आहे तो पूर्वपुण्याईनें होय ४. [१४९८]

योग्य वेळेच्या आड कोणता प्रतिबंध (अडथळा) आला आहे हें मला कळत नाहीं १. संतांची भेट झाली नाहीं एवढी मोठी दुसरी हानि आहे काय? २. जे संत सहज हरिचरणापाशीं प्राप्त झालेले आहेत (प्रतिबंध नसता तर मी संतांच्या पायांजवळ सहज आलों असतों) ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां चुकी झाल्यावर काय उरलें? हाय हाय करणें हें उरलें आहे ४. [१४९९]

मी एक श्रीहरीचे पायांचें चिंतन करून आहें; त्यावांचून दुसरें कांहीं जाणत नाहीं १. देवा, माझ्याविषयीं तुम्हांला विसर पडूं नये, कारण तुमचेवांचून मला दुसरा कोणाचा आधार नाहीं २. तुमच्या सेवारूपी भांडवलाचाच ठेवा मीं जतन करून टेविला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्ही माझ्या भावाचा (निष्ठेचा) मान करा, हीच मी विनंति करीत आहें ४. [१५००]

मीं आपल्या वेड्यावांकड्या व बोबड्या शब्दांनीं आपल्यापाशीं बोललों, ही मीं मुलानें आपल्यापाशीं खरोखर सलगी केली १. त्याचें संतमायबापांनीं कौतुक करावें व माझ्या ठिकाणीं लावलेल्या ज्ञानरोपाला पाणी घालून वाढवावें २. तुमच्या उच्छिष्टसेवनानें (तुम्हीं सांगितलें आहे त्याच्या आधारानें) माझ्या वाचेंतून प्रासादिक शब्द येत आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, संत हो, आपल्यास मी हीच विनंति करीत आहें. येथून पुढें आपल्याकडून आम्हांला आपल्या सेवेचें दान मिळावें हेंच मी मागेन ४. [१५०१]

पुरुषा हातीं कंकणचुडा । नवल दोडा वृत्तिया ॥ १ ॥ पाहा कैसी विटंबना । नारायणा देखिली ॥ २ ॥ जळो ऐसी ब्रीदावळी । भाट बोळीपणाची ॥ ३ ॥ तुका म्हणे पाहों डोळां । अवकळा न ये हे ॥ ४ ॥ [१५०२]

वितीयेवढेसें पोट । केवढा बोभाट तयाचा ॥ १ ॥ जळो याची विटंबना । भूक जना नाचवी ॥ २ ॥ अभिमाना सिरीं भार । झाले खर तृष्णेचे ॥ ३ ॥ तुका म्हणे नरका जावें । हाचि जीवें व्यापार ॥ ४ ॥ [१५०३]

शेवटासी जरी आले । तरी झाले आंधळे ॥ १ ॥ स्वहिताचा लेश नाहीं । दगड कांहीं अंतरीं ॥ २ ॥ काय परिसासवें भेटी । खापरखुंटी झालिया ॥ ३ ॥ तुका म्हणे अधम जन । अवगुणचि वाढवी ॥ ४ ॥ [१५०४]

प्रायश्चित्तें देतो तुका । जातो लोकां सकळां ॥ १ ॥ धरितील ते तरती मनीं । जाती घाणी वायां त्या ॥ २ ॥ निग्रहअनुग्रहाचे ठाय । देतो धाय पाहोनि ॥ ३ ॥ तुका म्हणे नरसिंहीं । भय नाहीं कृपेनें ॥ ४ ॥ [१५०५]

दुर्जनाचें अंग अवघेंचि सरळ । नर्काचा कोथळा सांठवण (सांठविला) ॥ १ ॥ खाय अमंगळ बोले अमंगळ । उठवी कपाळ संघट्टणें ॥ २ ॥ सर्पा मंत्र चाले धरावया हातीं । खळांची ते जाती निखळची ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं न साहे उपमा । आणीक अधमा वोखट्यासी ॥ ४ ॥ [१५०६]

ऐका जी संतजन । सादर मन करूनि ॥ १ ॥ सकळांचें सार एक । कंटक ते त्यजावे ॥ २ ॥ विशेषता कांद्याहूनि । सेवित्या घाणी आगळी ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्याची जोडी । ते परवडी बैसीजे ॥ ४ ॥ [१५०७]

पुरुषाच्या हातामध्यें कांचेच्या बांगड्या असणें हा नवलावा आहे. अशा प्रकारची वागणूक वाईट आहे (असें विपरीत वर्तन अशिष्टपणाचें आहे) १. हे नारायणा, पाहा, आम्हीं (साधुपणाची विटंबना ही) कशी फजीती पाहिली ती! २. भाटवृत्तीनें बडबड करणाऱ्याच्या ब्रीदास (ढोंगी साधूंच्या भारानें गायिलेल्या लांबलचक ब्रीदावळीस) आग लागो ३. तुकाराम महाराज म्हणतात, असली (साधुपणाची) फजीती डोळ्यांनीं पाहूं नये ४. [१५०२]

वीतभर पोट असून तें भरविण्याविषयींचा खटाटोप केवढा चालला आहे! १. लोकांमध्यें असणारी भूक त्यांना नाचविते. जळो अशी ही फजिती! २. डोक्यावर प्रपंचाभिमानाचा भार घेऊन लोक तृष्णेचे गाढव झाले आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, जीवाकडून नरकास जावयाचा व्यापार घडतो आहे ४. [१५०३]

जरी मरणप्रसंग येऊन पोंचला, तरी हे (कांहीं) लोक स्वहिताविषयीं आंधळे झाले आहेत १. असे हे दगड आहेत. ह्यांच्या अंतःकरणांत स्वहिताचा (परमार्थाचा) लेश नाहीं २. खापरखुंटीची व परिसाची गांठ पडल्यानें काय उपयोग होणार? ३. तुकाराम महाराज म्हणतात, वाईट लोक आहेत, ते अवगुणच वाढवितात ४. [१५०४]

एकंदर लोकांस तुका (हरिनामाचें) प्रायश्चित्त देत आहे १. जें मी सांगत आहें, तें मनीं धरतील ते तरतील व जे वाईट आहेत ते मनीं न धरतां वायां (नरकांत) जातील २. निग्रह (दंड) किंवा अनुग्रह (कृपा) अधिकारपरत्वें मीं करतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाच्या कृपेनें मी देवरूप झालों आहें (नरसिंह झालों आहें) म्हणून मला भय नाहीं ४. [१५०५]

दुर्जनाचें सर्वांग निःसंशय नरक सांठविण्याचा कोथळा आहे १. त्याचें खाणें अमंगळ, बोलणें अमंगळ, तो आपले संगतीनें दुसऱ्याचें कपाळ उठवितो (त्रास देतो) २. कांहीं मंत्रांच्या जोरानें सर्प हातांत धरतां येतो, पण त्यापेक्षांहि खळाची जात अगदींच वाईट ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा ह्या नष्ट नराधमास कोणतीहि वाईट उपमा दिली, तरी ती लागू पडत नाहीं (त्याच्यासारखा वाईट तोच) ४. [१५०६]

अहो संतजन हो, तुम्ही सावध मन करून ऐका १. सर्वांचें एक तात्पर्य हेंच आहे, कीं दुर्जनांचा त्याग करावा २. कांद्यापेक्षां कांदा खाणाराची विशेष घाण येते (त्याप्रमाणें दुर्जनापेक्षां दुर्जनाची संगति करणारा वाईट असतो) ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या ओळीला बसावें तसाच लाभ व्हावयाचा ४. [१५०७]

आज्ञा पाळुनियां असें एकसरें। तुमचीं उत्तरें संतांचीं हीं ॥ १ ॥ भागवूनि देह ठेवियेला पायीं। चरणावरि डोई येथूनचि ॥ २ ॥ येणें जाणें हें तों उपाधीचें मूळ। पूजा ते सकळ अकर्तव्य ॥ ३ ॥ तुका म्हणे असें चरणींचा रज। पदींच सहज जेथें तेथें ॥ ४ ॥ [१५०८]

न संडावा ठाव। ऐसा निश्चयाचा भाव ॥ १ ॥ आतां पुरे पुन्हां यात्रा। हेंचि सारूनि सर्वत्रा ॥ २ ॥ संनिधचि सेवा। असों करूनियां देवा ॥ ३ ॥ आज्ञेच्या पाळणें। असें तुका संतां म्हणे ॥ ४ ॥ [१५०९]

उपाधीचें बीज। जळोनि राहिलें सहज ॥ १ ॥ आम्हां राहिली ते आतां। चाली देवाचिया सत्ता ॥ २ ॥ पराधीन जिणें। केलें सत्ता नारायणें ॥ ३ ॥ तुका म्हणे जाणे पाय। खुंटले आणीक उपाय ॥ ४ ॥ [१५१०]

गोविंदावांचोनि वदे ज्याची वाणी। हगवण घाणी पिटपिट ते ॥ १ ॥ मस्तक सांडुनि सिसफुल गुडघा। चार तो अवघा बावळ्याचा ॥ २ ॥ अंगभूत म्हूण पूजितो वाहाणा। म्हणतां शहाणा येईल कैसा ॥ ३ ॥ तुका म्हणे वेश्या सांगे सुवासिणी (नी)। इतर पूजनीं भाव तैसा ॥ ४ ॥ [१५११]

कुतऱ्या ऐसें ज्याचें जिणें। संग कोणीं न करीजे ॥ १ ॥ जाय तिकडे हाडहाडी। गोऱ्हवाडीच सोइरीं ॥ २ ॥ अवगुणांचा त्याग नाहीं। खवळे पाहीं उपदेशें ॥ ३ ॥ तुका म्हणे कैंची लवी। ठेंग्या केवीं अंकूर ॥ ४ ॥ [१५१२]

सर्वथाही खोटा संग। उपजे भंग मनासी ॥ १ ॥ बहु रंगें भरले जन। संपन्नचि अवगुणीं ॥ २ ॥

तुम्ही संतांनीं आज्ञा केल्याप्रमाणें मी एकसारखा वागत आहें १. प्रपंचांतून देह काढून तुमच्या पायीं ठेविला आहे; म्हणून येथूनच पायांवर डोकें ठेवीत आहें २. येणें किंवा जाणें हें उपाधीचें मूळ आहे. कांहीं कर्तव्य नसणें ही सर्वपूजा आहे (कांहीं न करणें हीच तुमची खरी पूजा आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, (जेथें जावें तथें पायाची धूळ पायाजवळ असते, त्याप्रमाणें) सहज स्थितीनें जेथें मी असेन, तेथें मी तुमच्या चरणांवरचा रज तुमच्या पायींच आहें ४. [१५०८]

हे देवा, तुमचें ठिकाण आम्ही कधीं सोडणार नाहीं, हा आमचा दृढ निश्चय आहे १. आतां पुनश्च देहयात्रा (जन्ममरणाची यात्रा) पुरे. सर्वस्वाचा त्याग करून हेंच धरून राहिलों आहें २. हे देवा, तुमची सेवा करून तुमचे जवळ सर्व काळ आम्ही राहूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो संत जन हो, तुमची आज्ञा पाळून मी राहिलों आहें. [१५०९]

सर्व प्रपंचउपाधीचें बीज जें अज्ञान, तें आमच्या सहजस्थितीनें जळून गेलें १. आतां आमचें देवाच्या सत्तेनें वागणें एवढेंच राहिलें आहे २. आमचें जगणें, सर्वांहून पर जो नारायण, त्याच्या सत्तेनें होत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी देवाचे पाय जाणत आहें; त्यावांचून अन्य उपाय कुंठित झाले ४. [१५१०]

ज्याची वाणी गोविंदनामावांचून अन्य कांहीं बोलत आहे, तें हगवण लागलेल्या मनुष्याच्या बृहतीचें पिटपिटणें आहे असें समजावें व त्यापासून दुर्गंधी उत्पन्न होते १. दायकांनीं मस्तकावर घालण्याचीं जीं फुलें तीं गुडघ्यांस बांधलीं, तर ते वेडगळपणाचे वेडेचार दिसतील २. पायांतील जोडा अंगभूत आहे, असें समजून त्याची जो पूजा करितो त्यास शहाणा म्हणतां येईल काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवास सोडून इतरांची पूजा करण्याचा भाव (प्रकार) कसबिणीला सुवासिनी म्हणून जेवावयास सांगण्यासारखा आहे ४. [१५११]

ज्या मनुष्याचें जगणें कुत्र्याप्रमाणें आहे त्याची कोणींच संगती करूं नये १. कुत्रें जिकडे जाईल तिकडे त्यास हडहड करितात, आणि त्याला सोईरसंबंधाचा योग हागंदारींत होतो २. तसें त्या मनुष्याला अवगुण टाकण्याविषयीं कोणीं उपदेश (सदुपदेश) केला तर तो अवगुण न टाकतां उपदेशकांचा द्वेष करतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, टोणग्याचे ठिकाणीं (वाळलेल्या झाडाच्या सोटाला, बुंध्याला) अंकुर उत्पन्न होत नाहीं व तो स्वतः वांकत देखील नाहीं ४. [१५१२]

अशा प्रकारच्या वाईट मनुष्याची संगत करणें सर्वथैव वाईट आहे, कारण जरी मन चांगलें असलें तरी तें त्याच्या

सेविलिया निष्कामबुद्धि । मदें शुद्धि सांडवी ॥ ३ ॥ त्रासोनियां बोले तुका । आतां लोकां दंडवत ॥ ४ ॥ [१५१३]

उपचाराशी वांज (वांझ) जालों । नका बोलों यावरी ॥ १ ॥ असेल तें असो तैसें । भेटीसरिसें नमन ॥ २ ॥ दुसऱ्यामध्यें कोण मिळे । छंद चाळे बहु मतें ॥ ३ ॥ एकाएकीं आतां तुका । लौकिका या बाहेरी ॥ ४ ॥ [१५१४]

मी तें मी तूं तें तूं । कुंकुड हें लाडसी ॥ १ ॥ वचनाची पडो तुटी । पोटींचें पोटीं राखावें ॥ २ ॥ तेथील तेथें येथील येथें । वेगळ्या कुंथे कोण भारें ॥ ३ ॥ याचें यास त्याचें त्यास । तुक्यानें कास घातली ॥ ४ ॥ [१५१५]

लाडाच्या उत्तरीं वाड(ढ)विती कळह । हा तो अमंगळ जातिगुण ॥ १ ॥ तमाचे शरीरीं विटाळाचि वसे । विचाराचा नसे लेश तोही ॥ २ ॥ कवतुकें घ्यावे लेंकराचे बोल । साहिलिया मोल ऐसें नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे काय उपदेश खळा । न्हाउनि काऊळा क्षतें धुंडी ॥ ४ ॥ [१५१६]

आतां मज देवा । इचे हातींचे सोडवा ॥ १ ॥ पाठी लागलीसे लासी । इच्छा जिते जैसी तैसी ॥ २ ॥ फेडा आतां पांग । अंगीं लपवुनी अंग ॥ ३ ॥ दुजें नेणें तुका । कांहीं तुम्हांसी ठाउका ॥ ४ ॥ [१५१७]

संगतीनें बिघडून जातें १. अनेक रंगानें-ढंगानें जन भरले असून अवगुणानें संपन्न आहेत २. निष्काम बुद्धीनें जरी मद्याचें सेवन केलें तरी त्यापासून सेवन करणारा मनुष्य बेशुद्ध होतो (त्याप्रमाणें दुष्टांची संगति सहज घडली तरी त्याचे दुष्परिणाम नक्कीच होतात) ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारच्या लोकांना आतां नमस्कार असो, हें मी त्रासून बोलत आहें ४. [१५१३]

अहो जन हो, मला कोणत्याहि उपचारपूजेची गरज नाहीं. ह्याकरितां तुम्ही त्याबद्दल गोष्ट देखील बोलूं नका १. जसें असेल तसें असूं द्या. तुमची भेट झाल्याबरोबर मी तुम्हांस नमस्कार करितों २. त्याचें कारण लोक नाना छंदांचे व चेष्टायुक्त आहेत म्हणून ह्या लोकांमध्यें कोण मिसळतो ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां ह्या लौकिकाच्या बाहेर निघून मी एकटा राहिलों आहें ४. [१५१४]

मीपणांत मीपणा व तूंपणांत तूंपणा हे दोन्ही छंद खोटे आहेत. ते नाहींसे व्हावे, कारण त्यांचा लाड मी कोणीकडे करूं ? १. अशा प्रकारच्या शब्दांची तूट पडावी (असें बोलणें नाहींसें व्हावें) आणि वर सांगितलेले दोन्हीहि छंद पोटांतले पोटांतच ठेवावे [आत्मत्वीं असावे] २. ह्या ठिकाणचा धर्म ह्या ठिकाणीं व त्या ठिकाणचा धर्म त्या ठिकाणीं [देहाचे धर्म देहाचे ठिकाणीं व आत्म्याचे धर्म आत्म्याच्या ठिकाणीं समजणें] अशा वेगळाल्या ओझ्यानें कुंथाकुंथी कोण करितो ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याचें ह्याला (आत्म्याचें व्यापकत्व आत्म्याला व देहादिकांचें परिच्छिन्नत्व देहाला देण्याविषयीं) व त्याचें त्याला विरून जाण्याविषयीं मीं कांस घातली आहे (जड जडांत व चैतन्य चैतन्यांत विरून जावें म्हणून मीं कांस घातली आहे) ४. [१५१५]

पहिल्यानें गोड बोलून मग भांडण उत्पन्न करणें, हा गुण अमंगल जातीचा असतो १. ज्याचे अंगीं तमोगुण जास्ती आहे त्याच्या शरीरामध्यें विटाळाची वस्ती असते, म्हणून त्याच्या ठिकाणीं चांगला विचार लेशमात्र देखील नसतो २. हे माझे कठोर बोल आपल्या बालकाच्या बोलण्याप्रमाणें कौतुक मानून सहन केले असतां ते अमोल आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें कावळा गंगेंत स्नान करून जनावरांचीं क्षतें हुडकितो त्याप्रमाणें दुर्जनास जरी उपदेश केला तरी तो आपला स्वभाव टाकीत नाहीं [म्हणून त्यास उपदेश करून काय उपयोग आहे ?] ४. [१५१६]

हे देवा, मी इच्छेच्या हातामध्यें सांपडलों आहें म्हणून मला तिच्यापासून तुम्ही सोडवून घ्या १. ती इच्छा जशी आहे तशी नेहमीं जिवंत असून लांवसटीसारखी माझ्या पाठीस लागली आहे २. माझें अंग तुमचे अंगांत लपवून मला आपल्या अंगभूत करून घ्या. आतां माझें दारिद्र्य नाहींसें करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तुमच्यावांचून दुसरें कांहीं मी जाणत नाहीं, हें तुम्हांला माहीत आहे ४. [१५१७]

बहु वाटे भये । माझे उडी घाला दये ॥ १ ॥ फांसां गुंतलों लिगाडीं । न चले बळ चरफडीं ॥ २ ॥ कुंठितचि युक्ति । माझ्या झाल्या सर्व शक्ति ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । काममोहें केला गोवा ॥ ४ ॥ [१५१८]

विष्टा भक्षी तया अमृत पारिखें । वोंगळासी सखे वोंगळची ॥ १ ॥ नये पाहों कांहीं गोऱ्हवाडीचा अंत । झणीं ठाका संत दुर्जनापें ॥ २ ॥ भेंसळीच्या बीजा अमंगळ गुण । उपजवी सीण दरुषणें ॥ ३ ॥ तुका म्हणे छी थू जया घरीं धन । तेथें तें कारण कासयाचें ॥ ४ ॥ [१५१९]

चावळलें (चळलें) तें काय न करी बडबड । न म्हणे फिकें गोड भुकेलें तें ॥ १ ॥ उमजल्याविण न धरी सांभाळ । असो खळखळ जनाची हे ॥ २ ॥ गरज्या न कळे आपुलिया चाडा । करावी ते पीडा कोण काई ॥ ३ ॥ तुका म्हणे भोग भोगितील भोगें । संचित तें जोगें आहे कोणा (नाहीं कोणा) ॥ ४ ॥ [१५२०]

आपुला तो देह आम्हां उपेक्षीत । कोठें जाऊं हित सांगों कोणा ॥ १ ॥ कोणा नाहीं दक्ष करितां संसार । आम्हीं हा विचार वमन केला ॥ २ ॥ नाहीं या धरीत जीवित्वाचि चाड । कोठें करूं कोड आणिकांचें ॥ ३ ॥ तुका म्हणे असों चिंतोनियां देवा । मी माझें हा हेवा सारूनियां ॥ ४ ॥ [१५२१]

चाकरीवांचून । खाणें अनुचित वेतन ॥ १ ॥ धणी (धनी) काढोनियां निजा । करील ये कामेंची पूजा ॥ २ ॥ उचितावेगळें । अभिलोषें तोंड काळें ॥ ३ ॥ सांगे तरी तुका । पाहा लाज नाहीं लोकां ॥ ४ ॥ [१५२२]

हे देवा, मला फार भय वाटत आहे, म्हणून तुम्ही माझी कींव करून लवकर धांवून या १. कारण ह्या प्रपंच-लिगाडाचे (प्रपंच-उपाधीचे) पाशांत मी गुंतलों आहें, त्यांतून आपली सुटका करून घेण्याविषयीं, माझें बळ कांहीं चालत नाहीं. त्या योगानें मी अतिशय चरफडतों २. माझे उपाय व सर्व शक्ति कुंठित झाल्या आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, ह्या विषयकाममोहानें मला बद्ध केलें आहे ४. [१५१८]

जो कोणी नरकाचें सेवन करतो त्याला अमृत मुळींच आवडत नाहीं, कारण वाईट लोकांचें सख्य वाईट लोकांबरोबरच असतें १. जसें हागंदारीचा अंत पाहूं नये तसें दुर्जनांची संगति संतांनीं चुकून देखील करूं नये २. त्या दुर्जनांचें बीज भेसळीचें असतें म्हणून त्यांचे ठिकाणीं वाईट गुण असतात, त्यांचें दर्शन दुःखदायक आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या दुर्जनांस लोकांनीं छीः थूः करावें, हेंच त्यांचें मुख्य भांडवल आहे. मग त्या ठिकाणीं आपलें कोणतें कार्य (आपणांस कोणता लाभ) होणार आहे ? ४. [१५१९]

एखाद्यास भूक लागली म्हणजे तो अन्न फिकें आहे अथवा गोड आहे, असें म्हणत नाहीं. त्याप्रमाणें ज्याला वेड लागलें आहे तो मनास वाटेल तशी बडबड करणार नाहीं काय ? १. तो शुद्धीवर आल्याखेरीज आपल्या देहाचें रक्षण करणार नाहीं, असें जाणून ह्या जनांबरोबर आतां खळखळ करणें पुरे. २. जो कोणी गरजवंत आहे त्यास आपली गरज भागण्याकरितां कोणाला कशी पीडा द्यावी [हा विचार त्यास कळत नाहीं] ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपापल्या प्रारब्धभोगाच्या योगानें जन भोग भोगतील. कोणाचें योग्य संचित आहे ? (ह्या जगांत बहुतेकांचें पूर्वकर्म शास्त्रानुसार योग्य असें नाहीं) ४. [१५२०]

आम्हीं आपल्या देहाची उपेक्षा केली आहे; आतां कोणत्या ठिकाणीं जाऊन हिताचा विचार मी कोणाला सांगूं ? १. आपापला संसार करण्याविषयीं कोण तत्पर नाहीं ? तो संसारासंबंधीं विचार आम्हीं मात्र ओकून टाकला आहे २. जेथें माझ्या जिवाची मी गरज ठेवीत नाहीं तेथें दुसऱ्याचें कोडकौतुक कोठें करीत बसूं ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी देही व देहसंबंधीं माझें हा सोस नाहींसा करून आम्ही देवाचें चिंतन करून स्वस्थपणें राहूं ४. [१५२१]

मालकाची कांहीं चाकरी न करतां चाकरानें पगार खाणें अयोग्य आहे १. चाकरानें मालकाची योग्य चाकरी बजाविल्यावर मालक त्याबद्दल आपल्याजवळचें धन काढून योग्य पगार म्हणून देऊन चाकराचा गौरव करतो २. योग्य चाकरी न करितां अधिक पगाराची इच्छा जो करतो तो काळतोंड्या आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें मी लोकांना सांगत असतांहि त्यांना त्याची लाज नाहीं (तात्पर्य, देवानें निर्माण केलेलें अन्न देवाची सेवा केल्यावांचून खाणें योग्य नाहीं) ४. [१५२२]

बरें सावधान । राहावें समय राखोन ॥ १ ॥ नाहीं सारखिया वेळा । अवघ्या पावत(तां) अवकळा ॥ २ ॥ लाभ अथवा हानी । थोड्यामध्येंच भोवनी ॥ ३ ॥ तुका म्हणे राखा । आपणा नाहीं तोंचि वाखा ॥ ४ ॥ [१५२३]

काय करूं जी दातारा । कांहीं न पुरे संसारा ॥ १ ॥ झाली माकडाचे परी । जातों तळा येतों वरी ॥ २ ॥ घालीं भलते ठायीं हात । होती शिव्या बैसे लात ॥ ३ ॥ आदी अंतीं तुका । सांगे न कळे झाला चुका ॥ ४ ॥ [१५२४]

धर्म तो न कळे । काय झांकियेले डोळे ॥ १ ॥ जीव भ्रमले या कामें । कैसीं कळों येती वर्मे ॥ २ ॥ विषयांचा माज । कांहीं धरूं नेदी लाज ॥ ३ ॥ तुका म्हणे लासी । माया नाचविते कैसी ॥ ४ ॥ [१५२५]

दुर्जनाची जोडी । सज्जनाचें खेंटर तोंडीं ॥ १ ॥ पाहे निमित्य तें उणें । धांव छळावया सुनें ॥ २ ॥ न म्हणे रामनाम (राम) । मनें वाचे हेंचि काम ॥ ३ ॥ तुका म्हणे भागा । आली निंदा करी मागा ॥ ४ ॥ [१५२६]

शादीचें तें सोंग । संपादितां राजा व्यंग ॥ १ ॥ पाहा कैसी विटंबना । मूर्ख अभाग्याची जना ॥ १ ॥ दिसतें तें लोपी । झिंज्या वाढुनियां पापी ॥ ३ ॥ सिंदळी त्या सती । तुका म्हणे थुंकी(का) घेती ॥ ४ ॥ [१५२७]

भक्त म्हणऊनि वंचावें तें जीवें । तेणें शेण खावें काशासाठीं ॥ १ ॥ नासिलें अडवंद कौपिन

अहो जन हो, तुम्ही ही योग्य वेळ जाणून चांगले सावध राहा १. सर्व वेळा सारख्या नसतात. कांहीं दुष्ट वेळा फजिती होण्यासारख्या असतात २. लाभ होण्याची अथवा हानि होण्याची वेळ थोड्यामध्येंच शकुनानें कळून येते ३. तुकाराम महाराज म्हणतात, जोंपर्यंत तुमचा अंतकालचा वाखा होण्याचा समय आला नाहीं (संकट आलें नाहीं) तोंपर्यंत तुम्ही आपलें रक्षण करा ४. [१५२३]

हे दातारा, ह्या संसारामध्यें जरी पुष्कळ द्रव्य असलें, तरी आम्हांला कांहीं पुरे असें वाटत नाहीं १. जसें एखादें पाळींव माकड खांबाला बांधलें म्हणजे तें वर चढतें व खालीं उतरतें; तें विसांवा घेत नाहीं (तसा संसारांत माझा प्रकार झाला आहे) २. तें माकड हव्या त्या पदार्थांत हात घालतें, त्या योगानें त्यास लोक शिव्या देतात व लाथा मारतात (तशी फजिती आमची आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, आरंभापासून अखेरीपर्यंत सर्व आमचे अपराध आहेत, ते कोणते तें सांगण्याचें कळत नाहीं ४. [१५२४]

सर्व जनांनीं ज्ञानदृष्टि झांकल्याकारणानें खरा धर्म काय आहे, तो त्यांना कळत नाहीं १. विषयकामाच्या योगानें सर्व भ्रमिष्ट झाले आहेत, म्हणून त्यांस खरीं मर्मे कशीं समजून येतील? २. विषयाचे योगानें उन्मत्त झाल्यामुळें हे लोक कांहीं लाज धरीत नाहींत (धर्ममर्यादा सोडून वागतात) ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या लोकांच्या मागें लासीप्रमाणें (लांवसटीप्रमाणें, पिशाचाप्रमाणें) देवाची माया लागली आहे. तीच त्यांना कशी नाचवीत आहे पाहा ४. [१५२५]

सज्जनांची निंदा करून अखेरीस खेटरें खावीं ही दुर्जनांची जोडी (मिळकत) आहे १. कांहीं तरी संतांचें उणें पाहून त्या निमित्तानें त्यांचा छळ करण्याकरितां दुर्जन कुत्र्यासारखा धांवतो २. त्या दुर्जनाचे मुखीं कधीं रामनाम येत नाहीं. कायावाचामनेंकरून संतांचा छळ करावा, हेंच त्याचें काम असतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांची निंदा त्यांचे पश्चात् करावी हें त्या दुर्जनाच्या वांटणीस आलें आहे ४. [१५२६]

राजानें नवरदेवाचें सोंग घेऊन त्याची संपादणी करणें (नीच स्त्रीशीं निका-लग्न लावण्याचें सोंग घेणें) हें त्याला कमीपणा आणणारें आहे १. ह्या मूर्ख अभागी जनांची फजिती कशी आहे ती पाहा २. जें तोंड चांगलें दिसतें तें मुद्दाम मस्तकावरील केंसांनीं (झिपऱ्या वाढवून बायकांसारखें) झांकतो तो पापी आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, चांगली स्त्री पतिव्रता असून व्यभिचारिणीप्रमाणें वर्तन दाखवील, तर तिच्या तोंडावर लोक थुंकतील ४. [१५२७]

तोंडानें आपण देवाचे भक्त आहों असें म्हणतो पण मनापासून देवाची सेवा करीत नाहीं, मग त्यानें कां असें

ते माळा । अडचण राउळामाजी केली ॥ २ ॥ अंगिकारिले सेवे घडे अंतराय । तया झाला न्याय खापराचा ॥ ३ ॥ तुका म्हणे कोठें तगों येती घाणी । आहाच ही मनीं अधीरता ॥ ४ ॥ [१५२८]

गयाळाचें काम हिताचा आवारा । लाज फजितखोरा असत नाहीं ॥ १ ॥ चित्ता न मिळे तें डोळां सलों येतें । असावें परतें जवळूनि ॥ २ ॥ न करावा संग न बोलावी मात । सावधान चित्त नाहीं त्यासी ॥ ३ ॥ तुका म्हणे दुःख देतील माकडें । घालिती सांकडें उफराटें ॥ ४ ॥ [१५२९]

बहु बरें एकाएकीं । संग चुकी करावा ॥ १ ॥ ऐसें बरें झालें ठावें । अनुभवें आपुल्या ॥ २ ॥ सांगावें तें काम मना । सलगी जना नेदावी ॥ ३ ॥ तुका म्हणे निघे आगी । दुजे संगीं आतळतां ॥ ४ ॥ [१५३०]

बरें आम्हां कळों आलें देवपण । आतां गुज कोण राखे तुझें ॥ १ ॥ मारिलें कां मज सांग आजिवरी । आतां सरोवरी तुज मज ॥ २ ॥ जें आम्हीं बोलों तें आहे तुझ्या अंगीं । देईन प्रसंगीं आजि शिव्या ॥ ३ ॥ निलाजिरा तुज नाहीं याति कुळ । चोरटा शिंदळ ठावा मज ॥ ४ ॥ खासी धोंडे माती जीव जंत झाडें । एकलें उघडें परदेसी ॥ ५ ॥ गाढव कुतरा ऐसा मज ठावा । वईल तूं देवा भारवाही ॥ ६ ॥ लटिका तूं मागें बहुतांसी ठावा । आलें अनुभवा माझ्या तेंही ॥ ७ ॥ तुका म्हणे मज खवळिलें भांडा । आतां धीर तोंडा न धरवे ॥ ८ ॥ [१५३१]

आम्ही भांडों तुजसवें । वर्मीं धरूं जालें ठावें ॥ १ ॥ होसी सरड बेडूक । वाघ गांढयाही

शेण खायला करावें ? १. अशा भक्तांनीं कटदोरा बांधून नेसलेली लंगोटी व गळ्यांत घातलेल्या माळा ह्यांचा नाश करून देवळामध्यें उगीच दाटी केली २. त्यांनीं भक्तपणाच्या नात्यानें जी सेवा पत्करिली होती, तिच्यामध्यें अंतर पडत आहे. ह्याचा परिणाम परीस-खापराच्या न्यायाप्रमाणें (परिसाच्या स्पर्शानें खापराचें सोनें होत नसतें त्याप्रमाणें) आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या मनामध्यें धैर्य नाहीं असें घागेरडें मन कोठें टिकाव धरील काय ? ४. [१५२८]

स्वहित नाहींसें करणें हें बावळ्याचें काम आहे. त्या फजीतखोराला त्याची मुळींच लाज नसते १. जो कोणी आपल्या मनाप्रमाणें वागत नाहीं, तो सारखा डोळ्यांत सलत असतो, म्हणून त्याच्यापासून आपण दूर असावें २. परमार्थाविषयीं ज्याचें चित्त सावध नाहीं, त्याची कधींहि संगति करूं नये व त्याच्याशीं भाषणसुद्धां कधीं करूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे हे माकडासारखे लोक कांहीं तरी भलतेंच विचारून, उलट मला संकटांत घालून दुःख देतात ४. [१५२९]

लोकांची संगति सोडून निवांत एकटें राहावें हें मला फार बरें वाटतें १. हें मला स्वतःच्या अनुभवावरून चांगलें कळून आलें २. कांहीं काम सांगणें असेल तर तें आपल्या मनास सांगावें, पण इतर जनांना सलगी देऊं नये (लोकांशीं विशेष सलगी करूं नये) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसें एकमेकांमध्यें वेळूंचें घर्षण होऊन अग्नि उत्पन्न होतो व त्या योगानें ते जळतात, तसा दुसऱ्याचे संगतीनें आपला नाश होतो ४. [१५३०]

हे देवा, तुझा देवपणा आम्हांला चांगला कळून आला, आतां तो गुप्त कोण ठेवील ? १. कारण, तूं आजपर्यंत मला (जन्ममरणाच्या दुःखानें) कां मारलेंस, हें सांग. नाहींपेक्षां मी तुझ्याशीं बरोबरीच्या नात्यानें वागेन २. आम्ही जें कांहीं बोलतों तें सर्व तुझे अंगीं वसत आहे, म्हणून आजच्या प्रसंगीं मी तुला शिव्या देईन ३. देवा, तूं निलाजरा आहेस. तुला यातिकुळ नाहीं आणि तूं चोरटा शिंदळ आहेस हें (तुझ्या गोकुळांतील चरित्रावरून) मला माहीत आहे ४. सर्व जीवजंतु व वृक्ष–पाषाण आणि मृत्तिका हीं सर्व तूं प्रलयकाळीं भक्षण करतोस. तूं व्यावहारिक प्रांतांत परदेशी एकटा असून नागवा उघडा आहेस ५. हे देवा, (तूं विश्वरूपी असल्यामुळें) तूं गाढव व कुत्रा आहेस आणि ओझें वाहाणारा बैल आहेस, हें सर्व मला माहीत आहे ६. तूं लबाड आहेस तें पूर्वींच्या सर्व लोकांस माहीत आहे; तो लबाडपणा आज माझ्याहि अनुभवास आला ७. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मला भांडखोराला तूं खवळिलेंस, म्हणून आतां माझ्या तोंडाला धीर निघत नाहीं (माझ्या मनास वाटेल तसें मी बोलत आहें) ८. [१५३१]

तुझें मर्म आम्हांस ठाऊक झालें आहे, तें धरून आम्ही तुझ्याबरोबर भांडूं १. देवा, तूं सरडा, बेडूक, वाघ

पाईक ॥ २ ॥ बळ करी तया भ्यावें । पळों लागे तया घ्यावें ॥ ३ ॥ तुका म्हणे दूर परता । नर नारी ना तूं भूता ॥ ४ ॥ [१५३२]

काय साहतोसी फुका । माझा बुडविला रुका ॥ १ ॥ रीण घराचें पांगिलें । तें न सुटे कांहीं केलें ॥ २ ॥ चौघांचिया मतें । आधीं खरें केलें होतें ॥ ३ ॥ तुका म्हणे यावरी । आतां भीड कोण धरी ॥ ४ ॥ [१५३३]

प्रीतीचा हेकळ । पदरासी घाली पीळ । सरों नेदी बाळ । मागें पुढें पित्यासी ॥ १ ॥ काय लागे त्यासी बळ । हेडावितां कोण काळ । गोवितें सबळ । जाळीं स्नेहसूत्राचीं ॥ २ ॥ सलगी दिला लाड । बोले(केलें) तें तें वाटे गोड । करी बुझावोनि कोड । हातीं देऊनि भातुकें ॥ ३ ॥ तुका म्हणे बोलों कोणा । हें कां नेणां नारायणा । सलगीच्या वचना । कैंचें उपजे विषम ॥ ४ ॥ [१५३४]

भार देखोनि वैष्णवांचे । दूत पळाले यमाचे ॥ १ ॥ आले आले वैष्णववीर । काळ कांपती असुर ॥ २ ॥ गरुडटकयांच्या भारें । भूमी गर्जे जयजयकारें ॥ ३ ॥ तुका म्हणे काळ । पळे देखोनियां बळ ॥ ४ ॥ [१५३५]

रंगीं रंगें रे श्रीरंगें । काय भुललासी पतंगें ॥ १ ॥ शरीर जायाचें ठेवणें । धरिसी अभिलाष झणें ॥ २ ॥ नव्हे तुझा हा परिवार । द्रव्यदारा क्षणभंगुर ॥ ३ ॥ अंतकाळींचा सोइरा । तुका म्हणे विठो धरा ॥ ४ ॥ [१५३६]

जन्मा येउनि काय केलें । तुवां मुदल गमाविलें ॥ १ ॥ कां रे न फिरसी माघारा । अझुनि तरी फजितखोरा ॥ २ ॥ केली गांठोळीची नासी । पुढें भीकची मागसी ॥ ३ ॥

होतोस व कारणपरत्वें गांड्या (भित्रा) अगर सेवक होतोस २. जे कोणी तुझ्याशीं जोरानें वागतील त्यांस तूं भितोस आणि तुला भिऊन जे पळतात त्यांचा अंगीकार करतोस ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुला पुरुष, स्त्री किंवा (पंचमहाभूतांपैकीं) भूत असें कांहींच म्हणतां येत नाहीं, म्हणून आमच्यापासून तूं दूर राहा ४. [१५३२]

हें माझें बोलणें तूं फुकट सहन करतोस काय? कारण, मज गरिबाचा ठेवलेला रुका (सेवेचा ठेवा) त्वां बुडविला आहेस १. एकदां घरांत कर्ज शिरलें, म्हणजे तें सर्व घराचें वाटोळें करितें. तें परत दिल्याखेरीज त्यांतून कांहीं केल्यानें सुटका होत नाहीं. २ हें माझें कर्ज तुझ्याकडे आहे, हें चारचौघांच्या साक्षीनें पूर्वीं खरें केलें होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याउप्पर आतां तुझी भीड कोण धरील? ४. [१५३३]

हेकड-हेकेखोर मूल प्रीतीनें बापाचे पदरास पीळ घालून धरतें; तें त्याला मागें पुढें सरूं देत नाहीं १. त्या मुलाचे हातून हिसडा देऊन पदर सोडवून घेण्यास बापाला कांहीं वेळ अगर जोर लागेल काय? पण तसें तो करीत नाहीं, कारण पुत्रस्नेहानें तो जबरदस्त गुंतला जातो २. प्रथम बालकास लाडकें केलें म्हणून बालक जें करील तें गोडच वाटतें व त्यानें हट्ट घेतला तर त्याच्या हातावर खाऊ ठेवून त्याची कोडकौतुकानें समजूत घालतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, मी हें कोणाजवळ बोलूं? तुम्हांला कसें कळत नाहीं? आमच्या सलगीच्या शब्दानें तुमच्या अंतःकरणाला भेद (वैषम्य, राग) कसा उत्पन्न होईल? ४. [१५३४]

वैष्णवांचे समुदाय पाहून यमदूत पळून गेले १. वैष्णवजन हे महावीर आलेले पाहून काळ आणि असुर थरथर कांपूं लागले २. गरुडटके (गरुडचिन्हांकित पताका) आदिकरून शृंगाराचे समुदायानें व हरिनामाचे जयजयकारानें भूमि गर्जना करूं लागली (दुमदुमून गेली.) (भूमींतून हरिनामाचा जयघोष निघतो आहे, असें भासूं लागलें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, वैष्णवजनांचें बळ पाहून काल पळतो ४. [१५३५]

अरे नरा, श्रीहरीच्या रंगानें तूं रंगला जा. पतंगी खोट्या रंगाप्रमाणें असलेल्या देहादि प्रपंचाच्या रंगाला तूं कां भुललास? १. शरीर हा ठेवा नष्ट होण्याचा आहे. ह्याचा तूं एखादा लोभ धरशील तर तसें करूं नको २. द्रव्य, स्त्री इत्यादि परिवार तुझा नसून क्षणभंगुर आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अंतकाळीं सोडविणारा देव विठ्ठल हाच खरा सोयरा आहे. ह्याकरितां त्याचा आश्रय करा ४. [१५३६]

अरे नरा, तूं जन्माला येऊन काय केलेंस? नरदेहांतील आयुष्याचें (संसाराच्या नांवानें देहरुपी) मुद्दल मात्र गमावलेंस १. हे फजितखोरा, अजून तरी संसाराचा मोह टाकून मागें कां फिरत नाहींस? २. प्रपंचाच्या संगतीनें पदरीं

तुका म्हणे ठाया । जाईं आपल्या आलिया ॥ ४ ॥ [१५३७]

पंढरीस जाते निरोप आइका । वैकुंठनायका क्षेम सांगा ॥ १ ॥ अनाथांचा नाथ हें तुझें वचन । धांवें नकों दीन गांजों देऊं ॥ २ ॥ ग्रासिलें भुजंगें सर्पें महाकाळें । न दिसे हें जाळें उगवतां ॥ ३ ॥ कामक्रोध सुनीं श्वापदें बहुतीं । वेढलों आवर्ती मायेचिये ॥ ४ ॥ मृगजलनदी बुडविना तारी । आणूनियां वरी तळा नेते ॥ ५ ॥ तुका म्हणे तुवां धरिलें उदास । तरी पाहों वास कवणाची ॥ ६ ॥ [१५३८]

कृपाळू सज्जन तुम्ही संतजन । हेंचि कृपादान तुमचें मज ॥ १ ॥ आठवण तुम्ही द्यावी पांडुरंगा । कींव माझी सांगा काकुलती ॥ २ ॥ अनाथ अपराधी पतित आगळा । परि पायांवेगळा नका करूं ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही निरविल्यावरी । मग मज हरी उपेक्षीना ॥ ४ ॥ [१५३९]

संतांचिया पायीं हा माझा विश्वास । सर्वभावें दास झालों त्यांचा ॥ १ ॥ तेचि माझें हित करिती सकळ । जेणें हा गोपाळ कृपा करी ॥ २ ॥ भागलिया मज वाहतील कडिये (कडे) । त्यांचियानें जोडे सर्वसूख ॥ ३ ॥ तुका म्हणे शेष घेईन आवडी । वचन न मोडीं बोलिलें तें ॥ ४ ॥ [१५४०]

लाघवी सूत्रधारी । दोरी नाचवी कुसरी । उपजवी पाळूनि संहारी । नानापरींचीं लाघवें ॥ १ ॥ पुरोनि पंढरिये उरलें । भक्तिसुखें लांचावलें । उभें नीटचि राहिलें । कर कटीं न बैसे ॥ २ ॥

असलेल्या आयुष्याचा जर नाश केलास, तर पुढें तुला अनेक योनींतून दरिद्र्यासारखें सुखदुःख भोगीत हिंडलें पाहिजे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या श्रीहरीपासून तूं जीवदशेस आला आहेस, त्या ठिकाणीं जा ४. [१५३७]

तुम्ही पंढरीस जाणारे संत आहां म्हणून तुम्हांला मी निरोप सांगतों तो ऐका. वैकुंठाचा स्वामी जो पांडुरंग त्याला माझा हा आलिंगनपूर्वक निरोप सांगा १. "मी अनाथ जीवांचा स्वामी आहें," असें तुझेंच वचन आहे. ह्याकरितां दीन अशा सेवकांना दुःखी होऊं देऊं नको. ह्याकरितां तूं धांव घे २. त्या महाकाळरूपी भुजंगानें व लोभरूपी सर्पानें मला ग्रासलें आहे, त्याच्या तोंडांतून (व त्रिगुणांच्या जाळ्यांतून) माझी सुटका होत नाहींसें दिसतें ३. कामक्रोधादि कुत्र्यांनीं व अनेक विकाररूपी श्वापदांनीं मला सभोंवतीं घेरल्यामुळें मी मायेच्या भोंवऱ्यांत सांपडलों आहें ४. मृगजलवत् असणारी ही प्रपंचनदी जरी मला बुडवीत नाहीं तरी (पुण्याच्या द्वारां स्वर्गलोकाला) वर आणते व (पुण्य संपतांच मृत्युलोकाला) तळाला नेते, असें तिनें मला कुचंबत ठेवलें आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्हीं आमची काळजी घेतली नाहीं तर आतां आम्हीं कोणाची वाट पाहावी ? (ह्याकरितां धांवून ये) ६. [१५३८]

तुम्ही सर्व संतजन कृपाळु आहांत. ह्याकरितां (ध्रुवपदांत दर्शविलेलें) मला हेंच कृपादान आपल्याकडून व्हावें, अशी मी इच्छा करीत आहें १. मी कींवकाकुळती येऊन पांडुरंगाला आळवीत आहें २. मी अनाथ आहें, अपराधी आहें व विशेष पातकी आहें, पण मला आपले पायांपासून वेगळें करूं नका, असें तुम्ही देवाजवळ सांगा अथवा हीच आठवण द्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हीं सर्व संतांनीं जर मला हरीच्या स्वाधीन केलें, तर तो माझी कधींहि उपेक्षा करणार नाहीं ४. [१५३९]

माझा विश्वास फक्त संतांचेच (संतांच्या पायांचेच) ठिकाणीं आहे म्हणूनच मी काया, वाचा व मन ह्या सर्व भावानें त्यांचा दास बनलों आहें १. ज्या योगानें गोपाळ मजवर कृपा करतील अशा प्रकारचें माझें सर्व हित ते संतच करतील २. मी दमलों थकलों तर आईप्रमाणें मला कडेवर वागवतील (घेतील) (परमार्थांत माझा सांभाळ करतील). त्यांच्या योगानें मला सर्व सुखाची प्राप्ति होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या परमार्थाचें त्यांनीं सेवन केलें आहे त्याचा शेषभाग मी प्रीतीनें सेवन करीन. त्यांनीं जी कांहीं मला आज्ञा केली आहे ती मी मोडणार नाहीं ४. [१५४०]

हरि हा मोठा नाटकी आहे. सर्वांची प्रारब्धदोरी हातांत धरून सर्वांना जन्म देणें, त्यांचें पालन करणें व त्यांचा संहार करणें इत्यादि प्रकारें त्यांना मोठ्या चातुर्यानें नाचवितो (जगाची उत्पत्ति करतो, त्याचें पालन करतो व नंतर त्याचा संहार करतो, असे नाना प्रकारचे चमत्कार तो करीत असतो) १. सर्व ठिकाणीं ओतप्रोत असून पंढरीचे ठिकाणीं तो उरला आहे; तो भक्तिसुखास फार लांचावला आहे म्हणून कमरेवर हात ठेवून उभा आहे. तो खालीं बसत नाहीं २.

बहु काळें ना सांवळें । बहु कठिण ना कोंवळें । गुणत्रयावेगळें । बहुबळें आथीलें ॥ ३ ॥ असोनि नसे सकाळांमधीं । मना अगोचर बुद्धी । स्वामी माझा कृपानिधि । तुका म्हणे श्रीविठ्ठल ॥ ४ ॥ [१५४१]

कीर्तन ऐकावया भुलले श्रवण । श्रीमुख लोचन देखावया ॥ १ ॥ उदित हें भाग्य होईल कोणे काळीं । चित्त तळमळी म्हणऊनि ॥ २ ॥ उतावीळ बाह्या भेटीलागीं दंड । लोटांगणीं धड जावयासी ॥ ३ ॥ तुका म्हणे माथा ठेवीन चरणीं । होतील पारणीं इंद्रियांचीं ॥ ४ ॥ [१५४२]

नाम घेतां कंठ शीतळ शरीर । इंद्रियां व्यापार नाठवती ॥ १ ॥ गोड हें गोमटें अमृतासी वाड । केला कईवाड माझ्या चित्तें ॥ २ ॥ प्रेमरसें झाली पुष्ट अंगकांति । त्रिविध नासती ताप क्षणें ॥ ३ ॥ तुका म्हणे तेथें विकाराची मात । बोलों नये हित सकळांचें ॥ ४ ॥ [१५४३]

स्वामिकाज गुरुभक्ति । पितृवचन सेवा पति ॥ १ ॥ हेचि विष्णूची महापूजा। अनाभाव (आनुभाव) (अनुभव) नाहीं दुजा ॥ २ ॥ सत्य बोले मुखें । दुखवे आणिकांच्या दुःखें ॥ ३ ॥ निश्चयाचें बळ । तुका म्हणे तेंच (तेंचि) फळ ॥ ४ ॥ [१५४४]

चित्त घेऊनियां तूं काय देशी । ऐसें मजपाशीं सांग आधीं ॥ १ ॥ तरिच पंढरीराया करीन साटोवाटी । नेघें जया तुटी येईल तें ॥ २ ॥ रिद्धिसिद्धि कांहीं दाविसी अभिलाष । नाहीं मज आस मुक्तीचीही ॥ ३ ॥ तुका म्हणे तुझें माझें घडे तर । भक्तीचा भाव रे देणें घेणें ॥ ४ ॥ [१५४५]

तुझा संग पुरे संग पुरे । संगति पुरे विठोबा ॥ १ ॥ आपलया सारिखें करिसी दासा ।

तो फार काळाहि नाहीं व फार सांवळाहि नाहीं. तो स्वभावानें कठिणहि नाहीं व फार मृदुहि नाहीं. तो सत्त्वादि गुणत्रय-रहित असून महान् बलवान् आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो प्रपंचामध्यें अलिप्तपणानें असून नसल्यासारखा आहे व मनबुद्धीलाहि तो न कळणारा आहे; अशा प्रकारचा हा माझा स्वामी कृपानिधि श्रीविठ्ठल आहे ४. [१५४१]

हरीचें कीर्तन ऐकण्याकडे माझे कान वेधून गेले आहेत. त्याचप्रमाणें हरीचें श्रीमुख पाहाण्याकडे माझे डोळे लागून राहिले आहेत १. अशा प्रकारचा भाग्योदय कोणत्या वेळेला होईल, ह्याविषयीं माझें चित्त तळमळ करीत आहे २. बाहु अथवा दंड श्रीहरीस आलिंगन देण्याविषयीं उतावीळ झाले आहेत, तसाच हा देह लोटांगण घालण्याविषयीं उतावळा झाला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी आपलें मस्तक हरीचे चरणांवर ठेवीन. त्या योगानें सर्व इंद्रियांचीं पारणीं फिटतील (सर्व इंद्रियांची तृप्ति होईल) ४. [१५४२]

हरीचें नाम घेण्यानें कंठ शांत होतो व तनुहि (त्रिविधतापरहित) अशी शांत होते व इंद्रियांना विषयसेवनाचे व्यापार आठवत नाहींत १. अशा प्रकारचें हें चांगलें हरीचें नाम अमृतापेक्षांहि गोड आहे तेंच घेण्याचा माझ्या चित्तानें निर्धार केला आहे २. त्या हरिनामाचे प्रेमरसानें माझी कांति पुष्ट झाली व एका क्षणांत त्रिविधतापहि नाहींसा झाला. ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरिनामाचे ठिकाणीं (जन्ममरणादि विकार, किंवा) कामादिविकार उत्पन्न होतात ही गोष्ट देखील बोलूं नये. नामामध्यें सर्वांचें हित आहे ४. [१५४३]

स्वामीचें कार्य, गुरूची भक्ति, पित्याचें वचन–पालन व पतीची सेवा १. इत्यादि करणें हीच विष्णूची महापूजा आहे. ह्यांत अन्यथा नाहीं २. जो मुखानें खरें बोलतो व दुसऱ्यांना दुःख झालें असतां ज्याचे चित्तास दुःख होतें हीच विष्णूची महापूजा आहे (येथें पुढें ध्रुवपदांत वाचावें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसा ज्याचा निश्चय असेल तसें त्यास फळ मिळतें ४. [१५४४]

देवा, तूं माझें चित्त घेऊन त्याचे मोबदला मला काय देशील, हें आधीं सांग १. हे पंढरिराया, तरच मी तुझ्याशीं मोबदला (देण्या–घेण्याचा व्यवहार) करीन. ज्यांत मला नुकसानी येईल असें मी घेणार नाहीं २. ऋद्धि (सकळ ऐश्वर्य), सिद्धि (अष्टमहासिद्धि) ह्यांची कांहीं लालूच दाखवशील तर त्यांची मला गरज नसून, तुझ्या मुक्तीचीहि पण इच्छा नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझा आमचा जर सवदा झाला तर असा होईल, कीं तुला आम्हीं आपलें चित्त द्यावें आणि तूं आपले भक्तीविषयींची शुद्ध श्रद्धा आम्हांला द्यावी. अशा प्रकारचा तुझा आमचा देवघेवीचा व्यवहार होईल ४. [१५४५]

हे विठोबा, आतां तुझी संगति पुरे (असें त्रिवार सांगतों) १. कारण तूं जसा सर्वधर्मशून्य व दरिद्री आहेस तसें

भिकारीसा जग जाणे ॥ २ ॥ रूपा नाहीं ठाव नांवा । तैसें आमुचें करिसी देवा ॥ ३ ॥ तुका म्हणे तोयें आपुलें भेंडाळें । करिसी वाटोळें माझें तैसें ॥ ४ ॥ [१५४६]

आतां मज तारीं । वचन हें साच करीं ॥ १ ॥ तुझें नाम दिनानाथ । ब्रिदावळी जगविख्यात ॥ २ ॥ कोण लेखी माझ्या दोषां । तुझा त्रिभुवनीं ठसा ॥ ३ ॥ वायां जातां मज । तुका म्हणे तुम्हां लाज ॥ ४ ॥ [१५४७]

विठ्ठल आमुचा निजांचा । सज्जन सोयरा जीवाचा ॥ १ ॥ मापबाप चुलता बंधु । अवघा तुजशीं संबंधु ॥ २ ॥ उभयकुळीं साक्ष । तूंचि माझा मातुळपक्ष ॥ ३ ॥ समर्पिली काया । तुका म्हणे पंढरीराया ॥ ४ ॥ [१५४८]

वेदाचा तो अर्थ आम्हांसीच ठावा । येरांनीं वाहावा भार माथां ॥ १ ॥ खादल्याची गोडी देखिल्यासी नाहीं । भार धन वाही मजुरीचें ॥ २ ॥ उत्पत्तिपाळण संहाराचें निज । जेणें नेलें बीज त्याचे हातीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां सांपडलें मूळ । आपणचि फळ आलें हातां ॥ ४ ॥ [१५४९]

आमुचा तूं ऋणी टार्यांचाचि देवा । मागावया ठेवा आलों दारा ॥ १ ॥ वर्म तुझें आम्हां सांपडलें हातीं । धरियेलें चित्तीं दृढ पाय ॥ २ ॥ बैसलों धरणें कोंडोनियां द्वारीं । आंतूनि बाहेरी येओं(वों) नेदीं ॥ ३ ॥ तुज मज सरी होईल या विचारें । जळो भांडखोरें निलाजिरीं ॥ ४ ॥ भांडवल माझें मिरविसी जनीं । सहस्र वोवणी नाममाळा ॥ ५ ॥ तुका म्हणे आम्हीं केली जिवें साटी । तुम्हां आम्हां तुटी घालूं आतां ॥ ६ ॥ [१५५०]

तूं आपल्या दासास करितोस, असें जग समजतें २. तुझ्या ठिकाणीं नांवारूपाला आश्रय नाहीं. त्याप्रमाणें देवा, आम्हांलाहि नामरूपरहित करशील ३. तुकाराम महाराज म्हणतात, जशी आकारगुणादिकांची शून्यता तुझ्या रूपीं आहे तसें तूं माझें वाटोळें करशील. तूं जसा, (शेषशायी बनून) क्षीरसमुद्रानें वेढलेला आहेस तसेंच मलाहि पाण्यांत बुडवून माझें वाटोळें करशील ४. [१५४६]

हे देवा, आतां मला पतिताला तार व पतितपावन हें ब्रीद खरें कर १. सर्व दीनांचा स्वामी तूं आहेस हें तुझें ब्रीद जगविख्यात आहे २. माझ्या दोषांची कितीशी किंमत आहे? अनंत पातकांचा संहारक तूं आहेस असा तुझा त्रैलोक्यांत ठसा (शिक्का) आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी तुझा आश्रय करून जर व्यर्थ गेलों, तर त्या संबंधीची लाज तुला आहे ४. [१५४७]

विठ्ठल हा आमच्या निजजिवाचा सज्जन संबंधी (नातलग) आहे १. हे देवा, आई, बाप, चुलता, भाऊ इत्यादि नात्यांचा सर्व कांहीं तुझ्याशीं संबंध आहे. पितृ व मातृ या उभय कुळांमध्यें आईचा पक्षहि तूंच आहेस अशी (वेदाची) साक्ष आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीराया, मी आपला देह तुला समर्पण केला (तुझ्याशीं माझें सर्व ·कारचें नातें जुळलें आहे) ४. [१५४८]

वेदांचें खरें रहस्य आम्हांला ठाऊक आहे. बाकीचे वैदिक (वेद पठण करणारे) भारवाहक आहेत १. प्रत्यक्ष खाण्याच्या रुचीचा अनुभव पाहाणारास नाहीं. धनानें भरलेला हांडा घेऊन जाणाऱ्या मजुरास आंतील धनाचा लाभ नाहीं २. (जगाच्या उत्पत्ति-स्थिति-लयाला कारण असलेला पांडुरंग ज्यानें आत्मत्वानें हस्तगत केला त्यालाच वेदाचा तात्पर्यार्थ कळतो) उत्पत्ति, पालन व संहारस्वरूपाचें बीज ज्यानें नेलं त्याच्याच हातीं तें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्या हातांत सर्वांचें मूळ (पांडुरंग) लागल्यामुळें आपल्या आपण फळहि हस्तगत झालें आहे ४. [१५४९]

देवा, तूं आमचा मूळचाच ऋणकरी आहेस म्हणून आम्ही आपला स्वात्मभावाचा ठेवा तुझ्या दारीं मागावयास आलों आहों १. तुझे पाय आम्हीं चित्तांत दृढ धरले आहेत. हेंच तूं हातीं सांपडण्याचें मुख्य साधन मला सांपडलें आहे २ मी तुमचे दाराशीं धरणें घेऊन (धरून) तुम्हांला आंत कोंडून टाकलें आहे. आतां आंतून बाहेर येऊं देणार नाहीं ३. अशा करण्यानें तुझी आमची बरोबरी होईल म्हणून भांडखोरपणानें निर्लज्ज होणें ह्यास आग लागो ४. विष्णुसहस्रनाममाळा हें माझें भांडवल आहे, असें तूं मिरवीत आहेस ५. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं जीव अर्पण केला आहे. आतां तुमचा आमचा संबंध तोडून टाकूं ६. [१५५०]

काय धोविलें बाहेरी। मन मळलें अंतरीं। गादलें जन्मवरी। असत्य काटें काटलें ॥ १ ॥ सांडीं व्यापार दंभाचा। शुद्ध करीं रे मन वाचा। तुझिया चित्ताचा। तूंच ग्वाही आपुला ॥ २ ॥ पापपुण्यविटाळ देहीं। करितां न विचारिसी कांहीं। काय चांचपसी मही। जी अखंड सोंवळी ॥ ३ ॥ कामक्रोधा वेगळा। ऐसा होईं कां सोंवळा। तुका म्हणे कळा। गुंडून ठेवीं बुसरी ॥ ४ ॥ [१५५१]

सत्यकर्में आचरें रे। बापा सत्यकर्में आचरें रे। सत्यकर्में आचरें रे होईल हित। वारेल दुःख असत्याचें ॥ १ ॥ ऊंस वाढवितां वाढली गोडी। गूळ साकर हे त्याची परवडी ॥ २ ॥ साकरेच्या आळां लाविला कांदा। स्थूळसानापरी वाढे दुर्गंधा ॥ ३ ॥ सत्य असत्य हें ऐसिया परी। तुका म्हणे याचा विचार करीं ॥ ४ ॥ [१५५२]

पाषाण देव पाषाण पायरी। पूजा एकावरी पाय ठेवी ॥ १ ॥ सार तो भाव सार तो भाव। अनुभवीं देव तेचि जाले ॥ २ ॥ उदका भिन्न पालट काई। गंगा गोड येरां चवी काय नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे हें भाविकांचें वर्म। येरीं (येरें) धर्माधर्म विचारावे ॥ ४ ॥ [१५५३]

जन्मा येउनि कां रे निदसुरा। जाये (जाय) भेटी वरा रखुमाईच्या ॥ १ ॥ पाप ताप दैन्य जाईल सकळ। पावसी अढळ उत्तम तें ॥ २ ॥ संतमहंत सिद्धहरिदासदाटणी। फिटती पारणीं इंद्रियांचीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तेथें नामाचा गजर। फुकाची अपार। लुटी घेईं ॥ ४ ॥ [१५५४]

काय धोविलें कातडें। काळकूट भीतरीं कुडें ॥ १ ॥ उगा राहें लोकभांडा। चाळविल्या पोरें रांडा ॥ २ ॥ घेसी बुंथी पानवथां। उगाच हालविसी माथा। लावूनि बैसे टाळी। मन इंद्रियें मोकळीं

शरीर हें बाहेरून धुण्यांत काय अर्थ आहे? अंतःकरणांत मन हें मळलेलेंच आहे, कारण जन्मभर खोटा व्यवहार करून तें मन अनेक दोषांनीं व्यापलें आहे १. ह्याकरितां दांभिक परमार्थव्यवहार टाक आणि आपलें मन व वाणी शुद्ध कर. ह्याविषयीं तुझे चित्ताचा साक्षी तूंच आहेस २. पापपुण्याचा विटाळ तूं देहामध्यें भरीत आहेस (पापपुण्यात्मक कर्में तूं करीत आहेस) ह्याचा कांहीं विचार करीत नाहींस आणि सर्व काळ सोंवळी असणारी जी पृथ्वी तिचे ठिकाणीं तूं काय चांचपडत (ही जागा अशुद्ध आहे म्हणून दुसरीकडे जात) बसला आहेस? ३. तुकाराम महाराज म्हणतात, कामक्रोधादि अपवित्र विकार टाक व त्याहून वेगळा असा सोंवळा हो व सर्व ज्ञानचातुर्य गुंडाळून ठेव ४. [१५५१]

हे बापा, तूं सत्कर्माचें आचरण कर (असें त्रिवार सांगतों). त्या योगानें तुझें हित होऊन असत्य—खोट्या कर्मापासून होणाऱ्या दुःखाचें निवारण होईल १. उंसास वाढविलें कीं त्याचेबरोबर गोडी वाढते व त्या गोडीचे गूळ, साखर आदिकरून पदार्थ होतात २. साखरेच्या आळ्यांत कांदा लाविला तर लहानमोठ्या प्रमाणानें दुर्गंधच वाढेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याप्रमाणें खऱ्याखोट्याचा (बऱ्यावाइटाचा) तूंच विचार कर ४. [१५५२]

देव हा पाषाणाचाच केला आहे व ज्या पायरीवर उभें राहून त्याची पूजा करावयाची तीहि पण पाषाणाचीच आहे १. भाव हा सार आहे (असें द्विवार सांगतों) (शास्त्रशुद्ध श्रद्धा ही मुख्य आहे. शास्त्रोक्त प्राणप्रतिष्ठा झालेल्या पाषाणांत 'देव आहे' ही श्रद्धा असते. त्या पाषाणमय मूर्तीची उपासना करून देवाचा अपरोक्ष साक्षात्कार संतांना होतो.) असा ज्यांनीं (संतांनीं) अनुभव घेतला तेच देव झाले २. निरनिराळें उदक आहे परंतु त्याच्या रसांत कांहीं बदल आहे काय? गंगेचें पाणी गोड व बाकीच्या पाण्याला चव नाहीं असें आहे काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याचें सर्व मर्म एका भाविकाच्या हातांत आहे. बाकीच्यांनीं धर्म काय व अधर्म काय, ह्याचा विचार करीत बसावें ४. [१५५३]

नरदेहाच्या जन्माला येऊन मूर्ख, आळशी कां होतोस? रखुमाईचा पति जो श्रीविठ्ठल त्याचे भेटीस (पंढरीस) जा १. त्या योगानें तुझें सर्व पाप, ताप, दैन्य नाहींसें होऊन तूं (जन्म-मरणरहित) अचल परमात्मपदाच्या ठिकाणीं प्राप्त होशील २. संत, महंत, सिद्ध ह्या हरिदासांचे दाट समुदायांत तुझीं इंद्रियें समाधान पावतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या ठिकाणीं हरिनामाचा गजर चा ला आहे तेथें तूं अपार लाभ फुकट लूट ४. [१५५४]

देहाचें वरील कातडें धुवून काय उपयोग आहे? कालकूट विषाप्रमाणें वाईट विकार तुझे अंतःकरणांत भरले आहेत १. हे भांडखोर मूर्खा, तूं उगीच राहा. अज्ञानी बायकापोरांना कां फसवीत आहेस? २. आंगावर वस्त्राची खोळ घेऊन पाणवठ्यावर बसून (हरिचिंतनानें आनंद होत असल्याचें ढोंग करून) उगीच डोकें कां हालवितोस? ३. तूं तोंड मिटून

॥ ४ ॥ हालवीत बैसे माळा । विषयजप वेळोवेळां ॥ ५ ॥ तुका म्हणे हा व्यापार । नाम विठोबाचें सार ॥ ६ ॥ [१५५५]

येईं वो येईं वो येईं धांवोनियां । विलंब कां वायां लाविला कृपाळे ॥ १ ॥ विठाई विश्वंभरे भवच्छेदके । कोठें गुंतलीस माय विश्वव्यापके ॥ २ ॥ न करीं न करीं आतां आळस अव्हेरु । व्हावया प्रगट कैंचें दुरी अंतरु ॥ ३ ॥ नेघे नेघे नेघे माझी वाचा विसांवा । तुका म्हणे हांवा हांवा हांवा साधावा ॥ ४ ॥ [१५५६]

हेंचि याच्या ऐसें मागावें दान । वंदूनि चरण नारायणा ॥ १ ॥ धीर उदारीव निर्मळ निर्मत्सर । येणें सर्वेश्वर ऐसें नांव ॥ २ ॥ हाचि होईजेल याचिया विभागें । अनुभवी अंगें अनुभवीलया ॥ ३ ॥ जोडे तयाचे कां न करावे सायास । जाला तरि आळस दीनपणें ॥ ४ ॥ पावल्यामागें कां न घालावी धांव । धरिलिया तरि हांव बळ येतें ॥ ५ ॥ तुका म्हणे घालूं खंडीमध्यें टांक । देवाचें हें एक करुनी घेऊं ॥ ६ ॥ [१५५७]

सत्ताबळें येतो मागतां विभाग । लावावया लाग निमित्त करूं ॥ १ ॥ तुझीं ऐशीं (तुझें ऐसें) मुखें करूं उच्चारण । बोलें नारायण सांपडवूं ॥ २ ॥ आसेविण नाहीं उपजत मोहो । तरिच हा गोहो न पडे फंदीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां व्हावें याज ऐसें । सरिसे सरिसे समागमें ॥ ४ ॥ [१५५८]

करितां होया(य) होय चित्तचि नाहीं । घटापटा कांहीं करूं नये ॥ १ ॥ मग हालतचि नाहीं

घेऊन बसला आहेस, पण तुझीं मन-इंद्रियें मोकळींच आहेत (धन-स्त्री-मिष्टान्नाचा लोभ धरतोस) ४. हातांत माळ घेऊन तूं हालवीत बसलास तरी तेथें वरचेवर विषयाचाच जप होतो आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, हा सर्व पोट भरण्याचा व्यवहार आहे, आणि सारभूत असें एक विठोबाचें नाम आहे (हा दंभ टाकून एक सारभूत विठोबाचें नाम घे) ६. [१५५५]

हे कृपाळु आई, तूं धांवून ये (असें त्रिवार विनवितों.) व्यर्थ उशीर कां लाविला आहेस? १. संपूर्ण विश्वाची पालक, संसाराची छेदक व सर्व जगांत व्यापून असणारे, हे विठाबाई आई, तूं कोठें गुंतून राहिली आहेस? २. हे आई, आतां तूं मजकरितां धांव घेण्याविषयीं आळस करून माझा अव्हेर करूं नकोस. मला भेट देण्याकरितां प्रगट होण्यास तुझ्या माझ्यांत काय फार अंतर आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी वाणी तुला हांका मारतांना विसांवा घेत नाहीं (असें त्रिवार सांगतों), कारण तिला हाच हव्यास साधावयाचा आहे (असें त्रिवार सांगतों) ४. [१५५६]

नारायणाचे चरण वंदन करून त्याच्याच सारखें (त्याच्या स्वरूपस्थितीचें) त्याजजवळ दान मागावें १. त्या नारायणाचे आंगीं चार लक्षणें आहेत तीं अशीं: धैर्य, उदारपणा, निर्मलत्व, आणि निर्मत्सरत्व; म्हणून त्यास सर्वेश्वर असें नांव आहे २. ह्यांपैकीं कांहीं लक्षणें ज्याच्या जवळ आहेत (ह्या लक्षणांपैकीं सच्चिदानंद-सत्-चित्-आनंद एवढा भाग आंगीं बाणला तरीसुद्धां नर नारायणरूप होतो) तो प्रत्यक्ष देवरूपच होईल. त्याचा अनुभव घेणारानें तें अनुभविल्यास कळेल ३. जें प्राप्त होणारें आहे त्याविषयीं यत्न कां करूं नये? त्यांत जर आळस केला, तर तुमचें दीनत्व कायम राहील ४. जर आपल्याला त्याच्या प्राप्तीचा योग आहे, तर त्याच्या मागें कां धांव घेऊं नये? अथवा, ज्यांना तें प्राप्त झालें आहे त्यांच्या मागें कां धांव घेऊं नये? ५. आपली जसजशी हांव वाढते तसें तसें तें मिळविण्याविषयीं आंगांत बळ जास्त येतें. तुकाराम महाराज म्हणतात, जसें लोकांच्या खंडीभर मालामध्यें आपला एक टांक (पावशेराचा चौथा हिस्सा) त्यांत भर घालून त्या सर्व मालावर हक्क सांगावा तसें (ध्रुवपदांत दर्शविलेल्या) ह्या लक्षणांपैकीं आपले आंगीं थोडीं थोडीं जरी असलीं, तरी आपण देवाच्या सर्व विभागाचे अधिकारी होऊं ६. [१५५७]

देवाचे अंगीं असलेल्या लक्षणांमध्यें आपणास सत्तेनें वांटणी मागतां येते, म्हणून देवाशीं कांहीं तरी आपला संबंध जोडण्याकरितां हें एक निमित्त करूं १. हे देवा, आम्ही तुझे आहोंत, असें मुखानें बोलूं व त्या बोलण्यानें नारायणास आकळून घेऊं (असें गोड बोलूनच देवाला वश करूं) २. कांहीं तरी आशा असल्याशिवाय मोह उत्पन्न होत नाहीं; आशा आहे म्हणून नवरा दुसऱ्या फंदांत पडत नाहीं (मोह असणाऱ्या स्त्रीकडेच येतो) ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां ह्या देवाच्या समागमानें त्याच्यासारखेंच होऊन त्याच्याबरोबर असावें ४. [१५५८]

घटाकाश, पट, तंतु हे शास्त्राचे वाद आहेत. हे ऐकून होका हो देतात, पण त्यांत मन घालून तसें वागूं नये

जवळून । करावा तो सीण सीणवितो ॥ २ ॥ साहतचि नाहीं कांहीं पांकुळलें । उगल्या उगलें ढळत आहे ॥ ३ ॥ तुका म्हणे तरी बोलावें झांकून । येथें खुणें खूण पुरतेंचि ॥ ४ ॥ [१५५९]

संतसंगें याचा वास सर्वकाळ । संचला सकळ मूर्तिमंत ॥ १ ॥ घालूनियां काळ अवघा बाहेरी । त्यासीच अंतरीं वास दिला ॥ २ ॥ आपुलेंसें जींही नाहीं उरों दिलें । चोजवितां भलें ऐशीं स्थळें ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं झांकत परिमळ । चंदनाचें स्थळ चंदनचि ॥ ४ ॥ [१५६०]

पुष्ट कांति निवती डोळे । हे सोहळे श्रीरंगा (गीं)॥ १ ॥ अंतर्बाह्य विलेपन । हें भूषण मिरवूं ॥ २ ॥ इच्छेंऐसी आवड पुरे । विश्वंभरे जवळी ॥ ३ ॥ तुका करी नारायण । या सेवन नामाचें ॥ ४ ॥ [१५६१]

सुकाळ हा दिवसरजनी । नित्य धणी नवीच ॥ १ ॥ करुण (करूनि) सेवूं नानापरी । राहे उरी गोडीनें ॥ २ ॥ सरे ऐसा नाहीं झरा । पंक्तीकरा समवेत ॥ ३ ॥ तुका म्हणे बरवा पान्हा । कान्हाबाई माउलीचा ॥ ४ ॥ [१५६२]

पाहतां तव एकला दिसे । कैसा असे व्यापक ॥ १ ॥ ज्याचें त्याचे मिळणीं मिळे । तरी खेळे बहुरूपी ॥ ३ ॥ जाणिवेचें नेदी अंग । दिसे रंग निवडीना ॥ ३ ॥ तुका म्हणे येचि (हेचि) ठायीं । हें तों नाहीं सर्वत्र ॥ ४ ॥ [१५६३]

तुम्हासाठीं आम्हां आपुला विसर । करतां अव्हेर कैसें दिसे ॥ १ ॥ विचारा जी आतां

(ही शास्त्रें शिकण्याच्या भानगडींत पडूंच नये) १. अध्यात्मशास्त्राचे ठिकाणीं मन स्थिर केल्यावर देव आपणाजवळून कोठें जात नाहीं. त्यावांचून जे श्रम करावे त्याचें फळ श्रमच २. थोडें मन विचलित झालें तर तें देवास सहन होत नाहीं आणि निवांत मन असेल त्यांत निवांतपणें देव राहातो व कांहीं मन हालल्यानें तो हालतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां अध्यात्मशास्त्रांतलें जें बोलावयाचें आहे, तें (अधिकारी व्यक्तीपुढें साक्षेपानें व मर्यादेनें) पडद्यानें बोलावें म्हणजे खुणेला खूण पटेल ४. [१५५९]

अमूर्त जो देव तो पूर्ण मूर्तिमंत होऊन संतांच्या संगतीनें सर्वकाळ राहातो १. त्या संतांनीं कामक्रोधादि विकाररूपी काळाला बाहेर घालवून अंतःकरणामध्यें त्या देवास राहाण्याला जागा दिली २. ज्यांनीं देहअहंता मुळींच उरूं दिली नाहीं अशांचा शोध करीत जाणें चांगलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या ठिकाणीं चंदनाची वस्ती आहे, तें सर्व ठिकाण सुगंधानें व्यापलें जाऊन सर्वच सुगंधमय चंदन होतें (त्या सुगंधावरून चंदन कोठें आहे तें कळतें, तसेंच वरील लक्षणांवरून संत कोण तें कळून येतें) ४. [१५६०]

श्रीरंग जो देव, त्याला पाहिल्याबरोबर डोळे शांत होतात व आंग ब्रह्मतेजानें पुष्ट होतें. अशा प्रकारचे सुखसोहळे त्यायोगानें होतात १. म्हणून अंतरामध्यें त्याचें सुख व बाह्याकारी तेंच भूषण मिरवूं २. विश्वप्रतिपालन करणारा जो देव, त्याचेजवळ आपापल्या इच्छेप्रमाणें आवडी पूर्ण होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, (इच्छित वस्तूचा लाभ होण्याकरितां) ह्या नामाचें मी सेवन करीत आहें ४. [१५६१]

त्या नामस्मरणाचा सुकाळ मला रात्रंदिवस झाला आहे. त्यायोगानें मी नित्य नवी तृप्ति अनुभवितों १. त्या नामाचें नाना प्रकारानें मी सेवन करितों, तरी त्याच्या गोडीची आवड राहिली आहे २. पुष्कळ लोकांच्या-वैष्णवांच्या समुदायासहवर्तमान एका पंक्तीला बसून आम्हीं नामाचें कितीहि सेवन केलें, तरी हा (नामाविषयींच्या प्रेमाचा) झरा संपण्यासारखा नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्या कान्हाबाई आईचा प्रेमपान्हा सेवन करण्यास फार गोड आहे ४. [१५६२]

जो देव विटेवर उभा आहे तो पाहिला असतां एकटा दिसतो; पण तो सर्व जगामध्यें व्यापलेला आहे १. ज्याचा जसा भाव असेल, तसा तो त्याच्याशीं मिळूनहि बहुरूपानें खेळतो २. आपलें ज्ञानाचें अंग दुसऱ्यास दिसूं देत नाहीं व कोणताहि रंग तो आपल्याहून भिन्न दाखवीत नाहीं (तो व्यापक असला तरी ज्ञानाचा विषय होत नाहीं, कारण तो स्वतःच ज्ञानरुप आहे. त्याच्या स्वरूपाहून आनंददेखील वेगळा निवडितां येत नाहीं, कारण तो आनंदरूपच आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे सर्व प्रकार ह्याच (देवाचे) ठिकाणीं आहेत. असे सर्वत्र मिळावयाचे नाहींत ४. [१५६३]

हे देवा, तुमचे प्राप्तीकरितां आम्ही आपलेपणाला विसरलों. आतां तुम्ही जर आमचा अव्हेर कराल, तर तें

ठायींचे हे देवा। आम्हां नये हेवा वाढवितां ॥ २ ॥ आलों टाकोनियां सुखाची वसती। पुढें माझ्या युक्ति खुंटलिया ॥ ३ ॥ तुका म्हणे झाला सकळ वृत्तांत। केला प्रणिपात म्हणऊनि ॥ ४ ॥ [१५६४]

करावा उद्धार हें तुम्हां उचित। आम्हीं केली नीत कळली ते ॥ १ ॥ पाववीली हाक धांवा म्हणऊन। करावें जतन ज्याचें तेणें ॥ २ ॥ दुश्चिताशी बोल ठेवायासी ठाव। ऐसा आम्ही भाव जाणतसों ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें कायावाचामन। दुसरें तें ध्यान करीत नाहीं ॥ ४ ॥ [१५६५]

संतांचे (चा) उपदेश आमुचे मस्तकीं। नाहीं मृत्युलोकीं राहाणेंसा ॥ १ ॥ म्हणऊनि बहु तळमळी चित्त। येईं वो धांवत पांडुरंगे ॥ २ ॥ उपजली चिंता लागला उशीर। होत नाहीं धीर निढळ वाटे ॥ ३ ॥ तुका म्हणे पोटीं रिघालेंसे भय। करूं आतां काय ऐसें झालें ॥ ४ ॥ [१५६६]

काळावरी घालूं तरि तो सरिसा। न पुरतां इच्छा दास कैसे ॥ १ ॥ आतां नाहीं कांहीं उशिराचें काम। न खंडावें प्रेम नारायणा ॥ २ ॥ देणें मग विलंब कां आड। गोड तरी गोड आदि अंत ॥ ३ ॥ तुका म्हणे होईल दर्शनें निश्चिंती। गाईन तें गीतीं ध्यान मग ॥ ४ ॥ [१५६७]

परउपकारें कायावाचामन। वेंचे सुदर्शन रक्षी तया। याजसाठीं असें योजिलें श्रीपति। संकल्पाचे हातीं सर्व जोडी ॥ २ ॥ परपीडे त्याची जिव्हा मुडतासे। यमदूत टाळे करिती पूजा ॥ ३ ॥ तुका म्हणे अंबऋषि दुर्योधना। काय झालें नेणां दुर्वासया ॥ ४ ॥ [१५६८]

बरें दिसेल काय ? १. हे देवा, ह्याचा विचार तुम्ही अगोदरच करा, (आम्ही भक्त असल्यामुळें) आम्हांला तुमचा विशेष मत्सर–द्वेष–करतां येत नाहीं २. तुमच्याजवळ सुखाची वस्ती आहे, म्हणून मी धांवून आलों; आतां आपल्यापुढें माझ्या सर्व युक्ति कुंठित झाल्या आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा सर्व वृत्तांत आपले पायांजवळ मी सांगून साष्टांग नमस्कार केला (आतां तुम्हांला योग्य वाटेल तें करा) ४. [१५६४]

हे देवा, तुम्ही आम्हांला उद्धरावें हें तुम्हांला योग्य आहे, आणि जी नीति आम्हांला समजली ती आम्हीं निवेदन केली (आचरणांत आणली) १. ती अशी, कीं तुम्ही धांवून या, अशी तुमच्या कानापर्यंत पोहोंचण्याजोगी तुम्हांला हांक मारली, आतां ज्याचें त्यानें आपापलें कर्तव्य सांभाळावें २. आपल्या कर्तव्याविषयीं जो कोणी दुश्चित्त होईल, त्याच्यावर कर्तृत्वपराङ्मुखतेचा शब्द ठेवला जाण्यास तो पात्र होईल, हाच भाव आम्हीं निश्चयानें जाणला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझें काया-वाचा-मन तुजवांचून दुसरें (दुसऱ्याचें) ध्यान करीत नाहीं ४. [१५६५]

ह्या मृत्युलोकांत राहूं नये (पांडुरंगाची प्राप्ति मनुष्यजन्मांत करून घ्यावी) अशा प्रकारचे उपदेश पुष्कळ संतांचे झाले. तो बोजा आमच्या मस्तकीं आहे १. हे पांडुरंगे, एवढ्याकरितां माझें चित्त फार तळमळतें, म्हणून तूं धांवून ये २. तुला यावयास उशीर लागला, म्हणून मला चिंता उत्पन्न झाली आहे, आणि माझ्या जिवास धीर निघत नाहीं, व तुझी भेटी होणें कपाळीं (माझ्या दैवांत) आहे कीं नाहीं असें वाटतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याविषयीं (तुझ्या प्राप्तीवांचून हा देह वायां जाणार, दुःखरूप मृत्युलोकांत राहावें लागणार असें) माझ्या पोटांत भय शिरलें आहे. आतां म्यां काय करावें हें सांग ४. [१५६६]

तुझी भेटी होण्यास काळ अनुकूल नाहीं, असें निमित्त काळावर घालावें तर तो माझ्याबरोबर आहे. असें असून जर आमची इच्छा पूर्ण होत नाहीं, तर आम्ही तुझे दास कसें म्हणवावें? १. हे नारायणा, आतां भेट देण्यास उशीर करण्याचें कारण नाहीं. जें आमचें प्रेम तुझ्यावर आहे तें नाहींसें करूं नको २. कधींतरी भेट द्यावी लागेल असें जर आहे तर उशीर करण्याचें काय कारण? जें गोड करावयाचें तें अव्वलपासून अखेरपर्यंत गोड असावें हें उत्तम ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला तुझें दर्शन झालें म्हणजे मी चिंतेविरहित होऊन तुझ्या ध्यानाचें सुस्वरानें काव्यांत वर्णन करीन ४. [१५६७]

जो कोणी आपलें काया-वाचा-मन दुसऱ्यावर उपकार करण्यांत खर्च करतो त्याचें रक्षण सुदर्शन करतें १. लक्ष्मीपति जो देव त्यानें सुदर्शनाची योजना ह्याकडे केली आहे; पण आपापल्या संकल्पाप्रमाणें सर्व प्राप्ति होते (फळ मिळतें) २. दुसऱ्यास पीडा करण्याबद्दल ज्याची जीभ फार हालते, त्याची यम जोड्याचे टाळयानें (तळव्यानें) पूजा करितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अंबर्षीला छळल्यामुळें दुर्वासास झालेली शिक्षा व दुर्योधनास त्याचे दुष्ट कर्मांबद्दल झालेली शिक्षा, हीं तुम्हांला ठाऊक नाहींत काय? ४. [१५६८]

हागिल्याचे सिके (शिके) वोणवाचि राहे । अपशकून पाहे वेडगळ ॥ १ ॥ अत्यंत (अतेता) समय नेणतां अवकळा । येऊं नये बळा सिक धरा ॥ २ ॥ भोजनसमयीं ओकाचा आठव । ठकोनियां जीव कष्टी करी ॥ ३ ॥ तुका म्हणे किती सांगों उगवून । अभाग्याचे गुण अनावर ॥ ४ ॥ [१५६९]

नारडे तरी काय नुजेडे कोंबडें । करूनियां वेडे आग्रहो दावी ॥ १ ॥ आइत्याचे साहे फुकाचा विभाग । विक्षेपानें जग छी थू करी ॥ २ ॥ नेमून ठेविला कर्त्यानें काळ । मा लाहेसें बळ करूं पुढें ॥ ३ ॥ तुका म्हणे देव साहे जाल्यावरी । असांगाचें करी सर्व सांग ॥ ४ ॥ [१५७०]

तरी सदा निर्भर दास । चिंता आस विरहित ॥ १ ॥ अवघाच एकीं ठाव । सर्व भाव विठ्ठलीं ॥ २ ॥ निरविलें तेव्हां त्यास । झाला वास त्यामाजी ॥ ३ ॥ तुका म्हणे रूप घ्यावें । नाहीं ठावें गुणदोष ॥ ४ ॥ [१५७१]

वेडिया उपचार करितां सोहळे । काय सुख कळे तयासी तें । अंधापुढें दीप नाचती नाचणें । भक्तिभावेंविण भक्ति तैसी ॥ १ ॥ तिमाणें राखण ठेवियेलें सेता । घालुनियां माथां चुना तया । खादलें म्हणोनि सेवटीं बोंबली । ठायींची कां भुली नेणां रया ॥ २ ॥ मुकियापासाव सांगतां पुराण । रोगिया मिष्टान्न काय होय । नपुंसका काय करील पद्मिणी । रुचिविण वाणी तैसें होय ॥ ३ ॥

ज्याप्रमाणें हगलेलें मूल ओणवें उभें राहातें, तें पाहून न हगतां ओणवा राहाणें (ओणवा राहाण्याचें शिकेल तर) हा वेडगळपणा अपशकुनाचा (अशुभ) आहे असें समजावें १. योग्य समय न जाणणें ही विटंबना आहे, म्हणून भलतेंच करण्याविषयीं निकराला येऊं नये (आग्रह धरूं नये) ह्याबद्दलचें शिक्षण ग्रहण करा २. भोजनाचे वेळेस वांतीचा आठव केल्यास त्याच्या योगानें ठकला जाईल (मळमळावयास लागेल) व जिवास त्रास होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या मूर्ख माणसांना किती उलगडून सांगावें? जे करंटे असतात, त्यांच्या ठिकाणीं दुर्निवार (दूर न होण्याजोगे) अवगुण असतात ४. [१५६९]

पहांटे कोंबडें ओरडलें नाहीं तर उजाडावयाचें राहील काय? तथापि कित्येक मूर्ख आग्रहानें आपला कोंबडा ओरडूं नये म्हणून त्याला झांकून ठेवितात १. पण त्या मूर्खांना असें कळत नाहीं, कीं उजाडावयाचें तर थांबणार नाहींच, पण आपला कोंबडा ओरडण्यानें लोकांस पहांट झालेली कळते, अशा प्रकारचें जें लोकांस साहाय्य होतें त्याचा ते मूर्ख फुकट वांटा कां घेत नाहींत? त्यामध्यें कांहीं हरकत केल्यानें जग मात्र छीः थूः करतें २. (वरील दृष्टान्ताप्रमाणें आपल्या देह-स्त्री-पुत्रादिकांचें रक्षण करण्याचा आपण कितीहि प्रयत्न केला तरी जगत्कर्त्या ईश्वरानें मृत्यूच्या कालाचें नियमन करून ठेविलें आहे, म्हणून तो मृत्यु पुढें प्राप्त न होईल असा जोराचा प्रयत्न करूं ३. तुकाराममहाराज म्हणतात, एक वेळ देव साहाय्य झाला तर अपूर्णाचें कार्यदेखील तो पूर्ण करतो ४. [१५७०]

हरीचे सर्व दास चिंता-आशा-विरहित झाल्यामुळें सदासर्वदा निर्भय असतात १. त्यांचा सर्व भाव राहाण्यास एक श्रीविठ्ठल हेंच ठिकाण झालें आहे २. देवाच्या ठिकाणीं ज्या कालीं त्यांनीं सर्व भावाचा विनियोग केला त्या वेळेसच त्यांच्या जीवाचे ठिकाणीं देवाचें अभेदरूपानें वास्तव्य झालेलें असतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ते सदा सर्वकाळ हरीच्या रूपाचें ध्यान करीत असतात, त्यावांचून त्यांना जगांतील दुसरे गुणदोष ठाऊक नाहींत ४. [१५७१]

वेड्या मनुष्यास कितीहि (वस्त्रअलंकार, भोजन इत्यादि भोगांचे) सुखोपचार केले, तरी त्याचें सुख त्याला काय होणार आहे? आंधळ्यापुढें पुष्कळ दिवे लावून नृत्यसमारंभ केला, तर त्याचा उपभोग त्याला काय होईल? तशी भावावांचून हरीची भक्ति निरर्थक आहे १. काठीवर मडकें घालून त्याला चुना लावितात व तें बुजगावणें शेतामध्यें राखण ठेवतात, तरी पक्षी येऊन शेत खातात, त्यामुळें अखेरीस नुकसान झालें म्हणून ओरडतात, त्याचा विचार ते मुळांतच कां करीत नाहींत? २. जो कोणी बहिरा मुका मनुष्य आहे त्याला पुराण सांगितलें असतां काय उपयोग आहे? अगर रोग्यापुढें मिष्टान्न वाढलें असतां त्याची गोडी त्याला काय होय? अथवा नपुंसक पुरुषापुढें चांगली लावण्यवती स्त्री जर आली, तर त्यानें तिचें सुख काय घ्यावें? त्याप्रमाणें ज्याच्या वाणींत रस नाहीं त्याची ती वाणी व्यर्थ आहे ३.

हात पाय नाहीं करिल तो काय । वृक्षा फळ आहे अमोलिक । हातां नये तैसा वायांच तळमळी । भावेंविण भोळीं म्हणे तुका ॥ ४ ॥ [१५७२]

मेघवृष्टीनें करावा उपदेश । परि गुरुनें न करावा शिष्य । वांटा लाभे त्यास । केल्या अर्ध कर्माचा ॥ १ ॥ द्रव्य वेंचावें अन्नछत्रीं । भूतीं द्यावें सर्वत्र । न घ्यावा हा पुत्र । उत्तमयाती पोसणा ॥ २ ॥ बीज न पेरावें खडकीं । ओल नाहीं ज्याचें बुडखीं । थीतां टके सेखीं । पाठीं लागे दिवाण ॥ ३ ॥ गुज बोलावें संतांशीं । पत्नी राखावी जैसी दासी । लाड देतां तियेसी । वांटा पावे कर्माचा ॥ ४ ॥ शुद्ध कसूनि पाहावें । वरिल रंगा न भुलावें । तुका म्हणे घ्यावें । जया नये तुटी तें ॥ ५ ॥ [१५७३]

नावडावें जन नावडावा मान । करूनि प्रमाण तूंचि होईं ॥ १ ॥ सोडवूनि देहसंबंध व्यसनें । ऐसी नारायणें कृपा कीजे ॥ २ ॥ नावडावें रूप नावडावे रस । अवघी राहो आस पायांपाशीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां आपुलिया सत्ता । करूनि अनंता ठेवा ऐसें ॥ ४ ॥ [१५७४]

उपाधिवेगळे तुम्ही निर्विकार । कांहींच संसार तुम्हां नाहीं ॥ १ ॥ ऐसें मज करूनि ठेवा नारायणा । समूळ वासना नुरवावी ॥ २ ॥ निसंग तुम्हांसी राहणें एकट । नाहीं कटकट साहों येत ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं मिळो येत शिळा । रंगासी सकळा स्फटिकाची ॥ ४ ॥ [१५७५]

महार मातेचे पर्णीं भेरे । न कळे खरें पुढील ॥ १ ॥ वोंगळ अधमाचे गुण । जातां घडी

तुकाराम महाराज म्हणतात, वृक्षास फळ उत्तम आलें आहे पण ज्या मनुष्यास हातपाय नाहींत त्यानें तें उंच असलेलें फळ कसें घ्यावें ? मग हातास येत नाहीं म्हणून तो व्यर्थ तळमळ करीत असतो, त्याप्रमाणें जी कोणी भोळी मंडळी आहे, त्यांच्या ठिकाणीं देवाविषयींचा जर भाव (श्रद्धा, प्रेम, श्रवणादि क्रिया) नाहीं, तर त्यांचा भोळेपणा व्यर्थ आहे ४. [१५७२]

मेघाच्या सर्वत्र होणाऱ्या वृष्टीप्रमाणें अधिकारी गुरूनें सर्वांस उपदेश करावा, पण एकांतीं कानांत मंत्र सांगून गुरूनें एखादा शिष्य करूं नये; असें असून कोणी शिष्य करील तर त्या शिष्यांनीं केलेल्या पापाचा अर्धा भाग गुरूस भोगावा लागेल १. जो कोणी द्रव्यवान् असेल त्यानें त्या द्रव्याचा अन्नछत्राकडे विनियोग करावा व तें अन्न सर्वांभूतीं द्यावें; पण चांगल्या जातीनें (श्रीमंतानें) धनाला वारस नाहीं म्हणून दुसऱ्याचा पुत्र पोसणा (दत्तक) घेऊं नये २. खडकाळ जमिनीमध्यें बीं पेरूं नये व ज्या जमिनीच्या बुडाला ओल नाहीं अशा ठिकाणीं बीं पेरूं नये; पेरलें तर पीक हातास न येतां शेवटीं तो पेरणारा ठकला जातो आणि सरकारधारा मागें लागतो ३. गुह्य गोष्टी संतांपाशीं बोलाव्या आणि आपल्या बायकोपाशीं गुह्य न सांगतां तिला दासीप्रमाणें आज्ञेंत राखावें; तसें न करतां तिला लाडानें वागविलें, तर त्या स्त्रीकडून झालेल्या पापकर्माचा नवऱ्यास अर्धा भाग प्राप्त होतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, कोणतीहि गोष्ट कसाला लावून शुद्ध ठरवावी. केवळ वरच्या चकाकीला पाहून भुलूं नये. ज्यापासून आपलें नुकसान न होईल अशा वस्तूचें ग्रहण करावें ५. [१५७३]

हे देवा, मला लौकिक आवडूं नये व कोणी मान दिला असतां तोहि आवडूं नये. माझ्या आवडीचा विषय एक तूंच व्हावास असें कर १. देहसंबंधीं ज्या संबंधी (स्त्री-पुत्रादि आणि त्यांपासून होणारीं दुःखें) आहेत त्यांपासून मला सोडवावें. अशा प्रकारची कृपा नारायणानें मजवर करावी २. रूपविषय (स्त्रियादिकांचें रूप) आवडूं नये व अन्नादि रसविषय आवडूं नये. माझी सर्व इच्छा आपले पायांजवळ असावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे अनंता, तुम्ही आपल्या सत्तेनें ह्याप्रमाणें आतां मला (मी मागतों त्याप्रमाणें माझी स्थिति) करून ठेवा ४. [१५७४]

हे देवा, तुम्ही सर्व उपाधींच्या वेगळे असे निर्विकार आहां, तुम्हांला (जन्ममरणादि) कोणत्याहि प्रकारचा संसार नाहीं १. हे नारायणा, माझ्या वासनेचा समूळ नाश करून तुमच्यासारखें मला करून ठेवा २. तुम्ही असंग असे एकटे राहातां, कोणत्याहि प्रकारची जगाची कटकट तुम्हांस सोसत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें स्फटिकाची शिळा सर्व रंगांशीं मिळून त्यांहून वेगळी असते (त्याप्रमाणें मला करून ठेवा) ४. [१५७५]

जो मात्रागमन करण्याविषयीं पण करणारा आहे, (जो एखादा 'मी महार आईच्या पोटचा असेन' अशी आपल्या

नलगेचि ॥ २ ॥ श्वान झोळी स्वामिसत्ता । कोप येतां उतरे ॥ ३ ॥ तुका म्हणे गुमान कां । सांगों लोकां अधमांसी ॥ ४ ॥ [१५७६]

डोळ्यामध्यें जैसें कणु । अणु तेंहि न साहे ॥ १ ॥ तैसें शुद्ध राखा हित । नका चित्त वाटवूं ॥ २ ॥ आपुल्याचा कळवळा । आणिका बाळा वरि न ये ॥ ३ ॥ तुका म्हणे बीज मुडा । जैसा चाडा पिकाच्या ॥ ४ ॥ [१५७७]

मुखीं नाम हातीं मोक्ष । ऐसी साक्ष बहुतांची ॥ १ ॥ वैष्णवांचा माल खरा । तुरतुरा वस्तूसी ॥ २ ॥ भस्म दंड न लगे काठी । तीर्थां आटी भ्रमण ॥ ३ ॥ तुका म्हणे आडकाठी । नाहीं भेटी देवाचे ॥ ४ ॥ [१५७८]

आगी लागो तया सुखा । जेणें हरि नये मुखा ॥ १ ॥ मज होत कां विपत्ति । पांडुरंग राहो चित्तीं ॥ २ ॥ जळो तें समूळ । धन संपत्ति उत्तम कुळ ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । जेणें घडे तुझी सेवा ॥ ४ ॥ [१५७९]

आतां न म्हणें मी माझें । नेघें भार कांहीं ओझें ॥ १ ॥ तूंचि तारिता मारिता । कळों आलासी निरुता ॥ २ ॥ अवघा तूंचि जनार्दन । संत बोलती वचन ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं । माझें तिळभरी नाहीं ॥ ४ ॥ [१५८०]

समुद्रवलयांकित पृथ्वीचें दान । करितां समान न ये कामा ॥ १ ॥ म्हणऊनि कोणीं न करावा आळस । म्हणा रात्रंदिवस रामराम ॥ २ ॥ सकळही शास्त्रें पठण करितां वेद । सरी न ये गोविंद नामें एकें ॥ ३ ॥ सकळही तीर्थें प्रयागादि काशी । करितां नामासी तुळेति ना ॥ ४ ॥ कर्वतीं कर्मरीं

आईसंबंधीं शपथ वाहील) तो कोणत्याहि यातीचा जरी असला, तरी तो महार आहे असें समजावें. पुढें आपला परिणाम काय होईल हें तो समजत नाहीं १. अशा प्रकारचे वाईट गुण अधम यातीचे असतात. अशा लोकांना अधोगतीस जाण्यास घटका देखील लागणार नाहीं २. कुत्रें हें लाडानें मालकाचे अंगावरील वस्त्रावर येऊन बसतें व मालक रागावल्यावर खालीं उतरतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा अधम लोकांची परवा न करतां त्या अधम लोकांना मी सदुपदेश करतों, धर्मतत्त्व समजून सांगतों ४. [१५७६]

ज्याप्रमाणें डोळ्यास एक रजःकण देखील सोसत नाहीं १. त्याप्रमाणें तुम्ही आपलें हित करा. अनेक विषयवासनांच्या योगानें चित्त वाटवूं नका २. आपल्या मुलावर जी प्रीति असते, ती दुसऱ्याचे मुलावर नसते ३. तुकाराम महाराज म्हणतात, पुढें आपल्याला पिकाचा लाभ होईल ह्या इच्छेनें लहानशा कणगीमध्यें (मुड्यामध्यें) जसें बीज सांठवून ठेवतात (तसा आपल्या हिताविषयीं यत्न करावा) ४. [१५७७]

हरीच्या नामाची मुखांत बैठक झाल्याबरोबर मोक्ष हस्तगत होतो. ह्याबद्दल मागील पुरावा पुष्कळ आहे १. हरिनामचिंतन हा वैष्णवांचा खरा माल आहे. ह्या योगानें ब्रह्म वस्तु तुरतुर धांव घेते, म्हणून त्याचा झपाट्यानें खप आहे २. मोक्षप्राप्तीकरितां भस्म, दंड व काठी हें कांहींच नको व तीर्थभ्रमणाचा खटाटोप नको ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाच्या नामचिंतनानें (पापें नाहींशीं होतात व) देवाचे भेटीस कांहीं अडथळा येत नाहीं ४. [१५७८]

ज्याच्या वाचेस हरीचें नाम येत नाहीं त्याचे सर्व सुखास आग लागो १. मला कितीहि दारिद्र्यावस्था प्राप्त झाली तरी हरकत नाहीं, पण माझे चित्तांत पांडुरंगाची वस्ती राहो २. धन, संपत्ति, उत्तम कूळ हें हरिचिंतनावांचून असेल तर तें समूळ जळो ३. तुकाराम महाराज म्हणतात, दे देवा, ज्या योगानें तुझी सेवा घडेल ती स्थिति मला पाहिजे ४. [१५७९]

आतां हा देह मीं व देहसंबंधीं (स्त्री-पुत्रादि) माझें हें कांहीं म्हणणार नाहीं व ह्या वृत्तींचें ओझेंहि मी आपलेकडे घेणार नाहीं १. हे देवा, तारणारा व मारणारा तूंच आहेस हें मला निश्चयानें कळलें आहे २. सर्व कांहीं एक तूं जनार्दन आहेस असें संतवचन आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं (ह्या जगांत) माझें असें मला तीळभर देखील कांहीं नाहीं ४. [१५८०]

समुद्रानें वेष्टिलेल्या पृथ्वीचें दान केलें तरी त्यानें हरिनामचिंतनाची बरोबरी होत नाहीं १. ह्याकरितां तें नाम घेण्यास कोणी आळस करूं नये. रात्रंदिवस राम राम म्हणा २. सकळ शास्त्रांसहवर्तमान वेदांचें पठण केलें तरी तें एका गोविंदनामाचे तुलनेस येत नाहीं ३. प्रयाग, काशीसहवर्तमान सर्व तीर्थें जरी केलीं, तरी तीं नामाच्या तुलनेस

देहासी दंडण । करितां समान न ये नामा ॥ ५ ॥ तुका म्हणे ऐसा आहे श्रेष्ठाचार । नाम हेंचि सार विठोबाचें ॥ ६ ॥ [१५८१]

अवघ्या वाटा झाल्या क्षीण । कळीं न घडे साधन । उचित विधि विधान । न कळे न घडे सर्वथा ॥ १ ॥ भक्ति पंथ बहु सोपा । पुण्य नागवे या पापा । येणें जाणें खेपा । येणेंचि एकें खंडती ॥ २ ॥ उभारोनि बाहे । विठो पालवीत आहे । दासां मीच साहें । मुखें बोले आपुल्या ॥ ३ ॥ भाविक विश्वासी । पार उतरिलें त्यांसी । तुका म्हणे नासी । कुतर्क्यांचे कपाळीं ॥ ४ ॥ [१५८२]

आम्ही नामाचे धारक । नेणों प्रकार आणीक । सर्व भावें एक । विठ्ठलचि प्रमाण ॥ १ ॥ न लगे जाणावें नेणावें । गावें आनंदें नाचावें । प्रेमसुख घ्यावें । या वैष्णवां (चे) संगतीं ॥ २ ॥ भावबळें घालूं कास । लज्जा चिंता दवडूं आस । पायीं निजध्यास । म्हणवूं दास विष्णूचे ॥ ३ ॥ भय नाहीं जन्म घेतां । मोक्षसुखा हाणों लाता । तुका म्हणे सत्ता । करूं निकट सेवेची ॥ ४ ॥ [१५८३]

आम्ही हरीचे संवगडे । जुने ठायींचे वेडे बागडे । हातीं धरुनि कडे । पाठीसवें वागविलों ॥ १ ॥ म्हणोनि भिन्न भेद नाहीं । देव आम्हां एक देहीं । नाहीं झालों कहीं । एका एक वेगळे ॥ २ ॥ निद्रा करितां होतों पायीं । सवेंचि लंका घेतली तईं । वानर गोवळ गाई । सवें चारित फिरतसों ॥ ३ ॥ आम्हां नामाचें चिंतन । राम कृष्ण नारायण । तुका म्हणे क्षण । खातां जेवितां न विसंबों ॥ ४ ॥ [१५८४]

मागें बहुतां जन्मीं । हेंचि करित आलों आम्ही । भवतापश्रमीं । दुःखी (खें) पिडले निववूं त्यां ॥ १ ॥ गर्जूं (गर्जों) हरिचे पवाडे । मेळवूं वैष्णव बागडे । पाझर रोकडे । काढूं पाषाणामध्यें ॥ २ ॥

येत नाहींत ४. तीर्थामध्यें करवतीनें अगर एका प्रकारच्या शस्त्रानें गळा कापून घेण्यासारखें देहदंडन केल्यानें देखील हरिनामाची बरोबरी होत नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, एक विठोबाचें नाम हेंच सार आहे, असेंच (श्रुति-स्मृतींचे अर्थ जाणून त्याप्रमाणें वागणारे) श्रेष्ठ लोक परंपरेनें मानीत आले आहेत ६. [१५८१]

परमार्थाचे सर्व मार्ग क्षीण झाले आहेत आणि तीं साधनें कलियुगांत घडतहि नाहींत व त्यांचें योग्य विधिविधान कळतहि नाहीं. कळलें तर त्याप्रमाणें घडतहि नाहीं १. म्हणून हरीचा भक्तिपंथ हा फार सोपा आहे. तो पुण्य व पाप ह्या उपाधींनीं युक्त नाहीं (म्हणजे त्यापासून पुण्य किंवा पाप होत नाहीं), म्हणून येण्याजाण्याचे–जन्ममृत्यूचे हेलपाटे त्यायोगानें नाहींसे होतात २. हात वर करून भक्तिमार्गानें येणारास विठोबाराय बोलावितात व दासांचें सर्व कांहीं मी सहन करतों असें बोलतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी भक्तिविषयीं भाविक विश्वासु आहेत, त्यांना श्रीहरि या संसारसमुद्रांतून पार करतो व जे कुतर्की आहेत त्यांच्या हिताचा नाश होतो ४. [१५८२]

आम्ही वैष्णव एक श्रीहरीचें नाम घेणार, ह्यावांचून दुसरे कांहीं प्रकार जाणत नाहीं. काया-वाचा-मनानें आम्हांला एक विठ्ठलच मान्य आहे १. म्हणून त्याचे वांचून आम्ही ज्ञान-अज्ञान हे कांहीं जाणत नाहीं. त्याचेंच नांव घ्यावें आणि त्याच छंदामध्यें सर्व वैष्णवांचे समुदायांत नाचून त्याच्या प्रेमसुखाचा उपभोग घ्यावा २. हरिविषयींच्या भावबळाची बळकट कांस (काच्या) घालून लज्जा, चिंता, आशा हीं नाहींशीं करूं व एक विठोबाचे चरणांचा निजध्यास ठेवून आम्ही विष्णूचे दास आहों असें म्हणवूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हांला जन्म घेण्यास भय वाटत नाहीं म्हणून मोक्षसुखाचा आम्हीं धिःकार केला आहे. आतां हरीच्या चरणाच्या निकट सेवेचें बल संपादन करूं ४. [१५८३]

आम्ही हरीचे जुनाट खेळगडी, मूळचे भोळेभाळे आहोंत; आम्ही हरीला हातांत, कडेवर व पाठकुळीस घेऊन वागविलें, अथवा त्यानें आम्हांस वागविलें १. म्हणून देवाचे व आमचेमध्यें भिन्नभाव नाहीं. त्याचा व आमचा एक जीव आहे, म्हणून एकमेकांना सोडून आम्ही कधींहि वेगळे झालों नाहीं २. हरीनें क्षीरसागरांत निद्रा केली त्या वेळीं आम्ही हरीचे चरणांजवळ होतों व तो रानांत गाई चारीत होता त्या वेळीं आम्ही त्याचेबरोबर गोपाळरूपानें फिरत होतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हांला राम कृष्ण नारायण ह्या नामाचें खातां जेवतांना चिंतन असतें. त्याला आम्ही क्षणभरदेखील मुळींच विसंबत नाहीं ४. [१५८४]

मागें आम्ही अनेक जन्मीं हेंच काम करीत आलों आहों तें हें, कीं जे कोणी संसारतापानें दुःखी झाले असतील त्यांना शांत करणें १. शूर वैष्णवांचा समुदाय मिळवून हरीच्या कीर्तनाची गर्जना करूं व त्या योगानें जे कोणी

भावशुद्ध नामावळी । हर्षें नाचूं (चों) पिटूं टाळी । घालूं पायांतळीं । कळिकाळ त्या बळें ॥ ३ ॥ काम क्रोध बंदीखानीं । तुका म्हणे दिले दोन्ही । इंद्रियांचे धनी । आम्ही जालों गोसावी ॥ ४ ॥ [१५८५]

अमर तूं खरा । नव्हे कैसा मी दातारा ॥ १ ॥ चाल जाऊं संतांपुढें । वाद सांगेन निवाडे ॥ २ ॥ तुज नांव जरी नाहीं । तरी माझें दाव काई ॥ ३ ॥ तुज रूप जरी नाहीं । तरी माझें दाव काई ॥ ४ ॥ खेळसी तूं लीळा । तेथें मी काय वेगळा ॥ ५ ॥ साच तूं लटिका । तैसा मीही म्हणे तुका ॥ ६ ॥ [१५८६]

मंत्र चळे पिसें लागतें सत्वर । अबद्ध ते फार तरले नामें ॥ १ ॥ अशौचता(अशौच तो) बाधी आणिकां अक्षरां । नाम निदसुरा घेतां तरे ॥ २ ॥ रागज्ञानघात चुकतां होय वेळ । नाम सर्वकाळ शुभदायक ॥ ३ ॥ आणिकां भजनां विधि बोलिला निषेध । नाम तें अभेद सकळां मुखीं ॥ ४ ॥ तुका म्हणे तपें घालिती घालणी । वेश्या उद्धरूनि नेली नामें ॥ ५ ॥ [१५८७]

नव्हती ते संत करितां कवित्व । संतांचे ते आप्त नव्हती संत ॥ १ ॥ येथें नाहीं वेश सरतें आडनांव । निवडे घावडाव व्हावा अंगीं ॥ २ ॥ नव्हती ते संत धरितां भोपळा । करितां वाकळा प्रावर्णासी ॥ ३ ॥ नव्हती ते संत करितां कीर्तनें । सांगतां पुराणें नव्हती संत ॥ ४ ॥ नव्हती ते संत वेदाच्या पठणें । कर्मआचरणें नव्हती संत ॥ ५ ॥ नव्हती संत करितां तप तीर्थाटण । सेविलिया वन नव्हती संत ॥ ६ ॥ नव्हती संत माळामुद्रांच्या भूषणें । भस्म उधळणें नव्हती संत ॥ ७ ॥

पाषाणहृदयाचे असतील त्यांना सत्त्वगुणाचा साक्षात् पाझर फोडूं २. हरीची नामें हीं शुद्धभावानें घेऊं व आनंदानें गाऊं, नाचूं व टाळ्या वाजवूं व ह्या सामर्थ्यानें कळिकाळाला पायांखालीं घालूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही कामक्रोध हे दोन्ही बंदिखान्यांत टाकून इंद्रियांचे मालक असे गोसावी झालों आहोंत (असे आम्ही इंद्रियांचे सत्ताधारी मालक झालों आहोंत) ४. [१५८५]

हे दातारा, तूं जर अमर आहेस तर तुझ्याप्रमाणें मी अमर नाहीं हें कसें तें सांग १. हा तुझा आमचा वाद संतांना सांगेन. ह्याकरितां तुम्ही आम्ही तिकडे जाऊं, म्हणजे ते ह्याचा निकाल करतील २. तुझ्या ठिकाणीं नामाचा संबंध नाहीं तर मला तरी नांव कोठें आहे हें दाखीव ३. तूं जर अरूप आहेस तर माझें रूप कोठें आहे तें दाखीव ४. तूं नानाप्रकारच्या लीलेनें खेळ खेळतोस, तेथें मी तुझ्याहून निराळा आहें काय ? ५. तुकाराम महाराज म्हणतात, (ज्या दृष्टीनें निर्गुणरूपानें) तूं खरा आहेस (त्या दृष्टीनें) मीहि खरा आहें. [ज्या दृष्टीनें सगुणरूपानें] तूं खोटा आहेस [त्या दृष्टीनें] मीहि खोटा आहें ६. [१५८६]

कांहीं मंत्रांचा उच्चार करतांना त्यांत कांहीं चूक झाली, तर उच्चार करणारास तात्काळ वेड लागतें. श्रीहरीचें नाम तसें नाहीं. तें वेडेंवांकडें घेऊनहि पुष्कळ तरले १. अन्य मंत्र (वैदिक मंत्र) अशुद्ध स्थितीनें जपले तर ते बाधक होतात परंतु नामस्मरण निजले ठिकाणीं कोणी पारोश्यानें केलें तरी तो तरेल २. नामावांचून इतर गायनास वेळेचें व रागाचें ज्ञान पाहिजे. त्यांत चूक झाली तर गाणाराचा घात होतो. श्रीहरीचें नाम गाणें तसें नाहीं, तें सर्वकाळ शुभदायक आहे ३. इतर (श्रवण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य ह्या) भक्तींस विधिनिषेध सांगितला आहे. [कांहीं करावें, कांहीं न करावें] तसें नामाचे ठिकाणीं नसून सर्व यातीनें नाम सर्वकाळ घ्यावें ४. तुकाराम महाराज म्हाणतात, कांहीं तप, अनुष्ठानसाधन केल्यानें तीं धोक्यांत घालतात [तशी नामाचे ठिकाणीं कांहीं बाधा नसून तात्काळ कार्य होतें, ह्यास मागील पुरावा] व्यभिचारिणी गणिकेनें अंतकाळीं नामोच्चार केल्याबरोबर तिचा उद्धार झाला ५. [१५८७]

कवित्व (काव्य) केल्यानें संत होत नाहींत व संतांचे आप्तसंबंधी असण्यानेंहि खरे संत होत नाहींत १. संताचा बाह्य वेश धारण केल्यानें, किंवा संत हें आडनांव असल्यानेंहि संतत्व येत नाहीं. शत्रूचे घाव डाव सहन करून जो टिकाव धरतो तो खरा शूर; त्याचप्रमाणें संतपणाचाहि अधिकार अंगीं असला पाहिजे २. हातामध्यें भोंपळा धारण करून गोधडी पांघरल्यानें संत होत नाहींत ३. कीर्तन केल्यानें संत होत नाहींत व पुराणाचा अर्थ सांगूनहि संत होत नाहींत ४. वेदांचें पठण करून त्यांतील कर्मांचें आचरण केल्यानें संत होत नाहींत ५. तीर्थाटनादि तपश्चर्या केल्यानें संत होत नाहींत अगर वनांत जाऊन राहातील ते संत नव्हेत ६. माळा घालून मुद्रा लाविल्यानें संत होत नाहींत ७.

तुका म्हणे नाहीं निरसला देहे । तोंवरी हे अवघे (आघवे) संसारिक ॥ ८ ॥ [१५८८]

हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥ गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥ नलगे मुक्ति आणि संपदा (धन संपदा) । संतसंग देई सदा ॥ ३ ॥ तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसी ॥ ४ ॥ [१५८९]

भाग्यवंता हे परवडी । करिती जोडी जन्माची ॥ १ ॥ आपुलाल्या लाहो भावें । जें ज्या व्हावें तें आहे ॥ २ ॥ इच्छाभोजनाचा दाता । नलगे चिंता करावी ॥ ३ ॥ तुका म्हणे आल्या थाऱ्या । वस्तु बऱ्या मोलाच्या ॥ ४ ॥ [१५९०]

वंचुनियां पिंड । भाता दान करी लंड ॥ १ ॥ जैसी याची चाली वरी । तैसा अंतरला दुरी ॥ २ ॥ मेला राखे दिस । ज्यालेपण जालें वोस ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । लोभें न पुरेचि सेवा ॥ ४ ॥ [१५९१]

अधीरा माझ्या मना ऐक एक मात । तूं कां रे दुश्चित निरंतर ॥ १ ॥ हेचि चिंता काय खावें म्हणऊनि । भले तुजहूनि पक्षिराज ॥ २ ॥ पाहा ते चातक नेघे भूमिजळा । वरुषे उन्हाळा मेघ तया ॥ ३ ॥ सकळ यातींमध्यें ठक हा सोनार । त्या घरीं व्यापार झारियाचा ॥ ४ ॥ तुका म्हणे जळीं वनीं जीव एक । तयापाशीं लेख काय आहे ॥ ५ ॥ [१५९२]

कां रे नाठविसी कृपाळु देवासी । पोसितो जगासी एकला तो ॥ १ ॥ बाळा दूध कोण करितें उत्पत्ति । वाढवी श्रीपति सवें दोन्ही ॥ २ ॥ फुटती तरुवर उष्णकाळमासीं । जीवन तयांसी कोण घाली ॥ ३ ॥

तुकाराम महाराज म्हणतात, जोंपर्यंत देहाचें निरसन झालें नाहीं (मी व माझेपणा, अहंभाव गेला नाहीं) तोंपर्यंत हे वर सांगितलेले सर्व लोक संसारी आहेत असें जाणावें ८. [१५८८]

हे देवा, तुझा विसर मला कधीं पडूं नये हेंच दान तूं मला दे १. तुझे गुण मी आवडीनें गाईन. माझी सर्व कांहीं कमाई हीच आहे २. ह्यावांचून मोक्षहि नको आणि संपत्तिहि नको. मला सर्व काळ संतसमागम द्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, ही देणगी तुम्ही मला देऊन मग खुशाल गर्भवासामध्यें आम्हांला घाला (संतसंगाच्या आनंदापुढें गर्भवासाचें अनिवार दुःख हें दुःखच वाटणार नाहीं) ४. [१५८९]

भाग्यवानांचा असा प्रकार आहे, कीं ज्या योगेंकरून उत्तम जन्माचा लाभ होईल असें ते करितात १. भावनेप्रमाणें ज्याला जें पाहिजे असेल, तें ह्या ठिकाणीं (देवाजवळ) आहे २. हा देव इच्छेप्रमाणें भोजन देणारा दाता आहे, म्हणून कोणी कांहीं चिंता करूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, (उत्तम प्रकारच्या अमोल्य वस्तु) ह्या ठिकाणीं वस्तीस आल्या आहेत (त्यामुळें भक्तानें देवाची भक्ति करून आपला इच्छित लाभ करून घ्यावा) ४. [१५९०]

आपला देहपिंड न देतां (आईबाप जिवंत असतां त्यांच्या सेवेंत अंगचोरपणा करतो पण) पितरांस विष्णुपदीं भाताचे पिंड देतो त्यास लंड (लबाड) म्हणावें १. जशी ज्याची वागणूक असेल, तसा तो देवापासून दूर होतो व देवाला अंतरतो २. पितर जिवंत असतांना त्यांची सेवा न करितां ते मेल्यावर त्यांचे दिवस ध्यानांत ठेवून श्राद्ध करितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारच्या लोभिष्ट लोकांची सेवा देवास प्राप्त (मान्य) होत नाहीं ४. [१५९१]

हे माझ्या उतावळ्या मना, मी तुला एक विचारतों, तें तूं ऐक. अरे, तूं निरंतर दुश्चित्तपणानें (दुःखीकष्टी) कां असतोस ? १. मना, रोज उठून काय खावें ह्याची तूं चिंता करतोस पण चिंता न करणारे पक्षिराज आहेत, ते तुझ्यापेक्षां फार चांगले २. पाहा बरें, चातकपक्षी पृथ्वीवरील पाण्याचें सेवन करीत नाहींत, म्हणून त्यांच्याकरितां उन्हाळ्यांत देखील मेघ वर्षाव करितात ३. सर्व जातींमध्यें ठकविणारे (फसविणारे, लुच्चे) सोनार आहेत, तरीहि त्यांच्याशीं व्यवहार करून झारेकरी आपलें पोट भरतात. (देव त्यांना तेथेंहि अन्न देतो) ४. तुकाराम महाराज म्हणतात, कित्येक जीव पाण्यामध्यें व वनामध्यें आहेत, पण त्यांचेपाशीं कांहीं संचय आहे काय, ह्याचा विचार कर ५. [१५९२]

अरे, तूं कृपाळु देवाचें चिंतन कां करीत नाहींस ? तो एकटा देव सर्व जनांचें प्रतिपालन करीत आहे १. बालकासाठीं देव आईच्या स्तनामध्यें दूध निर्माण करितो. लक्ष्मीपति जो देव तो गर्भांतील मूल आणि स्तनांतील दूध हीं दोन्हीहि बरोबरच वाढवितो २. भर उन्हाळ्यामध्यें सर्व झाडांस पानें फुटतात. त्या वेळीं त्यांना पाणी कोण घालतो ? ३.

तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहें त्या अनंता आठवूनि ॥ ४ ॥ तुका म्हणे ज्याचें नाम विश्वंभर । त्याचें निरंतर ध्यान करीं ॥ ५ ॥ [१५९३]

उदारा कृपाळा पतितपावना । ब्रीदें नारायणा साच तुझीं ॥ १ ॥ वर्णिलासी जैसा जाणतां नेणतां । तैसा तूं अनंता साच होसी ॥ २ ॥ दैत्यां काळ भक्तां मेघश्याममूर्ति । चतुर्भुज हातीं शंख चक्र ॥ ३ ॥ काम इच्छा तयां तैसी होसी राणी । यशोदेच्या स्तनीं पान करी ॥ ४ ॥ होऊनि सकळ कांहींच न होसी । तुका म्हणे यासी वेद ग्वाही ॥ ५ ॥ [१५९४]

देवें देऊळ सेविलें । उदक कोरडेंचि ठेविलें ॥ १ ॥ नव्हे मत गूढ उमान कांहीं । तूं आपआपणापें पाहीं ॥ २ ॥ पाटें पूर वोसंडला । सरिता सागर तुंबोनि ठेला ॥ ३ ॥ वांझे घरीं बाळ तान्हा । एक बाळी दो कानां ॥ ४ ॥ तुका म्हणे पैस । अनुभविया ठावा गोडी रस ॥ ५ ॥ [१५९५]

मरण माझें मरोन गेलें । मज केलें अमर ॥ १ ॥ ठाव पुसिलें बुड पुसिलें । वोस वोसलें देहभाव ॥ २ ॥ आला होता गेला पूर । धरिला धीर जीवनीं ॥ ३ ॥ तुका म्हणे अ(बु)नादीचें । झालें साचें उजवणें ॥ ४ ॥ [१५९६]

माझे लेखीं देव मेला । असो त्याला असेल ॥ १ ॥ गोष्टी न करीं नांव नेघें । गेलों दोघे खंडोनी ॥ २ ॥ स्तुतिसमवेत निंदा । केला धंदा उदंड ॥ ३ ॥ तुका म्हणे निवांत ठेलों । वेंचित आलों जीवित्व ॥ ४ ॥ [१५९७]

त्या देवानें तुझी काळजी केली नाहीं काय? सर्वांचें प्रतिपालन करणारा असा जो अनंत त्याची आठवण करून तूं निवांत राहा ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या देवाचें नांव विश्वंभर आहे, त्याचें तूं सर्वकाळ ध्यान कर ५. [१५९३]

हे नारायणा, उदार, कृपाळु, पतितपावन हीं तुझीं सत्य ब्रीदें–बिरुदें आहेत १. हे अनंता, कोणी कळून अगर न कळून तुझें वर्णन करतील त्याप्रमाणें तूं खरोखर होतोस २. देवा, तूं दुष्ट लोकांस (दैत्यांस) काळाप्रमाणें भासतोस व भक्तांना शंखचक्रादि आयुधें धारण करणारा चतुर्भुज मेघश्याम मूर्तिरूप दिसतोस ३. गोपिकांना जसा काम उत्पन्न होईल तसा त्यांच्या इच्छेप्रमाणें तूं त्यांचा पति झालास, अथवा स्वस्त्रीची कामेच्छा करणाऱ्या अर्जुन भक्ताची तूं राणी झालास; बाळवेशानें यशोदेचें स्तनपान करतोस ४. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तूं सर्व कांहीं होऊन कांहींच होत नाहींस; ह्याला पुरावा चार वेदांचा आहे ५. [१५९४]

(देव स्वरूपाच्या देवळांतून मीपणाच्या घराला आल्यामुळें मायामय जळानें सर्व ब्रह्मांड व्यापलें आहे) तो देव आपले देवळांत गेल्यावर मायामय जळ नाहींसें होऊन सर्व कोरडेंच आहे १. हें बोलणें कांहीं माझे मताचें नाहीं अथवा कांहीं अवघड उमान (उखाणा, कोडें) मीं घातलें नाहीं; तूं आपल्या ठिकाणीं आपलेपणाचा (मी कोण आहें ह्याचा) विचार करून पाहा २. प्रथमतः मी देही आहें असा मायामय जळाचा थोडकासा पाट आला; तोच जास्त वाढून सर्व नद्या व समुद्र भरून ब्रह्मांडभर व्यापला ३. वांझेचे घरीं लेंकरूं तान्हें असून त्यानें एक भिकबाळी मी आणि माझें ह्या दोन्ही कानांत घातली हें सर्व म्हणणें जसें खोटें आहे [तसें मी व माझें तुझें हें सर्व म्हणणें खोटे आहे] ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांच्या अंतःकरणांमध्यें मीपणादि सर्व विकार नसून मोकळी जागा आहे त्या अनुभवी लोकांस–संतांस ह्या रसाची गोडी माहीत आहे ५. [१५९५]

माझ्या मरणास मरण आलें (सर्व देहादि प्रपंचभान नाहींसें झालें) म्हणून मी अमर झालों १. त्याचें ठावठिकाण जी मिथ्या देह-अहंता, ती समूळ नाहींशी करून टाकिली २. ज्या वाटेनें हा विकाराचा पूर आला होता तो त्या वाटेनें गेला आणि माझें धैर्य नामरूपी जीवनाचे ठिकाणीं राहिलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे प्रकार माझ्या ठिकाणीं जुने होते त्यांचें (ज्ञान नसल्यामुळें जन्म-मरणांचें दुःख आजवर भोगीत आलों त्याचें) आज खरोखरी सार्थक झालें ४. [१५९६]

माझ्या समजुतीनें देव मेला आहे. ज्या कोणाला असेल (आहे असें वाटत असेल) त्याला तो असो १. आतां त्याची गोष्ट बोलणें व त्याचें नांव घेणें हें कांहीं मी करणार नाहीं. त्याचा आमचा जो देवभक्तपणाचा संबंध होता तो नाहींसा झाला २. आजपर्यंत त्याच्या स्तुतिसहवर्तमान निंदेचा व्यवहार पुष्कळ केला (देवाची पुष्कळ स्तुति व प्रसंगानें निंदाहि केली) ३. तुकाराम महाराज म्हणतात, आजपर्यंत ह्यांच्या सेवेकडे जीवित्वाचा व्यय केला. आतां मात्र सर्व टाकून निवांत बसलों ४. [१५९७]

लवविलें तया सवें लवेजती। अभिमान हातीं सांपडेना ॥ १ ॥ भोळिवेचें लेणें विष्णुदासां साजे। तेथें भाव दुजे हारपती ॥ २ ॥ अर्चन वंदन नवविधा भक्ति। दया क्षमा शांति तये ठायीं ॥ ३ ॥ तये गांवीं नाहीं दुःखाची वसती। अवघाचि भूतीं नारायण ॥ ४ ॥ अवघेचि झालें सोंवळें ब्रह्मांड। विटाळाचें तोंड न देखती ॥ ५ ॥ तुका म्हणे गाजे वैकुंठीं सोहळा। याही भूमंडळामाजी कीर्ति ॥ ६ ॥ [१५९८]

पंढरीची वारी आहे माझे घरीं। आणीक न करीं तीर्थव्रत ॥ १ ॥ व्रत एकादशी करीन उपवासी। गाइन अहर्निश(शीं) मुखीं नाम ॥ २ ॥ नाम विठोबाचें घेईन मी वाचे। बीज कल्पांतींचें तुका म्हणे ॥ ३ ॥ [१५९९]

संपदा(संपत्ति) सोहळा नावडे मनाला। लागला टकळा पंढरीचा ॥ १ ॥ जावें पंढरीसी आवडी मनासी। कई(धीं) एकादशी आषाढी ये हें ॥ २ ॥ तुका म्हणे ऐसें आर्त ज्याचे मनीं। त्याची चक्रपाणी वाट पाहे ॥ ३ ॥ [१६००]

कथनीं पठनीं करूनि काय। वांचुनि रहणी वायां जाय ॥ १ ॥ मुखीं वाणी अमृतगोडी। मिथ्या भुकें चरफडी ॥ २ ॥ पिळणी पाक करितां दगडा। काय जडा होय तें ॥ ३ ॥ मधु मेळवूनि माशी। आणिका सांसी पारधिया ॥ ४ ॥ मेळवूनि धन मेळवी माती। लोभ्या हातीं तेंचि मुखीं ॥ ५ ॥ आपलें केलें आपण खाय। तुका वंदी त्याचे पाय ॥ ६ ॥ [१६०१]

उमटती वाणी। वाटा (वाटे) नामाचिया ध्वनी ॥ १ ॥ बरें सेवन उपकारा। घ्यावें घ्यावें या उत्तरा ॥ २ ॥ सरळ आणि मृदु। कथा पाहावी ते (पाववीते) ऊर्ध्व ॥ ३ ॥

जसा जो कोणी लवविणारा भेटेल तसे ते वैष्णव नम्र होतात, अभिमानाच्या हातीं ते लागत नाहींत. [त्यांच्यामध्यें अभिमान उत्पन्न होत नाहीं] १. भोळेपणाचा दागिना एक विष्णुदासांनाच शोभत आहे (त्यांचा द्वैतभाव हरपून गेल्यामुळें) त्यांच्या ठिकाणीं हरिवांचून दुसरी भावना नाहीं २. अर्चनवंदनादि नवविधा भक्ति व दया, क्षमा, शांति इत्यादिकांची वस्ती त्यांचे ठिकाणीं आहे ३. त्यांचे हृदयरूपी गांवांत दुःखाची वस्ती नाहीं, कारण सर्व भूतांचे ठिकाणीं एक नारायण आहे असें ते जाणतात ४. सर्व ब्रह्मांड एक हरीचे भावनेमुळें सोंवळें झालें आहे म्हणून द्वैतभावाच्या विटाळाचें तोंडदेखील ते पाहात नाहींत ५. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांच्या मोठेपणाचा सोहळा वैकुंठांत प्रख्यात असून ह्या सर्व पृथ्वीमध्यें देखील त्यांची कीर्ति आहे ६. [१५९८]

कुलपरंपरेनें पंढरीची वारी करण्याचा संप्रदाय आमचे घरीं आहे म्हणून मी कोणतेंहि अन्य तीर्थव्रत करणार नाहीं १. एकादशी हें व्रत करून हरीच्या सन्निध राहून त्याचेंच नांव रात्रंदिवस गाईन २. तुकाराम महाराज म्हणतात, कल्पाचे अंतीं राहाणारें जें बीज (जगाच्या उत्पत्ति-स्थिति-लयाचें कारण) विठोबारायाचें नांव तें मी निरंतर वाणीनें घेईन ३ [१५९९]

अनेक संपत्तीचा सुखसोहळा माझ्या मनाला आवडत नाहीं. त्यानें सारखा पंढरीचा ध्यास घेतला आहे १. पंढरीला जावें हीच आवड मनामध्यें असल्यामुळें आषाढी एकादशी कधीं येईल असा ध्यास त्या मनानें घेतला आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारची उत्कट इच्छा ज्याचे मनांत आहे त्याची चक्रपाणी वाट पाहातात ३. [१६००]

कोणतींहि परमार्थविचाराचीं अक्षरें पठण करणें व सांगणें हें, जर त्याप्रमाणें वागणूक नसेल तर, सर्व व्यर्थ आहे १. मुखानें अमृताचे गोडीचें वर्णन करितो (मुखांत अमृतासारखी गोड वाणी आहे) पण आपण स्वतः भुकेनें तडफडतो २. दगड शिजविला तर तो दगड शिजून नरम होईल काय ? ३. मधमाश्या सर्व पुष्पांतील मधाचें सेवन न करितां पारध्याकरितां (व इतर लोकांकरितां) मध जमा करून ठेवितात ४. लोभी हा पुष्कळ धन मिळवून मातींत पुरून ठेवितो. या योगानें जिवंतपणीं त्याचे हातांत माती असते व मेल्यावर तीच तोंडांत पडते ५. तुकाराम महाराज म्हणतात, जें ज्यानें केलें आहे त्याचा जो अनुभव घेतो त्याचे पाय मी वंदन करितों (जो स्वतः केलेल्या कथा-कीर्तन-प्रवचनांचा स्वतः अनुभव घेतो तोच खरा वंद्य होय) ६. [१६०१]

माझ्या मुखावाटे हरिनामाचा ध्वनिच निघत आहे १. त्याचेंच सेवन करणें बरें. परोपकार होण्यासाठीं तेंच नाम घ्यावें व घ्यावें २. ही हरिकथा सरळ असून मृदु आहे. ती गाणारास ऊर्ध्व गतीला (सद्गतीला) नेईल ३.

गात जातो तुका । हाचि उपदेश आइका ॥ ४ ॥ [१६०२]

कथाकाळींची मर्यादा । सांगतों ते भावें वंदा । प्रीतीनें गोविंदा । हेंचि एक आवडे ॥ १ ॥ टाळ वाद्य गीत नृत्य । अंतःकरणें प्रेमभरित । वाणिता तो कीर्त । तद्भावनें लेखावा ॥ २ ॥ नये आळसें मोडूं अंग । कथे कानवडें ढुंग । हेळणेचा रंग । दावी तो चांडाळ ॥ ३ ॥ तोंडीं विडा मानें ताठा । थोरपणें घाली गेंठा । चित्त नेदी नामपाठा । गोष्टी लावी तो चांडाळ ॥ ४ ॥ कथे इच्छी मान । दावूनियां थोरपण । रजा संकोचन । लुगडीं सांवरी तो चांडाळ ॥ ५ ॥ आपण बैसे वाजेवरी । सामान्य हरीच्या दासां धरी । तरि तो सुळावरी । वाहिजे(ल) निश्चयेंसी ॥ ६ ॥ येतां न करी नमस्कार । कर जोडोनियां नम्र । न म्हणतां थोर । आणिकां खेटी तो चांडाळ ॥ ७ ॥ तुका विनवी जना । कथे नाणावें अवगुणा । करा नारायणा । ऋणी समर्पक भावें ॥ ८ ॥ [१६०३]

कथा देवाचें ध्यान । कथा साधनां मंडण । कथे ऐसें पुण्य । आणीक नाहीं सर्वथा ॥ १ ॥ ऐसा साच खरा भाव । कथेमाजी उभा देव ॥ २ ॥ मंत्र स्वल्प जना । उच्चारितां वाचे मना । म्हणतां नारायणा । क्षणें जळती महा दोष ॥ ३ ॥ भावें करितां कीर्तन । तरे तारी आणीक जन । भेटे नारायण । संदेह नाहीं म्हणे तुका ॥ ४ ॥ [१६०४]

कथा त्रिवेणी संगम । देव भक्त आणि नाम । तेथींचें उत्तम । चरणरज वंदितां ॥ १ ॥ जळती दोषांचे डोंगर । शुद्ध होती नारी नर । गाती ऐकती सादर । जे पवित्र हरिकथा ॥ २ ॥ तीर्थें तया ठाया । येती पुनीत व्हावया । पर्वकाळ पायां । तळीं वसे वैष्णवां ॥ ३ ॥ अनुपम्य हा महिमा ।

तुकाराम महाराज म्हणतात, हरिनाम हीं अक्षरें मी सहज रीतीनें गात आयुष्याच्या मार्गानें जात आहें आणि लोकांना देखील 'हरिनाम गा' असा उपदेश करीत आहें. तुम्ही सर्व लोक हाच उपदेश ऐका ४. [१६०२]

हरिकथेच्या वेळेची जी मर्यादा आहे ती (हरिकथेच्या वेळीं कसें वागावें ह्यासंबंधीं नियम) तुम्हांस मी सांगतों. तुम्ही भावार्थानें ती शिरसावंद्य करा म्हणजे हेंच करणें गोविंदास प्रिय आहे १. टाळमृदंगादि वाद्यें घेऊन अंतःकरणाचे ठिकाणीं प्रेमभरित होऊन जो कोणी हरिनाम गातो व नृत्य करून भगवंताची कीर्ति वर्णन करितो तो तद्रूपच आहे असें जाणावें २. कथा श्रवण करणारांनीं आळस देऊन आंग मोडूं नये व वांकडें ढुंगण करून कथेंत बसूं नये, कारण हे हेळणा करण्याचे (हरिकथेला तुच्छ मानण्याचे) प्रकार जो दाखवील तो चांडाळ आहे, असें जाणावें ३. पानाचा विडा खाऊन जो मोठ्या (मोठेपणाच्या) ताठ्यानें जेठा मारून बसतो आणि कथाश्रवणाकडे चित्त न देतां दुसऱ्या कांहीं गोष्टी सांगतो त्यास चांडाळ म्हणावें ४. आपला मोठेपणा दाखवू. कथेच्या ठिकाणीं मानाची इच्छा करितो आणि बैठकीवर धूळ असेल तर संकोच मानून, आपलीं चांगलीं वस्त्रें सांवरून बसतो त्यास चांडाळ म्हणावें ५. जो कोणी आपण उंच ठिकाणीं बसून हरिदास सामान्य आहेत असें समजतो त्यास यमदूत अखेरीस निश्चयानें सुळावर चढवितील ६. कथेमध्यें आल्याबरोबर जो हात जोडून नम्रपणानें वक्त्यास नमस्कार करीत नाहीं आणि श्रेष्ठ मंडळी पुढें श्रवणास बसलेली आहेत त्यांना न मानतां खेटून बसतो तो चांडाळ आहे असें समजावें ७. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व लोकांस माझी विनंति आहे, कीं तुम्ही हरिकथेंत तरी वर सांगितलेले अवगुण टाकून या आणि यथायोग्य भावानें नारायणास आपला ऋणी करा ८. [१६०३]

हरिकथा करणें हें देवाचें ध्यानच आहे आणि सर्व साधनांमध्यें कथाच श्रेष्ठ आहे. ह्या हरिकथेप्रमाणें दुसरें कोणतेंच पुण्य नाहीं (असें निश्चयानें सांगतात) १. हरिकथेमध्यें प्रत्यक्ष देव उभा असतो हे निश्चयानें खरें आहे २. मनांत देवाचें ध्यान धरून वाचेनें नामोच्चार करणें हा मंत्र सर्व जनांस सोपा आहे. नारायण ह्या नामाचा उच्चार केल्याबरोबर एका क्षणामध्यें महादोष जळून जातात. तुकाराम महाराज म्हणतात, जो कोणी भावार्थानें कीर्तन करील तो आपण तरून अनेक जीवांना (इतरांनाहि) तारील आणि त्यास नारायण भेटेल ह्यांत कांहीं संशय नाहीं ४. [१६०४]

देव, भक्त व हरिनामाचा उच्चार असा त्रिवेणीसंगमच हरिकथा आहे. त्या ठिकाणच्या वैष्णवांच्या चरणरजांना जे कोणी वंदन करतील ते उत्तम होतील १. जे कोणी तत्परतेनें हरिकथा गातील व ऐकतील ते पुरुष असोत अगर स्त्रिया असोत, त्यांच्या सर्व दोषांचे पर्वत जळून जाऊन ते पवित्र होतील २. त्या वैष्णवांच्या ठिकाणीं सर्व तीर्थें पवित्र व्हावयास येतात व कपिलाषष्ठीसारखे सर्व पर्वकाळ त्यांच्या पायांच्या ठिकाणीं वास्तव्य करतात ३. तुकाराम महाराज म्हणतात,

नाहीं द्यावया उपमा । तुका म्हणे ब्रह्मा । नेणे वर्णू या सुखा ॥ ४ ॥ [१६०५]

सांडूनि कीर्तन न करीं आणीक काज । नाचेन निर्लज्ज तुझ्या रंगीं ॥ १ ॥ आवडीचें आर्त पुरवीं पंढरिराया । शरण तुझ्या पायां याचि लागीं ॥ २ ॥ टाळी वाहूनियां विठ्ठल म्हणेन । तेणें निवारीन भवश्रम ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा नुपेक्षावें आम्हां । न्यावें निजधामा आपुलिया ॥ ४ ॥ [१६०६]

जळती कीर्तनें । दोष पळतील विघ्नें ॥ १ ॥ हेंचि बळिवंत गाढें । आनंद करूं दिंडीपुढें ॥ २ ॥ कळि (लि) पापाची हे मूर्ति । नामखड्ग घेऊं हातीं ॥ ३ ॥ तुका म्हणे जाऊं । बळें दमामेही लावूं ॥ ४ ॥ [१६०७]

यमधर्म सांगे दूतां । तुम्हां नाहीं तेथें सत्ता । जेथें होय कथा । सदा घोष नामाचा ॥ १ ॥ नका जाऊं तया गांवां । नामधारकाच्या शिवां । सुदर्शन यावा । घरटी फिरे भोंवतीं ॥ २ ॥ चक्र गदा घेउनी हरि । उभा असे त्यांचे द्वारीं । लक्ष्मी कामारी । रिद्धिसिद्धी सहित ॥ ३ ॥ ते हे बळियाशिरोमणी । हरिभक्त ये मेदिनी । तुका म्हणे कानीं । यम सांगे दूतांचे ॥ ४ ॥ [१६०८]

कान्हया रे जगजेठी । देईं भेटी एक वेळे ॥ १ ॥ काय मोकलिलें वनीं । सावजांनीं वेढिलें ॥ २ ॥ येथवरी होता संग । अंगें अंग लपविलें ॥ ३ ॥ तुका म्हणे पाहिलें मागें । एवढ्या वेगें अंतरला ॥ ४ ॥ [१६०९]

आपुल्या आम्हीं पुसिलें नाहीं । तुज कांहीं कारणें ॥ १ ॥ मागें मागें धांवत आलों ।

ह्या हरिकथेच्या माहात्म्यास दुसरी उपमा नाहीं. ह्या हरिकथेच्या सुखाचें वर्णन ब्रह्मदेव देखील करूं शकत नाहीं ४. [१६०५]

एक कीर्तन सोडून मी दुसरें कोणतेंहि काम करणार नाहीं. ह्या कीर्तनछंदानें निर्लज्ज होऊन तुझ्या रंगांत (नामाच्या आनंदांत) नाचेन १. हे पंढरीराया, ही माझी उत्कट इच्छा आवडीची आहे ती आपण पूर्ण करा. ह्याकरितांच मी तुम्हांला शरण आलों आहें २. हातानें टाळी वाजवून मुखानें विठ्ठलनामाचा उच्चार करीन. त्या योगानें सर्व संसारश्रम नाहींसा होईल (जन्ममरणाचे श्रम नाहींसे होतील) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्ही माझी उपेक्षा करूं नका, तर तुमच्या निजधामास मला घेऊन जा ४. [१६०६]

ह्या हरिकीर्तनाच्या योगानें सर्व दोषांचें दहन होऊन विघ्नें पळून जातील १. हेंच एक श्रेष्ठ व बलाढ्य साधन आहे म्हणून आम्ही (वीणा हातीं घेऊन) दिंडी—समुदायामध्यें गाण्यानाचण्याचा आनंद करूं २. हा कलि केवळ पापाची मूर्ति आहे पण आम्हीं हातामध्यें नामरूपी शस्त्र घेतलें आहे [म्हणून त्या कलीचा इलाज चालत नाहीं] ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही आनंदाची नौबद लावून स्वसामर्थ्यानें (नामसंकीर्तनाच्या बळानें) हरीकडे (वैकुंठाला) जाऊं ४. [१६०७]

ज्या ठिकाणीं हरिकथा होत आहे व सर्वकाळ नामाचा घोष होत आहे त्या ठिकाणीं तुमची कांहीं सत्ता चालणार नाहीं असें आपल्या सेवकांना यम सांगतो १. जे कोणी हरिनाम घेणारे आहेत त्यांच्या गांवास जाऊं नका, इतकेंच नव्हे तर त्यांच्या गांवच्या शिवेवर देखील जाऊं नका; कारण तेथें भगवान् विष्णूच्या सुदर्शनाचें आगमन होऊन तें त्यांच्या रक्षणार्थ त्यांच्याभोंवतींच नव्हे, तर त्यांच्या गांवांतील प्रत्येक घराभोंवतीं फिरत असतें २. हातामध्यें चक्र व गदा घेऊन व दासी ऋद्धिसिद्धींसहवर्तमान व लक्ष्मीसहित हरि त्यांच्या दारांत उभे असतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरिभक्त हे पृथ्वीवर सर्व बलवानांत श्रेष्ठ आहेत असें यम आपल्या दूतांच्या कानांत सांगतो ४. [१६०८]

(विरही गौळण म्हणत्ये,) हे जगजेठी श्रीकृष्णा, मला एक वेळ भेट दे १. मला ह्या संसारवनामध्यें कां टाकून दिलेंस? येथें कामक्रोधादि श्वापदांनीं मला वेढलें आहे २. तुझा येथपर्यंत संग (सहवास) होता. आतां तूं आपलें शरीर निजरूपांत कां लपविलेंस? ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी दृष्टि देहादि प्रपंचाकडे फिरते न फिरते तोंच त्यानें आपलें स्वरूप नाहींसें केलें (तो अदृश्य झाला) ४. [१६०९]

(गौळणी म्हणतात,) हे देवा, तुझ्याकरितां आम्हीं आपलेपणाची (व घरच्या माणसांची) देखील परवा केली

कांहीं बोलों यासाठीं ॥ २ ॥ बहुत दिस होतें मनीं । घ्यावी धणी एकांतीं ॥ ३ ॥ तुका म्हणे उभा राहें । कान्हो पाहें मजकडे ॥ ४ ॥ [१६१०]

धन्य बा या (बाया) ऐशा नारी । घरीं दारीं नांदती ॥ १ ॥ चोरूनियां तुजपाशीं । येती त्यांसी न कळतां ॥ २ ॥ दोन्ही ठायीं समाधान । सम कठिण बहुतचि (बहुतांसी) ॥ ३ ॥ तुका म्हणे जीवासाठीं । दुर्लभ भेटी ते देवा ॥ ४ ॥ [१६११]

उदासीना पावल्या वेगीं । अंगा अंगीं जडलिया ॥ १ ॥ वेटाळिला भोंवता हरी । मयूरफेरी नाचती ॥ २ ॥ मना आलें करिती चार । त्या फार हा एकला ॥ ३ ॥ तुका म्हणे नारायणीं । निरंजनीं मीनलिया ॥ ४ ॥ [१६१२]

विषमाची शंका वाटे । सारिखें भेटे तरी सुख ॥ १ ॥ म्हणऊनि चोरिलें जना । आल्या राना एकांतीं ॥ २ ॥ दुजियासी कळों नये । जया सोय नाहीं हे ॥ ३ ॥ तुका म्हणे मोकळें मन । नारायण भोगासी ॥ ४ ॥ [१६१३]

आलिंगन कंठाकंठीं । पडे मिठी सर्वांगें ॥ १ ॥ न घडे मागें परतें मन । नारायण संभोगी ॥ २ ॥ वचनासी वचन मिळे । रिघती डोळे डोळियांत ॥ ३ ॥ तुका म्हणे अंतर्ध्यानीं । जीव जीवनीं विराल्या ॥ ४ ॥ [१६१४]

कोणी सुना कोणी लेंकी । कोणी एकी स्वतंता (सतंता) ॥ १ ॥ अवघियांची जगनिंद । झाली धिंद सारखी ॥ २ ॥ अवघ्या अवघ्या चोरा । विना वरा मायबापा ॥ ३ ॥ तुका म्हणे करा सेवा । आलें जीवावर (री) तरी ॥ ४ ॥ [१६१५]

नाहीं १. तुझ्याबरोबर कांहीं तरी बोलावें ह्याकरितां आम्ही तुझ्या पाठीमागें धांवत आलों २. तुझ्याबरोबर एकांत करून आपली इच्छा पूर्ण करावी असें आमच्या मनांत पुष्कळ दिवस होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे कान्होबा, तूं जाऊं नको, उभा राहा, डोळे भरून मजकडे पाहा ४. [१६१०]

घरींदारीं वागून तुझें सुख प्राप्त करून घेणाऱ्या अशा बाया (गोकुळांतील स्त्रिया) धन्य आहेत १. संसारांत असणारे भ्रतार, सासू-सासरे, दीर ह्यांना न समजतां चोरून त्या तुजकडे (कृष्णाकडे) येतात २. प्रपंचाकडे व परमार्थाकडे ह्या दोन्ही ठिकाणीं सारखें समाधान राखणें हें बहुतांस अवघड आहे (असें करणारे क्वचित्) ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपला जीव देवास अर्पण करून (देवाची) सेवा करणारे व त्याची भेट घेणारे जगांत दुर्लभ आहेत ४. [१६११]

(गोकुळांतल्या) ज्या गौळणी उदासीन होत्या त्या प्रभूच्या स्वरूपीं जडून गेल्या १. त्या सर्वांनीं सभोंवतीं हरीला वेढून घेतलें व मोरासारखे फेर धरून त्या नाचूं लागल्या २. जसें त्यांच्या मनास वाटेल तशा त्या क्रीडा करूं लागल्या. त्या गौळणी पुष्कळ व कृष्ण एकटा (पण कृष्णदेवानें अनेक रूपें धारण करून सर्वांची इच्छा पूर्ण केली) ३. तुकाराम महाराज म्हणतात, शुद्ध नारायणस्वरूपाशीं त्या स्त्रिया मिळून गेल्या ४. [१६१२]

परक्याविषयींचा संशय येतो म्हणून आपल्या जातीच्यांचा योग होण्यांतच सुख आहे. १. हें जाणून सर्व जनांना कळूं न देतां त्या गौळणी एकांतीं (वृंदावनामध्यें) मनामध्यें हरीच्या जवळ आल्या २. ज्यांना ह्या हरिसुखाचा अनुभव नाहीं अशा परक्यांना आपलें कृत्य कळूं नये हा त्यांचा हेतु होता ३. तुकाराम महाराज म्हणतात, एकांतांत नारायणाचा उपभोग घेणें ह्याविषयीं त्यांचें मन निःशंक (कल्पनारहित मोकळें) आहे ४. [१६१३]

ज्यांनीं हरीच्या कंठाला आपला कंठ लावून आलिंगन दिल्यामुळें ज्यांना हरीच्या सर्वांगाचें आलिंगन झालें १. ज्यांचें मन नारायणस्वरूपाहून परत होईना. त्या सारख्या नारायणाचाच उपभोग घेऊं लागल्या २. श्रीहरीच्या शब्दाला आपले शब्द मिळतील असें त्या बोलत. श्रीहरीच्या दृष्टींत आपली दृष्टि सामावेल अशा त्या पाहात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरिस्वरूपानें जीवनाच्या ठिकाणीं त्यांचा जीव विरून त्या अंतर्धान पावल्या (समरस झाल्या) ४. [१६१४]

गौळणींमध्यें तीन जाती होत्या त्या अशा, कीं कोणी सुना, कोणी लेकी, व कोणी स्वतंत्र अशा सासवा १. (विषयी, मुमुक्षु आणि मुक्त अशा तीन प्रकारच्या स्त्रिया हरीच्या सगुण रूपावर मोहित झाल्या. म्हणून) त्या सर्व जगनिंद्य होऊन सर्व सारख्या फजीत झाल्या २. पति, आई व बाप ह्या सर्वांना चोरून त्या हरीजवळ आल्या. तुकाराम महाराज म्हणतात, जरी तुमच्या जिवावर येऊन बेतली तरी तुम्ही हरीची सेवा करा ४. [१६१५]

येथील जे एक घडी । तये जोडी पार नाहीं ॥ १ ॥ किती त्यांचा सासुरवास । कैंचा रस हा तेथें ॥ २ ॥ अवघे दिवस गेले कामा । नाहीं जन्मा खंडण ॥ ३ ॥ तुका म्हणे रतल्या जनीं । सोडा झणीं कान्होबा ॥ ४ ॥ [१६१६]

चिंता नाहीं गांवीं विष्णुदासांचिये । घोष जयजयकार सदा ॥ १ ॥ नारायण घरीं सांठविलें धन । अवघेची वाण तया पोटीं ॥ २ ॥ सवंग सकळां पुरे धणीवरी । सेवावया नारी नर बाळा ॥ ३ ॥ तुका म्हणे येणें आनंदी आनंद । गोविंदें गोविंदु पिकविला ॥ ४ ॥ [१६१७]

करिती तया वेवसाव आहे । येथें व्हा रे साहे एका एक (एक एकां) ॥ १ ॥ गातां आइकतां समानचि घडे । लाभे लाभ जोडे विशेषता ॥ २ ॥ प्रेमाचें भरतें भातें घ्यावें अंगीं । नटें टाळीं रंगीं शूरत्वेंसी ॥ ३ ॥ तुका म्हणे बहुजन्माचें खंडण । होईल हा सीण निवारोनि ॥ ४ ॥ [१६१८]

जीव जीती जीवना संगें । मत्स्या मरण त्या वियोगें ॥ १ ॥ जया चित्तीं जैसा भाव । तया जवळी तैसा देव ॥ २ ॥ सकळां पढिये भानु । परि त्या कमळाचें जीवनु ॥ ३ ॥ तुका म्हणे माता । वाहे तान्हयाची चिंता ॥ ४ ॥ [१६१९]

मुंगिचिया घरा कोण जाय मूळ । देखोनियां गूळ धांव घाली ॥ १ ॥ याचकाविण काय खोळंबला दाता । तोचि धांवे हिता आपुलिया ॥ २ ॥ उदक अन्न काय म्हणे मज खावें । भुकेला तो जाय चोजवीत ॥ ३ ॥ व्याधी पिडिला धांवे वैद्याचिया घरा । दुःखाच्या परिहारा आपुलिया ॥ ४ ॥

हरीच्या संगतीमध्यें एक घटका गेल्यानें अपार लाभ होतो १. प्रपंचांत बहुतांचा सासूरवास भोगावा लागतो म्हणून त्या ठिकाणीं हरीच्या संगतीचा सुखरस-आनंद कसला आहे? २. सर्व काळ प्रापंचिक कामामध्यें गेल्यामुळें जन्माचें खंडण (जन्ममरणांची परंपरा खंडित) होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा विचारानें त्या सर्व गौळणी नारायणाचे ठिकाणीं रत झाल्या, म्हणून अहो देवा, त्यांना तुम्ही कदाचित् सोडाल, तर तसें करूं नका (कारण त्या तुमच्याशीं एकनिष्ठ आहेत) ४. [१६१६]

विष्णुदासांच्या हृदयांत कोणत्याहि प्रकारची चिंता राहिली नाहीं. ते निरंतर हरीच्या नामाचा घोष व जयजयकार करितात १. ज्यांनीं आपल्या हृदयमंदिरांत नारायणस्वरूपी धन सांठविलें आहे, त्या धनाच्या अंतर्भूत सर्व कांहीं पदार्थ आहेत २. सर्वांना तृप्त होईपर्यंत पुरणारें असें तें धन – नारायणाचें नांव – सवंग आहे; कारण पुरुष, स्त्रिया व बालक ह्यांना त्याचें सेवन व्हावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व ठिकाणीं गोविंदस्वरूपच पिकलें [भरलें] आहे म्हणून जिकडे तिकडे सर्व आनंदी आनंद झाला आहे ४. [१६१७]

जे कोणी परमार्थाचा उद्योग करण्यास तयार आहेत, त्यांना उद्योग आहे. त्यांनीं एकमेकांस नारायणाच्या चिंतनाविषयीं साह्य करावें. कोणी नारायणगुण गात असल्यास आपण ते ऐकावे १. हरीचे गुण गाणारास व ऐकणारास सारखी फलप्राप्ति आहे, म्हणून उभयतांस अशा लाभानें (संतपणाचाहि) विशेष लाभ होतो २. हरीविषयींच्या प्रेमानें भरलेल्या हृदयभात्याचा स्वीकार करावा आणि हरिकीर्तनांत टाळीच्या शूरत्वानें नाचावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या योगानें पुढें येणारे अनंत जन्म नाहींसे होऊन सर्व दुःखाचें निवारण होईल ४. [१६१८]

सर्व प्राणी जगण्यास साधन एक पाणी आहे, आणि पाण्याचा वियोग झाल्याबरोबर मासा तर तात्काल मरण पावतो (त्याप्रमाणें सर्वांनाच देव आवडत असला तरी खऱ्या भक्तांचें जीवन देव आहे. एक क्षणभर देवाचें विस्मरण झालें तर ते व्याकुळ होतात) १. ज्याच्या चित्तामध्यें देवाविषयीं जसा भाव असतो तसा तो देव त्याच्याजवळ राहातो २. सूर्याची प्रीति सर्वांना आहे तथापि तो सूर्यविकासिनी कमलाचें जीवनच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, गोजिरवाणें लहान मूल सर्वांना प्रिय असतें तथापि आईस त्याची विशेष काळजी असते ४. [१६१९]

तुम्ही गूळ खावयास या असें कोणी मुंग्यांच्या घरीं बोलावणें केलें आहे काय? त्या आपण होऊनच गुळाकडे धांव घेतात १. याचकानें आपणांकडे मागावयास यावें म्हणून कोणी दाता खोळंबला आहे काय? तो याचकच आपल्या हिताकरितां दात्याकडे धांव घेतो २. उदक आणि अन्न ह्यांनीं कोणास आम्हांला खा, प्या असें म्हटलें आहे काय? ज्यांना कोणाला भूक, तहान लागली असेल ते आपण होऊनच त्यांचा शोध करितात ३. व्याधीनें पीडिलेला मनुष्य आपल्या

तुका म्हणे जया आपुलें स्वहित । करणें तोचि प्रीत धरी कथे ॥ ५ ॥ [१६२०]

जन्मांतरिचा परिट न्हावी । जात ठावी त्यानें ते ॥ १ ॥ वाखर जैसा चराचरी । तोंड करी संवदणी ॥ २ ॥ पूर्वजन्मीं शिखासूत्र । मळमूत्र अंतरीं ॥ ३ ॥ तुका म्हणे करिती निंदा । धुवट धंदा पुढिलांचा ॥ ४ ॥ [१६२१]

नाम दूषी त्याचें नको दरुषण । विष तें वचन वाटे मज ॥ १ ॥ अमंगळ वाणी नाइकवे कानीं । निंदेची पोहणी उंठे तेथें ॥ २ ॥ काय साच लभ्य त्याचिये वचनीं । कोणत्या पुराणीं दिली ग्वाही ॥ ३ ॥ काय आड लावूं त्याचिया तोंडासी । आतां या जिभेसी काय करूं ॥ ४ ॥ तुका म्हणे संत न मानिती त्यास । घेऊं पाहे ग्रास यमदूत ॥ ५ ॥ [१६२२]

येऊनि नरदेहा झांकतील डोळे । बळेंचि आंधळे होती लोक ॥ १ ॥ उजेडासरसी न चलती वाट । पुढील बोभाट जाणोनियां ॥ २ ॥ बहु फेरे आले सोसोनियां वोळसा । पुढें नाहीं ऐसा लाभ मग ॥ ३ ॥ तुका म्हणे जाऊं सादावीत वाटे । भेटे तरी भेटे कोणी तरी ॥ ४ ॥ [१६२३]

नव्हे जाखाई जोखाई । मायराणी मेसाबाई ॥ १ ॥ बळिया माझा पंढरीराव । जो या देवांचाही देव ॥ २ ॥ रंडी चंडी शक्ति । मद्यमांस भक्षिती ॥ ३ ॥ बहिरव खंडेराव । रोटीसुटीसाठीं देव ॥ ४ ॥ गणोबा विक्राळ । लाडुमोदकांचा काळ ॥ ५ ॥ मुंजा म्हैसासुरें । हे तों कोण लेखी पोरें ॥ ६ ॥ वेताळ फेताळें । जळो त्याचें तोंड काळें ॥ ७ ॥ तुका म्हणे चित्तीं । धरा रखुमाईचा पती ॥ ८ ॥ [१६२४]

दुःखाचा परिहार होण्याकरितां वैद्याचे घराकडे धांव घेतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याला आपलें स्वहित कर्तव्य आहे तो हरिकथेवर प्रीति करतो (श्रद्धा व प्रेम ठेवून कथेला जातो) ५. [१६२०]

पूर्वजन्मीं कोणी एखादा परीट किंवा न्हावी होता कीं काय, हें खालीं दर्शविलेल्या त्याच्या कृतीवरून समजतें १. ज्याचें बोलणें वस्तऱ्याच्या चरचर वाजण्यासारखें असतें व ज्यानें आपलें तोंड परटाचें सतेलें केलें आहे (म्हणजे वाचेनें दुसऱ्याची निंदा करून दोष धुवून टाकतो) २. चालू जन्मांत शिखा-सूत्र (शेंडी आणि जानवें) असलें तरी मागच्या जन्मांतील मळमूत्रांचें सांठवण अंतःकरणांत तसेंच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, दुसऱ्याची निंदा करणें हा दुसऱ्यांना शुद्ध करण्याचा (परीटाप्रमाणें दोष धुवून काढण्याचा धंदा) व्यवहार आहे ४. [१६२१]

जो हरीच्या नांवास दोष देतो त्याचें मला दर्शनहि नको. त्याचे ते शब्द मला विषासमान भासतात १. ती त्याची वाणी अमंगळ आहे. ती कानानें ऐकवत नाहीं, कारण तिला हरीच्या निंदेची घाण सुटली आहे २. त्याच्या शब्दानें [खरोखर कोणता] काय लाभ व्हावयाचा आहे? (हरिनाम वाईट आहे) ह्याविषयीं कोणत्या पुराणांत पुरावा आहे? ३. हरिनामाची निंदा करणाराचे तोंडाआड मी काय लावूं (त्याचें तोंड कसें बंद करूं) व त्याच्या जिव्हेस काय करूं? ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्याला संत बिलकुल मानीत नाहींत व यमाचे दूत हे त्याचा घास करूं पाहातात ५. [१६२२]

नरदेह प्राप्त होऊन विचाराची दृष्टि बळेंच झांकून घेऊन हे सर्व लोक आंधळे झाले आहेत १. नरदेहांतील ज्ञानाच्या प्रकाशानें पुढें आपणाला नरदेह मिळणार नाहीं हें वर्म जाणून परमार्थाची वाट हे कां चालत नाहींत? २. आजपर्यंत अनेक योनींतून, पुष्कळ फेरे सोसून ह्या नरदेहाचा लाभ झाला आहे. हा जर वायां घालविला तर पुन्हां असा लाभ होणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही मार्गानें ह्याविषयीं सर्वांना सावध करीत जातों. आमचें ऐकणारा कोणी तरी आम्हांला मार्गांत भेटला तर भेटेल ४. [१६२३]

जाखाई, जोखाई, मायराणी, मेसाबाई ह्या क्षुद्र देवतांतला (ध्रुवपदांत दर्शविलेला) देव नाहीं १. माझा पंढरीनाथ मोठा बलाढ्य असून तो ह्या देवांचाहि देव आहे २. रंडी, चंडी ह्या शक्ति मद्यमांसाचें भक्षण करणाऱ्या आहेत ३. खंडोबा, बहिरोबा हे तर भरीत–रोडग्याचे देव आहेत ४. मोठ्या देहाचे गणपतिबावा हे लाडूमोदकांचे काळ आहेत ५. मुंजाबा, म्हैशासुरादि हे तर पोरांत जमा आहेत ६. ह्यांचा आमचे जवळ काय हिशेब आहे? वेताळ, फेताळादि ह्या काळतोंड्यांचें तोंड जळो ७. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही आपल्या चित्तीं एका पांडुरंगाला ठेवा ८. [१६२४]

पडतां जड भारी। दासीं आठवावा हरी ॥ १ ॥ मग तो होऊं नेदी सीण। आड घाली सुदर्शन ॥ २ ॥ नामाच्या चिंतनें। बारा वाटा पळती विघ्नें ॥ ३ ॥ तुका म्हणे प्राण। करा देवासी अर्पण ॥ ४ ॥ [१६२५]

मायें मोकलिलें कोठें जावें बाळें। आपुलिया बळें न वांचे तें ॥ १ ॥ रुसोनियां पळे सांडुनियां ताट। मागें पाहे वाट यावें ऐसी ॥ २ ॥ भांडवल आम्हां आळी करावी हे। आपणची मोहें (धाये) धांवशील ॥ ३ ॥ तुका म्हणे आळी करुनियां निकी। देसील भातुकी बुझाऊनि ॥ ४ ॥ [१६२६]

नागर गोडें बाळरूप। तें स्वरूप काळीचें ॥ १ ॥ गाईगोपाळांच्या संगें। आलें लागें पुंडलीका ॥ २ ॥ तें हें ध्यान दिगंबर। कटीं कर मिरवती ॥ ३ ॥ नेणपणें उगेंचि उभें। भक्तिलोभें राहिलें ॥ ४ ॥ नेणे वर दळाचा मान। विट चरण सम उभें ॥ ५ ॥ सहज कटावरी हात। दहीं भात शिदोरी ॥ ६ ॥ मोहरी पांवा गांजिवा पाठीं। धरिली काठी ज्या काळें ॥ ७ ॥ रम्य स्थळ चंद्रभागा। पांडुरंगा क्रीडेसी ॥ ८ ॥ भीमा दक्षण (दक्षिण) मुख वाहे। दृष्टी पाहे समोर ॥ ९ ॥ तारावेसे मूढ लोक। दिली भाक पुंडलिका ॥ १० ॥ तुका म्हणे वैकुंठवासी। भक्तांपासी राहिला ॥ ११ ॥ [१६२७]

विठ्ठलनामाचा नाहीं ज्या विश्वास। तो वसे उदास नरकामध्यें ॥ १ ॥ तयासी बोलतां होईल विटाळ। नव जाय तो जळस्नान करिता ॥ २ ॥ विठ्ठल नामाची नाहीं ज्या आवडी। त्याची काळ घडी लेखिताहे ॥ ३ ॥ तुका म्हणे मज विठोबाची आण। जरी प्रतिवचन करिन त्यासी ॥ ४ ॥ [१६२८]

तया घडले सकळ नेम। मुखीं विठोबाचें नाम ॥ १ ॥ कांहीं न लगे सिणावें।

कांहीं एखादें आपलेकडून न निवारवेल असें जड भारी संकट आलें तर हरीचे दासांनीं हरीचा आठव करावा १. मग तो त्या संकटापासून दुःख होऊं देणार नाहीं त्या संकटापासून भक्ताच्या रक्षणार्थ जामीन सुदर्शन ठेवील २. हरीच्या नामचिंतनानें आलेलीं विघ्नें हीं बारा वाटांनीं पळून जातात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा प्राण तुम्ही देवाला अर्पण करा (म्हणजे हरि तुमच्यावर दया करील) ४. [१६२५]

आईनें टाकून दिल्यावर बालकानें जावें कोठें? तें आपल्या सामर्थ्यानें कधींहि वांचणार नाहीं १. जेवावयाकरितां आईनें वाढलेल्या ताटावरून बालक रागानें ताट टाकून निघून जातें. पश्चात् आपण न जेवतां ती मुलानें जेवावयास यावें म्हणून वाट पाहात बसते (आईनें आपल्यामागून यावें म्हणून बालक मागें वळून पाहातें) २. आम्हीं लेंकरांनीं आईजवळ छंद घ्यावा हेंच आमचें भांडवल आहे. हे विठाबाई, तूं आमची आई असल्यामुळें आपण होऊन मोहानें आमच्याकडे धांवत येशील ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही चांगला हट्ट घेतल्यानें, इच्छेप्रमाणें खाऊ देऊन तूं आमची समजूत घालशील ४. [१६२६]

बाल्यावस्थेंतलें श्रीहरीचें बाळरूप सुंदर व गोंडस आहे १. तेंच गाईगोपाळांच्या मेळ्यानें पुंडलिकासाठीं पंढरीस आलें २. तें ध्यान सहज दिगंबर असून त्यानें आपल्या कमरेवर हात ठेविले आहेत ३. अज्ञानपणा घेऊन उगीच भक्तीच्या लोभानें (निवांत) उभे राहिले आहेत ४. दांभिकांचा सत्कार घेण्याचें ते जाणत नाहींत व ते विटेवर समचरण ठेवून उभे आहेत ५. त्या श्रीहरीचे कमरेवर हात असून जवळ दहींभाताची सहज शिदोरी आहे ६. मोहरी, [मुरली] पांवा, अलगूज, गांजीवा [जाळें] हीं ज्याच्या पाठीवर आहेत व त्या बाल्यावस्थेंत गोकुळांत गुरांचें रक्षण करण्यासाठीं हातांत घेतलेली काठीहि आहे ७. क्रीडा करण्याकरितां चंद्रभागा हें रम्य स्थान आहे ८. ज्याच्या दृष्टीसमोर भीमा ही दक्षिणवाहिनी नदी आहे ९. मूढ जिवांना तारण्याविषयीं पुंडलिकांना ज्यानें वचन दिलें आहे १०. तुकाराम महाराज म्हणतात, वैकुंठांत वास्तव्य करणारा तो हरि भक्ताजवळ उभा राहिला आहे ११. [१६२७]

विठ्ठलनामावर ज्याचा विश्वास नाहीं तो दुःखदायक नरकामध्यें पडेल १. त्याच्याशीं बोलल्यानें विटाळ होईल. तो विटाळ स्नान केल्यानें जाणार नाहीं २. विठ्ठलनामाची ज्याच्यामध्यें प्रीति नाहीं त्याच्या आयुष्यघटका काळ मोजीत असतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी त्याचेबरोबर बोलेन तर मला विठोबाची शपथ आहे ४. [१६२८]

ज्याच्या मुखांत विठोबाचें नाम आहे त्याला सर्व कांहीं व्रत-नियमांचें फळ मिळतें १. म्हणून कोणी निरनिराळ्या

आणिक वेगळाल्या भावें। वाचे उच्चारावें। रामकृष्ण गोविंदा ॥ २ ॥ फळ पावाल अवलीळा। भोगी (ग) वैकुंठ सोहळा ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याच्या नांवें। तोचि होईजे स्वभावें ॥ ४ ॥ [१६२९]

पुराणप्रसिद्ध सीमा। नामतारक महिमा ॥ १ ॥ मागें जाळी महादोष । पुढें नाहीं गर्भवास ॥ २ ॥ जें निंदिलें शास्त्रें। वंद्य झालें नाममात्रें ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसा । त्रिभुवनीं नामठसा ॥ ४ ॥ [१६३०]

नाम घेतां न लगे मोल। नाममंत्र नाहीं खोल ॥ १ ॥ दोंचि अक्षरांचें काम। उच्चारावें राम राम ॥ २ ॥ नाहीं वर्णधर्मयाती। नामीं अवघींचि सरतीं ॥ ३ ॥ तुका म्हणे नाम । चैतन्य हें निजधाम ॥ ४ ॥ [१६३१]

नाम घेतां वायां गेला। ऐसा कोणें आईकिला ॥ १ ॥ सांगा विनवितों तुम्हांसी। संत महंत सिद्ध ऋषी ॥ २ ॥ नामें तरला नाहीं कोण। ऐसा द्यावा निवडून ॥ ३ ॥ सलगीच्या उत्तरा। तुका म्हणे क्षमा करा ॥ ४ ॥ [१६३२]

फुकाचें तें लुटा सार। व्हा रे अमर सदैव ॥ १ ॥ नाहीं गर्भवास पुढती । डोंगर जळती दोषांचे ॥ २ ॥ उदंड भावें उदंड घ्यावें। नाम गावें आवडी ॥ ३ ॥ तुका म्हणे घरिच्या घरीं। दिशा उरीं न सीणीजे ॥ ४ ॥ [१६३३]

प्रीति नाहीं राया (यें) वर्जिली ते कांता। परी तिची सत्ता जगावरी ॥ १ ॥ तैसे दंभें (भी) झालों तरी तुझे (झा) भक्त। वास यमदूत न पाहाती ॥ २ ॥ राजयाचा पुत्र अपराधी देखा।

भावनेनें अनेक व्रतनियम करण्याचे श्रम घेऊं नये वाणीनें 'राम-कृष्ण-गोविंद' ह्या नामाचा उच्चार करावा २. त्या योगानें वैकुंठसुखभोगाचे सोहळारूपी फळ त्वरित मिळेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरीच्या नामचिंतनाच्या स्वभावानें मनुष्य श्रीहरिरूप होतो ४. [१६२९]

नाम हें जड जीवांना तारक आहे अशा ह्या नाममहिम्याच्या प्रसिद्धीची पुराणांमध्यें सीमा झाली आहे १. हरिनामचिंतनानें पूर्वीं केलेले महादोष दग्ध होतात व पुढें (गर्भवास) जन्म होत नाहीं (नामानें संचित व क्रियमाण नष्ट होतें) २. शास्त्रानें जे पातकी निंद्य ठरविले, ते हरिनाममंत्राच्या जपानें वंद्य होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा हा त्रैलोक्यांत हरिनामाचा ठसा (शिक्का) आहे ४. [१६३०]

हरिनाम घेण्याला कांहीं किंमत द्यावी लागत नाहीं व तो नाममंत्र घेण्यास मोठा कठिणहि नाहीं १. (नाम घेण्याकरितां) राम राम ह्या दोन अक्षरांचेंच काम आहे म्हणून त्याचा वाणीनें उच्चार करा २. त्या ठिकाणीं उत्तम वर्ण, धर्म (आचार) किंवा जाति ह्यांची जरूरी नाहीं, सर्वांना अधिकार आहे. हरीच्या नामानें हरीच्या ठिकाणीं सर्व मान्य होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरीचें नाम हें चैतन्याचें स्वतःचें घर आहे (नाम-नामीमध्यें पूर्ण अभेद आहे) ४. [१६३१]

हरीचें नाम नित्य घेणारा वायां गेला (त्यास नाम घेऊनहि त्याचें फळ मिळालें नाहीं) असें कोणीं ऐकिलें आहे काय? १. अहो संत, महंत, सिद्ध, ऋषि हो, ह्याबद्दल तुम्हांला मी विनंति करीत आहें; मला सांगा २. हरिनाम नित्य घेऊन तरला नाहीं, असा एखादा तरी कोणी निवडून द्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें मी तुमचे जवळ सलगीनें बोलत आहें, ह्याबद्दल आपण मला क्षमा करावी ४. [१६३२]

सारभूत (सकळ साधनांचें सार असें) हरीचें नाम तुम्ही फुकट लुटा व त्या योगानें नित्य हरिरूप होऊन अमर व्हा, अगर असे दैववान् व्हा १. पुनः तुम्हांला जन्म येणार नाहीं व अनेक दोषांचे डोंगर जरी असले, तरी ते जळून जातील २. अतिशय भावानें व अतिशय प्रीतीनें हरिनाम गावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, घरच्या घरींच हरीच्या नामाचें चिंतन करावें. देश उरावर घेण्याचे (देशभर हिंडण्याचे) श्रम करावयास नकोत ४. [१६३३]

राजानें आपल्या नावडत्या राणीचा जरी त्याग केला तरी तिची सत्ता प्रजेवर आहे (जगावर चालतेच) १. त्याप्रमाणें जरी आम्ही दांभिक असलों, तरी आम्ही तुमचे दास आहोंत; म्हणून आमचेकडे यमदूत पाहात नाहींत २.

तो काय आणिकां दंडवेल ॥ ३ ॥ बाहातरी खोडी परी देवमणी कंठीं । तैसा मी जगजेठी म्हणे तुका ॥ ४ ॥ [१६३४]

करावा उद्धार किंवा घ्यावी हारी । एका बोला स्थिरी राहें देवा ॥ १ ॥ निरासेनें माझा होईल संदेह । अवघेंचि आहे मूळ पायीं ॥ २ ॥ राहिलों चिकटून (डिंकोनी) कांहींचि न कळे । कोणा नेणों काळें उदय भाग्य ॥ ३ ॥ तुका म्हणे बहु उद्वेगला जीव । भाकीतसें कींव देवराया ॥ ४ ॥ [१६३५]

आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूनियां ॥ १ ॥ मग तो कृपासिंधु निवारी सांकडें । येर तें बापुडें काय रंक ॥ २ ॥ भयाचिये पोटीं दुःखाचिया रासी । शरण देवासी जातां भलें ॥ ३ ॥ तुका म्हणे नव्हे काय त्या करितां । चिंतावा तो आतां विश्वंभर ॥ ४ ॥ [१६३६]

भोग तो न घडे संचितावांचूनि । करावें तें मनीं समाधान ॥ १ ॥ म्हणउनी मनीं मानूं नये खेदु (द) । म्हणावा गोविंदु (द) वेळोवेळां ॥ २ ॥ आणिका रुसावें न लगे बहुतां । आपुल्या संचितावांचूनिया ॥ ३ ॥ तुका म्हणे भार घातलियावरी । होईल कैवारी नारायण ॥ ४ ॥ [१६३७]

निर्वैर व्हावें सर्व भूतांसवें । साधन बरवें हेंचि एक ॥ १ ॥ तरीच अंगीकार करील नारायण । बडबडतो सीण येणेंविण ॥ २ ॥ सोइरें पिशुन समानचि घडे । चित्त पर ओढे उपकारी ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्त झालिया निर्मळ । तरिच सकळ केलें होय ॥ ४ ॥ [१६३८]

दिली चाले वाचा । क्षय मागिल्या तपाचा ॥ १ ॥ रिद्धि सिद्धि येती घरा ।

राजाचे मुलानें जरी अपराध केला, तरी त्यास इतरांना दंड (शिक्षा) करवेल काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, घोड्याला बहात्तर खोडी आहेत, पण एक देवमण (देवमणी, गळ्यावर केंसांचा भोंवरा) जर त्याचे कंठीं आहे, तर त्या सर्व खोडी व्यर्थ आहेत. हे जगजेठी, त्याप्रमाणें दांभिक असलों तरी मी तुझा भक्त आहें म्हणून चांगलाच आहें ४. [१६३४]

हे देवा, तुम्हीं आमचा उद्धार करावा, अगर माझ्या हातून तो होत नाहीं असें म्हणून हार घ्यावी. दोहींतून एक बोल खरा करा. १. कारण माझें सर्व आश्रयस्थान तुमचे पाय आहेत आणि तुम्हीं निराशा केल्यावर माझा संशय वाढेल २. मी तुमच्या पायांना चिकटून राहिलों आहें; त्यावांचून दुसरें कांहीं मला कळत नाहीं. आतां माझें भाग्य कोणत्या वेळेस उदयास येईल, तें न कळे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवराया, माझा जीव फार चिंताक्रांत झाला आहे, म्हणून मी तुमची करुणा भाकीत आहें ४. [१३३५]

जें प्रारब्धानुरूप भोगावें लागेल, तें देवावर भार घालून भोगण्याविषयीं तत्पर असावें १. मग आपणावर जें कांहीं संकट येईल, त्याचें निवारण कृपासागर देव करील. त्यावांचून इतर सर्व रंक आहेत, ते काय करणार? २. मनामध्यें कांहीं भय उत्पन्न झालें, तर त्या योगानें अनेक दुःखांच्या राशि उत्पन्न होतात, म्हणून देवाला शरण जावें हें बरें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां विश्वाचें प्रतिपालन करणारा जो देव, त्याचें चिंतन करावें, कारण त्यानें केलें असतां काय होणार नाहीं? (सर्वदुःखनिवारणकर्ता देव आहे) ४. [१६३६]

सुखदुःखादि भोग प्रारब्धावांचून (पूर्वजन्मांत पाप-पुण्यात्मक कर्मे केल्यावांचून) होत नाहींत ह्या विचारानें मनाचें समाधान करावें १. ह्या संबंधाचा मनांत कांहीं खेद बाळगूं नये. वेळोवेळीं गोविंदाचें चिंतन करावें २. आपल्या प्रारब्धावांचून अन्य कोणावरहि रागावूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपण आपला सर्वस्व भार नारायणावर घातल्यावर तो आपला कैवारी होईल (आपलें दुःख दूर करील) [१६३७]

सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणीं आपण निर्वैर व्हावें, हेंच एक उत्तम साधन आहे १. असें झालें तरच नारायण अंगीकार करील. त्यावांचून बडबडीचे श्रम पोकळ आहेत २. आपले शरीरसंबंधी व परके हे ज्याला सारखे आहेत व ज्याचें चित्त परोपकाराकडे ओढत आहे (येथें पुढें ध्रुवपद वाचावें. त्याचा देव अंगीकार करील) ३. तुकाराम महाराज म्हणतात, चित्त जर निर्मळ होईल तरच सर्व कांहीं घडेल (केलेलीं साधनें सफळ होतात) ४. [१६३८]

एखाद्यास तपस्व्यानें वाणीनें शाप अथवा आशीर्वाद दिल्यास त्याप्रमाणें होईल, पण त्यायोगानें मागें केलेल्या त्याच्या तपाचा क्षय होईल १. रिद्धि (ऐश्वर्य) सिद्धि (अष्ट महासिद्धि) त्याच्या घरीं येतात व त्याच्या साधुत्वाचा प्रसार

करिती त्याचा पसारा ॥ २ ॥ मानदंभासाठीं । पडे देवासवें तुटी ॥ ३ ॥ तुका म्हणे मेवा । कैंचा वेंठीच्या निदैंवा ॥ ४ ॥ [१६३९]

तापल्यावांचून नव्हे अळंकार । पिटुनियां सार उरलें तें ॥ १ ॥ मग कदा काळीं नव्हे शुद्ध जाती । नासें शत्रु होती मित्र तेचि ॥ २ ॥ काळि (ले) बरें भोगूं द्यावें भोगा । फांसिलें तें रोगा हातीं सुटे ॥ ३ ॥ तुका म्हणे मन करावें पाठेळ । साहावेंचि जाळ सिजेवरि ॥ ४ ॥ [१६४०]

पाठेळ करितां न सहावे वारा । सहिलिया ढोरा गोणी चाले ॥ १ ॥ आपणां आपण हेचि कसवटी । हर्षामर्ष पोटीं विरों द्यावे ॥ २ ॥ नवनीत तोंवरी कडकडी लोणी । निश्चळ होऊनी राहे मग ॥ ३ ॥ तुका म्हणे जरी जगे टाकी घाया । त्याच्या पडे पायां जन मग ॥ ४ ॥ [१६४१]

कावळियासी नाहीं दया उपकार । काळिमें (मा) अंतर विटाळलें (सें) ॥ १ ॥ तैसें कुधनाचें (कुजनाचें) जिणें अमंगळ । घाणेरी वोंगळ वदे वाणी ॥ २ ॥ कडु (कटु) भोंपाळ्याचा (ळ्यांच्या) उपचारें पाक । सेविल्या तिडीक कपाळासी ॥ ३ ॥ तुका म्हणे विष सांडूं नेणें साप । आदरें तें पाप त्याचे ठायीं ॥ ४ ॥ [१६४२]

लाभ खरा न ये तुटी । नाहीं आडखळा भेटी ॥ १ ॥ जाय अवघिया देशा । येथें संचलासी

करितात २. त्यायोगानें साधकामध्यें (तपस्व्यामध्यें) मान व दंभ वाढून देव दुरावला जातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, मेवामिठाईचें ओझें ज्या मजुरानें घेतलें आहे, त्या निदैंवाला त्यांतील मेवामिठाईचा लाभ काय होय? (त्याप्रमाणें ऋद्धि-सिद्धीचें ओझें वाहाणाऱ्या साधकांना त्यापासून सुख-समाधान मिळत नाहीं) ४. [१६३९]

सुवर्ण (सोनें) तापविल्यावांचून व ठोकल्यावांचून त्यांतील असार दग्ध होऊन सारभूत अलंकार होत नाहींत १. नाहीं तर मग केव्हांहि अशुद्ध हें, शुद्धपणास येत नाहीं. जे मित्र आहेत त्यांचा कांहीं नाश केला तर ते शत्रु होतात (सोनें तापविलें नाहीं तर कधींहि शुद्ध होत नाही. मन शुद्ध केल्याशिवाय मनुष्य देवरूप होत नाहीं. मनांतील अशुद्धपणा निघून गेला तर जे पूर्वी शत्रु असतात तेच आपले मित्र होतात) २. देहास प्रारब्धाचे योगानें जे सुखदुःखाचे भोग होतील, ते होऊं द्यावेत; ज्याचे गळवास फासण्या टाकून फोडलें आहे तो रोगदुःखाचे हातून सुटतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, मनास धीट करावें आणि पदार्थ शिजेपर्यंत आगीची जाळ सहन करावी (साधकानें पुष्कळ गोष्टी सहन केल्याच पाहिजेत) ४. [१६४०]

घोड्याच्या नवीन शिंगरास (किंवा पाड्यास, बैलास, पाठाळ म्ह० पाठीवर ओझें वाहाणारें करतांना) धीट करावयास लागलें, तर त्यास मनुष्याचा वारा देखील सहन होत नाहीं, तेंच पुढें हळुहळू माणसाळलें म्हणजे पाठीवर मोठ्या गोण्या सहन करतें १. ह्याप्रमाणें आपलें हृदय आपण हर्षविषादाचे वेग सहन करण्याविषयीं तयार करावें; म्हणजे हर्षविषादाच्या वृत्ति अंतःकरणांतल्या अंतःकरणांत विरवूं–जिरवूं द्याव्या २. जोंपर्यंत लोण्याचा भाग तुपांत आहे तोंपर्यंत तें कडकड करीत असतें, मग लोणी त्यांतील साफ नाहींसें होतें, त्या वेळीं तें तूप निश्चळ राहातें ३. तुकाराम महाराज म्हणतात, टाकीचे घाव खाऊन जर दगडाचा देव झाला, तर लोक त्याच्या पायां पडतील (त्याप्रमाणें मनांत सहनशीलता आली तर तें मन देवरूप होतें) ४. [१६४१]

कावळ्याला कोणाची दया नाहीं व तो कोणावर उपकारहि करीत नाहीं. त्याच्या अंतःकरणांत काळिमेचा (बाहेर तसा आंत काळेपणाचा) विटाळ आहे १. तसें ज्याच्याजवळ वाईट कर्मानें मिळालेलें धन आहे त्याचें (पाठभेदः कुजनाचे—वाईट कुत्सित माणसाचे) जगणें अमंगळ आहे, व त्याच्या वाणींतून घाणेरडे वाईट शब्द निघतात २. कडू भोपळ्याचा पाक चांगले पदार्थ घालून तयार केला, तरी त्याचें सेवन केलें असतां कपाळास तिडीक उठते ३. तुकाराम महाराज म्हणतात, साप हा आपल्या विषाचा त्याग करणें जाणत नाहीं, त्याप्रमाणें कुत्सित माणसाच्या किंवा कुमार्गानें धन मिळविलेल्याच्या ठिकाणीं निरंतर पापाचाच आदर असतो ४. [१६४२]

हरीचें चिंतन (पंढरीस जाणें) हा, मोक्षाचा खरा लोभ आहे. त्यापासून नुकसानी होत नाहीं व देवाच्या भेटीसहि अडथळा येत नाहीं १. तो लाभाचा माल सर्व देशास जातो आणि येथेंहि भरलेला जशाचा तसाच कोठेंहि गेलें तरी

तैसा ॥ २ ॥ मग न लगे पारखी । अवघीं सकट सारखीं ॥ ३ ॥ तुका म्हणे वोळे । रूपें भुलविले डोळे ॥ ४ ॥ [१६४३]

नको आतां पुसों कांहीं । लवलाहीं उसंती ॥ १ ॥ जाय वेगीं पंढरपुरा । तो सोयरा दीनांचा ॥ २ ॥ वचनाचा न करीं गोवा । रिघें देवासी शरण ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपावंता । बहु चिंता दीनांची ॥ ४ ॥ [१६४४]

बुद्धिहीन जडजीवा । नका देवा उपेक्षूं ॥ १ ॥ पारसावी हे विज्ञापना । आम्हां दीनां दासांची ॥ २ ॥ चिंतूनियां आले पाय । त्यांसी काय वंचना ॥ ३ ॥ तुका म्हणे पुरुषोत्तमा । करा क्षमा अपराध ॥ ४ ॥ [१६४५]

म्हणऊनि काकुळती । येतों पुढतां (त) पुढती । तुमचे (तुम्हां) (तुमचिया) असे हातीं । कमळापती भांडार ॥ १ ॥ फेडूं आलेती दरिद्र । तरी नलगेचि उशीर । पुरे अभयकर । ठाया ठाव रंकासी ॥ २ ॥ कोठें न घाली धांव । याजसाठीं त्यजिली हांव । बेऊं नेदी वाव । मना केला विरोध ॥ ३ ॥ कारणांच्या गुणें । वेळ काळ तोही नेणें । तुमच्या कीर्तनें । तुका तुम्हां जागवी ॥ ४ ॥ [१६४६]

बहु नांवें ठेविलीं स्तुतीचे आवडी । बहुत या गोडी आली रसा ॥ १ ॥ बहु सोसें सेवन केलें बहुवस । बहु झाला दिस गोमस्याचा ॥ २ ॥ बहुतां पुरला बहुतां उरला । बहुतांचा केला बहु नट ॥ ३ ॥ बहु तुका झाला बहु निकट वृत्ति । बहु काकुलती येऊनियां ॥ ४ ॥ [१६४७]

इहलोकीं आम्हां वस्तीचें तें पेणें । उदासीन तेणें देहभावीं ॥ १ ॥ कार्या पुरतें कारण मारगीं।

असतो २. त्याची (देवाची) प्राप्ति झालयावर मग परीक्षक वगैरे कोणी नको. त्या ठिकाणीं सरसकट सर्व पदार्थ देवरूपानें सारखे आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, तें हरीचें स्वरूप सर्वत्र प्रकट असून त्या योगानें दृष्टि मोहित झाली आहे (म्हणून देवाला शरण जा) ४. [१६४३]

आतां दुसरें कांहीं विचारूं नकोस. ह्या संसारांतून त्वरेनें बाहेर पड १. व मोठ्या वेगानें तूं पंढरपुरास जा, कारण तेथें असणारा पांडुरंग हा दीनांवर दया करणारा आहे २. मी पंढरीस जाईन, ह्या वचनाच्या गुंताड्यांत राहूं नकोस. त्वरेनें तूं त्या देवाला शरण जा ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो फार कृपावंत आहे, त्याच्या ठिकाणीं दीन दासाविषयीं (दीनांच्या उद्धाराची) पुष्कळ काळजी आहे ४. [१६४४]

देवा, जे बुद्धिहीन उडजीव आहेत, (त्यांची तुम्ही उपेक्षा) त्यांचा तुम्ही त्याग करूं नका १. एवढी आमची दीन दासांची विनंति मान्य करा २. तुमच्या पायाची इच्छा धरून जे तुमच्याजवळ आले आहेत, त्यांना अंतर देणें हें तुम्हांला योग्य होईल काय ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पुरुषोत्तमा, त्यांच्या सर्व अपराधांची क्षमा करा ४. [१६४५]

म्हणून मी तुमच्याजवळ पुनःपुनः कींवकाकुळती करीत आहें. अहो लक्ष्मीपति, तुमच्या हातीं सर्व द्रव्यांचें भांडार आहे १. तुम्ही सर्वांचें दारिद्य दूर करण्याकरितां आलां आहांत, तर आतां उशीर करूं नका. तुम्हीं जागच्या जागीं हातानें अभयाचें आश्वासन दिलें. [भिऊं नको असें हातानें दर्शविलें] तर तेवढें आम्हां रंकांना पुरे होईल २. तुमच्यावांचून मी कोठेंहि धांव घेत नाहीं. ह्याकरितांच सर्व हांव टाकिली आहे व मनाशीं विरोध करून त्यास कोठें जाऊं देत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमचें कार्य व्हावें, म्हणून आम्ही वेळ काळ कांहीं न जाणतां तुमच्या कीर्तनानें तुम्हांस जागवीत आहों ४. [१६४६]

तुमची स्तुति करण्याची आवड असल्यामुळें तुम्हाला पुष्कळ नांवें ठेविलीं आहेत. त्या योगानें भक्तिरसाला पुष्कळ गोडी आली आहे १. मी त्या नांवांचें फार सोसानें पुष्कळ दिवस सेवन केलें. त्या योगानें पुष्कळ चांगले दिवस उदयास आले आहेत २. देव हा पुष्कळांना पुरून पुष्कळांकरितां उरला आहे व पुष्कळ वेष घेऊन त्यानें पुष्कळांचा उद्धार केला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी आपली वृत्ति त्याच्या ठिकाणीं पुष्कळ काकुळतीस येऊन निकट केली (देवाच्या पुष्कळ जवळ ऐक्यरूपानें राहाणारा झालों आहें) ४. [१६४७]

ह्या मृत्युलोकांत देह हे आमचें एक मुकामाचें ठिकाण आहे, असें जाणून आम्ही त्या देहाविषयीं उदासीन आहों (कारण प्रारब्ध संपलें म्हणजे हें ठिकाण सोडावें लागतें हें माहीत असल्यामुळें आम्ही ह्या देहाविषयीं उदासीन आहों) १.

उल्लंघूनि वेगीं जावें स्थळा ॥ २ ॥ सोंगसंपादणीं चालवितो वेव्हार । अत्यंतीं आदर नाहीं गोवा ॥ ३ ॥ तुका म्हणे वेंच लाविला संचिता । होईल घेतां देतां लाभ कोणा ॥ ४ ॥ [१६४८]

रोजकीर्दी जमा धरुनी सकळ । खताविला काळ बराबरी ॥ १ ॥ नाहीं होत झाड्यापाड्याचें लिगाड । हुजराती ते गोड सेवा रुजू ॥ २ ॥ चोरासाठीं रदबदल आटाहास (अट्टाहास्य) । जळो जिणें दास्य बहुतांचें ॥ ३ ॥ सावधान तुका निर्भर मानसीं । साल झाड्यापाशीं गुंपों (गुंफों) नेणें ॥ ४ ॥ [१६४९]

त्रिविध कर्माचे वेगळाले भाव । निवडूनि ठाव दाखविले ॥ १ ॥ आलियाचा झाडा राहिल्याचा ठाव । सुख तो गौरव संतां अंगीं ॥ २ ॥ हिशेबें आलें तें सकळांसी प्रमाण । तेथें नाहीं आन चालों येत ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं पापपुण्य खतीं । झाड्याची हुजुती हाता आली ॥ ४ ॥ [१६५०]

साखरेचें नाम घेतां कळे गोडी । तैसी आम्हां जोडी वैष्णवांची ॥ १ ॥ मोक्ष गांठीं असे ठेविला बांधोनी । सोस तो भजनीं आवडीचा ॥ २ ॥ भोजनाची चिंता माय वाहे बाळा । आम्हां तरी खेळावरी चित्त ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही देहउपकारें । गाऊं निरंतर नाचों लागों ॥ ४ ॥ [१६५१]

सुखें घेऊं जन्मांतरें । एक बरें इहलोकीं ॥ १ ॥ पंढरीचे वारकरी । होतां थोरी जोडी हे ॥ २ ॥

कार्यकारण मार्गांत (भगवद्भक्तीचें कार्य साधण्यापुरता) आश्रय करावा लागतो ह्याकरितां त्याचें उल्लंघन करून त्वरेनें स्वस्वरूपस्थानीं (भगवंताच्या परम ठिकाणीं) जावें हेंच बरें २. जो लौकिक व्यवहार मी करीत आहें, तो केवळ नटाच्या सोंगसंपादणीप्रमाणें आहे. त्यांत अत्यंत आदरानें गुंतलों नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी आपल्याजवळ असणाऱ्या संचयाचा सुखदुःखें भोगून व्यय करीत आहें. जे कोणी ह्या व्यवहारांत देवघेव करतील त्यांस काय लाभ होईल ? ४. [१६४८]

रोजकीर्दीमध्यें आजपर्यंत गेलेल्या काळाची (हरिसेवेंत किती काळ गेला, किती फुकट गेला ह्याची) जमा धरून पुनःपुनः जाणाऱ्या काळाची ही खतावणी केली १. आतां झाड्यापाड्याचें (देवाजवळ संपूर्ण हिशेब देण्याचें माझ्या मागें) लचांड राहिलें नाहीं; जी मी सेवा करीत आहें ती स्वामीला गोड असून ती रुजू आहे २. त्यावांचून कांहीं अट्टाहास व रदबदली करणें, हें सर्व चोराकरितां (चोराचें काम) आहे. बहुतांचें दास्यत्व करणें, अशा त्या जगण्यास आग लागो ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी आपल्या मनाच्या ठिकाणीं सावध झालों व त्या योगानें मला कोणाची भीति नाहीं व साल अखेरच्या झाडाच्या लिगाडांत मला गुंतण्याचें कारण नाहीं (आयुष्याच्या वर्षाअखेर पापपुण्यांचा व देहांतील पंचभूतांचा हिशेब देऊन मी मोकळा होणार आहें, म्हणून बंधनांत पडण्याचें मी जाणत नाहीं) ४. [१६४९]

कर्म हें (सात्त्विक, राजस आणि तामस असें) तीन प्रकारचें आहे. त्याचीं वेगळीं वेगळीं स्वरूपें दाखविलीं आहेत १. जें कर्म अंगीं येईल त्याचा सर्व झाडा करून जें राहील तें अवशेष संतांचे आंगीं लावून मी सुखाचा गौरव भोगीत आहें २. हिशेबानें जें येईल तें सर्वांना कबूल असतें. त्या ठिकाणीं अन्य उपाय चालत नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मला पापपुण्याविषयींची काळजी नाहीं, कारण (हरिकृपेनें व संतांच्या कृपेनें) सर्व कर्मांचा झाडा करून अखेर हुजुती (पावती) माझ्या हस्तगत झाली ४. [१६५०]

साखर ही प्रत्यक्ष खाल्ल्याशिवाय तिचें नांव घेतल्यानें तिची गोडी कळत नाहीं. तसें आम्हां वैष्णवांचें सुख प्रत्यक्ष अनुभवाखेरीज कळत नाहीं; अथवा, साखरेचें नांव घेतल्याबरोबर तिची गोडी लक्षांत येते, कारण ती तिच्या अंगभूत आहे. तसा आम्हां वैष्णवांचा लाभ आमच्या अंगभूत आहे (तो कसा हें ध्रुवपदांत सुचवितात) १. मोक्ष तर बांधून ठेवल्यासारखा आमच्या पदरीं आहे, म्हणून आमच्यामध्यें हरिभजनाच्या आवडीविषयींचा सोस आहे २. आम्हां बालकांचें सर्व लक्ष खेळण्याकडे आहे. म्हणून आमच्या भोजनाची काळजी विठाबाई आई करिते ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवांनीं आम्हांस मनुष्यदेह दिला आहे; ते उपकार फेडण्याकरितां आम्ही त्यांस सर्वकाळ मुखानें गाऊन त्या छंदानें नाचूं ४. [१६५१]

आम्ही सुखानें अनेक जन्म घेऊं, कारण ह्या लोकामध्यें एक कर्तव्य फार बरें आहे १. तें असें, कीं पंढरीची वारी

हें तों आलें अनुभवा। पाहावें जीवावरुनि ॥ ३ ॥ तुका म्हणे केला त्याग। सर्वसंग म्हणवूनि ॥ ४ ॥ [१६५२]

करूं जातां सन्निधान। क्षण जन पालटे ॥ १ ॥ आतां गोमटे ते पाय। तुझे माय विठ्ठले ॥ २ ॥ हरिदासांचा समागम। अंगीं प्रेम विसांवे ॥ ३ ॥ तुका म्हणे हेंचि मन। इच्छादान मागतसें ॥ ४ ॥ [१६५३]

क्षीर मागे तया रायतें वाढी। पाघानी गधडी ऐशा नांवें ॥ १ ॥ समयो जाणां समयो जाणां। भलतें नाणां भलतेथें ॥ २ ॥ अमंगळ वाणी वद्वी मंगळीं। अशुभ वोंगळी शोभेना ते (शोभे न तें) ॥ ३ ॥ तुका म्हणे नेणे समयो ठाया ठाव। रहाडी ते वाव नरकाडी ॥ ४ ॥ [१६५४]

विंचा पीडी नांगी। ज्याचा दोष त्याचे अंगीं ॥ १ ॥ केला पाहिजे विचार। मन मित्र दावेदार ॥ २ ॥ मधुरा उत्तरीं। रांवा खेळे उरावरी ॥ ३ ॥ तुका म्हणे रेडा। सुखें जाती ऐशा पीडा ॥ ४ ॥ [१६५५]

तीर्थीची अपेक्षा स्थळीं वाढे धर्म। जाणावें तें वर्म बहु पुण्य ॥ १ ॥ बहु वरी पेसी भाविकांची जोडी। काळ नाहीं घडी जात वायां ॥ २ ॥ करूनी चिंतन करवावें आणीकां। तो या झाला लोकां नाव जगीं ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसे परउपकारी। त्यांच्या पायांवरी डोई माझी ॥ ४ ॥ [१६५६]

भयाची तों आम्हां चित्तीं। राहों खंती शकेना ॥ १ ॥ समर्पिलों जीवें भावें।

केली असतां (मोक्षासारखा) श्रेष्ठ लाभ होतो २. हें माझ्या अनुभवाला आलें आहे. त्याचा सर्वांनीं अंगीकार करून पाहावा ३. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणूनच मी सर्वसंगाचा त्याग केला आहे ४. [१६९२]

हे देवा, तुमच्याजवळ वास्तव्य केल्यानें क्षणामध्यें सर्व जनांची देहबुद्धि पालटते (पूर्वी तो पामर असेल तर मुमुक्षु होतो, मुमुक्षु असेल तर मुक्त होतो, अभक्त असेल तर भक्त होतो) १. हे विठाबाई आई, आतां तुझे पाय फार चांगले आहेत २. हरिदासांच्या संगतीनें तुझें प्रेम सर्व अंगामध्यें स्थिरावतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या मनाची हीच इच्छा आहे, म्हणून मी (माझें मन तुझ्या पायांजवळ राहावें) हेंच दान मागतों ४. [१६५३]

भोजनाच्या पंक्तीमध्यें कोणी एकानें क्षीर–खीर मागितली असतां, त्यास तिखट असलेलें रायतें आणून जी वाढते, त्या स्त्रीस अचरट, गधडी असें म्हणावें १. म्हणून योग्य समय जाणा (असें द्विवार सांगतों) भलत्या ठिकाणीं भलतें आणूं नका २. शुभ कार्याचे ठिकाणीं जी कोणी अशुभ बोलेल किंवा बोलवील ती वाईट आहे म्हणून तेथें शोभणार नाहीं (कारण त्या शुभ समयाचे ठिकाणीं अमंगळ वचन उपयोगी नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी चांगल्या वाईट जाग्याचा व समयाचा (स्थळ–काळाचा) विचार जाणत नाहींत त्यांची वागणूक व्यर्थ असून नरकाप्रमाणें अमंगळ समजावी ४. [१६५४]

विंचवाची तीक्ष्ण नांगी विंचवास सुद्धां पीडा करते. कारण ज्याचा वाईट गुण त्यासच दुःखदायक होतो १. त्याप्रमाणें तुमचें (गुणदोषयुक्त) मन तुमचा वैरी आहे व मित्रहि आहे, ह्याचा तुम्हीं विचार केला पाहिजे २. आपल्या अंतःकरणांतील प्रीतीनें गोड बोलण्यापासून राघु (पोपट) आपले उरावर (आंगाखांद्यावर) देखील खेळतो ३. तुकाराम महाराज म्हणजात, रेड्यास किती शिकवून काय उपयोग आहे? अशा प्रकारच्या जातीपासून शिकविणारास त्रास होतो. (रेड्याचे अंगीं कोणताहि पोपटासारखा लोकप्रिय गुण नाहीं आणि अप्रिय दोषहि नाहीं, त्यामुळें त्याला पोपटासारखें सुख नसतें आणि विंचवासारखें दुःखहि नसतें) ४. [१६५५]

तीर्थास जाण्याची इच्छा धरून (किंवा देशोदेशीं तीर्थयात्रा करण्यापेक्षां) आपण ज्या ठिकाणीं आहों, त्या ठिकाणींच ज्या योगानें तीर्थयात्राधर्म होऊन बहुत पुण्य प्राप्त होईल असें मर्म जाणावें १. हें पुण्य करण्याविषयीं ज्यांचा काळ घटकाभर देखील व्यर्थ जात नाहीं, अशा भाविक लोकांची (वैष्णवांची)संगति व्हावी हें फार बरें २. जो कोणी आपण हरिनामचिंतन करून दुसऱ्या लोकांकडून करवितो तो ह्या जगामध्यें भवनदींतून तरून जाण्याची नौकाच झाली आहे असें समजावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे हे परोपकार करणारे जे वैष्णव आहेत त्यांच्या पायांवर माझें मस्तक आहे ४. [१६५६]

आमच्या चित्तामध्यें कोणत्याहि प्रकारच्या भयाची काळजी राहात नाहीं १. आम्ही जीवाभावानें

काशा भ्यावें कारणें ॥ २ ॥ करीन तें कवतुकें । अवघें निकें शोभेल ॥ ३ ॥ तुका म्हणे माप भरूं । दिस सारूं कवतुकें ॥ ४ ॥ [१६५७]

पाचारितां धांवे । ऐसी ठायींची हे सवे ॥ १ ॥ बोले करुणा वचनीं । करी कृपा लावी स्तनीं ॥ २ ॥ जाणे कळवळा । भावसिद्धीचा सोहळा ॥ ३ ॥ तुका म्हणे नाम । मागें मागें धांवे प्रेम ॥ ४ ॥ [१६५८]

कां जी माझे जीवीं । आळस ठेविला गोसावी ॥ १ ॥ येवढा घात आणीक काय । चिंतनासी अंतराय ॥ २ ॥ देह आत्मबंदी (आत्मवादी)। केला घात कुबुद्धी ॥ ३ ॥ तुका म्हणे मन । कळवळी वाटे सीण ॥ ४ ॥ [१६५९]

दर्शनाचें आर्त जीवा । बहु देवा राहिलें ॥ १ ॥ आतां जाणसी तें करीं । विश्वंभरीं काय उणें ॥ २ ॥ येथें जरी उरे चिंता । कोण दाता याहूनी ॥ ३ ॥ तुका म्हणे जाणवलें । आम्हां भलें एवढेंची ॥ ४ ॥ [१६६०]

बैसों पाठ (ठी) मोरीं । मना वाटे तैसें करीं ॥ १ ॥ परि तूं जाणसी आवडी । बाळा बहुतांची परवडी ॥ २ ॥ आपुलाल्या इच्छा । मागों जया व्हावें जैशा ॥ ३ ॥ तुका म्हणे आई । नव्हसी उदास विठाई ॥ ४ ॥ [१६६१]

विश्वंभरा वोळे । बहुत हात कान डोळे ॥ १ ॥ जेथें असे तेथें देखे । मागितलें तें आईके ॥ २ ॥ जें जें वाटे गोड । तैसें पुरवितो कोड ॥ ३ ॥ तुका म्हणे भेटी । कांहीं पडों नेदी तुटी ॥ ४ ॥ [१६६२]

दाटो (दाटे) कंठ लागो (लागे) डोळियां पाझर । गुणाची अपार वृष्टि वरी ॥ १ ॥ तेणें सुखें छंदें

(काया-वाचामनानें) देवास समर्पण झालों आहोंत, म्हणून आम्हांस कोणाचें भय धरण्याचें काय कारण आहे? २. जें कांहीं आम्ही कौतुकानें करूं तें सर्व चांगलेपणानें शोभत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही आमचें हृदयरूपी माप देवानें भरून सर्व दिवस आनंदांत–हरिचिंतनांत घालवूं ४. [१६५७]

देवास भक्तजनानें हांक मारल्याबरोबर तो त्याच्याकडे धांवत जातो, अशी त्याला मूळचीच संवय आहे १. मोठ्या करुणायुक्त शब्दानें जो भक्त देवाची करुणा भाकतो त्याच्यावर देव कृपा करून कृपेनें आपल्याविषयींच्या प्रेमाचें स्तनपान देतो २. भक्तजनाचे ठिकाणीं आपलेविषयीं असणाऱ्या भावकळवळ्याचा सोहळा जाणतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो कोणी हरीचें नाम घेतो त्याचे मागें त्याचें प्रेम धांवतें ४. [१६५८]

अहो स्वामी, माझ्या हृदयांत तुम्ही आळस कां ठेविलात? १. त्या योगानें तुमच्या चिंतनांत अंतर पडतो; यापरता दुसरा घात काय आहे? २. देहाला आत्मा मानणें हा बंध आहे (पाठभेद : देह हाच आत्मा असें म्हणूं लागलों) व ह्या कुबुद्धीनें माझा घात केला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याविषयीं माझें मन फार कळवळतें व त्या योगानें दुःख होतें ४. [१६५९]

हे देवा, माझ्या हृदयांत तुमच्या दर्शनाची बहुत इच्छा आहे १. आतां तुम्हांला जें कळेल–योग्य वाटेल–तें करा. तुम्ही सर्व विश्वाचे पालक आहांत, तुमचे ठिकाणीं काय उणें आहे? २. ह्या ठिकाणीं जर आम्हांला चिंता राहील तर ती निवारील असा तुमच्यापेक्षां दुसरा कोण दाता आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, एवढेंच काय तें आम्हांला चांगलें कळलें आहे ४. [१६६०]

आम्ही आतां तुमच्याकडे पाठ करून बसलों आहों. तुमच्या मनास वाटेल तसें तुम्ही करा १. पण बालकांना बहुत प्रकारची आवड आहे, हें तूं जाणतो आहेस २. जें ज्यास पाहिजे असेल तें त्यानें आपले इच्छेनुरूप मागावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठाई आई, तूं उदासीन नाहींस ४. [१६६१]

विश्वपालकाला पुष्कळ हातपाय डोळे आहेत १. जो जेथें असेल त्याला तो पाहातो व जो जेथून जें मागेल तें तो तेथून ऐकतो २. ज्याला जें जें प्रिय आहे तें तें तो देऊन त्याची इच्छा पूर्ण करतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या भेटीमध्यें तो अंतर पडूं देत नाहीं ४. [१६६२]

हे देवा, माझा कंठ सद्गदित होऊन डोळ्यांस आनंदाश्रु यावे व तुमच्या गुणाची अपार वृष्टि व्हावी (अगर तुमचें

घेईन सोहळा । होऊनि निराळा पापापुण्यां ॥ २ ॥ तुझ्या मोहें पडो मागील विसर । आलापें सुस्वर करिन कंठ ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें पाहिजे सौरस । तुम्हांविण रस गोड नव्हे ॥ ४ ॥ [१६६३]

पसरूनि राहिलों बाहो । सोयी अहो तुमचीये ॥ १ ॥ आतां यावें लागवेगें । पांडुरंगे धांवत ॥ २ ॥ बैसायाची इच्छा कडे । चाली खडे रुपताती ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपाळुवा । करणें सेवा लागली ॥ ४ ॥ [१६६४]

आम्ही झालों एकविध । सुद्या सुदें (सुध्या सुधें) असावें ॥ १ ॥ यावरी तुमचा मोळा । तो गोपाळा अकळ ॥ २ ॥ घेतलें तें उसणें द्यावें । कांहीं भावें विशेषें ॥ ३ ॥ तुका म्हणे क्रियानष्ट । तरी कष्ट घेतसां ॥ ४ ॥ [१६६५]

आम्ही आर्तभूत जीवीं । तुम्ही गोसावी उदास ॥ १ ॥ वादावाद समर्थाशीं । काशानशीं करावा ॥ २ ॥ आम्ही मरों वेरझारीं । स्वामी घरीं बैसले ॥ ३ ॥ तुका म्हणे करितां वाद । कांहीं भेद् कळेना ॥ ४ ॥ [१६६६]

पुसावें ते ठायीं आपुल्या आपण । अहंकारा शून्य घालूनियां ॥ १ ॥ येर वाग्जाळ मायेचा अहंकार । वचनाशीं थार अज्ञान तें ॥ २ ॥ फळ तेंचि बीज बीज तेंचि फळ । उपनांवें मूळ न पालटे ॥ ३ ॥ तुका म्हणे अवघे गव्हांचे प्रकार । सोनें अलंकार मिथ्या नांव ॥ ४ ॥ [१६६७]

माझी आतां सत्ता आहे । तुम्हां पायां हे वरती ॥ १ ॥ एकाविण नेणें दुजा । पंढरीराजा सर्वांगें

गुणवर्णन व्हावें) १. त्या छंदानें सुखसोहळा भोगीन व पापपुण्याहून वेगळा होईन २. देवा, तुझ्या मोहानें मागच्या सर्व गोष्टींचा विसर पडला म्हणून आलापानें, कंठ सुस्वर करून तुला गाईन ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं तुमचें प्रेम पाहिजे आहे; कारण तुमचेवांचून कोणताहि भक्तिरस गोड होत नाहीं ४. [१६६३]

तुमच्या भेटीकरितां मी आपले बाहु पसरून राहिलों आहें १. हे पांडुरंगा, आतां तुम्ही मोठ्या वेगानें धांवत यावें २. कारण आम्हांला तुमचे कडेवर बसण्याची इच्छा आहे. पायीं चालण्यांत खडे रुततात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे कृपाळु देवा, तुमची जी पाहिजे ती सेवा करीन (किंवा, परंतु उलट तुझीच सेवा आम्हांला करावी लागत आहे) ४. [१६६४]

देवा, आम्ही तुमच्या ठिकाणीं अनन्य झालों आहों. तेव्हां आम्हां सरळांकरितां तरी तुम्ही सरळ असावें, ही आमची विनंति आहे १. हे गोपाळा, याउपर तुमची रीत ही न कळणारी आहे. २. जें कांहीं विशेष प्रसंगीं उसनें घेतलें आहे, तें परत दिलें पाहिजे ३. तुकाराम महाराज म्हणतात, (तूं कोणाचें कांहीं घेतलेलें परत देत नाहींस, असा) तूं क्रियानष्ट आहेस, म्हणूनच आमचेकडून सेवेचे कष्ट घेत आहेस ४. [१६६५]

आमच्या हृदयामध्यें तुमच्या भेटीची इच्छा आहे आणि तुम्ही स्वामी आम्हांविषयीं उदास आहांत १. मोठ्याशीं वादविवाद कशासाठीं करावा ? २. आम्ही तुमचेकडे हेलपाटे घालून मरावें व तुम्ही स्वामी तर घरीं बसलां (हें योग्य आहे का?) ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्याबरोबर वाद करावयास जावें तर (तुम्ही गप्प बसतां, हा) कांहीं प्रकार कळत नाहीं ४. [१६६६]

देहअहंकार नाहींसा करून आपण आपले ठिकाणीं विचार करावा १. बाकीचा सर्व वाग्जाळ (इतर कांहीं बोलणें म्हणजे) माया, अहंकार आहे; शब्दाला आधार अज्ञानाचा आहे. (पामरांच्या ठिकाणीं असणारें अज्ञान वेदादि प्रमाणांनीं गृहीत धरलें आहे) २. फळ तेंच बीज आणि बीज तेंच फळ. मूळ या नांवानें तें कांहीं बदलत नाहीं. (हें सर्व जगत् मायेच्या योगानें परमात्म्यापासून झालें. जगत् भासतें त्या काळांतहि त्याचें मूळ जें परमात्मस्वरूप त्यांत कांहींहि बदल होत नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, करंज्या, शेवया व पोळ्या हे सर्व गव्हाचे मिथ्या प्रकार आहेत, त्यांत मूळ एक गहूंच सत्य आहे. सोन्याचे अनेक अलंकार होतात, पण तेथें सत्य सोनेंच आहे. अलंकार ही कल्पना मिथ्या आहे ४. [१६६७]

देवा, आतां तुमच्या पायांवर माझी सत्ता आहे १. सर्वांगानें (काया, वाचा, मनानें) एका पंढरीरायावांचून

॥ २ ॥ पुरवावी केली आळी । जे जे काळीं मागेन तें ॥ ३ ॥ तुका म्हणे सुटसी कैसा । धरूनि दिशा राहिलों ॥ ४ ॥ [१६६८]

फावलें तें तुम्हां मागें । नवतों लागें पावलों ॥ १ ॥ आलों आतां उभा राहें । जवळी पाहें सन्मुख ॥ २ ॥ घरीं होती गोवी झाली । कामें बोली न घडेचि ॥ ३ ॥ तुका म्हणे धडफुडा । झालों झाडा देईं देवा ॥ ४ ॥ [१६६९]

आतां नये बोलों अव्हेराची मात । बाळावरी चित्त असों द्यावें ॥ १ ॥ तुज कां सांगणें लागे हा प्रकार । परी हें उत्तर आवडीचें ॥ २ ॥ न वंचीं वो कांहीं एकही प्रकार । आपणां अंतर नका मज ॥ ३ ॥ तुका म्हणे मोहो राखावा सतत । नये पाहों अंत पांडुरंगा ॥ ४ ॥ [१६७०]

करूनि राहों जरी आत्माचि प्रमाण। निश्चळ नव्हे मन काय करूं ॥ १ ॥ जेविलिया विण काशाचे ढेंकर । शब्दाचे प्रकार शब्दचि ते ॥ २ ॥ पुरे पुरे आतां तुमचें ब्रह्मज्ञान । आम्हांसी चरण न सोडणें (वे) ॥ ३ ॥ विरोधें विरोध वाढ पुढतापुढती । वासनेचे हातीं गर्भवास ॥ ४ ॥ सांडीमांडी अंगीं वसे पुण्यपाप । बंधन संकल्प याचि नांवें ॥ ५ ॥ तुका म्हणे नाहीं मुक्तता मोकळी । ऐसा कोण बळी निरसी देह ॥ ६ ॥ [१६७१]

तुमचे स्तुतियोग्य कोठें माझी वाणी । मस्तक चरणीं ठेवितसें ॥ १ ॥ भक्तिभाग्य तरी नेदीं तुळसीदळ । जोडुनि अंजुळ उभा असें ॥ २ ॥ कैचें भाग्य ऐसें पाविजे सन्निध । नेणें पाळूं विध करुणा भाकीं ॥ ३ ॥ संतांचे शेवटीं उच्छिष्टाची आस । करुनियां वास पहातसें ॥ ४ ॥ करीं इच्छा

मी दुसऱ्यास जाणत नाहीं २. ज्या ज्या वेळीं आम्ही (हट्ट घेऊं) जी जी इच्छा धरून मागूं ती ती तुम्हीं पूर्ण केली पाहिजे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां तुम्ही माझ्या हातून सुटून कसे जाल? मी सर्व दिशा रोखून राहिलों आहें ४. [१६६८]

ह्यापूर्वीं मी तुमचा पाठलाग केला नव्हता, म्हणून तुम्हांला चांगली सवड मिळाली होती १. हे देवा, आतां मी तुमच्याकडे आलों आहें, म्हणून तुम्ही माझ्या जवळच समोर उभे राहा २. आजपर्यंत घरांतील अनेक कामांतच आम्ही गुंतून पडलों होतों, त्यामुळें तुमच्याशीं बोलणें झालें नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आतां मी मोकळा झालों आहें, तुम्ही आपला झाडा (आजवर माझें किती कल्याण केलें ह्याचा हिशेब) द्यावा ४. [१६६९]

हे देवा, आतां आमच्या त्यागाची गोष्ट बोलूं नका. आम्हां बालकांवर लक्ष असूं द्यावें १. देवा, हे प्रकार तुम्हांला कांहीं सांगण्याची जरुरी नाहीं, पण मी हें प्रीतीनें बोलतों आहें २. एकाहि गोष्टीविषयीं मला आपण अंतर देऊं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, पांडुरंगा, माझें मोहानें सतत रक्षण करा (माझ्यावर सतत लोभ असूं द्या.) आतां (संकटकाळीं) माझा अंत पाहूं नका ४. [१६७०]

देवा, मी असंग, शुद्ध, बुद्ध आत्मा आहें, असा निश्चय करावयास गेल्यानें माझें मन निश्चळ होत नाहीं, ह्याला कसें करूं? १. खरें जेवल्यावांचून ढेंकर कशाची येणार? बाकी (आत्म्याचा अनुभव नसतां, आत्मा असा तसा आहे हे) सर्व शब्दाचे प्रकार शब्दच आहेत २. हे देवा, तुमचें ब्रह्मज्ञान आतां पुरे. आम्हांला तुमचे पाय सोडवत नाहींत ३. वांकडेपणानें वांकडेपणाच (विरोधानें विरोध) उत्तरोत्तर वाढेल. जन्म हा अंतकाळीं होणाऱ्या वासनेवर अवलंबून आहे ४. अन्य कांहीं (विधि-निषेधांच्या) खटाटोपी करण्यामध्यें पुण्य-पाप उत्पन्न होतें (मग चित्तशुद्धि कशी होणार? देहादिकांना मी व स्त्री-पुत्रादिकांना माझें समजणें ह्या भ्रमालाच) ह्या संकल्पासच बंध म्हणतात ५. तुकाराम महाराज म्हणतात, मुक्तस्थिति ही सहज मिळणारी नाहीं; ती प्राप्त करून घेण्यास देहनिरसन (देहाभिमानाचें निरसन) केलें पाहिजे; तें करील, असा बलाढ्य कोण आहे? ६. [१६७१]

देवा, तुमची स्तुति करण्यायोग्य माझी वाचा कोठें आहे? म्हणून मी तुमच्या पायांवर मस्तक ठेविलें आहे १. माझें भक्तिभाग्य आहे म्हणावें, तर मी तुम्हांला तुळशीचें पानदेखील अर्पण करीत नाहीं. मात्र हात जोडून तुमच्या पुढें उभा असतों २. असें भाग्य कोठें आहे, कीं ज्या योगानें तुमचें सान्निध्य मला प्राप्त होईल; तुमच्या सेवेचा विधि कसा पाळावा हें न जाणून तुमची मी करुणा भाकीत आहें ३. अखेरीस संतांच्या उच्छिष्टाची आशा धरून मी त्याची वाट

मज म्हणोत आपुलें । एखादिया बोलें निमित्याच्या ॥ ५ ॥ तुका म्हणे शरण आलों हें साधन । करितों चिंतन रात्रंदिवस ॥ ६ ॥ [१६७२]

सर्वविशीं आम्हीं हेचि जोडी केली । स्वामीची साधिली चरणसेवा ॥ १ ॥ पाहिलेंचि नाहीं मागें परतोनि । जिंकिला तो क्षणोक्षणीं काळ ॥ २ ॥ नाहीं पडों दिला विचाराचा गोवा । नाहीं पोटीं हेवा येऊं दिला ॥ ३ ॥ केली लागवेगें अवघी तांतडी । भावना ते कुडी दुराविली ॥ ४ ॥ कोठें मग ऐसें होतें सावकाश । जळो तया आस वेव्हाराची ॥ ५ ॥ तुका म्हणे लाभ घेतला पालवीं । आतां नाहीं गोवी कासयाची ॥ ६ ॥ [१६७३]

येणें मुखें तुझे वर्णीं गुण नाम । तेंचि मज प्रेम देईं देवा ॥ १ ॥ डोळे भरूनियां पाहें (पाहीन) तुझें मुख । तेंचि मज सुख देईं देवा ॥ २ ॥ कान भरोनियां ऐकेन तुझी कीर्ति । ते मज विश्रांती देईं देवा ॥ ३ ॥ वाहें रंगीं टाळी नाचेन उदास । हें देईं हातांस पायां बळ ॥ ४ ॥ तुका म्हणे माझा सकळ देहभाव । आणीक नको ठाव चिंतूं यासी ॥ ५ ॥ [१६७४]

तूं माझा मायबाप सकळ वित्त गोत । तूंचि माझें हित करिता देवा ॥ १ ॥ तूंचि माझा देव तूंचि माझा जीव । तूंचि माझा भाव पांडुरंगा ॥ २ ॥ तूंचि माझा आचार तूंचि माझा विचार । तूंचि सर्व भार चालविसी ॥ ३ ॥ सर्वभावें मज तूं होसी प्रमाण । ऐशी तुझी आण वाहातसें ॥ ४ ॥ तुका म्हणे तुज विकला जीवभाव । कळेल तो उपाव करीं आतां ॥ ५ ॥ [१६७५]

वारंवार तुज द्यावया आठव । आइक तो भाव माझा कैसा ॥ १ ॥ गेला मग न ये फिरोन दिवस । पुढिलांची आस गणित नाहीं ॥ २ ॥ गुणां अवगुणांचे पडती आघात । तेणें होय चित्त कासावीस ॥ ३ ॥ कांहीं एक तुझा न देखों आधार । म्हणऊनि धीर नाहीं जीवा ॥ ४ ॥

पाहात आहे ४. ऐखाद्या निमित्तानें मला आपलें म्हणाल, अशी मी इच्छा करीत आहें ५. तुकाराम महाराज म्हणतात, मी तुम्हांला शरण आलों आहें व रात्रंदिवस तुमचें चिंतन करणें हें तुमच्या प्राप्तीचें एक साधन मी करीत आहें ६. [१६७२]

स्वामीची (पांडुरंगाची) चरणसेवा साध्य करून घेतली, हाच आम्हीं सर्वस्वीं लाभ करून घेतला आहे १. ह्याविषयीं प्रपंचाकडे आम्ही परतून पाहिलें नाहीं. क्षणाक्षणानें काळ जिंकला २. कांहीं विचाराचा अडथळा पडूं दिला नाहीं व संसारसंबंधीं सोस हृदयांत येऊं दिला नाहीं ३. हरिचिंतनाची व संतसंगतीची लवकरांत लवकर तांतडी केली आणि मोठ्या लगबगीनें हृदयांतील वाईट भावना दूर केली ४. संसारासंबंधीं आशेस आग लागो, कारण येथून पुढें कोणत्या ठिकाणीं मनुष्यदेहावांचून दुसऱ्या कोणत्या देहांत असा अवकाश मिळेल? ५. तुकाराम महाराज म्हणतात, पारमार्थिक लाभ आम्हीं आमचे पदरांत घेतला, आतां आम्हांला कोणतेहि प्रकारचा गुंता राहिला नाहीं ६. [१६७३]

हे देवा, या मुखानें तुझें नामस्मरण व गुणाचें वर्णन करावें ह्याविषयीं मला प्रेम दे १. हे देवा, तुझें श्रीमुख मीं डोळे भरून पाहावें असें मला सुख दे २. हे देवा, तुझी कीर्ति मीं कान भरून ऐकावी अशी मला विश्रांति दे ३. तुझ्या रंगानें संसारावर उदास होऊन हातानें टाळी वाजवून मीं नाचावें ह्याविषयीं शक्ति माझ्या हातापायांस दे ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या सर्व देहभावाला तुझ्यावांचून कोणतेंहि ठिकाण देण्याविषयींची योजना तूं करूं नको ५. [१६७४]

हे देवा, तूंच माझा आईबाप व सर्व पैसा व गोत असून माझें हित करणारा तूंच आहेत १. हे पांडुरंगा, माझा देव व जीवभाव तूंच आहेस २. माझा आचार व त्याविषयींचा विचार तूंच असून माझा सर्व योगक्षेमाचा भार तूंच चालवितोस ३. काया-वाचा-मन ह्या सर्वभावें तूंच मला मान्य आहेस, ह्याविषयीं तुझीच शपथ वाहून सांगतों ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझा सर्व जीवभाव तुला अर्पण केला आहे. आतां त्याविषयीं (माझ्या उद्धाराविषयीं) तुला वाटेल तो उपाय तूं कर ५. [१६७५]

हे देवा, तुला माझी हकीगत वरचेवर सांगतों, त्याचें कारण माझा भाव कोणत्या प्रकारचा आहे तो ऐक १. ह्या नरदेहाच्या आयुष्यापैकीं जो दिवस व्यर्थ गेला, तो पुनः मिळत नाहीं; व मी पुढच्या दिवसाच्या (आयुष्याच्या) आशेची पर्वा करीत नाहीं २. वरचेवर चांगल्या वाईट गुणांचे आघात होतात, त्या योगानें माझें चित्त फार कासावीस होत आहे ३.

तुका म्हणे तूं या ब्रह्मांडाचा जीव। तरि कां आम्ही कींव भाकीतसों ॥ ५ ॥ [१६७६]

असोत हे तुझे प्रकार सकळ। काय खळखळ करावी हे ॥ १ ॥ आमुचें स्वहित जाणतसों आम्ही। तुझें वर्म नामीं आहे तुझ्या ॥ २ ॥ विचारितां आयुष्य जातें वायांविण। रोज नागवण पडतसे ॥ २ ॥ राहेन मी तुझे पाय आठवूनी। आणीक तें मनीं येऊं नेदीं ॥ ४ ॥ तुका म्हणे येथें येसी अनायासें। थोर तुज पिसें कीर्तनाचें ॥ ५ ॥ [१६७७]

विष्णुदासां भोग। जरी आम्हां पीडी रोग ॥ १ ॥ तरि हें दिसे लाजिरवाणें। काय तुम्हांसी सांगणें ॥ २ ॥ आम्हां काळें खावें। बोलिलें तें वायां जावें ॥ ३ ॥ तुका म्हणे दास। आम्ही भोगूं गर्भवास ॥ ४ ॥ [१६७८]

भावें गावें गीत। शुद्ध करूनियां चित्त ॥ १ ॥ तुज व्हावा आहे देव। तरि हा सुलभ उपाव ॥ २ ॥ आणिकांचे कानीं। गुण दोष मना नाणीं ॥ ३ ॥ मस्तक ठेंगणा। करीं संतांच्या चरणा ॥ ४ ॥ वेंची तें वचन। जेणें राहे समाधान ॥ ५ ॥ तुका म्हणे फार। थोडा तरी परउपकार ॥ ६ ॥ [१६७९]

वचन तें नाहीं तोडित शरीरा। भेदतें अंतरा वज्राऐसें ॥ १ ॥ कांहीं न सहावें काशाही कारणें। संदेह निधान देह बळी ॥ २ ॥ नाहीं शब्द मुखीं लागत तिखट। नाहीं जड होत पोट तेणें ॥ ३ ॥ तुका म्हणे जरी गिळे अहंकार। तरी वसे घर नारायण ॥ ४ ॥ [१६८०]

तुमचा मला कांहींएक आधार दिसेना म्हणून माझ्या जिवास धीर निघत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, जर तूं या सकळ ब्रह्मांडाचा जीव आहेस, (तूं आपण होऊन आमची विचारपूस केली असतीस) तर आम्ही तुला काकुळती येण्याचें काय कारण आहे? ५. [१६७६]

हे देवा, तुझ्या घरचे मोक्षादिकरून जे सर्व प्रकार आहेत ते असोत, त्या खळखळीस घेऊन मला काय करावयाचें आहे? १. कारण तुझ्या प्राप्तीचें मर्म तुझें नाम आहे, त्या योगानेंच आमचें स्वहित आहे, असें आम्हीं जाणलें आहे २. ह्यावांचून अन्य विचार केला असतां व्यर्थ आयुष्याचा खर्च मात्र होऊन (आयुष्य व्यर्थ जाऊन) रोजचे रोज आमचें नुकसान होत आहे ३. तुझ्या पायांचा आठव करून मी राहीन. त्यावांचून दुसरें कांहीं मनांत येऊं देणार नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुला कीर्तनाविषयींचें फार वेड आहे, म्हणून आम्ही ह्या ठिकाणीं कांहीं सायास न करतां कीर्तन करूं. त्या कीर्तनाच्या योगानें तूं अनायासें धांवून येशील ५. [१६७७]

आम्हां विष्णुदासांना प्रारब्धाच्या योगानें दुःखाचे भोग व रोग उत्पन्न होऊन त्यांची पीडा होऊं लागते १. हें फार लाजिरवाणें दिसत आहे, हें तुम्हांस सांगितलें का पाहिजे? २. जर आम्हांला काळ खाईल व जें आम्ही बोलूं तें व्यर्थ जाईल (ह्याचा संबंध ध्रुवपदाशीं आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं दासांनीं गर्भवास भोगावे हें तुम्हांला बरें दिसतें काय? ४. [१६७८]

अहो जन हो, तुम्ही आपलें चित्त शुद्ध करून भावानें हरिनामाचें गीत गा १. तुम्हांला जर देवाची प्राप्ति करून घेणें आहे, तर हा उपाय सोपा आहे २. दुसऱ्याचे गुणदोष कानांनीं ऐकूं नये व मनांतदेखील येऊं नयेत ३. संतांचे चरणांवर लीन होऊन मस्तक ठेवावें ४. ज्या योगानें चित्तास समाधान होईल असे शब्द बोलावे (नाहींपेक्षां मौन असावें) ५. तुकाराम महाराज म्हणतात, लोकांवर पुष्कळ उपकार करावे अगर थोडे तरी करावे (ह्या सर्व उपायांनीं देवाची प्राप्ति होते) ६. [१६७९]

कोणी आपल्याला वाईट बोलला, तर तें बोलणें आपल्या शरीराला तोडीत नाहीं, पण वज्राप्रमाणें अंतःकरणास घाय बसतात १. हें कांहीं सहन होत नाहीं. हें कोणत्या कारणानें असावें ह्याचा संशय आहे; (संशयभ्रमाचा सांठा असलेला हा देह आणि त्याविषयीं अहंभाव हें सहन न होण्याला कारण आहे.) देहनिधान देवास बलिदान दिल्यावर त्या संदेहाचें निरसन होईल २. वाईट शब्द बोलणाराचे तोंडीं तिखट लागत नाहीं, व त्यायोगानें ऐकणाराचें पोटही जड होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर अहंकार नाहींसा केला तर हृदयरूपी घरांत नारायण वास्तव्य करील ४. [१६८०]

नव्हो आतां जीवीं कपटवसती । मग काकुळती कोणा यावें ॥ १ ॥ सत्याचिये मापें गांठीं नये नाड । आदि अंत गोड नारायण ॥ २ ॥ चोखटिया नाहीं विटाळाचा आघात । साच तें सांचत सांच पडे ॥ ३ ॥ विचारिली वाट उसंती सीतळ । बुद्धीपुढें बळ तृणतुल्य ॥ ४ ॥ आहाराच्या घांसें पचोनियां जिरे । वासना ही उरे उर्वरीत ॥ ५ ॥ तुका म्हणे ताळा घालावा वचनीं । तूं माझी जननी पांडुरंगे ॥ ६ ॥ [१६८१]

नव्हतीं हीं माझीं जायाचीं भूषणें । ऐसें नारायणें उचित केलें ॥ १ ॥ शब्दाच्या वोवणीं रत्नाचिया माळा । मुळींचा जिव्हाळा झरवणी ॥ २ ॥ अर्थांतर असे अनुभवसेवन । परिपाकीं मन साक्ष येथें ॥ ३ ॥ तुका म्हणे मज सरतें परतें । तें नाहीं अनंतें उरों दिलें ॥ ४ ॥ [१६८२]

सहज लीळा मी साक्षी याचा । नये वंचूं वाचा ऐसें झालें ॥ १ ॥ उपक्रमें वदे निःशब्दाची वाणी । जे कोठें बंधनीं गुंदों नेणे ॥ २ ॥ तम नासी परि वेव्हारावेगळा । रविप्रभाकळा वर्ते जन ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें गेला अतिशय । आतां पुन्हां नये तोंड दावूं ॥ ४ ॥ [१६८३]

बोलाल या आतां आपुल्यापुरतें । मज या अनंतें गोवियेलें ॥ १ ॥ झाडिला न सोडी हातींचा पालव । वेधी वेधें जीव वेधियेला ॥ २ ॥ तुमचे ते शब्द कोरडिया गोष्टी । मज सवें मिठी अंगसंगें ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्हां होईल हे परी । अनुभव (वा) वरी येईल मग ॥ ४ ॥ [१६८४]

जैशा तुम्ही दुरी आम्हां । तैशा राहा अंतरें ॥ १ ॥ नका येऊं देऊं आळ । अंगीं गोपाळ

आतां माझ्या मनामध्यें कपटाची वस्ती होऊं नये आणि झाली तर मग कोणाला काकुळती यावें ? १. खऱ्या मापानें (सत्य वागण्यानें) पदरीं कांहीं तूट येणार नाहीं, अव्वल अखेर नारायण गोड आहे २. जें कांहीं खरें शुद्ध आहे त्यास (अविद्येच्या व अहंकाराच्या) विटाळाचा आघात होत नाहीं आणि खरेपणानें खऱ्याचाच संचय होतो ३. आधीं विचार करून सोपी वाट मी चालत आहें. याला माझी बुद्धि साह्य झाली आहे, म्हणून त्या बुद्धीपुढें बळ तृणतुल्य आहे ४. जें कांहीं ग्रासोग्रासीं भोजन करावें तें पचून जिरलें पाहिजे, म्हणजे तेंच वरचेवर सेवन करण्याची इच्छा अवशिष्ट राहाते ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, ह्या माझ्या वचनाचा ताळमेळ घालावा; (माझ्याकडून असत्य भाषण न व्हावें, माझ्या बोलण्याला सत्याची मर्यादा असावी,) कारण तूं माझी आई आहेस ६. [१६८१]

हीं माझीं (काव्यरूपी भूषणें उसनीं आणलेलीं किंवा) जाणारीं भूषणें नाहींत, अशीं नारायणानें तीं योग्य केलीं १. मूळचाच स्फूर्तिरूपी जलाचा झरा असल्यामुळें शब्दरत्नांच्या माळा ओंवून तयार करूं [अभंगरचना करूं] २. मला अनेक अर्थांचा अनुभव आहे. ज्यांचें मन परिपक्व दशेस आलें असेल ते येथें साक्षी आहेत (ह्या माझ्या काव्यांत वेगवेगळे अर्थ आहेत, तसेंच ब्रह्मानुभवरसाचेंहि सेवन आहे. ह्याविषयीं शास्त्र आणि अनुभव–निष्णात मनच साक्षी आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला अनंतानें जी कवित्वाची स्फूर्ति दिली आहे, ती कधींहि संपणारी नाहीं अशी आहे ४. [१६८२]

सहज होणाऱ्या ह्या काव्य करण्याच्या लीलेचा मी साक्षी आहें. त्याचा वाचेनें त्याग करूं नये असें झालें आहे १. म्हणून माझी वाणी निःशब्द तत्त्वाचें (ब्रह्माचें) आरंभापासून निरूपण करीत आहे, तरी ती कोठेंहि मोहाच्या बंधनांत (मायिक पदार्थांचें वर्णन करण्याच्या बंधनांत) सांपडत नाहीं २. सूर्य आपल्या प्रकाशानें अंधकार नाहींसा करून सर्व जनांस आपापले व्यवहार करण्यास प्रवृत्त करतो, तथापि तो सर्व व्यवहारांहून वेगळा असतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्यांतील आग्रही वृत्ति नाहींशी झाली, ती पुन्हां आतां कधींहि तोंड दाखविणार नाहीं. (ह्या माझ्या काव्यापासून लोकांना आनंद वाटत असेल, पण ह्या काव्याविषयीं माझा कर्तेपणाचा अभिमान नष्ट झाला आहे ४. [१६८३]

(देवाशीं अनुरक्त झालेली एक भक्त स्त्री म्हणत्ये, सख्यांनो,) मला ह्या अनंतानें आपल्या वेधांत गुंतवून ठेविलें आहे. आतां जें बोलाल तें आपल्यापुरतें बोला १. माझा पदर त्यानें धरला आहे, तो हिसकावला तरी हातचा सोडीत नाहीं आणि त्याच्याच वेधानें माझा जीव वेधला आहे २. आतां जें कांहीं तुमचें बोलणें होईल, त्यांत कांहीं ओलेपणा आहे असें वाटत नाहीं, कारण मला देवानें मिठी मारली आहे व तो माझ्या संगतीला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा प्रकार तुम्हांला घडून आला मग तुमच्या अनुभवाला येईल ४. [१६८४]

सख्यांनो, तोंपर्यंत जशा तुम्ही मजपासून दूर आहां तशाच राहा १. कारण माझ्या अंगाशीं गोपाळ जडला आहे,

जडलासे ॥ २ ॥ अवघा हाचि राखा काळ । त्रिकाळची भोंवता ॥ ३ ॥ तुका म्हणे मज ऐशा। होतां पिशा जगनिंद्य ॥ ४ ॥ [१६८५]

सतीचें तें घेतां वाण। बहु कठीण परिणामीं ॥ १ ॥ जिवासाठीं गौरव वाढे । आहाच जोडे तें नव्हे ॥ २ ॥ जरि होय उघडी दृष्टी । तरि गोष्टी युद्धाच्या ॥ ३ ॥ तुका म्हणे अंगा येतां। तरी सत्ता धैर्याची ॥ ४ ॥ [१६८६]

आडवा तो उभा। असे दाटोनियां प्रभा ॥ १ ॥ देव नाहीं एकविध । एक भाव असे शुद्ध ॥ २ ॥ भेदाभेद आटी। नाहीं काळ (फार) कोठें तुटी ॥ ३ ॥ तुका म्हणे गोवा । उगवा वेव्हाराचा हेवा ॥ ४ ॥ [१६८७]

एका बोटाची निशाणी। परिपाक नाहीं मनीं ॥ २ ॥ तरि तें संपादिलें सोंग। कारणावांचूनियां व्यंग ॥ २ ॥ वैष्णवांचा धर्म । जग विष्णु नेणे वर्म ॥ ३ ॥ अतिशय पाप । तुका सत्य करी माप ॥ ४ ॥ [१६८८]

सत्यत्वेंशीं घेणें भक्तीचा अनुभव। स्वामीचा गौरव इच्छीतसें ॥ १ ॥ मग तें अवीट न भंगे साचार। पावलें विस्तार फिरों नेणें ॥ २ ॥ वाणी वदे त्याचा कोणासी विश्वास। अभयें करें दास सत्य तई ॥ ३ ॥ तुका म्हणे आधीं न करीं तांतडी। पायीं झाली जोडी तेणें शुद्ध ॥ ४ ॥ [१६८९]

म्हणून तुम्ही माझ्यावर आळ येऊं देऊं नका. (माझ्यावर देवाशीं व्यभिचार करण्याचा आळ आला आहे तसा तुम्ही आपल्या अंगावर आळ येऊं देऊं नका) २. तुमच्या सभोंवतीं एक मृत्युरूपी त्रिकाळ काळ आहे, त्याचेंच तुम्ही रक्षण करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्यासारख्या तुम्ही वेड्या व्हाल, तर लोक तुमची निंदा करतील. (ह्या अभंगांत हरिभक्ति करणाऱ्या स्त्रीच्या भूमिकेवरून सामान्य कोटींतल्या स्त्रियांना उपरोधिक भाषेत परमार्थाचा उपदेश केला आहे) ४. [१६८५]

सतीचें वाण घेणें हें परिणामीं फार अवघड आहे १. कारण जिवावर उदार झालें पाहिजे. त्याच योगानें महती होते. अशी स्थिति नसतांना वरवर दांभिकपणा असेल तर कीर्ति होत नाहीं २. ज्याची युद्धासंबंधानें दृष्टि उघडी झाली आहे (नजर मेली आहे) त्यानेंच युद्धाच्या गोष्टी बोलाव्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे समय जरी अंगास येऊन झगडले, तरी तेथें धैर्य पाहिजे (तरच तो शूर होय) ४. [१६८६]

देव हा स्वयंप्रकाशानें जगतामध्यें आडवा उभा असा दाट भरला आहे १. देव एकविध नाहीं पण आपणाजवळ जर शुद्ध भाव असेल तर तो एक होतो (जगांतील वस्तुमात्र कांहीं सात्त्विक, राजस, तामस गुणांनीं युक्त असतात; कांहीं लहान, कांहीं मोठे असतात म्हणून देवाची एकरूपानें प्रतीति येत नाहीं, तरी पण व्यापक रूपानें भिन्न भिन्न वस्तूंत देव एकच भरलेला आहे ही प्रतीति येते) २. त्यावांचून (जीव, जगत् आणि देव ह्या) भेदाभेदाचा वाद सर्वकाळ केल्यानें कोणत्याहि काळीं तो वाद तुटणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या प्रापंचिक व्यवहाराविषयीं असणाऱ्या हांवेचा गुंताडा सोडवा (हांव नाहींशी करा) ४. [१६८७]

वैष्णव हे एका बोटानें कपाळाला उभा अंगारा लावतात, पण जर त्यांचें मन परिपक्व (शुद्ध किंवा विष्णु व्यापक आहे हें ज्ञान जाणणारें) नसलें १. तर त्यांनीं तें सोंग संपादन केलें आहे. वैष्णवत्व येण्याला जें कारण (मनाची परिपक्वता) पाहिजे, त्याची उणीव आहे २. सर्व जग विष्णुमय मानावें, हा वैष्णवांचा मुख्य धर्म आहे. तें खरें मर्म त्यांना माहीत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या करण्यानें मोठें पाप घडत आहे, म्हणून मी तसें न वागतां सत्यवाचें माप करीत आहें (म्हणजे वैष्णवांचा मुख्य धर्म जाणतों व त्याप्रमाणें वागतों) ४. [१६८८]

मी खरोखरच भक्तीचा अनुभव घ्यावा आणि स्वामींनीं (देवानें) माझा गौरव करावा, ही माझी इच्छा आहे १. मग तो भक्तीचा खरा अनुभव कधीं नासणार नाहीं व त्याचा कधींहि वीट येणार नाहीं. भक्ति एकदां विस्ताराला पावली म्हणजे ती मागें फिरत नाहीं (भक्त फिरून संसारांत अडकून राहात नाहीं) २. अनुभवावांचून कोणी नुसतेंच वाणीनें बोलत असेल तर त्याचा विश्वास कोण धरील ? ज्या वेळीं स्वामी मस्तकावर हात टेवील त्या वेळीं तो खरा दास आहेसें ठरेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी अगोदरच (भक्त म्हणून घेण्याचा) उतावळेपणा करणार नाहीं. ज्या वेळीं प्रभूच्या पायांचा लाभ होईल, तेव्हां त्या योगानें मी शुद्ध झालों असें समजेन ४. [१६८९]

सर्वात्मकपण । माझें हिरोनि नेतो कोण ॥ १ ॥ मनीं भक्तीची आवडी । हेवा व्हावी ऐशी जोडी ॥ २ ॥ घेईन जन्मांतरें । हेंचि करावया खरें ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । ऋणी करूनि ठवूं सेवा ॥ ४ ॥ [१६९०]

आणितां त्या गती । हंस काउळे न होती ॥ १ ॥ सांडा सांडा रे मटारे । एके(एकी) गांटीसवें धुरें ॥ २ ॥ नाकेंविण मोतीं । उभ्या बाजारें फजिती ॥ ३ ॥ हुकुमदाज तुका । येथें कोणी फुंदों नका ॥ ४ ॥ [१६९१]

ढेंकणासी बाज गड । उतरचढ केवढी ॥ १ ॥ होता तैसा कळों भाव । आला वाव अंतरींचा ॥ २ ॥ बोरामध्यें वसे (असे) अळी । अठोळीच भोंवतीं ॥ ३ ॥ पोटासाठीं वेंची चणे । राजा म्हणे तोंडें मी ॥ ४ ॥ बेडकानें चिखल खावा । काय ठावा सागर ॥ ५ ॥ तुका म्हणे तैसें आहे । काय पाहे त्यांत तें ॥ ६ ॥ [१६९२]

धांव धांव गरुडध्वजा । आम्हां अनाथांच्या काजा ॥ १ ॥ बहु झालों कासावीस । म्हणोनि पाहें तुझी वास ॥ २ ॥ पाहें त्या मारगें । कोणी येतें माझ्या लागें ॥ ३ ॥ असोनियां ऐसा । तुज सारिखा कोंवसा ॥ ४ ॥ न लावावा उशीर । नेणों कां हो केला धीर ॥ ५ ॥ तुका म्हणे चाली । नको चालूं धांव घालीं ॥ ६ ॥ [१६९३]

पांडुरंगे पांडुरंगे । माझे गंगे माउलिये ॥ १ ॥ पान्हा घालीं प्रेमधारा । पूर क्षीरा लोटों दे

मी आत्मत्वानें सर्वांतर्यामी आहें, ही माझी स्थिति कोण हरण करून नेईल? १. पण माझ्या मनांत भक्तीची प्रीति आहे, म्हणून त्या लाभाची मजमध्यें हांव आहे २. हेंच खरें करण्याकरितां (त्याप्रमाणें वर्तवून दाखविण्याकरितां) मी अनेक जन्म घेईन ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही (प्रत्येक जन्मांत) देवाला सेवेचा ऋणी करून ठेवूं ४. [१६९०]

कावळ्यानें कितीहि रूप बदललें (हंसासारखें चालण्याचा कितीहि आव आणला) तरी तो हंस होणार नाहीं (त्याप्रमाणें साधुपणाचें सोंग घेतल्यानें अंगीं साधुपणा येत नाहीं.) १. ह्याकरितां, हे ढोंगी मठपतींनो, तुम्ही आपले मठ टाका (असें द्विवार सांगतों.) एक श्रेष्ठ जो पांडुरंग त्याच्याशीं संबंध ठेवा २. नाकावांचून नथ घालणें (नकट्या नाकांत नथ घालणें) ही भरबाजारांत फजिती आहे (भक्ति-ज्ञान-वैराग्याचा अनुभव नसतां आपण भक्त, ज्ञानी, विरक्त आहों असें म्हणवून घेणें म्हणजे संतांच्या घरीं फजिती करून घेणें आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं कोणीहि (भक्ति-ज्ञान-वैराग्याची) घमेंड करूं नका, असा हुकूम मी बजावीत आहें ४. [१६९१]

ढेकणांना बाजेवर चढणें व उतरणें हें गडावर चढण्याउतरण्याप्रमाणें अवघड आहे (त्याप्रमाणें सामान्य माणसाला आत्म्याचें व्यापकत्व समजणें कठीण) १. अंतःकरणांतील व्यर्थ देहभाव (जो आत्मस्वरूपाला देहानें मर्यादित करितो व त्यांतच आपल्याला मोठा समजतो) कळून आला २. बोरांतील अळी आठोळीच्या सभोंवतींच असते (तिला तेंच ब्रह्मांड वाटतें) ३. जो कोणी रस्त्यावर पडलेले हरभरे पोटाकरितां वेंचीत आहे, त्यास तूं कोण आहेस, असें दुसऱ्यानें कोणीं विचारलें असतां तो मी राजा आहें म्हणून सांगतो. तें त्याचें सांगणें व्यर्थ आहे ४. थोड्या पाण्यांत राहून चिखल खाणाऱ्या बेडकास समुद्र माहीत आहे काय? (त्याप्रमाणें संसारी माणसानें क्षुद्र विषयसुख भोगावें; त्याला आत्मानंदाची काय कल्पना?) ५. तुकाराम महाराज म्हणतात, देहभावाचा (देहालाच मी म्हणण्याचा) प्रकार तसा आहे. त्यांत काय आहे तें पाहा ६. [१६९२]

हे गरुडध्वजा, आम्हां गरिबांच्या कामाकरितां तूं त्वरेनें ये (असें द्विवार विनवितों) १. मी फार कासावीस झालों आहें, म्हणून तुझी वाट पाहातों २. माझ्याकरितां कोणी धांवून येईल कीं काय म्हणून त्या मार्गाकडे माझें लक्ष लागलें आहे ३. तुझ्यासारखा साह्यकारी असून मी फार कासावीस झालों आहें (हें तुला बरें वाटतें काय?) ४. तुम्ही धांवून येण्यास कधींहि उशीर करीत नाहीं पण तुम्हीं आज कां हो विलंब केला? ५. तुकाराम महाराज म्हणतात, तूं नेहमींच्या चालण्याप्रमाणें (चालीनें) चालूं नको. मजकरितां लवकर धांवून ये ६. [१६९३]

हे पांडुरंगे माझे आई, तूं माझी गंगा आहेस १. तुझ्याविषयीं असलेल्या प्रेमरूपी दुधाचा पान्हा निरंतर सोडून

॥ २ ॥ अंगें अंग मेळउनी । करीं धणी फेडाया ॥ ३ ॥ तुका म्हणे घेईन उड्या । सांडिन कुड्या भावना ॥ ४ ॥ [१६९४]

गजेंद्र पशु आप्तें मोकलिला । तो तुज स्मरला पांडुरंगा ॥ १ ॥ त्यासाठीं गरुड सांडुनि धांवसी । मोहें (माया) झळंबसी दीनानाथा ॥ २ ॥ धेनु वत्सावरी झेंप घाली जैसी । तैसें गजेंद्रासी सोडविलें ॥ ३ ॥ तुका म्हणे ब्रीद बांधलें यासाठीं । भक्तांसी संकटीं रक्षावया ॥ ४ ॥ [१६९५]

चारी वेद जयासाठीं । त्याचें नाम धरा कंठीं ॥ १ ॥ न करीं आणीक साधन । कष्टसी कां वायांविण ॥ २ ॥ अठरा पुराणांचे पोटीं । नामाविण नाहीं गोठी ॥ ३ ॥ गीता जेणें उपदेशिली । ते ही विटेवरी माउली ॥ ४ ॥ तुका म्हणे सार धरीं । वाचे हरिनाम उच्चारीं ॥ ५ ॥ [१६९६]

पाहातां ठायाठाव । जातो अंतरोनि देव ॥ १ ॥ नये वाटों गुणदोषीं । मना जतन येविशीं ॥ २ ॥ त्रिविध देह परिचारा । जनीं जनार्दन खरा ॥ ३ ॥ तुका म्हणे धीरें । विण कैसें होतें बरें ॥ ४ ॥ [१६९७]

नामसंकीर्तन साधन पैं सोपें । जळतील पापें जन्मांतरींचीं ॥ १ ॥ न लगती सायास जावें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ॥ २ ॥ ठायींच बैसोनि करा एकचित्त । आवडीं अनंत आळवावा ॥ ३ ॥ रामकृष्णहरि विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥ ४ ॥ याविण आणीक असतां साधन । वाहातसे आण विठोबाची ॥ ५ ॥ तुका म्हणे सोपें आहे सर्वांहुनि । शाहाणा तो धणी घेतो येथें ॥ ६ ॥ [१६९८]

(आमच्या ठिकाणीं) त्याला पूर येऊं दे २. हे पांडुरंगा, तूं आपले अंगीं माझें अंग मिळवून (प्रेमरूपी स्तनपान देऊन) माझी भूक नाहींशी करून तृप्ति दे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो प्रेमपान्हा सेवन करण्याकरितां वाईट भावना टाकून देऊन मी तुझकडे धांव घेईन ४. [१६९४]

नक्रानें (सुसरीनें) धरल्यामुळें पीडित झालेल्या गजेंद्राला त्याच्या आप्तवर्गानें टाकून दिल्यामुळें, हे पांडुरंगा, (तो पशु असूनहि) त्यानें तुझें स्मरण केलें १. हे दीनानाथा, भक्तांच्या मोहांत बुडून गेल्यामुळें गरुडवाहनाचा त्याग करून त्या गजेंद्राकरितां तूं त्वरेनें धांव घेतलीस २. धेनु आपले वत्साकरितां जशी धांवून जाते त्याप्रमाणें तूं त्वरेनें धांवून गजेंद्रास सोडविलेंस ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या वेळीं भक्तांस संकट पडेल, त्या वेळीं तें निवारण करून त्याचें रक्षण करणें हें तुझें (दीनानाथ हें) ब्रीद आहे ४. [१६९५]

अहो जन हो, ज्याकरितां चार वेद निर्माण झाले आहेत, त्या श्रीहरीचें नाम तुम्ही कंठांत धरा १. त्यावांचून दुसरें साधन करूं नका. जर (नामासारखें सोपें साधन सोडून) दुसरें साधन कराल तर त्यापासून तुम्हांला व्यर्थ कष्ट होतील २. अठरा पुराणांमध्यें नामावांचून दुसऱ्या गोष्टी नाहींत [मुख्य सारभूत नांवच आहे] ३. अर्जुनाला गीतेचा उपदेश जिनें केला, ती ही श्रीकृष्ण माउली पंढरीमध्यें विटेवर आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणून सारभूत हरीचें नाम असें जें तें तूं वाचेनें घे ५. [१६९६]

चांगलीं वाईट ठिकाणें पाहाण्यानें प्राप्त असलेला देव दुरावतो १. म्हणून आपलें मन लोकांच्या गुणदोषांकडे जाऊं देऊं नये. त्याविषयीं मनास फार संभाळावें २. उत्तम, मध्यम व कनिष्ठ (सात्विक, राजस, तामस) असे त्रिविध जन प्रचारांत आहेत. पण सर्व जनांमध्यें एक जनार्दनच खरा आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याविषयीं (मनाला आवरण्याचें) मुख्य धैर्य पाहिजे. त्यावांचून कसें चांगलें (कल्याण) होईल ? ४. [१६९७]

हरिनामसंकीर्तन करणें हें साधन फार सोपें आहे. त्या योगानें मागील अनेक जन्मांचीं पापें जळून जातील १. ह्या नामस्मरणावांचून दुसरें कोणतेहि सायास करणें नको व वनांतरास जाणें नको, ह्या योगानें नारायण सुखानें घरीं येतो. २. एका ठिकाणीं बसून व एकचित्त करून मोठ्या प्रीतीनें अनंतास आळवावें ३. 'रामकृष्णहरि विठ्ठला केशवा' ह्या मंत्राचा जप सर्वकाळ करावा ४. ह्यावांचून जर आणीक साधन असेल, तर मी विठोबारायाचीच शपथ वाहून सांगतों (दुसऱ्या साधनानें देवाची त्वरित प्राप्ति होणार नाहीं) ५. तुकाराम महाराज म्हणतात, हें सर्व साधनांपेक्षां सुलभ आहे म्हणून जो कोणी शहाणा असेल, तो ह्या ठिकाणीं आपली इच्छा पूर्ण करून घेईल ६. [१६९८]

भाविकांचें काज अंगें देव करी। काढी धर्माघरीं उच्छिष्ट तें ॥ १ ॥ उच्छिष्ट तीं फळें खाय भिल्लटीचीं। आवडी तयांची मोठी देवा ॥ २ ॥ काय देवा घरीं न मिळेचि अन्न। मागे भाजीपान द्रौपदीसी ॥ ३ ॥ अर्जुनाचीं घोडीं धुतलीं अनंतें। संकटें बहुतें निवारिलीं ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐसीं आवडती लडिवाळें। जाणिवेचें काळें तोंड देवा ॥ ५ ॥ [१६९९]

सांवळें रूपडें चोरटें चित्ताचें। उभें पंढरीचे विटेवरी ॥ १ ॥ डोळियांची धणी पाहतां न पुरे। तयालागीं झुरे मन माझें ॥ २ ॥ प्राण रिघों पाहे कुडी हे सांडूनी। श्रीमुख नयनीं न देखतां (आन गोड कांहीं न लगे संसारीं। राहिले अंतरीं पाय तुझे) ॥ ३ ॥ चित्त मोहियेलें नंदाच्या नंदनें। तुका म्हणे येणें गरुडध्वजें ॥ ४ ॥ [१७००]

आपुलिया अंगें तोडी मायाजाळ। ऐसें नाहीं बळ कोणापाशीं ॥ १ ॥ रांडापोरें त्याग करी कुटुंबाचा। नावरे हे वाचा आणि मन ॥ २ ॥ (हर्षामर्ष जों हे नाहीं हो जिराले। तोंवरी हे केले चार त्यांनीं ॥ ३ ॥) मुक्त झालों ऐसें बोलों जाये मुखें। तुका म्हणे दुःखें बांधला तो ॥ ४ ॥ [१७०१]

आलिया अतीता म्हणतसां पुढें। आपुलें रोकडें सत्व जाय ॥ १ ॥ काय त्याचा भार घेऊनि मस्तकीं। हीनकर्मी लोकीं म्हणावया ॥ २ ॥ दारीं हाका कैसें करवतें भोजन। रुची तरि अन्न कैसें देतें ॥ ३ ॥ तुका म्हणे ध्वज उभारिला कर। ते शक्ति उदार काय झाली ॥ ४ ॥ [१७०२]

जेथें लक्ष्मीचा वास। गंगा आली पापा नास ॥ १ ॥ तुझीं पाउलें सकुमार। तेथें मन माझें

जे कोणी परम भाविक भक्त आहेत त्यांचीं कामें देव स्वतः करतात. (ह्याविषयीं मागील पुरावे असे आहेत, कीं) धर्माचे घरीं राजसूययज्ञांत भगवंतांनीं स्वतः उष्टीं काढलीं १. भिल्लिणीचीं उष्टीं बोरें भगवंतांनीं सेवन केलीं, कारण देवाला त्यांची फार आवड आहे २. देवास काय घरीं अन्न मिळत नव्हतें म्हणून त्यानें द्रौपदीजवळ भाजीचें पान मागितलें ? ३. अनंतानें अर्जुनाचीं घोडीं धुवून त्याचीं अनेक संकटें निवारण केलीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, असे हे भाविक लाडके भक्त देवास फार आवडतात. ज्यांच्यामध्यें ज्ञानाची घमेंड आहे ते काळतोंडे आहेत ५. [१६९९]

पंढरीस विटेवर जें पांडुरंगाचें सांवळें रूप आहे, तें भक्तांचें चित्त हरण करणारें आहे १. त्याचें रूप डोळ्यांनीं कितीहि पाहिलें तरी डोळ्यांची तृप्ति होत नाहीं. त्या स्वरूपाच्या भेटीविषयीं माझें मन रात्रंदिवस झुरत आहे २. तें श्रीमुख जर डोळ्यांना दिसलें नाहीं, तर देहांतून प्राण बाहेर जाण्याची वेळ येते (संसारांत दुसरी कोणतीहि गोष्ट मला गोड वाटत नाहीं. तुझे पायच माझ्या चित्तांत राहिले आहेत) ३. तुकाराम महाराज म्हणतात, नंदाचा मुलगा जो गरुडध्वज त्यानें माझें चित्त मोहित केलें आहे ४. [१७००]

(देव आणि गुरु ह्यांच्या साह्यावांचून) आपल्या स्वसामर्थ्यानें मायाजाळांतून मुक्त होईल, अशी शक्ति कोणाजवळ नाहीं १. फार झालें तर एखादा स्त्रीपुत्रादि कुटुंबाचा त्याग करील, पण रसना [जिव्हा] व मन ह्यांचा निग्रह कधींहि होणार नाहीं २. (हर्ष, द्वेष हे जोंपर्यंत नाहींसे झाले नाहींत तोंपर्यंतच हे संसारी लोक नाना चार-सोंगें ढोंगें करतात ३). तुकाराम महाराज म्हणतात, तोंडानें मी मुक्त झालों असें म्हणतात पण ते खरोखर दुःखानें बद्ध झालेले असतात ४. [१७०१]

आपल्या दारांत आलेल्या याचकांस यथाशक्ति धर्म न करतां 'जा चालता हो' असें म्हटलें तर आपलें सत्त्व (पुण्य) नाहींसें होतें १. याचकाच्या येरझारीचा भार मस्तकावर घेऊन, लोकांकडून आपणांस कर्महीन, क्रियानष्ट म्हणवून घेतां कीं काय ? २. याचकास बाहेर अन्नाकरितां ओरडत ठेवून घरांत तुम्हांला भोजन तरी कसें करवतें, व तें अन्न तुम्हांला रुचि तरी कसें देतें ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, सर्व याचकांना मी इच्छिलेलें देणारा आहें, असा जो ध्वज तुम्हीं उभारला होता, ती तुमची उदारशक्ति काय झाली ? ४. [१७०२]

ज्या ठिकाणीं हरीचे चरण आहेत तेथें लक्ष्मीचें वास्तव्य आहे व जेथें (ज्या चरणापासून) गंगा आली आहे तेथें पापाचा नाश आहे (हरि, लक्ष्मी आणि गंगा ह्यांचा संगम पाप, ताप आणि दैन्य ह्यांचा नाश करितो) १. देवा, तुझें

भ्रमर ॥ २ ॥ ठाव धरिला संतजनीं । सुखें राहिले लपोनी ॥ ३ ॥ तुका म्हणे वांकी । भाट जाली तिहीं लोकीं ॥ ४ ॥ [१७०३]

रूपीं जडले लोचन । पायीं स्थिरावलें मन ॥ १ ॥ देहभाव हरपला । तुज पाहातां विठ्ठला ॥ २ ॥ कळों नेदी सुखदुःख । तहान हरपली भूक ॥ ३ ॥ तुका म्हणे नव्हे परती । तुझ्या दर्शनें मागुती ॥ ४ ॥ [१७०४]

जाणतें लेंकरूं । माता लागे दूरी (दूर) धरूं ॥ १ ॥ तैसें न करीं कृपावंते । पांडुरंगे माझे माते ॥ २ ॥ नाहीं मुक्ताफळा । भेटी मागुती त्या जळा ॥ ३ ॥ तुका म्हणे लोणी । ताक सांडी निवडूनी ॥ ४ ॥ [१७०५]

तुजविण कोणां । शरण जाऊं नारायणा ॥ १ ॥ ऐसा न देखें मी कोणी । दुजा तीहीं त्रिभुवनीं ॥ २ ॥ पाहिलीं पुराणें । धांडोळिलीं दरुषणें ॥ ३ ॥ तुका म्हणे ठायीं । जडून ठेलों तुझे पायीं ॥ ४ ॥ [१७०६]

ऐसें भाग्य कई लाहाता होईन । अवघें देखें जन ब्रह्मरूप ॥ १ ॥ मग तया सुखा अंत नाहीं पार । आनंदें सागर हेलावती ॥ २ ॥ शांति क्षमा दया मूर्तिमंत अंगीं । परावृत्त संगीं कामादिकां ॥ ३ ॥ विवेकासहित वैराग्याचें बळ । धगधगित ज्वाळ अग्नि जैसा ॥ ४ ॥ भक्ति नवविधा भावशुद्ध वरी । अलंकारावरी मुगुटमणि ॥ ५ ॥ तुका म्हणे माझी पुरवी वासना । कोण नारायणा तुजविण ॥ ६ ॥ [१७०७]

कासया करावे तपाचे डोंगर । आणीक अपार दुःखरासी ॥ १ ॥ कासया फिरावे अनेक ते देश ।

चरणकमल नाजूक आहे. त्या ठिकाणीं माझें मन भ्रमर आहे २. त्याच ठिकाणीं संतजन हे (देहांतीं) लीन होऊन सुखानें राहिले आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या पायाची वांकी (वेदादि, तसेंच लक्ष्मी आणि गंगा) त्रैलोक्यांत कीर्ति वर्णन करणारी झाली आहे ४. [१७०३]

माझे डोळे तुमच्या रूपाच्या ठिकाणीं जडून गेले आहेत व तुमच्या चरणीं माझें मन स्थिरावलें आहे १. हे विठ्ठला, तुला पाहाण्यानें माझा देहात्मभाव नाहींसा झाला २. तुझ्या दर्शनानें सुखदुःखाचें भान नाहींसें झालें व क्षुधातृषाहि नाहींशी झाली ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझें दर्शन झाल्यानें प्रपंचपरावर्तन (पुन्हां प्रपंचांत पडणें) नाहीं ४. [१७०४]

समज आलेल्या मुलास आई दूर करूं लागते १. त्याप्रमाणें हे पांडुरंगे, कृपावंत माते, मला करूं नकोस २. ज्या पाण्यापासून मोतीं उत्पन्न होतात त्या पाण्याची भेट पुनः त्यांना होत नाहीं (त्यांचें फिरून पाणी होत नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, मंथनानें ताकापासून लोणी निवडलें जातें [तें पुनः ताकांत मिसळत नाहीं त्याप्रमाणें तुझ्या निर्गुण रूपाचें ज्ञान झाल्यावर सगुण हें असार आहे असें समजून सगुणाचा त्याग माझ्याकडून घडेल असें करूं नकोस] ४. [१७०५]

हे नारायणा, तुझ्यावांचून मी कोणाला शरण जाऊं ? १. कारण तुमच्यासारखा त्रैलोक्यांत मला सर्वसमर्थ कोणी दिसत नाहीं २. सर्व पुराणेंहि पाहिलीं व शास्त्रांचाहि शोध घेतला ३. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणून तुझ्या चरणीं मी जडून गेलों आहें ४. [१७०६]

मी सर्व जगत् ब्रह्मरूप पाहीन असें भाग्य मला कधीं प्राप्त होईल ? १. असें भाग्य प्राप्त झाल्यावर जें सुख आहे तें अनंत अपार असून त्या आनंदानें (आनंदाच्या भरतीनें प्रेमाचा) सागर उचंबळत आहे २. कामक्रोधादि विकारांपासन हृदय परावृत्त झाल्यामुळें त्या ठिकाणीं शांति, दया, क्षमा ह्या दैवी संपत्ति मूर्तिमंत बिंबल्या आहेत ३. धगधगीत अग्निज्वाळेप्रमाणें सविवेक वैराग्याचें सामर्थ्य आहे ४. शुद्धभावानें होणारी श्रवणकीर्तनादि नवविधा भक्ति ही सर्व अलंकारांमध्यें श्रेष्ठ आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, तुमच्यावांचून असें भाग्य मिळण्याविषयींची माझी ही इच्छा कोण पूर्ण करील ? ६. [१७०७]

डोंगरासारखीं तपें कशाकरितां करावींत व अन्य अपार दुःखें देणारीं साधनें कां करावीं ? १. अनेक देशदेशांतरें

दावितील आस पुढें लाभ ॥ २ ॥ कासया पुजावीं अनेक दैवतें । पोट भरे तेथें लाभ नाहीं ॥ ३ ॥ कासया करावे मुक्तीचे सायास । मिळे पंढरीस फुकासाठीं ॥ ४ ॥ तुका म्हणे करीं कीर्तन पसारा । लाभ येईल घरा पाहिजे तो ॥ ५ ॥ [१७०८]

वैष्णव मुनि विप्रांचा सन्मान । करावा आपण घेऊं नये ॥ १ ॥ प्रभु झाला तरी संसाराचा दास । विहित तयास यांची सेवा ॥ २ ॥ तुका म्हणे हे आशीर्वादें बळी । जाईल तो छळी नरका यांसी ॥ ३ ॥ [१७०९]

देव वसे चित्तीं । त्याची घडावी संगती ॥ १ ॥ ऐसें आवडतें मना । देवा पुरवावी वासना ॥ २ ॥ हरिजनांसीं (संतजनासवें) भेटी । न हो अंगसंगें तुटी ॥ ३ ॥ तुका म्हणे जिणें । भलें संतसंघट्टणें ॥ ४ ॥ [१७१०]

भाग सीण गेला । माझा सकळ विठ्ठला ॥ १ ॥ तुझा म्हणवितों दास । केली उच्छिष्टाची आस ॥ २ ॥ राहिली तळमळ । तईं पासूनि सकळ ॥ ३ ॥ तुका म्हणे धालें । पोट ऐसें कळों आलें ॥ ४ ॥ [१७११]

रायाचे सेवक । सेवटींचें पीडी रंक ॥ १ ॥ हा तों हिणाव कवणा । कां हो नेणां नारायणा ॥ २ ॥ परिसेंसीं भेटी । नव्हे लोहोपणा तुटी ॥ ३ ॥ तुझें नाम कंठीं । तुक्या काळासवें भेटी ॥ ४ ॥ [१७१२]

सुखरूप ऐसा (सुखरूप) दुजा कोण सांगा (ऐसें कोण दुजें सांगा) । माझ्या पांडुरंगा सारिखा तो (सारिखें तें) ॥ १ ॥ न लगे हिंडणें मुंडणें तें कांहीं । साधनाची नाहीं आटाआटी ॥ २ ॥

कशाला फिरावीं ? तीं देशांतरें पुढें (पुढच्या जन्मांत) लाभांची आशा दाखवितील २. अन्य देवतांचें पूजन कशाकरितां करावें ? कारण त्याच्यापासून तृप्ति घेणारास आपलें पोट भरण्यापलीकडे लाभ होणार नाहीं ३. मुक्ति प्राप्त होण्याविषयीं कशासाठीं यत्न करावे ? ती तर पंढरीस फुकट मिळते ४. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वत्र हरिकीर्तनाचा प्रसार कर, त्या योगानें पाहिजे तो लाभ तुझ्या घरीं चालून येईल ५. [१७०८]

रात्रंदिवस हरिस्वरूपाचें मनन करणाऱ्या हरिभक्त संतांचा, संन्याशांचा व मुनींचा, ब्राह्मणांचा सत्कार करावा. त्यांचा मान आपण घेऊं नये [तो त्यांचा त्यांना द्यावा] १. राजा असला म्हणून काय झालें ? तो तरी संसाराचा दास आहे ना ? अर्थात् त्याचेंहि कर्तव्य त्यांची सेवा करणें हें होय २. तुकाराम महाराज म्हणतात, संत व ब्राह्मण ह्यांच्यामध्यें दुसऱ्यास आशीर्वाद देण्याचें सामर्थ्य असतें, म्हणून त्यांचा जो कोणी छळ करील तो नरकास जाईल ३. [१७०९]

ज्याच्या चित्तामध्यें निरंतर देवाची वस्ती आहे, त्याची संगति मला मिळावी १. देवा, हेंच माझ्या मनास आवडत आहे, म्हणून तूं ही माझी वासना-इच्छा पूर्ण कर २. हरिभक्तांची भेट होऊन निरंतर त्यांची संगति घडावी, ह्यांत अंतराय (अडथळा) येऊं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांच्या संगतींत जगणें हें मला सर्वांत बरें वाटतें ४. [१७१०]

हे विठ्ठला, माझा सर्व शीणभाग नाहींसा झाला १. मी तुझा दास आहें असें म्हणवितों, म्हणून तुझ्या उच्छिष्टाची आशा केली आहे २. ज्या वेळेस मी तुला अनुसरलों (तुझा दास झालों) त्या वेळेपासून माझी सर्व तळमळ नाहींशी झाली ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझें पोट भरलें (मन तृप्त झालें) असें मला वाटतें ४. [१७११]

राजाच्या सेवकांना नीच रंकांनीं पीडा करावी १. अहो नारायणा, हा कमीपणा कोणाला आहे, हें तुम्हांला कळत नाहीं काय ? २. परिसाचा व लोखंडाचा संबंध होऊनहि लोखंडाचा लोखंडपणा नाहींसा झाला नाहीं तर ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझें नाम निरंतर कंठामध्यें वागवून आम्हीं काळाच्या तडाख्यांत सांपडावें काय ? (हा कमीपणा तुम्हांला आहे) (तिसऱ्या व चवथ्या कडव्याचा संबंध ध्रुवपदाशीं आहे) ४. [१७१२]

माझ्या पांडुरंगाप्रमाणें दुसरा कोणी सुख-रूप (मूर्तिमंत सुख) असल्यास सांगा १. त्या पांडुरंगाला सोडून अन्य ठिकाणीं कोठेंहि हिंडूं नये व पंढरींत (क्षौर) मुंडणादि व्यवहार करूं नये व कोणत्याच (श्राद्ध) साधनादि

चंद्रभागें स्नान विध तो हरिकथा। समाधान चित्ता सर्वकाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे काला वैकुंठीं दुर्लभ। विशेष तो लाभ संतसंगें ॥ ४ ॥ [१७१३]

नसतां अधिकार। उपदेशासी बळात्कार। तरि ते केले चार। माकडा आणि गारोडी ॥ १ ॥ धन धान्य राज्य बोल। वृथा रंजवणें फोल। नाहीं तेथें ओल। बीज वेंची मूर्ख तो ॥ २ ॥ न ये बांधों गांठीं। पदरा आणी ऐसी तुटी। असोन कसोटी। शिष्टाचार अनुभव ॥ ३ ॥ उपदेसी तुका। मेघ वृष्टीनें आइका। संकल्पासी धोका। सहज तें उत्तम ॥ ४ ॥ [१७१४]

घालुनियां मापीं। देवभक्त बैसले जपीं ॥ १ ॥ तैसी होते सांडउलंडी। निजनिजांची मुकुंडी ॥ २ ॥ अमूपीं उखतें। आपण वोस आपण यातें ॥ ३ ॥ देव आतां झाला। उगवे संकोच वहिला ॥ ४ ॥ अखंड नेलें वेठी। भार सत्याविण गांठी ॥ ५ ॥ आडकिला झोंपा। रिता कळिवराचा खोंपा ॥ ६ ॥ गोदातीरीं आड। करिते करविते द्वाड ॥ ७ ॥ तुका म्हणे बळें। उपदेशाचें तोंड काळें ॥ ८ ॥ [१७१५]

उंबरांतील कीटका। हेंचि ब्रह्मांड ऐसें लेखा ॥ १ ॥ ऐसीं उंबरें किती झाडीं। ऐशीं झाडें किती नव खंडीं ॥ २ ॥ हेंचि ब्रह्मांड आम्हांसी। ऐसीं अगणित अंडें कैसीं ॥ ३ ॥ विराटाचे अंगीं तैसे। मोजूं जातां अगणित केश ॥ ४ ॥ ऐशा विराटाच्या कोटी। सांठवल्या ज्याच्या पोटीं ॥ ५ ॥

खटाटोपींत पडूं नये २. पंढरीस जाऊन चंद्रभागेचें स्नान करावें व हरिकीर्तन करावें (हरिकथा ऐकावी) हाच तेथील विधि आहे. त्या योगानें सर्वकाळ चित्ताचें समाधान असतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरीच्या चिंतनरूपी काल्याचा लाभ (दहीं-लाह्यांचा, हरिनामाचा आणि जीव-ब्रह्माचा अभेदरूप काला, त्याचा लाभ) वैकुंठांत दुर्लभ आहे. त्याचा विशेष लाभ संतांच्या संगतीनें [पंढरींत] होतो ४. [१७१३]

एखादा (ब्रह्मज्ञान ऐकण्याला) अनधिकारी असतांना त्याला बळेंच उपदेश करणें, हें गारोड्यानें माकडाला नाचविल्याप्रमाणें चेष्टा आहे १. धनधान्य, राज्यविषयक (तुम्ही धन-धान्य पिकवा, सत्ता मिळवा, ऐश्वर्य भोगा असे) जे शब्द आहेत, ते जरी जनरंजक (बरे वाटणारे) आहेत तरी फोलकट (व्यर्थ) आहेत. ज्या जमिनीमध्यें ओल नाहीं, तेथें जो बीं पेरतो तो मूर्ख आहे २. श्रेष्ठाचाराच्या अनुभवाची कसोटी असून ज्यामध्यें नुकसान असेल तें आपल्या पदरीं घेऊं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, मेघवृष्टीनें मी जो उपदेश करतों तो ऐका. विशिष्ट व्यक्तीस उपदेश करण्याचा संकेत धरून उपदेश करणें धोक्याचें आहे, म्हणून सहजासहजीं अभंगद्वारा मेघवृष्टीप्रमाणें सर्वांना उपदेश करणें हें उत्तम ४. [१७१४]

कितीएक ढोंगी भक्त अमाप—व्यापक देवाला मापामध्यें (मर्यादेंत) आणून खोटाच जप करीत बसतात १. हें त्यांचें आपापल्या ठिकाणीं देहबुद्धीची मुरकुंडी देऊन जें करणें होत आहे, ती सर्व पूर्ण परमात्म्याचीं सांडलवंड होत आहे २. (परमात्म्याचें रूप असंख्य-अमर्याद) असतांना त्या ठिकाणीं मर्यादित हरिस्वरूप आहे, असें मानणारांनीं आपला आपलेपणा नाहींसा केला ३. देवाची अमूक एक मर्यादा ठरवून, हेंच एक देवाचें रूप आहे, त्याच्यापुढें आतां देव नाहीं, तो संपला असा उपदेश करतात व सांगतात कीं ह्या संबंधाचा तूं त्वरेनें संकोच टाक व आम्हीं सांगितलेलें निश्चयानें मान ४. सत्य परमात्म्याला सोडून मिथ्या मायिक ओझें पदरीं बांधून त्यांनीं आपलें अखंड आत्मस्वरूप जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत घातलें ५. पोकळ देहबुद्धीच्या खोपटास भ्रमरूपी झडप लावून ते अडकून पडले ६. गोदावरीच्या तीरावर जे कोणी पाणी पिण्याकरितां व स्नानाकरितां आड खणतात, तें त्यांचें करणें वाईट आहे ७. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें सर्वत्र नित्य परिपूर्ण सहज आत्मस्वरूप असतांना त्या ठिकाणीं मर्यादित नामरूपात्मक देवाची कल्पना बळेंच करून त्याविषयींचा शिष्याचे कानांत जे अनुग्रह देतात त्यांचें तोंड काळें आहे ८. [१७१५]

उंबराच्या फळांत असणाऱ्या कीटकांना उंबर हेंच ब्रह्मांड आहे असें वाटतें १. परंतु विचार करून पाहिलें, तर एका उंबराच्या झाडास उंबराचीं फळें किती तरी आहेत व असलीं उंबराची झाडें ह्या नवखंड पृथ्वींत किती तरी आहेत २. तसें, आम्हांला जें ब्रह्मांड वाटतें अशीं ब्रह्मांडें विराटाचे एका केंसावर किती तरी आहेत ३. व ते केंस विराटाचे आंगावर मोजावयास गेलें तर तेहि असंख्य आहेत ४. अशीं कोट्यावधि विराट स्वरूपें ज्या परमात्म्याचे स्वरूपांत आहेत ५.

तो हा नंदाचा बाळ मुकुंद । तान्हा म्हणवी परमानंद ॥ ६ ॥ ऐसी अगम्य ईश्वर लीळा। ब्रह्मानंदीं गम्य तुकयाला ॥ ७ ॥ [१७१६]

ब्रह्मज्ञान जरी एके दिवशीं कळे । तात्काळ हा गळे अभिमान ॥ १ ॥ अभिमान लागे शुकाचिये पाठी । व्यासें उफराटी दृष्टी केली ॥ २ ॥ जनकभेटीसी पाठविला तेणें । अभिमान नाणें खोटें केलें ॥ ३ ॥ खोटें करूनियां लाविला अभ्यासीं । मेरुशिखरासी शुक गेला ॥ ४ ॥ जाउनियां तेणें साधिली समाधी । तुका म्हणे तधीं होतों आम्ही ॥ ५ ॥ [१७१७]

सहज पावतां भगवंतीं । परि हीं विकल्पें परतीं । फुकाची हे चित्तीं । आठवण न धरिती ॥ १ ॥ हरि व्यापक सर्वगत । हा तव मुख्यत्वें वेदांत । चिंतनासी चित्त । असों द्यावें सावध ॥ २ ॥ विरजाहोम याचि नांवें । देह नव्हे मी हें जाणावें । मग कां जी यावें । वरी लागे संकल्पा ॥ ३ ॥ कामक्रोधें देह मळिण । स्वाहाकारीं कैंचें पुण्य । मंत्रीं पूजिलीया यज्ञ । मनमुंडण नव्हेचि ॥ ४ ॥ अनन्यभक्तीचे उपाय । ते या विठोबाचे पाय । ध्याइल तो काय । चुकों जाणे मारग ॥ ५ ॥ आतां सांगे तुका । एक तुम्ही चुकों नका । सांडी मांडी धोका । शरण रिघतां गोमटें ॥ ६ ॥ [१७१८]

आम्हीं जाणावें तें काई । तुझें वर्म कोणे ठायीं । अंतपार नाहीं ऐसें श्रुति बोलती ॥ १ ॥ होईं मज तैसा मज तैसा साना सकुमार हृषीकेशा। पुरवीं माझी आशा भुजा चारी दाखवीं ॥ २ ॥

तोच परमानंदस्वरूप परमात्मा बालमुकुंद ह्या नांवानें आपणास नंदाचा तान्हा मुलगा म्हणवीत आहे ६. तुकाराम महाराज म्हणतात, अशी श्रीहरीची लीला मोठी अगम्य आहे; पण आनंदस्वरूप परब्रह्माच्या ठिकाणीं माझी वस्ती झाल्यामुळें (मला ब्रह्मानंदाचा अनुभव आला म्हणून) ती मला कळली ७. [१७१६]

ब्रह्मज्ञान हें एका दिवसांत कळण्यासारखें असतें तर तात्काळ सर्वांचा अभिमान गलित (नष्ट) झाला असता १. शुकासारख्या ब्रह्मनिष्ठाचे मागें अप्सरांच्या भाषणानें लागलेला अभिमान, व्यासांनीं त्याच्याकडे अंतर्दृष्टीनें पाहिलें तेव्हां त्यांना दिसला २. मग व्यासांनीं शुकास तूं जातां जातां जनकाची भेट घेऊन जा अशी आज्ञा केली व त्याप्रमाणें शुकानें जनकाची भेट घेतल्यावर जनकाकडून त्यास ब्रह्म-उपदेश होऊन तद्द्वारा त्याच्या अभिमानाचें निरसन झालें (देहाचा अभिमान खोटा आहे असें त्याला कळलें) ३. नंतर शुकास ब्रह्मचिंतनाचा अभ्यास लावून दिला. तो साधण्याकरितां शुक हा मेरुपर्वतावर गेला ४. तुकाराम महाराज म्हणतात, नंतर त्यानें ज्या वेळीं तेथें समाधि साध्य करून घेतली (ब्रह्मज्ञान होणें आणि अभिमान जाणें हें महा कठिण काम आहे, हें शुकाचार्यांच्या दृष्टांतावरून तुकाराम महाराज पटवून देतात) त्या वेळेस आम्ही तेथें होतों ५. [१७१७]

कायिक, वाचिक व मानसिक जीं कर्मे होत आहेत तीं सहज भगवंताला अर्पण होतात; पण तीं मीं केलीं असा विकल्प केल्यानें तीं भगवंताला अर्पण न होतां परत आपल्या गळ्यांत येतात. ह्याकरितां जीं कर्मे होत आहेत त्यांचा कर्ता मी नाहीं, मी अक्रिय, असंग आहें (कर्ता करविता हरिच आहे) अशी चित्तांत फुकटची आठवण कां ठेवीत नाहींत १. हरि हा सर्वगत सर्वव्यापी आहे, हाच मुख्यत्वेंकरून वेदान्त–सिद्धान्त (उपनिषदांचा मुख्य सिद्धान्त) आहे. ह्याकरितां त्या सर्वव्यापी परमात्म्याच्या चिंतनाविषयीं चित्त सावध ठेवावें २. देह हें माझें स्वरूप नाहीं असें आत्मानात्म विचारानें जाणावें; ह्यालाच खरा संन्यास म्हणतात. अशा प्रकारचा (संन्यासाश्रमाचा स्वीकार करतेवेळीं शास्त्रोक्त 'विरजा होम' करून) संन्यास घेतल्यावर मग अहो जी, देह मी आहें अशा संकल्पावर यावें लागेल का ? ३. कामक्रोधादिवृत्तीनें अंतःकरण मलिन झालें असून अग्नीमध्यें हुतद्रव्याचा कितीहि स्वाहाकार केला तरी त्यांत काय पुण्य आहे ? जर खरोखर मनाचें मुंडण झालें नाहीं तर मंत्रद्वारा यज्ञयजनाचें फळ काय आहे ? ४. एक विठोबारायाची अनन्य भक्ति करावी. हाच काय तो उपाय आहे; म्हणून त्याच्या चरणाचें अनन्यभावानें जो ध्यान करील तो मार्ग चुकेल काय ? ५. तुकाराम महाराज म्हणतात, मी हेंच एक तुम्हांला सांगतों, तें करण्याविषयीं तुम्ही चुकूं नका. तें हें, कीं विठोबारायाला अनन्यभक्तीनें शरण जाणें हें चांगलें; त्यावांचून इतर खटाटोपी करण्यांत धोका आहे ६. [१७१८]

देवा, आम्ही तुझ्या प्राप्तीचें मर्मस्थान (निर्गुण रूपाच्या ज्ञानाचें वर्म) कोणतें आहे हें कसें जाणावें ! कारण तुझें स्वरूप अनंत, अपार आहे असें श्रुति सांगत आहेत १. म्हणून तूं माझ्या भावनेप्रमाणें लहान, सुकुमार, मर्यादित हो,

खालता सप्तही पाताळां वरता स्वर्गाहूनि ढिसाळा। तो मी मशक डोळां कैसा पाहों आपुल्या ॥ ३ ॥ मज असे हा भरंवसा पढिये होसी तयां तैसा। पंढरीनिवासा तुका म्हणे गा विठोबा ॥ ४ ॥ [१७१९]

वृक्ष वल्ली आम्हां सोयरीं वनचरें। पक्षीही सुस्वरें आळविती ॥ १ ॥ तेणें सुखें रुचे एकांताचा वास। नाहीं गुणदोष अंगा येत ॥ २ ॥ आकाश मंडप पृथिवी आसन। रमे तेथें मन क्रीडा करी ॥ ३ ॥ कथा कमंडलु देहउपचारा। जाणवितो वारा अवसरू ॥ ४ ॥ हरिकथा भोजन परवडी विस्तार। करोनि प्रकार सेवूं रुची ॥ ५ ॥ तुका म्हणे होय मनासी संवाद। आपुलाचि वाद आपणांसी ॥ ६ ॥ [१७२०]

अनंत ब्रह्मांडें। एके रोमीं ऐसें धेंडें ॥ १ ॥ तो हा गौळियांचे घरीं। उंबरा चढतां टेंका धरी ॥ २ ॥ मारी दैत्य गाढे। ज्यांचे पुराणीं पवाडे ॥ ३ ॥ तुका म्हणे कळा। अंगीं जयाच्या सकळा ॥ ४ ॥ [१७२१]

सावधान ऐसें काय तें विचारा। आले हो संसारा सकळही ॥ १ ॥ अंतीं समयाचा करणें विचार। वेंचती सादर घटिका पळें ॥ २ ॥ मंगळ हें नोहे कन्यापुत्रादिक। राहिला लौकिक अंतरपाट ॥ ३ ॥ तुका म्हणे देव अंतरला दुरी। डोळिया अंधारी पडलीसे ॥ ४ ॥ [१७२२]

लवण मेळवितां जळें। काय उरलें निराळें ॥ १ ॥ तैसा समरस झालों। तुजमाजी हरपलों ॥ २ ॥ अग्निकर्पूराच्या मेळीं। काय उरली काजळी ॥ ३ ॥ तुका म्हणे होती। तुझी माझी एक ज्योती ॥ ४ ॥ [१७२३]

हे हृषीकेशा, एवढी माझी आशा तुम्ही आपलें चतुर्भुज रूप दाखवून पूर्ण करा २. तुझें स्वरूप सप्तहि पाताळांचे खालीं आहे व वरच्या बाजूस असणाऱ्या सप्त स्वर्गांच्याहि पलीकडे आहे. असें तुझें अवाढव्य स्वरूप, घुंगुरड्यासमान असणारा जो मी तो, आपल्या डोळ्यानें कसें पाहूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अगा पंढरीनिवासा विठोबा, मला ही खात्री आहे, कीं जो जशी आवड धरील त्याप्रमाणें तुम्ही होतां ४. [१७१९]

अनेक प्रकारचे वृक्ष व वेल–लता, वनांत असणारे वनचर–वन्य पशु आणि सुस्वरानें गायन करणारे पक्षी हे आमचे सोयीरसंबंधी आहेत १. त्या सुखानें आम्हांला एकांताचा वास हा मोठा प्रिय झाला आहे; तेथें कोणताहि गुणदोष आपल्याकडे येत नाहीं २. आकाश हा मंडप आहे व पृथ्वी ही बसण्याचें आसन आहे, म्हणून जेथें आमचें मन रमेल तेथें आम्ही क्रीडा करूं ३. आमच्या देहरक्षणाचीं साधनें गोधडी व भोपळ्याचा कमंडलू हीं आहेत व वेळ किती झाला हें समजविणारा वारा आहे ४. त्या ठिकाणीं आम्ही हरिकथेच्या भोजनाची रुचि एका पंक्तीनें बसून अनेक प्रकारांनीं घेऊं ५. तुकाराम महाराज म्हणतात, एकांतामध्यें आपल्याच मनाशीं आपण संवाद करूं. अशा तऱ्हेनें आपलाच संवाद आपणाशीं होतो ६. [१७२०]

अनंत ब्रह्मांडें ज्याच्या एका रोमावर आहेत असें जें अफाट स्वरूप १. तेंच ह्या गौळ्यांचे घरीं उंबरा चढून जाण्याचे वेळीं हाताचा टेका घेतें २. मोठमोठे बलाढ्य दैत्य लहानपणींच मारले अशी ज्याची कीर्ति पुराणांमध्यें आहे ३. आणि तुकाराम महाराज म्हणतात, सर्व कला-चातुर्य ज्याच्या आंगीं वसत आहेत ४. [१७२१]

अहो संसाराला आलेले सर्व जन हो, सावधान स्थितीचा विचार करा १. अंतकाळाचा सर्वांनीं विचार करीत असावें व जीं घटकापळें जात आहेत, तीं सर्व प्रपंचाच्या आदरांत जात आहेत ह्याकरितां (आपण मनुष्यजन्माला आलों तेव्हां आतां कोणतें कर्तव्य योग्य आहे ह्याचा सावधपणानें विचार करा) [पुढें ध्रुवपद वाचावें] २. कन्यापुत्रादिकांचा मोह धरणें हें खरें मंगल नाहीं. ह्यांच्या संबंधानें परमात्म्यांत व आपल्या दरम्यान एक लौकिकाचा पडदा राहातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यांच्या संगतीनेंच देव दूर अंतरला आहे आणि दृष्टिहि अविवेकाच्या अंधारांत पडली आहे ४. [१७२२]

पाण्यामध्यें मीठ घातलें, तर तेथें वेगळें काय उरतें? १. त्याप्रमाणें हे देवा, माझा जीवात्मा तुमच्या स्वरूपीं समरसतेला पावून तो नाहींसा झाला २. अग्नि आणि कापूर ह्यांच्या योगामध्यें अखेरीस कांहीं रक्षा राहाते काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, जशा दोन्ही वाती एका ठिकाणीं मिळाल्या म्हणजे एक ज्योत होते, तद्वत् तुझी व माझी एक ज्योत झाली ४. [१७२३]

सुख नाहीं कोठें आलिया संसारीं । वायां हांवभरी होऊं नका ॥ १ ॥ दुःखबांदवडी आहे हा संसार । सुखाचा विचार नाहीं कोठें ॥ २ ॥ चवदा कल्पेंवरी आयुष्य जयाला । परी तो राहिला ताटीतळीं (खालीं) ॥ ३ ॥ तुका म्हणे वेगीं जाय सुटोनियां । धरूनि हृदयामाजी हरि ॥ ४ ॥ [१७२४]

तुज करितां होय ऐसें कांहीं नाहीं । डोंगराची राई रंक राणा ॥ १ ॥ अशुभचि शुभ करितां तुज कांहीं । अवघड नाहीं पांडुरंगा ॥ २ ॥ सोळा सहस्र नारी ब्रह्मचारी कैसा । निराहारी दुर्वासा नवल नव्हे ॥ ३ ॥ पंचभ्रतारां द्रौपदी सती । करितां पितृशांति पुण्य धर्मा ॥ ४ ॥ दशरथ पातकें ब्रह्महत्यारासी । नवल त्याचे कुशीं जन्म तुझा ॥ ५ ॥ मुनेश्वरा नाहीं दोष अणुमात्र । भांडवितां सूत्र वध होती ॥ ६ ॥ तुका म्हणे माझे दोष ते कायी । सरता तुझे पायीं झालों देवा ॥ ७ ॥ [१७२५]

उभ्या बाजारांत कथा । हें तों नावडे पंढरीनाथा ॥ १ ॥ अवघें पोटासाटीं ढोंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥ २ ॥ लावी अनुसंधान । कांहीं देईल म्हणऊन ॥ ३ ॥ काय केलें रांडलेका । तुला राजी नाहीं तुका ॥ ४ ॥ [१७२६]

असोत लोकांचे बोल शिरावरी । माझी मज बरी विठाबाई ॥ १ ॥ आपंगिलें मज आहे ते कृपाळू । बहुत कनवाळु अंतरींची ॥ २ ॥ वेदशास्त्रें जिसी वर्णिती पुराणें । तिचें मी पोसणें लडिवाळ ॥ ३ ॥ जिचें नाम कामधेनु कल्पतरू । तिचें मी लेंकरूं तुका म्हणे ॥ ४ ॥ [१७२७]

वाराणसी गया पाहिली द्वारका । परी नये तुका पंढरीच्या ॥ १ ॥ पंढरीसी नाहीं कोणा

देहादि संसारामध्यें पाहूं गेलें तर कोठेंहि सुख नाहीं. ह्याकरितां सुखाविषयींची व्यर्थ हांव धरूं नका १. सकल संसार हा दुःखाचाच बंदिखाना आहे. त्या ठिकाणीं सुखानुभव कोठेंहि नाहीं २. म्हणूनच चौदा कल्पपर्यंत मार्कंडेयास जरी आयुष्य होतें, तरी देहादि संसाराचा लोभ न धरतां सूर्याच्या उष्णतेचा ताप न व्हावा म्हणून सूर्याचे आड एक कामटीची ताटी करून तो दैन्य भोगीत राहिला ३. तुकाराम महाराज म्हणतात, तूं आपल्या हृदयांत हरिस्वरूपाचें चिंतन करून त्वरेनें ह्या संसारांतून मुक्त हो ४. [१७२४]

देवा, तूं मनामध्यें आणलेंस तर काय काय होणार नाहीं ? सर्व कांहीं करशील. डोंगराची मोहरी व रंकाचा राजा करण्याचें तूं मनांत आणलेंस तर सहज होईल १. हे पांडुरंगा, अशुभाचें शुभ करणें, हें तुला कांहीं अवघड नाहीं २. सोळा हजार बायका असून तूं देव ब्रह्मचारी कसा आहेस ह्यासंबंधीं इतरांना आश्चर्य वाटतें. तसेंच साठ खंडी अन्न खाऊन निराहारी असणाऱ्या दुर्वासाबद्दल नवल नाहीं ३. पांच पांडवांची बायको एक द्रौपदी असून ती पतिव्रता, व सर्व गोत्रजांचा नाश करणारा धर्म हा पुण्यवान् आहे ४. दशरथ ब्रह्महत्या करणारा पातकी असून देवा, त्याच्या पोटीं तुम्हीं जन्म घेतला हें नवल आहे ५. नारद मुनीश्वर भांडण लावण्याचें सूत्र हातांत धरून दोघांत भांडण लावीत, त्यांत कित्येकांचे वध देखील होत, त्या संबंधाचा त्यांना अणुमात्र देखील दोष लागला नाहीं ६. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, अशांच्यापुढें माझे दोष ते कितीसे ? मी तुझ्या पायांच्या आश्रयानें निष्पाप झालों आहें ७. [१७२५]

भर बाजारामध्यें हरिकथा करणें हें पंढरीनाथाला आवडत नाहीं १. जे कोणी असें करतात, तें सर्व त्यांचें पोट भरण्याविषयींचें सोंग आहे. तेथें पांडुरंगाविषयींची श्रद्धा कसली आहे ? २. कांहीं तरी एखादें अनुसंधान (आख्यान) आपल्याला बिदागी मिळेल ह्या बुद्धीनें लावावयाचें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे रांडलेका, तूं असें कां करितोस ? तुझ्या ह्या अशा करण्याला मी राजी नाहीं (अशानें पांडुरंग मुळींच प्रसन्न होणार नाहीं) ४. [१७२६]

लोकांचे शब्द माझ्या डोक्यावर कितीहि असोत (मी देवभोळा असें लोक म्हणोत), मला माझी विठाबाई हीच बरी वाटत आहे १. ती अंतःकरणानें बहुत कनवाळु कृपाळु आहे, म्हणून माझा तिनें अंगीकार केला आहे २. ज्या विठाबाई माउलीचें वेद, शास्त्रें व पुराणें वर्णन करीत आहेत, तिच्या पदरीं पडलेलें मी एक लाडकें दत्तक मूल आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जिचें नांव कामधेनु, कल्पतरु आहे तिचें मी मूल आहें ४. [१७२७]

काशी, गया आणि द्वारका हीं तीर्थें मीं पाहिलीं, पण तीं पंढरीच्या बरोबरीस येत नाहींत १. पंढरीमध्यें असणाऱ्या

अभिमान । पायां पडे जन एकमेकां ॥ २ ॥ तुका म्हणे जाय एकवेळ पंढरी । तयाचिये घरीं यम न ये ॥ ३ ॥ [१७२८]

सांडूनियां सर्व लौकिकाची लाज । आळवा यदुराज भक्तिभावें ॥ १ ॥ पाहूनियां झाडें वरबडूनि पाला । खाऊनि विठ्ठला आळवावें ॥ २ ॥ वेंचूनियां चिंध्या भरूनियां धागा । गुंडाळूनि ढुंगा आळवावें ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसें मांडिल्या निर्वाण । तया नारायण उपेक्षीना ॥ ४ ॥ [१७२९]

दह्याचिये अंगीं निघे ताक लोणी । एका मोलें दोन्ही मागों नये ॥ १ ॥ आकाशाचे पोटीं चंद्रतारांगणें । दोहींशीं समान पाहों नये ॥ २ ॥ पृथ्वीच्या पोटीं हिरा गारगोटी । दोहोंसी संसाटी करूं नये ॥ ३ ॥ तुका म्हणे तैसे संत आणि जन । दोहोंसी समान भजूं नये ॥ ४ ॥ [१७३०]

तेरा दिवस झाले निश्चक्र करितां । न पवसी अनंता मायबापा ॥ १ ॥ पाषाणांची खोळ घेउनि बैसलासी । काय हृषीकेशी झालें तुज ॥ २ ॥ तुजवरी आतां प्राण मी त्यजीन । हत्या मी घालीन पांडुरंगा ॥ ३ ॥ फार विठाबाई धरिली तुझी आस । करीन जीवा नाश पांडुरंगा ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां मांडिलें निर्वाण । प्राण हा सांडीन तुजवरी ॥ ५ ॥ [१७३१]

लोक फार वाखा अमंगळ झाला । त्याचा त्याग केला पांडुरंगा ॥ १ ॥ विषयीं चेवलों (विषया वंचलों) मीपणा मुकलों । शरण तुज आलों पांडुरंगा ॥ २ ॥ घर दार अवघीं त्यजिलीं नारायणा । जीवींच्या जीवना पांडुरंगा ॥ ३ ॥ तुका म्हणे पडिलों पुंडलिकापाशीं । धांव हृषीकेशी आलिंगीं मज ॥ ४ ॥ [१७३२]

इंद्रियांची दीनें । आम्ही केलों नारायणें ॥ १ ॥ म्हणऊनि ऐसें सोसीं । काय सांगों

साधुसंतादिकांना अभिमान नाहीं. ते एकमेकांच्या पायां पडतात २. तुकाराम महाराज म्हणतात, जो एक वेळां पंढरीस जाईल, त्याच्या घरीं यम येत नाहीं ३. [१७२८]

सर्व लौकिकाची लज्जा टाकून भक्तिभावानें यादवांचा स्वामी जो श्रीकृष्ण त्याचें चिंतन करावें १. ज्यांचा पाला खाण्यासारखा आहे, अशीं झाडें पाहून त्यांचा पाला ओरबडून खावा व विठ्ठलाचें चिंतन करावें २. रस्त्यांतील चिंध्या जमा कराव्या व त्या एके ठिकाणीं शिवाव्या व तें वस्त्र नेसून पांडुरंगास आळवावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचें निर्वाण एखाद्यानें आरंभिल्यावर (पराकाष्ठेचें वैराग्य धरल्यावर) त्याची उपेक्षा नारायण करीत नाहीं ४. [१७२९]

एका दह्याच्या मंथनानें ताक व लोणी हीं दोन निर्माण होतात, तथापि तीं दोन्ही एका किंमतीनें मागूं नयेत १. आकाशाच्या पोकळींतच चंद्र व तारे आहेत, तथापि ते दोन्ही सारखे पाहूं नयेत (त्यांची योग्यता सारखी मानूं नये) २. पृथ्वीच्या पोटांत हिरा व गारगोटी आहे, पण त्या दोन्हींची अदलाबदल करूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें संत आणि संसारी जन ह्या दोघांस (ह्यांची योग्यता एकसारखी समजून) सारखें भजूं नये ४. [१७३०]

हे अनंता मायबापा, मी तेरा दिवस कांहीं न खातां तुझें अनुष्ठान केलें तथापि तूं अजून मला प्राप्त होत नाहींस १. हे हृषीकेशा, तूं पाषाणाच्या वस्त्राची खोळ घेऊन बसला आहेस. तुला झालें तरी काय? २. हे पांडुरंगा, आतां मी आपल्या प्राणांचा त्याग करीन व ती हत्या (त्या हत्येचा दोष) तुझ्यावर घालीन ३. हे विठाबाई, तुझी मीं पुष्कळशी आशा धरली आहे, पण आतां हे पांडुरंगा, मी आपल्या जीवाचा नाश करीन ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी आतां निर्वाण मांडलें आहे, (अखेरचा उपाय) म्हणून मी आपल्या प्राणांचा त्याग तुझ्याकरितां करीन ५. [१७३१]

फार लोक आहेत व अमंगळ वाखा झाला आहे. हे पांडुरंगा, त्यांचा तूं त्याग केलास (ह्या कलियुगांत लोक फार उपद्रव करणारे आणि दुराचारी झाले आहेत. त्यामुळें मीं ह्या लोकांना सोडलें) १. विषयाचा त्याग करून मीपणांतून मुक्त होऊन मी तुला शरण आलों आहें २. हे नारायणा, जीवींच्या जीवना पांडुरंगा, घरदारादि सर्व कांहीं मीं टाकलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी पुंडलिकाजवळ येऊन पडलों आहें. आतां हे हृषीकेशा, तूं मजकडे धांव घे व मला आलिंगन दे ४. [१७३२]

नारायणांनीं आम्हांला इंद्रियाधीन असें दीन केलें आहे १. म्हणून हे जन्मादि संसाराचे कष्ट सोसतों.

कोणापाशीं ॥ २ ॥ नाहीं अंगीं बळ । त्याग करीजेसा सकळ ॥ ३ ॥ तुका म्हणे मोठें । प्रारब्ध हें होतें खोटें ॥ ४ ॥ [१७३३]

हातीं धरूं जावें । तेणें परतेंचि व्हावें ॥ १ ॥ ऐसा कां हो आला वांटा । हीन भाग्याचा करंटा ॥ २ ॥ देव ना संसार । दोहीं ठायीं नाहीं थार ॥ ४ ॥ तुका म्हणे पीक । भूमि नेदी न मिळे भीक ॥ ४ ॥ [१७३४]

मोलें घातलें रडाया । नाहीं असूं आणि माया ॥ १ ॥ तैसा भक्तिवाद काय । रंगबेगडीचा न्याय ॥ २ ॥ वेठी धरिलिया दावी भाव । मागें पळावयाचा पाव ॥ ३ ॥ काजव्याच्या ज्योती । तुका म्हणे न लगे वाती ॥ ४ ॥ [१७३५]

तरिच जन्मा यावें । दास विठ्ठलाचें (विठोबाचें) व्हावें ॥ १ ॥ नाहीं तरि काय थोडीं । श्वानशूकरें (सूकरें) बापुडीं ॥ २ ॥ ज्यालाचें (जन्मल्याचें) तें फळ । अंगीं लागों नेदी मळ ॥ ३ ॥ तुका म्हणे भले । ज्याच्या नांवें मानवले ॥ ४ ॥ [१७३६]

द्या जी माझा विचारोनियां विभाग । खंडे हा लाग आहाचपणें ॥ १ ॥ किती नेणों तुम्हां साहाते कटकट । आम्हीच वाईट निवडलों तें ॥ २ ॥ करवितां कलह जिवाचियेसाठीं । हे तुम्हां वोखटी ढाळ देवा ॥ ३ ॥ तुका म्हणे धीर कारण आपला । तुम्ही तों विठ्ठला मायातीत ॥ ४ ॥ [१७३७]

आमुचे ठाऊके तुम्हां गर्भवास । बळिवंत दोष केले भोग ॥ १ ॥ काय हा सांगावा नसतां नवलाव । मैंदपणें भाव भुलवणेचा ॥ २ ॥ एका पळवूनि एका पाठी लावा । कवतुक देवा पहावया

हें मी कोणाजवळ सांगावें ? २. सर्वसंगपरित्याग करण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझें प्रारब्ध फार खोटें आहे (नारायणाला दोष देण्यांत काय अर्थ आहे ?) ४. [१७३३]

ज्याला (ज्या वस्तूला) हातानें धरावयास जावें त्यानें दूर व्हावें (ती वस्तू दूर व्हावी) १. असें आमच्या भागास (वांट्यास) कां आलें ? मी खरोखर भाग्यहीन करंटा आहें २. (इंद्रियाधीन झाल्यामुळें) देवाचाहि लाभ नाहीं व संसाराचेंहि सुख नाहीं. अशा तऱ्हेनें दोन्ही ठिकाणीं निराधार आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जमीन पीक देत नाहीं व कोणी भीकहि वाढीत नाहीं ४. [१७३४]

पैसे देऊन रडावयास लावलेल्या माणसांस अश्रु येत नाहींत व त्यांच्या हृदयांत मायाहि नसते १. तसा, हरीविषयींच्या प्रेमावांचून बाह्यात्कारीं भक्तीचें भाषण हें बेगडाच्या चकाकीप्रमाणें आहे असें समजावें २. एखाद्या मजुरास ओझ्याकरितां धरल्यावर तो जसा ओझें टाकून त्याच पावलीं परत फिरतो (तसा जो भक्तिभाव दाखवीत आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, काजव्याच्या तेजास दिवा लावावयास गेलें तर लागत नाहीं (त्याप्रमाणें प्रेमावांचून केलेली भक्ति हरिप्राप्ति करून देत नाहीं) ४. [१७३५]

विठोबाचा दास व्हावयाचें असेल तर मनुष्यजन्मास यावें १. नाहींतर गरीब डुकरें, कुतरीं काय थोडीं आहेत ? २. त्रिगुणांचा (अविद्येचा आणि पापाचा, सत्त्व–रज–तमाचा) मळ अंगाला लागूं न देणें हेंच खऱ्या मनुष्यजन्माचें फळ आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या विठोबाच्या नांवानें सज्जन हे मान्य झाले ते भले होत ४. [१७३६]

(अहो देवा) जी महाराज, तुम्ही विचार करून माझा वांटा मला द्या. नाहींपेक्षां वरवर समजूत केल्यानें मी पाठलाग करण्याचें सोडणार नाहीं १. (तुम्हांला कटकट तरी किती सहन होते हें कळत नाहीं,) म्हणून आम्हीच मात्र वाईट असे ठरलों २. आमचा जीव जाईतोंपर्यंत आम्हांस तुम्ही भांडावयास लावतां, ही खोड तुम्हांला देवा, फार वाईट आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं धीर धरावा हेंच आमचें कर्तव्य आहे आणि हे विठ्ठला, तुम्ही तर मायेच्या वेगळे आहांत (तुम्हाला व्यवहार संभाळण्याचें कारण नाहीं) ४. [१७३७]

हे देवा, आम्हांस गर्भवास होतात हें तुम्हांला ठाऊक आहे. त्याचें कारण आम्हीं जे महादोष केले ते व त्यांचा हा भोग तुमच्याच सत्तेनें नेमिला गेला आहे १. असें हें नवलावदायक (आश्चर्यकारक), नाहीं तें निर्माण करून, मैंदपणाच्या भावाप्रमाणें (संभावितपणें) लोकांस तुम्ही भुलवितां हें काय सांगावें ? २. हे देवा, एकास पळ म्हणून तुम्हीच सांगता

॥ ३ ॥ तुका म्हणे जेणें ऐसें चेतविलें । त्याच्यानें उगलें कैसें नव्हे ॥ ४ ॥ [१७३८]

निर्दयासी तुम्ही करितां दंडण । तुमचें गाऱ्हाणें कोठें द्यावें ॥ १ ॥ भाकितों करुणा ऐकती ते कान । उगलेंचि मौन्य धरिलें ऐसें ॥ २ ॥ दीनपणें पाहें पाय भिडावोनि । मंजुळा वचनीं विनवीतसें ॥ ३ ॥ तुका म्हणे गांठी मनाची उकला । काय जी विठ्ठला पाहातसां ॥ ४ ॥ [१७३९]

नसतों केंविलवाणें । कांहीं तुमच्या कृपादानें ॥ १ ॥ हेचि तयाची ओळखी । धालें टवटवित मुखीं ॥ २ ॥ वायां जात नाहीं । वचन प्रीतीचें तें कांहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । सत्य येतें अनुभवा ॥ ४ ॥ [१७४०]

झालों तंव साचें । दास राहवणें काचें ॥ १ ॥ हें कां मिळतें उचित । तुम्ही नेणां कृपावंत ॥ २ ॥ सिंहाचीं तीं पिलें । जाय घेऊनियां कोल्हें ॥ ३ ॥ तुका म्हणे नास । आम्हां म्हणविलिया दास ॥ ४ ॥ [१७४१]

देवाच्या उद्देशें जेथें जेथें भाव । तो तो वसे ठाव विश्वंभरें (र) ॥ १ ॥ लोभाचे संकल्प पळालिया वरी । कैंची तेथें उरी पापपुण्या ॥ २ ॥ शुद्ध भक्ती मन जालिया निर्मळ । कुश्चळीं विटाळ वज्रलेप ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्याचें तयासीच कळे । प्रांत येतो फळें कळों मग ॥ ४ ॥ [१७४२]

कडसणी धरितां अडचणीचा ठाव । म्हणवूनि जीव त्रासलासे ॥ १ ॥ लौकिकाबाहेरि राहिलों निराळा । तुजविण वेगळा नाहीं दुजा ॥ २ ॥ संकोचानें नाहीं होत धणीवरी । उरवूनि उरी काय काज ॥ ३ ॥ तुका म्हणे केलें इच्छेचि सारिखें । नाहींसें पारिखें येथें कोणी ॥ ४ ॥ [१७४३]

व दुसऱ्यास त्याच्या पाठीमागें लावतां आणि त्याचें कौतुक पाहाण्याकरितां तुम्ही अशी क्रीडा करतां ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यानें जें चेष्टविलें आहे तें त्याच्यानें राहाणार (बंद पडविणार) नाहीं काय ? ४. [१७३८]

ज्याच्या अंगीं दया नाहीं त्यास तुम्ही दंड करितां (शिक्षा करितां) आणि तुम्हींच जर निर्दय झालां तर हें तुमचें गाऱ्हाणें कोणाला सांगावें ? १. तुम्हांस मी करुणा भाकीत आहें आणि ती तुमच्या कानावरहि येत आहे असें असून उगीच तुम्ही मुकाट्यानें बसतां हें काय ? २. मीं गरिबानें तुमची भीड धरून उगीच तुमच्या पायांकडे पाहात असावें आणि मधुर शब्दांनीं तुमची विनंति करावी (हेंच माझें काम आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठ्ठला जी महाराज, उगीच मुकाट्यानें आमच्याकडे कां पाहातां ? तुमच्या मनांत कोणती गांठ (अढी) आहे ती तरी एकदां खुली करा (उकला) ४. [१७३९]

हे देवा, तुम्हीं जर कृपा केली असती तर मी असा गरिबासारखा दिसलों नसतों १. ज्याचें मुख टवटवीत दिसतें त्याचें पोट भरलें आहे असें समजावें. हीच कृपादान केल्याची खूण आहे २. तुम्हीं कांहीं प्रीतीचें भाषण केलें तर तें वायां जाणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, माझ्या अनुभवाला खरोखर हेंच येत आहे ४. [१७४०]

आम्ही तुमचे खरे खरे दास झालों आहों असें असून आम्हीं कच्चेपणांत (अज्ञानांत) काय म्हणून राहावें ? १. हे कृपावंता, हें तुमचें कर्तृत्व योग्य आहे वा नाहीं तें तुम्हांस समजत नाहीं काय ? २. सिंहाचा बच्चा कोल्ह्यानें धरून नेला (असें कोठें ऐकलें आहे काय ?) ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें आम्ही तुमचे दास म्हणून आमचा नाश होणें हें योग्य आहे काय ? ४. [१७४१]

देव आहे, अशी जेथें जेथें भावना धरावी त्या त्या ठिकाणीं विश्वंभराची वस्ती आहे १. आशेचे सर्व संकल्प नाहींसे केले तर पापपुण्य मग त्या ठिकाणीं कसलें राहिलें ? २. मन निर्मळ केलें तर भगवंताची शुद्ध भक्ति होते आणि मन मलिन असण्यानें पापाचा विटाळ वज्रलेपवत् अंगीं असतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे प्रकार ज्याचे त्यास कळत आहेत आणि जशी फळाची इच्छा करावी, तशी ती शेवटीं फलद्रूप झाल्यानें समजून येते ४. [१७४२]

जसजशी निवड (शोध) करावी (संसारासंबंधीं जसजसा विचार करावा) तसतसे अडचणीचे (शोक-भयांचे) प्रसंग येतात, म्हणून माझा जीव फार त्रासला आहे १. ह्याकरितां मी सर्व लौकिकाच्या बाहेर निघून वेगळा झालों आहें. आतां तुजवांचून मला दुसरा वेगळा ठाव राहिला नाहीं २. ह्या ठिकाणीं संकोच केला तर माझी इच्छा पूर्ण होणार नाहीं. ह्याकरितां संकोच धरण्याचें काय कारण आहे ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवानें माझ्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं केलें आहे. आतां ह्या ठिकाणीं तुझ्यावांचून कोणी परकें राहिलें नाहीं (सर्वत्र देव आहे ही बुद्धि झाली) ४. [१७४३]

हेंचि जतन करा दान । धरुनि चरण राहिलों ते ॥ १ ॥ आणीक कांहीं न घालीं भार । बहु फार सांकडें ॥ २ ॥ घ्यावी माझ्या हातें सेवा । हेचि देवा विनवणी ॥ ३ ॥ तुका तुमचा म्हणवी दास । त्याची आस पुरवावी ॥ ४ ॥ [१७४४]

आपलयाच स्फुंदें । जेथें तेथें घेती छंदें ॥ १ ॥ पडिला सत्याचा दुष्काळ । बहु फार झाली घोळ ॥ २ ॥ विश्वासाचें (विश्वाचें) माठ । त्याचे कपाळीं तें नाट ॥ ३ ॥ तुका म्हणे घाणा । मूढा तीर्थ (र्थी) प्रदक्षणा ॥ ४ ॥ [१७४५]

उद्वे(द्यो)गाची धांव बैसली आसनीं । पडिलें नारायणीं मोटळें हें ॥ १ ॥ सकळ निश्चिंती झाली हा भरंवसा । नाहीं गर्भवासा येणें ऐसा ॥ २ ॥ आपुलिया नांवें (सत्तें) नाहीं आम्हां जिणें । अभिमान तेणें नेला देवें ॥ ३ ॥ तुका म्हणे चळे एकाचिया सत्ते । आपुलें मी रितेपणें असें ॥ ४ ॥ [१७४६]

बहुतां पुरे ऐसा वाण । आलें धन घरासी ॥ १ ॥ घ्या रे फुका मोलेंविण । नारायण न भुला ॥ २ ॥ ऐका निवळल्या मनें । बरवें(व्या) कानें सादर ॥ ३ ॥ तुका म्हणे करूनि अंतीं । निश्चिंती हे ठेवावी ॥ ४ ॥ [१७४७]

माझीं मज जाती आवरलीं देवा । नव्हता या गोवा इंद्रियांचा ॥ १ ॥ कासया मी तुझा म्हणवितों दास । असतों उदास सर्व भावें ॥ २ ॥ भयाचिये भेणें धरियली कास । न पुरतां आस काय थोरी ॥ ३ ॥ तुका म्हणे आपआपुली जतन । कैचें थोरपण मग तुम्हां ॥ ४ ॥ [१७४८]

मी तुमचे चरण धरून राहिलों आहें. ही देणगी तुम्हींच मला दिली आहे तिचें रक्षण करा १. ह्यावांचून तुमच्यावर मी दुसरा भार घालीत नाहीं व फार संकटहि घालीत नाहीं २. माझ्या हातून तुम्हीं सेवा घ्यावी हीच देवा, माझी तुम्हांला विनंति आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी जर तुमचा दास म्हणवीत आहें तर त्या दासाची आशा (एवढी इच्छा) तुम्हीं पूर्ण केली पाहिजे ४. [१७४४]

कित्येक लोक आपापल्या गर्वानें जेथें तेथें दुराग्रह धरितात १. परंतु बहुतकरून खऱ्या तत्त्वाचा दुष्काळ पडून परमार्थाच्या बाबतींत अतिशय घोंटाळा झाला आहे २. जे जड विश्वासानें (मिथ्या जगाचा अभिमान धरून) आचरण करितात, त्यांच्या कपाळीं नाट लागतो (त्यांना फलप्राप्ति होत नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसा तेल्याचे घाण्याचा बैल घाण्याभोंवतीं फिरतो तसा तो अभाविक मूढ पृथ्वीवरील सर्व तीर्थांस प्रदक्षिणा करितो (हरि-प्राप्तीच्या विशेष साध्याचें त्यांना ज्ञान नसतें) ४. [१७४५]

सकल इंद्रियांसहवर्तमान माझें देहरूपी मोटकुळें नारायणाचे ठिकाणीं अर्पण केलें आहे, त्या योगानें (देहनिर्वाहादि सर्व चिंतेची धांव एका ठिकाणीं बसली १. म्हणून मी सकळ चिंतेविरहित झालों. आतां मला गर्भवास घेण्याचें कारण नाहीं हा भरंवसा आहे २. माझा सर्व अभिमान त्या देवानें नेला आहे म्हणून मला देहबुद्धीनें (स्वतःच्या नांवावर किंवा बळावर) जगावयाचें नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझें हें शरीर एका देवाच्याच सत्तेनें चलनवलन करीत आहे, म्हणून मी आपलेपणा टाकून रिकामा झालों आहें (देहाविषयीं ममत्व राहिलें नाहीं) ४. [१७४६]

आमचे घरीं अविनाशी परमार्थरूपी सर्व प्रकारचा माल व धन आलें आहे. तें पुष्कळांना पुरण्यासारखें आहे १. तुम्ही कांहीं खर्च न करितां हा नामाचा माल व नारायण हें धन फुकट घ्या. ह्यांत चुकूं नका २. हें जें मी सांगतों तें तुम्ही मन शुद्ध करून मोठ्या तत्परतेनें चांगलें ऐका ३. तुकाराम महाराज म्हणतात, अखेर निष्काळजी व्हावें म्हणून वर सांगितलेल्या नारायणधनाचा संग्रह करा ४. [१७४७]

हे देवा, माझीं इंद्रियें जर मला आवरलीं असतीं तर मी त्यांच्या मोहांत गुंतलों नसतों १. मग मी आपल्याला तुझा दास कशाला म्हणवितों, सर्वभावानें (काया–वाचा–मनानें संसाराविषयीं) उदास होऊन राहिलों असतों २. मला ह्या संसाराचें भय उत्पन्न झालें आहे, त्या भीतीनें म्यां तुमची कांस धरली आहे. आतां जर तुम्ही माझी आशा न पुरवाल तर तुमची थोरवी कशी राहील ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर आम्हीं आपापले विकार संभाळिले तर मग तुम्हांला थोरपणा कशाचा आहे ? ४. [१७४८]

विनवितों तरी आणितोसि परी । याचकानें थोरी दातयाची ॥ १ ॥ आमुचेही कांहीं असों द्या उपकार । एकल्यानें थोर कैंचे तुम्ही ॥ २ ॥ न घ्यावी जी कांहीं बहु साल सेवा । गौरव तो देवा यत्न कीजे ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं आमुचा मिराशी । असावेंचि (सी) ऐसीं दुर्बळेंचि ॥ ४ ॥ [१७४९]

एका ऐसें एक होतें कोणाकाळें । समर्थाच्या बळें काय नव्हे ॥ १ ॥ घालूनि बैसलों मिरासीस पाया । जिंकों देवराया संदेह नाहीं ॥ २ ॥ केला तो न संडीं आतां कइवाड । वारीन हे आड कामक्रोध ॥ ३ ॥ तुका म्हणे झाली आळसाची धाडी । नव्हती आली जोडी कळों साच ॥ ४ ॥ [१७५०]

झालें समाधान । तुमचे धरिले (देखिले) चरण ॥ १ ॥ आतां उठावेंसें मना । येत नाहीं नारायणा ॥ २ ॥ सुखाडिकपणें । येथें सांपडलें केणें ॥ ३ ॥ तुका म्हणे भोग । गेला निवारला लाग ॥ ४ ॥ [१७५१]

मुखाकडे वास । पाहें करूनियां आस ॥ १ ॥ आतां होईल ते शिरीं । मनोगत आज्ञा धरीं (आज्ञाधारी) ॥ २ ॥ तुम्हीं अंगीकार । केला पाहिजे तो (हें) सार ॥ ३ ॥ तुका म्हणे दारीं । उभें (भा) याचक मी हरी ॥ ४ ॥ [१७५२]

नाहीं माथां भार । तुम्ही घेत हा विचार ॥ १ ॥ जाणोनियां ऐसें केलें । दुरिल अंगेसीं लाविलें ॥ २ ॥ आतां बोलावें आवडी ; नाम घ्यावें घडी घडी ॥ ३ ॥ तुका म्हणे दुरी । देवा खोटी ऐसी उरी ॥ ४ ॥ [१७५३]

माझें जड भारी । आतां अवघें तुम्हांवरी ॥ १ ॥ झालों अंकित अंकिला । तुमच्या मुकलों

तुम्हांस मी जों जों विनवितों तों तों तुम्ही आपले भलतेच प्रकार दाखवितां, पण तुम्ही असें समजा कीं (याचकामुळें) मागणारामुळें दात्याचा थोरपणा आहे १. ह्याकरितां आमचे कांहींतरी तुमच्यावर उपकार असूं द्या. नाहींपेक्षां तुम्ही जर एकटे राहिलां तर तुमची थोरवी कशी वाढेल ? २. जी महाराज, तुम्ही आमच्याकडून फारशी सेवा करून घेऊं नये. ज्या योगानें उभयतांचा गौरव होईल असें करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही सर्वकाळ असें गरीबच असावें अशी कांहीं आमची मिरास (कायमचा हक्क) नाहीं ४. [१७४९]

कधीं कधीं एकाप्रमाणें दुसरें होतें. [भिकाऱ्याचे श्रीमंत व श्रीमंताचे भिकारी होतात.] समर्थांच्या सामर्थ्यानें काय काय होणार नाहीं ? १. हे देवा, तुम्हांला जिंकण्याविषयीं मी आतां मिराशीचा पाया घालून (वंशपरंपरागत तुमच्या सेवेचा आधार घेऊन) बसलों आहें. आतां तुम्हांला जिंकल्याशिवाय निःसंशय राहाणार नाहीं २. मीं जो हा निश्चय केला आहे तो आतां सोडणार नाहीं. तुमच्या आमच्यामध्यें कामक्रोध आडवे आहेत त्यांचें निवारण मी आपल्या सामर्थ्यानें करीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, जोंपर्यंत तुमचा लाभ होण्याचें खरें मर्म मला कळून आलें नव्हतें तोंपर्यंत आळसानें माझ्यावर धाड घातली ४. [१७५०]

मीं तुमचे चरण धरले. त्या योगानें माझें मन समाधान पावलें १. हे नारायणा, आतां माझ्या मनाला तुमच्या पायांपासून उठावें असें वाटत नाहीं २. मला ह्या ठिकाणीं हा मोक्षरूपी माल मोठ्या आनंदानें मिळाला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या योगानें माझ्या संचित कर्माचा भोग निवारण झाला ४. [१७५१]

हे देवा, मी मोठ्या आशेनें तुमच्या मुखाकडे पाहात बसलों आहें १. आतां जें तुमचें मनोगत असेल त्याप्रमाणें मला आज्ञा करावी म्हणजे ती मी शिरसावंद्य मानीन २. माझा तुम्हीं अंगीकार केला पाहिजे हेंच मुख्य सार आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे हरि, मी तुझ्या दारामध्यें भिकारी उभा राहिलों आहें ४. [१७५२]

आतां माझा भार तुम्ही आपले शिरावर घेत नाहीं म्हणून मला फार विचार पडला आहे १. असें जाणून आम्ही दूर होतों ते तुमचे अंगास येऊन झगटूं असें केलें २. आतां तुमच्याशीं मोठ्या प्रीतीनें भाषण करावें व घटके घटकेस तुमचें नाम घ्यावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझ्यापासून दूर राहाणें (व जीवदशेनें राहाणें) ही स्थिति वाईट आहे ४. [१७५३]

आतां माझें सर्व संकट तुमच्यावर आहे १. तुमच्या अधीन असणारा मी तुमचा आज्ञाधारक झालों आहें

मागिला ॥ २ ॥ करितों जें काम । माझी सेवा तुझें नाम ॥ ३ ॥ तुका पायां लागे । कांहीं नेदी ना न मागे ॥ ४ ॥ [१७५४]

तुम्ही आम्ही भले आतां । झालों चिंता काशाची ॥ १ ॥ आपुलाले आलों स्थळीं । मौन्य कळी वाढेना ॥ २ ॥ सहज जें मनीं होतें । तें उचितें उघडलें ॥ ३ ॥ तुका म्हणे नसतें अंगा । येत संगा सारिखें ॥ ४ ॥ [१७५५]

चित्ता ऐसी नको देऊं आठवण । जेणें देवाचे चरण अंतरे तें ॥ १ ॥ आलिया वचनें रामनामध्वनि । ऐकावीं कानीं ऐसी गोडी ॥ २ ॥ मत्सराचा ठाव शरीरीं नसावा । लाभेंविण जीवा दुःख देतो ॥ ३ ॥ तुका म्हणे राहे अंतर(रीं) शीतळ । शांतीचें तें बळ क्षमा अंगीं ॥ ४ ॥ [१७५६]

कोण पुण्य कोणा गांठीं । ज्यासी ऐसियांची भेटी ॥ १ ॥ जिहीं हरी धरिला मनीं । दिलें संसारासी पाणी ॥ २ ॥ कोण हा भाग्याचा । ऐसियांसी बोले वाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याचे भेटी । होय संसारासी तुटी ॥ ४ ॥ [१७५७]

तरिच हा जीव संसारीं उदास । धरिला विश्वास तुम्हां सोई ॥ १ ॥ एके जातीविण नाहीं कळवळा । ओढली गोपाळा सूत्रदोरी ॥ २ ॥ फुटतसे प्राण क्षणाच्या विसरें । हें तों परस्परें सारिखेंचि ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्तीं राखिला अनुभव । तेणें हा संदेह निवारला ॥ ४ ॥ [१७५८]

किती विवंचना करीतसें जीवीं । मन धांवंडवी दाही दिशा ॥ १ ॥ कोणा एका भावें तुम्ही अंगिकार । करावा विचार याचसाठीं ॥ २ ॥ इतर ते आतां लाभ तुच्छ झाले । अनुभवा आले

म्हणून मागें असणाऱ्या सर्व प्रपंचाला (प्रपंचाच्या दुःखाला) मी मुकलों. तुमचें नाम सर्वकाळ ध्यावें हीच माझी सेवा आहे म्हणून हेंच काम मी करितों ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी तुमच्या पायांवर मस्तक ठेवतों. ह्यावांचून तुम्हांला कांहीं देत नाहीं व तुम्हांजवळ कांहीं मागत नाहीं ४. [१७५४]

सेव्यसेवकपणाचे योगानें तुम्ही आम्ही चांगले झालों, आतां कशाची चिंता राहिली आहे? तुम्हीं स्वामित्वानें असावें, व मीं सेवकपणानें असावें, असे आपआपल्या ठिकाणीं उभयतां आलों आहोंत आणि उभयतां मौन धरल्यावर भांडण होण्याचें काय कारण आहे? २. जें आमचे मनांत होतें तें तुम्ही योग्य उघडकीस आणिलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जशी ज्याची संगति होईल त्याप्रमाणें नसलेले गुण अंगीं येतात ४. [१७५५]

हे माझ्या मना, ज्या योगानें देवाचे चरण अंतरतील अशा प्रकारची आठवण तूं मला देऊं नको १. मुखावाटे रामनाम ध्वनि निघतील ते आणि संतांचीं उपदेशवचनें मीं कानांनीं ऐकावीं ही गोडी असावी २. दुसऱ्याचा द्वेष करण्याची कल्पना देहामध्यें नसावी, कारण त्यापासून कांहीं फायदा नसून विनाकारण जिवास दुःख होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अंतःकरण थंड असून क्षमा असणें हेंच शांतीचें सामर्थ्य होय ४. [१७५६]

(ध्रुवपदांत ज्यांची स्थिति दर्शविली आहे) अशांची (अशा ज्ञानी भक्तांची) भेट होईल असें पुण्य कोणाचे पदरीं आहे? १. ज्यानें आपल्या संसारावर पाणी सोडून (संसार टाकून) आपल्या मनामध्यें हरीचें ध्यान धरलें आहे २. अशाबरोबर बोलेल असा भाग्यवंत कोण आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या पुरुषाची पूर्वपुण्याईनें भेट झाल्याबरोबर सर्व संसार नाहींसा होतो ४. [१७५७]

हे देवा, (तुम्ही आमची उपेक्षा करणार नाहीं असा) तुमच्याविषयीं आम्हीं विश्वास धरिला आहे, म्हणूनच आमचा जीव संसारामध्यें उदास आहे १. हे गोपाळा, दोन व्यक्तींच्या समान जाति-स्वभावावांचून एकमेकांविषयीं कळवळा उत्पन्न होत नाहीं; एकचित असल्यानें सूत्राची ओढ सारखी असते २. तुमचा विसर आम्हांला क्षणभर झाला असतां आमचा प्राण कासावीस होतो. ही स्थिति उभतांमध्यें सारखी आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा अनुभव आम्हीं चित्तामध्यें राखला आहे. त्या योगानें संशय निवारण झाला ४. [१७५८]

हे देवा, मी आपल्या जिवाचे ठिकाणीं किती काळजी वाहातों आणि तुम्हांला हुडकिण्याविषयीं माझें मन कसें दशदिशां फिरत आहे १. तुम्ही माझा अंगीकार कोणत्या तरी एका भावानें कराल, ह्याकरितां मी नेहमीं विचार करीत आहें २. तुमच्यावांचून संसारांतील दुसरे लाभ मला तुच्छ झाले आहेत, कारण त्यांतील चांगले वाईट गुण माझ्या

गुणागुण ॥ ३ ॥ तुका म्हणे लागो अखंड समाधि । जावें प्रेमबोधीं बुडोनियां ॥ ४ ॥ [१७५९]

दिक्कचि या नाहीं संसारसंबंधा । तुटेना या बाधा भवरोगाची ॥ १ ॥ तांतडी ते करीं म्हणऊनि तांतडी । साधिली ते घडी सोनियाची ॥ २ ॥ संकल्पाच्या बीजें इंद्रियांची चाली । प्रारब्ध तें घाली गर्भवासीं ॥ ३ ॥ तुका म्हणे बीजें जाळुनी सकळे(ळ) । करावे गोपाळें आपुले भाट ॥ ४ ॥ [१७६०]

आतां होइन धरणेकरी । भीतरींच कोंडीन ॥ १ ॥ नाहीं केली जीवेंसाटी । तों कां गोष्टी रुचे ते ॥ २ ॥ आधीं निर्धार तो सार । मग भार सोसेना ॥ ३ ॥ तुका म्हणे खाऊं जेवूं । नेदूं होऊं वेगळा ॥ ४ ॥ [१७६१]

होईल तरी पुसापुसी । उत्तर त्यासी योजावें ॥ १ ॥ तोंवरि मी पुढें कांहीं । आपुलें नाहीं घालीत ॥ २ ॥ जाणोनियां अंतर देव । जेव्हां भेव फेडील ॥ ३ ॥ तुका म्हणे धरिल हातीं । करील खंती वेगळें ॥ ४ ॥ [१७६२]

हा तों नव्हे कांहीं निराशेचा ठाव । भले पोटीं वाव राखिलिया ॥ १ ॥ विश्वंभर(रें) विश्व सामाविलें पोटीं । तेथेंचि सेवटीं आम्ही असों ॥ २ ॥ नेणतां चिंतन करितों अंतरीं । तेथें अभ्यंतरीं उमटेल ॥ ३ ॥ तुका म्हणे माझा स्वामी अबोलणा । पुरवूं खुणें खुणा जाणतसों ॥ ४ ॥ [१७६३]

निष्ठूर तो दिसे निराकारपणें । कोवळा सगुणें प्रतिपाळी ॥ १ ॥ केलाच करावा केला कइवाड । होईल तें गोड न परतें ॥ २ ॥ मथिलिया लागे नवनीत हातां । नासे वितळितां आहाच तें ॥ ३ ॥

अनुभवास आले ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वकाळ समाधि लावून तुमच्या प्रेम-बोधामध्यें (प्रेमांत आणि ज्ञानांत) बुडून राहावें असें माझ्या मनानें घेतलें आहे ४. [१७५९]

ह्या माझ्या संसारसंबंधाला मर्यादा नाहीं व त्या संसाराची बाधा कधीं नाहींशी होत नाहीं १. म्हणून मी तांतडीनें तांतडी करीत आहें, कारण जी घटका परमार्थाकडे लागेल ती सोन्याची समजावी २. जसें संकल्पाचें बीज असतें त्याप्रमाणें इंद्रियांची वागणूक होते आणि पूर्वींचें असलेलें प्रारब्धकर्म गर्भवासांत नेऊन घालतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे गोपाळा, माझीं सर्व कर्मांचीं बीजें जाळा व मला तुमची कीर्ति वर्णन करणारा भाट करा ४. [१७६०]

हे देवा, आतां मी तुझ्या दारामध्यें धरणें घेऊन बसेन आणि तुला आंतले आंत कोंडून ठेवीन १. मी आपले जिवावर उदार झालों नाहीं तोंपर्यंत कोरड्या गोष्टी तुम्हांला कशा गोड लागतील ? २. अगोदर निश्चय करावा हेंच सार आहे. मग तुम्हांला भार सोसणार नाहीं (आमची विचारपूस तुम्ही करालच) [निर्धारानें कार्य लवकर होतें.] ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, मी तुला खाऊं जेवूं देणार नाहीं व आपल्याहून कोठें निराळा होऊं देणार नाहीं ४. [१७६१]

कोणी विचारपूस करील तर त्याविषयीं प्रत्युत्तराची योजना करून ठेवावी १. (देवाकडून विचारणा होणार नाहीं) तोंपर्यंत मी कांहीं आपलें सुखदुःख पुढें मांडीत नाहीं २. ज्या वेळीं माझें अंतःकरण देव जाणील त्या वेळीं माझें सर्व भय नाहींसें करील ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या वेळीं तो मला हाताशीं धरील त्या वेळीं तो मला काळजीपासून दूर करील ४. [१७६२]

हें ठिकाण कांहीं निराश होण्याचें नव्हे, म्हणून आपल्या हृदयानें दम धरून राहावें हें उत्तम (देव केव्हांतरी माझ्यावर प्रसन्न होणारच) १. विश्व प्रतिपालन करणारा जो देव त्यानें सकळ विश्व आपल्या पोटांत सांठविलें आहे, म्हणून आम्ही अखेरीस त्याच ठिकाणीं राहूं २. जरी आम्हीं त्याला (त्याचें व्यापक स्वरूप व त्याचा कृपाळुपणा) न समजतां आपल्या अंतःकरणामध्यें त्याचें चिंतन केलें तरी तें त्याच्या अंतःकरणाला कळेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा स्वामी न बोलणारा [मौन धारण करणारा] आहे म्हणून आम्ही त्याच्या खुणेला खूण पटविण्याचें जाणत आहोंत (त्याच्या अंतर्मनोगताप्रमाणें वागण्याचें—त्याची सेवा करण्याचें—आम्ही जाणत आहों) ४. [१७६३]

देव आपल्या निराकार स्थितींत निष्ठुर [निर्दय] असा दिसतो आणि सगुण रूपानें तो कोंवळा (सदय) आहे म्हणून तो प्रतिपाळ करतो असें दिसतें १. ह्याकरितां दोन्ही रूपांतून जें ज्याला आवडेल त्याच रूपाचा निश्चय केला असतां तोच अखेरपर्यंत ठेवावा म्हणजे त्या योगानें न बदलणारें असें कल्याण होईल २. दह्याचें मंथन केलें असतां लोणी हातास

तुका म्हणे आतां मनाशीं विचार । करावा तो सार एकचित्तें ॥ ४ ॥ [१७६४]

बहु देवा बरें झालें । नसतें गेलें सोंवळें ॥ १ ॥ धोवटाशी पडिली गांठीं । जगजेठीप्रसादें ॥ २ ॥ गादल्याचा झाला झाडा । गेली पीडा विकल्प ॥ ३ ॥ तुका म्हणे वरावरी । निर्मळ करी निर्मळा ॥ ४ ॥ [१७६५]

स्वामित्वाचीं वर्मे असोनि जवळी । वाहों जावें मोळी गुणासवें ॥ १ ॥ काबाडापासूनि सोडवा दातारा । कांहीं नका भारा पात्र करूं ॥ २ ॥ धनवंत्र्याचिये अंगीं सत्ताबळ । व्याधि ते सकळ तोडावया ॥ ३ ॥ तुका म्हणे आलें मोड्यासी कोंपट । सांडोव्याची वाट विसरावी ॥ ४ ॥ [१७६६]

ऋणाच्या परिहारा झालों वोळगणा । द्यावी नारायणा वासलाती ॥ १ ॥ झालों उतराई शरीरसंकल्पें । चुकों द्यावीं पापें सकळही ॥ २ ॥ आजिवरी होतों धरूनि जिवासी । व्याजें कासाविसी बहु केलें ॥ ३ ॥ तुका म्हणे मना आणिला म्यां भाव । तुमचा तेथें ठाव आहे देवा ॥ ४ ॥ [१७६७]

येणें पांगें पायांपाशीं । निश्चयेंसीं राहेन ॥ १ ॥ सांगितली करीन सेवा । सकळ देवा दास्यत्वें (त्व) ॥ २ ॥ बंधनाची तुटली बेडी । हेचि जोडी मग आम्हां ॥ ३ ॥ तुका म्हणे नव्हे क्षण । पायांविण वेगळा ॥ ४ ॥ [१७६८]

आपुल्या आपण उगवा लिगाड । काय माझें जड करून घ्याल ॥ १ ॥ उद्धाराशीं(सी) काय उधाराचें काम । वाढवूंचि श्रम नये देवा ॥ २ ॥ करा आतां मजसाठीं वाड पोट । ठावें नाहीं तंट

लागतें आणि तेंच ताक घुसळलें असतां व्यर्थ नासून जातें व वितळतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही आतां आपल्या मनामध्यें एकचित्तपणानें (सगुणाचें का निर्गुणाचें चिंतन करावयाचें असा) जो विचार कराल तोच सारभूत आहे ४. [१७६४]

हे देवा, प्रपंचरूपी भान गेलें व त्या व्यवहारांतलें मिथ्या सोंवळें नाहींसें झालें हें फार चांगलें झालें १. सर्व जगांत बलवान् असा जो देव त्याच्या प्रसादानें मला शुद्धाचा (निरपेक्ष शुद्ध असलेल्या आत्म्याशीं) योग झाला २. त्रिगुणरूपी मलानें (कामक्रोधादींमुळें) जो माझा जीव मलिन झाला होता त्याचा सर्व झाडा झाला व विकल्पाची पीडा गेली ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां वरचेवर निर्मलत्व असें होत आहे ४. [१७६५]

आपल्या आंगीं (जगत्कारण जें ब्रह्म त्याचीं सत्–चित्–आनंद हीं) स्वामित्वाचीं (ईशत्वाचीं) चिन्हें असून ह्या त्रिगुणांच्या संगतीनें मोळक्यासारखे आम्ही दरिद्री झालों आहोंत, म्हणजे त्रिगुणांच्या संगतीनें प्रपंचमोळीचा भार वाहाणारे मोळके झालों १. हे दातारा, ह्या त्रिगुणांच्या लिगाडापासून मला सोडवा आणि संसाराचें ओझें वाहाण्याचा अधिकारी मला करूं नका २. जसें सर्व व्याधीचा नाश करण्याचें सामर्थ्य धन्वंतऱ्याच्या आंगीं असतें त्याप्रमाणें तुम्ही आमचें सर्वतोपरि हित करणारे सत्ताधीश आहांत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें देहरूपी खोपट मोडकळीस आलें आहे. त्याच्या त्यागाविषयींची वाट मीं विसरावी असें करा (म्ह० ह्या मोडक्या देहाचा तुम्ही अंगीकार करा) ४. [१७६६]

हे नारायणा, तुमचें कर्ज फेडण्याकरितां मी तुमचा सेवक झालों आहें म्हणून तुम्हीं त्याचा हिशेब द्यावा १. मी आपलें शरीर तुम्हांस अर्पण करून उत्तीर्ण झालों आहें; आतां माझीं सर्व पातकें नाहींशीं करा २. मी तें कर्ज आजपर्यंत आपल्या जिवाशीं धरून राहिलों होतों (मी आजवर जीवदशेला धरून होतों), पण त्याचें व्याज वरचेवर वाढल्यामुळें त्यानें मला फार कासावीस केलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तें शरीर तुमचें राहाण्याचें ठिकाण आहे असा भाव मीं आपले मनांत जाणला व तुम्हांस तें शरीर अर्पण केलें ४. [१७६७]

तुमचा सेवक असल्यामुळें तुमच्या पायांजवळ मी राहावें, हाच माझा निश्चय आहे १. हे देवा, तुम्हीं सांगितलेली सर्व सेवा मी दास्यत्वानें करीन. प्रपंचरूपी बंधनाची सबळ बेडी नाहींशी झाली, कीं तुमचे पायांची प्राप्ति आम्हांला होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मी तुमच्या पायांपासून क्षणभरहि वेगळा होणार नाहीं ४. [१७६८]

तुम्ही आपलें लचांड (आमच्या पाठीमागें लागलेली संसाराची उपाधि) आपणच नाहींसें करा. माझें जडत्व घेऊन तुम्ही काय कराल ? १. हे देवा, आमचा उद्धार करण्याचें लांबणीवर टाकण्याचें काय प्रयोजन आहे ? कारण उगीच (आमचे जन्म-मरणाचे) श्रम वाढवूं नयेत २. आतां माझ्याकरितां तुम्ही आपलें उदारपणाचें पोट मोठें करा; कारण

झाले लोकीं ॥ ३ ॥ तुका म्हणे बाकी झडलियावरी । न पडें व्यवहारीं संचिताचे ॥ ४ ॥ [१७६९]

सर्व संगीं वीट आला । तूं एकला आवडसी ॥ १ ॥ दिली आतां पायीं मिठी । जगजेठी न सोडीं ॥ २ ॥ बहु झालों खेदक्षीण । येणें सीण तो नासे ॥ ३ ॥ तुका म्हणे गंगे वास । बहु त्या आस स्थळाची ॥ ४ ॥ [१७७०]

शीतळ तें शीतळाहूनि । पायवणी चरणींचें ॥ १ ॥ सेवन हें शिरसा धरीं । अंतरीं ही वरद्ळा ॥ २ ॥ अवघेंचि नासे पाप । तीर्थ बाप माझ्याचें ॥ ३ ॥ बैसोनियां तुका तळीं । त्या कल्लोळीं डौरला ॥ ४ ॥ [१७७१]

गोदेकांठीं होता आड । करूनि कोड कवतुक(कें) ॥ १ ॥ देखण्यानीं एक केलें । आइत्या नेलें जीवनापें ॥ २ ॥ राखोनियां होतों ठाव । अल्प जीव लावूनि ॥ ३ ॥ तुका म्हणे फिटे धणी । हे सज्जनीं विश्रांती ॥ ४ ॥ [१७७२]

न पाहें माघारें आतां परतोनि । संसारापासूनि विटला जीव ॥ १ ॥ सामोरें येऊनि कवळीं दातारा । काळाचा हाकारा न साहावे ॥ २ ॥ सावधान चित्त होईल आधारें । खेळतांही बरें वाटईल ॥ ३ ॥ तुका म्हणे कंठ दाटला या सोसें । न पवेचि कैसें जवळी हें ॥ ४ ॥ [१७७३]

मथनींचें नवनीत । सर्वहितकारक ॥ १ ॥ दंडवत दंडा परी । मागें उरी नुरावी ॥ २ ॥ वचनाचा तो पसरु काई । तांतडी डोईपार्शीच ॥ ३ ॥ तुका म्हणे जगजेठी । लावीं कंठीं उचलूनि ॥ ४ ॥ [१७७४]

आमच्या भक्तपणाची कीर्ति-फजिती लोकांत झाली आहे तें तुम्हांस माहीत नाहीं काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या पूर्वीच्या संचितकर्मांच्या बाकीचा तुम्हीं एक वेळ झाडा केला, म्हणजे पुनः मी त्या (संचित निर्माण होईल अशा क्रियमाणाच्या) व्यापारांत पडणार नाहीं ४. [१७६९]

हे देवा, तूं एकटा आवडतोस म्हणून मला सर्वसंगाचा कंटाळा आला आहे १. हे जगजेठी, आतां मीं तुझ्या पायांस मिठी मारली आहे, ती कधींहि सोडणार नाहीं २. मी फार दुःखीकष्टी झालों आहें व माझा तो सर्व श्रम तुमच्या पायांच्या योगानें नाहींसा होणार आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या ठिकाणीं गंगेचें वास्तव्य आहे, त्या स्थळाची [तुमच्या पायाची] मला फार आशा आहे ४. [१७७०]

हे देवा, तुमच्या चरणांचें तीर्थ सर्व शीतळ पदार्थांपेक्षां शीतळ आहे १. तेंच तीर्थ सेवन करून शिरसावंद्य केलें आहे, तेंच पोटांत सेवन केलें आहे आणि तेंच बाहेर आंगावर शिंपडलें आहे २. हें सकळ तीर्थांचें जन्मस्थान आहे. त्या योगानें माझें केलेलें सर्व पाप नाश पावलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी चरणतीर्थाच्या तळीं बसून स्नान केलें, त्याच्या लाटेनें शोभलों आहें ४. [१७७१]

ज्ञानदृष्टि नसल्यामुळें गोदेच्या तीराला आड पाडून त्याचेंच कोडकौतुक करून राहिलों होतों १. तों माझ्याजवळ ज्ञानदृष्टि असलेले संत येऊन त्यांनीं मला गोदेच्या आयत्या ओघाजवळ नेऊन पोहोंचविलें २. (ह्या दृष्टांताप्रमाणें) मी आजपर्यंत जीव लावून तें अल्प ठिकाण (माझा स्त्री-पुत्रादिक संसार) राखून राहिलों होतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, तों माझी इच्छा पूर्ण झाली. ही परमात्मसुखाची विश्रांति मला संतांचे ठिकाणीं मिळाली ४. [१७७२]

माझे जीवास सर्व प्रपंचाचा त्रास असल्यामुळें त्यांतून मी बाहेर निघालों. आतां मी त्याकडे परत माघारा पाहाणार नाहीं १. हे दातारा, मला काळाचा दरारा सहन होत नाहीं म्हणून तूं माझेपाशीं त्वरेनें ये आणि मला आलिंगन दे २. तुमच्या आधारानें माझें चित्त सावध होईल, मग मला कोणतेहि खेळ खेळणें बरें वाटेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या तुझ्या सोसानें माझा कंठ दाटून आला आहे, असें असून तुझ्याजवळ मी कसा पोंहचत नाहीं? ४. [१७७३]

घुसळून काढलेलें लोणी सार असून जसें सर्व दृष्टीनें हित करणारें असतें १. तसें कांहीं कसर न ठेवितां दंडाप्रमाणें मी तुम्हांला साष्टांग नमस्कार घालीत आहें २. उगीच वरवर बोलण्याचा पाल्हाळ काय उपयोगी? तुमचे पायांवर मस्तक ठेवण्याची त्वरा करावी हें बरें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे जगजेठी, मला उचल आणि प्रेमालिंगन दे ४. [१७७४]

अवचितांचि हातीं ठेवा। दिला सेवा न करितां ॥ १ ॥ भाग्य फळलें झाली भेटी। नेघें तुटी यावरी ॥ २ ॥ दैन्य गेलें हरली चिंता। सदैव आतां यावरी ॥ ३ ॥ तुका म्हणे वांटा झाला। बोलों बोला (बोलाबोलीं) देवासीं ॥ ४ ॥ [१७७५]

समर्थाची धरिली कास। आतां नाश काशाचा ॥ १ ॥ धांवें पावें करीन लाहो। तुमचा आहो विठ्ठला ॥ २ ॥ न लगे मज पाहाणें दिशा। हाकेसरिसा ओढसी ॥ ३ ॥ तुका म्हणे नव्हे धीर। तुम्हां स्थिर दयेनें ॥ ४ ॥ [१७७६]

करूं तैसें पाठांतर। करुणाकर भाषण ॥ १ ॥ जिहीं केला मूर्तिमंत। ऐसा संतप्रसाद ॥ २ ॥ सोज्ज्वळ केल्या वाटा। आइत्या नीटा मागीलां ॥ ३ ॥ तुका म्हणे घेऊं धांवा। करूं हांवा ते जोडी ॥ ४ ॥ [१७७७]

अचळ न चळे ऐसें जालें मन। धरूनि निज खुण राहिलों तें ॥ १ ॥ आवडी बैसली गुणांची अंतरीं। करूं धणीवरी सेवन तें ॥ २ ॥ एकविध भाव नव्हे अभावना। आणिक या गुणां न मिळवे ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें पडिलें आहारीं। ध्यान विटेवरी ठाकलें तें ॥ ४ ॥ [१७७८]

वैष्णवांसंगतीं सुख वाटे जीवा। आणीक मी देवा कांहीं नेणें ॥ १ ॥ गायें नाचें उडें आपुलिया छंदें। मनाच्या आनंदें आवडीनें ॥ २ ॥ लाज भय शंका दुरविला मान। न कळे साधन यापरतें ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां आपुल्या सायासें। आम्हां जगदीशें सांभाळावें ॥ ४ ॥ [१७७९]

शरण शरण वाणी। शरण त्रिवाचा विनवणी ॥ १ ॥ स्तुती न पुरे हे वाचा। सत्य दास मी दासांचा ॥ २ ॥ देह न सांभाळून। पायांवरी लोटांगण ॥ ३ ॥

मी कांहीं देवाची सेवा केल्यावांचून देवांनीं आपला सर्व आत्मसुखाचा ठेवा एकदम माझे हातीं दिला १. माझें भाग्य सफळ झाल्यामुळें देवाची भेट झाली. आतां त्याचा वियोग होऊं देणार नाहीं २. सर्व दारिद्र्य नाहींसें झाल्यामुळें सर्व चिंता हरली. आतां मी एवढ्यानें मोठा भाग्यवान् झालों ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा हिस्सा मला मिळाला. आतां आम्ही देवाबरोबर गोड गोड भाषण करूं ४. [१७७५]

मी समर्थ देवाची कांस धरली आहे. आतां माझा नाश कसा होईल? १. हे विठ्ठला, तूं धांव घेऊन मला पाव असा मी तुझा अट्टाहास नेहमीं करीन २. हांक मारल्याबरोबर तूं वरून उडी घालशील म्हणून मला आधाराकरितां अन्य दिशा पाहाण्याचें कारण नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमचे आंगीं दीनाविषयीं दया आहे, म्हणून तुम्हांला माझ्या संकटाचे वेळीं पुष्कळ वेळ धीर निघणार नाहीं ४. [१७७६]

दया येईल अशा शब्दानें (आम्ही) तुम्हांला वेळोवेळीं आळवूं १. ज्या संतांनीं अमूर्त देवास मूर्तिमंत केलें असा त्यांचा प्रसाद आपल्यावर आहे २. ज्या ऋषिमुनींनीं पूर्वीं सरळ मार्ग स्थापिले होते, तेच ज्यांनीं स्वच्छ केले ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच वाटेनें आम्ही धांव घेऊं व संतांनीं जो लाभ मिळविला, तो मिळविण्याविषयीं हांव धरूं ४. [१७७७]

जें मन चंचल होतें, त्यानें निजपरमात्मस्वरूप खुणेला धरलें, म्हणून तें स्थिर झालें १. ज्या परमात्म्याचे गुणांची आवड अंतःकरणांत आहे त्यांचेंच तृप्ति होईपर्यंत सेवन करूं २. त्या परमात्म्याविषयींचीच एक भावना आहे, ती बदलत नाहीं व त्यावांचून इतर गुणांशीं हृदय मिळत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, विटेवर जें परमात्म्याचें ध्यान आहे, तें माझ्या आहारीं (अवसानांत) आलें आहे ४. [१७७८]

हे देवा, वैष्णवांचे संगतींतच राहाण्यानें माझ्या जिवास सुख होतें, म्हणून त्यावांचून मी कांहीं एक जाणत नाहीं १. त्यांच्याच संगतीनें मी हरिनाम गातों व आपल्याच छंदानें नाचतों व उड्या मारतों. हें सर्व मनाच्या प्रेमभरानें व आनंदानें करतों २. ह्याविषयीं मनांतील लज्जा, भय, शंका हीं दूर झालीं आहेत. ह्याखेरीज दुसरें साधन मला कांहीं कळत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां जगदीशांनीं आपल्या यत्नांनीं आमचा सांभाळ करावा ४. [१७७९]

संत हो, मी शरण आहें (माझी वाणी तुम्हांला अनन्य शरण आली आहे), असें वाचेनें त्रिवार विनवितों १. माझ्या वाचेनें स्तुति व्हावी तशी पूर्ण होत नाहीं. मी खरोखर तुमच्या दासांचा दास आहें २. आपल्या देहाची परवा

विनवी तुका संतां दीन । नव्हे गौरवें उत्तीर्ण (नोहे गौरवीं उत्तीर्ण) ॥ ४ ॥ [१७८०]

लेंकरा लेववी माता अळंकार । नाहीं अंतपार आवडीसी ॥ १ ॥ कृपेचें पोसणें तुमचें मी दीन । आजि संतजन मायबाप ॥ २ ॥ आरुषा उत्तरीं संतोषें माउली । कवळोनि घाली हृदयांत ॥ ३ ॥ पोटा आलें त्याचें नेणे गुणदोष । कल्याणाचि आस असावी हे ॥ ४ ॥ मनाची ते चाली मोहाचिये सोई । ओघ गंगा काई परतों जाणे ॥ ५ ॥ तुका म्हणे कोठें उदार मेघां शक्ति । माझी तृषा किती चातकाची ॥ ६ ॥ [१७८१]

युक्ति तंव झाल्या कुंठित सकळा । उरली हे कळा जीवनाची ॥ १ ॥ संतचरणीं भावें ठेविलें मस्तक । जोडोनि हस्तक राहिलोंसे ॥ २ ॥ जाणपणें नेणें कांहींचि प्रकार । साक्षी तें अंतर अंतरासी ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्हीं केलें अभयदान । तेणें समाधान राहिलेंसे ॥ ४ ॥ [१७८२]

हा रे (गे) आलों कोणी म्हणे बुडतिया । तेणें किती तया बळ चढे ॥ १ ॥ तुम्हीं तव भार घेतला सकळ । आश्वासिलें बाळ अभयकरें ॥ २ ॥ भुकेलिया आस दावितां निर्धार । किती होय धीर समाधान ॥ ३ ॥ तुका म्हणे दिली चिंतामणीसाठीं । उचित कांचवटी दंडवत ॥ ४ ॥ [१७८३]

कैसा तूं देखिला होसील गोपाळीं । पुण्यवंतीं(ता) डोळीं नारायणा ॥ १ ॥ तेणें लोभें जीव झालासे बराडी । आम्ही ऐसी जोडी कई लाभों ॥ २ ॥ असेल तें कैसें (चें) दर्शनाचें सुख । अनुभवें श्रीमुख अनुभवितां ॥ ३ ॥ तुका म्हणे वाटे देसी आलिंगन । अवस्था ते क्षणक्षणा होते ॥ ४ ॥ [१७८४]

न करतां मी आपले चरणांवर लोटांगण घालीत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमचा कितीहि गौरव (सन्मान) केला तरी मी तुमच्या उपकारांतून उत्तीर्ण होणार नाहीं. अशा प्रकारें मीं दीन तुम्हां संतांना प्रार्थना करीत आहें ४. [१७८०]

आई ही आपले बालकाला अनेक प्रकारचे अलंकार घालते. तिच्यामध्यें बालकाविषयीं प्रेम अमर्यादित असतें १. अहो मायबाप संत जन हों, तुमच्या कृपेच्या पदरीं मी दीन पडलेला आहें २. बालक कसेंहि बोबडें बोललें, तरी आईला त्याचा संतोष होऊन ती त्यास मिठी मारून आपल्या हृदयीं धरते ३. ज्यानें आपल्या पोटीं जन्म घेतला आहे, त्या बालकाचे गुणदोष न पाहातां आई ही निरंतर त्याच्या कल्याणाचीच इच्छा करिते ४. तिच्या मनाची धांव बालकाच्या मोहाकडे असते. ती कधीं गंगेच्या ओघाप्रमाणें माघारी परतत नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, मेघाची औदार्यशक्ति केवढी आहे! व त्यापुढें माझी चातकाची तृषा ती किती? ६. [१७८१]

संतस्तवन करण्याविषयीं सर्व युक्त्या कुंठित होऊन एक जीवनज्ञान राहातें (आतां संतांविषयीं कर्तव्यरूप जीवनाचा भाग तेवढा उरला) १. म्हणून मी संतचरणांवर भावानें–श्रद्धेनें मस्तक ठेवून दोन्ही हात जोडून राहिलों आहें २. शहाणपणानें त्यांची थोरवी (किंवा परमार्थांतील कोणताहि गूढ प्रकार) कांहीं जाणण्यास जावें, तों ती कांहीं कळत नाहीं. ह्याविषयीं मनोमन साक्षी आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हीं संतांनीं मला ('भिऊं नकोस, आम्ही तुझा उद्धार करूं' असें) अभयदान दिल्यामुळें माझ्या चित्ताचें समाधान झालें ४. [१७८२]

पाण्यांत बुडावयास लागलेल्या मनुष्यास हा बघ, मी आलों, तूं धीर सोडूं नको, असें कोणीं म्हटलें तर त्याला केवढें धैर्य येतें? १. आणि तुम्हीं संतांनीं माझा सर्वस्वभार घेऊन तुमच्या अभय हस्तानें (भिऊं नको अशा हस्तचिन्हानें) मला बाळकाला आश्वासन (वचन) दिलें आहे २. क्षुधित झालेल्या मनुष्यास, थांब, तुला आतां जेवावयास घालतों, अशा शब्दांनीं आशा लाविल्यास त्याला किती तरी धीर येऊन त्याचें समाधान होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मीं तुमच्या उपकाराबद्दल तुम्हांला दंडवत–नमस्कार केले. हा मोबदला चिंतामणीच्याबदला कांच दिल्यासारखा आहे ४. [१७८३]

हे नारायणा, तुला त्या पुण्यवान् गोपाळांनीं आपल्या डोळ्यांनीं कसा पाहिला असेल! १. तसा तूं माझ्या दृष्टीस पडावास, ह्या लोभानें माझा जीव क्षुधित झाला आहे. आम्हांला तो लाभ कधीं मिळेल? २. तुमच्या श्रीमुखदर्शनाचें सुख कसें असेल? तें साक्षात् अनुभवल्यानें कळून येईल. ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या स्वरूपदर्शनाविषयींची इच्छा मला क्षणोक्षणीं होत आहे. आतां तुम्ही केव्हां आलिंगन द्याल असें मला वाटत आहे ४. [१७८४]

कासया या लोभें केलें आर्तभूत। सांगा माझें चित्त नारायणा ॥ १ ॥ चातकाचे परी एकचि निर्धार। लक्षभेदी तीर फिरों नेणें ॥ २ ॥ सांवळें रूपडें चतुर्भूज मूर्ति। कृष्णनाम चित्तीं संकल्प हा ॥ ३ ॥ तुका म्हणे करीं आवडीसी ठाव। नको माझा भाव भंगों देऊं ॥ ४ ॥ [१७८५]

काय माझा पण होईल लटिका। ब्रिदावळी लोकां दाविली ते ॥ १ ॥ खरी करूनियां देईं माझी आळी। येऊनि कुरवाळीं पांडुरंगे ॥ २ ॥ आणीक म्यां कोणा म्हणवावें हातीं। नये काकुलती दुजियासी ॥ ३ ॥ तुका म्हणे मज येथेंचि ओळखी। होईन तो सुखी पायांनींच ॥ ४ ॥ [१७८६]

तुम्हां आम्हां जंव झालिया समान। तेथें कोणा कोण सनमानी ॥ १ ॥ उरी तों राहिलें गोमटें गौरव। ओढे माझा जीव पायांपाशीं ॥ २ ॥ नेणपणें आम्हीं आळवूं ओरसें। बोलावितों रसें शब्दरत्नें ॥ ३ ॥ तुका म्हणे लळे पाळीं वो विठ्ठले। कां हे उरविले भेदाभेद ॥ ४ ॥ [१७८७]

नको माझे मानूं आहाच ते शब्द। कळवळ्याचा वाद करीतसें ॥ १ ॥ कासयानें बळ करूं पायापासीं। भाकावी ते दासीं करुणा आम्हीं ॥ २ ॥ काय मज चाड असे या लौकिकें। परी असे निकें अनुभवाचें ॥ ३ ॥ लांचावल्यासाठीं वचनाची आळी। टकळ्यानें घोळी जवळी मन ॥ ४ ॥ वाटतसे आस पुरविसी ऐसें। तरि अंगीं पिसें लावियेलें ॥ ५ ॥ तुका म्हणे माझी येथेंचि आवडी। श्रीमुखाची जोडी इच्छीतसें ॥ ६ ॥ [१७८८]

जन्मा आलियाचा लाभ। पद्मनाभ दरुशन(नें)॥ १ ॥ म्हणवूनि लवलाहें। पाय आहें चिंतीत ॥२॥ पाठीलागा येतो काळ। तूं कृपाळ माउली ॥ ३ ॥ बहू उसंतीत आलों। तया भ्यालों स्थळासी ॥४॥

हे नारायणा, तुमच्या दर्शनाचे लोभाविषयीं माझें मन इतकें आतुर कां केलें, हें सांगा १. चातकाप्रमाणें माझ्या हृदयाचा (एक निश्चय) झाला आहे, ज्याप्रमाणें लक्ष्याचें भेदन तीर करतो, तो माघारी फिरत नाहीं, तद्वत् माझा निश्चय बदलत नाहीं २. ज्याचें चतुर्भुज सांवळें स्वरूप आहे, त्या कृष्णाचाच माझ्या चित्तांत संकल्प आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, माझ्या प्रीतीला आश्रय द्या. माझ्या भावनेचा नाश करूं नका ४. [१७८५]

नारायण हा आम्हां पतितांचा उद्धार करणारा आहे, असें तुमचें ब्रीद लोकांत प्रतिज्ञेनें प्रगट केलें तें काय खोटें होईल? १. हे पांडुरंगा, मीं वरील केलेली प्रतिज्ञा तूं खरी कर, म्हणजे तूं साक्षात् येऊन मला आपल्या हातानें कुरवाळ २. मी अन्य कोणाचा आश्रित आहें, असें कसें म्हणवावें? माझी दया दुसऱ्या कोणालाहि येणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी एक तुझ्याशींच ओळख आहे, म्हणून मी तुझ्या पायांचे योगानेंच सुखी होईन (असा मला भरंवसा आहे) ४. [१७८६]

देवा, तुम्ही व आम्ही एकरूप झालों, म्हणजे तेथें कोणीं कोणाचा सन्मान करावयाचा? १. म्हणून तुम्ही स्वामी व मी सेवक हा भेदभाव जोंपर्यंत उरला आहे, तोंपर्यंतच तुमच्याविषयीं चांगला आदर आहे; म्हणून माझा जीव तुमच्या पायांकडे ओढत आहे २. आम्ही अज्ञानी असल्यामुळें तुमचें प्रेमरसानें चिंतन करितों व रसभरित शब्दरत्नांनीं तुम्हांस हांका मारतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठ्ठले, माझे आई, माझे लाड (सेव्य-सेवकभावाचे हट्ट) तुम्ही पूर्ण करा. तुमच्या आमच्यामध्यें ही प्रतारणा कां केली? (हा भेद कां उरूं दिला? ह्याकरितां भेद राखून भक्ति तरी द्या, किंवा भेद नाहींसा करून ऐक्यस्थिति तरी द्या; परंतु भेद राखून संसार तेवढा मुळींच नको) ४. [१७८७]

देवा, मी तुझ्याशीं मोठ्या कळकळीनें संवाद करीत आहें; ते माझे शब्द तूं पोकळ मानूं नकोस १. मी कोणत्या आधारानें तुमच्यापाशीं जोर करूं? (मला अमुक दे असा आग्रह धरूं?) आम्हीं दासांनीं तुमची करुणा भाकावी हें बरें दिसतें २. मला ह्या लौकिकाची काय इच्छा आहे? तर तुमचा अनुभव यावा हेंच चांगलें ३. मी तुमच्या स्वरूपाविषयीं फार लाचावलों आहें, म्हणून शब्दानें तुमचा टकळा (हट्ट) घेऊन माझें मन तुमच्याजवळ फिरत आहे ४. तूं माझी आशा पूर्ण करशील असें वाटत आहे, म्हणून मीं आपल्या हृदयाला तुझें वेड लाविलें आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, मला श्रीमुखदर्शनाचा लाभ व्हावा अशी इच्छा आहे, व प्रीतिहि त्याचविषयीं आहे ६. [१७८८]

पद्मनाभाचें दर्शन होणें हाच मनुष्यजन्मांतला लाभ आहे १. म्हणून मी त्वरेनें हरीच्या पायाचें चिंतन करीत आहें २. काळ हा सारखा पाठीस लागला आहे. त्याच्या तडाख्यांतून सोडविणारी तूं माझी कृपाळु आई आहेस ३.

कोण्या उपायें हें घडे । भव आंगडें सुटकेचें ॥ ५ ॥ तुका म्हणे तूं जननी । ये निर्वाणीं विठ्ठले ॥ ६ ॥ [१७८९]

जेणें वाढे अपकीर्ति। सर्वार्थी तें त्यजावें (वर्जावें) ॥ १ ॥ सत्य रुचे भलेपण। वचन तें जगासी ॥ २ ॥ होईजे तें शूर त्यागें । वाउगें तें सारावें ॥ ३ ॥ तुका म्हणे खोटें वर्म । निंद्य कर्म काळिमा ॥ ४ ॥ [१७९०]

याची सवे लागली जीवा । गोडी हेवा संगाचा ॥ १ ॥ परतें न सरवे दुरी । क्षण हरीपासूनि ॥ २ ॥ झालें तरी काय तंट। आतां चट न संडे ॥ ३ ॥ तुका म्हणे चक्रचाळें । वेड वळें लाविलें ॥ ४ ॥ [१७९१]

याचा तंव हाचि मोळा । देखिला डोळां उदंड ॥ १ ॥ नेदी मग फिरों मागें । अंगा अंगें (अंग) संचरे ॥ २ ॥ कां गा याची नेणां खोडी । जीभा जोडी करितसे ॥ ३ ॥ पांघरे तें बहु काळें । घोंगडेंही ठायींचें ॥ ४ ॥ अंगीं वसेचि ना लाज । न म्हणे भाज कोणाची ॥ ५ ॥ सर्वसाक्षी अबोल्यानें । दुश्चित कोणें नसावें ॥ ६ ॥ तुका म्हणे धरिला हातीं । मग निश्चिंती हरीनें ॥ ७ ॥ [१७९२]

प्रसिद्ध हा असे जगा । अवघ्या रंगारंगाचा ॥ १ ॥ तरी वाटा न वजे कोणीं । नारायणीं घरबुडी ॥ २ ॥ बहुतां ऐसें केलें मागें । लाग लागें लागेना ॥ ३ ॥ हो कां नर अथवा नारी । लहान थोरीं आदर ॥ ४ ॥ झालें वेगळें लोकीं पुरे । मग नुरे समूळ ॥ ५ ॥ कळेना तो आहे कैसा । कोणी दिशा बहु थोडा ॥ ६ ॥ तुका म्हणे दुसऱ्या भावें । छाया नांवें न देखवे ॥ ७ ॥ ॥ १७९३ ॥

त्या यमलोकास भिऊन मी अनेक जन्म तुमचें चिंतन करीत आलों ४. संसाराच्या कोशांतून कोणत्या उपायानें सुटका होईल, हें मला कळत नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठ्ठले, तूं माझी आई आहेस, म्हणून या अशा निर्वाण प्रसंगीं (अंतकाळीं) तूं धांवून ये (व मला काळाच्या तडाख्यांतून सोडव) ६. [१७८९]

ज्या योगेंकरून आपली अपकीर्ति होते त्याचा सर्वस्वीं त्याग करावा १. खरें बोलणें आणि खरेपणानें वागणें हें चांगलें असल्यामुळें तें जगाला प्रिय होतें २. खोट्याचा त्याग करून जगतांत शूर व्हावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, खोटें (वेदनिंद्य व लोकनिंद्य कर्म) करणें हें काळिमा लावणारें निंद्य कर्म आहे ४. [१७९०]

ह्या देवाचीच संवय जिवाला लागल्यामुळें, त्याची संगति प्रीतीनें व्हावी अशी हांव आहे १. त्या हरीपासून क्षणभरदेखील निराळें व्हावें असें वाटत नाहीं २. ह्याचा किती जरी बोभाटा झाला (हरीशीं कितीहि भांडण झालें किंवा लोकांत तसा बोभाटा झाला) तरी त्याचें काय आहे? आम्हांला आतां त्याची लागलेली चटक जात नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्यानें मुद्दाम आम्हांला आपलें वेड लावलें आहे ४. [१७९१]

ह्या हरीची हीच रीत आहे असें (डोळ्यांनीं पुष्कळ) पाहिलें १. [ती येणेंप्रमाणें :] जे कोणी ह्याचे ठिकाणीं अनन्य झाले आहेत त्यांना हा संसाराकडे पुनः मागें फिरूं देत नाहीं. त्यांच्या आंगांत आपण संचार करतो २. अशी ह्या प्रभूची रीत तुम्ही कां जाणत नाहीं? व्यर्थ जिभेनें बडबड कां करितां? (किंवा ह्याचें नाम घेतलें म्हणजे जिव्हेला मोठा लाभ करून देतो) ३. मूळच्या स्वरूपस्थितीचें घोंगडें अनादिकाळाचें आहे, तें त्यानें पांघरलें आहे (हा कृष्णवर्णाचा देह धारण करितो) ४. ज्याला कशाचीहि लाज नाहीं व ही कोणाची बायको आहे, ह्याचाहि विचार जो करीत नाहीं ५. तो सर्वसाक्षित्वानें व निःशब्दपणानें आहे. त्या हरीच्या ठिकाणीं कोणी दुश्चित्त [उदास] राहूं नये (सर्वांनीं ह्याचें भजन करावें) ६. तुकाराम महाराज म्हणतात, हरीनें एकदां हातीं धरल्यावर भक्ताची सर्व चिंता नाहींशी होऊन त्याला शांति मिळते ७. [१७९२]

सर्व रंगांच्या नामरूपानें एक आपणच आहे, अशाविषयीं ह्या हरीची जगतांत प्रसिद्धि आहे १. नारायणस्वरूपीं जाणाराचें घर बुडतें, म्हणूनच ह्याच्या मार्गाकडे कोणी जात नाहींत २. पूर्वी बहुत भक्तजनांचें ह्यानें वाटोळें केलें. जे लोक ह्याच्या स्वरूपीं विलीन झाले त्यांचा मागमूसदेखील लागत नाहीं ३. पुरुष असोत अगर स्त्रिया असोत, लहान असोत अगर मोठे असोत, सर्वांचा तो अंगीकार करतो ४. एकदां ते लोकांचा (लौकिक व्यवहाराचा) त्याग करून हरीकडे वळले कीं पुरे, मग त्यांचें समूळ वाटोळें होतें ५. तो कोणत्या दिशेस आहे व लहान मोठा वगैरे कसा आहे हें कांहीं कळत नाहीं ६. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां देवाखेरीज ह्या जगतांत कोणी आहे, असें द्वैतभावानें पाहूं नये. आपली छायादेखील देवच आहे [असें जाणावें ७.] [१७९३]

न सांडावा (संडावा) आतां ऐसा वाटे ठाव। भयाशीं उपाव रक्षणाचा ॥ १ ॥ म्हणऊनि मनें वळियेलें मन । कारियाकारण चाड नाहीं ॥ २ ॥ मानावी (नाणावी) उपाधि करूनियां मूळ। राखतां विटाळ तेंचि व्हावें ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें न वेंचे वचन । निर्जी निज खूण सांपडली ॥ ४ ॥ [१७९४]

सत्तेचें भोजन समयीं आतुडे । सेवनही घडे रुचिनेसी ॥ १ ॥ वर्मे भ्रम नेला जालें एकमय। हृदयस्थीं सोय संग जाला ॥ २ ॥ कोथळीस जमा पडिलें संचित । मापल्याचा वित्त नेम जाला ॥ ३ ॥ तुका म्हणे धणी ऐसा जालों आतां । करीन ते सत्ता माझी आहे ॥ ४ ॥ [१७९५]

देईल तें उणें नाहीं। याचें कांहीं पदरीं ॥ १ ॥ पाहिजे तें संचित आतां। येथें सत्ता करावया ॥ २ ॥ गुणां ऐसा भरणा भरी । जें जें चारी तें लाभे ॥ ३ ॥ तुका म्हणे देवीं देव। फळे भाव आपुला ॥ ४ ॥ [१७९६]

तेव्हां होतों भोगाधीन । तुम्हां भिन्न पासुनि ॥ १ ॥ आतां बोलों नये ऐसें। अनारिसें वेगळें ॥ २ ॥ सन्मुख जालों स्वामीकडे । भव आंगडें निराळें ॥ ३ ॥ चिंतिलें तें चिंतामणी । फिटे धणी तों द्यावें ॥ ४ ॥ सहजस्थिति आहे अंगीं। प्रसंगीं तें वचन (ते वंचेना) ॥ ५ ॥ तुमची देवा धरिली कांस। केला नास प्रपंचा ॥ ६ ॥ तुका म्हणे जाणोनि वर्में। कर्माकर्में ठेविलीं ॥ ७ ॥ [१७९७]

केला कइवाड संतांच्या आधारें। अनुभवें खरें कळों आलें ॥ १ ॥ काय जीवित्वाची धरुनियां आशा । व्हावें गर्भवासा पात्र भेणें ॥ २ ॥ अबाळीनें जावें निश्चितीच्या ठायां । रांडा रोटा वायां

सर्व भयांपासून रक्षण होण्याच्या उपायाचें (हें हरिचरणरूपी) ठिकाण मला सांपडलें आहे, तें आतां कधींहि सोडूं नये, असें मला वाटतें १. म्हणून (सात्त्विक) मनानेंच (राजस-तामस) मन हरिकडे वळविलें आहे. त्यावांचून मला कार्यकारणाची गरज राहिली नाहीं २. सर्व प्रपंच हा उपाधिमूळ आहे असें मानावें; ह्या प्रपंचविटाळाचें रक्षण केलें असतां उपाधिरूपच व्हावें लागेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां ह्या उपाधीसंबंधानें मी कांहीं बोलणार नाहीं, कारण मला निजात्मखुणेचा अनुभव आला आहे (आत्मसुखाचें वर्म सांपडलें आहे) ४. [१७९४]

आपलें स्वसत्तेचें जेवण जर भुकेच्या वेळेला मिळालें, तर त्याचें सेवन मोठ्या गोडीनें होतें १. तसें मला मुख्य मर्म सांपडल्यामुळें सर्व संसारभ्रम नाहींसा होऊन, एक हरिमय जगत् झालें आहे, कारण हृदयनिवासी जो देव त्याची संगति मला झाली २. आतां जें कांहीं संचितकर्म आहे, तें स्वरूपाच्या कोथळींत जमा झालें (संचित हें स्वरूपीं नाहींसें झालें) व नियमित मोजकें प्रारब्धकर्म हें धन राहिलें. (देहारंभक मर्यादित प्रारब्धकर्म नियमें करून भोगावयास उरलें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मी अशा प्रकारचा मालक झालों आहें, कीं करीन ती सत्ता माझी आहे ४. [१७९५]

हा देव जर देईल, तर ह्याचेजवळ कांहीं कमी नाहीं १. पण आतां ह्या ठिकाणीं सत्ता करावयास आपल्या पदरीं कांहीं पुण्यसंचित (पुण्याचा सांठा) पाहिजे २. जशी धेनु आपल्या गुणासारखें व जो जसा चारा घालील त्याप्रमाणें दूध देते ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें आपला देवाचे ठिकाणीं जसा भाव असेल, तसा तो फलद्रूप होतो (फळ देतो) ४. [१७९६]

हे देवा, मी ज्या वेळेस तुम्हांपासून वेगळा होतों, त्या वेळीं प्रारब्धकर्माच्या भोगाधीन होतों १. आतां तुमच्याजवळ मी आलों आहें, म्हणून अन्यथा बोलूं नये २. मी स्वामीचे समोर आलों, म्हणून माझें पंचकोशरूपी (संसाराचें उपाधिरूप) आंगरखें नाहींसें झालें ३. चिंतामणीचा स्वभाव असा आहे, कीं जे कोणी जशी इच्छा करतील तशी पूर्ण करावयाची ४. ही स्थिति तुमच्या अंगीं सहजच आहे, पण प्रसंगानुरूप तें मी बोललों आहें (*पाठभेद :* चिंतामणीचा स्वभाव तुमच्याहि अंगीं सहजच आहे तो प्रसंगानुरूप लपविला जात नाहीं) ५. हे देवा, मीं तुमची कांस धरली आहे. त्या योगानें माझ्या सर्व प्रपंचाचा नाश झाला ६. तुकाराम महाराज म्हणतात, हीं तुझीं मर्मै मीं खरीं जाणल्यामुळें मीं कर्माचा व अकर्माचा त्याग केला आहे ७. [१७९७]

मीं जो निश्चय केला, तो संतांच्या आश्रयानें केला आहे, हें मला अनुभवानें खरें कळलें १. आतां जीवित्वाची गरज धरून काय उपयोग आहे? कारण जर भीति उत्पन्न झाली, तर पुढें गर्भवास भोगावे लागतील २. ह्याकरितां

करूं नये ॥ ३ ॥ तुका म्हणे बळी देतां तें निधान । भिकेसाठीं कोण राज्य देतो ॥ ४ ॥ [१७९८]

संगतीनें होतो पंगतीचा लाभ । अशोभीं अनुभव असिजे तें ॥ १ ॥ जैसीं तैसीं असों पुढिलांची (चे) सोई । धरिती हातीं पायीं आचारिये ॥ २ ॥ उपकारी नाहीं देखत आपदा । पुढिलाची सदा दया चित्तीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तरी सज्जनाची कीर्ति । पुरवावी आर्ति दुर्बळाची ॥ ४ ॥ [१७९९]

करितां विचार सांपडलें वर्म । समूळ निश्रम परिहाराचें ॥ १ ॥ मज घेऊनियां आपणांसी द्यावें । साटीं जीवें भावें नारायणा ॥ २ ॥ उरी नाहीं मग पडदा कां आला । स्वमुखेंचि भला करितां वाद ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें खरें देणेंघेणें । तुम्ही साक्षी जाणें अंतरीचें ॥ ४ ॥ [१८००]

कुळींची हे कुळदेवी । केली ठावी संतांनीं ॥ १ ॥ बरवें झालें शरण गेलों । उगविलों संकटीं ॥ २ ॥ आणिला (ली) ही रूपा बळें । करूनि खळें हरिदासीं ॥ ३ ॥ तुका म्हणे समागमें नाचों प्रेमें लागलों ॥ ४ ॥ [१८०१]

आतां देहअवसान । हें जतन तोंवरी ॥ १ ॥ गाऊं नाचूं गदारोळें । जिंकों बळें संसार ॥ २ ॥ याचि जीऊं अभिमानें । सेवाधनें बळकट ॥ ३ ॥ तुका म्हणे न सरें मागें । होईन लागें आगळा ॥ ३ ॥ [१८०२]

ज्यानें आड यावें कांहीं । त्याचें नाहीं बळ आतां ॥ १ ॥ मन येथें साह्य झालें । हरिच्या धालें गुणवादीं ॥ २ ॥ चुकुर तो गेला काळ । झालें बळ संधाचें ॥ ३ ॥ तुका म्हणे धरूं सत्ता । होईल आतां करूं तें ॥ ४ ॥ [१८०३]

फजिती सोसून जें चिंताविरहित स्थान आहे तेथें जावें हें बरें, नाहीं तर रांडेसारखें व्यर्थ पोट भरणें होईल; असें करूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर आपला जीव बळी दिला तर तें परमार्थरूपी निधान मिळतें. नाहींपेक्षां भिक्षा मागण्यावारी कोणी राज्य देईल काय ? (त्याकरितां जिवावर उदार होऊन युद्धच करावें लागतें) ४. [१७९८]

ज्याची संगति धरावी, त्या योगानें त्याच्या पंक्तीचा लाभ आपणास मिळतो; हा अनुभव अशोभीं (प्रपंचांत) आहे १. म्हणून आम्ही जसे आहों तसे पुढें जाणाऱ्या संतांच्या सोईनें चालूं, म्हणजे आचार्य जे संत ते आमच्या हाताला धरून पायीं चालवून ठिकाणीं (आत्मपदीं) पोंचवितील २. जो कोणी उपकार करणारा आहे, त्याच्या चित्तांत सर्व काळ भूतदया असते, म्हणून त्यास दुसऱ्याची फजिती झालेली पाहावत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणूनच संतांची कीर्ति आहे, कारण ते गरीब लोकांची इच्छा पूर्ण करितात ४. [१७९९]

हे देवा, विचार केला असतां सर्व श्रमांचा नाश होण्यासारखें तुझें खरें मर्म मला सांपडलें आहे १. हे नारायणा, तुम्ही मला घेऊन माझ्या जिवभावाचा मोबदला तुम्ही आपणां स्वतःस द्या (आपलें पारमार्थिक स्वरूप मला द्या) २. तुमच्या आमच्यामध्यें जर वेगळेपणा नाहीं, तर हा मायेचा पडदा मध्यें कां आला आहे ? ह्याबद्दल तुमच्या बरोबर आपल्या मुखानें वाद करावा हें बरें ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी देवघेव खरी आहे. ह्यास पुरावा तुमचाच आहे, कारण आमचे अंतरसाक्षी तुम्ही आहां ४. [१८००]

आमचे कुळांतील कुळदेवी आम्हांला संतांनीं माहीत करून दिली १. त्यांना मी शरण गेलों हें बरें झालें, कारण त्यायोगानें सर्व संकटांपासून मी मोकळा झालों २. त्या हरिदासांनीं मोठ्या निग्रहानें भक्ति करून, निराकार जो देव, त्याला (ह्या कुळदेवीला) आकारास आणलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणून मी त्यांच्या संगतीनें प्रेमभरित होऊन नाचूं लागलों ४. [१८०१]

आतां आमचें देहावसान होईपर्यंत हें (ध्रुवपदांत दर्शविलेलें) जतन करूं (ह्या भक्तिरूपी धनाचें रक्षण करूं) १. आम्ही हरिनाम गाऊं व त्या छंदानें नाचूं व आनंदाच्या सामर्थ्यानें संसारास जिंकूं २. ह्या सेवारूपी धनाच्या अभिमानानें आम्ही बलवान् होऊन जगूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें करण्यास मी कधीं मागें सरणार नाहीं आणि ह्या योगानें वरचेवर श्रेष्ठ पदवीस येईन ४. [१८०२]

जें कांहीं परमार्थास प्रतिबंधक होतें (जे कामक्रोधादिक परमार्थाच्या आड येत होते) त्याचें बळ आतां चालेनासें झालें १. तें मन ह्या ठिकाणीं हरीच्या गुणानुवादांत तृप्त होऊन मला (परमार्थांत) साह्य करीत आहे २. संतसंगतीचें बळ झाल्यामुळें त्या मनाचा चुकारपणाचा काळ नाहींसा झाला ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही सत्ताधारी झालों आहोंत, म्हणून आतां आम्ही जें करूं तें होईल ४. [१८०३]

देवासी तो पुरे एकभाव गांठीं । तोचि त्याचे मिठी देईल पायीं ॥ १ ॥ पाहोनि राहीन कवतुकें निराळा । सी मज वेगळा होऊनियां ॥ २ ॥ कांहीं नेघें शिरीं निमित्ताचा भार । न लगे उत्तर वेंचावेंचि ॥ ३ ॥ तुका म्हणे जीवें पडिलिया गांठी । मग नाहीं मिठी सुटों येत ॥ ४ ॥ [१८०४]

लौकिकासाठीं या पसाऱ्याचा गोवा । कांहीं नाहीं देवा लागों येत ॥ १ ॥ ठेवावा माथा तो नुचलवा पायीं । ठायींचिये ठायीं हालों नये ॥ २ ॥ ढवळिलया मनें वितुळेल रूप । नांव ऐसें पाप उपाधीचें ॥ ३ ॥ तुका म्हणे देव प्रीतीनें कवळी । ठेवील जवळी उटवूनि ॥ ४ ॥ [१८०५]

नाहीं होत भार घातल्या उदास । पुरवावी आस सकळही ॥ १ ॥ ऐसा नाहीं मज एकाचा अनुभव । धरिला तो भाव उद्धरील (उद्धरिले) ॥ २ ॥ उतावीळ असे शरणागतकाजें । धांवा केशीराजे आइकतां ॥ ३ ॥ तुका म्हणे हितचिंतनीं भरंवसा । नेदी गर्भवास येऊं देव (नेदीं गर्भवासा येऊं देऊं-देवा) ॥ ४ ॥ [१८०६]

उपजों मरों हे तों आमची मिरासी । हें तूं निवारिसी तरी थोर ॥ १ ॥ उभा राहे करीं खरा खोटा वाद । आम्ही झालों निंद्य लंडी(ड)पणें ॥ २ ॥ उभयतां आहे करणें समान । तुम्हां ऐसा म्हणे मीही देवा ॥ ३ ॥ तुका म्हणे हातीं सांपडलें वर्म । अवघाचि श्रम फेडिन आतां ॥ ४ ॥ [१८०७]

मेलियांच्या रांडा इच्छिती लेंकरूं । लाज नाहीं धरूं प्रीत कैशी ॥ १ ॥ मागिलां पुढिलां एक सरोवरी । काळाची पेटारी खांदां वाहे ॥ २ ॥ आन दिसे परी मरणचि खरें । सांपळां उंदिरें सामाविलीं ॥ ३ ॥ तुका म्हणे झाली मनाची परती । निवळली ज्योति दिसों आली ॥ ४ ॥ [१८०८]

देव प्राप्त करून घेण्याविषयीं आपले पदरीं एक भावच पुरे आहे. तो भावच देवाच्या पायांस मिठी घालील १. असा भाव माझ्याजवळ आहे. "मी व माझे" पणाच्या वेगळा होऊन या जगताचें कौतुक मी साक्षित्वानें पाहात राहीन २. ह्या जगांतील कोणत्याहि संबंधाचा भार मी शिरावर घेणार नाहीं आणि ह्याबद्दल कांहीं बोलणारहि नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या जिवाची आणि देवाची गांठ मारावी म्हणजे मग ती सुटली जाणार नाहीं ४. [१८०४]

पारमार्थिक साधनपसारा लौकिकाकरितांच आहे. ह्यांतील कांहीं प्रकार देवास रुजू होत नाहींत १. आपलें मस्तक देवाच्या पायांवर ठेवावें, तें पुनः उचलूं नये, तें जागच्या जागीं न हालेल असें करावें (देवाचे ठिकाणीं एकनिष्ठ भाव असावा) २. त्या ठिकाणीं कांहीं उपाधि होऊन जर मन चंचल होईल, तर त्यांतील देवाचें रूप अस्पष्ट होईल व असें होणें हेंच पाप आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, (ध्रुवपदांत दर्शविल्याप्रमाणें) (इतक्या गोष्टी) जो करील, त्यास देव मोठ्या आवडीनें आलिंगन देईल व त्यास उचलून घेऊन आपणाजवळ ठेवील ४. [१८०५]

जो कोणी देवावर भार घालील, त्याची तो उपेक्षा तर करीत नाहींच, पण त्याची सर्व इच्छा तो पूर्ण करितो १. भार घालणाराची देव उपेक्षा करितो, असा अनुभव मला एकाचाहि आला नाहीं. ज्यांनीं देवाविषयीं भाव धरिला, तो भाव त्यांचा उद्धार करील, अथवा देव त्यांचा उद्धार करील २. शरणागत भक्तांचें काम करण्याविषयीं देव मोठा उतावळा आहे, म्हणजे संकटसमयीं भक्तांनीं हांक मारली, तर ती ऐकतांक्षणींच तो भक्तांकडे धांवत येतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरिचिंतनानें सर्वांचें हित होणार आहे व त्या योगानें देव गर्भवास देणार नाहीं, अशी माझी खात्री आहे ४. [१८०६]

जन्माला यावें आणि मरावें ही आमची मिरास आहे, ह्याचें निवारण जर तुम्हीं केलें, तर देवा, आम्ही तुम्हांला मोठे म्हणूं १. आम्ही ह्याविषयीं तुझ्याशीं वाद करतों, म्हणून तूं आमचे समोर उभा राहा आणि ह्याचा खरा खोटा काय तो निकाल कर. आम्ही तर निःसंगपणें (लोकांत) निंद्य झालों आहोंत २. हे देवा, आम्हांला तुझी बरोबरी करावयाची आहे, म्हणून हे देवा, तुझ्यासारखा मीहि आहें, असें मी म्हणतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्या प्राप्तीचें मर्म आमच्या हातीं सांपडलें आहे. त्या योगानें आतां मी सर्व श्रम नाहींसा करीन ४. [१८०७]

ज्या स्त्रिया विधवा आहेत, त्यांनीं मुलें व्हावयाची इच्छा करणें व त्याविषयीं प्रीति धरणें, ह्याची त्यांना लाज कशी नाहीं ? १. असा मागच्या पुढच्यांचा व्यवहार (पति मरण्यापूर्वींचा आणि नंतरचा व्यवहार) एकसारखा होऊं लागला, तर ते काळाच्या पेटाऱ्यांत सांपडून त्याच्याच खांद्यावर वाहिले जातील २. जसे उंदीर आपल्या घरांत राहिल्याप्रमाणें सांपळ्यांत असतात, पण ते खरोखरी मरणाचे घरांत सांपडलेले असतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, विषयापासून मन परावृत्त झालें म्हणजे शुद्ध आत्मज्योति दिसून येते ४. [१८०८]

निष्ठुर मी झालों अतिवादागुणें । हें कां नारायणें नेणिजेल ॥ १ ॥ सांडियेली तुम्ही गोत परि सोय । फोडविली डोय कर्मा हातीं ॥ २ ॥ सांपडुनि संदी केली जीवेंसाठीं । घ्यावयासी तुटी कारण हें ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज काय म्हणों उणें । नाहीं अभिमानें चाड देवा ॥ ४ ॥ [१८०९]

माझें माझ्या हाता आलें । आतां भलें सकळ ॥ १ ॥ काशासाठीं विषम थारा । तो अंतरा विटाळ ॥ २ ॥ झाली तया दुःखें तुटी । मागिल पोटीं नसावें ॥ ३ ॥ तुका म्हणे शुद्ध कूळ । तेथें मळ काशाचा ॥ ४ ॥ [१८१०]

समर्थपणें हे करा संपादणी । नसतेंचि मनीं धरिल्याची ॥ १ ॥ दुसऱ्याचें येथें नाहीं चालों येत । तरी मी निवांत पाय पाहें ॥ २ ॥ खोटियाचें खरें खरियाचें खोटें । मानलें गोमटें तुम्हांसी तें ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्हांसवें करितां वाद । होईजे तें निंद्य जनीं देवा ॥ ४ ॥ [१८११]

तुम्हां आम्हांसवें न पडावी गांठी। आलेति जगजेठी कळों आतां ॥ १ ॥ किती म्हणों आतां वाइटा वाईट। शिवों नये वीट आल्यावरी ॥ २ ॥ बोलिल्याचि आतां हेचि प्रचित । भीडभार थीत बुडवील (उडवीली) ॥ ३ ॥ तुका म्हणे आली रोकडी प्रचिती । झांकणें तें किती कोठें देवा ॥ ४ ॥ [१८१२]

सकळ सत्ताधारी। व्हावें ऐसें काय हरी ॥१ ॥ परि या कृपेच्या वोरसें । कुढावयाचेंचि पिसें ॥ २ ॥ अंगें सर्वोत्तम । अवघाचि पूर्णकाम ॥ ३ ॥ तुका म्हणे दाता । तरि हा जीव दान देतां ॥ ४ ॥ [१८१३]

कोणापाशीं द्यावें माप। आपेंआप राहिलें ॥ १ ॥ कासयासी भरोवरी । काय दुरी जवळी

तुमच्याशीं अति वाद करण्यानें मी निर्भय झालों आहें. हे नारायणा, हें तुम्हांला कसें कळत नाहीं ? १. तुम्हीं आपल्या गोताचा संबंध टाकलात आणि कर्मांच्या हातानें आमचीं डोकीं फोडलींत २. प्रसंग पाहून मीं जीव अर्पण केला, ह्याचें कारण सगळ्यांशीं संबंध तोडणें हें होय (ह्याला कारण तुझी माझ्याविषयीं उपेक्षा हें होय) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुला काय म्हणून मी दोष देऊं ? कारण जे कोणी अभिमानानें बद्ध झाले आहेत, त्यांची तुला गरज नाहीं ४. [१८०९]

माझी स्वरूपस्थिति माझ्या हस्तगत झाली (माझें आत्मस्वरूप मला मिळालें), आतां सर्व कांहीं चांगलें आहे १. आतां द्वैताला आश्रय कशाकरितां द्यावा ? कारण तें अंतःकरणाला विटाळ आहे २. दुःखाचा संबंध सुटला. तें पूर्वस्थितींत असणारें दुःख हृदयांत नसावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें कुळ परमात्म्याच्या अनुभवानें शुद्ध झालें आहे, तेथें कशाचा मळ आहे ? ४. [१८१०]

जें तुमच्या मनांत नाहीं, त्याची संपादणी मोठेपणानें बाह्यात्कारीं करतां १. दुसऱ्या कोणाचें येथें कांहीं चालत नाहीं, म्हणूनच मी तुमचे पाय निवांत पाहात आहें २. खोट्याचें खरें व खऱ्याचें खोटें हें करणें तुम्हांला फार चांगलें आंगवळणीं पडलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमच्या बरोबर वाद करण्यानें त्या मनुष्याला जगतांत निंद्यत्व येतें (म्हणून मी अधिक कांहीं बोलत नाहीं) ४. [१८११]

हे जगजेठी, तुमची व आमची आतां गांठ पडूं नये हें बरें, असे तुम्ही आहांत हें समजून चुकलें १. जी गोष्ट वाईट आहे, तिला वाईट आहे असें किती वेळां म्हणावें ? ज्याचा वीट आला आहे त्याचा आपण संबंध करूं नये २. कांहीं बोललों त्याची ही प्रचीति आहे, कीं तुमच्यासंबंधानें असलेलें भिडेचें ओझें मला बुडवून टाकील *(पाठभेद : तुमची होती ती मर्यादा मीं उडविली आहे)* ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तुम्ही (आपल्या दुर्गुणांवर) कोठें किती झांकण घातलें आहे ह्याचा मला रोख अनुभव आला आहे ४. [१८१२]

हे हरि, ज्या योगानें आम्ही सकळ सत्ताधीश होऊं, असें साधन काय आहे? १. पण ह्याला कृपेचा पान्हा सोडण्याविषयीं कुंथत–कुढत बसण्याचें वेड लागलें आहे २. एरवीं हा अंगानें सर्वोत्तम असून पूर्णपणानें आत्मतृप्त आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर हा दाता असता, तर तो आम्हांला जीवदान देता ४. [१८१३]

कोणाच्या जवळ संचित कर्मांचा हिशेब द्यावा ! कारण, सर्व कांहीं आपले आपणच आहों १. कशाकरितां खटाटोप

॥ २ ॥ एकें दाखविले दाहा । फांटा पाहा पुसूनि ॥ ३ ॥ तुका म्हणे सरलें वोझें । आतां माझें सकळ ॥ ४ ॥ [१८१४]

नभोमय जालें जळ । एकीं सकळ हरपलें ॥ १ ॥ आतां काय सारासारी । त्याच्या लहरी तयांत ॥ २ ॥ कैंचा तेथ यावा सांडी । आप कोंडी आपणा ॥ ३ ॥ तुका म्हणे कल्प झाला । अस्त गेला उदयो ॥ ४ ॥ [१८१५]

राजा करी तैसे दाम । चाम तेही चालती ॥ १ ॥ कारण ते सत्ता शिरीं । कोण करी अव्हेर ॥ २ ॥ वाहिलें तें सुनें खांदीं । चाले पदीं बैसविलें ॥ ३ ॥ तुका म्हणे विश्वंभरें । करुणाकरें रक्षिलों (लें) ॥ ४ ॥ [१८१६]

आम्ही देव तुम्ही देव । मध्यें भेव अधीक ॥ १ ॥ कैवाडाच्या धांवा लागें । मागें मागें विठ्ठले ॥ २ ॥ भेडसाविलें हाकें नादें । वोळखी भेदें मोडिली ॥ ३ ॥ तुका म्हणे उभा राहें । मागें पाहें परतोनि ॥ ४ ॥ [१८१७]

हीन शूर बुद्धीपासीं । आकृतींसी भेद नाहीं ॥ १ ॥ एक दांडी एक खांदी । पदोपदीं भोगणें ॥ २ ॥ एकाऐसें एक नाहीं । भिन्न पाहीं प्रकृती ॥ ३ ॥ तुका म्हणे भूमी खंडे । पीक दंडे जेथें तें ॥ ४ ॥ [१८१८]

काय बोलों सांगा । याउपरी पांडुरंगा ॥ १ ॥ कांहीं आधारावांचून । पुढें न चले वचन ॥ २ ॥ वाढे ऐसा रस । कांहीं करावा सौरस ॥ ३ ॥ भक्तिभाग्यसीमा । द्यावा जोडोनियां प्रेमा ॥ ४ ॥ कोरड्या उत्तरीं । नका गौरवूं वैखरी ॥ ५ ॥ करी विज्ञापना । तुका प्रसादाची दाना ॥ ६ ॥ [१८१९]

करावयाचा ? दूर व जवळ काय आहे ? २. एकाच्या आंकड्यावर शून्य दिलें असतां दहा होतात. तो एक पुसून पाहा ३. तुकाराम महाराज म्हणतात, देहाःमबुद्धीचें ओझें नाहींसें झालें. आतां सर्व कांहीं माझें मीच आहें ४. [१८१४]

आब्रह्मस्तंबपर्यंत उदक झाल्यावर त्यांत पृथ्वीसकट पृथ्वींतील जलभेद नाहींसे होतात १. त्या सर्वत्र उदकाचे ठिकाणीं कमीजास्तपणाचा व्यवहार आहे काय ? त्याच्या लाटा त्याच्यांतच विलीन होतात २. तेथें पाण्याचें येणें व जाणें हा व्यवहार कसला आला आहे ? कारण, त्या पाण्यानें आपणास आपणच कोंडून घेतलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, सृष्टीच्या कल्पांतकाळीं सूर्यचंद्रांचे अस्त व उदय दोन्हीहि नाहींसे होतात ४. [१८१५]

राजानें कातड्याचे पैसे केले, तरी ते खऱ्याप्रमाणें चालतात १. कारण त्याची सत्ता सर्वांच्या शिरावर आहे. तिचा अव्हेर करण्याची कोणाची शक्ति आहे ? २. लाडकें कुत्रें हें कोणाच्या (राजानें आपल्या) खांद्यावर बसविलें तरी चालेल व आपल्या पदावर बसविलें तरी चालेल (सिंहासनावर बसविलें तर त्याची सुद्धां सत्ता चालते) ३. तुकाराम महाराज म्हणतात, कृपासागर विश्वंभरानें माझें रक्षण केलें (म्हणून जगांत मी पूज्य झालों) ४. [१८१६]

आम्ही देव व तुम्हीहि देव आहांत, पण उभयतांमधील भीति ही अधिक आहे १. जे कोणी निर्धारी भक्त आहेत, त्यांचा पाठलाग करीत विठ्ठल धांवतात २. मोठ्यानें आरोळी देऊन काळानें किती जरी भेडसावलें तरी भय वाटत नाहीं कारण भेदाची ओळख मोडली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, स्थिर राहून मागें परतून पाहा (म्हणजे आपण देव आहोंत हें कळून येईल) ४. [१८१७]

चांगल्या व वाईट ह्या सर्व बुद्धीच्या कल्पना आहेत. मूळ आकृतींत कांहीं भेद नाहीं १. एक (भोई होऊन पालखीची) दांडी खांदीं घेऊन चालत आहे व एक पालखीचे आंत बसला आहे. अशा रीतीनें पावलोपावलीं भिन्न भोग घेत आहेत २. सृष्टीमध्यें एकासारखें एक नाहीं. ह्या भिन्न प्रकारानें एक प्रकृति आहे, हें पाहा ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसजसे भूमीचे भाग आहेत, तसतशी तेथें असणाऱ्या पिकाचीहि शोभा आहे ४. [१८१८]

हे पांडुरंगा, ह्यानंतर मीं काय बोलावें तें आपण सांगा १. तुमचा (किंवा वेदादिकांचा) कांहीं आधार असल्याशिवाय माझें बोलणें पुढें होत नाहीं २. ज्या योगानें माझ्या बोलण्याला अतिशय रस येईल असा कांहीं प्रसाद करा ३. भक्तीचें भाग्य पूर्णपणें वाढेल अशा प्रकारचें प्रेम तुम्ही मला द्या ४. कोरड्या वचनांनीं तुम्ही माझ्या जिव्हेचा गौरव करूं नका. (शुष्क शब्द माझ्या मुखावाटे येऊं देऊं नका) ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्हीं मजवर प्रसाद करावा, अशी माझी विनंति आहे ६. [१८१९]

आहाच तों मोड वाळलियामधीं । अधीराची बुद्धि तेणें न्यायें ॥ १ ॥ म्हणऊनि संग न करीं दुसरें । चित्त मळीन द्वारें द्वाड पडे ॥ २ ॥ विषासाठीं सर्पा भयाभीत लोक । हें तों सकळीक जाणतसां ॥ ३ ॥ तुका म्हणे काचें राहे कुळांकुड । अवगुण तो नाड ज्याचा तया ॥ ४ ॥ [१८२०]

क्षणक्षणां जीवा वाटतसे खंती । आठवती चित्तीं पाय देवा ॥ १ ॥ येईं वो येईं लवलाहीं । आलिंगुनि बाहीं क्षेम देईं ॥ २ ॥ उताविळ मन पंथ अवलोकीं । आठवे ते चुकी काय झाली ॥ ३ ॥ तुका म्हणे माझ्या जीवींच्या जीवना । घाला नारायणा उडी वेगीं ॥ ४ ॥ [१८२१]

आळी करावी हें (तें) कळतें बाळका । बुझवावें हें कां नेणां तुम्ही ॥ १ ॥ निवाड तो येथें असे पायांपाशीं । तुम्हां आम्हांविशीं एके ठायीं ॥ २ ॥ आणीक तें आम्ही न देखोंसें झालें । जाणावें तें शिणलें भागलेंसें ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्हां लागतें सांगावें। अंतरीचें ठावें काय नाहीं ॥ ४ ॥ [१८२२]

तांतडीनें आम्हां धीराचे न कळे । पाळावे हे ळळे लवलाहो ॥ १ ॥ नका कांहीं पाहों सावकाशीं देवा । करा एक हेवा तुमचा माझा ॥ २ ॥ वोरसाचा हेवा(यावा) सांभाळावी प्रीत । नाहीं राहों येत अंगीं धंदा(सदा) ॥ ३ ॥ तुका म्हणे मज नको गोवूं खेळा । भोजनाची वेळा राखियेली ॥ ४ ॥ [१८२३]

नाहीं लोपों येत गुण । वेधी आणिकां चंदन ॥ १ ॥ न सांगतां पडे ताळा । रूप दर्पणीं सकळां ॥ २ ॥ सारविलें वरी । आहाच तें क्षणभरी ॥ ३ ॥ तुका म्हणे वोहळें । सागराच्या ऐसें व्हावें ॥ ४ ॥ [१८२४]

जसा पृथ्वीवरील उगलेवला मोड पाण्यावांचून वाळला म्हणजे तो निष्फळ होतो, त्याप्रमाणें ज्याच्या अंगीं धीर नाहीं त्याची बुद्धि व्यर्थ समजावी १. ह्याकरितां (संतांवांचून) दुसऱ्या कोणाचा संग करूं नये, कारण त्या संगतीनें चित्त मळकट होऊन त्या द्वारानें आपलें वाईट होतें २. सर्पाचे मुखांत विष असतें, त्याकरितां लोक त्यास भितात. हे प्रकार तुम्हां सर्वांस माहीत आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें कच्चें असतें तें (कु) वाईट लांकूड असतें म्हणून ज्याच्यामध्यें जो अवगुण असतो तो त्यास बाधक होतो ४. [१८२०]

हे देवा, तुमच्या वियोगानें माझ्या जिवाला फार काळजी लागली आहे आणि तुमच्या पायांचा आठव वरचेवर होत आहे १. ह्याकरितां तूं लौकर धांवून ये (असें त्रिवार विनवितों) आणि मला तूं बाहू पसरून आलिंगन दे २. माझें मन फार उतावळें झालें आहे, म्हणून तें तुझी वाट पाहात आहे आणि माझ्याकडून कांहीं चुकी झाली कीं काय असें वाटत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, तूं माझ्या जीवाचें जीवन आहेस, म्हणून माझ्याकरितां लवकर उडी घाल ४. [१८२१]

हट्ट करावा हें बालकाला समजतें आणि त्याची समजूत करण्याचें तुम्ही जाणत नाहीं काय? १. ह्या तुमच्या आमच्यामधील निकाल तुमच्या पायांच्या ठिकाणींच होणार आहे २. तुमच्यावांचून दुसऱ्या कोणास आम्ही पाहातदेखील नाहीं असें झालें आहे, म्हणून आमचें दुःख व श्रम तुम्ही लक्षांत आणा ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें कांहीं तुम्हांला सांगावयास पाहिजे काय? आमच्या अंतःकरणांतील भाव तुम्ही जाणत नाहीं काय? ४. [१८२२]

तुझ्या भेटीविषयीं फार धांदल झाली आहे, म्हणून आमच्यानें धीर निघत नाहीं. ह्याकरितां तुम्ही आमचे लाड लवकर पुरवा १. हे देवा, मला भेट देण्याविषयीं कांहीं अवकाश करूं नका. तुमची व माझी एक हांव राहील असें करा, अथवा तुमच्याविषयींचीच एक हांव मजमध्यें राहील असें करा २. माझ्या प्रेमाचा सोस आणि आवड हीं तुम्हीं सांभाळावीं अथवा तुम्हीं प्रेमभरानें माझें प्रेम रक्षण करावें. त्यावांचून दुसरा कांहीं उद्योग आमच्या ठिकाणीं राहाणार नाहीं असें करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी आनंदाच्या भोजनाची वेळ लक्षून आहें (राखून ठेविली आहे) म्हणून मला दुसऱ्या खेळांत गुंतवूं नको ४. [१८२३]

चंदनाचा गुण लोपला जात नाहीं. तो दुसऱ्यास वेध लावतो १. आपलें रूप आरशांत पाहिल्यावर दुसऱ्यानें न सांगतां त्याचें सर्व ज्ञान होतें २. एखादी जमीन सारवली असतां ती क्षणभर वरवर स्वच्छ दिसते ३. तुकाराम महाराज म्हणतात, किरकोळ ओढ्याला पाऊस पडून पूर आला, म्हणजे तो क्षणभर समुद्रासारखा होतो (तात्पर्य, कोणतीहि वस्तु मुळांतच चांगली असावी लागते) ४. [१८२४]

वचनेंचि व्हावें आपण उदार । होईल विश्वंभर संतुष्टचि ॥ १ ॥ सत्यसंकल्पाचीं फळें बीजाऐसीं । शुद्ध नाहीं नासी पावों येत ॥ २ ॥ वंचिलिया काय येतसे(येईल) उपेगा। शरीर हें नरकाचेंचि आळें ॥ ३ ॥ तुका म्हणे जीव जितां थोर लावा । पडिलिया गोवा देशधडी ॥ ४ ॥ [१८२५]

उखतें आयुष्य जायाचें कलि(ले)वर । अवघें वोडंबर विषयाचें ॥ १ ॥ काणासी हा लागे पुसणें विचार । मनेंच सादर करूं आतां ॥ २ ॥ उत्पत्ति प्रळय पडिलें दळण । पाकाचें भोजन बीज वाढे ॥ ३ ॥ तुका म्हणे जाऊं अभयाच्या ठाया । रिघों देवराया शरण वेगीं ॥ ४ ॥ [१८२६]

बोलावें म्हूण हे बोलतों उपाय । प्रवाह हें जाय गंगाजळ ॥ १ ॥ भाग्ययोगें कोणां घडेल सेवन । कैंचे येथें जन अधिकारी ॥ २ ॥ मुखीं देतां(घेतां) घांस लपविती तोंड । अंगींचिया भांड असुखानें ॥ ३ ॥ तुका म्हणे पूजा करितों देवाची । आपुलिया रुची मनाचिये ॥ ४ ॥ [१८२७]

लटिक्याची वाणी चवी ना संवाद (वचनाचा संवाद)। नाहीं कोणा वाद रुचों येत ॥ १ ॥ अन्याय तो त्याचा नव्हे वायचाळा । मायबापीं वेळा न साधिली ॥ २ ॥ अनावर अंगीं प्रबळ अवगुण । तांतडीनें मन लाहो साधी ॥ ३ ॥ तुका म्हणे दोष आणि अवकळा । न पडतां ताळा घडतसे ॥ ४ ॥ [१८२८]

नये स्तवूं काचें होतें क्रियानष्ट । फुंदाचे ते कष्ट भंगा मूळ ॥ १ ॥ नाहीं परमार्थ साधत लौकिकें । धरून होतों फिकें अंगा आलें ॥ २ ॥ पारखिया पुढें नये घालूं तोंड । तुटी लाभा खंड

आपण देवाचें नाम घेण्याकडे वाचेचा व्यय करण्याविषयीं उदार व्हावें, म्हणजे विश्वंभर देव आपणांस प्रसन्न होईल १. जर आपण खरा संकल्प केला, तर त्याप्रमाणें खरें फळ येईल, कारण शुद्ध हें कधींहि नष्ट होत नाहीं २. हें आपलें शरीर केवळ नरकाचें आळें आहे. तें देवाच्या सेवेस न लावलें तर त्याचा उपयोग काय होईल? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपला जीव आहे तोंपर्यंत देवाच्या आश्रयाकडे–भजनाकडे लावा, नाहींपेक्षां त्यांत हरकत आली तर देशोधडी व्हावें लागेल (म्हणजे चौऱ्यांशीं लक्ष योनींत फिरावें लागेल) ४. [१८२५]

आपलें सगळें आयुष्य व शरीर जाणारें आहे आणि आकाशांतील ढगाप्रमाणें (गारुड्याच्या खेळाप्रमाणें) हे सर्व विषय पोकळ आहेत १. हा विचार कोणास पुसावा लागत नाहीं, म्हणून ह्याविषयीं आतां आपलें मन सावध करूं २. सर्व जनांची उत्पत्ति व नाश ह्यांचें दळण काळ दळीत आहे, त्याचा पाक करून काळ भोजन करितो आणि लगेच बीज वृद्धिंगत करतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही लवकर देवरायाला शरण जाऊन अभयस्थळीं जाऊं ४. [१८२६]

जसें गंगेचें पाणी आपल्या ओघानें जात असतें, तसें हे उपाय बोलण्यासारखे आहेत, म्हणून मी ते सहज बोलतों १. जे कोणी भाग्यवान् असतील ते ह्याचें सेवन करतील. ह्या ठिकाणीं सर्व जन अधिकारी कशाचे आहेत? २. अनधिकारी भांडखोर लोकांच्या मुखांत जरी बळजबरीनें घांस घालावयास गेलें तरी ते दुःखानें तोंड चुकवितात (परमार्थाचे मार्गास लावावयास गेलें तर चुकवाचुकव करतात) ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी मात्र आपल्या मनाच्या आवडीप्रमाणें देवाची पूजा-भक्ति-सेवा करितों ४. [१८२७]

जो कोणी लबाड बोलणारा आहे त्याच्या वाणीला गोडी नसते व तें बोलणें कोणास मान्य होत नाहीं १. हा कांहीं त्याचा अन्याय व व्यर्थ चाळा नाहीं, कारण त्याच्या गर्भधारणेच्या वेळीं आईबापांनीं चांगली वेळ साधली नाहीं २. त्याच्या आंगीं मोठे प्रबळ व दुर्निवार अवगुण असतात, म्हणून तशी वागणूक करण्याविषयीं त्याच्या मनाची त्वरा असते. त्यामुळें अवगुणांत भर पडते ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच्या वागण्यांत ताळमेळ नसल्यामुळें त्याच्याकडून दोष घडतात व त्याची फजिती होते ४. [१८२८]

जो कोणी अनधिकारी परमार्थी आहे त्याची वाखाणणी केली तर तो क्रियानष्ट होतो, कारण त्या वाखाणण्यानें त्याच्या ठिकाणीं गर्व उत्पन्न होतो, व त्या भरांत तो जे कष्ट करील ते त्याच्याच नाशास कारण होतात; म्हणून त्याची स्तुति करूं नये १. प्रतिष्ठेच्या योगानें परमार्थ साध्य होत नाहीं, कारण जो लौकिक धरून राहातो त्याचा परमार्थ फिका पडतो २. ह्याकरितां परीक्षा करणाऱ्यापुढें–अनुभवी संतापुढें कच्च्या अनधिकाऱ्यांनीं तोंड घालूं नये; आणि घातलें असतां

होतो माना ॥ ३ ॥ तुका म्हणे तरी मिरवतें परवडी । कामावल्या गोडी अविनाश ॥ ४ ॥ [१८२९]

कोण्या काळें येईल मना । नारायणा तुमचिया ॥ १ ॥ माझा करणें अंगिकार । सर्व भार फेडूनी ॥ २ ॥ लागली हे तळमळ चित्ता । तरी दुश्चिता संसारीं ॥ ३ ॥ मुखाचीच पाहें वास । मागें दास सांभाळीं ॥ ४ ॥ इच्छा पूर्ण झाल्याविण । कैसा सीण वारेल ॥ ५ ॥ लाहो कायामनेंवाचा । दिवसाच्या भेटीचा ॥ ६ ॥ कांटाळा तो न धरावा । तुम्ही देवा दासांचा ॥ ७ ॥ तुका म्हणे माझे वेळे। न कळे कां हें उफराटें ॥ ८ ॥ [१८३०]

घ्यावी तरी घ्यावी उदंडचि सेवा। द्यावें तरि देवा उदंडचि ॥ १ ॥ ऐसीं कैचीं आम्हीं पुरतीं भांडवलें । आल्या करीं बोलें समाधान ॥ २ ॥ व्हावें तरी व्हावें बहुतचि दुरी । आलिया अंतरीं वसवावें ॥ ३ ॥ तुका म्हणे तुझें सख्यत्व आपणीं। अससील ऋणी आवडीचा ॥ ४ ॥ [१८३१]

काय करूं जीव होतो कासावीस । कोंडलिये दिसे (कोंडिले दिस) गमेचिना ॥ १ ॥ पडिलें हें दिसे ब्रह्मांडचि वोस। दाटोनि उच्छ्वास राहातसे ॥ २ ॥ तुका म्हणे अगा सर्व जाणातिया। विश्वंभरें काया निववावी ॥ ३ ॥ [१८३२]

सुकलिया कोंभा अत्यंत जळधरें । तेणेंच प्रकारें न्याय असे ॥ १ ॥ न चले पाउलीं सांडीं गरुडासन । मनाचें हो मन त्वरेलागीं ॥ २ ॥ तुका म्हणे भूक न साहावे बाळा । जीवनाची कळा ओढलीसे ॥ ३ ॥ [१८३३]

शृंगारिक माझीं नव्हतीं उत्तरें । आळवितों खरें अवस्थेच्या ॥ १ ॥ न घालावा मधीं कामाचा

ते लाभाला आंचवतील व त्यांची मानहानि होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या कमाईनें जर उत्तम स्वयंपाक (परमार्थ) केला, तर त्याला अविनाश गोडी येईल, आणि तो पंक्तीमध्ये शोभेल ४. [१८२९]

हे नारायणा, मजविषयीं तुमच्या मनाला कोणत्या वेळेस दया येईल ? १. माझा सर्व भार नाहींसा करून तुम्ही माझा अंगीकार कधीं कराल ? २. ही माझ्या मनाला तळमळ लागली आहे, म्हणून मी संसाराचे ठिकाणीं उदास आहें ३. मी तुमच्या श्रीमुखाच्या दर्शनाची वाट पाहातों आणि मज दासाचा सांभाळ करावा ही देणगी मागतों ४. माझें मनोगत तुम्हीं पुरविल्याशिवाय माझ्या श्रमाचा परिहार कसा होईल ? ५. तुमची भेट होण्याचा दिवस कधीं येईल, ह्याबद्दल माझ्या कायावाचामनानें सोस घेतला आहे ६. हे देवा, तुम्हीं आपल्या दासाचा कंटाळा करूं नये ७. तुकाराम महाराज म्हणतात, (अंबरीष, प्रल्हाद ह्यांच्या वेळीं तुमची वागणूक सरळ होती.) माझ्या वेळेला तुमची वागणूक उलटी कां झाली असावी, हें मला समजत नाहीं ८. [१८३०]

हे देवा, जर घ्यावयाची असेल तर माझ्याकडून पुष्कळ सेवा घ्या व द्यावयाचें असेल तर मला पुष्कळ देणगी द्या १. असा प्रकार घडावा, असें आमच्या जवळ पूर्ण पुण्याईचें कसलें भांडवल आलें आहे? आमच्याकडे कोणी आल्यास आम्ही त्याचें समाधान बोलण्यानें करतों २. जर तुम्हांला दूर व्हावयाचें असेल तर पुष्कळ दूर व्हावें आणि जवळ यावयाचें असेल तर अंतःकरणांत वस्ती करावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझें सख्यत्व जोडणें हें आपल्या हातीं आहे, कारण जे कोणी तुजवर प्रेम ठेवितील त्यांचा तूं ऋणी होतोस ४. [१८३१]

काय करावें ! जीव फार कासावीस होऊन कोंडल्यासारखें वाटत आहे, प्रत्येक दिवस जाईनासा झाला आहे. त्यायोगानें करमत नाहीं १. सर्व ब्रह्मांड ओस पडलें असें भासत आहे व त्या योगानें दम कोंडला आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, अगा सर्व जाणणाऱ्या विश्वंभरा, माझी काया–माझें शरीर शांत कर ३. [१८३२]

सुकत चाललेल्या वृक्षाच्या कोंबास पर्जन्याची अत्यंत जरूर आहे. त्याप्रमाणें हे देवा, तुझ्या वियोगानें दुःखी झालेल्या मला तुझी अत्यंत जरूर आहे १. मजकडे तूं पायानें चालत अथवा गरुडावर बसून येऊं नको, कारण त्यामुळें वेळ लागेल. ह्याकरितां तूं त्वरेनें धांवत येण्याविषयीं मनाचेंहि मन हो (मनापेक्षां त्वरा कर) २. तुकाराम महाराज म्हणतात, बालकाला भूक सहन होत नाहीं. अन्नाकरितां त्याचे प्राण आंत ओढल्यासारखे होतात ३. [१८३३]

देवा, मी तुम्हांला खऱ्या कळकळीनें हांका मारीत आहें. माझे हे शब्द शृंगारिक नव्हेत १. मध्यंतरीं कोणत्याहि

विलंब। तुम्ही तो स्वयंभ करुणामूर्ती ॥ २ ॥ तुका म्हणे केलें सन्मूख वदन। देखतां चरण पोटाळीन ॥ ३ ॥ [१८३४]

तूं माझी माउली तूं माझी साउली। पाहातों वाटुली पांडुरंगे ॥ १ ॥ तूं मज एकला वडील धाकुला। तूं मज आपुला सोइरा जीव ॥ २ ॥ तुका म्हणे जीव तुजपाशीं असे। तुझियानें ओस सर्व दिशा ॥ ३ ॥ [१८३५]

कराल तें करा। हातें आपुल्या दातारा ॥ १ ॥ बळियाचीं आम्ही बाळें। असों निर्भर या सळें ॥ २ ॥ आतां कोठें काळ। मधीं रिघेल ओंगळ ॥ ३ ॥ तुका म्हणे पंढरीराया। थापटितों ठोक बाह्या ॥ ४ ॥ [१८३६]

डोळां भरियलें रूप। चित्तीं पायांचा संकल्प ॥ १ ॥ अवघी घातली वांटणी। प्रेम राहिलें कीर्तनीं ॥ २ ॥ जिव्हा केली माप। रासीं हरिनाम अमुप ॥ ३ ॥ भरुनियां भाग। तुका बैसला पांडुरंग ॥ ४ ॥ [१८३७]

आतां आहे नाहीं। न कळे आळी करा कांहीं ॥ १ ॥ देसी पुरवुनी इच्छा। आतां पंढरीनिवासा ॥ २ ॥ नेणें भाग शीण। दुजें कोणी तुम्हांवीण ॥ ३ ॥ आतां नव्हे दुरी। तुका पायीं मिठी मारी ॥ ४ ॥ [१८३८]

संकल्पासी अधिष्ठान। नारायण गोमटें ॥ १ ॥ अवघियांचें पुरे कोड। फिटे जड देहत्व ॥ २ ॥ उभय लोकीं उत्तम कीर्ति। देव चित्तीं राहिलिया ॥ ३ ॥ तुका म्हणे जीव धाय। नये हाय जवळी ॥ ४ ॥ [१८३९]

भाग्यवंता हेचि (ऐसी) जोडी। परवडी संतांची ॥ १ ॥ धन घरीं पांडुरंग। अभंग तें सरेना ॥ २ ॥

कामामध्यें गुंटून भेटण्यास विलंब लावूं नकोस. देवा, तुम्ही तर साक्षात् कृपामूर्ति आहांत २. तुकाराम महाराज म्हणतात, मी तुमच्यासमोर तोंड करून उभा आहें. मला तुमचे चरण दिसल्याबरोबर मी त्याला मिठी मारीन ३. [१८३४]

हे पांडुरंगे, तूं माझी आई असून श्रम परिहार करणारी सांवली आहेस, मी तुझी वाट पाहात आहें १. मला वडील धाकटा काय तो तूंच आहेस व माझे जिवाचा जिवलग आप्त काय तो तूंच २. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, माझा सर्व जीव तुझ्यापाशीं असून तुझ्यावांचून मला सर्व दिशा शून्य भासत आहेत ३. [१८३५]

हे दात्या देवा, जें तुला आमचें करावयाचें असेल, तें तूं आपल्या हातानें कर १. आम्ही समर्थाचीं बालकें आहोंत, ह्यामुळें आम्ही भयविरहित आहोंत २. आतां आमच्यामध्यें दुष्ट काळाचा प्रवेश कसा होईल? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीराजा, हें मी त्या काळाशीं झुंजण्याकरितां रोखठोक दंड थोपटून आहोंत (असें सांगतों) ४. [१८३६]

देवा, तुमचें रूप माझ्या डोळ्यांत भरलें असून, चित्त हें तुमच्या पायांचाच संकल्प करीत आहे १. मनासह इंद्रियांची योजना मीं तुझ्या स्वरूपीं केली आहे व माझ्या जीवाचें प्रेम तुझ्या कीर्तनाकडे जडलें आहे २. असंख्य हरिनामाच्या राशी मोजण्याकरितां मी आपल्या जिव्हेचें माप केलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, पांडुरंग हा वांटा मी आपल्या हृदयांत भरून स्वस्थ बसलों आहें ४. [१८३७]

बालक हें आपल्या आईबापाजवळ एखाद्या गोष्टीचा हट्ट धरून बसतें, पण ती गोष्ट आपल्या आईबापाचेजवळ आहे कीं नाहीं, हें त्याला कळत नाहीं १. हे पंढरीनिवासा, आतां तूं माझी इच्छा पूर्ण होईल असें देशील २. आम्हांला झालेले (जन्म-मरणांचे) श्रम व त्रिविध तापांचें दुःख तुजवांचून दुसरा कोण जाणणारा आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मीं तुमच्या पायीं मिठी मारली आहे, तो मी तुमच्यापासून दूर होणार नाहीं ४. [१८३८]

संकल्प करण्यास नारायण हेंच फार चांगलें ठिकाण आहे (संकल्प हा नारायणाविषयींच करावा) १. त्या ठिकाणीं सर्वांची इच्छा पूर्ण होते आणि जड देहाचें तादात्म्य नाहींसें होतें २. जर आपल्या चित्तामध्यें देव राहिला तर इहलोकीं व परलोकीं आपली चांगली कीर्ति होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या ठिकाणीं आपला जीव तृप्त होऊन आपल्याजवळ तळमळ येणार नाहीं (तळमळ, इच्छा नाहींशी होईल) ४. [१८३९]

जे कोणी भाग्यवान् आहेत, त्यांना संतांच्या पंगतीचा लाभ होतो १. पांडुरंगरूपी द्रव्य संतांच्या घरीं असतें.

जनाविरहित हा लाभ। टाचे नभ सांठवण (णें) ॥ ३ ॥ तुका म्हणे विष्णुदासां। नाहीं आशा दुसरी ॥ ४ ॥ [१८४०]

जरी आलें राज्य मोळविक्या हाता। तरी तो मागुता व्यवसायी ॥ १ ॥ तृष्णेचीं मजुरें नेणती विसांवा। वाढे हांव हांवा काम कामीं ॥ २ ॥ वैभवाचीं सुखें नातळतां अंगा। चिंता करी भोगा विघ्न जाळी ॥ ३ ॥ तुका म्हणे वाहे मरणाचें भय। रक्षण उपाय करूनि असें ॥ ४ ॥ [१८४१]

कोण होईल आतां संसार पांगिलें। आहे उगविलें सहजचि (करुणाकरीं) ॥ १ ॥ केला तो चालवी आपुला प्रपंच। काय कोणां वेंच आदा घे दे ॥ २ ॥ सहजचि घडे आतां मोळ्याविण। येथें काय सीण आणि लाभ ॥ ३ ॥ तुका म्हणे जालों सहज देखणा। ज्याच्या त्यानें खुणा दाखविल्या ॥ ४ ॥ [१८४२]

आम्हां शरणागतां। एवढी काय करणें चिंता ॥ १ ॥ परि हे कौतुकाचे खेळ। अवघे पाहातों सकळ ॥ २ ॥ अभयदान वदें। आम्हां कैंचीं भयद्वंद्वें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही। हरिभजन साधनाचे स्वामी ॥ ४ ॥ [१८४३]

देवाचिये चाडे प्रमाण उचित। नये वांटूं चित्त निषेधासीं ॥ १ ॥ नये राहों उभें कसमळापाशीं। भुंकतील तैसीं सांडावीं तीं ॥ २ ॥ तुका म्हणे क्षमा सुखाची हे रासी। सांडूनि कां ऐसी दुःखी व्हावें ॥ ३ ॥ [१८४४]

खळा सदा क्षुद्रीं (क्षुद्र) दृष्टी। करी कष्टी सज्जना ॥ १ ॥ करिती आपुलाले परी।

त्याचा नाश कधीं होत नाहीं २. हा लाभ सर्व जनांच्या वेगळा आहे. ह्याला सांठवावयास आकाशदेखील पुरणार नाहीं. ३. तुकाराम महाराज म्हणतात, विष्णुदासांना संत आणि पांडुरंग ह्या धनावांचून दुसरी आशा नाहीं ४. [१८४०]

एखादा कोणी मोळी विकणारा राज्यावर बसविला, तरी त्यास मोळ्या विकण्याचा व्यापार करावयाची इच्छा उत्पन्न होते १. त्याप्रमाणें संसारी माणसें मनुष्यदेह हाताशीं येऊन देखील ज्यांचे अंगीं पुष्कळ तृष्णा आहे, ते तिचेच सेवक होऊन अविश्रांत श्रम करितात, आणि त्यायोगानें हांवेनें हांव व कामानें काम वाढतो २. जरी त्यास चांगलें वैभव असलें तरी त्याच्या अंगास सुख लागत नाहीं, आणि जरी उत्तम प्रकारचे भोग अनुकूल असले, तरी त्यांत कांहीं विघ्न येईल कीं काय, म्हणून तो सर्वकाळ चिंता करीत असतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, जरी तो मरणाचें भय बाळगीत असला तरी आपलें वैभव रक्षण करण्याचे उपाय तो करीत राहातो ४. [१८४१]

संसाराचा संबंध साहजिक सुटल्यामुळें, आतां त्याच्या आधीन कोणीं व्हावें ? १. हा प्रपंच ज्यानें (ज्या ईश्वरानें) निर्माण केला आहे, तोच तो आपला चालवील. त्यांत देवघेव करण्यानें कोणाची प्राप्ति खर्च होत आहे काय? २ आतां ह्या प्रपंचराहाटीचा ओघ सहज चालला आहे, म्हणून ह्या ठिकाणीं आम्हांला लाभ अथवा हानि मानण्याचें काय कारण आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी सहज आत्मस्थितीनें प्रपंचाचा द्रष्टा झालों आहें, कारण त्याच्या त्यांनीं (देवांनीं) आपल्या खुणा मला दाखविल्या (प्रपंचाला कारण असलेल्या ईश्वरानेंच आपण निर्माण केलेल्या प्रपंचाचें स्वरूप मिथ्या असल्याचें मला दाखविलें आहे) ४. [१८४२]

आम्ही देवाचे शरणागत झालों आहों, म्हणून आम्हांला इतकी चिंता करण्याचें काय कारण आहे? १. परंतु जें कांहीं क्रीडाकौतुक आहे तें सर्व आम्ही पाहातों २. देवानें मला भिऊं नको ह्या शब्दानें अभयदान दिलें आहे, म्हणून आम्हांला सुखदुःखादि द्वंद्वाचें भय कसलें आहे ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही हरीचे सेवक आहोंत, त्या योगानें सर्व साधनांचे मालक झालों आहोंत ४. [१८४३]

(मुमुक्षु हरिभक्तानें) एक देवाचीच गरज टेवावी (वेद व संत ह्यांना प्रमाण मानावें) हेंच योग्य कर्तव्य आहे. ह्याखेरीज चित्ताची विभागणी निषिद्ध कर्माकडे होऊं देऊं नये १. वाईट वागणाऱ्या कुत्सित लोकांजवळ घटकाभरदेखील उभें राहूं नये आणि त्यांचें बोलणें कुत्रें भुंकल्याप्रमाणें समजून त्याचा त्याग करावा २. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या अंगीं क्षमा हें लक्षण असलें, म्हणजे ती क्षमा केवळ सर्व सुखाची रास आहे, म्हणून तिला टाकून मुमुक्षूनें दुःखी कशाकरितां व्हावें ? ३. [१८४४]

जे कोणी नष्ट-दुष्ट आहेत त्यांची दृष्टि सर्वकाळ हलक्या गोष्टीकडे असते म्हणून ते सुजनांस त्रास देतात १.

धर्णीवरी व्यापार ॥ २ ॥ दया संतां भांडवल । वेंची बोल उपकार ॥ ३ ॥ तुका म्हणे आपुलालें । उसंतिलें ज्यांनीं तें ॥ ४ ॥ [१८४५]

जग ऐसें बहुनांवें । बहुभावें भावना ॥ १ ॥ पाहों बोलों बहु नये । सत्य काय सांभाळा ॥ २ ॥ कारियासी (कार्यासी) जें कारण । तें जतन करावें ॥ ३ ॥ तुका म्हणे संतजनीं । हेंचि मनीं धरावें ॥ ४ ॥ [१८४६]

निवालें तें अंगीहूनि(आगीहूनि) । आतां झणीं आतळे ॥ १ ॥ पळवा परपरतें दुरी । आतां हरी येथूनी ॥ २ ॥ धरिलें तैसें श्रुत करा हो । येथें आहों प्रपंचीं ॥ ३ ॥ अबोल्यानें टेला तुका । भिऊनि (भेउनि) लोकां निराळा ॥ ४ ॥ [१८४७]

आतां दुसरें नाहीं मनीं । निरंजनीं पडिलों ॥ १ ॥ तुमचीच पाहें वास । अवघी आस निरसली ॥ २ ॥ मागिलांचा मोडला माग । घडला त्याग अरुची ॥ ३ ॥ तुका म्हणे करुणाकरा । तूं सोयरा दीनांचा ॥ ४ ॥ [१८४८]

करूनियां सांडें परतलें मन । अनुलक्षीं चरण करूनियां ॥ १ ॥ येईं पांडुरंगे नेईं सांभाळूनि । करुणावचनीं आळविलों ॥ २ ॥ बुद्धि झाली साह्य परी नाहीं बळ । अवलोकितों जळ वाहे नेत्रीं ॥ ३ ॥ न चालती पाय शक्तित झाली काया । म्हणवुनि दया येऊं द्यावी ॥ ४ ॥ दिशेच्या करितों

हे जाणि संत हे अशा प्रकारच्या व्यवहार आपापल्या परीनें यथास्थित करतात २. सर्व भूतांवर दया करणें हें संतांजवळ भांडवल असतें, म्हणून ते परोपकाराकरितां बोलतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे प्रकार आपापल्या योग्यतेप्रमाणें ज्याचे त्यांनीं चालविले आहेत ४. [१८४५]

अनेक नांवांनीं व (सात्त्विक, राजस, तामस इत्यादि) अनेक भावनांनीं जें भरलेलें आहे तें जग होय १. ह्याकरितां जगाकडे फारसें पाहूं नये व त्याच्याबरोबर फारसें बोलूं नये आणि जें कांहीं खरें आहे त्याचें रक्षण करावें २. जगाशीं कार्याकारणापुरता संबंध ठेवावा, अथवा ज्यापासून आपलें हरिप्राप्तिरूप कार्य होत आहे, त्याचें कारण जी भक्ति तिचें रक्षण करावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतजनांनीं मीं सांगितलेले प्रकार पूर्णपणें लक्षांत ठेवावे ४. [१८४६]

माझे देहांतून जे विकार बाहेर पडले आहेत, ते आतां कदाचित् पुनः मला स्पर्श करतील. (पाठभेद : आतां प्रपंचरूपी अग्नींतून बाहेर पडल्यानंतर मला त्या अग्नीचा स्पर्श होऊं देऊं नका, त्याला माझ्या देहापासून दूर पिटाळा १–२) १. हे हरि, आतां ह्या ठिकाणांतून ते विकार परा वाचेच्या पलीकडे दूर घालवा (समूळ नाहींसे करा) २. जें मीं मनांत धरलें आहे, त्याप्रमाणें मला ऐकवा. (माझ्या मनोगताप्रमाणें मला सांगा). अहो देवा, आम्ही ह्या प्रपंचाच्या ठिकाणीच आहों (तुम्हां पतितपावन हें नांव धारण केलें तशी कृति करून दाखवा. आम्ही तर प्रपंचांतच आणखी आहों) ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी ह्या लोकांना भिऊन त्यांच्या वेगळा झालों आणि मौनपणें राहिलों ४. [१८४७]

मी निर्जन वनांत पडून राहिलों आहें. आतां देवा, तुझ्यावांचून माझ्या मनांत (दुसरें कांहीं नाहीं) १. (स्त्रीपुत्रादि धांवून येतील ही) माझी सर्व आशा नाहींशी झाली, म्हणून मी तुमचीच वाट पाहात आहें २. मागील सर्व संसाराचा वीट आल्यामुळें, मीं त्याचा त्याग केला, म्हणून त्याचा मागमूसदेखील राहिला नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे करुणाकरा देवा, तूं गरिबांचा सहकारी सखा आहेस ४. [१८४८]

तुमचे चरण अनुलक्षून व तोच मार्ग धरून प्रपंचापासून माझें मन परतलें १. हे पांडुरंगे, मी तुला करुणेच्या शब्दांनीं हांका मारीत आहें म्हणून तूं धांवून ये आणि मला सांभाळून आपल्याकडे घेऊन जा २. ह्याविषयीं (परमार्थाविषयीं) माझी बुद्धि मला साह्य झाली आहे, पण तुजकडे येण्याची अंगांत शक्ति नाहीं, म्हणून मी तुझी वाट पाहातों व (तूं येत असलेला दिसत नाहींस म्हणून) माझ्या डोळ्यांतून सारखें पाणी वाहात आहे ३. वाटेनें चालावें, तर पाय चालेनात व माझें शरीर क्षीण झालें. ह्याकरितां माझी करुणा तुला येऊं दे ४. तूं ज्या देशांत आहेस, तिकडून जर वारा आला, तर त्याला मी विचारतों, कीं देव मला न्यावयास येईल काय? असें म्हणून हात जोडून मी तुझी वाट

वारियासी मात। जोडुनियां हात वाट पाहें ॥ ५ ॥ तुका म्हणे वेग करावा सत्वर। पावावया तीर भवनदीचें ॥ ६ ॥ [१८४९]

कौलें भरियेली पेंठ (कवलें भरियलें पोट)। निग्रहाचे खोटे तंट ॥ १ ॥ ऐसें माता जाणे वर्म। बाळा वाढवितां धर्म ॥ २ ॥ कमावितां लोहो कसे (कामवितां लाहे कसें)। तांतडीनें काम नासे ॥ ३ ॥ तुका म्हणे खडे। देतां अक्षर तें जोडे ॥ ४ ॥ [१८५०]

चालिलें न वाटे। गाऊनियां जातां वाटे ॥ १ ॥ बरवा वैष्णवांचा संग। येतो सामोरा श्रीरंग ॥ २ ॥ नाहीं भय आड। कांहीं विषमाचें जड ॥ ३ ॥ तुका म्हणे भक्ति। सुखरूप आदीअंतीं ॥ ४ ॥ [१८५१]

करितां विचार। तव (तो) हा दृढ संसार। ब्रह्मादिकां पार। नुलंघवे सामर्थ्यें ॥ १ ॥ शरण शरण नारायणा। मज अंगिकारीं दीना। आलें तें वचना। पासीं (पाळीं) माझ्या सामर्थ्य (र्थ्यें) ॥ २ ॥ पाठीवरी मोळी। तोचि कळवा पायीं तळीं। सांपडला (तां) जाळीं। मस्त्य झाला तो न्याय ॥ ३ ॥ आतां करीन तांतडी। लाभाची ते याच जोडी। तुका म्हणे ओढी। पायां सोई मनाची ॥ ४ ॥ [१८५२]

बहुतां जातीचा केला अंगीकार। बहुतही फार सर्वोत्तमें ॥ १ ॥ सरलाचि नाहीं कोणाचिये वेचें। अक्षोभ ठायींचें ठायीं आहे ॥ २ ॥ लागतचि नाहीं घेतां अंतपार। वसवी अंतर अणूचेंही ॥ ३ ॥ तुका म्हणे केला होय ठाकी ऐसा। पुरवावी इच्छा धरिली ते ॥ ४ ॥ [१८५३]

पाहात आहें ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मला भवसागरांतून पलीकडल्या तीरास पोहोंचविण्याकरितां, तुम्ही त्वरा करा ६. [१८४९]

ही पेठ साधनरूपी कौलांनीं भरली आहे, त्या ठिकाणीं हट्ट करण्याचा गवगवा व्यर्थ आहे (*पाठभेद* : शहाणी आई लहान मुलाला एक एक घांस खाऊं घालते व त्याचें पोट भरविते. एकदम सर्व अन्न भरवीत नाहीं. सामान्य लोकांनीं योगाभ्यासासारखें निग्रहाचें साधन करण्याचा आग्रह धरूं नये. संतांनीं सामान्य लोकांकरितां हरिनामाची योजना केली आहे) १. बालकाचें पालनपोषण करून त्यास कसें वाढवावें, हा धर्म (हें मर्म) आई जाणते २. लोखंड चांगलें कमावलें तर तें किंमतींत चढतें आणि कमाई न करितां उतावीळपणा केला तर त्या कार्याचा नाश होतो (*पाठभेद* : कोणतेंहि साधन दीर्घकाल, अखंड व श्रद्धेनें केलें तरच तें फळाच्या दृष्टीनें कसोटीला येतें; तें तांतडीनें केल्यास निष्फल होतें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, लहान बालकांस जर खडे मांडून शिकविलें तर अक्षराची ओळख होते ४. [१८५०]

हरिनाम गाणें गात वाटेनें चालत असतां चालण्याचे श्रम वाटत नाहींत १. म्हणून संतांचा समागम फार बरा आहे, कारण त्यांच्याबरोबर गेलें असतां श्रीरंगदेव आपणांस सामोरा येतो २. ह्या वाटेनें कांहीं संकट येत नाहीं व भयहि उत्पन्न होत नाहीं. तुकाराम महाराज म्हणतात, हरीची भक्ति ही आरंभापासून शेवटपर्यंत सुखदायक आहे ४. [१८५१]

जों जों मी विचार करून पाहिलें, तों तों हा संसारसमुद्र मोठा दुस्तर आहे. ह्याच्या पैलतीरास जाण्याचें सामर्थ्य ब्रह्मादि देवांसदेखील नाहीं १. हे नारायणा, म्हणून मी तुम्हांला शरण आहें (असें द्विवार विनवितों). मज गरिबाचा तुम्ही अंगीकार करा, हेंच बोलण्याचें बळ माझ्याजवळ आहे. (*पाठभेद* : आपल्याकडून जें आज्ञावचन आलें त्याचें मी यथाशक्ति पालन करीत आहें.) त्यावांचून माझ्याजवळ दुसरी शक्ति नाहीं २. पाठीवर घेतलेल्या मोळीच्या ओझ्यानें पाठीसच ओझें होतें असें नाहीं, तर त्याची पोंच तळपायापर्यंतहि आहे; आणि जाळ्यामध्यें मासा सांपडल्यावर जशी त्याची स्थिति होते, तसा प्रकार माझा झाला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमची प्राप्ति करून घेण्याविषयीं आतां मी त्वरा करीन, कारण माझ्या मनाची ओढ तुमच्या पायांकडे आहे ४. [१८५२]

ह्या सर्वोत्तम देवानें अनेक जातींचा (जातींच्या भक्तांचा) अंगीकार केला आहे व पुष्कळांचा उद्धार केला आहे १. परंतु असें करण्यानें हा देव कमी झाला नाहीं, तर तो जागच्या जागींच स्थिर आहे २. ह्याचा अंत अथवा कड पाहावयास गेलों तर तो लागत नाहीं. तो अणुरेणूच्याहि आंत वास्तव्य करीत आहे (इतका तो व्यापक व सूक्ष्महि आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवाला जसा करावा, तसा तो होतो आणि भक्त जी जी वासना धरतील ती ती तो पूर्ण करतो ४. [१८५३]

पोट धालें आतां जीवनीं आवडी । पुरवावी परवडी बहुतांची ॥ १ ॥ काय आंचवणा तांतडीचें काम । मागील ते श्रम न पवाची ॥ २ ॥ वाढितिया पोटीं बहु असे वाव । सांभाळितां ठाव काय वेंचे ॥ ३ ॥ दाविल्यावांचूनि नाहीं कळों येत । तेथेंहि दुश्चित एकपण ॥ ४ ॥ नावेचा भार तो उदकाचे शिरीं । काय हळू भारी तये ठायीं ॥ ५ ॥ तुका म्हणे गीतीं गाऊनि गोविंद । करूं ब्रह्मानंद एकसरें ॥ ६ ॥ [१८५४]

एका हातीं टाळ एका हातीं चिपळिया । घालिती हुंबरी (हुमरी) एक वाहाताती टाळिया ॥ १ ॥ मातले वैष्णव नटती नाना छंदें । नाहीं मोक्षपदें चाड भजनीं आवडी ॥ २ ॥ हाका आरोळिया गीत वाद्यें सुख सोहळे । जाय ते न कळे केव्हां रजनी दिवस ॥ ३ ॥ तीर्थी नाहीं चाड न लगे जावें वनांतरा । तुका म्हणे हरिहरात्मकचि पृथ्वी ॥ ४ ॥ [१८५५]

देव सखा आतां केलें नव्हे काई । तेणें सकळही सोइरींच ॥ १ ॥ भाग्यवंत झालों गोतें सपुरतीं । आतां पुण्या नीति पार नाहीं ॥ २ ॥ पाहतां दिसती भरलिया दिशा । ठसावला ठसा लोकत्रयीं ॥ ३ ॥ अविनाश जोडी आम्हां भाग्यवंतां । झाली होती सत्ता संचिताची ॥ ४ ॥ पायांवरी डोई ठेवावी आरोथा । झाली द्यावी सत्ता क्षेम ऐसी ॥ ५ ॥ तुका म्हणे जीव पावला विसांवा । म्हणवितां देवा तुमचींसीं ॥ ६ ॥ [१८५६]

कोण आतां कळिकाळा । येऊं बळा देईल ॥ १ ॥ सत्ता झाली त्रिभुवनीं । चक्रपाणी कोवसा

(ब्रह्मानंदाचें भोजन करून) आतां आमचें पोट भरलें आहे तरी आमचें जीवन (भक्तिरूपी पाणी) जो श्रीहरि त्याविषयींची प्रीति आहे. ती प्रीति अनेकांच्या पंगतीस पुरवावी १. अहो पंगतिकर, अशा ह्या प्रीतीचें जेवण त्वरेनें पुरें करून आंचवण्यांत (हात धुण्यांत) काय अर्थ आहे ? कारण पूर्वीच्या पाकसिद्धीचे (जन्म-मरणांचे) श्रम तुम्हांस होणार नाहींत २. जे वाढणारे संत आहेत, त्यांच्या पोटांत जर पुष्कळ अवकाश आहे (वाढणारे जर उदार आहेत) तर आपलें ठिकाण आपण सांभाळल्यास काय खर्च होतो ? आपण जेवण्यांत कां कसर करावी ? ३. अशा ठिकाणीं एकटेपणानें किंवा एककल्लीपणानें राहाणें हें वाईट आहे. (संतांनीं उपदेश केल्याशिवाय सामान्य लोकांना परमार्थ कळत नाहीं आणि त्या उपदेशाविषयीं मनुष्य उदास राहील तर त्याला संसारदुःखांत एकटेपणानें राहावें लागेल.) असा हा प्रकार दर्शविल्यावांचून कांहीं समजूत येत नाहीं ४. जी नौका पाण्यावर चालते तिचा सर्व भार पाण्यावरच असतो मग नावेंत बसणाराचें तिला कांहीं जड भारी ओझें होतें काय? (त्याप्रमाणें संतांवर सर्व भार सोंपवावा) ५. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही गाण्यामध्यें गोविंदास गाऊन एकसारखा ब्रह्मानंद करूं ६. [१८५४]

वैष्णवसमुदाय मिळाला आहे. त्यांत कित्येकांच्या हातांमध्यें टाळ आहेत व कोणी चिपळ्या वाजवितात व कोणी टाळ्या वाजवितात. ते आनंदानें हरिनामाची अशी हुंबरी (सूर, आरोळी, गदारोळ) घालतात १. ते वैष्णव भक्तिसुखानें उन्मत्त झाले आहेत म्हणून अनेक शृंगारानें व अनेक छंदानें नटतात. त्यांना भजनाची आवड असल्यामुळें मोक्षपदाचीदेखील गरज नाहीं २. ते मोठ्यानें आरोळ्या फोडून देवास हांक मारितात आणि नाना प्रकारचीं वाद्यें वाजवून त्याचेंच गाणें गातात. अशा सुखसोहळ्यांत ते असल्यामुळें दिवस अथवा रात्र केव्हां गेली हें त्यांस समजत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या वैष्णवांना वनांतरास जाणें नको. कोणत्याहि तीर्थाची गरज नाहीं कारण त्यांना ही सर्व पृथ्वी हरि-हरमय झाली आहे ४. [१८५५]

आमचा देव सखा आहे म्हणून आतां आम्ही करूं लागलों तर काय एक होणार नाहीं? ह्या योगानें सर्व जीव आमचे आप्तच झाले आहेत १. म्हणून आम्ही मोठे भाग्यवान् झालों आहोंत व सर्व जीव पुरतेपणानें आमचे गोत झाले आहेत. आतां आमच्या पुण्य-नीतीचा अंत लागत नाहीं २. देवाची मूर्ति आमच्या हृदयांत ठसली आहे म्हणून आम्हांला त्रैलोक्यांत पाहिलें असतां सर्व दिशा देवानेंच भरल्या आहेत अशा दिसतात ३. आम्हां भाग्यवानांस हा अविनाश लाभ प्राप्त झाला आहे त्याचें कारण आमच्या प्रारब्धाची सत्ता हें होय ४. देवाच्या पायांवर आम्ही पंडितांनीं मस्तक ठेवावें आणि त्यास आलिंगन द्यावें अशी आमची विलक्षण इच्छारूपी सत्ता आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आम्ही तुमचे आहोंत असें म्हणविल्यामुळें आमचा जीव विश्रांति-समाधान पावला ६. [१८५६]

आतां आमच्या पुढें कळिकाळाचें कांहीं बळ चालणार नाहीं १. त्याचें कारण चक्रपाणी जो देव तो आमचा सखा आहे,

॥ २ ॥ लडिवाळांचा भार वाहे । उभा आहे कुढावया ॥ ३ ॥ तुका म्हणे घटिका दिस । निमिषही न विसंबे ॥ ४ ॥ [१८५७]

आम्हां आवडे नांव घेतां । तोही पिता संतोषे ॥ १ ॥ उभयतां एकचित्त । तरी प्रीत वाढली ॥ २ ॥ आम्ही शोभों निकटवासें । अनारिसें न दिसे ॥ ३ ॥ तुका म्हणे पांडुरंगें । अवघीं अंगें निवालीं ॥ ४ ॥ [१८५८]

देह तंव असे भोगाचे अधीन । याचे सुख सीण क्षणभंगुर ॥ १ ॥ अविनाश जोडी देवापायीं भाव । कल्याणाचा ठाव । सकळही ॥ २ ॥ क्षणभंगुर हा येथील पसारा । आलिया आकारा अवघें नासे ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें सकळ विश्रांति । आठवावा चित्तीं नारायण ॥ ४ ॥ [१८५९]

आतां अवश्यक करणें समाधान । पाहिलें निर्वाण न पाहिजे ॥ १ ॥ केलें तरी आतां सुशोभ्य करावें । दिसतें बरवें संतांमधीं ॥ २ ॥ नाहीं भक्तराजीं ठेविला उधार । नामाचा आकार त्यांचियानें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझ्या वडिलांचें ठेवणें । गौप्य (गोप्य) नारायणें न करावें ॥ ४ ॥ [१८६०]

काया वाचा मनें श्रीमुखाची वास । आणीक उदास विचारासी ॥ १ ॥ काय आतां मोक्ष करावा जी देवा । तुमचिया गोवा दर्शनासी ॥ २ ॥ केलिया नेमासी उभे ठाड व्हावें । नेमलें तें भावें पालटेना ॥ ३ ॥ तुका म्हणे जों जों कराल उशीर । तों तों मज फार रडवील ॥ ४ ॥ [१८६१]

पुढिलांचे सोयी माझ्या मना चाली । मताची आणिली नाहीं बुद्धी ॥ १ ॥ केलासी तों उभा आजिवरी संतीं । धरविलें हातीं कट देवा ॥ २ ॥ आहे तेंचि मागों नाहीं खोटा चाळा ।

म्हणून आमची सत्ता त्रिभुवनांवर झाली आहे २. आम्हां लडिवाळांचा योग-क्षेमाचा सर्व भार त्यानें घेऊन आमचा सांभाळ करण्याकरितां तो उभा राहिला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो देव आम्हांस दिवसभर अथवा घटकाभर अथवा निमिषभरदेखील विसंबत नाहीं ४. [१८५७]

आम्हांस हरीचें नाम घेणें आवडतें व त्या योगानें तो आमचा देव पिता संतुष्ट होतो १. त्याचें व आमचें मन एक आहे म्हणूनच उभयतांमध्यें मोठें प्रेम वाढलें आहे २. आमचा त्याच्याशीं निकट संबंध आहे म्हणून आम्ही शोभतों व त्याच्याहून आम्ही निराळे आहों असें दिसत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या पांडुरंगाच्या योगानें आमचें सर्वांग शांत झालें ४. [१८५८]

आमचा देह प्रारब्धकर्माचे स्वाधीन आहे म्हणून तत्संबंधीं सुख-दुःख क्षणिक आहे १. देवाचे पायांजवळ भाव ठेवणें हा अविनाशी लाभ आहे आणि सर्वकल्याणदायक असें हेंच ठिकाण आहे २. त्यावांचून हा सर्व संसारपसारा क्षणिक आहे, कारण जितकें आकाराग आलें आहे तें सर्व नाशवंत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, चित्तामध्यें नारायणाची आठवण करणें हीच सर्व विश्रांति आहे ४. [१८५९]

हे देवा, आतां तुम्ही माझें अवश्यमेव समाधान केलें पाहिजे. तुम्ही माझा अंत पाहूं नका १. जसें मला तुम्हीं दास केलें आहे तेंच आतां शोभिवंत दिसेल असें करा म्हणजे तें संतांमध्यें बरें दिसेल २. पूर्वींच्या भक्तराजांनीं तुम्हांस कांहीं उधार ठेवलें नाहीं. त्यांच्याकरितांच तुम्ही नांवारूपास आलां ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा माझा वडिलार्जित ठेवा तुमचेपाशीं आहे. तो नारायणांनीं लपवून ठेवूं नये ४. [१८६०]

काया-वाचा-मनानें हरीच्या सुशोभित मुखाचीच मी वाट पाहात आहें, त्यावांचून अन्य गोष्टीविषयीं उदासीनता आहे १. हे देवा, आतां मला मोक्ष काय करावयाचा आहे? कारण मोक्षस्थितीनें तुमच्या दर्शनांत अंतर येतें (अडथळा येतो) २. मी नियम केल्याप्रमाणें आपण माझ्यापुढें उभें राहावें. मीं जो नियम केला आहे त्या भावनेंत कधींहि बदल होणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, जों जों तुम्ही दर्शन देण्यास उशीर लावाल तों तों उशीर मला धीर न धरवल्यामुळें फार रडवील ४. [१८६१]

पुढें जे संत गेले त्या मार्गानेंच माझें मन धांवतें. मी आपल्या बुद्धीनें वागत नाहीं. १. हे देवा, आजपर्यंत तुम्हांला संतांनीं उभें केलें आहे, म्हणून तुम्ही कमरेवर हात ठेवून उभे आहांत २. जें तुमचें स्वरूप उभें आहे त्याचीच मी भेट

नये येऊं बळा लेंकरांसी ॥ ३ ॥ तुका म्हणे माझा साक्षीचा व्यवहार। कृपण जी थोर परी तुम्ही ॥ ४ ॥ [१८६२]

बहुतां करुनि चाळवाचाळवी। किती तुम्ही गोवी करीतसां ॥ १ ॥ लागटपणें मी आलों येथवरी। चाड ते दुसरी न धरूनि ॥ २ ॥ दुजियांचा तव तुम्हांसी कंटाळा। राहासी निराळा एकाएकी ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां यावरी गोविंदा। मजशीं विनोदा येऊं नये ॥ ४ ॥ [१८६३]

तीर्थ जळ देखे पाषाण प्रतिमा। संत ते अधमा माणसांऐसे ॥ १ ॥ वांजेच्या मैथुनापरी गेलें वायां। बांडेल्याचें जाया झालें पीक ॥ २ ॥ अभाविका सदा सुतकी चांडाळ। सदा तळमळ चुकेचि ना ॥ ३ ॥ तुका म्हणे वरदळी ज्याची दृष्टी। देहबुद्धि कष्टी सदा दुःखी ॥ ४ ॥ [१८६४]

नव्हे मतोळ्याचा वाण। नीच नवा नारायण ॥ १ ॥ सुख उपजे श्रवणें। खरें टांकसाळी नाणें ॥ २ ॥ लाभ हातोहातीं। अधिक पुढतोपुढती ॥ ३ ॥ तुका म्हणे नेणों किती। पुरोनि उरलें पुढती ॥ ४ ॥ [१८६५]

घातला दुकान देती आलियासी दान ॥ १ ॥ संत उदार उदार। भरलें अनंत भांडार ॥ २ ॥ मागत्याची पुरे। धणी आणिकांसी उरे ॥ ३ ॥ तुका म्हणे पोतें। देवें भरिलें नव्हे रितें ॥ ४ ॥ [१८६६]

नरस्तुती आणि कथेचा विकरा। हें नको दातारा घडों देऊं ॥ १ ॥ ऐसिये कृपेची भाकितों करुणा। आहेसि तूं राणा उदारांचा ॥ २ ॥ पराविया नारी आणि परधना। नको देऊं मना वरी येऊं ॥ ३ ॥ भूतांचा मत्सर आणि संतनिंदा। हें नको गोविंदा घडों देऊं ॥ ४ ॥ देहअभिमान नको

मागतों. आमचा कांहीं खोटा छंद नाहीं, म्हणून आम्हां बालकांविषयीं एवढे हट्टाला पेटूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा सर्व व्यवहार साक्षीनें (कोणाला तरी साक्षी ठेवून) होत आहे. अहो देवा, तुम्ही फार कृपण आहां ४. [१८६२]

आजपर्यंत तुम्ही पुष्कळ भक्तजनांना भुलथापा देऊन किती तरी गुंताड्यांत घातलें १. मी दुसरी कांहीं इच्छा न करितां लोचटपणानें तुमचेजवळ आलों आहें २. द्वैतभावाचा तुम्हांला कंटाळा आला आहे, म्हणून तुम्ही सर्व उपाधींहून वेगळे असे एकटे राहातां ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे गोविंदा, इतोत्तर (ह्यानंतर) इतर भक्तांप्रमाणें माझ्यापाशीं विनोदाचा व्यवहार करूं नये (मन उदार करून एकदांचें दर्शन द्याच) ४. [१८६३]

जो अभाविक मनुष्य गंगादि तीर्थांस सामान्य पाणी असें समजतो व देवाचे प्रतिमेस दगड समजतो आणि संतांस अधम माणसांप्रमाणें जाणतो १. कणसें न आलेलें पीक जसें व्यर्थ जातें तसें त्याचें सर्व कृत्य वंध्यामैथुनाप्रमाणें होतें २. ज्याच्यामध्यें भावना नाहीं (त्यानें कोणतेंहि धर्मकृत्य केलें तरी त्याला निश्चित निष्ठास्थान नसल्यामुळें) तो सर्वकाळ सुतकी व चांडाळ आहे. त्याच्या हृदयांत सर्वकाळ असणारी तळमळ कधींहि नाहींशी होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याची दृष्टि बाह्याकारी आहे असा देहबुद्धिमान (देहाभिमानी) सर्वकाळ दुःखी कष्टी असावयाचा ४. [१८६४]

नारायण हा माल घोंटाळ्याचा (जुना, कुजलेला) नाहीं तर नित्य नवा आहे १. त्याचें नाम श्रवण केलें तर सुख होतें असें हें टांकसाळींतलें खरें नाणें आहे २. त्याचा लाभ पुनः पुनः त्वरित अधिक होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरीचें नामरूपी धन कितीकांना (सर्व संतांना) पुरून पुढच्याकरितां उरलें आहे हें कळत नाहीं ४. [१८६५]

संतांनीं परमार्थाचें दुकान घातलें आहे. जें कोणी गिऱ्हाईक येईल त्यास परमार्थाचा माल दान देतात १. संत मोठे उदार आहेत, त्यांच्याजवळ परमार्थमालाचा भांडारखाना अनंत भरला आहे २. जे कोणी मागणारे आहेत त्यांची तृप्ति होऊन अन्यांकरितां तो माल शिलक राहिला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवरूपी मालानें संतांचें देहरूपी पोतें भरलें आहे तें कधीं कमी (रिकामें) होत नाहीं ४. [१८६६]

हे दातारा पांडुरंगा, नरस्तुति करणें व हरिकथेचा विक्रा करणें अशी गोष्ट माझ्या हातून कधींहि होऊं देऊं नको १. अशी तुमची कृपा व्हावी ह्याबद्दल मी तुमची करुणा भाकीत आहें, कारण तूं जे कोणी उदार आहेत त्यांचा राजा आहेस २. परस्त्री आणि परधन ह्यांविषयींची वासना माझ्या मनांत येऊं देऊं नकोस ३. हे गोविंदा, प्राण्यांचा

देऊं शरीरीं। चढों कांहीं परी एक देऊं ॥ ५ ॥ तुका म्हणे तुझ्या पायांचा विसर। नको वारवार पडों देऊं ॥ ६ ॥ [१८६७]

लौकिकापुरती नव्हे माझी सेवा। अनन्य केशवा दास तुझा ॥ १ ॥ म्हणऊनि करीं पायांसवें आळी। आणिक वेगळी नेणें परी ॥ २ ॥ एकविध आम्ही स्वामीसेवेसाठी। वरी तोचि पोटीं एक भाव ॥ ३ ॥ तुका म्हणे करीं सांगितलें काम। तुम्हां धर्माधर्म ठावे देवा ॥ ४ ॥ [१८६८]

ज्यांच्या संगें होतों पडिलों भोवनीं। ते केली धोवनी सांडोनियां (झाडोनियां) ॥ १ ॥ आतां एकाएकीं मनासीं विचार। करूं नाहीं भार दुजियाचा ॥ २ ॥ प्रसादसेवनें आली उष्टावळी। उचित ते काळीं अवचित ॥ ३ ॥ तुका म्हणे वर्म सांपडलें हातीं। सांडिली ते खंती चिंता देवा ॥ ४ ॥ [१८६९]

आवडी भोजन प्रकार परवडी। भिन्न भिन्न गोडी एका रसा ॥ १ ॥ भोगिल्या पंगती लाधलों प्रसाद। तीहीं नाहीं भेद राखियेला ॥ २ ॥ पाकसिद्धी स्वहस्तकें विनियोग। आवडीचे भाग सिद्ध केले ॥ ३ ॥ तुका म्हणे आला उच्छिष्ट प्रसाद। तेणें हा आनंद माझ्या जीवा ॥ ४ ॥ [१८७०]

समर्थांचा ठाव संचलाचि असे। दुर्बळाची आस पुढें करी ॥१॥ फावलें हें घेईन पदरीं तें दान। एकांतीं भोजन करूं जाऊं ॥ २ ॥ न लगे पहावी उचिताची वेळ। अयाचित काळ साधला तो ॥ ३ ॥ तुका म्हणे पोट धालिया उपरी। गौरवा उत्तरीं पूजूं देवा ॥ ४ ॥ [१८७१]

आपुल्यांचा करीन मोळा। माझ्या कुळाचारांचा ॥ १ ॥ अवघियांचे वंदिन पाय।

मत्सर आणि संतांची निंदा हें माझ्याकडून होऊं देऊं नकोस ४. देहाभिमान माझ्या शरीरावर आरूढ होईल असें कांहीं एक होऊं देऊं नको. ह्या सांगितलेल्या सर्व प्रकारांतील एक देखील मजकडे येऊं देऊं नको ५. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तुझ्या पायांचा विसर वारंवार होऊं देऊं नकोस ६. [१८६७]

हे केशवा, लोकांमध्यें माझी मान्यता व्हावी ह्या बुद्धीनें तुझी सेवा मी करीत नाहीं, तर तुझा मी अनन्य दास आहें १. म्हणून मी तुझ्या पायांपाशीं हट्ट करीत आहें. ह्यावांचून अन्य प्रकार मी जाणत नाहीं २. आम्ही स्वामीची सेवा करण्याकरितां एकनिष्ठ आहोंत. आमचा आंत व बाहेर एकच भाव आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हीं जें काम सांगितलें आहे तें मी करतों. हे देवा, तो धर्म होत आहे कीं अधर्म होत आहे हें तुम्ही जाणतां ४. [१८६८]

ज्या विकाराच्या (संसाराच्या) संगतीनें मी जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत पडलों होतों, ते विकार मी झाडून धुवून टाकले १. आतां एकट्या मनाशीं विचार करूं. दुसऱ्याचें (द्वैताचें) ओझें कांहीं राहिलें नाहीं २. प्रसाद सेवन करण्यानें (संतांचें) उच्छिष्ट प्राप्त झालें. हा सर्व प्रकार अकस्मात् योग्य काळीं घडला ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आमच्या हातीं परमार्थाचें मर्म लागल्यामुळें चिंतेपासून होणारी तळमळहि टाकून दिली ४. [१८६९]

पंक्तींत बसून भिन्नभिन्न प्रकारच्या पदार्थांचें भोजन मी करीत आहें (निरनिराळ्या हरिगुणांचें वर्णन करीत आहें) तथापि एक परमार्थरसाची गोडी प्राप्त होत आहे १. हा प्रसाद परमार्थाचा उपभोग घेणाऱ्या संतांच्या पंक्तींत प्राप्त झाला आहे, कारण त्यांनीं कांहीं पंक्तिप्रपंच केला नाहीं २. संतांनीं परमार्थपाकाची सिद्धि स्वहस्तें करून ज्याला ज्याची आवड असेल त्याप्रमाणें भक्ति-ज्ञान-वैराग्यरूपी अन्नांचे विभाग तयार करून त्याचे विनियोगसिद्ध विभाग प्रीतीनें केले (ते आपल्या हातानें जसा ज्याचा अधिकार तसा त्याला वाढून त्यांचा विनियोग केला) ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला त्यांतील उच्छिष्ट प्रसाद प्राप्त झाल्यामुळें माझ्या जिवास फार आनंद झाला आहे ४. [१८७०]

समर्थांचें (संतांचें) ठिकाण नेहमीं (भक्ति-ज्ञानरूपी) ऐश्वर्यानें भरलेलें असतें. त्यां दुर्बळाची (दरिद्र्याची) आशा ही कांहीं लाभ होईल म्हणून पुढें धांव घेते १. जी कांहीं त्यांच्याकडून भिक्षा मिळेल ती पदरीं घेऊन एकांतामध्यें जाऊन त्याचें सेवन करूं २. तें प्राप्त होण्याला योग्य वेळ पाहावी लागत नाहीं. याचना केल्यावांचून त्या लाभाचा काल साधतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांनीं दिलेल्या भिकेनें पोट तृप्त झाल्यानंतर स्तुतिपर शब्दांनीं देवाची पूजा करूं ४. [१८७१]

संतजन हो, माझ्या कुळाचाराच्या रीतीप्रमाणें मी आपल्यासारख्यांचा सत्कार करीन १. सर्वांच्या पायांना वंदन

ठायाठाय न देखें ॥ २ ॥ नेदीं तुटों समाधान । थांबू(बो) जन सकळ ॥ ३ ॥ तुका म्हणे झाडा होय । तों हे सोय न संडीं ॥ ४ ॥ [१८७२]

जन्ममरणाची विसरलों चिंता । तूं माझा अनंता मायबाप ॥ १ ॥ होतील ते डोळां पाहेन प्रकार । भय आणि भार निरसलीं ॥ २ ॥ लिगाडाचे मुळें होती पंच भूतें । त्यांचें (ज्याचें) त्या पुरतें विभागिलें ॥ ३ ॥ तुका म्हणे झाला प्रपंच पारिखा । जिवासी तूं सखा पांडुरंगा ॥ ४ ॥ [१८७३]

उदार तूं हरी । ऐसी कीर्ति चराचरीं । अनंत हे थोरी । गर्जताती पवाडे ॥ १ ॥ तुझे पायीं माझा भाव । पुसी जन्ममरणां(ण) ठाव । देवाचा तूं देव । स्वामी सकळां ब्रह्मांडां ॥ २ ॥ मागणें तें तुज मागों । जीव भाव तुज सांगों । लागों तरी लागों । पायां तुमच्या दातारा ॥ ३ ॥ दिसों देशी की(के)विलवाणें । तरी तुजचि हें उणें । तुका म्हणे जिणें । माझें तुज आधीन ॥ ४ ॥ [१८७४]

पाहा किती आले । शरण समानचि केले । नाहीं विचारिले । गुण दोष कोणाचे ॥ १ ॥ मज सेवटींचा(सा) द्यावा । ठाव तयांचिये देवा । नाहीं करीत हेवा । कांहीं थोरपणाचा ॥ २ ॥ नाहीं पाहिला आचार । कुळगोत्रांचा विचार । फेडूं आला भार । मग न म्हणे दगड ॥ ३ ॥ तुका म्हणे सर्व जाणा । तुझ्या आल्यावरी मना । केला तो उगाणा । घडल्या महादोषांचा ॥ ४ ॥ [१८७५]

आतां चुकलें बंधन । गेलें विसरोनि दान । आपुलें तें वाण । सावकाश विकावें ॥ १ ॥ लाभ जोडला अनंत । घरीं सांपडलें वित्त । हातोहातीं थीत । उरें तळ नल्हाची (न लाहेची) ॥ २ ॥

करीन. योग्य, अयोग्य कांहीं पाहाणार नाहीं. सर्व जनांचा खोळंबा होऊं देणार नाहीं व मी आपले हृदयाचें समाधान भंगूं देणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ही माझी रीत माझ्या सर्व कर्मांचा (पापांचा) निरास होईपर्यंत मी सोडणार नाहीं ४. [१८७२]

हे अनंता, तूं माझा आईबाप आहेस म्हणून मी जन्ममरणाची काळजी करणें विसरलों. ज्या वेळेला जें घडून येईल तें मी आपल्या डोळ्यांनीं पाहीन. माझें भय आणि प्रपंचाचें ओझें हें नाहींसें झालें २. सर्व लचांडाचें मूळ पंचभूतात्मक देह होता त्या भूतांची आपापल्या महत्तत्त्वांचे ठिकाणीं मी वांटणी करून टाकली ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, आतां सर्व प्रपंच हा परका झाला आहे व जीवाचा सखा काय तो तूंच एक आहेस ४. [१८७३]

हे हरि, तूं उदार आहेस अशी तुझी चराचर जगतांत कीर्ति आहे व तुझ्या थोरवीचे असंख्य पवाडे वेद-शास्त्र-पुराणें गर्जत आहेत १. हे देवा, तुझ्या पायांचे ठिकाणीं माझा भाव (माझी निष्ठा) आहे. तूं माझें जन्ममरणाचें ठावठिकाण नाहींसें करून टाक, कारण तूं देवांचाहि देव असून सर्व ब्रह्मांडाचा मालक आहेस २. जें कांहीं मागावयाचें आहे तें तुझ्याजवळ मागूं व अंतःकरणांतील हितगुज तुझ्याजवळ सांगूं. हे दातारा, पायां पडावयाचें झालें तर तुझ्याच पायां पडूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जगतांत आम्हांला केविलवाणें अगर दीन टेवशील तर तो तुलाच कमीपणा आहे. हे देवा, माझें सर्व जिणें तुझ्या स्वाधीन आहे ४. [१८७४]

देवा, पाहा, आजपर्यंत तुला जितके शरण आले त्यांच्या ठिकाणीं असणाऱ्या गुणदोषांचा कांहीं विचार न करितां त्या सर्वांना तूं आपल्या योग्यतेचे केलेंस १. हे देवा, मलाहि त्यांना दिलेल्या गतींपैकीं शेवटचा आश्रय द्यावा. मी कांहीं श्रेष्ठ पदवीची हांव करीत नाहीं २. देवांनीं कोणाचें कुळगोत्र व आचार हें कांहीं पाहिलें नाहीं. संसाराचे भारापासून देव मुक्त करण्यास आला म्हणजे हा दगड आहे कीं चांगला आहे ह्याचा तो कांहीं विचार करीत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे सर्व जाणणाऱ्या देवा, तुझ्या मनांत आल्यावर पतिताकडून जे महादोष घडले असतील ते तूं दूर करतोस ४. [१८७५]

आतां जन्म-मरणाच्या बंधनापासून सुटका झाली; (आणि कर्तव्य संपल्यामुळें देवाला काया, वाचा आणि मन समर्पण करण्याचें आम्ही विसरलों. आतां आपला आत्मज्ञानाचा माल गिऱ्हाइकाला सावकाशपणें विकावा.) हें दान प्रभूकडून विसरून झालें. आतां आपला माल सावकाश विकावा १. अनंत लाभाची प्राप्ति झाली आणि तें धन घरींच

होतें गोविलें विसोरें। माप जालें एकसरें। होतें होरें वारें। तोंचि लाहो साधिला ॥ ३ ॥ करावया जतन। तुका म्हणे निजधन। केला नारायण। साह्य नेदी विसंबों ॥ ४ ॥ [१८७६]

तुझ्या रूपें माझी काया। भरों द्यावी पंढरीराया। दर्पणींची छाया। एका रूपें भिन्नत्वें ॥ १ ॥ सुख पडिलें सांठवणें। सत्ता वेंचे शनें शनें (शनैः शनैः)। अडचणीचे कोन। चारी मार्ग उगवले ॥ २ ॥ वसो डोळ्यांची बाहुली। कवळें भिन्न छाया आली। कृष्णांजन चाली। नव्हे परती माघारी ॥ ३ ॥ जीव ठसावला शिवें। मना आलें तेथें जावें। फांटा पडिला नांवें। तुका म्हणे खंडलें ॥ ४ ॥ [१८७७]

सोसें सोसें मारूं हाका। होईल चुका म्हणऊनि ॥ १ ॥ मागें पुढें क्षणभरी। नव्हे दुरी अंतर ॥ २ ॥ नाम मुखीं बैसला चाळा। वेळोवेळां पडताळीं ॥ ३ ॥ तुका म्हणे सुखी केलें। या विठ्ठलें बहुतांसी ॥ ४ ॥ [१८७८]

धरूनियां चाली हांवा। येईन गांवा धांवत ॥ १ ॥ पाठविसी मूळ तरी। लवकरी विठ्ठले ॥ २ ॥ नाचेन त्या प्रेमसुखें। कीर्ति मुखें गाईन ॥ ३ ॥ तुका म्हणे संतमेळीं। पाय धुळी वंदीन ॥ ४ ॥ [१८७९]

मायबापाचिया (ये) भेटी ! अवघ्या तुटी संकोचा ॥ १ ॥ भोगिलें तें आहे सुख। खातां मुख मोकळें ॥ २ ॥ उत्तम तें बाळासाटीं। लावी ओटीं माउली ॥ ३ ॥ तुका म्हणे झाली धणी। आनंद मनीं न समाये ॥ ४ ॥ [१८८०]

उदासीनाचा देह ब्रह्मरूप। नाहीं पुण्य पाप लागत त्या ॥ १ ॥ अनुताप अंगीं अग्निचिया

सांपडलें. असलेला माल उभ्या उभ्या खपत आहे. खालीं कांहीं शिलक राहात नाहीं २. तो (आत्मज्ञानरूपी) माल (पूर्वीच काया-वाचा-मनांच्या) विसारानें गुंतविला होता म्हणून त्याचें एकदम माप झालें. त्या मालासंबंधानें वाटाघाट चालली आहे तोंच त्वरा करून साधला ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें निजधन (आत्मसुखाचें धन) जतन करण्याकरितां आम्हीं नारायणास साह्य करून घेतलें आहे, म्हणून तो आम्हांस दूर होऊं देत नाहीं ४. [१८७६]

हे पंढरीराया, तुझ्या स्वरूपानें माझें हृदय भरून जाऊं दे. आरशामध्यें बिंबाची छाया जरी दिसली तरी तो भेद एकरूपानेंच आहे १. (तुझ्या ऐक्याचें) सुख संचयास (शिलकी) पडलें आहे. हळुहळु तुझ्या सत्तेनें त्याचा वेंच होत आहे. अडचणीचे कोपरे (चार मार्गः आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी व ज्ञानी) नाहींसे केले २. डोळ्यांतील बाहुली असूनहि काविळीचे दोषानें आरशांतील प्रतिबिंब भिन्न (पिवळें) भासतें. कृष्णांजनाचे योगानें परत माघारी दृष्टि चाल घेत नाहीं (डोळ्यांत कृष्णांजन घालतांच ती पुनः भेद आणि पिवळेपणा पाहात नाहीं.) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जीवांत शिवाचा बोध ठसला गेला. आतां मनास जिकडे जावयाचें वाटेल तिकडे जावें. (त्याला विधीचें बंधन राहात नाहीं. द्वैताला फांटा दिला जातो.) आतां त्याला फांटा फुटला हें म्हणणें नाहींसें झालें ४. [१८७७]

देवा, तुमच्याआमच्यांत चूक होईल (नामचिंतनांत खंड पडेल) म्हणून आम्ही तुम्हांला हांवभरी होऊन एकसारखी हांक मारूं १. मागेंपुढें क्षणभर देखील ह्यामध्यें अंतर आणणार नाहीं २. वाणीला देवाचाच छंद लागला आहे म्हणून वेळोवेळीं त्याचाच अनुभव घेतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या विठोबानें नामचिंतन करणाऱ्या पुष्कळांस सुखी केलें आहे ४. [१८७८]

तुझी हांव धरून तुझ्या गांवास धांवत येईन १. हे विठ्ठले, पण जर तूं त्वरेनें पाचारण (बोलाविणें) पाठविशील तर २. त्या प्रेमसुखानें नाचूं व तुझी कीर्ति मुखानें गाऊं ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतसमुदायामध्यें राहून मी त्यांची पायधुळी वंदन करीन ४. [१८७९]

आईबापांच्या भेटीमध्यें बालकाचा सर्व संकोच नाहींसा होतो १. आईबापांच्या घरीं जें भोगावेंसें वाटेल त्याचें सुख आहे व खाण्याचे वेळेस तोंडहि मोकळें आहे २. जें चांगलें असेल तें आपल्या मुलांकरितां ठेवून आई ही त्याच्या मुखांत तें घालते ३. तुकाराम महाराज म्हणतात, मुलांची तृप्ति झाल्यामुळें आईच्या मनांत आनंद मावत नाहीं ४. [१८८०]

जे कोणी ज्ञानानें देहादि प्रपंचावर उदास आहेत त्यांचा देह ब्रह्मरूप आहे व त्यांना पापपुण्य लागत नाहीं १.

ज्वाळा । नाहीं मृगजळा विझों येत ॥ २ ॥ दोष ऐशा नांवें देहाचा आदर । विटाळलें अंतर अहंभावें ॥ ३ ॥ तुका म्हणे जाय नासोनियां खंती । तंवचि हे चित्तीं बद्धता ते ॥ ४ ॥ [१८८१]

बंधनाचा तोडूं फांसा । देऊं आशा टाकोनि ॥ १ ॥ नाहीं तेंच घेतां शिरीं । होईल दुरी निजपंथ ॥ २ ॥ नाथिलेंचि माझें तुझें । कोण ओझें वागवी ॥ ३ ॥ तुका म्हणे अंतराय । देवीं काय जिणें तें ॥ ४ ॥ [१८८२]

तेंच किती वारंवार । बोलों फार बोलिलें ॥ १ ॥ आतां माझे दंडवत । तुमच्या संत चरणांसी ॥ २ ॥ आवडी ते नीच नवी । झाली जीवीं वसती ॥ ३ ॥ तुका म्हणे बरवें जालें । घरा आलें वंदरींचें ॥ ४ ॥ [१८८३]

उपासा शेवटीं अन्नासवें भेटी । तैसी माझी मिठी पडो पायीं ॥ १ ॥ पुरवीं वासना साच सर्व जाणा । आम्हां नारायणा अंकिताची ॥ २ ॥ बहुदिसां पुत्रामातेसवें भेटी । तैसा दाटो पोटीं प्रीति उभड ॥ ३ ॥ तुका म्हणे धन कृपणा सोइरें । यापरि दुसरें न हो आतां ॥ ४ ॥ [१८८४]

रणीं निघतां शूर न पाहे माघारें । ऐशा मज धीरें राख आतां ॥ १ ॥ संसारा हातीं अंतरलों दुरी । आतां कृपा करीं नारायणा ॥ २ ॥ वागवितों तुझिया नामाचें हत्यार । हाचि बडिवार मिरवितों ॥ ३ ॥ तुका म्हणे मज फिरतां माघारें । तेथें उणें पुरें तुम्ही जाणा ॥ ४ ॥ [१८८५]

सकळ पूजा स्तुति । करावी ते व्हावें याती ॥ १ ॥ म्हणऊनि वारा जन । संतपूजा नारायण ॥ २ ॥ सेवावें तें वरी । दावी उमटूनि ढेकरीं ॥ ३ ॥ तुका म्हणे सुरा । दुधा म्हणतां केवीं बरा ॥ ४ ॥ [१८८६]

त्यांच्या हृदयांत अनुताप (वैराग्य)रूपी अग्नीच्या ज्वाळा चालल्या आहेत. त्या मिथ्या मृगजळवत् प्रपंचाच्या योगानें विझत नाहींत २. आत्मबुद्धीनें देहाचा अंगीकार करणें हाच दोष आहे. ह्याला देहहंकार म्हणतात व त्या योगानेंच अंतःकरण विटाळलेलें असतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जोंपर्यंत तळमळ नाहींशी झाली नाहीं (चित्तांतील संसाराविषयीं चिंता गेली नाहीं) तोंपर्यंत चित्त बद्धावस्थेंत आहे ४. [१८८१]

बंधनास मूळ जी आशा तिचा पाश तोडून टाकूं १. ज्याचा आपल्याशीं कांहीं संबंध नाहीं तें (देहाभिमानाचें ओझें) मूर्खपणानें आपल्या मस्तकावर घेतलें तर आपला निजस्वरूपाचा (आत्मसुखाचा) मार्ग दुरावतो २. मिथ्या अविद्यात्मक माझें–तुझेंपणाचें ओझें कोणीं वागवावें ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या जगण्यांत देवामध्यें अंतर पडतें तें जगणें काय उपयोगाचें आहे ? ४. [१८८२]

जें मी बोललों आहें तेंच वेळोवेळीं किती बोलावें ? १. आतां तुमचे संतचरणांस माझे दंडवत आहेत २. ह्याविषयीं नित्य नवी आवड जिवास आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें द्वारकावंदरीं होतें तें आमच्या हृदयरूपी घरांत आलें (जे संतचरण दूर होते ते पूर्वपुण्याईनें घरीं आले) हें फार चांगलें झालें ४. [१८८३]

उपवास करणारा उपासाचे अंतीं अन्नाचें जसें सेवन परम प्रेमानें करतो, तशी माझी मिठी तुझ्या पायीं परमप्रेमानें पडो १. हे सर्वज्ञ नारायणा, आम्ही तुझे आज्ञाधारक आहों. आमची ही खरी वासना तूं पूर्ण कर २. बहुत दिवसांच्या वियोगानें दुःखी झालेल्या मातेचा व पुत्राचा योग होतांच (भेट होतांच) जो प्रेमाचा उमाळा येतो तसें तुझ्याविषयींच्या प्रेमभरानें माझें हृदय भरो ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसें धन हें कृपणाचें सोयरें आहे (आप्तसंबंधी अथवा आवडतें आहे) त्याप्रमाणें आतां आम्हांला तुजवांचून कोणी प्रेमाचें नसावें ४. [१८८४]

रणामध्यें युद्ध करावयास (निघालेला) शूर जसा उलटून मागें पाहात नाहीं तशा धैर्यानें तुम्ही माझें रक्षण करा १. हे नारायणा, संसाराच्या तडाख्यांत सांपडून तुजपासून मी दुरावला गेलों आहें, आतां तूं मजवर कृपा कर २. तुझ्या नामाचें हत्यार मी निरंतर वागवीत असून त्याचीच बढीजाई (प्रतिष्ठा) दाखवीत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मीं जर माघार घेतली तर त्यांत उणेपणा आहे कीं पूर्णता आहे हें तुम्ही जाणा ४. [१८८५]

लोकांकडून सर्व प्रकारची पूजा-स्तुति करून घेण्यास योग्य अधिकारी पाहिजे १. म्हणून सर्व जनांचा त्याग करून संतांची पूजा व नारायणाची पूजा करावी २. ढेंकर येईपर्यंत चांगलें भोजन करावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, दुधाला दारू म्हटलें तर तें चांगलें कसें दिसेल ? ४. [१८८६]

धीर नव्हे मनें। काय तयापाशीं उणे ॥ १ ॥ भार घातलियावरी। दासां नुपेक्षील हरी ॥ २ ॥ याची ऐसी आटी। द्यावी द्रव्याचिये साटीं ॥ ३ ॥ तुका म्हणे पोटें। देवा बहु केलें खोटें ॥ ४ ॥ [१८८७]

द्रव्याचिया कोटी। नये गांडीची लंगोटी ॥ १ ॥ अंतीं कोळवणेंसाठीं। पांडुरंग धरा कंठीं ॥ २ ॥ लोभाचीं लोभिकें। यांचें सन्निधान फिकें ॥ ३ ॥ तुका म्हणे हितें। जग न हो पडो रितें ॥ ४ ॥ [१८८८]

कोणापाशीं आतां सांगों मी बोभाट। कधीं खटपट सरेल हे ॥ १ ॥ कोणा आरागूक होईल कोणे काळीं। आपुलालीं जाळीं उगवूनी ॥ २ ॥ माझा येणें दुःखें फुटतसे प्राण। न कळतां जन सुखी असे ॥ ३ ॥ भोगा आधीं मनें मानिलासे त्रास। पाहें लपायास ठाव कोठें ॥ ४ ॥ तुका म्हणे देतों देवाचें गाऱ्हाणें। माझें ऋण येणें सोसियेलें ॥ ५ ॥ [१८८९]

राहिलों निराळा। पाहों (पाहें) कवतुक डोळां ॥ १ ॥ करूं जगाचा विनोद। डोळां पाहोनियां छंद ॥ २ ॥ भुललिया संसारें। आलें डोळ्यासी माजिरें ॥ ३ ॥ तुका म्हणे माथा। कोणी नुचली सर्वथा ॥ ४ ॥ [१८९०]

आम्हां एकविध पुण्य सर्वकाळ। चरणकमळ स्वामीचे ते ॥ १ ॥ चित्ताचे संकल्प राहिलें चळण। आज्ञा ते प्रमाण करूनी असों ॥ २ ॥ दुजियापासून (पासाव) परतलें मन। केलें घ्यावें दान होईल तें ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां पुरला नवस। एकाविण ओस सकळही ॥ ४ ॥ [१८९१]

राहाणें तें पायांपाशीं। आणिकां रसीं विटोनि ॥ १ ॥ ऐसा धीर देईं मना। नारायणा विनवितों

आपल्या मनास धीर निघत नाहीं, बाकी देवापाशीं कांहीं कमी आहे काय? १. हरीवर सर्वस्व ओझें घातल्यावर तो दासाची उपेक्षा करीत नाहीं २. द्रव्यप्राप्तीसाठीं जशी आरण खटपट करितों, तशी हरिप्राप्तीसाठीं करावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, ह्या पोटानें आम्हांला फार लबाड केलें आहे ४. [१८८७]

कोटयवधि द्रव्य जरी जवळ असलें, तरी अखेरीस गांडीची लंगोटी देखील बरोबर येत नाहीं १. ह्याकरितां अंतसमयीं आपल्याबरोबर पांडुरंगानें यावें म्हणून त्यास कंठीं धरा—त्याचें नांव घ्या २. अनेक विषयलोभानें लोभी झालेले जे आहेत त्यांची संगति असार आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जग हें हित करणारें नव्हे, असें तें व्यर्थ आहे ४. [१८८८]

आतां ही माझी तक्रार मी कोणापाशीं करूं? ही प्रापंचिक खटपट कधीं संपेल? १. सर्व प्रपंचाच्या जाळ्यांतून सुटका होऊन मला कोणत्या वेळेस विश्रांति मिळेल? २. ह्या प्रपंचाच्या दुःखानें माझा प्राण कांसावीस होत आहे. ह्या प्रपंचाचें स्वरूप जनांस न कळल्यामुळें ते सुखी आहेत ३. विषयोपभोग घेण्याच्या पूर्वीच माझें मन त्रासलें आहे म्हणून तें कोठें लपण्यास ठिकाण पाहात आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी देवाचें गाऱ्हाणें सांगत आहें. तें हें, कीं त्यानें माझें सेवाऋण सहन केलें (दडपलें आहे, त्याच्या बदलीं माझें दुःख तो दूर करीत नाहीं) ५. [१८८९]

सर्व प्रपंचाहून वेगळा राहून मी ह्या संसाराचें कौतुक डोळ्यानें पाहात आहें १. जगताचा संसारछंद पाहून त्याचा आम्ही विनोद (त्याची फजिती) करूं २. संसारामध्यें जीव भुलून गेल्यामुळें त्यांच्या डोळ्यांवर धुंदी आली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, संसारामध्यें जे जीव बुडाले आहेत ते कोणी वर डोकें काढीत नाहींत (हें सर्व कौतुक डोळ्यांनीं पाहूं) ४. [१९९०]

आम्ही एकविध (एकनिष्ठ) आहोंत म्हणून स्वामीचें (पांडुरंगाचें) चरणकमल हें आम्हांला सर्वकाल पुण्य आहे १. त्यावांचून अनेक प्रकारच्या संकल्पानें होणारें चित्ताचें चलन नाहींसें झालें आणि एक स्वामीची आज्ञा आम्ही मानून आहोंत २. आमचें मन दुसऱ्यापासून (इतर मायिक पदार्थांपासून) माघारी परतलें; आतां स्वामी जें दान देतील तेंच घेण्याची इच्छा करीत आहों ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आमचा नवस पूर्ण झाला, कारण एका स्वामीवांचून सर्व ब्रह्मांड ओस झालें ४. [१८९१]

मला सर्व रसांचा (विषयसुखांचा) वीट येऊन तुमच्या पायांजवळ राहावें अशी इच्छा आहे १. हे नारायणा,

॥ २ ॥ अंतरीं तों तुझा वास। आणिकां नास कारणां ॥ ३ ॥ तुका म्हणे शेवटींचें। वाटे साचें राखावें ॥ ४ ॥ [१८९२]

चंदन तो चंदनपणें। सहजगुणें संपन्न ॥ १ ॥ वेधलिया धन्य जाती। भाग्यें होती सन्मुख ॥ २ ॥ परिसा अंगीं परिसपण। वाणोनि तें राहिलें ॥ ३ ॥ तुका म्हणे कैंची खंती। सुजाती ते टाकणी ॥ ४ ॥ [१८९३]

लय लक्षी मन न राहे निश्चळ। मुख्य तेथें बळ आसनाचें ॥ १ ॥ हें तों असाध्य जी सर्वत्र या जना। भलें नारायणा आळवितां ॥ २ ॥ कामनेचा त्याग वैराग्य या नांव। कुटुंब तें सर्व विषयजात ॥ ३ ॥ कर्म उसंतावें चालतां पाउलीं। होय जंव(जों) राहिली देहबुद्धि ॥ ४ ॥ भक्ति तें नमावें जीवजंतुभूत। शांतवूनि ऊत कामक्रोध ॥ ५ ॥ तुका म्हणे साध्य साधन अवघड। देतां हें सांकडें देह बळी ॥ ६ ॥ [१८९४]

ऐसें कां हो न करा कांहीं। पुढें नाहीं नास ज्या ॥ १ ॥ विश्वंभरा शरणागत। भूतजात वंदूनि ॥ २ ॥ श्रुतीचें कां नेघां फळ। सारमूळ जाणोनि ॥ ३ ॥ तुका म्हणे पुढें कांहीं। वाट नाहीं यावरी ॥ ४ ॥ [१८९५]

झाला प्रेतरूप शरीराचा भाव। लक्षियेला ठाव स्मशानींचा ॥ १ ॥ रडती रात्रंदिवस कामक्रोध माय। म्हणती हायहाय यमधर्म ॥ २ ॥ वैराग्याच्या शेणीं लागल्या शरीरा। ज्ञानाग्नि लागला ब्रह्मत्वेंसी ॥ ३ ॥ फिरविला घट फोडिला चरणीं। महावाक्य ध्वनीं बोंब झाली ॥ ४ ॥ दिली तिळांजुळी कुळनामरूपासी। शरीर ज्याचें त्यासी समर्पिलें ॥ ५ ॥

अशा प्रकारचा धीर माझ्या मनाला द्यावा अशी माझी विनंति आहे २. माझ्या अंतःकरणांत तुम्हीं वास्तव्य केलें म्हणजे कामक्रोधादि सर्व विकारांचा नाश होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशी विनंति केल्याप्रमाणें आपण शेवटीं (मरणाच्या वाटेला लागल्यावर माझें) खरें रक्षण करावें असें मला वाटतें ४. [१८९२]

चंदन जो आहे तो आपल्या सुगंधगुणानें सहजच संपन्न आहे १. ज्या वृक्षजाति भाग्यवान् आहेत त्या त्याच्या सान्निध्यानें वेधल्या जाऊन चंदनासारख्या सुगंधयुक्त होतात २. परिसाचे अंगीं परिसाचा धर्म पूर्णपणें ठसला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याची जात चांगली (शुद्ध आहे) त्याला कशाची तळमळ आहे? ४. [१८९३]

योगाभ्यासानें लक्ष्यस्वरूपाच्या ठिकाणीं लय लावून बसावें तर त्या ठिकाणीं मुख्यत्वेंकरून आसनमुद्रा साधली पाहिजे, पण सर्वांचें मन एकाग्र होत नाहीं १. हे प्रकार सर्व जनांस साध्य होत नाहींत, म्हणून नारायणास एकसारख्या हांका माराव्या हें बरें २. सर्व कुटुंबासह विषयांचा त्याग करून तत्संबंधी कामनेचा त्याग करणें ह्यालाच वैराग्य असें म्हणावें ३. पावलोंपावलीं जर कर्ममार्गाची वाट चालावी तर त्यास देहबुद्धि नाहींशी झाली पाहिजे ४. अंतरांतील काम-क्रोधाचा कड शांत करून सर्व जीवजंतूंस नमस्कार करणें ह्याला भक्ति म्हणावी ५. तुकाराम महाराज म्हणतात, हीं साधनें व तत्संबंधीं साध्य अशीं दोन्हींहि अवघड आहेत, कारण त्या ठिकाणीं देह बळी द्यावा लागतो, म्हणून हें फार संकट आहे ६. [१८९४]

अहो जन हो, ज्या योगानें तुमचा पुढें नाश होणार नाहीं असें तुम्ही कां करीत नाहीं? १. सर्व जीवमात्रांस भगवद्भक्तानें नमस्कार करून विश्वंभर देवास शरण जा २. हें श्रुतीचें मुख्य सारभूत फळ आहे तें तुम्ही समजून अथवा जाणत असून कां घेत नाहीं? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या हरिशरणागतीपेक्षां पुढें दुसरी वाट कांहीं नाहीं ४. [१८९५]

आमच्या शरीराचे धर्म प्रेतरूप झाल्यामुळें स्मशानांत जागा पाहाण्याची योजना ध्यानांत आणिली आहे (लक्ष्य-ब्रह्मस्थितीचें अनुसंधान ठेवणें ह्याचेंच नांव स्मशान) १. त्या योगानें मायादिकरून कामक्रोधांस फार दुःख झालें म्हणून ते रात्रंदिवस रडत आहेत आणि यमधर्म फार शोक करीत आहे २. ह्या शरीरास वैराग्यरूपी गोवऱ्या खालीं वर घालून ज्ञानरूपी अग्नीनें चेतवून ब्रह्मरूप केलें ३. ह्या देहरूपी घट देवाच्या सभोंवतीं फिरवून चरणांजवळ फोडला आणि तत्त्व-मस्यादि [मी ब्रह्म आहें अशा बोधाची गर्जना केली] महावाक्यध्वनीनें बोंब मारली ४. आपल्या कुळास व नांव–रूपास

तुका म्हणे रक्षा झाली आपींआप (आपोआप)। उजळीला दीप गुरुकृपा ॥ ६ ॥ [१८९६]

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां। तो झाला सोहळा अनुपम्य ॥ १ ॥ आनंदें दाटलीं तिन्ही त्रिभुवनें। सर्वात्मकपणें भोग झाला ॥ २ ॥ एकदेशीं होतों अहंकारें आथिला। त्याचा त्याग झाला सुकाळ हा ॥ ३ ॥ फिटलें सुतक जन्ममरणाचें। मी माझ्या संकोचें दुरी झालों ॥ ४ ॥ नारायणें दिला वसतीस ठाव। ठेवूनियां भाव ठेलों पायीं ॥ ५ ॥ तुका म्हणे दिलें उमटूनि जगीं। घेतले ते अंगीं लावूनियां ॥ ६ ॥ [१८९७]

बोळविला देह आपुलेनि हातें। हुताशिलीं भूतें ब्रह्माग्नीसीं ॥ १ ॥ एक वेळे झालें सकळ कारण। आतां नारायण नारायण ॥ २ ॥ अमृतसंजिवनी निवविली खाई। अंगें तये ठायीं हारपलीं ॥ ३ ॥ एकादशीविध जागरण उपवास। बारावा दिवस भोजनाचा ॥ ४ ॥ अवघीं कर्में झालीं घटस्फोटापाशीं। संबंध एकेसीं उरला नामीं ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां आनंदी आनंदू। गोविंदें गोविंदू विस्तारला ॥ ६ ॥ [१८९८]

पिंडदान पिंडें ठेविलें करून। तिळीं तिळवण मूळत्रयीं ॥ १ ॥ सारिले संकल्प एकाचि वचनें। ब्रह्मीं ब्रह्मार्पण सेवटींचिया ॥ २ ॥ सव्य अपसव्य बुडालें हें कर्म। एका एक वर्म एकोविष्णु ॥ ३ ॥ पित्या पुत्रत्वाचें जालें अवसान। जनीं जनार्दन अभेदेंसीं ॥ ४ ॥ आहे तैसी पूजा पावली सकळ। सहज तो काळ साधियेला ॥ ५ ॥ तुका म्हणे केला अवघ्यांचा उद्धार। आतां नमस्कार शेवटींचा ॥ ६ ॥ [१८९९]

तिलांजलि दिली आणि हें शरीर ज्या पंचमहाभूतांचें होतें त्यांना तें अर्पण केलें ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या शरीराची राख आपल्या आपण झाली. मग त्या ठिकाणीं गुरुकृपा हाच (ज्ञान–) दीप लावून ठेविला ६. [१८९६]

आमच्या मरणाचा (देहबुद्धिनाशाचा) सोहळा फार उत्तम झाला त्यास उपमा नाहीं आणि तो सोहळा मी आपल्या आत्मबोधाच्या दृष्टीनें प्रत्यक्ष पाहिला १. आतां हा आनंद त्रिभुवनांत मावेनासा झाला, कारण मला सर्वात्मकस्थितीच्या सुखाचा उपभोग झाला २. आजपर्यंत मी देहाहंकारानें युक्त असल्यामुळें एकदेशी (संकुचित) होतों. आतां त्या अभिमानाचा त्याग केल्यामुळें मला सर्वात्मकस्थितीचा सुकाळ झाला ३. देह मी व तत्संबंधीं माझें ह्या उभय भावांच्या संकोचापासून मी दूर झालों, म्हणून माझें जन्ममरणाचें सुतक नाहींसें झालें ४. नारायणांनीं आपल्या ठिकाणीं मला राहण्यास जागा दिली, म्हणून मी त्यांच्या पायांपाशीं भाव ठेवून राहिलों ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे प्रकार मीं आपल्या अंगीं लावून घेतले व ते सर्व जगतामध्यें प्रसिद्ध केले. (जो अनुभव मला आला तोच मी जगांत प्रसिद्ध केला) ६. [१८९७]

मी आपला देह आत्मानात्मविवेकाच्या हातानें (ज्ञानानें) ब्रह्मरूप स्मशानांत पोंचविला, पंचभूतात्मक देह परब्रह्मबोधाच्या अग्नीनें जाळला १. ह्या योगानें सर्व कार्य एकदम झालें. आतां नारायण ह्या नामाचें चिंतन राहिलें आहे २. ज्ञानाग्नीनें जी चिता पेटली होती ती अमृत (मोक्ष) संजीवनी शिंपून शांत केली आणि अष्टांगें त्याच ठिकाणीं नाहींशीं झालीं ३. आतां [अनंत जन्मांचें] दहा दिवसाचें सुतक फिटून एकादशीचे दिवशीं उपवासी राहून जागरणाचा विधि केला आणि द्वादशीच्या दिवशीं पारणें फेडलें. ४. ज्या वेळीं देहरूपी घट देवांचे पायांजवळ मीं परब्रह्मबोधानें फोडला त्या वेळीं तत्संबंधीं सर्व कर्में नाहींशीं झालीं. आतां माझा संबंध फक्त त्यांच्या नामाशीं उरला आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, त्या गोविंदानें सर्वत्र गोविंदमय व्याप्ति माझ्या अनुभवास आणून दिली. त्या योगानें आनंदीआनंद झाला आहे ६. [१८९८]

देहपिंड विष्णुपदाला अर्पण करून पिंडदान केलें आणि त्याचें मूळ जे त्रिगुण (अहंकार, महत्तत्त्व आणि अज्ञान) त्यांना तिलांजलि दिली. तेंच तिलोदक हातांत घेऊन शेवटीं ब्रह्मस्मशानाच्या ठिकाणीं 'ब्रह्मार्पण' ह्या एकाच शब्दानें सर्व संकल्प नाहींसे केले २. आतां एक विष्णुमय जगत् हें मर्म मला सांपडल्यामुळें सव्यापसव्य हें कर्म नाहींसें झालें ३. सर्व जनांमध्यें जनार्दन आहे असें अभेदत्वानें समजून आलें म्हणून एकदेशी पिता–पुत्रत्वाचा अभिमान नाहींसा झाला ४. अशा रीतीनें जशी शास्त्रांत पिंडपूजा सांगितली आहे तशी मीं अर्पण केली, म्हणून तो श्राद्धाचा पर्वकाळ मला सहज साध्य झाला (सहज रीतीनें त्या प्रसंगांतून पार पडलों) ५. तुकाराम महाराज म्हणतात, पिंडदान करून मीं सर्व कुळांचा (सर्वांचा) उद्धार केला, म्हणून तर पितृस्वरूपी जनार्दनाला हा माझा शेवटचा नमस्कार आहे ६. [१८९९]

सरलें आतां नाहीं । न म्हणे वेळकाळ कांहीं ॥ १ ॥ विठ्ठल कृपाळु माउली सदा प्रेम पान्हायेली ॥ २ ॥ शीण न विचारी भाग । नव्हे निष्ठुर नाहीं राग ॥ ३ ॥ भेदाभेद नाहीं । तुका म्हणे तिच्या ठायीं ॥ ४ ॥ [१९००]

तुज पहावें हे धरितों वासना । परि आचरणा नाहीं ठाव ॥ १ ॥ करिसी कैवार आपुलिया सत्ता । तरिच देखता होईन पाय ॥ २ ॥ बाहिरल्या वेषें उत्तम दंडिलें । भीतरी मुंडलें नाहीं तैसें ॥ ३ ॥ तुका म्हणे वायां गेलोंच मी आहें । जरि तुम्ही साहे न व्हा देवा ॥ ४ ॥ [१९०१]

दुष्ट आचरण ग्वाही माझें मन । मज ठावे गुण दोष माझे ॥ १ ॥ आतां तुम्ही सर्व जाणां पांडुरंगा । पाहिजे प्रसंगा ऐसें केलें ॥ २ ॥ व्याह्याजांवयांचे पंगति दुर्बळ । वंचिजे तो काळ नव्हे कांहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां झालों शरणागत । पुढील उचित तुम्हां हातीं ॥ ४ ॥ [१९०२]

आतां भय नाहीं ऐसें वाटे जीवा । घडलिया सेवा समर्थाची ॥ १ ॥ आतां माझ्या मनें धरावा निर्धार । चिंतनीं अंतर न पडावें ॥ २ ॥ येथें नाहीं झाली कोणाची निरास । आल्या याचकास कृपेविशीं ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें नाहीं दुजा परी । राया रंक सरी देवापायीं ॥ ४ ॥ [१९०३]

वैष्णव चोरटीं । आलीं घरासी करंटीं ॥ १ ॥ आजि आपुलें जतन । करा भांडें पांघरूण ॥ २ ॥ ज्याचे घरीं खावें । त्याचें सर्वस्वही न्यावें ॥ ३ ॥ तुका म्हणे माग । नाहीं लागों देत लाग ॥ ४ ॥ [१९०४]

पांडुरंग माउलीजवळ कांहीं मागावयास गेलें तर ती तें मजपाशीं नाहीं, आतां सरून गेलें असें म्हणत नाहीं, किंवा अमूक वेळेस ये असें म्हणत नाहीं १. विठाबाई आई कृपाळु आहे आणि तिच्या स्तनांमध्यें प्रेमाचा पान्हा सर्वकाळ आहे २. भक्ताकरितां स्वतःला किती कष्ट पडतात ह्याचा ती कधींहि विचार करीत नाहीं व राग येऊन कधींहि निष्ठुर होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, तिच्या ठिकाणीं आप-पर, उच्च-नीच भाव नाहीं. ती सर्वांन प्रेमाचें दूध पाजते ४. [१९००]

हे देवा, तुला पाहावें अशी इच्छा मीं धरली आहे, पण ज्या योगानें तुझें दर्शन व्हावें असें आचरण माझ्या ठिकाणीं नाहीं १. तूं आपल्या सामर्थ्यानें माझा पक्ष घेशील, तरच मला तुझ्या पायांचें दर्शन होईल २. मी बाह्यात्कारीं साधुपणाचा उत्तम वेष घेऊन सुशोभित झालों आहें, पण त्याप्रमाणें अंतःकरणांतील वासनाजालाचें मुंडण करून त्यास सुशोभित केलें नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, जर तुम्ही मला साह्य होत नाहीं तर मी खरोखरच वायां गेलों आहें ४. [१९०१]

माझी वागणूक फार वाईट आहे ह्यास साक्षी माझें मन आहे आणि माझ्या ठिकाणीं जे कांहीं गुणदोष आहेत ते मी जाणतों १. हे पांडुरंगा, आतां तुम्ही सर्व जाणत आहांत म्हणून तुम्हीं प्रसंगानुरूप वागणूक केली पाहिजे २. कोणी एखाद्यानें व्याह्यांजावयांस मेजवानी केली असून जर त्यांच्या पंक्तीस एखादा गरीब बसला असेल तर त्याविषयीं पंक्तिप्रपंच करण्याची ती वेळ नव्हे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मी तुझा शरणागत झालों आहें म्हणून तुम्हांला पुढें जें योग्य दिसेल तें करणें तुमच्या हातीं आहे ४. [१९०२]

माझ्या हातून ह्या समर्थ देवाची सेवा घडली आहे म्हणून आतां माझ्या जिवास कांहीं भय नाहींसें वाटतें १. हे माझ्या मना, आतां तूं देवाचें चिंतन टाकूं नको. तोच निश्चय दृढ असूं दे. त्यांत कांहीं अंतर पडूं देऊं नकोस २. ह्या ठिकाणीं कृपादान मागण्यास जे कोणी याचक आले त्या कोणाची आजपर्यंत निराशा झाली नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं भिन्नभाव नाहीं. जे कोणी देवाच्या पायांजवळ येतील ते श्रीमंत असोत अगर गरीब असोत, त्यांना देव सारखीच देणगी देतो (त्यांच्यावर देवाची सारखीच कृपा होते) ४. [१९०३]

वैष्णव हे करंटे असून चोरी करणारे आहेत. ते आज तुमच्या घरीं आले आहेत १. म्हणून तुम्ही आपलीं भांडीं व वस्त्रप्रावरणें आज सांभाळून ठेवा २. हे वैष्णव ज्याचे घरीं जेवतात त्याचें सर्वस्व हरण करतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, ते जी कांहीं वस्तु नेतील त्याचा (आपल्या भक्तांच्या संसाराचा) मागमूसदेखील लागूं देत नाहींत ४. [१९०४]

ऐकतों दाट। आले एकांचे बोभाट ॥ १ ॥ नका विश्वासों यावरी। चोर देहाचे खाणोरी ॥ २ ॥ हेचि यांची जोडी। सदा बोडकीं उघडीं ॥ ३ ॥ तुका म्हणे न्यावें। ज्याचें त्यासी नाहीं ठावें ॥ ३ ॥ [१९०५]

आणिकाची सेवा करावी शरीरें। ती येथें उत्तरें कोरडींच ॥ १ ॥ ऐसा पांडुरंग सुलभ सोपारा। नेघे येरझारा सेवकाच्या ॥ २ ॥ आणिकांचे भेटी आडकाठी पडे। येथें तों(तें) न घडे वचनही ॥ ३ ॥ आणिकांचें देणें काळीं पोट भरे। येथील न सरे कल्पांतींही ॥ ४ ॥ आणिकें दंडिती चुकलिया सेवा। येथें सोस हेवा नाहीं दोन्ही ॥ ५ ॥ तुका म्हणे करी आपणासारिखें। उद्धरी पारिखें उंच नीच ॥ ६ ॥ [१९०६]

दुर्जनाची जाती। त्याचे तोंडीं पडे माती ॥ १ ॥ त्याची बुद्धि त्यासी नाडी। वाचे अनुचित बडबडी ॥ २ ॥ पाहे संतांकडे। दोषदृष्टी सांडी भिडे ॥ ३ ॥ उंच निंच नाहीं। तुका म्हणे खळा कांहीं ॥ ४ ॥ [१९०७]

न करीं उदास। माझी पुरवावी आस ॥ १ ॥ ऐका ऐका नारायणा। माझी परिसा विज्ञापना ॥ २ ॥ मायबाप बंधुजन। तूंचि सोयरा सज्जन ॥ ३ ॥ तुका म्हणे तुजविरहित। कोण करील माझें हित ॥ ४ ॥ [१९०८]

जीवन उपाय। वैद्यवाणी तुझे पाय ॥ १ ॥ ते मी नाठवीं घडि घडि। म्हणोनियां चरफडी ॥ २ ॥ तुटे भवरोग। जेथें सर्व सुख भोग ॥ ३ ॥ तुका म्हणे विटे। धरियेलें जें गोमटें ॥ ४ ॥ [१९०९]

(ध्रुवपदांत दर्शविलेल्या अशा कित्येकांच्या) तक्रारी आलेल्या मी पुष्कळ ऐकत आहें १. हे [वैष्णव] केवळ शरीरांतील कामक्रोधादि विकार हरण करणारे चोर आहेत, म्हणून तुम्ही ह्यांचा विश्वास धरूं नका २. हे सर्व काळ बोडके उघडे (असंग निर्लेप) असे असतात. तीच स्थिति तुमची होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे ज्याचें जें कांहीं चोरून नेतात तें त्याचें त्यास देखील माहीत होऊं देत नाहींत. ४. [१९०५]

ह्या शरीरानें दुसऱ्या देवाची (प्राकृत जनांची) सेवा करावी लागते तेव्हां ती होते, पण त्या ठिकाणीं कोरड्या शब्दांनीं पांडुरंगाची स्तुति केल्यानें अथवा त्याला हांका मारल्यानें ती सेवा होते १. अशा प्रकारचा हा पांडुरंग सुलभ आहे म्हणून हा सेवकांना हेलपाटे देत नाहीं २. दुसऱ्यांचे भेटीस जाण्याविषयीं हरकत होते पण ह्या ठिकाणीं कोणाची शब्दानेंहि हरकत होत नाहीं ३. दुसऱ्यानें देणगी दिली असतां कांहीं काळानें पोट भरण्यापुरतें मिळतें पण ह्या देवानें दिलेलें कल्पाचा अंत झाला तरी संपत नाहीं ४. दुसऱ्याची सेवा करीत असतां कांहीं चूक झाल्यास ते शिक्षा करितात पण ह्या देवाच्या ठिकाणीं सेवा करून घेण्याचा सोस आणि हांव हीं दोन्ही नाहींत ५. तुकाराम महाराज म्हणतात, देव हा आपल्याकडे जे कोणी येणारे आहेत, मग ते चांगले असोत अगर वाईट असोत, त्याचा कांहीं विचार न करितां त्यांचा तो उद्धार करतो म्हणजे स्वरूपस्थिति देतो ६. [१९०६]

जे कोणी दुर्जन आहेत त्यांची जात अति नीच असते म्हणून अखेरीस त्यांच्या तोंडांत माती पडतें १. कारण त्यांची वाईट बुद्धि त्यांस दुःख देते आणि ते वाचेनें अयोग्य बडबडतात २. ते दुर्जन संतांकडे पाहूं लागले तर त्यांची कांहीं भीड न धरितां दोषदृष्टीनें नेत्र अग्नीप्रमाणें लाल करून पाहातात ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या नष्टाला कोणते लोक चांगले व कोणते वाईट हें कांहीं समजत नाहीं ४. [१९०७]

हे देवा, तूं मला निराश करूं नकोस, तर माझी आशा पूर्ण कर १. हे नारायणा, माझी अशी विनंति आहे ती तुम्ही ऐका (असें त्रिवार सांगतों) २. माझे आईबाप, भाऊ आणि आप्तइष्ट हे सर्व तूंच आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्याखेरीज माझें हित कोण करील बरें? ४. [१९०८]

हे देवा, सर्व लोकांस जगण्याला उपाय तुझे पाय आहेत असें वैद्य सांगतात १. त्या पायांची आठवण मी क्षणोक्षणीं करीत नाहीं म्हणूनच रोगानें चरफडत बसलों आहें २. त्या पायांच्या योगानें (जन्म-मरणरूप) भवरोग नाहींसा होऊन सर्व सुखांचा भोग होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे (सुंदर सुकुमार) पाय विटेवर तुम्हीं ठेविले आहेत ते चांगले आहेत ४. [१९०९]

ऐकां हें वचन माझें संतजन । विनवितों जोडून कर तुम्हां ॥ १ ॥ तर्क करूनियां आपुल्या भावना । बोलतिया जना कोण वारी ॥ २ ॥ आमुच्या जीवींचा तोचि जाणे भावो । रखुमाईचा नाहो पांडुरंग ॥ ३ ॥ चित्त माझें त्याचे गुंतलेंसे पायीं । म्हणऊनि कांहीं नावडे त्या ॥ ४ ॥ तुका म्हणे मज न साहे मीनती । खेद होय चित्तीं भंग मना ॥ ५ ॥ [१९१०]

ऐसा कोणी नाहीं हें जया नावडे । कन्या पुत्र घोडे दारा धन ॥ १ ॥ निंब घेतें रोगी कवणिया सुखें । हरावया दुःखें व्याधि पीडा ॥ २ ॥ काय पळे सुखें चोर लागे पाठी । न घालावी काठी आड तया ॥ ३ ॥ जयाचें कारण तोचि जाणे करूं । नये कोणां वारूं आणिकांसी ॥ ४ ॥ तुका म्हणे तरी सांपडे निधान । द्यावा ओंवाळून जीव बळी ॥ ५ ॥ [१९११]

काय मी अन्यायी तें घाला पालवीं । आणीक वाट दावीं चालावया ॥ १ ॥ माग पाहोनियां जातों तेच सोयी (ठायीं) । न वजावें कायी कोणी सांगा ॥ २ ॥ धोपट मारग लागलासे गाढा । मज काय पीडा करा तुम्ही ॥ ३ ॥ वारितांही भय कोण धरी धाक । परी तुम्हां एक सांगतों मी ॥ ४ ॥ तुका म्हणे शूर दोहीं पक्षीं भला । मरतां मुक्त झाला मान पावे ॥ ५ ॥ [१९१२]

नव्हती माझे बोल जाणा हा निर्धार । मी आहें मजूर विठोबाचा ॥ १ ॥ निर्धारा वचन ओढविलें माझ्या । कृपाळुवें लज्जा राखियेली ॥ २ ॥ निर्भर मानसीं झालों आनंदाचा । गोडावली वाचा नामघोषें ॥ ३ ॥ आतां भय माझें नासलें संसारीं । झालोंसें यावरी गगनाचा ॥ ४ ॥ तुका म्हणे हा तों संतांचा प्रसाद । लाधलों आनंद प्रेमसुख ॥ ५ ॥ [१९१३]

अहो संतजन, तुम्हांला मी हात जोडून विनंति करतों, कीं माझें हें बोलणें ऐका १. आपापल्या भावनेसारखे तर्क करून हे जन बोलतात त्याचें निवारण कोणीं करावें? २. रुक्माईचा पति जो पांडुरंग तो आमच्या जिवाचा सर्व भाव जाणत आहे ३. माझें चित्त त्याच्या पायांजवळ राहिलें आहे म्हणून त्यास दुसरें कांहीं आवडत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, मला आर्जव करणें सहन होत नाहीं. त्या योगानें माझा मनोभंग होऊन माझें मन खेदयुक्त होतें ५. [१९१०]

प्रपंचामध्यें असा कोणता मनुष्य आहे कीं ज्याला मुलगी, मुलगा, घोडे आदिकरून धन हें प्रिय नाहीं? १. रोगी हा कडुलिंबासमान कडु औषध, व्याधीपासून होणारी दुःखपीडा नाहींशी होण्याकरितां घेतो २. कोणी कांहीं सुखानें पळत आहे काय, तर नाहीं; चोर पाठीमागें लागला आहे, म्हणून धांवत आहे. त्याला कोणी प्रतिबंध करूं नये ३. ज्याचें जें कार्य आहे तो तें करण्याचें जाणतो, म्हणून तें अन्य कोणालाहि निवारण करतां येणार नाहीं, अथवा, कार्य करणाऱ्या दुसऱ्याला निवारण करूं नये ४. तुकाराम महाराज म्हणतात, जर जीव ओवाळून बळी दिला तर ठेवा प्राप्त होतो ५. [१९११]

हे देवा, मी अन्यायी कसा आहें हें माझ्या पदरांत घाला म्हणजे दुसऱ्यांनीं कसें वागावें ह्याचा मी मार्ग दाखवीन १. पुढें गेलेल्या संतांचा मार्ग पाहून मी जातों आहें. अशा प्रकारें कोणी जाऊं नये काय, हें सांगा २. मोठा आणि सरळ मार्ग मला सांपडला आहे असें असतां त्या मार्गांत मला तुम्ही पीडा कां करतां? ३. अशा मार्गानें जाणारास तूं इकडून जाऊं नकोस असें त्याचें निवारण केलें तरी त्याचें भय कोण मानतो? पण देवा, तुम्हांला मी एक सांगत आहें ४. तुकाराम महाराज म्हणतात, शूराला दुसऱ्याला जिंकण्यांत किंवा स्वतः मरण्यांत लाभ आहे. तो असा स्वतः मेला तर मुक्त होतो आणि शत्रूला जिंकलें तर मोठ्या अधिकाराचा मान मिळतो ५. [१९१२]

जे कांहीं मी बोलत आहें ते शब्द माझे नाहींत असें तुम्ही निश्चयानें समजा, कारण मी विठोबाचा दास आहें. १ मीं जो निश्चय केला त्या मला कृपाळु देवानें साह्य करून माझी लज्जा रक्षण केली २. माझी वाणी श्रीहरीचा नामघोष करण्यानें गोड झाली आहे. त्यायोगेंकरून माझें मानस निश्चिंत होऊन आनंदभरित झालें आहे ३. आतां ह्या संसारामध्यें भय नाहींसें झालें. इतोत्तर मी चिदाकाशाचा झालों आहें (आकाशापेक्षांहि व्यापक झालों आहें) ४. तुकाराम महाराज म्हणतात, हा सर्व संतांचा प्रसाद आहे. त्या योगानें श्रीहरीविषयीं आनंद प्राप्त झाला (संतांच्या प्रसादानेंच ब्रह्मानंद व भक्तिप्रेमसुख मला प्राप्त झालें आहे) ५. [१९१३]

जरा कर्णमूळीं सांगों आली गोष्टी। मृत्याचिये भेटी जवळी आली ॥ १ ॥ आतां माझ्या मना होईं सावधान। ॐपुण्याची जाण कार्यसिद्धि ॥ २ ॥ शेवटील घडी बुडतां न लगे वेळ। साधाया तो काळ जवळी आला ॥ ३ ॥ तुका म्हणे चिंतीं कुळींची देवता । वारावा भोंवता शब्द मिथ्या ॥ ४ ॥ [१९१४]

मागील ते आटी येणें घडे सांग । सुतविलें अंग एका सूत्रें ॥ १ ॥ पहिपाहुणेरे(र) ते सोहळ्यापुरते । तेथूनि आरते उपचार ते ॥ २ ॥ आवश्यक तेथें आगळा आदर । चाली थोडें फार संपादतें ॥ ३ ॥ तुका म्हणे ऋण फिटे एक घडी। अलभ्य ते जोडी हाता आल्या ॥ ४ ॥ [१९१५]

साधावा तो देव सर्वस्वाचे साठीं। प्रारब्ध तुटी क्रियमाण ॥ १ ॥ मग कासयानें पुन्हां संवसार। बीजाचे अंकुर दग्ध होती ॥ २ ॥ जिणें दिलें त्यासी द्यावा पिंड दान। उत्तीर्ण चरण धरूनि व्हावें ॥ ३ ॥ तुका म्हणे निज भोगईल निजता। नाहीं होईल सत्ता दुजियाची ॥ ४ ॥ [१९१६]

जळो आगी पडो खाण। नारायण भोगिता ॥ १ ॥ ऐसी ज्याची वदे वाणी। नारायणीं ते पावे ॥ २ ॥ भोजनकाळीं करितां धंदा। म्हणा गोविंदा पावलें ॥ ३ ॥ तुका म्हणे न लगे मोल। देवा बोल आवडती ॥ ४ ॥ [१९१७]

संतांसी क्षोभवी कोण्याही प्रकारें। त्याचें नव्हे बरें उभयलोकीं ॥ १ ॥ देवाचा तो वैरी शत्रु दावेदार। पृथ्वीही थार नेदी तया ॥ २ ॥ संतांपाशीं ज्याचा नुरेचि विश्वास । त्याचे जाले दोष

वृद्धावस्था ही कानामध्यें मृत्यूचा प्रसंग जवळ आला अशी हकीकत सांगावयास (पांढऱ्या केसांच्या रूपानें कानाजवळ) आली आहे १. आतां हे माझ्या मना, तूं सावध हो आणि ॐकार चिंतनाची पुण्याई मिळीव, म्हणजे त्या योगानें सर्व कार्यसिद्धि होईल २. आयुष्याची शेवटची घटका नाहींशी होण्यास कांहीं वेळ लागणार नाहीं. ह्याकरितां आपला अंतसमय जवळ आला आहे असें समजून राहिलेल्या काळाचें हरिचिंतनानें तूं सार्थक कर ३. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीमहाविष्णु ह्या कुलदेवतेचें चिंतन कर आणि ह्यावांचून जे इतर खोटे शब्द आहेत (स्त्री-पुत्रादिकांची रडारड किंवा धनादिकांची निरवानिरव) त्यांचा तूं त्याग कर ४. [१९१४]

जर तूं श्रीहरीच्याच एका सूतवेधानें (सूत्रानें) आपलें हृदय वेधशील तर मागें केलेली परमार्थाची सर्व खटपट सांग होईल १. पै-पाहुणे हे सुखसोहळ्यापुरतेच आहेत. तेथें सर्व उपचार अलीकडचे (पांडुरंगाच्या सुखापेक्षां कमी प्रतीचे) आहेत २. आवश्यक परमार्थाचे ठिकाणीं विशेष आदर ठेवल्यानें थोडीफार रीत (परमार्थाची वाटचाल) संपादन होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, परमार्थाचा अलभ्य लाभ हस्तगत झाल्यानें मनुष्य एका घटकेंत सर्व ऋणांतून (देव-पितृ-मनुष्य ऋणांतून) मुक्त होतो ४. [१९१५]

हरीला सर्वस्व अर्पण करून त्यास प्राप्त करून घ्यावें. त्यायोगानें प्रारब्ध-क्रियमाणादि कर्मांचा नाश होईल १. मग पुनः संसाराची प्राप्ति कशाला होईल ? कारण कर्मबीजामध्यें असणारा (जन्म-मरणात्मक) शरीर-अंकुरभाव हरीच्या अनुभवानें जळून जाईल २. ज्यानें हा जन्म दिला आहे त्या पांडुरंगास हा देह पिंडदान द्यावा आणि त्याच्या चरणांस बळकट मिठी मारून त्याच्या उपकारापासून उत्तीर्ण व्हावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, निजस्वरूपाच्या ठिकाणीं अनुसरल्यानें निजस्वरूपाचा भोग होईल व अन्याची (अनात्म्याची) सर्व सत्ता नाहींशी होईल ४. [१९१६]

मी भोक्ता आहें अशा भावनेस आग लागो अथवा तिचें हरण होवो; आणि सर्व भोक्ता नारायण आहे अशी भावना राहो १. अशा प्रकारची ज्याची वाणी बोलत आहे त्याचे सर्व भोग नारायणास अर्पण होतात २. भोजनाच्या वेळीं अगर अन्य कोणताहि धंदा करीत असतांना सर्व कांहीं गोविंदाला अर्पण होवो, असें म्हणावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, येथें कांहीं द्रव्य द्यावें लागत नाहीं. जें जें आपण करतों तें तें सर्व देवाला अर्पण असो, एवढे शब्द देवाला प्रिय आहेत ४. [१९१७]

कोणत्याहि प्रकारांनीं (निमित्तानें) जो संतांस राग आणतो त्याचें त्रैलोक्यांत बरें होत नाहीं १. तो देवाचा वैरी आहे (असें त्रिवार सांगतों), त्याला पृथ्वी कोठेंहि आश्रय देत नाहीं २. संतांच्या ठिकाणीं ज्याचा विश्वास नाहीं त्याच्या

बळिवंत ॥ ३ ॥ तुका म्हणे क्षीर वासराच्या अंगें । किंवा धांवे लागे विषमें मारूं ॥ ४ ॥ [१९१८]

उदकीं कालवी शेणमलमूत्र । तो होय पवित्र कासयानें ॥ १ ॥ उद्धारासी ठाव नाहीं भाग्यहीना । विन्मुख चरणां संतांचिया ॥ २ ॥ दुखवी तो बुडे सांगडीचा तापा । अतित्याई पापाचीच मूर्ति ॥ ३ ॥ तुका म्हणे जेव्हां फिरतें कपाळ । तरी अमंगळ योग होतो ॥ ४ ॥ [१९१९]

शोकवावा म्यां देहे । ऐसें नेणों पोटीं आहे ॥ १ ॥ तरीच नेदां जी उत्तर । दुःखी राखिलें अंतर ॥ २ ॥ जावें वनांतरा । येणें उद्देशें दातारा ॥ ३ ॥ तुका म्हणे गिरी । मज सेववावी दरी ॥ ४ ॥ [१९२०]

येईल तुझ्या नामा । लाज म्हूण पुरुषोत्तमा ॥ १ ॥ धीर राहिलों धरूनि । त्रास उपजला मनीं ॥ २ ॥ जगा कथा नांव । निराशेनें नुपजे भाव ॥ ३ ॥ तुम्ही साक्ष कीं गा । तुका म्हणे पांडुरंगा ॥ ४ ॥ [१९२१]

नेणें जप तप अनुष्ठान याग । काळें तंव लाग घेतलासे ॥ १ ॥ रिघालों या भेणें देवाचे पाठीशीं । लागे ज्याचें त्यासी सांभाळणें ॥ २ ॥ मापें पाप सळे चालिली चढती । झाली मग राती काय चाले ॥ ३ ॥ तुका म्हणे चोरा हातीं जें वांचलें । लाभावरी आलें वारिलेंशु ॥ ४ ॥ [१९२२]

कळों आलें ऐसें आतां । नाहीं सत्ता तुम्हांसी ॥ १ ॥ तरी वीर्य नाहीं नामा । जातो प्रेमा खंडत ॥ २ ॥ आड ऐसें येतें पाप । वाढे ताप आगळा ॥ ३ ॥ तुका म्हणे गुण झाला । हा विठ्ठला हीनशक्ति ॥ ४ ॥ [१९२३]

ठिकाणीं असणारे दोष बळावले जातात ३. तुकाराम महाराज म्हणतात, वासरास पुढें करून त्यामुळें गाईचें दूध हातीं लागतें. तसें न करतां जर दूध काढावयास गेलें तर ती रागानें दूध न देतां मारावयास धांवते (त्याप्रमाणें श्रद्धा असेल तर संतांचा प्रसाद होतो; अश्रद्धेनें त्याचा छळ केला तर इह-परलोकीं अकल्याण होतें) ४. [१९१८]

स्वच्छ पाण्यामध्यें शेण, विष्ठा, मूत्र कालविलें व त्यानें स्नान करूं लागला तर तो स्वच्छ कसा होईल? १. जो संतांच्या चरणसेवेविषयीं विन्मुख आहे त्या भाग्यहीनाला आपला उद्धार करून घेण्याला कोठेंहि आश्रय राहिला नाहीं २. सांगडीचा तापा फोडून त्याचा जो आश्रय करील तो खास पाण्यांत बुडेल. दुराग्रही हा पापाची मूर्ति आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या वेळेस प्रारब्ध प्रतिकूल होतें, त्या वेळेस वाईट योग येतो ४. [१९१९]

देवा, मी तुम्हांला हांका मारून मारून देह शुष्क करावा असें तुमच्या मनांत आहे कीं काय नकळे १. म्हणूनच तुम्ही कांहीं मला उत्तर देत नाहीं. त्यायोगानें माझें अंतःकरण फार दुःखी आहे २. हे दातारा देवा, तुम्ही असे निष्ठुर झालांत म्हणून सर्व सोडून वनांत निघून जावेंसें वाटतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मजकडून पर्वताच्या दरींत राहाण्यास लावावें असें तुम्हांला वाटतें ४. [१९२०]

हे पुरुषोत्तमा, तुझ्या नामाची तुला लाज येईल १. (केव्हां तरी माझा उद्धार करशील) म्हणून मी दम धरून राहिलों आहें. नाहीं तर खरोखर माझें मन त्रासलें आहे २. तुमच्या कथेविषयीं व नांवाविषयीं निराशेमुळें लोकांमध्यें भाव (श्रद्धा, प्रेम) उत्पन्न होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अगा पांडुरंगा, (मी म्हणतों तें खरें कीं खोटें) ह्याबद्दल तुम्ही साक्षी आहांत ४. [१९२१]

जप, तप, अनुष्ठान व यज्ञयाग हें मी कांहीं जाणत नाहीं. काळानें तर माझा पाठलाग केला आहे १. ह्या भीतीनेंच मी देवाच्या पाठीशीं शिरलों. आतां ज्याचें त्याला सांभाळावें लागेल २. काळ हा आयुष्याचे (दिवस, महिने, वर्षें ह्या) मापानें मार टाकीत आहे, त्या योगानें मोजदाद जास्त होत आहे. एकदां रात्र झाली (मनुष्यदेह गेला) म्हणजे मग काय चालणार आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कामक्रोधादि (किंवा, काळरूपी) चोराच्या तडाक्यांतून वांचलें ते अवशिष्ट ब्रह्मलाभाचे भूमिकेवर आलें ४. [१९२२]

आतां मला पूर्ण कळून आलें कीं, देवा, तुमच्या हातांत कांहीं सत्ता नाहीं म्हणून तुमच्या नामांत कांहीं वीर्य राहिलें नाहीं व त्या योगानें त्यावरील लोकांचें व आमचें हळहळू प्रेमहि कमी होत चाललें २. अशा प्रकारची पापकल्पना आमच्या मनांत येते. त्या योगानें अधिक ताप होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठ्ठला, तुमच्यामध्यें शक्तिहीनपणाचा गुण आला ४. [१९२३]

लागों दिलें अंगा। ऐसें कां गा संनिध ॥ १ ॥ कोण्या पापें उदयो केला । तो देखिला प्रळय ॥ २ ॥ न देखवे पिडला सर्प। दया (जया) दर्प विषाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे भलें। मज तों न वजे साहिलें ॥ ४ ॥ [१९२४]

धांवा शीघ्रवत। किंवा घ्यावें दंडवत ॥ १ ॥ तुमचा जातो बडिवार। आम्ही होतों हीनवर ॥ २ ॥ न धरावा धीर। धांवा नका चालों स्थिर ॥ ३ ॥ तुका म्हणे वाणी। माझी लाजली जी गुणीं ॥ ४ ॥ [१९२५]

सेवकासी आज्ञा निरोपाची काम। स्वामीचे ते धर्म स्वामी जाणे ॥ १ ॥ मनाचिये मुळीं रहावें बैसोन। आकर्षावे गुण पायांपाशीं ॥ २ ॥ भेटीचे तांतडी करितसें लाहो। ओंवाळावा देहो ऐसें वाटे ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें करावें कारण। आपुलें जतन ब्रीद करा ॥ ४ ॥ [१९२६]

उद्वेगासी बहु फांकती मारग। नव्हे ऐसें अंग माझें होतें ॥ १ ॥ आतां कोण यासी करणें विचार। तो देखा साचार पांडुरंगा ॥ २ ॥ मज तों अत्यंत दर्शनाची आस। झाला तरी हो नाश जीवित्वाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे आहे वचनाची उरी। करितों तोंवरी विज्ञापना ॥ ४ ॥ [१९२७]

दुःखाची संगति। तिच्याठायीं कोण प्रीति ॥ १ ॥ अवघें असो हें निराळें। करूं सोईरें सांवळें ॥ २ ॥ क्षणभंगुर ते ठाव। करूनि सांडावेचि वाव ॥ ३ ॥ तुका म्हणे बरा। ठाव पावलों हा थारा ॥ ४ ॥ [१९२८]

गेला तरी जावो सुखें नरकासी। कळंकीं याविशीं शिवों नये ॥ १ ॥ रजस्वला करी वेलासी

हे देवा, अशा प्रकारचे दुष्ट माझ्या आंगाला कां लागूं दिलेत? (असह्य संसारदुःख माझ्या आंगीं कां बरें लागूं दिलेंत?) १. कोणत्या पापाचा उदय झाला म्हणून मी असा दुःखाचा प्रलय पाहिला? २. विषाच्या दर्पानें सर्पास पीडा झालेली पाहावत नाहीं अशी मजमध्यें दया आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, दुर्जनाला पीडा होणें चांगलें तरी तें मला सहन होत नाहीं (पापाचें फळ दुःख आहे, हें जरी खरें असलें तरी सुद्धां मला तें दुःख घालवितां येत नाहीं व सहनहि होत नाहीं) ४. [१९२४]

देवा, लवकर आपण आमच्याकडे धांव घ्या, नाहीं तर आमचे दंडवत तरी घ्या १. आम्ही विन्मुख जाण्यांत तुमचा मोठेपणा जातो व आम्ही हिरमुसल्यासारखे होतों २. देवा, ह्याकरितां तुम्हीं विलंब करूं नये. आमच्याकडे त्वरेनें धांव घ्या. हळू हळू चालूं नका ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हीं माझा अंगीकार न केल्यामुळें तुमचें गुणवर्णन करण्याविषयीं माझी वाणी लज्जित झाली आहे ४. [१९२५]

चाकरास मालकाची जशी आज्ञा होईल त्याप्रमाणें वागणें हें त्याचें कर्तव्य आहे. मालकांनीं कसें वागावें (किंवा, आपली आज्ञा बरोबर आहे कीं नाहीं हें पाहाणें) हा त्यांचा धर्म ते जाणतील १. मनाचें मूळ जें हरिस्वरूप त्या ठिकाणीं वस्ती करून राहावें व सर्व गुणांचें आकर्षण पायांपाशीं करावें (जगांतील सर्व सद्गुण हरिपाशीं आहेत असें समजावें) २. तुमची मला भेट व्हावी म्हणून तुमचा छंद घेतला आहे व तुमच्यावरून देह ओंवाळून टाकावा असें वाटतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तुम्ही मला भेट देण्याचें आपलें कार्य करून आपलें ब्रीद रक्षण करा ४. [१९२६]

खिन्नतेला अनेक मार्ग फुटतात. माझें अंग माझें नाहीं असें वाटतें व देह माझा नाहीं असें वाटतें १. हे पांडुरंगा, आतां ह्याविषयीं कोणता विचार करावा तो तुम्ही यथार्थ जाणतां २. मला तर तुमच्या दर्शनाची अत्यंत आशा आहे, ह्याबद्दल माझें जीवित नष्ट झालें तरी हांवो असें वाटत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जोंपर्यंत माझ्या मुखांतून शब्द निघत आहेत तोंपर्यंत मी आपणाला भेटीची विनंति करीत आहें ४. [१९२७]

ज्याच्या संगतीनें दुःख होत आहे अशा विषयाच्या ठिकाणीं प्रीति कशी करावी? १. आतां हें सर्व (प्रापंचिक) निराळें ठेवून सांवळ्या श्रीहरीच्या रूपाशीं संबंध करूं (जोडूं) २. सर्व पदपदांतरें हीं क्षणभंगुर व्यर्थ आहेत असें समजून त्यांचा त्याग करूं (हा प्रपंच अनित्य, मिथ्या आहे असें समजून त्याचा त्याग करूं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरीच्या सान्निध्याचा उत्तम आश्रय प्राप्त झाला आहे ४. [१९२८]

नरकास गेला तरी सुखानें जावो; अशा ह्या पातक्यास स्पर्श करूं नये १. एखाद्या वेलास (पानवेलीस) विटाळशी

आघात । अंतर तो हित दुरी बरें ॥ २ ॥ उगीच कां आलीं नासवावीं फळें । विटाळ विटाळें कालवूनि ॥ ३ ॥ तुका म्हणे लोणी घालोनि शेणांत । उपेगाची मात काय असे ॥ ४ ॥ [१९२९]

वर्णावे तें किती । केले पवाडे श्रीपती ॥ १ ॥ विश्वासिया घडे लाभ । देइल तरी पद्मनाभ ॥ २ ॥ भाव शुद्ध तरी । सांगितलें काम करी ॥ ३ ॥ तुका म्हणे भोळा देव । परी हा नागवी संदेह ॥ ४ ॥ [१९३०]

संचितावांचून । पंथ न चलवे कारण ॥ १ ॥ कोरडी ते अवघी आटी । वायां जाय लाळ घोटी ॥ २ ॥ धन वित्तें जोडे । देव ऐसें तो न घडे ॥ ३ ॥ तुका म्हणे आड । स्वहितासी बहु नाड ॥ ४ ॥ [१९३१]

अतित्याई बुडे गंगे । पाप लागे त्यांचें त्या ॥ १ ॥ हें तों आपुलिया गुणें । असे जेणें योजिलें ॥ २ ॥ अवचटें अग्नि जाळी । न सांभाळी तो दुःख पावे ॥ ३ ॥ जैसें तैसें दावी आरसा । नकट्या कैसा पालटे ॥ ४ ॥ [१९३२]

हेंद्ऱ्याचे भरितां कान । हलवी मान भोंक रितें ॥ १ ॥ नाहीं मी येथें सांगों स्पष्ट । भावें नष्ट घेत नाहीं ॥ २ ॥ अवगुणीं बाटलें चित्त । तया हित आतळेना ॥ ३ ॥ तुका म्हणे फजितखोरा । म्हणतां बरा उगी रहा ॥ ४ ॥ [१९३३]

नाहीं सरों येत जोडिल्या वचनीं । कवित्वाची वाणी कुशळता ॥ १ ॥ सत्याचा अनुभव वेधी सत्यपणें । अनुभवाच्या गुणें रुचों येतें ॥ २ ॥ काय आगीपाशीं शृंगारिलें चाले । पोटींचें उकले

शिवली तर तो वेल जळून जातो. ज्याच्या योगानें हितांत अंतर येतें त्याच्यापासून दूर असणें हें बरें २. एकमेकांच्या स्पर्शानें विटाळ कालवून वृक्षाला आलेलीं फळें नासून कां टाकावीं? ३. तुकाराम महाराज म्हणतात, लोणी शेणामध्यें कालविण्यांत काय उपयोग आहे? ४. [१९२९]

हे श्रीपति, तुम्हीं जी कीर्ति केली आहे त्याचें आम्हीं किती वर्णन करावें? १. पद्मनाभाच्या ठिकाणीं जर विश्वास ठेवला तर त्याच्या प्रसादानें परम लाभ होईल २. माझा भाव शुद्ध आहे म्हणूनच मी (देवानें व गुरूंनीं) सांगितलेलें काम करीत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव हा भोळा आहे पण त्याच्याविषयीं असणारी अश्रद्धा ही प्राणिमात्रास नागवते ४. [१९३०]

शुद्ध संचितकर्मावांचून (शुद्ध प्रारब्धावांचून, पूर्वपुण्य असल्यावांचून) परमार्थमार्गानें चालणें होत नाहीं १. बाकी सर्व खटाटोप करणें हें कोरडें आहे. तो सर्व व्यर्थ जाऊन पुनः फळ मिळण्यासाठीं लाळ घोटण्याचा प्रसंग येतो २. पुष्कळ धनानें देवाची प्राप्ति होईल असें कधींहि होणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, येथें सर्व खटपट स्वहिताच्या आड येऊन फार नाडणारी आहे ४. [१९३१]

मोठ्या दुराग्रहानें गंगेमध्यें बुडून कोणी प्राण देईल तर तें पाप त्याचें त्याला बाधक होतें १. (पाप आणि पुण्य) हे प्रकार आपापल्या गुणानें होतात. अशी योजना ज्याची त्यानें केली आहे २. अग्नीस स्पर्श केला असतां जाळावें हा अग्नीचा सहजधर्म आहे, म्हणून ज्याचा त्यानें अग्नीपासून आपला सांभाळ न केला तर त्यास दुःख होईल ३. जसें असेल तसें प्रतिबिंब दाखविण्याचा गुण आरशाचा आहे. पाहाणारा नकटा असेल तर तो आरसा तसें दाखवील. त्यांत कांहीं बदल होणार नाहीं (असें तुकाराम महाराज सांगतात) ४. [१९३२]

एखाद्या वेडगळ मनुष्यास चांगला उपदेश करून जरी त्याचे कान भरले तरी तो उगीच मान हालवितो, पण त्याच्या कानाचीं भोकें रिकामींच राहातात १. अशा प्रकारचे जे नष्ट आहेत, ते भावानें (श्रद्धा-भक्तीनें सदुपदेश) घेत नाहींत, म्हणून त्यांस ह्या ठिकाणीं स्पष्ट न सांगितलेलें बरें २. ज्याचें मन वाईट गुणानें (काम-क्रोधादिकांनीं) दूषित झालें आहे त्यास किती जरी सांगितलें तरी हिताचा स्पर्श होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा फजितखोराला कांहीं करूं नको, उगीच बैस असें म्हणावें हें बरें ४. [१९३३]

कांहीं कौशल्यानें अक्षरांची जोडाजोड करून जर कोणी कवित्व करतील तर तें देवाला मान्य होत नाहीं १. ज्याचे ठिकाणीं खरा अनुभव आहे तो खरेपणानें दुसऱ्यास वेध लावतो आणि वक्ता हा अनुभवी असल्यानें ती वाणी ऐकण्यास गोड लागते २. आंत हिणकस घालून वर जर सोन्याचा मुलामा केला तर तो शृंगार अग्नीपुढें चालत नाहीं आणि

कसापाशीं ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें करावा उकल । लागेचि ना बोल वाढवूनि ॥ ४ ॥ [१९३४]

लचाळाच्या कामा नाहीं ताळावाळा । न कळे वोंगळा उपदेश ॥ १ ॥ वचनचर्येची न कळे चांचणी । ऐसी संघष्टनी अमंगळ ॥ २ ॥ समयो न कळे वेडगळ बुद्धि । विजाती ते शुद्धि चांच चाट ॥ ३ ॥ तुका म्हणे याचा धिःकारचि बरा । बहूमति खराहूनि हीन ॥ ४ ॥ [१९३५]

एक धरिला चित्तीं । आम्हीं रखुमाईचा पती ॥ १ ॥ तेणें झालें अवघें काम । निवारला भवश्रम ॥ २ ॥ परद्रव्य परनारी । झाली विषाचिया परी ॥ ३ ॥ तुका म्हणे फार। नाहीं लागत व्यवहार ॥ ४ ॥ [१९३६]

भेणें पळे डोळसा । न कळे मृत्यु तो सरिसा ॥ १ ॥ कैसी जाली दिशाभूली । नवजाति ये वाट चाली ॥ २ ॥ संसाराची खंती । मावळल्या तरी शक्ति ॥ ३ ॥ तुका म्हणे हीणा । बुद्धि चुकली नारायणा ॥ ४ ॥ [१९३७]

अभिमानाचें तोंड काळें । दावी बळें अंधार ॥ १ ॥ लाभ न्यावा हातो हातीं । तोंडीं माती पाडोनि ॥ २ ॥ लागलीसे पाठी लाज । झालें काज नासाया ॥ ३ ॥ तुका म्हणे कुश्चळ मनीं। विटंबनीं पडिलीं तीं ॥ ४ ॥ [१९३८]

चोराचिया धुडका मनीं । वसे ध्यानीं लांछन ॥ १ ॥ यासी आम्ही करणें काय । वर्षों न्यायें पर्जन्य ॥ २ ॥ ज्याच्या बैंसे खतावरी । तें चुरचुरी दुखवून ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्याची खोडी । त्याची जोडी त्या पीडी ॥ ४ ॥ [१९३९]

कसोटीनें देखील त्याच्या पोटांतील खोटें (हिणकट) समजलें जातें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या हृदयांत खरा अनुभव आहे तो शब्दानें उलगडून विस्तृत सांगावा लागत नाहीं ४. [१९३४]

जो कोणी चावट (अव्यवस्थित) मनुष्य आहे त्याचे कामांत कांहीं ताळमेळ नसतो व त्या मूर्खास–घामटास किती समजावून सांगितलें तरी तें त्यास कळत नाहीं १. शास्त्रवचनानें आचार सांगितला तरी त्यास आंतील गुह्य कांहीं कळत नाहीं. अशा लोकांची संगति करणें हें अमंगळ आहे २. ते मतिमंद असल्यामुळें त्यांस काळ-वेळ समजत नाहीं, म्हणून अशा विसंगत जातीस शुद्धि नाहीं व त्यास चावट असें म्हणावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा लोकांचा त्रास मानावा हें बरें, कारण अनेक मतांचे (बुद्धीचे) जे कोणी आहेत ते गाढवापेक्षांहि नीच समजावे ४. [१९३५]

एक रुक्मिणीचा पति पांडुरंग आम्हीं चित्तांत धरला १. त्या योगेंकरून सर्व कार्य होऊन संसारदुःखाचा परिहारहि झाला २. परद्रव्य आणि परस्त्री हीं विषासारखीं भासूं लागलीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां फार व्यवहाराची (ह्यापेक्षां अधिक कांहीं करण्याची) जरूरी नाहीं ४. [१९३६]

जे कोणी डोळस असून मरणाच्या भयानें पळून जाऊं इच्छितात पण मृत्यु त्यांच्याबरोबरच असतो हें त्यांना समजत नाहीं १. अशा ह्या गरिबांची कशी दिशाभूल झाली आहे पाहा. जी वाट खरी आहे त्या वाटेनें (परमार्थमार्गानें) ते मुळींच चालत नाहींत २. जरी सर्व शक्ति नाहींशा झाल्या तरी ते संसाराची काळजी करितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे जे हीन आहेत त्यांची बुद्धि भकली (चळली) आहे ४. [१९३७]

अभिमान हा काळतोंड्या आहे. त्यानें आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं बळेंच अंधकार केला आहे (देहाभिमानाच्या योगानें परमात्मस्फूर्ति नाहींशी झाली) १. जो खरा आत्मलाभ आहे तो नाहींसा करून अखेरीस तोंडीं माती घालणें हें अभिमानाचें करणें (लक्षण) आहे २. आपलें (संतांना शरण जाऊन होणारें) सिद्ध कार्य नासावयाकरितां लज्जा ही सर्वांच्या मागें लागली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांच्या मनाचे ठिकाणीं पाप आहे ते फजितीच्या डोहांत पडतात ४. [१९३८]

ज्याचा स्वभाव चोरी करण्याचा असतो त्याचे ध्यानींमनीं तोच ध्यास असतो १. असल्या लोकांस आम्हीं काय करावें, कारण आमचें बोलणें पर्जन्याप्रमाणें सहज रीतीनें होत आहे २. पण ज्याच्या अंगीं जो उणेपणा आहे त्याच्यावर आमच्या शब्दाचा घाव लागून तो मोठ्या दुःखानें तळमळतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या अंगीं जी खोड असेल तीच त्याची त्याला दुःख देते ४. [१९३९]

बुद्धिहीना उपदेश । तें तें विष अमृतीं ॥ १ ॥ हुंगो नये गोऱ्हावाडी । तेथें जोडी विटाळ ॥ २ ॥ अळसियाचें अंतर कुडें । जैसें मढें निष्काम ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐशा हातीं । मज श्रीपती वांचवा ॥ ४ ॥ [१९४०]

न करीं तुमची सेवा । बापुडें मीपण देवा । बोलिलों तो पाववा । पण सिद्धी सकळ ॥ १ ॥ आणीक काय तुम्हां काम । आम्हां नेदां तरी प्रेम । कैसे धर्माधर्म । निश्चयेंसी राहती ॥ २ ॥ आम्हीं वेंचलों शरीरें । तुम्ही बीज पेरा खरें । संयोगाचें बरें । गोड होतें उभयतां ॥ ३ ॥ एका हातें टाळी । कोठें वाजते निराळी । झाला तरी बळी । स्वामीविण शोभेना ॥ ४ ॥ रूपा यावें जी अनंता । धरीन पुटाची त्या सत्ता । होईन सरता । संतांमाजी पोपणा ॥ ५ ॥ ठेविलें उधारा । वरी काय तो पातेरा । तुका म्हणे बरा । रोकडाचि निवाड ॥ ६ ॥ [१९४१]

भुके नाहीं अन्न । मेल्यावरी पिंडदान ॥ १ ॥ हे तो चाळवा चाळवी । केलें आपणचि जेवी ॥ २ ॥ नैवेद्याचा आळ । वेंचे ठाकणीं सकळ ॥ ३ ॥ तुका म्हणे जड । मज न राखावें दगड ॥ ४ ॥ [१९४२]

सर्व भाग्यहीन । असें सांभाळिलों दीन ॥ १ ॥ पायीं संतांचे मस्तक । असों जडोनि हस्तक ॥ २ ॥ जाणें तरी सेवा । दीन दुर्बळाची देवा ॥ ३ ॥ तुका म्हणे जीव । समर्पून भाकीं कींव ॥ ४ ॥ [१९४३]

भाग्याचा उदय । ते हे जोडी संतपाय ॥ १ ॥ येथूनियां नुठो माथा । मरणावांचूनि सर्वथा ॥ २ ॥

जसें अमृतामध्यें विष घातलें असतां त्या अमृताचा नाश होतो तसें मतिमंद असलेल्या लोकांस उपदेश केला असतां तो वायां जातो १. कोणी शौचकूपाचे ठिकाणीं जाऊन दुर्गंधी घेऊं नये, कारण त्या ठिकाणीं विटाळाची प्राप्ति होते २. जे कोणी आळशी आहेत, त्यांचें हृदय खोटें असतें. जसें प्रेत कामनेच्या वेगळें (निष्क्रिय) असतें, तशी आळशांची स्थिति असते ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे लक्ष्मीपति देवा, अशा लोकांच्या तडाक्यांतून मला वांचवा (अशांची संगति घडूं देऊं नका) ४. [१९४०]

हे देवा, मी तुमची सेवा मीपणाच्या अभिमानानें करीत नाहीं, परंतु मीं जी भक्तिप्रेमाची इच्छा तुमच्याजवळ बोलून दाखविली ती पूर्ण करा १. जर तुम्ही आम्हांस प्रेम देत नाहीं तर तुम्हांला ह्याखेरीज दुसरें कोणतें काम आहे? तुम्ही प्रेम दिल्याबर मग निश्चयानें माझे धर्माधर्म कसे राहातील बरें? २. आम्हीं आपलें शरीर तुम्हांस अर्पण केलें आहे. त्या ठिकाणीं तुमच्या शुद्ध बीजाची पेरणी करा म्हणजे तुमचा आमचा संयोग होईल व उभयतांमध्यें चांगली गोडी वाढेल ३. एका हातानें कोठें टाळी वाजते आहे काय? त्याप्रमाणें सेवक जरी बलवान् असला तरी तो स्वामीवांचून शोभत नाहीं ४. हे अनंता, तुम्ही निराकारपणांत न राहातां आकारास यावें म्हणजे त्या सत्तेनें आमच्या सेवेस पूट चढेल. मग आम्ही तुम्हांस बळकट धरूं आणि सर्व संतांमध्यें आम्ही आवडते होऊं ५. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हीं जर भक्तिप्रेम देण्याचें उधार ठेवलेंत तर काय तो माझा फजितवाडा? म्हणून निकाल रोकडा करावा तो बरा ६. [१९४१]

जे कोणी आपल्या बापास जिवंत असतांना पोटभर अन्न घालीत नाहींत, ते बाप मेल्यावर विधीप्रमाणें पिंडदान करतात १. हे प्रकार केवळ खोटे फसवाफसवीचे असून (श्राद्धाकरितां शिजविलेलें गोडधोड) अन्न आपणांस भोजनाकरितांच असतें २. देवास नैवेद्याचे निमित्तानें चांगलीं पक्वान्नें करून तीं सर्व आपल्या पोटाच्या गारींत घालतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे हे दगडाप्रमाणें जड बुद्धीचे लोक तसें मला ठेवूं नका ४. [१९४२]

मी सर्व भाग्याविषयीं दरिद्री आहें पण दीनाचा सांभाळ संतांनीं केला आहे १. म्हणून त्या संतांचे पायांवर मी मस्तक ठेवून पुढें हात जोडून उभा राहिलों आहें २. हे देवा, मी केवळ दीन दुर्बळ आहें म्हणून ही माझी सेवा आपण जाणत आहांत ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी आपला जीव तुम्हांला समर्पण करून तुमची करुणा भाकीत आहें ४. [१९४३]

माझ्या भाग्याचा कांहीं उदय झाला म्हणून मला संतचरणांची प्राप्ति झाली १. आतां ह्या ठिकाणीं मी मस्तक

होईं बळकट । माझ्या मना तूं रे धीट ॥ ३ ॥ तुका आला लोटांगणीं । भक्तिभाग्यें (ग्या) झाली धणी ॥ ४ ॥ [१९४४]

नाहीं तरी आतां कैंचा अनुभव । झालासी तूं देव घरघेणा ॥ १ ॥ जेथें तेथें देखें लाचांचा पर्वत । घ्यावें तरी चित्त समाधान ॥ २ ॥ आधीं वरी हात या नांवें उदार । उसण्याचे उपकार फिटाफिट ॥ ३ ॥ तुका म्हणे जैसी तैसी करूं सेवा । सामर्थ्यानें देवा पायांपाशीं ॥ ४ ॥ [१९४५]

आम्ही सर्वकाळ कैंचीं सावधान । व्यवसायें मन अभ्यासलें ॥ १ ॥ तरी म्हणा मोट ठेविली चरणीं । केलों गुणागुणीं कासावीस ॥ २ ॥ याच कानसुलीं मारीतसे हाका । मज घाटूं नका मधीं आतां ॥ ३ ॥ तुका म्हणे निद्रा जागृति सुषुप्ति । तुम्ही हो श्रीपती साक्षी येथें ॥ ४ ॥ [१९४६]

नसताचि दाउनि भेव । केला जीव हिंपुटी ॥ १ ॥ झालों तेव्हां कळलें जागा । वाउगा आकांत ॥ २ ॥ गंवसिलों पुढें मागें । लाग लागे पावला ॥ ३ ॥ तुका म्हणे केली आयणी । सलगीच्यांनीं सन्मुख ॥ ४ ॥ [१९४७]

हें कां आम्हां सेवा दान । देखों सीण विषमाचा ॥ १ ॥ सांभाळा जी ब्रीदावळी । तुम्ही कां कळीसारिखे ॥ २ ॥ शरणांगता वैऱ्याहातीं । हे निश्चिंती देखिली ॥ ३ ॥ तुका म्हणे इच्छीं भेटी । पाय पोटीं उफराटे ॥ ४ ॥ [१९४८]

कां हो आलें नेणों भागा । पांडुरंगा माझिया ॥ १ ॥ उफराटी तुम्हां चाली । क्रिया गेली

ठेविलें आहे, तें मरण येई तोंपर्यंत निश्चयानें उचलणार नाहीं २. अरे माझ्या मना, हा मीं निश्चय केला आहे त्याविषयीं तूं चांगलें धीट हो ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी संतांस लोटांगण घातलें म्हणून भक्तिभाग्याविषयींची माझी इच्छा पूर्ण झाली ४. [१९४४]

नाहींपेक्षां आतां ह्या ठिकाणीं अनुभव कसला आहे ? कारण तूं देव असून घरबुडव्या झाला आहेस १. मी ज्या ज्या ठिकाणीं पाहातों त्या त्या ठिकाणीं लांच घेऊन प्राप्तीचे पर्वत करणारे मला दिसतात. किंवा, जेथें पाहावें तेथें लांचाचे पर्वत मला दिसतात. जर कोणापासून कांहीं घेतलें तर तुमचें चित्त समाधान पावतें २. अगोदर आपला हात वर करून जे कोणी देणगी देतात त्यांस खरें उदार म्हणावें, नाहींपेक्षां कांहीं तरी काम करून घेऊन दान दिलें तर तें एखाद्याचें उसनें परत दिल्याप्रमाणें होतें; मग तो उपकार मानतां येत नाहीं. ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमच्या पायांजवळ आमच्या अंगीं जशी शक्ति असेल त्याप्रमाणें आम्ही तुमची सेवा करूं ४. [१९४५]

आमचें मन सर्वकाळ सावध राहात नाहीं, कारण त्या मनाला अनेक संसारांतील व्यापार करण्याचा अभ्यास-सराव पडला आहे; म्हणून आम्ही कसे सावध राहूं ? १. आमचें देहरूपी मोटकुळें तुमचे पायांवर ठेविलें. कां म्हणाल, तर अनेक गुणावगुणांनीं आम्हांस कासावीस केलें म्हणून २. अशा प्रकारानें तुमचे कानीं आम्ही हांका मारितों, पण आतां मध्यंतरीं तुम्ही आम्हांस चेंगरूं नका ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो लक्ष्मीपति देवा, आमच्या निद्रेचे, जागृतीचे आणि स्वप्नाचे साक्षी तुम्ही आहांत (त्यामुळें माझी कोणतीहि अवस्था तुम्हांला समजते) ४. [१९४६]

हे देवा, तुम्हीं नाहीं तेंच भय दाखवून माझा जीव फार कष्टी केला आहे १. मी ज्या वेळेला ब्रह्मज्ञानानें सावध झालों त्या वेळेला हा सर्व पसारा व्यर्थ आहे असें मला समजून आलें २. ज्या वेळीं मागें व पुढें जन्ममृत्यूच्या सांच्यांत सांपडलों होतों त्या वेळीं तुमच्याविषयीं मोठी लगबग केल्यामुळें तुमचा लाग (थांगपत्ता) लागला ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी तुमचे लाडके भक्त व माझ्या प्रेमाचे संत होते त्यांनीं मला तुमचेपाशीं आणून मला ब्रह्मज्ञानाचा साक्षात्कार घडविला. [१९४७]

आम्हीं विषमभावाचें दुःख पाहावें हेंच तुमचें आम्हांला सेवादान आहे काय ? १. अहो महाराज, तुम्ही आपलें दीनवत्सल हें चालत आलेलें ब्रीद जतन करा. ह्या कलियुगाप्रमाणें लबाडीचें वर्तन तुम्ही कां ठेवितां ? २. जे तुम्हांला शरण आले आहेत त्यांना काळाच्या हातांत द्यावें हीच त्यांची निश्चिंति (फलश्रुति) तुम्हीं पाहिली काय ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही तुमच्या भेटीची इच्छा करीत आहोंत; असें असून तुम्ही उलट पोटांत पाय घालतां, आम्हांस दर्शन देत नाहीं हें तुम्हांला बरें दिसतें काय ? ४. [१९४८]

अहो पांडुरंगा, (आतांपर्यंत सर्व भक्तांना सरळपणें भेट देण्याविषयीं तुम्ही उदार होतां, मग मलाच भेट न देण्याचा)

सत्याची ॥ २ ॥ साक्षी हें गे माझें मन । आर्त कोण होतें तें ॥ ३ ॥ तुका म्हणे समर्थपणें । काय नेणें करीतसां ॥ ४ ॥ [१९४९]

शकुनानें लाभ हानि । येथूनिच कळतसे ॥ १ ॥ भयारूढ झालें मन । आतां कोण विश्वास ॥ २ ॥ प्रीत कळे आलिंगनीं । संपादनीं अत्यंत ॥ ३ ॥ तुका म्हणे मोकलिलें । कळों आलें बरवें हें ॥ ४ ॥ [१९५०]

न होय निग्रह देहासि दंडण । न वजे भूकतान सहावली ॥ १ ॥ तरि नित्य नित्य करीं आळवण । माझा अभिमान असों द्यावा ॥ २ ॥ नाहीं विटाळिलें काया वाचा मन । संकल्पानें भिन्न आशेचिया ॥ ३ ॥ तुका म्हणे भवसागरीं उतार । करावया आधार इच्छीतसें ॥ ४ ॥ [१९५१]

आइकिली कीर्ति संतांच्या वदनीं । तरि हें टाकोनि आलों स्थळ ॥ १ ॥ मागिला पुढिला करावें सारिखें । पालटों पारिखें नये देवा ॥ २ ॥ आम्हांसी विश्वास नामाचा आधार । तुटतां हे थार उरी नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें नसावेंचि दुजें । विनंति पंढरिराजें परिसावी हे ॥ ४ ॥ [१९५२]

मोलाचें आयुष्य वेंचतसे सेवे । नुगवतां गोवे खेद होतो ॥ १ ॥ उगवूं आलेति तुम्ही नारायणा । परिहार या सीणा निमिषांत ॥ २ ॥ लिगाडाचे मासी न्यायें झाली परी । उरली ते उरी नाहीं कांहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे लाहो साधीं वाचाबळें । ओढियेलों काळें धांव घालीं ॥ ४ ॥ [१९५३]

म्हणऊनि झालों क्षेत्रींचे संन्यासी । चित्त आशापाशीं आंवरुनि ॥ १ ॥ कदापिही नव्हे सीमा

असा प्रकार आमचे वांटणीस कशाकरितां आला असावा हें मला समजत नाहीं १. तुम्हीं आपली पहिली (माझ्याशीं) सरळ वागणूक सोडून वांकडे वागत आहां. तेव्हां तुमची खरी क्रिया नाहींशी झालीसें दिसतें २. पूर्वी तुमची इच्छा कशी होती, ह्याला पुरावा माझ्याच मनाचा आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्ही थोर आहांत म्हणून काय वाटेल तें कराल ? तें तुमचें करणें आम्हांस समजत नाहीं ४. [१९४९]

जसा शकून होईल तसा लाभ अथवा हानि होईल हें आपल्या ठिकाणींच समजतें १. देवा, तुम्हीं माझ्या मनांत भय उत्पन्न केलें, तर आतां तुमचा विश्वास कोणता धरावा ? २. एखाद्याचें प्रेम एखाद्यावर आहे कीं नाहीं हें परस्परांच्या भेटींत आलिंगन-व्यवहारावरून कळतें, म्हणजे प्रेम आहे असें दाखविण्याकरितां बाह्यात्कारीं आलिंगनाची संपादणी करतो; व तेंच आलिंगन कित्येकांचें अत्यंत प्रेमाचें असतें ३. देवा, तुम्हीं आम्हांला टाकलें आहे असें मला तुमच्या वागण्यावरून चांगलें समजून आलें ४. [१९५०]

तुमच्या भेटीविषयीं (कृच्छ्र-चांद्रायणासारखीं व्रतें करून) देहाचा निग्रह करून त्यास त्रास देणें हें आमच्या हातून होत नाहीं, आणि आम्हांला तहानभूक सहन करवत नाहीं १. म्हणून आम्ही तुम्हांला करुणावचनानें सतत हांका मारितों. ह्याकरितां माझा अभिमान तुम्हीं धरावा २. तुमच्यावांचून कोणत्याहि वेगळ्या आशेच्या संकल्पानें माझें काया, वाचा, मन विटाळलें नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या भवसमुद्रांतून पलीकडे उतरून जाण्याविषयीं कांहीं तरी तुमचा आधार असावा अशी माझी इच्छा आहे ४. [१९५१]

देवा, तूं पतितपावन आहेस अशी तुझी कीर्ति मीं संतांच्या मुखानें ऐकली, म्हणूनच मी तुझ्याजवळ आलों १. मागील भक्तांचा जसा उद्धार केलात, त्याचप्रमाणें पुढच्याहि भक्तांचा उद्धार करावा. हे देवा, ह्या स्थितींत बदल (भेदाभेद) येऊं देऊं नये २. आम्हांला तुझें नाम हाच आश्रय आहे, असा विश्वास आहे. जर तो आमचा आधार नाहींसा झाला तर आमचें कांहीं न राहातां सर्वस्वीं नाश होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीराजा, आमचेविषयीं तुम्हीं भिन्नभाव धरूं नये ही आमची विनंति ऐकावी ४. [१९५२]

देवा, मोठें मौल्यवान् असें आमचें आयुष्य तुमच्या सेवेमध्यें जात आहे, परंतु त्या योगानें संसाराच्या गुंताड्यांतून आमची सुटका होत नाहीं. ह्यामुळें मोठा खेद होत आहे १. अहो नारायणा, आमची सुटका करण्याविषयीं तुम्ही आलांत तर ह्या संसारदुःखाचा एका क्षणांत परिहार होईल २. माझी स्थिति गुळांतल्या लिगाडांत (चिकींत) सांपडलेल्या माशीप्रमाणें आहे. आतां ह्यांत कांहीं शंका राहिली नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, काळानें मला ओढलें आहे, तुम्ही धांवत येऊन मला सोडवा, असा मी वाणीच्या बळानें टाहो घेतला आहे ४. [१९५३]

सर्व स्त्री-पुत्रादिकांच्या आशेच्या पाशांपासून आम्हीं आपलें चित्त आंवरलें आहे, म्हणून ह्या देहरूपी क्षेत्रामध्यें

उल्लंघन । केलें विसर्जन आव्हानींच ॥ २ ॥ पारिखा तो आतां जाला दुजा ठाव । दृढ केला भाव एकविध ॥ ३ ॥ तुका म्हणे कार्यकारणाचा हेवा । नाहीं जीव देवा समर्पिला ॥ ४ ॥ [१९५४]

विभ्रंशिली बुद्धि देहांतीं जवळी । काळाची अवकाळीं वायचाळा ॥ १ ॥ पालटलें जैसें देंठ सांडी पान । पिकलें आपण तयापरी ॥ २ ॥ न मारितां हीन बुद्धि दुःख पावी । माजल्याचि गोवी तयापरी ॥ ३ ॥ तुका म्हणे गळ लागलिया मत्स्या । तळमळेचा तैसा लवलाहो ॥ ४ ॥ [१९५५]

न वजावा तो काळ वायां । मुख्य दया हे देवा ॥ १ ॥ म्हणऊनि जैसें तैसें । रहणी असे पायांचें ॥ २ ॥ मोकळें हें मन कष्ट । करी नष्ट दुर्जन ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं नेणें । न वजें येणें परी वायां ॥ ४ ॥ [१९५६]

कल्पतरूअंगीं इच्छिलें तें फळ । अभागी दुर्बळ भावें सिद्धी ॥ १ ॥ धन्य त्या जाती धन्य त्या जाती । नारायण चित्तीं सांठविला ॥ २ ॥ बीजाऐसा द्यावा उदकें अंकुर । गुणाचे प्रकार ज्याचे तया ॥ ३ ॥ तुका म्हणे कळे पारखिया हिरा । ओझें पाठीं खरा चंदनाचें ॥ ४ ॥ [१९५७]

उकिर्डा (उकिरडा) आधीं अंगें नरकाडी । जातीचे ते जोडी तेचि चित्तीं ॥ १ ॥ कासयानें देखे अंधळें माणिकें । चवीविण फिकें वायां जाय ॥ २ ॥ काय जाणे विष पालटों उपचारें ।

आम्ही संन्यास घेऊन राहिलों आहोंत १. आतां आरंभींच त्याचें विसर्जन केलें आहे. त्याकरितां त्या क्षेत्राचे बाहेरील शिवेचें उल्लंघन आम्हांस कधींहि करण्याचें कारण नाहीं २. आम्हीं देवाविषयीं एकविध भाव दृढ केला आहे, म्हणून आतां आम्हांला दुसरें ठिकाण पारखें झालें आहे ३. तुकाराम महाराज-म्हणतात, आम्हीं आपला जीव देवास अर्पण केला आहे, म्हणून आम्हांला कार्य (प्रपंच) कारणा (अज्ञाना) ची हांव नाहीं ४. [१९५४]

आपणांस जरी चांगली बुद्धि असली तरी देहाचे अंतसमयीं भ्रष्ट होते. अशी व्यर्थ फजिती करणें काळाच्या स्वाधीन आहे १. एखादें झाडाचें पान हिरवें असतें तें पिकलें म्हणजे सहज देंठापासून गळून पडतें तशी आपली स्थिति अखेरीस होते २. जो कोणी मतिमंद आहे त्यास दुसऱ्यानें त्रास न दिला तरी तो आपल्या कर्तव्यानेंच दुःखी होतो. तशी संसारांतील बद्धता उन्मत्तपणानें होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमिषाचे आशेनें मासा गळांत सांपडतो तेव्हां त्याची तळमळ फार होते. तशाच वेगानें संसारबद्ध जनाची अंतीं तळमळ होते (ह्यासाठीं क्षणिक सुखाच्या आशेनें संसारबंधनांत न पडतां परमार्थाविषयींची बुद्धि आमरण टेवावी) ४. [१९५५]

हे देवा, तुमचे चिंतनांत काळ जावा, तो व्यर्थ जाऊं नये ही मुख्य दया तुम्ही मजवर करा १. ह्याकरितां जसे आम्ही आहोंत तसे तुमच्या पायांच्या (तुमच्या उपासनेच्या) संप्रदायानें–आश्रयानें आहोंत २. जर आम्ही चिंतनावांचून मोकळे असलों तर आमचें मन नष्ट दुर्जन आहे तें आम्हांस दुःखी करतें; अथवा, आमचें मन मोकळें असतें तर त्यानें इतस्ततः धांवण्याच्या श्रमानें आम्हांला नष्ट दुर्जन केलें असतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही कांहीं शास्त्र वगैरे जाणत नाहीं. ह्यामुळें आम्ही वायां जाणार नाहीं (असा आम्हांला विश्वास आहे) ४. [१९५६]

कल्पतरूपासून इच्छावें तें फळ मिळतें मग तेथें कोणी दुर्दैवी दरिद्री मनुष्य चांगली इच्छा धरील तर त्याला त्यापासून चांगलेंच फळ मिळेल १. ज्यांनीं आपल्या चित्तामध्यें नारायण सांठविला आहे, अशा जाति धन्य आहेत (हें द्विवार सांगतों) २. जसें बीज असेल तसे अंकुर पाण्याच्या योगानें उगवतात पण ज्याच्या त्याच्या गुणाप्रमाणें प्रकार घडून येतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हिऱ्याची परीक्षा परीक्षावंतांसच समजते. चंदनाचें ओझें गाढवाचे पाठीवर असतें पण त्याचा त्याला कांहीं उपयोग न होतां त्या चंदनाचा सुगंध जाणणारे दुसरे आहेत (त्याप्रमाणें नारायण सर्वांभूतीं समान असला, तरी त्याला ओळखण्यांत सुख आहे व न ओळखण्यांत दुःख आहे) ४. [१९५७]

ज्याचें (कोणत्याहि गाढवाचें) अंग नरकासारखें अगर उकिरड्यासारखें असतें ती प्राप्ति ज्याचे त्याचे मनाप्रमाणें त्या जातीस होते (मूर्खाला वाईट विषयच आवडतात) १. जे कोणी आंधळे आहेत त्यांस माणिक कसें दृष्टीस पडेल? अगर चांगलें अन्न केलें पण जिव्हेला चव नसली तर तें फिकें होऊन व्यर्थ जाईल (मूर्खाला बुद्धि नसल्यामुळें परमार्थाचें महत्त्व समजत नाहीं) २. विष हें मूळचें कडु आहे. त्यास अनेक उपचार केल्यानें त्याचा कडुपणा बदलेल कीं काय?

मूर्खासी अंतर तोंचि बरें ॥ ३ ॥ तुका म्हणे काय उपदेश वेड्या । संग होतां (संगें होतां) रेड्यासवें कष्ट ॥ ४ ॥ [१९५८]

जया शिरीं कारभार । बुद्धि सार तयाची ॥ १ ॥ वर्ते तैसें वर्ते जन । बहुतां गुण एकाचा ॥ २ ॥ आपणीया पाक करी । तो इतरीं सेविजे ॥ ३ ॥ तुका म्हणे शूर राखे । गांढ्या वाखे सांगातें ॥ ४ ॥ [१९५९]

एक एका साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ ॥ १ ॥ कोण जाणे कैशी परी । पुढें उरी ठेवितां ॥ २ ॥ अवघे धन्य होऊं आतां । स्मरवितां स्मरण ॥ ३ ॥ तुका म्हणे अवघी जोडी । ते आवडी चरणांची ॥ ४ ॥ [१९६०]

फळकट तो संसार । येथें सार भगवंत ॥ १ ॥ ऐसें जागवितों मना । सरसें जनासहित ॥ २ ॥ अवघें निरसूनि काम । घ्यावें नाम विठोबाचें ॥ ३ ॥ तुका म्हणे देवाविण । केला शीण तो मिथ्या ॥ ४ ॥ [१९६१]

शुद्धरसें (सुधारसें) ओलावली । रसना धाली न धाये ॥ १ ॥ कळों नये जाली धणी । नारायणीं पूर्णता ॥ २ ॥ आवडे तें तेंचि यासी । ब्रह्मरसीं निरसें ॥ ३ ॥ तुका म्हणे बहुतां परी । करूनि (करुणा) करीं सेवन ॥ ४ ॥ [१९६२]

असंतीं कांटाळा हा नव्हे मत्सर । ब्रह्म तें विकारविरहित ॥ १ ॥ तरि म्हणा त्याग प्रतिपादिलासे । अनादि हा असे वैराकार ॥ २ ॥ सिजलें हिरवें एका नांवें धान्य ।

हें आम्ही काय जाणों ? म्हणून मूर्खांपासून दूर असावें हेंच बरें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसें रेड्याच्या संगतींत राहाण्याचा प्रसंग आल्यास जसे फार श्रम होतात तसें वेडगळ लोकांस किती जरी सांगितलें तरी त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं (मूर्खांच्या संगतींत श्रमच होणार) ४. [१९५८]

ज्याच्या शिरावर कारभार असतो त्याची मति सारभूत आहे (ज्यांच्यावर लोकांना सन्मार्गाला लावण्याची जबाबदारी आहे त्यांची बुद्धि धर्म-नीतिसंपन्न असावी) १. म्हणून तो वागणूक करील त्याप्रमाणें इतर लोक वागतात आणि त्या एकाचा गुण पुष्कळ जनांस लागतो २. आपणांकरितां पाक सिद्ध करावा व त्याचें जसें आपल्याबरोबर इतर लोक सेवन करतात (आपल्या कल्याणाकरितां आपण चांगले वागूं लागलों म्हणजे आपलें पाहून इतरहि तसे वागूं लागतात) [तसें ध्रुवपदांत दर्शविल्याप्रमाणें घडतें] ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी शूराच्या संगतीनें जातील त्यांचें रक्षण शूर करितो आणि गांड्याचे संगतीनें जाणारांची फजिती होते ४. [१९५९]

अहो जन हो, तुम्ही व आम्ही (सर्वजण) मिळून एकमेकांच्या साह्यानें चांगली वाट धरूं या १. नाहींपेक्षां (म्हातारपणीं परमार्थ करूं अशी) कांहीं कसर ठेवली तर कसा प्रकार होईल (आयुष्य शिल्लक राहील किंवा नाहीं) कोण जाणे ? २. म्हणून नामस्मरण करविणारा व करणारा असे मिळून आतां सर्व धन्य होऊं ३. तुकाराम महाराज म्हणतात, विठोबारायाचे चरणांची आवड धरण्यानें सर्व कांहीं प्राप्त होतें ४. [१९६०]

संसार हा फलकटाप्रमाणें असार आहे व त्या ठिकाणीं भगवंत हा एक सारभूत आहे १. हे विचार मी आपल्या मनांत जागवीत आहें व लोकांनाहि नेहमीं जागृति देत आहें २. संपूर्ण वैषयिक कामवासनेचा निरास करून (संसारांतील कामें बाजूस ठेवून) एक विठोबाचें नांव घ्यावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाच्या चिंतनावांचून इतर श्रम करणें मिथ्या आहे ४. [१९६१]

हरिचिंतनाच्या शुद्ध रसानें रसना ही चटावली आहे. ती जरी तृप्त झाली आहे तरी एका अर्थी ती तृप्त न झाल्यासारखीच आहे १. नारायणस्वरूपाच्या चिंतनानें हृदयाची पूर्ण तृप्ति झालेली लक्षांत येऊं नये २. जिव्हेला त्याच्या नामचिंतनाचीच आवड लागली आहे. त्या योगेंकरून ब्रह्मरसास सर्व विषय नीरस भासत आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, भगवन्नामचिंतनाच्या रसाचें मी बहुत प्रकारानें सेवन करतों व तृप्ति न झाल्यामुळें पुनःपुनः त्याच नामरसाचें सेवन करण्याकरितां देवाची अनेक प्रकारें करुणा भाकीत आहें ४. [१९६२]

खोट्या गोष्टीविषयींचा त्रास असणें ह्यास मत्सर म्हणूं नये. ब्रह्म हें कोणत्याहि विकारांत नाहीं १. असें जरी आहे तरी खोट्याचा त्याग करावा आणि खऱ्याचें ग्रहण करावें असें प्रतिपादन केलें आहे व असा अनादिकालापासून

सेवनापें भिन्न निवडे तें ॥ ३ ॥ तुका म्हणे भूतीं साक्ष नारायण । अवगुणीं दंडण गुणीं पूजा ॥ ४ ॥ [१९६३]

आपुलें आपण जाणावें स्वहित । जेणें राहे चित्त समाधान ॥ १ ॥ बहुरंगें माया असे विखुरली । कुंठितचि चाली होतां बरी ॥ २ ॥ पूजा ते अबोला चित्ताच्या प्रकारीं । भाव विश्वंभरीं समर्पावा ॥ ३ ॥ तुका म्हणे गेला फिटोनियां भेव । मग होतो देव मनाचाचि ॥ ४ ॥ [१९६४]

असोनि न कीजे अलिप्त अहंकारें । उगीच या भारें कुंथाकुंथी ॥ १ ॥ धांवा सोडवणें वेगीं लवकरी । मी तों झालों हरी शक्तिहीन ॥ २ ॥ भ्रमल्यानें दिसे बांधल्याचे परी । माझें मजवरी वाहोनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे धांव घेतलीसे सोई । आतां पुढें येईं लवकरी ॥ ४ ॥ [१९६५]

आपुल्याचा भोत चाटी । मारी करंटी पारख्या ॥ १ ॥ ऐसें जन भुललें देवा । मिथ्या हेवा वाढवी ॥ २ ॥ गळ गिळी आमिषें मासा । प्राण आशा घेतला ॥ ३ ॥ तुका म्हणे बोकड मोहो । धरी पहा हो खाटिकाचा ॥ ४ ॥ [१९६६]

विषय तो मरणसंगीं । नेणे सुटिका अभागी ॥ १ ॥ शास्त्राचा केला लुंडा । तोंडीं पाडियेला धोंडा ॥ २ ॥ अगदीं मोक्ष नाहीं ठावा । काय सांगावें गाढवा ॥ ३ ॥ तुका म्हणे ग्यानगंड । देवा सुखें पावो नाड ॥ ४ ॥ [१९६७]

मीच विखळ मीच विखळ । येर सकळ बहु बरें ॥ १ ॥ पाहिजे हें क्षमा केलें । येणें बोलें

खोट्या-खऱ्याचा विरोध आहे २. शिजलेलें व हिरवें ह्या उभय भावानें एक धान्य आहे तथापि सेवन करण्याचे वेळीं हिरव्याचा त्याग व शिजल्याचें ग्रहण अशाच प्रकारची निवड होते (त्याप्रमाणें चांगल्याचें ग्रहण व वाईटाचा त्याग अनादिकालापासून आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व भूतमात्रांचे ठिकाणीं साक्षित्वानें नारायण आहे. तथापि अवगुणी आहेत त्यांना तो शिक्षा करितो व गुणी असतात त्यांचें पूजन होतें ४. [१९६३]

ज्यापासून आपल्या चित्तांत समाधान राहील असा आपल्या हिताचा विचार आपणच करावा १. अनेक रंगरूपानें त्रैलोक्यांत मायाच पसरली आहे. अर्थात् तिच्याविषयींची इच्छा कुंठित करणें हाच व्यवहार बरा २. विश्वंभरास अनन्य भक्तीनें चित्त समर्पण करून निःशब्द स्थितींतच राहाण्यानें विश्वंभराची पूजा होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, हृदयांतील भय समूळ नाहींसें झाल्यावर मन हेंच देव (मनच देवरूप) होतें ४. [१९६४]

देहत्रयाहून आत्मा हा अलिप्त असून देह-अहंकाराच्या योगानें आपल्या अलिप्त स्थितींत जीवात्मा येत नाहीं. देहाचे अनेक धर्म आपल्या स्वरूपीं मानून तो निरर्थक कुंथत बसला आहे १. हे हरि, अशा ह्या भ्रमांतून तुम्ही धांव घेऊन माझी लवकर सुटका करा. मी ह्याविषयीं शक्तिहीन झालों आहें २. देहाविषयींच्या आत्मबुद्धीच्या भ्रमानें मी बद्ध झालों आहें असें वाटतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणून हे हरि, तुझ्या मार्गाकडे मीं धांव घेतली. आतां तूं लवकरच माझ्याजवळ ये व मला बंधांतून सोडव ४. [१९६५]

गाय ही आपल्या मेलेल्या वांसराच्या तृणकूट (पेंढा) घालून केलेल्या भोतास (कातड्यास) मोहानें चाटते आणि दुसऱ्या गाईचें खरें वांसरूं तिच्या जवळ आलें तर ती त्याला मारावयास धांवते १. हे देवा, अशा प्रकारें खोट्या प्रपंचाची हांव वाढवून हें जग भुलून गेलें आहे २. धीवरानें गळाला लावलेल्या आमिषाची आशा धरून गळास मासा गिळतो व मरतो. आतां त्याचा प्राण आमिषाच्या आशेनेंच घेतला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, पाहा हो, बोकड हा घातक खाटकाचा मोह धरतो (व मारला जातो) ४. [१९६६]

विषयाच्या संगतीनें मरण आहे (घात आहे). तरी सुद्धां त्या विषयाच्या संगांतून आपली सुटका कशी करून घ्यावी हें अभागी जीव समजत नाहींत १. ह्यानें सर्व शास्त्रांस पंगु मानून आपल्या तोंडावर धोंडा पाडून घेतला २. ज्या मूर्खांमध्यें बिलकूल मोक्षकल्पना नाहीं असल्या गाढवाला काय सांगावें ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, असले हे प्रपंचाच्या संगतीनें खुशाल फसोत (तात्पर्य, विषयांची संगति, शास्त्रांचें अज्ञान, मोक्षाविषयींचें अज्ञान आणि ज्ञानाभिमान ह्या सर्वांना कारण जीवाचा मूर्खपणा होय) ४. [१९६७]

मीपणा हा फार नष्ट आहे, बाकी सर्व फार चांगलें (असें द्विवार सांगतात) १. ह्याबद्दल आपण क्षमा केली पाहिजे

विनवणी ॥ २ ॥ मीच माझें मीच माझें । जालें ओझें अन्याया ॥ ३ ॥ आधीं आंचवला आधीं आंचवला । तुका जाला निर्मनुष्य ॥ ४ ॥ [१९६८]

येणें जाणें तरी । राहे देव कृपा करी ॥ १ ॥ ऐसें तव पुण्य नाहीं । पाहतां माझे गांठी कांहीं ॥ २ ॥ भय निवारिता । कोण वेगळा अनंता ॥ ३ ॥ तुका म्हणे वारे भोग । वारी तरी पांडुरंग ॥ ४ ॥ [१९६९]

भल्याचें कारण सांगावें स्वहित । जैसी कळे नीत आपणासी ॥ १ ॥ परी आम्ही असों एकाचिये हातीं । नाचवितों चित्तीं त्याचें तैसें ॥ २ ॥ वाट दावी (सांगे) त्याच्या पुण्या नाहीं पार । होती उपकार अगणित ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही बहु कृपावंत । आपुलें उचित केलें संतीं ॥ ४ ॥ [१९७०]

लाव्रनियां पुष्टी पोर । आणि करकर कथेमाजी ॥ १ ॥ पडा पायां करा विनंती । दवडा हातीं धरोनियां ॥ २ ॥ कुरवाळूनि बैसे मोहें । प्रेम कां हें नासीतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे वाटे चित्त । करा फजित म्हणऊनि ॥ ४ ॥ [१९७१]

पुण्य उभें राहो आतां । संतांचें या कारणें ॥ १ ॥ पंढरीचे लागा वाटे । सखा भेटे विठ्ठल ॥ २ ॥ संकल्प ते यावे फळा । कळवळा बहुतांचा ॥ ३ ॥ तुका म्हणे होऊनि क्षमा । पुरुषोत्तमा अपराध ॥ ४ ॥ [१९७२]

आइकिली मात । पुरविले मनोरथ ॥ १ ॥ प्रेम वाढविलें देवा । बरवी घेऊनियां सेवा ॥ २ ॥ केली विनवणी । तैसी पुरविली धणी ॥ ३ ॥ तुका म्हणे काया । रसा कुरोंडी वरोनियां (करूनियां) ॥ ४ ॥ [१९७३]

अशी मी विनंति करीत आहें २. देह मी आणि देहसंबंधीं माझें अशा भावनेचें ओझें झालें आहे. हा माझा अन्याय आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणूनच मी सांगितल्या प्रकारच्या अहं-प्रवृत्तीस आरंभीं आंचवलों (म्हणजे त्याचा त्याग केला) व मनुष्यधर्मरहित स्वात्मस्थितीस आलों ४. [१९६८]

देवाकडे वारंवार येणें जाणें ठेविल्यानें देव कृपा करतो १. अशा प्रकारचें पुण्य माझ्या पदरीं किंचित् देखील नाहीं २. भयाचें निवारण करणारा अनंताहून निराळ असा कोण आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, पांडुरंग निवारण करील तर जन्ममृत्युरूपी संसारभोगाचें निवारण होईल ४. [१९६९]

सज्जनांचें हेंच कर्तव्य आहे, कीं ज्या योगेंकरून जनाचें हित होईल, अशा प्रकारची नीति आपणांस जशी समजेल तशी सांगावी १. पण सर्वांच्या हृदयांत असून सर्व जनांना त्यांच्या कर्माप्रमाणें चेष्टविणारा असा जो हरि त्याचे स्वाधीन आम्ही राहूं २. जो आडवाटेंत पडलेल्या जीवांना सन्मार्ग दाखवील त्याच्या पुण्याईस पार नाहीं, कारण जिवांवर असंख्य उपकार त्याचेकडून होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही संत फार कृपावंत आहांत, म्हणून जगाला नीति सांगणें हें तुम्हीं आपलें योग्य कर्तव्य बजावलें ४. [१९७०]

कडेवर रडकें मूल घेऊन जी बाई हरिकथेस करकर आणते १. तिच्या पायां पडा आणि कथेंतून निघून जाण्याची तिला विनंति करा. एवढें सांगून तिनें ऐकलें नाहीं तर तिचा हात धरून तिला बाहेर घालवा २. रडत असलेल्या पोरास मोहानें कुरवाळून, उगीच बैस बाळा असें म्हणून ती लोचटपणानें कथेस बसून हरिकथेचा प्रेमभंग कां करते? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा तिच्या उपद्रवानें श्रोत्यांचें व वक्त्यांचें चित्त फांकतें म्हणून तिला फजीत करून हांकून द्या ४. [१९७१]

(ध्रुवपदांत दर्शविलेल्या कार्याकरितां) आतां संतांची तरी पुण्याई उभी राहो. १ अहो जन हो, तुम्ही सर्व पंढरीच्या मार्गाला लागा म्हणजे तुम्हांला सर्व जीवांचा सखा विठ्ठल भेटेल २. बहुत जनांच्या कळवळ्यांचे (संतांचे) संकल्प फलद्रूप व्हावेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पुरुषोत्तमा, आपल्याकडून पंढरीला न येणाऱ्या सर्वांच्या अपराधांची क्षमा व्हावी (व त्यांचा उद्धार व्हावा) ४. [१९७२]

ज्याप्रमाणें (तुमच्या उदारपणासंबंधीं संतांच्या मुखानें) मीं हकीगत ऐकिली त्याप्रमाणें माझे मनोरथ पूर्ण झाले १. हे देवा, मजकडून तुम्हीं उत्तम सेवा घेऊन मजमध्यें तुमच्याविषयींचें प्रेम वृद्धिंगत केलें २. ज्याप्रमाणें मीं तुम्हांस विनंति केली तशी तुम्हीं माझी इच्छा तृप्त केलीत ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या प्रेमरसावरून (ह्या आनंदावरून) मी आपला देह ओंवाळून टाकीन ४. [१९७३]

संतांची स्तुति ते दर्शनाच्या योगें। पडिल्या प्रसंगें ऐसी कीजे ॥ १ ॥ संकल्प ते सदा स्वामीचेचि चित्तीं। फांकों नये वृत्ति अखंडित ॥ २ ॥ दास्यत्व तें असे एकविध नांवें। उरों नये जीवें भिन्नत्वासी ॥ ३ ॥ निज बीजा येथें तुका अधिकारी। पाहिजे तें पेरी तये वेळे ॥ ४ ॥ [१९७४]

सेजेचा एकांत आगीपाशीं कळे। झांकिलिया डोळे अधःपात ॥ १ ॥ राहो अथवा मग जळो आगीमधीं। निवाड तो आधीं होऊनि गेला ॥ २ ॥ भेणें झडपणीं नाहीं येथें दुजें। पादरधिटा ओझें हतियारें ॥ ३ ॥ तुका म्हणे मज नाहीं जों भरंवसा। तोंवरि सहसा निवाड तो ॥ ४ ॥ [१९७५]

न सरे भांडार। भरलें वेंचितां अपार ॥ १ ॥ मवित्याचें पोट भरे। पुढलासी पुढें उरे ॥ २ ॥ कारणापुरता। लाहो आपुलाल्या हिता ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा। पुढें केला चाले हेवा ॥ ४ ॥ [१९७६]

तरी हांव केली अमुप व्यापारें। व्हावें एकसरें धनवंत ॥ १ ॥ झालों हरिदास शूरत्वाचे नेमें। झालीं ठावीं वर्में पुढिलांचीं ॥ २ ॥ जनावेगळें हें असे अभिनव। बळी दिला जीव म्हणऊनि ॥ ३ ॥ तुका म्हणे तरी लागलों विल्हेसी। चालतिया दिसीं स्वामी ऋणी ॥ ४ ॥ [१९७७]

कोण दुजें हरी सीण। शरण दीन आल्याचा ॥ १ ॥ तुम्हांविण जगदीशा। उदार ठसा त्रिभुवनीं ॥ २ ॥ कोण ऐसें वारी पाप। हरी ताप जन्माचा ॥ ३ ॥ तुका म्हणे धांव वाली। कोण चाली मनाची ॥ ४ ॥ [१९७८]

ग्रंथाचे ते अर्थ नेणती हे खळ। बहु अनर्गळ झाले विषयीं ॥ १ ॥ नाहीं भेद म्हूण भलतेंचि

दर्शनाचा प्रसंग आल्यास संतांची स्तुति करावी १. सर्वकाळ स्वामी (पांडुरंग) विषयींचे संकल्प चित्तांत ठेवावे. त्यांवांचून हृदयवृत्तीला कोठेंहि जाऊं देऊं नये २. एकनिष्ठपणानें स्वामीच्या ठिकाणीं असणें हेंच दास्यत्वाचें खरें नातें आहे, म्हणून स्वामीस आपला जीव समर्पण करावा. वेगळें राहूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, निजात्मरूपबीजाविषयीं मी अधिकारी आहें म्हणून ज्या वेळेला जें पाहिजे त्याची पेरणी करतों ४. [१९७४]

पतीच्या एका शय्येवर एकांतप्रेमाची निवड, पतिसहगमन करण्याच्या वेळीं, अग्नीपाशीं होते. जर अग्नीचे भयानें तिनें डोळे झांकले तर तिला पतन आहे १. मग ती अग्नींत उडी टाकून जळून जावो अगर राहो. तिचें पतीवर प्रेम किती आहे ह्याचा निवाडा डोळे झांकले तेव्हांच होऊन गेला २. ज्या योगेंकरून शत्रु रणांगणावर आला नसतांना, भयाची झडप पडेल अशा प्रकारचें दुसरें कांहीं नसून बळेंच ज्यानें धिटाई आणिली आहे असा शूर हत्यारांच्या ओझ्याचें निमित्त दाखवितो (भिऊन पळूं पाहातो) ३. तुकाराम महाराज म्हणतात, खऱ्या प्रसंगीं जोंपर्यंत जो धैर्याचा असा निवडला नाहीं तोंपर्यंत मला त्याच्या बाह्य आविर्भावाचा भरंवसा येत नाहीं ४. [१९७५]

परमार्थधनाचें भांडार असें अपार भरलें आहे, कीं त्याचा कोणी भजन--कीर्तनद्वारा कितीहि व्यय केला तरी तें सरतच नाहीं १. मोजणाराचें पोट तृप्त होऊन (हरिनामचिंतनानें तृप्त होऊन) दुसऱ्याकरितांहि पुष्कळ उरलेलेंच असतें २. आपापलें हित होण्यापुरतें सर्वांनीं तें धन मिळविण्याची त्वरा करावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाजवळ त्या धनाची हांव केली तरी ती पूर्ण होते ४. [१९७६]

(हरिनामाच्या) अमर्याद व्यापाराची पुष्कळ हांव एकदम पुष्कळ धनवान् व्हावें म्हणून आपल्याकरितांच केली १. मोठ्या शौर्यानें मी एकनिष्ठ हरिदास झालों. हरीला स्वाधीन करून घेण्याचें हें मर्म पुढें गेलेल्या संतांकडून मला कळलें २. जनाविरहित हा अपूर्व लाभ आहे म्हणून तो मिळण्याकरितां आपला जीव बळी दिला ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या वाटेनें मी ज्या दिवसापासून चालूं लागलों त्याच दिवसापासून स्वामी माझा ऋणी झाला ४. [१९७७]

जे दीन शरण आले असतील त्यांचें दुःख निवारण करणारा हरीवांचून दुसरा कोण आहे? १. हे जगदीशा, तुमच्यावांचून त्रैलोक्यांत औदार्याचा शिक्का कोणाचा आहे? २. ह्या जन्माचें (जन्ममरणांचें) पाप व दुःख निवारण करील असा हरीवांचून कोण आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, दीनांचें कार्य करण्याकरितां मनाच्या वेगानें धांवणारा असा हरीवांचून कोण आहे? ४. [१९७८]

शास्त्रीय संस्कृत किंवा प्राकृत ग्रंथार्थाचें ज्ञान मूर्ख नष्टांना नाहीं म्हणून ते अतिशय विषयासक्त झाले १. हें सर्व

आचरे । मोकळा विचरे मनासवें ॥ २ ॥ तुका म्हणे विषा नांव तें अमृत । पापपुण्या भीत नाहीं नष्ट ॥ ३ ॥ [१९७९]

कायावाचामनें झाला विष्णुदास । काम क्रोध त्यास बाधीतना ॥ १ ॥ विश्वासी तो करी स्वामीवरी सत्ता । सकळ भोगिता होय त्याचें ॥ २ ॥ तुका म्हणे चित्त करावें निर्मळ । येऊनि गोपाळ राहे तेथें ॥ ३ ॥ [१९८०]

याती हीन मती हीन कर्म हीन माझें । सर्व लज्जा सांडोनियां शरण आलों तुज ॥ १ ॥ येईं गा तूं मायबापा पंढरीच्या राया । तुजविण सीण वाटे क्षीण झाली काया ॥ २ ॥ दीनानाथ दीनबंधु नाम तुम्हां साजे । पतितपावन नाम ऐसी ब्रीदावळी गाजे ॥ ३ ॥ विटेवरी उभा नीट कटावरी कर । तुका म्हणे हेंचि आम्हां ध्यान निरंतर ॥ ४ ॥ [१९८१]

गंगा आली आम्हांवरी । संत पाउलें साजिरीं ॥ १ ॥ तेथें करीन मी आंघोळी । उडे चरणरजधुळी । येती तीर्थावळी । पर्वकाळ सकळ ॥ २ ॥ पाप पळालें जळालें । भवदुःख दुरावलें ॥ ३ ॥ तुका म्हणे धन्य झालों । संतसागरीं न्हालों ॥ ४ ॥ [१९८२]

पोटासाठीं खटपट करिसी अवघा वीळ । राम राम म्हणतां तुझी बसली दांतखीळ ॥ १ ॥ हरीचें नाम कदाकाळीं कां रे नये वाचे । म्हणतां रामराम तुझ्या बाचें काय वेंचे ॥ २ ॥ द्रव्याचिया आशा तुजला दाही दिशा न पुरती । कीर्तनासी जातां तुझी जड झाली माती ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐशा जीवा काय करूं आतां । राम राम न म्हणे त्याचा गाढव मातापिता ॥ ४ ॥ [१९८३]

आम्हां सुकाळ सुखाचा । जवळी हाट पंढरीचा । सादाविती वाचा । रामनामें वैष्णव ॥ १ ॥

जगत् एका परमात्म्यापासून झालेलें असून सर्व एक आहे, तेथें लहान-मोठा हा कांहीं भेद नाहीं अशा समजुतीनें विधीचें बंधन टाकून मनाला वाटेल तसे ते स्वैराचारी बनतात २. तुकाराम महाराज म्हणतात, विषवत् दुःख देणारे विषय हे अमृतवत् सुख देणारे मानून पापपुण्याचें भय न बाळगितां ते नष्ट त्यांचें सेवन करतात ३. [१९७९]

काया, वाचा व मन ह्या सर्व भावानें अनन्य होऊन जो विष्णुदास झाला आहे त्यास कामक्रोधाची बाधा होत नाहीं १. जो आपल्या स्वामीच्या ठायीं विश्वास ठेवतो तो त्याच्यावर आपली सत्ता गाजवितो व त्याच्या ऐश्वर्याचा भोक्ता बनतो २. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणून (ह्या दृष्टान्ताप्रमाणें) आपलें चित्त विकाररहित व निर्मळ करावें म्हणजे त्या ठिकाणीं गोपाळ येऊन वस्ती करतो ३. [१९८०]

मी जातीचा हीन, बुद्धिहीन व कर्महीन असा आहें, पण सर्व लज्जेचा त्याग करून हे देवा, तुम्हांला शरण आलों आहें १. हे पंढरीच्या मायबापा, तूं ये, कारण तुझ्यावांचून माझी स्थिति हीन झाली आहे व अति दुःखानें माझा देह क्षीण झाला आहे २. दीनाचे स्वामी व दीनास साह्य करणारे दीनबंधु हें नांव तुम्हांला शोभतें. पतितास पावन करणें ह्या तुमच्या ब्रीदाची त्रैलोक्यांत ख्याति आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही विटेवर नीट उभे आहांत आणि कमरेवर हात ठेविले आहेत; असें हें तुमचें ध्यान आम्ही निरंतर करतों ४. [१९८१]

संतांचीं गोजिरीं (सुकुमार) अशीं जीं पाउलें हीच कोणी गंगा आम्हांवर आली १. त्या पावलांची रजधुळी उडत आहे त्या ठिकाणीं मी स्नान करीन. त्या योगानें सकळ तीर्थें व सकळ पर्वकाळ मला घडतील अथवा, त्या ठिकाणीं सर्व तीर्थें व पर्वकाळ येतील २. माझें सर्व पाप पळून गेलें व तें जळून गेलें आणि संसाराचें (जन्म-मरणांचें) दुःख नाहींसें झालें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या संतसंगतिरूपी सागरामध्यें स्नान केल्यानें मी धन्य झालों ४. [१९८२]

अरे, तूं आपल्या पोटाकरितां सर्वकाळ मेहनत करतोस पण रामनाम घेण्याविषयीं तुझी दांतखीळ बसते १. अरे, तुझ्या वाचेला हरीचें नाम कधींहि येत नाहीं. तें नाम घेतल्यानें तुझ्या बापाचा कांहीं खर्च होतो काय? २. द्रव्य मिळविण्याच्या आशेनें हिंडण्यास दहा दिशा देखील तुला पुरत नाहींत आणि कीर्तनास जावयाच्या वेळीं तुझ्या शरीराची माती जड होते कीं काय? (तुझा देह जड होतो कीं काय?) ३. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या जीवांना काय करावें? जे कोणी रामनाम म्हणत नाहींत त्यांचे आईबाप गाढव आहेत असें समजावें ४. [१९८३]

आम्हांला पंढरीचा बाजार जवळ असल्यामुळें सुखाचा सुकाळ आहे. त्या बाजारांत वैष्णवजन वाणीनें रामनाम

घ्यारे आपुलाल्या परी । नका ठेवूं कांहीं उरी । ओसरतां भरी । तोंडावरी अंबर ॥ २ ॥ वाहे बंदर द्वारका । खेप आली पुंडलिका । उभेंचि विकिलें एका । सनकादिकां सांपडलें ॥ ३ ॥ धन्य धन्य भूमंडळी । प्रगटली नामावळी । घेती जीं दुबळीं । तीं आगळीं सदैव ॥ ४ ॥ माप आपुलेनी हातें । कोणी नाहीं निवारितें । पैस करूनि चित्तें । घ्यावें हितें आपुलिया ॥ ५ ॥ नाहीं वांटितां सरलें । आहे तैसेंहि (तैसेंचि) भरलें । तुका म्हणे गेलें । वायांविण न घेतां ॥ ६ ॥ [१९८४]

चुकलिया ताळा । वाती घालोनि बैसे डोळां ॥ १ ॥ तैसें जागें करीं चित्ता । कांहीं आपुलिया हिता ॥ २ ॥ निक्षेपिलें धन । तेथें गुंतलेंसे मन ॥ ३ ॥ नाशिवंतासाठीं । तुका म्हणे करिसी आटी ॥ ४ ॥ [१९८५]

करूनि जतन । कोणा कामा आलें धन ॥ १ ॥ ऐसें जाणत जाणतां । कां रे होतोसी नेणता ॥ २ ॥ प्रिया पुत्र बंधु । नाहीं तुज याशीं संबंधु ॥ ३ ॥ तुका म्हणे एका । हरीविण नाहीं सखा ॥ ४ ॥ [१९८६]

आम्ही देतों हांका । कां रे झालासी तूं मुका ॥ १ ॥ न बोलसी नारायणा । कळलासी क्रियाहीना ॥ २ ॥ आधीं चौघाचार । मग सांडूं भीडभार ॥ ३ ॥ तुका म्हणे सेवटीं । तुम्हां आम्हां घालूं तुटी ॥ ४ ॥ [१९८७]

नव्हे भिडा हें कारण । जाणे करूं ऐसें जन ॥ १ ॥ जों जों धरावा लौकिक । रडवितोसी आणीक ॥ २ ॥ चला जाऊं संतांपुढें । ते हें निवडिती रोकडें ॥ ३ ॥ तुका म्हणे तूं निर्लज्ज । आम्हां रोकडी गरज ॥ ४ ॥ [१९८८]

घेण्याविषयीं सावध करीत आहेत १. अरे, आपापल्या शक्तीप्रमाणें रामनाम घ्या. त्यांत कांहीं बाकी ठेवूं नका. तोंडावर प्रेमभरानें चिदाकाश वृष्टि मी करीत आहें २. द्वारकेचें बंदर परमार्थाच्या मालानें वाहात आहे. त्याच मालाची खेप पुंडलिकाकरितां पंढरीस आली व त्यालाच ती उक्ती (उभ्याउभ्याच) विकली. त्यापैकीं थोडा माल सनकादिकांना सांपडला ३. ब्रह्मांडांत हरीचें नाम प्रकट झालें; ह्याचा धन्यवाद (द्विवार) गातों. जे दीनजन भावानें नामचिंतन करतात, ते विशेष दैववान् आहेत ४. हरिनामरूपी मालाची मोजदाद आपल्या हातानें करावी; ह्या ठिकाणीं कोणी प्रतिबंध करणार नाहीं. चित्तांतील सर्व वैषयिक चिंतन नाहींसें करून नामाचा विकास करवावा व आपल्या हितासाठीं तें ग्रहण करावें ५. तुकाराम महाराज म्हणतात, हा माल कितीहि वांटला तरी सरला नाहीं, जशाचा तसाच भरला आहे. त्याचें ग्रहण न केल्यामुळें कित्येक अधोगतीला गेले ६. [१९८४]

व्यवहारामध्यें हिशेब चुकला तर ताळा बसेपर्यंत डोळ्यांत तेल घालून त्याचा शोध करतात १. त्याप्रमाणें आपले हित होण्याकरितां चित्ताला जागें कर २. मातींत पुरून ठेवलेल्या धनाचे ठिकाणीं कृपणाचें मन गुंतलेलें असतें (त्याप्रमाणें तुझें मन हरीचे ठिकाणीं राहूं दे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, नाशिवंत विषयाकरितां तूं कां खटपट करीत आहेस? (तशी हरीच्या प्राप्तीसाठीं कां करीत नाहींस?) ४. [१९८५]

अरे, हें धन सांचवून ठेवतोस पण त्यापासून अखेरीस कोणाला किती उपयोग झाला आहे? १. असें तुला ठाऊक असतां मुद्दाम वेडा कां होतोस? २. बायकापोरें, भाऊ हीं तूं आपलीं म्हणवितोस पण त्यांचा तुझा मुळींच संबंध नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका हरीवांचून अंतकाळींचा सखा (मित्र) दुसरा कोणी नाहीं ४. [१९८६]

अरे देवा, आम्ही तुला हांका मारतों, पण तूं प्रत्युत्तर देत नाहींस; तेव्हां तूं आमच्याविषयीं कां बरें मुका झालास? १. हे नारायणा, तूं आमच्याशीं बोलत नाहींस, म्हणून तूं क्रियानष्ट (कृतघ्न) आहेस असें मला वाटतें २. अगोदर तुला चौघांमध्यें नेऊन तेथें न्याय करूं आणि तूं जर ऐकलें नाहींस तर आम्ही तुझी भीड धरणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अखेरीस तुमचा आमचा संबंधच तोडून टाकूं ४. [१९८७]

कांहीं भीड धरल्यानें आपलें काम होत नाहीं असें सर्व लोक जाणत आहेत व तसें आम्ही करूं १. जसजसा आम्हीं तुझा लौकिक सांभाळावा तसतसा तूं आम्हांला फार दुःखी करतोस २. तूं आणि आम्ही मिळून संतांकडे जाऊं चला. मग ते ह्याचा खरा निकाल (निवाडा) करतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुला कोणत्या विषयींची (तुझी कितीहि फजिती केली तरी त्याची) लाज नाहीं, तरी पण (तुला आमची गरज नसली तरी) आम्हांला तुझी उघड उघड गरज आहे ४. [१९८८]

बहु होता भला । परि ये रांडेनें नासिला ॥ १ ॥ बहु शिकला रंग चाळे । खरें खोटें इचे वेळे ॥ २ ॥ नव्हतें आळवितें कोणी । इनें केला जगऋणी ॥ ३ ॥ ज्याचें त्यासी नेदी देऊं । तुका म्हणे धांवे खाऊं ॥ ४ ॥ [१९८९]

काय करावें तें आतां । झालें नयेसें बोलतां ॥ १ ॥ नाहीं दोषांचिये हातीं । गांटी घालावी एकांतीं ॥ २ ॥ होय आपुलें काज । तों हे भीड सांडूं लाज ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । आधीं निवडूं हा गोवा ॥ ४ ॥ [१९९०]

केली सलगी तोंडपिटी । आम्ही लडिवाळें धाकुटीं ॥ १ ॥ न बोलावें तेंचि आलें । देवा पाहिजे साहिलें ॥ २ ॥ अवघ्यामध्यें एक वेडें । तेंचि खेळविती कोडें ॥ ३ ॥ तुका म्हणे मायबापा । मजवरी कोपों नका ॥ ४ ॥ [१९९१]

शिकऊन बोल । केलें कवतुक नवल ॥ १ ॥ आपणियां रंजविलें । बापें माझिया विठ्ठलें ॥ २ ॥ हातीं प्रेमाचें भातुकें । आम्हां देऊनियां निकें ॥ ३ ॥ तुका करी टाहो । पाहे रखुमाईचा नाहो ॥ ४ ॥ [१९९२]

तेथें सुखाची वसति । गाती वैष्णव नाचती । दिंड्या पताका झळकती । जे गर्जती हरिनामें ॥ १ ॥ दोषा जाली येघेमारी । पळती भरले दिशा चारी । न येती माघारी । नाहीं उरी परताया ॥ २ ॥ विसरोनि देवपणा । उभा पंढरीचा राणा । विटोनि निर्गुणा । रूप धरिलें गोजिरें ॥ ३ ॥ पोट सेवितां न धाये । भूक भुकेलीच राहे । तुका म्हणे पाहे । कोण वास मुक्तीची ॥ ४ ॥ [१९९३]

हा देव पूर्वीं फार चांगला होता परंतु या मायारूपी रांडेनें त्याला बिघडविला १. हिच्या संगतीनें लोकांना फसविण्याचे अनेक प्रकारचे खरे खोटे चाळे हा शिकला २. ह्याला पूर्वीं कोणी कींव काकुळती कांहीं मागणारे नव्हते पण हिनें जगाचें कर्ज ह्याच्यावर करून ठेवलें, म्हणून लोक ह्याच्या नांवानें हांका मारतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, ईश्वराजवळ कोणी कांहीं मागावयास गेला असतां ही माया ज्याचें त्याला मिळूं देत नाहीं, पण उलट ती वर मागणाऱ्यास खाण्यास (संशय, भ्रम निर्माण करण्याकरितां त्याच्या अंगावर) धांवते ४. [१९८९]

हे प्रकार कांहीं सांगतां येत नाहींत असें झालें आहे, म्हणून आम्हीं आतां काय करावें ? १. हें दोषांचेहि स्वाधीन राहिलें नाहीं. ह्याकरितां ती माया नसेल त्या वेळीं एकांतामध्यें देवाची गांठ घ्यावी २. जोंपर्यंत आपलें काम होईल तोंपर्यंत लाज टाकून देऊं व कोणाची भीडहि धरणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, अगोदर आम्ही हा मायारूपी गुंताडा नाहींसा करूं [मग तुमचेकडे येऊं] ४. [१९९०]

हे देवा, आम्ही तुझीं लाडकीं लहान मुलें आहोंत म्हणून तुझ्यापुढें लाडानें तोंड वाजविलें (खूप बोललों) १. हे देवा, जें न बोलावें तें मुखावाटे आलें, पण तुम्हीं तें सहन केलें पाहिजे २. त्याचें कारण सर्व मुलांमध्यें जें एक लहान अज्ञानी मूल आहे त्यालाच आईबाप मोठ्या प्रीतीनें खेळवितात, त्याचें कौतुक करतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, तूं माझा मायबाप आहेस, म्हणून माझ्यावर तूं रागावूं नको (माझ्या सर्व बोलण्याची क्षमा कर) ४. [१९९१]

हें बोलणें मला देवानें शिकविलें आहे, त्यामुळेंच कौतुकानें देव नवल करीत आहे १. माझा बाप जो विठ्ठल त्यानें आपल्यास माझ्या बोलण्यानें रंजवून घेतलें (स्वतःची करमणूक करून घेतली) २. देवानें चांगल्या प्रेमाचा खाऊ आमच्या हातांत दिला ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी अट्टाहासानें टाहो फोडीत आहें म्हणून रुक्माईचा पति कृपादृष्टीनें मजकडे पाहात आहे (किंवा, मी पांडुरंगाला पाहात आहें) ४. [१९९२]

ज्या ठिकाणीं हरिनामगर्जना करून जे वैष्णव गातात, नाचतात व ज्या ठिकाणीं वीणे, पताका सुशोभित दिसतात त्या ठिकाणीं (पंढरींत) सकळ सुखाची वस्ती आहे १. म्हणून सर्व दोषांना (पातकांना) घे घे मारीनें त्रास झाल्यामुळें ते चारी दिशांनीं पळतात आणि ते दोष माघारे येऊं शकत नाहींत, कारण परत येण्याला ते मुळीं शिल्लकच राहात नाहींत २. त्या ठिकाणीं पंढरीचा राजा जो देव तो आपल्या देवपणाला विसरून उभा राहिला आहे आणि त्याला आपल्या निर्गुण स्वरूपाचा वीट आला आहे, म्हणून त्यानें गोजिरें रूप धारण केलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, वैष्णवाचें सुख सेवन केल्यानें आमचें पोट भरत नाहीं. हें सुख सेवन करण्याची भूक भुकेलीच राहाते, म्हणजे ती कधींहि शांत होत नाहीं. आतां मुक्तीची कोणाला गरज आहे ? ४. [१९९३]

शूद्रवंशीं जन्मलों । म्हणोनि दंभें मोकलिलों ॥ १ ॥ अरे तूंचि माझा आतां । मायबाप पंढरीनाथा ॥ २ ॥ घोकाया अक्षर । मज नाहीं अधिकार ॥ ३ ॥ सर्वभावें दीन । तुका म्हणे यातिहीन ॥ ४ ॥ [१९९४]

वेडें वांकडें गाईन । परि तुझाची म्हणवीन ॥ १ ॥ मज तारीं दीनानाथा । ब्रीद साच करीं आतां ॥ २ ॥ केल्या अपराधांच्या राशी । म्हणऊनि आलों तुजपाशीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मज तारीं । सोडीं (सांडीं) ब्रीद नाहीं तरी ॥ ४ ॥ [१९९५]

हरिभक्त माझे जिवलग सोइरे । हृदयीं पाउलें धरीन त्यांचीं ॥ १ ॥ अंतकाळीं येती माझ्या सोडवणें । मस्तक बैसणें देईन त्यांसी ॥ २ ॥ आणिक सोइरे सज्जन वो कोणी । वैष्णवांवांचोनि नाहीं मज ॥ ३ ॥ देईन आलिंगन धरीन चरण । संवसारसीण नासे तेणें ॥ ४ ॥ कंठीं तुळशीमाळा नामाचे धारक । ते माझे तारक भवनदीचे ॥ ५ ॥ तयांचे चरणीं घालीन मी मिठी । चाड हे वैकुंठीं नाहीं मज ॥ ६ ॥ आळसें दंभें भावें हरिचें नाम गाती । ते माझे सांगाती परलोकींचे ॥ ७ ॥ काया वाचा मनें देईन क्षेम त्यांसी । चाड जीवित्वासी नाहीं मज ॥ ८ ॥ हरिचें नाम मज म्हणविती कोणी । तया सुखा धणी धणीवरी ॥ ९ ॥ तुका म्हणे तया उपकारें बांधलों । म्हणऊनि आलों शरण संतां ॥ १० ॥ [१९९६]

लटिका तो प्रपंच एक हरिनाम साच । हरिविण आहाच सर्व इंद्रियें ॥ १ ॥ लटिकें तें मौन भ्रमाचें स्वप्न । हरिविण ध्यान नश्वर आहे ॥ २ ॥ लटकिया वित्पत्ति हरिविण करिती । हरि नाहीं चित्तीं तो शव जाणा ॥ ३ ॥ तुका म्हणे हरि हें धरिसी निर्धारीं । तरी तूं झडकरी जासी वैकुंठासी ॥ ४ ॥ [१९९७]

मी शूद्राच्या वंशांत (कुणब्याच्या) उत्पन्न झालों आहें म्हणून मला दंभानें सोडून दिलें आहे १. हे पंढरीनाथा, आतां माझा आईबाप तूंच आहेस २. वेदाक्षरें घोकण्याचा मला कांहीं अधिकार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी स्वभावानें गरीब असून हीन जातीचा आहें ४. [१९९४]

हे देवा, मी तुझें गाणें वेडेंवाकडें गाईन, पण मी तुझाच दास आहें असें म्हणवीन १. हे दीनानाथा, तूं आपलें ब्रीद खरें करण्याकरितां आतां मला तारलें पाहिजेस २. मीं अपराधांचे अनेक डोंगर केले आहेत म्हणून त्यांच्या परिहाराकरितां मी तुझ्याजवळ आलों ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां तूं माझा (भवसागरांतून) उद्धार कर. नाहींपेक्षां तुझें दीनानाथ नांवाचें ब्रीद तूं सोडून दे ४. [१९९५]

हरीचे दास हे माझ्या जिवाचे आवडते सोयरे आहेत, म्हणून त्यांचे चरण मी आपल्या हृदयांत धरीन १. ते भक्त अंतकाळीं मला काळापासून सोडवितील, म्हणून मी आपलें मस्तक त्यांना बसावयास देईन (शिरसावंद्य मानीन) २. ह्या वैष्णवांवांचून मला दुसरे कोणी सोयरे, आप्तवर्ग, सखे नाहींत ३. त्यांना आलिंगन देऊन मी त्यांचे चरण वंदीन. त्या योगानें माझा संसारश्रम नाहींसा होईल ४. ज्यांच्या गळ्यामध्यें तुळसीच्या माळा आहेत व ज्यांनीं हृदयांत अखंड हरिनाम धारण केलें आहे ते मला भवनदीचे पैलपार उतरतील ५. म्हणून मी त्यांच्या चरणांस मिठी घालीन. त्यावांचून (त्यांचे चरण सोडून) वैकुंठास जाण्याची मला इच्छा नाहीं ६. जे कोणी आळसानें, दंभानें व भावार्थानें हरीचें नाम गातात, ते परलोकीं माझे साहाकारी आहेत ७. म्हणून मी कायावाचामनानें त्यांना आलिंगन देईन. त्यांच्यापुढें माझ्या जीवाची देखील मला गरज (पर्वा) नाहीं ८. जर कोणी माझ्याकडून हरिनाम स्मरण करवितील तर तें सुख मी आपल्या इच्छेनें इच्छा तृप्त होईतोंपर्यंत घेईन ९. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारच्या त्यांच्या उपकारानें मी बांधलों आहें, म्हणून मी त्या संतांना शरण आलों आहें १०. [१९९६]

एक हरीचें नाम खरें आहे. त्यावांचून समूळ प्रपंच मिथ्या आहे आणि आपलीं सर्व इंद्रियें हरीवांचून व्यर्थ आहेत १. हरिनाम मुखांत नाहीं तर उगीच मौन धरणें लबाडीचें आहे आणि हरीवांचून जें कांहीं मनांत ध्यान करणें तें सर्व स्वप्नभ्रमासारखें नाशिवंत आहे २. एक हरीवांचून व्युत्पत्तीचे बळानें (इतर विद्या-ज्ञान संपादन करून) जें प्रतिपादन करतात तें सर्व खोटें आहे आणि ज्याच्या चित्तामध्यें हरीचें वास्तव्य नाहीं तो प्रेतरूप (जिवंत प्रेत) समजावा ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे, तूं हरिनाम हें निश्चयानें घे, म्हणजे तूं तात्काळ वैकुंठाला जाशील ४. [१९९७]

सर्वस्वासी मुकावें तेणें हरिसी जिंकावें । अर्थ प्राण जीवें देहत्याग ॥ १ ॥ मोह ममता माया चाड चिंता । विषयकंदुवेथा जाळूनियां ॥ २ ॥ लोकलज्जा दंभ आणि अहंकार । करूनि मत्सर देशधडी ॥ ३ ॥ शांति क्षमा दया सखिया विनऊनी । मूळ चक्रपाणी धाडी त्यांसी ॥ ४ ॥ तुका म्हणे याती अक्षरें अभिमान । सांडोनियां शरण रिघे संतां ॥ ५ ॥ [१९९८]

एकांताचें सुख देई मज देवा । आघात या जीवा चुकवूनि ॥ १ ॥ ध्यानीं रूप वाचे नाम निरंतर । आपुला विसर पडों नेदीं ॥ २ ॥ मायबाळा भेटी सुखाची आवडी । तैशी मज गोडी देई देवा ॥ ३ ॥ कीर्ति ऐकोनियां झालों शरणांगत । दासाचें तूं हित करितोसी ॥ ४ ॥ तुका म्हणे मी तों दीन पापराशी । घालावें पाठीशीं मायबापा ॥ ५ ॥ [१९९९]

लटिकें तें ज्ञान लटिकें तें ध्यान । जरि हरिकीर्तन प्रिय नाहीं ॥ १ ॥ लटिकाचि दंभ घातलें (ला) दुकान । चाळविलें जन पोटासाठीं ॥ २ ॥ लटिकेंचि केलें वेदपारायण । जरि नाहीं स्फुंदन प्रेम कथे ॥ ३ ॥ लटिकें तें तप लटिका तो जप । आळस निद्रा झोंप कथाकाळीं ॥ ४ ॥ नाम नावडे तो करील बोहरी । नाहीं त्याची खरी चित्तशुद्धि ॥ ५ ॥ तुका म्हणे ऐसीं गर्जती पुराणें । शिष्टांचीं वचनें मागिलांही ॥ ६ ॥ [२०००]

भूतीं भगवद्भाव । मात्रासहित जीव । अद्वैत तो ठाव । निरंजन एकला ॥ १ ॥ ऐसीं गर्जती पुराणें । वेदवाणी सकळ जन । संत गर्जतील तेणें । अनुभवें निर्भर ॥ २ ॥ माझें तुझें हा विकार । निरसतां एकंकार । न लगे कांहीं फार । विचाराचि करणें ॥ ३ ॥ तुका म्हणे दुजें ।

ज्याला हरीस जिंकावयाचें आहे त्यानें आपल्या देहाचा व जीवप्राणाचा व सर्व द्रव्याचा त्याग करून सर्वस्व टाकलें पाहिजे १. मोह, ममता व मायादि सर्व चिंता ह्यांची गरज न ठेवतां विषयाचें मूळ जाळून टाकून त्याचें दुःख नाहींसें केलें पाहिजे २. सर्व लोकांविषयींची लज्जा व अभिमान व दांभिकपणा आणि लोकांविषयीं मत्सर हे सर्व देशोधडी केले पाहिजेत ३. शांति, क्षमा, दया ह्यांच्याबरोबर मैत्री करून व त्यांना विनंति करून चक्रपाणि देवास आणावयाकरितां बोलावणें पाठवावें ४. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या जातीचा व अक्षरांचा (विद्वत्तेचा, ज्ञानाचा) अभिमान नाहींसा करून संतांना शरण जावें (म्हणजे हरि वश होईल) ५. [१९९८]

हे देवा, माझ्या जीवाचे (जीवावर होणारे संसारदुःखाचे) आघात (प्रतिबंध) नाहींसे करून मला एकांताचें सुख दे १. तुझें रूप माझे ध्यानांत असावें आणि तुझें नाम मुखांत सर्वकाळ असावें. अशा स्थितींत मी एकांतीं राहावें आणि तुमचा विसर मला कधींहि होऊं नये २. हे देवा, जसें बालकाचे आणि आईचे भेटीमध्यें परस्परांना सुख होतें, तसें तुझ्य भेटीविषयींचें प्रेम मजमध्यें असावें ही देणगी दे ३. तूं आपल्या दासांचें हित करतोस अशी तुझी कीर्ति ऐकली म्हणून मी तुझा शरणागत झालों आहें (तुला शरण आलों आहें) ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी गरीब असून सर्व पातकांची राशि आहें, म्हणून हे मायबापा, तूं मला आपल्या पाठीशीं घालून माझें रक्षण कर ५. [१९९९]

हरीचें कीर्तन आवडत नसेल तर इतर ध्यान करणाऱ्यांचें ध्यान व ज्ञान्यांचें ज्ञान व्यर्थ होय १. हे ध्यानी व ज्ञानी व जे परमार्थाचें दांभिक दुकान पसरतात (घालतात) ते आपल्या पोटासाठीं लोकांस फसवितात २. वेदाचें पारायण करीत आहे पण त्याचे ठिकाणीं हरीच्या कथेविषयीं प्रेम अथवा सात्त्विक भाव नाहीं तर तें त्याचें सर्व करणें लबाडीचें आहे ३. हरिकथा चालली असतांना आळसानें जो झोंप घेतो त्याचीं जपतपादि साधनें व्यर्थ होत ४. ज्याला हरिनाम आवडत नाहीं त्याचें चित्त खरोखर शुद्ध नाहीं व त्यानें आपला सर्वस्वीं नाश करून घेतला असें समजावें ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याप्रमाणें सर्व पुराणें गर्जना करून सांगतात आणि पूर्वींच्या श्रेष्ठांनींहि हेंच सांगितलें आहे ६. [२०००]

यच्चयावत् जीवमात्रांसहित सर्व भूतांच्या ठिकाणीं एका परमात्म्याची व्याप्ति आहे असा हा भेदशून्य भगवद्-भाव असावा. भेदशून्य मायारहित परमात्मा जगाला अधिष्ठान-आधार आहे १. पुराणें व वेद व सर्व जन असें बोलत आहेत. त्या स्थितीचा अनुभव घेऊन निर्भयपणानें संत गर्जना करीत आहेत २. मी, माझें व तुझें ह्या भेदभावाचें आत्मज्ञानानें निरसन झालें असतां सर्वत्र एकाकीपणानें चैतन्यस्वरूप राहातें, म्हणून मी–तूं ह्या भावाचा निरास करणें हेंच अवश्य

हें तों नाहींच सहजें । संकल्पाच्या काजें । आपें आप वाढलें ॥ ४ ॥ [२००१]

नेणें फुंकों कान । नाहीं एकांतींचें ज्ञान ॥ १ ॥ तुम्ही आइका हो संत । माझा सादर वृत्तांत ॥ २ ॥ नाहीं देखिला तो डोळां । देव दाखवूं सकळां ॥ ३ ॥ चिंतनाच्या सुखें । तुका म्हणे नेणें दुःखें ॥ ४ ॥ [२००२]

त्याग तरी ऐसा करा । अहंकारा दवडावें ॥ १ ॥ मग जैसा तैसा राहें । काय पाहें उरलें तें ॥ २ ॥ अंतरींचें विषम जाड । येऊं पुढें नेदावें ॥ ३ ॥ तुका म्हणे शुद्ध मन । समाधान पाहिजे ॥ ४ ॥ [२००३]

मातेचिये चित्तीं । अवघी बाळकाची व्याप्ति ॥ १ ॥ देह विसरे आपुला । जवळी घेतां सीण गेला ॥ २ ॥ दावी प्रेमभातें । आणि अंगावरी चढतें ॥ ३ ॥ तुका संतांपुढें । पायीं झोंबे लाडें-कोडें ॥ ४ ॥ [२००४]

कोणा पुण्या फळ आलें । आजि देखिलीं पाउलें ॥ १ ॥ ऐसें नेणों नारायणा । संतीं सांभाळिलें दीना ॥ २ ॥ कोण लाभकाळ । दीन आजींचा मंगळ ॥ ३ ॥ तुका म्हणे झाला । एवढा लाभ का विठ्ठला ॥ ४ ॥ [२००५]

मान इच्छी तो अपमान पावे । अमंगळ सवे अभाग्याची ॥ १ ॥ एकाचिये अंगीं दुजियाचा वास । आशा पुढें नाश सिद्ध करी ॥ २ ॥ आधीक फळाशीं(सी) कोठें पावों शके । वासनेची भिकेवरी चाली ॥ ३ ॥ तुका म्हणे राजहंस ढोरा नांवें । काय तया घ्यावें अळंकाराचें ॥ ४ ॥ [२००६]

आहे, दुसरा कांहीं विशेष विचार करण्याची जरूरी नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, सहज ब्रह्मस्थिति ही द्वैतधर्मरहित आहे. त्या ठिकाणीं जीवाच्या विपरीत संकल्पानें (कल्पनेनें) आपोआप द्वैतभावाचा प्रसार झाला आहे ४. [२००१]

कोणाचे कानांत गुरुमंत्र सांगणें हें मी जाणत नाहीं व एकांतांत तत्त्वमसि महावाक्याचा विचार शिष्याला सांगण्याचें ज्ञानहि मजजवळ नाहीं १. अहो संतजन हो, अशा प्रकारची ही माझी हकीकत तुम्ही सावध चित्तानें ऐका २. ज्या देवास कोणीहि डोळयानें पाहिला नाहीं तो देव साक्षात सर्वांना दाखवूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरीच्या चिंतनाच्या आनंदांत मी निरंतर आहें म्हणून मी संसारदुःख जाणत नाहीं ४. [२००२]

तुला त्याग करावा असें वाटेल तर देहाहंकाराचा त्याग कर १. मग ज्या स्थितीमध्यें तूं असशील तसा राहा व मग खालीं काय उरेल तें पाहा २. हृदयामध्यें द्वैतभावाचे जे दृढ संस्कार आहेत त्यांस तूं आपल्या समोरसुद्धां येऊं देऊं नकोस ३. तुकाराम महाराज म्हणतात, मन शुद्ध ठेवून निरंतर समाधानानें असावें ४. [२००३]

आईच्या चित्तांत बालकाविषयींचा मोह भरलेला असतो १. त्या बालकाला जवळ घेतलें म्हणजे ती आपल्या देहास विसरते व तिच्या सर्व श्रमांचा परिहार होतो २. ती बालकाला प्रेमानें खाऊ दाखविते. त्या योगानें तें बालक तिच्या अंगावर चढूं लागतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी संतांच्या पायांला लाडानें व कौतुकानें बालकासारखा मिठी मारीत आहें ४. [२००४]

कोणतें पुण्य फलद्रूप झालें म्हणून आज मी हीं पाउलें पाहिलीं? १. नारायणा, हें मी जाणत नाहीं, परंतु संतांनीं माझा दीनाचा सांभाळ केला २. आजचा हा लाभकाळाचा दिवस कसा मंगल आहे! ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठ्ठला, एवढा लाभ कां झाला हें तूंच सांग ४. [२००५]

जो लोकांकडून मान मिळावा अशी इच्छा करतो, त्याचा दांभिक म्हणून लोकांत अपमान होतो. अशी अभागी जिवाला वाईट संवय असते १. एका गोष्टीच्या अंगभूत विरुद्ध दुसरी गोष्ट असते (एका चांगल्या गुणाबरोबर दुसरा दुर्गुणहि तेथेंच राहातो.) आशा ही अखेरीस नाश करते हें सिद्ध आहे २. कितीहि इच्छा केली तरी त्या इच्छेप्रमाणें विशेष फळ कोठें मिळूं शकतें? असें जरी आहे तरी वासना ही भीक मागण्याकडे धांव घेत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, एखाद्या बैलाचें राजहंस असें नांव ठेवलें तर ह्या अलंकारिक नांवाचा त्या बैलाला काय उपयोग (सारांश, मान मिळण्यासाठीं पात्रता असावी लागते) ४. [२००६]

संसारापासूनी कैसें सोडविशी । न कळे हृषीकेशी काय झालों । करितां न सरे कांहीं (अधिक) वाढ पाहीं । तृष्णा देशधडी केलों । भक्तिभजनभाव यासी नाहीं ठाव । चरणीं तुझ्या अंतरलों । मागें पुढें रीग न पुरेचि पाहतां । अवघा अवघीं वेष्टिलों ॥ १ ॥ आतां माझी लाज राखें नारायणा । हीन दीन लीन याचकाची । करितां न कळे कांहीं असतील गुण दोष । करीं होळी संचिताची ॥ २ ॥ इंद्रियें द्वारें मन धांवे सैरें । नागवे करितांचि कांहीं । हात पाय कान । मुख लिंगस्थान । नेत्र घ्राण द्वारें पाहीं । जया जैसी सोय तया तैसें होय । क्षण एक स्थिर नाहीं । करिती ताडातोडी ऐसी यांची खोडी । न चले माझें यांस कांहीं ॥ ३ ॥ शरीरसंबंधू पुत्र पत्नी बंधु । धन लोभ मायावंतें । जन लोकपाळ मैत्र हे सकळ । सोयरीं सज्जनें बहुतें । नाना कर्म डाय करिती उपाय । बुडावया घातपातें । तुका म्हणे हरी राखे भलत्या परी । आम्ही तुझीं शरणागतें ॥ ४ ॥ [२००७]

नाम घेतां उठाउठीं । होय संसाराची तुटी ॥ १ ॥ ऐसा लाभ बांधा गांठी । विठ्ठलपायीं पडे मिठी ॥ २ ॥ नामापरतें साधन नाहीं । जें तूं करिशी आणिक कांहीं ॥ ३ ॥ हाकारोनी सांगे तुका । नाम घेतां राहों नका ॥ ४ ॥ [२००८]

प्राण समर्पिला आम्हीं । आतां उशीर कां स्वामी ॥ १ ॥ माझें फेडावें उसणें । भार न मना या ऋणें ॥ २ ॥ झाला कंठस्फोट । जवळी पातलों निकट ॥ ३ ॥ तुका म्हणे सेवा । कैशी बरी वाटे देवा ॥ ४ ॥ [२००९]

येणें मार्गें आले । त्यांचें निसंतान केलें ॥ १ ॥ ऐसी अवघड वाट । कोणा सांगावा बोभाट ॥ २ ॥

हे हृषीकेशी, तूं ह्या संसारापासून माझी सुटका कधीं करशील हें कांहीं मला कळत नाहीं. अशी माझी स्थिति कां झाली ? कांहीं करूं लागलें तरी तें संपत नाहीं, अधिकच वाढतें. अशा प्रकारें तृष्णेनें मला देशोधडी करून टाकलें आहे. श्रीहरीची भक्ति व भजनाविषयींचा भाव ह्याचा ठावठिकाणाहि माझ्याजवळ नाहीं अशा प्रकारें तुझ्या चरणांपासून मी दुरावला गेलों. मागें व पुढें सरकण्यास कांहीं अवकाश राहिला नाहीं. अशा प्रकारें सर्व प्रपंचपरिग्रहानें (स्त्री-पुत्र-आप्तेष्टांनीं) मी पूर्णपणें वेढला गेलों १. हे नारायणा, मी हीन, दीन व तुमचे ठिकाणीं लीन असा आहें, त्या मज याचकाची आतां तुम्ही लज्जा रक्षण करा. काय करावें हें मला कळत नाहीं म्हणून माझ्या ठिकाणीं जे गुणदोष किंवा जीं संचित पापें आहेत तीं सर्व तुम्ही जाळून टाका २. इंद्रियांच्या द्वारानें मन विषयांचे ठिकाणीं अवासवा धांव घेतें. तें कांहीं केल्या आवरत नाहीं. हात, पाय, कान, मुख, लिंगस्थान, नेत्र, घ्राण इत्यादि इंद्रियद्वारें ज्याला जिकडे वाटेल तशीं तिकडे धांव घेत आहेत; क्षणभर देखील स्थिर राहात नाहींत. माझी ह्या सर्वांनीं ओढाताण केली आहे, अशीं हीं खोडसाळ आहेत. माझें ह्यांच्यापुढें कांहीं चालत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, पुत्र, पत्नी, बंधु इत्यादिक हे शरीरसंबंधी, धनलोभी, मायावंत सर्व जन लोक व सर्व मित्र व सोईरेसंबंधी सज्जनादि अनेक प्रकारच्या घातक कर्मांचे उपाय करतात. त्यांचा हेतु माझा घातपात करून मला बुडविण्याचा आहे. म्हणून हे हरि, मी तुला शरण आलों आहें. आतां कोणत्याहि उपायानें ह्यांच्यापासून माझें रक्षण कर ४. [२००७]

हरीचें नाम घेतल्याबरोबर संसाराचा निरास होतो १. म्हणून अशा प्रकारचा लाभ तुम्ही आपल्या पदरीं बांधा म्हणजे त्या योगानें विठोबाचे चरणीं तुमचा योग होईल २. हरीच्या नामाखेरीज हरीची प्राप्ति होण्याला असें दुसरें साधन नाहीं, कीं ज्याचें अनुष्ठान करून तूं हरीची प्राप्ति करून घेशील ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी सर्वांना हांक मारून हेंच सांगत आहें, कीं तुम्ही हरीचें नाम घेतल्यावांचून राहूं नका ४. [२००८]

अहो स्वामी देवा, आम्हीं तुम्हांला आपले प्राण समर्पण केले आहेत. आतां माझा अंगीकार करण्याला उशीर कां करितां ? १. माझें अनन्य भक्तीचें जें धन तुम्हीं उसनें घेतलें आहे ती उसनवारी, माझा अंगीकार करण्याच्या रूपानें, फेडा. तुम्ही माझ्या सेवाऋणाचें ओझें मानूं नका २. तुम्हांला हांका मारून मारुन माझा घसा फुटला म्हणून मी तुमच्या अतिसन्निध आलों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, जर तुम्ही माझा अंगीकार करीत नाहीं, तर तुमची सेवा करणें मला कशी बरें बरी वाटेल ? ४. [२००९]

ह्या परमार्थमार्गानें (भक्तिमार्गानें) जे तुमच्याकडे आले त्यांचें तुम्हीं पुनर्जन्म-अभावरूप वाटोळें केलें १. अशी ही

नागविल्या थाटी । उरों नेदीच लंगोटी ॥ ३ ॥ तुका म्हणे चोर । तो हा उभा कटीं कर ॥ ४ ॥ [२०१०]

तोंवरि तोंवरि जंबुक करि गर्जना । जंव त्या पंचानना देखिलें नाहीं ॥ १ ॥ तोंवरि तोंवरि सिंधु करि गर्जना । जंव त्या अगस्ति ब्राह्मणा देखिलें नाहीं ॥ २ ॥ तोंवरि तोंवरि वैराग्याच्या गोष्टी । जंव सुंदर वनिता दृष्टीं देखिली नाहीं ॥ ३ ॥ तोंवरि तोंवरि शूरत्वाच्या गोष्टी । जंव परमाईचा पुत्र दृष्टीं देखिला नाहीं ॥ ४ ॥ तोंवरि तोंवरि माळामुद्रांचीं भूषणें । जंव तुक्याचें दर्शन झालें नाहीं ॥ ५ ॥ [२०११]

तोंवरि तोंवरि शोभतील गारा । जंव नाहीं हिरा प्रकाशला ॥ १ ॥ तोंवरि तोंवरि शोभती दीपिका । नुगवतां एका भास्करासी ॥ २ ॥ तोंवरि तोंवरि सांगती संतपणाचिया गोष्टी । जंव नाहीं भेटी तुक्यासवें ॥ ३ ॥ [२०१२]

धरोनि दोन्ही रूपें पाळणें संहार । करी कोप रुद्र दयाळ विष्णु ॥ १ ॥ जटाजूट एका मुगुट माथां शिरीं । कमळापति गौरीहर एक ॥ २ ॥ भस्मउद्धळण लक्ष्मीचा भोग । शंकर श्रीरंग उभयरूपीं ॥ ३ ॥ वैजयंती माळा वासुकीचा हार । लेणें अळंकार हरिहरा ॥ ४ ॥ कपाळ झोळी एका स्मशानींची वास । एक जगन्निवास विश्वंभर ॥ ५ ॥ तुका म्हणे मज उभयरूपीं एक । सारोनि संकल्प शरण तुज आलों ॥ ६ ॥ [२०१३]

उचिताचा भाग होतों राखोनीयां । दिसती ते वायां गेले कष्ट ॥ १ ॥ वचनाची कांहीं राहेचि ना रुचि । खळा ऐसें वाची कुची जालें ॥ २ ॥ विश्वासानें माझें बुडविलें घर ।

परमार्थाची अवघड वाट आहे. ही अडचण कोणाला सांगावी ? २. आजपर्यंत परमार्थामध्यें अनेक भक्तसमुदाय नागवले गेले त्यांची लंगोटी देखील उरली नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, भक्तजनांचें सर्वस्व हरण करणारा हा चोर कमरेवर हात ठेवून उभा आहे ४. [२०१०]

जोंपर्यंत वाघ पाहिला नाहीं तोंपर्यंतच कोल्ह्याच्या गर्जना १. जोंपर्यंत अगस्ती ब्राह्मणाला पाहिला नाहीं तोंपर्यंत सिंधूची गर्जना २. जोंपर्यंत सुंदर स्त्री दृष्टीस पडली नाहीं तोंपर्यंत वैराग्याचें व्याख्यान ३. जोंपर्यंत दुसऱ्या मातेच्या पोटचा शूर वीर योद्धा पाहिला नाहीं तोंपर्यंतच शूरत्वाच्या गप्पांची महती ४. तुकाराम महाराज म्हणतात, जोंपर्यंत माझी गांठ पडली नाही तोंपर्यंत माळामुद्रांचे लक्षणानें ढोंगी साधूची महती ५. [२०११]

जोंपर्यंत हिऱ्याचा प्रकाश पडला नाहीं तोंपर्यंत गारेची शोभा १. जोंपर्यंत सूर्योदय झाला नाहीं तोंपर्यंत अनेक दिव्यांची शोभा २. तुकाराम महाराज म्हणतात, जोंपर्यंत माझी गांठ पडली नाहीं तोंपर्यंत साधुपणाच्या व्याख्यानाचें प्रतिपादन (खऱ्या संताचीं लक्षणें कशीं असतात हें त्यांना माझी भेट झाल्यानंतरच कळेल) (वरील व ह्या अशा दोन अभंगांत आपल्या संतपणाचा अभिमान व्यक्त करतांना तुकाराम महाराजांनीं संतांचीं खरीं लक्षणें वर्णिलीं आहेत) ३. [२०१२]

ह्या देवानें जग पाळण्याकरितां व त्याचा संहार करण्याकरितां दोन रूपें धारण केलीं आहेत. त्यांतील सदय विष्णुरूपानें सर्व भूतांचें पालन करितो व दुसऱ्या रुद्ररूपानें मोठ्या क्षोभानें सर्वांचा नाश करितो १. एकाचे मस्तकीं जटेचा जूट गुंडाळलेला आहे व दुसऱ्याचे मस्तकीं रत्नजडित मुगुट आहे, आणि एक लक्ष्मीचा पति व दुसरा पार्वतीचा पति आहे २. शंकरानें सर्व अंगावर भस्माचें विलेपन केलें आहे व श्रीरंग जो देव तो सकल ऐश्वर्य भोगीत आहे. ते उभय रूपानें एकच आहेत ३. हरीच्या गळ्यामध्यें वैजयंती माळ व शिवाच्या गळ्यामध्यें वासुकी सर्पाचा हार असे अलंकार ह्या हरिहरांचे आहेत ४. महादेवानें हातामध्यें नर-कपाल घेऊन व काखेंत झोळी घेऊन स्मशानांत वास्तव्य केलें आहे आणि विश्वंभर जो विष्णु त्यानें सर्व जगतांत वास्तव्य केलें आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, उभय रूपांना मी एकच मानतों, म्हणून दोन्ही प्रकारचे संकल्प नाहींसे करून (भेदाचा भ्रम दूर सारून) मी एकासच शरण आलों आहें. ६. [२०१३]

हे देवा, मी (माझ्या सेवेचा) योग्य मोबदला रक्षण करून ठेविला होता पण ते माझे श्रम व्यर्थ गेले असें दिसतें १. कारण, तुम्ही मला 'आज उद्धार करतों, उद्यां उद्धार करतों' असें सारखें चाळवीत आहांत पण जसें दुष्टांचें भाषण

घ (क) रविला धीर येथवरी ॥ ३ ॥ तुका म्हणे शेकीं (येकीं) थोर नाहीं बुड। कैसें तुम्हीं कोड पुरविलें ॥ ४ ॥ [२०१४]

लांब लांब जटा काय वाढवूनि । पावडें घेऊनि क्रोधें चाले ॥ १ ॥ खायाचा वोळसा शिव्या दे जनाला। ऐशा तापशाला बोध कैंचा ॥ २ ॥ सेवी भांग अफू तमाखू उदंड। परि तो अखंड भ्रांतीमाजी ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसा सर्वस्वें बुडाला । त्यासी अंतरला पांडुरंग ॥ ४ ॥ [२०१५]

अवघींच तीर्थे घडलीं एकवेळां । चंद्रभागा डोळां देखिलिया ॥ १ ॥ अवघींच पापें गेलीं दिगंतरीं। वैकुंठ पंढरी देखिलिया ॥ २ ॥ अवघिया संतां एकवेळां भेटी । पुंडलीक दृष्टीं देखिलिया ॥ ३ ॥ तुका म्हणे जन्मा आल्याचें सार्थक । विठ्ठलचि एक देखिलिया ॥ ४ ॥ [२०१६]

आम्हीं असों निश्चिंतीनें। एक्या गुणें तुमचिया ॥ १ ॥ दुराचारी तरले नामें। घेतों प्रेमें म्हणोनि ॥ २ ॥ नाहीं तुम्हां धांव घेतां। कृपावंता आळस ॥ ३ ॥ तुका म्हणे विसरूं काई। तुज वो आई विठ्ठले ॥ ४ ॥ [२०१७]

अनुभवें वदे वाणी। अंतर ध्यानीं आपुलें ॥ १ ॥ कैंची चिका दुधा चवी। जरी दावी पांढरें ॥ २ ॥ जाती ऐसा दावी रंग। बहु जग या नांव ॥ ३ ॥ तुका म्हणे खद्योत तें। ढुंगाभोंवतें आपुलिया ॥ ४ ॥ [२०१८]

परपीडक तो आम्हां दावेदार। विश्वीं विश्वंभर म्हणऊनि ॥ १ ॥ दंडूं त्यागूं बळें नावलोकूं डोळां । राखूं तो चांडाळा ऐसा दुरी ॥ २ ॥ अनाचार कांहीं न साहे अवगुण ।

लबाडीचें असतें तसें तुमचें झालें आहे २. तुम्हीं मला बोलावयास सांगितल्यावरून येथपर्यंत मी धीर धरून राहिलों पण तुम्हीं विश्वास देऊन माझें घर बुडविलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अखेरीस मला थारा नाहींसा झाला आहे मग तुम्हीं माझी इच्छा पुरविली असें कसें म्हणूं ? ४. [२०१४]

जो कोणी लांब लांब जटा वाढवून हातामध्यें पावडें (कुबडीसारखें टेकावयाचें असतें तें) घेऊन किंवा कटोरा घेऊन भिक्षा मागतो, आणि कोणीं भिक्षा वाढली नाहीं, कीं मोठ्या रागानें लागलीच चालता होतो, अशा गोसावी-बैराग्यांना परमार्थाचा काय लाभ होणार ? १. त्याला चांगलें खाण्याचें व्यसन असतें त्याप्रमाणें कोणीं वाढलें नाहीं, कीं तो लोकांना शिव्या देतो; अशा तपस्व्याला पारमार्थिक बोध कसला आला आहे ? २. तो भांग, अफू व तमाखू यांचें पुष्कळ सेवन करतो. त्यायोगानें सर्वकाळ भ्रांतींत असतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारानें तो परमार्थाला सर्वस्वीं मुकला व पांडुरंगाच्या भेटीलाहि अंतरला असें समजावें ४. [२०१५]

ज्यानें चंद्रभागेचें दर्शन घेतलें त्याला सकळ तीर्थांचें स्नान घडलें १. एक भूवैकुंठ पंढरपूर पाहिलें असतां सर्व पातकें नाहींशीं होतात २. एक पुंडलिकरायाचें दर्शन घेतलें असतां सर्व संतांचें दर्शन घेतल्याचें श्रेय येतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका विठोबारायाचें दर्शन घेतल्यानें आपण जन्माला आल्याची सफलता होते ४. [२०१६]

हे देवा, तुमचा एक गुण उत्तम आहे. त्यायोगानें आम्ही चिंतेविरहित राहिलों आहोंत १. तुमच्या नामस्मरणानें पूर्वी पुष्कळ दुराचारी लोक तरले, म्हणून तें नाम मी प्रेमानें घेत आहें २. हे कृपावंता, (भक्तानें हांक मारली असतां) तुम्हांला धांवत येण्याविषयीं आळस नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठाबाई आई, तुझा असा प्रकार आहे म्हणून मी तुला कसें विसरूं ? ४. [२०१७]

अंतःकरणांत जें ध्यान आहे त्याच्या अनुभवानें मी वदत आहें १. गाईचे स्तनांत व्याल्याबरोबर चीक निघतो आणि कांहीं काळानें दूध निघतें; तीं दोन्ही पांढरींच दिसतात, पण दुधाची गोडी चिकास आहे काय? तशी प्रसादा-वांचून वाणी व्यर्थ आहे २. अनेक जातींचे ठिकाणीं अनेक प्रकारचे रंग असतात म्हणून त्यांची वर्तणूक आपापल्या रंगाप्रमाणें होते; त्यासच जग ही संज्ञा आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, काजव्याचा प्रकाश असतो तो त्याच्या ढुंगणाच्या भोंवतालींच असतो ४. [२०१८]

विश्वाचें पालन करणारा जो देव तो सर्व विश्वामध्यें आहे, म्हणून दुसऱ्याला त्रास देणारा जो तो आमचा वैरी आहे १. त्याला आम्ही बळानें शिक्षा करूं व त्याचा त्याग करूं व त्याला चांडाळाप्रमाणें दूर ठेवून आम्ही कधीं डोळ्यानें

बहु होय मन कासावीस ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी एकविध सेवा । विन्मूख ते देवा वाळी चित्तें ॥ ४ ॥ [२०१९]

कांहीं न मागे कोणासी । तोचि आवडे देवासी ॥ १ ॥ देव तयासी म्हणावें । त्याचे चरणीं लीन व्हावें ॥ २ ॥ भूतदया ज्याचे मनीं । त्याचे घरीं चक्रपाणी ॥ ३ ॥ नाहीं नाहीं त्या समान । तुका म्हणे मी जामीन ॥ ४ ॥ [२०२०]

नाम उच्चारितां कंठीं । पुढें उभा जगजेठी ॥ १ ॥ ऐसें धरोनियां ध्यान । मनें करावें चिंतन ॥ २ ॥ ब्रह्मादिकां ध्याना न ये । तो हा कीर्तनाचे सोये ॥ ३ ॥ तुका म्हणे सार घ्यावें । मनें हरिरूप पाहावें ॥ ४ ॥ [२०२१]

आडलिया जना होसी सहाकारी । अंधळियाकरीं काठी तूंचि ॥ १ ॥ आडिले पीडिले गांजिले संसारीं । त्यांचा तूं कैवारी नारायणा ॥ २ ॥ प्रल्हाद महासंकटीं रक्षिला । तुम्हीं आपंगिला नानापरी ॥ ३ ॥ आपुलेंची अंग तुम्हीं वोढविलें । त्याचें निवारिलें महा दुःख ॥ ४ ॥ तुका म्हणे तुझे कृपे पार नाहीं । माझे विठाबाई जननीये ॥ ५ ॥ [२०२२]

तपासी तें मन करूं पाहे घात । धरोनि सांगात इंद्रियांचा ॥ १ ॥ म्हणोनि कीर्तन आवडलें मज । सांडोनियां लाज हेंचि करीं ॥ २ ॥ पाहातां आगमानिगमाचा ठाव । तेथें नाहीं भाव एकविध ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें नाहीं वो विकार । नाम एक सार विठोबाचें ॥ ४ ॥ [२०२३]

गुरुशिष्यपण । हें तों अधमलक्षण ॥ १ ॥ भूतीं नारायण खरा । आप तैसाचि दुसरा ॥ २ ॥

पाहाणार नाहीं २. ज्याचें वाईट आचरण आहे, त्याचे अवगुण मला कांहीं सहन होत नाहींत आणि त्याला पाहिल्याबरोबर माझें मन फार कासावीस होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी एकविधपणानें सेवा करीत आहें, म्हणून जो कोणी देवास विन्मुख असेल (देवाचें नामसंकीर्तन करीत नसेल) त्याला माझ्या चित्तानें धिक्कारलें आहे ४. [२०१९]

जो कोणाशीं कांहीं मागत नाहीं तोच देवाला फार आवडतो १. असा जो निरिच्छ आहे त्यालाच देव म्हणावें आणि त्याच्या पायांजवळ लीन होऊन राहावें २. ज्याच्या मनामध्यें सर्व भूतांविषयीं दया असते, त्याचे घरीं चक्र धारण करणारा देव-विष्णु राहातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच्यासारखा श्रेष्ठ दुसरा कोणी नाहीं ह्याविषयीं माझी खात्री आहे (मी साक्षी आहें) ४. [२०२०]

हरिनामाचा उच्चार केल्याबरोबर देव त्याच्यापुढें उभा राहातो १. देव आपल्यापुढें उभा आहे, असें ध्यान मनामध्यें धरून देवाचें चिंतन करावें २. जो देव ब्रह्मादिकांच्या ध्यानांत देखील येत नाहीं तो ह्या नामसंकीर्तनाकडे धांवून येतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें सारभूत नाम आहे तें मनानें जपून (आपण हरिरूप आहोंत अशी भावना करावी, किंवा) देवाच्या रूपाचें ध्यान करावें आणि दृष्टीनें तेंच पाहावें ४. [२०२१]

हे देवा, जे कोणी जन अडचणींत पडले असतील त्यांना तूं साहाय्य करतोस आणि आत्मज्ञानदृष्टीनें अंध असणाऱ्या लोकांच्या हातामध्यें तूंच काठी होऊन त्यांना वागवितोस (त्यांना आत्मबोध देतोस) १. हे नारायणा, जे कोणी संसारामध्यें गांजलेले, अडलेले व पीडित झालेले त्यांना तूं आपल्या नामासाठीं साह्य करतोस २. प्रल्हाद हा भक्त महासंकटानें पीडित झाला होता. त्यानें तुझ्या नामाचा उच्चार केल्याबरोबर तूं त्याचा अंगीकार करून त्याचें नानाप्रकारांनीं रक्षण केलेंस ३. त्याच्याकरितां तुम्हीं आपला देह पुढें करून त्या महादुःखापासून त्याचें रक्षण केलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे माझे विठाबाई आई, तुला आमच्याविषयीं जी कृपा आहे तिचा अंत नाहीं ५. [२०२२]

कांहीं तपश्चर्या करावी तर मन हें इंद्रियांची संगती धरून माझा घात करूं इच्छितें १. ह्याकरितां मला हरिनाम-कीर्तन आवडतें म्हणून सर्व लज्जेचा त्याग करून हें कीर्तनच मी करतों २. वेदशास्त्राच्या ठिकाणीं शोध करून पाहिलें असतां तेथें (त्यांचें तात्पर्य कशांत आहे हेंच कळत नाहीं) एकविध भावाची प्राप्ति होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, विठोबारायाचें नाम हें सारभूत आहे. ह्याच्यामध्यें कोणते विकार (मतभेद) नाहींत ४. [२०२३]

एकानें गुरु व्हावें व एकानें शिष्य व्हावें हें लक्षण फार नीचपणाचें आहे १. कारण, सर्व भूतांचे ठिकाणीं यथार्थत्वानें जर एका नारायणाची व्याप्ति आहे तर एक मोठा व दुसरा लहान हा भेद नसून, जसा एक तसाच दुसरा (मग कोणीं

न कळतां दोरी साप। राहूं नेदावा तो कांप ॥ ३ ॥ तुका म्हणे गुणदोषी। ऐसें न पडावें सोसीं ॥ ४ ॥ [२०२४]

अंगीकार ज्याचा केला नारायणें। निंद्य तेहि तेणें वंद्य केले ॥ १ ॥ अजामेळ भिल्ली तारिली कुंटणी। प्रत्यक्ष पुराणीं वंद्य केली ॥ २ ॥ ब्रह्महत्याराशी पातकें अपार। वाल्मीक किंकर वंद्य केला ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें भजन प्रमाण। काय थोरपण जाळावें तें ॥ ४ ॥ [२०२५]

धनवंता घरीं। करी धनचि चाकरी ॥ १ ॥ होय बैसल्या व्यापार। न लगे सांडावेंचि घर ॥ २ ॥ रानीं वनीं द्वीपीं। असती तीं होती सोपीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मोल। देतां कांहीं नव्हे खोल ॥ ४ ॥ [२०२६]

हा गे माझा अनुभव। भक्तिभाव भाग्याचा ॥ १ ॥ केला ऋणी नारायण। नव्हे क्षण वेगळा ॥ २ ॥ घालोनियां भार माथां। अवघी चिंता वारली ॥ ३ ॥ तुका म्हणे वचनासाठीं। नाम कंठीं धरियेलें ॥ ४ ॥ [२०२७]

देव आहे सुकाळ देशीं। अभाग्यासी दुर्भिक्ष ॥ १ ॥ नेणती हा करूं सांटा। भरले फांटा आडरानें ॥ २ ॥ वसवूनि असे घर। माग दूर घातला ॥ ३ ॥ तुका म्हणे मन मुरे। मग जें उरे तेंचि तूं ॥ ४ ॥ [२०२८]

खुंटोनियां (सुटोनियां) दोरी आपणियांपाशीं। वावडी आकाशीं मोकलिली ॥ १ ॥ आपुलिया आहे मालासी जतन। गहाणाचें तें ऋण बुडों नेणें ॥ २ ॥ बीज नेलें तेथें येईल अंकूर।

कोणास उपदेश करावा?) २. दोरीचे ठिकाणीं सर्पाचा भास झाला तर तो सर्प नसून दोरी खरी आहे असें समजल्याखेरीज भयनिरसन होणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, एक चांगला, एक वाईट अशा गुणदोषांचे सोसांत (छंदांत) मुळींच कोणी पडूं नये ४. [२०२४]

ज्याचा अंगीकार नारायणानें केला आहे ते अति वाईट असले तरी सर्वांस पूज्य होतात १. ह्याविषयीं मागील पुरावा असा : गणिका नांवाची वेश्या व भिल्लीण आणि अजामिळ हे जरी नीच होते तरी त्यांचा उद्धार करून त्यांना तुम्हीं वंद्य केलें असें पुराणांत आहे २. वाल्या कोळी ह्यानें ब्रह्महत्यापातकाच्या राशि अगणित केल्या होत्या पण तो देवाचा सेवक झाल्यामुळें श्रेष्ठ अशा ऋषिपदाला येऊन बसला ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं देवाचें भजन करणें हेंच प्रमाण आहे. त्यावांचून नुसत्या मोठेपणास काय आग लावावयाची आहे? ४. [२०२५]

जे कोणी द्रव्यवान् आहेत त्यांची सेवा द्रव्यच करीत असतें १. त्यांनीं जो व्यापार करावयाचा तो बसले ठिकाणीं होतो, घर सोडून त्यांना कोठें जावयास नको २. ज्या वस्तु रानांत, वनांत अथवा द्वीपांतरांत आहेत त्या द्रव्याचे योगानें त्यांना सहज घरीं बसल्या मिळतात २. तुकाराम महाराज म्हणतात, कोणत्याहि वस्तूची भरपूर किंमत दिल्यावर ती मिळणें अवघड नाहीं ४. [२०२६]

भावभक्तीच्या भाग्याविषयींचा माझा अनुभव हाच आहे. तो तुम्हांस सांगतों १. त्या योगानें नारायण आमचा ऋणी होऊन राहिला आहे. तो आम्हांला सोडून क्षणभर देखील वेगळा होत नाहीं २. मीं आपला सर्व भार त्याच्या मस्तकीं टेविला आहे, म्हणून माझी चिंता निवारण झाली ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या मुखांतून जीं वचनें निघालीं तीं देवास अर्पण करून त्या मोबदला हरिनाम कंठीं धरून मी राहिलों आहें ४. [२०२७]

सर्व देशांत देव व्यापक आहे अशी ज्याची बुद्धि आहे त्याला देवाविषयींचा सुकाळ आहे आणि त्याविषयीं नास्तिकबुद्धीच्या करंट्यास देवाचा दुष्काळ आहे १. देवाच्या सर्वव्यापकत्वाविषयींचा निश्चय आपल्या ठिकाणीं ठेवण्याचें जे जाणत नाहींत, त्यांना भ्रांतीचा फाटा फुटून ते आडरानांत पडतात (प्रपंचांत पडतात) २. हा देव सर्व जगतांत राहून जगत् हेंच त्यानें आपलें घर केलें आहे आणि कोणाच्या दृष्टीस पडूं नये म्हणून त्यानें आपला मागमूस दूर पळविला ३. तुकाराम महाराज म्हणतात, मन नाहींसें झाल्यावर जें उरतें तेंच तुझें व देवाचेंहि स्वरूप आहे ४. [२०२८]

ज्याप्रमाणें कागदाची वावडी करून तिची दोरी आपणाजवळ ठेवून ती वावडी आकाशांत उडविली म्हणजे ती हवी तेव्हां आपल्याजवळ येते १. अगर वस्तु गहाण ठेवून जितकें कर्ज देतात तितक्या किंमतीची वस्तु जवळ असल्यामुळें

जतन तें सार करा याची ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी निश्चिंतीची सेवा। वेगळें नाहीं देवा उरों दिलें ॥ ४ ॥ [२०२९]

शहाणपणें वेद मुका। गोपिका त्या ताकटी ॥ १ ॥ कैसें येथें कैसें तेथें। शहाणे ते जाणती ॥ २ ॥ यज्ञमुखें खोडी काढी। कोण गोडी बोरांची ॥ ३ ॥ तुका म्हणे भावाविण। अवघा सीण केला होय ॥ ४ ॥ [२०३०]

मजुराचें पोट भरे। दाता उरे संचला ॥ १ ॥ या रे या रे हातोहातीं। काम माती सारावी ॥ २ ॥ रोजकीर्दी होतो झाडा। रोकडाचि पर्वत ॥ ३ ॥ तुका म्हणे खोल पाया। वेंचों काया क्लेशेंसीं ॥ ४ ॥ [२०३१]

स्मशानींच आम्हां न्याहालीचें सुख। या नांवें कौतुक तुमची कृपा ॥ १ ॥ नाहीं तरी वायां अवघेंचि निर्फळ। शब्द ते पोकळ बडबड ॥ २ ॥ झाडें झुडें जीव सोईरे पाषाण। होतीं तईं दान तुम्हीं केलें ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां पाहें अनुभव। घेऊनि हातीं जीव पांडुरंगा ॥ ४ ॥ [२०३२]

आमुची जोडी ते देवाचे चरण। करावें चिंतन विठोबाचें ॥ १ ॥ लागेल तरी कोणी घ्यावें धणीवरी। अमुपचि परि आवडीच्या ॥ २ ॥ उभारिला कर प्रसिद्ध या जगें। करूं केला त्याग मागें पुढें ॥ ३ ॥ तुका म्हणे होय दरिद्र विच्छिन्न। ऐसें देऊं दान एक वेळां ॥ ४ ॥ [२०३३]

जसें तें कर्ज बुडत नाहीं २. अथवा कोणतेंहि बीं जमिनींत पेरल्यावर त्यांचे जे मोड उगवून येतात त्यांचें पाणी घालून, कुंपण लावून जतन केलें असतां त्यांच्या पिकाचा लाभ होतो, म्हणून जसें सारभूत बीजाचें जतन करावें लागतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, त्याप्रमाणें तुमची सेवा करणें हीच माझी चिंताविरहित स्थिति आहे; त्यावांचून वेगळी हांव मी उरूं दिली नाहीं [ह्याच योगानें देव जोडेल] ४. [२०२९]

सर्व जाणत्यांमध्यें वेद हा पूर्ण ज्ञाता असून देवाचें वर्णन करण्यास त्यानें मौन धरलें पण ताक पिणाऱ्या गोपिका अडाणी असूनहि देवाचें सुख भोगतात १. ह्या ठिकाणीं कसें व त्या ठिकाणीं कसें हे प्रकार जे कोणी शहाणे संत असतील ते समजतील २. कोणी अग्निद्वारा हवन (यज्ञ) करावयास लागला तर त्या ठिकाणीं कांहीं तरी चूक काढून देव तिकडे पाहात देखील नाहीं; तर भिल्लीणीनें भावार्थानें बोरें अर्पण केलीं तीं काय गोड होतीं? (पण तींच देवाला फार आवडलीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां शुद्धभाव (भक्ति-प्रेम) असल्याशिवाय जें कांहीं करणें ते सर्व व्यर्थ श्रम होत ४. [२०३०]

जो कोणी दाता आहे त्याचेजवळ धनाचा संचय असल्यामुळें त्याचें दातृत्व कायम असतें; तेथें (परमार्थाची इमारत बांधण्याच्या कामावर) मजुरी करणारास आपल्या पोटापुरतें मिळतें १. अहो जन हो, तुम्ही आपल्या (संसाराच्या) कामावर माती घालून लवकर धांवत ह्या ठिकाणीं या (असें द्विवार सांगतों) २. ह्या ठिकाणीं रोजमेळाची कीर्द आहे म्हणून रोजीं हिशेबाची झडती होऊन रोकड शिल्लक पर्वताप्रमाणें असते ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपआपल्या सेवेप्रमाणें प्रत्येक मनुष्यास प्राप्ति होते. ह्याकरितां आपल्या शरीरानें कष्ट करून शरीर झिजवावें व परमार्थरूपी इमारतीचा असा खोल पाया घालावा ४. [२०३१]

हे देवा, जर आम्ही स्मशानाचे ठिकाणीं असलों (जिवंतपणीं चितेवर निजविले गेलों) तर त्या ठिकाणीं गादीवर निजल्याचें सुख आम्हांस व्हावें. असें झालें म्हणजे तुमची कृपा झाली असें आम्ही समजूं १. नाहींपेक्षां पोकळ शब्दानें बडबड करणें तें सर्व व्यर्थ असून निष्फळ आहे २. ज्या वेळीं तुम्ही कृपादान कराल, त्या वेळीं सर्व वृक्षपाषाणादि स्थावर व जीवजंतु हे सर्व आमचे आप्त होतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, आतां ह्याविषयींचा अनुभव मी आपला जीव मुठींत धरून पाहात आहें ४. [२०३२]

विठोबारायाचें चिंतन सर्वकाळ करावें आणि त्याच्याच पायाचें ध्यान करावें हीच आमची मुख्य मिळकत आहे. अहो जन हो, तुम्हां कोणास हा लाभ पाहिजे असेल तर आपआपल्या आवडीनें इच्छा पूर्ण होईतोंपर्यंत तो करून घ्यावा २. ह्याविषयीं मी आपला हात उभारून सर्व जगास सांगत आहें, कीं त्या जोडीवांचून सर्व प्रपंचाचा त्याग आम्हीं मागें केला आणि पुढेंहि करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या योगानें सर्व दारिद्र्य नाहींसें होईल अशा प्रकारची देणगी आम्ही एकदम देऊं ४. [२०३३]

दधीमाजीं लोणी जाणती सकळ । तें काढी निराळें जाणें मथन ॥ १ ॥ अग्नि काष्टामाजीं ऐसें जाणे जन । मथिलियाविण कैसा जाळी ॥ २ ॥ तुका म्हणे मुख मळीण दर्पणीं । उजळिल्यावांचूनि कैसें भासे ॥ ३ ॥ [२०३४]

नको नको मना गुंतूं मायाजाळीं । काळ आला जवळी ग्रासावया ॥ १ ॥ काळाची हे उडी पडेल वा जेव्हां । सोडवीना तेव्हां मायबाप ॥ २ ॥ सोडविना राजा देशींचा चौधरी । आणीक सोइरीं भलीं भलीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तुला सोडवीना कोणी । एका चक्रपाणीवांचूनियां ॥ ४ ॥ [२०३५]

पुढें जेणें लाभ घडे । तेंचि वेडे नाशिती ॥ १ ॥ येवढी कोठें नागवण । अंधारून विष द्यावें ॥ २ ॥ होणारासी मिळे बुद्धि । नेदी शुद्धि धरूं ते ॥ ३ ॥ तुका म्हणे जना सोंग । दावी रंग आणीक ॥ ४ ॥ [२०३६]

ऐका गा हे अवघे जन । शुद्ध मन तें हित ॥ १ ॥ अवघा काळ नव्हे (न ये) जरी । समयावरी जाणावें (वा) ॥ २ ॥ नाहीं कोणी सवें येता । संचिता या वेगळें ॥ ३ ॥ बरवा अवकाश आहे । करा साहे इंद्रियें ॥ ४ ॥ कर्मभूमी ऐसा ठाव । वेवसाव जाणावा ॥ ५ ॥ तुका म्हणे उत्तम जोडी । जाती घडी नरदेह ॥ ६ ॥ [२०३७]

संतसेवेसी अंग चोरी । दृष्टी न पडो तयावरी ॥ १ ॥ ऐसी कां तें व्याली रांड । जळो जळो तिचें तोंड ॥ २ ॥ संतचरणीं ठेवितां भाव । आपेंआप भेटे देव ॥ ३ ॥ तुका म्हणे संतसेवा । माझ्या पूर्वजांचा ठेवा ॥ ४ ॥ [२०३८]

दह्यामध्यें लोणी आहे, असें सर्व लोक जाणतात, पण ज्यांना तें घुसळण्याचें ज्ञान आहे तेच लोणी वेगळें काढतील (त्याप्रमाणें प्रत्येकाच्या देहांत आत्मा आहे, पण विचारी लोकांनाच त्याचें विशेषरूपानें ज्ञान होतें) १. सर्व काष्ठांचे पोटीं अग्नि आहे असें जनांस कळतें; पण काष्ठ घर्षण करून अग्नि काढल्याशिवाय जाळण्याचें काम तो कसें करील? २. तुकाराम महाराज म्हणतात, एखादा आरसा मळिण झालेला असतो; त्यांतील मळ नाहींसा करून तो स्वच्छ केल्याखेरीज, त्या ठिकाणीं आपलें मुख कसें दिसेल (अंतःकरण शुद्ध झाल्यावांचून आत्म्याचें विशेषज्ञान कसें होईल?) ३. [२०३४]

अरे माझ्या मना, तूं ह्या मायाजालामध्यें गुंतूं नको (असें द्विवार सांगतों), कारण तुला खावयाकरितां काळ तुझ्याजवळ आला आहे १. ज्या वेळीं काळाची उडी पडेल त्या वेळीं आईबाप देखील तुला सोडविणार नाहींत २. एखादा राजा किंवा देशाचा अधिकारी अगर तुझे थोर थोर सोयरे संबंधी ह्यांपैकीं तुला कोणी सोडविणार नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यानें आपल्या हाताच्या ठिकाणीं चक्र धारण केलें आहे असा जो देव हरि, त्याच्यावांचून तुला कोणीहि सोडविणार नाहीं ४. [२०३५]

ज्या सत्कर्माच्या योगानें पुढें लाभ होईल हें जाणूनहि त्याचा वेडगळ लोक नाश करितात १. अंधकार करून कोणाला कळूं न देतां विष भक्षण करावें असला घात कोठें आहे काय? २. परंतु पुढें जें होणार असतें त्याला बुद्धि साहाय्य होऊन तें तसें घडतें. तसें करूं नये असा विचार बुद्धीस येत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, एखाद्या निराळ्याच रंगानें मूर्ख लोक जनाला (आपण फार शहाणे, चांगल्या बुद्धीचे, सत्कर्मे करणारे असें) सोंग दाखवितात ४. [२०३६]

अहो सर्व जन हो, तुम्ही आपलें मन शुद्ध करा म्हणजे त्याच्या योगानें तुमचें हित होईल, असें मी तुम्हांला सांगतों तें ऐका १. सर्वकाळ मन जरी एकाग्र होत नाहीं, तरी प्रसंगीं सावध असावें हें समजा २. तुमच्या संचितकर्मा-शिवाय अखेरीस तुमच्या बरोबर दुसरें कोणी येणार नाहीं ३. तुमच्या अंतकाळास बराच वेळ आहे तोंच तुम्ही आपलीं सर्व इंद्रियें साह्य करून घ्या (व परमार्थाला लागा) ४. ह्या कर्मभूमीमध्यें जें साध्य करावें तें होतें, असें हें ठिकाण आहे. तुम्ही हें जाणून वागा ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या नरदेहाची आयुष्यरूपी उत्तम घटका वरचेवर वायां जात आहे (ह्याचा तुम्ही विचार करा) ६. [२०३७]

जो कोणी संतांची सेवा करण्याविषयीं अंग चोरतो, त्याचें मला दर्शन होऊं नये १. असल्या प्राण्यास ती रांड (आई) कशाकरितां प्रसवली? तिच्या तोंडास आग लागो; (असें द्विवार सांगतात) २. ज्यांनीं आपला भाव संतांचे पायांजवळ ठेविला त्यांना देव आपणच येऊन भेटतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांची सेवा करणें हा माझ्या पूर्वजांचा ठेवा आहे ४. [२०३८]

गेले पळाले दिवस रोज। काय म्हणतोसि माझें माझें॥ १ ॥ सळे धरोनि बैसला काळ। फांको नेदी घटिका पळ ॥ २ ॥ कां रे अद्यापि न कळे। केश फिरले कान डोळे ॥ ३ ॥ हित कळोनि असतां हातीं। तोंडीं पाडोनि घेसी माती ॥ ४ ॥ तुज ठाउकें मी जाणार। पाया शोधोनि बांधिसी घर ॥ ५ ॥ तुका म्हणे वेगें। पंढरिराया शरण रिघें ॥ ६ ॥ [२०३९]

आतां माझ्या मायबापा। तूं या पापा प्रायश्चित्त ॥ १ ॥ फजित हे केले खळ। तो विटाळ निवारीं ॥ २ ॥ प्रेम आतां पाजीं रस। करीं वास अंतरीं ॥ ३ ॥ तुका म्हणे पांडुरंगा। जिवलगा माझिया ॥ ४ ॥ [२०४०]

कां रे न पवसी धांवण्या। अंगराख्या नारायणा ॥ १ ॥ अंगीं असोनियां बळ। होसी खस्याळ नास्याळ ॥ २ ॥ आम्हां नरका जातां। काय येईल तुझ्या हातां ॥ ३ ॥ तुका म्हणे कान्हा। क्रियानष्टा नारायणा ॥ ४ ॥ [२०४१]

माझे पाय तुझी डोई। ऐसें करीं गा भाक देई ॥ १ ॥ पाहतां दिसे उफराटें। घडे तैं भाग्य मोठें ॥ २ ॥ बहु साधन मोलाचें। यासी जोडा दुजें कैचें ॥ ३ ॥ नका आनमान (अनुमानूं) विठ्ठला। तुका म्हणे धडा झाला ॥ ४ ॥ [२०४२]

पवित्र तें अन्न। हरिचिंतनीं भोजन ॥ १ ॥ येर वेठ्या पोट भरी। चाम मसकाचे परी ॥ २ ॥ जेऊनियां तोचि धाला। हरिचिंतनीं केला काला ॥ ३ ॥ तुका म्हणे चवी आलें। जें कां मिश्रित विठ्ठलें ॥ ४ ॥ [२०४३]

अरे, तुझे आतांपर्यंतचे आयुष्याचे दिवस व्यर्थ चालले आहेत, असें सांगून 'माझें माझें' असें तूं काय म्हणतोस? १. तुझ्याविषयीं मोठी अहंता (सळ हातांत धरून किंवा वैर मनांत) भरून काळ बसला आहे; तो तुला अखेरीस घटकाभर अगर पळभर देखील चुकवूं देणार नाहीं २. अरे, तुझे केस काळे होते ते पालटले, व कानांनीं आणि डोळ्यांनीं पूर्वीचा आपआपला ऐकण्यापाहाण्याचा धंदा टाकला, असें असून तुला अद्याप कसें कळत नाहीं? ३. तूं जर आपलें हित करून घेशील तर तें तुझ्या स्वाधीन आहे असें जाणूनही अखेरीस तोंडामध्यें तूं माती कां घालून घेतोस? ४. आपला देह कधीं तरी जाणार आहे असें तुला माहीत असून (आपला पाया ढिला झाला आहे इकडे लक्ष न देतां) खडकापर्यंत पाया खणून वर बांधतोस हें तुला बरें वाटतें काय? ५. तुकाराम महाराज म्हणतात, अरे तूं लवकर पंढरीरायाला शरण जा ६. [२०३९]

हे माझ्या मायबापा, आतां ह्या पातकाला तूंच प्रायश्चित्त देणारा आहेस १. मी सर्व दुर्जनांस बोलून फजीत केलें, त्याचें पाप कदाचित् मला लागेल; म्हणून तूं त्या विटाळाचें निवारण कर २. आतां तुझ्या प्रेमाचा रस मला पाज आणि माझ्या हृदयांत तूं वास्तव्य कर ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, तूं माझ्या जिवाचा आप्त आहेस. (म्हणून वर दर्शविल्याप्रमाणें कर, हेंच माझ्या पापाला प्रायश्चित्त दे) ४. [२०४०]

अरे नारायणा, तूं आपलें अंग राखणारा (कामचुकार) आहेस. हांकेसरसा धांवून कां येत नाहींस? १. तुझ्या अंगांत मला सोडविण्याचें सामर्थ्य असून खट्याळनाठाळासारखा कां होतोस? २. जर आम्ही नरकामध्यें गेलों तर तुझ्या हाताला काय लागेल? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, तूं क्रियानष्ट आहेस (तुला किती म्हणून बोलावें?) ४. [२०४१]

हे देवा, तुझे पाय हे माझे व्हावे आणि माझें मस्तक तुझें व्हावें, असें करण्याविषयीं मला तूं वचन दे १. पाहिलें असतां हें उफराटें दिसतें पण असें घडेल तर त्याचें भाग्य मोठें आहे २. हें साधन फार महत्त्वाचें आहे, ह्याच्या जोडीचें दुसरें काय आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठ्ठला, ह्याविषयीं मी धारिष्ट्य केलें आहे, पण तुम्ही माझा अपमान करूं नका ४. [२०४२]

हरीचें चिंतन करून ज्या अन्नाचें भोजन होतें तें अन्न फार शुद्ध असतें १. त्यावांचून बेगारीनें जें पोट भरतात तें कातड्याची मसक [पखाल] भरल्याप्रमाणें होतें २. ज्यांनीं हरिनामस्मरण करून काला सेवन केला तेच जेवून तृप्त झाले असें समजावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें विठ्ठलनामानें मिश्रित आहे, तें सेवन केलें असतां, त्याची गोडी समजते ४ [२०४३]

चरणाचा महिमा। हा तो तुझ्या पुरुषोत्तमा ॥ १ ॥ अंध पारखी माणिकें। बोलविशी स्पष्ट मुकें ॥ २ ॥ काय नाहीं सत्ता। हातीं तुझ्या पंढरिनाथा ॥ ३ ॥ तुका म्हणे मूढा। मज चेष्टविलें जडा ॥ ४ ॥ [२०४४]

बळिवंत कर्म। करी आपुला तो धर्म ॥ १ ॥ पुढें घालूनियां सत्ता। न्यावें पतना पतिता ॥ २ ॥ आचरणें खोटीं। केलीं सलताती पोटीं ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा। नाहीं भजन केली सेवा ॥ ४ ॥ [२०४५]

कैं वाहावें जीवन। कैं पलंगीं शयन ॥ १ ॥ जैसी जैसी वेळ पडे। तैसें तैसें होणें घडे ॥ २ ॥ कैं भोज्य नानापरी। कैं कोरड्या भाकरी ॥ ३ ॥ कैं बसावें वाहनीं। कैं पायीं अनवाणी ॥ ४ ॥ कैं उत्तम प्रावर्णें। कैं वसनें तीं जीर्णें ॥ ५ ॥ कैं सकळ संपत्ती। कैं भोगणें विपत्ती ॥ ६ ॥ कैं सज्जनाचा(शीं) संग। कैं दुर्जनाचा(शीं) योग ॥ ७ ॥ तुका म्हणे जाण। सुख दुःख तें समान ॥ ८ ॥ [२०४६]

उंच नीच कांहीं नेणे भगवंत। तिष्ठे भावभक्त देखोनियां ॥ १ ॥ दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी। दैत्याघरीं रक्षी प्रल्हादासी ॥ २ ॥ चर्म रंगूं लागे रोहिदासा संगें। कबिराचे मागें विणी शेले ॥ ३ ॥ सजन कसाया विकूं लागे मांस। माळ्या सांवत्यास खुरपूं लागे ॥ ४ ॥ नरहरि सोनारा घडूं फुंकूं लागे। चोख्यामेळ्यासंगें ढोरें ओढी ॥ ५ ॥ नामयाची जनी सवें वेंची शेणी। धर्मा घरीं पाणी वाहे झाडी ॥ ६ ॥ नाम्या सवें जेवी नव्हे संकोचित। ज्ञानियाची भिंत अंगें ओढी ॥ ७ ॥ अर्जुनाचे रथीं होय हा सारथी। भक्षी पोहे प्रीती सुदाम्याचे ॥ ८ ॥ गौळियांचे घरीं अंगें गाई वळी। द्वारपाळ बळी द्वारीं झाला ॥ ९ ॥ येकोबाचें ऋण फेडी हृषीकेशी। अंबऋषीचे सोशी गर्भवास ॥ १० ॥

हे पुरुषोत्तमा, (ध्रुवपदांत दर्शित केलेला) जगांत अघटित गोष्टी घडतात हा महिमा तुझ्याच चरणांचा आहे १. जे अंध आहेत ते माणिकांची परीक्षा करितात व मुक्यांकडून तूं स्पष्ट बोलवितोस २. हे पंढरीनाथा, कोणतें म्हणून सामर्थ्य तुझ्याजवळ नाहीं ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला जड मूढाला सुद्धां तूं हालचाल करावयास (काव्य करण्यास) लावलेंस ४. [२०४४]

आमचें बळकट प्रारब्धकर्म आपल्या स्वभावाप्रमाणें करीत आहे १. तें पापकर्म आपल्या सत्तेनें आम्हांला नरकांत घालतें २. जीं खोटीं कर्में आम्हीं केलीं आहेत तीं आमच्या हृदयांत सलतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मीं तुमचें (सेवा) भजन केलें नाहीं ४. [२०४५]

कधीं आपण स्वतः घागरीनें पाणी भरावें तर कधीं पलंगावर निजावें १. जसजसे प्रसंग येतील तसतसें वागावें लागतें २. कधीं नाना प्रकारचीं उत्तम पक्वान्नें भोजनास मिळावीं, तर कधीं कोरडी भाकरी ३. कधीं मेणा, पालखी, घोडागाडी अशा वाहनांत बसून जाण्याचा प्रसंग, तर कधीं अनवाणी पायानें चालण्याचा प्रसंग ४. कधीं कधीं उत्तम वस्त्र अंगावर परिधान करावें, तर कधीं जुनीं फाटकीं वस्त्रें आंगावर असावीं ५. कधीं सर्व संपत्तीनें संपन्न असावें, तर कधीं दारिद्र्य भोगीत असावें ६. कधीं सज्जनांची संगती असावी तर कधीं दुर्जनांचा योग घडावा ७. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारें ज्ञानी पुरुषाला सुख-दुःख हें सारखें आहे. ८. [२०४६]

हा भक्त उच्च जातीचा आहे कीं नीच जातीचा आहे हें भगवंत पाहात नाहीं. जसा त्या भक्ताचे ठिकाणीं आपल्या-विषयीं भाव असेल तसा त्याचें कार्य करण्याविषयीं तो तत्पर असतो १. विदुर जरी दासीपुत्र होता तरी भगवंतांनीं त्याचे घरीं कण्या खाल्लया. राक्षसकुळांत जन्मलेल्या प्रल्हादाचें रक्षण केलें २. रोहिदास चांभाराबरोबर देवानें कातडीं रंगविलीं. कबिराचे मागावर त्याच देवानें शेले विणले ३. सजन कसायाबरोबर मांस विकलें. सावता माळ्याबरोबर त्यांनीं मळा खुरपण्याचें काम केलें ४. नरहरि सोनाराबरोबर दागिने करण्याचा व भट्टी फुंकण्याचा व्यवहार केला व चोख्या मेळ्याबरोबर मेलेलीं गुरें ओढलीं ५. नामदेवाच्या जनी दासीबरोबर गोंवऱ्या वेंचल्या. त्याच देवानें धर्माचे घरीं पाणी भरलें व घर झाडलें ६. नामदेवाबरोबर जेवण्यांत त्यानें किंचित् संकोच धरला नाहीं व ज्ञानेश्वर महाराजांची भिंत त्यानें स्वतः ओढली ७. अर्जुनाचे रथावर त्यानें सारथ्य केलें व सुदामदेवाचे पोहे त्यानें स्वतः भक्षण केले ८. गौळ्यांच्या घरीं त्यानें स्वतः गाई राखिल्या आणि तोच बळीचें द्वार रक्षण करता झाला ९. एकनाथांच्या भक्तीचें ऋण ज्या हृषीकेशीनें त्याच्या घरीं गंगेच्या पाण्याच्या कावडी आणून फेडिलें त्यानेंच अंबऋषीकरितां गर्भवास सोशिला १०.

मिराबाईसाठीं घेतो विषप्याला । दामाजीचा झाला पाडेवार ॥ ११ ॥ घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची । हुंडी मेहत्याची अंगें भरी ॥ १२ ॥ पुंडलिकासाठीं अझूनि तिष्ठत । तुका म्हणे मात धन्य त्याची ॥ १३ ॥ [२०४७]

भेटीलागीं जीवा लागलीसे आस । पाहें रात्रंदिवस वाट तुझी ॥ १ ॥ पूर्णिमेचा चंद्र चकोरा जीवन । तैसें माझें मन वाट पाहे ॥ २ ॥ दिवाळीच्या मुळा लेंकी आसावली । पाहातसे वाटुली पंढरीची ॥ ३ ॥ भुकेलिया बाळ अति शोक करी । वाट पाहे परी माउलीची ॥ ४ ॥ तुका म्हणे मज लागलीसे भूक । धांवूनि श्रीमुख दावीं देवा ॥ ५ ॥ [२०४८]

आले संत पांय ठेविती मस्तकीं । इहीं उभयलोकीं सरता केलों ॥ १ ॥ वंदीन पाउलें लोळेन चरणीं । आजि इच्छा धणी फिटईल ॥ २ ॥ अवघीं पूर्व पुण्यें जालीं सानूकुळ । अवघेंचि मंगळ संतभेटी ॥ ३ ॥ तुका म्हणे कृतकृत्य जालों देवा । नेणें परि सेवा डोळां देखें ॥ ४ ॥ [२०४९]

करीं धंदा परि आवडती पाय । प्रीती सांगों काय नेणां देवा ॥ १ ॥ रूप डोळां देखें सदा सर्वकाळ । संपादितों आळ प्रपंचाचा ॥ २ ॥ नेमून टेविली कार्या कारणीं । आमुचि हे वाणी गुण वदे ॥ ३ ॥ मनासी उत्कंठा दर्शनाचा हेवा । नाहीं लोभ जीवा धन धान्य ॥ ४ ॥ उसंतितों पंथ वेठीचिया परी । जीवनसूत्र दोरीपाशीं ओढे ॥ ५ ॥ तुका म्हणे ऐसें करितों निर्वाण । जीव तुम्हां भिन्न नाहीं माझा ॥ ६ ॥ [२०५०]

मिराबाईकरितां पेलाभर विषाचें त्यानें सेवन केलें. तोच दामाजीपंताच्या हुंडीची भरपाई करण्याकरितां महार झाला ११. गोरोबा कुंभाराच्या येथें ज्यानें माती वाहिली व मडकीं घडलीं, त्यानें नरसी मेहत्याच्या हुंडीची स्वतः भरपाई केली १२. तुकाराम महाराज म्हणतात, पुंडलीक भक्ताकरितां तर तो अजून उभा आहे; अशा प्रकारची त्या देवाची कथा धन्य आहे १३. [२०४७]

हे देवा, तुझ्या भेटीची मला आशा लागली आहे म्हणून मी तुझी रात्रंदिवस वाट पाहात आहें १. पौर्णिमेचा चंद्र चकोराचें जीवन असल्यामुळें तो जसा चंद्रोदयाची मार्गप्रतीक्षा करतो, तसें हे देवा, माझें मन तुझी वाट पाहात आहे २. दिवाळीकरितां आपल्या आईबापांचें बोलावणें येण्याची इच्छा मुलगी करते, त्याप्रमाणें मी पंढरीची वाट पाहात आहें ३. क्षुधित झालेलें बालक दुग्धपानाकरितां अति रुदन करतें व आईची वाट पाहातें, त्याप्रमाणें विठु माउलीची मी वाट पाहात आहें ४. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, मला तुझ्या दर्शनाची अतिशय भूक लागल्यामुळें तूं धांव घे व आपलें श्रीमुख मला दाखीव ५. [२०४८]

संत आले व त्यांनीं माझ्या मस्तकावर पाय ठेविला व त्यांच्या कृपेनेंच मी इहपरलोकीं मान्य झालों १. त्यांच्या चरणांस नमस्कार करून त्या ठिकाणीं मी लोळण घेईन. आज माझी इच्छा पूर्ण झाली आहे २. अनेक जन्मांची जी माझी पूर्वपुण्याई, ती आज मला अनुकूल झाली आहे. त्या योगानें संतांची भेट होऊन सर्व कांहीं मंगल झालें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मी कृतकृत्य झालों आहें (माझ्या सर्व कर्तव्याची समाप्ति झाली आहे). दुसरें जरी मला कांहीं कळत नाहीं तरी आज मी सेवेचें फळ प्रत्यक्ष अनुभविलें (संतदर्शनानें मला आनंद होत आहे) ४. [२०४९]

हे देवा, देहनिर्वाहाकरितां मी उद्योग करतों पण माझी सर्व प्रीति तुझ्या पायांचे ठिकाणीं आहे, हें काय मीं तुला सांगावयास पाहिजे? तुला तें कळत नाहीं काय? १. सर्वकाळ तुझें रूप मी डोळयांनीं पाहात आहें व मजवर आलेल्या प्रपंचाचे आळाची (सोंगाची) मी संपादणी करीत आहें २. प्रपंचांत अवश्य कार्याकारणापुरतें इंद्रियांचें मी नियमन केलें व माझी वाचा तुझे गुणानुवाद गात आहे ३. माझ्या मनाला तुझ्या दर्शनाविषयीं उत्कट इच्छा असून तीच हांव आहे. धनधान्यादि संपत्तीचा लोभ माझे मनांत नाहीं ४. वेठीला धरलेला मजूर जसा मार्गक्रमण करतो त्याप्रमाणें मी संसारव्यवहार चालवीत आहें. माझें हृदय, जीवनसूत्र दोरी जो तूं, त्या तुझ्या ठिकाणीं ओढ घेत आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, मीं अशा प्रकारचें निर्वाण मांडलें आहे. माझा जीव तुझ्याहून निराळा नाहीं (तुझें आणि माझ परमार्थतः ऐक्य आहे) ६. [२०५०]

कां रे माझीं पोरें म्हणशील ढोरें । मायबाप खरें काय एक ॥ १ ॥ कां रे गेलें म्हणोनि करिसी तळमळ । मिथ्याच कोल्हाळ मेलियाचा ॥ २ ॥ कां रे माझें माझें करशील (म्हणसील) गोत । न सोडविती दूत यमा हातीं ॥ ३ ॥ कां रे मी बळिया म्हणविसी ऐसा । सरणापाशीं कैसा उचलविसी ॥ ४ ॥ तुका म्हणे न धरीं भरंवसा कांहीं । वेगीं शरण जाई पांडुरंगा ॥ ५ ॥ [२०५१]

अगा करुणाकरा करितसें धांवा । या मज सोडवा लवकरी ॥ १ ॥ ऐकोनियां माझीं करुणेचीं वचनें । व्हावें नारायणें उतावीळ ॥ २ ॥ मागें पुढें अवघा दिसे रिता ठाव । ठेवूनि पायीं भाव वाट पाहें ॥ ३ ॥ उशीर तो आतां न पाहिजे केला । अहो जी विठ्ठला मायबापा ॥ ४ ॥ उरलें तें एक हेंचि मज आतां । अवघें विचारितां शून्य झालें ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां करीं कृपा दान । पाउलें समान दावीं डोळां ॥ ६ ॥ [२०५२]

न मनीं ते ज्ञानी न मनीं ते पंडित । ऐसे परीचे एक एका भावें ॥ १ ॥ धातू पोसोनियां आणिकां उपदेश । अंतरीं तो लेश प्रेम नाहीं ॥ २ ॥ न मनीं ते योगी न मनीं ते हरिदास । दर्शनें बहुवस बहुतां परीचीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तयां नमन बाह्यात्कारीं । आवडती परी चित्तशुद्धी ॥ ४ ॥ [२०५३]

कासया पाषाण पूजितसां पितळ । अष्ट धातु खळ भावेंविण ॥ १ ॥ भावचि कारण भावचि कारण । मोक्षाचें साधन बोलियेलें ॥ २ ॥ काय करिल जपमाळा कंठमाळा । करिशी वेळोवेळां विषयजप ॥ ३ ॥ काय करिशील पंडित हे वाणी । अक्षराभिमानी थोर होय ॥ ४ ॥ काय करिशील कुशल गायन । अंतरीं मळीण दुर्बुद्धि (कुबुद्धि) ते ॥ ५ ॥ तुका म्हणे भाव नाहीं करीसी सेवा । तेणें काय देवा योग्य होशी ॥ ६ ॥ [२०५४]

अरे, माझीं पोरें, माझीं गुरें हें कां म्हणत बसला आहेस ? ज्यांनीं तुला जन्म दिला ते आईबाप तरी तुझे खरे आहेत काय ? १. तूं गेल्या-मेल्याविषयींची तळमळ कां रे करतोस व मिथ्याच ओरडत बसतोस ? २. हें सर्व गोत माझें आहे असें कां रे म्हणतोस ? हे तुला यमदूतांच्या हातून सोडविणार नाहींत ३. मी मोठा बलाढ्य आहें असें आपणास कां रे म्हणवितोस ? मग सरणावर ठेवण्याच्या वेळीं दुसऱ्याकडून कसा उचलला जातोस ? तुकाराम महाराज म्हणतात, तूं ह्यांचा कांहीं भरंवसा (जगांत कोणताहि पदार्थ शाश्वत आहे असा) न धरतां त्वरेनें पांडुरंगास शरण जा ५. [२०५१]

हे करुणासागरा देवा, तुमचा मी धांवा करीत आहें. लवकर या आणि ह्या संसारदुःखांतून मला सोडवा १. हे नारायणा, माझे हे कींवकाकुळतीचे शब्द ऐकून तुम्ही माझें कार्य करण्याविषयीं उतावीळ व्हा २. तुमच्यावांचून मागें पुढें सर्व ओस दिसत आहे, म्हणून मी तुमच्या चरणीं श्रद्धा ठेवून तुमची वाट पाहात आहें ३. अहो जी मायबापा विठ्ठला, आतां आपण मला दर्शन देण्यास उशीर करूं नये ४. आतां माझ्या ठिकाणीं तुमचें दर्शन व्हावें हीच एक अवस्था राहिली आहे. विचार करून पाहिलें तर जगांतील बाकी सर्व शून्य झालें आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्ही मजवर कृपा करून माझ्या डोळ्यांला आपले समचरण दाखवा ६. [२०५२]

(ध्रुवपदांत दर्शविलेले) ते ज्ञानी मी मानीत नाहीं व ते पंडितहि मी मानीत नाहीं, अशा प्रकारचे त्यांचे एक एक भाव आहेत (त्यांचा मनांत भाव एक पण त्यांची कृति वेगळीच !) १. ते देहांतील धातूंचें व द्रव्यधातूंचें पोषण करून दुसऱ्यांना उपदेश करितात; त्यांचे अंतःकरणांत परमार्थाविषयींच्या प्रेमाचा लेशहि नाहीं २. ते योगी मी मानीत नाहीं व हरिदासहि मी मानीत नाहीं, कारण त्या बहुतांची बहुत प्रकारची दृष्टि आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी त्यांना बाह्यात्कारानें नमस्कार करतों, पण ज्यांचें चित्त शुद्ध आहे ते मला फार आवडतात ४. [२०५३]

हरीविषयींचा भाव असल्यावांचून, पाषाणाच्या अथवा पितळ वगैरे अष्ट धातूंच्या मूर्तींचें कशाकरितां पूजन करितोस ? (कारण त्या मूर्तींच्या ठिकाणीं देवबुद्धीनें व शास्त्रोक्त सात्त्विक श्रद्धा ठेवून पूजा केली तरच ती देवाची पूजा होते) १. सर्व परमार्थप्राप्तीला एक भावच कारण आहे (असें द्विवार सांगतों) आणि मोक्षाचेंहि साधन तेंच आहे, असें अनेकांनीं सांगितलें आहे २. जर तूं वेळोवेळीं विषयांचा जप करीत आहेस, तर एका भावावांचून जपमाळा व कंठमाळा ह्या काय करतील ? ३. पांडित्याच्या बडबडीनें काय करशील ? कारण त्यायोगानें थोर अभिमानी होशील ४. जर तुझे अंतःकरणांत मलिन दुर्बुद्धि आहे तर गायनाच्या कौशल्यानें काय करशील ? ५. तुकाराम महाराज म्हणतात, जर तूं देवाची भावानें (सात्त्विक श्रद्धेनें) सेवा केली नाहींस तर तूं देवाला मान्य होशील काय ? ६. [२०५४]

अंतरींचें गोड । राहे आवडीचें कोड ॥ १ ॥ संघटणें येती अंगा । गुणदोष मनोभंगा (मनभंगा) ॥ २ ॥ उचिताच्या कळा । नाहीं कळत सकळां ॥ ३ ॥ तुका म्हणे अभावना । भावीं मूळ तें पतना ॥ ४ ॥ [२०५५]

शिळा जया देव । तैसा फळे त्याचा भाव ॥ १ ॥ होय जतन तें गोड । अंतराय येती नाड ॥ २ ॥ देव जोडे भावें । इच्छेचें तें प्रेम घ्यावें ॥ ३ ॥ तुका म्हणे मोड दावी । तैशीं फळें आलीं व्हावीं ॥ ४ ॥ [२०५६]

कांसया जी ऐसा माझे माथां ठेवा । भार तुम्ही देवा संतजन ॥ १ ॥ विचित्र विंदानीं नानाकळा खेळे । नाचवी पुतळे नारायण ॥ २ ॥ काय वानरांची अंगींची ते शक्ति । उदका तरती वरी शिळा ॥ ३ ॥ तुका म्हणे करीं निमित्याचि आड । चेष्टवूनि जड दावी पुढें ॥ ४ ॥ [२०५७]

पायां पडावें हें माझें भांडवल । सरती हे बोल कोठें पायीं ॥ १ ॥ तरि हे सलगी कवतुक केलें । लडिवाळ धाकुलें असें बाळ ॥ २ ॥ काय उणें तुम्हां संतांचिये घरीं । विदित या परी सकळही ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी उचित हे सेवा । नये करूं ठेवाठेवी कांहीं ॥ ४ ॥ [२०५८]

वदवावी वाणी माझी कृपावंता । वाक्पुष्पें संतां समर्पीसी ॥ १ ॥ सर्व संकटांचा तुम्हां परिहार । घालावा म्यां भार पांडुरंगा ॥ २ ॥ एकसरें चित्त ठेवूनियां पायीं । जालों उतराई होतों तेणें ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें झालें अवसान । काया वाचा मन वेंचूनियां ॥ ४ ॥ [२०५९]

अंतःकरणांतील गोड जें श्रीहरिस्वरूप त्याच्या आवडीच्या इच्छेनें राहा (किंवा, प्रसन्न अंतःकरण असलेल्या माणसाच्या आवडीच्या इच्छा पूर्ण होतात) १. दुसऱ्याच्या संघटनानें मनोभंग करणारे गुणदोष हृदयांत उत्पन्न होतील. (लोकांशीं अधिक सलगी ठेविल्यानें आपल्या अंगीं गुण-दोषांचा संचार होतो व आपलें मनःस्वास्थ्य बिघडतें) २. योग्य ज्ञानकला (म्हणून दुर्जनाशीं कसें वागावें व सज्जनाशीं कसें वागावें, कोठें श्रद्धा ठेवावी, कोठें ठेवूं नये, हें) सर्वांना कळत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरि, संत आणि वेद ह्यांविषयींच्या भावांत अभावना (अश्रद्धा) होणें हेंच पतनाचें कारण आहे ४. [२०५५]

जो ज्या भावानें दगडास देव मानून त्याची सेवा करतो त्या भावनेप्रमाणें त्यास फळ मिळतें १. म्हणून भावाचें (सात्त्विक श्रद्धेचें) जतन करणें हेंच चांगलें. त्यामध्यें अंत पाडणारीं पुष्कळ विघ्नें येतात २. देव हा भावानेंच प्राप्त होतो व जसें ज्याचें आपणाविषयींचें प्रेम व इच्छा असेल तसें तो ग्रहण करतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या जातीचे वृक्षाचे अंकुर असतात तशींच त्याला फळें आलीं पाहिजेत. (ज्याची जशी श्रद्धा, तसें त्याला फळ मिळतें) ४. [२०५६]

तुम्ही संतजन देवपणाचें ओझें माझ्या मस्तकावर कशाकरितां ठेवतां? (तो थोरपणा माझ्या कर्तृत्वानें मिळालेला नसून ती नारायणाची कृपा आहे) १. भिन्न भिन्न चातुर्यानें व नानाप्रकारच्या कलांच्या क्रीडेनें एक नारायणच ह्या भौतिक सृष्टीस नाचवीत आहे २. समुद्रांतून लंकेंत जाण्याचे वेळीं, समुद्राचे पाण्यावर जो दगडाचा सेतु बांधला, त्या वेळीं पाण्यावर जे दगड तरले, ते काय वानरांच्या अंगांत असलेल्या शक्तीनें? (अर्थात् तो प्रभु रामचंद्राचा महिमा) ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव, निमित्ताला कोणाला तरी पुढें करून, तद्द्वारा सर्व जड सचेतन असें दाखवितो (जडाकडून क्रिया घडवितो) ४. [२०५७]

अहो संतजन हो, तुमच्या पायां पडावें हें माझें भांडवल आहे. स्तुतिपर शब्द तुमच्या स्वरूपीं कोठें खपतात? १. तरी मीं जो हा व्यवहार केला आहे तें सलगीनें कौतुक केलें आहे, कारण मी तुमचें लाडकें सर्वांमध्यें लहान बालक आहें २. तुम्हां संतांच्या घरीं कशाची उणीव आहे? तुम्हांला माझी सर्व परिस्थिति ठाऊकच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी ही योग्य सेवा आहे. हिच्या खरेखोटेपणाची आपण कांहीं वाटाघाट करूं नये (तुमच्या पायां पडावें हीच माझ्या अधिकाराच्या दृष्टीनें योग्य सेवा आहे. ह्या वांचून दुसरा सेवेचा प्रकार मी करूं शकत नाहीं) ४. [२०५८]

हे कृपावंता, माझ्या वाणींतून जीं वचनें निघतील तीं पुष्पाप्रमाणें संतांना समर्पण व्हावीं अशी तुम्ही माझी वाणी वदवा १. हे पांडुरंगा, मला जीं जीं संकटें येतील तीं तीं मी तुम्हांस सांगून आपला सर्व भार मीं तुमचेवर घालावा २. माझें चित्त तुमचे पायांचे ठिकाणीं एकदम ठेवून त्या योगानें मी उत्तीर्ण झालों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या काया-वाचा-मनाचा मी आपल्या पायांकडे व्यय केला आहे. ह्याच ठिकाणीं माझ्या कर्तव्याची सर्व समाप्ति झाली ४. [२०५९]

नमावे पाय हें माझें उचित। आशीर्वादें हित तुमचिया ॥ १ ॥ कृपेचा वोरस न समाये पोटीं। म्हणोनि उफराटीं वचनें हीं ॥ २ ॥ तुमची उष्टावळी हें माझें भोजन। झाडावें अंगण केरपुंजे ॥ ३ ॥ परि ऐसें पुण्य नाहीं माझे गांठीं। जेणें पडे मिठी पायांसवें ॥ ४ ॥ तुका म्हणे राहे आठवण चित्तीं। ऐसी कृपा संतीं केली तुम्हीं ॥ ५ ॥ [२०६०]

काय नाहीं माता गौरवीत बाळा। काय नाहीं लळा पाळीत ते ॥ १ ॥ काय नाहीं त्याची करीत ते सेवा। काय नाहीं जीवा गोमटें तें ॥ २ ॥ अमंगळपणें कांटाळा न धरी। उचलोनी करीं कंठीं लावी ॥ ३ ॥ लेववी आपुले अंगें अळंकार। संतोषा ये फार देखोनियां ॥ ४ ॥ तुका म्हणे स्तुति योग्य नाहीं परी। तुम्हां लाज थोरी अंकिताची ॥ ५ ॥ [२०६१]

माझीया मीपणावरी पडो पाषाण। जळो हें भूषण नाम माझें। पापा नाहीं पार दुःखाचे डोंगर। झालों ये भूमीसी ओझें ॥ १ ॥ काय विटंबना सांगों किती। पाषाण फुटती ऐसें दुःख। नरनारी सकळ उत्तम चांडाळ। न पाहती डोळां माझें मुख ॥ २ ॥ काया वाचा मनें अघटित करणें। चर्म चक्षु हात पाय ॥ निंदा द्वेष घात विश्वासीं व्यभिचार। आणीक सांगों किती काय ॥ ३ ॥ लक्ष्मीमदें मातें घडले बहुत दोष। पत्नी दोनी भेदाभेद ॥ पितृवचनीं घडली अवज्ञा अविचारी। कुटिल कुचर वादी निंद्य ॥ ४ ॥ आणीक किती सांगों ते अवगुण। न वळे जिव्हा कांपे मन ॥ भूतदया उपकार नाहीं शब्द धीर। विषयीं लंपट शब्दहीन ॥ ५ ॥ संत महानुभाव ऐका हें उत्तरें।

अहो संतजन हो, तुमचे पायीं नमन करावें हेंच माझें करणें योग्य आहे, कारण तुमच्या आशीर्वादानें माझें सर्व कल्याण होणार आहे १. तुम्हीं माझ्यावर कृपा केली आहे. तो आनंद माझ्या पोटांत मावत नाहीं. हीं उफराटीं उत्तरें माझ्या मुखांतून आलीं आहेत; अथवा, तुमच्या हृदयांत मजविषयींचें कृपाप्रेम मावेनासें झालें म्हणून मला मोठेपणा देण्याचे उलटे शब्द आपल्या मुखांतून निघाले २. तुमच्या उच्छिष्टाचें मीं भोजन करावें, आणि तुमचें आंगण झाडून केर जमा करून टाकून द्यावा, हें माझें काम आहे ३. परंतु ज्या योगानें आपल्या पायांशीं अखंड मिठी पडेल अशा प्रकारचें पुण्य माझे गांठीला नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या चित्तामध्यें देवाची आठवण राहावी अशा प्रकारची कृपा तुम्ही संतांनीं मजवर केली आहे (म्हणून मी धन्य झालों) ५. [२०६०]

आई आपल्या बाळाचा शृंगार अथवा त्याचा मोठेपणा वर्णन करीत नाहीं काय? आणि तें बालक जो हट्ट करील तो पुरवीत नाहीं काय? १. त्या बालकाची सेवा आई करीत नाहीं काय? आणि तें तिच्या जिवाला चांगलें आहे असें वाटत नाहीं काय? २. तें बालक जरी वाईट असलें तरी त्याचा कंटाळा न करितां, त्यास ती आपल्या हातानें उचलून कंठास लावते (आपल्या गळ्याशीं धरते, पोटाळते) ३. ती आई स्वतः आपल्या मुलाला दागिने घालते आणि त्याच्याकडे पाहून तिला फार आनंद होतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, अहो संतजन हो, तुमची स्तुति करावी अशी माझी योग्यता नाहीं, पण मी तुमचा सेवक असल्यामुळें माझी लाज तुम्हांला फार आहे ५. [२०६१]

माझ्या मीपणावर दगड पडो आणि दांभिकत्वाच्या भूषणानें माझें नांव वाढलें आहे त्याला आग लागो! कारण माझ्याजवळ अंत–पार नाहीं अशीं पातकें आहेत व दुःखाचे पर्वत मी भोगीत आहें. त्या योगानें ह्या पृथ्वीला माझा भार झाला आहे १. माझी फजिती किती होते तें मी काय सांगूं? माझें दुःखाचें गाऱ्हाणें ऐकून दगड देखील फुटतील. चांगले–वाईट स्त्रीपुरुष आहेत ते सर्व माझ्या तोंडाकडे डोळ्यांनीं पाहात देखील नाहींत २. माझ्या काया-वाचा-मनानें, हातापायांनीं व कातड्याच्या डोळ्यांनीं न घडावींत तीं कर्में घडत आहेत. म्हणजे निंदा, दुसऱ्याचा द्वेष, विश्वासघात आणि व्यभिचार इत्यादि सर्व लक्षणें माझ्या ठिकाणीं पूर्ण आहेत. आणखी किती म्हणून दुर्लक्षणें आहेत तीं काय सांगूं? ३. द्रव्याच्या मदानें उन्मत्त झाल्यामुळें मला महादोष घडले. मला दोन बायका आहेत म्हणून आवडती आणि नावडती असा भेदाभेद नेहमीं होत आहे. मीं बापाचा आज्ञाभंग केला व अविचारी, कुटिल, कुचर, वादी, निंद्य असा झालों ४. माझ्या ठिकाणीं आणखी जे अवगुण आहेत ते सांगण्यास तर जिव्हा वळत नाहीं आणि मन थरथरां कापतें. माझ्या ठिकाणीं भूतांविषयींची दया नाहीं, दुसऱ्यावर मीं कधींहि उपकार केले नाहींत. माझ्या शब्दाला स्थिरता नाहीं व मी विषयाचे ठिकाणीं इतका लंपट झालों आहें कीं, तें सांगण्याविषयीं माझें बोलणें कुंठित झालें ५.

अवगुण अविचार वृद्धि पापा। तुका म्हणे सरते करा पांडुरंगीं। शरण आलों मायबापा॥ ६॥ [२०६२]

प्रेम देवाचें देणें। देहभाव जाय जेणें। न धरावी मनें। शुद्धी देशकाळाची॥ १॥ मुक्त लज्जाविरहित। भाग्यवंत हरिभक्त। झाले वोसंडत। नामकीर्ति पवाडे॥ २॥ जोडी झाली अविनाश। जन्मोनि झाले हरिचे दास। त्यांस नव्हे गर्भवास। परब्रह्मीं सौरस॥ ३॥ हेचि वाहाती संकल्प। पुण्य प्रसंगाचे जप। तुका म्हणे पाप। गांवीं नाहीं हरिजनां॥ ४॥ [२०६३]

तोचि लटिक्यांमाजी भला। म्हणे देव म्यां देखिला॥ १॥ ऐशियाच्या उपदेशें। भवबंधन कैसें नासे॥ २॥ बुडवी आपणासरिसे। अभिमानें आणिकांस॥ २॥ आणिक नाहीं जोडा। देव म्हणवितां या (म्हणवितया) मूढा॥ ३॥ आणिकांचें न मनी साचें। तुका म्हणे या श्रेष्ठाचें॥ ४॥ [२०६४]

होईल जाला अंगें देव जो आपण। तयासी हे जन अवघे देव॥ १॥ येरांनीं सांगावी रेमट काहाणी। चित्ता रंजविणी करावया॥ २॥ धाला आणिकांची नेणे तान भूक। सुखें पाहे सुख आपुलिया॥ ३॥ तुका म्हणे येथें पाहिजे अनुभव। शब्दाचें गौरव कामा नये॥ ४॥ [२०६५]

कां न वजावें वैसोनि कथे। ऐसें ऐका हो श्रोते। पांडुरंग तेथें उभा असे तिष्ठत॥ १॥ म्हणऊनि करीं धीर। लक्ष लावूनि सादर। भवसिंधुपार। असेल ज्या तरणें॥ २॥ कथे कांहीं अणुमात्र। बोलावें हा वृत्तांत। देवभक्तां चित्त। समरसीं खंडणा॥ ३॥ कां वैष्णवां पूजावें।

तुकाराम महाराज म्हणतात, अहो संत महानुभव हो, मी अवगुणी आणि अविचारी असून पुढेंहि वरचेवर माझें पाप वाढतें आहे. हें माझें बोलणें तुम्ही ऐका. आतां अहो मायबापा, मी तुम्हांस शरण आलों आहें, म्हणून मी पांडुरंगाचे ठिकाणीं मान्य होईन, असें तुम्ही करा ६. [२०६२]

ज्या योगानें देहभाव नाहींसे होतात अशा प्रेमाची देणगी देवाची आहे. तें प्रेम ज्याचे ठिकाणीं आहे त्याचें मन हरीचें चिंतन करण्याविषयीं देशकालाची आठवण धरीत नाहीं १. असे जे हरीचे भक्त आहेत ते मुक्त होऊन लज्जेच्या वेगळे असतात आणि ते हरिनामकीर्तनानें पूर्ण भरलेले असतात म्हणून सर्वकाळ तेंच गाणें गातात, असे ते भाग्यवान् आहेत २. जन्माला येऊन हरीचे दास झाल्यामुळें, ज्यांना अविनाशपदाची प्राप्ति झाली आहे, ते परब्रह्माचे ठिकाणीं आनंदानें असतात. त्यांना पुनर्जन्म नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या योगानें खरें पुण्य मिळतें असे जप करण्याविषयीं त्यांचें अंतःकरण संकल्प करीत असतें, आणि पाप तर हरिभक्तांच्या गांवींहि नसतें [कोणत्याहि पापाचा प्रसंग त्यांचे ध्यानीं मनीं नाहीं] ४. [२०६३]

जो कोणी 'मीं देव पाहिला' म्हणून लोकांस सांगतो, तो सर्व लबाडांमध्यें शिरोमणि आहे असें समजावें १ असा अभिमान ज्याचे चित्तांत आहे तो आपण भवसमुद्रांत बुडून दुसऱ्यासहि बुडवितो; मग अशाच्या उपदेशानें संसारबंधन कसें नाहींसें होईल ? २. जो कोणी मीच देव आहें असें लोकांस सांगतो, त्या मूढाच्या जोडीला दुसरा कोणी नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो दांभिक दुसऱ्या कोणाचें खरें मानीत नाहीं, त्यास श्रेष्ठांनीं (साधुसंतांनीं) जरी सांगितलें तरी तो ऐकत नाहीं ४. [२०६४]

जो कोणी स्वतः (हरि-गुरुकृपेनें) देव झाला आहे त्याला सर्व जग देवरूप दिसतें १. त्यावांचून इतरांनीं तर दुसऱ्याचें चित्त रंजविण्याकरितां मूर्खपणानें कांहींतरी कथा सांगावी २. जो आपण तृप्त झाला आहे तो दुसऱ्याची तहानभूक जाणत नाहीं. आपण जसे सुखी आहोंत तसे दुसरे लोक सुखी आहेत असें तो पाहातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं (अशा मुक्त पुरुषाला) देवाचा खरा अनुभव पाहिजे; त्यावांचून कोरड्या शब्दांचा गौरव केल्यानें कांहीं उपयोग होत नाहीं ४. [२०६५]

अहो कथाश्रवण करणारे जन हो, हरिकथेच्या ठिकाणीं बसलें असतां उठून कां जाऊं नये त्याविषयीं मी सांगतों तें ऐका. त्या ठिकाणीं कथेची आवड असल्यामुळें पांडुरंग तिष्ठत उभा असतो (म्हणून कोणी उठून जाऊं नये) १. ज्यांना भवसमुद्रांतून तरून पलीकडे जावयाचें असेल त्यांनीं ह्या हरिकथेच्या ठिकाणीं मोठ्या प्रीतीनें लक्ष लावून धीर धरून बसावें २. त्या कथेच्या ठिकाणीं कांहीं अणुमात्र देखील दुसऱ्या गोष्टी बोलूं नयेत, कारण देवाचें आणि भक्ताचें एकचित्त

ऐका घेईल जो भावें । चरणरजा शिवें । वोड (ढ) विला मस्तक ॥ ४ ॥ ऐसें जाणा हो निभ्रांत । देव वैष्णवांचा अंकित । अलिप्त अतीत । पर(रि)मित त्यासाठीं ॥ ५ ॥ घालोनि लोळणी । तुका आला लोटांगणीं । वंदी पायवणी । संतचरणींचें माथां ॥ ६ ॥ [२०६६]

अनुभवें आलें अंगा । तें या जगा देतसें ॥ १ ॥ नव्हती (हाततुके) आहाचतुके बोल । मूळ ओल अंतरींची ॥ २ ॥ उतरूनी दिलें कशीं । शुद्धरशीं सरतें ॥ ३ ॥ तुका म्हणे दुसरें नाहीं । ऐसी ग्वाही गुजरली ॥ ४ ॥ [२०६७]

साधकाची दशा उदास असावी । उपाधि नसावी अंतर्बाहीं ॥ १ ॥ लोलुप्यता काय निद्रेसी जिंकावें (निद्रेतें जिणावें) । भोजन करावें परिमित ॥ २ ॥ एकांतीं लोकांतीं स्त्रियांशीं भाषण । प्राण गेल्या जाण बोलों नये ॥ ३ ॥ संग सज्जनांचा उच्चार नामाचा । घोष कीर्तनाचा अहर्निशीं ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐशा साधनीं जो राहे । तोचि ज्ञान लाहे गुरुकृपा ॥ ५ ॥ [२०६८]

अंतरींची ज्योती प्रकाशली दीप्ति । मुळींची जे होती आच्छादिली ॥ १ ॥ तेथींचा आनंद ब्रह्मांडीं न समाये । उपमेशीं काय देऊं सुखा ॥ २ ॥ भावाचें मथिलें निर्गुण संचलें । तें हें उभें केलें विटेवरी ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां ब्रह्मांड पंढरी । प्रेमाची जे थोरी सांठवण ॥ ४ ॥ [२०६९]

कासया गा मज घातलें संसारीं । चित्त पायांवरी नाहीं तुझ्या ॥ १ ॥ कासया गा मज घातलें या जन्मा । नाहीं तुझा प्रेमा नित्य नवा ॥ २ ॥ नामाविण माझी वाचा अमंगळ । ऐसा कां चांडाळ निर्मियेलों ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी जळो जळो काया । विठ्ठला सखया वांचूनियां ॥ ४ ॥ [२०७०]

झालेलें असतें त्या समरसाचा बिघाड होतो ३. वैष्णवांची पूजा कां करावी असें कोणी म्हणाल तर भावानें जो ग्रहण करील त्याला मी सांगत आहें तें ऐका. ज्या वैष्णवांच्या चरणधुळींची प्राप्ति व्हावी म्हणून सदाशिवानें आपलें मस्तक पुढें केलें आहे असे ते वैष्णव श्रेष्ठ आहेत म्हणून त्यांना पुजावें ४. जो देव सर्व ब्रह्मांड उत्पन्न करून त्यांत लिप्त न होतां सर्वांहून वेगळा आहे तो वैष्णवांकरितां मर्यादित होऊन त्यांचा आज्ञाधारक झाला आहे ह्यांत संशय नाहीं हें तुम्ही निश्चयानें समजा ५. तुकाराम महाराज म्हणतात, ते वैष्णव ज्या ठिकाणीं राहातात, त्या ठिकाणीं मी नमस्कार घालून तेथें लोळत आहें आणि त्या संतांचे पाय धुऊन तें तीर्थ मस्तकानें वंदन करतों ६. [२०६६]

ज्याचा माझ्या अंगीं अनुभव आला आहे तेंच मी सर्व लोकांस सांगत आहें १. हे माझे शब्द पोकळ व्यर्थ असे नव्हेत, माझ्या अंतःकरणांतील मूळच्या खऱ्या जिव्हाळ्यानें ज्ञान उत्पन्न झालें आहे २. हे शब्द कसोटीला लावून खरे, शुद्ध रसभरित आहेत असें सिद्ध करून मी तुम्हांस दिले आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यावांचून दुसरें कांहीं करणें नको अशी साक्ष देऊन मीं हे सादर केले आहेत (त्या शब्दांनींच देवाची प्राप्ति होणार आहे.) [२०६७]

परमार्थाचा अभ्यास (साधनें) करणाऱ्या साधकाची स्थिति (संसाराविषयीं) उदास असली पाहिजे आणि अंतरबाह्य (अंतःकरणांत कामक्रोधादिकांची व बाहेर स्त्रीपुरुषादिकांची) कोणत्याहि प्रकारची उपाधि नसली पाहिजे १. संसारांत सक्त न होतां निद्रेस जिंकावें आणि अल्पाहार करावा २. एकांतामध्यें अगर लोकांच्या देखतहि प्राणावर जरी संकट आलें तरी स्त्रियांबरोबर भाषण करूं नये हें लक्षांत ठेवा ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा साधनानें जो कोणी राहील ४. त्याच्यावर गुरूची कृपा होऊन त्याला हरीच्या स्वरूपज्ञानाची प्राप्ति होईल ५. [२०६८]

अंतःकरणामध्यें हरीच्या स्वरूपाचा प्रकाश आरंभीं अज्ञानानें आच्छादित होता तोच प्रगट झाला १. त्या योगानें तो आनंद ब्रह्मांडांत मावेनासा झाला आणि जें मला सुख झालें आहे त्याला उपमा देण्यास दुसरें कांहीं मिळत नाहीं २. जें निर्गुणरूपानें असणारें तें एकनिष्ठभावानें मंथन करून सगुणस्थितीस आणलें व प्रत्यक्ष विटेवर उभें केलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, पंढरी हेंच आमचें ब्रह्मांड आहे, त्या ठिकाणीं थोर प्रेमाची सांठवण आहे ४. [२२६९]

अगा देवा, जर माझें चित्त तुझ्या पायांच्या ठिकाणीं नाहीं, तर मला ह्या संसारांत कशाला उत्पन्न केलेंस ? १. तुझें नित्य नवें प्रेम माझ्या हृदयांत नाहीं, तर मला कशाकरितां जन्म दिलास ? २. तुझ्या नामस्मरणावांचून माझी वाचा अमंगळपणें राहात आहे मग असला चांडाळ तुम्हीं कां निर्माण केला ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, विठ्ठल माझा सखा जर होत नाहीं तर माझ्या शरीराला आग लागो (असें द्विवार सांगतों) ४. [२०७०]

प्रारब्धेंचि जोडे धन । प्रारब्धेंचि वाढे मान ॥ १ ॥ सोस करिसी वायां । भज मना पंढरीराया ॥ २ ॥ प्रारब्धेंचि होय सुख । प्रारब्धेंचि पावे दुःख ॥ ३ ॥ प्रारब्धेंचि भरे पोट । तुका करीना बोभाट ॥ ४ ॥ [२०७१]

हीन माझी याति । वरि स्तुती केली संतीं ॥ १ ॥ अंगीं वसूं पाहे गर्व । माझें हरावया सर्व ॥ २ ॥ मी एक जाणता । ऐसें वाटतसे चित्ता ॥ ३ ॥ राख रोख (राख) गेलों वायां । तुका म्हणे पंढरीराया ॥ ४ ॥ [२०७२]

माता कापी गळा । तेथें कोण राखी बाळा ॥ १ ॥ हें कां नेणां नारायणा । मज चाळवितां दीना ॥ २ ॥ नागवी धांवणें । तेथें साह्य व्हावें कोणें ॥ ३ ॥ राजा सर्व हरी । तेथें दुजा कोण तारी (वारी) ॥ ४ ॥ तुझ्या केल्याविण । स्थिर वश नव्हे मन ॥ ५ ॥ तुका म्हणे हरी । सूत्र तुम्हां (तुझ्या) हातीं दोरी ॥ ६ ॥ [२०७३]

गाऊं नेणें परी मी कांहीं गाईन । शरण जाईन पांडुरंगा ॥ १ ॥ ब्रह्मांडनायक मी त्याचा अंकित । काय यमदूत करिती काळ ॥ २ ॥ वेश्या ज्याच्या नामें तारिली गणिका । अजामेळासारिखा पापरासी ॥ ३ ॥ चरणींच्या रजें अहिल्या तारिली । रूपवंत केली कुबजा दासी ॥ ४ ॥ पृथिवी तारिली पाताळाशीं जातां । तुका म्हणे आतां आम्ही किती ॥ ५ ॥ [२०७४]

गाजराची पुंगी । तैसे नवे झाले जोगी ॥ १ ॥ काय करोनि पठन । केली अहंता जतन ॥ २ ॥

ज्याचें प्रारब्धकर्म जसें असेल तसें त्याला द्रव्य मिळतें व त्याचप्रमाणें मान वाढतो १. अरे माझ्या मना, तूं पंढरीरायाचें भजन कर. त्यावांचून व्यर्थ हांव करूं नको २. आपणास सुख होणें अथवा दुःख होणें हें प्रारब्धकर्माचे स्वाधीन आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसें प्रारब्धकर्म असेल तसें आपलें पोट भरेल. त्यासंबंधानें मी व्यर्थ कोणाला गाऱ्हाणें सांगत नाहीं ४. [२०७१]

माझी जात अगोदरच कनिष्ठ आहे आणि त्यावर संतांनीं माझी भरमसाट स्तुति केली १. त्या योगानें (पारमार्थिक) सर्वस्व हरण करणाऱ्या गर्वाची वस्ती माझ्या अंगामध्यें होऊं पाहात आहे २. सर्व लोक वेडे आहेत आणि मीच एक शहाणा आहें असें माझ्या मनाला वाटत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीराया, आतां मी सर्वतोपरी वायां गेलों आहें, म्हणून माझें तूं रक्षण कर (असें द्विवार विनवितों) ४. [२०७२]

आई आपल्या बालकाचा गळा कापील तर त्या ठिकाणीं त्याचें रक्षण कोणीं करावें? १. हे नारायणा, असें तुम्ही कां समजत नाहीं आणि मज गरिबाला उगीच चाळवाचाळवी कां करतां? २. एखाद्यानें आडरानामध्यें भय वाटल्यामुळें दुसऱ्याचा धांवा केला. तें ऐकून जर धांवून येणारांनीं त्यास लुटलें तर त्याचें रक्षण कोणीं करावें? ३. पृथ्वीचें पालन करणारा राजा तो जर प्रजेचें सर्वस्व हरण करील तर त्याचें निवारण दुसरें कोण करील? ४. हे देवा, माझें मन चपळ आहे तें तुम्हीं स्थिर केल्याशिवाय आम्हांला तें वश होणार नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे हरि, सर्व ब्रह्मांडास चलनवलन करण्याचें सूत्र तुमच्या स्वाधीन आहे ६. [२०७३]

मला सुस्वरानें कांहीं गातां येत नाहीं पण मी हरीस कसा तरी गाईन आणि त्या पांडुरंगास शरण जाईन १. जो देव सकळ ब्रह्मांडाचा स्वामी आहे त्याचा मी सेवक झालों आहें म्हणून यमदूत अथवा काळ हे मला काय करतील? २. ज्याच्या नामानें पिंगला नामक वेश्येचा उद्धार झाला आणि सर्व पापांची राशी जो अजामिळ त्यालाहि आपल्या नांवाकरितां देवांनीं तारलें ३. अहिल्या ही शापानें दगड झाली होती. तिला देवाच्या चरणाचे रजःकण लागल्याबरोबरच तिचा उद्धार झाला आणि कुब्जा नांवाची दासी कुरूप होती ती देवांनीं अति सुंदर केली ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या वेळीं हिरण्याक्ष दैत्यानें पृथ्वी पाताळास नेली होती त्या वेळीं ज्या देवानें त्याला मारून पृथ्वीचें रक्षण केलें, त्यापुढें आम्ही कितीसे आहोंत? (आम्हांला तारणें त्या देवाला अशक्य आहे काय?) ५. [२०७४]

जशीं मुलें वाजविण्याकरितां गाजराची पुंगी करितात आणि ती थोड्या वेळानें खाऊन टाकतात, तशा प्रकारचे बाह्य वेष घेणारे (स्वधर्माचरण, हरिभक्ति, गुरुसेवा न करणारे) नवीन साधु झाले आहेत १. त्यांनीं जर देह-अहंतेचें रक्षण

अल्प असे ज्ञान । अंगीं ताठा अभिमान ॥ ३ ॥ तुका म्हणे लंड । त्याचें हाणोनि फोडा तोंड ॥ ४ ॥ [२०७५]

परद्रव्य परनारी । अभिलासूनि नाक धरी ॥ १ ॥ जळो तयाचा आचार । व्यर्थ भार वाहे खर ॥ २ ॥ सोंवळ्याची स्फीति । क्रोधें विटाळला चित्तीं ॥ ३ ॥ तुका म्हणे सोंग । दावी बाहेरील रंग ॥ ४ ॥ [२०७६]

टिळा टोपी उंच दावी । जगीं मी एक गोसावी ॥ १ ॥ अवघा वरपंग सारा । पोटीं विषयांचा थारा ॥ २ ॥ मुद्रा लाविती कोरोनि । मान व्हावयासी जनीं ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसे किती । नरका गेले पुढें जाती ॥ ४ ॥ [२०७७]

ऐसे संत झाले कलीं (ळीं) । तोंडीं तमाखूची नळी ॥ १ ॥ स्नानसंध्या बुडविली । पुढें भांग ओ (वो) ढवली ॥ २ ॥ भांगभुर्का हें साधन । पचीं पडे मद्यपान ॥ ३ ॥ तुका म्हणे अवघें सोंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥ ४ ॥ [२०७८]

जातीची शिंदळी । तिला कोण कैसा वळी ॥ १ ॥ आपघर वा (ना) बापघर । चिंती मनीं व्याभिचार ॥ २ ॥ सेजे असोनियां धनी । परद्वार मना आणी ॥ ३ ॥ तुका म्हणे अस्सल जाती । जातीसाठीं खाती माती ॥ ४ ॥ [२०७९]

अंधळ्याची काठी । हिरोनियां कडा लोटी ॥ १ ॥ हें कां देखण्या उचित । लाभ किंवा कांहीं हित ॥ २ ॥ चाळवूनि हातीं । साकर म्हणोनि द्यावी माती ॥ ३ ॥ तुका म्हणे वाटे । देवा पसरावे सराटे ॥ ४ ॥ [२०८०]

केलें आहे तर ग्रंथांचा अभ्यास करून काय उपयोग आहे? २. अंगामध्यें ज्ञान थोडेंच असतें पण अभिमानानें मोठे ताठरलेले असतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचे जे कोणी लंड—अधम आहेत त्यांचें तोंड हाणून फोडावें ४. [२०७५]

जे कोणी दुसऱ्याचें द्रव्य मिळावें आणि परस्त्रीचा भोग घ्यावा अशी इच्छा मनांत धरून अनुष्ठानाच्या (प्राणायामाच्या) निमित्तानें नाक धरून बसतात १. असल्या गाढवानें ज्ञानाचें ओझें व्यर्थ वागविलें आहे म्हणून त्याच्या आचारास आग लागो २. सर्व काळ ज्याचें चित्त क्रोधरूपी मांगानें विटाळलें आहे आणि जो बाह्यात्कारीं मोठी सोंवळेपणाची वागणूक करितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच्या अंतःकरणांत मुळींच खरा भाव नसून बाहेरील रंगानें तो लोकांस परमार्थाचें सोंग दाखवितो. ४. [२०७६]

सर्व अंगावर द्वादश टिळे लावून मस्तकावर उंच टोपी घालून लोकांना दाखवितो आणि ह्या जगामध्यें गोसावी एक मीच आहें असें सांगतो १. त्याचे हृदयांत विषयाची वस्ती असून हा बाह्यात्कारीं साधुपणाचा सर्व पसारा घालतो २. आपला मान जनामध्यें वाढावा ह्याकरितां कोरून मुद्रा लावितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचे कित्येक लोक पूर्वी नरकास गेले व पुढेंहि जातील ४. [२०७७]

सर्वकाळ तमाखू भरून गुडगुडी ओढावी, अशा प्रकारचे संत ह्या कलियुगामध्यें झाले आहेत १. त्यांनीं स्नानसंध्यादि आचार बुडवून पुढें भांग ओढण्याची प्राप्ति करून घेतली आहे २. भांग वाटून पिणें व कोरडी फकी—भुकटी खाणें हें त्यांचें साधन आहे आणि दारू पिणें तर त्यांच्या पचनीं पडलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे सर्व सोंगाडे लोक आहेत. त्या ठिकाणीं पांडुरंग कसला आहे ? ४. [२०७८]

जी स्त्री जातीची शिंदळ आहे तिची समजूत करून तिला कोण कसा वळवील? १. ती आपल्या घरीं असो अगर बापाचे घरीं असो, तिचें चिंतन नेहमीं मनामध्यें व्यभिचार करण्याचें असतें २. ती जरी आपल्या नवऱ्याचे जवळ निजलेली असते तरी तिच्या मनामध्यें परक्या पुरुषाचें ध्यान असतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जी कोणी खऱ्या जातीची आहे ती आपल्या जातीसाठीं माती खाऊन काळ काढिते (म्हणजे पतिव्रतापणानें राहाते) ४. [२०७९]

हे देवा, आंधळयाच्या हातांतील काठी हिसकावून त्याला डोंगरावरून ढकलून द्यावें १. हें करणें डोळसास योग्य आहे काय हें सांगा आणि त्या करण्यापासून कांहीं लाभ अगर हित होतें काय? २. अरे अंधा, ही साखर घे असें म्हणून त्याच्या हातांत माती द्यावी, असें फसविणें योग्य आहे काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, चांगल्या वाटेवर सराटे (कांटे) हांतरावे (तसें कर्तव्य तुम्ही आम्हांस करतां) ४. [२०८०]

प्रीतीचिया बोला नाहीं पेंचपाड। भलतैसें गोड करुनि घेई ॥ १ ॥ तैसें विठ्ठलराया तुज मज आहे। आवडीनें गायें नाम तुझें ॥ २ ॥ वेडे वांकडे बाळकाचे बोल। करिती नवल मायबाप ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज येवो माझी दया। जीवींच्या सखया जिवलगा ॥ ४ ॥ [२०८१]

माझे मज कळों येती अवगुण। काय करूं मन अनावर ॥ १ ॥ आतां आड उभा राहें नारायणा। दयासिंधुपणा साच करीं ॥ २ ॥ वाचा वदे परी करणें कठीण। इंद्रियां आधीन झालों देवा ॥ ३ ॥ तुका म्हणे तुझा जैसा तैसा दास। न धरीं उदास मायबापा ॥ ४ ॥ [२०८२]

वर्णावी ते थोरी एका विठ्ठलाची। कीर्ति मानवाची सांगूं नये ॥ १ ॥ उदंडचि झाले जन्मोनियां मेले। होवोनियां गेले राव रंक ॥ २ ॥ त्यांचें नाम कोणी नेघे चराचरीं। साही वेद चारी वर्णिताती ॥ ३ ॥ अक्षय अढळ चळेना ढळेना। तया नारायणा ध्यात जावें ॥ ४ ॥ तुका म्हणे तुम्ही विठ्ठल चित्तीं ध्यातां। जन्ममरण व्यथा दूर होती ॥ ५ ॥ [२०८३]

नको देऊं देवा पोटीं हें संतान। मायाजाळें जाण नाठवसी ॥ १ ॥ नको देऊं देवा द्रव्य आणि भाग्य। तो एक उद्वेग होय जीवा ॥ २ ॥ तुका म्हणे करीं फकिराचे परी। रात्रंदिवस हरि येईल वाचे ॥ ३ ॥ [२०८४]

जोडोनियां धन उत्तम वेव्हारें। उदास विचारें वेंच करी ॥ १ ॥ उत्तमचि गती तो एक पावेल। उत्तम भोगील जीव खाणी ॥ २ ॥ परउपकारी नेणे परनिंदा। परस्त्रिया सदा बहिणी माया ॥ ३ ॥ भूतदया गाई पशूंचें पालन। तान्हेल्या जीवन वनामाजीं ॥ ४ ॥ शांतिरूपें नव्हे

जें बालकाचें बोलणें आवडीचें असतें त्या वचनांत कांहीं पेंच नसून तें योग्य नसतें पण ते भलते शब्द आवडल्यामुळें आईबाप गोड करून घेतात १. हे विठोबाराया, तसा प्रकार तुझ्या माझ्यामध्यें आहे, कारण मी तुझें नाम आवडीनें गातों (तें तूं गोड मानून घे) २. जरी बालकाचें बोलणें वेडेंवांकडें असलें तरी त्याचे आईबाप कौतुक मानून नवल करितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे जिवलगा, तूं माझ्या जिवाचा सखा आहेस, म्हणून तुला माझी दया येऊं दे ४. [२०८१]

माझे वाईट गुण मला समजतात, पण माझें मन अनावर आहे त्याला काय करूं ? १. हे नारायणा, तूं आपलें दया-सिंधुपणाचें नांव खरें करण्यासाठीं माझ्या मनाच्या आड उभा राहा २. मी वाचेनें बोलत आहें पण इंद्रियांचे स्वाधीन झाल्यामुळें त्या बोलण्याप्रमाणें माझें वागणें होत नाहीं (तें कठिण आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे मायबापा, तुझा मीं जसा तसा (गुणी असों वा अवगुणी असों) दास झालों आहें म्हणून माझी निराशा करूं नका ४. [२०८२]

एका विठोबारायाचा थोरपणा वर्णन करावा. त्यावांचून इतर मानवांचा बडिवार सांगू नये १. मागें पुष्कळ थोर थोर राजे झाले व सेवकहि झाले. ते जन्माला येऊन कांहीं दिवस जगून मरून गेले २. परंतु ह्या चराचर जगतामध्यें त्यांच्या नांवाचा जप कोणी करीत नाहीं आणि सहा शास्त्रें, चार वेद श्रीहरीची कीर्ति वर्णन करितात ३. ज्याला नाश नाहीं आणि जो चळणारा, ढळणारा नाहीं असा अढळ आहे त्या नारायणाचें ध्यान मनानें सर्वकाळ करावें ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही जर आपल्या चित्तामध्यें विठोबाचें ध्यान कराल तर तुम्ही जन्ममरणाचे व्यथेपासून सुटाल ५. [२०८३]

हे देवा, मी मायाजाळांत पडलों तर तुझी आठवण होणार नाहीं ह्याकरितां माझे पोटीं संतति होऊं देऊं नको १. हे देवा, मी जर द्रव्याच्या योगानें भाग्यवंत झालों तर माझ्या जीवाला त्याविषयींची चिंता वाढेल ह्याकरितां मला तसलें भाग्य देऊं नको २. तुकाराम महाराज म्हणतात, मला फकिरासारखें (दरिद्री) कर म्हणजे रात्रंदिवस तुझें नाम माझे वाचेला येईल ३. [२०८४]

अहो जन हो, तुम्ही चांगला व्यापार करून द्रव्य मिळवा आणि त्याचा खर्च उदासीन विचारानें करा १. असा जो करील त्याला उत्तम गति मिळेल आणि चांगल्या मनुष्ययोनीमध्यें जन्म घेऊन उत्तम भोग भोगील २. दुसऱ्यावर नेहमीं उपकार करतो व दुसऱ्याची निंदा करण्याचें जाणत नाहीं आणि परस्त्रिया आपल्या आईबहिणींसारख्या सर्व काळ मानतो ३. सर्वभूतांचे ठिकाणीं दया करून गाई वगैरे पशूंचें पालन करतो आणि तृषित लोकांना अरण्याचे ठिकाणीं

कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचें ॥ ५ ॥ तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥ ६ ॥ [२०८५]

हरि म्हणतां गति पातकें नासती । कळिकाळ कांपती हरि म्हणतां ॥ १ ॥ हरि म्हणतां भुक्ति हरि म्हणतां मुक्ति । चुके यातायाती हरि म्हणतां ॥ २ ॥ तपें अनुष्ठानें न लागती (लगती) साधनें । तुटती बंधनें हरि म्हणतां ॥ ३ ॥ तुका म्हणे भावें जपा हरिचें नाम । मग काळ यम शरण तुम्हां ॥ ४ ॥ [२०८६]

नये वाटूं मन । कांहीं न देखावें भिन्न ॥ १ ॥ पाय विठोबाचे चित्तीं । असों द्यावे दिवसराती ॥ २ ॥ नये काकुळती । कोणा यावें हरिभक्ति ॥ ३ ॥ तुका म्हणे साई । करील कृपेची विठाई ॥ ४ ॥ [२०८७]

सकळ देवांचें दैवत । उभें असे या रंगा आंत (रंगांत) ॥ १ ॥ रंग लुटा माझे बाप । शुद्ध भाव खरें माप ॥ २ ॥ रंग लुटिला बहुतीं । शुक नारदादि संतीं ॥ ३ ॥ तुका लुटितां हे (लुटिताहे) रंग । साह्य झाला पांडुरंग ॥ ४ ॥ [२०८८]

उशीर कां केला । कृपाळुवा जी विठ्ठला ॥ १ ॥ मज दिलें कोणा हातीं । काय मानिली निश्चिंती ॥ २ ॥ कोठवरी धरूं धीर । आतां मन करूं स्थिर ॥ ३ ॥ तुका म्हणे जीव । ऐसी भाकीतसे कींव ॥ ४ ॥ [२०८९]

तुका वेडा अविचार । करी बडबड फार ॥ १ ॥ नित्य वाचे हाचि छंद । राम कृष्ण हरि गोविंद ॥ २ ॥ धरी पांडुरंगीं भाव । आणिक नेणे दुजा देव ॥ ३ ॥ गुरुज्ञान सर्वां ठायीं । दुजें न विचारी कांहीं ॥ ४ ॥ बोल नाइके कोणाचे । कथे नागवाचि नाचे ॥ ५ ॥ संग उपचारें कांटाळे ।

पाणी पिण्याकरितां आड, विहिरी यथाशक्ति (निर्माण) करतो ४. आपली वृत्ति शांत असून कोणाशीं वाईटपणानें वागत नाहीं व आपल्याहून जे श्रेष्ठ आहेत त्यांची महती वाढवितो ५. तुकाराम महाराज म्हणतात, गृहस्थाश्रमाचें हेंच मुख्य फळ आहे आणि परमपदप्राप्तीला (मोक्षाला) जें वैराग्याचें बळ लागतें तेंहि हेंच ६. [२०८५]

हरिनामाचा उच्चार केल्याबरोबर सर्व पापांचा नाश होऊन उत्तम गति मिळते आणि त्या नामोच्चारानें कळिकाळ थरथरां कांपतो १. जर मुखानें हरि म्हटलें तर सर्व भोग मिळतात व हरिनामाच्या उच्चारानें मुक्ति मिळते व त्याच उच्चारानें सर्व खटाटोप नाहींसा होतो २. हरिनामाचा उच्चार केल्याबरोबर सर्व संसारबंधनें तुटतील. त्यावांचून तपानुष्ठानादि साधनें करण्याचें कांहीं कारण नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो जन हो, तुम्ही भावानें हरिनामाचा जप करा, मग तुम्हांला यम काळ शरण येईल ४. [२०८६]

एक विठोबारायावांचून कांहीं वेगळें पाहूं नये व मनहि इतरांकडे वाटूं नये (पंच विषयांकडे मनाला फांकूं देऊं नये) १. रात्रंदिवस आपल्या चित्तामध्यें विठोबाच्या पायांची आठवण करावी २. असे जे हरीचे दास आहेत त्यांनीं हरीवांचून दुसरे कोणाला काकुळती येऊं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या योगानें विठाबाई आपले कृपेची सावली करील ४. [२०८७]

जें सकल देवांचें दैवत आहे तें या कीर्तनरंगामध्यें उभें आहे १. माझे बाप हो, शुद्धभावाचें खरें माप आणून तुम्ही हा रंग लुटा २. शुक-नारदादिकरून पुष्कळ संतांनीं पूर्वीं हाच रंग लुटला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मीहि हाच रंग लुटीत आहें, म्हणून मला पांडुरंग साहाय्य झाला ४. [२०८८]

अहो जी कृपाळु विठ्ठला, मला भेट देण्याविषयीं तुम्हीं उशीर कां लाविला आहे ? १. मला तुम्हीं कोणाच्या स्वाधीन केलेंत व कां म्हणून निष्काळजी झालां आहांत ? २. कोठपर्यंत मी धीर धरूं व आपलें मन स्थिर करूं ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, माझा जीव अशा प्रकारें तुम्हांस काकुळती येत आहे (करुणा भाकीत आहे) ४. [२०८९]

तुका वेडा आणि अविचारी आहे. तो फार बडबड करतो १. त्याच्या वाणीस 'रामकृष्ण हरि गोविंद' ह्याच नामाचा नित्य छंद लागला आहे २. एका पांडुरंगाचेच ठिकाणीं श्रद्धा ठेवतो व त्यावांचून दुसरा देव जाणत नाहीं ३. गुरूपासून प्राप्त झालेल्या ज्ञानानें परमात्मा सर्व ठिकाणीं आहे हेंच तो समजतो. त्यावांचून दुसरा कांहीं विचार करीत नाहीं ४. कोणाचे कांहीं शब्द ऐकत नाहीं व हरिकथेंत नागवा नाचतो ५. कोणत्याहि सुखोपभोगाचा त्यास कंटाळा आहे.

सुखें भलते ठायीं लोळे ॥ ६ ॥ कांहीं उपदेशिलें नेणे । वाचे विठ्ठल विठ्ठल म्हणे ॥ ७ ॥ केला बहुतीं फजित । तरी हेंचि करी नित्य ॥ ८ ॥ अहो पंडित जन । तुका टाकावा थुंकोन ॥ ९ ॥ [२०९०]

आली सिंहस्थपर्वणी । न्हाव्या भटा झाली धणी ॥ १ ॥ अंतरीं पापाच्या कोडी । वरिवरि बोडी डोई दाढी ॥ २ ॥ बोडिलें तें निघालें । काय पालटलें सांग पहिलें (वहिलें) ॥ ३ ॥ पाप गेल्याची काय खूण । नाहीं पालटले अवगुण ॥ ४ ॥ भक्तिभावेंविण । तुका म्हणे अवघा सीण ॥ ५ ॥ [२०९१]

तुज घालोनीयां पूजितों संपुटीं । परि तुझ्या पोटीं चौदा भुवनें ॥ १ ॥ तुज नाचूनि दाखवूं कौतुका । परि रूप रेखा नाहीं तुज ॥ २ ॥ तुजलागीं आम्ही गात असों गीत । परि तूं अतीत शब्दाहूनि ॥ ३ ॥ तुजलागीं आम्हीं घातियेल्या माळा । परि तूं वेगळा कर्तृत्वासी ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां होऊनि परिमित । माझें कांहीं हित विचारावें ॥ ५ ॥ [२०९२]

पापाची मी राशी । सेवाचोर पायांपाशीं ॥ १ ॥ करा दंड नारायणा । माझ्या मानाची खंडणा ॥ २ ॥ जनांहातीं सेवा । घेतों लंडपणें देवा ॥ ३ ॥ तुझा ना(देव ना) संसार । तुका दोहींकडे चोर ॥ ४ ॥ [२०९३]

दुडीवरी दुडी । चाले मोकळी गुजरी ॥ १ ॥ ध्यान लागो ऐसें हरी । तुज चरणीं तैशापरी ॥ २ ॥ आवंतण्याची आस । जैसी लागे दुर्बळास ॥ ३ ॥ लोभ्या कळांतराची आस । बोटें मोजी दिवस मास ॥ ४ ॥ तुका म्हणे पंढरीनाथा । मजला आणिक नको व्यथा ॥ ५ ॥ [२०९४]

पाहिजे त्या ठिकाणीं आनंदानें तो लोळतो ६. दुसऱ्यानें कोणीं कांहीं उपदेश केला तरी तो न जाणतां वाचेनें 'विठ्ठल विठ्ठल'च म्हणतो ७. ह्याबद्दल पुष्कळांनीं त्याला फजीत केला तरी वर सांगितलेला व्यवहारच तो नेहमीं करतो ८. तुकाराम महाराज सांगतात, अहो पंडितजन हो, असला वेडा तुका तुम्ही थुंकून टाका (वेडा आहे म्हणून त्याची उपेक्षा करा) ९. [२०९०]

सिंहस्थपर्वणी आल्यानें गोदातटाकावरील क्षेत्रस्थ भटांची व न्हाव्यांची चंगळ उडते (त्यांना खूप पैसा मिळतो) १. अंतःकरणांत कोटयावधि पापांचे थर आहेत असें असतांना वरवर दाढी डोकी मुंडल्यानें काय होणार? २. ज्यांचें तूं मुंडन केलेंस ते केस निघाले, असें असतांना मुंडन करण्यानें तुझ्या अंगच्या अवगुणांत काय बदल झाला हें त्वरेनें सांग ३. पाप गेल्याची काय खूण? तुझ्यामधील अवगुण तर कांहींच बदलले नाहींत ४. तुकाराम महाराज म्हणतात, हरीची श्रद्धेनें भक्ति करण्यावांचून बाकीचे सर्व व्यवहार श्रमदायक आहेत ५. [२०९१]

देवा, तुला संपुष्ट [लहानसें धातूचें पात्र] पात्रामध्यें टेवून तुझी मी पूजा करतों. पण तुझें स्वरूप एवढें मोठें आहे, कीं त्याच्या गर्भांत (पोटांत) चौदा लोक –भुवनें आहेत १. तुझ्यापुढें आम्ही गातों व नृत्य करण्याचें कौतुक तुला दाखवितों; परंतु तूं स्वभावतः साकार मर्यादेच्या (शब्दांच्या) पलीकडचा आहेस २. देवा, तुझ्याकरितां आम्ही तुझेच गुण गातों; पण तुझें स्वरूप शब्दापलीकडील म्हणजे निःशब्द आहे ३. देवा, तुझ्याकरितां आम्हीं तुळशीच्या माळा धारण केल्या; पण तूं कर्तृत्वरहित असा अकर्ता आहेस ४. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, आतां तूं माझ्याकरितां मर्यादित हो व माझ्या हिताचा कांहीं विचार कर ५. [२०९२]

मी पापाची राशी आहें. आजपर्यंत तुमच्या सेवेस विन्मुख असणारा मी सेवाचोर तुमच्या पायांपाशीं आलों आहें १. हे नारायणा, ह्याविषयीं माझ्या मानखंडणेचा (अपराधाचा) तुम्ही मला दंड (शिक्षा) करा. २. हे देवा, मी भक्त आहें असें दाखवून घमेंडीनें लोकांकडून आपली सेवा करून घेतों, हा माझा लंडपणा आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, मी धड तुझा नाहीं व संसाराचाहि नाहीं. असा दोहींलाहि आंचवलों आहें ४. [२०९३]

गुजराथी स्त्रिया डोक्यावर एकावर एक अशी रचलेली भांड्यांची उतरंड घेतात व त्याला हात न लावतां मोकळ्या हातानेंच चालतात, तथापि त्यांचें सर्व लक्ष डोक्यावरील उतरंडीवरच असतें १. हे हरि, ह्याप्रमाणें मी कोणत्याहि व्यवहारांत असलों, तरी माझें लक्ष तुझ्या पायांचे ठिकाणीं असावें २. दरिद्री भिक्षुक (माणूस) जेवणाच्या आमंत्रणाविषयीं सर्व काळ आशा करीत असतो ३. धनलोभी निरंतर कर्जदाराला कर्ज दिलेल्या रकमेच्या व्याजाची आशा करितो व निरंतर बोटानें दिवस महिने मोजीत राहातो ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा, त्याप्रमाणें माझ्या हृदयाला तुझाच ध्यास असावा, अन्यथा कांहीं चिंतन नको ५. [२०९४]

लागोनियां पायां विनवितों तुम्हांला । करें टाळी बोला मुखें नाम ॥ १ ॥ विठ्ठल विठ्ठल म्हणा वेळोवेळां । हा सुखसोहळा स्वर्गी नाहीं ॥ २ ॥ कृष्ण विष्णु हरि गोविंद गोपाळ । मार्ग हा प्रांजळ वैकुंठीचा ॥ ३ ॥ सकळांशीं येथें आहे अधिकार । कलियुगीं उद्धार हरिच्या नामें ॥ ४ ॥ तुका म्हणे नामापाशीं चारी मुक्ति । ऐसें बहुतां ग्रंथीं बोलियेलें ॥ ५ ॥ [२०९५]

लटिकें हांसे लटिकें रडे । लटिकें उडे लटिक्यापें ॥ १ ॥ लटिकें माझें लटिकें तुझें । लटिकें ओझें लटिक्याचें ॥ २ ॥ लटिकें गाये लटिकें ध्याये । लटिकें जाये लटिक्यापें ॥ ३ ॥ लटिका भोगी लटिका त्यागी । लटिका जोगी जग माया ॥ ४ ॥ लटिका तुका लटिक्या भावें । लटिकें बोले लटिक्यासवें ॥ ५ ॥ [२०९६]

झालों म्हणती त्याचें मज वाटे आश्चर्य । ऐका नव्हे धीर वचन माझें ॥ १ ॥ शिजलिया अन्ना ग्वाही दांत हात । जिव्हेसी चाखतां न कळे कैसें ॥ २ ॥ तापलिया तेला बावन चंदन । बुंद एक क्षण शीतळ करी ॥ ३ ॥ पारखी तो जाणे अंतरींचा भेद । मूढजना छंद लावण्याचा ॥ ४ ॥ तुका म्हणे कसीं निवडे आपण । शुद्ध मंद हीन जैसें तैसें ॥ ५ ॥ [२०९७]

हेचि थोर भक्ति आवडते देवा । संकल्पावी माया संसाराची ॥ १ ॥ ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें । चित्तीं असों द्यावें समाधान ॥ २ ॥ वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भोगणें तें फळ संचिताचें ॥ ३ ॥ तुका म्हणे घालूं तयावरी भार । वाहूं हा संसार देवापायीं ॥ ४ ॥ [२०९८]

अहो जन हो, तुमच्या पायां पडून मी तुम्हांला विनंति करितों, कीं तुम्ही हातानें टाळी वाजवून मुखानें देवाचें नांव घ्या १. 'विठ्ठल विठ्ठल' अशा नामानें तुम्ही वेळोवेळ भजन करा, कारण हरिभजनाचा सुखसोहळा स्वर्गांत देखील नाहीं २. 'कृष्ण, विष्णु, हरि, गोविंद, गोपाळ' ह्या नामांचें चिंतन करणें हा वैकुंठास जाण्याचा सोपा मार्ग आहे ३. सर्व मनुष्यमात्रांना हरिनामचिंतनाचा अधिकार आहे. कलियुगांत तर त्याचेच योगानें उद्धार होणार आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, हरिनामचिंतनानें सलोकतादि चारी मुक्ति प्राप्त होतात, असें अनेक ग्रंथांतून प्रतिपादन केलें आहे ५. [२०९५]

व्यवहारामध्यें जन हे खोटेंच हांसतात व खोटेंच रडतात आणि खोट्यापाशीं खोटेच उड्या मारतात १. खोटेंच माझें म्हणतात व खोटेंच तुझें म्हणतात. अशा प्रकारें खोट्या अहं इदंवृत्तीचा (हें माझें, हें तुझें अशा अहंकाराचा) खोटाच भार घेतात २. खोटेंच गातात व खोटेंच ध्यान करितात व खोटेच खोट्यापाशीं जातात ३. खोटेच भोगी आहेत व खोटेच त्यागी आहेत व खोटाच योग धारण केलेले जोगी आहेत, कारण सर्व जन ही माया आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या मायिक जगतांतील मीहि पण एक खोटाच आहें व खोट्या भावनेनें खोट्यापाशीं खोटेंच बोलत आहें ६. [२०९६]

आम्हीं सिद्ध – कृतार्थ झालों असें जे कोणी म्हणतात, त्यांचें मला फार आश्चर्य वाटतें, (कारण त्यांनीं धर्माचरण, हरिभजन, गुरुसेवा इत्यादि साधनें न करतां ते कृतार्थ कसे झाले? बरें, ते कृतार्थ झाले असें म्हणावें तर तशीं लक्षणें त्यांचे ठिकाणीं दिसत नाहींत) त्यांच्याबद्दलची हकीगत सांगावयास मला धीर निघत नाहीं, म्हणून मी सांगतों ती ऐका १. शिजलेलें अन्न हाताला व दांताला कळतें, तर जिव्हेनें चाखण्यांत कसें कळणार नाहीं? २. अति तापलेल्या तेलामध्यें अस्सल बावन (ह्या जातीच्या) चंदनाचा उगाळून एक थेंब टाकला, तर तें एका क्षणांत थंड होतें ३. ज्या वस्तूचा जो परीक्षक आहे, त्याच्या हातांत ती वस्तु आली असतां त्यांतील अंतरधर्म त्यास कळतो, आणि जे मूढ जन आहेत ते आंतील भाग न जाणतां वरच्या सौंदर्यास भुलतात ४. तुकाराम महाराज म्हणतात, सोनें कसेंहि असो, तें कसोटीला लावलें म्हणजे त्याचें शुद्धत्व, मंदत्व व हीनत्व जसें असेल तसें निवडलें जातें ५. [२०९७]

सर्व संसारमाया ही देवाला अर्पण करून जे कोणी त्याची भक्ति करितात, ती भक्ति देवाला फार आवडते १. प्रारब्धकर्मांच्या योगेंकरून अनंत जसें ज्याला ज्या स्थितींत ठेवील त्या स्थितींत त्यानें समाधानचित्तानें राहावें २. त्या स्थितीबद्दलच मनानें कांहीं काळजी केली, तर त्यायोगानें केवळ सुखप्राप्ति न होतां केवळ दुःखच भोगावें लागतें, कारण सर्व प्राणिमात्रांना सुखदुःखादि भोग हे प्रारब्धानें होतात. अर्थात् जसें ज्याचें प्रारब्ध असेल, तसें फळ त्याला भोगलेंच पाहिजे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही आमच्या योगक्षेमाचा बोजा देवाच्या मस्तकावर ठेवूं व आम्ही आपला सर्व संसार देवाचे चरणीं अर्पण करूं ५. [२०९८]

जन्मा येणें घडे पातकाचें मूळ । संचिताचें फळ आपुलिया ॥ १ ॥ मग वायांविण दुःख वाहों नये । रुसोनियां काय देवावरी ॥ २ ॥ ठाउकाची आहे संसार दुःखाचा । चित्तीं सीण याचा वाहूं नये ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याचें नाम आठवावें । तेणें विसरावें जन्मदुःख ॥ ४ ॥ [२०९९]

आतां माझे नका वानूं गुणदोष । करितों उपदेश याचा कांहीं ॥ १ ॥ मानदंभासाठीं छळीतसें कोणा । आण या चरणां विठोबाची ॥ २ ॥ तुका म्हणे हें तों ठावें पांडुरंगा । काय कळे जगा अंतरींचें ॥ ३ ॥ [२१००]

काय माझें वाईट म्हणोन । करूं समाधान कशासाठीं ॥ १ ॥ काय मज लोक नेतील परलोका । जातां कोणा एका निवारेल ॥ २ ॥ न म्हणे कोणासी उत्तम वाईट । सुखें माझी कूट खावो मागें ॥ ३ ॥ सर्व माझा भार असे पांडुरंगा । काय माझें जगासवें काज ॥ ४ ॥ तुका म्हणे माझें सर्वही साधन । नामसंकीर्तन विठोबाचें ॥ ५ ॥ [२१०१]

वंदिलें वंदावें जीवाचिये साठीं । किंवा बरी तुटी आरंभींच ॥ १ ॥ स्वहिताचि चाड ते ऐका हे बोल । अवघेंचि मोल धीरा अंगीं ॥ २ ॥ सिंपिलें तें रोप वरीवरी बरें । वाळलिया पुरें कोंभ नये ॥ ३ ॥ तुका म्हणे टाकीघायें देवपण । फुटलिया जन कुला पुसी ॥ ४ ॥ [२१०२]

आम्हां विष्णुदासां हेंचि भांडवल । अवघा विठ्ठल धनवित्त ॥ १ ॥ वाणी नाहीं घ्यावें आपुलिया हातें । करोनिथां चित्तें समाधान ॥ २ ॥ तुका म्हणे द्रव्य मेळविलें मागें । हें तों कोणासंगें आलें नाहीं ॥ ३ ॥ [२१०३]

पापकर्मामुळेंच जन्म घ्यावा लागतो, कारण देवा, ज्यास जो देह मिळाला तें त्याच्या पूर्वकृत संचिताचें फल आहे १. तर मग आतां त्यासंबंधीं व्यर्थ दुःख मानूं नये व देवाला त्रास देऊं नये, कारण देवावर रुसून काय उपयोग आहे? २. सर्व संसार दुःखमय आहे हें जर आपल्याला माहीत आहे, तर त्याच्या संबंधाचा चित्तांत त्रास मानूं नये. ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका देवाच्या नांवाचा आठव ठेवून त्या योगानें जन्मादि संसाराचें दुःख विसरावें ४. [२०९९]

आतां माझे गुणदोष वर्णन करूं नका. ह्याबद्दलचा मी आपणांस कांहीं उपदेश करीत आहें १. मला मान मिळावा अशा दंभानें किंवा भावनेनें जर मी कोणाला छळीत असेन, तर ह्या विठोबाच्या पायांची शपथ २. तुकाराम महाराज म्हणतात, माझी खरी स्थिति पांडुरंगाला ठाऊक आहे; जगाला माझ्या अंतःकरणांतील भाव कसा कळणार? २. [२१००]

मला वाईट म्हणून लोक माझें काय घेऊन जातील? मी कशाकरितां लोकांचें समाधान करूं? १. मीं त्यांच्या छंदानें वागलों, तर लोक काय मला परलोकास नेतील किंवा मीच स्वतः जाऊं लागलों तर त्याचें निवारण कोण करील? २. मी कोणाला चांगलाहि म्हणणार नाहीं व वाईटहि म्हणणार नाहीं. ते जन खुशाल माझ्यामागें माझी निंदा करोत ३ माझा सर्व योगक्षेमाचा बोजा त्या पांडुरंगावर आहे. जगाशीं मला काय कर्तव्य आहे? ४. तुकाराम महाराज म्हणतात, एक विठोबारायाचें नामसंकीर्तन करणें हेंच माझें सर्व साधन आहे ५. [२१०१]

आरंभीं ज्याला आपण वंदन केलें आहे, त्यालाच आपला जीव अर्पण करून वंदन करावें, नाहीं तर आरंभींच त्याच्याशीं संबंध न ठेवावा, हें बरें १. ज्या कोणास आपलें स्वहित व्हावें अशी इच्छा आहे, त्यानें हे माझे शब्द ऐकावे. सर्व कांहीं थोरवी धैर्याचे अंगीं आहे २. ज्या रोपास जलसिंचन केलें आहे त्यासच पुनः पुन्हां जलसिंचन करणें हें चांगलें, कारण तें एकदां पूर्ण वाळून गेलें म्हणजे त्याला नवे कोंब येणार नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, टाकीचे घाव खाऊन जर मूर्ति तयार झाली तरच तिला देवपण येतें व पूर्ण तयार न होतां भंगली तर लोक तिचा शौचविधीस जातेवेळीं उपयोग करतात ४. [२१०२]

आम्हां विष्णूचे दासांजवळ एक विठ्ठलचिंतन करणें, ह्याच धनाचें भांडवल आहे १. आपलें चित्त स्थिर करून ह्याचें कितीहि ग्रहण करावें, कारण तें तोट्याचें नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, पूर्वी पुष्कळांनीं द्रव्य मिळविलें, पण तें अखेरीस कोणाच्याहि बरोबर गेलें नाहीं (पण आमचें विठ्ठलनामरूप धन आमच्याबरोबर येतें) ३. [२१०३]

सुखाचे व्यवहारीं सुखलाभ झाला। आनंद कोंदला मागें पुढें ॥ १ ॥ संगती पंगती देवासवें घडे। नित्यानित्य (नित्य नित्य) पडे तेंचि साच ॥ २ ॥ समर्थाचे घरीं सकळ संपदा। नाहीं तुटी कदा कासयाची ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें लाभाचिया कोटी। बहु वाव पोटीं समर्थाचे ॥ ४ ॥ [२१०४]

काय देवें खातां घेतलें हातींचें। आलें हें तयाचें थोर भय ॥ १ ॥ म्हणतां गजरें राम एकसरें। जळती पापें थोरें भयधाकें ॥ २ ॥ काय खोळंबले हात पाय अंग। नासिलें हें सांग रूप काय ॥ ३ ॥ कोण लोकीं सांग घातला बाहेरी। म्हणतां हरि हरि तुका म्हणे ॥ ४ ॥ [२१०५]

उत्तम त्या याति। देवा शरण अनन्यगति ॥ १ ॥ नाहीं दुजा ठाव। कांहीं उत्तम मध्यम भाव ॥ २ ॥ उमटती ठसे। ब्रह्मप्राप्ति अंगीं दिसे ॥ ३ ॥ भाविक विश्वासी। तुका म्हणे नमन त्यांसी ॥ ४ ॥ [२१०६]

भय हरिजनीं। कांहीं न धरावें मनीं ॥ १ ॥ नारायणा ऐसा सखा। काय जगाचा हा लेखा ॥ २ ॥ चित्त वित्त हेवा। समर्पून राहा देवा ॥ ३ ॥ तुका म्हणे मन। असों द्यावें समाधान ॥ ४ ॥ [२१०७]

आयुष्य मोजावया बैसला मापारी। तूं कां रे वेव्हारीं संसाराच्या ॥ १ ॥ नेईल ओढोनी ठाउकें नसतां। न राहें दुश्चिता हरिविण ॥ २ ॥ कठिण हें दुःख यम जाचतील। कोण सोडवील तये (तया) ठायीं ॥ ३ ॥ राहतील दुरी सज्जन सोयरीं। आठवीं श्रीहरी लवलाहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे किती करिसील लंडाई। होईल भंडाई पुढें थोर ॥ ५ ॥ [२१०८]

सुखाचा व्यापार करण्यांत (नामसंकीर्तनासारख्या सुखकारक व्यवहारानें परमात्म–) सुखाचा इतका लाभ झाला, कीं मागें पुढें सर्व कांहीं आनंदच भरला गेला १. आतां आम्हांला देवाचीच संगति व पंगत आहे आणि सर्व नित्य व अनित्य वस्तु देवाच्याच साच्यांत ओतल्या गेल्या आहेत. २. समर्थ देवाच्या घरीं सर्व कांहीं संपत्ति आहेत. तेथें कोणत्याहि वस्तूची केव्हांहि तूट पडणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाचे घरीं अतिशय लाभ वसत आहे, असा त्या समर्थ देवाच्या पोटामध्यें औदार्याला अवकाश आहे (त्यामुळें भक्तांचे सर्व मनोरथ तेथें पूर्ण होतात) ४. [२१०४]

आपण हरिनाम सेवन करीत असतांना देवानें आपल्या हातचें कांहीं ओढून नेलें काय? मग त्याचें मोठेंसें काय भय मानावयाचें आहे? १. मोठ्या गजरानें एकसारखें रामनाम घेतलें, तर त्याच्या भयाच्या धाकानें महापातकें जळून जातात २. हरीचें नामचिंतन मुखानें करीत असतां काय हातपाय किंवा इतर अवयव बंद पडतात किंवा तुझ्या रूपसौंदर्यांत बिघाड येतो काय? सांग बरें ३. तुकाराम महाराज म्हणतात, 'हरि हरि' ह्या नामाचें भजन केल्यानें कोणत्या लोकांनीं तुला बहिष्कार घातला, तें सांग ४. [२१०५]

जे देवाला अनन्य शरण गेले आहेत त्यांची जात उत्तम आहे १. हरिस्वरूपीं उत्तम, मध्यम, अधम असा कांहीं भेदभाव नाहीं २. जे हरीला शरण गेले आहेत त्यांच्या हृदयांत हरिस्वरूपाचे ठसे उमटतात व त्यांचे ठिकाणीं ब्रह्मानुभव दिसतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी हरीला शरण गेलेले भाविक विश्वासी आहेत, त्यांना माझा नमस्कार आहे ४. [२१०६]

हरिदासांनीं आपल्या मनांत मुळींच भय धरूं नये १. कारण जेथें नारायणासारखा सखा आहे, तेथें जगाची किंमत काय आहे? २. आपलें चित्त व धन आणि त्याविषयींची हांव हीं देवाला समर्पून स्वस्थ राहा ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपलें मन समाधानस्थितीमध्यें शांत ठेवावें ४. [२१०७]

अरे, तुझें आयुष्य मोजण्याकरितां काळ हा मापाड्या बसला आहे, असें असून, तूं संसारव्यवहारामध्यें कां राहिला आहेस? १. तुला न कळतांच तो (स्त्रीपुत्रादिकांच्या परिवारांतून तुला) ओढून नेईल. ह्याकरितां तूं हरिचिंतनावांचून दुश्चित्त राहूं नकोस २. तुझ्याकडून झालेल्या पापकर्माबद्दल यम मोठी शिक्षा करील. तें दुःख मोठें कठिण आहे. त्या वेळीं त्यापासून तुला कोण सोडवील? ३. तुझे सोईरसंबंधी व इष्टमित्र सज्जनादि त्या वेळेस सर्व दूर होतील. ह्याकरितां तं मोठ्या त्वरेनें श्रीहरीचें चिंतन कर ४. तुकाराम महाराज म्हणतात, तूं किती दांडगाई करशील? ह्या योगानें अखेरीस तुझी मोठी भंडिमा होईल (तुझे धिंडवडे निघतील) ५. [२१०८]

होऊं नको कांहीं या मना आधीन। नाइकें वचन याचें कांहीं ॥ १ ॥ हटियाची गोष्टी मोडून टाकावी। सोई ही धरावी विठोबाची ॥ २ ॥ आपुले आधीन करूनियां ठेवा। नाहीं तरी जीवा घातक हें ॥ ३ ॥ तुका म्हणे झाले जे मना आधीन। तयांसी बंधन यम करी ॥ ४ ॥ [२१०९]

नामाविण काय वाऊगी चावट। वायां वटवट हरीविण ॥ १ ॥ फुकटची सांगे लोकांचिया गोष्टी। राम जगजेठी वाचे न ये ॥ २ ॥ मेळवूनि चाट करी सुरापान। विषयांच्या गुणें मातलासे ॥ ३ ॥ बैसोनि टवाळी करी दुजयाची। नाहीं गोविंदाची आठवण ॥ ४ ॥ बळें यम दांत खाय तयावरी। जंव भरे दोरी आयुष्याची ॥ ५ ॥ तुका म्हणे तुला सोडवील कोण। नाहीं नारायण आठविला ॥ ६ ॥ [२११०]

संत गाती हरिकीर्तनीं। त्यांचें घेईन पायवणी ॥ १ ॥ हेंचि तप तीर्थ माझें। आणीक मी नेणें दुजें ॥ २ ॥ काया कुरवंडी करीन। संत महंत ओंवाळीन ॥ ३ ॥ संत महंत माझी पूजा। अनभाव (आन भाव) नाहीं दुजा ॥ ४ ॥ तुका म्हणे नेणें कांहीं। अवघें आहे संतांपायीं ॥ ५ ॥ [२१११]

झालें भांडवल। अवघा पिकला विठ्ठल ॥ १ ॥ आतां वाणी काशासाठीं। धीर धरावाच पोटीं ॥ २ ॥ आपुलया संकोचें। म्हणऊनि तेथें टांचे ॥ ३ ॥ घेतों खऱ्या मापें। तुका देखोनियां सोपें ॥ ४ ॥ [२११२]

शुद्ध ऐसें ब्रह्मज्ञान। करा मन सादर ॥ १ ॥ रवि रसां सकळां शोषी। गुणदोषीं न लिंपे ॥ २ ॥ कोणासवें नाहीं चोरी। सकळांवरी समत्व ॥ ३ ॥ सत्य तरी ऐसें आहे। तुका पाहे उपदेशी ॥ ४ ॥ [२११३]

अरे, तूं या मनाच्या स्वाधीन होऊं नकोस व तें मन जें कांहीं सांगेल तें ऐकूं नकोस १. तें मन हट्टी आहे, म्हणून तें जें काय सांगेल तें मोडून टाकावें आणि विठोबारायाच्या भजनमार्गाला लागावें २. त्या मनाला आपले स्वाधीन करून ठेवा. नाहीं तर तें मोठें जीवाचा घात करणारें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे मनाच्या स्वाधीन झाले आहेत त्यांना यम बंधन करतो ४. [२१०९]

अरे, एका हरिनामावांचून चावट गोष्टीची वटवट करीत बसतोस ती व्यर्थ आहे १. अरे, तुझ्या वाचेला राम जगजेठी (जगतांत श्रेष्ठ) येत नाहीं आणि फुकट लोकांच्या गोष्टी सांगत बसतोस २. दुसरे चावट लोक गोळा करून दारू पितोस आणि त्या योगानें उन्मत्त होऊन विषयाचे भोग भोगतोस ३. एके ठिकाणीं बसून दुसऱ्याची टवाळी करतोस आणि तुला गोविंदाची आठवण कधींच होत नाहीं ४. असा जो कोणी दुराचारी आहे त्याच्यावर मोठ्या रागानें यम दांत खातो. केव्हां त्याचे आयुष्याची दोरी संपेल आणि त्याला मी नेईन केव्हां, ही वाट यम पाहात असतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, जर त्वां नारायणाची आठवण केली नाहीं, तर तुला अखेरीस यमापासून कोण सोडवील? ६. [२११०]

जे संत हरिकीर्तनामध्यें गात आहेत त्यांचे मी पाय धुऊन तीर्थ घेईन १. हेंच माझें तपश्चर्या करणें व तीर्थ आहे. ह्यावांचून मी दुसरें कांहीं जाणत नाहीं २. संतमहंतांवरून मी आपलें शरीर ओवाळून टाकीन ३. मी संतमहंतांची पूजा करितों. ह्यावांचून मी वेगळा भाव (संकल्प) जाणत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझें सर्व कांहीं संतांचे पायांचे ठिकाणीं आहे. त्यांवांचून मी कांहीं जाणत नाहीं ५. [२१११]

सर्वत्र विठ्ठल स्वरूपाचें पीक पिकलें आहे, म्हणून व्यापार करण्याला मला हेंच मुख्य भांडवल आहे १. आतां ह्या ठिकाणीं तोटा कशाचा आला आहे? फक्त आपले ठिकाणीं धीर धरला पाहिजे २. आपली वृत्ति संकोचित असते, म्हणून त्या ठिकाणीं (विठ्ठल नामांत) तोटा आहे असें दिसतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें भांडवल सोपें आहे, असें पाहून मी आपल्या खऱ्या अशा जिव्हेचे व श्रवणाचे मापानें तें भरून घेत आहें ४. [२११२]

अहो जन हो, तुम्ही आपलें मन शुद्ध करून सावध करा, म्हणजे तुम्हांस खऱ्या ब्रह्मज्ञानाची प्राप्ति होईल १. सूर्य चांगल्या व वाईट अशा सर्व रसांचें शोषण करतो, पण त्यांच्या गुणदोषांनीं लिप्त होत नाहीं २. आणि तो कोणाशीं वंचना न करितां सर्व लोकांस सारखा प्रकाश करितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचें हें खरें ब्रह्मज्ञान आहे. तरीच मी तुम्हांला त्याचा उपदेश करितों (त्याचा अनुभव पाहा) ४. [२११३]

अग्नि हा पाचारी कोणासी साक्षेपें । हिंवे तोचि तापे जाऊनियां ॥ १ ॥ उदक म्हणे काय याहो मज प्यावें । तृषित तो धांवे सेवावया ॥ २ ॥ काय वस्त्र म्हणे या हो मज नेसा । आपुले स्वइच्छा जग वेढी ॥ ३ ॥ तुकया स्वामी म्हणे काय मज स्मरा । आपुल्या उद्धारा लागूनियां ॥ ४ ॥ [२११४]

भक्त देवाघरिंचा सुना । देव भक्ताचा पोसणा ॥ १ ॥ येर येरां जडलें कैसें । जीवा अंग(गें) जैसें तैसें ॥ २ ॥ देव भक्ताची कृपाळु माता । भक्त देवाचा जनिता ॥ ३ ॥ तुका म्हणे अंगें । एक एकाचिया संगें ॥ ४ ॥ [२११५]

बरवया बरवंट । विटे चरण सम नीट ॥ १ ॥ ते म्यां हृदयीं धरिले । तापशमन पाउलें ॥ २ ॥ सकळ तीर्था अधिष्ठान । करी लक्ष्मी संवाहन ॥ ३ ॥ तुका म्हणे अंतीं । ठाव मागितला संतीं ॥ ४ ॥ [२११६]

मांस चर्म हाड । देवा अवघींचि गोड ॥ १ ॥ जे जे हरिरंगीं रंगले । कांहीं न वचे वायां गेले ॥ २ ॥ वेद खाय शंका(खा)सुर । त्याचें वागवी कलि(ले)वर ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसा । बराडी या भक्तिरसा ॥ ४ ॥ [२११७]

कोणा चिंता आड । कोणा लोकलाज नाड ॥ १ ॥ कैंचा राम अभागिया । करी वडबड वायां ॥ २ ॥ स्मरणाचा राग । क्रोधें विटाळलें अंग ॥ ३ ॥ तुका म्हणे जडा । काय चाले त्या दगडा ॥ ४ ॥ [२११८]

आपुलिया काजा । आम्हीं सांडियेले लाजा ॥ १ ॥ तुम्हां असों जागवीत । आपुलिये

अग्नि हा अगत्यानें (मुद्दाम) कोणाला हांक मारीत नाहीं, पण ज्याला थंडी वाजते तो त्याच्याकडे शेकावयास जातो १. पाणी हें 'मला प्या' असें कोणास म्हणत नाहीं, पण ज्याला तहान लागली आहे तो धांवत जाऊन त्याचें सेवन करतो २. वस्त्र हें मला नेसा असें कोणास म्हणतें काय ? पण आपआपल्या इच्छेप्रमाणें लोक त्याचा उपयोग करितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याचप्रमाणें माझा स्वामी जो पांडुरंग तो माझें स्मरण करा, असें कांहीं म्हणत नाहीं, पण ज्याला आपला उद्धार करून घ्यावयाचा आहे तो त्याचें स्मरण करितोच ४. [२११४]

भक्त हा देवाच्या घरीं कुत्रें होऊन राहातो आणि देवाचा पोशिंदा (भजन-पूजनद्वारां पोसणारा) होतो १. शरीर आणि जीव जशीं एकत्वानें असतात, तसे देव आणि भक्त हे एकमेकांना जडलेले आहेत २. भक्तांना उत्पन्न करणारा देव त्यांची कृपाळू आई आहे आणि निराकारांतून देव आकारास ज्यानें आणला आहे तो भक्त देवाचा बाप आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे देव व भक्त हे एकमेकांच्या निकटसंबंधानें असतात ४. [२११५]

विठोबारायाचे जे चरण विटेवर सारखे जोडलेले आहेत ते सकळ सौंदर्याला सौंदर्यदायक आहेत १. ते चरण मीं आपल्या हृदयाच्या ठिकाणीं धरले आहेत. त्यायोगानें त्रिविध तापांचा नाश होत आहे २. जे चरण सकळ तीर्थें उत्पन्न होण्याचें ठिकाण आहे आणि त्याच चरणांची सेवा लक्ष्मी करीत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व संतजनांनीं शेवटीं आपणास राहाण्याला तेंच ठिकाण मागितलें आहे ४. [२११६]

(जे कोणी ध्रुवपदांत दर्शविल्याप्रमाणें वागतात) त्यांचें हाड, मांस वगैरे सर्व देवास आवडतें १. हरीच्या रंगानें जे जे रंगले आहेत, त्यांचें कांहींच वायां जात नाहीं २. (यास मागील पुरावा : ज्यांत प्रभूचे स्वरूपाचा विचार केला आहे असे) वेद शंखासुर दैत्यानें गिळले होते. त्याचा वध करून त्याचें कलेवर (शंख) देव आपल्या हातांत वागवीत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, भक्तिरसाविषयीं अशा प्रकारचा देव बराडी (हापापलेला) झाला आहे ४. [२११७]

कित्येक लोक दरिद्री असल्यामुळें संसाराच्या चिंतेनें ग्रस्त आहेत, म्हणून ते परमार्थाविषयीं फसले जातात व कोणी द्रव्यवान् असून लोकलज्जेनें फसले जातात १. अशा करंट्या लोकांच्या वाचेला रामनाम कशाचें येतें ! ते व्यर्थ बडबड करीत बसतात २. त्यांस नामस्मरण करा म्हणून सांगितलें, तर ते उलटे सांगणारावर रागावतात, कारण त्यांचें शरीर क्रोधरूपी मांगानें विटाळलेलें असतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या जड दगडांपुढें कोणाचें काय चालणार आहे ? (अशा मूर्खांपुढें गप्पच बसावें लागतें) ४. [२११८]

हे देवा, आपल्या (उद्धाराच्या) कामाकरितां आम्हीं सर्व लाज टाकून दिली आहे १. आणि तुम्हांला नेहमीं जागवीत

हातीं हित ॥ २ ॥ तुम्ही देहशून्य । आम्हां कळे पापपुण्य ॥ ३ ॥ सांगायासी लोकां । उरउरीत (उर्वरीत) उरला तुका ॥ ४ ॥ [२११९]

सत्य आम्हां मनीं । नव्हों गाबाळाचे धनी ॥ १ ॥ ऐसें जाणा रे सकळ । भरा शुद्ध टाका मळ ॥ २ ॥ देतों तीक्ष्ण उत्तरें । पुढें व्हावयासी बरें ॥ ३ ॥ तुका म्हणे बरें घडे । देशोदेशीं चाले कोडें ॥ ४ ॥ [२१२०]

शिकवूनि हित । सोयी लावावे हे नीत ॥ १ ॥ त्याग करूं नये खरें । ऐसें विचारावें बरें ॥ २ ॥ तुमचिया तोंडें । धर्माधर्माचींचि खंडें ॥ ३ ॥ मजसाठीं देवा । कां हो लपविला हेवा ॥ ४ ॥ झाला सावधान । त्यासी घालावें भोजन ॥ ५ ॥ तुका म्हणे पिता । वरी बाळाच्या तो हिता ॥ ६ ॥ [२१२१]

सुख सुखा भेटे । मग तोडिल्या न तुटे ॥ १ ॥ रविरश्मिकळा । न ये घालितां पैं डोळां ॥ २ ॥ दुरी तें जवळीं । स्नेहें आकाश कवळी ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्त । माझें पायीं अखंडित ॥ ४ ॥ [२१२२]

तुम्हां न पडे वेंच । माझा सरेल संकोच ॥ १ ॥ फुकासाठीं जोडे यश । येथें कां करा आळस ॥ २ ॥ कृपेचें भुकेलें । होय जीवदान केलें ॥ ३ ॥ तुका म्हणे शिकविलें । माझें ऐकावें विठ्ठलें ॥ ४ ॥ [२१२३]

लोक म्हणती मज देव । हा तों अधर्म उपाव ॥ १ ॥ आतां कळेल तें करीं । सीस तुझे हातीं सुरी ॥ २ ॥ अधिकार नाहीं । पूजा करिती तैसा कांहीं ॥ ३ ॥ मन जाणे पापा । तुका म्हणे माय बापा ॥ ४ ॥ [२१२४]

आहों, कारण आमचें हित तुमच्या हातांत आहे २. तुम्हांला तर देह मुळींच नाहीं, आणि आम्ही देहधारी असल्यामुळें आमच्या मागें पापपुण्य लागलें आहे, हें सहज कळतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही आम्ही मुळींच एक आहोंत, पण लोकांना उपदेश करण्याकरितां वेगळेपणानें (देहरूपानें) मी अवशिष्ट (शिलक) राहिलों आहें ४. [२११९]

खरें देवाचें नाम हेंच आमच्या मनामध्यें आहे; ह्याकरितां आम्ही वरकड असाराचे (टाकाऊ मालाचे) मालक होणार नाहीं १. अहो सर्व जन हो, असें तुम्ही जाणून आपल्या मनांतील (रागद्वेषादि) मळ टाकून द्या आणि खरा माल भरा २. पुढें तुमचें कल्याण व्हावें म्हणून मी तुम्हांला शब्दानें ताडण करितों ३. तुकाराम महाराज म्हणतात, चांगलें घडल्यानें तुमचें कोडकौतुक सर्व देशांमध्यें (इह-परलोकीं) होईल ४. [२१२०]

हे देवा, तुम्हीं आम्हांला हिताच्या गोष्टी शिकवून नीतीच्या मार्गाला लावावें, अशी धर्मनीति आहे १. पण आमचा त्याग करूं नये. ह्याचा विचार तुम्हीं खरोखर करावा हें बरें २. धर्माधर्माचा सर्व निवाडा तुमच्याच तोंडानें (वेदांत व भगवद्गीतेंतहि) झाला आहे ३. असें असून देवा, तुम्ही माझ्याकरितांच ती हांव टाकून लपून बसतां हें काय? ४. जें बाळ झोपेंतून जागें होतें, त्याला आईनें जेवावयास घालावें, अशी रीत आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, मुलाचें सर्व हित केलें पाहिजे (हे सांगणें नको) ६. [२१२१]

तत्त्वतः सुखरूप जीवात्म्याचा सुखरूप परमात्म्याशीं योग झाल्यावर तो संबंध तोडूं गेलें असतां तुटत नाहीं १. सूर्यरश्मिकला ह्या सूर्यापासून वेगळ्या काढून (सूर्यापासून त्याचीं किरणें वेगळीं करून तीं) डोळ्यांत घालतां येत नाहींत २. ज्याविषयीं स्नेह आहे अशी वस्तु दूर जरी असली तरी ती जवळ असल्यासारखीच आहे, कारण स्नेह हा आकाशाला कवळणारा आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझें चित्त श्रीहरीच्या चरणीं अखंड राहिलें आहे ४. [२१२२]

हे देवा, माझें समाधान करण्यापासून तुमचा कांहीं खर्च होत नाहीं आणि माझा संकोच सहज नाहींसा होईल १. असें फुकटचें यश जर तुम्हांस मिळतें, तर तुम्ही तें मिळविण्याविषयीं आळस कां करतां? २. तुम्ही मजवर कृपा कधीं कराल, ह्याविषयीं मला भूक लागली आहे. ह्याकरितां तुम्हीं कृपा केली म्हणजे मला जीवदान दिल्याप्रमाणें होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठाबाई आई, असें जें मीं तुला सांगितलें आहे, तें माझें तूं ऐकावें हें बरें ४. [२१२३]

सर्व लोक मला देव म्हणतात, हें अधर्माचें साधन आहे १. हे देवा, माझें मस्तक तुझ्या स्वाधीन आहे व शस्त्रहि तुझ्या हातीं आहे. इतक्यावर आतां तुला वाटेल तसें कर २. सर्व लोक माझी पूजा करितात, पण तशा प्रकारची योग्यता माझ्या ठिकाणीं मुळींच नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें बाळकाचा बाप कोणता हें आईस माहीत असतें, त्याप्रमाणें आपण जें पाप केलें, तें आपल्या मनास कळतें ४. [२१२४]

एका म्हणतां भलें। आणिकां सहजची निंदिलें ॥ १ ॥ कांहीं न करितांचि सायास। सहज घडले ते दोष ॥ २ ॥ बरें वाईटाचें। नाहीं कांहीं मज साचें ॥ ३ ॥ तुका म्हणे वाणी। खंडोनि रहावें चिंतनीं ॥ ४ ॥ [२१२५]

आणिलें शेवटा। आतां कामा नये फांटा ॥ १ ॥ मज आपुलेंसें म्हणा। उपरि या नारायणा ॥ २ ॥ वेचियेली वाणी। युक्ती अवघी चरणीं ॥ ३ ॥ तुका धरी पाय। क्षमा करवूनि अन्याय ॥ ४ ॥ [२१२६]

न करा टांचणी। येथें कांहीं अडचणी ॥ १ ॥ जिव्हा अमुप करी माप। विठ्ठल पिकला माझा बाप ॥ २ ॥ आठही प्रहर। बारा मास निरंतर ॥ ३ ॥ तुका म्हणे वाणी। वर्जेना हे घेतां घणी ॥ ४ ॥ [२१२७]

तुझ्या नामाची आवडी। आम्ही विठो तुझीं वेडीं ॥ १ ॥ आतां न वजों आणिकां ठायां। गाऊं गीत लागों पायां ॥ २ ॥ काय वैकुंठ बापुडें। तुझ्या प्रेमसुखापुढें ॥ ३ ॥ संतसमागम मेळें (मेळ)। प्रेमसुखाचा सुकाळ ॥ ४ ॥ तुका म्हणे तुझ्या पायीं। जन्ममरणा ठाव नाहीं ॥ ५ ॥ [२१२८]

साकरेच्या योगें वर्ख। राजा कागदातें देखे ॥ १ ॥ तैसें आम्हां मनुष्यपण। रामनाम केण्यागुणें ॥ २ ॥ फिरंगीच्या योगें करीं। राजा काष्ठ हातीं धरी ॥ ३ ॥ रत्नकनक(का) योगें लाख। कंठीं धरिती श्रीमंत लोक ॥ ४ ॥ देवा देवपाट। देव्हाऱ्यावरी बैसे स्पष्ट ॥ ५ ॥ ब्रह्मानंदयोगें तुका। पढीयंता जन लोकां ॥ ६ ॥ [२१२९]

दहांतून एका मनुष्यास चांगलें म्हटलें तर बाकीच्यांच्या निंदेचा दोष सहज घडतो १. कांहीं श्रम न करितां अनायासें दोषाची वस्ती त्याच्यापाशीं होते २. म्हणून खरोखर माझ्या ठिकाणीं कोणी बरें अथवा वाईट हा भाव कांहीं नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व कारणांविषयीं वाचेनें मौन धरून ती वाणी हरिनामचिंतनाकडे लावावी ४. [२१२५]

मी आजपर्यंत तुमच्या सेवेचें कार्य शेवटास लाविलें आहे. आतां त्या कामास कांहीं अडथळा येणार नाहीं १. हे नारायणा, इतक्यावर तुम्ही मला आपला आहे असें म्हणा २. माझी बुद्धि आणि वाचा ह्यांचा तुमच्या पायांचे ठिकाणीं व्यय केला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या सर्व अपराधांची क्षमा तुमच्याकडून करविली, मग मी तुमचे पाय धरून राहिलों ४. [२१२६]

अहो जन हो, आतां ह्या ठिकाणीं तुम्ही कांहीं अडचणीचा संकोच मानूं नका १. कारण माझा बाप जो विठ्ठल तो फार पिकला आहे (सर्वत्र भरला आहे) म्हणून जिव्हेचें माप करून तेंच अमाप मी मोजीत आहें, पण त्याचा अंत लागत नाहीं २. रात्रंदिवसाचे आठ प्रहर व बारा महिने असे सर्व काळ मी मोजीत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या योगानें तृप्ति होत आहे, पण पुढें सेवन करण्याची इच्छा वाढती आहे म्हणून नाम घेण्याविषयीं माझी वाणी मागें सरत नाहीं ४. [२१२७]

हे विठ्ठला, आम्हांला तुझ्या नामाची प्रीति आहे. असलीं वेडींबागडीं आम्ही तुझीं आहोंत १. आतां आम्ही तुला सोडून अन्य ठिकाणीं जाणार नाहीं व ह्याच ठिकाणीं तुझें गाणें गाऊन वारंवार तुझ्या पायांवर मस्तक ठेवूं २. तुझ्या प्रेमसुखाची प्राप्ति आम्हांस झाली आहे. त्यापुढें वैकुंठ देखील तुच्छ आहे ३. ह्या ठिकाणीं वैष्णवसमुदायाच्या संगतीनें प्रेमसुखाचा सुकाळ आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझ्या पायांचे ठिकाणीं जन्ममृत्यूचा संबंध नाहीं ५. [२१२८]

ज्याप्रमाणें राजाला वर्खाचे कागद पाहाण्याचें कारण नाहीं पण ते साखरेच्या पदार्थास लावल्याकारणानें त्यास पाहावे लागतात १. त्याप्रमाणें रामनाम हें केणें (माल) आमच्यापाशीं आहे म्हणून आमचा मनुष्यपणा श्रेष्ठ आहे (नाहींतर पशु-पक्ष्यांप्रमाणें आमची स्थिति झाली असती) २. राजाला लांकडास स्पर्श करण्याचें कारण नाहीं, पण तें तरवारीच्या मुठीला असतें म्हणून तें हातांत धरावें लागतें ३. लाखेस किंमत नाहीं अशी ती फुकटची आहे, पण ती सोन्याच्या व रत्नाच्या संगतीनें श्रीमंत लोक आपले गळ्यामध्यें घालून मिरवितात ४. लांकडाचा अथवा धातूचा देवपाट देवाच्या योगानें देव्हाऱ्यांत बसतो हें उघड आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या ठिकाणीं ब्रह्मानंदाची वस्ती झाली आहे त्या योगानें मी सर्व लोकांस आवडता झालों आहें (नाहींतर मला कोण विचारतो ?) ६. [२१२९]

धनवंतालागीं। सर्व मान्यता आहे जगीं ॥ १ ॥ माता पिता बंधु जन। सर्व मानिती वचन ॥ २ ॥ जंव मोठा चाले धंदा। तंव बहिणी(ण) म्हणे दादा ॥ ३ ॥ सदा श्रृंगारभूषणें। कांता लवे बहुमानें ॥ ४ ॥ तुका म्हणे धन। भाग्य अशाश्वत जाण ॥ ५ ॥ [२१३०]

न विचारितां ठायाठाव। काय भुंके तो गाढव ॥ १ ॥ केला तैसा लाहे दंड। खळ अविचारी लंड ॥ २ ॥ करावें लाताळें। ऐसें नेणे कोण्या काळें ॥ ३ ॥ न कळे उचित। तुका म्हणे नीत हित ॥ ४ ॥ [२१३१]

कंठीं नामसिका(क्का)। आतां कळिकाळासी धका(क्का) ॥ १ ॥ रोखा माना सिका(क्का) माना। रोखा सिका(क्का) तत्समाना ॥ २ ॥ रोखा न मना सिका न मना। जतन करा नाक काना ॥ ३ ॥ सिका न मानी रावण। त्याचें केलें निसंतान ॥ ४ ॥ सिका मानी हळाहळ। झालें सर्वांग शीतळ ॥ ५ ॥ तुका म्हणे नाम सिका। पटीं बैसविलों निजसुखा ॥ ६ ॥ [२१३२]

भूतीं देव म्हणोनि भेटतों या जना। नाहीं हे भावना नरनारी ॥ १ ॥ जाणे भाव पांडुरंग अंतरींचा। न लगे द्यावा साचा परिहार ॥ २ ॥ दयेसाठीं केला उपाधि पसारा। जड जीवा तारा नाव कथा ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं पडत उपवास। फिरतसें आस धरोनियां ॥ ४ ॥ [२१३३]

हारपल्याची नका चित्तीं। धरूं खंती वायांच ॥ १ ॥ पावलें तें म्हणा देवा। सहज सेवा या नांव(वें) ॥ २ ॥ होणार तें भोगें घडे। लाभ जोडे संकल्पें ॥ ३ ॥

ज्याच्याजवळ पुष्कळ द्रव्य आहे त्याला जगतामध्यें सर्व लोक मानतात १. त्याचें वचन आई, बाप, भाऊ असे सर्व गोत (नातेवाईक व इतर लोक) मानतात २. जोंपर्यंत द्रव्याच्या योगानें मोठा व्यापार चालत आहे तोंपर्यंत त्याच्या बहिणी त्याला दादासाहेब, या बसा, असें म्हणतात ३. बायकोच्या अंगावर दागदागिने उत्तम प्रकारचे सर्व काळ घातले म्हणजे ती आज्ञेमध्यें राहून त्याला मानते ४. तुकाराम महाराज म्हणतात, असलें हें द्रव्यामुळें मिळालेलें भाग्य नाशिवंत आहे असें तुम्ही समजा ५. [२१३०]

चांगल्यावाईट ठिकाणाचा (व वेळेचा) विचार न करितां जो कोणी बोलतो तें त्याचें बोलणें गाढवाच्या ओरडण्याप्रमाणें होय २. तो जशी क्रिया करितो, त्याप्रमाणें त्या अविचारी दुर्जनास शिक्षा होते. तो लंड (अविचारी) आहे (असें समजावें) २. जसें गाढव हें कोणत्या वेळेस लाथाळी करावी हें जाणत नाहीं [तसा तो लंड वाटेल त्या वेळेस वाटेल त्याशीं तंटा करितो] ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याला धर्मनीतीनें हित कोणतें आहे आणि बरेंवाईट कोणतें आहे तें कळत नाहीं ४. [२१३१]

मीं आपल्या कंठामध्यें हरिनामरूपी शिक्का धारण केला आहे. त्या योगानें आतां मी कळिकाळाला धक्का देईन १. अहो जन हो, हा समर्थांचा रोखा व शिक्का तुम्ही माना, कारण हा रोखा आणि शिक्का (वेद आणि नाम दोन्ही) त्याच्या बरोबरीचीं आहेत २. जर तुम्ही हा रोखा अथवा शिक्का न मानाल तर तुम्ही आपलें नाक व कान हीं सांभाळा ३. हा हरिनामाचा शिक्का लंकेचा राजा जो रावण त्यानें मानला नाहीं म्हणून देवानें त्याचें निःसंतान केलें ४. ज्या वेळीं विषाच्या योगानें महादेवाच्या सर्वांगाचा दाह झाला त्या वेळीं हा नामशिक्का त्यानें मानल्यामुळें (हरिनाम घेतल्यामुळें) त्याचें सर्वांग शीतल झालें ५. तुकाराम महाराज म्हणतात, हा नामशिक्का मीं धारण केला आहे. त्या योगानें मी निजसुखाच्या (आत्मसुखाच्या) राज्यपटावर बसलों ६. [२१३२]

सर्व भूतांचे ठिकाणीं देव आहे अशा भावनेनें मी सर्व लोकांस आलिंगन देतों पण माझ्या ठिकाणीं स्त्री अथवा पुरुष ही भावना नाहीं १. हा माझ्या अंतरांतील भाव पांडुरंग जाणत आहे, म्हणून हें खरोखर मला सांगण्याचें कारण नाहीं २. सर्व लोकांना भव (संसार) समुद्रांतून तरून नेण्याची नौका हरिकथा ही आहे. हिचा पसारा मी दयेनें जगतामध्यें केला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी कांहीं उपाशीं मरत नाहीं, पण ह्या जगताचें कार्य व्हावें ही आशा धरून मी फिरत आहें ४. [२१३३]

अहो जन हो, जर तुमच्या कांहीं वस्तु गमावल्या तर तुम्ही त्यांची व्यर्थ काळजी करूं नका १. त्या वस्तु 'कृष्णार्पण' झाल्या असें तुम्ही म्हणा. त्या योगानें देवाची सेवा तुम्हांस सहज (सहजभक्ति) घडेल २. जें कांहीं होणारें आहे तें आपापल्या संचित कर्माप्रमाणें होत असतें पण त्याचा संकल्प देवाकडे केला तर सहज मोठा लाभ मिळतो ३.

तुका म्हणे मोकळें मन । अवघें पुण्य या नांवें ॥ ४ ॥ [२१३४]

नेसणें आलें होतें गळ्या । लोक रळ्या करिती ॥ १ ॥ आपणियां सांवरिलें । जग भलें आपण ॥ २ ॥ संबंध तो तुटला येणें । जागेपणें चेष्टांच्या ॥ ३ ॥ भलती सवा होती अंगें । वासर (वासर) वेगें पडिलें ॥ ४ ॥ सांवरिलें नीट वोजा । दृष्टिलाजा पुढिलांच्या ॥ ५ ॥ बरे उघडिले डोळे । हळहळेपासूनि ॥ ६ ॥ तुका म्हणे विटंबना । नारायणा चुकली ॥ ७ ॥ [२१३५]

जिव्हा जाणे फिकें मधुर कीं क्षार । येर मांसपर हातास न कळे ॥ १ ॥ देखावें नेत्रीं बोलावें मुखें । चित्ता सुखदुःखें कळों येती ॥ २ ॥ परिमळासी घ्राण ऐकती श्रवण । एकाचें कारण एका नोहे (नव्हे) ॥ ३ ॥ एके देहीं भिन्न ठेवियेल्या (दावियेल्या) कळा । नाचवी पुतळा सूत्रधारी ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐशी जयाची सत्ता । कां तया अनंता विसरलेती ॥ ५ ॥ [२१३६]

न लगे द्यावा जीव सहजचि जाणार । आहे तो विचार जाणा कांहीं ॥ १ ॥ मरण जो मागे गाढवाचें बाळ । बोलिजे चांडाळ शुद्ध त्यासी ॥ २ ॥ तुका म्हणे कांहीं होईल स्वहित । निधान जो थीत टाकूं पाहे ॥ ३ ॥ [२१३७]

मोल वेंचूनियां धुंडिती सेवका । आम्ही तरी फुका मागों बळें ॥ १ ॥ नसतां जवळी हित फार करूं । जीवभाव धरूं तुझ्या पायीं ॥ २ ॥ नेदूं भोग आम्ही आपुल्या शरीरा । तुम्हांसी दातारा व्हावें म्हूण ॥ ३ ॥ कीर्ति तुझी करूं आमुचे सायास । तूं कां रे उदास पांडुरंगा ॥ ४ ॥ तुका म्हणे तुज काय मागों आम्ही । फुकाचें कां ना भी म्हणसी ना ॥ ५ ॥ [२१३८]

तुकाराम महाराज म्हणतात, आपलें मन मलविरहित (राग-द्वेषरहित) असें मोकळें ठेविलें तर तेंच सर्व पुण्य आहे ४. [२१३४]

जर आपलें नेसलेलें वस्त्र फिटून वर गळ्यामध्यें आलें तर सर्व लोक आपली कुचेष्टा करतील १. (अशा वेळीं लोकांवर न रागावतां) आपण सावधानपणानें वस्त्र सांवरून वागणूक केली असतां आपणांस व लोकांस भलेपणा मिळतो २. अशा प्रकारच्या सावधगिरीनें लोकापवादाचा संबंध तुटतो ३. ज्या वेळीं अज्ञानरूपी झोपेनें ग्रस्त झालों होतों त्या वेळीं माझीं सर्व अंगें अस्ताव्यस्त होतीं ४. सावध झाल्यावर दृष्टीनें पाहूं लागलों तेव्हां लोकांची लाज वाटून चांगल्या व्यवस्थितपणानें मीं आपलीं अंगें सांवरलीं ५. अशा फजितीपासून सांवरल्यावर मीं डोळे उघडले, हें मला बरें वाटलें ६. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, आतां माझी सर्व फजिती चुकली, हें बरें झालें (कारण हरिनामामुळें देहाचा व लोकांचा विसर पडला. लोकांच्या चेष्टेकडे माझें लक्षच राहिलें नाहीं) ७. [२१३५]

पदार्थ पाणचट आहे कीं मधुर आहे कीं खारट आहे, हें जिभेलाच कळतें. जिभेमध्यें जसें मांस आहे तसें (इतर अवयवांत व) हातामध्यें मांस आहे पण हें (चवीचें) वर्म हातास कळत नाहीं १. पाहाण्याचा धर्म डोळ्यांचा, बोलणें हा वाणीचा आणि सुखदुःख हा चित्ताचा आहे २. सुगंध अथवा दुर्गंध घेणें हा धर्म नाकाचा आहे व ऐकणें हा कानांचा धर्म आहे. एका इंद्रियाचें कार्य दुसऱ्या इंद्रियापासून होणार नाहीं ३. एका देहाच्याच इंद्रियांचे ठिकाणीं असे भिन्नभिन्न ज्ञानधर्म ठेविले आहेत ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या अनंताची अशी सत्ता आहे त्यास हे जीव कां विसरले? ५. [२१३६]

जीव मुद्दाम द्यावयास नको, तो सहजच जाणार आहे, हें मूळचेंच ठरलेलें आहे असें तुम्ही समजा १. देवाजवळ मरण जो मागतो तो गाढवाचें बालक आहे व तो शुद्ध चांडाळ आहे असें समजावें २. तुकाराम महाराज म्हणतात, जवळ असलेला ठेवा जो टाकूं पाहातो त्याला असें कळत नाहीं, कीं त्यापासून आपलें कांहीं स्वहित (कल्याण) होईल (आपण जिवंत राहिलों तर ह्या देहानें हरिभक्ति व संतसेवा होईल) ३. [२१३७]

देवा, पगार देऊन चाकर हुडकीत बसलांत? आम्ही तर तुमचें फुकट बळेंच-मुद्दाम-दास्यत्व मागतों (तरी तू चाकरी करूं देत नाहींस हें आश्चर्य आहे) १. तूं जवळ नसलास तरी आम्ही तुझ्या पायीं जीवभाव ठेवून आमचें पुष्कळ हित करूं २. आम्ही सुखोपचार न भोगतां तुम्हांला पाहिजे म्हणून तें सर्व अर्पण करूं ३. हे पांडुरंगा, आम्ही यत्नानें जगतांत तुझी कीर्ति वाढवूं. असें असतांना तूं आमच्याविषयीं उदास कां? ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही तुजजवळ विशेष काय मागत आहोंत? तुझेकडून फुकटचें अभयवचन देखील कां मिळत नाहीं? ६. [२१३८]

काय लवणकणिकेविण । एके क्षीण सागर ॥ १ ॥ मां हे येवढी अडचणी । नारायणीं मजविण ॥ २ ॥ कुबेर आटाहासे (अट्टाहासें) जोडी। काय कवडीकारणें ॥ ३ ॥ तुका म्हणे काचमणि। कोण गणी भांडारी ॥ ४ ॥ [२१३९]

तुज मज नाहीं भेद। केला सहज विनोद ॥ १ ॥ तूं माझा आकार । मी तों तूंच निर्धार ॥ २ ॥ मी तुजमाजी देवा। घेसी माझ्या अंगें सेवा ॥ ३ ॥ मी तुजमाजी अचळ । मजमाजी तुझें बळ ॥ ४ ॥ तूं बोलसी माझ्या मुखें । मी तों तुजमाजी सुखें ॥ ५ ॥ तुका म्हणे देवा। विपरीत ठायीं नांवा ॥ ६ ॥ [२१४०]

वैराग्याचें भाग्य । संतसंग हाचि लाग ॥ १ ॥ संतकृपेचे हे दीप । करी साधका निष्पाप ॥ २ ॥ तोचि देवभक्त। भेदाभेद नाहीं ज्यांत ॥ ३ ॥ तुका प्रेमें नाचे गाये (गाय) । गाणियांत विरोन जाये (जाय) ॥ ४ ॥ [२१४१]

जप तप ध्यान न लगे धारणा । विठ्ठल कीर्तनामाजी उभा ॥ १ ॥ राहें माझ्या मना दृढ या वचनीं । आणिक तें मनीं न धरावें ॥ २ ॥ कीर्तनीं समाधि साधन तें मुद्रा । रहातील थारा धरोनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे मुक्ति हरिदासांच्या घरीं । वोळंगती चारी ऋद्धिसिद्धि ॥ ४ ॥ [२१४२]

नाहीं तुज कांहीं मागत संपत्ती । आठवण चित्तीं असों द्यावी ॥ १ ॥ सरलिया भोग येईन शेवटीं। पायापें या भेटी अनुसंधानें ॥ २ ॥ आतां मजसाठीं याल आकारास । रोकडी हे आस नाहीं देवा ॥ ३ ॥ तुका म्हणे मुखीं असो तुझें नाम । देईल तो श्रम देवो काळ ॥ ४ ॥ [२१४३]

एखाद्या मिठाचा बारीक खडा समुद्रांत नसला तर तेवढ्यानें त्या समुद्राला कमीपणा येईल काय ? १. तसें नारायणाच्या व्यापक स्वरूपाचे ठिकाणीं माझ्यावांचून मोठा संकोच (कमीपणा) होईल काय ? २. कुबेर मोठ्या यत्नानें धन मिळवितो तें काय एका कवडीकरितां ? (त्याच्या दृष्टीनें कवडीला कांहींच किंमत नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, भांडारखान्याच्या अधिपतीजवळ एखाद्या सामान्य कांचेच्या मण्याची काय किंमत! (त्याप्रमाणें मला गरिबाला देव कशाला किंमत देईल ? मी देवावांचून अपूर्ण असलों तरी तो मात्र माझ्यावांचूनहि पूर्ण आहे) ४. [२१३९]

हे देवा, तुझ्या माझ्यामध्यें भेद नाहीं. पूर्वी जो मजकडून भेदाचा विचार बोलण्यांत आला तो सर्व तुझ्याबरोबर विनोद केला १. माझा सर्व आकार तूं आहेस, फार काय सांगावें, मी म्हणून जो आहें तो तूंच आहेस २. देवा, मी सर्व तुझ्या स्वरूपामध्यें असून तूं मजकडून सेवा घेत आहेस ३. देवा, मी तुझ्या स्वरूपाचे ठिकाणीं स्थिर आहें व माझ्यामध्यें सर्व कांहीं बळ तुझेंच आहे ४. माझ्या मुखानें तूंच बोलत आहेस व मी तुझ्यामध्यें सुखानें वास्तव्य करीत आहें ५. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, वरवर असणाऱ्या तुमच्या आमच्या नांवरूपांतच भेद आहे (पण खरें पाहातां मी आणि तूं एकच आहोंत) ६. [२१४०]

वैराग्याचें भाग्य संतसंगति करणें हेंच होय १. संत हे कृपेचे दीप आहेत. ते साधकांना निष्पाप करितात २. देवाचा तोच भक्त आहे, कीं ज्याच्यामध्यें भेद व अभेद या कांहीं कल्पना राहिल्या नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी प्रेमानें हरीचें नाम गातों व त्याच छंदानें नाचतों व तें गातां गातां त्या गाण्याच्या प्रेमांत देहबुद्धीनें नाहींसा होतों ४. [२१४१]

जप, तप, ध्यान इत्यादि साधनें करावयास नकोत. एक विठोबाचें कीर्तन केल्यानें तो साक्षात् तेथें येऊन उभा राहातो १. हे माझ्या मना, तूं वर दर्शित केलेल्या विठ्ठलकीर्तनाच्या ठिकाणीं दृढ निश्चयानें राहा व तूं दुसरें कांहीं आपल्या ठिकाणीं येऊं देऊं नकोस २. समाधि व अनेक मुद्रा श्रीहरीच्या कीर्तनाचा आश्रय करून राहातील ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरिदासांच्या घरीं सलोकतादि मुक्ति व अष्टसिद्धि दास्यत्व करीत असतात ४. [२१४२]

हे देवा, तुझ्याजवळ मी कांहीं संपत्ति मागत नाहीं. तुझ्या चित्तांत माझा आठव असावा एवढी देणगी दे. अथवा, सर्व काळ तुझा आठव माझ्या चित्तांत असावा १. माझें पापकर्म भोगून संपल्यावर अखेरीस तुझ्या स्वरूपाच्या अनुसंधानानें मला तुझ्या पायांचें दर्शन होईल (तुझ्या निर्गुण रूपाला मी प्राप्त होईन) २. हे देवा, आतां तुम्ही माझ्याकरितां सगुण साकार व्हाल अशी मजमध्यें रोकडी आशा नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्या मुखामध्यें तुमचें नाम राहावें. मग काळाला काय दुःख द्यावयाचें असेल तें तो खुशाल देवो ४. [२१४३]

हितावरी यावें । कोणी बोलिलों या भावें ॥ १ ॥ नव्हे विनोद उत्तर । केले रंजवाया चार ॥ २ ॥ केली अटाअटी (आटाआटी) । अक्षरांची देवासाटीं ॥ ३ ॥ तुका म्हणे खिजों । नका जागा येथें निजों ॥ ४ ॥ [२१४४]

संचित प्रारब्ध क्रियमाण । अवघा जाला नारायण ॥ १ ॥ नाहीं आम्हांसी संबंधु । जरा मरण कांहीं बाधु ॥ २ ॥ द्वैताद्वैतभावें । अवघें व्यापियेलें देवें ॥ ३ ॥ तुका म्हणे हरी । आम्हांमाजी क्रीडा करी ॥ ४ ॥ [२१४५]

नेणें करूं सेवा । पांडुरंगा कृपाळुवा ॥ १ ॥ धांवें बुडतों मी काढीं । सत्ता आपुलिया ओढीं ॥ २ ॥ क्रियाकर्महीन । झालों इंद्रियां अधीन ॥ ३ ॥ तुका विनंती करी । वेळोवेळां पाय धरी ॥ ४ ॥ [२१४६]

जयापासोनि सकळे(ळ) । महीमंडळ हें झालें ॥ १ ॥ तो एक पंढरीचा राणा । न ये अनुमाना श्रुतीसी ॥ २ ॥ विवादती जयासाठीं । जगजेटी तो विठ्ठल ॥ ३ ॥ तुका म्हणे (तो) आकळ । आहे सकळ व्यापक । ॥ ४ ॥ [२१४७]

नाहीं रूप नाहीं नांव । नाहीं ठाव धराया ॥ १ ॥ जेथें जावें तेथें आहे । विठ्ठल मायबहीण ॥ २ ॥ नाहीं आकार विकार । चराचर भरलेंसे ॥ ३ ॥ नव्हे निर्गुण सगुण । जाणे कोण तयासी ॥ ४ ॥ तुका म्हणे भावाविण । त्याचें मन वोळेना ॥ ५ ॥ [२१४८]

आहे सकळां वेगळा । खेळे कळा चोरोनि ॥ १ ॥ खांबसूत्राचिये परी । देव दोरी हालवितो ॥ २ ॥ आपण राहोनि निराळा । कैसी कळा नाचवी ॥ ३ ॥ जेव्हां आसुडितो दोरी । पडे तेव्हां भूमीवरी ॥ ४ ॥ तुका म्हणे तो जाणावा । सखा आपुला करावा ॥ ५ ॥ [२१४९]

मनुष्यांनीं आपल्या हिताकडे प्रवृत्त व्हावें अशा भावनेनें आम्ही उपदेशाचे कांहीं शब्द बोललों १. माझे सर्व शब्द जनरंजनार्थ थट्टेचे आहेत असें नाहीं २. अक्षरांचे पाठपाठांतराची खटाटोप देवाकरितां केली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या शब्दानें तुम्ही खिजूं नका व निजूंहि नका. येथें जागे राहा ४. [२१४४]

संचित (सांटविलेलें), प्रारब्ध (भोगितों तें) व क्रियमाण (करितों तें) हें सर्व नारायणच झाला आहे १. आतां आमच्याशीं कोणाचा संबंध नाहीं. अस्ति, जायते, वर्धते, विपरिणमते, अपक्षीयते, विनश्यति ह्या षड्विकारांची आम्हांला कांहीं बाधा नाहीं २. द्वैत व अद्वैत ह्या सर्व कल्पना ह्या देवाच्या स्वरूपानें व्यापल्या आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरि हा सर्वतोपरि आमच्यामध्यें अभेदानें क्रीडा करीत आहे ४. [२१४५]

हे कृपावंता पांडुरंगा, तुझी सेवा कशी करावी हें मी जाणत नाहीं १. मी ह्या संसारसागरांत बुडत आहें, तेव्हां आपल्या सत्तेनें मला बाहेर काढण्याकरितां तूं धांवत ये २. मी क्रियाकर्मभ्रष्ट असून इंद्रियांचे स्वाधीन झालों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या पायांला मिठी घालून मी अशा प्रकारची वेळोवेळीं प्रार्थना करीत आहें ४. [२१४६]

ज्याच्यापासून सर्व पृथ्वीमंडल निर्माण झालें आहे १. असा एक पंढरीचा राजा आहे, त्याचें अनुमान श्रुतींस देखील करितां येत नाहीं २. ज्याच्याविषयीं अनेक वादविवाद करीत आहेत असा तो विठ्ठल सगळ्या जगामध्यें बलाढ्य आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो सर्वांना न कळणारा असा आकळ (अ-कळ) असून सर्वव्यापक आहे ४. [२१४७]

ज्या परमात्म्याचे ठिकाणीं रूपहि नाहीं व नांवहि नाहीं व कांहीं आश्रय करावा असें ठिकाणहि नाहीं १. ज्या ठिकाणीं जावें तेथें आई, बहीण जो विठ्ठल तो भरला आहे २. त्याच्या ठिकाणीं (स्थूल-सूक्ष्म) आकारादि विकार कांहीं नसून तो सर्व चराचर जगतांत भरला आहे ३. तो निर्गुणहि नाहीं व सगुणहि नाहीं अशा देवाला कोण जाणूं शकेल ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, एक त्याचे विषयीं दृढभाव असल्याशिवाय तो कधींहि वळणार नाहीं ५. [२१४८]

परमात्मा सर्व उपाधींहून आपण वेगळा राहून व लोकांना कळूं न देतां सर्व क्रीडा करीत आहे १. कळसूत्राच्या बाहुल्याप्रमाणें देव प्रारब्धाची दोरी हातांत घेऊन सर्वांना नाचवीत आहे २. देव आपण सर्वांहून निराळा राहून सर्वांना नाचविण्याचें त्याचें चातुर्य कसें आहे पाहा ! ३. ज्या वेळेस प्रारब्धक्षयाचे दोरीस तो हांसडा देतो (प्रारब्धक्षय होतो), त्या वेळेस देहबाहुली गतप्राण होऊन पडते ४. तुकाराम महाराज म्हणतात, असा जो देव त्यास जाणून आपलें व त्याचें सख्यत्व करावें ५. [२१४९]

आतां पुढें मना। चाली झाली नारायणा ॥ १ ॥ येथें राहिलें राहिलें। कैसें गुंतोनि उगलें ॥ २ ॥ भोंवतें भोंवुनी। आलियाची झाली धणी ॥ २ ॥ तुका म्हणे रंगें। रंगीं रंगलें श्रीपांडुरंगें ॥ ४ ॥ [२१५०]

आळस पाडीं विषयकामीं। शक्ति देईं तुझ्या नामीं ॥ १ ॥ हेचि विनवणी। विनविली धरा मनीं ॥ २ ॥ आणिक वचना मुकी वाणी। तुमच्या गर्जो द्यावी गुणीं ॥ ३ ॥ तुका म्हणे पाय डोळां। पाहें एरवीं आंधळा ॥ ४ ॥ [२१५१]

कोण वेंची वाणी। आतां क्षुल्लका कारणीं ॥ १ ॥ आतां हेंचि काम (माप) करूं। विठ्ठल हृदयांत धरूं ॥ २ ॥ नेदाविया वृत्ति। आतां उठोंचि बहुती ॥ ३ ॥ उपदेश लोकां। करुनी वेडा होतो तुका ॥ ४ ॥ [२१५२]

मागणें तें एक तुज। देईं विचारोनि मज ॥ १ ॥ नको दुर्जनाचा संग। क्षणक्षणां चित्तभंग ॥ २ ॥ जन्म घेईन मी नाना। बहु सोसीन यातना ॥ ३ ॥ रंक होईन दीनांचा। घायें देहपात साचा ॥ ४ ॥ तुका हेंचि आतां। देईं देईं तूं सर्वथा ॥ ४ ॥ [२१५३]

जाणसी उचित। पांडुरंगा धर्मनीत ॥ १ ॥ तरि म्यां बोलावें तें काई। सरे ऐसें तुझे पायीं ॥ २ ॥ पालटती क्षण। संचितप्रारब्धक्रियमाण ॥ ३ ॥ तुका म्हणे सत्ता। होसी सकळ करिता ॥ ४ ॥ [२१५४]

तुम्ही कांटाळलां तरी। आम्हां न सोडणें हरि ॥ १ ॥ जावें कवणिया ठायां। सांगा विनवितों पायां ॥ २ ॥ केली जिवें (जिवा) साटी। आतां सुखें लागा पाठीं ॥ ३ ॥ तुका म्हणे ठाव। न सोडणें हाचि भाव ॥ ४ ॥ [२१५५]

हे नारायणा, माझ्या मनाची विषयांकडे जाण्याची गति कुंठित झाली १. तें तुझ्या स्वरूपीं निमूटपणें गुंतून कसें राहिलें आहे ! २. तुला सोडून विषयाच्या सभोंवतीं फिरणारें मन तुझ्याच ठिकाणीं आल्यामुळें, त्याची तृप्तता झाली ३. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीपांडुरंगाच्या रंगानेंच माझें मन रंगून गेलें आहे (तेव्हां हे मानवा, तूं देखील आपलें मन स्थिर कर व ह्याच रंगांत तें रंगूं दे) ४. [२१५०]

हे देवा, विषयसेवन करण्याविषयीं आमच्यांत आळस उत्पन्न कर व तुझें नाम घेण्याविषयीं बल व हुशारी दे १. अशी जी मी (द्विवार) विनंति करीत आहें, ती तुम्ही मनांत घ्या २. तुमच्या चिंतनावाचून दुसरें बोलण्याविषयीं माझी वाणी मुकी व्हावी. तिनें निरंतर तुमचेच गुणानुवाद गर्जत असावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमचे पाय मी डोळ्यांनीं पाहावे. त्यावांचून इतर पाहाण्याविषयीं मी आंधळा व्हावें ४. [२१५१]

क्षुल्लक हकिगती सांगण्याकडे (हरिनामावांचून क्षुद्र कामाकडे) वाणीचा व्यय कोणीं करावा ? १. आतां विठ्ठल-चिंतनाचेंच (माप) काम करूं व त्याला हृदयांत धारण करूं २. अनेक प्रकारच्या वैषयिक वृत्तीचा आपल्या हृदयावर उठाव होऊं देऊं नका. अथवा मी होऊं देणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी सर्व लोकांना हरिभक्तीचा उपदेश करून मीहि स्वतः पांडुरंगचिंतनीं वेडा होईन ४. [२१५२]

देवा, तुझ्याजवळ एक मागणें आहे तें तूं मला विचार करून दे १. तें हें, कीं दुर्जनांची संगति मला केव्हांहि होऊं देऊं नकोस. त्याच्या योगानें चित्तास क्षणोक्षणीं विक्षेप होतो (मनाची शांतता बिघडते) २. मी नाना प्रकारचे जन्म घेईन व पुष्कळ यातना सोशीन. तुझ्या प्राप्तीविषयीं जे दीन आहेत, त्यांचा मी दास होईन, त्यांच्या बोधाच्या आघातानें माझा खरा देहपात होईल ४. तुकाराम महाराज म्हणतात, मला आतां हीच तूं सर्वथैव देणगी दे (असें द्विवार सांगतों) ५. [२१५३]

हे पांडुरंगा, तूं योग्य धर्मनीति जाणणारा आहेस १. म्हणून तुला मान्य होईल असें तुझ्यापाशीं काय बोलावें ? २. तुझ्या कृपेनें संचित, प्रारब्ध व क्रियमाण हीं कर्में एका क्षणांत बदलून जातात ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व सत्ताधारी व सर्वकर्ता तूंच एक आहेस ४. [२१५४]

हे हरि, तुम्हीं आमचा कितीहि कंटाळा केला तरी मला तुम्हांला सोडतां येत नाहीं १. कारण तुला सोडून आम्हीं कोणत्या ठिकाणीं जावें तें सांग, अशी मी तुजजवळ विनंति करीत आहें २. आम्हीं आपला जीव तर तुम्हांला अर्पण केला आहेच, आतां तुम्ही खुशाल आमचे मागें लागा ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हांला तुमचें ठिकाण सोडतां येत नाहीं असा आमच्या ठिकाणीं तुमच्याविषयींचा दृढभाव आहे ४. [२१५५]

येउनि संसारीं । मी तों एक जाणें हरी ॥ १ ॥ नेणें आणिक कांहीं धंदा । नित्य ध्यातसें गोविंदा ॥ २ ॥ कामक्रोधलोभस्वार्थ । अवघा माझा पंढरीनाथ ॥ ३ ॥ तुका म्हणे एक । धनी विठ्ठल मी सेवक ॥ ४ ॥ [२१५६]

सर्वपक्षीं हरि साहे सखा झाला । ओल्या अंगणींच्या कल्पलता त्याला ॥ १ ॥ सहज चालीं चालतां पायवाटे । चिंतामणी समान होती गोटे ॥ २ ॥ (ऐसें हरिभक्तांचें ज्ञान महिमान अतर्क्य तयांचें दुर्लभ दरुशन ॥ ३ ॥) तुका तरी सहज बोले वाणी । त्याचे घरीं वेदांत वाहे पाणी ॥ ३ ॥ (॥ ४ ॥) [२१५७]

काय पुण्य ऐसें आहे मजपाशीं । तांतडी धांवसी पांडुरंगा ॥ १ ॥ काय ऐसा भक्त वायां गेलों थोर । तूं मज समोर होसी वेगा ॥ २ ॥ काय कष्ट माझे देखिली चाकरी । तो तूं झडकरी पाचारिशी ॥ ३ ॥ कोण मी नांवाचा थोर गेलों मोटा । अपराधी करंटा नारायणा ॥ ४ ॥ तुका म्हणे नाहीं ठाउकें संचित । येणें जन्में हित नाहीं केलें ॥ ५ ॥ [२१५८]

आमुचिया भावें तुज देवपण । तें कां विसरोन राहिलासी ॥ १ ॥ समर्थासी नाहीं उपकार स्मरण । दिल्या आठवण वांचोनियां ॥ २ ॥ चळण वळण सेवकांच्या बळें । निर्गुणाचे मुळें सांभाळावें ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां आलों खंडावरी । प्रेम देउनि हरि बुझवावें ॥ ४ ॥ [२१५९]

आम्ही मेलों तेव्हां देह दिला देवा । आतां करूं सेवा कोणाची मी ॥ १ ॥ सूत्रधारी जैसा हालवितो कळा । नाचतो पुतळा नाचे छंदें ॥ २ ॥ बोलतसें जैसें बोलवितो देव । मज हा संदेह कासयाचा ॥ ३ ॥ पाप पुण्य ज्याचें तोचि जाणे कांहीं । संबंध हा नाहीं आम्हांसवें ॥ ४ ॥

ह्या देहादि संसारामध्यें मी एक हरीलाच जाणतों १. दुसरा व्यवहार मी जाणत नाहीं. नित्य गोविंदाचें ध्यान मी करीत आहें २. काम, क्रोध, लोभ व स्वार्थ हे सर्व कांहीं माझा पंढरीनाथ आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, एक विठ्ठल माझा धनी व मी त्याचा एक सेवक आहें ४. [२१५६]

सर्व बाजूनें हरि हा मित्र ज्याला साह्य झाला आहे त्याच्या आंगणांतील जे कांहीं ओले वेल व वृक्ष असतील ते सर्व त्याला (अपेक्षित वस्तु देणारे) कल्पतरु आहेत १. तो सहज चालूं लागला तर त्याच्या पायांला लागणारे खडेगोटे हे चिंतामणिसमान (चिंतिलेलें देणाऱ्या दुर्लभ रत्नाप्रमाणें) होतात २. (हरिभक्तांच्या ज्ञानाची एवढी थोरवी आहे. ती तर्क करतां येत नाहीं. त्यांचे दर्शन दुर्मिळ आहे ॥ ३ ॥) तुकाराम महाराज म्हणतात, मी सहज शब्द बोलतों पण त्या शब्दांच्या घरांत (माझ्या घरांत) वेदांत पाणी वाहात आहे (माझ्या सहज बोलण्यांत वेदांताचें प्रतिपादन होत आहे) ३ (४). [२१५७]

हे पांडुरंगा, तूं त्वरेनें माझ्याकडे धांव घेशील असें मजजवळ पुण्य काय आहे? १. देवा, तूं माझ्याकडे त्वरेनें धांव घेशील असा काय मी तुझा मोठा भक्त वायां जात आहें? २. अशी काय तुम्हीं माझी कष्टाची चाकरी पाहिलीत, कीं त्या कळकळीनें तुम्ही मला आपल्याजवळ बोलवाल? ३. हे नारायणा, मी असा काय नामांकित आहें? तर मी अपराधी करंटा आहें ४. तुकाराम महाराज म्हणतात, मला माझें संचित ठाऊक नाहीं व ह्या जन्मांतहि मीं स्वहित केलें नाहीं ५. [२१५८]

आमच्या भक्तिभावानें तुला देवपणा आला आहे त्याचा तुला कसा विसर पडला? १. समर्थावर किती उपकार केले तरी त्याला त्याची आठवण दिल्यावांचून स्मरण नसतें २. आम्हां सेवकांस सेवेच्या बलानें तुमच्या ठिकाणचें (निर्गुणाचे ठिकाणीं अवतार घेण्याचें) चलनवलनादिक सांभाळावें लागतें; कारण तुम्ही निर्गुण आहांत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे हरि, आतां मी वायदावर (निकरावर) आलों आहें, तर तुम्ही मला आपल्या विषयींचें प्रेम देऊन समजवावें ४. [२१५९]

ज्या वेळेला आम्हीं आपला देह देवास समर्पण केला त्या वेळेलाच आम्ही मेलों; आतां मी कोणाची सेवा करूं? १. सूत्रधारी देव जसें प्रारब्धाचें सूत्र हालवीत आहे तसा त्या छंदानें आमचा देहरूपी पुतळा चेष्टा करीत आहे २. देव जसें बोलवीत आहे तसें मी बोलतों. मग ('सर्वांचा नियंता देव आहे' ह्याविषयीं) मला संशय कशाचा! ३. पाप व पुण्य हीं सर्व देवाचींच आहेत, तीं त्यानेंच जाणावीं. आमच्याशीं त्यांचा कांहीं संबंध राहिला नाहीं ४.

तुका म्हणे तुम्ही आइका हो मात । आम्ही या अतीत देहाहूनी ॥ ५ ॥ [२१६०]

लागों नेदी बोल पायां तुझ्या हरी । जीव जावो परि न करीं आण ॥ १ ॥ परनारी मज रखुमाईसमान । वमनाहूनि धन नीच मानीं ॥ २ ॥ तुका म्हणे याची लाज असे कोणा । सहाकारी दीना ज्याची तया ॥ ३ ॥ [२१६१]

हेचि भेटी साच रूपाचा आठव। विसांवला जीव आवडीपें ॥ १ ॥ सुखाचें भातुकें करावें जतन। सेविलिया ताहान भूक जाय ॥ २ ॥ दुरी जवळी आपणचि होतें। कवळिलें चित्तें जीवनासी ॥ ३ ॥ तुका म्हणे नाम घेतां वेळोवेळां । होतील शीतळा सकळा नाडी ॥ ४ ॥ [२१६२]

आपुलिया बळें नाहीं मी बोलत । सखा कृपावंत वाचा त्याची ॥ १ ॥ साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी । शिकविता धनी वेगळाची ॥ २ ॥ काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा । वागवी पांगुळा पायांविण ॥ ४ ॥ [२१६३]

हित सांगे तेणें दिलें जीवदान । घातकी तो जाण मनामागें ॥ १ ॥ बळें हे वारावे अधर्म करितां । अंधळें चालतां आडरानें ॥ २ ॥ द्रव्य देऊनियां धाडावें तीर्थासी । नेदावें चोरासी चंद्रबळ ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसें आहे हें पुराणीं । नाहीं माझी वाणी पदरींची ॥ ४ ॥ [२१६४]

ऐसा घेई कां रे संन्यास । करीं संकल्पाचा नाश (न्यास) ॥ १ ॥ मग तूं राहें भलते ठायीं । जनीं वनीं खाटे भोई ॥ २ ॥ तोडीं जाणिवेची कळा । होईं वृत्तीसी वेगळा ॥ ३ ॥

तुकाराम महाराज म्हणतात, अहो जन हो, आम्ही या देहाहून निराळे आहोंत ही आमची पारमार्थिक स्थितीची हकीगत तुम्ही ऐका ५. [२१६०]

हे हरि, ज्या योगानें तुम्हांस उणेपणा येईल तें मी करणार नाहीं. ह्याविषयीं माझा प्राण जरी गेला तरी मी भलतें आचरण करणार नाहीं १. परस्त्रिया रखुमाईमातेसारख्या मानल्या आहेत आणि द्रव्य हें ओकलेल्या अन्नापेक्षां नीच आहे असें मी मानतों २. तुकाराम महाराज म्हणतात, जो दीनाला साह्य करणारा देव त्याचा मी दास आहें असें म्हणवितों, म्हणून माझी लाज त्याला आहे. त्यावांचून दुसऱ्या कोणास असणार ? ३. [२१६१]

देवाच्या रूपाची आठवण करून आवडीनें जीवास विसांवा द्यावा म्हणजे हीच देवाची खरी भेट आहे १. देवाचें सुख हेंच जतन करून तोच खाऊ सेवन करावा, म्हणजे तहानभुकेची बाधा होणार नाहीं २. आपल्या चित्तानें नामरूप जीवनास कवळून धरलें असतां तें विठ्ठलाचें रूप दूर असलेलें आपल्या आपण जवळ येतें. ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाचें नाम जर वरचेवर घेतलें, तर सर्व शरीराच्या नाड्या शीतळ होऊन विषय नाहींसे होतील ४. [२१६२]

मी आपल्या सामर्थ्यानें बोलत नाहीं. कृपाळु जो देव तो माझा सखा होऊन मला बोलवीत आहे, म्हणून हें सर्व बोलणें त्याचें आहे १. गोड शब्दानें साळुंकी बोलत असते, पण तिला शिकविणारा मालक वेगळा आहे २. तसें म्यां पामरानें उपदेशाचें काय बोलावयाचें आहे ? परंतु त्या विश्वप्रतिपालन करणाऱ्या देवानें मला तसें बोलविलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या देवाची युक्ति कोणास कळणार आहे ? तो देव पाय नसणाऱ्या पांगळ्यांस देखील चालवील (अशी त्याची शक्ति आहे) ४. [२१६३]

जो कोणी हित सांगणारा आहे, त्यानें आपणांस जीवदान दिलें असें समजावें आणि तूं आपल्या मनाप्रमाणेंच वाग असें सांगणारा तो घातकी आहे असें समजावें १. जो कोणी अधर्मानें वागत असेल त्याचें आपल्या सामर्थ्यानें निवारण करावें. जसें आडरस्त्यांत वाट चुकून आंधळे जातात त्यांस वाटेस लावावें (तसें करण्यांत मोठें पुण्य आहे) २. जर आपल्याजवळ द्रव्य असेल तर तें दुसऱ्यास देऊन त्याला तीर्थास पाठवावें आणि चोराला कोणत्याहि रीतीनें साहाय्य करूं नये (आज तुला चंद्र अनुकूल आहे असें चोरास सांगूं नये) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें बोलणें माझ्या पदरचें नाहीं. असे प्रकार पुराणामध्यें सांगितले आहेत ४. [२१६४]

अरे, तूं जेणेंकरून सर्व संकल्पांचा (अहं-ममतेच्या भ्रमाचा) नाश होईल असा संन्यास घे १. मग तूं जनांत, वनांत अगर बाजेवर अथवा भूमीवर पाहिजे त्या ठिकाणीं राहा (तुझें कांहीं बिघडणार नाहीं) २. सर्व जाणतेपणाच्या युक्त्या नाहींशा करून (लौकिक शहाणपणाचा अभिमान टाकून) देहसंबंधीं अहंवृत्तीपासून (मी ब्रह्म आहें ह्या वृत्तीहून) वेगळा हो ३.

तुका म्हणे नभा । होईं अणूचाही गाभा ॥ ४ ॥ [२१६५]

सोळा सहस्र होऊं येतें । भरलें रितें आम्हांपें ॥ १ ॥ ऐसे तुम्हां ठायाठाव । देव म्हणूनी संपादे ॥ २ ॥ कैंचीं चिरामध्यें चिरें । मना बरें आलें तें ॥ ३ ॥ तुका म्हणे पांडुरंगा । अंगसंगा भिन्न करा ॥ ४ ॥ [२१६६]

इहलोकीं आम्हां भूषण अवकळा । भोपळा वाकळा अन्नभिक्षा ॥ १ ॥ निमोली संपदा भयविरहित । सर्वकाळ चित्त समाधान ॥ २ ॥ छिद्राचा आश्रम उंदीरकुळवाडी । धन नाम जोडी देवाची ते ॥ ३ ॥ तुका म्हणे एके शेवटीं राहाणें । वर्ततों या जना विरहित ॥ ४ ॥ [२१६७]

गाऊं नेणें कळा कुसरी । कान धरोनि म्हणें हरी ॥ १ ॥ माझ्या बोबडिया बोला । चित्त द्यावें वा विठ्ठला ॥ २ ॥ मज हंसतील लोक । परि मी गाईन निःशंक ॥ ३ ॥ तुझे नामीं मी निर्लज्ज । काय जनासवें काज ॥ ४ ॥ तुका म्हणे माझी विनंती । तुम्ही परिसा कमळापती ॥ ५ ॥ [२१६८]

विष पोटीं सर्पा । जन भीतें तया दर्पा ॥ १ ॥ पंच भूतें नाहीं भिन्न । गुण दुःख देती शीण ॥ २ ॥ चंदन प्रिय वासें । आवडती जाती ऐसें ॥ ३ ॥ तुका म्हणे दाणा । कुचर मिळों नये अन्ना ॥ ४ ॥ [२१६९]

देव अवघें प्रतिपादी । वंदी सकळां एका निंदी ॥ १ ॥ तेथें अवघें गेलें वायां । विष घास एके ठायां ॥ २ ॥ सर्वांग कुरवाळी । उपटी एक रोमावळी ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्त । नाहीं जयाचें अंकित ॥ ४ ॥ [२१७०]

तुकाराम महाराज म्हणतात, जसा देव अणुरेणूपासून सर्व आकाशांत व्यापक आहे तसाच तूं हो ४. [२१६५]

हे देवा, तुम्हांला सोळा हजार स्त्रिया आहेत तितकीं रूपें तुम्ही धरतां असे तुम्ही सर्वत्र भरलेले आहांत आणि आम्हांविषयीं मात्र कसे नाहींसे झालांत ? १. तुम्ही अशा प्रकारें चांगले वाईट ठिकाणांची निवड करितां, हें तुम्हांस देवपणामुळें शोभतें आहे २. ज्या वेळीं द्रौपदीचें वस्त्रहरण केलें त्या वेळीं तिच्या वस्त्रांत अनेक वस्त्रें तुम्हीच झालां, त्या वेळीं तुमच्या मनास हें कसें आलें बरें ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, तुम्ही आम्हांला आपल्या संगतीपासून दूर करतां हें बरोबर नाहीं ४. [२१६६]

ह्या लोकामध्यें आम्हीं भिक्षेचें अन्न खावें, पाणी पिण्यास भोपळा व पांघरावयास गोधडी अशा फजीतीनें राहावें हेंच आम्हांला भूषण आहे १. कारण ही संपत्ति निर्भय असून फुकट मिळणारी आहे. ह्या योगानें सर्व काळ आमचें चित्त समाधानानें राहातें २. आमचें राहाण्याचें देहरूपी घर नऊ भोकांचें आहे त्यामध्यें कामक्रोधरूपी उंदरांचा व्यवहार आहे आणि देवाचें नाम हेंच धन सांठविलें आहे अथवा, आमचें विषमानें भरलेलें चंद्रमौळी घर आहे व त्यांत उंदरांचा व्यवहार आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अखेरीस आम्हांला एकटें राहावयाचें आहे, म्हणून आम्हीं आपली वागणूक सर्व जनांहून वेगळी ठेवली आहे ४. [२१६७]

हे देवा, मी रागदारीचें गाणें जाणत नाहीं, पण तुझ्यापुढें मी आपले कान धरून तुझ्या नामाच्या छंदानें नाचत आहें १. हे विठ्ठला, हे माझे बोबडे शब्द चित्त देऊन ऐका २. जरी मला पाहून लोक हंसले तरी मी त्यांची लाज न धरितां तुझें नाम निःसंशय गाईन ३. तुझें नाम गाण्याविषयीं मी निर्लज्ज झालों आहें, मग मला लोकांची काय गरज आहे ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे लक्ष्मीपति देवा, ही विनंति मीं केली आहे ती तुम्ही ऐका ५. [२१६८]

सर्पाच्या पोटामध्यें विष आहे, त्या दराऱ्यामुळें लोक त्याला भितात १. एरवीं पाहिलें असतां सर्वांचे देह पंचभूतात्मकच आहेत; पण चांगल्या वाईट गुणांनीं सुख अगर दुःख होतें २. चंदनाचे ठिकाणीं सुवास आहे म्हणून तो प्रिय असतो. ह्यावरून ज्याची जशी जात आहे तसा तो आवडतो असें सिद्ध होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, कुचर दाणा शिजलेल्या अन्नांत न मिळतां कच्चा राहातो ४. [२१६९]

जो कोणी सर्व ठिकाणीं एकच देव आहे असें प्रतिपादन करून सर्वांना नमन करितो आणि एखाद्याचा धिक्कार करतो १. जसें पोटभर जेवून एका घासांत विषाचें सेवन करणें त्यायोगानें सर्व जेवण व्यर्थ जातें (तसें वर सांगितलेलें करणें व्यर्थ होतें) २. सर्व अंगावरून हातानें कुरवाळलें असतां गोड वाटतें पण त्या अंगावरील एक केंस जर उपटला तर तितकेंच दुःख होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचें मन स्वाधीन नाहीं त्याचें (बोलणें व वागणें परस्पर-विरुद्ध असल्यामुळें) सर्व कांहीं वायां गेलें ४. [२१७०]

मज माझा उपदेश । आणिकां नये याची रीस ॥ १ ॥ तुम्ही अवघे पांडुरंग । मीच दुष्ट सकळ चांग ॥ २ ॥ तुमचा मी शरणांगत । कांहीं करा माझें हित ॥ ३ ॥ तुका पाय धरी । मी हें माझें दूर करीं ॥ ४ ॥ [२१७१]

जाणे त्याचें वर्म नेणे त्याचें कर्म । केल्याविण धर्म नेणवती ॥ १ ॥ मैथुनाचें सुख सांगितल्या गुण(शून्य) । अनुभवाविण कळों न ये ॥ २ ॥ तुका म्हणे जळो शाब्दिक हें ज्ञान । विठोबाची खूण विरळा जाणे ॥ ३ ॥ [२१७२]

अभिमानी पांडुरंग । गोवा कशाचा हो मग ॥ १ ॥ अनुसरा लवलाहीं । नका विचार करूं कांहीं ॥ २ ॥ कोठें राहतील पापें । जालिया हो अनुतापें ॥ ३ ॥ तुका म्हणे येचि घडी । उभ्या पाववील थडी ॥ ४ ॥ [२१७३]

तुझें वर्म हातीं । दिलें सांगोनियां संतीं ॥ १ ॥ मुखीं नाम धरीन कंठीं । अवघा सांठवीन पोटीं ॥ २ ॥ नवविधा वेढिन आधीं । सांपडलासी भावासंधीं ॥ ३ ॥ तुका म्हणे बळिये गाढे । कळिकाळ पायां पडे ॥ ४ ॥ [२१७४]

माझ्या मना लागो चाळा । पाहावया विठ्ठल डोळां ॥ १ ॥ आणीक नाहीं चाड । न लगे संसार हा गोड ॥ २ ॥ तरिच फळ जन्मा आलों । सरता पांडुरंगीं झालों ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । देईं चरणांची सेवा ॥ ४ ॥ [२१७५]

अवघें जेणें पाप नासे । तें हें असे पंढरीसी ॥ १ ॥ गात जागा गात जागा । प्रेम मागा विठ्ठला ॥ १ ॥ अवघी सुखाचीच राशी । पुंडलिकाशीं वोळली ॥ ३ ॥

हा उपदेश माझा मलाच आहे; ह्याचा त्रास दुसऱ्या कोणीं मानूं नये १. कारण तुम्ही सर्व लोक पांडुरंगस्वरूप असून चांगले आहांत आणि मी मात्र वाईट आहें २. ह्याकरितां मी तुम्हांला शरण आलों आहें, म्हणून तुम्ही माझें कांहीं तरी हित करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, मीं तुमचे पाय धरले आहेत. म्हणून देह मी व देहसंबंधीं माझें ह्या भावनेंतून (भ्रमांतून) मला सोडवा ४. [२१७१]

जे जाणते आहेत त्यांचें खरें मर्म व जे नेणते आहेत त्यांचें वाईट कर्म हीं दोन्ही प्रत्यक्ष घडल्याशिवाय त्यांचा अनुभव येत नाहीं (विठ्ठल अनुभवावांचून कळत नाहीं, आणि कर्म शास्त्रोक्त विधीनें केल्यावांचून धर्मरूप होत नाहीं) १. स्त्रीचें मैथुनसुख व त्याचें माहात्म्य नुसतें सांगितल्यानें कळत नाहीं, तें प्रत्यक्ष करावें तेव्हां त्या सुखाचा अनुभव येतो २. तुकाराम महाराज म्हणतात, कोरड्या शब्दानें जे ज्ञान सांगतात त्या ज्ञानाला आग लागो. माझ्या विठोबारायाचा सुखानुभव एखाद्यासच असतो ३. [२१७२]

जर आपला अभिमान पांडुरंगानें धरला तर मग प्रपंचाचा गुंताडा कशाचा आहे? १. ह्याकरितां तुम्ही कांहीं विचार न करितां लवकर पांडुरंगाचे ठिकाणीं रत व्हा २. जर तुम्हांला पश्चात्ताप झाला तर तुमचे ठिकाणीं पाप कोठून राहील? ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो पांडुरंग उभाउभीं ह्याच घटकेला संसारांतून पार पाडील ४. [२१७३]

हे देवा, तुझ्या प्राप्तीचें मर्म संतांनीं मला समजावून दिलें आहे १. तें मुख्य मर्म तुझें नाम मी आपल्या कंठांत धरून त्याच्या जपानें जो तूं सर्वव्यापक आहेस त्या तुला मी आपल्या हृदयांत सांठवीन २. तूं अगोदर आमच्या भावाच्या पेंचांत सांपडला आहेस म्हणून तुझ्या नवविधा भक्तीनें तुला वेढून टाकीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे आम्ही मोटे बलाढ्य आहोंत म्हणून कळिकाळ आमच्या पायां पडत आहे ४. [२१७४]

विठ्ठलाचें रूप डोळ्यांनीं पाहावें असा वेध माझ्या मनास लागावा १. ह्यावांचून मला दुसरी इच्छा नाहीं आणि हा संसार गोड लागत नाहीं २. ह्या पांडुरंगाचे ठिकाणीं मी कृतकृत्य (मान्य) झालों, त्या योगानें माझ्या जन्माचें सार्थक झालें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझ्या चरणांची सेवा मला सर्वकाळ दे ३. [२१७५]

जें रूप पाहिलें म्हणजे सर्व पापांचा नाश होतो तें पंढरीमध्यें प्रत्यक्ष उभें आहे १. ह्याकरितां तूं मुखानें हरिनाम गात पंढरीस जा (असें द्विवार सांगतों) आणि तेथें जाऊन विठोबारायाजवळ प्रेम मागून घे २. जी सर्व सुखाची रास आहे

तुका म्हणे जवळी आलें। उभें ठेलें समचरणीं ॥ ४ ॥ [२१७६]

देह तुझ्या पायीं। ठेवूनि झालों उतराई ॥ १ ॥ आतां माझ्या जीवा। करणें तें करीं देवा ॥ २ ॥ बहुत अपराधी। मतिमंद हीनबुद्धि ॥ ३ ॥ तुका म्हणे नेणें। भावभक्तीचीं लक्षणें ॥ ४ ॥ [२१७७]

जन हें सुखाचें दिल्याघेतल्याचें। अंत हें काळींचें नाहीं कोणी ॥ १ ॥ झाल्या हीन शक्ति नाकडोळे गळती। सांडोनियां पळती रांडापोरें ॥ २ ॥ बाईल म्हणे खर(खरें) मरता तरी बरें। नासिलें हें घर थुंकोनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे माझीं नव्हतील कोणी। तुज चक्रपाणी वांचूनियां ॥ ४ ॥ [२१७८]

जाणोनि नेणतें करीं माझें मन। तुझी प्रेमखूण देऊनियां ॥ १ ॥ मग मी व्यवहारीं असेन वर्तत। जेवीं जळा आंत पद्मपत्र ॥ २ ॥ ऐकोनि नाइकें निंदास्तुति कानीं। जैसा कां उन्मनी योगिराज ॥ ३ ॥ देखोनि न देखें प्रपंच हा दृष्टि। स्वप्नींचिया सृष्टि चेवि(इ)ल्या जेवीं ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐसें जालियावांचून। करणें तें तें(तो तो) सीण वाटतसे ॥ ५ ॥ [२१७९]

विठ्ठला विठ्ठला। कंठ आळवितां फुटला ॥ १ ॥ कां रे कृपाळू न होसी। काय झालें मजविसीं ॥ २ ॥ झाल्या वे(ये)रझारा। जन्म बहुतांचा फेरा ॥ ३ ॥ तुका म्हणे नष्टा। अबोलण्या तुझ्या चेष्टा ॥ ४ ॥ [२१८०]

वरतें करोनियां तोंड। हांका मारितो प्रचंड ॥ १ ॥ रागें आळवितो नाना। गातो काय

ती पुंडलिकरायास प्रसन्न होऊन त्याच ठिकाणीं राहिली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें रूप निराकारामध्यें दूर होतें तें आकारास येऊन पुंडलिकरायाच्या जवळ सारखे चरण जोडून उभें राहिलें आहे ४. [२१७६]

मी आपला देह तुझ्या पायांचे ठिकाणीं अर्पण करून तुझ्या उपकारांतून उत्तीर्ण झालों आहें १. हे देवा, आतां तुला माझ्या जिवास जसें करणें असेल तसें तूं कर २. मी केवळ मतिमंद असून बुद्धिहीन आहें आणि माझ्या हातून अगणित अपराध घडले आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्याविषयींच्या भावभक्तीचीं लक्षणें (भाव कशाला म्हणतात, भक्ति कशी करावी, भक्तीचीं लक्षणें कोणतीं हें) मी जाणत नाहीं ४. [२१७७]

हे सर्व जन माझ्या सुखाचे सोबती आहेत आणि ह्यांस कांहीं दिल्याघेतल्यानें ते उपयोगीं पडतात; पण अखेरच्या वेळेला दुःखसमयीं माझ्या उपयोगीं कोणी पडणार नाहींत १. आपल्या शक्ति क्षीण होऊन नाक व डोळे वाहावयास लागतील त्या वेळीं बायकापोरें हीं सर्व तुला टाकून जातील २. आपली बायको देखील आपला त्रास करील, कारण ह्यानें जागोजाग थुंकून माझ्या घराचा नाश केला आहे, तर हा म्हातारा गाढव लवकर मरेल तर बरें होईल असें ती म्हणेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे चक्रपाणि देवा, तुझ्यावांचून अंतकाळीं माझ्या उपयोगी कोणीहि पडणार नाहीं ४. [२१७८]

हे देवा, मला तुझ्याविषयींच्या प्रेमाची खूण देऊन माझें सर्व मन जाणून अजाण (जाणीवपणाची ऊर्मी राहूं देऊं नको) असें ठेव १. मग मी जसें पाण्यामध्यें कमळ असून तें ओलें होत नाहीं तसा संसारव्यवहारामध्यें असून अलिप्त राहीन २. ज्याप्रमाणें योगिराज उन्मनीच्या अवस्थेमध्यें निमग्न असल्यामुळें जगाची रहाटी त्याला कळत नाहीं, तसा मी लोकांनीं स्तुति अथवा निंदा केलेली कानांनीं ऐकून बहिऱ्यासारखा राहीन ३. जसा स्वप्नांत अनेक सृष्टींचा भास होतो व तो जागृत झाल्यावर मिथ्या वाटतो, तसा प्रपंच डोळ्यानें पाहून तो खोटा आहे असें मानून मी आंधळ्याप्रमाणें राहीन ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशी स्थिति झाल्यावांचून जें कांहीं करावें तें सर्व व्यर्थ श्रम वाटतात ५. [२१७९]

अरे विठ्ठला देवा, तुला हांका मारितां मारितां माझा कंठ फुटला आहे १. तूं माझ्याविषयीं कृपाळू कां होत नाहींस? तुला झालें तरी काय? २. मीं पुष्कळ जन्मांचे फेरे सोसून तुझ्याकडे पुष्कळ हेलपाटे घातले ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे नष्टा, असल्या तुझ्या सर्व (चमत्कारिक) चेष्टा सांगण्यासारख्या नाहींत ४. [२१८०]

जे कोणी वर तोंड करून उच्च स्वरानें मोठ्यानें आरोळ्या मारतात १. गायनाच्या नाना प्रकारच्या कलेनें (रागांनीं व आलापांनीं देवाला) हांका मारतात (आळवितात) १. पण त्या गाण्यांत काय गातों (त्या देवाचें स्वरूप

तें कळेना ॥ २ ॥ आशा धरोनि मनीं । कांहीं देईल म्हणऊनि ॥ ३ ॥ पोटा एका साठीं । तुका म्हणे झाले कष्टी ॥ ४ ॥ [२१८१]

प्रपंच वोसरो । चित्त तुझे पायीं मुरो ॥ १ ॥ ऐसें करीं गा पांडुरंगा । शुद्ध रंगावें रंगा ॥ २ ॥ पुरे पुरे आतां । नको दुजियाची सत्ता ॥ ३ ॥ लटिकें तें फेडा । तुका म्हणे जाय पीडा ॥ ४ ॥ [२१८२]

बोलाचे गौरव । नव्हे माझा हा अनुभव ॥ १ ॥ माझी हरिकथा माउली । नव्हे आणिकांसी पांगिली ॥ २ ॥ व्याली वाढविलें । निजपदीं निजविलें ॥ ३ ॥ दाटली वोरसें । त्रिभुवन ब्रह्मरसें ॥ ४ ॥ विष्णु जोडी कर । माथां रज वंदी हर ॥ ५ ॥ तुका म्हणे बळ । तोडरीं हा कळिकाळ ॥ ६ ॥ [२१८३]

शेवट तो भला । माझा बहु गोड झाला ॥ १ ॥ आलों निजाच्या माहेरा । भेटों रखुमाईच्या वरा ॥ २ ॥ परिहार झाला । अवघ्या दुःखाचा मागिल्या ॥ ३ ॥ तुका म्हणे वाणी । गेली आतां घेऊं धणी ॥ ४ ॥ [२१८४]

तुझें नाम गाऊं आतां । तुझ्या रंगीं नाचों था था ॥ १ ॥ तुझ्या नामाचा विश्वास । आम्हां कैंचा गर्भवास ॥ १ ॥ तुझे नामीं विसर पडे । तरी कोटि हत्या घडे ॥ ३ ॥ नाम घ्या रे कोणी फुका । भावें सांगतसे तुका ॥ ४ ॥ [२१८५]

बाइल तरी ऐसी व्हावी । नरकीं गोवी अनिवार ॥ १ ॥ घडों नेदी तीर्थयात्रा । केला कुतरा हातसोंका ॥ २ ॥ आपुलीच करवी सेवा । पुजवी देवासारिखें ॥ ३ ॥ तुका म्हणे गाढव पशु । केला नाशु आयुष्य ॥ ४ ॥ [२१८६॥

काय आहे) तें लोकांना कळत नाहीं २. ऐकणारांनीं मला कांहीं तरी द्यावें अशी आशा मनांत धरून ते गातात म्हणून त्यांचें गाणें व्यर्थ आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, असले लोक एका पोटाकरितां व्यर्थ दुःखी झाले आहेत (त्यांचा परमार्थाचा हेतु नसतो) ४. [२१८१]

हे देवा, सर्व प्रपंच नाहींसा होऊन माझें मन तुझ्या पायांच्या ठिकाणीं लीन व्हावें १. अगा पांडुरंगा, तुझ्या शुद्ध रंगानें माझें चित्त रंगावें असें तूं कर (माझें चित्त तन्मय करून टाक) २. आतां माझ्यावर दुसऱ्याची सत्ता चालूं देऊं नको. तो (अविद्या, कर्म, वासना ह्यांच्यावरचा) पराधीनपणा असलेला पुरे (असें द्विवार सांगतों) ३ तुकाराम महाराज म्हणतात, जें कांहीं खोटें आहे त्याचें तुम्ही निवारण करा (हा खोटा संसार घालवा) म्हणजे माझी (जन्ममरणांची) पीडा नाहींशी होईल ४. [२१८२]

मी हरिकथेची शब्दानेंच महती गातों असें नाहीं, तर तिच्याबद्दल माझा हा अनुभव आहे १. माझी हरिकथा आई ही दुसऱ्या साधनांच्या तंत्रानें असणारी नाहीं, अथवा तिनें मला परतंत्र केलें नाहीं २. आमच्या पारमार्थिक देहाला ब्रह्मतीच व्याली (तिनेंच जन्म दिला) व त्याला तिनें वाढवून आत्मपदाचे ठिकाणीं स्थिर केलें ३. त्रैलोक्यांत ती ब्रह्मरसाच्या पान्ह्यानें भरली आहे ४. विष्णु तिला हात जोडतात व तिच्या रजःकणांचें वंदन शिव मस्तकानें करतात ५. तुकाराम महाराज म्हणतात, तिनें कळिकाळाला बंदिखान्यांत घातलें आहे, अशी ती बलवान् आहे ६. [२१८३]

माझा अखेर परिणाम फार चांगला झाला १. रुक्माईचा पति जो माझा आईबाप त्याच्याकडे मी आलों २. आतां मागील सर्व दुःखांचा नाश झाला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी वाचा ही हरीकडे गेल्यामुळें आपण आतां त्याचेंच चिंतन (हरिनामसंकीर्तन) तृप्त होईपर्यंत करूं ४. [२१८४]

हे देवा, आतां तुझें नाम गाऊं व आतां तुझ्या आनंदरंगामध्यें थै थै नाचूं १. तुझ्या नामाचे ठिकाणीं आमचा जर विश्वास आहे तर आम्हांला गर्भवास कसा मिळेल? २. तुझ्या नामाचा जर विसर पडला तर मला कोटि जीवहत्येचें पातक लागो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे, हरीचें नाम कोणी फुकट घ्या, असें मी श्रद्धेनें (कळवळ्यानें) सांगत आहें ४. [२१८५]

अनिवार नरकामध्यें बुडविणारी बायको असली तर अशी असावी १. कीं जी पतीकडून केव्हांहि तीर्थयात्रा होऊं देत नाहीं. जिनें आपल्या नवऱ्याला घरीं बाळगून ठेवलेल्या कुत्र्याप्रमाणें अधीन करून टेविलें आहे २. जी नवऱ्याकडून आपली सेवा व पूजा देवासारखी करून घेते ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे जे नर आहेत ते गाढव पशु होत. त्यांनीं आपल्या आयुष्याचा नाश केला ४. [२१८६]

बाइले अधीन होय ज्याचें जिणें। तयाच्या अवलोकनें पडिजे द्वाड ॥ १ ॥ कासया ते जंत जिताती संसारीं। माकडाच्या परी गारोड्यांच्या ॥ २ ॥ बाइलेच्या मना येईल तें खरें। अभागी तें पुरें बाइलेचें ॥ ३ ॥ तुका म्हणे मेंग्या गाढवाचें जिणें। कुतऱ्याचें खाणें लगबगा ॥ ४ ॥ [२१८७]

जगीं मान्य केलें हा तुझा देकार। कीं कांहीं विचार आहे पुढें ॥ १ ॥ करितों कवित्व जोडितों अक्षरें। येणें काय पुरें झालें माझें ॥ २ ॥ तोंवरी हे माझी न सरे करकर। जो नव्हे विचार तुझ्या मुखें ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज पुंडलिकाची आण। जरी कांहीं वंचन करिसी मज ॥ ४ ॥ [२१८८]

कोंडिला गे माज। निरोधुनि द्वार। राखण तें बरें। येथें करा कारण ॥ १ ॥ हा गे हा गे हरि। करितां सांपडला चोरी। घाला गांठीं धरी। जीवें माया त्रासाया ॥ २ ॥ तेंचि पुढें आड। तिचा लोभ तिला नाड। लावुनि चरफड। हात गोउनी पळावें ॥ ३ ॥ संशयाचें बिरडें। याचें निरसलें भेटी। घेतलीस तुटी। आतां देतां घेतां फावेल ॥ ४ ॥ तुका येतो काकुळती। वाउगिया सोड। यासीचि निवाड। आम्ही भारवाहिका ॥ ५ ॥ [२१८९]

झड मारोनियां बैसलों पंगतीं। उठवितां फजिती दातयाची ॥ १ ॥ काय तें उचित तुम्हां कां न कळे। कां हो झांका डोळे पांडुरंगा ॥ २ ॥ घेईन इच्छेनें मागोनि सकळ। नाहीं नव्हे काळ बोलायाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे झालों माना अधिकारी। नाहीं लोक परी लाज देवा ॥ ४ ॥ [२१९०]

माझ्या वडिलांची मिरासी गा देवा। तुझी चरणसेवा पांडुरंगा ॥ १ ॥ उपवास पारणीं

ज्याचें जगणें बायकोचे आधीन झालें आहे, त्याला पाहाण्यानें मला अति त्रास होतो १. ते जंतवत् प्राणी संसारांत काय म्हणून जगले ? त्यांचा सर्व प्रकार गारुड्याच्या माकडासारखा आहे २. बायकोच्या मनांत येईल तेंच ज्याला खरें वाटतें असा तो पूर्ण करंटा बायकोच्या स्वाधीन आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मेंग्या गाढवाच्या जन्माप्रमाणें अथवा कुत्र्याच्या मचमच खाण्याप्रमाणें त्याचें सर्व आयुष्य समजावें ४. [२१८७]

हे देवा, जगतामध्यें तुम्हीं माझी येवढी जी मान्यता वाढविलीत ती ही तुमची आमच्या सेवेबद्दलची देणगी समजूं किंवा ह्यापेक्षां आणखी कांहीं पुढें देण्याचा विचार आहे ? मी शब्दाला शब्द जोडून कविता करतों, ह्यापासून माझी काय पूर्णता झाली आहे ? २. जोंपर्यंत तूं आपल्या मुखानें ह्या संबंधाचा कांहीं उल्लेख करणार नाहींस तोंपर्यंत तुझ्या मागची माझी कटकट संपणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तूं जर कांहीं माझ्यापासून चोरशील (माझ्या हिताविषयीं माझी फसवणूक करशील) तर तुला पुंडलीकाची शपथ आहे ४. [२१८८]

एक गवळण दुसरीला म्हणते, हे सखि, इंद्रियद्वार बंद करून अंतःकरणामध्यें हरीला कोंडला, आतां त्याचें रक्षण करणें हें चांगलें, म्हणून तेंच कार्य ह्या ठिकाणीं केलें पाहिजे १. अगे हा हरि, अगे हा हरि, असें म्हणतां म्हणतां हा चोरी करतांना सांपडला. मग त्याला सभोंवतीं वेढून जीवानें बळकट धरिलें, कारण आईला (मायेला) त्रास द्यावा म्हणून २. तोंच तिचा (मायेचा) लोभ तिच्या आड येऊन त्यानें तिला फसविलें, कारण देवानें तिचे हात गुंतवून तिला चरफडत ठेविली आणि आपण पळून गेला ३. तिच्या अंतःकरणामध्यें जें संशयाचें बिरडें होतें तें भगवंताच्या भेटीनें तुटलें. अशा प्रकारें (प्रपंचाशीं) संबंध सुटल्यावर त्या श्रीकृष्णाला ध्यावयास गेलें तर तो मिळतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी काकुळती येऊन विनंति करतों, कीं ज्या वावग्या वागणाऱ्या आहेत त्यांना तूं सोड. आम्ही संसाराचा भार वाहाणाऱ्या आहों असा त्यांच्याच मुखानें निवाडा झाला आहे (सख्यांनो, तुम्हीं श्रीहरीला कोंडलें आहे त्याला सोडूं नका, कारण तुम्ही संसाराचा भार वाहाणाऱ्या असल्यामुळें श्रीहरीच्या संगतीनेंच तुमचा संसार संपेल) ५. [२१८९]

मी झडप मारून बळेंच (संतांच्या) पंगतीस बसतों आहें. येथून मला उठविलें तर दात्याची फजिती होईल १. अहो पांडुरंगा, खरोखर योग्य कर्तव्य तुम्हांला कळत नाहीं का ? तुम्हीं बळेंच डोळेझांक कां करितां ? २. मला जें पाहिजे आहे तें मी सर्व मागून घेईन. नाहीं असें म्हणण्याचा हा काळ नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी मोठा मान मिळविण्याषयीं अधिकारी झालों आहें–पण हे देवा, मला लोकलज्जा नाहीं ४. [२१९०]

हे देवा पांडुरंगा, तुझी चरणसेवा करणें ही माझ्या वडिलांची मिरास (वतनदारी) आहे १. माझ्या वाडवडिलांनीं

राखिला दारवंटा । केला भोगवटा आम्हांलागीं ॥ २ ॥ वंशपरंपरा दास मी अंकिता । तुका मोकलितां लाज कोणा ॥ ३ ॥ [२१९१]

नाम न वदे ज्याची वाचा । तो लेक दो बापांचा ॥ १ ॥ हेचि ओळख तयाची । खूण जाणा अभक्ताची ॥ २ ॥ ज्यासी विठ्ठल नाहीं ठावा । त्याचा संग न करावा ॥ ३ ॥ ठावा नाहीं पांडुरंग । जाणा जातीचा तो मांग ॥ ४ ॥ नाम न म्हणे ज्याचें तोंड । तेंचि चर्मकाचें कुंड ॥ ५ ॥ तुका म्हणे त्याचे दिवशीं । रांड गेली महारापाशीं ॥ ६ ॥ [२१९२]

पतित मी पापी (मिराशी) शरण आलों तुज । राखीं माझी लाज पांडुरंगा ॥ १ ॥ तारियेले भक्त न कळे तुझा अंत । थोर मी पतित पांडुरंगा ॥ २ ॥ द्रौपदी बहिणी वैरी गांजियेली । आपणा ऐसी केली पांडुरंगा ॥ ३ ॥ प्रल्हादाकारणें स्तंभीं अवतार । माझा कां विसर पांडुरंगा ॥ ४ ॥ सुदाम ब्राह्मण दरिद्रें पीडिला । आपणा ऐसा केला पांडुरंगा ॥ ५ ॥ तुका म्हणे तुज शरण निजभावें । पाप निर्दाळावें पांडुरंगा ॥ ६ ॥ [२१९३]

कस्तूरीचें रूप अति हीनवर । माजी असे सार मोल तया ॥ १ ॥ आणीक ही तैसीं चंदनाचीं झाडें । परिमळें वाढे मोल तयां ॥ २ ॥ काय रूपें असे परीस चांगला । धातु केली मोला वाढ तेणें ॥ ३ ॥ फिरंगी आटितां नये बारा रुके । गुणें मोलें विके सहस्रावरी ॥ ४ ॥ तुका म्हणे नाहीं जातीसवें काम । ज्याचे मुखीं नाम तोचि धन्य ॥ ५ ॥ [२१९४]

नव्हें मी स्वतंत्र अंगाचा पाईक । जो (जे) हे सकळिक सत्ता वारूं ॥ १ ॥ तुम्हां आळवावें पाउला पाउलीं । कृपेची साउली करीं मज ॥ २ ॥ शक्तिहीन तरी झालों शरणागत । आपुला वृत्तांत जाणोनियां

उपास, पारणें आदि व्रतें करून तुमचें द्वार रक्षण करून ह्या वर सुचविलेला वांटा आम्हांला भोगण्याकरितां ठेविला आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, मी वंशपरंपरेनें तुमचा आज्ञाधारक दास आहें. आतां माझी जर आपण उपेक्षा केली तर ही लाज कोणाला ? ३. [२१९१]

ज्याची वाचा हरीचें नाम घेत नाहीं तो दोन बापांच्या पोटचा आहे असें समजावें १. हरीच्या नामाकडे भक्ति नसणें हीच तो अभक्त दोन बापांचा आहे असें ओळखण्याची खूण आहे असें समजावें २. ज्याला विठ्ठल दैवत ठाऊक नाहीं त्याची संगत कधींहि करूं नये ३. ज्याला पांडुरंग माहीत नाहीं तो जातीचा मांग आहे असें समजा ४. जें तोंड हरिनाम घेत नाहीं तें चांभाराचें कातडीं भिजविण्याचें कुंड आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या दिवशीं ह्याचा गर्भ राहिला त्या दिवशीं ह्याची आई म्हाराबरोबर गेली ६. [२१९२]

हे नारायणा, पांडुरंगा, मी (मिरासदार) पातकी पतित असून तुम्हांला शरण आलों आहें. आतां माझी लज्जा तुम्ही रक्षण करा १. हे पांडुरंगा, तुम्ही बहुत भक्तांचा उद्धार केलात. तुमचा अंत लागत नाहीं. मी मोठा पतित आहें २. हे पांडुरंगा, तुमच्या द्रौपदी बहिणीला दुर्योधनादि वैऱ्यांनीं गांजलें, त्या वेळीं चोळीची गांठ देण्याकरितां तुम्हीं तिला आपल्याप्रमाणें चतुर्भुज केलें ३. हे पांडुरंगा, तुम्ही प्रल्हादाकरितां खांबामध्यें नरसिंह रूप घेऊन प्रगट झालां. मग तुम्हांला माझाच कां विसर पडला ? ४. सुदामा ब्राह्मण दारिद्र्यानें पीडित झाला. त्याला तुम्हीं आपल्यासारखें श्रीमंत केलें ५. तुकाराम महाराज म्हणतात, मी निजभावानें तुम्हांला शरण आलों आहें, तरी माझें पाप तुम्ही नाहींसें करा ६. [२१९३]

कस्तुरीचें रूप वरून पाहातां वाईट दिसतें पण तिच्या आंतमध्यें सारभूत सुगंध असतो, म्हणूनच ती मौल्यवान् आहे १. आणि त्याप्रमाणें आणखी चंदनाचींहि झाडें दिसण्यांत सुंदर नसतात, पण त्यांच्या ठिकाणीं सुगंध असल्यामुळें तींहि अधिक मौल्यवान झालीं आहेत २. परीस हा रूपानें काय चांगला आहे ? पण तो सामान्य धातूचें (लोखंडाचें) अति मौल्यवान् असें सोनें करतो ३. चांगली तलवार आटवली तर त्याची बारा पैसे देखील किंमत येणार नाहीं. ती जर तशीच कायम ठेविली तर आपल्या अंगीं असलेल्या गुणामुळें ती हजार रुपयांस विकली जाईल ४. तुकाराम महाराज म्हणतात, जातीचा येथें संबंध नाहीं. हरिनाम जो मुखानें घेईल तोच धन्य आहे ५. [२१९४]

हें सर्व संसारदुःख आपल्या सत्तेनें निवारण करण्याइतका मी स्वतंत्र अधिकारी नोकर नाहीं १. हे देवा, पावलोपावलीं तुम्हांला मीं काकुळती यावें, हेंच माझें कर्तव्य आहे; म्हणून तुम्ही माझ्यावर कृपेची छाया करा २.

॥ ३ ॥ तुका म्हणे भवाभेणें धरिले पाय । आणीक उपाय नेणों कांहीं ॥ ४ ॥ [२१९५]

पाहों ग्रंथ तरी आयुष्य नाहीं हातीं । नाहीं ऐशी मती अर्थ कळे ॥ १ ॥ होईल तें हो या विठोबाच्या नांवें । अर्जिलें तें भावें जीवीं धरूं ॥ २ ॥ एखादा अंगासी येईल प्रकार । विचारितां फार युक्ति वाढे ॥ ३ ॥ तुका म्हणे आळी करितां गोमटी । मायबापा पोटीं येते दया ॥ ४ ॥ [२१९६]

पाहातां रूप डोळां भरे । अंतरीं(र) नुरे वेगळें । इच्छावशें खेळ मांडी । अवघें सांडी बाहेरी ॥ १ ॥ तो हा नंदानंदन बाइये । यासी काय परिचार वो ॥ २ ॥ दिसतो हा नव्हे तैसा । असे दिशाव्यापक । लाघव हा खेळासाठीं । होतां भेटी परतेना ॥ ३ ॥ म्हणोनि उभे ठाकलीये । परतली ये या वाटा । आड करोनियां तुका । जो या लोकां दाखवितो ॥ ४ ॥ [२१९७]

जाळी महा कर्में । दावी निजसुख वर्में ॥ १ ॥ ऐसें कळलें आम्हां एक । झालों नामाचे धारक ॥ २ ॥ तपाचे सायास । न लगे घ्यावा वनवास ॥ ३ ॥ तुका म्हणे येणें । कळिकाळ हें ठेंगणें ॥ ४ ॥ [२१९८]

कामक्रोध अहंकार नको देहीं । आशा तृष्णा माया लज्जा चिंता कांहीं । वास पंढरीचा जन्म सदा देईं । आणीक दुजें मागणें तुज नाहीं ॥ १ ॥ कृपा देईं दान हरि मज कृपा देईं दान । नासीं तिमिर दाखवीं चरण । आर्त पुरवावें भेटी देऊन । नको उपेक्षूं आलिया शरण ॥ २ ॥ नाम अखंड हृदयीं राहो वाणी । न पडो विसर क्षण जागृतीं स्वप्नीं । संतसमागम ऐसा दे लावूनी ।

मी जरी शक्तिहीन आहें तरी तुम्ही सर्वशक्तिमान् आहां असें जाणून तुम्हांला शरण आलों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या संसाराच्या भयानें मीं तुमचे पाय धरले. ह्यावांचून दुसरा उपाय कांहीं जाणत नाहीं ४. [२१९५]

अनेक ग्रंथ पाहावयास पुष्कळ आयुष्य पाहिजे, पण तें तर आपल्या स्वाधीन नाहीं व त्या ग्रंथार्थांचें ज्ञान होईल अशा तीव्र बुद्धीची अनुकूलताहि नाहीं १. विठोबाचें नाम घेण्यानें जें होणार असेल तें होवो. जें साधन मिळविलें आहे तेंच मनोभावानें जीवीं धरून राहूं २. विचार करावयास गेलें तर अनेक प्रकारच्या कुतर्क युक्ति वाढून एखादा जाणतेपणाचा (अभिमानाचा) भाव आपणांकडे येईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, बालकानें चांगला छंद घेतला तर त्याचा तो पुरविण्याविषयीं आईबापांचे मनांत दया येते (त्याप्रमाणें निष्ठेनें हरीचें नाम घेतलें तर हरीला त्या भक्ताची करुणा येऊन तो त्याचा उद्धार करील) ४. [२१९६]

श्रीहरीचें रूप पाहिल्याबरोबर तें डोळ्यांमध्यें भरतें व अंतःकरणहि त्याचेहून वेगळें राहात नाहीं. तो हरि भक्तांच्या हृदयांत इच्छेनुरूप क्रीडा करतो व त्यांचे हृदयांतील विकार बाहेर घालवितो १. तो हा नंदाचा पुत्र कृष्ण आहे. त्याची सेवा तरी कशी करावी ? २. जसा हा दिसतो तसा नाहीं. सर्व दिशा व्यापून तो राहिला आहे. त्याचें सर्व चातुर्य क्रीडा करण्याकरितां आहे (जगाची उत्पत्ति-स्थिति-संहार करण्याचा खेळ खेळण्याविषयीं हा फार चतुर आहे) व त्याची गांठ पडली असतां वियोग होत नाहीं (मानव संसाराकडे परतत नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणून उभी राहून या वाटेला परत आलें. देवाच्या आड होऊन मी या जनलोकांस दाखवीत आहें, अथवा म्हणून भगवत्स्वरूपाच्या विरहानें वेधलेली ती विरहिणी वाटेनें परतून उभी राहिली ती आडून मी लोकांना दाखवितों ४. [२१९७]

ज्या योगानें महाकर्मांचें (महापातकांचें) दहन होतें आणि निजसुखाचें खरें मर्म दिसून येतें १. अशा प्रकारचें मर्म एक आम्हांलाच समजलें आहे, म्हणून आम्ही नामचिंतन करणारे झालों आहोंत २. आतां तपादि साधनांचे सायास करणें नकोत आणि वनवास करणें नको ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या नामाच्या योगानें कळिकाळ हा लहान व दुर्बळ होतो ४. [२१९८]

हे देवा, काम, क्रोध, अभिमान, आशा, तृष्णा, माया, लज्जा, चिंता इत्यादि विकार माझ्या देहाचे ठिकाणीं राहूं देऊं नकोस, आणि मला सदा जन्म देऊन पंढरीमध्यें वास होईल असें कर. ह्यावांचून दुसरें तुला मी कांहीं मागत नाहीं १. हे हरि, तूं मला कृपादान दे (असें द्विवार विनवितों). माझे हृदयांतील अज्ञानांधकार नाहींसा करून मला तुझे पाय दाखीव, अशी माझी इच्छा तूं भेट देऊन पूर्ण कर, कारण मी तुला शरण आलों आहें. ह्याकरितां माझी उपेक्षा तूं करूं नकोस २. तुझें नाम सर्वकाळ हृदयांत असून मुखामध्यें राहावें, त्याचा विसर जागृतींत व स्वप्नाचे ठिकाणीं देखील क्षणभर होऊं नये आणि अशाच स्थितीनें वागणारे जे संत आहेत, कीं ते तुजवांचून दुसरें कांहीं जाणत नाहींत,

आणीक दुजें कांहीं नेणें तुजवांचूनी ॥ ३ ॥ पंथपुरींचा रविसुत पुरे आतां। आड करावा भवसिंधु ऐसा नव्हता। नाहीं अडथळा त्रैलोक्यामाजी सरता। विनवी तुकयाबंधु चरणीं ठेवूनि माथा ॥ ४ ॥ [२१९९]

तट्टाचे जातीला नाहीं भीड भार। लाता मारी थोर लहान नेणे ॥ १ ॥ परी त्या विशेष मनुष्य होऊनि। करी खंड मान वडिलांचा ॥ २ ॥ बेरसा गाढव माय ना बहिण। भुंके चवीविण भलतेंचि ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे बोकड मातलें। न विचारी आपुले तोंडीं मुते ॥ ४ ॥ [२२००]

मायझंवा खर गाढवाचें बीज। तें ऐसें सहज कळों येतें ॥ १ ॥ अपमानिलें जेणें श्रेष्ठाचें वचन। तेचि त्याची खूण ओळखावी ॥ २ ॥ मद्यपि तो पुरा अधम यातीचा। तया उपदेशाचा राग वायां ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे पिसाळलें सुनें। आपपर तेणें न विचारावें ॥ ४ ॥ [२२०१]

मत्स्यकूर्मशेषा कोणाचा आधार। पृथिवीचा भार वाहावया ॥ १ ॥ काय धाक आम्हां कासयाची चिंता। ऐसा तो असतां साहाकारी ॥ २ ॥ शंखचक्रगदा आयुधें अपार। वागवितो भार भक्तांसाठीं ॥ ३ ॥ पांडवां जोहरीं राखिलें कुसरी। तो हा बंधूचा कैवारी तुकयाच्या ॥ ४ ॥ [२२०२]

राम म्हणतां कामक्रोधांचें दहन। होय अभिमान देशधडी ॥ १ ॥ राम म्हणतां कर्म तुटल भवबंधन। न ये श्रमसीण स्वप्नामाजी ॥ २ ॥ राम म्हणतां जन्म नाहीं गर्भवास। नव्हे दारिद्रास पात्र कधीं ॥ ३ ॥ राम म्हणतां यम शरणागत बापुडें। अढळपद पुढें काय तेथें ॥ ४ ॥ राम म्हणतां

त्यांचा मला समागम दे ३. तुकाराम महाराजांचे बंधु कान्होबा म्हणतात, सूर्याचा जो पुत्र यम त्याच्या गांवास जाण्याचा रस्ताच चालणें हें मला पुरे, म्हणून आतां हा भवसमुद्र माझ्या पुढून नाहींसा करा, कारण तुम्ही कराल तर सर्व सत्ता तुमची असल्याकारणानें त्रैलोक्यांत तुम्हांला कोणी हरकत करणार नाहीं; म्हणून मी तुमच्या पायांवर मस्तक ठेवून विनंति करीत आहें ४. [२१९९]

तट्टाच्या जातीला कोणाची कांहीं भीड नाहीं म्हणून लहान थोर न समजतां वाटेल त्यास तें लाथा मारतें १. परंतु मनुष्य असून जो श्रेष्ठांची मानखंडना करतो तो त्या तट्टापेक्षांहि नीच आहे असें समजावें २. जो आपली आई बहीण न जाणतां वाटेल तशा बेचव शिव्यागाळी करितो तो गाढवाची अवलाद आहे असें समजावें ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, जें बोकड माजलेलें असतें तें कांहीं विचार न करितां आपल्या तोंडांत देखील मुततें ४. [२२००]

(ध्रुवपदांत दर्शविल्याप्रमाणें ज्याची वागणूक आहे) तो मात्रागमनी असून गाढवाच्या पोटचा आहे, असें साहाजिक समजून येतें १. ज्यांनीं श्रेष्ठांच्या आज्ञेचा धिक्कार केला आहे ते ह्या कृतीवरून व खुणेवरून वर सांगितल्याप्रमाणें आहेत असें जाणावें २. जो दारू पिणारा आहे तो अधम जातीचा असतो. त्याला जर कोणीं चांगलें शिकविलें तर तो सांगणारावर व्यर्थ रागावतो ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, जें कुत्रें पिसाळलेलें असतें, तें चावण्याच्या बाबतींत आपलें अगर परकें ह्याचा विचार करीत नाहीं ४. [२२०१]

मत्स्य, कूर्म व शेष हे पृथ्वीचें ओझें वाहातात, पण ह्यांना कोणाचा आधार आहे ? १. असा जो लाघवी देव, तो आमचा साह्यकारी आहे, म्हणून आम्हांला कोणाचा धाक नाहीं व कांहीं चिंता करण्याचें कारण नाहीं २. शंख, चक्र, गदा आदिकरून अगणित शस्त्रांचें ओझें भक्तांकरितां देव वागवीत आहे ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, ज्या वेळीं लाक्षागृहांत पांडव सांपडले होते, त्या वेळीं मोठ्या युक्तीनें त्यांना विवरांतून बाहेर काढून त्यांचें रक्षण केलें, असा जो देव तो माझा साह्यकारी आहे ४. [२२०२]

राम हें नामस्मरण केल्याबरोबर कामक्रोधांचें दहन होऊन शरीरांतील अभिमान देशोधडीस जातो १. रामनामाच्या योगानें सर्व कर्मांचें व संसाराचें बंधन तुटेल आणि कोणतेहि श्रम स्वप्नांत देखील होणार नाहींत २. नामस्मरणानें गर्भवासाचें दुःख नाहींसें होऊन पुनः जन्म घ्यावा लागत नाहीं आणि कोणतेंहि दारिद्र्य कोणत्याच वेळेला भोगावें लागत नाहीं ३. रामनाम घेतलें असतां यम गरीब होऊन शरणागत होतो आणि त्या योगानें जी अविनाशप्राप्ति होते,

धर्म घडती सकळ । तिमिरपडळ नासे हेळा ॥ ५ ॥ राम म्हणतां म्हणे तुकयाचा बंधु । तरिजेल भवसिंधु संदेह नाहीं ॥ ६ ॥ [२२०३]

मरोनि जाईन गुणनामावरूनी। तुझ्या चक्रपाणी मायबापा ॥ १ ॥ चुकविलीं दुःखें मायेचा वोळसा। तोडोनियां आशापाश तेणें ॥ २ ॥ केली काया तनु हिंवशी शीतळ। चिंता तळमळ नाहीं ऐशी ॥ ३ ॥ काळें तोंड काळ करूनि राहिलें। भूतमात्र जालें सज्जनसखे ॥ ४ ॥ तुकयाबंधु म्हणे अवघ्या दशदिशा। मुक्त रे परेशा तुझ्या पुण्यें ॥ ५ ॥ [२२०४]

आतां मागतों तें ऐक नारायणा। भावपूर्वक मनापासूनियां ॥ १ ॥ असों दे मोकळी जिव्हा जरी गाईल गुण। नाहीं तरी खिळून टाकी परती ॥ २ ॥ मातेचिया परी देखती परनारी। ठेवीं नेत्र तरी नाहीं तरी नको ॥ ३ ॥ तरी बरें कांटाळा करिती निंदास्तुतीचा। नाहीं तरी कानांचाही देख प्रेत्न ॥ ४ ॥ सकळ इंद्रियांचा निग्रह करूनि एक। राखावीं पृथक तोडोनि भ्रम ॥ ५ ॥ तुकयाबंधु म्हणे तेचि वाट प्राणां। पडतां नारायणा विसर तुझा ॥ ६ ॥ [२२०५]

नमस्कारी भूतें विसरोनि याती। तेणें आत्मस्थिति जाणीतली ॥ १ ॥ परउपकारीं वेंचियेल्या शक्ती। तेणें आत्मस्थिति जाणीतली ॥ २ ॥ द्वैताद्वैतभाव नाहीं जया चित्तीं। तेणें आत्मस्थिति जाणीतली ॥ ३ ॥ जयाचिये वाचे नये निंदास्तुती। तेणे आत्मस्थिति जाणीतली ॥ ४ ॥ उचित अनुचित जाणे धर्मनीती। दृढ भाव भक्ति मानव तो ॥ ५ ॥ तुकयाबंधु म्हणे वरकड ते येर। संसाराचे खर भारवाही ॥ ६ ॥ [२२०६]

चवदा भुवनें लोक तिन्ही दाढे जो कवळी। संपुष्ट तो संवळीमध्यें देखा ॥ १ ॥ उत्पत्तीसंहार

तिच्यापुढें ध्रुवाचें अढळपद देखील तुच्छ आहे ४. रामनाम उच्चारलें असतां सर्व धर्म घडतात आणि अज्ञानांधकाराचें पटल एका क्षणांत नाहींसें होतें ५. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, रामनाम उच्चारलें असतां तो भवसमुद्रांतून सहज तरेल ह्यांत कांहीं संशय नाहीं ६. [२२०३]

हे चक्रपाणि मायबापा, तुझ्या गुणांवरून व नामावरून मी माझा देह ओंवाळून टाकीन १. कारण त्या तुझ्या गुणनामानें माझा मायासंबंधींच्या दुःखाचा त्रास नाहींसा केला आणि मला सर्व आशापाशांतून मुक्त केलें २. त्रिविधतापानें माझी काया संतप्त झाली होती ती अति शीतळ केली, म्हणून कोणतीहि तळमळ व चिंता मला करण्याचें कारण नाहीं ३. कळिकाळ हा तोंड काळें करून लपून राहिला आणि सर्व जीवमात्र माझे आप्तवर्ग मित्र झाले आहेत ४. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे देवा, तूं सर्वांचा ईश असून सर्वांच्या पलिकडे आहेस. त्या तुझ्या पुण्यानें मला सर्व दिशा मोकळ्या झाल्या आहेत ५. [२२०४]

हे नारायणा, मी आपल्या मनोभावानें जें कांहीं मागतों तें आतां तूं ऐक १. जर माझी जिव्हा तुझे गुण गाईल तर ती मोकळी ठेव. नाहींपेक्षां तिला खिळून बंद करून टाक २. जर माझे डोळे परस्त्रिया मातेसमान पाहातील तर ते ठेवा, नाहींपेक्षां त्यांचें मला कारण नाहीं ३. हे माझे कान कोणाची स्तुति अथवा निंदा ऐकण्याचा त्रास मानतील तर बरें, नाहींपेक्षां ते बहिरे होतील असें कर ४. माझ्या सर्व इंद्रियांना दंड करून त्यांचा वेगळाला भ्रम आहे, तो नाहींसा करून तुझ्याकडे एकनिष्ठपणानें त्यांना राख ५. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे नारायणा, जर तुझा विसर पडला, तर त्या प्राणाला ठेवून काय करावयाचें आहे? त्याचीहि तीच वाट कर (प्राण जाऊं दे) ६. [२२०५]

आपल्या जातीला विसरून जो सर्व भूतांस नमस्कार करतो, त्याला आत्मस्थितीचा अनुभव खरा आला आहे, असें जाणावें १. जो आपलें सामर्थ्य दुसऱ्यावर उपकार करण्याकडे खर्च करतो, त्याला आत्मस्थिति खरी कळली २. एक द्वैत व एक अद्वैत हे भाव ज्याच्या मनामध्यें नाहींत, त्याला खरी आत्मस्थिति कळली ३. कोणाची स्तुति अथवा निंदा ही ज्याच्या वाचेंत येत नाहीं, त्याला खरी आत्मस्थिति कळली ४. जो धर्मनीतीचे योग्य अयोग्य प्रकार जाणून दृढ भावानें देवाची भक्ति करितो, त्यालाच मनुष्य म्हणावें ५. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, वर सांगितलेल्या लक्षणांवांचून जे कोणी आहेत, ते संसाराचें ओझें वाहणारे गाढव आहेत असें समजा ६. [२२०६]

जो देव चौदा भुवनांसुद्धां त्रैलोक्य आपल्या दाढेमध्यें कवळतो तो भक्ताचे भावाकरितां लहान होऊन संपुटांत

करिता जो पाळण । तो नंदानंदन म्हणवीतसे ॥ २ ॥ असुर तोडरीं दैत्यांचा काळ । झाला द्वारपाळ बळीचा तो ॥ ३ ॥ लक्ष्मीचा स्वामी क्षीराच्या सागरा । उछिष्ट (उच्छिष्ट) कावळा पसरी मुख ॥ ४ ॥ तुकयाबंधु म्हणे चतुराचा रावो । भावें तो पाहा हो केला वेडा ॥ ५ ॥ [२२०७]

कोण या पुरुषार्थाची गति । आणियेला हातोहातीं । जाहाज पृथ्वीपति । केली ख्याती अद्भुत ॥ १ ॥ भला रे पुंडलिका भला । महिमा नवजाये वर्णिला । दगा देउनि अवघियांला । सांठविलें अविनाश ॥ २ ॥ केलें एके घरीं केणें । भरलीं सदोदीत दुकानें । दुमदुमिलीं सुखानें । हे भाग्याची पंढरी ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे किल्ल्या । संतांच्या हातीं दिल्या । अंगावेगळें आपुल्या । टाकुनी जाला महिमान ॥ ४ ॥ [२२०८]

केली हार्णाळां अंघोळी । येऊनि बैसलों राऊळीं ॥ १ ॥ अजिचें झालें भोजन । रामकृष्ण नारायण ॥ २ ॥ तुकयाबंधु म्हणे नास । नाहीं कल्पांतीं जयास ॥ ३ ॥ [२२०९]

तुजलागीं माझा जीव झाला पिसा । अवलोकितों दिशा पांडुरंगा ॥ १ ॥ सांडिला व्यवहार माया लोकाचार । छंद निरंतर हाचि मनीं ॥ २ ॥ आइकिलें कानीं तें रूप लोचन । देखावया सीण करिताती ॥ ३ ॥ प्राण हा विकळ होय कासावीस । जीवनाविण मत्स्य तयापरी ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां कोण तो उपाव । करूं तुझे पाव (पाय) आतुडे तो ॥ ५ ॥ [२२१०]

कोणें गांवीं आहे सांगा हा विठ्ठल । जरी ठावा असेल तुम्हां कोणा ॥ १ ॥ लागतसें पायां येतों लोटांगणीं । मात तरी कोणी सांगा याची ॥ २ ॥ गुण रूप याचें वानितां (वाणितां) या संतां । मज क्षेम देतां सुख वाटे ॥ ३ ॥ सर्वस्वें हा जीव ठेवीन चरणीं । पांडुरंग कोणी दावी तया ॥ ४ ॥

अथवा संबळींत राहातो, तें पाहा १. जो सकल ब्रह्मांड उत्पन्न करून त्याचें रक्षण करितो व त्याचा नाश करितो तो देव गोकुळामध्यें आपणास नंदाचें बालक म्हणवितो २. ज्यानें सर्व दैत्यांचा काळाप्रमाणें नाश करून आपल्या पायांत असुरमर्दनाचे तोडर (पैंजण) बांधले आहेत, तो देव पाताळामध्यें बळीचें द्वार रक्षण करीत आहे ३. जो देव लक्ष्मीचा पति आहे व जो देव क्षीरसागरांत वास करितो, तो देव गोपाळांचा उच्छिष्ट कवळ (घांस) घेण्याकरितां आपलें तोंड पसरतो ४. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, जो सर्व चतुरांचा राजा आहे, तो देव भक्ताच्या भावानें कसा वेडा झाला आहे, तें पाहा बरें! ५. [२२०७]

जो देव ब्रह्मांडाचा अधिपति असून भवसमुद्र तरण्याचें जहाज आहे, तो देव त्वरित जिंकून स्वाधीन केला, ही पुंडलीकानें अद्भुत कीर्ति केली. ही ह्या पुरुषार्थाची योग्यता कोणाला कळेल? १. हे पुंडलीकराया, तुझें करणें फार चांगलें आहे (असें द्विवार सांगतों). सर्व विकारांना फसवून अविनाश पांडुरंगाचा संग्रह तूं केलास म्हणून तुझा महिमा वर्णन करवत नाहीं २. हा पांडुरंगरूपी माल एका घरीं तूं केलास त्या योगानें परमार्थाचीं दुकानें सर्व काळ भरलेलीं आहेत आणि त्याच सुखानें पंढरी दुमदुमून (गजबजून) गेली आहे; म्हणून ती भाग्याची आहे ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, ती वस्तु ज्या खजिन्यांत सांठविली त्याच्या किल्ल्या संतांच्या स्वाधीन करून, आपल्या अंगावेगळें टाकून, हा पुंडलीक मोठ्या माहात्म्याला चढला आहे ४. [२२०८]

हर्णाळांत (ओघांत अथवा प्रवाहांत) आंघोळ करून देवाच्या राउळांत येऊन बसलों १. रामकृष्ण नारायण ह्या रसाचें आज जेवण झालें २. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, आतां ह्या जीवात्म्याला कल्पांतीं नाश नाहीं ३. [२२०९]

हे देवा पांडुरंगा, तुझ्याकरितां माझा जीव वेडा होऊन मी दशदिशांस तुला पाहात आहें १. लोकव्यवहारादि लोभाचा मीं त्याग केला. माझ्या मनांत निरंतर तुझेंच दर्शन व्हावें हाच छंद राहिला आहे २. जें तुझ्या स्वरूपाचें वर्णन मीं कानांनीं ऐकलें तें रूप पाहाण्याकरितां डोळे श्रम करीत आहेत ३. पाण्यावांचून जसा मासा तडफड करितो (कासावीस होतो) तसा माझा प्राण तुझ्या दर्शनाकरितां कासावीस होत आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुझे पाय ज्या योगानें स्वाधीन होतील असा उपाय कोणता करूं? (तें तूंच सांग) ५. [२२१०]

विठ्ठल हा कोणत्या गांवामध्यें आहे, हें जर तुम्हां कोणाला ठाऊक असेल तर सांगा १. ह्याबद्दल मी तुमच्या पायां पडून लोटांगण घालतों; कोणी तरी ह्याची हकीकत सांगा २. संतजनांनीं ह्याच्या रूपगुणांचें वर्णन करीत असतां त्यांस मी आलिंगन दिल्यानें मला सुख वाटतें ३. जो कोणी मला पांडुरंग दाखवील त्याच्या पायीं मी आपला जीव

तुका म्हणे गाईवत्सां तडातोडी। तैसी जाते घडी एकी मज ॥ ५ ॥ [२२११]

एकाचिये सोई कवित्वाचे वांधे । बांधिलिया साधे काय तेथें ॥ १ ॥ काय हातीं लागे भुसाचे कांडणीं। सत्यासी (सत्याची) दाटणी करूनि काय ॥ २ ॥ कवित्वाचे रूढी पायां पडे जग। सुखावोनि मग नरका जाय ॥ ४ ॥ तुका म्हणे देव केल्याविण साहे । फजिती ते आहे लटिक्या अंगीं ॥ ४ ॥ [२२१२]

भल्याचें दर्शन। तेथें शुभचि वचन ॥ १ ॥ बोलावी हे धर्मनीत। क्षोभें होत नाहीं हित ॥ २ ॥ मर्यादा ते बरी। वेळ जाणावी चतुरीं ॥ ३ ॥ तुका म्हणे बहु। लागे ऐसें बरें मऊ ॥ ४ ॥ [२२१३]

आवडीनें धरिलीं नांवें । प्रियभावें चिंतन ॥ १ ॥ वेडा झाला वेडा झाला। लांचावला भक्तीसी ॥ २ ॥ निचाड हा चाड धरी। तुळसी करी दळ मागे ॥ ३ ॥ धरिला मग न करी बळ। तुका म्हणे कळ पायीं ॥ ४ ॥ [२२१४]

कंठीं राहो नाम। अंगीं भरोनियां प्रेम ॥ १ ॥ ऐसें द्यावें कांहीं दान । आलों पतित शरण ॥२॥ संतांचिये पायीं । वेळोवेळां ठेवीं डोई ॥३॥ तुका म्हणे तरें । भवसिंधु एक सरें ॥४॥ [२२१५]

विठ्ठल विठ्ठल येणें छंदें । ब्रह्मानंदें गर्जावें ॥ १ ॥ वाये टाळ टाळ्या टाळी । होय होळी विघ्नांचि ॥ २ ॥ विठ्ठल आदि अवसानीं । विठ्ठल मनीं स्मरावा ॥ ३ ॥ तुका म्हणे विठ्ठल वाणी । वदा कानीं आइका ॥ ४ ॥ [२२१६]

पंढरीचे वारकरी । ते अधिकारी मोक्षाचे ॥ १ ॥ पुंडलिका दिला वर । करुणाकरें विठ्ठलें ॥ २ ॥

सर्वतोपरी अर्पण करीन ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें लहान वांसराची व गाईची ताटातूट झाल्यानें वांसरूं कासावीस होतें तसा तुझ्या वियोगांत माझा एक एक क्षण दुःखांत जात आहे. ५. [२२११]

एका प्रासादिक कविता करणाऱ्या कवीकडे पाहून दुसऱ्यानें त्याप्रमाणें कविता जुळवीत बसण्यांत कोणता लाभ होतो ? १. भूस कितीहि कांडलें, तरी तेथें काय हातीं लागणार आहे ? सत्यव्यवहारांत अडचण करण्यांत काय फायदा आहे ? २. कवित्व केल्याच्या योगानें जगांत मान्यता होऊन लोक पायां पडतात व त्या योगानें आनंदहि होतो, पण अखेरीस कवीला नरकगति मिळते ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाला साह्य करून घेतल्यावांचून खोट्या (काव्यरचनेसारख्या निष्फळ) व्यवहाराच्या आश्रयांत फजिती आहे ४. [२२१२]

सज्जनांचे दर्शनांत शुभ शब्द ऐकण्यांत येतात १. ते धर्मनीतीचेंच प्रतिपादन करितात. त्यांचेबद्दल कोणीं ऐकणारांनीं राग मानला तर त्यांचें हित होणार नाहीं २. म्हणून चतुर पुरुषांनीं योग्य प्रसंग जाणून मर्यादेनें वागणें उत्तम ३. तुकाराम महाराज म्हणतात, (संतांपुढें) फार मृदु असणें हें चांगलें ४. [२२१३]

देवा, प्रीतीनें तुम्हीं नांवें धारण केलीं. त्यांचेंच आम्ही प्रीतीनें चिंतन करतों १. देव हा वेडा होऊन भक्तीविषयीं चटावला आहे (असें द्विधार सांगतों) २. अशा भक्ताजवळ निरिच्छ देव इच्छा धरून तुलसीपत्र मागतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याचे पाय धरले म्हणजे तो कांहीं जोर करीत नाहीं, हीच काय ती मोठी किल्ली आहे ४. [२२१४]

देवा, तुमचें नांव माझ्या कंठामध्यें राहावें व त्याविषयींचेंच प्रेम शरीरांत भरलेलें असावें १. अशी कांहीं देणगी द्या. मी पातकी तुम्हांला शरण आलों आहें २. संतांच्या पायांवर मी वेळोवेळीं मस्तक ठेवीत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका तडाक्यांत मीं संसारसागरांतून तरून जावें ४. [२२१५]

विठ्ठल विठ्ठल ह्या चिंतनाच्या नादानें ब्रह्मानंदानें गर्जना करावी १. टाळ्या व टाळ हे वाजवावे, ह्या योगानें अनेक विघ्नें जळून जातील २. अथवलपासून अखेरपर्यंत मनामध्यें विठ्ठलाचें स्मरण करावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, वाचेनें विठ्ठल म्हणा व कानानें (विठ्ठलाचे गुण) ऐका ४. [२२१६]

जे पंढरीची वारी करणारे आहेत, ते मोक्षाचे अधिकारी आहेत १. कारण, जे कोणी माझ्याकडे येतील त्यांना

मूढ पापी जैसे तैसे । उतरी कासे लावूनि ॥ ३ ॥ तुका म्हणे खरें झालें । एका बोलें संतांच्या ॥ ४ ॥ [२२१७]

अमृताचीं फळें अमृताची वेली । तेचि पुढें चाली बीजाचीही ॥ १ ॥ ऐसियांचा संग देईं नारायणा । ओलावा वचना जयांचिया ॥ २ ॥ उत्तम सेवन सितळ कंठासी । पुष्टी कांती तैसी दिसे वरी ॥ ३ ॥ तुका म्हणे तैसें होईजेत संगें । वास लागे अंगें चंदनाच्या ॥ ४ ॥ [२२१८]

पंढरीसी जा रे आलेनो संसारा । दीनाचा सोयरा पांडुरंग ॥ १ ॥ वाट पाहे उभा भेटीची आवडी । कृपाळु तांतडी उतावीळ ॥ २ ॥ मागील परिहार पुढें नाहीं सीण । जालिया दर्शन एक वेळा ॥ ३ ॥ तुका म्हणे नेदी आणिकांचे हातीं । बैसला तो चित्तीं निवडेना ॥ ४ ॥ [२२१९]

न कळे तें कळों येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ॥ १ ॥ न दिसे तें दिसों येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ॥ २ ॥ न बोलों ते बोलों येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ॥ ३ ॥ न भेटे तें भेटों येईल आपण । करितां चिंतन विठोबाचें ॥ ४ ॥ अलभ्य तो लाभ होईल अपार । नाम निरंतर म्हणतां वाचे ॥ ५ ॥ तुका म्हणे जीव आसक्त सर्वभावें । तरतील नांवें विठोबाच्या ॥ ६ ॥ [२२२०]

बहुजन्मीं केला लाग । तो हा भाग लाधलों ॥ १ ॥ जीव देईन हा बळी । करीन होळी संसारा ॥ २ ॥ गेलें मग न ये हाता । पुढती चिंता वाटतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे तांतड करूं । पाय धरूं बळकट ॥ ४ ॥ [२२२१]

मी संसारांतून मुक्त करीन, असा दयावंत विठ्ठलानें पुंडलीकास वर दिला आहे २. मूढ पातकी जसे असतील तसे आपल्या कांसेला लावून देव त्यांना भवनदींतून पार करतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका संताच्या बोलण्यानें (पुंडलीकाच्या प्रार्थना-वचनानें) मूढ जनांना मुक्त करण्याचा व्यवहार देवांनीं खरा केला ४. [२२१७]

अमृताच्या वेलास अमृताचींच फळें यावयाचीं व तशाच जातीच्या बीजाची उत्तरोत्तर वाढ व्हावयाची १. हे नारायणा, अशा प्रकारच्या संतांची संगति दे, कीं ज्यांच्या शब्दांत स्वरूपप्रेमाचा (परमार्थाचा) ओलावा आहे २. चांगल्या रसाचें सेवन केल्यानें घसा थंड होतो व शरीरकांतिहि वरच्या बाजूंनीं पुष्ट दिसते ३. तुकाराम महाराज म्हणतात, चंदनाच्या संगतीनें जसा भोंवतालच्या वृक्षांत सुगंधगुण येतो तसे संतांच्या संगतीनें संतांचे गुण अंगीं येतात ४. [२२१८]

अहो संसाराला आलेल्यांनो, तुम्ही पंढरीस जा, कारण जे दीन दुःखी आहेत त्यांच्यावर कृपा करणारा पांडुरंग तेथें आहे १. तो मोठ्या प्रीतीनें दीन जीवांची वाट पाहात उभा आहे. तो स्वभावतः कृपावंत असल्यामुळें दीनजनांची भेट घेण्याविषयीं उतावळा झालेला आहे २. त्याचें एक वेळ दर्शन झाल्यानें मागें केलेलीं सर्व पातकें नाहींशीं होऊन, पुढें जन्ममृत्यूचेंहि दुःख होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी दीन जीव त्याच्याकडे आले आहेत, त्यांना तो देव अन्य कोणाच्याहि हातीं लागूं देत नाहीं व आपण त्यांच्या चित्तांत वेगळा न होतां अखंड बैठक करतो ४. [२२१९]

एका विठोबाचें नामचिंतन केल्यानें न कळणाऱ्या गोष्टी कळूं लागतात १. एका विठोबाच्या नांवाचें चिंतन केल्यानें न दिसणारी वस्तु आपोआप दिसूं लागते २. विठोबारायाचें नामचिंतन केल्यानें बोलण्यास कठिण असलेला वेदार्थहि सहजपणें बोलतां येतो ३. एका विठोबाचें चिंतन केलें असतां न भेटणारा देव आपोआप भेटतो ४. एका विठोबाचें नाम निरंतर वाचेनें घेतल्यानें न होणारा असा अलभ्य अपार स्वरूपलाभ होतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, संसाराचे ठिकाणीं आसक्त असणाऱ्या जीवांनीं काया-वाचा-मनानें विठोबाचें नामचिंतन केलें, तर ते भवसागरांतून तरतील ६. [२२२०]

अनेक जन्मीं परमार्थाचा पाठलाग केल्यानें अशा प्रकारचा वांटा प्राप्त झाला १. आतां मी आपला जीव परमार्थाकडे बळी देऊन सर्व संसाराची होळी करून टाकीन २. एकदां हा नरदेह गेला म्हणजे तो पुनः मिळणार नाहीं. ह्याकरितां मोठी काळजी लागली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्वरा करून देवाचे पाय हृदयांत बळकट धरून ठेवूं ४. [२२२१]

भक्तिप्रेमसुख नेणवे आणिकां। पंडित वाचकां ज्ञानियांसी ॥ १ ॥ आत्मनिष्ठ जरी झाले जीवन्मुक्त। तरी भक्तिसुख दुर्लभ त्यां ॥ २ ॥ तुका म्हणे कृपा करिल नारायण। तरीच हें वर्म पडे ठायीं ॥ ३ ॥ [२२२२]

दुभाळ गाढवी जरी जाली पाहें। पावेल ते काय धेनुसरी ॥ १ ॥ कागाचिया पाया पुष्पांचिया माळा। हंसाची तो कळा काय जाणे ॥ २ ॥ मर्कटें अंघोळी लावियेले टिळे। ब्राह्मणाचे लीळे वर्तू नेणे ॥ ३ ॥ जरी तो ब्राह्मण झाला कर्मभ्रष्ट। तुका म्हणे श्रेष्ठ तिहीं लोकीं ॥ ४ ॥ [२२२३]

देव भक्तालागीं करूं नेदी संसार। अंगें वारावार करूनि ठेवी ॥ १ ॥ भाग्य द्यावें तरी अंगीं भरे ताठा। म्हणोनि करंटा करोनि ठेवी ॥ २ ॥ स्त्री द्यावी गुणवती तीपें गुंते आशा। यालागीं कर्कशा करूनि ठेवी ॥ ३ ॥ तुका म्हणे साक्ष मज आली देखा। आणीक या लोकां काय सांगों ॥ ४ ॥ [२२२४]

वाघें उपदेशिला कोल्हा। सुखें खाऊं द्यावें मला ॥ १ ॥ अंतीं मरसी तें न चुके। मज हे (मजही) मारितोसी भुके ॥ २ ॥ येरू म्हणे भला भला। निवाड तुझ्या तोंडें झाला ॥ ३ ॥ देह तो जाणार। घडेल हा परउपकार ॥ ४ ॥ येरू म्हणे मनीं। ऐसें जावें समजोनि ॥ ५ ॥ गांठी पडली ठका ठका। त्याचें वर्म जाणे तुका ॥ ६ ॥ [२२२५]

जेथें आठवती स्वामीचे ते पाय। उत्तम तो ठाय रम्य स्थळ ॥ १ ॥ रान अथवा घर एकांत लोकांत। समाधान चित्त तें ते घडी ॥ २ ॥ धन्य तो हा काळ सरे आनंदरूप। वाहातां संकल्प गोविंदाचे ॥ ३ ॥ तुका म्हणे लाभकाळ तेंचि जिणें। भाग्य नारायण उत्तम तें ॥ ४ ॥ [२२२६]

पंडित, अनेक ग्रंथ वाचणारे व मोठे ज्ञानी हे भक्तिप्रेमानें सुख जाणत नाहींत १. आत्मनिष्ठ जरी जीवन्मुक्त आहेत तरी त्यांना भक्तिसुख हें दुर्लभ आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, नारायण जर कृपा करील तर हें भक्तीचें मर्म कळेल ३. [२२२२]

गाढवी ही जरी पुष्कळ दूध देणारी असली, तरी ती गाईच्या बरोबरीला येईल काय ? १. कावळ्याच्या गळ्यांत फुलांच्या माळा घातल्या म्हणून त्यास हंसाची शोभा येईल काय ? २. माकडानें आंघोळ करून द्वादश (बारा) टिळे लावले तरी त्याला ब्राह्मणाचे स्वभावाप्रमाणें वर्तन करण्याचें कळणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जरी ब्राह्मण चुकून कर्मभ्रष्ट झाला, तरी तो तिन्ही लोकांत श्रेष्ठ आहे ४. [२२२३]

देव हा आपल्या भक्तांना संसार करूं देत नाहीं (तो संसारांत गुंतून राहिला तर भक्ति करणार नाहीं), तो स्वतः त्यांचा संसार आटपून टाकतो १. त्यांना पुष्कळ ऐश्वर्य द्यावें तर त्यांच्या अंगीं ऐश्वर्याचा ताठा येईल (म्हणून भक्ताला दरिद्री करून ठेवतो) २. गुणवान् स्त्री दिली तर तिच्या ठिकाणीं आशा गुंतून राहील, एवढ्याकरितां तिला कर्कश्या करून ठेवितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, पाहा, मला त्याचा अनुभव आला आहे, आणखी ह्या लोकांना काय सांगूं ? ४. [२२२४]

एका वाघानें कोल्ह्याला असा उपदेश केला, कीं “ मी तुला खातों, तूं मला सुखानें खाऊं दे १. कारण अखेरीस तुझ्या कपाळीं मरण आहे, तें कधींच चुकणार नाहीं. मग मला भुकेनें कां मारतोस ? ” २. कोल्हा वाघाला म्हणतो, “ तुझ्याच तोंडानें हा चांगला निवाडा झाला आहे ” ३. त्यावर वाघ म्हणतो “ अरे, देह हा जाणारा आहे, येवढ्याकरितां मीं जर तुला खाल्लें तर तुला परोपकाराचें पुण्य लागेल ” ४. कोल्हा वाघास म्हणतो, “ हा कायदा तुलाहि लागू आहे, हें तूं मनांत समज ” ५. तुकाराम महाराज म्हणतात, एकमेकांना फसविणारांची गांठ पडली आहे व त्यांचें मर्म (परस्परांना स्वार्थी उपदेश कसा करतात तें) मी जाणत आहें ६. [२२२५]

ज्या ठिकाणीं स्वामी जो देव त्याच्या पायांचें चिंतन चालू आहे, ती जागा उत्तम असून तें स्थळ रम्यहि आहे १. मग तें रान असो अगर घर असो, एकांत असो अगर लोकांमध्यें असो, त्याचा योग झाला असतां त्याच घटकेस चित्ताचें समाधान होतें २. गोविंदाचेच संकल्प ज्या वेळेस हृदय करीत आहे तो काळ धन्य असून आनंदांत जात आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारच्या लाभकाळाचा योग होणें तें जगणें उत्तम. हें उत्तम भाग्य नारायणाचे योगानें आहे ४. [२२२६]

तुज न भें मी कळिकाळा । मज नामाचा जिव्हाळा ॥ १ ॥ माझा बळिया नेणसी कोण । संतां साह्य नारायण ॥ २ ॥ शंख वधिला सागरीं । वेद घेउनि आला चारी ॥ ३ ॥ कूर्मे दैत्य वधिला जेठी । हात पाय लपवी पोटीं ॥ ४ ॥ व(वा)राहरूप धरिलें गाढें । धरा प्रतापें धरिली दाढे ॥ ५ ॥ हिरण्यकश्यप विदारिला । भक्त प्रल्हाद रक्षिला ॥ ६ ॥ वामन झाला दीनानाथ । बळी पाताळीं घातला दैत्य ॥ ७ ॥ छेदुनियां सहस्त्र भुजा । कामधेनु आणिली वोजा ॥ ८ ॥ शिळा प्रतापें सागरीं तारी । स्थापी बिभीषण रावणा मारी ॥ ९ ॥ मारोनियां कंसराव । पिता सोडविला वसुदेव ॥ १० ॥ पांचाळीसी गांजितां वैरी । वस्त्रें आपण झाला हरी ॥ ११ ॥ गजेंद्र स्मरे राम राम । त्यासी पाववी वैकुंठधाम ॥ १२ ॥ तुका म्हणे हरिरूप झाले । पुन्हां जन्मा नाहीं आले ॥ १३ ॥ [२२२७]

सर्वां भूतीं द्यावें अन्न । द्रव्य पात्र विचारून । उपतिष्ठे कारण । तेथें बीज पेरीजे ॥ १ ॥ पुण्य करितां होय पाप । दूध पाजोनी पोशिला साप । करोनि अघोराचा (अघोर) जप । दुःख विकत घेतलें ॥ २ ॥ भूमी पाहतां नाहीं वेगळी । माळ बरड एक काळी । उत्तम निराळी । मध्यम आणि कनिष्ठ ॥ ३ ॥ म्हणोनि विवेकें । कांहीं करणें तें निकें । तुका म्हणे फिकें । रुची नेदी मिष्टान्न ॥ ४ ॥ [२२२८]

देवावरी भार । वृत्ति अयाचित सार ॥ १ ॥ देह देवाचे सांभाळी । सार योजे यथाकाळीं ॥ २ ॥ विश्वासी निर्धार । विस्तारिल(रला) विश्वंभर ॥ ३ ॥ तुका म्हणे व्हावें । बळ एकचि जाणावें ॥ ४ ॥ [२२२९]

वर्ततां बासर । काय करावें शरीर ॥ १ ॥ ठेवा नेमून नेमून । माझें तुमचे पायीं मन ॥ २ ॥

हे कळिकाळा, तुला मी भीत नाहीं, कारण माझ्या ठिकाणीं हरिनामचिंतनाचा जिव्हाळा (झरा) आहे १. माझा रक्षक बलाढ्य कोण आहे तें तूं जाणत नाहींस. तो संतांना साह्य करणारा नारायण हा होय २. सागरामध्यें वेद चोरून नेणाऱ्या शंखासुराला मारून मत्स्यावतारांत जो ब्रह्मदेवाचे चारी वेद घेऊन आला ३. कच्छ अवतारांत महान् बलाढ्य राहु दैत्याचा वध करून ज्यानें आपले हातपाय पोटांत लपवून ठेवले ४. जंगी वराहरूप धारण करून ज्यानें आपल्या दाढेवर पृथ्वी धरली ५. हिरण्यकशिपूला फाडून भक्त प्रल्हादाचें ज्यानें रक्षण केलें ६. जो दीनांचा स्वामी, त्यानें वामनरूप धारण करून बळीला पाताळांत घातलें ७. सहस्रार्जुनाचे सहस्र हात तोडून त्यापासून ज्यानें व्यवस्थित तऱ्हेनें कामधेनु आणली ८. आपल्या प्रतापानें सेतुबंधनाचे वेळीं ज्यानें दगड तारले व रावणाला मारून ज्यानें लंकेच्या राज्यावर बिभीषणास बसविलें ९. त्यानें कंसास मारून आपला पिता जो वसुदेव ह्यास बंदींतून सोडविलें १०. दुष्ट दुर्योधनानें भर सभेंत द्रौपदीची विटंबना केली, त्या वेळेस हे हरि, आपण स्वतः तिचीं वस्त्रें झालां ११. गजेंद्रानें रामनामाचें स्मरण केल्याबरोबर त्याला वैकुंठधामास नेलें १२. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारें जे हरिरूप झाले ते पुनः जन्माला आले नाहींत १३. [२२२७]

सर्व भूतांना अन्न द्यावें, पण द्रव्य देण्याचे वेळेस पात्रापात्रतेचा विचार करावा, कारण जेथें बीं उगवेल त्या ठिकाणीं तें पेरावें १. दूध पाजून सापाला पोसण्यांत पुण्यकर्म न होतां पाप होतें व किती एक अघोर जप करून त्याच्या मोबदला दुःख विकत घेतात २. पृथ्वी पाहूं गेलें असतां कांहीं निराळी नाहीं पण त्या ठिकाणीं कांहीं माळ, बरड, काळ्या अशा उत्तम, मध्यम, कनिष्ठ असे निरनिराळे जमिनीचे भेद आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणून जें कांहीं करणें असेल तें विचारानें करावें हें चांगलें. मिष्टान्न असून तें जर फिकें असेल (खाणारास गोडी निर्माण करीत नसेल) तर रुचि देणार नाहीं ४. [२२२८]

(साधकानें) सर्वस्वाना देवावर भार घालून अयाचित वृत्तीनें राहाणें हें सार आहे १. देह हा देवाच्या स्वाधीन करून योग्य कालीं त्याची योग्य कर्माकडे योजना करणें हें सार मानावें २. विश्वामध्यें विश्वपोषक देव आहे, असा निश्चय केला म्हणजे तो सर्व व्यवस्था लावतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारची स्थिति असणें हेंच एक बळ आहे असें समजावें ४. [२२२९]

शरीर बासर (अमर्याद) वागेल तर त्याला ठेवून काय करावयाचें आहे? १. हे विठ्ठला, म्हणून माझ्या मनाची

नेदाविया वृत्ती । कोठें फांकोचि श्रीपती ॥ ३ ॥ तुका म्हणे भले । जन्मा येऊनियां ज्याले ॥ ४ ॥ [२२३०]

केली प्रज्ञा (प्रतिज्ञा) मनाशीं । तईं मी दान (दास) सत्यत्वेंशीं । नेईल पायांपाशीं । स्वामी मूळ पंढरिये ॥ १ ॥ तोंवरी हें भरीं पोट । केला तो मिथ्या बोभाट । नाहीं सांपडली वाट । सइराट फिरतसें ॥ २ ॥ ज्याचें आदराचें जिणें । स्वामी कृपा करी तेणें । पाळिल्या वचनें । सख्यत्वाचा अनुभव ॥ ३ ॥ घडे तैसें घडो आतां । मायबापाची हे सत्ता । तुका म्हणे चिंता । काय पाहें मारगा ॥ ४ ॥ [२२३१]

नेत्र झांकोनियां काय जपतोसी । जंव नाहीं मानसीं भावप्रेम ॥ १ ॥ उघडा मंत्र जाणा रामकृष्ण म्हणा । तुटती यातना गर्भवास ॥ २ ॥ मंत्र यंत्र काय करिसी बुट बुटी । तेणें भूतसृष्टी पावशील ॥ ३ ॥ सार तुका जपे बीजमंत्र एक । भवसिंधुतारक रामकृष्ण ॥ ४ ॥ [२२३२]

संत मारगीं चालती । त्यांची लागो मज माती ॥ १ ॥ काय करावीं साधनें । काय नव्हे एक तेणें ॥ २ ॥ शेष घेईन उच्छिष्ट । धाय धणीवरी पोट ॥ ३ ॥ तुका म्हणे संतांपायीं । जीव ठेविला निश्चयीं ॥ ४ ॥ [२२३३]

जैसें तैसें बाळ मातेसी आवडे । बोलतां बोबडे शब्द गोड ॥ १ ॥ आपुले आवडी लेववी खावावी । पाहोनियां जीवीं सुख वाढे ॥ २ ॥ तुका म्हणे काय देऊं परिहार । काय तें साचार जाणा संत ॥ ३ ॥ [२२३४]

देवाचिया वस्त्रा स्वप्नींही नाठवी । स्त्रियेसी पाठवी उंच साडी ॥ १ ॥ गाईचें पाळण

तुमच्या पायीं नेमणूक करून ठेवा २. अहो श्रीपति, आमच्या वृत्ति कोठेंहि बहकूं देऊं नका ३. तुकाराम महाराज म्हणतात, मनुष्यजन्माला येऊन जे अशा प्रकारें जगले असतील ते उत्तम ४. [२२३०]

पंढरीस आपल्या पायांजवळ यावें, असा मीं आपल्या मनाचा निश्चय केला आहे. तेथें मी आलों म्हणजे स्वामीपासून मूळचें खऱ्या स्वरूपाचें दान मला प्राप्त होईल १. तोंपर्यंत पोट भरून राहावयाचें आहे व त्याविषयींची हाकाटी करणें व्यर्थ आहे, कारण पंढरीची वाट सांपडली नाहीं तोंपर्यंत मी सैराटपणें (स्वैरपणें) फिरत आहें २. स्वामींनीं कृपा करून आदर केला म्हणजे तें जगणें बरें आणि त्यांचें वचन पाळलें असतां सख्यत्वाचा अनुभव येतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां माझ्या मायबापाच्या सत्तेनें जसें व्हावयाचें असेल तसें होवो. मी फक्त पंढरीची वाट पाहात आहें म्हणून मला (संसाराची वा परमार्थाची) चिंता करण्याचें काय कारण आहे ? ४. [२२३१]

अरे, तुझ्या मनामध्यें प्रेमभाव नाहीं, तर तूं डोळे झांकून कशाचा जप करतोस ? १. 'रामकृष्ण' हा मंत्र उघडा आहे, हें जाणून त्याचा तूं उच्चार कर. त्या योगानें तुझ्या गर्भवासाच्या यातना नाहींशा होतील २. त्यावांचून मंत्रयंत्रादि प्रकारांची बुटबुट (मंत्राची पुटपुट व यंत्रांची पूजा) करशील, तर तूं पिशाचयोनीला जाशील ३. तुकाराम महाराज म्हणतात, रामकृष्णनामाचा हा बीजमंत्र एक मुख्य सारभूत आहे आणि तो भवसमुद्रांतून तारून नेणारा आहे, म्हणून त्याचा सर्व काळ तूं जप कर ४. [२२३२]

संतांनीं स्थापन केलेले जे मार्ग आहेत त्या वाटांनीं चालणारांची धूळ माझ्या आंगाला, अथवा संतमार्गानें चालत असतांना त्यांच्या पायांची धूळ मला, लागो १. त्या योगानें काय एक होणार नाहीं ? म्हणून इतर साधनें काय करावयाचीं आहेत ? २. त्यांचे उच्छिष्टाचा शेष मी इच्छेची तृप्ति होईपर्यंत सेवन करीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांच्या पायीं मी आपला जीव निश्चयानें अर्पण केला आहे ४. [२२३३]

बालक जसें असेल तसें (कसेंहि असलें तरी) आईस आवडतें आणि तें बोबडे शब्द बोललें असतां तिला गोड वाटतें १. ती प्रीतीनें त्याला जेवूं घालून अलंकार घालते व ते पाहून ती आपणच आपल्या ठिकाणीं आनंद मानते २. तुकाराम महाराज म्हणतात, अहो संतजन हो, ह्यासंबंधानें मी तुमच्याजवळ काय सांगूं ? जें कांहीं खरें आहे, तें तुम्ही जाणतच आहांत ३. [२२३४]

जो कोणी देवाला वस्त्र द्यावें अशी आठवण स्वप्नांत देखील करीत नाहीं, पण आपल्या बायकोला मोठ्या किंमतीची

न येचि विचारा। अश्वासी खरारा करी अंगें ॥ २ ॥ लेंकराची गांड स्वयें धांवे क्षाळूं। न म्हणे प्रक्षाळूं द्विजपायां ॥ ३ ॥ तुका म्हणे त्यांच्या तोंडावरी थुंका। जातो यमलोका भोगावया ॥ ४ ॥ [२२३५]

उरा लावी उर आळंगितां कांता। संतासी भेटतां अंग चोरी ॥ १ ॥ अतीत देखोनि होय पाठमोरा। व्याह्यासी सामोरा जाय वेगीं ॥ २ ॥ द्विजा नमस्कारा मनीं भाव कैंचा। तुर्कांचे दासीचा लेंरू होय ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही क्रोधासी न यावें। स्वभावा करावें काय कोणीं ॥ ४ ॥ [२२३६]

ब्रह्मज्ञान जरी कळे उठाउठी। तरि कां हिंपुटीं वेदशास्त्रें ॥ १ ॥ शास्त्रांचें भांडण तप तीर्थाटण। पुर्वींच (पुरींचें, उर्वींचें) भ्रमण याजसाठीं ॥ २ ॥ याजसाठीं जप याजसाठीं तप। व्यासेंही अमूप ग्रंथ केले ॥ ३ ॥ याजसाठीं संतपाय हे सेवावे! तरीच तरावें तुका म्हणे ॥ ४ ॥ [२२३७]

गायत्री विकोन पोट जे जाळिती। तया होय गती यमलोकीं ॥ १ ॥ कन्येचा जे नर करिती विकरा। ते जाती अघोरा नरकपाता ॥ २ ॥ नाम गाऊनियां द्रव्य जे मागती। नेणों तयां गति कैसी होय ॥ ३ ॥ कैसें होय त्यांचें (कैसी होय गति) तेच हो जाणती। आम्हांसी संगती न लगे त्यांची ॥ ४ ॥ आमुचा सांगाती आहे तो श्रीहरी। न लगे दुराचारी तुका म्हणे ॥ ५ ॥ [२२३८]

साधूच्या दर्शना लाजशी गव्हारा। वेश्येचिया घरा पुष्पें नेसी ॥ १ ॥ वेश्या दासी मुरळी जगाची वोंवळी। ते तुज सोंवळी वाटे कैशी ॥ २ ॥ तुका म्हणे आतां लाज धरीं बुच्या। टांचराच्या कुच्या मारा वेगीं ॥ ३ ॥ [२२३९]

साडी घेतो १. घोडे बाळगून त्याचा खरारा वगैरे चाकरी स्वतः करितो आणि गाईस चारा घालावयाचा विचार देखील मनांत येत नाहीं २. ब्राह्मणाचे पाय धुवावे असा उच्चार करणें देखील आवडत नाहीं आणि आपल्या पोराची गांड स्वतः धुतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या लोकांच्या तोंडांवर थुंकावें हें बरें, कारण त्यांना अखेरीस यमलोक भोगावा लागेल ४. [२२३५]

बायकोला आलिंगन देतांना तिच्या उरास आपला ऊर लावतो आणि संतांस भेटतेवेळीं आंग चोरतो १. घरास कोणी याचक आल्यास पाठमोरा बसतो आणि व्याही वगैरे पाहुण्यांना सामोरा धांवत जातो २. ब्राह्मणास नमस्कार करण्याविषयीं मुळींच भाव धरीत नाहीं आणि मुसलमानाचे दासीस तिच्या लेंकाप्रमाणें भजतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा माझ्या बोलण्याचा तुम्ही राग येऊं देऊं नका, कारण आपआपल्या स्वभावापुढें कोणाचा कांहीं उपाय आहे काय? ४. [२२३६]

जर ब्रह्मज्ञान उभाउभी समजतें, तर वेदशास्त्रें कष्टी कां झालीं असतीं? १. ह्या ब्रह्मज्ञानाकरितां सहा शास्त्रांमध्यें परस्परांत भांडण आहे व तपतीर्थाटनादि भ्रमण करणें, हें पूर्वींपासून ह्याच्या करितांच आहे २. जपतपादि साधनें हीं याजसाठींच आहेत व व्यासांनीं पुष्कळ ग्रंथ ह्याकरितांच केले आहेत. ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांच्या चरणांची सेवा करून हें ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेतलें तरच (संसारसागराचा) तरणोपाय होईल ४. [२२३७]

गायत्रीमंत्राची विक्री करून जे आपलें पोट जाळतात (भरतात) त्यांना अखेरीस यमलोकास जावें लागतें १. जे कोणी आपल्या लेंकीचा विक्रय करितात, त्यांना अघोर नरकवास भोगावा लागतो २. जे हरिनाम गाऊन लोकांजवळ द्रव्य मागतात, त्यांची गति कोणती होईल हें आम्हांस सांगतां येत नाहीं ३. ते कोणत्या गतीला जाणार हें त्यांचें त्यांनाच माहीत असेल. त्यांची (त्या पाप्यांची) संगति आम्हांस नको ४. तुकाराम महाराज म्हणतात, आमचा सोबती सर्वकाळ हरि आहे, म्हणून आम्हांस वाईट आचरण करणारांची संगत नको ५. [२ ३८]

अरे मूर्खा, साधूचें दर्शन घेण्यास तूं लाजतोस आणि चांगलीं फुलें कसबिणीच्या घरीं नेतोस १. ती कसबीण मुरळी असून सर्व जगाची दासी अशी वाईट आहे. ती तुला सोंवळी (चांगली) आहे कसें कसें वाटतें? २. तुकाराम महाराज म्हणतात, अरे बुच्या (नागव्या, नीचा, हलकटा) आतां तूं ह्याची कांहीं तरी लाज धर. अहो जन हो, अशास टाचेच्या कुचानें [टोकानें] लवकर मार द्यावा ३. [२२३९]

बहु टाळाटाळी । होतां (होते) भोंवताहे कळी ॥ १ ॥ बरें नव्हेल सेवटीं । भय असों द्यावें पोटीं ॥ २ ॥ मुरगाळितां कान । घुसमांडील सावधान ॥ ३ ॥ अबोलणा तुका । ऐसें कोणी लेखूं नका ॥ ४ ॥ [२२५०]

जिव्हे झाला चळ । नेणे (नाहीं) अवसान तें पळ ॥ १ ॥ हेंचि वोसनावोनी उटी । देव सांठविला पोटीं ॥ २ ॥ नाहीं ओढा वारा । पडिला प्रसंग तो बरा ॥ ३ ॥ तुका म्हणे जाली (झाली) । मज अनावरु (र) बोली ॥ ४ ॥ [२२५१]

गोहो यावा गांवा । ऐसे नवस करी आवा ॥ १ ॥ कैंचें पुण्य तिचे गांठी । व्रतें वेंची लोभासाटीं ॥ २ ॥ वाढावें संतान । गृहीं व्हावें धनधान्य ॥ ३ ॥ मागे गारगोटी । परिसाचीये साटोवाटीं ॥ ४ ॥ तुका म्हणे मोल । देऊन घेतला सोमल ॥ ५ ॥ [२२५२]

बाळपणें ऐसीं वरुषें गेलीं बारा । खेळतां या पोरा नाना मतें ॥ १ ॥ विटू दांडू चेंडू लगोऱ्या वाघोडी । चंपे पेंड घडी एकीबेकी ॥ २ ॥ हमामा हुंबरी पकव्याच्या बारे । खेळें जंगी भोंवरे चुंबाचुंबी ॥ ३ ॥ सेलडेरा आणि निसरभोंवंडी । उचली वाळें धोंडी अंगबळें ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐसें बाळपण गेलें । मग तारुण्य आलें गर्वमूळ ॥ ५ ॥ [२२५३]

तारुण्याच्या मदें न मानी कोणासी । सदा मुसमुसी धुळी जैसा ॥ १ ॥ अटोनी वेटोनी बांधला मुंडासा । फिरतसे म्हैसा जनामधीं ॥ २ ॥ हातीं दीड पान वरती करी मान । नाहीं तो सन्मान भलियांसी ॥ ३ ॥ श्वानाचिया परी हिंडे दारोदारीं । पाहे परनारी पापदृष्टीं ॥ ४ ॥

ह्या युगांत परमार्थाविषयीं लोक फार टाळाटाळीच करतात, हा कलिकालच भोंवतो आहे १. परंतु ह्यानें अखेरीस चांगलें होणार नाहीं असें भय पोटामध्यें असलें पाहिजे २. काळ हा तुमचा कान मुरगळून ज्या वेळीं घुसमंडील (घुसळील), त्या वेळीं तुम्ही सावध व्हाल ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां लोकांस सांगण्याविषयीं मी अबोल्या आहें, असें कोणी समजूं नका ४. [२२५०]

माझ्या जिव्हेला हरिनामाचा चाळा लागला आहे, ती पळभर देखील विसांवा घेत नाहीं १. हृदयांत देव भरला आहे, म्हणून झोंपेमध्यें देखील उसणून त्याचेंच नांव घेत आहे २. तो (हरिनामाचें वेड लागण्याचा) प्रसंग मला बरा पडला आहे, म्हणून त्याविषयीं मी विचार करीत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ही माझी जिव्हा मला अनावर झाली आहे (तिला हरिनामाचा सारखा छंद लागला आहे) ४. [२२५१]

एखाद्या बाईचा नवरा देशावर गेला तर तो आपल्या गांवास परत येण्याबद्दल ती नवस करीत असते १. पण ती लोभानें व्रताचरण करते म्हणून तिच्या पदरीं पुण्याचा संचय कसला आला आहे? २. कारण, आपले पोटीं संतति व्हावी आणि घरीं धनधान्यांची समृद्धि व्हावी (अशा फलाशेनें तिचें आचरण व्यर्थ आहे) ३. जसा परीस देऊन त्याचे मोबदला गारगोटी मागावी, तसें चांगलें व्रत आचरून नीच फळाची ती आशा करते ४. तुकाराम महाराज म्हणतात, जसें पुष्कळ द्रव्य खर्च करून सोमल नांवाचें विष विकत घेतलें असतां (तें खाल्लें असतां) प्राणास मुकावें लागतें, [तसें तें करणें होतें] (सकाम बुद्धीनें धर्मकर्म करणाऱ्याची स्थिति असते) ५. [२२५२]

पुढें दिलेले खेळ पोरांशीं खेळण्यांत बाल्यावस्थेचीं बारा वर्षें गेलीं. विटी-दांडू, चेंडू-लगोऱ्या अथवा चिरघोडी, चंपी, पेंडघडी, एकीबेकी इत्यादि खेळ २. आणि हमामा, हुंबरी, पकव्याचीं बारें, जंगी भोंवरे, आणि चुंबाचुंबी (शिवाशिव) इत्यादि खेळ ३. शेलडेरा व निसरघोडी, आणि अंगांतील बळानें लहान धोंडे उचलणें इत्यादि खेळ ४. तुकाराम महाराज म्हणतात, असे खेळ खेळून बाळपणाचें वय गेलें. मग गर्वाचें मूळ असें तारुण्य आलें (मग तर परमार्थ घडतच नाहीं) ५. [२२५३]

तारुण्यानें उन्मत्त होऊन तो कोणाचा मान ठेवीत नाहीं व माजलेल्या बैलाप्रमाणें तो सर्व काळ मुसमुसत असतो १. चापून चोपून पागोटें बांधून माजलेल्या हाल्या (रेड्या) प्रमाणें तो लोकांमध्यें फिरत असतो २. हातामध्यें एकदीड विड्याचें पान असतें, पण ताठ्यानें नेहमीं वर मान करितो; कोणी श्रेष्ठ दृष्टीस पडले तर त्यांना मुळींच नमस्कार करावयाचा नाहीं ३. कुत्र्याप्रमाणें लोकांच्या दारोदार हिंडतो आणि दुसऱ्यांच्या स्त्रियांस पापदृष्टीनें पाहातो ४.

तुका म्हणे ऐसी थोर हानि झाली । करितां टवाळी जन्म गेला ॥ ५ ॥ [२२५४]

म्हातारपणीं थेटे पडसें खोकला । हात कपाळाला लावुनि बैसे ॥ १ ॥ खोबरीयाची वाटी जालें असे मुख । गळतसे नाक श्लेष्मपुरी ॥ २ ॥ बोलों जातां शब्द न येचि हा नीट । गडगडी कंठ कफ भारी ॥ ३ ॥ सेजारी म्हणती मरेना कां मेला । आणिला कांटाळा येणें आम्हां ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां सांडुनी सर्व काम । स्मरा राम राम क्षणक्षणां ॥ ५ ॥ [२२५५]

जेथें कीर्तन करावें । तेथें अन्न न सेवावें ॥ १ ॥ बुका लावूं नये भाळा । माळ घालूं नये गळां ॥ २ ॥ तट्टावृषभासी दाणा । तृण मागों नये जाणा ॥ ३ ॥ तुका म्हणे द्रव्य घेती । देती तेही नरका जाती ॥ ४ ॥ [२२५६]

लंकेमाजी घरें किती तीं आइका । सांगतसें संख्या जैसी तैसी ॥ १ ॥ पांच लक्ष घरें पाषाणांचीं जेथें । सात लक्ष तेथें विटबंदी ॥ २ ॥ कोटि घरें जेथें कांशा आणि तांब्याचीं । शुद्ध कांचनाचीं सप्त कोटि ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्याची संपदा एवढी । सांगातें कवडी गेली नाहीं ॥ ४ ॥ [२२५७]

वाढविलें कां गा । तुम्हीं एवढें पांडुरंगा ॥ २ ॥ काय होती मज चाड । एवढी करावया बडबड ॥ २ ॥ ब्रह्मसंतर्पण । लोकीं करावें कीर्तन ॥ ३ ॥ निमित्याचा धनी । तुका म्हणे नेणे कोणी ॥ ४ ॥ [२२५८]

न मानावी चिंता । कांहीं माझेविशीं आतां ॥ १ ॥ ज्यानें लौकिक हा केला । तो हा निवारिता भला ॥ ३ ॥ माझे इच्छें काय । होणार तें एक ठाय ॥ ३ ॥ सुखा आणि दुःखा । म्हणे वेगळा मी तुका ॥ ४ ॥ [२२५९]

तुकाराम महाराज म्हणतात, ह्यानें कुचाळी करण्यांत आपला जन्म घालविला, म्हणून ह्याच्या आयुष्याची मोठी हानि झाली ५. [२२५४]

थंडी, पडसें, खोकला इत्यादि सर्व रोग म्हातारपणीं जडतात, म्हणून तो कपाळाला हात लावून नेहमीं काळजी करीत बसतो १. त्याचें तोंड खोबऱ्याच्या वाटीप्रमाणें मोकळें झालेलें असतें आणि नाकांतून शेंबडाचा पूर वाहातो २. कांहीं शब्द लोकांबरोबर बोलावयास लागला तर त्यांचा स्पष्ट उच्चार होत नाहीं, आणि कफाच्या योगानें कंठ दाटून येऊन घरघर वाजतो २. त्याच्या शेजारीं राहाणाऱ्या बाया असें म्हणतात, कीं ह्या थेरड्यानें आम्हांला फार त्रास आणला आहे, म्हणून हा जर मरेल तर बरें होईल ४. तुकाराम महाराज म्हणतात, अहो जन हो, अशी फजिती होईल, हें जाणून तुम्ही आतां सर्व काम टाकून देऊन क्षणोक्षणीं रामनामाचें स्मरण करा ५. [२२५५]

ज्या ठिकाणीं कीर्तन करावें, त्या ठिकाणचें अन्न सुद्धां खाऊं नये १. गळ्यामध्यें फुलांच्या माळा घालूं नयेत. तेथला बुक्का कपाळाला लावूं नये २. त्या ठिकाणीं घोड्यास अथवा बैलास दाणा, कडबा वगैरे चंदी मागून घेऊं नये (आपल्या पैशानें त्यांची व्यवस्था करावी) ३. तुकाराम महाराज म्हणतात, कीर्तन करून द्रव्य घेणारे व देणारे हे दोन्हीहि नरकास जातात असें समजा ४. [२२५६]

ज्या लंकेमध्यें रावण राज्य करीत होता, तेथील घरांची संख्या जशी होती तशी मी सांगतों ती ऐका १. त्या ठिकाणीं पाषाणाचीं (चिरेबंदी) घरें पांच लक्ष व वीटबंदी (विटांनीं बांधलेलीं) सात लक्ष अशीं होतीं २. एक कोटि घरें कांसें या धातूचीं व तांब्याचीं एक कोटि व उत्तम सोन्याचीं सात कोटि अशीं घरें तेथें होतीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याची अशी संपत्ति होती त्याच्याबरोबर (त्या रावणाबरोबर) अखेरीस त्यांतील एक कवडी देखील गेली नाहीं ४. [२२५७]

हे पांडुरंगा, तुम्हीं एवढा विस्तार कशाकरितां वाढविला? (माझें एवढें महत्त्व कशाकरितां वाढविलें?) १. अशी ही अभंगरचना करून बडबड करण्याचें मला काय कारण होतें? २. ह्या लोकांमध्यें कीर्तन करून ब्राह्मणभोजन घालावयाचें (ब्रह्मज्ञानाचें संतर्पण करण्याचें) मला काय कारण होतें? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें सर्व करणें तुमचें आहे व मी निमित्तास कारण आहें, असें कोणी जाणत नाहीं ४. [२२५८]

अहो जन हो, तुम्ही माझ्याविषयीं आतां कांहीं चिंता करूं नका १. हा लौकिक ज्यानें वाढविला आहे, तो ह्याचें निवारण करण्यास समर्थ आहे २. माझ्या इच्छेसारखें कोणतें एक काय होणार आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी सुखदुःखांच्या वेगळा आहें (कोणत्याच दुःखाची मी काळजी करीत नाहीं) ४. [२२५९]

माझा पाहा अनुभव। केला देव आपुला ॥ १ ॥ बोलविलें तेंचि द्यावें। उत्तर व्हावें ते काळीं ॥ २ ॥ सोडिलिया जग निंद्य। मग गोविंद म्हणियारा ॥ ३ ॥ तुका म्हणे धीर केला। तेणें याला गोविलें ॥ ४ ॥ [२२६०]

जिंकावा संसार। येणें नांवें तरी शूर ॥ १ ॥ येरें (येर) काय तीं बापुडीं। कीर अहंकाराचीं घोडीं ॥ २ ॥ पण ऐशा नांवें। देव धरिजे तो भावें ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्यावें। सत्कीर्तीनें बरवें ॥ ४ ॥ [२२६१]

सरे ऐसें ज्याचें दान। त्याचे कोण उपकार ॥ १ ॥ नको वाढूं ऐसें काचें। देईं वो साचें विठ्ठले (देवो साचें विठ्ठला) ॥ २ ॥ रडत मागें सांडी पोर। ते काय थोर माउली ॥ ३ ॥ तुका म्हणे कीर्ति वाढे। धर्म गाढे ते ऐसे ॥ ४ ॥ [२२६२]

लोभावरी ठेवुनि हेत। करी असत्य न्याय नीत ॥ १ ॥ त्याच्या पूर्वजां पतन। नरकीं किडे होती जाण ॥ २ ॥ कोटि गोहत्या पातक। त्यासी घडेल निष्टंक ॥ ३ ॥ मासां स्रवे जे सुंदरा। पाजी विटाळ पितरां ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐसियासी। यम गांजील सायासीं ॥ ५ ॥ [२२६३]

देह जाईल जाईल। यासी काळ वा खाईल ॥ १ ॥ कां रे नुमजशी दगडा। कैंचे हत्ती घोडे वाडा ॥ २ ॥ लोड बोलिस्तें (बलिस्ते) सुपती। जरा आलिया फजिती ॥ ३ ॥ शरीरसंबंधाचें नातें। भोरड्या बुडविती सेतातें ॥ ४ ॥ अझुनि तरी होईं जागा। तुका म्हणे पुढें दगा ॥ ५ ॥ [२२६४]

मागें बहुतां जनां राखिलें आडणीं। धांवसी निर्वाणीं नाम घेतां ॥ १ ॥ ऐसें ठावें झालें मज बरव्या परी। म्हणऊनि करीं धांवा तुझा ॥ २ ॥ माझेविशीं तुज पडिला विसरू।

मीं देव आपलासा करून घेतला आहे, हा तुम्ही माझा अनुभव पाहा १. मला ज्या वेळीं जें उत्तर पाहिजे, त्या वेळीं तें देऊन देव मला बोलवितो २. निंद्य जग टाकिलें असतां गोविंद आपला सेवक होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी (भक्तीचें) धैर्य धरल्यामुळें देव माझ्यापाशीं गुंतून राहिला आहे ४. [२२६०]

जो संसाराला जिंकतो तोच खरा शूर होय १. बाकीचीं देहाहंकाराचीं बसण्याचीं गरीब घोडीं आहेत २. परम भावानें देवाला हृदयामध्यें दृढ धरणें हीच प्रतिज्ञा होय ३. तुकाराम महाराज म्हणतात, सत्कीर्तीनें जगणें हें उत्तम ४. [२२६१]

ज्यानें दिलेलें दान नाहींसें होतें, त्या दात्याचे उपकार कसले ? १. हे विठ्ठला, असलें नाशिवंत कचें वाढूं नकोस, तर खरी खरी देणगी दे २. जी आपल्या मुलाला मागें रडत टेवते, ती आई थोर आहे काय ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या योगानें कीर्ति वाढते, त्यालाच श्रेष्ठ धर्म (दान) म्हणतात ४. [२२६२]

लांचलुचपतीवर हेतु ठेवून जो खोटा न्याय देतो १. (तो तर नरकाला जाईलच पण) त्या न्यायाधीशाचे पूर्वज पतनाला जाऊन नरकांत किडे होतील असें समजा २. कोटि गोहत्यांचें पातक त्याला निश्चयानें लागेल ३. जी स्त्री महिन्याला विटाळशी होते, तिचा विटाळ तो आपल्या पितरांना पाजील ४. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या दुष्टाला यम प्रयत्नानें-कटाक्षानें शिक्षा करील ५. [२२६३]

अरे, देह हा नष्ट होईलच. ह्यास अखेरीस काळ खाईल (असें द्विवार सांगतों) १. हे दगडासमान जड जीवा, तुला हें कसें उमजत नाहीं ? हत्ती, घोडे, वाडा ह्यांचा भरंवसा कसला आहे ? २. लोड, तक्के, उत्तम गाद्या हीं सर्व सुखाचीं आहेत, पण जरेनें (म्हातारपणानें) सर्व शरीर व्याप्त झालें, कीं फजितीला पारावर राहाणार नाहीं ३. पिकलेल्या शेतास जशा भोरड्या (क्षुद्र पक्ष्यांची जात) खाऊन टाकतात, तसे देहसंबंधी नातेवाईक तुझे घातक आहेत ४. तुकाराम महाराज म्हणतात, अरे, अजून तरी जागा होऊन आपल्या हिताच्या मार्गाकडे लाग. नाहीं तर पुढें दगा आहे ५. [२२६४]

पांडुरंगा, पूर्वीं बहुत भक्तजनांचें तुम्हीं अनेक संकटीं रक्षण केलें. त्यांनीं निर्वाणप्रसंगीं आठवण केली, कीं तुम्ही त्यांच्या कार्यासाठीं धांव घेत होतां १. अशी तुमची वहिवाट मला चांगल्या तऱ्हेनें कळली, म्हणून मीहि तुम्हांला

आतां काय करूं पांडुरंगा ॥ ३ ॥ अजुनि कां न ये तुम्हांसी करुणा। दुरी नारायणा धरिलें मज ॥ ४ ॥ तुका म्हणे जीव जाऊं पाहे माझा। आतां केशीराजा घालीं उडी ॥ ५ ॥ [२२६५]

कळलें माझा तुज नव्हे रे आठव । काय काज जीव ठेवूं आतां ॥ १ ॥ तूं काय करिसी माझिया संचिता। धिग हें अनंता झालें जिणें ॥ २ ॥ पतितपावन राहिलों ये (या) आशा। आइकोनि ठसा कीर्ति तुझी ॥ ३ ॥ आतां कोण करील माझा अंगीकार। कळलें निष्ठुर झालासी तूं ॥ ४ ॥ तुका म्हणे माझी मांडिलो निरास। करितों जीवा नास (नाश) तुजसाठीं ॥ ५ ॥ [२२६६]

तरि कां मागें वायां कीर्ति वाढविली। जनांत आपुली ब्रिदावळी ॥ १ ॥ साच करितां आतां फिरसी माघारा। ठायींचें दातारा नेणवेचि ॥ २ ॥ संतांसी श्रीमुख कैसें दाखविसी। पुढें मात त्यांसी सांगईन ॥ ३ ॥ घेईन डांगोरा तुझिया नामाचा । नव्हे अनाथांचा नाथ ऐसा ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्हीं राहिलों मरोनी। तूं कां होसी धनी निमित्याचा ॥ ५ ॥ [२२६७]

आम्हीं तुझ्या दासीं। जरि जावें पतनासी ॥ १ ॥ तरी हें दिसे विपरीत। कोठें बोलिली हे नीत ॥ २ ॥ तुझें नाम कंठीं। आम्हां संसारआटी ॥ ३ ॥ तुका म्हणे काळ। करी आम्हांसी विटाळ ॥ ४ ॥ [२२६८]

लाजती पुराणें। वेदां येऊं पाहे उणें ॥ १ ॥ आम्ही नामाचे धारक । किविलवाणी दिसों रंक ॥ २ ॥ बोलिले ते संतीं । बोल वायांविण जाती ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । रोकडी हे मोडे सेवा ॥ ४ ॥ [२२६९]

आहार निद्रे न लगे आदर। आपण सादर तेचि होय ॥ १ ॥ परिमितीविणें बोलणें तें वायां।

कींवकाकुळतीनें हांका मारीत आहें २. हे पांडुरंगा, माझ्या संबंधानें तुम्हांला विसर पडला. आतां मी काय करूं? ३. हे नारायणा, अजून तुम्हांला माझी दया कशी येत नाहीं? तुम्हीं आपल्यापासून मला दूर ठेवलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे केशीराजा, तुमचें दर्शन होत नाहीं, म्हणून माझा जीव जाऊं पाहात आहे. ह्याकरितां तुम्ही त्वरेनें आतां मला भेटा ५. [२२६५]

हे देवा, माझी आठवणसुद्धां तुला नाहीं, हें मला पूर्णपणें कळलें. आतां जीव ठेवून काय करावयाचें आहे? १. हे अनंता, माझ्या अनिष्ट प्रारब्धापुढें तूं काय करशील? माझें जगणें धिःकारयुक्त झालें आहे. तूं पतितांना पावन करणारा आहेस, अशी तुझी कीर्ति ऐकून त्या आशेनें मी राहिलों ३. आतां माझा अंगीकार कोण करील? कारण तूं निर्दय झाला आहेस हें मला कळलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, तूं माझी निराशा करीत आहेस, म्हणून आतां तुझ्याकरितां मी जीव देतों ५. [२-६६]

तूं असा निर्दय आहेस, तर "मीप तितला पावन करणारा आहें" असें आपलें ब्रीद पूर्वीं जगतामध्यें (लोकांत) व्यर्थ कां प्रसिद्ध केलेंस? १. हे देवा दातारा, हें आपलें ब्रीद खरें करण्या द्दल मागें कां घेतोस? तें तुझें मूळचें ब्रीद तुला कसें कळत नाहीं? २. देवा, तूं आपलें तोंड संताना कसें दाखविशील? कारण त्यांच्यापुढें मी ही सर्व हकीकत सांगेन ३. देव अनाथांचा नाथ नाहीं, अशाबद्दलची तुझ्या नांवाची प्रसिद्धि करीन ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी आरंभींच देहबुद्धीनें मरून परमार्थाचे ठिकाणीं राहिलों आहें; मग तूं निमित्ताचा मालक कां होतोस? ५. [२-६७]

देवा, आम्हीं तुझ्या दासांनीं अधोगतीला जावें १. तर हें लोकांमध्यें विपरीत दिसणार आहे, कारण हरीचे दास अधोगतीस जातात, अशी नीति कोठें सांगितली आहे? २. निरंतर तुझें नाम आम्ही कंठामध्यें वागवितों तरी आमच्या मागें संसाराचा खटाटोप लागला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, काळानें आम्हांला विटाळ करावा (ह्याचा संबंध ध्रुवपदाशीं आहे) ४. [२२६८]

पुराणें लज्जित होऊन वेदाला उणीव येऊं पाहात आहे १. कारण आम्ही तुझें नाम निरंतर घेणारे अति दरिद्री, दीन दिसत आहों २. पूर्वीं जें संतांनीं सांगितलें, तें सर्व व्यर्थ जात आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, अशा तुमच्या करण्यानें तुमच्या सेवेचा मार्ग उघड उघड मोडला जाईल ४. [२२६९]

आहारनिद्रेचा बुद्धिपुरस्सर आदरसत्कार करावयास नको, कारण ती प्रवृत्ति आपल्या आपणच होते १. परिमित न

फार थोडें काया पिंड पीडी ॥ २ ॥ समाधान त्याचें तोचि एक जाणे । आपुलिये खुणे पावोनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे होय पीडा ते न करीं । मन राहें परी भलतिये ॥ ४ ॥ [२२७०]

भूमि अवघी शुद्ध जाणा । अमंगळ हे वासना ॥ १ ॥ तैसे वोसपले जीव । सांडी नसतां अंगीं घाव ॥ २ ॥ जीव अवघे देव । खोटा नागवी संदेह ॥ ३ ॥ तुका म्हणे शुद्ध । मग तुटलिया भेद ॥ ४ ॥ [२२७१]

सरतें माझें तुझें । तरि हें उतरतें ओझें ॥ १ ॥ न लगे सांडावें मांडावें । आहे शुद्धचि स्वभावें ॥ २ ॥ घातला तो आशा । मोहोजाळें गळां फांसा ॥ ३ ॥ सुखाचा तो मान । नाहीं दुःखाचा तो शीण ॥ ४ ॥ करितां नारायण । एवढें वेचितां वचन ॥ ५ ॥ तैसा मान अपमान । लाभ हानि हे समान ॥ ६ ॥ तुका म्हणे याचें । नांव सोंवळें हें साचें ॥ ७ ॥ [२२७२]

तुजकरितां होती (ते) ऐसे । मूढ चतुर पंडित पिसे ॥ १ ॥ परि हें वर्म नेणती कोणी । पीडाखाणी भोगितील ॥ २ ॥ उलंघितें (ती) पांगुळ गिरी । मुकें करी अनुवाद ॥ ३ ॥ पापी होय पुण्यवंत । न करी घात दुर्जन ॥ ४ ॥ अवघें हेळामात्रें हरी । मुक्त करी ब्रह्मांड ॥ ५ ॥ तुका म्हणे खेळे लीला । पाहे वेगळा व्यापूनि ॥ ६ ॥ [२२७३]

पिकवावें धन । ज्याची आस करी जन ॥ १ ॥ पुरोनि उरे खातां देतां । नव्हे खंडन मवितां ॥ २ ॥ खोलीं पडे ओली बीज । तरीच हाता लागे निज ॥ ३ ॥ तुका म्हणे धणी । विठ्ठल अक्षरें या तिन्ही ॥ ४ ॥ [२२७४]

करिसी लाघवें । तूं हें खेळसी आघवें ॥ १ ॥ केला अहंकार आड । आम्हां जगासी हा नाड

बोलतां वायफळ बोलणें व्यर्थ आहे. त्या योगानें देहाला थोडीफार पीडाच होणार २. आपल्या निजात्मखुणेच्या ठिकाणीं प्राप्त होऊन त्याचें समाधान तोच एक जाणत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या योगानें पीडा होईल अशी गोष्ट करूं नये, मग पाहिजे त्या स्थितीमध्यें राहावें. [२२७०]

सर्व भूमि शुद्ध आहे, पण मनुष्याची वासना ही अमंगळ आहे असें समजा १. तसे हे जीव भयभीत झाले व त्यांनीं अंगास कांहीं एक घाव न लागतां परमार्थत्याग केला २. सर्व जीव देवच आहेत, परंतु त्याबद्दल असलेला खोटा संशयच त्यांना फसवीत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जीवांमध्यें व ईशामध्यें जो भ्रमानें भेद भासत आहे, तो नाहींसा झाला, कीं सर्वच शुद्ध [ईश्वर] आहे ४. [२२७१]

माझें तुझें हा द्वैतभाव जर नाहींसा होता, तर जीवात्म्यावरील सर्व ओझें उतरलें असतें १. ह्यावांचून कोणतीहि गोष्ट करावयाला नको व टाकावयाला नको. मनुष्य स्वभावतःच स्वरूपभावानें (ब्रह्मरूपानें) शुद्ध आहे २. प्रपंचमोहजाळाच्या आशेनें सर्व जीवांच्या गळ्यांत पाश घातला आहे ३. स्वरूपीं सुखाचा मान आहे व दुःखाचे श्रम नाहींत (पण मनुष्यानें दैवानुसार सुख प्राप्त झालें तरी संतोष मानूं नये व दुःख प्राप्त झालें तरी खेद मानूं नये) ४. सर्व कांहीं एक नारायण कर्ता आहे, एवढे शब्द बोलावेत ५. लाभ व हानि, मान व अपमान हे तो समान जाणतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यालाच खरें सोंवळें म्हणावयाचें ७. [२२७२]

देवा, तूं जर करण्याचें मनांत आणलेंस, तर हे जेवढे मूढ जन आहेत, ते मोठे चतुर पंडित होतील १. पण हें मर्म कोणी जाणत नसल्यामुळें ते अनेक योनींतून जन्ममृत्यूंच्या पीडा भोगीत राहतात २. देव जर कृपा करील, तर पांगळे हे मोठ्या पर्वताचें उलंघन करतील व मुके मोठ्या गहन विषयाचा अनुवाद करतील ३. देव जर कृपा करील, तर पापी पुण्यवान् होतील व दुर्जन हे कधीं घात करणार नाहींत ४. हरि हा सर्व ब्रह्मांडास एका क्षणांत मुक्त करील ५. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व कांहीं लीलेनें तोच क्रीडा करीत आहे व सर्वांमध्यें व्यापला असून तो सर्वांहून निराळा आहे ६. [२२७३]

धनधान्य पिकवावें, कारण त्याची आशा लोक करीत आहेत (परंतु हें धनधान्य संपणारें आहे) १. परमार्थ (विठ्ठलरूपी) धान्य हें सर्वांना खावयास व द्यावयास पुरून उरलेंच आहे व कितीहि मोजलें तरी तें संपत नाहीं २. खोलवर ओलीमध्यें (ओल्या जमिनींत) जर बीजाची पेरणी झाली, तरच त्याचें पीक हाताला लागेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, विठ्ठल या तीन अक्षरांत तृप्ति आहे ४. [२२७४]

हे देवा, सर्व जगत् हें तुझें लाघव (ही तुझी लीला) असून ह्या रूपानें सर्वत्र तूंच (उत्पत्ति-स्थिति-लयाची) क्रीडा

॥ २ ॥ इत्थंभूत यावें । दावूं लपूंही (लपोंहि) जाणावें ॥ ३ ॥ तुका म्हणे हो श्रीपती आतां चाळवाल किती ॥ ४ ॥ [२२७५]

घालिती पव्हया । वाटे अनाथांची (अनाथाच्या) दया ॥ १ ॥ तैसें कां हो नये करूं । पांडुरंगा मज तारूं ॥ २ ॥ रोगियासी काढा । देऊनि वारिताती पीडा ॥ ३ ॥ बुडत्यासाठीं उडी घालिताती काय जोडी ॥ ४ ॥ झाडिताती कांटे । पुढें मागिलांचे वाटे ॥ ५ ॥ तुका म्हणे भार । घेती भागल्यांचा फार ॥ ६ ॥ [२२७६]

नका दंतकथा येथें सांगों कोणी । कोरडे ते मानी बोल कोण ॥ १ ॥ अनुभव येथें पाहिजे साचार । न चलती चार आम्हांपुढें ॥ २ ॥ वरी कोण मानी रसाळ बोलणें । नाहीं झालीं मनें ओळखी तों ॥ ३ ॥ निवडी वेगळें क्षीर आणि पाणी । राजहंस दोन्ही वेगळालीं ॥ ४ ॥ तुका म्हणे येथें पाहिजे जातीचें । येरा (येर) गबाळाचें नाहीं (काय) काम ॥ ५ ॥ [२२७७]

न करि त्याचें गांढेपण । नारायण सिद्ध उभा ॥ १ ॥ भवसिंधूचा थडवा केला । बोलाविला पाहिजे ॥ २ ॥ याचे सोई पाउल वेंचे । मग कैंचे अडथळे ॥ ३ ॥ तुका म्हणे खरें खोटें । न म्हणे लहान मोटें ॥ ४ ॥ [२२७८]

रिकामें तूं नको मना । राहों क्षणक्षणाही ॥ १ ॥ वेळोवेळां पारायण । नारायण हें करीं ॥ २ ॥ भ्रमणांच्या मोडीं वाटा । न भरें फांटा आडरानें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझ्या जीवें । हेंचि घ्यावें धणीवरी ॥ ४ ॥ [२२७९]

करीत आहेस १. तुम्हीं जगामध्यें असणाऱ्या आम्हां जीवांमध्यें जो एक अहंकार उत्पन्न केला आहे, तोच आम्हांला फसवीत आहे २. सर्व दाखविण्याची व लपविण्याची कला (आपलें रूप केव्हां प्रकट करावें व केव्हां लपवावें ही गारुडी कला) तूंच एक जाणत आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो श्रीपति, आतां आम्हांला किती फसवाल ? ४. [२२७५]

कित्येक समर्थ लोक अनाथ जीवांकरितां दयेनें मार्गामध्यें पाणपोया करितात (घालतात) १. हे पांडुरंगा, तसा आमच्याकरितां ह्या संसारांतून तारण्याचा व्यवहार तुम्हीं कां करूं नये ? २. वैद्याकडे रोगी आला असतां, त्याला कांहीं काढा घ्यावयास सांगून त्याची पीडा तो दूर करतो ३. पाण्यांत बुडणारास काढण्याकरितां जे उडी घालतात, त्यांना काय लाभ आहे ? ४. वाटेमध्यें पडलेले कांटे मागून येणाराला त्रास होऊं नये, म्हणून पुढें जाणारे झाडून काढितात ५. तुकाराम महाराज म्हणतात, जे पायीं प्रवास करणारे दमले भागले आहेत त्यांचें ओझें ते परोपकारी आपल्या मस्तकावर घेतात ६. [२२७६]

कोरड्या (ब्रह्मज्ञानाच्या) दंतकथा ह्या ठिकाणीं कोणीं सांगूं नयेत, कारण ते शुष्क शब्द कोण मानतो ? १. ह्या ठिकाणीं खरा खरा अनुभव पाहिजे. आमच्यापुढें वरवर पोकळ आचार चालणार नाहीं २. जोंपर्यंत हरीची ओळख मनाला झाली नाहीं, तोंपर्यंत वरवर गोड बोलणें कोण मानतो ? ३. राजहंस हा आपल्या चोंचीनें पाणी व दूध वेगळें करितो ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं अंतरीं आत्मनिष्ठ अशा योग्य जातीचा साधु पाहिजे; बाकीच्या केरकचऱ्याचा (वेडरटांचा) येथें काय उपयोग आहे ? ५. [२२७७]

जड जीवाला तारण्याला नारायण हा सिद्ध उभा आहे. आतां त्याची जे कोणी उपासना न करतील तो त्यांचा नेभळेपणा आहे १. अफाट भवसिंधूचें त्यानें एक लहानसें तळें केलें आहे. आतां त्यांतून तरून पार जाण्याकरितां श्रीहरीला बोलाविलें पाहिजे. २. श्रीहरीच्या मार्गाकडे पावलें पडूं लागलीं, कीं मग प्रतिबंध कसले आहेत ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, एकदां त्याच्या ठिकाणीं अनन्य झाल्यावर भक्ताचें खरें-खोटेंपण व लहान-मोठेंपण ह्यांचा तो कांहीं विचार करीत नाहीं ४. [२२७८]

हे मना, तूं क्षणोक्षणीं रिकामें राहूं नकोस १. तर वेळोवेळीं नारायण नामाचेंच पारायण करीत राहा २. इतस्ततः भ्रमण करण्याचे (चौऱ्यांयशीं लक्ष योनींत फिरण्याचे) मार्ग नाहींसे करून टाक. एका हरीला सोडून (निषिद्ध कर्मांच्या) आडरानांत धांव घेऊं नकोस ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा जीव हा तृप्त होईपर्यंत एक नारायणाचेंच चिंतन करीत आहे ४. [२२७९]

पंचभूतांचिये(चे) सांपडलों संदीं । घातलोंसें बंदीं अहंकारें ॥ १ ॥ आपुला आपण बांधविला गळा । नेणोंचि निराळा असतांही ॥ २ ॥ कासया हा सत्य मानिला संसार । कां हे केले चार माझें माझें ॥ ३ ॥ कां नाहीं शरण गेलों नारायणा । कां नाहीं वासना आवरिली ॥ ४ ॥ किंचित सुखाचा धरिला अभिलाष । तेणें केला नाश बहु पुढें (तेणें बहुनास केला पुढें) ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां देह देऊं बळी । करूनि सांडूं होळी संचिताची ॥ ६ ॥ [२२८०]

देव झाले अवघे जन । दोषगुण हारपले ॥ १ ॥ बरवें झालें बरवें झालें । चित्त धालें महालाभें ॥ २ ॥ दर्पणाचें दुसरें भासे। परि तें असे एक तें ॥ ३ ॥ तुका म्हणे सिंधुभेटी। उदका तुटी वाहाळासी (वोहोळासी) ॥ ४ ॥ [२२८१]

बहु प्रकार गव्हाचे। जिव्हा नाचे आवडी ॥ १ ॥ सरले परि आवडी नवी। सिंधु दावी तरंग ॥ २ ॥ घेतलें घ्यावें वेळोवेळां। माय बाळा न विसंबे ॥ ३ ॥ तुका म्हणे रस वचनीं। पडताळूनि सेवितसे (पडताळूनि तोचि सेवी) ॥ ४ ॥ [२२८२]

आम्हां सोयरे हरिजन। जनीं भाग्य निकंचन ॥ १ ॥ ज्यांच्या धैर्या नाहीं भंग। भाव एकविध रंग ॥ २ ॥ भुके तान्हे चित्तीं। सदा देव आठविती ॥ ३ ॥ तुका म्हणे धन। ज्यांचें निज नारायण ॥ ४ ॥ [२२८३]

म्हणवितों दास न करितां सेवा। लंडपणें देवा पोट भरीं ॥ १ ॥ खोटें कोठें सरे तुझे पायांपाशीं। अंतर जाणसी पांडुरंगा ॥ २ ॥ आचरण खोटें आपणासी ठावें। लटिकें बोलावें दुसरें तें ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसा आहें अपराधी। असो कृपानिधी तुम्हां ठावा ॥ ४ ॥ [२२८४]

मी पंचमहाभूतात्मक देहाच्या पेंचांत सांपडून त्याविषयींच्या मिथ्या अहंकारानें मला बंदींत घातलें आहे १. मी ह्या देहाहून निराळा असून तें न जाणतां मूर्खपणानें मी आपला गळा (स्वरूपभाव) आपल्या हातानें देहबुद्धींत बांधून घेतला २. देहादि प्रपंच कशाकरितां मीं खरा मानला? व हें माझें घर, माझें पोर असें कां केलें? ३. सर्व वैषयिक वासना आंवरून मी नारायणाला शरण कां गेलों नाहीं? ४. क्षणिक विषयसुखाची इच्छा धरल्यामुळें माझा अखेरीस फार नाश झाला ५. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आपला देह देवाचे पायीं बळी देऊन सर्व संचित कर्मांची होळी करून टाकूं ६. [२२८०]

मला सर्व जग देव भासत आहे. म्हणून माझी गुणदोषदृष्टि नाहींशी झाली १. हें फार चांगलें झालें (असें द्विवार सांगतों), परमार्थ–महालाभानें माझें चित्त तृप्त झालें आहे २. आरशामध्यें दुसरें प्रतिबिंब जरी दिसलें, तरी तात्त्विक दृष्टीनें पाहाणारा एकच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, समुद्राची गांठ पडली म्हणजे ओढ्याचा ओढेपणा नाहींसा होऊन तो समुद्रच होतो ४. [२२८१]

एका गव्हाचे पुष्कळ प्रकार होतात. त्यांचें सेवन करण्याविषयीं जिव्हा मोठ्या प्रीतीनें नाचते १. भोगण्याचे पदार्थ जरी सरले, तरी त्यांच्याविषयीं आवड नित्य नवी असते. जसे समुद्रावर एकामागून एक नवे नवे तरंग येतात, तसा आवडीचा प्रकार होय २. आपल्या एकदां घेतलेल्या बालकाला आई पुनःपुनः घेते, त्याला ती विसंबत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, बालकाच्या शब्दामध्यें जो रस आहे त्याचाच वरचेवर पडताळा घेऊन आई त्याचें सेवन करते ४. [२२८२]

आमचे आवडते संबंधी-सोयरे हरिभक्त आहेत. द्रव्यहीन असणें, हेंच त्यांचें जनांतील भाग्य आहे १. ज्यांचें धैर्य कधींहि भंगत नाहीं व (पांडुरंगाच्या ठिकाणीं) एकनिष्ठभावाचाच ज्यांच्या हृदयावर रंग आहे २. भूकतहानेच्या वेळेस सर्व काळ ते चित्तानें देवास आठवितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, नारायण हेंच त्यांचें (आत्मिक) धन आहे ४. [२२८३]

देवा, मी तुझा दास आहें, असें तुझी सेवा न करितां म्हणवितों व (तुझ्या नांवाखालीं) लबाडीनें पोट भरतों १. हे पांडुरंगा, अशा प्रकारचें खोटें कृत्य तुझ्यापाशीं कसें खपेल? कारण तूं अंतःकरणाचा जाणता आहेस २. आपलें आचरण खोटें आहे, हें माहीत असूनहि मी तुझा खरा सेवक आहें, असें दुसरें खोटें कसें बोलावें? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे कृपानिधि देवा, अशा प्रकारचा मी अपराधी आहें, हें तुम्हांस माहीत आहे ४. [२२८४]

जळो तें बाह्य सोंग । पडलिया अंतर व्यंग ॥ १ ॥ कारण तें अंतरलें । म्हणवितां वाईट भलें ॥ २ ॥ तांतडीनें नासी । तांतडीनेंचि संतोषी ॥ ३ ॥ तुका म्हणे धीर । नाहीं बुद्धि एकीं स्थिर ॥ ४ ॥ [२२८५]

चित्ताचें बांधलें जवळी तें वसे । प्रकाशीं प्रकाशे सर्वकाळ ॥ १ ॥ अंतरीं वसावी उत्तम ते भेटी । होऊं कांहीं तुटी न सकेची ॥ २ ॥ ब्रह्मांड कवळे आठवणेसाठीं । धरावा तो पोटीं वाव बरा ॥ ३ ॥ तुका म्हणे लाभ घरींचिया घरीं । प्रेमतंतु दोरी न तुटतां ॥ ४ ॥ [२२८६]

दुखवलें चित्त आजिच्या प्रसंगें । बहु पीडा जगें केली देवा ॥ १ ॥ कधीं हा संबंध तोडिसी तें नेणें । आठवूनि मनें पाय असें ॥ २ ॥ आणिकांचीं येती अंतरा अंतरें । सुखदुःख बरें वाईट तें ॥ ३ ॥ तुका म्हणे घडे एकांताचा वास । तरीच या नाश संबंधाचा ॥ ४ ॥ [२२८७]

धनवंत एक बहिरट अंधळे । शुभ्र कुष्ट काळे भोग अंगीं ॥ १ ॥ प्रारब्धाची गति न कळे विचित्र । आहे हातीं सूत्र बिठोबाचे ॥ २ ॥ आणीक रोगांचीं नांवें सांगूं किती । अखंड असती जडोनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे नष्ट संचिताचें दान । पावे खातां पण सुख नेदी ॥ ४ ॥ [२२८८]

भेदाभेदताळा न घडे घालितां । आठवा रे आतां नारायण ॥ १ ॥ येणें एक केलें अवघें होय सांग । अच्युताचा योग नामछंदें ॥ २ ॥ भोंवरे खळाळ चोरवांटा घेती । पावलें मारिती शिवेपाशीं ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें भावेंविण पार । न पविजे सार हेंचि आहे ॥ ४ ॥ [२२८९]

अंतःकरणामध्यें साधूची वृत्ति नसेल, तर बाह्यात्कारी साधुपणाचें सोंग जाळावयाचें आहे काय? १. वाइटांनीं आपणास चांगलें म्हणविलें, (किंवा, वाइटाला चांगलें म्हटलें) तर मुख्य (इष्ट) कार्यसिद्धि होत नाहीं. कोणत्याहि कामांत तांतड (घाई) केली, तर त्याचा नाश होतो, आणि ज्यांत तांतड करावयाची आहे, त्यांत ती केली असतां संतोष होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका ठिकाणीं ज्याची बुद्धि स्थिर नाहीं, आणि ज्यास धैर्य नसतें असे लोक वायां जातात ४. [२२८५]

आपल्या चित्तानें देवास बंधन करावें, म्हणजे तो जवळ राहातो. मग त्याच्या प्रकाशानें अंतःकरण सर्वकाळ प्रकाशित होतें १. हृदयामध्यें देवाची वस्ती होईल, ती मोठी उत्तम. त्या योगानें त्याची कधीं तूट (वियोग) होणार नाहीं २. त्याची आठवण केल्यानें पोटांत ब्रह्मांड सांठवेल, म्हणून त्याच्या आठवणीनें अंतःकरणाचा विकास करावा हें बरें ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच्या विषयींच्या प्रेमतंतूची दोरी तुटली नाहीं, तर सर्व लाभ घरचे घरीं प्राप्त होवात ४. [२२८६]

हे देवा, ह्या जगतानें मला फार पीडा केल्यामुळें आजच्या प्रसंगाला माझें चित्त दुःखी झालें आहे १. तुझ्या पायांची आठवण मी आपल्या मनानें करीत आहें, पण ह्या जगाचा आणि माझा संबंध तूं कधीं तोडशील, हें मी जाणत नाहीं २. कारण अनेक लोकांचें सुख-दुःख व बरें-वाईट हें माझ्या अंतःकरणांत येतें, व त्या योगानें तुझ्या सेवेंत अंतर पडतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर माझें एकांतीं वास्तव्य घडेल (मला एकांतवास घडेल) तरच ह्या संबंधाचा नाश होईल ४. [२२८७]

कित्येक धनवान् बहिरट अथवा आंधळे अथवा पांढरें कोडवाले अथवा काळें कोड ज्यांचे अंगीं आहे असे असतात १. हा सर्व विचित्र प्रकार प्रारब्धाचा आहे, हें कळत नाहीं. त्या सर्वांचें सूत्र एका विठोबाच्या हातीं आहे २. आणखी किती म्हणून रोगांचीं नांवें सांगावींत? अनेक रोग अखंड अंगीं जडलेले असतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, नष्ट अशा संचिताचें दान मिळतें, पण त्याचा उपभोग घेण्यांत तें सुख देत नाहीं (नष्टसंचित भोगण्यांत सुख नाहीं) ४. [२२८८]

भेद व अभेद यांचा ताळमेळ घालावयास गेलें, तर तो बसत नाहीं. ह्याकरितां, अरे, तूं आतां नारायणाचा आठव कर १. एका अच्युताचें नामचिंतन केल्यानें, सर्व कांहीं केलेलें सांग होतें २. चोर हे नदींतील भोंवऱ्यांप्रमाणें व खळाळाप्रमाणें चोरवाटेनें येऊन, गांवच्या शिवेपर्यंत पोहोंचलेल्या पांथिकास गांठून मारितात व त्याचें सर्वस्व हरण करितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं एका श्रीहरीवर भाव ठेवल्यावांचून कोणताहि साधक संसार-नदींतून पार होणार नाहीं, म्हणून एका हरीचे ठिकाणीं दृढभाव असणें, हेंच सार आहे ४. [२२८९]

जे गाती अखंड विठ्ठलाचें गीत । त्यांचे पायीं चित्त ठेवीन मी ॥ १ ॥ जयांसी आवडे विठ्ठलाचें नाम । ते माझे परम प्राणसखे ॥ २ ॥ जयांसी विठ्ठल आवडे लोचनीं । त्यांचें पायवणी स्वीकारीन ॥ ३ ॥ विठ्ठलासी जींही दिला सर्व भाव । त्यांच्या पायीं (जीव ठेवीन मी) ठाव मागईन ॥ ४ ॥ तुका म्हणे रज होईन चरणींचा । म्हणविती त्यांच्या हरिचे दास ॥ ५ ॥ [२२९०]

काय तो विवाद असो भेदाभेद । साधा परमानंद एका भावें ॥ १ ॥ निघोनि आयुष्य जातें हातोहात । विचारी पां हित लावलाहीं ॥ २ ॥ तुका म्हणे भावभक्ति हें कारण । नागवी भूषण दंभ तोचि ॥ ३ ॥ [२२९१]

देवकीनंदनें । केलें आपुल्या चिंतनें ॥ १ ॥ मज आपुलिया ऐसें । मना लावुनियां पिसें ॥ २ ॥ गोवळे गोपाळां । केलें लावुनियां चाळा ॥ ३ ॥ तुका म्हणे संग । केला दूरि नव्हे मग ॥ ४ ॥ [२२९२]

माझिया जीवासी होचि पैं विश्रांती । तुझे पाय चित्तीं पांडुरंगा ॥ १ ॥ भांडवल गांठीं झालेंसे पुरतें । समाधान चित्तें मानियेलें ॥ २ ॥ उदंड उच्चारें घातला पसरु । रूपावरी भरु आवडीचा ॥ ३ ॥ तुका म्हणे मज भक्तीची आवडी । अभेदा तांतडी नाहीं म्हूण ॥ ४ ॥ [२२९३]

एकविध आम्ही न धरूं पालट । न संडूं हे वाट सांपडली ॥ १ ॥ म्हणवूनि केला पाहिजे सांभाळ । माझें बुद्धीबळ पाय तुझे ॥ २ ॥ बहुत न कळे बोलतां प्रकार । अंतरा अंतर साक्ष असे ॥ ३ ॥ तुका म्हणे अगा जीवींच्या जीवना । तूंचि नारायणा साक्षी माझा ॥ ४ ॥ [२२९४]

राहो येचि ठायीं । माझा भाव तुझे पायीं ॥ १ ॥ करीन नामाचें चिंतन । जाऊं नेदीं

विठ्ठलगुणांचें जे अखंड गायन करितात, त्यांचे पायीं मी आपलें चित्त ठेवीन १. ज्यांस विठोबाचें नाम प्रिय आहे, ते माझे परम प्राणसखे आहेत २. ज्यांच्या डोळ्यांस विठ्ठलाचें दर्शन प्रिय आहे त्यांचें चरणतीर्थ मी घेईन ३. ज्यांनीं आपलीं काया-वाचा-मन विठ्ठलास अर्पण केलीं आहेत, त्यांच्या चरणीं मी आपला ठाव (आश्रय) मागेन ४. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी आम्ही हरीचे दास आहों असें म्हणवितात, त्यांच्या चरणांचा मी रजःकरण होईन ५. [२२९०]

भेदाभेदाविषयीं वाद करणें व्यर्थ आहे, म्हणून एकनिष्ठभावानें परमानंदाची प्राप्ति करून घ्या १. तुमचें आयुष्य हातोहात तेंव्हांच निघून जाईल; ह्याकरितां आपल्या हिताचा विचार लवकर करा २. तुकाराम महाराज म्हणतात, भावभक्तीनेंच तुमचें कार्य होणार आहे. त्यावांचून दंभानें वागण्यांत नागवण (नुकसान) आहे ३. [२२९१]

देवकीचा पुत्र जो श्रीकृष्ण त्यानें आपल्या चिंतनानें मला आपल्यासारखें केलें १. माझ्या मनाला त्यानें आपलें वेड लावल्यामुळें मी तद्रूप झालों २. ह्याचप्रमाणें त्यानें आपला छंद लावून, गवळी जे गोपाळ त्यांसही असेंच केलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, एकदां त्याच्याशीं संबंध केला म्हणजे तो आपल्यापासून दूर जात नाहीं ४. [२२९२]

हे पांडुरंगा, तुझे पाय चित्तामध्यें आहेत, त्याच्या योगानें माझ्या जीवाला विसांवा होत आहे १. हेंच भांडवल माझ्या गांठीस पुरतेपणीं आहे, म्हणून माझ्या चित्तानें समाधान मानलें आहे २. आणि वाचेनें नामोच्चाराचा पसारा अतिशय घातला आहे व तुमच्या स्वरूपाच्या ठिकाणीं माझ्या आवडीचा भर आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला भक्तीची आवडी आहे, कारण अभेदभावाकडे जाण्याची (तुझ्याशीं एकरूप होऊन विदेहमुक्तीला जाण्याची) मला त्वरा नाहीं म्हणून ४. [२२९३]

(मागील अभंगांत सांगितलेली) भक्तीची वाट मला सांपडली आहे. ती मी कधीं सोडणार नाहीं. असे जे आम्ही एकनिष्ठ झालों आहोंत, त्यांत कधीं बदल होणार नाहीं १. म्हणूनच तुम्हीं आमचा सांभाळ केला पाहिजे, कारण माझें बुद्धिबल तुमचे पायच आहेत २. हा प्रकार पुष्कळ बोलून दाखविला तरी कळणारा नाहीं, कारण माझ्या अंतःकरणाला तुमचें अंतःकरण साक्षी आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अगा नारायणा, तूं माझ्या जीवाचें जीवन असून त्याचा साक्षीहि तूंच आहेस ४. [२२९४]

हे देवा, तुझ्या पायांचे ठिकाणीं माझा भाव (माझी निष्ठा) राहो १. म्हणजे मी सर्वकाळ नामाचें चिंतन करीन

कोठें मन ॥ २ ॥ देईन ये रसीं । आतां बुडी सर्वविशीं ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । साटी करोनियां जीवा ॥ ४ ॥ [२२९५]

तैसे नव्हों आम्ही विठोबाचे (विठ्ठलाचे) दास । यावें आणिकांस काकुळती ॥ १ ॥ स्वामिचिया सत्ता ठेंगणें सकळ । आला कळिकाळ हाताखालीं ॥ २ ॥ अंकिताचा असे अभिमान देवा । समर्पूनि हेवा असों पायीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां इच्छेचें खेळणें । कोड नारायणें पुरवावें ॥ ४ ॥ [२२९६]

मोक्ष देवापाशीं नाहीं । लटिक्या धाईं विव्हळत ॥ १ ॥ काय खर न धरि शुद्धि । गेली बुद्धी भ्रमलें ॥ २ ॥ अहंकारा उरलें काई । पांचाठायीं हें वांटे ॥ ३ ॥ तुका म्हणे कुंथें भारें । लटिकें खरें मानूनियां ॥ ४ ॥ [२२९७]

आपुला तो एक देव करूनि घ्यावा । ये (ते) णेंविण जीवा सुख नव्हे ॥ १ ॥ येर तीं माइकें दुःखाचीं जनितीं । नाहीं आदिअंतीं अवसान ॥ २ ॥ अविनाश करीं आपुलिया ऐसें । लावीं मना पिसें गोविंदाचें ॥ ३ ॥ तुका म्हणे एका मरणेंचि सरे । उत्तमाचि उरे कीर्ति मागें ॥ ४ ॥ [२२९८]

आजिचें हें मज तुम्हीं कृपादान । दिलें संतजन मायबापीं ॥ १ ॥ आलीं मुखावाटा (टे) अमृत वचनें । उत्तीर्णता येणें नव्हे जन्में ॥ २ ॥ तुका म्हणे तुम्हीं उदार कृपाळ । शृंगारिलें बाळ कवतुकें ॥ ३ ॥ [२२९९]

स्तुती अथवा निंदा करावी देवाची । अधम तो वेंचि व्यर्थ वाणी ॥ १ ॥ आइकोनि होती बहिरे हे बोल । वेंचूनि ते मोल नरका जाती ॥ २ ॥ इहलोकीं थुंका पडे (उडे) तोंडावरी । करणें अघोरीं

आणि आपलें मन कोठें जाऊं देणार नाहीं २. आतां सर्व प्रकारानें ह्याच रसामध्यें मी बुडी मारीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मी जिवावर उदार होऊन हेंच (तुझी भक्तिच) करीत आहें ४. [२२९५]

आपला स्वामी सोडून दुसऱ्याला काकुळती यावें, तसे आम्ही विठोबाचे दास नाहीं १. एका स्वामीच्या सत्तेनें सर्व ब्रह्मांड आम्हांला लहान झालें आहे व कळिकाळ देखील आमचे हाताखालीं दास झाला आहे. २. आम्हां सेवकांचा अभिमान देवास आहे आणि आम्ही आपली हांव (काया, वाचा, मन) त्याचे चरणीं अर्पण करून तेथेंच राहिलों आहोंत ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही आपल्या इच्छेप्रमाणें खेळ खेळत आहोंत आणि नारायण आमचें कौतुक पुरवीत आहे ४. [२२९६]

मोक्ष हा देवाजवळ नाहीं. तो तुझ्याजवळच असून मिथ्या देहाच्या अभिमानानें मार न बसतां व्यर्थ विव्हळतोस १. असले हे गाढव सावध कां होत नाहींत? ह्यांची बुद्धि गेल्यामुळें हे भ्रमिष्ट झाले आहेत २. ज्या देहाचा तूं अहंकार घेतला आहेस त्या देहांतील पंचभूतें आपापल्या महत्तत्त्वांत मिसळल्यानंतर अहंकाराला खालीं आधार काय राहिला? ३. तुकाराम महाराज म्हणतात, खोट्या देहास खरें मानून त्याच्या अभिमानाच्या ओझ्यानें तूं उगीच कुंथत आहेस ४. [२२९७]

जीवानें एक देव आपलासा करून घ्यावा; कारण त्यावांचून जीवास सुख होणार नाहीं १. एका देवावांचून सर्व कांहीं मायिक व दुःख देणारें आहे. त्यांच्यामध्यें अव्वल अखेर सुख देण्याचें सामर्थ्य नाहीं अथवा त्या दुःखाला आदिअंत नाहीं २. तुम्ही आपल्या मनाला गोविंदाचें वेड लावून अविनाश वस्तु आपल्या स्वाधीन करून घ्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें केल्यानें तुम्ही जन्मास आलां ते एकचवार (एकदांच) मरण पावाल; त्या योगानें अनेक जन्ममृत्यूंचें निवारण होईल आणि तुमची चांगली कीर्ति तुमच्या मागें जगतांत राहील ४. [२२९८]

तुम्ही संतजन मायबापांनीं आज मला हें कृपादान दिलें आहे १. कीं जेणेंकरून माझ्या मुखांतून नामामृतवचनें (भक्ति-ज्ञान-वैराग्यपर बोधवचनें) निघालीं. आतां ह्या उपकारांतून मी ह्या जन्मांत उत्तीर्ण होणार नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही उदार असून कृपाळु आहांत, म्हणून ह्या बालकावर तुम्ही कौतुकानें परमार्थ कृतीचे अलंकार घातले ३. [२२९९]

एक देवाचें स्तवन अथवा निंदा करावी. त्यावांचून सामान्य मनुष्याची निंदा करून वाचेचा व्यर्थ खर्च करणारास अधम म्हणावें १. हें बोलणें ऐकून (संतांचा उपदेश ऐकूनहि) हे लोक बहिरे होतात आणि ज्या कृत्यानें नरक प्राप्त होतो तें द्रव्य खर्च करून (अमोल वाणीचा अस्थानीं खर्च करून) नरकास जातात २. अशा ह्यांच्या कृत्यानें इहलोकीं त्यांच्या

वास लागे ॥ ३ ॥ तुका म्हणे माप वाचेऐसें निकें । भरलें नरकें निंदेसाठीं ॥ ४ ॥ [२३००]

लोह कफ गार सिद्ध हे सामुग्री । अग्नि टणत्कारीं दिसों येतो ॥ १ ॥ सांगावें तें काई सांगावें तें काई । चित्ता होय ठायीं अनुभव तो ॥ २ ॥ अन्नें सांगों येतो तृप्तीचा अनुभव । करूनि उपाव घेऊं हेवा ॥ ३ ॥ तुका म्हणे मिळे जीवनीं जीवन । तेथें कोणा कोण नांव ठेवी ॥ ४ ॥ [२३०१]

बाळाचें जीवन । माता जाणे भूक तान ॥ १ ॥ काय करूं विनवणी । असो मस्तक चरणीं ॥ २ ॥ ठेविलिये ठायीं । चित्तें ठेवूनि असें पायीं ॥ ३ ॥ करितों हे सवा । चिंतन सर्वां ठायीं देवा ॥ ४ ॥ न्यून तेंचि पुरें । घ्यावें करोनि दातारें ॥ ५ ॥ तुका म्हणे बुद्धि । अल्प असे अपराधी ॥ ६ ॥ [२३०२]

जाणतों समय । परिमित कामा नये ॥ १ ॥ तुम्ही सांगावें तें बरें । देवा सकळ विचारें ॥ २ ॥ पुसाचिये पुसी । चिंता नाहीं होते ऐसी ॥ ३ ॥ तुका म्हणे आहे । धर पाय मज साहे ॥ ४ ॥ [२३०३]

द्वारपाळ विनंती करी । उभे द्वारीं राउळा ॥ १ ॥ आपुलिया शरणागता । वाहों चिंता नेदावी ॥ २ ॥ वचना या चित्त द्यावें । असो ठावें तुम्हांसी ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपासिंधू । दीनबंधू केशवा ॥ ४ ॥ [२३०४]

दोहीं बाहीं आम्हां वास । असों कांस घालूनि ॥ १ ॥ बोल बोलों उभयतां । स्वामीसत्ता सेवेची ॥ २ ॥ एकसरें आज्ञा केली । असों चाली ते नीती ॥ ३ ॥ तुका म्हणे जोहारितों । आहे हो तों ते ठायीं ॥ ४ ॥ [२३०५]

तोंडावर लोक थुंकतात व परलोकीं अघोर नरकांत वस्ती करावी लागते ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या वाचेचें माप उत्तम असून त्यांनीं तें (हरिनामानें भरण्याऐवजीं) निंदेकडे लावल्यानें नरकानें भरलें ४. [२३००]

लोखंड, कफ (कापूस) आणि गारगोटी ही सामग्री तयार असली म्हणजे गारगोटीवर कापूस ठेवून लोखंडाच्या तुकड्यानें घर्षण केल्याबरोबर अग्नि उत्पन्न होतो, तसें तुमचें चित्त एके ठिकाणीं स्थिर झालें म्हणजे अनुभव येईल, हें सांगावें लागतें काय? (असें द्विवार सांगतात) २. अन्न भक्षण केलें म्हणजे तृप्तीचा अनुभव सांगावयास येईल काय? तोच उपाय करून ह्या अखंड आनंदाविषयींची आम्ही हांव घेऊं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसें पाण्यांत पाणी मिसळलें असतां त्या ठिकाणीं हें पहिलें पाणी व हें दुसरें पाणी असें नांव कोणीं ठेवावें? ४. [२३०१]

हे देवा, भूकतहानेच्या वेळेस जीवन जें अन्नपाणी तें बालकास देण्याचें आई जाणते (त्याप्रमाणें देवा, तूं माझी आई आहेस) १. म्हणून मी तुम्हांस कोणती विनंति करूं? माझें मस्तक तुमच्या पायांवर आहे २. तुम्ही मला ठेवाल त्या ठिकाणीं तुमचे पायीं चित्त ठेवून मी राहीन ३. हे देवा, तुमची व्याप्ति सर्व ठिकाणीं आहे असें चिंतन मी करितों हीच माझी सेवा आहे ४. हे दातारा, जें माझें (माझ्या भक्तींत) कांहीं कमी असेल तें तुम्हीं पुरतें करून घ्यावें ५. तुकाराम महाराज म्हणतात, मी अपराधी आहें आणि माझी बुद्धि अल्प आहे ६. [२३०२]

मी वेळ प्रसंग जाणतों पण माझें मर्यादित ज्ञान कामास येत नाहीं (कृतार्थ होण्याकरितां उपयोगी पडत नाहीं) १. हे देवा, म्हणून सर्व विचारानें तुम्ही मला अध्यात्मज्ञान शिकवाल तें बरें २. तुम्हांला विचारपूस केल्यानें जर चिंता नाहींशी होते तर आम्ही पुसावयास अनमान कां करावें? ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमचे पाय धरणारा मी सेवक आहें म्हणून तुम्ही मला साह्य करा ४. [२३०३]

हे देवा, देवळाच्या दरवाज्यांत मी द्वारपाळ होऊन उभा राहिलों आहें; मी तुम्हांस विनंति करितों १. ती अशी, कीं तुम्ही आपले शरणागताला कोणतीहि काळजी उत्पन्न होऊं देऊं नका २. हें तुम्हांला सर्व माहीत आहे पण ह्या माझ्या बोलण्याकडे तुम्हीं लक्ष द्यावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे केशवा, तुम्ही कृपेचे समुद्र असून दीनाला साह्य करणारे आहांत ४. [२३०४]

जगताच्या व तुमच्या अशा ह्या दोन्ही पक्षांचा अभिमान धरून कांस (कांचा) घालून आम्हीं वास्तव्य केलें आहे १. सेवेच्या धर्माचें व स्वामीच्या सत्तेचें असें उभयतांचें बोलणें आम्हीच बोलूं २. स्वामींनीं जी एकदम आज्ञा केली आहे त्या नीतीनें आम्ही वागणूक करीत राहूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी पूर्वी ज्या ठिकाणीं (निर्गुण स्थितींत) होतों व आतांहि आहें त्या ठिकाणाला (आत्मस्वरूपाला) (सगुण हरीला) नमस्कार करितों ४. [२३०५]

ऐका जी देवा माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥ सन्निध पातलों सांडूनियां शंका । सन्मुखाचि एकाएकीं पुढें ॥ २ ॥ जाणविलें कोठें पावे पायांपाशीं । केली या जिवाशीं साटीं म्हूण ॥ ३ ॥ तुका म्हणे माझे हातीं द्या उद्धार । करीं करकर म्हणवूनि ॥ ४ ॥ [२३०६]

बैसलों तों कडियेवरी । नव्हें दुरी वेगळा ॥ १ ॥ घडलें हें बहुता दिसां । आतां इच्छा पुरवीन ॥ २ ॥ बहु होता झाला सीण । नाहीं क्षण विसांवा ॥ ३ ॥ दुःखी केलें मीतूंपणें । जवळी नेणें होतें तें ॥ ४ ॥ पाहत जे होतों वास । तेचि आस पुरविली ॥ ५ ॥ तुका म्हणे मायबापा । झणीं कोपा विठ्ठला ॥ ६ ॥ [२३०७]

तुझें नाम मुखीं तयासी विपत्ति । आश्चर्य हें चित्तीं वाटतसे ॥ १ ॥ काय जाणों देवा होसील निजला । नेणों जी विठ्ठला मायबापा ॥ २ ॥ भवबंधनाचे तुटतील फांसे । ते कां येथें ऐसे अव्हेरिलें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें दचकलें मन । वाटे वायांविण श्रम केला ॥ ४ ॥ [२३०८]

सेवकें करावें सांगितलें काम । सिक्याचा तो धर्म स्वामी राखे ॥ १ ॥ काय देवा नेणों आलें गांढेपण । तुम्ही शक्तिहीन झाले दिसां ॥ २ ॥ विष्णुदास आम्ही निर्भर ज्या बळें । ते दिसे या काळें अव्हेरिलें ॥ ३ ॥ तुका म्हणे मूळ पाठवा लौकरी । किंवा करूं हरी काय सांगा ॥ ४ ॥ [२३०९]

खेळतां निजभावें समर्थाचें बाळ । तयाच्या सकळ सत्तेखालीं ॥ १ ॥ तरी लेवविला शोभे अलंकार । नाहीं तरी भार मानाविण ॥ २ ॥ अवघीच दिशा असावी मोकळी । मायबाप बळी म्हणऊनि ॥ ६ ॥ तुका म्हणे माझें ऐसें आहे देवा । म्हणऊनि सेवा समर्पिली ॥ ४ ॥ [२३१०]

अहो देवा, मी तुमच्या पायांवर मस्तक ठेवितों, तुम्ही माझी विनंति ऐका १. सर्व भीति टाकून तुमच्या समोर मी एकदम आलों आहें २. कांहीं हकीकत सांगितली तर तुमच्या पायांजवळ ती कशी पोहोंचेल म्हणून मी जिवावर उदार झालों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा उद्धार करण्याचें सामर्थ्य मला द्या. म्हणूनच तुमच्या पुढें मी किरकीर करतों ४. [२३०६]

हे देवा, मी तुमच्या कडेवर बसलों आहें तो वेगळा होणार नाहीं १. असें हें पुष्कळ दिवसांनीं घडून आलें आहे. आतां मी आपले मनाची इच्छा पूर्ण करीन २. आजपर्यंत मी पुष्कळ श्रम पावलों. कोणत्याहि ठिकाणीं क्षणभर देखील विसांवा मिळाला नाहीं ३. देह मी व देहसंबंधीं माझें ह्या योगानें मी दुःखी असल्यामुळें, तुम्ही जवळ होतां तें मला कळलें नाहीं ४. आजपर्यंत मी वाट पाहात होतों ती माझ्या मनाची आशा पूर्ण झाली ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठ्ठला मायबापा, तुम्ही एखादे वेळी मजवर रागवाल (पण रागावूं मात्र नका) ६. [२३०७]

तुझें नाम ज्याच्या मुखामध्यें आहे त्याची फजिती होते (त्याला विपत्ति असावी) हें मला फार आश्चर्य वाटतें १. हे विठ्ठला, देवा, मायबापा, तुम्ही निजलां आहांत कीं काय हें मीं कसें जाणावें तें मला समजत नाहीं २. संसारबंधनाचे फांसे ह्या ठिकाणीं (तुझ्या दर्शनानें) तुटले जातात. मग आतांच त्या बळाचा असा कां अव्हेर केला? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें पाहून माझें मन दचकलें व मी परमार्थाचा (भक्तीचा) जो श्रम केला तो व्यर्थ गेला असें वाटूं लागलें ४. [२३०८]

आम्हीं सेवकांनीं सांगितलेलें कार्य करावें आणि शिक्क्याचा धर्म (सत्ता रक्षण करण्याचा) काय असेल तो स्वामींनीं रक्षण करावा १. असें असून देवा, तुम्हांला गांडेपणा (भित्रेपणा) आला कीं काय न कळे! कारण देवा, तुम्ही शक्तिहीन झालांसें मला दिसतें २. ज्या बळावर आम्ही विष्णुदास आनंदरूप आहोंत तें बळ हल्लींच्या काळीं देवानें टाकिलें कीं काय असें दिसतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे हरि, मला घेऊन जाण्यास लवकर मूळ [बोलावणें] पाठवा. नाहींपेक्षां मी ह्या ठिकाणीं काय करूं हें सांगा ४. [२३०९]

समर्थाचें बालक आपल्या भावार्थानें सहज खेळत असतां त्याच्या सत्तेमध्यें सर्व कांहीं असतें १. असें असलें तरच घातलेले अलंकार शोभतात. नाहींपेक्षां त्या बालकाला प्रजाजनांत जर मान नाहीं तर त्या अलंकारांचें ओझें आहे २. मायबाप बलवान् आहेत तर त्या बालकास खेळण्यास सर्व दिशा मोकळ्या असल्या पाहिजेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, असा माझा (तुमच्या लेंकराचा) प्रकार आहे, आणि तुम्ही असे सर्वसमर्थ आहांत म्हणून मीं तुम्हांस सेवा समर्पण केली आहे ४. [२३१०]

निरंजनीं एकटवाणें। संग नेणें दुसरा ॥ १ ॥ पाहा चाळविलें कैसें। लावूनि पिसें गोवळीये ॥ २ ॥ लपविलें अंगें अंग । दिला संग होता तो ॥ ३ ॥ तुका म्हणे नव्हतें ठावें । झालें भावें वाटोळें ॥ ४ ॥ [२३११]

नव्हती भेटी तोंचि बरें। होतां चोरें नाडिलें ॥ १ ॥ अवघियांचा केला झाडा। रिता वाडा खोंकर ॥ २ ॥ चिंतनाचें मूळ चित्त। नेलें वित्त हरुनि ॥ ३ ॥ तुका म्हणे मूळा आलें। होतें केलें तैसेंचि ॥ ४ ॥ [२३१२]

जये ठायीं आवडी टेली। मज ते बोली न संडे ॥ १ ॥ पुरवावें जीवींचें कोड। भेटी गोड तुज मज ॥ २ ॥ आणिलें तें येथवरी (आणियलें येथवरी)। रूप दुरी न करावें ॥ ३ ॥ तुका म्हणे नारायणा। सेवाहीना धिग वृत्ति ॥ ४ ॥ [२३१३]

सरलियाचा सोस मनीं । लाजोनियां राहिलों ॥ १ ॥ आवडीनें बोलावितों । येथें तें तों लपावें ॥ २ ॥ माझें तेंचि मज द्यावें । होतें भावें जोडिलें ॥ ३ ॥ तुका म्हणे विश्वंभरा। आळीकरा बुझावा ॥ ४ ॥ [२३१४]

नाचावेंसें वाटे मना। छंद गुणा आधीन ॥ १ ॥ चेष्टविलीं माझीं गात्रें। सत्तासूत्रें हालती ॥ २ ॥ नामरूपें रंगा आली । तेचि चाली स्वभावें ॥ ३ ॥ तुका म्हणे पांडुरंगें । अंगसंगें कवळिलें ॥ ४ ॥ [२३१५]

खेळतों ते खेळ पायांच्या प्रसादें। नव्हतीं हीं छंदें नासिवंतें ॥ १ ॥ माझा मायबाप उभा विटेवरी। कवतुकें करी कृपादान ॥ २ ॥ प्रसादाची वाणी वदती उत्तरें। नाहीं मतांतरें जोडियेलीं

ज्या ठिकाणीं कांहीं मळ नाहीं आणि कोणाचा संग नाहीं त्या ठिकाणीं मी एकटा होतों १. तेथें गोनाम इंद्रियें, त्यांचें आकर्षण करणारा जो देव गोवाळ त्यानें आपलें वेड बळेंच लावून मला गुंतविलें आणि फसविलें. कसें तें पाहा २. त्यानें आपला (सगुण रूपाचा) संग मला दिला होता तें आपलें अंग माझ्या अंगांत (मायेच्या आवरणांत स्वतः) नाहींसें केलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा देव असें करील हें मला माहीत नव्हतें पण माझ्या भावानें (देवावर विश्वास ठेवून त्याची भक्ति केल्यानें) माझा नाश झाला ४. [२३११]

जोंपर्यंत ह्या देवाची भेट झाली नव्हती तोंपर्यंत बरें होतें. भेट झाल्यावर ह्या चोरानें मला फसविलें १. ह्या देहरूपी वाड्यांतील कामक्रोधरूपी विकारांचा सर्व झाडा करून तो वाडा फुटका असा रिकामा केला २. त्याचें चिंतन करण्यास चित्तरूपी द्रव्य हेंच मूळ आहे. तें माझें चित्त त्यानें हरण करून नेलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मीं जें कांहीं केलें होतें, तें करणें माझ्या मुळावर आलें ४. [२३१२]

ज्या ठिकाणीं माझी आवड राहिली आहे तें बोलणें माझ्यानें सांडवत नाहीं १. माझ्या जीवाची इच्छा तुम्ही पुरवा, म्हणजे मला तुमची भेट गोड आहे (ती द्या) २. ज्या रूपानें तुम्ही येथपर्यंत आलां आहांत तें माझ्यापासून तुम्ही दूर करूं नका ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, तुमची सेवा आमच्याकडून होत नाहीं म्हणून आमच्या वृत्तीला धिक्कार असो ४. [२३१३]

जें कांहीं (माझ्याजवळचें भक्तिप्रेम) संपलें आहे त्याची हांव मनामध्यें धरून मी लाजून राहिलों आहें १. त्या रूपाची प्रीति आहे म्हणून मी तुम्हांला हांका मारतों आणि तुम्ही तर ह्याच ठिकाणीं लपून बसलां २. जें मीं भावार्थानें प्राप्त करून घेतलें होतें तेंच रूप माझें आहे म्हणून मला तेंच द्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विश्वंभरा, आम्ही हट्ट करणारीं मुलें तुमचीं आहोंत म्हणून तुम्ही आमची समजूत करा ४. [२३१४]

मनामध्यें नामचिंतनाच्या आनंदांत नाचण्याची इच्छा आहे, कारण जो छंद लागतो तो गुणाधीन असतो १. माझीं सर्व इंद्रियें प्रभूनें आपल्या सत्तेच्या सूत्रानें हालवून त्यांस चेष्टा करावयास लावलें २. हरीच्या नामरूपाच्या रंगांत तीं आलीं आहेत, म्हणून स्वभावतःच त्यांची प्रवृत्ति तिकडे झाली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला पांडुरंगानें आपल्या स्वरूपरंगानें वेढून टाकिलें ४. [२३१५]

जे अभंगरचनेचे खेळ मी खेळत आहें ते सर्व श्रीहरीच्या प्रसादानेंच होय. ह्या माझ्या खेळांमध्यें एकहि छंद नाशिवंत नाहीं १. माझा आईबाप हा विटेवर उभा आहे व तोच आपल्या कृपादानाचें कौतुक करीत आहे २. माझ्या मुखांतून

॥ ३ ॥ तुका म्हणे रस वाढितीया अंगें । छाया पांडुरंगें केली वरी ॥ ४ ॥ [२३१६]

अखंड मुडतर । सासुरवास करकर ॥ १ ॥ याची झाली बोळवण । आतां न देखों तो शीण ॥ २ ॥ बहुतांची (वतनांची) दासी । तये घरीं सासुरवासी ॥ ३ ॥ तुका म्हणे मुळें । खंड झाला एके वेळे ॥ ४ ॥ [२३१७]

अवघा भार वाटे देवा । संतसेवा न करितां (घडतां) ॥ १ ॥ कसोटी हे असे हातीं । सत्य भूतीं भगवंत ॥ २ ॥ चुकलोंसा दिसे पंथ । गेले संत तो ऐसा ॥ ३ ॥ तुका म्हणे सोंग वायां । कारण या अनुभवें ॥ ४ ॥ [२३१८]

आतां तुम्ही कृपावंत । साधु संत जिवलग ॥ १ ॥ गोमटें तें करा माझें । भार ओझें तुम्हांसी ॥ २ ॥ वंचिलें तें पायांपाशीं । नाहीं यासी वेगळें ॥ ३ ॥ तुका म्हणे सोडिल्या गांठी । दिली मिठी पायांसी ॥ ४ ॥ [२३१९]

सुख वाटे परी वर्म । धर्माधर्म न कळे ॥ १ ॥ गायें नाचें एवढें जाणें । विठ्ठल म्हणें निर्लज्ज ॥ २ ॥ अवघें माझें हेंचि (एवढें) धन । साधनही सकळ ॥ ३ ॥ तुका म्हणे पायां पडें । तुमच्या कोडें संतांच्या ॥ ४ ॥ [२३२०]

धरिलीं जीं होतीं चित्तीं । डोळां तींच दिसती ॥ १ ॥ आलें आवडीशीं फळ । जालें कारण सकळ ॥ २ ॥ घेईन भातुकें । मागोनियां कवतुकें ॥ ३ ॥ तुका म्हणे लाड । विठोबा पुरवील कोड ॥ ४ ॥ [२३२१]

जे शब्द निघत आहेत ते सर्व प्रासादिक आहेत. मी आपल्या बुद्धीनें जोडाजोड करून बोललों नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो कांहीं माझ्या शब्दामध्यें रस आहे तो सर्व रस तो वाढणाऱ्या आईबापांकडून आला आहे आणि त्याच्यावर कृपेची छायाहि त्यांनींच केली आहे ४. [२३१६]

ह्या संसारांत विशेष मूढ दशेच्या सासुरवासाची करकर सतत माझ्या पाठीशीं लागली होती १. ती नाहींशी झाली, आतां तें दुःख मी पाहात नाहीं २. मूढावस्थेच्या घरीं बहुतांचा सासुरवास आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, एक वेळ स्वरूपस्थितींत भेद झाल्यामुळें परतंत्रता आली (देवा, तुझ्या कृपेमुळें आज हीं सर्व दुःखें एकदम नष्ट झालीं) ४. [२३१७]

हे देवा, संतसेवेशिवाय इतर जें कांहीं करणें तें सर्व मला ओझें वाटत आहे, अथवा, संतसेवा न करितां जें कांहीं करणें तें देवाला ओझें वाटतें १. सर्वांभूतीं परमात्मा आहे अशा अनुभवाची कसोटी जरी आपल्या हस्तगत झाली २. तरी संत ज्या मार्गानें गेले तो मार्ग मी चुकलों असें मला वाटत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतसेवेवांचून जें करणें तें सर्व व्यर्थ आहे; खरें कार्य संतसेवेच्या अनुभवांत आहे, किंवा जें करितों तें व्यर्थ सोंग आहे, कारण माझ्या अनुभवानें मला असें वाटतें ४. [२३१८]

तुम्ही साधुसंत आतां माझे जिवलग असून कृपेनें युक्त (कृपालु) आहांत १. माझें चांगलें करण्यासंबंधानें सर्व ओझ्याचा भार तुमच्या मस्तकावर आहे २. आजपर्यंत मीं आपल्या पायांपाशीं प्रतारणा केली ह्यांत कांहीं अन्यथा नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी जी कांहीं खरी स्थिति होती ती गुप्त न ठेवितां तिच्या गांठी सोडून मोकळी करून आपले पुढें मांडली व मीं आपले पायांला मिठी मारली ४. [२३१९]

विठ्ठल विठ्ठल म्हणतांना मला फार सुख होत आहे, पण धर्म काय व अधर्म काय ह्याचें खरें स्वरूप समजत नाहीं १. निर्लज्ज होऊन विठ्ठलाचें नाम गाणें व त्या छंदांत नाचणें हेंच काय तें मी जाणतों २. माझें सर्व कांहीं धन हेंच असून सर्व साधनहि हेंच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हां संतांच्या पायां मी कोडकौतुकानें पडत आहें ४. [२३२०]

जें प्रिय होतें तेंच मीं चित्तामध्यें धरलें आहे व माझ्या डोळ्यांसहि तेंच दिसत आहे १. माझ्या आवडीला फळ येऊन सर्व कांहीं कार्य झालें आहे २. मी आतां कौतुकानें खाऊ मागून घेईन ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझे लाड व इच्छा हीं विठोबा पूर्ण करील ४. [२३२१]

बहुतां दिसांची आजि झाली भेटी । झाली होती तुटी काळगती ॥ १ ॥ येथें सावकाश घेईन ते धणी । गेली अडचणी उगवोनि ॥ २ ॥ बहु दुःख दिलें होतें घरीं कामें । वाढला हा श्रमें श्रम होता ॥ ३ ॥ बहु दिसां (दिस) होता सांडिला मारग । क्लेशाचा तो (त्या) त्याग आजि झाला ॥ ४ ॥ बहु होती केली सोंगसंपादणी । लौकिकापासूनि निर्गमलें ॥ ५ ॥ तुका म्हणे येथें झालें अवसान । परमानंदीं मन विसावलें ॥ ६ ॥ [२३२२]

पुत्र झाला चोर । मायबापां हर्ष थोर ॥ १ ॥ आतां कशासाटीं जोडी । हाट धांटे गुंडगे घडी ॥ २ ॥ ऐते (आइते) अपहार । आणूनियां भरी घर ॥ ३ ॥ मानिली निश्चिंती । नरका जावया उभयतीं ॥ ४ ॥ झोंडा झोंडगीचे पोटीं । फळें बीजें तीं (विजाती) करंटीं ॥ ५ ॥ तुका म्हणे बेस्या । भांडवल न लगे खस्या ॥ ६ ॥ [२३२३]

एवढी अपकीर्ती । ऐकोनियां फजीती ॥ १ ॥ जरि दाविल वदन । थुंका थुंका तो देखोन ॥ २ ॥ काळिमेचें जिणें । जीऊनियां (जीवोनियां) राहे सुनें ॥ ३ ॥ तुका म्हणे गुण । दरुषणें अपशकुन ॥ ४ ॥ [२३२४]

पुंडलीक भक्तराज । तेणें साधियेलें काज । वैकुंठीचें निज । परब्रह्म आणिलें ॥ १ ॥ पांडुरंग बाळमूर्ति । गाईगोपाळ सांगाती । येऊनियां प्रीति । उभें समचि राहिलें ॥ २ ॥ एका आगळें अक्षरें । भूवैकुंठचि दुसरें । म्हणविती येरें । परि तीं ऐशीं नव्हे तीं (नव्हेती) ॥ ३ ॥ पाप पंचक्रोशीमधीं । येऊं न सकेचि कधीं । कैंची तेथें विधि । निषेधाची वसति ॥ ४ ॥ पुराणें बोलती ऐसें । चतुर्भुज तीं माणसें । सुदर्शनावरी वसे । न बुडे कदा कल्पांतीं ॥ ५ ॥ अनुपम्य इची थोरी ।

बहुत दिवस प्रतिकूल काळाच्या योगानें देवाच्या पायांचा वियोग झाला होता पण आज त्या पायांची भेट झाली आहे १. आतां स्वस्थपणानें चरणचिंतनाचें सुख मी तृप्त होईपर्यंत घेईन, कारण सर्व कांहीं अडचणी नाहींशा झाल्या आहेत २. पूर्वी अनेक वैषयिक कामनांनीं मला फार दुःख दिलें होतें व त्यांच्या संगतीनें अनेक प्रकारच्या व्यवहाररूपी श्रमानें श्रमच वाढले होते ३. पूर्वी बहुत दिवस परमार्थमार्ग सुटला गेला होता. त्यामुळें जे फार क्लेश झाले होते, त्या सर्व क्लेशांचा आज संबंध सुटला ४. प्रपंचामध्यें आजपर्यंत बहुत सोंगसंपादणी केली, पण त्या लौकिक व्यवहारापासून आतां सुटका झाली ५. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व व्यवहाराचें पर्यवसान एका परमानंदाचे ठिकाणीं होऊन तेथें मन विश्रांति पावलें (स्थिर झालें) ६. [२३२२]

पुत्र चोरटा निघाला म्हणून आईबापांना मोठा आनंद झाला १. आतां आम्हांला बाजारहाट करणें व गर्दीत धक्के घेऊन गुडघे दुखवून घेण्याचें काय कारण आहे? २. दुसऱ्याच्या मालाचा अपहार करून आयतें घेऊन येऊन तो चोरटा घर भरतो ३. असल्या ह्या चोरट्या पोराच्या चौर्यकर्माविषयींचा हर्ष मानून जे आईबाप निष्काळजीपणें राहातात, त्या उभयतांचें हें करणें त्यांस नरकास पोंचवितें ४. असल्या ह्या निलाजऱ्या आईबापांच्या पोटीं असलें हें विपरीत चोरटें करंटें पोर जन्मलें (जसें बीज तसें फळ!) ५. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या ह्या खट्याळ चोरट्या मुलाला भांडवलाची जरूर नाहीं ६. [२३२३]

(हा चोर आहे, जार आहे) अशा प्रकारची अपकीर्तीची फजिती ऐकूनहि १. जर तो नीच तोंड दाखवील तर त्याला पाहून त्याच्या तोंडावर तुम्ही थुंका (असें द्विवार सांगतात) २. अपकीर्तीच्या काळिमेनेंच तो कुत्रा जगला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच्या दर्शनाचा गुण अपशकुन होय (त्याचें तोंड पाहिल्यानें अपशकुन होतो) ४. [२३२४]

सगळ्या भक्तांमध्यें राजा जो पुंडलीक त्यानें सर्वांचें कार्य केलें, म्हणजे वैकुंठवासी साक्षात् जें परब्रह्म तें इहलोकीं पंढरीस आणलें १. पांडुरंग ही बालमूर्ति आहे व ती बरोबर गाई गोपाळ घेऊन समचरणानें विटेवर उभी राहिली २. 'भू' ह्या एका अक्षरानें अधिक पंढरी ही दुसरें भूवैकुंठच आहे. बाकीचीं क्षेत्रें हीं मोठीं पवित्र आहेत, तथापि तीं पंढरीचे बरोबरीस येत नाहींत ३. पंढरीच्या पंचक्रोशीमध्यें पाप केव्हांहि येत नाहीं. त्या ठिकाणीं विधिनिषेधाची वस्ती कसली आली आहे? ४ असें पुराणें सांगत आहेत. तेथलीं माणसें चतुर्भुज (देवतुल्य) आहेत व पंढरी ही प्रभूच्या

महाक्षेत्र महीवरी । धन्य धन्य वारकरी । तुका म्हणे तेथींचे (येथींचे) ॥ ६ ॥ [२३२५]

देह मृत्यूचें भातुकें । कळों आलें कवतुकें ॥ १ ॥ काय मानियेलें सार । हेंचि वाटतें आश्चर्य ॥ २ ॥ नाना भोगांचीं संचितें । करूनि ठेविलें आइतें ॥ ३ ॥ तुका म्हणे कोडीं । उगवूं न सकती बापुडीं ॥ ४ ॥ [२३२६]

त्यानें भोग माझ्या येतील अंतरा । मग मी दातारा काय करूं ॥ १ ॥ आतां असों तुझे पायीं हें मोटळें । इंद्रियें सकळें काया मन ॥ २ ॥ सांडीमांडी विधिनिषेधाचा ठाव । न कळतां (खळतां) भाव जाईल वायां ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां नको उजगरा । लपवीं दातारा अंगीं मज ॥ ४ ॥ [२३२७]

दावूनिया मांड । पुरे न करिती भांड ॥ १ ॥ जळो जळो तैसें जिणें । फटभर लाजिरवाणें ॥ २ ॥ घेतलें तैसें (तें) सोंग । बरवें संपादावें सांग ॥ ३ ॥ तुका म्हणे धीरें । देव नुपेक्षील खरें ॥ ४ ॥ [२३२८]

न पालटे जाती जीवाचिये साटीं । वाहे तेंचि पोटीं दावी वरी ॥ १ ॥ अंतर सबाहीं सारिखाचि रंग । वीट आणि भंग नाहीं रसा ॥ २ ॥ घणाचिया घायें पोटीं शिरे हिरा । सांडूं नेणे धीरा आपुलिया ॥ ३ ॥ तुका म्हणे कढे करावें शीतळ । ऐसें जातिबळ चंदनाचें ॥ ४ ॥ [२३२९]

दिली मान तरी नेघावी शत्रुसी (ची) । शरण आले त्यासी जतन जीवें ॥ १ ॥ समर्थांसी असे विचाराची आण । भलीं पाप पुण्य विचारावें ॥ २ ॥ काकुळतीसाठीं सत्याचा विसर । पडिलें अंतर

सुदर्शनाच्या आधारावर आहे, म्हणून ती केव्हांहि नाहींशी होत नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, पंढरी हें महा क्षेत्र असून तिची थोरवी अनुपम्य आहे. त्या पंढरीची वारी करणारे धन्य आहेत (असें द्विवार सांगतात) ६. [२३२५]

देह हें मृत्यूचें खाजें (खाद्य) आहे, ही गोष्ट सहज कळून चुकली आहे १. असें असून ह्या देहादि प्रपंचाचे ठिकाणीं जो लोभ अज्ञानी लोकांनीं ठेविला आहे तेथें त्यांनीं काय सार मानलें आहे त्याचें आश्चर्य वाटतें २. संचित कर्मानें नाना प्रकारच्या भोगांचें हें शरीर आयतें स्थान तयार करून ठेविलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देहबुद्धीनें दीन झालेले जीव संसाराच्या गुंताड्यांतून मुक्त होऊं शकत नाहींत ४. [२३२६]

अनेक विषयभोगांचा त्याग केल्यानें त्या भोगांविषयींच्या वासना पुनः अंतःकरणांत होतील; हे दातारा, असें जर आहे तर मी कसें करूं ? १. आतां इंद्रियें व मनादि सर्व तत्त्वांचें गांठोडें जो देह तो तुझे पायीं असो २. अन्य कर्मांच्या खटाटोपाच्या मागें विधिनिषेध लागला आहे, त्याचें स्वरूप जर कळलें नाहीं तर केलेलें सर्व व्यर्थ जाईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मला प्रख्यात होणें (कीर्ति मिळविणें) नको, म्हणून हे दातारा देवा, तूं आपल्या स्वरूपीं मला लपीव ४. [२३२७]

कित्येक भांडखोर परमार्थाचा देखावा (सोंग) दाखवितात, पण तो पूर्णपणें तडीस नेत नाहींत १. अशा जगण्याला आग लागो (असें द्विवार सांगतों). तें सर्व लज्जा उत्पन्न करणारी फटफजीती आहे २. जें सोंग आपण घेतलें आहे त्याची सर्व सांगता होईपर्यंत उत्तम संपादणी करावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, धैर्यवान् भक्तांची देव खरोखर उपेक्षा करीत नाहीं ४. [२३२८]

जी खरी जात आहे ती आपल्या मनाच्या स्थितीपासून कधीं भ्रष्ट होत नाहीं. त्यांच्या हृदयांत जो भाव आहे तोच ते वर दाखवितात १. त्यांच्या अंतर्बाह्य एक रंग आहे. त्यामध्यें कधीं वीट न येतां त्या रसाचा कधीं भंग होत नाहीं २. घणाचा घाव मारल्यानें हिरा न फुटतां ऐरणीच्या पोटांत शिरतो. कसेहि तडाखे मारले तरी तो आपलें कठिणत्व टाकीत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, तेल कितीहि तप्त (कढत) झालेलें असलें तरी त्याला चंदन हें आपल्या गुणानें शीतळ करतें अशी त्याची जाति आहे (उत्तम जातीचीं माणसें किंवा उत्तम जातीचे पदार्थ आपले सद्गुण कधींहि बदलीत नाहींत) ४. [२३२९]

शत्रूनें आपली मान दिली तरी ती कापूं नये, कारण जे शरण आले आहेत त्यांच्या जीवाचें रक्षण करावें १. जे कोणी समर्थ आहेत त्यांच्यामध्यें विचार करणें हीच शपथ आहे; म्हणून भल्यांनीं (ज्ञात्यांनीं) पापपुण्याचा विचार करावा २. कोणी काकुळतीस आलें तरी आपल्या सत्य कर्माला (न्याय नीतीला) विसरूं नये व त्याविषयीं अंतर पडूं

न पाहिजे ॥ ३ ॥ तुका म्हणे यश कीर्ति आणि मन । करितां जतन देव जोडे ॥ ४ ॥ [२३३०]

विचारिलें आधीं आपुल्या मानसीं । वांचों येथें कैसीं कोण्या द्वारें ॥ १ ॥ तंव जाला साह्य (साह्य झाला) हृदयनिवासी । बुद्धि दिली ऐसी नास नाहीं ॥ २ ॥ उद्वेगाचे होतों पडिलों समुद्रीं । कोणें रीती तीरीं पाविजेल ॥ ३ ॥ तुका म्हणे दुःखें आला आयुर्भाव । झाला बहु जीव कासावीस ॥ ४ ॥ [२३३१]

आपुलें वेंचूनि खोडा घाली पाय । ऐसा तो हा जीव हीनबुद्धि ॥ १ ॥ विषयांच्या संगें आयुष्याचा नास । पडियलें ओस स्वहिताचें ॥ २ ॥ भुललयाचें अंग आपणा पारिखें । छंदाच सारिखें वर्ततसे ॥ ३ ॥ तुका म्हणे दुःख उमटे परिणामीं । लंपटासी कामीं रतलिया ॥ ४ ॥ [२३३२]

केलें शकुनें प्रयाण । आतां मागें फिरे कोण ॥ १ ॥ होय तैसें हो आतां । देह बळी काय चिंता ॥ २ ॥ पडिलें पालवीं । त्याचा धाक वाहे जीवीं ॥ ३ ॥ तुका म्हणे जीणें । देवा काय हीनपणें ॥ ४ ॥ [२३३३]

आळणी ऐसें कळों आलें । त्यासी भलें मौनचि ॥ १ ॥ नये कांहीं वेंचूं वाणी । वेडे घाणीसांगातें ॥ २ ॥ वेगळे ते देहभावा । भ्रम जीवा माजिरा ॥ ३ ॥ तुका म्हणे कवतुक केलें । किंवा भलें दवडितां ॥ ४ ॥ [२३३४]

चित्ताचा चाळक । त्याचें उभय सूत्र एक ॥ १ ॥ नाचवितो नाचे छंदें (नाना छंदें) । सुखें आपुलया विनोदें ॥ २ ॥ चंद्र कमळणी । नाहीं धाडीत सांगोनि ॥ ४ ॥ तुका म्हणे उठी । लोह चुंबकाचे दृष्टी ॥ ४ ॥ [२३३५]

देऊं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव जतन केला असतां—यश, कीर्ति, व मानाची प्राप्ति होते, अथवा यश, कीर्ति व मान हीं जतन केलीं असतां देवाची प्राप्ति होते ४. [२३३०]

ह्या संसारामध्यें आम्ही कसे व कोणत्या साधनानें जगूं ह्याविषयींचा विचार अगोदर आम्हीं आपल्या मनामध्यें केला १. इतक्यांत हृदयांत राहाणारा जो देव, त्यानें साहाय्य करून आम्हांला अविनाश आत्मविषयक बुद्धि दिली २. दुःखसमुद्रामध्यें आम्ही बुडत होतों, त्या वेळीं आम्ही कोणत्या योगाने पैलतीरास जाऊं अशी काळजी होती ३. तुकाराम महाराज म्हणतात, आजपर्यंतची आयुष्यमर्यादा दुःखामध्यें गेली. त्यायोगें माझा जीव फार कासावीस झाला ४. [२३३१]

आपल्या पदरचें खर्चून खोड्यामध्यें पाय घालतो अशा प्रकारचा हा जीव मतिमंद आहे १. विषयांच्या संगतीनें आयुष्याचा नाश होऊन सर्व लोक हितशून्य झाले आहेत २. जो कोणी भुलला आहे त्याचें अंग त्याला परकें होतें आणि आपल्या छंदाप्रमाणें वाटेल तशी तो वर्तणूक करतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, विषयलंपट पुरुष कामाच्या ठिकाणीं रममाण झाला असतां, त्याचा परिणाम दुःखकारक होतो ४. [२३३२]

जर शकुन पाहून गमन केलें आहे तर आतां मागें कोण फिरतो? १. आतां होईल तसें होवो; कारण आम्हीं देवाला देहाचें बलिदान दिलें आहे. त्याविषयींची चिंता करण्याचें कारण नाहीं २. जो लाभ पदरांत पडला आहे त्याविषयींचा दरारा जीवाचे ठिकाणीं असतो (तो लाभ जाण्याची भीति मनांत असते) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आम्ही (देवावांचून) हीनपणानें जगावें, हें काय उपयोगाचें आहे? ४. [२३३३]

भोजनास बसलें असतां वाढलेले पदार्थ अळणी आहेत असें जरी आपल्याला समजून आलें तरी त्याविषयीं मुकाट्यानें बसावें हें बरें १. असल्या घामट वेडगळ स्त्रियेबरोबर (किंवा आचाऱ्याबरोबर) व्यर्थ बोलूं नये २. ज्यांच्या जीवांत भ्रम वाढला आहे ते देहभावविवर्जित असतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, तशा स्त्रियेचें करणें विनोदावारीं न्यावें अथवा तिला बाहेर घालवून द्यावें हें बरें ४. [२३३४]

जो देव चित्ताचें चलनवलन करणारा आहे त्याचें उभयपक्षींचें सूत्र त्याचेच हातीं आहे, म्हणजे चित्ताचें व ईश्वराचें एक सूत्र आहे १. तो जसा जीवांना नाचवितो तसे आपल्या सुखाच्या संगानें (आनंदानें व संसाराच्या नादानें) जीव नाचतात. हें त्याचें करणें सहज लीलेचें आहे २. कमळणीला विकसित व्हावें म्हणून चंद्र सांगून पाठवितो काय? ती जशी त्याच्या उदयानें विकसित होते तसे देवाच्या इच्छेनें जीव नाचतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, लोहचुंबकाच्या आकर्षणानें लोखंडाचे ठिकाणीं सहजच चलन उत्पन्न होतें [तशी जीवाची स्थिति होते] ४. [२३३५]

करितां तडातोडी । वत्स माते सोई ओढी ॥ १ ॥ करित्याचा आग्रह उरे । एक एकासाठीं झुरे ॥ २ ॥ भुके इच्छी अन्न । तेंही त्यासाठीं निर्माण ॥ ३ ॥ तुका म्हणे जाती । एक एकाचिये चित्तीं ॥ ४ ॥ [२३३६]

निघालें दिवाळें । जालें देवाचें वाटोळें ॥ १ ॥ आतां वेंचूं नये वाणी । विचारावें मनींच्या मनीं ॥ २ ॥ गुंडाळिलीं पोतीं । भीतरीं लावियेली वाती ॥ ३ ॥ तुका म्हणे करा । ऐसा राहे माजी घरा ॥ ४ ॥ [२३३७]

तीर्थाचिये असे पंथें तो निदैंव (तीर्थाचिये पंथें चाले तो निदैंव) । पाविजे तो ठाव अंतराय ॥ १ ॥ म्हणऊनि भलें निश्चळचि स्थळीं । मनाचिये मुळीं बैसोनियां ॥ २ ॥ संकल्पारूढ तें पराधीन जिणें । कार्यचि कारणें वाढतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे कामा नाहीं एक मुख । जिरवितां सुख होतें पोटीं ॥ ४ ॥ [२३३८]

क्षणक्षणा हाचि करावा विचार । तरावया पार भवसिंधु ॥ १ ॥ नाशिवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ॥ २ ॥ संतसमागमीं धरावी (धरूनि) आवडी । करावी तांतडी परमार्थी ॥ ३ ॥ तुका म्हणे इहलोकींच्या वेव्हारें । नये डोळे धुरें भरूनि राहों ॥ ४ ॥ [२३३९]

कोणाशीं विचार करावा सेवटीं । एवढ्या लाभें तुटी जाल्या तरें ॥ १ ॥ सांभाळितो शूर आला घावडाव । पुढें दिला पाव न करी मागें ॥ २ ॥ घात तो या नांवें येथें अंतराय । अंतरल्या पाय गोविंदाचे ॥ ३ ॥ तुका म्हणे गडसंदीचा हा ठाव । केला तो उपाव कार्या येतो ॥ ४ ॥ [२३४०]

तान्हें वांसरूं आणि गाय यांच्यामध्यें ताडातोड केली असतां त्या वासराची ओढ आपल्या आईकडेच असते १. ताडातोड करणाऱ्याचा मात्र हा हट्ट उरतो, कारण तीं परस्पर एकमेकांविषयीं झुरत असतात २. भूक लागली म्हणजे प्राण्यास अन्न खाण्याची इच्छा उत्पन्न होते आणि तें अन्न त्याच्याकरितांच उत्पन्न झालें आहे (म्हणून त्याला अन्नावरून उठवूं नये) ३. तुकाराम महाराज म्हणतात, एका जातीचीं जीं आहेत त्यांचें चित्त एकमेकांचे ठिकाणीं असतें ४. [२३३६]

(ज्याअर्थीं भक्ताची इच्छा पूर्ण होत नाहीं त्याअर्थीं) देवाचें दिवाळें वाजलें व त्याचा सर्वनाश झाला १. आतां व्यर्थ वाचा खर्च करूं नये. ह्याविषयींचा विचार आपल्या मनांतल्या मनांत करावा २. त्यानें मालाचीं सर्व पोतीं आंवरून जागा खुली करून तेथें (शेर पालथा घालून त्यावर) दिवा लावून ठेविला ३. तुकाराम महाराज म्हणतात, असला देव आपल्या देहरूपी घरामध्यें सर्वकाळ राहील असें करा ४. [२३३७]

जो कोणी तीर्थयात्रेच्या मार्गांत असतां (मार्गानें चालतो) तो बहिर्मुख असल्यामुळें दुर्दैवी समजावा, कारण त्या योगानें ईशप्राप्तीमध्यें अडथळा येतो; त्या ठायाचा (आत्मस्वरूपाच्या प्राप्तींत) अंतर पडतो १. ह्याकरितां मनाचें मूळ जें आत्मस्वरूप, त्या ठिकाणीं जागचे जागीं निश्चळ बसावें हें बरें २. ज्याचें मन (योग, तीर्थ, व्रतें करण्याच्या) संकल्पाधीन आहे त्याचें जगणें परतंत्र असून तें अधिक अधिक परतंत्र होत जातें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या कामाला (इच्छेला) एकच तोंड नाहीं, म्हणून तो हृदयांतल्या हृदयांत नाहींसा केल्यानेंच (इच्छा जिरवून टाकल्या असतां) आत्मसुख प्रकट होतें ४. [२३३८]

भवसमुद्रामध्यें बुडालेल्या लोकांनीं पलीकडे जाण्याचा विचार वारंवार करावा १. तो असा, कीं हा देह नाशिवंत (क्षणभंगुर) असून कधीं तरी लयास जाणार आहे. ह्याचें आयुष्य काळ खातो म्हणून सावध व्हावें २. संतसंग धरण्याची प्रीति धरून परमार्थ साध्य करून घेण्याची लगबग-त्वरा करावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, ऐहिक प्रपंचव्यवहाराच्या मस्तीनें अंध (अविचारी) होऊन राहूं नये ४. [२३३९]

हा नरदेहरूपी लाभ हातचा गेल्यावर अखेरीस विचार कोणाबरोबर करावा ? १. ह्याकरितां परमार्थमार्गाकडे ज्यांनीं पाय टाकला आहे त्यांनीं जे आघात येतील ते सहन करावे, पण मागें सरूं नये हेंच शूराचें लक्षण आहे २. ह्या ठिकाणीं देवाच्या पायांचा विसर झाला म्हणजे त्यालाच घात असें म्हणावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें मनुष्यरूपी ठिकाण मोठें गडसंदीचें (देव आणि तिर्यक् ह्यांच्या मधलें) (हा मनुष्यदेह म्हणजे योग्य संधीचा फायदा करून घेण्याचें) आहे, म्हणून ह्या ठिकाणीं (ह्या देहास) जो उपाय करावा तो सफल होतो ४. [२३४०]

असां जी सोंवळे । आहां तैसेचि निराळे ॥ १ ॥ आम्हीं नयों तुमच्या वाटा । काय लटिकाची ताठा ॥ २ ॥ चिंतनचि पुरे । काय सलगी सवें धुरे ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । नको नावडे ते सेवा ॥ ४ ॥ [२३४१]

अहंकार तो नासा भेद । जगीं निंद्य ओंवळा ॥ १ ॥ नातळे तो धन्य यासी । झाला वंशीं दीपक ॥ २ ॥ करवितो आत्महत्या । नेदी आप्ता (सत्या) आतळों ॥ ३ ॥ तुका म्हणे गुरुगुरी । माथां थोरी धरोनि ॥ ४ ॥ [२३४२]

इच्छिलें ते शकुनवंती । होय देती तात्काळ ॥ १ ॥ क्षीरा नीरा निवाड करी । वरावरी विठ्ठल ॥ २ ॥ भाग्याविण कैचें फळ । अंतर मळमूत्राचें ॥ ३ ॥ तुका म्हणे संचित कुडें । तें बापुडें करीतसे ॥ ४ ॥ [२३४३]

काशासाठीं आम्हीं जाळिला संसार । न करा विचार ऐसा देवा ॥ १ ॥ कैसें नेणों तुम्हां करवतें उदास । माझा प्रेमरस भंगावया ॥ २ ॥ समर्पूनि ठेलों देह हा सकळ । धरितां विटाळ न लजा माझा ॥ ३ ॥ तुका म्हणे अवघी मोकलूनि आस । फिरतों उदास कोणासाठीं ॥ ४ ॥ [२३४४]

नाहीं तुम्हां कांहीं लाविलें मागणें । कांटाळ्याच्या भेणें त्रासलेती ॥ १ ॥ एखादिये परी टाळावी करकर । हा नका विचार देखों कांहीं ॥ २ ॥ पायांच्या वियोगें प्राणा संवसाटी । नेवेवेसी तुटी झाली आतां ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्हां मागणें तें आतां । हेंचि कृपावंता चरणीं वास ॥ ४ ॥ [२३४५]

अहो देवा, तुम्ही जर सोंवळ्या निराकार स्थितीनें आमच्याहून वेगळे आहांत, तर तसेच असा १. तुमच्या निर्गुणाच्या मार्गाकडे आम्ही मुळींच येणार नाहीं, कारण तेथें ब्रह्मस्थितीचा मायिक (ब्रह्मज्ञानाच्या खोट्या अभिमानाचा) ताठा आहे २. तुम्हां थोरांबरोबर सलगी करणें हें काय? आम्हीं तुमचें चिंतन करून राहावें एवढेंच पुरे ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, ती अव्यक्त सोंवळ्या रूपाची सेवा आम्हांला आवडत नाहीं, म्हणून ती तुम्ही देऊं नका ४. [२३४१]

ह्या जगामध्यें मुख्य ओंवळा अभिमान आहे, संतांनीं त्याची निंदा केली आहे आणि त्याच्या योगानें भेद वाढून नाशाला कारण होतें १. ह्या अभिमानाला जो स्पर्श करीत नाहीं, तो वंशामध्यें कुलदीपक झाला आहे आणि त्यालाच धन्य म्हणावें २. हा अभिमान आत्महत्येचा दोष करवितो आणि जो आपला आप्त (सत्य) आहे त्याची (श्रीहरीची, संतांची) भेट होऊं देत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या अभिमानाच्या योगानें आपल्याकडे मोठेपणा घेऊन तो उगीच गुरगुरत राहातो ४. [२३४२]

ही विठाबाई शकुनवंती आहे, म्हणून जो जी इच्छा करील ती त्याची इच्छा ती तत्क्षणीं पूर्ण करते १. दुधाचा [साराचा] आणि पाण्याचा [असाराचा] निवाडा वरचेवर करणारी ही विठाबाई राजहंसाप्रमाणें आहे (खरा भक्त कोण व खोटा भक्त कोण ह्यांची निवड विठाई करते) २. कांहीं भाग्य उदयास आल्याशिवाय (पूर्वपुण्याशिवाय) तिच्यापासून फळ कसें मिळेल? कारण, अंतःकरण पापरूपी (कामक्रोधरूपी) मलमूत्रानें भरलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, वाईट प्रारब्धकर्म ह्या लोकांना दीन करून सोडतें ४. [२४४३]

हे देवा, आम्हीं आपला संसार कशाकरितां नाहींसा केला आहे, ह्याचा तुम्ही कांहीं विचार करीत नाहीं १. तुमच्यानें मला निराश कसें करवतें तें समजत नाहीं. पण तुमच्याविषयीं माझ्यामध्यें असणारा प्रेमरस नाहींसा करण्याकरितां (हे असावें असें वाटतें) २. आम्हीं आपला सर्व देह तुम्हांला अर्पण करून राहिलों आहोंत. असें असून आमचा तुम्ही विटाळ मानतां, ही तुम्हांला लाज वाटत नाहीं काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही सर्व आशा टाकून उदासीनपणानें कोणाकरितां फिरतों (ह्याचा तुम्ही एकदां तरी विचार करा) ४. [२३४४]

हे देवा, तुम्हांजवळ आम्ही कांहीं मागत नाहीं, असें असून कांहीं मागूं या भीतीनें तुम्ही आमचा कंटाळा करून त्रास मानतां १. कांहीं तरी देऊन आपले जवळची कटकट नाहींशी करावी, असा कांहीं विचार तुम्ही करूं नका २. आतां आम्हांला तुमचा वियोग कधीं होऊं नये असें झालें आहे. असें असून जर तुमच्या पायांचा वियोग झाला तर आमचा प्राणच जाईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे कृपावंता, तुमच्या चरणांचे ठिकाणीं आतां आम्हांला ठेवा, एवढेंच आमचें मागणें आहे ४. [२३४५]

जग अमंगळ । लागे देखतां विटाळ ॥ १ ॥ धर्म भूतांची ते दया । संत कारण ऐसीया ॥ २ ॥ नव्हे माझें मत । साक्षी करूनि सांगें संत ॥ ३ ॥ तुका म्हणे जीवें । दावी उमटूनि अनुभवें ॥ ४ ॥ [२३४६]

दंड अन्याच्या(चे) माथां । देखोनि करावा सर्वथा ॥ १ ॥ नये उगें बहुतां घाटूं । शिसें सोनियांत आटूं ॥ २ ॥ पापपुण्यासाठीं । नीत केली आतां खोटी ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । दोष कोणाचा तो दावा ॥ ४ ॥ [२३४७]

आम्ही पतीत तूं पावन । हें तों पूर्वापार जाण ॥ १ ॥ नवें करूं नये जुनें । सांभाळावें ज्याचें त्याणें ॥ २ ॥ मिराशीचा ठाव । राखा करूनि उपाव ॥ ३ ॥ वादें मारी हाका । देवा आइकवीतो तुका ॥ ४ ॥ [२३४८]

पाडावी ते बरी । गांठी धुरेसवें खरी ॥ १ ॥ नये मरों लंडीपणें । काय बापुडें तें जिणें ॥ २ ॥ लुटावें भांडार । तरी जया नाहीं पार ॥ ३ ॥ तुका म्हणे नांवें । कीर्ति आगळीनें ज्यावें ॥ ४ ॥ [२३४९]

भांडण तें जालें । मग जीवाचें काय आलें ॥ १ ॥ येऊं नेदावी पुढती । आड भयाची ते जाती ॥ २ ॥ करितां सरोबरी । कांहीं न ठेवावा उरी ॥ ३ ॥ तुका म्हणे शूर । व्हावें धुरेसींच धूर ॥ ४ ॥ [२३५०]

जन्मांतरीं शुद्ध नाहीं आचरण । यालागीं चरण अंतरले ॥ १ ॥ वोड (ढ) वलें संचित येणें जन्में पाहतां । आतां पंढरिनाथा कृपा करीं ॥ २ ॥ पतितपावन ब्रिदें साच करीं देवा । यालागीं कुढावा करीं माझा ॥ ३ ॥ अपराधी पातकी दुष्ट दुराचारी । आहाळलों भारी संवसारें ॥ ४ ॥ कामक्रोध आदि

जग अपवित्र आहे, असें जो पाहील तोच अपवित्र होईल १. सर्व भूतांवर दया करणें हाच खरा धर्म आहे व हेंच संतकार्य होय २. हें मी आपल्या मतानें सांगतों असें नाहीं. ह्याला पुरावा मागील संतांचा आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा अनुभव आपल्या जीवाचे ठिकाणीं प्रगट करून (स्वानुभवानें) मी दाखवितों ४. [२३४६]

शिक्षा करण्यास अपराधी पात्र आहे. त्याचा अपराध पाहून त्याप्रमाणें त्यास निश्चयानें शिक्षा करावी १. (अन्याय न करणाऱ्या) इतर लोकांस व्यर्थ त्रास देऊं नये. जसें सोन्यामध्यें शिसें आटवूं नये [म्हणून तसें करूं नये] २. पापपुण्याकरितां जी नीति· वेद–शास्त्रांत तुम्हीं निर्माण केली आहे, ती आतां तुम्ही खोटी करितां ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, ह्यांत अपराध कोणाचा आहे तो तुम्ही दाखवा ४. [२३४७]

आम्हीं पातकी असावें आणि तुम्हीं आम्हांला पावन करावें, असें पूर्वापार जें चालत आलें आहे, तें तुम्ही समजा १. नवीन कांहीं करूं नये. जुनें असेल तें ज्याचें त्यानें रक्षण केलें पाहिजे २. ही जी उभयतांची मिरास आहे, तें ठिकाण (ती मिरासदारी) यत्नानें तुम्ही रक्षण करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा वर्दळीवर येऊन मी हांका मारतों व त्याप्रमाणें देवास ऐकावयास लावतों ४. [२३४८]

खरोखर थोरांशीं गांठ घालावी हें बरें. त्यावांचून भित्रेपणानें मरूं नये आणि जगूंहि नये; कारण तें जगणें दीनपणाचें आहे २. ज्या खजिन्यास अंतपार नाहीं तोच लुटावा तर बरें (गरिबाच्या घरचीं हांडीं-मडकीं लुटण्यांत काय अर्थ आहे?) ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वांपेक्षां मोठी कीर्ति करून (विशेष नांवलौकिक मिळवून) जगणें तें बरें (नाहीं तर कुत्रीं, डुकरें जगतातच!) ४. [२३४९]

भांडण्याचाच प्रसंग आला तर आपल्या जिवाची पर्वा धरूं नये १. भांडतांना पुन्हां केव्हांहि भय धरूं नये. शत्रूशीं चांगलें निकरानें भांडावें. २. ज्याच्याशीं भांडावयाचें आहे त्याच्याशीं बरोबरीच्या नात्यानें वागण्याविषयीं कांहीं पर्वा ठेवूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें शूर होऊन मोठ्यांशीं मोठें व्हावें ४. [२३५०]

अनेक जन्मांमध्यें मीं कांहीं चांगला आचार केला नव्हता, म्हणून तुमच्या पायांचा वियोग झाला १. हे पंढरीनाथा, ह्या जन्माचे ठिकाणीं पाहिलें असतां कांहीं प्रारब्ध उदयास आलें आहे, म्हणून आतां तुम्ही माझ्यावर कृपा करा २. हे देवा, तुम्ही आपलें पतितपावनपणाचें ब्रीद खरें करण्याकरितां माझें रक्षण करा ३. मी दुष्ट असून अपराधी, पातकी,

कल्पनेच्या त्रासें । तुज न पवें ऐसें झालें देवा ॥ ५ ॥ हा ना तो सा ठाव झाला पांडुरंगा । नयेचि उपेगा काय करूं ॥ ६ ॥ आपुलिया नांवा धांवणिया धांवें । लवकरी यावें तुका म्हणे ॥ ७ ॥ [२३५१]

प्रथम भेटी आलिंगन । मग चरण वंदावे ॥ १ ॥ ऐसा माझा भोळा बाप । हरी ताप कवळोनि ॥ २ ॥ न सांगतां सीणभाग । पांडुरंग जाणतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपावंतें । द्यावें भातें न मागतां ॥ ४ ॥ [२३५२]

वचनाचा अनुभव हातीं । बोलविती देव मज ॥ १ ॥ परि हें न कळे अभाविकां । जडलोकां जीवांसी ॥ २ ॥ अनुश्रुत हे प्रासादिक । कृपा भीक स्वामीची ॥ ३ ॥ तुका म्हणे वरावरी । जातों तरी सांगत ॥ ४ ॥ [२३५३]

कां रे तुम्हीं ठेवा वह्रुतां निमित्तें । माझिया संचितें वोड(ढ) वलें ॥ १ ॥ भक्तिप्रेम गोडी बैसली जिव्हारीं । आनंद अंतरीं येणें झाला ॥ २ ॥ पुसिलें पडळ तिमिर विठ्ठलें । जगचि भरलें ब्रह्मानंदें ॥ ३ ॥ तुका म्हणे केला कामने वेगळा । आवडी गोपाळा वरी असे (असे वरी) ॥ ४ ॥ [२३५४]

आसन शयन भोजन गोविंदें । भरलें आनंदें त्रिभुवन ॥ १ ॥ अवघियां केली काळें ताडातोडी । अवसर घडी पुरों नये ॥ २ ॥ वांटणी घातले शरीराचे भाग । दुजियाचा लाग खंडियेला ॥ ३ ॥ आवडीच्या आलें आहारासी रूप । पृथक संकल्प मावळले ॥ ४ ॥ काम तरी क्रोध बुद्धि मन नासे । भ्रमाचे वोळसे गिळिले शांती ॥ ५ ॥ तुका म्हणे मना श्रीरंगाचा रंग । बैसला अभंग एकविध ॥ ६ ॥ [२३५५]

दुराचारी असा आहें; आणि संसाराचे तापानें फार पीडित झालों आहें ४. अंतरांतील काम, क्रोध आदिकरून ज्या कल्पना, त्यांच्या त्रासानें देवा, तुमच्याजवळ मी पोहोंचत नाहीं असें झालें आहे ५. हे पांडुरंगा, इकडे संसार नाहीं व तिकडे तुझी प्राप्ति नाहीं, अशीं दोन्ही ठिकाणें अंतरल्यामुळें मी निरुपयोगी झालों आहें, त्याला मी काय करूं? ६. तुकाराम महाराज म्हणतात, तुझें नांव पतितपावन आहे म्हणून माझ्याकरितां तूं लवकर धांवत ये ७. [२३५१]

ह्या देवाला प्रथम भेटीबरोबर आलिंगन द्यावें आणि मग पायांवर मस्तक ठेवावें १. कारण पहिल्या भेटीबरोबर आलिंगन देऊन सर्व तापांचा परिहार करतो, अशा प्रकारचा माझा बाप भोळा आहे २. आपलें दुःख व श्रम ह्याला न सांगतां हा पांडुरंग सर्व जाणत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याची जशी इच्छा असेल तें त्यानें न मागतां हा कृपाळु देव त्याच्या मनांतील इच्छा जाणून ती पूर्ण करितो ४. [२३५२]

जीं वचनें माझ्या मुखांतून निघतात, त्यांचा अनुभव मला आला आहे, कारण मला देव बोलवीत आहे १. परंतु हे जडजीव अभाविक असल्यामुळें तें कांहीं ह्यांना कळत नाहीं २. पूर्वीं कोणीं आइकलें नाहीं, अशा प्रसादाची (प्रासादिक वाणीची) भिक्षा मला माझ्या स्वामींनीं [देवानें] दिली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी ह्याविषयीं वरचेवर सांगत आहें [तरी ह्या लोकांस तें कळत नाहीं] ४. [२३५३]

अहो जन हो, तुम्हीं माझ्यावर संसार सोडल्याबद्दल कां पुष्कळ आरोप करतां? कारण हें माझ्या संचितानेंच मला मिळालें आहे १. माझ्या अंतःकरणाचे ठिकाणीं प्रेमभक्तीची गोडी राहिली आहे. त्या योगानें सर्व काळ माझ्या हृदयांत आनंद भरला आहे २. अज्ञानरूपी अंधकाराचें ज्ञानदृष्टीवर आलेलें पटल विठ्ठलानें नाहींसें केलें, म्हणून आतां सर्व जग ब्रह्मानंदानें भरलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या गोपाळानें मला कामनेच्या वेगळें केलें आहे, म्हणून माझी प्रीति त्याच्यावर आहे ४. [२३५४]

बसतांना, निजतांना व जेवतांना मी गोविंदाचें ध्यान करीत आहें त्या योगानें हें सर्व त्रिभुवन आनंदमय झालें आहे १. काळानें सर्वांची ताडातोड केल्यामुळें मला तें ध्यान करतांना घटकाभर देखील विसांवा मिळत नाहीं २. त्याविषयीं मी आपल्या शरीराचे भाग पंचमहाभूतांना वांटून दिले आहेत, म्हणून माझ्यावरची दुसऱ्याची सत्ता नाहींशी झाली ३. देवाच्या रूपाचा आहार माझ्या आवडीनें केला म्हणून माझे वेगळाले संकल्प नाहींसे झाले ४. काम, क्रोध, बुद्धि हीं ज्या मनांत असतात त्या मनाचा नाश होऊन तें शांतीला पावल्यामुळें सर्व भ्रमदुःख नाहींसें झालें ५. तुकाराम महाराज म्हणतात, आतां माझें मन श्रीरंगाच्या एकविध रंगानें अखंड रंगलें आहे, त्याचा कधीं नाश होणार नाहीं ६. [२३५५]

ज्वरल्यासी काढा औषध पाचन । मूढा नारायण स्मरवितों ॥ १ ॥ भवव्याधि येणें तुटेल रोकडा । करूनियां झाडा निश्चयेंसीं ॥ २ ॥ आणिकां उपाया अनुपान कठिण । भोगें बरें सीण शीघ्रवत् ॥ ३ ॥ तुका म्हणे केला उघडा पसारा । भाग्य आलें घरा द्वारावरी ॥ ४ ॥ [२३५६]

जपाचें निमित्त झोंपेचा पसरू । देहाचा विसरू पाडूनियां ॥ १ ॥ ऐसें तें भजन अमंगळवाणी । सोंग संपादणी बहुरुप्याची ॥ २ ॥ सेवेसी विकलें देहाचिया आसे । तया कोठें असे उरला देव ॥ ३ ॥ तुका म्हणे मान दंभ जया चित्तीं । तयाची फजिती करूं आम्ही ॥ ४ ॥ [२३५७]

परद्रव्य परकांता । नातळे जयाचिया चित्ता । आणिक कर्मीं तो तत्वता । बांधला नवजाय (न वजाय) ॥ १ ॥ ऐसा अनुभव रोकडा । विश्वासी तो जीवा जोडा । एकांत त्या पुढां । अवघा करी उकल ॥ २ ॥ सकट आंवलें तें अन्न । शोधी तेंचि मद्यपान । विषमानें भिन्न । केलें शुद्धाशुद्ध ॥ ३ ॥ तुका म्हणे नित । बरवें अनुभवें उचित । तरी काय हित । मोलें घ्यावें लागतें ॥ ४ ॥ [२३५८]

भूक पोटापुरती । तृष्णा भरवी वाखती । करवी फजीती । हांवें भार वाढला ॥ १ ॥ कुळिंकेसी लांस फांस । डोई दाढी बोडवी दोष । अविहित नाश । करवी वचन चुकतां ॥ २ ॥ विधिसेवनें विहितें । कार्य कारणापुरतें । न वाटे जो चित्तें । अधर्माच्या तो त्यागी ॥ ३ ॥ आज्ञा पाळणें ते सेवा । भय धरोनियां जीवा । तुका म्हणे ठेवा । ठेविला तो जतन ॥ ४ ॥ [२३५९]

कळे न कळे ज्या धर्म । ऐका सांगतों रे वर्म । माझ्या विठोबाचें नाम । अट्टाहासें उच्चारा ॥ १ ॥ तो या दाखवील वाटा । जया पाहिजे त्या नीटा । कृपावंत मोठा । पाहिजे तो कळवळा ॥ २ ॥

जो त्रिविधतापाच्या ज्वरानें पीडिला आहे, त्या मूढाला नारायणाचें स्मरण करणें हेंच पचन होण्यासारखें औषध मी देतों १. ह्या योगानें संसाररूपी रोगाचा झाडा होऊन तो तात्काळ नाहींसा होईल, असें मी निश्चयानें सांगतों २. दुसऱ्या (योगयागादि) औषधास अनुपान कठिण असतें आणि त्यापासून दुःख भोगावें लागतें. हें तसें नसून उत्तम आहे व त्याचा लवकरच गुण येतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा पसारा मीं उघड केला आहे, म्हणून हें भाग्य तुमच्या दारीं आलें आहे ४. [२३५६]

जप करण्याच्या निमित्तानें ज्यामध्यें देहाचा विसर होतो अशी झोंप घेतो १. असलें भजन करणें फार अपवित्र आहे, कारण बहुरूप्याच्या सोंगसंपादणीप्रमाणें तें होतें २. जे कोणी देहाची आशा धरून देवाची सेवा करितात त्यांना देव कसा प्राप्त होईल ? तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या चित्तामध्यें दंभ आहे त्याची आम्ही फजिती करूं ४. [२३५७]

ज्याच्या चित्तामध्यें परद्रव्याचा व परनारीचा अभिलाष नाहीं, तो इतर पापानें बांधला जाणार नाहीं, हें निश्चयानें सांगतों १. (त्या श्रद्धावान् विश्वासूला) हा अनुभव उघडा आहे. तो विश्वासूक जीवाला मिळेल आणि त्याच्याजवळ एकांतांतील सर्व गुह्य उलगडून सांगावें २. अन्न हें कांहीं दिवस ठेवून तें सर्व आंबल्यावर शोधून सेवन केलें असतां, तेंच दारू पिण्याप्रमाणें होतें, कारण वाईटानें चांगल्याचेंहि वाईट होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशी धर्मनीति आहे. तिचा अनुभव योग्य रीतीनें घेतल्यास बरें. मग स्वहित हें कांहीं किंमत देऊन घ्यावें लागेल काय ? ४. [२३५८]

सर्वांची भूक पोटापुरती असते; पण आशा ही संचय करविते आणि ती हांव संसाराचें ओझें वाढवून फजिती करते १. एखाद्यास मोडशी [अजीर्ण] झाली असतां, त्याचा योग्य इलाज जो पाय ओरपणें वगैरे तो न करतां जर दाढी व डोकें मुंडलें तर तो दोष आहे, कारण सांगितलेला इलाज चुकला असतां कांहीं हित न होतां उलट अविधीनें (शास्त्रविरुद्ध आचरणानें) नाश होतो २. आपल्या विहित कर्मांचें विधीनें सेवन करावें आणि कारणापुरतें काम करावें (विधीनें विषयांचें सेवन करावें). अशा प्रकारें जो चित्तानें बाटणार नाहीं, त्यानें अधर्माचा त्याग केला ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या जीवाचे ठिकाणीं भय धरून श्रुति-स्मृति-उक्त आज्ञेचें पालन करावें हीच मुख्य सेवा आहे. त्या योगानें जो पुण्याचा ठेवलेला ठेवा आहे, त्याचें रक्षण होतें ४. [२३५९]

अरे, ज्यांना धर्म कळत असेल व ज्यांना कळत नसेल त्यांना मी एक मार्मिक धर्म सांगत आहें, तो तुम्ही ऐका. माझ्या विठोबाच्या नामाचा मोठ्या जोरानें उच्चार करा २. ज्यांना ज्या नीट वाटा पाहिजे असतील, त्यांना तो त्या दाखवील.

पुसतां चुका होतो वाटा । सवें बोळावा गोमटा । मोडों नेदी कांटा । घेऊं सांटा चोरांसी ॥ ३ ॥ तुका म्हणे मोल । न लगे द्यावें वेंचा बोल । विठ्ठल विठ्ठल । ऐसा छंद मानसीं ॥ ४ ॥ [२३६०]

तरी कां वोळंगणें । राजद्वारीं होती सुने ॥ १ ॥ अंगीं दावुनि निष्कामता । पोकळ पोकळीं ते वृथा ॥ २ ॥ कासया मोकळ । भोंवतें शिष्यांचें गाबाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे ढाळे । बाहेर मुदे ते निराळे ॥ ४ ॥ [२३६१]

हरिच्या दासां सोपें वर्म । सर्व धर्म पाउलें ॥ १ ॥ कडिये देव वाहे खांदीं । वैष्णव मांदी क्रीडेसी ॥ २ ॥ सरती येणें आटाआटी । नाहीं तुटी लाभाची ॥ ३ ॥ तुका म्हणे समाधान । सदा मन आमुचें ॥ ४ ॥ [२३६२]

भूतांचिये नांदे जीवीं । गोसावीच सकळां ॥ १ ॥ क्षण क्षणां जागा ठायीं । दृढ पायीं विश्वास ॥ २ ॥ दावूनियां सोंग दुजें । अंतर बीजें वसतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे जाणे धर्म । धरीं तें वर्म चिंतन ॥ ४ ॥ [२३६३]

संत आले घरा । तों मी अभागी दातारा ॥ १ ॥ कासयानें पूजा करूं । चरण हृदयींच धरूं ॥ २ ॥ काया कुरवंडी । करून ओंवाळून सांडीं ॥ ३ ॥ तुका म्हणे भावें । हात जोडीं असो ठावें ॥ ४ ॥ [२३६४]

भेद तुटलियावरी । आम्ही तुमचींच हो हरी ॥ १ ॥ आतां पाळावें पाळावें । आम्हां लडिवाळांचे लळे ॥ २ ॥ आणिकांची देवा । नाहीं जाणतची सेवा ॥ ३ ॥ तुका म्हणे हेवा । माझा हेत पायीं देवा ॥ ४ ॥ [२३६५]

देव हा मोटा कृपावंत आहे. त्याच्याविषयींचा भक्तामध्यें कळवळा मात्र पाहिजे २. कोणाला सरळ वाट विचारली असतां गैरमाहीतगार चुकीचा रस्ता दाखवितो, त्या योगानें सरळ वाट चुकते, पण ह्या ठिकाणीं आपल्याबरोबर चांगला पोंचविणारा देव आहे, तो आपल्या भक्ताला (नरकाचा) कांटा देखील मोडूं देत नाहीं व सुतळीचा तोडा देखील (कामक्रोधादि) चोरांना घेऊं देत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, विठ्ठलचिंतन करण्याला कांहीं किंमत द्यावी लागत नाहीं. वाणीनें विठ्ठल विठ्ठल असें भजन करून मनासहि तोच नाद लावावा ४. [२३६०]

(ध्रुवपदांत दर्शविलेली स्थिति दाखवीत असून) एवढे मोठे विरक्तपणा दाखविणारे साधु राजाचे द्वारीं कुत्र्यासारखे कां नाचतात ! १. आपल्या ठिकाणीं जो निरिच्छपणा ते दाखवितात, तो केवळ व्यर्थ पोकळ आहे २. आपल्याभोंवतीं मोकाट (स्वैर) शिष्यांचा समुदाय ते कशाकरितां जमवितात ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांचा बाह्यात्कारीं भक्तपणाचा व्यवहार आहे, ते खऱ्या साधुत्वापासून निराळे आहेत ४. [२३६१]

एका हरीच्या पायांचें चिंतन करणें, हाच सर्व धर्म, हेंच हरिदासांचें सोपें साधन आहे १. ज्यांच्या कडेवर, खांद्यावर देव आहे अथवा जे देवाचे खांद्यावर, कडेवर आहेत व ज्यांना खेळण्याकरितां वैष्णवांचा समुदाय आहे २. अशा प्रकारानें इतर खटाटोप नाहींसा होऊन परमार्थलाभांत अंतर पडत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमचें मन सर्व काळ सर्व विकारांपासून मुक्त असून तें समाधानस्थितीनें आहे ४. [२३६२]

सर्व भूतांचा स्वामी जो श्रीहरि तो सर्वांच्या जीवांत (अंतरांत) वास्तव्य करीत आहे १. हरीच्या पायीं दृढ विश्वास ठेवून त्या ठिकाणीं तुम्ही वेळोवेळां जागृत राहा २. नाम-रूपाचें निराळें सोंग दाखवून नाम-रूपांच्या मायारूप बीजाच्याहि अंतरीं ज्याची वस्ती आहे, अथवा तो बीजभूत सर्वांच्या अंतरांत वसत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वान्तर्यामी हरीचें चिंतन करणें ह्या साधनाचा आश्रय करणें हाच धर्म आहे, असें समज ४. [२३६३]

हे दात्या देवा, माझ्या घरीं संत आले आहेत, पण मी दरिद्री आहें म्हणून मी त्यांची पूजा कशानें करूं ? ह्याकरितां त्यांचे चरणच मी हृदयांत धरून राहिलों आहें २. मी आपली काया त्यांच्यावरून ओंवाळून टाकीन ३. तुकाराम महाजर म्हणतात, मी त्यांना भावानें हात जोडतों आहें हें आपणांस ठाऊक असावें. ४ [२३६४]

अहो हरि, तुमच्या व आमच्यामध्यें जो भेदभ्रम आहे, तो नाहींसा झाल्यावर आम्ही तुमचेच [तुम्ही आम्ही एक] १. आतां आम्ही तुमचे लाडके आहोंत, तर ते आमचे लाड तुम्ही पूर्ण करा [असें द्विवार सांगतात] २. अहो देवा, एका तुमच्यावांचून दुसऱ्याची सेवा करणें मी जाणत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, माझा हेतु एका तुमच्या पायीं असून त्याविषयींचीच मला हांव आहे ४. [२३६५]

आमुची विश्रांति । तुमचे चरण कमळापती ॥ १ ॥ हेंचि एक जाणें । काया वाचा आणि मनें ॥ २ ॥ पुढती पुढती नमन । घालूनियां लोटांगण ॥ ३ ॥ नीच जनां लोकां । ताळिले पायरीस तुका ॥ ४ ॥ [२३६६]

विनवितों सेवटीं । आहे तैसें माझे पोटीं ॥ १ ॥ कंठीं राहावें राहावें । हेंचि मागतसे भावें ॥ २ ॥ पुरली वासना । येणें होईल नारायणा ॥ ३ ॥ तुका म्हणे जो देहाडा । तोचि वर्णीन पवाडा ॥ ४ ॥ [२३६७]

आवडीची सलगी पूजा । विषम दुजा भाव तो ॥ १ ॥ ऐसीं उफराटीं वर्मे । कळों भ्रमें न येती ॥ २ ॥ न लगे समाधान मोल । रुचती बोल प्रीतीचे ॥ ३ ॥ तुका म्हणे एका जीवें । सुत्र व्हावें गुंतलें ॥ ४ ॥ [२३६८]

बाळ माते लातेवरी । मारी तेणें संतोषे ॥ १ ॥ सुख वसे चित्ता अंगीं । तें हें रंगीं मिळालें ॥ २ ॥ भक्षी त्याचा जीवमाग । आला भाग तो बरा ॥ ३ ॥ तुका म्हणे ऋणानुबंधें । सांगें मुदें सकळां हें ॥ ४ ॥ [२३६९]

शिजल्यावरी जाळ । वायां जायाचें तें मूळ ॥ १ ॥ ऐसा वारावा तो श्रम । अतिशयीं नाहीं काम ॥ २ ॥ सांभाळावें वर्म । उचिताच्या काळें धर्म ॥ ३ ॥ तुका म्हणे कळे । ऐसें कारणाचे वेळे ॥ ४ ॥ [२३७०]

उभा ऐल थडी । तेणें घालूं नये उडी ॥ १ ॥ पुढें गेल्याचे उपाय । करावे ते केले काय ॥ २ ॥ दिसतें आहारीं । नये जाऊं ऐशावरी ॥ ३ ॥ आळसाची धाडी । तुका म्हणे वहु नाडी ॥ ४ ॥ [२३७१]

अहो लक्ष्मीपति, तुमचे चरण हें आमचें विश्रांतीचें स्थान आहे १. कायेनें, वाचेनें व मनानें तुमचे चरणच जाणत आहों २. म्हणून पुनः पुनः लोटांगण घालून आम्ही तुमच्या पायांना नमस्कार करीत आहों ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी लोकांच्या पायांखालच्या शेवटचे पायरीस आहें ४. [२३६६]

जी भावना माझ्या हृदयांत आहे त्याप्रमाणें मी अखेर आपल्यास विनंती करीत आहें १. हे देवा, तुमचें चिंतन निरंतर माझ्या कंठांत असावें हेंच मी मोठ्या भावानें मागतों २. अहो नारायणा, ह्या योगानें माझी सर्व वासना पूर्ण होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा देह तुमची कीर्ति वर्णन करील (जोंपर्यंत देहाचा सांगाडा उभा आहे तोंपर्यंत मी तुमचें गुणवर्णन करीत राहीन) ४. [२३६७]

परम प्रीतीनें हरीशीं सलगी करणें, हीच त्याची पूजा होय. त्याविषयीं कांहीं विषमता धरणें, हाच द्वैतभाव होय १. अशा प्रकारची ही हरीच्या पूजेची उलटी खूण आहे. ही कित्येकांना भ्रमानें कळत नाहीं २. भगवंताचें समाधान करण्यास मोल द्यावें लागत नाहीं. परम प्रीतीनें हरीशीं बोलणें हेंच त्याला मोठें आवडतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या जीवाचे प्रेमतंतु हरिस्वरूपाचे ठिकाणीं गुंतलेले असावेत ४. [२३६८]

बालक हें आईला लाथा मारतें, त्या योगानें तिला संतोषच होतो १. एकमेकांचे चित्तांचा रंग एकमेकांत मिळाल्यामुळें चित्तामध्यें सुखच असतें २. आई ही ज्या पदार्थांचें सेवन करते, त्यांतील उत्तम सार मुलाच्या वांट्यास येतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा सर्व ऋणानुबंधाचा संबंध आहे, हें मी सरळ सर्वांना सांगत आहें ४. [२३६९]

अन्न शिजल्यावर त्याला जाळ लावला तर तें करपून व्यर्थ जातें १. म्हणून अशा प्रकारचे व्यर्थ श्रम करूं नयेत, कारण वर सुचविलेल्या अतिशय क्रियेंत (अतिरेकांत) कांहीं उपयोग नसतो २. योग्य काळीं जें योग्य करणें, तोच धर्म आहे, म्हणून त्याचें रक्षण करावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व कार्यांचे वेळेस (व्यवहार करते वेळीं) असेंच समजतें ४. [२३७०]

जो नदीच्या अलीकडल्या कांठावर उभा आहे, त्यानें अविचारानें पाण्यांत उडी टाकूं नये १. आपल्या पुढें जे ज्या उपायांनीं पाण्यांतून तरून गेले आहेत, तेच उपाय आपण करावे २. हें माझ्या आटोक्यांत आहे, ह्यांतून मी सहज पार होईन, अशा भ्रमावर जाऊं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर आळसाची धाड पडेल तर ती फार फसवील (तुम्ही वायां जाल) ४. [२३७१]

शक्ती द्याव्या देवा। नाहीं पार्थिवाची सेवा ॥ १ ॥ मुख्य आहे ऐसा धर्म। जाणते हे जाणा मर्म (वर्म) ॥ २ ॥ मना पोटीं देव। जाणे जैसा तैसा भाव ॥ ३ ॥ तुका म्हणे सोसें। लागे लाविल्याचें पिसें ॥ ४ ॥ [२३७२]

कार्यचि कारण। तृष्णा पाववित्ते (वाढविते) सीण ॥ १ ॥ काय करूनियां ऐसा संग! सोसेंचि तूं (सोसें चिंतूं) पांडुरंग ॥ २ ॥ रूपीं नाहीं गोडी। हांवें हांवें ऊर फोडी ॥ ३ ॥ तुका म्हणे पडे भरी। ऐशा वरदळाचे थोरी ॥ ४ ॥ [२३७३]

संसाराच्या नांवें घालूनियां शून्य। वाढता हा पुण्य धर्म केला ॥ १ ॥ हरिभजनें हें धवळिलें जग। चुकविला लाग कळिकाळाचा ॥ २ ॥ कोणाही न लगे साधनांचा पांग। करणें केला त्याग देहबुद्धी ॥ ३ ॥ तुका म्हणे सुख समाधि हरिकथा। नेणे भवव्यथा गाईल तो ॥ ४ ॥ [२३७४]

विश्वासीया नाहीं लागत सायास। अनायासें रस (रंग) अंगा येतो ॥ १ ॥ लेंकराच्या हातें घास मागे माता। वोरसोनि चित्ता सुख पावे ॥ २ ॥ गौरव तो मानी आरुषा वचनीं। भूषण ते वाणी मिरवावी ॥ ३ ॥ तुका म्हणे आहे सकळही साक्षी। माझा तो कईपक्षी पांडुरंग ॥ ४ ॥ [२३७५]

वैभवाचे धणी सकळ शरणागत। सत्यभावें चित्त अर्पिलें तें ॥ १ ॥ नेदी उरों देव आपणावेगळें। भावाचिया बळें ठायाठाव ॥ २ ॥ जाणोनि नेणोनि अंगा आली दशा। मग होय इच्छा आपणच ॥ ३ ॥ तुका म्हणे बरें धाकुट्याचें जिणें। माता स्तनपानें वाढविते ॥ ४ ॥ [२३७६]

कई ऐसी दशा येईल माझ्या अंगा। चित्त पांडुरंगा झुरतसे ॥ १ ॥ नाठवूनि देह

हे देवा, मला परमार्थ करण्याची शक्ति द्या. त्या योगानें मी देहपिंडाची किंवा देहसंबंधी स्त्री-पुत्रादिकांची सेवा करणार नाहीं १. हे जाणते हो, देहाची सेवा करूं नये हाच मुख्य धर्म आहे, हें मर्म तुम्ही जाणा २. मनामध्यें जसा भाव असेल तसा देव प्राप्त होतो, असें तुम्ही समजा ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसा मनाला ध्यास लावावा, तसें त्याला वेड लागतें ४. [२३७२]

आशेच्या योगानें दुःख होतें. प्रपंचांत कार्यकारणभाव दुःख देतो १. म्हणून असला खोटा संग करून काय उपयोग आहे? आम्ही आपल्या मनाचे सोसानें पांडुरंगाचें चिंतन करूं २. जर देवाचे रूपाचे ठिकाणीं गोडी नाहीं, तर हांवेनें हांव वाढून व्यर्थ त्रास होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा बाह्यात्कारी व अल्प सुखाच्या थोरपणाच्या भरीला पडणें व्यर्थ आहे ४. [२३७३]

मीं आपल्या प्रपंचावर पाणी सोडून (ध्रुवपदांत सुचविलेला) पुण्यकारक धर्म वाढता केला १. तो असा, कीं श्रीहरीच्या भजनानें जग प्रकाशित केलें आणि त्याला कळिकाळाच्या तडाख्यांतून वांचविलें २. आतां कोणत्याहि साधनांच्या तंत्रांत राहाणें नको, कारण मीं सर्व देहबुद्धीचा (संसाराचा देहाभिमानासह) त्याग केला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरिकथा ही केवळ सुखाची समाधि आहे. हरिकथा जो गाईल तो संसाराचें दुःख जाणणार नाहीं [म्हणजे त्याचा संसार सुखरूप होईल] ४. [२३७४]

ज्यानें भगवंतावर दृढ विश्वास ठेविला आहे त्यानें कांहीं सायास न करितांहि त्याचें हृदय ब्रह्मरसानें भरतें १. लहान बाळकाच्या हातून मुखांत घास घ्यावे अशी इच्छा मातुश्री करीत असते, आणि बाळकानें घास घातल्यावर आनंदानें ती सुखावते २. त्या मुलाच्या बोबड्या भाषणाचा आनंद मानून त्या बोलण्याचें भूषण ती लोकांत मिरविते ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा माझा प्रकार आहे. ह्याविषयीं सकलसाक्षी जो पांडुरंग तो मला साहाय्य आहे ४. [२३७५]

ज्यांनीं आपलें चित्त खऱ्या भावानें अर्पण करून जे देवास शरण गेले आहेत, ते देवाच्या वैभवाचे मालक होतात १. त्यांना देव आपणावेगळें राहूं देत नाहीं. तरी पण ते भावाच्या बळानें स्वामिसेवकपणाचें नातें ठेवितात २. ही नेणतेपणाची अवस्था त्यांच्या अंगाला सर्व जाणून (जीव ब्रह्मरूप आहे असें जाणूनहि) आली आहे; म्हणून त्यांच्या इच्छेप्रमाणें देव आपल्या आपण होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, लहान मुलाला स्तनपान देऊन आई वाढविते म्हणून लहानपणा बरा ४. [२३७६]

हे पांडुरंगा, (ध्रुवपदांत दर्शविलेली) अशी अवस्था माझ्या ठिकाणीं कधीं येईल ह्याविषयीं माझें चित्त तळमळत आहे १.

पायांचें चिंतन । अवसान ते क्षण नाहीं मध्यें ॥ २ ॥ काईं ऐसा पात्र होईन लाभासी । नेणों (कई) हृषीकेशी तुष्टईल ॥ ३ ॥ तुका म्हणे धन्य मानीन संचित । घेईन तें नित्य प्रेमसुख ॥ ४ ॥ [२३७७]

नाहीं वागवीत जाणिवेचें ओझें । स्वामिसेवा काजें निर्भरु हा ॥ १ ॥ आज्ञा ते प्रमाण हा मनीं निर्धार । येणें फिटे भार निश्चयेंसीं ॥ २ ॥ आळीकर आम्ही एकविध चित्तें। तैसें होऊं येतें मायबापें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी ये जातीची सेवा । घातलासे देवावरी भार ॥ ४ ॥ [२३७८]

काय नाहीं माझे अंतरीं वसति। व्यापक हा भूतीं सकळां नांदे ॥ १ ॥ चित्तासी प्रसाद होईल चळण । तेंचि तें वळण मनासही ॥ २ ॥ सर्व शक्ति जीवीं राहिल्या कुंठित । नाहीं केलें होत आपुलें तें ॥ ३ ॥ तुका म्हणे दोरी खांबसूत्र्या हातीं । नाचवी नाचतीं जडें तैसीं ॥ ४ ॥ [२३७९]

देवाचें निर्माल्य कोण शिवे हातीं। संकल्पासी होती विकल्प ते ॥ १ ॥ वाहिलें देह हें देवा एकसरें । होईल तें बरें तेणें द्वारें ॥ २ ॥ होता भार त्याची निवारली खंती । येथें आतां रिती सांठवण ॥ ३ ॥ तुका म्हणे इच्छे पावविले कष्ट । म्हणऊनि नष्ट दुरावली ॥ ४ ॥ [२३८०]

देव तीर्थी येर दिसे जया ओस । तोचि तया दोष जाणतिया ॥ १ ॥ तया बरें फावे देवा चुकवितां । संचिताची सत्ता अंतराय ॥ २ ॥ शुद्धाशुद्ध ठाव पापपुण्य बीज । पाववील दुजे फळभोग ॥ ३ ॥ तुका म्हणे विश्वंभरा ऐसें वर्म । चुकलिया धर्म अवघे मिथ्या ॥ ४ ॥ [२३८१]

देहाचा विसर होऊन तुमच्या पायांचें चिंतन नेहमीं असावें. मध्यें क्षणभर देखील अंतर पडूं नये २. अशा लाभाला पात्र मी कधीं होईन व माझ्यावर देव कृपा कधीं करतील हें मला समजत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें प्राप्त झाल्यावर माझें संचित (पूर्वपुण्य) धन्य आहे असें मानीन आणि सर्वकाळ हरीच्या प्रेमसुखाचा भोग घेईन ४. [२३७७]

जाणतेपणाचा (ज्ञानाच्या अभिमानाचा) भार मस्तकीं मी मुळींच घेत नाहीं, फक्त स्वामीची सेवा करावी हाच माझा निश्चय आहे १. स्वामीची आज्ञा निर्धारानें मानावी हेंच माझ्या मनास प्रमाण आहे. ह्या योगानें सकल प्रपंचाचें ओझें खात्रीनें नाहींसें होईल २. आमचें चित्त एकविध आहे. त्या योगानें आम्ही हट्ट करणारीं बालकें आहोंत, म्हणून आमच्या हट्टासारखें मायबापांना व्हावें लागतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ही माझी सेवा अशा प्रकारची आहे, म्हणून मीं आपला भार देवावर घातला आहे ४. [२३७८]

जो देव सर्व जगामध्यें (भूतांमध्यें, प्राणिमात्रामध्यें) व्यापक आहे, त्याचें वास्तव्य माझ्या हृदयांत नाहीं काय ? १. त्याचा जसा प्रसाद होईल तसें माझें चित्त चलित (कार्यप्रवृत्त) होईल आणि तेंच वळण मनास लागेल २. माझ्या सर्व शक्ति जीवाच्या ठिकाणीं कुंठित होऊन राहिल्या, म्हणून माझें कांहीं कर्तव्य चालत नाहीं (स्वतंत्रपणें कांहीं करतों म्हटलें तरी होत नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, सूत्रधारी जो आहे, त्याचे स्वाधीन साइकड्याची दोरी असते (चौऱ्यांयशीं लक्ष बाहुल्यांची दोरी कळसूत्राचा खेळ खेळणाऱ्या ईश्वराच्या हातीं आहे) म्हणून तो जसा नाचवील तसे ते जड असतांना नाचतात ४. [२३७९]

जें देवास अर्पण केलें आहे, तो निर्माल्य कोण परत घेतो ? कारण जो अर्पण केल्याचा संकल्प केला आहे, त्यामध्यें (परत घेण्याचे) विकल्प उत्पन्न होतात १. मीं आपला देह एकदम देवास अर्पण केला आहे. आतां त्याच्याकडून ह्या देहाचें जें होईल तें बरेंच आहे २. जो देहाचा भार माझ्या शिरावर होता, तो देवास अर्पण केल्यामुळें त्याविषयींची माझी काळजी नाहींशी झाली. आतां येथें देहसंबंधीं पोकळ सांठा राहिला आहे (प्रपंचाची ठेव रिकामी झाली आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या देहाविषयींची मीं आशा धरली होती, तिनें मला फार दुःखी केलें, म्हणून त्या नष्ट आशेला मीं दूर केलें ४. [२३८०]

देवाचें सर्वव्यापकत्व माहीत असून तीर्थाच्याच ठिकाणीं तो आहे आणि बाकीच्या ठिकाणीं नाहीं, असें मानलें तर तोच त्याच्या ज्ञानांत दोष आहे १. त्याला देवास चुकविण्यास चांगली सवड मिळते, म्हणून ह्या प्रारब्धाच्या सत्तेनें देवांत अंतर पडलें २. एक चांगलें व एक वाईट असें स्थळ जर मानलें तर तेंच पापपुण्याला कारण आहे; व त्याला खरें फळ न मिळतां दुसऱ्या फळाचा भोग (मिळतो) (पुढला जन्म देतें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव सर्व विश्वाचे ठिकाणीं भरला आहे, असें हें मर्म जाणलें नाहीं तर सर्व धर्म खोटे आहेत ४. [२३८१]

काय करूं सांगतांही न कळे तें वर्म। उपस्थित भ्रम उपजवितो ॥ १ ॥ मन आधीं ज्याचें आलें होईल हाता। तयावरी सत्ता केली चाले ॥ २ ॥ अभूकेचे अंगीं चवी ना संवाद। मिथ्या ऐसा वाद दुराग्रह ॥ ३ ॥ तुका म्हणे आप राखावें आपणा। संकोचोंचि कोणा नये आतां ॥ ४ ॥ [२३८२]

अमृत आव्हेरें उचंबळे जातां। विष आर्तभूतां आवश्यक ॥ १ ॥ आदरासी मोल नये लावूं केजें। धीर शुद्धबीजें गोमटा तो ॥ २ ॥ खऱ्याचिये अंगीं आपणाचि चाली। लावणी लाविली काय लागे ॥ ३ ॥ तुका म्हणे चाडे करा वेवसाव। आम्हांसी तों वाव धीर आहे ॥ ४ ॥ [२३८३]

अनुभवाचे रस देऊं आर्तभूतां। सोडूं चोजवितां पुढें पोतीं ॥ १ ॥ देवाचा प्रसाद रत्नाच्या ओवणी। शोभतील गुणीं आपुलिया ॥ २ ॥ आधीं भाव सार शुद्ध हे भूमिका। बीज आणि पिका चिंता नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्याचें नाम गुणवंत। तें नाहीं लागत पसरावें ॥ ४ ॥ [२३८४]

काय मज एवढा भार। हे वेव्हार चालवाया ॥ १ ॥ उकल तो जाणे धणी। मज भोजनीं कारण ॥ २ ॥ चिंता ज्याची तया शिरीं। लेंकरीं तें खेळावें ॥ ३ ॥ तुका म्हणे सेवट झाला। देव या बोला भोगिता ॥ ४ ॥ [२३८५]

एकांतीं लोकांतीं करूं गदारोळ। लेश तोही मळ नाहीं येथें ॥ १ ॥ घ्यावें द्यावें आम्हीं आपुलिया सत्ता। न देखों पुसता दुजा कोणी ॥ २ ॥ भांडाराची किल्ली माझे हातीं आहे। पाहिजे तो पाहें वाण येथें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां विश्वासाच्या बळें। ठेविलें मोकळें देवें येथें ॥ ४ ॥ [२३८६]

लोकांना मार्मिक उपदेश केला असतांहि तो कळत नाहीं, आणि नाहीं तोच भ्रम उत्पन्न होतो, त्याला मी काय करूं? १. अगोदर ज्याचें मन माझ्या हातीं येईल त्याच्यावर जशी सत्ता करावी तशी चालेल २. ज्याच्या ठिकाणीं भूक नाहीं त्याच्या तोंडास चव नसते व त्याचें बोलणें यथार्थ नसतें; म्हणून त्याच्या हटवादीपणाचा वाद खोटा आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां कोणाचा संकोच धरणें उपयोगी नाहीं. आपलें आपण सांभाळावें हें बरें ४. [२३८२]

उचंबळलेल्या अमृताचा दुर्व्यसनी माणसें त्याग करितात व त्या अति गरजूंचा (व्यसनाधीन माणसांचा) विषाचे (अफूचे) टिकाणीं आदर असतो १. आदरानें दिलेला जो नारळ त्याची किंमत करूं नये. शुद्ध बीजाचे ठिकाणीं धैर्य असतें म्हणून तें चांगलें २. खरा आहे त्याची वर्तणूक साहाजिक खरी असते. खोट्यांना खऱ्या वर्तणुकीची बळानें रीत लावली असतां लागेल काय ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या इच्छेनें तुम्ही व्यवहार करा; पण आम्ही तो व्यर्थ (वाईट व निष्फळ) मानतों असें आमचें धैर्य आहे ४. [२३८३]

जे कोणी गरजू–मोक्षाची तीव्र इच्छा धरणारे–आहेत त्यांना आम्ही स्वानुभविक रस देऊं व जो शोधक आहे, त्याच्यापुढें आमचें परमार्थ मालाचें पोतें मोकळें करूं १. देवाचा प्रसाद हा एक रत्न ओंवलेली माळ आहे व ती आपल्या गुणांनीं शोभत आहे २. आधीं परमार्थामध्यें शुद्ध भावाची भूमिका (विश्वास) असणें हें सार आहे. मग तेथें परमार्थाचें बीजारोपण केलें असतां पीक घेण्याविषयीं काळजी करणें नको ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचें नाम गुणवंत आहे अथवा जी वस्तु गुणवंत आहे त्याचा पसारा करावा लागत नाहीं [तो आपोआप होतो] ४. [२३८४]

मला (प्रपंचाचा) व्यवहार चालविण्याविषयींचा एवढा बोजा कशास घ्यावयास पाहिजे? १. ह्या सर्वांचा उलगडा करण्याचें एक स्वामी जाणत आहेत. जेवणें हें माझें कर्तव्य होय २. व्यवहाराची ज्यानें मालकी घेतली असेल त्याची चिंता त्याचे मस्तकावर. आम्हां मुलांचें काम खेळणें हें होय ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व कांहीं भोगणारा देव आहे, ह्या समजुतीनें बोलण्याचा शेवट झाला आहे ४. [२३८५]

एकांतांत व लोकांतामध्यें (जनसमुदायांत) आम्ही हरीच्या नामाचा गजर करूं. ह्या संबंधानें शंकेचा किंवा लज्जेचा आमच्यामध्यें लेशमात्र मळ नाहीं १. जें कांहीं द्यावयाचें व घ्यावयाचें असेल, तें तें आम्ही आपल्या सत्तेनें देतों व घेतों; त्यासंबंधीं आम्हांला येथें दुसरा कोणी विचारणार नाहीं २. परमार्थाच्या भांडारखान्याची किल्ली माझ्या हातांत आहे. ह्या ठिकाणीं ज्याला जो माल पाहिजे तो आहे [असें समजावें] ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमची देवावर दृढ श्रद्धा असल्यामुळें देवानें आम्हांस ह्या ठिकाणीं स्वतंत्र ठेविलें आहे ४. [२३८६]

स्मरणाचे वेळे। व्हावें सावध न कळे ॥ १ ॥ पडिलों विषयांचे ओढी। कोणी न दिसेसें काढी ॥ २ ॥ भांडवल माझें। वेंच झालें भूमी ओझें ॥ ३ ॥ तुका म्हणे कळे। तूंचि धांवें ऐसे वेळे ॥ ४ ॥ [२३८७]

पहा हो देवा कैसें जन। भिन्न भिन्न संचितें ॥ १ ॥ एक नाहीं एका ऐसे। दावी कैसे शुद्ध हीन ॥ २ ॥ पंचभूतें एकी रासीं। सूत्रें कैशीं ओळखावीं ॥ ३ ॥ तुका म्हणे जो जे जाती। त्याची स्थिति तैशी ते ॥ ४ ॥ [२३८८]

कोणाचिया न पडों छंदा। गोविंदासी आळवूं ॥ १ ॥ बहुतांचीं बहुत मतें। अवघें रितें पोकळ ॥ २ ॥ घटापटा ढवळी (डहुळी) मन। होय सीण न करूं तें ॥ ३ ॥ तुका म्हणे पांडुरंग। भरूं भाग आला तो ॥ ४ ॥ [२३८९]

एकवेळ करीं या दुःखावेगळें। दुरिताचें जाळें उगवूनि ॥ १ ॥ आठवीन पाय हा माझा नवस। रात्रीही दिवस पांडुरंगा ॥ २ ॥ बहु दूरवरी भोगविलें भोगा। आतां पांडुरंगा सोडवावें ॥ ३ ॥ तुका म्हणे काया करीन कुरवंडी। ओवाळूनि सांडीं मस्तक हें ॥ ४ ॥ [२३९०]

आणीक म्यां कोणा यावें काकुलती। कोण कामा येती अंतकाळीं ॥ १ ॥ तूं वो माझी सखी होसी पांडुरंगे। लवकरी ये गे वाट पाहें ॥ २ ॥ काया वाचा मनें हेचि आस करीं। पाउलें गोजिरीं चिंतीतसें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी पुरवीं हे आस। घालीं ब्रह्मरस भोजन हें ॥ ४ ॥ [२३९१]

आम्हांसीं सकळ। तुझ्या नामाचेंचि बळ ॥ १ ॥ करूं अमृताचें पान। दुजें नेणों

हरिस्मरणकाळीं वृत्ति सावध ठेवण्याचें मला कळत नाहीं १. मी विषयांच्या तावडींत सांपडलों आहें, ह्यांतून मला काढील असें कोणी दिसत नाहीं २. माझें जें भांडवल होतें, त्याचा सर्व व्यय झाला व ह्या पार्थिव देहास ओझें झालें आहे, अथवा देहाचें पृथ्वीस ओझें झालें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तूंच ह्या वेळेला धांवत यावेंस असें मला वाटतें ४. [२३८७]

अहो देवा, हे जन कसे निरनिराळ्या प्रारब्धाचे आहेत १. एकाप्रमाणें एक नाहीं. कांहीं चांगले व कांहीं वाईट असा भिन्न प्रकार प्रारब्धाच्या योगानें आहे २. सर्व भौतिक सृष्टि ही सर्व पंचमहाभूतांच्या एका मसाल्यानें बनली आहे. ह्या ठिकाणीं प्रारब्धरूपी भिन्न भिन्न सूत्रें कशीं ओळखावीं ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो जन्म-कर्मानुसार ज्या जातीचा असेल त्याची स्थितिहि तशीच असते ४. [२३८८]

आम्ही कोणाचेहि नादास लागणार नाहीं. एक गोविंदाचेंच चिंतन करूं १. कारण अनेकांचीं मतेंहि अनेक असून तीं सर्व निरर्थक अशीं पोकळ आहेत २. घटपटाच्या (तर्कशास्त्राच्या) विचारानें मनाची स्थिरता बिघडते व त्यायोगानें ताप होतो, म्हणून त्या भानगडींत आम्ही पडणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, पांडुरंगाचें चिंतन करणें हाच वर्णाश्रमानुसार जो धर्माचा-कर्तव्याचा भाग आमच्या वांट्याला आला आहे, तो आम्ही आचरूं व हृदयांत पांडुरंगाला भरून ठेवूं ४. [२३८९]

पातकाच्या जाळ्यांत सांपडून मी जो दुःखी झालों आहें, त्यापासून एक वेळ मला मुक्त करा १. हे पांडुरंगा, मग मी तुमच्या पायांचें चिंतन रात्रंदिवस करीन; अशा प्रकारचा मीं नवस केला आहे २. हे पांडुरंगा, अनादि कालापासून ह्या प्रारब्धानें दुःख भोगावयास लाविलें, आतां त्यापासून माझी सुटका करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, धडासहवर्तमान हें मस्तक तुमचेवरून मी ओंवाळून टाकीन ४. [२३९०]

देवा, तुमच्यावांचून दुसरे कोणाला मीं काकुळतीला यावें ? अंतकाळीं माझ्या कोण उपयोगीं पडणार आहे ? १. हे पांडुरंगे, तूं माझी मैत्रीण आहेस. अगे, तूं माझ्याकडे त्वरेनें ये. मी तुझी वाट पाहात आहें २. काया-वाचा-मनानें तुझ्या गोजिरवाण्या चरणांची मला इच्छा आहे, म्हणून त्यांचेंच मी चिंतन करीत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला (माझी एवढी इच्छा) ब्रह्मरसाचें भोजन देऊन पूर्ण करा ४. [२३९१]

हे देवा, आमच्या अंगामध्यें जें बळ आहे, तें सर्व तुझ्या नामचिंतनाचें आहे १. त्या नामामृताचें मी सेवन करीन,

कांहीं आन ॥ २ ॥ जयाचा जो भोग। सुख दुःख पीडा रोग ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा। तुझे पायीं माझा हेवा ॥ ४ ॥ [२३९२]

आर्त माझ्या बहु पोटीं। व्हावी भेटी पायांशीं (पायांची) ॥ १ ॥ यासी तृप्ती कृपावंता। माझी चिंता असों द्या ॥ २ ॥ तळमळ करी चित्त। अखंडित वियोगें ॥ ३ ॥ तुका म्हणे पंढरीनाथा। जाणें व्यथा अंतरींची ॥ ४ ॥ [२३९३]

बहु जन्मांतरें (रीं) फेरे। केले ये रे सोडवीं ॥ १ ॥ आळवितों करुणाकरे। विश्वंभरे दयाळे ॥ २ ॥ वहावतों मायापुरीं। येथें करीं कुडावा ॥ ३ ॥ तुका म्हणे दुजा कोण। ऐसा सीण निवारी ॥ ४ ॥ [२३९४]

कराल तें काय नव्हे जी विठ्ठला। चित्त द्यावें बोला बोबडिया ॥ १ ॥ सोडवुनि घ्यावें (न्यावें) काळचक्रा हातीं। बहुत विपत्ति भोगविल्या ॥ २ ॥ जियालें (ज्यालें) जीवों नेदी मारिलेंचि मरे। प्रारब्ध तें उरे मागुतालें ॥ ३ ॥ तुका म्हणे दुजा खुंटला उपाय। म्हणउनि पाय आटविले ॥ ४ ॥ [२३९५]

डौरलों भक्तिसुखें। सेवूं अमृत हें मुखें ॥ १ ॥ संतसंगें सारूं काळ। प्रेमसुखाचा कल्लोळ ॥ २ ॥ ब्रह्मादिकांसी शिराणी। तो हा आनंद मेदिनीं ॥ ३ ॥ नाहीं वैकुंठींचा पांग। धांवे कथे पांडुरंग ॥ ४ ॥ मुक्त व्हावें कशासाठीं। कैंची येणें रसें तुटी ॥ ५ ॥ तुका म्हणे गोड। हेंचि पुरे माझें कोड ॥ ६ ॥ [२३९६]

फोडिलें (लीं) भांडारें। माप घेऊनियां खरें ॥ १ ॥ केली हरिनामाची वरो। मागिल तें आतां सरो ॥ २ ॥ देशांत सुकाळ। झाला हरपला काळ ॥ ३ ॥ घ्यावें धणीवरी। तुका म्हणे लहानथोरीं ॥ ४ ॥ [२३९७]

त्यावांचून दुसरें कांहीं जाणत नाहीं २. सुखदुःखादि पीडांचे रोग हे ज्याचे भोग आहेत, तो (तें शरीर) ते भोगील ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मजमध्यें तुझ्या पायांविषयींची हांव (इच्छा) आहे ४. [२३९२]

पांडुरंगा, तुझ्या पायांची भेट व्हावी हीच फार इच्छा माझे हृदयांत आहे १. हे कृपावंता, ह्या विषयींची माझी काळजी तुम्हांला असूं द्या २. तुमचा वियोग झाला आहे, म्हणून माझें चित्त सर्व काळ तळमळ करितें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा, माझ्या अंतःकरणांतील हें दुःख तुम्ही जाणा ४. [२३९३]

पूर्वी अनेक जन्मांतून मी फिरत आलों आहें, म्हणून तूं ये व त्यांतून मला सोडीव १. हे करुणाकरे विश्वंभरे दयाळे, मला सोडविण्याविषयीं मी तुझी करुणा भाकीत आहें २. ह्या मायामय पुरामध्यें मी वाहून जात आहें. त्या ठिकाणीं माझें तूं रक्षण कर ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझें दुःख निवारण करणारा तुझ्यावांचून दुसरा कोण आहे ? ४. [२३९४]

अहो विठ्ठला, तुम्ही कराल तर काय एक होणार नाहीं ? म्हणून माझ्या बोबड्या शब्दांकडे लक्ष द्यावें १. ह्या कालचक्राच्या फेऱ्यामध्यें मी फार फजिती सोसली, म्हणून त्यांतून मला सोडवून तुम्ही घ्यावें २. माझें प्रारब्धकर्म मला जगूं देत नाहीं, व मेल्यानें मरूं देत नाहीं (पुन्हां जन्माला घालतें), असें तें माझा सूड घेण्याकरितां उत्तरोत्तर शिल्लक राहातें ३. तुकाराम महाराज म्हणतात, दुसरा उपाय करणें माझ्या हातून कांहीं होत नाहीं, म्हणून मीं तुझ्या पायांचा आठव केला आहे ४. [२३९५]

भक्तीच्या सुखानें मी शृंगारलों आहें, आणि नामामृताचें मुखानें सेवन करीत आहें १. त्याच प्रेमसुखाचा पूर संतसंगतींत आहे, म्हणून त्यांच्या सहवासांत आम्ही काळक्रमण करूं २. ज्याची ब्रह्मादिक देवांनाहि महर्गता आहे, तो आनंद आम्हांला पृथ्वीवर आहे ३. पांडुरंगाला वैकुंठाची गरज नाहीं; पण ज्या ठिकाणीं हरिकथा चालली आहे तेथें तो धांवत येतो ४. ह्या भक्तिरसाची तूट कधीं पडत नाहीं, म्हणून आम्हांला मुक्त होण्याचें काय कारण आहे ? ५. तुकाराम महाराज म्हणतात, संतसंगतीचें सुखच मला गोड आहे, म्हणून त्याच ठिकाणीं माझी इच्छा पूर्ण होते ६. [२३९६]

मीं देवाचे जामदारखाने फोडले व ते मोजण्याकरितां जिव्हारूपी (किंवा, भक्तीचें) खरें माप घेतलें आहे १. हरिनामाची रेलचेल केली आहे. त्याविषयींचा पूर्वी असणारा तोटा आतां संपला २. सर्व देशामध्यें (जिकडे तिकडे, सर्वत्र) हरिनामाचा सुकाळ झाल्यामुळें मागील दुष्काळ नाहींसा झाला ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां लहानथोरांनीं इच्छा पूर्ण होईपर्यंत हेंच सेवन करावें ४. [२३९७]

आनंदाचे डोहीं आनंद तरंग । आनंदचि अंग आनंदाचें ॥ १ ॥ काय सांगों झालें कांहींचियाबाहीं । पुढें चाली नाहीं आवडीनें ॥ २ ॥ गर्भाचे आवडी मातेचा डोहाळा । तेथींचा जिव्हाळा तेथें बिंबे ॥ ३ ॥ तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा । अनुभव सरिसा मुखा आला ॥ ४ ॥ [२३९८]

म्हणऊनि धरिले पाय । अवो माये विठ्ठले ॥ १ ॥ आपुलेंचि करूनि घ्यावें । आश्वासावें ना भीसें ॥ २ ॥ वाढली ते तळमळ चित्ता । शम आतां करावी ॥ ३ ॥ तुका म्हणे जीवीं वसे । मज नसे वेगळा ॥ ४ ॥ [२३९९]

कल्याण या आशीर्वादें । जाती द्वंद्वें नासोनि ॥ १ ॥ आश्वासिलें नारायणें । प्रेमदानें अंतरींच्या ॥ २ ॥ गेली निवारोनि आतां । सकळ चिंता यावरी ॥ ३ ॥ तुका म्हणे गातां गीत । आलें हित सामोरें ॥ ४ ॥ [२४००]

हरिनामवेली पावली विस्तार । फळीं पुष्पीं भार वोल्हावली ॥ १ ॥ तेथें माझ्या मना होईं पक्षिराज । साधावया काज तृप्तीचें या ॥ २ ॥ मुळींचिया बीजें दाखविली गोडी । लवकरचि जोडी जालियाची ॥ ३ ॥ तुका म्हणे क्षणक्षणां जातो काळ । गोडी ते रसाळ अंतरेल ॥ ४ ॥ [२४०१]

बरवें ऐसें आलें मना । नारायणा या काळें ॥ १ ॥ देव आम्हां प्राणसखा । झालें दुःखा खंडण ॥ २ ॥ जन्मांतरींच्या पुण्यरासी । होत्या त्यांसी फळ आलें ॥ ३ ॥ तुका म्हणे निज ठेवा । होईल देवा लाधलों ॥ ४ ॥ [२४०२]

जरि हे आड येती लाज । कैसें काज साधतें ॥ १ ॥ करणें केलें उठा उठी । पायीं मिठी घातली ॥ २ ॥ समर्पिला जीवभाव । धरिला भाव अखंड ॥ ३ ॥ तुका म्हणे आड कांहीं । काळ नाहीं घातला ॥ ४ ॥ [२४०३]

मी आनंदाचा (ब्रह्मानंदाचा) डोह झालों आहें, म्हणून त्याच्यामध्यें आनंदाच्याच लाटा येतात, कारण आनंदाचें अंग आनंदच असतें १. मला जें कांहीं सुख झालें तें कांहींच्या बाहींच आहे; त्याचें मी काय वर्णन करूं? कारण त्याच्या प्रीतीनें (प्रपंचाची) पुढील हांव संपली २. पोटांतील गर्भाची जशी आवड असते तेच डोहाळे आईला होतात, कारण त्या ठिकाणचा [गर्भाचा] स्वभाव तेथेंच (आईमध्यें) प्रगट होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याचप्रमाणें जो अनुभवाचा ठसा माझ्या अंतःकरणांत उमटला आहे, तोच माझ्या वाणीवाटें प्रगट झाला ४. [२३९८]

हे विठाबाई आई, [ध्रुवपदांत दर्शविलेल्या विषयींची मला इच्छा आहे] संसाराची भीति वाटली म्हणून मीं तुझे पाय धरले आहेत १. मला तूं आपलेंसें करून घे आणि 'भिऊं नको,' असें आश्वासन दे. माझ्या चित्तांत जी तळमळ वाढली आहे, ती आतां तूं शांत कर ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या जीवाच्या ठिकाणीं वास्तव्य करून तूं माझ्या वेगळा होऊं नकोस ४. [२३९९]

देवांनीं 'तुझें कल्याण होवो' असा आशीर्वाद दिला, तर सुखदुःखादि सर्व द्वंद्वें नाहींशीं होतात १. आणि मला तर नारायणांनीं अंतःकरणांतील प्रेमदान देऊन भरंवसा दिला २. ह्याउपर आतां माझी सर्व काळजी निवारण झाली ३. तुकाराम महाराज म्हणतात, मीं त्या देवाला सुस्वरानें गाइलें म्हणून माझें हित पुढें आलें ४. [२४००]

हरिनामरूपी वेलाचा विस्तार होऊन पुष्पफळांच्या संभारानें तो प्रसन्न झाला १. हे माझ्या मना, तृप्ति होण्याकरितां त्यांचा भोग घेणारा तूं पक्षी हो २. मूळच्या बीजानें फळाची गोडी दाखविली आणि त्या फळाची प्राप्ति लवकर करून घे ३. तुकाराम महाराज म्हणतात, क्षणक्षणानें काळ हा व्यर्थ जात आहे, त्या योगानें हरिनामाच्या रसभरित गोडीमध्यें अंतर पडेल [म्हणून तूं लवकर सेवन कर.] ४. [२४०१]

हे नारायणा, ह्या समयाला तुझ्या मनाला (माझें हित करण्याचें) आलें आहे हें बरें आहे १. देवा, तूं आमचा प्राणसखा आहेस, त्या योगानें दुःखाचा नाश झाला २. अनेक जन्मजन्मांतरीं केलेल्या ज्या पुण्याईच्या राशी होत्या त्यांना हें फळ प्राप्त झालें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, निजस्वरूपस्थितीस मी प्राप्त झालों ४. [२४०२]

जर ही लज्जा परमार्थाचे आड येईल, तर कार्य कसें साध्य होईल? म्हणून जें कांहीं करावयाचें आहे, तें करण्याची त्वरा करून श्रीहरीचे पायीं मिठी घातली २. मी आपला जीवभाव श्रीहरीला समर्पण करून निरंतर स्वरूपभावानें राहिलों ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें करणें मी कालावधीवर घातलें नाहीं (तांतडीनें परमार्थ केला हें बरें झालें) ४. [२४०३]

पात्र शुद्ध चित्त ग्वाही । न लगे कांहीं सांगणें ॥ १ ॥ शूर तरी सत्य व्हावें । साटी जीवें करूनि ॥ २ ॥ अमुपचि सुखमान । स्वामी जन मानवे ॥ ३ ॥ तुका म्हणे जैसी वाणी । तैसा मनीं परिपाक ॥ ४ ॥ [२४०४]

प्रगटलें ज्ञान । नारायण भूतीं तें ॥ १ ॥ अनुभवचि घेऊं हावा । विनंति देवा करूनियां ॥ २ ॥ देखोवेखीं वदे वाणी । पाडिलिया कानीं प्रमाणें ॥ ३ ॥ तुका म्हणे योगक्षेम । घडे तें वर्म साधावें ॥ ४ ॥ [२४०५]

मुख्य आधीं विषयत्याग । विधिभाग पाळणें ॥ १ ॥ मन पावे समाधान । हेंचि दान देवाचें ॥ २ ॥ उदासीन वृत्ति देहीं । चाड नाहीं पाळणें ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं भय । सम सोय विषमाची ॥ ४ ॥ [२४०६]

आतां हेंचि सार हेंचि सार । मूळबीज रे आइका ॥ १ ॥ आवडीनें आवडी उरे । ज ज्या झुरे त त्यासी ॥ २ ॥ प्रेमाचिया सूत्रदोरी । नाहीं उरी उरवी ॥ ३ ॥ तुका म्हणे चिंतन बरें । आहे खरें खऱ्यापें ॥ ४ ॥ [२४०७]

केला तैसा अंगीकार । माझा भार चालवीं ॥ १ ॥ होऊं अंतराय बुद्धी । कृपानिधी नेदावी ॥ २ ॥ आम्ही तरी जडजीव । कैंचा भाव पुरता ॥ ३ ॥ अनन्यभावें घ्यावी सेवा । आम्हां देवा घडेसी ॥ ४ ॥ तुझीं आम्ही शरणांगतें । कृपावंतें रक्षीजे ॥ ५ ॥ तुका म्हणे भाकूं कींव । असों जीव जड आम्ही ॥ ६ ॥ [२४०८]

सोसें बहु गर्भवासीं । मेलों असों उपवाशीं । नाहीं सखी ऐसी । तेथें कोणी भेटली ॥ १ ॥ करीं करीं रे स्वहित । देह तंव हें अनित्य । नाहीं दिलें चित्त । सोडवूं मोहापासूनि ॥ २ ॥

शुद्ध पात्राविषयीं चित्त हें साक्षी असतें; त्याविषयीं दुसऱ्यानें कांहीं सांगावयास नको १. शूर व्हावयाचें असेल, तर जिवावर उदार होऊन खरें खरें शूर व्हावें २. त्यापासून अमुप सुखाचा मान मिळतो व ते शूर जन स्वामीला मान्य होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें आपलें बोलणें असतें, तशी परिस्थिति मनाची आहे ४. [२४०४]

सर्व भूतांचे ठिकाणीं एक नारायण आहे, हें ज्ञान प्रगट झालें १. देवाला विनंति करून त्याचा (शब्दज्ञानापेक्षां प्रत्यक्ष) अनुभवच घ्यावासा वाटतो २. एकमेकांचें ऐकून व पाहून तसा अनुभव नसतांहि वाचा बोलते ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या मार्गानें हरीचा योगक्षेम (लाभ) होतो, तो मार्ग साध्य करून घ्यावा ४. [२४०५]

परमार्थामध्यें मुख्यत्वेंकरून आरंभीं अहंकारासह विषयत्याग करणें, ह्याच विधीचें (वर्णाश्रमानुसार आपल्या वांट्याला आलेल्या धर्माचें) पालन करावें १. मनानें सर्व वासना टाकून समाधानस्थितीनें असणें, हेंच देवाचें दान होय २. देहाविषयीं उदासवृत्ति असावी, त्याचें रक्षण करण्याची गरज ठेवूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, समविषम भावाचा (भेदाभेदमूलक अज्ञानाचा) परित्याग होऊन हृदय निर्भय झालें आहे (ध्रुवपद वाचावें) ४. [२४०६]

अरे, आतां हेंच सारभूत मूळबीज आहे तें ऐका (असें द्विवार सांगतात) १. प्रेमानें प्रेमच उरतें व तें ज्या विषयींचें असतें, त्याकरितां जीव झुरत असतो २. ज्याविषयींचें प्रेम आहे तें प्रेमसूत्र कांहीं शिल्लक ठेवीत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरीचें उत्तम चिंतन हें जे कोणी खऱ्या वर्तनाचे आहेत त्यांच्या ठिकाणीं असतें ४. [२४०७]

हे देवा, जसा तुम्हीं माझा अंगीकार केला, त्याप्रमाणें माझ्या योगक्षेमाचें ओझें तुम्हींच वागविलें पाहिजे १. हे कृपानिधि देवा, माझ्या परमार्थी बुद्धीमध्यें अंतर होऊं देऊं नका २. हे देवा, आम्ही विवेकशून्य असे जडजीव आहोंत, तुमच्याविषयींचा पूर्ण भाव आमच्यामध्यें कसला आहे ? ३. हे देवा, अनन्यभावानें आमच्याकडून जशी सेवा होईल तिचें तुम्ही ग्रहण करा ४. हे कृपावंता देवा, तुला आम्ही शरण आलों आहोंत, ह्याकरितां तूं आमचें रक्षण करावेंस ५. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही जडजीव आहोंत, म्हणून तुम्हांस काकुळती येत आहोंत ६. [२४०८]

प्रपंचसोसानें अनेक गर्भवासांमध्यें राहून मी मेलों आहें किंवा उपाशीं आहें ह्याचा पूसतपास करणारी मैत्रीण (माय-बहीण) तेथें कोणी मला भेटली नाहीं १. अरे (मना), ह्याकरितां तूं आपलें स्वहित कर (असें द्विवार सांगतों), कारण देह हा अनित्य असून त्याच्या मोहापासून (आप्तेष्ट लोकांनीं) चित्ताची सुटका करूं दिली नाहीं २.

पाळी तोंडींचिया घांसें। तेचि होय अनारिसे। ज्या नव्हे ऐसें। खेदी परि सोडवीना ॥ ३ ॥ तुका म्हणे धनमानें। माझ्या बाटलों मीपणें। नाहीं दिला मनें। देखों लाभ अलाभ (लाभें हा लाभ) ॥ ४ ॥ [२४०९]

इच्छिती तयांसी व्हावें जी अरूप। आम्हांसी स्वरूपस्थिति चाड ॥ १ ॥ आतां नव्हे माझा भाव अनारिसा। पाउलांनीं इच्छा गौवियेली ॥ २ ॥ लेंकरासी कोठें जाणत्याची परी। करूं येते दुरी धरावया ॥ ३ ॥ लागली न सुटे नामाची आवडी। माझी भावजोडी भंगूं नका ॥ ४ ॥ घेसील आढेवेढे मुक्तीच्या अभिलासें। चाळवीं जा पिसे ब्रह्मज्ञानी ॥ ५ ॥ तुका म्हणे माझा कोठें भक्तिरस। पाडावया ओस चाळविसी ॥ ६ ॥ [२४१०]

आम्हां भाविकांची जाती। एकविध जी श्रीपती। अळंकार युक्ति। सरों तेथें शकेचिना ॥ १ ॥ जाणे माउली त्या खुणा। क्षोभ उपजों नेदी मना। शांतवुनि स्तना। लावीं अहो कृपाळे ॥ २ ॥ तुज अवघें होऊं येतें। परि मज वाटों नये चित्तें। उपासने परतें। नये कांहीं आवडों ॥ ३ ॥ करूं रूपाची कल्पना। मुखीं नाम नारायणा। तुका म्हणे जना। जल स्थल (जळ स्थळ) देखतां ॥ ४ ॥ [२४११]

ज्यावें हीनपणें। कासयाच्या प्रयोजनें ॥ १ ॥ प्रारब्धीं संसार। बरी हिमातीची थार ॥ २ ॥ होणार तें कांहीं। येथें अवकळा नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे देवें। कृपा केलिया बरवें ॥ ४ ॥ [२४१२]

किती रांडवडे। घालूनि व्हाल रे बापुडे। संसाराचे भिडे। कासावीस झालेती ॥ १ ॥ माझ्या स्वामी शरण रिघा। कृपाळुवा पांडुरंगा। ठेवी अंगसंगा। विश्वासियां जवळी ॥ २ ॥

तोंडच्या घासांनीं पाळणारी जी माता तीहि अखेरीस (मरणकाळीं) वेगळी होते. ह्यासंबंधाचा तिला खेद होत नाहीं काय? पण ती सुटका करीत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देहाचे ठिकाणीं मी व देहासंबंधीं धनमानादि माझें अशा भावनेनें बाटलों. माझ्या मनानें ह्या परमार्थाचें लाभ किंवा नुकसान पाहूं दिलें नाहीं ४. [२४०९]

हे देवा, जे कोणी तुमच्या निराकार स्वरूपाच्या सर्व ठिकाणीं इच्छा करतील त्यांच्याकरितां तुम्हीं तसें व्हावें. आम्हांला सगुण साकार स्वरूपाची इच्छा आहे १. हे देवा, अशा प्रकारचा जो माझा भाव आहे तो कधींहि बदलणार नाहीं, कारण तुझ्या चरणारविंदानें माझ्या इच्छावृत्तीला आपल्या ठिकाणीं गुंतवून टाकलें आहे २. लहान मुलास जाणत्या मुलाप्रमाणें दूर करतां येतें काय? ३. तुमच्या नामाविषयीं मला जी प्रीति लागली आहे ती जात नाहीं, ह्याकरितां माझ्या प्रेमभावाचा भंग करूं नका ४. मोक्षाविषयींच्या लोभानें तुम्ही आढेवेढे घेत आहांत तर तो आम्हांला नको. जे कोणी ब्रह्मज्ञानानें वेडे झाले असतील त्यांना तूं तो देऊन फशीव जा ५. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या भक्तिरसाची योग्यता कोणीकडे! तो तूं नाहींसा करण्याकरितां चाळवीत आहेस (फसवीत आहेस) ६. [२४१०]

अहो जी श्रीपति, एकनिष्ठबुद्धीनें तुमची सेवा करणें हीच आम्हां भाविक जनांची ज़ात आहे. अलंकार व युक्ति ह्या ठिकाणीं खपत नाहींत १. अहो कृपाळु देवा, बालकाच्या सर्व खुणा आई जाणते. ती त्याचें मन कधींहि क्षोभित (दुःखित) होऊं देत नाहीं. तें जर किंचित् रडूं लागलें तर त्याला स्तनपान देऊन शांत करते २. हे देवा, तुला सर्व कांहीं रूपें घेतां येतात, परंतु तितक्या रूपांनीं तुम्ही मला विभागूं नका. तुमचें जें स्वरूप आहे तेंच माझें उपास्य आहे; त्याच्या उपासनेपुढें आम्हांला दुसरें कांहीं प्रिय नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, तुम्ही जरी निरनिराळीं रूपें घेतलीं, तरी त्या ठिकाणीं आम्ही आपल्या उपास्य स्वरूपाची कल्पना करून त्याचेंच नाम मुखानें गाऊं. हा सर्व व्यवहार पाणी, जमीन आणि लोक ह्यांच्या दर्शनामध्यें करूं. (जळीं स्थळीं तुझेंच रूप पाहूं व तुझेंच नामसंकीर्तन करूं) ४. [२४११]

कोणत्या कार्याकरितां हीन स्थितीनें जगावें? १. प्रारब्धामध्यें संसार आहे मग आपण चांगल्या हिंमतीस आश्रय द्यावा २. परमार्थाचे ठिकाणीं काय परिणाम होणार आहे? कारण ह्या ठिकाणीं कोणत्याहि प्रकारची विटंबना नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवानें कृपा केली असतां चांगलें आहे ४. [२४१२]

अरे, एकमेकांना घालूनपाडून बोलून व शिव्या देऊन तुम्ही किती दीन व्हाल? तुम्हांला संसाराची मोठी भीड पडल्यानें तुम्ही कासावीस झालां १. माझा स्वामी कृपाळु जो पांडुरंग त्याला तुम्ही शरण जा, म्हणजे जे कोणी विश्वासू

कांहीं न मागतां भलें । होईल तेंचि काम केलें । नसावें आथिलें । कांहीं एका संकल्पें ॥ ३ ॥ तुका म्हणे भाव । पाववील ठायाठाव । एकविध जीव । ठेविलिया सेवेसीं ॥ ४ ॥ [२४१३]

बाप करी जोडी लेंकराचे ओढी । आपुली करवंडी वाळवूनी ॥ १ ॥ एकाएकीं केला मिरासीचा धनी । कडिये वागवूनि भार खांदीं ॥ २ ॥ लेवऊनि (घालूनियां) पाहे डोळां अळंकार । ठेवा दावी थोर करूनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे नेदी गांजूं आणिकांसी । उदार जीवासी आपुलिया ॥ ४ ॥ [२४१४]

या रे हरिदासांनो जिंकों कळिकाळा । आमुचिया बळा पुढें किती बापुडें ॥ १ ॥ रंग सुरंग घमंडी नाना छंदें । हास्यविनोदें नामाची आवडी ॥ २ ॥ येणें तेणें प्रकारें बहुतां सुख जोडे । पूजन तें घडे नारायणा अंतरीं ॥ ३ ॥ वांकुडिया माना बोलावे आर्ष । येईल तो त्यास छंद पढियें गोविंदा ॥ ४ ॥ आपुलाले आनंदें एकापुढें एक नटा । नाहीं थोर मोठा लहान या प्रसंगीं ॥ ५ ॥ तुका म्हणे येथें प्रेम भंगूं नये कोणीं । देव भक्त दोन्ही निवडितां पातक ॥ ६ ॥ [२४१५]

काय वृंदावन माखियेलें गुळें । काय जिरें काळें उपचारिलें ॥ १ ॥ तैसी अधमाची जातीच अधम । उपदेश श्रम करावा तो ॥ २ ॥ न कळे विंचासी (विंचवासी) कुरवाळिलें अंग । आपले ते रंग दावीतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे न ये पाकासी दगड । शूकरासी गोड जैसी विष्ठा ॥ ४ ॥ [२४१६]

स्तवूनियां नरा । केला आयुष्याचा मातेरा ॥ १ ॥ नारायणाचिया लोपें । घडलीं अवघींचि पापें ॥ २ ॥ जीव ज्याचें दान । त्याचा खंडूनिया मान ॥ ३ ॥ तुका म्हणे वाणी । आइके त्या दोष कानीं ॥ ४ ॥ [२४१७]

आहेत त्यांना तो आपलें स्वरूपसान्निध्य देतो (आपल्याजवळ ठेवतो) २. कांहीं न मागणें हें चांगलें. त्याची कामगिरी देवाकडून केली जाते. आपण कोणत्याहि एका संकल्पानें संपन्न नसावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरीच्या सेवेविषयीं जीवानें एकनिष्ठभावानें राहिल्यानें तो स्वस्वरूपाच्या ठिकाणीं (परमपदीं, वैकुंठीं) पोहोंचवील ४. [२४१३]

मुलाच्या लोभानें आपलीं हाडें वाळवून बाप त्याला पुष्कळ कमाई करून ठेवितो १. कडेवर खांद्यावर वागवून एकदम त्यास आपल्या कमाईचा मालक करितो २. त्या बालकाला अनेक प्रकारचे अलंकार घालून आपल्या डोळ्यांनीं तो पाहातो व आपलें ऐश्वर्य मोठें आहे असें दाखवितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या बालकास पिता हा कोणाकडूनहि दुःख होऊं देत नाहीं. तो बालकाच्या रक्षणाविषयीं जिवावर उदार असतो ४. [२४१४]

अहो हरिदासांनो, तुम्ही या म्हणजे आपण कळिकाळाला जिंकूं. आपल्या बळापुढें त्या दीनाचें बळ किती ? १. चांगल्या परमार्थरंगानें व नाना प्रकारच्या पारमार्थिक छंदांच्या घमेंडीनें व हास्यविनोदादिकांच्या योगें हरिनामावर प्रीति ठेवा २. अशा ह्या प्रकारें बहुतांना सुख होऊन अंतःकरणांत नारायणाचें पूजन घडेल ३. माना वांकड्या करून पारमार्थिक बोल हर्षानें बोलावे. ज्याला जो छंद अवगत असेल तो गोविंदाला प्रिय आहे ४. आपल्या आवडीप्रमाणें एकापुढें एक सुशोभित व्हा. ह्या परमार्थाचे ठिकाणीं लहान व मोठा हा भेद नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं देवभक्तांमधील प्रेमाचा भंग कधीं करूं नये, कारण देव व भक्त ह्या दोहोंमध्यें निवड करणें हें पातक होय ४. [२४१५]

कडु वृंदावन फळ कितीहि गुळानें माखलें तरी तें कडू तें कडूच ! काळ्या जिऱ्यास पुष्कळ चांगले उपचार केले तरी तें कडु तें कडुच (त्याचा कडुपणा जाईल काय ?) १. त्याप्रमाणें नीचाची जात ही नीचच आहे, त्यांना उपदेश करणें हा श्रम होय २. मोठ्या प्रीतीनें विंचवाचें अंग कुरवाळिलें तरी तें त्याला न समजून तो फटकन् नांगी मारण्याचा स्वभाव व्यक्त करील ३. तुकाराम महाराज म्हणतात, दगड हा किती शिजविला तरी पक्व होत नाहीं. डुकराला विष्ठाच जशी गोड आहे (तशी अधमाची जात आहे, नीचाला नीचपणाच प्रिय आहे) ४. [२४१६]

लोकांच्या आयुष्याचें स्तवन (मनुष्यानें मनुष्याची स्तुति) करून ज्यानें आपल्या आयुष्याची खराबी केली आहे १. ज्या करण्यांत नारायणाच्या ठिकाणीं विन्मुखता होते, त्यापासून सर्व पापच होतें २. ज्यानें आपल्याला जीव दिला आहे, त्या देवाची मानखंडना करितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या देवाच्या स्तुतीवांचून इतर शब्द ऐकणें हा दोष आहे ४. [२४१७]

संतां नाहीं मान । देव मानी मुसलमान ॥ १ ॥ ऐसे पोटाचे मारिले । देवा आशा विटंबिले ॥ २ ॥ घाली लोटांगण । वंदी नीचाचे चरण ॥ ३ ॥ तुका म्हणे धर्म । न कळे माजल्याचा भ्रम ॥ ४ ॥ [२४१८]

अहो कृपावंता । होईं बुद्धिचा ये दाता ॥ १ ॥ जेणें पाविजे उद्धार । होय तुझे पायीं थार ॥ २ ॥ वदवी हे वाचा । भाव पांडुरंगीं साचा ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । माझें अंतर वसवा ॥ ४ ॥ [२४१९]

नाहीं म्या वंचिला मंत्र कोणापाशीं । राहिलों जीवेंसी धरूनि तो ॥ १ ॥ विटेवरी भावें ठेवियेलें मन । पाउलें समान चिंतीतसें ॥ २ ॥ पावविलों पार धरिला विश्वास । घालूनियां कास बळकट ॥ ३ ॥ तुका म्हणे मागें पावले उद्धार । तींहीं हा आधार ठेविलासे ॥ ४ ॥ [२४२०]

चंचळीं चंचळ निश्चळीं निश्चळ । वाजवी खळाळ उदकासी ॥ १ ॥ सोपें वर्म परि मन नाहीं हातीं । हा हा भूताचित्तीं भ्रम गाढा ॥ २ ॥ रविबिंब नाहीं तुटत उदका । छायेची ते नका सरी धरूं ॥ ३ ॥ तुका म्हणे भय धरलें (धरी) रज्जूसाटीं । नाहीं साच पोटीं कळलें तों ॥ ४ ॥ [२४२१]

आवडी येते गुणें । कळों चिन्हें उमटती ॥ १ ॥ पोटींचें ओठीं उभें राहे । चित्त साहे मनासी ॥ २ ॥ डोहोळियाची भूक गर्भा । तार्टी प्रभा प्रतिबिंबे ॥ ३ ॥ तुका म्हणे मागोन घ्यावें । मना खावें वाटे तें ॥ ४ ॥ [२४२२]

कां हो ऐसी (काय ऐसी) वेळ । वोडवली (वोढवली) अमंगळ ॥ १ ॥ आजि दुखवलें मन । कथाकाळीं झाला सीण ॥ २ ॥ पापाचिया गुणें । त्यांचिया वेळे दर्शनें ॥ ३ ॥ तुका म्हणे कानीं । घालूं आले दुष्ट वाणी ॥ ४ ॥ [२४२३]

संतजनांचा सन्मान राखीत नाहीं व मुसलमानांना देव मानतो १. हे देवा, असे जे पोटाचे मारले आहेत, त्यांची आशेनें विटंबना केली आहे २. नीचांच्या पुढें लोटांगण घालतो व त्यांच्या चरणाला नमस्कार करतो (पायां पडतो) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी आपण फार शहाणे असें समजून उन्मत्त झाले आहेत, त्यांना धर्म अधर्म कांहीं कळत नाहीं. [२४१८]

अहो कृपावंता देवा, तुम्ही अशा बुद्धीचे दाते व्हा १. ज्यायोगेंकरून जीवात्म्याचा उद्धार होऊन तुमच्या पायांचा आश्रय मिळेल २. जी बुद्धि पांडुरंगाच्या ठिकाणीं खऱ्या भावाविषयींची वाणी वदवील ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, माझ्या अंतःकरणांत तुम्ही वस्ती करा ४. [२४१९]

कोणापाशीं 'रामकृष्ण हरि' ह्या मंत्राची वंचना न करितां तो सर्वांना सांगितला. तो मंत्र माझ्या जीवाच्या ठिकाणीं धरून राहिलों आहें १. विटेवर परम भावनेनें मीं आपलें मन ठेवलें आहे व तेथें असलेल्या समान चरणांचें चिंतन करीत आहें २. बळकट भावाची कांस घालून पांडुरंगाचे ठिकाणीं विश्वास ठेवल्यामुळें मी संसारांतून पार पडलों ३. तुकाराम महाराज म्हणतात, पूर्वीं जे भक्तजन उद्धरले गेले, त्यांनीं हा भक्तीचा मार्ग पुढच्यांकरितां आश्रय करून ठेविला आहे. ४. [२४२०]

पाणी हें सपाट जागेवर स्थिर असतें व खांचखळगे व उतार जागेच्या ठिकाणीं तें चंचळ असतें. खडकाळ असून जो उतार भाग आहे तो पाण्याला खळखळ वाजवितो १. परमार्थप्राप्तीचें साधन सोपें आहे, पण अरेरे! जीवाचे हातांत त्याचें मन नसून तें दृढ भ्रमानें ग्रस्त झालें आहे २. सूर्याचें बिंब हें पाण्याच्या योगानें वेगळें होत नाहीं. पाण्यांत जी छाया दिसते ती तुम्ही खऱ्या बिंबाप्रमाणें समजूं नका ३. तुकाराम महाराज म्हणतात, दोरी न कळल्यामुळें तेथें सर्पबुद्धि होऊन रज्जूचें भय धरितात ४. [२४२१]

प्रीति ही गुणचिन्हाच्या प्रगटतेनें कळते १. जी गोष्ट हृदयांत असते तीच ओंठांमध्यें प्रगट होते, कारण चित्त हें मनाला साहाय्य असतें २. आईला जे डोहाळे होतात ती सर्व गर्भस्थ प्राण्याची क्षुधा आहे, कारण त्या गर्भाची भावना आईच्या ठिकाणीं प्रतिबिंबित होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें मनाला खाण्याच्या वेळेस रुचकर लागतें, तेंच पुन्हां मागून घ्यावेंसें वाटतें ४. [२४२२]

अहो, (हा ध्रुवपदांत दर्शविल्याप्रमाणें) अमंगळ वेळेचा योग कां आला? १. आज हरिकथेच्या वेळेस मन दुखावलें जाऊन मला ताप झाला आहे २. माझ्या पूर्वजन्मींच्या कांहीं पापाच्या योगानें मला ह्या दुष्टांचें दर्शन झालें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, दुर्जन हे दुष्ट शब्द कानावर घालण्यास आले आहेत ४. [२४२३]

किती वेळां जन्मा यावें। किती (नित्य) व्हावें फजीत ॥ १ ॥ म्हणऊनि जीव भ्याला। शरण गेला विठोबासी ॥ २ ॥ प्रारब्ध हें पाठीं गाढें। न सरे पुढें चालतां ॥ ३ ॥ तुका म्हणे रोकडी हे। होती पाहें फजिती ॥ ४ ॥ [२४२४]

होतों सांपडलों वेंटी। जातां भेटी संसारा ॥ १ ॥ तों या वाटे कृपा केली। भेटी झाली विठोबासी ॥ २ ॥ होता भार माथां माझे। बहु ओझें अमुप ॥ ३ ॥ तुका म्हणे केली चिंता। कोण दाता भेटेल ॥ ४ ॥ [२४२५]

भुंकुनियां सुनें लागे हत्तीपाठीं। होऊनि हिंपुटी दुःख पावे ॥ १ ॥ काय त्या मशकें तयाचें करावें। आपुल्या स्वभावें पीडतसे ॥ २ ॥ माकड विटवी पंचानना। घेतलें मरणा धरणें तेणें ॥ ३ ॥ तुका म्हणे संतां पीडितील खळ। येती तोंड काळें करूनियां ॥ ४ ॥ [२४२६]

जा रे तुम्ही पंढरपुरा। तो सोयरा दीनांचा ॥ १ ॥ गुण दोष नाणी मना। करी आपणासारिखें ॥ २ ॥ उभारोनि उभा कर। भवपार उतराया ॥ ३ ॥ तुका म्हणे तांतड मोठी। झाली भेटी उदंड ॥ ४ ॥ [२४२७]

गर्जत जावें (जावी) नामावळी। प्रेमें टाळी वाहोनि ॥ १ ॥ येणें सुखें पुढती धांवे। भेटी सवें गोपाळ ॥ २ ॥ लोटांगण घाला तळीं। वंदा धुळी संतांची ॥ ३ ॥ तुका म्हणे विठ्ठल लाहो। ऐसा वाहो उभारा ॥ ४ ॥ [२४२८]

अनुसरे तो अमर झाला। अंतरला संसार ॥ १ ॥ न देखती गर्भवास। कधीं दास विष्णूचे ॥ २ ॥ विसंबेना माता बाळा। तैसा लळा पाळावा ॥ ३ ॥ त्रिभुवनीं ज्याची सत्ता।

किती वेळां जन्माला येऊन त्रिविध दुःखांनीं फजीत व्हावें? १. म्हणून माझा जीव भयभीत होऊन विठोबाला शरण गेला २. मोठें जबरदस्त प्रारब्ध पाठीमागें लागलें आहे, तें आम्ही पुढें चालूं लागलों असतां नाहींसें होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, अशा प्रकारची उघड फजीती होत आहे हें जाणा ४. [२४२४]

संसाराची भेट घेण्याकरितां जात असतांना ह्या जन्ममृत्यूंच्या वेढ्यांत (स्त्री-पुत्रादिकांची सेवा करण्याच्या बिगारींत) सांपडलों १. अशा स्थितींत भक्तिमार्गानें विठोबारायाची कृपा होऊन त्याची भेट झाली २. आजपर्यंत माझ्या मस्तकावर ह्या संसाराचें जबरदस्त ओझें होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जीवात्म्याची चिंता करणारा असा ज्ञानदाता कोण सद्गुरु मला भेटेल? ४. [२४२५]

हत्तीच्या पाठीमागें एखादें कुत्रें भुंकत जातें, त्या योगानें हत्तीला कांहीं एक ताप न होऊन तेंच भुंकून भुंकून कष्टी होऊन दुःख पावतें १. कारण हत्तीपुढें घुंगुरट्याप्रमाणें असणाऱ्या कुत्र्यानें त्याचें काय वाईट करावें? पण दुसऱ्याच्या अंगावर भुंकत जाण्याचा त्याचा स्वभाव तोच त्याला पीडा करीत आहे २. मस्त झालेलें माकड हें सिंहाला वेडावून दाखवितें. त्या योगानें त्यानें आपल्या मरणाला धरणें करून घेतलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे दुष्ट संतांना पीडा करितात, ते त्या योगानें आपलें तोंड काळें करितात ४. [२४२६]

अरे, तुम्ही पंढरपुराला जा, कारण पांडुरंग हा दीनांविषयीं दयाळु आहे १. तो दीनजनांचा गुणदोष मनावर न घेतां आपणासारखे त्यांना करतो २. तो दीनजनांना भवसिंधूंतून पार करण्याकरितां आपले हात वर करून उभा आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, दीनजनांना भेटण्याविषयीं तो मोठा उतावळा आहे, अशाची भेट झाली असतां पुष्कळ लाभ होतो ४. [२४२७]

प्रेमानें टाळी वाजवून मुखानें हरीचें नाम गर्जत जावें १. ह्या सुखानें गोपाळ हा भेटण्याकरितां सामोरा येतो २. जमिनीवर लोटांगण घाला व संतांच्या रजःकणांना वंदन करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, विठ्ठलचिंतनाची त्वरा करण्याविषयीं बाहु उभारा ४. [२४२८]

जो अनन्यभावानें हरीच्या ठिकाणीं अनुसरला (हरीला शरण गेला) तो अमर झाला व त्या योगानें संसाराला आंचवला आहे. १. विष्णूचे दास हे केव्हांहि गर्भवास करीत नाहींत २. आई बालकांना ज्याप्रमाणें विसंबत नाहीं,

तो रक्षिता झालिया (तुक्या रक्षिता तो जाला) ॥ ४ ॥ [२४२९]

आतां केशीराजा हेचि विनवणी। मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥ देह असो माझा भलतिये ठायीं। चित्त तुझ्या पायीं असों द्यावें ॥ २ ॥ काळाचें खंडन घडावें चिंतन। तन मन धन विन्मुखता ॥ ३ ॥ कफवातपित्त देहअवसानीं। ठेवावीं वारूनि दुरितें हीं ॥ ४ ॥ सावध तों माझीं इंद्रियें सकळें। दिली एक वेळे हाक आधीं ॥ ५ ॥ तुका म्हणे तूं या सकळांचा जनिता। येथें ऐक्यता सकळांसी ॥ ६ ॥ [२४३०]

चित्त तें चिंतन कल्पनेची धांव। जे जे वाढे हांव इंद्रियांची ॥ १ ॥ हात पाय दिसे शरीर चालतां। नांवें भेद सत्ता जीवाची ते ॥ २ ॥ रवीचिये अंगीं प्रकाश सकळां। वचनें निराळा भेद दिला ॥ ३ ॥ तुका म्हणे माप वचनाच्या अंगीं। मौन्य काय रंगीं निवडावें ॥ ४ ॥ [२४३१]

बोलोनियां काय दावूं। तुम्ही जीऊ जगाचे ॥ १ ॥ हेचि आतां माझी सेवा। चिंतन देवा करितों ॥ २ ॥ विरक्तासी देह तुच्छ। नाहीं आस देहाची ॥ ३ ॥ तुका म्हणे पायांपाशीं। येइन ऐसी वासना ॥ ४ ॥ [२४३२]

मायबाप सर्वे नये धनवित्त। करावें संचित भोगावें तें ॥ १ ॥ म्हणऊनि लाभ काय तो विचारीं। नको चालीवरी चित्त ठेवूं ॥ २ ॥ आयुष्य सेवटीं सांडूनि जाणार। नव्हेची साचार शरीर हें ॥ ३ ॥ तुका म्हणे काळें लावियेलें माप। जमा धरी पापपुण्याची हे ॥ ४ ॥ [२४३३]

मोटळें हाटीं सोडिलया गांठी। विकऱ्या घातले कण ॥ ज्याचे भाग त्यासी देउनि निवारिलें। सारूनि लिगाड दान ॥ खरें माप हातीं बैसलों। मानिती तेचि चौधे जन ॥ खरें वित्त

तसा देवानें भक्ताचा लळा पूर्ण करावा असा देवाचा स्वभाव आहे ३. त्रैलोक्यांत ज्याची सत्ता आहे, तोच रक्षण करणारा झाला आहे (त्यानें तुकोबाचें रक्षण केलें आहे) ४. [२४२९]

हे केशवराजा, तुमच्या पायांवर मस्तक ठेवून मी हीच विनंति करीत आहें १. ती अशी, कीं माझा देह पाहिजे त्या ठिकाणीं असो, पण तुझ्या पायांच्या ठिकाणीं माझें चित्त असावें २. देह, मन व द्रव्य ह्यांचे ठिकाणीं विन्मुख होऊन तुझ्या चिंतनामध्यें माझा काळ जावा ३. कफ, वात, पित्त ह्या पातकांची वस्ती देहाचे ठिकाणीं आहे. त्यांचें तुम्ही निवारण करा ४. जोंपर्यंत माझीं सर्व इंद्रियें सावध आहेत तोंपर्यंत एक वेळ अगोदर हाक मारून मी आपली हकीगत कळविली ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या सर्वांना उत्पन्न करणारा तूंच आहेस आणि अखेरीस तुझ्या ठिकाणीं ह्या सर्वांचाच मेळ होणार आहे ६. [२४३०]

इंद्रियांपासून जी जी हांव वाढते, त्या विषयाची कल्पना करून चिंतन करणारें त्यालाच चित्त म्हणावें १. सर्व शरीर हातांनीं देतें व घेतें, पायांनीं चालतें असें दिसतें, पण त्याविषयींची सत्ता एका जीवाची आहे २. सूर्यापासून सर्व प्रकाश मिळतो, पण शब्दामध्यें सूर्य आणि किरणें अशा नांवांचा भेद आला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, कोणतेंहि माप वचनापासून निर्माण होतें. त्यांत जर मौन धरलें तर कोणता रंग निवडतां येईल काय? ४. [२४३१]

हे देवा, तुम्ही ह्या सर्व जगताचें जीवन आहांत म्हणून मीं तुम्हांला अधिक बोलून काय दाखवावें? १. देवा, तुमच्या चिंतनाची आतां सेवा मी करीत आहें २. जे वैराग्यशील आहेत, त्यांनीं आपल्या देहाची देखील चाड धरली नाहीं; मग ते दुसरी कशाची आशा करतील? ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या पायांजवळ यावें अशी माझी वासना आहे ४. [२४३२]

सर्व प्राण्यांच्या अखेरीस आईबाप अथवा द्रव्य हें कांहीं बरोबर येत नाहीं. फक्त जें कृत कर्म झालें असेल, तें संचित बरोबर येऊन त्याप्रमाणें भोग मिळतो १. ह्याकरितां कशामध्यें लाभ आहे, ह्याचा तूं विचार कर. व्यवहाराच्या चालीरीतीवर लक्ष ठेवून राहूं नको २. अखेरीस आयुष्य तुला टाकून जाईल. हा देह खरा आहे, असें तूं मानूं नको ३. तुकाराम महाराज म्हणतात, काळ हा मापाड्या होऊन बसला आहे. तो तुझ्या पापपुण्याची जमा धरून त्याप्रमाणें तुला ठेवील ४. [२४३३]

ह्या संसारबाजारामध्यें देहरूपी मोटकळ्याच्या गांठी सोडून त्यांतील कण मीं विक्रीस मांडले आहेत. त्याचे वांटे ज्याचे त्यास (पंचमहाभूतांस) देऊन लचांड संपविलें; आणि खरें माप हातामध्यें घेऊन मी बसलों आहें; तें चारी

तेथें आले चोजवीत । गिऱ्हाइक संतजन ॥ १ ॥ झाडिला पालव केला हाट वेंच । जाली सकळींच अराणूक ॥ याल तरि तुम्ही करा लगबग । आमचे ते कोणी लोक ॥ २ ॥ एक उत्तम मध्यम कनिष्ट । वित्ताचे प्रकार तीन । बहुतां जनांचे बहुत प्रकार । वेगळाले वाण । लाभ हानि कोणा मुद्दल जालें । कोणासीं पडिलें खाण ॥ अर्धमर्ध कोणी गुंतोनि राहिले । थोडे तैसे बहु जन ॥ ३ ॥ एके सांते आले एक गांवींहून । येकामेचि नव्हे जाणें ॥ येतां जातां रुजू नाहीं दिवाणा । काळतोंडीं एकी तेणें ॥ लाग भाग एकी एकांनीं गोविलें । मागील पुढलां ऋणें । तुका म्हणे आतां पाहूं नये वास । साधावें आपुलें येणें ॥ ४ ॥ [२४३४]

करा करा लागपाठ । धरा पंढरीची वाट । जंव नाहीं चपेट । घात पडिला काळाचा ॥ १ ॥ दुजा ऐसा नाहीं कोणी । जो या काढी भयांतूनि । करा म्हणऊनि । हा विचार ठायींचा ॥ २ ॥ होती गात्रें बेंबळीं । दिवस अस्तमाना काळीं । हातें वाहे टाळी । जंव मोकळीं आहेती ॥ ३ ॥ कां रे घेतलासी सोस । तुज वाटताहे कैसें । तुका म्हणे ऐसें । पुढें कैं लाहासी ॥ ४ ॥ [२४३५]

यत्न आतां तुम्ही करा । मज दातारा सत्तेनें ॥ १ ॥ विश्वास तो पायांवरी । ठेवून हरी राहिलों ॥ २ ॥ जाणतचि दुजे नाहीं । आणिक कांहीं प्रकार ॥ ३ ॥ तुका म्हणे शरण आलों । नेणें बोलों विनवितां ॥ ४ ॥ [२४३६]

अनाथां जीवन । आम्हां तुमचे चरण । करूनि सांठवण । ते धरीयेले (धरिले) हृदयीं ॥ १ ॥

वेदपुरुषांना मान्य आहे. हरिनामरूपी खरा माल भरला आहे, त्या ठिकाणीं संतजन (हेच कोणी) गिऱ्हाईक शोध करीत आले आहेत १. ह्या बाजारांत पदरीं असलेल्या संचित कर्माचा व्यय करून (प्रारब्ध भोगून) पदर झाडला आहे. त्या योगानें सर्व विश्रांति झाली आहे; ह्या ठिकाणीं जर कोणी याल, तर मोठ्या त्वरेनें लवकर या. जे कोणी आमचे आहेत त्या लोकांस मी सांगतों २. ह्या बाजारांत उत्तम, मध्यम व कनिष्ठ असा तीन प्रकारचा माल आहे आणि ह्या जगामध्यें पुष्कळ लोकांचे पुष्कळ प्रकार आहेत. [ह्या जगामध्यें अनेक स्वभावाचे अनेक लोक आहेत.] त्यांत वेगळाले रंग आहेत, म्हणून ह्या बाजारांत सात्त्विकास लाभ होतो व जे कोणी राजस आहेत त्यांचें मुद्दल जतन राहातें, आणि जे कोणी तामसी असतील त्यांचें नुकसान होतें व जे कोणी अत्यंत तमोगुणी पापी आहेत त्यांचा सर्वनाश होतो आणि त्या ठिकाणीं अर्धे प्रपंचांत आणि अर्धे परमार्थांत असे अर्ध्यामुर्ध्या विचारानें गुंतून राहिलेले लोक थोडे असून वर सांगितलेले तसलेच लोक फार आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, एकाच ठिकाणाहून (ब्रह्मापासून) ह्याच बाजारामध्यें सर्व आले आहेत; पण आतां ते आपण कोणत्या ठिकाणापासून आलों हें जाणत नाहींत; येतेवेळेस व जातेवेळेस ते आपल्या स्वामीला रुजू होत नाहींत. त्या योगानें कित्येकांचें तोंड काळें होतें व कित्येक मागील प्रारब्धकर्माच्या वांट्यानें गुंतून पडले. त्यांस मागील कर्ज असून पुढेंहि तें प्रारब्धरूपी कर्ज वाढतें; म्हणून परमार्थ साधण्याकरितां कोणीं कोणाची वाट पाहूं नये, आपापल्या हरिप्राप्तीच्या मुक्कामाची जागा साध्य करून घ्यावी ४. [२४३४]

अहो जन हो, जोंपर्यंत तुम्ही काळाच्या झपाट्यांत सांपडलां नाहीं, तोंपर्यंत मोठी लगबग करून तुम्ही पंढरीचा रस्ता धरा १. ह्या काळाच्या भयांतून सोडविणारा पांडुरंगासारखा दुसरा कोणी नाहीं. ह्याकरितां आरंभींच ह्याचा तुम्ही विचार करा २. हा आयुष्याचा सूर्य अस्ताला जाईल, त्या वेळीं तुमच्या शरीराचीं सर्व गात्रें क्षीण होतील; आणि जोंपर्यंत हात आणि तोंड मोकळें आहे, तोंपर्यंत हातानें टाळी वाजवून मुखानें हरिनाम घेऊन त्यांचा उपयोग करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे, तूं संसाराची कां व्यर्थ हांव घेतली आहेस? तुला असें वाटतें तरी कसें? मनुष्यदेह गेल्यावर परमार्थाचा लाभ तुला पुढें कधीं प्राप्त होईल ? ४. [२४३५]

हे दात्या देवा, आतां माझें रक्षण करण्याविषयींचा प्रयत्न तुम्हीच आपल्या सत्तेनें करा १. हे हरि, तुमच्या पायांच्या ठिकाणीं विश्वास ठेवून मी राहिलों आहें २. ह्यावांचून दुसरे कोणतेहि माझ्या रक्षणाचे प्रकार जाणत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला बोलतां येत नाहीं व तुम्हांस विनवितांहि येत नाहीं, म्हणून मी तुम्हांस शरण आलों आहें ४. [२४३६]

तुमचे पाय हे आम्हां गरिबांना जीवन आहे, म्हणून तेच सांठवून हृदयांत धरले आहेत १.

पुष्ट झाली अंगकांति । आनंद न समाये चित्तीं । कवतुकें प्रीतीं । गाऊं नाचों उल्हासें ॥ २ ॥ करुणाउत्तरीं । करूं आळवण हरी । जाऊं नेदूं दुरी । प्रेमप्रीतिपडिभरें ॥ ३ ॥ मोहो ममता करी गोवा । ऐसें आहे जी केशवा । तुका म्हणे सेवा । आणीक नाहीं जाणत ॥ ४ ॥ [२४३७]

सुखाची वसती झाली माझे जीवीं । तुमच्या गोसावी कृपादानें ॥ १ ॥ रूप वेळोवेळां आठवीं अंतरीं । बैसोनि जिव्हारीं राहिलें तें ॥ २ ॥ विसावलें मन विटलें प्रपंचा । गोडावली वाचा येणें रसें ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं नाठवेसें झालें । दुसरें विठ्ठले मज आतां ॥ ४ ॥ [२४३८]

आम्हां कांहीं आम्हां कांहीं । आतां नाहीं या बोलें ॥ १ ॥ मोल सांगा मोल सांगा । घेणें तींहीं कां पुसावें ॥ २ ॥ कैसें घडे कैसें घडे । बडबड तुज मज ॥ ३ ॥ मुदलें साटीं मुदलें साटीं । लाभ पोटीं त्या मधीं ॥ ४ ॥ तुका म्हणे सांठवूं घरीं । आडल्या काळें पुसती तरी ॥ ५ ॥ [२४३९]

घ्या रे भाई घ्या रे भाई । कोणी कांहीं थोडें बहु ॥ १ ॥ येच हाटीं येच हाटीं । बांधा गांठीं पारखून ॥ २ ॥ वेंच आहे वेंच आहे । सरलें पाहें मग खोटें ॥ ३ ॥ उघडें दुकान उघडें दुकान । रात्री जाली कोण सोडी मग ॥ ४ ॥ तुका म्हणे अंतकाळीं । जाती टाळीं बैसोनि ॥ ५ ॥ [२४४०]

मार्ग चुकले विदेशीं एकले । तयावरी झाले दिशाभुली ॥ १ ॥ हातीं धरूनियां पावविले घरा । त्याच्या उपकारा काय द्यावें ॥ २ ॥ तैसा मी कुडकुडा होतों केशीराजा । सेवा न घडे लाजा म्हणऊनि ॥ ३ ॥ सांडियेला गर्भ उबगोनि माउली । नाहीं संभाळिली भूमि शुद्ध ॥ ४ ॥ उष्ण तान भूक

त्या योगानें माझें शरीर धष्टपुष्ट झालें आहे आणि तो आनंद चित्तांत मावत नाहीं. आतां त्या प्रीतीनें त्याचेंच कौतुक करून मुखानें तुम्हांला गाऊन सुखानें नृत्य करूं २. हे हरि, करुणावचनानें तुमची करुणा भाकूं आणि त्याच प्रेमप्रीतीच्या आवडीनें तुम्हांला दूर जाऊं देणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो केशवा, ह्या मोहममतेनें तुम्हांला गुंतवून ठेवूं असा माझा प्रकार आहे. ह्यावांचून मी दुसरी सेवा जाणत नाहीं ४. [२४३७]

अहो स्वामी, तुम्हीं मजवर कृपादान केलें, त्या योगानें माझ्या जीवाचे ठिकाणीं सुखाची वस्ती झाली १. जें रूप माझ्या अंतःकरणामध्यें बसून राहिलें आहे, त्याचीच आठवण मला वारंवार होत आहे २. त्या रूपाच्या ठिकाणीं माझें मन स्थिरावलें, म्हणून त्याला प्रपंचाचा वीट आला आणि हरिनामरसानें माझी वाणी गोडावली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठाबाई आई, तुझ्या नामरूपावांचून आतां मला दुसरें कांहींच आठवत नाहीं, असें झालें आहे ४. [२४३८]

कोणी कोणी आम्हांला कांहीं तरी परमार्थ पाहिजे असें वरचेवर म्हणतात, पण आतां ह्या बाह्य बोलण्यानें तो मिळत नाहीं १. कांहीं तरी (परमार्थप्राप्तीची, देवप्राप्तीची) किंमत सांगा असें कोणी वरचेवर म्हणतात, पण ज्याला घेण्याची खरी इच्छा आहे त्यांनीं मला विचारावें २. अंतरीं जिव्हाळा नसेल तर व्यर्थ बडबड करून तुझें माझें देणें घेणें कसें घडेल ? ३. मुद्दल जतन केलें असतां त्याच्या योगानें लाभ होतो ४. तुकाराम महाराज म्हणतात तें मुद्दल (देव) आम्ही आपल्या हृदयरूपी घरांत सांठवून ठेवूं, म्हणजे ज्या वेळीं कोणास नड पडेल, त्या वेळेस तरी कोणी मला विचारतील ५. [२४३९]

अरे भाईनो, फार थोडें (परमार्थसाधन) कोणीं कांहीं तरी घेतलें पाहिजे (असें मी द्विवार सांगतों) १. ह्या प्रपंचबाजारांत जर तुम्ही आलां आहांत, तर परीक्षा करून वस्तु पदरीं बांधा. ती वस्तु ह्याच बाजारांत मिळणार आहे २. तुमच्या आयुष्यरूपी द्रव्याला नाश आहे (असें द्विवार सांगतों). तें एकदां संपल्यावर मग तुम्ही कोणीकडे पाहाल ? ३. जोंपर्यंत हें दुकान (तोंड) उघडें आहे तोंपर्यंत लाभाची प्राप्ति करून घ्या (असें द्विवार सांगतों). नाहींपेक्षां आयुष्य-भानु (आयुष्याचा सूर्य) मावळून रात्र झाल्यावर दुकान बंद होईल. मग तुम्हांला तेथें कोण सोडील ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या अखेरच्या समयाला तुमचीं जाभाडें (तोंडें) बंद होऊन जातील (म्हणून आतांच सावध व्हा व हरिनाम घ्या) ५. [२४४०]

जे कोणी परदेशांत जाऊन रस्ता चुकले, आणि तेथें एकटे असून त्यांस दिशाभूल झाली १. जर कोणी त्यांच्या हाताला धरून त्यांना आपल्या घरास पोहोंचविलें तर त्या पोंचविणाराच्या उपकाराचे मोबदला काय द्यावें ? २. अहो केशवराजा, त्याप्रमाणेंच मी संकोचित होतों, कारण माझ्या हातून सेवा न घडल्यामुळें मला लाज वाटत होती ३. एखाद्या दुष्ट आईनें पोटांतील गर्भ कांहीं त्रासामुळें टाकून दिला; त्या ठिकाणीं चांगली जमीन आहे, असें देखील पाहिलें नाहीं ४

एवढीये आकांतीं । वोसंगा लाविती काय म्हूण ॥ ५ ॥ खांद्यावरी शूळ मरणाचे वाटे । अन्यायहि मोठे साच केले ॥ ६ ॥ हातींचें हिरोनि घातला पाठीसी । तुका म्हणे ऐसी परी झाली ॥ ७ ॥ [२४४१]

जैसी तैसी तरी वाणी । मना आणी माउली ॥ १ ॥ लेंकरांच्या स्नेहें गोड । करी कोड त्या गुणें ॥ २ ॥ मागें पुढें रिघे पोटीं । साहे खेटी करी तें ॥ ३ ॥ तुका विनवी पांडुरंगा । ऐसें पैं गा आहे हें ॥ ४ ॥ [२४४२]

गुणांची आवडी वाचेचा पसरू । पडिला विसरू सर्व रसां ॥ १ ॥ आदिमध्यअंतीं नाहीं अवसान । जीवनीं जीवन मिळोनि गेलें ॥ २ ॥ रामकृष्णनाम माळा हे साजिरी । ओंविली गोजिरी कंठाजोगी ॥ ३ ॥ तुका म्हणे तनु जालीसे शीतळ । अवघी सकळ ब्रह्मानंदें ॥ ४ ॥ [२४४३]

देवाची (देवाचा) भांडारी । आदा विनियोग करी ॥ १ ॥ आतां न माखे हातपाय । नेणों होतें कैसें काय ॥ २ ॥ देवें नेली चिंता । झाला सकळ करिता ॥ ३ ॥ तुका म्हणे धणी । त्यासी अवघी पुरवणी ॥ ४ ॥ [२४४४]

पेणावलें ढोर मार खाय पाठीं । बैसलें तें नुठी तेथूनियां ॥ १ ॥ तैसी माझ्या मना परी झाली देवा । धांवें अहंभावा सांडावलों ॥ २ ॥ कडां घाली उडी मागिलांच्या भेणें । पडणें मरणें न कळेचि ॥ ३ ॥ तुका म्हणे झालों त्यापरी दुःखित । असें बोलावीत पांडुरंगा ॥ ४ ॥ [२४४५]

झालिया दर्शन करीन मी सेवा । आणीकही देवा न लगे दुजें ॥ १ ॥ प्रारब्धा आधीन

त्या मुलाला ऊन लागून तहान-भुकेची पीडा झाली होती, अशा आकांतसमयीं ती त्यास काय म्हणून उचलून कडेवर घेईल ? ५. त्या मुलानें पूर्वजन्मीं खरे मोठे अपराध केल्यामुळें खांद्यावर शूळ देऊन मरणाच्या वाटेला त्याला यमदूत नेत होते ६. तुकाराम महाराज म्हणतात, त्या अपराध्याला काळाच्या हातचें सोडवून जसें आपल्या पाठीशीं घ्यावें, तसा माझा प्रकार झाला आहे ७. [२४४१]

बालकाचा जसा वेडावांकडा शब्द असेल, तसा तो आई मनावर घेते (गोड मानून घेते) १. कारण मुलाचा स्नेह हाच तिला गोड आहे. त्या योगानें ती त्याच्या बोलण्याचें कोडकौतुक करते २. ती आई त्या मुलाकरितां मागेंपुढें येरझारा करण्याचे श्रम सहन करते (तें मूल केव्हां आईच्या मागें तर केव्हां पुढें येतें–जातें, केव्हां तिच्या कुशींत शिरतें, केव्हां खेटून धक्के मारतें, परंतु ती प्रेमळ आई त्याच्या त्या खोड्या सहन करते) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, अशा प्रकारची स्थिति आहे. ही तुम्हांला विनंति करतों (कीं मी जें बोलेन तें तूं सहन कर) ४. [२४४२]

श्रीहरीच्या गुणांचें प्रेम असल्यामुळें वाणीनें त्याच्याच वर्णनाचा विस्तार होत आहे. बाकी सर्वांची विस्मृति झाली आहे १. ह्यामध्यें आरंभापासून अखेरपर्यंत खंड नाहीं. परमात्मजीवनाच्या ठिकाणीं जीवचैतन्य हें समरस झालें (हरिरूपी जीवनांत माझें जीवन एकरूप झालें) २. रामकृष्णनामरूपी मण्यांची माळाहि चांगली सुशोभित गोजिरवाणी कंठांत बसेल अशी ओंवून तयार केली ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी सर्व तनु ही संपूर्ण ब्रह्मानंदाच्या योगानें शांत झाली ४. [२४४३]

देवाचा भांडारी (कोषपति, खजीनदार, कुबेर) सर्वकाळ आम्हांला लागणाऱ्या द्रव्याचा जमाखर्च करीत आहे १. आतां देहनिर्वाहाकरितां आमचे हातपाय हे कशानेंहि भरले जात नाहींत (आम्हांला शिणवावे लागत नाहींत) व हें कसें काय होतें, हेंहि कळत नाहीं २. देवानें सर्व चिंता नाहींशी केली आहे, कारण तो सर्व कांहीं कर्ता झाला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो मालक आहे त्याला सर्व कांहीं आम्हांला पुरवावें लागतें ४. [२४४४]

जें गुरूं उठवणीला आलें आहे, त्याला किती जरी मारलें तरी तितका भार तें पाठीवर सहन करून बसल्या जाग्यावरून उठत नाहीं १. हे देवा, तसा प्रकार माझ्या मनाचा झाला आहे, ह्याकरितां तूं त्वरेनें धांव घे. मी अहंकार-रहित झालों आहें २. मागें मोठें भय लागलें म्हणजे त्याच्या तावडींतून सुटण्याकरितां पुढें असलेल्या कड्यावरून देखील एखादे उडी मारतात. त्या योगानें आपण पडूं, मरूं हें कांहीं कळत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, त्याप्रमाणें मी दुःखी झालों आहें, ह्याकरितां मी तुला बोलावीत आहें ४. [२४४५]

हे देवा, तुमचें दर्शन झाल्यावर मी तुमची सेवा करीन. ह्यापरतें मी दुसरें कांहीं जाणत नाहीं १. अन्नवस्त्र हें

अन्नआच्छादन। स्थिर करोनि मन ठेवीं पायीं ॥ २ ॥ ये गा ये गा ये गा कृपाळुवा हरी। निववीं अभ्यंतरीं देऊनि भेटी ॥ ३ ॥ आसावलें मन जीवनाचे ओढी। नामरूपें गोडी लावियेली ॥ ४ ॥ काय तुम्हांपाशीं नाहीं भांडवल। माझे मिथ्या बोल जाती ऐसे ॥ ५ ॥ काय लोखंडाचे पाहे गुण दोष। शिवोनि परिस सोनें करी ॥ ६ ॥ तुका म्हणे माझें अवघें असों द्यावें। आपुलें करावें ब्रीद साच ॥ ७ ॥ [२४४६]

येथें आड कांहीं न साहे आणिक। प्रमाण तें एक हेंचि झालें ॥ १ ॥ गाऊं नाचों टाळी वाहूं गीत छंदें। डोलवूं विनोदें अंग तेणें ॥ २ ॥ मंथुनियां सार काढिलें बाहेरी। उपाधि त्या येरी निवडिल्या ॥ ३ ॥ तुका म्हणे जगा लाविली शिराणी। सेवितां हे धणी होत नाहीं ॥ ४ ॥ [२४४७]

शरणागत जालों। तेणें मीपणा मुकलों ॥ १ ॥ आतां दिल्याचीच वाट। पाहों नाहीं खटपट ॥ २ ॥ न लगे उचित। कांहीं पाहावें संचित ॥ ३ ॥ तुका म्हणे सेवा। माने तैसी करूं देवा ॥ ४ ॥ [२४४८]

वाचेचिया आळा कवळिलें ब्रह्म। चुकविला श्रम पृथक तो ॥ १ ॥ सुलभ तें झालें सुलभ तें झालें। जवळी तें आलें पंढरिये ॥ २ ॥ नामरूपाचें बांधलें मोटलें। एक एका वेळे सारियेलें ॥ ३ ॥ तुका म्हणे वांटे चुकली वसती। उद्धार तो हातीं आणियेला ॥ ४ ॥ [२४४९]

सवंग झालें सवंग झालें। घरा आलें बंदरींचें ॥ १ ॥ आतां हेवा करा सोस। भक्तिरस बहु गोड ॥ २ ॥ पाउल वेंचे चिंता नाहीं। आड कांहीं मग नये ॥ ३ ॥ तुका म्हणे संचिताचें। नेणें काचें राहे तें ॥ ४ ॥ [२४५०]

प्रारब्धाच्या स्वाधीन आहे. ह्याकरितां त्यांच्या चिंतेंतून सोडवून तूं आपल्या चरणीं मला स्थिर कर २. हे कृपाळु हरि, अगा तूं ये (असें त्रिवार म्हणतों). मला भेट देऊन माझें अंतःकरण शांत कर ३. तुमच्या नामरूपाच्या ठिकाणीं तुम्हीं गोडी लावल्यामुळें त्या जीवनाकडे मन ओढत आहे व त्याचीच आशा करीत आहे ४. अहो देवा, तुमच्याजवळ काय भांडवल नाहीं त्यामुळें मी जें कांहीं बोललों ते माझे बोल व्यर्थ जातात? ५. परीस लोखंडाचे गुणदोष पाहातो काय? आपल्या स्पर्शानें परीस त्यास सुवर्णत्व देतो ६. तुकाराम महाराज म्हणतात, माझें सर्व कांहीं असूं द्या. तिकडे तुम्ही पाहूं नका. पतितपावन हें आपलें ब्रीद सत्य करा ७. [२४४६]

ह्या ठिकाणीं ठरविलेल्या साधनामध्यें दुसरा कोणताहि प्रतिबंध मला सहन होत नाहीं. (जें ध्रुवपदांत दर्शविलें आहे) तेंच एक साधन करण्याचा माझा विचार निश्चित झाला आहे १. देवाचें नाम गाऊं व टाळी वाजवून त्या गायनाचे तालामध्यें नाचूं व त्या कौतुकानें अंग डोलवूं २. सर्वांचें–वेदशास्त्रांचें–मंथन करून हें सार बाहेर काढलें आहे व बाकीची योग–यागादि उपाधि निवडून वेगळी केली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यासंबंधाचा (हरिनाम गाणें, नाचणें, टाळी वाजविणें ह्याचा) जगामध्यें झेंडा लावला आहे, त्याचें कितीहि सेवन केलें तरी तृप्ति होत नाहीं ४. [२४४७]

देवा, मी तुम्हांला अभेदभावानें शरण आलों, त्या योगानें देहाच्या ठिकाणीं असणाऱ्या मीपणापासून मुक्त झालों १. आतां तुम्हीं जें वचन दिलें आहे त्याचीच मार्गप्रतीक्षा करीत आहें. ह्याखेरीज कोणतीच खटपट करणार नाहीं २. ह्या ठिकाणीं योग्य संचित (संचितापासून सुख होईल का दुःख होईल हें) पाहाण्याचें कारण नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जशी देवाला मान्य होईल तशी सेवा आम्ही करूं ४. [२४४८]

वाणीच्या आळयामध्यें परब्रह्मरूप हरीचें नाम आम्हीं बांधलें आहे, त्या योगानें निरनिराळी खटपट करण्याचे श्रम चुकविले १. हरि हा जवळ पंढरींत आल्यामुळें त्याचीच सेवा करण्याचें सुलभ झालें आहे (असें द्विवार सांगतों) २. एका खेपेसच श्रीहरीच्या ह्या नामरूपाचें गांठोडें बांधून सर्व कांहीं निकाल केला ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां वाटेंत पुनः जन्म घेण्याची वस्ती चुकली. जो हरि उधार (अनेक जन्मांच्या शेवटीं) असावयाचा तो रोकडा (ह्याच जन्मांत) आणला ४. [२४४९]

जें [श्रीकृष्ण] द्वारका बंदराच्या ठिकाणीं होतें, तें आपल्या घरीं (पंढरींत) आलें आहे, म्हणून फार स्वस्त झालें, (असें द्विवार सांगतों) १. त्याच्याविषयींचा भक्तिरस फार गोड आहे म्हणून आतां तुम्ही त्याचाच सोस करून ध्यास लावा २. त्या मार्गाकडे (पंढरीकडे) जर पाऊल पडलें तर काळजी निवारण होते, आणि मग कांहीं आघात आडवे येत नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या योगानें संचित कर्म कच्चें राहात नाहीं, मोक्ष मिळतो. ४. [२४५०]

तुम्ही संत मायबाप कृपावंत। काय मी पतित कीर्ती वाणूं ॥ १ ॥ अवतार तुम्हां धराया कारण। उद्धरावे जन जड जीव ॥ २ ॥ वाढावया सुख भक्ति भाव धर्म। कुळाचार नाम विठोबाचें ॥ ३ ॥ तुका म्हणे गुण चंदनाचे अंगीं। तैसे तुम्ही जगीं संतजन ॥ ४ ॥ [२४५१]

पाठी लागे तया दवडीं दुरी। घालीं बाहेरी संसारा ॥ १ ॥ येउनि दडें तुमच्या पायीं। धांवें तई छो म्हणा ॥ २ ॥ पारखियाचा वास पडे। खडबडे उठी तें ॥ ३ ॥ तुका म्हणे लाविला धाक। नदी ताक खाऊं देऊं (खाऊं कोणा) ॥ ४ ॥ [२४५२]

सांखळिलों प्रीती गळां। भुंकें वेळा जाणोनियां ॥ १ ॥ तुमचें मी केशीराजा। सुनें या काजा पाळिलों ॥ २ ॥ आलें गेलें कळे वाटा। कोण निटा वांकुडिया ॥ ३ ॥ तुका म्हणे आलें वारीं। दुरितें दुरी नातळतां ॥ ४ ॥ [२४५३]

सुनियाचा हाचि भाव। आपला ठाव राखावा ॥ १ ॥ दुजियाचा येऊं वारा। नेदूं घरावरी देऊं ॥ २ ॥ केली याची फाडाफाडी। तडामोडी क्षेत्राची ॥ ३ ॥ पातेजत नाहीं लोकां। देव तुका वांचूनि ॥ ४ ॥ [२४५४]

सुनियाची आवडी देवा। घेत सेवा नाहीं कांहीं ॥ १ ॥ शिकविलें तें जवळीं बैसों। जेथें असों तेथेंचि ॥ २ ॥ नेदी दुजे बोल करूं। गुरुगुरू न साहे ॥ ३ ॥ तुका म्हणे कुर्वाळितां। अंगसत्ता संगाची ॥ ४ ॥ [२४५५]

अहो संतजन, तुम्ही माझे कृपाळु आईबाप आहांत, म्हणून तुमची कीर्ति मीं पतितानें काय वर्णन करावी? १. ह्या सर्व जड जीवांचा (पातक्यांचा) उद्धार करण्याकरितां तुम्हीं ह्या जगांत अवतार घेतला आहे २. ह्या जगामध्यें भक्ति, भाव, धर्म आणि सुख हीं वाढविण्याकरितां तुम्ही प्रकट झालां आहांत आणि विठोबारायाचें नाम हाच तुमचा कुळाचार आहे. ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसा चंदनाच्या अंगामध्यें आपल्याप्रमाणें दुसऱ्या आपल्या जवळपास असलेल्या बोरी, बाभळीसारख्या वृक्षांस सुगंधी करण्याचा गुण आहे त्याप्रमाणें आपल्या संगतींत असणाऱ्यांना आपली योग्यता देणारे ह्या जगतामध्यें तुम्ही संतजन आहांत ४. [२४५१]

मी ज्याच्यामागें लागेन त्याला संसाराच्या बाहेर काढून लांब घालवीन १. हे देवा, असें मी तुमचें कुत्रें असून तुमच्या पायांजवळ लपून बसत आहें, आणि ज्या वेळेस तुम्ही छूः म्हणाल (म्हणजे आज्ञा कराल) त्या वेळीं सांसारिक लोकांच्या अंगावर धांवून जाईन २. जर ह्या ठिकाणीं परक्याचा म्हणजे विजातीचा वास आला, तर मोठ्या रागानें उठून तें कुत्रें (मी) धांवतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, प्रपंचरूपी असार ताक माझा धनी मला खाऊं देत नाहीं असा मला त्यानें धाक लाविला आहे ४. [२४५२]

देवाविषयींच्या प्रीतीच्या सांखळीनें मी बांधलों आहें, आणि समय जाणून मी भुंकत आहें [म्ह० बोलत आहें] १. अहो केशवराजा, मी तुमचें कुत्रें आहें, म्हणून तुम्ही माझें वर सांगितलेल्या कामाकरितांच रक्षण केलें आहे २. नीट रस्त्यानें अगर वांकड्या रस्त्यानें जे कोणी येतील तें मला समजतें व जातील तेंहि समजतें ३. तुकाराम महाराज म्हणतात ह्या ठिकाणीं कांहीं विघ्न आलें (वांकड्या वाटेनें, पापाच्या मार्गानें जाणारे लोक तुमच्याकडे आले) तर त्यांचें पाप माझ्या अंगास स्पर्श न होऊं देतां दूरचे दूर आहे तोंपर्यंत त्यांचें निवारण मी करतों ४. [२४५३]

आपला ठिकाणा रक्षण करावा, हाच भाव कुत्र्याचा आहे (परमार्थ करणाऱ्या साधकरूपी कुत्र्याची आपलें स्वरूपस्थितीचें घर राखावें अशी निष्ठा असावी) १. दुजेपणाचा (द्वैताचा) वारा आपल्या घरावर येऊं देऊं नये २. जर कोणी दुजेपणा करतील तर देहरूपी क्षेत्राची फाडाफाड करून (अहंकारादि क्षेत्रांची) मोडतोड करावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी अशा लक्षणांनीं युक्त असा राखणदार कुत्रा असल्यामुळें देव माझ्यावांचून दुसऱ्या लोकांचा विश्वास धरीत नाहीं ४. [२४५४]

ह्या देवाला माझ्यासारख्या भक्तरूपी कुत्र्याची फार प्रीति आहे, म्हणून त्या कुत्र्याकडून तो कांहीं सेवा घेत नाहीं १. आपल्याजवळ बसावें असें शिकविल्यामुळें आम्ही ज्या ठिकाणीं आहोंत त्याच ठिकाणीं राहातों २. आपल्या नामावांचून दुसरें बोलणें तो मला बोलूं देत नाहीं, आणि अभिमानानें गुरगुरणें त्याला सहन होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्यानें मला आपल्या हातानें सर्व आंगास कुरवाळिल्यामुळें त्याच्या संगतीनें राहाण्याची माझी सत्ता (देवाजवळ जाऊन बसण्याचा माझा हक्क) आहे ४. [२४५५]

शिळें खातां आला वीट। सुनें धीट पाय धरी ॥ १ ॥ कान्होबा ते जाणे खूण। उन उन घांस घाली ॥ २ ॥ आपुलिये ठायींचें द्यावें। लाड भावें पाळावा ॥ ३ ॥ तुका म्हणे मी जुनाट सुनें। मोहो तेणें परतला ॥ ४ ॥ [२४५६]

लागलें भरतें। ब्रह्मानंदाही वरतें ॥ १ ॥ झाला हरिनामाचा तारा। शीड लागलें फरारा ॥ २ ॥ बैसोनि सकळ। बाळ चालिले गोपाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे वाट। बरवी सांपडली नीट ॥ ४ ॥ [२४५७]

धन वित्त कुळें। अवघियानें ते आगळे ॥ १ ॥ ज्याचे नारायण गांठीं। भरला हृदय संपुष्टीं (हीं) ॥ २ ॥ अवघेंचि गोड। त्याचें पुरे सर्व कोड ॥ ३ ॥ तुका म्हणे अस्त। उदय (यो) त्याच्या तेजा नास्त ॥ ४ ॥ [२४५८]

बोलावें तें आतां आम्हीं अबोलणें। एकाचि वचनें सकळांसी ॥ १ ॥ मेघवृष्टि कांहीं न विचारी ठाव। जैसा ज्याचा भाव तैसें (त्यासी) फळे ॥ २ ॥ तुका म्हणे नाहीं समाधानें चाड। आपणाही नाड पुढीलांसी ॥ ३ ॥ [२४५९]

अधिकार तैसा करूं उपदेश। साहे ओझें त्यास तेंचि द्यावें ॥ १ ॥ मुंगीवरी भार गजाचें पालाण। घालितां ते कोण कार्यसिद्धि ॥ २ ॥ तुका म्हणे फांसे वाघुरा कुऱ्हाडी। प्रसंगीं ते काढी पारधी तो ॥ ३ ॥ [२४६०]

नव्हों वैद्य आम्ही अर्थाचे भुकेले। भलते द्यावे पाले भलत्यासी ॥ १ ॥ कुपथ्य करूनि विटंबावे रोगी। काय हे सलगी भीड त्यांची ॥ २ ॥ तुका म्हणे लासूं फांसूं देऊं डाव। सुखाचा उपाव पुढें आहे ॥ ३ ॥ [२४६१]

बहुतां दिवसांचें शिळें अन्न (संसारांतील तेंच तें विषयरूपी शिळें अन्न) खातांना वीट आल्यामुळें धीट होऊन कुत्रें आपल्या मालकाचे पाय धरतें (जवळ जाऊन गोंडा घोळतें) १. ती खूण कान्होबा देवानें जाणून तो ताज्या अन्नाचे घांस कुत्र्याचे तोंडांत घालीत आहे २. जें कांहीं आपल्या ठिकाणचें असेल तें घेऊन भावार्थानें त्याचा लाड करीत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी (देवाच्या घरचें) जुनाट कुत्रें आहें, त्यायोगानें माझा मोह नाहींसा झाला (माझें अज्ञान दूर झालें) ४. [२४५६]

ह्या हरिनामामुळें जो मला आनंद झाला आहे त्याचा पूर अतिशय भरला. त्यांत ब्रह्मानंद हा बुडून गेला. १. त्या ठिकाणीं तरण्याला हरिनामरूपी जहाजावर मोठ्या फराऱ्याचें प्रेमाचें शीड लागलें आहे २. ह्यामध्यें सर्व बाळगोपाळ बसून देवाकडे चालले आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, ही वाट नीट असून फार चांगली असलेली आम्हांला सांपडली आहे ४. [२४५७]

द्रव्यानें, कुळानें सगळ्यांपेक्षां (वैष्णव) हे जास्त आहेत (ध्रुवपदांत दर्शविलेलें मोठें आहे) १. ज्याचे पदरीं नारायण-रूपी धन असून ज्यांच्या अल्प हृदयांत तो भरला आहे २. त्यांचें सर्व कर्तव्य (वागणें, बोलणें) गोड असल्यामुळें त्यांची सर्व इच्छा पूर्ण होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या वैष्णवांचा प्रकाश सदोदित आहे, त्याला कधीं सूर्याच्या-प्रमाणें अस्त किंवा उदय नाहीं ४. [२४५८]

जें अबोलणें आहे, तें आतां आम्ही एक वचनानें सर्वांशीं बोलत आहों १. जसा पर्जन्याचा वर्षाव जागेचा कांहीं विचार न करितां होतो, पण बीजाप्रमाणें पीक येतें, तसें आमच्या बोलण्याच्या ठिकाणीं ज्यांचा जसा भाव असेल तसें त्यांस फळ मिळतें २. तुकाराम महाराज म्हणतात, कोणाचें मन समाधानी करावें अशी मला गरज नाहीं, कारण त्या योगानें आपणास व दुसऱ्यास दुःख भोगावें लागेल (केवळ कर्तव्य म्हणून मी उपदेश करतों) ३. [२४५९]

जसा ज्याचा अधिकार असेल तसा त्यास आम्ही उपदेश करूं, कारण ज्याला जेवढें ओझें सोसेल तेवढेंच त्याचे मस्तकीं द्यावें हें बरें १. जर हत्तीचा पोषाख मुंगीवर घातला, तर त्यापासून कोणतें काम साध्य होईल ? २. तुकाराम महाराज म्हणतात, शिकार करणाऱ्या पारध्याजवळ फांसे, जाळें, कुऱ्हाडी वगैरे शस्त्रें असतात, पण तो ज्या वेळीं जसा प्रसंग पडेल तसा त्यांचा उपयोग करतो ३. [२४६०]

जे वैद्य लोभानें औषध देण्याचे निमित्तानें भलती वनसपती भलत्या रोगावर देऊन पैसे मिळवितात, तसे आम्ही आशेखोर नव्होंत १. रोग्यांना कांहीं तरी भलतेंच खावयास सांगून त्यांची फजिती करावी हें योग्य नाहीं, म्हणून लाडानें त्यांची भीड धरणें हें काय उपयोगी आहे ? २. तुकाराम महाराज म्हणतात, जर कांहीं शरीरावर दुःख झालें (गळवें झालीं असतील) तर त्याला लासणें व डागणें असे उपाय करावे हें बरें, कारण त्यापासून पुढें सुख होणार आहे [तसें आम्ही करूं] ३. [२४६१]

नव्हे परि म्हणवीं दास। कांहीं निमित्तास मूळ केलें ॥ १ ॥ तुमचा तो धर्म कोण। हा आपण विचारा ॥ २ ॥ नाहीं शुद्ध आचरण। परि चरण चिंतीतों ॥ ३ ॥ तुका म्हणे पांडुरंगा। ऐसें कां गा नेणा हें ॥ ४ ॥ [२४६२]

मागें चित्ता (चिंता) होती आस। केला नास या काळें ॥ १ ॥ तुम्ही आम्हां उदासीन। भिन्नाभिन्न वारिलें ॥ २ ॥ मोहजाळें दुःख वाढे। वोढे वोढे त्यास तें ॥ ३ ॥ तुका म्हणे कोण देवा। आतां हेवा वाढवी ॥ ४ ॥ [२४६३]

अहो उभा विटेवरी। भरोवरी चुकविली ॥ १ ॥ निवारलें येणें जाणें। कोणा कोणें रुसावें ॥ २ ॥ संकलपासी वेंचे बळ। भारें फळ निर्माण ॥ ३ ॥ तुका म्हणे उभयतां। भेटी सत्ता लोभाची ॥ ४ ॥ [२४६४]

असो खटपट। आतां वाउगे बोभाट ॥ १ ॥ परिसा हे विनवणी। असो मस्तक चरणीं ॥ २ ॥ अपराध करा। क्षमा घडले दातारा ॥ ३ ॥ तुका म्हणे व्यथा (वेथा)। तुम्हां कळे पंढरिनाथा ॥ ४ ॥ [२४६५]

वारकरी पायांपाशीं। आले त्यांसी विनविलें ॥ १ ॥ काय काय तें आइका। विसरों नका रंकासी ॥ २ ॥ चिंतावोनि चिंता केली। हे राहिली अवस्था ॥ ३ ॥ तुका म्हणे संसारा। रुसलों खरा यासाठीं ॥ ४ ॥ [२४६६]

जीवींचे कां नेणां। परि हे आवडी नारायणा ॥ १ ॥ वाढवावें हें उत्तर। कांहीं लाड करकर ॥ २ ॥

हे देवा, तुमच्या सत्यत्वाचा धर्म मी जाणत नाहीं, पण तुमचा दास म्हणवितों आहें, कारण कांहींतरी तुमच्या प्राप्तीचें निमित्त केलें आहे १. आतां तुमचा जो धर्म असेल त्याचा तुम्ही विचार करा २. माझ्या हातून कोणतेंहि चांगलें आचरण होत नाहीं, पण तुमच्या पायांचा आठव मी मनामध्यें नेहमीं करतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, अगा पांडुरंगा, असे माझे प्रकार आहेत. ते तुम्ही कां जाणत नाहीं? ४. [२४६२]

पूर्वी माझ्या चित्तामध्यें अनेक प्रकारची संसाराची आशा व त्याविषयींची काळजी होती, त्या दोहींचा नाश ह्या समयास मीं केला आहे १. कारण, देवा, तुम्ही आमच्याविषयीं उदास झालां. त्या योगानें तुमचे-आमचेमधील आपपर [भेदाभेद] व्यवहाराचा संबंध तुटला २. इच्छित विषयाचा (संसारांत स्त्री–पुत्रादिकांचा) मोह आम्हीं धरला आहे व तो तुम्ही पूर्ण करीत नाहीं, म्हणून दुःख वाटतें व इच्छित विषयाच्या प्रेमासंबंधानें अंतःकरण तिकडे ओढ घेतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आतां तुमचेकडून आमची इच्छा पूर्ण होईल तर अशी (संसाराची) हांव कोण वाढवितो? ४. [२४६३]

अहो विटेवर उभ्या राहाणाऱ्या देवा, तुम्हीं माझी अनेक प्रकारची खटपट (प्रपंचाची कटकट) नाहींशी केली १. आतां जन्ममृत्यूच्या येरझारा तुम्हीं नाहींशा केल्या, ह्याकरितां कोणावर कोणीं रुसावें? २. जसजसा संकल्प करून बळ खर्च करावें, तसतसें त्यापासून होणाऱ्या संचितकर्मांच्या ओझ्यानें सुखदुःखरूपी फळ उत्पन्न होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमची व आमची भेट होणें हें तुमच्या लोभाधीन आहे (माझ्याजवळ तितकें पुण्याचें बळ नाहीं) ४. [२४६४]

आतां अनेक प्रकारची खटपट करणें हें व्यर्थ आहे, म्हणून मी ती करीत नाहीं व तो व्यर्थ बोभाटा करणेंहि नको १. तुमच्या पायांवर मीं मस्तक ठेविलें आहे, तें तेथेंच असावें, अशी माझी विनंति आहे, ती तुम्ही ऐका २. हे दात्या देवा, मजकडून जे कांहीं अपराध झाले असतील त्यांविषयींची तुम्ही क्षमा करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा, माझ्या अंतरांतील जें कांहीं दुःख आहे, तें तुम्हांला समजतें ४. [२४६५]

देवा, तुमच्या पायांजवळ जे कोणी वारकरी आले आहेत, त्यांच्यापाशीं मीं विनंति केली आहे १. ती विनंति काय आहे ती तुम्ही श्रवण करा. मी गरीब आहें म्हणून माझा तुम्हांला विसर होऊं नये २. त्याविषयींची चिंता वाटून मी नेहमीं काळजी करीत आहें आणि तीच अवस्था माझ्या ठिकाणीं सर्व काळ आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी आपल्या संसाराचा त्याग खरोखरी ह्याचकरितां (तुम्ही माझी उपेक्षा करणार नाहीं म्हणून) केला आहे ४. [२४६६]

हे नारायणा, तुम्हांला माझ्या अंतःकरणांतील इच्छा समजत नाहीं काय? पण माझ्या प्रीतीच्या वचनांची तुम्हांला आवड आहे १. कांहीं लाडानें भांडण करावें आणि त्याविषयींचें उत्तर प्रत्युत्तर वाढवावें अशी तुम्हांला आवड आहे २.

कोठें वायां गेले। शब्द उत्तम चांगले ॥ ३ ॥ तुका म्हणे बाळा। असे तात्पर्य (असतां तात्पर्य) या खेळा ॥ ४ ॥ [२४६७]

वोढविलें अंग। आतां करूनि घ्यावें सांग ॥ १ ॥ काय पूजा ते मी नेणें। जाणावें जी सर्वजाणें ॥ २ ॥ पोटा आलें बाळ। त्याचें जाणावें सकळ ॥ ३ ॥ तुका म्हणे हरी। वाहावें जी कडियेवरी ॥ ४ ॥ [२४६८]

शेवटींची हे विनंति। पाय चित्तीं राहावे ॥ १ ॥ ऐसें करा कृपादान। तुम्हां मन सन्निध ॥ २ ॥ भाग्याविण कैंची भेटी। नव्हे तुटी चिंतनें ॥ ३ ॥ तुका म्हणे कळसा आलें। हें विठ्ठलें परिसावें ॥ ४ ॥ [२४६९]

करूनियां शुद्ध मन। नारायण स्मरावा ॥ १ ॥ तरीच हा तरिजे सिंधु। भवबंधू तोडोनियां ॥ २ ॥ येथें खरें शुद्ध साचें। अंतरींचें बीज तें ॥ ३ ॥ तुका म्हणे लवणकळी। पडतां जळीं तें होय ॥ ४ ॥ [२४७०]

जिकडे पाहें तिकडे देव। ऐसा भाव दे कांहीं ॥ १ ॥ काय केलों एकदेशी। गुणदोषीं संपन्न ॥ २ ॥ पडे तेथें तुझ्या पायां। करीं वायां न वजेसें ॥ ३ ॥ तुका म्हणे विषमें सारी। ठाणें धरी जिवासी ॥ ४ ॥ [२४७१]

जिकडे जाय तिकडे सवें। आतां यावें यावरी ॥ १ ॥ माझ्या अवघ्या भांडवला। तूं एकला झालासी ॥ २ ॥ आतां दुजें धरा झणीं। पायांहूनि वेगळें ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां देवा। नका गोंवा यावरी ॥ ४ ॥ [२४७२]

जीं भाषणें उत्तम आहेत तीं कोणत्या ठिकाणीं व्यर्थ गेलीं आहेत काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हां बालकांना तुम्हीं खेळवावें व आपली करमणूक करून घ्यावी हाच मुख्य सारांश आहे ४. [२४६७]

आम्हीं आपला सर्व देह तुम्हांस अर्पण केला आहे. आतां तें तुम्ही सांग [चांगलें, पूर्ण] करून घ्यावें १. अहो, तुम्ही सर्व जाणत आहांत. तुमची पूजा कोणत्या प्रकारानें करावी हें मी जाणत नाहीं २. जें मूल पोटीं जन्मलें आहे त्याचें सर्व हित आई जाणते ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो हरि, तुम्ही मला उचलून कडेवर घेऊन वागवा ४. [२४६८]

हे देवा, तुमचे पाय माझ्या चित्तामध्यें राहावे अशी माझी अखेरची विनंति आहे १. तुमच्या समोर सर्व काळ माझें मन असावें, अशा कृपेचें दान तुम्ही मला द्या २. कांहीं भाग्य असल्याखेरीज तुमची भेट कशाची होते? पण तुमच्या पायांचें चिंतन केल्यामुळें तुमचा आमचा वियोग होणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें माझें भाषण शेवटचें आहे, तें विठ्ठलांनीं ऐकावें व त्याप्रमाणें करावें ४. [२४६९]

अहो जन हो, तुम्ही आपलें मन निर्मळ करून नारायणाचें स्मरण करा १. तरच ह्या भवसमुद्रांतून तुम्ही पार पडाल आणि तत्संबंधीं सर्व पाश तुटतील २. अंतःकरणांतील खरें बीज चांगलें असेल तरच ह्या ठिकाणाची प्राप्ति होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसा मिठाचा खडा पाण्यांत पडला असतां त्यांत मिळून जातो [तसें तुमचें मन नारायणीं अर्पण झाल्यावर तुम्ही तद्रूप व्हाल] ४. [२४७०]

मी जिकडे दृष्टि भरून पाहीन तिकडे मला देवच दृष्टीस पडावा. देवा, असा भाव तुम्ही मला द्या १. अनेक प्रकारच्या गुणदोषांनीं मी संपन्न झाल्यामुळें मला एकदेशीपणा आला आहे. ह्यापासून काय उपयोग आहे? २. ज्या ठिकाणीं मी मस्तक ठेवीन त्या ठिकाणीं तें मस्तक तुमच्या पायांवर असावें. त्यावांचून मी वायां जाईन, असें तुम्ही करूं नका ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या अंतःकरणांतील विषम भाव नाहींसा करून त्या ठिकाणीं तुम्ही वास्तव्य करा ४. [२४७१]

आतां इतक्यावर मी जिकडे जाईन तिकडे देवा, तूं माझ्याबरोबर यावें १. कारण तूं एकटाच माझें सर्व भांडवल आहेस २. आतां मला एखादे वेळीं तुमच्या पायांवांचून दुसरीकडे तुम्ही ठेवाल, हें उपयोगीं नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आतां ह्याउपर कोणत्याहि प्रकारच्या गुंताड्यांत मला गुंतवूं नको ४. [२४७२]

स्मरतां कां घडे नास। विष्णुदास यावरी ॥ १ ॥ ऐसी सीमा जाली जगीं। तरी मी वेगीं अनुसरलों ॥ २ ॥ धरिलें तें निवडे आतां। न घडे चित्ता वेगळें । ३ ॥ तुका म्हणे नाश नाहीं। पुराणेंही गर्जती ॥ ४ ॥ [२४७३]

आधीं नाहीं कळों आला हा उपाय। नाहीं तरी काय चुकी होती ॥ १ ॥ घालितों पायांसी मिठी एकसरें। नेदीतों दुसरें आड येऊं ॥ २ ॥ कासया पडतों लटिक्याचे भरीं। नव्हता कां शिरीं भार घेतों ॥ ३ ॥ संसाराचा हाट कां (हाटक) फिरतों दुकान। भरोवरी धन मेळवितों ॥ ४ ॥ तुका म्हणे कां हे घेतों गर्भवास। कां या होतों दास कुटुंबाचा ॥ ५ ॥ [२४७४]

आतां बरें झालें। माझें मज कळों आलें॥ १ ॥ खोटा ऐसा संसार। मज पायीं द्यावी थार ॥ २ ॥ उघडल्या डोळे। भोग देतां काळीं कळे ॥ ३ ॥ तुका म्हणे जीवा। होतां तडामोडी देवा ॥ ४ ॥ [२४७५]

बोलिलों ते धर्म अनुभव अंगें। काय पांडुरंगें उणें केलें ॥ १ ॥ सर्व सिद्धि पायीं वोळंगती दासी। इच्छा नाहीं ऐसी व्हावें कांहीं ॥ २ ॥ संतसमागमें अळंकारूं वाणी। करूं हे पेरणी शुद्ध बीजें ॥ ३ ॥ तुका म्हणे रामकृष्णनामें गोड। आवडीचें कोड माळ ओऊं ॥ ४ ॥ [२४७६]

करून चिंतन खेळे(खेळों) भोवतालें। चित्त येथें आलें पायांपाशीं ॥ १ ॥ येथें नाहीं खोटा चालत परिहार। जाणसी अंतर पांडुरंगा ॥ २ ॥ सुख दुःख तुज देऊनि सकळ। नाहीं ऐसा काळ केला आम्हीं ॥ ३ ॥ तुका म्हणे झाला देहाचा विसर। आतां आपपर नाहीं कोणी (नाहीं आतां पर आप दोन्ही) ॥ ४ ॥ [२४७७]

जर कोणी विष्णूचें दास्यत्व करून त्याचें स्मरण केलें तर त्याचा नाश होऊं शकत नाहीं १. अशा प्रकारच्या कीर्तीचें वर्णन करण्याची ह्या जगामध्यें शर्थ झाली आहे, म्हणून त्या विष्णूच्या ठिकाणीं मी मोठ्या त्वरेनें अनन्य झालों आहें २. असें जें माझ्या चित्तानें धरलें आहे, तें जाणें शक्य नाहीं. ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी विष्णूचें दास्यत्व करितात त्यांचा नाश होणार नाहीं अशी गर्जना करून पुराणें सांगतात ४. [२४७३]

(ध्रुवपदांत दर्शविल्याप्रमाणें) तुझ्या प्राप्तीचा उपाय मला अगोदर समजला नव्हता. जर तो समजला असता तर माझ्याकडून त्याविषयींची चुकी झाली नसती १. दुसरें विघ्न आडवें येऊं न देतां मी एकदम देवाच्या पायांस मिठी घातली असती २. खोट्या प्रपंचाच्या भरीला मी कशाला पडलों असतों व नाहीं तेंच (देह–स्त्री–पुत्रादिकांच्या अभिमानाचें) ओझें मस्तकावर मीं कशाला वागविलें असतें ? ३. ह्या संसारबाजारांतील अनेक प्रकारच्या दुकानांकडे (अनेक योनींमध्यें) कशाला हेलपाटे घातले असते, आणि मोठ्या श्रमानें धनाची प्राप्ति करून कां घेतली असती ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, मला जर हा उपाय समजला असता, तर मी अनेक गर्भवास कशाला भोगले असते आणि बायकापोरांची व्यर्थ सेवा कां केली असती ? ५. [२४७४]

आतां माझ्या मनानें हे उपाय मला समजून आले, हें फार उत्तम झालें १. सर्व संसार खोटा आहे म्हणून देवा, मला तुमच्या पायांजवळ आश्रय द्या २. ज्या वेळीं संचिताप्रमाणें दुःख भोगावें लागेल, त्या वेळीं डोळे उघडले असतां सर्व समजून येईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, जीवाची संसारांत फजिती झाल्यावरच हें कळलें (मला शहाणपण आलें) (ह्याचा संबंध ध्रुवपदाशीं आहे) ४. [२४७५]

जे धर्म मीं प्रतिपादन केले ते स्वतःच्या अनुभवाचे आहेत आणि पांडुरंगानें मला कांहीं कमी केलें काय ? १. नामसंकीर्तनानें अष्टमहासिद्धि मला शरण येऊन माझें दास्यत्व करितात पण त्यांच्या प्राप्तीची मला इच्छा नाहीं २. संतांच्या संगतीनें राहून नामाचे अलंकार आम्ही आपल्या वाचेस घालूं आणि त्याच निर्मळ बीजाची पेरणी करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, रामकृष्ण हीं नामें फार गोड आहेत, म्हणून कौतुकानें त्यांचीच माळ ओंवून आम्ही आपल्या कंठांत प्रीतीनें घालूं ४. [२४७६]

जें चित्त भोंवतालीं फांकलें होतें, तें योग्य कृति करून आपल्या पायांपाशीं आलें आहे १. हे पांडुरंगा, ह्या ठिकाणीं (तुझ्या पुढें) खोटी हकीकत सांगणें चालणार नाहीं, कारण तूं सर्वांचें अंतःकरण जाणतोस २. सुखदुःखादि सर्व तुला अर्पण करण्याचा योग कधीं आणलाच नाहीं, अथवा, सुखदुःखादि सर्व तुला देऊन आम्हीं काळाला नाहींसें केलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आम्हांला देहाचा विसर पडला आहे, म्हणून आप-परभाव आमच्या ठिकाणीं नाहीं ४. [२४७७]

परिसाचे अंगें सोनें झाला विळा । वांकणें या (वाकणिया) कळा हीन नव्हे ॥ १ ॥ अंतरीं पालट घडलों कारण । मग समाधान तेंचि गोड ॥ २ ॥ पिकलीया सेंद पूर्वकर्मा नये । अव्हेरु तो काये घडे मग ॥ ३ ॥ तुका म्हणे आणा पंगतीं सुरण । पृथक ते गुण केले पाकें ॥ ४ ॥ [२४७८]

ज्याचे माथां जो जो भार । तोचि फार तयासी ॥ १ ॥ मागें पुढें अवघें रितें । कळों येतें अनुभवें ॥ २ ॥ परिसा अंगीं अमूप सोनें । पोटीं हीन धातूचें ॥ ३ ॥ आपुला तो करी धर्म । जाणे वर्म तुका तें ॥ ४ ॥ [२४७९]

पाहें तिकडे दिशा ओस । अवघी आस पायांपें ॥ १ ॥ मनींचें साच होईल कई । प्रेम देई भेटोनी ॥ २ ॥ सर्वांपरी पांगुळ असें । न कळे कैसें हें तुम्हां ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपावंता । तूं तों दाता दीनांचा ॥ ४ ॥ [२४८०]

चाळवणें काय । ऐसें अगे माझे माय ॥ १ ॥ धांव पाव लवलाहें । कंठीं प्राण वाट पाहे ॥ २ ॥ पसरूनि कर । तुज चालिलों समोर ॥ ३ ॥ देशील विसांवा । तुका म्हणे ऐशा हांवा ॥ ४ ॥ [२४८१]

आवडीच्या ऐसें झालें । मुखा आलें हरिनाम ॥ १ ॥ आतां घेऊं धणीवरी । मागें उरी नुरे तों ॥ २ ॥ सांठवण मना ऐसी । पुढें रासी अमुप ॥ ३ ॥ तुका म्हणे कारण झालें । विठ्ठल या तीं अक्षरीं ॥ ४ ॥ [२४८२]

त्यांचिया चरणा माझे दंडवत । ज्यांचें धनवित्त पांडुरंग ॥ १ ॥ तेथें माझा जीव पावला विसांवा । म्हणऊनि हांवा भरलासे ॥ २ ॥ चरणींचें रज लावीन कपाळा । जीं पदें राउळा सोई जाती ॥ ३ ॥ आणीक तीं भाग्यें येथें कुरवंडी । करूनियां सांडीं इंद्राऐसीं ॥ ४ ॥ वैष्णवांचे घरीं देवाची वसती ।

लोखंडाचा विळा परिसाच्या स्पर्शानें सोनें झाला. आतां तो जरी आकृतीनें वांकडा असला तरी तेवढ्यानें त्याला हीनत्व येत नाहीं १. अंतःकरण पालटणें हेंच कार्य आहे. मग जी समाधानस्थिति प्राप्त होते तीच उत्तम आहे २. पिकलेलें शेंदाड (शेंद नांवाचें फळ) आपल्या पूर्वींच्या कडुपणास येत नाहीं. अशा ह्या पक्वदशेस आलेल्या शेंदाडाचा कोणी त्याग करील काय ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, सुरण हा जरी खाजरा आहे, तरी तो शिजविल्यावर त्याचा पूर्वींचा दोष जाऊन गुण उत्पन्न होतो, म्हणून तो पंक्तीस वाढण्याकरितां आणावा (जेवणारे तो आवडीनें खातात) ४. [२४७८]

ज्याच्या मस्तकावर (विद्वत्ता, सत्ता, संपत्ति ह्या कारणांनीं) जें ओझें आहे तेंच त्याला अधिक आहे (तो जगांत मोठेपणाला चढतो) १. मागेंपुढें सर्व ओस आहे हें अनुभवानें समजून येतें २. परिसाचे ठिकाणीं असंख्य सोनें आहे. अन्य धातूंचे आंत हीनत्व आहे, अथवा, ज्या धातु पोटीं हीन त्यांचें परिसाच्या योगानें अमूप सोनें होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे जे पदार्थ आहेत ते आपापले धर्म करितात हा प्रकार मी जाणतों ४. [२४७९]

हे देवा, मी जिकडे पाहातों तिकडे दिशा ओस दिसत आहेत. माझी सर्व आशा तुझ्या पायांच्या ठिकाणीं आहे १. माझ्या मनांतील भावना कधीं खरी होईल असें मला झालें आहे. ह्याकरितां देवा, मला तूं भेट देऊन आपल्या विषयींचें प्रेम दे २. मी सर्वतोपरि ज्ञानहीन, पंगु आहें, हें तुला कसें समजत नाहीं ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे कृपावंता देवा, तूं तर दीन जीवांना इच्छित दान देणारा दाता आहेस ४. [२४८०]

हे माझे आई पांडुरंगे, अशी फसवाफसवी काय बरें ही ? १. तूं त्वरेनें धांवत ये [असें द्विवार सांगतात], कारण तुझ्या वियोगदुःखानें मी कंठीं प्राण ठेवून तुझी वाट पाहात आहें २. हात पसरून मी तुझ्यासमोर येत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तूं मला विश्रांति (आश्रय) देशील अशी मला आशा आहे ४. [२४८१]

वाचेनें हरिनामाचा उच्चार घडला ही आवडीप्रमाणें गोष्ट घडली १. आतां पश्चात् त्याची इच्छा राहाणार नाहीं इतकें त्याचें पोटभर सेवन करूं २. हें सांठविण्यास मन हेंच मोठें पात्र आहे व पुढेंहि परमार्थमालाची असंख्य रास आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, 'विठ्ठल' ह्या तीन अक्षरांनीं माझीं सर्व कार्यें झालीं ४. [२४८२]

ज्यांचें धन, ऐश्वर्य सर्व कांहीं पांडुरंगच आहे, त्यांच्या पायांस मी दंडवत करतों (साष्टांग नमस्कार घालतों) १. त्या ठिकाणीं माझा जीव विश्रांति पावला म्हणून त्याविषयीं हांवभरी झालों आहें २. ज्यांचे पाय श्रीहरीच्या दर्शनाकरितां त्याच्या मंदिराकडे जात आहेत, त्यांचे चरणरज मी आपल्या कपाळास लावीन ३. इंद्रादि देवांच्या ऐश्वर्यासारखीं भाग्यें मी ह्या ठिकाणावरून ओंवाळून टाकीन ४. वैष्णव जनांच्या घरीं देवाची वस्ती आहे,

विश्वास हा चित्तीं सर्वभावें ॥ ५ ॥ तुका म्हणे सखे हरिचे ते दास। आतां पुढें आस नाहीं दुजी ॥ ६ ॥ [२४८३]

उपजोनि मरें। परि हेंचि वाटे बरें ॥ १ ॥ नाहीं आवडीसी पार। न म्हणावें झालें फार ॥ २ ॥ अमृताची खाणी। उघडली नव्हे धणी ॥ ३ ॥ तुका म्हणे पचे। विठ्ठल हें मुखा रुचे ॥ ४ ॥ [२४८४]

लटिकें तें साच दाविलें अचळ। पीडितसे काळ किती म्हूण ॥ १ ॥ सत्य तूं सत्य तूं सत्य तूं विठ्ठला। कां गा हा दाविला जगदाकार ॥ २ ॥ सांभाळीं सांभाळीं आपुली हे माया। आम्हांसी कां भयाभीत केलें ॥ ३ ॥ रूप नाहीं त्यासी ठेवियेलें नाम। लटकाची भ्रम वाढविला ॥ ४ ॥ तुका म्हणे कां गा झालासी चतुर। हातासी निसुर निर्विकार ॥ ५ ॥ [२४८५]

आमच्या कपाळें तुज ऐसी बुद्धि। धरावी ते शुद्धी योगा न ये ॥ १ ॥ काय या राहिलें विनोदावांचून। आपुलिया भिन्न केलें आम्हां ॥ २ ॥ कोठें मूर्तिमंत दावीं पुण्यपाप। काशासी संकल्प वाहाविसी ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां आवरावा चेडा। लटिकी ते (लटिकीच) पीडा पांडुरंगा ॥ ४ ॥ [२४८६]

न बोलावें ऐसें जनासी उत्तर। करितों विचार बहु वेळां ॥ १ ॥ कोण पाप आड ठाकतें येऊन। पालटीत गुण अंतरींचा ॥ २ ॥ संसारा हातीं सोडवला गळा। कां हे अवकळा येती पुढें ॥ ३ ॥ तुका म्हणे सेवे घडे अंतराय। यास करूं काय पांडुरंगा ॥ ४ ॥ [२४८७]

आतां हें उचित माझी जना हातीं। पाहिजे फजिती केली कांहीं ॥ १ ॥ मग मी तुमचे न सोडीं चरण। त्रासोनियां मन येईल ठाया ॥ २ ॥ वाउगे वाणीचा न धरीं कांटाळा। ऐशी कां चांडाळा

ह्याविषयींची माझ्या चित्तामध्यें अनन्य श्रद्धा आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, हरीचे दास माझे परमप्रिय मित्र आहेत. त्यांचा मी दास व्हावें. आतां ह्यापुढें दुसरी आशा नाहीं ६. [२४८३]

ह्या हरिनामासाठीं वारंवार जन्मून मेलों तरी परमार्थ करणें हेंच मला बरें वाटतें १. त्याविषयींची अपार आवड आहे, त्याचा किती जरी उपभोग घेतला तरी तो पुष्कळ झाला असें म्हणवत नाहीं २. श्रीहरीचें नाम अमृताची खाणच उघडली आहे, म्हणून त्याच्या सेवनानें तृप्ति होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, विठ्ठलनामाचें सेवन हें पचतें व वाणीलाहि रुचतें ४. [२४८४]

जें जग खोटें आहे तें खरें भासवून काळ हा सर्व प्राणिमात्रांना किती म्हणून पीडा करीत आहे? १. हे विठ्ठला, तूं सत्य आहेस (असें त्रिवार सांगतों). असें असून अगा, हा खोटा जगदाभास कां दाखविला? २. देवा, आपल्या ह्या मायेस तुम्हीं आंवरून धरा (असें द्विवार सांगतों.) ह्या मायेच्या योगानें आम्हांला तुम्ही भयभीत कां केलेंत? ३. निराकार स्वरूपास साकार हें नाम ठेवून खोटाच भ्रम तुम्हीं कां वाढविलात? ४. तुकाराम महाराज म्हणतात, अगा देवा, तूं पूर्वी निर्दय निर्विकार असा होतास, असें असून जगद्विलासाचें चातुर्य कां दाखविलेंस? ५. [२४८५]

देवा, आमच्या प्रारब्धानें तूं आमचा अंगीकार करूं नये, अशी बुद्धि तुला उत्पन्न झाली आहे. ती पुनः आमचें प्रारब्ध बदलूं देत नाहीं १. देवा, तुम्ही आपल्यापासून आम्हांला वेगळें ठेवलेंत; पण असा विनोद करण्यावांचून तुमचें काय खोळंबलें होतें? २. हे देवा, मूर्तिमंत पापपुण्य कोठें आहे तें मला दाखवा. ह्या पापपुण्यांचा संकल्प आमचेकडून कशाकरितां करवितां? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, आतां आपलें हें चेटूक आंवरा, कारण ही पीडा संपूर्ण खोटी आहे ४. [२४८६]

सामान्य जनाशीं कांहीं संभाषण करूं नये असा मी पुष्कळ वेळां निश्चय करतों १. पण कोणतें पाप आड येऊन त्या योगानें हा अंतःकरणांतील निश्चय बदलला जातो हें कळत नाहीं २. संसाराच्या तडाख्यांतून मी मुक्त झालों असतांहि माझी पुढें फटफजीती कां होते? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, तुमच्या सेवेकडे मी प्रवृत्त झालों असतांना त्यांत अडथळा येतो त्याला मी काय करूं? ४. [२४८७]

देवा, आतां लोकांकडून माझी फजिती व्हावी, असें कांहीं कृत्य करा १. मग मी तुमचें चरणारविंद कधीं सोडणार नाहीं, कारण सर्व ठिकाणीं त्रासून माझें मन तुमच्या चरणांच्या ठिकाणीं येईल २. वायफळ बडबडीचा कंटाळा येत नाहीं

बुद्धि मज ॥ ३ ॥ तुका म्हणे जरि माथां बैसे घाव। तरि मग वाव नेघे पुढें ॥ ४ ॥ [२४८८]

मायेवरी सत्ता आवडीची बाळा। संकोचोनि ळळा प्रतिपाळी ॥ १ ॥ अपराध माझे न मानावे मनीं। तुम्ही संतजनीं मायबापीं ॥ २ ॥ आरुषवचनें लेंकुराची आळी। साहोनि कवळीं मागुताली ॥ ३ ॥ तुका म्हणे अंगीं काय नाहीं सत्ता। परि निष्ठुरता उपजेना ॥ ४ ॥ [२४८९]

कैसा हो तो (होतो) कृपावंत। बहु संत सांगती ॥ १ ॥ पुसणें नाहीं याती कूळ। लागों वेळ नेदावी ॥ २ ॥ ऐसीं काय जाणों किती। उतरती उतरलीं ॥ ३ ॥ दावी वैकुंठींच्या वाटा। पाहतां मोठा संपन्न ॥ ४ ॥ अभिमान तो नाहीं अंगीं। भक्तालागीं न बैसे ॥ ५ ॥ आलें घ्यावें भलत्या काळें। विठ्ठल बळें आगळा ॥ ६ ॥ तुका म्हणे आळस निद्रा। नाहीं थारा ते ठायीं ॥ ७ ॥ [२४९०]

सदैव हे वारकरी। जे पंढरी देखती ॥ १ ॥ पदोपदीं विठ्ठल वाचा। त्यांसी कैंचा संसार ॥ २ ॥ दोष पळाले पळाले। पैल आले हरिदास ॥ ३ ॥ प्रेमभातें भरलें अंगीं। निर्लज्ज रंगीं नाचती ॥ ४ ॥ गोपीचंदनाची उटी। तुळसी कंठीं मिरवती ॥ ५ ॥ दुर्बळा या शक्तिहीना। त्याही जना पुरता ॥ ६ ॥ तुका म्हणे देव चित्तीं। मोक्ष हातीं रोकडा ॥ ७ ॥ [२४९१]

ऐसीं ठावीं वर्मे। तरी सांडवलों भ्रमें ॥ १ ॥ सुखें नाचतों कीर्तनीं। नाहीं आशंकित मनीं ॥ २ ॥ ऐसें आलें हाता। बळ तरी गेली चिंता ॥ ३ ॥ सुख येथें झालें तरी। नाहीं आणिकांची उरी ॥ ४ ॥ ऐसें केलें देवें। पुढें कांहींचि न व्हावें ॥ ५ ॥ तुका म्हणे मन। आतां झालें समाधान ॥ ६ ॥ [२४९२]

अशी माझी चांडाळाची बुद्धि कशी? ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर माझ्या मस्तकावर दुःखाचे घांव बसतील, तर तें मन तुला सोडून इतर ठिकाणीं (लोकांना निष्कारण बोलण्याकडे) धांव घेणार नाहीं ४. [२४८८]

बाळाची आईवर प्रीतीमुळें सत्ता आहे. ती कांहीं मनांत संकोच धरून त्याचे लाड पुरविते काय? १. अहो संतजन मायबाप, त्याप्रमाणें माझे अपराध तुम्ही मनावर घेऊं नयेत २. बोबड्या शब्दानें बालकानें केलेले लाड सहन करून आई त्याला वेळोवेळीं मिठी मारते ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या बालकाला शासन करण्याची तिच्या अंगीं सत्ता नाहीं काय? पण तिच्या ठिकाणीं लेंकराविषयीं निर्दयता उत्पन्न होतच नाहीं ४. [२४८९]

देव फार कृपावंत आहे (होतो) असें संत सांगतात, तो कसा आहे हो? १. कोणाची जात, कुळ विचारीत नाहीं, व त्याला उद्धरण्यासहि कांहीं वेळ लावीत नाहीं २. असे अनेक जातींचे लोक संसारसमुद्रांतून तरले व पुढेंहि तरतील; त्यांची गणती मीं काय जाणावी? ३. देव त्यांना वैकुंठाच्या वाटा दाखवितो. तो देव पाहिला असतां मोठा संपन्न आहे ४. त्याचे ठिकाणीं कोणत्याहि प्रकारचा अभिमान नाहीं. तो भक्ताकरितां जो विटेवर उभा आहे तो खालीं बसत नाहीं ५. भलत्या वेळेला भलत्या जातीचे लोक जरी आले तरी त्यांचा तो अंगीकार करतो आणि हा विठ्ठल सर्व बलवानांत श्रेष्ठ आहे ६. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच्या ठिकाणीं झोंप व आळस ह्यांचा रिघाव नाहीं ७. [२४९०]

जे वारकरी पंढरी पाहातील ते मोठे भाग्यवान् आहेत १. पंढरीच्या वारीस पावलोंपावलीं विठ्ठलाचें नाम वाचेनें घेणारांस संसार कशाचा आहे? २. असे हरीचे दास संसारसमुद्राच्या पैलथडीस आले आहेत. त्यांचे सर्व दोष पळून गेले (असें द्विवार सांगतो) ३. त्यांचे अंगामध्यें प्रेमाचें भातुकें (भरतें) भरलें आहे, अथवा, बाण टेवण्याचे भाते भरले आहेत आणि ते लाज टाकून हरीच्या रंगामध्यें नाचतात ४. त्यांनीं गळ्यांमध्यें तुळसीच्या माळा घालून अंगास गोपीचंदनाची उटी लावल्यामुळें ते शोभतात ५. वारकऱ्यांकरितांच नव्हे, तर जे कोणी दुर्बळ आहेत, त्या सर्व जनांकरितांहि हा देव विटेवर उभा आहे ६. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांच्या चित्तामध्यें देवाची वस्ती आहे, त्याच्या हस्तगत मोक्ष नगद (रोकडा) आहे ७. [२४९१]

अशा प्रकारचीं मर्मे मला समजलीं (असें देवाचें गुह्य ज्ञान मला समजलें) म्हणून मी प्रपंचाच्या भ्रमांतून मोकळा झालों १. आतां हरिकीर्तनाच्या ठिकाणीं मी आनंदानें नृत्य करीत आहें. माझ्या मनामध्यें कोणत्याहि प्रकारचा संशय राहिला नाहीं २. अशा प्रकारचें बळ माझ्या हस्तगत झालें, म्हणून माझी सर्व काळजी दूर झाली ३. ह्या ठिकाणीं मला सुख झालें आहे, म्हणून इतर कांहीं बाकी राहिली नाहीं ४. आतां पुढें कांहीं प्राप्त व्हावें अशी इच्छा राहिली नाहीं. हीच स्थिति मला देवानें दिली आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, (अशी स्थिति मला प्राप्त झाल्यामुळें माझ्या मनाचें समाधान झालें आहे) आतां माझें मन आनंदरूप झालें आहे ६. [२४९२]

चित्तीं बैसलें चिंतन । नारायण नारायण ॥ १ ॥ न लगे गोड कांहीं आतां । आणीक दुसरें सर्वथा ॥ २ ॥ हरपला द्वैतभाव । तेणें देह जाला वाव ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे आम्ही । जालों निष्काम ये कामीं ॥ ४ ॥ [२४९३]

व्यापिलें सर्वत्र । बाहेरी भीतरी अंतर ॥ १ ॥ ऐसें गोविंदें गोविलें । बोलें न वजाये बोलिलें ॥ २ ॥ संचिताची होळी । करूनि जीव घेतला बळी ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे नाहीं । आतां संसारा उरी कांहीं ॥ ४ ॥ [२४९४]

आम्हांपाशीं सरे एक शुद्ध भाव । चतुराई जाणीव न लगे कळा ॥ १ ॥ सर्वजाण (सर्व जाणे) माझा स्वामी पांडुरंग । तया अंगसंग गोपाळासी ॥ २ ॥ तुका म्हणे कर्में धर्में न ये हाता । तयावरी सत्ता भाविकांची ॥ ३ ॥ [२४९५]

प्रीती करी सत्ता । बाळा भीती मातापिता ॥ १ ॥ काय चाले त्याशीं बळ । आळी करितां कोल्हाळ ॥ २ ॥ पदरीं घाली मिठी । खेदी मागें पुढें लोटी ॥ ३ ॥ बोलें मना आलें । तुका साहिलें विठ्ठलें ॥ ४ ॥ [२४९६]

आवडीचे भेटीं निवे । चित्त पावे विश्रांती ॥ १ ॥ बरवियाचा छंद मना । नारायणा अवीट ॥ २ ॥ तुळणें कांहीं साम्या पुरे । हें तों नुरे ये रुचि ॥ ३ ॥ तुका म्हणे बरवें झालें । पावलें हें कळे त्या ॥ ४ ॥ [२४९७]

केलियाचें दान । करा आपुलें जतन ॥ १ ॥ माझी बुद्धि स्थिर देवा । नाहीं विषयांचा हेवा ॥ २ ॥ भावा अंतराय । अंतीं अंतरती पाय ॥ ३ ॥ तुका म्हणे जोडी । आदी अंतीं राहो गोडी ॥ ४ ॥ [२४९८]

नारायणनामाचें चिंतन सर्व काल माझ्या चित्तांत बसलें आहे १. आतां त्यावांचून मला दुसरें कांहीं गोड लागत नाहीं, हें मी निश्चयानें सांगतों २. माझ्या ठिकाणीं असणारा भेदभाव नाहींसा झाला, त्या योगानें माझा देह मला तुच्छ झाला आहे ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, ह्या सर्व विषयकामाचे ठिकाणीं (संसार करण्याचे विषयीं) आम्ही निष्काम झालों आहोंत ४. [२४९३]

हा देव सर्व जगांत व्यापक असल्यामुळें, तो माझे अंतर्बाह्य भरला आहे १. अशा प्रकारें गोविंदानें आपल्या स्वरूपांत मला गुंतविलें आहे. तें वाचेनें सांगतां येत नाहीं २. माझें संचितकर्म जाळून, त्यानें माझा जीवभाव नाहींसा केला ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, आतां संसारांत कांहीं शिल्लक राहिली नाहीं ४. [२४९४]

माझा स्वामी पांडुरंग म्हणतो, आम्हांला एक शुद्ध भावच मान्य होतो, त्यावांचून ज्ञानचातुर्याची आम्हांला गरज नाहीं १. माझा स्वामी पांडुरंग हा सर्व-जाणता आहे व इंद्रियांचें रक्षण करणारा आहे. त्याची मला संगति आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, जो यज्ञयागादि सकाम कर्मानें अथवा वैदिक सकाम धर्मानें हस्तगत होणारा नव्हे, त्या देवावर एकनिष्ठ भाविक सत्ता करितात ३. [२४९५]

जें बालक आवडीनें आईबापांवर सत्ता करीत असतें, त्याला तीं भितात १. तें हट्ट घेऊन रडावयास लागलें म्हणजे त्याच्या पुढें आईबापांचें कांहीं चालत नाहीं २. तें बाळ आई-बापांच्या पदराला धरून, लहरीप्रमाणें जर मागें रेटूं लागलें व पुढें ओढूं लागलें, तर त्यांना त्याप्रमाणें वागावें लागतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसें माझ्या मनाला वाटलें तसा मी बोललों, तें विठ्ठलांनीं सहन केलें ४. [२४९६]

ज्याची आवड आहे त्याची भेट झाली असतां, चित्त आनंदित होऊन विश्रांति पावतें १. हे नारायणा, जें कांहीं चांगलें आहे त्याचा छंद जर मनाला लागला, तर त्याचा वीट येणार नाहीं २. अशी समता झाल्यावर त्याला उपमा देण्याला काय पुरणार आहे? म्हणजे त्या गोडीसारखें दुसरें कांहींच नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याला नारायणाचें महत्त्व कळलें त्यालाच हें प्राप्त झालें, ही गोष्ट फार चांगली झाली ४. [२४९७]

देवा, तुम्हीं मला जें प्रेमाचें दान दिलें आहे त्याचें तुम्हीच रक्षण करा १. हे देवा, माझ्या बुद्धीच्या ठिकाणीं कांहीं विषयाची हांव राहिली नाहीं, म्हणून ती स्थिर झाली आहे (किंवा, माझी बुद्धि स्थिर नाहीं, तिला विषयांचा हव्यास आहे) २. असा जो भाव माझ्या ठिकाणीं आहे त्याला जर अंतर पडलें (विषयांच्या हव्यासानें तुझ्या प्रेमांत जर अडथळा आला) तर अखेरीस तुमचे पाय मला दुरावतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, जी मला प्राप्ति झाली आहे, तिची गोडी अव्वल अखेर सारखी राहावी (अशी माझी विनंति आहे) ४. [२४९८]

माझे हातीं आहे करावें चिंतन। तुम्हीं कृपादान प्रेम द्यावें ॥१॥ मागतियां भांडवल आळवण। नामाचें जतन दातियासी ॥ २ ॥ बाळक धांवोनि आड रिघे स्तनीं। घालावा जननी कृपे पान्हा (प्रेम पान्हा) ॥ ३ ॥ (तैशापरी पुढें तुझिया मी आशे। धांवोनि वोरसे देईं भेटी ॥ ४ ॥) तुका म्हणे करीं कांसवीचे परी। आहे सूत्रदोरी तुझे हातीं ॥ ४ ॥ (॥ ५ ॥) [२४९९]

वाट दावी त्याचें गेलें काय। नागवला जो वारितां जाय ॥ १ ॥ ऐसीं मागें टकलीं किती। सांगतां खाती विषगोळा ॥ २ ॥ विचारोनि पाहे त्यास। न वजे जीवें नव्हे नास ॥ ३ ॥ तुका म्हणे जो रुसला जीवा। तयासी केशवा काय चाले ॥ ४ ॥ [२५००]

अनुभवावांचून सोंग संपादणें। नव्हे हें करणें स्वहिताचें ॥ १ ॥ तैसा नको भुलों बाहिरल्या रंगें। स्वहित तेंचि वेगें करूनि घेईं ॥ २ ॥ बहुरूपी रूपें नटला नारायण। सोंग संपादून जैसा तैसा ॥ ३ ॥ कनक झाड म्हूण वंदियेलें माथां। परि तेंही अर्था न मिळे माजी ॥ ४ ॥ पाषाणाचें नांव ठेवियेलें देव। आणिकां तारी भाव परि तो तैसा ॥ ५ ॥ तुका म्हणे त्याचा भाव तारी त्यास। अहंभावीं नास तोचि पावे ॥ ६ ॥ [२५०१]

मज नष्टा माया मोह नाहीं लोभ। अधिक तो क्षोभ आदराचा ॥ १ ॥ धिग हें शरीर अनउपकार। न मानी आभार उपकाराचा ॥ २ ॥ मजहून नष्ट आहे ऐसा कोण। नावडे मिष्टान्न बहु बोल (बहुमोल) ॥ ३ ॥ न दिसती मज आपलेसे गुण। संचित तें कोण जाणे मागें ॥ ४ ॥ तुका म्हणे माझें देखोनियां काई। पांडुरंगें पायीं राखियेलें ॥ ५ ॥ [२५०२]

देवा, तुमचें चिंतन करावें हें माझ्या स्वाधीन आहे, (तें मी करीत आहें,) पण त्याविषयींच्या प्रेमाचें दान तुम्हीं कृपा करून मला द्यावें १. जो कोणी याचक आहे त्यानें करुणा भाकावी, हेंच त्याचें भांडवल आहे; आणि दात्यानें आपल्या नांवाचें रक्षण केलें पाहिजे २. बालकानें धांवत जाऊन आईच्या मांडीवर बसून, आडवें होऊन तिचें स्तनपान करावें हें त्याचें काम आहे आणि कृपेनें पान्हा सोडावा हें आईचें कर्तव्य आहे ३. (त्याप्रमाणें मी तुझ्यापुढें धांवून येत आहें तेव्हां मला भेट व प्रेमपान्हा पाज) ४. तुकाराम महाराज म्हणतात, जशी कांसवी कृपादृष्टीनेंच आपल्या पिलांचें रक्षण करते त्याप्रमाणें तूं माझें रक्षण कर, कारण सर्वांच्या रक्षणाचें काम तुझ्या हातीं आहे ४. (५.) [२४९९]

जो चांगला मार्ग दाखवितो त्याचा कांहीं खर्च होतो काय? पण वाईट मार्गानें जाऊं नको म्हणून सांगितलें असतां, जो तें न ऐकतां जातो तो फसतो १. असे कित्येक मूढ लोक पूर्वी फसले; त्यांना विष सेवन करूं नको म्हणून सांगितलें असतां ते तें आग्रहानें सेवन करितात २. जो वाईट मार्गानें जात नाहीं त्याच्या जीवाचा नाश कधींहि होत नाहीं. त्याविषयींचा तूं विचार करून पाहा ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे केशवा, जो आपला जीव देण्यास तयार आहे, त्या मूर्खापुढें कोणाचें काय चालणार आहे? ४. [२५००]

जसा परमार्थाचा वेष घ्यावा तसा अनुभव पाहिजे. नाहींपेक्षां त्या सोंगाची संपादणी केली असतां तें करणें त्याच्या हिताचें होत नाहीं १. तसा तूं बाह्यात्कारी वेषाला–रंगाला भुलूं नको, आपलें खरें हित लवकर करून घे २. बहुरूपी हा देवाचें सोंग घेतो आणि त्याप्रमाणें संपादणी देखील करतो, पण तो तद्रूप न होतां मूळचा जसा होता तसा असतो ३. (कनक=) धोत्र्याचें झाड हें सोन्याचें म्हणून जरी मस्तकीं वंदन केलें तरी तें सत्य सुवर्णत्वाला (कनक=सोनें) येत नाहीं ४. जर दगडाच्या ठिकाणीं भावार्थानें देवाची कल्पना केली, तर ते भाविक लोक तरून जातील, पण तो दगड जशाचा तसाच राहतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचा शुद्ध भाव आहे तो त्याला तारील, पण अहंकारानें वागणारे नाश पावतील ६. [२५०१]

माझ्या ठिकाणीं माया नाहीं व कोणाचा लोभ नाहीं म्हणून कोणी प्रीति केली असतां त्याचा मला जास्त राग येतो, असा मी नष्ट आहें १. दुसऱ्यांनीं मजवर उपकार केले असतां ते मी मानीत नाहीं, असें माझें शरीर अनुपकारी आहे म्हणून त्याला धिक्कार असो २. मला कोणीं चांगल्या पक्वान्नाचें जेवण घालून माझें फार स्तवन केलें तर तें मला आवडत नाहीं, म्हणून माझ्यासारखा नष्ट कोणी आहे काय? ३. माझ्या ठिकाणीं कांहीं गुण मला दिसत नाहीं आणि पूर्वसंचित काय आहे तें तरी कोणास समजतें काय? ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या ठिकाणीं कोणतें पुण्य पाहून पांडुरंगांनीं आपल्या पायाजवळ माझें रक्षण केलें हें मला समजत नाहीं ५. [२५०२]

मतीविण काय वर्णूं तुझें ध्यान। जेथें पडिलें मौन वेदश्रुती ॥ १ ॥ करूनि गोजिरा आपुलिये मति। धरियेलें चित्तीं चरणकमळ ॥ २ ॥ सुखाचें ओतिलें पाहों तें श्रीमुख। तेणें हरे भूक तान माझी ॥ ३ ॥ रसना गोडावली ओव्या गातां गीत। पावलेंसे चित्त समाधान ॥ ४ ॥ तुका म्हणे माझी दृष्टि चरणांवरी। पाउलें गोजिरीं कूंकुमाचीं ॥ ५ ॥ [२५०३]

ओस झाल्या दिशा मज भिंगुळवाणें। जीवलग नेणे मज कोणी ॥ १ ॥ भय वाटे देखें श्वापदांचें भार। नव्हे मज धीर पांडुरंगा ॥ २ ॥ अंधकारापुढें (अंधकार पुढें) न चलवे वाट। लागतील खुंट कांटे अंगा ॥ ३ ॥ एकला निःसंग फांकती मारग। भितों नव्हे लाग चालावया ॥ ४ ॥ तुका म्हणे वाट दावूनि सद्गुरु। राहिला हा (राहिलासे) दुरू पांडुरंग ॥ ५ ॥ [२५०४]

जे केली आळी ते अवघी गेली वायां। उरला पंढरिराया श्रम माझा ॥ १ ॥ काय समाधान केलें कोणें वेळे। कोणें माझे लळे पाळियेले ॥ २ ॥ आभासही नाहीं स्वप्नीं दुश्चिता। प्रत्यक्ष बोलतां काय चिंता ॥ ३ ॥ आतां पुढें लाज वाटे पांडुरंगा। भक्त ऐसे जगामाजी झाले ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां नाहीं भरंवसा। मोकलीसी ऐसा वाटतोसी ॥ ५ ॥ [२५०५]

वाघाचा कलभूत दिसे वाघा ऐसा। परी नाहीं दशा साच अंगीं ॥ १ ॥ बाहेरील रंग निवडी कसोटी। संघट्टणें (संघष्टणें) भेटी आपेंआप ॥ २ ॥ शिकविलें तैसें नाचावें माकडें। न चले त्यापुढें युक्ति कांहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे करी लटिक्याचा सांठा। फजित तो खोटा शीघ्र होय ॥४॥ [२५०६]

हे देवा, बुद्धीवांचून तुझ्या स्वरूपाचें वर्णन मीं कसें करावें? कारण तें रूप वर्णन करतांना वेदश्रुति मुक्या झाल्या १. म्हणून आपल्या बुद्धिकल्पनेनें तसा तुला गोजिरवाणा करून तुझीं चरणकमलें म्यां (मीं) चित्तामध्यें धरलीं आहेत २. तुझें श्रीमुख सुखाचें ओतलेलें आहे. तें मी वारंवार पाहातों, त्यायोगानें माझी तहानभूक निवारण होत आहे ३. तुझ्या कीर्तीच्या ओंव्या गाण्यानें माझी जिव्हा सुखावली आहे आणि माझें चित्त समाधान पावलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, जीं पावलें कुंकुमवत् आरक्त असून विटेवर आहेत, तीं गोजीरवाणीं असल्यामुळें त्या चरणांवर माझी दृष्टि राहिली आहे ५. [२५०३]

हे देवा, ह्या संसाररूपी अरण्यांत तुजवांचून मला सर्व दिशा उजाड झाल्या आहेत, त्या मला भयंकर दिसतात आणि त्या ठिकाणीं मला कोणी सखा आहे असें दिसत नाहीं १. हे पांडुरंगा, अशा अरण्यामध्यें अनेक श्वापदांचा थाट (कामक्रोधरूपी पशूंचा समुदाय) पाहून मला भय वाटतें, ह्यामुळें मला धीर निघत नाहीं २. पुढे मोठा (अज्ञानरूपी) अंधार पडल्यामुळें मला वाट चालवत नाहीं व माझ्या अंगास कांटे व खुंट ओरबडतात ३. ह्या आडरानामध्यें अनेक (मत-मतांतराच्या) वाटा फुटल्या आहेत, तेथें मला कोणी सोबती नसून मी एकटा असल्यामुळें भय वाटून पुढें चालण्यास रिघाव होत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझा सद्गुरु पांडुरंग ह्यानें मला पहिल्यानें (जीव-ब्रह्मैक्याची व नामभक्तीची) वाट दाखविली, पण आतां तो दूर राहिला आहे ५. [२५०४]

अहो पंढरीच्या राजा, मीं जो कांहीं तुमच्याजवळ हट्ट केला तो सर्व व्यर्थ गेल्यामुळें माझ्या ठिकाणीं श्रम मात्र उरले १. माझें समाधान तुम्हीं कोणत्या वेळेस काय केलें आणि म्यां जे लाड केले ते तुम्हीं कोणते पुरविले? २. स्वप्नांत देखील तुमचें दर्शन नाहीं, असा मी दुश्चित आहें म्हणून ही गोष्ट मला प्रत्यक्ष बोलण्यास काय हरकत आहे? ३. हे पांडुरंगा, मी तुझा दास आहें, असा डांगोरा ह्या जगांत झाला आहे आणि तुझी जर प्राप्ति होत नाहीं तर आतां मला लाज वाटते ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आतां मला तुझा भरंवसा येत नाहीं, कारण तूं माझा त्याग करशील असें मला वाटतें ५. [२५०५]

वाघाचें कातडें काढून त्यांत पेंढा भरून शिवलें असतां तें वाघासारखें दिसतें, पण खऱ्या जिवंत वाघाची स्थिति (वाघाचें शौर्य, क्रौर्य) त्याच्या अंगीं नसते १. मुलाम्याचें नाणें कसोटीला लावलें असतां त्याचा खरा रंग प्रगट होतो, त्याप्रमाणें एखाद्याची गांठ पडून त्याच्याशीं विशेष संघट्टन झाल्यानें त्याची खरी स्थिति आपोआप कळून येते २. जसें शिकवावें तसें माकड नाचतें, त्याखेरीज त्याच्यापुढें दुसरी कांहीं युक्ति चालत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांनीं खोट्याचा संग्रह केला आहे अशा त्या लबाडांची त्वरित फजीती होते ४. [२५०६]

सिंदळीचे सोइरे चोराचीया दया। तोही जाणा तया सं(व)सर्गी ॥ १ ॥ फुकासाठीं भोगी दुःखाचा तो वांटा। उभारोनि कांटा वाटेवरी ॥ ४ ॥ सर्प पोसूनियां दुधाचाही नाश। केलें थीता विष अमृताचें ॥ ३ ॥ तुका म्हणे त्यासी न करितां दंडण। पुढिल्या खंडण नव्हे दोषा ॥ ४ ॥ [२५०७]

तेणें सुखें माझें निवालें हें अंग। विठ्ठल हें जग देखियेलें ॥ १ ॥ कवतुकें करुणा भाकितसें लाडें। आवडी बोबडें बोलोनियां ॥ २ ॥ मज नाहीं दशा अंतरीं दुःखाची। भावना भेदाची समूळ गेली ॥ ३ ॥ तुका म्हणे सुख झालें माझ्या जीवा। रंगलों केशवा तुझ्या रंगें ॥ ४ ॥ [२५०८]

विठ्ठल सोयरा सज्जन विसांवा। जाईन त्याच्या गांवा भेटावया ॥ १ ॥ सीण भाग त्यासी सांगेन आपुला। तो माझा बापुला सर्व जाणे ॥ २ ॥ माय माउलिया बंधुवर्गा जाणा। भाकीन करुणा सकाळिकांसी ॥ ३ ॥ संत महंत सिद्ध महानुभाव मुनि। जीवभाव जाऊनि सांगेन त्यां ॥ ४ ॥ माझिये माहेरीं सुखा काय उणें। न लगे येणें जाणें तुका म्हणे ॥ ५ ॥ [२५०९]

ध्याइन तुझें रूप गाइन तुझें नाम। आन न करीं काम जिव्हा मुखें ॥ १ ॥ पाहिन तुझे पाय ठेविन मी डोयी। पृथक तें कांहीं न करीं आन ॥ २ ॥ तुझेचि गुणवाद आइकेन कानीं। आणिकांची वाणी पुरे आतां ॥ ३ ॥ करिन सेवा करें चालेन पायीं। आणीक न वजें ठायीं तुजविण ॥ ४ ॥ तुका म्हणे जीव ठेवीन मी पायीं। आणिक तें काई (कांहीं) देऊं कोणा कवणा ॥ ५ ॥ [२५१०]

देवाचें भजन कां रे न करीसी तैसें। अखंड हव्यासीं (सें) पीडीतोसी ॥ १ ॥ देवासी शरण कां रे न वजसी तैसा। बक मीना जैसा मनुष्यालागीं ॥ २ ॥ देवाचा विश्वास कां रे नाहीं तैसा।

जो कोणी शिंदळ रांडेचा आप्त आहे आणि ज्याच्या ठिकाणीं चोराविषयीं दया आहे हे दोघेहि त्यांचेच सोबती आहेत असें समजावें १. चांगल्या वाटेवर कांटे पसरणारा तो जसा पातकी होतो, तसे ते वर सांगितलेले लोक दुःखाच्या वांट्याचे भोग व्यर्थ भोगतात २. जर दूध पाजून सर्पाचें पालन केलें तर त्या चांगल्या अमृतमय दुधाचा नाश होऊन त्याचें विष होतें ३. तुकारामं महाराज म्हणतात, त्या दुष्ट लोकांना शिक्षा केल्याशिवाय पुढें होणाऱ्या त्यांच्या पापाचा नाश होणार नाहीं ४. [२५०७]

हें सर्व अंग मीं विठ्ठलरूप आहे असें पाहिलें. त्या साम्यसुखानें माझें सर्व अंग शीतळ झालें १. आतां मी प्रीतीच्या लाडानें व बोबड्या शब्दानें त्या देवाची करुणा भाकीत आहें; त्याचेंच मला कौतुक वाटतें २. माझ्या ठिकाणची भेदात्मक भावना सर्व नाहींशी झाली, त्या योगानें दुःखाची अवस्था अंतःकरणांत राहिली नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे केशवा, तुझ्या रंगानें मी रंगलों आहें म्हणून माझ्या जीवाला फार सुख झालें आहे ४. [२५०८]

विठ्ठल हा उत्तम असून माझा संबंधी आहे, म्हणून तो माझें विश्रांतिस्थान आहे. त्यास भेटण्याकरितां मी त्याच्या गांवाला जाईन १. माझे सर्व श्रम व दुःख त्याला मी सांगेन, कारण तो माझा बाप सर्व जाणता आहे २. त्या ठिकाणीं माझी आई व बंधु आदिकरून सर्व आहेत, त्यांना मी कींवकाकुळतीस येईन ३. संतमहंत, सिद्ध, ब्रह्मानुभवी आणि मुनि हे सर्व त्या ठिकाणीं आहेत, म्हणून मी तेथें जाऊन आपला जीवभाव त्यांस निवेदन करीन ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशा माझ्या माहेराच्या ठिकाणीं सुख कांहीं कमी आहे काय? म्हणून तेथें गेलें असतां जन्ममृत्यूच्या येरझारांचें खंडण होईल ५. [२५०९]

हे देवा, तुझ्या रूपाचें ध्यान करून मी तुझें नाम गाईन. त्यावांचून जिव्हेनें व मनानें दुसरें काम करणार नाहीं १. तुझे पाय डोळ्यांनीं पाहून तेथें मी आपलें मस्तक ठेवीन. त्यावांचून दुसरें कांहीं कर्तव्य करणार नाहीं २. तुझे गुणानुवाद मी कानांनीं ऐकेन, त्यावांचून आतां अन्य वाणी ऐकण्याचें पुरे ३. मी आपल्या पायांनीं चालत तुझ्याकडे येऊन हातांनीं तुझी सेवा करीन आणि तुला सोडून दुसरीकडे कोठेंहि मी जाणार नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, मीं आपला जीव तुझ्या चरणीं अर्पण केला आहे. आतां दुसरे कोणास काय देऊं? ५. [२५१०]

अरे, तूं सर्व काळ अनेक हव्यासांनीं प्रापंचिक खटपट करून जसा दुःखी होतोस त्या ऐवजीं सर्व काळ देवाचें भजन कां करीत नाहींस? १. जसा माशाकरितां बगळा ध्यान धरून बसतो तसा तूं मनुष्याच्या ठिकाणीं लोभानें नम्र होतोस व लीन होतोस, त्याप्रमाणें तूं देवाला शरण कां जात नाहींस? २. अरे, तूं पुत्राच्या स्नेहामध्यें जसा

पुत्रस्नेहें जैसा गुंतलासी ॥ ३ ॥ कां रे नाहीं तैसी देवाची ते गोडी । नागवूनि सोडी पत्नी जैसी ॥ ४ ॥ कां रे नाहीं तैसे देवाचे उपकार । माया मिथ्या भार पितृपूजन ॥ ५ ॥ कां रे भय वाहासी लोकांचा तूं धाक। विसरोनियां एक नारायण ॥ ६ ॥ तुका म्हणे कां रे घातलेंसे वायां। सर्व आयुष्य जाया भक्तिविण ॥ ७ ॥ [२५११]

माझें चित्त तुझे पायीं। राहे ऐसें करीं कांहीं। धरोनियां बाहीं। भव हा तारीं दातारा ॥ १ ॥ चतुरा तूं शिरोमणी। गुणलावण्याची खाणी। मुगुट सकळां मणि। धन्य तूंचि विठोबा ॥ २ ॥ करीं या तिमिराचा नाश। उदय होउनि प्रकाश। तोडीं आशापाश। करीं वास हृदयीं ॥ ३ ॥ पाहें गुंतलों नेणतां। माझी असो तुम्हां चिंता। तुका ठेवी माथा। पायीं आतां राखावें ॥ ४ ॥ [२५१२]

आमुचें उचित हेचि उपकार। आपलाचि भार घालूं तुज ॥ १ ॥ भूक लागलिया भोजनाची आळी। पांघुरणें काळीं शीताचिया ॥ २ ॥ जेणें काळें उठी मनाची आवडी। तेचि मागों घडी आवडतें ॥ ३ ॥ दुःख येऊं नेदी आमचिया घरा। चक्र करी फेरा भोंवताला ॥ ४ ॥ तुका म्हणे नाहीं मुक्तीसवें चाड। हेंचि आम्हां गोड जन्म घेतां ॥ ५ ॥ [२५१३]

मी दास तयाचा जया चाड नाहीं। सुख दुःख दोहीं विरहित जो ॥ १ ॥ राहिलासे उभा भींवरेच्या तीरीं। कट दोहीं करीं धरोनियां ॥ २ ॥ नवल काय तरी पाचारितां पावे। न संवरित धांवे भक्तिकाजें (न स्मरत धांवे भक्तकाजा) ॥ ३ ॥ सर्व भार माझा त्यासी आहे चिंता। तोचि माझा दाता स्वहिताचा ॥ ४ ॥ तुका म्हणे त्यास गाईन मी गीतीं। आणीक तें चित्तीं न धरीं कांहीं ॥ ५ ॥ [२५१४]

गुंतला आहेस तसा तुला देवाचा विश्वास कां येत नाहीं? ३. अरे, तुला तुझी बायको सर्वस्वीं बुडविते तिच्या ठिकाणीं जशी प्रीति करतोस तशी तुला देवाची गोडी कां नाहीं? ४. अरे, तूं जसा मायेच्या संबंधानें आईबापांची थाटानें पूजा करतोस तें सर्व मिथ्या असून त्यांचा आभारी होतोस, तसे देवाचे उपकार कां मानीत नाहींस? ५. अरे, तूं एका नारायणाला विसरून अन्य जनांचें भय कां धरितोस? ६. तुकाराम महाराज म्हणतात, अरे, तुझें आयुष्य भक्तीवांचून व्यर्थ जावें म्हणून तुला जन्मास घातलें आहे काय? ७. [२५११]

हे देवा, माझें चित्त तुझ्या पायांच्या ठिकाणीं स्थिर राहील असें कर व आम्हांला हातीं धरून ह्या संसारसिंधूंतून पार कर १. तूं चतुर आहेस व सर्वांमध्यें श्रेष्ठ आहेस. गुणांची व सौंदर्याची तूं तर खाण आहेस. हे विठोबा, तूं सर्वांचा मुकुटमणि आहेस, अशा प्रकारचा तूं धन्य आहेस २. आमच्या हृदयीं असणाऱ्या अज्ञान-अंधकाराचा तूं प्रगट होऊन आपल्या ब्रह्मज्ञानाच्या प्रकाशानें नाश कर, व आमच्या हृदयांतून संसाराच्या आशेचा पाश तोडून टाकून तूं तेथें वास्तव्य कर ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, पाहा, मी ह्या प्रपंचामध्यें अज्ञानानें गुंतलों आहें; माझी काळजी ठेवून, आतां आपल्या पायांच्या ठिकाणीं तूं माझें ह्या संसारभयापासून रक्षण कर, असें मी तुमच्या चरणांवर मस्तक ठेवून विनवीत आहें ४. [२५१२]

आमचें योग्य कर्तव्य हेंच आहे व आमचा तुझ्यावर उपकारहि हाच आहे, कीं आपल्या योगक्षेमाचा भार तुझ्यावर घालून असावें १. भूक लागली म्हणजे भोजनाविषयींचा हट्ट घ्यावा. थंडी वाजूं लागली म्हणजे पांघरुणाविषयीं हट्ट घ्यावा २. ज्या वेळेस जें मनास प्रिय वाटेल तेंच त्या घटकेस आम्ही मोठ्या प्रीतीनें मागूं ३. आमच्या रक्षणार्थ आमच्या भोंवतीं तुझें सुदर्शन चक्र फिरत असल्यामुळें तें आमच्या हृदयांत दुःखास येऊं देत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हांला मुक्तीची गरज नाहीं, कारण पुनः पुनः जन्म घेऊन तुझी सेवा करणें हेंच आम्हांला प्रिय वाटतें ५. [२५१३]

मी अशा देवाचा दास झालों आहें, कीं ज्याला कसलीहि इच्छा नाहीं व जो सुखदुःखादि द्वंद्वविरहित आहे १. भीमेच्या तीरावर कमरेवर दोन्ही हात ठेवून तो उभा राहिला आहे. २. त्या देवास हांका मारल्याबरोबर भक्तकार्य करण्याकरितां तो त्वरेनें येतो, हेंच आश्चर्य आहे ३. माझा योगक्षेम चालविण्याविषयींची त्यास चिंता आहे व माझें खरें हित करणारा तोच आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्याला मी सुस्वरानें माझ्या काव्यांत गाईन आणि त्याचेवांचून दुसरें कांहीं चित्तांत येऊं देणार नाहीं ५. [२५१४]

यासी कोणी म्हणे निंदेचीं उत्तरें। नागवला खरें तोचि एक ॥ १ ॥ आड वाटे जातां लावी नीट सोई। धर्मनीत (ती) तेही ऐसी आहे ॥ २ ॥ नाइकतां सुखें करावें ताडण। पाप नाहीं पुण्य असे फार ॥ ३ ॥ जन्म व्याधि फार चुकतील दुःखें। खंडावा हा सुखें मान त्याचा ॥ ४ ॥ तुका म्हणे निंब दिलियावांचून (दिधल्यावांचून)। अंतरींचा सीण कैसा जाय ॥ ५ ॥ [२५१५]

निवडे जेवण सेवटींच्या घांसें। होय त्याच्या ऐसें सकळही ॥ १ ॥ न पाहिजे झाला बुद्धीचा पालट। केली खटपट जाय वायां ॥ २ ॥ संपादिलें व्हावें धरिलें तें सोंग। विटंबना व्यंग पडिलिया ॥ ३ ॥ तुका म्हणे वर्म नेणतां जो रांधी। पाववी ते बुद्धि अवकळा ॥ ४ ॥ [२५१६]

न लगे मरावें। ऐसा ठाव दिला देवें ॥ १ ॥ माझ्या उपकारासाठीं। वागविला म्हूण कंठीं ॥ २ ॥ घरीं दिला ठाव। अवघा सकळही वाव ॥ ३ ॥ तुका म्हणे एके ठायीं। केलें माझें तुझें नाहीं ॥ ४ ॥ [२५१७]

नाहीं लाग माग। न देखेंसें केलें जग ॥ १ ॥ आतां बैसोनियां खावें। दिलें आइतें या देवें ॥ २ ॥ निवारिलें भय। नाहीं दुसऱ्याची सोय ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं। बोलायाचें काम नाहीं ॥ ४ ॥ [२५१८]

दिली हाक मनें नव्हे ती (नव्हतें) जतन। वेगळाल्या (वेंटाळिलया) गुणें धांव घेती ॥ १ ॥ काम क्रोध मद मत्सर अहंकार। निंदा हिंसा (द्वेष) फार माया तृष्णा ॥ २ ॥ इंद्रियांचे भार फिरतील चोर। खाणें (खान) घ्यावया घर फोडूं पाहे ॥ ३ ॥ माझा येथें कांहीं न चले पराक्रम। आहे त्याचें वर्म तुझे हातीं ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां करितों उपाय। जेणें तुझे पाय आतुडती ॥ ५ ॥ [२५१९]

(आम्हीं खालील दर्शविलेल्या) ह्या भाषणास कोणी निंदा म्हणेल तर तो खरोखर फसला १. जो कोणी आडमार्गी जात आहे, त्यास नीट वाटेस लावणें हीच धर्मनीति आहे २. कोणास नीतीची गोष्ट सांगितली असतां, जर त्यानें ती ऐकिली नाहीं, तर त्याला खूप चोपावें. तसें करण्यांत कांहीं पाप नाहीं, तर उलट अधिक पुण्य आहे ३. असें केल्यानें जन्मव्याधि व पुष्कळ दुःखें ह्यांतून त्याची सुटका होईल, म्हणून त्याची मानखंडणा सुखानें करावी ४. तुकाराम महाराज म्हणतात, कडुलिंबाप्रमाणें कडु औषध दिल्याशिवाय शारीरिक दुःख कसें जाईल? त्याप्रमाणें दुर्जनाला शासन केल्यावांचून त्याचें दुर्जनत्व कसें जाईल? ५. [२५१५]

शेवटचा गोड घांस घेण्यानेंच जेवण चांगलें झालें असें ठरतें. ह्याप्रमाणेंच सर्व कार्यांचा प्रकार जाणावा १. आपली सद्बुद्धि केव्हांहि बदलूं देऊं नये, कारण तसें जर होईल तर पूर्वीं केलेली सर्व खटपट व्यर्थ जाईल २. जें सोंग घेतलें आहे त्याची संपादणी यथायोग्य झाली पाहिजे; त्यांत कांहीं कमी झाल्यास फजिती होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, स्वयंपाक करण्याची हातोटी न जाणतां जे तो करितात त्यांच्या शहाणपणाची फजिती होते (त्याप्रमाणें परमार्थीचें मर्म कळणें व आरंभिलेला परमार्थ शेवटाला नेणें हें शहाणपणाचें लक्षण होय) ४. [२५१६]

ज्या ठिकाणीं मरण नाहीं अशा पदाची देवानें मला देणगी दिली १. अशा प्रकारचे त्याचे आमच्यावर उपकार झाल्यामुळें, मी त्याला कंठामध्यें धारण केलें २. हरीनें आपल्या पूर्णतेच्या घरीं मला आश्रय दिला. त्या योगानें सर्व कांहीं प्रपंच व्यर्थ भासूं लागला ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझें-तुझेंपणाचें जें द्वैत होतें, तें सर्व त्यानें एक करून नाहींसें केलें ४. [२५१७]

ज्या पदाच्या ठिकाणीं कोणाचा प्रवेश होत नाहीं व जेथें जाण्यास मार्गहि नाहीं, अशा ठिकाणीं हरीनें मला ठेवून, जग न भासेल असें केलें १. अशा प्रकारची ही आयती स्वरूपदेणगी देवानें दिल्यामुळें आतां त्याचा उपभोग जागच्या जागींच स्थिर होऊन घ्यावा २. त्या ठिकाणीं सर्व भयाचा निरास झाला आहे, कारण भयास मूळ जें द्वैत, त्याचा तेथें संबंध नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां कांहीं बोलण्याचें कारण उरलें नाहीं ४. [२५१८]

हे देवा, मनानें परमार्थाचें रक्षण होत नाहीं, म्हणून तुला हांक मारली. तें ज्या गुणानें वेढलें आहे (हीं इंद्रियें फारच ओढाळ असल्यामुळें) तदनुरूप त्या त्या वृत्ती धांव घेतात १. काम, क्रोध, मद, मत्सर, अहंकार, निद्रा, हिंसा, माया, तृष्णादि विकार हे मनाच्या ठिकाणीं जोरावले आहेत २. इंद्रियरूपी चोरांचे समुदाय देहरूपी घर फोडून परमार्थाची चोरी करण्यास फिरत आहेत ३. ह्या ठिकाणीं माझा पराक्रम कांहीं चालत नाहीं, त्यांतून माझी सुटका करण्याविषयींचें चातुर्य तुझ्यामध्यें आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, ज्या योगेंकरून तुझ्या पायांचें दर्शन होईल ते उपाय मी करीत आहें ५. [२५१९]

तुझा दास मज म्हणती अंकित। अवघे सकळिक लहान थोर ॥ १ ॥ हेंचि आतां लागे करावें जतन। तुझें थोरपण तुज देवा ॥ २ ॥ होउनी निर्भर राहिलों निश्चिंत। पावन पतित नाम तुझें ॥ ३ ॥ करितां तुज होय डोंगराची राई। न लगतां कांहीं पात्या पातें ॥ ४ ॥ तुका म्हणे तुज काय तें अशक्य। तारितां मशका मज दीना ॥ ५ ॥ [२५२०]

काय मागावें कवणासी। ज्यासी मागों तो मजपाशीं ॥ १ ॥ जरी मागों पद इंद्राचें। तरी शाश्वत नाहीं त्याचें ॥ २ ॥ जरी मागों ध्रुवपद। तरी त्यासी येथील छंद ॥ ३ ॥ स्वर्गभोग मागों पूर्ण। पुण्य सरल्या मागुती येणें ॥ ४ ॥ मागों जरी पद वैकुंठ। तें तव एकदेशी करंटें ॥ ५ ॥ आयुष्य मागों चिरंजीव। जीवा मरण नाहीं स्वभावें ॥ ६ ॥ तुका म्हणे एक मागें। एकपणा(णीं) नाहीं भंग ॥ ७ ॥ [२५२१]

आम्ही ज्याचे दास। त्याचा पंढरिये वास ॥ १ ॥ तो हा देवांचाही देव। काय कळिकाळाचा भेव ॥ २ ॥ वेद जया गाती। श्रुति म्हणती नेति नेति ॥ ३ ॥ तुका म्हणे निज। रूपडें हें तत्त्वबीज ॥ ४ ॥ [२५२२]

भक्तवत्सल दीनानाथ। तिहीं लोकीं ज्याची मात ॥ १ ॥ तो हा पुंडलिकासाठीं। आला उभा वाळवंटीं ॥ २ ॥ गर्भवास धरी। अंबऋषीच्या कैवारीं ॥ ३ ॥ सकळां देवां अधिष्ठान। एका मंत्रासी कारण ॥ ४ ॥ तुका म्हणे ध्यानीं। ज्यासि ध्यातो शूळपाणी ॥ ५ ॥ [२५२३]

फटकाळ (तो) देव्हारा फटकाळ अंगारा। फटकाळ विचारा चाळविलें ॥ १ ॥ फटकाळ तो देव फटकाळ तो भक्त। करवितो घात आणिकां जीवां ॥ २ ॥ तुका म्हणे अवघें फटकाळ हें जिणें। अनुभवी ये खूणे जाणतील ॥ ३ ॥ [२५२४]

मी तुझा आज्ञांकित दास आहें असें सर्व लहानथोर जन म्हणत आहेत १. देवा, आतां तुला हा आपला मोठेपणा रक्षण केला पाहिजे २. तुझें पतितपावन नाम आहे, हें जाणून मी निष्काळजीपणानें आनंदांत राहिलों आहें ३. देवा, तुझा असा पराक्रम आहे, कीं पापणीला पापणी लागली नाहीं तोंच तूं डोंगराची राई (मोहरी) करशील ४. तुकाराम महाराज म्हणतात, घुंघुरट्याप्रमाणें असणारा जो मी दीन, त्या मला तारणें तुला अशक्य आहे काय? ५. [२५२०]

कोणापाशीं काय मागावयाचें आहे? मागण्यास योग्य जो देव तो तर मजजवळ आहे १. जर इंद्रपद मागावें तर तें शाश्वत नाहीं २. अथवा ध्रुवपद मागावें तर त्या ध्रुवाला ह्या मृत्युलोकाचाच छंद आहे ४. पूर्ण स्वर्गैश्वर्य भोगणें मागावें तर पुण्यक्षय झाल्यावर अधोगतीस यावें लागतें ३. वैकुंठाचें पद मागावें तर तें दरिद्री एकदेशी (मर्यादित) आहे ५. चिरंजीव आयुष्य मागावें, तर स्वभावतः जीव अमर आहे ६. तुकाराम महाराज म्हणतात, जो हरीशीं एकपणा तो केव्हांहि भ्रष्ट होत नाहीं, तो आत्मैक्यभाव मी मागतों ७. [२५२१]

आम्ही ज्याचे दास आहोंत त्याचें वास्तव्य पंढरीस आहे १. पंढरपुरवासी पांडुरंग हा सर्व देवांचा देव आहे; मग आम्हांला कळिकाळाची काय भीति? २. वेद ज्याचें वर्णन करीत आहे व नेति नेति म्हणून श्रुति माघारी परतली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, बीजतत्त्व जें निजात्मस्वरूप तेंच पांडुरंगाचें स्वरूप आहे ४. [२५२२]

देव हा भक्तांवर दया करणारा व दीनांचा स्वामी आहे, अशाविषयीं ज्याची त्रैलोक्यांत कीर्ति आहे १. तोच हा पुंडलिकाकरितां वाळवटीं उभा राहिला आहे २. तो देव अंबऋषींचा कैवारी आहे म्हणून त्यानें त्यांच्याकरितां दहा गर्भवास सोसले ३. सर्व देवांस तो आधार आहे, म्हणून त्याच्याच एका मंत्रानें (नामस्मरणानें) कार्यसिद्धि होते ४. तुकाराम महाराज म्हणतात, शूळपाणि जो शिव हा एकतानतेनें ज्याचें ध्यान आपल्या चित्तांत सदा करीत आहे ५. [२५२३]

तामस उपासना करणाऱ्यांचा वेदबाह्य असा वाह्यात देव्हारा व्यर्थ आहे. रोग-भूतबाधा निवारण व्हावी म्हणून त्यांनीं दिलेला अंगारा-धुपाराहि व्यर्थ आहे, कारण त्यांनीं भोळ्या-भाबड्या लोकांस भावडे विचार सांगून फसविलें १. त्यांचा तो देव वाह्यात आहे व त्यांचा भक्तहि वाह्यात आहे आणि तो आणिकांना नादीं लावून त्यांचा घात करतो २. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा देव्हारा माजवून जे अंगारा देणारे आहेत त्यांचें जगणें सर्व व्यर्थ आहे, हें ज्यांना खरोखर श्रीहरीचा अनुभव आहे ते जाणतील ३. [२५२४]

लावूनियां गोठी । चुकवूं आदरिली दिठी । देउनियां मिठी । पडे (पळे) महीया माथुलें ॥ १ ॥ पुढें तेंचि करी आड । तिचा लोभ तिसी नाड । उरवी (लावूनी) चरफड । हात गोऊनि पळावें ॥ २ ॥ आधीं काकुलती । मोहो घालावा पुढती । तोंडीं पडे माती । फिरतां मागें कैंचा तो ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । यासी रडवी याचा हेवा । भावें कां हे सेवा । सुखें तुम्हां नार्पिती ॥ ४ ॥ [२५२५]

नेत्राची वासना । तुज पहावें नारायणा ॥ १ ॥ करी यांचें समाधान । काय पहातोसी अनुमान ॥ २ ॥ भेटावें पंढरीराया । हेंचि इच्छिताति बाह्या ॥ ३ ॥ जावें पंढरीसी । हेंचि ध्यान या मानसीं ॥ ४ ॥ चित्त म्हणे पायीं । तुझ्या राहिन निश्चयीं ॥ ५ ॥ म्हणे बंधु तुकयाचा । देवा भाव पुरवीं याचा ॥ ६ ॥ [२५२६]

जेणें तुज झालें रूप आणि नांव । पतित हें दैव तुझें आम्हीं ॥ १ ॥ नाहीं तरी तुज कोण हो पुसतें । निराकारी तेथें एकाएकीं ॥ २ ॥ अंधारें तें दीप आणियेली शोभा । माणिकासी प्रभा कोंदणाची ॥ ३ ॥ धन्वंतरी रोगें आणिला उजेडा । सुखी काय चाडा जाणावें त्या ॥ ४ ॥ अमृतासी मोल विषाचिये गुणें । पितळ तरी सोनें उंच निंच ॥ ५ ॥ तुका म्हणे आम्ही असोनियां जाण । तुज देवपण आणियेलें ॥ ६ ॥ [२५२७]

सुख वाटे येचि ठायीं । बहु पायीं संतांचे ॥ १ ॥ म्हणउनि केला वास । नाहीं नास ते ठायीं ॥ २ ॥ न करवे हाली चाली । निवारिली चिंता हे ॥ ३ ॥ तुका म्हणे निंवे तनु । रजकणु लागतां ॥ ४ ॥ [२५२८]

देऊनियां कपाट । कोण काळ राखों वाट ॥ १ ॥ काय येईल तें शिरीं । आज्ञा धरोनियां करीं

कृष्ण हा गोपींशीं कांहीं तरी गप्पागोष्टी सांगून त्यांत त्यांना गुंतवून त्यांची दृष्टि चुकवून माझ्या मैत्रिणीस त्यानें मिठी मारल्यामुळें तिच्या डोक्यावरील घट खालीं पडला १. तिनें जो दूधदह्याविषयीं लोभ धरला, तोच लोभ तिच्या आड येऊं लागला. श्रीहरि हे तिचे हात गुंतवून, दहींदुधाच्या नुकसानीबद्दल तिला चरफडावयास लावून पळतात २. आरंभीं पुनः पुनः कींवकाकुलती येऊन आपला मोह हरीस लावावा व नंतर माघार घेतली (संसाराच्या मोहांत पडल्या) तर त्यांना हरीचा लाभ कसला होतो ? म्हणून अखेरीस त्यांच्या तोंडांत माती पडते ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, ह्यांच्यामध्यें असलेली संसाराची हांवच ह्यांना रडवीत आहे. भावभक्तीनें तुम्हांस दहींदूध (प्रेम) अर्पण करण्याची सेवा ह्या कां करीत नाहींत ? ४. [२५२५]

हे नारायणा, तुझें रूप पाहावें हीच डोळ्यांना वासना आहे १. ह्याविषयींचें तूं समाधान कर. काय अनमान पाहात बसला आहेस ? २. हे पंढरीराया, तुला आलिंगन द्यावें हीच इच्छा बाहूंची आहे ३. पंढरीस जाण्याविषयींचा ध्यास मनानें घेतला आहे ४. चित्त हें, तुझ्या पायांच्या ठिकाणीं निश्चिंत होऊन निश्चयानें राहीन असें, म्हणत आहे ५. तुकाराम महाराजाचे बंधु म्हणतात, हे देवा, अशी ही माझी भावना आहे ती तूं खरोखर पूर्ण कर ६. [२५२६]

हे देवा, आम्हां पतितांकरितांच तूं नामरूप धारण केलेंस म्हणून आम्ही पतित हे तुझें दैवत होत १. नाहीं तर देवा, तूं जर भेदशून्य निराकार स्वरूपस्थितीनें असतास, तर तेथें तुला कोणी मानलें असतें ? २. अंधकारानें दीपप्रकाशास शोभा आणली आहे व कोंदणाचे योगानें माणिकास प्रभा आणिली आहे ३. वैद्याला रोग्यानेंच प्रसिद्धीस आणलें. जर सर्व निरोगी सुखी असते, तर त्यांना वैद्याकडे जाण्याचें काय कारण आहे ? ४. अमृताची किंमत विषामुळें वाढली आहे पितळ ही नीच धातु आहे म्हणून सोनें उंचपणास आलें आहे (सोलास चढलें आहे) ५. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही असे पतित होतों म्हणून तुला देवपणाच्या मोठेपणाला आणलें हें तूं समज ६. [२५२७]

संतांच्या ठिकाणीं मला अतिशय सुख वाटत आहे १. सुखास कधींहि नाश नाहीं, म्हणून मीं त्या ठिकाणीं वास्तव्य केलें २. आतां तेथून हालचाल करतां येत नाहीं व माझी सर्व चिंता नाहींशी झाली ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांच्या चरणरजाचा स्पर्श झाला असतां देहांतील त्रिविधताप नाहींसे होऊन तो शांत होतो ४. [२५२८]

हे देवा, द्वार (इंद्रियें) बंद करून कोठपर्यंत तुझी वाट पाहात बसावें ? १. आतां जी तुम्ही आज्ञा कराल ती

॥ २ ॥ करूं कळे ऐसी मात । किंवा राखावा एकांत ॥ ३ ॥ तुका म्हणे जागों । किंवा कोणा नेदूं वागों ॥ ४ ॥ [२५२९]

मायबापांपुढें लेंकराची आळी । आणीक हे पाळी कोण लळे ॥ १ ॥ सांभाळा जी माझीं विषमें अनंता । जवळी असतां अव्हेर कां ॥ २ ॥ आणिकांची चाले सत्ता आम्हांवरी । तुमची ते थोरी काय मग ॥ ३ ॥ तुका म्हणे आलों दुरोनी जवळी । आतां टाळाटाळी करूं नये ॥ ४ ॥ [२५३०]

माझ्या मुखें मज बोलवितो हरि । सकळांचे अंतरीं नारायण ॥ १ ॥ न करावा द्वेष भूतांचा मत्सर । हा तंव विचार जाणों आम्ही ॥ २ ॥ तुका म्हणे दोष नाहीं या विचारें । हिताचीं उत्तरें शिकवितां ॥ ३ ॥ [२५३१]

मांस खातां हाउस (हौस) करी । जोडोनि वैरी ठेवियेला ॥ १ ॥ कोण त्याची करील कींव । जीवें जीव नेणती ॥ २ ॥ पुढिलासाठीं पाजवी सुरी । आपुली चोरी अंगुळी ॥ ३ ॥ तुका म्हणे पुढें कुटिती हाडें । आपुल्या नाडें रडतील ॥ ४ ॥ [२५३२]

तुज जाणें तान्हें नाहीं पांडुरंगा । कां जी मज सांगा उपेक्षिलें ॥ १ ॥ तुज ठावें होतें पातकी मी खरा । आधींच कां थारा दिधला पायीं ॥ २ ॥ अंक तों पडिला हरीचा मी दास । भेद पंगतीस करूं नये ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हीं जिंतीलें तें खरें । आतां उणें पुरें तुम्हांलागीं ॥ ४ ॥ [२५३३]

आम्हां घरीं (सकळ) धन शब्दांचींच रत्नें । शब्दांचींच शस्त्रें यत्न करूं ॥ १ ॥ शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन । शब्दें वांटूं धन जनलोकां ॥ २ ॥ तुका म्हणे पहा शब्दचि हा देव । शब्देंचि गौरव पूजा करूं ॥ ३ ॥ [२५३४]

मी शिरसावंद्य करीन २. मला जसें वाटेल तसें मी करूं किंवा एकांत धरून (एकांतांत जाऊन) राहूं ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं मी जागृत राहूं किंवा दुसऱ्या कोणाची येण्याजाण्याची वाट बंद करूं हें सांगा ४. [२५२९]

आपल्या आईबापांजवळ लेंकरानें हट्ट करून मागावें, त्यावांचून त्याची इच्छा कोण पूर्ण करील ? १. अहो जी देवा, माझ्या ठिकाणीं जी विषम (कामक्रोधादि वृत्ति) वाढली आहे ती तुम्ही नाहींशी करा. तुम्ही माझ्याजवळ असून माझा अव्हेर कां करितां ? २. जर आमच्यावर दुसऱ्याची सत्ता चालेल, तर मग तुमचा थोरपणा तो काय राहिला? ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी तुमच्याजवळ लांबून आलों आहें, आतां आपण टाळाटाळी करणें, हें योग्य नाहीं ४. [२५३०]

जो नारायण सर्वांच्या हृदयांत आहे, तो मला माझ्या मुखानें बोलवीत आहे १. म्हणून कोण्याहि भूताचा द्वेष अथवा मत्सर करूं नये, हा विचार आम्ही जाणत आहोंत २. तुकाराम महाराज म्हणतात, जर कोणाला हितोपदेश केला, तर त्या योगानें पातक लागत नाहीं ३. [२५३१]

जर पशूंचा वध करून उल्हासानें कोणी मांस खाईल, तर त्यानें ते वैरी जोडून ठेविले हें तो लक्षांत घेत नाहीं. १. आपल्या जीवाप्रमाणें दुसऱ्याचा जीव जाणत नाहीं, तर त्या दुष्टाची दया कोणास येईल ? २. दुसऱ्याचा वध करण्यास शस्त्राला धार लावतो ते वेळीं आपल्या करंगुळीस देखील धक्का लागूं देत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, दुसऱ्याचीं हाडें कुटून पीठ करितात, पण ते पुढें त्यांना कृतकर्माचें फळ भोगतांना दुःख झालें म्हणजे रडतील ४. [२५३२]

हे पांडुरंगा, मी तान्हें बाळ आहें. लहान बालकानें तुला जाणावें असें नाहीं; असें असून माझी उपेक्षा तुम्ही कां करितां हें सांगा १. मी पातकी आहें असें जर तुला माहीत होतें, तर तूं आपल्या पायांजवळ आधीं मला कां आश्रय दिलास ? २. मी तुझा सेवक आहें, असा जगांत डांगोरा झाल्यामुळें संतांच्या ओळीला मी बसलों. आतां त्या ठिकाणीं वंचना करणें तुला योग्य नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आम्हीं तुला खरोखर जिंकलें आहे, म्हणून जो कमीजास्तपणा आमच्याकडे येईल तो तुझ्याकडे आहे ४. [२५३३]

आमचे घरीं (हरिवर्णनपर अभंग) शब्दरूपी रत्नांचें धन आहे व शब्दरूपी शस्त्र आम्ही जतन करूं १. आम्हांला जगण्यास (व्यावहारिक व पारमार्थिक) उपाय शब्दच आहे व तोच सर्व लोकांसहि देऊं २. तुकाराम महाराज म्हणतात, पाहा, हा शब्दच देव आहे व त्याची शब्दाच्याच गौरवानें आम्ही पूजा करूं ३. [२५३४]

ब्रह्मज्ञान दारीं येतें काकुलती । अव्हेरिलें संतीं विष्णुदासीं ॥ १ ॥ रिघों पाहे माजी बळेंचि त्याचें घर । दवडिती दूर म्हणोनियां ॥ २ ॥ तुका म्हणे येथें न चले सायास । पडिलें उदास त्यांच्या गळां ॥ ३ ॥ [२५३५]

कासया लागला यासी चौघाचार । मुक्तीचा (मुळींचा) वेव्हार निवाडिला ॥ १ ॥ ग्वाही भक्तांची (बहुतांची) घालूनियां वरि । महजर करीं आहे माझ्या ॥ २ ॥ तुम्हां वेगळें (लागे) आपुल्याच ठायीं । होतें करूनि तेंही माझें माझें ॥ ३ ॥ भांडण शेवटीं झालें एकवट । आतां कटकट करूं नये ॥ ४ ॥ ठेविला तो ठेवा आला माझ्या हाता । आतां नसे सत्ता तुज देवा ॥ ५ ॥ तुका म्हणे वायांविण खटपटा । राहिलों मीं वांटा घेऊनियां ॥ ६ ॥ [२५३६]

देहबुद्धि वसे जयाचिये अंगीं । पूज्यता ते जगीं सुख मानी ॥ १ ॥ थोर असे दगा झाला त्यासी हाटीं । सोडोनियां गांठी चोरीं नेली ॥ २ ॥ गांठींचें जाऊनि नव्हे तो मोकळा । बांधविलासे गळा दंभलोभें ॥ ३ ॥ पुढिल्या उदिमा झालेंसे खंडण । दिसे नागवण पडे गांठीं ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐसें बोलतील संत । जाणूनियां घात कोण करी ॥ ५ ॥ [२५३७]

निंबाचिया झाडा साकरेचें आळें । आपुलीं तीं फळें न संडीच ॥ १ ॥ तैसें अधमाचें अमंगळ चित्त । वमन तें हित करूनि सांडी ॥ २ ॥ परिसाचे अंगीं लाविलें खापर । पालट अंतर नेघे त्याचें ॥ ३ ॥ तुका म्हणे वेळू चंदनासंगतीं । काय ते असती जवळिके ॥ ४ ॥ [२५३८]

दुबळें सदैवा । म्हणे नागवेल केव्हां ॥ १ ॥ आपणाऐसें करूं पाहे । स्वभावासी करिल काये

संतांच्या द्वारामध्यें माझा स्वीकार करा म्हणून ब्रह्मज्ञान काकुलती येत असतें, पण त्या विष्णुदासांनीं हरिभक्तीपुढें ब्रह्मज्ञानांत गोडी नाहीं म्हणून त्याचा अव्हेर केला आहे १. ते संत त्या ब्रह्मज्ञानाला दूर दवडतात, म्हणून तें त्यांच्या घरामध्यें बळानें रिघाव करूं इच्छितें २. तुकाराम महाराज म्हणतात, जें ब्रह्मज्ञान मोठ्या सायासानें प्राप्त होत नाहीं, तें जे कोणी उदास आहेत त्यांच्या गळां पडतें ३. [२५३५]

हे देवा, मुक्तीविषयींच्या व्यवहाराचा (आम्ही तुझ्याप्रमाणें मुक्त आहोंत कीं नाहींत ह्याचा) तुमच्या आमच्यामध्यें पूर्वींच निकाल झालेला आहे. त्याविषयीं आतां चौघाचार करण्याचें (हें प्रकरण चारचौघांत नेण्याचें) काय कारण आहे? १. ह्या संबंधानें झालेला करार माझ्याजवळ आहे, त्यावर संतांची साक्ष आहे २. ज्या वेळीं मी माझेपणाच्या पसाऱ्यांत गुंतलों होतों, त्या वेळीं मी देहअहंतेनें तुमच्यापासून वेगळा होतों ३. पूर्वीं तुमचें आमचें भांडण होऊन अखेरीस तुमची आमची एकी झाली, आतां तंटा वाढवूं नये ४. आम्हीं तुमच्याजवळ जो ठेवा ठेविला होता तो माझ्या हस्तगत झाला आहे. आतां हे देवा, तुमची त्याच्यावर सत्ता नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, माझा विभाग (हक्काचा मोक्षाचा वांटा) मला प्राप्त झाला. आतां त्याविषयीं तुम्ही खटपट करणें हें व्यर्थ आहे ६. [२५३६]

ज्याच्या ठिकाणीं देहअहंकृती (देहाविषयीं अभिमान) आहे, त्याला लोकांकडून पूजा व मान मिळाल्यानें तो त्याचें सुख मानतो १. ह्या संसारबाजारामध्यें त्या योगानें त्याला थोर दगा झाला आहे, कारण त्याच्या पदरीं जी कांहीं पुण्यसामुग्री होती, ती त्या मान-दंभरूपी चोरांनीं हरण करून नेली २. अशा प्रकारें पदरीं असलेलें पुण्य, त्याच्या गांठीचें जाऊनहि तो सुटला नाहीं, तर दंभ-लोभांनीं त्याचा गळा बांधला आहे ३. त्या योगानें त्याच्याकडून पुढें होणारा सत्कर्मव्यवहार नाहींसा झाला व पदरीं होतें तें पुण्य गेल्यामुळें तो साफ बुडाला असें दिसतें ४. तुकाराम महाराज म्हणतात, असें वर्तमान संतांच्या मुखानें ऐकलें. असें असतांना ह्या गोष्टी करून जाणूनबुजून आपला घात कोण करून घेईल? ४. [२५३७]

ज्याप्रमाणें कडु लिंबाच्या झाडास साखरेचें अळें जरी केलें, तरी तें आपलीं कडु फळें देण्याचें टाकीत नाहीं १. त्याप्रमाणें दुर्जनाचें चित्त मळकट असतें. त्याला किती जरी हितोपदेश केला, तरी तो ओकून टाकतो २. परिसाच्या अंगाला कोणतीहि धातु लाविली असतां तिचें सोनें होतें, पण त्यास खापर लावलें तर तें बिलकूल पालटत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, वेळूचें बन जरी चंदनाच्या जवळ असलें तरी त्याचा त्यास काय उपयोग आहे? ४. [२५३८]

जर भाग्यवंतासमोर करंटें आलें, तर तें भाग्यवंताचें वाटोळें केव्हां होईल असें म्हणतें १. तें भाग्यवानास

॥ २ ॥ मुढ सभेआंत। इच्छी पंडिताचा घात ॥ ३॥ गांढें देखुनियां शूर। उगीच करि बुरबुर ॥ ४॥ आणिकांचा हेवा। न करीं शरण जाईं देवा ॥ ५ ॥ तुका म्हणे किती। करूं दुष्टाची फजिती ॥ ६ ॥ [२५३९]

माझी आतां लोक सुखें निंदा करू। म्हणती विचारू सांडियेला॥ १ ॥ कारण होय तो करीन विचार। काय भीड भार करूं देवा ॥ २ ॥ तुका म्हणे काय करूं लापनिक। जनाचार सुख नाशिवंत ॥ ३ ॥ [२५४०]

ढेंकणाचे संगें हिरा जो भंगला। कुसंगें नाडला साधु तैसा ॥ १ ॥ ओढाळाच्या संगें सात्विक नासली। क्षण एक नाडली समागमें॥ २॥ डांकाचे संगती सोनें हीन झालें। मोल तें तुटलें लक्ष कोडी ॥ ३ ॥ विषानें पक्वानें (न्नें) गोड कडू झालीं। कुसंगानें केली तैसी परी॥ ४॥ भावें तुका म्हणे सत्संग हा बरा। कुसंग हा फेरा चौऱ्यांशींचा॥ ५॥ [२५४१]

भलते जन्मीं मज घालिशील तरी। न सोडीं मी हरी नाम तुझें॥ १॥ सुख दुःख तुज देईन भोगितां। मग मज चिंता कासयाची ॥ २ ॥ तुझा दास म्हणवीन मी अंकिला। भोगितां विठ्ठला गर्भवास ॥ ३ ॥ कासया मी तुज भाकितों करुणा। तारीं नारायणा म्हणऊनि ॥ ४॥ तुका म्हणे तुज येऊ पाहे उणें। तारिसील तेणें आम्हां तया ॥ ५॥ [२५४२]

गातों नाचतों आनंदें। टाळघागरीयांच्या छंदें ॥ १ ॥ तुझी तुजपुढें देवा। नेणों भाव कैसी सेवा ॥ २ ॥ नेणों ताल घात मात। भलते सवां पाय हात ॥ ३ ॥

आपल्यासारखें करेंटें होण्याविषयीं यत्न करितें, असा त्याचा स्वभाव आहे त्याला त्यानें काय करावें? २ सभेमध्यें असलेल्या पंडिताचा अपमान केव्हां होईल, अशी लोकांची इच्छा असते ३. एखाद्या शूराला पाहून नपुंसक आपल्या मनामध्यें उगीच बुरबुरत असतो ४. अरे, तूं दुसऱ्याचा हेवा करूं नको. एका देवाला शरण जा ५. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या दुर्जनाची फजिती तरी किती करावी? ६. [२५३९]

'ह्यानें आचार–विचार टाकला आहे' असें लोक मला म्हणतात. अशा प्रकारची माझी निंदा लोकांनीं खुशाल करावी १. हे देवा, ज्या योगानें माझें कारण (तुझी प्राप्ति) होईल तो विचार मी करीन, त्यावांचून मला कोणाची भीडपर्वा धरण्याचें कारण नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, असलें हें लोकव्यवहारांतलें सुख नाशिवंत असून बाह्यात्कारींचें–ढोंगीपणाचें आहे, तें घेऊन मला काय करावयाचें आहे? ३. [२५४०]

जो हिरा घणाच्या घावानें फुटत नाहीं, त्यास ढेंकणाचें रक्त लागलें असतां तो साहाजिक फुटतो, त्याप्रमाणें वाईट लोकांच्या संगतीनें साधु हा फसला जातो १. चांगली गाय जर ओढाळाच्या संगतीनें एक रात्र गेली तर तिच्या गळ्यांत लोढणें बांधावें लागतें. (शिंदळ स्त्रीच्या संगतीनें सात्त्विक सुशील स्त्रीदेखील आचारभ्रष्ट होते.) अशी क्षणभर समागमानें देखील चांगली बुद्धि भ्रष्ट होते २. डाक लागल्याच्या योगानें चांगलें सोनें कमी कसाचें होतें, आणि त्या सोन्याची किंमत कोट्यवधि रुपये जरी असली तरी तें कमी किंमतीस विकतें ३. गोड असलेलें पक्वान्न विषाच्या संगतीनें कडु होतें, तसा प्रकार वाईटाच्या संगतीनें चांगल्या लोकांचा होतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां भावानें–श्रद्धेनें संतांची संगत धरावी हें बरें; नाहींपेक्षां दुर्जनाच्या संगतीनें चौऱ्यांशीं लक्ष योनींच्या फेऱ्यांत पडावें लागेल ५. [२५४१]

हे हरि, तूं जरी मला कोणत्याहि जन्मास घातलेंस, तरी तुझें नामस्मरण मी सोडणार नाहीं १. त्या ठिकाणीं सुखाचे अथवा दुःखाचे भोग जे मला होतील ते तुला अर्पण करीन. मग मला काळजी कशाची आहे? २. हे विठ्ठला, मी गर्भवास भोगीत असतां, तुझा आज्ञाधारक सेवक आहें, असें म्हणवीन ३. हे नारायणा, तूं माझा उद्धार कर, अशी मी तुला विनंति करीत आहें ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुला आमच्या ह्या हीन दशेनें कमीपणा येण्याचा प्रसंग आला, म्हणजे तूं आमचा उद्धार करशील ५. [२५४२]

हातांमध्यें टाळ व पायांमध्यें घागऱ्या बांधून त्यांच्या नादांत मी आनंदानें गात आहें व नाचत आहें १. हे देवा, तुझ्यापुढें तुझी सेवा कशी करावी व तुजविषयीं भाव कसा धरावा, हें मी जाणत नाहीं २. ताल कसा असतो व तो चुकला असतां त्याचा घात होतो हा प्रकार मी जाणत नाहीं, म्हणून पायांनीं बेताल नाचतों व त्याचप्रमाणें

लाज नाहीं शंका । प्रेमें धालों म्हणे तुका ॥ ४ ॥ [२५४३]

रुसलों या आम्हीं आपुल्या संसारा। तेथें जनाचारा कोण पाड ॥ १ ॥ आम्हां इष्ट मित्र सज्जन सोयरे। नाहीं या दुसरे देवाविण ॥ २ ॥ दुराविले बंधु सखे सहोदर। आणीक विचार काय तेथें ॥ ३ ॥ उपाधिवचन नाइकती कान। त्रासलें हें मन वहु माझें ॥ ४ ॥ तुका म्हणे करा ठाकेल ते दया। सुख दुःख वायां न धरावें ॥ ५ ॥ [२५४४]

सांडुनि सुखाचा वांटा। मुक्ति मागे तो करंटा ॥ १ ॥ कां रे न घ्यावे हे जन्म। काय वैकुंठा जाऊन ॥ २ ॥ येथें मिळतो दहीं भात। नाहीं वैकुंठीं ते मात ॥ ३ ॥ तुका म्हणे मुक्ति न लगे। राहीन संतांचिया संगें ॥ ४ ॥ [२५४५]

पदोपदीं पाया पडणें। करुणा जाण भाकावी ॥ १ ॥ ये गा ये गा विसांविया। करुणा दयासागरा ॥ २ ॥ जोडोनियां करकमळ। नेत्रीं जळ भरोनि ॥ ३ ॥ तुका उभा दानपात्र। पुरवी आर्त विठोबा ॥ ४ ॥ [२५४६]

आतां हें शेवटीं असो पायांवरी । वदती वैखरी वागपुष्पें ॥ १ ॥ नुपेक्षावें आम्हां दीनां पांडुरंगा। कृपादानीं जगामाजी तुम्ही ॥ २ ॥ बोळवुनी देह सांडियेली शुद्धी। तोडियेले भेद जीव शिव ॥ ३ ॥ तुका म्हणे मन तुमचे चरणीं। एवढी आयणी पुरवावी ॥ ४ ॥ [२५४७]

तरिच शोभे वेडी। नग्न होय धड फाडी ॥ १ ॥ काय बोलाचें गौरव । आंत वरी दोन भाव ॥ २ ॥ मृगजळा न्याहाळितां। तान न वजे सेवितां ॥ ३ ॥ न पाहे आणिकांची वास (आस) ।

हातांनीं टाळ वाजवितों ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला कोणाची भीति नाहीं व लज्जा नाहीं असा मी तुझ्या प्रेमानें तृप्त झालों आहें ४. [२५४३]

आम्हीं जर आपल्या संसाराचा त्याग केला आहे, तर मग आम्हांला लोकाचाराची काय पर्वा आहे? १. ह्या देवावांचून आम्हांला इष्टमित्र, सज्जन, सोयरे दुसरे कोणी नाहींत २. आपले शरीरसंबंधी बंधु आदिकरून सर्वांचा मीं त्याग केला आहे तर अन्य विचारांची (इतरांचा विचार करण्याची) मला काय गरज आहे? ३. अनेक प्रपंचासंबंधीं उपाधींचें भाषण माझे कान ऐकत नाहींत, कारण त्या योगानें माझें मन फार त्रासलें आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्हांला वाटेल तशी माझ्यावर दया करा, पण ह्या व्यर्थ वैषयिक सुखदुःखांमध्यें मला ठेवूं नका ५. [२५४४]

ह्या हरिनामसुखाचा वांटा सोडून जो कोणी मुक्ति मागतो त्यास करंटा म्हणावें १. अरे, तुला जन्म कां घेववत नाहींत? वैकुंठास जाऊन काय करावयाचें आहे? २. ह्या ठिकाणीं दहीं (हरीविषयींचें प्रेम) भाताचें (हरिचिंतन) भोजन मिळत आहे. त्या विषयींची वैकुंठाच्या ठिकाणीं वार्ता देखील नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला मुक्त होण्याची गरज नाहीं. मी संतांच्या संगतीनें सर्व काळ राहीन ४. [२५४५]

पावलोंपावलीं नमस्कार घालून देवास करुणा भाकावी, असें तुम्ही जाणा १. ती अशी, कीं हे करुणा-दयासागरा, विसांविया (विश्रांतिदायका) अगा, तूं धांवून ये असें देवाला वारंवार म्हणावें २. हात जोडून नेत्रांनीं अश्रुभरित होऊन (वर सांगितल्याप्रमाणें करुणा भाकावी) ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशी करुणा भाकल्यामुळें मी दान घेण्यास योग्य होऊन उभा आहें, म्हणून माझी सर्व इच्छा विठोबाराया पुरवीत आहे ४. [२५४६]

माझ्या वाणींतून जीं वाक्पुष्पें निर्माण झालीं आहेत, तीं अखेरीस तुमच्या पायांच्या ठिकाणीं अर्पण असोत १. हे पांडुरंगा, तुम्ही ह्या जगामध्यें कृपादान करण्याविषयीं समर्थ आहांत, म्हणून आम्हां गरिबांचा त्याग करूं नका २. विचारानें देहाचा निरास करून देहात्मबुद्धि टाकली आणि जीवशिवांतील भेद नाहींसा केला ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या चरणांच्या ठिकाणीं माझें मन राहावें अशी मला उत्कट इच्छा आहे, ती तुम्ही पूर्ण करा ४. [२५४७]

जर कोणी स्त्री नेसलेलें धड वस्त्र फाडून नागवी होईल, तरच तिचा वेडेपणा शोभला जातो १. नाहींपेक्षां अंतःकरणांत एक व बाह्यात्कारीं वेडेपणाचें सोंग अशा दोन भावांनीं बोलण्याच्या गौरवाचा काय उपयोग आहे (अशाला संत कसें म्हणावें? तो जगाचें कल्याण कसें करणार?) २. मृगजळ पाहाण्यानें व त्याचें सेवन केल्यानें तहान जात नाहीं ३.

शूर बोलिजे तयास ॥ ४ ॥ तुका म्हणे या लक्षणें । संत अळंकार लेणें ॥ ५ ॥ [२५४८]

आग्रहा नांवें पाप । योगीं सारावे संकल्प ॥ १ ॥ सहज ऐसें भांडवल । असोनि कां सारा बोल ॥ २ ॥ तैं न भेट तें काय । मना अंगींचे उपाय ॥ ३ ॥ तुका म्हणे धरीं सोय। वासनेची फोडा डोय ॥ ४ ॥ [२५४९]

न करीं पठण घोष अक्षरांचा । बीजमंत्र आमुचा पांडुरंग ॥ १ ॥ सर्वकाळ नामचिंतन मानसीं। समाधान मनासीं समाधि हे ॥ १ ॥ न करीं भ्रमण न रिघें कपाटीं । जाईन तेथें दाटी वैष्णवांची ॥ ३ ॥ आनु (आन) नेणें कांहीं न वजें तपासी । नाचें दिंडीपाशीं जागरणीं ॥ ४ ॥ उपवास व्रत न करीं पारणें । रामकृष्ण म्हणें नारायण ॥ ५ ॥ आणिकांची स्तुती सेवा नेणें वाणूं। तुका म्हणे आनु (अणु) दुजें कांहीं ॥ ६ ॥ [२५५०]

पुंडलिकाचे निकट सेवे । कैसा धांवे बराडी ॥ १ ॥ आपुलें तें थोरपण । नारायण विसरला ॥ २ ॥ उभा कटीं ठेवुनि कर । न म्हणे पर बैसतसें (बैससें) ॥ ३ ॥ तुका म्हणे जगदीशा । करणें आशा भक्तांची ॥ ४ ॥ [२५५१]

बाळ काय जाणे जीवनउपाय । मायबाप वाहे सर्व चिंता ॥ १ ॥ आइतें भोजन खेळणें अंतरीं। अंकिताचे शिरीं भार नाहीं ॥ २ ॥ आपुलें शरीर रक्षितां न कळे। सांभाळूनि लळे पाळी माय ॥ ३ ॥ तुका म्हणे माझा विठ्ठल जनिता । आमुची ते सत्ता तयावरी ॥ ४ ॥ [२५५२]

काय करतील केलीं नित्य पापें । वसे नाम ज्यापें विठोबाचें ॥ १ ॥ तृणीं हुताशन लागला ते रासी। जळतील तैसीं क्षणमात्रें ॥ २ ॥ विष्णुमूर्तिपाद पाहतां चरण । तेथें कर्म कोण राहूं शके ॥ ३ ॥

जो आपली कार्यसिद्धि करण्यास दुसऱ्याची वाट पाहात नाहीं त्यालाच शूर असें म्हणावें ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशा लक्षणाचे (अमानित्वादि) अलंकार संतांनीं अंगावर धारण केले आहेत ५. [२५४८]

दुराग्रह धरणें ह्याचेंच नांव पाप आहे, म्हणून जे कोणी योगी आहेत त्यांनीं दुराग्रहाचे संकल्प नाहींसे करावेत १. अशा प्रकारचें भांडवल साहाजिक जवळ असतांना तुम्ही व्यर्थ कां बोलतां ? २. आपलें मन वश करून घेण्याचे उपाय साध्य झाल्यास कोणती वस्तु प्राप्त होण्याचें दुर्लभ आहे ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही योग्य मार्गानें चला (मनोनिग्रह करा) व वासनेचें टाळकें फोडा ४. [२५४९]

आमचा बीजमंत्र पांडुरंग आहे, त्यावांचून अन्य अक्षरांच्या पठणाचा गजर करणार नाहीं १. मी हरिनामाचें चिंतन सर्वकाळ मनानें करीन, त्या योगानें मनाचें समाधान होणें हीच समाधि होय २. त्यावांचून दुसरीकडे कोठें फिरणार नाहीं व पर्वताच्या दरींत जाणार नाहीं. ज्या ठिकाणीं वैष्णवांचा समुदाय आहे त्या ठिकाणीं मी जाईन ३. ते वैष्णव दिंडीसमुदाय घेऊन हरिजागर करतील तेथें मी नृत्य करीन. त्यांवाचून अन्य तपादि साधनें मी जाणत नाहीं ४. रामकृष्ण नारायण या नामस्मरणांवाचून उपवासव्रतादि पारण्यांचे प्रकार मी करणार नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, एका हरीवांचून दुसऱ्याची स्तुति अगर दुसऱ्याची सेवा करणें हें अणुमात्र मी जाणत नाहीं ६. [२५५०]

पुंडलीकरायाची तीव्रतर सेवा पाहून अन्नाला दुकाळलेल्या बराड्याप्रमाणें देवानें त्याच्याकडे धांव घेतली १. नारायण हा आपला मोठेपणा विसरला २. कमरेवर हात ठेवून विटेवर उभा आहे. तो मी पलीकडे जाऊन बसतों, असें म्हणत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जगदीश हा भक्तांची आशा पूर्ण करतो ४. [२५५१]

बालक हें आपल्या जीवनाचा उपाय जाणत आहे काय? त्याची सर्व काळजी आईबाप करीत असतात १. तें आयतें जेवून अंतःकरणांत खेळण्याचा छंद ठेवतें आणि तें आईबापांचे आधीन असल्यामुळें त्याच्या मस्तकावर योगक्षेमाचा कोणताहि बोजा नाहीं २. बालक हें आपल्या देहाचें रक्षण करणें जाणत नाहीं, आई त्याचे लाड पुरवून त्याचा सांभाळ करिते ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा विठ्ठल हा पिता आहे, म्हणून त्याच्यावर माझा हक्क आहे ४. [२५५२]

ज्याच्या मुखांत सतत विठ्ठलनामाचें चिंतन आहे त्याच्याकडून नेहमीं पापाचरणें झालीं, तर तीं त्याला काय करतील ? १. गवताचे गंजीस थोडासा अग्नि लागला, कीं ती जशी जळून खाक होते तशी हरिचिंतनानें पातकें क्षणांत नाहींशीं होतात २. विष्णुमूर्तीचे चरण पाहिले असतां, तेथें कोणतें पापकर्म राहूं शकेल ? ३.

तुका म्हणे नाम जाळी महादोष । जेथें होय घोष कीर्तनाचा ॥ ४ ॥ [२५५३]

माकडा दिसती कंवटी नारळें । भोक्ता तो निराळें वरील सारी ॥ १ ॥ एका रस एका तोंडीं पडे माती । आपुलाले नेती विभाग ते ॥ २ ॥ सुनियांसी क्षीर चारिलिया ओकवी । भोक्ता तो सेवी धणीवरी ॥ ३ ॥ तुका म्हणे मूर्ख वागविती भार । नेतील तें सार परीक्षक ॥ ४ ॥ [२५५४]

भेटीची आवडी उताविळ मन । लागलेंसे ध्यान जीवीं जीवा ॥ १ ॥ आतां आवडीचा पुरवावा सोहळा । येऊनी गोपाळा क्षेम देईं ॥ २ ॥ नेत्र उन्मळित राहिलें ताटस्ती (तटस्थी) । गंगा अश्रुपातीं वाहावली ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही करा साचपणा । मुळींच्या वचना आपुलिया ॥ ४ ॥ [२५५५]

धवळलें जगदाकार । आंधार तो निरसला ॥ १ ॥ लपों जातां नाहीं ठाव । प्रगट पाहें (हीं) पसारा ॥ २ ॥ खरियाचा दिवस आला । वाढी बोला न पुरे ॥ ३ ॥ तुका म्हणे जीवें साठीं । पडिली मिठी धुरेसी ॥ ४ ॥ [२५५६]

मातेची अवस्था काय जाणे बाळ । तिसी तों सकळ चिंता त्याची ॥ १ ॥ ऐसा परस्परें आहे जो विचार । भोपळयाचा तार दगडासी ॥ २ ॥ भुजंग पोटाळी चंदनाचें अंग । निवे परि संग नव्हे तैसा ॥ ३ ॥ तुका म्हणे करा परिसाचे परी । मज ठेवा सरी लोखंडाचे ॥ ४ ॥ [२५५७]

लावूनि कोलित । माझा करितील घात ॥ १ ॥ ऐसे बहुतांचे संधी । सांपडलों खोळेमधीं ॥ २ ॥ पाहातील उणें । तेथें देती अनुमोदनें ॥ ३ ॥ तुका म्हणे रीघ । पुढें नाहीं झाली (झालें) धींद ॥ ४ ॥ [२५५८]

तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरीच्या नामसंकीर्तनाचा जेथें घोष होत आहे तेथें सर्व पातकें दग्ध होतात (नामधारकानें दररोज पापें केलीं तरी चालतील असें नव्हे, तर पाप्यानें देखील नामाकडे प्रवृत्त व्हावें, हें तात्पर्य) ३. [२५५३]

माकडाला नारळाच्या आंतील खोबरें न समजतां तो वरील कवटीच जाणतो; परंतु जे कोणी शहाणे आहेत ते वरील कवटीचा त्याग करून आंतील खोबऱ्याचा–साराचा स्वीकार करतात १. कितीएक शहाणे सारभूत रसाचें ग्रहण करितात व कितीएकांचे तोंडांत माती पडते. अशा प्रकारें ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें जो तो आपापला भाग नेतो २. कुत्र्याला खीर खाऊं घातली असतां ती त्यास ओकावयास लावते आणि तिचा खरा भोक्ता आहे त्याला ती तृप्ति देऊन पुष्ट करते ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे मूर्ख आहेत ते भारवाहक असतात व जे शहाणे चतुर आहेत ते त्यांतील सार घेऊन जातात ४. [२५५४]

देवा, तुमची भेट व्हावी ह्याविषयींची प्रीति असल्यामुळें माझें मन फार उतावळें झालें आहे व तेंच ध्यान माझ्या जीवास लागलें आहे १. हे गोपाळा, आतां मला आलिंगन देऊन माझी दर्शनाची आवड पूर्ण करा २. तुमच्या दर्शनाकरितां डोळे तटस्थ राहिले आहेत; (ते मिटत नाहींत) व डोळयांतून सारखी प्रेमाश्रुरूपी गंगा वाहात आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी पतिताला पावन करणारा आहें, असें हें तुमचें मूळचें वचन खरें करून दाखवा ४. [२५५५]

सर्व जगत् हें चैतन्यप्रकाशानें प्रकाशित झालें आहे म्हणून माझा अज्ञानअंधकार नाहींसा झाला आहे १. आतां लपण्यास कोठें अज्ञानअंधकार सांपडत नाहीं. सर्व कांहीं एकचित्त ऐक्यभावाचीच प्रकट व्याप्ति आहे २. खऱ्या आत्मस्थितीचा (परमार्थाचा) दिवस उगवला आहे व त्याच्या प्रकाशाचा जो प्रसार झाला आहे तो वाणीनें सांगणें पुरवत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, श्रेष्ठ असें जें परब्रह्मस्वरूप त्या ठिकाणीं जीवानें समरसतेनें मिठी दिली ४. [२५५६]

आईची कठिण स्थिति बालक जाणतें काय? तिला मात्र सर्वतोपरि बालकाची काळजी असते १. अहो देवा, असा हा मायलेकांतील परस्परांचा प्रकार आहे. दगड भोपळयास तारूं शकत नाहीं, उलट भोपळाच त्यास तारून नेतो २. चंदनाच्या झाडास मोठमोठे नाग वेटाळून असतात म्हणून ते त्यायोगानें शांत होतात, पण ते चंदनाच्या संगतीनें चंदनासारखे होत नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हीं परिसाप्रमाणें होऊन मला लोखंडाप्रमाणें करून ठेवा (म्हणजे माझें सोनें होईल) ४. [२५५७]

हे दुष्ट लोक पेटलेलें कोलीत अंगाला लावून माझा घात करतील १. अशा प्रकारेंच बहुत जनांच्या तावडींत सांपडून मी त्यांच्यामध्यें क्रीडा करीत आहें २. माझ्या ठिकाणीं उणें पाहून तें जगजाहीर करतील व ते तेंच करण्याविषयींचें (किंवा, माझा घात करणाऱ्यास) अनुमोदन देतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां सुखाच्या आयुष्यांत पुढें प्रवेश होत नाहीं, अशा प्रकारची माझी फजिती झाली आहे ४. [२५५८]

ऐसी एकां अटी । रीतीं सिणती करंटीं ॥ १ ॥ साच आपुल्या पुरतें । करून न घेती कां(हीं) हितें ॥ २ ॥ कां हे वेंचितील वाणी । निरर्थकचि कारणीं ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । कांहीं समर्पूनि सेवा ॥ ४ ॥ [२५५९]

चालिले सोबती । काय मानिली निश्चिंती ॥ १ ॥ काय करिसी एकला । काळ सन्निध पातला ॥ २ ॥ कांहीं सावध तो बरवा । करीं आपुला काढावा ॥ ३ ॥ चालिले आगळे । हळूच कान केश डोळे ॥ ४ ॥ वोसरले दांत । दाढा गडबडल्या आंत ॥ ५ ॥ एकली तळमळे । जिव्हा भलतेंचि चावळे ॥ ६ ॥ तुका म्हणे यांणीं । तुझी मांडिली घालणी ॥ ७ ॥ [२५६०]

नका मजपाशीं । वदों प्रपंचाचे विशीं ॥ १ ॥ आतां नाइकावी कानीं । मज देवाविण वाणी ॥ २ ॥ येउनियां रूपा । कोण पाहे पुण्यपापा ॥ ३ ॥ मागें आजिवरी । झालें माप नेलें चोरीं ॥ ४ ॥ सांडियेलीं पानें । पुढें पिका अवलोकनें ॥ ५ ॥ पडों नेदी तुका । आड गुंफा (गुंफूं) कांहीं चुका ॥ ६ ॥ [२५६१]

जाले आतां सांटे । कासयाचे लहान मोठे (झाले आतां सांटें । कासयाचें लहान मोठें) ॥ १ ॥ एक एका पडिलों हातीं । जाली तेव्हांचि निश्चिंती ॥ २ ॥ नाहीं फिरों येत मागें । जालें साक्षीचिया अंगें ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । आतां येथें नाहीं हेवा (कोठें हेवा) ॥ ४ ॥ [२५६२]

माझें मज द्यावें । नाहीं करवीत नवें ॥ १ ॥ सहस्रनामाचें रूपडें । भक्तकैवारी चोखडें ॥ २ ॥

ह्या मिथ्या प्रपंचावीच खटपट करण्याचें कित्येकांच्या वांट्यास आलें आहे. अशीं हीं करंटीं व्यर्थ श्रम करितात १. खरोखर आपल्या पुरतेंच आपलें हित कां करून घेत नाहींत? २. निरर्थक विषयाविषयीं हे कां बडबड करितात? त्यापेक्षां हरिनाम कां घेत नाहींत? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवास सेवा समर्पण करून (आपलें हित कां करून घेत नाहींत)? ४. [२५५९]

अरे, आपले सोबती हळू हळू एकेक जाऊं लागले आहेत असें असतां तूं निष्काळजीपणांत कां राहिलास? १. आतां तूं एकटा काय करशील? काळ अगदीं तुझ्या जवळ येऊन पोहोंचला आहे. २. अशा प्रसंगीं कांहीं काळ सावध होऊन आपली मुक्तता होईल असें कांहीं चांगलें कर्म करावें ३. हळूहळू तुझे कान, केंस व डोळे ह्यांचे व्यवहार अधिक नाहींसे होत चालले आहेत ४. मुखांतील दांतांत खिंडारें पडून कडेच्या दाढाहि नाहींशा होऊं लागल्या आहेत ५. मुखामध्यें एकटी जिव्हाच लुडबुडत राहिली आणि ती वाटेल तसें बरळत आहे ६. तुकाराज महाराज म्हणतात, अशा प्रकारें ह्या सर्व इंद्रियांनीं तुझा घात मांडला आहे (म्हणून वेळींच सावध हो व परमार्थ कर) ७. [२५६०]

अहो जन हो, प्रपंचाच्या संबंधानें माझ्याशीं कांहीं बोलूं नका १. आतां मला एक देव ह्या शब्दावांचून दुसरे कांहीं एक शब्द कानांनीं ऐकवत नाहींत २. आतां जन्माला येऊन पुण्यपापाचें दर्शन कोणीं घ्यावें? ३. ह्या पुण्यपापाचा पूर्वींपासून आजतागायत (पर्यंत) जो संचय झाला होता तो काळरूपी चोरानें नेला ४. कणसाचे ठिकाणीं दाणा तयार झाल्यावर पीक पाहिल्याबरोबर पिकाचा पाला आपोआप गळतो (भगवत्प्राप्ति हें माझें साध्य आहे, म्हणून इतर कोणत्याहि गोष्टींविषयीं प्रेम वाटत नाहीं) ५. तुकाराम महाराज म्हणतात, पापपुण्याचा गुंताडा मी आपल्यापुढें येऊं देणार नाहीं ६. [२५६१]

हे देवा, आतां तुमच्या आमच्यामध्यें मोबदला झाला (आम्हीं जीवभाव तुम्हांला समर्पण केला व तुमचा स्वरूपभाव आम्हीं घेतला) आतां लहान मोठेपणा कशाचा राहिला आहे? १. तुम्ही आम्ही एकमेकांच्या हातांत सांपडलों त्या योगें आम्ही चिंतारहित झालों २. हा प्रकार संतांच्या साक्षित्वानें घडून आला आहे, म्हणून आतां कोणासहि मागें फिरतां येणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आतां ह्या ठिकाणीं कांहीं स्पर्धा राहिली नाहीं, अगर हांव राहिली नाहीं ४. [२५६२]

हे देवा, माझें मलाच द्यावें. त्यावांचून तुमच्याकडून कांहीं नवें मिळण्याची इच्छा करीत नाहीं (लोक हो, तुम्ही विठ्ठलाचें नाम घ्या व रूप पाहा असें जें सांगतों तें कांहीं नवें नाहीं) १. ज्या रूपाला सहस्रावधि नामें आहेत, तें रूप

साक्षीविण बोलें । तरी मज पाहिजे दंडिलें ॥ ३ ॥ तुका म्हणे माल । माझा खरा हो विठ्ठल ॥ ४ ॥ [२५६३]

आम्हां लडिवाळांचे बोल । करा कवतुकें नवल ॥ १ ॥ करूं स्तुती तरि ते निंदा । तुम्ही जाणा हे गोविंदा ॥ २ ॥ बोबड्या उत्तरीं । तुम्हां रंजवितों हरी ॥ ३ ॥ मागतों भातुकें । तुका म्हणे कवतुकें ॥ ४ ॥ [२५६४]

न लाहिजे जपें न लाहिजे तपें । आम्हांसी हें सोपें गीतीं गातां ॥ १ ॥ न करितां ध्यान न करितां धारणा । तो नाचे कीर्तनामाजी हरि ॥ २ ॥ जयासी नाहीं रूप आणि आकार । तोचि कटीं कर उभा विटे ॥ ३ ॥ अनंत ब्रह्मांडें जयाचिया पोटीं । तो आम्हां संपुष्टीं भक्तिभावें ॥ ४ ॥ तुका म्हणे वर्म जाणती लडिवाळें । जीं होतीं निर्मळें अंतर्बाहीं ॥ ५ ॥ [२५६५]

जालों बळिवंत । होऊनियां शरणागत ॥ १ ॥ केला घरांत रिघावा । ठायीं पाडियेला ठेवा ॥ २ ॥ हातां चढे धन । नये (ऐसें) रचिलें कारण ॥ ३ ॥ तुका म्हणे मिठी । पायीं देऊनि केली सुटी ॥ ४ ॥ [२५६६]

लागपाठ केला । आतां वांटा नीट त्याला ॥ १ ॥ करा जोडीचा हव्यास । आले दुरील घरास ॥ २ ॥ फोडिलीं भांडारें । मोहोरलीं एक सरें ॥ ३ ॥ अवघियांपुरतें । तुका म्हणे घ्यावें हातें ॥ ४ ॥ [२५६७]

एकीं असे एक हेवा । येर अनावडी जीवां ॥ १ ॥ देवें केल्या भिन्न जाती । उत्तम कनिष्ठ मध्यस्ती ॥ २ ॥ प्रीतिसाठीं भेद । कोणी पूज्य कोणी निंद्य ॥ ३ ॥ तुका म्हणे लळा । त्याचा जाणे हा कळवळा ॥ ४ ॥ [२५६८]

भक्तांना साहाय्य करणारें असून फार चांगलें आहे २. जर माझें बोलणें कांहीं पुराव्याखेरीज (श्रुति-युक्ति अनुभवावांचून) असलें, तर मला तुम्हीं (लोकांनीं) शिक्षा केली पाहिजे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो, श्रीविठ्ठल हा माझा खरा माल आहे (म्हणून मी लोकांना तो घ्या, असें आग्रहानें सांगत आहें) ४. [२५६३]

हे देवा, आम्हां लाडक्या लेंकरांचें बोलणें ऐकून तुम्ही कौतुकानें आश्चर्य माना १. हे गोविंदा, मी तुमची जी कांहीं स्तुति करितों ती निंदा होत आहे असें तुम्ही जाणत आहांत २. हे हरि, बोबड्या बोलण्यानें मी तुम्हांला रंजवीत आहें. ३. तुकाराम महाराज म्हणतात, कौतुकानें व लाडानें मी कांहीं खाऊ मागत आहें ४. [२५६४]

जें परमार्थधन जपतपादि साधनांनीं प्राप्त होणारें नाहीं तें हरीचे गुण गायल्यामुळें आम्हांला सोपें झालें आहे १. कांहीं ध्यानधारणादि अष्टांग योग न करितां तो देव हरिकीर्तनामध्यें येऊन नृत्य करीत आहे २. ज्याला रूप आकार नाहीं असा जो निराकार तो साकार होऊन कमरेवर हात ठेवून विटेवर उभा राहिला आहे ३. अनंत ब्रह्मांडें ज्याच्या पोटामध्यें सामावलीं आहेत, तो भक्तिभावानें आमच्या हृदयसंपुटांत राहात आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, जे देवाविषयीं प्रेमळ आहेत ते अंतर्बाह्य निर्मल आहेत म्हणूनच देवाचीं खरीं वर्में जाणतात ५. [२५६५]

आम्ही देवाला शरण जाऊन सर्वांपेक्षा बलवान् झालों १. त्याच्या घरामध्यें शिरकाव करून त्याचा मुख्य सच्चिदानंदाचा ठेवा माहिती करून घेतला २. ज्या योगानें परमार्थधन हस्तगत होईल अशा प्रकारच्या कारणाची योजना केली ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाच्या पायांना मिठी घालून सर्व बंधनांपासून आम्हीं आपली सुटका करून घेतली ४. [२५६६]

आम्हीं परमार्थाचा पाठलाग करून कार्य साधलें, आतां ह्या ठिकाणीं जे नीट मार्गानें येतील त्यांना आमचा विभाग मिळेल १. जी वस्तु दूर होती ती आपल्या घरास आली आहे, म्हणून तुम्ही ती प्राप्त करून घेण्याविषयींचा हव्यास करा २. आम्ही येथें परमार्थाचें भांडार फोडल्यामुळें तें एकदम प्रगट झालें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तें सर्वत्रांना पुरण्यासारखें आहे आणि ह्या ठिकाणीं कोणी हरकत करणारें नाहीं, म्हणून सर्वत्रांनीं आपल्या हातांनीं घ्यावें. (मुखानें त्याचें चिंतन करावें) ४. [२५६७]

कित्येकांमध्यें एका परमार्थाचा सोस असतो व कित्येक जीवांना त्या विषयींची प्रीति मुळींच नसते १. देवानें अशा उत्तम, मध्यम व कनिष्ठ गुणात्मक निरनिराळ्या जाति निर्माण केल्या आहेत २. त्यांत कोणी श्रेष्ठ व कोणी नीच आहेत. हे भेद आपापल्या आवडीप्रमाणें होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या अंतःकरणांत ज्या विषयाविषयीं जशी कळकळ आहे तशी तो जाणतो (व आपली इच्छा पूर्ण करतो) ४. [२५६८]

स्वामीचें हें देणें । येथें पावलों दर्शनें ॥ १ ॥ करूं आवडीनें वाद । तुमच्या सुखाचा संवाद ॥ २ ॥ कळावया वर्म । हा तों(चि) पायांचाहि धर्म ॥ ३ ॥ तुका म्हणे सिद्धी । हेचि पाववीली बुद्धी ॥ ४ ॥ [२५६९]

रुसलों संसारा । आम्ही आप आणि परा ॥ १ ॥ म्हणऊनि केली सांडी । देउनि पडिलों मुरकंडी ॥ २ ॥ परतेंचि ना मागें । मोहो निष्ठुर झालों अंगें ॥ ३ ॥ सांपडला देव । तुका म्हणे केला भेव ॥ ४ ॥ [२५७०]

हें तों वाटलें आश्चर्य । तुम्हां धरवला धीर ॥ १ ॥ माझा फुटतसे प्राण । धांवा धांवा म्हणऊन ॥ २ ॥ काय नेणों दिशा । झाल्या तुम्हांविण ओशा (सा) ॥ ३ ॥ तुका म्हणे कां गा । नाइकिजे पांडुरंगा ॥ ४ ॥ [२५७१]

धांवा केला धांवा । श्रम होऊं नेदीं जीवा ॥ १ ॥ वर्षे अमृताच्या धारा । घेई वोसंगा लेंकरा ॥ २ ॥ उशीर तो आतां । न करावा हेच चिंता ॥ ३ ॥ तुका म्हणे त्वरें । वेग करीं विश्वंभरे ॥ ४ ॥ [२५७२]

जोडिले अंजुळ । असें दाना उताविळ ॥ १ ॥ पहा पहा कृपादृष्टी । आणा अनुभवा हे गोष्टी ॥ २ ॥ तूं स्वामी मी सेवक । आइक्य तें एका एक ॥ ३ ॥ करितों विनंती । तुका सन्मुख पुढती ॥ ४ ॥ [२५७३]

काय तुज कैसें जाणावें गा देवा । आणावें अनुभवा कैशा परी ॥ १ ॥ सगुण कीं निर्गुण स्थूल कीं लहान । न कळे अनुमान मज तुझें ॥ २ ॥ कोण तो निर्धार करूं हा विचार । भवसिंधु पार तरावया ॥ ३ ॥ तुका म्हणे कैसे पाय आतुडती । न पडे श्रीपती वर्म ठावें ॥ ४ ॥ [२५७४]

हे देवा, तुमची देणगी (मुक्तस्थिति) ह्या ठिकाणीं (ह्या जन्मांत) तुमच्या दर्शनाच्या योगानें मला प्राप्त झाली १. तुमच्या बरोबर आम्ही प्रीतीनें भांडण करूं आणि तुमच्या सुखाविषयींचें वर्णन करूं २. (ध्रुवपदांत दर्शविलेलें) तुमच्या प्राप्तीचें मर्म तुमच्या पायांच्या दर्शनानें आम्हांला समजलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकाराची बुद्धि ही मी सिद्धीला नेली ४. [२५६९]

आम्ही आपपर भावरूपी संसारावर रागावलों १. म्हणून त्याचा आम्ही त्याग करून देवाजवळ मुरकुंडी देऊन पडून राहिलों आहोंत २. त्या प्रापंचिक व्यवहारावर आम्ही निष्ठुर झाल्यामुळें आमचा मोह माघारी फिरत नाहीं. [प्रपंचाविषयीं मोह उत्पन्न होत नाहीं] ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा देव आम्हांला सांपडल्यामुळें आमचें भय नाहींसें झालें ४. [२५७०]

हे देवा, आम्ही तुमची करुणा भाकीत असून तुम्ही धीर धरून बसतां ह्याचें मला मोठें आश्चर्य वाटत आहे १. मजकडे धांवून या, असें वेळोंवेळां म्हणत असतां माझा प्राण शोषला आहे २. तुमच्यावांचून सर्व दिशा ओसाड पडल्या कीं काय हें मला समजत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अगा पांडुरंगा, मी करुणा भाकीत आहें तें तुम्हांला ऐकायला कां येत नाहीं ? ४. [२५७१]

मी तुम्हांला कींवकाकुळती येऊन हांका मारीत आहें. म्हणून तुम्ही धांवत या. माझ्या जीवास कांहीं श्रम होऊं देऊं नका १. त्या मला बालकाला उचलून कडेवर घ्या आणि प्रेमामृताची धार सोडून मला पाजा २. आतां तुम्ही ह्या कृत्यास वेळ लावूं नये. उशीर न करण्याविषयीं काळजी घे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे जगाचें पालन करणारे आई, तूं मोठ्या वेगानें मजकडे धांवत ये ४. [२५७२]

मी तुमच्यापुढें हात जोडून दान मिळविण्याकरितां उभा राहिलों आहें व त्याविषयीं उतावळा झालों आहें १. ही गोष्ट माझ्या अनुभवास येण्यासाठीं तुम्ही कृपादृष्टीनें मजकडे अवलोकन करा (असें द्विवार विनविलें) २. तुम्ही आमचे स्वामी व मी तुमचा सेवक अशी एको उभयतांमध्यें असावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशी विनंति मी तुमच्या समोर उभा राहून वारंवार करीत आहें (माझ्याकडे एकदां कृपादृष्टीनें पाहा) ४. [२५७३]

अगा देवा, तुला आम्हीं जाणावें तरी कसें आणि कोणत्या रूपानें तुझा अनुभव घ्यावा ? १. तूं सगुण किंवा निर्गुण, लहान कीं मोठा आहेस, हें अनुमानानें कांहीं जाणतां येत नाहीं २. हा संसारसमुद्र पार तरून जाण्याविषयीं कोणत्या प्रकारचा विचार करून आम्हीं निश्चय करावा ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे श्रीपति, तुझे पाय आम्हांला कसे सांपडतील ? कारण ते प्राप्त होण्याचें मर्म आम्हांस कांहीं समजत नाहीं ४. [२५७४]

मी तंव बैसलों धरुनियां आस (ध्यास)। न करीं उदास पांडुरंगा ॥ १ ॥ नको आतां मज दवडूं श्रीहरी। मागाया भिकारी झालों दास ॥ २ ॥ भुकेलों कृपेच्या वचनाकारणें। आशा नारायणें पुरवावी ॥ ३ ॥ तुका म्हणे येऊनियां देईं भेटी। कुरवाळुनी पोटीं धरीं मज ॥ ४ ॥ [२५७५]

आतां तुझें नाम गात असें गीतीं। म्हणोनि मानिती लोक मज ॥ १ ॥ अन्नवस्त्रचिंता नाहीं या पोटाची। वारिली देहाचि थोर पीडा ॥ २ ॥ सज्जन संबंधी तुटली उपाधी। रोकडा या बंदीं सुटलोंसें ॥ ३ ॥ घ्यावा द्यावा कोणें करावा सायास। गेले आशापाश वारोनियां ॥ ४ ॥ तुका म्हणे तुज कळेल तें आतां। करा जी अनंता मायबापा ॥ ५ ॥ [२५७६]

कामक्रोध माझे (सुनें) लावियेले पाठीं। बहुत हिंपुटी झालों देवा ॥ १ ॥ आवरितां तुझे तुज नावरती। थोर वाटे चित्तीं आश्चर्य हें ॥ २ ॥ तुझिया विनोदें आम्हां प्राणसाटीं। भयभीत पोटीं सदा दुःखी ॥ ३ ॥ तुका म्हणे माझ्या कपाळाचा गुण। तुला हांसे कोण समर्थासी ॥ ४ ॥ [२५७७]

स्वमुखें जी (स्वमुखेंचि) तुम्हीं सांगा मज सेवा। ऐसें माझें देवा मनोगत ॥ १ ॥ नेघों आम्ही कांहीं आपल्या उदारें। चित्तवित्त घरें जीवावरी ॥ २ ॥ बोलें परस्परें वाढवावें सुख। पाहावें श्रीमुख डोळेभरी ॥ ३ ॥ तुका म्हणे सत्य बोलतों वचन। करूनी चरण साक्ष तुझे ॥ ४ ॥ [२५७८]

मज अनाथाकारणें। करीं येणें केशवा ॥ १ ॥ जीव झुरे तुजसाठीं। वाट पोटीं पहातसें ॥ २ ॥ चित्त रंगलें चरणीं। तुजवांचूनी न राहे ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपावंता। माझी चिंता असावी ॥ ४ ॥ [२५७९]

कासया वांचूनि झालों भूमीभार। तुझ्यापायीं थार नाहीं तरी ॥ १ ॥ जातां भलें काय

हे पांडुरंगा, मी तुमच्या भेटीची आशा धरून बसलों आहें म्हणून तुम्ही मला त्याविषयीं निराश करूं नका १. हे श्रीहरि, तुमच्या द्वारामध्यें मी तुमचा सेवक होऊन भीक मागावयास आलों आहें. आतां तुम्ही मला हांकलून देऊं नका २. तुम्ही कृपा करून कांहीं तरी बोला. ह्याविषयीं मला फार भूक लागली आहे, म्हणून नारायणांनीं माझी आशा पूर्ण करावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही येऊन मला भेट द्या आणि माझें सर्व अंग कुरवाळून तुम्ही मला आपल्या पोटाशीं धरा ४. [२५७५]

हे देवा, आतां तुझें नाम मी गात आहें, म्हणून लोक मला मानतात १. अन्नवस्त्राबद्दलची काळजी नाहींशी झाली आहे, त्या योगानें देहसंबंधीं महत् दुःख नाहींसें झालें २. देहसंबंधी जनांची (आप्त–इष्टांची) उपाधि नाहींशी केल्यामुळें ह्या बंधनापासून मी तात्काळ मोकळा झालों आहें ३. माझे सर्व आशापाश निवारण झाले आहेत, म्हणून देवघेवीचा व्यवहार कोण करतो ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, जी अनंता मायबापा, इतःपर आतां तुम्हांला वाटेल तसें करा ५. [२५७६]

हे देवा, तूं कामक्रोधादि विकार (किंवा, कुत्रे) माझ्यामागें लावले आहेस. त्या त्रासानें मी फार दुःखी झालों आहें १. ते तूं आवरावयास लागलास तर ते तुझे तुला आंवरले जात नाहींत. ह्याबद्दल माझ्या मनाला मोठें आश्चर्य वाटतें २. हे तुझे सहज कौतुकाचे खेळ आहेत पण त्या योगानें आमच्या प्राणाचा नाश होणारा आहे, म्हणून मी भयभीत होऊन सर्व काळ दुःखी आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा माझ्या प्रारब्धाचा गुण आहे. तूं श्रीमंत असल्यामुळें तुला कोण हंसणार व कोण दोष देणार ? ४. [२५७७]

जी महाराज देवा, तुम्हीं आपल्या मुखानें कांहीं तरी सेवा सांगावी अशी माझ्या मनांत इच्छा आहे १. आम्ही आपल्या चित्तानें जीवावर व द्रव्यादि घरादारावर उदार झालों, म्हणून तुम्हीं सेवेवांचून कांहीं दिल्यास तें आम्ही घेणार नाहीं २. तुमचें श्रीमुख डोळे भरून पाहावें व उभयतांनीं गोड भाषणाचें सुख वाढवावें, हें माझें मनोगत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्या पायांची शपथ वाहून सांगतों, कीं माझें बोलणें हेंच खरें आहे ४. [२५७८]

हे केशवा, मज दीनाकरितां तूं त्वरेनें ये १. कारण तुझ्या भेटीकरितां माझा जीव तळमळ करीत आहे, म्हणून मी तुझी वाट पाहातों २. माझें चित्त तुझ्या पायाच्या ठिकाणीं रंगलें आहे, तें तुझ्या भेटीवांचून स्थिर होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे कृपावंता, माझी काळजी तुला असूं द्या ४. [२५७९]

जर तुझ्या पायांच्या ठिकाणीं मला आश्रय मिळत नाहीं तर मी पृथ्वीला ओझें झालों आहें. मग मला निष्कारण

डोळियांचें काम। जंव पुरुषोत्तम न देखती ॥ २ ॥ काय मुख पेंव श्वापदांचें धांव। नित्य तुझें नांव नुच्चारितां ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां पांडुरंगाविण। न वांचतां क्षण जीव भला ॥ ४ ॥ [२५८०]

नको मज ताठा नको अभिमान। तुजवीण क्षीण होतो जीव ॥ १ ॥ दुर्धर हे माया न होय सुटका। वैकुंठनायका सोडवीं मज ॥ २ ॥ तुका म्हणे तुझें झालिया दर्शन। मग निवारण होईल सर्व ॥ ३ ॥ [२५८१]

चाल घरा उभा राहें नारायणा। ठेवूं दे चरणांवरि माथा ॥ १ ॥ वेळोवेळां देईं क्षेम आलिंगन। करीं अवलोकन कृपादृष्टी ॥ २ ॥ प्रक्षाळूं दे पाय बैसें माजघरीं। चित्त स्थिर करीं पांडुरंगा ॥ ३ ॥ आहे त्या संचितें करवीन भोजन। काय न जेवून करिसी आतां ॥ ४ ॥ करुणाकरें नाहीं कळों दिलें वर्म। दुरी होतां भ्रम कोण वारी ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां आवडीच्या सत्ता। बोलिलों अनंता करवीन तें ॥ ६ ॥ [२५८२]

देवाची ते खुण आला ज्याच्या घरा। त्याच्या पडे चिरा संसारासी ॥ १ ॥ देवाची ते खुण करावें वाटोळें। आपणा वेगळें राहों नेदी ॥ २ ॥ देवाची ते खुण गुंतों नेदी वाचा। लागों असत्याचा मळ नेदी ॥ ३ ॥ देवाची ते खुण झाला जया संग। त्याच्या झाला भंग मनुष्यपणा ॥ ४ ॥ देवाची ते खुण गुंतों नेदी आशा। ममतेच्या पाशा शिवों नेदी ॥ ५ ॥ देवाची ते खुण करावें तोंडाळ। आणिक सकळ जग हरी ॥ ६ ॥ पहा देवें तेंचि बळकाविलें स्थळ। तुक्यापें सकळ चिन्हें त्याचीं ॥ ७ ॥ [२५८३]

अनंताचे मुखीं होसील गाइला। अमुप विठ्ठला दास तुम्हां ॥ १ ॥ माझें कोठें आलें होईल विचारा। तरीच अव्हेरा योग्य झालों ॥ २ ॥ सर्व काळ तुम्ही असा जी संपन्न। चतुरा नारायण

जगून तरी काय करावयाचें आहे १. तूं सर्व पुरुषांमध्यें उत्तम आहेस त्या तुझें जर दर्शन होत नाहीं, तर हे डोळे गेले असतां बरें २. मुख हें जर तुझें नाम सतत घेत नसेल तर तें धान्याचें पेंव आहे किंवा वाघ आणि लांडगे ह्यांचें घर आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां पांडुरंगावांचून जर एक क्षण जात असेल तर जीव न वांचेल तर बरें ४. [२५८०]

हे देवा, माझ्या ठिकाणीं गर्व व अभिमान हे राहूं देऊं नकोस, कारण तुजवांचून माझा जीव क्षीण होत आहे १. हे वैकुंठनायका, तुझी माया मोठी दुस्तर आहे, म्हणून तूं मला तिच्यापासून सोडीव २. तुकाराम महाराज म्हणतात, एक वेळ तुझें दर्शन झालें म्हणजे मग सर्व मायादि विकारांचें आपोआप निरसन होईल ३. [२५८१]

हे नारायणा, तूं माझ्या घरीं येऊन उभा राहा आणि मला तुझ्या पायांवर मस्तक ठेवूं दे १. वेळोवेळीं आलिंगन देऊन मजकडे कृपादृष्टीनें अवलोकन कर २. माझ्या हृदयरूपी माजघरांत तूं बैस. मला तुझे पाय धुऊं दे. तूं माझें चित्त स्थिर कर ३. जो कांहीं जवळ संचय (स्वयंपाकाची सामुग्री) आहे त्याप्रमाणें स्वयंपाक करून मी तुला जेवूं घालीन. आतां तूं न जेवून काय करशील! (जसें असेल तसें जेवलें पाहिजे) ४. दयावंत देवानें आपलें मर्म मला समजूं दिलें नाहीं. आतां जर तुम्ही टाकून गेलां तर माझा भ्रम कोण निवारण करील? ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे अनंता, आतां प्रीतीच्या योगानें माझी सत्ता तुमच्यावर आहे म्हणून मी जसें बोललों तसें तुझ्याकडून करवीन ६. [२५८२]

ज्याच्या अंतःकरणांत देव आला त्याच्या संसारावर दगड पडावा (म्ह० संसाराचा नाश व्हावा) हीच त्याची खूण आहे १. त्याचा सर्व नाश करून आपणावेगळें त्याला राहूं देऊं नये हीं देवाच्या प्राप्तीचीं चिन्हें आहेत २. त्याच्या वाचेला आपल्या नामावांचून असत्यादि मळामध्यें गुंतूं देऊं नये ही अंतःकरणांत देव आल्याची खूण आहे ३. ज्याला देवाची संगति झाली आहे त्याच्या मनुष्यपणाचा नाश व्हावा हींच त्याचीं चिन्हें आहेत ४. त्याला कोणत्याहि प्रकारच्या आशेच्या व ममतेच्या पाशामध्यें गुंतूं देऊं नये हीच देव अंतरीं आल्याची खूण आहे ५. ज्याला देवाची प्राप्ति झाली आहे तो चांगला वक्ता होऊन सर्व जगताला आपल्या स्वाधीन ठेवतो हीच त्याची खूण आहे ६. तुकाराम महाराज म्हणतात, माझें हृदयरूपी घर देवानें बळकावलें आहे म्हणून तीं सर्व चिन्हें माझ्या ठिकाणीं आहेत तीं तुम्ही प्रत्यक्ष पाहा ७. [२५८३]

हे विठ्ठला, अनंतावधि लोक तुझें वर्णन मुखानें करीत आहेत. असे तुझे सेवक अगणित आहेत १. त्या ठिकाणीं मज गरिबाची दाद कोठें लागेल? म्हणूनच मी अव्हेर करण्यायोग्य झालों आहें २. हे नारायणा, सर्व चतुरांमध्यें

शिरोमणि ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसे कलियुगींचे जीव । तरी नये कींव बहुपापी ॥ ४ ॥ [२५८४]

न करावी चिंता । भय न धरावें सर्वथा ॥ १ ॥ दासां साह्य नारायण । होय रक्षिता आपण ॥ २ ॥ न लगे परिहार । कांहीं योजावें उत्तर ॥ ३ ॥ न धरावी शंका । नये बोलों म्हणे तुका ॥ ४ ॥ [२५८५]

भांडवल माझें लटिक्याचे गांठीं । उदीमासी तुटी यावी हेचि ॥ १ ॥ कैसी तुझी वाट पाहों कोणा तोंडें । भोंवतालें भांडे गर्भवास ॥ २ ॥ बहू खाणींचिया रंगलोंसें रंगें । सुष्ट दुष्ट अंगें धरूनियां ॥ ३ ॥ बहुतांचे बहु पालटलों साळे । बहु आले काळे रंग अंगा ॥ ४ ॥ उकलूनि नये दावितां अंतर । घडीचा पदर सारूनियां ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां करीं गोळ्या साटीं । आपणा (आपुल्या) पालटीं संगें देवा ॥ ६ ॥ [२५८६]

संतसंगतीं न करावा वास । एखादे गुणदोष अंगा येती ॥ १ ॥ मग तया दोषा नाहीं परिहार । होय अपहार सुकृताचा ॥ २ ॥ तुका म्हणे नमस्कारावें दुरून । अंतरीं धरून राहें रूप ॥ ३ ॥ [२५८७]

जें ज्याचें जेवण । तेंचि याचकासी दान ॥ १ ॥ आतां जाऊं चोजवीत । जेथें बैसतील संत ॥ २ ॥ होतीं धालीं पोटें । मागें उरलीं उच्छिष्टें ॥ ३ ॥ तुका म्हणे धांव । पुढें खुंटईल हांव ॥ ४ ॥ [२५८८]

धरावा तो बरा । ठाव वसतीचा थारा ॥ १ ॥ निजलया जागविती । निज पुरवूनि देती ॥ २ ॥ एक वेवसाव । त्याचा संग त्यांचा जीव ॥ ३ ॥ हितें कळे हित । ग्वाही एक एकां चित्त ॥ ४ विषमाचें कांहीं । आड तया एक नाहीं ॥ ५ ॥ तुका म्हणे बरीं । घरा येतील त्यापरी ॥ ६ ॥ [२५८९

तुम्ही श्रेष्ठ आहांत आणि सर्व गुणांनीं सर्व काळ संपन्न आहांत ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी ह्या कलियुगांतील जीव फार पातकी आहें; म्हणूनच तुम्हांला माझी दया येत नाहीं ४. [२५८४]

अहो जन हो, तुम्ही कांहीं काळजी करूं नका व निश्चयानें कांहीं भय धरूं नका १. कारण आपल्या दासांना नारायण साहाकारी होऊन स्वतः त्यांचें रक्षण करितो २. त्याच्याजवळ आपल्या संबंधाची हकीगत सांगण्याच्या उद्देशानें कांहीं शब्दांची योजना करण्याचें कारण नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही कांहीं भीति धरूं नका व त्याविषयीं कांहीं बोलूं नका ४. [२५८५]

ज्या योगानें व्यवहारांत तोटा येईल, हेंच खोटें भांडवल माझ्या गांठीस आहे १. हे देवा, गर्भवासाचें दुःख माझ्या भोंवतें लागलें आहे, म्हणून मी तुझी वाट कशी व कोणत्या तोंडानें पाहूं ? २. कांहीं चांगलें व कांहीं वाईट अशा अनेक योनींच्या अनेक स्वभावानें (गुणकर्मांच्या रंगांनीं) मी स्वतः रंगलों आहें ३. अनेकांच्या संगतीनें मी पुष्कळ बदलत आलों, आणि अनेक तमोगुणी रंग माझ्या ठिकाणीं आले ४. घडीच्या पदराच्या सणंगाच्या वरचा पदर बाजूला करून आंतलें अंग जसें दाखवितां येत नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, तसें हे देवा, ह्या शरीररूप वस्त्राचा गोळा वरघडी पालवानें शोभिवंत आहे. तो उलगडून न पाहातां तुम्हीं आपल्या स्वरूपाच्या मोबदला तो घ्यावा ६. [२५८६]

संताच्या संगतीनें अति संघट्टण करून वास्तव्य करूं नये, कारण त्यांचा एखादा दुसरा दोष आपल्या अंगाला जडण्याची शक्यता आहे १. त्या योगानें अपरिहार्य दोष लागतो आणि त्यापासून आपल्या पदरीं असलेल्या सर्व पुण्याचा नाश होतो २. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां संतांस दुरून नमस्कार करावा आणि त्यांचें रूप आपल्या अंतःकरणांत धरून राहावें ३. [२५८७]

जें ज्याचें भक्ष्य आहे, तेंच याचकाला दान देतात १. आतां ज्या ठिकाणीं संतांचें वास्तव्य आहे (जेथें संत ज्ञान–भक्तीचें जेवण करीत असतील) त्याचा आम्ही शोध करीत जाऊं २. ते श्रीहरीच्या नामचिंतनानें तृप्त झाले आहेत व त्यांचें उच्छिष्ट पश्चात् उरलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या योगानें सर्व आशा नाहींशी होऊन पुढील जन्ममरणाच्या येरझारा कुंठित होतील ४. [२५८८]

ते संत ज्या ठिकाणीं राहातात त्या ठिकाणाच्या आश्रयानें राहावें हें बरें १. कारण स्वरूपाची अज्ञानरूपी निद्रा ज्यांना लागली आहे त्यांना ते संत सावध करून निज [आत्म] वस्तूची प्राप्ति करून देतात २. त्यांचा जो व्यवहार आहे, तो त्यांच्या संगतीनें व जीवैक्यभावानें आपलासा करावा ३. त्यांच्या स्वहितानेंच आपलें हित कळणारें आहे. ह्याविषयीं परस्परांचें चित्त साक्षी आहे ४. त्यांच्या ठिकाणीं द्वैतभावाचा कांहींएक प्रतिबंध नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या प्रकारानें ते अनुभवी संत घरीं येतील तो प्रकार बरा ६. [२५८९]

धोंड्यासवें आदळितां फुटे डोकें। तो तों त्याच्या दुःखें घामेजेना ॥ १ ॥ इंगळासी सन्निधान अतित्याई। क्षेम देतां काई सुख वाटे ॥ २ ॥ सप्रेमें कुरवाळी महाफणी व्याळ। आपुली ते ढाळ जावूं नेदी (आपुला तो ढाळ सांडी केवीं) ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हांसवें जो रुसला। तयाचा अबोला आकाशासीं ॥ ४ ॥ [२५९०]

आतां तळमळ। केली पाहिजे सीतळ ॥ १ ॥ करील तें पाहें देवा (पहा करील तें देव)। पायीं ठेवूनियां भाव ॥ २ ॥ तोचि अन्नदाता ! नाहीं आणिकांची सत्ता ॥ ३ ॥ तुका म्हणे दासा। नुपेक्षील हा भरंवसा ॥ ४ ॥ [२५९१]

लांब धांवे पाय चोरी। भरोवरी जनाच्या ॥ १ ॥ आतां कैसें होय याचें। सिजतां काचें राहिलें ॥ २ ॥ खाय ओकी वेळोवेळां। कैसी कळा राहेल ॥ ३ ॥ तुका म्हणे भावहीण। त्याचा सीण पावावा ॥ ४ ॥ [२५९२]

माझ्या इंद्रियांसीं लागलें भांडण। म्हणतील कान रसना धाली ॥ १ ॥ करिती तळमळ हस्त पाद भाळ। नेत्रांसी दुकाळ पडिला थोर ॥ २ ॥ गुण गाय मुख आइकती कान। आमचें कारण तैसें नव्हे ॥ ३ ॥ दरुपणें फिटे नेत्रांचा तो पांग। जेथें ज्याचा भाग घेईल तें ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐसें करीं नारायणा। माझी ही वासना ऐसी आहे ॥ ५ ॥ [२५९३]

जन्मा येउनि तया लाभ झाला। बिडवई भेटला पांडुरंग ॥ १ ॥ संसारदुःखें नासियेलीं तेणें। उत्तम हें केणें नामघोष ॥ २ ॥ धन्य तेचि संत सिद्ध महानुभाव। पंढरीचा ठाव ठाकियेला ॥ ३ ॥ प्रेमदाते तेच पतितपावन। धन्य दरुषण होय त्याला ॥ ४ ॥ पावटणि पंथें झालिया सिद्धि।

जर कोणी दगडावर डोकें आपटिलें तर तें फुटेल, पण त्या दगडाचें हृदय त्या दुःखानें द्रवलें जाणार नाहीं १. दुराग्रहानें विस्तवाजवळ जाऊन त्याला जर स्पर्श केला, तर त्यापासून कांहीं सुख होईल काय ? २. मोठ्या विखारी सर्पास जर कोणीं प्रेमानें कुरवाळिलें, तर तो सर्प आपला स्वभाव टाकील काय ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो मूर्ख आमच्यावर रुसला आहे, त्याचा अबोला आकाशाबरोबर असल्यासारखा समजावा (त्यांत रुसणाऱ्याचेंच नुकसान होईल, आमचें नाहीं) ४. [२५९०]

अहो जन हो, तुम्ही आपल्या अंतःकरणांतील प्रापंचिक तळमळ आतां शांत केली पाहिजे १. देवाच्या चरणारविंदीं भाव ठेऊन, तो जें करील तें तुम्ही निवांतपणें पाहा २. सर्वभूतांस अन्न देणारा तोच आहे. त्यावांचून कोणी सत्ताधीश नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो आपल्या दासाचा अव्हेर कधींहि करणार नाहीं अशी खात्री आहे ४. [२५९१]

जो कोणी जनांमध्यें लांबलचक गोष्टी सांगावयास धांवतो, पण तशी वर्तणूक न करतां लोकांना चोरून आपण भलतेंच आचरण करतो १. अन्न शिजत असतां परिपक्व न होऊन कांहीं कच्चें राहिलें, तर त्याचें कसें होईल, म्हणजे कोणतीहि गोष्ट करीत असतां ती परिपक्व दशेला न येतां जर कच्ची राहील तर त्या करणाराचें कसें होईल ? २. घरचेवर खावें, आणि तेंच ओकून पाडावें त्या योगानें देहावर जेवल्याची चांगली तेजी कशी राहील ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचे जे भावहीन आहेत त्यांचें दर्शन ज्यास होईल त्यास दुखणें उलटल्याप्रमाणें श्रम होतील ४. [२५९२]

माझीं इंद्रियें आपआपसांत भांडण करूं लागलीं. कान हे जिव्हेला म्हणूं लागले, कीं तूं हरिचिंतन करून तृप्त झालीस. हात, पाय, कपाळ हे तर श्रीहरिविषयीं सारखी तळमळ करीत आहेत. डोळ्यांना तर श्रीहरिदर्शनाविषयीं मोठा दुष्काळ पडला आहे २. वाणी ही श्रीहरीचे गुण गात आहे. कान हे श्रीहरीचे गुणानुवाद श्रवण करीत आहेत. त्या योगेंकरून बाकीचीं इंद्रियें म्हणतात, कीं आमचें तसें कार्य होत नाहीं ३. ह्याकरितां एक श्रीहरीचें दर्शन झालें म्हणजे डोळ्यांचा पांग फिटून ज्या इंद्रियांचा जो विषय आहे, तो तें आपआपल्या श्रीहरीच्या स्वरूपीं घेईल ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, असें तुम्ही करा, ही वासना माझ्यामध्यें आहे ५. [२५९३]

ज्यांना तारणारा समर्थ पांडुरंग भेटला आहे, त्यांना मनुष्यजन्माला येऊन खरोखर लाभ झाला आहे १. त्या पुरुषानें संसारदुःखाचा निरास केला असा हा हरिनामचिंतनाचा घोषरूपी माल उत्तम आहे २. त्यांचें संचितकर्म धन्य आहे, कारण ते ब्रह्मानुभवी सिद्ध-संत हे पंढरी मुक्कामीं दाखल झाले ३. अशा प्रकारचे हे सिद्ध जीवांना हरिविषयींचें प्रेमदान देऊन पतितांना पावन करणारे आहेत. अशा महात्म्यांचें ज्यास दर्शन होईल तो धन्य आहे ४. ते साधुमार्गानें चालले

बोळगे समाधि सायुज्यता ॥ ५ ॥ प्रेम अराणूक नाहीं भय धाक। मज तेणें सुख काय चिंता ॥ ६ ॥ ते दुर्लभ संसारासी। जडजीव उद्धार लोकांसी ॥ ७ ॥ तुका म्हणे त्यांसी। धन्य भाग्य दरुषणें ॥ ८ ॥ [२५९४]

सिद्धीचा दास नव्हें श्रुतींचा अंकिला। होईन विठ्ठला दास तुझा ॥ १ ॥ सर्व सुख असे माझिये मानसीं। राहिलों तयांसी नाश नाहीं ॥ २ ॥ तेणें पुण्य पाप न पाहें लोचनीं। आणीकावांचूनि पांडुरंगा ॥ ३ ॥ न करीं मी आस साधनीं (मुक्तीचे) सायास। भक्तिप्रेमरस वांचूनियां ॥ ४ ॥ गर्भवासीं धाक (दुःख) नाहीं येतां जातां। हृदयीं असतां नाम तुझें ॥ ५ ॥ तुका म्हणे तुझा होईन अंकिला। न भें मी विठ्ठला कळिकाळासी ॥ ६ ॥ [२५९५]

काय दिवस गेले अवघेचि वऱ्हाडें। तें आलें सांकडें कथेमाजी ॥ १ ॥ क्षण एके ठायीं मन स्थिर नाहीं। आराणूक कई होइल पुढें ॥ २ ॥ कथेचा विरस (विसर) दोषामुळें होय। तरणे उपाय (तरणोपाय) कैंचा माती (मग) ॥ ३ ॥ काय सांचवूनि उरलें हें मागें। घटिका एक संगें काय गेली ॥ ४ ॥ तेचि वाणी तेथें (येथें) करा उजळणी। काढावीं मंथूनि शब्दरत्नें ॥ ५ ॥ तुका म्हणे हेंचि बोलावया चाड। नाम घेतां गोड हित असे ॥ ६ ॥ [२५९६]

शुद्धाशुद्ध निवडे कैसें। चर्म मांस भिन्न नाहीं ॥ १ ॥ कांहीं अधिक नाहीं उणें। कवण्या गुणें देवासी ॥ २ ॥ उदक भिन्न असे काई। वाहाळ बावी सरिता नई ॥ ३ ॥ सूर्य तेजें निवडे काय। रश्मी रसा सकळा खाय ॥ ४ ॥ वर्णां भिन्न दुधा नाहीं। सकळां गाई सारखें ॥ ५ ॥ करितां भिन्न नाहीं माती। मडक्या गति भिन्न नांवें ॥ ६ ॥ वर्ते एकविध अग्नि। नाहीं मनीं शुद्धाशुद्ध ॥ ७ ॥ तुका म्हणे पात्र चाड। किंवा विष अमृत गोड ॥ ८ ॥ [२५९७]

तर अष्टमहासिद्धि ह्या त्यांच्या पायांच्या खालच्या पायऱ्या होतात. समाधि आणि सायुज्यमुक्ति ह्या तेथें दास्यत्व करितात ५. ते निरंतर हरिविषयींच्या प्रेमानें विश्रांतीला पावले आहेत. त्यांना कोणतेंहि भय राहिलें नाहीं! त्यांच्या योगानें मला कांहीं चिंता आहे काय? ६. जे जडजीवलोकांचा उद्धार करणारे साधु आहेत ते संसारामध्यें दुर्मिळ आहेत ७. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांना अशा संतांचें दर्शन होतें त्यांचें भाग्य धन्य आहे ८. [२५९४]

मी अष्टमहासिद्धींचा दास नाहीं व श्रुतींच्याहि स्वाधीन नाहीं, तर हे विठ्ठला, मी तुझा दास आहें १. सर्व सुखानें माझ्या मनाच्या ठिकाणीं वस्ती केली आहे, ती कधींहि नाश पावणारी नाहीं २. त्या सुखाच्या भरांत मी एका पांडुरंगावांचून पुण्य आणि पाप अवलोकन करीत नाहीं ३. मी भक्तिरस सोडून अन्य साधनांचे सायास करणार नाहीं ४. हे देवा, तुझें नामचिंतन हृदयांत असल्यामुळें गर्भवासास येण्याजाण्याचें भय नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठ्ठला, मी एक तुझाच आज्ञाधारक झाल्यामुळें मला काळाचें देखील भय नाहीं ६. [२५९५]

सर्व दिवस प्रपंचव्यवहारामध्यें गेले काय? म्हणून त्याचें संकट हें हरिकथेमध्यें येऊन उभें राहिलें १. माझें मन एका ठिकाणीं क्षणभर देखील स्थिर राहात नाहीं. अशा स्थितीनें पुढें विश्रांति केव्हां मिळणार? २. कथेचा विरस (विसर, विस्मरण) होणें हें दोषांचें मूळ होय. असें झाल्यावर मग तरणोपाय कसला मातीचा! ३. संचय करून मागें काय उरलें आहे व तो करण्यांत ज्यानें आपला काळ घालविला आहे त्यापैकीं एक घटका तरी त्याचेबरोबर गेली काय? ४. त्या हरिनामचिंतनाच्या आवृत्तिरूपी मंथनानें (सूक्ति-सुभाषितरूपी) शब्दरत्नें प्रगट करावीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, हरीचें नाम तोंडानें घेण्यांत हित आहे म्हणून तेंच बोलण्याची मला इच्छा आहे ६. [२५९६]

सर्व देहांच्या त्वचा आणि मांस यांत भेद नाहीं, तर शुद्ध आणि अशुद्ध हें कसें निवडावें? १. देवाचे ठिकाणीं कोणी अधिक व कमी असा विषमभाव कोणत्याहि योगानें नाहीं २. ओढा, विहीर, नदी, नद इतके जरी भेद आहेत तरी उदकामध्यें कांहीं भेद आहे काय? ३. (सूर्याचे किरण) सूर्यरश्मि ह्या सकळ रसांचें शोषण करितात तरी त्यांच्या तेजांत वेगळेपणा होतो काय? ४. अनेक रंगांच्या अनेक गाई असतात तथापि त्यांच्या दुधामध्यें अनेक रंग नसून सर्व गाईचें एकाच रंगाचें दूध असतें ५. मडकीं हीं जरी निरनिराळ्या आकृतींचीं केलेलीं असतात, तरी मातीमध्यें भेद नाहीं ६. अग्नि हा एकरूपानें असतो, त्याबद्दलचे शुद्धाशुद्ध भाव मनामध्यें येत नाहींत ७. तुकाराम महाराज म्हणतात, पात्र चांगलें असण्याची जरूरी आहे कीं आंतील गोड, कडु, विष, अमृत पाहाण्याची जरूरी आहे? (पात्र कसेंहि असलें तरी आंतल्या वस्तूला महत्त्व असतें) ८. [२५९७]

न धरी प्रतिष्ठा कोणाचीही यम। म्हणतां कां रे राम लाजा झणी ॥ १ ॥ सांपडे हातींचें सोडवील काळा। तो कां वेळोवेळां न ये वाचे ॥ २ ॥ कोण लोक जो हा सुटला तो एक। गेले कुंभ (भी) पाकें रवरवांत ॥ ३ ॥ तुका म्हणे हित तो म्हणा विठ्ठल। न म्हणे तो भोगील कळेल तें ॥ ४ ॥ [२५९८]

म्हणवितां हरी न म्हणे तयाला। दरवडा पडिला देहामाजीं ॥ १ ॥ आयुष्यधन त्याचें नेलें यमदूतीं। भुलविला निश्चितीं कामरंगें ॥ २ ॥ नावडे ती कथा देउळासी जातां। प्रियधनसुतां लक्ष तेथें ॥ ३ ॥ कोण नेतो तया घटिका दिवसा एका। कां रे म्हणे तुका नागवसी ॥ ४ ॥ [२५९९]

कथे बैसोनि सादरें। सुखचर्चा परस्परें। नवल काय तो उद्धरे। आणीक तरे सुगंधें ॥ १ ॥ पुण्य घेईं (घ्यावें) रे फुकाचें। पाप दुष्ट वासनेचें। पेरिलिया बीजाचें। फळ घेईं शेवटीं ॥ २ ॥ कथे विरस पाडी आळसें। छळणा करूनि मोडी रस। बुडवी आपणासरिसें। विटाळसें (सी) नावेसी ॥ ३ ॥ सज्जन चंदनाचिये परी। दुर्जन देशत्यागें दुरी। राहो म्हणे हरि। विनंति करी तुका हे ॥ ४ ॥ [२६००]

कळों आलें तुझें जिणें। देवा तूं माझें पोषणें (पोसणें) ॥ १ ॥ वाट पाहासी आमुची (आठवाची)। सत्ता सतत ते कईंची ॥ २ ॥ दोलावितां यावें रूपा। सदा निर्गुणींचि लपा ॥ ३ ॥ तुका म्हणे तूं परदेशी। येथें आम्हां अंगेजिसी ॥ ४ ॥ [२६०१]

आतां येथें लाजे नाहीं तुझें काम। जाय मज राम आठवूं दे ॥ १ ॥ तुझे भिडे माझे बहु झाले घात। केलों या अंकित दुर्जनांचा ॥ २ ॥ माझें केलें मज पारिखें माहेर। नष्ट तूं साचार चाळविलें

यम हा, इहलोकांत कोणी कितीहि मोठा असला तरी, त्याची पर्वा करीत नाहीं. असें जर आहे तर रामनाम घेण्याविषयीं तुम्ही लाज कां धरितां ? १. काळाचे तडाख्यांत सांपडलेल्या प्राण्यास जो सोडवितो, त्याचें नाम वाचेला वेळोवेळीं कां येत नाहीं ? २. केवळ आपल्या स्वतःच्या सामर्थ्यावर कोणीहि काळाच्या तडाख्यांतून सुटला नाहीं. मात्र जे रामनामाचें स्मरण करितात ते मोक्षाप्रत जातात. बाकीचे सर्व रौरव नरकास जातात ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर आपलें हित व्हावें असें वाटत असेल तर विठ्ठलाचें चिंतन करा. जो कोणी तें करणार नाहीं त्याला ज्या वेळीं नरक भोगावा लागेल त्या वेळीं कळेल ४. [२५९८]

हरिभजन करावयास ज्यानें सांगितलें आहे त्याप्रमाणें जो न करील त्याच्या अंतःकरणांत कामादि विकारांनीं दरोडा घातला असें समजावें १. त्याचें आयुष्य व परमार्थ धन हे यमदूत घेऊन गेले व त्याला विषयकामनेच्या रंगांत निश्चयानें मोहित केलें २. ज्याला हरिकथा व देवाच्या देवळांत जाण्याचें आवडत नाहीं त्याचें सर्व लक्ष प्रिय धनपुत्रादिकांच्या ठिकाणीं आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे, तुझी शरीरादिसंपत्ति एका दिवसांत अथवा एका घटकेंत तूं हरिकथा ऐकावयास गेलास तर कोणी उपटून नेईल काय ? असें जर आहे तर तिच्याकडे लक्ष ठेवून (आणि हरिकथेला विन्मुख होऊन) कां फसला जातोस ? ४. [२५९९]

मोठ्या सावध चित्तानें हरिकथेमध्यें बसून श्रोते व वक्ते हरिसुखाची चर्चा करितात. त्यांच्या पुण्यसुगंधानें सन्निध असलेले तरतात, मग तो (सामान्य जन) तरेल ह्यांत नवल काय आहे? १. अरे, तुम्ही हें फुकटचें पुण्य घ्या. दुष्ट वासना धरल्यानें पापच पदरीं येईल. ज्या बीजाची पेरणी झाली त्याचेंच फल अखेरीस मिळेल २. आळसानें कथेचा विरस करितो व वक्त्याचा छल करून जो कथेचा मोड करितो, तो विटाळशी नौकेंत बसली तर ती जशी नौकेंतील मंडळीसहवर्तमान आपण बुडते, तसें आपल्या सहवर्तमान तो आपलें कूळ बुडवितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे हरि, जे सज्जन आहेत ते चंदनाप्रमाणें जवळ असावेत व दुर्जनांचा देश सोडून मी दूर राहावें, अशी मी विनंति करितों ४. [२६००]

हे देवा, तूं माझ्याकडून सांभाळला जाणारा आहेस असें मला समजून आलें १. सर्व काळ तूं आमची वाट पाहातोस. तुला आम्हांवांचून स्वतंत्रता कसली आहे? २. जर आम्हीं बोलाविलें तर तूं रूपास येतोस. नाहीं तर निर्गुणस्थितीनें लपलेला असतोस ३. तुकाराम महाराज म्हणतात, तूं प्रकृतीच्या पलीकडल्या देशांतला आहेस, म्हणून त्या ठिकाणीं आमच्या योगानें तूं सगुण रूप धारण करून वास्तव्य करीत आहेस ४. [२६०१]

हे लज्जे, आतां ह्या ठिकाणीं तुझें काम नाहीं. तूं येथून निघून चालती हो. मला नामस्मरण करूं दे १. तुझी भीड धरली त्या योगानें माझा फार घात झाला आहे व दुष्ट लोकांच्या स्वाधीन मी झालों २. माझें माहेर [पांडुरंग]

॥ ३ ॥ सुखासाठीं एक वाहियेलें खांदीं। तेणें बहु मांदी मेळविली ॥ ४ ॥ केला चौंघाचार नेलों पांचामधीं। नाहीं दिली शुद्धी धरूं आशा ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां घेईन काठीवरी। धनी म्यां कैवारी केला देव ॥ ६ ॥ [२६०२]

आजिवरी होतों तुझे सत्तेखालीं। तोंवरी त्वां केली विटंबना ॥ १ ॥ आतां तुज राहों नेदीं या देशांत। ऐसा म्यां समर्थ केला धणी ॥ २ ॥ सापें रिग केला कोठें बाळपणीं। होतीसी पापिणी काय जाणों ॥ ३ ॥ तुका म्हणे म्यां हा बुडविला वेव्हार। तुझेंचि ढोपर सोलावया ॥ ४ ॥ [२६०३]

देवाच्या निरोपें पिटितों डांगोरा। लाजे नका थारा देऊं कोणी ॥ १ ॥ मोडिले रांडेनें पंथ मारग। चालविलें जग यमपंथें ॥ २ ॥ परीचारी केली आपुलीच रूढी। पोटींची ते कुडी (कुढी) ठावी नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आणा राउळा धरून। फजित करून सोडूं मग ॥ ४ ॥ [२६०४]

कां रे तुम्ही निर्मळ हरिगुण गा ना। नाचत आनंदरूपें वैकुंठासी जा ना ॥ १ ॥ काय गणिकेचा याती अधिकार मोठा। दोषी (पापी) अजामेळ ऐसा नेला वैकुंठा ॥ २ ॥ ऐसे सांगें नेणों किती तारिले अनंत अपार। पंच महा पातकी (दोषी) त्यांच्या दोषां (पातका) नाहीं पार ॥ ३ ॥ पुत्राचिया लोभें नष्ट म्हणे नारायण। कोण कर्तव्य तुका म्हणे त्याचें पुण्य ॥ ४ ॥ [२६०५]

बैसोनियां खाऊं जोडी। ओढाओढी चुकवूनि ॥ १ ॥ ऐसें केलें नारायणें। बरवें जिणें सुखाचें

मला परकें केलेंस आणि मला फार फसविलेंस. अशी तूं खरोखरी नष्ट आहेस ३. मला कांहीं सुख होईल म्हणून एक तुझा आश्रय केला त्या योगानें अनेक कामादिविकारांचा समुदाय माझ्या ठिकाणीं जमला ४. मला तूं पंचांमध्यें नेऊन माझ्या गुन्ह्याचा निवाडा–पंचक्या केलास पण कांहीं देवाची आठवण होऊं दिली नाहींस, मग मी तुझी गरज कशाला धरूं? ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे लज्जे, तुझी कंबर मोडण्याकरितांच मी काठी घेऊन तुझी कंबर मोडीन. आतां मी धनी जो देव तो साह्यकारी केला आहे ६. [२६०२]

हे लज्जे, आजपर्यंत मी तुझ्या स्वाधीन होतों तोंपर्यंत माझी तूं फार फजिती केलीस १. आतां तुला माझ्या देशांत देखील राहूं देणार नाहीं अशा प्रकारच्या जबरदस्त मालकाचा मीं आश्रय केला आहे २. जसें सर्पाचें पिलूं लहान असतें तेव्हां तें कोठें शिरकाव करतें काय? तशी तूं पापिणी लहान होतीस म्हणून तुला मीं आधार दिला. पुढें तूं इतकी वाईट होशील हें आम्हांस काय माहीत? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां देव हा मालक मीं साह्यकारी केला आहे. त्याच्या आधारानें तुझ्या ढोंपराचें कातडें सोलून काढण्याकरितांच मीं लोकलज्जा बुडवून टाकिली आहे ४. [२६०३]

अहो जन हो, मला देवाचा निरोप आहे तो मी प्रसिद्ध करून तुम्हांला सांगतों. ह्या लाजेला तुम्ही कोणी आश्रय देऊं नका १. ह्या रांडेनें चांगले मार्ग मोडले आहेत आणि लोकांना फसवून यमपुरीची वाट दाखविली आहे २. लोकव्यवहारामध्यें तिनें आपली प्रतिष्ठा मिरविली आहे आणि तिच्यांतला खोटेपणा आहे तो कोणास माहीत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या लाजेला धरून राउळामध्यें (देवळामध्यें) स्वामीकडे घेऊन या, म्हणजे तिची फजिती करून मग तिला बाहेर घालवून देऊं ४. [२६०४]

अहो जन हो, तुम्ही निर्मळ हरीचे गुण कां गात नाहीं व आनंदरूप होऊन त्या छंदानें नृत्य करीत देवाकडे कां जात नाहीं? १. गणिका पिंगला वेश्येचा कांहीं मोठा अधिकार होता काय? पण ती नामानें उद्धरली व अजामीळ हा फार पातकी होता त्यालाहि वैकुंठास नेलें २. अशा प्रकारचे पंच महादोष करणारे, ज्यांच्या पातकाचा अंत नाहीं, असल्या अनंतावधि जीवांचा देवानें पूर्वी उद्धार केला आहे, त्याचा अंत आम्हांस लागत नाहीं (त्याची गणति आम्हांस करवत नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, अजामिळानें पुत्राच्या स्नेहानें नारायणनामाचा उच्चार केला. तो जरी अति नष्ट होता तरी त्याचा उद्धार केला. त्या हरिनामावांचून त्यानें कांहीं पुण्य केलें काय? (ही हरिनामाची अद्भुत शक्ति आहे) ४. [२६०५]

मला जी प्राप्ति झाली तिचें एका ठिकाणीं बसून सेवन करीन. आतां प्रपंचाची व्यर्थ खटपट करण्याचें टळलें १.

॥ २ ॥ घरींच्या घरीं भांडवल। न लगे बोल वेंचावे ॥ ३ ॥ तुका म्हणे आटाआटी। चुकली दाटी सकळ ॥ ४ ॥ [२६०६]

नाहीं भ्यालों तरी पावलों या ठायां। तुम्हां आळवाया जवळिकें ॥ १ ॥ सत्ताबळें आतां मागेन भोजन। केलें तें चिंतन आजिवरी ॥ २ ॥ नवनीतासाठीं खादला हा जीव। थोड्यासाठीं कींव कोण करी ॥ ३ ॥ तुका म्हणे ताक न लगे हें घाटे। पांडुरंगा खोटें चाळवणें ॥ ४ ॥ [२६०७]

सारीन तें आतां एकाचि भोजनें। वारीन मागणें वेळोवेळां ॥ १ ॥ सेवटीचा घास गोड करीं माते। अगे कृपावंते पांडुरंगे ॥ २ ॥ वंचूं नये आतां कांहींच प्रकार। धाकल्याचें थोर झाल्यावरी ॥ ३ ॥ तुका म्हणे पोटीं बहु झाला वाव। कांहीं नेदी ठाव उरों मागें ॥ ४ ॥ [२६०८]

पोट धालें मग न लगे पंगती। झालिया निश्चिंतीं खेळ गोड ॥ १ ॥ आपुलिया हातें देईं वो कवळ। विठ्ठला शीतळ जीवनवरी ॥ २ ॥ घराचा विसर होईल आनंदें। नाचेन मी छंदें प्रेमाचिया ॥ ३ ॥ तुका म्हणे तोंचवरी करकर। मग हें उत्तर खंडईल ॥ ४ ॥ [२६०९]

बोलाविसी तरी। तुझ्या येईन उत्तरीं ॥ १ ॥ कांहीं कोड कवतुकें। हातीं द्यावया भातुकें ॥ २ ॥ बोलविसी तैसें। करीन सेवन सरिसें ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा। माझें चळण तुज सवा ॥ ४ ॥ [२६१०]

दिला जीवभाव। तेव्हां सांडिला म्यां ठाव ॥ १ ॥ आतां वर्ते तुझी सत्ता। येथें सकळ अनंता ॥ २ ॥ माझिया मरणें ॥ तुम्हीं बैसविलें ठाणें ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं। मीं हें माझें येथें नाहीं ॥ ४ ॥ [२६११]

अशा प्रकारचें माझें जगणें चांगलें सुखाचें नारायणांनीं केलें आहे २. आतां सर्व भांडवल घरचे घरीं प्राप्त झालें आहे, म्हणून कोणापुढें तोंड वेंगाडून 'मला हें द्या, मला तें द्या' असें बोलण्याचें कारण नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी सर्व मेहनत करणें चुकलें आहे व कोणाचीहि गर्दी नाहीं असें निवांत स्थळ मला मिळालें आहे ४. [२६०६]

हे देवा, मी कोणासहि भ्यालों नाहीं म्हणून तुम्हांला कींवकाकुळत (प्रार्थना) करण्याकरितां तुमच्याजवळ येऊन पोहोंचलों आहें १. आजपर्यंत मीं तुमचें चिंतन केलें; आतां त्या बळावर सत्तेनें तुमच्याजवळ भोजन मागेन २. जें लोण्याप्रमाणें सारभूत आहे तें मिळावें म्हणून तुमचा जीव खाल्ला आहे. [तुम्हांस त्रास दिला आहे.] त्यावांचून फलकटाकरितां (असार, अल्प, मायिक पदार्थासाठीं) कोण कींव भाकतो ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, असार संसाररूपी ताककण्या मला नकोत. तें तुम्हीं देणें हें तुमचें मला फसविणें होय ४. [२६०७]

देवा, तुम्हीं इच्छित ब्रह्मरसाचें भोजन एक वेळ दिलें म्हणजे वरचेवर तुम्हांला मी कांहीं मागणार नाहीं १. अगे पांडुरंगे कृपाळु आई, तूं शेवटचा गोड घांस मला खाऊं घाल २. एकदां लहानाचें थोर झाल्यावर त्याची कोणत्याहि प्रकारानें वंचना करूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या पोटामध्यें पुष्कळ जागा झाली आहे, म्हणून जो तुम्हीं वाढलेला ठाव (भक्ति-ज्ञानादि पक्वान्न) त्यांतील मागें कांहीं शिल्लक ठेवणार नाहीं ४. [२६०८]

एक वेळ तृप्त होईतोंपर्यंत भोजन झालें, म्हणजे पंक्तीस बसणें नको. चिंतेच्या वेगळें झालें असतां, भक्तीचा खेळ खेळणें हें बरें वाटतें १. हे विठ्ठला, तूं आपल्या हातानें मला घांस दे आणि शीतळ जें नामरूपी जीवन तें मला पाज २. त्या आनंदानें देहरूपी घराचें विस्मरण होईल, मग त्या प्रेमाच्या छंदानें मी नृत्य करीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें तुम्ही कराल तोंपर्यंत माझी कटकट आहे, मग ह्या बोलण्याचा खंड होईल (म्हणजे, तें नाहींसें होईल, आपोआप बंद पडेल) ४. [२६०९]

देवा, तूं मला हांक मारलीस म्हणजे मी तुझ्या हांकेसरसा धांवत येईन १. मीं तुम्हांस आळविलें आहे त्याचें कौतुक करून इच्छेप्रमाणें मला कांहीं खाऊ पाठवून द्या २. जशी तूं मला हांक मारशील तसाच मी तुझ्याजवळ येऊन खाऊ सेवन करीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, माझ्या सर्व इंद्रियांच्या चेष्टा तुझ्या इच्छेप्रमाणें होत आहेत ४. [२६१०]

ज्या वेळीं मीं आपला जीवभाव तुम्हांस अर्पण केला, त्याच वेळीं त्याचा ठावठिकाण नाहींसा केला १. हे अनंता, आतां ह्या ठिकाणीं तुझ्या सत्तेनें मी सर्व वर्तणूक करीत आहें २. त्या योगानें माझी देहात्मबुद्धि मृत झाली आहे, म्हणून मजमध्यें तुमचें वास्तव्य झालें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं देह मी व देहसंबंधीं माझें हें कांहींहि उरलें नाहीं ४. [२६११]

एकाचिये वेठी । सांपडलों फुकासाठीं ॥ १ ॥ घेतो काम सत्तावळें । माझें करूनि भेंडोळें ॥ २ ॥ धांवे मागें मागें । जाय तिकडे चालत लागे ॥ ३ ॥ तुका म्हणे नेलें । माझें सर्वस्व विठ्ठलें ॥ ४ ॥ [२६१२]

बराडियाची आवडी पुरे । जया झुरे साठीं तें ॥ १ ॥ तैसें झालें माझ्या मना । नुठी चरणावरूनि ॥ २ ॥ भागलिया पेणें पावे । विसांवे ते ठाकणी ॥ ३ ॥ तुका म्हणे छाया भेटे । बरें वाटे तापे त्या ॥ ४ ॥ [२६१३]

आतां द्यावें अभयदान । जीवन ये कृपेचें ॥ १ ॥ उभारोनि बाहो देवा । हात ठेवा मस्तकीं ॥ २ ॥ नाभी नाभी या उत्तरें । करुणाकरें सांतवीजे ॥ ३ ॥ तुका म्हणे केली आस । तो हा दिस (दिवस) फळाचा ॥ ४ ॥ [२६१४]

बहुजन्में सोस केला । त्याचा झाला परिणाम ॥ १ ॥ विठ्ठलसें नाम कंठीं । आवडी पोटीं संचितें ॥ २ ॥ येथून तेथवरी आतां । न लगे चिंता करावी ॥ ३ ॥ तुका म्हणे धालें मन । हेंचि दान शकुनाचें ॥ ४ ॥ [२६१५]

उसंतिल्या कर्मवाटा । बहु मोठा आघात ॥ १ ॥ शीघ्र यावें शीघ्र यावें । हातीं न्यावें धरूनि ॥ २ ॥ भागलों या खटपटें । घटपटें करितां ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपावंता । माझी चिंता खंडावी ॥ ४ ॥ [२६१६]

तुम्हांसी हें अवघें ठावें । किती द्यावें स्मरण ॥ १ ॥ कां बा तुम्ही ऐसें नेणें । निष्ठुरपणें टाळितसां ॥ २ ॥ आळवितां मायबापा । न ये कृपा अझूनि ॥ ३ ॥ तुका म्हणे जगदीशा । काय असां निजेले ॥ ४ ॥ [२६१७]

जसें बिगारीस धरितात, तसें मी फुकट एका देवाच्या हस्तगत झालों आहें १. तो माझें सर्व वाटोळें करून आपल्या सत्तेनें माझ्या हातून काम करवून घेत आहे २. मी जिकडे जाईन तिकडे धांवत येऊन माझ्या मागें चालत आहे आणि मला जीं सुखदुःखें होतील तीं तो स्वतः सहन करीत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या विठ्ठलानें माझें सर्वस्व हरण करून नेलें ४. [२६१२]

एखादें गरीब मनुष्य ज्याच्याकरितां झुरत असतें, तें त्याला प्राप्त झाल्यावर तें आनंदी होतें १. तसा प्रकार माझ्या मनास झाला आहे, म्हणून तें मन देवाच्या चरणावरून हालत नाहीं २. कोणी मनुष्य वाटचालीनें श्रमला असतां, मुक्कामास गेल्यावर विश्रांति मिळाल्यामुळें बसल्या ठिकाणाहून त्याला उठावेंसें वाटत नाहीं. अथवा, मुक्कामास पोंचल्यावर त्यास विश्रांति मिळते ३. तुकाराम महाराज म्हणतात, उन्हानें ज्याचें आंग तापलें आहे, त्यास सांवली मिळाली असतां फार बरें वाटतें [तसें माझ्या मनास झालें आहे] ४. [२६१३]

आतां तुम्ही मजवर कृपा करून अभयाचें दान द्या. तेंच माझें जीवन आहे १. अहो देवा, तुम्ही आपला अभय हात वरतीं करून माझ्या मस्तकावर ठेवा २. कांहीं भिऊं नको, असें बोलून करुणाकर देवांनीं माझें शांतवन (सांत्वन) करावें ३ तुकाराम महाराज म्हणतात, मीं जी आशा केली होती, ती फलद्रूप होण्याचा आज दिवस प्राप्त झाला आहे ४. [२६१४]

अनेक जन्मांच्या ठिकाणीं जी हांव मीं धरली होती, तिचा आज चांगला शेवट झाला १. विठ्ठल हें नाम माझ्या कंठाचे ठिकाणीं राहिलें आहे आणि त्याची आवड माझ्या हृदयांत भरली आहे २. आतां ह्या जन्मापासून मागील मूळच्या जन्मापर्यंत सफलता झाली म्हणून त्याविषयींची (चित्तशुद्धीपासून मोक्षापर्यंतची) कांहीं काळजी करणें नको ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझें मन तृप्त झालें, हें दान पुढें होणाऱ्या देवप्राप्तीच्या शकुनाचें आहे ४. [२६१५]

हे देवा, संचितकर्माच्या वाटा मी उल्लंघन करीत आलों, पण त्या वाटेमध्यें फार मोठमोठे घात होत आहेत १. ह्याकरितां तुम्हीं त्वरेनें यावें आणि मला हाताला धरून तुमच्याकडे न्यावें (असें द्विवार विनवितों) २. घटाकाश व पटतंतुन्याय ह्यांची (ह्या शास्त्रीय चर्चांची) वाटाघाट करण्यानें मी फार श्रमलों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो कृपावंता, माझी सर्व काळजी निवारण करा ४. [२६१६]

देवा, तुम्हांस माझें सर्व दुःख माहीत आहेच; आम्हीं त्याचें स्मरण तुम्हांला किती म्हणून करून द्यावें? १. तुम्ही निष्ठुरपणानें चुकावून घेतां (मला टाळतां) असे तुम्ही कां बा झालांत, हें मला समजत नाहीं २. हे मायबापा, आम्ही तुमची करुणा भाकीत असतां अजूनहि तुमच्या ठिकाणीं दया उत्पन्न होत नाहीं काय? ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे जगदीशा, तुम्हांला झोंप लागली आहे कीं काय हें समजत नाहीं ४. [२६१७]

नेलें सळेंबळें। चित्तावित्ताचें गांठोळें ॥ १ ॥ साह्य झालीं घरींच्या घरीं। होतां ठायींच कुठोरी ॥ २ ॥ मी पातलों या भावा। कपट तें नेणें देवा ॥ ३ ॥ तुका म्हणे उघडें केलें। माझें माझ्या हातें नेलें ॥ ४ ॥ [२६१८]

झाला हा डांगोरा। मुखीं लहानाही थोरा ॥ १ ॥ नागविलों जनाचारीं। कोणी बैसों नेदी दारीं ॥ २ ॥ संचिताचा ठेवा। आतां आला तैसा घ्यावा ॥ ३ ॥ तुका म्हणे देवें। केलें आतां हें बरवें ॥ ४ ॥ [२६१९]

किती चौधाचारें। होतें (येथें) गोविलें वेव्हारें ॥ १ ॥ असे बांधविले गळे। होऊं न शकती निराळे ॥ २ ॥ आपलें आपण। केलें कां नाहीं जतन ॥ ३ ॥ तुका म्हणे खंडदंडें। येरझारीं लपती लंडें ॥ ४ ॥ [२६२०]

पांडुरंगा ऐसा (सारिखा) सांडुनि वेव्हारा। आणिकांची करा आस वायां ॥ १ ॥ बहुतांसी दिधला उद्धार उदारें। निवडीना खरें खोटें कांहीं ॥ २ ॥ याचिया अंकिता वैकुंठ बंदर। आणीक वेव्हार चालतीना ॥ ३ ॥ तुका म्हणे माझे हातींचें वजन। यासी बोल कोण ठेवूं सके ॥ ४ ॥ [२६२१]

ठेवूनि इमान राहिलों चरणीं। म्हणउनि धनी कृपा करी ॥ १ ॥ आम्हांसी भांडार करणें जतन। आला गेला कोण उंच निंच ॥ २ ॥ करूनि सांभाळी राहिला निराळा। एक एक वेळां आज्ञा केली ॥ ३ ॥ तुका म्हणे योग्यायोग्य हे विनीत। देवा नाहीं चित्त येथें देणें ॥ ४ ॥ [२६२२]

देवांनीं आपल्या सामर्थ्यानें आम्हांला छळून माझें चित्तरूपी द्रव्याचें गाठोडें हरण करून नेलें १. हृदयरूपी घरांत चोर जो देव होता, त्याला माझीं सर्व इंद्रियें घरचे घरीं साह्य झालीं २. हे देवा, मी तुमच्याविषयींचा विश्वास धरून ह्या संसाररूपी अरण्यांत आलों होतों, त्या ठिकाणीं असलें तुझें कपट मला समजलें नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, चित्तरूपी द्रव्याचें गांठोडें माझें असून तुम्हीं माझ्या हातून घेतलें, आणि मला उघडें करून ठेविलें (माझा अभिमान माझ्या हातानेंच मीं घालविला आहे) ४. [२६१८]

ही प्रसिद्धि लहानथोरांच्या मुखानें सर्व जनांच्या ठिकाणीं झाली १. ती ही, कीं लौकिक आचारामध्यें तुम्हीं मला नागविलें. त्या योगानें कोणी दारांत देखील मला बसूं देत नाहीं २. आतां माझा संचितकर्माचा ठेवा जसा असेल तसा प्राप्त झाला आहे, तो घ्यावा (भोगावा) हें बरें ३. तुकाराम महाराज म्हणतात, लोक कांहींहि बोलोत, पण देवांनीं माझें आतां असें भलेंच केलें, हें फार चांगलें आहे ४. [२६१९]

कित्येक लोक ह्या (जगांत) लौकिकाचारामध्यें गुंतल्यामुळें व्यवहारांत पडले आहेत. १. ह्या पाशाच्या योगानें सर्वांचे गळे बांधले आहेत, ते त्यांतून वेगळे होऊं शकत नाहींत २. त्यांनीं आपल्या स्वतःचें रक्षण कां केलें नाहीं? ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या लोकांचा जन्ममृत्यूचा खंड (नाश) होत नाहीं आणि वरचेवर त्यांस यम शिक्षा करतो, ह्याकरितां ते लंड जन्ममृत्यूच्या येरझारांत लपून बसतात ४. [२६२०]

अहो जन हो, पांडुरंगासारखा सावकार टाकून दुसऱ्याची व्यर्थ आशा कां करितां? १. ह्या उदार देवानें बहुतांचा उद्धार केला आहे आणि तो खऱ्याखोट्याची निवड करीत नाहीं २. जे कोणी ह्याचे सेवक होतात, त्यांना वैकुंठ बंदराची प्राप्ति होते. त्या ठिकाणीं सेवेवांचून अन्य व्यापार चालत नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा समतोलपणाचा निकाल माझ्या हातानें ठरला आहे, ह्याला कोण बट्टा लावूं शकणार आहे? ४. [२६२१]

देवाच्या चरणांजवळ मी इमान (विश्वास) ठेवून राहिलों म्हणून तो धनी माझ्यावर कृपा करीत आहे १. त्याचा जो जामदारखाना आहे, तो मी रक्षण करीत आहें. त्या ठिकाणीं चांगला वाईट कोणी येईल जाईल, त्याचा तपास करणें मजकडे आहे २. त्यानें मला एक वेळ (कोणत्या वेळीं कोणतें काम करावें ही) एक आज्ञा केली व देवानें आपला परमार्थाचा भांडारखाना माझ्या स्वाधीन करून तो अलिप्तपणानें राहिला आहे ३. तुकाराम महाराम म्हणतात, कोणी योग्य, कोणी अयोग्य व कोणी नम्र असलेले ह्या सर्वांचा विचार करणें मजकडे आहे. आतां ह्या ठिकाणीं देवांनीं आपलें मन घालण्याचें कारण नाहीं ४. [२६२२]

आतां नव्हे गोड करितां संसार । आणीक संचार जाला माजी ॥ १ ॥ ब्रह्मरसें गेलें भरूनियां अंग । आधील तो रंग पालटला ॥ २ ॥ रसनेचिये रुची कंठीं नारायण । बैसोनियां मन निवविलें ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां बैसलों ठाकणीं । इच्छेची ते धणी पुरईल ॥ ४ ॥ [२६२३]

आतां काशासाठीं दुरी । अंतर उरी राखिली ॥ १ ॥ करीं लवकरी मूळा । लहान तळामुळींचिया ॥ २ ॥ दोहीं ठायीं उद्वेग वाणें । दरुषणें निश्चिंती ॥ ३ ॥ तुका म्हणे वेग व्हावा । ऐसी जीवा उत्कंठा ॥ ४ ॥ [२६२४]

पडिली हे रूढि जगा परिचार । चालविती वेव्हार सत्य म्हूण ॥ १ ॥ मरणाची कां रे नाहीं आठवण । संचिताचें धन लाभ हेवा ॥ २ ॥ देहाचें भय तें काळाचें भातुकें । ग्रासूनि तें एकें ठेविलेंसे ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं उघडा रे डोळे । जागोनि अंधळे होऊं नका ॥ ४ ॥ [२६२५]

हित नाहीं ठावें जननी जनका । दाखविला लौकिकाचार तिहीं ॥ १ ॥ आंधळ्याचे काठीं लागले आंधळे । घात ऐके वेळे पुढें मागें ॥ २ ॥ न धरावी चाली करावा विचार । वरील आहार गळीं लावी ॥ ३ ॥ तुका म्हणे केला निवाडा रोकडा । राउत हा घोडा हातोहातीं ॥ ४ ॥ [२६२६]

जेथें पाहें तेथें कांडिती भूस । चिपाडें चोखूनि पहाती रस ॥ १ ॥ काय सांगों देवा भुलले जीव । बहु यांची येतसे कींव ॥ २ ॥ वैकुंठींचें मोटळें लटिकेंची फुगे । पोणया जाऊनि भिक्षा मागे ॥ ३ ॥ तुका म्हणे कां उगेचि खोल । जवळी दाखवी आपणा बोल ॥ ४ ॥ [२६२७]

आतां माझ्या हृदयामध्यें दुसरा संचार झाला आहे [म्हणजे, ध्रुवपदांत दर्शविलेला] म्हणून संसार करीत असतां तो मला गोड लागत नाहीं १. ब्रह्मरसानें [ब्रह्मबोधानें] माझें सर्वांग भरलें आहे. त्यामुळें पूर्वींच्या देहविषयाचा (देहतादात्म्याचा व विषयासक्तीचा) सर्व रंग बदलला २. कंठामध्यें नारायणाची वस्ती होऊन मन शांत झालें आणि त्याच्याच नांवाची गोडी जिव्हेला लागली ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मी एकाच ठिकाणीं बसून राहिलों आहें, तेथें माझी सर्व इच्छा पूर्ण होईल ४. [२६२३]

हे देवा, आतां तुमच्या-आमच्यामधील अंतर दूर कां ठेविलें? १. तुमच्या-आमच्यांत जो मूळचा स्वरूपैक्य-संबंध आहे, तो तूं त्वरित प्रगट कर. दुसरा अर्थ : मूळचें जें लहान रोप आहे त्याच्या जमिनींतील मुळाला लौकर तुझ्या दर्शनरूपी जीवनानें ओलें कर २. संसार व परमार्थ दोन्ही ठिकाणीं जी हृदयाची उद्विग्नता आहे ती तुझ्या दर्शनानें दूर होऊन हृदयाचें समाधान होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, तूं मला भेट देण्याविषयीं फार त्वरा कर, कारण तुझ्या दर्शनाविषयीं माझा जीव अति उत्कंठित झाला आहे ४. [२६२४]

हा सर्व संसार खरा आहे, अशा समजुतीनें प्रपंचव्यवहार करण्याची रूढी लोकांमध्यें पडली आहे १. अरे, तुला मरणाची आठवण कां नाहीं? जें धन सांठवावें, तोच लाभ भोगावा लागेल, म्हणून चांगला संचय करण्याची हांव कर २. जर तूं देहमृत्यूचें भय धरतोस तर तें काळाचें खाजें आहे. त्यानें तें चघळून ठेवलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे तुम्ही कांहीं डोळे उघडा, समजून उमजून आंधळे होऊं नका ४. [२६२५]

तुझ्या देहसंबंधी आईबापांना खऱ्या हिताची माहिती नाहीं. फक्त ते प्रापंचिक लोकाचार दाखवितात १. जसे एका आंधळयाच्या काठीला धरून अनेक आंधळे चालले असतां जर पुढचा खड्डयांत पडला तर मागचे सर्व क्रमाक्रमानें खड्डयांत पडतील, अशा प्रकारें सर्वांचा एकदमच घात होईल २. ह्याकरितां आपल्या नेहमींच्या चालीवर नजर न ठेवतां खरा विचार केला पाहिजे. नाहींपेक्षां गळाच्या वरील आमिषास भुलून मासा जसा गळांत अडकतो, तसें तुम्हांस होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी (मनुष्य आणि त्याचें वागणें) ह्याचा निवाडा, घोडा व त्यावर बसलेला स्वार हे उभ्या उभ्या (घोड्याच्या चालीवरून व स्वाराच्या घोड्यावरील बैठकीवरून) जसे निवडावे, तसा केला आहे ४. [२६२६]

मी ज्या ठिकाणीं पाहात आहें त्या ठिकाणीं कोणी भुसकट कांडतात, कोणी चिपाडें चोखतात, व त्यापासून रसप्राप्तीची इच्छा करतात १. हे देवा, अशा प्रकारें हे जीव कसे व्यर्थ भुलले आहेत तें सांगतां येत नाहीं, म्हणून त्यांची मला फार दया येत आहे २. आमचें देहरूपी मोटकुळें वैकुंठांतलें आहे, असा खोटाच गर्व धरतात; पण मजल संपली म्हणजे गांवोगांवीं मुक्कामास जाऊन भीक मागून खातात ३. तुकाराम महाराज म्हणतात, उगीच खोल वेदांतशब्दानें (प्रवचन-कीर्तनांतून आपली गाढ विद्वत्ता दाखवून) आपल्याजवळ आत्मभाव आहे असें दाखवितात ४. [२६२७]

जाणिवेच्या भारें चेपलासे उर। सदा बुरबुर सरेचि ना ॥ १ ॥ किती याचे बोल ऐकों कानीं। मारिलें घाणीं नाळेकरी ॥ २ ॥ मिठेंविण काय आळणी हे बोल। करडीच फोल घसघस ॥ ३ ॥ तुका म्हणे डेंगा न कळे हित। किती फजिती करूं तरी ॥ ४ ॥ [२६२८]

अनुतापयुक्त गेलिया अभिमान। विसरूं वचन मागिलांचें ॥ १ ॥ त्याचे पाय माझे लागोत कपाळीं। भोगें उष्टावळी अन्य काळ ॥ २ ॥ षड उर्मी जिंहीं हाणितल्या लाता। शरण या संतां आल्या वेगीं ॥ ३ ॥ तुका म्हणे जाती वोळे लवकरी। ठायींचि अंतरीं शुद्ध होती ॥ ४ ॥ [२६२९]

खोल ओलीं पडे तें पीक उत्तम। उथळाचा श्रम वायां जाय ॥ १ ॥ लटिक्याचे आम्ही नव्हों सांटेकरी। थितें घाली भरी पदरींचें ॥ २ ॥ कोणा इहलोकीं पाहिजे पसारा। दंभ पोट भरायाचे चाडे ॥ ३ ॥ तुका म्हणे कसीं आगीं जें उतरे। तेंचि येथें सरे जाती शुद्ध ॥ ४ ॥ [२६३०]

गोमट्या बीजाचीं फळेंही गोमटीं। वाहे तेंचि पोटीं समतुक ॥ १ ॥ जातीच्या संतोषें चित्तासी विश्रांति। परतोनि मागुती फिरों नेणें ॥ २ ॥ खऱ्याचे पारखीं येत नाहीं तोटा। निवडे तो खोटा ढाळें दुरी ॥ ३ ॥ तुका म्हणे मज सत्याची आवडी। करितां तांतडी येत नाहीं ॥ ४ ॥ [२६३१]

मन झालें भाट। कीर्ति मुखें घडघडाट। पडियेली वाट। येचि चाली स्वभावें ॥ १ ॥ बोले देवाचे पवाडे। नित्य नवेचि रोकडे। ज्या परि आवडे। तैसा तैसा करूनि ॥ २ ॥ रोखीं रहावें समोर। पुढें मागें चाले भार। करावें उत्तर। सेवा रुजू करोनि ॥ ३ ॥ पूर वर्षला (पुरविला) देकारें। संतोषाच्या अभयें करें। अंगींच्या उतारें। तुकया स्वामी शृंगारी ॥ ४ ॥ [२६३२]

ज्ञानाच्या ओझ्यानें ऊर चेपला गेला म्हणून ते सदा शब्दाची पुटपुट लावतात, पण ती संपत नाहीं १. ह्यांचे बोल कानांनीं किती ऐकावे? गर्भावस्थेंत नाळ व घाण ह्यानें माखलें (गुंडाळलें) आहे तसें त्यांचें प्रवचन आहे २. मिठावांचून अन्न जसें अळणी आहे, तशी ती फोलकट बोलण्याची कोरडी किरकीर आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या ह्या ढोंग्यांना आपलें खरें हित कळत नाहीं, त्यांची फजिती तरी किती करावी? ४. [२६२८]

पूर्वींच्या सिद्धांचे शब्द ऐकून वैराग्यपूर्वक जो देहाभिमान विसरून गेला आहे १. त्याचे पाय माझ्या कपाळाला लागोत. त्याचें उच्छिष्ट भोगण्याचा जो काळ आहे तो धन्य आहे २. जे कामक्रोधादि षड्उर्मींना लाथा मारून त्वरेनें संतांना शरण गेले आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या मुळांतच अंतःकरणानें शुद्ध असतात त्या संतांच्या जाति लवकर परमार्थाकडे वळतात ४. [२६२९]

जें बीं शेतामध्यें खोल ओलींत पडतें त्यास जें पीक येतें, तें उत्तम; असें न होतां जें वर कोरडींत बीं असतें त्याच्या पेरणीबद्दल केलेला श्रम व्यर्थ जातो १. आम्ही खोट्याचे भागीदार होणार नाहीं, कारण तो आपल्या पदरीं असलेल्या मूर्खपणाचे भरीस घालतो २. ह्या मृत्युलोकांत बाह्य साधुपणाचा पसारा कोणाला हवा आहे? कारण तो सर्व दंभ असून पोट भरण्याच्या इच्छेनें ढोंगी मनुष्य तें ढोंग दाखवितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें अग्नींत घातल्यानें कसाला चांगलें उतरतें, तेंच शुद्ध जातीचें सोनें आहे, असें येथें मान्य होतें ४. [२६३०]

चांगल्या बीजाचीं आंत बाहेर चांगलींच फळें असतात (त्यांच्या पोटींहि चांगलीं बीजें असतात) १. जातीच्या संतोषानें जें चित्त विश्रांतीस पावतें तें पुनः मागें परतण्याचें (चंचलत्वावर जाण्याचें, दुसऱ्या वस्तूकडे वळण्याचें) जाणत नाहीं २. खऱ्याच्या परीक्षकांस तोटा येत नाहीं, कारण त्यांच्या परीक्षेंत जो खोटा निवडला जातो, त्याला ते दूर करतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला खऱ्याविषयींची प्रीति आहे, म्हणून मला कांहीं उतावळेपणा करतां येत नाहीं ४. [२६३१]

माझें मन हरीची कीर्ति वर्णन करण्याविषयीं तत्पर झाल्यामुळें माझी वाणीहि श्रीहरीची कीर्ति घडाघड वर्णन करीत आहे. अशा तऱ्हेचा ओघ स्वभावतः पडल्यामुळें इंद्रियांची गति तिकडेच झाली आहे १. जशी आवड आहे, तद्नुरूप वाणी नित्य नूतन देवाची कीर्ति वर्णन करीत आहे २. रोख (प्रत्यक्ष) सेवा करणारांनीं (माझ्या मनानें देवाच्या) समोर असावें; बाकीचा समुदाय (मनाचा परिवार-इंद्रियें-मनाबरोबर) मागें पुढें चालतो. समोर राहून (देवाच्या नामसंकीर्तनाची) सेवा रुजू करून भाषण करावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, भगवंताच्या देणगीस पूर आला. तो कोणता म्हणाल, तर त्यानें संतोषानें माझे मस्तकावर अभय हस्त ठेविला. मला स्वामींनीं आपल्या आंगच्या उताऱ्यांनीं (सच्चिदानंदरूप वस्त्रप्रावरणें व दागदागिने ह्यांनीं) सुशोभित केलें ४. [२६३२]

दूरि तोंचि होतों आपुले आशंके। नव्हते ठाउके मूळभेद ॥ १ ॥ आतां जेथें तेथें येईन सांगातें। लपाया पुरतें उरों नेदीं ॥ २ ॥ मिथ्या मोहें मज लाविला उशीर। तरी हें अंतर झालें होतें ॥ ३ ॥ तुका म्हणे कां रे दाखविती भिन्न। लटिकाचि सीण लपंडाई ॥ ४ ॥ [२६३३]

कळों नये तोंचि चुकवितां बरें। मग पाठमोरें काय काज ॥ १ ॥ धरिलेति आतां द्या जी माझा डाव। सांपडतां भाव ऐसा आहे ॥ २ ॥ होतासी अंतरें झांकिलिया डोळीं। तो मी न्याहाळीं धरुनी दृष्टी ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज रडीचीच खोडी। अहाच बराडी तो मी नव्हें ॥ ४ ॥ [२६३४]

विश्वास तो देव। म्हणुनि (म्हूण) धरियेला भाव ॥ १ ॥ माझी वदविते वाणी। जेणें धरिली धरणी ॥ २ ॥ जोडिलीं अक्षरें। नव्हती बुद्धीचीं उत्तरें (बुद्धीच्या विचारें) ॥ ३ ॥ नाहीं केली आटी। कांहीं मानदंभासाठीं ॥ ४ ॥ कोणी भाग्यवंत। तया कळे हें उचित ॥ ५ ॥ तुका म्हणे झरा। आहे मुळींचाचि खरा ॥ ६ ॥ [२६३५]

सुराणीचीं झालों लाडिकीं एकलीं। वडील धाकुलीं आम्ही देवा ॥ १ ॥ म्हणऊनि कांहीं न घडे अव्हेर। गोमटें उत्तर भातुकेंही ॥ २ ॥ कांहीं एक नाहीं वंचिलें वेगळें। मुळींचिया मुळें स्थिराविलें ॥ ३ ॥ लेवविलीं अंगीं आपुलीं भूषणें। अलंकार लेणें सकळही ॥ ४ ॥ सारितां न सरे अमुप भांडार। धना अंतपार नाहीं लेखा ॥ ५ ॥ तुका म्हणे आम्ही आळवूं आवडी। म्हणऊनी जोडी दाखविली ॥ ६ ॥ [२६३६]

एका वेळे केलें रितें कलिवर (कलेवर)। आतां दिली थार पांडुरंगा ॥ १ ॥ पाळण पोषण न

देवापासून आपल्या स्वरूपाविषयींच्या शंकेमुळें मी दूर होतों. देवाचा आणि आमचा मूळचा स्वरूपैक्यतेचा प्रकार आम्हांस माहीत नव्हता १. आतां देव जिकडे जिकडे जातील, तिकडे तिकडे मी जाईन. त्यांना लपण्यास ठिकाण उरूं देणार नाहीं २. खोट्या प्रपंचाच्या मोहानें देवाशीं मिळण्याला विलंब लागला, म्हणूनच इतके दिवस देवांत व आमच्यांत अंतर होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे देवा! हा भिन्न देहादि प्रपंच दाखवून तूं लपंडावीचा मिथ्या श्रम कां घेतोस? ४. [२६३३]

जोंपर्यंत खरें कळलें नाहीं, तोंपर्यंत चुकवाचुकवी करणें हें बरें. एकवार खरें कळल्यावर मग मागें फिरण्याचें काय कारण आहे? १. अहो देवा, आतां तुम्हांला मीं वर्मावर धरलें आहे. आतां तुम्ही माझी इच्छित देणगी द्या. खरी गोष्ट कळण्यामध्यें अशी स्थिति असते २. डोळे झांकल्यामुळें दूर अंतरावर होतास असा जो तूं त्या तुला मी दृष्टि स्थिर करून बारकाईनें पाहात आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुला रडी जाण्याचीच फार खोड आहे, परंतु मी असा वरवर दुकाळलेला बराडी (पोकळ भक्त) नाहीं ४. [२६३४]

तो देव आहे, अशा विश्वासानेंच मीं भाव (विश्वास) ठेविला आहे १. ज्यानें पृथ्वी धारण केली आहे, तो माझे वाचेकडून बोलवितो २. मीं बुद्धीच्या कौशल्यानें अक्षरांची जोडाजोड केली नाहीं ३. लोकांमध्यें माझी मानमान्यता व्हावी अशा दांभिक बुद्धीनें मी ही खटपट करीत नाहीं ४. माझें हें योग्य कर्तव्य जे कोणी भाग्यवान् असतील त्यांना कळेल ५. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या ठिकाणीं हा मूळचा खऱ्या प्रसादाचा (भक्तिप्रेमाचा) झरा आहे (त्यामुळेंच हे अभंग मीं रचिले आहेत) ६. [२६३५]

आम्ही देवाचीं लेकरें प्रीतीचीं एकटीं लाडकीं झालों आहोंत, म्हणून वडील तरी आम्हीच व धाकटे तरी आम्हीच १. ह्याकरितां देव आमचा कांहीं अव्हेर करीत नाहीं व चांगलें बोलून गोड असा खाऊ देत आहे २. आपल्याविषयीं देव कांहीं एक वेगळेपणानें वंचना करीत नाहीं आणि जें मूळचें आहे, तेंच आमच्या चित्तामध्यें स्थिरावलें आहे ३. त्यांनीं आपलेपणाचे अलंकार स्वतः आमचे अंगावर सर्व कांहीं घातले आहेत ४. अगणित द्रव्य ज्यामध्यें आहे व ज्याचा अंतपार लागत नाहीं, असें तें परमार्थधनाचें भांडार आमच्या हस्तगत झालें आहे, तें आतां किती जरी लुटलें तरी संपत नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं मोठ्या प्रीतीनें देवास आळविल्यामुळें त्यानें ही जोड आमच्या हस्तगत करून दिली आहे ६. [२६३६]

शरीरांतील सर्व (कामक्रोधादि) विकार एकदम नाहींसे करून तें शरीर रिकामें केलें, आतां ह्या ठिकाणीं पांडुरंगास

लागता (न लगे तें) सोई। देहाचें तें काई सर्व भाव ॥ २ ॥ माझिया मरणें झाली हे वसति। लागली ते ज्योती अविनाश ॥ ३ ॥ झाला ऐसा एका घायें येथें नाहीं। तुका ऐसें कांहीं बोलों नये ॥ ४ ॥ [२६३७]

पावतों ताडन। जरी हें मोकलितें जन ॥ १ ॥ मग मी आठवितों दुःखें। देवा सावकाश सुखें ॥ २ ॥ होती अप्रतिष्ठा। होतों वरपडा कष्टा ॥ ३ ॥ तुका म्हणे मान। होतां उत्तम खंडन ॥ ४ ॥ [२६३८]

धरावें तें भय। जाती अंतरोनि पाय ॥ १ ॥ झाल्या तुटी देवासवें। काय वांचोनि करावें ॥ २ ॥ कोणासी पारिखें। लेखूं आपणासारिखें ॥ ३ ॥ तुका म्हणे असो। अथवा हें आतां नसो ॥ ४ ॥ [२६३९]

आम्हांसी सांगाती। होती अराले ते होती ॥ १ ॥ येती आइकतां हांक। दोनी मिळोन म्हणती एक ॥ २ ॥ आणिका उत्तरीं। नसे गोविली वैखरी ॥ ३ ॥ तुका म्हणे बोल। खूण पहाती विठ्ठल ॥ ४ ॥ [२६४०]

आनंदाचा थारा। सुखें मोहरला झरा ॥ १ ॥ ऐसी प्रभुची ज्या कळा। त्याच्या कोण पाहे बळा ॥ २ ॥ अंकिता ऐसिया। होईल पावविलें ठाया ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसें। दिलें आभंड प्रकाशें ॥ ४ ॥ [२६४१]

काहे लकडा बांस कटावे। खोद हि जुमीन मठ बनावे ॥ १ ॥ देवलवासी तरवरछाया। घरघर माई खपरि बसमाया (खपर बनाया) ॥ २ ॥ कां छाडियें भार फेर सीर भागें। मायाकों दुःख मिटलिये अंगें ॥ ३ ॥ कहे तुका तुम सुनो हो सिद्धा। रामबिना और झुटा कछु धंदा ॥ ४ ॥ [२६४२]

राहाण्यास जागा दिली १. त्या सोईनें देहसंबंधीं सर्व भावाचें पाळण पोषण हें कांहीं मला करण्याचें कारण नाहीं २. हृदयामध्यें अविनाश वस्तूच्या प्रकाशाचें वास्तव्य झालें आहे. असा प्रकार मी व माझेपणा ह्यांच्या मरणांतीं घडून आला ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां एका घांवाने मी देहाचे ठिकाणीं असणाऱ्या आत्मबुद्धीनें नाहींसा झालों आहें. आतां मी एकदेशी आहें, असें कोणीं बोलूं नये ४. [२६३७]

जर माझा जनांनीं त्याग केला तर ही मला आयतीच शिक्षा मिळाली १. मग त्या दुःखानें मी देवाचें चिंतन स्वस्थपणानें करीन २. जर लोकांत माझा कांहीं अपमान होऊन मला त्रास होईल तर बरें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जनाचे हातून माझ्या मानाची खंडणा व्हावी, हें उत्तम ४. [२६३८]

देवाचे चरण अंतरले जातील, ह्याबद्दल चित्तांत भय बाळगावें १. जर देवाचा वियोग झाला, तर जगून काय करावयाचें आहे ? २. एका देवावांचून परके लोक हे आपल्यासारखे (आपलेसे) आहेत, असें मी कोणाला मानून घेऊं ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला फक्त देव पाहिजे आहे. आतां तें विश्व असो अथवा नाहींसें होवो, त्याची मला गरज नाहीं ४. [२६३९]

ज्यांची वृत्ति स्थिर झाली आहे, ते आमचे मित्र होतात १. त्यांना मी हांक मारली असतां ऐकून ते धांवत येतात आणि तुम्ही आम्ही एकच आहोंत असें म्हणतात. २. विठ्ठल नामावांचून अनेक प्रकारच्या भाषणानें त्यांची जिव्हा गुंतलेली नसते ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठ्ठला, माझे बोल कशा प्रकारचे आहेत, त्याची खूण (बोलण्यांत 'विठ्ठल' हें नाम) ते पाहातात ४. [२६४०]

माझ्या ठिकाणीं (किंवा ह्या जगाला) ज्या आनंदाचा आश्रय झाला आहे, त्या सुखाचा—आनंदाचाच झरा शब्दादि विषयांच्या उपाधीमध्यें प्रगट झाला आहे १. ह्या सर्व कृति एका प्रभूच्या आहेत, त्याच्या बलाची तुलना कोण करणार आहे ? २. त्याचे आम्ही सेवक असल्यामुळें तो आम्हांस चांगले ठिकाणीं पावतें करील ३. तुकाराम महाराज म्हणतात, प्रभूनें अशी देणगी आम्हांस पुष्कळ प्रकारची करून दिली आहे ४. [२६४१]

अहो जन हो, लांकडें व गवत कापून जमिनीमध्यें पाया खणून मठ बांधणें असें कां करितां ? १. एखाद्या देवाचे देवळांत अगर झाडाचे सावलींत वास्तव्य करावें आणि घरोघर सर्व ठिकाणीं जें धान्य भरलें आहे, तें वाढण्यास सर्व आया बाया आहेत, त्यांना पोटापुरतें खापराचे पात्रांत मागून घ्यावें २. तुम्हीं सर्व प्रपंचाचें ओझें अगोदर कां टाकलेंत आणि तें पुन्हां शिरावर कां घेतां ? हें सर्व मायिक दुःख आहे, तें तुम्ही स्वतः नाहींसें करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे सिद्ध हो, एक रामचिंतनावांचून सर्व व्यवहार खोटा आहे, असें मी सांगतों तें तुम्ही ऐका ४. [२६४२]

आणीक पाखांडें असती उदंडें। तळमळिती पिंडें आपुलिया ॥ १ ॥ त्याचिया बोलाचा नाहीं हा विश्वास। घातलीसे कास तुझ्या नामीं ॥ २ ॥ दृढ एक चित्तें झालों या जिवासी। लाज सर्वविशीं तुम्हांसी हे ॥ ३ ॥ पीडों नेदी पशु आपुले अंकित। आहे जें उचित तैसें करा ॥ ४ ॥ तुका म्हणे किती भाकावी करुणा। कोप नारायणा येईल तुम्हां ॥ ५ ॥ [२६४३]

व्हावया भिकारी हें आम्हां कारण। अंतरोनि जन जावें दुरी ॥ १ ॥ संबंध तुटावा शब्दाचाहि स्पर्श। म्हणउनि आस मोकलिली ॥ २ ॥ तुका म्हणे दुःखें उबगला जीव। म्हणउनि कींव भाकीं देवा ॥ ३ ॥ [२६४४]

कोरडिया ऐशा काय सारूं गोष्टी। करूं उठाउठीं हित आधीं ॥ १ ॥ खोळंबला राहे आपुला मारग। पहावी ते मग तुटी कोठें ॥ २ ॥ लौकिकाचा आड येईल पसारा। मग येरझारा दुःख देती ॥ ३ ॥ तुका म्हणे डांख लागे अळंकारें। मग नव्हे खरें पुटाविण (पुटेंविण) ॥ ४ ॥ [२६४५]

ऐसें ठावें नाहीं मूढा। सोस काकुळती पुढा ॥ १ ॥ माझीं नका जाळूं भांडीं। पोटीं भय सोस तोंडीं ॥ २ ॥ पातलिया काळ। तेव्हां काय चाले बळ ॥ ३ ॥ संचित तें करी। नरका जाय मेल्यावरी ॥ ४ ॥ परउपकार। न घडावा हा विचार ॥ ५ ॥ तुका म्हणे लांसी। आतां भेटो नये ऐसी ॥ ६ ॥ [२६४६]

करूनि चिंतन खेळे भोंवतालें। चित्त येथें आलें पायांपाशीं ॥ १ ॥ येथें नाहीं खोटा चालत परिहार। जाणसी अंतर पांडुरंगा ॥ २ ॥ सुखदुःखें तुज देऊनी सकळ। नाहीं ऐसा काळ

अनेक प्रकारचे कुतर्कवादी पाखांडी लोक पुष्कळ आहेत, ते आपल्या आपल्या देहलोभानें (पंच विषयांचा उपभोग घेण्यासाठीं) तळमळ करितात (व लोकांनाहि तसाच उपदेश करितात) १. अहो देवा, त्या लोकांच्या बोलण्याचा मला विश्वास नाहीं; म्हणून तुमचें नांव घेण्याविषयीं मीं कांस घातली आहे २. जीवासहवर्तमान चित्तानें दृढ एकनिष्ठ झालों. आतां सर्वतोपरि माझी लाज तुम्हांला आहे ३. तुमचे स्वाधीन असलेल्या पशूंनाहि तुम्ही पीडा देऊं नका. कोणी पशू जरी असले तरी त्यांस तुम्ही पीडा होऊं देत नाहीं. मी तर तुमचा दास आहें. इतक्यावर जसें योग्य आहे तसें माझ्याविषयीं करा ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, आम्हीं तुमची करुणा तरी किती भाकावी? त्याचा तुम्हांला राग येईल! ५. [२६४३]

लोकांनीं आमच्यापासून दूर व्हावें, म्हणूनच आम्ही भिकारी झालों आहोंत. १. लोकांचा कोणत्याहि प्रकारें संबंध न व्हावा व त्यांच्याशीं भाषण करण्याचें देखील कारण पडूं नये म्हणून मीं त्यांची आशा टाकली आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, संसारसंबंधीं दुःखानें माझा जीव फार त्रासला आहे, म्हणून देवा, तुम्हांला मी करुणा भाकीत आहें ३. [२६४४]

ज्यामध्यें ओलावा नाहीं, अशा कोरड्या ज्ञानाच्या गोष्टी मी कशाला सांगूं? ज्यापासून आपलें हित होईल, तें मोठ्या लगबगीनें अगोदर करून घेऊं १. कोरड्या गोष्टी सांगण्यापासून वाटचालीची खोटी होईल. मग ती नुकसानी कोणत्या ठिकाणीं पाहावी? २. त्या प्रपंचाच्या पसाऱ्यापासून मोठा लौकिक वाढेल, पण त्या पसाऱ्यानें वाटचालीस हरकत होऊन जन्ममृत्यूच्या येरझाऱ्याचें दुःख भोगावें लागेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर चांगल्या सोन्याचे डाक देऊन अलंकार केले, तर ते रसायनाचीं पुटें दिल्यावांचून शुद्ध होणार नाहींत ४. [२६४५]

पुढें आपली फजिती होईल असें ह्या मूर्ख लोकांस माहीत नसल्यामुळें ह्या संसारांत अनेकांस हव्यासानें 'माझी वस्तु नेऊं नका' असें काकुळतीस येऊन सांगतात १. पोटीं भय धरून लोभानें, स्वयंपाकाकरितां कोणी भांडीं मागावयास आलेल्यांना, तीं जाळूं नका असें म्हणतात २. ज्या वेळीं काळ जीवाचें आकर्षण करील त्या वेळीं तुमचें कांहीं बळ चालेल काय? ३. मेल्यावर ज्या योगानें नरकप्राप्ति होईल तसलें संचितकर्म करितात ४. दुसऱ्यावर उपकार न करावा ह्याविषयींचा विचार नेहमीं करितात ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचे लांवसटासारखे घातक लोक कधींहि भेटूं नयेत ६. [२६४६]

हे देवा, माझें चित्त तुमचे पायांचे ठिकाणीं राहिलें आहे, त्यांचें चिंतन करून तुमचे सभोंवतीं खेळत आहे १. हे पांडुरंगा, तुमच्याजवळ खोटें बोलणें चालत नाहीं, कारण तुम्ही अंतर (सर्वांचें अंतःकरण) जाणत आहांत २. आम्हांस

केला आम्हीं ॥ ३ ॥ तुका म्हणे झाला देहाचा विसर । आतां आप पर नाहीं दोन्ही (नाहीं आतां पर आप दोन्ही) ॥ ४ ॥ [२६४७]

काळाच सारिखीं वाहती नक्षत्रें । करितां दुसरें फळ नाहीं ॥ १ ॥ ऐसें करत्यानें ठेविलें करून । भरिलें भरून माप नेमें ॥ २ ॥ शीतउष्णकाळीं मेघ वरुषाव । वरषतां वाव होय शीण ॥ ३ ॥ तुका म्हणे विष अमृताचे किडे । पालट न घडे जीणें तया ॥ ४ ॥ [२६४८]

बोलणें तें आम्ही बोलों उपयोगी । पडिले प्रसंगीं काळा ऐसें ॥ १ ॥ जयामध्यें देव आदि मध्यें अंतीं । खोल पाया भिंतीं न खचेचि ॥ २ ॥ करणें तें आम्ही करूं एका वेळे । पुढिलिया बळें वाढी खुंटे ॥ ३ ॥ तुका म्हणे असों आज्ञेचीं धारकें । म्हणऊनि एकें बोलें सारूं ॥ ४ ॥ [२६४९]

तुझिया विनोदें आम्हांसी मरण । सोसियेला सीण बहु फेरे ॥ १ ॥ आतां आपणचि येसी तें करीन । नाम हें धरीन तुझें कंठीं ॥ २ ॥ वियोगेंचि आलों उसंतीत वनें । संकल्प हे मनें वाहोनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे वर्म रुांपडलें सोपें । गोवियेलों पापें पुण्यें होतों ॥ ४ ॥ [२६५०]

पाठीलागा काळ येतसे या लागें । मी माझें वाउगें मध्यें ऐसें (मेंडी ऐसे) ॥ १ ॥ आतां आगी लागो ऐसिया वेव्हारा । तूं माझा सोइरा पांडुरंगा ॥ २ ॥ वागविला माथां नसताचि भार । नव्हतें साचार देखिलें तों ॥ ३ ॥ तुका म्हणे केलें जवळील दुरी । मृगजळ वरी आड आलें ॥ ४ ॥ [२६५१]

आपुलिये टाकीं । करीन कांहीं तरी एकी ॥ १ ॥ करीन पायांशीं ओळखी । करिसी तें

सुख अथवा दुःख जें होईल तें तुम्हांस अर्पण करून सर्व काळाची खंडणा केली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्या देहाचा विसर आम्हांला झाला, म्हणून आतां आपलें व पराचें हीं दोन्ही नाहींशीं झालीं ४. [२६४७]

वर्ष, अयन, ऋतु, मास, पक्ष व दिवस असा सहा प्रकारचा काल आहे. ह्या कालांत मेषादि बारा राशि व संक्रांति आणि अश्विनीपासून रेवतीपर्यंतचीं २७ नक्षत्रें क्रमानें येतात. त्यांत बदल केला तर त्यापासून लोकांना योग्य फळ मिळत नाहीं १. असें हें जो कोणी जग उत्पन्न करणारा आहे, त्यानें निश्चित करून ठेविलें आहे. जसा ज्याचा नेम आहे, तसें तें त्यानें माप भरून ठेविलें आहे २. शीतकाळीं अगर उष्णकाळीं जर पर्जन्याचा वर्षाव झाला, तर तो निरर्थक होऊन त्रासदायक होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, विषांतील किडे अमृतांत किंवा अमृतांतील विषांत टाकले असतां ते उभयतांहि जगत नाहींत ४. [२६४८]

ज्या समयाला ज्या बोलण्याचा उपयोग होईल, त्या त्या प्रसंगीं तें तें बोलणें आम्ही बोलूं १. पाया खोल खणून भिंत बांधली असतां जशी ती खचली जात नाहीं, तसें ज्यामध्यें अव्वल–अखेर देव आहे, तें बोलणें अविनाश आहे २. ज्या योगानें संचितकर्माच्या बळाची पुढील वाढ संपेल, असें कर्तव्य आम्ही एकदम करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही स्वामीचे आज्ञाधारक आहोंत, म्हणून एकाच बोलण्यानें [म्ह० नामानें] सर्व कांहीं नाहींसें करूं ४. [२६४९]

हे देवा, तुझे सहज लीलेचे खेळ विनोदाचे होतात, पण त्या योगानें आमचा नाश होतो, कारण अनेक योनींच्या येरझाऱ्यांचें दुःख आम्ही भोगीत आहोंत १. आतां तुझें नाम मी आपल्या कंठांत धरीन म्हणजे तूं आपल्या आपण धांवून येशील, म्हणून तेंच कर्तव्य मी करीन २. तुमचा वियोग मला झाला, तेव्हांपासून अनेक योनींचीं वनें मी उल्लंघन करीत आलों व अनेक प्रकारचे संकल्प मनांत वागविले ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी आजपर्यंत पापपुण्याच्या गुंताड्यांत गुंतलों होतों, तें आज तुझे प्राप्तीचें सोपें मर्म मला सांपडलें ४. [२६५०]

देह मी, व देहसंबंधीं माझें ह्या भावनेमुळें काळ माझ्या पाठीमागें लागला आहे, म्हणून ह्यामध्यें गुंतणें व्यर्थ आहे १. हे पांडुरंगा, आतां तूं माझा आप्त झाला आहेस म्हणून अशा प्रकारच्या व्यवहाराला आग लागो २. जोंपर्यंत मला खऱ्या वस्तूचें दर्शन झालें नव्हतें, तोंपर्यंत नाहीं तेंच खोटें असलेलें ओझें मीं आपल्या मस्तकावर वागविलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मिथ्या मृगजळ माझ्या समोर आलें, तें खरें भासल्यामुळें जवळ असलेली वस्तु टाकून मी दूर गेलों होतों ४. [२६५१]

हे देवा, मी आपल्या योग्यतेप्रमाणें कांहीं तरी एक कर्तव्य करीन १. ज्या योगानें तुमच्या पायांची ओळख होईल

करीं सुखीं ॥ २ ॥ कायाक्लेशगंगाजळ । समर्पीन तुळसीदल ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । कर जोडीन ते सेवा ॥ ४ ॥ [२६५२]

माझें तों स्वभाव मज अनावर । तुजही देतां भार कांहीं नव्हे ॥ १ ॥ ऐसें कळों आलें मज नारायणा । जागृती स्वपना ताळ नाहीं ॥ २ ॥ संपादितों तो हा अवघा बाह्य रंग । तुझा नाहीं संग अभ्यंतरीं ॥ ३ ॥ तुका म्हणे सत्या नाहीं पाठी पोट । असते निघोंट एकी जाती ॥ ४ ॥ [२६५३]

न व्हावा तो बरा मुळींच संबंध । विश्वासिकां वध बोलिलासे (विश्वासिं कां बन्द्ध बोलिलासे) ॥ १ ॥ आतां माझें हित काय तें विचारा । सत्यत्वें दातारा पांडुरंगा ॥ २ ॥ नाहीं भाव परी म्हणवितों दास । नको देऊं यास उणें येऊं ॥ ३ ॥ तुका म्हणे कां हो उद्धरितां दीन । मानीतसां सीण मायबापा ॥ ४ ॥ [२६५४]

काय तुमची यास वेंचते गांठोळी । माझी टाळाटाळी करीतसां ॥ १ ॥ चतुरांच्या राया अहो पांडुरंगा । ऐसें तरी सांगा निवडूनि ॥ २ ॥ कोण तुम्हां सुख असे या कौतुकें । भोगितां अनेक दुःखें आम्ही ॥ ३ ॥ तुका म्हणे काय झालासी निर्गुण । आम्हां येथें कोण सोडवील ॥ ४ ॥ [२६५५]

निष्ठुर यासाठीं करितों भाषण । आहेसी सर्वज्ञ जाणता तूं ॥ १ ॥ ऐसें दुःख कोण आहे निवारिता । तो मी जाऊं आतां शरण त्यासी ॥ २ ॥ बैसलासी केणें करूनि एक घरीं (बैसलासी कोण करूनियां धीर)। नाहीं येथें उरी दुसऱ्याची ॥ ३ ॥ तुका म्हणे आलें अवघेंचि पायापें । आतां मायबापें नुपेक्षावें ॥ ४ ॥ [२६५६]

तें मी करीन. मग तुला जसें वाटेल तसें तूं खुशाल कर २. मी आपल्या देहाच्या कष्टानें गंगेचें पाणी व तुळसीपत्र हें तुला अर्पण करीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मी तुमच्यापुढें हात जोडून उभा राहीन हीच माझी सेवा आहे ४. [२६५२]

हे देवा, माझ्या ठिकाणीं जे अनेक प्रकारचे गुण आहेत ते माझे मला आवरले जात नाहींत आणि मीं तुझ्यावर भार घातला असतां तूंहि ते निवारण करीत नाहींस १. हे नारायणा, जागृति व स्वप्न ह्यांमध्यें कांहीं मेळ नाहीं, असें मला समजून आलें २. बाह्य साधुपणाचा वेष धारण करून त्याची संपादणी मी करीत आहें, पण अंतःकरणामध्यें तुझा वास नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें कांहीं खरें आहे त्याला पाठ पोट नाहीं. तें एकाकी स्थितीनें परिपूर्ण भरलेलें असतें ४. [२६५३]

हे देवा, तुमचा आमचा संबंध जर प्रथमच झाला नसता तर बरें होतें, कारण विश्वासुकास ठार मारणें, (किंवा त्याला संसारांत बांधून टाकणें) हें कोठें सांगितलें आहे? १. हे पांडुरंगा दातारा, आतां माझें खरोखर हित कोणत्या योगानें होईल, त्याचा तुम्ही विचार करा २. माझ्या ठिकाणीं शुद्ध भाव नाहीं, पण मी तुमचा सेवक म्हणवीत आहें, त्याला तुम्ही कमीपण येऊं देऊं नका ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे मायबापा, आम्हां गरिबांचा उद्धार करण्याविषयींचा श्रम तुम्ही कां मानतां? ४. [२६५४]

हे देवा, मला तारण्याविषयीं तुम्ही टाळाटाळी करतां ह्यांत कांहीं तुमच्या पदरचें गांठोडें खर्च होतें काय? १. अहो पांडुरंगा, तुम्ही चतुरांचे राजे आहांत म्हणून मीं जें विचारलें आहे त्याचा निवाडा तरी करून सांगा २. अनेक प्रकारचीं दुःखें आम्ही भोगीत आहों, अशा ह्या कौतुकाचें तुम्हांला काय सुख वाटतें? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्ही निर्गुण झालांत काय? असें जर असेल तर मग ह्या संसारांतून आमची सुटका कोण करील? ४. [२६५५]

हे देवा, तूं सर्वज्ञ आहेस, म्हणून मी निष्ठुरपणानें तुझ्याशीं बोलतों तें तुला समजावें १. तुझ्याप्रमाणें दुःख निवारण करणारा दुसरा कोण आहे, म्हणून आतां मी त्याला शरण जाऊं? २. सर्वांचें दुःख निवारण्याची सत्ता तूं आपल्याच एकघरीं ठेविली आहेस, हें तुझें करणें व्यवहाराच्या म्हणीप्रमाणें एकघरीं केल्यासारखें आहे (*पाठभेद : माझ्या उद्धाराविषयीं कोणाच्या बळावर धैर्य धरून तूं स्वस्थ बसला आहेस?*) ह्या उद्धाराच्या कामांत दुसरा कोणी समर्थ राहिला नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां सर्व कांहीं तुमच्याच पायांजवळ आलें आहे. ह्याकरितां मायबापांनीं आमचा अव्हेर करूं नये ४. [२६५६]

पायांपाशीं चित्त । तेणें भेटी अखंडित ॥ १ ॥ असें खेळें भलते ठायीं । प्रेमसूत्रदोरी पायीं ॥ २ ॥ केलेंसे जतन । मुळीं काय तें वचन ॥ ३ ॥ तुका म्हणे सर्वजाणा । ठायीं विचारावें मना ॥ ४ ॥ [२६५७]

तुझें मजपाशीं मन । माझी तेथें भूक तान ॥ १ ॥ जिव्हा रते एके ठायीं । दुजें बोलायाचें काई ॥ २ ॥ माझिया कवतुकें । उभा पहासी भातुकें ॥ ३ ॥ तुका म्हणे साचें । तेथें मागील कईंचें ॥ ४ ॥ [२६५८]

तुम्हां आम्हा सरी । येथें कईंच्या या परी ॥ १ ॥ स्वामिसेवा अलंकार । नाहीं आवडिये थार ॥ २ ॥ खुंटलिया वाचा । मग हा आनंद कईंचा ॥ ३ ॥ तुका म्हणे कोडें । आम्ही नाचों तुजपुढें ॥ ४ ॥ [२६५९]

कैचें भांडवल खरा हातीं भाव । कळवळ्यानें माव दावीतसें ॥ १ ॥ आतां माझा अंत नको सर्वजाणा । पाहों नारायणा निवडूनि ॥ २ ॥ संतांचे उच्छिष्ट मागिले पंगतीं । करावें संगती लागे ऐसें ॥ ३ ॥ तुका म्हणे आलों द्यवूनि विश्वास । संचित तें नास पावे ऐसें ॥ ४ ॥ [२६६०]

थोडे तुम्ही मागें होते उद्धरिले । मज ऐसे गेले वायां जीव ॥ १ ॥ आतां याचा कांहीं न मानावा भार । कृपेचा सागर आहेसी तूं ॥ २ ॥ तुज आळवितां पापाची वसति । राहे अंगीं किती बळ त्याचें ॥ ३ ॥ तुका म्हणे जैसे तारिले दगड । तैसा मीही जड एक देवा ॥ ४ ॥ [२६६१]

आम्ही म्हणों कोणी नाहीं तुज आड । दिसतोसी भ्याड पांडुरंगा ॥ १ ॥ हा गे माझ्या भोगें

देवा, माझें चित्त तुझ्या पायांच्या ठिकाणीं राहिलें आहे, त्या योगानें मला तुझी भेट सर्व काळ होत आहे १. मी भलते ठिकाणीं खेळत असतों, पण माझ्या प्रेमतंतूची दोरी तुझ्या चरणीं गुंतली आहे २. मी पतितांना पावन करीन असें जें मूळचें तुमचें वचन तें मी सांभाळून राहिलों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे सर्वज्ञ देवा, जो कांहीं मूळांतच झालेला करार आहे, त्याचा तुम्ही आपल्या मनांत विचार करा ४. [२६५७]

तुझें मन माझ्यावर आहे, त्या योगानें मला जी भूक तहान लागेल ती तुला लागते, ती तुझ्या ठिकाणीं उमटते १. त्याचें कारण, दोघांचें अंतःकरण एक आहे, म्हणून माझी जिव्हा तुझ्या एका नामाचे ठिकाणींच गुंगून गेली आहे, दुसरें कांहीं सांगणें नको २. तूं माझें कौतुक करण्याकरितां उभा राहून मजकरितां कांहीं खाऊ देण्याचें पाहात आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां ह्या ठिकाणीं (आपल्या परस्परांच्या प्रेमांत) मागील संचितकर्माचें स्वरूप कसलें आलें आहे (मागील अपराध किंवा पापें कोठून शिलक राहातील)? ४. [२६५८]

हे देवा, जर तुमची आमची बरोबरी झाली, तर ह्या ठिकाणीं (ध्रुवपदांत दर्शविलेले) स्वामि-सेवक हे प्रकार कसले राहिले आहेत? १. मग स्वामिसेवकपणाचा अलंकार राहाणार नाहीं आणि त्याविषयींच्या प्रीतीलाहि ठिकाण राहाणार नाहीं २. एकत्वामध्यें (अद्वैतांत चार वाणींचे व्यवहार कुंठित होतात) शब्द कुंठित होतो, मग त्या ठिकाणीं हा भक्तीचा आनंद कसा मिळेल? ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही स्वामी ह्या नात्यानें राहिलां तर आम्ही कौतुकानें तुम्हांपुढें नृत्य करूं ४. [२६५९]

शुद्धभावाचें भांडवल माझ्या हातीं कसलें आलें आहे? पण कळवळ्यानें मी जें दाखवितों तें सर्व माया (भक्तीचें ढोंग) आहे. १. हे नारायणा, तुम्ही सर्व जाणणारे आहांत म्हणून माझें ढोंग निवडून माझाच अंत पाहूं नका २. संतांनीं जेथें जेवण केलें आहे, त्यांचें मागल्या पंक्तीचें उच्छिष्ट मला देऊन, त्यांच्या संगतीनें मी राहीन, असें करावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, संचितकर्माचा नाश होईल, अशा प्रकारचा विश्वास लोकांना देऊन मी तुमच्यापर्यंत आलों आहें, म्हणून माझा अंत पाहूं नये ४. [२६६०]

माझ्यासारखे वायां गेलेले जीव पूर्वीं तुम्हीं थोडे उद्धरले काय? १. आतां ह्या माझ्या जीवाचें ओझें कांहीं मानूं नये, कारण तूं कृपेचा समुद्र आहेस २. जर मी तुझी करुणा भाकीत आहें, तर माझ्या ठिकाणीं पाप कसें राहील? त्याचें तुजपुढें कितीसें बळ आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसे तुम्हीं पूर्वीं दगड तारले त्याप्रमाणें मीहि एक जडबुद्धीचा आहें म्हणून देवा, तुम्ही मला तारा ४. [२६६१]

हे पांडुरंगा, तूं आमचा अंगीकार करूं लागलास तर तुला प्रतिबंध करणारें कोणी नाहीं, पण तूंच भित्रा आहेस

केलासी परता । विश्वंभरीं सत्ता नाहीं ऐसी ॥ २ ॥ आम्ही तुज असों देऊनि आधार । नाम वारंवार उच्चारितों ॥ ३ ॥ तुका म्हणे मज धरियेलें काळें । पंचभूतीं खळें करूनियां ॥ ४ ॥ [२६६२]

आहे तें सकळ प्रारब्धाचे हातीं । यावें काकुलती यासी आतां ॥ १ ॥ ऐसा माझ्या मनें सांगितला भाव । तोंवरिच देव दुजा नाहीं ॥ २ ॥ अवघियांची जेव्हां सारावी करकर । भावबळें थार धरूं येसी ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज ठेवावें पुजून । आणीक तो गुण नाहीं येथें ॥ ४ ॥ [२६६३]

शेवट तो होतो तुझियानें गोड । म्हणऊनि चाड धरीतसों ॥ १ ॥ देऊं भोगाभोग कलिवराचा भार । साहों तुज थार त्याचमधीं ॥ २ ॥ तुझ्या बळें कांहीं खटपट काम । वाढवावा श्रम न लगे तो ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही चेंपलों या भारें । तुमचें तें खरें देवपण ॥ ४ ॥ [२६६४]

ऐसाचि तो गोवा । न पाहिजे केला देवा ॥ १ ॥ बहु आली दुरिवरी । ओढत हे भरोवरी ॥ २ ॥ आम्हांसी न कळे । तुम्ही झांकूं नये डोळे ॥ ३ ॥ तुका म्हणे संगें । असों एक एका अंगें ॥ ४ ॥ [२६६५]

मायलेंकरांत भिन्न । नाहीं उत्तरांचा सीण ॥ १ ॥ धाडीं धाडीं वो भातुकें । रंजविल्याचें कौतुकें ॥ २ ॥ करुनि नवल । याचे बोलिलों ते बोल ॥ ३ ॥ तुका म्हणे माते । पांडुरंगे कृपावंते ॥ ४ ॥ [२६६६]

आवडी कां ठेवूं । बैसोनियां संगें जेवूं ॥ १ ॥ मागें नको ठेवूं उरी । माझी आण तुजवरी ॥ २ ॥ देखिले प्रकार । त्याचे पाहेन साचार ॥ ३ ॥ तुका म्हणे बाळीं । केली चाहाडी सकळीं ॥ ४ ॥ [२६६७]

असें आम्ही म्हणतों १. त्याचें कारण माझ्या प्रारब्धकर्मानें तुला माघारें हटविलें आणि तुझी विश्वंभरपणाची शक्ति नाहींशी केली, असें माझ्या अनुभवास येत आहे २. आम्ही तुझ्या आश्रयानें राहिलों आहों आणि तुझ्या नामाचा आठव वारंवार करीत आहों ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या पंचभूतांनीं मला वेटाळल्यामुळें मी काळाच्या स्वाधीन झालों आहें (तरी तूं आतां शूर होऊन मला ह्या भयापासून सोडव) ४. [२६६२]

(ह्या प्रपंचांत सुख-दुःख, मान-अपमान ह्या सर्व गोष्टी होणें) देहनिर्वाह होणें हें सर्व कांहीं प्रारब्धाच्याच स्वाधीन आहे. आतां हरीला कींवकाकुलती यावें हें बरें १. असा माझ्या मनानें विचार सुचविला म्हणूनच आतां देव वेगळा नाहीं २. प्रपंचाची सर्व प्रकारची कटकट ज्या वेळीं दूर करावी त्या वेळीं भावाच्या बळानें तुझा आश्रय करण्यांत येतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तुझी पूजा करून असावें. ह्या ठिकाणीं ह्याशिवाय दुसरा उपाय नाहीं ४. [२६६३]

हे देवा, तुझ्या योगानें अखेर चांगलें होतें, म्हणून मी तुझी इच्छा धरीत आहें १. भोग व अभोग (दुःख आणि सुख) ह्यांसहवर्तमान शरीराचें ओझें आम्ही सहन करूं व त्यांतच तुला आश्रय देऊं २. देवा, तुझ्या साह्यामुळें अनेक खटाटोपांच्या कामनेचा श्रम आम्हांस वाढवावा लागत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही देहादि प्रपंचाच्या भारानें चेपलों आहोंत; तुम्ही मात्र खरे देव आहांत (तुम्हांला सुख-दुःखाचा भोग नाहीं) ४. [२६६४]

हे देवा, अशा ह्या प्रपंचाच्या गुंताड्यामध्यें आम्हांला गुंतवूं नका १. देवा, प्राचीन काळापासून ह्या प्रपंचाचा खटाटोप आम्ही करीत आलों २. देवा, आम्हांला कांहीं कळत नाहीं, पण तुम्ही तरी डोळेझांक करूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तुम्ही आम्ही एकमेकांच्या संगतीनें राहूं (म्हणजे मला प्रपंचबंधन राहाणार नाहीं) ४. [२६६५]

आई व मूल ह्यांमध्यें एकमेकांविषयीं बोलण्याचा कांहीं विषम भाव नसल्यामुळें त्यापासून त्यांना त्रास होत नाहीं १. हे देवा, आम्ही तुला इतकें रंजविलें आहे, म्हणून तूं आम्हांकडे कौतुकानें खाऊ पाठीव २. देवा, मी जे बोल बोललों आहें ह्याचें तुम्ही कौतुक करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे कृपावंते पांडुरंगे आई, मला खाऊ दे (अशा प्रकारची माझी विनंति आहे) ४. [२६६६]

देवा, तूं व मी एका ठिकाणीं बसून बरोबर जेवूं, कारण एवढी तरी आवड कां शिल्लक ठेवायची? १. ह्यांत कांहीं कसर ठेवूं नकोस. तुला माझी शपथ आहे २. मायलेकांतील प्रकार (श्रीनामदेवादि भक्तांबरोबर तुझें जेवण) जे मीं पाहिले आहेत त्याचा खरेपणा मी तुझ्या ठिकाणीं पाहीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, काल्याच्या प्रसंगीं देव आमच्याबरोबर जेवतो, आमचें उष्टें सुद्धां खातो, अशी गोकुळांतील बालगोपाळांनीं तुझ्यासंबंधानें माझ्याजवळ चहाडी केली आहे ४. [२६६७]

नव्हेसी तूं लासी । माया आणिकां त्या ऐसी ॥ १ ॥ जे हे वायां जाती बोल । होती निर्फळचि फोल ॥ २ ॥ नव्हेसी दुबळी । कांहीं नाहीं तें जवळी ॥ ३ ॥ तुका म्हणे खोटी । कांहीं नव्हेसी करंटी ॥ ४ ॥ [२६६८]

आम्हां बोल लावा । तुम्हां अनुचित हें देवा ॥ १ ॥ ऐसें सांगा कां व्यालेती । काय नाहीं तुम्हां हातीं ॥ २ ॥ आतां धरा दूरी । वायां दवडाया थोरी ॥ ३ ॥ तुका म्हणे ठायीं । ऐसें विचारावें पाहीं ॥ ४ ॥ [२६६९]

मरोनियां गेली माया । मग तया कोण पुसे ॥ १ ॥ पोरटियांची दाद कोणा । ऐसा जना प्रवाहो ॥ २ ॥ निढळासी निढळ जोडा । होय कोडा कवतुका(क) ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा ऐशीं । आहों सरशीं आपण ॥ ४ ॥ [२६७०]

संसाराची कोण गोडी । दिली जोडी करूनि ॥ १ ॥ निष्ठुर तूं बहु देवा । पुरे हेवा न म्हणवी ॥ २ ॥ पाहोनियां कर्म डोळां । निराळा तो वर्जीना ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज माझें । म्हणतां ओझें फुकट ॥ ४ ॥ [२६७१]

नव्हतें तें कळों आलें । तरी बोले अबोला ॥ १ ॥ तुज मज घातली तुटी । एके भेटीपासुनि ॥ २ ॥ आतां याची न धरीं चाड । कांहीं कोड कवतुकें ॥ ३ ॥ तुका म्हणे यावें जावें । एका भावें खंडलें ॥ ४ ॥ [२६७२]

आतां दोघांमध्यें काय । उरलें होय वाणीजेसें ॥ १ ॥ निष्ठुर हें केलें मन । समाधान न करूनि (समाधान करूनि) ॥ २ ॥ झुरावें तें तेथींच्या परी । घरींच्या घरीं अवघिया ॥ ३ ॥ तुका म्हणे देवपण । गुंडाळून असोंदे ॥ ४ ॥ [२६७३]

हे देवा, तूं इतरांसारखी लावसट आई नाहींस १. जे माझे बालकाचे बोल आहेत, ते सर्व तुझ्या ठिकाणीं फोलकट निष्फळ होतील काय ? २. जवळ कांहीं नाहीं अशा तऱ्हेची दरिद्री दुर्बळ आई तूं नव्हेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, तूं स्वभावाची खोटी नसून करंटीहि नाहींस ४. [२६६८]

हे देवा, आमच्यावर कांहीं शब्द ठेवणें तुम्हांला योग्य नाहीं १. हे देवा, अशा प्रकारच्या बालकाला तुम्हीं कां जन्म दिलात तें सांगा. काय, तुमच्या हातांत कोणती सत्ता नाहीं ? २. आतां जर तुम्ही आम्हां बालकांना दूर धराल तर तुम्ही आपली थोरवी मात्र घालवाल ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याचा तुम्ही आपल्या ठिकाणींच विचार करून पाहा ४. [२६६९]

ज्याची आई मेली आहे त्या मुलाला कोण विचारतो ? १. कारण तें पोरकें आहे, त्याची दाद कोण घेतो ? असा जनाचा ओघच पडला आहे २. चांगल्या प्रारब्धाची आई व मूल असें जर असेल तर त्या ठिकाणीं कोडकौतुकच व्हावयाचें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपण सर्व बालकें देवाच्या जवळच आहोंत म्हणून भाग्यवान् आहोंत. तेव्हां आम्हांला काय कमी आहे ? ४. [२६७०]

संसारांत काय गोडी आहे ? मुळींच नाहीं; म्हणूनच सर्व लाभ तुला समर्पण केले १. पण हे देवा, तूं फार निर्दय आहेस. तुझ्यामध्यें जी हांव आहे ती तुला कितीहि कोणीं दिलें तरी पुरे असें म्हणूं देत नाहीं २. आमचें सर्व पापकर्म आपल्या डोळ्यांनीं पाहून तूं तें आमच्याकडून टाकवीत नाहींस, तर त्यापासून अलिप्त राहातोस ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे माझे भक्त आहेत असें म्हणतांना व्यर्थ ओझें वाटतें ना ? ४. [२६७१]

तुझ्याजवळ असलेला निर्गुणपणा, त्यामुळें आलेली निष्ठुरता हा जो प्रकार मला माहीत नव्हता तो मला कळून चुकला, म्हणूनच आम्हीं अबोला धरला आहे १. हे देवा, तुझ्या आमच्या एका भेटींतच तुझा आम्हीं संबंध तोडला २. आतां मी कोडकौतुकानें देखील ह्या देवाविषयीं इच्छा धरणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्याकडे येण्याजाण्याचा व्यवहार अशा ह्या एका भावनेनेंच सारून नाहींसा केला ४. [२६७२]

हे देवा, तुम्हां आम्हांमध्यें आतां वर्णन करण्यासारखें काय उरलें आहे ? १. तूं माझें समाधान न केल्यामुळें माझें मन मात्र निर्दय केलें आहेस (तूं मला ज्ञान सांगून माझें समाधान करून माझें मन निष्ठुर केलें आहेस) २. घरच्याघरींच आम्हीं झुरत बसावें, असेच तुझ्या येथील सर्व प्रकार आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझें देवपण गुंडाळून ठेव (जीव-ब्रह्मैक्यस्थितींत सगुणभक्तीची आवड व कर्तव्य राहात नाहीं, हें विरोधाभासानें ह्या व मागील अशा दोन अभंगांत वर्णिलें आहे) ४. [२६७३]

मागितल्यास आस करा । उरी धरा कांहींबाहीं ॥ १ ॥ म्हणऊनि सारिली आस । होती यास मूळ ते ॥ २ ॥ माझ्या मोहें तुज पान्हा । लोटे स्तना वोरसे ॥ ३ ॥ तुका म्हणे आळवणें । माझ्या देणें उत्तर ॥ ४ ॥ [२६७४]

आतां बरें घरिंच्याघरीं । आपली उरी आपणापें ॥ १ ॥ वाइट बरें न पडे दृष्टि । मग कष्टी होईजेना ॥ २ ॥ बोलों जातां वाढे बोल । वायां फोल खटपट ॥ ३ ॥ काकुलती यावें देवा । तों तों सेवा इच्छितो ॥ ४ ॥ हिशोबाचे खटखटे । चढे तुटे घडेना ॥ २ ॥ तुका म्हणे कळों आलें । दुसरे भले तों नव्हे ॥ ६ ॥ [२६७५]

आधीं सोज्वळ करावा मारग । चालतां तें मग गोवी नाहीं ॥ १ ॥ ऐसा चालोनियां आला शिष्टाचार । गोवीचा वेव्हार पापपुण्य ॥ २ ॥ पळणें तें पळो सांडुनि कांबळें । उपाधीच्या मुळें लाग पावे ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें शूर तो निवडे । पडिले बापुडे कालचक्रीं ॥ ४ ॥ [२६७६]

उद्धत त्या जाती । द्रव्यें रंगल्या उद्धती ॥ १ ॥ म्हणउनि बहु फार । त्यांसी असावें अंतर ॥ २ ॥ कैचें पाठी पोट । गोड विषासी सेवट ॥ ३ ॥ तुका म्हणे सापा । न कळे कुरवाळिलें बापा ॥ ४ ॥ [२६७७]

आम्हां कथा आवश्यक । येर संपादूं लौकिक ॥ १ ॥ जैसी तैसी माय बरी । मानिल्या त्या माना येरी ॥ २ ॥ व्यालीचा कळवळा । जीव बहुत कोंवळा ॥ ३ ॥ कवतुकें वावरे । तुका म्हणे त्या आधारें ॥ ४ ॥ [२६७८]

हे देवा, तुमच्याजवळ मागितल्यास तुम्ही आशा करितां व थोडेंबहुत अंतर ठेवितां १. म्हणून मीं जी कांहीं तुमच्यासंबंधाची आशा धरली होती ती टाकली, त्याचें कारण वरी हेंच २. माझ्या मोहानें तुमच्या स्तनांत मोठा प्रेमपान्हा लोटतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी जें कांहीं आळवीत आहें त्या माझ्या बोलण्याला तुम्हीं मान द्यावा ४. [२६७४]

आतां घरच्या घरींच राहाणें हें बरें; त्यांत आपला आपल्याशींच संबंध असतो १. दुसऱ्याचें वाईट-बरें दृष्टीस पडत नाहीं व असें झाल्यावर मग जीवास दुःख होण्याचें कांहीं कारण नाहीं २. बोलण्यांत शब्दानें शब्द वाढतो व सर्व खटपट फोलकटवत् व्यर्थ होते ३. जों जों देवाला आम्हीं काकुलती यावें, तों तों देव आमच्याकडून सेवा घेण्याची इच्छा करितो. ४. नुसत्या हिशेब करण्याच्या खटपटींत कांहीं लाभहि होत नाहीं व कांहीं नुकसानहि होत नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, दुसरे जोंपर्यंत चांगले नाहींत, तोंपर्यंत त्यांच्याशीं संबंध ठेवून कांहीं कार्य होणार नाहीं. एकटेंच असणें बरें; कदाचित् संगतीला दुसरा मनुष्य असलाच तर तो सज्जन असावा, ही गोष्ट आम्हांला कळून चुकली ६. [२६७५]

ज्या मार्गानें आपणास जावयाचें असेल तो मार्ग आधीं स्वच्छ करावा, म्हणजे त्या मार्गानें जाण्यांत कोणत्याहि तऱ्हेची अडचण येत नाहीं १. असा पूर्वीपासून श्रेष्ठाचार (शिष्टांचा आचार) चालत आला आहे. पारमार्थमार्गांत प्रतिबंध करणारीं पापपुण्यात्मक कर्में आहेत २. जर तुम्हांस पळावयाचें असेल तर पंचभूतात्मक देहबुद्धीचें कांबळें टाकून पळा, कारण ह्या देहबुद्धीच्या उपाधीमुळेंच पापपुण्यें पाठलाग करीत येतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं खरा विवेक-वैराग्यसंपन्न शूर असेल तोच ह्या सर्वांच्या तडाख्यांतून सुटून मुक्त होईल; बाकीचे बिचारे देही तादात्म्यानें दीन झाल्यानें कालचक्रांत फिरत राहातील ४. [२६७६]

ज्या जाती धनमदाच्या संपत्तीनें रंगल्या आहेत, त्या फार मस्त असतात १. ह्याकरितां सुज्ञ मनुष्यानें त्यांच्यापासून फार दूर राहावें हें बरें २. विषाच्या ठिकाणीं कांहीं गोडपणा नसून पाठपोट तेंच असतें; विष सेविल्यानें शेवट गोड कसा होईल? ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्पाला जर मृदुपणानें कुरवाळलें तर त्याला तें समजत नाहीं; म्हणून त्याचेपासून जसें दूर राहावें तसें दुर्जनापासून दूर राहावें ४. [२६७७]

हरिकथा करणें हें काम आमचें आवश्यक आहे, त्यावांचून इतर संपादणी लौकिकापुरती करूं १. बालकांस आपली आई जशी असेल तशी प्रिय असते. इतर स्त्रियांना जसा मान देतां येईल तसा द्यावयाचा २. जिनें बालकास जन्म दिला आहे तिचा जीव त्याविषयीं फार कळवळतो, त्याप्रमाणें इतर स्त्रियांचा नसतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें हरिकथेच्या आश्रयानें मी कौतुकानें क्रीडा करीत आहें ४. [२६७८]

पाळितों वचन । परि बहु भीतें मन ॥ १ ॥ करितों पायांशीं सलगी । नये बैसों अंगसंगीं ॥ २ ॥ जोडोनियां कर । उभें असावें समोर ॥ ३ ॥ तुका म्हणे संत । तुम्ही मी बहु पतित ॥ ४ ॥ [२६७९]

जैसा तैसा आतां । मज प्रमाण अनंता ॥ १ ॥ पायां पडणें न सोडीं । पोटीं तेंच वर तोंडीं ॥ २ ॥ एका भावें चाड । आदीं तेंची अंतीं गोड ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां । टळणेंचि नाहीं नेमा ॥ ४ ॥ [२६८०]

चुकलों या ऐशा वर्मा । तरी कर्मा सांपडलों ॥ १ ॥ पाठी लागे करी नास । गर्भवास भोगवी ॥ २ ॥ माझें तुझें भिन्नभावें । गळां दावें मोहाचें ॥ ३ ॥ तुका म्हणे पाठेळ केलों । नसत्या भ्यालों छंदासी ॥ ४ ॥ [२६८१]

देह प्रारब्धाचे शिरीं । असोन करी उद्वेग ॥ १ ॥ धांव घालीं नारायणा । माझ्या मना जागवीं ॥ २ ॥ ऐसीं चुकोनियां वर्मे । पीडा भ्रमें पावलों ॥ ३ ॥ तुका म्हणे कैंचा भोग । नव्हे रोग अंगींचा ॥ ४ ॥ [२६८२]

अनंताच्या ऐकों कीर्ति । ज्याच्या चित्तीं हरिनाम ॥ १ ॥ उलंघूनि गेले सिंधू । हा भवबंधू तोडोनियां ॥ २ ॥ (आतां) हळुहळु तेचि वाहीं । चालों कांहीं अधिकारें ॥ ३ ॥ खुंटुनियां गेले नावा । नाहीं हेवा खोळंबा ॥ ४ ॥ न लगे मोल द्यावा रुका । भाव एका कारणें ॥ ५ ॥ भीमातिरीं थडवा केला । उठा चला लवलाहें ॥ ६ ॥ तुका म्हणे पाहतो वाट । उभा नीट पाउलीं ॥ ७ ॥ [२६८३]

तरीच म्यां देवा । साटी करुनियां जीवा ॥ १ ॥ येथें बैसलीं धरणें । दृढ काया-वाचा-मनें ॥ २ ॥

अहो संतजन, मी तुमची आज्ञा प्रतिपालन करीत आहें, पण माझ्या मनास फार भय वाटतें १. कारण तुमच्या (लगत मला बसतां येत नाहीं; म्हणून तुमच्या) पायांजवळ मी लाड करीत आहें २. हात जोडून तुमच्याजवळ समोर उभें राहावें हें बरें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो संतजन, तुम्ही श्रेष्ठ आहांत आणि मी तर फार पातकी आहें ४. [२६७९]

हे अनंता, तूं आतां जसा असशील तसाच मला मान्य आहेस १. तुमच्या पायांवर मस्तक ठेवणें मी सोडणार नाहीं. जसें माझ्या हृदयीं आहे तें बाहेर मुखानें सांगतों २. एक शुद्ध भावाची मला गरज आहे; तो आरंभीं जसा आहे तसाच अखेर गोड व्हावा ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा जो आम्हीं नेम केला आहे तो कधींहि सोडणार नाहीं ४. [२६८०]

(मागील अभंगांत सांगितल्याप्रमाणें) मी खऱ्या मर्मास चुकलों म्हणून कर्माच्या पेंचांत आलों १. तें कर्म माझ्या पाठीस लागल्यामुळें माझा नाश करून अनेक गर्भवास घ्यावयास लावतें २. देहसंबंधी माझें व इतर तुझें अशा वेगळ्या भावानें मोहाच्या पाशानें माझा गळा बांधला गेला ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याप्रमाणें त्या कर्मानें मला ओझ्याच्या बैलाप्रमाणें केलें,–राबविलें, म्हणून नाहीं त्या छंदाचें मला भय वाटलें ४. [२६८१]

देह हा प्रारब्धाच्या स्वाधीन आहे पण मनास अनेक प्रकारची काळजी लागली आहे १. हे नारायणा, तूं धांवत ये व माझ्या मनास जागृत ठेव. तुझी करुणा भाकण्याचीं खरीं मर्में चुकल्यामुळें खोट्या प्रपंचाच्या भ्रमानें मीं फार त्रास भोगला ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा आमचा रोग तो प्रारब्धाचा भोग नाहीं काय ? ४. [२६८२]

ज्यांच्या चित्तामध्यें हरीचें नाम आहे ते ह्या भवसमुद्रांतून पार पडले व त्यांनीं संसारबंधनें नाहींशीं केलीं, अशा प्रकारच्या अगणित हकीगती मीं ऐकिल्या आहेत १–२. त्याच वहिवाटीप्रमाणें आमचा जसा अधिकार असेल तसे आम्ही कांहीं तरी वागणूक करूं ३. ते ज्या हरिनामाच्या नौकेंत बसून गेले ती आमच्याकरितां खुंटाला बांधून ठेवली आहे, त्यामुळें इच्छेचा खोळंबा होण्याचें कारण नाहीं (किंवा) त्यांना कोठें कांहीं प्रतिबंध झाला नाहीं ४. त्यांना कांहीं मोल द्यावें लागलें नाहीं. एक शुद्धभावानें त्यांचें कार्य झालें ५. तुकाराम महाराज म्हणतात, चंद्रभागेच्या कांठावर सर्वांना तारून नेणारा भवसिंधूचा उतार केला आहे. ह्याकरितां उठा, चला लवकर ६. विटेवर सम पाउलें जोडून सर्वांची वाट पाहात पांडुरंग उभा आहे आणि भक्तांची वाट पाहात आहे ७. [२६८३]

हे देवा, मी आपल्या जीवावर उदार होऊन बसलों आहें १. ह्या ठिकाणीं माझें काया-वाचा-मन दृढ धरणें घेऊन

आवरिल्या वृत्ति । मन घेउनियां हातीं ॥ ३ ॥ तुका म्हणे जरा । बाहेर येऊं नेदीं घरा ॥ ४ ॥ [२६८४]

हें तों एक संतांठायीं । लाभ पायीं उत्तम ॥ १ ॥ म्हणवितां त्याचे दास । पुढें आस उरेना ॥ २ ॥ कृपादान केलें सतीं । कल्पांतींही सरेना ॥ ३ ॥ तुका म्हणे संतसेवा । हेचि देवा उत्तम ॥ ४ ॥ [२६८५]

नारायणा ऐसा । सेवूं नेणतील रसा ॥ १ ॥ जेणें भवव्याध तुटे । दुःख मागुतें न भेटे ॥ २ ॥ न लगे कांहीं आटी । बाधा राहों न सके पोटीं ॥ ३ ॥ कैवल्य तें जोडे । कृपा लवकरी घडे ॥ ४ ॥ जन्ममरण दुःख आटे । जाळें अवघेंचि तुटे ॥ ५ ॥ तुका म्हणे झाला । याचा गुण बहुतांला ॥ ६ ॥ [२६८६]

अनेक दोषांचे काट । जे जे गादले निघोंट । होती हरिनामें चोखट । क्षण एक न लागतां ॥ १ ॥ तुम्ही हरि म्हणा हरि म्हणा । महादोषांचे छेदना ॥ २ ॥ अति प्रीतीचा बांधला । नष्ट चांडाळीं रतला । क्षण न लागतां नेला । वैकुंठासी हरि म्हणतां ॥ ३ ॥ अमित दोषाचें मूळ । झालें वाल्मिकासी सबळ । झाला हरिनामें निर्मळ । गंगाजळ पैं जैसा ॥ ४ ॥ हरि म्हणतां तरले । महादोषी उद्धरिले । पहा गणिकेसी नेलें । वैकुंठासी हरि म्हणतां ॥ ५ ॥ हरिविण जन्म नको वायां । जैसी दर्पणींची छाया । म्हणोनि तुका म्हणे पायां । शरण तया हरीसी ॥ ६ ॥ [२६८७]

भजन हें नासिलें हेंडीं । दंभा लंडी आवडी ॥ १ ॥ जेवीच [जेवीत] ना आइता पाक । नासी ताक घुसळूनि ॥ २ ॥ एकाएकीं इच्छी पाट । नेणे चाट काउळें ॥ ३ ॥ तुका म्हणे मुलाम्याचें । बंधन साचें सेवटीं ॥ ४ ॥ [२६८८]

बसलें आहे २. मी आपलें मन स्वाधीन ठेवून सर्व वृत्ति आवरल्या आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां देवा, तुला घराचे बाहेर थोडासा देखील मी येऊं देणार नाहीं ४. [२६८४]

संतांच्या ठिकाणीं उत्तम लाभ आहे. तो ह्याच ठिकाणीं मिळतो १. जर त्यांचा सेवक म्हणविलें तर पुढील सर्व व्यवहाराची आशा नाहींशी होते २. जर संतांनीं कृपादान दिलें तर तें कल्पांतीं देखील संपणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, संतांची सेवा जर मला मिळेल तर फार उत्तम होईल (किंवा, संतांची सेवा देवाला देखील गोड वाटेल) ४. [२६८५]

नारायणाच्या नामासारखें उत्तम औषध असून लोक त्याचें सेवन करण्याचें जाणत नाहींत १. ज्या योगानें भवरोग नाहींसा होऊन जन्ममृत्यूचें दुःख पुनः कधींहि प्राप्त होणार नाहीं २. त्याविषयीं (ह्या रोगावरील औषधाकरितां) कांहीं खटपट करणें नको. एक नाम घेतलें असतां अंतःकरणांत कोणतीहि बाधा राहूं शकणार नाहीं ३. देवाची कृपा होऊन लवकर कैवल्यपदाची (मोक्षाची) प्राप्ति होते ४. जन्ममृत्यूचें दुःख निवारण होऊन सर्व मायाजालाचा नाश होतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या औषधाचा गुण मागें पुष्कळ लोकांस आला आहे ६. [२६८६]

अनेक प्रकारच्या पातकांच्या मळानें जे परिपूर्ण भरले आहेत, त्यांस हरीच्या नांवानें शुद्ध होण्याला एक क्षणदेखील लागत नाहीं १. ह्याकरितां तुम्ही हरिनामाचा उच्चार करा (असें द्विवार सांगतात). त्या योगानें महापातकांचा नाश होईल २. अजामिळ हा अति प्रीतीनें बांधला असल्यामुळें, मांगिणीच्या ठिकाणीं रममाण झाला. अशा त्या नष्टास नामोच्चाराच्या योगानें एक क्षणहि न लागतां हरीनें वैकुंठास नेलें ३. सर्व दोषांची मूळ जी ब्रह्महत्या ती वाल्मीकीला अगणित घडल्यामुळें तें पाप सबळ झालें, पण तो हरिनामोच्चाराच्या योगानें गंगेच्या पाण्याप्रमाणें निर्मळ झाला ४. अशा हरिनामोच्चाराच्या योगानें मागें पुष्कळ महादोषी लोकांचा उद्धार केला. पिंगला गणिका अति दोषी असून, नामोच्चार केल्याबरोबर तिला वैकुंठास नेलें कसें तें पाहा ५. तुकाराम महाराज म्हणतात, जसें आरशांतील प्रतिबिंब व्यर्थ आहे तसा हरिनामचिंतनावांचून जन्म व्यर्थ आहे, म्हणून तसला जन्म नको. ह्याकरितां मी त्या हरीला शरण जाऊन त्याच्या पायां पडतों ६. [२६८७]

ज्या लंडांना (लबाडांना) दंभाची आवड आहे त्या पशूंनीं केलेलें भजन नासलें १. (परान्न निषिद्ध आहे असें म्हणून जो तयार झालेल्या स्वयंपाकाचें) सिद्ध पाकाचें सेवन ढोंगानें न करितां जो ताक घुसळून पितो आणि झालेला स्वयंपाक अव्हेरितो तो मनुष्य नीच होय २. आपला अधिकार न जाणतां एकदम पाटावर बसण्याची इच्छा करितो तो चावट, कावळ्यासारखा मूर्ख आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, परमार्थाचा मुलामा दिलेले असे जे ढोंगी असतात ते शेवटीं यमाच्या शिक्षेस पात्र होतात ४. [२६८८]

जैसा निर्मळ गंगाओघ। तैसा भाग वोगरीं ॥ १ ॥ प्रेम वाढे ग्रासोग्रासीं। ब्रह्मरसीं भोजन ॥ २ ॥ तृप्तीवरि आवडी उरे। ऐसे बरे प्रकार ॥ ३ ॥ तुका म्हणे पाख (पाक) मन। नारायण तें भोगी ॥ ४ ॥ [२६८९]

सुख सुखा विरजण झालें। तें मथिलें नवनीत ॥ १ ॥ हाले डोले हरुषें काया। निवती बाह्या (बाहू) नयन ॥ २ ॥ प्रबल तो नारायण। गुणें गुण वाढला ॥ ३ ॥ तुका म्हणे भरली सीग। वरी मग वोसंडे ॥ ४ ॥ [२६९०]

कां रे न भजसी हरी। तुज कोण अंगीकारी ॥ १ ॥ होईल यमपुरी। यमदंड यातना ॥ २ ॥ कोण जाली लगबग। काय करिसी तेथें मग ॥ ३ ॥ कां रे भरला ताठा। करिती वोज नेतां वाटा ॥ ४ ॥ तोंडा पडिली खिळणी। जिव्हा पिटिती वोढूनि ॥ ५ ॥ कां रे पडिली जनलाज। कोण सोडवील तुज ॥ ६ ॥ लाज धरीं म्हणे तुका। नको वायां जाऊं फुका ॥ ७ ॥ [२६९१]

क्षरला सागर गंगा ओघीं मिळे। आपणाचि खेळे आपणाशीं ॥ १ ॥ मधील ते वाव अवघी उपाधि। तुम्हां आम्हांमधीं तेचि परि ॥ २ ॥ घट मठ झाले आकाशाचे पोटीं। वचनेंचि तुटी तेथेंचि ते ॥ ३ ॥ तुका म्हणे बीजें बीज दाखविलें। पत्र पुष्प आलें गेलें वायां ॥ ४ ॥ [२६९२]

पाळोनियां मोठें केलें। त्यासी बोलें ओळखी ॥ १ ॥ जवळुनी न वजे दुरी। लाड करी कवतुक ॥ २ ॥ खूण उभा विटेवरी। कटीं कर धरियेले ॥ ३ ॥ तुका म्हणे घातली वरी। झुली थोरी मोलाची ॥ ४ ॥ [२६९३]

जसा गंगेचा ओघ निर्मळ आहे तशा प्रकारचें भोजन मला वाढ १. ब्रह्मरसाच्या भोजनानें घांसाघांसाला प्रेम वृद्धिंगत होतें २. तृप्तीनंतर भोजनाविषयींची प्रीति राहील असे प्रकार उत्तम ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें मन शुद्ध आहे त्याचा नारायण उपभोग घेतो (किंवा, शुद्ध मन नारायणाचा आत्मत्वानें भोग घेत असतें) ४. [२६८९]

(मूळच्या निर्गुण) सुखाला सगुण सुखाचेंच विरजण घालून त्याचें दहीं तयार झालें तें घुसळून खरें तें ज्ञानोत्तर भक्तीचें लोणी काढलें १. तें ज्यांनीं सेवन केलें आहे, ते तृप्त होऊन निर्गुणाच्या आनंदाच्या उद्‌गारानें डोलूं लागतात व त्या सगुण सुखास पाहून डोळे व बाहु निवतात २. त्यांचे ठिकाणीं शेष बळ (मूलतः बळ) नारायणाचेंच असतें, म्हणून त्याच गुणानें गुण (सगुण-निर्गुणाचा गुण) वाढला जातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें शिगेपर्यंत भरलें आहे, तें मग साहाजिकच बाहेर (सर्व त्रैलोक्यांत) सांडलें जातें (सर्व त्रैलोक्य आनंदरूप होतें) ४. [२६९०]

अरे, तूं हरीचें भजन कां करीत नाहींस ? हरीवांचून तुला कोणाचा आश्रय मिळेल ? १. अखेरीस यमपुरीस गेल्यावर तेथें यमाच्या शिक्षेनें फार दुःख होईल २. आतां तुला कोणत्या कामाची त्वरा झाली आहे ? मग यमपुरीस गेल्यावर तेथें तुझें काय चालेल ? ३. अरे, तूं गर्वानें कां उन्मत्त झालास ? अखेरीस यमदूत मोठ्या व्यवस्थेनें तुला घेऊन जातील ४. आतां नाम घेण्याविषयीं तुझी दांतखीळ बसली आहे, पण अखेरीस खरोखरी तुझी जिव्हा ओढून तुला मारतील ५. नाम घेण्याविषयीं तुला जनाची लज्जा वाटते पण, अरे, त्या ठिकाणीं तुला कोण सोडवील ? ६. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याची तूं कांहीं लाज धर; उगीच व्यर्थ वायां (फुकट मरून) जाऊं नकोस ७. [२६९१]

समुद्र हा वाफेच्या रूपानें वरती जाऊन मेघ होतो व तो पर्जन्यरूपानें गंगेच्या ओघांत मिळतो; आणि ती गंगा समुद्रास मिळावयास जाते. अशा रीतीनें समुद्र हा आपल्याबरोबर आपणच खेळतो १. अशी ती गंगा आणि समुद्र एकच आहेत; पण मध्यंतरीं होणारी अवघी उपाधि व्यर्थ आहे. तसा देवा, तुमच्या आमच्या मधील प्रकार आहे २. घट, मठ हे प्रकार महद् आकाशाच्या पोटांत निर्माण झाले आणि त्याच ठिकाणीं घटाकाश, मठाकाश (हीं नांवें) उत्पन्न होऊन तेथेंच महदाकाशांत मावळतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, बीजापासून अखेरीस बीजच निर्माण होतें, मध्यंतरींचे पत्रपुष्पादि प्रकार होतात ते वायां जातात (त्याप्रमाणें एक ब्रह्मच सत्य आहे, इतर सर्व भेद मिथ्या आहेत-मायेचे प्रकार आहेत.) ४. [२६९२]

ज्यानें माझें (मज कुत्र्याला) पालन करून मला वाढविलें आहे त्याच्या शब्दावरून मी ओळखितों १. तो माझ्यापासून दूर जात नाहीं आणि लाडानें माझें कौतुक करीत आहे २. कमरेवर हात ठेवून विटेवर उभा राहिला आहे; तीच त्याला ओळखण्याची खूण आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या आंगावर जी बारीक झूल घातली आहे ती फार किमतीची आहे ४. [२६९३]

काय विनवावें कोण तो निवाड । केलें माझ्या कोड वचनाचें ॥ १ ॥ अहो कृपानिधि गुणांच्या निधाना । माझ्या अनुमाना न येचि हें ॥ २ ॥ वहुत करुणा केलेंसे भाषण । एकही वचन नाहीं आलें ॥ ३ ॥ माझी कांहीं सेवा होईल पावली । निश्चिंती मानिली होती ऐसी ॥ ४ ॥ तुका म्हणे माझी उरली ते आटी । अभयकर कटीं न देखेंचि ॥ ५ ॥ [२६९४]

लाजोनियां काळें राहिलें लिखित । नेदितांही चित्त समाधान ॥ १ ॥ कैसें सुख वाटे वचनांचे तुटी । प्रीतिविणें भेटी रुचि नेदी ॥ २ ॥ एकाचिये भेटी एकाचा कोंपर । मावेचा पदर कळों येतो ॥ ३ ॥ होत्या आपलया त्या वेंचलया (वेंचूनियां) शक्ती । पुढें झालों युक्ति कळाहीन ॥ ४ ॥ तुका म्हणे तुम्ही समर्थ जी देवा । दुर्बळाची सेवा कोठें पावे ॥ ५ ॥ [२६९५]

आशाबद्ध बहु असे निलाजिरें । होय म्हणे धीरें फळ टोंके ॥ १ ॥ कारणापें चित्त न पाहे अपमान । चित्त समाधान लाभासाठीं ॥ २ ॥ तुका म्हणे हातें लोटिलें न कळे । झांकितसें डोळे पांडुरंगा ॥ ३ ॥ [२६९६]

सातां पांचां तरी वचनां सेवटीं । निरोप कां भेटी एक तरी ॥ १ ॥ कां नेणें निष्ठुर केलें नारायणा । न देखें हें मना येतां कांहीं ॥ २ ॥ तुका म्हणे ऐसा न देखें निवाड । कडू किंवा गोड फळ पोटीं ॥ ३ ॥ [२६९७]

वायां ऐसा जन्म गेला । हें विठ्ठला दुःख वाटे ॥ १ ॥ नाहीं सरता झालों पायीं । तुम्ही जई न पुसा ॥ २ ॥ कां मी जीतों संवसारीं । अद्यापवरीं भूमिभार ॥ ३ ॥ तुका म्हणे पंढरीनाथा । सबळ व्यथा भवरोग ॥ ४ ॥ [२६९८]

हे देवा, तुम्हांस मीं जी विनंति केली तिचा तुम्ही निवाडा कोणता केला आणि त्या माझ्या वचनाचें कौतुक तरी काय केलें? १. अहो कृपानिधि, गुणांच्या निधाना, हें माझ्या समजुतीस कांहींच येत नाहीं २. आजपर्यंत करुणेचें भाषण मीं पुष्कळ केलें पण तुमच्याकडून एक सुद्धां उत्तर आलें नाहीं ३. माझी कांहीं तरी सेवा तुम्हांस पोहोंचेल, अशी मीं निश्चिंती मानली होती ४. तुकाराम महाराज म्हणतात, परंतु माझी केलेली खटपट व्यर्थ गेली असें दिसतें, कारण उभय हस्त कटावर ठेविले आहेत तें रूप माझ्या दृष्टीस पडत नाहीं ५. [२६९४]

हे देवा, वेद-शास्त्र-पुराणांत 'देव कृपाळु आहे' अशीं जीं वचनें लिहून ठेविलीं आहेत त्यांना ह्या समयीं लाज लावली असें वाटतें, कारण तुम्ही माझ्या चित्ताला समाधान देत नाहीं १. तुम्हीं जर आपलें बोलणें बंद केलें तर आम्हांला कसें सुख वाटेल? कारण कांहीं प्रीति असल्याशिवाय भेटीमध्यें गोडी वाटणार नाहीं २. एक लाडानें भेटावयास गेला त्यास दुसऱ्यानें जर कोंपर (हात) आडवा केला, तर त्या उभयतांमध्यें मायेचा पदर किती आहे तो समजून येतो ३. आजपर्यंत ज्या ज्या प्रकारच्या शक्ति होत्या त्या सर्व मीं खर्च केल्या. येथून पुढें माझी मति कुंठित झाल्यामुळें मी कळाहीन व युक्तिहीन झालों आहें ४. तुकाराम महाराज म्हणतात, अहो जी देवा, तुम्ही समर्थ आहांत, म्हणून तुमच्या ठिकाणीं आम्हां गरिबांची सेवा कशी पोहोंचेल? ५. [२६९५]

जें कोणी आशापाशानें बांधलें आहे तें फार निलाजरें असतें. त्यास कांहीं वेळानें देऊं म्हणून सांगितलें असतां तें होय म्हणतें व फलप्राप्तीकरितां टोकत बसतें १. त्याचें लक्ष आपल्या कार्याकडे असल्यामुळें तें अपमान झालेला पाहात नाहीं, कारण इच्छित लाभ होऊन चित्ताचें समाधान होण्याची त्यास गरज असते २. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, मी डोळे झांकल्यामुळें तुम्हीं मला हातानें जरी ढकलून दिलें तरी तें मला समजत नाहीं. ३. [२६९६]

हे देवा, मी पांचसात वचनें खर्च केल्यावर तरी, भेट देणें अथवा कांहीं निरोप पाठविणें ह्या दोहींपैकीं एक तरी करावयाचें होतें? १. हे नारायणा, माझ्याविषयीं तुम्ही निष्ठुर कां झालां हें समजत नाहीं. माझें बोलणें तुमच्या मनास कांहीं येत नाहीं. २. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या हृदयांत चांगलें किंवा वाईट फळ देण्याची भावना आहे कीं नाहीं, हें मला कळत नाहीं ३. [२६९७]

अहो विठ्ठला, असा माझा जन्म व्यर्थ गेला, ह्याबद्दल मला फार दुःख वाटतें १. तुम्ही ज्या अर्थी मला कांहीं विचारीत नाहीं त्या अर्थी मी तुम्हांला मान्य झालों नाहीं असें दिसतें २. मग मी अजूनपर्यंत पृथ्वीला भार होऊन ह्या संसारांत का जगलों आहें? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा, भवरोगाचें जबरदस्त दुःख माझ्या मागें लागलें आहे ४. [२६९८]

कासया हो माझा राखिला लाकिक। निवाड कां एक केला नाहीं ॥ १ ॥ मग तळमळ न करितें मन। झालें तें कारण कळों येतें ॥ २ ॥ तुका म्हणे केला पाहिजे निवाड। वैद्याची ते भीड मरण रोग्या ॥ ३ ॥ [२६९९]

ऐसें कोण पाप बळी। जें जवळी येऊं नेदी ॥ १ ॥ तुम्हां तंव होईल ठावें। नेदावें कां कळों हें ॥ २ ॥ कोण झाला अंतराय। कां ते पाय अंतरले ॥ ३ ॥ तुका म्हणे निमित्याचा। आला सुचा अनुभव ॥ ४ ॥ [२७००]

ब्रह्मज्ञान भरोवरी। सांगे आपण न करी ॥ १ ॥ थू थू त्याच्या तोंडावरी। व्यर्थ शिणविली वैखरी ॥ २ ॥ कथा करी वरिवरी। प्रेम नसेचि अंतरीं ॥ ३ ॥ तुका म्हणे कवित्व करी। मान लोभ हे अंतरीं ॥ ४ ॥ [२७०१]

दगडाच्या देवा बगाडी नवस। बाईल कथेसी जाऊं नेदी ॥ १ ॥ वेंची धनरासी बांधिलें स्मशान। दारीं वृंदावन द्वाड मानी ॥ २ ॥ चोरें नागविला न करी त्याची खंती। परि द्विजा हातीं नेदी रुका ॥ ३ ॥ करी पाहुणेर व्याह्याजांवयासी। आल्या अतितासी पाठमोरा ॥ ४ ॥ तुका म्हणे जळो धिग त्याचें जिणें। भार वाही सीण धरातळीं ॥ ५ ॥ [२७०२]

करूनि विनवणी। माथा ठेवितों चरणीं ॥ १ ॥ होतें तेंचि असो द्यावें। रूप सौम्यचि बरवें ॥ २ ॥ भया भेणें तुमचा ठाव। तुमच्या कोपें कोठें जावें ॥ ३ ॥ तुका म्हणे पायां लागे। दान समुदाय मागे ॥ ४ ॥ [२७०३]

अहो देवा, तुम्ही माझा 'भक्त' म्हणून लौकिक कशाकरितां राखला? कांहीं तरी (भेट देईन किंवा भेट देणार नाहीं असा) एक निकाल कां केला नाहीं? १. मग माझ्या मनानें तळमळ केली नसती. कांहीं तरी एक आपलें काम झालेलें समजूत येतें २. तुकाराम महाराज म्हणतात, कोणता तरी एक निकाल तुम्हीं केला पाहिजे. नाहींपेक्षां जर रोग्याची भीड वैद्यानें धरली तर त्या रोग्यास मरण प्राप्त होतें ३. [२६९९]

हे देवा, जें तुमच्या जवळ मला येऊं देत नाहीं, असलें मोठें माझें कोणतें पाप आहे? १. तुम्हांला तर हें सर्व माहीतच आहे, मग मला कां तुम्ही समजूं देऊं नये? २. कशाकरितां आपला अंतर पडला? कोणत्या कारणानें आपले पाय दुरावले? ३. तुकाराम महाराज म्हणतात, कोणत्या चुकीचें निमित्त माझ्यावर आलें तें तुम्ही सुचवा म्हणजे अनुभवास येईल (ती चूक असल्यास मी सुधारीन) ४. [२७००]

एखादा विद्वान् मोठ्या जोरानें ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगतो पण त्याप्रमाणें आपण वागणूक करीत नाहीं १. त्याच्या तोंडावर बेलाशक थुंकावें (असें द्विवार सांगतात), कारण त्यानें आपल्या जिव्हेस व्यर्थ श्रम दिले २. बाह्यात्कारीं हरीची कथा सांगतो पण त्याविषयींचें प्रेम अंतःकरणांत मुळींच नसतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, चतुरपणानें कवित्वाची रचना करतो पण त्याच्या ठिकाणीं धनाविषयींचा लोभ व लोकांनीं मानावें अशी इच्छा असते ४. [२७०१]

क्षुद्र मनुष्य एखाद्या दगडांच्या देवाला नवस करून बायकोच्या पाठीला गळ टोंचून तिला देवापुढें टांगतो, पण तिला हरिकथेच्या ठिकाणीं कधीं जाऊं देत नाहीं १. जवळ असलेलें द्रव्य खर्च करून मसणवट्यामध्यें आपल्या वडिलाचें थडगें बांधतात; पण, दारामध्यें जर तुळशीचें वृंदावन असलें, तर तें धार्जिणं नाहीं म्हणून वाईट मानतात २. जर त्याला चोरानें लुटलें तर त्याचें दुःख मानीत नाहीं पण एखाद्या ब्राह्मणास पै सुद्धां देत नाहीं ३. व्याही, जांवई वगैरे पाहुणे घरीं आल्यास मेजवानीचा थाट करितात पण त्यांच्या घरीं कोणी भिक्षुक आले असतां त्यांस विन्मुख होतात ४. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या लोकांचें ह्या पृथ्वीस फार ओझें होतें, म्हणून त्यांच्या जगण्याला धिक्कार असो अथवा आग लागो ५. [२७०२]

हे देवा, मी विनंति करून तुमच्या पायांवर मस्तक ठेवितों १. जें माझ्या दृष्टिसमोर रूप आहे तेंच असावें, कारण तें सौम्यरूपच फार बरें आहे २. जर तुम्हीं उग्ररूप धारण केलें तर त्या भयानें आम्हीं कोणत्या ठिकाणीं जावें व तुम्हांस राग आल्यावर तुमची प्राप्ति कशी होईल? तुकाराम महाराज म्हणतात, ज्या योगानें वैष्णवसमुदाय मिळेल तें तुम्ही मला दान द्या. म्हणून मी तुमच्या पायां पडतों ४. [२७०३]

प्रेम नये सांगतां बोलतां दावितां। अनुभव चित्ता चित्त जाणे ॥ १ ॥ कासवीचें बाळ वाढे कृपादृष्टीं। दुधा नाहीं भेटी अंगसंगें ॥ २ ॥ पोटामध्यें कोणें सांगितलें सर्पा। उपजत लपा म्हणऊनि ॥ ३ ॥ बोलो नेणें परी जाणे गोड क्षार। अंतरीं विचार त्यासी ठावा ॥ ४ ॥ तुका म्हणे बरें विचारावें मनीं। आणिक भल्यांनीं पुसों नये ॥ ५ ॥ [२७०४]

आतां मी पतित ऐसा साच भावें। कळों अनुभवें आलें देवा ॥ १ ॥ काय करावें तें रोकडेंचि करीं। राहिली हे उरी नाहीं दोघां ॥ २ ॥ येर येरा दृष्टी द्यावया उत्तरा। यासी काय करा ग्वाही आतां ॥ ३ ॥ तुका म्हणे मेलों सांगत सांगतां। तेंचि आलें आतां कळों तुम्हां ॥ ४ ॥ [२७०५]

काय तुज मागों नाहीं जाणवलें। माझें नाहीं केलें हित कांहीं ॥ १ ॥ डोळे झांकुनियां होसी अबोलणा। तेव्हां नारायणा आतां कैसा ॥ २ ॥ न कळे उचित न सांगतां स्पष्ट। ऐसा क्रियानष्ट काय जाणें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझा घात तुम्हां ठावा। तरी कां आधीं देवा वारूं नये ॥ ४ ॥ [२७०६]

नये ऐसें बोलों कठिण उत्तरें। सलगी लेंकुरें केली पुढें ॥ १ ॥ अपराध कीजे घडला तो क्षमा। शिकवा उत्तमा आमुचिया ॥ २ ॥ धरूं धांवे आगी पोळेल तें नेणे। ओढिलिया होणें माते बाळा ॥ ३ ॥ तुका म्हणे भार ज्याचा जार त्यासी। प्रवीण येविशीं असा तुम्ही ॥ ४ ॥ [२७०७]

लडिवाळ म्हणोनी निष्ठुर न बोला। परी सांभाळिला लागे घात ॥ १ ॥ बहु वागवीत आणिलें दुरूनि। दिसांची पोसणी बहु आहे ॥ २ ॥ नाहीं लागों दिला आघाताचा वारा। निष्ठुर उत्तरा कोमेजतों

हरिविषयींच्या प्रेमाचें बोलून वर्णन करतां येत नाहीं व त्याचा आविर्भाव दाखवितां येत नाहीं. जो खरा अनुभव चित्तामध्यें असतो तो ज्याच्या त्याच्या चित्तास माहीत असतो १. कासवीचें पिलूं हें तिच्या कृपादृष्टीनें वाढतें; त्याला तिचा संबंध होऊन स्तनपान होत नाहीं २. सर्पाचीं पिलें जन्मल्याबरोबर लपून राहातात, त्यांना तसें करण्याकरितां पोटांत असतां कोणीं सांगितलें काय ? ३. एखाद्या मुक्या मनुष्यास कांहीं पदार्थ जर सेवन करण्यास दिला, तर त्याची गोड, खारट जी रुचि असेल ती तो जाणतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, असा प्रेमाविषयींचा प्रकार आहे, त्याचा तुम्ही मनांत विचार करून पाहा. जे कोणी शहाणे आहेत त्यांनीं आणिक हरिप्रेम कसें असतें असें विचारूं नये (त्याचा अनुभव घेऊन त्यासंबंधीं विचार करावा) ५. [२७०४]

हे देवा, आतां मी खरोखरच पातकी आहें असें माझ्या अनुभवावरून मला समजलें आहे १. म्हणून दोघांमध्यें कांहीं शिल्लक राहिली नाहीं (संकोच राहिला नाहीं). इतक्यावर तुला काय करावयाचें असेल तें उघड कर २. उभयतां एकमेकांच्या दृष्टीसमोर बोलण्याकरितां उभे आहोंत. ह्याविषयीं आतां तिसऱ्या साक्षीदाराचें काय कारण आहे ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें तुम्हांला सांगतां सांगतां माझा प्राण चालला आहे, हें तुम्हांला आतां समजलें आहे ४. [२७०५]

पूर्वी तूं जें कांहीं पतिताला पावन करण्याचें कृत्य केलेंस, तें मीं तुला पूर्वी कळविलें नाहीं काय ? असें असून तुम्हीं माझें कांहीं हित केलें नाहीं १. हे नारायणा, डोळे झांकून तुम्ही न बोलणारे झालांत; पूर्वीच्या वेळीं भक्तांच्या हिताविषयीं कसे होतां व आतां कसे घुमे झालां ? २. स्पष्ट सांगितल्यावांचून योग्य तें तुला कांहीं कळणार नाहीं, असा तूं क्रियानष्ट आहेस, हें मी काय जाणें ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, माझा होणारा घात जर तुम्हांला कळला होता तर त्याचें आधीं निवारण कां केलें नाहीं ? ४. [२७०६]

देवा, मीं मुलानें आपल्यापुढें सलगी केली आहे. आपण मला असले कठिण शब्द बोलूं नका १. जो कांहीं आमच्याकडून अपराध झाला असेल तो क्षमा करा. हे आमच्या सर्वोत्तमा देवा, आम्हांला शिकवा २. बालक हें अग्नीस हात लावण्यास जातें; त्यापासून आपला हात भाजेल हें तें जाणत नाहीं. अशा वेळीं आई त्याला मागें ओढते ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यानें जो भार घेतला आहे तो त्याच्या मस्तकावर ठेवून अलिप्त राहाण्याविषयीं आपण मोठे चतुर आहांत ४. [२७०७]

आम्ही तुमचे लाडके आहोंत म्हणून तुम्ही आमच्याशीं निर्दयपणानें बोलूं नका, तर दयेनें घातांपासून आमचा सांभाळ तुम्हांला करावा लागेल १. असा तुमचा आमचा संबंध फार दिवसांपासून चालत आल्यामुळें तुम्हीं आमचा फार सांभाळ केला आहे २. देवा, तुम्ही मला आघाताचा वारा सुद्धां लागू दिला नाहीं असा जो मी, तो तुमच्या निष्ठुर

॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही कृपावंत हरि । शांतवा उत्तरीं अमृताच्या ॥ ४ ॥ [२७०८]

आत्मस्थिति मज नको हा विचार । देईं निरंतर चरणसेवा ॥ १ ॥ जन्मोजन्मीं तुझा दास पुरुषोत्तमा । हेचि गोडी आम्हां देईं देवा ॥ २ ॥ काय सायुज्यता मुक्तिसवें (मुक्तीची ही) चाड । देव भक्त कोड तेथें नाहीं ॥ ३ ॥ काय तें निर्गुण पाहों कैशापरी । वर्णू तुझी हरी कीर्ति कैसी ॥ ४ ॥ गोड चरणसेवा देवभक्तपणें । मज देवा झणें दुराविसी ॥ ५ ॥ जाणिवेपासूनि सोडवीं सत्वर । देइं निरंतर चरणसेवा ॥ ६ ॥ तुका म्हणे गोडा गोड न लगे प्रीति । सेवेविण चित्तीं सार नाहीं ॥ ७ ॥ [२७०९]

चालें दंडवत घालीं नारायणा । आपुल्या कल्याणा लागूनियां ॥ १ ॥ बैसविला पदीं पुत्र राज्य करी । पिता वाहे शिरीं आज्ञा त्याची ॥ २ ॥ तुका म्हणे आहे ठायींचाचि मान । आतां अनुमान कासया तो ॥ ३ ॥ [२७१०]

समर्थाचें बाळ पांघरे वाकळ । हंसती सकळ लोक कोणा ॥ १ ॥ समर्थासी लाज आपुल्या नांवाची । शरण आल्याची लागे चिंता ॥ २ ॥ जरी तुज कांहीं होईल उचित । तरि हा पतित तारीं तुका ॥ ३ ॥ [२७११]

न करीं रे मना कांहींच कल्पना । चिंतीं या चरणां विठोबाच्या ॥ १ ॥ येथें सुखाचिया अमुपचि रासी । पुढें कल्पनेसी ठाव नाहीं ॥ २ ॥ सुखाचें ओतिलें साजिरें श्रीमूख । शोक मोह दुःख पाहतां नासे ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें होईल विसांवा । तुटतील हांवा (धांवा) पुढिलिया ॥ ४ ॥ [२७१२]

उत्तरानें कोमेजला जातों ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो हरि, तुम्ही फार कृपावंत आहांत म्हणून माझें अमृतासारख्या मधुर शब्दानें शांतवन करा ४. [२७०८]

वृत्तिशून्य आत्मस्थितीचा विचार मला नको. निरंतर तूं आपल्या चरणांची सेवा दे १. हे पुरुषोत्तमा देवा, जन्मजन्मांतरीं आम्हीं तुमचें दास्यत्व करावें अशा प्रकारची गोडी तूं आम्हांला दे २. सायुज्यता मुक्ति ही आम्हांला काय करावयाची आहे? कारण तेथें देव व भक्त ह्यांचें कौतुक नाहीं ३. हे देवा, तुमचें निर्गुण स्वरूप कसें आहे व तें कसें पाहूं व त्याची कीर्ति कशी वर्णन करूं? ४. तर तुम्ही देव व आम्ही भक्त ह्या नात्यानें राहून तुमची चरणसेवा करावी. देवा, ह्या स्थितींतून आपण मला एखादे वेळीं दूर कराल ५. हे देवा, ज्ञानाच्या घमेंडीपासून आमची सुटका करून, आपल्या चरणांची सेवा आम्हांकडून निरंतर करवावी ६. तुकाराम महाराज म्हणतात, गोड अगोडाची मला प्रीति नको. (किंवा, गोड पदार्थाला स्वतःची गोडी कळत नाहीं, त्याप्रमाणें सायुज्य मुक्तींत आनंदरूपता प्राप्त होते म्हणून आनंदाचा भोग मिळत नाहीं. ह्याकरितां) तुमच्या सेवेवांचून (प्रेमाचें लक्षण असलेल्या भक्तीवांचून) माझें चित्त दुसऱ्या कशांतहि सार मानीत नाहीं ७. [२७०९]

हे नारायणा, तुम्ही चला व आपल्या कल्याणाकरितां भक्तांना दंडवत घाला १. असें कां, तर राज्यपदावर बसलेला मुलगा राज्य करतो व त्याची आज्ञा पिता मान्य करतो २. तुकाराम महाराज म्हणतात, हा भक्ताच्या ठिकाणचा मूळचा मान आहे (तूं भक्तांना सच्चिदानंदपदावर बसविलें आहेस) आतां तो मान त्यांना देण्याचा अनमान (संकोच) कसला आहे? ३. [२७१०]

समर्थ पित्याचें बालक जर गोधडी पांघरील तर त्याबद्दल लोक कोणाला हांसतील? १. जे समर्थ आहेत त्यांनीं आपल्या मोठेपणाविषयींची लज्जा रक्षण केली पाहिजे, म्हणून जो कोणी त्यांना शरण आला आहे त्याची सर्व काळजी त्यांना करावी लागते २. तुकाराम महाराज म्हणतात, जर तुला कांहीं योग्य कर्तव्य करावेंसें वाटलें, तर मी जो पतित पातकी आहें त्या माझा तूं उद्धार कर ३. [२७११]

अरे मना, तूं कांहीं अन्य कल्पना न करितां ह्या विठोबाचें चिंतन कर १. त्या ठिकाणीं अगणित सुखाच्या राशि आहेत, म्हणून त्या ठिकाणीं कल्पनेची गति होत नाहीं २. हरीचें श्रीमुख हें सुखाचेंच ओतलेलें असें सुशोभित दिसत आहे. त्याच्या दर्शनानें शोक, दुःख व मोह हीं सर्व नाहींशीं होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या ठिकाणीं हृदय विश्रांति पावून पुढें उत्पन्न होणारी विषयांविषयींची त्याची हांव नाहींशी होईल (विषयाकडे धांवणें बंद पडेल) ४. [२७१२]

काय करूं मज नागविलें अळसें। बहुत या सोसें पीडा केली ॥ १ ॥ हिरोनियां नेला मुखींचा उच्चार। पडिलें अंतर जवळीच ॥ २ ॥ द्वैताचिया कैसा सांपडलों हातीं। बहुत करिती ओढाओढी ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां आपुलिया सवें (सवा)। न्यावें मज देवा सोडवूनी ॥ ४ ॥ [२७१३]

नाहीं देवाचा विश्वास। करी संतांचा उपहास ॥ १ ॥ त्याचे तोंडीं पडे माती। हीन शूकराची जाती ॥ २ ॥ घोकुनी अक्षरें। वाद छळणा करीत फिरे ॥ ३ ॥ म्हणे देवासी पाषाण। तुका म्हणे भावहीन ॥ ४ ॥ [२७१४]

हेंचि सर्व सुख जपावा विठ्ठल। न दवडावा पळ क्षण वायां ॥१॥ हेंचि एक सर्व साधनांचें मूळ। आतुडे गोपाळ येणें पंथें ॥ २ ॥ न लगती कांहीं तपांचिया रासी। करणें वाराणसी नाना तीर्थें ॥ ३ ॥ कल्पना हे तिळ देहीं अभिमान। नये नारायण जवळी त्याच्या ॥ ४ ॥ तुका म्हणे नामें देव नेदी भेटी। म्हणे त्याचें होंटीं (ओठीं) कुष्ठ होय ॥ ५ ॥ [२७१५]

माझे विषयीं तुज पडतो (पडतां) विसर। नको धरूं दूर पांडुरंगा ॥ १ ॥ तुझा म्हणवितों हेचि लाज तुला (तूज)। आतां झणीं मला (मज) विसरसी ॥ २ ॥ तुका म्हणे तुझी माझी नाहीं उरी। आतां केली खरी देवराया ॥ ३ ॥ [२७१६]

अभक्तांचे गांवीं साधु म्हणजे काय। व्याघ्रवाडां गाय सांपडली ॥ १ ॥ कसाबाचे आळी मांडिलें प्रमाण। बस्वण्णाची आण तया काई ॥ २ ॥ मोतियाची गोणी माळ्या ओळी नेली। पुसती केवढ्या केली पासरी हे ॥ ३ ॥ केळी आणि बोरी वसती शेजारीं। संवाद कोणे परी घडे तेथें ॥ ४ ॥ तुका म्हणे खीर केली कार्‍हेळ्याची। शुद्ध गोडी कैंची वसे तेथें ॥ ५ ॥ [२७१७]

काय करावें, मला आळसानें लुटलें आहे आणि ह्या प्रपंचाचा सोस फार दुःख देत आहे १. माझ्या वाणीच्या ठिकाणीं असणारें हरिनामाचें चिंतन त्यानें हरण करून नेलें आहे; त्या योगानें जवळ असलेल्या हरीमध्यें अंतर पडलें आहे २. जीव व ईश ह्या उभयतांमधील भेद–भ्रमाच्या तडाख्यांत सांपडल्यामुळें माझी फार ओढाताण करीत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, आतां मला तुम्ही ह्या भेदभ्रमांतून सोडवून आपल्या बरोबर घेऊन जावें ४. [२७१३]

ज्याच्या ठिकाणीं देवाविषयींचा विश्वास नाहीं व जो संतांचा उपहास करितो १. त्याच्या तोंडीं अखेरीस मातीच पडेल, अशी त्या डुकराची वाईट जात आहे २. ग्रंथांचें पाठ-पाठांतर करून दुसऱ्याशीं वाद करीत व त्यांना छळीत गांवोगांव फिरतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा भावहीन पुरुष देवाला (देवाच्या मूर्तीला) दगड म्हणतो ४. [२७१४]

सर्व काळ विठोबाचा जप करणें हेंच सर्व सुख आहे, म्हणून त्याच्या चिंतनावांचून एक पळ किंवा क्षण सुद्धां वायां घालवूं नये १. हेंच एक सर्व साधनांचें मूळ आहे व ह्या मार्गानें श्रीकृष्ण गोपाळ स्वाधीन होतो २. दुसऱ्या कांहीं तपाच्या राशि करण्याची जरूर नाहीं व काशीआदिकरून अनेक तीर्थेंहि करण्याची जरूरी नाहीं ३. देहाविषयींचा अभिमान व कल्पना ज्याच्यामध्यें फक्त एकच तिळभर आहे, त्याच्याजवळ नारायण कधींहि येत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरीच्या नामचिंतनानें देव भेट देत नाहीं असें म्हणणारांच्या ओंठाला कोड फुटेल ५. [२७१५]

हे पांडुरंगा, मजविषयींचा तुला विसर पडतो, पण तसें न करतां मला दूर धरूं नको १. हे देवा, मी आपल्याला तुझा दास म्हणवीत आहें, ह्याची लज्जा तुला आहे. आतां मला तूं एकदम विसरशील बरें! २. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवराया, आतां तूं खरोखर आपली व माझी कांहीं योग्यता ठेवली नाहींस, किंवा, तूं जर माझी सतत आठवण ठेवलीस तर तुझ्या माझ्यांत भेद उरला नाहीं, हें आतां खरें केल्यासारखें होईल ३. [२७१६]

जे अभक्त आहेत, त्यांच्या गांवामध्यें साधूंची योग्यता ही काय आहे? तेथें साधु म्हणजे तर वाघाच्या दरींत गाय सांपडल्याप्रमाणें होय १. कसायाच्या आळीमध्यें कोणी बैलाची शपथ घालूं लागला तर त्याला ती काय प्रमाणभूत आहे? (कसायांना त्याचें काय महत्त्व वाटणार?) २. भाजी विकणाऱ्या माळ्यांच्या बाजारांत उत्तम खऱ्या मोत्यांची गोणी नेली तर ते असें म्हणतील, कीं हीं मोत्यें कशीं पासरी दिलीं? ३. केळी आणि बोरी एकाजवळ एक राहातात, पण त्या उभयतांमध्यें कोणत्याहि प्रकारचा सारखेपणा असतो काय? ४. तुकाराम महाराज म्हणतात, जर कडु कारल्याची खीर केली तर तेथें गोडी आहे काय? (त्याप्रमाणें अभक्तांच्या गांवीं साधूचें महत्त्व कोणाला कळणार आहे?) ५. [२७१७]

भागल्यांचा तूं विसावा। करीन नांवा निंबलोण ॥ १ ॥ परमानंदा पुरुषोत्तमा। हरीं या श्रमापासूनि ॥ २ ॥ अनाथांचा अंगीकार। करितां भार न मानिसी ॥ ३ ॥ तुका म्हणे इच्छा पुरे। ऐसे धुरे हे विठ्ठले ॥ ४ ॥ [२७१८]

घालूनियां कास। बळें आलों मागायास ॥ १ ॥ प्रेमें देईं पाठवूनि। पांडुरंगा सेवाऋणी ॥ २ ॥ होईं रे शहाणा। कळों नेदावें या जनां ॥ ३ ॥ तुका म्हणे पायीं। जडलों मग उरलें काई ॥ ४ ॥ [२७१९]

भेटीलागीं पंढरीनाथा। जीवा लागली तळमळ व्यथा ॥ १ ॥ कैं कृपा करिसी नेणें। मज दीनाचें धांवणें ॥ २ ॥ सीणलें माझें मन। वाट पाहतां लोचन ॥ ३ ॥ तुका म्हणे भूक। तुझें पहावया मुख ॥ ४ ॥ [२७२०]

सांडियेली काया। वरी ओंवाळुनी पायां ॥ १ ॥ शरण शरण नारायणा। मज अंगीकारा दीना ॥ २ ॥ आलों लोटांगणीं। रुळें तुमचे चरणीं ॥ ३ ॥ तुका म्हणे शीर। ठेवियलें पायांवर ॥ ४ ॥ [२७२१]

तुझे दारींचा कुतरा। नको मोकलूं दातारा ॥ १ ॥ धरणें घेतलें दारांत। नको धरून उठवूं हात ॥ २ ॥ घातली मुरकुंड। झालों शिरोमणी लंड ॥ ३ ॥ तुका म्हणे जगजीवना। ब्रीद पाहें नारायणा ॥ ४ ॥ [२७२२]

पाहातां हें बरवें झालें। कळों आलें यावरी ॥ १ ॥ मागिलांचा झाला झाडा। त्या निवाडास्तव हे ॥ २ ॥ विसांवलें अंग दिसे। सरिसे सरिसें अनुभवें ॥ ३ ॥ तुका म्हणे बरें झालें। देवें नेलें गवसूनि ॥ ४ ॥ [२७२३]

हे देवा, जे कोणी श्रमले आहेत त्यांचें विश्रांतीचें स्थान तूं आहेस, म्हणून तुझ्यावरून मी लिंबलोण उतरीन १. हे परमानंदा पुरुषोत्तमा, अनेक प्रकारच्या श्रमांपासून तूं मला मुक्त कर २. जे कोणी अनाथ आहेत त्यांचा अंगीकार करण्याविषयीं तूं कांहीं भार मानीत नाहींस ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठाबाई आई, आम्हीं जी कांहीं इच्छा करावी ती पूर्ण करण्यासारखी तूं श्रेष्ठ आहेस ४. [२७१८]

मी बळकटपणें कांस घालून तुला दिलेलें कर्ज मागण्याकरितां आलों आहें १. हे पांडुरंगा, आम्हीं जी सेवा केली आहे त्याचें कर्ज तुझ्यावर आहे, त्याच्या मोबदला तूं आम्हांला प्रेम दे २. ह्याचा तूं लोकांत बोभाटा करूं नको; अशा प्रकारचा तूं शहाणा हो ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी तुझ्या पायांचे ठिकाणीं जडून राहिलों आहें, मग ह्यावांचून माझें कर्तव्य काय उरलें? ४. [२७१९]

हे पंढरीनाथा, तुझी भेट व्हावी ह्याकरितां, माझ्या जीवाच्या ठिकाणीं दुःख वाटून तळमळ लागली आहे १. मी गरीब तुझा धांवा करीत आहें तो ऐकून तूं केव्हां कृपा करशील, हें मला समजत नाहीं २. तुझी वाट पाहातांना माझ्या डोळ्यांस श्रम झाले व मनासहि श्रम झाले ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझें श्रीमुख पाहावें ह्याबद्दलची भूक मला लागली आहे ४. [२७२०]

तुझ्या पायांवरून मीं आपला देह ओंवाळून टाकला १. हे नारायणा, मी गरीब तुला शरण आलों आहें (असें द्विवार विनवितों), म्हणून माझा तुम्ही अंगीकार करा २. मी लोटांगण घालून तुमच्या चरणांजवळ लोळत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मीं आपलें मस्तक तुमच्या पायांवर ठेविलें आहे ४. [२७२१]

हे दात्या देवा, मी कुत्रा होऊन तुझ्या दारांत पडलों आहें, म्हणून तूं मला बाहेर दवडूं नको १. तुझ्या दारांत मीं धरणें घेतलें आहे, ह्याकरितां तूं हात धरून मला उठवूं नको २. सर्व लंडांमध्यें (निर्लज्जांमध्यें) मी शिरोमणि होऊन ह्या ठिकाणीं लोळत पडलों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, तूं सर्व जगाचें जीवन आहेस. आपलें ब्रीद कसें आहे ह्याचा तूं विचार करून पाहा ४. [२७२२]

विचारानें पाहिलें असतां हें माझें फार बरें झालें असें समजलें १. मागील संचित कर्मांचा सर्व झाडा झाला त्या निवाड्यानें हें अनुभवास आलें २. देवाच्या समागमानें माझ्या अंगास विश्रांति मिळाली असें अनुभवावरून दिसतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवांनीं मला शोधून काढून आपल्याबरोबर नेलें हें फार बरें झालें ४. [२७२३]

चक्रफेरी गळीं गळा । होता गोवियेला माळा ॥ १ ॥ फुटोनिया गेला कुंभ । झालों निष्काम स्वयंभ ॥ २ ॥ धरिताचि नाहीं थारा । वेंठी भ्रमण खोंकरा ॥ ३ ॥ तुका म्हणे कोडें । आगी काय जाणें मढें ॥ ४ ॥ [२७२४]

श्रमपरिहारा । मूळ जालों दातारा ॥ १ ॥ देह निवेदुनि पायीं । जालों रिकामा (निष्काम) उतराई ॥ २ ॥ आपली ते सत्ता । येथें असों नेदीं आतां ॥ ३ ॥ राहिला निराळा । तुका खटपटी वेगळा ॥ ४ ॥ [२७२५]

पाठवाल तेथें गर्जेन पवाडे । कांहीं देहाकडे नावलोकीं ॥ १ ॥ म्हणउनि मागें कंठींचा सौरस । पावतील नाश विघ्नें पुढें ॥ २ ॥ कृपेच्या कटाक्षें न भें कळिकाळा । येतां येत बळा शक्तिपुढें ॥ ३ ॥ तुका म्हणे गुढी आणीन पायांपें । होईल तें सोपें (जगा होईल सोपें) नाम तुझें ॥ ४ ॥ [२७२६]

उपजल्या काळें शुभ कां शकुन । आतां आवरोन राहिलेती ॥ २ ॥ नाहीं मागितली वचनाची जोडी । निष्काम रोकडी वरीवरि ॥ २ ॥ सत्याविण काय उगीच लांबणी । कारियाची वाणी येर भूस ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसी कोणा चाळवणी । न विचारा मनीं पांडुरंगा ॥ ४ ॥ [२७२७]

नव्हें मी आहाच आशेचें बांधलें । जें हें टोंकविलें नारायणा ॥ १ ॥ अंतर तें तुम्हां बरें कळों येतें । वेव्हार उचितें चाळवीजे ॥ २ ॥ मनें कल्पिलें तें आवरितां पाप । संकल्प विकल्प याचि नांवें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां न सोसे जळजळ । शिजल्यावरी जाळ कड खोटा ॥ ४ ॥ [२७२८]

काळचक्राच्या फेऱ्याच्या गळयांत रहाटगाडग्याप्रमाणें माझा गळा गुंतला होता १. त्या माळेंतील एक गाडगें फुटलें म्हणजे तें मोकळें होतें, तसा मी मुक्त होऊन आत्मस्थितीनें स्वयंभु निष्काम झालों आहें २. त्या फुटक्या गाडग्याला भ्रमण करण्याच्या बिगारीस कोणी धरीत नाहीं, तसें काळचक्रांतील माझा ठिकाणा मोडला ३. तुकाराम महाराज म्हणतात, प्रेताला अग्नीचें कौतुक कांहीं समजतें काय ? (तसें काळचक्राचें दुःख मला नाहीं) ४. [२७२४]

हे दात्या देवा, सर्व श्रमाचा नाश करण्यास कारण मी झालों १. मी आपला देह तुझ्या पायांचे ठिकाणीं अर्पण करून उत्तीर्ण झालों आणि सर्व कामांतून सुटलों २. आतां मी ह्या ठिकाणीं आपल्या सत्तेनें वर्तणूक करीत नाहीं. सर्व सत्ता तुझीच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अनेक प्रकारच्या खटपटींतून मी वेगळा होऊन राहिलों आहें ४. [२७२५]

हे देवा, तुम्ही ज्या ठिकाणीं मला पाठवाल, त्या ठिकाणीं मी तुमच्या कीर्तीची गर्जना करीन. ह्याशिवाय मी आपल्या देहाकडे कांहीं पाहाणार नाहीं १. ह्याकरितां तुमच्या हृदयांतील गौप्य प्रसाद (नामाचा प्रसाद) मी मागत आहें. त्या योगानें पुढील विघ्नांचा नाश होईल २. काळिकाळ आपल्या सामर्थ्यानें जरी मजपुढें आला, तरी तुम्ही कृपादृष्टीनें मजकडे पाहिलें म्हणजे मी त्याला भिणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा विजयाची गुढी तुमच्या पायांजवळ आणीन आणि कळिकाळाचा अडथळा नष्ट झाला म्हणजे तुमचें नाम उच्चार करण्यास फार सोपें होईल ४. [२७२६]

ज्या वेळीं तुमच्याविषयींचा भाव मला उत्पन्न झाला त्या वेळीं शुभ शकुन झाला आणि आतां तुम्ही लपून बसतां, हें काय ? १. माझ्या मुखावाटे शब्दांची जोड व्हावी (शब्दाला शब्द जोडून काव्य करावें) असें कांहीं मीं मागणें मागितलें नाहीं व वरवर (दिखाऊ वैराग्यहि) निष्कामताहि मागितली नाहीं २. खऱ्याच्या प्राप्तीशिवाय व्यर्थ लांबण लावून काय उपयोग आहे ? वाणी जर सफल झाली नाहीं तर इतर भुसकटाप्रमाणें ती व्यर्थ होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, अशी फसवाफसवी कोणाला करावी ह्याचा तुम्ही मनांत विचार करीत नाहीं (अविचारानें आम्हां भाविकांचीहि फसवणूक करतां हें योग्य नाहीं) ४. [२७२७]

आशाबद्ध असणारा, असा पोकळ भक्त मी नव्हे. पण हे नारायणा, तुम्ही मला टोकत (वाट पाहात) बसविलें आहे १. माझ्या अंतःकरणांत काय आहे तें तुम्हांस समजतें; असें असून योग्य व्यवहारांत तुम्ही मला (खऱ्या भक्ताला) फसवितां २. मनानें कांहीं कल्पना केली असतां तें जर आंवरलें, तरी त्याचेंहि पाप लागतें, कारण त्यालाच संकल्पाच्या ठिकाणीं विकल्प होणें म्हणावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, असली मनांत जळजळ ठेवणें हें आम्हांला सोसत नाहीं, कारण अन्न परिपक्व झाल्यावर जाळ लावून कढ देणें हें खोटें आहे. (आमच्या मनांत भक्तीविषयीं विकल्प–संशय–आल्यानंतर मग तुम्ही आमच्यावर कितीहि प्रेम केलें तरी तें शिळ्या कढीला ऊत आणण्यासारखें व्यर्थ आहे) ४. [२७२८]

ताकें कृपण तो जेवूं काय घाली । आहाच ते चाली वरि कळे ॥ १ ॥ काय तुम्हां वेंचे घातलें सांकडें । माझें आलें कोडें आजिवरी ॥ २ ॥ सेवेविण आम्ही न लिंपों हे काया । झाला देवराया निर्धार हा ॥ ३ ॥ तुका म्हणे तुझीं राखावया ब्रीदें । येणें अनुवादें गर्जतसें ॥ ४ ॥ [२७२९]

वृत्तीवरि आम्हां येणें कशासाठीं । एवढी हे आटी सोसावया ॥ १ ॥ जाणतसां परी नेणते जी देवा । भ्रमचि बरवा राखावा तो ॥ २ ॥ मोडूनि क्षरलों अभेदाची मूस । तुम्हां कां आळस वोडवला ॥ ३ ॥ तुका म्हणे होईं लवकरि उदार । लांबणीचें फार काम नाहीं ॥ ४ ॥ [२७३०]

सुलभ कीर्तनें दिलें ठसावूनि । करितां धरणी उरी कोण ॥१॥ आतां न टळावें केलिया नेमासी । उदाराचा होसी हीन काय ॥ २ ॥ एका नेमें कोठें दुसरा पालट । पादर तो धीट म्हणती त्यासी ॥३॥ तुका म्हणे किती बोलशील उणें । एकाच वचनें खंड करीं ॥ ४ ॥ [२७३१]

जेथें माझी दृष्टि राहिली बैसोन । तेथेंचि हें मन गुंडाळतें ॥ १ ॥ टाळावी ते पीडा आपुल्यापासून । दिठावलें अन्न ओकवितें ॥ २ ॥ तुम्हांसी कां कोडें कोणेही विशींचें । नवलाव याचें वाटतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे वेगीं उभारा जी कर । कीर्त मुखें थोर गर्जईन ॥ ४ ॥ [२७३२]

इच्छेपाशीं आलों फिरोनि मागुता । स्वामीसेवकता आवडीचे ॥१॥ द्यावें लवकरी मागितलें दान । मुळींचें जतन करूनि असें ॥ २ ॥ उपाय हे करीं एकाचि वचना । दावूनियां खुणा ठाया येतों ॥ ३ ॥ तुका म्हणे गांठी किती तुज पाशीं । जगाच्या तोडिसी चिंतनानें ॥ ४ ॥ [२७३३]

जो ताक देण्यास कृपण तो जेवूं काय घालील? असें त्याच्या बाह्य वागणुकीवरून समजतें १. हे देवा, मी तुम्हांला आजपर्यंत कांहीं मागण्याचें संकट घातलें काय? असें असून, तुम्हांला माझें फार संकट पडलें आहे २. तुझ्या सेवेवांचून, अन्य कामांत मी पडत नाहीं. हे देवराया, हाच माझा निश्चय झाला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझीं पतितपावनादि ब्रीदें रक्षण करण्याकरितां, ह्या वचनानें मी गर्जना करीत आहें ४. [२७२९]

आम्ही (वृत्तिशून्य ब्राह्मी अवस्थेंत राहाणारे असूनहि) वृत्तीवर कशाकरितां आलों आहोंत? (व्यवहाराच्या क्षेत्रांत कां आलों?) एवढी मेहनत आम्हांला धर्मभक्तीच्या रक्षणाकरितां सोसण्याचें काय कारण होतें? १. अहो जी देवा, तुम्ही सर्व जाणत आहांत, परंतु नेणते आहांत असें मला वाटतें. तोच भ्रम तुमचा राखावा हें बरें २. पूर्वीं अभेद स्थितींत मी होतों त्यांतून बाहेर आलों, असें असून तुम्हांला धर्मभक्तीच्या रक्षणाचा कां आळस उत्पन्न झाला? ३. तुकाराम महाराज म्हणतात, तूं लवकर उदार हो. फार उशीर लावण्याचें कारण नाहीं ४. [२७३०]

कीर्तन हें सोपें आहे असें सर्वांस प्रसिद्ध करून दिलें. तें ह्या पृथ्वीवर करीत असतां माझें कोणतें कर्तव्य राहिलें आहे? १. हे देवा, जो कांहीं तूं पूर्वींचा नेम (नामधारकाला दर्शन देण्याचा व त्याचा उद्धार करण्याचा) केला आहेस त्यास आतां टाळाटाळी करूं नये. नाहींपेक्षां जो तूं उदार आहेस तो अशी टाळाटाळ करून हीन होशील काय? २. एक नेम केल्यावर तो कोठें बदलतो काय? असें जर होईल तर त्यास पादराधीट (भ्याडांतील शूर) असें म्हणतात (तसा तूं आहेस काय?) ३. तुकाराम महाराज म्हणतात, तूं माझ्याकडून किती तरी उणें बोलून घेतोस; त्यापेक्षां माझ्या एकाच शब्दानें आपला नियम पाळण्याचा निश्चय कर ४. [२७३१]

ज्या ठिकाणीं माझी दृष्टि जडून राहिली आहे, त्याच ठिकाणीं मन घोंटाळत आहे १. माझी दृष्टि ज्याच्यावर गेली आहे तें देऊन आपली पीडा नाहींशी करा. नाहींपेक्षां जें अन्न दृष्टावलें आहे, तें सेवन केल्यास ओकावें लागेल २ तुम्हांला कोणत्या विषयींचें काय संकट पडलें, ह्याचें मला आश्चर्य वाटतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो जी देवा, तुम्ही बाहु उभारून इच्छादान दिल्यावर, तुमच्या मोठेपणाच्या कीर्तिगर्जना मी आपल्या मुखानें करीन ४. [२७३२]

स्वामिसेवकपणाच्या आवडीच्या इच्छेजवळ मी प्रपंचांतून माघारा फिरून आलों १. पूर्वीं जें कांहीं दान मीं मागितलें आहे, तें तुम्ही लवकर द्या, कारण मूळचा जो ठराव (अद्वैत ब्रह्मस्वरूप) आहे तो मी सांभाळून राहिलों आहें २. मी भक्तांना ते मागतील तें देतों ह्या तुमच्या एका वचनाकरितां मी हे उपाय करितों व पूर्वींच्या खुणा तुम्हांस दाखवून आपल्या ठिकाणीं येतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, नामचिंतनाच्या योगानें सर्व जगाच्या मनांतील संशयरूपी गांठी तुम्ही तोडतां आणि त्या आपल्या मनांत किती तरी वागवीत आहांत (तुम्ही उदार होऊन मागितलें तें देत नाहीं) ४. [२७३३]

कोठें आम्ही आतां वेंचावी हे वाणी । कोण मना आणी जाणोनियां ॥ १ ॥ न करावी सांडी आतां टाळाटाळी । दैन्य ये काळीं (हे कळी) होईल माजी ॥ २ ॥ घरोघरीं झाल्या ज्ञानाचिया गोष्टी । सत्यासवें गांठी न पडावी ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां भाकितां करुणा । भलताचि शहाणा शोध काढी ॥ ४ ॥ [२७३४]

डगमगी मन निराशेच्या गुणें । हें तों नारायणें शांतवीजे ॥ १ ॥ धीर तूं गंभीर जीवन जगाचें । जळो विभागाचें आहाच ते ॥ २ ॥ भेईल जीव हें देखोनि कठिण । केला जातो सीण तो तो वायां ॥ ३ ॥ तुका म्हणे आवश्यक हें वचन । पाळावेंचि दान समयो आहे ॥ ४ ॥ [२७३५]

आम्ही पहा कैसीं एकतत्त्वी झालों । राखणें लागलों वासनेसी ॥ १ ॥ तुम्हांविण कांहीं नावडावें (नावडे या) जीवा । केला तोचि देवा दृढ पण ॥ २ ॥ वर्म नेणों परि वृत्ति भंगों नेदूं । वंदिलेंचि वंदूं आवडीनें ॥ ३ ॥ तुका म्हणे केलें नामाचें जीवन । वारताही (वार्ताही) भिन्न नेणों आतां ॥ ४ ॥ [२७३६]

आपण तों असा । समर्थ जी हृषीकेशा ॥ १ ॥ करा करा बुझावणी । काय विलंब वचनीं ॥ २ ॥ हें घे ऐसें म्हणा । उठूनि लागेन चरणा ॥ ३ ॥ घेउनियां सुखें । नाचेल तुका कवतुकें ॥ ४ ॥ [२७३७]

द्याल ऐसें दिसे । तुमचें साचपण इच्छे ॥ १ ॥ म्हणउनि न भंगे निर्धार । केले लोचन सादर ॥ २ ॥ मुखाचीच वास । पुरला पाहे अवकाश ॥ ३ ॥ तुका म्हणे कळे । काय लाभ कोणे वेळे ॥ ४ ॥ [२७३८]

तुम्ही तों सदैव । अधीरपणें माझी हांव ॥ १ ॥ जळो आशेचें तें जिणें । टोंकतसावें दीनपणें ॥ २ ॥

आतां आम्हीं वाणीचा कोणत्या ठिकाणीं व्यय करावा ? आमच्या अंतःकरणांतील ही गोष्ट जाणून आमचें कोण मनावर घेणार आहे ? १. देवा, आतां माझी टाळाटाळी करून हेळसांड करूं नका, कारण त्या योगानें आमची फार फजिती होईल २. कोरड्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी घरोघर सांगतात, पण त्या योगानें खऱ्या वस्तूची प्राप्ति होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमची करुणा भाकीत असतां एखादा शहाणा भलताच शोध काढून नांवें ठेवतो ४. [२७३४]

आमची जर आशा तुम्हीं पुरविली नाहीं तर त्या योगानें आमचें मन डगमगतें; म्हणून नारायणांनीं त्याचें शांतवन करावें १. तूं सर्व जगाचें जीवन असून तुझ्या अंगीं गंभीरपणाचें धैर्य आहे. असें असून आमच्या वांटणीस खोटेपणा आला, त्याला आग लागो २. असा तुमचा निर्दयपणा पाहून आमचा एखादा जीव भिईल आणि जो जो श्रम करावा तो तो सर्व व्यर्थ जाईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां तुमचें पूर्वीचें जें वचन आहे तें संभाळलें पाहिजे, कारण दान देण्याचा हाच योग्य समय आहे ४. [२७३५]

हे देवा, आम्ही पाहा कसे एकनिश्चयी झालों आणि वासनेचें रक्षण करूं लागलों १. हे देवा, तुझ्यावांचून ह्या जीवाला कांहीं आवडूं नये, अशा विषयींचा मीं दृढतर निश्चय केला आहे २. आम्ही तुझें मर्म जाणत नाहीं, पण आपल्या वृत्तीचा भंग होऊं देणार नाहीं आणि जें कांहीं प्रीतीनें मानलें आहे तेंच शिरसावंद्य करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्या नामानें आमची जगणूक होत असल्यामुळें आतां दुसरी वार्ता मी जाणत नाहीं ४. [२७३६]

हे हृषीकेशा, आपण तर श्रेष्ठ आहांत १. म्हणून माझी समजूत करा (असें द्विवार विनवितों). ह्या विषयींच्या बोलण्याला उशीर कां लावला? २. हें देतों तूं घे, असें म्हणा, म्हणजे आनंदानें उठून मी तुमच्या पायां पडेन ३. तुकाराम महाराज म्हणतात, इच्छित दान दिल्यावर तें कौतुकानें घेऊन त्या सुखानें मी तुमच्यापुढें नृत्य करीन ४. [२७३७]

माझ्या इच्छेप्रमाणें तुम्ही द्याल असा तुमचा खरेपणा आहे १. म्हणून माझा निश्चय भंगत नाहीं आणि तुमच्याकडे सावधपणानें डोळे लावून राहिलों आहें २. तुमच्या श्रीमुखाकडे लक्ष लावून पाहात आहें व अवकाश किती लागेल ह्या विचार मनानें करीत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, कोणत्या वेळेला तुमच्याकडून काय लाभ मिळेल हें कांहीं समजतें काय ? ४. [२७३८]

महाराज, तुम्ही तर समर्थ आहांत, पण मला धीर नसल्यामुळें माझी हांव वाढत आहे १. आशाबद्धाचे जगण्यास आग लागो, कारण त्याला इच्छित वस्तू मिळण्यासाठीं दीनत्वानें वाट पाहात राहावें लागतें २.

येथूनि सोडवा। आतां अनुभवें देवा ॥ ३ ॥ तुका म्हणे झालें। एक मग हें निमालें ॥ ४ ॥ [२७३९]

कैसें भलें देवा अनुभवा कां नये। उशीर तो काय तुम्हांपाशीं ॥ २ ॥ आहे तें मागतों दिसतें जवळी। केल्यामध्यें कळि कोण साध्य ॥ २ ॥ नाहीं सांडीत मी सेवेची मर्यादा। लाविला तो धंदा नित्य करीं ॥ ३ ॥ तुका म्हणे हात आंवरिला गुंती। माझे तंव चित्तीं नाहीं दुजें ॥ ४ ॥ [२७४०]

हुंदकी पिसवी हलवीतो दाढी। माळेमणी ओढी निंदेचे तो ॥ १ ॥ त्याचें फळ पाकीं यमाचे ते दंड। घर केलें कुंड कुंभपाकीं ॥ २ ॥ क्रोध पोटीं मांग आणिला अंतरा। भुंकोन कुतरा जप करी ॥ ३ ॥ तुका म्हणे स्नान केलें मळमूत्रें। जेविलीं पितरें अमंगळ ॥ ४ ॥ [२७४१]

अंगीं भरला ताठा। नये वळणी जैसा खुंटा ॥ १ ॥ कैसें न कळे त्या डेंगा। हित आदळलें अंगा ॥ २ ॥ जीव जाते वेळे। भलत्याकडे त्राहटी डोळे (भलत्याकडे ताठी डोळे) ॥ ३ ॥ मुसळाचें धनु। तुका म्हणे नव्हे अनु ॥ ४ ॥ [२७४२]

करूनि कडविड। जमा घडिली लगड ॥ १ ॥ होतें तेंचि जालें। नाम ठायींचें पडलें ॥ २ ॥ उतरलें डाईं। उत्तम ते सुलाखताई ॥ २ ॥ हिंडवितां देशोदेश। तुका म्हणे नाहीं नाश ॥ ४ ॥ [२७४३]

पढीयंतें (पढिये तें) मागा पांडुरंगापाशीं। मज दुर्बळासी काय पीडा ॥ १ ॥ याचसाठीं दुराविला संसार। वाढे हे अपार माया तृष्णा ॥ २ ॥ कांहीं करितां कोठें नव्हे समाधान। विचारितां पुण्य

हे देवा, तुम्ही देखील आशाबद्ध होऊन बळिराजाकडे गेलां होतां, तेव्हां आशाबद्ध मनुष्य किती दीन होत असतो ह्या स्वानुभवावरून तरी आतां मला ह्या आशेपासून सोडवा ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमचें-आमचें मन एक झालें म्हणजे हें सर्व नाहींसें होईल (किंवा, एक आशेचें बंधन नष्ट झालें म्हणजे मग कामच संपलें) ४. [२७३९]

हे देवा, जर माझ्या कांहीं अनुभवाला येत नाहीं, तर तुम्हांला भलें कसें म्हणावें ? तुमच्याजवळ उशीर कां लागावा ? १. जें तुमच्याजवळ आहे तें मला प्रत्यक्ष दिसत आहे. तेंच मी मागतों. असें असून भांडण उत्पन्न करण्यामध्यें तुम्हांला काय मिळतें ? २. मी तुमच्या सेवेची मर्यादा उल्लंघन करीत नाहीं; मला जो तुम्हीं धर्मरक्षणाचा उद्योग लावला आहे तोच मी सर्वकाळ करतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हीं दान देण्याच्या पेंचांतून आपला हात आंवरला आहे, पण माझ्या चित्तांत तुमच्या सेवेवांचून दुसरा कांहीं विचार नाहीं ४. [२७४०]

जो कोणी हातांत माळ घेऊन, गोमुखींत (जप करण्याच्या पिशवींत) हात घालून, जपाच्या निमित्तानें नुसतीच दाढी हालवितो, आणि अंतःकरणांत दुसऱ्याची निंदा करून, ते मणी ओढतांना गोमुखीस हिसका मारतो १. त्याचें फळ परिणामीं त्यास यमाची शिक्षा सोसावी लागेल; हें त्यानें आपणास राहाण्याकरितां, कुंभीपाक नरकाच्या कुंडांत, घर केलें आहे २. क्रोधरूपी मांगास अंतरांत जागा देऊन, कुत्र्यासारखें भुंकून, (म्ह० रागानें भाषण करून) जप करितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा ढोंग्यानें आणि त्याचबरोबर त्याच्या पूर्वजांनीं मलमूत्रांत स्नान करून नरकाचें भोजन केलें, असें समजावें ४. [२७४१]

अंगांत सत्ता, धन, विद्या, तारुण्य ह्यांच्या गर्वाचा ताठा भरल्यामुळें जो खुंट्याप्रमाणें कधींहि वांकला जात नाहीं १. असल्या गाढवाला, मरण जवळ येऊन ठेपलें असतांहि, आपलें हित कसें कळत नाहीं ! २. जीव जातेसमयीं उगीच भलत्याकडेच डोळ्यांस तराटी देऊन (डोळे वटारून) पाहातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर मुसळाचें धनुष्य करावयास लागलें, तर तें अणुमात्र देखील वांकलें जाणार नाहीं. त्याप्रमाणें तो देवापुढें व संतांपुढें नम्र होत नाहीं ४. [२७४२]

सोन्याचा चाराचुरा (किडूक-मिडूक) जमा करून त्याची लगड घडून तयार केली १. मग त्याचीं जीं अनेक अलंकारांचीं नांवें होतीं तीं नाहींशीं होऊन, मूळचें सोनें हें नांव कायम राहिलें २. अग्नींत तावून त्याला सुलाख देऊन कसाला उतरल्यामुळें तें उत्तम निवडलें जातें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मग तें सोनें देशोदेशीं जरी नेलें तरी त्याचा नाश होत नाहीं (म्ह. कमी किंमतींत विकत नाहीं) ४. [२७४३]

अहो जन हो, मला गरीबाला तुम्ही कां त्रास देतां ? तुम्हांला जें कांहीं आवडत असेल, तें पांडुरंगाजवळ मागून घ्या १. तुमची गरज धरल्यानें मायातृष्णा अगणित वाढेल; ह्याकरितां मीं सर्व संसाराचा त्याग केला आहे २. कोणत्याहि

तेंचि पाप ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां निश्चळचि भलें । तुज आठविलें पांडुरंगा ॥ ४ ॥ [२७४४]

नव्हे मी शाहाणा । तरी म्हणा नारायणा ॥ १ ॥ तुम्हां बोलावया कांहीं । येच भरलोंसे वाहीं ॥ २ ॥ आणावेति रूपा । कोपलेती तरी कोपा ॥ ३ ॥ कळोनि आवडी । तुका म्हणे जाते घडी ॥ ४ ॥ [२७४५]

आम्ही भाविक हे काय जाणों खोडी । आइकोनि प्रौढी विनविलें ॥ १ ॥ नाहीं ऐसें येथें जालेती असतां । वाढविली चिंता अधिक सोस ॥ २ ॥ न कळेचि आधीं करितां विचार । न धरितां धीर आहाचता ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां वचनें वचन । वाढलें तीक्षण (तीक्ष्ण) बुद्धि झाली ॥ ४ ॥ [२७४६]

कोठें देवा बोलों । तुम्हां भीड घालूं गेलों ॥ १ ॥ करावया सत्वहानी । भांडवलाची टांचणी ॥ २ ॥ दुर्बळा मागतां । त्याच्या प्रवर्तलां घाता ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं । मज कळलें ऐसें कांहीं ॥ ४ ॥ [२७४७]

पाहिजे तें आतां प्रमाण प्रत्यक्ष । आलियानें साक्ष खरें खोटें ॥ १ ॥ काय त्या दिवस उचिताचा आला । मागील जो केला श्रम होता ॥ २ ॥ ठेविलिया खूण करूनि संकेत । तयापाशीं चित्त लागलेंसे ॥ ३ ॥ जाणसी गे माते लेंकराचा लाड । नये पडों आड निष्ठुरता ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्हीं करावें वचन । तुम्हांसी जतन करणें तें ॥ ५ ॥ [२७४८]

पडिला प्रसंग कां मी ऐसा नेणें । संकल्प ते मनें जिरवले ॥ १ ॥ चेष्टविलें तरी सांगावें कारण । भक्ती ते जीवन करावया ॥ २ ॥ लावूनियां दृष्टि घातली सामोरी । बैसलें जिव्हारीं डसोन तें ॥ ३ ॥

ठिकाणीं कांहीं केलें असतां, मनाचें समाधान होत नाहीं, कारण ज्या कांहीं पुण्याचा विचार करावा, तेंच पाप ठरतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां निवांतपणें जर पांडुरंगास आठविलेंस, तर तुझें कल्याण होईल ४. [२७४४]

हे नारायणा, मी कांहीं शहाणा नाहीं. तुम्ही जर म्हणत असाल तर म्हणा १. तुम्हांबरोबर कांहीं तरी बोलावें, अशा भरीस मी पडलों आहें २. हरएक प्रकारें बोलून, तुम्हांस निराकारांतून आकारास आणावयाचें आहे; मग तुम्ही आमच्यावर रागावाल तर रागावा ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमची आवड तुम्हांला समजूनहि घटकेनें घटका लांबत चालली आहे (माझी इच्छा पूर्ण होत नाहीं, हें उपयोगी नाहीं) ४. [२७४५]

असली तुमची खोड आम्हां भाविकांना काय माहीत? तुमची थोर कीर्ति ऐकून आम्ही विनंति करीत आहोंत १. ह्या ठिकाणीं तुम्ही असून नाहींसे झालां आहांत आणि आमच्या मनामध्यें अधिक हांव वाढल्यामुळें चिंता लागली आहे २. अगोदर विचार करून तुम्हांला हें कळलें नाहीं काय? आम्हीं धीर न धरल्यामुळें वाईटपणा मात्र आम्हांकडे येतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां बोलण्यानें बोलणें जास्त वाढल्यामुळें, तुमच्याविषयीं आमची बुद्धि तीव्र (विलक्षण व कठोर) झाली आहे ४. [२७४६]

हे देवा, तुमच्याशीं बोलून, तुम्हांला भीड घालावयास कोणीकडे गेलों, असें झालें १. तुमच्याजवळ भांडवलाचा तोटा आला, म्हणून तुमच्या सत्त्वाची हानि करण्याचें मला काय कारण आहे? २. एखादा गरीब मनुष्य कांहीं मागत असतां त्याचा घात करण्यास तुम्ही तयार झालां (हें योग्य नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां तुमच्याजवळ कांहीं नाहीं हें मला समजून आलें ४. [२७४७]

हे देवा, आतां प्रत्यक्ष प्रमाण पाहिजे; अनुभवानें खरें खोटें समजतें १. जो सेवेचा यत्न मीं पूर्वीं केला होता, त्या योगानें योग्य फलप्राप्तीचा दिवस आला काय? २. जो स्वामिसेवकपणाचा, मी भक्त म्हणून तुमची सेवा करावयाची व तुम्हीं आपलें सगुणरूप मला प्रत्यक्ष दाखवायचें, असा संकेत (निश्चय) करून ठेवला आहे, त्या ठिकाणीं माझें चित्त लागलें आहे ३. हे विठाबाई आई, बालकाचे लाड करणें हा तुझा स्वभाव आहे. त्यामध्यें निर्दयपणा येऊं देऊं नये ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं बोलावें त्याप्रमाणें खरें करून दाखवावें व आम्हीं मागावें तें देऊन तुम्ही आमचें रक्षण करावें हें तुमचें कर्तव्य आहे ५. [२७४८]

जो निराश होण्याचा आलेला प्रसंग तो मी काय जाणत नाहीं? म्हणूनच माझ्या मनानें सर्व संकल्प नाहींसे केले आहेत १. आतां तुम्हीं तें मन चेष्टविलें आहे, तर भक्ति हें जीवन करण्याचें सांगावें २. श्रीहरीच्या समोर दृष्टीनें टक

तुका म्हणे जीवा लाविला तो चाळा । करावें गोपाळा शीघ्र दान ॥ ४ ॥ [२७४९]

मागील विसर होईल सकळ । केली तळमळ दुःखाची ते ॥ १ ॥ दोहींचें ऐक्य घाली गडसंदीं । स्थिरावेल बुद्धि पायांपाशीं ॥ २ ॥ आहाच या केलों देहपरिचारें । तुमचें तें खरें वाटों नये ॥ ३ ॥ तुका म्हणे व्हावें लवकरी उदार । मी आहें सादर प्रतिग्रहा ॥ ४ ॥ [२७५०]

वाढवावा पुढें आणीक प्रकार । एकाचि तें फार रुचि नेदि ॥ १ ॥ निंच नवें लेणें देह हा पवाडा । पालट रोकडा वरावरी ॥ २ ॥ दिसे शोभिवंत सेवेनें सेवक । स्वामीची ते लोकत्रयीं कीर्ति ॥ ३ ॥ तुका म्हणे आजी पाववा संतोष । करुनि कीर्तिघोष नाचईन ॥ ४ ॥ [२७५१]

क्षोभ आणि कृपा मातेची समान । विभाग जतन करूनि ठेवी ॥ १ ॥ क्षणभंगुर ते उपजली चिंता । खरी अखंडता आवडीची ॥ २ ॥ सिकवूं जाणे तें गोमटिया साठीं । लोभें नाहीं तुटी निश्चयेंसी ॥ ३ ॥ अवघेंचि मिथ्या समया आरतें । देतां तो उचितें काळ जाणे ॥ ४ ॥ न करी अव्हेर नेदी गांजूं कोणा । भेडसावी तान्हें बाऊ (हाऊ) आला ॥ ५ ॥ तुका म्हणे करी जिवाची जतन । दचकूनि मन जवळी आणी ॥ ६ ॥ [२७५२]

संसाराचे धांवे वेठी । आवडी पोटीं केवढी ॥ १ ॥ हागों जातां दगड सांची । अंतरींही (हे) संकल्प ॥ २ ॥ लाज तेवढी नारायणीं । वांकडी वाडी पोरांपें ॥ ३ ॥ तुका म्हणे बेशरमा । श्रमावरी पडिभरू ॥ ४ ॥ [२७५३]

लावली, त्या योगानें तें स्वरूप जीवाच्या ठिकाणीं चिकटून राहिलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे गोपाळा, माझ्या जीवाला तुमच्या स्वरूपाचा छंद लागेल, अशी देणगी तुम्ही लवकर द्या ४. [२७४९]

पूर्वीं जी मीं संसारदुःखाची तळमळ केली, ती सर्व विसरली जाईल १. हे देवा, माझी बुद्धि तुझ्या पायांपाशीं स्थिर झाली आहे, आतां तूं तिला जीवाशिवाच्या ऐक्य संधींत ठेव, (किंवा, संसार आणि बुद्धि ह्यांचें ऐक्य जन्ममरणाच्या अडचणींत घालीत असतें, परंतु आतां ती बुद्धि तुझ्या पायापाशीं स्थिर झाली आहे) २. देहाची सेवा केल्यानें मी व्यर्थ दांभिक भक्त झालों. देवा, तुमचा खरेपणाहि वाटत नव्हता. ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आतां तुम्हीं लवकर उदार व्हावें, मी दान घेण्याविषयीं तत्पर झालों आहें ४. [२७५०]

देवा, अन्य कांहीं प्रकार (नामसंकीर्तनाशिवाय आणखी श्रवणादि भक्तींचा प्रकार) पुढें वृद्धिंगत करावा. एकाचेंच फार सेवन केल्यानें तें रुचकर होत नाहीं १. देहास नित्य नवा पोशाख व अलंकार घालून वरचेवर त्याची निरनिराळा डामडौल करण्याची हांव असते २. हे देवा, तुमच्या सेवेनें सेवक हे शोभिवंत दिसतात व त्या योगानें स्वामीचीहि कीर्ति त्रैलोक्यांत पसरते ३. तुकाराम महाराज म्हणतात, आज मला अनेक प्रकारच्या सेवेचें दान करून तुम्ही संतोष द्या, म्हणजे मी तुमच्या कीर्तीचा घोष करून नाचेन ४. [२७५१]

मुलांविषयीं राग आणि कृपा हीं दोन्ही आईच्यी सारखींच असतात. त्याचा वांटा ती जतन करून ठेवते १. क्षणभर पुत्र ऐकेनासा झाला, म्हणजे त्याच्याविषयीं राग येऊन ती किंचित् चिंतेंत पडते. त्या मातेची निरंतर पुत्रावरच खरी आवड आहे २. मुलाला त्याचें चांगलें होण्याकरितां ती शिकविते परंतु तिच्या ठिकाणीं पुत्राविषयीं असलेल्या प्रेमांत अंतर येत नाहीं ३. मुलानें अयोग्य हट्ट घेतला तर सर्व अयोग्य समय ती जाणते व तो हट्ट ती पुरवीत नाहीं व ती मुलानें योग्य मागितलें तर तें देण्याचे वेळेस योग्य काळ जाणून देते ४. ती माता दुसरा व्यवहार (मुलाचा तिरस्कार) आपण करीत नाहीं व आपल्या मुलाला दुसऱ्या कोणाला गांजूं देत नाहीं. तें बालक हट्ट करून रडूं लागलें, तर बाऊ (बागूलबुवा) आला, असें आपल्या तान्ह्या मुलाला भेडसावते ५. तुकाराम महाराज म्हणतात, ती आई मुलाचें जीवाभावानें जतन करते व तें मूल आपल्यापासून दूर गेलें, तर तिचें मन दचकतें व ती त्याला जवळ घेते ६. [२७५२]

संसाराच्या कार्याकडे मोठ्या त्वरेनें धांव घेतो, अशी ही त्याविषयींची हृदयांत केवढी आवड आहे १. हगावयास बसला, तरी संसाराचे उपयोगाकरितां दगड सांठवितो व संसाराविषयींचेच संकल्प हृदयांत असतात २. नारायणाचें नाम घेण्याविषयीं मात्र लज्जा वाटते व पोराला हांक मारते वेळीं मात्र 'अरे, माझ्या बाब्या' असें वांकडें तोंड करून बोलतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या ह्या बेशरमाचा संसाराविषयींच्या श्रमावरच विशेष भर असतो ४. [२७५३]

मी त्यांसी अनन्य तीं कोणा असती। ऐसें तंव चित्तीं विचारावें ॥ १ ॥ आहे तो विचार आपणयापाशीं। कळा बिंबाऐसी प्रतिबिंबीं ॥ २ ॥ शुभ शकून तो शुभ लाभें फळे। पुढील तें कळे अनुभवें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझा असेल आठव ॥ तैसा माझा भाव तुझ्या पायीं ॥ ४ ॥ [२७५४]

बहु कृपावंतें माझीं मायबापें। मी माझ्या संकल्पें अंतरलों ॥ १ ॥ संचितानें नाहीं चुकों दिली वाट। लाविलें अदट मजसवें ॥ २ ॥ आतां मी रुसतों न कळतां वर्म। परी ठावे धर्म सर्व देवा ॥ ३ ॥ तुका म्हणे उभा राहिला न बैसे। आमुची या ऐसे उद्योग त्या (आमुचिया असे उद्वेग त्या) ॥ ४ ॥ [२७५५]

कैशीं दिसों बरीं। आम्ही आळवितां हरि ॥ १ ॥ नाहीं सोंग आळंकार (अलंकार)। दास झाला संवसार ॥ १ ॥ दुःख आम्हां नाहीं चिंता। हरिचे दास म्हणवितां ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा। ऐशीं झालों करितां सेवा ॥ ४ ॥ [२७५६]

आतां सांडूं तरी हातीं ना पदरीं। सखीं सहोदरीं मोकलिलों ॥ १ ॥ जनाचारामध्यें उडाला पातेरा। झालों निलाजिरा म्हणऊनि ॥ २ ॥ कोणाचिया दारा जावेनासें झालें। म्यांच विटंबिलें आपणासी ॥ ३ ॥ कोण झाला माझे बुद्धीस संचार। नाहीं कोठें थार ऐसें झालें ॥ ४ ॥ तुका म्हणे तुज भक्त झाले फार। म्हणोनियां थार नाहीं येथें ॥ ५ ॥ [२७५७]

जेथें जातों तेथें पडतो मतोळा। न देखिजे डोळां लाभ कांहीं ॥ १ ॥ कपाळींची रेखा असती उत्तम। तरि कां हा श्रम पावतों मी ॥ २ ॥ नव्हेचि तुम्हांस माझा अंगिकार। थीता संसार अंतरला ॥ ३ ॥ भोग तंव झाला खरा भोगावा तो। भांडवल नेतो आयुष्य काळ ॥ ४ ॥ कोठें तुझी कीर्ति आइकिली देवा। मुकतों कां जीवा तुका म्हणे ॥ ५ ॥ [२७५८]

मी जर त्यांच्या ठिकाणीं अनन्य एकनिष्ठ आहें, तर ते कोणाच्या ठिकाणीं अनन्य असतील ह्याचा आपल्याच ठिकाणीं विचार करावा १. सर्व कांहीं कर्तव्य आपल्या जवळच आहे. जसें बिंबाचें तेज असेल, तसेंच प्रतिबिंबाचे ठिकाणीं असतें २. शुभ शकुन हा शुभलाभानेंच फलद्रूप होतो, हें अखेरीस अनुभवानेंच कळतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, जसा माझा भाव तुझ्या ठिकाणीं आहे, तसा तुझाहि माझ्या ठिकाणीं असेल ४. [२७५४]

माझे आईबाप हे फार कृपावंत आहेत, पण त्यांच्यामध्यें मी देह आणि देहसंबंधीं माझें अज्ञानें अंतर आणलें. १. पण प्रारब्धकर्मानें मला भक्तीचा मार्ग चुकूं दिला नाहीं. तें माझ्या बरोबर मोठें दृढ लाविलें आहे २. पण हें वर्म मला न कळल्यामुळें मी देवावर रुसत आहें. तथापि हें सर्व मर्म देव जाणतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणूनच तो देव आम्हां मूर्खांचा उद्धार करण्याकरितां उभा आहे व त्यालाहि आमच्यासारख्या पतिताला पावन करण्याचा उद्योग लागला आहे (*पाठभेद* : त्याला आमच्या उद्धाराची फार काळजी आहे) ४. [२७५५]

हे हरि, आम्ही तुला विनवीत आहों, त्या योगानें कसे बरे दिसत आहोंत (तें ध्रुवपदांत दर्शवितात) १. नानाप्रकारचे वस्त्र-अलंकार अंगावर घालण्याचें सोंग आमचें नाहीं, तथापि संसार आमचा दास झाला आहे २. आम्ही हरीचे दास आहोंत, असें म्हणवीत असल्यामुळें आम्हांला कोणत्याहि तऱ्हेचें दुःख व चिंता नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमची सेवा (भक्ति) करण्यानें आम्ही अशा निश्चिंत व आनंदी स्थितीला पावलों ४. [२७५६]

आतां जर श्रीहरीचा त्याग करावा, तर हातांत व पदरांतहि कांहीं येणार नाहीं व संसारामध्यें तर बंधु-भगिनींनीं, इष्टमित्रांनीं मला टाकून दिलें आहे १. लोकाचारामध्यें आमचा बोज उडाला आहे, कारण आम्ही निलाजरे झालों २. कोणाच्या दारांत जाऊं नये असें झालें, कारण अशा प्रकारची विटंबना माझी मींच केली ३. कसा हा माझ्या बुद्धीच्या ठिकाणीं संचार झाला! त्या योगानें कोठेंहि आश्रय नाहीं, असें झालें ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझे भक्त पुष्कळ आहेत, म्हणून मला तुमच्या ठिकाणीं आश्रय मिळत नाहीं ५. [२७५७]

जेथें जावें, तेथें (नुकसान) आंतच पाय येतो. कोठेंहि डोळ्याला कांहीं लाभ दिसत नाहीं १. माझें प्रारब्ध जर चांगलें असतें, तर अशा प्रकारचें हें दुःख कां प्राप्त झालें असतें? २. हे देवा, माझा अंगीकार तर तुमच्याकडून होत नाहीं व असलेल्या संसारांत मात्र अंतर पडलें (संसार गमावून बसलों) ३. भोग मात्र भोगावयास खरा झाला. त्या योगानें आयुष्याचें भांडवल काळ नेत आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तूं पतितपावन आहेस, अशी तुझी कीर्ति कोणीकडे ऐकण्यांत आली कोण जाणे! नाहीं तर मी जीवानें कां मुकलों असतों? ५. [२७५८]

कां जी आम्हां होतें दोषांचें दर्शन । तुज समर्पून देहभाव ॥ १ ॥ पांडुरंगा कृपाळुवा दयावंता । धरशील सत्ता सकळही ॥ २ ॥ कां जी आम्हांवरि आणिकांची सत्ता । तुम्हांसी असतां जवळिकें ॥ ३ ॥ तुका म्हणे पायीं केलें निवेदन । उचित तें दान करीं सत्ता ॥ ४ ॥ [२७५९]

निंदावें हें जग । ऐसा भागा आला भाग ॥ १ ॥ होतें तैसें आलें फळ । गेलें निवडूनि सकळ ॥ २ ॥ दुसऱ्याच्या मता । मिळेनासें झालें चित्ता ॥ ३ ॥ तुका झाला सांडा । विटंबिती पोरें रांडा ॥ ३ ॥ [२७६०]

माझे माथां तुझा हात । तुझे पायीं माझें चित्त ॥ १ ॥ ऐसी पडियेली गांठी । शरीरसंबंधाची मिठी ॥ २ ॥ येरयेरांपाशीं । सांपडोन गेलों ऐसी ॥ ३ ॥ तुका म्हणे सेवा । माझी कृपा तुझी देवा ॥ ४ ॥ [२७६१]

सत्य त्यागाचि समान । न लगे वेंचावें वचन ॥ १ ॥ नारायणा ऐसे दास । येरयेरांचीच आस ॥ ३ ॥ मळ नाहीं चित्ता । तेथें देवाचीच सत्ता ॥ ३ ॥ तुका म्हणे जाण । तेंच भल्याचें वचन ॥ ४ ॥ [२७६२]

माझिये बुद्धीचा खुंटला उपाय । करिसील काय पाहणें तें (पाहीन तें) ॥ १ ॥ सूत्रधारी तूं हें सकळ चाळिता । कासया अनंता भार वाहों ॥ २ ॥ वाहिले संकल्प न पवती सिद्धी । येऊं देहबुद्धिवरि नये ॥ ३ ॥ तुका म्हणे दुःखी करिती तरंग । चिंतूं पांडुरंग आंवरूनि ॥ ४ ॥ [२७६३]

देखिलें तें धरिन मनें । समाधानें राहेन ॥ १ ॥ भाव माझी सांठवण । जगजीवन कळावया ॥ २ ॥ आळवीन (बोलवीन) एकसरें । उत्तरें या करुणेच्या ॥ ३ ॥ तुका म्हणे न योन (येऊनी) रूपा । काय बापा करीसील ॥ ४ ॥ [२७६४]

हे देवा, तुला देहभाव समर्पण केल्यावरहि आम्हांला दोषांचें दर्शन कां होतें? १. अहो दयावंता पांडुरंगा, तुम्हीं सर्व सत्ता धारण केली आहे २. अशा प्रकारचे तुम्ही आमच्या जवळ असतांना, अन्यांची (दुसऱ्यांची–कालादिकांची) आमच्यावर सत्ता कां? ३. तुकाराम महाराज म्हणतात, जी कांहीं खरी स्थिति आहे, ती आपल्या पायांपाशीं विदित केली. आतां आपल्या सत्तासामर्थ्यानें आपण योग्य ती देणगी द्यावी ४. [२७५९]

(लोकांनीं निंदा करावी) असा वांटा आमच्या वांटणीस आला आहे १. जें कांहीं प्रारब्धानुसार फळ होतें, तें आम्हांस प्राप्त झाल्यामुळें, त्याखेरीज सर्वांची निवड झाली (सर्व चांगलीं फळें दूर गेलीं) २. दुसऱ्याच्या मतास आमचें चित्त न मिळेल, असें झालें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी सर्वांस टाकाऊ झाल्यामुळें रांडापोरें हीं सर्व माझी विटंबना करितात ४. [२७६०]

हे देवा, तुम्हीं माझ्या मस्तकीं हात ठेविला आहे, आणि मींहि तुमच्या पायांच्या ठिकाणीं चित्त ठेविलें आहे १. ह्याप्रमाणें उभयतांची गांठ पडून शरीरसंबंध झाला आहे २. अशा प्रकारें आम्ही एकमेकांच्या तावडींत सांपडलों आहों ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मीं तुमची सेवा करावी आणि तुम्हीं माझ्यावर कृपा करावी, असें उभयतांचें कर्तव्य आहे ४. [२७६१]

संसारांत खरी वागणूक केली असतां सत्य आचरण हें सर्वस्वाचा त्याग केल्याप्रमाणें आचरण होतें; त्यास दुसरें वचन खर्च करावयास नको (ह्यासंबंधीं अधिक बोलण्याची गरज नाहीं) १. जर नारायणाचें दास्यत्व केलें, तर त्या उभयतांमध्यें एकमेकांविषयीं आशा उत्पन्न होते २. जें चित्त निर्मळ झालें आहे, त्या ठिकाणीं देवाचें वास्तव्य असतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें वचन मागील श्रेष्ठांनीं सांगितलें आहे, तें तूं समज ४. [२७६२]

हे देवा, माझ्या बुद्धीचा सर्व उपाय कुंठित झाला. आतां तूं जें कांहीं करशील, त्याची मी वाट पाहात आहें १. हे अनंता, सर्वांचा चालक तूं सूत्रधारी आहेस, तर उगीच मीं आपल्या मस्तकीं संसाराचा भार घेण्याचें काय कारण आहे? २. जे कांहीं संकल्प करावेत ते सिद्धीस जात नाहींत, म्हणून देहबुद्धीवर येऊं नये, हें बरें ३. तुकाराम महाराज म्हणतात, चित्तांतील अनेक विकारतरंग दुःखदायक आहेत. ते सर्व आंवरून आम्ही पांडुरंगाचें चिंतन करूं ४. [२७६३]

जें मीं देवाचें रूप पाहिलें आहे, तेंच मनामध्यें धरून समाधानवृत्तीनें राहीन १. जगाचें जीवन जो देव आहे, तो समजण्यास माझा भाव हेंच सांठविण्याचें पात्र आहे २. तो जर रूपाला आला तर करुणावचनानें एकसारखें मी त्याला आळवीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, ह्या कर्तव्यानें तूं रूपाला न येशील, तर निर्गुण स्थितींत राहून बापा, काय करशील? ४. [२७६४]

वायां जाय ऐसा । आतां उगवावा फांसा ॥ १ ॥ माझें परिसावें गाऱ्हाणें । सुखदुःखांचीं वचनें ॥ २ ॥ हाचि आम्हां ठाव । पायीं निरोपाया भाव ॥ ३ ॥ तुका म्हणे जार । तुझा तुज देवा भार ॥ ४ ॥ [२७६५]

खादलेंच खावें वाटे । भेटलें भेटें आवडी ॥ १ ॥ वीट नाहीं पांडुरंगीं । वाढे अंगीं आर्त तें ॥ २ ॥ इंद्रियांची हांव पुरे । परि हें उरे चिंतन ॥ ३ ॥ तुका म्हणे पोट भरे । परि ते उरे भूक पुढें ॥ ४ ॥ [२७६६]

सत्य आठवितां देव । जातें भेव पळोनि ॥ १ ॥ न लगे कांहीं करणें चिंता । धरी सत्ता सर्व तो ॥ २ ॥ भावें भाव राहे पायीं । देव तैं सन्निध ॥ ३ ॥ तुका म्हणे कृष्णनामें । शीतळ प्रेमें सर्वांसी ॥ ४ ॥ [२७६७]

ब्रीद ज्याचें जगदानी । तोचि मनीं स्मरावा ॥ १ ॥ सम पाय कर कटीं । उभा तटीं भींवरेच्या ॥ २ ॥ पाहिलिया वेध लावी । बैसे जीवीं जडोनि ॥ ३ ॥ तुका म्हणे भक्तिकाजा । धांवे लाजा लवलाहें ॥ ४ ॥ [२७६८]

माझिया मनाची बैसली आवडी । अवसान घडी एकी नेघे ॥ १ ॥ पाय चित्तीं रूप डोळांची बैसलें । चिंतनें गोविलें मुख सदा ॥ २ ॥ अवघियांचा झाला विसर हा मागें । वेध हा श्रीरंगें लावियेला ॥ ३ ॥ तुका म्हणे कानीं आइकिली मात । तोचि झाला घात जीवपणा ॥ ४ ॥ [२७६९]

याची कोठें लागली चट । बहु तंट झालेंसे ॥ १ ॥ देवपिसी देवपिसी । मजऐसी जग म्हणे ॥ २ ॥ एकांताचें बाहेर आलें । लपविलें झांकेना ॥ ३ ॥ तुका म्हणे याचे भेटी । झाली तुटी आपल्यासी ॥ ४ ॥ [२७७०]

हे देवा, सर्वतोपरि मी वायां जाईन असा जो फांसा (संसारपाश) आहे, तो तुम्ही नाहींसा करा १. त्यासंबंधीं सुखदुःखाचें गाऱ्हाणें जें मी सांगतों, तें तुम्ही ऐका २. आमचा भाव तुझ्या पायांच्या ठिकाणीं निरूपण करावा, एवढेंच आम्हांला ठिकाण आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, ह्या देहाला तूंच जन्म दिला आहेस त्याच्या योगक्षेमाचा भार तुला कसा होईल ? ४. [२७६५]

खाल्लेले प्रिय पदार्थच खावेसे वाटतात व भेटलेल्या प्रियजनास प्रीतीनें भेटावेंसें वाटतें १. त्याप्रमाणें पांडुरंगाच्या ठिकाणीं वीट नाहीं, म्हणून त्याचीच आवड करण्याची इच्छा हृदयांत वाढते २. त्याविषयींची हृदयांतील हांव तृप्त होते; पण प्रीतीनें त्याचेंच चिंतन मनांत उरतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या योगानें पोट भरतें, पण त्याचीच भूक पुढें उरते ४. [२७६६]

खरोखर खऱ्या भावानें देवाचा आठव केला असतां, सर्व भय नाहींसें होतें १. मग कांहीं चिंता करणें नको, कारण सर्व सत्ता त्याच्याच स्वाधीन आहे २. एकनिष्ठ भाव जर देवाच्या पायीं राहील, तर देव त्या एकनिष्ठ भक्ताजवळ राहातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, कृष्ण या नामाचा उच्चार प्रेमानें केला असतां सर्वांची तनु शांत होते (काया, वाचा, मन ह्या सर्वांना समाधान मिळतें) ४. [२७६७]

सर्व जनांस दान देणें हेंच ज्याचें ब्रीद [पेशा] आहे, त्याचेंच मनामध्यें स्मरण करावें १. तो देव विटेवर सारखे पाय जोडून कमरेवर हात ठेवून चंद्रभागेच्या तीरावर उभा राहिला आहे २. त्याला पाहिलें असतां अंतःकरणांत त्याचा वेध लागून तो जीवाच्या ठिकाणीं जडून बसतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, भक्ताचें काम करण्याकरितां आपल्या ब्रीदाच्या लाजेनें (भक्ताचा अभिमान धरून) देव त्वरेनें धांवत जातो ४. [२७६८]

माझ्या मनाची प्रीति देवाच्या रूपीं बसली आहे, म्हणून तें मन घटकाभर देखील विसांवा घेत नाहीं १. त्याचे पाय माझ्या चित्तांत व रूप डोळ्यांमध्यें राहिल्यामुळें त्याच्याच नामचिंतनांत मुख सर्वकाळ गुंतलें आहे २. असा वेध मला श्रीरंगानें लाविल्यामुळें मागील सर्व देहादि प्रपंचाचा विसर पडला ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या वेळीं सद्गुरुमुखानें (निर्गुणाची) कीर्ति मीं कानानें ऐकिली, त्याच वेळीं जीवाचा जीवपणा नाहींसा झाला ४. [२७६९]

(एक गौळण म्हणते,) ह्या देवाची मला चटक कोणीकडून लागली, असे माझे लोकांत फार बोभाट झाले आहेत १. हिला देवाचें वेड लागलें आहे, असें लोक मला म्हणतात २. त्या देवाचा संग मीं एकांतीं केला, पण तो बोभाट बाहेर प्रगट झाला. आतां तो लपविला असतां, झांकला नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या वेळीं ह्याची मला अभेदानें भेट झाली त्या वेळीं (माझी जीवदशा) आपलेपणा नाहींसा झाला ४. [२७७०]

दीन आणि दुर्बळांसी। सुखरासी हरिकथा ॥ १ ॥ तारूं भवसागरींचें। उंच नीच अधिकार ॥ २ ॥ चरित्र तें उच्चारावें। केलें देवें गोकुळीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आवडी धरी। कृपा करी म्हणऊनी ॥ ४ ॥ [२७७१]

संतोषे माउली आरुपा वचनीं। वोरसोनी स्तनीं लावी बाळा ॥ १ ॥ तैसें प्रेमळाचें अववेंचि गोड। पुरवितो कोड पांडुरंग ॥ २ ॥ सेवा करी साहे निष्ठुर उत्तरें। त्याचें वाहे बरें तेंच मनीं ॥ ३ ॥ तुका म्हणे इच्छावसें खेळे खेळ। चिंता ते सकळ कांहीं नेणे ॥ ४ ॥ [२७७२]

विनवीजे ऐसें कांहीं। उरलें नाहीं यावरी ॥ १ ॥ आतां असो पंढरीनाथा। पायीं माथा तुमचिये ॥ २ ॥ मागें सारियेली युक्ति। कांहीं होती जवळी ते ॥ ३ ॥ निराशेची न करी आस। तुका दास माघारी ॥ ४ ॥ [२७७३]

आतां येथें झाली जीवा संवसाटी। होतें तैसें पोटीं फळ आलें ॥ १ ॥ आतां धरिले ते न सोडीं चरण। सांपडलें धन निज ठेवा ॥ २ ॥ आतां हा आळस असो परता दुरी। नेदावी ते उरी उरों कांहीं ॥ ३ ॥ आतां याचा मज न व्हावा विसर। भरोनि अंतर राहो रूप ॥ ४ ॥ आतां लोकलाज न यो येथें आड। बहु झाला गोड ब्रह्मरस ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां जन्म हा सफळ। अंतरीं गोपाळ स्थिरावला ॥ ६ ॥ [२७७४]

अनंता जीवांचीं तोडिलीं बंधनें। मजाहि काळें येणें कृपा कीजे ॥ १ ॥ अनंत पवाडे तुझे विश्वंभरा। भक्तकरुणाकरा नारायणा ॥ २ ॥ अंतरींचें कळों देईं गुह्य गुज। अंतरींचें बीज राखईन ॥ ३ ॥ समदृष्टी तुझीं पाहेन पाउलें। धरीन संचलें हृदयांत ॥ ४ ॥ तेणें या चित्ताची

जे कोणी इंद्रियाधीन असल्यामुळें दीनदुर्बल झाले आहेत त्यांना जर सुख पाहिजे असेल तर त्यांनीं हरीची कथा करावी, म्हणजे अमूप सुख होईल १. भवसमुद्रांतून तरून जाण्याला हें हरिकथारूपी जहाज आहे. ह्यामध्यें बसण्यास अधिकार हीनापासून उत्तम लोकांपर्यंत आहे २. देवांनीं गोकुळांत अवतार धारण करून जें चरित्र केलें आहे, त्याचा उच्चार करणें ह्याचेंच नांव कथा ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या कथेच्या ठिकाणीं जो आवड धरील त्याच्यावर देव कृपा करील ४. [२७७१]

लाडक्या बालकाचें बोबडें भाषण ऐकून आई संतुष्ट होते आणि ती स्नेहभरित होऊन त्या बाळाला स्तनपान देते १. त्याप्रमाणें प्रेमळाचें भाषण ऐकून पांडुरंगास गोड वाटतें आणि त्याची सर्व इच्छा तो पूर्ण करतो २. त्या बालकाचें कठोर भाषण सहन करून, आई त्याची सेवा करते आणि ज्या योगानें त्याचें कल्याण होईल, तेंच कर्तव्य मनांत वागविते ३. तुकाराम महाराज म्हणतात, तें बालक आपल्या इच्छेप्रमाणें खेळ खेळतें. त्याला कोणत्याहि प्रकारची चिंता करण्याचें समजत नाहीं ४. [२७७२]

हे देवा, इतक्यावर तुला विनंति करावी, असें कांहीं उरलें नाहीं १. हे पंढरीनाथा, आतां माझें मस्तक तुमच्या पायांच्या ठिकाणीं असो २. ज्या कांहीं युक्ति माझ्याजवळ होत्या, त्या सर्व आजपर्यंत मीं खर्च केल्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या ठिकाणीं (संसाराविषयीं) निराशा झाली आहे, त्याची पुनः गरज धरीत नाहीं, असा मी तुमचा सेवक आहें ४. [२७७३]

हे देवा, आतां ह्या ठिकाणीं मीं आपला जीव अर्पण केला आहे, म्हणून इच्छित फळाची प्राप्ति मला झाली १. आतां मीं तुमचे पाय धरले आहेत. तेच माझ्या निजधनाची ठेव आहे म्हणून मी कधींहि सोडणार नाहीं २. माझ्या ठिकाणीं जो भजनाचा आळस आहे, तो कांहीं शिल्लक न ठेवतां घालवीन ३. तुमचें रूप माझ्या अंतःकरणांत भरून राहावें; त्याचा आतां कधींहि विसर पडूं नये ४. गोड अशा ब्रह्मरसाची प्राप्ति मला झाली आहे. आतां ह्या ठिकाणीं लोकलज्जा आड येऊं नये ५. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या अंतःकरणाचे ठिकाणीं गोपाळ स्थिरावला आहे. त्या योगानें आतां माझा जन्म सफल झाला ६. [२७७४]

हे देवा, तुम्हीं संसारबंधनांतून अपार जीव मुक्त केले. त्याप्रमाणें मजवर ह्या काळीं कृपा करा १. हे विश्वंभरा भक्तकरुणाकरा नारायणा, अशा प्रकारची तुझी कीर्ति अपार आहे २. तुझ्या अंतःकरणांतील गुह्य ज्ञान मला समजूं दे, म्हणजे तेंच बीज मी आपल्या अंतःकरणांत रक्षण करीन. ३. तुझे समचरण मी दृष्टि भरून पाहीन आणि तेच मी आपल्या

राहेल तळमळ । होतील शीतळ सकळ गात्रें ॥ ५ ॥ तुका म्हणे शांति करील प्रवेश । मग नव्हे नाश अखंड तो ॥ ६ ॥ [२७७५]

पराधीन माझें करूनियां जीणें । सांडी काय गुणें केली देवा ॥ १ ॥ उदार हे कीर्ति असे जगामाजी । कां तें ऐसें आजि पालटिलें ॥ २ ॥ आळवितों परी न पुरेचि रीग । उचित तो त्याग नाहीं तुम्हां ॥ ३ ॥ तुका म्हणे कां वा मुळींच व्यालासी । ऐसें कां नेणसी पांडुरंगा ॥ ४ ॥ [२७७६]

नेणपणें नाहीं केला हा बोभाट । आतां आली वाट कळों खरी ॥ १ ॥ आतां बहु शीघ्र यावें लवकरी । वाट पाहें हरी भेटी देई ॥ २ ॥ समर्थाच्या बाळा करुणेचें भाषण । तरी त्याची कोण नांदणूक ॥ ३ ॥ तुका म्हणे बहु बोलिले बडिवार । पडिलें अंतर लौकिकीं तें ॥ ४ ॥ [२७७७]

जें जें केलें तें तें साहे । कैसें पाहे भाविक ॥ १ ॥ ओंवाळूनि माझी काया । सांडिली यावरूनि ॥ २ ॥ काय होय नव्हे करूं । नेणें धरूं सत्ता ते ॥ ३ ॥ तुका म्हणे कटीं कर । उभें धीर धरूनि ॥ ४ ॥ [२७७८]

नाहीं मज कृपा केली पांडुरंगें । संतांचिया संगें पोट भरीं ॥ १ ॥ चतुराचे सभे पंडित कुशाळ । मी काय दुर्बळ विष्णुदास ॥ २ ॥ तुका म्हणे नेणें करूं समाधान । धरिले चरण विठोबाचे ॥ ३ ॥ [२७७९]

तुम्ही माझा देवा करिजे (करा) अंगिकार । हा नाहीं विचार मजपाशीं ॥ १ ॥ आतां दोहीं पक्षीं लागलें लांछन । देवभक्तपण लाजविलें ॥ २ ॥ एकांतीं एकलें न राहे निश्चळ । न बैसे चपळ (न राहेचि पळ) मन ठायीं ॥ ३ ॥ पायीं महत्त्वाची पडिली श्रृंखळा । बांधविला गळा स्नेहाहातीं ॥ ४ ॥

हृदयांत सांठवीन ४. त्या योगानें चित्तांतील सर्व तळमळ नाहींशी होईल आणि सर्व शरीराचीं गात्रें शिथिल होतील ५. तुकाराम महाराज म्हणतात, मग माझ्या हृदयांत शांतीची वस्ती होईल, त्या योगानें कालत्रयीं नाश होणार नाहीं ६. [२७७५]

हे देवा, माझें जगणें संचितकर्माच्या सांच्यांत सांपडून परस्वाधीन तुम्हीं केलें. अशी माझी हेळसांड तुम्हीं कोणत्या कारणानें केली ? १. तुमची उदारपणाची कीर्ति ह्या जगतामध्यें वाढली आहे, ती आज कशाकरितां पालटली आहे ? २. मी तुमची करुणा भाकीत आहें, पण तुमच्याजवळ शिरकाव होत नाहीं. असा माझा त्याग करणें, हें तुम्हांला योग्य नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, तुम्हीं मला आधीं जन्म कां दिला ? हा विचार तुम्ही पूर्वीं जाणत नव्हतां काय ? ४. [२७७६]

तुमचा आणि माझा पिता-पुत्राचा संबंध आहे ह्याची आजपर्यंत अज्ञानपणानें मीं प्रसिद्धी केली नाहीं, पण आतां तुमची खरी वाट मला समजून आली १. हे हरि, आतां तुम्ही फार त्वरेनें धांवत या आणि मला भेट द्या. मी तुमची वाट पाहात आहें २. समर्थांच्या लेंकरानें कींवकाकुलती येऊन ओरडत बसावें असली त्याची नांदणूक काय उपयोगाची आहे ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमची कीर्ति पुष्कळ लोकांनीं मागें वर्णन केली आहे, पण ह्या काळीं लोकाचारामध्यें त्याला अंतर पडलें ४. [२७७७]

जें जें कांहीं आम्हीं केलें, तें तें सर्व त्या देवानें सहन केलें. कसें हें दैवत भाविक आहे पाहा १. मीं आपलें शरीर त्याच्यावरून ओंवाळून टाकलें २. त्यानें केलें तर काय एक होणार नाहीं ? पण तो ती आपली सत्ता चालवीत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, कंबरेवर हात ठेवून जें धीर धरून उभें आहे (तें काय करूं शकणार नाहीं ?) ४. [२७७८]

पांडुरंगानें अजून माझ्यावर कृपा केली नाहीं व संतांच्या संगतीनें मी पोट भरीत आहें १. चतुरांच्या सभेमध्यें सर्व कुशल पंडित आहेत. तेथें मज गरीब विष्णुदासाची काय किंमत आहे ? २. तुकाराम महाराज म्हणतात, मी तुमचें समाधान करण्याचें जाणत नाहीं. एक विठोबाचे चरण धरून राहिलों आहें ३. [२७७९]

हे देवा, तुम्ही माझा अंगीकार कराल असें मला आतां वाटत नाहीं १. ह्या तुमच्या करण्यानें देव व भक्त ह्या दोन्ही पक्षांना लांछन लागून (माझी भक्ति शुद्ध नाहीं म्हणून मला आणि तुम्ही माझा अंगीकार करीत नाहीं म्हणून तुम्हांला) उभयतांनाहि त्यामध्यें लज्जा आहे २. चपळ मन एकांतामध्यें एकाग्र असें स्थिर राहात नाहीं ३. मोठेपणाची बेडी माझ्या

शरीर सोकलें देखिलिया सुखा। कदान्न हें मुखा रुचेचिना (मान्य नाहीं) ॥ ५ ॥ तुका म्हणे झाला अवगुणांचा थारा। वाढली हे निद्रा आळस बहु ॥ ६ ॥ [२७८०]

बोलिलिया गुणीं नाहीं पाविजेत। देवा नाहीं होत हित तेथें ॥ १ ॥ कवतुक तुझें नवल (न कळे) यावरि (यापरी)। घेशील तें शिरीं काय नव्हे ॥ २ ॥ नाहीं मिळों येत संचिताच्या (संतांचिया) मता। पुराणीं पाहतां अघटित ॥ ३ ॥ तुका म्हणे पायीं निरोपिला भाव। न्याल तैसा जावो सिद्धी देवा ॥ ४ ॥ [२७८१]

हा तों नव्हता दीन। टाळायाचा ऐसा क्षण ॥ १ ॥ कां जी नेणों राखा हात। कैसें देखावें रडत ॥ २ ॥ दावूनियां आस। दूर पळवितां कशास ॥ ३ ॥ तुका म्हणे धांव। घेतां न पुरेचि हांव ॥ ४ ॥ [२७८२]

आर्तभूतां द्यावें दान। खरें पुण्य त्या नांवें ॥ १ ॥ होणार तें सुखें घडो। लाभ जोडो महाबुद्धि ॥ २ ॥ सत्य संकल्पाचे साठीं। उजळा पोटीं रविबिंब ॥ ३ ॥ तुका म्हणे मनीं वाव। शुद्ध भाव राखावा ॥ ४ ॥ [२७८३]

कवतुकवाणी बोलतसे लाडें। आरुष वांकडें करूनि मुख ॥ १ ॥ दुजेपणीं भाव नाहीं हे आशंका। जननीबाळकामध्यें भेद ॥ २ ॥ सलगी दुरूनि जवळी पाचारूं। धांवोनियां करूं अंगसंग ॥ ३ ॥ धरूनि पालव मागतों भातुकें। आवडीचें निकें प्रेमसुख ॥ ४ ॥ तुका म्हणे तुज आमचीच गोडी। ऐसी हे आवडी कळों आली ॥ ५ ॥ [२७८४]

ऐक पांडुरंगा वचन माझें एक। झालों मी सेवक दास तुझा ॥ १ ॥ कळे तैसा आतां करावा उद्धार। खुंटला विचार माझा पुढें ॥ २ ॥ दंभ मान माझा करूं पाहे घात। झालियाही थीत कारणाचा

पायांमध्यें पडली व देह-स्त्री-पुत्रांच्या ममतेच्या योगानें मीं आपला गळा बांधून घेतला ४. शरीर हें अनुभविलेल्या विषयसुखाच्या ठिकाणीं सवकलें आहे. कदान्न हें मुखाला रुचत नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, अवगुणांचा आश्रय विशेष झाल्यामुळें निद्रा व आळस हीं विशेष वाढलीं गेलीं ६. [२७८०]

हे देवा, वर प्रतिपादन केलेल्या गुणांनीं परमार्थ प्राप्त होत नाहीं, म्हणून कांहीं हित होत नाहीं १. आतां जर तूंच कांहीं आमचें हित केलेंस, तर तुझ्या कौतुकाचें नवल आहे (काय तुझें कौतुक आहे तें समजत नाहीं). तूं आपल्या मस्तकावर घेतल्यावर काय करणार नाहींस? २. प्रारब्धमतवादाकडे मिळतां येत नाहीं, पुराणें पाहूं गेलें असतां, सर्व कांहीं अघटित वाटतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व कांहीं हकीगत तुझ्या पायांपाशीं निवेदन केली आहे. हे देवा, आतां तुम्ही जसें माझें म्हणणें सिद्धीस न्याल तसें होईल ४. [२७८१]

हे देवा, ही वेळ दीन जिवांची टाळटाळी करण्यासारखी नव्हे १. अहो देवा, तुमचा हात राखण्याचा व्यवहार कळत नाहीं. तुमच्यानें दीन जीव रडत असतांना कसें पाहावतें? २. प्रथम आशा दाखवून आपले हात दूर कां पळवितां? ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्याकडे धांव घेण्याविषयींची हांव पूर्ण होत नाहीं ४. [२७८२]

ज्याला ज्याची अत्यंत गरज आहे, तें त्याला द्यावें त्यांतच खरें पुण्य आहे १. जें व्हावयाचें असेल, तें सुखानें होवो. महाबुद्धीचा (आत्मविषयक बुद्धीचा) लाभ प्राप्त होवो. २. सत्यसंकल्पाकरितां विवेकाचें सूर्यबिंब हृदयामध्यें प्रकाशित करावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मनाच्या अवकाशामध्यें वेद-हरि-गुरुविषयीं शुद्ध भावाचें रक्षण करावें ४. [२७८३]

बालक हें आईशीं कौतुकानें मोठे लाडके असंबद्ध शब्द तोंड वांकडें करून बोलतें १. जरी तीं दोघें आहेत, तरी त्या आई–बालकामध्यें कोणत्याहि तऱ्हेची शंका व भेद नाहीं २. तें सलगीनें आईला दुरून जवळ येण्याकरितां हांक मारो अथवा आपणच स्वतः धांवत जाऊन आईच्या अंगाला मिठी मारो ३. आईचा पदर धरून भरून बालक हें आपल्याला जें कांहीं प्रिय व चांगलें वाटत आहे, तो खाऊ तें आईजवळ मागतें ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुला आमचीच गोडी आहे, असें हें आमच्या आवडीवरून समजून आलें ५. [२७८४]

हे पांडुरंगा, तुझा मी सेवक झालों आहें, म्हणून माझें तूंच एक वचन ऐक १. आतां माझा उद्धार जसा तुम्हांला कळेल तसा करा, त्याविषयीं माझा कांहीं उपाय पुढें चालत नाहीं २. जें कांहीं माझें सिद्ध कार्य झालें आहे, त्याचा

॥ ३ ॥ हीन बुद्धि माझी अधम हे याती। अहंकार चित्तीं वसों पाहे ॥ ४ ॥ तुका म्हणे मज बिघडतां क्षण। न लगे जतन करीं देवा ॥ ५ ॥ [२७८५]

जेणें माझें चित्त राहे तुझ्या पायीं। आखंड तें देई प्रेमसुख ॥ १ ॥ देहभाव राखें दीन करूनियां। जनाचारी वायां जाय तैसा ॥ २ ॥ द्रव्य दारा नको मानाची आवडी। कवणेविशीं गोडी प्रपंचाची ॥ ३ ॥ तुझें नाम माझें धरूनियां चित्त। एकांत लोकांत सदा राहो ॥ ४ ॥ तुका म्हणे तुझे जडोनियां पायीं। झालों उतराई पांडुरंगा ॥ ५ ॥ [२७८६]

काय सांगों आतां संतांचे उपकार। मज निरंतर जागविती ॥ १ ॥ काय द्यावें त्यांसी व्हावें उतराई। ठेवितां हा पायीं जीव थोडा ॥ २ ॥ सहज बोलणें हित उपदेश। करूनि सायास शिकविती ॥ ३ ॥ तुका म्हणे वत्स धेनुवेचे चित्तीं। तैसे मज येती सांभाळीत ॥ ४ ॥ [२७८७]

देव जाणता देव जाणता। आपुलीया सत्ता एकाएकीं ॥ १ ॥ देव चतुर देव चतुर। जाणोनि अंतर वर्ततसे ॥ २ ॥ देव निराळा देव निराळा। अलिप्त विटाळा तुका म्हणे ॥ ३ ॥ [२७८८]

आपण चाळक बुद्धीच्या संचारा। आम्हांसी वेव्हारा पात्र केलें ॥ १ ॥ काय झालें तरी नेघां तुम्ही भार। आणीक कोणा थोर म्हणों सांगा ॥ २ ॥ पंचभूतें तंव चर्माचिया (कर्माचिया) मोटा। येथें खरा खोटा कोण भाव ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं बोलावया जागा। कां देवा वाउगा श्रम करूं ॥ ४ ॥ [२७८९]

एका एक वर्मे लावूनियां अंगीं। ठेवितों प्रसंगीं सांभाळीन (सांभाळीत) ॥ १ ॥ नेघावा जी आम्ही (तुम्ही) वाव बहु फार। धरूनि अंतर ठाया ठाव ॥ २ ॥ वेव्हारें आलें तें समानचि होतें।

दंभाच्या व मानाच्या योगानें नाश होऊं पाहात आहे ३. माझी जाति अधम आहे व बुद्धि वाईट आहे आणि चित्तामध्यें अहंकार वसूं पाहात आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मला बिघडण्याला एक क्षणसुद्धां लागणार नाहीं, एवढ्याकरितां तूं माझें रक्षण कर ५. [२७८५]

हे देवा, ज्या योगानें माझें चित्त तुझ्या पायांच्या ठिकाणीं राहील, तें प्रेमसुख मला सर्व काळ दे १. ज्या योगानें मी लोकव्यवहारामध्यें निरुपयोगी होईन, अशा तऱ्हेची माझी देहस्थिति दुर्बल करून ठेवा २. द्रव्य, बायको व मान आदिकरून सर्व प्रापंचिक विषयांची माझ्या ठिकाणीं प्रीति राहूं नये ३. माझ्या चित्तानें एकांतीं व लोकांतीं (लोकांत) सर्व काळ तुझें नामस्मरण करून राहावें ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, तुझ्या पायांच्या ठिकाणीं मी देह ठेवून तुझ्या उपकारांतून उत्तीर्ण झालों ५. [२७८६]

संत हे अविद्यामय निद्रेंतून निरंतरची मला स्वरूपीं जागृति (धर्म-भक्ति-ज्ञान-वैराग्य ह्यांची नित्य जागृति) देतात, म्हणून आतां त्यांच्या उपकाराचें काय वर्णन करूं? १. त्यांच्या उपकारांतून उत्तीर्ण होण्याला माझ्यापाशीं कांहीं नाहीं. तर आपला जीव त्यांच्या चरणीं अर्पण करावा, तर त्याची किंमत थोडी आहे २. ज्यांच्या सहज बोलण्यानें हिताचा उपदेश होत आहे, ते श्रम करून मला शिकवितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, गाईच्या चित्तामध्यें वासराविषयीं ममत्व असतें, अशा ममतेनें संत माझें रक्षण करतात ४. [२७८७]

देव हा सर्व जाणता आहे (असें द्विवार सांगतों) व सर्व कांहीं एक त्याचीच सत्ता आहे १. देव हा चतुर आहे (असें द्विवार सांगतों.) तो सर्वांचें अंतःकरण जाणून वर्तन करतो २. तुकाराम महाराज म्हणतात, देव हा सर्वांच्या वेगळा आहे (असें द्विवार सांगतों). तो कोणत्याहि (कल्पित कार्य-कारणात्मक उपाधींच्या) मळांत लिप्त होत नाहीं ३. [२७८८]

हे देवा, तुम्ही सर्वांच्या बुद्धीमध्यें संचार करून सर्वांना चेष्टवितां आणि आम्हांला व्यवहारांत निमित्तास पात्र केलें आहे १. आमचा योगक्षेमाचा भार तुम्ही घेत नाहीं, तर तुम्हांला झालें तरी काय? तुमच्यावांचून मी श्रेष्ठ कोणाला म्हणूं तें सांगा २. पंचभूतें तर ह्या शरीररूपी कातड्याच्या मोटेंत आहेत; ह्या ठिकाणीं खरें व खोटें हे भाव कसले आहेत? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमच्यावांचून निमित्त ठेवायला जागा मला कोणत्याच ठिकाणीं नाहीं, मग मी व्यर्थ तुम्हांला प्रश्न विचारण्याचे श्रम कशाला करूं? ४ [२७८९]

मी एका परमात्म्याच्या अंगीं सर्व कांहीं लावून हेंच एक मर्म प्रसंगाला संभाळून ठेवतों १. अहो जी देवा, आमच्यानें फार धांव घेववत नाहीं, म्हणून आम्ही प्रत्येक ठिकाणीं हृदयाचा निग्रह करून राहिलों आहीं (प्रत्येक योनींत

बळ नाहीं येथें चालों येत ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां निवाड्याचसाटीं । संसारें तुटी करूनि ठेलों ॥ ४ ॥ [२७९०]

आतां येथें खरें । न ये फिरतां माघारें ॥ १ ॥ होय तैसी हो आबाळी । देहनिमित्य या बळी ॥ २ ॥ तुम्हांसवें गांठी । देवा जीवाचिये साठीं ॥ ३ ॥ तुका नव्हे लंड । करूं चौघांमध्यें खंड ॥ ४ ॥ [२७९१]

कां हो वाढवितां देवा । मज घरींच समजावा । केवढा हो गोवा । फार केलें थोड्याचें ॥ १ ॥ ठेवीन पायांवरी डोई । यासी तुमचें वेंचे काई । झालों उतराई । जाणा एकएकांचे ॥ २ ॥ निवाड आपणियांपाशीं । असोन कां व्हावें अपेसी । होती गांठी तैसी । सोडूनियां ठेविली ॥ ३ ॥ तुका म्हणे गोड । होतें झालिया निवाड । दर्शनेंही चाड । आवडीच वाढेल ॥ ४ ॥ [२७९२]

नव्हों सभाधीट । समोर बोलावया (बोलायाचें) नीट । एकलीं एकट । दुजें नाहीं देखिलें ॥ १ ॥ आतां अवघें तुम्ही जाणा । तुमचें माझें नारायणा । येईल करुणा । तेंचि पहा तुम्हांसी ॥ २ ॥ ताळ नाहीं माझे बुद्धि । धरली न धरवे शुद्धि । आतां बळ कधीं । कोण्या जन्में निवाड ॥ ३ ॥ आतां शेवटींचें । उत्तर हेंचि साचें । शरण आलें त्याचें । तुका म्हणे सांभाळा ॥ ४ ॥ [२७९३]

ऐसा तंव मोळा । तुमचा नसेल गोपाळा ॥ १ ॥ मागत्याची टाळाटाळी । झिंज्या ओढोनि कपाळीं ॥ २ ॥ नसेल ना नवें । ऐसें धरियेलें देवें ॥ ३ ॥ तुका म्हणे झाला । उशीर नाहीं तो विठ्ठला ॥ ४ ॥ [२७९४]

प्रत्येक ठिकाणीं आमच्याशीं अंतर ठेवून तुम्ही फार दिवस दम धरून बसूं नका) २. जें हिशोबानें येतें तेंच बरोबर असतें, त्या ठिकाणीं कांहीं शक्ति चालत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी आतां सर्व कांहीं गोष्टींचा निकाल होण्याकरितां संसाराचा त्याग करून राहिलों आहें ४. [२७९०]

आतां ह्या ठिकाणापासून (तुमच्याशीं चालू असलेल्या भांडणांत) खरोखर आम्हांला माघारी फिरतां येत नाहीं १. त्या निमित्तानें आम्हीं देह बळिदान दिला आहे म्हणून आमची फजिती जशी होईल तशी होवो २. हे देवा, आम्हीं जीव समर्पण करून तुमच्याशीं योग केला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां लंड (हरामी) कोण आहे, ह्याचा निकाल चौघांमध्यें करूं ४. [२७९१]

अहो देवा, उगीच कां तंटा वाढवितां ? घरच्या घरीं माझी समजूत काढा; अहो, तुम्ही थोड्याचें फार करून केवढा गुंताडा केला आहे ? १. मीं जर तुमच्या पायांवर मस्तक टेवलें, तर तुमचें त्यांत कांहीं खर्च होईल काय ? आणि त्यापासून उभयतां एकमेकांच्या उपकारांपासून उत्तीर्ण होऊं २. असा निकाल करणें तुमच्या आमच्या स्वाधीन असून अपयशी कां व्हावें ? ही माझ्या मनांतली गांठ जशी होती, ती सोडून तुमच्यापुढें टेविली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपसांमधील बखेड्याचा निकाल झाल्यानें चांगलें होतें. मला फक्त तुमच्या दर्शनाची गरज आहे, त्या योगानेंच प्रीति वाढेल ४. [२७९२]

तुमच्या समोर बोलण्यासारखां मी कांहीं सभाधीट नाहीं. ह्या ठिकाणीं दुसरें कोणी नसून तुम्ही एकटे आहांत असें पाहून मी बोलत आहें १. हे नारायणा, आतां तुमचें व माझें कर्तव्य तुम्हीच समजलें पाहिजे; आणि इतक्यावर जशी तुम्हांला दया येईल, तसें करावयाचें पाहा २. माझ्या बुद्धींत कांहीं येईल म्हणून शुद्धि धरावयास गेलों तर ती शुद्धीवर येत नाहीं. आतां माझी शक्ति कधीं चालेल आणि तुम्हांकडून निकाल कोणत्या जन्मांत मिळेल हें समजत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी तुम्हांला शरण आलों आहें, आतां त्याविषयींचें रक्षण करणें (मला पदरांत घेणें) आपणांकडे आहे. हें माझें शेवटचें भाषण खरें आहे ४. [२७९३]

हे गोपाळा, (ध्रुवपदांत दर्शविल्याप्रमाणें) तशी तर तुमची राहाटी नसेल ? १. कोणी याचक कांहीं मागावयास आला, म्हणजे डोकें दुखण्याच्या निमित्तानें कपाळावर केश ओढून (शेकत बसावें, किंवा निजून राहावें) आणि त्याची टाळाटाळी करावी ! २. हे देवा, आपण अशी कांहीं नवीन रीत धरली नसेल ना ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठ्ठला, दान देण्यास तुमच्याकडुन न होणारा (कधीं नव्हे तो) उशीर झाला ४. [२७९४]

माझ्या कपाळाच्या गुणें । किंवा सरलेंसे नेणें ॥ २ ॥ न ये वचन बाहेरी । उभें तिष्ठतसें दारीं ॥ २ ॥ काय सांगावयास वेंचे । रितें आरंभीं ठायींचें ॥ ३ ॥ तुका म्हणे किती । भीड धरावी पुढती ॥ ४ ॥ [२७९५]

कांहीं एक तरी असावा आधार । कासयानें धीर उपजावा ॥ १ ॥ म्हणविलिया साठीं कैसें पडे रुजू । धनी नाहीं उजू सन्मुख तो ॥ २ ॥ वेंचल्या दिसांचा कोणावरी लेखा । घालावा हा सुखासुखें आम्हीं ॥ ३ ॥ नाहीं मनोगत तोंवरि हे देवा । तुका म्हणे सेवा नेघीजे (ने घेजे, न घेजे) तों ॥ ४ ॥ [२७९६]

मनाचिये साक्षी जाली सांगों मात । सकळ वृत्तांत आपला तो ॥ १ ॥ तुम्हां परामर्ष घेतां सत्ताबळें । धरितां निराळें कैसीं वांचों ॥ २ ॥ मी माझें सांडून यावया पसारा । आणिक दातारा काय काज ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही तुजविण एका । निढळ लौकिका माजी असों ॥४॥ [२७९७]

घालूनि लोळणी पडिलों अंगणीं । सिंचा सिंचवणी तीर्थ वरी ॥ १ ॥ वोल्हावेल तनु होईल शीतळ । जाली हळहळ बहु तापें ॥ २ ॥ पावेन या ठाया कई जालें होतें ' आलों अवचितें उष्ट्यावरि ॥ ३ ॥ तुका म्हणे कोणी जाणवा राउळीं । येईल जवळी पांडुरंग ॥ १ ॥ [२७९८]

तरी भलें वायां गेलों । जन्मा आलों मागुता ॥ १ ॥ म्हणऊनि ठेलों दास । सावकाश निर्भयें ॥ २ ॥ उणें पुरें काय माझें । त्याचें ओझें तुम्हांसी ॥ ३ ॥ सांभाळावें तें म्यां काई । अवो आई विठ्ठले ॥ ४ ॥ भोग (भाग्य, भागें) जया जाइन स्थळा । तुज गोपाळा विसरेंना ॥ ५ ॥ आपलें म्यां एकसरें । करूनि बरें घेतलें ॥ ६ ॥ तुका म्हणे नारायणा । आतां जाणा आपुलें ॥ ७ ॥ [२७९९]

हा माझ्या प्रारब्धाचा गुण आहे किंवा तुमच्या घरचें सर्व संपलें हें समजत नाहीं १. मी दारांत तिष्ठत उभा राहिलों आहें आणि तुमच्याकडून कांहींच उत्तर बाहेर येत नाहीं २. प्रथमच फुकटचें उत्तर देण्यांत तुमचा काय खर्च होतो ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां तुमची भीड वरचेवर किती म्हणून धरावी ? ४. [२७९५]

हे देवा, तुमच्याकडून आम्हांला (आमच्या-मनुष्याच्या जीवनाला) थोडातरी आश्रय असावा. नाहीं तर कशानें धीर उत्पन्न होईल ? १. किती बोललें तरी जर धनी सन्मुख नसतील, तर तें रुजू कसें होईल ? २. गेलेल्या दिवसांचें नुकसान कोणाच्या मस्तकावर आम्हीं सुखासुखीं घालावें ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, जोंपर्यंत तुमच्या मनामध्यें नाहीं, तोंपर्यंत तुम्ही आमची सेवा घेणार नाहीं हें निश्चित ४. [२७९६]

मनोवृत्तीच्या साक्षित्वाची स्थिति प्राप्त झाली. हा सर्व आमच्या झालेल्या स्थितीचा (ज्या गोष्टीचा माझ्या मनाला अनुभव आला तो आपला) वृत्तांत मी सांगतों १. आपल्या सत्तेच्या बलानें तुम्ही आमचा समाचार घेतां, जर तुम्ही वेगळें धरलें, तर आम्ही कसे वांचूं (कसें जगावें बरें ?) २. हे दात्या देवा, देह मी व देहसंबंधीं माझें हा प्रापंचिक पसारा टाकून मीं तुझ्याकडे धांव घेतली, त्याचें कांहीं दुसरें कारण आहे काय ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझ्यावांचून आम्ही ह्या लोकाचारामध्यें (प्रपंचामध्यें कितीहि ऐश्वर्यवान असलों तरी तुझ्यावांचून) प्रारब्धहीन (दुर्दैवी) राहूं ४. [२७९७]

तुमच्यापुढें मी लोटांगण घालीत तुमच्या अंगणांत पडलों आहें. माझ्या अंगावर तुमच्या तीर्थाचें सिंचन करा (शिंपडा) १. त्या योगानें माझ्या शरीरास जो त्रिविधतापाच्या योगानें फार ताप झाला आहे, तो सर्व दूर होऊन तें शरीर शांत होईल २. ह्या ठिकाणीं प्राप्त होण्याचा असा योग कधीं आला होता काय ? मी अकस्मात् उच्छिष्टाकरितां येथें आलों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ही हकीगत कोणी श्रीहरीच्या मंदिरांत जाऊन पांडुरंगाला कळवा, म्हणजे तो माझ्या जवळ येईल ४. [२७९८]

पूर्वीचा माझा जन्म व्यर्थ गेला हें चांगलें झालें, म्हणून मी पुनः जन्माला आलों १. शांत व निर्भयपणानें मी हरीचा दास होऊन राहिलों २. माझें उण्यापुऱ्याचें ओझें तुम्हांला काय आहे ? ३. अगे विठ्ठले आई, मी कशाचा सांभाळ करावा ? ४. पूर्व पुण्यानें ज्या ठिकाणीं केलेल्या कर्मांचे भोग भोगावे लागतात, त्या ठिकाणीं मी जाईन; पण हे गोपाळा, तुला कधीं विसरणार नाहीं ५. एकदम मीं आपलें चांगलें (कल्याण) करून घेतलें ६. तुकाराम महाराज म्हणतात, आतां नारायणा, तुम्ही आपलें कर्तव्य काय असेल तें जाणा ७. [२७९९]

उरलें तें भक्तिसुख । डोळां मुख पहावें ॥ १ ॥ अंतरींचें कां हो नेणां । नारायणा माझिये ॥ २ ॥ पुरवा तैसी केली आळी । बळी जगदानिया ॥ ३ ॥ हातीं घेऊनि चोरा भातें । दावा रितें बाळका ॥ ४ ॥ साजत (साजतें) हें थोरपण । नाहीं दीनवत्सला ॥ ५ ॥ शाहणें तरी लाड दावी । बाळ जेवीं मातेसी ॥ ६ ॥ तुका म्हणे पांडुरंगा । ऐसें पैं गा आहे हें ॥ ७ ॥ [२८००]

धरूनियां (धरूनि हें) आलों जीवीं । भेटी व्हावी विठोसी ॥ १ ॥ संकल्प तो नाहीं दुजा । महाराजाविण तो ॥ २ ॥ पायांवरी ठेविन भाळ । येणें सकळ (समूळ) पावलें ॥ ३ ॥ तुका म्हणे डोळेभरी । पाहिन हरी श्रीमुख ॥ ४ ॥ [२८०१]

तुम्हां उद्धरणें फार । मज दुसरी नाहीं थार ॥ १ ॥ आतां जैसें तैसें सोसा । काय करणें हृषीकेशा ॥ २ ॥ बरें न दिसेल ओळी । एका अन्न एका गाळी ॥ ३ ॥ लावितां (तों) आभार । तुका विसरलेती फार ॥ ४ ॥ [२८०२]

न कळे जी भक्ति काय करूं सेवा । संकोचोनि देवा राहिलोंसें ॥ १ ॥ जोडोनियां कर राहिलों निवांत । पायांपाशीं चित्त ठेऊनियां ॥ २ ॥ दिशाभुली करीं स्थळीं प्रदक्षणा । भ्रमें नारायणा कष्टविलें ॥ ३ ॥ तुका म्हणे झालों आज्ञेचा पालक । जीवनासी एक ठाव केला ॥ ४ ॥ [२८०३]

एकविध वृत्ति न राहे अंतरीं । स्मरणींच हरी विस्मृति हे ॥ १ ॥ कैसा हा नवलाव वाटतो अनुभवें । मज माझ्या जीवें साक्षीत्वेंसी ॥ २ ॥ न राहे निश्चळ जागवितां मना । किती क्षणोंक्षणा (क्षणक्षणा) सांवरावें ॥ ३ ॥ तुका म्हणे बहु केले वेवसाव । तेणें रंगें जीव रंगलासे ॥ ४ ॥ [२८०४]

श्रीहरीचें मुख डोळ्यांनीं पाहावें, त्याच एका भक्तिसुखाची इच्छा राहिली आहे १. हे नारायणा, माझ्या अंतःकरणाची अशी स्थिति तुम्ही कां जाणत नाहीं ? २. हे बलाढ्य जगदात्म्या, जशी मीं इच्छा केली आहे, तशी ती तुम्ही माझी पुरवा ३. हातामध्यें खाऊ घेऊन तो लपवून ठेवतां व आम्हां बालकांना रिकामा हात दाखवितां ! ४. पण हे दीनवत्सला, तुम्हांला आपला हा कृपणाचा मोठेपणा शोभत नाहीं ५. हे पांडुरंगा, शहाणें मूल असलें तरी तें लाडानें आईस घांस घालावयास लावतें ६. तुकाराम महाराज म्हणतात, अगा देवा, अशा प्रकारचा हा प्रीतीचा प्रकार आहे ७. [२८००]

मला विठोबाची भेट व्हावी, हीच वासना जीवामध्यें (मनांत) धरून आलों आहें १. श्रीहरिमहाराजावांचून माझ्या हृदयांत दुसरा संकल्प (विचार) नाहीं २. देवा, तुमच्या पायांवर मी आपलें कपाळ ठेवीन. त्या योगानें सर्व कांहीं मला प्राप्त झालें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे हरि, मी तुझें श्रीमुख डोळ्यांचें समाधान होईपर्यंत पाहीन ४. [२८०१]

देवा, तुम्हांला पुष्कळांचा उद्धार कर्तव्य आहे, मला मात्र तुमच्यावांचून आश्रय नाहीं १. हे हृषीकेषा, आतां जसे आम्ही आहोंत, तसें, इतर भक्तांचें सहन केलें तसें, सहन करा. न करून काय कराल ? २. एका पंक्तीला सर्व कांहीं बसले आहेत, त्यांत एकाला अन्न वाढायचें व दुसऱ्याला न वाढावें, हें बरें दिसणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला तर तुम्ही फार विसरलां आणि तुम्ही तर मोठा उपकार केलासें दाखवितां ४. [२८०२]

हे देवा, तुमची भक्ति कशी करावी, हें मला कळत नाहीं म्हणून आतां सेवा कशी करूं, अशा संकोचानेंच स्वस्थ राहिलों आहें १. हात जोडून स्थिर होऊन राहिलों व तुमच्या पायांपाशीं चित्त ठेविलें २. दिशाभूल झाली म्हणजे मनुष्य जसा आपल्याभोंवतीं फिरतो, तसा मी आपल्या भोंवतींच फिरतों. हे नारायणा, अशा भ्रमानें मला कष्टविलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी तुमची आज्ञा पालन करणारा होऊन जगण्याला तूंच एक ठिकाण करून ठेवलें आहे ४. [२८०३]

हे हरि, अंतःकरणाची एकाग्रता न राहातां, जें तुमचें स्मरण करणें तें विस्मरण होय १. ह्या माझ्या सांगितलेल्या अनुभवाचें मला कसें नवल वाटत आहे, ह्याविषयीं माझा जीवच साक्षी आहे २. ह्या मनाला विचारानें जागृति देण्याचा यत्न किती जरी करूं लागलों, तरी तें निश्चल राहात नाहीं. अशा ह्या मनास क्षणोक्षण किती आंवरावें ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आजपर्यंत पुष्कळ व्यवहार (प्रपंचाचे उद्योग) केले. त्याच रंगानें माझा जीव रंगला आहे, परंतु पुष्कळ दिवस केलेल्या भक्तीचे संस्कार मनावर होतच नाहींत (ह्याचें आश्चर्य वाटतें) ४. [२८०४]

आतां सोडवणें न या नारायणा । तरि मी वांचेना काळा हातीं ॥ १ ॥ ऐसें सांगोनियां झालों उतराई । आणीक तें काई माझे हातीं ॥ २ ॥ केलियाचें माप न ये शेवटाशीं । करितील नाशी अंतराय ॥ ३ ॥ तुका म्हणे भय वाटतसे जीवा । धांवणिया धांवा लवकरी ॥ ४ ॥ [२८०५]

सत्या (सत्य) माप वाढे । गाबाळाची चाली खोडे ॥ १ ॥ उतरे तें कळे कसीं । विखरोन सर्वदेशीं ॥ २ ॥ घरामध्यें राजा । नव्हे व्हावी पाटपूजा (नोहे व्हावी पट्टपूजा) ॥ ३ ॥ तुका म्हणे साचें । रूप तें दर्पणाचें (रूप तेंचि दर्पणींचें) ॥ ४ ॥ [२८०६]

नाहीं खंड झाला । माझा तुमचा विठ्ठला ॥ १ ॥ कैसें कैसें हो दुश्चित । आहे चौघांपाशीं नीत ॥ २ ॥ मुळींचें लिहिलें । मज आतां सांपडलें ॥ ३ ॥ तुका म्हणे मज । न लगे बोलणें सहज ॥ ४ ॥ [२८०७]

होचि वादकाची कळा । नाहीं येऊं देत बळा ॥ १ ॥ धीर करावा करावा । तरी तो आहे आम्हां देवा ॥ २ ॥ रिघावें पोटांत । पायां पडोन घ्यावा अंत ॥ ३ ॥ तुका म्हणे वरि । गोडा आणावा उत्तरीं ॥ ४ ॥ [२८०८]

एक परी बहिरें बरें । परि तीं ढोरें ग्यानगंडें ॥ १ ॥ कपाळासी लागली आगी । अभागी कां जीतसे ॥ २ ॥ एकें परि बरें वेडें । तर्की कुडें जळो तें ॥ ३ ॥ तुका म्हणे खातडवासी । अमृतासी नोळखे ॥ ४ ॥ [२८०९]

खेळों मनासवें जीवाच्या संवादें । कौतुकें विनोदें निरंजनीं ॥ १ ॥ पचीं पडिलें तें

हे नारायणा, ह्या प्रपंचांतून आतां जर तुम्ही मुक्तता करण्याकरितां आलां नाहीं, तर मी खरोखर ह्या काळाच्या तडाख्यांतून वांचणार नाहीं १. अशा प्रकारची स्थिति सांगणें, हें मी आपलें कर्तव्य बजावून उत्तीर्ण झालों. ह्यापेक्षां दुसरें माझ्या हातांत काय आहे? २. मीं जो कांहीं परमार्थ केला आहे, तो कडेला लागेल असें वाटत नाहीं, कारण त्याचा नाश करतील असे अनेक घातक विचार मनांत येत आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणून माझ्या जीवास भय वाटत आहे, ह्यास्तव माझें कार्य करण्याकरितां लवकर धांव घे ४. [२८०५]

सत्याची संख्या वाढते, आणि असार असत्याची गति कुंठित होते (फैलाव होत नाहीं.) १. जें खरोखर कसाला उतरतें (म्ह० परीक्षेंत चांगलें असें ठरतें) त्याच मालाचा सर्व देशभर प्रसार होतो २. घरांत बसून मी राजा आहें असें म्हणण्यानें खरोखर राजा होत नाहीं, तर त्याला खरोखरच राज्याभिषेक झाला पाहिजे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आरशांतील प्रतिबिंब खरें नसून ज्या वस्तूचें प्रतिबिंब दिसतें ती बिंबभूत वस्तु खरी असते. सारांश, सत्याला किंमत आहे, असत्याला किंमत नाहीं ४. [२८०६]

हे विठ्ठला, तुमचा आमचा विभाग झाला नाहीं (तुमच्या आमच्यांत वांटणी झाली नाहीं, तुम्ही आम्ही एक आहोंत) १. असें असतांना आमच्याविषयीं तुम्ही कसे उदास आहांत? पण ह्या संबंधाचा चार चौघांत न्याय आहे (न्याय-नीति जाणणारे संत ह्याचा निवाडा करतील) २. तुमच्या आमच्या मूळच्या संबंधांचा आतां मला वेदांतला लेख सांपडला आहे (त्यांत स्पष्टच म्हटलें आहे कीं 'तत्त्वमसि'-तूं विठ्ठल आहेस) ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां साहाजिकच मला बोलावयास नको ४. [२८०७]

खऱ्या वाद करणाराचें चातुर्य हें आहे, कीं तो आपल्या प्रतिपक्षी वादकास विशेष क्षोभूं (राग आणून मारामारीपर्यंत येऊं) देत नाहीं १. हे देवा, सर्व ठिकाणीं जो धीर धरावयास पाहिजे, तो आमचेजवळ आहे २. आपण ज्याच्याशीं वाद करीत आहों, त्याच्या पोटांत शिरून त्याचें खरें खरें हृदय काय आहे, हेंहि समजून घ्यावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या मधुर भाषणानें त्या वाद करणाराला खुलवावा (वाद विकोपाला जाऊं देऊं नये) ४. [२८०८]

एका दृष्टीनें बहिरें, मुकें असणें हें बरें, पण ते अन्हा सन्हा वागणारे ज्ञानी गुरें आहेत १. ज्याच्या सुदैवाला आग लागली आहे, अशा प्रकारचा अभागी कशाकरितां जगला आहे? २. एका दृष्टीनें वेडें असणें हें बरें, पण अनेक प्रकारचे वेद-देव-संत ह्यांविषयीं तर्ककुतर्क करणारीं वाईट माणसें जळोत (तीं फार वाईट) ३. तुकाराम महाराज म्हणतात, एखाद्या उकिरड्यांत वास्तव्य करणाऱ्यास अमृताची चव कळत नाहीं ४. [२८०९]

एकांतामध्यें कौतुकानें मनोवृत्तीबरोबर संवाद करण्याची क्रीडा करूं १. जो रस पचनीं पडला आहे, तोच वेळोवेळीं

रुचे वेळोवेळां । होतसे डोहळा आवडीसी ॥ २ ॥ एकांताचें सुख जडलें जिव्हारीं । वीट परिचारीं बरा आला ॥ ३ ॥ जगा ऐसी बुद्धि नव्हे आतां कदा । लंपट गोविंदा जालों पायीं ॥ ४ ॥ आणीक ते चिंता न लगे करावी । नित्य नित्य नवी आवडी हे ॥ ५ ॥ तुका म्हणे धडा राहिला पडोन । पांडुरंगीं मन विसांवलें ॥ ६ ॥ [२८१०]

उचिताचा काळ । साधावया युक्तिबळ । आपलें सकळ । तें प्रसंगीं पाहिजे ॥ १ ॥ नेम नाहीं लाभ हानि । अवचित घडती दोनी । विचारूनि मनीं । पाहिजे तें प्रयोजावें ॥ २ ॥ जाळा जाळा काळें । करपों नेदावें आगळें । जेवितां वेगळें । ज्याचें त्याचें तेथें शोभे ॥ ३ ॥ पाळी नांगर पाभारीं । तन निवडूनि सोंकरी । तुका म्हणे धरी । सेज जमा शेवटीं ॥ ४ ॥ [२८११]

पडिलिया ताळा । मग अवघाचि निर्वाळा । तेथें कोणी बळा । नाहीं येत कोणासी ॥ १ ॥ जोडिलें तें लागे हातीं । आपआपली निश्चिंती । हर्ष आणि खंती । तेथें दोनी नासलीं ॥ २ ॥ सहज सरलिया कारण । मग एकला आपण । दिसे तरी भिन्न । वचनाचा प्रसंग ॥ ३ ॥ करूनि झाडा पाडा । तुका वेगळा लिगाडा । निश्चिंतीच्या गोडा । गोष्टी म्हूण लागती ॥ ४ ॥ [२८१२]

जो वितो तो माझा पिता । उखता तो उखत्यांचा ॥ १ ॥ जनार्दनीं सरती कर्मे । बाधा भ्रमें अन्यत्र ॥ २ ॥ अपसव्य सव्यामधीं । ऐसी शुद्धि न धरितां ॥ ३ ॥ तुका म्हणे खांद्या पानें । सिंचतां भिन्न कोरडीं ॥ ४ ॥ [२८१३]

रुचकर होतो व त्याच्याच सेवनाची प्रीति उत्पन्न होते २. एकांतसेवनाचें सुख जीवाच्या ठिकाणीं जडलें आहे व लोकव्यवहाराचा वीट आला हें चांगलें झालें ३. जगाप्रमाणें (चारचौघां लोकांप्रमाणें) संसार करण्याची आतां आमची बुद्धि केव्हांहि होणार नाहीं, कारण आम्ही गोविंदाच्या चरणीं लंपट (आसक्त) होऊन गेलों ४. आणखी कोणतीहि काळजी करण्याचें कारण नाहीं. श्रीहरिविषयींची नित्य नवी आवड उत्पन्न होत आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा ओघच पडून गेला, (मनाला असें वळणच पडून गेलें) त्या योगानें माझें मन पांडुरंगाच्या ठिकाणीं विश्रांतीला पावलें ६. [२८१०]

योग्य असलेला काल साध्य करून घेण्याचे प्रसंगीं, आपल्या ठिकाणीं युक्तिबळ हें सर्व पाहिजे आहे १. कारण लाभ अथवा हानि हीं कोणत्या समयीं होतील ह्याचा नेम नाहीं. तीं अकस्मात होतात, म्हणून त्या विषयींचा विचार करून ज्या वेळीं जें पाहिजे त्याची योजना करावी २. अन्नीस धान्य शिजवितेवेळीं जाळ लाविला पाहिजे; तेंच शिजल्यावर जास्त जाळ लावून करपूं देऊं नये आणि जातिधर्माप्रमाणें वेगवेगळें जेवण्यांत ज्याचें जें आहे तेंच त्याला शोभा देतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जमीन नांगरून पाळ्या घालाव्या व नंतर त्या ठिकाणीं पेरणी करावी, तें धान्य उगवून आल्यावर त्यांतलें गवत काढून पिकाचें रक्षण करावें आणि अखेरीस तें जमा करून घरीं नेऊन सांठवून ठेवावें (तात्पर्य, योग्य वेळीं, योग्य धोरणानें, योग्य प्रयत्न केल्याशिवाय खरा लाभ होत नाहीं) ४. [२८११]

स्वस्वरूपज्ञानाचा (सर्वत्र आत्मा भरलेला आहे अशा अनुभवाचा) मेळ बसण्यानें मग सर्व कांहीं शुद्ध होत आहे; त्या ठिकाणीं कोणी कोणास दुराग्रह (विरोध) करीत नाहीं १. जें प्राप्त करून घेतलें आहे, तें हस्तगत होतें. त्या योगानें आपापली काळजी दूर होते. मग तेथें हर्ष आणि शोक ह्या दोहोंचा नाश होतो २. सहजीं कारण संपल्यावर मग तो स्वरूपाच्या ठिकाणीं एकटाच राहातो आणि जे कांहीं त्यास बोलण्याचे प्रसंग येतात, ते तरी इतरांहून वेगळे दिसतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी सर्व कर्मांची झाडणी करून, लचांडाच्या (उपाधीच्या) वेगळा राहिलों आहें, म्हणून समाधानाच्या गोष्टी गोड लागत आहेत ४. [२८१२]

जो हें विश्व उत्पन्न करतो, तोच माझा बाप आहे आणि सर्वांचाहि तोच आहे १. त्या जनार्दनाच्या ठिकाणीं अनेक कर्में अर्पण केलीं असतां, सरतीं (मोक्षाला कारण) होतात. नाहींपेक्षां ती वेगळ्या (ऐहिक-पारलौकिक फलाच्या) भ्रमानें बाधक होतात २. सव्य अथवा अपसव्य अशी आठवण न धरितां, देवास कर्में अर्पण करावीं (मनुष्यानें अविचारानें व अजाणतेपणानें कर्में केलीं म्हणजे श्राद्धांत देवासाठीं यज्ञोपवीताचें जें सव्य करावयाचें तें त्याऐवजीं अपसव्य होतें, त्याप्रमाणें जनार्दनाला अर्पण करण्याऐवजीं तें मायिक फलाच्या उद्देशानें केलें म्हणजे बंधनाला कारण होतें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसें वृक्षाच्या मुळाला पाणी न घालतां, फांद्यांस व पानांस घातलें असतां, वृक्ष वाळून जातो (तसें एक मुख्य देवावांचून सर्व निरर्थक आहे) ४. [२८१३]

माउलीची चाली लेंकराचे ओढी । तयालागीं काढी प्राण प्रीति ॥ १ ॥ ऐसी बळिवंत आवडी जी देवा । संतमहानुभावा विनवितों ॥ २ ॥ मोहें मोहियेलें सर्वकाळ चित्त । विरूरु तो देत नाहीं क्षण ॥ ३ ॥ तुका म्हणे दिला प्रेमाचा वोरस । सांभाळिले दास आपुले ते ॥ ४ ॥ [२८१४]

केवढा तो अहंकार । माझा तुम्हां नव्हे दूर ॥ १ ॥ आतां कोण पडे पायां । तुमच्या अहो पंढरिराया ॥ २ ॥ कां जी कृपेनें कृपण । वेंचतसें ऐसें धन ॥ ३ ॥ तुका म्हणे देवें । दुजियाचें पोतें न्यावें ॥ ४ ॥ [२८१५]

अपराधी म्हणोनि येतों काकुलती । नाहीं तरी होती काय चाड ॥ १ ॥ येईल तारूं तरी तारी जो जी देवा । नाहीं तरी सेवा घ्यावी भार ॥ २ ॥ कासया मी आतां वंचूं हें शरीर । आहें बारगीर जाईजणें ॥ ३ ॥ तुका म्हणे मन करूनि मोकळें । आहे साळेंढाळें उदार तें (आहे साळेंढाळें उदार मी) ॥ ४ ॥ [२८१६]

माझें तों फुकाचे काय वेंचे कष्ट । नव्हें क्रियानष्ट तुम्हां ऐसा ॥ १ ॥ कांहींच न वंचीं आजींच्या प्रसंगीं । सकळाही अंगीं करीन पूजा ॥ २ ॥ द्यावें तुम्हीं कांहीं हे तों नाहीं आस । असों या उदास देहभावें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी मावळली खंती । समाधान चित्तीं सर्वकाळ ॥ ४ ॥ [२८१७]

स्वामीचिया सत्ता । आधीं वर्म येतें (वर्में येती) हाता । पुढती विशेषता । लाभें लाभ आगळा ॥ १ ॥ करीं कवतुकाचे बोल । परि जिव्हाळ्याची ओल । आवडे रसाळ । मायबापा लाडाचें ॥ २ ॥ मन मिळविलें मना । नाहीं अभावी शहाणा । अंतरींच्या खुणा । वरि दिल्या उमटोनि ॥ ३ ॥

आईच्या सर्व वागणुकीस बालकाची ओढ असते. त्याच्याकरितां आपल्या प्रीतीनें ती प्राण सुद्धां खर्चीं घालते १. अहो संतमहानुभाव देवा, अशा प्रकारची तुमची प्रीति बलवान् आहे, म्हणून मी तुम्हांला विनंति करतों २. त्या बालकाच्या मोहानें आईचें चित्त सर्व काळ मोहित झालेलें असतें, म्हणून ती त्यास क्षणभर देखील विसरत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हीं सेवकांना त्याप्रमाणें प्रेमाचा स्नेहभरित पान्हा देऊन त्यांचा सांभाळ केला ४. [२८१४]

हे देवा, माझ्या ठिकाणीं केवढासा अहंकार आहे ! आणि तो तुमच्यानें दूर होत नाहीं १. अहो पंढरिराया, आतां देव म्हणून तुमच्या कोण पायां पडणार ? २. अहो देवा, कृपा करण्याविषयीं तुम्ही कृपण कां झालांत ? त्यापासून तुमच्या पदरचें कांहीं खर्चतें काय ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्या ठिकाणीं जो भेदभाव आहे, तो देवांनीं नाहींसा करावा ४. [२८१५]

आमच्या ठिकाणीं अनंत जन्मांचे पुष्कळ अपराध आहेत. त्याकरितां तुम्हांला काकुळती येतों, नाहींपेक्षां आम्हांला काय गरज होती ! १. हे देवा, तुम्हांला उद्धार करण्यास येत असेल, तर आमचा उद्धार करा. नाहींपेक्षां आमच्या सेवेचा भार तुमच्या मस्तकीं असूं द्या २. मी आपल्या शरीराचा कशाकरितां त्याग करूं ? कारण हें शरीर चार दिवस दुसऱ्याचें (पंचमहाभूतांचें) मागून आणलेलें ! त्याचें त्याला द्यावें लागेल, म्हणून आहे तोंवर राबवून घ्यावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या क्षणिक शरीरानें तुझी सेवा करावी म्हणून मी आपलें मन मोकळें करून, हट्ट न करितां, तुझ्यामध्यें मिळून मी उदारपणें राहिलों आहें ४. [२८१६]

हे देवा, माझे तर कष्ट फुकटचे आहेत (माझी सेवा फुकटची आहे), ते करण्यास माझेकडून हयगय नाहीं, पण तुमच्यासारखा क्रियानष्ट मी होणार नाहीं १. आजच्या समयाला कोणत्याच प्रकारची वंचना (सेवेमध्यें चुकारपणा) करणार नाहीं. सर्वांगानें तुमची पूजा करीन २. तुम्हीं (सेवेच्या मोबदल्यांत) कांहींतरी द्यावें, अशी कांहीं मला आशा नाहीं, कारण मी आपल्या देहावर उदास झालों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी सर्व काळजी नाहींशी झाली, म्हणून चित्तामध्यें सर्व काळ समाधान झालें आहे ४. [२८१७]

स्वामीच्या सत्तेनें अगोदर सर्व (प्रेमलक्षण भक्तीचें) मर्म हस्तगत होतें, नंतर विवेक–वैराग्याच्या लाभानें साक्षात्कारासारख्या विशेष लाभाची प्राप्ति होते १. मी लाडानें भाषण करीत आहें, पण त्यामध्यें खऱ्या जिव्हाळ्याचा ओलावा असून तें रसभरित आहे, म्हणून तें लाडाचें बोलणें मायबापास आवडतें २. मी अभाविक शहाणा नसून स्वामीच्या मनाशीं मीं आपलें मन मिळविलें आहे, त्या योगानें त्याच्या अंतःकरणांतील खुणा मीं बाहेर प्रगट करून

पराश्रमें काळा। अवघ्या जागविल्या वेळा। देवासी निराळा। तुका क्षण न सोडी ॥ ४ ॥ [२८१८]

एके ठायीं अन्नपाणी । ग्रासोग्रासीं चिंतनीं ॥ १ ॥ वेळोवेळां जागवितों । दुजें येईल म्हूण भीतों ॥ २ ॥ नाहीं गुंतत उपचारीं। मानदंभाचे वेव्हारीं ॥ ३ ॥ तुका जालासे शाहणा। आड लपे नारायणा ॥ ४ ॥ [२८१९]

वैरागरापाशीं रत्नाचिया खाणी। हेचि घ्यावी धणी फावेल तों ॥ १ ॥ येथें नाहीं तर्कवितर्काची चाड। होतसे निवाड खऱ्याखोट्यां ॥ २ ॥ उगाच सारावा वाढिला तो ठाव। वाढितिया भाव कळतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे नव्हे टांचणीचें पाणी । येथें झरवणी जैशा तैसें ॥ ४ ॥ [२८२०]

समर्थ या नांवें दीनांचा कृपाळ । हें तंव सकळ स्वामीअंगीं ॥ १ ॥ मज काय लागे करणें विनवणी। विदित चरणीं सकळ आहे ॥ २ ॥ दयासिंधु तुम्हां भांडवल दया। सिंचावें आतां या कृपामृतें ॥ ३ ॥ तुका म्हणे अहो पंढरीनिवासे। बहु जीव आसे लागलासे ॥ ४ ॥ [२८२१]

लेखिलें कवित्व माझे सहज बोल । न लगेचि ओल जिव्हाळ्याची ॥ १ ॥ न येचि उत्तर कांहीं परतोनि । झालों नारायणीं न सरतें ॥ २ ॥ लाजिरवाणी कां वदली हे वाचा । नव्हेच ठायींचा मननशीळ ॥ ३ ॥ तुका म्हणे फळ नव्हेचि सायासा। पंढरीनिवासा काय झालें ॥ ४ ॥ [२८२२]

येणें झाला तुझे पोतडीचा झाडा। केलासी उघडा पांडुरंगा ॥ १ ॥ भरूनियां घरीं राहिलों वाखती। आपुली निश्चिंती आपुल्यापें ॥ २ ॥ आतां काय उरी उरली ते सांगा। आणिलेति जगाचिये साक्षी

दाखविल्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, मोठ्या श्रमानें सर्व काळ (प्रत्येक प्रसंगीं) मीं मन जागृत ठेवलें आहे, आतां देवाला सोडून मी क्षणभर देखील वेगळा होणार नाहीं ४. [२८१८]

एका ठिकाणीं चित्तवृत्ति ठेवून घासाघासाच्या ठिकाणीं देवाचें चिंतन करून अन्नपाणी सेवन करतों १. वरचेवर चित्त जागृत ठेवतों, कारण ह्या ठिकाणीं एखादा द्वैतभाव (हरीवांचून दुसरा विक्षेप) येईल म्हणून भय वाटतें २. मानदंभासंबंधीं अनेक उपचारांच्या व्यवहारांत मी गुंतत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी शहाणा होऊन नारायणाच्या स्वरूपीं लपून बसलों आहें (त्यामुळें जग मला व मी जगाला पाहूं शकत नाहीं) ४. [२८१९]

वैरागर ह्या नांवाचा मणि जेथें सांपडतो तेथें अनेक रत्नांच्या खाणी असतात, कारण वैरागर मणि वाळूच्या खड्यांना आपल्या स्पर्शानें रत्न करतो, म्हणून तो प्राप्त झाल्यावर त्या ठिकाणीं आपली रत्नांची इच्छा पूर्ण करून घ्यावी १. असा लाभ होईल त्या ठिकाणीं तर्कानें विशेष तर्क वाढविण्याची गरज नाहीं, कारण तेथें खऱ्या-खोट्याचा निवाडा सहज होतो २. ज्या ठिकाणीं भोजनसमारंभांत पात्र वाढलें आहे, तेथें बसून त्याचें निवांत सेवन करावें. कोणाची इच्छा काय आहे, हें वाढणारास समजतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं कांहीं पाण्यास तोटा नाहीं, कारण मूळचा जसा झरा लागला आहे, तसा तो सर्व ऋतूंत वाहात आहे ४. [२८२०]

हे देवा, जो दीनांवर कृपा करतो, त्यालाच समर्थ म्हणावें. हीं सर्व लक्षणें स्वामीच्या-पंढरीनाथाच्या-अंगीं आहेत १. मी दीन आहें असें आपल्यास माहीत आहे, मग मला विनंति करण्याचें काय कारण आहे ? २. अहो दयासिंधु, दीनांवर दया करावी हें तुमचें मुख्य भांडवल आहे, ह्याकरितां मज दीनावर आतां कृपामृताचें सिंचन करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो पंढरींत वास्तव्य करणाऱ्या देवा, तुम्ही माझी आशा पूर्ण कराल, म्हणून माझा जीव तिकडेच फार लागला आहे ४. [२८२१]

हे देवा, माझें जें सहज बोलणें होत आहे तेंच कवित्व आहे, असें जरी मानलें, तरी त्यांत प्रेमाच्या जिव्हाळ्याचा ओलावा नाहीं १. कारण मी जें बोलतों त्यास तुमचेकडून प्रत्युत्तर मिळत नाहीं, म्हणून तुमचे ठिकाणीं मी मान्य झालों नाहीं असें वाटतें २. माझी वाणी जें बोलली आहे ती लाजिरवाणी झाली असें दिसतें, कारण मी कांहीं मूळचा हरीचें चिंतन करणारा मननशील भक्त नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो पंढरीनिवासा, मीं जे कांहीं काव्यरचनेचे श्रम केले, ते अजून फलद्रूप होत नाहींत असें कां झालें ? ४. [२८२२]

हे पांडुरंगा, तुला कोणीं लुटिलें असावें. ह्या योगानें तुझ्या पोत्यांतील सर्व भांडवल संपलें असें वाटतें १. तें हें भांडवल मी आपल्या हृदयरूपी खोलींत भरून घरीं राहिलों आहें; आतां त्या योगानें आम्ही आपल्यापुरते चिंतारहित

॥ ३ ॥ तुका म्हणे कोठें पाहों जासी आतां । माझी झाली सत्ता तुम्हांवरी ॥ ४ ॥ [२८२३]

तुमच्या पाळणा ओढतसे मन । गेलों विसरोन आपणासि ॥ १ ॥ लागेल पालटें फेडावें उसणें । येणेंचि प्रमाणें पांडुरंगा ॥ २ ॥ तुमचे आवडी संबंधाचा त्याग । घेतलासे लाग जगनिंदेचा ॥ ३ ॥ तुका म्हणे जैसा माझा जीव ओढे । तैसेंच तिकडे पाहिजेल ॥ ४ ॥ [२८२४]

नाहीं मज कोणी उरला दुर्जन । मायबापाविण ब्रह्मांडांत ॥ १ ॥ कासया जिकीर करणें येविसीं । भयाची मानसीं चिंता खंती ॥ २ ॥ विश्वंभराचिये लागलों सांभाळीं । सत्तेनें ते चाली आपुलिया ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें पाळणपोषण । करितां आपण पांडुरंगा ॥ ४ ॥ [२८२५]

मज कांहीं सीण न व्हावा यासाठीं । कृपा तुम्हां पोटीं उपजली ॥ १ ॥ होतें तैसें केलें आपलें उचित । शिकविलें हित बहु बरें ॥ २ ॥ आम्ही न मानावी कोणाची आशंका । तुम्हां भय लोकां आहे मनीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां संचिताचा ठेवा । वोडवला घ्यावा जैसा तैसा ॥ ४ ॥ [२८२६]

कोणाचें चिंतन करूं ऐशा काळें । पायांचिया बळें कंठीतसें ॥ १ ॥ पाहातसें वाट येईं गा विठ्ठला । मज कां हा केला परदेश ॥ २ ॥ बहुतांचे सत्ते झालों कासाविस । जाय रात्र दिस वैरियांचा ॥ ३ ॥ तुका म्हणे बैसें मनाचिये मुळीं । तरीच हीं जाळीं उगवती ॥ ४ ॥ [२८२७]

कां जी तुम्ही ऐसे न व्हा (नव्हे) कृपावंत । निवे माझें चित्त ठायींच्या ठायीं ॥ १ ॥ कांहीं सम नये विषम अंतरा । शांतीचा तो बरा ऐसा योग ॥ २ ॥ दुःखी होतों पंचभूतांच्या विकारें ।

झालों आहों २. हें सर्व जगाच्या साक्षित्वास तूं आणलेंस. आतां अवशिष्ट काय राहिलें तें सांग. ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां तूं कोठें जाणार हें पाहूं बरें! कारण माझी सत्ता तुझ्यावर झाली आहे ४. [२८२३]

हे देवा, तुमचें रक्षण करण्याकडे माझें मन ओढत आहे त्याकरितां मी आपलेपणाला देखील विसरून गेलों आहें १. अहो पांडुरंगा, ह्याप्रमाणें माझ्या कर्तव्याचा (तुम्हांला पाळण्याचा) मोबदला म्हणून तुम्हीं आपला आपलेपणा टाकला पाहिजे (माझें रक्षण केलें पाहिजे), कारण उसन्याची फिटाफीट झालीच पाहिजे २. तुमची प्रीति मला आहे, म्हणून देहसंबंधाचा (आप्तेष्टांचा) मीं त्याग केला आणि त्या योगानें जगाच्या निंदेला पात्र झालों ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसा तुमच्याविषयीं माझा जीव ओढत आहे, त्याप्रमाणें तुमच्या जीवाची आम्हांकडे ओढ पाहिजे ४. [२८२४]

हे पांडुरंगा मायबापा, सर्व ब्रह्मांडामध्यें तुम्हीच भरलां आहांत असें मला दिसतें, म्हणून मला कोणी दुष्ट भासत नाहीं. १. ह्याविषयीं कांहीं जिकीर करणें नको, कारण मनांतील सर्व काळजी, चिंता नाहींशी झाल्यामुळें कोणाचें भय वाटत नाहीं २. विश्वाचें पालन करणारा जो देव त्याजकडून सांभाळला जाणारा असा मी झालों. त्या योगानें आपल्या सत्तेनें मी वागत आहें (माझें जीवन चाललें आहे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, माझें पालनपोषण तुम्हीच करतां ४. [२८२५]

हे देवा, मला कोणत्याहि प्रकारचे श्रम होऊं नयेत, ह्याकरितां तुमच्या हृदयीं कृपा उत्पन्न झालीच आहे १. तुम्हीं मला फार चांगल्या हिताचा बोध केलात. हें जसें तुमचें आजपर्यंत कर्तव्य होतें, तसेंच तें तुम्हीं योग्य केलेंत २. आम्ही कोणाचीहि भीति मानीत नाहीं, पण भक्तांचा उद्धार न केल्यास सर्व लोकांचें (लोकनिंदेचें) भय तुमच्या मनांत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां ज्याला जसा प्रारब्धाचा ठेवा प्राप्त झाला आहे, तसा त्यानें त्याचा उपभोग घ्यावा ४. [२८२६]

अशा काळाला (संकटप्रसंगीं) मी तुमच्यावांचून कोणाची आठवण करूं हें समजत नाहीं, म्हणून तुमच्या पायांच्या आधारानें कालक्रमणा करितों १. अगा विठ्ठला, तुझी मी वाट पाहात आहें, म्हणून लवकर यावें. ज्या ठिकाणीं तुझा योग नाहीं असल्या दूर देशांत मला कां टाकलेंस? २. कामक्रोधादि विकारांची सत्ता माझ्यावर फार आहे, त्या योगानें मी कासावीस झालों आहें. रात्र व दिवस हे वैऱ्यासारखे जात आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, तूं जर माझ्या मनाच्या बुडाशीं [अंतःकरणांत] वस्ती करशील तरच माझी ह्या प्रपंचाच्या जाळ्यांतून मुक्तता होईल ४. [२८२७]

अहो देवा, जागचे जागीं माझें चित्त स्थिर होईल, अशी कृपा तुम्ही कां करीत नाहीं? १. माझ्या अंतःकरणांत कांहीं सम-विषमभाव उत्पन्न न होतां शांतीची वस्ती होईल असला योग बरा २. पंचभूतादि विकारानें मी फार दुःखी

जडत्वें दातारें राखावीं तीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मोडा अहंकाराची मान । धरितों चरण म्हणऊनि ॥ ४ ॥ [२८२८]

मागत्यासी (ची) कोठें घडते निरास । लेंकरा उदास नाहीं होत ॥ १ ॥ कासया मी होऊं उतावीळ जीवीं । जाणता गोसावी सर्व आहे ॥ २ ॥ झाला तरी वेळ कवतुकासाठीं । निर्दया तों पोटीं उपजेना ॥ ३ ॥ तुका म्हणे त्यासी ठाऊकें उचित । होईल संकेत नेमियेला ॥ ४ ॥ [२८२९]

आरुषा वचनीं मातेची आवडी । म्हणवूनि तांतडी घेत नाहीं ॥ १ ॥ काय होईल माझें मांडिलें कवतुक । आदराची भूक रडारोवी ॥ २ ॥ लपोनियां करी चुकुर माउली । नाहीं होती केली निष्ठा सांडी ॥ ३ ॥ तुका म्हणे करी पारखीं वचनें । भेवउनि तान्हें आळवावें ॥ ४ ॥ [२८३०]

प्रीतीच्या भांडणा नाहीं शिरपाव । वचनाचेचि भाव निष्ठुरता ॥ १ ॥ जीणें तरि एका जीवें उभयतां । पुत्राचिया पिता दुखवे दुःखें ॥ २ ॥ काय जाणे तुटों मायेचें लिगाड । विषम तें आड उरों नेणे ॥ ३ ॥ तुका म्हणे मज करुणा उत्तरें । करितां विश्वंभरें (विश्वंभर) पाविजेल ॥ ४ ॥ [२८३१]

नको घालूं झांसां । मना उपाधि वोळसा ॥ १ ॥ जे जे वाहावे संकल्प । पुण्य तरी तेंचि पाप ॥ २ ॥ उपजतो भेव । होतो कासावीस जीव ॥ ३ ॥ तुका म्हणे पाहों । होईल तें निवांत साहों ॥ ४ ॥ [२८३२]

बीजीं फळाचा भरंवसा । जतन सिंचनासरिसा । चाळविलिया आशा । काकुलती ते नाड ॥ १ ॥ हा तों गडसंदीचा ठाव । पिकें पिकविला भाव । संकोचोनि जीव । दशा केली जतन ॥ २ ॥

होत आहें, कारण ते जडभावनेमध्यें अडकवून ठेवणारे दाते आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या देह-अहंकाराची अविद्यारूपी मान मोडा; ह्याकरितां मीं तुमचे पाय धरले आहेत ४. [२८२८]

देवाजवळ कोणी याचक गेला, तर त्याची कोठें निराशा होते काय? बालकाविषयीं आई मुळींच उदास होत नाहीं १. माझ्या अंतःकरणांतील सर्व प्रकार स्वामींना कळत आहेत, मग मला जीवाच्या ठिकाणीं (मनांत) उतावळेपणा करण्याचें काय कारण आहे? २. बाळकाचें समाधान करण्यास आईनें उशीर लाविला तरी तें करणें कौतुकाकरितां असतें, पण तिच्या पोटांत निष्ठुरता कधींहि उत्पन्न होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें भक्ताविषयीं जें योग्य कर्तव्य तें स्वामीला माहीत आहे, म्हणून तें कर्तव्य पार पाडण्याचा देवानें जो संकेत नेमला असेल तसें घडून येईल ४. [२८२९]

लाडक्या बालकाच्या बोबड्या भाषणाची आईला प्रीति असते म्हणून ती त्याला लवकर कडेवर घेत नाहीं १. त्या बालकानें रडावें ह्या प्रीतीची भूक आईस असते, त्याप्रमाणें देवांनीं माझें कौतुक मांडलें आहे काय? २. बालकाला चुकवून आई विनोदानें लपून बसते, पण निश्चयानें त्याची टाकसांड (हेळसांड) केली असें होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ती आई दुसऱ्या–परक्या–शब्दानें भयंकर ओरडून बालकाला भय दाखविते आणि तें भिऊन ओरडूं लागलें म्हणजे त्याला उचलून घेऊन गोड भाषणानें समजूत घालते ४. [२८३०]

पिता-पुत्रांच्या प्रीतीच्या भांडणांत कांहीं तथ्य नसून फक्त कठोर शब्दाचेच भाव दिसतात १. ते उभयतां पितापुत्र एक जीवानेंच असतात, कारण पुत्राला दुःख झालें असतां पिता दुःखी असतो २. असलें मायेचें लचांड तुटतें काय? कोण जाणे! त्यांच्यामध्यें विषमता (भेदभाव) उत्पन्न होतच नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी करुणेच्या शब्दानें हांका मारीत असतां, विश्वाचें पालन करणारा जो देव तो मला प्राप्त होईल ४. [२८३१]

हे मना, अनेक प्रापंचिक उपाधींच्या दुःखांत पडून मला दहशत घालूं नको १. तूं जो कांहीं प्रापंचिक देहादि उपाधींशीं एकरूप होऊन पुण्याचा संकल्प करशील तें तें सर्व पातकच होईल २. मग भय उत्पन्न होऊन जीव फार कासावीस होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां देवाच्या इच्छेप्रमाणें जें कांहीं होईल तें सहन करून निवांतपणें पाहूं ४. [२८३२]

जमिनींत बीजपेरणी करून त्यास पाणी घालून जतन केलें असतां, भरंवशानें फळ प्राप्त होईल; तसें न करितां फलाशेच्या इच्छेनें जे कींवकाकुळती येतात ते फसतात १. हें देहरूपी ठिकाण मोठ्या अडचणीचें आहे, पण ह्या ठिकाणीं जो भाव पिकवावा तो पिकतो असें असून संकोचित वृत्तीनें जे राहातात त्यांनीं जीवदशा जतन केली असें समजावें २.

माती घाली धनावरी । रांडा रोटा वरीवरी । सुखाचे सेजारीं । दुःख भ्रमें भोगीतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे दिशाभुली । झाल्या उफराटी चाली । निवाडाची बोली । अनुभवें साक्षीसी ॥ ४ ॥ [२८३३]

काय उरली ते करूं विनवणी । वेंचलों वचनीं पांडुरंगा ॥ १ ॥ अव्हेरलों आतां कैंचें नामरूप । आदर निरोप तरि तो नाहीं ॥ २ ॥ माझा मायबाप ये गेलों सलगी । तों हे तुम्हां जगीं सोयरिक ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां जोडोनियां हात । करीं दंडवत ठायींच्या ठायीं ॥ ४ ॥ [२८३४]

आवडी धरूनि करूं गेलों लाड । भक्ति प्रेमकोड न पुरेचि ॥ १ ॥ म्हणऊनि जीव ठेला आसावोनि । खेद होतो मनीं बहुसाल ॥ २ ॥ वेठीऐसें वाटे निर्फळ कारण । शीतळ होऊन खोडावलों ॥ ३ ॥ तुका म्हणे सरतें नव्हेचि पायांपें । बळ केलें पापें नव्हेचि भेटी ॥ ४ ॥ [२८३५]

प्रीतीचा तो कळवळा । जिव्हाळाचि वेगळा ॥ १ ॥ बहु नेदी रडों माता । दुश्चित होतां धीर नव्हे ॥ २ ॥ वरी वरी तोंडापुरतें । मोहोरीतें कळतसे ॥ ३ ॥ जाणोनियां नेणतां तुका । नव्हे लोकांसारिखा ॥ ४ ॥ [२८३६]

हा गे आतां हाचि लाहो । माझा अहो विठ्ठला ॥ १ ॥ दंडवत दंडवत । वेगळी मात न बोलें ॥ २ ॥ वेगळाल्या कोठें भागें । लाग लागें लावावा ॥ ३ ॥ तुका म्हणे केल्या जमा । वृत्ति तमा (वृत्ति क्षमा) भाजूनि ॥ ४ ॥ [२८३७]

तुम्हांसी न कळे सांगा काय एक । कासया संकल्प वागवूं मी ॥ १ ॥ आहे तेथें सत्ता ठेविलों स्थापूनि । प्रमाणेंचि वाणी वदे आज्ञा ॥ २ ॥ कृपा झाली मग न लगे अंगसंग । निजध्यासें रंग चढताहे

जसें जवळ असलेलें द्रव्य जमिनींत पुरून वर माती घालून रांडवे-विधवा बाईलेप्रमाणें पोट भरतात, तसें जवळ स्वस्वरूपाचें सुख असून अज्ञानाच्या भ्रमानें सांसारिक लोक दुःख भोगतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, एखाद्यास दिशाभूल झाली असतां तो उलट दिशेनें चालतो, त्याप्रमाणें हें माझें बोलणें निर्णयाचें असून स्वानुभवसाक्षित्वाचें आहे ४. [२८३३]

हे पांडुरंगा आजपर्यंत माझा बोलण्यांतच कालक्षेप झाला. आतां कोणती विनंति करावयाची उरली आहे ती करूं? १. माझा तुम्हीं अव्हेर केला. आतां माझ्या नांवारूपाचा लौकिक काय आहे? कारण तुम्ही माझा आदर करीत नाहीं व निरोप देखील पाठवीत नाहीं २. तूं माझा मायबाप आहेस ह्या लाडानें मी गेलों, पण सर्व जगामध्यें तूंच व्यापून आप्तपणा दाखवून राहिला आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां दोन्ही हात जोडून ठिकठिकाणीं तुला दंडवत –नमस्कार मी करीत आहें ४. [२८३४]

हे देवा मी तुमच्या ठिकाणीं मोठ्या प्रीतीनें लाड करावयास गेलों; पण आमच्या भक्तिप्रेमाची इच्छा तुमच्याकडून पूर्ण होत नाहीं १. हे देवा, म्हणून माझा जीव मोठी आशा धरून आहे, ह्याविषयीं मनांत फार खेद होत आहे २. एखाद्या बिगारीस धरलेल्या मजुरासारखें सर्व कार्य निष्फळ गेलेंसें वाटतें, म्हणून मी कुंठित होऊन लांकडाच्या खोडाप्रमाणें जागचे जागीं थंड राहिलों ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपण माझा अंगीकार करीत नाहीं. हा सर्व माझ्या पापाचा जोर असल्यामुळें तुमची भेट होत नाहीं ४. [२८३५]

प्रीतीच्या कळवळ्याचा झरा निराळाच असतो १. आई ही आपल्या बालकाला मुळीं रडूं देत नाहीं. तें मूल दुःखी झालें कीं तिला धीर निघत नाहीं २. वरवर तोंडापुरता जो मोह असतो, तो पुढें संकटाच्या वेळीं पोकळ आहे असें समजतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी सर्व जाणून नेणतेपणा घेतला आहे, लोकांसारखा मी मूर्ख नाहीं (मला खरें प्रेम कोणतें व खोटें प्रेम कोणतें हें सर्व समजतें) ४. [२८३६]

अहो विठ्ठला, आतां माझी हीच त्वरा (हाच छंद) आहे १. प्रत्येक प्राणिमात्राला पाहून दंडवत हेच शब्द बोलेन; ह्यावांचून कांहीं बोलणार नाहीं २. वेगवेगळ्या साधनाच्या मागें कोठें लागत बसावें? ३. तुकाराम महाराज म्हणतात, तमोगुण जाळून टाकून सत्त्ववृत्तीचा मीं अंगीकार केला आहे (*पाठभेद* : दया, क्षमा इत्यादि वृत्ति परिपक्व करून त्या हृदयांत सांठवून ठेविल्या आहेत) ४. [२८३७]

हे देवा, तुम्हांला कोणती एक गोष्ट कळत नाहीं तें सांगा, मग कशाकरितां मी तुमच्या ठिकाणीं कींवकाकुळती येण्याचे संकल्प करूं? १. तुम्हीं आपल्या सत्तेनें वाणीला जशी स्थापून ठेविली आहे, तशा तुमच्या आज्ञेप्रमाणें ती बोलत

॥ ३ ॥ तुका म्हणे मागें बोलिलों तें वाव । आतां हाचि भाव दृढ झाला ॥ ४ ॥ [२८३८]

आवडी न पुरे मायबापापासीं । घडों का येविसीं सकईल ॥ १ ॥ होईल नेमलें आपुलिया काळें । आलीयाचा बळें आग्रो उरे ॥ २ ॥ जाणविलें तेथें थोडें एक वेळां । सकळ ही कळा सर्वोत्तमीं ॥ ३ ॥ तुका म्हणे निवेदिलें गुह्य गुज । आतां तुझी तुज सकळ चिंता ॥ ४ ॥ [२८३९]

वोखटा तरी मी विटलों देहासी । पुरे आतां ऐसी जोडी पुन्हां ॥ १ ॥ किती मरमर सोसावी पुढती । राहिलों संगतीं विठोबाचे ॥ २ ॥ आतां कोण याचा करील आदर । जावो कळिवर विटंबोनी ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां सांडी तेचि सांडी । कोण फिरे लंडी यासी मागें ॥ ४ ॥ [२८४०]

हेंही ऐसें तेंही तैसें । उभय पिसें अविचार ॥ १ ॥ अभिमानाचे ठेलाठेलीं । मधीं जालीं हिंपुटी ॥ २ ॥ धीरा शांती ठाव नुरे । हाचि उरे आबाळ्या ॥ ३ ॥ कौतुक हें पाहे तुका । कढतां लोकां अधणीं (आधणीं) ॥ ४ ॥ [२८४१]

हित जाणे चित्त । कळों येतसे उचित ॥ १ ॥ परिहार ते संपादणी । सत्य कारण कारणीं ॥ २ ॥ वरदळ तें नुतरे कसीं । आगीमध्यें तेथें रसीं ॥ ३ ॥ तुका म्हणे करुनी खरें । ठेवितां तें पुढें बरें ॥ ४ ॥ [२८४२]

देवें दिला देह भजना गोमटा । तो या झाला फाटा बाधिकेच्या ॥ १ ॥ ताठोनियां मान राहिली वरती । अहंकारा हातीं लवों नेदी ॥ २ ॥ दास म्हणावया न वळे रसना । सइर वचना वास गळे (वासे गळा) (बा सगळे) ॥ ३ ॥ तुका म्हणे कोठें ठेवावा विटाळ । स्नानें निर्मळ व्हावयासी ॥ ४ ॥ [२८४३]

आहे २. तुमची कृपा झाल्यावर तुमची अंगसंगति नको, कारण निजध्यासानें सर्व कांहीं आनंद वाटत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें मी पूर्वीं बोललों तें व्यर्थ. आतां माझा हाच स्वस्थ राहाण्याचा दृढ भाव झाला आहे ४. [२८३८]

आईबापाच्या ठिकाणीं बालकाची आवड पूर्ण होणार नाहीं, असें होणें शक्य आहे काय? १. जें ज्या वेळेस नेमलें आहे तें त्या वेळेस होईल. असें असतांना जो कोणी बळकटीस (हट्टास) येतो, त्याचा आग्रहच (शुद्ध दुराग्रहच) राहातो २. सर्वोत्तम श्रीहरीचे ठिकाणीं सर्व कांहीं ज्ञान आहे, तेथें एक वेळ आम्हीं आपली थोडकीशी हकीकत कळविली ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमचें जें कांहीं गुह्य होतें, तें तुला आम्हीं कळविलें; आतां त्याची सर्व कांहीं काळजी तुला आहे ४. [२८३९]

देह हा फार वाईट आहे म्हणूनच त्याचा मला वीट आला आहे. आतां अशा ह्या देहाची प्राप्ति पुरे १. ह्या देहाच्या संगतीनें पुनः पुनः किती यातायात सोसावी, म्हणून त्याचा संबंध टाकून मीं विठोबाची संगत केली २. आतां ह्या देहाचा कोण आदर करतो? ह्या देहाची विटंबना होवो! ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो कांहीं मीं ह्या देहाचा त्याग केला आहे, तोच खरा आहे. आतां ह्याविषयीं कोण लंडी (लबाड मनुष्य) मागें फिरेल? ४. [२८४०]

हें असें आहे तर तेंही तसेंच आहे, (माणसेंहि तशींच, पशुपक्षिहि तसेच) म्हणजे उभयतां वेडे व अविचारी आहेत १. देहाभिमानाच्या धक्काबुक्कीनें सर्व प्राणी कष्टी झाले आहेत २. धैर्य व शांति ह्यांना राहाण्याला जीवाच्या ठिकाणीं निर्मळ असें कांहीं राहिलें नाहीं. असा हा जीव केवळ निर्बल आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे सर्व लोक त्रिविध तापाच्या आधणांत कसे कढत आहेत, त्यांचें कौतुक मी पाहातों ४. [२८४१]

(निष्काम कर्म व निष्काम भक्ति ह्यांच्यामुळें शुद्ध झालेलें) चित्त हें आपलें हित जाणतें; कारण त्याला योग्य गोष्ट कोणती ती कळते १. बाह्यात्कारीं सोंगाची बतावणी करावी लागते. खरें कार्य हें खऱ्या कृत्यानेंच मिळतें २. जी हिणकस धातु आहे ती अग्नीमध्यें घातल्यावर रसानें चांगल्या कसाला उतरत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, चित्त चांगलें करून ठेवल्यानें तें पुढें चांगलें उपयोगी पडतें ४. [२८४२]

देवानें हा चांगला मनुष्यदेह आपलें भजन करण्याकरितां दिला आहे. अशा नरदेहाला ज्यांत आपला नाश आहे, असा संसाराचा आडरानाचा फांटा फुटला आहे १. सदा सर्व काळ मान वरतीं ताठरलेलीच असते. अहंकाराच्या योगानें ती कधीं वळत नाहीं (देव, द्विज, गुरु, मातपिता, संत ह्यांपुढें नम्र होऊं देत नाहीं) २. मी हरीचा दास आहें असें म्हणण्याला जिव्हा वळत नाहीं आणि वायफळ (स्वैर, अश्लील) शब्दांची घाण सुटली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, स्नानानें निर्मळ होण्याकरितां देह हा विटाळ कोठें ठेवावा? ४. [२८४३]

काय करूं पोरा लागली चट । धरी वाट देउळाची ॥ १ ॥ सांगितलें नेघे कानीं । दुजें मनीं विठ्ठल ॥ २ ॥ काम घरीं न करी धंदा । येथें सदा दुश्चित ॥ ३ ॥ आमचे कुळीं नव्हतें ऐसें । हेंच पिसें निवडलें ॥ ४ ॥ लौकिकाची नाहीं लाज । माझें मज पारिखें ॥ ५ ॥ तुका म्हणे नरका जाणें । त्या वचनें दुष्टांचीं ॥ ६ ॥ [२८४४]

कारणापें असतां दृष्टी । शंका पोटीं उपजेना ॥ १ ॥ शूर मिरवे रणांगणीं । मरणींच संतोष ॥ २ ॥ पाहिजे तो कळवळा । मग बळा काय उणें ॥ ३ ॥ तुका म्हणे उदारपणें । काय उणें मानावें ॥ ४ ॥ [२८४५]

नव्हती हे उसणे बोल । अहाच फोल रंजवण ॥ १ ॥ अनुभव तो वरावरी । नाहीं दुरी वेगळा ॥ २ ॥ पाहिजे तें आलें रुची । काचाकुची काशाची ॥ ३ ॥ तुका म्हणे लाजे आड । त्याची चाड कोणासी ॥ ४ ॥ [२८४६]

जों जों घ्यावा सोस । माझे वारीं गर्भवास । लटिक्याचा दोष । अधिक जडे अंगेंसीं ॥ १ ॥ आतां आहे तैसें असो । अनुताप अंगीं वसो । येवढेंचि नसो । माझें आणि परावें ॥ २ ॥ जागा झालेपणें । काय असावें स्वप्नें । शब्दाचिया शिणें । कष्ट मिथ्या मानावे ॥ ३ ॥ छाये माकड विटे । धांवे कूपीं काय भेटे । तुका म्हणे फुटे । डोई गुडघे कोंपर ॥ ४ ॥ [२८४७]

गुणाचाचि सांटा । करूं न वजों आणिका वाटा ॥ १ ॥ करिती छंद नानापरी । भरोन सिणती आडभरी ॥ २ ॥ नेमली पंगती । आम्हां संतांची संगती ॥ ३ ॥ तुका म्हणे लिळा । येर कवतुक पाहों डोळां ॥ ३ ॥ [२८४८]

(एक दुष्ट बाप म्हणतो,) काय करावें! पोराला देवाच्या देवळाकडे जाण्याची मोठी चट लागली आहे १. एका विठ्ठलावांचून दुसरें कांहीं सांगितलें, तर तें कानामनावर घेत नाहीं २. घरीं कामधंदा करीत नाहीं; सदा सर्वदा ह्या ठिकाणीं उदास असतो ३. आमच्या कुळामध्यें असें कोणी झालें नाहीं. हेंच एक वेडें जन्मलें आहे ४. त्याला लौकिकाची लज्जा नाहीं, म्हणून तें आमचें असून आम्हांला तें परकें झालें आहे, अथवा माझा मजपणा (अहंभाव) त्याला परका झाला आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या ह्या दुष्ट बापाचे हे शब्द ऐकून नरकाला जावें लागेल ६. [२८४४]

आपल्या (इच्छित फलांकडे) कारणाकडे दृष्टि असतांना हृदयांत शंका (भय) उत्पन्न होत नाहीं १. शूर हा रणभुमीमध्यें शोभतो व तेथेंच मरण्यांत त्याला संतोष वाटतो २. खरी कळकळ मात्र पाहिजे. तेथें सामर्थ्याची काय उणीव आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, मन जर खरोखर उदार असेल तर तेथें काय उणें आहे? ४. [२८४५]

जनरंजन करणारे असले हे लोकांचे उष्टे घेतलेले पोकळ शब्द नव्हेत १. सर्वांहून अलिप्त (वेगळा, अलौकिक) असणारा असा त्या माझ्या बोलण्याच्या पाठीं माझा अनुभव आहे. माझें बोलणें वरवरचें नाहीं २. माझ्या बोलण्यांतील तत्त्वाची रुचि अनुभवास आली पाहिजे. ह्या ठिकाणीं संकोच कशाचा आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे माझें बोलणें ऐकण्याविषयीं व त्यांतील तत्त्व स्वीकारण्याविषयीं लज्जायुक्त आहेत, त्यांची इच्छा कोण करतो? ४. [२८४६]

हे देवा, जों जों तुमच्याविषयींचा सोस घ्यावा, तों तों तो माझे गर्भवास दूर करील. खोट्या संसाराच्या संगतीनें अधिक दोष अंगाला लागतात १. आतां आमची जशी स्थिति आहे तशीच ती असावी व निरंतर आमचे ठिकाणीं अनुताप असावा आणि आपपर हे भाव मात्र नष्ट व्हावेत २. जागा झाल्यावर स्वप्न काय राहात असतें? मग त्यांतील अनुभविलेल्या दुःखाच्या शब्दानें मिथ्या दुःख काय मानावयाचें? ३. तुकाराम महाराज म्हणतात, पाण्यांत पडलेल्या प्रतिबिंबावर रागावून माकडानें जर विहिरींत उडी टाकिली, तर तेथें त्याला काय भेटणार आहे? गुडघे, डोकें, कोंपर हीं मात्र फुटतील. ह्याप्रमाणें प्रत्येक जीव मिथ्या संसारानें मोहित होतो ४. [२८४७]

आम्ही गुणांचा संग्रह करूं. दुसऱ्या कोणत्याहि (दोषांच्या) मार्गाला जाणार नाहीं १. कित्येक जीव अनेक प्रकारच्या नादानें आडरानांत जातात व त्या योगानें दुःखी होतात २. आमचा नियम संतांच्या संगतीनें राहाण्याचा झाला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, बाकीचें सर्व कौतुक मी जगांत अलिप्त राहून आपल्या लीलेनें पाहातों ४. [२८४८]

शिकल्या शब्दाचें उत्पादितों ज्ञान । दरपणीचें धन उपर वायां ॥ १ ॥ अनुभव कई होईन भोगितां । सांकडें तें आतां हेंचि आलें ॥ २ ॥ गायें नाचें करीं शरीराचे धर्म । बीजनामें वर्म तुमचें दान ॥ ३ ॥ तुका म्हणे केला उशीर न साहे । द्याल तरी आहे सर्व सिद्ध ॥ ४ ॥ [२८४९]

शिकविला तैसा पढों जाणे पुंसा । कैंची साच दशा तैसी अंगीं ॥ १ ॥ स्वप्नींचिया सुखें नाहीं होत राजा । तैसा दिसे माझा अनुभव ॥ २ ॥ कासया हा केला जिव्हे अलंकार । पायांसी अंतर दिसतसे ॥ ३ ॥ दर्पणीचें धन हातीं ना पदरीं । डोळां दिसे परी सत्याचिये ॥ ४ ॥ आस केली तरी लाळचि घोटावी । ठकाठकी तेवीं दिसतसे ॥ ५ ॥ कवित्व रसाळ वदविली वाणी । साक्षही पुराणीं घडे ऐशी ॥ ६ ॥ तुका म्हणे गुरें राखोनि गोवारी । माझीं म्हणे परि लाभ नाहीं ॥ ७ ॥ [२८५०]

अनुभव तो नाहीं तुमचिया दर्शनीं । आइकिलें कानें वदे वाणी ॥ १ ॥ जेविल्याचा कैसा अनुभव अंतरीं । म्हणतां मांडे पुरी काय होतें ॥ २ ॥ नाहीं नाहीं गेली तळमळ दातारा । कां जी हरिहरा चाळविलें ॥ ३ ॥ पत्रीं कुशलता भेटीं अनादर । काय तें उत्तर येईल मानूं ॥ ४ ॥ अंतरीं (र) सबाह्यीं (ह्य) कां नाहीं सारिखें। करूनि पारिखें वर्ततसां॥ ५ ॥ आलों आलों ऐसी दाऊनियां आस। बुडों बुडतयास काय द्यावें ॥ ६ ॥ तुका म्हणे अहो चतुराशिरोमणि । किती माझी वाणी तुम्ही कोठें ॥ ७ ॥ [२८५१]

केलें तरी आतां साचचि करावें। विचारिलें द्यावें कृपादान ॥ १ ॥ संकल्पासी नाहीं बोलिला विकल्प । तुम्हां पुण्यपाप कळे देवा ॥ २ ॥ उदार विख्यात तुम्ही भूमंडळीं ।

जे शब्द शिकलों आहें तें ज्ञानच मी प्रगट करितों. आरशामध्यें प्रतिबिंबित झालेलें धन जरी वरच्या बाजूनें भासलें, तरी तें व्यर्थ (तसें माझें शाब्दिक ज्ञान व्यर्थ आहे) १. खऱ्या अनुभवाचा भोक्ता मी कधीं होईन ह्याचेंच आतां मला संकट पडलें आहे २. तुझ्या नामाच्या आनंदांत गाणें, नाचणें हे सर्व शरीराचे धर्म मी करीत आहें, परंतु नामबीज ह्या खऱ्या साधनाचें (परमात्मस्वरूप जाणण्याचें) दान करणारा तूं आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला आतां उशीर सहन होत नाहीं. तुम्हीं आम्हांला द्यावयाचें मनांत आणलें, तर तुमचे जवळ सर्व सिद्ध आहे ४. [२८४९]

राघूला (पोपटाला) जसें शिकवावें तसा तो बोलूं लागतो, पण खरोखर त्याचा अर्थ त्याला समजतो काय? १. स्वप्नामध्यें कोणी राजैश्वर्याचें सुख भोगूं लागला तर तो खरोखर राजा होत नाहीं, तसा माझा ह्या परमार्थाविषयींचा अनुभव दिसत आहे २. कवित्वाचा जिव्हेस अलंकार कशाकरितां केला? कारण त्या योगानें श्रीहरीच्या चरणांत अंतर पडलें आहे ३. आरशामध्यें प्रतिबिंबित झालेलें धन, तें डोळ्यास खऱ्या धनासारखें दिसतें, पण हातांत किंवा पदरांत घ्यावयाला लागलें तर कांहीं नाहीं ४. त्या धनाची आशा केली तर लाळच घोटीत बसलें पाहिजे, त्याप्रमाणें हे देवा, मलाहि तुमची फसवाफसवी दिसते ५. माझ्या वाणीनें रसभरित कवित्व वदविलें, रसभरित काव्य गायिल्यानें हरि प्राप्त होतो ह्याविषयीं पुराणेंहि साक्ष देत आहेत ६. तुकाराम महाराज म्हणतात, लोकांचीं गुरें रक्षण करणारा जो गुराखी तो तीं गुरें माझीं म्हणतो, पण खरोखर त्याला त्याचा लाभ आहे काय? (नाहीं) ७. [२८५०]

देवा, तुमच्या दर्शनानें होणारा अनुभव नाहीं. संतांच्या मुखानें तुमचें वर्णन जें मीं कानानें ऐकलें आहे तेंच माझी वाणी बोलत आहे १. मुखानें मांडे, पुऱ्या असें म्हटल्यानें खरोखर जेवल्याचा अनुभव येतो काय? २. हे दात्या देवा, खरोखर हृदयांतील तुमच्या साक्षात्काराची तळमळ नाहींशी झाली नाहीं (असें द्विवार सांगतों). अहो, जी हरिहरा, तुम्हीं मला कां फसविलें? ३. पत्रामध्यें कुशल मजकूर एखाद्यास लिहावयाचा आणि तो साक्षात् भेटीला आला असतां, तूं आमच्या येथून चालता हो, असा त्याचा अनादर करावयाचा, तो कसा मान्य होईल? ४. तुम्ही अंतरबाह्य एकसारखे कां नाहीं? हे देवा, तुम्ही आमचे ठिकाणीं परकेपणा धरून वर्तन करतां ५. जो कोणी पाण्यांत बुडत आहे त्यास मी तुला काढावयास आलों असें म्हणून आशा उत्पन्न करावयाची व न जातां त्या बुडणारास तसेंच बुडूं द्यावें, हें काय (बरें आहे)? ६. तुकाराम महाराज म्हणतात, अहो चतुरशिरोमणि देवा, तुमचें सामर्थ्य कोणीकडे व माझ्या गरिबाच्या बोलण्याची किंमत ती किती! ७. [२८५१]

हे देवा, तुम्ही आमचें कल्याण करावयास तयार झालांत तर आतां खरें तरी करा. ज्याप्रमाणें आम्हीं इच्छा केली आहे, त्याप्रमाणें कृपाप्रसादाची देणगी व्हावी १. सत्कृत्य करण्याचा जो संकल्प केला आहे, त्या ठिकाणीं तें न करण्याचा विकल्प करावा, असें कोठें सांगितलें आहे? हे देवा, तुम्हांला सर्व पुण्य-पाप कळत आहे २. तुम्ही उदार आहांत अशी

ऐसी ब्रीदावळी गर्जतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे अहो रखुमादेवीवरा । उपरोध कां धरा माझा आतां ॥ ४ ॥ [२८५२]

अहो पुरुषोत्तमा । तुम्हां काशाची उपमा ॥ १ ॥ सतत (स्वतंत्र) (सतत) तो नाहीं बुद्धी । आळवितां नाहीं शुद्धी ॥ २ ॥ जागविलें तरी । तुम्हां व्यक्ति येणें हरी ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । तुम्हां नित्य दिस नवा ॥ ४ ॥ [२८५३]

मथनें भोगे सार । ताकें घडे उपकार ॥ १ ॥ बरवी सायासाची जोडी । अनुभविया ठावी गोडी ॥ २ ॥ पाक आणि रुचि । जेथें तेथें ते कइंची ॥ ३ ॥ वाढितो पंगती । तुका आवडी संगती ॥ ४ ॥ [२८५४]

चिंतनाची जोडी । हाचि लाभ घडोघडी ॥ १ ॥ तुम्ही वसूनि अंतरीं । मज जागवीं निर्धारीं ॥ २ ॥ जेथें जेथें जाय मन । आड घाला सुदर्शन ॥ ३ ॥ तुका म्हणे भोजें । मग मी नाचेन निर्लज्ज ॥ ४ ॥ [२८५५]

आवडीची न पुरे धणी । प्रीत मनीं बैसली ॥ १ ॥ नित्य नवा कळवळा । मायबाळामध्यें तो ॥ २ ॥ सुख सुखा भेटों आलें । होय वाल्हें पोटींचें ॥ ३ ॥ तुका म्हणे ब्रह्मानंदें । संतवृंदें चरणापें ॥ ४ ॥ [२८५६]

जडलों तों आतां पायीं । होऊं काई वेगळा ॥ १ ॥ तुम्ही संतीं कृपा केली । गंगे चाली ओघाची ॥ २ ॥ सांभाळिलों मायबापा । केलों तापावेगळा ॥ ३ ॥ वोरसें या जीव धाला । तुका ठेला मौन्यचि ॥ ४ ॥ [२८५७]

ब्रीदावळीची विशेष ख्याति ह्या भूमंडळामध्यें गर्जना करीत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो रखुमाईच्या पति, आतां माझें हित करण्याविषयीं संकोच कां धरतां? ४. [२८५२]

अहो पुरुषोत्तमा, तुम्हांला कशाची उपमा देऊं? १. कारण निरंतर बुद्धीची अनुकूलताहि नाहीं व तुम्हांला हांका मारूं लागलों असतां, शुद्धिहि राहात नाहीं २. अहो हरि, तुम्हांला जागृत ठेविलें तर तुम्ही व्यक्त दशेस येतां (अवतार घेतां) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमचा नित्य नवा दिवस आहे. [२८५३]

दह्याचें मंथन करण्यांत सारभूत लोण्याचा भोग घडतो व ताक दुसऱ्याला देण्याचा उपयोगहि होतो १. श्रमानें प्राप्ति (लाभ) करून घेणें फार बरें. हा अनुभव ज्याला असेल त्याला ही रुचि समजते २. पाकसिद्धि करण्यावांचून ज्या त्या ठिकाणीं रुचि कशाची आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, पंक्तीला बसलेल्यांची जशी आवड असेल, तसें मी त्याला (सारभूत, अमृततुल्य रुचि असलेलें हरिनामरूपी अन्न) वाढतों ४. [२८५४]

हरिनामचिंतनाच्या कमाईचा लाभ घटकोघटकीं होत आहे १. हे देवा, तुम्ही अंतःकरणांत वास करून मला निश्चयानें तुमच्या स्वरूपचिंतनाविषयीं जागृत ठेवा २. ज्या ज्या ठिकाणीं माझें मन जाईल, त्या त्या ठिकाणीं तुम्ही सुदर्शन आडवें घालून तें स्थिर करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें प्राप्त झाल्यावर निर्लज्ज होऊन आनंदानें मी नृत्य करीन ४. [२८५५]

माझ्या आवडीची इच्छा पूर्ण होत नाहीं, कारण जी प्रीति मनामध्यें बसली आहे ती ढळत नाहीं १. जशी माय-लेकांमध्यें नित्य नूतन प्रीति असते, त्याप्रमाणें २. आईची व मुलाची भेट नव्हे तर तें सुखच सुखाला भेटावयास आलें आहे, इतकें तें पोटचें मूल आईस प्रिय असतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारच्या ब्रह्मानंदानें संतांचे समुदाय देवाच्या चरणांजवळ मिळाले आहेत ४. [२८५६]

मी जो तुमच्या पायांच्या ठिकाणीं चिकटून राहिलों आहें तो वेगळा होऊं काय? १. अहो संत हो, जशी गंगेची गति (लोकांचें पाप, ताप दूर करीत व तीरांवरील वृक्ष-वेलींचें पोषण करीत) ओघांतून सहज अखंड चालू आहे तशी तुम्हीं मजवर सहज कृपा केली २. अहो मायबापा, तुम्हीं त्रिविधतापांतून मुक्त करून माझें रक्षण केलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, स्नेहभरित पान्हा पाजल्याच्या योगानें माझा जीव तृप्त झाला. त्याविषयीं वर्णन करण्यास वाचा पुरत नाहीं, म्हणून मी मौन धरून राहिलों आहें ४. [२८५७]

काळावरी सत्ता । ऐसी करितों वारता ॥ १ ॥ मी तों हीनाहूनि सांडें । देव दुन्हें काळतोंडें ॥ २ ॥ मानूनि भरंवसा । होतों दास म्हणत ऐसा ॥ ३ ॥ तुका म्हणे मान । गेलों वाढवूं थोरपण ॥ ४ ॥ [२८५८]

समर्थाचे सेवे कोठें नाहीं घात । पाहों नये अंत पांडुरंगा ॥ १ ॥ आहे तैसी नीत विचाराची बरी । येऊनि भीतरीं वास करा ॥ २ ॥ निढळ राखिलें तरी भयाभीत । हर्षामर्ष चित्त पावतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे तरी कळेल निवाड । दर्शनाची चाड शुभ कीर्ति ॥ ४ ॥ [२८५९]

बहु धीर केला । जाण न होसी विठ्ठला ॥ १ ॥ आतां धरीन पदरीं । तुज मज करीन सरी ॥ २ ॥ झालों जीवासी उदार । उभा राहिलों समोर ॥ ३ ॥ तुका म्हणे संतां । ऐसें सांगा पंढरीनाथा ॥ ४ ॥ [२८६०]

नेदावी सलगी न करावा संग । करी चित्ता भंग वेळोवेळां ॥ १ ॥ सर्प शांतिरूप न म्हणावा भला । झोंबे खवळिला तात्काळ तो ॥ २ ॥ तुका म्हणे दुरी राखावा दुर्जन । करावें वचन न घडे तें ॥ ३ ॥ [२८६१]

अभयदान मज देईं वो दातारा । कृपेच्या सागरा मायबापा ॥ १ ॥ देहभाव तुझ्या ठेवियेला पायीं । आणीक मी कांहीं दुजें नेणें ॥ २ ॥ सेवा भक्तिहीन नेणता पतित । आतां माझें हित तुझ्या पायीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तुझें नाम दीनानाथ । तें मज उचित करीं आतां (तुका म्हणे माझें सर्वही साधन । नाम संकीर्तन विठोबाचें) ॥ ४ ॥ [२८६२]

करावा वर्षाव । तृषाक्रांत झाला जीव ॥ १ ॥ पाहें आकाशाची वास । जाणता तूं जगदीश ॥ २ ॥ संयोगें विस्तार । वाढी लागे तो अंकूर ॥ ३ ॥ तुका म्हणे फळ । चरणांबुज तें सकळ ॥ ४ ॥ [२८६३]

माझी कळिकाळावर सत्ता चालेल असें बोलणें मी बोलतों १. पण मी वाईटापेक्षांहि वाईट आहें, कारण मला देव अंतरल्याच्या योगानें मी काळतोंड्या झालों आहें २. मी देवाचा दास आहें असें म्हणत असून तो माझा अंगीकार करील अशा भरंवशानें मी होतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, जनांमध्यें थोरपणा वाढवून मान व्हावा अशी माझी इच्छा होती (म्हणून देव दुरावला) ४. [२८५८]

अहो पांडुरंगा, जर समर्थाची सेवा केली तर कोठें घात होत नाहीं, ह्याकरितां तुम्ही माझा अंत पाहूं नका १. जशी तुमची नीति आहे त्याविषयींचा चांगला विचार करून माझ्या अंतःकरणांत येऊन वास्तव्य करा २. जर तुम्हीं मला फुटक्या कपाळाचें ठेविलें, तर (जन्म-मरणामुळें) अतिशय भय वाटून चित्तामध्यें सुख-दुःख उत्पन्न होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या दर्शनाची मला गरज आहे ती पुरविली म्हणजे तुमची चांगली कीर्ति मला व जगालाहि कळेल ४. [२८५९]

आजपर्यंत मीं पुष्कळ धीर धरला, पण हे विठ्ठला, तें कांहीं तूं जाणत नाहींस १. आतां तुझ्या पदराला धरून तुझी व माझी बरोबरी करीन २. जीवावर उदार होऊन तुझ्यासमोर उभा राहिलों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो संतजन हो, अशा प्रकारची विनंति तुम्ही पंढरीनाथाला करा ४. [२८६०]

दुर्जनास आपल्याशीं कधींहि सलगी देऊं नये व त्याची संगतिहि करूं नये, कारण त्या योगानें चित्ताच्या शांततेचा वेळोवेळीं भंग होतो १. सर्प हा शांत दिसला तरी त्यास हा शांतरूप चांगला आहे असें म्हणूं नये. त्याला थोडकें चिडविलें तर तो खवळून तात्काळ चावेल २. तुकाराम महाराज म्हणतात, दुर्जनाला नेहमीं आपल्यापासून दूर ठेवावें व त्याच्याशीं कधींहि बोलण्याचा प्रसंग न येईल असें करावें ३. [२८६१]

हे दातारा कृपेच्या सागरा, मला तूं अभयदान दे. आम्हीं तुझ्या पायांवर देहभाव ठेविला आहे. ह्यावांचून आम्ही कांहीं जाणत नाहीं २. मी सेवाहीन व भक्तिहीन असा मूर्ख पतित आहें. आतां माझें हित तुझ्या चरणीं आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझें नांव दीनानाथ आहे, त्याप्रमाणें तूं मला पातकापासुन मुक्त करण्याचें योग्य कृत्य कर (विठोबाचें नामसंकीर्तन करणें हेंच माझें एकमेव साधन आहे) ४. [२८६२]

माझा जीव तुझ्या कृपेविषयीं तृषित झाला आहे. ह्याकरितां तूं मजवर कृपेची वृष्टि कर १. चिदाकाशरूप जो तूं त्या तुला मी पाहात आहें. हे जगदीशा, ह्याचा तूं जाणता आहेस २. तुझ्या कृपाजलसंयोगानें माझ्या अंतःकरणांत ज्ञानवृक्षांकुर वाढीला लागून विस्ताराला पावतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमच्या चरणकमलाची प्राप्ति हेंच त्याचें सर्व फल आहे ४. [२८६३]

करीं ऐसी धांवाधांवी। चित्त लावीं चरणापें ॥ १ ॥ मग तो माझा मायबाप। घेईल ताप हिरूनि ॥ २ ॥ बहुतांच्या मतें गोवा। होऊं जीवा नेदावा ॥ ३ ॥ तुका म्हणे करुणा बोलें। धीर विठ्ठलें निघेना ॥ ४ ॥ [२८६४]

एकविध नारायण। तेथें विषमाचा सीण। पालटोंचि भिन्न। न ये अणुप्रमाण ॥ १ ॥ अवघें सारावें गाबाळ। चुकवूनियां कोल्हाळ। आनंदाचें स्थळ। एकाएकीं एकांत ॥ २ ॥ कायावाचामन। स्वरूपींच अनुसंधान। लक्ष (लक्ष्य) भेदी बाण। तेणें पाडें लवलाहो ॥ ३ ॥ तुका म्हणे आळस निद्रा। येथें देउनियां चिरा। देउनियां धीरा। मिठी जाणा जागृती ॥ ४ ॥ [२८६५]

हारपोनि गेली निशी। निद्रा कैसी न देखों ॥ १ ॥ नारायणीं वसलें घर। निरंतर आनंद ॥ २ ॥ अवघा रुधविला ठाव। नेला वाव मी माझें ॥ ३ ॥ तुका म्हणे एके ठायीं। असों नाहीं क्षण भिन्न ॥ ४ ॥ [२८६६]

देवें केलें कैसें कैसें। उद्धरिलें अनायासें ॥ १ ॥ ऐका नवलयाची ठेव। नेणतांही भक्तिभाव ॥ २ ॥ कैलासासी नेला। भिल्ल पानेडी बैसला ॥ ३ ॥ पांखांच्या फडत्कारीं। उद्धरुनी नेली घारी ॥ ४ ॥ चोरें पिंडीं दिला पाव। त्या पूजनें धावे देव ॥ ५ ॥ तुका म्हणे भोळा। स्वामी माझा हा कोंवळा ॥ ६ ॥ [२८६७]

अनुभव ऐसा। मज लागला परिसा ॥ १ ॥ पाठीं बैसलीं सेजारीं। नव्हे शांत कोणे वरी ॥ २ ॥ कोठें न लगे जावें। कांहीं घालावया ठावें ॥ ३ ॥ तुका म्हणे कोटी। दुःखाच्याच तये पोटीं ॥ ४ ॥ [२८६८]

अरे, तूं अशा प्रकारची त्वरा कर, कीं ज्या योगेंकरून चित्त श्रीहरीच्या चरणीं लागेल १. मग तो माझा मायबाप श्रीहरि तुझ्या सर्व कांहीं तापाचें हरण करील २. अनेक मतांच्या ठिकाणीं आपला जीव गुंतूं देऊं नकोस ३. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरीला कींवकाकुळती केली, कीं त्या बोलण्यानें त्या विठ्ठलाला दम निघत नाहीं (तो भक्ताकडे त्वरेनें धांव घेतो) ४. [२८६४]

नारायणाची एकविध उपासना करावी, कारण त्याला विषम भावनेचा त्रास आहे म्हणून त्याच्या विषयींच्या भावनेमध्यें किंचित् देखील पालट येऊं देऊं नये १. प्रपंचाच्या बाकी सर्व कांहीं असार गोष्टी दूर कराव्यात व विक्षेपाचा (स्त्रीपुत्रादिकांच्या मोहाचा) त्याग करावा आणि एकाएकीं आनंदाचें स्थान जो श्रीहरि त्याच्या एकांताचा वास करावा २. जसें निशाण मारावयाचें असलयास, त्याचें जें लक्ष्य, त्याचें भेदन करण्याकरितां निशाण मारणारा त्याचें जसें अनुसंधान ठेवितो, तसें कायावाचामनें एक श्रीहरीच्या स्वरूपाचें अनुसंधान ठेवावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आळस, व निद्रा ह्यांच्यावर दगड मारून [ह्यांचा नायनाट करून] धैर्य धरावें व जागृतीमध्यें नारायणस्वरूपास मिठी मारावी ४. [२८६५]

अविद्येची रात्र नाहींशी झाली. आतां देहबुद्धीची निद्रा कशी ती जाणत नाहीं १. आतां नारायणस्वरूपाच्या ठिकाणीं वस्ती झाल्यामुळें निरंतर आनंद आहे २. सर्व कांहीं जागा नारायणस्वरूपानें व्यापिली आहे. त्या योगानें देह मी व देहसंबंधीं माझें हें सर्व मिथ्या झालें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां देव आणि आम्ही एकरूप झालों आहोंत ते एकमेकांपासून एक क्षण देखील भिन्न राहाणार नाहीं ४. [२८६६]

देवांनीं कशा कशा प्रकारच्या पातकी प्राण्यांचा अनायासें उद्धार केला १. भक्तिभाव न जाणणाऱ्या जीवांचाहि देवानें उद्धार केला. हें नवल ऐका २. भिल्ल (व्याध) वृक्षाच्या शाखेवर बसला असतां चुकून त्याच्या हातून शिवाच्या पिंडीवर बेल पडला म्हणून त्याला कैलासास नेलें ३. पंखाच्या फणत्कारानें, शिवपिंडीवर बसलेल्या घारीनें घातलेला वारा शिवास सुखकर वाटला. त्यामुळें ती घारहि देवानें उद्धरून नेली. ४. चोरानें चुकून पिंडीवर पाय दिला त्या योगानें त्याची पूजा मानून देव संतुष्ट झाला ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा माझा स्वामी फार भोळा असून भक्ताविषयीं कोंवळ्या हृदयाचा आहे ६. [२८६७]

[ध्रुवपदांत दर्शविलेला] संसारदुःखाचा अनुभव एकसारखा माझ्या बरोबर आहे १. काम-क्रोधादि हे सर्व विकार पाठीशीं लागल्यासारखे जवळ बसले आहेत, ते कोणत्याहि प्रकारानें शांत होत नाहींत २. त्यांचें ज्ञान होण्याकरितां कोठेंहि जावें लागत नाहीं (कारण, मन एकटेंच सर्वत्र फिरून येतें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच्या अंतरीं (संसाराच्या पोटीं) अनेक दुःखें आहेत ४. [२८६८]

पाठीवरी भार। जातों वाहूनियां खर ॥ १ ॥ संत नेतील त्या ठायां। माझी आधीन त्यां काया ॥ २ ॥ मोठें चौफळ। अंगीं उच्छिष्टाचें बळ ॥ ३ ॥ न संडीं मारग। येथें न चोरूनि अंग ॥ ४ ॥ आपुलिया सत्ता। चालविलें नाहीं चिंता ॥ ५ ॥ कळवळिला तुका। जनाचार येथें नका ॥ ६ ॥ [२८६९]

मागें पुढें जालों लाठा। अवघा मोठा सरळ ॥ १ ॥ नाहीं कोठें रितें अंग। नित्य रंग नवाचि ॥ २ ॥ पोसिंध्याचे पडलों हातीं। वोझें माती चुकली ॥ ३ ॥ जोगावलों पोटीं खर। पाठी भार वरि नाहीं ॥ ४ ॥ अवघिया मोकळ्या दिशा। नाहीं वोळसा कामाचा ॥ ५ ॥ संताचिये लोळें द्वारीं। पळती दुरी गोमाशा ॥ ६ ॥ पाहातों गे महाद्वारीं। वरि झुली वाकळा ॥ ७ ॥ कांहीं न साहेसा जाला। तुका नेला समर्थे ॥ ८ ॥ [२८७०]

कारणा कारण (कार्यकारण) वरियलें जेथें। जातों तेणें पंथें सादावित ॥ १ ॥ संतीं हें पईल लाविलें निशाण। ते खूण पाहोन नाम गर्जे ॥ २ ॥ तुका म्हणे तुम्ही चला याचि वाटे। पांडुरंग भेटे भरंवसेनी ॥ ३ ॥ [२८७१]

धन्य तोचि ग्राम जेथें हरिचे दास। धन्य तोचि वंश भक्ति भाग्य ॥ १ ॥ ब्रह्मज्ञान तेथें असे घरोघरीं। धन्य त्या नरनारी चतुर्भुज ॥ २ ॥ नाहीं पापा रीघ काळाचें खंडण। हरिनामकीर्तन घरोघरीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तीहीं तारिलें सकळां। आपल्या कोटीकुळासहित पैं ॥ ४ ॥ [२८७२]

पाठीवर ओझें घेऊन (ध्रुवपदांत दर्शविलेल्या ठिकाणीं) गाढवासारखा जात आहें १. संत ज्या ठिकाणीं नेतील त्या ठिकाणीं जाईन, कारण हा देह त्यांच्या स्वाधीन आहे २. त्यांच्या उच्छिष्टाच्या योगानें अंगांत पुष्कळ बळ आहे (संतांच्या कृपेनें धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ह्या चार मोठ्या फळांची प्राप्ति होते) ३. ह्या ठिकाणीं (त्यांच्या सेवेंत मी) अंग चोरणार नाहीं व हा मार्ग सोडणार नाहीं ४. संतांनीं आपल्या सत्तेनें चालविल्यामुळें आतां मला माझ्या योगक्षेमाची काळजी नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, मी अतिशय कळकळीनें वागत आहें, म्हणून ह्या ठिकाणीं कोणी मला लोकाचार–व्यवहारासंबंधीं सांगूं नये ६. [२८६९]

मागें पुढें सर्वव्यापी असा मी सरळ मोठा बलाढ्य झालों आहें १. आमचें स्वरूपअंग कोठेंहि रितें राहिलें नाहीं. त्यायोगेंकरून नित्य आनंदाचा नवा रंग आहे २. पालनपोषण करणाऱ्या संतांच्या आम्ही स्वाधीन झाल्यामुळें पार्थिव देहरूपी अहंकाराच्या ओझ्यापासून माझी सुटका झाली ३. मज गाढवाचें संतांकडून रक्षण झालें. आतां माझ्या पाठीवर (संसाराचें) ओझें नाहीं ४. सर्व कांहीं दिशा मोकळ्या आहेत; कामाच्या फेऱ्यांतून सुटका झाली ५. संतांच्या द्वारामध्यें मी लोळत आहें; त्या योगानें अनेक प्रकारच्या विकाराच्या गोमाश्या पळून गेल्या ६. प्रेमाच्या गोधडीची झूल माझ्या अंगावर घालून संतांनीं आपल्या महाद्वारांत मला उभें केलें आहे, तें तुम्ही पाहा ७. तुकाराम महाराज म्हणतात, संत समर्थांनीं माझा अंगीकार केला, म्हणून मला कोणताहि संसाराचा भार सहन होत नाहीं असें झालें आहे ८ [२८७०]

ज्या ठिकाणीं कार्यकारण नाहींसें होतें (शेतांत बीं पेरलें असतां धान्य पिकतें, यज्ञ केला असतां स्वर्ग प्राप्त होतो हा कार्यकारणभाव प्रवृत्तीमध्यें असतो. ही प्रवृत्ति ज्या मार्गांत बाजूला सारली आहे त्या निवृत्तीच्या) मार्गानें मी लोकांना सांगत जात आहें १. भवसमुद्राच्या पैलतीरास जाऊन संतांनीं कीर्तीचा ध्वज उभारला आहे, ती खूण पाहून हरिनामाची गर्जना मी करीत आहें २. तुकाराम महाराज म्हणतात, अहो जन हो, तुम्ही ह्याच मार्गानें चला, म्हणजे भरंवशानें पांडुरंगाची भेट होईल ३. [२८७१]

ज्या ठिकाणीं हरीचे दास वास्तव्य करितात तो गांव धन्य व ज्याच्या ठिकाणीं भक्तीचें भाग्य आहे त्याचा वंश धन्य झाला आहे १. त्या गांवामध्यें घरोघर स्त्रीपुरुष चतुर्भुज होऊन ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगतात, म्हणून ते सर्व धन्य आहेत २. घरोघर हरिनामाचें कीर्तन करितात त्या योगानें काळाचा नाश होत आहे व त्या ठिकाणीं पापाचा शिरकाव नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या वैष्णवांनीं आपल्या अगणित पूर्वजांसहवर्तमान सर्व जनांचा उद्धार केला आहे ४. [२८७२]

मारूं नये सर्प संतांचिये दृष्टी । होतील ते कष्टी व्यापकपणें ॥ १ ॥ एक सूत्र जीवशिवीं आइक्यता । रोम उपडितां अंग कांपे ॥ २ ॥ नाहीं साहों येत दुःखाची ते जाती । परपीडा भूतीं साम्य झालें ॥ ३ ॥ तुका म्हणे दिला नीतीचा संकेत । पूजा नांवें चित्त सुखी तेणें ॥ ४ ॥ [२८७३]

भय होतें आम्हीपणें । पाठी येणें घातलें ॥ १ ॥ अवघा आपुलाचि देश । काळा लेश उरेचिना ॥ २ ॥ समर्थाचें नाम घेतां । मग चिंता काशाची ॥ ३ ॥ तुका म्हणे नारायणें । केलें जिणें सुखाचें ॥ ४ ॥ [२८७४]

विषम वाटे दूरवरी । चालूनि परती धरी । मागील ते उरी । नाहीं उरली भयाची ॥ १ ॥ मुख्य न व्हावा तो नाड । सेवटाचे हातीं गोड । सरलिया चाड । मग कैंचें उद्वेग ॥ २ ॥ होता पहिला अभ्यास । समयीं घालावया कास । तेव्हां लटिके दोष । योगें अनुतापाच्या ॥ ३ ॥ तुका म्हणे आहे । बुद्धि केलियानें साह्य (साहे) । जवळीच पाहे । देव वाट स्मरणाची ॥ ४ ॥ [२८७५]

आतां कोठें धांवे मन । तुझे चरण देखिलिया ॥ १ ॥ भाग गेला सीण गेला । अवघा झाला आनंद ॥ २ ॥ प्रेमरसें बैसली मिठी । आवडी लाठी मुखासी ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां जोगें । विठ्ठल घोगें खरें माप ॥ ४ ॥ [२८७६]

विश्वीं विश्वंभर । बोले वेदांतींचें सार ॥ १ ॥ जगीं जगदीश । शास्त्रें वदती सावकाश ॥ २ ॥ व्यापिलें हें नारायणें । ऐसीं गर्जती पुराणें ॥ ३ ॥ जनीं जनार्दन । संत बोलती वचन ॥ ४ ॥ सूर्याचिया परी । तुका लोकीं क्रीडा करी ॥ ५ ॥ [२८७७]

संतांच्या दृष्टीनें पाहिलें तर सर्प देखील मारूं नये, कारण हरि सर्व ठिकाणीं सर्वव्यापक आहे हा अनुभव त्यांच्या ठिकाणीं आहे, म्हणून ते दुःखी होतील १. जसा आपल्या अंगावरील एक केंस उपटला असतां जीवास दुःख होतें तसें जीवशिवाच्या ऐक्यतेचें सूत्र संतांच्या स्वाधीन झाल्यामुळें, दुसऱ्यास दुःख दिलें असतां तें त्यांच्या ठिकाणीं उमटतें २. सर्व भूतांच्या ठिकाणीं समता आहे, ह्या अनुभवानें परपीडेचें दुःख सहन होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, चित्तांतील मत्सर नाहींसा करून सुखरूप असलें म्हणजे विश्वंभराची पूजा होते, हा मुख्य वेदनीतीचा निश्चय तुम्हांस दाखविला आहे ४. [२८७३]

देहबुद्धि होती म्हणून आम्ही देही ह्या भावनेच्या योगानें आमच्या ठिकाणीं भय होतें. ती देहबुद्धि नाहींशी झाल्यावर श्रीहरीनें आम्हांस आपल्या पाठीशीं घातलें १. आतां सर्व देश आपलाच आहे म्हणून काळाचा लेशभर देखील येथें शिरकाव होणार नाहीं २. सर्वांपेक्षां समर्थ जो देव त्याचें नामस्मरण केलें असतां मग कशाची चिंता आहे ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, नारायणांनीं अशा प्रकारच्या सुखाचें आमचें शरीर (जगणें) केलें आहे ४. [२८७४]

अहो जन हो, तुम्ही विषमपणाच्या (भेदबुद्धीच्या) मार्गानें चालत आहांत त्या योगानें देव दुरावला आहे, म्हणून तुम्ही तेथून माघारी फिरा; मग सर्व मागील भयाची उरी उरणार नाहीं १. मुख्य विषमाचा नाड होऊं नये म्हणजे अखेरचें कार्य हस्तगत होईल. त्या विषमाची गरज नाहींशी केल्यावर मग कशाची काळजी आहे ? २. जो तुम्हांला मूळचा अभ्यास होता त्याविषयींची कांस समयीं बळकटपणें घाला म्हणजे त्याविषयींचा पश्चात्ताप झाल्यावर त्या योगानें मिथ्या असलेले दोष नाहींसे होतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही आपली बुद्धी साह्य करून घेतली तर देव तुमच्या जवळच आहे, तो आपल्या नामस्मरणाची वाट पाहात आहे ४. [२८७५]

हे देवा, तुझे चरण मीं पाहिले आहेत, आतां माझें मन कोणत्या ठिकाणीं धांव घेणार ? १. सर्व शीणभाग नाहींसा होऊन मी आनंदरूप झालों आहें २. तुझ्याविषयींच्या प्रेमरसाच्या ठिकाणीं मनानें बुडी दिल्यामुळें, नामउच्चाराची मोठी आवड माझ्या मुखास लागली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, विठ्ठल हें माप मोठें असून खरें आहे, म्हणून तें आमच्या जोगें आहे ४. [२८७६]

विश्वामध्यें विश्वंभर देव व्यापक आहे, असें वेदांतांतील मुख्य सार बोलत आहे १. सर्व जगामध्यें जगाचा जो स्वामी तो वसत आहे असें शास्त्रांचें सांगणें आहे २. नारायणांनीं सर्व व्यापिलें आहे अशी गर्जना करून पुराणें सांगतात ३. सर्व जनांत जनार्दनाची वस्ती आहे आहे असें संत बोलतात ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें सूर्य जगामध्यें प्रकाश करून कोणत्याहि रसांत लिप्त होत नाहीं, त्याप्रमाणें माझा स्वामी असंगपणानें जगतामध्यें खेळ खेळत आहे ५. [२८७७]

निरोधितों परि न मोडे विकार। बहु हीं दुस्तर विषयद्वारें ॥ १ ॥ राहातेति तुम्ही भरोनि अंतरीं। होतों तदाकारी निर्विषयची ॥ २ ॥ कृपेचिया साक्षी असती जवळी। वचनें मोकळीं सरत नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे ताळा मेळवणीपाशीं। विनंति पायापाशीं हेचि करीं ॥ ४ ॥ [२८७८]

अद्वयचि द्वय झालेंचि कारण। धरिलें नारायणें भक्तिसुख ॥ १ ॥ अपरोक्ष आकार झाला चतुर्भुज। एकतत्त्व बीज भिन्न नाहीं ॥ २ ॥ शून्य निरसूनि राहिलें निर्मळ। तें दिसे केवळ विटेवरी ॥ ३ ॥ सुखें घ्यावें नाम वदना ही चाड। सरिता वापी आड एक पाणी ॥ ४ ॥ तुका म्हणे मीच आहें तेणें सुखें। भेद नाहीं मुखें नाम गातां ॥ ५ ॥ [२८७९]

उदार चक्रवर्ती। वैकुंठींचा भूपति। पुंडलिकाचिया प्रीतीं। विटे उभा (विटेवरी) राहिला ॥ १ ॥ सर्वसिद्धींचा दातार। सवें आणिला परिवार। भक्तां अभयंकर। घ्या घ्या ऐसें म्हणतसे ॥ २ ॥ जेणें हें विश्व निर्मिलें। महर्षी देवां संस्थापिलें। एकवीस स्वर्गांतें धरिलें। सत्तामात्रें आपुलिया ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपावंत। इच्छिले पुरवी मनोरथ। रिद्धिसिद्धि मोक्ष देत। शेवीं संग आपुला ॥ ४ ॥ [२८८०]

सकलगुणें संपन्न। एक देवाचें लक्षण ॥ १ ॥ वरकड कोठें कांहीं। एक आहे एक नाहीं ॥ २ ॥ षड्गुण ऐश्वर्य संपन्न। एक भगवंतीं जाण ॥ ३ ॥ तुका म्हणे जें जें बोला। तें तें साजे या विठ्ठला ॥ ४ ॥ [२८८१]

सुख पंढरीसी (पंढरिये) आलें। (खरें) पुंडलिकें सांठविलें ॥ १ ॥ घ्या रे घ्या रे माझे बाप। जिव्हा घेउनि खरें माप। करा एक खेप। मग न लगे हिंडणें ॥ २ ॥ विषय गुंडूनि पसारा।

हे देवा, सर्व इंद्रियांचें मी नियमन करितों; पण अनेक विकारांची वस्ती मोडत नाहीं, कारण हीं विषयांचीं इंद्रियरूपी द्वारें अडविणें फार कठिण आहे १. ह्याकरितां तुम्ही जर माझ्या हृदयांत वास्तव्य कराल तर मी तद्रूप होऊन निर्विषयी होईन २. तुमच्या कृपेचा अनुभव मला तुम्ही जवळ असल्यानें येईल, त्यावांचून कोरडें बोलणें उपयोगी पडणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मूळच्या स्वरूपाचा शोध लागून हृदयांत मेळ पडावा, अशी विनंति मी तुमच्या पायांजवळ करीत आहें ४. [२८७८]

जो देव अद्वैत [निर्गुण] तो दुसऱ्या [सगुण] रूपास आला, ह्याचें कारण नारायणांनीं आपल्या भक्तीचें सुख स्वीकारिलें आहे १. तो चतुर्भुज आकारास आला आहे, त्याचा अनुभव सर्वांस आहेच, पण एकत्वाच्या बीजांत कांहीं भिन्नता नाहीं २. सर्व शून्यत्वाचा निरास करून मलरहित जें स्वरूप उरलें आहे तें प्रत्यक्ष विटेवर दिसत आहे ३. त्याचेंच नामस्मरण सुखानें करावें, ही गरज माझ्या मुखाला आहे. जसें नदीचें, विहिरीचें आणि आडाचें सर्व पाणी एकच आहे तसेंच सगुण–निर्गुणांत नारायण एकच आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें देवाचें नामस्मरण मुखानें केलें असतां द्वैताद्वैतामध्यें भेद होत नाहीं; म्हणून त्याच सुखानें मी भरून राहिलों आहें ५. [२८७९]

वैकुंठींचा सार्वभौम राजा उदार आहे, तो पुंडलीक रायाच्या आवडीनें विटेवर उभा राहिला आहे १. सर्व सिद्धींची प्राप्ति करून देणारा जो देव त्यानें आपल्याबरोबर लक्ष्मी, गरुड इत्यादि सकल समुदाय आणिला आहे आणि भक्तजनांना आपला अभय हस्त उभारून, 'दान घ्या, दान घ्या' असें तो म्हणत आहे २. ज्यानें सकल जगत् निर्माण करून सप्त महर्षींची आणि सर्व देवांची स्थापना केली आहे व आपल्या सत्तेवर एकवीस स्वर्गांना धारण केलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, कोणी ऋद्धि, सिद्धि व मोक्ष मागणारे येतील त्यांची इच्छा तो पूर्ण करतो व त्यांचा त्याग करून त्याच्याच प्राप्तीची इच्छा करणारास शेवटीं आपली संगति देतो. ह्याप्रमाणें जसे ज्याचे मनोरथ असतील ते पूर्ण करणारा तो कृपालु देव आहे ४. [२८८०]

सर्व गुणांनीं संपन्न असें लक्षण एका मुख्य देवाचेंच आहे १. त्याच्या वांचून दुसऱ्या ठिकाणीं, कांहीं आहे कांहीं नाहीं असे प्रकार बहुतेक असतात २. यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य आणि ऐश्वर्य ह्या सहा गुणांनीं संपन्न एक भगवंतच आहे असें तुम्ही समजा ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या विठोबारायाला जें कांहीं तुम्ही बोलाल तें सर्व शोभत आहे ४. [२८८१]

जें कांहीं ब्रह्मसुख आहे तें ह्या पंढरपुरीं आल्यामुळें पुंडलीकरायानें सांठवून ठेविलें आहे १. माझे मायबाप हो, तुम्ही आपल्या जिव्हेचें खरें माप घेऊन नामाच्या द्वारां तें सुख हृदयांत भरून घ्या. ह्या मनुष्यजन्मींच्या एकेका खेपेला हें भरून घेतलें तर तुम्हांला अनेक जन्ममृत्यूंच्या येरझाऱ्यांत हिंडणें नको २. सर्व विषयांचा पसारा आटपून

धांव घाला पंढरपुरा ॥ ३ ॥ आयुष्य वेंच जंव आहे। तोंचि धांवोनियां जावें (जायें) ॥ ४ ॥ आळस न करीं या लाभाचा। तुका विनवी कुणबियाचा ॥ ५ ॥ [२८८२]

देवाचें चरित्र नाठवे सर्वथा। विनोदाची कथा गोड वाटे ॥ १ ॥ हातावरि हात हांसोनि आफळी। वाजवितां टाळी लाज वाटे ॥ २ ॥ तुका म्हणे थुंका त्याच्या तोंडावरि। जाती यमपुरी भोगायला ॥ ३ ॥ [२८८३]

अद्वैतीं तों माझें नाहीं समाधान। गोड हे चरणसेवा तुझी ॥ १ ॥ करूनी उचित देईं हेंचि दान। आवडे कीर्तन नाम तुझें ॥ २ ॥ देवभक्तपण सुखाचा सोहळा। ठेवूनि निराळा दावीं मज ॥ ३ ॥ तुका म्हणे आहे तुझें हें सकळ। कोणे एके काळें देईं मज ॥ ४ ॥ [२८८४]

हेंचि माझें तप हेंचि माझें दान। हेंचि अनुष्ठान नाम तुझें ॥ १ ॥ हेंचि माझें तीर्थ हेंचि माझें व्रत। सत्य हें सुकृत नाम तुझें ॥ २ ॥ हाचि माझा धर्म हेंचि माझें कर्म। हाचि नित्यनेम नाम तुझें ॥ ३ ॥ हाचि माझा योग हाचि माझा यज्ञ। हेंचि जपध्यान नाम तुझें ॥ ४ ॥ हाचि कुळाचार हाचि कुळधर्म। हाचि नित्यनेम नाम तुझें ॥ ५ ॥ हा माझा आचार हा माझा विचार। हा माझा निर्धार नाम तुझें ॥ ६ ॥ तुका म्हणे दुजें सांगायासी नाहीं। नामेंविण कांहीं धनवित्त ॥ ७ ॥ [२८८५]

कोणें साक्षीवीण। केलें उधारा (उद्धारा) भजन ॥ १ ॥ ऐसें सांगा जी दातारा। माझी भक्ति परंपरा ॥ २ ॥ कोणें नाहीं केली आळी। ब्रह्मज्ञानाहुनि वेगळी ॥ ३ ॥ कोणाचें त्वां कोड। नाहीं पुरविला लाड ॥ ४ ॥ कोणाच्या उद्धारा। केला विलंब माघारा ॥ ५ ॥ तुका म्हणे भिन्न। कां हें बोलें (बोला) साक्षीवीण ॥ ६ ॥ [२८८६]

त्वरेनें पंढरपुरास धांवत जा ३. जोंपर्यंत आयुष्याची खर्ची (शिदोरी) तुमच्याजवळ आहे तोंपर्यंत मोठ्या वेगानें धांवत जा ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या लाभाविषयींचा आळस करूं नका, अशी विनंति मी कुणबी (कुणब्याचा पोर) करीत आहें ५. [२८८२]

क्षुद्र पामरांना देवाच्या चरित्राचा आठव निश्चयानें होत नसून थट्टामस्करीच्या गोष्टी ऐकण्यास गोड वाटतात १. त्या गोष्टी ऐकून दुसऱ्याच्या हातावर हात आपटून अट्टाहासानें हंसतात, त्यांना हरिकीर्तनाच्या ठिकाणीं टाळी वाजविण्यास लाज वाटते २. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या लोकांचे स्वभाव असले आहेत त्यांच्या तोंडावर बेलाशक थुंकावें, कारण ते यमपुरी भोगावयास जातात ३. [२८८३]

हे देवा, अद्वैताच्या ठिकाणीं माझें चित्त समाधान पावत नाहीं, कारण तुझ्या चरणांची सेवाच मला गोड वाटते १. तुझें नामसंकीर्तन मला आवडतें, म्हणून तीच उचित देणगी तुम्ही मला द्या २. तुमच्या स्वरूपापासून वेगळें ठेवून तुम्ही देव व आम्ही भक्त ह्या सुखाचा सोहळा दाखवा ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, हें सर्व जगत् तुझेंच आहे, पण कोणत्या तरी एका काळीं मला माझ्या इच्छेप्रमाणें देणगी द्यावी ४. [२८८४]

हे देवा, तुझें नामस्मरण करावें हेंच माझें तप, दान व अनुष्ठान आहे १. तुझें नामस्मरण करणें हेंच माझें खरें पुण्य असून ह्या योगानेंच तीर्थें व व्रतें घडतात २. नामोच्चार करण्याचा माझा नित्यनेम आहे व हेंच माझें कर्मधर्म आहे ३. योग, यज्ञ, जप व ध्यान हीं तुझ्या एका नामाच्याच योगानें घडतात ४. तुझा नामोच्चार करावा हाच माझा कुळाचार व कुळधर्म असून हाच नित्य नेम आहे ५. तुझें नामस्मरण करणें हाच माझा आचार व विचार आहे असें निश्चयानें सांगतों ६. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या एका नामावांचून माझ्याजवळ द्रव्य वगैरे दुसरें सांगण्यासारखें कांहीं एक नाहीं ७. [२८८५]

हे देवा, प्रत्यक्ष अनुभवावांचून तुमचें उधारीचें भजन कोणी केलें आहे काय? (*पाठभेद :* कोण्याहि भक्तानें आपल्या उद्धाराकरितां जें तुमचें भजन केलें तें तुमच्या भजनानें उद्धरून गेलेल्या संतांच्या साक्षीवांचून का केलें आहे?) १. अहो देवा, तुम्हीच सांगा. माझी तर भक्तिपरंपरा माझ्या कुळांत परंपरेनें चालत आली आहे २. पूर्वीं ब्रह्मज्ञानावांचून दुसरा कोणी हट्ट केला नाहीं काय? ३. त्याविषयीं तुम्हीं कौतुकानें कोणाचा लाड पुरविला नाहीं काय? ४. अशा प्रकारच्या मागील भक्तांचा उद्धार करण्यास तुम्हीं कधीं उशीर लाविला होता काय? ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचें बोलणें मी अनुभवावांचून बोलत नाहीं ६. [२८८६]

सुखरूप चाली । हळूहळू उसंतिली ॥ १ ॥ बाळगोपाळाची वाट । सेव्यसेवकता नीट ॥ २ ॥ जरी झाला श्रम । तरी पडों नये भ्रम ॥ ३ ॥ तुका म्हणे दासां । देव सरिसा सरिसा ॥ ४ ॥ [२८८७]

चुकली ते वाट । पुढें सांपडली नीट ॥ १ ॥ म्हणऊनी गर्भवास । नेणती ते हरिचे दास ॥ २ ॥ संचिताचा संग । काय जाणों पावे भंग ॥ ३ ॥ तुका म्हणे दृष्टी । उघडी तो नव्हे कष्टी ॥ ४ ॥ [२८८८]

कई तो दिवस देखेन मी डोळां । कल्याण मंगळामंगळाचें ॥ १ ॥ आयुष्या शेवटीं पायांसवें भेटी । काळ वेळ तुटी झाल्या तरे ॥ २ ॥ सरो हें संचित पदरींचा गोवा । उताविळ देवा मन झालें ॥ ३ ॥ पाउलापाउलीं करितां विचार । अनंत विकार चित्ता अंगीं ॥ ४ ॥ म्हणउनि भयाभीत होतो जीव । भाकितसें कींव आटाहासें (अट्टाहासें) ॥ ५ ॥ दुःखाच्या उत्तरीं आळविले पाय । पाहणें तों काय अजून अंत ॥ ६ ॥ तुका म्हणे होईल आइकिलें कानीं । तरी चक्रपाणी धांव घाला ॥ ७ ॥ [२८८९]

कळों येतें वर्म । तरी न पावतों श्रम ॥ १ ॥ तुम्हां शिरीं होता भार । आम्हां कैंचा संचार ॥ २ ॥ होतें अभयदान । तरी स्थिर होतें मन ॥ ३ ॥ तुका म्हणे पाहें । ऐसी वाट उभा आहें ॥ ४ ॥ [२८९०]

वारंवार हाचि न पडावा विसर । वसावें अंतर तुमच्या गुणीं ॥ १ ॥ इच्छेचा ये दाता तूं एक समर्था । अगा कृपावंता मायबापा ॥ २ ॥ लाभाचिये वोढी उताविळ मन । त्यापरि चिंतन चरणांचें ॥ ३ ॥ तुका म्हणे जीवीं जीवन ओलावा । पांडुरंगे द्यावा शीघ्र आतां ॥ ४ ॥ [२८९१]

आइकावीं माझीं कवतुक उत्तरें । देउनी सादरें चित्त देवा ॥ १ ॥ वोरसें आवडी आलों पायांपासीं । होय तें मनेंसीं सुख कीजे ॥ २ ॥ तुमचें न भंगे सर्वोत्तमपण । करितां समाधान

आम्ही ही वाट सुखानें चालून हळू हळू तिचें उल्लंघन करीत आहोंत (पुढें पुढें पाऊल टाकीत आहोंत) १. ही सेव्यसेवकपणाची वाट नीट असल्यामुळें बाळगोपाळ देखील त्या वाटेनें चालत आहेत २. ह्या मार्गानें जरी कांहीं श्रम झाला तरी परिणामीं कोणताहि भ्रम पडत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याचें कारण हेंच, कीं देव आपल्या सेवकाच्या समागमानें राहातो ४. [२८८७]

जे वाट चुकले होते त्यांना पुढें नामसंकीर्तनाचा सरळ मार्ग सांपडला १. ह्याकरिता असें वाटतें, कीं हरीचे दास गर्भवास जाणत नाहींत २. त्यांच्या संचितकर्माचा नाशच झाला कीं काय ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याची ज्ञानदृष्टि उघडी आहे, तो जन्ममृत्यूच्या येरझाऱ्यांनीं दुःखी होत नाहीं ४. [२८८८]

मी तो कल्याणदायक मंगलांत मंगल असा दिवस डोळ्यांनीं कधीं पाहीन ? १. आयुष्याच्या अखेर देवाच्या चरणांचा योग होऊन आयुष्य जरी संपलें तरी तो भवसागरांतून तरेल २. आपल्या पदरीं जें संचितकर्म आहे, तें नाहींसें होवो ह्याविषयीं, हे देवा, माझें मन फार उतावळें झालें आहे ३. ह्या प्रपंचांत पदोपदीं विचार करावे तों चित्ताच्या ठिकाणीं अनेक विकार आहेत ४. असें समजून माझा जीव भयभीत होत आहे. ह्याकरितां मोठ्या अट्टाहासानें तुला कींवकाकुळती येत आहें ५. मोठ्या दुःखानें तुला हांका मारीत आहें, तरी अजून तूं माझा अंत पाहातोस, हें काय बरें ! ६. तुकाराम महाराज म्हणतात, आपण माझे कींवकाकुळतीचे शब्द जर कानांवर घेतले असतील तर, अहो चक्रपाणि, मला भेट देण्याकरितां धांव घ्या ७. [२८८९]

जर खरोखर परमार्थाचें वर्म समजलें असतें तर मला श्रम झाले नसते १. आमचा सर्वस्वाचा (योगक्षेमाचा) भार तुमच्या डोक्यावर घेतला असता तर आमच्या पाठीमागें हा संसार कशाला लागला असता ? २. देवा, तुम्हीं जर अभयदान दिलें असतें तर माझें मन स्थिर झालें असतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां मी तुझी वाट पाहात उभा आहें ४. [२८९०]

वरचेवर तुमच्या गुणांचा विसर पडूं नये; तुमचे गुण निरंतर माझ्या अंतःकरणांत राहावे १. अगा कृपावंता मायबापा, इच्छिल्याप्रमाणें तूं दान देण्यास समर्थ आहेस २. मनाला लाभाची ओढ लागल्यामुळें तें चरणांचें चिंतन करीत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, जीवाचें जीवन जो प्रेमाचा ओलावा तो आतां तुम्ही त्वरित द्यावा ४. [२८९१]

हे देवा, मी कौतुकानें जें आपणाशीं बोलत आहें, तें मोठ्या सावध चित्तानें ऐकावें १. प्रेमपान्हाची आवड असल्यामुळें मी तुमच्या पायांजवळ आलों आहें. ज्यायोगेंकरून मनाला सुख होईल असें करा २. तुमचा सर्वोत्तमपणा

लेंकरांचें ॥ ३ ॥ तुका म्हणे जरी बोलतों बोबडें । तरी लाडेंकोडें कवतुकें ॥ ४ ॥ [२८९२]

नाहीं गुणदोष लिंपों देत अंगीं । झाडितां प्रसंगीं वरावरी ॥ १ ॥ निकटवासिया आळवितों धांवा । तेथूनियां देवा सोडवूनी ॥ २ ॥ उमटे अंतरीं तें करूं प्रगट । कळोनि बोभाट धांव घालीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तरि वांचलों या काळें । समर्थाचे बळें सुखी असों ॥ ४ ॥ [२८९३]

आतां येणें पडिपाडें । रस सेवूं हा निवाडें । मुंगीं नेली गोडें । ठेविलिये अडचणी ॥ १ ॥ तैसें होय माझ्या जीवा । चरण न सोडीं केशवा । विषयबुद्धि हेवा । वोस पडो सकळ ॥ २ ॥ भुकेलिया श्वाना । गांठीं पडे सवें अन्ना । मुकों पाहे प्राणा । परि तोंडींचें न सोडी ॥ ३ ॥ काय जिंकियेलें मन । जीवित्व कामातुरा तृण । मागे व्यभिचारिण । भक्ती तुका ये जाती ॥ ४ ॥ [२८९४]

न पवीजे तया ठाया । आलों काया क्लेशेंसीं ॥ १ ॥ आतां माझें आणीं मना । नारायणा ओजेचें ॥ २ ॥ बहु रिणें पिडिलों फार । परिहार करावा ॥ ३ ॥ तुका म्हणे निर्बळ शक्ति । काकुलती म्हूण येतों ॥ ४ ॥ [२८९५]

बहु फिरलों ठायाठाव । कोठें भाव पुरेचि ना ॥ १ ॥ समाधान तों पावलों । उरलों बोलों यावरि ॥ २ ॥ घे गा देवा आशीर्वाद । आमुच्या नांद भाग्यानें ॥ ३ ॥ तुका म्हणे जेवूं आधीं । खवखव मधीं सारावी ॥ ४ ॥ [२८९६]

कोण येथें रिता गेला । जो जो आला या ठाया ॥ १ ॥ तांतडी ते काय आतां । ज्याची चिंता तयासी ॥ २ ॥ नांवासाठीं नेघे भार । न लगे फार वित्पत्ति ॥ ३ ॥ तुका म्हणे न लगे जावें । कोठें देवें सुचेना ॥ ४ ॥ [२८९७]

जो आहे तो आमचें बालकांचें समाधान करण्यानें नष्ट होणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जरी मी बोबडें बोलत आहें तरी त्याचें लाडानें कोडकौतुक करावें ४. [२८९२]

लोकांचे गुणदोष कोणत्याहि प्रसंगीं मी माझ्या आंगीं लागूं देत नाहीं, वरचेवर प्रसंगाला ते झाडीत (टाळीत) आहें १. हे सन्निध वास करणाऱ्या देवा, मी तुम्हांला हांक मारीत आहें ह्याकरितां धांवत धांवत येऊन येथून माझी सुटका करा २. जें आमच्या अंतःकरणांत येत आहे तें आम्ही प्रगट करूं. तें देवाला समजून तो धांवत येईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही समर्थाचे बालक आहोंत म्हणून ह्या परिस्थितींत वांचलों असून सुखी आहोंत ४. [२८९३]

ज्याप्रमाणें अडचणींत ठेविलेली साखर मुंगी नेते, त्याप्रमाणें आतां सूक्ष्म रीतीनें ह्या परमार्थरसाचें सेवन करूं १. म्हणून माझ्या जीवाची स्थिति मुंगीसारखी हावरी झाली आहे. हे केशवा, तुमचे चरण मी सोडणार नाहीं. विषयबुद्धी-विषयींची सर्व हांव नाहींशी होवो २. भुकेलेल्या कुत्र्याची व अन्नाची गांठ पडल्यावर त्याच्या तोंडचें अन्न जर कोणी घेऊं लागलें तर तें प्राण देईल पण तोंडांतलें सोडणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, कामातुरानें मनाला काय जिंकलें ! कामातुराला आपलें जीवित तृणवत् आहे म्हणून तो जसा व्यभिचारी स्त्री मागतो (वासनातृप्तीकरितां वेश्ये-जवळहि याचना करितो) त्याच जातीची श्रीहरीच्या भक्तीची मी इच्छा करीत आहें ४. [२८९४]

देहाला क्लेश देऊन येथें आलों तरी त्या ठिकाणीं प्रवेश होत नाहीं १. हे नारायणा, आतां मजविषयीं माझें परम हित करण्याचा कांहीं सरळ विचार तुम्ही तुमच्या मनांत आणा २. मी पुष्कळ पापपुण्यांच्या भोगाच्या कर्जानें पीडित झालों आहें त्यांतून तुम्ही सुटका करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी शक्तिहीन आहें म्हणून तुम्हांला काकुळती येत आहें ४. [२८९५]

मी पुष्कळ ठिकाणें फिरलों परंतु माझी इच्छा कोठेंहि पूर्ण होत नाहीं १. समाधान प्राप्त झालें. आतां केवळ बोलण्याकरितांच उरलों आहें २. अगा देवा, तूं आमचा आशीर्वाद घे आणि आमच्या भाग्यानें तरी तूं सुखाचा राहा ३. तुकाराम महाराज म्हणतात, आधीं आपण दोघे ऐक्यरसाचें जेवण करूं, म्हणून मध्यें आलेली खटपट दूर करावी ४. [२८९६]

जो कोणी ह्या ठिकाणीं देवाजवळ आला तो रिकामा निराश होऊन गेला काय ? १. आतां त्वरा करण्याचें काय काम आहे ! सर्व कांहीं चिंता त्यासच असते २. एका हरिनामचिंतनावांचून जो इतर साधनांचें ओझें घेत नाहीं व ज्याला फार व्युत्पत्तीची (विद्वत्तेचीहि) जरूर नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवाच्या योगानें कोठें जावेंसें वाटत नाहीं व कांहीं सुचत नाहीं ४. [२८९७]

इंद्रियांचें पुरे कोड। तेंचि गोड पुढतीही ॥ १ ॥ जावें म्हणती पंढरपुरा। हाचि बरा संसार ॥ २ ॥ बैसलें तें मनामुळीं। सुख डोळीं देखिलें ॥ ३ ॥ तुका म्हणे देती कान। वाणावाण निवडुनी ॥ ४ ॥ [२८९८]

आतां देवा मोकलिलें। तुम्हीं भलें दिसेना ॥ १ ॥ आतां नाहीं जीव भाव। उरला ठाव वेगळा ॥ २ ॥ सांभाळून घ्यावें देवा। आपणासवा यावरि ॥ ३ ॥ तुका म्हणे नग्न भाज। तरि ते लाज स्वामीसी ॥ ४ ॥ [२८९९]

आशाबद्ध आम्ही भाकितसों कींव। तत्पर हा जीव कार्यापाशीं ॥ १ ॥ प्रत्तिउत्तराची पाहातसें वाट। करूनि बोभाट महाद्वारीं ॥ २ ॥ आपुलिया उचितें करूनियां ठेवीं। संबंध गोसावी तोडोनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे एक झालिया निवाड। कोण बडबड करी मग ॥ ४ ॥ [२९००]

खद्योतें फुलविलें रविपुढें ढुंग। साक्षी तंव जग उभयतां ॥ १ ॥ आपल्या आपण नाहीं शोभों येत। चार करी स्फीत दाखवूनि ॥ २ ॥ खाणार ताकाचें असे तें मांजर। आपणचि अधीर कळों येतें ॥ ३ ॥ तुका म्हणे जळो मैंदाची मवाळी। दावूनियां नळी कापी सुखें ॥ ४ ॥ [२९०१]

नाहीं सरों येत कोरड्या उत्तरीं। जिव्हाळ्याची बरी ओली (बोली) ठायीं ॥ १ ॥ आपुलिया हिता मानिसी कारण। सत्या नारायण साह्य असो ॥ २ ॥ निर्वाणीं निवाड होतो आगीमुखें। तप्त लोह सुखें धरितां हातीं ॥ ३ ॥ तुका म्हणे नेमा न टाळतां बरें। खऱ्यासीचि खरें ऐसें नांव ॥ ४ ॥ [२९०२]

ज्याच्या योगानें इंद्रियांची इच्छा पूर्ण होते तेंच पुनः गोड लागतें १. वारकरी संत पंढरपुराला जात असावें असें व क्षुद्र संसारी माणसें हाच संसार चांगला असें म्हणतात २. जें मनोवृत्तीच्या बुडाशीं आहे तें श्रीहरीचें सुख ज्यांनीं डोळ्यांनीं पाहिलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, प्रत्येक जण आपापल्या दृष्टीनें चांगल्या-वाईटाची निवड करून त्याच्याकडे लक्ष देतात (त्याचा स्वीकार करतात) ४. [२८९८]

हे देवा, आतां तुम्हीं आमचा त्याग केलात हें चांगलें दिसत नाहीं १. आतां आमच्या जीवाभावाला आधार असें निराळें ठिकाण राहिलें नाहीं २. हे देवा, ह्यानंतर तुम्हीं आपल्या बरोबर आम्हांला सांभाळून घ्यावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याची बायको नागवी फिरते आहे तिची लज्जा नवऱ्यास आहे त्याप्रमाणें हे देवा, माझी लाज तुम्हांस आहे ४. [२८९९]

हे देवा, आम्ही आशेनें बद्ध झालेले जीव स्वकार्य करण्याविषयीं तत्पर होऊन तुम्हांला कींवकाकुळती करीत आहोंत १. महाद्वाराच्या ठिकाणीं उभे राहून आम्ही गलबला करीत आहोंत व तुमच्या उत्तराची वाट पाहात आहोंत २. हे देवा, सर्व उपाधींचा व माझा संबंध तोडून टाका. हें योग्य करणें तुम्ही आपलें बजावा ३. तुकाराम महाराज म्हणतात, एकदां ह्याचा निकाल लागला म्हणजे कोण बडबड करीत बसेल? ४. [२९००]

काजव्यानें आपल्या ढुंगणाचे ठिकाणीं भासणारी चकाकी सूर्याकडे केली तर तेथें होणाऱ्या प्रकारासंबंधानें (दोघांपैकीं कोणाचा प्रकाश अधिक आहे ह्याविषयीं) सर्व जग साक्षी आहे १. आपली आपण कोणतीहि शोभा मिरविणें शोभत नाहीं, तथापि कित्येक आपला असला आचरटपणाच्या व्यवहाराचा मोठेपणा दाखवितात २. जें असार ताकाचें सेवन करितें तें मांजर आहे, असें त्याच्याच सेवन करण्याच्या उतावळ्या स्वभावावरून दिसून येतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मैंदाच्या (लबाड माणसाच्या) मऊपणाच्या व्यवहाराला आग लागो, कारण बकऱ्याला लोभ दाखवून खाटीक त्याचा गळा सुखानें कापतो ४. [२९०१]

तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत अनुभव नसतांना कोरड्या बडबडीनें हें कांहीं चालणार नाहीं (ती बडबड मान्य होत नाहीं). कांहीं तरी ज्ञऱ्याची चांगली ओल (अनुभवाचा ओलावा) पाहिजे १. आपलें हित जर मानशील तर नारायण साह्य होईल, कारण खऱ्याला नारायण साह्य करतो. अग्निदिव्य करतांना आरोपीनें तापलेलें लोखंड हातीं सुखानें धरल्यानें तो निर्दोषी ठरतो व हात पोळल्यास तो दोषी ठरतो, असा खरा निकाल होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, खऱ्या आचरणाच्या नियमापासून न ढळणें हें चांगलें, कारण खऱ्यालाच खरें असें नांव आहे ४. [२९०२]

आलों उल्लंघूनि दुःखाचे पर्वत । पायांपाशीं हित तुमच्या तरी ॥ १ ॥ न देखेंचि लासा दुःखी होतें मन । कठिणें कठिण वाटतसे ॥ २ ॥ नव्हे सांडी परी वाटतें निरास । न ये माझा दिस संकल्पाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्हीं सदैव जी देवा । माझ्या हाचि जीवा एक ठाव ॥ ४ ॥ [२९०३]

किती सोसिती करंटीं । नेणों संसाराची आटी । सर्वकाळ पोटीं । चिंतेची हळहळ ॥ १ ॥ रिकामिया तोंडें राम । काय उच्चारितां श्रम । उफराटा भ्रम । गोवी विषय माजिरा ॥ २ ॥ कळतां न कळे । उघडे झांकियेले डोळे । भरलें त्याचे चाळे । अंगीं वारें मायेचें ॥ ३ ॥ तुका म्हणे जन । ऐसें नांवबुद्धिहीन । बहुरंगें भिन्न । एकीं एक न मिळे ॥ ४ ॥ [२९०४]

मंगळाचा मंगळ सांटा । विट तोटा नेणे तें ॥ १ ॥ हें भरा सातें आलें । भलें भलें म्हणवावें ॥ २ ॥ जनीं जनार्दन वसे । येथें दिसे तें शुद्ध ॥ ३ ॥ तुका म्हणे बहुतां मुखें । खरें सुखें ठेवावें ॥ ४ ॥ [२९०५]

नामाचा महिमा बोलिलों उत्कर्ष । अंगा कांहीं रस न येचि तो । कैसें समाधान राहे पांडुरंगा । न लगेचि अंगा आणी कांहीं ॥ २ ॥ लाभाचिये अंगीं सोस कवतुकें । फिक्याचें तें फिकें वेवसाव ॥ ३ ॥ तुका म्हणे करा आपुला महिमा । नका जाऊं धर्मावरि माझ्या ॥ ४ ॥ [२९०६]

हेंचि वारंवार । पडताळुनी उत्तर ॥ १ ॥ करितों पायांसी विनंती । नुपेक्षावें कमळापती ॥ २ ॥ गंगोदकें गंगे । अर्घ्य द्यावें पांडुरंगे ॥ ३ ॥ जोडोनियां हात । तुका करी प्रणिपात ॥ ४ ॥ [२९०७]

तुमच्या पायांजवळ माझें हित आहे, म्हणून मी अनेक दुःखांचे पर्वत उल्लंघन करून येथें आलों आहें १. असें असून खरें हित मला दृष्टीस पडत नाहीं. त्या घायानें माझें मन दुःखी होत आहे. संकट वाटत आहे २. देवा, आपल्याकडून माझा त्याग झाला नाहीं तरी निराशा वाटते, कारण माझ्या प्राप्तीच्या संकल्पाचा दिवस अद्यापि येत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो जी देवा, तुम्ही सभाग्य आहांत (तुम्हांला आमची गरज नाहीं, पण) माझ्या जीवाला तुमचे पाय हेंच एक ठिकाण आहे ४. [२९०३]

हे करंटे लोक संसाराच्या खटाटोपाचे किती श्रम सोसतील हें समजत नाहीं. सर्व काळ ह्यांच्या हृदयांत चिंता तळमळत असते १. संसारांतून फावल्या वेळेस तोंड रिकामें असेल तेव्हां रामनामाचा उच्चार केला असतां कांहीं श्रम होतात काय ? पण विषयाचा भ्रम उफराटा गुंत्यांत घालून उन्मत्तपणा उत्पन्न करतो २. डोळे उघडे असून हे आंधळ्यासारखे वागतात, आणि समजत असून अज्ञानपणा घेतात, ह्याचें कारण मायेचें वारें त्यांच्या अंगांत भरलें आहे त्याच्या ह्या सर्व चेष्टा आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारच्या जनांस बुद्धिहीन म्हणावें. त्यांच्यामध्यें अनेक रंग असतात, म्हणून त्यांचे एकमेकांचे स्वभाव एकमेकांना मिळत नाहींत ४. [२९०४]

मंगलाच्या ठिकाणीं मंगलच सांठवण असतें म्हणून त्यास कधीं वीट येत नाहीं व कधीं तोटा होत नाहीं १. अहो जन हो, तुम्ही संसारबाजारांत आलां आहांत तर ह्या हरिनामरूपी मंगलाची सांठवण करून जगतामध्यें भलें म्हणवून घ्या २. सर्व जनांमध्यें जनार्दनाचें वास्तव्य आहे तें ह्या ठिकाणीं प्रत्यक्ष अनुभवास येऊन दिसलें म्हणजे तेंच मंगल आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याविषयींचा निवाडा बहुतांचे (संतांचे) मुखानें खरा झाला आहे त्याचाच सुखानें संग्रह करा ४. [२९०५]

मी नामाचें माहात्म्य विशेष वर्णन केलें आहे, पण त्या विषयींचा अनुभव माझ्या अंगास येत नाहीं १. हे पांडुरंगा, तें जर कांहींच अंगास येत नाहीं, तर माझ्या चित्तांत समाधान कसें राहील ? २. व्यापारांत कांहीं लाभ झाला तर त्या विषयींच्या कौतुकानें जास्त हांव वाढते; नाहींपेक्षां फिकेपणाचे व्यापार फिके होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्ही माझ्या धर्माकडे पाहूं नका. जसें तुमचें माहात्म्य असेल तसें करा ४. [२९०६]

हींच वचनें पडोसा पाहून तुमचें तिकडे लक्ष वेधून मी वरचेवर बोलत आहें १. अहो कमलापति, ह्या विनंतीचा तुम्ही अव्हेर करूं नका, अशी माझी विनंति तुमच्या पायांपाशीं आहे २. अहो पांडुरंगे, जसें गंगेचें पाणी अर्घ्य देण्याच्या निमित्तानें गंगेंतच सोडावें (तसें तुम्हीं बोलविलेलीं वचनें तुम्हांस अर्पण करितों) ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी दोन्ही हात जोडून तुम्हांस नमस्कार करीत आहें ४. [२९०७]

अवचित या तुमच्या पायां। देवराया पावलों ॥ १ ॥ बरवें झालें देशाउर। आल्या दूर सारिखें ॥ २ ॥ राहोनियां जातों ठायां। आलियाची निशाणी ॥ ३ ॥ तुका म्हणे चरणसेवा। जोडी हेवा लाधलों (ली) ॥ ४ ॥ [२९०८]

आतां पाविजेल घरा। या दातारा संगती ॥ १ ॥ पायांवरि ठेवूनि माथा। सर्वथा हा नुपेक्षी ॥ २ ॥ येथून तेथवरि आतां। नाहीं सत्ता आणिकांची ॥ ३ ॥ तुका म्हणे चक्रपाणी। शिरोमणी बळियांचा ॥ ४ ॥ [२९०९]

बरवें माझ्या केलें मनें। पंथें येणें निघालें ॥ १ ॥ अभयाचे जावें ठाया। देवराया प्रतापें ॥ २ ॥ साधनाचा न लगे पांग। अवघें सांग कीर्तनें ॥ ३ ॥ तुका म्हणे सत्ता थोरी। कोण करी खोळंबा ॥ ४ ॥ [२९१०]

मागें पुढें नाहीं। दुजें यावेगळें कांहीं ॥ १ ॥ नाहीं उरलें आणीक। केला झाडा सकळिक ॥ २ ॥ विश्वासावांचून। नावें दुजियाचें शून्य ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं। बोलायाची उरी नाहीं ॥ ४ ॥ [२९११]

वैराग्याचा अंगीं झालासे संचार। इच्छी वनांतर सेवावया ॥ १ ॥ कां जी माझें करूं नये समाधान। वियोगानें मन शिणतसे ॥ २ ॥ न येचि न्यावया पंढरीचें मूळ। न देवेचि माळ कंठींचीही ॥ ३ ॥ तुका म्हणे झालें अप्रीतीचें जीणें। लाजिरें (लाजिर) हें वाणें सेवा करी ॥ ४ ॥ [२९१२]

आळीकारा कोठें साहातें कठीण। आपुला ते प्राण देऊं पाहे ॥ १ ॥ सांभाळावें मायबापें कृपादृष्टी। पीडितां तो दृष्टीं देखों नये ॥ २ ॥ अंतरलों मागें संवसारा हातीं। पायांपें सरतीं झालों नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही विचारा जी देवा। ठेवाल तें ठेवा कोणे परी ॥ ४ ॥ [२९१३]

अहो देवराया, मी तुमच्या पायांजवळ अकस्मात् येऊन पोहोंचलों १. अनेक देश उलंघन करून दूर आल्याप्रमाणें आपले पाय प्राप्त झाले हें बरें झालें २. आतां ह्या ठिकाणीं चित्त ठेवून आपल्या मूळच्या ठिकाणीं जातों, तीच येथें आल्याची खूण आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या चरणसेवेच्या लाभाची हांव माझ्या ठिकाणीं उत्पन्न झाली ४. [२९०८]

आतां ह्या दात्या देवाच्या संगतीनें स्वस्वरूपाच्या घरास–ब्रह्मस्वरूपास पोहोंचणें होईल १. ह्या देवाच्या पायांवर मस्तक ठेविलें असतां हा निश्चयानें अव्हेर करणार नाहीं २. येथून तेथपर्यंत (ब्रह्मरूपी घराला) जाण्यास आतां दुसऱ्या कोणाची सत्ता नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा चक्र धारण करणारा देव बलवानांमध्यें श्रेष्ठ आहे ४. [२९०९]

ह्या देवाच्या मार्गानें माझें मन निघालें, हें त्यानें फार चांगलें केलें १. देवरायाच्या प्रतापानें निर्भय अशा स्थळास जाणें होईल २. नामसंकीर्तनानें सर्व कार्य सांग होतें आहे, म्हणून कोणत्याहि साधनाची गरज नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवाची मोठी सत्ता असल्यामुळें कोण हरकत करणार आहे ? ४. [२९१०]

मागें पुढें एक देवच भरलेला आहे, त्यावांचून दुसरें कांहीं नाहीं १. हृदयांतील सर्व विकारांचा झाडा केल्यामुळें आणीक कांहीं उरलें नाहीं २. एका देवाच्या ठिकाणीं विश्वास ठेविला आहे, त्यावांचून इतरांच्या नांवें शून्य घातलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां ह्यावांचून सांगण्यासारखें कांहीं राहिलें नाहीं ४. [२९११]

हे देवा, माझ्या हृदयांत वैराग्याचा संचार झाला आहे, त्या योगानें अरण्यांत जाऊन एकांतवास करण्याची मला इच्छा उत्पन्न झाली आहे १. अहो देवा, ह्या विरक्त असलेल्या मनुष्याचें आपण कां समाधान करूं नये ? तुमचा वियोग झाल्यामुळें मनास फार दुःख होत आहे २. पंढरीहून मला न्यावयाकरितां बोलावणें येत नाहीं व तुमच्या कंठांतील माळ देखील तुमच्यानें पाठवून देववत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात. तुमची प्रीति नाहीं असलें माझें जगणें झालें आहे, आतां जी सेवा करतों ती लाजिरवाणी होत आहे ४. [२९१२]

हट्ट करणाऱ्या लहान बालकास दूर धरलें, तर त्याला तो दुःखाचा कठिणपणा कोठें सहन होतो काय ? तें रडून रडून आपला प्राण द्यावयास पाहातें १. मायबापांनीं कृपादृष्टीनें अवलोकन करून आम्हां बालकांचा सांभाळ करावा. आम्ही पीडित झालेले तुम्ही दृष्टीनें देखील पाहूं नये २. तुमच्याकरितां पूर्वीच संसाराच्या हातून मीं आपली सुटका केली, तरी पण तुमच्या पायांची प्राप्तिहि होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो जी देवा, आतां ह्याविषयींचा विचार तुम्हीं करून, मला कोणत्या रीतीनें ठेवावयाचें असेल तसें ठेवा ४. [२९१३]

स्वप्नींचें हें धन हातीं ना पदरीं । प्रत्यक्ष कां हरि होऊं नये ॥ १ ॥ आजुनि कां करा चाळवाचाळवी । सावकाशें द्यावी सत्य भेटी ॥ २ ॥ बोलोनियां फेडा जीवींचि काजळी । पाहेन कोमळीं चरणांबुजें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझ्या जीवींचिया जीवा । सारूनियां ठेवा पडदा आतां ॥ ४ ॥ [२९१४]

येतील अंतरा शिष्टाचें अनुभव । तळमळे जीव तया सुखा ॥ १ ॥ आतां माझा जीव घेऊनियां बळी । बैसवावें ओळी संतांचिये ॥ २ ॥ विस्तारिली वाचा फळेंविण वेल । कोरडेचि बोल फोस (फोल) वांझे ॥ ३ ॥ तुका म्हणे आलों निर्वाणाचे वरी । राहों नेदीं उरी नारायणा ॥ ४ ॥ [२९१५]

म्हणउनि काय जीऊं भक्तपणें । जायाचीं भूषणें अळंकार ॥ १ ॥ आपुल्या कष्टाची करूनियां जोडी । मिरवीन उघडी इच्छावसें ॥ २ ॥ तुके तरि तुके (तुकीं) खऱ्याचें उत्तम । मुलाम्याचा श्रम कोठवरी ॥ ३ ॥ तुका म्हणे पुढें आणि मागें फांस । पावे ऐसा नास न करीं देवा ॥ ४ ॥ [२९१६]

आपणचि व्हाल साहे । कार्य आहे निर्वाणीचें (कासियाला हे धांवणी) ॥ १ ॥ भाकिली ते उरली कींव । आहे जीव जीवपणें ॥ २ ॥ आहाच कैंचा बीजा मोड । प्रीती कोड वांचूनि ॥ ३ ॥ तुका म्हणे दंडिन काया । याल तया धांवणिया ॥ ४ ॥ [२९१७]

निश्चितीनें होतों करूनियां सेवा । कां जी मन देवा उद्वेगिलें ॥ १ ॥ अनंत उटती चित्ताचे तरंग । करावा हा त्याग वाटतसे ॥ २ ॥ कोण तुम्हांविण मनाचा चाळक । दुजें सांगा एक नारायणा ॥ ३ ॥ तुका म्हणे माझा मांडिला विनोद । करवूं (करूं) नेणें छंद कराल काई ॥ ४ ॥ [२९१८]

अहो हरि, स्वप्नांत दिसलेलें द्रव्य हातांत अगर पदरांत राहात नाहीं, तसें तुमच्या मिथ्यापणाचा आभास टाकून तुम्ही प्रत्यक्ष कां प्रगट होत नाहीं ? १. अजून कां फसवाफसवी करतां ? कांहीं कालांतरानें तरी मला खरें दर्शन द्या २. माझ्याशीं प्रत्यक्ष भाषण करून जीवांतील काळजी नाहींशी करा, म्हणजे तुमचें कोमल चरणकमल मी डोळे भरून पाहीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो, माझ्या जीवींच्या जीवा देवा, तुमच्या-आमच्यामध्यें जो मायेचा पडदा आडवा आहे, तो आतां नाहींसा करून ठेवा ४. [२९१४]

पूर्वीं जे श्रेष्ठ संत झाले त्यांच्या ठिकाणीं ज्या सगुण-निर्गुण सुखाचे अनुभव होते, ते माझ्या अंतःकरणांत येतील काय ? ह्याविषयीं माझा जीव तळमळत आहे १. हे देवा, आतां माझा जीव तुम्हीं बलिदान घेऊन त्या संतांच्या पंक्तीला मला बसवावें २. जसें कण नसलेलें भूस व्यर्थ असतें अथवा फळाखेरीज वेल वांझ असतो, त्याप्रमाणें तुमच्या सुखाखेरीज माझ्या वाणीचा विस्तार झाला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, मी आतां आणीबाणीवर आलों आहें, म्हणून कांहीं उरी ठेवणार नाहीं ४. [२९१५]

परत देण्याचे उसने दागिने अंगावर घालून भक्त असें लोकांत म्हणवून काय म्हणून मी जगावें ? १. आपल्या श्रमानें प्राप्त करून घेतलेले (भक्तीचे) सुखालंकार इच्छेप्रमाणें अंगावर घालून उघड मिरवावें हें बरें २. जें कांहीं खरें (सोनें) आहे, तें उत्तम किंमतीच्या पदार्थाबरोबर विकलें जातें. मुलामा केलेल्या खोट्या (सोन्याच्या) नाण्याचा श्रम कोठपर्यंत राहाणार आहे ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, ज्या योगानें मागील व पुढील संचित कर्मांच्या पाशांत मी पडेन असलें माझा नाश करणारें कृत्य मी करणार नाहीं ४. [२९१६]

हे देवा, निर्वाणीच्या (अखेरच्या) कार्यास मीं आरंभ केला आहे त्यास आपणच साह्य कराल १. आजपर्यंत तुम्हांला कींवकाकुळती केली ती राहिली (त्याचें कांहीं फल मिळालें नाहीं,) कारण जीवपणानें जीव कायम आहे २. तुम्ही जर कौतुकानें प्रीति करीत नाहीं, तर वरवर पेरलेल्या बीजाला अंकुर कसा येईल ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मी आपल्या शरीराला दंड करून तुमचा धांवा करीन, म्हणजे तुम्हांस धावून यावें लागेल ४. [२९१७]

अहो देवा, मी निश्चितपणानें तुमची सेवा करीत असतांना माझ्या मनास काळजी कां उत्पन्न केली ? १. चित्ताच्या ठिकाणीं अनेक प्रकारच्या विकारांचे तरंग उत्पन्न होतात. त्या योगानें तुमच्या सेवेचा त्याग करावा, असें वाटत आहे २. हे नारायणा, तुमच्यावांचून मनाचें चलनवलन करणारा दुसरा कोण आहे ? दुसरा एखादा कोणी असल्यास मला तो सांगा ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हीं माझी थट्टा आरंभिली आहे. मी कोणत्या प्रकारचा हट्ट करूं जाणत नाहीं; त्याला तुम्ही काय कराल ? ४. [२९१८]

आश्वासावें दास। तरी घडतो विश्वास ॥ १ ॥ नाहीं चुकत चाकरी। फुटे लाडक्याचे थोरी (पुटे लाडेशाची थोरी) ॥ २ ॥ स्वामीच्या उत्तरें। सुख वाटे अभयकरें ॥ ३ ॥ न मगें परि भातें। तुका म्हणे निढळ रितें (वांटे) ॥ ४ ॥ [२९१९]

जेणें होय हित। तें तूं जाणसी उचित ॥ १ ॥ मज नको लावूं तैसें। वायां जाय ऐसें पिसें ॥ २ ॥ धरितोसी सत्ता। होसी सकळ जाणता ॥ ३ ॥ चतुराच्या राया। अंगीकारावें तुकया ॥ ४ ॥ [२९२०]

राहे उभा वादावादीं। तरी फंदीं सांपडे ॥ १ ॥ लव्हाळ्यासी कोठें बळ। करिल जळ आपुलें ॥ २ ॥ कठिणासी बळजोडा। नम्र पीडा देखेना ॥ ३ ॥ तुका म्हणे सर्वरसीं। मिळे त्यासी गोत तें ॥ ४ ॥ [२९२१]

म्हणउनि जाली तुटी। नाहीं भेटी अहंकारें ॥ १ ॥ दाखविलें देवें वर्म। अवघा श्रम नासला ॥ २ ॥ हातें मुरगळितां कान। नाहीं भिन्न वेदना ॥ ३ ॥ तुका म्हणे एकांतसुखें। अवघीं गोतें गुंतलीं ॥ ४ ॥ [२९२२]

न पडो आतां हाडीं घाव। मध्यें कींव नाशक ॥ १ ॥ करविली आत्महत्या। जीवा कां त्या द्वंद्वाच्या ॥ २ ॥ आशापाशीं गुंतला गळा। तेणें कळाहीन जालों ॥ ३ ॥ तुका म्हणे लावूं मुळीं। जीवकुळी थारेसी ॥ ४ ॥ [२९२३]

सामावे कारण। नाहीं सोसत धरणें ॥ १ ॥ लाही थिंके लाजिरवाणी। हीन कमाईची घाणी ॥ २ ॥ पुष्प जवळी नाका। दुर्गंधीच्या नांवें थुंका ॥ ३ ॥ तुका म्हणे किती। उपदेशहीन जाती ॥ ४ ॥ [२९२४]

भिऊं नये अशा प्रकारचें आश्वासन तुम्हीं आपल्या सेवकास दिलें तर त्याचा विश्वास तुमच्या ठिकाणीं पूर्णपणें होतो १. वरचेवर लाड वाढल्यानें सेवकाची थोरी वाढून तो सेवा करण्यास चुकत नाहीं २. जर स्वामींनीं मस्तकीं अभय हस्त ठेवून, भिऊं नको म्हटलें, तर सेवकास फार सुख वाटतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही सेवक तुम्हांस कांहीं मुशारा (सेवेबद्दल बक्षीस) मागत नाहीं, पण करंटे असे असल्यास व्यर्थ वांटतें [म्हणून वर दर्शविल्याप्रमाणें करा.] [२९१९]

हे देवा, ज्या योगानें माझें हित होईल तें योग्य करणें तूं जाणत आहेस १. ह्याकरितां ज्या योगानें मी वायां जाईन असलें वेड मला लावूं नकोस २. तूं सर्व सत्ताधारी व सर्व जाणणारा आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो चतुरांच्या राजा देवा, माझा तुम्ही अंगीकार करा ४. [२९२०]

जर एखादा वादी वाद घालण्यास उभा राहील, तर तो शत्रूच्या घातपाताच्या कारस्थानांनीं जिंकला जाईल १. नम्रपणानें लव्हाळा पाण्यामध्यें राहातो, त्याच्यापुढें त्या पाण्याचें बळ न चालतां तें त्याच्यासारखें होतें २. जो कोणी कठोर आहे, त्याला जोडीदार बलवान् मिळतो, पण नम्रत्वाच्या ठिकाणीं पीडा होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो सर्व रसांच्या ठिकाणीं मिळतो, त्याला सर्व जग आप्त होतें ४. [२९२१]

अहंकाराचा संबंध नाहीं, म्हणून सर्व प्रपंचाचा निरास झाला १. असें मर्म मला देवांनीं दाखविलें, म्हणून सकळ प्रापंचिक श्रम नाहींसा झाला २. आपला कान आपल्या हातानें मुरगळल्यास त्या वेदना दुसऱ्या कोणास होत नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या ठिकाणीं देहाची अहंता नाहीं त्या स्वरूपएकांताचें सुख मिळाल्यास सर्व जगत् आप्तपणानें आपल्या ठिकाणीं गुंतलें जातें ४. [२९२२]

आतां त्या अभिमानाचा घाव माझ्या देहहाडाच्या ठिकाणीं पडूं नये, कारण तो घाव आंतील नम्रपणाचा नाश करणारा आहे १. त्या योगानें जीवाशीं (सुखदुःखें, मान–अपमान इत्यादि) द्वंद्वांचें वैर करून आत्महत्या करवीत आहे, म्हणून त्या अभिमानाचें काय कारण आहे? २. माझा गळा आशेच्या पाशांत गुंतला, त्यामुळें मी कळाहीन झालों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आपल्या जीवाची कुळी मूळच्या ठिकाणीं (स्वरूपीं) लावूं ४. [२९२३]

आपलें खरें कार्य करून घेतल्यास देवाच्या ठिकाणीं समावेश होतो. त्यावांचून व्यर्थ धरणें घेणें त्याला सोसत नाहीं १. शोक करणें हें लाजिरवाणें असून वाईट कमाईची ही वाण आहे. २. सुगंधि फूल नाकाजवळ असावें व दुर्गंधीच्या नांवावर थुंकावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या वाईट जातीस उपदेश तरी किती करावा? ४. [२९२४]

असाल ते तुम्ही असा । आम्ही सहसा निवडों ना ॥ १ ॥ अनुसरलों एका चित्तें । हातोहातें गिवसीत ॥ २ ॥ गुणदोष काशासाठीं । तुमचे पोटीं वागवूं ॥ ३ ॥ तुका म्हणे दुजें आतां । कोठें चित्ता आतळों ॥ ४ ॥ [२९२५]

सोंवळा होऊं तों वोंवळें जडलें । सांडीमांडी बोलें (बोल) तोंडीं बीजीं ॥ १ ॥ एकसरी केली कळिवरें साटी । आतां नका तुटी पायांसवें ॥ २ ॥ संकल्पीं विकल्प पापाचा सुकाळ । रज्जुसर्प मूळ मरणाचें ॥ ३ ॥ तुका म्हणे हें तूं ब्रह्मांड चाळिता । मी कां करूं चिंता पांडुरंगा ॥ ४ ॥ [२९२६]

आहें तैसा (ऐसा) आतां आहें ठायीं बरा । ठेविलों दातारा उचितें त्या ॥ १ ॥ वचनाचा भार पडिलिया शिरीं । झालें मग भारी उतरेना ॥ २ ॥ अबोल्याची सवे लावुनियां मना । फांकों नेदूं गुणा ऐसें करूं ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां गोवळ्याचा संग । राखावें तें अंग जाणतसों ॥ ४ ॥ [२९२७]

तूं माझा कोंवसा । परी न कळे या धसां ॥ १ ॥ कूट खाती मागें पुढें । जाती निरयगांवा पुढें ॥ २ ॥ मज म्हणताती कवी । निषेधुनी पापी जीवीं ॥ ३ ॥ तुका म्हणे पांडुरंगा । आतां कोण लेखी जगा ॥ ४ ॥ [२९२८]

दर्पणासी बुजे । नखटें तोंड लपवी लाजे ॥ १ ॥ गुण ज्याचे जो अंतरीं । तोचि त्यासी पीडा करी ॥ २ ॥ चोरा रुचे निशी । देखोनियां विटे शशी ॥ ३ ॥ तुका म्हणे जन । देवा ऐसे भाग्यहीन ॥ ४ ॥ [२९२९]

म्हणऊनि शरण जावें । सर्वभावें देवासी ॥ १ ॥ तो हा उतरील पार । भव दुस्तर नदीचा ॥ २ ॥ बहु आहे करुणावंत । अनंत हें नाम ज्या ॥ ३ ॥ तुका म्हणे साक्षी आलों । तरी केलें प्रगट ॥ ४ ॥ [२९३०]

अहो जन हो, आतां तुम्ही जसे असाल तसे असा, पण आम्ही सहसा तुमचे गुणदोष कधींहि निवडणार नाहीं १. एकचित्त करून हातोहात हुडकीत देवाच्या ठिकाणीं अनुसरून आम्ही राहिलों आहोंत २. आतां तुमचे गुणदोष अंतःकरणांत मला वागविण्याचें काय कारण आहे ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां देवावांचून माझ्या चित्ताला दुसरें कोण स्पर्श करणार आहे ? ४. [२९२५]

हे देवा, मीं जर शुद्ध व्हावें, तर विषमतेचा विटाळ अंगीं जडलेला आहे, त्यामुळें ओंवळें टाकलें व सोंवळें घेतलें हें बोलणें बरोबरच होय १. त्याकरितां मीं आपला देह तुम्हांस अर्पण केला आहे. आतां तुमच्या पायांचा वियोग होऊं देऊं नका २. जसा दोरीच्या ठिकाणीं सर्पपणाचा भास झाल्यावर भयामुळें मरणास मूळ होतें, तसें संकल्पाच्या ठिकाणीं विकल्प उत्पन्न होऊन पापाचा सुकाळ होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, ह्या सर्व ब्रह्मांडाचें चलनवलन करणारा तूं आहेस, मग मला चिंता करण्याचें काय कारण आहे ? ४. [२९२६]

हे दात्या देवा, आतां जसा मी ज्या ठिकाणीं आहें, त्या ठिकाणीं तुम्हीं मजला चांगलें योग्य ठेविलें आहे १. आमच्या शब्दांचा भार तुमच्या मस्तकावर पडल्यानंतर तो भार अतिशय झाल्यामुळें उतरणार नाहीं २. कांहीं न बोलण्याची संवय मनाला लावून हरीचे गुण हृदयांतून बाहेर जाऊं देणार नाहीं असें करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हांस गोपाळाची संगति असल्यामुळे तें अंग (सेवेविषयीं शरीर) रक्षण करण्याचें आम्ही जाणत आहोंत ४. [२९२७]

हे देवा, तूं माझें घर–आधार आहेस पण हें ह्या अविचारी मूर्खांस कळत नाहीं १. माझी मागें पुढें निंदा करतात, त्या योगानें अखेरीस ते नरकास जातील २. ज्याप्रमाणें पाप्याचा निषेध करतात त्याप्रमाणें ते मला कवि म्हणून माझा निषेध करतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, आतां असल्या ह्या जगाची कोण पर्वा करतो ? ४. [२९२८]

नकटें हें आरशास भितें व त्याकडे न पाहातां लज्जेनें आपलें तोंड लपवितें १. ज्याच्या अंतःकरणांत जो दोष असतो, तोच त्यास पीडा करतो २. चोराला काळोखी रात्र आवडते. चंद्रोदय झाला तर तो पाहून त्यास त्रास होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, त्याप्रमाणें जन हे भाग्यहीन आहेत ४. [२९२९]

(ध्रुवपदांत दर्शविलेलें) पुढील कार्य होत आहे म्हणून देवास सर्व भावानें शरण जावें १. तरून जाण्यास कठिण अशी जी भवनदी त्या भवनदीच्या पलीकडे देव उतरून नेईल २. कारण तो दीनाविषयीं फार कृपावंत आहे व त्याचें नांव अनंत हें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें माझ्या अनुभवास आलें, म्हणून मीं तें प्रगट केलें ४. [२९३०]

ऐसीं वर्मे आम्हां असोनियां हातीं। कां होऊं नेणतीं दिशाभुली ॥ १ ॥ पोटाळुनि पाय कवळीन उभा। कृपें पद्मनाभा हालों नेदीं ॥ २ ॥ आपुले इच्छेचे घालीन संपुष्टीं। श्रीमुख तें दृष्टी न्याहाळीन ॥ ३ ॥ तुका म्हणे बहु सांडियेलीं मतें। आपुलया पुरतें धरूनी ठेलों ॥ ४ ॥ [२९३१]

रत्नाच्या वोवणी कांचे ऐशा धरी। अव्हेरुनी दुरी अधिकारें ॥ १ ॥ जातिचा स्वभाव आला डोळ्यां आड। तया घडे नाड न कळतां ॥ २ ॥ कामधेनु देखे जैशा गाईम्हैशी। आणिकां त्या ऐसी करोनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे काय बोलोनियां फार। जयाचा वेव्हार तया साजे ॥ ४ ॥ [२९३२]

तरीच हीं केलीं। दानें वाईट चांगलीं ॥ १ ॥ एकें एका शोभवावें। केलें कवतुक देवें ॥ २ ॥ काय त्याची सत्ता। सूत्र आणिक चाळिता ॥ ३ ॥ तुका म्हणे धुरें। डोळे भरिले परि खरें ॥ ४ ॥ [२९३३]

करी आणिकांचा अपमान। खळ छळवादी ब्राह्मण। तया देतां दान। नरका जाती उभयतां ॥ १ ॥ तैसें जालें दोघांजणां। मागतिया यजमाना। जाळियलें वना। आपणासहित कांचणी ॥ २ ॥ घडितां दगडाची नाव। मोल क्लेश गेले वाव। तरता नाहीं ठाव। बुडवी तारूं तरतीया ॥ ३ ॥ चोरा दिधला सांटा। तेणें मारियेल्या वाटा। तुका म्हणे ताठा। हे तंव दोघे नाडती ॥ ४ ॥ [२९३४]

जळो ते जाणीव जळो ते शाहाणीव। राहो माझा भाव विठ्ठलपायीं ॥ १ ॥ जळो तो आचार जळो तो विचार। राहो मन स्थिर विठ्ठलपायीं ॥ २ ॥ जळो हा लौकिक जळो दंभमान। लागो मना ध्यान विठ्ठलाचें ॥ ३ ॥ जळो हें शरीर जळो हा संबंध। राहो परमानंद माझ्या कंठीं ॥ ४ ॥ तुका म्हणे येथें अवघेंचि होय। धरीं मना सोय विठोबाची ॥ ५ ॥ [२९३५]

(ध्रुवपदांत दर्शविलेलें) इतकें चांगलें भक्तीचें मर्म आमच्या हस्तगत असून दिशाभुळी झाल्यासारखे आम्ही मूर्ख कां होऊं? १. देवाच्या पायांस मिठी मारून त्या पद्मनाभास कृपेनें उभा करीन तो हालूं देणार नाहीं २. आपल्या इच्छेनुरूप मी त्यास संपुष्टांत घालून ठेवीन व त्याचें श्रीमुख दृष्टीनें पाहीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी पुष्कळ मतांचा त्याग करून ज्यामध्यें स्वतःचें कार्य होईल तेवढेंच काय तें धरून बसलों ४. [२९३१]

ओंविलेली रत्नें कांचेप्रमाणें मानून आपल्या मूर्खपणाच्या अधिकाराच्या बळानें त्यांचा ज्यानें सर्वस्वीं त्याग केला आहे १. अशा प्रकारें जातिस्वभाव ज्यांच्या दृष्टीआड आला आहे त्याला त्याची खरी परीक्षा न झाल्यामुळें तो फसतो २. कामधेनूस अन्य गाईम्हशींसारखे मानून जो पाहात आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, फार बोलून काय फायदा आहे? ज्याचा जो व्यवहार आहे तोच त्यास शोभतो ४. [२९३२]

म्हणून देवानें हीं चांगलीं वाईट दानें केलीं (बऱ्यावाईट व्यक्ति निर्माण केल्या) १. देवानें एकमेकांस सुशोभित करण्यास्तव हें कौतुक केलें २. देवाची सत्ता काय आहे म्हणून विचाराल तर तो सर्व जगाचा चालक सूत्रधारी आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, पण लोकांचे डोळे खरोखर विषयसुखाच्या धुरानें भरलेले आहेत ४. [२९३३]

जो दुसऱ्याचा अपमान करतो, जो स्वभावानें दुष्ट आणि दुसऱ्याचा छळ करण्याच्या हेतूनें वाद घालतो अशा अपात्र ब्राह्मणाला दान दिलें तर दान देणारा व घेणारा हे उभयतांहि नरकास जातील १. त्याप्रमाणें मागणारा याचक व देणारा यजमान ह्या दोघांची स्थिति झाली. वनामध्यें वायूच्या योगानें जवळ असलेल्या फांद्यांचें एकमेकींशीं घर्षण होऊन, जो अग्नि उत्पन्न होतो, तो त्या वृक्षासह सर्व वन जाळून भस्म करतो २. दगडाची नाव तयार करण्यास लागलेला खर्च व तयार करण्यास लागलेले श्रम व्यर्थ जातात, कारण तिच्या योगेंकरून तरणें तर होत नाहींच, पण उलट तारणारी नौका तरूं इच्छिणाऱ्यास व आपल्यासहि बुडवून टाकते ३. तुकाराम महाराज म्हणतात, चोराजवळ जर वाटमारेपणा करून सांचलेलें गांठोडें संरक्षणासाठीं दिलें, तर तो त्यांतला कांहीं भाग काढून घेतो. त्याप्रमाणें ज्याच्यामध्यें ताठा आहे, तो व पूर्वीचा चोर हे दोघे फसले जातील (दोघेहि न्यायालयांत शिक्षेस पात्र होतील) ४. [२९३४]

जळो तें ज्ञान व जळो तें शहाणपण; श्रीविठ्ठलाच्या चरणीं माझा भाव राहो म्हणजे झालें १. जळो तो आचार व विचार; माझें मन पांडुरंगाच्या ठायीं स्थिर राहो म्हणजे पुरे २. दंभ, मान व लौकिक यांस आग लागो. माझ्या मनास श्रीविठ्ठलाचें ध्यान लागो म्हणजे झालें ३. हें शरीरहि जळो, तत्संबंधीही जळोत. माझ्या कंठामध्यें निरंतर परमानंद श्रीहरीची वस्ती होवो म्हणजे झालें ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या योगानें सर्व कांहीं साध्य होईल; करितां हे मना, तूं श्रीविठ्ठलचरणांचा आश्रय कर ५. [२९३५]

विश्वास धरूनि राहिलों निवांत। ठेवूनियां चित्ता तुझे पायीं ॥ १ ॥ तरावें बुडावें तुझिया वचनें। निर्धार हा मनें केला माझ्या ॥ २ ॥ न कळे हें मज साच चाळविलें। देसी तें उगलें घेइन देवा ॥ ३ ॥ मागणें तें सरे ऐसें करीं देवा। नाहीं तरी सेवा सांगा पुढें ॥ ३ ॥ करावें कांहीं कीं पाहावें उगलें। तुका म्हणे बोलें पांडुरंगा ॥ ५ ॥ [२९३६]

कोणी एकाचिया पोरें केली आळी। ठावी नाहीं पोळी मागे देखी ॥ १ ॥ बुझाविलें हातीं देऊनि खापर। छंद करकर वारियेली ॥ २ ॥ तैसें नको करूं मज कृपावंता। काय नाहीं सत्ता तुझे हातीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मायबापाचें उचित। करावें स्वहित बाळकाचें ॥ ४ ॥ [२९३७]

देवाचिये पायीं देई मना बुडी। नको धांवों वोढी इंद्रियांचे ॥ १ ॥ सर्व सुखें तेथें होती एकवेळे। न सरती काळें कल्पांतींही ॥ २ ॥ जाणें येणें खुंटे धांव वेरझार। न लगे डोंगर उसंतावे ॥ ३ ॥ सांगणें तें तुज इतुलेंचि आतां। मानीं धन कांता विषतुल्य ॥ ४ ॥ तुका म्हणे तुझे हातीं उपकार। उतरों हा पार भवसिंधु ॥ ५ ॥ [२९३८]

आम्ही विठ्ठलाचे दास झालों आतां। न चलेचि सत्ता आणिकांची ॥ १ ॥ नावरे तयासी ऐसें नाहीं दुजें। करितां पंढरिराजें काय नव्हे ॥ २ ॥ कोठें तुज ठाव घ्यावयासी धांवा। मना तूं विसांवा घेई आतां ॥ ३ ॥ इंद्रियांची वोढी मोडिला व्यापार। ज्या अंगें संचार चाली तुज ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्ही जिंकोनियां काळ। बैसलों निश्चळ होऊनियां ॥ ५ ॥ [२९३९]

सांगतों तें तुम्हां भजा रे विठ्ठला। नाहीं तरि गेला जन्म वायां ॥ १ ॥ करितां भरोवरी दुरावसी दुरी। भवाचिये पुरीं वाहावसी ॥ २ ॥ कांहीं न लगे एक भावचि कारण।

देवा, मी परम श्रद्धेनें तुझ्या पायीं चित्त ठेवून निवांत राहिलों आहें १. देवा, आज्ञेनें राहाण्यांत तरणें होवो अगर बुडणें होवो, तेथून कधींहि माधार न घेण्याचा माझ्या मनानें निश्चय केला आहे २. मला खरोखर नाहीं लाविलेलें कळत नाहीं. हे देवा, तूं जें मला देशील तें मी निमूटपणें घेईन ३. देवा, मजला आतां अशी देणगी दे, कीं ज्या योगेंकरून तुजपाशीं याचना करण्याचा प्रसंग येणार नाहीं व असें न होईल तर तुझी सेवा मीं पुढें कशी करावी हें सांग ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, मी कांहीं करावें किंवा उगीच राहावें ह्याविषयीं तूं मला सांग ५. [२९३६]

कोणी एका मुलानें पोळीबद्दल हट्ट घेतला, पण ती पोळी कशी असते हें त्यानें पूर्वी न पाहिल्यामुळें त्यास ती माहीत नव्हती १. त्याचा हट्ट व करकर हीं नाहींशी करण्याकरितां शहाण्यानें ही पोळी घे म्हणून त्याचे हातीं खापराचा एक तुकडा देऊन त्याची समजूत केली २. हे कृपावंता देवा, तसा प्रकार मज दीनाविषयीं करूं नका. तुमच्या हातीं कोणती सत्ता नाहीं ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आईबापांनीं योग्य तेंच बालकाचें हित करावें ४. [२९३७]

हे मना, तूं देवाच्या चरणीं बुडी देऊन राहा. इंद्रियांच्या संगतीनें विषयाकडे धांव घेऊं नकोस १. श्रीहरीच्या स्वरूपीं एका वेळींच सर्व सुखाचा लाभ होतो व तें सुख कल्पांत झाला तरी नाहींसें होत नाहीं २. जन्ममृत्यूच्या येरझारांची धांव कुंठित होईल. ह्याकरितां दुःखकर साधनांच्या डोंगराचें उल्लंघन करावयास नको ३. हे मना, तुला आतां सांगावयाचें इतकेंच आहे, कीं बायको व धन हीं तूं विषसमान मान ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे मना, असें जर तूं केलेंस तर मजवर तुझे मोठे उपकार होऊन मी या भवनदींतून उतरून पार जाईन ५. [२९३८]

आम्ही विठोबाचे दास झालों आहोंत. आतां आमच्यावर अन्य कोणाची सत्ता चालणार नाहीं १. असें दुसरें जगांत कांहींहि नाहीं, कीं तें परमेश्वरास आवरतां येणार नाहीं. पंढरीराजानें मनांत कांहींहि करावयाचें योजिलें, तर तें होणार नाहीं, असें काय आहे ? २. हे मना, तुला धांव घेण्याविषयीं आतां अन्य ठिकाण नाहीं, म्हणून तूं हरीच्याच ठिकाणीं आतां विश्रांति घे ३. ज्या इंद्रियांच्या मार्गानें बाहेर जाऊन विषयसेवनाचा व्यवहार करीत होतास त्या इंद्रियांची जी विषयाकडे धांव होती ती मोडून टाकून तिचा नाश केला. ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही काळास जिंकून श्रीहरीच्या स्वरूपीं निश्चळ होऊन बसलों ५. [२९३९]

अरे, तुम्ही विठ्ठल देवास भजा. जर तसें न कराल तर तुमचा जन्म व्यर्थ गेला असें समजा १. अन्य कांहीं खटपट कराल तर तुम्ही ह्या संसारनदींत वाहावले जाऊन श्रीहरीच्या पदापासून दूर व्हाल २. तुकाराम महाराज म्हणतात,

तुका म्हणे आण विठ्ठलाची ॥ ३ ॥ [२९४०]

शब्द ज्ञर्णी येऊं नेदी दृष्टीपुढें (शब्दज्ञानी येऊं नेदीं दृष्टीपुढें) । छळवादी कुडे अभक्त ते ॥ १ ॥ जळो ते जाणीव जळो त्यांचें बंड । जळो त्यांचें तोंड दुर्जनांचें ॥ २ ॥ तुका म्हणे येती दाटूनि छळाया । त्यांच्या बोडूं डोया न धरूं भीड ॥ ३ ॥ [२९४१]

अन्यायासी राजा न करितां दंड । बहुत ते लंड पीडिती जना ॥ १ ॥ न करी निगा न काढितां तण । कैंचे येती कण हातासी ते ॥ २ ॥ तुका म्हणे संतां करूं नये अनृत । पाप नाहीं नीत विचारितां ॥ ३ ॥ [२९४२]

भले लोक नाहीं सांडीत ओळखी । हे तों झाली देखी दुसऱ्याची ॥ १ ॥ असो आतां यासी काय चाले बळ । आपुलें कपाळ ओढवलें ॥ २ ॥ समर्थासी काय कोणें हें म्हणावें । आपुलिया जावें भोगावरी ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्हां बोल नाहीं देवा । नाहीं केली सेवा मनोभावें ॥ ४ ॥ [२९४३]

मुकें होतां काय पदरींचें जातें । मूर्ख तें भोगितें मी मीपण ॥ १ ॥ आपुलिये घरीं मैंद होउनी बैसें । कवणासी ऐसें बोलों नको ॥ २ ॥ तुका म्हणे तुम्हां सांगतों मी खूण । देवासी तें ध्यान लावूनि बैसा ॥ ३ ॥ [२९४४]

आषाढी निकट । आला कार्तिकीचा हाट ॥ १ ॥ पुरे दोन्हीच बाजार । न लगे आणीक व्यापार ॥ २ ॥ तेंचि घ्यावें तेंचि द्यावें । कैवल्याच्या रासी भावें ॥ ३ ॥ कांहीं कोणा नेणें । विठोबावांचूनि तुका म्हणे ॥ ४ ॥ [२९४५]

देऊनियां प्रेम मागितलें चित्त । झाली फिटाफिट तुम्हां आम्हां ॥ १ ॥ काशानें उदार

देवाच्या ठिकाणीं एका भावावांचून दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीची जरुरी नाहीं, हें मी श्रीविठ्ठलाची शपथ घेऊन सांगतों ३. [२९४०]

जे कोणी छळ करणारे वाईट व अभक्त आहेत ते चुकून देखील आमच्या सदुपदेशाचे शब्दास पुढें येऊं देत नाहींत. (*पाठभेद :* जे शाब्दिक ज्ञान मिरविणारे, हुज्जतखोर, वाईट व अभक्त आहेत ते आमच्या दृष्टीसहि पडूं देऊं नकोस) १. त्यांच्या ज्ञानीपणाच्या बंडास व तोंडास आग लागो २. तुकाराम महाराज म्हणतात, जे आमचा छळ करण्याकरितां येतात त्यांची भादरपट्टी करण्यास आम्ही भीत नाहीं ३. [२९४१]

राजा अन्यायानें वागणाऱ्या प्रजेस जर शिक्षा न करील तर ते धर्मलंड लोकांना पुष्कळ पीडा करतील २. शेताची मेहनत मशागत न करितां तण न काढील तर त्या ठिकाणीं पीक हस्तगत कसें होईल ? २. तुकाराम महाराज म्हणतात, धर्मनीतीनें वागणाऱ्या संतांवर खोटे आरोप ठेवून राजानें त्यांना दंड किंवा शिक्षा करूं नये; पण नीतीचा विचार केला असतां अनीतीनें वागणाऱ्यांस दंड करणें हें पातक नाहीं ३. [२९४२]

चांगले लोक ओळख विसरत नाहींत, पण दुसऱ्याचें पाहून त्यांचाहि तसा प्रकार झालासा दिसतो १. असो. आतां तर असें झालेंच, आतां त्यापुढें आमची शक्ति काय चालणार ? आमचें कपाळच ओढवलें म्हणावयाचें ! २. समर्थास कोणीं बोल लावावा ? प्रारब्धास दोष लावावा हें बरें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, हा बोल तुमचेकडे मुळींच नाहीं. मीच मनोभावानें तुमची सेवा केली नाहीं त्याचाच हा परिणाम असावा ४. [२९४३]

हे मूर्खा, मी मी म्हणून नेहमीं म्हणतोस व दुःख भोगतोस त्यापेक्षां मुका होऊन बसलास तर त्यांत तुझें काय जातें ? १. आपल्या घरीं मैंदासारखें बसावें हें बरें. मीपणाचें भाषण कोणाशी करूं नकोस २. तुकाराम महाराज म्हणतात, असें वागण्याचा मी एक मार्ग सांगतों. तू देवाचें एक फक्त ध्यान धरून बैस म्हणजे झालें ३. [२९४४]

आषाढी यात्रेनंतर लागलीच जवळच कार्तिकी यात्रारूपी बाजार असतो १. पंढरीस जाणाऱ्या वारकऱ्यांनीं हे दोनच बाजार संभाळावे [ह्या दोन वाऱ्यांना जावें]. अन्य व्यापार करूं नयेत २. ह्या व्यापारांत कैवल्यसुखाच्या राशी मिळतात व हरिनाम घ्यावें व द्यावें, नामाची देवघेव करावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं विठोबावांचून कोणी कांहीं ओळखीत नाहींत ४. [२९४५]

हे देवा, तुम्हीं आम्हांला प्रेम देऊन आमचें चित्त मागितलें त्या योगानें उभयतांची फिटाफीट झाली १,

तुम्हांसी म्हणावें । एक नेसी भावें एक देसी ॥ २ ॥ देऊनियां थोडें नेसील हें फार । कुंठिसी विचार अवघियांचा ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां भांडवल चित्त । नेउनी दुश्चित पाडियेलें ॥ ४ ॥ [२९४६]

तांतडीची धांव अंगा आणि भाग । खोळंबा तो मग निश्चितीचा ॥ १ ॥ म्हणवूनि बरी विचाराची चाली । उरीचि ते बोली कामा येते ॥ २ ॥ कोरडें वैराग्य माजिरा बडिवार । उतरे तो शूर अंगींचें तें ॥ ३ ॥ तुका म्हणे बरी झऱ्याची ते चाली । सांठवण्या खोली कासयाची ॥ ४ ॥ [२९४७]

मी तों बहु सुखी आनंदभरित । आहे साधुसंत मेळीकारीं ॥ १ ॥ कांहीं व्हावें ऐसें नाहीं माझ्या जीवा । आणीक केशवा तुजविण ॥ २ ॥ न लगे वैकुंठ मोक्ष सायुज्यता । सुख वाटे घेतां जन्म ऐसें ॥ ३ ॥ मृत्युलोकीं कोण धरिल वासना । पावावया जनासवें दुःख ॥ ४ ॥ तुका म्हणे तुझा दास ऐसें लोकां । कांहीं सकळिकां कळों यावें ॥ ५ ॥ [२९४८]

घ्या रे लुटी (लुटा) प्रेम सुख । फेडा आजि धणी । चुकला तो मुकला । जाली येरझारें हाणी ॥ १ ॥ घाला घातला वैकुंठीं । करूनियां जीवें साटी । पुरविली पाटी । वैष्णवीं काळाची ॥ २ ॥ अवघें आणिलें अंबर । विठोसहित तेथें धुर । भेदूनि जिव्हार । नामबाणीं धरियेला ॥ ३ ॥ संचित प्रारब्ध क्रियमाण । अवघीं झालीं गहन । केलीं पापपुण्यें । देशधडी बापुडीं ॥ ४ ॥ आनंदें गर्जति निर्भर । घोष करिती निरंतर । कांपती असुर । वीर कवणा नागवती ॥ ५ ॥ जें दुर्लभ ब्रह्मादिकां । आजि सांपडलें फुका । घ्या रे म्हणे तुका । सावचित्त होऊन ॥ ६ ॥ [२९४९]

तुझिया दासाचा हीन झालों दास । न धरीं उदास मायबापा ॥ १ ॥ तुजविण प्राण कैसा राहों

एक भावार्थानें (कपटानें) घेऊन त्याच्या मोबदला दुसरें जर देतां तर तुम्हांला उदार कसें म्हणावें ? २. प्रेम देऊन आमचें फार मोठें असलेलें चित्त नेऊन जातोस. त्या योगानें सर्व इंद्रियांचा विचार कुंठित करतोस ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमचें चित्त हें मुख्य भांडवल त्याचा तूं अभिलाष करून आम्हांला ओस पाडतोस, नागवून सोडतोस ४. [२९४६]

मोठ्या लगबगीनें धांव घालून चांगुलपणा आपल्याकडे घेतोस मग त्या योगानें निश्चिंत होण्यास हरकत होते १. ह्याकरितां विचारानें वागणूक करावी हें बरें, नुसत्या अवशिष्ट परमार्थविषयींच्या बोलण्यानें कांहीं उपयोग होणार नाहीं २. विवेकाचा ओलावा असल्याखेरीज वैराग्य धारण करणें ह्यापासून महत्त्व वाढतें पण उन्मत्तपणा येतो, म्हणून खऱ्या कसाचें वैराग्य ज्याच्या अंगीं आहे त्यालाच शूर म्हणावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या ठिकाणीं झऱ्याचें पाणी आहे तेथें खोल सांठवणीचें काय कारण आहे ? त्याप्रमाणें अंतरांतील जिव्हाळ्यानें वागणूक करावी हें बरें ४. [२९४७]

साधुसंतांच्या समुदायामध्यें आनंदभरित असा मी फार सुखी झालों आहें १. हे केशवा, तुजवांचून माझ्या जीवाला आणीक कांहीं पाहिजे असें वाटत नाहीं २. वैकुंठ, मोक्ष किंवा सायुज्यता ह्याची मला गरज नाहीं. हरिभक्तांच्या कुळांत हरिभक्ति करण्याकरितां अशा प्रकारचे जन्म घ्यावे, ह्यांतच मला सुख वाटतें ३. एरवीं ह्या मृत्युलोकामध्यें जन्म घेऊन जनांच्या संगतीनें दुःख भोगावयाची वासना कोण धरणार आहे ? ४. तुकाराम महाराज म्हणजात, मी तुझा सेवक झालों आहें म्हणून त्या सुखाची मला इच्छा आहे, असें हें सर्व लोकांस समजून यावें ५. [२९४८]

अरे जन हो, आज तुम्ही प्रेमसुख लुटून इच्छा पूर्ण करून घ्या. नाहींपेक्षां ह्या ठिकाणीं जो चुकला तो सुखाला मुकून जन्ममृत्यूच्या येरझारीमध्यें पडेल व असली हानि होईल १. वैष्णवांनीं आपला जीव मोबदला देऊन वैकुंठाच्या ठिकाणीं घाला (दरवडा) घातला आणि त्यांनीं कळिकाळाची पाठ पुरवली २. सर्व आकाशांत राहाणारा व श्रेष्ठ असलेला विठोबा व त्याच्यासहवर्तमान सर्व आकाश खालीं आणिलें आणि हरिनामबाणानें त्याचें अंतर खोंचून (हृदय विद्ध करून) त्यास धरिलें ३. अशी ती वैष्णव मंडळी सर्वांहून श्रेष्ठ झाली आणि त्यांनीं संचित, प्रारब्ध, क्रियमाण व पापपुण्य हीं देशावर घालविलीं ४. हे वैष्णव वीर आनंदानें पूर्णपणें भरून सर्वकाळ हरिनामाच्या घोषाची गर्जना करितात. असे ते वीर कोणाच्या हस्तगत होत नाहींत ! त्यांच्यापुढें असुर थरथरां कांपतात ५. तुकाराम महाराज म्हणतात, जें ब्रह्मादिक देवांना दुर्लभ आहे तें आज फुकट सांपडलें आहे, म्हणून तुम्ही सावध होऊन लुटा ६. [२९४९]

अहो मायबापा, तुमच्या सेवकाचा सेवक असा मी हीन झालों आहें म्हणून तुम्ही मला निराश करूं नका १. कारण

पाहे। वियोग न साहे क्षणभरी ॥ २ ॥ आणिक माझ्या जीवें मोकलिली आस। पाहे तुझी वास पांडुरंगा ॥ ३ ॥ सर्वभावें तुज आणिला उचित। राहिलों निश्चिंत तुझे पायीं ॥ ४ ॥ तुका म्हणे तुज असो माझा भार। बोलतों मी फार काय जाणें ॥ ५ ॥ [२९५०]

तेचि करीं मात। जेणें होईल तुझें हित। काय बडबड निमित्त। सुख जिव्हारीं सिणविसी ॥१॥ जो मुळव्याधीं पीडिला। त्यासी देखोन हांसे खरजुला ॥ २ ॥ आराध्र करी सोसी। त्यांसि हांसे तो आळसी ॥ ३ ॥ क्षयरोगी म्हणे परता। सर रोगिया कुष्टता ॥ ४ ॥ वडस दोहीं डोळां वाढले। आणिकां कानें कोंचें बोले ॥ ५ ॥ तुका लागे पायां। शुद्ध करा आपणियां ॥ ६ ॥ [२९५१]

कळों आला भाव माझा मज देवा। वायांविण जीवा आट केली (आटविलें) ॥ १ ॥ जोडुनि अक्षरें केली तोंडपिटी। न लगे शेवटीं हातीं कांहीं ॥ २ ॥ देव जोडे म्हणुनि सांगतसें लोकां। माझा मीच देखा दुःख पावें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझे गेले दोन्ही ठाय। संसार ना पाय तुझे मज ॥ ४ ॥ [२९५२]

आतां तरी मज सांगा साच भावें। काय म्यां करावें ऐसें देवा ॥ १ ॥ चुकलिया वर्म नव्हतें (नोहे तें) कारण। केला होय सीण अवघाचि ॥ २ ॥ कळे म्हणवून करीतसें वाद। दिसे भेदाभेद अंतरींचा ॥ ३ ॥ तुका म्हणे नको पाहूं तूं निरवाण। देईं कृपादान याचकासी ॥ ४ ॥ [२९५३]

बोल नाहीं तुझ्या दातृत्वपणासी। आम्ही अविश्वासी सर्वभावें ॥ १ ॥ दंभें करूं भक्ती सोंग दावूं जना। अंतरीं भावना वेगळिया ॥ २ ॥ चित्ताचा तूं साक्षी तुज कळे सर्व। किती करूं गर्व आतां पुढें ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा तूं काय करिसी। कर्मा दुस्तरासी आमुचिया ॥ ४ ॥ [२९५४]

तुमचा वियोग झालेला मला क्षणभर देखील सहन होत नाहीं. मग तुमच्यावांचून माझा प्राण कसा राहील, हें पाहा २. हे पांडुरंगा, माझ्या जीवानें सर्वांची आशा टाकिली आहे, तो जीव फक्त तुमचीच वाट पाहात आहे ३. काया, वाचा व मन सर्व भावानें तुला अर्पण करण्याकरितां हा योग्य देह आणला आहे, तो तुझ्यापायीं अर्पण करून मी निश्चिंत राहिलों आहें ४. तुकाराम महाराज म्हणतात, आतां माझा भार तुझ्यावर आहे, हें मी बोलतों; मी फार काय जाणे? [२९५०]

अरे, ज्या योगानें तुझें हित होईल तें तूं बोल. अन्य बडबडीच्या निमित्तानें अंतरांतील सुखी जीवांना कां दुःख देतोस? १. जो कोणी मूळव्याधीच्या आजारानें पीडित झाला आहे त्याला पाहून ज्याच्या अंगाला खरूज आहे तो हंसतो २. सोसानें श्रम करणारास आळशी हंसतो ३. ज्याच्या अंगास कोड भरलें आहे त्याला पाहून, क्षयरोगी तूं परता सर असें म्हणतो ४. ज्याच्या दोन्ही डोळयांत वडस वाढले आहेत, तो दुसऱ्याला तिरळा–चकणा म्हणतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही आपले आपण शुद्ध व्हा, दुसऱ्याचा धिक्कार करूं नका, असें मी तुमच्या पायां पडून सांगतों ६. [२९५१]

हे देवा, माझ्या जीवाला मी व्यर्थ श्रम दिले असें माझें मला कळून आलें १. अक्षरांची जोडाजोड करून मीं तोंड वाजविलें पण अखेरीस कांहींच हस्तगत होत नाहीं असें दिसतें २. ह्या वाटेनें चाललें असतां देवाची प्राप्ति होते असें मी जनांना सांगतों पण माझा मीच दुःख भोगीत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, ना संसार ना तुझे पाय अशा दोन्हीं ठिकाणांनाहि मी मुकलों ४. [२९५२]

अहो देवा, आतां म्यां काय करावें हें खरोखर तुम्ही मला सांगा १. तुमच्या प्राप्तीचें मर्म चुकलें असतां खरें कार्य होणार नाहीं. मग जें कांहीं करावें तें सर्व व्यर्थ जाईल २. तुमच्या अंतरामध्यें भेदाभेद उत्पन्न झाला आहे असें दिसतें. हें पुरतेपणानें समजल्यामुळें मी तुमच्याबरोबर भांडण करीत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी याचक दान मागण्यास आलों आहें, तर तूं निर्वाण (अंत) पाहूं नकोस, मला कृपादान दे ४. [२९५३]

हे देवा, तुझ्या दातेपणास बोल नाहीं, पण सर्व भावानें (दृष्टीनें) आम्ही अविश्वासी आहोंत १. दांभिकत्वानें भक्ति करून जनाला सोंग दाखवितों पण अंतःकरणांतील भावना वेगळाल्या आहेत २. तूं चित्ताचा साक्षी आहेस म्हणून तुला सर्व कळत आहे. आतां तुझ्यापुढें आम्ही किती गर्व करावा? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आमच्या असल्या दुस्तर कर्माला तूं काय करणार! ४. [२९५४]

कां हो पांडुरंगा न करा धांवणें । तरि मज कोणें सोडवावें ॥ १ ॥ तुझा म्हणवूनि आणिकापें उभा । राहों हे तों शोभा नेदी आतां ॥ २ ॥ काळें पुरविली पाठी दुरवरी । पुढें पायां धीरीं राहों नेदी (पुढें पाय स्थिर राहों नेदी) ॥ ३ ॥ नको आणूं माझें संचित मनासी । पावन आहेसी पतितां (पतित) तूं ॥ ४ ॥ तुका म्हणे चाले आणिकांची सत्ता । तुज आळवितां नवल हें ॥ ५ ॥ [२९५५]

कावळ्याच्या गळां मुक्ताफळमाळा । तरी काय त्याला भूषण शोभे ॥ १ ॥ गजालागीं केला कस्तुरीचा लेप । तिचें तो स्वरूप काय जाणे ॥ २ ॥ बकापुढें सांगे भावार्थवचन । वाउगाचि सीण होय त्यासी ॥ ३ ॥ तुका म्हणे तैसे अभाविक जन । त्यांसी वायां सीण करूं नये ॥ ४ ॥ [२९५६]

न कळसी ज्ञाना न कळसी ध्याना । न कळसी दर्शना धांडोळितां ॥ १ ॥ न कळसी आगमा न कळसी निगमा । न बोलवे सीमा ब्रह्मादिकां (वेदां पार) ॥ २ ॥ तुका म्हणे तुझा नाहीं अंतपार । म्हणोनि विचार पडिला मज ॥ ३ ॥ [२९५७]

मायबापें सांभाळिती । लोभाकारणें पाळिती ॥ १ ॥ तैसा नव्हे देवराव । याचा कृपाळू स्वभाव ॥ २ ॥ मनासारिखें न होतां । बाळकासी मारी माता ॥ ३ ॥ तुका म्हणे सांगूं किती । बाप लेंकासी मारिती ॥ ४ ॥ [२९५८]

धन मेळवूनि कोटी । सवें नये रे लंगोटी ॥ १ ॥ पानें खाशील उदंड(डें) । अंतीं जासी सुकल्या तोंड(डीं) ॥ २ ॥ पलंग न्याहाल्या सुपती । शेवटीं गोवऱ्या सांगाती ॥ ३ ॥ तुका म्हणे राम । एक विसरतां श्रम ॥ ४ ॥ [२९५९]

विनवितों चतुरा तुज विश्वंभरा । परियेसीं दातारा पांडुरंगा ॥ १ ॥ तुझे दास ऐसें जगीं

अहो श्रीपांडुरंगा, जर तुम्ही मजकरितां धांवत येत नाहीं तर तुमच्यावांचून मजला मुक्त कोण करील ? १. मी तुझा आहें म्हणून जर दुसऱ्यापाशीं गेलों तर आतां तें शोभणार नाहीं २. काळानें माझी पाठ दूरवर पुरविली आहे व तो मजला क्षणभर सुद्धां स्थिर राहूं देत नाहीं ३. देवा, तूं पतितांचा उद्धार करणारा आहेस म्हणून माझें संचित कर्म मुळींच मनांत आणूं नकोस ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुझें स्मरण आम्ही करीत असतां दुसऱ्याची (काळाची) सत्ता आमच्यावर चालावी हें आश्चर्य होय ५. [२९५५]

कावळ्याच्या गळ्यामध्यें मोत्यांचे हार करून घातले तर त्यास ते शोभतात काय ? १. हत्तीच्या अंगास कस्तुरीचा लेप केला तर त्यास काय गोडी लागणार ? २. बगळ्यापुढें अहिंसा करण्याच्या गोष्टी मोठ्या श्रद्धेनें जरी सांगितल्या तरी त्याचा कांहीं उपयोग न होतां सांगणाराचे श्रम मात्र व्यर्थ जातात ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें भावरहित भक्तांस उपदेश करूं नये, कारण तो फुकट जातो ४. [२९५६]

हे देवा, तूं ज्ञानाच्या मार्गानें किंवा ध्यानाच्या मार्गानें प्राप्त होत नाहींस. सौर, वैष्णव, शक्ति, शैव, गाणपत्य आणि स्कांद इत्यादि षट्दर्शनानें शोध केला तरी सुद्धां तूं सांपडत नाहींस १. सहा शास्त्रें व चारी वेद ह्यांसहि तुझा अंत लागत नाहीं व ब्रह्मादिक देवांसहि तुझें आकलन करतां येत नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्या स्वरूपाचा अंतपारहि लागत नाहीं, त्यामुळें तुझ्या शोधाचा मला मोठा विचार पडला आहे ३. [२९५७]

बालकांचा सांभाळ आईबाप करतात, परंतु त्यांच्या मनांत मुलगा पुढें आपणांस विचारील असा लोभ असतो १. तशा प्रकारचा हा देवांचा देव नसून ह्याचा स्वभाव फार कृपाळु आहे २. मुलानें आईच्या इच्छेविरुद्ध वर्तन केल्यास त्याची आई त्यास शिक्षा करते ३. तुकाराम महाराज म्हणतात, मुलांस बाप शिक्षा करतात, तें मी किती सांगूं ! ४. [२९५८]

रे मनुष्या, जरी तूं आपल्या आयुष्यांत कोट्यवधि संपत्ति मिळविलीस तरी मेल्यानंतर तुजबरोबर त्या संपत्तीपैकीं लंगोटी सुद्धां येणार नाहीं १. पानांचे विडे करून खातोस व तोंड रंगवितोस, परंतु अखेर फिक्या तोंडानेंच जावें लागेल २. पलंगावर गादी टाकून निजण्याचें तुला सुख वाटतें, परंतु शेवटीं गोंवऱ्यांशीं तुझा संबंध येणार आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, एक श्रीरामनाम जर तूं विसरलास तर तुझा जन्म व्यर्थ होईल ४. [२९५९]

हे उदारा विश्वंभरा चतुरा देवा पांडुरंगा, मी तुम्हांस विनंति करतों ती ऐका १. आम्ही तुझे सेवक आहोंत,

वाखाणिलें । आतां नव्हे भलें मोकलितां ॥ २ ॥ माझे गुणदोष कोण जाणे मात । पावन पतित नाम तुझें ॥ ३ ॥ लोभ मोह माया आम्हां बांधवितां (बाधवितां) । तरि हा अनंता बोल कोणा ॥ ४ ॥ तुका म्हणे मी तों पतितचि खरा । परि आलों दातारा शरण तुज ॥ ५ ॥ [२९६०]

त्राहे त्राहे त्राहे सोडवीं अनंता । लागों दे ममता तुझे पायीं ॥ १ ॥ एकचि मागणें देईं तुझी गोडी । न लगे आवडी आणिकांची ॥ २ ॥ तुझे गुण नाम वर्णीन पवाडे । आवडीच्या कोडें नाचों रंगीं ॥ ३ ॥ बापा विठ्ठलराया हेंचि देईं दान । जोडती चरण जेणें तुझे ॥ ४ ॥ आवडीसारिखें मागितलें जरी । तुका म्हणे करीं समाधान ॥ ५ ॥ [२९६१]

सुगरणीबाई थिता नास केला । गुळ तो घातला भाजीमध्यें ॥ १ ॥ क्षीरीमध्यें हिंग दुधामध्यें बोळ । थितेंचि वोंगळ नास केला ॥ २ ॥ हिन्याचिया (हिन्याच्या) पेटें आणियेल्या गारा । खांदीं शिरीं भारा व्यर्थ वाहे ॥ ३ ॥ दळण दळोनी भरूं गेली (भरीयेली) पाळी । भरडोनि वोंगळी नास केला ॥ ४ ॥ कापुराचे सांते आणिला लसण । वागवितां सीण दुःख होय ॥ ५ ॥ रत्नांचा जोहरी रत्नचि पारखी । येर देखोदेखीं (देखोवेखीं) हातीं घेती ॥ ६ ॥ तुका म्हणे जरी योग घडे निका । न घडता थुंका तोंडावरी ॥ ७ ॥ [२९६२]

बाप माझा दिनानाथ । वाट भक्तांची पाहात ॥ १ ॥ कर ठेवूनियां कटीं । उभा चंद्रभागे तटीं ॥ २ ॥ गळां वैजयंतीमाळा । रूपें डोळस सांवळा ॥ ३ ॥ तुका म्हणे भेटावया । सदा उभारिल्या बाह्या ॥ ४ ॥ [२९६३]

माझें जीवन तुझे पाय । कृपाळू तूं माझी माय ॥ १ ॥ नेदीं दिसों किविलवाणें ।

हें सर्व जगास माहीत झालें आहे. आमचा आतां त्याग केला तर तुमचा मोठेपणा राहाणार नाहीं २. कारण तुझें नाम पतितांचा उद्धार करणारें (पतितपावन) असें आहे. माझ्या ठिकाणीं असलेले गुणदोष मी कोणास सांगावे व ते ऐकेल तरी कोण ? हे अनंता, मोह आणि लोभ ह्यांच्या मायेनें तुम्ही आम्हांस बाधा करवितां, तरी हा बोल कोणास लावूं ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी पापी ही गोष्ट खरी आहे; पण तुला शरण आलों आहें म्हणून मला तार ५. [२९६०]

हे अनंता, तुझ्या पायांची मला ममता जडूं दे. संसारांतून सोडीव व रक्षण कर (असें त्रिवार विनवून सांगतात) १. तुझी सेवा करण्याची मला गोडी लागावी हीच देणगी मला दे. इतरांची गोडी मला लागूं देऊं नको २. तुझे गुणानुवाद व नांव मी गाऊं लागेन आणि मोठ्या प्रीतीनें तुझ्या नामाच्या आनंदामध्यें नाचूं लागेन ३. हे बापा श्रीविठ्ठला, ज्या योगानें तुमच्या चरणांची मला प्राप्ति होईल असेंच दान मजला द्यावें ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी आपल्या आवडीप्रमाणें हें मागितलें आहे, तर तें मला देऊन माझें समाधान कर ५. [२९६१]

अगे बाई, सिद्ध असलेल्या स्वयंपाकाच्या भाजीमध्यें (पुरणपोळीचा) गूळ वगैरे घालून नाश केलास अशी तूं फार शहाणी आहेस १. खिरीमध्यें हिंग व दुधामध्यें बोळ घालून चांगल्या पदार्थांचा नास केलास २. हिन्याच्या पेटीमध्यें (बाजारांत) जर गारा भरून ती खांद्यावर व डोक्यावर वागविली तर तें वागविणें व्यर्थ जातें ३. दळणाच्या वेळीं भरड मोठें दळून जातें भरलें पण चांगल्याचा वाईटपणानें नाश केलास ४. जर एखाद्यापाशीं कापूर असून त्याचे शेजारीं लसूण बाळगिली तर तें उलटें त्रासदायक होतें ५. जो कोणी रत्नपरीक्षक आहे त्यासच रत्नाची परीक्षा असते व इतर लोक तें पाहूं म्हणून नुसतें हातांत घेतात ६. तुकाराम महाराज म्हणतात, जर चांगला योग घडला तर ठीक आहे, नाहीं तर ओंगळ लोकांच्या तोंडावर थुंकावें हें बरें ७. [२९६२]

दीनांचा पालक जो परमेश्वर तो माझा बाप असून भक्तांची वाट पाहात आहे १. तो देव कंबरेवर हात ठेवून चंद्रभागेच्या कांठीं उभा राहिला आहे २. त्याच्या गळ्यामध्यें वैजयंती माळ आहे व त्याचें रूप सांवळें असून डोळ्यांनीं पहाण्याला योग्य आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी भक्त भेटीस येतील त्यांस आलिंगन देण्याकरितां त्यानें आपले बाहू उभारिले आहेत ४. [२९६३]

हे विठाबाई, तूं कृपाळु असून माझी माय आहेस म्हणून तुझ्या चरणप्रतापानें मी जगलों आहें १. हे पांडुरंगा,

पांडुरंगा तुझें तान्हें ॥ २ ॥ जन्ममरण तुजसाठीं । आणीक नेणें दुजी गोष्टी ॥ ३ ॥ तुका म्हणे तुजविण । कोण हरिल माझा सीण ॥ ४ ॥ [२९६४]

कां रे प्रेमें (पुंड्या) मातलासी । उभें केलें विठ्ठलासी ॥ १ ॥ ऐसा कैसा रे तूं धीट । मागें भिरकाविली वीट ॥ २ ॥ युगें झालीं अठ्ठावीस । अजुनि न म्हणसी बैस ॥ ३ ॥ भाव देखोनि निकट । देवें सोडिलें वैकुंठ ॥ ४ ॥ तुका म्हणे पुंडलिका । तूंचि भक्त बळिया निका (तूंचि बळिया भक्त निका) ॥ ५ ॥ [२९६५]

तुज पाहतां सामोरी । दृष्टी न फिरे माघारी ॥ १ ॥ माझें चित्त तुझ्या पायां । मिठी पडली पंढरिराया ॥ २ ॥ नव्हे सारितां निराळें । लवण मेळवितां जळें ॥ ३ ॥ तुका म्हणे बळी । जीव दिला पायांतळीं ॥ ४ ॥ [२९६६]

उपदेश किती करावा खळासी । नावडे तयासी बरें कांहीं ॥ १ ॥ शुद्ध कां वासना नव्हे चांडाळाची । होळी संचिताची केली तेणें ॥ २ ॥ नाहीं भाव मनीं नाइके वचन । आपला आपण नाडीयेले ॥ ३ ॥ तुका म्हणे त्यासी काय व्याली रांड । करी बडबड रात्रंदिवस ॥ ४ ॥ [२९६७]

समर्थासी लाज आपुल्या नामाची । शरण आल्याची लागे चिंता ॥ १ ॥ न पाहे तयाचे गुणदोषअन्याय । सुख देऊनि साहे दुःख त्याचें ॥ २ ॥ मान भलेपण नाहीं फुकासाठीं । जयावरि गांठीं झीज साहे ॥ ३ ॥ तुका म्हणे हें तूं सर्वही जाणसी । मज अधिरासी धीर नाहीं ॥ ४ ॥ [२९६८]

आनंदें कीर्तन कथा करीं घोष । आवडीचा रस प्रेमसुख ॥ १ ॥ मज या आवडे वैष्णवांचा संग । तेथें नाहीं लाग कळिकाळाचा ॥ २ ॥ स्वल्प मंत्र वाचे बैसलासे निका । रामकृष्ण सखा

मी तुझें अज्ञान बालक आहें म्हणून मला गरीबासारखें दिसूं देऊं नको १. मी जन्ममरणाचे फेरे तुजसाठीं सोसले आहेत; तुजवांचून आतां दुसरी हकीगत मी जाणूं शकत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां तुजवांचून माझे श्रम कोण हरण करील ? ४. [२९६४]

हे पुंडलीकराया, तूं प्रेमसुखानें उन्मत्त होऊन श्रीविठोबास कशाकरितां उभें केलेंस ? १. तो देव ज्या वेळीं भेटीस आला, त्या वेळीं त्यास आसन म्हणून पाठीमागें वीट फेंकून दिलीस, हा कसला तुझा धीटपणा ! २. उभें करून अठ्ठावीस युगें झालीं तरी अद्यापि तूं त्यास कसा बरें म्हणत नाहींस ? ३. तुझा निकटभाव पाहून देवांनीं वैकुंठ सोडिलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, अहो पुंडलीकराया, खरोखरी तुम्हीच देवाचे चांगले बलाढ्य भक्त आहांत ५. [२९६५]

हे देवा, तुला माझ्या दृष्टीनें समोर पाहिल्याबरोबर ती माघारी फिरेना १. हे पंढरीनाथा देवा, माझ्या चित्तानें तुझ्या पायांना मिठी मारली आहे २. मीठ पाण्यामध्यें घातल्यावर तें निराळें काढितां येत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, मी आपला जीव तुमच्या पायांतळीं बळी दिला ४. [२९६६]

दुराचारी जीवांना किती उपदेश करावा ? त्यांना चांगलें कांहीं आवडत नाहीं १. त्या चांडाळास शुद्ध वासना कां उत्पन्न होत नाहीं ? त्यानें आपलें प्रारब्धकर्म दुर्वर्तनानें व्यर्थ जाळलें २. त्याच्या मनामध्यें भाव नाहीं व त्याला कोणी चांगलें सांगितलें तरी तो त्याचें ऐकत नाहीं, अशा प्रकारें त्यानें आपलें आपल्यासच फसविलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या ह्या नष्टाला रांडेनें [त्याच्या आईनें] कां जन्म दिला ? कारण तो रात्रंदिवस वायफळ बडबड करितो ४. [२९६७]

समर्थाला आपल्या नांवाची लज्जा असल्यामुळें जे कोणी त्यास शरण आले आहेत त्यांची काळजी करावी लागते १. त्याचे गुणदोष व अन्याय तो पाहात नाहीं. त्याला सुख देऊन त्याचें दुःख आपण सोसतो २. लोकांमध्यें मान्यता व भलेपणा हे फुकट मिळत नाहींत. त्याकरितां आपल्या गांठीला झीज सोसावी लागते ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, हें तूं सर्व कांहीं जाणत आहेस; पण मी अधीर असल्यामुळें मला दम धरवत नाहीं ४. [२९६८]

आनंदानें श्रीहरीच्या कथाकीर्तनाचा मी घोष करीत आहें, त्या योगानें मला आवडीचा प्रेमसुखरस प्राप्त होत आहे १. मला ह्या वैष्णवांची संगति आवडते, कारण त्या ठिकाणीं कळिकाळाचा प्रवेश होऊं शकत नाहीं २

नारायण ॥ ३ ॥ उच्चरितां दुजें वाटे मज लाज । उपदेश काज आणीक (आन) नाहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे चित्त रंगलेंसे ठायीं । माझें तुझ्या पायीं पांडुरंगा ॥ ५ ॥ [२९६९]

आतां पहाशील काय माझा अंत । आलों शरणागत तुज देवा ॥ १ ॥ करीं अंगीकार राखें पायांपाशीं । झणीं दिखों देशी कीविलवाणें ॥ २ ॥ नाहीं आइकिली मागें ऐसी मात । जे त्वां शरणागत उपेक्षिले ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां धरीं अभिमान । आहेसी तूं दानशूर दाता ॥४॥ [२९७०]

होईल तो भोग भोगीन आपुला । न घालीं विठ्ठला भार तुज ॥ १ ॥ तुम्हांपासाव हें इच्छीतसें दान । अंतरींचें ध्यान मुखीं नाम ॥ २ ॥ न यें काकुलती गर्भवासासाठीं । न धरीं हें पोटीं भय कांहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मज उदंड एवढें । नाचेन मी पुढें मायबापा ॥ ४ ॥ [२९७१]

करावा संकोच चित्ताचि भोंवता । होय तें बहुतां सुख कीजे ॥ १ ॥ देवाची पूजा हें भूतांचें पाळण । मत्सर तो सीण बहुतांचा ॥ २ ॥ रुसावें फुगावें आपुलियावरी उरला । तो हरि सकळही ॥ ३ ॥ तुका म्हणे संतपण याचि नांवें । जरि होय जीव सकळांचा ॥ ४ ॥ [२९७२]

नाहीं जप तप जीवाची आटणी । मनासी दाटणी नाहीं केली ॥ १ ॥ निजलिया ठायीं पोकारिला धांवा । सांकडें तें देवा तुज माझें ॥ २ ॥ नाहीं आणुनियां समर्पिलें जळ । सेवा ते केवळ चिंतनाची ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हीं वेंचिलीं उत्तरें । घेतलीं उदारें मायबापें ॥ ४ ॥ [२९७३]

देह तंव आहे प्रारब्धा आधीन । याचा मी कां सीण वाहूं भार ॥ १ ॥ सरो माझा काळ तुझिया चिंतनें । कायावाचामनें इच्छीतसें ॥ २ ॥ लाभ तो न दिसे याहूनि दुसरा । आणीक दातारा

नारायण हा मंत्र सोपा व प्रिय असल्यामुळें तो आमच्या वाणीवर उत्तम तऱ्हेनें बसला आहे (त्याचें चिंतन चांगलें होत आहे) ३. दुसरा कांहीं उच्चार करावयास लागलें तर त्याची मला लज्जा वाटते. आतां ह्या मंत्रापरतें दुसऱ्या उपदेशाचें कारण उरलें नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, माझें मन तुझ्या पायांच्याच ठिकाणीं रंगलें आहे ५. [२९६९]

हे देवा, आतां तूं माझा अंत पाहाशील काय? मी तुला शरण आलों आहें १. माझा तूं अंगीकार करून आपल्या पायांपाशीं मला सतत ठेव, नाहींतर तूं मला दीनवाण्या स्थितींत ठेवशील हो ! २. जे कोणी तुला शरण आले आहेत त्यांची तूं ह्यापूर्वीं उपेक्षा केलीस असें मीं ऐकिलें नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तूं आपल्या भक्तांविषयींचा अभिमान धर, कारण तूं मोठा दान करण्यांत शूर दाता आहेस ४. [२९७०]

हे विठ्ठला, जे मला प्रारब्धानुसार सुखदुःखादि भोग होतील ते माझे मी भोगीन; त्याबद्दलचें तुझ्यावर ओझें घालणार नाहीं १. अंतःकरणांत तुझें ध्यान असावें व मुखानें तुझें नामस्मरण व्हावें, एवढेंच तुझ्यापासून दान मिळण्याची मी इच्छा करीत आहें २. वारंवार जन्म होतात ते दूर व्हावेत अशा बुद्धीनें तुला मी काकुळती येत नाहीं, कारण वारंवार जन्माबद्दलचें भय मी हृदयांत बिलकूल धरीत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे आईबापा, एवढें तूं मला दिलेंस म्हणजे पुष्कळ झालें, मग मी तुझ्यापुढें मोठ्या प्रेमभरानें नाचेन ४. [२९७१]

जो कांहीं संकोच करणें असेल तो चित्ताच्याच संबधीं करावा व ज्यामध्यें पुष्कळांना सुख होतें तें कृत्य करावें १. सर्व भूतांचें सम दृष्टीनें रक्षण करणें ही देवाची पूजा आहे. बहुत जनांचा मत्सर करणें ह्यांत दुःख आहे २. जर कांहीं रुसायाचें किंवा फुगायाचें असेल तर तें आपलें आपल्यावर रुसावें, कारण बाकी सर्व हरि उरला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वांचा जीव (आत्मा) होणें, हेच खरें संतपण आहे ४. [२९७२]

मी जपतप करून जीवाची आटणी करून मनास कोंडण्याचा प्रकार केला नाहीं १. हे देवा, मी निजल्या ठिकाणींच तुझा धांवा केला, आतां माझें संकट सर्व तुला आहे २. हे देवा, तुला मी पाणी आणून देखील घातलें नाहीं, केवळ तुझें चिंतन करणें हीच सेवा करीत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही जे शब्द बोललों त्याचा मायबापांनीं उदारपणानें स्वीकार केला ४. [२९७३]

देह हा प्रारब्धकर्माच्या स्वाधीन आहे. ह्याच्या योगक्षेमाचा बोजा मी आपल्या डोक्यावर घेऊन कशाला दुःखी होऊं? १. देवा, तुझें चिंतन करण्यांत माझा सर्व काळ जावो, अशी मी कायावाचामन ह्या सर्व भावांनीं इच्छा करीत आहें २. हे दातारा देवा, ह्या जन्मामध्यें वर सांगितलेल्या स्थितीवांचून अन्य कोणताहि लाभ

येणें जन्में ॥ ३ ॥ तुका म्हणे आलों सोसीत संकटें । मी माझें वोखटें आहे देवा ॥ ४ ॥ [२९७४]

सकळ तुझे पायीं मानिला विश्वास । न करीं उदास आतां मज ॥ १ ॥ वाचे गातां गोड आइकतां कानीं । पाहातां लोचनीं मूर्ती तुझी ॥ २ ॥ मन स्थिर माझें झालेंसे निश्चळ । वारिले सकळ आशापाश ॥ ३ ॥ जन्म जरा व्याधि निवारिलें दुःख । वोसंडलें सुख प्रेमधारीं ॥ ४ ॥ तुका म्हणे मज झाला हा निर्धार । आतां वायां फार काय बोलों ॥ ५ ॥ [२९७५]

नये माझा तुम्हां होऊं शब्दस्पर्श । विप्र तुम्हीं विद्वांस ब्राह्मणांसी ॥ १ ॥ म्हणोनियां तुम्हां करितों विनंती । द्यावें शेष हातीं उरलें तें ॥ २ ॥ वेदीं कर्म जैसें बोलिलें विहित । करावी ते नीत विचारूनी ॥ ३ ॥ तुमचा स्वधर्म माझा अधिकार । भोजन उत्तर तुका म्हणे ॥ ४ ॥ [२९७६]

बहुत असती मागें सुखी केलीं । अनाथा माउली जिवांची तूं ॥ १ ॥ माझिया संकटा न धरीं आळस । लावूनियां कासे पार पावीं ॥ २ ॥ कृपावंता करा ज्याचा अंगीकार । तया संवसार नाहीं पुन्हां ॥ ३ ॥ विचारितां नाहीं दुजा बळिवंत । ऐसा सर्वगत व्यापी कोणी ॥ ४ ॥ म्हणवूनी दिला मुळीं जीवभाव । देह केला वाव समाधिस्थ ॥ ५ ॥ तुका म्हणे नाहीं जाणत आणिक । तुजविण एक पांडुरंग ॥ ६ ॥ [२९७७]

आम्हां देणें धरा सांगतों तें कानीं । चिंता पाय मनीं विठोबाचे ॥ १ ॥ तेणें माझे चित्ता होय समाधान । विलास मिष्टान्न न लगे सोनें ॥ २ ॥ व्रत एकादशी द्वारीं वृंदावन । कंठीं ल्या रे लेणें तुळसी माळा ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याचे घरींची उष्टावळी । मज ते दिवाळी दसरा सण ॥ ४ ॥ [२९७८]

दिसत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आजपर्यंत मी पुष्कळ संकटें सोशीत आलों. ह्याचें कारण, देह मी व देहसंबंधीं जें सर्व तें माझें, अशा प्रकारची भावना ठेविली येवढें वाईट आहे ४. [२९७४]

हे देवा, माझा सर्व विश्वास तुझ्या पायांच्या ठिकाणीं आहे. आतां तूं मला निराश करूं नको १. तुझें नाम वाणीनें गाण्यास फार गोड आहे व कानानें ऐकण्यालाहि फार गोड आहे व तुझी मूर्ति डोळ्यानें पाहाण्यास चांगली आहे २. माझें मन निश्चळ व स्थिर झालें आहे. त्या योगानें सर्व आशापाश नाहींसे झाले ३. जन्म, जरा, व्याधि आदिकरून दुःखांचें निवारण झालें व श्रीहरीच्या प्रेमधारेच्या योगानें सुखाचा पूर आला ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझा असा निश्चय झाला आहे. आतां मी व्यर्थ फार कशाला बोलूं ? ५. [२९७५]

(एका विद्वान् पवित्र ब्राह्मणानें आपल्या घरीं श्री तुकाराम महाराजांना जेवावयास बोलाविलें त्या वेळचे महाराजांचे उद्गार :) माझा तुम्हांला माझ्या देहाचाच काय, शब्दाचा देखील स्पर्श होऊं नये, कारण तुम्ही विद्वान् ब्राह्मण आहांत १. म्हणून तुम्हांला विनंति करीत आहें, कीं जें कांहीं अवशेष उच्छिष्ट उरलें असेल तें माझ्या हातीं द्या २. वेदामध्यें जसें विहित कर्म करण्याचें सांगितलें आहे त्या नीतीचाच विचार करून तें करावें. ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा अधिकार तुमच्या भोजनानंतर उच्छिष्ट सेवनाचा आहे व तुमचा स्वधर्म वेदामध्यें सांगितल्याप्रमाणें वागण्याचा आहे (ब्रह्मनिष्ठ आणि हरिभक्त संतहि किती धर्ममर्यादा सांभाळीत तें ह्या उद्गारांवरून दिसून येतें.) ४. [२९७६]

हे देवा, तूं पूवा बहुतां जनांना तारलेंस. तूं अनाथ जीवांची आई आहेस १. त्याकरितां मला संकटापासून रक्षण करण्याविषयीं आळस करूं नकोस. तुझ्या कांसेला लावून मला भवसमुद्रांतून पार पाडून ने २. हे कृपावंता, तुम्ही ज्याचा अंगीकार कराल, तो संसारदुःखांत पुनः पडत नाहीं ३. विचार केला असतां तुझ्याप्रमाणें बलवान् कोणी नाहीं व सर्व जगांत व्यापक असाहि कोणी नाहीं ४. ह्याकरितां आरंभींच जीवभाव तुम्हांला अर्पण करून आपला देह व्यर्थ मानला आणि तुझें ध्यान धरून समाधिस्थ राहिलों ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, तुजवांचून मी कांहींएक जाणत नाहीं ६. [२९७७]

अहो जन हो, जर तुम्ही आम्हांला देणगी देत असाल तर मी जें सांगतों तें कानानें ऐकून मनांत धरा. तें असें, कीं विठोबारायाच्या पायांचें चिंतन सर्व काळ मनामध्यें करा १. अशी देणगी जर तुम्ही द्याल, तर त्या योगानें माझें चित्त समाधान पावेल; ह्यावांचून मिष्टान्न भोजन व सोनें आदिकरून उपचारांची मला गरज नाहीं २. अरे, तुम्ही गळ्यामध्यें तुळशीच्या माळा घालून एकादशी व्रत करा व दारामध्यें तुळसीवृंदावन घालून त्याची पूजा करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याप्रमाणें जे वागतील त्यांच्या घरचे उच्छिष्टावशेष मला मिळाले तर ते दिवशीं दसरा-दिवाळी सणच आहे असा आनंद मी मानीन ४. [२९७८]

आवडी धरोनी आलेती आकारा । केला हा पसारा जयासाठीं (याजसाठीं) ॥ १ ॥ तें मी तुझें नाम गाईन आवडी । क्षण एक घडी विसंबेना ॥ २ ॥ वर्म जाणावें हा (हें) मुख्य धर्मसार । अवघे प्रकार तयापोटीं (तयापासीं) ॥ ३ ॥ वेगळ्या विचारें वेगळाले भाव । धरायासी ठाव बहु नाहीं ॥४॥ तुका म्हणे घालूं इच्छेचिये पोटीं । कवळुनी धाकुटी मूर्ती जीवें ॥ ५ ॥ [२९७९]

भागलों मी आतां आपुल्या स्वभावें । कृपा करोनि देवें आश्वासीजे ॥ १ ॥ देउनि आलिंगन प्रीतीच्या पडिभरें । अंगें हीं दातारें निववावीं ॥ २ ॥ अमृताची दृष्टी घालूनियां वरी । शीतळ हा करीं जीव माझा ॥ ३ ॥ घेईं उचलूनि पुसें तहान (तान) भूक । पुसीं माझें मुख पीतांबरें ॥ ४ ॥ बैसवोनि (बैसोनियां) माझी धरीं हनुवटी । ओंवाळुनी दिठी करुनी सांडीं ॥ ५ ॥ तुका म्हणे बापा अहो विश्वंभरा । आतां कृपा करा ऐसी कांहीं ॥ ६ ॥ [२९८०]

न सरे लुटितां मागें बहुतांनीं (बहुतां जनीं) । जुनाट हे खाणी उघडिली ॥ १ ॥ सिद्ध महामुनि साधक संपन्न । तिहीं हें जतन केलें होतें ॥ २ ॥ पायाळाच्या गुणें पडिलें टाऊकें । जगा पुंडलिकें दाखविलें ॥ ३ ॥ तुका म्हणे तेथें होतों मी दुबळा । आलें या कपाळा थोडें बहु ॥ ४ ॥ [२९८१]

भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा । तेथें अनुभवाचा काय पंथ ॥ १ ॥ वाढवुनी जटा फिरे दाही दिशा । तरी जंबु वेषा सहज स्थिति ॥ २ ॥ कोरोनियां भूमी करिती मध्यीं वास । तरी उंदरास काय वाणी ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसें कासया करावें । देहासी दंडावें वाउगेंचि ॥ ४ ॥ [२९८२]

धन्य दिवस आजि डोळियां लाधला । आनंद देखिला धणीवरी ॥ १ ॥ धन्य झालें मुख निवाली रसना । नाम नारायणा घोष करी ॥ २ ॥ धन्य हें मस्तक सर्वांगा शोभलें । संतांचीं पाउलें

अहो देवा, ज्याची आवड धरून तुम्ही आकारास आलां व हा सर्व पसारा ज्याच्याकरितां वाढविला १. तें तुमचें हरिनाम मी प्रीतीनें गाईन. त्याला घटकाभर देखील विसरणार नाहीं २. हेंच मुख्य मर्म सारभूत आहे व हाच मुख्य धर्म आहे. सर्व कांहीं प्रकार ह्याच्या पोटामध्यें आहेत ३. वेगळाल्या भावानें वेगळाले विचार करणें नको, कारण मुख्य ठिकाण (परमार्थांत हरि) प्राप्त करून घेण्याला एका नामाशिवाय बहुत प्रकार नाहींत ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही आपल्या जीवानें देवाच्या लहान मूर्तीस मिठी घालून इच्छेच्या संपुटामध्यें घालून ठेवूं (म्हणजे तत्संबंधीं इच्छा ठेवूं) ५. [२९७९]

हे देवा, मी आपल्या स्वाभाविक कर्मानें (आजवर संसार करून) फार थकलों आहें, म्हणून तुम्हीं कृपा करून मला आश्वासन द्यावें १. हे दात्या देवा, तुम्ही आत्यंतिक प्रीतीनें मला आलिंगन देऊन माझीं अष्टांगें शीतळ करा २. माझ्यावर दृष्टीनें कृपामृताचा वर्षाव करून माझा जीव शीतळ करा ३. मला उचलून कडेवर घेऊन तहान-भूक विचारा आणि तुमच्या पीतांबरानें माझ्या मुखावरील घाम पुसा ४. मला मांडीवर बसवून कौतुकानें हनुवटी धरून माझी समजूत घाला आणि दृष्ट काढण्यासाठीं लिंबलोण माझ्यावरून उतरून टाका ५. तुकाराम महाराज म्हणतात, अहो बापा विश्वंभरा, वर सांगितल्याप्रमाणें अशी कांहीं तरी कृपा करा ६. [२९८०]

या पंढरीमध्यें पूर्वींची जुनाट असलेली खाण प्रत्यक्ष सांपडली आहे ती मागें पुष्कळांनीं लुटली, पण संपत नाहीं १. पूर्वींचे सिद्ध महामुनि आणि साधनानें संपन्न साधक ह्या सर्वांनीं ही जतन केली होती, परंतु सामान्य जनांना ती खूण कळली नव्हती २. पुंडलीकराय, पायाळु माणसाला भूमिगत धन दिसतें व सांपडतें, त्याप्रमाणें पायाळु असल्यामुळें त्यांस ती खाण माहीत झाली व त्यांनींच ती सर्व जगाला दाखविली ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या ठिकाणीं मी गरीब होतों म्हणून माझ्या वांट्याला दैवानुसार थोडेंबहुत आलें ४. [२९८१]

कांहीं जन भगवीं वस्त्रें घेतात, तो कांहीं हरीचा अनुभव घेण्याचा मार्ग आहे काय ? त्या प्रमाणें भगव्या रंगाचीं साहाजिक कुत्रीं नसतात काय ? १. मस्तकावर जटा वाढवून जे दशदिशा (नग्न) हिंडतात, त्याप्रमाणें कोल्ह्याची वागणूक साहाजिक असते २. कित्येक, जमिनीमध्यें विवर करून राहातात, तसे आपापल्या बिळामध्यें राहाणारे उंदीर कमी आहेत काय ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें करण्याचें काय कारण आहे ? व्यर्थ देहाला दंड कां करावा ? ४. [२९८२]

आजचा दिवस धन्य झाला, कारण विटेवर मूर्तिमंत आनंद डोळ्यांनीं तृप्ति होईपर्यंत पाहिला १. जिव्हा ही नारायणनामाचा घोष करून शीतळ झाली. त्या योगानें माझें मुख धन्य झालें २. मस्तकासहित सर्व शरीर संतांच्या

लागताती ॥ ३ ॥ धन्य आजि पंथें चालती पाउलें । टाळियां शोभले कर दोन्ही ॥ ४ ॥ धन्य तुका म्हणे आम्हांसी फावलें । पावलों पाउलें विठोबाचीं ॥ ५ ॥ [२९८३]

बरवी हे वेळ सांपडली संधी । साह्य झाली बुद्धि संचितासी ॥ १ ॥ येणें पंथें माझीं चालिलीं पाउलें । दरुषण जालें संतां पायीं ॥ २ ॥ त्रासिलें दरिद्रें दोषा जाला खंड । त्याचि काळें पिंड पुनीत झाला ॥ ३ ॥ तुका म्हणे झाला अवघा व्यापार । आली वेरझार फळासी हे ॥ ४ ॥ [२९८४]

आपणा लागे काम वाण्याघरीं गूळ । त्याचें याति कूळ काय कीजे ॥ १ ॥ उकरड्यावरी वाढली तुळसी । टाकावी ते कैसी ठायागुणें ॥ २ ॥ गाईचा जो भक्ष अमंगळ खाय । तिचें दूध काय सेवूं नये ॥ ३ ॥ तुका म्हणे काय सलपटासी काज । फणसांतील बीज काढुनि घ्यावें ॥ ४ ॥ [२९८५]

जयासी नावडे वैष्णवांचा संग । जाणावा तो मांग जन्मांतरींचा ॥ १ ॥ अपवित्र वाचा जातीचा अधम । आचरण धर्म नाहीं तया ॥ २ ॥ मंजुळ वदनीं बचनागाची कांडी । शेवटीं बिघडी जीवप्राणा ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्याचा पिता नाहीं शुद्ध । तयासी गोविंद अंतरला ॥ ४ ॥ [२९८६]

वांझेनें दाविलें गऱ्हवार लक्षण । चिरगुटे घालून वाथयाला ॥ १ ॥ तेवीं शब्दज्ञानी करिती चावटी । ज्ञान पोटासाटीं विकूनियां ॥ २ ॥ बोलाचीच कढी बोलाचाचि भात । जेवुनियां तृप्त कोण झाला ॥ ३ ॥ कागदीं लिहितां नामाची साकर । चाटितां मधुर गोडी नेदी ॥ ४ ॥ तुका म्हणे जळो जळो ते महंती । लाज नाहीं चित्तीं निसुगाला ॥ ५ ॥ [२९८७]

झुंझायाच्या गोष्टी ऐकतांचि सुख । करितां देहदुःख थोर आहे ॥ १ ॥ तैसी हरिभक्ति

पायांवर ठेविलें त्या योगानें तें धन्य होऊन शोभायमान दिसलें ३. ह्या पंढरीच्या मार्गानें माझे पाय चालले त्या योगानें ते धन्य झाले व दोन्ही हातांनीं टाळ्या वाजविल्यामुळें ते शोभायमान झाले ४. तुकाराम महाराज म्हणतात, विठोबारायाच्या चरणांजवळ आम्ही येऊन पोहोंचलों व हा लाभ आम्हांस झाला, त्या योगानें आम्ही धन्य झालों ५. [२९८३]

प्रारब्धाला बुद्धि साह्य झाली, अशी वेळ मला सांपडली; हा प्रसंग चांगला आहे १. या पंथानें माझे चरण चालत येऊन संतांचे पाय माझ्या दृष्टीस पडले २. पूर्वीचें भोगलेलें दारिद्र्य व दोष हे सर्व नाहींसे झाले आणि त्याच समयाला माझा देह पवित्र झाला ३. तुकाराम महाराज म्हणतात, आज जन्ममृत्यूच्या येरझारांचें सार्थक झालें, आतां सर्व व्यापार फलद्रूप झाला ४. [२९८४]

वाण्याचे घरीं गूळ आहे तो आपल्या कामाकरितां जर आणावयाचा असला तर त्या वाण्याची जातिकुळ विचारण्याचें कारण नाहीं १. तुळस ही जर उकिरड्यावर वाढली तर ती वाईट जाग्यावर वाढल्यामुळें टाकून द्यावी काय? २. गाईचें खाणें विष्ठादिकरून अमंगळ असतें, म्हणून तिच्या दुधाचा स्वीकार करूं नये काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, फणसावरील सालपटाचें कारण नाहीं, आंतील बीज (गरा) सेवन करावा (तसे कोणाचेहि दोष टाकून गुण घ्यावे) ४. [२९८५]

ज्याला वैष्णवांची संगति आवडत नाहीं, तो ह्या जन्मांत जरी ब्राह्मण असला, तरी पूर्वील जन्मींचा मांग असावा १. ज्याचें आचरण धर्माप्रमाणें नाहीं, आणि जो वाचेनें अपवित्र भाषण करतो, तो जातीचा चांडाळ आहे असें समजावें २. जशी बचनागाची कांडी तोंडांत घातल्याबरोबर मधुर लागते, पण अखेरीस जीवाची हानि करिते, तशी दुर्जनाची संगत परिणामीं वाईट असते ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याला गोविंदाची आठवण कधीं होत नाहीं, तो चांगल्या बापाच्या पोटचा नाहीं असें समजावें ४. [२९८६]

पोटावर वस्त्रांच्या घड्या घालून वांझ स्त्री ही जशी गर्भारपणाचीं लक्षणें दाखविते १. तशी शब्दज्ञानी हे शब्दांची रचना करितात आणि ज्ञानाची विक्री करून पोट भरतात २. कढीचें व भाताचें वर्णन जर नुसत्या शब्दानें केलें, तर त्यापासून कोणाचें पोट भरतें काय? ३. कागदावर साखर हें नांव लिहून तोंडानें चाटलें असतां मधुरपणाची गोडी लागणार नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या कोरड्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगून मोठेपण दाखविणें, त्यास आग लागो (असें द्विवार सांगतात); पण त्या कोडग्या मनुष्याच्या चित्तामध्यें कांहीं लाज नाहीं ५. [२९८७]

लढाईच्या (युद्धाच्या) गोष्टी ऐकल्या असतां सुख वाटतें; पण प्रत्यक्ष लढाई करणाराच्या देहाला फार दुःख आहे १.

सुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ॥ २ ॥ पिंड पोसिलिया विषयांचा पाइक । वैकुंठनायक कैंचा तेथें ॥ ३ ॥ तुका म्हणे व्हावें देहासी उदार । रखुमादेवीवर जोडावया ॥ ४ ॥ [२९८८]

पाषाण प्रतिमा सोन्याच्या पादुका । हें हो हातीं एका समर्थाचे ॥ १ ॥ अनामिकाचे हातीं समर्थाचा शिक्का । न मानितां लोकां येईल कळों ॥ २ ॥ तुका म्हणे येथें दुराग्रह खोटा । आपल्या अदृष्टा शरण जावें ॥ ३ ॥ [२९८९]

बहु या प्रपंचें भोगविल्या खाणी । टाकोनियां मनीं आला सीण ॥ १ ॥ आतां पायांपाशीं लपवावें देवा । नको पाहूं सेवा भक्ती माझी ॥ २ ॥ बहु भय वाटे एकाच्या बोभाटें । आली घायवटे फिरोनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे सिगे भरूं आलें माप । वियोग संताप झाला तुझा ॥ ४ ॥ [२९९०]

धरूनियां मनीं बोलिलों संकल्प । होसी तरी बाप सिद्धी नेईं ॥ १ ॥ उत्कंठा हे आजी झाली माझे पोटीं । मागील या गोष्टी टाळाटाळ ॥ २ ॥ माझा मज असे ठाऊका निर्धार । उपाधि उत्तर न साहे पैं ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज दिली आठवण । तरि अभिमान धरीं माझा ॥ ४ ॥ [२९९१]

आजिवरी होतों संसाराचे हातीं । आतां ऐसें चित्तीं उपजलें ॥ १ ॥ तुम्हां शरणागत व्हावें नारायणा । अंगीकारा दीना आपुलिया ॥ २ ॥ विसरलों काम याजसाठीं धंदा । सकळ गोविंदा माझें तुझें ॥ ३ ॥ तुका म्हणे विज्ञापना परिसावी । आवडी हे जीवीं झाली तैसी ॥ ४ ॥ [२९९२]

तशी श्रीहरीची भक्ति केवळ सुळावरल्या पोळीप्रमाणें आहे. (म्हणजे शूळ पोटांत शिरल्यावर गोड पोळी खावयास दिली तरी दुःखकारक आहे.) तसली भक्ति साध्य करणारा बलाढ्य शूर क्वचितच (हजारांत एखादाच) निवडला जातो २. जो देहाचें पोषण करतो तो विषयांच्या अधीन होऊन राहातो; त्याच्या ठिकाणीं वैकुंठनायक कसचा आहे? (त्याला वैकुंठनायक कसा वश होईल?) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर तुम्हांला रुक्माईचा भ्रतार जो देव, त्याची प्राप्ति करून घ्यावयाची असेल तर आपल्या देहावर उदार झालें पाहिजे ४. [२९८८]

दगडाच्या देवाची (विष्णूची) मूर्ति करून त्याच्या पायांतील पादुका सोन्याच्या करितात, तरी मूर्तिच श्रेष्ठ आहे; किंमतीवर मेळ नाहीं, कारण ही सत्ता एका समर्थ देवाच्या हातीं आहे १. समर्थांनीं आपला शिक्का (अधिकार) नीच अंत्यजाच्या हातीं दिला असला व तो जर लोकांनीं मानला नाहीं, तर ते शिक्षेस पात्र होतील २. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं दुराग्रह करणें खोटें आहे, तर आपापल्या प्रारब्धास शरण जावें (प्रारब्धानुसार वागावें) ३. [२९८९]

हे देवा, ह्या प्रपंचानें अनेक योनींचें दुःख मला भोगविल्यामुळें माझें मन त्रासलें, म्हणून मी तुमच्या जवळ आलों १. आतां माझी सेवाभक्ति न पाहातां, हे देवा, तुमच्या पायांच्या ठिकाणीं मला आश्रय द्या २. कित्येक जीव अनेक योनी फिरल्यानें दुःखी झाले; त्यांचा बोभाट ऐकून मला भय वाटतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या आयुष्याचें माप भरून अखेरीस आलें आहे, आणि तुझा वियोग झाल्यामुळें मन फार संतप्त झालें आहे (आम्हांला हें दुःख होत आहे) ४. [२९९०]

हे देवा, तुझ्या प्राप्तीचा संकल्प मनामध्यें धरून मी बोललों आहें; जर तूं माझा बाप आहेस तर तो संकल्प सिद्धीस न्यावा १. आज माझ्या हृदयांत भेटीविषयींची उत्कंठा उत्पन्न झाली आहे, तरी माझ्या मागील पातकांच्या गोष्टी टाळाव्यात २. कोणत्याहि प्रकारच्या उपाधीचें भाषण तुम्हांला सहन होत नाहीं, हें निश्चयेंकरून माझें मी जागतों (किंवा, देवाकडून मायिक वस्तु घ्यावयाच्या नाहींत हा माझा निश्चय माझ्या लक्षांत आहे, त्यामुळें मायिक वस्तूंत मला गुंतवावें म्हणून तूं कांहीं बोलशील तर तें मला सहन होणार नाहीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारची मी जर तुम्हांला आठवण दिली आहे, तर तुम्हीं माझा अभिमान धरला पाहिजे ४. [२९९१]

हे देवा, आजपर्यंत मी संसारांत गुंतलों होतों, आतां माझ्या चित्तांत असें उत्पन्न झालें आहे, कीं १. हे नारायणा, तुम्हांला शरण यावें आणि मज गरिबाचा तुम्हीं अंगीकार करावा २. हे गोविंदा, ह्याकरितां माझें–तुझें ह्या भावना व सर्व कामधंदा मी विसरलों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जशी माझ्या जीवाच्या ठिकाणीं आवड उत्पन्न झाली तशी मी विनंति केली आहे, ती तुम्ही ऐका ४. [२९९२]

धन्यधन्य ज्यांसी पंढरीचा वास । धन्य ते जन्मास प्राणी आले ॥ १ ॥ चहूं खाणींमध्यें होत कोणी एक । त्रिगुण कीटक पक्षिराज ॥ २ ॥ उत्तम चांडाळ नर नारी बाळ । अवघेचि सकळ चतुर्भुज ॥ ३ ॥ अवघा विठ्ठल तेथें दुजें नाहीं । भरला अंतर्बाहीं सदोदित ॥ ४ ॥ तुका म्हणे तेथें होउनी राहेन । सांडोवा पाषाण पंढरीचा ॥ ५ ॥ [२९९३]

असंतलक्षण भूतांचा मत्सर । मनास निष्ठुर अतिवादी ॥ १ ॥ अंतरींचा रंग उमटे बाहेरी । वोळखि यापरी आपेंआप ॥ २ ॥ संत ते समय ओळखती वेळ । संतुष्ट निर्मळ चित्त सदा ॥ ३ ॥ तुका म्हणे हित उचित अनुचित । मज लागे नित्य विचारावें ॥ ४ ॥ [२९९४]

आतां काय खावें कोणीकडे जावें । गांवांत राहावें कोण्या बळें ॥ १ ॥ कोपला पाटील गांवींचे हे लोक । आतां मज भीक कोण घाली ॥ २ ॥ आतां येणें चवी सांडिली म्हणती । निवाडा करिती दिवाणांत ॥ ३ ॥ भल्या लोकांपासीं सांगितली मात । केला माझा घात दुर्बळाचा ॥ ४ ॥ तुका म्हणे यांचा संग नव्हे भला । शोधीत विठ्ठला जाऊं आतां ॥ ५ ॥ [२९९५]

विठ्ठलावांचूनि ब्रह्म जे बोलती । वचन तें संतीं मानूं नये ॥ १ ॥ विठ्ठलावांचूनी ज्या ज्या उपासना । अवघाचि जाणा श्रमची (संभ्रम) तो ॥ २ ॥ विठ्ठलावांचूनी सांगतील गोष्टी । वायां ते हिंपुटी होती जाणा ॥ ३ ॥ विठ्ठलावांचूनि जें कांहीं जाणती । तितुल्या वित्पत्ति वाउगीया ॥ ४ ॥ तुका म्हणे एक विठ्ठलचि खरा । येर तो पसारा वाउगाचि ॥ ५ ॥ [२९९६]

सर्व काळ डोळां बैसो नारायण । न यो अभिमान आड पुढें ॥ १ ॥ धाड पडो माझ्या थोरपणावरि । वाचे हरिहरि उच्चारीन ॥ २ ॥ जळो अंतरींचें सर्व जाणपण । विवादवचन अहंतेचें ॥ ३ सकळां चरणीं गळित माझा जीव । तुका म्हणे भाव एकविध ॥ ४ ॥ [२९९७]

जे पंढरीमध्यें वास्तव्य करितात, ते प्राणी जन्माला येऊन धन्य झाले (असें त्रिवार सांगतात) १. जारज, अंडज, स्वेदज व उद्भिज्ज ह्या चार खाणींपैकीं त्रिगुणात्मक देहाचे पक्षी अथवा किडे जे कोणीहि तेथें असतील ते सर्व धन्य आहेत २. तेथील स्त्रिया व पुरुष, उत्तम अथवा चांडाळ व अज्ञान मुलें हे सर्व चतुर्भुज (धन्य) आहेत ३. त्या ठिकाणीं सर्व विठ्ठलरूप अंतर्बाह्य सर्व काळ भरलें आहे, त्यावांचून दुसरें नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्या पंढरीच्या ठिकाणीं टाकाऊ पाषाण (दगड) सुद्धां होऊन मी वास्तव्य करीन ५. [२९९३]

भूतांचा द्वेष करणें, मनांत निष्ठुर असणें व फार वाद घालणें अशीं तीन वाईट लक्षणें ज्याच्या ठिकाणीं आहेत तो अभक्त समजावा १. अंतःकरणांतील स्वभाव बाहेर प्रगट होतात, ते ह्या प्रकारें आपोआप ओळखिले जातात २. ज्यांचें चित्त सर्व काळ संतुष्ट असून निर्मळ असतें आणि जे प्रसंग व योग्य काळ जाणतात त्यांस संत म्हणावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, योग्य-अयोग्य हिताचा विचार मला सर्व काळ करावा लागतो ४. [२९९४]

आतां खावें तरी काय? जावें कोणीकडे? गांवांत कोणाच्या बळावर राहावें? १. गांवचा पाटील रागावला आहे व लोकहि रागावले आहेत, आतां मला भिक्षा कोण घालील? २. आतां हे सर्व असें म्हणतात, कीं त्यानें चव टाकली, असा हा वेडा झाला आहे. अशा प्रकारें सरकारांत फिर्याद करतात अथवा वेड्यांत काढतात ३. दुर्बल जो मी त्या माझा ह्यांनीं घात केला, अशी चांगल्या लोकांजवळ हकीगत सांगितली ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांची संगति करणें चांगलें नाहीं, म्हणून आतां विठोबाचा शोध करीत जाऊं ५. [२९९५]

विठ्ठल देवावांचून जे कोणी ब्रह्म आहे असें म्हणतील, त्यांचें बोलणें संतांनीं मानूं नये १. विठ्ठलदेवाखेरीज ज्या ज्या म्हणून उपासना करतील तो सर्व कांहीं श्रम आहे असें समजा २. विठ्ठलदेवावांचून जे कोणी गोष्टी सांगतील ते सर्व व्यर्थ कष्टी होत आहेत, असें समजा ३. विठ्ठलदेवाखेरीज जें कांहीं जाणतील ती सर्व विद्वत्ता व्यर्थ आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, एक विठ्ठलच खरा आहे, बाकीचा व्यर्थ पसारा आहे ५. [२९९६]

सर्व काळ माझ्या डोळ्यामध्यें एका नारायणाचीच बैठक व्हावी, त्यामध्यें लौकिक अभिमानाचा प्रतिबंध पुढें येऊं नये १. माझा थोरपणा सर्व नाहींसा होवो. मी वाणीनें हरिनामाचा उच्चार करीन २. अंतःकरणांतील सर्व जाणीववृत्तीस (शहाणपणास) आग लागो व अहंकाराचे वादविवादशब्द जळोत ३. तुकाराम महाराज म्हणतात, सगळ्यांच्या पायांपाशीं माझा जीव गलित होऊन एकविध (एकनिष्ठ) भाव माझ्या ठिकाणीं राहिला आहे ४. [२९९७]

मधुरा उत्तरासवें नाहीं चाड। अंतरंगीं वाड भाव (प्रेम) असो ॥ १ ॥ प्राणावेगळा न करीं नारायण। मग नसो ज्ञान मूर्ख बरा ॥ २ ॥ जननिंदा होय तो बरा व्यापार। थोरवीचा भार कामा नये ॥ ३ ॥ तुका म्हणे भाव निष्ठावंत चित्तीं। दया क्षमा शांती सर्वां भूतीं ॥ ४ ॥ [२९९८]

झाडें वोरपोनि खाऊनियां पाला। आठवी विठ्ठला वेळोवेळां ॥ १ ॥ वल्कलें नेसुनि ढुंगा गुंडाळूनि। सांडी जवळुनी देहभान ॥ २ ॥ लोकमान वमनासमान मानणें। एकांतीं राहणें विठोसाठीं ॥ ३ ॥ सहसा करूं नये प्रपंचीं सौजन्य। सेवावें अरण्य एकांतवास ॥ ४ ॥ ऐसा हा निर्धार करी जो मनाचा। तुका म्हणे त्याचा पांग फिटे ॥ ५ ॥ [२९९९]

भक्तिभावें करीं बैसोनि निश्चिंत। नको गोवूं चित्त प्रपंचासी ॥ १ ॥ एक दृढ करीं पंढरीचा राव। मग तुज उपाव पुढील सुचे ॥ २ ॥ नको करूं कांहीं देवतापूजन। जप तप ध्यान तेंही नको ॥ ३ ॥ मानिसील झणीं आपलिक कांहीं। येरझार पाहीं न चुके कदा ॥ ४ ॥ ऐसे जन्म किती पावलासी देहीं। अझूनि कां नाहीं कळली सोय ॥ ५ ॥ सोय धरीं आतां होय पां सावध। अनुभवी आनंद आहे कैसा ॥ ६ ॥ सहज कैसें आहे तेथींचें तें गुज। अनुभवें निज पाहे तुकीं ॥ ७ ॥ तुका म्हणे आतां होईं तूं सावध। तोडीं भवबंध एका जन्में ॥ ८ ॥ [३०००]

दोराच्या आधारें पर्वत चढला। पाउलासी केला अपघात ॥ १ ॥ अष्टोत्तरशें व्याधि ज्या वैद्यें दवडुनी। तो वैद्य मारुनि उत्तीर्णता ॥ २ ॥ नव मास माया वाहिलें उदरीं। ते माता चौबारीं नग्न केली ॥ ३ ॥ गायत्रीचें क्षीर पिळुनी घेउनी। उपवासी बांधोनी ताडितसे ॥ ४ ॥ तुका म्हणे गुरुनिंदकाचें तोंड। पाहतां नरककुंड पूर्वजांसी ॥ ५ ॥ [३००१]

गोड शब्दाची इच्छा मला नाहीं तर माझ्या अंतःकरणांत हरीविषयीं अतिशय भाव असावा (निष्ठा असावी) १. मी आपल्या प्राणावेगळा नारायणाला करणार नाहीं. मग मला ज्ञान नसून मी मूर्ख असलों तरी चांगलें २. ज्यायोगेंकरून जन आपली निंदा करतील तो व्यवहार चांगला. मोठेपणाचें ओझें कांहीं उपयोगी नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, एकनिष्ठभाव चित्तामध्यें असून मीं सर्व भूतांच्या ठिकाणीं दया, क्षमा, शांति धारण केल्या आहेत ४. [२९९८

वनांत जाऊन खाण्यासारखा झाडाचा पाला ओरबाडावा व तो खाऊन वेळोवेळीं विठ्ठलाचें चिंतन करावें १ झाडाच्या साली ढुंगणाला गुंडाळून घ्याव्या व देहअभिमान जाळून टाकावा. २. लोकांकडून मिळणारा मान ओकारीप्रमाणे मानून विठोबाच्या प्राप्तीपुरता एकांत सेवन करावा ३. होतां होईल तितकें प्रपंचाशीं प्रेम ठेवूं नये; अरण्यादि एकांतवासाचें सेवन करावें ४, तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा ज्याच्या मनानें निश्चय केला आहे, त्याच्या मागें लागलेलें प्रपंचाचें दारिद्र्य नाहींसें होईल ५. [२९९९]

श्रीहरीची भक्ति तूं मोठ्या श्रद्धेनें सर्व चिंता टाकून निश्चळ हृदयानें कर; आपलें चित्त प्रपंचांत गुंतवूं नको १. एक पंढरीचा राजा विठ्ठल ह्याच्याविषयींचा भाव दृढ कर. त्या योगानें तुला पुढील उपाय सुचतील २. अन्य देवतांचें पूजन कांहीं करूं नकोस व जप, तप, ध्यानाच्या भानगडींत पडूं नकोस ३. एखाद्यास चुकूनहि माझा देहसंबंधी आहे असें मानशील तर त्या योगानें जन्ममृत्यूच्या येरझाऱ्यांतून तूं कधीं सुटणार नाहींस असें तूं समज ४. अशा प्रकारचे तुझ्या जीवात्म्यानें कितीएक जन्म घेतले आहेत, तरी तुला अजून परमार्थाचा मार्ग कां कळला नाहीं ? ५. आतां तूं सावध होऊन पांडुरंगाचा मार्ग धर, आणि त्याच्या भक्तीचा आनंद कसा आहे त्याचा अनुभव घे ६. तेथलें सहज गुह्य कसें आहे तें निजस्वरूप तूं अनुभवानें पाहा ७. तुकाराम महाराज म्हणतात, आतां तूं सावध होऊन आपल्या एका जन्मानें संसाराचीं बंधनें तोडून मुक्त हो ८. [३०००]

एक मूर्ख दोराच्या आश्रयानें पर्वताच्या शिखरावर चढून गेला व नंतर त्यानें आपले पाय तोडून टाकले (किंवा, तो दोर तोडून टाकला) १. एकशें आठ व्याधि ज्या वैद्यानें नाहींशा केल्या त्याच्या उपकाराबद्दल त्या वैद्याला ठार मारून त्याच्या उपकारांतून उत्तीर्ण झाला २. ज्या आईनें नऊ महिनेपर्यंत ओझें वागविलें, त्या आईस भर रस्त्यावर ज्यानें नग्न केलें ३. गाईचें दूध काढून घेतलें व तिला खायला न घालतां उपाशीं बांधून मारीत आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, जो कोणी गुरूची निंदा करितो, त्याचें तोंड जर पाहिलें तर पाहणारासहवर्तमान त्याच्या पूर्वजांस नरक प्राप्त होतो ४. [३००१]

न कळे ब्रह्मज्ञान आचार विचार। लटिका वेव्हार करीतसे ॥ १ ॥ विश्वामित्रीपोटीं तयाचा अवतार। नांव महाखर चांडाळाचें ॥ २ ॥ द्रव्यइच्छेसाठीं करीतसे कथा। काय त्या पापिष्टा न मिळे खाया ॥ ३ ॥ पोट पोसावया तोंडें बडबडी। नाहीं धडफुडी एक गोष्टी ॥ ४ ॥ तुका म्हणे तया काय व्याली रांड। येऊनियां भांड जनामध्यें ॥ ५ ॥ [३००२]

नित्य उठोनियां खावयाची चिंता। आपुल्या तूं हिता नाठवीसी ॥ १ ॥ जननीचे पोटीं उपजलासी जेव्हां। चिंता तुझी तेव्हां केली तेणें ॥ २ ॥ चातकांलागूनि मेघ नित्य वर्षे। तो तुज उदास करील केवीं ॥ ३ ॥ पक्षी वनचरें आहेत भूमिवरि। तयालागीं हरि उपेक्षीना ॥ ४ ॥ तुका म्हणे भाव धरून राहे चित्तीं। तरि तो श्रीपती उपेक्षीना ॥ ५ ॥ [३००३]

पूर्वीहूनी बहु भक्त सांभाळिले। नाहीं अव्हेरिले दास कोणी ॥ १ ॥ जे जे शरण आले ते ते आपंगिले। पवाडे विठ्ठले ऐसे तुझे ॥ ३ ॥ मिरवे चरणीं ऐसीये गोष्टीचें। भक्त सांभाळाचें प्रेम ऐसें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हांसाठीं येणें रूपा। माझ्या मायबापा पांडुरंगा ॥ ४ ॥ [३००४]

भक्तकरुणा बहुत तुझिया अंतरा। मज विश्वंभरा कळों आलें ॥ १ ॥ पक्षीयासी तुझें नाम जें ठेविलें। तयें उद्धरिलें गणिकेसी ॥ २ ॥ कुंटिणी ते दोष बहु आचरली। नाम घेतां आली करुणा तुज ॥ ३ ॥ हृदय कोमळ तुझें नारायणा। ऐसें बहुतां जनां तारियेलें ॥ ४ ॥ तुका म्हणे सीमा नाहीं तुझे दये। कोमल हृदय पांडुरंगा ॥ ५ ॥ [३००५]

अजामीळ अंत मरणासी आला। तोंवरि स्मरला नाहीं तुज ॥ १ ॥ प्राण जातेवेळे म्हणे नारायण। त्यासाठीं विमान पाठविलें ॥ २ ॥ बहुत कृपाळु होसी जगन्नाथा। त्रैलोक्यसमर्था

जो ब्रह्मज्ञान व आचारविचार कांहीं न समजतां परमार्थाचा खोटा व्यवहार करीत आहे १. त्याचा जन्म विश्वामित्रानें निर्माण केलेल्या गाढवीच्या पोटीं झालेला आहे असें समजावें, म्हणून त्या चांडाळास मोठा गाढव आहे असें समजावें २. आपणांस पैसे मिळावेत अशा बुद्धीनें जो हरीची कथा करितो, त्या पाप्याला हरिकथा केल्यावांचून खावयास मिळत नाहीं काय ? ३. आपलें पोट भरण्याकरितां जो तोंडानें बडबड करितो त्याच्याजवळ निश्चयात्मक अशी एकहि गोष्ट नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, जो भांडखोर जनांमध्यें येऊन (असलें खोटें आचरण करतो) त्या असल्या ह्या नष्टाला त्या रांडेनें (आईनें) कां जन्म दिला ? ५. [३००२]

सकाळीं झोंपेंतून उठल्याबरोबर सद्‌. सर्वकाल खाण्याचीच चिंता करतोस व ज्यांत आपलें हित आहे त्याची आठवण देखील करीत नाहींस १. ज्या वेळेस तूं आपल्या आईच्या पोटीं जन्म घेतलास त्या वेळेसच तुझी श्रीहरीनें काळजी करून व्यवस्था लाविली आहे २. चातक पक्ष्याकरितां मेघांकडून जो नित्य वर्षाव करवितो, तो देव तुला निराश कसा करील ? ३. पृथ्वीवर पक्षी व वनांतील प्राणी आहेत, त्यांची हरि कधींहि उपेक्षा करीत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरीविषयीं तूं मनांत श्रद्धा धरून राहा, म्हणजे श्रीहरि तुझी कधींहि उपेक्षा करणार नाहीं ५. [३००३]

पूर्वीपासून तुम्हीं पुष्कळ भक्तांचा सांभाळ केला; कोणत्याहि आपल्या दासाचा आपण अव्हेर केला नाहीं १. हे विठ्ठला, जे जे म्हणून आजपर्यंत तुला शरण आले, त्यांचा तूं अंगीकार केलास, अशी तुझी कीर्ति आहे २. भक्तांचा प्रेमानें सांभाळ करणें अशाविषयींचें ब्रीदच तूं आपल्या पायीं बांधलेलें मिरवीत आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, माझ्या मायबापा, तुम्ही आमच्याकरितां सगुण रूप धारण करितां ४. [३००४]

हे देवा, तुझ्या अंतःकरणांत भक्तांविषयींची दया पुष्कळ आहे, असें हे विश्वपोषका, मला कळून चुकलें १ ज्या गणिका वेश्येनें राघुपक्ष्याच्या निमित्तानें तुझें नांव घेतलें, तिचाहि तूं उद्धार केलास २. कुंटिण जारिणीनें बहुत पापाचरण केलें, परंतु तिनें तुझें नांव घेतल्याबरोबर तुला तिची दया आली ३. हे नारायणा, तुझें हृदय फार कोंवळें आहे, म्हणून असें तूं बहुत जनांस तारिलेंस ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, तुझ्या ठिकाणीं असणाऱ्या दयेस मर्यादा नाहीं, असा तूं कोंवळ्या हृदयाचा आहेस ५. [३००५]

अजामिळानें मरण येईपर्यंत तुझें स्मरण केलें नाहीं १. प्राण जाण्याच्या वेळेस पुत्रलोभानें त्यानें नारायणाचें चिंतन केलें त्याकरितां हे देवा, तुम्हीं वैकुंठाहून विमान पाठविलें २. हे जगन्नाथा, त्रैलोक्यांत समर्थ असणाऱ्या व सर्वांचा संबंधी

सोइरिया ॥ ३ ॥ तुका म्हणे भक्तकाज तूं कैवारी । तुज साही चारी वर्णिताती ॥ ४ ॥ [३००६]

धर्म रक्षावया अवतार घेसी । आपुल्या पाळिसी भक्तजना ॥ १ ॥ अंबऋषीसाठीं जन्म सोशियेले । दुष्ट निर्दाळिले किती एक ॥ २ ॥ धन्य तुज कृपासिंधु म्हणतील । आपुला तूं बोल साच करीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज वर्णिती पुराणें । होय नारायण दयासिंधू ॥ ४ ॥ [३००७]

येउनी जाउनी पाहें तुजकडे । पडिल्या सांकडें नारायणा ॥ १ ॥ आणीक कोणाचा मज नाहीं आधार । तुजवरि भार जीवेंभावें ॥ २ ॥ निष्ठुर अथवा होईं तूं कृपाळ । तुज सर्वकाळ विसरेंना ॥ ३ ॥ आपुलें वचन राहावें सांभाळून । तुम्हां आम्हां जाण पडिपाडु ॥ ४ ॥ ज्याच्या वचनासी अंतर पडेल । बोल तो येईल तयाकडे ॥ ५ ॥ तुम्हां आम्हां तैसें नाहीं म्हणे तुका । होशील तूं सखा जीवलग ॥ ६ ॥ [३००८]

आइक नारायणा वचन माझें खरें । सांगतों निर्धारें तुजपासीं ॥ १ ॥ नाहीं भाव मज पडिली लोकलाज । राहिलेंसे काज तुझे पायीं ॥ २ ॥ वरदळ भक्ति करितों मी नित्य । परि नाहीं चित्त तुझे पायीं ॥ ३ ॥ जरि तुज कांहीं करणें उचित । तारीं तूं पतित तुका म्हणे ॥ ४ ॥ [३००९]

अनाथ परदेशी हीन दीन भोळें । उगलेंचि लोळें तुझे रंगीं ॥ १ ॥ आपुलें म्हणावें मज नुपेक्षावें । प्रेमसुख द्यावें मायबापा ॥ २ ॥ कांसवीचे परी दृष्टी पाहें मज । विज्ञानीं उमज देवूनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे तुझा झालों शरणागत । काया वाचा चित्त दुजें नाहीं ॥ ४ ॥ [३०१०]

पावलों पंढरी वैकुंठभुवन । धन्य आजि दिन सोनियाचा ॥ १ ॥ पावलों पंढरी आनंदगजरें । वाजतील तुरे शंख भेरी ॥ २ ॥ पावलों पंढरी क्षेम आलिंगनीं । संत या सज्जनीं निवविलें ॥ ३ ॥

जा तूं, नो कार कृपाळु आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, भक्तांचें कार्य करण्याविषयीं तूं सदा तत्पर आहेस, म्हणून तुला भक्तकैवारी असें म्हणतात, आणि चार वेद व सहा शास्त्रें हीं तुझें वर्णन करीत आहेत ४, [३००६]

आपल्या भक्तांचें रक्षण करण्याकरितां तुम्ही अवतार घेऊन आपल्या भक्तजनांचा प्रतिपाल करतां १. अंबऋषीकरितां तुम्हीं दहा जन्म सोसले व कित्येक दुष्टांचें निर्दळण केलें २. तूं धन्य आहेस. तुला कृपेचा समुद्र म्हणतात, म्हणून "पतिताला पावन करणारा आहें" हें तूं आपलें वचन खरें कर ३. तुकाराम महाराज म्हणतात, नारायण हा दयेचा समुद्र–दयासिंधु आहे असें तुझें वर्णन पुराणें करीत आहेत ४. [३००७]

मी येऊन जाऊन हे नारायणा, संकटसमयीं तुझ्याकडे पाहात आहें १. तुझ्यावांचून मला दुसऱ्या कोणाचा आश्रय नाहीं. मीं योगक्षेमाचें ओझें तुझ्यावर टेविलें आहे २. आतां तूं निष्ठुर हो अथवा कृपाळु हो, कसेंहि असलें तरी मी तुला कधींहि विसरणार नाहीं, सर्व काळ तुझेंच चिंतन करीन ३. तुम्हीं आपल्या वचनाचें रक्षण करावें हा तुमचा अधिकार आहे व तुमची सेवा करणें हें आमचें कर्तव्य आहे, असें समजा ४. बोलल्याप्रमाणें वागण्यांत जो चुकेल त्याच्यावर दोष येईल ५. तुकाराम महाराज म्हणतात, तुमचा–आमचा तसा प्रकार नाहीं, कारण तूं आमचा जिवलग मित्र आहेस ६. [३००८]

हे नारायणा, मी तुमच्याजवळ जें निश्चयानें खरें सांगत आहें, तें तुम्ही ऐका १. लोकलज्जेविषयींचा मजमध्यें संबंध नाहीं (किंवा, मला लोकांची भीड फार वाटते) व मी भावहीन आहें. माझें सर्व कार्य तुझ्या पायांच्या ठिकाणीं आहे २. मी नेहमीं तुझी बाह्यात्कारी (दांभिक) भक्ति करीत आहें, पण खरोखर तुझ्या पायाच्या ठिकाणीं माझें चित्त नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, जर तुला कांहीं करणें असेल, तर पतित जो मी त्या माझा तूं उद्धार कर ४. [३००९]

मी निराश्रित असा परदेशी असून हीन, दीन, भोळा आहें, म्हणून तुझ्या चिंतनाच्या रंगामध्यें स्वस्थ लोळत आहें १. हे मायबापा, मी तुमचा आहें असें तुम्ही समजून माझी तुम्ही उपेक्षा करूं नका आणि मला तुमच्याविषयींचें प्रेमसुख द्या २. ह्या प्रपंचाच्या ठिकाणीं मला सावध करून कासवीच्या दृष्टीप्रमाणें मजवर कृपावलोकन करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी तुमचा शरणागत झालों आहें; काया, वाचा, मनानें मी तुमच्यावांचून दुसरें जाणत नाहीं ४. [३०१०]

भूवैकुंठ पंढरीच्या ठिकाणीं मी येऊन पोहोंचलों म्हणून आजचा दिवस सोन्याचा असा धन्य झाला आहे १. शंख, भेरी, तुरे ह्या वाद्यांच्या गजरानें आनंदरूप होऊन पंढरीच्या ठिकाणीं पोहोंचलों २. येथें येऊन पोहोंचल्यावर

पावलों पंढरी पार नाहीं सुखा। भेटला हा सखा मायबाप ॥ ४ ॥ पावलों पंढरी येरझार खुंटली। माउली बोळली प्रेमपान्हा ॥ ५ ॥ पावलों पंढरी आपुलें माहेर। नाहीं संवसार तुका म्हणे ॥ ६ ॥ [३०११]

लागो (लागे) तुझी सोय ऐसें करी कांहीं। माझे विठाबाई जननिये (माउलिये) ॥ १ ॥ पतितपावन म्हणविशी जरी। अव्हेर न करीं तरी माझा ॥ २ ॥ नाहीं तरी ब्रीद टाकीं सोडूनियां। न धरिसी माया जरी माझी ॥ ३ ॥ बोलिला तो बोल करावा साच रे। तरि लोक बरें म्हणतील ॥ ४ ॥ करावा संसार लोकलाजे भेणें। वचनासी उणें येऊं नेदीं ॥ ५ ॥ तुम्हां आम्हां तैसें नाहीं म्हणे तुका। होशील तूं सखा जीवलग ॥ ६ ॥ [३०१२]

तूं आम्हां सोयरा सज्जन सांगाती। तुज मज प्रीती चालो सदा ॥ १ ॥ तूं माझा जिव्हाळा जीवाचा जिवलग। होसी अंतरंग अंतरींचा ॥ २ ॥ गणगोत मित्र तूं माझें जीवन। अनन्य शरण तुझ्या पायीं ॥ ३ ॥ तुका म्हणे सर्वगुणें तुझा दास। आवडे अभ्यास सदा तुझा ॥ ४ ॥ [३०१३]

आवडेल तैसें तुज आळवीन। वाटे समाधान जीवा तैसें ॥ १ ॥ नाहीं येथें कांहीं लौकिकाची चाड। तुजविण गोड देवराया ॥ २ ॥ पुरवीं मनोरथ अंतरींचें आर्त। धायेवरी गीत गाय तुझें ॥ ३ ॥ तुका म्हणे लेंकी आळवी माहेरा। गाऊं या संसारा तुज तैसें ॥ ४ ॥ [३०१४]

माझें मुख नामीं रंगो सर्वकाळ। गोविंद गोपाळ राम कृष्ण ॥ १ ॥ अबद्ध चांगलें गाऊं भलतैसें। बाळ वदे जैसें मायबापा ॥ २ ॥ तुका म्हणे मज न लावीं वांकडें। मी तुझें बोबडें बाळ तान्हें ॥ ३ ॥ [३०१५]

संतसज्जनांनीं मला क्षेमालिंगन देऊन शीतळ केलें (माझा श्रमपरिहार केला) ३. पंढरीस पोहोंचल्यावर विठोबाराय सखा मायबाप भेटला, त्या योगानें मला जें सुख झालें त्याचा अंतपार लागत नाहीं ४. पंढरीस आलों त्या कारणानें जन्ममृत्यूच्या येरझारा कुंठित झाल्या आणि विठाबाई आईनें मला प्रेमपान्हा दिला ५. तुकाराम महाराज म्हणतात, पंढरी हें आमचें माहेर आहे. तेथें येऊन मी पोहोंचलों त्या योगानें जन्ममृत्युरूपी संसार नाहींसा झाला ६. [३०११]

हे विठाबाई आई, मला ज्या योगानें तुझी सोय लागेल (तूं प्राप्त होशील) असें तूं कांहीं तरी कर १. जर तूं पतितपावन म्हणवीत आहेस, तर तूं माझा अव्हेर करूं नकोस २. तूं जर मज पतिताची माया धरीत नाहींस, तर तूं आपलें पतितपावनाचें ब्रीद सोडून टाक ३. "मी पतितपावन आहें" असें तूं जें पतितपावनपणाचें बोलणें बोलून जगप्रसिद्ध केलें आहेस, तें तूं खरें करशील तर लोक तुला चांगलें म्हणतील ४. लोकलाजेच्या भयानें संसार (योग्य व्यवहार) केला पाहिजे, म्हणून तूं आपल्या वचनास उणेपणा येऊं देऊं नकोस ५. तुकाराम महाराज म्हणतात, तसा प्रकार माझ्यांत नाहीं, तूं माझा अंतरंग जिवलग सखा आहेस ६. [३०१२]

हे देवा, आमचा सोयरासज्जन साहाकारी तूंच आहेस. तुझी माझी प्रीति सर्व काळ असूं दे १. माझ्या अंतरांतील जिवलग जिव्हाळा तूं आहेस. तूं माझ्या अंतःकरणांतील अंतरंग [अत्यंत जवळचा] आहेस २. माझें गणगोत्र व मित्र तूं असून जीवाचें जीवन आहेस, म्हणून तुझ्या पायांप्रत मी अनन्यभावें शरण आलों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, सकळ गुणानें (काया-वाचा-मनेंकरून) मी तुझा सेवक झालों आहें, ह्याकरितां सर्व काळ तुझाच अभ्यास करावा—(तुझेंच चिंतन करावें) हें मला आवडतें ४. [३०१३]

हे देवा, जशा मला आवडतील व ज्या योगानें माझ्या जीवाचें समाधान होईल तशा मी तुला हांका मारीन १. हे देवराया, तुजवांचून ह्या ठिकाणीं मला लौकिकाची गरज नाहीं; मला तुझीच गोडी लागली आहे २. माझी इच्छा तृप्त होईतोंपर्यंत तुझें गाणें मी गाईन. माझ्या अंतरांतील मनोरथ तूं पूर्ण कर ३. तुकाराम महाराज म्हणतात, जशी लेंक सासरीं असतांना मनांत आईबापांचा निजध्यास (त्यांचें नित्य चिंतन) करते तसें ह्या संसारामध्यें मी तुला गाईन ४. [३०१४]

गोविंद, गोपाळ, राम, कृष्ण ह्या नामांच्या ठिकाणीं माझें मुख सर्व काळ रंगावें १. जसें आईबापांशीं बालक लाडानें भाषण करतें तसें चांगलें किंवा वेडेंवांकडें, भलत्यासलत्या शब्दांनीं तुलाच गाईन २. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मी तुझें बालक तान्हें बोबडें असें आहें, म्हणून मला तूं वांकडें लावूं नको (म्हणजे माझ्या चुका काढूं नको) ३. [३०१५]

यालागीं आवडीं म्हणा राम कृष्ण । जोडा नारायण सर्वकाळ ॥ १ ॥ सोपें हें साधन लाभ येतो घरा । वाचेसी उच्चारा राम हरि ॥ २ ॥ न लगती कष्ट न लागे सायास । करावा अभ्यास विठ्ठलाचा ॥ ३ ॥ न लगे तप तीर्थ करणें महादान । केल्या एक मन जोडे हरि ॥ ४ ॥ तुका म्हणे कांहीं न वेंचितां धन । जोडे नारायण नामासाठीं ॥ ५ ॥ [३०१६]

पापिया चांडाळा हरिकथा नावडे । विषयी आवडे गाणें त्याला ॥ १ ॥ ब्राह्मणा दक्षणा देतां रडे रुका । विषयालागीं फुका धन लुटी ॥ २ ॥ वीतभरि लंगोटी नेदी अतीताला । भोरप्यासी शाला वांटीतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याच्या थुंका तोंडावरि । जातो यमपुरी भोगावया ॥ ४ ॥ [३०१७]

दुष्काळें अन्नें पीडिलें क्षुधार्थी (क्षुधार्थी दुष्काळें अन्नें पीडियलें)। मिष्टान्न देखिलें तेणें जैसें ॥ १ ॥ तैसें तुझे पायीं लाचावलें मन । झुरे माझा प्राण भेटावया ॥ २ ॥ मांजरें देखिला लोणियाचा गोळा । लावुनियां डोळा बैसलेंसे ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां झडी घालूं पाहें । पांडुरंगे माये तुझे पायीं ॥ ४ ॥ [३०१८]

स्वामीसी संकट पडे जे गोष्टीचें । काय त्या प्रेमाचें सुख मज ॥ १ ॥ दुखवीना चित्त तुझें नारायणा । कांहींच मागेना तुजपाशीं ॥ २ ॥ रिद्धिसिद्धि मोक्ष संपत्ति विलास । सोडियेली आस यांची जीवें ॥ ३ ॥ तुका म्हणे एके वेळें देईं भेटी । वोरसोनि पोटीं आलिंगावें ॥ ४ ॥ [३०१९]

देव तिंहीं बळें धरिला सायासें । करूनियां नास उपाधीचा ॥ १ ॥ पूर्वपक्षी धातु धिःकारिलें जन । स्वयें जनार्दन तेचि झाले ॥ २ ॥ तुका म्हणे यासी न चले तांतडी । अनुभवें गोडी येइल कळों ॥ ३ ॥ [३०२०]

अहो जन हो, जर तुम्हांला नारायणाची प्राप्ति करून घ्यावयाची असेल तर तुम्ही सर्व काल प्रीतीनें रामकृष्ण नामाचा उच्चार करा १. वाचेनें राम हरि ह्या नामांचा उच्चार करणें हें साधन सोपें आहे, ह्या योगानें अलभ्य लाभ आपल्या घरीं चालून येतो २. विठ्ठल ह्या नामाचा अभ्यास करावा. त्यावांचून इतर सायास व श्रम करणें नको ३. तप, तीर्थाटन अथवा महादान हें कांहीं करणें नको. एकाग्र मन करून नामचिंतन केलें असतां हरीची प्राप्ति होते ४. तुकाराम महाराज म्हणतात, कांहीं द्रव्य खर्च न करतां एका नामाच्या योगानेंच नारायणाची प्राप्ति होते ५. [३०१६]

जे कोणी पातकी चांडाळ आहेत त्यांना हरीची कथा आवडत नसून विषयाचें ग्राम्य गीत आवडतें १. एका ब्राह्मणास एक पै देतेवेळीं डोळ्यांतून पाणी काढतो पण विषयासंबंधीं ख्याल, तमाशे करण्यांत फुकट द्रव्य खर्च करितो २. एखाद्या भिकाऱ्यास लंगोटी घालण्यास वीतभर सुद्धां चिरगूट देत नाही; पण तो बहुरूप्यांना शाल दुपेटे (शालजोड्या) देतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या लोकांच्या तोंडावर बेलाशक थुंकावें, कारण ते अखेरीस यमपुरी भोगावयास जातात ४. [३०१७]

हे देवा, जें कोणी दुष्काळामध्यें अन्नावांचून भुकेनें पीडित झालेलें असतें त्यास चांगलें पक्वान्न दृष्टीस पडलें म्हणजे जसा आनंद होतो १. त्याप्रमाणें तुझे पाय पाहून माझें मन लाचावलें आहे, म्हणून तुझ्या भेटीकरितां माझा प्राण झुरणीस लागला आहे २. लोण्याचा गोळा जर मांजराच्या दृष्टीस पडला तर तें त्याजकडे सारखी नजर लावून टपत बसतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगे माये, आतां त्या मांजराप्रमाणें मी तुझ्या पायांच्या ठिकाणीं झडप घालूं पाहात आहें ४. [३०१८]

हे स्वामिवर्या, ज्या योगानें आपणाला संकट पडेल, तसल्या प्रेमाचें मला तरी काय सुख आहे? १. हे नारायणा, ह्याकरितां ज्या योगानें तुझें चित्त दुखवेल तशा प्रकारचें तुजशीं मी कांहीं मागणार नाहीं २. ऋद्धिसिद्धि, मोक्ष आदिकरून जे संपत्तिविलास आहेत त्यांची आशा माझ्या जीवानें सोडली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तूं एक वेळ मला भेट दे आणि परम प्रेमभरित हृदयानें मला आलिंगन दे ४. [३०१९]

ज्यांनीं उपाधीचा यत्नानें नाश केला त्यांनीं स्वसामर्थ्यानें देवास हस्तगत करून घेतलें १. ज्यांनीं आरंभाला जन आणि धन यांचा त्याग केला आहे ते स्वयमेव जनार्दनरूप झाले आहेत २. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या कर्तव्याला त्वरा चालत नाहीं. ह्याविषयींची गोडी अंतरांतील अनुभवानें समजून येईल ३. [३०२०]

भेटीवांचोनियां दुजें नाहीं चित्तीं । येणें काकुलती याजसाठीं ॥ १ ॥ भेटोनियां बोले आवडीचें गुज । आनंदाचें भोज जेवूं संगें ॥ २ ॥ मायलेंकराशीं नाहीं दुजी परि । जेवूं बरोबरी बैसोनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसें अंतरींचें आर्त । यावें जी त्वरित नारायणा ॥ ४ ॥ [३०२१]

जायाचें शरीर जाईल क्षणांत । कां हा गोपीनाथ पावेचि ना ॥ १ ॥ तुम्ही संत सारे कृपेचे सागर । निरोप हा फार सांगा देवा ॥ २ ॥ अनाथ अज्ञान कोणी नाहीं त्याला । पायांपें विठ्ठला ठेवीं मज ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐसी करा निरवण । मग तो रक्षण करील माझें ॥ ४ ॥ [३०२२]

त्रासला हा जीव संसारींच्या सुखा । तुजविण सखा नाहीं कोणी ॥ १ ॥ ऐसें माझे मनीं वाटे नारायणा । घालावी चरणावरी मिठी ॥ २ ॥ कईं तें सुंदर देखेन रूपडें । आवडीच्या कोडें आळंगीन (आलिंगीन) ॥ ३ ॥ नाहीं पूर्व पुण्य मज पामरासी । म्हणोनि पायांसी अंतरलों ॥ ४ ॥ अलभ्य लाभ कैंचा संचितावेगळा । विनवी गोपाळा दास तुका ॥ ५ ॥ [३०२३]

मोलाचें आयुष्य वेंचुनियां जाय । पूर्व पुण्यें होय लाभ याचा ॥ १ ॥ अनंत जन्मींचा शेवट पाहतां । नर देह हाता आला तुझ्या ॥ २ ॥ कराल ते जोडी येईल कार्यासी । ध्यावें विठ्ठलासी सुखालागीं ॥ ३ ॥ सांचलिया धन होईल ठेवणें । तैसी नारायण जोडी करा ॥ ४ ॥ करा हरिभक्ती परलोकीं ये कामा । सोडविल यमापासोनियां ॥ ५ ॥ तुका म्हणे करा आयुष्याचें मोल । नका वेंचूं बोल नामेंविण ॥ ६ ॥ [३०२४]

काय सुख आहे वाउगें बोलतां । ध्यातां पंढरीनाथा कष्ट नाहीं ॥ १ ॥ सर्व काळ वाचे उच्चारितां हरि । तया सुखा सरी पाड नाहीं ॥ २ ॥ रामकृष्णरंगीं रसना रंगली । अमृत उकळी

हे देवा, तुझी भेट व्हावी ही मला इच्छा आहे, ह्यावांचून दुसरें कांहीं माझ्या चित्तांत नाहीं. ह्याकरितांच मी तुझी करुणा भाकीत आहें १. उभयतां भेटून प्रीतीचें भाषण करूं व आनंदानें व प्रेमानें एके ठिकाणीं भोजन करूं २. आईनें आणि लेंकरानें एका ठिकाणीं एका पात्रांत बसून जेवण करावें; त्यावांचून दुसरा प्रकार तीं जाणत नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, ह्याप्रमाणें माझी इच्छा आहे; ती पूर्ण करण्याविषयीं तुम्ही लवकर यावें ४. [३०२१]

अहो संतजन हो, हें शरीर नाशिवंत आहे. त्याचा नाश होण्यास एक क्षणदेखील लागणार नाहीं. असें असून गोपिकांचा पति जो देव, हा मला अजून कां पावत नाहीं ? १. तुम्ही सकळ संत कृपेचे समुद्र आहांत, ह्याकरितां हा माझा निरोप विस्तारून तुम्ही देवास सांगा २. तो निरोप असा, कीं हा गरीब व अज्ञान असून ह्याला कोणी त्राता नाहीं, म्हणून हे देवा, ह्याला तुमच्या पायांजवळ ठेवा, असें सांगा ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा रीतीनें मला तुम्हीं देवाच्या स्वाधीन केलें म्हणजे तो माझें रक्षण करील ४. [३०२२]

हे देवा, त्या मायिक संसारांतील सुखानें माझा जीव त्रासला आहे, ह्याकरितां तुजवांचून मला कोणी साह्यकारी नाहीं १. हे नारायणा, तुमच्या पायांस मिठी घालावी असें माझ्या मनास वाटत असतें २. तुमचें सुंदर रूप पाहून प्रीतीच्या कौतुकानें त्या रूपाला केव्हां आलिंगन देईन असें मला वाटतें ३. मज पातक्यापाशीं पूर्वींची कांहीं सामग्री नाहीं, म्हणून तुमच्या पायांचा वियोग झाला आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे गोपाळा, अलभ्य लाभाची प्राप्ति संचितावांचून कशी होते ? पण मी तुमचा दास असल्यामुळें विनंति करीत आहें ५. [३०२३]

अहो जन हो, तुमचें मौल्यवान आयुष्य व्यर्थ खर्चून जात आहे; ह्या आयुष्याचा कांहीं पूर्वार्जित पुण्यानें तुम्हांला लाभ झाला आहे १. हा नरदेह विचारून पाहिलें असतां अनंतावधि जन्मांच्या अखेरीस तुमच्या हस्तगत झाला आहे २. ह्या ठिकाणीं जी प्राप्ति कराल ती कामास येणार आहे. ह्याकरितां सुखास्तव विठोबारायाचें ध्यान करावें ३. जसें तुम्ही द्रव्य सांचवून संग्रह करितां तशी नारायणाची प्राप्ति करून घ्या ४. त्याविषयीं तुम्ही हरीची भक्ति करा म्हणजे ती परलोकीं कामास येईल; तुम्हांला ती यमापासून सोडवील ५. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही आपल्या आयुष्याची किंमत करा (आयुष्याचें मोल ओळखा); तें जतन करण्यास हरिनामावांचून शब्द बोलूं नका ६. [३०२४]

व्यर्थ भाषण करण्यापासून कांहीं फायदा होतो काय? पंढरीनाथाचें ध्यान करण्यांत कांहीं श्रम होत नाहींत १. हरिनामाचा उच्चार जर वाचेनें सर्व काळ केला, तर त्या अपार सुखाला दुसरी उपमा नाहीं २. हे देवा, राम कृष्ण ह्या

नाम तुझें ॥ ३ ॥ तुका म्हणे धन्य तयाचें वदन । जया नारायण ध्यानीं मनीं ॥ ४ ॥ [३०२५]

कीर्तनाच्या सुखें सुखी होय देव । पंढरीचा राव संगीं असे ॥ १ ॥ भक्त जाय सदा हरिकीर्ति गात । त्यासवें अनंत हिंडतसे ॥ २ ॥ त्रैलोक्य भ्रमण करीत नारद । त्यासवें गोविंद फिरतसे ॥ ३ ॥ नारद मंजुळ सुस्वरें गीत गाये (गाय) । मार्गी चालताहे संगें हरि ॥ ४ ॥ तुका म्हणे त्याला गोडी कीर्तनाची । नाहीं आणिकांची प्रीति ऐसी ॥ ५ ॥ [३०२६]

मायेविण बाळ क्षणभरि न राहे । न देखतां होय कासावीस ॥ १ ॥ अणिक उदंड बुझाविती तरी । छंद त्या अंतरीं माउलीचा ॥ २ ॥ नावडती तया बोल आणिकांचे । देखोनियां नाचे माय दृष्टीं ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी विठ्ठल माउली । आणिकांचे बोलीं चाड नाहीं ॥ ४ ॥ [३०२७]

हरिचिया भक्ता नाहीं भयचिंता । दुःखनिवारिता नारायण ॥ १ ॥ न लगे वाहणें संसार उद्वेग । जडों नेदी पांग देवराव ॥ २ ॥ असों द्यावा धीर सदा समाधान । आहे नारायण जवळीच ॥ ३ ॥ तुका म्हणे माझा सखा पांडुरंग । व्यापियेलें जग तेणें एकें ॥ ४ ॥ [३०२८]

दसरा दिवाळी तोचि माझा सण । सखे हरिजन भेटतील ॥ १ ॥ अमूप जोडल्या पुण्याचिया राशी । पार त्या सुखासी नाहीं लेखा ॥ २ ॥ धन्य दिवस आजी झाला सोनियाचा । पिकली हे वाचा रामनामें ॥ ३ ॥ तुका म्हणे काय होऊं उतराई । जीव ठेवूं पायीं संतांचिये ॥ ४ ॥ [३०२९]

खिस्तीचा उदीम उदीमांत हीन । करिती ब्राह्मण कलियुगीं ॥ १ ॥ वेवसाव करितां पर्वत मांगासी । ते पैं विटाळासी न मानिती ॥ २ ॥ मांगिणीशीं नित्य करीतसे लेखा । तोंडावरी थुंका

चिंतनानें जिव्हा रंगली आहे. तुझें नाम ही अमृताची उकळी आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या पुरुषाचें मुख धन्य आहे, कारण त्याच्या ध्यानांत व मनांत नारायणाची वस्ती झाली आहे ४. [३०२५]

पंढरीचा राजा जो देव, तो कीर्तनाच्या सुखानें सुखी होऊन सेवकाच्या समागमें राहातो १. हरीची कीर्ति वर्णन करीत सर्व भक्त जिकडे जातात त्यांच्या समागमें अनंत हिंडत आहे २. नारद हा त्रैलोक्यांत हिंडतो त्याच्याबरोबर गोविंद नेहमीं फिरत असतो ३. तो नारद सुस्वर गायनामध्यें हरीची कीर्ति गात असतो. त्याच्याबरोबर हरि मार्गानें चालत जातो ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवाला कीर्तनाची फार प्रीति आहे, अशी दुसऱ्या कशाचीहि नाहीं ४. [३०२६]

बालक हें आपल्या आईवांचून घटकाभर देखील राहात नाहीं; ती जर दृष्टीस पडली नाहीं तर तें फार कासावीस होतें १. तिजवांचून त्या बालकाची समजूत पुष्कळ लोक करितात, पण त्याचे अंतरांत आईचाच छंद असतो २. त्याला दुसऱ्या कोणाचें बोलणें आवडत नाहीं. आपली आई दृष्टीस पडली म्हणजे तें आनंदानें नाचावयास लागतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, विठाबाई ही माझी आई आहे; तिजवांचून दुसऱ्यांच्या बोलण्याची मला गरज नाहीं ४. [३०२७]

जे कोणी हरीचे भक्त आहेत त्यांना कोणत्याहि प्रकारचें भय नाहीं व कोणतीहि काळजी नाहीं, कारण नारायण त्यांचें दुःख निवारण करीत आहे १. त्यांच्या अंगाला देवराय दारिद्याचा संबंध होऊं देत नाहीं, म्हणून त्यांना संसारासंबंधीं काळजी करण्याचें कारण नाहीं २. सर्व काळ धीर धरून चित्तामध्यें समाधान असूं द्यावें, म्हणजे नारायण आपल्या जवळच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो सर्व जगांत व्यापक आहे, तोच एक पांडुरंग माझा सखा झाला आहे ४. [३०२८]

ज्या दिवशीं मला प्रिय हरिभक्तांची भेट होईल, त्या दिवशीं दसरा–दिवाळी हे दोन्ही सण एकदम आले असें मी समजेन १. असा योग आज घडून आल्यामुळें अगणित पुण्याच्या राशीची प्राप्ति होऊन जें सुख झालें त्याचा लेखा होत नाहीं (मोजदाद होत नाहीं) २. आजचा दिवस सोन्याचा असा धन्य झाला आहे, कारण त्यांच्या संगतीनें वाचेला रामनामाचें पूर्ण पीक आलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां त्या संतांच्या उपकाराचें उतराई (उपकारांतून उत्तीर्ण) कसें व्हावें, म्हणून आपला जीव मी त्यांच्या पायांवर ठेवला आहे ४. [३०२९]

खिस्तीचा व्यापार (रोज अथवा चारआठ दिवसांचे वायद्यानें किरकोळ रुपये व्याजीं देऊन व्याजबट्ट्याची देवघेव) सर्व व्यापारांत वाईट आहे. तो ह्या कलियुगामध्यें ब्राह्मण देखील करितात १. परवत्या नामक मांगाबरोबर व्यापार करितात आणि ते विटाळाला मानीत नाहींत २. मांगिणीशीं केलेल्या व्यवहाराचा कागदांत लेख ठेवतो, तिच्याशीं

पडतसे ॥ ३ ॥ आशा माया रांडा नांव हें कागदीं। आठवीना कधीं नारायण ॥ ४ ॥ तुका म्हणे देह झाला पराधीन । पांडुरंगाविण गति नाहीं ॥ ५ ॥ [३०३०]

अंगीं ब्रह्मक्रिया खिस्तीचा व्यापार । हिंडे घरोघर चांडाळांचे ॥ १ ॥ अंत्यजाची खिचडी घेताती मागून । गाळियाप्रदान मायबहिणी ॥ २ ॥ उत्तमकुळीं जन्म क्रिया अमंगळ । बुडविलें कूळ उभयतां ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसी कलियुगाची चाली । स्वार्थे बुडविलीं आचरणें ॥ ४ ॥ [३०३१]

हाचि माझा नेम धरिला हा धंदा । यावरि गोविंदा भेटी द्यावी ॥ १ ॥ हाचि माझा ध्यास सदासर्वकाळ । न्यावयासी मूळ येसी कधीं ॥ २ ॥ डोळियांची भूक पाहतां श्रीमुख । आलिंगनें सुख निवती भुजा ॥ ३ ॥ बहु चित्त ओढे तयाचिये सोई । पुरला हा कई नवस नेणें ॥ ४ ॥ बहुबहु काळ झालों कासावीस । वाहिलें बहुवस कलेवर ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां पाडावें हें ओझें । पांडुरंगा माझें इयावरि । ॥ ६ ॥ [३०३२]

जेणें माझें हित होईल तो उपाव । करिसील भाव जाणोनियां ॥ १ ॥ मज नाहीं सुख दुःख तया खंती । भावना हे चित्तीं नाना छंदें ॥ २ ॥ तोडीं हे संबंध तोडा आशापाश । मज हो सायास न करितां ॥ ३ ॥ तुका म्हणे मा तों राहिलों निश्चिंत । कवळोनि एकांत सुख तुझें ॥ ४ ॥ [३०३३]

शिखा सूत्र तुझा गुंतला जमान । तंववरि तूं जाण श्रुतिदास ॥ १ ॥ त्याची तुज कांहीं चुकतांचि नीत । होसील पतित नरकवासी ॥ २ ॥ बहू तूं झालासी चतुर शहाणा । शुद्ध आचरणा चुकों नको ॥ ३ ॥ शिखा सूत्र याचा तोडीं तूं संबंध । मग तुज बाध नाहीं नाहीं ॥ ४ ॥

बोलण्यांत त्याच्या तोंडावर तिचा थुंका उडतो ३. आशा, माया, मांगिणी अशीं रांडांची नांवें कागदावर लिहून घेतात, पण ते नारायणाचा आठव कधींहि करीत नाहींत ४. तुकाराम महाराज म्हणतात, असे त्या ब्राह्मणलोकांचे देह परतंत्र झाले आहेत; त्यांना पांडुरंगाला आठविल्यावांचून उत्तम गति मिळणार नाहीं ५. [३०३०]

अंगचे ब्राह्मण असून, कर्तव्य अशी जी ब्रह्मक्रिया ती न करितां खिस्तीचा (व्याजबट्ट्याचा) व्यापार करतात व चांडाळांचे घरोघर हिंडतात १. उदरनिर्वाहाकरितां अंत्यजापासून खिचडी (डाळ तांदूळ मिश्रित) मागून घेतात आणि व्यापारानिमित्त त्या लोकांना आईबहिणीवरून शिवीगाळ देतात. असे ते उत्तम कुळामध्यें जन्मले असून त्यांची क्रिया अमंगळ असल्यामुळें त्यांनीं आपल्या आईबापांचीं उभय कुळें बुडविलीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारची ह्या कलियुगांत वागणूक झाली आहे. स्वार्थाचा हव्यास वाढल्यामुळें शुद्ध आचरणापासून ते भ्रष्ट झाले ४. [३०३१]

हे गोविंदा, इतक्यावर तरी तुम्हीं मला ह्याच देहीं भेट द्यावी, हाच उद्योग माझ्या चित्तानें धरला आहे व माझा हाच नेम आहे १. मला न्यावयास तूं केव्हां येशील हाच ध्यास सदा सर्व काळ माझ्या ठिकाणीं आहे २. तुझें श्रीमुख पाहिलें म्हणजे डोळ्यांची भूक निवारण होईल व आलिंगनाच्या योगानें सुख होऊन भुजा व दंड निवतील ३. त्याकरितां माझें चित्त फार ओढ घेत आहे. हा नवस कधीं पूर्ण होईल हें समजत नाहीं ४. ह्याकरितां बहुत काळ फार कासावीस झालों आणि एवढ्याचकरितां हें शरीर फार दिवस वागविलें (धारण केलें) आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, ह्याउपर माझा भार तुझ्यावर असावा ६. [३०३२]

हे देवा, ज्यायोगानें माझें हित होईल त्याविषयींचा उपाय माझ्या अंतरांतील भाव जाणून तुम्ही करालच असा मला दृढ विश्वास आहे १. माझ्या चित्तामध्यें नाना प्रकारच्या इच्छा आहेत. त्याविषयींच्या सुखदुःखाची मला काळजी नाहीं २. ह्यांचे (स्त्री–पुत्रादिकांचे, संसाराचे) संबंध व आशापाश, मला कांहीं आयास न होतां, तूं तोडावेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्या एकांतांतील सुखास मिठी देऊन मी निष्काळजीपणानें राहिलों आहें ४. [३०३३]

शेंडी आणि जानवें ह्या जामीनकींत (प्रतिज्ञेंत) जर तूं गुंतला आहेस तर तूं वेदांचा दास आहेस असें समज १. म्हणून वेदांनीं सांगितलेलें कर्म करण्यांत जर तूं कांहीं चुकशील तर तूं पातकी होऊन नरकांत जाशील २. पुष्कळ चातुर्य व शहाणपण जरी तुझ्यांत आलें तरी शुद्ध आचरणानें वागण्यास चुकूं नकोस ३. संन्यासविधीनें (विधिपूर्वक संन्यास घेऊन) शेंडी आणि जानवें ह्यांचा संबंध तोडून टाक; मग वेदानें सांगितलेलें कर्म जरी तूं केलें नाहींस तरी त्याची तुला

इच्छिती देवान्न । पाहताती मान आदराचा ॥ २ ॥ तुका म्हणे ऐसें दांभिक भजन । तया जनादन भेटे केवीं ॥ ३ ॥ [३०४३]

लांबवूनि जटा नेसोनि कासोटा । अभिमान मोटा करिताती ॥ १ ॥ सर्वांगा करिती विभूति लेपन । पाहती मिष्टान्न भक्षावया ॥ २ ॥ तुका म्हणे त्यांचा नव्हे हा स्वधर्म । न कळतां वर्म मिथ्यावाद ॥ ३ ॥ [३०४४]

कान फाडुनियां मुद्रा ते घालिती । नाथ म्हणविती जगामाजी ॥ १ ॥ घालोनियां फेरा मागती द्रव्यासी । परि शंकरासी नोळखती ॥ २ ॥ पोट भरावया शिकती उपाय । तुका म्हणे जाय नरकलोका ॥ ३ ॥ [३०४५]

कौडीकौडीसाठीं फोडिताती शिर । काढूनि रुधिर मलंग ते ॥ १ ॥ पांघरती चर्म लोहाची सांकळी । मारिती आरोळी धैर्यबळें ॥ २ ॥ तुका म्हणे त्यांचा नव्हेचि स्वधर्म । न कळेचि वर्म गोविंदाचें ॥ ३ ॥ [३०४६]

दाढी डोई मुंडी मुंडुनियां सर्व । पांघुरती बरवीं वस्त्रें काळीं ॥ १ ॥ उफराटी काठी घेउनियां हातीं । उपदेश देती सर्वत्रांसी ॥ २ ॥ चाळवुनी रांडा देउनियां भेष । तुका म्हणे त्यास यम दंडी ॥ ३ ॥ [३०४७]

होउनि जंगम विभूति लाविती । शंख वाजविती घरोघरीं ॥ १ ॥ शिवाचें निर्माल्य तीर्थ न सेविती । घंटा वाजविती पोटासाठीं ॥ २ ॥ तुका म्हणे त्यांसी नाहीं शिवभक्ति । व्यापार करिती संसाराचा ॥ ३ ॥ [३०४८]

लावुनियां मुद्रा बांधोनिया कंठीं । हिंडे पोटासाठीं देशोदेशीं ॥ १ ॥ नेसोनि कोपीन शुभ्रवस्त्र जाण । पाहाती पक्वान्न क्षेत्रींचें ते ॥ २ ॥ तुका म्हणे ऐसे मावेचे मइंद । त्यापाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥ ३ ॥ [३०४९]

इत्यादि) कदान्नाची जे निंदा करतात व चांगल्या गोड अन्नाची इच्छा धरितात व आपला आदरसत्कार होईल अशाविषयीं वाट पाहात (इच्छा करीत) बसतात २. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांनीं जरी मुखानें नारायणनामाचें भजन केलें तरी तें त्यांचें दांभिकपणाचें आहे. त्या योगेंकरून त्यांना जनार्दनाची भेट कशी होईल ? ३. [३०४३]

कितीएक गोसावी लांब लांब जटा वाढवून मोठ्या डौलानें कासोटा घालितात व मोठ्या अभिमानाचें भाषण करतात १. सर्वांगाला राख लावून मिष्टान्न खावयास मिळण्याची वाट पाहातात २. तुकाराम महाराज म्हणतात, हा त्यांचा स्वधर्म नाहीं, पण त्यांना हें न कळल्यामुळें ते खोट्या वादांत (खोटया आचारांत) पडतात ३. [३०४४]

कानांला भोकें पाडून त्यांत मुद्रा (लाकडाचीं किंवा कासवाच्या पाठीचीं कर्णभूषणें) घालितात व आपण नाथ आहोंत असें ते जगांत म्हणतात. १. ते गांवांमध्यें फेरे घालून लोकांजवळ बहुत द्रव्य मागतात, पण शंकराला मुळींच ओळखीत नाहींत २. तुकाराम महाराज म्हणतात, ते पोट भरण्याचे उपाय शिकतात व पुढें त्या योगानें नरकगतीस जातात ३. [३०४५]

मलंग (फकीर) हे कवडी कवडी करितां ठिकठिकाणीं डोकें फोडून रक्त काढितात १. अंगावर कातडें घेऊन लोखंडाची साखळी गळ्यांत घालतात व मोठ्या धैर्यानें आरोळ्या मारतात २. तुकाराम महाराज म्हणतात, (शरीराला पीडा देणें) हा त्यांचा स्वधर्म नाहीं व त्यांना गोविंदप्राप्तीचें खरें साधन कळत नाहीं ३. [३०४६]

मानभाव पंथाचे लोक हे दाढी आणि डोकें इत्यादिकांचें मुंडण करितात व अंगावर काळीं वस्त्रें घेतात १. उफराटी काठी हातांमध्यें घेऊन सर्वांना उपदेश देतात २. तुकाराम महाराज म्हणतात, रांडापोरांना फसवून ते आपला वेष त्यांना देतात. त्यांना यम शिक्षा करील ३. [३०४७]

जंगम होऊन विभूती लावतात व घरोघर शंख वाजवीत हिंडतात १. शिवाचें निर्माल्य व तीर्थ ह्यांचें ते सेवन करीत नाहींत. घरोघर ते घंटा वाजवून पोट भरतात २. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांना खरोखर शिवाची भक्ति नाहीं, त्यांचा हा सर्व संसाराचा, पोटभरू उद्योग आहे ३. [३०४८]

गळ्यामध्यें रुद्राक्षाची किंवा तुळशीची माळा (कंठी) बांधून व मुद्रा लावून पोटाकरितां देशोदेशीं फिरतात १. पांढरी लंगोटी नेसून ते क्षेत्रस्थ पक्वान्नांची वाट पाहात बसतात, असें तूं समज २. तुकाराम महाराज म्हणतात, असे हे मायिक मैंद (ढोंगी) आहेत. त्यांच्या जवळ गोविंद नाहींच नाहीं ३. [३०४९]

ऐसे नाना वेष घेऊनी हिंडती । पोटासाठीं घेती प्रतिग्रह ॥ १ ॥ परमार्थासी कोण त्यजी संवसार । सांग पां साचार नांव त्याचें ॥ २ ॥ जन्मतां संसार त्यजियेला शुकें । तोचि निष्कळंक तुका म्हणे ॥ ३ ॥ [३०५०]

स्त्रिया पुत्र कलत्र हे तंव मायावंत । शेवटींचा अंत न पवे कोणी ॥ १ ॥ यमाचिये हातीं बांधोनियां देती । भूषणेंही घेती काढूनियां ॥ २ ॥ ऐसिया चोरांचा कैसा हा विश्वास । धरिली तुझी कास तुका म्हणे ॥ ३ ॥ [३०५१]

न लगती मज शब्दब्रह्मज्ञान । तुझिया दर्शनावांचूनियां ॥ १ ॥ म्हणऊनि तुझें करितों चिंतन । नावडे वचन आणिकांचें ॥ २ ॥ काय ते महत्वें करावी मान्यता । तुज न देखतां पांडुरंगा ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज भेटल्यावांचूनि । न राहें त्याहूनि होइन वेडा ॥ ४ ॥ [३०५२]

तुझा म्हणोनियां (म्हणवूनि) दिसतों गा दीन । हाचि अभिमान सरे तुझा ॥ १ ॥ अज्ञान बाळका कोपली जननी । तयासि निर्वाणीं कोण पावे ॥ २ ॥ तैसा विठो तुजविण परदेशी । नको या दुःखासी गोवूं मज ॥ ३ ॥ तुका म्हणे मज सर्व तुझी आशा । अगा जगदीशा पांडुरंगा ॥ ४ ॥ [३०५३]

जन्म मृत्यु फार झाले माझ्या जीवा । ऐक माझा धांवा पांडुरंगा ॥ १ ॥ सिणलों बहुत करितां येरझारा । रखुमाईच्या वरा पावें वेगीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तूं गा पतितपावन । घेईं माझा सीण जन्मांतर ॥ ४ ॥ [३०५४]

आतां माझ्या दुःखा कोण हो सांगाती । रखुमाईचा पति पावेचि ना ॥ १ ॥ काय विधात्यानें घातलीसे रेखा । सुटका या दुःखा न होयचि ॥ २ ॥ तुका म्हणे माझी विसरूं नको चिंता । अगा पंढरीनाथा पाव वेगीं ॥ ३ ॥ [३०५५]

असे नानाप्रकारचे वेष घेऊन लोक देशोदेशीं हिंडतात व पोटाकरितां दान घेतात १. परमार्थाकरितां संसाराचा त्याग कोण करतो ? जर कोणीं केला असेल तर त्याचें नांव खरोखर सांगा २. तुकाराम महाराज म्हणतात, जन्मतांक्षणींच शुकानें मात्र संसाराचा त्याग केला, म्हणून तोच एक कलंकरहित शुद्ध आहे ३. [३०५०]

स्त्रिया व पुत्र हे सर्व मायिक (लोभी, कपटी) आहेत. अखेर कोणीहि उपयोगी पडणारें नाहीं १. उलट यमाच्या हातीं बांधून देतील व अंगावर असलेलीं वस्त्रभूषणें काढून देतील २. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या ह्या चोरांचा विश्वास कसला आहे ? म्हणून हे देवा, मी तुझी कांस धरली ३. [३०५१)

देवा, तुझ्या दर्शनावांचून मला शाब्दिक ब्रह्मज्ञानाची जरूरी नाहीं १. म्हणून तुझें मी चिंतन करीत आहें. आणिकांचें बोलणें मला आवडत नाहीं २. हे पांडुरंगा, तुला न पाहातां जनामध्यें मानमान्यता जी वाढत आहे ती काय करावयाची आहे ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुला भेटल्याखेरीज मी कधीं राहाणार नाहीं. नाहीं तर मी वेडा होईन ४. [३०५२]

हे देवा, मी तुझा आहें असें असून दीन दिसत आहें, म्हणून ह्याचा अभिमानच तुझ्यामध्यें नाहीं १. अज्ञान बालकावर आई जर रागावली तर दुःखसमयीं त्याच्याकरितां कोण धांव घेईल ? २. तसें, हे विठोबा, तुझ्यावांचून मी परदेशी आहें, म्हणून मला ह्या दुःखांत गुंतवूं नकोस ३. तुकाराम महाराज म्हणतात, अगा जगदीशा पांडुरंगा, मला सर्व तुझीच आशा आहे ४. [३०५३]

हे पांडुरंगा, माझ्या जीवानें जन्ममृत्यु फार सोसले, ह्याकरितां मी तुझा धांवा करीत आहें तो तूं ऐक १. हे रखुमाईच्या पति, अनेक योनींतून जन्ममृत्यूच्या येरझाऱ्यांतून फार श्रम झाले आहेत. एवढ्याकरितां तूं त्वरेनें मला प्राप्त हो २. तुकाराम महाराज म्हणतात, अगा पतिताला पावन करणाऱ्या देवा, अनेक जन्मजन्मांतरीं मला होणारें जें दुःख त्याचें तूं हरण कर ३. [३०५४]

रखुमाईचा पति विठ्ठल आतां मला पावत नाहीं म्हणून मला होणाऱ्या दुःखास भागीदार कोण आहे ? १. ब्रह्मदेवानें आमच्या कपाळांत अशीं कोणतीं अक्षरें लिहिलीं, कीं ज्या योगानें आमची ह्या दुःखांतून सुटका होत नाहीं ? २. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा, मजविषयींची चिंता टाकूं नका. मला लवकर प्राप्त व्हा ३. [३०५५]

पंढरीसी जावें ऐसें माझे मनीं । विठाई जननी भेटे केव्हां ॥ १ ॥ न लगे त्याविण सुखाचा सोहळा । लागे मज ज्वाळा अग्नीचिया ॥ २ ॥ तुका म्हणे त्याचे पाहिलिया पाय । मग दुःख जाय सर्व माझें ॥ ३ ॥ [३०५६]

तन मन धन दिलें पंढरिराया । आतां सांगावया उरलें नाहीं ॥ १ ॥ अर्थ (आर्त) चाड चिंता नाहीं मनीं आशा । तोडियेला फांसा उपाधीचा ॥ २ ॥ तुका म्हणे एक विठोबाचें नाम । आहे जवळी दाम नाहीं रुका ॥ ३ ॥ [३०५७]

आलिया संसारा उठा वेग करा । शरण जा उदारा पांडुरंगा ॥ १ ॥ देह हें काळाचें धन कुबेराचें । तेथें मनुष्याचें काय आहे ॥ २ ॥ देता देवविता नेता नेवविता । येथें याची सत्ता काय आहे ॥ ३ ॥ निमित्याचा धनी केला असे प्राणी । तुका म्हणे म्हणोनि व्यर्थ गेला ॥ ४ ॥ [३०५८]

मायवणी घालया धाये । गर्भ आंवतणें न पाहे ॥ १ ॥ तैसें पूजितां वैष्णव । सुखें संतोषतो देव ॥ २ ॥ पुत्राच्या विजयें । पिता सुखावत जाये ॥ ३ ॥ तुका म्हणे अमृतसिद्धि । हरे तृषा आणि व्याधि ॥ ४ ॥ [३०५९]

तुझें अंगभूत । आम्ही जाणतों समस्त ॥ १ ॥ येरां वाटतसे जनां । गुढारसें नारायणा ॥ २ ॥ ठावा थारा मारा । घरचिया संव चोरा ॥ ३ ॥ तुका म्हणे भेदाभेद । करूनि करितसे वाद ॥ ४ ॥ [३०६०]

तुज दिला देह । आजूनि वागवितों भय ॥ १ ॥ ऐसा विश्वासघातकी । घडली कळतां हे चुकी ॥ २ ॥ बोलतों जें तोंडें । नाहीं अनुभवलें लंडें ॥ ३ ॥ दंड लाहे केला । तुका म्हणे जी विठ्ठला ॥ ४ ॥ [३०६१]

पंढरीस जावें असें माझ्या मनामध्यें आहे, म्हणून विठाबाई आई ही मला केव्हां भेटेल असें मला झालें आहे १. त्याखेरीज मला सुखाची प्राप्ति होईल असें नाहीं. सर्वांगाचा अग्नीच्या ज्वाळा लागल्याप्रमाणें दाह होत आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, त्या देवाचे पाय पाहिल्यावर माझें सर्व दुःख नाहींसें होईल ३. [३०५६]

देह, मन व धन हें मी पंढरीराजाला दिलें आहे. आतां कांहीं सांगण्याला राहिलें नाहीं १. (धन, स्त्रीपुत्रादिकांची चिंता, विद्या, धन, मान इत्यादि) विषयांची चिंता व कोणतीहि आशा मनांत राहिली नाहीं. उपाधींचा फांसा तोडून टाकला २. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्याजवळ एक विठोबाचें नांव आहे; त्याखेरीज एक रुका (दमडी) देखील जवळ नाहीं ३. [३०५७]

अहो, मनुष्यरूपी संसारास आलेले तुम्ही उठा व त्वरा करा, आणि त्या उदार पांडुरंगाला शरण जा १. देह हा देवाचा आहे, व धन सर्व कुबेराचें आहे अशी जेथें स्थिति आहे तेथें मनुष्याचें काय आहे? २. देणारा व देवविणारा सर्व कांहीं एक देव आहे अशी जेथें स्थिति आहे, तेथें मनुष्याची सत्ता काय आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, प्राणी हा एक निमित्ताला मालक केला आहे, पण हें न समजल्यामुळें मनुष्य व्यर्थ गेला ४. [३०५८]

गरोदर स्त्रीला आमंत्रण दिलें कीं पुरे. गर्भस्थ प्राण्याला आमंत्रण द्यावयाला नको. ती जेवून तृप्त झाली, कीं तो गर्भस्थ प्राणीहि तृप्त होतो १. तसें वैष्णवाची पूजा केली असतां देव सुखानें संतुष्ट होतो २. पुत्रास जय मिळाल्यानें बापाच्या हृदयास सुख होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अमृताच्या सेवनानें तृषा आणि व्याधि ह्यांचा नाश होतो ४. [३०५९]

हे देवा, तुझ्या अंगभूतच सर्व कांहीं आहे, हें मी जाणतों १. हे नारायणा, बाकीच्या सर्व जनांना हें फार गूढ वाटत आहे २. सतत बरोबर असणाऱ्या घरांतील चोरास घरांतील सर्व ठिकाणें माहीत असतात, त्याप्रमाणें आम्ही सतत तुझ्याजवळ राहाणारे असल्यामुळें, तुझें सर्व कांहीं आम्हांला माहीत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व भेदांचा अभेद करून मी परमार्थस्वरूपाचा यथार्थ संवाद करीत आहें ४. [३०६०]

हे देवा, मीं तुला देह अर्पण केला असून त्याच्या संबंधानें अजून मनामध्यें भय बाळगीत आहें १. असा मजकडून हा मोठा विश्वासघात होत आहे ही चुकी कळत असून झाली २. जें मी तोंडानें बोलत आहें त्याचा मी दांडग्यानें कधींहि अनुभव घेतला नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो विठ्ठला, ह्या अपराधाबद्दल तुम्हीं दंड केला पाहिजे ४. [३०६१]

सर्वस्वाची साटी। तरिच देवासवें गांठीं ॥ १ ॥ नाहीं तरी जया तैसा। भोग भोगवील इच्छा ॥ २ ॥ द्यावें तेंचि घ्यावें। म्हणउनि जावें जीवें ॥ ३ ॥ तुका म्हणे उरी। मागें नुरवितां बरी ॥ ४ ॥ [३०६२]

गाढव शृंगारिलें कोडें। कांहीं केल्या नव्हे घोडें ॥ १ ॥ त्याचें भुंकणें न राहे। स्वभावासी करील काये ॥ २ ॥ श्वान शिबिके बैसविलें। भुंकतां न राहे उगलें ॥ ३ ॥ तुका म्हणे स्वभावकर्म। कांहीं केल्या न सुटे धर्म ॥ ३ ॥ [३०६३]

आवडे सकळां मिष्टान्न। रोग्या विषा तें समान ॥ १ ॥ काय तया एकासाठीं। कामें केलीं अवघीं खोटीं ॥ २ ॥ दर्पण न लगे तया एका। ठाव नाहीं ज्याच्या नाका ॥ ३ ॥ तुका म्हणे तैशा खळा। उपदेशाचा कांटाळा ॥ ४ ॥ [३०६४]

अखंड संत निंदी। ऐसी दुर्जनाची बुद्धि ॥ १ ॥ काय म्हणावें तयासी। तो केवळ पापरासी ॥ २ ॥ जो स्मरे रामनामा। त्यासी म्हणती रिकामा ॥ ३ ॥ जो तीर्थव्रत करी। त्यासी म्हणती भिकारी ॥ ४ ॥ तुका म्हणे विंचवाची नांगी। तैसा दुर्जन सर्वांगीं ॥ ५ ॥ [३०६५]

या रे नाचों अवघे जण। भावें आनंदें करून ॥ १ ॥ गाऊं पंढरीचा राणा। क्षेम देऊनि संतजना ॥ २ ॥ सुख फुकासाठीं। साधे हरिनाम बोभाटीं ॥ ३ ॥ प्रेम वांटितो उदार। देतां नाहीं सान थोर ॥ ४ ॥ पापें पळालीं बापुडीं। काळ झाला देशधडी ॥ ५ ॥ तुका म्हणे धन्य काळ। आजि प्रेमाचा सुकाळ ॥ ६ ॥ [३०६६]

उपजलें मनीं। हे तों स्वामीची करणी ॥ १ ॥ होईल प्रसादाचें दान। तरि हें कवतुक पाहेन ॥ २ ॥ येईल अभय जरि। तरि हे आज्ञा वंदीन शिरीं ॥ ३ ॥ भक्तिप्रयोजना। प्रयोजावें बंदीजना

सर्वस्व हरीला अर्पण केलें तरच देवाची गांठ पडणार आहे १. नाहीं तर जशी ज्याची इच्छा असेल तशी ती त्याला भोग भोगावयास लावील २. जसें आपण द्यावें तसेंच परत घ्यावें, भोगाच्या इच्छेनें देवाची भक्ति केल्यास भोग प्राप्त होतात; निष्काम बुद्धीनें भक्ति केल्यास देव प्राप्त होतो, म्हणूनच जीवानें निष्काम बुद्धीनेंच श्रीहरीच्या ठिकाणीं नाहींसें व्हावें (देवाला शरण जावें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, पश्चात् माझें म्हणून कांहीं बाकी न ठेवणें हें बरें ४. [३०६२]

गाढवाला कितीहि कौतुकानें शृंगार घातले तरी तें कांहीं केल्या घोडें होणार नाहीं १. त्याचें ओरडणें नाहींसें होणार नाहीं, कारण तो त्याचा स्वभावच आहे, त्याच्यापुढें त्याचा इलाज काय चालणार ? २. कुत्र्याला जरी पालखींत बसविलें तरी तें भुंकल्याखेरीज उगीच राहाणार नाही ३. तुकाराम महाराज म्हणतात, जन्मजात स्वभावधर्म हा कांहीं केल्यानें नाहींसा होत नाहीं ४. [३०६३]

सर्वांना गोड अन्न आवडतें पण रोग्यांना तें विषासारखें कडु भासतें १. म्हणून त्या एकाकरितां सर्व कार्यें खोटीं झालीं कीं काय ? २. ज्याला नाक नाहीं त्या गृहस्थाला आरशांत पाहाणें आवडत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या ह्या खळाला कितीहि उपदेश केला तरी त्याचा त्याला कंटाळा आहे ४. [३०६४]

सर्व काळ संतांची निंदा करावी, अशी दुर्जनाची बुद्धि असते १. त्याला काय म्हणावें ? तो केवळ पापाचीच रास आहे २. जो नित्य रामनामाचें स्मरण करतो त्याला तो दुर्जन रिकामा म्हणतो ३. जो तीर्थ व व्रत करितो त्याला तो भिकारी म्हणतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, जसा विंचू नांगीच्या ठिकाणीं विषारी असतो तसा दुर्जन सर्वांगानें विषारी असतो ५. [३०६५]

या रे, आपण सर्व आनंदानें व प्रेमभावानें नृत्य करूं १. पंढरीच्या राजाला गाऊं व संत मंडळींना आलिंगन देऊं २. हरिनामाची गर्जना केल्यानें फुकट सुखाची प्राप्ति होते ३. जो श्रीहरीचें प्रेम, लहान मोठें असा कांहीं विचार न करतां, सर्वांना देतो तो उदार आहे ४. त्या योगानें दीन पातकें पळून गेलीं व काळहि देशोधडी झाला ५. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरीच्या प्रेमाचा सुकाळ झाला, म्हणून आजचा काळ धन्य आहे ६. [३०६६]

मनामध्यें शुभ इच्छा उत्पन्न झाली हें सर्व स्वामींचें कृत्य आहे १. जर स्वामी आमच्यावर प्रसाद करतील तर मी हें कौतुक पाहीन २. स्वामी मला अभय देतील तर ती आज्ञा मी शिरसावंद्य करीन ३. ह्या भक्तिफळाची आम्हां

॥ ४ ॥ यश स्वामीचिये शिरीं । दास्य करावें किंकरीं ॥ ५ ॥ तुका म्हणे आळीकरा । त्यासी योजावें उत्तरा ॥ ६ ॥ [३०६७]

माझें मन पाहें कसून । चित्त न ढळे तुजपासून ॥ १ ॥ कापूनि देईन शिर । पहा कृपण कीं उदार ॥ २ ॥ मजवरि घालीं पण । परि मी न सोडीं चरण ॥ ३ ॥ तुका म्हणे अंतीं । तुजवांचूनि नाहीं गति ॥ ४ ॥ [३०६८]

भूमीवरी कोण ऐसा । गांजूं शके हरिच्या दासा ॥ १ ॥ सुखें नाचा हो कीर्तनीं । जयजयकारें गर्जा वाणी ॥ २ ॥ काळा सुटे पळ । जाती दुरितें सकळ ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्तीं । साच माना हे निश्चितीं ॥ ४ ॥ [३०६९]

झाला देहासी (जीवासी) उदार । त्यासी काय भीडभार ॥ १ ॥ करीन आडक्या घोंगडें । उभ्या बाजारीं उघडें ॥ २ ॥ जों जों धरिली भीड । तों तों बहू केली चीड ॥ ३ ॥ तुका म्हणे मूळ । तुझें उच्चारीन कुळ ॥ ४ ॥ [३०७०]

मिळे हरिदासांची दाटी । रीग न होय शेवटीं ॥ १ ॥ तेथें काय म्यां करावें । माझें कोणें आइकावें ॥ २ ॥ कसें तुज लाजवावें । भक्त म्हणोनियां भावें ॥ ३ ॥ नाचतां न ये ताली । न ये (मज) वाजवितां टाळी ॥ ४ ॥ अति मंडित भूषणें । शरीर माझें दैन्यवाणें ॥ ५ ॥ तुका म्हणे कमळापति । मज द्यावें त्यां (त्यांचे) हातीं ॥ ६ ॥ [३०७१]

जाणों नेणों काय । चित्तीं धरूं तुझे पाय ॥ १ ॥ आतां हेंचि वर्म । गाऊं धरूनियां प्रेम ॥ २ ॥ काय सांडूं मांडूं । भावें हृदयींच कोंडूं ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । जन्मोजन्मीं मागें सेवा ॥ ४ ॥ [३०७२]

बंदीजनांच्या ठिकाणीं योजना करावी ४. आम्हीं सेवकांनीं सेवा करावी. त्याला यश देण्याची जबाबदारी स्वामीच्या मस्तकावर आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही हट्ट करणारीं मुलें आहोंत; आमच्या ठिकाणीं तुम्ही योग्य शब्दांची योजना करा (आम्हांला योग्य असें कांहीं तरी बोला) ६. [३०६७]

हे देवा, माझें मन तुम्ही नीट तपासून पाहा, तुमच्या पायांपासून चित्त कधींहि हालणार नाहीं १. तूं म्हणशील तर मी आपली मान कापून देईन; मी कृपण आहें किंवा उदार आहें तें तूं पाहा २. माझ्यावर मोठे मोठे हातोडे जरी घातले तरी मी तुझे पाय सोडणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अखेरीस तुझ्यावांचून आम्हांला गति नाहीं ४. [३०६८]

हरीच्या दासाला ताप देईल असा ह्या पृथ्वीवर कोण आहे ? १. ह्याकरितां, अहो जन हो, तुम्ही सुखानें हरिकीर्तनांत नाचा व हरिनामाची वाणीनें गर्जना करा २. त्या योगानें काळ भयभीत होऊन पळत सुटतो व सर्व पातकें नाहींशीं होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें तुम्ही आपल्या चित्तांत निश्चयानें खरें माना ४. [३०६९]

हे देवा, जो आपल्या देहावर (जीवावर) उदार झाला आहे त्या ठिकाणीं भिडेचें ओझें कशाचें आहे ? १. मी तुला भर बाजारामध्यें उघडा करून तुझ्या अंगावरील मौल्यवान घोंगडें (शालजोडी) पैच्या किंमतीची करून टाकीन २. मी जों जों तुझी भीड धरली तों तों तूं मला जास्त चिडविलेंस ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां चारचौघांत तुझ्या कुळा-मुळाचा उच्चार करीन ४. [३०७०]

हे देवा, तुझ्याजवळ हरिदासांची दाटी झाली आहे, म्हणून माझा अखेरीस त्या ठिकाणीं प्रवेश होत नाहीं १. त्या ठिकाणीं (त्या परिस्थितींत) मीं काय करावें व माझें बोलणें कोणीं ऐकावें ? २. मी मोठा तुझा भावार्थी भक्त आहें, असें म्हणून तुला कसें लाजवावें ? (कारण तशी स्थिति माझी नाहीं) ३. भजनाच्या तालानें मला नाचतां येत नाहीं व हातानें टाळीहि वाजवितां येत नाहीं ४. त्यांचें अंग माळा, मुद्रा, भूषणानें फार शोभिवंत आहे आणि माझें शरीर तर दुबळ्यासारखें कलाहीन आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, अहो लक्ष्मीपति, तुम्ही मला त्या संतांच्या स्वाधीन करा ६. [३०७१]

हे देवा, मी काय जाणूं ? व काय न जाणूं ? (हें कांहीं मला कळत नाहीं) म्हणून तुझे पाय मी चित्तांत धरून राहीन १. तुझे पाय चित्तीं धरून मुखानें प्रेमानें तुझें नाम गावें हेंच आतां साधन आहे २. ह्यावांचून कांहीं सांडणें, कांहीं मांडणें जाणत नाहीं, फक्त भावार्थानें तुला हृदयांत कोंडून ठेवीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, हीच तुझी सेवा जन्मोजन्मीं घडावी हें माझें मागणें आहे ४. [३०७२]

जाळें घातलें सागरीं । बिंदु न राहे भीतरीं ॥ १ ॥ तैसें पापियाचें मन । तया नावडे कीर्तन ॥ २ ॥ गाढव गंगेसी न्हाणिलें । जाऊनि उकरड्यावरी लोळे ॥ ३ ॥ प्रीतीं पोशिलें काउळें । जाउनि विष्ठेवरी लोळे ॥ ४ ॥ तुका म्हणे तैसी हरी । कीरव्या नावडे कस्तुरी ॥ ५ ॥ [३०७३]

तरलों म्हणुनि धरिला ताठा । त्यासी चळ झाला फांटा ॥ १ ॥ वायांविण तुटे देोड । मान सुख इच्छी भांड ॥ २ ॥ ग्वाहीविण मात । स्थापी आपुली सतंत ॥ २ ॥ तुका म्हणे ऐसीं किती । नरका गेलीं अधोगतीं ॥ ४ ॥ [३०७४]

कठिण नारळाचें अंग । बाहेरी भीतरींचें चांग ॥ १ ॥ तैसा करीं कां विचार । शुद्ध कारण अंतर ॥ १ ॥ वरि कांटे फणसफळा । माजि अंतरीं जिव्हाळा ॥ ३ ॥ मिठें रुचविलें अन्न । नये सतंत कारण ॥ ४ ॥ ऊंस बाहेरी दिसे (कठीण) काळा । माजी रसाचा आगळा ॥ ५ ॥ तुका म्हणे मोल गोडी । काय चाड वरल्या खोडी ॥ ६ ॥ [३०७५]

ज्याची जया आस । तयाजवळी त्याचा वास ॥ १ ॥ येर जवळी तें दुरी । वत्स सांडी धेनु घरीं ॥ २ ॥ गोडी प्रियापाशीं । सुख उपजे येरासी ॥ ३ ॥ तुका म्हणे बोल । घडे तया ठायीं मोल ॥ ४ ॥ [३०७६]

बाळ माते निष्ठुर होये । परि ते स्नेह करीत आहे ॥ १ ॥ तैसा तूं गा पुरुषोत्तमा । घडी न विसंबासि आम्हां ॥ २ ॥ नेणतीं भागलीं । कडे घेतां अंग घाली ॥ ३ ॥ भूक साहे ताहान । त्याचें राखे समाधान ॥ ४ ॥ त्याच्या दुःखें धाये । आपला जीव देऊं पाहे ॥ ५ ॥ नांवें घाली उडी । तुका म्हणे प्राण काढी ॥ ६ ॥ [३०७७]

समुद्रांत जर जाळें टाकलें तर त्यांत पाण्याचा एक थेंब देखील येत नाहीं १. तशा प्रकारचें पातकी लोकांचें मन असतें, म्हणून त्यांना हरिकीर्तन मुळींच आवडत नाहीं २. गाढवाला गंगेमध्यें जरी न्हाऊं घातलें, तरी तें पुन्हा उकिरड्यावर जाऊन लोळतें ३. प्रीतीनें कावळ्याचें पाळण चांगल्या रीतीनें केलें तरी तो हागंदारींत जाऊन लोळतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे हरि, त्याचप्रमाणें कस्तुरीचा सुगंध डुकरास (खेंकड्यास) आवडत नाहीं (तसें पापी जनांस कीर्तन आवडत नाहीं) ५. [३०७३]

आम्ही उद्धरलों आहोंत असा गर्व धरून जे लोकांस सांगतात त्यांची वाणी चळली व तीस फांटा फुटला १. असले भांडखोर लोक मानाच्या सुखाची इच्छा करितात. ते कडु असलेल्या कच्च्या शेंदाड तोंडल्याप्रमाणें (कापसाच्या कच्च्या फुटलेल्या बोंडाप्रमाणें) व्यर्थ जातात २ वेदशास्त्राच्या पुराव्याशिवाय बोलून आपल्या मतानें कांहीं तरी स्वतंत्र मताची स्थापना करितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचे कित्येक लोक अधोगतीस (नरकास) गेले ४. [३०७४]

नारळाचें बाहेरील अंग कठिण असतें, पण आंतला गाभा गोड लागतो १. अहो जन हो, त्याप्रमाणें तुम्ही विचार करा. अंतःकरण शुद्ध असणें हेंच मुख्य कार्य आहे २. फणसाच्या फळाला वर कांटे असतात, पण आंतील गऱ्यांत गोडी असते ३. मिठानें अन्नास चव येते, त्यावांचून तें नुसतें उपयोगी पडत नाहीं (मिठाशिवाय नुसत्या अन्नाला चव नाहीं) ४. उंसाचा रंग बाहेरून काळा दिसतो पण आंतील रस उत्तम असतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, आतील गोडीस काय ती किंमत आहे. त्यावांचून वरील दोषांची काय जरूरी आहे? ६, [३०७५]

ज्याची ज्याला आशा असते, तो मनानें त्याच्या जवळच राहातो १. ज्याची गरज नाहीं तो जवळ जरी असला, तरी दूर समजावा. जसें मोठ्या झालेल्या वासरास गाय सोडते (मोह टाकते), मग तें वासरूं जवळ जरी असलें तरी तें दूर असल्यासारखेंच आहे २. गोडी ही प्रिय मनुष्याविषयीं असते व त्याच्या योगानें दुसऱ्यास सुख उत्पन्न होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या ठिकाणीं प्रेमाचा जिव्हाळा आहे तेंच ठिकाण मौल्यवान आहे ४. [३०७६]

बालक आईवर रागावतें, पण ती त्याच्यावर प्रीति करिते १. अगा पुरुषोत्तमा, त्याप्रमाणें तूं आम्हांला घटकाभर देखील विसंबत नाहींस २. माझें तें नेणतें बाळ श्रमलें आहे, असें म्हणून ती आई कडेवर घेत असतांहि तें खालीं अंग टाकतें ३. आपल्याला तहान भूक लागली, तर ती सहन करून बालकाचें समाधान करते ४. त्याला कांहीं दुःख झाल्यास शोक करून आपला प्राण द्यावयास पाहाते ५. तुकाराम महाराज म्हणतात, बालकानें आई ह्या नांवानें हांक मारली असतां ती धांवत येऊन प्राणापेक्षां त्याचें ज्यास्त जतन करते ६. [३०७७]

माझें मागणें तें किती । दाता लक्ष्मीचा पति (दाता लक्ष्मीचा पति । माझें मागणें तें किती) ॥ १ ॥ जाणे तान्हेल्याची तान । पीतां गंगा नव्हे न्यून ॥ २ ॥ कल्पतरु झाला देता । तेथें पोटाचा मागता ॥ ३ ॥ तुका म्हणे संतां ध्यातां । परब्रह्मची आलें हातां ॥ ४ ॥ [३०७८]

कुरवंडी करिन काया । वरोनि पायां गोजिरिया ॥ १ ॥ बैसलें तें रूप डोळां । मन चाळा लागलें ॥ २ ॥ परतें न सरवे दुरी । आवडी पुरी बैसली ॥ ३ ॥ तुका म्हणे विसावलों । येथें धालों धणीवरी ॥ ४ ॥ [३०७९]

साधनाचे कष्ट मोठे । भय वाटे थोर हें ॥ १ ॥ मुखें गावें भावें गीत । सर्व हित बैसलिया ॥ २ ॥ दासां नव्हे कर्म दान । तन मन निश्चळ ॥ ३ ॥ तुका म्हणे आत्मनिष्ठा । भोग चेष्टा मनाची ॥ ४ ॥ [३०८०]

घेतां आणिकांचा जीव । तेव्हां कींव कराना ॥ १ ॥ आपुलें तं वरदळ नेदां । हे गोविंदा कृपणता ॥ २ ॥ सेवा तरी इच्छा सांग । चोरिलें अंग साहेना ॥ ३ ॥ तुका म्हणे अरे धन्या । निसंतान्या विठोबा ॥ ४ ॥ [३०८१]

आम्हां केलें गुणवंत । तें उचित राखावें ॥ १ ॥ तुम्हांसी तों चाड नाहीं । आणिकां कांहीं सुखदुःखा ॥ २ ॥ दासांचें तों देखों नये । उणें काय होईल तें ॥ ३ ॥ तुका म्हणे विश्वंभरा । दृष्टि करा सामोरी ॥ ४ ॥ [३०८२]

अगत्य ज्या नरका जाणें । वीट मानणें कीर्तनीं ॥ १ ॥ नावडेसा झाला बाप । आलें पाप

लक्ष्मीपतीसारखा जर दान देणारा आहे तर माझें मागणें कितीसें आहे? १. एखाद्यास तहान लागली आणि तो गंगेमध्यें जाऊन पाणी प्याल्यास ती गंगा कमी होत नाहीं, असें तुम्ही समजा २. इच्छित देणारा कल्पतरु (कल्पवृक्ष) भेटला असतां, त्या ठिकाणीं पोटभर खावयास मिळावें, अशा बुद्धीनें याचक आला तर तेथें त्याचा काय हिशेब आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांचें जर ध्यान केलें, तर परब्रह्म देखील हस्तगत होतें ४. [३०७८]

हे देवा, तुमच्या कोमल पायांवरून मी आपलें शरीर ओंवाळून टाकीन १. कारण तुमचें रूप माझ्या डोळ्यांत बसलें आहे, मनाला त्या रूपाचाच छंद लागला आहे २. माझी प्रीति रूपाच्या ठिकाणीं पुरतेपणीं बसली आहे, म्हणून येथून दूर परतें जावें, असें वाटत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं मी इच्छा पुरेतोंपर्यंत तृप्त झाल्यामुळें स्थिरावलों आहें ४. [३०७९]

योग, याग, श्रवण-मननादि अनेक साधनांचे फार श्रम आहेत, म्हणून त्याचें मला फार भय वाटतें १. भावार्थीनें हरिनाम गाइलें तर बसलेल्या ठिकाणीं सर्व हिताची प्राप्ति होते २. दासांनीं मन निश्चळ केलें म्हणजे पुरे, त्यावांचून कोणतेंहि कर्म व दान करणें हें त्याच्या हातून होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी आत्मनिष्ठ आहेत त्यांच्या सर्व चेष्टा मनाच्या ठिकाणीं आत्मसुख भोगण्याच्या असतात ४. [३०८०]

हे देवा, तुम्ही ज्या वेळीं सेवा करायला लावून दुसऱ्यांचा जीव घेतां त्या वेळीं तुम्हांला कांहीं दया येत नाहीं १. अहो गोविंदा, तुम्ही आपल्याला तर ब्राह्यात्कारीं अंगाला धक्का लागूं देत नाहीं, असे तुम्ही कृपण आहांत २. आमच्या हातून चांगली सेवा घेण्याची इच्छा करितां. त्याविषयीं आम्हीं कांहीं अंग चोरलें तर तर तें देखील तुम्हांस सहन होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे विठोबा धन्या, असा तूं निसंतान्या आहेस (म्हणजे माझें वाटोळें करणारा आहेस किंवा, तुला मागें पुढें कोणी नाहीं म्हणून तूं एवढा निर्दय आहेस) ४. [३०८१]

हे देवा, तुम्हीं आम्हांला जसें गुणवान् (त्रिगुणांनीं बद्ध) केलें आहे, तसें आमचें योग्य रक्षण करा (आम्हांला मुक्त करा) १. तुम्हांला तर इतर सुखदुःखाची मुळींच पर्वा नाहीं २. परंतु दासाला कांहीं सुखदुःख होईल त्याविषयींचा कमीपणा आपण कांहीं पाहूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो विश्वपालनकर्त्या देवा, तुम्ही आपली दृष्टि आमच्या समोर करून कृपावलोकन करा ४. [३०८२]

ज्याला नरकाला जाण्याची गरज आहे, त्यानें हरिकीर्तनाचा वीट मानावा १. देव हा आपला बाप आहे, तो जर

वस्तीसी ॥ २ ॥ नारायण नाहीं वाचे । तें यमाचें आंदणें ॥ ३ ॥ तुका म्हणे अभक्तासी । माता दासी जगझोडी ॥ ४ ॥ [३०८३]

पहा ते पांडव अखंड वनवासी । परि त्या देवासी आठविती ॥ १ ॥ प्रल्हादासी पिता करितो जाचणी । परि तो स्मरे मनीं नारायण ॥ २ ॥ सुदामा ब्राह्मण दरिद्रें पीडिला । नाहीं विसरला पांडुरंगा ॥ ३ ॥ तुका म्हणे तुझा न पडावा विसर । दुःखाचे डोंगर झाले तरी ॥ ४ ॥ [३०८४]

जन्ममरणांची कायसी चिंता । तुझ्या शरणागतां पंढरीराया ॥ १ ॥ वदनीं तुझें नाम अमृतसंजीवनी । असतां चक्रपाणी भय काय (कवणा) ॥ २ ॥ हृदयीं तुझें रूप बिंबलें साकार । तेथें कोण पार (पाड) संसाराचा ॥ ३ ॥ तुका म्हणे तुझ्या नामाची (चरणांची) पाखर । असतां कळिकाळ पायांतळीं ॥ ४ ॥ [३०८५]

क्षमा शस्त्र जया नराचिया हातीं । दुष्ट तयाप्रति काय करी ॥ १ ॥ तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि । जाय तो विझोन आपसया ॥ २ ॥ तुका म्हणे क्षमा सर्वांचें स्वहित । धरा अखंडित सुखरूप ॥ ३ ॥ [३०८६]

पानें जो खाईल बैसोनि कथेसी । घडेल तयासी गोहत्या ते ॥ १ ॥ तमाखू ओढोनि काढील जो धूर । बुडेल तें घर तेणें पापें ॥ २ ॥ कीर्तनीं बडबड करील जो कोणी । बेडुक होउनी येईल जन्मा ॥ ३ ॥ जयाचिये मनीं कथेचा कंटाळा । होती त्या चांडाळा बहु जाच ॥ ४ ॥ जाच होती पाठीं उडती यमदंड । त्याचें काळें तोंड तुका म्हणे ॥ ५ ॥ [३०८७]

कामामध्यें काम । कांहीं म्हणा रामराम । जाईल भवश्रम । सुख होईल दुःखाचें ॥ १ ॥ कळों येईल अंतकाळीं । प्राणप्रयाणाचे वेळीं । राहाती निराळीं । रांडापोरें सकळ ॥ २ ॥ जीतां जीसी

आवडेनासा झाला, तर सर्व पापाची वस्ती त्याच्या ठिकाणीं होते २. ज्यांच्या वाचेला नारायणनाम येत नाहीं, ते प्राणी यमास आंदण दिलेले दास होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे जे अभक्त आहेत, त्यांची आई सर्व जगताची बटीक (दासी) असावी ४. [३०८३]

ते पांडव सर्व काळ वनवासांत होते, पण ते देवाचा आठव करीत होते असें जाणा १. प्रल्हादाला त्याच्या बापानें पुष्कळ जाचलें, पण त्यानें मनामध्यें नारायणाचें स्मरण नेहमीं केलें २. सुदाम ह्या नांवाचा ब्राह्मण दारिद्र्यानें फार पीडित झाला होता, पण तो पांडुरंगाला विसरला नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मला पर्वताएवढें जरी दुःख झालें तरी तुझा विसर पडूं नये ४. [३०८४]

हे पंढरीराया, जे तुला शरण आले आहेत, त्यांना जन्ममरणाची काळजी कशाची आहे? १. हे चक्रपाणि, तुझें नाम हीच अमृतसंजीवनी जर मुखामध्यें आहे, तर भय कशाचें आहे? २. तुझें सगुण रूप जर हृदयांत प्रकाशलें, तर संसाराची काय किंमत आहे? (संसारसमुद्र तरून जाणें काय अवघड आहे?) ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्या नामाची कृपा जर आमच्या ठिकाणीं आहे, तर कळिकाळदेखील पायांखालीं येतो (म्हणजे स्वाधीन होतो) ४. [३०८५]

ज्या पुरुषाच्या हातीं क्षमारूपी शस्त्र आहे, त्याला दुर्जन काय करणार? १. जसें जेथें गवत नाहीं, तेथें मोठा प्रळयाग्नि जरी पडला, तरी तो आपल्या आपणच विझून जातो (तसा दुर्जनाचा यत्न कुंठित होतो) २. तुकाराम महाराज म्हणतात, क्षमेच्या योगानें सर्वांचें हित होणार आहे, ह्याकरितां तुम्ही सर्व काळ सुखाचें मूळ अशी जी क्षमा तिला आपल्या ठिकाणीं ठेवा ३. [३०८६]

जो कोणी हरिकथेमध्यें बसून पानांचे विडे खाईल, त्याला गोहत्येचें पातक लागेल १. त्या ठिकाणीं तंबाखू ओढून जर कोणी धूर काढील तर त्या पापानें त्याच्या सर्व घराचें वाटोळें होईल २. कीर्तनामध्यें बसून कोणी इतर बडबड करील, तर तो पुढें बेडकाच्या जन्माला जाईल ३. ज्याच्या मनामध्यें हरिकथेचा कंटाळा आहे, त्या चांडाळाला यम फार जाच करील ४. तुकाराम महाराज म्हणतात, जो कोणी कथेंत बसला असतां उठून जाईल, त्याचें तोंड काळें होऊन यमाचे दंड त्याच्या पाठीवर बसतील. ५. [३०८७]

अहो जन हो, तुम्हांला संसारासंबंधीं अनेक कामें आहेत, त्यांत कांहीं सवड करून रामनाम घेण्याचें काम करा. त्या योगानें संसारश्रमाचा नाश होऊन तो दुःखरूप संसार सुखरूप होईल १. नाहींपेक्षां अखेरीस तुमचा प्राण जातेवेळीं

जैसातैसा। थोर आहे रे वोळसा। उगवुनि फांसा। काय करणें तें करीं ॥ ३ ॥ केलें होतें याचि जन्में। अवघें विठोबाच्या नामें। तुका म्हणे वर्मे। जाणोनियां तरती ॥ ४ ॥ [३०८८]

माउलीसी सांगे कोण। प्रेम वाढवी तान्हें ॥ १ ॥ अंतरींचा कळवळा। करीतसे प्रतिपाळा ॥ २ ॥ मायबापाची उपमा। तुज देऊं पुरुषोत्तमा (मेघश्यामा) ॥ ३ ॥ तेही साजेना पाहतां। जीवलगा पंढरिनाथा ॥ ४ ॥ माय पाळी संसारीं। परलोकीं राहे दुरी ॥ ५ ॥ तैसा नव्हेसी अनंता। काळावरी तुझी सत्ता ॥ ६ ॥ तुका म्हणे नारायणा। तुज बहुत करुणा ॥ ७ ॥ [३०८९]

कोड आवडीचें। पुरविना बाळकाचें ॥ १ ॥ तेव्हां कैसी ते माउली। जाणा कशासाठीं व्याली ॥ २ ॥ वत्साचिये आसे। धेनु धांवेना वोरसें ॥ ३ ॥ तुका म्हणे घरीं। बाळ टाकिलें वानरीं ॥ ४ ॥ [३०९०]

अवघ्या पातकांची मीच एक राशी। अवघा तूं होशी सर्वोत्तम ॥ १ ॥ जैसा तैसा लागे करणें अंगिकार। माझा सर्व भार चालविणें ॥ २ ॥ अवघेंची मज गिळियेलें काळें। अवघींच बळें तुझे अंगीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां खुंटला उपाय। अवघेचि पाय तुझे मज ॥ ४ ॥ [३०९१]

अनुसरे तया फिरों नेदी मागें। राहे अंगसंगें समागमें ॥ १ ॥ अंगसंगें असे कर्मसाक्ष देव। जैसा ज्याचा भाव तैसें फळ ॥ २ ॥ फळपाकीं भोग देतील प्राणिये। तुका म्हणे नये सवें कांहीं ॥ ३ ॥ [३०९२]

सांवळें सुंदर रूप मनोहर। राहो निरंतर हृदयीं माझे ॥ १ ॥ आणीक कांहीं इच्छा आम्हां नाहीं चाड। तुझें नाम गोड पांडुरंगा ॥ २ ॥ जन्मोजन्मीं ऐसें मागितलें तुज। आम्हांसी सहज

तुम्हांला समजून येईल कीं तेव्हां सर्व बायकापोरें तुमच्यापासून दूर राहातील २. अरे, तूं आयुष्य असेपर्यंत कसातरी जगशील, पण पुढें जन्ममृत्यूचा मोठा भोंवरा आहे, म्हणून त्याच्या तडाख्यांतून सुटून तुला कांहीं करावयाचें असेल तें कर ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे, त्या मनुष्याच्याच जन्मामध्यें विठोबाच्या नामचिंतनानें जें केलें तें होईल; म्हणून हें मर्म जाणून त्याप्रमाणें जे वागतील ते तरतील ४. [३०८८]

बालकाला सांभाळण्याविषयीं आईला कोणीं सांगतें काय? पण तें तान्हें मूल तिच्या ठिकाणीं प्रेम वाढवितें १. अंतरांतील कळवळ्यानें आई त्याचें प्रतिपालन करते २. हे पुरुषोत्तमा, जर तुला आईबापाची उपमा द्यावी ३. तर हे जिवलगा पंढरीनाथा, ती उपमा पाहिली असतां, तुला शोभत नाहीं ४. कारण मृत्युलोकीं संसारामध्यें आई पालन करते, पण परलोकीं तिचा उपयोग होत नाहीं ५. हे अनंता, त्याप्रमाणें तूं नाहींस. तुझी सत्ता कलिकाळावर आहे ६. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, तुझ्या ठिकाणीं आम्हां बालकाविषयींची आई-बापापेक्षां फार दया आहे ७. [३०८९]

बालकाच्या इच्छा आई जर पूर्ण करीत नाहीं १. तर ती आई कसली म्हणावी व त्या मुलाला कशाकरितां प्रसवली, हे देवा, असें तुम्ही समजा २. वासराची आशा पूर्ण करण्याकरितां गाय स्नेहभरित होऊन जर धांवत जात नाहीं तर ती गाय कसली? ३. तुकाराम महाराज म्हणतात, वानरीण आपलें बाळ नेहमीं आपल्या पोटाशीं वागवितें, तें तिनें घरीं टाकून दिलें तर तिनें त्या बाळाला कां जन्म दिला? [ह्याचा संबंध ध्रुवपदाशीं आहे] (ह्याप्रमाणें जो भक्तांची उपेक्षा करतो तो देव कसला? तूं मात्र तसा नव्हेस) ४. [३०९०]

हे देवा, तूं सर्वपणें सर्वोत्तम आहेस आणि मी तर एक केवळ सर्व पातकांची राशि आहें १. आतां मी जसा आहें, तसा माझा अंगीकार केला पाहिजे, आणि माझा सर्व भार चालविला पाहिजे २. काळानें मला सर्व गिळून टाकलें आहे. त्यांतून सोडविण्याचें सर्व सामर्थ्य तुझ्या अंगीं आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां माझा सर्व उपाय कुंठित झाल्यामुळें मला तुझ्या पायांचाच सर्व आधार आहे ४. [३०९१]

जो देवाच्या ठिकाणीं अनन्य झाला आहे, त्याला आपल्यापासून तो निराळा होऊं न देतां त्याच्या समागमें राहातो १. सर्वांच्या अंतर्यामीं कर्मसाक्षित्वानें देव आहे, पण जसा ज्याचा भाव असेल तसें त्याला फळ मिळतें २. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व प्राणी आपापल्या कर्माप्रमाणें परिणामीं फळ भोगतील. त्यावांचून दुसरें कांहीं बरोबर येणार नाहीं ३. [३०९२]

हे देवा, तुझें सांवळें, सुंदर व मन हरण करणारें जें रूप आहे, तें सर्व काळ माझ्या हृदयांत राहो १. हे पांडुरंगा, तुझें नाम फार गोड आहे, त्यावांचून दुसरी कोणतीहि इच्छा नाहीं २. त्याप्रमाणें तुला आम्ही जन्मोजन्मीं मागत

द्यावें आतां ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज ऐसे जी दयाळ । धुंडितां सकळ नाहीं आम्हां ॥ ४ ॥ [३०९३]

भक्तांहूनि देवा आवडतें काई । त्रिभुवनीं नाहीं आन दुजें ॥ १ ॥ नावडे वैकुंठ क्षीराचा सागर । धरोनी अंतर राहे दासा ॥ २ ॥ सर्वभावें त्याचें सर्वस्वही गोड । तुळसीदळ कोड करूनी घ्यावें ॥ ३ ॥ सर्वस्वें त्याचा म्हणवी विकिला । चित्त द्यावें बोला सांगितलया ॥ ४ ॥ तुका म्हणे भक्तिसुखाचा बांधिला । आणीक विठ्ठला धर्म नाहीं ॥ ५ ॥ [३०९४]

हरि तुझें नाम गाइन अखंड । याविण पाखंड नेणें कांहीं ॥ १ ॥ अंतरीं विश्वास अखंड नामाचा । काया मनें वाचा देईं हेंचि ॥ २ ॥ तुका म्हणे आतां देईं संतसंग । तुझे नामीं रंग भरो मना ॥ ३ ॥ [३०९५]

करणें तें हेंचि करा । नरका अघोरा (घोरा) कां जातां ॥ १ ॥ जयामध्यें नारायण । शुद्ध पुण्य तें एक ॥ २ ॥ शरणागतां देव राखे । येरां वाखे विघ्नाचे ॥ ३ ॥ तुका म्हणे लीन व्हावें । कळे भावें वर्म हें ॥ ४ ॥ [३०९६]

आणीक नका करूं चेष्टा । व्हाल कष्टा वरपडी ॥ १ ॥ सुखें करा हरिकथा । सर्वथा हे तारील ॥ २ ॥ अनाथाचा नाथ देव । अनुभव सत्य हा ॥ ३ ॥ तुका म्हणे बहुतां रीती । धरा चित्तीं सकळ ॥ ४ ॥ [३०९७]

सेट्या ना चौधरी । पांडेपण वाहे शिरीं ॥ १ ॥ जकातीचा धंदा । तेथें पाप वसे सदा ॥ २ ॥ गाई म्हैसी हेड । तूपविकी महा द्वाड ॥ ३ ॥ तुका म्हणे पाहीं । तेथें पुण्या रीघ नाहीं ॥ ४ ॥ [३०९८]

आलों, म्हणून तें आतां तरी आम्हांला सहज द्यावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो देवा, तुमच्यासारखे दयावंत सर्व ठिकाणीं शोध करून पाहिलें असतांहि आम्हांस कोणी दिसत नाहींत ४. [३०९३]

देवाला त्रैलोक्यांत भक्तांपेक्षां दुसरें काय बरें आवडतें? दुसरें कांहींहि आवडत नाहीं १. वैकुंठ व क्षीरसागर हेहि आवडत नाहींत, तो दासाच्या अंतःकरणांत वस्ती करून राहातो २. सर्व भावानें भक्तांनीं अर्पण केलेल्या तुळसीपत्राचें कोड कौतुकानें व सर्वस्वप्रकारें चांगलें मानून त्याचा स्वीकार करितो ३. सर्वतोपरि मी भक्तांच्या आधीन आहें, असें तो म्हणतो. ते भक्तजन जें काय बोलतील तिकडे तो लक्ष देतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, विठ्ठल हा भक्तांकडून होणाऱ्या भक्तीकडून बांधला गेला आहे. तो अन्य कांहीं जाणत नाहीं ५. [३०३४]

हे हरि, तुझें नाम मी निरंतर घेईन. त्यावांचून दुसरें कांहीं पाखंड (तर्क-वितर्क) जाणत नाहीं १. अंतःकरणामध्यें सर्व काळ तुझ्या नामाविषयींचा विश्वास काया-वाचा-मनानें असावा हें दान तूं दे २. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आतां तूं मला संतसंगति दे व त्यायोगेंकरून तुझ्या नामाचा आनंद माझ्या ठिकाणीं भरून जाईल असें कर ३. [३०९५]

अहो जन हो, जर तुम्हांला कांहीं करावयाचें असेल तर (तें ध्रुवपदांत सुचविलें आहे) त्याचें चिंतन करा. अघोर नरकास कशाकरितां जातां? १. ज्यामध्यें नारायणाची वस्ती आहे (जें कर्म नारायणाला उद्देशून केलें जातें) तेंच एक शुद्ध पुण्य आहे २. जे कोणी आपल्याला शरण आले आहेत त्यांचें देव रक्षण करतो; बाकीच्यांच्यामागें विघ्नांचा ताप आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, लीन व नम्र व्हावें, पण हें श्रीहरीविषयींचा भाव असल्यावांचून कळणार नाहीं ४. [३०९६]

(ध्रुवपदांत दर्शविलेल्या साधनाखेरीज) अन्य कांहीं व्यवहार करूं नका, कारण त्या योगानें तुम्हांला दुःख होईल १. सुखानें श्रीहरीची कथा करा. ती सर्वथैव तुम्हांला तारील २. देव अनाथ दीन जीवांचा स्वामी आहे, हा खरा अनुभव आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, बहुत प्रकारानें आम्हीं (ध्रुवपदांत) सांगितलेली गोष्ट सर्व करण्याविषयींचा तुम्ही आपल्या चित्तामध्यें निश्चय करा ४. [३०९७]

जो मनुष्य नगरशेटजी नाहीं व चौधरीहि नाहीं असें असून जो पांडेपणा अथवा गांवचा कारभार आपल्या मस्तकीं घेतो तो मूर्ख आहे १. जो निरंतर जकातीचा धंदा करतो, तेथें सर्व काळ पापाची वस्ती आहे २. जो गाईचें व म्हशीचें तूप विकतो तो व्यापारी फार वाईट आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, पाहा, अशा लोकांचे ठिकाणीं कधींहि पुण्याचा प्रवेश होणार नाहीं ४. [३०९८]

मागें बहुत जाले खेळ । आतां बळ वोसरलें ॥ १ ॥ हालों न ये चालों आतां । घट रिता पोकळ ॥ २ ॥ भाजल्याची दिसे घडी । पट ओढी न साहे ॥ ३ ॥ तुका म्हणे पाहतां घडी । जगा जोडी अंगारा ॥ ४ ॥ [३०९९]

आळस आला अंगा । धांव घालीं पांडुरंगा ॥ १ ॥ सोसूं शरिराचे भाव । पडती अवगुणांचे घाव ॥ २ ॥ करावीं व्यसनें । दुरी येउनि नारायणें ॥ ३ ॥ जवळील दुरी । झालों देवा धरीं करीं ॥ ४ ॥ म्हणउनि देवा । वेळोवेळां करीं धांवा ॥ ५ ॥ तुका म्हणे पांडुरंगा । दुरी धरूं नको अंगा ॥ ६ ॥ [३१००]

झेंविली महारें । त्याची व्याली असे पोरें ॥ १ ॥ करी संताचा मत्सर । कोपें उभारोनि कर ॥ २ ॥ बीज तैसें फळ । वरी आलें असंगळ ॥ ३ ॥ तुका म्हणे ठावें । ऐसें झालें अनुभवें ॥ ४ ॥ [३१०१]

जे जे व्हावे (वाहावे) संकल्प । तेंचि पुण्य होय (तेंचि) पाप ॥ १ ॥ कारण तें मनापासीं । मेळविल्या मिळे रसीं ॥ २ ॥ सांडी मांडी हाली चाली । राहे तरी भली बोली ॥ ३ ॥ तुका म्हणे सार । नांव जीवनाचें सागर ॥ ४ ॥ [३१०२]

त्या हरिदासांची भेटी घेतां । नरका उभयतांसी जाणें ॥ १ ॥ माते परिस थोर कथा । भाड घेतां न लाजे ॥ २ ॥ देतां घेतां नरकवासी । उभयतासी रवरव ॥ ३ ॥ तुका म्हणे नरकगांवा । जाती हांवा धरोनि ॥ ४ ॥ [३१०३]

पूर्वीं पुष्कळ खेळ [प्रपंचव्यवहार] केले. आतां देहाभिमानाची सर्व शक्ति नाहींशी झाली आहे १. आतां पूर्ण आत्मस्वरूपस्थिति प्राप्त झाल्यामुळें कांहीं हालचाल करणें राहिलें नाहीं. देहादि प्रपंचरूपी घट सर्व विकारानें शून्य झाल्यामुळें त्याचा केवळ पोकळ भास मात्र उरला आहे २. जसें एखाद्या वस्त्राची घडी अग्नीनें जळल्यावरही घडीची आकृति दिसते, पण उलगडून वस्त्र मोकळें करावयास गेलें म्हणजे तें त्या घडीस सहन होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जळलेली घडी कशी आहे हे पाहावयास गेलें तर जगाचे हातास राखच लागेल (त्याप्रमाणें माझा देह जसाच्या तसा दिसला तरी तो आतां ज्ञानाग्नीनें पवित्र, शुद्ध झाला आहे) ४. [३०९९]

हे पांडुरंगा, आमच्या अंगांत आळस भरला आहे; आतां तूं धांव घे १. शरीराचे धर्म कोठपर्यंत सोसूं ? कारण अनेक अवगुणांचे घाव लागत आहेत २. अहो नारायणा, तुम्ही या व आमच्या मागें लागलेलीं हीं व्यसनें नाहींशीं करा ३. हे देवा, मी तुझ्याजवळ असणारा दूर झालों आहें, म्हणून मला तुम्ही हातामध्यें धरा ४. हे देवा, ह्याकरितांच तुमचा मी धांवा करून वेळोवेळीं हांका मारीत आहें ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, तुम्हीं आपल्या अंगापासून आम्हांला दूर करूं नका ६. [३१००]

तिला महारांनीं उपभोगिली. त्याच्याच पोटचीं हीं पोरें झालीं आहेत १. म्हणूनच तीं रागानें हात वर करून संतांचा मत्सर करितात. २. बीज वाईट असेल तसेंच फळ वाईट येतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें ह्या अनुभवानें मला कळलें आहे ४. [३१०१]

जे जे संकल्प होतात ते ते पापपुण्य होय १. त्यांना अनुसरून शरीरेंद्रियांकडून क्रिया घडतात व त्यांपासून पाप किंवा पुण्य निर्माण होतें १. सर्व कांहीं होणें आपल्या मनाजवळ आहे. तें ज्या रसांत (विषयांत) मिळवावें तेथें मिळतें २. नानाप्रकारच्या खटाटोपांची हालचाल जर बंद राहील तरच चांगली गति आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, समुद्राचें पाणी कोणत्याहि भांड्यांत ठेवलें तरी त्या पाण्याचें नांव समुद्र आहे हाच सारांश होय. (त्याप्रमाणें कायिक, वाचिक, मानसिक अशा कोणत्याहि क्रिया घडल्या तरी सर्वांचें मुख्य कारण मनच होय) ४. [३१०२]

(ध्रुवपदांत दर्शविलेल्या) हरिदासाची भेट घेतली असतां हरिदासास व भेट घेणारास नरकास जावें लागेल १. कारण आईपेक्षां थोर अशी जी हरिकथा तिच्यावर पैसे मिळविणें ही एक प्रकारची आईची भाड घेणेंच (आईला दुसऱ्यास विकणेंच) होय २. पण ती घेण्याविषयीं ज्यास लाज वाटत नाहीं त्या हरिदासाला जे कोणी पैसे देतात ते व तो हरिदास या दोघांना नरकवास प्राप्त होईल ३. अशा प्रकारें हे कथेवर द्रव्य मिळविण्याची हांव धरणारे नरकास जातील ४. [३१०३]

भोगीं जाला त्याग । गीतीं गातां पांडुरंग । इंद्रियांचा लाग । आम्हां वरूनि चुकला ॥ १ ॥ करूनि ठेविलों निश्चळ । भय नाहीं तळमळ । घेतला सकळ । अवघा भार विठ्ठलें ॥ २ ॥ तळीं पक्षिणीचे परी । नखें चोंची चारा धरी । आणुनियां घरीं । मुखीं घाली बाळका ॥ ३ ॥ तुका म्हणे ये आवडी । आम्ही पायीं दिली बुडी । आहे तेथें जोडी । जन्मांतरींचें ठेवणें ॥ ४ ॥ [३१०४]

कुंकवाची ठेवांठेवी । बोडक्या देवी काशाला ॥ १ ॥ दिवस गमा भरा पोट । कां गे नट नटावा ॥ २ ॥ दिमाख हा कोणा दावा । लटकी जीवा चडफड ॥ ३ ॥ तुका म्हणे झोंडगी हो । फुंदा कां हो कोरडी ॥ ४ ॥ [३१०५]

आम्ही आइते जेवणार । न लगे सोसावे डोंगर । सुखाचा वेव्हार । तेणेंचि वाढेल ॥ १ ॥ ठेवा जोडला मिरासी । ठाव झाला पायांपाशीं । नव्हे आणिकांसी । रीघ तेथें यावया ॥ २ ॥ बळी दिला जीवभाव । नेणें आणिकांचें नांव । धरिला एकभाव । तो विश्वास फळला ॥ ३ ॥ तुका म्हणे झालों बळी । आम्ही निकट जवळी । बोलिलों तें पाळीं । वचन स्वामी आमचें ॥ ४ ॥ [३१०६]

कोण आमचीं योगतपें । करूं वापें जाणावीं ॥ १ ॥ गीत संतसंगें गाऊं । उभीं ठाऊं जागरणीं ॥ २ ॥ आमुचा तो नव्हे लाग । करूं त्याग जावया ॥ ३ ॥ तुका म्हणे इंद्रियांसी । येचि रसीं रंगवूं ॥ ४ ॥ [३१०७]

आम्हां वैष्णवांचा कुळधर्म कुळींचा । विश्वास नामाचा एका भावें ॥ १ ॥ तरीच हरिदास म्हणवितां श्लाघीजे । निर्वासना कीजे चित्त आधीं ॥ २ ॥ गाऊं नाचूं प्रेमें आनंदें कीर्तनीं । भुक्ति मुक्ति दोन्ही न मागों तुज ॥ ३ ॥ सगुण निर्गुण एकची आवडी । चित्तें दिली बुडी चिदानंदीं ॥ ४ ॥

पांडुरंगाचें नाम सुस्वरानें गाइल्यामुळें भोगाच्या ठिकाणीं त्याग झाला व इंद्रियांचा पगडा आमच्यावरून उठून त्यांतून आमची सुटका झाली १. अंतःकरण स्थिर करून राहिलों आहें. भय व तळमळीचा संबंध राहिला नाहीं, कारण सर्व कांहीं योगक्षेमाचा बोजा विठोबारायानें आपल्यावर घेतला आहे २. जशी पक्षिणी ही पृथ्वीवर चारा हुडकून ती आपल्या नखांमध्यें व मुखामध्यें धरून घरट्यामध्यें आणते व आपल्या पिलांच्या मुखांत घालते ३. तुकाराम महाराज म्हणतात, तशा प्रेमानें आम्हीं श्रीहरीच्या पायीं बुडी दिली आहे. त्या ठिकाणीं आम्ही जन्मांतरीं जोडलेल्या पुण्याईची ठेव आहे ४. [३१०४]

कुंकवाची उठाठेव विधवा बोडकीनें कशास करावी ? १. आपलें पोट भरून आयुष्याचे दिवस काढावे असें असतां अगे, नाच्यासारखें कां नटावें ? २. नटून थटून मोठा दिमाख कोणाला दाखवायचा आहे ? म्हणून त्याविषयीं जीवांत तळमळ ठेवणें हें खोटें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो झोंड बायांनो, तुम्ही कोरडाच नखरा कशासाठीं करितां ? ४. [३१०५]

कांहीं कामाचे डोंगर न सोसतां (उपसतां) आम्ही सिद्ध असलेलें भोजन करणारे आहोंत. त्या योगानें सुखाचा व्यवहार वाढला जाणार आहे १. देवाच्या पायांजवळ ठाव मिळाला हा आमच्या वडिलार्जित मिरासीचा ठेवा आहे. ह्या ठिकाणीं यावयास अन्य कोणाचा रिघाव होणार नाहीं २. येथेंच आम्हीं आपला जीवभाव बलिदान दिला आहे, म्हणून अन्य कोणाचें नांव जाणत नाहीं व ह्या ठिकाणींच आम्हीं एका भावार्थानें विश्वास ठेविला, तो फलद्रूप झाला ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं देवाच्या जवळ निकट वास्तव्य केलें आहे, म्हणून बलवान् आहोंत. त्या योगानें आम्ही जें कांहीं बोलूं तें आमचें वचन स्वामी पाळीत आहेत ४. [३१०६]

योगतपादि साधनांचें अनुष्ठान करणें हें आमच्या बापाकडून देखील जाणलें जावयाचें नाहीं १. संतांच्या संगतीनें हरिनाम गाऊन हरिजागरणामध्यें उभे राहूं २. सर्व विषयांचा त्याग करावा, तर ह्या आमच्या इंद्रियांची शक्ति नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या हरिनामरूपी रसामध्यें आम्ही इंद्रियांना रंगवूं ४. [३१०७]

एकनिष्ठभावानें हरिनामाच्या ठिकाणीं विश्वास धरावा. आम्हां वैष्णवांचा हा कुळांतील कुळधर्म आहे १. अगोदर चित्त निर्वासन (निःस्पृह) करावें, तरच मोठ्या श्लाघ्यतेनें हरिदास म्हणवावें २. हे देवा, हरिकीर्तनामध्यें प्रेमानें तुला गाऊन नृत्य करूं, त्यावांचून इहलोकींचे भोग व पारत्रिक मुक्ति हीं दोन्हीहि आम्ही तुला मागणार नाहीं ३.

वृत्तीसहित मन रिघे प्रेमडोहीं । नाठवती देहीं देहभाव ॥ ५ ॥ तुका म्हणे देवा ऐसियांची सेवा । द्यावी जी केशवा जन्मोजन्मीं ॥ ६ ॥ [३१०८]

पावलों हा देह काकतालीन्यायें (कागटाळीन्यायें) । न घडे उपायें घडों आलें ॥ १ ॥ आतां माझीं खंडीं देहदेहांतरें । अभय दातारें देऊनियां ॥ २ ॥ अंधळ्याचे पायीं धनाची चरवी । अवचित तेवीं घडों आलें ॥ ३ ॥ तुका म्हणे योग घडला बरवा । आतां कास देवा न सोडीं मी ॥ ४ ॥ [३१०९]

सांडावी हे भीड अधमाचे चाळे । मद्यपी बरळे भलत्या छंदें ॥ १ ॥ ऐसे तंव तुम्ही नाहीं जी दिसत । कां हें अनुचित वद्लेत (ती) ॥ २ ॥ फांटा झाला त्यासी नाहीं वोढा वारा । बेरसाचा खरा हा तो गुण ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं ज्याच्या बापा ताळा । तो देखे विटाळा संतां अंगीं ॥ ४ ॥ [३११०]

आवडे हें रूप गोजिरें सगुण । पाहतां लोचन सुखावले ॥ १ ॥ आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहें । जों मी तुज पाहें पांडुरंगा ॥ २ ॥ लांचावलें मन लागलीसे गोडी । तें जीवें न सोडीं ऐसें झालें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही मागते लडिवाळी । पुरवावी आळी मायबापा ॥ ४ ॥ [३१११]

तिळ एक अर्ध राई । शीत बिंदु पावे काई । तया सुखा नाहीं । अंतपार पाहतां ॥ १ ॥ म्हणउनी करा लाहो । नका मागें पुढें पाहो । अवघ्यामध्यें आहों । अवघे सावचित्त तों ॥ २ ॥ तीर्थें न येती तुळणी । आजि या सुखाची धणी । कासी गयेहुनी । जीं आगळीं असती ॥ ३ ॥ येथें धरी लाज । वर्णा अभिमान काज । नाडला सहज । तुका म्हणे तो येथें ॥ ४ ॥ [३११२]

सगुण-निर्गुणाच्या ठिकाणीं एकच प्रेम ठेवून ज्ञानानंदामध्यें माझ्या चित्तानें बुडी दिली आहे ४. सर्व वृत्तींसहवर्तमान मनानें प्रेमडोहामध्यें रिघाव केला आहे; त्यायोगानें देहभावाचा आठव नाहींसा झाला ५. तुकाराम महाराज म्हणतात, अहो केशवा देवा, अशा लक्षणाचे जे वैष्णव आहेत, त्यांची सेवा जन्मोजन्मीं घडावी ६. [३१०८]

जसा एकाएकीं आंधळ्याच्या टाळीमध्यें कावळा सांपडावा, त्याप्रकारें हा नरदेह आम्हांला अवचित प्राप्त झाला आहे १. ह्याकरितां दात्या देवांनीं अभयदान देऊन आमच्या अनेक योनींतील देहांतराचा नाश करावा (म्हणजे नरदेहांवाचून दुसरा देह मिळूं नये) २. जसें एखादें आंधळें चालत असतां, वाटेनें अवचित द्रव्याचा हांडा पायास लागावा, तसें न होणारें आम्हांस घडून आलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, नरदेह मिळून तुमचा योग झाला हें उत्तम घडून आलें आहे, म्हणून आतां मी तुमची कांस सोडणार नाहीं ४. [३१०९]

अहो जन हो, कोणाचीहि भीड न धरणें हीं दुर्जनाचीं लक्षणें आहेत व जो दारू पिणारा आहे, तो आपल्या छंदानें भलतें बडबडतो १. अशा प्रकारचे तुम्ही तर दिसत नाहींत, पण हें अयोग्य भाषण कशाकरितां केलें? २. ज्याच्या तोंडाला फांटा फुटतो, त्यास कांहीं बोलण्याचा ओढावारा (धरबंध) नसतो. तो हा गुण गाढवाच्या पोटचा असणाराचा (गाढवांत) आहे (तो विचारशून्य माणसांत असतो) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो अनेक बापांच्या पोटचा आहे (ज्याच्या बापाचा पत्ता लागत नाहीं) तो संतांच्या ठिकाणीं दोष पाहातो ४. [३११०]

हे देवा, तुझें गोजिरें सगुणरूप पाहून माझ्या डोळ्यांस सुख झालें आहे, म्हणून मला हेंच रूप आवडतें १. हे पांडुरंगा, ज्या वेळीं तुला मी पाहीन त्या वेळीं आतां माझ्या दृष्टीसमोर जसा तूं आहेस, तसा तूं कायम राहा २. ह्या व रूपाच्या ठिकाणीं गोडी लागल्यामुळें माझें मन लाचावलें आहे; म्हणून जरी जीव गेला तरी तें सोडूं नये, असें झालें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही लडिवाळांनीं (लाडक्या लेंकरांनीं) हट्ट करून जें कांहीं मागावें, तें मायबापांनीं पुरविलें पाहिजे ४. [३१११]

तिळमात्र अथवा अर्ध मोहरीएवढें बिंदुमात्र सुख प्राप्त झालें असतां पाहूं गेलें तर त्या सुखाला अंतपार नाहीं [असें पंढरीचें सुख आहे] १. ह्याकरितां तेंच सुख घेण्याची हांव करा. जोंपर्यंत सर्व जन सर्व इंद्रियांमध्यें सावध आहांत तोंपर्यंत मागें पुढें पाहूं नका २. ह्या तीर्थाच्या बरोबरीस दुसरीं काशीगयेपेक्षां जीं मोठीं तीर्थें आहेत, तीं येत नाहींत. आज ह्या सुखाची समाधानी ह्या योग्यतेची आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं वर्णाभिमान अथवा लाज धरील तो सहज फसला जाईल ४. [३११२]

विठोबाचें नांव ज्याचे मुखीं नित्य । त्या देखिल्या पतित उद्धरती ॥ १ ॥ विठ्ठल विठ्ठल भावें म्हणे वाचे । तरि तो काळाचे दांत ठेची ॥ २ ॥ बहुत तारिले सांगों किती आतां । ऐसा कोणी दाता दुजा नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे म्यां ही । ऐकुनियां कीर्ति । धरिली (धरिला) एकांतीं हृदयामाजी ॥ ४ ॥ [३११३]

आड पडे काडी । तरि ते बहुत पाणी खोडी ॥ १ ॥ ऐसे दुर्जन संगती । बहुतांचे घात होती ॥ २ ॥ एक पडे मासी । तरी ते बहु अन्न नासी ॥ ३ ॥ तुका म्हणे रांड । ऐसी कां ते व्याली भांड ॥ ४ ॥ [३११४]

पंढरीचें भूत मोठें । आल्या गेल्या झडपी वाटे । ॥ १ ॥ बहु खेचरीचें रान । जातां वेडें होय मन ॥ २ ॥ तेथें जाऊं नका कोणी । गेले नाहीं आले परतोनि ॥ ३ ॥ तुका पंढरीसी गेला । पुन्हां जन्मा नाहीं आला ॥ ४ ॥ [३११५]

काय करूं आतां या मना । न संडी विषयाची वासना । प्रार्थितांही राहेना । आदर पतना नेऊं पाहे ॥ १ ॥ आतां धांवें धांवें गा श्रीहरी । गेलों वायां नाहीं तरी । न दिसे कोणी आवरी । आणीक दुजा तयासी ॥ २ ॥ न राहे एके ठायीं एक घडी । चित्त तडतडा तोडी । भरलें विषय-भोवंडी । घालूं पाहे उडी भवडोहीं ॥ ३ ॥ आशा तृष्णा कल्पना पापिणी । घात मांडला माझा यांणीं । तुका म्हणे चक्रपाणी । काय अझोनि पहातोसी ॥ ४ ॥ [३११६]

पाषाण परिस भूमि जांबूनद । वंशाचा संबंध धातयाचा ॥ १ ॥ सोनियाची पुरी समुद्राचा वेढा । समुदाय गाढा राक्षसांचा ॥ २ ॥ ऐशीं सहस्र त्या सुंदरा कामिनी । माजी मुखरणी मंदोदरी

ज्याच्या मुखामध्यें नेहमीं विठोबाचें नाम आहे, त्याचें दर्शन झाल्याबरोबर पातकी लोकांचा उद्धार होतो १. जो भावार्थानें विठ्ठलनामाचा वाचेनें उच्चार करितो, तो काळाचे देखील दांत पाडील २. ह्या नामस्मरणानें पूर्वीं बहुतांचा उद्धार केला, तें आतां किती म्हणून सांगावें ? अशा प्रकारचा दाता दुसरा कोणी नाहीं. ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवाची असली कीर्ति ऐकून मी त्या कीर्तीला धरून एकांतांत राहिलों आहें (किंवा, देवाला चित्तांत सांठविलें आहे). ४. [३११३]

पाण्याच्या पाटामध्यें एक काडी आडवी आली, तरी ती पुष्कळ पाणी अडवून तें दोषी करते १. अशा न्यायानें दुर्जनाची संगत धरली असतां, पुष्कळांचे घात होतात २. अन्नामध्यें एक जर माशी पडली, तर तिच्या योगानें पुष्कळ अन्न नासलें जातें [तसें दुष्टाच्या संगतीनें होतें] ३. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या भांडखोर दुष्टास ती रांड कां प्रसवली ? ४. [३११४]

सर्व भूतांहून श्रेष्ठ भूत आहे तें पंढरीस नांदतें. त्या वाटेनें कोणी आलें गेलें, तर तें त्याला झपाटून घेतें १. असें हें रान फार कडक भूतांचें आहे; तेथें गेलें असतां, मनास वेड लागतें २. त्या ठिकाणीं पूर्वीं कोणी जे गेले ते परत आले नाहींत, म्हणून तेथें कोणी जाऊं नका ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी जो पंढरीस गेलों, तो परत जन्माच्या गांवास (जन्माला) आलोंच नाहीं ४. [३११५]

हे देवा, माझें मन विषयाची वासना टाकीत नाहीं, ह्याला आतां मी काय करूं ? ह्याची किती जरी प्रार्थना केली, तरी तें मोठ्या उत्सुकतेनें मला अधोगतीस नेऊं पाहात आहे १. अगा श्रीहरि, आतां तूं लवकर धांवून ये (असें द्विवार विनवितों), नाहींपेक्षां मी वायां गेलों आहें; त्या मनाला तुजवांचून दुसरा कोणी आंवरील असें दिसत नाहीं २. असें माझें चित्त एक घटकाभर देखील एका ठिकाणीं स्थिर होत नाहीं, तें तडतडा मला तोडून विषयाच्या भोंवडीनें भरल्या-मुळें भवसमुद्राच्या डोहांत उडी घालूं पाहात आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आशा, मनीषा, तृष्णा, कल्पना ह्या पापिणी माझा नाश करूं पाहात आहेत. ह्याकरितां, हे चक्रपाणि देवा, तूं अजून तरी काय पाहातोस ? ४. [३११६]

रावणाच्या वैभवाचें वर्णन : ज्या लंकेमध्यें परिसाचे दगड असून जांबूनद नांवाच्या रत्नांची पृथ्वी होती, आणि त्या रावणाच्या वंशाचें मूळ ब्रह्मदेवापासून होतें १. सर्व लंका नगरी सोन्याची असून सभोंवतीं समुद्राचा वेढा होता व त्या ठिकाणीं मोठा (राक्षसांचा) समुदाय होता २. त्या रावणाच्या स्वरूपवान् स्त्रिया ऐशीं हजार होत्या, त्यांत मुख्य

॥ ३ ॥ पुत्रपौत्रांचा लेखा कोण करी । मुख्य पुत्र हरी (हारी) इंद्रा आणी ॥ ४ ॥ चौदा चौकडिया आयुष्यगणना । बंधुवर्ग जाणा कुंभकर्ण ॥ ५ ॥ तुका म्हणे ज्याचे देव बांदवडी । सांगातें कवडी गेली नाहीं ॥ ६ ॥ [३११७]

लाभ पुढें करी । घात नारायण वारी ॥ १ ॥ ऐसी भक्तांची माउली । करी कृपेची साउली ॥ २ ॥ माय बाळकासी । जीव भाव वेंची तैसी ॥ ३ ॥ तुका म्हणे नाड । नाहीं शरणागता आड ॥ ४ ॥ [३११८]

तुजविण कांहीं । स्थिर राहे ऐसें नाहीं ॥ १ ॥ कळों आलें बहुतां रीतीं । पांडुरंगा माझ्या चित्तीं ॥ २ ॥ मोकलिली आस । सर्वभावें झालों दास ॥ ३ ॥ तुका म्हणे तूंचि खरा । येर वाउगा पसारा ॥ ४ ॥ [३११९]

खोंकरीं आधण होय पाकसिद्धि । हें तों घडों कधीं शकेचि ना ॥ १ ॥ खापराचे अंगीं घासितां परिस । न पालटे कीस काढिलिया ॥ २ ॥ पालथें घागरीं रिचवितां जळ । तुका म्हणे खळ तैसे कथे ॥ ३ ॥ [३१२०]

नागलें देखोनि चांगलें बोले । आपुलें वेचूनि त्यापुढें खुले ॥ १ ॥ अधमाचे ओंगळ गुण । उचित नेणे तो धर्म कोण ॥ २ ॥ आर्तभूतां न घाली पाण्याची चुळ । न मागे त्यासी घाली साखरगुळ ॥ ३ ॥ एकासी धड न बोले वाचा । एकासी म्हणे मी तुझे बांदीचा ॥ ४ ॥ एका देखोनि लपवी भाकरी । एकासी आड पडोनी होकरी ॥ ५ ॥ तुका म्हणे ते गाढवपशु । लाभेंविण केला आयुष्यनाशु ॥ ६ ॥ [३१२१]

पट्टराणी मंदोदरी होती ३. रावणास मुलें, नातु व पणतु अगणित होतीं, त्यांची संख्या कोणीं केली नाहीं. त्यांत मुख्य जो श्रेष्ठ पुत्र त्यानें इंद्र जिंकल्यामुळें इंद्रजित नांव पावला ४. चार युगें मिळून एक चौकडी, अशा चौदा चौकड्या रावणास आयुष्य होतें, [आणि मोठे अक्राळविक्राळ असे] कुंभकर्णासारखे ज्याचे पाठिराखे भाऊ होते ५. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या रावणानें तेहतीस कोटि देव बंदींत ठेविले होते. एवढी श्रेष्ठसंपत्ति असून अखेरीस त्याच्या बरोबर एक कवडी देखील गेली नाहीं ६. [३११७]

नारायण आपल्या भक्तांच्या पुढें लाभ ठेवून त्यांच्यावरील आघात निवारण करतो १. आणि आपल्या कृपेची छाया करून तो रक्षण करीत आहे. अशी ही भक्तजनांची आई आहे २. जसें बालकाचें रक्षण जीवभाव खर्चून त्याची आई करते त्याप्रमाणें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवास जे शरण आले आहेत, त्यांना कधींहि नुकसान नाहीं व त्यांच्यांत कसलीहि इच्छा राहात नाहीं ४. [३११८]

हे देवा, तुझ्यावांचून कांहीं अचळ राहील असें नाहीं [एका देवावांचून सर्व नाशिवंत आहे] १. हे पांडुरंगा, असें बहुत प्रकारानें माझ्या चित्तासच कळून आलें २. ह्याकरितां मी सर्वांची आशा टाकून सर्वभावानें तुझा सेवक झालों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तूंच एक खरा आहेस, बाकी सर्व मायिक पसारा व्यर्थ आहे ४. [३११९]

फुटक्या भांड्यांत अगर मडक्यांत जर आधण ठेविलें तर त्यांत स्वयंपाक तयार होईल हें तर कधींहि घडणार नाहीं १. खापराला जर परिसानें घासून त्याचा कीस काढला, तरी तें कधींहि पालटलें जाणार नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, पालथ्या घागरीवर जर पाणी घातलें तर तें आंत लेशभर सुद्धां जाणार नाहीं, ह्या तीन दृष्टांतांप्रमाणें दुष्ट लोक हरिकथेच्या ठिकाणीं जरी बसले तरी त्यांना त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं ३. [३१२०]

एखादा नागर [म्हणजे उत्तम द्रव्यवान्] सुशिक्षित, शहरवासी व राज्याधिकारी मनुष्य पाहून चांगलें भाषण करितात व आपल्या पदरचा खर्च करून त्याच्यापुढें खुलतात १. असले हे वाईट गुण अधम लोकांचे असतात, ते योग्य कर्तव्य जाणत नाहींत मग त्यापासून कोणता धर्म होणार आहे? २. तहान भुकेनें पीडित झालेले पाणी मागूं आले असतां त्यांस एक चूळभर सुद्धां पाणी देत नाहीं, पण न मागणारास साखरेचे व गुळाचे पदार्थ वाढतात ३. एकाबरोबर तोंडानें देखील चांगलें बोलत नाहीं व एकाला तुझ्या बटकीचा मी सेवक आहें असें म्हणतात ४. एकाला पाहून भाकरी लपवितात व एकाच्या आडवें पडून त्यांना सत्कारानें जेवणाकरितां ठेवून घेतात ५. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या नरपशूंनीं कांहीं लाभावांचून (स्वहित न साधतां) आयुष्याचा व्यर्थ नाश केला ६. [३१२१]

पिंडपोषकाच्या जळो ज्ञानगोष्टी । झणी दृष्टिभेटी न हो त्याची ॥ १ ॥ नाहीं संतचिन्हें उमटलीं अंगीं । उपदेशा लागीं पात्र झाला ॥ २ ॥ पोहों नेणे कांसे लावितो आणिका । म्हणावें त्या मूर्खा काय आतां ॥ ३ ॥ शिणलें तें गेलें शिणलियापाशीं । झाली त्या दोघांसी एक गति ॥ ४ ॥ तुका म्हणे अहो देवा दीनानाथा । दरुषण आतां नको त्याचें ॥ ५ ॥ [३१२२]

संतचिन्हें लेउनि अंगीं । भूषण मिरविती जगीं ॥ १ ॥ पडिले दुःखाचे सागरीं । वहावले भवपुरीं ॥ २ ॥ काम क्रोध लोभ चित्तीं । वरिवरि दाविती विरक्ती ॥ ३ ॥ आशापाशीं बांधोनि चित्त । म्हणती झालों आम्ही मुक्त ॥ ३ ॥ त्यांचे लागले संगती । झाली त्यांची तेचि गति ॥ ५ ॥ तुका म्हणे शब्दज्ञानें । जग नाडियेलें तेणें ॥ ६ ॥ [३१२३]

राम कृष्ण ऐसीं उच्चारीन नामें । नाचेन मी प्रेमें संतांपुढें ॥ १ ॥ काय घडेल तें घडो ये सेवटीं । लाभ आणि तुटी देव जाणे ॥ २ ॥ चिंता मोह आशा ठेवुनि निराळीं । देईन हा बळी जीव पायीं ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं उरों नेदीं उरी । सांडीन हे थोरी ओंवाळोनी ॥ ४ ॥ [३१२४]

आइत्या भाग्या धनी व्हावें । केणें घ्यावें न सरे तें ॥ १ ॥ केणें आलें पंढरपुरीं । उधारीचें लाभीक ॥ २ ॥ बाखराचीं करुनी रितीं । भरा पोतीं सकळ ॥ ३ ॥ तुका म्हणे संतांपाडें । करूं पुढें वाखती ॥ ४ ॥ [३१२५]

हेचि व्हावी माझी आस । जन्मोजन्मीं तुझा दास ॥ १ ॥ पंढरीचा वारकरी । वारी चुकों नेदीं हरी ॥ २ ॥ संतसंग सर्व काळ । अखंड प्रेमाचा कल्लोळ ॥ ३ ॥ चंद्रभागे स्नान । तुका मागे हेंचि दान ॥ ४ ॥ [३१२६]

आपल्या देहाचें पालन पोषण करून जे ज्ञानाच्या गोष्टी सांगतात, त्यांना आग लागो. त्यांची चुकून सुद्धां दृष्टिभेट होऊं नये १. अंगाच्या ठिकाणीं संतपणाचीं चिन्हें उमटलीं नसून, लोकांना ज्ञानाचा उपदेश करण्याला तो योग्य झाला आहे काय ? २. आपणाला पुरतें पोहायला येत नसून तो जर दुसऱ्याला कांसेस लावील तर आतां त्या मूर्खाला काय म्हणावें ? ३. एखादा श्रम झाल्यामुळें दुसऱ्या श्रमलेल्या मनुष्याजवळ गेला, तर त्या उभयतांचें दुःख एकच होईल ४. तुकाराम महाराज म्हणतात, अहो, दीनानाथा देवा, आतां त्या लोकांचें दर्शन मला कधींहि होऊं नये ५. [३१२२]

जे लोक संतांचीं चिन्हें बाह्यात्कारीं धारण करून, जगांत भूषण मिरवितात १. ते लोक भवदुःखाच्या समुद्रांत पडून पुरामध्यें वाहून जात आहेत २. चित्तामध्यें काम, क्रोध, लोभ ठेवून बाह्यात्कारीं वैराग्य दाखवितात ३. अनेक विषयांच्या आशेच्या पाशानें चित्त बांधलेलें असून आम्ही मुक्त झालों आहोंत असें जगांत सांगतात ४. असल्यांची जे संगत धरतील त्यांची गति तीच होईल ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा संतांनीं कोरडें शब्दज्ञान सांगून जग नासलें आहे (जगाला फसविलें आहे) ६. [३१२३]

रामकृष्ण ह्या नांवांचा उच्चार करून मी संतांच्यापुढें प्रेमानें नाचेन १. ह्या योगानें अखेरीस लाभ अथवा हानि काय व्हावयाचें असेल तें देव जाणे २. चित्तांतील काळजी दूर करून आशा, मोह नाहींसा करीन व संतचरणारविंदीं आपला जीव बळी देईन (अर्पण करीन) ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यासंबंधीं कांहीं एक शिल्लक न ठेवितां आपला थोरपणा संतांवरून ओवाळून टाकीन ४. [३१२४]

जें आयतें ऐश्वर्य आहे त्याचें मालक व्हावें व कधीं न संपणारें असें धन हातीं घ्यावें १. तें धन पंढरपुरीं आहे; त्यापासून उद्धार व लाभ होणार आहे २. फळाशेनें जीं देहरूपी पोतीं भरलेलीं आहेत तीं रिकामीं करून वर दर्शविलेल्या वस्तूनें सर्व भरून ठेवा ३. तुकाराम महाराज म्हणतात, मागील संतांप्रमाणें देहरूपी खोळ पुढें करून भरून घ्या ४. [३१२५]

हे देवा, जन्मोजन्मीं तुझें दास्यत्व करावें हीच माझी आशा असावी १. हे हरि, मीं पंढरीची वारी नेमानें करावी, ती कधींहि चुकवूं नये २. सर्व काळ संतांच्या संगतीनें असावें म्हणजे अंगामध्यें तुझ्याविषयींचें प्रेम स्थिरावेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, चंद्रभागेचें स्नान घडावें हेंच दान मला द्यावें ४. [३१२६]

कां गा कोणी न म्हणे पंढरीची आई । बोलाविते पाहीं चाल नेटें ॥ १ ॥ तेव्हां माझ्या मना होईल (होय) समाधान । जाईल सर्व शीण जन्मांतरींचा ॥ २ ॥ तुका म्हणे माझी होईल माउली । वोरसोनि घाली प्रेमपान्हा ॥ ३ ॥ [३१२७]

वेद अनंत बोलिला । अर्थ इतुलाचि (इतुकाचि) साधिला ॥ १ ॥ विठोबासी शरण जावें । निजनिष्ठें नाम गावें ॥ २ ॥ सकळ शास्त्रांचा विचार । अंतीं इतलाचि निर्धार ॥ ३ ॥ अठरा पुराणीं सिद्धांत । तुका म्हणे हाचि हेत ॥ ४ ॥ [३१२८]

मायेचा मारिला अंगीं नाहीं घाव । दुःखें तरी लव धडधडी ॥ १ ॥ न लभे हा काळ न सुटे हातींचा । न बोलवें वाचा वेडावली ॥ २ ॥ न पवे धांवणें न पवेची लाग । न लगेची माग धरावया ॥ ३ ॥ भेणें तरि अंगा लावियेल्या राखा । परी त्यासी वाखा करीतसे ॥ ४ ॥ तुका म्हणे नेदी हाका मारूं देवा । लोकांपाठीं हेवा लाविलासे (लागलासे) ॥ ५ ॥ [३१२९]

नाहीं पाक होत उफराटे चाली । बोलिली ते केली व्हावी नीत ॥ १ ॥ नाहीं मानूं येत वांजटाचे बोल । कोरडेच फोल चवी नाहीं ॥ २ ॥ तरुवरा आधीं कोठें आहे फळ । चावटा बरळ म्हणा त्यासी ॥ ३ ॥ तुका म्हणे किती ठकलीं तांतडी । गव्हीं नाहीं गोडी मांडे पुऱ्या ॥ ४ ॥ [३१३०]

झाली हरिकथा रंग वोसरला । उचितासी आला पांडुरंग ॥ १ ॥ वांटितो हें प्रेम उचिताचा दाता । घेई रे तूं आतां धणीवरि ॥ २ ॥ प्रेम देऊनियां अवघीं सुखी केलीं । जीं होतीं रंगलीं विठ्ठलीं तीं ॥ ३ ॥ तुकें हें दुर्बळ देखियेलें संतीं । म्हणउनि पुढती आणियेलें ॥ ४ ॥ [३१३१]

मला कां बरें कोणी असें म्हणत नाहीं, कीं पंढरीची विठाबाई आई तुला बोलावीत आहे, त्वरेनें चल १. असें जर कोणी म्हणालें तर माझ्या चित्ताचें समाधान होऊन मागील सर्व जन्मांतरींचें दुःख नाहींसें होईल २. तुकाराम महाराज म्हणतात, विठाबाई माझी माउली आहे. ती स्नेहभरित होऊन मला प्रेमाचा पान्हा पाजील ३. [३१२७]

वेदांनीं अगणित वर्णन केलें आहे (अनेक विषय सांगितले आहेत), त्यांत शोध करून हाच मुख्य अर्थ निघाला आहे १. तो असा, कीं विठोबारायाला शरण जाऊन निजनिष्ठेनें त्याचें नाम घ्यावें २. सर्व शास्त्रांचा विचार होऊन अखेरीस निश्चयानें हाच सारांश ठरविला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अठरा पुराणांनीं हाच सिद्धांत केला ४. [३१२८]

सर्व जनांस मायेनें मारलें आहे, पण अंगावर त्याचा एकहि व्रण नाहीं आणि विचार करून पाहिलें असतां तत्संबंधी दुःखानें शरीर जळत आहे तें लेशमात्र रिकामें नाहीं १. त्या मायेच्या हातून सुटका होण्यासारखा काळ कधीं प्राप्त होत नाहीं व तिचें वर्णन करावें तर वाचा वेडावली आहे २. त्या ठिकाणीं कोणाहि सोडविणाराचा लाग लागत नाहीं व त्या मायेस धरावें तर तिचा माग [पत्ता] लागत नाहीं ३. तिच्या भयानें लोक अंगास राख लावून हिंडतात तरी त्यांची ती फजिती करीत आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, ती माया देवास हांक मारूं देत नाहीं; स्त्री-पुत्रादिकांचा सोस तिनें लोकांच्या पाठीमागें लावला आहे ५. [३१२९]

उफराट्या वागणुकीनें (चुलींत तांदूळ टाकून व पातेल्यांत विस्तव घालून) पाकसिद्धि होत नाहीं, म्हणून जी नीति (स्वयंपाकाची पद्धत) सांगितली आहे ती केली पाहिजे १. त्याप्रमाणें, अंतरांत जिव्हाळा नसून कोरडें फोलकट बोलणें बोललें असतां त्यास गोडी नसते व तें कोणास मानलें जात नाहीं २. झाड लावल्याच्या आधीं फळ कोठून येईल? जो कोणी फळ मिळतें (ब्रह्मसाक्षात्कार न होतां मनुष्य मुक्त होतो) असें म्हणतो त्यास चावट व बरळणारा म्हणावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशी त्वरा करून किती एक लोक ठकले; कमाईनें मांडे, पुऱ्या वगैरे पदार्थ केल्यास नुसत्या गव्हाचेच होतात; पण हे पदार्थ न करितां गव्हाच्या ठिकाणीं आपोआप त्यांची गोडी कशी येईल? ४. [३१३०]

संतांनीं केलेली हरीची कथा झाली. कथेचा रंग ओसरला. पांडुरंग हा योग्य दान (प्रसाद) देण्यास आला आहे १. तो दाता योग्य परमार्थविषयींचें प्रेम वांटीत आहे. अरे, आतां तूं पोटभर घे २. जीं विठ्ठलस्वरूपीं रंगलीं होतीं त्यांना प्रेमाची देणगी देऊन तीं सर्व सुखी केलीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांनीं मला दुर्बळ पाहिलें म्हणून मला पुन्हां पांडुरंगापुढें घेऊन आले व प्रसाद देवविला ४. [३१३१]

भय नाहीं भेव। अनुतापी नव्हतां जीव ॥ १ ॥ जेथें देवाची तळमळ। तेथें काशाचा विटाळ ॥ २ ॥ उच्चारितां दोष । नाहीं उरों देत लेश ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्त । होय आवडी मिश्रित ॥ ४ ॥ [३१३२]

ध्यानीं ध्यातां पंढरिराया। मनासहित पालटे काया ॥ १ ॥ येथें बोला कैंची उरी। माझें मीपण झाला हरि ॥ २ ॥ चित्तचैतन्यीं पडतां मिठी। दिसे हरिरूप अवघी सृष्टि ॥ ३ ॥ तुका म्हणे सांगों काय। एकाएकीं वृत्ति हरिमय ॥ ४ ॥ [३१३३]

देव तिळीं आला। गोडें गोड जीव धाला ॥ १ ॥ साधला हा पर्वकाळ। गेला अंतरींचा मळ ॥ २ ॥ पापपुण्य गेलें। एका स्नानेंचि खुंटलें ॥ ३ ॥ तुका म्हणे वाणी शुद्ध जनार्दन जनीं ॥ ४ ॥ [३१३४]

काय उणें मज पांडुरंगा पायीं। रिद्धिसिद्धि ठायीं ओळंगती ॥ १ ॥ कोण पाहे सुखा नासिवंताकडे। तृष्णेचें बापुडें नव्हों आम्ही ॥ २ ॥ स्वर्गसुखें आम्हीं केली पावटणी। पापपुण्यें दोन्ही उलंडिलीं(उडविलीं) ॥ ३ ॥ तुका म्हणे घरीं आणिलें वैकुंठ। वसविली पेठ वैष्णवांची ॥ ४ ॥ [३१३५]

अर्भकाचे साठीं। पंतें हातीं धरिली पाटी ॥ १ ॥ तैसे संत जगीं। क्रिया करुनी दाविती अंगीं ॥ २ ॥ बालकाचे चाली। माता जाणुनि पाउल घाली ॥ ३ ॥ तुका म्हणे नाव। जनासाठीं उदकीं ठाव ॥ ४ ॥ [३१३६]

सारासार विचार करा उठाउठी। नाम धरा कंठीं विठोबाचें ॥ १ ॥ तयाच्या चिंतनें निरसेल संकट। तराल दुर्घट भवसिंधु ॥ २ ॥ जन्मोनियां कुळीं वाचे स्मरे राम। धरी हाचि नेम अहर्निशीं ॥ ३ ॥ तुका म्हणे कोटी कुळें तीं पुनीत। भावें गातां गीत विठोबाचें ॥ ४ ॥ [३१३७]

मी नामसंकीर्तन करतों म्हणून जीवास अनुताप न होतां भयापासून तो सुटला. १. जेथें देवाविषयीं तळमळ आहे तेथें पापाचा विटाळ कशाचा? २. तें नाम दोषाचा उच्चार करण्याला लेशदेखील राहूं देत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें चित्त श्रीहरीच्या आवडीनें मिश्रित झालें आहे [श्रीहरीची आवड आहे] ४. [३१३२]

पंढरीनाथाचें रूप ध्यानामध्यें आणून ध्यान केलें असतां ध्यात्याची–ध्यान करणाऱ्याची मनासहवर्तमान काया पालटते [ध्याता हरिरूप होतो] १. त्या ठिकाणीं शब्द बोलण्यास कोठें जागा आहे ? माझें व मीपणा हें सर्व कांहीं हरिच झाला आहे २. चित्ताचा व चैतन्यरूप हरीचा योग झाला, कीं सर्व जग हरिरूप दिसूं लागतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मी काय सांगूं! एकदम सर्व हरिस्वरूपमय होतें ४. [३१३३]

आज मकरसंक्रांतीच्या पर्वकाळीं देव तिळांत आला, असा देव अनुकूल झाल्यामुळें अशा ह्या चांगल्या योगानें चांगला जीव तृप्त झाला आहे १. अशा प्रकारचा हा पर्वकाल प्राप्त झाल्यामुळें अंतःकरणांतील पापमल नाहींसा झाला आहे २. ह्या ठिकाणीं एक स्नान केल्यानें पापपुण्य नाहींसें झालें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां वाचा ही जनांमधल्या शुद्ध जनार्दनास (जनीं जनार्दनास) वर्णीत आहे (सर्वांशीं शुद्ध व गोड बोलत आहे) ४. [३१३४]

मला पांडुरंगाच्या पायीं कोणती गोष्ट उणी आहे ? त्या ठिकाणीं ऋद्धि [ऐश्वर्य] व अष्टसिद्धि दास्यत्व करीत आहेत १. अशा ह्या नाशिवंत सुखाकडे कोणी पाहावें ? आम्हीं आशातृष्णेच्या योगानें दीन झालेलों नाहीं २. त्रैलोक्यांतील सर्व सुखांची आम्हीं पायरी केली व पाप आणि पुण्य या दोन्हींचें उलंघन केलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही आपल्या हृदयरूपी घरामध्यें श्रीहरीस आणिलें व वैष्णवांच्या पेठेची बाजारांत वसाहत केली ४. [३१३५]

मुलाकरितां मास्तर (पंतोजी, शिक्षक) हातामध्यें पाटी घेऊन धडा लिहितो १. तसे संत हे जगामध्यें क्रिया करून अज्ञानी जीवांना परमार्थ दाखवितात २. लहान मुलाच्या चालण्याप्रमाणेंच आई हळूहळू चालते ३. तुकाराम महाराज म्हणतात, लोकांना तारून नेण्याकरितांच पाण्यावर नौका आहे ४. [३१३६]

सारासार विचार करून मोठ्या त्वरेनें विठोबाचें नांव तुम्हीं कंठामध्यें धारण करा १. त्याच्या चिंतनानें संसार-संकट नाहींसें होऊन तुम्ही दुस्तर भवसिंधु तरून जाल २. ज्या कुळामध्यें जन्म घेऊन वाचेनें नामस्मरण करतो आणि रात्रंदिवस श्रीहरीच्या चिंतनाचाच नियम करतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशीं कोट्यावधि कुळें, विठोबाचें नाम मोठ्या श्रद्धेनें घेतलें तर, पुनीत होतात ४. [३१३७]

द्रव्य घेऊनियां कथा जरी करीं। तरी भंगो हरी देह माझा ॥ १ ॥ माझी कथा करा ऐसें म्हणें कोणा। तरी नारायणा जिव्हा झडो ॥ २ ॥ साह्य तूं झालासी काय उणें तूपें। आणीक भूतांपें काय मागों ॥ ३ ॥ तुका म्हणे सर्व सिद्धि तुझे पायीं। तूं माझा गोसावी पांडुरंगा ॥ ४ ॥ [३१३८]

जरि हा हो कृपा करिल नारायण। तरी हेंचि ज्ञान ब्रह्म होय ॥ १ ॥ कोठोनियां कांहीं न लगे आणावें। न लगे कोठें जावें तरावया ॥ २ ॥ जरी देव कांहीं धरिल पैं चित्तीं। तरि हेचि होती दिव्य चक्षु ॥ ३ ॥ तुका म्हणे जरी देव दावील आपणा। तरी जीवपणा ठाव नाहीं ॥ ४ ॥ [३१३९]

रात्री दिवस (रात्रंदिवस) आम्हां युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन ॥ १ ॥ जीवाही आगोज पडती आघात। येऊनियां नित्य नित्य वारूं ॥ २ ॥ तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळें। अवघीयांचें काळें केलें तोंड ॥ ३ ॥ [३१४०]

होईन खडे गोटे। चरणरज साने मोटे। पंढरीचे वाटे। संतचरणीं लागेन ॥ १ ॥ आणीक दुजें कांहीं। मी मागें न तुजपाशीं। आठवितां सुख। भय नास नाहीं ज्यासी ॥ २ ॥ होईन मोचे वाहणा। पायीं सकळां संतजनां। मांजर सुकर सुणा। जवळी शेष घ्यावया ॥ ३ ॥ सांडोवा पायरी। वोहळ बावी गंगातीरीं। होईन तयावरी। संतसज्जन चालती ॥ ४ ॥ लागें संतांपायीं। ऐसा ठेवीं भलते ठायीं। तुका म्हणे देईं। धाक नाहीं जन्माचा ॥ ५ ॥ [३१४१]

कासयासी व्हावें आम्ही जीवन्मुक्त (जीतांचि मुक्त)। सांडुनिया थीत प्रेमसुख ॥ १ ॥ वैष्णवांचा दास झाला नारायण। काय त्या मिळोन असों सुखी (असे काम) ॥ २ ॥ काय त्या गांठीचें पडलें सुटोन। उगेचि बैसोन धीर धरूं ॥ ३ ॥ सुख आम्हांसाठीं केलें हें निर्माण। निर्दैव तो

हे हरि, द्रव्य घेऊन श्रीहरीची कथा जर मी करीन तर माझा देह त्याच वेळेस नष्ट होवो १. हे नारायणा, माझी तुम्ही कथा करा असें जर मी कोणाला म्हटलें तर माझी जिव्हा त्याच वेळीं झडून जावो २. हे देवा, तूं साहाय्य झाल्यावर तुजपाशीं काय कमी आहे! मग अन्य कोणाजवळ काय मागावयाचें आहे! ३ तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, तुझ्यापायीं सर्व सिद्धि आहे, आणि तूं माझा स्वामी आहेस ४. [३१३८]

जर हा नारायण कृपा करील तर हें प्रापंचिक ज्ञानच ब्रह्म होईल १. दुसरें कोठून कांहीं आणावयास नको व आपला तरणोपाय होण्यास कोठें जावयास नको २. जर देव कृपा करण्याविषयीं चित्तामध्यें आणील तर हे आपले असणारे चक्षुच दिव्य होतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर देवानेंच आपलें रूप दाखविलें तर जीवदशेस राहाण्यास ठिकाण राहाणार नाहीं ४. [३१३९]

रात्रंदिवस आंत मन व बाहेर उपद्रवी जग ह्यांच्याशीं आम्हांला युद्ध करण्याचा प्रसंग आहे १. (मनापासून पापांचे आणि जगापासून छळांचे) जीवावर अकस्मात् आघात होतात, त्यांचें निरंतर निवारण करावें लागतें २. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझ्या नामाच्या साह्यानें सर्वांचें तोंड काळें करून टाकलें ३. [३१४०]

पंढरीचे मार्गांत मी खडे गोटे होईन अथवा पायाला लागेल अशी बारीक धूळ होईन आणि जाणाऱ्यायेणाऱ्या संतांच्या पायांस लागेन १. हे देवा, अन्य कांहीं मी तुझ्याजवळ मागत नाहीं, कारण त्या संतांचा आठव केला असतां सुख प्राप्त होतें व भय आणि नाश हीं मला कांहीं होत नाहींत २. सर्व संतजनांच्या पायांतील मोचे, वहाणा मी होईन अथवा मांजर, डुकर, कुत्रें होऊन त्यांचें उच्छिष्ट-शेष खाण्याकरितां मी त्यांचे जवळ राहीन. ३. पाणी सांडण्याची पायरी होईन अगर ओढा, विहीर गंगेच्या तटाकाला होईन म्हणजे त्यांचेवरून संत सज्जन चालतील ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, जेणेंकरून मला संतांचे चरण लागतील अशा पाहिजे त्या स्थितींत तूं मला ठेव, इतकेंच तुझ्याजवळ माझें मागणें आहे, म्हणजे मला जन्ममृत्यूचा धाक नाहीं ५. [३१४१]

आम्हीं असलेल्या भक्तिसुखाच्या प्रेमाचा त्याग करून कशाकरितां जीवन्मुक्त व्हावें? १. नारायण हा वैष्णवजनांचा दास झाला आहे, तर त्याच्याशीं मिळून असण्यामध्यें काय आहे? २. आमच्या पदरचें काय सुटून पडलें आहे म्हणून उगीच बसून धीर धरूं? ३, देवांनीं भक्तिसुख आमच्याकरितां निर्माण केलें आहे; त्या भक्तिसुखाला जो कोणी

कोण हाणे लाता ॥ ४ ॥ तुका म्हणे मज न लगे सायुज्यता । राहेन या संतां समागमें ॥ ५ ॥ [३१४२]

आवडे पंढरी भीमा पांडुरंग । चंद्रभागा लिंग पुंडलीक ॥ १ ॥ कामधेनु कल्पतरु चिंतामणी । आवडीची धणी पुरवीती ॥ २ ॥ तुका म्हणे जीवा थोर झालें सुख । नाठवे हे भूक तान कांहीं ॥ ३ ॥ [३१४३]

प्रपंच परमार्थ संपादीन दोन्ही । एकही निदानीं न घडे त्यासी ॥ १ ॥ दोहीं पेवांवरी ठेवूं जातां हात । होय अपघात शरीराचा ॥ २ ॥ तुका म्हणे तया दोहींकडे धका । शेवटीं तो नरकामाजी पडे ॥ ३ ॥ [३१४४]

आम्हां भय धाक कोणाचा रे पाहें । काळ मशक काय मानव हे ॥ १ ॥ आम्हांसी ते काय चिंता या पोटाची । माउली आमुची पांडुरंग ॥ २ ॥ काय करावी हे कोणाची मान्यता । करितां अनंता कोण वारी ॥ ३ ॥ नाहीं शीण आम्हां झालें कवतुक । पुनीत हे लोक करावया ॥ ४ ॥ तुका म्हणे खातों आनंदाचे लाडू । नका चरफडूं घ्या रे तुम्ही ॥ ५ ॥ [३१४५]

तांबियाचें नाणें न चले खऱ्या मोलें । जरी हिंडविलें देशोदेशीं ॥ १ ॥ करणीचें कांहीं न मने सज्जना । यावें लागे मना वृद्धांचिया ॥ २ ॥ हिरियासारिखा दिसे शिरगोळा । पारखी ते डोळां न पाहाती ॥ ३ ॥ देऊनियां भिंग कमाविलें मोतीं । पारखिया हातीं घेतां न ये ॥ ४ ॥ तुका म्हणे काय नटोनियां व्यर्थ । आपुलें हें चित्त आपणा ग्वाही ॥ ५ ॥ [३१४६]

चित्ता मिळे त्याचा संग रुचिकर । क्षोभवितें दूर तेंचि भलें ॥ १ ॥ ऐसी परंपरा आलीसे चालत ।

लाथा मारील तो निर्दयहृदयी होय ४. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, मला सायुज्य मुक्ति नको. मी संतांचे समागमांत आनंदानें राहीन ५. [३१४२]

आम्हांला पंढरी व भीमानदी आणि पांडुरंग व चंद्रभागा आणि शंकराचें लिंग व पुंडलीक हीं आवडत आहेत १. कामधेनु, कल्पतरु आणि चिंतामणि हीं ज्याला जी आवड आहे ती पूर्ण करितात त्याप्रमाणें पंढरी, भीमा आणि पांडुरंग हीं सर्वांच्या इच्छा पूर्ण करतात २. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या जीवाला अतिशय सुख झालें व त्यायोगेंकरून क्षुधेचा व तृषेचा कांहीं आठव राहिला नाहीं ३. [३१४३]

मी प्रपंचहि करीन व परमार्थहि करीन असें कोणी म्हणेल तर अखेरीस त्याच्याकडून एकहि होणार नाहीं १. दोन्ही पेवांवर (डगरींवर) हात ठेवावयास गेलें तर तेथें शरीराला अपघात होतो २. तुकाराम महाराज म्हणतात, अशा ह्या साधकाला दोन्हींकडे धक्का बसून अखेरीस तो नरकांत पडतो (प्रपंच हा प्रवृत्तिरूप व परमार्थ हा निवृत्तिरूप असल्यामुळें परस्परभिन्न आहेत. प्रपंचाचा अधिकारी राजस व तामस आहे, तर परमार्थाचा अधिकारी अत्यंत सात्त्विक आहे. त्यामुळें दोघांच्या नादीं लागणें शक्य नाहीं व परिणामीं कांहींच हातीं लागत नाहीं) ३. [३१४४]

हे देवा, आम्हां हरिभक्तांना भय व धाक हा कोणाचा आहे बरें! पाहा, काळ हा आमच्यापुढें चिलटाप्रमाणें आहे, मग सामान्य माणसाची काय कथा? १. आम्हांला पोट भरण्याची चिंता काय करावयाची आहे, कारण आमची आई पांडुरंग आहे २. दुसऱ्या कोणाकडून होणारी मानमान्यता काय करावयाची आहे? श्रीहरीला आम्हीं मोठें मानलें किंवा श्रीहरीनें आम्हांला मोठें केलें तर त्याचें निवारण कोण करील? ३. आम्हांला कोणत्याहि तऱ्हेचा श्रम नाहीं. लोकांना पवित्र करणें हें केवळ आमच्या कौतुकाची क्रीडा आहे. ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही आनंदाचे लाडू खात आहों; त्याबद्दल कोणीहि (विशेष) न तडफडतां त्यांचें सेवन तुम्ही करा ५. [३१४५]

तांब्याचें नाणें खऱ्या चांदीच्या नाण्याच्या मोलानें चालणार नाहीं; जरी तें अनेक देशोदेशीं हिंडविलें तरी तें खोटेंच १. कोणत्याहि कृतीचें विष सज्जनांना मानत नाहीं, कारण जे ज्ञानवृद्ध आहेत त्यांच्या मनाला ती गोष्ट आली पाहिजे २. नदींतील गारा हिऱ्यासारख्या चमकतात, पण जे खरोखर परीक्षक सराफ आहेत ते त्याकडे डोळ्यानें देखील पाहात नाहींत ३. कांच कमावून त्याचें मोतीं केलें तरी परीक्षक त्याला हातीं घेणार नाहींत ४. तुकाराम महाराज म्हणतात, व्यर्थ नटून काय करावयाचें आहे? आपलें चित्त आपल्याकडून होणाऱ्या परमार्थाच्या खऱ्याखोट्याविषयीं आपल्या ठिकाणीं साक्षी आहे ५. [३१४६]

ज्याची संगति करणें चित्ताला प्रिय झालें आहे, त्याची संगति करणें चांगलें. ज्याच्या योगानें चित्ताला क्षोभ होतो

भलत्याची नीत त्यागावरी ॥ २ ॥ हो कां पिता पुत्र बंधु कोणी तेही । विजाति संग्रहीं धरूं नये ॥ ३ ॥ तुका म्हणे सत्य पाळावें वचन । अन्यथा आपण करूं नये ॥ ४ ॥ [३१४७]

आपुली कसोटी शुद्ध राखी कारण । आगीनें भूषण अधिक पुटा ॥ १ ॥ नाहीं कोणासवें बोलणें लागत । निश्चिंतीनें चित्त समाधान ॥ २ ॥ लपविलें तेंही ढेकरें उमटे ॥ खोटियाचें खोटें उर फोडी ॥ ३ ॥ तुका म्हणे निंदा स्तुति दोन्ही वाव । आपुलाला भाव फळा येतो ॥ ४ ॥ [३१४८]

आणिकांच्या घातें मानितां संतोष । सुख दुःख दोष अंगीं लागे ॥ १ ॥ ऐसे मनीं वाहूं नये ते संकल्प । करूं नये पाप भांडवल ॥ २ ॥ किल्मिषाची चित्तीं राहातां कांचणी । अनीत जडोनी (अंगीं तें जडोनी) ठाव जाळी ॥ ३ ॥ तुका म्हणे कोपें घडे पुण्यक्षय । होणार तें होय प्रारब्धेंची ॥ ४ ॥ [३१४९]

अज्ञानाची भक्ति इच्छिती संपत्ती । तयाचिये चित्तीं बोध कैंचा ॥ १ ॥ अज्ञानाची पूजा कामिक भावना । तयाचिया ध्याना देव कैंचा ॥ २ ॥ अज्ञानाचें कर्म फळीं ठेवी मन । निष्काम साधन तया कैंचें ॥ ३ ॥ अज्ञानाचें ज्ञान विषयावरी ध्यान । ब्रह्म सनासन तया कैंचें ॥ ४ ॥ तुका म्हणे जळो ऐशियांचें तोंड । अज्ञानाचें बंड वाढविती ॥ ५ ॥ [३१५०]

गुळें माखोनियां दगड ठेविला । वर दिसे भला लोकाचारीं ॥ १ ॥ अंतरीं विषयाचें लागलें पैं पिसें । बाहिरल्या वेषें भुलवी लोकां ॥ २ ॥ ऐशिया दांभिका कैंची हरिसेवा । नेणेचि सद्भावा कोणे काळीं ॥ ३ ॥ तुका म्हणे येणें कैसा होय संत । विटाळलें चित्त कामक्रोधें ॥ ४ ॥ [३१५१]

त्याच्यापासून दूर राहाणें चांगलें १. अशा प्रकारची पूर्वपरंपरा चालत आली आहे. जें नको आहे त्याच्या त्यागाविषयीं सामान्य माणसाचीहि प्रवृत्ति होते २. मग तो पिता असो, बंधु असो, अगर कोणीहि असो, जो आपल्यास प्रतिकूल आहे त्याचा संबंध करूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपण दिलेल्या खऱ्या शब्दाचें रक्षण करावें आणि त्याविषयीं अन्यथा वर्तन करूं नये ४. [३१४७]

कोणाचीहि पारख करण्याची आपली कसोटी चांगली ठेवावी, कारण सोन्यास पुटें देऊन अग्नीची आंच दिली असतां तें अधिक सुशोभित होतें १. कोणाच्या जवळ बोलण्याची जरूर लागत नाहीं; निष्काळजी होऊन चित्त समाधानाला पावतें २. आपण जेवलों असतांना जेवलों नाहीं, असें बोलून खरी स्थिति लपवावयास लागलों तर, ती ढेंकर येण्यानें प्रगट होते, म्हणून खोट्या कृत्यानें खोटी ऊरफोड करावी लागते ३. तुकाराम महाराज म्हणतात, निंदा व स्तुति ह्या दोन्हीहि व्यर्थ आहेत; जसा ज्याचा अंतर्भाव (मनाचा भाव) असतो तसा त्याला तो फलद्रूप होतो ४. [३१४८]

दुसऱ्याचा घात होण्यानें संतोष मानला असतां सुखदुःख व दोष हे अंगीं लागतात १. म्हणून अशा प्रकारचे संकल्प मनांत आणूं नये व आपल्याजवळ निषिद्ध कर्मांचें भांडवल जमवूं नये २. पातकाची चित्तामध्यें जर घासाघास (विचारांचा संघर्ष) होत असेल, तर अनीति अंगीं जडली जाऊन ती पुण्याचा ठावठिकाण जाळून टाकील (किंवा, तें पातक अंगीं जडलें जाऊन पुण्याचा ठावठिकाण जाळून टाकील) ३. तुकाराम महाराज म्हणतात, राग येण्यानें पुण्यक्षय होतो; जें व्हावयाचें आहे तें प्रारब्धानें होतेंच ४. [३१४९]

अज्ञानी जीव भक्ति करूं लागले तर धनधान्यादि संपत्तीची इच्छा करितात. त्यांच्या चित्तांत श्रीहरिस्वरूपाविषयीं बोध कसला आला आहे ? १. अज्ञान्याच्या देवपूजेमध्यें कामनिक भावना असते, त्याच्या ध्यानांत देव कसला येतो ? २. अज्ञानी हे कर्मफळाच्या ठिकाणीं मन ठेवून कर्म करतात, अशा ह्या अज्ञान्यांस निष्काम साधन कसें घडेल ? ३. विषयाविषयीं चित्तामध्यें ध्यान ठेवणें हेंच अज्ञान्यांचें ज्ञान आहे; त्याला सनातन ब्रह्माचें चिंतन कसलें आलें आहे ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशांचें तोंड जळो ! ते अज्ञानाचेंच बंड वाढवीत जातात ५. [३१५०]

दगड गुळानें वरच्या बाजूस सारवून ठेवला तर लोकांना तो वरच्या दृष्टीनें गुळच आहे असें दिसतें १. त्याप्रमाणें अंतःकरणांत विषयाचें वेड लागलें आहे आणि बाहेर साधुपणाचा वेष घेऊन लोकांना फसवीत आहे २. अशा ह्या दांभिक भक्तांना हरीची सेवा कसली ? ते कोणत्याहि वेळेस पारमार्थिक सद्भावना जाणत नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचें चित्त कामक्रोधादि दोषानें विटाळलें आहे, तो अशा ह्या स्थितीनें (वरवरच्या वेषानें) संत कसा होईल ? ४. [३१५१]

संतांचा पढीयावो कैशापरि लाहो। नामाचा आठवो कैसा राहे ॥ १ ॥ हेचि थोर चिंता लागली मनासी। निजतां निद्रेसी न लगे डोळा ॥ २ ॥ जेवितां जेवणीं न लगे गोड धड। वाटतें काबाड विषयसुख ॥ ३ ॥ ऐसिया संकटीं पावें कृपानिधि। लावीं संतपदीं प्रेमभावें ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्ही नेणों कांहीं हित। तुजविण अनाथ पांडुरंगा ॥ ५ ॥ [३१५२]

पंढरीचा वास धन्य तेचि प्राणी। अमृताची वाणी दिव्य देह ॥ १ ॥ मूढ मतिहीन दुष्ट अविचारी। ते होती पंढरीं दयारूप ॥ २ ॥ शांति क्षमा अंगीं विरक्ती सकळ। नैराश्य निर्मळ नारी नर ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं वर्ण अभिमान। अवघेचि जीवनमुक्त लोक ॥ ४ ॥ [३१५३]

देखीचें तें ज्ञान करावें तें काई। अनुभव नाहीं आपणासी ॥ १ ॥ इंद्रियांचे गोडी ठकलीं बहुतें। सोडितां मागुतें आवरेना ॥ २ ॥ युक्तीचा आहार नीतीचा वेव्हार। वैराग्य तें सार तरावया ॥ ३ । नाव नावलितां घाला घाली वारा। तैसा तो पसारा अहंतेचा ॥ ४ ॥ तुका म्हणे बुद्धि आपुले अधीन। करी नारायण आतुडे तो ॥ ५ ॥ [३१५४]

नर नारी बाळें अवघा नारायण। ऐसें माझें मन करीं देवा ॥ १ ॥ न यो काम क्रोध द्वेष निंदा द्वंद्व। अवघा गोविंद निःसंदेह ॥ २ ॥ असावें म्यां सदा विषयीं विरक्त। काया वाचा चित्त तुझे पायीं ॥ ३ ॥ करोनियां साह्य पुरवीं मनोरथ। व्हावें कृपावंत तुका म्हणे ॥ ४ ॥ [३१५५]

जगीं कीर्ति व्हावी। म्हणोनि झालासी गोसावी ॥ १ ॥ बहुत केलें पाठांतर। वर्म राहिलेंसे (राहिलें तें) दूर ॥ २ ॥ चित्तीं नाहीं अनुताप। लटिकें भगवें स्वरूप ॥ ३ ॥ तुका म्हणे सिंदळीच्या। व्यर्थ श्रमविली वाचा ॥ ४ ॥ [३१५६]

संताविषयींची प्रीति कशी प्राप्त होईल व श्रीहरीच्या नामाचा आठव चित्तांत कसा राहील ? १. हीच मोठी काळजी मनाला लागली आहे, त्या योगानें अंथरुणावर निजलें तरी झोंप लागत नाहीं २. जेवावयास बसलें तर त्या वेळीं गोड धोड कांहीं भासत नाहीं. यच्चयावत् विषयसुख हें असार वाटत आहे ३. हे कृपानिधे देवा, अशा ह्या संकटसमयीं आम्हांला तू प्राप्त हो व आमचें प्रेम संतांच्या चरणांकडे लाव ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, आम्ही आपलें हित कांहीं जाणत नाहीं; आम्ही तुझ्यावांचून केवळ दीन झालों आहोंत ५. [३१५२]

ज्यांना पंढरीवास घडत आहे, ते प्राणी धन्य होत; त्यांची वाणी अमृततुल्य असून देह दिव्य आहे १. मूढ, नीच जातीचे, दुष्ट स्वभावाचे, अविचारी हे सर्व पंढरीमध्यें राहिल्यानें दयारूप होतात २. शांति, क्षमा, विरक्ति आदिकरून सर्व कांहीं त्यांच्या अंगीं येतात व तेथील स्त्रीपुरुष निराशेनें निःस्पृहपणानें अंतर्बाह्य निर्मळ झालेले असे आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे पंढरीस वास्तव्य करितात, त्यांच्यामध्यें देहाभिमान नसून ते सर्व जीवन्मुक्त आहेत ४. [३१५३]

दुसऱ्याचें पाहून ज्यानें ज्ञान मिळविलें आहे तें त्याचें देखीचें ज्ञान काय करावयाचें आहे ? कारण तसा त्याला अनुभव नाहीं १. असे हे शब्दज्ञानी इंद्रियांच्या सुखानें पुष्कळ फसले गेले. त्याविषयींचा ते त्याग करूं लागले असतां तीं त्यांना आवरत नाहींत २. म्हणून युक्ताहार करणें व नीतीनें वागणें व वैराग्यादि धारण करणें, हेंच संसारांतून तरण्याचें सार होय ३. पाण्यामध्यें नावेला आवरलें नाहीं तर वारा घात करील, तसा ज्ञानाभिमानाचा पसारा आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, जो बुद्धि आपल्या स्वाधीन ठेवील त्याला नारायण प्राप्त होईल ५. [३१५४]

देवा, पुरुष, स्त्रिया व मुलें हीं सर्व कांहीं नारायण आहेत, असें माझ्या मनास भासावें, असें तूं कांहीं कर १. माझ्या हृदयांत काम, क्रोध, द्वेष, निंदा, द्वंद्व हे कांहीं विकार येऊं नयेत; सर्व गोविंद आहे असें निःसंशय भासावें २. मी सदा सर्व काळ विषयांच्या ठिकाणीं विरक्त असावें व माझें काया, वाचा, मन तुझ्या पायीं राहावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्ही कृपावंत व्हा आणि ह्याविषयीं मला साहाय्य होऊन माझे मनोरथ पूर्ण करा ४. [३१५५]

लोकांमध्यें आपली कीर्ति व्हावी म्हणून तूं गोसावी (हरिदास) झाला आहेस १. पुष्कळ पाठांतर केलेंस, परंतु श्रीहरीच्या प्राप्तीचें साधन दूरच राहिलें आहे २. चित्तामध्यें विषयांसंबंधाचा अनुताप नाहीं व खोटींच भगवीं वस्त्रें धारण केलीं आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे सिंदळीच्या, तूं आपल्या वाणीस व्यर्थ श्रम दिलास ४. [३१५६]

प्राक्तनाच्या योगें आळशावरी गंगा । स्नान काय जगा करूं नये ॥ १ ॥ उभी कामधेनु मांगाचे अंगणीं । तिसी काय ब्राह्मणीं वंदूं नये ॥ २ ॥ कोढियाचे हातें परिसें होय सोनें । अपवित्र म्हणोन घेवूं नये ॥ ३ ॥ यातिहीनि झाला गांवींचा मोकासी । त्याच्या वचनासी मानूं नये ॥ ४ ॥ भावारूढ तुका मुद्रा विठोबाची । न मनी तयांचीं तोंडें काळीं ॥ ५ ॥ [३१५७]

बोलिलों उत्कर्षें । प्रेमरसें दास्यत्वें ॥ १ ॥ साच करिता नारायण । जया शरण गेलों तो ॥ २ ॥ समर्थ तो आहे ऐसा । धरिली इच्छा पुरवी तो ॥ ३ ॥ तुका म्हणे लडिवाळाचें । द्यावें साचें करूनियां ॥ ४ ॥ [३१५८]

विचा केला ठोबा । म्हणोनि नांव तो विठोबा ॥ १ ॥ कां रे नेणां त्याचें नांव । काय वेदासि नाहीं ठावें ॥ २ ॥ शेष स्तुती प्रवर्तला । जिव्हा चिरूनि पलंग झाला ॥ ३ ॥ तुका म्हणे सत्ता । ज्याची काळाचिये माथां ॥ ४ ॥ [३१५९]

चोरासी चांदणें वेश्येसी सेजार । परिसेंसी खापर काय होय ॥ १ ॥ दूधाचे आधणीं वैरिले पाषाण । कदा काळीं जाण पाक नव्हे ॥ २ ॥ तुका म्हणे जरि पूर्वपुण्यें सिद्धि । तरिच राहे बुद्धि संतसंगीं ॥ ३ ॥ [३१६०]

उदंड देखिले उदंड ऐकिले । उदंड वर्णिले क्षेत्रमहिमे ॥ १ ॥ परी ऐसी चंद्रभागा ऐसें भीमातीर । ऐसा विटेवर देव कोठें ॥ २ ॥ ऐसे संतजन ऐसे हरिदास । ऐसा नामघोष सांगा कोठें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां अनाथां कारणें । पंढरी निर्माण केली देवें ॥ ४ ॥ [३१६१]

प्रारब्धाच्या योगानें आळशावर गंगा आली, तर तींत जगानें स्नान करूं नये काय? १. मांगाच्या आंगणांत कामधेनु उभी आहे, तरी तिला ब्राह्मणांनीं नमस्कार करूं नये काय? २. ज्याच्या हाताला कुष्ठ झालें आहे, त्यानें त्या हातानें परीस लोखंडाला लावून सोनें केलें तर तें अपवित्र म्हणून घेऊं नये काय? ३. गांवचा मालक कमी जातीचा असला, तर त्याची आज्ञा मानूं नये काय? ४. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरिविषयक भावारूढ होऊन मीं विठोबाची मुद्रा धारण केली आहे तिला जे न मानितील त्यांचीं तोंडें काळीं होतील ५. [३१५७]

मोठ्या प्रेमरसानें दास्यत्वाच्या नात्यानें मी बोललों १. ज्याला मी शरण गेलों आहें, तो नारायणच खरें करणारा आहे २. जो कोणी जशी इच्छा करील तशी तो त्यांची इच्छा पूर्ण करतो, असा तो समर्थ आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी नारायणाचे लडिवाळ आहेत त्यांचें तो खरें करतो ४. [३१५८]

वि (विद्) म्हणजे ज्ञान, त्याचा सोट [सगुण आकार] केला म्हणून त्या देवाला विठोबा असें म्हणतात, किंवा, वि म्हणजे भेद, ठोबा म्हणजे नाश, जीव-ब्रह्मांतील भेदाचा नाश करतो तो विठोबा, किंवा, वि म्हणजे गरुड, ठोबा म्हणजे आधार, गरुड हें वाहन ज्याचें तो भगवान विष्णु म्हणजेच विठोबा होय १. अरे तुम्ही त्याचें सार्थ नांव कां जाणत नाहीं? तें वेदाला ठाऊक नाहीं काय? २. त्या श्रीहरीची स्तुति करण्याकरितां शेष प्रवृत्त झाला, परंतु स्तुति करतां करतां जिव्हा फाटल्यामुळें तो देवाचा निजावयाचा पलंग झाला ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याची सत्ता काळावरहि आहे (पुढें ध्रुवपद वाचावें) त्या विठोबाचें नांव कां घेत नाहीं? ४. [३१५९]

चोराला चांदणें व वेश्येस चांगला शेजार व परिसाला खापर मिळालें असतां काय उपयोग होणार आहे? त्याप्रमाणें पाप्याला संतसंगति नकोशी वाटते. १. उकळी येईतोंपर्यंत दूध तापवून त्यांत दगड घातले तर ते केव्हांहि शिजणार नाहींत २. तुकाराम महाराज म्हणतात, जर पूर्वपुण्याची सिद्धता असेल, तरच संतसंगतीकडे बुद्धीची श्रद्धा राहील ३. [३१६०]

सर्व जगतांत पुष्कळ तीर्थें पाहिलीं व ऐकलीं व क्षेत्रांचें माहात्म्यहि पुष्कळ वर्णन केलें आहे १. परंतु असें चंद्रभागा तीर्थ, अशा प्रकारचें भीमातीर व असा विटेवर देव कोठें आहे काय? २. अशा प्रकारचें हरीचें दास्यत्व करणारे संतजन व असा हरिनामाचा गजर कोणत्या ठिकाणीं आहे हें सांगा ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हां अनाथ जीवांकरितां देवानें पंढरीक्षेत्र हें उत्पन्न केलें आहे ४. [३१६१]

मंथनासाठीं धर्माधर्म। त्याचें वर्म नवनीत ॥ १ ॥ तेंचि तें घाटूं नये । आलें जाय नासूनि ॥ २ ॥ सांभाळावें वरावर। वर्म दूर न वजावें ॥ ३ ॥ तुका म्हणे धालें पोट। मग बोटा चाटणी ॥ ४ ॥ [३१६२]

न घडे मायबापा बाळकाचा घात। आपणा देखत होऊं नेदी ॥ १ ॥ कां मी मनीं चिंता वाहूं भय धाक। काय नव्हे एक करितां तुज ॥ २ ॥ वर्म जाणे त्याच्या हिताचे उपाय। तान भूक वाहे कडिये खांदीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तूं गा कृपावंता भारी। ऐसें मज हरी कळों आलें ॥ ४ ॥ [३१६३]

करावें कीर्तन। मुखें गावे हरिचे गुण ॥ १ ॥ मग कांहीं नव्हे बाधा। काम दुर्जनाची क्रोधा ॥ २ ॥ शांतिखड्ग हातीं। काळासी ते नागविती ॥ ३ ॥ तुका म्हणे दाता सखा। ऐसा अनंता सारिखा ॥ ४ ॥ [३१६४]

(काय)साधनांच्या कोटी। केल्या आटी होती त्या ॥ १ ॥ देव कृपा करी जरी। होय उजरी स्वरूपीं ॥ २ ॥ केले होती व्यर्थ श्रम। उपरम न होतां ॥ ३ ॥ तुका म्हणे कळों आलें। सर्व जालें आपरूप ॥ ४ ॥ [३१६५]

तुज काय करूं मज एक सार। अमृतसागर नाम तुझें ॥ १ ॥ काय झालें उणें आम्हां तयापोटीं। गोवितां हे कंठीं कामधेनु ॥ २ ॥ नोळखे तानुलें माय ऐसी कोण। वोरसे देखून शोक त्याचा ॥ ३ ॥ जो नाहीं देखिला याचक नयनीं। तो पावे घेउनि लज्जा दान ॥ ४ ॥ नामासाठीं प्राण सांडियेला रणीं। शूर ते भांडणीं न फिरती ॥ ५ ॥ तुका म्हणे आम्हीं गातां गीतीं भला। भेटूनि विठ्ठला काय चाड ॥ ६ ॥ [३१६६]

दह्यादिक मंथनाची खटाटोप एका लोण्याकरितां आहे १. तें लोणी ताकावर आलें असतां तें ताक पुन्हा तसेंच घुसळल्यावर तें लोणी वितळून जातें, म्हणून लोणी आल्यावर पुनः ताक घुसळूं नये २. त्याप्रमाणें देवाच्या प्राप्तीचें धर्माधर्माचें परिपालन हें मुख्य मर्म वरचेवर सांभाळावें व त्याच्यापासून दूर जाऊं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, पोटभर जेवण झाल्यावर बोटें चाटीत बसणें (व्यर्थ) (हरिप्राप्ति झाल्यानंतर धर्माधर्माचें परिपालन निरर्थक होय) ४. [३१६२]

आईबापांच्या हांतून लेंकराचा घात होऊं शकत नाहीं व त्यांच्या देखत त्याला कोणीं दुसऱ्यानें गांजलें तरी तें सहन होत नाहीं १. हे देवा, तसा तूं आमचा मायबाप असून मी आपल्या मनामध्यें काळजी, भय व धाक वागविण्याचें काय कारण आहे ? तूं जर करूं लागलास तर काय एक होणार नाहीं ? २. बालकाचें हित ज्या योगानें होईल तें मर्म (बालकाची तहानभूक) आईबाप जाणतात आणि त्याला कडेवर, खांद्यावर वागवितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे हरि, तूं फार कृपावंत आहेस असें मला निश्चयानें कळून आलें ४. [३१६३]

मुखानें हरीचे गुणवाद वर्णन करून तेंच कीर्तन करावें १. त्यायोगानें कामक्रोध ह्या दुर्जनांची बाधा कधींहि होणार नाहीं २. शांतिरूपी शस्त्र ज्याच्या हस्तगत आहे, तो कळिकाळालाहि जिंकूं शकतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अनंतासारखा दाता आपला सखा [मित्र] आहे (पुढें ध्रुवपद वाचावें) तेव्हां आपणाला कोणाचें भय आहे व काय कमी पडणार आहे ? ४. [३१६४]

कोट्यवधि साधनांची मेहनत केली तरी ती व्यर्थ होत आहे १. जर देवानें कृपा केली तर त्याच्या स्वरूपाचें ज्ञान होईल २. चित्ताच्या ठिकाणीं जर (वैराग्य) उपरति झाली नाहीं तर जे श्रम कराल ते सर्व व्यर्थ होतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर देवानें कृपा केली तर यच्चयावत् पदार्थ आपलें स्वरूप (आत्मरूप) झाले आहेत असें समजून येतें ४. [३१६५]

हे देवा, तुझें नामामृतसार एक मजपाशीं आहे तें उत्तम आहे. त्यावांचून मी तुला घेऊन काय करूं ? १. ही नामरूपी कामधेनु कंठामध्यें सांठविली असतां तिच्या पोटीं आम्हांला काय कमी आहे ? २. आपल्या तान्ह्या लेंकराला ओळखणार नाहीं अशी कोणी आई आहे काय ? तें रडलेलें पाहून ती तात्काळ स्नेहभरित होते ३. जो कोणी दाता आहे तो याचक डोळ्यानें पाहिला नाहीं तोंच दान द्यावयास तयार होतो. तो दानाविषयीं लज्जित होईल काय ? ४. जो कोणी शूर आहे, तो लढाईचे समयीं माघारा न फिरतां आपल्या नांवाकरितां त्या रणामध्यें प्राण खर्च करतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं विठोबाचे गुण गावे हेंच आम्हांला भलें आहे. ह्यावांचून त्याला भेटण्याची काय गरज आहे ? ६. [३१६६]

कृपेचे सागर हेचि साधुजन। तिहीं कृपादान केलें मज ॥ १ ॥ बोबडे वाणीचा केला अंगीकार। तेणें माझा स्थिर केला जीव ॥ २ ॥ तेणें सुखें मन स्थिर झालें ठायीं। संतीं दिला पायीं ठाव मज ॥ ३ ॥ नाभी नाभी ऐसें बोलिलें वचन। तें माझें कल्याण सर्वस्वही ॥ ४ ॥ तुका म्हणे झालों आनंदनिर्भर। नाम निरंतर घोष करूं ॥ ५ ॥ [३१६७]

भक्तीचें तें वर्म जयाचिये हातीं। तया घरीं शांति क्षमा दया ॥ १ ॥ अष्ट महासिध्दि वोळगती द्वारीं। न वजती दूरी दवडितां ॥ २ ॥ तेथें दुष्ट गुण न मिळे निःशेष। चैतन्याचा वास झाला माजी ॥ ३ ॥ संतुष्ट हें चित्त सदा सर्वकाळ। तुटली हळहळ त्रिगुणांची ॥ ४ ॥ तुका म्हणे त्याचा देव सर्व भार। चालवी कामार होऊनीयां ॥ ५ ॥ [३१६८]

साच हा विठ्ठल साच हें करणें। संत जीं वचनें बोलियेले ॥ १ ॥ साच तें स्वहित साच ते प्रचीत। साच वेदें नीत सांगितली (वेद नीत सांगितील) ॥ २ ॥ तुका म्हणे घेती साच साच भावें। लटिकें वर्म ठावें नाहीं त्यांसी ॥ ३ ॥ [३१६९]

संगें वाढे सीण संगें वाढे भजन। विविध हें जन बहू देवा ॥ १ ॥ याचिमुळें आला संगाचा कांटाळा। दिसताती डोळां नानाछंद ॥ २ ॥ एकविध भाव राहावया ठाव। नेदी हा संदेह राहों चित्तीं ॥ ३ ॥ शब्दज्ञानी हित नेणती आपुलें। आणीक देखिलें नावडे त्यां ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां एकलेंचि भलें। बैसोनि उगलें राहावें तें ॥ ५ ॥ [३१७०]

पुण्यपापा ठाव नाहीं सुखदुःखा। हानि लाभ शंका नासलिया ॥ १ ॥ जितां मरण आलें आपपर गेलें। मूळ हें छेदिलें संसाराचें ॥ २ ॥ अधिकार जात वर्णधर्मयात। ठाव नाहीं सत्यअसत्याशीं ॥ ३ ॥

संतजन हे कृपेचे समुद्र आहेत. त्यांनीं मला कृपादान दिलें आहे १. माझ्या बोबड्या शब्दांचा त्यांनीं अंगीकार केला व त्यांनीं माझा जीव त्रिविध तापांपासून शांत केला २. त्या सुखानें माझें मन एके ठिकाणीं स्थिर झालें व संतांनीं आपल्या पायांच्या ठिकाणीं मला राहाण्यास जागा दिली ३. मला भिऊं नको असें ते द्विवार बोलले. त्या योगानें माझें सर्वतोपरि कल्याण झालें ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्या आनंदानें मी परिपूर्ण भरलों. आतां सर्व काल हरीच्या नामाचा गजर करूं ५. [३१६७]

हरीच्या भक्तीचें मर्म ज्याच्या स्वाधीन आहे त्याच्या घरीं शांति, क्षमा, दया हीं लक्षणें राहातात १. अष्टमहासिद्धि त्याच्या द्वारामध्यें सेवेविषयीं तत्पर असतात. त्यांना हाकललें असतां त्या दूर जात नाहींत २. त्याच्या ठिकाणीं वाईट गुण मुळींच मिळत नाहींत, कारण त्याच्या हृदयामध्यें श्रीहरीच्या स्वरूपाचें वास्तव्य झालें आहे ३. त्याचें चित्त सर्व काल स्वस्थ असतें, कारण त्याच्या हृदयांतील सत्त्व, रज, तमाची तळमळ नाहींशी झाली आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, देव त्याचा सेवक होऊन सर्व भार चालवितो ५. [३१६८]

विठ्ठल हा सत्य आहे, त्याची सेवा करणें हेंहि सत्य आहे, असें संतांनीं सांगितलें १. वेदांनीं जी नीति सांगितली आहे ती खरी आहे. त्याप्रमाणें आचरण केलें असतां त्यांत खरें स्वहित आहे, अशी खरी प्रचीति येते (असा खरा अनुभव येतो) २. तुकाराम महाराज म्हणतात, जे खरे आहेत, ते खऱ्या भावानें घेतात. त्यांना लबाडीचें मर्म मुळींच माहीत नाहीं ३. [३१६९]

हे देवा, संगतीनेंच दुःख वाढतें व संगतीनेंच भजनहि वाढतें. असे नानाप्रकारचे पुष्कळ जन आहेत १. ह्याकरितां मला त्या जनांच्या संगतीचा त्रास आला आहे, कारण त्यांच्या ठिकाणीं अनेक प्रकारचे छंद आहेत, ते दृष्टीसमोर दिसतात २. त्या योगानें चित्तामध्यें संशय उत्पन्न होतो. मग एकविधभाव धरला असतां, संशय त्या भावास राहूं देत नाहीं ३. कोणी लोक शब्दज्ञान सांगतात. ते आपलें हित जाणत नाहींत म्हणून त्या जनांना पाहिलें असतां ते मला आवडत नाहींत ४. तुकाराम महाराज म्हणतात, आतां एकटें एका ठिकाणीं उगीच बसून हरि हरि म्हणत राहावें, हें मला बरें वाटतें ५. [३१७०]

माझा देह-अभिमान नष्ट झाल्यामुळें माझ्या ठिकाणीं पुण्य-पाप नाहीं, व सुख-दुःखास राहाण्यास ठिकाण नाहीं, आणि लाभहानीचा नाश होऊन माझी सर्व भीति नाहींशी झाली आहे १. असा मी जिवंत असून मेल्याप्रमाणें झालों आहें, कारण संसाराचें मूळ जो देह तो मी, व देहसंबंधीं माझें, व ह्याखेरीज इतर सर्व परकें, हे सर्व आपपर भाव नाहींसे झाले २. आतां माझ्या ठिकाणीं खऱ्याखोट्याचा संबंध राहिला नाहीं, त्यामुळें वर्ण, धर्म व जातीचा अधिकार

जन वन भिन्न अचेत चळण । नाहीं दूजेंपण ठाव यासी ॥ ४ ॥ तुका म्हणे देह वाहिला विठ्ठलीं । तेव्हांच घडली सर्व पूजा ॥ ५ ॥ [३१७१]

संकोचित जीव महत्वाच्या भारें । दासत्वचि बरें बहू वाटे ॥ १ ॥ कळावी जी माझी आवडी हे संतां । देणें तरि आतां हेंचि द्यावें ॥ २ ॥ तुमचे चरण पावविलों सेवा । म्हणउनि हेवा हाचि करीं ॥ ३ ॥ विनवूनि तुका वंदितो चरण । लेखा रजरेण चरणींचा ॥ ४ ॥ [३१७२]

देव कैंचा तया दुरी । भाका बरी करुणा ॥ १ ॥ आळवितिया न लगे घर । माय जाणे रे भातुकें ॥ २ ॥ नावेवरी ज्याचा भार । पैल पार जवळी त्या ॥ ३ ॥ आतां परदेशी तुका । झाला लोकां वेगळा ॥ ४ ॥ [३१७३]

भक्ति ज्याची थोडी । पूर्ण विषयाची गोडी ॥ १ ॥ तो नरचि नव्हे पाहीं । खर जाणावा तो देहीं ॥ २ ॥ भजन पूजनही नेणे । काय स्वरूपासी जाणे ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याला । भोवंडून बाहेर घाला ॥ ४ ॥[३१७४]

संतांनीं सरता केलों तैशापरी । चंदनें ते बोरी व्यापियेली ॥ १ ॥ गुणदोषयाती न विचारी कांहीं । ठाव दिला पायीं आपुलिया ॥ २ ॥ तुका म्हणे आलें समर्थाच्या मना । तरि हाये राणा रंक त्याचा ॥ ३ ॥ [३१७५]

चित्तीं तुझे पाय डोळां रूपाचें ध्यान । अखंड मुखीं नाम तुमचे वर्णावे गुण ॥ १ ॥ हेंचि एक तुम्हां देवा मागणें मी दातारा । उचित तें करा माझा भाव जाणूनि (भाव जाणूनी खरा) ॥ २ ॥ खुंटलें जाणीव माझें बोलणें आतां । कळों यावी तैसी करा बाळाची चिंता ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां नको देऊं अंतर । न कळे पुढें काय बोलूं विचार (कैसा होईल विचार) ॥ ४ ॥ [३१७६]

नाहींसा झाला आहे ३. आतां जन आणि वन हें वेगळें आणि शरीरांतील चलन [चित्] व जड द्वैताला ठिकाण राहिलें नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, म्यां विठ्ठलाच्या ठिकाणीं ज्या वेळीं देह अर्पण केला, त्या वेळीं त्याची सर्व पूजा मला घडली ५. [३१७१[

संत हो, मोठेपणा माझ्याकडे आल्यानें जीव संकोचित होतो, म्हणून तुमचें दास्यत्व करणें हें फार चांगलें वाटतें १. अशा प्रकारची माझी आवड तुम्हां संतांना कळावी. तुम्हांला कांहीं द्यावेंसें वाटेल तर मला हेंच द्या २. तुमच्या चरणांची मला प्राप्ति झाली, म्हणून मी त्याविषयींचीच हांव धरीत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशी मी तुम्हांला विनंति करून तुमच्या पायां पडत आहें, मला तुम्ही आपला चरणरज (चरणांचा रजःकण, पायांची धूळ) आहे असें समजा ४. [३१७२]

अहो जन हो, तुम्ही देवाची करुणा भाका म्हणजे तो कांहीं लांब आहे काय? १. जो करुणा भाकील त्याला कोणत्याहि स्थानाचा आश्रय करणें नको, कारण विठाबाई माउली त्याचा उदरनिर्वाह करण्याचें जाणते २. भवसमुद्रांतून तरून जाण्याविषयीं नौकेचा आश्रय केला तर त्याला पलीकडचें तीर जवळच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी ह्या लोकांच्या वेगळा झालों, म्हणून आतां पर पुरुषाच्या-विठोबाच्या स्वरूपीं मला आश्रय मिळाला ४. [३१७३]

जो हरीची भक्ति थोडकी करून विषयांच्या ठिकाणीं फार गोडी धरतो १. त्याला मनुष्य न म्हणतां तो गाढव आहे, असें समजावें २. तो देवाचें भजनपूजन करण्याचें जाणत नाहीं मग त्याचें स्वरूप कोठून जाणील ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा मूर्खाला गरगर फिरवून, गचांड्या मारून, वैष्णवांतून बाहेर घालवा ४. [३१७४]

ज्याप्रमाणें चंदनाच्या वृक्षाजवळ बोरीचें झाड जरी असलें तरी तें चंदनरूप होतें, त्याप्रमाणें मला संतांनीं कृतार्थ केलें १. माझ्यामध्यें असणारे गुणदोष व माझी हीन जात ह्यांचा विचार न करतां त्यांनीं आपल्या पायांजवळ मला आश्रय दिला २. तुकाराम महाराज म्हणतात, जर समर्थांच्या मनास आलें तर ते रंकाचा राजा करतील ३. [३१७५]

अहो देवा, तुमचे पाय माझ्या चित्तांत राहावे व डोळ्यांत तुमचें स्वरूप राहावें आणि मुखानें सर्व काळ तुमचे गुण वर्णन करून नाम गावें १. अहो दात्या देवा, माझें हेंच एक तुमच्याजवळ मागणें आहे. आतां माझा भाव जाणून जें योग्य असेल तें तुम्ही करा २. माझें जाणतेपणाचें बोलणें आतां कुंठित झालें, म्हणून ह्या बालकाची चिंता तुम्हांला कळेल तशी करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, आतां तुमच्यापासून मला दूर करूं नका. ह्यापेक्षां अधिक काय बोलावें, ह्याचा विचार पुढें कांहीं मला समजत नाहीं ४. [३१७६]

संतांच्या पादुका घेईन मोचे खांदीं । हातीं टाळ दिंडी नाचेन पुढें ॥ १ ॥ भजनविधि नेणें साधनउपाय । सकळ सिद्धि पाय हरिदासांचे ॥ २ ॥ ध्यान मति गति आसन समाधि । हरिनाम गोविंदीं प्रेमसुख ॥ ३ ॥ नेणतां निर्लज्ज नेणें नादभेद । सुखें हा गोविंद गाऊं गीतीं ॥ ४ ॥ सर्व जोडी मज गोत आणि वित्त । तुका म्हणे संतमहंतपाय ॥ ५ ॥ [३१७७]

हरिजनां प्राण विकली हे काया । अंकिला मी तयां घरीं झालों ॥ १ ॥ म्हणियें सत्वर करीन सांगतां । घेईन मी देतां शेष त्यांचें ॥ २ ॥ आस करूनियां राहेन अंगणीं । उच्छिष्टाची धणी घ्यावयासी ॥ ३ ॥ चालतां ते मार्गीं चरणींचे रज । उडती सहज घेईन आतां ॥ ४ ॥ दुरी त्यांपासूनि न वजें दवडितां । तुका म्हणे लाता घेईन अंगीं ॥ ५ ॥ [३१७८]

पुण्य फळलें बहुतां दिवसां । भाग्यउदयाचा ठसा । जालों सन्मुख तो कैसा । संतचरण पावलों ॥ १ ॥ आजि फिटलें माझें कोडें । भव दुःखाचें सांकडें । कोंदाटलें पुढें । परब्रह्म सांवळें ॥ २ ॥ आलिंगनें संतांचिया । दिव्य जाली माझी काया । मस्तक हें पायां । वरी त्यांच्या ठेवितों ॥ ३ ॥ तुका म्हणे धन्य झालों । सुखें संतांचिया धालों । लोटांगणीं आलों । पुढें भार देखोनी ॥ ४ ॥ [३१७९]

भक्ति आम्हीं केली सांडुनी उद्वेग । पावला हें संग सुख याचें ॥ १ ॥ सुख आम्हां झालें धरितां याचा संग । पळाले उद्वेग सांडूनियां ॥ २ ॥ तुका म्हणे सुख बहु झालें जीवा । घडली या सेवा विठोबाची ॥ ३ ॥ [३१८०]

इंद्रियांसी नेम नाहीं । मुखीं राम म्हणोनि काई ॥ १ ॥ जेवीं मासीसवें अन्न । सुख नेदी तें भोजन ॥ २ ॥ कीर्तन करावें । तेसैं करूनी दावावें ॥ ३ ॥ हें तों अंगीं नाहीं चिन्हें । गाइलें

संतांच्या पायांतील मोचे म्हणजे वाहणा मी खांद्यावर घेऊन हातांमध्यें टाळ व वीणा घेऊन त्यांच्यापुढें नाचेन १. ह्यावांचून मी कांहीं भजनाचा विधि जाणत नाहीं व अन्य साधनाचा उपाय जाणत नाहीं. संतांचे पाय चित्तांत धरावे. त्या योगानें माझी सर्व कार्यसिद्धि होणारी आहे २. ध्यानाची गति व आसन, समाधि हे प्रकार बुद्धि जाणत नाहीं, तर एका हरि-गोविंदनामाच्या ठिकाणीं सुखानें प्रेम ठेवून मी राहिलों आहें ३. त्या गोविंदाचें गाणें मी सुखानें गाईन. त्यावांचून गाण्याचे प्रकार [नाद–भेद] मी कांहीं जाणत नाहीं व लज्जा माझ्या ठिकाणीं नाहीं असा मी अज्ञानी आहें ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझी सर्व कमाई व गोत्रज (आप्त, इष्ट, बंधु) आणि पैसा हे सर्व संतमहंतांचे पाय आहेत ५. [३१७७]

वैष्णवांना मी आपलें शरीर प्राणांसुद्धां विकून त्यांच्या घरीं त्यांचा आज्ञाधारक होऊन राहिलों आहें १. ते मला जें काम सांगतील तें मोठ्या त्वरेनें करीन व त्यांनीं कांहीं आपलें अवशेष दिलें असतां मी घेईन २. त्यांचें उच्छिष्ट इच्छा पूर्ण होईतोंपर्यंत मिळावें अशी आशा धरून त्यांच्या अंगणांत मी उभा राहीन ३. ते वाटेनें चालले म्हणजे सहज त्यांच्या चरणांची जी धूळ उडेल ती मी आपल्या अंगावर घेईन ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांनीं मला जरी घालविलें तरी मी त्यांच्यापासून दूर जाणार नाहीं व त्यांनीं मला लाथा मारल्या तरी मी त्या सहन करीन ५. [३१७८]

माझें बहुत दिवसांचें पुण्य, भाग्य आज सफल झालें, कारण मी समोर होऊन संतचरणांच्या ठिकाणीं प्राप्त झालों १. आज माझें संसारसंबंधीं दुःखाचें संकट निरसलें आणि सांवळें परब्रह्म डोळ्यांमध्यें भरलें तें चहूंकडे दिसूं लागलें २. संतांनीं मला आलिंगन दिलें व मी त्यांच्या पायांवर मस्तक ठेविलें, त्या योगानें माझें शरीर दिव्यरूप झालें ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांच्या सुखानें मी तृप्त झालों व धन्य झालों, म्हणून त्या वैष्णवांचा समुदाय पुढें पाहून मीं लोटांगण घातलें ४. [३१७९]

मनांतील सर्व काळजी टाकून आम्हीं हरीची भक्ति केली त्या योगानें हरीच्या संगतीचें सुख आम्हांला मिळालें १. त्याची संगति धरल्याबरोबर आम्हांस फार सुख होऊन मनांतील अनेक विकार मनाला टाकून पळून गेले २. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या विठोबारायाची सेवा आम्हांस घडली त्या योगानें आमच्या जीवास फार सुख झालें ३. [३१८०]

जे आपल्या इंद्रियांचें नियमन करीत नाहींत त्यांनीं मुखानें नामोच्चार करून काय उपयोग आहे? १. जर जेवण करीत असतां एखाद्या घासास माशी लागली, तर त्या अन्नापासून सुख होणार नाहीं २. जसें कीर्तनामध्यें बोलावें तसें आचरण करून दाखवावें ३. असें जर नसेल तर त्याचें गाणें कलावंतिणीच्या ढंग्याप्रमाणें (पद्धतीनें गाइल्यासारखें)

वेश्येच्या ढव्यानें ॥ ४ ॥ तुका म्हणे रागा । संत शिवूं नेदिती अंगा ॥ ५ ॥ [३१८१]

न लगे देवा तुझें आम्हांसी वैकुंठ । सायुज्यता पट न लगे मज ॥ १ ॥ देईं तुझें नाम मज सर्वकाळीं । मागणें वनमाळी हेंचि तुज ॥ २ ॥ नारद तुंबर उद्धव प्रल्हाद । बळी रुक्मांगद नाम ध्याती ॥ ३ ॥ सिद्ध मुनिगण गंधर्व किन्नर । करितातीं गजर रामनामें ॥ ४ ॥ तुका म्हणे हरी देईं तुझें नाम । अखंडित प्रेम हेंचि द्यावें ॥ ५ ॥ [३१८२]

पावलों प्रसाद इच्छा केली तैसी । जालें या चित्तासी समाधान ॥ १ ॥ माय बाप माझा उभा कृपादानी । विटे सम जोडोनि पादांबुजें ॥ २ ॥ सांभाळासी येऊं नेदीतां उणीव । अधिकार गौरव राखे तैसा ॥ ३ ॥ तुका म्हणे सर्व अंतर्बाह्य आहे । जया तैसा राहे कवळुनी ॥ ४ ॥ [३१८३]

मुखीं विठ्ठलाचें नाम । मग कैंचा भवभ्रम ॥ १ ॥ चालतां बोलतां खातां । जेवितां निद्रा करितां ॥ २ ॥ सुखें असों संसारीं । मग जवळीच हरि ॥ ३ ॥ मुक्तिवरील भक्ति जाण । अखंड मुखीं नारायण ॥ ४ ॥ मग देव भक्त जाला । तुका तुकीं उतरला ॥ ५ ॥ [३१८४]

क्षुधा तृषा कांहीं सर्वथा नाठवे । पहावया धांवे कोल्हाटासी ॥ १ ॥ कथेसी साक्षेपें पाचारिलें जरी । म्हणे माझ्या घरीं कोणी नाहीं ॥ २ ॥ बलात्कारें जरी आणिला कथेसी । निद्रा घे लोडासी टेंकूनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे थुंका त्याच्या तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ॥ ४ ॥ [३१८५]

आतां वाटों नेदीं आपुलें हें मन । न सोडीं चरण विठोबाचे ॥ १ ॥ दुजियाचा संग लागों नेदीं वारा । आपुल्या शरीरावरूनियां ॥ २ ॥ यावें जावें आम्हीं देवाचे सांगातें । मागूनी करित हेंचि आलों

समजावें ४. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी खरे संत आहेत, ते क्रोधादिक ऊर्मींचा स्पर्श आपल्या आंगास [हृदयास] होऊं देत नाहींत ५. [३१८१]

हे देवा, तुझें वैकुंठ अथवा तुझा सायुज्य पटाचा अधिकार हें कांहीं आम्हांस नको १. हे वनमाळी, तुझ्या नामाचा उच्चार मीं सर्व काळ करावा हेंच तुला माझें मागणें आहे २. नारद, तुंबर, उद्धव, प्रल्हाद, बळी, रुक्मांगद या भक्तांनीं तुझ्या नामावांचून दुसरें कांहीं स्वीकारलें नाहीं ३. सिद्ध, ऋषि, मुनि, गंधर्व, किन्नर हे सर्व रामनामाचा गजर करितात ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे हरि, तुझें नाम म्यां सर्व काळ उच्चारावें हेंच प्रेम मला द्या ५. [३१८२]

मीं जशी इच्छा केली तसा प्रसाद मिळाला, म्हणून माझ्या चितास समाधान झालें १. विटेवर सारखे चरणकमल जोडून माझा मायबाप कृपादान करण्याविषयीं उभा राहिला आहे २. भक्तजनांचा सांभाळ करण्यांत उणेपणा येऊं न देतां ज्याचा जसा अधिकार असेल तसा त्याचा गौरव [मोठेपणा] राखतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो देव सर्वांच्या अंतर्बाह्य व्यापून आहे; पण जसा ज्याचा भाव असेल तसा त्याला धरून राहातो [म्ह० सांभाळतो] ४. [३१८३]

ज्याच्या मुखामध्यें सदा विठोबाचें नाम आहे, त्याला संसाराचा भ्रम कशाचा आहे? १. चालतांना, बोलतांना व भोजनाच्या वेळेस व निजल्या ठिकाणीं झोपेमध्यें असा सर्व काळ नामोच्चार करीत आहे २. तो सुखानें संसारांत जरी असला तरी देव त्याच्या जवळच आहे ३. नारायणनामाचा उच्चार सर्व काळ मुखामध्यें असणें ही भक्ति चारी मुक्तींपेक्षां श्रेष्ठ आहे, असें समजा ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याच नामानें ब्रह्माच्या तुलनेस मी उतरलों म्हणून मी भक्त होतों तो देवरूप झालों ५. [३१८४]

एखाद्यास ख्याल, तमाशा पाहाण्याचा नाद असला, म्हणजे तहानभुकेची सुद्धां आठव न करितां जेथें कोल्हाट्याचा खेळ चालला असेल तेथें तो धांवत जातो १. त्याला जर कोणी हरिकथेला मुद्दाम बोलाविलें तर माझ्या घरीं कोणी नाहीं म्हणून सांगतो २. एखाद्या कोणी त्यास बळानें जर हरिकथेस आणिलें तर तो लोडाला टेंकून झोंप घेत बसतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, असले लोक अखेरीस यमपुरी भोगावयास जातात; म्हणून त्यांच्या तोंडावर बेलाशक थुंकावें ४. [३१८५]

मी विठोबारायाचे चरण सोडणार नाहीं व त्याच्यावांचून आपल्या मनाची वांटणी अन्य ठिकाणीं होऊं देणार नाहीं १. आपल्या अंगावर दुसऱ्याच्या संगाचा वारा देखील लागूं देणार नाहीं २. देवाच्या समागमें आम्ही येणें जाणें

॥ ३ ॥ काय वायां गेलों तो करूं उद्योग (उद्वेग)। उभा पांडुरंग मागें पुढें ॥ ४ ॥ तुका म्हणे प्रेम मागतों आगळें। येथें भोगूं फळ वैकुंठींचीं ॥ ५ ॥ [३१८६]

आतां जावें पंढरीसी। दंडवत विठोबासी ॥ १ ॥ चंद्रभागेचिये तिरीं। आम्ही नाचों पंढरपुरीं ॥ २ ॥ जेथें संतांची दाटणी। तेथें घेऊं पायवणी ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही बळी। जीव दिला पायां तळीं ॥ ४ ॥ [३१८७]

आम्हां नरका जातां काय येईल तुझ्या हाता। ऐसें तूं अनंता विचारीं पां ॥ १ ॥ तुज शरण आलियाचें काय हेंचि फळ। विचारा दयाळ कृपानिधी ॥ २ ॥ तुझें पावनपण न चले आम्हांसी। ऐसें हृषीकेशी कळों आलें ॥ ३ ॥ आम्ही दुःख पावों जन्ममरण व्यथा। काय तुझ्या हाता येत असे ॥ ४ ॥ तुका म्हणे तुम्हीं खादली हो रडी। आम्हीं धरली शेंडी नाम तुझें ॥ ५ ॥ [३१८८]

पांडुरंगें पाहा खादलीसे रडी। परि नाम शेंडी धरिली आम्हीं ॥ १ ॥ आतां संतांनीं करावी पंचाईत। कोण हा फजितखोर येथें ॥ २ ॥ कोणाचा अन्याय येथें आहे स्वामी। गर्जतसों आम्ही पातकीही ॥ ३ ॥ याचें पावनपण सोडवा जी तुम्ही। पतितपावन आम्ही आहों खरे ॥ ४ ॥ आम्ही तंव आहों अन्यायी सर्वथा। याची पावन कथा कैसी आहे ॥ ५ ॥ तुका म्हणे आम्ही मेलों तरी जाणा। परि तुमच्या चरणां न सोडावें ॥ ६ ॥ [३१८९]

घालूनियां मध्यवर्ती। दाटूनि उपदेश देती ॥ १ ॥ ऐसे पोटभरे संत। तयां कैंचा भगवंत ॥ २ ॥ रांडापोरांतें गोविती। वर्षासनें तें लाविती ॥ ३ ॥ जैसें बोलती निरूपणीं। तैसी न करिती करणी ॥ ४ ॥ तुका म्हणे तयां। तमोगुणियांची क्रिया ॥ ५ ॥ [३१९०]

करावें. हेंच आम्ही पुष्कळ दिवसांपासून करीत आलों ३. आमच्या मागें पुढें पांडुरंग उभा आहे, म्हणून आम्ही त्याला सोडून दुसरा उद्योग करावा असे वायां गेलों काय ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, वैकुंठांतले दिव्य भोग इहलोकीं भोगतां येतील असें मोठें प्रेम मी मागत आहें ५. [३१८६]

आतां पंढरपुरीं जाऊन विठोबारायाला दंडवत् साष्टांग नमस्कार घालावा १. त्या पंढरपूरच्या ठिकाणीं चंद्रभागेच्या तीराला हरिनामाच्या छंदानें आम्ही नृत्य करूं २. ज्या ठिकाणीं संतांचा समुदाय आहे त्यांचे पाय धुवून तीर्थ घेऊं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं आपला जीव त्यांच्या चरणीं बळिदान दिला आहे, म्हणून आम्ही विठोबावांचून दुसरें कांहींच जाणत नाहीं ४. [३१८७]

हे अनंता, आम्ही जर अधोगतीला गेलों, तर तुझ्या हाताला काय येईल ह्याचा तूं विचार कर १. अहो कृपानिधि दयाळा, आम्ही तुला शरण आलों, त्याचें फळ हेंच आहे काय, असें विचार करून सांगा २. हे हृषीकेशी, तुझ्या ठिकाणीं पतिताला पावन करण्याची शक्ति आहे; ती आमच्यापुढें चालत नाहीं असें मला समजून आलें ३. जन्ममरणाचें दुःख आम्हांस होतें, त्या योगानें तुला कांहीं लाभ होतो काय ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हीं फार लबाडी केली आहे परंतु आम्हीं नाम हीच तुमची शेंडी बळकट धरली आहे ५. [३१८८]

अहो संतजन, ह्या पांडुरंगानें कशी लबाडी केली आहे तें पाहा; पण नाम हीच ह्याची शेंडी आम्हीं धरली आहे १. आतां ह्या ठिकाणीं कोण फजीतखोर आहे, त्याबद्दलची पंचाईत तुम्हीं संतांनीं करावी २. अहो संतस्वामी, ह्या ठिकाणीं कोणाचा अन्याय आहे ? आम्ही तर पातकी आहोंत, म्हणून गर्जना करतों ३. अहो संत महाराज, ह्या देवाचा पावनपणा तुम्ही नाहींसा करा, कारण खरे पतितपावन आम्ही आहोंत ४. आम्ही तर सर्वथैव अपराधी आहोंत, पण ह्याची पावनपणाची कथा कसली आहे हें सांगा ५. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही जरी मेलों तरी तुमच्या चरणांना सोडूं नये हा आमचा धर्म आहे, असें तुम्ही समजा ६. [३१८९]

गुरु हे एखादे कोणी शिष्य करण्याविषयीं दुसऱ्या कोणास रदबदलीला घालून बळानें गुरु-उपदेश देतात १. अशा प्रकारचे जे आहेत, ते पोटाचे उद्योग करणारे संत आहेत, त्यांना भगवत्प्राप्ति कशाची आहे ? २. ते गुरु बायापोरांना वचनांत गुंतवून प्रतिवर्षी पैसे द्यावे असा करार करून घेतात ३. जसें ते निरूपण करितात तसें ते मुळींच वागत नाहींत ४. तुकाराम महाराज म्हणतात, असें त्यांचें सर्व आचरण तमोगुणाचें असतें ५. [३१९०]

जीवें जीव नेणे पापी सारिखाची। नळी दुजयाची कापूं बैसे ॥ १ ॥ आत्मा नारायण सर्वां घटीं आहे। पशूमध्यें काय कळों नये ॥ २ ॥ देखत हा जीव हुंबरे वरडत। निष्ठुराचे हात वाहाती कैसे ॥ ३ ॥ तुका म्हणे तया चांडाळासी नर्क। भोगिती अनेक महादुःखें ॥ ४ ॥ [३१९१]

भागल्याचें तारूं शिणल्याची साउली। भुकेलिया घाली प्रेमपान्हा ॥ १ ॥ ऐसी हे कृपाळू अनाथांची वेशी। सुखाचीच राशी पांडुरंग ॥ २ ॥ सकळां सन्मुख कृपेचिया दृष्टी। पाहे बहू भेटी उतावीळ ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें आतां उरला कैंचा। अनंता जन्मींचा शीण भाग ॥ ४ ॥ [३१९२]

काय न्यून आहे सांगा। पांडुरंगा तुम्हांपें ॥ १ ॥ आमुची तों न पुरे इच्छा। पिता ऐसा मस्तकीं ॥ २ ॥ कैसी तुम्हां होते (होय) सांडी। करुणा तोंडीं उच्चारें ॥ ३ ॥ आश्चर्यचि करी तुका। हे नायका वैकुंठींचिया ॥ ४ ॥ [३१९३]

परि आतां माझी परिसावी विनंती। रखुमाईच्या पति पांडुरंगा ॥ १ ॥ चुकलिया बाळा न मारावें जीवें। हित तें करावें मायबापीं ॥ २ ॥ तुका म्हणे तुझा म्हणताती मज। आतां आहे लाज हेचि तुम्हां ॥ ३ ॥ [३१९४]

पापाचिया मुळें। जालें सत्याचें वाटोळें ॥ १ ॥ दोष जाले बळिवंत। नाहीं ऐसी जाली नीत ॥ २ ॥ मेघ पडों भीती। पिकें सांडियेली क्षिती ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं। वेदा वीर्य शक्ति नाहीं ॥ ४ ॥ [३१९५]

ऐसा दुस्तर भवसागर। नेणों कैसा उतरूं पार ॥ १ ॥ कामक्रोधादि सावजें थोर। दिसताती भयंकर ॥ २ ॥ मायाममतेचे भोंवरे। घेती भयानक फेरे ॥ ३ ॥ वासनेच्या लहरी येती। उद्वेग हेलकावे बसती ॥ ४ ॥ तरावया एक युक्ति असे। तुका नामनावेमधें बैसे ॥ ५ ॥ [३१९६]

आपल्या जीवासारखा दुसऱ्याचा जीव जाणत नाहीं, असा तो पातकी कसाई दुसऱ्याचें नरडें छाटावयास पाहातो १. सर्वांच्या हृदयांत जीवरूपानें नारायण आहे, तो पशूंमध्येंहि आहे, हें त्याला समजूं नये काय? २. गळा कापतेवेळीं त्याच्या देखत पशु आरडतो ओरडतो पण निष्ठुराचे हात त्यावर कसे चालतात? ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या चांडाळाला अधोगतीला जाऊन अनेक महान् दुःखें भोगावीं लागतील ४. [३१९१]

ही विठाबाई आई, श्रमी झालेल्या लोकांची विश्रांति आहे व हिच्याविषयीं ज्याला भूक लागेल त्याला ती प्रेमाचा पान्हा पाजते १. अशी ही पांडुरंग आई कृपाळु व अनाथास आधार देणारी असून केवळ सुखाचीच राशि आहे २. सर्वत्रांच्या समोर कृपादृष्टीनें अवलोकन करून भेटीविषयीं फार उतावीळ होऊन त्यांची वाट पाहात आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां ह्या ठिकाणीं अनंतावधि जन्मांचें दैन्य, श्रम व दुःख कसलें उरणार आहे? ४. [३१९२]

हे पांडुरंगा, तुमच्यापाशीं काय कमी आहे, हें सांगा १. तुमच्यासारखा बाप आमच्या शिरावर असून आमची इच्छा पूर्ण होत नाहीं २. आम्ही तुमची करुणा भाकीत असतां आमची हेळसांड तुम्हांला कशी करवते? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे वैकुंठनायका, ह्याबद्दल मला मोठें आश्चर्य वाटत आहे ४. [३१९३]

हे रुक्माईचे पति पांडुरंगा, माझी आतां विनंति ऐकावी १. बालक चुकलें तरी आईबापानें त्याला ठार मारूं नये, तर त्याचें हित करावें २. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, मी तुझा आहें असें लोक म्हणतात, आतां ह्याची लाज तुला असो ३. [३१९४]

ह्या कलियुगांत अति पाप–अधर्म झाल्यामुळें सत्य नाहींसें झालें, धर्माचें वाटोळें झालें १. बलाढ्य दोष वाढले व नीति नाहींशी झाली २. मेघ वृष्टि करण्याकरितां भितात आणि पृथ्वीनें पीक देण्याचें टाकलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, वेदांमध्यें कांहीं (मंत्रबल) वीर्यशक्ति राहिली नाहीं. (हा सर्व पापाचा-अधर्माचा परिणाम होय) ४. [३१९५]

(खालील कडव्यांतून दर्शविलेल्याप्रमाणें) जो तरण्यास कठिण अशा ह्या संसारांतून पार कसें व्हावें हें कळत नाहीं १. कामक्रोधादिक मोठे हिंसक प्राणी भयंकर दिसतात २. मायेचे व ममतेचे भोंवरे मोठे भयंकर वाटण्यासारखे फिरत आहेत ३. वासनेच्या मोठमोठ्या लाटा येत आहेत, त्यायोगेंकरून अनेक प्रकारचे कर्मांचे धक्के बसत आहेत ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं तरून जाण्याला एकच युक्ति आहे ती ही, कीं श्रीहरीच्या नामरूपी नौकेमध्यें बसावें; मी सुद्धां ह्याच नौकेंत बसलों आहें ५. [३१९६]

हरिदासाचिये घरीं । मज उपजवा जन्मांतरीं ॥ १ ॥ म्हणसी कांहीं मागा । हेंचि दे गा पांडुरंगा ॥ २ ॥ संतां लोटांगणीं । जातां लाज नको मनीं ॥ ३ ॥ तुका म्हणे अंगीं । शक्ती देईं नाचें रंगीं ॥ ४ ॥ [३१९७]

लटिक्याचे आंवतणें जेविलिया साचें । काय त्या विश्वास तोचि खरा ॥ १ ॥ कोल्हाटिणी लागे आकाशीं खेळत । ते काय पावत अमरपद ॥ २ ॥ जळमंडपयाचे घोडे राउत नाचती । ते काय तगती युद्धालागीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तैसें मतवादीचें जिणें । दिसे लाजिरवाणें बोलतांचि ॥ ४ ॥ [३१९८]

काय आम्हीं केलें ऐसें । नुद्धरिजेसें सांगावें ॥ १ ॥ हरिण कोल्हे वैकुंठवासी । कोण त्यांसी अधिकार ॥ २ ॥ गजा नाड्या सरोवरीं । नाहीं हरी विचारलें ॥ ३ ॥ तुका म्हणे गणिका नष्ट । माझे कष्ट त्याहूनि ॥ ४ ॥ [३१९९]

गुणा आला विटेवरी । पितांबरधारी सुंदर जो ॥ १ ॥ डोळे कान त्याच्या ठायीं । मन पायीं राहो हें ॥ २ ॥ निवारोनि जाय माया । ऐसी छाया जयाची ॥ ३ ॥ तुका म्हणे समध्यान । ते हे चरण सुकुमार ॥ ४ ॥ [३२००]

रंगीं रंगें नारायण । उभा करितों कीर्तन ॥ १ ॥ हातीं घेऊनियां वीणा । कंठीं राहें नारायणा ॥ २ ॥ देखिलीसे मूर्ति । माझ्या हृदयाची विश्रांति ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । देईं कीर्तनाचा हेवा ॥ ४ ॥ [३२०१]

तुझा भरंवसा आम्हां । फार होता पुरुषोत्तमा ॥ १ ॥ भवसागर-संकटीं । तारिशील जगजेठी ॥ २ ॥ नाम आदित्याचें झाड । त्याचा न पडे उजेड ॥ ३ ॥ सिलंगणींचें सोनें । त्यासी गाहाण

देवा, मला हरिदासाच्या घरीं पुढचा जन्म द्या १. हे पांडुरंगा, तूं जर कांहीं माग असें म्हणत असशील तर मला हीच देणगी दे २. संतांना लोटांगणें घालण्यांत मनामध्यें लज्जा नसावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या अंगीं तुझ्या चिंतनाच्या रंगांत नाचेन अशी शक्ति दे ४. [३१९७]

लबाड मनुष्यानें जेवण्याविषयीं दिलेल्या आमंत्रणाप्रमाणें जेवावयास मिळाल्यावर तें खरें समजावें. जेवल्यावांचून त्याचा खरा विश्वास काय धरावा ? १. कोल्हाटीण ही उंचावर आकाशांत तारेवर नाचण्याचा खेळ करते, त्या योगानें तिला अमरपद (इंद्रपद) मिळेल काय ? २. ढगांवर गंधर्व नगरांत जे घोडेस्वार नाचतांना दिसतात ते खरोखर युद्ध करण्यांत टिकाव धरतील काय ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, चार्वाकादि मतवादी जे आहेत त्यांचें जगणें हें लाजिरवाणें आहे, असें त्यांच्या बोलण्यावरून दिसतें ४. [३१९८]

देवा, तुम्ही आमचा उद्धार करीत नाहीं, असें आम्हीं तुमचें काय केलें हें सांगावें १. हरिण, कोल्हे आदिकरून पशूंना तुम्हीं वैकुंठवासी केलें. त्यांचा असा कोणता अधिकार होता ? २. गजेंद्र सरोवरामध्यें सुसराकडून पीडित झाल्यावर त्याची दया येऊन हे हरि, तो अधिकारी किंवा अनधिकारी आहे ह्याचा कांहींएक विचार न करितां त्या गजेंद्राचा तुम्हीं उद्धार केला ३. तुकाराम महाराज म्हणतात, नष्ट गणिका (वेश्या–तिनें पोपटाला उद्देशून रघु रघु म्हटलें) तिचा तुम्हीं अंगीकार केला. माझें पातक तिच्याहून जास्त आहे काय ? ४. [३१९९]

देव हा सगुण साकार होऊन विटेवर उभा राहिला व पीतांबर धारण केल्यामुळें जो सुंदर शोभत आहे १. आपले डोळे व कान त्याच्या ठिकाणीं लावावे व त्याच्यापायीं मन ठेवावें २. त्याची कृपेची छाया ही भक्तजनांच्या मायेचें निवारण करते ३. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरीचें वदन विषमभावशून्य (सर्वांविषयीं सारखा भाव ठेवणारें) असून चरणहि सुकुमार आहेत ४. [३२००]

मी उभ्यानें कीर्तन करीत असतां नारायणाच्या रंगांत पूर्ण रंगलों आहें १. हे नारायणा, हातामध्यें वीणा घेऊन तूं माझ्या कंठामध्यें राहा, किंवा, मी हातांत वीणा घेऊन तुझें चिंतन करूं लागल्यावर तूं कंठांत राहा २. मीं तुझी मूर्ति पाहिली आहे त्या योगानें माझें हृदय विश्रांतीला पावलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मला तुमच्या कीर्तनाविषयींचा छंद लावा ४. [३२०१]

हे पुरुषोत्तमा, तुझा भरंवसा आम्हांला पुष्कळ होता १. तो कोणता म्हणशील तर संसारसागरांतून हे जगजेठी, तूं आम्हांला तारशील असा २. सूर्यकमळाचीं (रुईचीं-अर्काचीं) झाडें आहेत परंतु त्यांचा उजेड पडत नाहीं ३.

ठेवी कोण ॥ ४ ॥ नामा सारखी करणी । कोठें नाहीं त्रिभुवनीं ॥ ५ ॥ तुका म्हणे देवा । ब्रीद सोडूनियां ठेवा ॥ ६ ॥ [३२०२]

अहो कृपावंता । होईं बुद्धीचा ये दाता ॥ १ ॥ जेणें पाविजे उद्धार । होय तुझे पायीं थार ॥ २ ॥ वदवीं हे वाचा । भाव पांडुरंगीं साचा ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । माझें अंतर वसवा ॥ ४ ॥ [३२०३]

विद्या अल्प परी गर्वशिरोमणी । मजहुनि ज्ञानी कोण आहे ॥ १ ॥ अंगीं भरला ताठा कोणातें मानीना । साधूचीं छळणा स्वयें करी ॥ २ ॥ साधूचे देहाचा मानी जो विटाळ । त्रिलोकीं चांडाळ तोचि एक ॥ ३ ॥ संतांची जो निंदा करी मुखें जपे । खतेला सकळ पापें तोचि एक ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐसे मावेचे मइंद । त्यापाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥ ५ ॥ [३२०४]

बसतां (बैसतां) चोरापाशीं तैसी होय बुद्धि । देखतांचि चिंधी मन धांवे ॥ १ ॥ व्यभिचाऱ्यापाशीं बैसतां क्षणभरी । देखतांचि नारी मन धांवे ॥ २ ॥ प्रपंचाचा छंद टाकुनियां गोवा । धरावें केशवा हृदयांत ॥ ३ ॥ सांडुनियां देईं संसाराची बेडी । कीर्तनाची गोडी धरावी गा ॥ ४ ॥ तुका म्हणे तुला सांगतों मी एक । रुक्मिणीनायक मुखीं गावा ॥ ५ ॥ [३२०५]

परिसें गे सुनेबाई । नको वेंचूं दूध दहीं ॥ १ ॥ आवा चालिली पंढरपुरा । वेसीपासुनि आली घरा ॥ २ ॥ ऐकें गोष्टी सादर बाळे । करीं जतन फुटकें पाळें ॥ ३ ॥ माझे हातींचा कलवडू । मजवांचूनि नको फोडूं ॥ ४ ॥ वळवटक्षिरीचें लिंपन । नको फोडूं मजवांचून ॥ ५ ॥ उखळ मुसळ जातें । माझें मन गुंतलें तेथें ॥ ६ ॥ भिक्षुक आल्या घरा । सांग गेली पंढरपुरा ॥ ७ ॥ भक्षीं मपित आहारु । नको फारसी वरो सारूं ॥ ८ ॥ सून म्हणे बहुत निकें । तुम्ही यात्रेसि जावें सुखें ॥ ९ ॥ सासूबाई

दसऱ्याच्या दिवशीं सीमोल्लंघनाचे वेळेस द्यावयाचें सोनें, त्याला कोणीं गहाण ठेवील काय ? ४. नांवासारखी कृति त्रैलोक्यांत कोठेंहि दिसत नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, पतिताला पावन करणें हें जें तुमचें ब्रीद आहे तें तुम्ही सोडून द्या ६. [३२०२]

अहो देवा कृपावंता, तुम्ही सुबुद्धीचें दान देणारे व्हा १. ज्यायोगेंकरून माझा उद्धार होऊन तुमच्या पायांचा आश्रय मिळेल २. पांडुरंगाचे ठिकाणीं खरा भाव आहे असें आमच्या वाणीकडून बोलीव. ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, माझ्या अंतःकरणांत तुम्ही वस्ती करा ४. [३२०३]

एखाद्याच्या ठिकाणीं विद्या थोडी असते पण त्याविषयींचा तो गर्वशिरोमणि (पराकाष्ठेचा गर्विष्ठ) असतो. माझ्यापेक्षां दुसरा श्रेष्ठ ज्ञानी कोण आहे ? (असें त्याला वाटतें) १. असें ज्ञानाहंकारानें शरीर ताठल्यामुळें कोणालाहि मानीत नाहीं व साधूचा छळ स्वतः करतो २. साधूच्या देहाचा जो विटाळ मानतो तोच एक त्रैलोक्यांत चांडाळ आहे ३. संतांची निंदा जो स्वमुखानें करतो त्याच एकट्याचा सर्व देह पापानें व्यापला आहे. तुकाराम महाराज म्हणतात, असे जे मायेचे मैंद (ठकबाज) आहेत त्यांचे जवळ गोविंद नाहीं (हें द्विवार सांगतों) ५. [३२०४]

चोराच्या जवळ बसलें तर तशीच चोरी करण्याची बुद्धि होते, म्हणजे एखादी चिंधी पडलेली पाहिली तर ती घेण्याविषयीं मनामध्यें येतें १. जार (परस्त्रीगमन करणाऱ्या) पुरुषाचे जवळ क्षणभर बसलें असतां परस्त्री पाहातां-क्षणींच तिच्यावर मन जातें २. म्हणून प्रपंचाचा छंद व गुंताडा टाकून द्यावा व हृदयांत केशवस्वरूप धारण करावें ३. संसारबंधनाचा त्याग करून श्रीहरिकीर्तनाविषयींची प्रीति धरावी ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुला मी एक सांगत आहें. रुक्मिणीचा पति श्रीविठ्ठल हा तूं वाचेनें गा, त्याचें नाम घेत जा ५. [३२०५]

हे सूनबाई, तूं ऐक. माझें दूधदहीं तूं खर्चूं नकोस १. सासू ही पंढरपुरास जात्रयास निघाली ती गांवच्या वेशीपाशीं जाऊन परत आली २. हे सूनबाई, मी सांगतें हें तूं मोठ्या सादर चित्तानें ऐक. माझें फुटकें पाळें तूं जतन कर ३. गोवऱ्याचा कलवड मी आल्यावांचून तूं फोडूं नकोस ४. खीर करण्याकरितां ज्या शेवया केल्या आहेत व ज्या पात्रांत लिंपून ठेवल्या आहेत तें पात्र तूं माझ्यावांचून फोडूं नकोस ५. उखळ, मुसळ व जातें ह्या ठिकाणीं माझें मन गुंतलें आहे ६. कोणी भिक्षुक घरीं आल्यास त्याला सांग, कीं आमची सासू पंढरपुरास गेली आहे ७. तूंहि परिमित भोजन करीत जा. फारसा खर्च करीत जाऊं नको ८. सून म्हणते, फार चांगलें आहे, तुम्ही यात्रेला सुखानें जावें ९. सासूबाई, तुम्ही

स्वहित जोडा । सर्व मागील आशा सोडा ॥ १० ॥ सूनमुखींचें वचन कानीं । ऐकोनि सासू विवंची मनीं ॥ ११ ॥ सवतीचे चाळे खोटे । म्यां जावेंसें इला वाटे ॥ १२ ॥ आतां कासया यात्रे जाऊं । काय जाउनि तेथें पाहूं ॥ १३ ॥ मुलें लेंकरें घरदार । माझें येथेंचि पंढरपूर ॥ १४ ॥ तुका म्हणे ऐसे जन । गोवियेलें मायेंकरून ॥ १५ ॥ [३२०६]

पतिव्रतेची कीर्ती वाखाणितां । सिंदळीच्या माथां तिडिक उठे ॥ १ ॥ आमुचें तों आहे सहज बोलणें । नाहीं विचारून केलें कोणीं ॥ २ ॥ अंगें उणें त्याच्या बैसे टाळक्यांत । तेणें ठिणग्या बहुत गाळीतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हीं काय करणें त्यासी । ढका खवंदासी लागतसे ॥ ४ ॥ [३२०७]

आहे ऐसा देव वदवावी वाणी । नाहीं ऐसा मनीं अनुभवावा ॥ १ ॥ आवडी आवडी कळिवरा कळिवरीं । वरिली अंतरीं ताळा पडे ॥ २ ॥ अपूर्व दर्शन मातेपुत्रा भेटी । रडे मागे तुटी हर्षयोगें ॥ ३ ॥ तुका म्हणे एकें कळतें दुसरें । बरियानें बरें आहाचें आहाच ॥ ४ ॥ [३२०८]

हेंचि माझे चित्तीं । आतां राहो भाव प्रीति । विठ्ठल सुषुप्तीं । जागृतीं स्वप्नासी ॥ १ ॥ आणीक नाहीं मागणें । राज्यचाड संपत्ति धनें । जिव्हे सुख तेणें । घेतां देहीं नाम तुझें ॥ २ ॥ तुझें रूप सर्वांठायीं । देखें ऐसें प्रेम देई । ठेवावा हा पायीं । अनुभव चित्ताचा ॥ ३ ॥ जन्ममरणाचा बाध । समूळनि तुटे कंद । लागो हाचि छंद । हरि गोविंद वाचेसी ॥ ४ ॥ काया पालटे दरुषणें । अवघें कोंदाटे चैतन्य । जीवशिवा खंडण । होय तरे चिंतितां ॥ ५ ॥ तुका म्हणे याचि भावें । आम्ही धालों तुझ्या नांवें । सुखें होत जन्में । भलते याती भलतैसीं ॥ ६ ॥ [३२०९]

मौन्य कां धरिलें विश्वाच्या जीवना । उत्तर वचना देई माझ्या ॥ १ ॥ तूं माझें संचित तूंचि

स्वहिताची जोड करा व मागील आशा टाका १०. सुनेचे हे शब्द ऐकून सासू मनांत विचार करूं लागली ११. ती सासू म्हणूं लागली, कीं ही सून माझ्या सवतीसारखी आहे; हिचे चाळे अगदीं खोटे आहेत म्हणूनच हिला मी जावेंसें वाटतें १२. आतां मी कशाकरितां यात्रेला जाऊं ? तेथें जाऊन काय पाहूं ? १३ मुलेंबाळें व घरदार ह्या ठिकाणींच माझें पंढरपूर आहे १४. तुकाराम महाराज म्हणतात, असें मायेच्या योगानें सर्व जग मोहित झालें आहे १५. [३२०६]

पतिव्रतेची स्तुति केलेली ऐकून, छिनालीच्या मस्तकाला तिडीक उठते १. आम्ही जें बोलतों तें सहज आहे, त्याच्याबद्दल आधीं कोणाचाहि विचार करून ठेविला नाहीं २. ज्याच्या अंगीं दोष आहे, त्याला आमचें बोलणें टाळक्यांत मारल्यासारखें होतें; त्यायोगेंकरून त्याच्या डोळ्यांतून पुष्कळ पाणी गळतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं त्याला काय करावें ? ज्याच्या अंगाला क्षत पडलें आहे त्यास सहज धक्का लागतो (त्याप्रमाणें आमचें बोलणें चांगलें असलें तरी दुष्टाच्या मनाला तें झोंबणारच) ४. [३२०७]

देव आहे असें वाणीनें बोलावें. तो सगुण साकार नाहीं, तो निराकार आहे असा त्याचा आपल्या मनांत अनुभव घ्यावा १. मग जी देहाची देहावर आवड आहे त्यावरच्या आवडीचा, अंतःकरणांतील अनुभवलेल्या स्वरूपाशीं, मेळ बसेल २. पुत्राशीं आईची भेट पुष्कळ काळानें होते तेव्हां मुलाचें रडें नाहींसें होतें, व आनंदाचा त्याला योग होतो. अथवा, उभयतांच्या भेटीमध्यें रडणें व हर्ष हीं प्रगट होतात, असा त्यांच्या परस्परांच्या दर्शनाचा अपूर्व प्रकार आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, एकानें दुसरें कळतें, म्ह० बऱ्यानें बरें व खोट्यानें खोटें समजतें ४. [३२०८]

आतां माझ्या चित्तामध्यें हीच प्रीति असो, कीं विठ्ठल जागृतींत, स्वप्नांत व सुषुप्तींत राहावा १. दुसरें कांहीं राज्य, संपत्ति, धन हें मागण्याची इच्छा नाहीं. जिव्हेनें तुझें नाम घेतांना माझ्या देहाला सुख व्हावें २. हे देवा, तुझें रूप सर्व ठिकाणीं दिसावें इतकें तुझ्याविषयीं माझ्या चित्तांत प्रेम असूं द्यावें. माझ्या चित्ताचा अनुभव तुमच्या पायांच्या ठिकाणीं असावा ३. जन्ममरणाची बाधा समूळ नाहींशी व्हावी व हरिगोविंद ह्या नामाचा वाणीला निरंतर छंद असावा ४. देवा, तुझ्या दर्शनानें देह पालटतो, सर्वत्र चैतन्य कोंडून भरलेलें भासतें व जीवशिवभाव नाहींसा होऊन श्रीहरीच्या चिंतनानें तरणोपाय होतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या अशा भावनेनें तुझें नांव घेऊन आम्ही तृप्त झालों आहों; आतां पाहिजे त्या जातीमध्यें पाहिजे तो जन्म सुखानें मिळो ६. [३२०९]

हे संपूर्ण विश्वाच्या जीवना, तुम्हीं मौन कां धरिलें आहे ? मी जें कांहीं विचारीत आहें त्याला तुम्हीं उत्तर द्यावें १.

पूर्वपुण्य । तूं माझें प्राचीन पांडुरंगा ॥ २ ॥ तूं माझें सत्कर्म तूं माझा स्वधर्म । तूंचि नित्यनेम नारायणा ॥ ३ ॥ कृपावचनाची वाट पाहातसें । करुणा वोरसें बोला कांहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे प्रेमळाच्या प्रियोत्तमा । बोल सर्वोत्तमा मजसवें ॥ ५ ॥ [३२१०]

काय करूं आतां धरूनियां भीड । निःशंक हें तोंड वाजविलें ॥ १ ॥ नव्हे जगीं कोणी मुकियाचा जाण । सार्थक लाजोनि नव्हे हित ॥ २ ॥ आलें तें उत्तर बोलों स्वामीसवें । धीट नीट जीवें होऊनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे मना समर्थाशीं गांठी । घालावी हे मांडी थापटूनी ॥ ४ ॥ [३२११]

भ्रतारासी भार्या बोले गुज गोष्टी । मज ऐसी कष्टी नाहीं दुजी ॥ १ ॥ अखंड तुमचें धंद्यावरी मन । माझें तों हेळण करिती सर्व ॥ २ ॥ जोडितसां तुम्ही खाती येर चोर । माझीं तंव पोरें हळहळती ॥ ३ ॥ तुमची व्याली माझे डाई हो पेटली । सदा दुष्ट बोली सोसवेना ॥ ४ ॥ दुष्टवृत्ति नंदुली सदा द्वेष करी । नांदों मी संसारीं कोण्या सुखें ॥ ५ ॥ जावा दीर कांहीं धड ही न बोले । नांदों कोणाखालें कैसी आतां ॥ ६ ॥ माझ्या अंगसंगें तुम्हांसी विश्रांति । मग धडगति नाहीं तुमची ॥ ७ ॥ ठाकतें ठमकतें जीव मुठी धरूनि । परि तुम्ही अजूनि न धरा लाज ॥ ८ ॥ वेगळें निघतां संसार करीन । नाहीं तरी प्राण देतें आतां ॥ ९ ॥ तुका म्हणे झाला कामाचा अंकित । सांगे मनोगत तैसा वर्ते ॥ १० ॥ [३२१२]

कामाचा अंकित कांतेतें प्रार्थीत । तूं कां हो दुश्चित निरंतर ॥ १ ॥ माझीं मायबापें बंधु हो बहिण । तुज करती सीण त्यागीन मी ॥ २ ॥ त्यांचें जरी तोंड पाहेन मागुता । तरी मज हत्या घडो तुझी ॥ ३ ॥ सकाळीं उठोन वेगळा निघेन । वाहतों तुझी आण निश्चयेंसी ॥ ४ ॥ वेगळें निघतां घडीन दोरे चुडा । तूं तंव माझा जोडा जन्माचा कीं ॥ ५ ॥ ताईत सांखळी गळांची दुलडी । बाजुबंद जोडी

माझें संचित कर्म व पूर्व पुण्य तूंच आहेस ! हे पांडुरंगा, माझें प्रारब्धहि तूंच आहेस ! २. हे नारायणा, माझें सत्कर्म व स्वधर्म तूंच आहेस व माझा नित्य नेम तूंच आहेस ३. तुझ्या कृपेच्या शब्दांची मी वाट पाहात आहें; कांहीं तरी कृपेच्या भरांत आमच्याशीं बोल ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे सर्वोत्तमा, हे प्रेमळ भक्तांच्या प्रियोत्तमा, तुम्ही माझ्याबरोबर चार शब्द बोला ५. [३२१०]

देवा, तुझी भीड धरून काय करूं ? म्हणून निःशंकपणानें मी तुला बोलतों १. मुक्याचा जाणणारा (कैवारी) जगतांत कोणी नाहीं, म्हणून लज्जा धरल्यानें हितसार्थकता होत नाहीं २. जीवानें धीट होऊन, ज्या वेळीं जसें बोलण्याचा प्रसंग येईल, त्या वेळीं तसें आम्ही स्वामीशीं बोलूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे मना, समर्थाशीं मांडी थापटून शौर्यानें सामना करावा ४. [३२११]

नवऱ्याशीं बायको एकांतांत गुप्त गोष्टी बोलूं लागली. त्या अशा, कीं माझ्यासारखी दुःखी कोणी नसेल १. तुमचें लक्ष निरंतर धंद्याकडे असतें व वरामध्यें माझी सर्व हेळसांड करतात २. तुम्ही पैसे मिळवितां व घरांतील हे सर्व चोर खाऊन जातात, पण माझीं पोरें तर तरफडत बसतात ३. तुम्हांला जन्म दिलेली आई माझ्या द्वेषाग्नीनें नुसती पेटली आहे. तिचें सर्वदा दुष्ट बोलणें सोसत नाहीं ४. माझी नणंद तर फार दुष्ट आहे. ती माझा नेहमीं द्वेष करते. आतां मी ह्या संसारांत कोणत्या प्रकारें वागूं ? ५. आपले भाऊ माझे दीर हे तर कधीं धड बोलतच नाहींत. मी कोणाच्या हाताखालीं आतां कशी नांदूं ? ६. माझ्या अंगसंगतीनें तुम्हांला विश्रांति मिळत आहे पण मग मी मेल्यावर तुमची धडगत नाहीं ७. मी आपला जीव मुठींत धरून नटून थटून असतें, पण माझे हाल होतात त्याबद्दल तुम्हांला लाज वाटत नाहीं ८. तुम्ही वेगळे निघालां तर मी संसार करीन, नाहींतर आतां जीव देतें ९. तुकाराम महाराज म्हणतात, नवरा कामाच्या आधीन झाल्यामुळें, जशी ती इच्छा दर्शविते, तसा तो वागूं लागतो १०. [३२१२]

मग स्त्रीकामाधीन झालेला तो नवरा आपल्या बायकोची प्रार्थना करूं लागला, कीं तूं निरंतर अशी दुश्चित्त (उदास) कां असतेस ? १. माझे आईबाप, बहीणभाऊ हे जर तुला त्रास देत असतील, तर त्यांचा मी त्याग करीन २. पुनः मीं जर त्यांचें तोंड पाहिलें, तर मला तुझी हत्या घडेल ३. उद्यां सकाळीं उठल्याबरोबर वेगळा निघेन, ह्याबद्दल मी निश्चयानें तुझी शपथ वाहातों ४. वेगळें निघण्याच्या वेळीं तुला बांगड्या आदिकरून दागदागिने करीन; कारण

हातसर ॥ ६ ॥ वेणीचे जे नग सर्वही करीन । नको धरूं सीण मनीं कांहीं ॥ ७ ॥ नेसावया साडी सेलारी चुनडी । अंगींची कांचोळी जाळिया फुलें ॥ ८ ॥ तुका म्हणे केला रांडेनें गाढव । मनासवें धांव घेतलीसे ॥ ९ ॥ [३२१३]

उजळितां उजळे दीपकाची वाती । स्वयंभ ते ज्योति हिऱ्या अंगीं ॥ १ ॥ एकीं महाकष्टें मिळविलें धन । एकासी जतन दैवयोगें ॥ २ ॥ परिमळें केलें चंदनाचें चिन्ह । निवडितो भिन्न गाढव तो ॥ ३ ॥ तुका म्हणे जया अंगीं नाम ठसा । तो तरे सहसा वंद्य होय ॥ ४ ॥ [३२१४]

सोवळा तो झाला । अंगीकार देवें केला ॥ १ ॥ येर करिती भोजन । पोट पोसाया दुर्जन ॥ २ ॥ चुकला हा भार । तयाचीच येरझार ॥ ३ ॥ तुका म्हणे दास । झाला तया नाहीं नास ॥ ४ ॥ [३२१५]

आजि शिवला मांग । माझें विटाळलें आंग ॥ १ ॥ यासी घेऊं प्रायश्चित । विठ्ठल विठ्ठल हृदयांत ॥ २ ॥ झाली क्रोधासवें भेटी । तोंडावाटे नर्क लोटी ॥ ३ ॥ अनुतापीं न्हाऊं । तुका म्हणे रवी पाहूं ॥ ४ ॥ [३२१६]

ठाव तुम्हांपाशीं । झाला आतां हृषीकेशी ॥ १ ॥ न लगे जागावें सतत । येथें स्वभावें हे नीत ॥ २ ॥ चोरट्यासी थारा । येथें कैंचा जी दातारा ॥ ३ ॥ तुका म्हणे मन । आम्हां झालें समाधान ॥ ४ ॥ [३२१७]

पाळियेले लळे । माझे विठ्ठले कृपाळे ॥ १ ॥ बहु जन्मांचें पोसणें । सरतें पायांपाशीं तेणें ॥ २ ॥ सवे दिली लागों । भातें आवडीचें मागों ॥ ३ ॥ तुका म्हणे भिन्न । नाहीं दिसों दिलें क्षण ॥ ४ ॥ [३२१८]

जो या गेला पंढरपुरा । आणीक यात्रा न मनी तो ॥ १ ॥ सुलभ माय पंढरिराणा । पुरवी

तुझा–माझा जन्माचा जोडा आहे ५. तुला ताईत, सांखळया, गळ्यांत घालण्याची दुलड, बाजूबंदाचा जोड व हातसर हे दागिने करीन ६. वेणींतील फुलें करीन, त्याच्याबद्दल तूं कांहीं मनांत काळजी करूं नको ७. तुला नेसावयास शेलारी साडी व चुनडी व अंगांतील कांचोळी आणि जाळया, फुलें, हें सर्व करीन ८. तुकाराम महाराज म्हणतात, त्या आपल्या पतीला त्या रांडेनें गाढव केला, म्हणून तो तिच्या मनाप्रमाणें वागत आहे ९. [३२१३]

दिव्यांतील वात लाविली असतां ज्योत प्रगट होते आणि हिऱ्याचे ठिकाणीं जो प्रकाश आहे तो स्वतःसिद्ध आहे १. एकानें मोठ्या कष्टानें पैसे मिळविले तर कित्येकांना दैवयोगेंकरून पित्यानें जतन केलेलें धन मिळतें २. सुगंधानें चंदनाचें चिन्ह प्रगट केलें आहे, त्या चंदनाची व परिमळाची जो निवड करील तो गाढव आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या अंगीं हरिनामाचा ठसा उमटला आहे, तो एक तरला जाऊन सर्वांना वंद्य होतो ४. [३२१४]

ज्याचा देवानें अंगीकार केला आहे तो सोंवळा आहे १. बाकीचे दुर्जन पोट भरण्याकरितां जेवण जेवतात २. जन्ममृत्युरूपी संसाराचा येरझाररूपी बोजा नाहींसा झाला ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो हरीचा दास झाला आहे त्याला कधींहि नाश नाहीं ४. [३२१५]

आज मला (क्रोधरूपी) मांग शिवला त्यानें माझें आंग विटाळलें १. ह्याबद्दल हृदयानें विठ्ठलाचें चिंतन करण्याचें प्रायश्चित्त घेईन २. अंतःकरणांत क्रोधाचा उदय झाल्यानें मुखावाटे जे शब्द येतात ते नरकवत् होत ३. तुकाराम महाराज म्हणतात, अनुतापतीर्थामध्यें स्नान करून आत्मबोध सूर्याचें दर्शन घेईन ४. [३२१६]

हे हृषीकेशी, तुझ्या पायांपाशीं आतां आम्हीं वस्ती केली १. आतां सतत जागृत राहाण्याचें कारण नाहीं, अशी ह्या ठिकाणची स्वभावतः नीति आहे २. अहो जी दातारा देवा! ह्या ठिकाणीं चोरट्याला आश्रय कसला आला आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमचा आधार मिळाल्यामुळें आमच्या मनाचें समाधान झालें ४. [३२१७]

कृपाळू विठ्ठलानें माझे लाड पुरविले १. अनेक जन्म तो आमचें पोषण करीत आल्यामुळें देवाचे पायांपाशीं आम्ही मान्य झालों २. आम्हांला संवय लावल्यामुळें प्रियकर खाऊ आम्ही मागत आहोंत ३. तुकाराम महाराज म्हणतात, वेगळें असें आम्हांला क्षणभर देखील देवानें ठेविलें नाहीं ४. [३२१८]

जो या पंढरपुरास गेला तो अन्य यात्रा मानीत नाहीं १. पंढरीचा राजा ही आई मोठी सुलभ असून, भक्तांच्या

खुणा अंतरींच्या ॥ २ ॥ जन्मांतरींच्या पुण्यरासी । वारी त्यासी पंढरीची ॥ ३ ॥ बाहेर येतां प्राण फुटे । रडें दाटे गहिंवरें ॥ ४ ॥ दधिमंगळ भोजन सारा । म्हणती करा मुरडींव ॥ ५ ॥ मागुता हा पाहों ठाव । पंढरिराव दर्शनें ॥ ६ ॥ तुका म्हणे भूवैकुंठ । वाळुवंट भींवरा ॥ ७ ॥ [३२१९]

न मिळती एका एक । जये नगरींचे लोक ॥ १ ॥ भलीं तेथें राहूं नये । क्षणें होईल न कळे काय ॥ २ ॥ न करितां अन्याय । बळें करिती अपाय ॥ ३ ॥ नाहीं पुराणाची प्रीति । ठायीं ठायीं पंचाइती ॥ ४ ॥ भल्या बुऱ्या मारी । होतां कोणी न निवारी ॥ ५ ॥ अविचाऱ्या हातीं । देऊनि प्रजा नागविती ॥ ६ ॥ तुका म्हणे दरी । सुखें सेवावी ते बरी ॥ ७ ॥ [३२२०]

शिकवणें नाक झाडी । पुढील जोडी कळेना ॥ १ ॥ निरयगांवीं भोग देतां । तेथें सत्ता आणिकांची ॥ २ ॥ अवगुणांचा सांठा करी । तेचि धरी जीवासी ॥ ३ ॥ तुका म्हणे जडबुद्धि । कर्मशुद्धी सांडवी ॥ ४ ॥ [३२२१]

गोपिचंदनमुद्रा धरणें (धारणें) । आम्हां लेणें वैष्णवां ॥ १ ॥ मिरवूं अळंकार लेणें । हीं भूषणें स्वामीचीं ॥ २ ॥ विकलों तो सेवाजीवें । एक्या भावें एकविध ॥ ३ ॥ तुका म्हणे शूर झालों । बाहेर आलों संसारा ॥ ४ ॥ [३२२२]

विषयांचे लोलिंगत । ते फजीत होतील ॥ १ ॥ न सरे येथें यातिकुळ । शुद्ध मूळ बीज व्हावें ॥ २ ॥ शिखासूत्र सोंग वरी । दुराचारी दंड पावे ॥ ३ ॥ तुका म्हणे अभिमान । नारायणा न सोसे ॥ ४ ॥ [३२२३]

अंतःकरणांतील इच्छा पूर्ण करते २. जन्मजन्मांतरीं ज्यानें राशीच्या राशि पुण्य केलें असेल, तोच पंढरीचा वारकरी बनतो ३. वारी झाल्यावर देवाचा निरोप घेऊन बाहेर पडतांना भक्तजनांचे प्राण कासावीस होतात व ते मोठ्या गहिंवरानें रडूं लागतात ४. पंढरींतून निघण्याचे वेळीं दहींभाताचें मंगल भोजन करितात आणि मुरडीचे कानवले करा म्हणतात ५. कारण तसें केल्यानें पुनः हें पंढरीचें ठिकाण मुरडून पाहावयास मिळेल व पांडुरंगाचें दर्शन होईल ६. तुकाराम महाराज म्हणतात, भीमेचें वाळवंट हे सर्वांत पवित्र असें भूवैकुंठच आहे ७. [३२१९]

ज्या गांवांतल्या लोकांचें एकमेकांशीं जमत नाहीं १. चांगल्यानें त्या ठिकाणीं राहूं नये ! कारण एका क्षणांत तेथें काय होईल हें कळणार नाहीं २. कांहीं अन्यायाचें वर्तन न करतां बळजबरीनें जेथें शिक्षा करितात ३. ज्या गांवांतील लोकांची पुराणाचे ठिकाणीं प्रीति नसून जे ठिकठिकाणीं पंचाइती करीत बसतात ४. वाईट लोक चांगल्याला मारीत असतांना त्यांचें निवारण कोणी करीत नाहींत ५. अविचारी लोकांच्या हातीं अधिकार देऊन त्यांच्या हातानें प्रजेला बुडवितात ६. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या गांवांत राहाण्यापेक्षां सुखानें पर्वताच्या दरीचें सेवन करणें हें चांगलें ७. [३२२०]

एखाद्यास कांहीं चांगली गोष्ट शिकविली तर तो नाक झाडतो (धिःक्कार करतो) व त्या योगानें पुढें काय गति होईल ही त्याला कळत नाहीं १. नरकदुःख भोगीत असतां दुसऱ्याचे सत्तेखालीं राहावें लागतें २. अवगुणांचाच संग्रह ज्यानें केला आहे व तोच जीवांत धरून राहिला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा जीवाची जड बुद्धि ही सत्कर्माविषयींच्या बुद्धीचा त्याग करविते ४. [३२२१]

गोपीचंदनाचे द्वादश टिळे लावून मुद्रा धारण करणें हेच आम्हां वैष्णव जनांचे अलंकार होत १. अशा प्रकारचे अलंकार धारण करूं, कारण हीं सर्व स्वामीचीं (पांडुरंगाचीं) भूषणें आहेत २. श्रीहरीच्या सेवेकडेच एकविधभावनेनें आम्हीं आपला जीव विकला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी शूर होऊन संसाराच्या बाहेर पडलों आहें ४. [३२२२]

जे जीव विषयासक्त आहेत ते ह्या परमार्थाचे ठिकाणीं फजीत होतील १. ह्या ठिकाणीं उत्तम जातीची अगर उत्तम कुळाची जरूरी नाहीं; मात्र त्या परमार्थाचें मूळबीज (भावना) शुद्ध पाहिजे २. शेंडी व जानवें हें ब्राह्मणपणाचें वरच्या बाजूचें सोंग आहे. ह्या घमेंडीवर जर तो दुराचरण करील, तर त्याला शिक्षा होईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, नारायणाला कोणत्याहि प्रकारचा अभिमान सहन होत नाहीं ४. [३२२३]

वडिलें दिलें भूमिदान। तें जो मागे अभिलाषून ॥ १ ॥ अग्रपूजेचा अधिकारी। श्रेष्ठ दंड यमा घरीं ॥ २ ॥ उभयकुळ समवेत। नरकीं प्रवेशे अद्भुत ॥ ३ ॥ तप्तलोहा भेटी। तुका म्हणे कल्पकोटी ॥ ४ ॥ [३२२४]

लटिकी ग्वाही सभेआंत। देतां पतित आगळा ॥ १ ॥ कुंभपाकीं वस्ती करूं। होय धुरु कुळेंसीं ॥ २ ॥ रजस्वला रुधिर स्रवे। तेंचि घ्यावें (द्यावें) तृषेसी ॥ ३ ॥ तुका म्हणे जन्मा आला। काळ झाला कुळासी ॥ ४ ॥ [३२२५]

आचरे दोष न धरी धाक। परीपाक दुःखाचा ॥ १ ॥ चांडाल तो दुराचारी। अंगीकारी कोण त्या ॥ २ ॥ नव्हे संतान वोस घर। अंधकार कुळासी ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याचें दान। घेतां पतन दुःखासी ॥ ४ ॥ [३२२६]

कींविलवाणा झाला आतां। दोष करितां न विचारी ॥ १ ॥ अभिलाषी नारी धन। झकवी जन लटिकेंचि ॥ २ ॥ विश्वासिया करितां घात। न धरी चित्त कंटाळा ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं आला। वृथा गेला जन्मासी ॥ ४ ॥ [३२२७]

घेऊं नये तैसें दान। ज्याचें धन अभिलाषी ॥ १ ॥ तोही येथें कामा न ये। नरका जाय म्हणोनि ॥ २ ॥ विकी स्नानसंध्या जप। करी तप पुढिलांचें ॥ ३ ॥ तुका म्हणे दांभिक तो। नरका जातो स्वइच्छा ॥ ४ ॥ [३२२८]

सदा नामघोष करूं हरिकथा। तेणें सदा चित्ता समाधान ॥ १ ॥ सर्वसुख ल्यालों सर्व अलंकार। आनंदें निर्भर डुलतसों ॥ २ ॥ असों ऐसा कोठें आठवही नाहीं। देहींच विदेही भोगूं दशा ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही जालों अग्निरूप। लागों नेदूं पापपुण्य अंगा ॥ ४ ॥ [३२२९]

वडिलांनीं जी जमीन दान केली आहे, तिचा लोभ धरून ती जो परत मागतो १. तो यमाच्या घरीं अग्रपूजेचा अधिकारी आहे; म्हणून त्याला तेथें मोठी शिक्षा होते २. आईचें व बापाचें अशा उभय कुळांसहवर्तमान तो अद्भुत नरकामध्यें पडेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, कोटिकल्पपर्यंत त्याला तापलेल्या लोहाचा योग होईल ४. [३२२४]

कचेरीमध्यें जो कोणी खोटी साक्ष देतो, तो महापातकी पतित आहे १. तो नरकाच्या ठिकाणीं वस्ती करणाऱ्या कुळांमध्यें श्रेष्ठ होईल २. रजस्वलेचा जो रक्तस्राव होतो तो त्याला तहानेच्या वेळेस पिण्यास मिळेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा हा प्राणी जन्माला येऊन आपल्या कुळाला काळच झाला आहे ४. [३२२५]

अधोगतीची भीति न धरतां कोणी पापाचरण करतो त्याचा परिणाम दुःखदायक होतो १. असा हा दुराचारी चांडाळ आहे, म्हणून त्याचा कोण अंगीकार करील ? २. त्याची कधींहि संतति वाढणार नाहीं. सर्व घर ओस पडेल व तो आपल्या कुळास काळिमा लावील ३. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या पुरुषापासून दान घेणारा दुःखी होऊन अधोगतीला जाईल ४. [३२२६]

पापाचरण करण्याचे वेळेस कांहीं विचार केला नाहीं व आतां केंविलवाणा दीन झाला आहे १. ज्यानें स्त्रीचा व धनाचा अभिलाष धरून लोकांना खोटेंच फसविलें २. ज्याच्या चित्तानें विश्वासघात करण्याविषयीं कधींहि कंटाळा केला नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा प्राणी जन्माला न आल्यासारखा व्यर्थ गेला ४. [३२२७]

लोकांच्या चोरून आणलेल्या किंवा अनीतीनें मिळविलेल्या द्रव्याचा अभिलाष धरून ज्यानें तें संपादन केलें आहे त्यानें दान दिलें तरी तें घेऊं नये १. कारण तो प्राणी अधोगतीला जाणार आहे, म्हणून तो केवळ निरुपयोगी झाला आहे २. स्नानसंध्या, जप केल्याचें पुण्य जो विकतो व दुसऱ्याबद्दल अनुष्ठान करतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, असला जो दांभिक आहे तो स्वइच्छेनें अधोगतीस जातो ४. [३२२८]

आम्ही सर्व काळ नामघोष करून हरीची कथा करतों; त्या योगानें आमच्या चित्तांत सर्व काळ समाधान असतें १. श्रीहरीच्या चिंतनाच्या सर्व सुखाचे अलंकार आम्हीं अंगावर घातले आहेत. त्या आनंदाच्या छंदानें आम्ही डुलत आहोंत २. आम्ही कोठें राहातों ह्याविषयींची आठवण नाहीं, अशी विदेहपणाची अवस्था आम्ही देही असून भोगतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही अग्निरूप झालों आहोंत [ब्रह्मरूप झालों आहोंत], म्हणून पापपुण्याचा मळ आम्ही अंगास लागूं देणार नाहीं ४. [३२२९]

वरीवरी बोले युद्धाचिया गोष्टी । परसैन्या भेटी नाहीं झाली ॥ १ ॥ पराव्याचे भार पाहुनियां दृष्टी । कांपतसे पोटीं थरथरां ॥ २ ॥ मनाचा उदार रायाचा जुंझार । फिरंगीचा मार मारीतसे ॥ ३ ॥ धन्य त्याची माय धन्य त्याचा बाप । अंगीं अनुताप हरिनामें ॥ ४ ॥ तुका म्हणे साधु बोले खर्ग (खड्ग) धार । खोंचतें अंतर दुर्जनाचें ॥ ५ ॥ [३२३०]

गंधर्वनगरीं क्षण एक न राहावें । तैंचि (पैं) करावें मूळक्षेत्र ॥ १ ॥ खपुष्पाची पूजा बांधोनि निर्गुणा । लक्ष्मीनारायणा तोषवावें ॥ २ ॥ वंध्यापुत्राच्या लग्नाचा सोहळा । आपुलिया डोळां पाहों वेगीं ॥ ३ ॥ मृगजळा पाहे घालूनि सज्ञाना । तापलिया जना निववावें (तोषवावें) ॥ ४ ॥ तुका म्हणे मिथ्या देहेंद्रियकर्म । ब्रह्मार्पण ब्रह्म होय बापा ॥ ५ ॥ [३२३१]

दासीचा जो संग करी । त्याचे पूर्वज नर्कद्वारीं ॥ १ ॥ ऐसें सांगों जातां जना । नये कोणाचिया मना ॥ २ ॥ बरें विचारूनी पाहें । तुज अंतीं कोण आहे ॥ ३ ॥ तुका म्हणे रांडलेका । अंतीं जाशिल यमलोका ॥ ४ ॥ [३२३२]

भाग्यवंत आम्ही विष्णुदास जनीं । अभंग प्रसंगीं धैर्यवंत ॥ १ ॥ नाहीं तें पुरवीत आणुनि जवळी । गाउनी माउली गीत सुखें ॥ २ ॥ प्रीति अंगीं असे सदा सर्वकाळ । वोळलीं सकळ सुखें ठायीं ॥ ३ ॥ आपुल्या स्वभावें जैसे जेथें असों । तैसे तेथें दिसों साजिरेचि ॥ ४ ॥ वासनेचा कंद उपडिलें मूळ । दुरितें सकळ निवारिलीं ॥ ५ ॥ तुका म्हणे भक्तजनांची माउली । करील साउली विठ्ठल आम्हां ॥ ६ ॥ [३२३३]

भोंदावया मीस घेऊनि संतांचें । करी कुटुंबाचें दास्य सदा ॥ १ ॥ मनुष्याचे परी बोल रावा करी ।

तो वरवर युद्धाच्या गोष्टी सांगतो, पण त्या कोठपर्यंत म्हणाल तर जोंपर्यंत परक्या सैन्याची गांठ पडली नाहीं तोंपर्यंतच १. परक्या सैन्याचा आलेला समुदाय पाहून त्याचें हृदय थरथरां कापूं लागतें २. जो मनानें जीवावर उदार झाला आहे, तो राजाचा खरा लढवय्या सेवक असून शत्रूवर तरवारीचा मार करितो ३. असाच चित्तांत अनुताप होऊन, जो हरीच्या नामाचा सर्वकाळ जप करितो, त्याचे आईबाप धन्य आहेत ४. तुकाराम महाराज म्हणतात, वैष्णवांचें बोलणें तलवारीच्या धारेसारखें तीक्ष्ण असतें. त्या योगानें दुर्जनांचें अंतःकरण भेदलें जातें ५. [३२३०]

ढगाचे ठिकाणीं गंधर्व नगर दिसतें. तें घटकाभर सुद्धां स्थिर राहात नाहीं. तें जर स्थिर राहील तर तेथें वसतिस्थान करावें १. आकाशाच्या पुष्पाची दोऱ्याशिवाय माळ करून लक्ष्मीनारायणाची पूजा करून त्यांना संतोषविणें [हें मिथ्या आहे] २. वांझेच्या मुलाचा लग्नसोहळा त्वरेनें जाऊन आपल्या डोळ्यानें पाहावा ३. अरे शहाण्या, मृगजलाची पाणपोई घालून संतप्त झालेल्या लोकांना शांत करावें (असें होईल का?) ४. तुकाराम महाराज म्हणतात, तें जसें सर्व खोटें आहे, तसें देहसंबंधीं इंद्रियांचीं कर्में खोटीं आहेत, तीं सर्व ब्रह्मार्पण करून, हे बापा, तूं ब्रह्मरूप हो ५. [३२३१]

जो कोणी दासीशीं गमन करितो त्याचे पूर्वज अधोगतीला (नरकांत) जातात १. ह्याप्रमाणें मी सर्व जनांस सांगत असतां, हें कोणाच्या मनास येत नाहीं २. अरे, तूं पुरतेपणीं विचार करून पाहा. तुला अखेरीस कोण साहाय्य होणार आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे रांडेच्या लेका, तूं शेवटीं यमलोकास जाशील ४. [३२३२]

आम्ही विष्णूचे सेवक ह्या जगतामध्यें मोठे भाग्यवंत आहोंत व प्रसंगीं न भंगणारे असे आम्ही धैर्यवान आहोंत १. विठाबाई आईचें गाणें आम्ही गातों; त्या सुखानें ती आई आमच्याजवळ नाहींत ते पदार्थ आणून देऊन आमची इच्छा पूर्ण करते २. तिच्याविषयींची आवड आमच्या ठिकाणीं सर्व काळ आहे, त्या योगानें सर्व सुखें आम्हांस बसल्या ठिकाणीं प्राप्त झालीं आहेत ३. आम्ही आपल्या लहरीनें ज्या ठिकाणीं असें वास्तव्य करूं तसे त्या ठिकाणीं शोभिवंत दिसत आहोंत ४. सर्व वासनेचा मूळ गड्डा उपटून काढला; त्या योगानें सकळ पातकांचा नाश झाला ५. तुकाराम महाराज म्हणतात, विठाबाई सर्व भक्तजनांची आई आहे, ती आमच्यावर कृपेची छाया करीत आहे ६. [३२३३]

जनांस भोंदण्याकरितां संतांचीं सोंगें घेऊन सर्व काळ आपल्या कुटुंबाची सेवा करितो १. जसा पिंजऱ्यांतील राघू

रंजवी नरनारी जगामध्यें ॥ २ ॥ तिमयाचा बैल करी शिकविलें । चित्रींचें बाहुलें गोष्टी सांगे ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा जळो हे महंती । लाज नाहीं चित्तीं निसुगातें ॥ ४ ॥ [३२३४]

अंगीं घेऊनियां वारें दया देती । तया भक्तां हातीं चोट आहे ॥ १ ॥ देव्हारा बैसोनि हालविती सुपें । ऐसीं पापी पापें लिंपताती (लिंपती तीं) ॥ २ ॥ एकीबेकीन्यायें होतसे प्रचीत । तेणें लोक समस्त भुलताती ॥ ३ ॥ तयांचे स्वाधीन दैवतें असती । तरी कां मरती त्यांचीं पोरें ॥ ४ ॥ तुका म्हणे पाणी अंगारा जयाचा । भक्त कान्होबाचा तोही नव्हे ॥ ५ ॥ [३२३५]

अधमाचें चित्त अहंकारी मन । उपदेश शीण तया केला ॥ १ ॥ पापियाचें मन न करी आचार । विधवेसी शृंगार व्यर्थ केला ॥ २ ॥ अधमाचें चित्त दुश्चित ऐकेना । वायांवीण मना करूनी काय ॥ ३ ॥ गर्दभासी दिली चंदनाची उटी । केशर लल्लाटीं शूकराच्या ॥ ४ ॥ पतिवंचकेसी सांगतां उदंड । परि ते पाषांड तिचे मनीं ॥ ५ ॥ तुका म्हणे तैसें अभाविकां सांगतां । वाउगाचि चित्ता सीण होय ॥ ६ ॥ [३२३६]

संत देखोनियां स्वयें दृष्टी टाळी । आदरें न्याहाळी परस्त्रीसी ॥ १ ॥ वीट ये कर्णासी संतवाक्यामृता । स्त्रीशब्द ऐकतां निवे कर्ण ॥ २ ॥ कथेमाजी नीज वाढे नित्यक्षणीं । स्त्रियेचे कीर्तनीं प्रेमें जागे ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही क्रोधासी न यावें । स्वभावा करावें काय कोणीं ॥ ४ ॥ [३२३७]

भोळें भाविक हें जुनाट चांगलें । होय तसें केलें भक्तिभावें ॥ १ ॥ म्हणउनि चिंता नाहीं आम्हां दासां ।

मनुष्याप्रमाणें बोलतो तसा मधुर भाषणानें (मधुर, विनोदी भाषेंत कथाकीर्तनें करून) स्त्रीपुरुषांच्या चित्ताची रंजवणूक करितो २. जसा नंदीबैल मालकानें शिकविल्याप्रमाणें वागतो अथवा चित्रांतलें बाहुलें कळसूत्रधारी जसें बोलवील त्याप्रमाणें बोलतें, तसा तो शिकल्या शब्दांचें ब्रह्मज्ञान सांगतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, अशा कोडग्या मनुष्यास किती जरी सांगितलें तरी तो मनांत लाज धरीत नाहीं. तसल्या त्याच्या महंतपणास आग लागो ४. [३२३४]

क्षुल्लक दैवताचें वारें अंगांत भरून जे लोकांवर दया करितात तसल्या भक्तांच्या हातांत चोट आहे! (अकस्मात् लाभ करून देण्याचें कोणतेंहि साधन अशा भक्तांच्या हातीं नसतें) १. देव्हाऱ्यावर बसून सूप हालवून जे शकुन सांगतात, ते पापी अशा पापानें लिप्त होतात २. जसें मुलें एकीबेकी खेळतात तेव्हां साहाजिक हातांतला डाव एखादे वेळेस ओळखतात त्या न्यायानें लोकांमध्यें एखाद्यास ह्या ढोंग्यांची प्रचीति येते, त्या योगानें सर्व लोक भुलतात ३. जर त्याच्या स्वाधीन देव असते तर त्याचीं पोरें कां मेलीं असतीं? ४. तुकाराम महाराज म्हणतात, जे तीर्थ, अंगारे देणारे आहेत ते श्रीकृष्णाचे भक्त नाहींत ५. [३२३५]

ज्याचें चित्त अभिमानी आहे त्या दुष्टाला पारमार्थिक उपदेश केला असतां तो व्यर्थ जातो व करणारा श्रमी होतो १. जसें विधवेच्या अंगावर अलंकार घालणें व्यर्थ आहे, तसें त्या खळाला उपदेश करणें व्यर्थ आहे, कारण पाप्याचें मन कधींहि शुद्ध आचरण करावयाचें नाहीं २. त्या अधर्म्याचें चित्त सर्व काळ दुश्चित्त असल्यामुळें तो ऐकत नाहीं. मग त्याला व्यर्थ हरकत करून काय उपयोग आहे? ३. एखाद्या गाढवाच्या अंगास चंदनाची उटी लावणें, अथवा डुकराच्या कपालाला केशराचा टिळा लावणें (हें जसें व्यर्थ आहे त्याप्रमाणें) ४. व्यभिचार करणाऱ्या स्त्रीच्या अंगीं आपल्या नवऱ्याविषयीं तिरस्कार असतो; तिला जर पतिव्रताधर्माच्या गोष्टी सांगितल्या तर ती त्या मानीत नाहीं, कारण तिच्या मनांत अनेक प्रकारच्या कुतर्कांचें पाखंड असतें ५. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें अभाविक लोकांना हित सांगितलें असतां चित्ताला व्यर्थ श्रम होतो ६. [३२३६]

समोर संत आले हें पाहून आपली दृष्टि मुद्दाम चुकवून जो दुसरीकडे पाहातो, पण दुसऱ्याच्या स्त्रीला मोठ्या प्रीतीनें न्याहाळून पाहातो १. संतजनांचें अमृतासारखें वचन ऐकून जो त्रास मानतो, पण बायकांचें गाणें ऐकून त्याचे कान सुखावले जातात २. हरिकथेस गेला तर क्षणोक्षणीं ज्याची झोंप वाढत असते, पण कोणी बायकांचें वर्णन करूं लागला तर त्या ठिकाणीं मोठ्या प्रेमानें जागत बसतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे तुम्ही माझ्या बोलण्यावर रागावूं नका, कारण स्वभावाला कोणीं काय करावें? ४. [३२३७]

हें दैवत अनादि जुनें असून उत्तम भोळें भाविक आहे, म्हणून ह्याला भक्तिभावानें जसें रूप द्यावें तसें तें होतें १.

न भिवों गर्भवासा जन्म घेतां ॥ २ ॥ आपुलिया इच्छा करूं गदारोळ। भोगूं सर्वकाळ सर्व सुखें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां देवाचा सांगात। नाहीं विसंबत येरयेरां ॥ ४ ॥ [३२३८]

नाहीं बळ योग अभ्यास कराया। न कळे ती क्रिया साधनाची ॥ १ ॥ तुझीये भेटीचें प्रेम अंतरंगीं। नाहीं बळ अंगीं भजनाचें ॥ २ ॥ काय पांडुरंगा करूं बा विचार। झुरतें अंतर भेटावया ॥ ३ ॥ तुका म्हणे सांगा वडीलपणें बुद्धि। तुजविण दयानिधि पुसों कोणा ॥ ४ ॥ [३२३९]

हेंचि सुख पुढती मागतों आगळें। आनंदाचीं फळें सेवादान ॥ १ ॥ जन्मजन्मांतरीं तुझाचि अंकिला। करूनि विठ्ठला दास ठेवीं ॥ २ ॥ दुजा भाव आड येऊं नेदीं चित्ता। करावा अनंता नाश त्याचा ॥ ३ ॥ अभय देऊनि करावें सादर। क्षण तो विसर पडों नेदीं ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्ही जे जे इच्छा करूं। ते ते कल्पतरू पुरविसी ॥ ५ ॥ [३२४०]

पवित्र तें कुळ पावन तो देश। जेथें हरिचे दास जन्म घेती ॥ १ ॥ कर्मधर्म त्यांचा जाला नारायण। त्यांचेनि पावन तिन्ही लोक ॥ २ ॥ वर्ण अभिमानें कोण जाले पावन। ऐसें द्या सांगून मजपाशीं ॥ ३ ॥ अंत्यजादि योनि तरल्या हरिभजनें। तयाचीं पुराणें भाट जालीं ॥ ४ ॥ वैश्य तुळाधार गोरा तो कुंभार। धागा हा चांभार रोहिदास ॥ ५ ॥ कबीर मोमीन लतिफ मुसलमान। सेना न्हावी आणि विष्णुदास ॥ ६ ॥ कान्होपात्रा खादु पिंजारी तो दादु। भजनीं अभेदू हरिचे पायीं ॥ ७ ॥ चोखामेळा वंका जाताचा महार। त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी ॥ ८ ॥ नामयाची जनी कोण तिचा भाव। जेवी पंढरीराव तियेसवें ॥ ९ ॥ मैराळ जनक कोण कूळ त्याचें।

ह्याकरितां आम्हां सेवकांस कोणत्याहि प्रकारची काळजी नाहीं व अनेक जन्म घेण्यास गर्भवासाचें भय नाहीं २. आम्ही आपल्या इच्छेप्रमाणें सर्व काळ हरिनामाचा गजर करून सर्व सुखाचा भोग घेऊं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही देवाच्या संगतींत सर्व काळ आहोंत, ते एकमेकांना कधींहि विसंबणार नाहीं ४. [३२३८]

हे देवा, योगाभ्यास करण्याविषयींची शक्ति आमच्या अंगीं नाहीं व अन्य साधनांची क्रिया आम्हांस समजत नाहीं १. फक्त तुझ्या भेटीचें प्रेम आमच्या अंतःकरणांत आहे; पण तुझें भजन करण्याची शक्ति आमच्या अंगीं नाहीं २. बा रे पांडुरंगा, तुझ्या भेटीकरितां आमचें अंतःकरण झुरत आहे, तुझ्या भेटीकरितां कोणतें साधन करण्याचा मी काय विचार करूं ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो दयासिंधु, तुम्ही मोठेपणाची बुद्धि मला सांगा. तुमच्यावांचून मीं तरी कोणास विचारावें ? ४. [३२३९]

हे देवा, तुमच्या सेवेचें मला दान द्या हेंच आनंदाचें फळ आहे. त्याकरितां तेंच अधिक सुख मी तुम्हांपाशीं वारंवार मागतों १. हे विठ्ठला, जन्मजन्मांतरीं तुझ्या आधीन होऊन मीं तुझें दास्यत्व करावें असें मला करून ठेवा २. ह्यावांचून दुसरा ठाव (विषय) माझ्या चित्तामध्यें उत्पन्न होऊं देऊं नका. जर उत्पन्न झाला तर हे अनंता, त्याचा तुम्ही नाश करा ३. मला निर्भय करून तुमच्या चिंतनाविषयीं तत्पर ठेवा व मला तुमचा विसर क्षणभर देखील पडूं देऊं नका ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तूं कल्पवृक्ष आहेस, म्हणून आम्हीं जी जी इच्छा करावी ती ती तूं पूर्ण करतोस ५. [३२४०]

ज्या ठिकाणीं हरीचे दास जन्म घेतात त्यांचें कूळ व तो देश अति पुनीत झालीं आहेत १. त्या वैष्णवांचे कर्मधर्म सर्व नारायणच झाल्यामुळें त्यांच्या योगानें त्रैलोक्य पुनीत झालें आहे २. उत्तम वर्णाभिमानाच्या योगानें कोणी पवित्र झाले असले तर ते मला निवडून सांगा ३. हरिभजनाच्या योगानें अंत्यज आदिकरून नीचलोक सुद्धां तरले. त्यांची कीर्ति पुराणांनीं भाट होऊन वर्णन केली आहे ४. सत्य तुलणारा तुलाधार वाणी व गोरोबा ह्या नांवाचा कुंभार व जोडे शिवणारा रोहिदास चांभार असे नीच हरिभजनानें तरले ५. मुसलमानांपैकीं कबीर, मोमीन व लतीबशा आणि सेना ह्या नांवाचा न्हावी असे हे विष्णूचे दास झाले ६. कान्होपात्रा ह्या नांवाची कलावंतीण व खोदू ह्या नांवाचा हिजडा व दादू ह्या नांवाचा पिंजारी ह्यांनीं श्रीहरीच्या पायांचें भजन अभेदत्वानें केलें (ते हरीच्या स्वरूपाशीं अभिन्न झाले) ७. चोखामेळा व वंका हे जातीचे महार असून, त्यांचे बरोबर सर्वांत श्रेष्ठ जो ईश्वर त्यानें ऐक्य केलें (म्ह० त्यानें आपल्यांत मिळवून घेतलें) ८. नामदेवरायाची दासी जनाबाई, हिच्याबरोबर पंढरीराव जेवण करीत होते, असा तिच्या ठिकाणीं मोठा भाव होता ९. मैराळ जनक ह्या नांवाचा भक्त होता. त्याचें कूळ कोणतें होतें हें सांगतां येत नाहीं. तो अति नीच असून

महिमान तयाचें काय सांगों ॥ १० ॥ यातायातीधर्म नाहीं विष्णुदासा । निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ॥ ११ ॥ तुका म्हणे तुम्ही विचारावे ग्रंथ । तारिले पतित नेणों किती ॥ १२ ॥ [३२४१]

पिकलिया सेंद कडुपण गेलें । तैसें आम्हां केलें पांडुरंगें ॥ १ ॥ काम क्रोध लोभ निमाले ठायींचि । सर्व आनंदाची सृष्टि जाली ॥ २ ॥ आठव नाठव गेले भावाभाव । जाला स्वयमेव पांडुरंग ॥ ३ ॥ तुका म्हणे भाग्य या नांवें म्हणीजे । संसारीं जन्मीजे याचि लागीं ॥ ४ ॥ [३२४२]

येऊनि नरदेहा विचारावें सार । धरावा पैं धीर भजनमार्गी ॥ १ ॥ चंचळ चित्तासी ठेवूनियां ठायीं । संतांचिये पायीं लीन व्हावें ॥ २ ॥ भावाचा पैं हात धरावा निश्चयें । तेणें भवभय देशधडी ॥ ३ ॥ नामापरतें जगीं साधन सोपें नाहीं । आवडीनें गाईं सर्वकाळ ॥ ४ ॥ तुका म्हणे धन्य वंश त्या नराचा । ऐसा निश्चयाचा मेरू झाला ॥ ५ ॥ [३२४३]

बीज भाजुनि (जाळुनि) केली लाही । आम्हां जन्ममरण नाहीं ॥ १ ॥ आकारासी कैंचा ठाव । देह प्रत्यक्ष जाला देव ॥ २ ॥ साकरेचा नव्हे ऊंस । अम्हां कैंचा गर्भवास ॥ ३ ॥ तुका म्हणे अवघा जोग । सर्वां घटीं पांडुरंग ॥ ४ ॥ [३२४४]

वैकुंठींचा देव आणिला भूतळा । धन्य तो आगळा पुंडलीक ॥ १ ॥ धारिष्ट धैर्याचा वरिष्ठ भक्तांचा । पवित्र पुण्याचा एकनिष्ठ ॥ २ ॥ पितृसेवापुण्यें लाधला निधान । ब्रह्म सनातन अंगसंगें ॥ ३ ॥ अंगसंगें रंग क्रीडा करी जाणा । ज्या घरीं पाहुणा वैकुंठींचा ॥ ४ ॥ धन्य त्याची शक्ति भक्तिची हे ख्याति । तुका म्हणे मुक्ति पायीं लोळे ॥ ५ ॥ [३२४५]

हरीच्या भजनानें किती श्रेष्ठ झाला? हें त्याचें माहात्म्य माझ्यानें वर्णन करवत नाहीं १०. विष्णूचें दास्यत्व करणारे जे आहेत तेथें जातिकुळाचे विशेष धर्म नाहींत, असा वेदशास्त्रांनीं सिद्धांत केला आहे ११. तुकाराम महाराज म्हणतात, हरिनामानें किती पातकी तारले हें मला समजत नाहीं, ह्याविषयीं तुम्ही पुराणादि सर्व ग्रंथांत शोध करून पाहा १२. [३२४१]

शेंदाडें पिकलीं असतां त्यांतील कडुपण जातें, तशी आमची स्थिति पांडुरंगांनीं केली आहे १. आमच्या देहाच्या ठिकाणीं काम, क्रोध, लोभ हे विकार होते ते जागच्या जागीं मेले; म्हणून आतां आम्हांला सर्व सृष्टि आनंदरूप झाली आहे २. देहादि प्रपंचाचा आठव आणि त्याविषयींचा अनाठव (विस्मरण) व तत्संबंधी भावाभाव हे सर्व नाहींसे होऊन माझा देह प्रत्यक्ष पांडुरंगस्वरूप झाला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशी जीवदशा नष्ट होऊन ब्राह्मी स्थिति ज्याला प्राप्त होईल त्यालाच भाग्यवंत म्हणावें व ह्याकरितांच संसारामध्यें जन्म घ्यावा ४. [३२४२]

अहो जन हो, नरदेहाला येऊन सारभूत काय आहे ह्याचा विचार करून हरीच्या भजनमार्गाच्या ठिकाणीं धैर्य धरावें १. तुमचें चित्त जें चंचल आहे तें एका ठिकाणीं स्थिर करून, संतांच्या पायांजवळ लीनपणानें टेवावें २. हरीविषयींचा भाव निश्चयानें धरावा, म्हणजे त्या योगानें संसाराचें भय देशोधडी होईल ३. हरिनामापरतें ह्या जगामध्यें दुसरें सोपें साधन नाहीं. ह्याकरितां सर्व काळ प्रीतीनें तेंच उच्चारावें ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा निश्चय मेरु पर्वताप्रमाणें ज्यानें अचळ केला आहे, त्या पुरुषाचा वंश धन्य आहे ५. [३२४३]

जोंधळे वगैरे बीज भाजून त्याची लाही करावी, त्याप्रमाणें जन्ममरणाचें बीज जें कर्म त्याची ज्ञानाग्नीनें भाजून लाही केली आहे, म्हणून आम्हांला जन्ममरण नाहीं १. आमचा देह प्रत्यक्ष देवच झाला आहे, म्हणून नाशिवंत आकारास (अविद्याकार्य असलेल्या जगदाकारास) आमच्या ठिकाणीं कशाचा ठाव आहे? २. उंसापासून साखर निर्माण होते, पण त्या साखरेचा पुनः ऊंस जसा होत नाहीं, तसा आम्हांला गर्भवास नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व भूतांच्या ठिकाणीं एक पांडुरंग आहे, अशा पूर्ण अनुभवाचें वैराग्य आमच्या ठिकाणीं आहे ४. [३२४४]

वैकुंठवासी जो देव तो ह्या पुंडलीकरायानें पृथ्वीवर आणला म्हणून ते सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहेत १. सर्व धैर्यवंतांमध्यें केवळ त्यांचें धारिष्ट्य झालें म्हणून ते सर्व भक्तांमध्यें श्रेष्ठ झाले व पुण्यवंतांमध्यें एकनिश्चयाच्या पुण्यानें पवित्र झाले २. हें पांडुरंग निधान त्यांना पित्याच्या सेवेनें प्राप्त झालें; तेंच सनातन ब्रह्म त्यांच्या सांनिध्यानें राहिलें आहे ३. ज्याचे घरीं वैकुंठींचा देव पाहुणा होऊन राहिला आहे, त्याच्या अंगसंगाच्या रंगानें तो क्रीडा करीत आहे असें तुम्ही समजा ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्या पुंडलीकरायाच्या पायांजवळ चारी मुक्ति लोळण घालतात. त्यांची शक्ति अशी मोठी आहे, म्हणून त्यांच्या भक्तीची महती धन्य आहे ५. [३२४५]

मृगाचिये अंगीं कस्तुरीचा वास। असे ज्याचा त्यास नसे ठावा ॥ १ ॥ भाग्यवंत घेती वेंचूनियां मोलें। भारवाही मेले वाहतां वोझें ॥ २ ॥ चंद्रामृतें तृप्ति पारणें चकोरा। भ्रमरासी चारा सुगंधाचा ॥ ३ ॥ अधिकारी येथें घेती हातवटी। परीक्षवंता दृष्टी रत्न जैसें ॥ ४ ॥ तुका म्हणे काय आंधळिया हातीं। दिलें जैसें मोतीं वायां जाय ॥ ५ ॥ [३२४६]

ऐसे कैसे झाले भोंदू। कर्म करोनि म्हणती साधू ॥ १ ॥ अंगीं लावूनियां राख। डोळे झांकुनि करिती पाप ॥ २ ॥ दावुनि वैराग्याची कळा। भोगी विषयांचा सोहळा ॥ ३ ॥ तुका म्हणे सांगों किती। जळो तयाची संगती ॥ ४ ॥ [३२४७]

रक्त श्वेत कृष्ण पीत प्रभा भिन्न। चिन्मय अंजन सुदलें डोळां ॥ १ ॥ तेणें अंजनगुणें दिव्य-दृष्टि झाली। कल्पना निमाली द्वैताद्वैत ॥ २ ॥ देशकालवस्तु भेद मावळला। आत्मा निर्वाळला विश्वाकार ॥ ३ ॥ न झाला प्रपंच आहे परब्रह्म। अहं सोहं ब्रह्म आकळलें ॥ ४ ॥ तत्त्वमसि विद्या ब्रह्मानंद सांग। तेंचि झाला अंगें तुका आतां ॥ ५ ॥ [३२४८]

मानूं कांहीं आम्ही आपुलिया इच्छा। नाहीं तरी सरिसा रंकरावो ॥ १ ॥ आपुलया उदास आहों देहभावीं। मग लज्जा जीवीं चाड नाहीं ॥ २ ॥ तुका म्हणे आम्हीं खेळों सहज लीळे। म्हणोनी निराळे सुखदुःखा ॥ ३ ॥ [३२४९]

फिरविलें देऊळ जगामाजीं ख्याति। नामदेवा हातीं दूध प्याला ॥ १ ॥ भरियेली हुंडी

जे कस्तुरीमृग आहेत, त्यांचे नाभीपासून कस्तुरी उत्पन्न होते, पण तिचा सुगंध त्या मृगांना समजत नाहीं १. जे कोणी भाग्यवान् आहेत, ते द्रव्य देऊन कस्तुरी घेतात आणि बाकीचे तिचें ओझें वाहून व्यर्थ मरतात २. चंद्रापासून अमृत उत्पन्न होतें, त्या योगानें चकोर तृप्त होतो व कमळापासून सुगंध उत्पन्न होतो तेंच भ्रमराचें खाद्य आहे ३. जसें अमोलिक असलेलें रत्न परीक्षवंताच्या दृष्टीसमोर आलें कीं त्यांना समजतें, तशा प्रकारें ज्या वस्तूचे जे अधिकारी आहेत ते आपापल्या हातोटीनें ह्या ठिकाणीं त्यांचा स्वीकार करतात ४. तुकाराम महाराज म्हणतात, जर आंधळ्याच्या हातांत मोतीं दिलें तर तें व्यर्थ होतें, म्हणून देऊन काय उपयोग आहे? (ज्याला ज्याचा अधिकार नाहीं त्याला त्या वस्तु व्यर्थ होतात) (तसें अभिमान्यानें वेद–शास्त्रांचें अध्ययन केलें, तरी तें त्याला वाहावें लागणारें ओझेंच होय, त्यांतील सिद्धांत त्याच्या अनुभवाला येत नाहींत) ५. [३२४६]

जे कोणी मनास वाटेल तें कर्म आचरण करून आपणांस साधु म्हणवितात, ते असे भोंदु जगामध्यें कां निर्माण झाले? १. सर्वांगाला राख लावून लोकांचे डोळे चुकवून जे पापकर्म करतात २. जगामध्यें वैराग्य दाखवून जे विषयांचा सोहळा भोगतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशांच्या संगतीला आग लागो. अशा भोंदु साधूंविषयीं किती म्हणून सांगावें? ४. [३२४७]

तांबडा वर्ण रजोगुणाचा आहे, पांढरा सत्त्वगुणाचा आहे व काळा तमोगुणाचा आणि पिवळा वर्ण शुद्ध सत्त्वाचा आहे. ह्या ज्या गुणप्रभा आहेत त्यांहून निराळें चिन्मात्र [ज्ञानमात्र] असें काजळ माझ्या बुद्धीच्या डोळ्यांत [सद्गुरूनें] घातलें १. त्या अंजनाच्या योगानें माझ्या बुद्धिदृष्टीवरील मल, विक्षेप, आवरण हे दोष जाऊन दृष्टि दिव्य झाल्यामुळें द्वैत व अद्वैत ह्या कल्पना नाहींशा झाल्या २. देशपरिच्छेद, कालपरिच्छेद व वस्तुपरिच्छेद हे नाहींसे होऊन यावत् विश्व हें आत्मरूपानें सोज्ज्वळ झालें आहे ३. प्रपंच हा झालाच नाहीं. एक परब्रह्म आहे; अहं ब्रह्म सोहं ब्रह्म अशा भावनेच्या अभ्यासानें त्याचें दृढ अपरोक्ष ज्ञान मला झालें ४. तुकाराम महाराज म्हणतात, तत्त्वमसि महावाक्याच्या विचारानें ब्रह्मसाक्षात्कार झाला. मी ब्रह्मानंदांत पूर्ण निमग्न झालों, किंबहुना संपूर्ण ब्रह्मानंदच स्वतः मी झालों आहें ५. [३२४८]

आम्ही आपल्या इच्छेनें ज्यास वाटेल त्यास कांहीं तरी मान देऊं. नाहींपेक्षां राजा आणि रंक आम्हांस सारखेच आहेत १. आम्ही जर आपल्या देहभावाच्या ठिकाणीं उदास आहोंत तर दुसऱ्याची लाज आमच्या ठिकाणीं असण्याचें काय कारण आहे? २. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही त्या ठिकाणीं सहज लीलेनें (कौतुकानें) खेळ खेळतों, म्हणून सुखदुःखाच्या वेगळे झालों आहोंत ३. [३२४९]

नामदेवराय तीर्थयात्रेस गेले त्या वेळीं आंवढे मुक्कामीं (औंढ्याला) त्यांच्याकरितां देवानें देवळाचें तोंड फिरविलें व त्यांच्या हातून पांडुरंग मूर्तीनें दूध प्राशन केलें, अशी त्यांची कीर्ति जगतामध्यें प्रसिद्ध आहे १. नरसिंह मेहत्यानें

नरसीमेहत्याची । धनाजीजाटाचीं सेतें पेरी ॥ २ ॥ मिराबाईसाठीं पी जो विषाचा प्याला । लाख्या कोल्हाट्याचा ढोल पिटी (मिराबाईसाठीं घेतो विषप्याला। दामाजीचा जाला पाडेवार) ॥ ३ ॥ कबिराचे मागीं विणूं लागे सेले । मूल उठविलें कुंभाराचें ॥ ४ ॥ आतां तुम्ही दया करा (धरा) पंढरिराया । तुका विनवी पायां वेळोवेळां ॥ ५ ॥ [३२५०]

निरंजनीं आम्हीं बांधियेलें घर । निराकारीं निरंतर राहिलोंसे ॥ १ ॥ निराभासीं पूर्ण झालों समरस । अखंड ऐक्यास पावलों आम्ही ॥ २ ॥ तुका म्हणे आतां नाहीं अहंकार । झालों तदाकार नित्य शुद्ध ॥ ३ ॥ [३२५१]

पांडुरंगें सत्य केला अनुग्रह । निरसोनि संदेह बुद्धिभेद ॥ १ ॥ जीवाशिवा सेज रचिली आनंदें । आउटाविये पदीं आरोहण ॥ २ ॥ निजीं निजरूपीं निजाविला तुका । अनुहत बाळका हलुरू गाती ॥ ३ ॥ [३२५२]

नाना मतांतरें शब्दाची वित्पत्ति । पाठांतरें होती वाचाळ ते ॥ १ ॥ माझ्या विठोबाचें वर्म आहे दुरी । कैंची तेथें उरी देहभावा ॥ २ ॥ यज्ञ याग जप तप अनुष्ठान । राहे ध्येय ध्यान अलीकडे ॥ ३ ॥ तुका म्हणे होय उपरति चित्ता । अंगीं सप्रेमता येणें लागे ॥ ४ ॥ [३२५३]

नाहीं शब्दाधीन वर्म आहे दुरी । नव्हे तंत्रीं मंत्रीं अनुभव तो ॥ १ ॥ हर्षामर्षें अंगीं आदळती लाटा। कामक्रोधें तटा सांडियेलें ॥ २ ॥ न सरे ते भक्ति विठोबाचे पायीं । उपरति नाहीं जेथें चित्ता

देवाच्या नांवाची हुंडी द्वारकेस लिहिली ती त्यानें भरली व धनाजी जाट ह्यानें घरीं असलेलें पेरण्याचें बीं संतांच्या भोजनास खर्चिल्यामुळें त्याचीं शेतें देवानें पेरलीं २. मिराबाईच्या बापानें प्याला भरून विष दिलें तें ज्या देवानें प्राशन केलें त्याच देवानें लाखोबा ह्या नांवाचा कोलाटी खेळ करतेवेळीं त्याचा भाऊ दोरावरून पडून मयत झाल्यामुळें त्या प्रसंगीं देवानें ढोल वाजविला (दामाजीपंतांसाठीं महाराचें रूप घेऊन दरबारीं धान्याचें माप घातलें) ३. कबीराच्या मागाच्या ठिकाणीं देव शेले विणूं लागत होता व गोरोबा कुंभाराचें मूल हरिनामछंदानें नृत्य करतेवेळीं चेंगरून मयत झालें तें देवानें जिवंत केलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीराया, त्याप्रमाणें तुम्ही माझ्यावर दया करा अशी माझी तुम्हांस वारंवार विनंति आहे ५. [३२५०]

ज्या ठिकाणीं दृश्याकार विश्व नाहीं अशा शुद्ध ब्रह्माच्या निराकार निर्मल स्वरूपीं आम्हीं घर बांधून निरंतर वास्तव्य केलें आहे १. ज्या ठिकाणीं विश्वाभास नाहीं त्या स्वरूपाचे ठिकाणीं समरस होऊन अखंड ऐक्य स्थितीस आम्ही प्राप्त झालों आहोंत २. तुकाराम महाराज म्हणतात, असे आम्ही तद्रूप होऊन निर्मळ अविनाश झालों आहोंत, म्हणून आतां आमच्या ठिकाणीं अहंकार नाहीं. ३. [३२५१]

आमच्या ठिकाणीं (जीवेश्वरांतील भेद) भेदात्मक देहबुद्धि व संशय होता, त्याचा पांडुरंगांनीं नाश करून आमच्यावर खरोखर कृपा केली १. आणि जीवशिवाचें ऐक्य करून आनंदानें साडेतीन मात्रांच्या ॐ काररूप श्रीहरिपदाच्या ठिकाणीं मला स्थापन केलें २. तुकाराम महाराज म्हणतात, त्या आईनें मला बालकाला स्वकीय आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं स्थिर केलें आणि ती अनुहतध्वनीनें गाणें गात आहे. [३२५२]

नाना प्रकारच्या मतानें शब्दाचे व्युत्पत्तींत अर्थ करतात आणि अनेक ग्रंथ पाठ करून वाचाळपणा करतात १. परंतु माझ्या विठोबाच्या प्राप्तीचें मर्म दूर राहिलें आहे, तें ज्याला कळेल त्याच्या ठिकाणीं देहभाव कसा राहील? २. याग, यज्ञ, जप, तप व अनुष्ठान ह्या योगानें विठ्ठलाच्या प्राप्तीचें मर्म प्राप्त होत नाहीं व ध्येय, ध्याता व ध्यान ही त्रिपुटी अलीकडे राहात आहे असें तें मर्म दूर आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, चित्ताच्या ठिकाणीं उपरति होऊन अंगामध्यें हरीविषयींचें प्रेम भरलें पाहिजे. हेंच देवप्राप्तीचें मुख्य मर्म आहे ४. [३२५३]

तें मर्म शब्दांत नाहीं, तर शब्दांपासून दूर आहे. तसेंच त्या स्वरूपाचा अनुभव मंत्रानें किंवा तंत्रानें होणार नाहीं १. अंगावर संसारांतील सुखदुःखाच्या लाटा उत्पन्न होतात. त्या कामक्रोधाच्या हद्दीबाहेर जातात (ह्या योगानें पीडा होते) २. ज्याच्या चित्तामध्यें संसाराविषयीं उपरति झाली नाहीं, त्याची भक्ति विठोबाच्या पायांजवळ मान्य

॥ ३ ॥ तुका म्हणे सुख देहनिरसनें । चिंतन चिंतनें तद्रूपता ॥ ४ ॥ [३२५४]

शोधूनि अन्वय वंश वंशावळी । परस्परा कुळीं उच्चारण ॥ १ ॥ म्हणविलें मागें पुढें चाले कैसें । केला सामरस्यें अभिषेक ॥ २ ॥ एकछत्र झळके उन्मनी निशाणी । अनुहत ध्वनी गगन गर्जे ॥ ३ ॥ तुकया स्वामी स्थापी निजपदीं दासा । करुनी उल्हासा सप्रेमता ॥ ४ ॥ [३२५५]

प्रवृत्तिनिवृत्तीचे आटूनियां भाग । उतरिलें चांग रसायण ॥ १ ॥ ज्ञानाग्निहुताशीं कडशिले वोजा । आत्मसिद्धिकाजा लागूनियां ॥ २ ॥ ब्रह्मा ब्रह्मरस सिद्ध झाला पाक । घेतला रुचक प्रतीतीमुखें ॥ ३ ॥ स्वानुभवें अंगीं झाला समरस । साधनीं निजध्यास ग्रासोग्रासीं ॥ ४ ॥ अरोग्यता तुका पावला अष्टांगीं । मिरविला रंगीं निजात्मरंगें ॥ ५ ॥ [३२५६]

स्वप्नीं तूंही कैसा न पडसी डोळां । सुंदर सांवळा घवघवीत ॥ १ ॥ चतुर्भुज माळा रुळे एकावळी । कस्तुरी निढळीं रेखीलीसे ॥ २ ॥ शंख चक्र गदा रुळे वैजयंती । कुंडलें तळपती श्रवणीं दोन्ही ॥ ३ ॥ तुका म्हणे स्वप्नीं आतां दावीं पाय । पांडुरंग माय कृपावंते ॥ ४ ॥ [३२५७]

सात दिवसांचा जरी झाला उपवासी । तरी कीर्तनासी टाकूं नये ॥ १ ॥ फुटो हें मस्तक तुटो हें शरीर । परि नामाचा गजर सोडूं नये ॥ २ ॥ शरीराचे होत दोन्ही तेही भाग । परि कीर्तनाचा रंग सांडों नये ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसा नामीं ज्या निर्धार । तेथें निरंतर देव असे ॥ ४ ॥ [३२५८]

होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देहाभिमानाचें निरसन करून श्रीहरीचें चिंतन करावें, त्या योगानें तद्रूपता प्राप्त होते. मग त्या सुखाला अंतपार नाहीं ४. [३२५४]

देव हा आपल्या दासांच्या बोधपरंपरेच्या वंशावळीचा परभारें शोध करून त्यांच्या कुळांचें स्मरण करतो १. नंतर; आम्ही हरीचे दास आहोंत असें जे म्हणतात, त्या आपल्या म्हणविलेल्या भक्तांची मागून चालत आलेली बोधपरंपरा पुढें कशी चालेल, ह्याविषयींची काळजी घेऊन, माझ्या जीवात्म्याचें आपल्या स्वरूपीं (ऐक्यतारूप समरसतेचा देवांनीं मला पट्टाभिषेक केला) देव हा जीव व परमात्मा यांच्या तात्त्विक अभेद--स्वरूपाविषयींचा बोध देतो २. तेथें एक चिन्मय स्वरूपतेचें छत्र चकाकत आहे, व संकल्पविकल्पात्मक अशा मनरहित स्वरूपस्थितीच्या ठिकाणीं सोहंरूप होणारा अनुहत ध्वनि, हीच कोणी एक डंक्याची गर्जना हिच्या योगानें तो ध्वनि चिदाकाशांत दुमदुमूं लागला ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा स्वामी जो देव हा आपल्या दासांना मोठ्या प्रेमभरानें निजात्मपदीं स्थापन करण्याचा आनंद--उत्साह करतो ४. [३२५५]

आत्मस्वरूप हें प्रवृत्तिनिवृत्तिधर्मरहित आहे. अशा त्याच्या निर्धर्म स्वरूपविचारानें प्रवृत्ति व तत्सापेक्ष निवृत्ति ह्या कल्पना नाहींशा झाल्यावर शुद्ध निर्धर्म आत्मस्वरूपरूपी रसायन शिल्लक उरलें १. ही व्यवस्थित निवड ज्ञानाग्नीनें आत्मफलप्राप्तीकरितां (आत्मसाक्षात्काराकरितां) केली २. त्या योगानें स्वतःसिद्ध ब्रह्मरसाचें भोजन तयार झालें, तें मी आहें अशा अनुभवाच्या तोंडानें त्या ब्रह्मरसाची रुचि घेतली ३. अशा प्रकारें अनुभवाच्या मुखानें ब्रह्मरसरूपी अन्नाचे घांसाघांसाच्या ठिकाणीं निजध्यास साधनाचा अभ्यास केल्यानें, जीव व परमात्मा हे दोन्ही एक आहेत असा निःसंशय अनुभव होतां क्षणींच परस्परांची समरसता झाली ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या ठिकाणांतला भवरोग जाऊन मी सर्वांगानें आरोग्यस्थिति पावलों आणि मी निजात्मसुखरंगानें सुशोभित झालों ५. [३२५६]

तुझें श्यामसुंदर ठळठळीत स्वरूप स्वप्नांत देखील कसें तें दिसत नाहीं १. तें स्वरूप चतुर्भुज असून त्याच्या गळ्यामध्यें एकेरी मोत्यांची माळ आहे आणि कपाळावर कस्तुरीचा मळवट आहे २. हातामध्यें शंख, चक्र, गदा, पद्म हीं आयुधें आहेत आणि दोन्ही कानांमध्यें कुंडलें शोभत आहेत. ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगे, दयाळु आई, तूं स्वप्नांत तरी असें हें रूप दाखीव ४. [३२५७]

जो कोणी कीर्तनामध्यें बसला असेल त्याला सात दिवसांचें उपोषण जरी झालें तरी त्यानें तेथून उठून जाऊं नये १. मग त्या ठिकाणीं मस्तक फुटो अथवा शरीराचे तुकडे होवोत, पण नामाचा घोष सोडून जाऊं नये २. शरीराचे दोन तीन तुकडे जरी झाले तरी हरिकीर्तनाचा रंग सोडूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा नामाच्या ठिकाणीं ज्याचा निर्धार झाला आहे तेथें सर्व काळ देवाची वस्ती आहे ४. [३२५८]

ढालतलवारे गुंतले हे कर । म्हणे मी जुंझार कैसा झुंजों ॥ १ ॥ पोटीं पडदाळे सिले टोप ओझें । हें तों झालें दुजें मरणमूळ ॥ २ ॥ बैसविलें मला येणें अश्वावरी । धांवूं पळूं तरी कैसा आतां ॥ ३ ॥ असोनि उपाय म्हणे हे अपाय । म्हणे हाय हाय काय करूं ॥ ४ ॥ तुका म्हणे हा तों स्वयें परब्रह्म । मूर्ख नेणे वर्म संतचरण ॥ ५ ॥ [३२५९]

पहिली माझी ओंवी ओवीन जगत्र । गाईन पवित्र पांडुरंग ॥ १ ॥ दुसरी माझी ओंवी दुजें नाहीं कोठें । जनीं वनीं भेटे पांडुरंग ॥ २ ॥ तिसरी माझी ओंवी तिला नाहीं ठाव । अवघाचि देव जनीं वनीं ॥ ३ ॥ चवथी माझी ओंवी वैरिलें दळण । गाईन निधान पांडुरंग ॥ ४ ॥ पांचवी माझी ओंवी माझिया माहेरा । गाईन निरंतरा पांडुरंगा ॥ ५ ॥ साहावी माझी ओंवी साहाही आटले । गुरुमूर्ति भेटली पांडुरंग ॥ ६ ॥ सातवी माझी ओंवी आठवे वेळोवेळां । बैसलासे डोळां पांडुरंग ॥ ७ ॥ आठवी माझी ओंवी अठ्ठावीस युगें । उभा चंद्रभागे पांडुरंग ॥ ८ ॥ नववी माझी ओंवी सरलें दळण । चुकलें मरण संसारींचें ॥ ९ ॥ दहावी माझी ओंवी दहा अवतारा । न यावें संसारा तुका म्हणे ॥ १० ॥ [३२६०]

बहुतां जन्मां अंतीं जन्मलासी नरा । देव तूं सोयरा करीं आतां ॥ १ ॥ करीं आतां बापा स्वहिताचा स्वार्थ । अनर्थाचा अर्थ सांडीं आतां (परता) ॥ २ ॥ सांडीं आतां कुडी कल्पनेची वाट । मार्ग आहे नीट पंढरीचा ॥ ३ ॥ पंढरीस जावें सर्व सुख घ्यावें । रूप तें पाहावें विटेवरी ॥ ४ ॥ विटेवरी नीट आनंदाचा कंद । तुका नाचे छंदें नामघोषें ॥ ५ ॥ [३२६१]

किती सांगों तरी नाइकती बटकीचे । पुढें सिंदळीचे रडतील ॥ १ ॥ नका नका करूं रांडेची

नपुंसक योद्धा लढाईंत गेल्यावर भाषण करतो, कीं एका हातांत ढाल व एका हातांत तलवार असे माझे दोन्ही हात गुंतले असतां म्यां लढाई तरी कशी करावी? १. अंगांत चिलखत व डोक्याला टोप व कमरेस पट्टा ह्यांचें मला फार ओझें झाल्यामुळें हें एक मला दुसरें मरणमूळच आलें २. आणि शिवाय, ह्यांनीं तर मला मोठ्या घोड्यावर बसविलें, मग शत्रूला गांठण्याकरितां धांवत कसें जावें! ३. हे उपाय आपल्या शरीररक्षणाचे असून त्यास अपाय मानून मोठ्या दुःखानें, हाय हाय करूं, असें म्हणतो (शोक करतो) ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें हे सर्व प्राणी स्वतः परब्रह्मरूप असून संतचरणरूपी आश्रयाचें मर्म जाणत नाहींत, त्या योगानें अति मूर्ख झाले आहेत ५. [३२५९]

हें त्रैलोक्य पवित्र पांडुरंगानें भरलें आहे, त्या पांडुरंगास मी पहिल्या ओंवीमध्यें गाईन १. सर्व जनांत वनांत पांडुरंगाचेंच दर्शन होत आहे, म्हणून माझ्या ठिकाणीं द्वैत राहिलें नाहीं ह्या योगानें मला दुसरी ओंवी गातां येते २. सर्व जनाचे व वनाचे ठिकाणीं मला देवच दिसत आहे, म्हणून माझ्या तिसऱ्या ओंवीला ठिकाण मिळत नाहीं ३. सर्व प्रपंचाचें दळण (नाश आरंभिला आहे) म्हणून चवथ्या ओंवीनें पांडुरंगनिधान गाईन ४. माझी पांचवी ओंवी आईबाप जो पांडुरंग त्यास सर्वकाळ गात आहे ५. आतां सहावी ओंवी सहा शास्त्रांचा जेथें लाग चालत नाहीं अशी जी पांडुरंग गुरुमूर्ति मला भेटली तीस गात आहे ६. तो पांडुरंग माझ्या डोळ्यांत भरला आहे म्हणून त्यास वारंवार मीं सातव्या ओंवीनें आठविला आहे ७. चंद्रभागेच्या तीरीं जो पांडुरंग अठ्ठावीस युगें उभा आहे त्याला मी आठव्या ओंवीनें गात आहें ८. आतां जन्ममृत्युरूपी दळण संपल्यामुळें, ज्या योगानें संसारांतील मरण नाहींसें झालें, तें मी नवव्या ओंवीमध्यें गाईन ९. तुकाराम महाराज म्हणतात, मी दहाव्या ओंवीनें दहा अवतारांस गात आहें, म्हणून मला जन्ममृत्युरूपी संसारास येण्याचें कारण नाहीं १०. [३२६०]

हे नरा, अनेक जन्मांच्या अखेरीस तुला मनुष्यदेह दिला आहे; आतां तूं देवास आपलेंसें करून घे १. अरे बापा, ज्या द्रव्यामध्यें (धनादिक गोष्टींमध्यें व कुकर्मांमध्यें) अनर्थ आहेत तो अर्थ दूर टाकून देऊन, ज्या योगानें स्वहित होईल तोच स्वार्थ आतां साधून घे २. आतां तूं कल्पनेचा वाईट मार्ग टाकून देऊन पंढरीच्या नीट मार्गाकडे लागावें हें बरें ३. पंढरीस जाऊन विटेवरील देवाचें रूप पाहाणें हेंच सर्व सुख प्राप्त करून घे ४. तुकाराम महाराज म्हणतात, आनंदाचें मूळ आहे तें विटेवर नीट उभें आहे. त्याच्या नामघोषाच्या छंदानें मी नाचत आहें ५. [३२६१]

किती सांगितलें तरी, हे बटकीच्या पोटचे लोक ऐकत नाहींत, पण हे शिंदळीचे, अखेरीस यमाची जाचणी झाली

संगती । नेवोनी (नेईल) अधोगती घाली यम ॥ २ ॥ तुका म्हणे जरी देवीं नाहीं चाड । हाणोनि (म्हणोनि) थोबाड फोडी काळ ॥ ३ ॥ [३२६२]

स्वर्गींचे अमर इच्छिताती देवा । मृत्युलोकीं व्हावा जन्म आम्हां ॥ १ ॥ नारायणनामें होऊं जीवन्मुक्त । कीर्तनीं अनंत गाऊं गीतीं ॥ २ ॥ वैकुंठींचे जन सदा चिंतिताती । कई येथें येती हरिचे दास ॥ ३ ॥ यमधर्म वाट पाहे निरंतर । जोडोनियां कर तिष्ठतसे ॥ ४ ॥ तुका म्हणे पावावया पैल पार । नाममंत्र सार भाविकासी ॥ ५ ॥ [३२६३]

व्यापक हा विश्वंभर । चराचर ज्याचेनी ॥ १ ॥ पंढरिराय विटेवरी । त्याचीं धरीं पाउलें ॥ २ ॥ अवघियांचा हाचि ठाव । देवीं देव सकळ ॥ ३ ॥ तुका म्हणे न करीं सोस । भेदें दोष उफराटे ॥ ४ ॥ [३२६४]

आमुची मिरासी पंढरी । आमुचें घर भीमातिरीं ॥ १ ॥ पांडुरंग आमुचा पिता । रखुमाई आमुची माता ॥ २ ॥ भाऊ पुंडलिक मुनि । चंद्रभागा आमुची बहिणी ॥ ३ ॥ तुका जुनाट मिराशी । ठाव दिला पायांपाशीं ॥ ४ ॥ [३२६५]

गंगा गेली सिंधुपाशीं । जरी तो ठाव नेदी तिशीं ॥ १ ॥ तिनें जावें कवण्या ठायां । मज सांगा पंढरिराया ॥ २ ॥ जळ क्षोभलें जळचरां । माता बाळा नेदी थारा ॥ ३ ॥ तुका म्हणे आलों शरण । देवा त्वां कां धरिलें मौन ॥ ४ ॥ [३२६६]

वेठी ऐसा भाव । न करीं आहाच उपाव ॥ १ ॥ रूप डसवीन जीवा । अवघा येच

म्हणजे, रडतील १. अरे तुम्ही रांडेची (आशेची) संगत करूं नका (असें द्विवार सांगतात). हें जर न ऐकाल तर तुम्हांला यम नरकांत घालील २. तुकाराम महाराज म्हणतात, जर तुम्हांला देवाची गरज नाहीं तर परिणामीं तुमचें तोंड काळ हाणून फोडील ३. [३२६२]

हे देवा, मृत्युलोकाच्या ठिकाणीं आम्हांस जन्म व्हावा अशी इच्छा स्वर्गांतील अमर असलेले देव सुद्धां करितात १ कीर्तनाच्या ठिकाणीं नारायणाचीं अनंत नामें सुस्वरानें गाऊन आम्ही जीवन्मुक्त होऊं असें ते देव म्हणतात २. वैकुंठांत राहाणारे जन सर्व काळ इच्छा करितात, कीं ह्या ठिकाणीं हरीचे दास केव्हां येतील ३. त्याचप्रमाणें दोन्ही हात जोडून यमधर्म भक्तांची पूजा करण्याकरितां सर्व काळ वाट पाहात उभा राहिला आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, भवसिंधूंतून पार उतरण्यास भाविक लोकांना हरिनाममंत्र हाच सारभूत आहे ५. [३२६३]

हा विटेवरील देव विश्वामध्यें व्यापक असून त्याचें पालन पोषण करणारा आहे व त्याच्यापासून स्थावरजंगमादि विश्व उत्पन्न झालें आहे १. तो पंढरीचा राजा विटेवर उभा आहे. त्याच्या पायांची मनांत सर्व काळ आठवण करावी २. सर्वांचें मुख्य ठिकाण हेंच आहे. ह्याच्या अंशापासून सर्व देवी व देव हे उत्पन्न झाले आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर त्यांत तुम्ही भेद मानाल (जगाचें कारण जो ईश्वर तो न दिसणारा–परोक्ष आहे, ब्रह्म व्यापक आहे आणि हा पांडुरंग तर डोळ्यांना दिसत आहे, असा भेद मानाल) तर उलट तुम्हांला पातक लागेल, म्हणून अनेक दैवतें भजण्याची हांव करूं नका ४. [३२६४]

पंढरी ही आमची मिरास आहे (वंशपरंपरेचें वतन आहे). त्या ठिकाणीं भीमा हें तीर्थ वाहात आहे. तिचे तटाकीं आमचें घर आहे १. आमची आई रखुमाई व पांडुरंग बाप आहे २. आमचे बंधु मननशील पुंडलीकराय व चंद्रभागा बहीण आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा मी पुरातनचा मिरासदार आहें, म्हणून देवांनीं मला आपल्या पायांजवळ जागा दिली ४. [३२६५]

जर गंगा समुद्रामध्यें मिळावयास गेली असतां तिला राहाण्यास त्यानें ठिकाण दिलें नाहीं १. तर तिनें कोणत्या ठिकाणीं जावें, हें पंढरीराया, मला सांगा २. पाणी जर त्यांत राहाणाऱ्या जलचरांवर रागावलें अथवा आईनें बालकास जवळ राहाण्यास आश्रय न दिला (तर त्यांनीं काय करावें ?) ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, त्याप्रमाणें मी तुला शरण आलों असतां तूं माझ्याबरोबर कां बोलत नाहींस ? [तर तुला सोडून मी कोठें जावें ?] ४. [३२६६]

बिगारीप्रमाणें भाव दाखवून मी व्यर्थ भक्तीचा उपाय (वरवर सोंग दाखवून) करणार नाहीं १. देवाचें रूप

ठायीं हेवा ॥ २ ॥ कृपणाचे परी । लेखा पळ निमिष वरी ॥ ३ ॥ तुका म्हणे असा । संनिधचि जगदीशा ॥ ४ ॥ [३२६७]

सर्व सुखा अधिकारी । मुखें उच्चारी हरिनाम ॥ १ ॥ सर्वांगें तो सर्वोत्तम । मुखीं नाम हरीचें ॥ २ ॥ ऐशी उभविली बांह (ऐसी उभारिली बाहे) । वेदीं पाहें पुराणीं ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें कांहीं । संदेह नाहीं भरंवसा ॥ ४ ॥ [३२६८]

कोडियाचें गोरेपण । तसें अहंकारी ज्ञान ॥ १ ॥ त्यासी आतां रिझे कोण । जवळी जातां चिळसवाणें ॥ २ ॥ प्रेतदेहा गौरविलें । तैसें विटंबवाणें झालें ॥ ३ ॥ तुका म्हणे खाणें विष्टा । तैशा देहबुद्धी चेष्टा ॥ ४ ॥ [३२६९]

कामधेनूचें वासरूं । खाया न मिळे काय करूं ॥ १ ॥ ऐसें आम्हां मांडियेलें । विठो त्वां कां सांडियेलें ॥ २ ॥ बैसोनि कल्पद्रुमातळीं । पोटासाठीं तळमळी ॥ ३ ॥ तुका म्हणे नारायणा । भलें लोकीं हें दिसेना ॥ ४ ॥ [३२७०]

हरिः ॐ तत्सदिति सूत्राचें जें सार । कृपेचा सागर पांडुरंग ॥ १ ॥ हरि ॐ दत्त उदात्त अनुदात्त । प्रचुररहित पांडुरंग (हरिः ॐ सहित उदत अनुदत । प्रचुरीश्वरासहित पांडुरंग) ॥ २ ॥ सर्वस्व व्यापिलें सर्वां होऊनी निराळें । वेदाचें जें मूळ तुका म्हणे (गोत्राह्मणहिता होऊनि निराळें । वेदाचें तें मूळ तुका म्हणे) ॥ ३ ॥ [३२७१]

सिंदळीचें चित्त परपुरुषावरी । पति चुरमुरी रात्रंदिवस ॥ १ ॥ ऐशी ते वोंगळी जाय वो नरका । तिच्या दोषें देखा पति जाय ॥ २ ॥ आपण बुडती पति बुडविती । दोन्ही कुळें नेती अधःपाता ॥ ३ ॥

अंतःकरणामध्यें ठसवून सर्व सोस त्याच्याच ठिकाणीं ठेवीन २. जसा कृपण सर्व काळ धनाची मोजदाद करतो, तसा पळनिमिष देखील देवास विसंबणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो जगदीशा, तुम्ही माझ्याजवळ सर्व काळ असावें (अशी माझी इच्छा आहे) ४. [३२६७]

ज्याच्या मुखांत हरीचें नाम सर्व काळ आहे तो सर्व सुखाचा अधिकारी होतो १. हरीचें नाम जर मुखामध्यें आहे तर तो सर्वांगानें सर्वांत श्रेष्ठ होतो २. अशा प्रकारें वेदपुराणांनीं बाहू उभारून सांगितलें आहे, तें शोधून पाहा ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा मला भरंवसा आहे. ह्याविषयीं कांहीं संशय नाहीं ४. [३२६८]

जसें एखाद्यास कोड भरलें म्हणजे त्याचें अंग गोरें दिसतें, तसें साहंकार ज्ञान आहे असें समजावें १. त्या कुष्ट भरलेल्या मनुष्याच्या जवळ गेलें असतां चिळस उत्पन्न होते, तसें त्या ज्ञानाभिमान्याला आतां कोण रिझणार आहे (त्या अभिमान्यावर कोण संत-सज्जन प्रेम करतील ?) २. प्रेताला अलंकार घालावे तशी अहंकारी मनुष्याची ज्ञानापासून फजिती होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, जशी विष्टा भक्षण करावी तशा देहात्मबुद्धीच्या (ज्ञानाचा अहंकार ज्याच्याजवळ आहे त्यानें देहाला आत्मा समजून केलेल्या वाईट क्रिया) चेष्टा आहेत ४. [३२६९]

कामधेनूचें वासरूं असून त्याला कांहीं खावयास मिळत नाहीं हें म्हणणें शोभेल काय ? १. असा प्रकार मला झाला आहे, त्याला मी काय करूं ? हे विठो, त्वां माझी हेळसांड कां केलीस ? २. कल्पतरूखालीं बसून जशी पोटाकरितां तळमळ करावी (त्याप्रमाणें मला केलेंस) ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, तुझें हें भक्तांना दीन करणें लोकांत बरें दिसत नाहीं ४. [३२७०]

हरिः ॐ तत् सत् या त्रैवागीरूप (तीन शब्दांच्या) सूत्राचें सार कृपेचा सागर परमात्मा पांडुरंग आहे १. ॐ इत्यादि अक्षरें मोठ्या स्वरानें, लहान स्वरानें व मध्यम स्वरानें म्हटल्यानें जें हित व्हावयाचें, तेंच साक्षात् पांडुरंग आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, हरीचें स्वरूप यच्चयावत् पदार्थांतून व्यापलेलें असून सर्वांहून असंग व अलिप्त आहे, व तेंच वेदांचें मूळ आहे ३. [३२७१]

व्यभिचारिणी स्त्रीचें मन नेहमीं परपुरुषावर असतें, त्या कारणानें तिचा नवरा रात्रंदिवस तळमळत असतो १. अशली ती वाईट स्वभावाची स्त्री खरोखर अधोगतीला जाते, आणि तिच्या पापानें तिचा नवराहि जातो २. आपण बुडून नवऱ्यास बुडविते आणि आईबापाचें कूळ व नवऱ्याचें कूळ अशीं दोन्ही अधोगतीला नेते ३,

तुका म्हणे तिची न करावी संगती । होईल फजिती मागें पुढें ॥ ४ ॥ [३२७२]

आनंद अद्वय नित्य निरामय । जें कां निजध्येय योगियांचें ॥ १ ॥ ते हे समचरण साजिरें विटेवरी । पहा भीमातीरीं विठ्ठलरूप ॥ २ ॥ पुराणासी वाड श्रुति नेणती पार । तें झालें साकार पुंडलिका ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्यातें सनकादिक ध्यात । तें आमुचें कुळदैवत पांडुरंग ॥ ४ ॥ [३२७३]

एक म्हणती आम्ही देवची पैं झालों । ऐसें नका बोलों पडाल पतनीं ॥ १ ॥ एक म्हणती आम्ही देवाचीं पैं रूपें । तरी तुमचिया बापें न चुके जन्म ॥ २ ॥ देवें उचलिली स्वसुखें मेदिनी । तुमचेनी गोणी नुचलवे ॥ ३ ॥ देवें मारियेले दैत्य दानव मोठे । तुमचेनी न तुटे तृणमात्र ॥ ४ ॥ राया विठोबाचें पद जो अभिलाषी । पातकाची राशी तुका म्हणे ॥ ५ ॥ [३२७४]

पुराणीक म्हणविती । जाणोनि कांदे ते भक्षिती ॥ १ ॥ अगस्तीचें मूत्र मळ । लावुनि म्हणती कृष्णावळ ॥ २ ॥ श्रेष्ठ वर्ण ब्राह्मणाचा । संग न सुटे शूद्रीचा ॥ ३ ॥ बदराहीच्या पाडी दाढा । लागे तुकयाचा हुंदाडा ॥ ४ ॥ [३२७५]

काय करूं न करीं धंदा । चित्त गोविंदा तुझे पायीं ॥ १ ॥ ऐसा संकल्पाचे संधी । माझे बुद्धि धीर द्यावा ॥ २ ॥ कुटुंबाचा तुम्हां भार । मज व्यवहार निमित्त ॥ ३ ॥ तुका म्हणे करितां काम । हृदयीं नाम धरीन ॥ ४ ॥ [३२७६]

नव्हे आजि कलिया ऐसें । अनारिसें पालटे ॥ १ ॥ आतां लागवेग करा । ज्याचें धरा ठाके तें ॥ २ ॥ नका सांगों वाउग्या गोष्टी । चाऊल खोटी ये ठायीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मोडा माग । आपल्या लागावरूनी ॥ ४ ॥ [३२७७]

तुकाराम महाराज म्हणतात, तिच्या संगतीनें इहलोकीं व परलोकीं फजिती होईल म्हणून तिचा त्याग करावा ४. [३२७२]

जें ब्रह्म आनंदरूप, एकटें, अविनाश, निर्मळस्वरूप आहे व ज्या निजवस्तूचें योगिजन ध्यान करितात १. तें विठ्ठलाचें रूप भीमेच्या तीराला, समचरण जोडून कटावर कर ठेवून शोभिवंत दिसत आहे, हें तुम्ही पाहा २. जें पुराणांस कळलें नाहीं, व ज्याचें वर्णन वेदश्रुतींस होत नाहीं तें पुंडलीकरायाकरितां साकार झालें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या पांडुरंगाचें ध्यान सनकादिक करतात तें आमचें कुळदैवत आहे ४. [३२७३]

कोणी एखादे दांभिक शब्दज्ञानी आम्ही देवच झालों आहोंत, असें म्हणतात; त्यांना मी सांगतों, कीं अरे तुम्ही असें बोलूं नका. त्या योगानें अधोगतीस जाल १. आम्ही देवाचींच रूपें आहोंत असें कित्येक म्हणतात, पण त्या योगानें त्यांच्या बापाला तरी जन्म चुकेल काय ? २. देवांनीं (वराह अवतारांत) सहज कौतुकानें पृथ्वी उचलली पण तुम्हांस साधारण गोणी उचलवत नाहीं ! ३. देवांनीं मोठे पराक्रमी दैत्यदानव मारले आणि तुम्हांला एखादी गवताची काडी देखील तुटत नाहीं ! ४. तुकाराम महाराज म्हणतात, विठोबारायाचें निजपद घेण्याविषयीं जे इच्छा करितात ते केवळ पातकाच्या राशि आहेत ५. [३२७४]

आम्ही पुराणिक आहों असें म्हणवितात, पण पुराणांतील निषिद्ध कर्मपर वचनांचा अर्थ माहीत असून कांदे खातात १. ज्या मिठाला मूळ अगस्तीचें मूत्र (समुद्र) आहे तें मीठ कांदे किसून त्यास लावतात आणि त्याचें नांव कृष्णावळ (कोशिंबीर) ठेवितात २. सर्व वर्णांमध्यें ब्राह्मणाचा वर्ण श्रेष्ठ आहे, पण ते दासीचा संग करणें सोडीत नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा बदकर्मानें वागणूक करणाऱ्यांना माझ्या वचनाचा धक्का लागल्यानें, त्यांचे दांत पडतील व ते दुष्ट आचरण टाकतील ४. [३२७५]

हे गोविंदा, माझें चित्त तुझ्या पायाचे ठिकाणीं आहे. (मी आतां संसारासंबंधीं कोणताच धंदा करीत नाहीं.) तें दुसरा कांहीं उद्योग करीत नाहीं, त्याला मी काय करूं ? १. अशा माझ्या संकल्पाच्या संधीमध्यें (निश्चयांत) माझ्या मनास तुम्हीं धैर्य द्यावें २. सर्व कुटुंब-पालन-पोषणाचा भार मीं तुमच्यावर घातला आहे; म्हणून मी व्यवहारांत निमित्तमात्र आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी संसारउद्योग करीत असतांहि, सर्व काळ तुझें नांव हृदयांत धरीन ४. [३२७६]

वेगळ्या भावानें बदललें जाईल, असें आजकालचें पांडुरंग हें दैवत नाहीं, म्हणून आतां त्याचा मार्ग आपल्या शक्तीप्रमाणें त्वरेनें धरावा २. भलत्या गोष्टी कोणी बोलूं नये. ती चाल ह्या ठिकाणीं वाईट आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्यावर ज्या योगानें कांहीं निमित्त येतें त्याचा मागमूस नाहींसा करा ४. [३२७७]

एक ब्रह्मचारी गाढवा झोंबतां । हाणोनियां लाता पळालें तें ॥ १ ॥ गाढवही गेलें ब्रह्मचर्य गेलें । तोंड काळें झालें जगामाजी ॥ २ ॥ हें ना तैसें झालें हें ना तैसें झालें । तुका म्हणे गेलें वायांचि तें ॥ ३ ॥ [३२७८]

: पौराणिक व प्रासंगिक अभंग :

आम्हां घरीं एक गाय दुभताहे । पान्हा न समाये त्रिभुवनीं ॥ १ ॥ वान ते सांवळी नांव ते श्रीधरा । चरे वसुंधरा चौदा भुवनें ॥ २ ॥ वत्स नाहीं माय भलत्यासवें जाय । कुर्वाळी तो लाहे भावभरणा ॥ ३ ॥ चहूं धारीं क्षीर वोळली अमुप । धाले सनकादिक सिद्ध मुनी ॥ ४ ॥ तुका म्हणे माझी भूक तेथें काय । जोगाविते माय तिन्ही लोक ॥ ५ ॥ [३२७९]

फिरविलीं दोन्ही । कन्या आणि चक्रपाणी ॥ १ ॥ झाला आनंदी आनंद । अवतरले गोविंद ॥ २ ॥ तुटलीं बंधनें । वसुदेव देवकीचीं दर्शनें ॥ ३ ॥ गोकुळासी आलें । ब्रह्म अव्यक्त चांगलें ॥ ४ ॥ नंद जसवंती । धन्य देखिले श्रीपति ॥ ५ ॥ निशीं जन्मकाळ । आले अष्टमी गोपाळ ॥ ६ ॥ आनंदली मही । भार गेला सकळही ॥ ७ ॥ तुका म्हणे कंसा । आट भोविला वोळसा ॥ ८ ॥ [३२८०]

सोडियेल्या गांठी । दरुषणें कृष्णभेटी ॥ १ ॥ करिती नारी अक्षयवाणें । जीवभाव देती दानें ॥ २ ॥ उपजल्या काळें । रूपें मोहिलीं सकळें ॥ ३ ॥ तुका तेथें वारी । एकी आडोनी दूसरी ॥ ४ ॥ [३२८१]

मुख डोळां पाहे । तैशीच ते उभी राहे ॥ १ ॥ केल्याविण नव्हे हातीं । धरोनी आरती परती ॥ २ ॥ न धरिती मनीं । कांहीं संकोच दाटणीं ॥ ३ ॥ तुका म्हणे देवें । ओस केल्या देहभावें ॥ ४ ॥ [३२८२]

एका ब्रह्मचाऱ्याला काम उत्पन्न झाल्यामुळें तो (कामातुर झाल्यामुळें) गाढवीच्या मागें लागला असतां ती त्यास लाथा मारून पळून गेली १. त्या योगानें त्याचें ब्रह्मचर्य नष्ट झालें व गाढवहि पळून गेलें आणि जगतामध्यें तोंड काळें झालें २. तुकाराम महाराज म्हणतात, स्वार्थ ना परमार्थ असें तें ब्रह्मचर्य वायां गेलें ३. [३२७८]

आमचे घरीं एक गाय दुभती आहे, तिचें दूध त्रिभुवनांत सामावत नाहीं १. तिचा रंग सांवळा आहे व श्रीधरा हें तिचें नांव आहे. ती पृथ्वी आदि चौदा भुवनांत स्वइच्छेनें विचरत असते २. तिला वासरूं मुळींच नाहीं. अशी ती गाय कोणाहि भक्ताबरोबर जाते. तिला जो भावानें कुरवाळील त्याला तृप्त होईपर्यंत दुग्धामृताची प्राप्ति होते ३. चार स्तनांपासून (भक्तिचतुष्टयरूपी) दूध अपार निघतें. त्याचेंच सेवन करून सनकादिक सिद्ध ऋषि तृप्त झाले आहेत ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशी ती गाय त्रैलोक्यास पोषीत आहे, मग त्या ठिकाणीं माझी भूक कितीशी असणार ? ५. [३२७९]

कृष्णाचा जन्म बंदीशाळेंत झाल्यावर, त्या चक्रपाणीला वसुदेवानें गोकुळांत यशोदेचे येथें ठेविलें व तेथून तिला झालेली कन्या घेऊन आले. अशा प्रकारची अदलाबदल केली १. ज्या वेळीं देवांनीं देवकीच्या पोटीं अवतार घेतला त्या वेळीं आनंदीआनंद झाला २. श्रीहरीचें दर्शन झाल्यानें वसुदेव-देवकीच्या बेड्या तुटल्या ३. जें शुद्ध अव्यक्त परब्रह्म तेंच गोकुळामध्यें कृष्णवेष धरून आलें ४. ज्या नंदानें व यशोदेनें लक्ष्मीपतीस पाहिलें तीं धन्य होत ५. श्रावण वद्य अष्टमीच्या रात्रीं गोपाळाचा जन्म झाला ६. पृथ्वी आनंदित झाली व तिच्यावरचा सर्व भार नाहींसा झाला ७. तुकाराम महाराज म्हणतात, कंस मात्र चिंतेच्या भोंवऱ्यामध्यें अडकला गेला व गरगर फिरूं लागला, त्याला कांहीं सुचेनासें झालें ८. [३२८०]

कृष्णदर्शनानें आत्मा आणि अनात्मा ह्याबद्दलच्या संशयाच्या गांठी सुटल्या १. गोकुळांतील सर्व स्त्रिया श्रीकृष्णाच्या आरत्या करूं लागल्या २. भगवंतानें जन्मतांच आपल्या रूपानें सर्व जनांस मोहून टाकलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या ठिकाणीं श्रीकृष्णाच्या दर्शनाकरितां गोपस्त्रियांची गर्दी झाली, तेव्हां एकीमागून एकीनें भगवंताकडे जावें अशी व्यवस्था करणारा मी झालों ४. [३२८१]

जिनें श्रीहरीचें मुख डोळ्यानें पाहिलें ती तटस्थ उभी राही १. तिला हातानें धरून पलीकडे केल्यावांचून ती दूर होत नसे २. त्या गोपी मनामध्यें तेथें असणाऱ्या दाटीचा संकोच धरीत नसत ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवानें आपल्या स्वरूपाच्या मोहानें सर्वांचे देहभाव नाहींसे केले ४. [३२८२]

गोकुळींच्या सुखा । अंतपार नाहीं लेखा ॥ १ ॥ बाळकृष्ण नंदा घरीं । आनंदल्या नरनारी ॥ २ ॥ गुढिया तोरणें । करिती कथा गाती गाणें ॥ ३ ॥ तुका म्हणे छंदें । येणें वेधिलीं गोविंदें ॥ ४ ॥ [३२८३]

विटंबिले भट । दिला पाठीवरी पाट ॥ १ ॥ खोटें जाणोनी अंतर । न साहेचि विश्वंभर ॥ २ ॥ तेंचि करी दान । जैसें आइके वचन ॥ ३ ॥ तुका म्हणे देवें । पूतना शोषियेली जीवें ॥ ४ ॥ [३२८४]

: त्रोटक चरित्रें व त्रोटक प्रकरणें :

: शिवावर अभंग :

काय धर्म नीत । तुम्हां शिकवावें हित ॥ १ ॥ अवघें रचियेलें हेळा । लीळा ब्रह्मांड सकळा ॥ २ ॥ नाम महादेव । येथें निवडला भाव ॥ ३ ॥ तुका म्हणे वेळे । माझें तुम्हां कां न कळे ॥ ४ ॥ [३२८५]

भांडावें तें गोड । पुरे सकळ ही कोड ॥ १ ॥ ऐसा घरिचिया मोळा । ठाव निकटां जवळां ॥ २ ॥ हाक देतां दारीं । येती जवळी सामोरीं ॥ ३ ॥ तुका म्हणे शिवें । मागितलें हातीं द्यावें ॥ ४ ॥ [३२८६]

: हनुमंत स्तुति :

शरण शरण जी हनुमंता । तुज आलों रामदूता ॥ १ ॥ काय भक्तीच्या त्या वाटा । मज दाबाव्या सुभटा ॥ २ ॥ शूर आणि धीर । स्वामिकाजीं तूं सादर ॥ ३ ॥ तुका म्हणे रुद्रा । अंजनीचिया कुमरा ॥ ४ ॥ [३२८७]

केली सीताशुद्धि । मूळ रामायणा आधीं ॥ १ ॥ ऐसा प्रतापी गहन । भक्तांचें भूषण ॥ २ ॥

गोकुळांतल्या सुखाला अंतपार नाहीं, म्हणजे तें अनंत अपार आहे १. बाळकृष्ण नंदाचे घरीं प्रगट झाल्यामुळें सर्व स्त्रीपुरुषांना आनंद झाला २. सर्वांनीं आपल्या घरीं गुढ्या उभारिल्या व दारांना तोरणें बांधिलीं व सर्व लोक श्रीहरीची कथा सुस्वरानें गाऊं लागले ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारें गोविंदानें गोकुळांतल्या सर्वांना आपला छंद लावून त्यांचें हृदय वेधून घेतलें ४. [३२८३]

मांबळ भट हा कंसाकडून कृष्णाचें पारिपत्य करण्याकरितां गोकुळांत आला होता. आपण मोठे त्रिकालज्ञ ज्योतिषी आहोंत, असें त्यानें नंद–यशोदेला सांगितलें. तेव्हां त्यांनीं त्याला पाटावर बसविलें व श्रीकृष्णाचें भविष्य सांगा म्हणून विनंति केली. त्या कपटी ज्योतिष्यानें मुद्दामच विपरीत भविष्य सांगायला सुरवात केली, त्याचे मोबदला ज्या पाटावर तो बसला होता, तोच पाट त्याचे पाठींत बसला व त्याची फटफजिती झाली १. त्याचे हृदयांतील खोटेपणा विश्वंभरास सहन झाला नाहीं २. जसे ज्याचे शब्द ऐकावे तसेंच त्यास दान मिळूं लागलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवानें पूतनेला जिवासकट शोषून टाकिलें ४. [३२८४]

हे देवा, तुम्हांला आम्हीं धर्मनीति सांगून हित शिकवावें काय ? १. तुम्हीं सहज लीलेनें सर्व ब्रह्मांड एका क्षणांत निर्माण केलें आहे २. तुझें नांव महादेव आहे ह्यावरून तूं सर्व देवांत श्रेष्ठ आहेस, असा भाव ह्या ठिकाणीं समजून आला ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें असून माझ्या वेळेला तुम्हांला कां समजत नाहीं ? ४. [३२८५]

जों जों तुमच्याशीं भांडण करावें तसतसे तुम्ही गोड होऊन आमची सर्व इच्छा पूर्ण करतां १. ह्याप्रमाणें तुमच्या घरची रीत आहे, ती मी तुमच्या जवळ असतों म्हणून मला समजली २. दारांत उभा राहून हांका मारल्या म्हणजे तूं समोर आमच्या जवळ येतोस ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तूं मंगलकारक आहेस म्हणून तुझें नांव शिव आहे; ह्याकरितां जें आम्हीं मागितलें आहे तें आमच्या हातीं द्यावें ४. [३२८६]

अहो मारुतिराया, तुम्ही रामाचे सेवक आहांत, म्हणून मी तुम्हांला शरण आलों आहें (असें द्विवार सांगतात) १. अहो श्रेष्ठवीरा, भक्तीच्या वाटा कोणत्या आहेत त्या मला दाखवाव्या २. तुम्ही धैर्यवान असून पुरुषार्थी आहांत व स्वामीचे कामांत तत्पर आहांत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे रुद्रा, त्या अंजनीच्या पोटीं तुम्हीं अवतार घेतला ४. [३२८७]

मारुतिरायानें सीतेचा शोध केला, ही कीर्ति सर्व रामायणाचे आरंभीं (राम–रावणयुद्धाचे पूर्वींची) आहे व तेंच

जाऊनी पाताळा। केली देवीची अवकळा ॥ ३ ॥ राम लक्ष्मण। नेले आणिले चोरून ॥ ४ ॥ जोडूनियां कर। उभा सन्मुख समोर ॥ ५ ॥ तुका म्हणे जपें। वायुसुता जाती पापें ॥ ६ ॥ [३२८८]

काम बांदवडी। काळ घातला तोडरीं (काम घातला बांदोडी। काळ केला देशधडी) ॥ १ ॥ तया माझें दंडवत। कपिकुळीं हनुमंत ॥ २ ॥ शरीर वज्राऐसें। कवळी ब्रह्मांड जो पुच्छें ॥ ३ ॥ रामरायाच्या सेवका। शरण आलों म्हणे तुका ॥ ४ ॥ [३२८९]

हनुमंत महाबळी। रावणाची दाढी जाळी ॥ १ ॥ तया माझा नमस्कार। वारंवार निरंतर ॥ २ ॥ करोनी उड्डाण। केलें लंकेचें शोधन ॥ ३ ॥ जाळियेली लंका। धन्य धन्य म्हणे तुका ॥ ४ ॥ [३२९०]

: पंढरीचें माहात्म्य :

कार्तिकीचा सोहळा। चला जाऊं पाहूं डोळां। आलें वैकुंठ जवळां। सन्निध पंढरीये ॥ १ ॥ पीक पिकलें घुमरी। प्रेम न समाये अंबरीं। अवघी मातली पंढरी। घरोघरीं सुकाळ ॥ २ ॥ चालती स्थिर स्थिर। गरुड टकयांचे भार। गर्जती गंभीर। टाळ श्रुति मृदंग ॥ ३ ॥ मिळालिया भद्रजाती। कैशा आनंदें डुल्लती। शूर उटावती। एका एक आगळे ॥ ४ ॥ नामामृत कल्लोळ। वृंदें कोंदलीं सकळ। आलें वैष्णवदळ। कळिकाळ कांपती ॥ ५ ॥ आस करिती ब्रह्मादिक। देखुनि वाळवंटींचें सुख। धन्य धन्य मृत्युलोक। म्हणती भाग्याचा कैसा ॥ ६ ॥ मरण मुक्ति वाराणसी। पितृॠण गया नासी। उधार नाहीं पंढरीसी। पायांपाशीं विठोबाच्या ॥ ७ ॥ तुका म्हणे आतां। काय करणें आम्हां चिंता। सकळ सिद्धींचा दाता। तो सर्वथा नुपेक्षी ॥ ८ ॥ [३२९१]

बीज आहे १. असा तो श्रेष्ठ प्रतापी असून सर्व भक्तजनांचें भूषण आहे २. त्यानें पाताळास जाऊन देवीची फजिती केली ३. अहिरावण-महिरावण ह्या राक्षसांनीं रामलक्ष्मण चोरून नेले होते; त्यांना मारुतिरायांनीं त्या दुष्टांचा वध करून सोडवून आणिलें ४. ते मारुतिराय दोन्ही हात जोडून रामाचे समोर सर्व काळ उभे असतात ५. तुकाराम महाराज म्हणतात, वायुपुत्र मारुति ह्या नामाचा सर्व काळ जप केल्यास सर्व पापांचा नाश होईल ६. [३२८८]

ज्या मारुतींनीं कामाला जिंकून बंदींत ठेविलें व काळाला बेडी घातली १. त्या वानरवंशांतील हनुमंताला माझा नमस्कार आहे २. ज्याचें शरीर वज्रासारखें आहे व जो शेपटाचा वेढा घालून सर्व ब्रह्मांड आवळणारा आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो रामाच्या सेवका, अशा तुम्हांला मी शरण आलों आहें ४. [३२८९]

ज्यानें मोठ्या पराक्रमी रावणाची दाढी जाळिली, तो हनुमंत महान् बलवंत आहे १. त्याला मी वारंवार नमस्कार करीत आहें २. शतयोजन समुद्रावरून एक उडी मारून त्यानें सर्व लंकेचा शोध केला (सर्व लंका धुंडाळिली) ३. तुकाराम महाराज म्हणतात, मोठ्या प्रतापी रावणाची लंका मारुतीनें सहज कौतुकानें जाळली, म्हणून त्या मारुतीचा पुरुषार्थ धन्य आहे (असें द्विवार सांगतात) ४. [३२९०]

कार्तिकीचा उत्साह आपण जाऊन डोळयानें पाहूं. वैकुंठ नामक परमात्मा हा जवळ पंढरींत आला आहे १. हरिनामाचें पीक हें घनदाट पिकलें आहे. प्रेम हें आकाशांत मावेनासें झालें. श्रीहरीच्या सुखानें सर्व पंढरपूरवासी मस्त झाले आहेत, घरोघरीं परमार्थाचा सुकाळ झाला २. विष्णुभक्त समुदायानें स्थिर स्थिर चालत आहेत, ह्यांनीं (गरुडचिन्हांकित झेंडे) गरुडटके धारण केलेले आहेत, व श्रीहरीच्या नामाची गंभीर गर्जना टाळ, वीणा, मृदुंग ह्यांच्या नादानें ते करीत आहेत ३. जसे दळामध्यें झुलणारे हत्ती डोलत असावे तसे एकाहून एक श्रेष्ठ असे भावभक्तीनें शूर विष्णुभक्त उठाव करीत आहेत ४. श्रीहरीच्या नामामृतघोषानें सर्व भक्तजनांचा समुदाय कोंदाटून (भरून) गेला. अशा प्रकारें विष्णुभक्तांचें सैन्य आलेलें पाहून कळिकाळांना कंप सुटला ५. पंढरींतील वाळवंटांतील भजनसुखाची ब्रह्मादिक इच्छा करितात आणि मुखानें मृत्युलोक धन्य आहे, तेथील लोक कसे भाग्यवान् आहेत, असें बोलतात ६. काशीमध्यें मरण आलें असतां मुक्ति मिळते. गयावर्जन (श्राद्ध) केलें असतां पितृॠणांपासून मुक्तता होते. पंढरींत विठोबाच्या पायांपाशीं ह्या गोष्टी उधार मुक्ति नसून आपल्याला त्या येथेंच प्राप्त होतात ७. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आम्हांला चिंता कशाला करायला पाहिजे? सर्व सिद्धि देणारा श्रीहरि आमची उपेक्षा सर्वथैव करणार नाहीं ८. [३२९१]

जया दोषां परिहार । नाहीं नाहीं धुंडितां शास्त्र । ते हरती अपार । पंढरपूर देखिलिया ॥ १ ॥ धन्य धन्य भीमातीर । चंद्रभागा सरोवर । पद्मतीर्थी विठ्ठल वीर (धीर) । क्रीडास्थळ वेणुनाद ॥ २ ॥ सकळ तीर्थांचें माहेर । भूवैकुंठ निर्विकार । नामाचा गजर । असुर काळ कांपती ॥ ३ ॥ नाहीं उपमा द्यावया । सम तुल्य आणिका ठायां । धन्य भाग्य जयां । जे पंढरपूर देखती ॥ ४ ॥ उपजोनि संसारीं । एक वेळ पाहें पां पंढरी । महा दोषां कैंची उरी । देवभक्त देखिलिया ॥ ५ ॥ ऐसी विष्णूची नगरी । चतुर्भुज नरनारी । सुदर्शन घरटी करी । रीग न पुरे कळिकाळा ॥ ६ ॥ तें सुख वर्णावया गति । एवढी कैंची मज मति । जे पंढरपुरा जाती । ते पावती वैकुंठ ॥ ७ ॥ तुका म्हणे या शब्दाचा । जया विश्वास नाहीं साचा । तो अधम जन्मांतरींचा । जया पंढरी नावडे ॥ ८ ॥ [३२९२]

व्यभिचारिणी गणिका असतां कुंटणी । विश्वास तिच्या मनीं राघोबाचा ॥ १ ॥ ऐसी ही पापिणी वाहिली विमानीं । अचळ भुवनीं ठेवियेली ॥ २ ॥ पतितपावन तिहीं लोकीं ठसा । कृपाळु कोंवसा अनाथांचा ॥ ३ ॥ तुका म्हणे विठोबाची धरा सोय । आणिक उपाय नेणों किती ॥ ४ ॥ [३२९३]

गजेंद्र तो हस्ती सहस्र वरुषें । जळामाजी नक्रें पीडिलासे ॥ १ ॥ सुहृदीं सांडिलें कोणी नाहीं साहे । अंतीं वाट पाहे विठो तुझी ॥ २ ॥ कृपेच्या सागरा माझ्या नारायणा । तया दोघां जणां तारियेलें ॥ ३ ॥ तुका म्हणे नेलें वाहूनी विमानीं । मीही आइकोनी विश्वासलों ॥ ४ ॥ [३२९४]

नाहीं आम्ही विष्णुदास । करीत आस कोणाची ॥ १ ॥ कां हे नष्ट करिती निंदा ।

अशा प्रकारचे दोष झाले आहेत, कीं त्यांचा नाश करणारीं प्रायश्चित्तें कोणत्याहि शास्त्रांत शोध केला तरी सांपडत नाहींत. अशा प्रकारचीं अपार पातकें जरी झालीं तरी एक पंढरपूर पाहिल्यानें तीं सर्व नाहींशीं होतात १. जें भीमातीर पंढरींत आहे तें धन्य आहे (असें द्विवार सांगतात). त्याचप्रमाणें चंद्रभागा सरोवर हें धन्य आहे. पद्मतीर्थाच्या ठिकाणीं विठ्ठल वीर राहात आहेत व त्यांचें क्रीडास्थान वेणुनाद आहे २. सर्व तीर्थांचें जन्मस्थान अशा प्रकारचें पंढरपूर भूवैकुंठ निर्विकार आहे, तेथें हरीच्या नामाचा गजर होत आहे त्या योगानें असुरांना व कळिकाळालाहि कंप सुटत आहे ३. ह्या पंढरीस दुसरी उपमा देण्यायोग्य असें अन्य कोणतेंहि क्षेत्र नाहीं. जे पंढरपूर पाहातात त्यांचें भाग्य धन्य आहे ४. संसारामध्यें जन्म घेऊन एक वेळ पंढरी पाहा. त्या ठिकाणीं असणारें पांडुरंग दैवत व पुंडलीक भक्त ह्या दोघांचें दर्शन झाल्यानें महापातकें कसलीं राहातात ? ५. अशा प्रकारची ही विष्णूची नगरी आहे, तेथील स्त्रीपुरुष चतुर्भुज आहेत. सुदर्शन हें त्यांच्या रक्षणाकरितां सभोंवतीं फिरत आहे. त्या योगानें काळाला प्रवेश करण्यास अवकाश मिळत नाहीं. तें सुख वर्णन करण्याइतकी माझ्यामध्यें बुद्धि कोठें आहे ? जे पंढरपुरास जातात त्यांना वैकुंठाची प्राप्ति होते ७. तुकाराम महाराज म्हणतात, हें जें मीं सांगितलें आहे ह्याच्यावर ज्याचा खरोखर विश्वास नाहीं तो पूर्वजन्मींचा अधम आहे, म्हणून त्याला पंढरी आवडत नाहीं ८. [३२९२]

गणिका नामक कुंटीण (वेश्या) ही व्यभिचारी स्त्री होती. तिच्या मनामध्यें राघुपक्ष्याविषयींचा विश्वास होता, त्यामुळें तिनें मरणाच्या वेळेस, राघोबा तुझें कसें होईल, अशा मिषानें देवाचें नांव घेतलें १. त्या योगानें अशा त्या पापिणीला विमानांत घालून अचलभुवन जें वैकुंठ त्याच्या ठिकाणीं नेऊन ठेवलें २. तूं पतितांना पावन करणारा आहेस, अशी तुझी त्रैलोक्यांत कीर्ति आहे. अनाथ जीवांचें तूं कृपेचें घरच आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही विठोबाचा मार्ग धरा. आणखी उपाय किती आहेत, हें मी जाणत नाहीं ४. [३२९३]

गजेंद्र हत्ती हा हजार वर्षेंपर्यंत मगराशीं युद्ध करून श्रमी झाला १. त्याचे देहसंबंधी जे कोणी होते त्यांनीं त्याचा त्याग केला, म्हणून अखेरीस हे विठोबा, तुझी तो वाट पाहूं लागला २. हे माझ्या नारायणा, कृपेच्या सागरा, तूं त्वरेनें धांवत येऊन गजेंद्र व मगर ह्या दोघांना तारिलेंस ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांना तुम्ही विमानांत घालून नेलेली हकीगत ऐकून, तुमचे ठिकाणीं माझा विश्वास बसला ४. [३२९४]

आम्ही विष्णूचे सेवक कोणाचीहि आशा करीत नाहीं १. असें असून, ते दुष्ट लोक सर्व काळ आमची निंदा

नेणों सदा आमुचि ॥ २ ॥ असों भलत्या ठायीं मनें । समाधानें आपुल्या ॥ ३ ॥ तुका म्हणे करूं देवा । तुझी सेवा धंदा तो ॥ ४ ॥ [३२९५]

: जोहार :

जोहार जी मायबाप जोहार (मायबाप जोहार जी जोहार) । सारा साधावया आलों वेसकर ॥ १ ॥ मागील पुढील करा झाडा । नाहीं तरी खोडा घालिती जी ॥ २ ॥ फांकूं नका रुजू झालियावांचूनी । सांगा जी कोणी धरिती धन्या ॥ ३ ॥ आजी मायबाप करा तडामोडी । उद्यां कोण घडी राहेना हो ॥ ४ ॥ तुका म्हणे कांहीं न चले ते बोली । अखेर ते सालीं झाडा देती (घेती) ॥ ५ ॥ [३२९६]

येऊं द्या जी कांहीं वेसकरास । आंतून बाहेर वोजेचा घास ॥ १ ॥ जों यावें तों हातचि रिता नाहीं । कधीं तरी कांहीं द्यावें घ्यावें ॥ २ ॥ तुका म्हणे उद्यां लावीन मनेरा । जे हें दारोदारांभोंवतीं फिरा ॥ ३ ॥ [३२९७]

देती घेती परज गेली । घर खालीं करूनियां ॥ १ ॥ धांवाणियाचे न पडे हातीं । खादली राती काळोखी ॥ २ ॥ अवघियांचें अवघें नेलें । कांहीं ठेविलें नाहीं मागें ॥ ३ ॥ सोंग संपादुनि दाविला भाव । गेला आधीं माव वरि होती ॥ ४ ॥ घराकडे पाहूं नयेसेंचि जालें । अमानत केलें दिवाणांत ॥ ५ ॥ आतां तुका कोणा न लगेचि हातीं । जाली ते निश्चिंती बोलों नये ॥ ६ ॥ [३२९८]

कशाला करितात हें समजत नाहीं २. आम्ही आपल्या मनाचें समाधान करून भलत्या ठिकाणीं आमच्या इच्छेप्रमाणें राहात आहोंत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझी सेवा ज्यामध्यें आहे तें सर्व आम्ही करूं ४. [३२९५]

(कोणी एक ईश्वराचा प्रेषित संत वेसकऱ्याच्या रूपानें जीवास उपदेश करतो :) अहो जी मायबाप, मी तुम्हांस (द्विवार) जोहार करतों, कारण सरकारसारा मागण्याकरितां मी वेसकर आलों आहें १. तुम्हीं आपल्या मागील संचित कर्माचा व पुढील-क्रियमाण कर्माचा ईश्वरासमोर झाडा करावा. नाहींपेक्षां आमचे धनी तुम्हांस जन्ममृत्यूच्या खोड्यांत घालतील २. धन्यास रुजू (धन्यासमोर हजर) झाल्यावांचून कोणी चुकवून जाऊं नका. जी साहेब, ज्या कोणाचें कांहीं गाऱ्हाणें असेल, त्यानें तें मालकास जाऊन सांगावें ३. अहो जन मायबाप, आज तुम्हीं आपली संचितकर्माची तडजोड करावी. नाहींपेक्षां उद्यां सकाळीं असें म्हणाल तर कोणी घटकाभर देखील ऐकणार नाहींत ४. तुकाराम महाराज म्हणतात, सालअखेरीस (मरणाच्या वेळीं) झाडा देतेवेळीं तुमच्या वायद्याचें भाषण कांहीं देखील चालणार नाहीं (अंतकाळीं ईश्वराचें स्मरण झालें नाहीं तर सारा देणें होणार नाहीं, त्यामुळें खोडा घालणें भाग पडेल, म्हणून सारा भरण्याची त्वरा करा) ५. [३२९६]

(एक यमाचा प्रेषित वेसकऱ्याच्या रूपानें दानधर्म न करणाऱ्या, हरिनाम न घेणाऱ्या व सर्व वेळ संसारांत आसक्त असलेल्या मनुष्यास उपदेश करतो :) जी महाराज, घरांतून कांहीं बरेपणाचा (हरिनामाचा, दानधर्माचा) घांस वेसकरासाठीं बाहेर येऊं द्या १. ज्या वेळीं मीं यावें त्या वेळीं हात रिकामा नाहीं म्हणून सांगतां, पण केव्हां तरी कांहीं दिलें घेतलें पाहिजे २. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या देवरूपी गांवाचा मनरूपी दरवाजा मी उद्यां बंद करीन; मग तुम्ही जन्ममृत्यूच्या दारोदार (पशु-पक्ष्यांच्या देहांच्या दाराभोंवतीं) हिंडाल ३. [३२९७]

जिच्यापासून स्वीकार, त्याग इत्यादि क्रिया होतात अशी जी देहबुद्धि चमकत होती, ती देहरूपी घर टाकून गेली १. कारण स्वरूपाच्या अज्ञानाची (अविद्यारूपी) काळोखी रात्र होती, ती खाऊन टाकली (नाहींशी झाली), म्हणून धांवत येणारा जो पाठीलागा काळ त्याच्या मी हातीं लागणार नाहीं २. (देह, इंद्रियें, मन, बुद्धि ह्या) सर्व तत्त्वांचें सर्व धर्मासह निरसन केलें. बाकी कांहीं ठेवलें नाहीं ३. स्वरूपावर असलेली जी मूळमाया तिनें ह्या सर्व प्रपंचाचें सोंग घेऊन जो भाव प्रकट केला होता, तो आतां नाहींसा झाला ४. आतां देहादि प्रपंचरूपी घराचें परावर्तन नाहीं अशी स्थिति झाली आहे, कारण सर्व उपाधींची अनामत (रोकड धन) दिवाणांत (दिवाणी कचेरींत) (श्रीहरीच्या ठिकाणीं) रुजू (जमा) केली ५. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मी कोणाच्या हातीं लागणार नाहीं, अशी माझी अचिंत्य स्थिति झाली आहे; ती वाचेनें बोलतां येत नाहीं ६. [३२९८]

करिसी कीं न करिसी माझा अंगिकार । हा मज विचार पडला देवा ॥ १ ॥ देसी कीं न देसी पायांचें दर्शन । म्हणउनी मन स्थिर नाहीं ॥ २ ॥ बोलसी कीं न बोलसी मजसवें देवा । म्हणोनियां जीवा भय वाटे ॥ ३ ॥ होईल कीं न होय तुज माझा आठव । पडिला संदेह हाचि मज ॥ ४ ॥ तुका म्हणे मी तों कमाईचें हीण । म्हणउनी सीण करी देवा ॥ ५ ॥ [३२९९]

ऐसा माझा कोण आहे भीड भार । नांवाचा मी फार वायां गेलों ॥ १ ॥ काय सेवा रुजू आहे सत्ताबळ । ते मज राऊळ कृपा करी ॥ २ ॥ काय याती शुद्ध आहे कुळ धर्म । तेणें पडे वर्म तुझे ठायीं ॥ ३ ॥ कोण तपोनिधि दानधर्मशीळ । अंगीं एक बळ आहे सत्ता ॥ ४ ॥ तुका म्हणे वायां झालों भूमीभार । होईल विचार काय नेणों ॥ ५ ॥ [३३००]

साच मज काय कळों नये देवा । काय तुझी सेवा काय नव्हे ॥ १ ॥ करावें तें बरें जेणें समाधान । सेवावें हें वन न बोलावें ॥ २ ॥ शुद्ध माझा भाव होईल तुझे पायीं । तरीच हें देई निवडूनी ॥ ३ ॥ उचित अनुचित कळों आली गोष्टी । तुझे कृपादृष्टी पांडुरंगा ॥ ४ ॥ तुका म्हणे मज पायांसवें चाड । सांगसी तें गोड आहे मज ॥ ५ ॥ [३३०१]

नाहीं कंटाळलों परि वाटे भय । करावें तें काय न कळतां ॥ १ ॥ जन वन आम्हां समानाचि झालें । कामक्रोध केले पावटणीं ॥ २ ॥ षडऊर्मी शत्रु जिंकिले अनंता । नामाचिया सत्ताबळें तुझ्या ॥ ३ ॥ मुख्य धर्म आम्हां सेवकांचा ऐसा । स्वामी करी शिरसा पाळावें तें ॥ ४ ॥ म्हणऊनी तुका अवलोकूनी पाय । वचनाची पाहे वास एका ॥ ५ ॥ [३३०२]

वायांविण वाढविला हा लौकिक । आणिला लटिक वाद दोघां ॥ १ ॥ नाहीं ऐसा झाला देव

हे देवा, ह्या आयुष्यांत तूं माझा अंगीकार करशील किंवा नाहीं ह्याविषयीं मला फार विचार पडला आहे १. तुझ्या पायांचें दर्शन मला देशील किंवा नाहीं अशी काळजी उत्पन्न होऊन माझें मन तळमळ करीत आहे, तें स्थिर होत नाहीं २. हे देवा, तूं माझ्याबरोबर भाषण करशील किंवा नाहीं, ह्या काळजीनें माझ्या जीवास भय उत्पन्न झालें आहे ३. तुला माझी आठवण होईल किंवा नाहीं, असा संशय माझ्या ठिकाणीं वाढला आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, माझ्या हातून कोणत्याहि प्रकारची मेहनत होत नाहीं, म्हणून माझें मन खेद करीत आहे ५. [३२९९]

असा मी काय मोठा आहें कीं, माझ्या भिडेचें ओझें होईल ? उलट मी फार वायां गेलेला मनुष्य आहें १. माझी देवाच्या ठिकाणीं सेवा रुजू होऊन त्या योगानें मजवर श्रीहरि कृपा करील, असें आहे काय ? २. माझी जात व कुळाचार हीं शुद्ध आहेत म्हणून त्या योगेंकरून हे देवा, तुझ्या प्राप्तीचें साधन मला कळेल असें आहे काय ? ३. मी असा काय तपस्वी व दानधर्मशील आहें ? माझे अंगीं कोणतेंहि एक सत्ताबळ आहे काय ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी व्यर्थ जन्माला येऊन पृथ्वीला भार झालों आहें; माझें परिणामीं काय होईल, हें कांहीं मला कळत नाहीं ५. [३३००]

हे देवा, खरी स्थिति (ह्या जगांत सत्य) काय आहे हें मला कळूं नये काय ? तुझी सेवा काय मजकडून होत नाहीं ? १. ज्या योगानें समाधान होईल तें करणें बरें, अथवा न बोलतां मुकाट्यानें अरण्यवास करणें हें बरें २. जर माझा शुद्ध भाव तुझ्या पायांचे ठिकाणीं असेल तर (ध्रुवपदांत दर्शविलेली देणगी दे) (आपल्या सत्य स्वरूपाचें ज्ञान मला स्पष्ट करून सांग) ३. हे पांडुरंगा, योग्य व अयोग्य कोणतें हें तुझ्या कृपादृष्टीनें कळून चुकलें आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्या पायांची (सेवेची) इच्छा आहे. जें तूं सांगशील तें मला चांगलें गोड आहे ५. [३३०१]

हे देवा, मी कंटाळलों नाहीं, पण मला काय करावें हें न कळल्यामुळें भय वाटत आहे १. जन-वन हें सर्व आम्हांला सारखें आहे. आम्ही कामक्रोधांच्या पायांखालील पायऱ्या केल्या आहेत २. हे अनंता, तुझ्या नामाचिंतनाच्या बलानें क्षुधा, तृषा, शोक, मोह, जरा, मरण हे सहा मनोविकार व काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे सहा शत्रु जिंकले. स्वामी जें करील तें शिरसावंद्य करावें, हाच आमचा सेवकांचा मुख्य धर्म होय ४. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणून मी आपल्या पायांकडे पाहून आपल्या मुखांतून एखादा शब्द येण्याची वाट पाहात आहें ५. [३३०२]

व्यर्थ हा लौकिक वाढविला, असें आम्हां दोघांचा वाद मिथ्यत्वाला आल्यामुळें वाटतें १. माझ्या मतानें देव नाहीं

माझ्या मतें । भुकेलें जेवितें काय जाणे ॥ २ ॥ शब्दज्ञानें गौरविली हे वैखरी । साच तें अंतरीं बिंबेचि ना ॥ ३ ॥ झालों परदेशी गेले दोन्ही ठाय । संसार ना पाय तुझे देवा ॥ ४ ॥ तुका म्हणे मागें कळों येतें ऐसें । न घेतों हें पिसें लावूनियां ॥ ५ ॥ [३३०३]

न कळे तत्त्वज्ञान मूढ माझी मति । परि ध्यातों चित्तीं चरणकमळ ॥ १ ॥ आगमाचे भेद मी तों काय जाणें । काळ तो चिंतनें सारीतसें ॥ २ ॥ कांहीं नेणें परि म्हणवितों दास । होईल त्याचा त्यास अभिमान ॥ ३ ॥ संसाराची सोय सांडिला मारग । दुराविलें जग एका घायें ॥ ४ ॥ मागिल्या लागाचें केलेंसे खंडण । एकाएकीं मन राखियेलें ॥ ५ ॥ तुका म्हणे अगा रखुमादेवी वरा । भक्तकरुणाकरा सांभाळावें ॥ ६ ॥ [३३०४]

इतुलें करीं देवा ऐकें हे वचन । समूळ अभिमान जाळीं माझा ॥ १ ॥ इतुलें करीं देवा ऐकें हे गोष्टी । सर्व समदृष्टी तुज देखें ॥ २ ॥ इतुलें करीं देवा विनवितों तुज । संतचरणरज वंदीं माथां ॥ ३ ॥ इतुलें करीं देवा ऐकें हे मात । हृदयीं पंढरीनाथ दिवसरात्रीं ॥ ४ ॥ भलतिया भावें तारीं पंढरीनाथा । तुका म्हणे आतां शरण आलों ॥ ५ ॥ [३३०५]

तुझा दास ऐसा म्हणती लोकपाळ । म्हणऊनी सांभाळ करीं माझा ॥ १ ॥ अनाथाचा नाथ पतितपावन । हें आतां जतन करीं नाम ॥ २ ॥ माझे गुणदोष पाहतां न लगे अंत । ऐसें माझें चित्त मज ग्वाही ॥ ३ ॥ नेणें तुझी कैसी करावी हे सेवा । जाणसी तूं देवा अंतरींचें ॥ ४ ॥ तुका म्हणे तूं या कृपेचा सिंधु । तोडीं भवबंधु माझा देवा ॥ ५ ॥ [३३०६]

जाणावें तें काय नेणावें तें काय । ध्यावे तुझे पाय हेंचि सार ॥ १ ॥ करावें तें काय न करावें

असें ठरलें, मग तो भुकेल्याचें जीवित काय जाणे ? २. मी आपली वाणी शब्दज्ञानानें अनेक कवित्व करून शृंगारिली पण त्यांतील खरा विचार अंतःकरणांत बिंबत नाहीं ३. हे देवा, मी परदेशी झालों आहें. संसार नाहीं व तुझ्या पायांचा योगहि नाहीं, असा मी दोन्ही ठिकाणांना मुकलों ४. तुकाराम महाराज म्हणतात, मला जर असें हें पूर्वी कळलें असतें तर हे देवा, तुझें वेड मीं आपल्या मनाला लावून घेतलें नसतें ५. [३३०३]

हे देवा, मी मतिमंद आहें. ह्या योगानें तत्त्वज्ञानाचा विचार मला कळत नाहीं; पण तुमच्या चरणकमलाचें ध्यान मी चित्तामध्यें सर्व काळ करतों १. शास्त्रांतील भेद मी जाणत नाहीं, पण तुमच्या नामस्मरणामध्यें नेहमीं काळ घालवितों २. सर्व प्रकारें मी अज्ञान असून तुमचा दास म्हणवीत आहें. त्याबद्दलचा अभिमान ज्याचा त्यानें धरला पाहिजे ३. संसाराचा संबंध टाकला व रस्ताहि टाकला असें एका घावानें सर्व जग नाहींसें केलें ४. मागील संचित कर्माच्या लागाचें खंडण करून एकटेपणें मी मनाचें रक्षण करीत आहें ५. तुकाराम महाराज म्हणतात, अगा रुक्मिणीच्या वरा, तुमच्या ठिकाणीं भक्तांविषयींची करुणा आहे म्हणून तुम्ही आमचा सांभाळ करा ६. [३३०४]

हे देवा, माझा समूळ अभिमान जाळून टाक. इतकें कर असें मी तुला सांगतों १. हे देवा, सर्वत्र समदृष्टीनें मी तुला पाहावें इतकें करण्याविषयीं मी म्हणत आहें तें तूं ऐक २. हे देवा, संतचरणांचा स्पर्श झालेले रज मीं मस्तकावर वंदन करावे. इतकें करण्याविषयीं मी तुला विनंति करीत आहें ३. हे देवा पंढरीनाथा, तुझें स्वरूप रात्रंदिवस माझ्या हृदयांत राहील, असें करण्याविषयीं मी तुझी प्रार्थना करीत आहें ती ऐक ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा, मी तुला शरण आलों आहें. आतां तूं मला (भक्त, अभक्त, लहान, मोठा, ज्ञानी, अज्ञानी-कांहींहि समजून) पाहिजे त्या भावनेनें तार ५. [३३०५]

हे देवा, जन हे मला तुझा दास असें म्हणतात, म्हणून माझा तूं सांभाळ कर १. तूं अनाथ जीवांचा स्वामी असून पातकी जीवांना पावन करणारा आहेस. अशा प्रकारचें आपलें नांव तूं रक्षण कर २. माझ्या ठिकाणीं असणारे गुणदोष पाहावयास गेलें तर त्यांचा अंतपार लागावयाचा नाहीं. ह्याविषयीं माझेंच चित्त मला साक्षी देत आहे ३. हे देवा, तुझी सेवा कशी करावी हें मी जाणत नाहीं, हें माझ्या अंतःकरणांतील तूं जाणतच आहेस ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तूं कृपेचा सागर आहेस, म्हणून माझें संसारबंधन तोड ५. [३३०६]

हे देवा, काय एक जाणावें व काय एक न जाणावें, म्हणून तुझ्या पायांचें चिंतन करावें हेंच मला सर्वांचें सार

तें काय। ध्यावे तुझे पाय हेंचि सार ॥ २ ॥ बोलावें तें काय न बोलावें तें काय। ध्यावे तुझे पाय हेंचि सार ॥ ३ ॥ जावें तें कोठें न जावें तें आतां। बरवें आठवितां नाम तुझें ॥ ४ ॥ तुका म्हणे तूं करिसी तें सोपें। पुण्यें होती पापें आमुच्या मतें ॥ ५ ॥ [३३०७]

नको ब्रह्मज्ञान आत्मस्थिति भाव। मी भक्त तूं देव ऐसें करीं ॥ १ ॥ दावीं रूप मज गोपिकारमणा। ठेवूं दे चरणांवरी माथा ॥ २ ॥ पाहीन श्रीमुख देईन आलिंगन। जीवें लिंबलोण (निंबलोण) उतरीन ॥ ३ ॥ पुसतां सांगेन हितगुज मात। बैसोनि एकांत सुखगोष्टी ॥ ४ ॥ तुका म्हणे यासी न लावीं उशीर। माझें अभ्यंतर जाणोनियां ॥ ५ ॥ [३३०८]

मागें शरणागत तारिले बहुत। म्हणती दीनानाथ तुज देवा ॥ १ ॥ पाहिले अपराध नाहीं याती कूळ। तारिला अजामेळ गणिका भिल्ली ॥ २ ॥ अढळपदीं बाळ बैसविला धुरु। क्षीराचा सागरु उपमन्या ॥ ३ ॥ गजेंद्रपशु नाडिला जळचरें। भवसिंधु पार उतरिला ॥ ४ ॥ प्रल्हाद अग्नींत राखिला जळांत। विषाचें अमृत तुझ्या नामें ॥ ५ ॥ पांडवां संकट पडतां जडभारी। त्यांचा तूं कैवारी नारायणा ॥ ६ ॥ तुका म्हणे तूं या अनाथांचा नाथ। ऐकोनियां मात शरण आलों ॥ ७ ॥ [३३०९]

तुझा शरणागत झालों मी अंकित। करीं माझें हित पांडुरंगा ॥ १ ॥ पतितपावन तुझी ब्रीदावळी। ते आतां सांभाळीं मायबापा ॥ २ ॥ अनाथांचा नाथ बोलतील संत। ऐकोनियां मात विश्वासलों ॥ ३ ॥ न करावी निरास न धरावें उदास। देईं याचकास कृपादान ॥ ४ ॥ तुका म्हणे मी तों पातकांची रासी। देईं पायांपाशीं ठाव देवा ॥ ५ ॥ [३३१०]

वाटत आहे १. करावयाचें कोणतें व न करावयाचें कोणतें हें मला कळत नाहीं. तुझ्या पायाचें चिंतन करणें हेंच मुख्य सार होय २. बोलावयाचें कोणतें व न बोलावयाचें कोणतें हें मला समजत नाहीं, पण तुझ्या पायाचें चिंतन करणें हेंच मुख्य सार होय ३. आतां जावें तरी कोठें आणि न जावें तरी कोठें? तुझें नामस्मरण करणें हेंच चांगलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तूं जें करशील तें (वेद–गीताद्वारां तूं केलेल्या उपदेशाप्रमाणें) करणें सोपें आहे. आमच्या बुद्धीनें जें पुण्य म्हणून करावें तें पाप होतें ५. [३३०७]

हे देवा, मला (तुझ्या सगुणरूपाच्या दर्शनाला व त्यासंबंधींच्या आवडीला आडकाठी करणारें) ब्रह्मज्ञान नको व आत्मसिद्धीच्या भावनेनें (आत्मनिष्ठेनें) राहाणें हेंहि नको. मी तुझा भक्त व तूं माझा देव, अशी स्थिति ठेव १. हे गोपिकांना रमविणाऱ्या, मला तुझें रूप दाखीव म्हणजे मी तुझ्या पायांवर मस्तक ठेवीन २. तुझें सुशोभित मुख मी पाहीन व तुला आलिंगन देईन व मी आपला जीव तुझ्यावरून ओंवाळून टाकीन ३. देवा, तूं जर विचारलेंस तर तुला हित-गुह्याची हकीगत एकांतांत बसून सुखानें सांगेन ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या अंतःकरणाची स्थिति जाणून तूं ही विनंति मान्य करण्यास उशीर लावूं नकोस ५. [३३०८]

हे देवा, पूर्वीं तूं पुष्कळ पातकी पतित तारलेस, म्हणून तुला दीनांचा स्वामी असें म्हणतात १. कोणाच्या अपराधाकडे व जातिकुळाकडे कांहीं लक्ष न देतां, अजामिळ, गणिका, शबरी भिल्लीण यांसारखे पातकी तूं तारलेस २. ध्रुव बालकास ध्रुवाच्या अढळपदावर बसविलेंस. उपमन्यु बालकास तूं दूध पिण्याकरितां दुधाचा समुद्र दिलास ३. गजेंद्र नामक हत्ती जळांतील सुसरीच्या योगेंकरून पीडित झाला असतांना त्याला तूं ह्या संसारसमुद्रांतून पार पाडून टाकलास ४. प्रल्हादाचें अग्नीपासून व पाण्यापासून तूं रक्षण केलेंस. तुझ्या नामचिंतनानें विषाचें अमृत झालें ५. हे नारायणा, पांडव कांहीं मोठ्या संकटामध्यें सांपडले, कीं त्यांचा तूं कैवार घेऊन त्यांतून त्यांना मुक्त करीत होतास ६. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तूं अनाथ दीन जीवांचा रक्षक आहेस, अशी तुझी कीर्ति ऐकून मी तुला शरण आलों आहें ७. [३३०९]

हे पांडुरंगा, तुला मी शरण येऊन तुझा आज्ञांकित झालों आहें. आतां तूं माझें हित कर १. हे मायबापा देवा, पतितांना पावन करणें हें तुझें ब्रीद आहे. आतां तूं त्याचा सांभाळ कर २ तूं अनाथ जीवांचा सांभाळ करणारा आहेस असें मी संतांच्या मुखानें ऐकल्यावरून तुझे ठिकाणीं विश्वास धरून राहिलों आहें ३. माझी तूं निराशा करून मला उदास करूं नकोस. मी तुझ्या दाराशीं भीक मागणारा आलों आहें, म्हणून मला तूं कृपादान दे ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मी केवळ पापाचीच रास आहें, म्हणून मला तूं आपल्या पायांपाशीं आश्रय दे ५. [३३१०]

सर्वस्वाचा त्याग तो सदा सोंवळा। न लिंपे विटाळा अग्नि जैसा ॥ १ ॥ सत्यवादी करी संसार सकळ। अलिप्त कमळ जळीं जैसें ॥ २ ॥ घडे ज्या उपकार भूतांची ते दया। आत्मस्थिति तया अंगीं वसे ॥ ३ ॥ न बोले गुणदोष नाइके जो कानीं। वर्तोनी तो जनीं जनार्दन ॥ ४ ॥ तुका म्हणे वर्म जाणितल्याविण। पावे करितां सीण सांडीमांडी ॥ ५ ॥ [३३११]

कुळधर्म ज्ञान कुळधर्म साधन। कुळधर्म निधान हातीं चढे ॥ १ ॥ कुळधर्म भक्ति कुळधर्म गति। कुळधर्म विश्रांति पाववील ॥ २ ॥ कुळधर्म दया कुळधर्म उपकार। कुळधर्म सार साधनांचें ॥ ३ ॥ कुळधर्म महत्त्व कुळधर्म मान। कुळधर्म पावन परलोकींचें ॥ ४ ॥ तुका म्हणे कुळधर्म दावी देवीं देव। यथाविध भाव जरी होय ॥ ५ ॥ [३३१२]

पुण्य परउपकार पाप ते परपीडा। आणिक नाहीं जोडा दुजा यासी ॥ १ ॥ सत्य तोचि धर्म असत्य तें कर्म। आणिक हें वर्म नाहीं दुजें ॥ २ ॥ गति तेचि मुखीं नामाचें स्मरण। अधोगति जाण विन्मुखता ॥ ३ ॥ संतांचा संग तोचि स्वर्गवास। नर्क तो उदास अनर्गळा ॥ ४ ॥ तुका म्हणे उघडें आहे हित घात। जयाचें उचित करा तैसें ॥ ५ ॥ [३३१३]

न वजे वायां कांहीं ऐकतां हरिकथा। आपण करितां वायां न वजे ॥ १ ॥ न वजे वायां कांहीं देवळासी जातां। देवासी पूजितां वायां न वजे ॥ २ ॥ न वजे वायां कांहीं केलिया तीर्थ। अथवा कां व्रत वायां न वजे ॥ ३ ॥ न वजे वायां झालें संतांचें दर्शन। शुद्ध आचरण वायां न वजे ॥ ४ ॥ तुका म्हणे भाव असतां नसतां। सायास करितां वायां न वजे ॥ ५ ॥ [३३१४]

ज्यानें (अविद्येसह अहंतेचा व ममतेचा) सर्वांचा त्याग केला आहे तो सर्व काळ सोंवळा आहे. ज्याप्रमाणें अग्नि कोणत्याहि विटाळानें विटाळला जात नाहीं, त्याप्रमाणें तो होय १. सत्य भाषण करणारा (किंवा ब्रह्मवेत्ता मनुष्य) सर्व संसार करतो, पण जसें पाण्यांत असून कमल हें पाण्याहून अलिप्त असतें, तसा तो संसारापासून अलिप्त असतो २. ज्याच्यामध्यें भूतदया असून जो दुसऱ्यावर उपकार करतो, त्याच्या अंगीं आत्मस्थिति मुरली आहे ३. जो दुसऱ्याचे गुणदोष बोलत नाहीं व कानानें ऐकतहि नाहीं, तो जगांत वागूनहि त्याचेपासून अलग असतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, परमार्थप्राप्तीचें खरें मर्म समजल्याखेरीज जी खटपट करणें ते श्रम होत ५. [३३११]

जो ज्या कुळांत जन्मला आहे त्या कुळाचा धर्म (कुलपरंपरागत वर्णाश्रमधर्म) त्यानें चालविला असतां, त्याच साधनानें ज्ञानाची प्राप्ति होऊन स्वरूपाचा ठेवा त्याच्या हस्तगत होतो १. ज्याच्या कुळामध्यें श्रीहरीची भक्ति हाच कुळधर्म असतो, त्या योगानें उत्तम गति मिळते व विसांवा होतो २. ज्याचा कुळधर्म अंतरांत दया ठेवून लोकांवर उपकार करण्याचा आहे, तेंच सर्व साधनांचें मुख्य सार आहे ३. आपल्या कुळांतील धर्माप्रमाणें वागणूक केली असतां, महती वाढते व मान होतो आणि त्याच योगानें पवित्र होऊन परलोकाची प्राप्ति होते ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशा कुळधर्माच्या ठिकाणीं जसा ज्याचा थोडाबहुत भाव असेल, त्याप्रमाणें देवीची अथवा देवाची त्यास भेट होईल (कुळधर्म म्ह० शास्त्रोक्त वडिलार्जित धर्म) ५. [३३१२]

लोकांवर उपकार करणें हेंच मुख्य पुण्य व लोकांस त्रास देणें त्याचेंच नांव पाप, ह्याखेरीज दुसरें पापपुण्य नाहीं १. खरें बोलणें व त्याप्रमाणें वागणें हाच मुख्य धर्म आहे आणि खोटें बोलून तसें वागणें त्या योगानें कर्म वाढतें (पातक वाढतें). ह्याखेरीज मुख्य मर्म दुसरें नाहीं २. श्रीहरीचें नामस्मरण करणें हीच मुख्य गति व त्यास विन्मुख होणें ह्याचेंच नांव नरकवास, असें समजावें ३. संतांची संगति करणें तोच स्वर्गवास आणि त्यांवर उदास होऊन त्यांचा धिक्कार करणें त्याचेंच नांव वाईट नरक (नरकवास) ४. तुकाराम महाराज म्हणतात, हेंच प्रत्यक्ष हित आणि हाच प्रत्यक्ष घात आहे. ह्यांतून ज्याला जें योग्य वाटेल तें त्यानें करावें ५. [३३१३]

श्रीहरीची कथा दुसऱ्याच्या मुखानें श्रवण केली, अथवा आपण केली तर ती कांहीं वायां जाणार नाहीं १. देवळांत जाऊन देवाचें दर्शन घेतलें अगर त्याचें पूजन केलें तर तें कांहीं वायां जाणार नाहीं २. एखाद्या तीर्थयात्रेस जाणें अगर कोणतेंहि व्रत करणें, हें कांहीं वायां जाणार नाहीं ३. संतांचें दर्शन घेतलें असतां वायां जाणार नाहीं; अशा प्रकारचीं कोणतींहि चांगलीं आचरणें वायां जाणारीं नव्हेत ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशा कर्तव्यांमध्यें भाव (श्रद्धा) असो अगर नसो, चांगल्या आचरणाचे श्रम केलें असतां वायां जाणार नाहींत ५. [३३१४]

चित्तीं धरीन मी पाऊलें सुकुमार । सकळ बिढार संपत्तीचें ॥ १ ॥ कंठीं धरीन नाम अमृताची वल्ली । होईल राहिली शीतळ तनु ॥ २ ॥ पाहेन श्रीमुख साजिरें सुंदर । सकळां आगर लावण्याचें ॥ ३ ॥ करीन अंगसंग बाळकाचे परी । बैसेन तोंवरी नुतरीं कडिये ॥ ४ ॥ तुका म्हणे हा केला तैसा होय । धरिली मनें सोय विठोबाची ॥ ५ ॥ [३३१५]

बाळ मातेपाशीं सांगे तानभूक । उपायाचें दुःख काय जाणे ॥ १ ॥ तयापरि करीं पाळण हें माझें । घेऊनियां ओझें सकळ भार ॥ २ ॥ कासया गुणदोष आणिसील मना । सर्व नारायणा अपराधी ॥ ३ ॥ सेवाहीन दीन पातकांची रासी । आतां विचारिसी काय ऐसें ॥ ४ ॥ जेणें काळें पायीं अनुसरलें चित्त । निर्धार हें हित झालें ऐसें ॥ ५ ॥ तुका म्हणे तुम्हीं तारिलें बहुतां । माझी कांहीं चिंता असों द्यावी ॥ ६ ॥ [३३१६]

जीवनावांचूनि तळमळी मासा । प्रकार हा तैसा होतो जीवा ॥ १ ॥ न सांपडे झालें भूमिगत धन । चरफडी मन तयापरी ॥ २ ॥ मातेचा वियोग झालिया हो बाळा । हा तो कळवळा जाणा देवा ॥ ३ ॥ सांगावे ते किती तुम्हांसी प्रकार । सकळांचें सार पाय दावीं ॥ ४ ॥ येचि चिंते माझा करपला भीतर । कां नेणों विसर पडिला माझा ॥ ५ ॥ तुका म्हणे तूं हें जाणसी सकळ । यावरी कृपाळ होईं देवा ॥ ६ ॥ [३३१७]

शरण आलें त्यासी न द्यावी जी पाठी । ऐका जगजेठी विज्ञापना ॥ १ ॥ आळवी तयांसी उत्तर झडकरी। द्यावें परिसा हरि विज्ञापना ॥ २ ॥ गांजलियाचें करावें धांवणें । विनंती नारायणें परिसावी हे ॥ ३ ॥ भागलियाचा होईं रे विसांवा । परिसावी देवा (केशवा) विज्ञापना ॥ ४ ॥ अंकिताचा भार

देवाचे चरण हें मोक्षादि सकळ संपत्तीचें स्थान आहे; ते सुकुमार पाय मी आपल्या चित्तामध्यें धारण करीन १. श्रीहरीची नामामृतवल्ली मी कंठामध्यें धारण करीन. त्या योगानें त्रिविधतापानें संतप्त असलेली तनु शीतळ होईल २. सुंदर शोभायमान असून जें सकळ लावण्याचें उत्पत्तिस्थान आहे तें देवाचें श्रीमुख मी पाहीन ३. त्या देवाचा अंगसंग लहान बालकाप्रमाणें मी करीन आणि लाडानें मी त्याच्या कडेवर बसेन, खालीं उतरणार नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, विठोबा हा भावार्थानें जसा करावा तसा होतो, म्हणून त्याची सोय माझ्या मनानें धरली आहे ५. [३३१५]

बालक हें आपल्यास भूक अगर तहान लागली असतां आईजवळ सांगतें, पण ज्या योगानें तहानभूक शांत होईल तो उपाय करण्याचे श्रम तें जाणतें काय? १. हे देवा, त्याप्रमाणें माझा सर्व भार घेऊन तूं माझें रक्षण कर २. हे नारायणा, मी सर्वतोपरि अपराधी आहें. पण माझ्या ठिकाणीं असलेले गुणदोष तूं कशाला मनावर घेशील? ३. हे देवा, तुझी सेवा कशा प्रकारें करावी हें मी कांहीं जाणत नाहीं; हें माझें बोलणें लाक्षणिक नाहीं, असें तूं जाणत आहेस ४. ज्या वेळेस तुझ्या पायांच्या ठिकाणीं माझें चित्त स्थिरावलें त्या वेळेस माझें सर्व हित झालें, असें मी निश्चयानें समजलों ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तूं पूर्वी पुष्कळांचा उद्धार केला आहेस. ह्याकरितां मज बालकाची कांहीं तरी तुला काळजी असावी ६. [३३१६]

पाण्याखेरीज मासा जसा तळमळ करतो तशी स्थिति माझ्या जीवाची झाली आहे १. जमिनींत पुरून ठेवलेलें धन मालकास सांपडेनासें झालें म्हणजे त्याचें मन जसें तळमळ करतें, तसें देवा, तुमच्याकरितां माझें मन तळमळत आहे २. हे देवा, बालकास आईचा वियोग झाल्यास तें जसें तळमळतें त्याप्रमाणें तुमच्याकरितां हृदयाची स्थिति झाली आहे ३. हे देवा, आतां तुमच्याजवळ किती प्रकारांनीं सांगावें? सर्वांचें सार असे जे तुझे पाय ते तुम्ही मला दाखवा ४. ह्या चिंतेनें माझें अंतःकरण करपून गेलें आहे, कीं माझा विसर तर तुम्हांला पडला नाहीं ना? ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्ही सर्वज्ञ आहांत. ह्याउपर मजवर कृपा करा ६. [३३१७]

हे जगजेठी देवा, तुम्हांला जे शरण आले आहेत, त्यांच्या ठिकाणीं तुम्हीं विन्मुख होऊं नये, ही विनंति आहे १. जे कोणी आपणांला हांक मारीत असतील त्यांना त्वरित उत्तर द्यावें. हे हरि, तुमच्याजवळ ही माझी विनंति आहे २. हे नारायणा, जे कोणी संसारानें गांजले गेले आहेत त्यांच्याकरितां धांव घ्यावी एवढी माझी विनंति तुम्ही ऐका ३. हे केशवा, जे कोणी श्रमले आहेत, त्यांचा तुम्ही अंगीकार केल्यानें ते विश्रांति पावतील, म्हणून एवढी विनंति ऐका ४.

वागवावा माथां । परिसावी अनंता विज्ञापना ॥ ५ ॥ तुका म्हणे आम्हां विसरावें ना देवा । परिसावी केशवा विज्ञापना ॥ ६ ॥ [३३१८]

कोण आम्हां पुसे सिणलें भागलें । तुजविण उगलें पांडुरंगा ॥ १ ॥ कोणापाशीं आम्हीं सांगावें सुखदुःख । कोण तानभूक निवारील ॥ २ ॥ कोण या तापाचा करील परिहार । उतरील पार कोण दुजा ॥ ३ ॥ कोणापें इच्छेचें मागावें भातुकें । कोण कवतुकें बुझावील ॥ ४ ॥ कोणावरी आम्हीं करावी हे सत्ता । होईल साहाता कोण दुजा ॥ ५ ॥ तुका म्हणे अगा स्वामी सर्वजाणा । दंडवत चरणा तुमच्या देवा ॥ ६ ॥ [३३१९]

तेव्हां धालें पोट बैसलों पंगती । आतां आम्हां मुक्तिपांग काई ॥ १ ॥ धांवा केला आतां येईल धांवोन । येथें काई करणें लागे संदेह (न लगे संदेह) ॥ २ ॥ गायनाचा आतां कोठें उरला काळ। आनंदें सकळ भरी आलें ॥ ३ ॥ देवाच्या सख्यत्वें विषमासी ठाव । मध्यें कोठें वाव राहों सके ॥ ४ ॥ तेव्हां झाली अवघी बाधा वाताहात । प्रेम हृदयांत प्रवेशलें ॥ ५ ॥ तुका म्हणे आम्हीं जिंतिलें भरंवसा । देव कोठें दासा मोकलितो ॥ ६ ॥ [३३२०]

तरी कां पवाडे गर्जती पुराणें । असता नारायण शक्तिहीन ॥ १ ॥ कीर्तीविण नाहीं नामाचा डांगोरा । येर कां इतरां वाणीत ना ॥ २ ॥ तरीच म्हणतों आहे चिरंजीव । केलियाचा जीव सुखी गुणें ॥ ३ ॥ चांगलेपण हें निरुपमता अंगीं । बाणलें श्रीरंगीं म्हणऊनी ॥ ४ ॥ तरीच हा थोर सांगितलें करी । अभिमान हरीपाशी नाहीं ॥ ५ ॥ तुका म्हणे तरी करिती याची सेवा । देवापाशीं हेवा नाहीं कुडी ॥ ३ ॥ [३३२१]

अवीट हें क्षीर हरिकथा माउली । सेवितां सेविली वैष्णवजनीं ॥ १ ॥ अमृत राहिलें लाजोनि

हे अनंता, जे तुमच्या अंकित आहेत त्यांच्या योगक्षेमाचें ओझें तुम्हीं आपल्या मस्तकावर घ्यावें ही माझी विनंति ऐका ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे केशवा देवा, आम्हांला तुम्हीं विसरूं नये ही माझी विनंति ऐकावी ६. [३३१८]

हे पांडुरंगा, तुम्ही थकलांत काय, श्रमलांत काय असें तुझ्यावांचून आम्हांला निमूटपणें कोण विचारणार आहे? १. आम्हीं आपली तहानभूक, सुखदुःख कोणाजवळ सांगावें? त्याचें तुझ्यावांचून कोण निवारण करील? २. आमच्या त्रिविध तापाचें निरसन कोण करील? तुझ्यावांचून ह्या संसारसमुद्रांतून दुसरा कोण आम्हांला पार करील? ३. ज्या खाऊची आम्हांला इच्छा आहे तो आम्हीं कोणाजवळ मागावा? तुझ्यावांचून आमचें कोडकौतुकानें कोण समाधान करील? ४. आम्हीं कोणावर मालकी (सत्ता) करावी? तुझ्यावांचून आमचें सहन करणारा दुसरा कोण आहे? ५. तुकाराम महाराज म्हणतात, अगा देवा स्वामी, तूं सर्वज्ञ आहेस; माझा तुझ्या पायांशीं दंडवत (नमस्कार) आहे ६. [३३१९]

ज्या वेळेस देवाच्या पंक्तीस मी बसलों, त्या वेळींच माझें पोट भरलें; आतां आम्हांला मुक्तीचें दारिद्र्य काय आहे? १. आतां आम्हीं त्या देवास हांक मारली, कीं तो धांवत येईल ह्याविषयीं कांहीं संशय घ्यावयास नको २. आतां गायन करण्याचा काल कोठें राहिला? सर्व श्रीहरीच्या आनंदानें भरून गेलें आहे ३. देवाशीं मैत्री (एकता) केल्यानें विषमभावाला आश्रय मिळण्याइतकी तेथें कोठें जागा आहे? ४. ज्या वेळेस श्रीहरीच्या प्रेमाचा संचार हृदयांत झाला, त्या वेळीं अहंकार, काम, क्रोधादि अनेक विकार बाधित होऊन त्यांची वाताहात झाली ५. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं देवाला खात्रीनें जिंकलें, कारण दासांची उपेक्षा तो कोठें करूं शकतो! ६. [३३२०]

जर खरोखर नारायण निर्बल असता तर त्याची पुराणांनीं कीर्ति कशी वर्णन केली असती? १. कीर्तीवांचून नामाची प्रसिद्धि होणार नाहीं. जर झाली असती तर एकमेकांनीं एकमेकांचें वर्णन केलें नसतें काय? (पुराणें देवावांचून इतरांचें वर्णन कां करीत नाहींत?) २. तुम्हीं जीवाला सुखी केल्यामुळें मी तुम्हांला चिरंजीव असें म्हणत आहें ३. चांगुलपणा हा श्रीरंगाच्या ठिकाणीं अनुपम्य बाणला आहे, म्हणून पुराणांनीं त्याचें वर्णन केलें ४. हरीच्या जवळ अभिमान नाहीं म्हणूनच हा श्रेष्ठ देव जसें सांगावें तसें करतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, देवाच्या जवळ (भक्ताचें वाईट करावें असा) वाईट हांव नाहीं, म्हणून भक्त त्याची सेवा करितात ६. [३३२१]

हरिकथारूपी माउलीचें आनंदरूपी दूध अवीट आहे (हरिकथा अवीट आहे). त्याचें वैष्णवांनीं सेवन केलें आहे १.

माघारें । येणें रसें थोरें ब्रह्मानंदें ॥ २ ॥ पतित पातकी पावनपंगती । चतुर्भुज होती देवाऐसे ॥ ३ ॥ सर्व सुखें तया मोहोरती ठायां । जेथें दाटणी या वैष्णवांची ॥ ४ ॥ निर्गुण हें सोंग धरिलें गुणवंत । धरूनियां प्रीत गायनाची ॥ ५ ॥ तुका म्हणे केली साधना गाळणी । सुलभ कीर्तनीं होउनी ठेला ॥ ६ ॥ [३३२२]

संसारसोहळे भोगिती सकळ । भक्तां त्याचें बळ विठोबाचें ॥ १ ॥ भय चिंता (चित्तीं) धाक न मानिती मनीं । भक्तां चक्रपाणी सांभाळीत ॥ २ ॥ पाप पुण्य त्यांचें धरूं न शके अंग । भक्तांसी श्रीरंग सर्व भावें ॥ ३ ॥ नव्हती ते मुक्त आवडे संसार । देव त्याचा भार सकळ (सर्व) वाहे ॥ ४ ॥ तुका म्हणे देव भक्तां वेळाईत । भक्त ते निश्चिंत त्याचियानें ॥ ५ ॥ [३३२३]

देवासी अवतार भक्तांसी संसार । दोहींचा विचार एकपणें ॥ १ ॥ भक्तांसी सोहळे देवाचिया अंगें । देव त्यांच्या संगें सुख भोगी ॥ २ ॥ देवें भक्तां रूप दिलासे आकार । भक्तीं त्याचा पार वाखाणिला ॥ ३ ॥ एका अंगीं दोन्ही जालीं हीं निर्माण । देवभक्तपण स्वामीसेवा ॥ ४ ॥ तुका म्हणे येथें नाहीं भिन्नभाव । भक्त तोचि देव देव भक्त ॥ ५ ॥ [३३२४]

हुंबरती गाय (गायें) तयाकडे कान । कैवल्य निधान देउनी ठाके ॥ १ ॥ गोपाळांची पूजा उच्छिष्ट कवळी । तेणें वनमाळी सुखावला ॥ २ ॥ चोरोनियां खाये दुध दहीं लोणी । भावें चक्रपाणि गोंविला तो ॥ ३ ॥ निष्काम तो झाला कामासी लंपट । गोपिकांची वाट पाहात बैसे ॥ ४ ॥ जगदानी इच्छी तुळसी एक दळ । भावाचा सकळ विकिला तो ॥ ५ ॥ तुका म्हणे हेंचि चैतन्य सांवळें । व्यापुनी निराळें राहिलेंसे ॥ ६ ॥ [३३२५]

त्याच्यापुढें अमृत लज्जित होऊन मागें राहिलें, असा ह्या हरिकथेच्या रसानें ब्रह्मानंद झाला आहे २. जे कोणी पतित पातकी आहेत त्यांनीं वैष्णवांच्या पंगतीस बसून हरिकथारूपी अमृताचें सेवन केलें तर ते देवासारखे चतुर्भुज होतात ३. ज्या ठिकाणीं वैष्णवांचा अति दाट समुदाय आहे तेथें सर्व सुखें मोहर घेतात (वळतात) ४. भक्तजनांच्या गायनाची श्रीहरीस प्रीति लागल्यामुळें निर्गुण श्रीहरीनें सगुण स्वरूप धारण केलें ५. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरीची प्राप्ति कीर्तनानें सुलभ झाली. बाकीचीं सर्व साधनें गाळून हरिकथा हें सार निघालें आहे. ६ [३३२२]

सर्व लोक संसाराचें सर्व सुख भोगतात, पण भक्तांना एक विठोबाचेंच साह्य आहे १. ते भक्त भय, चिंता इत्यादि मनाच्या ठिकाणीं कांहीं करीत नाहींत, कारण त्यांचा सांभाळ चक्रपाणि करीत आहे २. भक्तजन हे सर्व भावानें एका श्रीरंगाच्या ठिकाणीं रंगल्यामुळें पापपुण्य त्यांच्या आत्म्याला स्पर्श करूं शकत नाहीं ३. ते मुक्त होत नाहींत; त्यांना पुनः जन्माला यावें हेंच प्रिय वाटतें; त्यांच्या योगक्षेमाचें सर्व ओझें देव वागवितो ४. तुकाराम महाराज म्हणतात, देव हा भक्तांचा कैवारी असल्यामुळें भक्त हे निष्काळजी असतात ५. [३३२३]

देवाच्या मागें अवतार घेणें व भक्तांच्या मागें जन्म घेणें हें जरी लागलें आहे तरी दोघांचाहि विचार धर्माचें रक्षण करणें हा एकच होय १. देवाच्या योगानें भक्त सुखी आहेत, आणि देवहि त्यांच्या संगतीनें सुख भोगीत आहे २. देवानें भक्तांना साकार देह दिला आहे, म्हणून भक्तांनीं त्या देवाचा महिमा गाइला ३. एका परब्रह्माच्या स्वरूपावरच देव आणि भक्त, स्वामी आणि सेवा हे दोन भाग निर्माण झाले ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं भिन्न भेद नाहीं. जो देव तोच भक्त व भक्त तोच देव आहे. ५. [३३२४]

जे मोठ्या प्रेमभावानें मान वांकडी करून फेऱ्या घेऊन गातात, त्यांचें देव लक्ष देऊन ऐकतो व कैवल्यासारखा ठेवा त्यांना देतो (भगवान् श्रीकृष्ण गाई चारण्याकरितां वृंदावनांत जात असतां एखादी गाय हंबरली तर तिच्या आवाजाकडे कान देऊन उभा राहात असे) १. गोपाळांची पूजा करतो व त्यांचें उच्छिष्ट सेवन करतो (तीच गोपाळांनीं भगवंताची केलेली पूजा होय). त्यायोगेंकरून वनमाळी सुखी होतो २. त्या गोपीगोपाळांचें दहीं, दूध, तूप, लोणी तो चक्रपाणि खातो, असा तो त्यांच्या भावानें गुंतला गेला आहे ३. निष्काम श्रीहरि गोपींच्या कामनेनें मोहित झाला म्हणून त्यांची तो वाट पाहात बसतो ४. सर्व जगाला दान देणारा भक्तांच्या एका तुळसीपत्राची इच्छा करीत आहे. अशा प्रकारें भक्तांच्या भावनेला तो विकला आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, हें सांवळें (शुद्ध) चैतन्यस्वरूप सर्व ठिकाणीं व्यापून (सर्वांपेक्षां) वेगळें राहिलें आहे ६. [३३२५]

समर्थासी नाहीं वर्णावर्णभेद। सामग्री ते सिद्ध सर्व घरीं ॥ १ ॥ आदराचे ठायीं बहुत आदर। मागितलें फार तें तें वाढी ॥ २ ॥ न म्हणे सुहृद सोयरा आवश्यक। राजा आणि रंक सारिखेचि ॥ ३ ॥ भाव देखे तेथें करी लडबड। जडा राखे जड निराळेंचि ॥ ४ ॥ कोणा न विसंबे याचकाचा ठाव। विनवूनि देव शंका फेडी ॥ ५ ॥ तुका म्हणे पोट भरूनी उरवी। आलें ऐसें दावी अनुभवा ॥ ६ ॥ [३३२६]

: शेताधर अभंग :

सेत करा रे फुकाचें। नाम विठोबारायाचें ॥ १ ॥ नाहीं वेठी जेवा सारा। जाहाती नाहीं म्हणियारा ॥ २ ॥ सरिक नाहीं दुसरा। धनी सारा तुझा तूं ॥ ३ ॥ जप तप नांगरणी। न लगे आटी दुनवणी ॥ ४ ॥ कर्म कुळवणी। न लगे धर्म पाळी दोन्ही ॥ ५ ॥ ज्ञानपाभारी तीफणी। न लगे करावी पेरणी ॥ ६ ॥ बीज न लगे संचिताचें। पीक पिकलें ठायींचें ॥ ७ ॥ नाहीं यमाचें चोरटें। विठ्ठल पागोऱ्याच्या नेटें ॥ ८ ॥ पीक न वजे हा भरंवसा। करी उद्योग तो पिसा ॥ ९ ॥ सराई सर्व काळ। वायां न वजे घटिकापळ ॥ १० ॥ प्रेम पिकलें अपार। नाहीं सांठवावया थार ॥ ११ ॥ ऐसिये जोडी जो चुकला। तुका म्हणे धिग त्याला ॥ १२ ॥ [३३२७]

वोणव्या सोंकरीं। सेत खादलें पाखरीं ॥ १ ॥ तैसा खाऊं नको दगा। निदसुरा राहुनी जागा ॥ २ ॥ चोरासवें वाट। चालोंनि केलें तळपट ॥ ३ ॥ डोळे झांकूनी राती। कूपीं पडे दिवसा ज्योती ॥ ४ ॥ पोसी वांझ गाय। तेथें कैंची दूध साय ॥ ५ ॥ फुटकी सांगडी। तुका म्हणे न पवे थडी ॥ ६ ॥ [३३२८]

उदार श्रीमंताच्या घरीं हा उत्तम व हा कनिष्ठ ज्ञातीचा असा कांहीं भेद नाहीं. सर्व सामुग्रीहि त्याच्या घरीं सिद्ध आहे १. ज्यांच्यामध्यें देवाविषयींचा आदर आहे त्यांचा देवहि पुष्कळ आदर करतो व भक्तजन जें कांहीं मागतील तें त्यांना पुष्कळ वाढतो २. माझे कोणी आप्तसंबंधी आहेत असें तो म्हणत नाहीं. त्याच्या येथें राजा आणि रंक ह्या दोघांचीहि किंमत सारखीच आहे ३. ज्या भक्तांच्या ठिकाणीं शुद्ध भाव असेल त्यांच्या मात्र हा पुढें पुढें करतो. तो भक्त जरी जड हृदयाचा असला तरी त्याला देहादि जड प्रपंचापासून वेगळा ठेवतो. कोणत्याहि याचकाकडे देव हा दुर्लक्ष न करितां तो त्यांना विनंति करून सर्वांना इच्छित भोजन देऊन त्यांचें इच्छित पूर्ण करतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वांचें पोट भरून बाकी अन्न उरलें आहे असें आपलें औदार्य सर्वांच्या अनुभवास येईल असें तो समर्थ दाखवितो ६. [३३२६]

अरे, विठोबारायाचें नामचिंतनरूपी शेत तुम्हीं फुकटचें करा १. ह्या ठिकाणीं बिगारी, अन्नखर्च व सरकारी पट्टी कांहीं नाहीं, कोणाच्या हुकमाचा जुलूमहि नाहीं २. ह्याला शेताचा दुसरा मालक किंवा भागीदार नाहीं. तुझा तूंच ए.. धनी आहेस ३. ह्या शेतास जपतपाचें नांगरणें व पिकांतील गवत काढण्याकरितां दुणवणी नको ४. षट्कर्म व धर्म ह्यांची कुळवणी (पाळी) नको ५. ज्ञान पाभराची (फारुळयाची) तिफण नको व पेरणीहि करावयास नको ६. संचित कर्माचें बीज नको. हरिनामरूपी शेत मूळचेंच पिकलें आहे ७. ह्याला विठ्ठलाच्या चिंतनरूपी गोफणीच्या पागुऱ्यामुळें यमरूपी चोराचा उपद्रव नाहीं ८. आणि हें पीक कधींहि बुडणार नाही. ही खात्री असून जो पिकाची काळजी करील तो वेडा आहे ९. त्याचा सर्व काळ हंगाम असतो. एक घटका, पळ देखील व्यर्थ जात नाहीं १०. श्रीहरीचें प्रेमरूपी पीक असंख्या पिकलें आहे. त्याला सांठविण्याला जागा नाहीं ११. तुकाराम महाराज म्हणतात, असा लाभ करून घेण्याला जो चुकेल त्याला धिःकार असो १२. [३३२७]

शेताकडे नजर न देतां जो राखणदार खालीं वांकून (मान घालून) राखतो त्याचें शेत पांखरें खाऊन टाकतात १. त्याप्रमाणें हे मूर्खा, जागा राहून परमार्थाच्या ठिकाणीं दगा खाऊं नकोस २. चोराच्या बरोबर मार्गक्रमण करून ज्यांनीं आपलें वाटोळें करून घेतलें ३. व भर दिवसाच्या प्रकाशामध्यें डोळे झांकून घेऊन ज्यांनीं रात्र केली ते पापाच्या अंधाऱ्या विहिरींत पडतात ४. संसाररूपी वांझ गाईचें पोषण करणारास दुधाची व साईची प्राप्ति कशी होईल? ५. तुकाराम महाराज म्हणतात, फुटक्या सांगडीनें पलिकडच्या तीरावर जाणें होणार नाहीं (तसें संसार करून सुखरूपी फळ मिळणार नाहीं. म्हणून परमार्थ-शेताचें रक्षण करा) ६. [३३२८]

सेत आलें सुगी सांभाळावे चारी कोन। पिक आलें परी केलें पाहिजे जतन ॥ १ ॥ सोंकरीं सोंकरीं सोहंकरी। विसावा तोंवरी नको उभें आहे तों ॥ २ ॥ गोफणीस गुंडा घाली पागोऱ्याच्या नेटें। पळती हाहाकारें अवघीं पाखरांचीं थाटें ॥ ३ ॥ पेटवूनी आगटी राहें जागा पालटुनी। पडलिया मानी बळ बुद्धि व्हावी दोनी ॥ ४ ॥ खळे दाणे (दाते) विश्व सुखी करी होता रासी। सारा सारुनियां ज्याचे भाग देईं त्यासी ॥ ५ ॥ तुका म्हणे मग नाहीं आपुलें कारण। निज आलें हातां भूस सांडिलेनि कण ॥ ६ ॥ [३३२९]

: पाळणा :

जननिये (या) बाळका रे घातलें पाळणा। पंचतत्त्वीं जडियेल्या वारतिया चहूं कोणा। अखंड जडियेल्या तया ढाळ अंगणा। वैखरी धरूनी हातीं भाव दावी खेळणा ॥ १ ॥ निजीं रे निजीं आतां। म्हणोनि परिये दे माता। खेळतां कष्टलासी बाळा तूं रे नेणतां ॥ २ ॥ खेळतां बाहेरी रे मुला लोकांच्या सवें। बागुल काळतोंडा नाहीं नेतो तें ठावें। खेळतां दुश्चित्ता रे देखोनी तें न्यावें। म्हणोनि सांगे तुज शीघ्र वचन पाळावें ॥ ३ ॥ संचित मागें शुद्ध होतें सांगाती। तेणें तुज वांचविलें वेरझारिया हातीं। आणीक नेलीं मागें काय जाणों तीं किती। आलासी येथवरी थोर पुण्यें बहुतीं ॥ ४ ॥ खेळतां शुद्ध शुक देवा तो रे लागला पाठीं। लपाला वरुषें बारा तीये मातेचे पोटीं। रिघतां बाहेरी रे पळे घेऊनि कासोटी। तेचि परी झाली स्वामी भेणें रिघे कपाटीं ॥ ५ ॥ खेळतां चक्रवर्ती जनका लागला धाक। पडिला अग्निमाजीं पाव जळत एक। भरलासे कांप अंगीं सुख नाठवे दुःख।

देहरूपी शेत हंगामाला आलें आहे म्हणून त्याचे (इंद्रियें, प्राण, मन, व बुद्धि हे) चारी कोंपरे सांभाळावे. परमार्थाचें पीक भारदारीचें आहे पण जतन केलें पाहिजे १. म्हणून सांभाळ कर (असें त्रिवार सांगतात). शेत उभें आहे तोंपर्यंत विसांवा घेऊं नको २. मुखरूपी गोफणींत श्रीहरीचें नाम हाच एक धोंडा घालून जोरानें मार, म्हणजे त्या अहंकारासरसे कामक्रोधादि दोषरूपी पाखरांचे समुदाय उडून जातील ३. स्वरूपविचारांची आगटी पेटवून देहबुद्धीची जागा बदलून राहा. अभिमानाचा घाला आला तर बळ व बुद्धि ह्या दोघांचें साह्य पाहिजे ४. ह्या पिकाच्या खळ्यावर श्रीहरीच्या नामाचें दान करून जगाला सुखी कर. परमार्थरूपी खळ्यावर स्वरूपबोधाची रास झाल्यावर पंचभूतांचे भाग ज्यांचे त्यांस देऊन सारा वार ५. तुकाराम महाराज म्हणतात, मग आपलें कार्य कांहीं राहिलें नाहीं, निजस्वरूप हस्तगत झाल्यावर देहादि प्रपंचरूपी भुसाचा सहजच त्याग झाला ६. [३३२९]

मायेनें (किंवा, संतरूपी मातेनें) जीवात्मरूपी बालकांस पंचतत्त्वांच्या देहरूपी पाळण्यांत घातलें व पंचतत्त्वांच्या ठिकाणीं असणाऱ्या चारी देहांचे चार कोंपरे त्या ठिकाणीं चारी वाणीरूपी स्त्रिया अखंड जडलेल्या आहेत व त्यांचा स्वभाव नेहमीं हालणें हा आहे. तथापि वैखरीचा अंगीकार करून सोहं अशा भावनेनें राहावें, असें त्या खेळकर मुलाला सुचविलें १. अरे बाळा, आतां तूं निजस्वरूपाच्या ठिकाणीं स्थिर हो असें म्हणून आई त्याला झोंके देऊं लागली. आत्मस्वरूप न जाणल्यामुळें देहबुद्धि धरून संसाराचे खेळ खेळलास व अनेक प्रकारचीं कर्में व त्यांचें फळ (सुखदुःख) भोगण्याकरितां अनेक योनींतून जन्ममृत्युद्वारा फिरण्यांत फार श्रमी झालास २. हे मुला, बहिर्मुख स्थितीनें जगाशीं क्रीडा करण्यांत काळ हाच कोणी एक बागुलबुवा तुला धरून घेऊन जातो हें तुला ठाऊक नाहीं. अनेक प्रकारचीं कर्में करण्यांत ज्यांचें हृदय दुःखी असतें असें पाहून त्यांना तो घेऊन जातो, म्हणून मीं सांगितलेल्या शब्दाप्रमाणें तूं त्वरेनें वाग ३. पूर्वींचें तुझें शुद्ध संचितकर्म तुझ्याबरोबर होतें, त्यानें तुला अनेक योनींतून फिरण्यापासून बचावलें. पूर्वीं ह्या संसारानें किती लोक अधोगतीला नेले. तूं ह्या नरदेहापर्यंत मोठ्या पुण्याईनें येऊन पोहोंचलास ४. शुकदेव खेळत असतां तो यमरूप बागूल पाठीमागें लागला. त्याच्या भीतीनें बारा वर्षें आईच्या पोटांत जो लपून बसला, तो बाहेर आल्यावर पळूं लागला. अप्सरांचें भाषण ऐकून देहबुद्धि उत्पन्न झाली व लंगोटी लावून पळूं लागला. तोच प्रकार कार्तिकस्वामींचा होऊन स्त्रियांचा संग नको म्हणून ते गिरिकपाटीं जाऊन बसले ५. सार्वभौम जनक राजा राज्यकारभारादि क्रीडा करीत असतां त्याला त्याचें (काळाचें) भय उत्पन्न झालें. अशा स्थितींत त्याचा एक पाय अग्नींत पडून जळूं लागला, परंतु त्या काळ बागुलाच्या भयकंपानें, विदेह अवस्था प्राप्त झाली होती म्हणून, सुखदुःख हीं आठवेनाशीं झालीं

आपपर तेंही नाहीं देहभाव सकळीक ॥ ६ ॥ सिबीया चक्रवर्ती कव पडली अवचिती । धीट तो न भे तया मास कापिलें हातीं । टाकिलें तयावरी खुणें गोविला अंतीं । पातला मायबाप हिरोनि घेतला हातीं ॥ ७ ॥ बांधला अजामेळा वेश्यागणिका कैसी । मारिली हाक धाकें कळलें मायबापासी । घातली धांव नेटें वेगीं पावला त्यासी । हिरोनि नेली दोघें आपणयां तीं पासीं ॥ ८ ॥ धरुनी आठवू रे बाळा राहें निश्चळ । खेळतां दुश्चिता रे नको जाऊं बरळ । टोंकताहे तुजलागीं दिवस लेखूनी काळ । मग नेदी आठवूं रे नेत्रीं घालीं पडळ ॥ ९ ॥ ऐसीं तीं कृपावंतें बाळा मोहिलें चित्त । सुस्वरें कंठ गाय मधुर आणि संगीत । तेणें तेंचि चित्त राहे होऊनियां निवांत । पावती तुका म्हणे नाहीं विश्वास ते घात ॥ १० ॥ [३३३०]

: तुकाराम महाराजांचें चिंचवडच्या देवाशीं भाषण :

वांजा (वांझा) गाई दुभती । देवा ऐसी तुझी ख्याति ॥ १ ॥ ऐसें मागत नाहीं तुज । चरण दाखवावे मज ॥ २ ॥ चातक पाखरूं । त्यासी वर्षे मेघ धारू ॥ ३ ॥ पक्षी राजहंस । अमोलिक मोतीं त्यास ॥ ४ ॥ तुका म्हणे देवा । कां गा खोचलासी जीवा ॥ ॥ [३३३१]

परतें मी आहें सहजचि दुरी । वेगळें भिकारी नामरूपा ॥ १ ॥ न लगे रुसावें धरावा संकोच । सहज तें नीच आलें भागा ॥ २ ॥ पडियेले ठायीं उच्छिष्ट सेवावें । आर्त तेंचि देवें केलें ऐसें ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही आम्हां जी वेगळे । केलेती निराळे द्विज देवा ॥ ४ ॥ [३३३२]

आपपर ह्या भेद नाहींसा होऊन सर्व देहभाव गलित झाला ६. पृथ्वीपति शिबिराजावर अकस्मात् घाला आला. तो इतका धीट होता, कीं त्यानें श्येनपक्ष्यापासून रक्षण मागणाऱ्या कबुतराला आश्रय देऊन त्या मोबदला न भितां आपल्या हातानें आपल्या आंगाचें मांस कापून हरीस दिलें. हरीनें त्याच अंगावर तें परत, तुझ्या डोळ्यांतून पाणी येतें ह्या सबबीवर, टाकून दिलें. त्यावर तो म्हणूं लागला, कीं राहिलेलें एक अंग व्यर्थ जातें म्हणून तें रडतें, असें सांगून त्यानें हरीला कुंठित केलें. नंतर आईबाप जो देव तो त्याला प्रसन्न झाला व काळाच्या हातून त्याला सोडवून घेतलें ७. अजामिळासहि काळ-बागुलानें बद्ध केलें. त्याचप्रमाणें गणिका नामक वेश्येलाहि पाशानें बद्ध केलें. त्या वेळीं त्या भयानें त्यांनीं देवाला हांक मारली. ती आईबाप देवाला समजली. नंतर देवांनीं मोठ्या वेगानें धांवत येऊन प्रसन्न होऊन त्यांना त्या काळ बागुलाचे हातून सोडवून घेऊन आत्मसान्निध्य दिलें ८. हे बाळा, अशा प्रकारें तूंहि श्रीहरीची आठवण ठेवून निश्चळ हो. संसारांत अनेक कर्मरूपी क्रीडा करतांना तूं असावधपणानें बरळूं नकोस. काळ हा तुझी सारखी वाट पाहात बसला आहे व तुझ्या आयुष्याचे दिवस मोजीत बसला आहे. मग तो श्रीहरीची आठवण होऊं देणार नाहीं. डोळ्यावर पडदा घालील ९. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारें त्या कृपावंतानें बाळाचें चित्त मोहित करून टाकलें, सुस्वर गळ्यानें मधुर अंगाई गीत गाइलें. त्यायोगानें बाळाचें चित्त तसेंच निवांत झालें. त्यांच्या वचनावर (संतवचनावर) जे विश्वास ठेवतात त्यांना फलप्राप्ति होते; त्यांचा विश्वासघात होत नाहीं १०. [३३३०]

हे देवा, तुझ्या प्रसादानें वांझ गाईस दूध येतें, अशी तुझी प्रसिद्धि आहे १. अशा प्रकारचें तुझ्याजवळ मी कांहीं मागत नाहीं. मला तूं आपले पाय दाखीव २. चातक पक्ष्याकरितां मेघ वृष्टि करतो. ३. राजहंस पक्ष्याच्या सेवनाकरितां अमूल्य मोत्यें निर्माण झालीं आहेत, त्याप्रमाणें मोरयाच्या दर्शनाची इच्छा आहे. ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमच्या जीवाला हे माझे शब्द कां बोंचले ? ५. [३३३१]

ह्या नामरूपात्मक दरिद्री देहादिप्रपंचांतून मी सहज निराळा आहें १. सहज देहदृष्टीनें वांट्याला आलेल्या नीचत्वाबद्दल रुसावयास नको, अथवा, त्याजबद्दल संकोच धरावयास नको २. पडल्या जागींच उच्छिष्ट सेवन करावें, हीच इच्छा देवानें पूर्ण होण्याची तजवीज केली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो ब्राह्मणदेवा, तुम्हीं आपल्यापासून आम्हांला वेगळें केलेंत (चिंचवडच्या गणपतीचे उपासक चिंतामणि देव ह्यांच्याशीं तुकाराम महाराजांचें जें भाषण झालें, त्याचा अनुवाद ह्या दोन अभंगांत आला आहे) ४. [३३३२]

चिंतामणि देवा गणपतीसी आणा । करवावें भोजना दुजे पात्रीं ॥ १ ॥ देव म्हणती तुक्या एवढी कैंची थोरी । अभिमानाभीतरीं नागवलों ॥ २ ॥ वाढ वेळ झाला शिळें झालें अन्न । तटस्थ ब्राह्मण बैसलेती ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा तुमच्या सुकृतें । आणीन त्वरित मोरयासी ॥ ४ ॥ [३३३३]

भोक्ता नारायण लक्ष्मीचा पति । म्हणोनी प्राणाहुति घेतलिया ॥ १ ॥ भर्ता आणि भोक्ता कर्ता आणि करविता । आपण सहजता पूर्णकाम ॥ २ ॥ विश्वंभर कृपादृष्टी सांभाळीत । प्रार्थना करीत ब्राह्मणांची ॥ ३ ॥ कवळोकवळीं नाम घ्यावें गोविंदाचें । भोजन भक्तांचें तुका म्हणे ॥ ४ ॥ [३३३४]

माझा स्वामी तुझी वागवितो लात । तेथें मी पतित काय आलों ॥ १ ॥ तीर्थें तुमच्या चरणीं जाहलीं निर्मळ । तेथें मी दुर्बळ काय वाणूं ॥ २ ॥ तुका म्हणे तुम्ही देवा द्विजवंद्य । मी तों काय निंद्य हीन याति ॥ ३ ॥ [३३३५]

: वाराणसीस यात्रा चालली त्या वेळीं दिलेलें पत्र :

परिसें वो माते माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥ भागीरथी महादोषनिवारणी । सकळां स्वामिणी तीर्थांचिये ॥ २ ॥ जितां भुक्ति मोक्ष मरणें तुझ्या तीरीं । अहिक्यपरत्रीं सुखरूप ॥ ३ ॥ तुका विष्णुदास संतांचें पोसणें । वाक्यपुष्प तेणें पाठविलें ॥ ४ ॥ [३३३६]

तुम्ही विश्वनाथ । दीन रंक मी अनाथ ॥ १ ॥ कृपा कराल ते थोडी । पायां पडिलों बराडी

(एका उत्सवप्रसंगीं तुकाराममहाराज, चिंतामणि देव व इतर ब्राह्मण जेवावयास बसले असतांना तुकाराम महाराज विनोदानें म्हणालेः) हे चिंतामणि देवा, तुमचें उपास्य जो गणपति त्याला भोजनासाठीं आणा व तुम्ही दुसऱ्या पात्रावर भोजनास बसा १. देव म्हणतात, हे तुकया, आमच्यामध्यें एवढी शक्ति कसली आली आहे, आम्ही अभिमानाच्या योगानें फसलों आहोंत २. (दोघांच्या संभाषणांत) पुष्कळ वेळ झाला आहे, अन्न निवालें व ब्राह्मण तटस्थ बसले आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे चिंतामणि देवा, तुमच्या पुण्याईनें मी गणपतीला भोजनाला त्वरित आणीन (आणि त्याप्रमाणें घडलें) ४. [३३३३]

(पांडुरंग गणपतीच्या रूपानें तेथें भोजनास येतांच) लक्ष्मीचा पति नारायण भोक्ता आहे, अशा अर्थाचा मंत्र म्हणून ब्राह्मणांनीं प्राणाहुति घेतल्या १. पालन करणारा व भोक्ता व करता करविता देवच आहे, आणि तो आपण सहज पूर्णकाम आहे २. असा विश्वाचें पालन करणारा जो देव तो सर्व ब्राह्मणांकडे कृपादृष्टीनें पाहून, भोजन सावकाश होऊं द्या, अशी त्यांची प्रार्थना करीत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याप्रमाणें देवासह भक्तांचें भोजन एका पंक्तीस होत आहे, म्हणून तुम्हीं सर्वांनीं ग्रासोग्रासाच्या ठिकाणीं गोविंदाचें नामस्मरण करावें ४. [३३३४]

(देव प्रत्यक्ष भोजनास आले ह्याबद्दल चिंतामणि देवांनीं तुकाराम महाराजांची स्तुति केली, तेव्हां महाराज नम्रपणें म्हणालेः) हे चिंतामणि देवा, तुम्हां ब्राह्मणांची लाथ (भृगुऋषीची लाथ श्रीवत्सलांछन म्हणून) माझा स्वामी आपल्या छातीवर वागवीत आहे, असे तुम्ही श्रेष्ठ आहांत. त्या ठिकाणीं मज गरिबाचा पाड काय आहे? १. तुमच्या चरणांच्या स्पर्शानें तीर्थें देखील निष्पाप होतात, मग मज दीनाचा काय केवा (किंमत) आला आहे? २. तुकाराम महाराज म्हणतात, असे तुम्ही ब्राह्मण सर्व देवांना वंद्य आहांत आणि माझी याति हीन असून निंद्य आहे, म्हणून तुमच्यापुढें माझें सामर्थ्य कितीसें आहे? ३. [३३३५]

अहो भागीरथी मातोश्री, मी तुमच्या पायांवर मस्तक ठेवून विनंति करितों, ती तुम्ही ऐका १. भगीरथ राजानें तुम्हांस आणलें, म्हणून भागीरथी हें तुमचें नांव असून सकळ तीर्थांमध्यें तुम्ही श्रेष्ठ आहांत आणि महा पातकांचा नाश करणाऱ्या आहांत २. तुमच्या तटाकाला जे येतात त्यांना जीवंत असतां सकळ ऐश्वर्यांचा भोग मिळतो व अखेरीस मोक्ष मिळतो. ह्याप्रमाणें इहपरलोकीं प्राणी सुखरूप होतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी विष्णूचा दास असून माझें पोषण संतांकडून होत आहे. त्यायोगानें तुमच्या पूजेस हें वाक् (शब्द) पुष्प पाठविलें आहे ४. [३३३६]

अहो देवा, तुम्ही सर्व विश्वाचे स्वामी आहांत आणि मी केवळ गरीब रंक आहें १. असा मी बराडी (गरीब)

॥ २ ॥ काय उणें तुम्हांपाशीं । मी तों अल्पचि संतोषी ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । कांहीं भातुकें पाठवा ॥ ४ ॥ [३३३७]

पिंड पदावरी । दिला आपुलिये करीं ॥ १ ॥ माझें जालें गयावर्जन । फिटलें पितरांचें ऋण ॥ २ ॥ केलें कर्मांतर । बोंब मारिली हरिहर ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें । भार उतरलें ओझें ॥ ४ ॥ [३३३८]

: पक्षी दाणे टिपीत असतां तुकोबास पाहून ते उडाले त्यामुळें तुकोबास खेद झाला तो अभंग :

अवघीं भूतें साम्या आलीं । देखिलीं म्यां कैं होतीं ॥ १ ॥ विश्वास तो खरा मग । पांडुरंग कृपेचा ॥ २ ॥ माझी कोणी न धरो शंका । विश्व हो कां निर्द्वंद्व ॥ ३ ॥ तुका म्हणे जें जें भेटे । तें तें वाटे मी ऐसें ॥ ४ ॥ [३३३९]

अणुरेणुया थोकडा । तुका आकाशाएवढा ॥ १ ॥ गिळूनि सांडिलें कलिवर । भवभ्रमाचा आकार ॥ २ ॥ सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां । उरलों उपकारापुरता ॥ ४ ॥ [३३४०]

फिरंगी वाखर लोखंडाचे विळे । परि ते निराळे गुणा मोल ॥ २ ॥ पायरी प्रतिमा एकचि पाषाण । परि तें महिमान वेगळालें (वेगळेंचि) ॥ २ ॥ तुका म्हणे तैशा नव्हतील परी । संत जना सरी सारिखिया ॥ ३ ॥ [३३४१]

: एका ब्रह्मचाऱ्याचा निषेध :

काखे कडासन आड पडे । खडबड खडबड हुसकलें ॥ १ ॥ दाद करा दाद करा । फजितखोरा लाज नाहीं ॥ २ ॥ अवघा झाला राम राम । कोणी वर्म आचेरना ॥ ३ ॥ हरिदासांच्या पडती पायां ।

तुम्हांस नमस्कार करतों; म्हणून तुम्ही माझ्यावर कृपा कराल तेवढी थोडकी आहे २. तुमच्यापाशीं काय कमी आहे? पण मला थोडक्यानेंच संतोष आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मला कांहीं तरी (प्रेमरूपी) खाऊ पाठवून द्या ४. [३३३७]

मीं आपला देहरूप पिंड आपल्या हातानें विष्णूच्या चरणीं अर्पण केला आहे १. त्यायोगानें माझें गयावर्जन करणें होऊन पूर्वजांचें कर्ज फिटलें २. हरिहर हें नांव घेतलें त्याच योगानें सर्व कर्मांतर होऊन अखेरची बोंबहि मारली ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या कर्तव्यानें मजवरील सर्व बोजा नाहींसा झाला ४. [३३३८]

सर्व भूतांच्या ठिकाणीं एक हरीचेंच स्वरूप आहे असा मला अनुभव कधीं येईल? १. ज्या वेळीं असें होईल त्या वेळीं पांडुरंगाची खरी कृपा झाली असें विश्वासानें मानतां येईल २. माझें कोणालाहि भय उत्पन्न होऊं नये असा मी निर्द्वंद्व व्हावें, अथवा, माझ्याविषयीं जगानें निर्द्वंद्व व्हावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें जें भूत (प्राणी) मला भेटेल तें तें माझें स्वरूप आहे असें मला वाटतें ४. [३३३९]

मी (तुकाराम) अणुरेणूपेक्षांहि सूक्ष्म असून आकाशाएवढा मोठा आहें १. मी भ्रमजन्य देहादि प्रपंच-आकार नाहींसा केला २. ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान इत्यादि त्रिपुटीचा निरास करून, आत्मस्वरूपबोधरूपी दीप देहाच्या ठिकाणीं प्रकाशित केला ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मी अवशिष्ट प्रारब्धाच्या योगानें लोकांवर उपकार करण्याकरितां उरलों आहें ४. [३३४०]

तलवार, वस्तरे आणि विळे हे सर्व एका लोखंडाचे पदार्थ आहेत, त्यांच्या गुणानुरूप किंमतीनें ते वेगवेगळाले आहेत १. पायरी व देवाची प्रतिमा ही जरी एका दगडाची असली, तरी त्यांच्या माहात्म्यामध्यें भेद असतो २. तुकाराम महाराज म्हणतात, तसा येथें प्रकार नाहीं. सर्व संत जन सारखे आहेत ३. [३३४१]

ब्रह्मचाऱ्याच्या काखेंत कडासन (हरणाचें कातडें) होतें तें चालतांना पायांत आडवें पडून खडखड असें वाजलें १. असला निलाजरा फजीतखोर येथें आला त्याची कांहीं तरी दाद लावा (हें द्विवार सांगतों) २. तो ब्रह्मचारी म्हणत आहे, कीं ह्या ठिकाणीं (देहूंत) सर्व लोक रामराम म्हणतात आणि स्वकर्माचरण कोणीच करीत नाहींत ३.

म्हणती तयां नागवावें ॥ ४ ॥ दोहीं ठायीं फाजित झाले । पारणें केलें अवकळा ॥ ५ ॥ तुका म्हणे नाश केला । विटंबिला वेश जेणें ॥ ६ ॥ [३३४२]

कुटुंबाचा केला त्याग । नाहीं राग जंव गेला ॥ १ ॥ भजन तें वोंगळवाणें । नरका जाणें चुकेना ॥ २ ॥ अक्षरांची केली आटी । जरी पोटीं संतनिंदा ॥ ३ ॥ तुका म्हणे मागें पाय । तया जाय स्थळासी ॥ ४ ॥ [३३४३]

तारतिम वरी तोंडाच पुरतें । अंतरा हें येतें अंतरींचें ॥ १ ॥ ऐसी काय बरी दिसे ठकाठकी । दिसतें लौकिकीं सत्या ऐसें ॥ २ ॥ भोजनांत द्यावें विष कालवूनि । मोह चाळवणीं मारावया ॥ ३ ॥ तुका म्हणे मैंद देखों नेदी कुडें । आदराच पुढें सोंग दावी ॥ ४ ॥ [३३४४]

ब्रह्मनिष्ठ काडी । जरी जीवानावें मोडी ॥ १ ॥ तया घडली गुरुहत्या । गेला उपदेश तो मिथ्या ॥ २ ॥ सांगितलें कानीं । रूप आपुलें वाखाणी ॥ ३ ॥ भूतांच्या मत्सरें । ब्रह्मज्ञान नेलें चोरें ॥ ४ ॥ शिकल्या सांगे गोष्टी । भेद क्रोध वाहे पोटीं ॥ ५ ॥ निंदा स्तुति स्तवनीं । तुका म्हणे वेंची वाणी ॥ ६ ॥ [३३४५]

: विषयसुखप्राप्त्यर्थ एक स्त्री तुकोबाकडे गेली त्या वेळचे अभंग :

पराविया नारी रखुमाईसमान । हें गेलें नेमून ठायींचेंची ॥ १ ॥ जाईं वो तूं माते न करीं सायास । आम्ही विष्णुदास नव्हों तैसे (तैसे नव्हों) ॥ २ ॥ न साहावे मज तुझें हें पतन । नको हें वचन दुष्ट वदों ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज पाहिजे भ्रतार । तरी कां इतर लोक थोडे (तरी काय नर थोडे जाले) ॥ ४ ॥ [३३४६]

हरीच्या दासाच्या पायां कोणी पडतील त्यांस लुटून घ्यावें, असें तो म्हणत आहे ४. अशी ज्यांची समजूत आहे ते संसार व परमार्थ ह्या दोन्ही ठिकाणीं फजीत होऊन कळाहीन झाले ५. तुकाराम महाराज म्हणतात, अंतरशुद्धीवांचून ज्यानें नुसता वेष धारण केला आहे त्याची विटंबना होऊन त्याच्या सर्व सुकृताचा नाश होत आहे ६. [३३४२]

जोंपर्यंत अंतरांतील काम गेला नाहीं (विषयाची आसक्ति गेली नाहीं) तोंपर्यंत बायकापोरांचा त्याग करणें व्यर्थ आहे १. बाह्यात्कारीं वेष धरून जें भजन करितात तें व्यर्थ आहे, व त्यांचें नरकास जाणें चुकणार नाहीं २. वेदाक्षरें पाठ करण्याची मेहनत करून जर पोटामध्यें साधूंची निंदा करण्याचा हेतु असेल तर त्याचें करणें व्यर्थ होऊन त्यास नरक चुकावयाचा नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, असा तो मनुष्य पिशाच्चयोनींत जन्माला जाईल ४. [३३४३]

अरे, तुझें हें बोलणें वरवर तोंडापुरतें तारतम्याचें आहे, पण तुझ्या अंतरांत कपट आहे तें आमच्या अंतःकरणास समजून आलें १. तुझें हें करणें लोकांत खरेपणासारखें दिसतें, पण अशी ही ठकवाठकवी चांगली दिसते काय? २. जसें एखाद्यास प्रीतीनें जेवावयास बोलावून अन्नामध्यें विष घालून त्याला मारावें, तसें हें बाह्यात्कारी फसविणें व्यर्थ आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो मैंद (कपटी) आहे तो आपलें अंतरांतील खोटें दिसूं न देतां आदरसत्कार करण्याचें सोंग पुढें दाखवितो ४. [३३४४]

ज्याच्या अंगीं खरी ब्रह्मस्थिति आहे तो काडीहि मोडीत नाहीं, मग जीवाचा वध कोठून करील? जर त्यानें सजीव गवताची एक काडी मोडली १. तर त्यास गुरुहत्येचें पातक लागेल आणि त्यास गुरूंनीं केलेला उपदेश व्यर्थ जाईल २. कानामध्यें जो अभेद स्वरूपाचा बोध केला त्याचें तो आपल्या मुखानें बाह्यात्कारी वर्णन करतो ३. सर्व भूतांच्या ठिकाणीं जो मत्सरानें वागेल त्याचें ब्रह्मज्ञान कामक्रोधादि चोर लुटून नेतील ४. ज्या गोष्टी गुरूंनीं शिकविल्या आहेत त्या तो लोकांना सांगतो, पण अभेदत्वाची वागणूक न करतां भेदानें लोकांचा क्रोध पोटांत वागवितो ५. तुकाराम महाराज म्हणतात, तो कोणाची निंदा व कोणाची स्तुति करण्याकडे व्यर्थ वाचा खर्च करतो ६. [३३४५]

परस्त्रिया आम्हांला रखुमाईप्रमाणें आहेत, हा नियम आमचा मूळचाच झालेला आहे १. हे आई, तूं जा, आम्हांला वश करण्याचे सायास करूं नकोस. आम्ही विष्णुदास त्या जातीचे नाहीं २. तुझें हें पापकृत्य मला सहन होत नाहीं, म्हणून असे वाईट शब्द बोलूं नकोस ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुला नवरा पाहिजे असेल, तर काय गांवांत माणसें थोडीं आहेत? ४. [३३४६]

स्त्रियांचा तो संग नको नारायणा। काष्ठा या पाषाणा मृत्तिकेच्या ॥ १ ॥ नाठवे हा देव न घडे भजन। लांचावलें मन आवरेना ॥ २ ॥ दृष्टिमुखें मरण इंद्रियांच्या द्वारें। लावण्य तें खरें दुःखमूळ ॥ ३ ॥ तुका म्हणे जरी अग्नि जाला साधु। परी पावे बाधू संघट्टणें (तरि पडे बाधु संघट्टणें) ॥ ४ ॥ [३३४७]

: अनुयायी जनांस शेवटचा उपदेश :

ऐका ऐका भाविक जन। व्हाल कोण कोण तें (कोण कोण व्हाल ते) ॥ १ ॥ तार्किकांचा टाका संग। पांडुरंग स्मरा हो ॥ २ ॥ नका शोधूं मतांतरें। नुमगे खरें बुडाल ॥ ३ ॥ कलीमध्यें दास तुका। जातो लोकां सांगत ॥ ४ ॥ [३३४८]

: सीताशोक :

अशोकाच्या वनीं (वासुगीच्या वनीं) सीता शोक करी। कां हो अंतरले रघुनाथ दुरी। येउनि गुंफेमाजी दुष्टें केली चोरी। कां हो मज आणिलें अवघड लंकापुरीं ॥ १ ॥ सांग वो त्रिजटे सखिये ऐसी मात। देईल कां नेदी भेटी रघुनाथ। मन उतावीळ झाला दुरी पंथ। राहों न शके प्राण माझा कुडी आंत ॥ २ ॥ काय दुष्ट आचरण होतें म्यां केलें। तीर्थ व्रत होतें कवणाचें भंगिलें। गाईवत्सा पत्नीपुरुषा विघडिलें। न कळे वो संचित चरण अंतरले ॥ ३ ॥ नाडियेलें आशा मृगकांतिसोनें। धाडिलें रघुनाथा पाठिलागे तेणें। उल्लंघिली आज्ञा माव काय मी जाणें। देखुनी सुनाट घेउनि आलें सुनें ॥ ४ ॥ नाहीं मूळ मारग लागे अणीक सोये। एकाविण नामें रघुनाथाच्या माये। उपटी पक्षिया एक देऊनि पाये। उदकवेढयामध्यें तेथें चाले काये ॥ ५ ॥ जनकाची नंदिनी

हे नारायणा, स्त्रियांची संगति नको, मग त्या काष्ठाच्या, मातीच्या अगर दगडाच्या कां केलेल्या असेनात! १. कारण त्यांच्या संगतीनें देव आठवत नाहीं व त्याचें भजनहि होत नाहीं व तेथें लाचावलेलें मनहि आंवरत नाहीं २. त्यांना इंद्रियद्वारा दृष्टीनें पाहिलें कीं मरण येतें. जरी स्त्रिया दिसण्याला सुंदर असतात, तरी तें त्यांचें सौंदर्य दुःखाला कारण आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अग्नि हा जरी साधु झाला तरी आलिंगन दिल्यानें बाधाच करील (पोळील) ४. [३३४७]

जे कोणी भाविक असतील त्यांनीं माझें बोलणें ऐकावें (असें द्विवार सांगतों) १. अहो जे कोणी कुतर्कवादी आहेत त्यांची संगति सोडा व पांडुरंगाचें स्मरण करा २. अनेक मतमतांतरांच्या शोधांत पडूं नका, तुम्हांला त्यांतील खरें कळणार नाहीं व तुम्ही व्यर्थ बुडाल ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या कलियुगामध्यें श्रीहरीचा दास जो मी तो तुम्हां भाविक लोकांना हें सांगत आहे ४. [३३४८]

सीता ही लंकेमध्यें जेथें अशोकाचे वृक्ष आहेत, अशा वनांत रुदन करीत आहे. ती त्रिजटेला उद्देशून म्हणाली, सखे त्रिजटे, माझे स्वामी जे रघुनंदन, त्यांचा मला कां हो वियोग झाला? त्या दुष्ट रावणानें गुहेमध्यें येऊन मला हरण करून नेलें आणि असल्या ह्या अवघड लंका शहरीं कां हो मला आणलें? १. हे त्रिजटे मैत्रिणी, असें निश्चित सांग, कीं रघुनाथ मला भेट देतील किंवा न देतील? त्यांच्या भेटीविषयीं माझें मन अति उतावळें झालें आहे, पण ते येथून फार दूर आहेत. माझा प्राण देहांत राहीनासा झाला आहे २. मीं पूर्वजन्मीं कोणतें क्रूरतेचें आचरण केलें काय? किंवा कोणाचें तीर्थव्रत भंगिलें काय? गाईची आणि वासराची अथवा पत्नीची आणि पतीची ताटातूट केली काय? हे मैत्रिणी, माझें प्रारब्ध कसें आहे हें मला कळत नाहीं, पण रघुनाथाचे चरण मला अंतरले ३. त्या सुवर्णकांति मृगाच्या आशेनें मला फसविलें. रघुनाथांना त्याचा वध करून त्याची चोळी करण्याकरितां पाठविलें आणि लक्ष्मणजींची आज्ञा मीं मोडली, कारण मी त्या राक्षसाची माया कशी समजावी? रिकामें घर पाहून हें रावणरूपी कुत्रें मला घेऊन आलें ४. हे माये, एका रघुनाथाच्या नामाखेरीज कांहीं मूळ मार्ग अथवा कांहीं सोय (उपाय) लागेल असें नाहीं; मार्गामध्यें सोडवावयास आलेला जो जटायु पक्षी, त्यास रावणानें पाय देऊन पंख उपटून मारला. सभोंवतीं

दुःखें ग्लानी थोरी। चुकली कुरंगिणी मेळा तैशापरी। संमोखी (संबोखी) त्रिजटा स्थिर स्थिर वो करी। घेईल (येईल) तुकयास्वामी राम लंकापुरीं ॥ ६ ॥ [३३४९]

: श्लोकरूपी बोध :

तुजवांचुनी मागणें काय कोणा। महीमंडळीं व्यापक विश्व जाणा। जीवभावना पुरवूं कोण जाणे। तुजवांचुनी होत कां रावराणे ॥ १ ॥ नसे मोक्षदाता तिहींमाजि लोकां। भवतारकु तुजवांचूनि एका। मनीं मानसीं चिंतितां रूपनाम। पळे पाप ताप भयें नासे काम ॥ २ ॥ हरी नाम हें साच तूझें पुराणीं। हरी हातिचें काळगर्भादि योनी। करूं मुखवाणी कैसी देशघडी। तुजवांचुनी वाणितां व्यर्थ गोडी ॥ ३ ॥ भवभजना व्यापका लोक तिन्ही। तुज वर्णितां श्रमला (शीणला) शेषफणी। असो जीवभावें तुझ्या सर्व पायीं। दुजें मागणें आणिक व्यर्थ काई ॥ ४ ॥ दिनानाथ हे साक्ष तूझी जनासी। दिनें तारिलीं पातकी थोर दोषी। तुका राहिला पायिं तो राख देवा। असें मागतों तूमची पादसेवा ॥ ५ ॥ [३३५०]

उभा भींवरेच्या तिरीं राहिलाहे। असे सन्मुख दक्षिणे मूख वाहे। पळे पाप महा सुटे कांप थोर। कसे गर्जती घोष हे नामवीर ॥ १ ॥ गुणगंभीर धीर हा हास्यमूख। वदे वदनीं अमृत सर्वसूख। मुनीलागिं लागे बहू गोड चित्तीं। देहभावना तुटलियाचि खंती ॥ २ ॥ ठसा घातला ये भूमिमाजी थोर। इच्छादान तें (हा) द्यावयासी उदार। सिद्धि वोळंगती जया सर्वठायीं। तुझें नाम हें चांगलें गे विठाई ॥ ३ ॥ असे उघडा हा विटेवरि उभा। धरूनी कटसूत्र हें भक्तिलोभा। पुढें वाट

पाण्याचा वेढा असल्यामुळें तेथें त्याचें काय चालणार? ५. तुकाराम महाराज म्हणतात, जनकाची मुलगी दुःखानें फार विव्हळूं लागली. हरिणीची व पाडसाची वनांत चुकामूक झाल्यावर त्या पाडसाची जशी स्थिति होते, तसाच प्रकार सीताबाईचा झाला. त्या वेळीं त्रिजटा ही तिची समजूत करून तिला शांत करूं लागली, कीं भक्तांचा स्वामी जो श्रीराम तो येऊन लंकापुरी जिंकील ६. [३३४९]

हे देवा, तुझ्यावांचून कोणापाशीं काय मागावें? तूं सर्व पृथ्वीमंडळामध्यें व्यापक असणारा आहेस, हें आम्ही जाणतों. आमच्या जीवांतील भावना पुरविण्याचें कोण जाणतो? तुझ्यावांचून दुसरे कोणी मोठे सरदार, राजेहि असले तरी आमचें मनोगत पूर्ण करण्याची त्यांची शक्ति नाहीं १. त्रैलोक्यामध्यें मोक्षदाता कोणी नाहीं व संसारांतून तारणारा तुझ्यावांचून कोणी नाहीं. तुझें रूप व नाम ह्यांचें मनानें चिंतन केलें असतां पाप, ताप, भय, कामना हीं सर्व नाहींशीं होतात २. हरि हें जें तुझें नांव पुराणानें सांगितलें आहे तें खरें आहे, कारण गर्भवासादि योनींतून फिरणें हें तूं जीवांचें हरण करतोस; म्हणून तुझ्यावांचून मुख व वाणी हीं देशधडी कशी करूं (इतरांचें वर्णन कसें करूं?), कारण तुझ्यावांचून इतरांचें वर्णन करण्याची गोडी व्यर्थ होय. ३ संसाराचा नाश करणारा व त्रैलोक्यांत व्यापक असणारा जो तूं त्या तुझें वर्णन करितांना शेष थकला. हे देवा, आमचा सर्व जीवभाव तुझ्या पायांच्या ठिकाणीं असो. ह्याहून अन्य व्यर्थ काय मागावयाचें आहे? ४ तुकाराम महाराज म्हणतात, तूं दीनांचा स्वामी आहेस ह्याबद्दल तुझी लोकांना प्रचीति आहे. महापातकी असे दीन तूं तारिलेस, म्हणून हे देवा, मी तुझ्या पायांच्या आश्रयानें राहिलों आहें. त्या माझें तूं रक्षण कर, म्हणजे तूं आपली पादसेवा मजकडून घे, हें माझें मागणें आहे ५. [३३५०]

देव हा चंद्रभागेच्या तटाकीं उभा राहिला आहे. त्याचे समोर दक्षिण मुखानें वाहाणारी भीमा आहे. तेथें हरीच्या नामाचा घोष करणाऱ्या वैष्णववीरांना पाहून महा पातकांना थोर कंप सुटून तीं कशीं पळत आहेत! १. श्रीहरि हा मोठा गंभीर असा धीरवान् असून हास्यमुखानें अमृतवत् सर्व देणारे असे शब्द बोलतो. तो श्रीहरि नित्य मनन करणाऱ्या मुनींना चित्तामध्यें फार प्रिय वाटत आहे. त्याच्या चिंतनानें देहभावना नाहींशी झाली आहे २. ह्या पंढरपूर भूमीमध्यें हा इच्छित दान देणारा असा उदार आहे, असा मोठा शिक्काच (ठसाच) उमटून दिला आहे. सर्व सिद्धि सर्व ठिकाणीं ज्याच्या सेवेंत तत्पर आहेत. अगे विठाई आई, हें तुझें नाम चांगलें आहे ३. देव हा उघडा विटेवर उभा

दावी भवसागराची । विठो माउली सिद्ध हे साधकांची ॥ ४ ॥ करा वेगु हो तो धरा पंथ आधीं । जया पार नाहीं सुखा तेंच साधीं । म्हणे तुका पंढरीये सर्व आलें । असे विश्व हें जीवनें त्याचि ज्यालें ॥ ५ ॥ [३३५१]

धना गुंतलें चित्त माझें मुरारी । मन घेऊनी हिंडवी दारोदारीं । मन हिंडतां न पुरे यासि कांहीं । मही टेंगणी परि तें तृप्त नाहीं ॥ १ ॥ पाहतां न दिसे निज शुद्ध मती । पुढें पडिलों इंद्रियां थोर घातीं । जिवा नास त्या संगती दंड बेडी । हरी शीघ्र या दुष्टसंगासि तोडीं ॥ २ ॥ अशीं आणिकें काय सांगों अनंता । मोहो पापिणी दुष्ट माया ममता । काम क्रोध ही यातना थोर करी । तुजवांचुनी सोडवी कोण हरि ॥ ३ ॥ निज देखतां निज हें दूरि जाये । निद्रा आळस दंभ या भीत आहें । तयां वस्ति देहीं नको देऊं देवा । तुजवांचुनी आणिक नास्ति हेवा ॥ ४ ॥ करीं घातपात शंका (भय) लाज थोरी । असे सत्य भाव बहु भक्ति दूरी । नको मोकलूं दीनबंधू अनाथा । तुका वीनवी ठेवुनी पायिं माथा ॥ ५ ॥ [३३५२]

पैल सांवळें तेज पुंजाळ कैसें । शिरीं तुर्बिलीं साजिरीं मोरपीसें । हरे त्यासि देखतां ताप माया । भजा रे भजा यादवा योगिराया ॥ १ ॥ जया कामिनी लुब्धल्या सहस्र सोळा । सुकुमार त्या गोपिका दिव्य बाळा । शोभे मध्यभागीं कळा चंद्रकोटी । रुपा मीनली साजिरी माळ कंठीं ॥ २ ॥ तया यादवां श्रेष्ठ हा चक्रपाणी । जया वंदिती कोटि तेहतीस तिन्ही । महाकाळ हे कांपती दैत्य ज्यासी । पाहा सांवळें रूप हें पाप नासी ॥ ३ ॥ कसीं पाउलें साजिरीं कुंकुमाचीं । कसी वीट हे लागली दैवाची । जया चिंतितां अग्नि हा शांति (शांत) नीवे । धरावा मानसीं

राहून भक्तांच्या लोभाकरितां (कमरेवरील कटिसूत्र–करगोटा-धरून) कमरेवर हात ठेविले आहेत. ह्या संसारसागरांतून पार पडण्याची तो पुढें वाट दाखवितो. अशा प्रकारें सिद्धांची व साधकांची विठोबा ही आई आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, म्हणून तुम्ही त्वरा करून आधीं श्रीहरीचा मार्ग धरा. ज्याच्या सुखाला पार नाहीं, असें श्रीहरीचें सुख तुम्ही साध्य करून घ्या. तें पंढरीस आलें आहे. सर्व विश्व त्याच्या योगेंकरून जगलें आहें ५. [३३५१]

हे मुरारि, माझें मन धनलोभांत गुंतलें आहे व तें मला आपल्या हातीं घेऊन दारोदार हिंडवीत आहे. तें मन हिंडावयास लागलें आहे त्याला हिंडण्यास कांहीं पुरें होत नाहीं. सर्व पृथ्वी फिरून येणें त्याला थोडकेंच वाटल्यामुळें तें तृप्त होत नाहीं १. पाहावयास गेलों तों माझी बुद्धिहि शुद्ध दिसत नाहीं व इंद्रियांच्या पुढील मोठ्या माऱ्यांत मी पडलों. जीवाला त्याच्या संगतीनें शिक्षा-बेडी प्राप्त होऊन नाश होतो. म्हणून हे हरि, तूं मला, लागलेल्या दुष्ट संगतीचा संबंध त्वरेनें तोड २. हे अनंता, असे हे अनेक प्रकार किती सांगूं ? मोह, पापिणी दुष्ट माया, ममता, काम, क्रोध, इत्यादिकांच्या संगतीनें निजस्वरूप दुरावलें जातें. निद्रा, आळस, दंभ ह्यांना मी भीत आहें. हे देवा, त्यांची आमच्या देहाचे ठिकाणीं वस्ती होऊं देऊं नको. माझ्यामध्यें तुझ्यावांचून दुसरी कांहीं हांव नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, शंका, लज्जा ह्या तर फार घातक आहेत. ह्यांच्या योगानें सत्य भाव व भक्ति हीं फार दूर राहिलीं आहेत. हे दीनांच्या बंधु देवा, तूं आम्हां अनाथांचा त्याग करूं नको, अशी मी तुझ्या पायांवर मस्तक ठेवून विनंति करीत आहें ५. [३३५२]

पलीकडे सांवळें व तेजःपुंज, मस्तकावर मोराचीं पिसें ज्यानें धारण केलीं आहेत, तें रूप कसें शोभत आहे ? त्याला पाहिल्याबरोबर मायेसहवर्तमान त्रिविध ताप नाहींसे होतात. अशा प्रकारच्या ह्या यदुकुळांत जन्मलेल्या योगिराज श्रीकृष्ण यादवास तुम्ही भजा (असें द्विवार सांगतों) १. ज्याला सोळा हजार स्त्रिया लुब्ध झाल्या व सुकुमार अशा गोपिका तेजस्वी श्रीकृष्णबालस्वरूपाला लुब्ध झाल्या. ज्याच्या मध्यभागीं कोटिचंद्रांचें तेज शोभत आहे, अशा ह्या रूपाच्या ठिकाणीं गळ्यामध्यें वैजयंती माळ शोभत आहे २. ह्या सर्व यादवांमध्यें ज्याच्या हातांत चक्र आहे असा श्रीकृष्ण श्रेष्ठ आहे. ज्याला तिन्ही देवांसहवर्तमान तेहतीस कोट देव वंदन करितात, महाकाळ व दैत्य ज्याला पाहून थरथरां कांपत आहेत, अशा ह्या श्यामसुंदर तनूला तुम्ही पाहा. त्या योगानें पापनाश होईल ३. त्या हरीचीं आरक्त पाउलें कशीं शोभत आहेत ! ती दैववान् वीटहि हरीच्या पायांस कशी लागली आहे. ज्या चरणांचें चिन्तन केलें असतां, अग्नीस शांति

आपल्या दृढभावें ॥ ४ ॥ मुनी देखतां मूख हें चित्त माये। देह मांडला भाव हा बापमाय। तुक्या लागलें मानसीं देवपीसें। चित्तचोरटें सांवळें रूप कैसें ॥ ५ ॥ [३३५३]

असे नांदतु हा हरी सर्वजीवीं। असे व्यापुनी अग्नि काष्ठांत तेवीं। घटीं बिंबलें बिंब हें ठायिं ठायीं। तया संगती नासु हा त्यासि नाहीं ॥ १ ॥ तन (तृण) वाटितां क्षीर हें होत नाहीं। पशू भक्षितां पालटे तेंचि देहीं। तया वर्म तो जाणता एक आहे। असे व्यापक व्यापुनी अंतर्बाहे ॥ २ ॥ फळ कर्दळी सेवटीं येत आहे। असें शोधितां पोकळीमाजि काये। धीर नाहीं तें वाउगें धीग झालें। फळ पुष्प ना यत्न ते व्यर्थ गेले ॥ ३ ॥ असे नाम हें दर्पणें सिद्ध केलें। असे बिंब तें या मळाआड ठेलें। कसें शुद्ध नाहीं दिसे माजि रूप। नका वाढवूं सीण हा पुण्यपाप ॥ ४ ॥ करा वर्म ठावें नका सोंग वायां। तुका विनविती पडों काय पायां। त्यजीं पुत्र दारा धन वासना हे। मग ऊरलें शेवटीं काय पाहें ॥ ५ ॥ [३३५४]

मना सांडिं हें वासना दुष्ट खोडी। मती मानसीं एक हे व्यर्थ गोडी। असे हीत माझें तुज कांहीं एक। धरीं विठ्ठलीं प्रेम हें पायिं सूख ॥ १ ॥ असा सर्वभावें तुज शरण आलों। देह दुःख हें भोगितां फार भ्यालों। भवतारितें दूसरें नाहीं कोणी। गुरू होत कां देव आणीक तिन्ही ॥ २ ॥ जना वासना हे धना थोरि आहे। तुज लागली संगती तेचि सोये। करी सर्व संगीं परित्यागु ठायीं। तुका वीनवी शीर ठेवोनि पायीं ॥ ३ ॥ [३३५५]

प्राप्त होऊन तो निवला जातो, अशा प्रकारच्या श्रीहरीस आपल्या दृढ भावानें धरावें ४. तुकाराम महाराज म्हणतात, ऋषि-मुनींनीं ज्यास पाहिलें असतां त्यांचें चित्त सुखानें भरलें जातें व ही हरीची मूर्ति आपला आईबाप आहे अशी त्यांची दृढ भावना झाली आहे. माझ्या मनासदेखील ह्या देवाविषयींचें वेड लागलें आहे. असें हें चित्ताचें हरण करणारें सांवळें रूप कसें आहे तें पाहा ! ५. [३३५३]

ज्याप्रमाणें अग्नि सर्व काष्ठांमध्यें व्यापिलेला असतो त्याप्रमाणें सर्व जीवांचे ठिकाणीं हरीचें वास्तव्य आहे. अनेक घटांतील जलांत एक सूर्याचें बिंब प्रतिबिम्बित होतें. त्या घटांचा जरी नाश झाला तरी त्या योगानें सूर्यबिम्बाचा नाश होत नाहीं (त्याप्रमाणें भूतांचा जरी नाश झाला तरी आत्मा हा नष्ट होत नाहीं) १. गवत पाट्यावर वांटलें तरी त्याच्यापासून दूध निघत नाहीं, पण तेंच गाई-म्हशी आदिकरून पशूंनीं खाल्लें, म्हणजे त्यांच्या देहांत दूध बनतें. सर्वांचे अंतरबाह्य व्यापून असणारा एक श्रीहरीच त्याचें वर्म काय आहे तें जाणतो २. केळीच्या झाडास अखेरीस केळीं हीं फळें येतात पण तीं फळें येण्याच्या पूर्वीं त्या पोकळ केळीच्या झाडास शोधावयास गेलें तर तेथें काय आहे? म्हणून धीर न धरतांना ज्यानें निराश होऊन केळीचें झाड उपटलें, तें सर्व व्यर्थ झालें, कारण त्याचे हातास फळें व पुष्पें हीं कांहींच न लागल्यामुळें, झाड लावणें व वाढविणें हे श्रम व्यर्थ गेले ३. प्रतिबिंब हें नाम आरशानें सिद्ध केलें. जें खरें बिंब (मुख) आहे तें मळाचे आड राहिलें. तसें उपाधीमध्यें श्रीहरीचें शुद्ध स्वरूप दिसत आहे, म्हणून तुम्ही देहाभिमान धरून पुण्य-पापात्मक कर्में करण्याचें दुःख वाढवूं नका ४. तुकाराम महाराज म्हणतात, खरें श्रीहरिप्राप्तीचें वर्म जाणून घ्या. व्यर्थ सोंग घेऊं नका असें मी तुम्हांला विनवीत आहें, ह्याबद्दल तुमच्या पायां पडूं का? मुलांची, बायकोची व धनाची वासना हृदयांतून काढून टाका, त्या योगानें अखेरीस काय उरेल तें पाहा ५. [३३५४]

हे मना, विषयाची वासना व अनेक प्रकारच्या दुष्ट खोडी (व्यसनें) टाक, आपल्या मनबुद्धींत ह्याविषयींची एक गोडी धरणें, हें व्यर्थ होय. तुझ्याजवळ माझें कांहीं हित आहे. तें हें, कीं तूं विठ्ठलाचे पायीं प्रेम ठेव, कारण तेथें सुख आहे १. हे मना, अशा प्रकारें सर्व भावानें मी तुला शरण आलों आहें. आजपर्यंत अनेक योनींतून देहदुःख भोगण्यानें मी फार दुःखी झालों आहें. त्यायोगेंकरून मी फार भयभीत झालों आहें. ह्या संसारांतून तारणाऱ्या हे मना, तुझ्यावांचून दुसरें कोणी भवतारक नाहीं. गुरु किंवा ब्रह्मा, विष्णु, महेश हे तिन्ही देव कां असेनात, परंतु ह्यांचीहि तुझ्या साह्यावांचून भव तारण्याची शक्ति नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, लोकांना द्रव्याची वासना फार आहे. त्यांच्या संगतीनें हे मना, तुलाहि तोच मार्ग लागला आहे. तूं सर्वसंगाचा आपल्या ठिकाणींच परित्याग कर. हे मना, तुझ्या पायांवर मस्तक ठेवून माझी तुला अशी विनंति आहे ३. [३३५५]

श्रीपंढरीशा पतितपावना। एक विज्ञापना पायांपाशीं ॥ १ ॥ अनाथा जीवांचा तूं काजकैवारी। ऐसी चराचरीं ब्रीदावळी ॥ २ ॥ न सांगतां कळे अंतरींचें गुज। आतां तुझी लाज तुज देवा ॥ ३ ॥ आळिकर ज्याचें करिसी समाधान। अभयाचें दान देऊनियां ॥ ४ ॥ तुका म्हणे तूंचि खेळें दोहीं ठायीं। नसेल तो देईं धीर मना ॥ ५ ॥ [३३५६]

अगा ये उदारा अगा विश्वंभरा। रखुमाईच्या वरा पांडुरंगा ॥ १ ॥ अगा सर्वोत्तमा अगा कृष्णा रामा। अगा मेघश्यामा विश्वजनित्या ॥ २ ॥ अगा कृपावंता जीवन तूं दाता। अगा सर्वसत्ता धरतिया ॥ ३ ॥ अगा सर्वजाणा अगा नारायणा। करुणावचना चित्त द्यावें ॥ ४ ॥ तुका म्हणे नाहीं अधिकार तैसी। सरती पायांपाशीं केली मागें ॥ ५ ॥ [३३५७]

नव्हे (नोहे) दास खरा। परि आला हा डांगोरा (परि हा झालासे डांगोरा) ॥ १ ॥ यासी काय करूं आतां। तूं हें सकळ जाणता ॥ २ ॥ नाहीं पुण्य गांठीं। जें हें वेंचूं कोणासाठीं ॥ ३ ॥ तुका म्हणे कां उपाधि। वाढविली कृपानिधि ॥ ४ ॥ [३३५८]

तुजविण सत्ता। नाहीं वाचा वदविता ॥ १ ॥ ऐसे आम्ही जाणों दास। म्हणोनी झालों उदास ॥ २ ॥ तुम्हीं दिला धीर। तेणें मन झालें स्थिर ॥ ३ ॥ तुका म्हणे आड। केलों मी हें तुझें कोड ॥ ४ ॥ [३३५९]

काय मी जाणता। तुम्हांहूनि जी अनंता ॥ १ ॥ जो हा करूं अतिशय। कां तुम्हां दया नये ॥ २ ॥ काय तुज नाहीं कृपा। विश्वाचिया मायबापा ॥ ३ ॥ तुका म्हणे वाणी। माझी वदे तुम्हांहूनी ॥ ४ ॥ [३३६०]

हे पंढरीराजा, पतिताला पावन करणाऱ्या अशा तुझ्या पायांपाशीं एक विनंति आहे १. अनाथ दीन जीवांचें कार्य करण्याविषयीं कैवारी तूं आहेस असें तुझें जगांत ब्रीद आहे २. हे देवा, अंतकरणांतील गुप्त गोष्ट तुम्हांला न सांगतां समजते, म्हणून आतां तुझी लाज तुला असूं दे ३. जे कोणी छंद घेऊन बसले आहेत, त्यांना तूं अभय देऊन सुखी करतोस ४. तुकाराम महाराज म्हणतात, (भय उत्पन्न करणारा तूंच आणि भयनाशक तूंच, चांगल्या आणि वाईट अशा उभयपक्षीं) दोन्ही ठिकाणीं तूंच खेळत आहेस. जें धैर्य आमच्या मनाच्या ठिकाणीं नाहीं तें तूं आम्हांला दे ५. [३३५६]

अगा रुक्मिणीच्या पति पांडुरंगा विश्वपोषका, तूं उदार आहेस १. अगा कृष्णा, रामा, देवा, तूं सर्वांत उत्तम आहेस, व तुझी मेघासारखी श्यामतनु असून तूं सर्व विश्वाला निर्माण करणारा आहेस २. अगा देवा, तूं कृपावंत आहेस व जीवदान देणारा दाता असून सर्वसत्ताधारी आहेस ३. हे सर्वज्ञ नारायणा, मी तुला कींव काकुळती येत आहें, ह्याकडे तूं चित्त दे ४. तुकाराम महाराज म्हणतात, पूर्वीं जे (अजामिळासारखे) अनधिकारी होते त्यांचादेखील आपण अंगीकार केला (तसाच मीहि आहें, तरी माझा स्वीकार करा हीच माझी विनंति आहे) ५. [३३५७]

मी तुझा खरा खरा दास नाहीं, पण जगतामध्यें मी तुझा दास आहें अशी खोटीच प्रसिद्धी झाली आहे १. आतां हे देवा, ह्याला मी काय करूं? तूं हें सर्व जाणतच आहेस २. कोणाकरितां आपलें पुण्य खर्च करावें, तर तें आपल्या पदरीं नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो कृपानिधि देवा, आमच्या मोठेपणाची उपाधि कां वाढविलीत? ४. [३३५८]

हे देवा, तुझ्यावांचून माझी वाचा वदविण्याची सत्ता दुसऱ्यांत नाहीं १. असे आम्ही तुझे दास जाणत असल्यामुळें संसाराविषयीं उदास आहों २. देवा, तुम्हीं धैर्य दिल्यामुळें माझें मन स्थिर झालें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला तुम्हीं आपल्या पाठीशीं घातलें हें तुमचें कौतुक होय ४. [३३५९]

अहो अनंता, तुमच्यापेक्षां मी जाणता आहें काय? १. म्हणून कोणता अतिशयपणा करूं? (तुमच्यापुढें माझ्या शहाणपणाचा अभिमान दाखवूं?) अहो देवा, तुम्हांला माझी दया येत नाहीं काय? २. हे जगताला निर्माण करणाऱ्या आईबापा, तुझ्यामध्यें दया नाहीं काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी वाचा तुमच्यापेक्षां जास्त बोलूं शकणारी आहे काय? ४. [३३६०]

: ज्ञानेश्वर महाराजांनीं एका (धरणेकरी) ब्राह्मणास तुकोबाकडे पाठविलें होतें त्याविषयीं अभंग :

काय ज्ञानेश्वरीं उणें। तिहीं पाठविलें धरणें ॥ १ ॥ ऐकोनियां लिखित। म्हूण जाणविली हे मात ॥ २ ॥ तरी जाणे धणी। वदे सेवकाची वाणी ॥ ३ ॥ तुका म्हणे ठेवा। होतां सांभाळावा देवा ॥ ४ ॥ [३३६१]

ठेवूनियां डोई। पायीं जालों उतराई ॥ १ ॥ कारण तें तुम्ही जाणा। मी तराळ नारायणा ॥ २ ॥ प्रसंगीं वचन। दिलें तेंचि खावें अन्न ॥ ३ ॥ तुका म्हणे भार। तुम्ही जाणा थोडा फार ॥ ४ ॥ [३३६२]

: धरणेकऱ्यास उपदेश :

नको कांहीं पडों ग्रंथाचिये भरीं। शीघ्र व्रत करीं हेंचि एक ॥ १ ॥ देवाचिये चाडे आळवावें देवा। ओस देहभावा पाडोनियां ॥ २ ॥ साधनें घालिती काळाचिये मुखीं। गर्भवास सेखीं न चुकती ॥ ३ ॥ उधाराचा मोक्ष होय नव्हे ऐसा। पतनासी इच्छा आवश्यक ॥ ४ ॥ रोकडी पातली अंगसंगें जरा। आतां उजगरा कोठवरी ॥ ५ ॥ तुका म्हणे घालीं नामासाठीं उडी। पांडुरंग थडी पाववील ॥ ६ ॥ [३३६३]

नाहीं देवापाशीं मोक्षाचें गांठोळें। आणूनी निराळें द्यावें हातीं ॥ १ ॥ इंद्रियांचा जय साधूनियां मन। निर्विषय कारण असे तेथें ॥ २ ॥ उपास पारणीं अक्षरांची आटी। सत्कर्मा शेवटीं असे फळ ॥ ३ ॥ आदरें संकल्प वारीं अतिशय। सहज तें काय दुःख जाणे ॥ ४ ॥ स्वप्नींच्या घायें विवळसी वायां। रडे रडतियासवें मिथ्या ॥ ५ ॥ तुका म्हणे फळ आहे मूळापाशीं। शरण देवासी जाय वेगीं ॥ ६ ॥ [३३६४]

ज्ञानेश्वर महाराजांचे घरीं उपदेश करण्यास कांहीं उणें आहे म्हणून त्यांनीं धरणेकरी माझ्याकडे पाठविला कीं काय? १. त्यांनीं लिहिलेल्या पत्रांतील मजकूर ऐकल्यामुळें ही हकीकत मला समजली २. स्वामी सर्वज्ञ आहेत तेव्हां सेवकाची वाणी कितीशी समर्थ आहे हें जाणणारे स्वामी आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, जो परमार्थाचा ठेवा आहे तो तुम्हींच संभाळावा ४. [३३६१]

तुमच्या पायांवर डोकें ठेवून मी उत्तीर्ण झालों १. हे नारायणा, ह्याचें कारण काय आहे तें तुम्ही जाणा. मी फक्त खबर देणारा बिगारी आहें २. ज्या प्रसंगीं जशी आज्ञा कराल तसें बोलणें व जें अन्न द्याल तें खाणें हें आमचें कर्तव्य आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमचें थोडेंफार ओझें तुम्हांला कळतच आहे ४. [३३६२]

तूं ग्रंथ अध्ययन करण्याच्या व पठण करण्याच्या भरीस पडूं नकोस. त्वरेनें (ध्रुवपदांत दर्शविलेलेंच) एक व्रत कर १. देवाचीच इच्छा धरून व देहाहंकार टाकून देवाचेंच भजन कर २. ह्याहून इतर साधनांचा आश्रय केल्यानें तीं अखेरीस काळाच्या तोंडीं तुला नेऊन टाकतील व तसें झाल्यानें पुनः जन्म घेणें चुकणार नाहीं ३. मेल्यावर मिळणारा मोक्ष नाहींसारखाच आहे, म्हणून मुद्दाम पापकर्म करून पतनास जाण्याची इच्छा कां करावी? ४. उघड उघड देहसंगतीनें जरा(वृद्धा)वस्था प्राप्त झाली असतां तुला कोठपर्यंत जागृत करूं? (किंवा, कोठपर्यंत संसार करण्याविषयीं तत्पर राहाणार आहेस?) ५. तुकाराम महाराज म्हणतात, पांडुरंग हा आपलें नांव घेणाराकरितां धांव घेऊन त्याला संसारनदीच्या पार करील ६. [३३६३]

देवाच्याजवळ हातीं आणून देण्यासारखें मोक्षाचें गांठोडें नाहीं (मोक्ष हा स्वप्रयत्नानें व आपल्या अधिकाराच्या बलानें मिळवावा लागतो) १. विषयांपासून इंद्रियांस व मनास आवरून धरून निर्विषय होणें हेंच मोक्षाचें स्वरूप होय २. अनेक व्रतांचीं उपोषणें करून पारणें सोडणें व अक्षर घोकण्याची मेहनत घेणें अशा प्रकारचीं सत्कर्में करून त्याच फळाची प्राप्ति होते ३. अनेक प्रकारच्या प्रीतीनें संसारांतील कार्य करण्याचे संकल्प करून त्याचा सोस करणें हें सोडावें, म्हणजे दुःखाचा नाश सहज होईल, असें समजावें ४. अरे, स्वप्नांतील घायाचें दुःख होऊन जसें विव्हळावें तसा तूं व्यर्थ रडतोस ५. तुकाराम महाराज म्हणतात, अरे तूं मोठ्या त्वरेनें मूळच्या देवाला शरण जा, म्हणजे त्या ठिकाणीं सर्व फलप्राप्ति होईल ६. [३३६४]

त्यजिलें भेटवीं आणूनी वासना । दाविलयाचें जना काय काज ॥ १ ॥ आळवावें देवा भाकूनी करुणा । आपुलिया मना साक्ष करीं ॥ २ ॥ नाहीं जावें थावें दुरूनी लागत । आहे साक्षभूत अंतरींचा ॥ ३ ॥ तुका म्हणे हा तों आहे कृपासिंधु । तोडी भवबंधु तात्काळिक ॥ ४ ॥ [३३६५]

गोविंद गोविंद । मना लागलिया छंद ॥ १ ॥ मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ॥ २ ॥ आनंदलें मन । प्रेमें पाझरती लोचन ॥ ३ ॥ तुका म्हणे आळी । जेंवी नुरेचि वेगळी ॥ ४ ॥ [३३६६]

ज्याचें जया ध्यान । तेंचि होय त्याचें मन ॥ १ ॥ म्हणऊनी अवघें सारा । पांडुरंग दृढ धरा ॥ २ ॥ सम खूण ज्याचे पाय । उभा व्यापक विटे ठाय ॥ ३ ॥ तुका म्हणे नभा । परता अणूचाही गाभा ॥ ४ ॥ [३३६७]

पाहूनियां ग्रंथ करावें कीर्तन । तेव्हां आलें जाण फळ त्याचें ॥ १ ॥ नाहीं तरी वायां केली तोंडपिटी । उरी ते शेवटीं उरलीसे ॥ २ ॥ पढोनियां वेद हरिगुण गावे । ठावे तें जाणावें तेव्हां झालें ॥ ३ ॥ तप तीर्थाटणें तेव्हां कार्यसिद्धि । स्थिर राहे बुद्धि हरीच्या नामीं ॥ ४ ॥ यागयज्ञादिक काय दानधर्म । तरी फळ नाम कंठीं राहे ॥ ५ ॥ तुका म्हणे नको कावाडाचे भरीं । पडों सार धरीं हेंचि एक ॥ ६ ॥ [३३६८]

सुखें खावें अन्न । त्याचें करावें चिंतन ॥ १ ॥ त्याचें दिलें त्यासी । पावे फळ आपणासी ॥ २ ॥ आहे हा आधार । नाम त्याचें विश्वंभर ॥ ३ ॥ नाहीं रिता ठाव । तुका म्हणे पसरीं भाव ॥ ४ ॥ [३३६९]

सर्व कुटुंबाचा त्याग करून जर त्याविषयीं वासना ठेविली तर त्याची प्राप्ति पुनः होते. मग तें त्यागाचें सोंग जगामध्यें दाखविण्याचें काय कारण आहे? १. आपलें मन साक्षी करून देवास करुणेच्या वचनांनीं आळविणें हें बरें २. देवाच्या प्राप्तीकरितां दूर कोठें जावें-यावें लागत नाहीं. मनाचा साक्षी असलेला पांडुरंग आपल्याजवळच आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा पांडुरंग दयेचा सागर आहे. तो निर्मळ मनाच्या भक्तांचें संसारबंधन तात्काळ तोडतो ४. [३३६५]

गोविंदाच्या नांवाचें चिंतन करण्याचा ध्यास मनाला लागल्यावर १. मग त्याचा देह गोविंदस्वरूप होतो. भक्त आणि देव ह्यांमध्यें कांहीं फरक राहात नाहीं २. अशा भक्ताचें मन आनंदित होतें व श्रीहरीच्या प्रेमानें त्याच्या डोळ्यांतून प्रेमाश्रु पाझरतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, कुंभारणीचा (भुंग्याचा) ध्यास घेणारी आळी ज्याप्रमाणें कुंभारणीहून (भुंग्याहून) वेगळी राहात नाहीं (त्याप्रमाणें तो भक्त देवाहून वेगळा राहात नाहीं) ४. [३३६६]

ज्या प्राण्याला ज्या वस्तूचें ध्यान लागतें तसें त्याचें मन तद्रूप होतें १. ह्याकरतां तुम्ही सर्व प्रापंचिक पसारा नाहींसा करून मनानें दृढतर पांडुरंगाचें स्मरण करा २. तो पांडुरंग समचरण जोडून विटेवर उभा आहे तोच सर्व जगांत व्यापक आहे, अशी खूण मनांत ठेवावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो देव आकाशाहूनहि थोर असून अणुरेणूच्याहि हृदयांत वास्तव्य करतो ४. [३३६७]

अनेक प्रकारचे ग्रंथ पाहून आवड उत्पन्न होऊन जर हरिकीर्तन केलें तर तें पाहाण्याचें (ग्रंथांच्या अध्ययनाचें) सार्थक १. नाहींपेक्षां तोंडानें व्यर्थ बडबड करण्याचे शेवटीं श्रम उरतील २. चार वेद पठण करून जर हरीचे गुण गाइले तर त्याचा अर्थ समजला असें जाणावें ३. हरिनामाचे ठिकाणीं बुद्धि स्थिरावली म्हणजे तपादि साधनें अथवा तीर्थाटनें ह्यांचें सार्थक होईल ४. यागयज्ञादिक व कांहीं दानधर्म केले तरी पण कंठामध्यें जर हरिनाम राहिलें तर त्याचें फळ मिळेल ५. तुकाराम महाराज म्हणतात, अरे तूं अनेक प्रकारच्या कावाडकष्टांच्या भरीला न पडतां एक सारभूत हरिनाम कंठामध्यें धरून राहा ६. [३३६८]

निराहार न करतां कांहीं अन्न सेवन करून देवाचें चिंतन सुखानें करावें १. मग त्याचें अन्न त्याला अर्पण होऊन आपणांस फल प्राप्त होईल २. विश्वाचें पालन करणारा म्हणून त्याचें नांव विश्वंभर आहे. हा आधार आपणांस आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या देवावांचून कोणतीहि जागा रिकामी नाहीं, म्हणून सर्व ठिकाणीं आपल्या भावाचा प्रसार करावा (आपणासकट सर्व भूतमात्रांचे ठायीं भगवद्भाव ठेवावा) ४. [३३६९]

संकोचोनी काय झालासी लहान । घेईं आपोशन ब्रह्मांडाचें ॥ १ ॥ करोनी पारणें आंचवें संसारा । उशीर उशीरा लावूं नको ॥ २ ॥ घरकुलानें होता पाडिला अंधार । तेणें केलें फार कासावीस ॥ ३ ॥ झुगारूनी दुरीं लपविलें काखे । तुका म्हणे वाखे कौतुकाचे ॥ ४ ॥ [३३७०]

माझ्या बापें मज दिधलें भातुकें । म्हणोनी कवतुकें क्रीडा करीं ॥ १ ॥ कली आळी पुढें बोलिलों वचन । उत्तम हे गुण आले त्याचे ॥ २ ॥ घेऊनी विभाग जावें लवलाह्या । आलेती त्या ठाया आपुलिया ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्ञानदेवीं समुदाय । करावा मीं पाय येईन वंदूं ॥ ४ ॥ [३३७१]

ज्ञानियांचा राजा गुरु महाराव (ज्ञानियांचा गुरू राजा महाराव) । म्हणती ज्ञानदेव तुम्हां ऐसें ॥ १ ॥ मज पामरा हें काय थोरपण । पायींची वाहाण पायीं बरी ॥ २ ॥ ब्रह्मादिक जेथें तुम्हां वोळंगणें । इतर तुळणे काय पुरे (पुढें) ॥ ३ ॥ तुका म्हणे नेणें युक्तीची ते खोली । म्हणोनि ठेविली पायीं डोई ॥ ४ ॥ [३३७२]

बोलिलीं लेंकुरें । वेडीं वांकडीं उत्तरें ॥ १ ॥ करा क्षमा अपराध । महाराज तुम्ही सिद्ध ॥ २ ॥ नाहीं विचारला । अधिकार म्यां आपुला ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्ञानेश्वरा । राखा पायांपें किंकरा ॥ ४ ॥ [३३७३]

काय तुम्ही जाणा । करूं अव्हेर नारायणा ॥ १ ॥ तरी या लटिक्याची ग्वाही । निवडली दुसरे ठायीं ॥ २ ॥ कळों अंतरींचा गुण । न ये फिटल्यावांचून ॥ ३ ॥ आणिलें अनुभवा । जनाच्या हें ज्ञानदेवा ॥ ४ ॥ आणीक कोणी भिती । त्यांच्या चिंतेनें विश्रांति ॥ ५ ॥ एक म्हणे बीज पोटीं । फळ तैसेंचि शेवटीं ॥ ६ ॥ [३३७४]

अरे, तूं चित्ताच्या ठिकाणीं संकोच धरून लहान कां होतोस? देवाला हृदयांत सांठवून सर्व ब्रह्मांडाचा एकच ग्रास कर १. अशा प्रकारें तृप्त होऊन संसाराला आंचवावें (टाकावें). ह्यास उशीरानें उशीर जास्त लावूं नकोस २. मी देही, देहाएवढाच मी आहें, असलें लहान घर करून त्या अज्ञानानें अंधार वाढला, ह्या योगानें तूं फार कासावीस झालास ३. तुकाराम महाराज म्हणतात, एखादी आई बाळकास कांहीं पदार्थ दाखवून दूर टाकून दिल्यासारखें करून कांखेंत लपवून ठेवते, तशा ह्या देवाच्या कौतुकाच्या चेष्टा आहेत ४. [३३७०]

माझ्या बापानें (पांडुरंगानें) मला प्रेमाचा खाऊ दिला आहे म्हणून मी कौतुकानें क्रीडा करीत आहें १. मी लाडानें हट्ट करून त्याच्यापुढें शब्द बोलल्नों, त्यायोगानें चांगले गुण माझ्या ठिकाणीं आले आहेत २. अरे, तूं ज्या ठिकाणाहून आलास त्या ठिकाणीं तुझ्या वांटणीस जो वांटा आला तो तूं घेऊन त्वरेनें जा ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्ञानोबारायांच्या ठिकाणीं अनेक जीवांचा (काया, वाचा, मन, प्राण, बुद्धि ह्यांचा) मेळ करावा. त्या ठिकाणीं मीहि चरणवंदन करण्यास येईन ४. [३३७१]

ज्यांच्या ठिकाणीं ज्ञान आहे त्यांचे आपण श्रेष्ठ गुरुराज आहांत म्हणून तुम्हांला ज्ञानदेव म्हणतात १. मी तुमच्या पायांतील वहाण आहें तेंच बरें. त्यावांचून हा इतर थोरपणा मज पामराला कशाला पाहिजे? २. ज्या ठिकाणीं ब्रह्मादिक देव तुम्हांला शरण येतात तेथें तुम्हांला तुमच्याजोगी इतर उपमा कशाची द्यावी? ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी कांहीं कळाकुसरीचा खोलपणा जाणत नाहीं; ह्याकरितां मी तुमच्या पायांवर मस्तक ठेविलें आहे ४. [३३७२]

मी लेकरूं वेडेवांकडे शब्द बोललों आहें १. अहो ज्ञानोबा महाराज, तुम्ही सिद्ध, ज्ञानी आहांत म्हणून माझे सर्व अपराध क्षमा करावे २. मीं तुमच्या अधिकाराचा कांहीं विचार न करतां भाषण केलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो ज्ञानेश्वरा, मज सेवकाला तुमच्या पायांजवळ ठेवून माझें रक्षण करा ४. [३३७३]

हे नारायणा, तुम्ही अव्हेर करण्याचें जाणतां काय? १. लटक्यांची साक्ष अन्य ठिकाणीं उघड होते २. अंतःकरणांतील गुण मोकळे झाल्यावांचून कळत नाहींत ३. हें ज्ञानेश्वर महाराजांनीं अशा प्रकारच्या लोकांच्या अनुभवास आणलें ४. त्यांच्या चिंतनाच्या योगानें दुसरें कोणतें कांहीं भय आहे काय? नाहीं. हृदय मात्र समाधानाला पावतें ५. तुकाराम महाराज म्हणतात, बीजाच्या अंगीं जसा धर्म असतो (परामार्थांत आपल्या अंतःकरणांत जसा भाव असेल) तशाच प्रकारचें फळ येतें (प्राप्त होतें) ६. [३३७४]

अविश्वासीयाचें शरीर सुतकी । विटाळ पातकी भेदवाही (भेद वाहे) ॥ १ ॥ काय त्याचा वेल जाईल मांडवा । होता तैसा ठेवा आला पुढें ॥ २ ॥ मातेचा संकल्प व्हावा राजबिंडा । कपाळींचा धोंडा उभा ठाके ॥ ३ ॥ तुका म्हणे जैसा कुचराचा दाणा । परिपाकीं जाणा खोटा तैसा ॥ ४ ॥ [३३७५]

तामसाचीं तपें पापाची सिदोरी । तमोगुणें भरी घातलेंसे ॥ १ ॥ राज्यपदा आड सुखाची संपत्ति । उल्लंघूनी जाती निरयगांवा ॥ २ ॥ इंद्रियें दमिलीं इच्छा जीती जीवीं । नागविती ठावीं नाही पुढें ॥ ३ ॥ तुका म्हणे हरिभजनावांचून । करिती तो सीण पाहों नये ॥ ४ ॥ [३३७६]

हरिकथेवीण इच्छिती स्वहित । हरिजन चित्त न घाला तेथें ॥ १ ॥ जाईल भंगोन आपुला विश्वास । अवघिया नास कारणांचा ॥ २ ॥ ज्याचिया बैसावें भोजना पंगती । त्याचिया संगती तैसें खावें ॥ ३ ॥ तुका म्हणे काय झालेती जाणते । देवा ही परते थोर तुम्ही ॥ ४ ॥ [३३७७]

सेवकें करावें स्वामीचें वचन । त्यासी हूंतूंपण कामा नये ॥ १ ॥ घेईल जीव कां सारील परतें । भंगलिया चित्तें सांदीजेना ॥ २ ॥ खद्योतें दावावी रवी केवीं वाट । आपुलेंचि (आपुलें तें) नीट उसंतावें ॥ ३ ॥ तुका म्हणे तो आहे ज्ञानाचा सागर । परि नेदी अगर भिजों भेदें ॥ ४ ॥ [३३७८]

जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगीं ऐसें बळ रेडा बोले ॥ १ ॥ करील तें काय नव्हे महाराज । परि पाहे बीज शुद्ध अंगीं ॥ २ ॥ जेणें हे (जयानें) घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ॥ ३ ॥ तुका म्हणे तेथें सुखा काय उणें । राहे समाधानें चित्ताचिया ॥ ४ ॥ [३३७९]

परमार्थाकडे ज्याचा विश्वास नाहीं त्याचा देह सुतकी आहे, तो पातकी अंतःकरणामध्यें भेदबुद्धीचा विटाळ वागवितो १. अशाचा वंश वाढेल काय ? जसें पूर्वसंचित होतें तसें फळ पुढें आलें आहे २. आईची इच्छा आपल्यास सुलक्षणी पोर व्हावें अशी असते, पण प्रारब्धानुरूप दगडच पुढें उभा राहातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें कुचर दाणा पक्क अन्नाशीं मिळत नाहीं त्याप्रमाणें तो अविश्वासी मनुष्य खोटा आहे ४. [३३७५]

(तमोगुणी माणसाच्या योग, याग, दानधर्म इत्यादि) तामसी तपानें पापच त्याच्याबरोबर असावयाचें. असें तप करण्याकडे तमोगुणच त्यांना प्रवृत्त करतो १. राज्यपदादि सुखसंपत्तीस मागें टाकून ते नरकाच्या गांवाला जातात २. इंद्रियांचें दमन केलें पण इच्छा जर अंतःकरणांत जिवंत असेल तर त्या योगानें पुढें सर्वस्व हरण होईल, हें त्यांना कळत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरिभजन करण्यावांचून जे कांहीं श्रम करतील ते पाहूं नयेत ४. [३३७६]

हरिकथा न करितां जे स्वतःच्या हिताची इच्छा करितात त्यांजकडे हरीच्या दासांनीं आपलें लक्ष जाऊं देऊं नये १. कारण आपल्या ठिकाणीं हरिकथेविषयीं असलेला त्यांचा विश्वास नष्ट होईल. त्या योगानें हरीच्या दासांचा सर्व कार्यनाश होईल २. ज्याच्या पंगतीस जेवावयास बसावें त्याच्या संगतीनें तसें खावें (ह्याकरितां परमार्थ करावयाचा झाल्यास संतांची संगत करणेंच बरें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, (परमार्थाच्या बाबतींत वेद-गीतेच्या द्वारा सांगणाऱ्या) देवाच्यापेक्षां (व ज्ञानेश्वरीच्या द्वारा सांगणाऱ्या ज्ञानदेवांपेक्षां) तुम्ही विशेष ज्ञानी झालां काय ? ४. [३३७७]

मालकानें सांगितल्याप्रमाणें चाकरानें वागावें; तेथें मी तूं पणा उपयोगाचा नाहीं १. आपला जीव घेवो किंवा कामावरून दूर करो, परंतु स्वामीचा आज्ञाभंग करूं नये; कारण त्या योगानें एकदां चित्त फाटलें म्हणजे तें पुनः जुळतां येणार नाहीं २. काजव्यानें आपल्या प्रकाशानें सूर्याला कशाला वाट दाखवावी ? त्यानें आपल्या सरळ मार्गानें जावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्ञानेश्वर महाराज हे ज्ञानाचे समुद्र आहेत, पण भेदकल्पनेच्या ओलाव्यानें हृदयाचें ठिकाण ओलें होऊं देत नाहींत ४. [३३७८]

ज्या ज्ञानेश्वर महाराजांच्या द्वारामध्यें सोन्याचा पिंपळ आहे व ज्यांच्या अंगीं असें सामर्थ्य आहे, कीं रेड्याला आज्ञा केल्याबरोबर तो वेद बोलला १. असे हे ज्ञानेश्वर महाराज काय करणार नाहींत ? पण ते साधकाचें शुद्ध भावाचें बीज पाहातात २. ज्यांनीं मुक्तीचें अन्नछत्र घालून वैष्णवांचा समुदाय मिळविला ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांच्या ठिकाणीं सुखाला कोणती उणीव आहे ? त्यांचा आश्रय केला असतां चित्त समाधानास पावतें ४. [३३७९]

बहुतां छंदांचे बहु असे जन। नये वांटूं मन त्यांच्या संगें ॥ १ ॥ करावा जतन आपुला विश्वास। अंगा आला रस आवडीचा ॥ २ ॥ सुखाची समाधि हरिकथा माउली। विश्रांति साउली सिणलियांची ॥ ३ ॥ तुका म्हणे बुडे बांधोनी दगड। तेथें कोण (काय) कोड धांवयाचें ॥ ४ ॥ [३३८०]

हरिकथे नाहीं। विश्वास ज्याचे ठायीं ॥ १ ॥ त्याची वाणी अमंगळ। कान उंदराचें बीळ ॥ २ ॥ सांडुनी हा रस। करिती आणीक सायास ॥ ३ ॥ तुका म्हणे पिसीं। वायां गेलीं किती ऐसीं ॥ ४ ॥ [३३८१]

प्रेम अमृताची धार। वाहे देवाचे समोर ॥ १ ॥ ऊर्ध्ववाहिनी हरिकथा। मुकुटमणि सकळां तीर्थां ॥ २ ॥ शिवाचें जीवन। जाळी महादोष कीर्तन ॥ ३ ॥ तुका म्हणे हरि। इची स्तुति वाणी थोरी ॥ ४ ॥ [३३८२]

आतां माझ्या मना। हेचि घडो उपासना ॥ १ ॥ ऐसें करीं पांडुरंगा। प्रेम वोसंडेसें अंगा ॥ २ ॥ सर्व काळ नये। वाचे वीट आड भये ॥ ३ ॥ तुका वैष्णवांसंगती। हेचि भोजनपंगती ॥ ४ ॥ [३३८३]

उपास कराडी। तिहीं करावीं बापुडीं ॥ १ ॥ आम्ही विठोबाचे दास। चिंता झुगारिली आस ॥ २ ॥ भक्तीच्या उत्कर्षें। नाहीं मुक्तीचें तें पिसें ॥ ३ ॥ तुका म्हणे बळ। अंगीं आमुच्या सकळ ॥ ४ ॥ [३३८४]

करविली तैसी केली कटकट। वांकडें कीं नीट देव जाणे ॥ १ ॥ कोणा कारणें हें जालेंसे निर्माण। देवाचें करणें देव जाणे ॥ २ ॥ तुका म्हणे मी या (तो) अभिमानावेगळा। घालूनि गोपाळा भार असें ॥ ३ ॥ [३३८५]

अनेक मताचे अनेक लोक आहेत. तितक्यांच्या नादीं लागून आपलें मन तितक्या ठिकाणीं वांटून देऊं नये १. आपल्या ठिकाणीं भक्तिविषयींचा विश्वास व प्रेमगोडी जी उत्पन्न झाली आहे तिचें रक्षण करावें २. हरिकथा ही आई सुखाची समाधि आहे आणि जे कोणी संसारश्रमानें श्रमी झाले आहेत त्यांना विश्रांति देणारी छाया आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो पाठीला दगड बांधून बुडतो त्याची कींव करून त्याला काढण्याकरितां धांवत जाणें ह्याचा काय उपयोग आहे? (त्याप्रमाणें अविश्वासामुळें जो हरिकथेचा तिटकारा मानतो त्याला संत-महात्म्यांनीं उपदेश केला तरी काय उपयोग?) ४. [३३८०]

हरिकथेविषयींचा ज्याच्या ठिकाणीं विश्वास नाहीं १. त्याची वाचा अमंगल असून कान उंदराचीं बिळें आहेत २. हा हरिकथेचा रस टाकून जे अन्य साधन करण्याचे यत्न करितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, तशा प्रकारचे किती एक वेडे व्यर्थ गेले ४. [३३८१]

देवाच्यासमोर हरिकथेच्या प्रेमामृताची धार वाहात आहे १. हरिकथा हें तीर्थ वरतीं (धर्म, अर्थ, काम, मोक्ष ह्या चार पुरुषार्थांतला वरचा श्रेष्ठ जो मोक्ष त्याकडे) वाहाणारी नदी आहे व सर्व तीर्थांमध्यें श्रेष्ठ आहे २. कीर्तन हें शिवाचें जीवन असून महा पातकाला तें जाळतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या हरिकथेची थोरवी साक्षात् हरि वर्णन करतात ४. [३३८२]

आतां माझ्या मनाकडून हरिकथेची उपासना होवो १. हे पांडुरंगा, हरिकथेविषयीं माझ्या अंगांत प्रेमाचा पूर यावा असें तूं कर २. सर्व काळ वाणीनें हरिकथा करण्यांत वीट येत नाहीं व भयहि वाटत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला वैष्णवांच्या संगतीनें हरिकथारूपी अन्नाचें पंगतींत भोजन होतें ४. [३३८३]

उपासाचे कष्ट जे कोणी बापडे असतील त्यांनींच करावे १. आम्ही विठोबाचे दास होऊन हरिकथेवांचून दुसरें कांहीं करणार नाहीं. संसाराची सर्व चिंता व आशा ही फेकून दिली २. भक्तीच्या विशेष रंगामुळें आम्हांला मुक्तीचें वेड नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व प्रकारचें बळ आमच्या अंगीं आहे ४. [३३८४]

जशी मजकडून बडबड करवेल तशी मीं केली. आतां ती सरळ आहे किंवा वांकडी याचा जाणता देव आहे १. कोणाकरितां हें काव्य माझ्या तोंडून निर्माण झालें आहे, हें देवाचें कर्तृत्व देवच जाणे २. तुकाराम महाराज म्हणतात, मी ह्या अभिमानाहून वेगळा राहून सर्व भार गोपाळावर घालून आहें ३. [३३८५]

: धरणेकऱ्यानें अभंग व नारळ टाकून दिल्याबद्दल ज्ञानेश्वरमहाराजांस पत्र :

तुम्हीं येथें पाठविला धरणेकरी । त्याची झाली परी आइका ते ॥ १ ॥ आतां काय पुढें वाढवूनी विस्तार । झाला समाचार आइका तो ॥ २ ॥ देवाचे उचित एकादश अभंग । महाफळ त्याग करूनी गेला ॥ ३ ॥ तुका म्हणे सेवा समर्पूनी पायीं । झालों उतराई ठावें असो ॥ ४ ॥ [३३८६]

: शिवाजी राजे ह्यांनीं तुकोबास आपल्या येथें आणविण्याकरितां
अबदागिरी, घोडा, कारकून पाठविला त्या वेळचे अभंग :
(क्रमांक ३३८७,३३८८,३३९१,३३९४ हे चार अभंग)

दिवट्या छत्री घोडे । हें तों बऱ्यांत न पडे ॥ १ ॥ आतां येथें पंढरिराया । मज गोंविसी कासया ॥ २ ॥ मान दंभ चेष्टा । हे तो शूकराची विष्ठा ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । माझे सोडवणें धांवा ॥ ४ ॥ [३३८७]

नावडे जें चित्ता । तेंचि होसी पुरविता ॥ १ ॥ कां रे पुरविली पाठी । माझी केली जीवें साटी ॥ २ ॥ न करावा संग । वाटे दुरवावें जग ॥ ३ ॥ सेवावा एकान्त । वाटे न बोलावी मात ॥ ४ ॥ जन धन तन । वाटे लेखावें वमन ॥ ५ ॥ तुका म्हणे सत्ता । हातीं तुझ्या पंढरिनाथा ॥ ६ ॥ [३३८८]

जाणोनी अंतर । टाळिसील करकर ॥ १ ॥ तुज लागली हे खोडी । पांडुरंगा बहु कुडी ॥ २ ॥ उठविसी दारीं । धरणें एखादिये परी ॥ ३ ॥ तुका म्हणे पाय । कैसे सोडीन तें पाहें ॥ ४ ॥ [३३८९]

नाहीं विचारीत । मेघ हगणदारी सेत ॥ १ ॥ नये पाहों त्याचा अंत । ठेवी कारणापें चित्त ॥ २ ॥ वर्जीत गंगा । नाहीं उत्तम अधम जगा ॥ ३ ॥ तुका म्हणे मळ । नाहीं अग्नीसी विटाळ ॥ ४ ॥ [३३९०]

अहो ज्ञानेश्वर महाराज, तुम्ही आमचेकडे पाठविलेल्या धरणेकऱ्यासंबंधानें झालेला वृत्तांत ऐका १. आतां पुढें विशेष विस्तार कशाला करूं? झालेला प्रकार ऐका २. ज्यांत देवाचें योग्य वर्णन केलें आहे (क्रमांक ३३६३, ३३६४, ३३६५, ३३६६, ३३६७, ३३६८, ३३६९, ३३७०, ३३७१, ३३७८ आणि ३३७९) असे अकरा अभंग व महाफळ नारळ हा प्रसाद त्याला दिला, त्याचा त्याग करून तो गेला ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपण सांगितलेली सेवा आपल्या पायीं अर्पण करून मी उत्तीर्ण झालों आहें ४. [३३८६]

दिवट्या, छत्री, घोडे हें ऐश्वर्य चांगल्यापैकीं नव्हे. (जरी चांगलें आहे तरी त्यांत मी पडत नाहीं) १. हे पंढरिराजा, आतां मला ह्या ठिकाणीं कां गुंतवितोस? २. मान, दंभ, प्रतिष्ठा हीं मला डुकराच्या विष्ठेप्रमाणें भासत आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, ह्यांतून आम्हांला सोडविण्याकरितां तुम्ही धांव घ्या ४. [३३८७]

जें चित्तास आवडत नाहीं तेंच तूं देतोस १. अरे देवा, तूं माझा जीव हरण करून माझी पाठ कां पुरविलीस? २. कोणाची संगति करूं नये, सर्व लोकांपासून दूर राहावें असें वाटत आहे ३. कोणाशीं बोलूं नये, एकांतांत राहावें असें मला वाटत आहे ४. शरीर, पैसा व लोक हें वांतीप्रमाणें जाणावें असें वाटत आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीराया, सर्व कांहीं सत्ता तुझ्या हातांत आहे ६. [३३८८]

देवा, कोणी एखादें किरकिर करूं लागलें तर त्याचें अंतःकरण जाणून त्यास कांहीं तरी देऊन कटकट दूर करतां १. पांडुरंगा, तुम्हांला ही फार वाईट खोड लागली आहे २. कांहीं तरी समजूत घालून आपल्या दारांत बसलेल्या धरणेकऱ्यास उठवून लावून देतां ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमचे पाय कसे सोडीन हें पाहा बरें! ४. [३३८९]

पर्जन्य हा हागंदारी व शेत ह्याचा कांहीं विचार करीत नाहीं. सर्व ठिकाणीं सारखा पडतो १. हे देवा, त्याचा परिणाम पाहूं नये, आपल्या कार्याकडे लक्ष असावें (भक्ताच्या गुणदोषांचा विचार न करतां भक्तोद्धाराच्या कार्याकडेच लक्ष द्या) २. गंगा ही चांगल्यावाईट लोकांचा त्याग करीत नाहीं, सर्वांची तृषा व पाप नाहींसें करते ३. तुकाराम महाराज म्हणतात, अग्नीला पापाचा विटाळ नाहीं ४. [३३९०]

मुंगी आणि राव । आम्हां सारखाचि जीव ॥ १ ॥ गेला मोह आणि आशा । कळिकाळाचा हा फांसा ॥ २ ॥ सोनें आणि माती । आम्हां समान हें चित्तीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आलें । घरा वैकुंठ सगळें (सांवळें) ॥ ४ ॥ [३३९१]

सोन्याचे पर्वत करवती पाषाण । अवघे रानोरान कल्पतरु ॥ १ ॥ परि या दुर्लभ विठोबाचे पाय । तेथें हे उपाय न सरती ॥ २ ॥ अमृतें सागर भरवेल (भरवती) गंगा । म्हणवेल उगा राहें काळा ॥ ३ ॥ भूत भविष्य कळों येईल वर्तमान । करवती प्रसन्न रिद्धिसिद्धि ॥ ४ ॥ ठानमान कळों येती योगमुद्रा । नेववेल वारा ब्रह्मांडासी ॥ ५ ॥ तुका म्हणे मोक्ष राहे अलीकडे (ऐलीकडे) । येर ते बापुडे काय तेथें ॥ ६ ॥ [३३९२]

तिहीं त्रिभुवनीं । आम्ही वैभवाचे धनी ॥ १ ॥ हातां आला घाव डाव । आमचा मायबाप देव ॥ २ ॥ काय त्रिभुवनीं बळ । अंगीं आमुच्या सकळ ॥ ३ ॥ तुका म्हणे सत्ता । अवघी आमुचीच आतां ॥ ४ ॥ [३३९३]

काय दिला ठेवा । आम्हां विठ्ठलचि व्हावा ॥ १ ॥ तुम्ही कळलेती उदार । साटीं परिसाची गार ॥ २ ॥ जीव दिला तरी । वचना माझ्या न ये सरी ॥ ३ ॥ तुका म्हणे धन । आम्हां गोमांसासमान (गोमांसासमान । तुका म्हणे आम्हां धन) ॥ ४ ॥ [३३९४]

आम्ही तेणें सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखीं ॥ १ ॥ तुमचें येर वित्त धन । तें मज मृत्तिकेसमान ॥ २ ॥ कंठीं मिरवा तुळसी । व्रत करा एकादशी ॥ ३ ॥ म्हणवा हरीचे दास । तुका म्हणे मज हे आस ॥ ४ ॥ [३३९५]

आम्हांला मुंगीपासून राजापर्यंत सर्व जीव सारखेच आहेत १. मोह, आशा व काळपाश हे सर्व नाहींसे झाले आहेत २. सोनें आणि माती आम्ही चित्तानें सारखींच मानतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्या घरीं (सांवळें परब्रह्म) श्रीहरि तो येऊन राहिला आहे ४. [३३९१]

कांहीं एका सिद्धीच्या जोरानें मोठमोठे डोंगर सोन्याचे करितां येतील, त्याचप्रमाणें दगडहि सोन्याचे करितां येतील १. सर्व रानोरानीं असलेल्या वृक्षांचेहि कल्पतरु करितां येतील १. पण ह्या पांडुरंगाचे चरण प्राप्त होण्याला फार कठिण आहेत. त्यांची कोणत्याहि उपायानें प्राप्ति होत नाहीं २. अमृतानें समुद्र भरतां येतील व गंगादि नद्याहि भरतां येतील, प्राण घ्यावयास आलेल्या काळासहि स्वस्थ राहा असें म्हणतां येईल ३. मागें काय झालें, पुढें काय होणार, वर्तमानकाळीं काय चाललें आहे, हें सर्व समजून येईल. अष्ट महासिद्धि आणि ऐश्वर्य ह्यांना आपलेंसें करून घेतां येईल ४. स्थान व त्याचें मान (एखाद्याच्या शरीराची किंवा वस्तूची आकृति) सांगतां येईल. योगचिन्हें कळून येतील व प्राणवायु ब्रह्मांडास नेतां येईल ५. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या श्रीहरीच्या चरणांपासून मोक्षहि अलीकडेच आहे तेथें ह्या इतर साधनांची काय योग्यता ? ६. [३३९२]

त्रैलोक्यांतील ऐश्वर्याचे आम्ही मालक आहोंत १. आमचा आईबाप देव आहे. हें युक्तिज्ञान आमच्या हस्तगत झालें २. त्रैलोक्यांत बळ कसलें आलें आहे ? सर्व कांहीं आहे तें आमच्या अंगीं आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां सर्व कांहीं सत्ता आमची आहे ४. [३३९३]

हे शिवराया, तूं आम्हांला हें ऐश्वर्य कशाला देत आहेस ? आम्हांला त्याची जरूरी नाहीं; आम्हांला एक विठ्ठलच पाहिजे १. परिस घेऊन गारगोटी द्यावयाची हें तुमचें उदारपण आम्हांला समजलें २. तुम्हीं जीव दिला तरी माझ्या एका शब्दाची बरोबरी येणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, पैसा हा आम्हांला गाईच्या मांसाप्रमाणें आहे ४. [३३९४]

तुम्ही मुखानें विठ्ठल हें नाम घ्या, म्हणजे त्यायोगानें आम्ही सुखी होऊं १. बाकीची तुमची धनसंपत्ति मला मातीप्रमाणें आहे २. गळ्यामध्यें तुळसीची माळ घाला व एकादशी व्रत करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही हरीचे दास आहोंत असें म्हणाल हीच मला आशा आहे ४. [३३९५]

व्यभिचाराच्या रूपकानें केलेले अभंग : व्यभिचारिणी स्त्रीचें रूपक : विराण्या :

वाळो जन मज म्हणोत शिंद्रळी । परि हा वनमाळी न विसंबें ॥ १ ॥ सांडुनी लौकिक झालियें उदास । नाहीं भय आस जीवित्वाची ॥ २ ॥ नाइकें वचन बोलतां या लोकां । म्हणे झालें तुका हरिरत ॥ ३ ॥ [३३९६]

आधिलिया भ्रतारें काम नव्हे पुरा । म्हणोनी व्यभिचारा टेकलियें ॥ १ ॥ रात्रंदिवस मज पाहिजे जवळी । क्षण त्यानिराळी न गमे घडी ॥ २ ॥ नाम गोष्टी माझी सोय सांडा आतां । रातलें अनंता तुका म्हणे ॥ ३ ॥ [३३९७]

हाचि नेम आतां न फिरे माघारीं । बैसलें शेजारीं गोविंदाचे ॥ १ ॥ घररिघी झालें पट्टराणी बळें । वरिलें सांवळें परब्रह्म ॥ २ ॥ बळियाचा अंगसंग झाला आतां । नाहीं भय चिंता तुका म्हणे ॥ ३ ॥ [३३९८]

नाहीं काम माझें काज तुम्हासवें । होतें गुप्त ठावें केलें आतां ॥ १ ॥ व्यभिचार माझा पडिला टाऊका । न सरती लोकांमाजीं झालें ॥ २ ॥ न धरावा लोभ कोणी माझेविशीं । झालें देवपिशी तुका म्हणे ॥ ३ ॥ [३३९९]

विसरलें कुळ आपुला आचार । पति भावे दीर घर सोय ॥ १ ॥ सांडिला लौकिक लाज भय चिंता । रातलें अनंता चित्त माझें ॥ २ ॥ मज आतां कोणी आळवाल झणीं । तुका म्हणे कानीं बहिरी (बहिर) झालें ॥ ३ ॥ [३४००]

न देखें न बोलें नाइकें आणीक । बैसला हा एक हरि चित्तीं ॥ १ ॥ सासुरें माहेर मज नाहीं

लोक माझा त्याग करोत अथवा मला शिंदळ म्हणोत, पण ह्या वनमाळीला मी विसंबणार नाहीं १. लौकिक टाकून मी उदास झालें आहें. मला भय नाहीं व जीवित्वाची आशा नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, लोक किती जरी बोलले तरी मी त्यांचें ऐकणार नाहीं. मी हरीच्या ठिकाणीं रत झालें आहें ३. [३३९६]

पहिला देहाकार जो नवरा त्याच्या संगतीनें कामना (सुखाची इच्छा) पूर्ण होत नाहीं, म्हणून त्याचा त्याग करून श्रीहरीशीं व्यभिचार (आश्रय) केला १. रात्रंदिवस तो माझ्या जवळ पाहिजे; त्याचेखेरीज मला एक क्षणदेखील करमत नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, माझें नांव व हकीगत ह्यांचा तुम्ही आतां संबंध सोडून द्या. मी अनंताच्या ठिकाणीं रत झालें आहें ३. [३३९७]

मी गोविंदाच्या शेजारीं बसलें आहें (त्याचा कधीं त्याग करणार नाहीं). ह्यांत कधींहि बदल होणार नाहीं १. त्याच्या घरांत शिरून त्या सांवळ्या परब्रह्माशीं मी लग्न लावून त्याची बळानेंच पट्टराणी झालें २. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मला बलाढ्य श्रीहरीचा अंगसंग झाला आहे; त्या योगानें भय व चिंता हीं नाहींशीं झालीं ३. [३३९८]

आतां तुमच्याशीं माझें कांहीं काम राहिलें नाहीं, ही माझ्या हृदयांतील गुप्त गोष्ट मीं तुम्हांला प्रगट केली आहे १. मी श्रीहरीशीं केलेला व्यभिचार सर्वांना माहीत झाला आहे. आतां लोकव्यवहारांत माझा कांहीं उपयोग नाहीं असें झालें आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, आतां माझ्याविषयीं कांहीं लोभ धरूं नये; मी देवाविषयीं अगदीं वेडी झालें आहें ३. [३३९९]

देहाहंकार पति व तत्संबंधीं कामादि दीर व अविद्येचें घर इत्यादि कुळाची मला विस्मृति झाली व ह्या आपल्या कुळासंबंधानें होणाऱ्या इतर व्यवहारांसहि मी विसरलें १. लौकिक, लज्जा, भय व चिंता हीं टाकलीं, कारण अनंताचे ठिकाणीं मीं रत झालें २. तुकाराम महाराज म्हणतात, आतां कोणी माझी (संसाररूपी पतीबरोबर नांदण्याविषयीं) एखादी समजूत घालाल तर मी कानानें बहिरी झालें आहें ३. [३४००]

माझ्या चित्तामध्यें एक हरीचें ध्यान लागलें आहे. त्या योगानें मला कांहीं दृष्टीस पडत नाहीं व कोणाचेहि शब्द

कोणी । एक केलें दोन्ही मिळोनियां ॥ २ ॥ आळ आला होता आम्ही भांडखोरी । तुका म्हणे खरी केली मात ॥ ३ ॥ [३४०१]

दुजा ऐसा कोण बळी आहे आतां । हरी या अनंतापासूनियां ॥ १ ॥ बळियाच्या आम्ही झालों बळिवंता । करूं सर्व सत्ता सर्वांवरी ॥ २ ॥ तुका म्हणे आम्ही जिवाच्या उदारा । झालों प्रीतिकरा गोविंदासी ॥ ३ ॥ [३४०२]

क्षणभरी आम्ही सोसिलें वाईट । साधिलें अवीट निजसुख ॥ १ ॥ सांडीमांडी मागें केल्या भरोवरी । अधिकचि परी दुःखाचिया ॥ २ ॥ तुका म्हणे येणें जाणें नाहीं आतां । राहिलों अनंताचिये पायीं ॥ ३ ॥ [३४०३]

आम्हां आम्ही आतां वडील धाकुटीं । नाहीं पाठीं पोटीं कोणी दुजें ॥ १ ॥ फावला एकांत एकविध भाव । हरी आम्हांसवें सर्व भोगी ॥ २ ॥ तुका म्हणे अंगसंग एके ठायीं । असों जेथें नाहीं दुजें कोणी ॥ ३ ॥ [३४०४]

सर्व सुख आम्ही भोगूं सर्व काळ । तोडियेलें जाळ मोहपाश ॥ १ ॥ याचसाठीं सांडियेले भरतार । रातलों या पर पुरुषाशीं ॥ २ ॥ तुका म्हणे आतां गर्भ नये धरूं । औषध जें करूं फळ नव्हे ॥ ३ ॥ [३४०५]

एका जीवें आतां जिणें झालें दोहीं । वेगळेते (वेगळीक) कांहीं नव्हे आतां ॥ १ ॥ नारायणा आम्हां नाहीं वेगळीक । पुरविली हे भाक सांभाळिली ॥ २ ॥ तुका म्हणे झालें सायासाचें फळ । सरली ते वेळ काळ दोन्ही ॥ ३ ॥ [३४०६]

ऐकूं येत नाहींत व कोणाशींहि मी बोलत नाहीं १. सासर व माहेर हीं कोणी मला राहिलीं नाहींत. त्या दोन्हींचे ठिकाणीं मी एक हरीच केला आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही भांडखोर आहोंत, असा आळ आमच्यावर आला होता. ती गोष्ट आम्हीं खरीच केली ३. [३४०१]

आतां ह्या अनंतापासून आम्हांला हरण करून घेणारा दुसरा बलवान् असा कोण आहे? १. बलवान् जो देव त्याच्या योगानें आम्ही बलवंत झालों आहोंत, म्हणून सर्व प्रकारची सत्ता सर्व ठिकाणीं आम्ही करूं २. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही जिवावर उदार झालों, त्या योगानें गोविंदाला आवडत्या झाल्या आहोंत ३. [३४०२]

एक क्षणभर आम्हीं लोकांचा वाईटपणा सोसला त्या योगानें अवीट असलेलें निजसुख प्राप्त झालें १. ह्याला सोडून पूर्वीं कांहीं सांडावें, कांहीं मांडावें, ह्याविषयींच्या बरोबरी (वाटाघाटी) पुष्कळ केल्या; त्या योगानें दुःखाचे प्रकार जास्त वाढले २. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आम्ही अनंताच्या पायांजवळ राहिलों, म्हणून आम्हांला जन्ममृत्यूच्या येरझारांचें कारण नाहीं ३. [३४०३]

आमचे आम्हीच लहान व थोर आहोंत; दुसरें कोणी आमच्या पाठीमागें नाहीं व पोटींहि नाहीं १. एकविधभावानें एकांताचें सुख आम्हांस प्राप्त झालें. आमचा सर्व प्रकारचा भोग हरि घेत आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या ठिकाणीं दुसरें कोणी नाहीं त्या ठिकाणीं आम्ही हरीशीं अंगसंग करून एकत्वानें राहिलों आहोत ३. [३४०४]

आम्हीं प्रापंचिक मोहपाशाचें जाळें तोडून टाकलें. आतां आम्ही सर्व काळ सर्व सुखाचा भोग घेऊं १. ह्या सुखाकरितांच पहिला प्रपंचरूपी नवरा टाकून ह्या परपुरुषाशीं रत झालों आहोंत २. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आम्हांला (वासना) गरोदर होण्याचें कारण नाहीं; असें एक विशिष्ट औषध (ज्ञान) सेवन करूं, कीं ज्यामुळें आम्ही गर्भवती होऊन जन्ममरणरूपी बाळ प्रसवणार नाहीं ३. [३४०५]

आतां देवाचा व आमचा देह वेगवेगळा दिसतो, पण दोघांचा जीव एक आहे. त्यांत आतां कधींहि वेगळेपणा होणार नाहीं १. नारायणांत व आम्हांत कांहीं वेगळेपणा नसून सेव्यसेवकपणाचें पूर्वींचें वचन उभयतांनीं जतन केलें आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, जे कांहीं आम्हीं सायास केले त्याचें फळ प्राप्त झालें. आतां तें भोगण्यास कांहीं काळवेळ लागत नाहीं ३. [३४०६]

हांसों रुसों आतां वाढवूं आवडी । अंतरींची गोडी अवीट ते ॥ १ ॥ सेवा सुखें करूं विनोदवचन । आम्ही नारायण एकाएकीं ॥ २ ॥ तुका म्हणे आम्ही झालों उदासीन । आपल्या आधीन केला पति ॥ ३ ॥ [३४०७]

मजसवें आतां येऊं नका कोणी । सासुरवासिनी बाइयांनो ॥ १ ॥ न साहवे तुम्हां या जनाची कूट । बोलती वाईट ओखटें तें ॥ २ ॥ तुका म्हणे झालों उदास मोकळ्या । विचरों गोवळ्यासवें आम्ही ॥ ३ ॥ [३४०८]

शिकविलें तुम्ही तें राहे तोंवरी । मज आणि हरी वियोग तो ॥ १ ॥ प्रसंगीं या नाहीं देहाची भावना । तेथें या वचना कोण मानी ॥ २ ॥ तुका म्हणे चित्तीं बैसला अनंत । दिसों नेदी नित्य अनित्य तें ॥ ३ ॥ [३४०९]

सांगतों तें तुम्ही आइकावें कानीं । आमुचे नाचणीं नाचूं नका ॥ १ ॥ जोंवरी या तुम्हां मागिलांची आस । तोंवरी उदास होऊं नका ॥ २ ॥ तुका म्हणे काय वायांविण धिंद । पति ना गोविंद दोन्ही नाहीं ॥ ३ ॥ [३४१०]

आजीवरी तुम्हां आम्हां नेणपणें । कौतुकें खेळणें संग होता ॥ १ ॥ आतां अनावर झालों अगुणाची । करूं नये तेंचि करीं सुखें ॥ २ ॥ तुका म्हणे आतां बुडविलीं दोन्ही । कुळें एक मनीं नारायण ॥ ३ ॥ [३४११]

सासुरिया वीट आला भरतारा । इकडे माहेरा स्वभावेंचि ॥ १ ॥ सांडवर कोणी न धरिती हातीं । प्रारब्धाची गति भोगूं आतां ॥ २ ॥ न व्हावी ते झाली आमुची भंडाई । तुका म्हणे काई लाजों आतां ॥ ३ ॥ [३४१२]

आतां आम्ही देवाबरोबर हास्य करूं व विनोदानें रुसूं, अशी आवड सर्व काळ नित्य नवी ठेवूं, कारण जी गोडी अंतरांत लागली आहे, ती कधीं विटणार नाहीं १. नारायण व आम्ही एकांतामध्यें सुखानें विनोदाचें भाषण करूं हीच आमची सेवा आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही आपल्या देहावर उदार झालों, त्यायोगानें आमचा पति आमच्या स्वाधीन झाला आहे ३. [३४०७]

अगे सासुरवासिनी बायांनो, आतां तुम्ही कोणी मजबरोबर येऊं नका १. कारण हे जन वाईट व कडु बोलतील. ही निंदा तुम्हांस सहन होणार नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही लौकिकापासून मोकळ्या व सर्व ठिकाणीं उदास झालों असून त्यायोगानें गोपाळाबरोबर क्रीडा करतों ३. [३४०८]

माझा आणि हरीचा जोंपर्यंत वियोग होता तोंपर्यंत तुम्हीं जें शिकविलें तें माझ्या ठिकाणीं राहिलें होतें १. आतां ह्या प्रसंगीं आम्हांला देहाचीदेखील गरज नाहीं, मग तुमचें भाषण कोण मानतो ? २. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या चित्तामध्यें अनंतानें वास्तव्य केलें आहे. तो नित्यानित्य माझ्या दृष्टीस पडूं देत नाहीं (नित्य म्ह० अक्षर, अनित्य म्ह० क्षर) ३. [३४०९]

हे सासुरवासिनी बायांनो, आतां मी जें तुम्हांला सांगतें तें तुम्ही ऐका. आमच्या वागणुकीप्रमाणें तुम्ही वर्तन करूं नका १. जोंपर्यंत तुम्हांला प्रापंचिक आशा आहे तोंपर्यंत तुम्ही देहावर उदार होऊं नका २. तुकाराम महाराज म्हणतात, ना पूर्वींचा पति ना परपुरुष गोविंद ! ह्या दोहोंची प्राप्ति न होतां ह्या जगांत व्यर्थ तुमची फजिती मात्र होईल ३. [३४१०]

आजपर्यंत तुमचा व आमचा अज्ञानानें प्रापंचिक कौतुकाच्या खेळामध्यें संग झाला होता १. आतां आम्ही सत्त्व, रज, तम ह्या गुणांचा त्याग करून निर्गुण जो देव त्याच्या अंकित झालों. त्यायोगानें जें करूं नये तें कर्तव्य सुखानें करूं अशा अनावर झालों आहोंत २. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आम्हीं दोन्ही कुळें टाकून एक नारायण मनामध्यें धरिला आहे ३. [३४११]

देहरूपी सासऱ्यास व तेथील अहंकाररूपी नवऱ्यास आमचा वीट आला. मग साहाजिक उत्पत्तिस्थान जें अक्षर त्या माहेरासहि वीट आला १. अशी मी त्याग करण्यास योग्य झाल्यामुळें कोणीहि मला हातीं धरीत नाहीं. आतां प्रारब्धकर्माची जशी गति असेल तशी भोगावी २. तुकाराम महाराज म्हणतात, आमची अपकीर्ति न व्हावी ती झाली. आतां लाज धरून काय उपयोग आहे ? ३. [३४१२]

मरणाही आधीं राहिलों मरोनी । मग केलें मनीं होतें तैसें ॥ १ ॥ आतां तुम्ही पाहा आमुचें नवल । नका वेंचूं बोल वायांविण ॥ २ ॥ तुका म्हणे तुम्ही भयाभीत नारी । कैसी संग सरी तुम्हां आम्हां ॥ ३ ॥ [३४१३]

परपुरुषाचें सुख भोगे जरी (तरी) । उतरोनी करीं घ्यावें सीस ॥ १ ॥ संवसारा आगी आपुलेनि हातें । लावूनी मागुतें पाहूं नये ॥ २ ॥ तुका म्हणे व्हावें तयापरी धीट । पतंग हा नीट दीपावरी (दीपा सोई) ॥ ३ ॥ [३४१४]

आइकाल परी ऐसें नव्हे बाई । न सांडावी सोई भ्रताराची ॥ १ ॥ नव्हे आराणूक लौकिकापासून । आपुल्या आपण गोंविलें तें ॥ २ ॥ तुका म्हणे मन कराल कठीण । त्या या निवडोन मजपाशीं ॥ ३ ॥ [३४१५]

आहाच वाहाच आंत वरी दोन्ही । न लगा गडणी आम्हां तैशा ॥ १ ॥ भेऊं नये तेथें भेडसावूं कोणा । आवरूनी मना बंद द्यावा ॥ २ ॥ तुका म्हणे कांहीं अभ्यासावांचूनी । नव्हे हे करणी भलतीची ॥ ३ ॥ [३४१६]

बहुतांच्या आम्ही न मिळों मतासी । कोणी कैसी कैसी भावनेच्या ॥ १ ॥ विचार करितां वायां जाय फळ । लटिकेंचि मूळ फजितीचें ॥ २ ॥ तुका म्हणे तुम्ही करा घटापटा । नका जाऊं वाटा आमुचिया ॥ ३ ॥ [३४१७]

त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा । कठीण हें जिवा तोंचिवरी ॥ १ ॥ मागिलांचें दुःख लागों नेदी अंगा । अंतर हें सांगा नेदी पुढें ॥ २ ॥ तुका म्हणे सर्वविशीं हा संपन्न । जाणती महिमान श्रुति ऐसें ॥ ३ ॥ [३४१८]

स्थूल देहाला मरण येण्याच्या पूर्वींच आम्ही अविद्येचा नाश केल्यामुळें मेलों, मग जसें मनांत होतें तसें आम्हीं केलें १. आतां तुम्ही आमचा नवलावा (आश्चर्य) पाहा. उगीच भाषण व्यर्थ खर्च करूं नका २. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही सकळ स्त्रिया भित्र्या आहांत. मग तुमची आमची बरोबरी होण्याची संगति कशी लागेल? ३. [३४१३]

क्षराक्षरांतील जो उत्तम पुरुष आहे त्याचें सुख जर भोगावयाचें असेल तर आपलें मस्तक उतरून तळहातावर घेतलें पाहिजे (जीवावर उदार झालें पाहिजे) १. आपल्या हातानें संसाराला अग्नि लावून (संसाराचा त्याग करून) त्याकडे परत पाहूं नये २. तुकाराम महाराज म्हणतात, जसा पतंग जिवावर उदार होऊन दिव्यावर झेंप घालतो, तसें निर्भय झालें पाहिजे ३. [३४१४]

अहो बाई, तुम्हीं हें कानानें ऐकाल पण असें कर्तव्य तुमच्यानें होणार नाहीं, म्हणून तुम्ही आपल्या अहंकाररूपी नवऱ्याची सोय सोडूं नका. ज्या तुम्ही आपल्या आपण गुंतून संसारांत पडलां आहांत, त्यासंबंधीं लौकिकापासून तुमची सुटका होऊन तुम्हांला कधीं विसांवा मिळणार नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांना ह्याविषयीं आपलें मन कठिण करतां येईल त्यांनीं निवडून योग्य झाल्यानें मजपाशीं यावें ३. [३४१५]

पोटांत एक व बाह्यात्कारीं एक असल्या अवाच्यासवा वागणुकीच्या मैत्रिणी आम्हांस नको आहेत १. आमच्या मनांत भय उत्पन्न होत नाहीं; मग आम्हांस लोकांना भय दाखविण्याचें काय कारण आहे? पण तुम्ही आपलें मन आंवरून बंदींत ठेवा २. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याविषयीं विवेक-वैराग्यादिकांचा कांही तरी अभ्यास केल्यावांचून भलतेंच दांभिक साधन केल्यानें श्रीहरि साध्य होणार नाहीं ३. [३४१६]

आम्ही अनेकांच्या मतास मिळणार नाहीं, कारण प्रत्येकाचे ठिकाणीं अनेक प्रकारची भावना आहे १. ह्याविषयींचा विचार करावा तर काळ व्यर्थ जातो आणि फजितीचें खोटें मूळ असलेलें वाढतें २. तुकाराम महाराज म्हणतात, घटाकाश अथवा पटतंतुन्याय (सांख्य मत अथवा न्यायशास्त्र) ह्याचा विचार तुम्ही करीत बसा. आमच्या वाटेस कोणी जाऊं नका. (म्हणजे आम्हांला छळूं नका.) ३. [३४१७]

जोंपर्यंत उत्तम पुरुषाचें सुख अनुभवाला आलें नाहीं, तोंपर्यंत जीवाला हें कर्तव्य कठिण वाटतें १. एक वेळ त्याचें सुख अनुभवाला आलें, म्हणजे मागील जन्मांतरींचें दुःख अंगास न लागूं देतां तो आपला संग देईल व त्यांत पुढें कधींहि वियोग होणार नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, हा देव सर्व ऐश्वर्यानें संपन्न आहे असा ह्याचा महिमा वेदश्रुतींना समजला आहे ३. [३४१८]

न राहे रसना बोलतां आवडी । पायीं दिली बुडी माझ्या मनें ॥ १ ॥ मानेल त्या तुम्ही आइका स्वभावें । मी तो माझ्या भावें अनुसरलें ॥ २ ॥ तुका म्हणे तुम्ही फिरावें बहुतीं । माझी तों हे गति झाली आतां ॥ ३ ॥ [३४१९]

न बोलतां तुम्हां कळों न ये गुज । म्हणऊनी लाज सांडियेली ॥ १ ॥ आतां तुम्हां पुढें जोडितसें हात । नका कोणी अंत पाहों माझा ॥ २ ॥ तुका म्हणे आम्ही बैसलों शेजारीं । करील तें हरी पाहों आतां ॥ ३ ॥ [३४२०]

: तुकोबास मंबाजी गोसाव्यानें मारिलें त्याजबद्दल देवाजवळ परिहार :

न सोडीं न सोडीं न सोडीं । विठोबा चरण न सोडीं ॥ १ ॥ भलतें जड पडो भारी । जीवावरी आगोज ॥ २ ॥ शतखंड देह शस्त्रधारीं । करितां परी न भीयें ॥ ३ ॥ तुका म्हणे केली आधीं । दृढ बुद्धि सावध ॥ ४ ॥ [३४२१]

बरवें बरवें केलें विठोबा बरवें । पाहोनि अंत क्षमा अंगीं कांटीवरी मारविलें ॥ १ ॥ शिव्या गाळी नीत नाहीं । बहु फार विटंबिलें ॥ २ ॥ तुका म्हणे क्रोधा हातीं । सोडवूनी घेतलें रे ॥ ३ ॥ [३४२२]

पावलों पावलों । देवा पावलों रे ॥ १ ॥ बरवें संचित होतें तैसें जालें रे । आतां काय बोलों रे ॥ २ ॥ सोज्वळ कंटकवाटा भावें करूं गेलों रे । तुका म्हणे करूनी वेगळा केलों रे ॥ ३ ॥ [३४२३]

कां होती कां होती । देवा एवढी फजीती ॥ १ ॥ मुळीं वर्म नसतें चुकलों । तो मी ऐसें चित्तीं ॥ २ ॥ होणार होऊनि गेलें । मिथ्या आतां खंती रे ॥ ३ ॥ तुका म्हणे पुरे । आतां दुर्जनाची संगती रे ॥ ४ ॥ [३४२४]

त्याच्या पायाच्या ठिकाणीं माझ्या मनानें बुडी दिली आहे, पण जिव्हा त्याच्या प्रीतीनें लाचावल्यामुळें तें सुख सांगतांना राहात नाहीं १. तुम्हांला जसें आवडेल त्या भावार्थानें तुम्ही श्रवण करा; मी तर माझ्या भावनेनें एकत्वाचे ठिकाणीं रत झालें आहें २. तुकाराम महाराज म्हणतात, आतां माझी तर अशा प्रकारची गति झाली आहे. ह्याकरितां तुम्हीं बहुतकरून मागें फिरावें हें बरें ३. [३४१९]

माझ्या अंतरांतील हें गुह्य जर मीं तुम्हांला सांगितलें नसतें, तर तें तुम्हांस कळलें नसतें. ह्याकरितां निर्लज्जपणानें मीं तें तुम्हांस सांगितलें आहे १. आतां तुमच्यापुढें मी हात जोडून विनंति करितों, कीं माझा कोणी अंत पाहूं नका २. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही हरीच्या एकत्वाच्या सुखाच्या शेजेवर बसलों आहोंत. आतां तो जसें करील तसें आम्हीं पाहूं ३. [३४२०]

हे विठोबा, तुझे पाय मी सोडणार नाहीं (असें त्रिवार सांगतों) १. न सोसवेल असें जीवापेक्षां जड भारी (भयंकर संकट, दुःख) प्राप्त झालें (पुढें पहिलें कडवें वाचावें) तरी मी तुझे पाय सोडणार नाहीं २. देहाचे शस्त्राच्या योगानें शतशः तुकडे जरी केलेस तरी मी भिणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी आरंभींच सावध होऊन आपली बुद्धि दृढ केली आहे ४. [३४२१]

हे विठोबा, आमच्या अंतःकरणांतील क्षमावृत्ति जाणून मंबाजी गोसाव्याकडून मला काट्यांनीं (कांटेऱ्या काठीनें) मारविलें, हें तुम्हीं फार चांगलें केलें (असें त्रिवार सांगतों) १. त्यांनीं आमचा अपराध कोणता आहे ह्याचा विचारसुद्धां न करतां आम्हांला शिव्यागाळी देऊन आमची पुष्कळ विटंबना केली २. तुकाराम महाराज म्हणतात, अरे देवा, पण आम्हांला तूं क्रोधाच्या हातून सोडवून घेतलेंस (मला राग येऊं दिला नाहींस, हें बरें केलेंस) ३. [३४२२]

अरे देवा, माझ्या संचिताप्रमाणें मला फळ मिळालें (असें त्रिवार सांगतों) १. जसें माझें संचित होतें तसें झालें. आतां काय बोलावयाचें आहे? २. तुकाराम महाराज म्हणतात, मंबाजी गोसाव्यांनीं प्रदक्षिणेच्या वाटेवर लावलेल्या काट्या भावानें काढून वाट शुद्ध करावयास गेलों, परंतु त्यानें मला हातानें ओढून बाजूला केलें व मारलें ३. [३४२३]

देवा, (ध्रुवपदांत म्हटल्याप्रमाणें) जर मला वर्म कळलें असतें, तर एवढी फजिती कशाला झाली असती? १. मुळांतच हा असा दुर्जन आहे, असें चित्तानें वर्म जाणण्याचें चुकलों नसतों २. व्हावयाचें तें होऊन गेलें. आतां त्याबद्दल तळमळ करणें, हें खोटें होय. ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे देवा, आतां दुर्जनांची संगति पुरे ४. [३४२४]

सोडवा सोडवा सोडवा (हो) अनंता। तुजविण ऐसा कोण दुजा प्राणदाता ॥ १ ॥ कोणा लाज नेणां ऐसें। आणिकां शरण आम्ही जातां ॥ २ ॥ तुका म्हणे सखया। माझ्या रखुमाईच्या कांता ॥ ३ ॥ [३४२५]

पुत्राची वारता। शुभ ऐके जेवीं माता ॥ १ ॥ तैसें राहो माझें मन। गातां ऐकतां हरिगुण ॥ २ ॥ नादें लुब्ध जाला मृग। देह विसरला अंग ॥ ३ ॥ तुका म्हणे पाहे। कासवीचें पिलें माये ॥ ४ ॥ [३४२६]

प्रासंगिक अभंग
: तुकोबावर सद्गुरुकृपा :

(सद्गुरुरायें) सत्य गुरुरायें कृपा मज केली। परि नाहीं घडली सेवा कांहीं ॥ १ ॥ सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना। मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥ २ ॥ भोजना मागती तूप पावशेर। पडिला विसर स्वप्नामाजी ॥ ३ ॥ कांहीं कळे उपजला अंतराय। म्हणोनियां काय त्वरा जाली ॥ ४ ॥ राघवचैतन्य केशवचैतन्य। सांगितली खूण माळिकेची ॥ ५ ॥ बाबाजी आपलें सांगितलें नाम। मंत्र दिला रामकृष्णहरि ॥ ६ ॥ माघशुद्ध दशमी पाहूनी गुरुवार। केला अंगीकार तुका म्हणे ॥ ७ ॥ [३४३७]

माझिये मनींचा जाणोनियां भाव। तो करी उपाव गुरुराजा (गुरुरावो) ॥ १ ॥ आवडीचा मंत्र सांगितला सोपा। जेणें नव्हे गुंपा कांहीं कोठें ॥ २ ॥ जाती पुढें एक उतरले पार। हा भवसागर साधुसंत ॥ ३ ॥ जाणत्या नेणत्या ज्या जैसी आवडी। उतार सांगडी तापे पेटे ॥ ४ ॥ तुका म्हणे मज दावियेला तारू। कृपेचा सागरु पांडुरंग ॥ ५ ॥ [३४२८]

हे अनंता, मला तुम्ही ह्या उपाधींतून मुक्त करा (असें त्रिवार सांगतों). तुझ्यावांचून दुसरा जीवदान करणारा (देणारा) कोण आहे ? १. आम्ही अन्याला (तुला सोडून इतरांस) जर शरण गेलों, तर त्याबद्दलची लज्जा कोणाला वाटणार हें कसें कळत नाहीं ? २. तुकाराम महाराज म्हणतात, अरे रखुमाईच्या पति, माझ्या मित्रा, मला तुम्ही ह्या उपाधींतून मुक्त करा ३. [३४२५]

ज्याप्रमाणें दूर देशीं गेलेल्या मुलाची शुभवार्ता आई ऐकते १. त्याप्रमाणें हरीचे गुण गाण्याचे वेळेस व ऐकते वेळीं माझ्या मनाची स्थिति व्हावी २. व्याधाच्या गाण्याचे नादास हरिण लुब्ध होऊन आपल्या देहास विसरतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, कांसवीचीं पिलें हीं आपल्या आईकडे पाहातात (वरील व खालील दृष्टांताचा ध्रुवपदाशीं संबंध आहे) ४. [३४२६]

हे गुरुराजा, तुम्हीं मजवर खरोखर कृपा केलीत, पण मजकडून तुमची कांहीं सेवा झाली नाहीं १. मी स्वप्नामध्यें गंगेचें स्नान करण्याकरितां जात असतांना, गुरूंनीं मला वाटेंत गांठलें व अभयहस्त माझ्या मस्तकावर ठेविला २. त्यांनीं जेवण्याकरितां इहलोकींचें अमृत असें जें तूप, तें पावशेर मागितलें, परंतु मला त्याचा विसर पडला ३. मजकडून सेवेंत अंतर आलें कीं काय कोण जाणे, म्हणून त्यांनीं मजकडे स्वप्नांत येण्याची व अनुग्रह करण्याची त्वरा केली ४. व आपल्या गुरुपरंपरेच्या मालिकेची खूण सांगितली, ती ही, कीं राघवचैतन्य गुरु व केशवचैतन्य त्यांचे शिष्य ५. व त्यांनीं बाबाजी असें आपलें नांव मला सांगून रामकृष्ण हरि हा मंत्र दिला ६. तुकाराम महाराज म्हणतात, त्या दिवशीं माघ शुद्ध दशमी असून गुरुवार होता व त्याच दिवशीं मीं त्या मंत्राचें ग्रहण केलें ७. (३४२७]

गुरुराजानें माझ्या हृदयांतील भाव जाणून, त्याप्रमाणेंच मला मार्ग सांगितला १. तो हा, कीं माझ्या प्रीतीचा जो सुलभ रामकृष्ण हरि हा मंत्र, तोच मला सांगितला. त्या मंत्राच्या योगानें चित्त कोठेंहि गुंतलें जात नाहीं २. कित्येक साधुसंत ह्या मंत्राच्या योगानें पुढें जाऊन ह्या संसारसिंधूंतून पार झाले ३. हा मंत्र ज्ञान्याला व अज्ञान्याला, ज्याला जशी आवड असेल त्यांना तारणारी सांगडच आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, कृपेचा समुद्र जो पांडुरंग, तो भवनदींतून तारून नेणारें तारूं आहे, असें मला संतांनीं दाखविलें ५. [३४२८]

घालूनियां भार राहिलों निश्चितीं । निरविलें संतीं विठोबासी ॥ १ ॥ लावूनियां हातें कुरवाळिला माथा । सांगितलें चिंता न करावी ॥ २ ॥ कटीं कर सम चरण साजिरे । राहिला भीवरेतीरीं उभा ॥ ३ ॥ खुंटले सायास आणीक या जीवा । धरिले केशवा पाय तुझे ॥ ४ ॥ तुज वाटे आतां तें करीं अनंता । तुका म्हणे संतां लाज माझी ॥ ५ ॥ [३४२९]

माझिये मनींचा जाणा हा निर्धार । जिवासी उदार जालों आतां ॥ १ ॥ तुजविण दुजें न धरीं आणिका । भय लज्जा शंका टाकियेली ॥ २ ॥ ठायींचा संबंध तुज मज होता । विशेष अनंता केला संतीं ॥ ३ ॥ जीवभाव तुझ्या ठेवियेला पायीं । हेंचि आतां नाहीं लाज तुम्हां ॥ ४ ॥ तुका म्हणे संतीं घातला हवाला । न सोडीं विठ्ठला पाय आतां ॥ ५ ॥ [३४३०]

: वाममार्गी शाक्तांचा निषेध :

टवकारूनी दृष्टी लावूनियां रग । दावी झगमग डोळ्यापुढें ॥ १ ॥ म्हणती शिष्यासी लागली समाधि । लटकीचि उपाधि झकविती ॥ २ ॥ दीपाचिये ज्योति कोंडियेलें तेज । उपदेश सांजरात्रीमाजी ॥ ३ ॥ रांगोळियां चौक श्रृंगारोनी ओजा । आवरण पूजा यंत्र करी ॥ ४ ॥ पडदा लावोनियां दीप चहूं कोनीं । बैसोनि आसनीं मुद्रा लावी ॥ ५ ॥ नैवेद्यासी म्हणे करावें पक्वान्न । पात्रासी दिव्यान्न परवडी ॥ ६ ॥ झाला उपदेश कवळ घ्या रे मुखीं । आपोशन शेखीं बुडविलें ॥ ७ ॥ पाषांड करोनि मांडिली जीविका । बुडवी भाविका लोकांप्रती ॥ ८ ॥ कायावाचामनें सोडवी संकल्प । गुरु गुरु जप प्रतिपादी ॥ ९ ॥ शुद्ध परमार्थ बुडविला तेणें । गुरुत्वभूषणें भोग भोगी ॥ १० ॥

संतांवर मी आपलें सर्वस्व ओझें घालून निष्काळजी राहिलों. त्यांनीं मला विठोबाच्या स्वाधीन केलें १. माझ्या डोक्यावरून हात फिरवून त्यांनीं मला कुरवाळिलें व 'तूं कांहीं चिंता करूं नकोस' असें सांगितलें २. कमरेवर हात ठेवून व सारखे पाय ठेवून तो उभा राहिला आहे ३. हे केशवा, ह्या जीवाकडून कोणतेहि उपाय होणें अशक्य झालें, म्हणून तुझे पाय धरले ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे अनंता, आतां तुला वाटेल तें तूं कर. माझी सर्वस्वीं लज्जा संतांना आहे ५. [३४२९]

आतां मी जीवावर उदार झालों आहें. हा माझ्या मनाचा निश्चय तुम्ही समजा १. तुझ्यावांचून अन्याचा (दुसऱ्या कोणाचाहि) मी आश्रय करीत नाहीं. भय, लज्जा व शंका ह्या सर्वांचा मीं त्याग केला २. हे अनंता, आम्ही तुझे अंश असल्यामुळें तुझा आमचा मूळचाच संबंध आहे, तोच संतांनीं विशेष वाढविला ३. मीं आपला जीव तुमच्या पायीं ठेविला आहे, त्याची तुम्हांस लाज कशी नाहीं? ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे विठ्ठला, संतांनीं मला तुझ्या स्वाधीन केलें. आतां मी तुझे पाय सोडणार नाहीं ५. [३४३०]

शाक्तमार्गी गुरु, हे शिष्याचे डोळे बोटानें दाबून त्यास रग लावितात व त्यास दृष्टि टवकारून पाहावयास सांगतात. त्या योगानें डोळ्यापुढें एक प्रकारची चकाकी दिसावयाला लागते. ती त्याला पाहावयास सांगतात १. आणि म्हणतात, कीं शिष्याला समाधि लागली. अशा प्रकारच्या लबाडीनें ते शिष्यास फसवितात, किंवा, आपण कांहीं असा लबाडीचा प्रकार दाखवून ते शिष्यास फसवितात २. दिव्याच्या ज्योतीचें तेज घरामध्यें कोंडून संध्याकाळीं अथवा रात्रीं ते शिष्यास उपदेश करतात ३. सभोंवतीं रांगोळ्या घालून मध्यें धान्याचा व्यवस्थित चौक तयार करून तो शृंगारतात. अशा प्रकारें धान्याचें आवरण करून मध्यें त्रिकोण यंत्राची पूजा करतात ४. सभोंवतीं पडदे लावून आंत चार बाजूंस चार दिवे लावून ठेवतात, व आपण आसनावर बसून ध्यानाची मुद्रा दाखवितात ५. आणि शिष्यास नैवेद्याकरितां अनेक दिव्य पक्वान्नें करावयास लावितात व तीं पात्रांत वाढतात (देवापुढें ठेवितात) ६. आणि शिष्यास म्हणतात, अरे तुम्हांस उपदेश झाला. आतां तुम्ही जेवा, पण आपोशन घेण्याचें कांहीं कारण नाहीं ७. अशा प्रकारच्या पाखंडानें भाविक लोकांना फसवून ते पोट भरतात ८. काया, वाचा, मन गुरूला अर्पण करण्याविषयींचा संकल्प त्याजकडून सोडवितात व गुरुनामाचा जप त्यास करण्यास सांगतात ९. ते खरा परमार्थ बुडवून गुरुत्वाच्या भूषणानें ऐश्वर्य भोगितात १०.

विधीचाही लोप बुडविला वेद । शास्त्रांचाही बोध हरविला ॥ ११ ॥ योगाची धारणा नाहीं प्राणायाम । सांडी यम नेम नित्यादिक ॥ १२ ॥ वैराग्याचा लोप हरिभजनीं विक्षेप । वाढविलें पाप मतिलंडें ॥ १३ ॥ तुका म्हणे गेलें गुरुत्व गुखाडी । पूर्वजांसी धाडी नरकवासा ॥ १४ ॥ [३४३१]

गुरुमार्गामुळें भ्रष्ट झाले सर्वकाळ (सकळ)। म्हणती यातीकूळ नाहीं ब्रह्मीं ॥ १ ॥ पवित्राला म्हणती नको हा कंटक । मानिती आत्मिक अनामिका ॥ २ ॥ डोहोर होलार दासी बलुतीं बारा । उपदेशिती फारा रांडापोरें ॥ ३ ॥ कांहीं टाण्या टोण्या विप्र शिष्य होती । उघडी फजिती स्वधर्माची ॥ ४ ॥ नसता करूनी होम खाती एके ठायीं । म्हणती पाप नाहीं मोक्ष येणें ॥ ५ ॥ इंद्रियांचे पेठे भला कौल देती । मर्यादा जकाती माफ केली ॥ ६ ॥ नाहीं शास्त्राधार पात्रापात्र नेणें । उपदेशून घेणें द्रव्य कांहीं ॥ ७ ॥ तुका म्हणे ऐसे गुरु शिष्य जाण । विठोबाची आण नरका जाती ॥ ८ ॥ [३४३२]

शाक्त गधडा जये देशीं । तेथें राशी पापाच्या ॥ १ ॥ सुकृताचा उदो केला । गोंधळ घाला इंद्रियें ॥ २ ॥ क्रोध रूपें वसे काम । तिचें नाम जपतसे ॥ ३ ॥ मद्यभक्षण मांगिण जाती । विटाळ चित्तीं सांठविला ॥ ४ ॥ स्तवूनियां पुजी रांड । न लगे भांड दाढीसी ॥ ५ ॥ तुका म्हणे भगवती । नेईल अंतीं आपणापें ॥ ६ ॥ [३४३३]

वेदांत सांगितलेल्या विधीचा लोप करून सर्व शास्त्रांचाहि बोध ते नाहींसा करितात ११. नित्यकर्मे व यमनियमादिकांचा त्याग करतात, कारण ते योगधारणा व प्राणायाम जाणत नाहींत १२. वैराग्याचें स्वरूप तर त्यांना मुळींच माहीत नाहीं. त्यांनीं हरीच्या भजनाचा नाश केला आहे; अशा ह्या लंडानें बुद्धिपुरःसर पाप वाढविलें १३. तुकाराम महाराज म्हणतात, असा हा त्याचा गुरुपणा नरकांत गेला. त्यांनीं आपल्या कृतीनें आपल्या पूर्वजांसहि नरकास पाठविलें १४. [३४३१]

शाक्त हे पूर्वपरंपरेनेंच नेहमीं भ्रष्ट असतात. ते म्हणतात, कीं परब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं जात आणि कुळ नाहीं १. पवित्र गृहस्थास म्हणतात, कीं हा नीच नको आणि अंत्यजादि आपले संबंधी मानितात २. ढोर, लोहार, चांभार, सुतार, कुंभार, न्हावी, वेसकर, रस्ते झाडणारी दासी इत्यादि दासांचीं बारा बलुतीं, त्यांना व त्यांच्या बायकापोरांना बहुत उपदेश करितात ३. त्यांच्या जवळ कांहीं छा, छू (जारण–मारणादि मंत्र–तंत्र) असल्यास ब्राह्मण त्यांचे शिष्य होतात. अशा तऱ्हेनें ते आपल्या धर्माची उघड फजिती करितात ४. खोटाच एखादा होम करून त्या निमित्यानें एके ठिकाणीं बसून सर्व खातात आणि म्हणतात, कीं हें करण्यांत पाप नाहीं, उलट मोक्षप्राप्ति आहे ५. इंद्रियव्यवहारामध्यें चांगली मोकळीक देतात. शास्त्रमर्यादारूपी जकातीची माफी करितात ६. त्यांच्या करण्याला शास्त्राधार नसून पात्रापात्रहि ते जाणत नाहींत व हवा त्यास उपदेश करून त्याच्या जवळून कांहीं द्रव्य उपटतात ७. तुकाराम महाराज म्हणतात, असे हे गुरु-शिष्य, विठोबाची शपथ, नरकास जातील असें समजा ८. [३४३२]

जो देवीची उपासना करणारा वाममार्गी शाक्त आहे, तो मूर्ख गाढव ज्या देशांत राहातो त्या ठिकाणीं पापाच्या राशी असतात १. त्यानें आपल्या सर्व पुण्याचा नाश केल्यामुळें, त्याच्यावर इंद्रियांचा घाला (दरवडा) पडतो; मग ते विषयाचा गोंधळ घालतात २. प्रत्यक्ष क्रोधरूपानें कामाची वस्ती जिच्या ठिकाणीं आहे, त्या देवीच्या नामाचा जे जप करतात; किंवा, प्रत्यक्ष क्रोधरूपानें जिच्या ठिकाणीं काम आहे, अशा मांगिणीच्या मुलीस देवी असें मानून तिचा ते जप करतात ३. ती देवी दारू पिणारी असून मांगिणीच्या स्वभावाची आहे, तिचें ध्यान मनानें करून ज्यानें आपल्या हृदयांत विटाळ सांठविला आहे; अथवा मांगीण जातीच्या मुलीस देवी असें समजून तिची पूजा करितात व तिला दारू प्यावयास देतात आणि तिनें ती थोडी प्यालयानंतर राहिलेऱी उष्टी दारू प्रसाद म्हणून हे शाक्त पितात. अशा प्रकारच्या विटाळानें त्यांचें चित्त विटाळलेलें असतें ४. त्या रांडेचें स्तवन करून पूजा केली तर त्या भांडखोरांचें भांडण करण्याविषयीं दांतांस दांत लागत नाहींत (एकसारखे भांडत राहातात), अथवा, ह्या रांडेचें स्तवन करून जे पूजा करतात. अशा ह्या भांडखोरांच्या तोंडाशीं लागूं नये ५. तुकाराम महाराज म्हणतात, असें केल्यानें ही देवी अखेरीस आपल्याजवळ नेईल, अशी त्यांची भावना असते ६. [३४३३]

राजा प्रजा द्वाड देश। शाक्त वास करिती तो ॥ १ ॥ अधर्माचें उघड पीक। धर्म रंक ते गांवीं ॥ २ ॥ न पिके भूमि कांपें भारें। मेघ वारे पितील ॥ ३ ॥ तुका म्हणे अवघीं दुःखें। येती सुखें वस्तीसी ॥ ४ ॥ [३४३४]

ऐसें कलियुगाच्या मुळें। झालें धर्माचें वाटोळें ॥ १ ॥ सांडुनियां रामराम। ब्राह्मण म्हणती दोमदोम ॥ २ ॥ शिवों नये तीं निळीं। वस्त्रें पांघरती काळीं ॥ ३ ॥ तुका म्हणे वृत्ति। सांडुनि गदा मागत जाती ॥ ४ ॥ [३४३५]

ऐका कलीचें हें फळ। पुढें होईल ब्रह्मघोळ ॥ १ ॥ चारी वर्ण अटरा याती। भोजन करिती एके पंक्ती ॥ २ ॥ पूजिती असुरा रांडा। मद्य प्राशितील पेंढा ॥ ३ ॥ वाम कवळ मार्जन। जन जाईल अधःपतन ॥ ४ ॥ तुका हरिभक्ति करी। शक्ति पाणी वाहे घरीं ॥ ५ ॥ [३४३६]

अवघ्या पापें घडला एक। उपासक शक्तीचा ॥ १ ॥ त्याचा विटाळ नको अंगा। पांडुरंगा माझिया ॥ २ ॥ काम क्रोध मद्य अंगीं। रंगला रंगीं अवगुणी ॥ ३ ॥ करितां पाप न धरी शंका। म्हणे तुका कोणीही ॥ ४ ॥ [३४३७]

शाक्ताची शूकरी माय। विष्टा खाय बिदीची ॥ १ ॥ तिची त्या पडली सवे। मागें धांवे म्हणोनी ॥ २ ॥ शाक्ताची गाढवी माय। भुंकत जाय वेसदारा ॥ ३ ॥ तुका म्हणे शिंदळीचे। बोलतां वाचे निंद्य ते ॥ ४ ॥ [३४३८]

वारितां बळें धरितां हातीं। जुलुमें जाती नरकामधीं ॥ १ ॥ रंडीदासाप्रति कांहीं। उपदेश तोही

देवीची उपासना करणारे शाक्त ज्या देशांत राहातील, तेथील सर्व प्रजा व राजा आणि तो देश हे सर्व अति वाईट होतील १. त्या ठिकाणीं प्रत्यक्ष अधर्माचें पीक येईल व धर्मास नीचत्व येईल २. त्या पापानें जमीन पिकणार नाहीं व तेथें पाऊस पडणार नाहीं, आणि त्याच्या ओझ्यानें पृथ्वी थरथर कांपूं लागेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, जेवढीं म्हणून ब्रह्मांडांत दुःखें आहेत, तितकीं त्याच्या वस्तीला सुखानें येऊन राहातील ४. [३४३४]

अशा प्रकारें ह्या कलियुगाच्या योगानें सर्व धर्माचा नाश झाला आहे १. रामनाम स्मरण करण्याचें सोडून ब्राह्मण-देखील दावल मलकाचा (फकिराचा) वेष घेऊन दोमदोम म्हणून भीक मागतात २. ज्या निळ्या रंगास स्पर्श करूं नये, त्यानें रंगवून निळीं अथवा काळीं वस्त्रें ते पांघरतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपली उच्च वर्णाची वृत्ति टाकून कंदुरी (भंडारा, उत्सवाचें जेवण) करण्याकरितां गदा मागावयास जातात (ओलें अन्न अथवा धान्य मागून आणणें त्यास गदा म्हणतात व इतर माधुकरी म्हणतात) ४. [३४३५]

अहो, तुम्ही कलियुगाचें फल ऐका. ह्या कलियुगामध्यें पुढें एकंकार होईल १. चार वर्ण आणि अठरा जाति एका पंक्तीस जेवतील २. मांगादिकांच्या स्त्रियांचें पूजन करतील व त्यांत उच्छिष्ट मद्याचें पान करितील ३. डाव्या हातानें ग्रास घेऊन जे मुखशुद्धि करतात, त्यांच्या योगानें जग अधःपतनास जाईल ४. तुकाराम महाराज म्हणतात, तूं हरिभक्ति कर. त्या योगानें देवी तुमच्या घरीं पाणी वाहील ५. [३४३६]

जो देवीची उपासना करणारा आहे, तो एक सर्व पातकांचाच पुतळा ओतला गेलेला आहे १. हे पांडुरंगा, त्या दुष्टाचा विटाळ माझ्या अंगास होऊं देऊं नकोस २. त्याचे अंगीं पूर्णपणें काम, क्रोध व दारू पिणें हीं लक्षणें आहेत. अशा अनेक अवगुणांच्या रंगानें तो रंगला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, असले लोक वरील कांहीं पाप करण्यास कोणाची भीति धरीत नाहींत ४. [३४३७]

शक्तीच्या उपासकाची आई रस्त्यांतील विष्टा खाणारी डुकरीण आहे, असें समजावें १. तिची त्याला संवय लागल्यामुळें तो तिच्या मागें धांवत आहे २. शक्तीच्या उपासकाची आई वेशीबाहेर अगर चव्हाट्यामध्यें भुंकत जाणारी गाढवी आहे, असें समजावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, असे ते लोक शिंदळीचे आहेत व त्यांचें कर्म वाचेनें बोललें असतां विटाळ होतो, असें ते निंद्य आहेत ४. [३४३८]

देवीच्या उपासकांना हाताला धरून आडमार्गाला जाऊं नका, म्हणून जरी सांगितलें तरी ते बळजबरीनें अधोगतीस

चालेना ॥ २ ॥ जन्म नेला वाताहात । थोर घात ये ठायीं ॥ ३ ॥ तुका म्हणे पंढरीनाथा । तुझी कथा दूषिती ॥ ४ ॥ [३४३९]

हरिहर सांडूनी देव । धरिती भाव क्षुल्लकां ॥ १ ॥ ऐका त्यांची विटंबना । देवपणा भक्तांची ॥ २ ॥ अंगीं कवडे घाली गळां । परडी कळाहीन हातीं ॥ ३ ॥ गळां गांठा हिंडे दारीं । मनुष्य परी कुतरीं तीं ॥ ४ ॥ माथां सेंदुर दांत खाती । जेंगट हातीं सटवीचें ॥ ५ ॥ पूजिती (ते) विकट दोंद । पशु सोंड गजाची ॥ ६ ॥ ऐशा छंदें चुकलीं वाटा । भाव खोटा भजन ॥ ७ ॥ तुका म्हणे विष्णुशिवा । वांचुनि देवा भजती ते ॥ ८ ॥ [३४४०]

कांद्यासाठीं झालें ज्ञान । तेणें जन नाडिलें ॥ १ ॥ काम क्रोध बुचबुची । भुंके पुची व्यालीची ॥ २ ॥ पूजेलागीं द्रव्य मागे । काय सांगे शिष्यातें ॥ ३ ॥ तुका म्हणे कैंचें ब्रह्म । अवघा भ्रम विषयांचा ॥ ४ ॥ [३४४१]

सांडुनियां पंढरीराव । कवणातें म्हणों देव ॥ १ ॥ बहु लाज वाटे चित्ता । आणीकांतें देव म्हणतां ॥ २ ॥ सांडुनियां हिरा । कोणें वेंचाव्या त्या गारा ॥ ३ ॥ तुका म्हणे हरिहर । ऐसी सांडुनियां धुर ॥ ४ ॥ [३४४२]

बहुत गेलीं वायां । न भजतां पंढरीराया ॥ १ ॥ करिती कामिकांची सेवा । लागोन मागोन खात्या देवा ॥ २ ॥ अवघियांचा धनी । त्यासी गेलीं विसरोनी ॥ ३ ॥ तुका म्हणे अंतीं । पडती यमाचिये हातीं ॥ ४ ॥ [३४४३]

जातात १. असल्या त्या रांडेच्या दासास कांहीं उपदेश केला तरी तोहि पण चालत नाहीं २. ह्या ठिकाणीं मनुष्यजन्मास येऊन त्यानें जन्म व्यर्थ घालविला, असा त्यानें वेदबाह्य आचार करून स्वतःचा मोठा घात केला ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा, तुझ्या कथेस सुद्धां ते लोक दूषण ठेवितात ४. [३४३९]

हरि आणि हर हे मुख्य देव सोडून जे क्षुल्लक देवतांच्या ठिकाणीं भाव धरतात १. त्या भक्तांची व त्या देवतांची फजीती कशी आहे, ती मी सांगतों. ऐका २. कवड्यांची माळ गळ्यांमध्यें घालून सर्वांगालाहि कवड्या बांधतात व व हातांमध्यें काळीबेरी परडी घेऊन भीक मागतात; ते कळाहीन दिसतात ३. वाघ्या होऊन गळ्यांत गांठ घालून जे लोकांच्या दारोदार हिंडतात, ते मनुष्य खरे, पण लांडीं कुत्रीं आहेत असें समजावें ४. कपाळाला शेंदूर लावून वांकडे-तिकडे दांत असणारीं अशीं जीं भयंकर दैवतें आहेत त्यांची सेवा करणारी सटवी हातामध्यें जेंगट ह्या नांवाचें वाद्य वाजवीत हिंडते. ५. ज्या देवाचें पोट मोठें व सोंड हत्तीच्याप्रमाणें आहे त्याची ते पूजा करतात ६. अशा नाना प्रकारच्या छंदानें ते खऱ्या वाटेस अंतरले. त्यांचें तें भजन व भाव हे सर्व व्यर्थ आहेत ७. तुकाराम महाराज म्हणतात, विष्णु आणि शिव ह्यांवांचून इतर देवाचें भजन करणें व्यर्थ आहे ८. [३४४०]

शक्तीच्या उपासकांच्या गुरूजवळ जें ज्ञान आहे तें कांदे घेऊन देखील ते लोकांस सांगतात. (सर्व ब्रह्म आहे. चांगलें-वाईट असा भेद करणें हा भ्रम आहे. कांदे देखील ब्रह्मच; तेव्हां ते खाण्यास कांहींच हरकत नाहीं, असें म्हणून जे कांदे खातात आणि कांदे खाण्यासाठींच त्यांना ब्रह्मज्ञान झालें आहे, त्यांना गुरु मानणारे) त्या योगानें भोळे जन फसतात १. अशा गुरूच्या ठिकाणीं बुचबुचीत काम व क्रोध भरलेले असून व्यालेल्या कुत्रीच्या भुंकण्याप्रमाणें ते ज्ञानाची बडबड मात्र तोंडानें करतात. माझी पूजा करा म्हणून असा गुरु शिष्याजवळ द्रव्य मागतो व त्यास कांहीं तरी उपदेश करतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच्या ठिकाणीं सर्व विषयाचा भ्रम आहे. तेथें ब्रह्म कशाचें आहे? ४. [३४४१]

एक पंढरीचा राजा सोडून म्यां कोणास देव म्हणावें? १. त्यावांचून दुसऱ्या कोणाला देव म्हणावयास माझ्या चित्ताला फार लाज वाटते २. एक अमोल्य हिरा प्राप्त झाला असतां गारा वेंचीत व्यर्थ कोणीं बसावें? ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें ज्याचे अंगभूत हरिहर आहेत असा श्रेष्ठ देव सोडून इतरांचें भजन कोणीं करावें? ४. [३४४२]

एका पंढरीरायावांचून इतर देवतांचें भजन केल्यानें पुष्कळ लोक वायां गेले आहेत १. लोकांना पीडा करून पोटाला मागून खाणारे आशाळभूत असे जे देव आहेत त्यांची लोक सेवा करितात २. जो सर्व ब्रह्मांडाचा स्वामी देव त्यास ते लोक विसरले ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां ते लोक अखेरीस यमाचे हातीं सांपडतील ४. [३४४३]

असो आतां ऐसा धंदा। तुज गोविंदा आठवूं ॥ १ ॥ रक्षिता तूं होसी जरी। तरी काय येरीं करावें ॥ २ ॥ काया वाचा मन पायीं। राहे ठायीं करूं तें ॥ ३ ॥ तुका म्हणे गाइन गीतीं। रूप तें चित्तीं धरूनियां ॥ ४ ॥ [३४४४]

: भूपाळ्यांचे अभंग :

बोलोनियां दाऊं कां तुम्ही नेणा जी देवा। ठेवाल तें ठेवा ठायीं तैसा राहेना ॥ १ ॥ पांगुळलें मन कांहीं नाठवे उपाय। म्हणऊनी पाय जीवीं धरूनी राहिलों ॥ २ ॥ त्याग भोग दुःख काय सांडावें मांडावें। ऐशी धरियेली जीवें माझ्या थोर आशंका ॥ ३ ॥ तुका म्हणे बाळ माता चुकलिया वनीं। न पवतां जननी दुःख पावे विठ्ठला ॥ ४ ॥ [३४४५]

ऐसी वाट पाहें कांहीं निरोप कां मूळ। कां हो कळवळा तुम्हां उमटेचि ना ॥ १ ॥ आहो पांडुरंगे पंढरीचे निवासे। लावूनियां आसे चाळवूनी ठेविलें ॥ २ ॥ काय जन्मा येऊनियां केली म्यां जोडी। ऐसा घडीघडी चित्ता येतो आठव (ऐसें घडोघडी चित्ता ये तें आठवूं) ॥ ३ ॥ तुका म्हणे खरा न पवेचि विभाग। धिक्कारितें जग हेंचि लाहें हिशोबें ॥ ४ ॥ [३४४६]

कां गा केविलवाणा केलों दीनाचा दीन। काय तुझी हीन शक्ति जालीसे दिसे ॥ १ ॥ लाज येते मना तुझा म्हणवितां दास। गोडी नाहीं रस बोलिलीया सारिखी ॥ २ ॥ लाजविली मागें संताचीं ही उत्तरें। कळों येतें खरें दुजें एकावरूनी ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी कोणी वदविली वाणी। प्रसादावांचूनी तुमचिया विठ्ठला ॥ ४ ॥ [३४४७]

जळो माझें कर्म वायां केली कटकट। जालें तैसें तंट नाहीं आलें अनुभवा ॥ १ ॥ आतां पुढें

हे गोविंदा, त्या लोकांचा धिःक्कार करण्याचा उद्योग पुरे. आतां आम्ही तुझें स्मरण करूं १. तूं जर आमचें रक्षण करशील तर इतर दैवतें आमचें काय करणार आहेत? २. ज्या योगानें आमचें काया, वाचा, मन तुझ्या पायांच्या ठिकाणीं राहील असें आम्ही करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुझें रूप चित्तामध्यें धरून आम्ही सर्व काळ तुझें गीत गाऊं ४. [३४४४]

देवा, तुम्हांला 'मला दर्शन द्या, मला मुक्त करा' असें बोलून काय दाखवावयाचें आहे? तुम्ही जाणत नाहीं काय? तुम्ही ज्या स्थितींत मला ठेवाल त्या स्थितींत मी राहीन १. माझें मन पांगळें झालें आहे. कांहीं उपाय सुचत नाहींत म्हणून तुमचे पाय जिवांत धरून राहिलों २. भोगदुःख कोणतें टाकावें व कोणतें ग्रहण करावें, ह्याबद्दल माझ्या जीवानें शंका घेतली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो विठ्ठला, आईची व बालकाची रानांत चुकामूक झाल्यावर आईची गांठ न पडली तर बालकास दुःख होतें (त्याप्रमाणें माझी स्थिति झाली आहे) ४. [३४४५]

तुमचें मला बोलावणें यावें अगर तुमचेकडून कांहीं निरोप यावा हीच मी वाट पाहात आहें. अहो देवा, मजविषयींची कळकळ तुमच्यामध्यें कां उत्पन्न होत नाहीं? १. अहो पांडुरंगा, पंढरीमध्यें वास्तव्य करणारे असे जे आम्ही त्या आमच्या ठिकाणीं आशा उत्पन्न करून तुम्हीं मला फसविलें २. मी जन्माला येऊन कोणता लाभ मिळविला ह्याविषयींचा विचार घटकोघटकीं चित्तामध्यें येत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, खऱ्या परमार्थलाभाची प्राप्ति नाहींच, पण जगानें माझा धिःक्कार करावा हाच काय तो हिशेब पदरीं पडला आहे ४. [३४४६]

अगा देवा, दीनापेक्षां दीन व कींवकाकुळती करणारा असें तूं मला कां केलें आहेस? तूं काय शक्तिहीन झालास असें तुला वाटतें? १. तुझा दास मी आहें असें म्हणण्याला माझें मन लज्जित होतें, कारण बोलल्याप्रमाणें त्यांत गोडी व रस नाहीं २. संत पूर्वी जें कांहीं बोलले त्या त्यांच्या शब्दाला तुम्हीं लज्जा आणलीत, ह्यावरून माझी वर सांगितल्या-प्रमाणें स्थिति कां झाली हें आपोआप समजून आलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो विठ्ठला, माझ्या वाचेसहि तुमच्या प्रसादाखेरीज इतर कोणीं बोलविलें काय? ४. [३४४७]

आग लागो ह्या माझ्या कर्माला! व्यर्थ मीं तुमच्या दाराशीं कटकट केली! तुमची कीर्ति जशी झाली आहे

धीर काय देऊं या मना । ऐसें नारायणा प्रेरिलें तें पाहिजे ॥ २ ॥ गुणवंत केलों दोष जाणायासाठीं । माझें माझें पोटीं बळकट दूषण ॥ ३ ॥ तुका म्हणे अहो केशीराजा दयाळा । बरवा हा लळा पाळियेला शेवटीं ॥ ४ ॥ [३४४८]

कामें नेलें चित्त नेदी अवलोकूं मुख । बहु वाटे दुःख फुटों पाहे हृदय ॥ १ ॥ कां गा सासुरवासी मज केलें भगवंता । आपुलिया सत्ता स्वाधीनता ते नाहीं ॥ २ ॥ प्रभातेसी वाटे तुमच्या यावें दर्शना । येथें न चले चोरी उरली राहे वासना ॥ ३ ॥ येथें अवघें वायां गेले दिसती सायास । तुका म्हणे नाश दिसे जालया वेंचाचा ॥ ४ ॥ [३४४९]

जळोत तीं येथें उपजविती अंतराय । सायासाची जोडी माझी तुमचे पाय ॥ १ ॥ आतां मज साह्य येथें करावें देवा । तुझी घेईं सेवा सकळ गोवा उगवूनी ॥ २ ॥ भोगें रोगा जोडोनिया दिलें आणिकां । अरुचि ते हो कां आतां सकळांपासूनी ॥ ३ ॥ तुका म्हणे असो तुझें तुझे मस्तकीं । नाहीं ये लौकिकीं आतां मज वर्तणें ॥ ४ ॥ [३४५०]

न सांगतां तुम्हां कळों येतें अंतर । विश्वीं विश्वंभर परिहारचि न लगे ॥ १ ॥ परि हे अनावर आवरितां आवडी । अवसान ते घडी पुरों एकीं देत नाहीं ॥ २ ॥ काय उणें मज येथें ठेविलिये ठायीं । पोटा आलों तईं पासूनियां समर्थे ॥ ३ ॥ तुका म्हणे अवघी आवरिली वासना । आतां नारायणा दुसरियापासूनी ॥ ४ ॥ [३४५१]

तुजसवें आम्ही अनुसरलों अबळा । नको अंगीं कळा राहों हरी हीन देऊं ॥ १ ॥ सासुरवासा भीतें (भीतो) जीव ओढे तुजपाशीं । आतां दोहीं विशीं लज्जा राखें आमुची ॥ २ ॥ न कळतां संग

त्याप्रमाणें ती माझ्या अनुभवास आली नाहीं १. अहो नारायणा, आतां येथून पुढें मी आपल्या मनाला कोणता धीर देऊं ह्याविषयीं आपण प्रेरणा केली पाहिजे २. मला दुसऱ्याचे दोष समजण्यासाठीं गुणवान् केलें व देह मी व देहसंबंधीं माझे हाच माझ्या हृदयांत दृढ दोष आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो दयालु केशवा राजा, माझे लाड तुम्हीं शेवटीं अशा प्रकारें चांगले पुरविलेत, हे तुमचे माझ्यावर मोठे उपकार झाले ४. [३४४८]

माझें चित्त विषयवासनेनें हरण केलें आहे, म्हणून ती तुमचें श्रीमुख पाहूं देत नाहीं, ह्याबद्दल हृदय दुःखानें फार फुटत आहे १. अगा भगवंता, तुम्हीं मला सासुरवासी (दुसऱ्याच्या स्वाधीन) कां केलें आहे? त्या योगानें आपल्या स्वाधीन कांहीं सत्ता राहिली नाहीं २. प्रातःकाळीं तुमच्या दर्शनास यावेंसें वाटतें. ह्या ठिकाणीं कांहीं चोरी करणें चालत नाहीं व वासना राहिली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, वासना नष्ट करण्याचे जेवढे कांहीं यत्न केले तेवढे सर्व कांहीं ह्या ठिकाणीं व्यर्थ गेलेसे भासत आहेत, म्हणून आजपर्यंत झालेल्या कालव्ययाचा (आयुष्याचा) नाश झालासा वाटतो ४. [३४४९]

मीं तुमच्या पायांचा लाभ मोठ्या कष्टानें करून घेतला आहे. आतां त्या ठिकाणीं अंतर जाणणारीं (काम, कर्म, अविद्या, बाह्य शत्रु व अंतःशत्रु) जीं कोणी आहेत तीं जळोत १. हे देवा, आतां तूं मला ह्या ठिकाणीं साह्य कर व ह्या सर्व प्रपंचाच्या गुंताड्यांतून माझी सुटका करून मजकडून तूं आपली सेवा घे २. प्रारब्धयोगानें अनेक प्रकारच्या भोगांनीं रोगांचा संबंध करून दिला. आतां सर्वांच्या ठिकाणीं अरुचि (वैराग्य) होवो ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आतां जें कांहीं तुझें आहे तें तुझ्या मस्तकीं असो. आतां मी त्या लोकांत वागणार नाहीं ४. [३४५०]

देवा, माझ्या अंतःकरणांतील कोणतीहि गोष्ट तुम्हांला न सांगतां कळते. सर्व विश्वांत व्यापलेले व विश्वाचे पालक असे तुम्ही आहांत म्हणून कोणतीहि हकीकत सांगावी लागत नाहीं १. पण तुमच्याविषयींची जी प्रीति आहे ती आंवरावयास गेलें तर अनावर होते. ती घटकाभर देखील आवरण्याचें अवसान शरीरांत नाहीं २. मजमध्यें कोणती उणीव आहे म्हणून मला तुम्हीं या ठिकाणीं ठेविलेंत? ज्या वेळेस मी तुमच्या पोटीं आलों त्या वेळेपासून मी समर्थ आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, दुसऱ्यापासून (तुमच्यावांचून इतर सर्वांपासून) आतां मी आपली सर्व वासना आंवरली आहे ४. [३४५१]

आम्ही बलहीन स्त्रिया तुझ्या ठिकाणीं अनन्य झालों आहोंत. अहो हरि, आमच्या अंगीं आतां हीनत्व राहूं देऊं नका १. सासुरवासांत (परतंत्रतेंत) राहाण्यास जीव भीत आहे, म्हणून तो तुझ्याकडे ओढ घेतो, आतां ह्या दोहोंविषयीं

झाला सहज खेळतां। प्रवर्तली चिंता मागिलाचि यावरी ॥ ३ ॥ तुका म्हणे असतां जैसें तैसें बरवें। वचन या भावें वेंचूनियां विनटलों ॥ ४ ॥ [३४५२]

: तुकोबांच्या अभंगांतील तुकोबांचें नांव काढून सालोमालो यांनीं आपलें नांव घातलें त्याबद्दल त्यांचा निषेध :

नाहीं घाटावें लागत। एका सितें कळे भात ॥ १ ॥ क्षीर निवडिते पाणी। चोंची हंसाचिये आणी ॥ २ ॥ आंगडें फाडुनि घोंगडें करी। अवकळा तये परी ॥ ३ ॥ तुका म्हणे कण। भुसीं निवडे कैसा सीण ॥ ४ ॥ [३४५३]

सालोमालो हरिचा दास। म्हणवून केला अवघा नास ॥ १ ॥ अवघें बचमंगळ केलें। म्हणती एकांचें आपुलें ॥ २ ॥ मोडूनी संतांचीं वचनें। करिती आपणा भूषणें ॥ ३ ॥ तुका म्हणे कवी। जगामधीं रूढी दावी ॥ ४ ॥ [३४५४]

जायाचे अळंकार। बुडवूनि होती च्रोर ॥ १ ॥ त्यांसी ताडणाची पूजा। योग घडे बर्‍या वोजा ॥ २ ॥ अभिलाषाच्या सुखें। अंतीं होती काळीं मुखें ॥ ३ ॥ तुका म्हणे चोरा। होय भूषण मातेरा ॥ ४ ॥ [३४५५]

कालवूनी विष। केला अमृताचा नास ॥ १ ॥ ऐशी अभाग्याची बुद्धि। सत्य लोपी नाहीं शुद्धि ॥ २ ॥ नाक कापुनि लावी सोनें। कोण अळंकार तेणें ॥ ३ ॥ तुका म्हणे बावी। मोडूनि मदार बांधावी ॥ ४ ॥ [३४५६]

कण भुसाच्या आधारें। पारि ते निवडितां बरे ॥ १ ॥ काय घोंघाणी पाधाणी। ताकामध्यें

तूं आमची लज्जा रक्षण कर २. सहज क्रीडा करण्यांत तुझी संगति न कळतां झाली. ह्यानंतर मागील मंडळींची (मागें असणाऱ्या आमच्या पति-पुत्रांची) चिंता उत्पन्न झाली ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां जसें चांगलें आहे तसें असणें हें बरें. मी अशा प्रकारचे शब्द भावानें बोलून तुमच्या चरणीं (प्रेमांत) रंगलों ४. [३४५२]

भात शिजला आहे किंवा नाहीं हें पाहाण्यासाठीं सगळा भात ढवळावा लागत नाहीं. एक शीत दाबून पाहिलें म्हणजे पुरे आहे १. राजहंसाच्या चोंचीच्या टोंकाचे योगानें दूध व पाणी हीं दोन्ही वेगळीं होतात २. अंगांतील अंगरखे फाडून जसें कोणीं घोंगडें करावें, त्याप्रमाणें प्रासादिक अभंगांतील कर्त्याचें नांव काढून आपलें नांव घालणें ही विटंबना होय ३. तुकाराम महाराज म्हणतात, भूस व कण (दाणे) हे वायूच्या योगानें निवडले जातात. (तसेंच संतांचें प्रासादिक काव्य कोणतें व सालोमालोचें कोणतें हें सुज्ञ माणसाच्या सहज लक्षांत येतें) ४. [३४५३]

सालोमालोंनीं आपण हरीचे दास आहोंत असें म्हणून सर्व नाश केला १. प्रासादिक वाणी व आपली एका ठिकाणीं करून सर्व बचमंगळ केलें (सर्व प्रकारें गोंधळ केला) आणि म्हणूं लागला, कीं हें सर्व कवित्व आमचें एकट्याचें आहे २. संतांच्या प्रासादिक कविता मोडून कांहीं त्यांचें व कांहीं आपलें असें मिसळून कित्येक आपण कविता केली असें जगतांत भूषण मिरवितात ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे कवि जगतामध्यें अशी रूढी निर्माण करतात ४. [३४५४]

कांहीं कार्याकरितां उसने मागून आणलेले अलंकार ज्याचे त्याला परत न देतां ते नाहींसे करून जे चोर बनतात १. त्यांना शिक्षा करणें हीच पूजा आहे, म्हणून त्यांना असा मार खाण्याचा चांगला व्यवस्थित योग येतो २. अभिलाषबुद्धीनें कांहीं काळ बरें झालें तरी अखेरीस तोंड काळें होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, लोकांकडून मार मिळून अशा चोराचा नाश करणें हेंच चोराला भूषण होय ४. [३४५५]

दुधांत विष कालवून ज्यानें दुधाचा नाश केला १. अशी दुर्दैव्याची बुद्धि असते. सत्य नाहींसें झाल्याची त्याला शुद्धिहि नसते २. स्वतःचें नाक कापून जी नथ घालते त्या अलंकाराची तिला काय शोभा आहे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें त्यांचें करणें म्हणजे मोठी बावडी मोडून मशीद बांधल्याप्रमाणें आहे (त्याप्रमाणें सालोमालोचें विपरीत करणें आहे) ४. [३४५६]

दाणे हे भुसकटाच्या संगतींत असतात, पण ते त्यापासून वेगळे करणें हेंच चांगलें १. ताकामध्यें लोणी कालविणें

घोटी (घाटी) लोणी ॥ २ ॥ सुइणीपुढें चेटा। काय लपविसी चाटा ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्ञान। दिमाकाची भनभन (दिमाखाची भणभण) ॥ ४ ॥ [३४५७]

विकाल (विकेल) तेथें विका। माती नांव ठेवूनि बुका ॥ १ ॥ हा तों निवाड्याचा ठाव। खऱ्या खोट्या निवडी भाव ॥ २ ॥ गऱ्हवारें हा विधि। पोट वाढविलें चिंधी ॥ ३ ॥ लावूं जाणे विल्हे ॥ तुका साच आणिक कल्हे ॥ ४ ॥ [३४५८]

विषयीं अद्वये। त्यासी आम्हां सिवों नये ॥ १ ॥ देव तेथूनि निराळा। असे निष्काम वेगळा ॥ २ ॥ वासनेची बुंथी। तेथें कैंची ब्रह्मस्थिती ॥ ३ ॥ तुका म्हणे असतां देहीं। तेथें नाहीं जमती (हा जमे ती तेथें नाहीं) ॥ ४ ॥ [३४५९]

नमितों या देवा। माझी एके ठायीं सेवा ॥ १ ॥ गुणअवगुण निवाडा। म्हैस म्हैस रेडा रेडा ॥ २ ॥ जनीं जनार्दन। साक्ष त्यासी लोटांगण ॥ ३ ॥ तुका म्हणे खडे। निवडूं दळणीं घडघडे ॥ ४ ॥ [३४६०]

: हिंदी पदें :

क्या गाऊं कोई सुननेवाला। देखें तो जब जग ही भुला ॥ १ ॥ खेलों आपनें रामहि सात। जैसी वैसी कर रहूं मात ॥ २ ॥ काहांसे लाऊं मधुर बानी। रीझे ऐसी लोक बिरानी ॥ ३ ॥ गिरिधर लाल तो भावका भुका। राग कला नहिं जानत तुका ॥ ४ ॥ [३४६१]

छोडे धन मंदिर बन बसाया। मांगत टुका घरघर खाया ॥ १ ॥ तीनसों हम करवों सलाम। ज्या मुख बैठा राजाराम ॥ २ ॥ तुलसीमाला बहुत चऱ्हावे। हरजीके गुण निर्मल गावे ॥ ३ ॥

हें मूर्ख स्त्रीचें नासधूस करण्याचें कृत्य आहे २. हे चावटे, सुइणीच्या पुढें इंद्रिय कसें लपवितां येईल ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, पोकळ ज्ञान हें रिकाम्या डौलाची भगभग आहे, पण खऱ्या ज्ञान्यापुढें त्याचें ज्ञान कशा प्रकारचें आहे तें उघड होतें ४. [३४५७]

मातीला बुका हें नांव ठेवून बुक्क्याच्या दरानें जेथें ती विकली जाईल तेथें ती विका, जा १. हें तर खऱ्या व खोट्या स्वरूपाची निवड होऊन निकाल लागण्याचें ठिकाण आहे २. पोटावर चिंध्या बांधून जिनें पोट वाढविलें व मी गरोदर आहें असा व्यवहार दाखविला ३. तुकाराम महाराज म्हणतात, खरें आणि खोटें ह्यांची व्यवस्था लावण्याचें मी जाणतों ४. [३४५८]

विषयांशीं जे एकरूप झाले आहेत त्यांनीं आम्हांला शिवूं नये १. देव निष्काम असल्यामुळें त्यापासून वेगळा आहे २. वासनेच्या गुंताड्यांत जे सांपडले आहेत तेथें ब्रह्मस्थिति कसली आहे ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, देहबुद्धीनें असल्यानें (ज्यांची देहाविषयीं ममत्वबुद्धि आहे ते) देवाच्या ठिकाणीं रुजू (मान्य) होत नाहींत ४. [३४५९]

मी ह्या देवाला नमन करतों. माझी एक ह्याच ठिकाणीं सेवा आहे १. म्हैस ती म्हैस व रेडा तो रेडा ह्या न्यायानें गुण व अवगुण ह्यांची निवड आहे २. परमार्थदृष्टीनें जगतामध्यें जनार्दन हा साक्षी आहे, त्याला मीं लोटांगण घातलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे दाणे दळावयाचे आहेत त्यांतील खडे निवडून काढूं, नाहीं तर दळणाच्या वेळीं ते खडे घडघडतील (त्याप्रमाणें मनुष्याच्या चांगल्या वाईट प्रवृत्तीवरून कोण चांगला, कोण वाईट, हें सहज निवडतां येतें) ४. [३४६०]

काय गावें ? कोणी ऐकणाराच नाहीं. जिकडे पाहावें तिकडे सर्व जग विषयाचे ठिकाणीं भुलून गेलें आहे १. आतां आत्मारामाबरोबर क्रीडा करूं व जसें येईल तसें त्याच्याशीं बोलत राहूं २. ज्यायोगेंकरून हे रजोगुणी लोक रिझतील असे सुस्वर शब्द कोठून आणूं ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, गोवर्धन पर्वताला धारण करणारा श्रीहरि तर शुद्ध भावाचा भुकेला आहे व मीहि रागज्ञान जाणत नाहीं ४. [३४६१]

आपलें घर व द्रव्य इत्यादिकांचा त्याग करून ज्यानें वनामध्यें वस्ती केली आहे व घरोघर खाण्याकरितां तुकडा मागत आहे १. ज्याच्या मुखामध्यें निरंतर राजारामाच्या नामाचीच बैठक झाली आहे, त्याला आम्ही नमस्कार करूं २. तुळशीची माळ ज्यानें गळ्यांत घालून अंगाला राख लाविली आहे व जो हरीचे गुण निर्मळ हृदयानें गातो

कहे तुका जो साई हमारा । हिरन श्यप जिन्हे मारहि डारा ॥ ४ ॥ [३४६२]

मंत्रतंत्र नहिं मानत साखी। प्रेमभाव नहिं अंतर राखी ॥ १ ॥ राम कहे त्याके पग हुं लागूं । देखत कपट अभिमान दुर भागूं ॥ २ ॥ अधिक याती कुल नहिं जानूं । जाने नारायण सो प्रानी मानूं ॥ ३ ॥ कहे तुका जीव न धन डारू वारी । राम उपासिहुं बलियारी ॥ ४ ॥ [३४६३]

चुराचुराकर माखन खाया । गौलनीका नंदकुमर कन्हैया ॥ १ ॥ काहे बराई दिखावत मोहि । जानतहूं प्रभुपना तेरा सब हि ॥ २ ॥ और बात सुन उखलसुं गला । बांधलिया आपना तूं गोपाला ॥ ३ ॥ फेरत बनबन गाऊ धरावत । कहे तुकयावंधु लकरी लेले हात ॥ ४ ॥ [३४६४]

हरिसूं मिल दे एकहि बेर । पाछें तूं फिर नावे घर ॥ १ ॥ मात सुनों दुति आवे मनावन । जाया करति भर जोवन ॥ २ ॥ हरिसुख मोहि कहिया न जाय । तब तूं बुझे आगो पाय ॥ ३ ॥ देखहि भाव कछु पकरी हात । मिलाई तुका प्रभुसात ॥ ४ ॥ [३४६५]

क्या कहूं नहिं बुझत लोका । लिजावे जम मारत धका ॥ १ ॥ क्या जीवनेकी पकडी आस । हातों लिया नहिं तेरा घांस ॥ २ ॥ किसे दिवाने कहता मेरा । कछु जावे तब तूं सब ल्या न्यारा ॥ ३ ॥ कहे तुका तूं भया दिवाना । आपना विचार कर ले जना ॥ ४ ॥ [३४६६]

कब मरुं पाउं चरन तुम्हारे । ठाकुर मेरे जीवन प्यारे ॥ १ ॥ जग डेरे ज्याकूं सो मोहि मीठा । मीठा दर आनंद साहि पैठा ॥ २ ॥ भला पाऊं जनम इन्हे बेर । बस (सब) मायाके असंग फेर ॥ ३ ॥ कहे तुका धन मानहि दारा । वोहि लिये गुंडलिया पसारा ॥ ४ ॥ [३४६७]

ह्याचा ध्रुवपदाशीं संबंध आहे) त्याला आम्ही नमस्कार करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हिरण्यकश्यपूला ज्यानें मारलें तो आमचा स्वामी आहे ४. [३४६२]

अंतःकरणांत श्रीहरीच्या प्रेमाचें जर रक्षण नसेल, तर मंत्र-तंत्रांची पत आमच्याजवळ नसून आम्ही ती मानीतहि नाहीं १. जो निरंतर रामभजन करील त्याच्या आम्ही पायां पडूं व ज्याच्या ठिकाणीं कपट आणि अभिमान आहे त्याला पाहातांच आम्ही दूर पळून जाऊं २. त्याची जात, कूळ हें विशेषतः कांहीं आम्ही जाणणार नाहीं. जो एक नारायणाला जाणील त्या प्राण्यालाच आम्ही जाणूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो समर्थ रामाची उपासना करतो त्याच्यावरून आम्ही जीव, तनु आणि धन हीं ओंवाळून टाकूं ४. [३४६३]

नंदाचा मुलगा कृष्ण हा चोरून गवळणीचें लोणी खातो १. मला कशाला बढाई दाखवितोस ? तुझा प्रभुपणा मी जाणत आहें; त्याचें तूं रक्षण कर २. हे गोपाळा, आणखी एक गोष्ट ऐकें. तूं आपला गळा उखळाला बांधून घेतलास ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हातामध्यें काठी घेऊन तूं रानारानांतून गाई वळवीत हिंडतोस ४. [३४६४]

एक वेळेस तूं आपलें चित्त हरिस्वरूपीं मिळवून दे, म्हणजे तुला जन्ममृत्युरूपी घराकडे यावें लागणार नाहीं १. ह्याविषयीं हकीकत ऐक. ज्या वेळेस यमदूत येतील त्या वेळीं तूं जरी ज्वानींत असलास तरी तुला ते जायबंदी करतील २. माझ्याच्यानें हरीचें सुख सांगवलें जात नाहीं. ज्या वेळेस तूं परमार्थाकडे पाऊल टाकतील त्या वेळीं तुला तें कळेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, प्रभु भक्तजनांचा शुद्ध भाव पाहून त्यांचा हात धरून आपल्याबरोबर केव्हां मिळवून घेईल (निर्गुणरूपाशीं एकरूप करील) हें पाहा ४. [३४६५]

काय सांगूं ! यम धक्के मारून नेईल हें लोकांना कांहीं समजत नाहीं १. हातामध्यें घेतलेला घांस मरण्यापूर्वी खात्रीनें तोंडांत घालीन, इतकी देखील सत्ता तुमच्या हातांत नसून आम्ही पुष्कळ जगूं अशी आशा कां धरली आहे ? २. हे वेड्या, तूं देह, स्त्रीपुत्रादि माझें असें कां म्हणतोस ? हें सर्व नाहींसें होईल. तूं ह्या सर्वांहून निराळा आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे तूं वेडा झाला आहेस. अहो लोक हो, तुम्ही आपल्याविषयीं विचार करा ४. [३४६६]

हे देवा, मी केव्हां मरेन व तुमच्या चरणाच्या ठिकाणीं केव्हां प्राप्त होईन इतके तुम्ही मला जीवापेक्षां प्रिय आहांत १. ज्या मरणाच्या संबंधानें जग दुःखी होतें तें मला गोड आहे. त्या गोडीचा इतका आदर आहे, कीं त्या योगानें मी आनंदांत स्थिर होतों २. ह्या योगानें आम्ही चांगल्या जन्माला जाऊं व मायेचे फेरे पुरे झाले म्हणून असंगपणानें राहूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, धन, मान व स्त्री हा सर्व पसारा मीं गुंडाळून टाकिला आहे ४. [३४६७]

दासों पाछें दौरे राम । सोवे खडा आपें मुकाम ॥ १ ॥ प्रेमरसडी बांधी गले । खैंच चले तब उधर चले ॥ २ ॥ आपने जनसुं भूल न देवे । कर हि धर आगे वाट बतावे ॥ ३ ॥ तुका प्रभु दीनदयाला । वारि रे तुज पर हूं गोपाला ॥ ४ ॥ [३४६८]

ऐसा कर घर आवे राम । और धंदा सब छोर हि काम ॥ १ ॥ इतने गोते काहे खाता । जब तूं आपना भूल न होता ॥ २ ॥ अंतरजामीं जानत साचा । मनका एक उपर बाचा ॥ ३ ॥ तुका प्रभु देस बिदेस । भरिया खाली नहि लेस ॥ ४ ॥ [३४६९]

मेरे रामका नाम जो लेवे बारोंबार । त्याके पाऊं मेरे तनकी पैंजार ॥ १ ॥ हांसत खेलत चालत बाट । खाना खाते सोते खाट ॥ २ ॥ जातनसुं मुजे कछु नहिं प्यार । असतके नहिं हिंदु धेड चंभार ॥ ३ ॥ ज्याका चित लगा मेरे रामको नाम । कहे तुका मेरा चित लगा त्याके पाव ॥ ४ ॥ [३४७०]

आप तरे त्याकी कोण बराई । औरनकुं भलो नाम धराई ॥ १ ॥ काहे भूमि इतना भार राखे । दुभत धेनु नहिं दुध चाखे ॥ २ ॥ बरसत मेघ फलतहि बिरखा । कोन काम आपनी उन्हो तिरखा ॥ ३ ॥ काहे चंदा सुरज खावे फेरा । खिन एक बैठण पावत घेरा ॥ ४ ॥ काहे परिस कंचन करे धातु । नहिं मोल तुटत पावत धातु ॥ ५ ॥ कहे तुका उपकार हि काज । सब कर रहिया रघुराज ॥ ६ ॥ [३४७१]

जग चले उस घाट को न जाय । नहिं समजत फिरफिर गोते खाय ॥ १ ॥ नहिं एक दो सब

राम हा दासांच्या मागें धांवतो व ते आपल्या मुक्कामावर जाऊन निजले, कीं त्या ठिकाणीं उभा राहातो १. दास प्रेमाची दोरी रामाचे गळ्यांत बांधून त्याला ओढीत चालवितात, त्या वेळेस तो तिकडे तोंड करून चालतो २. आपल्या दासांना तो परमार्थाचा रस्ता चुकूं देत नाहीं. असावधपणानें चुकूं लागले तर हात धरून त्यांना परमार्थाची नीट वाट दाखवितो ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या स्वामी प्रभो, तूं दीनदयाळ आहेस, म्हणून हे गोपाळा, तुझ्यावरून मी आपल्याला ओंवाळून टाकीन ४. [३४६८]

ज्यायोगेंकरून तुझा राम येईल असें कांहीं कर. बाकीच्या धंद्याविषयींची सर्व कामना टाकून दे १. जर तूं आपल्या स्वरूपाला विसरला नसतास तर अनेक जन्म-मृत्यूचे गोते कां आले असते? २. मनांत एक भाव व वाणींत दुसरा भाव, परंतु हे दोन्ही भाव लोकांना कळले नाहींत, तरी अंतर्यामीं असणारा जो परमात्मा तो सर्व कांहीं जाणतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा स्वामी प्रभु देशविदेशांतून भरला आहे. त्याच्यावांचून एक लेशमात्र स्थल रिकामें नाहीं ४. [३४६९]

माझ्या रामाचें नांव जो वेळोवेळीं घेईल त्याच्या पायांत मी आपल्या देहाचा जोडा करून घालीन १. हांसतांना, खेळतांना, पलंगावर निजतांना जो रामाचें नांव घेतो, तो मला प्रिय आहे २. मग तो कोणत्याहि जातीचा कां असेना? त्याच्या जातीची मला प्रीति नाहीं; तो धेड, चांभार, कोणत्याहि जातीचा का असेना? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचें चित्त माझ्या रामाच्या नांवाकडे लागलें आहे त्याच्या पायांच्या ठिकाणीं माझें चित्त जडलें आहे ४. [३४७०]

जो आपण स्वतः परमार्थ करून तरतो त्याचा काय एवढा मोठेपणा आहे? म्हणून अन्य जडजीवांना हरीचें नांव चांगलें घ्यावयास लावावें १. पृथ्वी अनेक भूतांचा भार वाहाते त्यांत तिचें काय कार्य आहे? गाय ही मालकाला दूध देते, त्यांतलें किंचितसुद्धां ती चाखीत नाहीं २. मेघ वृष्टि करितात, तिचें फळ मेघांना मिळतें काय? म्हणून काय त्यानें आपलें वृष्टि करण्याचें काम बंद ठेवलें आहे? ३. हे चंद्र व सूर्य अहोरात्र फिरतात व एक क्षणभरदेखील विसांवा घेत नाहींत (त्यांत त्यांचें काय कार्य आहे?) ४. परीस हा लोखंड ह्या धातूचें सोनें कां करतो? त्यानें लोखंडाचें सोनें केलें तरी त्याची किंमत कमी होत नाहीं व तो स्वतः धातुहि होत नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, दुसऱ्यावर उपकार करणें हें कार्य होय. तें सर्व राम करीत आहे. तेव्हां माणसानें देखील यथाशक्ति परोपकार करावा ६. [३४७१]

ज्या मार्गानें जग जात आहे त्या रस्त्यानें कोण जात नाहीं? परंतु त्याचा परिणाम काय होईल तें कोणी समजत

संसार। जो बुझे सो आगला स्वार ॥ २ ॥ उपर स्वार बैठे तृष्णापीठ । नहिं बाचे कोइ जाव लूट ॥ ३ ॥ देख हि डर फेर बैठा तुका । जोवत मारग राम हि एका ॥ ४ ॥ [३४७२]

भले रे भाई जिन्हें किया चीज। अछा नहिं मिलत बीज ॥ १ ॥ फीरत फीरत पाया सारा। मीटत लोले धनकि नारा ॥ २ ॥ तीरथ बरत फिर पाया जोग । नहिं तलमल तुटत भवरोग ॥ ३ ॥ कहे तुका मैं ताको दास । नहिं सिरभार चलावे पास ॥ ४ ॥ [३४७३]

लाल कंबली वोढे पेनाये । मोसु हरिथे कैसें बनाये ॥ १ ॥ कहे साखि तुम्हें करीते सोर। हिरदा हरिका कठिन कठोर ॥ २ ॥ नहिं क्रिया सरम कछु लाज। और सुनाउं बहुत हे भाज ॥ ३ ॥ और नामरूप नहिं गोवलिया । तुका प्रभु माखन खाया ॥ ४ ॥ [३४७४]

राम कहो जीवना फल सो ही । हरिभजनसुं विलंब न पाई ॥ १ ॥ कवनका मंदर कवनकी झोपरी। एक रामबिन सब हि फुकरी ॥ २ ॥ कवनकी काया कवनकी माया। एक रामबिन सब हि जाया ॥ ३ ॥ कहे तुका सबहि चलनार । एक रामबिन नहिं वो सार ॥ ४ ॥ [३४७५]

काहे भुला धनसंपत्ती घोरे । रामनाम सुन गाउ हो बाप रे ॥ १ ॥ राजे लोक सब कहे तूं आपना । जब काल नहिं पाया ठाना ॥ २ ॥ माया मिथ्या मनका सब धंदा। तजो अभिमान भजो गोविंदा ॥ ३ ॥ राना रंक डोंगरकी राई। कहे तुका करें हिलाई ॥ ४ ॥ [३४७६]

काहे रोवे आगले मरना। गंव्हार तू भूला आपना ॥ १ ॥ केते मालुम नहिं पडे। नन्हे बडे

नसल्यामुळें वारंवार जन्ममृत्यूचे गोते खातात १. असे एकदोन नाहींत. सर्व प्राणिमात्र असेच गोते खातात. जो हें जाणतो तो आघाडीचा स्वार होतो २. जे तृष्णेच्या आसनावर बसले आहेत त्यांतले कोणी वांचणार नाहींत, सर्व लुटले जाणार आहेत. ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा सर्व प्रकार पाहून मला भीति वाटली व मी जगाकडे पाठ फिरवून एकट्या रामाचाच मार्ग धरला ४. [३४७२]

अहो जन हो, ज्यांनीं आपल्या जन्माचें सार्थक केलें ते भले, कारण चांगलें बीज मिळत नाहीं १. अनेक योनींतून फिरत फिरत सारभूत असा नरदेह प्राप्त झाला. ज्या ठिकाणीं धनाची आणि स्त्रीची आसक्ति नाहींशी होते २. सर्वस्वाचा त्याग करून ज्यानें तीर्थव्रतें केलीं पण देहादि संसाररूपी रोगाची तळमळ नाहींशी झाली नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देह मी व देहसंबंधीं माझें ह्या भावनेचें ओझें जो आपलेबरोबर वागवीत नाहीं त्याचा मी दास आहें ४. [३४७३]

हे सखे, तूं मोठ्या थाटानें लाल शालू नेसून ओढणी पांघरून गेलीस खरी, परंतु हरीनें तुझीं वस्त्रें हरण करून तुला नग्न कसें केलें तें पाहा १. मैत्रीण म्हणते, तूं हरीशीं स्वैराचार करतेस पण हरीचें हृदय तुजविषयीं कठोर (कठिण) आहे २. हरीचें आचरण चांगलें नाहीं. त्याला लाज-लज्जा, भय नाहीं. आणखीहि तुला सांगतें, कीं त्याला पुष्कळ बायका आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, ती मैत्रीण आणखी सांगते, कीं इंद्रियांचें रक्षण करणाऱ्या हरीला नामरूप नाहीं. असा माझा प्रभु घरोघर चोरी करून लोणी खातो ४. [३४७४]

रामाचें भजन करणें हीच जगण्याची सफलता आहे, म्हणून हरिभजन करण्यास आळस करूं नकोस १. कोणाचें घर आणि कोणाची झोंपडी! एका रामावांचून सर्व फुकट आहे २. कोणाचा देह व कोणाची ममता! एका रामावांचून सर्व कांहीं नष्ट होणारें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व कांहीं नष्ट होणार आहे. एका नामावांचून कांहीं सार नाहीं ४. [३४७५]

भयंकर घातुक अशा धनसंपत्तीच्या ठिकाणीं तूं कां भुलून पडलास? अरे बापा, रामनाम गा व ऐक १. राजे आदिकरून लोक हे सर्व तूं माझे आहेत असें म्हणतोस, पण जोंपर्यंत काळ तुझे प्राण आकर्षण करण्यास प्राप्त झाला नाहीं तोंपर्यंत हें माझें आहे असें म्हणणें शोभतें, पण प्रसंगीं कोणी उपयोगीं पडत नाहीं २. देहादि प्रपंच ही खोटी माया सर्व मनाच्या कल्पनेची आहे, म्हणून त्याचा अभिमान टाक व देवाला भज ३. तुकाराम महाराज म्हणतात, राजाचा रंक व डोंगराची मोहरी होईल असा सर्वसमर्थ राम, त्याच्या प्राप्तीकरितां कांहीं तरी उपाय कर ४. [३४७६]

अरे मूर्खा, पुढचा मेल्याबद्दल तूं कां रडतोस? तूं आपल्यावर येणाऱ्या मृत्यूस विसरलास काय? १. किती तरी

गये सो ॥ २ ॥ बाप भाई लेखा नहिं। पाछे तू हि चलनार ॥ ३ ॥ काले बाल सोपत भये। खबर पकडो तुका कहे ॥ ४ ॥ [३४७७]

क्या मेरे राम कवन सुख सारा। कहकर दे पुछुं दास तुम्हारा ॥ १ ॥ तनजोबनकी कोन बराई। व्याधिपीडा दिस काटहि खाई ॥ २ ॥ कीर्त बधाऊं तो नाम न मेरा। काहे झुटा पछताऊं घेरा ॥ ३ ॥ कहे तुका नहिं समजत मात। तुम्हारे शरन हे जोडत हात ॥ ४ ॥ [३४७८]

देखत आखों झुटा कोरा। तो काहे छोरा घरबार ॥ १ ॥ मनसुं किया चाहिये पाख। उपर खाक पसारा ॥ २ ॥ कामक्रोधसो संसार। वो सिरभार चलावे ॥ ३ ॥ कहे तुका सो संन्यास। छोडे आस तनकी हि ॥ ४ ॥ [३४७९]

रामभजन सब सार मिठाई। हरि संताप जनमदुख राई ॥ १ ॥ दूतभात घृत सकरपारे। हरते भूक नहि अंत तारे ॥ २ ॥ खावते जुग सब चलि जावे। खटामिठा फिर पचतावे ॥ ३ ॥ कहे तुका रामरस जो पीवे। बहुरी(ही) फेरा वो कबहु न खावे ॥ ४ ॥ [३४८०]

बारबार काहे मरत अभागी। बहुरी मरनसे क्या तेरे भागी ॥ १ ॥ ये हि तन करते क्या ना होय। भजन भगति कर बैकुंठ जाय ॥ २ ॥ रामनाम मोल नहिं बेचे कबरि। वोहि सब माया छुरावत सगरी ॥ ३ ॥ कहे तुका मनसुं मिल राखो। रामरस जिव्हा नित चाखो ॥ ४ ॥ [३४८१]

हम (हूं) दास तीन्हके सुनाहो लोकां। रावण मार बिभीषण दिई लंका ॥ १ ॥ गोवरधन नखपर गोकुल राखा। बर्सन लागा जब मेंहुं फत्तरका ॥ २ ॥ वैकुंठनायक काल कौंसासुरका। दैत डुबाय

लहान मोठे मृत्यूच्या मुखीं गेले हें तुला ठाऊक नाहीं काय? २. बाप, भाऊ आदिकरून अनेक मेले; त्यांची मोजदादहि नाहीं. पश्चात् तूंहि मरणार ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे तुझे काळे केस पांढरे झाले, हें तुला माहीत असूं दे ४. [३४७७]

असें माझ्या रामावांचून सारभूत सुख संसारांत कोणतें आहे हें मला सांग, मग मी तुमचा दास होईन १. शरीराचे ठिकाणीं तारुण्याचा काय मोठेपणा आहे? कारण व्याधींचें दुःख त्याला क्षीण करून मारील २. कीर्ति करावयास जावें तर आपलें नांव कुठें आहे? ह्या खोट्याच्या (जन्म-मरणाच्या) फेऱ्यांत पडून पश्चात्ताप कां करून घ्यावा? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा प्रकार लोकांना समजत नाहीं. ह्याकरितां मी तुम्हांला हात जोडून शरण आहें ह्याचा तुम्ही विचार करा ४. [३४७८]

डोळ्यांदेखत तूं खोटा (ढोंगी) कोरा आहेस, तर घरव्यवहार कशाकरितां टाकलास? १. प्रथम मन शुद्ध केलें पाहिजे. तसें न करतां वरच्या बाजूनें राख लावणें हा सर्व पसारा आहे २. कामक्रोधवृत्तींस हृदयांत आश्रय देणें हाच संसार आहे. तूं मस्तकावर त्यांचें ओझें घेतलें आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यानें आपल्या देहाचा समूळ लोभ टाकला आहे तोच संन्यासी आहे ४. [३४७९]

रामाचें भजन करणें हें सगळ्या गोडाचें सार आहे. हें जन्मदुःख व त्रिविध ताप निःशेष नाहींसें करतें १. दूधभात, तूपसाखर सेवन करण्यानें भूकहि नाहींशी होत नाहीं व तें पुरवतहि नाहीं २. खाण्यांत सर्व युग निघून जातें. नंतर आंबट-गोडाच्या रुचीच्या मोहानें पश्चात्ताप होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, रामरसाचें ज्यानें सेवन केलें तो मोठ्या जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत केव्हांहि सांपडत नाहीं ४. [३४८०]

हे करंट्या, तूं वेळोवेळीं कां मरत आहेस? तुझ्या वांट्यास पुष्कळ मरणांची संख्या आली आहे १. ह्या मनुष्य-देहानें केलें तर काय होणार नाहीं? श्रीहरीच्या भक्तिभजनानें तो वैकुंठास जाऊं शकतो २. रामनामाचें चिंतन करण्याला एक कवडीसुद्धां किंमत द्यावी लागत नाहीं; त्यापासूनच ह्या सर्व मायेंतून सुटका होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, रामाच्या ठिकाणीं मन मिळवून ठेव व त्या रसासच जिव्हेनें नित्य चाख ४. [३४८१]

रावणाला मारून बिभीषणाला लंका ज्यानें दिली त्या रामाचा मी दास आहें असें सर्व लोकांना सांगतों १. ज्या वेळेस इंद्रानें शिळाधारांनीं पर्जन्यवृष्टि केली त्या वेळेस देवानें गोवर्धन पर्वत उचलून नखावर धरला व गोकुळाचें रक्षण केलें २. वैकुंठाचा स्वामी हा कंसासुराचा काळ असून त्याचें सर्व दैत्यसैन्य त्यानें मारून टाकलें; त्याला

सब मगाय गोपिका ॥ ३ ॥ स्तंभ फोड पेट चिरीया कश्यपका । प्रल्हादके लिये कहे भाई तुकयाका ॥ ४ ॥ [३४८२]

: दोहरे :

तुका बस्तर बिचारा क्या करो रे । अंतर (भगवान्) भगवा न होय । भीतर मैल कब मिटे रे । मरे उपर धोय ॥ १ ॥ राम राम कहे रे मन । औरसुं नहिं काज । बहुत उतारे पार । आगे राखे तुकाकी लाज ॥ २ ॥ लोभीके चित धन बैठे । कामिनी चित काम । माताके चित पुत बैठे । तुकाके मन राम ॥ ३ ॥ तुका पंखि बहिर न मानूं । वोई जनावर बाग । असंतनकुं संत न मानूं । जे वर्मकुं दाग ॥ ४ ॥ तुका राम बहुत मिठा रे । भर राखूं शरीर । तनकी करूं नावरि । उतारूं पैल तीर ॥ ५ ॥ संत (जन) पन्हयां ले खडा । राहूं ठाकुरद्वार । चलत पाछे हुं फिरों । रज उडत लेऊं सीर ॥ ६ ॥ तुका प्रभु बडो न मनूं न मानूं बडो । जिसपास बहु दाम । बलिहारि उस मुखकी । जिसते निकसे राम ॥ ७ ॥ राम कहे सो मुख भला रे । खाये खीर खांड । हरिबिन मुखमो धूल परे । क्या जनी उस रांड ॥ ८ ॥ राम कहे सो मुख भला रे । बिनरामसें बीख । अब न जानूं मते बेरों । जब काल लगावे सीख ॥ ९ ॥ कहे तुका मैं सवदा बेचूं । लेवेके तन हार । मिठा साधु संतजन रे । मुरखके सिर मार ॥ १० ॥ तुका दास तिनका रे । रामभजन निरास । क्या बिचारे पंडित करो रे । हात पसारे आस ॥ ११ ॥ तुका प्रीत रामसुं । तैसी मिठा राख । पतंग जाय दीपपरे । करे तनकी खाक ॥ १२ ॥ कहे तुका जग भुला रे । कह्या न मानत कोय । हात परे

सर्व गोपिकांनीं मागितलें (त्याच्या संगाची इच्छा केली) ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, प्रल्हादाकरितां नरसिंह रूप धारण करून तो खांब फोडून प्रगट झाला व त्यानें हिरण्यकश्यपूचें पोट फाडलें ४. [३४८२]

तुकाराम महाराज म्हणतात, जर अंतःकरण भगवें झालें नाहीं, तर बाह्य भगवें वस्त्र बिचारें काय करील ? वरच्या बाजूनें मरेतोंपर्यंत धुतलें तरी अंतःकरणांतील मळ नाहींसा कसा होईल ? १. अरे मना, तूं राम राम असें भजन कर. दुसऱ्याशीं कांहीं काम नाहीं. ह्या रामनामानें ह्या संसारांतून पुष्कळ लोक पार पडले. ह्याकरितां ह्यापुढें तूं माझी लज्जा रक्षण कर २. लोभ्याचें चित्त धनावर बसलेलें असतें किंवा विषयी मनुष्याच्या चित्तामध्यें जसा काम असतो, आईचें चित्त बालकाच्या ठिकाणीं असतें, तसें माझें मन रामाच्या ठिकाणीं बसेल असें कांहीं तूं कर ३. बहिरी ससाणा, ह्यास आम्ही इतर पक्ष्यांप्रमाणें मानणार नाहीं व वाघ हा इतर जनावरांप्रमाणें जनावर नाहीं, त्याप्रमाणें आम्ही असंतांना संत मानणार नाहीं. त्यांच्या वाईट वर्मास आम्ही डाग देऊं ४. राम हा फार गोड आहे, म्हणून सर्व शरीरांत भरून ठेवूं व देहाची नौका करून या भवनदींतून पार उतरून जाऊं ५. संतांच्या पादुका मस्तकावर घेऊन देवाच्या द्वारांत उभा राहीन. संत निघाले कीं त्यांच्यामागें मी फिरेन व त्यांच्या पायांची जी धूळ उडेल ती मी मस्तकावर घेईन ६. तुकाराम महाराज म्हणतात, मी राजाला मोठा मानणार नाहीं व ज्याच्यापाशीं पुष्कळ पैसा आहे त्यालाहि मी मोठा मानणार नाहीं. ज्याच्या मुखांतून रामनाम निघत आहे त्याचें मुख धन्य आहे व तो श्रेष्ठ आहे ७. जें मुख रामनामाचें चिंतन करीत आहे तें उत्तम आहे व तें चिंतन नव्हे तर दूधसाखरेचें सेवन आहे. ज्या मुखांत हरीचें चिंतन नाहीं त्या मुखांत माती पडली. त्या आईनें रांडेनें त्याला जन्म कशाला दिला ? ८. जें मुख रामचिंतन करीत आहे तें उत्तम आहे. रामचिंतन नसेल तर तें मुख विष होय. आपल्या मतानें आपल्यास मोठें समजूं नये, कारण ज्या वेळीं काळ शिक्षा करील त्या वेळेस आपल्यास कळून येईल ९. तुकाराम महाराज म्हणतात, मी सौदा विकीत आहें (परमार्थरूपी मालाची खरेदी – विक्री करीत आहें). जे कोणी हा माल घेतील त्यांची देहबुद्धि नाहींशी होईल. साधुसंत हे गोड आहेत व मूर्खांच्या डोक्यावर मार (त्याला परमार्थ आवडत नाहीं म्हणून काळाचा बडगा) बसेल १०. तुकाराम महाराज म्हणतात, जो निष्काम चित्तानें रामाचें भजन करतो, त्याचा मी सेवक आहें. मोठे पंडित जरी असले तरी त्या गरिबांचें काय करावयाचें आहे ? कां, तर ते आशेनें ज्याच्या त्याच्यापुढें हात पसरतात ११. तुकाराम महाराज म्हणतात, जसा पतंग हा प्रेमानें दिव्यावर उडी घालून आपल्या देहास जाळून टाकतो, तसें उत्तम प्रेम रामाच्या ठिकाणीं

जब कालके । मारत फोरत डोय ॥ १३ ॥ तुका सुरा नहिं सबद्का रे । जब कमाई न होय । चोट सांहे घनकी रे । हिरा नीबरे तोय ॥ १४ ॥ तुका सुर बहुत कहावे । लडत बिरला कोय । एक पावे ऊंच पदवी । एक खौंसां जोय ॥ १५ ॥ तुका मान्या पेटका । और न जाने कोय । जपता कछु रामनाम । हरिभगतनकी सोय ॥ १६ ॥ तुका सज्जन तिनसुं कहिये । जिथनी प्रेम दुनाये । दुर्जन तेरा मुख काला । थीता प्रेम घटाये ॥ १७ ॥ काफर सोही आपण बुझे । अल्ला दुनिया भर । कहे तुका तुम्ह सुनो रे भाई । हिरदा जिन्हका (जिन्होंका) कठोर ॥ १८ ॥ भीस्त न पावे मालथी । पढिया लोक रिझाय । निचा जथें कमतारिव सो ही फल खाय ॥ १९ ॥ फल पाया तो सुख भया । किन्होसूं न करे बेबाद् । बान न देखे मिरगी । चित मिलाया नाद् ॥ २० ॥ तुका दास रामका । मनमें एकहि भाव । तो न पालट आव । ये हि तन जाव ॥ २१ ॥ तुका रामसुं चित बांधा राखो । तैसा अपनी हात । धनु बछरा छोर जावे । प्रेम न छुटे सात ॥ २२ ॥ चितसुं चित्त जब मिले । तब तन थंडा होय । तुका मिलना जिन्होसुं । ऐसा बिरला कोये ॥ २३ ॥ चित मिले तो सब मिले । नहिं तो फुकट संग । पानी पाथर येक (ही) ठोर । कोरा न भिजे अंग ॥ २४ ॥ तुका मिलना तो भला । मनसुं मन मिल जाय । उपर उपर मट्टी घसनी । उनकि कोन बराय ॥ २५ ॥ तुका कुटुंब छोरे दो । लरके जोरों सिर मुंदाय (मुंडाय) । जब थे इच्छा नहिं मुई (मुंडी) । तब तूं किया काय

तूं ठेव १२. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व जग विषयाच्या संगतीनें भुलून गेलें आहे. किती सांगितलें तरी कोणी मानीत नाहीं. ज्या वेळेस त्याच्यावर काळाचा हात पडेल त्या वेळेस तो इतका मार खाईल, कीं त्या योगानें त्याचें डोकें फुटेल १३. तुकाराम महाराज म्हणतात, जे बोलण्यानें आपल्याला शूर मानतात, त्यांनीं जोंपर्यंत शूरत्व गाजविलें नाहीं तोंपर्यंत मी त्यांना मानीत नाहीं. घणाचे रट्टे सोसून न फुटतां जो टिकतो त्याची खऱ्या हिरेपणानें निवड होते १४. तुकाराम महाराज म्हणतात, तोंडानें आपणाला शूर म्हणविणारे पुष्कळ आहेत, पण खऱ्या प्रसंगीं धैर्य धरून शूरत्वानें युद्ध करणारे असे थोडे; म्हणून असे जे कोणी आहेत ते मोठे अधिकारी होतात; पण किती एक जोडा खाणारे अशा नीच पदवीचे राहातात १५. तुकाराम महाराज म्हणतात, मी पोटानें मारला गेलों आहें. दुसरें कांहीं जाणत नाहीं. त्यांतल्या त्यांत हरिभक्तांच्या संप्रदायानें मी कांहीं रामनामाचा जप करतों १६. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांच्या योगानें प्रेम वाढतें (दुप्पट होतें) त्यांस मी संत समजतों, व ज्यांच्यामुळें देवावर असलेलें प्रेम कमी होतें त्यांस दुर्जन, काळतोंडे असें मी म्हणतों १७. तुकाराम महाराज म्हणतात, अहो जन हो, तुम्ही ऐका. ज्याचें हृदय कठोर आहे, असा हरामी अल्ला अल्ला करीत लोकांना ताप देऊन पोट भरण्याचें समजतो १८. जे कोणी पढीक आहेत त्यांनीं आपल्या विद्यारूपी मालावर भरंवसा ठेवून लोकरंजन केलें, तर त्यांना परमार्थफळ प्राप्त होणार नाहीं व जे कोणी सर्व अभिमान टाकून आपल्याकडे कमीपण घेऊन नम्र झाले आहेत तेच खऱ्या परमार्थफलाचें सेवन करितात १९. जो परमार्थफलाचें सेवन करितो तो सुखी होतो व कोणाशीं वादविवाद करीत नाहीं. जसें व्याधाच्या गायनानें हरिणीचें चित्त वेधून गेलें, कीं व्याधानें मारावयास काढलेल्या बाणाकडे ती पाहातहि नाहीं २०. तुकाराम महाराज म्हणतात, मी रामाचा दास आहें व माझ्या मनांत त्याच्याविषयींचाच एकभाव आहे, तो हें शरीर पडलें तरी कधीं बदलणार नाहीं २१. तुकाराम महाराज म्हणतात, वत्साला टाकून गाय जरी वनांत गेली तरी तिचें वांसरावरील जें प्रेम आहे तें उठून तिच्याबरोबर जात नाहीं, तसें तुम्ही आपलें चित्त आपल्या हातानें रामाच्या ठिकाणीं बांधून ठेवा २२. तुकाराम महाराज म्हणतात, चित्ताला चित्त ज्या वेळेस मिळून जातें (उभयतांच्या चित्तांतले विचार एक होतात) त्या वेळेस देह शांत होतो, पण ज्याच्या चित्ताशीं आपलें चित्त मिळवावें असे योग्य सज्जन थोडकेच असतात २३. तुकाराम महाराज म्हणतात, चित्ताला चित्त मिळालें, कीं सर्व कांहीं मिळालेंच. नाहीं तर कोणाचीहि संगति करणें फुकट. जसें पाणी आणि दगड ह्या दोघांचा योग जरी झाला तरी त्या दगडाच्या आंतील एक भागसुद्धां भिजला जात नाहीं (जलसंगतीनें दगडाचे काठिण्यांत नरमाई येत नाहीं) २४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या संगतीनें प्रेमसुखाची दुप्पट होते, त्याची संगति करावी व ज्याच्या संगतीनें असलेलें प्रेम नाहींसें होतें, त्या दुर्जनाचें तोंड काळें आहे असें समजावें. जर मिळावयाचें असेल तर मनानें मनाशीं मिळून जावें हें चांगलें. वरवर एकाच्या शरीररूपी मातीला दुसऱ्याच्या शरीररूपी मातीनें कितीहि घांसलें तरी त्यांत मोठेपण कसलें ? २५. तुकाराम महाराज म्हणतात, बायका, पोरें इत्यादि सर्व कुटुंबाचा त्याग करून डोकें बोडून संन्यास

॥ २६ ॥ तुका इच्छा मिटाई तो । काहा करे जट खाक । मथीया गोला डारदिया तो । नहिं मिले फेरन ताक ॥ २७ ॥ ब्रीद मेरे साइंयाके । तुका चलावे पास । सुरा सो हि लरे हमसें । छोरे तनकी आस ॥ २८ ॥ कहे तुका भला भया । हम हुवा संतनका दास । क्या जानूं केते मरते । वो न मिटती मनकी आस ॥ २९ ॥ तुका और मिठाई क्या करूं रे । पाले विकारपिंड । राम कहावे सो भली रुखी । माखन खीर खांड ॥ ३० ॥ [३४८३]

: तुकोबांस त्यांच्या स्त्रीचें कठोर भाषण :

काय नेणों होता दावेदार मेला । वैर तो साधिला होऊनि गोहो ॥ १ ॥ किती सर्वकाळ सोसावें हें दुःख । किती लोकां मुख वांसूं तरी ॥ २ ॥ झवे आपुली आई काय माझें केलें । धड या विठ्ठलें संसाराचें ॥ ३ ॥ तुका म्हणे येती बाईले आसडे । फुंदोनियां रडे हांसे कांहीं ॥ ४ ॥ [३४८४]

गोणी आली घरा । दाणे खाऊ नेदी पोरां ॥ १ ॥ भरी लोकांची पांटोरी । मेला चोरटा खाणोरी ॥ २ ॥ खवळली पिसी । हाता झोंबे जैसी लांसी ॥ ३ ॥ तुका म्हणे खोटा । रांडे संचिताचा सांठा ॥ ४ ॥ [३४८५]

आतां पोरा काय खासी । गोहो झाला देवलसी ॥ १ ॥ डोचकें तिंबी घातल्या माळा । उदमाचा सांडी चाळा ॥ २ ॥ आपल्या पोटा केली थोर । आमचा नाहीं येसपार ॥ ३ ॥ हातीं टाळ तोंड वासी । गाय देउळीं देवापाशीं ॥ ४ ॥ आतां आम्ही करूं काय । न वसे घरीं राना जाय ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां धीरी । अजुनी नाहीं जालें तरी ॥ ६ ॥ [३४८६]

घेतला, पण जर अंतःकरणांतील इच्छा नाहींशी झाली नाहीं तर तूं काय केलेंस? २६. तुकाराम महाराज म्हणतात, अंतःकरणांतील इच्छा नाहींशी झाल्यावर जटा राखणें व राख लावणें हें काय करावयाचें आहे? तो संसारांत जरी असला तरी त्याहून अलिप्त आहे. जसें मंथन करून लोण्याचा गोळा काढून घेतल्यावर पुन्हां तो ताकामध्यें घातला तरी त्याच्याशीं अलिप्त असतो २७. तुकाराम महाराज म्हणतात, जो माझ्या स्वामीचें ब्रीद चालवितो (स्वामीची सेवा करतो व त्यांनीं सांगितलेल्या संप्रदायानें चालतो) त्याच्या जवळ मी असतों. जो कोणी वीर शूर असून देहाचा लोभ टाकतो तोच आमच्याशीं लढेल २८. तुकाराम महाराज म्हणतात, मी संतांचा दास झालों हें फार चांगलें झालें. माझ्या मनांतील आशा जर नाहींशी झाली नसती तर किती वेळ मरावें लागलें असतें हें कसें कळूं शकेल? २९. तुकाराम महाराज म्हणतात, बाकीच्या मिष्ट रसास काय करावयाचें आहे? त्यायोगेंकरून विकारी देहाचेंच रक्षण होईल. रामभजन करून कोरडी भाकरी खाणें हें लोणी, दूध, साखर खाल्ल्याप्रमाणें उत्तम होय ३०. [३४८३]

हा मेला काय पूर्वजन्मींचा दावेदार होता म्हणून ह्यानें नवरा होऊन माझें वैर साधलें कीं काय, हें कळत नाहीं १. सतत किती तरी दुःख सोसावें व लोकांच्या जवळ हें मला द्या व तें मला द्या म्हणून किती तरी तोंड वासावें? २. ह्यानें लग्न झाल्यापासून माझें काय चांगलें केलें व ह्या विठ्ठलानें माझ्या संसाराचें काय चांगलें केलें? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा ह्या दुःखानें बायकोला संतापाचे झटके येऊन स्फुंदस्फुंदून कांहीं रडते व हांसते ४. [३४८४]

घरीं दाण्यांची गोणी आली असतां पोरांना खाऊं देत नाहीं १. लोकांचीं पोटें भरतो असा हा मेला चोरटा खादाड आहे २. कोणा भिक्षेकऱ्याला धान्य वाढतांना एखाद्या वेडावल्यासारखी माझ्या हाताला झोंबते ३. तुकाराम महाराज म्हणतात, (आपल्या बायकोस) हे रांडे, तुझ्याजवळ असलेल्या संचिताचा (पापाचा) भाग खोटा आहे ४. [३४८५]

हे पोरा, आतां तूं काय खाशील? नवऱ्याला देवाचें वेड लागलें आहे १. त्यानें डोक्यापर्यंत माळा घातल्या आहेत व त्यानें उद्योगाचा नाद सोडला आहे २. आपल्या पोटापुरता आधार केला आहे. आमचेविषयीं कांहीं ईर्षा (काळजी) नाहीं [ती हद्दपार झाली] ३. देवळांत देवाजवळ जाऊन हातांत टाळ घेऊन तोंड वांसून गातो ४. आतां आम्हीं काय करावें? हा घरीं बसत नाहीं, रानांत जातो ५. तुकाराम महाराज म्हणतात, अजून मी नाहींशी झालें नाहीं, म्हणूनच आतांपर्यंत तरी धीर धरला ६. [३४८६]

बरें झालें गेलें । आजी अवघें मिळालें ॥ १ ॥ आतां खाईन पोटभरी । ओल्या कोरड्या भाकरी ॥ २ ॥ किती तरी तोंड । यांशीं वाजवूं मी रांड ॥ ३ ॥ तुका बाइले मानवला । छिथू करूनियां बोला ॥ ४ ॥ [३४८७]

मजचि भोंवता केला येणें जोग । काय याचा भोग अंतरला ॥ १ ॥ चालोनियां घरा सर्व सुखें येती । माझी तों फजीती चुकेचि ना ॥ २ ॥ कोणाची बाईल होऊनियां वोढूं । संवसारीं काढूं आपदा किती ॥ ३ ॥ काय तरी देऊं तोडतील पोरें । मरतीं तरी बरें होतें आतां ॥ ४ ॥ कांहीं नेदी वाचों धोवियेलें घर । सारवावया ढोरशेण नाहीं ॥ ५ ॥ तुका म्हणे रांड न करितां विचार । वाहूनियां भार कुंथे माथां ॥ ६ ॥ [३४८८]

निजों नेदी सकाळ वेळीं । रातीकाळीं चिनचिनी ॥ १ ॥ वेंगळानें घेतली पाठी । केली आटी जीवासीं ॥ २ ॥ मेळवूनी सर्वे जन । चिंता नेणें देवळींचे ॥ ३ ॥ तुका म्हणे आलों घरा । तोंडा घोरा बाइलेच्या ॥ ४ ॥ [३४८९]

न करवे धंदा । आइता तोंडीं पडे लोंदा ॥ १ ॥ उठितें तें कुटितें टाळ । अवघा मांडिला कोल्हाळ ॥ २ ॥ जिवंताचि मेले । लाजा वाटूनियां प्याले ॥ ३ ॥ संवसाराकडे । न पाहाती ओस पडे ॥ ४ ॥ तळमळती यांच्या रांडा । घालिती जीवा नांवें धोंडा ॥ ५ ॥ तुका म्हणे बरें झालें । घे गे बाइले लिहिलें ॥ ६ ॥ [३४९०]

कोण घरा येतें आमुच्या कशाला । काय ज्याचा त्याला नाहीं धंदा ॥ १ ॥ देवासाठीं झालें ब्रह्मांड सोइरें । कोंवळ्या उत्तरें काय वेंचे ॥ २ ॥ मानें पाचारितां नव्हे आराणूक । ऐसे येती लोक प्रीतीसाठीं ॥ ३ ॥ तुका म्हणे रांडे नावडे भूषण । कांतेलेंसें श्वान लागे पाठी ॥ ४ ॥ [३४९१]

पूर्वी गेले तें बरें झालें (नवरा रानांत निघून गेला, हें बरें झालें), आज सर्व अन्न आपणांस मिळालें १. आतां जवळ ज्या ओल्या कोरड्या भाकऱ्या आहेत त्या पोटभर खाईन २. मी रांड ह्या नवऱ्याशीं किती तरी तोंड वाजवूं ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, छीः थूः करून बोलण्याला मी बायकोला मानवलों (बायकोच्या बोलण्याचा विषय झालों) ४. [३४८७]

माझ्या भोंवतींच ह्याचा सर्व त्याग आला. ह्याच्या उपभोगांत काय कमी पडलें आहे ? १. सर्व सुखोपचार आयते घरीं चालून येतात, पण माझी मात्र फजिती चुकत नाहीं २. संसारांत मी किती आपदा सोसूं ? का कोणाची बायको म्हणून मी संसारांत ओढाओढ करूं ? ३. पोरें मला खाण्याकरितां ताप देतात. आतां हीं मरतील तरी बरें होईल ४. हा पति घरांत कांहींएक राहूं देत नाहीं. गुराचें शेणसुद्धां राहूं दिलें नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, ही रांड कांहीं विचार न करितां, मी सर्व कांहीं चालविणार आहें असा भार घेऊन कुंथत बसते ६. [३४८८]

हा सकाळ झाल्यावर निजूं देत नाहीं, रात्रीच्या वेळेस भजनाची कटकट करतो १. अशा ह्या वाईटानें माझी पाठ घेतली आहे व जीवाला काचणींत घातलें २. लोक आपल्याबरोबर जमवून देवळांतच भजन करीत राहातो, घरची कांहीं काळजी करीत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या बायकोच्या कठोर तोंडामुळें मी घरीं आलों (किंवा, देवळांतून किंवा रानांतून घरीं आल्याबरोबर बायकोच्या कठोर बोलण्याला तोंड द्यावें लागतें) ४. [३४८९]

कांहीं धंदा न करतां आयता खाणारा असा हा माझ्या गळ्यांत पडला आहे १. उठतात कीं टाळ कुटतात. सर्व कांहीं गोंगाट केला आहे २. हे जिवंत असून मेल्यासारखे आहेत आणि लाज तर वाटून प्याले आहेत ३. हे संसाराकडे पाहात नाहींत, त्या योगानें तो संसार ओस पडला आहे ४. ह्यांच्या बायका घरीं रडतात व जीव धोंड्यासारखा घट्ट करून बसल्या आहेत ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे बये, तुझा नवरा हरिभजनीं लागला, तुझा संसार ओस पडला, हें चांगलें झालें. जें तुझ्या कपाळीं लिहिलें होतें तें आतां भोग ६. [३४९०]

आमच्या घरीं कोण कशाला येतात ? ज्यांचा त्यांना उद्योग काय कमी आहे ? १. देवाकरितांच एक सर्व ब्रह्मांडाचा संबंध झाला आहे. त्याच्याशीं मधुर भाषण करण्यांत तुझें काय खर्च होतें ? २. ज्यांना मोठ्या सन्मानानें बोलाविलें तरी समाधान नसतें, असे लोक प्रीतीनें आपल्याकडे येतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, (आपल्या बायकोस) तुला संत-महात्मे घरीं आल्याचें भूषण कां आवडत नाहीं ? कातावलेल्या कुत्रीसारखी ज्याच्या त्याच्या अंगावर (माझ्यावर) कां निष्कारण भुंकतेस (रागावतेस) ? ४. [३४९१]

: तुकोबाचा स्त्रीस उपदेश :

पिकल्या शेताचा आम्हां देतो वांटा। चौधरी गोमटा पांडुरंग ॥ १ ॥ सत्तर टके बाकी उरली मागे तो हा। मागें झडले दाहा आजीवरी ॥ २ ॥ हांडा भांडीं गुरें दाखवीं ऐवज। माजघरीं बाजे बसलासे ॥ ३ ॥ मज यासी भांडतां जाब नेदी बळें। म्हणे एका वेळें घ्याल वांटा ॥ ४ ॥ तुका म्हणे स्त्रिये काय वो करावें। नेदितां लपावें काय कोठें ॥ ५ ॥ [३४९२]

करितां विचार अवघें एक राज्य। दुजा कोण मज पाठीं घाली ॥ १ ॥ कोण्या रीतीं जावें आम्ही वो पळोनी। मोकळे अंगणीं मागें पुढें ॥ २ ॥ काय तें गव्हाणें हिंडावीं वो किती। दूत ते लागती याचे पाठीं ॥ ३ ॥ कोठें याची करूं गेलों कुळवाडी। आतां हा न सोडी जीवें आम्हां ॥ ४ ॥ होऊनी बेबाख येथेंचि राहावें। देईल तें खावें तुका म्हणे ॥ ५ ॥ [३४९३]

नागवुनी एकें नागवींच केलीं। फिरोनियां आलीं नाहीं येथें ॥ १ ॥ भेणें सुती कोणी न घेती पालवी। करूनियां गोवी निसंतान ॥ २ ॥ एकें तीं गोंविलीं घेऊनी जमान। हांसतील जन लोक तयां ॥ ३ ॥ सरले तयांसी घालितो वैकुंठीं। न सोडी हे साटी जाली जीवें ॥ ४ ॥ तुका म्हणे जालों जाणोनी नेणतीं। सांपडलों हातीं याचे आम्हीं ॥ ५ ॥ [३४९४]

आतां तूं तयास होईं वो उदास। आरंभला नास माझ्या जीवा ॥ १ ॥ जरूर हें झालें तुज कां नावडे। उपाय रोकडे येती आतां ॥ २ ॥ बरें म्यां तुझिया जीवाचें तें काय। व्हावें तें हें पाहें विचारूनि ॥ ३ ॥ तुज मज तुटी नव्हे या विचारें। सहित लेंकुरें राहों सुखें ॥ ४ ॥

पांडुरंग हा आमचा चांगला अधिकारी आम्हांला देहरूपी शेतांत पिकलेल्या प्रारब्धकर्माचा भोगरूपी वांटा देतो १. पूर्वीपासून आजपर्यंत पंचविषय व पंचभूतें ह्यांची दहा टके बाकी ह्याची कमी झाली व ह्या व्यष्टिसमष्टींतील महाभूतादिकांची सत्तर टके बाकी राहिली आहे ती तो मागतो २. हृदयरूपी माजघरामध्यें अंतःकरणचतुष्टयाच्या बाजेवर बसून हांडा, भांडीं, गुरें इत्यादि ऐवज तुमच्याजवळ आहे असें दाखवितो; मी ह्याच्याशीं भांडावयाला लागलों असतां मला बळेंच जबाब देत नाहीं ३. असें जरी आहे तरी एखादे वेळेस रागानें असें म्हणतो कीं, आतां तुम्ही शेताचा वांटा घ्यालच? देह गेल्यानंतर ह्या संसारावर तुमची मालकी राहाणार नाहीं ४. तुकाराम महाराज (आपल्या कुटुंबाला) म्हणतात, कीं हे स्त्रिये, आतां काय करावें? ह्याची बाकी न देतां कोणत्या ठिकाणीं कसें लपावें? ५. [३४९२]

विचार करावयास गेलें तर सर्व एकाचें (पांडुरंगाचें) राज्य आहे, म्हणून मला दुसरा कोण पाठीला घालील? १. ह्या सर्व उघड्या मैदानांतून आम्हीं मागें अथवा पुढें कोणत्या रीतीनें पळून जावें? २. किती योनींतून हिंडलें तरी त्या ठिकाणीं याचे दूत पाठीमागें लागतात ३. (ह्या पांडुरंगाच्या देहरूपी शेतांत शुभाशुभ कर्मरूपी पीक काढण्याचा धंदा मीं कां बरें सुरु केला?) मी कां बरें ह्याच्याशीं व्यवहार करावयास गेलों? आतां हा आम्हांला जीवानेंदेखील सोडणार नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, (आपले बायकोस), ह्याचा सर्व निकाल करून ह्याच ठिकाणीं राहावें व तो जें देईल तें खावें ५. [३४९३]

कितीएकांचें ह्या पांडुरंगानें सर्वस्व हरण करून त्यांना उघडें केलें. ते फिरून ह्या संसारांत आले नाहींत १. ह्या भीतीनेंच त्याला (ह्या पांडुरंगाच्या भक्तीला) कोणी पदरांत घेत नाहीं, कारण तो सर्वांचें वाटोळें करून आपल्या स्वरूपाचा वेध लावतो २. कितीएकांचे जामीन (उद्धाराची हमी) घेऊन त्यांना गुंतविलें (आपल्या नादीं लाविलें). त्यांना लोक हंसूं लागले ३. ज्याचें ऋण फिटलें आहे त्यांना तो वैकुंठीं घालतो (नेतो). अशा प्रकारें जीव अर्पण झाला, कीं तो त्याला सोडीत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, हें सर्व आम्ही जाणून त्याच्या तडाख्यांत सांपडलों, ह्यामुळें आमचें संसाराकडे लक्ष नाहीं, ह्यांत नवल काय? ५. [३४९४]

ज्यानें माझ्या जीवाचा नाश आरंभिला आहे, त्याची आतां तूं आशा टाक (त्याविषयीं उदास हो, त्याची भक्ति करूं नकोस) १. पण ह्याचीच जरूरी आहे. तुला भक्ति कां आवडत नाहीं? आतां उघड उघड उपास होत आहेत २. बरें, ह्याच्यापुढें तुझ्या ह्या जीविताची किंमत काय आहे म्हणून त्याची प्राप्ति व्हावी? त्याचा तूं विचार करून पाहा ३. ह्या स्वरूपाचा विचार जर तूं करशील तर तुझ्या माझ्यांत कधींहि वियोग येणार नाहीं; सर्व मुलांसहवर्तमान आपण

तुका म्हणे तरी तुझा माझा संग । घडेल वियोग कधीं नव्हे ॥ ५ ॥ [३४९५]

काय करूं आतां माझिया संचिता । तेणें जीववित्ता साटी केली ॥ १ ॥ न म्हणावें कोणी माझें हें करणें । हुकूम तो येणें देवें केला ॥ २ ॥ करूनी मोकळा सोडिलों भिकारी । पुरविली तरी पाठी माझी ॥ ३ ॥ पाणिया भोंपळा जेवावया पानें । लाविली वो येणें देवें आम्हां ॥ ४ ॥ तुका म्हणे यासी नाहीं वो करुणा । आहे नागवणा ठावा मज ॥ ५ ॥ [३४९६]

नको धरूं आस व्हावें या बाळांस । निर्माण तें त्यांस त्यांचें आहे ॥ १ ॥ आपुला तूं गळा घेईं उगवूनी । चुकवीं जाचणी गर्भवास ॥ २ ॥ ऐवज देखोनी बांधितील गळा । म्हणोनी निराळा पळतसें ॥ ३ ॥ देखोनियां त्यांचा अवघड मार । कांपे थरथर जीव माझा ॥ ४ ॥ तुका म्हणे जरी आहे माझी चाड । तरी करीं वाड चित्त आतां ॥ ५ ॥ [३४९७]

भले लोक तुज बहु मानवती । वाढेल या कीर्ति जगामाजीं ॥ १ ॥ म्हणे मेलीं गुरें भांडीं नेलीं चोरें । नाहींत लेंकुरें झालीं मज ॥ २ ॥ आस निरसूनी कठिण हें मन । करीं वो समान वज्र तैसें ॥ ३ ॥ किंचित हें सुख टाकीं वो थुंकोनी । पावसील धणी परमानंद ॥ ४ ॥ तुका म्हणे थोर चुकती सायास । भवबंधपाश तुटोनियां ॥ ५ ॥ [३४९८]

ऐक हें सुख होईल दोघांसी । सोहळे हे ऋषि करिती देव ॥ १ ॥ जडितविमानें बैसविती मानें । गंधर्वांचें गाणें नामघोष ॥ २ ॥ संत महंत सिद्ध येतील सामोरे। सर्वसुखा पुरे कोड तेथें ॥ ३ ॥ आलिंगुनी लोळों त्यांच्या पायांवरी । जाऊं तेथवरी मायबापें ॥ ४ ॥ तुका म्हणे तया सुखा वर्णूं काय । जेव्हां बापमाय देखों डोळां ॥ ५ ॥ [३४९९]

सुखानें राहूं ४. तुकाराम महाराज म्हणतात, मग तुझी व माझी अशी संगति होईल, कीं त्यांत कधींहि वियोग होणार नाहीं ५. [३४९५]

आतां ह्या माझ्या प्रारब्धकर्माला काय करूं ? त्या देवानें माझा जीव हरण केला १. हें माझें कर्तृत्व असें कोणी म्हणूं नये. हा सर्व हुकूम देवानें केला आहे २. मला भिकारी करून मोकळें सोडलें आहे, तथापि ह्यानें माझी पाठ पुरविली आहे ३. पाणी प्यावयास भोंपळा व जेवणास झाडाचीं पानें अशा प्रकारें देवानें आमची सर्व सोय लाविली आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवाला दया नाहीं, हा सर्वस्व हरण करणारा आहे हें मला पूर्वीपासूनच ठाऊक होतें ५. [३४९६]

माझ्या मुलांना हें मिळावें, तें मिळावें, अशी आशा तूं धरूं नकोस. त्यांच्यापुरतें त्यांच्या प्रारब्धानें निर्माण केलें आहे १. ह्या सर्वांच्या मोहांतून तूं आपली सुटका करून घे आणि गर्भवासादिक दुःख नाहींसें कर २. आपल्याजवळ कांहीं संचय दिसल्यास टाळ्याला बांधतील (यमदूत माझा गळा बांधतील) असें जाणून मी सर्वांचा त्याग करून पळत आहें ३. त्या यमदूतांची ती अवघड शिक्षा पाहून माझा जीव थरथर कांपत आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, जर तुला माझी जरूर असेल तर तूं आपलें मन मोठें विचारी कर व धैर्य धर ५. [३४९७]

चांगल्या लोकांकडून तुला चांगला मान मिळेल व ह्या जगामध्यें तुझी चांगली कीर्ति वाढेल १. गुरें मेलीं, भांडीं चोरानें नेलीं व मला मुलें झालींच नाहींत असें समज २. सर्व आशा नाहींशी करून आपलें मन वज्राप्रमाणें कठोर, घट्ट कर ३. संसारांतील किंचित् वैषयिक सुख तूं थुंकून टाक; त्या योगानें परमानंदाची तृप्ति होईल ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या योगानें पुष्कळ क्लेश नाहींसे होऊन संसारपाश तुटले जातील ५. [३४९८]

अशा कृत्यानें दोघांनाहि सुख होईल. ऋषि व देव हेहि आपला सत्कार करतील, हें तूं ऐक १. रत्नजडित विमानामध्यें आपणाला मोठ्या मानानें बसवितील व गंधर्वांचें गाणें व नामघोष होईल २. संत, महंत, सिद्ध हे समोर येतील; त्या ठिकाणीं सर्व सुखाची इच्छा पूर्ण होते ३. आलिंगन देऊन त्यांच्या पायांवर लोळूं व जेथें आपले आईबाप आहेत तेथपर्यंत आपण जाऊं ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या वेळेस आपण आईबापांना (भगवान् श्रीविष्णु व लक्ष्मीदेवी ह्यांना) डोळ्यांनीं पाहूं त्या वेळीं होणाऱ्या सुखाचें वर्णन मी काय करूं ? ५. [३४९९]

देव पहावया करीं वो सायास । न करीं हे आस नाशिवंत ॥ १ ॥ दिन शुद्ध सोम सकळीं पातला । द्वादशी घडला पर्वकाळ ॥ २ ॥ द्विजां पाचारूनी शुद्ध करीं मन । देईं वो हें दान यथाविध ॥ ३ ॥ नको चिंता करूं वस्त्रा या पोटाची । माउली आमुची पांडुरंग ॥ ४ ॥ तुका म्हणे दुरी सांगतों पाल्हाळीं । परी तो जवळी आहे आम्हां ॥ ५ ॥ [३५००]

सुख हें नावडे आम्हां कोण्या बळें । नेणसी अंधळे जालीसी तूं ॥ १ ॥ भूक तान कैसी राहिली निश्चळ । खुंटले चपळ मन ठायीं ॥ २ ॥ द्रव्य जीवाहूनि आवडे या जना । आम्हांसी पाषाणाहूनी हीन ॥ ३ ॥ सोईरे सज्जन जन आणि वन । अवघें समान काय गुणें ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्हां जवळीच आहे । सुखदुःख साहे पांडुरंग ॥ ५ ॥ [३५०१]

गुरुकृपें मज बोलविलें देवें । होईल तें घ्यावें हित कांहीं ॥ १ ॥ सत्य देवें माझा केला अंगीकार । आणीक विचार नाहीं आतां ॥ २ ॥ होईं बळकट घालूनियां कांस । हाचि उपदेश तुज आतां ॥ ३ ॥ सडासंमार्जन तुळसीवृंदावन । अतीतपूजन ब्राह्मणांचें ॥ ४ ॥ वैष्णवांची दासी होईं सर्व भावें । मुखीं नाम घ्यावें विठोबाचें ॥ ५ ॥ पूर्ण बोध स्त्रीभ्रतारसंवाद । धन्य जिंहीं वाद आइकिला ॥ ६ ॥ तुका म्हणे आहे पांडुरंगकथा । तरेल जो चित्ता धरील कोणी ॥ ७ ॥ [३५०२]

: कवित्वाचा निषेध व त्याचा परिहार :

भूतबाधा आम्हां घरीं । हें तों आश्चर्य गा हरी ॥ १ ॥ जाला भक्तीचा कळस । आले वसतीस दोष ॥ २ ॥ जागरणाचें फळ । दिली जोडोनी तळमळ ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । आहाच कळों आली सेवा ॥ ४ ॥ [३५०३]

अगे, देव पाहाण्याविषयीं यत्न कर, नाशिवंत प्रपंचाची तूं आशा धरूं नकोस. शुद्ध सोमवाराचा दिवस उजाडला आहे व द्वादशी तीथ असून पर्वकाळाचाहि योग आहे २. ब्राह्मणांना बोलावून आण व आपलें मन शुद्ध करून जवळ कांहीं ऐवज आहे तो यथाविधि अर्पण कर ३. अन्नाची व वस्त्राची कांहीं काळजी करूं नकोस, कारण आमची आई पांडुरंग आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, रिकामा पाल्हाळ लावणारा, देव दूर आहे असें, सांगतो; मी प्रकृतीच्या पलीकडे फार दूर आहें, असें विस्तारानें वेदांत व गीतेंत भगवंतानें सांगितलें आहे, पण तो खरोखर आमच्याजवळ आहे ५. [३५००]

संसारसुख हें आम्हांला कोणाच्या बळानें आवडत नाहीं तें तूं आंधळी असल्यामुळें तुला कळत नाहीं १. हरिभजनाच्या आनंदांत माझी क्षुधा व तृषा हीं जागच्या जागींच निश्चळ कशीं झालीं आहेत व चंचल मन हें जागचे जागींच स्थिर कसें झालें आहे, ह्याचा नीट विचार कर २. ह्या लोकांना द्रव्य जीवापेक्षांहि जास्त आवडतें, तें द्रव्य आम्ही दगडापेक्षांहि वाईट मानतों ३. आपले आप्तसंबंधी सज्जन आणि लोक व अरण्य हें सर्व आम्हांला सारखें कशामुळें भासत आहे ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, पांडुरंग हा आमच्याजवळच असून तोच सुखदुःख सहन करतो ५. [३५०१]

गुरुदेवानें आपल्या कृपाप्रसादानें मला बोलाविलें म्हणून त्यांतील ज्या योगानें आपलें हित होईल तें ग्रहण करावें १. खरोखर देवानें माझा अंगीकार केला. ह्याविषयीं कांहीं अन्य विचार करावयास नको २. धैर्याचा कांसोटा घालून तूं बळकट हो. आतां तुला हाच उपदेश आहे ३. तुळसीवृंदावनाच्या ठिकाणीं सडासंमार्जन कर व जे कोणी अतिथि ब्राह्मण येतील त्यांचें पूजन कर ४. काया-वाचा-मनानें वैष्णवांची (विष्णुभक्त संतांची) दासी हो व विठोबाचें नाम मुखानें घे ५. अशा प्रकारच्या बायको व नवऱ्यामधील पूर्ण बोधाचा संवाद ज्यानें ऐकला तो धन्य होय ६. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या संवादांत पांडुरंगाची कथा आहे. ती जो कोणी चित्तांत धरील त्याचा उद्धार होईल ७. [३५०२]

अगा हरि, आमच्या घरीं भूताची बाधा हें आश्चर्य होय १. आतां माझ्या भक्तीचा शेवट झाला, कारण भक्तीनें तुझी प्राप्ति होण्याऐवजीं माझ्या ठिकाणीं अभिमानादि दोषांचें वास्तव्य झालें २. मला हरिजागरणानें मनाला तळमळ ह्या फळाची प्राप्ति करून दिली ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आमची सेवा पोकळ आहे असें समजून चुकलें ४. [३५०३]

नाहीं जों वेंचलों जिवाचिया त्यागें। तोंवरी वाउगें काय बोलों ॥ १ ॥ जाणवलें आतां करीं ये उद्देश। जोडी किंवा नाश तुमची जीवें ॥ २ ॥ ठायींचेंचि आलें होतें ऐसें मना। जावें ऐसें वना दृढ जालें ॥ ३ ॥ तुका म्हणे मग वेंचीन उत्तरें। उद्देशिलें खरें जाल्यावरी ॥ ४ ॥ [३५०४]

करूं कवित्व आतां काय नाहीं लाज। मज भक्तराज हांसतील ॥ १ ॥ आतां आला एका निवाड्याचा दिस। सत्याविण रस विरसला ॥ २ ॥ अनुभवाविण कोण करी पाप। रितेचि संकल्प लाजवावे (लाज लावी) ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां न धरवे धीर। नव्हे जीव स्थिर माझा मज ॥ ४ ॥ [३५०५]

नाहीं आइकत तुम्ही माझे बोल। कासया हें फोल उपणूं भूस ॥ १ ॥ येसी तें करीन बैसलिया ठायां। तूंचि बुझावया जवळी देवा ॥ २ ॥ करावे ते केले सकळ उपाय। आतां पाहों काय अझुनी वास ॥ ३ ॥ तुका म्हणे आला आशेसी शेवट। होऊनियां नीट पायां पडों ॥ ४ ॥ [३५०६]

नोहे तुम्हां जरी। येवढें कारण मुरारी ॥ १ ॥ मग जैसा तैसा काळ। दाट सारावा पातळ ॥ २ ॥ स्वामीचें तें सांडे। पुत्र होतां काळतोंडें ॥ ३ ॥ शब्दा नाहीं रुचि। मग कोठें तुका वेंची ॥ ४ ॥ [३५०७]

केल्यापुरती आळी। कांहीं होते टाळाटाळी ॥ १ ॥ सत्य संकल्पाचें फळ। होतां न दिसेचि बळ ॥ २ ॥ दळणाच्या ओंव्या। रित्या खऱ्या मापें घ्याव्या ॥ ३ ॥ जाती उखळें चाटूं। तुका म्हणे राज्य घाटूं ॥ ४ ॥ [३५०८]

पावावें संतोष। तुम्ही यासाठीं सायास ॥ १ ॥ करीं आवडी वचनें। पालटूनी क्षणक्षणें ॥ २ ॥

जोंपर्यंत सेवेकडे जीवानें अर्पण झालों नाहीं, तोंपर्यंत वावगें बोलूं नये १. आतां हें समजलें. तुम्हांस काकुळती येण्यांत मी आपल्या जीवाचा नाश करून घेईन २. मुळांतच आमच्या मनांत वनामध्यें जावें असें दृढ वाटलें होतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मीं मनामध्यें जें संकल्पिलें आहे त्याप्रमाणें खरोखर घडून आल्यावर मग मी देवाशीं बोलेन ४. [३५०४]

आतां तुझी प्राप्ति न होतां कवित्व करण्याविषयीं मला काय लज्जा नाहीं? कारण सगुण–निर्गुण साक्षात्कारी ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ ह्यांसारखे थोर थोर भक्तराज मला हांसतील १. आतां एक निकालाचा दिवस आला आहे. खऱ्या अनुभवावांचून केवळ साहित्यपूर्ण काव्याच्या रसाचा विरस आहे. २. अनुभवाखेरीज काव्य करण्याचें कोण पाप करील? पोकळ संकल्प लाजिरवाणे आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मला दम धरवत नाहीं व देवाचा अनुभव आल्यावांचून जीवहि स्थिर होत नाहीं ४. [३५०५]

तुम्ही माझें काव्यांतील बोलणें ऐकत नाहीं. मी फोलकट भूस उफणल्याप्रमाणें कशाला बडबड करूं? १. हे देवा, बसल्या ठिकाणीं ज्या उपायानें तूं माझ्याजवळ समजूत घालावयास येशील तो उपाय मी करीन २. आजपर्यंत जे उपाय करावयास पाहिजेत ते केले, आतां अजूनहि वाट पाहूं काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आशेची अखेर आली, म्हणून मी दंडवत् नीट होऊन तुमच्या पायां पडतों ४. [३५०६]

अहो मुरारि, जर माझें एवढें कार्य तुमच्यानें होत नाहीं १. मग दाट (चांगला) अथवा पातळ (वाईट) जसा काल येईल तसा घालवावा २. (राजाच्या) मुलाचें तोंड काळें होण्यांत पित्याचा (राजाचा) मोठेपणा कमी होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, शब्दाची रुचि (किंमत) नाहींशी झाल्यावर मग ते कशाला बोलावेत? (माझें बोलणें तुम्हांला आवडत नाहीं तर मग मीं अधिक कशाला बोलावें?) ४. [३५०७]

हट्ट घेतल्यापुरतें कांहीं तरी देऊन तुमच्याकडून माझ्या हिताची वारावारी (टाळाटाळी) होते १. सत्य संकल्पाचें फळ प्राप्त होईल असें माझ्या काव्यांत बळ दिसत नाहीं २. दळणाच्या वेळीं बाया ज्या ओंव्या म्हणतात त्या खऱ्या मापानें घेतां येतील काय? म्हणजे त्यांतील भावार्थ खरा आहे असें म्हणतां येईल काय? (त्या केवळ काल्पनिक होत.) ३. तुकाराम महाराज म्हणतात, जातीं, उखळें, लाकडाच्या पळ्या यांनीं राज्य घांटणें (राज्य मिळविण्याचा विचार) होईल काय? ४. [३५०८]

देवा, तुम्हीं संतुष्ट व्हावें म्हणून माझा काव्यरचनेचा सर्व यत्न आहे १. क्षणोक्षणीं निरनिराळीं तुम्हांला जीं प्रिय

द्यावें अभयदान । भूमीं न पडावें वचन ॥ ३ ॥ तुका म्हणे परस्परें । कांहीं वाढवीं उत्तरें ॥ ४ ॥ [३५०९]

बोलतां वचन असां पाठमोरे । मज भाव बरे कळों आले ॥ १ ॥ मागितलें नये अरुचीनें हातां । नाहीं वरी सत्ता आदराची ॥ २ ॥ समाधानासाठीं लाविलासे कान । चोरलें तें मन दिसतसां ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां तुमचेचि फंद । वरदळ छंद कळों येती ॥ ४ ॥ [३५१०]

कशासाठीं बैसों करूनियां हाट । वाउगा बोभाट डांगोरा हा ॥ १ ॥ काय आलें एका जिवाच्या उद्धारें । पावशी उच्चारें काय हो तें ॥ २ ॥ नेदी पट (पट्ट) परी अन्नें तो न मारी । आपुलिये थोरीसाठीं राजा ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां अव्हेरिलें तरी । मग कोण करी दुकान हा ॥ ४ ॥ [३५११]

माझा मज नाहीं । आला उबग तो कांहीं ॥ १ ॥ तुमच्या नामाचें जतन । नव्हतां थोर वाटे शीण ॥ २ ॥ न पडावी निंदा । कानीं स्वामींची गोविंदा ॥ ३ ॥ तुका म्हणे लाज । आम्हां स्वामींचें तें काज ॥ ४ ॥ [३५१२]

कांहीं मागणें हें आम्हां अनुचित। वडिलांची रीत जाणतसों ॥ १ ॥ देह तुच्छ झालें सकळ उपाधी । सेवेपाशीं बुद्धी राहिलीसे ॥ २ ॥ शब्द तो उपाधि अचळ निश्चळ । अनुभव हा काय नाहीं अंगीं ॥ ३ ॥ तुका म्हणे देह फांकिला विभागीं । उपकार अंगीं उरविला ॥ ४ ॥ [३५१३]

मागितल्यास पसरीं कर । पळतां भरी वाखती ॥ १ ॥ काय आम्ही नेणों वर्म । केला श्रम

तीं वचनें बोललों २. तुम्ही आम्हांला अभयदान द्या. आमचे शब्द भूमीवर पडल्यासारखे निरर्थक होऊं नयेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, परस्परांमध्यें कांहीं प्रेमाचें भाषण वाढवावें, अशी माझी इच्छा आहे ४. [३५०९]

आम्ही कांहीं शब्द बोलूं लागलों, कीं तुम्ही तिकडे पाठ करतां (लक्ष देत नाहीं) ह्यावरून तुमच्या मनांतील मजविषयींची भावना मला चांगली कळून आली १. जें मागितलें आहे तें तुम्हांला न आवडल्यामुळें व त्याविषयींचा आदरहि नसल्यामुळें तें आमच्या हस्तगत होत नाहीं २. माझें समाधान होण्याकरितां तुम्हीं माझ्या बोलण्याकडे नुसतें लक्ष लाविलें आहे; पण तुम्हीं आपलें मन चोरून ठेविलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हांला तुमचे वरकरणीचे छंद फंद (व्यवहार) कळतात ४. [३५१०]

तुम्हांला आवडत नसेल, तर मी एवढा काव्यरचनेचा बाजार भरवून 'तुम्ही असे आहांत' अशी वावगी आरडाओरड अगर प्रसिद्धि कशाकरितां करूं? १. एका जीवाचा उद्धार होण्याची काय विशेष किंमत आहे? फक्त तुझा नामोच्चार केला म्हणजे तूं प्राप्त होतोस. बाकीची कवित्वाची बडबड करण्यांत काय उपयोग आहे? २. राजानें आपल्या नावडत्या मुलास जरी पट्टाभिषेक केला नाहीं, तरी आपल्या नांवाकरितां तो त्याला उपाशी मरूं देत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां तुम्हीं जर माझा अव्हेर केला, तर मग हा काव्यरचनेच्या दुकानाचा पसारा कोण करतो? ४. [३५११]

माझा मला कांहीं त्रास झाला नाहीं (कंटाळा आला नाहीं), पण तुमच्या नामाचें तुमच्याकडून रक्षण होत नाहीं ह्याबद्दल मोठें वाईट वाटत आहे २. अहो गोविंदा, स्वामींची निंदा आमच्या कानीं येऊं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, स्वामींच्या कार्याची आम्हांला लज्जा आहे व आमची लज्जा राखणें हें स्वामींचें कार्य आहे ४. [३५१२]

कोणाजवळ कांहीं मागणें हें आम्हांला अयोग्य आहे, कारण आमच्या पूर्वींच्या श्रेष्ठ संतांची रीत आम्ही जाणत आहों १. देहासहवर्तमान सर्व उपाधि तुच्छ आहेत व आमची बुद्धि देवाच्या सेवेकडे राहिली आहे २. अचल, अक्रिय स्वरूपाच्याच ठिकाणीं शब्द ही उपाधि आहे, (किंवा, कांहीं तरी बोलत बसणें ही केवळ उपाधि आहे) हा अनुभव आमच्या अंगीं नाहीं काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, पंचभूतात्मक देहाचींच पंचमहाभूतें पंचमहाभूतांच्या ठिकाणीं वांटून मीं नाहींशीं केलीं व परोपकार तेवढा आपल्या अंगीं ठेविला ४. [३५१३]

हे देवा, जो तुझ्याजवळ कांहीं मागणारा आहे त्याच्यापुढेंच तुम्ही हात पसरतां व निराश होऊन पळणाराची (निष्काम भक्ताची) ओटी (पोटें) भरतां १. हा तुमचा प्रकार आम्हांला कळूं नये काय? पण आजपर्यंत न जाणूनच

नेणतां ॥ २ ॥ बोलतां बरें येतां रागा । कठीणा लागा मागेंमागें ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें बोली । असे चाली उफराटी ॥ ४ ॥ [३५१४]

असो तुझें तुजपाशीं । आम्हां त्याची काय चाड ॥ १ ॥ विरोधें कां कोंडूं मन । समाधान असोनी ॥ २ ॥ करावा तो उरे आट । खटपट वाढतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे येउनि रागा । कां मी विभागा मुकेन ॥ ४ ॥ [३५१५]

आहे तेंचि पुढें पाहीं । बरें आहों येथेंचि ॥ १ ॥ काय वाढवूनि काम । उगाच श्रम तृष्णेचा ॥ २ ॥ स्थिरावतां ओघीं बरें । चाली पुरें पडेना ॥ ३ ॥ तुका म्हणे वळितां मन । आम्हां क्षण न लगे ॥ ४ ॥ [३५१६]

सांगा दास नव्हे तुमचा मी कैसा । ऐसें पंढरीशा विचारूनी ॥ १ ॥ कोणासाठीं केली प्रपंचाची होळी । या पायां वेगळी मायबापा ॥ २ ॥ नसेल तो द्यावा सत्यत्वासी धीर । नये भाजूं हीर उफराटे ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां आहिक्य परत्रीं । नाहीं कुळगोत्रीं तुजविण ॥ ४ ॥ [३५१७]

अनन्यासी ठाव एक सर्व काजें (काज) । एकाविण दुजें नेणें चित्त ॥ १ ॥ न पुरतां आळी देशधडी व्हावें । हें काय बरवें दिसतसे ॥ २ ॥ लेंकराचा भार माउलीचे शिरीं । निढळ तें दुरी धरिलिया ॥ ३ ॥ तुका म्हणे किती घातली लांबणी । समर्थ होऊनी केवढयासाठीं ॥ ४ ॥ [३५१८]

स्तुति तरी काय करूं कोणापासीं । कीर्ति तरी कैसी वाखाणावी ॥ १ ॥ खोट्या तंव नाहीं अनुवादाचें काम । उरला तो भ्रम वरी बरा ॥ २ ॥ म्हणवावें त्याची खूण नाहीं हातीं । अवकळा

अवघड साधनांचे श्रम केले २. चांगलें (काव्यमय) बोलणारावर तुम्ही रागावतां व सर्व मोह ज्यानें टाकला आहे अशा जनाबाईसारख्या कठोर बोलणाऱ्या भक्तांच्या मागें तुम्ही लागतां ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या ठिकाणीं तुमची उलट्या पद्धतीची वागणूक आहे ४. [३५१४]

आतां तुझें करणें तुझ्याजवळ असो, आम्हांला त्याची काय जरूरी आहे ? १. माझ्या मनाला समाधान असतांना तुझ्याशीं विरोध करून मनाला कशाकरितां कोंडूं ? २. जों जों खटपट करावी तों तों खटपट वाढून श्रम मात्र पदरीं राहातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी तुझ्यावर रागावून मला मिळणाऱ्या आपल्या विभागाला (वांट्याला) कशाकरितां मुकूं ? ४. [३५१५]

ह्या ठिकाणीं (ह्या स्थितींतच) आम्ही राहों तें बरें. येथूनच आहे तो प्रकार पुढें पाहूं १. उगीच तृष्णेचें दुःख वाढविण्यांत काय अर्थ आहे ? २. ओघांतच स्थिर होणें हें चांगलें. वाहात जाणें हें कधींहि पुरें पडणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाचें मन वळविण्याला (किंवा, इच्छा आणि आशा ह्यांपासून मन परावृत्त करायला) आम्हांला एक क्षणहि लागणार नाहीं ४. [३५१६]

अहो पंढरीराया, मी तुमचा दास कसा नाहीं हें विचार करून सांगा १. अहो मायबापा, तुमच्या पायांखेरीज मीं दुसऱ्या कोणाकरितां ह्या संसाराची होळी केली बरें ? २. खऱ्याच्या ठिकाणीं (कोणतेंहि खरें काम करण्याविषयीं भक्ताचे ठिकाणीं) धीर नसल्यास तो आपण द्यावा. उलट बीं न उगवेल असा त्याचा नाश करूं नये, (भक्ताच्या मनांत असलेला उत्साह भंगूं देऊं नये) ३. तुकाराम महाराज म्हणतात, इहपरलोकीं आमच्या कुलगोत्रांत तुमच्यावांचून दुसरें कोणी नाहीं ४. [३५१७]

अनन्य झालेल्या भक्तांच्या सर्व कार्यांचें एकच ठिकाण आहे. त्यांचें चित्त एकावांचून दुसऱ्या कोणालाहि जाणत नाहीं १. त्यांची इच्छा पूर्ण न होतां त्यांनीं देशांतर करावें, हें काय देवा, चांगलें दिसतें ? २. बालकाचा सर्वस्व भार आईच्या मस्तकावर आहे, त्या बालकास आईनें जर दूर टाकलें तर तें निर्दैवी पोरकें होय ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तुम्ही समर्थ असून एवढ्याशा गोष्टीकरतां किती हो लांबण लावलीत ? ४. [३५१८]

देवा, तुमची स्तुति कोणापाशीं काय करावी व तुमची कीर्ति तरी कशी वर्णन करावी ? १. एखादा खोटा अनुवाद करणें (तुमचें खरें स्वरूप न कळतां उगाच कांहीं तरी खोटी स्तुति करणें) हें कांहीं उपयोगी नाहीं. त्यापेक्षां तुमच्या खऱ्या स्वरूपाविषयीं भ्रम राहिलेला बरा २. तुम्हांला पतितपावन म्हणावें तर त्याचा अनुभव आम्हांला नाहीं. आमची

फजिती सावकाश ॥ ३ ॥ तुका म्हणे हें गे तुमचें माझें तोंड। होऊनियां लंड आळवितों ॥ ४ ॥ [३५१९]

काहींच न लगे आदि अवसान । बहुत कठिण दिसतसां ॥ १ ॥ अवघ्याच माझ्या वेंचविल्या शक्ति । न चलेसी युक्ति झाली पुढें ॥ २ ॥ बोलिलें वचन हारपलें नभीं । उतरलों तों उभीं आहों तैसीं ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं न करावेंसें झालें । थकिताचि ठेलें चित्त उगें ॥ ४ ॥ [३५२०]

रूपीं गोवियेलें चित्त । पायीं राहिलें निश्चिंत ॥ १ ॥ तुम्ही देवा अवघेचि गोमटे । मुख देखतां दुःख न भेटे ॥ २ ॥ झाली इंद्रियां विश्रांति । भ्रमतां पीडित होती ॥ ३ ॥ तुका म्हणे भेटी । सुटली भवबंदाची गांठी ॥ ४ ॥ [३५२१]

: देवांनीं वह्या रक्षण केल्यावर अपराध झाल्याचे अभंग :

तूं कृपाळू माउली । आम्हां दीनांची साउली । न संवरीत आली । बाळवेशें जवळी ॥ १ ॥ माझें केलें समाधान । रूप गोजिरें सगुण । निववितें मन । आलिंगन देऊनी ॥ २ ॥ कृपा केली जना-हातीं । पायीं ठाव दिला संतीं । कळों नये चित्तीं । दुःख कैसें आहे तें ॥ ३ ॥ तुका म्हणे मी अन्यायी । क्षमा करीं वो माझे आई । आतां पुढें काई । तुज घालूं सांकडें ॥ ४ ॥ [३५२२]

थोर अन्याय केला । तुझा अंत म्यां पाहिला । जनाचिया बोला- । साठीं चित्त क्षोभविलें ॥ १ ॥ भागविलासी केला सीण । अधम मी यातीहीन । झांकूनी लोचन । दिवस तेरा राहिलों ॥ २ ॥ अवघें घालूनियां कोडें । तानभुकेचें सांकडें । योगक्षेम पुढें । तुज करणें लागलें ॥ ३ ॥ उदकीं राखिले कागद । चुकविला जनवाद । तुका म्हणे ब्रीद । साच केलें आपुलें ॥ ४ ॥ [३५२३]

विटंबना, फजिती स्वस्थपणानें सारखी चालली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी निलाजरा होऊन माझें तोंड तुमचें वर्णन करीत आहे ४. [३५१९]

आरंभापासून अखेरपर्यंत कांहींच आशा वाटत नाहीं. तुम्ही फार कठिण हृदयाचे दिसत आहांत १. माझ्या सर्व शक्ति तुम्हीं नाहींशा केल्या. तुमच्यापुढें माझी युक्ति चालत नाहींशी झाली आहे २. आजवर मी जे शब्द बोललों ते आकाशांत नाहींसे होऊन आम्ही मात्र तुमच्यापुढें जशाचे तसे उभे आहों ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां कांहीं करावेंसें वाटत नाहीं. तुमचा प्रकार पाहून माझें चित्त चकित होऊन उगीच बसलें (तुमच्या प्राप्तीकरितां ह्यापुढें कोणताच उपाय करूं नये, असें वाटतें) ४. [३५२०]

तुमच्या रूपाच्या ठिकाणीं माझें चित्त गुंतलें आहे, म्हणून तें तुमच्या पायांच्या ठिकाणीं निश्चिंत राहिलें आहे १. अहो देवा, तुम्ही सर्व चांगले आहांत. म्हणून तुमचें मुख पाहिल्यानें दुःखदर्शन होत नाहीं २. अनेक विषयांच्या ठिकाणीं भ्रमण करून श्रमलेल्या इंद्रियांस तुमच्या ठिकाणीं विश्रांति मिळाली ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमची भेट झाल्यानें संसारबंधनाची गांठ सुटली ४. [३५२१]

हे देवा, तूं कृपाळु आई असून आम्हां दीन जीवांची छाया आहेस, म्हणून त्वरेनें बाळवेषानें आमच्या जवळ तूं आलीस १. गोजिरें सगुण रूप दाखवून तूं आमचें समाधान केलेंस व आलिंगन देऊन मन शांत केलेंस २. लोकांकडून कृपा करविलीस व संतांनींहि आपल्या पायीं आश्रय दिला; आतां दुःख कसलें आहे हें चित्ताला वाटतसुद्धां नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, माझे आई, मी अन्यायी आहें. आतां तूं क्षमा कर. येथून पुढें आम्ही तुझ्यावर कोणतेंहि संकट कशाकरितां घालूं ? ४. [३५२२]

हे देवा, तुझ्यावर संकट घालून जो मीं तुझा अंत पाहिला (तुझें सत्त्व पाहिलें) हा मोठा अन्याय केला. ह्यानें संसारहि बुडविला आणि एवढे श्रम करून लिहिलेल्या अभंगांच्या वह्याहि बुडविल्या, अशा लोकांच्या बोलण्यानें चित्तवृत्ति उद्विग्न केली १. मीं कष्ट घेऊन तुला श्रमविलें. मी हीन जातीचा अधम आहें, म्हणून डोळे झांकून घेऊन इंद्रायणीच्या कांठीं उपाशीं राहिलों २. तहानभुकेचें सर्व संकट तुझ्यावर घातल्यामुळें तुला आमचा योगक्षेम चालविणें भाग पडलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्या वह्या पाण्यांत रक्षण करून तूं जनापवाद दूर केलास व आपलें दीनवत्सल हें ब्रीद सांभाळलेंस ४. [३५२३]

काचो कोणी माझी मान । सुखें पीडोत दुर्जन । तुज होय सीण । तें मी न करीं सर्वथा ॥ १ ॥ चुकी झाली एकवेळा । मजपासूनी चांडाळा । उभें करोनियां जळा- । माजी वह्या राखिल्या ॥ २ ॥ नाहीं केला हा विचार । माझा कोण अधिकार । समर्थासी भार । न कळे कैसा घालावा ॥ ३ ॥ गेलें होऊनियां मागें । नये बोलों तें वाउगें । पुढिलिया प्रसंगें । तुका म्हणे जाणावें ॥ ४ ॥ [३५२४]

काय जाणें मी पामर । पांडुरंगा तुझा पार । धरिलीया धीर । काय एक न करिसी ॥ १ ॥ उतावीळ जालों आधीं । मतिमंद हीनबुद्धि । परि तूं कृपानिधि । नाहीं केला अव्हेर ॥ २ ॥ तूं देवांचाही देव । अवघ्या ब्रह्मांडाचा जीव । आम्हां दासां कींव । कां भाकणें लागली ॥ ३ ॥ तुका म्हणे विश्वंभरा । मी तों पतितचि खरा । अन्याय दुसरा । दारीं धरणें बैसलों ॥ ४ ॥ [३५२५]

न्हती आली सिसा सुरी । अथवा घाव पाठीवरी । तो म्यां केला हरी । एवढा तुम्हां आकांत ॥ १ ॥ वांटिलासी दोहीं ठायीं । मजपाशीं आणि डोहीं । लागों दिला नाहीं । येथें तेथें आघात ॥ २ ॥ जीव घेती मायबापें । थोड्या अन्यायाच्या कोपें । हें तों नव्हे सोपें । साहों त्वांचि जाणितलें ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपावंता । तुज ऐसा नाहीं दाता । काय वाणूं आतां । वाणी माझी कुंठली ॥ ४ ॥ [३५२६]

तूं माउलीहून मायाळ । चंद्राहूनी शीतळ । पाणियाहूनी पातळ । कल्लोळ प्रेमाचा ॥ १ ॥ देऊं काशाची उपमा । दुजी तुज पुरुषोत्तमा । ओंवाळूनि नामा । तुझ्या वरूनि टांकिलों ॥ २ ॥ तुवां केलें रे अमृता । गोड त्याही तूं परता । पांचां तत्वांचा जनिता । सकळ सत्तानायक ॥ ३ ॥ कांहीं न बोलोनी आतां । उगाच चरणीं ठेवितों माथा । तुका म्हणे पंढरीनाथा । क्षमा करीं अपराध ॥ ४ ॥ [३५२७]

माझी कोणी मान कापोत अथवा हे दुष्ट लोक मला कितीहि पीडा करोत, पण ज्या योगानें तुला पीडा होईल असें मी सर्वथैव करणार नाहीं १. तुला पाण्यांत उभें करून वह्या रक्षण करावयास लावल्या, ही मज चांडाळाकडून एक वेळ चुकी झाली २. माझा अधिकार कोणता व समर्थ देवावर ओझें कसें घालावें ह्याचा विचार न केल्यामुळें मला तें समजलें नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें पूर्वी होऊन गेलें, तें वावगें कशाला बोलावें ? आतां मात्र पुढच्या प्रसंगीं समजून सावध राहावें ४. [३५२४]

हे पांडुरंगा, मी पामर तुझा महिमा कसा समजेन ? दम धरल्यास तूं काय करणार नाहींस ? १. मी बुद्धिहीन मतिमंद आधींच उतावळा झालों, पण देवा, तूं कृपानिधि असल्यामुळें आमची उपेक्षा केली नाहींस २. तूं सर्व देवांचाहि देव असून यच्चयावत् जगताचा जीव आहेस, असें असून आम्हां सेवकांना कींवकाकुळती येण्याचें काय कारण आहे ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे विश्वपोषका, मी खरोखर मूळचा पातकी पतित आहें आणि त्यामध्यें तुझ्या दाराशीं धरणें घेऊन बसलों हा दुसरा अपराध केला ४. [३५२५]

अहो हरि, माझ्या मानेवर सुरी आली नव्हती किंवा कोणी पाठीवर घावहि मारीत नव्हतें. कीं मी तुमच्याजवळ एवढा आकांत करावा ! १. देवा, तुला वह्यांचें रक्षण करण्याकरितां डोहांत राहावें लागलें व माझें रक्षण करण्याकरितां मजजवळहि राहावें लागलें. अशा प्रकारें तुम्ही दोन्ही ठिकाणीं वांटले जाऊन ह्या ठिकाणीं व त्या ठिकाणीं कांहीं घात होऊं दिला नाहीं २. लेंकराकडून जर थोडा अपराध झाला तर त्याचे प्राकृत आईबाप त्याला रागावून जीव जाईतोंपर्यंत मारतात, परंतु माझा अपराध थोडा नसूनसुद्धां तुम्हीं तो सहन केलात. हें तुमच्यावांचून कोणी साहणार नाहीं असें मी जाणत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो कृपावंता, तुमच्याप्रमाणें दाता कोणी त्रिभुवनांत नाहीं. तें मीं काय वर्णन करावें ? आतां माझी वाचा कुंठित झाली ४. [३५२६]

हे देवा, तुझी माया (प्रीति) आईपेक्षां जास्त असून पाण्यापेक्षां पातळ व चंद्राहून शीतळ आहे आणि तूं प्रेमाचा डोह आहेस १. हे पुरुषोत्तमा, तुला दुसऱ्या कोणाची उपमा द्यावी ? तुझ्या नांवावरून मी आपला देह ओंवाळून टाकीन २. त्वां जें अमृत निर्माण केलेंस, त्याच्याहिपेक्षां तूं गोड आहेस आणि पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश हीं पंचतत्त्वें तुझ्यापासून निर्माण झालीं, असा तूं सर्वसत्ताधीश आहेस ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा, आतां मी मौनपणानें तुझ्या पायांवर उगीच मस्तक ठेवितों. माझे सर्व अपराध तूं क्षमा करावेस ४. [३५२७]

मी अवगुणी अन्यायी । किती म्हणोन सांगों काई । आतां मज पायीं । ठाव देईं विठ्ठले ॥ १ ॥ पुरे पुरे हा संसार । कर्म बळिवंत दुस्तर । राहों नेदी स्थिर । एके ठायीं निश्चळ ॥ २ ॥ अनेक बुद्धीचे तरंग । क्षणक्षणां पालटती रंग । धरूं जातां संग । तंव तो होतो बाधक ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां । तोडीं माझी अवघी चिंता । येऊनियां पंढरीनाथा । वास करीं हृदयीं ॥ ४ ॥ [३५२८]

: पंढरीरायास पत्र पाठविलें ते अभंग :

कोणा मुखें ऐसी ऐकेन मी मात । चाल तुज पंढरीनाथ बोलावितो ॥ १ ॥ मग मी न धरीं आस मागील बोभाट । वेगीं धरिन वाट माहेराची ॥ २ ॥ निलाजिरें चित्त करितें तळमळ । केधवां देखती मूळ आलें डोळे ॥ ३ ॥ तुका म्हणे कई भाग्याची उजरी । होईल पंढरी देखावया ॥ ४ ॥ [३५२९]

कां माझा विसर पडिला मायबापा । सांडियेली कृपा कोण्या गुणें ॥ १ ॥ कैसा कंठुनियां राहों संवसार । काय एक धीर देऊं मना ॥ २ ॥ नाहीं निरोपाची पावली वारता । करावी ते चिंता ऐसीं कांहीं (कां ही) ॥ ३ ॥ तुका म्हणे एक वेंचूनी वचन । नाहीं समाधान केलें माझें ॥ ४ ॥ [३५३०]

कांहीं माझे कळों आले गुण दोष । म्हणऊनी उदास धरिलें ऐसें ॥ १ ॥ नाहीं तरी येथें न घडे अनुचित । नाहीं ऐसी रीत तया घरीं ॥ २ ॥ कळावें तें मना आपुलिया सवें । ठायींच हें घ्यावें विचारूनी ॥ ३ ॥ तुका म्हणे मज अव्हेरिलें देवें । माझिया कर्तव्यें बुद्धीचिया ॥ ४ ॥ [३५३१]

नव्हे धीर कांहीं पाठवूं निरोप । आला तरी कोप येऊं सुखें ॥ १ ॥ कोपोनियां तरी देईल उत्तर । जैसें तैसें पर फिरावूनी ॥ २ ॥ नाहीं तया तरी काय एक पोर । मज तों माहेर आणीक नाहीं ॥ ३ ॥

हे विठाबाई आई, मी अवगुणी असून बहुत अपराधी आहें; पण तो किती हें सांगतां येत नाहीं, आतां मला तुझ्या पायांच्या ठिकाणीं आश्रय दे १. जन्ममृत्युरूपी संसार आतां भोगावयास नको, कारण संचित कर्म हें मोठें भयंकर आहे. तें मला एका ठिकाणीं क्षणभरदेखील विसांवा घेऊं देत नाहीं २. माझ्या बुद्धीच्या ठिकाणीं अगणित बुडबुडे उत्पन्न होऊन घटकेघटकेला रंग पालटला जातो; आणि दुसऱ्या कोणाचा संग धरावा तर त्या संगतीनें बुद्धि पालटून ती बद्धतेला कारण होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा, आतां माझ्या ठिकाणची सर्व काळजी दूर करून तुम्हीं माझ्या हृदयांत वास्तव्य करावें ४. [३५२८]

पंढरीनाथ तुला बोलावितो आहे, तूं चल, अशी गोष्ट कोणाच्या मुखानें मी ऐकेन काय ? १. असें ऐकल्यावर मग मी मागील प्रपंचाचा बोभाट कांहीं न सांगतां मोठ्या त्वरेनें पंढरी माहेराची वाट चालेन २. माझें चित्त लाज टाकून तळमळ करीत आहे, आतां मला न्यावयास पंढरीहून मूळ (बोलावणें, आमंत्रण, निरोप) आल्याचें कधीं माझ्या दृष्टीस पडेल ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, पंढरी पाहाण्यासारखें माझें भाग्य कधीं उदयास येईल ? ४. [३५२९]

हे आईबापा, माझा विसर तुम्हांला कां पडला ? कोणत्या कारणास्तव तुम्हीं मजवरची कृपा नाहींशी केलीत ? १. हा संसार कशा रीतीनें घालवूं ? मनाला कोणता धीर देऊं ? २. आपल्याकडून निरोप पाठविल्याचें उत्तर कांहींच मिळालें नाहीं. आम्हीं चिंता करूं नये असें कांहींच निरोपाचें उत्तर नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, एक शब्द बोलूनदेखील आपण माझें समाधान केलें नाहीं ४. [३५३०]

देवाला माझे गुण-दोष कळले म्हणून कीं काय त्यानें मला निराश केलें ? १. नाहीं तर ह्या ठिकाणीं असा अयोग्य व्यवहार होणार नाहीं, कारण ह्याच्या घरची अशा प्रकारची रीत नाहीं २. आपल्याबरोबर असलेल्या मनाला खरी स्थिति कळते, म्हणून जी आपली स्थिति असेल तीच विचारानें जाणली पाहिजे (माझ्यांत कोणते दोष आहेत हें जर माझ्या मनाला कळलें, तर तें समूळ नष्ट करण्याचा कांहीं तरी विचार मी करीन) ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवांनीं माझा जो त्याग केला त्याचें कारण माझ्या बुद्धीचें कर्तव्य (बुद्धीचे विचार चांगले नसावेत हें) होय ४. [३५३१]

मला दम निघत नाहीं, म्हणून मी आपल्याकडून देवाकडे कांहीं निरोप पाठवूं काय ? त्या योगानें त्यांना राग आला तरी येवो १. रागावून तरी कांहीं उत्तर जसें येईल तसें येऊं दे. प्रतिकूल उत्तर आल्यास पुन्हां परत निरोप पाठवितां येईल २. त्यांना एकच पोर आहे असें नाहीं; मला मात्र त्यांच्यावांचून कोणी आईबाप नाहींत ३.

तुका म्हणे असे तयामध्यें हित । आपण निवांत असों नये ॥ ४ ॥ [३५३२]

आतां पाहों पंथ (पंथ पाहें) माहेराची वाट । कामाचा बोभाट पडो सुखें ॥ १ ॥ काय करूं आतां न गमेसें जालें । बहुत सोसिलें बहु दिस ॥ २ ॥ घर लागे पाठी चित्ता उमें वारें । आपुलें तें झुरे पाहावया ॥ ३ ॥ तुका म्हणे जीव गेला तरी जावो । धरिला तो देव भाव शुद्ध ॥ ४ ॥ [३५३३]

विनवीजे ऐसें भाग्य नाहीं देवा । पायांशीं केशवा सलगी केली ॥ १ ॥ धीटपणें पत्र लिहिलें आवडी । पार नेणें थोडी मति माझी ॥ २ ॥ जेथें वेदा तुझा कळेचिना पार । तेथें मी पामर काय वाणूं ॥ ३ ॥ जैसे तैसे माझे बोल अंगीकारीं । बोबड्या उत्तरीं गौरवितों ॥ ४ ॥ तुका म्हणे विटेवरी जीं पाउलें । तेथें म्यां ठेविलें मस्तक हें ॥ ५ ॥ [३५३४]

देवाच्याही देवा गोपिकांच्या पति । उदार हे ख्याति त्रिभुवनीं ॥ १ ॥ पातकांच्या रासी नासितोसी नामें । जळतील कर्में महा दोष ॥ २ ॥ सर्व सुखें तुझ्या वोळंगती पायीं । रिद्धि सिद्धि ठायीं मुक्ति चारी ॥ ३ ॥ इंद्रासी दुर्लभ पाविजे तें पद । गीत गातां छंद वाहतां टाळी ॥ ४ ॥ तुका म्हणे जड जीव शक्तिहीन । त्यांचें तूं जीवन पांडुरंगा ॥ ५ ॥ [३५३५]

काय झालें नेणों माझिया कपाळा । न देखिजे डोळां मूळ येतां ॥ १ ॥ बहू दिस पाहें वचनासी वास । धरिलें उदास पांडुरंगा ॥ २ ॥ नाहीं निरोपाचें पावलें उत्तर । ऐसें तों निष्ठुर न पाहिजे ॥ ३ ॥ पडिला विसर किंवा कांहीं धंदा । त्याहूनी गोविंदा जरूरसा ॥ ४ ॥ तुका म्हणे आलें वेंचाचें सांकडें । देणें घेणें पुढें तोहि धाक ॥ ५ ॥ [३५३६]

तुकाराम महाराज म्हणतात, त्याला कांहीं तरी निरोपावर निरोप पाठविण्यांत आपलें हितच आहे म्हणून आपण स्वस्थ बसूं नये ४. [३५३२]

आतां आईबापाच्या गांवाच्या मार्गाकडे वाट पाहात राहूं; गृहकृत्याचा खुशाल बोभाट होवो १. आतां काय करावें ? चित्ताला कांहीं करमेनासें झालें आहे. पुष्कळ दिवस पुष्कळ त्रास सोसला २. घर पाठीमागें लागल्यासारखें वाटून चित्ताला उभें वारें सुटलें आहे. आपल्यास प्रिय जें आईबापाचें स्वरूप तें पाहाण्याकरितां चित्त झुरत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां जीव गेला तरी जावो. देवाचा शुद्ध भावनेनें आश्रय केला आहे ४. [३५३३]

हे देवा, तुम्हांला मीं विनंति करावी असा मी भाग्यवान् नाहीं. आतां जी विनंति केली ही आपल्या पायांपाशीं सलगी केली १. धिटाईनें व प्रीतीनें मी आपणांस पत्र लिहिलें. माझी अल्प बुद्धि आपलें सामर्थ्य जाणत नाहीं २. ज्या ठिकाणीं वेदाला तुझा महिमा कळला नाहीं तेथें म्यां पामरानें काय वर्णन करावें ? ३. बोबड्या शब्दांनें जो मीं आपला गौरव केला त्या माझ्या बोलण्याचा आपण कांहीं तरी स्वीकार करावा ४. तुकाराम महाराज म्हणतात, विटेवर जीं श्रीहरीचीं पावलें आहेत, त्यांच्यावर मी आपलें मस्तक ठेविलें आहे ५. [३५३४]

हे देवांच्या देवा, गोपिकांच्या स्वामी, तुमच्या औदार्याची त्रैलोक्यांत प्रसिद्धि आहे १. तुझें नामचिंतन करणारांच्या पातकांच्या राशीच्या राशि तूं नाहींशा करतोस आणि त्यांचीं महा पापकर्मेंहि जाळून टाकतोस २. सर्व सुखें तुझ्या चरणांचा आश्रय करून आहेत व सकल ऐश्वर्य व अष्ट महासिद्धि व चारी मुक्ति ह्याहि तुझ्या चरणाचा आश्रय करून आहेत ३. जें पद इंद्रालाहि दुर्मिळ आहे तें, श्रीहरीचें नाम सुस्वर गाण्यानें व त्या तालांत टाळी वाजविण्यानें, प्राप्त होतें ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, जे योग-याग करण्याची शक्ति नसलेले निर्बल व मूर्ख जीव आहेत, त्यांचें तूं जीवन आहेस ५. [३५३५]

माझ्या प्रारब्धाची स्थिति काय झाली आहे हें मला कळत नाहीं. तुमच्याकडून बोलावणें आलें, असें माझ्या डोळ्यांस दिसत नाहीं १. हे पांडुरंगा, पुष्कळ दिवस मी आपल्या उत्तराची वाट पाहात आहें, पण तुम्हीं मला उदासीन केलें, अथवा आपण माझ्याविषयीं उदास आहांत २. मी तुमच्याकडे पाठविलेल्या निरोपाचें उत्तर आलें नाहीं. अशी निष्ठुरता आमच्याविषयीं न करावी ३. हे गोविंदा, तुम्हांला आमचा विसर पडला किंवा आमच्या कार्यापेक्षां दुसऱ्या कांहीं जरूरीच्या कामाकडे तुम्ही गुंतलांत ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हांला खर्च करण्याचें (निरोपाचें उत्तर देण्याचें) मोठें संकट आहे व तसेंच तुम्हांला देण्याघेण्याचाहि धाक वाटतो ५. [३५३६]

एवढा संकोच तरी कां व्यालासी । आम्ही कोणापाशीं तोंड वासूं ॥ १ ॥ कोण मज पुसे शिणलें भागलें । जरी मोकलिलें तुम्ही देवा ॥ २ ॥ कवणाची वाट पाहों कोणीकडे । कोण मज ओढे जीवलग ॥ ३ ॥ कोण जाणे माझे जीवींचें सांकडें । उगवील कोडें संकटाचें ॥ ४ ॥ तुका म्हणे तुम्ही देखिली निश्चिंती । काय माझे चित्तीं पांडुरंगा ॥ ५ ॥ [३५३७]

देईं डोळे भेटी न धरीं संकोच । न घालीं कांहीं वेंच तुजवरी ॥ १ ॥ तुज बुडवावें ऐसा कोण धर्म । अहर्निशीं नाम घेतां थोडें ॥ २ ॥ फार थोडें कांहीं करूनी पातळ । त्यामध्यें काळ कडे लावूं ॥ ३ ॥ आहे माझी तेचि सारीन सिदोरी । भार तुजवरी नेदीं माझा ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्हां लेंकराची जाती । भेटावया खंती वाटतसे ॥ ५ ॥ [३५३८]

सीणभाग हरे तेथींच्या निरोपें । देखिलिया रूप उरी नुरे ॥ १ ॥ इंद्रियांची धांव होईल कुंठित । पावेल हें चित्त समाधान ॥ २ ॥ माहेर आहेसें लौकिकीं कळावें । निढळ बरवें शोभा नेदी ॥ ३ ॥ आस नाहीं परि उरी बरी वाटे । आपलें तें भेटे आपणासी ॥ ४ ॥ तुका म्हणे माझी अवीट आवडी । खंडण तांतडी होऊं नेदीं ॥ ५ ॥ [३५३९]

धरितों वासना परि न ये फळ । प्राप्तीचा तो काळ नाहीं आला ॥ १ ॥ तळमळी चित्त घातलें खापरीं । फुटतसें परी लाहीचिया ॥ २ ॥ प्रकार ते कांहीं नावडती जीवा । नाहीं पुढें ठावा काळ हातीं ॥ ३ ॥ जातों तळा येतों मागुतला वरी । वोळशाचे फेरी सांपडलों ॥ ४ ॥ तुका म्हणे बहु करितों विचार । उत्तरें डोंगर एक चढें ॥ ५ ॥ (३५४०]

कां माझे पंढरी न देखती डोळे । काय हें न कळे पाप त्यांचें ॥ १ ॥ पाय पंथें (पंथ) कां हे

हे देवा, आमच्याविषयीं तूं जर असा संकोच करतोस तर आम्हांला उत्पन्न कां केलेंस? तुजवांचून आम्हीं कोणाजवळ तोंड पसरावें? १. जर देवा, तुम्हीं आम्हांला टाकलेंत तर माझा शीणभाग तुजवांचून दुसरा कोण निवारण करील? २. तुजवांचून मी कोणीकडे कोणाची वाट पाहूं? मला तरी दुसरा सखा कोण आहे? ३. माझ्या अंतरांतील संकट जाणून तें तुजवांचून कोण निवारण करील? ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पांडुरंगा, माझ्या चित्तामध्यें कोणत्या प्रकारची विश्रांति (निष्काळजी) असलेली तुम्हांस दृष्टी पडली? ५. [३५३७]

हे देवा, तूं मला दृष्टिभेट दे, ह्यावांचून तुजवर मी कांहीं खर्च (भार) घालीत नाहीं १. संकट घालून तुला बुडवावें असा धर्म काय उपयोगी आहे? रात्रंदिवस तुझें नाम मी घेत असतां तें थोडें वाटतें २. तुझी भेट होईपर्यंत थोडेंफार कांहीं नामस्मरण करून त्या योगानें कसा तरी आयुष्याचा काळ कडेस लावूं ३. तुझी भेट झाल्यावर जी कांहीं माझी संचिताची शिदोरी असेल ती मी संपवीन, पण तुझ्यावर कांहीं माझा भार घालणार नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्या भेटीविषयींची काळजी नेहमीं मनांत असावी, असा आम्हां सेवकांचा स्वभाव आहे ५. [३५३८]

माहेरचा जर निरोप आला, तर त्या योगानें शीणभाग नाहींसा होतो. मग प्रत्यक्ष रूप पाहिल्यावर कोणत्याहि दुःखाची उरी उरणार नाहीं १. सकळ इंद्रियांची धांव बंद होऊन चित्ताला समाधान होईल २. जर तुम्हीं मला वरचेवर नेलें आणलें, तर लौकिकामध्यें माझे आईबाप आहेत असें समजून येईल. नाहींपेक्षां पोरकेपणाची शोभा चांगली नाहीं ३. मला कांहीं मागण्याची आशा नाहीं, पण तुमच्या आमच्या भेटीची उरी असावी ती बरी, त्यांत आपला आसपणा वाढतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुजवर माझी जी प्रीति आहे, ती कधींहि विटणार नाहीं व तीमध्यें कधींहि खंड अथवा तुटातूट पडूं देऊं नकोस ५. [३५३९]

तुझ्या भेटीविषयीं मीं वासना धरली आहे, पण फळप्राप्ति होण्याचा काळ अजून आला नाहीं १. खापरामध्यें लाही भाजतेवेळीं जशी ती तडफड करते, तसें माझें चित्त तुझ्या भेटीविषयीं तळमळ करून फुटत आहे २. तुझ्या भेटीवांचून कोणत्याहि प्रकारची माझ्या जिवाला आवड नाहीं आणि भेट घेण्याचें स्वाधीन नाहीं व तो काळ कधीं येईल तेंहि माहीत नाहीं ३. अशा काळजीच्या भोंवऱ्यांत सांपडून पुनः खालीं, पुनः वर असा मी त्वरेनें जात येत आहें ४. तुकाराम महाराज म्हणतात, अनेक प्रकारच्या विचारांचे डोंगर करून त्यांत एकावरून उतरून एकावर चढावें हा मनाचा उद्योग चालत आहे ५. [३५४०]

माझे डोळे पंढरी कां पाहात नाहींत? असलें ह्या डोळ्यांचें काय पाप आहे, तें मला समजत नाहीं १. पंढरीच्या

न चलती वाट । कोण हें अदृष्ट कर्म बळी ॥ २ ॥ कां हें पायांवरी न पडे मस्तक । क्षेम कां हस्तक न पवती ॥ ३ ॥ कां या इंद्रियांची न पुरे वासना । पवित्र होईना जिव्हा कीर्ती ॥ ४ ॥ तुका म्हणे कई जाऊनी मोटळें । पडेन हा लोळें महाद्वारीं ॥ ५ ॥ [३५४१]

काय पोरें जालीं फार । किंवा न साहे करकर ॥ १ ॥ म्हणऊनी केली सांडी । घांस घेऊं न लाहे तोंडीं ॥ २ ॥ करूं कलागती । तुज भांडणें भोंवतीं ॥ ३ ॥ तुका म्हणे टांचे । घरीं जालेंसे वरोचे ॥ ४ ॥ [३५४२]

कांहीं चिंतेविण । नाहीं उपजत शीण ॥ १ ॥ तरी हा पडिला विसर । माझा तुम्हां जाला भार ॥ २ ॥ आली कांहीं तुटी । गेली सुटोनियां गांठी ॥ ३ ॥ तुका म्हणे घरीं । बहु बैसले रिणकरी ॥ ४ ॥ [३५४३]

निरोपासी वेंचे । काय बोलतां फुकाचें ॥ १ ॥ परि हें नेघेवेचि (न घेवेचि) यश । भेओं नको सुखी आस ॥ २ ॥ सुख समाधानें । कोण पाहे देणें घेणें ॥ ३ ॥ न लगे निरोपासी मोल । तुका म्हणे वेंचे बोल ॥ ४ ॥ [३५४४]

जोडीच्या हव्यासें । लागे धनाचेंचि पिसें ॥ १ ॥ मग आणीक दुसरें । लोभ्या नावडती पोरें ॥ २ ॥ पाहे रुक्याकडे । मग अवघें ओस पडे ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । तुला बहुतांचा हेवा ॥ ४ ॥ [३५४५]

मविलें मविती । नेणों रासी पडिल्या किती ॥ १ ॥ परि तूं धालाचि न धासी । आलें उभाउभीं घेसी ॥ २ ॥ अवघ्यां अवघा काळ । वाटा पाहाती सकळ ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं । आराणूक तुज कांहीं ॥ ४ ॥ [३५४६]

रस्त्यानें माझे पाय कां चालत नाहींत ? असलें माझें प्रारब्धकर्म कोणतें तरी बळिवंत आहे ? २. माझें मस्तक तुमच्या पायांवर कां पडत नाहीं ? व तुम्हांला आलिंगन देण्यास माझे हात कां पोहोंचत नाहींत ? ३. ह्या सकळ इंद्रियांची इच्छा कां पूर्ण होत नाहीं ? आणि तुमचे गुण वर्णन करून माझी जिव्हाहि शुद्ध होत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझें देहरूपी मोटकुळें तुमच्या महाद्वारांत केव्हां जाऊन पडेल व तेथें लोळेल असें मला झालें आहे ५. [३५४१]

हे देवा, तुला लेंकरें फार झालीं काय ? किंवा त्यांची कटकट सहन होत नाहीं काय ? १. आम्ही लेंकरें तुझ्याजवळ असलों म्हणजे तुला कांहीं एकट्याला घांस घेऊं देणार नाहीं, म्हणून आम्हांला टाकलें कीं काय ? २. तुझ्यासभोंवतीं आम्ही मिळून एकमेकांमध्यें तंटा करून तुझ्याबरोबर भांडण करूं म्हणून का तुला आमचा कंटाळा आला ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अथवा तुझ्या घरचा खाण्याचा सांठा संपला कीं काय म्हणून तूं मला टाकलेंस ? ४. [३५४२]

हे देवा, कांहीं तरी काळजी असल्याशिवाय त्रास उत्पन्न होत नाहीं १. तुम्हांस कोणती तरी काळजी लागून माझें संकट वाटल्यामुळें माझा तुम्हांला विसर पडला २. तुमच्यापाशीं जो संचय असेल, त्यांत तोटा होऊन ठेव्याची गांठ नाहींशी झाली असावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, अथवा कोणाचें कर्ज होऊन तें मागण्याकरितां सावकार तुमच्या दारांत फार बसले असावेत, म्हणून तुम्हांला माझा विसर पडला ४. [३५४३]

तूं जर कोणाबरोबर निरोप पाठविलास तर त्या फुकटच्या शब्दानें तुझा कांहीं खर्च होतो काय ? १. पण अशा प्रकारचें यश तुझ्यानें घेववत नाहीं. आतां कांहीं भय न धरतां तूं तरी खुशाल राहा २. जो आपल्या सुखाच्या समाधानांत असतो तो दुसऱ्यास देण्याघेण्याची गरज कशाला ठेवील ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, निरोप पाठविण्यास कांहीं खर्च होत नाहीं, म्हणून फुकटचे शब्द तरी खर्च कर ४. [३५४४]

कृपणाला द्रव्य मिळविण्याचा हव्यास लागला म्हणजे त्या द्रव्याच्या योगानें त्याला वेड लागतें १. मग त्या कृपणाला द्रव्याशिवाय दुसरें कांहीं म्हणजे पोटचीं मुलेंसुद्धां आवडत नाहींत २. तो सर्व काळ द्रव्याकडे पाहात असतो. त्या योगानें त्याला द्रव्यावांचून सर्व ओसाड वाटतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, त्याप्रमाणें तुला बहुतांचा सोस लागला आहे ४. [३५४५]

मोजलेलेंच वरचेवर मोजावें, अशा प्रकारच्या किती तरी धनाच्या राशी तुझ्याजवळ पडल्या आहेत, हें समजत नाहीं १. परंतु तूं तृप्त असून जें पुढें येईल त्याविषयीं भुकेला आहेस, म्हणून तुझ्याकडे जे येतील त्यांस उभाउभीं (तात्काळ) आपणांत मिळवून घेतोस २. सर्व काळ लोकांच्या सर्व वाटा तुझ्या दर्शनासाठीं तुझ्याकडे वाहात आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याविषयीं तुला घटकाभरदेखील कांहीं विसांवा नाहीं ४. [३५४६]

न बैससी खालीं। सम उभाच पाउलीं ॥ १ ॥ ऐसे जाले बहुत दिस। जालीं युगें अठ्ठावीस ॥ २ ॥ नाहीं भाग सीण। आराणूक एक क्षण ॥ ३ ॥ तुका म्हणे किती। मापें केलीं देती घेती ॥ ४ ॥ [३५४७]

जोडी कोणासाठीं। एवढी करितोसी आटी ॥ १ ॥ जरी हें आम्हां नाहीं सुख। रडो पोरें पोटीं भूक ॥ २ ॥ करूनी जतन। कोणा देसील हें धन ॥ ३ ॥ आमचे तळमळें। तुझें होईल वाटोळें ॥ ४ ॥ घेशील हा श्राप। माझा होउनियां बाप ॥ ५ ॥ तुका म्हणे उरी। आतां न ठेवीं यावरी ॥ ६ ॥ [३५४८]

करूनी चाहाडी। अवघी बुडवीन जोडी ॥ १ ॥ जरी तूं होऊनी उदास। माझी बुडविसी आस ॥ २ ॥ येथें न करीं काम। मुखें नेघें तुझें नाम ॥ ३ ॥ तुका म्हणे कुळ। तुझें बुडवीन समूळ ॥ ४ ॥ [३५४९]

समर्थाचे पोटीं। आम्ही जन्मलों करंटीं ॥ १ ॥ ऐसी झाली जगीं कीर्ति। तुझ्या नामाची फजिती ॥ २ ॥ येथें नाहीं खाया। न ये कोणी मूळ न्याया ॥ ३ ॥ तुका म्हणे जिणें। आतां खोटें जीवपणें ॥ ४ ॥ [३५५०]

पुढें तरी चित्ता। काय येईल तें आतां ॥ १ ॥ मज सांगोनियां धाडीं। वाट पाहातों बराडी ॥ २ ॥ कंठीं धरिला प्राण। पायांपाशीं आलें मन ॥ ३ ॥ तुका म्हणे चिंता। बहु वाटतसे आतां ॥ ४ ॥ [३५५१]

कैंचा मज धीर। कोठें बुद्धी माझी स्थिर ॥ १ ॥ जें या मनासी आवरूं। आंत पोटीं वाव धरूं ॥ २ ॥ कैंची शुद्ध मति। भांडवल ऐसें हातीं ॥ ३ ॥ तुका म्हणे अंगा। कोण दशा आली सांगा ॥ ४ ॥ [३५५२]

सारखे पाय जोडून उभा राहिलास, तो तूं खालींसुद्धां बसत नाहींस १. अशा प्रकारें पुष्कळ दिवस झाले म्हणजे अठ्ठावीस युगांची संख्या झाली आहे. अजून तूं उभाच आहेस २. तुझ्या ठिकाणीं शीणभाग नाहीं, म्हणून तूं एक क्षणभरदेखील विसांवा घेत नाहींस ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवघेव करण्याचीं मापें तुझ्याजवळ किती व कशीं आहेत, तीं समजत नाहींत ४. [३५४७]

एवढी मेहनत करून अशी जोडी कोणाकरितां करून ठेवतोस ? १. जर आम्हां लेंकरांना त्या सुखाचा लेशहि मिळत नसून पोटामध्यें भूक लागून आम्ही रडत आहोंत २. मग हें सुखरूपी धन जतन करून तूं दुसऱ्या कोणाला देणार ? ३. माझा तूं बाप असून अशा प्रकारचा तुला माझा शाप लागेल ४. आमच्या तळमळीच्या योगानें तुझा सर्वस्वीं नाश होईल ५. तुकाराम महाराज म्हणतात, इतक्यावर तुला बोलावयाचें मी कांहीं शिल्लक ठेवणार नाहीं. आतां ह्यापुढें तरी तूं आपल्याजवळ सुखरूपी धन ठेवूं नकोस, सर्व आम्हांला देऊन टाक. ६. [३५४८]

दुसऱ्याजवळ तुझी चहाडी सांगून मी तुझी सर्व प्राप्ति (कीर्ति व धन) बुडवून टाकीन १. जर तूं आमच्यावर उदास होऊन आमची निराशा करशील तर वर दर्शविल्याप्रमाणें करीन २. ह्या ठिकाणीं कांहीं उद्योग करणार नाहीं व मुखानें तुझें नांव देखील घेणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवाचा कांहीं उपयोग नाहीं, असें सांगून तुझ्या कुळाचा मी समूळ नाश करीन (ब्रह्मज्ञानानें तुझें सगुणरूप व मायेसह कूळ मुळासकट बुडवून टाकीन) ४. [३५४९]

श्रीमंताच्या पोटीं असलीं करंटीं लेंकरें आम्ही उत्पन्न झालों आहोंत १. अशा प्रकारचा डांगोरा जगांत होऊन तुझ्या नांवाची अपकीर्ति झाली आहे २. मला येथें कांहीं खावयास मिळत नाहीं व तूं न्यावयास मूळहि (माघारी) पाठवीत नाहींस ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां माझ्या जीवाचें जगणें अशा वागणुकीवरून व्यर्थ आहे ४. [३५५०]

आतां येथून तरी पुढें मनाला काय येईल तसें कर १. मी गरीब तुझी वाट पाहात आहें, म्हणन मला कांहीं तरी निरोप पाठवून दे २. माझा प्राण कंठामध्यें आला आहे व माझें मन तुझ्या पायांजवळ आलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तूं कसें करशील ह्याविषयीं आतां मला फार चिंता वाटत आहे ४. [३५५१]

माझ्या ठिकाणीं धीर कशाचा आहे व माझी बुद्धि तरी स्थिर कोठें आहे ? १. पोटामध्यें पैस (अवकाश) धरून मनाला जर आंवरावें तर तेंहि स्वाधीन नाहीं २. माझी वासना शुद्ध नाहीं. मग तूं प्राप्त होण्याचें विवेक–वैराग्याचें भांडवल हातीं कसलें आहे ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या योगानें माझ्या अंगाला कोणती अवस्था (फजिती) आली असावी हें तरी सांगा ४. [३५५२]

समर्पक वाणी । नाहीं ऐकिजेसी कानीं ॥ १ ॥ आतां भावें करूनी साचा । पायां पडिलों विठोबाच्या ॥ २ ॥ न कळे उचित । करूं समाधान चित्त ॥ ३ ॥ तुका म्हणे विनंति । विनविली धरा चित्तीं ॥ ४ ॥ [३५५३]

येती वारकरी । वाट पाहातों तोंवरी ॥ १ ॥ घालुनियां दंडवत । पुसेन निरोपाची मात ॥ २ ॥ पत्र हातीं दिलें । जया येथें पाठविलें ॥ ३ ॥ तुका म्हणे येती । जाईन सामोरा पुढती ॥ ४ ॥ [३५५४]

रुळे महाद्वारीं । पायांखालील पायरी ॥ १ ॥ तैसें माझें दंडवत । निरोप सांगतील संत ॥ २ ॥ पडे दंडकाठी । देह भलतीसवा लोटी ॥ ३ ॥ तुका म्हणे बाळ । लोळे न धरितां सांभाळ ॥ ४ ॥ [३५५५]

तुम्हीं संतजनीं । माझी करावी विनवणी ॥ १ ॥ काय तुक्याचा अन्याय । त्यासी अंतरले पाय ॥ २ ॥ भाका बहुतां रीती । माझी कींव काकुलती ॥ ३ ॥ न देखे पंढरी । तुका चरण विटेवरी ॥ ४ ॥ [३५५६]

होईल कृपादान । तरी मी येईन धांवोन ॥ १ ॥ होती संतांचिया भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं ॥ २ ॥ रिघेन मातेपुढें । स्तनपान करीन कोडें ॥ ३ ॥ तुका म्हणे ताप । हरती देखोनियां बाप ॥ ४ ॥ [३५५७]

परिसोनी उत्तर । जाब देईजे सत्वर ॥ १ ॥ जरी तूं होसी कृपावंत । तरी हा बोलावीं पतित ॥ २ ॥ नाणीं कांहीं मना । करूनी पापाचा उगाणा ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं । काय शक्ती तुझे पायीं ॥ ४ ॥ [३५५८]

तुम्हीं कानानें ऐकावी अशी माझी वाणी योग्य, समाधानकारक नाहीं १. आतां मी खऱ्या भावार्थानें विठोबाच्या पायीं मस्तक ठेवीत आहें २. ज्या योगानें तुमच्या चित्ताचें समाधान करावें, तें योग्य कर्तव्य मला समजत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी जें विनंति करून पत्र लिहीत आहें, तें तुम्हीं मनावर घेतलें पाहिजे ४. [३५५३]

पंढरीहून वारकरी परत येईतोंपर्यंत मी त्यांची सारखी वाट पाहात बसेन १. ते आल्यावर त्यांना नमस्कार करून निरोपाची हकीगत विचारीन २. त्यांच्या स्वाधीन पत्र करून त्यांना त्या ठिकाणीं पाठविलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ते परत आले म्हणजे मी त्यांना धांवत सामोरा जाईन ४. [३५५४]

तुमच्या महाद्वाराच्या सर्व पायऱ्यांच्या खालील पायरी जशी शोभते तसा मी असून त्या ठिकाणीं मी लोळणी घालीन १. तसा माझा दंडवत आहे, असा निरोप संत तुम्हांस सांगतील २. जशी हातांतील काठी एकदम खालीं पडते, तसा मी आपल्या देहानें साष्टांग नमस्कार घालीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, बालक हें जसें आपलें अंग न सांभाळतां आईपुढें लोळतें, तसा मी लोळेन ४. [३५५५]

अहो वैष्णवजन हो, तुम्ही माझ्या तर्फेनें देवास विनंति करा. १. ती अशी, कीं तुकोबाचा काय अपराध आहे म्हणून त्याला तुमचे पाय अंतरले? २. असें पुष्कळ प्रकारानें काकुळती येऊन मजविषयीं तुम्हीं कींवकरुणा भाकावी ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला पंढरी दृष्टीस पडत नाहीं व विटेवरील पाय दिसत नाहींत. ह्याचें काय कारण आहे तें विचारा ४. [३५५६]

जर देवानें मजवर कृपा केली तर मी धांवत पंढरीला येईन १. त्या ठिकाणीं सर्व वैष्णव जनांची भेट होऊन आपण वाळवंटामध्यें मिळून आनंदानें नृत्य करूं २. रुक्मिणी मातोश्रीजवळ जाऊन लाडानें मी स्तनपान करीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा बाप जो पांडुरंग त्याला पाहिल्याबरोबर त्रिविध तापापासून माझा देह शीतळ होईल ४. [३५५७]

हे देवा, हीं माझीं वचनें ऐकून ह्यांबद्दलचा जबाब लवकर पाठवून द्यावा १. तुम्ही जर कृपाळु असलां, तर ह्या पतिताला बोलावणें पाठवावें २. माझ्या ठिकाणीं जीं पातकें असतील, तीं मनावर न घेतां त्यांचा सर्वस्वी नाश करावा ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याविषयीं तुझ्या पायांच्या ठिकाणीं कांहीं सामर्थ्य नाहीं काय? ४. [३५५८]

ऐकोनीयां कीर्ति । ऐसी वाटती विश्रांती ॥ १ ॥ मा तें सुख डोळां पडे । तेथें कोण लाभ जोडे ॥ २ ॥ बोलतां ये वाचे । वीट न ये जिव्हा नाचे ॥ ३ ॥ तुका म्हणे धांवे । वासना ते रस घ्यावे ॥ ४ ॥ [३५५९]

किती करूं शोक । पुढें वाढे दुःखें दुःख ॥ १ ॥ आतां जाणसी तें करीं । माझें कोण मनीं धरी ॥ २ ॥ पुण्य होतें गांठीं । तरी कां लागती हे आटी ॥ ३ ॥ तुका म्हणे बळ । माझी राहिली तळमळ ॥ ४ ॥ [३५६०]

करील आबाळी । माझ्या दांतांची कसाळी ॥ १ ॥ जासी एखादा मरोन । पाठी लागेल हें जन ॥ २ ॥ घरीं लागे कलह । नाहीं जात तो शीतळ ॥ ३ ॥ तुका म्हणे पोरवडे । मज येतील रोकडे ॥ ४ ॥ [३५६१]

आतां आशीर्वाद । माझा असो सुखें नांद ॥ १ ॥ म्हणसी कोणें तरी काळें । आहेतसीं माझीं बाळें ॥ २ ॥ दुरी दूरांतर । तरी घेशी समाचार ॥ ३ ॥ नेसी कधीं तरी । तुका म्हणे लाज हरी ॥ ४ ॥ [३५६२]

आतां हे शेवटीं । माझी आईकावी गोष्टी ॥ १ ॥ आतां द्यावा वचनाचा । जाब कळे तैसा याचा ॥ २ ॥ आतां करकर । पुढें न करीं उत्तर ॥ ३ ॥ तुका म्हणे ठसा । तुझा आहे राखें तैसा ॥ ४ ॥ [३५६३]

बोलिलों तें आतां । कांहीं जाणतां नेणतां ॥ १ ॥ क्षमा करावे अन्याय । पांडुरंगे माझे माय ॥ २ ॥ स्तुति निंदा केली । लागे पाहिजे साहिली ॥ ३ ॥ तुका म्हणे लाड । दिला तैसें पुरवा कोड ॥ ४ ॥ [३५६४]

देवाची कीर्ति ऐकून मनाला जी विश्रांति प्राप्त होत आहे तिचें वर्णनच करतां येत नाहीं १. मग तें साक्षात् हरीचें सुख डोळ्यांस भासल्यावर त्यापेक्षां महत्त्वाचा लाभ जगांत कोणता असणार? २. तो वाणीनें वर्णन करण्यांत वीट येत नाहीं, ती जिव्हा तर वर्णन करण्यांत मोठ्या आनंदानें नाचते ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी वासना तो सुखरस घेण्याकरितां धांव घेत आहे ४. [३५५९]

आता म्यां किती शोक करावा? त्या योगानें पुढें दुःखानें दुःख वाढत जातें १. आतां तुला कळेल तसें कर. तुझ्यावांचून माझें दुःख कोण मनावर घेणार आहे? २. जर कांहीं पुण्य माझ्या गांठीस असतें तर एवढी मेहनत कशाला करावी लागली असती? ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या ठिकाणीं कोणत्याच प्रकारची शक्ति नाहीं, पण तुझ्या भेटीविषयीं काळजी लागली आहे ४. [३५६०]

अशा प्रकारच्या रागाच्या बोलण्यानें तुझी एखादी फजिती होईल व त्यापासून तुला एखादी बाधा होईल १. ह्या माझ्या तळमळीनें तूं एखादे वेळ मरशील, मग हे लोक मला अपवादाचें दुःख देतील (माझ्या डोक्यावर खापर फोडतील) २. घरांत जर कळ लागली तर कोणासहि सुखकर होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मग रोकड पोरटेपणा माझ्या कपाळाला येईल ४. [३५६१]

आतां तूं सुखानें नांद असा माझा तुला आशीर्वाद आहे १. माझीं लेंकरें खुशाल आहेत का, असें कोणत्या काळीं तूं म्हणशील? २. आम्ही कितीहि दूर असलों तरी कालांतरानें (केव्हांतरी) माझा समाचार घेशील ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे हरि, तूं केव्हां तरी लोकलज्जेस्तव मला पंढरीला घेऊन जाशील ४. [३५६२]

आतां माझें अखेरचें एक वचन ऐक १. आतां तुला कळेल तसा ह्या वचनाचा जबाब द्यावा २. आतां मी विनाकारण शब्दाची किरकीर करणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसा तुझा पतितपावन हा शिक्का असेल, तसा तूं तो राख म्हणजे झालें ४. [३५६३]

आतां मीं जें कांहीं जाणतेपणानें अथवा नेणतेपणानें बोललों आहें १. हे पांडुरंगे आई, ते माझे सर्व अपराध तूं क्षमा करावेस २. स्तुति अथवा निंदा जी मजकडून घडली असेल, ती तूं सहन केली पाहिजे ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याचें कारण जसा तुम्हीं मला आपला ळळा लावला तसे माझे छंद तुम्ही पूर्ण करा ४. [३५६४]

: पत्राचें उत्तर लवकर न आल्यामुळें विरह :

माहेरींचा काय येईल निरोप । म्हणऊनी झोंप नाहीं डोळां ॥ १ ॥ वाट पाहें आस धरूनियां जीवीं । निढळा हे ठेवीं वरी बाहे ॥ २ ॥ बोटावरी (वाटेवरी) माप लेखितों दिवस । होतों कासावीस धीर नाहीं ॥ ३ ॥ काय नेणों संतां पडिला विसर । कीं नव्हे सादर मायबाप ॥ ४ ॥ तुका म्हणे तेथें होईल दाटणी । कोण माझें आणी मना तेथें ॥ ५ ॥ [३५६५]

परि तो आहे कृपेचा सागर । तोंवरी अंतर पडों नेदी ॥ १ ॥ बहु कान दृष्टी आइके देखणा । पुरोनियां जना उरलासे ॥ २ ॥ सांगितल्याविणें जाणे अंतरींचें । पुरवावें ज्याचें तैसें कोड ॥ ३ ॥ बहुमुखें कीर्ति आइकिली कानीं । विश्वासही मना आहे माझ्या ॥ ४ ॥ तुका म्हणे नाहीं जात वायांविण । पाळितो वचन बोलिला तें ॥ ५ ॥ [३५६६]

यावरी न कळे संचित आपुलें । कैसें वोढवलें होईल पुढें ॥ १ ॥ करील विक्षेप धाडितां मूळासी । किंवा धाडा ऐसी तांतडी हे ॥ २ ॥ जोंवरी हे डोळे देखे वारकरी । तों हें भरोवरी करी चित्त ॥ ३ ॥ आस वाढविते बुद्धीचे तरंग । मनाचेही वेग वावडती ॥ ४ ॥ तुका म्हणे तेव्हां होतील निश्चळ । इंद्रियें सकळ निरोपानें ॥ ५ ॥ [३५६७]

होईल निरोप घेतला यावरी । राउळाभीतरीं जाऊनियां ॥ १ ॥ करूनियां दधि मंगळ भोजन । प्रयाण शकुन सुमुहूर्तें ॥ २ ॥ होतील दाटले सद्गदीत कंठीं । भरतें त्या पोटीं वियोगाचें ॥ ३ ॥ येरयेरां भेटी क्षेम आलिंगनें । केलीं समाधानें होतीं संतीं ॥ ३ ॥ तुका म्हणे चाली न साहे मनास । पाहाती ते कळस परतोनी ॥ ५ ॥ [३५६८]

आईबापांकडून काय निरोप येतो म्हणून माझ्या डोळ्यांना झोंप नाहीं १. मोठ्या आशेनें कपाळावर हात ठेवून वाट पाहात आहें २. बोटानें दिवस मोजीत आहें व माझा जीव अति कासावीस होत आहे व किंचित्हि धीर निघत नाहीं ३. संत हे माझा निरोप सांगण्यास विसरले, किंवा आईबापच माझा निरोप ऐकण्यास तत्पर नव्हते कीं काय, हें कळत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, आईबापांजवळ दाटी असेल, अशा ठिकाणीं माझें कोण मनावर घेतो ! ५. [३५६५]

पण जोंपर्यंत माझा आईबाप हा कृपेचा समुद्र आहे तोंपर्यंत बहुधा तो अंतर पडूं देणार नाहीं १. त्यांना ऐकण्याकरितां कान व दृष्टि ह्या पुष्कळ आहेत व तो सर्व जगताला पुरुन उरला आहे २. त्याला सांगितल्यावांचून तो अंतःकरणांतील जाणतो व जशी ज्याची इच्छा असेल ती पूर्ण करतो ३. त्याची कीर्ति मीं पुष्कळांच्या मुखांतून ऐकली व माझ्याहि मनांत त्याच्याविषयीं विश्वास आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, तो जें वचन बोलतो तें आपलें वचन तो पाळतो, त्याचें बोलणें व्यर्थ जात नाहीं ५. [३५६६]

ह्यानंतर आपलें प्रारब्ध पुढें कसें उभें राहिलें आहे हें कळत नाहीं १. माझेंच प्रारब्ध (कर्म) मला बोलावणें पाठविण्यासंबंधानें विघ्न करील कीं धाडण्याची त्वरा करील ? २. जोंपर्यंत निरोप घेऊन आलेले वारकरी डोळ्यांना दिसले नाहींत तोंपर्यंत हें चित्त अनेक कल्पना करणारच ३. आशेनें बुद्धीवर अनेक प्रकारचे तरंग येतात व चित्ताचें चांचल्यहि अधिक वाढतें ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या वेळेस तिकडून निरोप येईल त्या वेळेस सर्व इंद्रियें शांत होतील ५. [३५६७]

आज आषाढ शुद्ध पौर्णिमा. गोपाळपूरचा काला झाला असेल. आतां राउळांमध्यें जाऊन वारकऱ्यांनीं देवाजवळ निरोप घेतला असेल १. दहींभाताचें मंगल भोजन करून प्रयाणाकरितां सुमुहूर्तावर निघण्याच्या तयारींत ते असतील २. निघतेवेळीं त्यांचा कंठ सद्गदित झाला असेल व श्रीहरीच्या वियोगानें त्यांच्या हृदयांत प्रेमाचें भरतें आलें असेल ३. संतांनीं तेथून निघतेवेळीं एकमेकांस आलिंगन देऊन एकमेकांचें समाधान केलें असेल ४. तुकाराम महाराज म्हणतात, निघते वेळीं तें वियोगदुःख त्यांना सहन न झाल्यामुळें वेळोवेळीं परत फिरून ते देवळाचा कळस पाहात असतील ५. [३५६८]

ऐसी ते सांडिली होईल पंढरी । येत वारकरी होते वाटे ॥ १ ॥ देखिले सोहळे होती आठवत । चालती ते मात करूनियां ॥ २ ॥ केली आइकिली होईल जे कथा । राहिलें तें चित्ता होईल प्रेम ॥ ३ ॥ गरुडटके टाळ मृदंग पताका । सांगती ते एकां एक सुख ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां येती लवलाही । आलिंगूनि बाहीं देईन क्षेम ॥ ५ ॥ [३५६९]

क्षेम मायबाप पुसेन हें आधीं । न घलीं हें मधीं सुख दुःख ॥ १ ॥ न करीं तांतडी आपणांपासूनि । आईकेन कानीं सांगती तें ॥ २ ॥ अंतरींचें संत जाणतील गुज । निरोप तो मज सांगतील ॥ ३ ॥ पायांवरी डोई ठेवीन आदरें । प्रीतिपाडिभरें आलिंगून ॥ ४ ॥ तुका म्हणे काया करीन कुरवंडी । ओंवाळून सांडीं त्यांवरून ॥ ५ ॥ [३५७०]

होईल माझी संतीं भाकिली करुणा । जे त्या नारायणा मनीं बैसे ॥ १ ॥ शृंगारूनी माझीं बोबडीं उत्तरें । होतील विस्तारें सांगितलीं ॥ २ ॥ क्षेम आहे ऐसें होईल सांगितलें । पाहिजे धाडिलें शीघ्र मूळ ॥ ३ ॥ अवस्था जे माझी ठावी आहे संतां। होईल कृपावंता निरोपिली ॥ ४ ॥ तुका म्हणे सवें येईल मुऱ्हाळी । किंवा कांहीं उरी राखतील ॥ ५ ॥ [३५७१]

दोहींमध्यें एक पडेल विश्वासें । भातुकें सरिसें मूळ तरी ॥ १ ॥ करिती निरास निःशेष न घडे । कांहीं तरी ओढे चित्त माये ॥ २ ॥ लौकिकाची तरी धरितील लाज । काय माझ्या काज आचरणें ॥ ३ ॥ अथवा कोणाचें घेणें लागे रीण । नाहीं तरी हीन कर्मी कांहीं ॥ ४ ॥ व्यालीचिये अंगीं असती वेदना । तुका म्हणे मना मन साक्ष ॥ ५ ॥ [३५७२]

बैसतां कोणापें नाहीं समाधान । विवरे हें मन तेचि सोई ॥ १ ॥ घडीघडी मज आठवे माहेर ।

अशा प्रकारें ते पंढरी सोडून बाहेर पडले असतील व ते वारकरी देहूच्या वाटेनें येत असतील १. पंढरींत पाहिलेल्या उत्सवाच्या सुखाची त्यांना आठवण होऊन त्यासंबंधानें मार्गांत एकमेक चालतांना बोलत असतील २. व त्यांनीं जी कथा केली असेल व ऐकली असेल त्याविषयींचेंच प्रेम त्यांच्या चित्तामध्यें राहिलें असेल ३. गरुडटके, टाळ, मृदंग व पताका घेऊन ते भजन करीत एकमेकांशीं सुखचर्चा करीत असतील ४. तुकाराम महाराज म्हणतात, आतां ते त्वरेनें येतील व मी त्यांना हातांनीं आलिंगन देऊन क्षेम विचारीन ५. [३५६९]

आईबापाकडील प्रथम कुशल विचारीत असतांना दरम्यान मी आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी काढणार नाहीं १. आपल्याकडून कांहीं उतावळेपणा होऊं देणार नाहीं. ते जें कांहीं सांगतील तें कानानें ऐकेन २. माझ्या अंतःकरणांतील गुप्त गोष्टी ते संत समजत असतीलच व मला ते तिकडील निरोप सांगतील ३. त्यांच्या पायांवर मी मोठ्या प्रीतीनें मस्तक ठेवीन व त्यांना प्रेमभरानें आलिंगन देईन ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी आपली काया त्यांच्यावरून ओंवाळून टाकीन ५. [३५७०]

ज्यायोगानें मजविषयीं नारायणाच्या मनांत दया येईल अशाविषयींची संतांनीं कींव काकुळती केली असेल १. मी त्यांच्या हातीं बोबड्या शब्दांनीं पाठविलेल्या निरोपाचा त्यांनीं गौरव करून सविस्तरपणें आईबापाला सांगितला असेल २. मजविषयींचें कुशल सांगून, त्याला लौकर बोलावणें पाठविलें पाहिजे, असेंहि सुचविलें असेल ३. माझ्या हृदयाची काय स्थिति होत आहे ही संतांना ठाऊक आहे, ती सर्व हकीगत त्या कृपाळु देवाला संतांनीं सांगितलीच असेल ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांच्या बरोबर मला पाचारणाकरितां कोणी येईल किंवा त्यांनीं सध्यां कांहीं अडचण आहे, उशिरानें बोलावणें पाठवितों, असें कारण सांगितलें असेल ? ५. [३५७१]

देवानें वारकऱ्यांबरोबर एक तर मला बोलावणें पाठविलें असेल किंवा खाऊ तरी दिला असेल, हें निश्चित शक्य आहे १. तूं समूळ निराशा करीत नाहींस. हे आई, तुझें कांहीं तरी चित्त मुलाकडे ओढतें २. लौकिकाची तरी ते माझे मायबाप देव लज्जा धरतील. माझ्या आचरणाचें (बऱ्या–वाईट वर्तनाचें) काय कारण आहे ? ३. अथवा माझ्या पालनपोषणाकरितां देवाला ऋण घ्यावें लागलें असेल. नाहींपेक्षां मी हीनकर्मी आहें ४. तुकाराम महाराज म्हणतात, जन्म देणाऱ्या आईलाच वेदना होतात, ह्याविषयीं मनालाच मन साक्षी आहे ५. [३५७२]

कोणाच्या जवळ बसण्यानें समाधान होत नाहीं. मनांत आईबापांचाच विचार येतो १. घटकोघटकीं मला

न पडे विसर क्षणभरी ॥ २ ॥ न बोलावें ऐसा करितों विचार । पडतो विसर प्रसंगीं तो ॥ ३ ॥ इंद्रियांसी वाहो पडिली ते चाली । होती विसांवली येचि ठायीं ॥ ४ ॥ एकसरें सोस माहेरासी जावें । तुका म्हणे जीवें घेतलासे ॥ ५ ॥ [३५७३]

नाहीं हानि परि न रहावे निसुर । न पडे विसर काय करूं ॥ १ ॥ पुसाविसी वाटे मात कापडियां । पाठविती न्याया मूळ मज ॥ २ ॥ आणीक या मना नावडे सोहळा । करितें टकळा माहेरींचा ॥ ३ ॥ बहु कामें केलें बहु कासावीस । बहु झाले दिस भेटी नाहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे त्याचें न कळे अंतर । अवस्था ते फार होते मज ॥ ५ ॥ [३५७४]

तोंवरी म्यां त्यास कैसें निषेधावें । जों नाहीं बरवें कळों आलें ॥ १ ॥ कोणाचिया मुखें तंट नाहीं मागें । वचन वाउगें बोलों नये ॥ २ ॥ दिसे हानि परि निरास न घडे । हे तंव रोकडे अनुभव ॥ ३ ॥ आपुलिया भोगें होईल उशीर । तोंवरी कां धीर केला नाहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे गोड करील सेवट । पाहिली ते वाट ठावी आहे ॥ ५ ॥ [३५७५]

माहेरींचें आलें तें मज माहेर । सुखाचें उत्तर करीन त्यासी ॥ १ ॥ पायांवरी माथा आलिंगन वाहीं । घेईन लवलाहीं पायवणी ॥ २ ॥ सुख समाचार पुसेन सकळ । कैसा पर्वकाळ आहे त्यास ॥ ३ ॥ आपुले जीवींचें सुख दुःख भावें । सांगेन आघवें आहे तैसें ॥ ४ ॥ तुका म्हणे वीट नेणें आवडीचा । बोललीच वाचा बोलवीन ॥ ५ ॥ [३५७६]

वियोग न घडे सन्निध वसलें । अखंड राहिलें होय चित्तीं ॥ १ ॥ विसर न पडे विकल्प न घडे । आलें तें आवडे तया पंथें ॥ २ ॥ कामाचा विसर नाठवे शरीर । रसना मधुर नेणें फिकें ॥ ३ ॥

आईबापांचें स्मरण होतें. त्यांचा मला क्षणभर देखील विसर पडत नाहीं २. कांहीं बोलूं नये असा विचार करतों पण प्रसंगाच्या वेळीं त्याचा विसर पडतो ३. इंद्रियांचाहि ओघ इकडेच पडून तीं ह्याच ठिकाणीं विश्रांतीला पावलीं आहेत ४. तुकाराम महाराज म्हणतात, आईबापांकडे जावें असा माझ्या जीवानें एकसारखा सोस घेतला आहे ५. [३५७३]

जरी हानि होत नाहीं तरी निष्काळजीपणानें बसवत नाहीं. कांहीं केलें तरी त्याचा मला विसर पडत नाहीं १. जे कोणी वारकरी यात्रेकरू येतील त्यांना, 'मला आईबाप बोलावणें पाठवितील काय?' ही हकिगत विचारावीशी वाटते २. ह्याशिवाय मनाला दुसरें कांहीं सुख वाटत नाहीं. रात्रंदिवस त्यानें आईबापाचा ध्यास घेतला आहे ३. प्रपंचांतील पुष्कळ कामधंदा करून माझ्या हृदयास फार कासावीस केलें आहे. पुष्कळ दिवस झाले तरी भेटीचा योग येत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या हृदयास दर्शनाची अति हुरहूर लागली आहे, पण देवाचें मनोगत काय आहे तें मला समजत नाहीं ५. [३५७४]

जोंपर्यंत खरी स्थिति काय आहे ती कळून आली नाहीं तोंपर्यंत मीं देवाचा निषेध कसा करावा ? १. हे आईबाप धिःकार करतात अशी कीर्ति पूर्वीं कोणाच्याहि मुखानें ऐकली नाहीं. ह्याकरितां त्यांना वावगें बोलूं नये २. लवकरच मूळ न आल्यामुळें हानि अशी भासत आहे, पण माझी निराशा होत नाहीं. देव कृपाळु आहे अशा प्रकारचा माझा उघड अनुभव आहे ३. आपल्या प्रारब्धानेंच वेळ लागत आहे, तोंपर्यंत धीर कां धरूं नये ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, तो शेवट चांगला करील. त्यानें पूर्वीं अनेक भक्तांची वाट पाहिली व त्यांचा उद्धार केला, ही स्थिति मला माहीत आहे ५. [३५७५]

आईबापाकडून जे आले आहेत, ते मला आईबापासारखेच आहेत. मी त्यांच्याशीं सुखसंवाद करीन. १. त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून त्यांना हातानें आलिंगन देईन व त्यांचें चरणतीर्थ त्वरेनें घेईन २. त्यांना सर्व प्रकारची खुशाली विचारीन. त्यांना आम्हांस भेट देण्यास काय पर्वकाळ लागतो ? ३. आपल्या हृदयांतील सुखदुःखाची स्थिति जशी आहे तशीच त्यांना सांगेन ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याविषयीं आवड आहे, त्याविषयींचा वीट मानणार नाहीं. जें वाणी बोलली आहे, तेंच तिच्याकडून बोलवीन. त्यांच्याशीं बोललेलेंच पुनः पुनः बोलेन ५. [३५७६]

देवाजवळ बसलेल्याचा देवाशीं वियोग होत नाहीं हें खरें आहे, परंतु वियोगांत सुद्धां त्याचीच चित्तांत अखंड वस्ति होते १. त्याविषयीं विसरहि होत नाहीं व कांहीं संशयहि येत नाहीं. जे आईबापाकडून आले आहेत ते प्रिय आहेत २. काम करण्याचा विसर पडतो व देहाचाहि आठव राहात नाहीं. जिव्हा ही जेवतांना गोड किंवा फिकें हें जाणत नाहीं ३.

निरोपासी काज असो अनामिक । निवडितां एक न ये मज ॥ ४ ॥ तुका म्हणे हित चित्तें ओढियेलें । जेथें तें उगलें जावें येणें ॥ ५ ॥ [३५७७]

आतां माझे सखे येती वारकरी । जीवा आस थोरी लागलीसे ॥ १ ॥ सांगतील माझ्या निरोपाची मात । सकळ वृत्तांत माहेरींचा ॥ २ ॥ काय लाभ झाला काय होतें केणें । काय काय कोणें सांठविलें ॥ ३ ॥ मागणें तें काय धाडिलें भातुकें । पुसेन तें सुखें आहेतसीं ॥ ४ ॥ तुका म्हणे काय सांगती तें कानीं । ऐकोनियां मनीं धरूनी राहें ॥ ५ ॥ [३५७८]

काय करावें म्यां केले ते विचार । घडेल साचार काय पाहों ॥ १ ॥ काय मन नाहीं धरीत आवडी । प्रारब्धीं जोडी तेचि खरी ॥ २ ॥ काय म्यां तेथींचें रांधिलें चाखोनी । तें हें करी मनीं विवंचना ॥ ३ ॥ आणीकही त्यासी बहुत कारणें । बहु असे जिणें ओढीचेंही ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्हां बोळविल्यावरी । परती माघारी केली नाहीं ॥ ५ ॥ [३५७९]

आम्हां आराणूक संवसार हातीं । पडिली नव्हती आजीवरी ॥ १ ॥ पुत्र दारा धन होता मनीं धंदा । गोंवियेलों सदा होतों कामें ॥ २ ॥ वोढवलें ऐसें दिसतें कपाळ । राहिलें सकळ आवरोनी ॥ ३ ॥ मागें पुढें कांहीं न दिसे पाहातां । तेथूनियां चिंता उपजली ॥ ४ ॥ तुका म्हणे वाट पाह्याचें कारण । येथींचिया हीन जालें भाग्य ॥ ५ ॥ [३५८०]

बहु दिस नाहीं माहेरींची भेटी । जाली होती तुटी व्यवसायें ॥ १ ॥ आपुलाल्या होतों गुंतलों व्यासंगें । नाहीं त्या प्रसंगें आठवलें ॥ १ ॥ तोडिलें तुटतें जडीतें जडलें । आहे तें आपुलें आपणापें ॥ ३ ॥ बहु निरोपाचें पावलें उत्तर । जवळीच पर एक तेंही ॥ ४ ॥

आईबापाकडून निरोप आणणारा जरी अंत्यज असला तरी त्याच्याशीं आपला कांहीं संबंध नाहीं, म्हणून अशा प्रकारची निवड मला करतां येत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, चित्तानें हिताचें आकर्षण केलें आहे. ज्या ठिकाणीं हित आहे तेथें तें आपोआप जातें ५. [३५७७]

आतां माझे मित्र वारकरी येतील, त्यांच्या येण्याची माझ्या जीवाला फार आशा लागली आहे १. मी त्यांच्याबरोबर पाठविलेल्या निरोपाच्या आईबापांकडून मिळालेल्या उत्तराची हकीगत ते सांगतील आणि पंढरीचाहि पण वृत्तांत सांगतील २. पंढरींत कोणता लाभ झाला, कोणता माल होता व कोणी काय काय माल सांठविला हें विचारीन ३. आईबापांनीं काय खाऊ पाठविला आहे ? मी मोठ्या आनंदानें आहे तशी स्थिति (आईबापांची खुशाली) विचारीन ४. तुकाराम महाराज म्हणतात, ते वारकरी मित्र जें कांहीं सांगतील तें मी ऐकून मनांत धरून ठेवीन ५. [३५७८]

जे मीं विचार केले आहेत ते काय करावयाचे आहेत ? त्याप्रमाणें खरोखर अनुभवाला येतें कीं काय ? १. मन कोणत्या गोष्टीची आवड धरीत नाहीं, पण प्रारब्धानें जो लाभ होईल तो खरा २. काय मी देहूंत राहून त्यांच्याकडील अन्न चाखून पाहिलें आहे काय ? म्हणून मनानें त्याविषयींची चिंता करीत बसावें ? ३. आणीक त्यांना (मायबापांना) पुष्कळ कार्यें आहेत. त्यांच्या जीवाला फार ओढाओढ आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हांला घालविल्यावर आईबापानें पुनः आम्हांला पंढरीस बोलाविलें नाहीं ५. [३५७९]

आजपर्यंत संसाराच्या तडाख्यांत असल्यामुळें विश्रांति मिळाली नाहीं १. बायकामुलें व पैसा ह्याविषयींचाच व्यवहार मनामध्यें होता व ह्याबद्दलच सर्व काळ कामामध्यें गुंतलों होतों २. आतां प्रारब्ध उदयाला आलें आहे असें वाटत आहे, कारण आतां सर्व उपाधि नाहींशी झाली आहे (दारिद्र्य आलें. एक बायको मेली) ३. मागेंपुढें कांहीं पाहूं लागलों तों कांहीं आपल्या भेटीचा योग दिसेना. तेथपासून चिंता उत्पन्न झाली ४. तुकाराम महाराज म्हणतात, परमार्थाविषयींचें हीन भाग्य हेंच येथें वाट पाहाण्याचें कारण आहे ५. [३५८०]

पुष्कळ दिवस आईबापांची भेट नाहीं. प्रपंचव्यवसायामुळें वियोग झाला १. प्रपंचाचा व्यासंग होता. त्या योगानें मी गुंतलों होतों. त्या वेळीं मला देव आठवला नाहीं २. संबंध तोडल्यानें तुटतो व जोडल्यानें जडतो. सर्व कांहीं आपल्या वागणुकीवर आहे ३. पुष्कळ निरोपांचें आईबापांकडून उत्तर मिळालें तेंच एक माझ्याजवळ आहे. संसाराच्या कामामुळें

काय जाणों मोह होईल सांडिला । बहू दिस तुटला तुका म्हणे ॥ ५ ॥ [३५८१]

होतीं नेणों झालीं कठिणें कठीण । जवळीच मनें मन ग्वाही ॥ १ ॥ आम्ही होतों सोई सांडिला मारग । घडलें तें मग तिकूनही ॥ २ ॥ निश्चिंतीनें होते पुढिलांची सांडी । न चले ते कोंडी मायबापा ॥ ३ ॥ आम्हां नाहीं त्याचा घडला आठव । त्यांचा बहु जीव विखुरला ॥ ४ ॥ तुका म्हणे झालें धर्माचें माहेर । पडिलें अंतर आम्हांकूनी ॥ ५ ॥ [३५८२]

आतां करावा कां सोस वायांविण । लटिकाचि सीण मनासी हा ॥ १ ॥ असेल तें कळों येईल लवकरी । आतां वारकरी आल्यापाठीं ॥ २ ॥ बहु विलंबाचें सन्निध पातलें । धीराचें राहिलें फळ पोटीं ॥ ३ ॥ चालिलें तें ठाव पाविल सेवटीं । पुरलिया तुटी पाउलांची ॥ ४ ॥ तुका म्हणे आसे लागलासे जीव । म्हणऊनी कींव भाकीतसें ॥ ५ ॥ [३५८३]

: वारकरी परत आल्यावर प्रार्थना :

भागलेती देवा । माझा नमस्कार घ्यावा ॥ १ ॥ तुम्ही क्षेम कीं सकळ । बाळ अवघे गोपाळ ॥ २ ॥ मारगीं चालतां । श्रमलेती येतां जातां ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं । कृपा आहे माझ्या ठायीं ॥ ४ ॥ [३५८४]

घालूनियां ज्योति । वाट पाहें दिवसराती ॥ १ ॥ बहु उतावीळ मन । तुमचें व्हावें दरुषण ॥ २ ॥ आलों बोळवीत । तैसें याचि पंथें चित्त ॥ ३ ॥ तुका म्हणे पेणी । येतां जातां दिवस गणीं ॥ ४ ॥ [३५८५]

आजी दिवस धन्य । तुमचें जालें दरुषण ॥ १ ॥ सांगा माहेरींची मात । अवघा विस्तारीं वृत्तांत ॥ २ ॥ आइकतों मन । करूनी सादर श्रवण ॥ ३ ॥ तुका म्हणे नाम । माझा सकळ संभ्रम ॥ ४ ॥ [३५८६]

माझें पंढरीला जाणें झालें नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, पुष्कळ दिवस संबंध तुटल्यानें आईबापांनीं माझा लोभ सोडला आहे असें वाटतें ५. [३५८१]

मी कठोर झाल्यामुळें आईबापें कठोर झालीं आहेत कीं काय न कळे. माझ्या मनाच्या कठोरपणाविषयीं माझ्याजवळ असणारें मनच साक्षी आहे १. आम्ही आईबापांचा मार्ग टाकून दिला. नंतर आमच्याप्रमाणें त्यांच्याकडूनहि तसें घडलें २. निष्काळजीपणा धरल्यानें आईबापांकडून पुढच्याचा त्याग होतो व अशा स्थितींत आईबापांना अटकाव करणें हें त्यांना खपत नाहीं ३. आम्हांला आईबापांचें स्मरण झालें नाहीं. त्यामुळें त्यांचा जीव फार तळमळूं लागला ४. तुकाराम महाराज म्हणतात, पांडुरंग हे मला धर्माचे आईबाप झाले आहेत. ह्याचें कारण आमच्याकडूनच अंतर पडलें म्हणून त्यांच्यावर माझी औरस पुत्र म्हणून सत्ता राहिली नाहीं ५. [३५८२]

आतां व्यर्थ हव्यास कां करावा ? तसें करणें हें मनाला व्यर्थ श्रमदायक आहे १. कांहीं खरी स्थिति आहे ती आतां वारकरी आल्यावर त्वरित कळेल २. पुष्कळ अवकाशानें होणारी गोष्ट जवळ आली, आतां एवढा धीर धरल्यामुळें फळ मिळेल ३. मार्गानें चालणारे अखेरीस मुक्कामास पोहोंचतील, पण पावलें न चालतां खोळंबून राहिलीं तर वियोग होईल ४. तुकाराम महाराज म्हणतात, माझा जीव आशेला गुंतला आहे, म्हणून मी त्यांना कींवकाकुळती येत आहें ५. [३५८३]

अहो देवा, तुम्ही श्रमलां आहांत. मी तुम्हांला नमस्कार करीत आहें तो तुम्ही स्वीकारावा १. तुम्ही सर्व अवघ्या बाळगोपाळांसह खुशाल आहां ना ? २. मार्गानें जाण्यायेण्यानें आपण थकलां आहांत ३. तुकाराम महाराज म्हणतात, मजवर आपली कांहीं कृपा आहे ना ? ४. [३५८४]

डोळ्यांमध्यें तेल घालून मी तुमची रात्रंदिवस वाट पाहात आहें १. तुमचें दर्शन होण्याविषयीं मन फार उतावळें झालें आहे २. तुम्ही जातेवेळीं मी तुम्हांला निरोप देऊन आलों त्या वेळेपासून माझें लक्ष तुमच्या मार्गाकडे लागलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुमचे जाण्यायेण्याचे मुक्काम मी रात्रंदिवस मोजीत बसलों आहें ४. [३५८५]

तुमचें दर्शन झालें, आजचा हा दिवस धन्य आहे १. आतां आईबापांकडील सर्व सविस्तर हकीगत सांगा २. मी तत्पर मनानें ती हकीगत ऐकतों ३. तुकाराम महाराज म्हणतात, नाम घेणें हाच माझा सर्व सोहोळा आहे तरी पण माहेरचा वृत्तांत ऐकण्याला मी फार उत्सुक आहें ४. [३५८६]

बोलिलीं तीं काय (बोलिलेती काय) । माझा बाप आणि माय ॥ १ ॥ ऐसें सांगा जी झडकरी । तुम्ही सखे वारकरी ॥ २ ॥ पत्राचें वचन । काय दिलें फिरावून ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं । मना आणिलें कीं नाहीं ॥ ४ ॥ [३५८७]

काय पाठविलें । सांगा भातुकें विठ्ठलें ॥ १ ॥ आसे लागलासे जीव । काय केली माझी कींव ॥ २ ॥ फेडिले मुडतर । किंवा कांहीं जरजर ॥ ३ ॥ तुका म्हणे सांगा । कैसें आर्त पांडुरंगा ॥ ४ ॥ [३५८८]

आजीचिया लाभें ब्रह्मांड ठेंगणें । सुखी जालें मन कल्पवेना ॥ १ ॥ आर्तभूत माझा जीव जयांसाटीं । त्यांच्या जाल्या भेटी पायांसवें ॥ २ ॥ वाटुली पहातां सिणले नयन । बहु होतें मन आर्तभूत ॥ ३ ॥ माझ्या निरोपाचें आणिलें उत्तर । होईल समाचार सांगती तो ॥ ४ ॥ तुका म्हणे भेटी निवारला ताप । फळले संकल्प संत आले ॥ ५ ॥ [३५८९]

आजी बरवें झालें । माझें माहेर भेटले ॥ १ ॥ डोळां देखिले सज्जन । निवारला भाग सीण ॥ २ ॥ धन्य झालों आतां । क्षेम देऊनियां संतां ॥ ३ ॥ इच्छेचें पावलों । तुका म्हणे धन्य झालों ॥ ४ ॥ [३५९०]

वोरसोनि येती । वत्स धेनूवेच्या चित्तीं ॥ १ ॥ माझा करावा सांभाळ । वोरसोनियां कृपाळ ॥ २ ॥ स्नेहें भूक तान । विसरती झाले शीण ॥ ३ ॥ तुका म्हणे कवतुकें । दिलें प्रेमाचें भातुकें ॥ ४ ॥ [३५९१]

आलें तें आधीं खाईन भातुकें । मग कवतुकें गाईन ओंव्या ॥ १ ॥ सांगितला आधीं आइकों निरोप । होईन माझा बाप पुसे तो तें ॥ २ ॥ तुका म्हणे माझे सखे वारकरी । आले हे माहेरींहून आजी ॥ ३ ॥ [३५९२]

माझे आई आणि बाप काय बोलले? १. तें तुम्ही माझे मित्र वारकरी लवकर सांगा २. मी तुमच्याबरोबर दिलेल्या पत्राचें उत्तर त्यांनीं काय दिलें? ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी सर्व हकीगत त्यांनीं मनावर घेतली किंवा नाहीं? ४. [३५८७]

विठोबारायांनीं माझ्यासाठीं कोणता खाऊ पाठविला तो सांगा १. ह्याविषयीं माझा जीव फार आशा करीत आहे. त्यांनीं मजविषयींची दया दर्शित केली काय? २. त्यांनीं मी मूढ आहें म्हणून माझी उपेक्षा केली का ग्लानि दाखविली (हातपाय गाळले)? ३. तुकाराम महाराज म्हणतात, पांडुरंगाची मजविषयीं इच्छा कशी आहे ती सांगा ४. [३५८८]

आजच्या लाभापुढें ब्रह्मांड देखील कमी आहे, कारण मनाला जें सुख झालें आहे त्याची कल्पना करतां येत नाहीं १. ज्यांच्याविषयीं माझें हृदय इच्छातुर झालें होतें त्यांच्या पायांची गांठ पडली २. त्यांची वाट पाहाण्यानें डोळे श्रमी झाले होते व मनहि अतिशय उत्सुक होतें ३. मीं पाठविलेल्या निरोपाचें ते उत्तर आणतील व तिकडे झालेली सर्व हकीगत ते आतां सांगतील ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांची भेट झाल्यानें सर्व ताप दूर झाला व संत घरीं आल्यानें इच्छा सफळ झाली ५. [३५८९]

आज माझे आईबाप भेटले हें फार चांगलें झालें १. सज्जनांना डोळ्यांनीं पाहिलें त्यामुळें सर्व श्रम दूर झाले २. संतांना आलिंगन देऊन मी धन्य झालों ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझें इच्छित मला प्राप्त झाल्यानें मी धन्य झालों ४. [३५९०]

प्रेमभरानें वासरूं हें गाईच्या चित्तामध्यें येतें, म्हणून ती स्तनावर प्रेमानें वांसराकडे धांव घेते १. त्याप्रमाणें कृपेच्या प्रेमपान्ह्यानें माझें संरक्षण करावें २. ममतेनें भूक, तहान व झालेल्या श्रमाचा विसर होतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला आईबापांनीं कौतुकानें प्रेमाचा खाऊ दिला ४. [३५९१]

जो खाऊ मला पाठविला आहे तो मी आधीं खाईन. मग कौतुकानें आईबापांच्या वर्णनपर ओंव्या गाईन १. जो कांहीं माझ्या आईबापांनीं निरोप सांगितला आहे तो ऐकूं २. तुकाराम महाराज म्हणतात, माझे मित्र वारकरी हे आईबापांकडून आज आले ३. [३५९२]

अमूप जोडल्या सुखाचिया राशी । पार त्या भाग्यासी नाहीं आतां ॥ १ ॥ काय सांगों सुख झालें आलिंगनें । निवाली दर्शनें कांती माझी ॥ २ ॥ तुका म्हणे यांच्या उपकारासाटीं । नाहीं माझे गांठीं कांहीं एक ॥ ३ ॥ [३५९३]

पवित्र व्हावया घालीन लोळणी । ठेवीन चरणीं मस्तक हें ॥ १ ॥ जोडोनि हस्तक करीन विनवणी । घेइन पायवणी धावोनियां ॥ २ ॥ तुका म्हणे माझें भांडवल सुचें । संतां हें ठायींचें ठावें आहे ॥ ३ ॥ [३५९४]

: स्वामी वैकुंठास गेले ते वेळचे–निर्याणाचे अभंग :

शोधितांचि न ये । म्हणोनि वोगळतों पाय ॥ १ ॥ आतां दिसों नये जना । ऐसें करा नारायणा ॥ २ ॥ परतोनी मन । गेलें ठायींचि मुरोन ॥ ३ ॥ विसरला तुका । बोलों चालों जाला मुका ॥ ४ ॥ [३५९५]

रज्जुसर्पाकार । भासयेलें जगडंबर ॥ १ ॥ म्हणोनी आटवितों (आवडती) पाय । वेतों आलाय बलाय ॥ २ ॥ दृश्य द्रुमाकार लाणी । केलों सर्वस्वासी धणी ॥ ३ ॥ तुकीं तुकला तुका । विश्वीं भरोनी उरला लोकां ॥ ४ ॥ [३५९६]

म्हणवितों दास । परी मी असें उदास ॥ १ ॥ हाचि निश्चय माझा । परि मी निश्चयाहुनी दुजा ॥ २ ॥ सरतें कर्तृत्व माझ्यानें । परि मी त्याहींहून भिन्न (परि मी त्याहून असें भिन्न) ॥ ३ ॥ तुका तुकासी तुकला । तुकाहूनि निराळा ॥ ४ ॥ [३५९७]

घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं । मुक्ता आत्मस्थिति सांडवीन ॥ १ ॥ ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं । भाग्य तरी ऋणी देवा ऐसा ॥ २ ॥ तीर्थभ्रामकासी आणीन आळस । कडू स्वर्गवास

असंख्य सुखाच्या राशि प्राप्त झाल्या. आतां आमचें भाग्य अपार आहे १. संतांना आलिंगन दिल्यानें जें सुख झालें तें काय सांगावें ? त्यांच्या दर्शनानें माझा ताप शांत झाला २. तुकाराम महाराज म्हणतात, संतांनीं जे मजवर उपकार केले, त्यांचा मोबदला देण्याला मजजवळ काहीं नाहीं ३. [३५९३]

मी पवित्र होण्याकरितां त्यांच्या पायाशीं लोळेन व त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवीन १. हात जोडून त्यांना विनंति करीन व त्यांच्या चरणतीर्थाचें धांवत जाऊन सेवन करीन २. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचें मूळचेंच माझें भांडवल संतांना ठाऊक आहे ३. [३५९४]

हे देवा, कोणत्याहि तऱ्हेनें तुमचा शोध करतां येत नाहीं, म्हणून मी तुमच्या पायांचा आश्रय करीत आहें १. हे नारायणा, आतां लोकांना मी दिसूं नये असें करा (मला परम धामाला न्या) २. मन देहादि प्रपंचापासून परत होऊन तें स्वरूपाच्या ठिकाणींच मुरून गेलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी व्यवहारांतला बोलण्याचालण्याचा व्यवहार करून तें विसरून गेलों व मुक्यासारखा झालों ४. [३५९५]

दोरीवर सर्प भासल्याप्रमाणें, हा जगदाभास स्वरूपावर भासत आहे १. म्हणूनच सत्य जे श्रीहरीचे चरण, त्यांचा मी आठव करीत आहें व त्यांनाच प्रीतीनें कुरवाळीत आहें २. दृश्य जो जगदाभास, हाच कोणी एक वृक्षाकार, याचें जें मूळ ठिकाण परब्रह्म, त्याच्या योगानें सर्वस्वी तृप्ति झाली ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी परमात्म्याच्या तुलनेस आल्यामुळें सर्व विश्वाच्या अंतर्बाहीं भरून लोकांवर उपकार करण्याकरितां देहदृष्टीनें शिल्लक राहिलों आहें ४. [३५९६]

मी हरीचा भक्त आहें, असें आपल्याला म्हणवीत आहें. पण खरोखर पाहिलें तर उदास आहें १. अशा प्रकारचाच माझा निश्चय झाला आहे, पण मी त्या निश्चयाहून निराळा आहें २. माझ्या योगानें कर्तृत्व होत आहे, पण मी त्या कर्तृत्वाहूनहि निराळा आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी परब्रह्माच्या तुलनेस आलों परंतु त्या स्थितीहूनहि (तुलनेहूनहि) मी वेगळा आहें ४. [३५९७]

मी असें रसपूर्ण कीर्तन करीन, कीं त्यानें ब्रह्मज्ञान्याकडून लाळ घोंटावयास लावीन व आत्मस्थितीनें असणाऱ्या मुक्ताकडून आत्मस्थिति टाकावयास लावीन १. कारण हरीच्या कीर्तनानें देह ब्रह्मरूप होतो व देवासारखाहि ऋणी होतो, असें भाग्य प्राप्त होतें २. तीर्थयात्रा करणारास आळस आणीन. स्वर्गांत राहाणें व तेथील दिव्य भोग भोगणें.

करीन भोग ॥ ३ ॥ सांडवीन तपोनिधा अभिमान। यज्ञ आणि दान लाजवीन ॥ ४ ॥ भक्तिभाग्यसीमा साधीन पुरुषार्थ । ब्रह्मींचा जो अर्थ निजठेवा ॥ ५ ॥ धन्य म्हणवीन इह लोकीं लोकां। भाग्य आम्हीं तुका देखियेला ॥ ६ ॥ [३५९८]

संसाराचे अंगीं अवघींच व्यसनें। आम्ही या कीर्तनें शुद्ध झालों ॥ २ ॥ आतां हें सोंवळें झालें त्रिभुवन। विषमा धोऊन सांडियेलें ॥ १ ॥ ब्रह्मपुरीं वास करणें अखंड। न देखिजे तोंड विटाळाचें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां एकांताचा वास। ब्रह्मीं ब्रह्मरस सेवूं सदा ॥ ४ ॥ [३५९९]

तुम्ही सनकादिक संत। म्हणवितां कृपावंत ॥ १ ॥ एवढा उपकार। देवा सांगा नमस्कार ॥ २ ॥ भाकोनी (भाकावी) करुणा। विनवा वैकुंठींचा राणा ॥ ३ ॥ तुका म्हणे मज आठवा। मूळ लवकरी पाठवा ॥ ४ ॥ [३६००]

गरुडाचे पायीं। ठेवीं वेळोवेळां डोई ॥ १ ॥ वेगीं आणावा तो हरी। मज दीनातें उद्धरीं ॥ ३ ॥ पाय लक्ष्मीच्या हातीं। तिशीं यावें (म्हणोनि येतों) काकुलती ॥ ३ ॥ तुका म्हणे शेषा। जागें करा हृषीकेशा ॥ ४ ॥ [३६०१]

आपुल्या माहेरा जाईन मी आतां। निरोप या संतांहातीं आला ॥ १ ॥ सुख दुःख माझें आइकिलें कानीं। कळवळा मनीं करुणेचा ॥ २ ॥ करूनी सिद्ध मूळ साउलें भातुकें। येती दिसे एकें न्यावयासी ॥ ३ ॥ त्याचि पंथें माझें लागलेंसे चित्त। वाट पाहे नित्य माहेराची ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां येतील न्यावया। अंगें आपुलिया मायबाप ॥ ५ ॥ [३६०२]

चिन्हें उमटती अंगीं। शकुनाजोगीं उत्तम ॥ १ ॥ आठवला बाप माय। येईल काय मूळ नेणों

हें कडु वाटावयास लावीन ३. जे कोणी तपोनिधि आहेत, त्यांच्याकडून अभिमान टाकवीन व यज्ञदानादि साधनें लज्जित करीन ४. भक्तिभाग्य व चवथा पुरुषार्थ म्हणजे परब्रह्मस्वरूपीं निजात्मभावरूपी अर्थाचा ठेवा आहे तो साध्य करीन ५. तुकाराम महाराज म्हणतात, इहलोकांतल्या लोकांकडून असें म्हणवीन, कीं आम्हीं तुकाराम महाराजांना पाहिलें, हें आमचें भाग्य आहे ६. [३५९८]

संसाराच्या ठिकाणीं सर्व व्यसनें (उपाधि) आहेत. आम्ही श्रीहरीच्या कीर्तनानें शुद्ध झालों आहों १. आतां हें त्रैलोक्य आम्हांला शुद्ध झालें असून आम्हीं हृदयावरील विषम कल्पना धुऊन टाकली २. आतां आम्ही परब्रह्मरूपी गांवामध्यें अखंड वस्ती करीत आहोंत. तेथें भेदात्मक प्रपंचरूपी विटाळाचें दर्शन होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आमचें वास्तव्य एकांतांत असून परब्रह्माच्या ठिकाणीं परब्रह्मरूपी रसाचें आम्ही सर्व काळ सेवन करीत आहोंत ४. [३५९९]

अहो सनकादिक संत हो, तुम्ही आपणांस कृपावंत म्हणवितां १. देवांना तुम्ही माझा नमस्कार सांगा. एवढा मजवर उपकार करा २. मजविषयीं वैकुंठाच्या स्वामीजवळ कींव काकूळती करून विनंति करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाला सांगा, कीं, माझी आठवण करून मला बोलावणें पाठवा ४. [३६००]

मी गरुडाचे पायावर वारंवार मस्तक ठेवीत आहें १. कारण मज गरिबाचा उद्धार करण्याकरितां त्यानें श्रीहरीला मोठ्या वेगानें घेऊन यावें २. लक्ष्मी ही पादसेवा करीत आहे म्हणून तिला काकुळती येऊन सांगतों, कीं हरीस पाठवून द्यावें. ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो शेषा, तुमच्या ठिकाणीं भगवानानें शयन केलें आहे तर मजकरितां तुम्ही त्या हृषीकेशाला जागृत करा ४. [३६०१]

आपल्या आईबापांच्या घरीं मी आतां जाईन, कारण तिकडून संतांपाशीं निरोप आला आहे १. माझी सुखदुःखाची हकीगत त्यांनीं कानानें ऐकली व मजविषयींच्या दयेनें त्यांचें मन कळवळलें आहे २. मला बोलावणें पाठविण्याची तयारी करून व खाऊ देऊन तीं मला नेण्याकरितां येत आहेत, असें दिसतें ३. त्यांच्या मार्गाकडे माझें चित्त लागलें आहे, मी सतत आईबापांच्या बोलावण्याची वाट पाहात आहें ४. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मायबाप स्वतः मला न्यावयास येतील ५. [३६०२]

शुभ शकुनाचीं लक्षणें माझ्या आंगीं स्पष्ट दिसत आहेत १. तीं हीं, कीं मला आईबापांचें स्मरण झालें, ते मला स्वतःच

॥ २ ॥ उत्कंठित झालें मन । तेचि खुण तेथींचि ॥ ३ ॥ तुका म्हणे कामा वारीं । आळस घरीं करमेना ॥ ४ ॥ [३६०३]

आरोनियां पाहें वाट । कटकट सोसेना ॥ १ ॥ आलियास पुसें मात । तेथें चित्त लागलें ॥ २ ॥ दळीं कांडीं लोकांऐसें । परि मी नसें ते ठायीं ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें पिसें । तेथें तैसें असेल ॥ ४ ॥ [३६०४]

येथीलिया अनुभवें । कळों जीवें येतसे ॥ १ ॥ दोहीं ठायीं एक जीव । माझी कींव त्या अंगीं ॥ २ ॥ भूक भुकेंची खाऊनि धाय । नाहीं हाय अन्नाची ॥ ३ ॥ तुका म्हणे सुख झालें । अंतर धालें त्यागुणें ॥ ४ ॥ [३६०५]

पैल आले हरि । शंख चक्र शोभे करीं ॥ १ ॥ गरुड येतो फडत्कारें । ना भी ना भी म्हणे त्वरें ॥ २ ॥ मुगुटकुंडलांच्या दीप्ति । तेजें लोपला गभस्ति ॥ ३ ॥ मेघश्यामवर्ण हरि । मूर्ति डोळस साजिरी ॥ ४ ॥ चतुर्भुज वैजयंती । गळां माळ हे रुळती ॥ ५ ॥ पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ॥ ६ ॥ तुका झालासे संतुष्ट । घरा आलें वैकुंठपीठ ॥ ७ ॥ [३६०६]

शंखचक्रगदापद्म । पैल आला पुरुषोत्तम ॥ १ ॥ ना भी ना भी भक्तराया । वेगीं पावलों सखया ॥ २ ॥ दुरूनी येतां दिसे दृष्टीं । धाकें दोष पळती सृष्टी ॥ ३ ॥ तुका देखोनी एकला । वैकुंठींहूनि हरि आला ॥ ४ ॥ [३६०७]

पैल दिसतील भार । दिंडी पताका अपार ॥ १ ॥ आला पंढरीचा राणा । दिसतील त्याच्या खुणा ॥ २ ॥ सुख वाटे मना । डोळे बाह्या स्फुरती ॥ ३ ॥ उठिले गजर नामाचे । दळभार वैष्णवांचे

बोलवावयास येतील काय न कळे २. माझें मन त्यांच्याविषयीं अति उत्सुक झालें आहे, हीच त्यांच्या येण्याची खूण होय ३. तुकाराम महाराज म्हणतात, कामधंद्याविषयीं आळस उत्पन्न झाला व घरांत राहून मला करमत नाहीं ४. [३६०३]

मन स्थिर करून मी वाट पाहात आहें, मला घरची कटकट सोसत नाहीं १. येणारांना मी आईबापांकडील हकीगत विचारीत आहें; माझें सर्व चित्त तेथें लागलें आहे २. दळणें, कांडणें इत्यादि घरचे व्यवहार मी लोकांसारखा करीत आहें, पण माझें लक्ष त्या ठिकाणीं नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्या ठिकाणीं आईबापांचें वेड आहे, तर त्यांनाहि आमचें असेंच वेड असेल ४. [३६०४]

येथल्या एकंदर स्थितीच्या अनुभवावरून जीवाला असें वाटत आहे, कीं १. मी व आईबाप ह्या उभयतांमध्यें एक जीव, चैतन्य आहे. ह्या दृष्टीनें माझी कींव त्यांना असलीच पाहिजे २. भूकच भुकेला खाऊन तृप्त झाली आहे. आतां अन्नाविषयींची हांव राहिली नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाच्या निर्गुण-सगुण रूपाच्या दर्शनाच्या योगानें अंतःकरण तृप्त झालें, म्हणून तें सुखी आहे ४. [३६०५]

शंख चक्र ज्यांच्या हातांत शोभत आहेत, असे हरि हे पलीकडून येत आहेत १. हा गरुडाचा फडत्कार ऐकूं येत असून, 'तूं भिऊं नकोस, भिऊं नकोस' असें तो फडत्कार त्वरेनें म्हणत आहे २. त्यांच्या मस्तकावरील मुगुटाच्या व कानाच्या कुंडलांच्या तेजानें सूर्य आच्छादित झाला आहे ३. मेघासारखा हरीचा श्यामवर्ण असून त्यांची मूर्ति सुंदर सुशोभित आहे ४. त्यांना चार हात असून त्यांनीं गळ्यामध्यें वैजयंती माळ धारण केली आहे ५. पीतांबर असा चमकत आहे, कीं त्याच्या योगानें दशदिशा प्रकाशित झाल्या आहेत ६. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या घरीं वैकुंठाची देवता आल्यामुळें मी संतोषित झालों आहें ७. [३६०६]

शंख, चक्र, गदा, पद्म हीं आयुधें हातामध्यें धारण करून पलीकडून हे पुरुषोत्तम येत आहेत १. 'हे भक्तराजा जिवलगा, तूं भिऊं नकोस, भिऊं नकोस, मी त्वरेनें येतों' असें ते म्हणत आहेत २. दुरून ते येत आहेत असें दृष्टीला दिसत आहे व त्यांच्या भयानें सृष्टींतील दोष पळत आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला एकटा पाहून वैकुंठाहून हरि आला आहे ४. [३६०७]

पलीकडे असंख्य वीणे व पताका ह्यांसह वैष्णवांचे समुदाय दिसत आहेत १. खरोखर पंढरीचा राजा पांडुरंग आला. असें त्यांच्या खुणांवरून भासत आहे २. त्या योगानें माझ्या मनाला सुख होऊन डोळे व बाहु स्फुरण पावत आहेत ३.

॥ ४ ॥ तुका करी रिता ठाव । त्यांसी बैसावया वाव ॥ ५ ॥ [३६०८]

चला जाऊं रे सामोरे । पुढें भेटों विठ्ठल धुरे ॥ १ ॥ तुका आनंदला मनीं । कैसा जातो लोटांगणीं । फेडावया धणी । प्रेमसुखाची आजी ॥ २ ॥ पुढें आले कृपावंत । मायबाप साधुसंत ॥ ३ ॥ तुका आळंगिला बाहीं । ठेविला विठोबाचे पायीं ॥ ४ ॥ [३६०९]

पाहुणे घरासी । आजी आले हृषीकेशी ॥ १ ॥ काय करूं उपचार । कोंप मोडकी जर्जर ॥ २ ॥ दरदरी पाण्या- । माजी रांधियेल्या कण्या ॥ ३ ॥ घरीं मोडकिया वाजा । वरी वाकळांच्या शेजा ॥ ४ ॥ मुखशुद्धि तुळसीदळ । तुका म्हणे मी दुर्बळ ॥ ५ ॥ [३६१०]

संतीं केला अंगीकार । त्यांसी अभिमान थोर ॥ १ ॥ कांहीं ठेविलें चरणीं । घेती तेंचि पुरवूनि । तुका पायवणी । घेऊनियां निराळा ॥ २ ॥ नसतां कांहीं संचित । भेटी जाली अवचित ॥ ३ ॥ देव मिळोनियां भक्त । तुका केलासे सनाथ ॥ ४ ॥ [३६११]

अवधियांच्या आलों मुळें । एका वेळे न्यावया ॥ १ ॥ सिद्ध व्हावें सिद्ध व्हावें । आधीं ठावें करितों ॥ २ ॥ जोंवरी ते घटिका दुरी । आहे उरी तो काळ ॥ ३ ॥ मंगळाचे वेळे उभे । असो शोभे सावध ॥ ४ ॥ अवघियांचा योग घडे । तरी जोडे श्लाघ्यता ॥ ५ ॥ तुका म्हणे पाहें वाट । बहु आट करूनी ॥ ६ ॥ [३६१२]

सकळही माझी बोळवण करा । परतोनी घरा जावें तुम्हीं ॥ १ ॥ कर्मधर्मे तुम्हां असावें कल्याण । घ्या माझें वचन आशीर्वाद ॥ २ ॥ वाढवूनी दिलें एकाचिये हातीं । सकळ निश्चिंती जाली तेथें ॥ ३ ॥ आतां मज जाणें प्राणेश्वरासवें । मी माझिया भावें अनुसरलों ॥ ४ ॥ वाढवितां लोभ होईल उशीर । अवघींच स्थिर करा ठायीं ॥ ५ ॥ धर्म अर्थ काम जाला एके ठायीं । मेळविला जिहीं

वैष्णवांच्या समुदायांत हरिनामाचा गजर होत आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांना बसण्याकरितां मी जागा रिकामी करीत आहें ५. [३६०८]

चला, आपण सर्व जण सामोरे जाऊं व श्रेष्ठ विठ्ठलाला भेटूं १. मला आनंद होऊन मी आज प्रेमसुखाची तृप्ति घेण्याकरितां लोटांगण घालीत जात आहें २. कृपावंत साधुसंत आईबाप हे पुढें आले आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला त्यांनीं आपल्या हातानें आलिंगन देऊन विठोबाच्या पायांवर घातलें आहे ४. [३६०९]

हृषीकेशी हे आज माझ्या घरीं पाहुणे आले आहेत १. त्यांचा सत्कार काय करूं ? माझें खोपट जुनें मोडकें आहे २. कण्या पाण्यामध्यें पातळ शिजविल्या आहेत ३. घरीं मोडक्या बाजा असून त्यांजवर गोधड्या अंथरल्या आहेत ४. तुकाराम महाराज म्हणतात, मुखशुद्धीला माझ्याजवळ तुळसीदळ आहे, अशा प्रकारचा मी भिकारी आहें ५. [३६१०]

संतांनीं माझा स्वीकार केला आहे, म्हणून आतां त्यांना माझा मोठा अभिमान आहे १. जें कांहीं त्यांच्या पायांपाशीं हजर करावें, तेवढ्यांतच ते पूर्ण मानून घेतात. मी त्यांचें चरणतीर्थ घेऊन निराळा राहिलों आहें २. माझें योग्य प्रारब्ध नसतां त्यांची भेट अकस्मात् झाली ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवांनीं व भक्तांनीं मिळून मला सनाथ केलें आहे ४. [३६११]

तुकाराम महाराज आपल्या आनुषंगिक जनांना म्हणतात, कीं मी सर्वांना एक वेळ वैकुंठीं न्यावयाला आलों आहें १. सर्वांनीं तयार व्हावें, असी मी आधीं सर्वांना द्विवार सूचना करीत आहें २. जोंपर्यंत जाण्याची वेळ दूर आहे, तोंपर्यंत सर्वांनीं जाण्याच्या तयारींत असावें ३. मंगल कार्याच्या वेळेस सावध बुद्धीनें तत्पर होऊन उभें असूं ४. अशा वेळीं सर्वांचा योग होण्यांतच आनंद होतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, पुष्कळ यत्न करून मी वाट पाहात आहें ६. [३६१२]

तुम्हीं सर्व जण मला पोहोंचवून परत आपल्या घरीं जावें १. कर्मधर्मांच्या योगेंकरून तुमचें कल्याण असावें अशा प्रकारचा माझा हा आशीर्वाद घ्या २. माझें पालनपोषण करून तुम्हीं मला देवाच्या स्वाधीन केलेंत. त्या योगानें माझी सर्व चिंता दूर झाली ३. आतां मला प्राणांच्या स्वामीबरोबर जावयाचें आहे; मी आपल्या भावनेनें त्याच्या ठिकाणीं अनुसरलों आहें ४. आतां तुम्हीं मजविषयींचा लोभ वाढविला तर उशीर होईल, म्हणून तुम्ही सर्व जण आपलीं मनें व इंद्रियें जागच्या जागीं स्थिर करा ५. धर्म, अर्थ, काम हे तीन पुरुषार्थ ज्यांनीं आमच्या हाताला हात दिला

हाता हात ॥ ६ ॥ तुका म्हणे आतां जाली हेचि भेटी । उरल्या त्या गोष्टी बोलावया ॥ ७ ॥ [३६१३]

बोलिलों तें आतां पाळावें वचन । ऐसें पुण्य कोण माझे गांठीं ॥ १ ॥ जातों आतां आज्ञा घेऊनियां स्वामी । काळक्षेप आम्ही करूं कोठें ॥ २ ॥ न घडे यावरी न धरवे धीर । पीडतां हें राष्ट्र देखोनी जग ॥ ३ ॥ हातीं धरोनियां देवें नेला तुका । जेथें नाहीं लोकां पराश्रम ॥ ४ ॥ [३६१४]

करावें तें काम । उगाच वाढवावा श्रम ॥ १ ॥ अवघें एकमय । राज्य बोलों चालों नये ॥ २ ॥ दुजीयाची सत्ता । न चलेसी झाली आतां ॥ ३ ॥ आतां नाहीं तुका । पुन्हां हारपला या लोकां ॥ ४ ॥ [३६१५]

आम्ही जातों तुम्ही कृपा असों द्यावी । सकळां सांगावी विनंति माझी ॥ १ ॥ वाढवेळ झाला उभा पांडुरंग । वैकुंठा श्रीरंग बोलावितो ॥ २ ॥ अंतकाळीं विठो आम्हांसी पावला । कुडीसहित झाला गुप्त तुका ॥ ३ ॥ [३६१६]

न देखिजे ऐसें केलें । या विठ्ठलें दुःखासी ॥ १ ॥ कृपेचिये सिंहासनीं । अधिष्ठानीं बैसविलें ॥ २ ॥ वाजता तो न लगे वारा । क्षीरसागरा शयनीं ॥ ३ ॥ तुका म्हणे अवघे ठायीं । मज पायीं राखिलें ॥ ४ ॥ [३६१७]

: तुकोबाच्या वियोगानें कान्होबा देवाशीं भांडले ते अभंग :

दुःखें दुभागलें हृदयसंपुष्ट । गहिंवरें कंठ दाटताहे ॥ १ ॥ ऐसें काय केलें सुमित्रा सखया । दिलें टाकोनिया वनामाजी ॥ २ ॥ आक्रंदती बाळें करुणावचनीं । त्या शोकें मेदिनी फुटों पाहे ॥ ३ ॥

त्यांनीं मिळविले ६. तुकाराम महाराज म्हणतात, आमची हीच भेट अखेरची झाली असें समजा. आतां माझ्या मरणानंतर माझ्यासंबंधीं बोलण्याकरितां गोष्टी मात्र शिल्लक राहातील ७. [३६१३]

आतां मीं जो तुम्हांला 'कर्मधर्मे तुम्हां असावें कल्याण' असा (मागील अभंगांत) उपदेश केला, तो तुम्ही आतां पाळावा. तो नाहीं पाळलात तर तो तुम्हांला पाळायला लावावा, असें पुण्य माझ्या पदरीं कोठें आहे? १. अहो स्वामी, आतां आपली आज्ञा घेऊन आम्ही जातों. आम्ही कोठेंतरी कालक्षेप करूं २. राष्ट्रांतील सर्व लोक पीडित झालेले पाहून आमच्यानें येथें राहाणें होत नाहीं व धीरहि निघत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला देवांनीं हातीं धरून नेलें व ज्या ठिकाणीं लोकांचा कोणताहि उपद्रव नाहीं, किंवा जीवाला पुनः जन्ममरण नाहीं, अशा ठिकाणीं मला नेऊन ठेविलें ४. [३६१४]

आतां काम करणें हें उगीच श्रम वाढविणें आहे १. आतां सर्व एकमय राज्य झालें आहे, बोलणें चालणें कांहीं राहिलें नाहीं २. ह्या ठिकाणीं आतां दुसऱ्याची सत्ता चालणार नाहीं, अशी स्थिति झाली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां मी पुनः येणार नाहीं. इतउत्तर ह्या सर्व लोकांना मी हरवलों (नाहींसा झालों) ४. [३६१५]

आम्ही जातों, तुमची आमच्यावर कृपा असावी अशा प्रकारची सर्वांना माझी विनंति सांगावी. श्रीहरि आम्हांला वैकुंठास बोलावणें आले आहेत व ते फार वेळ उभे आहेत २. तुकाराम महाराज म्हणतात, विठोबा हा अंतकाळीं आम्हांला पावला (प्रसन्न झाला), इतकें बोलून तुकाराम महाराज देहासहित गुप्त झाले ३. [३६१६]

विठोबारायांनीं, पुनः दुःखदर्शन न होईल, अशा स्थितींत मला नेऊन बसविलें १. आपल्या कृपेनें जगाचें अधिष्ठान असलेल्या ब्रह्मरूप सिंहासनावर माझी स्थापना केली २. क्षीरसागरशयनाच्या ठिकाणीं कोणत्याहि तऱ्हेचा उपद्रव (दुःखाचा कितीहि वारा सुटला तरी) लागत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व ठिकाणीं माझें ब्रह्मरूपानें व्यापकत्व ठेवून दिव्य देहानें आपल्या चरणाजवळहि ठेविलें आहे व त्यांनीं माझें आपल्या पायांपाशीं रक्षण केलें ४ [३६१७]

दुःखानें माझें हृदय दुभंग झालें, कंठ दुःखाच्या गहिंवरानें दाटत आहे १. हे सख्या सुमित्रा, तूं मला वनांत टाकून दिलेंस, असें कां केलेंस? २. बालकें कींव काकुळती येऊन रडत आहेत, त्यांच्या शोकानें पृथ्वी फुटते कीं काय

काय हें सामर्थ्य नव्हतें तुजपाशीं । संगें न्यावयासीं अंगभूतां ॥ ४ ॥ तुज ठावें आम्हां कोणी नाहीं सखा । उभय लोकीं तुका तुजविण ॥ ५ ॥ कान्हा म्हणे तुझ्या वियोगें पोरटीं । झालों दे रे भेटी बंधुराया ॥ ६ ॥ [३६१८]

सख्यत्वासी गेलों करीत सलगी । नेणेंचि अभागी महिमा तुझा ॥ १ ॥ पावलों आपुलें केलें लाहें रस । निर्दैवां परिस काय होय ॥ २ ॥ कष्टविलासी म्यां चांडाळें संसारीं । अद्यापिवरी तरी उपदेशीं ॥ ३ ॥ उचित अनुचित सांभाळिलें नाहीं । कान्हा म्हणे कांहीं बोलों आतां ॥ ४ ॥ [३६१९]

असो आतां कांहीं करोनियां ग्लांती । कोणा काकुलती येइल येथें ॥ १ ॥ करूं कांहीं दिस राहे तों सायास । झोंबों त्या लागास भावाचिये ॥ २ ॥ करितां रोदना बापुडें म्हणती । परि नये अंतीं कामा कोणी ॥ ३ ॥ तुकया बंधु म्हणे पडिलिया वनीं । विचार तो मनीं बोलिला हे ॥ ४ ॥ [३६२०]

चरफडें चरफड शोकें शोक होये । कार्यमूळ आहे धीरापाशीं ॥ २ ॥ कल्पतसे मज ऐसें हें पाहतां । करावी ते चिंता मिथ्या खोटी ॥ २ ॥ न चुके होणार सांडिलया शूरत्वा । फुकटचि सत्वा होईल हानि ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे दिल्या बंद मना । वांचूनी निधाना न पवीजे ॥ ४ ॥ [३६२१]

: तुकोबाच्या वियोगामुळें कान्होबाचें देवाशीं कठोर भाषण :

मूळस्थळ ज्याचें गोमतीचे तीरीं । तो हा सारी दोरी खेळवितो ॥ १ ॥ ऐसें हें कळलें असावें सकळां । चोर त्या वेगळा नाहीं दुजा ॥ २ ॥ वैष्णव हे हेर तयाचे पाळती । खूण हे निरुती सांगितली ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे आलें अनुभवास । तेणेंच आम्हांस नागविलें ॥ ४ ॥ [३६२२]

न लगे चिंता आतां अनुमोदन हातां । आलें मूळ भ्राता गेला त्याचें ॥ १ ॥ घरभेद्या येथें आहे तें सुकान । धरितों कवळून पाय दोन्ही ॥ २ ॥ त्याचें त्याचिया मुखें पडियेलें ठावें । न लगे

असें वाटतें ३. आपल्याबरोबर आम्हांला नेण्याला तुझ्या अंगीं शक्ति नव्हती काय ? ४. हे तुकया बांधवा, तुला ठाऊक आहे, कीं आम्हांला तुझ्यावांचून इहपरलोकांत प्रियसखा कोणी नाहीं ५. कान्होबा म्हणतात, हे बंधुराया, तुझ्या वियोगानें आम्ही पोरकीं झालों आहोंत, म्हणून तूं आम्हांला भेट दे ६. [३६१८]

सख्यत्वामुळें तुझ्याशीं सलगीनें वागलों, पण तुझी योग्यता आम्ही भाग्यहीनांनीं जाणली नाहीं १. आम्हीं तुझ्याशीं अशा प्रकारचें वर्तन ठेवल्याचें फळ पावलों. निर्दैवांना परिसाची किंमत काय आहे? २. मीं चांडाळानें तुला संसारामध्यें त्रास दिला व मी अजूनदेखील तुला उपदेश करीत होतों ३. कान्होबा म्हणतात, मी योग्य अयोग्य जाणून, त्या विचारानें वागलों नाहीं. आतां काय सांगूं? ४. [३६१९]

असो, आतां त्याचा पश्चात्ताप करून काय उपयोग आहे ? आतां येथें आमच्याविषयीं कोणाला काकुळती येईल? १. ज्या मार्गानें आपला भाऊ गेला आहे, त्या मार्गाचा आश्रय करून कांहीं दिवस यत्न करीत राहूं २. रडत बसलें तर लोक दीन बापुडा आहे असें म्हणतील, पण अंतसमयीं कोणीहि उपयोगाला येणार नाहीं ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, वनामध्यें पडल्यावर जो मनांत विचार आला, तो मी बोललों ४. [३६२०]

कितीहि तडफडलें तरी त्यानें तडफडच वाढणार व शोकानें शोकच वाढेल. धैर्य धरणें हेंच कार्याचें मूळ आहे १. असा विचार करून पाहिल्यानें मला वाटलें, कीं व्यर्थ चिंता करणें हें मिथ्या होय २. शौर्य व धैर्य टाकल्यानें होणारी गोष्ट कधींहि चुकणार नाहीं, मग तसें केल्यानें सत्त्वाचीहि हानि मात्र फुकट होईल ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, मनावर ताबा ठेवल्याशिवाय, मनाला बंधन घातल्याशिवाय परमार्थाचा ठेवा प्राप्त होणार नाहीं ४. [३६२१]

जो गोमती तीर्थाच्या कांठीं आहे, तोच हा सर्वांना नाचविणारा सूत्रधारी आहे १. असें सर्वांना कळलें असावें. त्याच्याखेरीज दुसरा चोर नाहीं २. वैष्णव हे त्याच्या पाळतीवर असणारे हेर आहेत, त्यांनीं मला ही खरी खूण सांगितली ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, तीच गोष्ट अनुभवाला आली, त्यानेंच आम्हांला फसविलें ४. [३६२२]

आतां चिंता करावयास नको व कोणाची संमति नको. माझा भाऊ गेला त्याचें कारण मला कळलें १. सर्व चालविणारा जो देव तोच त्या ठिकाणीं घरभेद्या आहे, त्याचेच पाय मी मिठी मारून धरतों २. हें त्याचें कृत्य मला

सरावें मागें पुढें ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे करील भेटी भावा । सोडीन तेधवां या विठ्ठला ॥ ४ ॥ [३६२३]

बरा रे निर्गुणा नष्ट नारायणा । घरबुडवणा भेटलासी ॥ १ ॥ एके घरीं कोणी कोणासी न धरी । ऐसी अपरांपरी केली आम्हां ॥ २ ॥ कान्हा म्हणे कां रे निष्काम देखिलें । म्हणोनि मना आलें करितोसी ॥ ३ ॥ [३६२४]

धींदधींद तुझ्या करीन चिंधड्या । ऐसें काय वेड्या जाणितलें ॥ १ ॥ केली तरी बरें मज भेटी भावास । नाहीं तरी नास आरंभिला ॥ २ ॥ मरावें मारावें या आलें प्रसंगा । बरें पांडुरंगा कळलेंसावें ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे तुझी माझी उरी । उडाली न धरीं भीड कांहीं ॥ ४ ॥ [३६२५]

भक्ति मुक्ति तुझें जळो ब्रह्मज्ञान । दे माझ्या आणोनि भावा वेगीं ॥ १ ॥ रिद्धि सिद्धि मोक्ष ठेवीं गुंडाळून । दे माझ्या आणून भावा वेगीं ॥ २ ॥ नको आपुलिया नेऊं वैकुंठासी । दे माझ्या भावासी आणून वेगीं ॥ ३ ॥ नको होऊं कांहीं होशील प्रसन्न । दे माझ्या आणून भावा वेगीं ॥ ४ ॥ तुकयाबंधु म्हणे पाहा हो नाहीं तरी । हत्या होईल शिरीं पांडुरंगा ॥ ५ ॥ [३६२६]

मुख्य आहे आम्हां मातेचा पटंगा । तुज पांडुरंगा कोण लेखी ॥ १ ॥ नको लावूं आम्हां सवें तूं तोंवरी । पाहा दूरवरी विचारूनी ॥ २ ॥ साहे संतजन केले महाराज । न घडे आतां तुज भेईन मी ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे आइक्यें ऐक्यता । वाढतें अनंता दुःखें दुःख ॥ ४ ॥ [३६२७]

नये सोमसरी उपचाराची हरी । करकरेचें करीं काळें तोंड ॥ १ ॥ मागतों इतुकें जोडूनियां कर । ठेवूनियां शिर पायांवरी ॥ २ ॥ तुम्हां आम्हां एके ठायीं सहवास । येथें द्वैत द्वेष काय बरा ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे बहुतां बहुतां रीती । अनंता विनंति परिसावी हे ॥ ४ ॥ [३६२८]

त्याच्याच मुखानें कळलें. आतां मागेंपुढें ठेवण्याची गरज नाहीं ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, ज्या वेळीं हा विठ्ठल माझ्या भावाची मला भेट करून देईल तेव्हांच मी ह्याच्या पायांना मारलेली मिठी सोडीन ४. [३६२३]

अरे नारायणा, तूं गुणातीत निष्ठुर असा आहेस, आमचें घर बुडविणारा बरा आम्हांस भेटलास ! १. एका घरांत कोणीं कोणाचा संबंध धरूं नये अशी आमची वाताहात केलीस २. कान्होबा म्हणतात, अरे देवा, तूं माझा बंधु तुकाराम हा निरिच्छ, निष्काम आहे असें पाहिलेंस म्हणून जें मनाला वाटेल तें करतोस ? ३. [३६२४]

धिक्कार असो तुला, तूं नष्ट आहेस अशी तुझी सर्वत्र प्रसिद्धि करीन. हे वेड्या देवा, तूं आमचें काय जाणलें आहेस ? १. माझी आणि माझ्या भावाची भेट करून दिलीस तर बरें, नाहींतर तुझा नाश करण्याला मी प्रवृत्त झालों आहें २. हे पांडुरंगा, आतां ह्या वेळचा असा प्रसंग आला आहे, कीं आपण तरी मरावें किंवा तुला तरी मारावें, हें आम्हांला चांगलें समजून आलें आहे ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, आतां तुमची आणि आमची कांहीं मर्यादा राहिली नाहीं, म्हणून तुमची कांहीं भीड मी धरणार नाहीं ४. [३६२५]

भोग, मोक्ष, आणि ब्रह्मज्ञान ह्या तुझ्या भांडवलाला आग लागो ! तूं माझ्या भावाला लवकर आणून दे १. ऐश्वर्य आणि अष्ट महासिद्धि व मोक्ष गुंडाळून ठेव व माझ्या भावाला लवकर आणून दे २. पाहिजे तर आम्हांला आपल्या वैकुंठाला नेऊं नको, पण माझ्या भावाला लवकर आणून दे ३. तुला प्रसन्न व्हावयाचें नसेल तर होऊं नकोस, पण माझ्या भावाला लवकर आणून दे ४. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे पांडुरंगा, ह्याचा तूं विचार कर, नाहीं तर माझ्या हत्येचा दोष तुझ्या मस्तकावर येईल ५. [३६२६]

मुख्यत्वेंकरून आम्हांला संत आईचा आश्रय आहे, मग हे पांडुरंगा, तुला कोण मोजतो ? १. जोंपर्यंत संतमाउलीचा आम्हांला आधार आहे तोंपर्यंत आमच्याबरोबर दांडगाई करूं नकोस. ह्याचा तूं दूरवर विचार करून पाहा २. संतजन महाराज हे मी आपल्याला साह्य करून घेतले आहेत, आतां तुला मी भिईन हें कधींहि होणार नाहीं ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे अनंता, एकी केल्यानें एकीच वाढते व दुःखानें दुःख वाढतें ४. [३६२७]

हे हरि, सौम्य उपचार अनुपम्य आहेत म्हणून किरकिरीचें तोंड काळें (नाहींसें) होईल असें कर १. हात जोडून तुझ्या पायांवर मस्तक ठेवून एवढें मी मागत आहें २. तुमचें आमचें एकेच ठिकाणीं वास्तव्य आहे, म्हणून ह्या ठिकाणीं द्वैत व द्वेष ठेवणें हें बरें आहे काय ? ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे अनंता, बहुत रीतींनीं मी तुमची विनंति करीत आहें ती तुम्हीं ऐकावी ४. [३६२८]

लालुचाईसाठीं बळकाविसी भावा । परि मी जाण देवा जिरों नेदीं ॥ १ ॥ असों द्या निश्चय हा मनीं मानसीं । घातली येविशीं दृढ कांस ॥ २ ॥ मज आहे बळ आळीचें सबळ । फोडीन अंत्राळ हृदय तुझें ॥ ३ ॥ करुणारसें तुकयाबंधु म्हणे भुलवीन । काढूनी घेईन निज वस्तु ॥ ४ ॥ [३६२९]

तुझीं वर्मे आम्हां ठावीं नारायणा । परि तूं शहाणा होत नाहीं ॥ १ ॥ मग कालावुली हाका देते वेळे । होतोसी परि डोळे नुघडिसी ॥ २ ॥ जाणोनि अज्ञान करावें मोहरें । खोटी खोडी हे रे तुझी देवा ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे कारण प्रचिति । पाहातां वेळ किती तेच गुण ॥ ४ ॥ [३६३०]

अवघीं तुज बाळें सारिखीं नाहीं तें । नवल वाटतें पांडुरंगा ॥ १ ॥ म्हणतां लाज नाहीं सकळांची माउली । जवळी धरिलीं एकें दुरी ॥ २ ॥ एकां सुख द्यावें घेऊनी वोसंगा । एकें दारीं गळा श्रमविती ॥ ३ ॥ एकां नवनीत पाजावें दाटून । एकें अन्न अन्न करितील ॥ ४ ॥ एकें वाटतील न वजावीं दूर । एकांचा मत्सर जवळी येतां ॥ ५ ॥ तुकयाबंधु म्हणे नावडती त्यांस । कासया व्यालास नारायणा ॥ ६ ॥ [३६३१]

निनांव हें तुला । नांव साजे रे विठ्ठला । बरा शिरविला । फाटक्यामध्यें पाव ॥ १ ॥ कांहीं तरी विचारिलें । पाप पुण्य ऐसें केलें । भुरळें घातलें एकाएकीं भावासी ॥ २ ॥ मुद्राधारण माळा टिळे । बोल रसाळ कोंवळे । हातीं फांशांचें गुंडाळें । कोण चाळे गृहस्था हे ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे मिस्कीन । करितोसी देखोन । पाहा दुरीवरी विच्छिन्न । केला परी संसार ॥ ४ ॥ [३६३२]

नाहीं घटिका म्हणसी । लाग लागला तुजपाशीं । पडिला हृषीकेशी । जाब सकळ करणें ॥ १ ॥ माझें नेलें पांघरूण । ठावें असोन दुर्बळ दीन । माणसांमधून । उठविलें खाणोऱ्या ॥ २ ॥ आम्हीं हें

माझ्या भावाला तूं लालचेसाठीं बळकाविलेंस काय ? पण हे देवा, मी तो तुला जिरूं देणार नाहीं १. तुमच्या मनामध्यें निश्चय असूं द्या. मीं आपल्या ठिकाणीं ह्यासंबंधानें दृढ निश्चयाची कांस घातली आहे २. हट्ट करण्याचें मला बळ आहे, त्या योगानें तुझें हृदयाकाश फोडीन ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, करुणारसानें तुझ्या हृदयाला भुलवून टाकून मी आपली वस्तु तुझ्यापासून काढून घेईन ४. [३६२९]

हे नारायणा, तुझीं सर्व वर्मे आम्हांला ठाऊक झालीं आहेत, पण तूं शहाणा होत नाहींस १. तुला हांक मारल्यानंतर तुझी मोठी कासाविशी होते, तथापि तूं डोळे उघडीत नाहींस २. हे देवा, सर्व कांहीं जाणून अज्ञान दाखवितां ही तुम्हांला वाईट खोड लागली आहे ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, तुझ्या एकंदर कृत्याची आम्हांला प्रचीति आहे, कित्येक काळ तुझे हेच गुण आम्ही पाहात आहों ४. [३६३०]

हे पांडुरंगा, तुला सर्व मुलें सारखीं नाहींत. आम्हांला हें तुझें मोठें नवल वाटतें १. मी सर्वांची आई आहें असें म्हणण्याला तुला लाज कशी वाटत नाहीं ? कारण कित्येकांना तूं जवळ धरलेंस व कित्येकांना दूर धरलेंस २. कित्येकांना आपल्या पदरांत घेऊन सुख देतोस व कित्येकांना आपल्या दारांत ओरडून घसा कोरडा करावयास लावलें आहेस ३. कित्येकांना बळानेंच दूध पाजतोस व कित्येकांना अन्न अन्न करावयाला लावलें आहेस ४. कित्येकांविषयीं तुला असें वाटत आहे, कीं तीं आपल्यापासून दूर जाऊं नयेत, पण कित्येक जवळ येऊं लागलीं तर तूं त्यांचा मत्सर करतोस ५. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे नारायणा, जीं तुला आवडत नाहींत त्यांना तूं जन्म कां दिलास ? ६. [३६३१]

हे विठ्ठला, तूं निनांव आहेस हें तुला नांव शोभतें; फाटक्यामध्यें पाय बरा घुसविलास ? १. पाप व पुण्य हें जें तुम्हीं केलें ह्याचा कांहींतरी विचार केला काय ? एकदम माझ्या भावाला तुम्हीं ही भुरळ घातली २. मुद्रा धारण करणें व द्वादश टिळेमाळा धारण करून रसभरित मृदु भाषण करावें, आणि हातीं पाशांचें गुंडाळें घ्यावें. हे गृहस्था, असले हे चाळे कसले ? ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे देवा, जाणून तूं लुच्चेगिरी करतोस. आम्हीं सर्व संसाराची पांगापांग केली ह्याचा तूं दूरवर विचार कर ४. [३६३२]

हे हृषीकेशी, तुझा मार्ग (छंद) आम्हांला लागला आहे. आतां एक घटका देखील वेळ नाहीं असें म्हणशील तर तसें चालणार नाहीं; पडलेलें सर्व करण्याची जबाबदारी तुझ्याकडे आहे १. मी गरीब शक्तिहीन तुला ठाऊक असतांना

जगवूनि होतों पाणी। संदीं देवदेव करूनी। जालासी कोठोनी। पैदा चोरा देहाच्या ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे केलें। उघडलें मजचि उमगिलें। ऐसें काय गेलें। होतें तुज न पुरतें ॥ ४ ॥ [३६३३]

कनवाळ कृपाळ। उदास दयाळ मायाळ। म्हणवितोसी परि केवळ। गळेकाटू दिसतोसी ॥ १ ॥ काय केलें होतें आम्हीं। सांग तुझें एक ये जन्मीं। जालासी जो स्वामी। एवढी सत्ता करावया ॥ २ ॥ भलेपणाचा पवाडा। बरा दाखविला रोकडा। करूनी बंधु वेडा। जोडा माझा विखंडिला ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे भला। कैसें म्हणताती तुजला। जीव आमुचा नेला। अंत पाहिला कांहीं तरी ॥ ४ ॥ [३६३४]

आतां कळों आले गुण। अवघेचि यावरून। चोखट लक्षण। धरिलें हें घरघेणें ॥ १ ॥ या नांवें कृपासिंधु। म्हणवितोसी दीनबंधु। मज तरी मैंदु। दिसतोसी पाहतां ॥ २ ॥ अंमळ दया नाहीं पोटीं। कठीण तैसाचि कपटी। आंधळयाची काठी। माझी गुद्रसीच ना ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे पुरता। नाहीं म्हूण बरें अनंता। एरवीं असतां। तुझा घोंट भरि(ये)ला ॥ ४ ॥ [३६३५]

काय सांगों हृषीकेशा। आहे अनुताप आला ऐसा। गिळायासी निमिषा। निमिष लागों नेदावें ॥ १ ॥ माझें बुडविलें घर। लेंकरें बाळें दारोदार। लाविलीं काहार। तारातीर करोनी ॥ २ ॥ जीव घ्यावा किंवा द्यावा। तुझा आपुला केशवा। इतुकें उरलें आहे देवा। भावाचिया निमित्यें ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे जग। बरें वाईट म्हणो मग। या कारणें परि लाग। न संडावा सर्वथा ॥ ४ ॥ [३६३६]

मायबाप निमाल्यावरी। घातलें भावाचे आभारीं। तोही परि हरी। तुज जाला असमाई ॥ १ ॥ हे कां भक्तीचे उपकार। नांदतें विध्वंसिलें घर। प्रसन्नता व्यवहार। सेवटीं हे जालासी ॥ २ ॥

माझें पांघरूण तूं घेऊन गेलास व अरे चोरा, मला माणसांतून उठविलेंस २. आम्ही देवदेव असें भजन करून टाळ्या वाजवीत होतों अशा स्थितीमध्यें तूं संधि साधून, हे चोरा, तूं देहाच्या ठिकाणीं कोठून प्रगट झालास? ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, मला तूं उघडें केलेंस हें समजलें. देवा, असें काय तुझ्याजवळ तुला पुरेल असें नव्हतें? ४. [३६३३]

देवा, तूं उदार, कृपाळु, कनवाळु, मायाळु असें आपल्यास म्हणून घेतोस, पण मला तर तूं केवळ गळेकापू दिसत आहेस १. तुझ्या ह्या एका जन्मामध्यें आम्हीं काय केलें होतें, कीं तो तूं आमच्यावर एवढी सत्ता करणारा धनी झालास हें सांग २. चांगलेपणाची कीर्ति तुम्हीं उघड चांगली दाखविली. माझ्या भावाला आपलें वेड लावून अखेरीस आम्हां बंधूंच्या जोडीमध्यें वियोग आणलास ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, तुला चांगलें कसें म्हणतात? आमचा तर तूं जीव घेऊन गेलास त्या वेळेला त्याचा आमच्यावर काय परिणाम होईल ह्याचा तूं कांहीं विचार केलास काय? ४. [३६३४]

ह्यावरून तुझे गुण आतां मला सर्व समजले. तूं चांगुलपणा जो आपणाकडे घेतला आहेस, हें तुझें घर घेण्याचें लक्षण होय १. दीनबंधु, कृपासिंधु अशीं नांवें तूं आपणास म्हणवून घेत आहेस; मी पाहूं गेलों तर तूं मला मैंद दिसत आहेस २. किंचित् देखील तुझ्या पोटांत दया नाहीं; असा तूं कठिण असून कपटीहि आहेस. माझी आंधळयाची काठी तूं नाहींशी केली नाहींस का? ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे अनंता, आम्हांला तुझा घोंट भरतां येईल इतका तूं नाहींस. जर तसा असतास तर तुझा घोंट घेतला असता ४. [३६३५]

हे हृषीकेशा, काय सांगूं? अशा प्रकारचा अनुताप मला झाला आहे. पाप नाहींसें करण्याला एक निमिष लावूं नयेस. माझें घर तूं बुडविलेंस, मुलें लेकरें दारोदार पाठविलींस व सर्वांची ताडातोड करून सर्वांना ओरडावयास लावलेंस २. हे केशवा, भावाच्याकरितां तुझा जीव घ्यावा, नाहीं तर आपला जीव द्यावा, एवढेंच काय तें उरलें आहे ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, मग लोक अशा करण्यामध्यें बरें म्हणोत अगर वाईट म्हणोत, पण तुझा सर्वथैव पाठलाग सोडूं नये ४. [३६३६]

आईबापांनीं मरतेवेळीं मला भावाच्या पदरीं घातलें. हे हरि, तोहि पण तुला खपला नाहीं १. हे देवा, आम्हीं भक्ति केल्याचे हे काय उपकार? आमचें घर नांदत होतें त्याचा विध्वंस केलास. शेवटी प्रसन्नतेचा व्यवहार असा केलास काय? २.

एका जीवावरी । होतों दोन्ही कुटुंबारी । चाळवूं तो तरी । तुज येतो निर्लज्जा ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे भला । आणीक काय म्हणावें तुला । वेडा त्यानें केला । तुजसवें संबंधु ॥ ४ ॥ [३६३७]

पूर्वी पूर्वजांची गति । हेचि आइकिली होती । सेवे लावूनी श्रीपती । निश्चिंती केली तयांची ॥ १ ॥ कां रे पाठीं लागलासी । ऐसा सांग हृषीकेशी । अद्यापवरी न राहासी । अंत पाहसी किती म्हूण ॥ २ ॥ जन्मजन्मांतरीं दावा । आम्हां आपणां केशवा । निमित्य चालावा । काईसयास्तव हें ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे अदेखणा । किती होसी नारायणा । देखों सकवेना । खातयासी न खात्या ॥ ४ ॥ [३६३८]

निसुर संसार करून । होतों पोट भरून । केली विवशी निर्माण । देवगण दाखविलें ॥ १ ॥ ऐसा काढियेला नीस । काय म्हूण सहित वंश । आणिलें शेवटास । हाउस तरी न पुरे ॥ २ ॥ उरलों पालव्या शेवटीं । तेंही न देखवे दृष्टी । दोघांमध्यें तुटी । रोकडीचि पाडिली ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे गोड । बहु जालें अति वाड । म्हणोनि कां बुड । मुळ्यांसहित खावें ॥ ४ ॥ [३६३९]

बरा जाणतोसी धर्मनीति । उचित अनुचित श्रीपति । करूं येते राती । ऐसी डोळे झांकूनि ॥ १ ॥ आतां जाब काय कैसा । देसी तो दे जगदीशा । आणीला वोळसा । आपणाभोंवता ॥ २ ॥ सेवेचिया सुखास्तव । बळें धरिलें अज्ञानत्व । येईल परि हा भाव । ज्याचा त्यासी कारणा ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे नाहीं । आतां आम्हां बोल कांहीं । जडोनियां पायीं । तुझें त्वांचि घेतलें ॥ ४ ॥ [३६४०]

कांहीं विपत्ति अपत्यां । आतां आमुचिया होतां । काय होईल अनंता । पहा बोलों कासया ॥ १ ॥ बरें अनायासें जालें । सायासेंविण बोले चाले । काबाड चुकलें । केलें कष्टावेगळें ॥ २ ॥

आमचीं दोन्हीं कुटुंबें एकाच जीवावर होतीं, हे निर्लज्जा, त्याला तुला फसवितां कसें आलें? ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे देवा, तूं फार चांगला आहेस आणि तुला काय म्हणावें? आमचाच भाऊ वेडा म्हणून त्यानें तुझ्यापाशीं संबंध केला ४. [३६३७]

आमच्या पूर्वीच्या पूर्वजांची गति अशीच ऐकिली, कीं हे श्रीपति, त्यांना तूं आपल्या सेवेला लावून त्यांची सर्वत्र शांति केलीस १. हे हृषीकेशि, तूं आमच्या पाठीस कां लागलास हें सांग. अजूनपर्यंत देखील स्वस्थ राहात नाहींस. आमचा किती तरी अंत पाहाशील ! २. हे केशवा, जन्मजन्मांतरीं तुम्ही आपलें दर्शन आम्हांला द्या. कशाकरितां हें असलें निमित्त चालवितां ? ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे नारायणा, तूं किती तरी अंध (मत्सरी) झाला आहेस! कीं न खाणारा असा जो तूं त्या तुला खाणारा पाहावत नाहीं ४. [३६३८]

संसारामध्यें आम्ही पोटभरू निष्काळजी होतों, तूं देवपण दाखविलेंस व एक पिशाच निर्माण केलेंस. अशा प्रकारचा त्यांनीं आमचा निकाल केला. सर्व वंश नाहींसा केला, व अगदीं अखेरीस गोष्ट येऊन ठेपली तरी तुझी हौस पूर्ण होत नाहीं २. शेवटीं आम्ही पाला उरलों तेंहि तुला पाहावलें नाहीं. उघड उघड आम्हां दोघां भावांमध्यें अंतर आणलेंस. ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, पुष्कळ मोठें आणि गोड जरी झाड असलें तरी मुळासकट व बुर्खुंडासकट खाऊन टाकावें काय? ४. [३६३९]

हे श्रीपति, तूं उचित व अनुचित धर्म आणि खरी धर्मनीति जाणतोस, म्हणून डोळे झांकून तुला अशा प्रकारांत रात्र करतां येते १. हे जगदीशा, आतां तूं जबाब कसा काय देतोस तो दे. तुमच्या भोंवतीं मीं हा भोंवरा आणिला आहे २. भक्तांच्या सेवेचें सुख भोगण्याकरितां बळें अज्ञानपण घेतलें आहेस, पण ज्या भक्ताचा जसा भाव आहे, तसा त्याला तो फलद्रूप होईल ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, आतां आमच्यावर कांहीं बोल नाहीं. तूं स्वतः मिळवून तुझें तूंच घेतलें आहेस ४. [३६४०]

हे अनंता, आमच्या मुलांना कांहीं आपद्दशा आल्यास तुला काय प्राप्त होईल हें तूं पाहा, मी कशाला बोलूं ? १. अनायासानें बरें झालें. बोलण्याचालण्यावांचून काबाडकष्ट चुकल्यामुळें दुःखावेगळें केलेंस २. हे केशव राजा, तूं बरा वर्मी

बरा सांपडलासी वोजा । वर्मावरी केशीराजा । बोलायासी तुझा । उजुराचि नाहींसा ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे दगा । बरा दिला होता बगा । झडकरी चला गा । चांग दैवें पावलों ॥ ४ ॥ [३६४१]

देवा तुजपें माझ्या पूर्वजांचें ऋण । आहे तें कां नेदिसी अझून । अवगलासी झोंडपणें । परि मी जाण जीवें जिरों नेदीं ॥ १ ॥ कळों येईल रोकडें । उभा करीन संतांपुढें । तुझें काय एवढें । भय आपुलें मागतां ॥ २ ॥ आजीवरी होतों नेणता । तों तुज फावलें रे अनंता । कवडीचा तों आतां । पडों नेदीन फेर ॥ ३ ॥ ठेविला ये जीवनीं जीव । म्हणे तुकयाचा बांधव । माझा गळा तुझा पाव । एके ठायीं बांधेन ॥ ४ ॥ [३६४२]

मागें असतासी कळला । उमस घेऊं नसता दिला । तेणेंचि काळें केला । असता अवघा निवाडा ॥ १ ॥ इतका न लगता उशीर । न धरितों भीडमार । सिद्धासी व्यवहार । कासयासी लागला ॥ २ ॥ असोनियां माल खरा । किती केल्या येरझारा । धरणेंही दिवस तेरा । माझ्या भावें घेतलें ॥ ३ ॥ अझून तरी इतक्यावरी । चुकवीं जनाचार हरी । तुकयाबंधु म्हणे उरी । नाहीं तरी नुरे कांहीं ॥ ४ ॥ [३६४३]

आतां न राहें क्षण एक । तुझा कळला रे लौकिक । नेदीं हालों एक । कांहीं केल्यावांचूनी ॥ १ ॥ संबंध पडिला कोणाशीं । काय डोळे झांकितोसी । नेईन पांचांपाशीं । दे नाहीं तरी वोढूनी ॥ २ ॥ सुखें नेदीस जाणवलें । नाश केल्याविण उगलें । तरि तेंही विचारिलें । आम्ही आहे तुज आधीं ॥ ३ ॥ असेंच करूनी किती । नागविलीं नाहीं नीति । तुकयाबंधु म्हणे अंतीं । न सोडिसी ते खोडी ॥ ४ ॥ [३६४४]

तुज ते सवे आहे ठावें । घ्यावें त्याचें बुडवावें । परि तें आम्हा सवें । आतां न फावे कांहीं ॥ १ ॥ नव्हों सोडायाचे धणी । कष्टें मेळविलें करोनी । पहा विचारोनी । आधीं धरोनी काम नाहीं

सांपडलास. बोलण्याला तुला जागाच राहिली नाहीं ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, तूं आम्हांला दगा चांगला दिला होतास. आतां लवकर चल, मी सुदैवानें प्राप्त झालों आहें ४. [३६४१]

देवा, तुझ्याजवळ आमच्या पूर्वजांचें भक्तिऋण आहे तें तूं अजून कां देत नाहींस? तूं झोंडपणानें आवगला आहेस, पण मी तुला खरोखर तें जिरूं देणार नाहीं हें समज १. ज्या वेळेस तुला संतांच्यापुढें उभें करीन त्या वेळेस तुला समजून येईल. आपला हिशेब तुझ्याजवळ मागायला तुझें कसलें भय आलें आहे? २. हे अनंता, आजपर्यंत मी मूर्ख होतों, म्हणून तुला बरीच सवड मिळाली. आतां आपल्याला जी आवड आहे तीमध्यें मी कधीं अंतर पडूं देणार नाहीं ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, ह्या जीवनाच्या ठिकाणीं मीं आपला जीव ठेवला आहे. आतां माझा गळा आणि तुझे पाय एका ठिकाणीं बांधीन ४. [३६४२]

तूं असा कपटी आहेस असें पूर्वी कळलें असतें तर तुला दम घेऊं दिला नसता. त्याच वेळेस सर्व निकाल करून टाकला असता १. इतका उशीरहि लागला नसता. सारखा भडिमार केला असता, सिद्ध गोष्टीला (पंचाईत) व्यवहार कशाला लागला असता? २. आपला माल खरा असून किती येरझारा केल्या. माझ्या भावानें तेरा दिवस धरणेंहि घेतलें ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे हरि, अंतःपर अजून तरी जनापवाद चुकीव, नाहींतर तुझा लौकिक कांहीं उरणार नाहीं ४. [३६४३]

हे देवा, आतां मी क्षणभर देखील स्वस्थ राहाणार नाहीं, तुझा सर्व लौकिक मला कळला. आतां कांहींएक निकाल लावल्यावांचून तुला हालूं देणार नाहीं १. अरे देवा, तुझा कोणाशीं संबंध पडला आहे? डोळे झांकून काय राहिला आहेस, मी पंचांमध्यें ओढून नेईन, नाहींतर माझ्या भावाला दे २. तुझा कांहीं नाश केल्यावांचून सुखानें तूं कांहीं देणार नाहींस, तरी त्याचाहि विचार आम्हीं तुझ्या आधींच करून ठेवला आहे ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, आजपर्यंत किती जणांचें असेंच नुकसान करून नागविलेंस त्याचा नेम नाहीं. तरी तूं अखेरीस ती आपली खोड टाकली नाहींस ४. [३६४४]

ज्याचे घ्यावें त्याचें बुडवावें, ही तुझी संवय आम्हांला ठाऊक आहे; पण तें आमच्याबरोबर मात्र आतां कांहीं चालणार नाहीं १. आम्ही सोडून येणार नाहीं, कारण जें आम्हीं मिळविलें तें कष्टानें मिळविलें आहे, ह्याचा तूं विचार कर.

॥ २ ॥ अवघे राहिले प्रकार । झालों जीवासीं उदार । असा हा निर्धार । कळला असावा असेल ॥ ३ ॥ आतां निदसुर नसावें । गांठ पडली कुणब्यासवें । तुकयाबंधु म्हणे राखावें । देवा महत्व आपुलें ॥ ४ ॥ [३६४५]

बहु बोलणें न ये कामा । वाउगें तें पुरुषोत्तमा । एकाचि वचनें आम्हां । काय सांगणें तें सांग ॥ १ ॥ देणें आहे कीं भंडाई । करणें आहे सांग भाई । आतां भीड कांहीं । कोणी न धरी सर्वथा ॥ २ ॥ मागें गलें जें हाऊनी । असो तें धरित नाहीं मनीं । आतां पुढें येथूनी । कैसा काय विचार ॥ ३ ॥ सारखी नाहीं अवघी वेळ । हें तों कळतें सकळ । तुकयाबंधु म्हणे खळखळ । करावी ते उरेल ॥ ४ ॥ [३६४६]

आतां हें न सुटे न चुके । बोल कां दवडिसी फिके । जन लोक पारिखें । अवघें केलें म्यां यासाठीं ॥ १ ॥ नये सरतां नव्हे भलें । तुझें लक्षण कळलें । बैसलासी काढिलें । देहाचें मुळीं दिवाळें ॥ २ ॥ दिसतोसी बरा बोल कोंवळे । गुण मैंदाचे चाळे । दिसताती ये वेळे । काय करूं विसंबोनी ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे देखता । अंध बहिर (बधिर) ऐकतां । कैसें व्हावें आतां । इतुकियापरी ॥ ४ ॥ [३६४७]

तिहीं ताळीं हेचि हांक । म्हणती पांढरा स्फटिक । अवघा बुडविला लौकिक । सुखेंचि भिके लाविलीं ॥ १ ॥ थोंटा नांव शिरोमणी । नाहीं जोडा त्रिभुवनीं । म्हणोनी शहाणे ते कोणी । तुझे द्वारीं बैसतीना ॥ २ ॥ निर्गुण निलाजिरा निनांवा । लंड झोंड कुडा देवा । नागवणा या नांवा-वांचूनी दुजा नाइकों ॥ ३ ॥ सर्वगुणें संपन्न । कळों आलासी संपूर्ण । तुकयाबंधु म्हणे चरण । आतां जीवें न सोडीं ॥ ४ ॥ [३६४८]

तोचि प्रसंग आला सहज । गुज धरितां नव्हे काज । न संडितां लाज । पुढें वोज न दिसे ॥ १ ॥

येथें आढी धरण्याचा कांहीं उपयोग नाहीं २. सर्व प्रकार बाजूला ठेवून मी जीवावर उदार झालों आहें. अशा प्रकारचा आमचा निश्चय कळला असेलच, नसल्यास समजावा ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, देवा, आतां तूं निद्रेंत राहूं नये. आतां कुणब्याशीं गांठ पडली आहे, म्हणून तुम्ही आपला मोठेपणा सांभाळा ४. [३६४५]

हे पुरुषोत्तमा, व्यर्थ पुष्कळ बोलून काय उपयोगाचें आहे? एका शब्दानें आम्हांला काय बोलावयाचें असेल तें बोला १. हे भाई, द्यावयाचें आहे किंवा आपली अपकीर्ति, फजीती करावयाची आहे हें सांग. सर्वथैव आतां कोणी कांहीं भीड धरणार नाहीं २. पूर्वीं जी गोष्ट होऊन गेली ती असो. त्याबद्दल आम्ही कांहीं मनांत ठेवीत नाहीं. आतां येथून पुढें काय विचार आहे हें सांग ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, सर्व वेळ सारखी नसते, हें सर्वांना कळतें, म्हणून ह्या ठिकाणीं खळखळ केल्यास, ती तेवढी राहील ४. [३६४६]

आतां हें कधीं चुकणार नाहीं. पोकळ बोलून व्यर्थ कां घालवितोस? माझेसंबंधी लोक व जन ह्या सर्वांचा मीं संबंध टाकला आहे १. ह्या ठिकाणीं माघारी सरणें हें चांगलें होणार नाहीं. आपलें दिवाळें काढून तूं बसला आहेस २. तूं चांगला दिसत आहेस व तुझें भाषणहि मृदु आहे व तुझ्या अंगीं मैंदाचे (ढोंग्याचे) गुण व चेष्टा आहेत. असो. ह्या प्रसंगाला मला असें दिसत आहे, तेव्हां दूर होऊन काय करूं? ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, देवा, तूं पाहात असतांना आंधळा आहेस व ऐकत असतांना बहिरा आहेस. आतां इतक्या उपर आमचें कसें व्हावें! ४. [३६४७]

त्रैलोक्यांत हीच एक हाकाहाक आहे, कीं तुला पांढरा स्फटिक म्हणतात. सर्व लोकाचार बुडवून सुखानें त्यांना तूं भिकेला लावतोस १. तूं थोटांचा शिरोमणि आहेस. तुझ्यासारखा झोंड (लबाड) कोणी त्रैलोक्यांत नाहीं, म्हणून शहाणे लोक तुझ्या दारांत बसत नाहींत २. तूं निर्गुण असून नामरहित आहेस व निलाजरा आहेस. हे देवा, तूं लबाड, लंड व व वाईट आहेस. तुझ्यासारखा नागविणारा दुसरा कोणी ऐकण्यांत येत नाहीं ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, तूं सर्व गुणांनीं संपन्न असून परिपूर्ण आहेस, हें मला समजल्यामुळें मी तुझे चरण आतां जीवानें सोडणार नाहीं ४. [३६४८]

तुझें कृत्य गुप्त ठेवल्यानें आपलें कार्य होणार नाहीं असा सहज प्रसंग आला आहे. आतां जर आम्हीं लज्ज-

तूं तर न होसी शाहाणा । नये सांगतों तेंही मना । आपण आपणा । आतां प्रयत्न देखावा ॥ २ ॥ न पुरवी पाहातां वाट । द्यावें प्रमाण चोखट । कास घालूनियां नीट । चौंघाचार करावा ॥ ३ ॥ आतां श्रमाचें कारण । नव्हे व्हावें उदासीन । न पडे तयाविण । गांठी तुकयाबंधु म्हणे ॥ ४ ॥ [३६४९]

हळूहळू जाड । होत चाललें लिगाड । जाणवेल निवाड । न करिसी परि ॥ १ ॥ मीं तों सांगून उतराई । जालों आतां तुज काई । कळों येईल भाई । तैसा करीं विचार ॥ २ ॥ मागें युगें अठ्ठावीस । झालीं दिवसाचा दिवस । मुद्दल व्याज कासावीस । होसी देवा ये कामें ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे राखें । आतां टाकीं तुझीं तीं सुखें । जगजाहिर ठाउकें । झालें नाहीं खंडलेंसें ॥ ४ ॥ [३६५०]

पत्र उचटिलें प्रयत्नें । ग्वाही कराया कारणें । नाहीं तरी पुण्यें । तुझ्या काय उणें आम्हां ॥ १ ॥ नांव तुझेंचि करोनी । सुखें पोट भरोनी । केली केली जाणवणी । म्हणउनी नाहीं म्हणसील ॥ २ ॥ आतां इतकिया उपरी । दे नको भलतें करीं । म्हणती ऋणकरी । आमुचा इतकें उदंड ॥ ३ ॥ तुकयाबंधु जागा । आळवावया पांडुरंगा । केला कांहीं मागा–। याची नव्हती गरज ॥ ४ ॥ [३६५१]

माझ्या भावें केली जोडी । न सरेसी कल्पकोडी । आणियेलें धाडी । घालूनी अवघें वैकुंठ ॥ १ ॥ आतां न लगे यावें जावें । कोठें कांहींच करावें । जन्मोजन्मीं सुखें खावें । बैसोनसें जालें ॥ २ ॥ असंख्य संख्या नाहीं पार । आनंदें दाटलें अंबर । न माये अपार । त्रिभुवनीं सांटवितां ॥ ३ ॥ अवघें भरलें सदोदित । जाले सुखाचे पर्वत । तुकयाबंधु म्हणे परमार्थ । धन अद्भुत सांपडलें ॥ ४ ॥ [३६५२]

आतां चुकलें देशावर । करणें अकरणें सर्वत्र । घरासी आगर । आला सकळ सिद्धींचा ॥ १ ॥

टाकली नाहीं तर पुढें चांगलें होईल असें दिसत नाहीं १. देवा, तूं तर शहाणा होत नाहींस आणि मी जें सांगत आहें तेंहि तूं मनावर घेत नाहींस; आतां आपणच आपली कांहीं सोय पाहिली पाहिजे २. किती वाट पाहिली तरी तूं कांहीं आमची इच्छा पूर्ण करीत नाहींस. आतां दृढ निश्चयाची कांस घालून उत्तम पुरावा देऊन चौघांमध्यें पंचाईत (फिर्याद) करावी ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, आतां यत्न करण्याचाच प्रसंग आला आहे; म्हणून त्याबद्दल उदास राहाणें उपयोगी नाहीं, कारण त्यावांचून तुझी गांठ पडणार नाहीं ४. [३६४९]

हळुहळू आमच्या भक्तीच्या कर्जाचें लचांड वाढत चाललें आहे त्याचा तूं निकाल करीत नाहींस; पण हें तुला पुढें चांगलें जाणवेल १. आतां जें मला तुला सांगावयाचें आहे तें मी तुला सांगून उत्तीर्ण झालों आहें. हे भाई, जसा तुला विचार सुचेल तसें कर २. दिवस दिवस करितांना अशीं पूर्वीं अठ्ठावीस युगें लोटून गेलीं. ह्या प्रसंगांत मुद्दल व व्याज ह्याचा निकाल करण्यासंबंधानें तूं फार कासावीस होत आहेस ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, आतां तूं आपलीं सर्व सुखें टाकून आपलें भक्तरक्षणाचें ब्रीद्र रक्षण कर. तुझा आमचा व्यवहार जगजाहीर झाला नाहीं तोंपर्यंत विचार कर ४. [३६५०]

पुराव्याकरितां तुझा लेख प्रयत्नानें शोधून काढला, नाहीं तर तुझ्या पुण्याईनें आम्हांला काय कमी आहे ? १. तुझ्या नांवावर आम्ही सुखानें पोट भरून आहोंत. तूं आपल्या वचनांत बदलशील म्हणून ही हकीगत तुला कळविली २. आतां इतक्या उपर दे अथवा नको देऊंस, पाहिजे तें कर. तुला आमचा ऋणकरी म्हणतील इतकेंच पुरे झालें ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे पांडुरंगा, तुला जागें करण्याकरितांच आम्हीं आळविण्याचा व्यवहार केला. आहांला कांहीं मागण्याची इच्छा नाहीं ४. [३६५१]

माझ्या भावानें जो लाभ करून घेतला आहे तो कोट्यवधि कल्पांतीं नाहींसा होणार नाहीं. त्यानें वैकुंठावर घाला घालून परमात्म्याला आणिलें १. आतां मला कोठें जाणें येणें व कांहीं कर्म करणें राहिलें नाहीं. जन्मोजन्मीं सुखानें बसून खावें असें झालें आहे. २. ज्याची संख्या होत नाहीं अशा अपार आनंदानें आकाश भरून गेलें आहे. तो आनंद अपार असल्यामुळें त्रिभुवन देखील सांठविण्यास पुरत नाहीं ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, संपूर्ण सुखाचे पर्वत सदोदित भरले आहेत. अशा प्रकारचें परमार्थाचें अलौकिक धन आम्हांला सांपडलें आहे ४. [३६५२]

आतां देशांतराला जाणें व करणें न करणें (कार्य अकार्य) ह्या सर्वत्रांचा संबंध सुटला, कारण सकळ सिद्धींचें

झालों निधाई निधानें । लागलें अनंतगुणरत्न । जन्माचें विच्छिन्न । दुःख झालें दारिद्र ॥ २ ॥ तारूं सागरींचें अवचितें । हेंदोवलें आलें येथें । ओढिलें संचितें । पूर्वदत्तें लाधलें ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे सीमा । नाहीं आमुचिया दैवा । आतां पुरुषोत्तमा । ऐसा सौदागर सांपडला ॥ ४ ॥ [३६५३]

सांपडलें जुनें । आमुच्या वडिलांचें ठेवणें । केली नारायणें । कृपा पुण्यें पूर्वींचिया ॥ १ ॥ सुखें आनंदरूप आतां । आम्ही आहों याकरितां । निवारिली चिंता । देणें घेणें चुकलें ॥ २ ॥ जालें भांडवल घरींचें । अमूप नाम विठ्ठलाचें । सुकृत भावाचें । हें तयानें दाविलें ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे फिटला । पांग नाहीं बोलायाला । चाड दुसरी विठ्ठला- । वांचूनियां आणीक ॥ ४ ॥ [३६५४]

: पाईकाचे अभंग :

पाईकपणें जोतिला सिद्धांत । शूर धरी मात वचन चित्तीं ॥ २ ॥ पाईकीवांचून नव्हे कधीं सुख । प्रजांमध्यें दुःख न सरे पीडा ॥ २ ॥ तरि व्हावें पाईक जिवाचे उदार । सकळ त्यांचा भार स्वामी वाहे ॥ ३ ॥ पाईकीचें सुख जया नाहीं ठावें । धिग त्यांनीं जियावें (ज्यावें) वायांविण ॥ ४ ॥ तुका म्हणे एका क्षणाचा करार । पाईक अपार सुख भोगी ॥ ५ ॥ [३६५५]

पाईकीचें सुख पाईकासी ठावें । म्हणोनियां जीवें केली साटी ॥ १ ॥ येतां गोळ्या बाण साहिले भडमार । वर्षतां अपार वृष्टि वरी ॥ २ ॥ स्वामी पुढें व्हावें पडतां भांडण । मग त्या मंडण शोभा दावी ॥ ३ ॥ पाईकांनीं सुख भोगिलें अपार । सुख आणि धीर अंतर्बाही ॥ ४ ॥ तुका म्हणे यांही सिद्धांताच्या खुणा । जाणे तो शहाणा करी तो भोगी ॥ ५ ॥ [३६५६]

स्थानच आमच्या घरीं आलें आहे १. अशा प्रकारचें हें, म्हणजे ज्याच्यामध्यें अनंत गुण आहेत अशा रत्नांचें निधान, आमच्या हस्तगत झाल्यामुळें अनेक जन्मांचें दुःखदारिद्र्य नाहींसें झालें २. अकस्मात् लाटांच्या धक्यानें सागरांतलें तारूं ह्या ठिकाणीं आलें व पूर्वकर्मांच्या उदयानें हें आम्हांला प्राप्त झालें ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, आतां आमचें अमर्याद दैव उदयाला आलें, कारण पुरुषोत्तमासारखा सावकार (व्यापारी) आम्हांला प्राप्त झाला ४. [३६५३]

आमच्या वडिलांचें जुनें परमार्थाचें ठेवणें आम्हांला सांपडलें. आमच्या पूर्वपुण्याईनें ही आमच्यावर नारायणांनीं कृपा केली १. ह्यास्तव आम्ही आता आनंदरूप आहोंत. आमची सर्व चिंता नाहींशी होऊन देण्याघेण्याचा व्यवहार चुकला २. असंख्य विठ्ठलनामाचें भांडवल आमच्या घरीं झालें आहे. हें सर्व आमच्या भावाच्या सुकृतानें दाखविलें आहे. ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, सर्व दारिद्र्य आतां दूर झालें आहे. एका विठ्ठलावांचून दुसरें कांहीं बोलण्याची गरज नाहीं ४. [३६५४]

मीं जो मनुष्यानें देवाचा पाईक-सेवक व्हावें हा सेवकपणाचा सिद्धांत सांगितला आहे तो शूर असेल त्याच्या मनामध्यें बिंबेल आणि त्याप्रमाणें तो वागणूक करील १. देवाची सेवा करून सेवक झाल्याशिवाय कधींहि सुख होणार नाहीं. एकंदर प्रजेमध्यें जें संसाराचें दुःख आहे तें कधींहि संपणार नाहीं २. ह्याकरितां मनुष्यानें जीवावर उदार होऊन देवाचा सेवकपणा स्वीकारावा, म्हणजे त्याचा सर्व भार स्वामी आपल्या शिरावर घेतो ३. ज्याला सेवकपणाचें सुख माहीत नाहीं तो जन्माला येऊन व्यर्थ जाईल. त्याच्या जीवित्वाला धिक्कार असो ४. तुकाराम महाराज म्हणतात, प्रसंग पडेल ते वेळीं जर एक क्षणभर देवाची सेवा करण्याचा निश्चय केला तर तो सेवक अपार सुख भोगील ५. [३६५५]

सेवकपणाचें सुख सेवकालाच माहीत असतें, म्हणून मी जीवावर उदार झालों आहें १. दुःखें, त्रिविध ताप, लोकनिंदा अशा संसारांतील युद्धाच्या प्रसंगीं तोफेचे गोळे व बाणांचा अगणित वर्षावहि मीं सहन केला २. ह्याप्रमाणें युद्धसमयीं जो सेवक स्वामीच्या पुढें होऊन शत्रूचे बाण वगैरे सहन करतो, त्याच्या अंगावर शूरत्वाचे अलंकार असतील ते शोभतील ४. जो सेवक अंतर्बाह्य धीर धरून शूरपणा करतो तो अपार सुख भोगितो ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याप्रमाणें सिद्धांताच्या खुणा मीं सांगितल्या आहेत. जो शहाणा असेल तो त्या जाणून त्याप्रमाणें वागणूक करील व स्वामिसेवेचें सुख भोगील ५. [३६५६]

पाईक तो जाणे पाईकीचा भाव । लाग पगें (लगबग) ठाव चोरवाट ॥ १ ॥ आपणां राखोनी ठकावें आणीक । घ्यावें सकळीक हरूनीयां ॥ २ ॥ येऊं नेदी लाग लागों नेदी माग । पाईका त्या जग स्वामी मानी ॥ ३ ॥ ऐसें जन केलें पाईकें पाईक । जया कोणी भीक न घालिती ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐसे जयाचे पाईक । बळिया तो नाईक त्रैलोकींचा ॥ ५ ॥ [३६५७]

पाईकांनीं पंथ चालविल्या वाटा । पारख्याचा सांटा मोडोनियां ॥ १ ॥ पारखिये ठायीं घेऊनियां खाण । आपुलें तें जन राखियेलें ॥ २ ॥ आधारेंविण जें बोलतां चावळे । आपुलें तें कळे नव्हे ऐसें ॥ ३ ॥ सांडितां मारग मारिती पाईक । आणिकांसी शीक लागावया ॥ ४ ॥ तुका म्हणे विश्वा घेऊनी विश्वास । पाईक तयास सुख देती ॥ ५ ॥ [३६५८]

पाईक तो प्रजा राखोनियां कुळ । पारखिया मूळ छेदी दुष्टा ॥ १ ॥ तो एक पाईक पाईकां नाईक । भाव सकळीक स्वामिकाजीं ॥ २ ॥ तृणवत तनु सोनें ज्या पाषाण । पाईक त्या भिन्न नाहीं स्वामी ॥ ३ ॥ विश्वासावांचूनी पाईकासी मोल । नाहीं मिथ्या बोल बोलिलिया ॥ ४ ॥ तुका म्हणे नये स्वामी उणेपण । पाईक जतन करी त्यासी ॥ ५ ॥ [३६५९]

धनी ज्या पाईका मानितो आपण । तया भितें जन सकळीक ॥ १ ॥ जिवांचे उदार शोभती पाईक । मिरवती नाईक मुगुटमणि ॥ २ ॥ आपुलिया सत्ता स्वामीचें वैभव । भोगिती गौरव सकळ सुख ॥ ३ ॥ कमाईची हीणें पडिलीं उदंड । नाहीं तया खंड येती जाती ॥ ४ ॥

जो खरा सेवक असेल तो सेवकत्वाचा भाव जाणतो व कोणत्या ठिकाणीं काय उपाधि आहे आणि तेथें रिघाव कसा करावा ह्याविषयींच्या चोरवाटा त्यास माहीत असतात १. आपलें शरीर रक्षण करून दुसऱ्याला (शत्रूला) ठकवितात आणि त्यांचें सर्वस्व हरण करून घेतात २. त्याविषयींचा पत्ता लागूं देत नाहींत व आपलेजवळ कोणाचा रिघाव होऊं देत नाहींत; असे जे सेवक ते जगामध्यें मान्य होऊन स्वामीसहि आवडतात ३. ज्या लोकांना कोणी भीक घालणार नाहीं असले लोक त्या खऱ्या सेवकानें आपल्या बरोबरीचे केले आहेत ४. तुकाराम महाराज म्हणतात, असे शूरत्वानें वागणारे सेवक ज्याच्या स्वाधीन आहेत तो स्वामी (राजा) त्रैलोक्यामध्यें बलवान असून मोठा श्रेष्ठ आहे (सारांश, शिपायाप्रमाणें देवाच्या सेवकानेंसुद्धां गनिमी कावा करून कामक्रोधादि शत्रूंवर हल्ला करावा व त्यांना जिंकावें) ५. [३६५७]

संत-महात्मे हे देवाचे शूर शिपाई असतात. त्यांनीं चार्वाकादि मतमतांचा, परक्या सैन्याचा ठिकाणा मोडून निष्काम कर्म, भक्ति, अद्वैत संप्रदाय असे चांगले मार्ग चालू केले १. परक्या ठिकाणीं घाला घालून आपल्या जनांचें रक्षण केलें २. कांहीं वेदशास्त्राचा आधार असल्यावांचून गोष्टी बोलतात त्यांची ती बडबड व्यर्थ होते आणि ते आपल्या जातीचे (मताचे) नव्हेत असें समजून येतें ३. (वैदिक मार्गाचा) चांगला रस्ता सोडून आडमार्गानें जाणारास खरे सेवक शिक्षा करितात, कारण तें शिक्षण इतर जनांस लागलें पाहिजे ४. तुकाराम महाराज म्हणतात, जे खरे सेवक आहेत ते विश्वांतील लोकांना देव, वेद आणि धर्म ह्यांचा उपदेश करून त्यांच्यामध्यें श्रद्धा निर्माण करितात व त्यांना खऱ्या (मोक्ष) सुखाची प्राप्ति करून देतात ५. [३६५८]

जो खरा सेवक आहे, तो प्रजेचें रक्षण करून परकें सैन्य दृष्टीस पडतांच त्याचा नाश करतो १. तोच एक सर्व सेवकांमध्यें अधिपति सेवक आहे. त्याचा सर्व भाव स्वामीच्याच कार्यावर असतो २. त्याला आपला देह गवतासमान तुच्छ असतो आणि तो सोन्याला सुद्धां दगडासारखें मानतो. त्या सेवकाला आणि स्वामीला कांहीं वेगळेपणा नाहीं ३. स्वामीचे ठिकाणीं खरा विश्वास ठेवल्यावांचून मिथ्या भाषणानें सेवकाची किंमत वाढत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या योगानें स्वामीला उणेपणा येणार नाहीं, त्या कार्याचें रक्षण सेवक करीत असतो (संतदेखील आपला स्वामी जो पांडुरंग त्याचा महिमा वाढविण्याकरितां व त्याच्या अवतारकार्यांत साह्य करण्याकरितां जन्म घेतात) ५. [३६५९]

स्वामी ज्या सेवकाला मानीत असतो त्याला सर्व लोक भितात १. जे सेवक जीवावर उदार आहेत तेच शोभतात व ते सर्वांत नाईक होऊन श्रेष्ठत्वानें मिरवितात २. ते सेवक आपल्या सत्तेनें स्वामीच्या सर्व वैभवाचें सुख भोगतात व त्यांचाच सत्कार स्वामी करतो ३. जे कोणी हीन कमाईचे (मेहनतीचे) आहेत ते पुष्कळ पडून राहातात व त्यांच्या

तुका म्हणे तरी पाईकीच भली । थोडीबहुत केली स्वामिसेवा ॥ ५ ॥ [३६६०]

पाईकपणें खरा मुशारा । पाईक तो खरा पाईकीनें ॥ १ ॥ पाईक तो जाणे मारितें अंग । पाइकासी भंग नाहीं तया ॥ २ ॥ एके दोहीं घरीं घेतलें खाणें । पाईक तो पणें निवडला ॥ ३ ॥ करूनी कारण स्वामी यश द्यावें । पाईक त्या नांवें खरेपण ॥ ४ ॥ तुका म्हणे ठाव पाईका निराळा । नाहीं स्वामीस्थळा गेल्याविण ॥ ५ ॥ [३६६१]

उंच नीच कैसी पाईकाची ओळी । कोण गांठे बळी निवडिले ॥ १ ॥ स्वामिकाजीं एक सर्वस्वें तत्पर । एक ते कुचर आशाबद्ध ॥ २ ॥ प्रसंगावांचूनी आणिती आविर्भाव । पाईक तो नांव मिरवी वायां ॥ ३ ॥ गणतीचे एक उंच नीच फार । तयांमध्यें शूर विरळा थोडे ॥ ४ ॥ तुका म्हणे स्वामी जाणे त्यांचा मान । पाईक पाहोन मोल करी ॥ ५ ॥ [३६६२]

एकाच स्वामीचे पाईक सकळ । जैसें तैसें बळ मोल तया ॥ १ ॥ स्वामिपदीं एकां ठाव उंच स्थळीं । एक तीं निराळीं जवळी दुरी ॥ २ ॥ हीन कमाईचा हीन आणि ठाव । उंचा सर्व भाव उंच पद ॥ ३ ॥ पाईकपणें तो सर्वज्ञ सरता । चांगा तरी परत्या गांढ्या वाव ॥ ४ ॥ तुका म्हणे मरण आहे या सकळां । भेणें अवकळा अभयें मोल ॥ ५ ॥ [३६६३]

प्रजी तो पाईक ओळीचा नाईक । पोटासाठीं एक जैशीं तैशीं (जैसे तैसे) ॥ १ ॥ आगळें पाऊल आणिकांसी तारी । पळती माघारीं तोडिजेती ॥ २ ॥ पाठीवरी घाय म्हणती फटमर ।

जन्ममृत्यूच्या येरझारांचा खंड होत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी स्वामीची सेवा थोडीफार करतात तेच सेवक भलेपणा मिरवितात ५. [३६६०]

जो सेवकपणानें खरें (एकनिष्ठपणानें) वागतो त्यास खऱ्या लाभाचा मुशारा (वेतन, बक्षीस) मिळतो आणि तो सेवेच्याच योगानें खरा होतो १. ज्याला लढाईचें अंग ठाऊक आहे तो खरा सेवक आणि त्याचा कालत्रयीं नाश होणार नाहीं २. ज्या सेवकानें एकदोन ठिकाणीं घाला घातला आहे, त्या शूरपणानें तो सेवक निवडला जातो ३. जो कार्य करून स्वामीच्या शिरावर यश देतो त्याच सेवकाला खरें शूर म्हणावें ४. तुकाराम महाराज म्हणतात, सेवकाला स्वामीचे ठिकाणीं गेल्याखेरीज दुसऱ्या ठिकाणीं कोठेंहि आश्रय मिळणार नाहीं ५. [३६६१]

श्रेष्ठ व कनिष्ठ हे सेवकांचे विभाग कसे आहेत पाहा. कितीएक नामर्द ढिले आहेत व कितीएक महान् बलाढ्य शूर असे निवडले आहेत १. कितीएक स्वामिकार्य करण्याविषयीं सर्वथैव दक्ष आहेत व कित्येक आशाबद्ध कुचराई करणारे आहेत २. शूरत्व दाखविण्याचा प्रसंग आल्यावांचून शूरपणाचा आविर्भाव दाखवितात, असले सेवक आपला सेवकपणा व्यर्थ मिरवितात ३. लहानमोठे असे सेवक संख्येनें पुष्कळ आहेत. त्यांमध्यें खरे शूर असे क्वचित् थोडकेच आहेत ४. तुकाराम महाराज म्हणतात, स्वामी हे असल्या सेवकांचा अधिकार जाणतात व त्याप्रमाणेंच त्यांची किंमत करतात ५. [३६६२]

एकाच मालकाचे सर्व सेवक असतात. ज्यांमध्यें जसें बळ असेल तशी त्यांची किंमत असते १. जे खरे शूर, वीर, बुद्धिमान् सेवक असतात त्यांना स्वामीच्या उंच आसनावर जवळच जागा मिळते, कितीएक जे मध्यम स्थितीचे असतात त्यांना थोड्या जवळचा मान मिळतो व कनिष्ठ जे असतात ते सदा स्वामीपासून दूरच असावयाचे २. ज्यांचें कर्तृत्व कमीपणाचें असतें, त्यांना कमीपणाचाच अधिकार मिळतो आणि जे सर्वभावानें योग्य बलवान् श्रेष्ठ असतात, त्यांना मोठ्या अधिकाराचें पद मिळतें ३. असा सेवकास सर्वत्र मान मिळतो. चांगला असून जर कुचर असेल तर तो भित्र्याहिपेक्षां व्यर्थ आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, मरण हें सर्वांना ठरलेंच आहे, पण त्याचें भय धरून जो मागें हटेल त्याची फजिती होते; निर्भयपणानें जो आपलें कार्य करण्याविषयीं तत्पर होईल तो कीर्तिमान् असा योग्य होईल ५. [३६६३]

जो जगामध्यें तलवार फिरविणारा (परजणारा) तलवारबहाद्दर खरा शूर वीर सेवक आहे तो स्वामीच्या बरोबरीचा असा श्रेष्ठ आहे. कितीएक आपलें पोट भरण्याकरितां सेवकत्व करितात तर त्यांची किंमतहि तशीच असते १. शत्रु चाल करून आल्यावर जे भिऊन माघारे पळतात ते शत्रूच्या शस्त्राघातानें तुटले जाऊन मरतात २. पण पाठीवर शस्त्राचे घाव लागून जो सेवक मरतो त्याचें मरणें गांडूपणाचें आहे, व जो धैर्यानें चाल करून आलेल्या शत्रूवर

नीधडा अंगें शूर मान पावे ॥ ३ ॥ घेईल दरवडा देहा तो पाईक । मारी सकळीक सर्व हरी ॥ ४ ॥ तुका म्हणे नव्हे बोलाचें कारण । कमाईचा पण सिद्धी पावे ॥ ५ ॥ [३६६४]

जातीचा पाईक ओळखे पाईका । आदर तो एका त्याचे ठायीं ॥ १ ॥ धरतील पोटासाठीं हातयेरें (हातियारें) । कळती तीं खरें (येरें) वेठीचींसीं ॥ २ ॥ जातीचें तें असे खरें घायडाय । पाराखया काय पाशीं लोपे ॥ ३ ॥ तुका म्हणे नमूं देव म्हूण जना । जालियांच्या खुणा जाणतसों ॥ ४ ॥ [३६६५]

: रामाचे अभंग :

रामा वनवास । तेणें वसे (वोस) सर्व देश ॥ १ ॥ केलें नामाचें जतन । समर्थ तो नव्हे भिन्न ॥ २ ॥ वनांतरीं रडे । ऐसे पुराणीं पवाडे ॥ ३ ॥ तुका म्हणे ऋषिनेम । ऐसा कळोनी कां भ्रम ॥ ४ ॥ [३६६६]

राम म्हणे वाट चाली । यज्ञ पाउला पाउलीं ॥ १ ॥ धन्य धन्य तें शरीर । तीर्थांव्रतांचें माहेर ॥ २ ॥ राम म्हणे करितां धंदा । सुख समाधि त्या सदा ॥ ३ ॥ राम म्हणे ग्रासोग्रासीं । तोचि जेविला उपवासी ॥ ४ ॥ राम म्हणे भोगीं त्यागीं । कर्म न लिंपे त्या आंगीं ॥ ५ ॥ ऐसा राम जपे नित्य । तुका म्हणे तो जीवन्मुक्त ॥ ६ ॥ [३६६७]

तारी ऐसे जड । उदकावरी जो दगड ॥ १ ॥ तो हा न करी तें काई । कां रे लीन व्हा ना पायीं ॥ २ ॥ शिळा होती मनुष्य झाली । ज्याच्या चरणाचे चाली ॥ ३ ॥ वानरां हातीं लंका । घेवविली म्हणे तुका ॥ ४ ॥ [३६६८]

मारा करतो त्याला मोठा मान मिळतो ३. जो सेवक आपल्या जीवावर उदार होईल, तो सर्वांना मारून त्यांना जिंकील ४. तुकाराम महाराज म्हणतात, नुसत्या शूरत्वाच्या गोष्टी सांगितल्यानें कार्यसिद्धि होत नाहीं, तर जो मोठ्या निश्चयानें कमाई करतो त्याचेंच कार्य सिद्धीला जातें ५. [३६६४]

जो खरा शूर वीर जातिवंत सेवक आहे तो दुसऱ्या खऱ्या सेवकाला ओळखतो व त्याच्याविषयींची त्याच्या मनांत आदरबुद्धि असते १. जे सेवक आपलें पोट भरण्याकरितां हत्यारें हातांत घेतात, ते बिगारीला धरलेल्या मजुराप्रमाणें असतात २. जो जातीनें खरा शूर वीर सेवक आहे, त्याचे डावपेंच परीक्षकांच्या ठिकाणीं झांकतील काय? ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व जन हें देव आहे (जनीं जनार्दन) असें शास्त्र सांगतें, म्हणून आम्ही त्याला नमस्कार करूं, पण खऱ्या पूर्ण बोधाला जे गेलेले आहेत त्यांचीं लक्षणें आम्ही खरे परीक्षक असल्यामुळें जाणतों ४. [३६६५]

श्रीरामांनीं दंडकारण्यांत वास्तव्य केल्यामुळें ह्या सर्व देशाची वसाहत झाली (*पाठभेद* : सर्व अयोध्या प्रदेश ओस पडला, दुःखी झाला) १. पितृ-आज्ञा पाळून आपल्या नांवाचें त्यांनीं रक्षण केलें; ते समर्थपणांत कांहीं पालटले नाहींत २. वनाच्या ठिकाणीं जाऊन त्यांनीं सीतेकरितां शोक केला, म्हणून पुराणांनीं वर्णन केलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याचें कारण वाल्मीकिऋषीनें जसें लिहून ठेविलें होतें त्याप्रमाणें रामांनीं वर्तन केलें असें तुम्हांला माहीत असूनहि 'सर्वज्ञ रामानें सीताशोधासाठीं फिरतांना कां रडावें?' अशा शंका तुम्ही कां धरतां? ४. [३६६६]

जो कोणी वाट चालतांना रामाचें नांव घेतो त्याला पावलापावलाच्या ठिकाणीं यज्ञ केल्याचें पुण्य घडतें १. त्याचें शरीर तीर्थें, व्रतें उत्पन्न होण्याचें स्थान आहे. असा तो धन्य धन्य आहे २. प्रापंचिक उद्योग करीत असतां जो रामनामाचें स्मरण करील तो सर्व काळ सुखाची समाधि भोगील ३. भोजनसमयीं घांसाघांसाच्या ठिकाणीं रामनाम घेईल तर तो जेवला असून उपवासी समजावा ४. भोगांत अथवा योगाचे ठिकाणीं रामनाम उच्चारील तर त्याच्या अंगीं कर्माचा लेप होणार नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याप्रमाणें जो सर्व काळ नामाचा जप करील तो जिवंत असून मुक्त आहे असें समजावें ६. [३६६७]

सेतु बांधण्याच्या वेळीं सागरावर ज्या रामांनीं जड असलेले दगड पाण्यावर तारले १. तो राम करील तर काय एक होणार नाहीं? असें असून तुम्ही कां रे त्याच्या चरणीं लीन होत नाहीं? २. ज्या रामाच्या चरणरजाच्या स्पर्शानें जी अहिल्या पाषाण होती ती मनुष्यरूप झाली ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यानें वानरांच्या हातून रावणाच्या लंकेचा विध्वंस केला, असा राम समर्थ आहे ४. [३६६८]

राम म्हणतां रामाचि होइजे । पदीं बैसोन पदवी घेइजे ॥ १ ॥ ऐसें सुख वचनीं आहे । विश्वासें अनुभव पाहें ॥ २ ॥ रामरसाचिया चवी । आन रस रुचती केवीं ॥ ३ ॥ तुका म्हणे चाखोनी सांगें । मज अनुभव आहे अंगें ॥ ४ ॥ [३६६९]

राम राम उत्तम अक्षरें । कंठीं धरिलीं आपण शंकरें ॥ १ ॥ कैसीं तारक उत्तम तिहीं लोकां । हळाहळ शीतळ केलें शिवा देखा ॥ २ ॥ हाचि मंत्र उपदेश भवानी । तिच्या चुकल्या गर्भाधियोनि (गर्भादियोनि) ॥ ३ ॥ जुनाट नागर नीच नवें । तुका म्हणे म्यां धरिलें जीवें भावें ॥ ४ ॥ [३६७०]

राम म्हणतां तरे जाणतां नेणतां । हो कां यातिभलता कुळहीन ॥ १ ॥ राम म्हणतां न लगे आणीक सायास । केले महादोष तेही जळती ॥ २ ॥ राम म्हणे तया न ये जवळी भूत । कैंचा यमदूत म्हणतां राम ॥ ३ ॥ राम म्हणतां तरे भवसिंधुपार । चुके येरझार म्हणतां राम ॥ ४ ॥ तुका म्हणे हेंचि सुखाचें साधन । सेवीं अमृतपान एका भावें ॥ ५ ॥ [३६७१]

पैल आला राम रावणासी सांगती । काय निद्सुरा निजलासी भूपति ॥ १ ॥ अवघे लंकेमाजी झाले रामाचे दूत । व्यापिलें सर्वत्र बाहेरीं भीतरीं आंत ॥ २ ॥ अवघे अंगलग तुझे वधियेले वीर । होईं शरणागत किंवा युद्धासी सादर ॥ ३ ॥ तुका म्हणे एक्या भावें रामासी भेटी । करूनि घेईं आतां या संबंधेंसी तुटी ॥ ४ ॥ [३६७२]

समरंगणा आला । रामें रावण देखिला ॥ १ ॥ कैसे भीडतील दोन्ही । नांव सारूनियां रणीं ॥ २ ॥ प्रेमसुखाचें संधान । बाणें निवारती बाण ॥ ३ ॥ तुकयास्वामी रघुनाथ । वर्म जाणोनि केली मात ॥ ४ ॥ [३६७३]

जो कोणी सर्व काळ रामनाम स्मरण करील तो केवळ रामरूप होईल १. अहो जन हो, अशा प्रकारचें सुख नामस्मरणाच्या ठिकाणीं आहे; त्याचा तुम्ही विश्वास धरून अनुभव पाहा २. ज्याला रामनामरसाची गोडी लागली आहे त्याला इतर रस कसे आवडतील ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी स्वतः त्या रामरसाच्या गोडीचा अनुभव घेऊन तुम्हांस सांगत आहें ४. [३६६९]

राम हीं दोन अक्षरें फार उत्तम आहेत. म्हणून तीं शंकरांनीं आपल्या कंठाच्या ठिकाणीं धारण केलीं आहेत १. शंकराला विषाचा दाह झाला होता तो ह्या योगानें शमला व त्याचा कंठ शीतळ झाला. अशीं हीं उत्तम अक्षरें त्रैलोक्यास तारणारीं आहेत २. ह्याच नाममंत्राचा उपदेश शंकरांनीं पार्वतीस केला त्या योगानें तिचें अंधतम योनीच्या गर्भवासाचें दुःख चुकलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हीं रामनाम अक्षरें पवित्र असून पुरातनचीं आहेत व ह्यांची नित्य नूतन गोडी आहे, म्हणून तीं अक्षरें म्यां भावार्थानें जीवांत धरलीं आहेत ४. [३६७०]

जाणतेपणानें अथवा नेणतेपणानें जो रामनाम स्मरण करील तो तरेल. मग तो कोणत्याहि यातीचा असो अगर नीच कुळांतला असो १. जो सर्व काळ रामनाम उच्चार करतो त्यानें पूर्वीं जरी महादोष केले असले तरी त्यांचें दहन होईल. त्या नामावांचून अन्य साधनांचे सायास करावयास नकोत २. जो रामनामाचें स्मरण करतो त्याला पिशाच्चाची बाधा व्हायची नाहीं व तो अखेरीस यमदूतांच्या हस्तगत होणार नाहीं ३. सर्व काल रामनाम स्मरण केल्यानें भवसमुद्रांतून पार पडून जन्ममृत्यूच्या येरझारा चुकतात ४. तुकाराम महाराज म्हणतात, एका भावानें हें रामनामामृत सेवन करावें, हेंच सुखाचें साधन आहे ५. [३६७१]

रावणाचे सेवक रावणास म्हणतात, हे पृथ्वीपति राजा, तो पलीकडे राम आला आहे, पाहा. अजून तूं झोंप घेत कसा निजला आहेस ? १. सर्व लंकेमध्यें रामाचे दूत आंत शिरले आहेत व बाहेरहि आहेत. असे ते सर्व आंत बाहेर व्यापले आहेत २. तुझ्या आवडते असे सर्व पुरुषार्थी वीर त्यांनीं मारले आहेत. आतां तूं रामास शरण तरी जा अथवा युद्ध करण्याची तयारी कर ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या दोहींतून एका भावानें रामाची प्राप्ति करून घेऊन मागील सर्व प्रापंचिक संबंध तोडून टाक ४. [३६७२]

युद्धभूमीच्या ठिकाणीं आलेला रावण रामानें पाहिला १. ह्या रणांगणाच्या ठिकाणीं आपापल्या नांवाला विसरून, ते दोघे कसे एकमेकांच्या सन्मुख येतील तें पाहा २. परस्परांविषयींच्या अंतरंग प्रेमसुखाच्या अनुसंधानानें एकमेकांच्या बाणानें एकमेकांचें ते निवारण करतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझे धनी श्रीरामचंद्र ह्यांनीं मर्म जाणून पराक्रम केला ४. [३६७३]

कला रावणाचा वध । अवघा तोडिला संबंध ॥ १ ॥ लंकाराज्य बिभीषणा । केली चिरकाळ स्थापना ॥ २ ॥ औदार्याची सीमा । काय वर्णू रघुरामा ॥ ३ ॥ तुका म्हणे माझा दाता । रामें सोडविली सीता ॥ ४ ॥ [३६७४]

रामरूप केली । रामें कौसल्या माउली ॥ १ ॥ राम राहिला मानसीं । ध्यानीं चिंतनीं जयासी । राम होय त्यासी । संदेह नाहीं भरंवसा ॥ २ ॥ अयोध्येचे लोक । राम झाले सकळीक ॥ ३ ॥ स्मरतां जानकी । रामरूप झाले कपि ॥ ४ ॥ रावणेशीं लंका । राम आपण झाला देखा ॥ ५ ॥ ऐसा नित्य राम ध्याय । तुका वंदी त्याचे पाय ॥ ६ ॥ [३६७५]

आनंदले लोक नरनारी परिवार । शंख भेरी तुरें वाद्यांचे गजर ॥ १ ॥ आनंद झाला अयोध्येसी आले रघुनाथ । अवघा जयजयकार आळंगिला भरत ॥ २ ॥ करिती अक्षवाणें ओंवाळिती रघुवीरा । लक्ष्मीसहित लक्ष्मण दुसरा ॥ ३ ॥ झालें रामराज्य आनंदलीं सकळें । तुका म्हणे गाईवत्सें नरनारी बाळें ॥ ४ ॥ [३६७६]

झालें रामराज्य काय उणें आम्हांसी । धरणी धरी पीक गाई वोळल्या म्हैसी ॥ १ ॥ राम वेळोवेळां आम्ही गाऊं ओंविये । दळितां कांडितां जेवितां गे बाइये ॥ २ ॥ स्वप्नींही दुःख कोणीं न देखे डोळां । नामाच्या गजरें भय सुटलें कळिकाळा ॥ ३ ॥ तुका म्हणे रामें सुख दिधलें आपुलें । तयां गर्भवासा येणें जाणें खुंटलें ॥ ४ ॥ [३६७७]

अहिल्या जेणें तारिली रामें । गणिका परलोका नेली नामें ॥ १ ॥ रामहरे रघुराज हरे । रामहरे महाराज हरे ॥ २ ॥ कंठ शीतळ जपतां शूळपाणी । राम जपे अविनाश भवानी ॥ ३ ॥

त्या रावणाचा वध करून त्याचा मागील सर्व प्रपंचसंबंध नाहींसा केला १. आणि त्याचा बंधु जो बिभीषण तो शरण आल्यामुळें त्याला लंकेचें राज्य देऊन त्या ठिकाणीं त्याची चिरकाल स्थापना केली (म्ह० चंद्रसूर्य आहेत, तोंपर्यंत) २ अशी त्या रामाच्या औदार्याची (उदारपणाची) सीमा झाली आहे त्याचें म्यां काय वर्णन करावें? ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो राम माझा दाता आहे. त्यानें रावणाचा वध करून जानकीस सोडविलें ४. [३६७४]

तो राम अयोध्येस आल्यावर त्यानें आपली कौसल्या मातोश्री रामरूप केली १. ज्याच्या मनांत रामाचें ध्यान व चिंतन सर्व काळ आहे तो भरंवशानें रामरूपच होईल ह्यांत कांहीं संशय नाहीं २. व अयोध्येच्या लोकांना सर्व काळ रामाच्या भेटीचा निजध्यास होता, म्हणून रामानें भेट देतेसमयीं सर्व लोकांस रामरूप केलें ३. सीतेचा शोध करतेवेळीं तिचा निजध्यास वानरांना लागल्यामुळें ते सर्व रामरूप झाले ४. लंकेंतील रावणासुद्धां सर्व राक्षस भीतीनें (विरोधभक्तीनें) रामाचें ध्यान करीत होते म्हणून ते सर्व रामरूप झाले ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारें जे रामाचें ध्यान सर्व काळ करतील त्यांच्या चरणांस मी नमस्कार करीत आहें ६. [३६७५]

अयोध्येस राम आल्यावर सर्व लोकांस आनंद झाला व मोठ्या प्रीतीनें भरतास रामांनीं आलिंगन दिलें, त्या वेळीं सर्वांनीं जयजयकार केला १. सर्व लोकांचा समुदाय स्त्रीपुरुषांसुद्धां आनंदरूप झाला. मग त्यांनीं शंख, भेरी, तुरें वगैरे अनेक प्रकारच्या वाद्यांचा गजर केला २. सीताबाईसहवर्तमान राम व लक्ष्मण ह्या उभयतांस अक्षवाणें करून नारी ओंवाळूं लागल्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां रामराज्य झालें. त्या योगानें गाई, वासरें, नर, नारी व लहान लेंकरें ह्या सर्वांस आनंद झाला ४. [३६७६]

त्रैलोक्यांत रामराज्य झालें आहे. त्या योगानें आम्हांस आतां काय उणें आहे? पृथ्वी ही पीक देण्याविषयीं व गाई, म्हशी दूध देण्याविषयीं पूर्णपणें ओळल्या आहेत (पुष्कळ दूध देत आहेत) १. अहो बाई, आतां आम्ही दळण, कांडण व भोजन करतांना वारंवार रामास ओंव्या गाऊं २. रामनामाच्या गजरानें कळिकाळास भय सुटलें म्हणून कोणालाहि स्वप्नांत दुःख दृष्टीस पडत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, असें रामांनीं आपलें सुख सर्वत्रांस दिलें, म्हणून त्यांचें गर्भवासास येणें-जाणें खुंटलें ४. [३६७७]

ज्या रामांनीं अहिल्येचा उद्धार केला व नामस्मरणाबरोबर गणिकेला वैकुंठास नेलें १. अहो जन हो, ह्याकरितां 'राम हरे रघुराज हरे, राम हरे महाराज हरे,' ह्या मंत्राचा उच्चार तुम्ही सर्व काळ करा २. ह्या मंत्राचा जप सर्व काळ

तारक मंत्र श्रवण काशी । नाम जपतां वाल्मीक ऋषि ॥ ४ ॥ राम जपे बीजमंत्र नळा । सिंधु तरती ज्याच्या प्रतापें शिळा ॥ ५ ॥ नाम जप जीवन मुनिजना । तुकयास्वामी रघुनंदना ॥ ६ ॥ [३६७८]

मी तों अल्प मतिहीन । काय वर्णू तुझे गुण । उदकीं तारिले पाषाण । हें महिमान नामाचें ॥ १ ॥ नाम चांगलें चांगलें । माझे कंठीं राहो भलें । कपिकुळ उद्धारिलें । मुक्त केलें राक्षसां ॥ २ ॥ द्रोणागिरी कपिहातीं । आणविला सीतापती । थोर केली ख्याति । भरतभेटी समयीं ॥ ३ ॥ शिळा होती मनुष्य झाली । थोर कीर्ति वाखाणिली । लंका दहन केली । हनुमंत काशानें ॥ ४ ॥ राम जानकीजीवन । योगियांचें निजध्यान । राम राजीवलोचन । तुका चरण वंदितो ॥ ५ ॥ [३६७९]

: घोंगडीचे अभंग :

ठकिलें काळा मारिली दडी । दिली कुडी टाकोनियां (टाकोनी) ॥ १ ॥ पांघुरलों बहु काळें । घोंगडें बळें सांडवलें ॥ २ ॥ नये ऐसा लाग वरी । परतें दुरी लपालें ॥ ३ ॥ तुका म्हणे आड सेवा । लाविला हेवा धांदलीं ॥ ४ ॥ [३६८०]

घोंगडियांचा पालट केला । मुलांमुलां आपुल्यांत ॥ १ ॥ कान्होबा तो मीच दिसें । लाविलें पिसें संवगडियां ॥ २ ॥ तो बोले मी उगाच बैसें । अनारिसें न दिसे ॥ ३ ॥ तुका म्हणे दिलें सोंग । नेदी व्यंग जाऊं देऊं ॥ ४ ॥ [३६८१]

महादेव करीत आहेत, म्हणून त्यांचा विषानें संतप्त झालेला कंठ शीतळ झाला व ह्याच उच्चारानें पार्वतीस अविनाशी पद मिळालें ३. काशीमध्यें ह्याच तारक मंत्राचें श्रवण झालें असतां उद्धार होतो व पूर्वी वाल्हा या नांवाचा कोळी अति पातकी असून त्यानें ह्या नांवाचा उच्चार केल्यामुळें तो वाल्मीकि ऋषि झाला ४. नळ ह्या नांवाच्या वानरानें ह्याच रामनाम बीजमंत्राचा जप केला. त्या सामर्थ्यानें समुद्रावर त्यानें शिळांचा सेतु बांधला ५. तुकाराम महाराज म्हणतात, माझा स्वामी जो रघुनंदन त्याचें नाम हें जे कोणी मुनि (मननशील जन) आहेत त्यांचें जीवन आहे ६. [३६७८]

अहो रामा, तुम्ही पाण्यावर पाषाण तारले हा महिमा तुमच्या नामाचा आहे. असे तुमचे गुण म्यां अल्पमतीनें (बुद्धिहीनानें) काय वर्णन करावे ? १. नाम हें फार उत्तम आहे असें त्रिवार सांगतों. तेंच माझ्या कंठांत राहावें, कारण त्या नामाच्या योगानें वानरांचें कुळ उद्धरलें व राक्षस मुक्त झाले २. राम-रावण युद्धांत लक्ष्मणाला शक्ति लागली तेव्हां मारुतिरायाच्या हातून रामांनीं द्रोणागिरी पर्वत आणविला व रावणाचा वध करून अयोध्येस सीतेसह परत जात असतां भरतास भेट दिली. त्या समयीं सर्व लोक रामरूप केले. अशी थोर ख्याति रामांनींच केली आहे ३. अहिल्या ही गौतमाच्या शापानें शिळा झाली होती, तिला आपल्या चरणरजाच्या स्पर्शानें मनुष्यत्व आलें, अशी पुराणांनीं थोर कीर्ति वर्णन केली आहे. मारुतिरायांनीं लंकेचें दहन केलें हें सामर्थ्य नामाशिवाय दुसऱ्या कशाचें आहे ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, जो जानकीजीवन राम आहे, जो योगिजनांचा गुप्त ठेवा आहे व ज्याचे कमळासारखे नेत्र आहेत, त्या रामाच्या चरणांवर मीं मस्तक ठेविलें आहे ५. [३६७९]

मी काळाला फसवून दडून राहिलों व (देहरूपी घोंगडी) देह टाकून दिला १. पुष्कळ काळ पांघरलेलें देहरूपी काळें घोंगडें बळानें टाकून दिलें, म्हणजे ज्या ठिकाणीं काळाचा कांहीं लाग लागणार नाहीं, अशा सर्व उपाधीपलीकडील दूरच्या स्वरूपस्थितींत मी लपलों ३. तुकाराम महाराज म्हणतात, बहिरंग सेवेची जी मध्यें आडकाठी होती तिजविषयींची हांव त्वरेनें नाहींशी केली (त्या काळानें मला धरण्याचा खूप प्रयत्न केला, पण त्याच्या मार्गांत हरिसेवेचा अडसर लावून त्याला माझ्यापासून दूर रोखलें) ४. [३६८०]

मुलांनीं आपापल्या देहरूपी घोंगड्या बदलल्या (निरनिराळीं सोंगें घेतलीं) १. आतां मीच कृष्णाची घोंगडी पांघरली तेव्हां मी कृष्णच दिसत आहें. अशा प्रकारच्या भावनेनें मी आपल्या कृष्णरूपानें संवगड्यांना वेड लावलें २. तो खरा कृष्ण बोलत आहे व मी उगीच बसलों आहें तथापि त्यांच्या आमच्यामध्यें ब्रह्मदृष्टीनें भिन्नपणा दिसत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरीनें असें सोंग ज्यांना दिलें आहे त्यांना तो व्यर्थ जाऊं देत नाहीं ४. [३६८१]

खेळों लागलों सुरकवडी । माझी घोंगडी हारपली ॥ १ ॥ कान्होबाचे पडिलों गळां । घेई गोपाळा देईं झाडा ॥ २ ॥ मी तों हा गे उघडा झालों । अवघ्या आलों बाहेरी ॥ ३ ॥ तुका म्हणे बुद्धि काची । नाहीं ठायींची मजपाशीं ॥ ४ ॥ [३६८२]

घोंगडियांची एकी राशी । त्याचपाशीं तेंही होतें ॥ १ ॥ माझियाचा माग दावा । केला गोवा उगवूं द्या ॥ २ ॥ व्हावें ऐसें निसंतान । घेईन आण तुजपाशीं ॥ ३ ॥ तुका म्हणे लहान मोठा । सांडा ताठा हा देवा ॥ ४ ॥ [३६८३]

नाहीं तुझे उगा पडत गळां । पुढें गोपाळा जाऊं नको ॥ १ ॥ चाहाड तुझे दाविन घरीं । बोलण्या उरी नाहीं ऐसी ॥ २ ॥ तुम्हां आम्हां पडदा होता । सरला आतां सरोवरी ॥ ३ ॥ तुका म्हणे उरती गोठी । पडली मिठी न सुटे ॥ ४ ॥ [३६८४]

तुम्हां आम्हां उरी तोंवरी । जनाचारीं आहे तैसी ॥ १ ॥ माझें घोंगडें टाकुन देईं । एके ठायीं मग असों ॥ २ ॥ विरोधानें पडे तुटी । कपट पोटीं नसावें ॥ ३ ॥ तुका म्हणे तूं जाणता हरी । मज वेव्हारीं बोलविसी ॥ ४ ॥ [३६८५]

घोंगडियास घातली मिठी । न सोडी साटी केली जीवें ॥ १ ॥ हा गे चोर धरा धांवा कोणी । घरांत रहाटे चहूं कोनीं ॥ २ ॥ नोळखवे म्यां धरिला हातीं । देहा दीप माया लाविली वाती ॥ ३ ॥ न पवे धांवणें मारितो हांका । जनाचारीं तुका नागवला ॥ ४ ॥ [३६८६]

मुळींचा तुम्हां लागला चाळा । तो गोपाळा न संडा ॥ १ ॥ घ्यावें त्याचें देणेंचि नाहीं ।

सुरकवडी खेळ मी खेळूं लागलों त्या वेळीं माझी घोंगडी हरवली (माझ्या देहत्रयाचा निरास झाला, माझी देहभावना नष्ट झाली) १. त्या वेळीं मी कृष्णाच्या (कान्होबाच्या) गळीं पडलों व त्यास म्हणालों, कीं माझा झाडा (हिशेब) घे आणि तूं आपला दे २. हा पाहा, मी उघडा होऊन सर्व मंडळींच्या (उपाधींच्या) बाहेर आलों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मजजवळ मूळचीच खोटी बुद्धि नाहीं, त्यामुळें मी जी माझी स्थिति तुला सांगत आहें ती खरीच तशी आहे ४. [३६८२]

देहरूपी घोंगड्यांची पंचभूतांच्या रूपानें एकच रास होती. त्याच ठिकाणीं तें माझेंहि देहरूपी घोंगडें होतें १. माझ्या घोंगडीचा मार्ग दाखवा. त्या योगानें मी जो अडकलों आहें त्यांतून मला माझी सुटका करून घेऊं द्या. ज्या योगानें देहाहि प्रपंचाचें निसंतान होईल असें अन्य मी तुजपासून घेईन ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, ह्या देहरूपी घोंगडीमुळेंच लहानमोठेपणाचा ताठा निर्माण झाला, त्यांतून मला सोडवा ४. [३६८३]

हे गोपाळा, माझी घोंगडी तूं घेतलीस, असें मी जें कांहीं म्हणतों, हें कांहीं मीं बळें गळीं पडलों असें नाहीं १. तुझ्या बोलण्यांत कांहीं खरेपणा नाहीं असें आम्हांला सांगणारे तुझ्या घरीं चहाडखोर आहेत, ते तुला दाखवीन २. देवा, तुमच्या आमच्यांत जो मर्यादेचा पडदा होता तो आतां नाहींसा झाला आहे व तुमची आमची बरोबरी झाली आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हकीगतच (तुझ्या-माझ्यांत बोलण्यापुरतीच) बाकी राहाते. मीं पायांना मिठी मारली आहे ती सुटणार नाहीं ४. [३६८४]

लोकव्यवहारामध्यें वागणुकीचा जो प्रकार आहे त्याविषयींच्या तुमच्या आमच्या मर्यादा तोंपर्यंत आहेत १. देवा, माझें घोंगडें टाकून द्या. मग आपण एके ठिकाणीं राहूं २. एकमेकांत विरोध वाढल्यानें अंतर येतें, म्हणून हृदयांत कपट ठेवूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे हरि, तूं जाणता आहेस, पण मला मात्र व्यवहारांत प्रपंचासंबंधींच बोलवितोस ४. [३६८५]

त्या देवानें माझ्या देहरूपी घोंगड्यास मिठी घातली, ती मीं जीव दिला तरी तो सोडीत नाहीं १. अहो जन हो, हा चोर माझ्या घरांत चहूंकडे वावरत आहे त्याला धरण्यास कोणी तरी धांवून या २. म्यां त्याला आपल्या हातीं धरलें आहे व दिवसा मायारूपी दीपाचा प्रकाश केला आहे, पण तो माझ्यानें ओळखवत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी ह्या लोकाचारांत नागवल्यामुळें जनांना हांका मारीत आहें, पण मजकडे कोणी धांवून येत नाहीं ४. [३६८६]

हे गोपाळा, तुम्हांला अशी मूळचीच संवय आहे ती तुम्ही टाकीत नाहीं १. ज्याचें घेतां त्याचें पुनः देतच नाहीं;

येचि वाही देखतसों ॥ २ ॥ माझी तरी घोंगडी मोठी । गांडीची लंगोटी सोडीस ना (सोडिशी ना) ॥ ३ ॥ तुका म्हणे म्यां सांडिली आशा । हुंगिला फांसा येथूनियां ॥ ४ ॥ [३६८७]

आतां मी देवा पांघरों काई । भिकेचें तेंहि उरेचि ना ॥ १ ॥ सदैव दुबळें नेणें चोर । देखोनि सुनाट फोडितो घर ॥ २ ॥ नाहीं मजपासीं फुटकी फोडी । पांचांनीं घोंगडी दिली ॥ ३ ॥ तुका म्हणे जगावेगळें झालें । एकचि नेलें एकल्याचें ॥ ४ ॥ [३६८८]

मी माझें करीत होतों जतन । भीतरिल्या चोरें घेतलें खान ॥ १ ॥ मज आल्याविण आधींच तो होता । मज न कळतां मजमाजी ॥ २ ॥ घोंगडें नेलें घोंगडें नेलें । उघडें केलें उघडेंचि ॥ ३ ॥ तुका म्हणे चोरटाचि झाला साव । सहजचि न्याय नाहीं तेथें ॥ ४ ॥ [३६८९]

घोंगडें नेलें सांगों मी कोणा । दुबळें माझें नाणीती मना ॥ १ ॥ पुढें तें मज न मिळे आतां । जवळी सत्ता दाम नाहीं ॥ २ ॥ शेटे महाजन ऐका कोणी । घोंगडियाची करा शोधणी ॥ ३ ॥ घोंगडियाचा करा बोभाट । तुका म्हणे जंव भरला हाट ॥ ४ ॥ [३६९०]

माझें घोंगडें पडिलें ठायीं । माग तया पायीं सांपडला ॥ १ ॥ चोर तो भला चोर तो भला । पाटिसी घातला पुंडलिकें ॥ २ ॥ चोर कुठोरी एकेचि ठायीं । वेगळें पाहावें न लगे कांहीं ॥ ३ ॥ आणिकांचींही चोरलीं आधीं । माझें तयामधीं मेळविलें ॥ ४ ॥ आपल्या आपण शोधिलें तिहीं । करीन मीही तेंचि परी ॥ ५ ॥ तुका म्हणे माझें हितची झालें । फाटकें जाऊनि धडकें आलें ॥ ६ ॥ [३६९१]

हाच मी तुमच्या येथला ओघ पाहात आहें २. माझी तर घोंगडी मोठ्या किंमतीची आहे, पण गांडीची लंगोटी सुद्धां तूं सोडीत नाहींस ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा देहरूपी घोंगडीचा पाश मीं हुंगून टाकला व त्याची आशा सोडली ४. [३६८७]

हे देवा, आतां म्यां पांघरावें काय ? कारण मी जें घोंगडें पंचभूतांकडून आणलें होतें तेंहि तुम्हीं राहूं दिलें नाहीं १. सभाग्य अथवा गरीब याचा चोर विचार करीत नाहीं. ओसाड पाहिलें, कीं त्याचें घर फोडतो २. आरंभीं माझ्याजवळ फुटकी कवडी देखील नव्हती, पण त्या पंचभूतांनीं देहरूपी घोंगडी मला दिली होती ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझें एकट्याचें एकच घोंगडें नेऊन मला लोकाचारावेगळें करून ठेवलें ४. [३६८८]

मी देही हें घोंगडें माझें मी सांभाळून होतों, पण घरांतल्या (हृदयांतल्या देवरूपी) चोरानेंच तें लुबाडून नेलें १. मी येथें येण्याच्या पूर्वींच मला न समजतां ह्या ठिकाणीं तो होता २. माझें देहरूपी घोंगडें नेऊन मला उघडें केलें (असें द्विवार सांगतो) ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो देव शाहाजोग असून जर चोरटा झाला आहे तर त्या ठिकाणीं सहजच न्याय राहिला नाहीं ४. [३६८९]

माझें देहरूपी घोंगडें नेलें हें गाऱ्हाणें मीं कोणास सांगावें ? कारण मज गरिबाचें कोण मनावर घेणार आहे ? १. आतां ती घोंगडी मिळविण्याविषयीं मजपाशीं कोणतीहि सत्ता नाहीं व खर्चण्यास कांहीं भांडवलहि नाहीं, म्हणून ती पुनः मला मिळणार नाहीं २. अहो शेट, महाजन, माझ्या घोंगड्याचा शोध कोणी तरी करा. हें माझें गाऱ्हाणें तुम्ही ऐका ३. तुकाराम महाराज म्हणतात, जोंपर्यंत हा संसाररूपी बाजार भरला आहे तोंपर्यंत माझ्या देहरूपी घोंगड्याचा बोभाट करा (तपास करा) ४. [३६९०]

असा मी बोभाट करीत आहें, इतक्यांत माझें घोंगडें ठिकाणींच सांपडलें. त्या देवाच्या पायांजवळच शोध लागला १. ज्या देवाला पुंडलीकरायानें पाठीशीं घातलें आहे तो चांगला पक्का चोर आहे २. चोराला आश्रय देणारा पुंडलीक व तो चोर हे दोन्ही एके ठिकाणींच आहेत. कोठें कांहीं वेगळें पाहावयास नको ३. पूर्वीं अनेक लोकांचीं देहरूपी घोंगडीं चोरून घेतलीं होतीं. त्यांतच माझेंहि मिळविलें ४. त्यांनीं जसा आपापला शोध केला तोच प्रकार मीहि करीन ५. तुकाराम महाराज म्हणतात, माझें पूर्वींचें पांच ठिगळांचें (पंचभूतात्मक) फाटकें घोंगडें (देह) घेऊन देवांनीं मला ब्रह्मरूपतेचें देहाचें घोंगडें दिलें. तें धड (अविनाश) असें प्राप्त झाल्यामुळें माझें त्यांत हितच झालें आहे ६. [३६९१]

: कलियुगाचें भविष्य :

पाहा हो कलिचें महिमान । असत्यासी रिझलें जन । पापा देती अनुमोदन । करिती हेळण संतांचें ॥ १ ॥ ऐसें अधर्माचें बळ । लोक झकविले सकळ । केलें धर्माचें निर्मूळ । प्रळयकाळ आरंभला ॥ २ ॥ थोर या युगाचें आश्चर्य । ब्रह्मकर्म उत्तम सार । सांडूनियां द्विजवर । दावलपीर स्मरताती ॥ ३ ॥ ऐसे यथार्थाचे अनर्थ । झाला बुडाला परमार्थ । नाहीं झाली ऐसी नीत । हा हा भूत पातलें ॥ ४ ॥ शांति क्षमा दया । भावभक्ति सत्क्रिया । ठाव नाहीं सांगावया । सत्वधैर्य भंगिलें ॥ ५ ॥ राहिले वर्णाश्रमधर्म । अन्यान्य विचरती कर्म । म्हणवितां रामराम । श्रम महा मानिती ॥ ६ ॥ थेर भोरपाचेविशीं । धांवती भूतें आमिषां तैसीं । कथा पुराण म्हणतां सिशीं । तिडिक उठी नकरियाची ॥ ७ ॥ विषयलोभासाटीं । सर्वार्थेंसीं प्राण साटी । परमार्थी पीठ मुठी । मागतां उठती सुनींसीं ॥ ८ ॥ धनाढ्य देखोनि अनामिक । तयातें मानिती आवश्यक । अपमानिले वेदपाठक । सात्विक शास्त्रज्ञ संपन्न ॥ ९ ॥ पुत्र ते पितियापाशीं । सेवा घेती सेवका ऐसी । सुनांचिया दासी । सासा झाल्या आंदण्या ॥ १० ॥ खोटें झालें आली विवसी । केली मर्यादा नाहींसी । भार्या ते भ्रतारेंसी । रंक तैसीं मानिती ॥ ११ ॥ नमस्कारावया हरिदासां । लाजती धरिती कांहीं गर्वसा । पोटासाठीं खौंसा । वंदिती मिलिंछाच्या ॥ १२ ॥ बहुत पाप झालें उचंबळ । उत्तम न म्हणती चांडाळ । अभक्ष भक्षिती विटाळ । कोणी न धरिती कोणाचा ॥ १३ ॥ कैसें झालें नष्ट वर्तमान । एकादशीस खाती अन्न । विडे घेऊनि ब्राह्मण । अविंधवाणी वदताती ॥ १४ ॥ कामिनी विटंबिल्या कुळवंती । वदनें दासींचीं चुंबिती । सोंवळ्याची स्फीती । जगीं मिरविती पवित्रता ॥ १५ ॥ मद्यपानाची सुराणी । नवनीता न पुसे कोणी । केळवल्या व्यभिचारिणी दैन्यवाणी । पतिव्रता ॥ १६ ॥ केवढी दोषाची

तुम्ही ह्या कलियुगाचें महिमान पाहा. सर्व लोक असत्यांत गर्क आहेत आणि पापकर्मास अनुमोदन देऊन संतांची हेळणा करितात १. असे अधर्माच्या बळानें सर्व लोक फसविले गेले आहेत. खऱ्या धर्माचा नाश केल्यामुळें प्रलयकाळाचा आरंभ झाला आहे २. ह्या कलियुगाचें मला फार आश्चर्य वाटतें, कारण सर्व वर्णांमध्यें श्रेष्ठ जे ब्राह्मण, ते आपलें कर्म टाकून दावलपीरास भजतात ३. असा खरा मार्ग बुडून अनर्थ झाला आहे. त्या योगानें परमार्थ राहिला नाहीं आणि भय, नीति नाहींशी होऊन सर्व लोक हायहाय करितात ४. शांति, दया, क्षमा व भावभक्तीची चांगली क्रिया, ह्या लक्षणांचा मुळींच ठिकाणा राहिला नाहीं आणि सत्त्वगुणा ं धैर्य नाहींसें झालें ५. आपापल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणें मुळींच न वागतां नीचांचें कर्म उच्चांस, व उच्चांचें कर्म नीचांस, करावेंसें वाटतें; आणि त्या लोकांस रामनाम म्हणा, असें जर सांगितलें तर ते मोठा त्रास मानतात ६. जसें रस्त्यावर भूतबळी टाकला म्हणजे तो खावयास पिशाचें धांवतात तसे सर्व लोक नाटकें-तमाशा पाहावयास धांवतात. आणि त्यांना कथा, पुराण सांगूं गेलें तर त्या न करणारांच्या कपाळाला तिडीक उठते ७. विषयाच्या लोभाकडे सर्वस्वाचा खर्च करून प्राण सुद्धां देतात, पण त्यांच्याजवळ धर्मादाय म्हणून जर कोणीं मूठभर पीठ मागितलें तर ते कुत्र्याप्रमाणें त्याच्या पाठीस लागतात ८. कोणी महार जरी असला तरी तो धनवान् असला म्हणजे त्याला ते अवश्यमेव मानतात आणि वेदपाठ करणाऱ्या सात्त्विक व शास्त्रसंपन्न अशा ब्राह्मणांचा अपमान करतात ९. पुत्र हे आपल्या बापापासून सेवकाप्रमाणें सेवा घेतात आणि सासवांस आपल्या सुनांच्या स्वाधीन राहून आंदण दिलेल्या दासीप्रमाणें वागावें लागतें १०. हडळीप्रमाणें विघ्न करणाऱ्या स्त्रिया कलियुगामध्यें आल्या, म्हणून खऱ्याच्या जागीं खोटें येऊन, मर्यादा नाहींशी झाली, ती अशी, कीं बायका आपल्या नवऱ्याला गरीब सेवकाप्रमाणें मानतात ११. जर कोणी हरीचे दास भेटले तर त्यांना नमस्कार करण्याविषयीं मोठा गर्व धरितात आणि आपल्या पोटाकरितां मुसलमानांच्या खिदमतगारास देखील नमस्कार करितात १२. असें हें पाप पुष्कळ वाढल्यामुळें, लोक चांगलें वाईट असें कांहीं जाणत नाहींत आणि न खाण्याचे पदार्थ खाऊन (अभक्ष्यभक्षण करून) कोणाचा विटाळ कोणीच मानीत नाहींत १३. एकादशीच्या दिवशीं ब्राह्मण देखील अन्न खाऊन पानाचे विडे खातात आणि मुसलमानाच्या भाषेनें बोलतात, अशी कशी वाईट स्थिति झाली आहे, तें पाहा १४. चांगल्या स्त्रियांची फजीती करून दासीचे मुके घेतात आणि आम्ही मोठे आचारवान् सोंवळे पवित्र आहोंत, असें लोकांत मिरवितात १५. सर्वांस बहुतकरून दारू पिण्याची आवड लागल्यामुळें लोण्यास कोणी

सबळता। झाली पाहा हो भगवंता। पुण्य धुडावोनी संतां। तीर्थां हारी आणिली ॥ १७ ॥ भेणें मंद झाली मेघवृष्टि। आक्रांतली कांपे सृष्टि। देव रिगाले कपाटीं। आटाआटी प्रवर्तली ॥ १८ ॥ अपीकें धान्यें दिवसें दिवसें। गाई म्हैसी चेवल्या गोरसें। नगरें दिसती उदासें (उध्वंसें)। पिकलीं बहुवसें पाखांडें ॥ १९ ॥ होम हरपलीं हवनें। यज्ञयाग अनुष्ठानें। जपतपादि साधनें। आचरणें भ्रष्टलीं ॥ २० ॥ आठरा यातींचा व्यापार। करिती तस्कराई विप्र। सांडोनियां शुद्ध शुभ्र। वस्त्रें निळीं पांघरती ॥ २१ ॥ गीता लोपली गायत्री। भरले चमत्कार मंत्रीं। अश्वाचियेपरी विकिती। कुमारी वेदवक्ते ॥ २२ ॥ वेदाध्ययनसंहिताऋचि। भकांद्या करिती तयांची। आवडी पंडितांची। मुसाफावरी बैसली ॥ २३ ॥ मुख्य सर्वोत्तम साधनें। तीं उच्छेदुनी केलीं दीनें। कुडी कपटें (कापस्थें) महामोहनें। शठें दुर्जनें मिरवताती (मिरविताती दुर्जन) ॥ २४ ॥ कळाकुशळता चतुराई। तर्कवादी भेद निंदेठायीं। विधिनिषेधाच्या वाही। एकही ऐसीं नाडली ॥ २५ ॥ जे संन्यासी तापसी ब्रह्मचारी। होती वैराग्यकारी दिगंबरी। निस्पृही कामक्रोधें व्यापिले भारी। इच्छेकरीं न सुटती ॥ २६ ॥ कैसें विनाशकाळाचें कौतुक। राजे झाले प्रजांचे अंतक। पिते पुत्र सहोदर एकाएक। शत्रुघातें वर्तती ॥ २७ ॥ केवढी ये रांडेची अंगवण। भ्रमविलें अवघें जन। याती अठरा चाऱ्ही वर्ण। कर्दम करूनि विटाळले ॥ २८ ॥ पूर्वी होतें भविष्य केलें। संतीं तें यथार्थ झालें। ऐकत होतों तें देखिलें। प्रत्यक्ष लोचनीं ॥ २९ ॥ आतां असो हें अवघें (आघवें)। गति नव्हे कलीमध्यें। करुणा भाका वेगें। देवासी स्मरावें अंतरीं रे ॥ ३० ॥ अगा ये वैकुंठनायका। काय पाहातोसि या कौतुका। कलीनें गांजिलें लोकां। देतो हांका सेवक तुकयाचा ॥ ३१ ॥ [३६९२]

विचारीत नाहीं आणि व्यभिचार कर्म करणाऱ्या स्त्रियांस महत्त्वानें मिरवतात व पतिव्रतेस गरिबाप्रमाणें ठेवतात १६. हे भगवंता, अशा पातकाचें बळ केवढें वाढलें आहे पाहा बरें ? कारण सर्व पुण्याचा नाश करून संतांस व तीर्थांस कमीपणा आणला आहे १७. ह्या पातकाच्या भयानें पाऊस थोडा पडूं लागला आणि पृथ्वीस ओझें होऊन ती थरथरां कांपत आहे व देव कपाटांत लपून बसले. त्यायोगानें सर्व व्यर्थ खटपट वाढली आहे १८. दिवसेंदिवस धान्य कमी पिकतें व गाईम्हशींस दूध कमी निघतें आणि जागोजाग पाखंड मत फार वाढलें. त्या योगानें गांवें उदास दिसतात १९. होमहवन करणें व जपतपादि साधनें, हीं सर्व शुद्ध आचरणें व यज्ञयागादि नाहींशीं झालीं आहेत २०. अठरा जातीचे व्यापार व चोरी करणें, हीं लक्षणें ब्राह्मणांनीं स्वीकारलीं आहेत. ते ब्राह्मण चांगलीं पांढरीं वस्त्रें टाकून काळीं वस्त्रें घेतात (नेसतात, पांघरतात) २१. भगवद्गीतेचा अभ्यास व गायत्री मंत्राचा जप कोणी ब्राह्मण करीत नाहींत, आणि ज्यांत कांहीं चमत्कार आहे असें शिकतात; व वेदपाठ करणारे ब्राह्मण, जशी घोड्याची विक्री करावी, तशी आपल्या मुलींची विक्री करतात २२. वेदपाठ करणें व वेदांतील संहिता व ऋचा ह्यांचा तिरस्कार करितात आणि पंडिताची प्रीति मुसलमानी धर्माचे ग्रंथ वाचण्यावर बसली आहे २३. जीं कांहीं चांगलीं साधनें आहेत, त्यांचा उच्छेद करून दीन केलीं आहेत आणि ज्यामध्यें खोटें, कपट व मोहन आहे, ते मंत्र शिकून, हे शठ व दुर्जन लोकांत मिरवितात २४. कांहीं कलाकुशलता शहाणपणानें शिकून मोठ्या तर्कानें भेदाचा वाद करितात आणि सर्वांची निंदा करून, विधिनिषेधाच्या भरीला पडून कित्येक फसले आहेत २५. कोणी ब्रह्मचारी, संन्यासी अथवा दिगंबर निःस्पृही असे होतात, पण त्यांना कामक्रोधांनीं व्यापिल्यामुळें ते इच्छेच्या हातून सुटत नाहींत २६. ह्या विनाशकाळाचें कौतुक कसें आहे तें पाहा ! राजे देखील आपल्या प्रजेचा नाश करूं इच्छितात आणि बापलेक व भाऊभाऊ हे एकमेकांमध्यें वैऱ्याप्रमाणें वर्तणूक करून एकमेकांस मारूं पाहातात (परस्परांत शत्रूप्रमाणें वागतात) २७. ह्या माया रांडेचें केवढें सामर्थ्य आहे ! हिनें सर्व जन भ्रमिष्ट करून अठरा जाती व चार वर्ण हे एकत्र करून विटाळले आहेत २८. ह्या कलियुगाचें भविष्य संतांनीं पूर्वी केलेलें ऐकलें होतें, तें आतां प्रत्यक्ष डोळ्यांनीं दिसावयास लागलें आहे. म्हणून तें खरें झालें असें मला वाटतें २९. आतां हे प्रकार असोत. वर सांगितलेल्या कलियुगांतील वागणुकीनें चांगली गति कोणास मिळणार नाहीं. ह्याकरितां सर्व जन हो, तुम्ही अंतरामध्यें देवाचें ध्यान करून लवकर त्याची करुणा भाका ३०. तुकाराम महाराजांचे सेवक (त्यांचे बंधु कान्होबा) म्हणतात, अगा वैकुंठनायका, तूं ह्या कलीचें कौतुक काय पाहातो आहेस ! ह्यानें लोकांना फार गांजिलें आहे, म्हणून तूं धांवून येऊन त्यांना सोडीव. अशा तुला मी हांका मारीत आहें ३१. [३६९२]

: धर्मनीतीचा अभंग :

ऐका संतजन उत्तर माझे बोबडे बोल। करीं लाड तुम्हांपुढें हो कोणी झणीं कोपाल ॥ १ ॥ उपाय साधन आइका कोण गति अवगति। दृढ बैसोनी सादर तुम्हीं धरावें चित्तीं ॥ २ ॥ धर्म तयासी घडे रे ज्याचे स्वाधीन भाज। कर्म तयासी जोडे रे भीत नाहीं लाज ॥ ३ ॥ पुण्य तें जाणा रे भाइनो परोपकाराचें। परपीडा परनिंदा रे खरें पाप तयाचें ॥ ४ ॥ लाभ तयासीच झाला रे मुखीं देव उच्चारी। प्रपंचापाठीं गुंतला रे हानी तयासीच थोरी ॥ ५ ॥ सुख तें जाणा रे भाइनो संतसमागम। दुःख तें जाणा रे भाइनो सम तेथें विषम ॥ ६ ॥ साधन तयासी साधे रे ज्यासी स्वाधीन बुद्धि। पराधीनासी आहे घात रे थोर जाण संबंधी ॥ ७ ॥ मान पावे तो आगळा मुख्य इंद्रियें राखे। अपमानी तो अधररसस्वाद चाखे ॥ ८ ॥ जाणता तयासी बोलिजे जाणे सारलक्षण। नेणता तयासी बोलिजे वाद करी भूषण ॥ ९ ॥ भला तोचि एक जाणा रे गयावर्जन करी। बुरा धन नष्ट मेळवी परद्वार जो करी ॥ १० ॥ आचारी (तोचि) अन्न काढी रे गाई अतिथिविभाग। अनाचारी करी भोजन ग्वाही नसतां संग ॥ ११ ॥ स्वहित तेणेंचि केलें रे भूतीं देखिला देव। अनहित तयाचें झालें रे आणी अहंभाव ॥ १२ ॥ धन्य तेचि जन्मा आले रे एक हरीचे दास। धिग ते विषयीं गुंतले केला आयुष्यनास ॥ १३ ॥ जो हरी तोचि एक जाणा रे जाणे सिद्ध लक्षणें। वेडसरू तो भुले रे वरदळभूषणें ॥ १४ ॥ बळिया गाढा तोचि जाणा रे भक्ति दृढ शरीरीं। गांढ्या तयासी बोलिजे एक भाव न धरी ॥ १५ ॥ खोल तो वचन गुरूचें जो गिळूनी बैसे। उथळ धीर नाहीं अंगीं रे म्हणे होईल कैसें ॥ १६ ॥ उदार तोचि जीवभाव रे ठेवी देवाचे पायीं। कृपण

अहो संतजन, माझें बोबडें भाषण तुम्ही ऐका. मी तुमच्यापुढें लाड करीत आहें, त्यास कोणी एखादे मजवर रागावाल १. उत्तम गति अथवा अधोगति मिळण्याचे साधनउपाय मी सांगतों, ते तुम्ही एकाग्रचित्तानें बसून ऐका आणि ते चित्तामध्यें बळकटपणें धरा २. गृहस्थाश्रमामध्यें ज्याच्या स्वाधीन (आज्ञेंत) बायको असेल, त्याच्या हातून धर्म घडतो आणि ज्यास भीति व लज्जा नसते त्याच्या हातून कर्माची जोड होते ३. अरे भाईनो, परोपकार हेंच पुण्य आहे असें समजा आणि दुसऱ्याची निंदा करणें व त्यास त्रास देणें ह्याचें नांव पाप आहे असें समजा ४. जो श्रीहरीचें नामस्मरण मुखानें नित्य करतो त्यासच लाभ झाला आणि जो प्रपंचांतच गुंतून राहिला त्याची थोर हानि झाली ५. अरे भाईनो, संतांची संगति धरणें हेंच सुख आहे, आणि सर्व भूतांच्या ठिकाणीं परमात्मा समत्वानें असून, तेथें आपल्या कल्पनेनें विषम पाहाणें हेंच दुःख आहे, असें तुम्ही समजा ६. ज्याच्या स्वाधीन आपली बुद्धि आहे, त्यास कोणतेंहि साधन करतां येतें आणि जो दुसऱ्याची बुद्धि ऐकून वागतो, त्याचा मोठा नाश होतो ७. जो कोणी आपल्या इंद्रियांचें रक्षण करतो तो मुख्यत्वें श्रेष्ठ मान पावतो आणि जो परस्त्रीच्या अधरामृतरसाची गोडी सेवन करतो त्याचा मोठा अपमान होतो ८. जे सारभूत लक्षण जाणतात त्यांना जाणते असें म्हणावें आणि दुसऱ्याबरोबर वाद घालून जे भूषण मिरवितात त्यांना नेणते म्हणावें ९. जो द्रव्य मिळवून गयेच्या ठिकाणीं वडिलांचें श्राद्ध करतो, तोच एक चांगला आणि जो परद्वाराकडे (परस्त्रीगमन करण्याकडे) द्रव्य खर्च करितो, तो एक नष्ट वाईट आहे असें समजावें १०. जो भोजनसमयीं अतिथीचा व गाईचा विभाग काढून भोजन करतो, त्याचा आचार शुद्ध म्हणावा आणि असाक्ष (पंगतीला कोणी न घेतां) भोजन करणारास अनाचारी म्हणावें ११. जो सर्व भूतांच्या ठिकाणीं देवाचीच व्याप्ति पाहातो त्यानें आपलें हित साधून घेतलें आणि जो अभिमानानें वागतो त्याचें अकल्याण होतें १२. जन्माला येऊन जे श्रीहरीचें दास्यत्व करितात तेच प्राणी धन्य आहेत आणि जे सर्व काळ विषयामध्यें गुंतले आहेत त्यांच्या जिवित्वाला धिक्कार असो; त्यांनीं आपल्या आयुष्याचा नाश केला १३. जे सिद्धांचें लक्षण जाणतात त्यांना खरे परीक्षक म्हणावें आणि बाह्यात्कारी भूषणांस पाहून जे भुलतात त्यांना वेडगळ असें म्हणावें १४. ज्याच्या ठिकाणीं श्रीहरीची भक्ति दृढतर आहे तोच एक बलवान् आहे आणि जो एक भाव धरून राहात नाहीं त्यास नामर्द म्हणावें, असें तुम्ही समजा १५. जो गुरूचें वचन ऐकून तें हृदयांत सांठवितो त्याचें अंतःकरण सखोल आहे; आणि ज्याच्यापाशीं धीर नसून माझें कसें होईल असें जो म्हणतो त्यास उथळ म्हणावें १६. ज्यानें आपला जीवभाव देवाच्या पायीं अर्पण केला आहे

तयासी बोलिजे पडे उपाधिठाई ॥ १७ ॥ चांगलेंपण तेंचि रे ज्याचें अंतर शुद्ध । वोंगळ मळीन अंतरीं वाणी वाहे दुर्गंध ॥ १८ ॥ गोड तेंचि एक आहे रे सार विठ्ठलनाम । कडु तो संसार रे लक्षचौऱ्यांशीं जन्म ॥ १९ ॥ तुका म्हणे मना धरीं रे संतसंगतिसोई । न लगे कांहीं करावें राहें विठ्ठलपायीं ॥ २० ॥ [३६९३]

: एकाखडी :

(ह्यांत पहिल्या कडव्याचा क ह्या व्यंजनानें आरंभ होतो. पुढें ख, ग वगैरे व्यंजनें कोठें-कोठें एक चरण सोडून चरणाचे आरंभीं आहेत.)

करावा कैवाड । नाहीं तरी आला नाड ॥ १ ॥ स्मरा पंढरीचा देव । मनीं धरोनियां भाव ॥ २ ॥ खचविलें काळें । उगवा लवलाहें जाळें ॥ ३ ॥ गजर नामाचा । करा लवलाहें वाचा ॥ ४ ॥ घरटी चक्रफेरा । जन्ममृत्यूचा भोंवरा ॥ ५ ॥ नानाहव्यासांची जोडी । तृष्णा करी देशधडी ॥ ६ ॥ चरणीं ठेवा चित्त । म्हणवा देवाचे अंकित ॥ ७ ॥ छंदें नानापरी । कळा न पविजे हरी ॥ ८ ॥ जगाचा जनिता । भुक्तिमुक्तींचाही दाता ॥ ९ ॥ झणी माझें माझें । भार वागविसी ओझें ॥ १० ॥ यांची कां रे गेली बुद्धि । नाहीं तरायाची शुद्धि ॥ ११ ॥ टणक धाकुलीं । अवघीं सरतीं विठ्ठलीं ॥ १२ ॥ ठसा त्रिभुवनीं । उदार हा शिरोमणी ॥ १३ ॥ डगमगी तो वायां जाय । धीर नाहीं गोता खाय ॥ १४ ॥ ढळों नये जरी । लाभ घरींचिया घरीं ॥ १५ ॥ नाहीं ऐसें राहे । कांहीं नासिवंत देहे ॥ १६ ॥ तरणा भाग्यवंत । नटे हरिकीर्तनांत ॥ १७ ॥ थडी ठाकी पैलतीर । बाहे ठोके होय शूर ॥ १८ ॥ दया तिचें नांवें । अहंकार जाय जिवें ॥ १९ ॥ धनधान्य हेवा । नाडे कुटुंबाची सेवा ॥ २० ॥ नाम गोविंदाचें । घ्या रे हेंचि भाग्य साचें ॥ २१ ॥ परउपकारा । वेंचा शक्ति निंदा वारा ॥ २२ ॥

त्यास उदार म्हणावें आणि जो संसाराच्या उपाधींमध्यें पडतो त्यास कृपण म्हणावें १७. ज्याचें अंतःकरण शुद्ध आहे त्यास चांगलें म्हणावें आणि जो अंतरीं मलिन असून वाचेनें कुश्चळ भाषण करतो त्यास वाईट म्हणावें १८. विठोबारायाचें नांव हेंच सारभूत असून गोड आहे आणि चौऱ्यांशीं लक्ष योनी फिरणें हा संसार कडु आहे १९. तुकाराम महाराज म्हणतात, अरे मना, तूं संतसमागमाच्या सोईला लागून विठ्ठलाच्या पायीं राहा, त्यावांचून अन्य साधनांचे कांहीं उपाय करणें नको २०. [३६९३]

अहो जन हो, तुम्ही हरिभजनाविषयीं निर्धार करा. नाहींपेक्षां तुम्ही नाडले जाल १. मनामध्यें भाव धरून पंढरीच्या देवाचें तुम्ही स्मरण करा २. काळानें तुमचें शरीर खचविलें (क्षीण केलें) आहे म्हणून त्या मायाजालांतून लवकर बाहेर पडा ३. ह्याकरितां वाचेनें श्रीहरीच्या नामाचा गजर मोठ्या वेगानें करा ४. नाहींपेक्षां जन्ममृत्यूच्या घिरटामध्यें सांपडून (घिरट्या घालून) त्या भोंवऱ्यांत पडाल ५. मनांत हव्यास धरून नाना प्रकारची प्राप्ति तुम्ही करूं इच्छितां, पण त्या आशेनें देशोधडीं फिराल ६. देवाच्या चरणीं चित्त ठेवून तुम्ही त्याचे सेवक म्हणवा ७. त्यावांचून अनेक प्रकारच्या छंदानें अथवा कलाकुसरीनें श्रीहरीची प्राप्ति होणार नाहीं ८. तो हरि सर्व जगाचा बाप असून सर्व ऐश्वर्य व मुक्ति देणारा आहे ९. असें असून तुम्ही एखादे वेळीं देहसंबंधीं माझें असा ममत्त्वाचा भार (संसाराचें मोठें ओझें) आपल्या डोक्यावर घ्याल १०. अरे, ह्या लोकांस तरून जाण्याची शुद्धि नाहीं. अशी ह्यांची बुद्धि कां नष्ट झाली? ११. विठ्ठलाच्या ठिकाणीं लहान थोर सर्व लोक सारखे होतात १२. अशा प्रकारें उदारांचा शिरोमणि म्हणून ह्याचा डांगोरा त्रिभुवनांत आहे १३. ज्याच्या ठिकाणीं ह्याबद्दल धीर नाहीं, तो डगमगून व्यर्थ जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत गोते खातो १४. जर घरचे घरीं लाभ मिळत आहे, तर केलेल्या नेमांत कधींहि ढळूं नये १५. हा देह नाशिवंत आहे. तो कधीं कायम राहील असें नाहीं १६. जो श्रीहरीच्या कीर्तनामध्यें नृत्य करतो, तोच तरणा असून भाग्यवान् आहे १७. अरे जना, तूं शूरत्वानें दंड थोपटून ह्या भवनदींतून पलीकडे जा १८. अंतरांतील अभिमान जीवानिशीं घालविणें, ह्याचेंच नांव आत्मदया आहे १९. धनधान्याचा सोस करून कुटुंबाची सेवा करणें हाच मुख्य नाड (परमार्थातला अडथळा) आहे २०. अरे, तुम्ही गोविंदाचें नामस्मरण करा हेंच खरें भाग्य आहे २१. दुसऱ्यावर उपकार करण्याच्या कामांत बळ

फळ भोग इच्छा । देव आहे जैसा तैसा ॥ २३ ॥ बरवा ऐसा छंद । वाचे गोविंद गोविंद ॥ २४ ॥ भविष्याचे माथां । भजन न द्यावें (नेदावें) सर्वथा ॥ २५ ॥ माग लागला न संडीं । आळस माती घाली तोंडीं ॥ २६ ॥ यश कीर्ति मान । तरी जोडे नारायण ॥ २७ ॥ रवि लोपे तेजें । जरी हारपे हें दुजें ॥ २८ ॥ लकार लाविला । असतां नसतांचि उगला ॥ २९ ॥ वासनेची धाडी । बंद खोडा नाड बेडी (बंद खोड्या नाड्या बेडी) ॥ ३० ॥ सार तें न कळे । काय झांकियेले डोळे ॥ ३१ ॥ खंती ते न धरा । होणें गाढव कुतरा ॥ ३२ ॥ सायासाच्या जोडी । पिकें काढियेल्या पडी ॥ ३३ ॥ हातीं हित आहे । परि न करिसी पाहें ॥ ३४ ॥ अळंकार लेणें । तुळसी मुद्रा भूषणें (तुळसी मुद्रांचीं भूषणें) । ॥ ३५ ॥ ख्याति केली विष्णुदासीं । तुका म्हणे पाहा कैसी ॥ ३६ ॥ [३६९४]

: खेळाचे अभंग :

झेला रे झेला । वरचेवरी झेला । हातींचें गमावी तो पाठीसी खाय टोला ॥ १ ॥ त्रिगुणांचा चेंडू हातें झुगारी निराळा । वरिलिया मुखें मन लावी तेथें डोळा ॥ २ ॥ आगळा होऊनि धरी वराचिया वरी । चपळ तो जिंके गांड्या ठके येरझारीं ॥ ३ ॥ हातीं सांपडलें उभें बैसों नेदी कोणी । सोरीमागें सोरी घेती ओणवें करूनी ॥ ४ ॥ डाईं पडलिया सोसी दुःखाचे डोंगर । पाठीवरी भार भोंवताही उभा फेर ॥ ५ ॥ तुका म्हणे सुख पाहे तयांचें आगळें । जिंकितो हरीसी कोणी एका तरी काळें ॥ ६ ॥ [३६९५]

खर्च करा आणि कोणाची निंदा करूं नका २२. तुम्हांला ज्या फलप्राप्तीचा भोग पाहिजे असेल, त्या इच्छेप्रमाणें देव जशाचें तसें देणार आहे २३. वाचेनें गोविंदाच्या नामाचा छंद घ्यावा तोच बरा २४. अरे, तुम्ही प्रारब्धावर देवाचें भजन घालवूं नका, (दैवांत असेल तर हरिभजन घडेल, किंवा पुढें म्हातारपणीं हरिभजन करूं असें म्हणूं नका) असें निश्चयानें सांगतों २५. देवाच्या वाटेचा मार्ग तुम्हांस सांपडला आहे तो सोडूं नका. ह्यांत आळस कराल तर तोंडीं माती पडेल २६. जर नारायणाची प्राप्ति करून घ्याल, तर तुमची कीर्ति, यश व मान वाढेल २७. जर दुजेपणा नाहींसा होईल, तर तुमच्या प्रकाशानें सूर्य लोपेल २८. जीवात्मा हा मूळचा शांत असतांना नसलेल्या विषयांची त्यानें हांव धरली (किंवा, अशी हांव धरल्यामुळें ल ह्या अक्षरानें आरंभ होणारें 'लबाड' हें विशेषण त्या जीवात्म्याला लागलें) २९. वासनेची धाड पडून जन्ममृत्यूच्या खोड्याचें बंधन सोसावें लागेल, त्या योगानें तुम्ही नाडले जाल ३०. अरे, श्रीहरीचें नाम हेंच सार आहे, तें तुम्हांस न कळून डोळे झांकून कां बसतां ? ३१. जर आतां तुम्ही काळजी करीत नाहीं, तर तुम्हांला पुढें गाढवाचे, कुत्र्याचे जन्म घ्यावे लागतील ३२. जशी पड जमीन असते, ती मेहनतीच्या योगानें पिकते, तशी श्रमानें हरीची प्राप्ति करून घ्यावी ३३. हित करून घेण्याचें तुझ्या हातीं आहे, पण तूं तें करून घेत नाहींस ३४. गळ्यामध्यें तुळशीच्या माळा घालून मुद्रा लावणें, हेच अलंकार अंगावर घालून मिरवावें ३५. तुकाराम महाराज म्हणतात, त्या विष्णुदासांनीं कसे पुरुषार्थ केले आहेत, ते पाहा बरें ३६. [३६९४]

त्रिगुणात्मक देहरूपी चेंडू हा तुम्ही वरचेवर झेला (वरचेवर ह्या देहानें स्वरूपानुसंधान ठेवा). असें न करतां जर हा त्रिगुणात्मक देहरूपी चेंडू हातचा घालविला, तर जन्ममृत्यूचे टोले पाठीवर बसतील १. हा त्रिगुणात्मक देहरूपी चेंडू आत्मबुद्धीच्या हातानें निराळा टाकून दे (देहाचें तादात्म्य सोड) व अंतर्मुख दृष्टीनें स्वरूपीं अनुसंधान ठेव २. स्वस्वरूपाच्या अनुभवानें मोठा हो व हा त्रिगुणात्मक देहरूपी चेंडू बाहेरच्या बाहेर टेव. त्याच्याशीं संबंध करूं नकोस. असें करण्याविषयीं जो चपळाई करतो, तोच प्रपंचरूपी डाव जिंकतो; आणि जो भित्रा आहे तो जन्ममृत्यूच्या येरझाऱ्यांत फसला जातो ३. ह्या पंचभूतात्मक देहबुद्धीचे हातीं सांपडल्यावर संचित, क्रियमाण व प्रारब्ध हीं कोणी विश्रांति घेऊं देणार नाहींत व डावामागें डाव वांकवून घेतील (जन्मामागें जन्म घ्यावे लागतील) ४. देहबुद्धीच्या डावांत सांपडल्यावर दुःखाचे डोंगर सोसावे लागतील व देह मी व देहसंबंधीं माझें हें ओझें पाठीवर राहील व डावांत न सांपडलेले संतगडी हे भोंवताले राहातील ५. तुकाराम महाराज म्हणतात, कोणत्याहि एका वेळेला जो हरीला जिंकील त्याला सुख अधिक आहे हें समज ६. [३६९५]

अझुनि कां थीर पोरा न म्हणसी किर । धरूनियां धीर लाजे बुर निघाला ॥ १ ॥ मोकळा होतासी कां रे पडिलासी डाईं । वरिलांचा भार आतां उतरेसा नाहीं ॥ २ ॥ मेळवूनि मेळा एकाएकीं दिली मिठी । कवळिलें एक बहु बैसविलीं पाठीं ॥ ३ ॥ तळील तें वरी वरील तें येतें तळा । न सुटे तोंवरी येथें गुंतलिया खेळा ॥ ४ ॥ सांडितां ठाव पुढें रुईल धरी हात । चढेल तो पडेल ऐसी ऐका रे मात ॥ ५ ॥ तुका म्हणे किती आवरावे हात पाय । न खेळावें तोंच बरें वरी न ये डाय ॥ ६ ॥ [३६९६]

: कोडें :

कोडें रे कोडें ऐका रे कोडें । उगवूनि फार राहे गुंतोनियां थोडें ॥ १ ॥ पुसतसें सांगा मी हें माझें ऐसें काई । रुसूं नका नुगवे तो झवे आपुली आई ॥ २ ॥ सांगतों हें मूळ कांहीं न धरावी खंती । झालें जीवो मेलें मरो प्रारब्धा हातीं ॥ ३ ॥ तुका म्हणे अभिमान सांडवा सकळीं । नये अंगावरी वायां येऊं देऊं कळी ॥ ४ ॥ [३६९७]

नुगवे तें उगवून सांगितलें भाई । घालूनियां ताळा आतां शुद्ध राखा घाई ॥ १ ॥ आतां कांहीं नाहीं राहिलें । म्यां आपणा आपण पाहिलें ॥ २ ॥ कमाईस मोल येथें नका रीस मानूं । निवडूं नये मज कोणा येथें वानूं ॥ ३ ॥ तुका म्हणे पदोपदीं कान्हो वनमाळी । जयेजत मग सेवटिला एक वेळीं ॥ ४ ॥ [३६९८]

अरे पोरा, देहबुद्धि धरल्यामुळें अनेक योनींतून जन्ममृत्युद्वारा अनेक दुःख भोगलेंस तरी अजून चिर म्हणत नाहींस (अजून त्याला त्रासला नाहींस). तूं लज्जेनें धैर्य धरून राहिल्यामुळें तुझें घामटें निघालें (तुला त्रास सोसावा लागला) १. प्रथम तूं मुक्त असतांना देहाभिमानाच्या डावांत निष्कारण कां पडलास ? आतां त्या योगानें तुझ्यावर जो प्रपंचाचा बोजा आहे तो खालीं उतरला जाणार नाहीं २. पंचभूतांचा मेळा मिळवून एकानें (आत्म्यानें) एकाला (अनात्म्याला) आत्मबुद्धीची मिठी मारली. अशा प्रकारें ह्या एकाला मिठी मारण्यांत अनेक विकार आपल्या अंगावर घेतले ३. जोंपर्यंत ह्या देहादि प्रपंचाच्या खेळांत गुंतले आहेत (त्याचा मोह धरला आहे) तोंपर्यंत पुण्यक्षयानें वरचे अधोगतीला येणार व पुण्यार्जनानें खालचे ऊर्ध्वगतीला जाणार ४. आपलें स्थान टाकण्याच्या वेळीं जो वृत्तिरूपी आपल्या हितविचाररहित अशा ढिलाईनें जो चढेल (स्वर्गादि गतीला जाईल) तो पुण्यक्षयानें अधोगतीला येईल. अरे, अशी तुम्ही हकीगत ऐका ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देहादि प्रपंचरूपी खेळांत वृत्तीचे हातपाय किती आवरावे, म्हणून देहतादात्म्य घेऊन अनेक प्रकारची क्रीडा न करणें हें चांगलें, कारण अंगावर डाव येणार नाहीं ६. [३६९६]

अरे, ही गुप्त गोष्ट तुम्ही ऐका (असें त्रिवार सांगतों). थोडेफार जे तुम्ही देहादि प्रपंचाच्या मोहांत गुंतलांत तें नाहींसें करून टाका १. मी आणि माझें हें काय आहे असें तुम्हांला विचारीत आहें तें तुम्ही सांगा. ह्यासंबंधानें रागावूं नका. ह्या आमच्या प्रश्नाचा जो उलगडा करणार नाहीं तो आपल्या मायारूपी आईशीं अनैतिक संबंध ठेवणारा आहे २. ही तुम्हांला अगदीं मूळची गोष्ट सांगतों. ह्यासंबंधानें तुम्ही कांहीं त्रास मानूं नका. देह हा प्रारब्धाच्या योगानें जन्मो, जगो अथवा मेल्यास मरो, त्याच्याशीं संबंध करूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वांनीं देहाभिमानाचा त्याग करून आपल्या अंगावर कोणतेंहि लचांड येऊं देऊं नये ४. [३६९७]

अरे भाईनो, आपल्या बुद्धीनें जें उलगडणार नाहीं तें उलगडून सांगितलें. आतां त्याचा आपल्याशीं मेळ घालून त्वरेनें शुद्धभाव राखा १. मी आपल्या स्वस्वरूपाला (आत्मरूपाला) जाणलें. आतां कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं २. मोक्षाची कमाई करण्याला किंमत आहे. ह्याबद्दलचा तुम्ही तेथें राग मानूं नये. मला ह्या ठिकाणीं कोणाला निवडतां येत नाहीं व कोणाचें वर्णनहि करतां येत नाहीं. बंधूंनो, तुम्ही स्वतःच आपण बद्ध आहों का मुक्त आहों, हें अनुभवानें ठरवा ३. तुकाराम महाराज म्हणतात, पदोपदीं कान्हा वनमाळी ह्याचें चिंतन केल्यानें अखेर एके वेळीं जय मिळेल. त्याचें दर्शन तुम्हांला होईल ४. [३६९८]

: काला आणि खेळ :

हा रस आनंदाचा । घोष करा हरिनामाचा । कोण हा दैवाचा । भाग पावे येथील ॥ १ ॥ पुण्य पाहिजे बहुत । जन्मांतरींचें संचित । होईल करीत । आला अधिकारी तो ॥ २ ॥ काय पाहतां हे भाई । हरुषें नाचा धरा घाई । पोटभरी कांहीं । घेतां तरी न ठेवा ॥ ३ ॥ जें सुख दृष्टीं आहे । तेंच अंतरीं जो लाहे । तुका म्हणे काय । कळिकाळ तें बापुडें ॥ ४ ॥ [३६९९]

अवघे गोपाळ म्हणती या रे करूं काला । काय कोणाची सिदोरी ते पाहों द्या मला । नका कांहीं मागें पुढें ठेवूं रे खरेंच बोला । वंची वंचला तोचि रे येथें भोंवंडा त्याला ॥ १ ॥ घेतल्यावांचून झाडा रे नेदी आपुलें कांहीं । एक एकां ग्वाही बहुत देती मोकळें नाहीं । ताक सांडी येक येक रे काला भात भाकरी दहीं । आलें घेतों मध्यें बैसला नाहीं आणवीत तें ही ॥ २ ॥ एका नाहीं धीर तांतडी दिल्या सोडोनी मोटा । एक सोडितील गांठी रे एक चालती वाटा । एक उभा भार वाहोनी पाहे उगाचि खोटा । एक ते करूनि आराले आतां ऐसेंचि घाटा ॥ ३ ॥ एकीं स्थिरावल्या गाई रे एक वळत्या देती । एकांच्या फांकल्या वोढाळा फेरे भोंवतीं घेती । एकें चाराबोरा गुंतलीं नाहीं जीवन चित्तीं । एक एका चला म्हणती एक हुंबरी घेती ॥ ४ ॥ एकीं एकें वाटा लाविलीं भोळीं नेणतीं मुलें । आपण घरींच गुंतले माळा नासिलीं फुलें । गांठींचें तें सोडूं नावडे खाय आइतें दिलें । सांपडलें वेठी वोढी रे भार वाहतां मेलें ॥ ५ ॥ एक ते माया गुंतले घरीं बहुत कामें । वार्ता ही नाहीं तयाची तया कांहींच ठावें । जैसें होतें शिळें संचित तैसें लागलें खावें । हातोहातीं गेलें वेंचुनी मग

हरिनामाचा घोष करणें हा रस आनंदाचा आहे म्हणून कोणा दैववानास हा वांटा प्राप्त होईल १. अनेक जन्म-जन्मांतरींचा बहुत पुण्यसंचय ज्यानें केला, तोच ह्याविषयीं अधिकारी आहे २. अरे भाईंनो, तुम्ही काय पाहात बसलां ? आनंदानें नाचा, ओळ धरा व ह्या रसाचें पोटभर सेवन करा. ह्यांत कांहीं कसर ठेवूं नका ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें श्रीहरीचें स्वरूपसुख दृष्टीपुढें उभें आहे तेंच ज्याला अंतःकरणांत प्राप्त होईल, त्याच्यापुढें कळिकाळ दीन आहे ४. [३६९९]

गोपाळ म्हणतात, अरे, या रे काला करूं. कोणी काय पापापुण्याची शिदोरी आणली आहे ती मला पाहूं द्या. अरे, कांहीं चोरून मागें पुढें ठेवूं नका, जें कांहीं खरें असेल तें सांगा. ह्या ठिकाणीं जो ठकबाजी करील तोच ठकला जाईल. त्याला बाहेर घालवून द्या १. श्रीहरि हे दुसऱ्याचा झाडा घेतल्याशिवाय आपली कांहीं शुद्धस्थिति देत नाहींत. पुष्कळ एकमेकांची साक्ष देतात ते मोकळे नाहींत. अरे, कितीएक ताक टाकतात व कित्येक भात, भाकरी व दहीं ह्यांचा काला घेऊन येतात. त्यांचेकडून सर्वांच्या मध्यभागीं बसलेला हरि तो घेतो. तो काला हरि त्यांच्याकडून आणवीत नाहीं (किंवा, परंतु तो स्वतः कोणतीच शिदोरी आणीत नाहीं) २. कित्येकांना दम निघेना, म्हणून त्यांनीं त्वरेनें देहाभिमानाच्या मोटा सोडून टाकल्या. कित्येक विचारानें चित् जडाची ग्रंथी (आत्मा आणि अनात्मा ह्यांची अन्योन्य-अध्यासरूप गांठ) सोडण्यांत गुंतले व कितीएक त्या मार्गानें चालूं लागले. कितीएक देहाभिमानाचें ओझें घेऊन उगीच खोटा भास पाहात राहिले व कित्येक परमार्थ करून शांत झाले व ते सांगूं लागले, कीं आतां तुम्ही असाच परमार्थाचा अभ्यास करा ३. कित्येकांनीं आपल्या इंद्रियरूपी गाई श्रीहरीच्या स्वरूपीं स्थिर केल्या. कित्येक आपल्या इंद्रियरूपी गाईंना विषयांपासून दूर करून श्रीहरीकडे वळवूं लागले व कित्येकांच्या इंद्रियरूपी गाई, त्या विषयाच्या ठिकाणीं पांगल्या व सभोंवतीं विषयाच्या लालचेनें फिरत राहिल्या व कित्येकांच्या इंद्रियरूपी गाई अल्पस्वल्प विषयसुखांतच गुंतून राहिल्या. त्यांच्या चित्तांत सर्वांचें जीवन जो श्रीहरि त्याचें वास्तव्य नाहीं. कित्येक एकमेकांना श्रीहरीकडे चला म्हणतात; कित्येक विषयसुखांतच फेरे घेतात ४. कित्येक भोळ्या अज्ञान्यांना परमार्थाच्या वाटेस लावून आपण देहबुद्धीच्या घरांतच गुंतून राहिले. माळा-फुलांची शिष्यांकडून पूजा घेऊन त्या फुलांचा व माळांचा नाश केला. आपल्या पदरचें खर्च करणें हें ज्यांना आवडत नाहीं व शिष्यांनीं आयतें दिलेलें जे खातात, ते जन्ममृत्यूच्या वेठींत सांपडून देहाभिमानाचें ओझें वाहाण्यांत मरतात ५. एक त्या मायेच्या तडाख्यांत सांपडून देहबुद्धीच्या घरांत व अनेक विषयकामनेंत गुंतले. आपण कोण आहोंत ही खबर त्यांची त्यांना देखील कांहीं नाहीं. जसें पूर्वकृत संचितप्रारब्ध शिळें होतें तसेंच त्यांना खावें लागलें (प्रारब्धानुरूप सुखदुःख भोगावें लागलें) व अशा स्थितींत हां हां म्हणतां असलेलें

पडिलें ठावें ॥ ६ ॥ एकीं हातीं पायीं पट रे अंगीं लाविल्या राखा । एक ते सोलिव बोडके केली सपाट शिखा । एक ते आळसी तळीं रे वरी वाढिल्या कांखा । सिदोरीवांचून बुद्धि रे केल्या अवघ्या वाखा ॥ ७ ॥ तुका म्हणे आतां कान्होबा आम्हां वांटोनी द्यावें । आहे नाहीं आम्हांपाशीं तें तुज अवघेंचि ठावें । मोकलितां तुम्हीं शरण आम्हीं कवणासी जावें । कृपावंतें कृपा केली रे पोट भरे तों खावें ॥ ८ ॥ [३७००]

बैसवूनी फेरी । गडियां मध्यभागीं हरी । अवघियांचें करी । समाधान सारिखें ॥ १ ॥ पाहे तो देखे समोर । भोगी अवघे प्रकार । हरुषें झेली कर । कवळ मुखीं देती ते ॥ २ ॥ बोले बोलतिया सवें । देतील तें त्यांचें घ्यावें । एक एका ठावें । येर येरा अदृश्य ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । बहु आवडीचा हेवा । कोणाचिया जीवा । वाटों नेदी विषम ॥ ४ ॥ [३७०१]

आम्हां निकट वासें । कळों आलें जैसें तैसें । नाहीं अनारिसें । कान्होबाचे अंतरीं ॥ १ ॥ पीडती आपुल्या भावना । जैसी जयाची वासना । कर्माचा देखणा । पाहे लीळा कौतुक ॥ २ ॥ खेळ खेळे न पडे डाईं । ज्याचा भार त्याचे ठायीं । कोणी पडतील डाईं । कोणी कोडीं उगविती ॥ ३ ॥ तुका म्हणे कवळ । हातीं घेऊनि गोपाळ । देतो ज्याचें बळ । त्यासी तैसा विभाग ॥ ४ ॥ [३७०२]

काम सारूनी सकळ । आले अवघे गोपाळ । जाली आतां वेळ । म्हणती आणा सिदोऱ्या ॥ १ ॥ देती आपुलाला झाडा । गाई बैसविल्या वाडां । दोंदिल बोबडा । वांकड्याचा हरि मेळीं ॥ २ ॥ आपुलालिये आवडी । मुदा बांधल्या परवडी । निवडूनि गोडी । हरि मेळवी त्यांत ते ॥ ३ ॥

आयुष्य त्वरेनें नाहींसें झालें. मग ते सावध झाले ६. कित्येकांनीं हातापायांवर राखेचे पट्टे लावले व सर्व अंगाला राख लावली, कित्येकांनीं आपलें डोकें मुंडून शेंडी नाहींशी केली. कित्येक आळशी असल्यामुळें त्यांनीं खालवर केंस वाढविले; पण शुद्ध पुण्याईच्या शिदोरीवांचून त्यांची बुद्धि असल्यामुळें त्यांनीं सर्व व्यर्थ श्रम केले ७. तुकाराम महाराज म्हणतात, गोपाळ म्हणाले, हे कान्होबा, आतां तुम्हीं आम्हांला शिदोऱ्या वांटून द्याव्या. आमच्याजवळ काय आहे नाहीं तें सर्व तुला ठाऊक आहे. आम्ही तुला शरण आलों आहोंत. जर तूं आमचा त्याग केलास तर आम्हीं कोठें जावें ? कृपावंत देवानें कृपा केल्यावर पोट भरेपर्यंत खावें ८. [३७००]

श्रीहरि हे आपले गडी सभोंवतीं बसवून व आपण मध्यभागीं राहून सर्वांचें सारखें समाधान करूं लागले १. श्रीहरि ज्यांना पाहूं लागले त्यांना ते समोरच दिसूं लागले व सर्व प्रकारचा भोग ते भोगूं लागले. गोपाळांनीं तोंडामध्यें जे घांस द्यावे ते श्रीहरीनें आपल्या हातामध्यें झेलावे २. आणि जे कोणी बोलतील त्यांच्याबरोबर बोलावें आणि ते जें देतील तें घ्यावें. त्यांचें तें करणें एक हरीलाच ठाऊक. त्यांच्या त्या एकमेकांमध्यें तें गुप्त असावयाचें ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाला भक्तांच्या प्रीतीची पुष्कळ हांव आहे. कोणाच्याहि हृदयाला तो विषम (परकेपणा) वाटूं देत नाहीं ४. [३७०१]

कान्होबाच्या (श्रीकृष्णाच्या) अंतःकरणामध्यें विषम भाव नाहीं, हें त्याच्याशीं आमचा निकट संबंध असल्यामुळें जसेंच्या तसेंच समजलें १. ज्याची जशी भावना अथवा वासना असेल तशी त्याला ती पीडा करते. श्रीहरि हा सर्वांच्या कर्मांचा साक्षी असल्यामुळें तो सर्वांचें लीलेनें कौतुक पाहातो २. श्रीहरि हा सर्व खेळ खेळून कोणाच्या डावांत सांपडत नाहीं; ज्याचा भार त्याच्या मस्तकावर ठेवतो, कोणी डावामध्यें सांपडतात व कोणी प्रपंचाचा गुंताडा नाहींसा करतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, काल्याच्या प्रसंगीं तो गोपाळकृष्ण हातामध्यें काल्याचे घांस घेऊन जसा ज्याचा अधिकार असेल तसे त्यांना देत होता ४. [३७०२]

आपलें काम आटपून सर्व गोपाळ एका ठिकाणीं जमा झाले व आतां वेळ झाली, आपापल्या शिदोऱ्या आणा असें म्हणूं लागले १. सर्व आपापला झाडा देऊं लागले व सर्वांनीं आपल्या इंद्रियरूपी गाई हृदयरूपी वाड्यांत स्थिर केल्या. तेथील हरीच्या त्या गोपाळसमुदायामध्यें दोंदील, बोबडा, वांकडा इत्यादि नांवाचे गोपाळ होते २. आपापल्या प्रीतीप्रमाणें त्यांनीं भावभक्तीच्या मुदा बांधल्या. त्यांतील आपल्याविषयींची शुद्ध गोडी निवडून श्रीहरीनें ती आपल्या

भार वागविला खांदीं । नव्हती मिळाली तों मांदी । सकळांचे संदी । ओझीं अवघीं उतरलीं ॥ ४ ॥ मागे जो तांतडी । त्यासी रागा येती गडी । तुझी कां रे कुडी । येथें मिथ्या भावना ॥ ५ ॥ एक एकाच्या संवादें । कैसे धाले ब्रह्मानंदें । तुका म्हणे पदें । या रे वंदूं हरीचीं ॥ ६ ॥ [३७०३]

यमुने पाबळीं । गडियां बोले वनमाळी । आणा सिदोऱ्या सकळी । काला करूं आजी । अवघें एका ठायीं । करूनी स्वाद त्याचा पाहा । मजपाशीं आहे तेंही । तुम्हांमाजी देतों ॥ १ ॥ म्हणती बरवें गोपाळ । म्हणती बरवें गोपाळ । वाहाती सकळ । मोहरी पांवे आनंदें । खडकीं सोडियेल्या मोटा । अवघा केला एकवटा । काला करूनियां वांटा । गडियां देतो हरि ॥ २ ॥ एकापुढें एक । घाली हात पसरी मुख । गोळा पावे तया सुख । अधिकचि वाटे । म्हणती गोड झालें । म्हणती गोड झालें । आणिक देईं धालें । नाहीं पोट आमुचें ॥ ३ ॥ हात नेतो मुखापाशीं । येर आशा तोंड वासी । खाय आपण तयासी । दावी वांकुलिया । देऊनियां मिठी । पळे लागतील पाठीं । धरूनी काढितील ओठीं । मुखामाजी खाती ॥ ४ ॥ म्हणती टकडा रे कान्हा । लावी घांसा भरी राणा । दुम करितो शहाणा । पाठोवाठीं तयाच्या । अवघियांचें खाय । कवळ कृष्ण माझी माय । सुरवर म्हणती हाय हाय । सुखा अंतरलों ॥ ५ ॥ एक एका मारी । ढुंगा पाठी तोंडावरी । गोळा न साहावे हरि । म्हणे पुरे आतां । येतो काकुलती । गोळा न साहावे श्रीपति । म्हणे खेळों आतां नीति । सांगों आदरिलें ॥ ६ ॥ आनंदाचे फेरी। माजी घालुनियां हरि । एक घालिती हुंबरी । वाती सिंगें पांवे । वांकडे बोबडे । खुडे मुडे एक लुडे । कृष्णा आवडलीं पुढें । बहु भाविक तीं ॥ ७ ॥

शुद्ध गोडींत मिळविली ३. पापपुण्यात्मक शिदोरीचें ओझें, त्यांनीं जोंपर्यंत शुद्ध भावभक्तीच्या समुदायाचा योग झाला नव्हता तोंपर्यंत, वागविलें. पारमार्थिक लक्षणाचा योग सर्वांच्या ठिकाणीं पाहून, त्या वेळीं श्रीहरींनीं सर्वांची पापपुण्यात्मक शिदोऱ्यांचीं ओझीं उतरलीं ४. जो उतावळा होऊन श्रीहरीजवळ मागतो त्याच्यावर बाकीचे गडी रागावून त्याला म्हणतात, 'आपल्याला मिळेल का नाहीं' अशी तुझी रे कां तेथें खोटी भावना? श्रीहरि सर्वांनाच देणार आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, एकमेकांशीं संवाद करण्यानें ते गोपाल ब्रह्मानंदानें तृप्त झाले. या रे, आपण सर्व हरीच्या चरणांस वंदन करूं ६. [३७०३]

श्रीहरि हे यमुनेच्या तटाकीं येऊन सर्व गोपाळांना म्हणूं लागले, कीं सर्वांनीं आपापल्या शिदोऱ्या आणाव्या. आज आपण काला करूं. सर्व एका ठिकाणीं मिळवून त्याचा मी स्वाद पाहीन. माझ्याजवळ आहे तेंहि तुमच्यामध्यें मिसळतों १. हें ऐकून सर्व गोपाळ (द्विरुक्तीनें) बरें म्हणाले व त्या आनंदानें सर्व मोहरी, पांवे वाजवूं लागले. आपापल्या शिदोऱ्यांचीं गांठोडीं त्यांनीं खडकावर सोडून मोकळीं केलीं व सर्व शिदोऱ्या एका ठिकाणीं मिळवून काला केला व तो काला हरि आपल्या सर्व गड्यांना देऊं लागला २. एकाच्या पुढें एक तोंड व हात पसरतात व ज्याला काल्याचा भाग जास्त मिळतो त्याला अधिक सुख होतें. त्या वेळीं सर्व गोपाळ काला गोड झाला आहे असें (द्विरुक्तीनें) म्हणून आणखी आम्हांला द्या, आमचें पोट भरलें नाहीं, असें देवाजवळ म्हणूं लागले ३. देव तोंडापाशीं हात नेत आहेत असें पाहून सर्व गोपाळ आपल्याला मिळावें म्हणून आशेनें तोंड वासूं लागले, पण हरि आपणच खाऊं लागला व त्यांना टुक टुक करूं लागला. सर्व काला आपणच एकट्यानें तोंडांत घालून हरि पळूं लागला. त्या वेळीं सर्व गोपाळ त्याच्या पाठीमागें लागून त्यांनीं त्याला धरलें व त्याच्या तोंडांतलें हिसकावून घेऊन आपण खाऊं लागले ४. अरे, कान्हा हा मोठा फसव्या आहे. एका घांसाकरितां त्यानें आपणाला रानभर पळावयास लाविलें. त्याच्या पाठीमागें सारखा जो धूम ठोकील तो शहाणा, असें म्हणूं लागले. माझी आई जो कृष्ण तो सर्वांचे घांस खातो. तें पाहून देव हायहाय करून म्हणूं लागले, कीं आम्ही त्या सुखाला अंतरलों ५. गोपाळ एकमेकांच्या ढुंगणावर व तोंडावर काल्याचे गोळे मारूं लागले. ते तडाखे हरीला सहन होईनात. त्या वेळीं ते गोपाळ आपसांत म्हणूं लागले, कीं आपल्या काल्याच्या गोळ्यांचा मार त्या श्रीहरीला सोसत नाहीं, म्हणून तो कींवकाकुळती येऊन आतां ही दांडगाई पुरे, आतां आपण खेळूं, अशी नीति सांगण्याचा त्यानें आरंभ केला आहे ६. सर्व गोपाळांनीं आनंदानें सभोंवतीं फेर धरून मध्यें श्रीहरीला ठेविलें व कित्येक आपल्याभोंवतींच फिरूं लागले व कित्येक शिंगें, पांवे, वाजवूं लागले. त्यांत कित्येक गोपाळ वांकडे, बोबडे, खुडे (खुरट्या अवयवांचे), मुडे (पंगु, कुब्जे) व कित्येक लुडे (लुळे) असे होते, पण ते फार भाविक असल्यामुळें कृष्णाला फार प्रिय होते ७.

करी कवतुक । त्यांचें देखोनियां मुख । हरिसी वाटतसे सुख । खदखदां हांसे । एक एकाचें उच्छिष्ट । खातां न मानिती वीट । केलीं लाजतांही धीट । आपुलिया संगें ॥ ८ ॥ नाहीं गेली ज्याची भूक त्याचें पसरविती मुख । अवघियां देतो सुख । सारिखेंचि हरि । म्हणती भला भला हरी । तुझी संगति रे बरी । आतां चाळविसी तरी । न वजों आणिकां सवें ॥ ९ ॥ गाई विसरल्या चार । पक्षी श्वापदांचे भार । झालें यमुनेचें स्थिर । जळ वाहों ठेलें । देव पाहाती सकळ । मुखें घोटूनियां लाळ । धन्य म्हणती गोपाळ । धिग झालों आम्ही ॥ १० ॥ म्हणती कैसें करावें । म्हणती कैसें करावें । यमुनाजळीं व्हावें । मत्स्य शेष घ्यावया । सुरवरांचे थाट । भरलें यमुनेचें तट । तंव अधिकचि होंट । मट मटां वाजती ॥ ११ ॥ आनंदें गोपांसहित । क्रीडा करी गोपीनाथ । म्हणे यमुनेंत हात । नका धुऊं कोणी । म्हणती जाणें जीवींचें । लाजे त्यास येथें कैचें । शेष या कृष्णाचें । लाभे थोरिवे ॥ १२ ॥ धन्य दिवस काळ । आजी फावला गोपाळ । म्हणती धालों रे सकळ । तुझियानी हातें । मानवले गडी । एक एकांचे आवडी । दहीं खादलें परवडी । धणीवरी आजी ॥ १३ ॥ तुझा संग बरवा । नित्य आम्हांसी द्यावा । ऐसें करूनी जीवा । नित्य देवा चालावें । तंव म्हणे वनमाळी । घ्या रे काठिया कांवळी । आतां जाऊं खेळीमेळीं । गाई चारावया ॥ १४ ॥ तुका म्हणे प्रेमें धालीं । कोणा न साहावे चाली । गाई गोपाळांसी केली । आपणया सरी । आजी झाला आनंदु । न वर्णवे ब्रह्मानंदु । चाले परमानंदु । सवें आम्हांसहित ॥ १५ ॥ [३७०४]

: गौळण :

या हो चला जाऊं सकळा । पाहों हा सोहळा आजि वृंदावनींचा ॥ १ ॥ वाइला गोपाळें

त्यांचीं मुखें पाहून कृष्ण त्यांचें कौतुक करूं लागला, हरीला त्याचें सुख होऊन तो खदखदां हांसे. एकमेकांचें उच्छिष्ट सेवन करण्याविषयीं ते वीट मानीनातसे झाले. ते लाजणारे होते पण आपल्या संगतीनें हरीनें त्यांना धीट केलें ८. ज्यांची भूक गेली नाहीं त्यांच्याकडून तोंड वांसावयास लावतो. हरि हा सर्वांना सारखें सुख देतो, हें पाहून गोपाळ आपसांत (द्विरुक्तीनें) म्हणूं लागले, कीं अरे हरि, तूं चांगला आहेस म्हणून तुझी संगति करणें उत्तम. आतां तूं जरी आम्हांला फसविलेंस तरी दुसऱ्याच्या बरोबर आम्ही जाणार नाहीं ९. तो सर्व गोपाळांचा आनंद पाहून गाई चारा खाण्याचें विसरल्या व पक्षी आणि वनचरांचे समुदाय हेहि आपापलें भक्ष्य सेवन करावयाचें विसरले व यमुनेचें पाणी वाहाण्याचें बंद होऊन स्थिरावलें. तो आनंद स्वर्गींच्या सर्व देवांनीं पाहिल्यामुळें तेहि लाळ घोटूं लागले व म्हणूं लागले, कीं हे गोपाळ धन्य आहेत. आमच्या जन्माला धिःकार असो १०. स्वर्गींचे देव आपापसांत (द्विरुक्तीनें) आतां काल्याचा प्रसाद मिळविण्याकरितां आपण काय युक्ति करावी असें म्हणूं लागले. यमुनेच्या पाण्यामध्यें गोपाळांच्या काल्याचें उच्छिष्टशेष आपल्याला प्राप्त होण्याकरितां आपण मासे व्हावें असा संकल्प करून सर्व देवांनीं मत्स्यरूपानें यमुनेचा तटाक भरला. त्या वेळीं ते गोपाळ खातांना आपल्या ओंठांनीं मोठ्या मोठ्यानें मिटक्या मारूं लागले ११. कृष्ण हे आनंदानें गोपाळांसहवर्तमान क्रीडा करीत असतांना ते गोपाळ म्हणूं लागले, कीं तुम्ही कोणी यमुनेमध्यें आपले हात धुवूं नका. त्या वेळीं गोपाळ (द्विरुक्तीनें) म्हणूं लागले, कीं कृष्ण जीवांतलें जाणतो. कृष्णाच्या उच्छिष्टशेषप्रसादाचा लाभ जे मोठेपणाच्या डौलानें लाजणारे आहेत त्यांना कसा मिळेल? १२. आजची वेळ व दिवसहि आम्हांला चांगला लाभला आहे, असें गोपाळ म्हणूं लागले. अरे देवा, तूं आपल्या हातानें प्रसाद दिल्यानें आम्ही तृप्त झालों. एकमेकांच्या प्रीतीनें तें सर्व गड्यांना मानवलें गेलें व ते गडी म्हणूं लागले, कीं आजच्या तुझ्या पंगतीमध्यें आम्हीं दहीं पोटभर खालें १३. देवा, तुझी संगति उत्तम आहे, ती तूं आम्हांला नित्य दे, अशा प्रकारेंच आमच्या जीवास आनंद देऊन नित्य तुम्हीं वागावें. त्या वेळेस कृष्ण सर्व गोपाळांस म्हणाले, कीं तुम्ही आपल्या काठ्या व घोंगड्या घ्या. आतां आपण सर्व समुदायानें गाई चारण्याकरितां जाऊं १४. तुकाराम महाराज म्हणतात, आज जो आनंद झाला आहे तो ब्रह्मानंद होय. त्याचें वर्णन करतां येत नाहीं. साक्षात् परमानंदरूप कृष्ण आमच्या बरोबर वागत आहे. त्या योगानें ते सर्व गोपाळ तृप्त होऊन कोणालाहि कृष्णाला सोडून एक पाऊल चालणें सहन होईना. प्रभूनें सर्व गाई-गोपाळ आपल्यासारखे केले १५. [३७०४]

अहो, सर्व जणी या व आपण आज वृंदावनांतील (काल्याचा) उत्साह पाहूं चला १. गोपाळ हा वेणु वाजवीत आहे.

वेणुनाद पडे कानीं । धीर नव्हे मनीं चित्त झालें चंचळ ॥ २ ॥ उरलें तें सांडा काम नका करूं गोवी । हीच वेळ ठावी मज कृष्णभेटीची ॥ ३ ॥ निवतील डोळे याचें श्रीमुख पाहतां । बोलती तें आतां घरचीं सोसूं वाईट ॥ ४ ॥ कृष्णभेटी आड कांहीं नावडे आणीक । लाज तरी लोक मन झालें उदास ॥ ५ ॥ एका एकी चालियेल्या सादावीत सवें । तुका म्हणे देवें रूपें केल्या तन्मय ॥ ६ ॥ [३७०५]

: फुगड्या :

फुगडी फू फुगडी घालितां उघडी राहे । लाज सांडोनी एक एकी पाहे ॥ १ ॥ फुगडी गे अवघें मोडी गे । तरीच गोडी गे संसार तोडी गे ॥ २ ॥ मागें जें शिकली होतीस पोटीं । तेंचि विचारूनी आतां उच्चारीं ओठीं ॥ ३ ॥ त्रिगुणाची वेणी तुझे उडते पाठीं । सावरूनी धरी घालीं मूळबंदीं गांठी ॥ ४ ॥ आगळें पाऊल जिंकें एका एक । पावसी मान हे मानवती तिन्ही लोक ॥ ५ ॥ तुका म्हणे तुजमजमध्यें एक भाव । सम तुकें बार घेऊं पावों उंच ठाव ॥ ६ ॥ [३७०६]

फुगडी फू सवती माझे तूं । हागुनी भरलें धू तुझ्या ढुंगा तोंडावरती थूं ॥ १ ॥ फुगडी घेतां आली हारी । ऊठ जा वो जगनोवरी ॥ २ ॥ हात पाय बेंबळ जाती । ढुंगण घोळितां लागे माती ॥ ३ ॥ सात पांच आणिल्या हारी । वांचूनी काय तगसी पोरी ॥ ४ ॥ सरला दम पांगले पाय । अझुनी तरी घोळिसी काय ॥ ५ ॥ तुका म्हणे अझुन तरी । सांगितलें तें गधडी करीं ॥ ६ ॥ [३७०७]

त्याचा मंजुळ ध्वनि कानावर पडत आहे. त्या योगानें मनाला दम निघत नाहीं. चित्त फार चंचल झालें आहे २. जें काम करावयाचें राहिलें असेल तें टाका. त्यांत गुंतून पडूं नका, कारण हीच कृष्णभेटीची वेळ आहे असें मी समजतें ३. श्रीकृष्णाचें मुख पाहिल्यानें डोळे शांत होतील. कृष्णभेटीला गेल्यासंबंधानें घरांतील मंडळी कांहीं वाईट बोलतील तें आतां सोसूं ४. कारण कृष्णाचे भेटीमध्यें जे कांहीं अन्य प्रतिबंध येतात ते कांहीं आवडत नाहींत. मुख्यत्वेंकरून कृष्णभेटी-विषयीं आड येणारी लोकलज्जा आहे, तीविषयीं तर मन उदास झालें आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, एकमेकांना सावध करीत सर्व गोपिका मेळ्यानें कृष्णाकडे निघाल्या. त्यांना देवानें आपल्या रूपाच्या ठिकाणीं तन्मय केलें ६. [३७०५]

प्रपंचाची फुगडी घालतांना (प्रापंचिक क्रिया करतांना) हृदयामध्यें कोणत्याहि संगाची ममता न धरतां असंग अशी उघडी राहा व सर्व लज्जा टाकून अनेक उपाधिभागांतून एकत्वानें असणाऱ्या एका परमात्म्याला तूं पाहा १. अगे, सर्व देहादि प्रपंचाची गडी फू कर (स्नेह सोड) तरच फुगडीची मजा आहे. ह्याकरितां अगे, विचारानें देहादि संसाराचा संबंध तोड २. पूर्वी गर्भवासामध्यें जो सोहंभाव शिकली होतीस (जाणत होतीस), त्याचा विचारानें अनुभव घेऊन आतां तो तूं तोंडानें उच्चार ३. त्रिगुणात्मक वृत्तिरूपी वेणी ही वारंवार तुझ्या हृदयामध्यें उठत आहे. योगांतील मूळबंधादिकांचा आश्रय करून (वज्रासनाची गांठ घालून) ती तूं आवरून धर ४. पुढें पाऊल टाकीत टाकीत योगाचें एकेक अंग साधीत जा. त्यायोगेंकरून तुला मोठा मान मिळेल व हें तुझें करणें त्रैलोक्यालाहि मानलें जाईल ५. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्या आणि माझ्यामध्यें एक आत्मस्वरूपभाव आहे अशा समस्थितीचाच घोष घेऊन भेदशून्य अशा उंच स्वस्वरूपस्थानीं प्राप्त होऊं ६. [३७०६]

देहादि प्रपंचाच्या संगतीनें वागणाऱ्या माझ्या सवती, तूं देहादि प्रपंचाची गडी फू कर (संबंध सोड). आपल्या स्वस्वरूपाच्या अज्ञानानें अनात्म उपाधीशीं तादात्म्य करून त्याच्या गुणविकाराच्या मलानें तूं आपलें स्वरूप भरविलें आहेस (ते विकार आपल्या ठिकाणीं मानीत आहेस) हे विचारानें धुवून काढ. तसें न करशील तर तुझ्या ढुंगणावर व तोंडावर आम्ही थुंकूं १. ह्या देहादि प्रपंचाशीं फुगडी घेण्यानें (खेळण्यानें) कित्येक जिंकले गेले आहेत. हे जगाशीं संबंध करणाऱ्या स्त्रिये, चल, ऊठ, स्वस्वरूपाकडे जाऊं २. प्रापंचिक क्रीडा करतां (म्हातारपण) जरावस्था आली म्हणजे तुझे हातपाय निर्बळ होतील. असें असतां तूं वागूं लागलीस म्हणजे त्यांतील अनेक विकारांचे मळ तुझ्या बुद्धीला लागतील ३. हे मुली, सप्तधातू व पंचभूतात्मक देह जिंकल्यावांचून (पंच प्राण, पंच ज्ञानेंद्रियें, मन, बुद्धि ह्या सातां पांचांना जिंकल्यावांचून) तूं ह्या फुगडीच्या खेळांत कशी टिकशील ? ४. तुझ्या आंगांतील सर्व बळ नाहींसें झालें, व तुझे पायहि लटपटूं लागले आहेत, तरी तूं अजून ह्या प्रपंचाच्या खेळांत अशी वागत आहेस ? ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे गधडे, जें मीं तुला सांगितलें आहे तें तूं अजून तरी कर ६. [३७०७]

: हुंबरी :

तुशीं कोण घाली हुंबरी। साही पांगल्या अठरा चारी ॥ १ ॥ सहस्र मुखावरी हरी। शेष शिणविलें ॥ २ ॥ चेंडुवासवें घातली उडी। नाथिला काळिया देऊनी बुडी ॥ ३ ॥ अशुद्ध पीतां करुणा नाहीं। तुवां आपुली माउशीही मारियेली ॥ ४ ॥ रावणाचें घर बुडविलें सारें। त्याचीं रांडापोरें मारियेलीं ॥ ५ ॥ जाण तो ठावा आहेसी आम्हां। तुवां आपुला मामा मारियेला ॥ ६ ॥ याशीं खेळतां नाश थोरू। तुकया स्वामी सारंगधरू ॥ ७ ॥ [३७०८]

: हमामा :

मशीं पोरा घे रे बार। तुझें बुजीन खालील द्वार ॥ १ ॥ पोरा हमामा रे हमामा रे ॥ २ ॥ मशीं हमामा तूं घालीं। पोरा वरी सांभाळीं खालीं ॥ ३ ॥ तरीच मशीं बोल। पोरा जिव्हाळ्याची ओल ॥ ४ ॥ मशीं घेतां भाष। जीवा मीतूंपणा नाश ॥ ५ ॥ मज सवें खरा। पण जाऊं नेदीं घरा ॥ ६ ॥ आमुचिये रंगीं। दुजें तगेना ये संगीं ॥ ७ ॥ तुक्यासवें भाष। हरी जीवा करी नाश ॥ ८ ॥ [३७०९]

हमामा रे पोरा हमामा रे। हमामा घालितां ठकलें पोर। करी येरझार चौऱ्यांशींचा ॥ १ ॥ पहिले पहारा रंगासी आलें। सोहं सोहंसें बार घेतलें। देखोनि गडी तें विसरलें। डाईं पडिलें आपणचि ॥ २ ॥ दुसऱ्या[1] पहारा महाआनंदें। हमामा घाली छंदछंदें। दिस वाढे तों गोड वाटे। परि पुढें नेणें पोर काय होतें तें ॥ ३ ॥ तिसऱ्या पहारा घेतला बार। अहंपणें पाय न राहे स्थिर। सोसें सोस करितां डाईं पडसी। सत्य जाणें हा निर्धार ॥ ४ ॥ चौथ्या पहारा हमामा।

हे हरि, तुझ्याशीं कोण हुंबरी (एक प्रकारचा तोंडानें ओरडण्याचा पोरांचा खेळ) घालतो, (तुझ्याशीं कोण बरें गर्वानें गुरगुर करील) कारण चार वेद व सहा शास्त्रें आणि अठरा पुराणें हीं सर्व तुझें वर्णन करतां करतां थकलीं व हजार तोंडांचा शेषहि थकला १. चेंडू यमुनेंत पडला ते वेळीं त्वां यमुनेंत उडी घालून व खालीं बुडून कालियासर्पाच्या बळाचा नाश केला (कालियाचें दमन केलें) २. एखाद्याचें रक्त प्राशन करण्याविषयीं तुला अगदीं दया आली नाहीं. त्वां आपल्या पूतना मावशीचें रक्त प्राशन करून तिला मारलेंस ३. राम अवतार घेऊन त्वां रावणाचें सर्व घर बुडविलेंस. त्याचीं बायका-पोरें देखील मारलींस ४. ह्या अवतारामध्यें त्वां आपला कंस मामा मारलास. असा तूं निर्दय आहेस तें आम्हांला पुरतेपणानें समजलें ५. तुकाराम महाराज म्हणतात, सारंग (शार्ङ्ग) ह्या नांवाचें धनुष्य हातीं धारण करणारा तो माझा स्वामी आहे, त्याच्याबरोबर जो कोणी खेळ खेळेल त्याच्या देहादि सर्व प्रपंचाचा नाश होतो ६. [३७०८]

देव म्हणतात, हे पोरा, माझ्याबरोबर तूं हमामा खेळ म्हणजे तुझें अधोगतीचें दार मी बुजवून टाकीन १. पोरा, म्हणून तूं माझ्याशीं हमामा घाल २. परंतु माझ्याशीं हमामा खेळतांना वर, खालीं नजर ठेव (सद्‌गतीचा व अधोगतीचा विचार कर) ३. जर स्वस्वरूप जिव्हाळ्याची (बोधाची) ओल असेल तर तूं माझ्याशीं बोल ४. माझ्याशीं भाषण करण्यांत तुझा जीवपणा मी-तूंपणाच्या भावानिशीं नाहींसा होईल ५. माझ्याबरोबर तूं आहेस खरा, पण मी तुला जन्ममृत्यूच्या घराकडे जाऊं देणार नाहीं ६. आमच्या निजरंगाच्या संगतींत द्वैतभाव टिकत नाहीं ७. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्याबरोबर प्रतिज्ञा केली म्हणजे जीवदशा हरण करून मी तिचा नाश करतों ८. [३७०९]

अरे पोरा, देहादि प्रपंचाशीं हमामा (एक प्रकारची क्रीडा) घालण्यानें फसलास तर चौऱ्यांशीं लक्ष योनींतून जन्ममृत्यूच्या येरझारा करीत राहिलास १. गर्भावस्थेचा पहिला पाहारा रंगाला आला ते वेळीं सोहं सोहं असा छंद घेतलास. ते गडी देहादि प्रपंच पाहून सोहं छंद विसरले; व आपणच ह्या संसाराच्या डावांत सांपडले २. दुसरा जो बाल्यावस्थेचा पाहारा त्या वेळीं मोठ्या आनंदानें आपल्या बाल्यबुद्धीच्या छंदानें क्रीडा करूं लागलें व ते दिवसेंदिवस वाढूं लागल्यानें सर्वांना चांगलें वाटूं लागलें, पण पुढें तें पोर कसें होतें तें न कळे ३. तिसरा पाहारा [प्रहर] जी तारुण्यावस्था ते वेळीं मी देह असा पोरानें छंद घेतला व त्या अहंपणाच्या भरामध्यें क्षणभरदेखील एका जागीं राहीना. ह्या विषयाचा सोस घेतल्यानें तूं प्रपंचाच्या तडाख्यांत सांपडशील हें खरोखर समज ४. चौथा पाहारा (प्रहर) जी वृद्धावस्था ते वेळीं

घालिसी कांपविसी हातपाय । सुऱ्या पाटिलाचा पोर यम । त्याचे पडसील डाईं रे ॥ ५ ॥ हमामा घालितां भ्याला तुका । त्यानें सांडिली गड्याची सोई । यादवाचा मूल एक विठोबा । त्यासवें चारितो गाई रे ॥ ६ ॥ [३७१०]

: कांडण :

सिद्ध करुनियां ठेविलें कांडण । मज सांगातीण शुद्ध बुद्धी गे ॥ १ ॥ आठव हा धरीं मज जागें करीं । मागिले पाहारीं शेवटींचा गे ॥ २ ॥ सम तुकें घाव घालीं वो साजणी । मी तुज मिळणी जीवें मिळे ॥ ३ ॥ एक कशी पाखडी दुसरी निवडी । निःशेष तिसरी ओज करी ॥ ४ ॥ सरलें कांडण पाकसिद्धि करी । मेळवण क्षिरीं साखरेचें ॥ ५ ॥ उद्धव अक्रूर बंधु दोघेजण । बाप नारायण जेवणार ॥ ६ ॥ तुका म्हणे मज माहेरीं आवडी । म्हणोनी तांतडी मूळ केलें ॥ ७ ॥ [३७११]

सावडीं कांडण ओवी नारायण । निवडी आपण भूस सार ॥ १ ॥ मुसळ आधारीं आवरूनी धरीं । सांवरूनी थिरीं घाव घालीं ॥ २ ॥ वाजती कांकणें अनुहात गजरें । छंद माहियेरे गाऊं गीतीं ॥ ३ ॥ कांडितां कांडण नव्हे भाग शीण । तुजमजपण निवडे तों ॥ ४ ॥ तुका म्हणे रूप उमटे आरिसा । पाक त्यासरिसा सिद्ध झाला ॥ ५ ॥ [३७१२]

प्रपंचक्रीडा करितांना हातापायांस कांपरें सुटेल व सूर्य पाटलाचा मुलगा जो यमधर्म त्याच्या तडाख्यांत सांपडशील ५. तुकाराम महाराज म्हणतात, देहादि प्रपंचाशीं क्रीडा करण्याविषयीं (हमामा घालतांना) मी भ्यालों व शरीरत्रयाच्या गड्याचा (किंवा स्त्री-पुत्रादि गड्यांचा) संबंध टाकून यादवाच्या कुळामध्यें जन्मलेलें जें मूल विठोबा त्याच्या संगतीनें मी इंद्रियरूपी गाई चारतों (इंद्रियांनीं श्रीहरीचें सुख घेतों.) ६. [३७१०]

आत्मानात्मभावाचें कांडण (कांडण्यायोग्य वस्तु) मी तयार करून ठेविलें आहे, अगे, माझ्याबरोबर आत्मानात्म-विचारसंपन्न अशी शुद्ध बुद्धि आहे १. अगे, तिला मी सांगतों, कीं तूं स्वस्वरूपाचा आठव धरून कर्मक्षयाच्या मोठ्या पहांटे मला आत्मजागृति दे २. हे शुद्धबुद्धि मैत्रिणी, सर्वत्र समानत्वेंकरून एक परमात्मा आहे अशा भावनेचा घाव घाल, म्हणजे तुझ्या आणि माझ्या जीवाचा योग एका स्वस्वरूपाच्या (ब्रह्मरूपाच्या) ठिकाणीं होईल ३. एका स्थूल देहाच्या विवेकानें सडणें झालें (स्थूल देह हा अनात्म परकीय, असें ठरलें) म्हणजे पाखंड (स्थूल देहाचें तादात्म्य) टाक व विचारानें सूक्ष्म देहाची दुसरी सड झाली (सूक्ष्म हाहि अनात्म परकीय आहे, असें ठरलें) म्हणजे त्यापासून आपली आत्मबुद्धि निवडून घे (सूक्ष्म देहाचें तादात्म्य टाक). तिसरा जो कारणदेह त्याची विचारानें तिसरी सड झाली (कारण देहसुद्धां विचारानें अनात्म असें ठरलें), म्हणजे तें तूं चांगलें पाखड (कारणदेहाचेंहि तादात्म्य टाकून दे) ४. अशा तऱ्हेनें देहत्रयाची तिसड झाल्यावर असंग ज्ञानरूप सिद्ध आत्मभावाचा पाक कर (असंग ज्ञानरूप आत्मा मी आहें असें समज) व त्या ज्ञानरूप क्षीरामध्यें आत्मानंदाची साखर मिळीव ५. उद्धव आणि अक्रुर हे दोघे भाऊ आणि नारायण हा पिता ही मंडळी जेवणार आहे ६. तुकाराम महाराज म्हणतात, मला आईबापांची प्रीति आहे, म्हणून ते मला लवकर बोलवावयास आले ७. [३७११]

सखे, नारायणाच्या स्वरूपचिंतनानें कांडण आवर, कारण आतां आपण अनात्मभावाचा असार कोंडा व आत्म-भावाचे सार कण हे निवडूं १. आत्मानात्मविवेकाचें मुसळ तूं वरचेवर आवरून धर व इंद्रिय व मनबुद्धि ह्यांना आवरून (ह्यांचा निग्रह करून) स्थिरबुद्धीनें आत्मबोधाचा घाव घाल २. त्या वेळेस सोहंरूपी अनुहताच्या गजरानें परावाणी-रूपी बांगड्या वाजूं लागतील. त्या छंदांत आईबापाला (रुक्मिणी–पांडुरंगाला) सुस्वरांत गाऊं ३. जोंपर्यंत मी आणि तूं असा द्वैतभाव हृदयामध्यें उभा राहिला नाहीं तोंपर्यंत ऐक्यबोधाच्या कांडण्यामध्यें श्रमदुःख नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याप्रमाणें आपलें रूप आरशामध्यें प्रगट होतें त्याप्रमाणें सिद्ध स्वात्मानुभवाची पाकसिद्धता झाली ५. [३७१२]

: काला :

उपजोनियां पुढती येऊं । काला खाऊं दहींभात ॥ १ ॥ वैकुंठीं तों ऐसें नाहीं । कवळ कांहीं काल्याचे ॥ २ ॥ एकमेकां देऊं मुखीं । सुखीं घालूं हुंबरी ॥ ३ ॥ तुका म्हणे वाळवंट । बरवें नीट उत्तम ॥ ४ ॥ [३७१३]

याल तर या रे लागें । अवघे माझ्या मागें मागें ॥ १ ॥ आजी देतों पोटभरी । पुरे म्हणाल तोंवरी ॥ २ ॥ हळूहळू चला । कोणी कोणाशीं न बोला ॥ ३ ॥ तुका म्हणे सांडा घाटे । तेणें नका भरूं पोटें ॥ ४ ॥ [३७१४]

शिंकें लावियेलें दुरी । होतों तिघांचे मी वरी ॥ १ ॥ तुम्ही व्हा रे दोहींकडे । मुख पसरुनी गडे ॥ २ ॥ वाहती त्या धारा । घ्या रे दोहींच्या कोंपरा ॥ ३ ॥ तुका म्हणे हातीं टोका । अधिक उणें नेदीं एका ॥ ४ ॥ [३७१५]

पळाले ते भ्याड । त्यांसी येथें झाला नाड ॥ १ ॥ धीट घेती धणीवरी । शिंकीं उतरितो हरी ॥ २ ॥ आपुलिया मतीं । पडलीं विचारीं तीं रितीं ॥ ३ ॥ तुका म्हणे घ्या रे पया । कैं पावाल या ठाया ॥ ४ ॥ [३७१६]

धालें मग पोट । केला गड्यांनीं बोभाट ॥ १ ॥ ये रे ये रे नारायणा । बोलों अबोलण्या खुणा ॥ २ ॥ खांद्यावरी भार । तीं शिणती बहु फार ॥ ३ ॥ तुकयाच्या दातारें । नेलीं सुखी केलीं पोरें ॥ ४ ॥ [३७१७]

पाहाती गौळणी । तंव ती पालथी दुधाणी ॥ १ ॥ म्हणती नंदाचिया पोरें । आजी चोरी केली खरें ॥ २ ॥ त्याविण हे नासी । नव्हे दुसरिया ऐसी ॥ ३ ॥ सवें तुक्या मेला । त्यानें अगुणा आणिला ॥ ४ ॥ [३७१८]

गोपाळ म्हणाले, पुनः जन्म घेऊन येऊं व पुनः दहींभाताचा काला खाऊं १. अशा प्रकारच्या काल्याचे घास वैकुंठांत नाहींत २. ते एकमेकांच्या तोंडामध्यें देऊन सुखानें हुमदुम (आरडाओरड) करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, काल्याला यमुनेचें, चंद्रभागेचें, इंद्रायणीचें किंवा गोदावरीचें वाळवंट हें उत्तम स्थळ आहे ४. [३७१३]

भगवान् गोपाळकृष्ण म्हणाले, अरे, अवघ्या गोपाळांनो, तुम्हांला यावयाचें असलें तर आमच्या मागें या १. आज तुम्ही पुरे म्हणाल तोंपर्यंत पोटभर देतों २. तुम्ही मात्र हळू हळू चला. कोणी एकमेकांशीं बोलूं नका ३. तुकाराम महाराज म्हणतात, संसाररूपी घाटलेल्या कच्च्या कण्या टाका. त्या योगानें पोट भरूं नका ४. [३७१४]

अरे, त्या गौळणीनें शिंकें उंच लाविलें आहे. तुम्ही एकावर एक तिघे उभे राहा, म्हणजे त्याच्यावर मी जातों १. अरे, तुम्ही दोन्ही बाजूला तोंड पसरून राहां २. दोन्ही कोंपरांनीं ज्या धारा वाहातील त्या तुम्ही घ्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, गड्यांनो, माझ्या हाताकडे पाहा. मीं कोणाला कांहीं कमी पडूं देत नाहीं ४. [३७१५]

जे कोणी भित्रे होते ते पळाले; ते ह्या ठिकाणीं फसले १. हरि हा दह्यादुधाचीं शिंकीं उतरीत आहे. त्यांत जे कोणी धैर्यवान् होते ते पोटभर सेवन करते झाले २. जीं आपल्या बुद्धीनें विचारामध्यें पडलीं तीं रिकामीं बसलीं (तीं ह्या गोरसास मुकलीं) ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे, तुम्ही दूध सेवन करा. मग तुम्ही कधीं ह्या ठिकाणीं याल? ४. [३७१६]

सर्व गड्यांचें पोट भरल्यावर त्यांनीं आरडाओरडा केला १. अरे अरे, नारायणा, तूं व आम्ही बोलण्याच्या पलीकडच्या खुणेची (ब्रह्मरूपाची किंवा भक्तिप्रेमाची) चर्चा करूं २. देहाभिमानाचें ओझें ज्यांनीं घेतलें आहे तीं पुष्कळ दुःखी होत आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या दात्या देवानें सर्व पोरें आपल्याबरोबर गोरसाची चोरी करण्याकरितां नेऊन सुखी केलीं ४. [३७१७]

सकाळीं उठून गौळणी पाहूं लागल्या तों दुधाचीं मडकीं पालथीं पडलीं आहेत १. त्या म्हणूं लागल्या, कीं आज ही चोरी खरोखर नंदाच्या मुलानें केली २. त्याच्या वांचून दुसऱ्याला अशी नासाडी करतां येणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या म्हणूं लागल्या, हा मेला देहूचा तुक्या तुझ्या बरोबर होता, त्यानें ह्या गुणातीत हरीला नंदाच्या पोराला सगुण करून आमच्या घरीं चोरी करण्याकरितां आणलें ४. [३७१८]

आतां ऐसें करूं । दोघां धरूनियां मारूं ॥ १ ॥ मग टाकिती हे खोडी । तोंडीं लागली ते गोडी ॥ २ ॥ कोंडूं घरामधीं । न बोलोनी जागो बुद्धी ॥ ३ ॥ बोलावितो देवा । तुका गडियांचा मेळावा ॥ ४ ॥ [३७१९]

: लखोटा :

लये लये लखोटा । मूळबंदी कासोटा । भावा केलें साहें । आतां माझें पाहें ॥ १ ॥ हातोहातीं गुंतली । जीवपणा मुकली । धीर माझा निका । सांडीं बोल फिका ॥ २ ॥ अंगीकारी हरि । नको पडों फेरी । लाज धरीं भांडें । जग झोडी रांडे ॥ ३ ॥ बैस भावापाठीं । ऐक माझी गोष्टी । केला सांडीं गोहो । धरीं येथें मोहो ॥ ४ ॥ पाठमोरा डोल । आवरीं ते बोल । पांगलीस बाळा । पुढें अवकाळा ॥ ५ ॥ आतां उभी ठायीं । । उभाउभी पाहीं । नको होऊं डुकरी । पुढें गाढव कुतरी ॥ ६ ॥ नाम केलें खरें । आपुल म्यां बरें । तुका म्हणे येरी । पांगविल्या पोरी ॥ ७ ॥ [३७२०]

: काला :

गडी गेले रडी । कान्हो नेदीच तूं चढी ॥ १ ॥ आम्ही न खेळों न खेळों । आला भाव तुझा कळों ॥ २ ॥ न साहवे भार । बहु लागतो उशीर ॥ ३ ॥ तुका आला रागें । येऊं नेदी मागें मागें ॥ ४ ॥ [३७२१]

: हाल :

यमुनेतटीं मांडियेला खेळ । म्हणे गोपाळ गडियांसी ॥ १ ॥ हाल मांडा हाल मांडा । वाउगीं सांडा मोकळीं ॥ २ ॥ नांवें ठेवूनि वांटा गडी । न वजे रडी मग कोणी ॥ ३ ॥

आतां तुक्या आणि नंदाचा पोर देव या दोघांना धरून मारूं १. मग चोरून खाण्याची जी गोडी ह्यांच्या तोंडाला लागली आहे ती खोड हे टाकतील २. हृदयरूपी घरांत त्यांना कोंडूं व बुद्धि जागृत ठेवूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या म्हणाल्या, कीं हा तुकाच देवाला आणि त्याच्या गड्यांना बोलावितो त्याचाच आपण समाचार घेऊं. [३७१९]

समाधिअवस्थेपर्यंत पोंचलेली एक मैत्रीण दुसऱ्या संसारासक्त मैत्रिणीला म्हणते, योगांतील मूळबंदाचा कांसोटा घालून परमात्म्याविषयींच्या भावाचें साह्य घेऊन मी आपल्या वृत्तीला परमात्म्याच्या अनुसंधानरूपी लखोट्याची (लाखेनें चिकटल्यासारखी एकीकरणाची) क्रीडा आरंभिली; आतां माझी स्थिति पाहा १. माझी मनोवृत्ति त्वरित स्वस्वरूपाच्या ठिकाणीं गुंतल्यामुळें ती जीवदशेंतून सुटली; अशा प्रकारचें हें माझें उत्तम धैर्य आहे, इकडे पाहा आणि पोकळ गडबडीचा त्याग कर २. श्रीहरीचा तूं अंगीकार कर व जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत पडूं नकोस. हे भांडखोर झोंड रांडे, ह्याची तूं कांहीं लाज धर ३. श्रीहरीच्या भावारूढ हो, श्रीहरीविषयीं आसक्ति धर, ही माझी गोष्ट तूं ऐक, देहाहंकार हा जो पति तूं केला आहेस ह्याचा तूं त्याग कर व स्वस्वरूपीं मोह ठेव ४. व्यर्थ बडबड आवरून आत्म्याचा संबंध टाकून आपल्या हृदयवृत्तीला पाठमोरी कर (अंतर्मुख कर). हे मुली, तूं ह्या देहादि प्रपंचाच्या पंगिस्त (आधीन) झालीस पण ह्या योगानें तुझी पुढें फजिती होईल ५. आतां जागच्या जागीं स्थिर होऊन त्वरेनें श्रीहरीकडे पाहा. पुढें डुकर, गाढव, कुत्रें इत्यादिकांचे जन्माला जाऊं नकोस ६. तुकाराम महाराज म्हणतात, मीं आपलें चांगलें नांव खरें केलें व ज्या बहिर्मुख मुली होत्या त्यांची पांगापांग केली ७. [३७२०]

कुरघोडीच्या खेळामध्यें सर्व गडी रडीला जाऊन म्हणूं लागले, हे कृष्णा, आमच्या पक्षाला तूं डावच जिंकूं देत नाहींस १. आम्ही आतां तुझ्याशीं खेळणार नाहीं, तुझी भावना आम्हांला समजली २. तूं पाठीवर बसल्यामुळें आम्हांला गड्यांचें ओझें फार वेळपर्यंत सहन करवत नाहीं व त्यामुळें ठराविक ठिकाणापर्यंत जाण्यास उशीर लागतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी रागावलों म्हणून हरीला खेळण्याकरितां आपल्या मागें येऊं देत नाहीं ४. [३७२१]

गोपाळ यमुनेच्या तीरावर खेळास आरंभ करून आपल्या गड्यांस म्हणूं लागला १. तुम्ही हद्द ठरवा व त्या हद्दींत राहा. व्यर्थ मोकाटपणा सोडा २. गड्यांचीं नांवें ठेवून त्यांची वांटणी करा, म्हणजे कोणी रडीला जाणार नाहीं ३.

तुका म्हणे कान्हो तिळातांदळया । जिंके तो करी आपुला खेळया ॥ ४ ॥ [३७२२]

बळें डाईं न पडे हरी । बुद्धि करी शाहाणा तो ॥ १ ॥ मोकळें देवा खेळों द्यावें । सम भावें सांपडावया ॥ २ ॥ येतो जातो वेळोवेळां । न कळे कळा सांपडती ॥ ३ ॥ तुका म्हणे धरा ठायींच्या ठायीं । मिठी जीवें पायीं घालूनियां ॥ ४ ॥ [३७२३]

कवळाचिया सुखें । परब्रह्म झालें गोरखें । हात गोवूनि खाय मुखें । बोटासांदीं लोणचें (लोणचीं) ॥ १ ॥ कोण जाणे तेथें कोण लाभ । कां तें ब्रह्मादिकां दुर्लभ ॥ २ ॥ घाली हमामा हुंबरी । पांवा वाजवी मोहरी । गोपाळांचे फेरी । हरि छंदें नाचतसे ॥ ३ ॥ काय नव्हतें त्या घरीं खावया । रिघे लोणी चोरावया । तुका म्हणे सवें तया । आम्हीही सोंकलों ॥ ४ ॥ [३७२४]

कान्होबा आतां तुम्ही आम्हीच गडे । कोणाकडे जाऊं नेदूं ॥ १ ॥ वाहीन तुझी भारशिदोरी । वळतीवरी येऊं नेदूं ॥ २ ॥ ढवळे गाईचें दूध काढूं । एकल्या एक ठोंबे मारूं ॥ ३ ॥ तुका म्हणे टोकवूं त्याला । जे तुझ्या बोला मानीत ना ॥ ४ ॥ [३७२५]

बहु काळीं बहु काळीं । आम्ही देवाचीं गोवळीं ॥ १ ॥ नाहीं वीट देतो भातें । जेऊं बैसवूं सांगातें ॥ २ ॥ बहु काळें बहु काळें । माझें पांघरे कांबळें ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं नाहीं । त्याचें आमचेंसें कांहीं ॥ ४ ॥ [३७२६]

बहु बरा बहु बरा । यासांगातें मिळे चारा ॥ १ ॥ म्हणोनी जीवेंसाठीं । घेतली कान्होबाची पाठी ॥ २ ॥ बरवा बरवा दिसे । समागम याचा निमिषें ॥ ३ ॥ पुढती पुढती तुका । सोंकला सोंकविती लोकां ॥ ४ ॥ [३७२७]

तुकाराम महाराज म्हणतात, कामक्रोधरूपी तीळतांदळाला जो जिंकतो त्यालाच श्रीकृष्ण आपल्या बरोबरीनें खेळांत गडी करतो व मानतो ४ [३७२२]

दुराग्रहानें हरीला कोंडून धरल्यानें तो डावांत सांपडणार नाहीं, म्हणून बुद्धिकौशल्यानें त्याला जिंकण्याचा यत्न करील तो शहाणा १. हरि हा सर्वत्र समानत्वें आहे, ह्या भावनेनें, तो देव सांपडण्याकरितां त्याला मोकळेपणानें क्रीडा करूं द्यावी २. तो वेळोवेळीं हृदयांत येतो, जातो; पण ज्या योगानें तो कायमचा सांपडेल असा विचार समजत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या हरीला जागच्या जागींच, त्याच्या स्वरूपाला जीवानें मिठी घालून, धरावें ४. [३७२३]

काल्याच्या घासाच्या सुखानें साक्षात् परब्रह्म गुराखी झाले (गोपाळकृष्ण गुराखी झाला) व काला हातांत धरून तोंडानें खाऊं लागला व बोटाच्या सांदींत टेवलेलें लोणचें चाटूं लागला १. कोणाला ठाऊक तेथें कोणता काय लाभ आहे ? तो ब्रह्मादिकांना दुर्लभ आहे २. हमामा व हुंबरी ही क्रीडा करूं लागले. गोपाळाच्या मेळ्यांत मुरली व पांवा वाजवून हरि त्यांच्या छंदानें नाचूं लागले ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच्या घरीं काय खावयास लोणी नव्हतें म्हणून तो चोरी करावयास जातो ? त्याच्या बरोबर फिरून आम्हीहि लोणी खावयास सवकलों ४. [३७२४]

हे कान्होबा, आतां गड्या, तुम्ही आम्हीच हिस्सेदार होऊन ही शिदोरी खाऊन टाकूं. आतां ह्यांतील भाग कोणाकडेहि जाऊं देणार नाहीं १. तुझ्या शिदोरीचें ओझें वागवून तुझ्यावर गाई राखण्याची पाळी येऊं देणार नाहीं २. पांढऱ्या गाईचें दूध काढूं. इतर स्वैर बुद्धिरूपी एकेका गाईला तडाखे मारूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे कान्होबा, जे तुझ्या सांगण्याप्रमाणें वागत नाहींत, त्यांना तोंडाकडे पाहाण्याला लावूं ४. [३७२५]

आम्ही देवाचे फार दिवसांचे बरोबर असणारे गुराखी मित्र आहोंत १. तो अवीट खाऊं देतो व आपल्या बरोबर जेवावयास घेतो २. फार दिवसांचें माझें कांबळें त्यानें पांघरलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व कांहीं त्याचें आहे. आमचें असें कांहींच नाहीं ४. [३७२६]

ह्या देवाच्या संगतीनें गुरांना चारा मिळतो किंवा, आम्हांला चांगलें चागलें खावयास मिळतें, असा हा फार चांगला आहे १. म्हणून कान्होबाला (कृष्णाला) मी आपला जीव अर्पण करून त्याच्या मागें राहिलों २. एक क्षणभर ह्याचा समागम झाला असतां बरें वाटतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, पुनः पुनः ह्याच्या संगतीस मी सवकलों आहें, व लोकांनाहि सवकवीत आहें ४ [३७२७]

घेती पाण्यासी हुंबरी । त्यांचें समाधान करी ॥ १ ॥ ऐशी गोपाळांची सवे । जाती तिकडे मागें धांवे ॥ २ ॥ स्थिरावली गंगा । पांगविली म्हणे उगा ॥ ३ ॥ मोहरी पांवा काठी । तुका म्हणे याजसाठीं ॥ ४ ॥ [३७२८]

वळी त्या गाई धांवे घरा । आमच्या करी येरझारा ॥ १ ॥ नांव घेतां तो जवळी । बहु भला कान्हो बळी ॥ २ ॥ नेदी पडों उणें पुरें । म्हणे अवघेंचि बरें ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्ता । वाटे न व्हावा परता ॥ ४ ॥ [३७२९]

म्हणती धालों धणीवरी । आतां न लगे शिदोरी । नये क्षणभरी । आतां यासी विसंबों ॥ १ ॥ चाल चाल रे कान्होबा । खेळ मांडूं रानीं । बैसवूं गोठणीं । गाई जमा करूनी ॥ २ ॥ न लगे जावें घरा । चुकलिया येरझारा । सज्जन सोयरा । मायबाप तूं आम्हां ॥ ३ ॥ तुका म्हणे धालें पोट । आतां कशाचा बोभाट । पाहाणें ते वाट । मागें पुढें राहिली ॥ ४ ॥ [३७३०]

तुझिये संगतीं । झाली आमुचि निश्चिंती ॥ १ ॥ नाहीं देखिलें तें मिळे । भोग सुखाचे सोहळे ॥ २ ॥ घरीं ताकाचें सरोवर । येथें नवनीताचे पूर ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां । आम्ही न वजों दवडितां ॥ ४ ॥ [३७३१]

कामें पीडिलों माया । बहु मारी नाहीं दया ॥ १ ॥ तुझ्या राहिलों आधारें । झालें अवघेंचि बरें ॥ २ ॥ तुझें लागलों संगती । आतां येतों काकुळती ॥ ३ ॥ तुका म्हणे तुझ्या भिडा । कान्होबा हे गेली पीडा ॥ ४ ॥ [३७३२]

यमुनेचें पाणी वाहातांना मोठें वाजत असतें. तें वाजणें बंद होण्याकरितां गोपाळांनीं हूं, हूं करण्याची क्रीडा आरंभिली, त्यांचें समाधान भगवंतांनीं केलें १. त्या हरीला गोपाळांची फार संवय असल्यामुळें ते जातील तिकडे तो धांवत जातो २. प्रभूंनीं वेणु वाजविला, त्याच्या मंजुळ ध्वनीच्या योगानें यमुना स्थिरावली व सर्व पसरलेले गोपाळ हूं, हूं करीत होते त्यांना सांगितलें, कीं यमुना दमली. तुम्ही आतां उगीच बसा ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवानें मोहरी, पांवा इत्यादि वाद्यें जीं धारण केलीं आहेत, तीं ह्या गड्यांकरितां होत ४. [३७२८]

देव हा आमच्या इंद्रियरूपी गाई रक्षण करितो व वेळोवेळीं आमच्या घरीं येरझारा करितो १. कान्होबाचें नांव घेतल्याबरोबर तो जवळ येऊन उभा राहातो, असा हा फार चांगला बलवान् आहे २. कोणत्याहि प्रकारचें कमी पडूं देत नाहीं, सर्व कांहीं चांगलें म्हणतो ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो दूर जावा असें माझ्या चित्ताला कधींच वाटत नाहीं ४. [३७२९]

सर्व गोपाळ म्हणूं लागले, कीं आम्ही तृप्त झालों, आतां आम्हांला शिदोरीची जरूर नाहीं; व आतां ह्या हरीला क्षणभर देखील विसंबतां येत नाहीं १. अरे कान्होबा, चल, रानामध्यें खेळावयास जाऊं, व म्हणून सर्व गाई एके ठिकाणीं जमा करून बसवूं २. हे देवा, तूं आमचा आईबाप व सज्जन सोयरा आहेस. एखादी गाय आपण खेळत असतां चुकली तर घराकडे जाण्यायेण्याचें काम पडूं नये (किंवा, आम्हांला घरीं जावेंसें वाटत नाहीं. तूं आमच्या येरझारा चुकविल्या आहेस) ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमचें पोट भरलें आहे. आतां कशाची गडबड आहे ? मागेंपुढें वाट पाहाण्याचेंहि राहिलें नाहीं ४. [३७३०]

हे देवा, तुझ्या संगतीनें आमचें हृदय अगदीं निष्काळजी झालें १. जें आम्हीं कधीं पाहिलें नाहीं, असले सुखोपचार आम्हांस भोगावयास मिळतात २. आमचे घरीं ताक विपुल आहे, पण येथें तर लोण्याचा पूर आला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवानें आम्हांला हांकललें तरी आम्ही जाणार नाहीं ४. [३७३१]

आम्ही घरीं कष्टानें फार गांजून गेलों आहों व आईहि घरीं फार मारते, (किंवा, वैषयिक वासनेनें मला नरकाचें दुःख दिलें आणि माया तर मला जन्म-मृत्यूच्या फेऱ्या करायला लावून मला मारीत आहे,) तिलाहि दया नाहीं १. म्हणून देवा, आम्ही तुझ्या आश्रयानें राहिलों. त्यानें आमचें सर्व चांगलें झालें २. तुझ्या संगतीला आम्ही लागलों, म्हणून आतां तुला कींव काकुळती येत आहोंत ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे कान्होबा, तुझ्या भिडेनें आमच्या मागील सर्व पीडा गेली ४. [३७३२]

: खेळावरील रूपकें : टिपरी

खेळ मांडियेला वाळवंटी घाई। नाचती वैष्णव भाई रे। क्रोध अभिमान केला पावटणी। एक एका लागती(ल) पायीं रे ॥ १ ॥ नाचती आनंदकल्लोळीं। पवित्र गाणें नामावळी रे। कळिकाळावरी घातली कास। एक एकाहुनी बळी रे ॥ २ ॥ गोपिचंदन उटी तुळसीच्या माळा। हार मिरवती गळां रे। टाळ मृदंग घाई पुष्पांचा वरुषाव। अनुपम्य सुखसोहळा रे ॥ ३ ॥ लुब्धलीं नादीं लागली समाधी। मूढ जन नर नारी लोकां रे। पंडित ज्ञानी योगी महानुभव। एकचि सिद्ध साधकां रे ॥ ४ ॥ वर्णाभिमान विसरलीं याति। एक एकां लोटांगणीं जाती रे। निर्मळ चित्तें झालीं नवनीतें। पाषाणा पाझर सुटती रे ॥ ५ ॥ होतो जयजयकार गर्जत अंबर। मातले वैष्णव वीर रे। तुका म्हणे सोपी केली पायवाट। उतरावया भवसागर रे ॥ ६ ॥ [३७३३]

एके घाईं खेळतां न पडसी डाईं। दुचाळ्यानें ठकसील भाई रे। त्रिगुणांचे फेरीं थोर कष्टी होसी। या चौघांची तरी धरीं सोई रे ॥ १ ॥ खेळ खेळोनियां निराळाचि राहीं। सांडीं या विषयांची घाई रे। येणेंचि खेळें बसवंत होसी। ऐसें सत्य जाणें माझ्या भाई रे ॥ २ ॥ शिंपियाचा पोर एक खेळिया नामा। तेणें विठ्ठल बसवंत केला रे। आपुल्या संवगडियां शिकवुनी घाई। तेणें सतत फड जागविला रे। एके घाईं खेळतां तो न चुकेचि कोठें। तया संत जन मानवले रे ॥ ३ ॥ ज्ञानदेव मुक्ताबाई वटेश्वर चांगा। सोपान आनंदें खेळती रे। कान्हो गोवारी त्यांनीं बसवंत केला। आपण भोंवतीं नाचती रे। सकळिकां मिळोनी एकीच घाई। त्याच्या ब्रह्मादिक लागती पायीं रे ॥ ४ ॥ रामा बसवंत कबिर खेळिया। जोडा बरवा मिळाला रे। पांच संवगडियां एकाचि घाई। तेथें नाद बरवा उमटला रे। ब्रह्मादिक सुरवर मिळोनियां त्यांनीं। तोही खेळिया निवडिला रे ॥ ५ ॥

अरे भाई, वैष्णव जन वाळवंटामध्यें श्रीहरीच्या भजनाच्या खेळास लगबगीनें आरंभ करून नाचतात. क्रोध व अभिमान ह्यांची पायांखालील पायरी करून ते एकमेकांच्या पायां पडतात १. श्रीहरीच्या आनंदाच्या लहरींत नाचतात व पवित्र असें श्रीहरीचें नाम गातात. कलिकालाशीं लढण्याकरितां ज्यांनीं काच्या घातला आहे, असे ते एकमेकांपेक्षां बलाढ्य आहेत २. सर्वांगाला त्यांनीं गोपीचंदनाची उटी लावून गळ्यांत माळा धारण केल्या आहेत व तुळशीचे हारहि घातले आहेत. तेथें टाळ, मृदुंग ह्यांचा घोष होत असून पुष्पांचा वर्षाव होत आहे. असा हा उपमा न देतां येण्यासारखा उत्साह आहे ३. त्या नादाला लुब्ध होऊन मूढ जन व स्त्रिया, पंडित, ज्ञानी, योगी, महानुभव, सिद्ध व साधक ह्या सर्वांना एकच समाधि लागली ४. वर्णाभिमान व आपली जात विसरून ते एकमेकांना लोटांगण घालीत आहेत. त्यांचें चित्त लोण्याप्रमाणें शुद्ध झालें आहे व त्यांच्या संगतीनें पाषाणहृदयी मनुष्यास सुद्धां सत्त्वाचा पाझर सुटतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, हरीच्या नामाचा जयजयकार होत आहे, त्या योगानें आकाश गर्जत आहे. अशा प्रकारें वैष्णव वीरांनीं भक्तिसुखानें मस्त होऊन संसारसमुद्रांतून पार होण्याकरितां सोपी पायवाट केली आहे ६. [३७३३]

ऐक्यभावानें तूं क्रीडा करूं लागलास म्हणजे ह्या संसाराच्या डावांत (कात्रींत, चिमट्यांत) सांपडणार नाहींस. हे भाई, द्वैतभावना धरल्यानें तूं फसशील. तीन गुणांच्या गर्तींतून जन्ममृत्युद्वारा फिरण्यानें तूं मोठा दुःखी होशील. ह्याकरितां आम्ही जें आतां खालीं चौघेजण (नामदेव, ज्ञानदेव, कबीर, एकनाथ) सांगणार आहोंत त्यांचा (किंवा, चारी वेदांचा) तूं मार्ग धर १. संसाररूपी खेळ खेळतांना तूं आत्मस्थितीनें अलिप्त राहा; व ह्या विषयांचा संबंध टाक. अशा प्रकारची संसार-क्रीडा केल्यानें तूं देव होशील; अरे माझे भाई, हें तूं खरोखर समज २. शिंप्याचा मुलगा एक खेळ खेळणारा नामदेव ह्यानें आपलें उपास्य दैवत विठ्ठल केलें व आपल्या बरोबरच्या गड्यांना परमार्थाचा बोध करून त्यानें स्वतंत्र समुदाय जागृत ठेवला. एका स्वरूपभावनेनें तो खेळ खेळल्यामुळें कोठेंहि फसला नाहीं व त्याला संतजन मान्य झाले (किंवा, त्याला संतजनांनीं मोठा मान दिला) ३. ज्ञानदेव, मुक्ताबाई, चांगदेव, वटेश्वर व सोपानदेव हेहि आनंदानें खेळूं लागले, त्यांनीं आपलें उपास्य दैवत गोरक्षण करणाऱ्या कृष्णास केलें व आपण सर्व मिळून त्याच्याभोंवतें एकदम नाचूं लागले व ब्रह्मादिक देव त्यांच्या पाया पडूं लागले ४. खेळणारा कबीर व त्याचें उपास्य दैवत राम ह्यांची जोडी उत्तम शोभली. ह्या पांच गड्यांनीं (कबीर आणि राम, सीता, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न ह्यांनीं) एकदम केलेल्या भजनाच्या गजराचा उत्तम नाद

ब्राह्मणाचा पोर एक खेळिया एका भला। तेणें जन खेळकर केला रे । जनार्दन बसवंत करूनियां तेणें। वैष्णवांचा मेळ मेळविला रे। एकचि घाईं खेळतां खेळतो। आपणाचि बसवंत झाला रे ॥ ६ ॥ आणीक खेळिये होऊनियां गेले। वर्णावया वाचा मज नाहीं रे। तुका म्हणे गडे हा हुशारूनि खेळा। पुढिलांची धरूनियां सोई रे। एकचि घाईं खेळतां जो चुकला। तो पडेल संसारडाईं रे ॥ ७ ॥ [३७३४]

बाराही सोळा गडियांचा मेळा। सतरावा बसवंत खेळिया रे। जतिस पद (जतिस्पद) राखों जेणें टिपरिया घाईं। अनुहातें(त) वायें मांदळा रे ॥ १ ॥ नाचत पंढरिये जाऊं रे खेळिया। विठ्ठलरखुमाई पाहूं रे ॥ २ ॥ सा चहूं वेगळा अठराही निराळा। गाऊं वाजवूं एक चाळा रे। विसरती पक्षी चारा घेणें (चारा नेघे) पाणी। तारुण्य देहभाव बाळा रे ॥ ३ ॥ आनंद तेथींचा मुकियासी वाचा। बहिरे ऐकती कानीं रे। आंधळ्यासी डोळे पांगळ्यासी (पांगुळासी) पाय। तुका म्हणे वृद्ध होती तरणे रे ॥ ४ ॥ [३७३५]

दोन्ही टिपरीं एकचि नाद। सगुण निर्गुण नाहीं भेद रे। कुसरी अंगें मोडितील परी। मेळविती एका छंदें रे ॥ १ ॥ कांहींच न वजे वायां रे खेळिया। एकचि बसवंत अवघिया रे। सम विषम तेथें होऊंच नेदी। जाणऊनी आगळिया रे ॥ २ ॥ संत महंत सिद्ध खेळतील घाई। तेच सांभाळीं माझ्या भाई रे। हात राखोन हाणिती टिपऱ्या। टिपरें (टिपरी) मिळोनि जाय त्याची सोई रे ॥ ३ ॥ वितालाचें अवघें जाईल वायां। काय ते शृंगारूनि काया रे। निवडुनी बाहेर काढिती निराळा। जो न मिळे संतांचिया घाईं रे ॥ ४ ॥ प्रकाराचें काज नाहीं सोडीं लाज। निःशंक होऊनियां खेळे रे। नेणतीं नेणतींच एके पावलीं मान। विठ्ठल नामाचिया बळें रे ॥ ५ ॥

उत्पन्न झाला. ब्रह्मादिक देव मिळून त्यांनीं ह्यांचा खेळ उत्तमांत निवडला ५. एका चांगले खेळ खेळणाऱ्या ब्राह्मणाच्या मुलानें (एकनाथानें) सर्व जनाला खेळकर केलें व त्यानें आपलें उपास्य दैवत जनार्दन करून वैष्णवांचा समुदाय मिळविला व ऐक्यभावानें खेळ खेळत तो आपण स्वतःच जनार्दन झाला ६. तुकाराम महाराज म्हणतात, आणखी पुष्कळ खेळ खेळणारे होऊन गेले. त्यांचें वर्णन करण्याला माझी वाचा समर्थ नाहीं. अरे गड्यांनो, तुम्ही हुशारी धरून पुढें गेलेल्या संतांच्या राहाणीनें खेळा. स्वस्वरूपैक्य भावनेनें खेळण्याचें जो चुकला तो जन्ममृत्युरूपी संसाराचे डावांत सांपडेल ७. [३७३४]

टिपऱ्यांच्या खेळांत बारा अथवा सोळा संतरूपी गड्यांचा मेळा जमवूं आणि सतरावा खेळणारा गडी देव आहे, व ह्या टिपऱ्यांच्या नादांत यति, पद (तालबद्धता) राखूं, अनुहत ध्वनीचा (योगधारणेच्या वेळीं ऐकूं येणाऱ्या ध्वनीचा) मृदंग वाजत आहे १. खेळ खेळणारे आपण पंढरीस नाचत पोंचूं व विठ्ठल रखुमाई पाहूं २. चार वेद, सहा शास्त्रें ह्यांहून तो निराळा आहे. त्याला गाऊं व त्याच्या छंदामध्यें टाळ्या वाजवूं. त्या आनंदानें पक्षी आपला चारा घेण्याचें विसरतात व तरुण मुलें-मुली आपल्या देहभावाला विसरतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, तेथील आनंदानें मुक्याला वाचा फुटते व बहिरे कानानें ऐकतात आणि आंधळे पाहूं लागतात, पांगळ्याला पाय फुटतात व म्हातारे तरणे होतात ४. [३७३५]

दोन टिपऱ्यांच्या आघातांत एक नाद उत्पन्न होतो, त्याप्रमाणें सगुण-निर्गुणामध्यें कांहीं भेद नाहीं. चातुर्यानें जरी आपलें अंग हालविलें तरी आपल्या वृत्ति एका श्रीहरीच्या छंदाच्या ठिकाणीं मिळवितात १. रे खेळणाऱ्या, कांहीं व्यर्थ जात नाहीं, सर्वांचा एकच देव आहे. त्या श्रेष्ठ देवाला जाणून आपल्या हृदयांत कांहीं सम-विषम भाव येऊं देऊं नकोस २. रे माझे भाई, संतमहंत, सिद्ध ज्या रीतीनें खेळले, त्या रीतीनें तुम्ही खेळा. त्यांनीं जसें आपल्या स्वस्वरूपविषयक वृत्तीचा हात रक्षण करून टिपरीवर टिपरी मारली, त्या पद्धतीचा तूं अंगीकार कर ३. विसंगत क्रीडा सर्व व्यर्थ जाईल. मग बाहेरच्या बाजूनें शरीर शृंगारल्याचा काय उपयोग आहे ? जो संतांची राहाणी सोडून वागतो, त्याला ते आपल्या मेळ्यांतून बाहेर काढतील ४. अधिक मार्गांमध्यें वेगवेगळ्या प्रकारचें (इतर सोंगांढोंगांचें) कांहीं कारण नाहीं; तूं सर्व लज्जा टाक व निर्भय होऊन खेळ. रे, विठ्ठलनामाच्या चिंतनाच्या बलानें कित्येक अज्ञानी माणसें विठ्ठलस्वरूपीं मान पावलीं ५.

रोमांच गुढिया डोलविती अंगें । भावबळें खेळविती सोंगें रे । तुका म्हणे कंठ सद्गदित दाटे । या विठोबाच्या अंगसंगें रे ॥ ६ ॥ [३७३६]

या रे गडे हो धरूं घाई जाणतांही नेणतां । नाम गाऊं टाळी वाहूं आपुलिया हिता ॥ १ ॥ फावलें तें घ्या रे आतां प्रेमदाता पांडुरंग । आजी दिवस सोनियाचा वोढवला रंग ॥ २ ॥ हिंडती रानोरान भुजंग ते कांट्यावन । सुख तयांहून आम्हां गातां नाचतां रे ॥ ३ ॥ म्हणे तुका ब्रह्मादिकां सांवळें दुर्लभ मुखा । आजी येथें आलें फुका नाम मुखा कीर्तनीं ॥ ४ ॥ [३७३७]

भीमातीरीं एक वसविलें नगर । त्याचें नांव पंढरपुर रे । तेथील मोकासी चार भुजा त्यासी । बाइला सोळा हजार रे ॥ १ ॥ नाचत जाऊं त्याच्या गांवा रे खेळिया । सुख देईल विसांवा रे । पुढें गेले ते निधाई झाले । वाणितील त्याची सीमा रे ॥ २ ॥ बळियां आगळा पाळी लोकपाळां । रीघ नाहीं कळिकाळा रे । पुंडलीक पाटील केली कुळवाडी । तो झाला भवदुःखा वेगळा रे ॥ ३ ॥ संतसज्जनीं मांडिलीं दुकानें । जया जें पाहिजे तें आहे रे । भुक्तिमुक्ती फुकाच साटीं । कोणी तयाकडे न पाहे रे ॥ ४ ॥ दोन्हीच हाट भरले घनदाट । अपार मिळाले वारकरी रे । न वजों म्हणती आम्ही वैकुंठा । जिहीं देखिली पंढरी रे ॥ ५ ॥ बहुत दिवस होती मज आस । आजी घडलें सायासीं रे ॥ तुका म्हणे होय तुमचेनी पुण्यें । भेटी तया पायांसी रे ॥ ६ ॥ [३७३८]

: काला :

ब्रह्मादिकां न कळे खोळ । ते हे आकळ धरियेली ॥ १ ॥ मोहरी पांवा वाहे काठी । धांवे पाठीं

तुकाराम महाराज म्हणतात, ह्या विठोबाच्या संगतीनें खेळणारे जे भक्त आहेत, त्यांच्या शरीरावर रोमांच उभे राहिलेले असून त्यांच्या अंगरूपी काठ्या डोलत आहेत व विठोबाच्या संगतीनें त्यांचा कंठ सद्गदित झाला ६. [३७३६]

अरे गड्यांनो, आपण जाणते, नेणते कसेहि असलों तरी असा ताल धरूं व आपल्या हिताकरितां श्रीहरीचें नाम गाऊं व टाळी वाजवूं १. अरे, जो लाभ प्राप्त झाला आहे तो आतां घ्या, आतां हें अशा प्रकारचें प्रेम देणारा पांडुरंग आहे; आजचा दिवस सुखाचा उदयाला आला आहे २. कित्येक रानोरान जेथें साप, कांटे आहेत अशा ठिकाणांतून हिंडतात. (विषयी जन पंचविषयांच्या रानांत, जेथें काम-क्रोधासारखे मोठे साप व दंभ-दर्प हे कांटे आहेत अशा रानांत अहोरात्र हिंडतात). त्या साधकांपेक्षां आम्हांला श्रीहरीचे नाम गाण्यानें व नाचण्यानें अधिक सुख मिळतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, जें ब्रह्मादिकांना श्रीहरीचें श्यामसुंदर (सांवळें) मुख दुर्लभ आहे तें श्रीमुख आज नामसंकीर्तनाच्या ठिकाणीं फुकट आलें आहे ४. [३७३७]

भीमेच्या कांठीं एक नगर वसविलें आहे; त्याचें नाम पंढरपूर असें आहे. तेथल्या मालकास (विठ्ठलास) चार हात आहेत आणि त्याला सोळा हजार बायका आहेत १. हे खेळणारांनो, आपण त्याच्या गांवास नाचत जाऊं. तो आपल्याला सुखाची विश्रांति देईल. जे संत पुढें गेले ते समाधान पावले. आतां तेच आपणांला विठ्ठलाचें स्वरूप कसें आहे त्याचें वर्णन करतील २. तो अतिशय बलाढ्य आहे म्हणून लोकांचें रक्षण करतो. त्या ठिकाणीं कळिकाळाचाहि प्रवेश नाहीं; त्याच्याशीं पुंडलीक पाटलानें व्यवहार केल्यानें तो ह्या संसारदुःखांतून मोकळा झाला ३. त्या ठिकाणीं संतजनांनीं परमार्थाचीं दुकानें घातलीं आहेत. जो जसा अधिकारी आहे त्याला जें पाहिजे तें त्या ठिकाणीं आहे. भोग व मोक्ष हे तर तेथें फुकट मिळत आहेत, पण त्यांच्याकडे कोणी पाहातहि नाहीं ४. आषाढी आणि कार्तिकी हे दोन बाजार मोठे भरतात. त्या वेळीं तेथें असंख्य वारकरी जमतात व जे पंढरी पाहातात ते असें म्हणतात, कीं आम्ही वैकुंठाला जाणार नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, मलाहि पुष्कळ दिवस पंढरीला जाण्याची आशा होती, पण मोठ्या प्रयत्नानें पंढरीला जाण्याचा योग आला. अहो संतजन, तुमच्या पुण्याईनें त्या देवाचे पाय मला दिसले ६. [३७३८]

ब्रह्मादि देवांना जें कळत नाहीं असें ज्याचें स्वरूप त्यानें घोंगडीची खोळ धारण केली १. मुरली, पावा व काठी

गाईंचे ॥ २ ॥ उच्छिष्ट जें न लभे देवां । तें हें सदैवां गोवळ्यां ॥ ३ ॥ तुका म्हणे जोडी झाली । ते हे माउली आमुची ॥ ४ ॥ [३७३९]

: दळण :

शुद्ध दळणाचें सुख दळण सांगों काई । मानवत असे सईबाई ॥ १ ॥ शुद्ध तें वळण लवकरी पावे । डोलवितां निवे अष्टांग तें ॥ १ ॥ शुद्ध हें जेवितां तन निवे मन । अल्प त्या इंधन बुडा लागे ॥ ३ ॥ शुद्ध त्याचा पाक सुचित चांगला । अविट तयाला नाश नाहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे शुद्ध आवडे सकळां । भ्रतार वेगळा न करी जीवें ॥ ५ ॥ [३७४०]

: काला :

कान्होबा तूं आलगट । नाहीं लाज बहु धीट । पाहिलें वाईट । बोलेनियां वोखटें ॥ १ ॥ परि तूं न संडिसी खोडी । करिसी केली घडी घडी । पाडिसी रोकडी । तुटी माये आम्हांसी ॥ २ ॥ तूं ठायींचा गोवळ । अविचारी अनर्गळ । चोरटा शिंदळ ऐसा पिटूं डांगोरा ॥ ३ ॥ जरी तुझी आई । आम्ही घालूं सर्वां ठायीं । तुका म्हणे तेंही । तुज वाटे भूषण ॥ ४ ॥ [३७४१]

भोजनाच्या काळीं । कान्हें (कान्हों) मांडियेली आळी । काला करी वनमाळी । अन्नें एकवटा । देईं निवडुनि । मातें म्हणतो जननी । हात निपटुनी मेदिनी-। वरी अंग घाली ॥ १ ॥ कैसा आळी घेसी । नव्हे तेंचि करविसी । घेईं दुसरें तयेसी । वारी म्हणे नको ॥ २ ॥ आतां काय करूं । नये यासी हाणूं मारूं । नव्हे बुझावितां स्थिरू । कांहीं करितां ही । हातेंची केलें एके ठायीं । आतां निवडुनी खाईं । आम्हां जाचितोसी कांई । हरिसी म्हणे माता ॥ ३ ॥ त्याचें तयाकुन ।

घेऊन जो गाईंच्या पाठीमागें धांवत आहे २. ज्याचें उच्छिष्ट देवांनाहि प्राप्त होत नाहीं तें ह्या भाग्यवान् गोपाळांना प्राप्त होत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या देवाची गोपाळांना प्राप्ति झाली, तोच आमची आई आहे ४. [३७३९]

शुद्ध आचरणरूपी दळणाचें काय सुख सांगावें ? हे सईबाई, तें चांगलें मानवलें जातें १. शुद्ध आचरणाचें दळण लवकर होतें व तें दळण दळतांना आंग हालविल्यानें अष्टांग शांत होतें २. शुद्ध परमार्थाचें सेवन करण्यानें देह व मन शांत होतात व थोडक्याच आत्मानात्मविवेकानें तें तयार होतें ३. जो साधक सुचित्त व चांगला आहे, त्याचा परमार्थरूपी पाकहि शुद्ध असतो व त्याचा कधीं वीट येत नाहीं व तो कधीं नाश पावत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वांना शुद्ध आवडतें. जी सदाचाराचें दळण दळून शुद्ध परमार्थाचा पाक करते तिला श्रीहरि हा पति जीवानें वेगळा करीत नाहीं ५. [३७४०]

हे कान्होबा, तूं हलकट आहेस व तुला लाज नसून तूं फार धीट आहेस. तुला आम्ही वाईट वोखटें बोलून पुष्कळ पाहिलें १. परंतु तूं आपली खोड टाकीत नाहींस. जें पूर्वी केलेंस तेंच आतां वेळोवेळीं करीत आहेस. अशा करण्यानें आमच्याशीं तूं उघड अंतर पाडीत आहेस २. तूं मूळचाच गुराखी असून अविचारी, मूर्ख, चोरटा, शिंदळ आहेस, त्याची आम्ही प्रसिद्धी करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जरी आम्हीं तुझी मायारूपी आई सर्वांच्या खालीं घातली, तरी तेंहि तुला मोठें भूषणच वाटतें ४. [३७४१]

एके दिवशीं भोजन करण्याच्या वेळेस कृष्णानें हट्ट केला तो असा, कीं आई, निरनिराळीं अन्नें वाढलेलीं एकत्र करून मला पहिल्याप्रमाणें निवडून दे. असें आईला म्हणून जेवीत असतांना हात आंखडून कृष्णानें जमिनीवर लोळण घातली १. यशोदा म्हणते, अरे कृष्णा, नाहीं तेंच करून तूं भलताच हट्ट कसा घेतोस ? मी तुला दुसरीं अन्नें वाढतें. तें ऐकून कृष्ण म्हणाला, कीं मला तें नको २. मग यशोदा मनांत विचार करूं लागली, ह्याला मी आतां काय करावें ? लाडक्याला हाणतां मारतांहि येत नाहीं आणि अनेक प्रकारें समजूत केली तरी तो रडायचा थांबत नाहीं. मग यशोदा म्हणाली, कीं कृष्णा, तूं आपल्या हातानेंच एकत्र केलेंस तें तुझें तूंच निवडून खा. आम्हांला विनाकारण कां त्रास देतोस ? ३.

करावितां तुटे भान। तंव झालें समाधान। उठोनियां बैसे। माते बरें जाणविलें। अंग चोरूनी आपुलें। तांडियेलें एका बोलें। कैसें सुखदुःख ॥ ४ ॥ ताट पालवें झाकिलें। होतें तैसें तेथें केलें। भिन्नाभिन्न निवाडिलें। अन्नें वेगळालीं। विस्मित जननी। भाव देखोनियां मनीं। म्हणे नाहीं ऐसा कोणी। तुज सारिखा रे ॥ ५ ॥ हरुपली माये। सुख अंगीं न समाये। कवळूनी बाहे। देती आलिंगन। आनंद भोजनीं। तेथें फिटलीसे धणी। तुका म्हणे कोणी। सांडा शेष मज ॥ ६ ॥ [३७४२]

चला वळूं गाई। बैसों जेऊं एके टायीं ॥ १ ॥ बहु केली वणवण। पायपिटी झाला सीण ॥ २ ॥ खांदीं भार पोटीं भूक। काय खेळायाचें सुख ॥ ३ ॥ तुका म्हणे धांवें। मग अवघें बरवें ॥ ४ ॥ [३७४३]

नेणों वेळ काळ। धालों तुझ्यानें सकळ ॥ १ ॥ नाहीं नाहीं रे कान्होबा भय आम्हांपाशीं। वळूनी पुरविसी गाई पोटा खावया ॥ २ ॥ तुजपासीं भय हें तों बोलों परी न ये ॥ ३ ॥ तुका म्हणे बोल। आम्हां अनुभवें फोल ॥ ४ ॥ [३७४४]

: विटीदांडू :

सारा विटूदांडू (विटीदांडू)। आणीक कांहीं खेळ मांडूं ॥ १ ॥ बहु अंगा आले डाव। स्थिर नाहीं कोठें पाव ॥ २ ॥ कोली हाणे टोला। झेली तेणें तो गोंविला ॥ ३ ॥ एकमेकां हाका मारी। सेल जाली एक धरी ॥ ४ ॥ राजी आलें नांव। फेरा न चुकेचि धांव ॥ ५ ॥ पुढें एक पाटी।

ज्याचें लिगाड त्याच्या अंगावर घातलें असतां कोणताच वाद राहात नाहीं, अशा न्यायानें मातेच्या बोलण्यानें कृष्णाचें समाधान होऊन, तो खालीं लोळत होता, तो उठून बसला; आणि मातेस म्हणाला, कीं हें तुला बरें समजलें. एकाच भाषणानें सुखदुःखाचा निवाडा तूं कसा केलास? ४. असें बोलून कृष्णानें ताटावर पदर झांकला आणि त्यांतील अन्नें स्वसामर्थ्यानें वेगळालीं निवडून पहिल्याप्रमाणें केलीं. तें पाहून यशोदेला मनामध्यें मोठें आश्चर्य वाटलें आणि ती कृष्णाला म्हणाली, अरे, तुझ्यासारखा लाघवी ह्या ब्रह्मांडांत नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, यशोदेला मोटा आनंद झाला. तें सुख हृदयांत मावेनासें झालें, त्या सुखोद्गारानें बाह्या पसरून यशोदेनें कृष्णाला आलिंगन दिलें आणि उभयतां मायलेंकरें आनंदानें भोजन करूं लागलीं. त्या ठिकाणीं इच्छेची तृप्ति होत आहे. अशा ठिकाणचा अवशेष प्रसाद मला मिळावा अशी इच्छा आहे ६. [३७४२]

गोपाळ म्हणाले, गड्यांनो, चला, आपण सर्व (इंद्रियरूपी) गाई राखूं (अंतर्मुख करूं) आणि आपण सर्व एका ठिकाणीं बसूं (एका ब्रह्माच्या अधिष्ठानावर बसूं) व आनंदानें जेवण करूं १. पुष्कळ जन्म-मरणांची पायपिटी केल्यामुळें दुःख झालें २. खांद्यावर शिदोऱ्यांचें ओझें आणि पोटांत सुखाची भूक अशा अभिमानाचे स्थितींत खेळण्याचें काय सुख! ३. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरिकडे तूं धांव घे; मग सर्व उत्तम आहे ४. [३७४३]

देवा, आम्ही काळवेळ कांहीं जाणत नाहीं, तुझ्या संगतीनें आम्हीं सर्व कांहीं तृप्त झालों आहों १. अरे कान्होबा, आम्हांला आतां भय नाहीं, तूं आमच्या गाई रक्षण करून आमच्या पोटाला देतोस २. तुझ्याजवळ भय असा एक शब्द देखील बोलूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्या अनुभवानें बोलणें हें फोल झालें आहे ४. [३७४४]

हा विटीदांडूचा खेळ नको, आतां दुसरा कांहीं खेळ खेळूं १. पुष्कळ डाव अंगावर आले, कोठेंहि पाय स्थिर नाहीं (हा खेळ द्वैताचा असल्यामुळें आपल्या अंगावर प्रपंचाचे फार डाव आले) २. विटी खोलल्यावर व जोरानें टोला मारल्यावर ती जो झेलतो तोच धरून टेवतो (वधूपितारूपी एक गडी आपली कन्यारूपी विटी कोलून तिला लग्नरूपी टोला मारतो. जांवईरूपी दुसरा गडी ती विटी झेलतो व त्या डावांत गुंततो) ३. एकमेकांना गडी हांका मारतात व एकाकडून चुकला तर दुसरा धरतो ४. खेळण्यास जे तयार झाले, त्यांना फिरणें व धांवणें चुकत नाहीं (एकदां का सांसारिक गड्यांच्या ओळींत नांव लागलें म्हणजे जन्म-मृत्यूचा फेरा आणि धनाची हांव कधीं चुकायची नाहीं.) ५.

एक एकें दोघां आटी ॥ ६ ॥ एका सोस पोटीं। एक धांवे हात पिटी ॥ ७ ॥ तुका म्हणे आतां। खेळ मोडावा परता ॥ ८ ॥ [३७४५]

कोंडिला गे माज। निरोधुनि द्वार। राखण तें बरें। येथें करा कारण ॥ १ ॥ हा गे हा गे हरी। करितां सांपडला चोरी। घाला गांठी धरी। जीवें माय त्रासाया ॥ २ ॥ तेंचि पुढें आड। तिचा लोभ तिला नाड। लाऊनि चरफड। हात गोउनी पळावें ॥ ३ ॥ संशयाचें बिरडें। याचे निरसलें भेटी। घेतली ते तुटी। आतां देतां (घेतां) फावेल ॥ ४ ॥ तुका येतो काकुलती। वाऊगिया सोड। यासीचि निवाड। आम्ही भार वाहिका ॥ ५ ॥ [३७४६]

अनंत ब्रह्मांडें उदरीं। हरि हा बाळक नंदाघरीं ॥ १ ॥ नवल केव्हडें केव्हडें। न कळे कान्होबाचें कोडें ॥ २ ॥ पृथ्वी जेणें तृप्त केली। त्यासी यशोदा भोजन घाली ॥ ३ ॥ विश्वव्यापक कमळापति। त्यासी गौळणी कडिये घेती ॥ ४ ॥ तुका म्हणे नटधारी। भोग भोगूनि ब्रह्मचारी ॥ ५ ॥ [३७४७]

कृष्ण गोकुळीं जन्मला। दुष्टां चळकांप सुटला ॥ १ ॥ होतां कृष्णाचा अवतार। आनंद करिती घरोघर ॥ २ ॥ सदा नाम वाचे गाती। प्रेमें आनंदें नाचती ॥ ३ ॥ तुका म्हणे हरती दोष। आनंदानें करिती घोष ॥ ४ ॥ [३७४८]

मिळोनी (मेळवूनी) सकळ गोपाळ। कांहीं करिती विचार ॥ १ ॥ चला जाऊं चोरूं लोणी। आजी घेऊं चंद्रधणी। वेळ लावियेला अझूनी (चला वेळु लाविला अझुनी)। काय कारितां गडे हो ॥ २ ॥ वाट काढिली गोविंदीं। मागें गोपाळांची मांदी ॥ ३ ॥ अवघाचि वावरे। कळों नेदी कोणा फिरे ॥ ४ ॥

एक पुढें धांवतो (मुलगा, नातु, पणतु पुढें धांवतात) व एक मागें धांवतो (बाप, आजा, पणजा हे गडी मागें असतात). अशा प्रकारें दोघांनाहि धांवाधांव करावी लागते ६. कित्येकांच्या हृदयांत खेळण्याचा सोस असतो व कितीएक धांवण्यानें हातटेकीला येतात ७. तुकाराम महाराज म्हणतात, आतां हा खेळ मोडावा हें बरें ८. [३७४५]

गोपी म्हणतात, सख्यांनो, द्वार निरोधून हरीला आंत (माजघरांत) कोंडून टाकलें; आतां ह्याचें रक्षण करणें हें चांगलें, म्हणून हें कार्य तुम्ही करा १. अगे, जिवावर उदार होऊन त्याची व आपली बळकट गांठ बांधली पाहिजे, कारण त्याच्या मायेला त्रास द्यावयाचा आहे २. जिचा जो लोभ आहे तो तिला नाडणारा आहे असें जाणून, तोच लोभ तिच्यापुढें आड करून व तिचे हात गुंतवून हा हरि तिला तळमळ लावून पळून जात आहे ३. आतां आमचें संशयरूपी बिरडें ह्याच्या भेटीच्या योगानें नाहींसें झालें, म्हणून आम्हीं त्याची तूट घेतली आहे. आतां ह्या हरीबरोबर देणें घेणें करावें म्हणजे तो आम्हांला सांपडेल ४. तुकाराम महाराज म्हणतात, संसार-ओझ्याचा आपल्या मस्तकीं भार आहे, म्हणून ह्याशीं संबंध केला असतां त्याचा निवाडा होणार आहे (म्हणजे संसार नाहींसा होणार आहे) ५. [३७४६]

ज्याच्या पोटामध्यें अनंतावधि ब्रह्मांडें आहेत तो हरि नंदाच्या घरीं बाळवेषानें क्रीडा करीत आहे १. हा केवढा नवलाव (हें केवढें आश्चर्य) आहे! त्या कान्होबाचें कौतुक कोणासहि समजत नाहीं २. ज्या देवानें सर्व पृथ्वी तृप्त केली त्याला यशोदा आपल्या हातानें जेवूं घालीत आहे ३. जो लक्ष्मीचा पति सकळ विश्वामध्यें व्याप्त आहे त्याला गौळणी कडेवर घेतात ४. तुकाराम महाराज म्हणतात, हा देव कौतुकानें वेश धारण करून अनेक प्रकारचे भोग भोगून आपणास ब्रह्मचारी म्हणवीत आहे ५. [३७४७]

गोकुळामध्यें कृष्णरायाचा जन्म झालेला ऐकून कंसादि दुष्ट लोकांस भयानें थरकांप सुटला १. कृष्णरायाचा अवतार झाल्याबरोबर सात्त्विक लोक आनंदानें घरोघर उत्साह करूं लागले २. तो असा, कीं सर्व काळ वाचेनें नामोच्चार करून त्या प्रेमाच्या आनंदामध्यें नृत्य करूं लागले ३. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी हरिनामाची गर्जना आनंदानें करतात त्यांच्या सकळ दोषांचें (पापांचें) निवारण होतें ४. [३७४८]

सर्व गोपाळ एका ठिकाणीं मिळून (*पाठांतर:* कृष्णानें सर्व गोपाळ जमवून ते) कांहीं विचार करूं लागले १. अरे, आज गौळणीच्या घरीं जाऊन मनाची तृप्ति होईपर्यंत लोणी चोरून खाऊं. अरे गड्यांनो, अजून तुम्ही काय करतां? उशीर कां लावला, लवकर चला २. कृष्णरायानें पुढें वाट काढली, त्याच्या मागें सर्व गोपाळांचा समुदाय निघाला ३. जो देव कोणालाहि आपला खरेपणा समजूं देत नाहीं तो सर्व ठिकाणीं स्वेच्छेनें क्रीडा करीत आहे ४.

घर पाहोनि एकांताचें । नवविधा नवनीताचें ॥ ५ ॥ रिघे आपण भीतरीं । पुरवी माथुलियाच्या हरी ॥ ६ ॥ बोलों नेदी म्हणे स्थीर । खुणा दावी खा रे क्षीर ॥ ७ ॥ जोगावल्यावरी । तुका करितो चाकरी ॥ ८ ॥ [३७४९]

कां रे गमाविल्या गाई । आली वळती तुझी जाई । मागें जालें काई । एकां तें कां नेणसी ॥ १ ॥ केलास फजित । मागें पुढेंही बहुत । लाज नाहीं नित्य । नित्य दंड पावतां ॥ २ ॥ वोला खोडा खीळ गाढी । ऐसा कोण तया काढी । धांवली कापडी । तुझी आधीं वोढाळा ॥ ३ ॥ चालें चालें धांवें । मीही येतों तुजसवें । तुका म्हणे जंव । तेथें नाहीं पावली ॥ ४ ॥ [३७५०]

कंठीं धरिला कृष्णमणी । अवघा जनीं प्रकाश ॥ १ ॥ काला वांटूं एकमेकां । वैष्णव निका संभ्रम ॥ २ ॥ वांकुलिया ब्रह्मादिकां । उत्तम लोकां दाखवूं ॥ ३ ॥ तुका म्हणे भूमंडळीं । आम्ही बळी वीर गाढे ॥ ४ ॥ [३७५१]

पाहातां गोवळी । खाय त्यांची उष्टावळी ॥ १ ॥ करिती नामाचें चिंतन । गडी कान्होबाचें ध्यान ॥ २ ॥ आली द्यावी डाई । धांवे वळत्या मागें गाई ॥ ३ ॥ एके ठायीं काला । तुका म्हणे भाविकाला ॥ ४ ॥ [३७५२]

पैल आली आगी कान्हो काय रे करावें । न कळे तें कैसें आजी वांचों आम्ही जीवें ॥ १ ॥ धांव रे हरी सांपडलों संधीं । वोणव्याचे मधीं बुद्धि कांहीं (काय) करावी ॥ २ ॥ अवचितां जाळ

ज्याच्या ठिकाणीं नवविधा भक्तीचें नवनीत आहे असें एकांताचें घर पाहून ५. त्या ठिकाणीं देवांनीं प्रवेश केला आणि नवनीतानें भरलेल्या भांड्यांच्या ओळी गोपाळांस देव आपल्या हातानें वांटीत आहे ६. अरे, तुम्ही बोलूं नका, स्थिर मन करून दूध प्राशन करा असें खुणा दाखवून तो म्हणत आहे ७. तुकाराम महाराज म्हणतात, तो प्रसादसेवन करून तृप्त झाल्यावर मी देवाची सेवा करूं लागलों ८. [३७४९]

कृष्ण गोपाळास म्हणतात, कीं अरे, त्वां इंद्रियरूपी गाई मोकळ्या सोडून कां गमावल्यास? तुझ्याकडे (ह्या मनुष्यदेहांत गाई वळविण्याची) वळती करण्याची खेप आली आहे म्हणून तूं जाऊन त्या वळून आण. असें वासरपणानें वागून (गाई मोकाट सोडल्यानें) पूर्वीं कित्येकांची फजिती झाली (इंद्राच्या अंगाला भगें पडलीं, नारद भजन करण्याचें चुकला) ती तुला माहीत नाहीं काय? १. ह्या योगानें तूंहि मागें फजित झालास व पुढेंहि आणखी पुष्कळ होशील. असा रोजचे रोज काळ तुला दंड करीत आहे तरी तूं लाज धरीत नाहींस २. पुढें येणारा जन्ममृत्युरूपी जो नवा खोडा, त्यांत अज्ञानाची खीळ बळकटपणें बसविली आहे ती निवारण करणारा असा कोण आहे? अगोदर तुझी कापडी ह्या नांवाची गाय (श्रवणरूपी, रसनारूपी गाय) ओढाळकी करण्यास धांवत गेली ३. तुकाराम महाराज म्हणतात, जोंपर्यंत त्या विषयाच्या ठिकाणीं ती श्रवणरूपी, रसनारूपी गाय पोंहचली नाहीं तोंपर्यंत मोठ्या वेगानें तूं चाल. तुला मीहि साह्य आहें. जोंपर्यंत सर्व इंद्रियरूपी गाई माझ्या स्वरूपाचे ठिकाणीं पूर्ण विश्रांति मिळविणार नाहींत, तोंपर्यंत त्यांना वळवीत राहावें लागेल ४. [३७५०]

ज्यांनीं आपल्या कंठामध्यें कृष्णनामरूपी मणि धारण केला आहे, त्यांचा प्रकाश सर्व लोकांस झाला आहे १. वैष्णवांच्या उत्तम समारंभामध्यें एकमेकांना (दहींलाह्यांचा, कृष्णनामाचा किंवा कृष्णैक्याचा) काला वांटूं २. ब्रह्मलोकादि जे उत्तम ऊर्ध्वलोक आहेत त्यांना टुकटुक करूं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या जगतामध्यें आम्ही वैष्णव बलाढ्य वीर आहोंत ४. [३७५१]

देव ह्या गोपाळांचें उच्छिष्ट त्यांच्या देखत खात आहे १. कान्होबाचे गडी श्रीहरीच्या नामाचें चिंतन व ध्यान करतात २. आलेला डाव खेळावा व गाईंचें रक्षणहि करावें ३. तुकाराम महाराज भाविकांना म्हणतात, हरि व तुम्ही एका ठिकाणीं काला करा ४. [३७५२]

एके दिवशीं रानांत गाई चारीत असतां एकदम वणवा लागला, तेव्हां गोपाळ घाबरून म्हणाले, हे कान्होबा, पुढें अग्नि जाळीत आला आहे. आतां काय करावें? ह्या चहूंकडून पेटलेल्या वणव्याच्या तडाख्यांतून आम्ही कसे जगूं, हें आम्हांला कळत नाहीं १. हे हरि, चहूंकडून पेटलेल्या वणव्याच्या तडाख्यांत आम्ही सांपडलों आहोंत. येथें

(ज्वाळा) येतां देखियेला परी (देखिल्या वरी)। परतोनि पाहतां आधीं होतों पाठमोरी ॥ ३ ॥ सभोंवता फेर रीग न होये पळतां। तुका म्हणे जाणसी तें करावें अनंता ॥ ४ ॥ [३७५३]

भिऊं नका बोले झांकूनियां राहा डोळे। चालवील (वांचविल) देव धाक नाहीं येणें वेळे ॥ १ ॥ बाप रे हा देवांचाही देव। कळों नेदी माव काय करी करवी ते (करवीतो) ॥ २ ॥ पसरूनी मुख विश्वरूप खाय जाळ (ज्वाळ)। सारूनियां संधि अवघे पहाती गोपाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही मागें भ्यालों वायांविण। कळों आलें अतां या सांगातें नाहीं शिण ॥ ४ ॥ [३७५४]

नेणती तयांसी साच भाव दावी हरी। लाज नाहीं नाचे पांवा वाजवी मोहरी ॥ १ ॥ चला रे याच्या पायां लागों आतां। राखिलें जळतां महा आगीपासूनी ॥ २ ॥ कैसी रे कान्होबा एवढी गिळियेली आगी। न देखों पोळला तुज तोंडीं कोठें अंगीं ॥ ३ ॥ तुका म्हणे कां रे तुम्ही करितां नवल। आमची सिदोरी खातो त्याचें आलें बळ ॥ ४ ॥ [३७५५]

त्यांनीं धणीवरी संग केला हरीसवें। देऊनी आपुलें तोचि देईल तें खावें ॥ १ ॥ न ठेवी आभार प्रेमाचा भुकेला। बहु दिवस (दिस) संग हाचि निर्धार त्याला ॥ २ ॥ कान्होबा तूं जेवीं घासोघासीं आळविती। आरुप गोपाळें त्यांची बहु देवा प्रीति ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां जाऊं आपुलिया घरा। तोहें वांचविलें ऐसें सांगों रे दातारा ॥ ४ ॥ [३७५६]

घ्या रे भोंकरें भाकरी। दहीं भाताची शिदोरी। ताक सांडा दुरी। असेल तें जयापें (तयापें) ॥ १ ॥ येथें द्यावें तैसें घ्यावें। थोडें परि निरें व्हावें। सांगतों रे ठावें। असों द्यावें सकळां ॥ २ ॥ माझें आहे तैसें पाहे। नाहीं तरी घरा जाये। चोरोनियां माये। नवनीत आणावें ॥ ३ ॥

काय करावें हें आमच्या बुद्धीला कांहीं सुचत नाहीं. ह्याकरितां तूं धांव घे २. पूर्वी आम्ही इकडे पाठमोरे होतों, पण वळून जों पाहूं लागलों तों ज्वाळा अंगावर येत आहेत असें दिसूं लागलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे अनंता, भोंवतालीं सर्व वणवा पेटला आहे. ह्यांतून पार पडण्याला कोठेंहि मार्ग दिसत नाहीं. आतां काय करावें हें तूं जाणतोस ४. [३७५३]

हरि हे सर्व गोपाळांना म्हणतात, तुम्ही भिऊं नका. आपल्यावर आलेलें अरिष्ट देव घालवील, ह्या भरंवशानें स्वस्थ डोळे झांकून राहा. १. अरे बाप रे, हा देवांचाहि देव आहे. हा काय करतो आणि करवितो हें कांहीं समजत नाहीं २. तो विश्वरूप हरि मोठें तोंड पसरून वणवा गिळीत आहे असें बोटांच्या फटींतून सर्व गोपाळ पाहूं लागले ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही मात्र पूर्वी व्यर्थ भ्यालों. आतां मात्र समजलें, कीं ह्या देवाच्या संगतीला राहाण्यानें कांहीं दुःख नाहीं ४. [३७५४]

हरि हा अज्ञानी गोपाळांना खरा भाव दाखवितो व त्यांच्या संगतीनें निर्लज्जपणें पांवा व मुरली वाजवून नाचतो १. सर्व गोपाळांनो, चला, आपण हरीच्या पायां पडूं. त्यानें जळत्या वणव्यांतून आपलें रक्षण केलें २. हे कान्होबा, तूं आतां एवढा मोठा अग्नि कसा रे गिळलास? व तो कोठें तोंडाला व अंगाला पोळतांनाहि दिसला नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे गोपाळांनो, तुम्ही ह्याचा नवलाव काय करतां? हा देव नित्य आमची शिदोरी खातो, त्याचें ह्याला बळ आलें आहे ४. [३७५५]

त्या गोपाळांनीं तृप्त होईतोंपर्यंत हरीची संगति केली व आपल्या शिदोऱ्या त्याला देऊन आपण तो जें देईल तें खाऊं लागले १. फार दिवस गोपाळांची संगत असल्यामुळें, हे गोपाळ मजविषयीं प्रेमळ आहेत अशी त्यांजविषयीं भगवंताची खात्री होती व तो प्रेमळाचा भुकेला असल्यामुळें त्यांचे उपकार त्यानें ठेवले नाहींत २. सर्व गोपाळ शिदोऱ्या खात असतांना ग्रासोग्रासीं कान्होबा, तूं जेव असें ते म्हणत. त्या छांदिष्ट (गांवढळ) गोपाळांची देवाला अति प्रीति असे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां चला, आपण घरीं जाऊं व दात्या देवानें आपणास वांचविलें असें आपल्या घरच्या माणसांस सांगूं ४. [३७५६]

अरे गोपाळांनो, भोंकरांचें लोणचें व भाकरी घ्या आणि दहींभाताची शिदोरीहि घ्या. ज्याच्याजवळ ताक असेल त्यानें तें दूर टाकावें १. ह्या ठिकाणीं जसें द्यावें तसें घ्यावें, म्हणून थोडें पण चांगलें असावें. अरे, हें तुम्हां सर्वांना सांगतों ह्याची माहिती असूं द्या २. माझी शिदोरी जशी शुद्ध पुण्याईची आहे तशी तुम्ही आपली आहे कीं नाहीं हें पाहा.

तुका म्हणे घरीं । माझें कोणी नाहीं हरी । नका करूं दुरी । मज पायां वेगळें ॥ ४ ॥ [३७५७]

काल्याचिये आसे । देव जळीं झाले मासे । पुसोनियां हांसे । टिरी सांगातें हात ॥ १ ॥ लाजे त्यासी वांटा नाहीं । जाणें अंतरींचें तेंही । दीन होतां कांहीं । होऊं नेदी वेगळें ॥ २ ॥ उपाय अपाय यापुढें । खोटें निवडितां कुडें । जोडूनियां पुढें । हात उभे नुपेक्षी ॥ ३ ॥ तें घ्या रे सावकाशें । जया फावेल तें तैसें । तुका म्हणे रसें । प्रेमाचिया आनंदें ॥ ४ ॥ [३७५८]

गोपाळ म्हणती कान्होबा या रे कांहीं मागों । आपुलाले आम्ही जीवींची तया आवडी सांगों । एक म्हणती उगे रे उगे मागेंचि लागों । निजों नका कोणी घरीं रे आजी अवघेचि जागों ॥ १ ॥ जाणोनी नेणता हरि रे मध्यें उगाचि बैसे । नाइकोनी बोल आइके कोण कोणाचें कैसें । एक एकाच्या संवादा जाणे न मिळती ऐसें (मिळेचि ऐसें) । पोटाचें होटा आणवी देतो तयांसी तैसें ॥ २ ॥ एक म्हणती बहु रे आम्हीं पीडियेलों माया । नेदी दहींभातसिदोरी ताक घालिती पिया । तापलों वळितां गोधनें नाहीं जीवन छाया । आतां मागों पोटभरी रे याच्या लागोनी पायां ॥ ३ ॥ एक म्हणती अरे तुमचें पोट तें किती । मागों गाई म्हैसी घोडे रे धन संपत्ति हत्ती । देव गडी कान्होबा आमुचा आम्हां काय विपत्ति । कन्याकुमरें दासी रे बाजावरी सुपती ॥ ४ ॥ एक म्हणती वेटे हो कोण करी जतन । गाढव तैसेंचि घोडें रे कोण तयाचा मान । लागे भवरोग वाहतां खांदीं चवघे जण । हातीं काठ्या डोया बोडक्या हिंडों मोकळें रान ॥ ५ ॥ एक म्हणती रानीं रे बहु सावजें फार । फाडफाडूं खाती डोळे रे पाय नेतील कर । राखोनि राखे आपणां ऐसा कईंचा शूर । बैसोनी राहों घरीं रे

नसली तर घरीं जा आणि आईला न कळतां लोणी घेऊन या ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे हरि, माझे घरीं कोणी नाहीं. तुम्ही मला आपल्या पायापासून दूर करूं नका ४. [३७५७]

भगवंतांनीं केलेल्या काल्याचें उच्छिष्ट शेष मिळावें ह्या आशेनें स्वर्गांतील देव यमुनेच्या पाण्यांत मासे झाले. त्या वेळीं कृष्णानें व गोपाळांनीं सर्व काला खाऊन हात टिरीला पुसून टाकले १. जो कोणी येथें लज्जित होईल त्याला शिदोरीचा वांटा मिळणार नाहीं; त्याच्या ठिकाणीं दीनत्व घेतलें असतां तो आपल्यापासून निराळें होऊं देत नाहीं २. ह्या देवापुढें यज्ञ-यागादि उपाय हे खोटे होतात. तो खऱ्याखोट्याची निवड करतो. त्याच्यापुढें दीनपणानें हात जोडून जो उभा राहातो, त्याची तो उपेक्षा करीत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याला जें देवापासून प्राप्त होईल त्यानें तें समाधानानें ग्रहण करावें व त्या प्रेमरसाच्या आनंदांत राहावें ४. [३७५८]

गोपाळ म्हणतात, या रे, आपण कांहीं कान्होबाजवळ मागूं आणि आपल्या मनांतील गोष्ट त्याला प्रीतीनें सांगूं. त्यांपैकीं कित्येक गोपाळ म्हणूं लागले, कीं आपण उगीच त्याच्यामागें जाऊं, म्हणून कोणी घरीं निजूं नका, आपण सर्व जागृत राहूं (जागरण करूं) १. हरि हे सर्वांचा प्रकार जाणून गोपाळांच्या मेळाव्यामध्यें उगीच बसले. कोणाचें काय बोलणें आहे तें न ऐकल्यासारखें करून ऐकत होते. एकमेकां गोपाळांचें मत एकमेकांशीं मिळत नाहीं, असें हरि समजला; ती त्यांच्या हृदयाची स्थिति त्यांच्या वाणीकडून वदवून त्यांना त्याप्रमाणें दिलें २. कित्येक गोपाळ म्हणूं लागले, कीं आम्ही मायेनें फार पीडित झालों, ती दहींभाताची शिदोरी देत नाहीं, ताक प्यावयास घालते. गुरें राखतां राखतां अतिशय दुःखी झालों. कोठें पाणी नाहीं व छायाहि नाहीं, आतां पोटभर शिदोरी ह्या देवाच्या पायां पडून मागूं ३. कित्येक गोपाळ म्हणूं लागले, अरे, तुमचें पोट तें केवढेंसें? आपला जो कान्होबा देव त्याचेजवळ गाई, म्हशी, घोडे, हत्ती ही धनसंपत्ति मागूं. असा आमचा गडी असून आम्हांला दारिद्र्य कसलें आहे? मुलें, मुली, दासी हीं सर्व पलंगावर सुखानें पडतात (किंवा, मुलें, मुली, दासी, पलंग, शय्या इत्यादि संपत्ति त्यापाशीं मागूं व आपण सुखांत राहूं) ४. कित्येक म्हणूं लागले, कीं अरे पोरांनो, हें कोणीं रक्षण करावें? अरे, गाढव तसेंच घोडें. त्यांची काय विशेष किंमत आहे? त्यांचा भार वाहाण्यानें भवरोग लागेल, असें चार वेद सांगतात. (किंवा, काम, क्रोध, लोभ, मद ह्या चौघांना आपण अंगाखांद्यांवर वागविलें तर भवरोग आपल्या पाठीशीं लागेल). ह्याकरितां हें सर्व सोडून हातांमध्यें काठ्या घेऊन उघड्या बोडक्यानें खुल्या रानांत हिंडूं ५. कितीएक म्हणूं लागले, कीं रानामध्यें हिंस्र पशु फार आहेत. ते फाडफाडून खातील, डोळे, हातपाय, कान हे नाहींसे करतील. त्यांच्या तडाख्यांतून आपलें रक्षण करून आणिकांचें रक्षण करील असा

कोण करी हे चार ॥ ६ ॥ घरीं बैसलिया बहुतें बहु सांगती कामें। रिकामें कोणासी नावडे ऐसें आम्हांसी ठावें। चौघांमध्यें बरें दिसे तेथें नेमक व्हावें। लपोनी खेळतां सहज भलें गडियांसवें ॥ ७ ॥ एक म्हणती गडी ते भले मिळती मता। केली तयावरी चाले रे बरी आपुली सत्ता। नसावे ते तेथें तैसे रे खेळ हाणिती लाता। रडी एकाएकीं गेलिया गोंधळ उडती लाता ॥ ८ ॥ एक म्हणती खेळतां उगी राहती पोरें। ऐसें काय घडों शके रे कोणी लहान थोरें। अवघीं येती रागा रे एका म्हणतां बरें। संगें वाढे कलह करावा (हरावा) एकाएकींच खरें ॥ ९ ॥ एक म्हणती एकला रे तूं जासील कोठें। सांडी मांडी हें वाउगें तुझे बोलचि खोटे। ठायीं राहा उगे ठायींच कां रे सिणसी वांट। अवघियांची सिदोरी तुझे वरी भरली मोटे ॥ १० ॥ तुका म्हणे अरे काहण्या काय सांगाल गोष्टी। चाटावें तुमचे बोल रे भुका लागल्या पोटीं। जागा करूं या रे कान्होबा मागों कवळ ताटीं। घाले गडी तुका ढेंकर देतो विठ्ठल कंठीं ॥ ११ ॥ [३७५९]

आजी ओस अमरावती। काला पाहावया येती। देव विसरती। देहभाव आपुला ॥ १ ॥ आनंद न समाये मेदिनी। चारा विसरल्या पाणी। तटस्थ त्या ध्यानीं। गाई झाल्या श्वापदें ॥ २ ॥ जें या देवांचें दैवत। उभें असे (आहे) या रंगांत। गोपाळांसहित। क्रीडा करी कान्होबा ॥ ३ ॥ जया सुखाची शिराणी। तींच पाउलें मेदिनीं। तुका म्हणे मुनी। धुंडितांही न लाभती ॥ ४ ॥ [३७६०]

चला बाई पांडुरंग पाहूं वाळवंटीं। मांडियेला काला भोंवतीं गोपाळांची दाटी ॥ १ ॥ आनंदें कवळ देती एकामुखीं एक। न म्हणती सान थोर अवघीं सकळीक ॥ २ ॥ हमामा हुंबरी पांवा वाजविती मोहरी। घेतलासे फेर (फेरा) माजी घालुनियां हरी ॥ ३ ॥ लुब्धल्या नारी नर अवघ्या

कोण आहे? ह्याकरितां आपण गृहस्थाश्रमांत घरीं बसून राहूं. असले हे संन्यासाचे व्यवहार कोणीं करावे? ६. घरांत बसलें तर (वेद-स्मृतिरूपी माता-पिता) पुष्कळ कामें सांगतात. आम्हांला माहीत आहे, कीं रिकामें बसलेलें आवडत नाहीं. गृहस्थाश्रमांत जी गोष्ट चारचौघांस चांगली वाटत असेल ती आपण पाळली पाहिजे. त्यापेक्षां वानप्रस्थ स्वीकारून एखाद्या झोंपडींत ऋषिमुनि ह्या गड्यांबरोबर लपून लपून परमार्थाचा खेळ खेळलें पाहिजे ७. कित्येक गडी म्हणूं लागले, कीं आपल्या मतास मिळणारे गडी बरे. आपण सत्ता केली तर ती त्यांच्यावर चालते. अरे, तसा प्रकार खेळाचे ठिकाणीं नाहीं. तेथें लाथा खाव्या लागतील. गडी एकमेकांवर रडी जाऊन गोंधळ लाथाडी होते ८. कित्येक म्हणूं लागले, कीं अरे, खेळण्याचे वेळीं पोरें उगीच राहातील असें त्या लहान-मोठ्यांकडून काय घडूं शकेल? एकाला चांगलें म्हटलें म्हणजे सर्व रागावतील व म्हणून संगतीनें कलहच वाढला जातो. ह्याकरितां ती टाकून एकटें राहाणें हेंच खरें ९. कित्येक म्हणतात, कीं अरे, तूं एकटा कुठें जाशील? मी अमूक करीन व टाकीन वगैरे हें बोलणें खोटें होय. अरे, जागच्या जागींच स्वस्थ राहा. खोट्या मार्गानें जाऊन कां शिणतोस? सर्वांची शिदोरी तुझ्या पदरीं भरली आहे १०. तुकाराम महाराज म्हणतात, अरे, कसल्या व्यर्थ गोष्टी सांगत बसलांत? पोटामध्यें भूक लागली आहे. तुमचें बोलणें काय चाटावयाचें आहे! या रे, कान्होबाला आपण जागें करूं व आपल्या ताटामध्यें घास मागून घेऊं. सर्व गडी तृप्त होऊन ढेंकर देऊं लागले. त्यांच्याबरोबर मीहि विठ्ठलनामाचे ढेंकर देऊं लागलों ११. [३७५९]

आज इंद्राची अमरावती ओस पडली, तेथील सर्व देव काला पाहावयास येऊन आपला देहभाव विसरले १. काल्याचा आनंद पृथ्वीमध्यें मावेना. वनांतील गाई व श्वापदें आपापलें भक्ष्य सेवन करण्याचें व पाणी पिण्याचें विसरले व त्यांच्या चित्तवृत्ति श्रीहरीच्या ध्यानानें तटस्थ झाल्या २. सर्व देवांचें दैवत कान्होबा, हा ह्या काल्याच्या आनंदांत उभा आहे व गोपाळांसहवर्तमान काल्याची क्रीडा करीत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व सुखांचा शिरोभाग (सुखांत मुख्य) अशीं जीं श्रीहरीचीं पाउलें तीं पृथ्वीवर आहेत. त्यांचा शोध मुनि करीत आहेत तथापि त्यांना तीं प्राप्त होत नाहींत ४. [३७६०]

अहो बायांनो, वाळवंटामध्यें चला जाऊं व पांडुरंगाला पाहूं, त्यांनीं काला करण्याला आरंभ केला आहे व सभोंवतीं गोपाळांचा दाट समुदाय आहे १. गोपाळ आनंदानें एकमेकांचे तोंडांत काल्याचे घास घालीत आहेत. तेथें ते लहानमोठ्यांची निवड करीत नाहींत. सर्वांस सारखे मानतात २. गोपाळ हे श्रीहरीला मध्यें घालून सभोंवतें हमामा,

पशुयाती । विसरली देहभाव शंका नाहीं चित्ता ॥ ४ ॥ पुष्पांचा वरुषाव झाली आरतियांची दाटी । तुळसी गुंफोनियां माळा घालितील कंठीं ॥ ५ ॥ यादवांचा राणा गोपीमनोहर कान्हा । तुका म्हणे सुख वाटे देखोनियां मना ॥ ६ ॥ [३७६१]

माझे गडी कोण कोण । निवडा भिन्न यांतुनी ॥ १ ॥ आप आपणामध्यें मिळों । एक खेळों एकाशीं ॥ २ ॥ घाबरियांच्या मोडा काड्या । धाडा भ्याडां वळतियां ॥ ३ ॥ तुका म्हणे देवापाशीं विटाळशी नसावी ॥ ४ ॥ [३७६२]

हेंचि अनुवाद सदा सर्वकाळ । करूनि गोपाळकाला सेवूं ॥ १ ॥ वोरसलें कामधेनूचें दुभतें । संपूर्ण आइतें गगनभरी ॥ २ ॥ संत सनकादिक गोमट्या परवडी । विभाग आवडी इच्छेचिये ॥ ३ ॥ तुका म्हणे मधीं घालूं नारायण । मग नव्हे सीण कोणा खेळें ॥ ४ ॥ [३७६३]

अधिकाचा मज कांटाळा । तुम्हां गोपाळां संगतीं ॥ १ ॥ काय नाहीं तुम्हांपाशीं । सकळांविशीं संपन्न ॥ २ ॥ उद्योगाचा (उद्वेगाचा) नेघें भार । भागल्या सार पुरतें ॥ ३ ॥ तुका म्हणे अधीर जिणें । नारायणें न करावें ॥ ४ ॥ [३७६४]

झालों (जालों) आतां एके ठायीं । न वंचूं कांहीं एकमेकां ॥ १ ॥ सरलों हें गे देऊनि मोट । कटकट काशाची ॥ २ ॥ सोडोनियां गांठी पाहें । काय आहे त्यांत तें ॥ ३ ॥ तुका म्हणे झालों निराळा । आतां गोपाळा देऊं बोभा ॥ ४ ॥ [३७६५]

या रे करूं गाई । जमा निजलेती काई । बोभाटानें (बोभाट्यानें) आई । घरा गेल्या मारील ॥ १ ॥ घाला घाला रे कुकारे । ज्याची नेणोंचि मोहरे । एवढेंचि पुरे । केलियानें सावध ॥ २ ॥

हुंबरी, पावा व मुरली वाजवूं लागले ३. त्यायोगानें पुरुष व स्त्रिया आणि सर्व पशुजाति हे आपापला देहभाव विसरून चित्तानें निर्भय झाले ४. त्या वेळीं पुष्पांची वृष्टि होऊन आरत्या करणारांची दाटी झाली व तुळशीमाळांचे हार तयार करून गोपाळ श्रीकृष्णाच्या व परस्परांच्या गळ्यांत घालूं लागले ५. तुकाराम महाराज म्हणतात, यादवांचा राजा गोपींचें मन हरण करणारा जो कृष्ण त्याला पाहून माझ्या मनाला सुख होतें ६. [३७६१]

श्रीकृष्ण म्हणाला, आमच्या पक्षाकडील गडी कोण कोण आहेत, ते गोपाळसमुदायांतून वेगळे निवडा १. आपण आपल्या स्वरूपीं मिळून एकमेकांशीं खेळूं २. अशा प्रकारचा खेळ खेळण्याविषयीं जे अनधिकारी होते, ते घाबरले. त्यांच्या काड्या मोडा (त्यांस खेळांतून काढा) आणि त्या भित्र्यांना इंद्रियरूपी गाई रक्षण करावयास लावा ३. तुकाराम महाराज म्हणतात, देहाहंकारानें ज्याचें हृदय विटाळलें आहे, अशा प्रकारची विटाळशी (रजस्वला) देवाजवळ नसावी ४. [३७६२]

भगवंताच्याच चरित्राचा अनुवाद सर्व काल करून गोपाळकाल्याचें सेवन करूं १. परमार्थरूपी कामधेनूचें दुभतें संपूर्ण आयतें (सिद्ध) सर्व गगनभर (त्रैलोक्यांत) भरलें आहे २. सनकादिक संत ह्यांच्या चांगल्या पंक्तीनें आपल्या इच्छेनुरूप त्यांचा वांटा घ्यावा ३. तुकाराम महाराज म्हणतात, नारायणाला हृदयामध्यें धारण केलें म्हणजे कोणत्याहि खेळाच्या योगानें दुःख होणार नाहीं ४. [३७६३]

हे गोपाळा, तुझ्या संगतीमुळें विशेष ऐश्वर्याचा मला कंटाळा आला आहे १. हे देवा, तुझ्याजवळ काय एक नाहीं? सर्व ऐश्वर्यानें तूं संपूर्ण आहेस २. मी कोणत्याहि व्यवहाराचा बोजा (किंवा, संसाराच्या काळजीचें ओझें) घेण्याचें जाणत नाहीं. ह्या ठिकाणीं झालेल्या श्रमाचा परिहार हेंच सार आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, नारायणा, माझें जीवित्व अधीर करूं नये (तूं आमचें जीवन निराधार करूं नये) ४. [३७६४]

देव आणि आम्ही आतां एके ठिकाणीं झालों. आतां आम्ही एकमेकांपासून भिन्न होणार नाहीं १. देहरूपी मोट श्रीहरीला समर्पण करून मी देहबुद्धीनें नाहींसा झालों. आतां त्रास कसला आला आहे? २. चिज्जडग्रंथि सोडून त्यांत काय आहे तें पाहूं लागलों ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी सर्व उपाधींहून वेगळा होऊन आतां गोपाळाच्या नांवें हांका मारीन ४. [३७६५]

अहो गोपाळ हो, तुम्ही असावधपणानें काय निजतां? ह्या इंद्रियरूपी गाई एका ठिकाणीं जमा करूं या. नाहींतर पंचविषयांकडे गाईंच्या ओढाळकीचा बोभाटा झाल्यावर आपण घरीं गेलों, म्हणजे आपली मायारूपी आई आपणांस शिक्षा करील १. अरे, तुम्ही हांका मारून गाईंस पाचारण करा, म्हणजे ज्याची जी गाय असेल, ती त्या योगानें माघारीं

नेणोनियां खेळा । समय समयाच्या वेळा । दुश्चिताजवळां । मिळालेती (मिळाले ते) दुश्चित ॥ ३ ॥ तुका म्हणे शीक । न धरितां लागे भीक । धरा सकळीक । मनेरी धांवे वळतियां ॥ ४ ॥ [३७६६]

बोळलीचा दोहूं पान्हा । मज कान्हा सांगितलें ॥ १ ॥ घ्या जी हें गे क्षीर हातीं । निगुतीनें वाढावें ॥ २ ॥ सांगितलें केलें काम । नव्हे धर्म सत्तेचा ॥ ३ ॥ तुका म्हणे नवें जुनें । ऐसें कोणें सोसावें ॥ ४ ॥ [३७६७]

येईल तें घेईन भागा । नव्हे जोगा दुसरिया ॥ १ ॥ आवडी ते तुम्ही जाणा । बहु गुणांसारिखी ॥ २ ॥ मज घेती डांगवरी । सवें हरी नसलिया ॥ ३ ॥ तुका म्हणे रावबा देवा । करीन सेवा सांगितली ॥ ४ ॥ [३७६८]

अंतरली खुटी मेटी (कुटी मेटी) । भय धरूनियां पोटीं । म्हणतां जगजेठी । धांवे करुणाउत्तरीं ॥ १ ॥ बाप बळिया शिरोमणी । उताविळ या वचनीं । पडलिया कानीं । धांवा न करी आळस ॥ २ ॥ बळ दुनी शरणागता । स्वामी वाहों नेदी चिंता । आइतेंचि दाता । पंगतीसी बैसवी ॥ ३ ॥ वाहे खांदीं पाववी घरा । त्याच्या करी येरझारा । बोबड्या उत्तरा । स्वामी तुकया मानवे ॥ ४ ॥ [३७६९]

: अडसण अभंग :

शुद्धीचें सारोनी भरीयेली पाळी । भरडोनी वोंगळी नाश केला ॥ १ ॥ आडसोनी शुद्ध करीं वो साजणी । सिद्ध कां पापिणी नासियेलें ॥ २ ॥ सुपीं तोंचि पाहें धड उगटिलें । नव्हता नासिलें

मुरडेल. असें एक वेळ सावध करणें, एवढेंच पुरे २. योग्य अयोग्य समय न जाणतां तुम्ही खेळ खेळतां आणि जे कोणी खिन्न झाले आहेत, त्यांच्या जवळ तुम्ही खिन्नपणानें बसतां ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें मी तुम्हांस शिकविलें, तें जर तुम्ही न ऐकाल, तर चौऱ्यांशीं लक्ष योनींच्या द्वारांत भिक्षा मागावी लागेल. ह्याकरितां मुख्य तुमची मनरूपी गाय सर्वांनीं आंवरून धरली पाहिजे, कारण तीच खट्याळपणानें अनेक ठिकाणीं ओढाळकी करण्यास धांवते ४. [३७६६]

जी गाय ओळली आहे (पुष्कळ दूध देणारी आहे) तिची धार काढावी, असें मला कृष्णानें सांगितलें १. तें दूध यथार्थ रीतीनें सर्वांना वांटण्याविषयीं मी तयार आहें. तें तुम्ही सर्वत्र हस्तगत करून घ्या २. हा धर्म स्वतः माझ्या सत्तेचा नाहीं. जें देवांनीं काम सांगितलें, तें मी करीत आहें. ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यावांचून नव्या जुन्याचे कष्ट कोणी सोसावे? (एकाच प्रकारचें दूध सर्वांना देत आहें; कारण आम्हांला शिळें दिलें, आम्हांला ताजें दिलें, हीं लोकांची बोलणीं कोणीं सोसावीं?) ४. [३७६७]

सर्वांना वाढून जें दूध माझ्या वांटणीस आलें आहे, तेंच मी घेईन; दुसऱ्यासारखा हांवभरी होणार नाहीं १. ह्याविषयीं माझी गुणासारखी आवड फार आहे, ती तुम्ही समजा (माझी आवड ज्यामध्यें सद्गुण असतील त्यावर अवलंबून आहे, हें तुम्ही लक्षांत घ्या.) मी प्रत्येकाचे गुण पाहून त्यांप्रमाणें त्याला भक्ति-ज्ञान-वैराग्याचें दूध देत आहें २. दूध देतांना जर माझ्यापाशीं क्षणभर देव नसला, तर मला हे गडी काठीनें मारतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुमच्याजवळ मला ठेवून मजकडून काम घ्या. तुम्ही जें सांगाल तें काम मी करीन ४. [३७६८]

घरादारामध्यें (संसारांत) जीं सांपडलीं होतीं त्यांनीं पोटांत भय धरून करुणस्वरानें देवाचा धांवा केल्यामुळें, तो धांवत येऊन, त्यानें ती मंडळी तेथून सोडविली १. हा देव सर्व बळवंतांमध्यें श्रेष्ठ असून ह्या करुणावचनानें उताविळा होतो, कोणी धांवा केलेला कानानें ऐकल्याबरोबर तो धांवत जाण्याविषयीं आळस करीत नाहीं २. जे कोणी शरण आले आहेत, त्यांना स्वामीच्या आधारानें दुप्पट बळ चढतें व स्वामी त्यांस कोणतीहि काळजी करूं देत नाहीं, पंक्तीस त्यांना आयतें बसवितो, असा तो दाता समर्थ आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा स्वामी आपल्या भक्तांच्या बोबड्या वचनास मान देऊन, त्यांना आपल्या खांद्यावर घेऊन, निजस्वरूपाच्या घरीं पावतें करतो; आणि वारंवार त्या ठिकाणीं हेलपाटे घेऊन त्यांचें रक्षण करतो ४. [३७६९]

शुद्ध परमार्थाचें असलेलें दळण बाजूला सारून, अशुद्ध विषयरूपी जात्याची पाळी भरून, ह्या विषयासक्त घाणेरडीनें (घाणेरड्या स्त्रीनें म्ह० विषयी जीवांनीं) भरडलें (अशुद्ध विषय सेवन केले) व त्यायोगानें नरदेहाचा (किंवा, परमार्थाचा) नाश केला १. हे मैत्रिणी, आत्मानात्मविवेकाच्या सुपानें शुद्ध आत्मभाव अडसून (निवडून) घे. हे पापिणी, सिद्ध आत्मस्थिति अनात्म्याशीं तादात्म्य करून कां नासलीस? २. हे जगांतील झोंड स्त्रिये, नरदेहरूपी सुपाच

जगझोडी ॥ ३ ॥ सुपीं तोंचि आहे तुज ते आधीन । दळिल्या जेवण जैसें तैसें ॥ ४ ॥ सुपीं तोंचि संग घेई घडफुडी । एकसा गधडी नाश केला ॥ ५ ॥ दळितां आदळे तुज कां न कळे । काय गेले डोळे कान तुझे ॥ ६ ॥ सुपीं तोंचि वोज न करितां सायास । पडसी सांदीस तुका म्हणे ॥ ७ ॥ [३७७०]

: काला :

धन्य तें गोधन (तीं गोधनें) कांबळी काठिका । मोहरी पांवा निका ब्रीद वांकी ॥ १ ॥ धन्य तें गोकुळ धन्य ते गोपाळ । नर नारी सकळ धन्य झाल्या ॥ २ ॥ धन्य ते देवकी जसवंती दोहींचें । वसुदेवनंदाचें भाग्य झालें ॥ ३ ॥ धन्य त्या गोपिका सोळासहस्र बाळा । यादवां सकळां धन्य झालें ॥ ४ ॥ धन्य म्हणे तुका जन्मा तींचि आलीं । हरिरंगीं रंगलीं सर्वभावें ॥ ५ ॥ [३७७१]

गौळणी बांधिती धारणासी गळा । खेळे त्या गोपाळांमाजी ब्रह्म ॥ १ ॥ धांवोनियां मागे यशोदे भोजन । हिंडे रानोरान गाईंपाठीं ॥ २ ॥ तुका म्हणे सर्व कळा ज्याचे अंगीं । भोळेपणालागीं भीक मागे ॥ ३ ॥ [३७७२]

देखिलासी माती खातां । दावियानें बांधी माता ॥ १ ॥ जाळी घेउनि कांबळी काठी । गाई वळी वेणू पाठीं ॥ २ ॥ मोठें भावार्थाचें बळ । देव झाला त्याचें बाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे भक्तांसाठीं । देव धांवे पाठोपाठीं ॥ ४ ॥ [३७७३]

हा गे माझे हातीं । पाहा कवळ सांगाती ॥ १ ॥ देवें दिला खातों भाग । कराल तर

जोंपर्यंत योग आहे तोंपर्यंतच न बिघडतां चांगलें आहे, असें समज ३. जोंपर्यंत नरदेहरूपी सुपाचा योग आहे तोंपर्यंतच कल्याण करून घेण्याचें तुझ्या स्वाधीन आहे. त्याचें नाशरूपी दळण झालें, म्हणजे कर्मानें जशी योनि मिळेल, तशी भोगावयास पाहिजे ४. जोंपर्यंत ह्या नरदेहाच्या सुपाचा योग आहे, तोंपर्यंत स्वस्वरूपाची संगति कर. तसें न केल्यानें, हे गधडये, ह्या नरदेहाचा (किंवा, परमार्थाचा निष्कारण) एकसारखा नाश केलास ५. देहबुद्धि धरून अनेक काम्य कर्मांचें दळण दळल्यानें अनेक योनींत आदळावें लागतें (जन्म घ्यावे लागतात) हें तुला कसें समजत नाहीं? तुझे डोळे व कान गेले काय? ६. तुकाराम महाराज म्हणतात, जोंपर्यंत नरदेहरूपी सुपामध्यें वास्तव्य आहे, तोंपर्यंत परमार्थाचे यत्न केले नाहींस, तर तूं अनेक योनींच्या सांदाडींत पडशील ७. [३७७०]

त्या गोकुळांतील गाई, घोंगड्या, काठ्या, मुरली, पांवा, वाक्या आदिकरून भूषणें हीं कृष्णाच्या संगतीनें धन्य आहेत १. तें गोकुळ धन्य आहे, व तेथील गोपाळादि पुरुष व गोपीआदि स्त्रिया ह्याहि सर्व धन्य आहेत. २. देवकी व यशोदा ह्या श्रीहरीच्या माताहि धन्य आहेत व वसुदेव आणि नंद हेहि परम भाग्यवान् आहेत ३. तेथील गोपिका व सोळा सहस्र स्त्रिया आणि सर्व यादव हेहि धन्य आहेत ४. तुकाराम महाराज म्हणतात, जीं हरिचिंतनाच्या सुखानें काया-वाचा-मनानें रंगलीं त्यांचेंच जन्माला येणें धन्य होय ५. [३७७१]

गौळणींनीं दाव्यानें देवाचा गळा बांधला. तेथील गोपाळांच्या समुदायामध्यें साक्षात् परब्रह्म जो देव तोच खेळतो १. देव धांवत जाऊन यशोदेजवळ जेवावयास मागतो व तोच रानोरान गाईंच्या पाठीमागें हिंडतो २. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचे ठिकाणीं सर्व ज्ञान आहे, तोच गोकुळांतील लोकांच्या भोळेपणाकरितां (किंवा, भोळेपण धरून) भीक मागतो ३. [३७७२]

देवा, तुला माती खातांना पाहून आईनें तुला दाव्यानें बांधलें १. हातांत जाळें, घोंगडी व काठी घेऊन व वेणू पाठीवर टाकून देव गाईंचें रक्षण करतो २. त्यांच्या मोठ्या भावबळाच्या योगानें देव हा त्यांचा बालक झाला ३. तुकाराम महाराज म्हणतात, भक्तांकरितां देव हा त्यांच्या पाठीमागें धांवतो ४. [३७७३]

हे गोपाळ, 'माझ्या हातांत काल्याचा घांस आहे. अरे, तो तूं पाहा,' असें ते एकमेकांना सांगतात १. देवानें दिलेला भाग (घांस) मी खातों. ह्याकरितां जर तुम्हांला असें करावयाचें असेल (तुम्हांला असा घांस हवा असेल) तर तुम्ही

करा लाग ॥ २ ॥ धालें ऐसें पोट । वरी करूनियां बोभाट ॥ ३ ॥ तुका म्हणे घरीं । मग कैंच्या या परी ॥ ४ ॥ [३७७४]

अवघें अवघीकडे । दिलें पाहे मजकडे । अशा संवगडे-। सहित थोरी लागली ॥ १ ॥ कां रे धरिला अबोला । माझा वांटा देई मला । सिदोरीचा केला । झाडा आतां निवडेना ॥ २ ॥ भूक लागली अनंता । कां रे नणसी जाणतां । भागलों वळितां । गाई सैरा ओढाळा ॥ ३ ॥ तुका करुणा भाकी । हरि पाहे गोळा टाकी । घेतां जालों सुखी । भीतरी वांटी आणिकां ॥ ४ ॥ [३७७५]

"अवघियां दिला गोर । मजकरे पाहीना" ॥ १ ॥ फुंदे गोपाळ डोळे चोळी । ढुंगा थापली हाणे तोंडा ॥ २ ॥ आवडती थोर मोठे । मी रे पोरटें दैन्यवाणें ॥ ३ ॥ तुका म्हणे जाणों भाव । जीवींचा देव बुझावूं ॥ ४ ॥ [३७७६]

: मृदंग पाठ्या :

मागें पुढें पाहें सांभाळूनी दोनी ठाय । चुकावूनी जाय गडी राखे गडियांसी ॥ १ ॥ मुरडे दंडा दोहीं तोंडा गडियां सावध करीं । भेटतिया संगें तया हाल तुजवरी ॥ २ ॥ गडिया गडी वांटूनी देई । ज्याचा सोडी तेचि ठायीं । आगळ्या बळें करील काय । तुज देणें लागे डाय ॥ ३ ॥ नवां घरीं पाउला करीं । सांपडे तो येथें धरी । जिंकोनी डाव करीं । ठाव सत्ता आणिकांवरी ॥ ४ ॥ सांपडोनी डाई वहुकाळ गुंतलासी । बळिया गडी फळी फोडी न धरितां त्यांसी ॥ ५ ॥ झुकांडी जो खाय मिळोनी अंगीं जाय । गुंतलासी काय तुका म्हणे अझूनी ॥ ६ ॥ [३७७७]

त्याचा पाठलाग करा २. माझें पोट भरलें आणि त्यावर मी पुनः त्याचा बोभाटाहि करीत आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, गोपाळांनो, तुमच्या (प्रपंचरूपी) घरीं असे प्रकार कसले मिळणार ? ४. [३७७४]

हे देवा, तुम्ही सर्व कांहीं सर्वांना दिलें, आतां माझ्याकडे पाहा. मला व आमच्या सर्व गड्यांना मोठी आशा लागली आहे १. अरे देवा, तूं आमच्याशीं अबोला कां धरलास ? माझा भाग मला दे. मीं आपल्या पापपुण्यात्मक शिदोरीचा सर्व झाडा केला. आतां माझ्याजवळ निवडण्यासारखें कांहीं उरलें नाहीं २. अरे अनंता, आम्हांला भूक लागली आहे, हें तूं कसें जाणत नाहींस ? स्वैर धांवणाऱ्या ह्या इंद्रियरूपी गाई राखण्यानें आम्ही अगदीं दमून गेलों ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी कींवकाकुळती येत आहें व हरि माझ्याकडे काल्याचा गोळा टाकीत आहे, तो पाहून त्याचें ग्रहण केलें व त्यायोगानें सुखी झालों आणि आपल्या समुदायामध्यें तें अन्यांनाहि वांटलें ४. [३७७५]

एक बोबडा गोपाळ म्हणत आहे, कीं कृष्णानें गोड घास सर्वांना वांटला आणि तो मजकडे पाहातसुद्धां नाहीं १. असें बोलून तो गोपाळ डोळे चोळून रडत रडत हातानें आपल्या तोंडावर व ढुंगणावर थापड्या हाणूं लागला २. अरे, ह्या देवाला थोर मोठे लोक आवडतात आणि मी तर गरीबसें पोर आहें ! ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याच्या अंतःकरणांतील भाव जाणून त्याची समजूत करण्याचें देव जाणत आहे ४. [३७७६]

मागें निवृत्तीकडे पाहा व पुढें प्रवृत्तीकडेहि पाहा. अशा प्रकारें दोन्ही बाजूंचें अनुसंधान ठेवून कामादिविकार हे तुझे प्रवृत्तींतील खेळगडी, त्यांनीं जें निवृत्तींतील खेळगड्यांस रोखून ठेवलें आहे, त्यांना [प्रवृत्तींतील गड्यांना] तूं चुकवून जा १. आपल्या हद्दीवरून निवृत्ति व प्रवृत्ति ह्या दोन्ही बाजूंकडे वळून गड्यांना सावध कर. जे कोणी भेटतील, त्यांना हद्दीवर ठेवणें हें तुझें काम आहे २. प्रवृत्तींतले आणि निवृत्तींतले जे गडी आहेत, त्यांतील गड्यांस गडी अशा प्रमाणानें वांटणी करून दे, व ज्या बाजूचा जो गडी असेल त्याला त्याच ठिकाणीं सोडून दे; प्रतिपक्षी जी प्रवृत्ति तींतील गडी जर अधिक बलवान् असतील, तर तूं त्यांच्यापुढें काय करशील ? तुला त्यांना डाव दिला पाहिजे ३. नऊ इंद्रियरूपी गड्यांच्या घरांतून चाल कर. जो गडी तेथें सांपडेल त्याला तूं धर. अशा प्रकारें प्रवृत्तीचा डाव जिंकून इतर सर्वांवर आपली सत्ता चालेल असें ठिकाण कर ४. ह्या प्रवृत्तींतील गड्यांच्या तडाख्यांत तूं पुष्कळ काळ अडकून पडला आहेस. जो गडी विवेकवैराग्यांनीं बलाढ्य असतो, तो ह्या प्रवृत्तींतील गड्यांची फळी, त्यांच्या तडाख्यांत न सांपडतां, फोडतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, जो गडी ह्या प्रवृत्तींना झुकांडी देऊन जातो, तो स्वरूपीं मिळून राहातो, ह्याकरितां अजून ह्या प्रवृत्तींत (प्रपंचाच्या डावांत) गुंतून कां राहिलास ? ६. [३७७७]

आम्ही गोवळीं रानटें। नव्हों जनांतील धीटें ॥ १ ॥ सिदोरीचा करूं काला। एक वाटितों एकाला ॥ २ ॥ खेळों आपआपणाशीं। आमचीं तीं आम्हांपाशीं ॥ ३ ॥ म्हणे मिळाले नेणते। तुका कान्होबा भोंवते ॥ ४ ॥ [३७७८]

पाहा रे तमासा तुमचा येथें नव्हे लाग। देईल तो भाग आलियाचा बाहेरी ॥ १ ॥ जागा रे गोपाळांनो ठायीं ठायीं जागा। चाहुलीनें भागा दूरी (दूर) मजपासूनी ॥ २ ॥ न रिघतां ठाव आम्हां ठावा पाळतियां। भयातीत वायां तेथें काय चांचपाल ॥ ३ ॥ तुका म्हणे हातां चढे जीवाचिये साटीं। मिटक्या देतां गोड मग लागतें शेवटीं ॥ ४ ॥ [३७७९]

डाई घालूनियां पोरें। त्यांचीं गुरें चुकविलीं ॥ १ ॥ खेळ खेळतां फोडिल्या डोया। आपण होय निराळा ॥ २ ॥ मारिती माया घेती जीव। नाहीं कींव अन्यायें (अन्याया) ॥ ३ ॥ तुका कान्होबा मागें। तया अंगें कळों आलें ॥ ४ ॥ [३७८०]

आतां हेंचि जेऊं। सवें घेऊं सिदोरी ॥ १ ॥ हरिनामाचा खिचडा (खिचडी) काला। प्रेमें मोहिला साधनें ॥ २ ॥ चवीं चवीं घेऊं घास। ब्रह्मरस आवडी ॥ ३ ॥ तुका म्हणे गोड लागे। तों तों मागे रसना ॥ ४ ॥ [३७८१]

गोड अवघेंचि झालें। मागीलये भरी आलें ॥ १ ॥ साह्य झाला पांडुरंग। दिला अभ्यंतरीं संग ॥ २ ॥ थडिये पावतां तो वाव। मागें पाहातां ठाव ॥ ३ ॥ तुका म्हणे गेलें। स्वप्नींचें जागें झालें ॥ ४ ॥ [३७८२]

आम्ही गाई रक्षण करणारे रानवट आहोंत. लोकांत वागण्यासारखे धीट नाहीं १. आम्ही सर्वांच्या शिदोऱ्यांचा एके ठिकाणीं काला करून सर्वांना वांटतों २. आपापल्यामध्यें खेळूं. जी आमच्या तर्फेची मंडळी आहेत ती आम्हांला मिळतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, कान्होबाच्या सभोंवतीं सर्व नेणते भोळे गोपाळ जमले ४. [३७७८]

अहो गोपाळ हो, तुमचा ह्या ठिकाणीं रिघाव होणार नाहीं, म्हणून तुम्ही त्या देवाची गंमत पाहा. तो चोरी करून बाहेर आल्यावर तुमचा तुम्हांस वांटा देईल १. अहो गोपाळांनो, तोंपर्यंत तुम्ही आपापल्या जागीं सावधपणें राहा. मजपासून दूर असल्यावर असावधपणानें तुम्हांस फार त्रास होईल २. आम्हीं तेथें रिघाव केल्याशिवाय नुस्ते त्या ठिकाणचे पाळत घेणारे असल्यामुळें आम्हांस तें सर्व ठिकाण माहीत आहे. त्यावांचून तुम्हीं अंतरांत भय धरून त्या ठिकाणीं जाल, तर व्यर्थ चांचपीत बसाल ३. तुकाराम महाराज म्हणतात, जीवावर उदार होऊन रिघाव केला तर तें नवनीत हस्तगत होईल व अखेरीस तें मिटक्या मारून खाण्यास गोड लागेल ४. [३७७९]

ह्या देवानें अनेक प्रकारच्या खेळाच्या पेंचांत सर्वांस (अभिमानी गोपाळांस) घालून त्यांचीं इंद्रियरूपी गुरें वासरें दूर पंच विषयांच्या रानांत पळवून नेलीं १. अनेक प्रकारचे खेळ खेळत असतां अभिमानाच्या योगानें कित्येकांचीं डोकीं फोडलीं आणि तो देव आपण तर वेगळा राहिला २. ह्या अपराधानें सर्वांना माया (–रूपी आई) ही शिक्षा करून त्यांचा जीव घेते; तिच्या ठिकाणीं कांहीं दया उत्पन्न होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी ह्या कान्होबाच्या मागें सर्व काळ असतों, त्या संगानें त्याचें हें करणें माझ्या अनुभवास आलें ४. [३७८०]

आपल्या बरोबर (ध्रुवपदांत दर्शविल्याप्रमाणें) शिदोरी घेऊन आतां आम्ही हेंच भोजन करूं १. श्रीहरीचें नामस्मरण व त्याचे गुणानुवाद ह्यांचा खिचडीरूपी काला करून, त्यांत त्याच्याविषयींच्या प्रेमाचें मोहन घालूं. हेंच आमचें साधन आहे २. त्या ब्रह्मरसाचें भोजन मोठ्या प्रीतीनें करून, त्याची गोडी घेत घेत घांस घेत जाऊं ३. तुकाराम महाराज म्हणतात, तो काला जों जों गोड लागतो तों तों जिव्हा अधिक मागत आहे ४. [३७८१]

सर्व कांहीं मागें केलें, तें संचित कर्म देवास अर्पण केल्यामुळें सर्व कांहीं आतां गोड झालें १. तो पांडुरंग आम्हांस साह्य होऊन आमच्या हृदयांत राहिला, असा सर्व काळ त्यानें आम्हांस संग दिला २. एखादा कोणी महापुरांत बुडत असतां, तो पैल तीरास लागल्यावर त्याची मागील बुडालेपणाची स्थिति पाहिली असतां व्यर्थ होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, निद्रिस्तास भयंकर स्वप्न पडलें, तें जागृत झालें असतां जसें व्यर्थ होतें, तसें पांडुरंगाच्या साह्यानें माझें हित झालें ४. [३७८२]

तुजसवें येतों हरी । आम्हां लाज नाहीं तरी । उचलिला गिरी । चांग तई वांचलों ॥ १ ॥ मोडा आतां खेळ । गाई गेल्या झाला वेळ । फांकल्या ओढाळ । नाहीं तोंचि आवरा ॥ २ ॥ चांग दैवें यमुनेसी वांचलों बुडतां । निलाजिरीं आम्ही नाहीं । भय धाक या अनंता ॥ ३ ॥ खातो आगी माती । आतां पुरे हा सांगाती । भोंवतां भोंवेल । आम्हां वाटतें हें चित्तीं ॥ ४ ॥ तुका म्हणे उरी नाहीं तुजसवें । शहाणिया दुरी छंद भोळियां सवें (भावें) ॥ ५ ॥ [३७८३]

नको आम्हांसवें गोपाळा । येऊं ओढाळा तुझ्या गाई ॥ १ ॥ कोण धांवे त्यांच्या लागें । मागें मागें येरझारी ॥ २ ॥ न बैसती एके ठायीं । धांवती दाही दाहा वाटां ॥ ३ ॥ तुका म्हणे तूं राख मनेरी । मग त्या येरी आम्ही जाणों ॥ ४ ॥ [३७८४]

मागायास गेलों सिदोरी । तुझ्या मायाघरीं गांजियेलों ॥ १ ॥ तुजविणें ते नेदी कोणा । सांगतां खूणा जिवें गेलों ॥ २ ॥ वायांविण केली येरझार । आतां पुरे घर तुझी माया ॥ ३ ॥ तुका म्हणे तूं आम्हां वेगळा । राहें गोपाळा म्हणऊनी ॥ ४ ॥ [३७८५]

काकुलती येतो हरी । क्षणभरी निवडितां ॥ १ ॥ तुमची मज लागली सवे । ठायींचे नवे नव्हों गडी ॥ २ ॥ आणीक बोलाविती फार । बहु थोर नावडती ॥ ३ ॥ भाविकें त्यांची आवडी मोटी । तुका म्हणे मिठी घाली जिवें ॥ ४ ॥ [३७८६]

वरता वेंघोनी घातली उडी । कळंबावुडीं यमुनेसी ॥ १ ॥ हरि बुडाला बोंब घाला । घरचीं त्याला ठावा नाहीं ॥ २ ॥ भवनदीचा न कळे पार । काळिया माजी थोर विखार ॥ ३ ॥ तुका म्हणे काय वाउग्या हाका । हातींचा गमावुनियां थिंका ॥ ४ ॥ [३७८७]

हे हरि, आम्हांला लाज नाहीं, म्हणून आम्ही तुझ्याबरोबर येतों. ज्या वेळेस इंद्रानें मुसळधारांनीं पर्जन्यवृष्टि केली त्या वेळीं तूं गोवर्धन पर्वत उचललास म्हणून आम्ही वांचलों १. आतां खेळ मोडा, कारण वेळ झाला व गाई गेल्या. जोंपर्यंत त्या गाईंची पांगापांग झाली नाहीं, तोंपर्यंत त्यांना आंवरा २. दैवाच्या योगानें आम्ही यमुनेंत बुडत असतां वांचलों. आम्ही निलाजरीं आहोंत. ह्या अनंताला कांहीं भय व धाक नाहीं ३. हा देव अग्नि व माती खातो, आतां ह्याची संगति पुरे, कारण आसमंत भागांत हा ताप देईल असें आमच्या चित्तांत येतें ४. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्याबरोबर आम्हांला पुरें पडवत नाहीं. शहाण्यापासून दूर असावें व भोळ्याच्या नादानें असावें (किंवा, तूं शहाण्याला दूर करतोस व भोळ्याभाविकांचा मात्र तूं छंद लावून घेतोस) ५. [३७८३]

कृष्ण म्हणाला, हे गोपाळा, तूं आमच्या बरोबर मोक्षरूपी रानांत येऊं नको. तुझ्या गाई स्वैर धांवणाऱ्या आहेत १. त्यांच्यामागें धांवण्याच्या येरझारा कोणीं कराव्यात? २. तुझ्या दश इंद्रियरूपी गाई, ह्या एके ठिकाणीं न बसतां, दहा वाटांनी धांवतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या मनरूपी गाईचें तूं रक्षण कर, मग बाकीच्यांची व्यवस्था आम्ही पाहून घेऊं ४. [३७८४]

तुझ्या घरीं शिदोरी मागण्याकरितां गेलों, तों तुझ्या मायेनें फार गांजिलें १. तुझ्यावांचून ती कोणाला कांहीं देईना, तुझ्या स्वरूपाच्या कांहीं खुणा तिला सांगावयास गेलों, तों जीवदशाच गलित झाली. व्यर्थ येण्याजाण्याचा शीण झाला. तुझ्या मायेचें घर नको ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे गोपाळा, तूं आमच्या पासून निराळा राहिलास म्हणून हे आम्हांला हेलपाटे बसतात ४. [३७८५]

हरीला आम्हीं जर क्षणभर वेगळें केलें, तर तो कींवकाकुळतीला येतो १. तो म्हणतो, कीं तुमची मला संवय लागली आहे. तुम्ही मूळचेच आमचे गडी आहांत, नवे नाहींत २. दुसरे मोठमोठे त्याला बोलावतात, पण ते त्याला फार आवडत नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, जीं परम भाविक आहेत, तीं त्याला फार आवडतात, म्हणून देव जीवानें (मनापासून) त्यांना मिठी मारतो ४. [३७८६]

यमुनेच्या तीरावरील कळंबाच्या झाडावर चढून खालीं यमुनेंत हरीनें उडी घातली व बुडी मारली १. अरे, हरि बुडाला म्हणून आरडाओरड करा, कारण जीं घरीं आहेत त्यांना हें ठाऊक नाहीं २. ह्या (भवनदीचा) यमुना नदीचा अंत लागत नाहीं व आंतमध्यें मोठा विखारी कालिया सर्प आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हातच्या हरीला गमावून व्यर्थ कां हांका मारतां व रडत बसतां ? ४. [३७८७]

अवघीं मिळोनि कोल्हाळ केला । आतां होता म्हणती गेला ॥ १ ॥ आपुलाल्या रडती भावें । जयासवें जयापरी ॥ २ ॥ चुकलों आम्ही खेळतां खेळ । गेला गोपाळ हातींचा ॥ ३ ॥ तुका म्हणे धांवती थडी । न घाली उडी आंत कोणी ॥ ४ ॥ [३७८८]

भ्यालीं जिवा चुकलीं देवा । नाहीं ठावा जवळी तो ॥ १ ॥ आहा कटा करिती हाय । हात डोकें (डोकीं) पिटिती पाय ॥ २ ॥ जवळी होता न कळे आम्हां । गेल्या सीमा नाहीं दुःखा ॥ ३ ॥ तुका म्हणे हा लाघवी मोठा । पाहे खोटा खरा भाव ॥ ४ ॥ [३७८९]

काळिया नाथूनी आला वरी । पैल हरी दाखविती ॥ १ ॥ दुसरिया भावें न कळे कोणा । होय नव्हेसा संदेह मना ॥ २ ॥ रूपा भिन्न पालट झाला । गोरें सांवळेंसा पैं देखिला ॥ ३ ॥ आश्वासीत आला करें । तुका खरें म्हणे देव ॥ ४ ॥ [३७९०]

हरि गोपाळांसवें सकळां । भेटे गळ्या गळा मेळवूनी ॥ १ ॥ भाविकें त्यांची आवडी मोटी । सांगे गोष्टी जीवींचिया ॥ २ ॥ योगियांच्या ध्याना नये । भाकरी त्यांच्या मागोनी खाये ॥ ३ ॥ तुका म्हणे असे शहाणियां दुरी । बोबडियां दास (दासां) हाका मारी ॥ ४ ॥ [३७९१]

धांव कान्होबा गेल्या गाई । न म्हणे मी कोणा काई ॥ १ ॥ आपुलियांचें वचन देवा । गोड सेवा करीतसे ॥ २ ॥ मागतां आधीं द्यावा डाव । बळिया मी तों नाहीं भाव ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐशा सवें । अनुसरावें जीवें भावें ॥ ४ ॥ [३७९२]

आणीक (आणीकें) काय थोडीं । परि तीं फार खोटीं कुडीं ॥ १ ॥ सदा मोकळींच गुरें ।

सर्व गोपाळांनीं मिळून गोंगाट केला व आतां इतक्यांत देव होता तो गेला, असें ते म्हणाले १. ज्यांच्या ठिकाणीं जशी भावना होती, त्याप्रमाणें ते रडूं लागले २. आम्ही खेळ खेळण्यामध्यें चुकलों म्हणून आमच्या हातचा गोपाळ गेला ३. तुकाराम महाराज म्हणतात, ते कांठावरच धांवूं लागले, परंतु कोणाची यमुनेंत उडी घालण्याची छाती होईना ४. [३७८८]

ते गोपाळ आपल्या जीवाला भ्याले, म्हणून जवळ असलेल्या हरीस मुकले. तो त्यांना कळेना १. सर्व जण हाय हाय करूं लागले व हातपाय आपटून डोकें बडवूं लागले २. आमच्या जवळ असून तो आम्हांला दिसेना. आतां तो गेल्यामुळें निस्सीम दुःख होत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव हा मोठा लाघवी आहे. तो आपणाविषयीं कोणाचा खरा व खोटा भाव आहे, तो जाणतो ४. [३७८९]

कालिया सर्पाचें मर्दन करून हरि हा वरतीं आला. त्या वेळीं सर्व गोपाळ म्हणूं लागले, कीं हा पाहा हरि पलीकडे आला आहे १. जो द्वैतभावानें कोणाला कळत नाहीं तो हरि आहे किंवा नाहीं अशा संशयांत त्यांचें मन पडलें २. त्या वेळीं हरीच्या रूपामध्यें किंचित् बदल झाला. तो कांहीं गोरा व कांहीं सांवळा असा त्यांनीं पाहिला ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव हा त्या सर्वांना आश्वासन देऊन तो खरोखर त्यांच्या जवळ आला ४. [३७९०]

हरीनें सर्व गोपाळांच्या गळ्याला गळा लावून आलिंगन दिलें १. कारण त्या देवाला भाविक भक्तांची फार प्रीति आहे, म्हणून तो आपल्या जीवांतील गुह्य गोष्टी त्यांना सांगूं लागला २. जो योगियांच्याहि ध्यानांत प्रगट होत नाहीं, तो देव गोपाळांच्या भाकरी मागून खातो ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या कोणाला शहाणपणाचा फुंज आहे त्यांच्यापासून देव दूर राहातो व बोबड्यांचा दास होऊन त्यांस हांका मारतो ४. [३७९१]

हे कान्होबा, गाई दूर गेल्या, तूं धांव घे. 'मी कोण आहें? मला असलें काम कसें सांगतोस,' असें तो कान्होबा कधीं म्हणत नसे १. देवाला आपल्या भक्तांचें वचन मोठें प्रिय आहे, म्हणून तो त्यांची सेवा करतो २. गोपाळांनीं आधीं डाव मागितला तर त्यानें तो त्यांना द्यावा, पण मी बलाढ्य आहें, त्यांना आधीं डाव कसा द्यावा, ही भावना देवामध्यें नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशा देवाला जीवाभावानें शरण जावें ४. [३७९२]

जगांत इतर गवळ्यांचीं पोरें काय थोडीं आहेत? पण तीं फार खोट्या व वाईट बुद्धीचीं अशीं आहेत १.

होती फजीत तीं पोरें ॥ २ ॥ सदा घालिती हूंबगी । एक एकाचें न करी ॥ ३ ॥ तुका म्हणे घरीं । माय वेळोवेळां मारी ॥ ४ ॥ [३७९३]

बहुतांचे संगतीं । बहु पावलों फजिती ॥ १ ॥ बरें केलें नंदबाळें । मागिलांचें तोंड काळें ॥ २ ॥ माझा करितील तंटा । लपती आलिया बोभाटा ॥ ३ ॥ तुका म्हणे काई । किती म्हणों बाप आई ॥ ४ ॥ [३७९४]

: गौळणी :

गाईन ते लीळा चरित्र पवाडे । राखिले संवगडे सहित गाई ॥ १ ॥ चोरिलें नवनीत बांधविला गळा । जे तुम्ही गोपाळा छंद केले ॥ २ ॥ मोहिल्या गोपिका पांवयाच्या छंदें । केली ते गोविंदें क्रीडा गाऊं ॥ ३ ॥ मायबापा लाड दाखविलें कौतुक । तें या आणूं सुख अंतरासी ॥ ४ ॥ निर्दाळिले दुष्ट भक्तां प्रतिपाळी । ऐसा म्हणे बळी आमुचा स्वामी ॥ ५ ॥ तुका म्हणे सरसीं असों येणें बोधें । लागोनी संबंधें सर्व काळ ॥ ६ ॥ [३७९५]

: गौळणींचे अभंग :

विचार करिती बैसोनि गौळणी । ज्या कृष्णकामिनी कामातुरा ॥ १ ॥ एकांतीं एकल्या एकाच सुखाच्या । आवडती त्यांच्या गोष्टी त्याला ॥ २ ॥ तर्कवितर्किणी दुराविल्या दुरी । मौन त्या परिचारी (परि चोरी) आरंभिलें(ली) ॥ ३ ॥ कुशळा कवित्या कथित्या लोभिका । त्याही येथें नका आम्हांपाशीं ॥ ४ ॥ बोलक्या वाचाळा कृष्णरता नाहीं । त्या चोरोनी तिंहीं खेट केली ॥ ५ ॥ भेऊनियां जना

ज्यांचीं इंद्रियरूपीं गुरें सर्व काळ मोकळीं आहेत, तीं पोरें फजीत पावतील २. सदा सर्व काळ अहं अहं अशी हुंबरीच घालीत राहातात. एकासारखे एक वागत नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, असल्या पोरांना घरीं मायारूपी माय (आई) वेळोवेळीं मारते ४. [३७९३]

आजपर्यंत अनेकांच्या (स्त्री, पुत्र आणि लोक ह्यांच्या) संगतीनें पुष्कळ फजीत पावलों १. पण नंदाच्या मुलानें आमचा अंगीकार केला, हें चांगलें झालें. त्या योगानें पूर्वीच्या सर्व विकारांचें (फजितीचें) तोंड काळें झालें २. ते माझ्या सोबतीचे गडी माझेंच गाऱ्हाणें सांगून भांडण करितात आणि त्यांचा कांहीं बोभाटा आल्यास लपून बसतात ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां त्या लौकिक आईबापांना आईबाप असें किती म्हणावें? खरा आईबाप हा श्रीकृष्णच आहे ४. [३७९४]

आपल्या गड्याबरोबर गाईंचें रक्षण केलें, अशा प्रकारची तुमची लीला अथवा चरित्र जें कांहीं आहे, त्याचें मी वर्णन करीन १. आणि लोणी चोरलेंत, आपला गळा बांधून घेतलात, अशा प्रकारें हे गोपाळा, तुम्हीं जी कांहीं क्रीडा केलीत त्याचें आम्ही वर्णन करूं २. आपल्या वेणूच्या सुस्वर नादानें गोपिकांना मोहित केलें, अशा प्रकारें गोविंदानें जी जी म्हणून क्रीडा केली, तिचें आम्ही वर्णन करूं ३. हे देवा, आई-बापांना लाडानें तुम्हीं जें विश्वरूपदर्शनाचें कौतुक दाखविलेंत, त्या सुखाचा आम्ही आपल्या अंतःकरणांत विचार करूं ४. ज्यानें दुष्टांचा संहार करून भक्तांचा सांभाळ केला, अशा प्रकारचा जो बलाढ्य देव तो आमचा मालक आहे असें म्हणूं ५. तुकाराम महाराज म्हणतात, त्या बोधानेंच आम्ही श्रीहरीशीं ऐक्यरूप संबंध करून सर्व काल त्याच्या सन्निध राहूं ६. [३७९५]

गौळणींबरोबर रासक्रीडा करतेवेळीं देव एकाएकीं गुप्त झाल्यामुळें, ज्या कृष्णाच्या कामानें कामातुर होत्या, त्या एका ठिकाणीं जमून विचार करूं लागल्या १. एका कृष्णाचें सुख भोगणाऱ्या गौळणी एकांतीं मिळाल्या आणि एकमेकींस बोलूं लागल्या, त्या त्यांच्या गोष्टी त्यांनाच आवडत आहेत २. तर्ककुतर्कानें वितंडवाद करणाऱ्यांना दूर घालवून त्यांच्याशीं भाषण न करितां, त्यांना चोरून, ह्या एका ठिकाणीं जमल्या आहेत ३. चतुरपणानें कवित्व करून कथा करणाऱ्या व ज्या धनाच्या लोभी आहेत त्यांनीं आमच्याजवळ येऊं नये, अशा त्या एका अनुभवाच्या गौळणी म्हणूं लागल्या ४. पुष्कळ वाचाळपणानें बडबडणाऱ्या व ज्या कृष्णाचे ठिकाणीं रत नाहींत त्यांना चोरून, ह्या एका अनुभवाच्यांनीं (अनुभवी

एकीसवा जाल्या । वाती विझविल्या दाटो बळें ॥ ६ ॥ कृष्णसुख नाहीं कळलें मानसीं । निंदिती त्या त्यांसी कृष्णरता ॥ ७ ॥ तो नये जवळी देखोनि कोल्हाळ । म्हणउनि समेळ मेळविला ॥ ८ ॥ अंतरीं कोमळा बाहेरी निर्मळा । तल्लीन त्या बाळा कृष्णध्यानीं ॥ ९ ॥ हरिरूपीं दृष्टि कानीं त्याची (त्याच) गोष्टी । आळंगिती कंठीं एका-एकी ॥ १० ॥ न साहे वियोग करिती रोदना । भ्रमिष्ट भावना देहाचिया ॥ ११ ॥ विसरल्या मागें गृह सुत पती । अवस्था या चित्तीं (याचिती) गोविंदाची ॥ १२ ॥ अवस्था लागोनी निवळचि ठेल्या । एका एकी जाल्या कृष्णरूपा ॥ १३ ॥ कृष्ण म्हणोनियां देती आलिंगन । विरहताप तेणें निवारेना ॥ १४ ॥ ताप कोण वारी गोविंदावांचूनी । साच तो नयनीं न देखतां ॥ १५ ॥ न देखतां त्यांचा प्राण रिघों पाहे । आजी कामा सये उसिर केला (जाला) ॥ १६ ॥ रित्या ज्ञान गोष्टी तयां नावडती । आलिंगनप्रीति कृष्णाचिया ॥ १७ ॥ मागें आम्ही कांहीं चुकलों त्याची सेवा । असेल या देवा राग आला ॥ १८ ॥ आठविती मागें पापपुण्यदोष । परिहार एकीस एक देती ॥ १९ ॥ अनुतापें जाल्या संतप्त त्या बाळा । टाकिती विव्हळा धरणीं अंग ॥ २० ॥ जाणोनि चरित्र जवळीच होता । आली त्या अनंता कृपा मग ॥ २१ ॥ होऊनि प्रगट दाखविलें रूप । तापत्रयताप निवविले ॥ २२ ॥ निवालिया देखोनी कृष्णाचें श्रीमुख । शोक मोह दुःख दुरावला ॥ २३ ॥ साच भाव त्यांचा आणूनियां मना । आळंगितो राणा वैकुंठींचा ॥ २४ ॥ हरिअंगसंगें हरिरूप जाल्या । बोलों विसरल्या तया सुखा ॥ २५ ॥ व्यभिचारभावें भोगिलें अनंता । वर्तोनी असतां घराचारी ॥ २६ ॥ सकळां चोरोनी हरि जयां चित्तीं । धन्य त्या नांदती तयामध्यें ॥ २७ ॥ उणेंपुरें त्यांचें पडों नेदी कांहीं । राखे सर्वां ठायीं देव तयां ॥ २८ ॥ न कळे लाघव ब्रह्मादिकां

भक्त भाविक गौळणींनीं) पंगत केली ५. अशा ह्या जनाला भिऊन त्या एका बाजूला बसल्या व त्यांनीं मुद्दाम दिवे मालविले (म्हणजे त्यांनीं आपली वृत्ति निग्रहानें जनांकडून श्रीहरीकडे वळविली) ६. ज्यांना कृष्णाचें सुख माहीत नाहीं, त्यांस कृष्णसुखाच्या अनुभवी गवळणी धिःकारितात ७. कारण तर्कटपणानें बाजार भरविणाऱ्याजवळ देव येत नाहीं. म्हणून एका सुखाच्या अनुभवी एके ठिकाणीं जमल्या ८. त्यांचें अंतर कोंवळें व त्या बाहेर निर्मळ असून कृष्णाच्या ध्यानानें त्या तलीन झाल्या आहेत ९. त्यांची दृष्टि श्रीहरीच्या रूपावर जडली आहे. त्या कानानें त्याची कीर्ति ऐकितात आणि कृष्णाच्या गळ्याला गळा लावून आलिंगन देतात १०. अशा त्या गौळणी कृष्णाचा वियोग झाल्यामुळें दुःख वाटून रडूं लागल्या आणि त्या आपल्या देहाची स्मृति विसरल्या ११. आपलें घरदार, भ्रतार, मुलें वगैरे गोत टाकून एका कृष्णाचीच तळमळ लागून त्या रानांत आल्या आहेत १२. अशी तळमळ लागून त्या वेधानें सर्व गौळणी एकदम कृष्णरूप झाल्या १३. मग एकमेकींत कृष्णरूप पाहूं लागल्यामुळें त्या एकमेकींस आलिंगन देऊं लागल्या, पण त्यांचा त्या योगानें कामज्वर शांत होईनासा झाला १४. कृष्णास डोळ्यांनीं खरोखर पाहिल्यावांचून त्यांचा कामज्वर कोण निवारण करील ? १५. एका कृष्णास पाहिल्यावांचून त्यांचा प्राण जाऊं पाहात आहे. मग त्या एकमेकींस म्हणतात, अगेबाई, आज कृष्णानें कां बरें उशीर केला ? १६. एका कृष्णावांचून पोकळ शब्दज्ञानाच्या गोष्टी त्यांना आवडत नाहींत. एका कृष्णासच आलिंगन द्यावें हीच त्यांची आवड आहे १७. मग त्या एकमेकींस म्हणतात, कीं आम्ही कांहीं कृष्णाची सेवा चुकलों कीं काय, म्हणून त्यास राग आला असावा १८. त्याप्रमाणें पूर्वीं केलेल्या पापपुण्याचा आठव करून एकमेकींना परिहार देऊं (सांगूं) लागल्या (क्षमा मागूं लागल्या, पुनः असें करणार नाहीं असें म्हणूं लागल्या) १९. असा त्यांना पश्चात्ताप होऊन अतिशय दुःखानें त्यांनीं आपलें अंग धरणीवर टाकलें २०. ही सर्व हकीगत देवाला समजली, कारण तो जवळच होता. मग गवळणींचें दुःख पाहून त्याला दया उत्पन्न झाली २१. मग देवानें प्रगट होऊन आपलें रूप गोपींस दाखविलें व त्यांचे त्रिविध ताप शांत केले २२. मग त्या कृष्णाचें श्रीमुख पाहून आनंदरूप झाल्या व त्यांचीं शोकमोहादि दुःखें नाहींशीं झालीं २३. त्या गोपींचा खरा भाव समजून वैकुंठवासी देवानें त्यांना आलिंगन दिलें २४. श्रीहरीच्या अंगसंगानें त्या गवळणी हरिरूप झाल्या व त्यांना जें सुख झालें, तें त्यांना सांगतां येईना २५. ह्याप्रमाणें संसारांत वर्तन करून कामनिक भावानें कृष्णरायाचें सुख त्यांनीं भोगिलें २६. योग्यादिकांच्या ध्यानांत न जातां सर्वांला चोरून गोपींच्या चित्तामध्यें श्रीहरीची वसती आहे व त्या गवळणी कृष्णरूपामध्येंच जडल्या आहेत, अशा त्या धन्य झाल्या २७. हा देव गोपींस कांहीं उणें पडूं देत नाहीं. असें सर्व ठिकाणीं त्यांचें रक्षण करितो २८. ज्या देवाची लीला

माव । भक्तिभावें देव केला तैसा ॥ २९ ॥ तुका म्हणे त्यांचा धन्य व्यभिचार । साधिलें अपार निजसुख ॥ ३० ॥ [३७९६]

स्वयें सुखाचे झाले अनुभव । एक एकीपाशीं सांगतील भाव । अवघ्यां अवघा हा कैसा नवलाव । सर्वसाक्षी तेथेंचि त्यांचा जीव वो ॥ १ ॥ आपआपणांशीं करिती नवल । परि वादावाद न संडिती बोल । एका मेघश्यामें जलधरें वोल । रसीं उताविळ हृदय सखोल वो ॥ २ ॥ एक विषय तो सकळांचा हरि । त्याच्या आवडीनें आवडी इतरीं । अंध बहिरे हे प्रेत लोकाचारी । त्यांची कीर्ति गाइली पुराणांतरीं वो ॥ ३ ॥ स्तुति पराविया मुखें रुचिकर । प्रीतिपात्राच्या(चा) गौरवीं आदर । परस्परें हें सादरा सादर । योग सज्जनाच्या सुखा नाहीं पार वो ॥ ४ ॥ भक्तिवालभ न तुटे चराचरीं । आप्त अनाप्त हे ऐशी नाहीं उरी । दुरी जवळी संचिता ऐसें धरी । रंगा रंगा ऐसें होणें लागे हरी वो ॥ ५ ॥ तुका लाधला हें उच्छिष्ट भोजन । आला बाहेरी प्रेमें वोसंडून । कानीं पडिलें त्या जीवाचें जतन । धरियेले (धरी) एका भावें हृदयीं चरण वो ॥ ६ ॥ [३७९७]

आजी कां वो तूं दिससी दुश्चित्ती । म्हणिये काम न लगे तुझ्या चित्तीं । दिलें ठेवूं तें विसरसी हातीं । नेणों काय बैसला हरि चित्तीं वो ॥ १ ॥ सर सर परती झालीस आतां भांड । कैसें दाखविसी जगासी या तोंड । व्याली माय ते लाजविली रांड । नाहीं थार (थारा) दो ठायीं जाला खंड वो ॥ २ ॥ होतें तैसें तें उमटलें वरी । बाह्य संपादणी अंतरींची चोरी । नाहीं मर्यादा निःसंग

ब्रह्मादिकांस समजत नाहीं, तो देव भक्तिभावानें गोपींनीं आपलासा केला २९. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याप्रमाणें श्रीहरीचें सुख त्या गोपींना अगणित प्राप्त झालें, म्हणून त्यांचा व्यभिचार धन्य आहे ३०. [३७९६]

निजसुखाचे अनुभव स्वतःला आले, ते भाव त्या गौळणी एकमेकींपाशीं वर्णन करून सांगतात. तें असें, कीं हा कृष्ण अनेक रूपें धारण करून सर्व गोपिकांचे मनोरथ पूर्ण करतो. हा नवलाव (आश्चर्याचा विषय) ह्याचा कसा असेल ? असें सांगून सर्वसाक्षी जो देव त्याच्याच ठिकाणीं त्या गौळणींचा जीव लागला आहे १. ह्याप्रमाणें आपापल्या ठिकाणीं नवलाव (आश्चर्य) मानतात, पण तें सुख वर्णन करण्याविषयींच्या वादावादांचें बोलणें त्या सोडीत नाहींत आणि एका मेघःशामाच्या कळवळ्यारूपी मेघाचा ओलावा त्यांच्या अंतःकरणाच्या ठिकाणीं आहे. तें अंतःकरण सखोल होऊन त्या प्रीतीचा रस त्यांत भरण्याविषयीं त्या उतावळ्या झाल्या आहेत व त्यांनीं आपलें मन गंभीर केलें आहे २. सर्व गोपींचा विषय एक हरिच आहे. त्याच्या प्रीतीनें इतर वस्तूंवर त्या प्रीति करितात. लौकिकामध्यें त्या गोपी हरीवांचून कांहीं न पाहाणाऱ्या (अंध), कान असून न ऐकणाऱ्या (बधिर) अशा प्रेतरूप झाल्या आहेत, पण त्यांची कीर्ति पुराणांनीं वर्णन केली आहे ३. आपणास आवडल्या वस्तूची स्तुति दुसऱ्याच्या मुखानें गोड लागते, कारण ज्याच्या ठिकाणीं आपली प्रीति आहे त्याचाच गौरव वाढावा, अशी आवड असते. ह्याविषयीं त्या गोपी एकमेकींमध्यें परस्परें आपापलें सुख सांगण्यास परस्पर तत्पर होत्या, अशा त्या संयोगजन्य सज्जनांच्या सुखाचा अंतपार लागत नाहीं ४. अशी ही आवडीची भक्ति चराचरामध्यें खंडत नाहीं व त्यांच्या ठिकाणीं आपपरपणाची उरी उरत नाहीं. श्रीकृष्ण त्यांना, दूर अथवा जवळ त्यांच्या संचित कर्माप्रमाणें ठेवतात आणि ज्यांच्या अंतःकरणामध्यें जो रंग असेल, त्या त्या रंगाप्रमाणें हरीला व्हावें लागतें ५. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांच्या संवादरूपी उच्छिष्टप्रसादाचें भोजन मला मिळालें, त्या प्रेमाचा पूर माझ्या अंतरांत ओसंडून बाहेर आला. त्यामध्यें जीव विरावयाचा, पण त्या गोपींच्या सुखाचे शब्द कानानें ऐकल्याबरोबर जतन झाला आणि एकभावानें श्रीकृष्णरायाचे चरण मी हृदयांत धरून राहिलों ६. [३७९७]

सासू सुनेला म्हणते, आज तूं अशी उदास कां दिसतेस? सांगितलेलें काम करणें तुझ्या चित्तांत येत नाहीं. जें तुझ्याहातीं ठेवावयाला सांगितलें आहे, तें तूं विसरतेस. तुझ्या चित्तामध्यें हरि बसला आहे कीं काय न कळे १. आतां तूं दूर हो, कारण तूं बेशरमी झालीस. ह्या लोकांना आतां तूं कशी तोंड दाखविशील ? ज्या आईनें जन्म दिला, त्या रांडेला तूं लाज लावलीस. आतां तुला माहेरीं व सासरीं त्या दोन्ही ठिकाणीं आधार नाहीं. दोन्हीहि ठिकाणचा तुझा संबंध सुटला २. जी तुझ्या अंतःकरणाची स्थिति होती, ती लपवून तूं बाह्य लौकिक व्यवहार दाखवीत होतीस; पण तुझ्या अंतःकरणांत जें होतें, तेंच आतां बाहेर प्रगट झालें. तुला आतां मर्यादा राहिली नाहीं. तूं निःसंग झालीस. तुझें मन

बावरी । मन हें गोविंदीं देह काम करी वो ॥ ३ ॥ नाहीं करीत उत्तर कोणासवें । पराधीन भोजन दिलें खावें । नाहीं अचळ सांवरावा ठावें । देखो उदासीन तुझे गे देहभावें (-भाव) वो ॥ ४ ॥ कोटें नेणों हा फावला एकांत । सदा किलकिल भोंवतीं बहुत । दोघां एकवट बोलावया मात । नाहीं लाज धरिली दिला हात वो ॥ ५ ॥ करी कवतुक खेळ खेळे कान्हा । दावी लाघव भांडवी सासुसुना । पराभक्ति हे शुद्ध तुम्ही जाणा । तुका म्हणे ऐसें कळों यावें या जना वो ॥ ६ ॥ [३७९८]

भरिला उलंडूनी रिता करी घट । मीस पाणियाचें गोविंदाची चट ॥ चाले झडझडां उसंतूनी वाट । पाहे पाळतूनी उभा तोचि नीट वो ॥ १ ॥ चाळा लावियेला गोपगोपीनाथें । जाणे आवडीचें रूप जेथें तेथें ॥ दावी बहुतांच्या बहुवेषपंथें । गुणातीत खेळ मांडियेला येथें वो ॥ २ ॥ मनीं आवड तें करावें उत्तर । कांहीं निमित्ताचा पाहोनी आधार । उगा राहे कां मारिसी कंकर । मात वाटविसी उत्तरा उत्तर वो ॥ ३ ॥ धरिली खोडी दे टाकोनियां मागें । न ये विनोद हा कामा मशीं संगें । मिटी घालीन या जीवाचिया त्यागें । नव्हती ठाउकीं पडिलीं तुझीं सोंगें रे (वो) ॥ ४ ॥ सुख अंतरींचें वाह्य ठसठसी । म्हणे विनोद हा काय सोंग यासी । तुज मज काय सोयरीक ऐसी । नंदानंदन या थोरपणें जासी रे (वो) ॥ ५ ॥ करी कारण तें कळों नेदी कोणा । सुख अंतरींचें वाह्य रंग जाणा (जना) । मन मिनलें रे तुका म्हणे मना । भोग अंतरींचा पावे नारायणा वो ॥ ६ ॥ [३७९९]

आजी नवल मी आलें येणें रानें । भेटी अवचिती नंदाचिया कान्हें । गोष्टी सांगती वो सकळही जन । होतें संचित आणियेलें तेणें वो ॥ १ ॥ गेलें होऊनी न चले आतां कांहीं । साद

गोविंदाच्या ठिकाणीं असून केवळ देहाचा प्रापंचिक व्यवहार चालला आहे ३. तूं कोणाच्या बरोबर बोलत नाहींस, प्रारब्धाच्या योगेंकरून जे कांहीं सुखदुःखादि भोग प्राप्त होतील ते तूं भोगतेस. तुला देहाहंकाराचें वस्त्र सांवरण्याचें ठाऊक नाहीं, तूं देहभावानें उदासीन आहेस ४. तुझ्या सभोंवतीं अतिशय गलबला आहे, तरी तुला हरीशीं एकांतीं भाषण करण्यास सवड कोठें मिळाली, हें कळत नाहीं. तूं त्याविषयीं लज्जा न धरतां हरीच्या हातांत हात दिलास ५. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें कौतुकाचे खेळ करून कृष्ण खेळत आहे. सासू-सुनांचें भांडण लावून लाघव दाखवितो. ह्या कर्तव्यास ज्ञानरूप शुद्धभक्ति असें म्हणावें. हा प्रकार सर्वत्र लोकांस समजून यावा म्हणूनच श्रीहरीनें हें लाघव केलें ६. [३७९८]

कृष्णदर्शनाच्या लालसेनें पाण्यानें भरलेल्या घागरी सुनांनीं ओतून सास्वांजवळ पाणी आणण्याचें निमित्त करून त्वरेनें कृष्णाकडे जाण्याचा मार्ग धरला आणि पाळत ठेवून पाहूं लागल्या तों देव नीट उभा आहे, असें त्यांना दिसलें १. गोपाळ व गोपी ह्यांच्या स्वामीनें आपल्या विषयींचा छंद त्यांना लाविला, त्या ठिकाणीं आपल्या विषयींची आवड तो जाणतो व बहुतांचा वेष अनेक प्रकारच्या वाटेवर दाखवितो. अशा प्रकारचा त्रिगुणांतील खेळ ह्यानें ह्या ठिकाणीं (गोकुळांत) मांडला आहे २. कांहीं तरी निमित्ताच्या आधारानें कृष्णाबरोबर भाषण करावें अशी आवडी त्या गोपींच्या मनांत उत्पन्न झाल्यामुळें त्यांतील एक गौळण त्यास म्हणूं लागली, कीं अरे, तूं खडे कां मारतोस ? उगीच राहा, माझ्याशीं भाषण करून बोलण्यानें बोलणें कां वाढवितोस ? ३. असली खोड तूं धरली आहेस ती टाकून दे. माझ्याशीं मस्करी करणें, तें माझ्या उपयोगी पडणार नाहीं. मी आपला जीव देऊन तुला कवळून धरीन. अरे कृष्णा, असलीं तुझीं सोंगें आजपर्यंत मला माहीत नव्हतीं ४. त्या गोपींच्या अंतरांत कृष्णसंगाचें सुख बाणलें असून ते उद्गार बाहेर पडतात. आणखी ती म्हणते, कीं असला विनोद आम्हां मुलींबरोबर तूं काय म्हणून करतोस ? तूं नंदाचा मुलगा आहेस, ह्या श्रीमंतीच्या जोरावर जातोस कीं काय ? अरे, तुझी माझी (पति-पत्नीची) सोयरीक व्हावयाची आहे काय ? ५. तुकाराम महाराज म्हणतात, हा कृष्ण जें काम करतो, तें कोणास समजूं देत नाहीं. त्या गोपींच्या अंतरांत तर सुख वाटतें आणि बाह्यात्कारी लौकिक संपादण्यास्तव त्या हे रंग दाखवितात, पण त्या उभयतांचें मन एक झाल्यामुळें गोपींच्या अंतःकरणांतील (सुखदुःखांचे) सर्व भोग नारायणाचे ठिकाणीं पावतात. [३७९९]

ह्या मनुष्यदेहरूपी रानांत मी आलें हें मोठें नवल झालें, कारण ह्या ठिकाणीं अनेक प्रकारची गुंती आहे, असें लोक सांगत असून नंदाचा मुलगा जो कृष्ण, त्याची मला भेट अवचित झाली. ह्याविषयीं माझें कांहीं पूर्वसंचित होतें त्यानें मला ह्या ठिकाणीं पोहोंचविलें १. ही गोष्ट होऊन गेली; आतां तीस दुसरा उपाय कांहीं चालत नाहीं, दुसऱ्या

घालितां जवळी दुजें नाहीं । अंगीं जडला मग उरलें तें कायी । आतां राखतां गुमान भलें बाई वो ॥ २ ॥ बहुत कामें मज नाहीं आराणूक । एक सारितां तों पुढें उभें एक । आजी मी टाकोनी आलें सकळीक । तंव रचिलें आणीक कवतुक वो ॥ ३ ॥ चिंता करितां हरिली नारायणें । अंगसंगें मिनतां दोघेंजणें । सुखें निर्भर जालियें त्याच्या गुणें । तुका म्हणे खुंटलें येणें जाणें वो ॥ ४ ॥ [३८००]

मैं भुली घरजानी बाट । गोरस बेचन आयें हाट ॥ १ ॥ कान्हा रे मनमोहन लाल । सबही बिसरूं देखें गोपाळ ॥ २ ॥ काहां पग डारूं देख आनेरा । देखे तों सब वोहिंने घेरा ॥ ३ ॥ हुं तो थकित भैरे (भईरे) तुका । भागा रे सब मनका धोका ॥ ४ ॥ [३८०१]

हरिबिन रहियां न जाये जिहिरा । कबकी टाडी देखें राहा ॥ १ ॥ क्या मेरे लाल कवन चुकी भई । क्या मोहिपासिती बेर लगाई ॥ २ ॥ कोई सखी हरी जावे बुलावन । बार हि डारूं उसपर तन ॥ ३ ॥ तुका प्रभु कब देखें पाऊं । पासीं आऊं फेर न जाऊं ॥ ४ ॥ [३८०२]

भलो नंदजीको डिकरो । लाज राखीलीन हमारो ॥ १ ॥ आगळ आवो देवजी कान्हा । मैं घर छोडी आहे म्हाना (आये मान्हा) ॥ २ ॥ उनसुं कळना नव्हे तो भला । खसम अहंकार दादुला ॥ ३ ॥ तुका प्रभु परवली हरी । छपी आहे हुं जगाथी न्यारी ॥ ४ ॥ [३८०३]

नका कांहीं उपचार माझ्या शरीरा । करूं न साहावे मज बहु होतो उबारा । मनोजन्य व्यथा वेध जाला अंतरा । लवकरी आणा नंदाचिया कुमरा वो ॥ १ ॥ सखिया वोशिया तुम्ही प्राणवल्लभा । निवेदिला भाव आर्तभूत या लोभा । उमटली अंगीं वो सांवळी प्रभा । साच हे अवस्था कळे

कोणास हांक मारावी तर जवळ कोणी नाहीं. दुजेपणाचा नाश करून एकदम कृष्ण माझ्या अंगाशीं जडला ! मग दुसरें काय उरलें आहे ! सख्यांनो, आतां मौनपणानें गुप्त राखावें हें बरें २. आजपर्यंत संसारांतील अनेक प्रकारच्या कामांनीं मला कधींहि विसांवा मिळत नव्हता. एक संपवावें तों दुसरें निर्माण होत होतें. तीं सर्व कामें टाकून मी आज येथें आलें, तों ह्यानें येथें दुसरेंच कौतुक निर्माण केलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशी ती गोपी काळजी करीत असतां नारायणानें ती निवारण करून तिच्याशीं अंगसंग केला; त्या सुखाच्या योगानें ती पूर्ण सुखमय झाली आणि तिच्या जन्ममृत्यूच्या येरझारा कुंठित झाल्या ४. [३८००]

एक गौळण म्हणते, मी निजस्वरूपाच्या घरीं जाण्याची वाट विसरून ह्या संसाररूपी बाजारांत, चित्तरूपी नवनीताचा विक्रय करण्याकरितां आलें १. अरे कान्हा, माझ्या स्वामी, त्वां माझें मन मोहित केलें, त्यायोगानें सर्व प्रपंचाचा विसर होऊन जिकडेतिकडे मला तुझेंच रूप दिसूं लागलें २. ह्यावांचून अन्य कांहीं दृष्टीस पडेना, मग मी पाऊल तरी कोठें ठेवावें ? जिकडे पाहावें तिकडे ह्या देवानेंच व्यापलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें पाहून मी तर चकित झालें आणि माझ्या मनांतील सर्व प्रापंचिक भय नाहींसें झालें ४. [३८०१]

हरीवांचून राहावें तर मला एक पळभर देखील करमत नाहीं, म्हणून मी त्याची वाट पाहात केव्हांची उभी राहिलें आहें १. अहो माझ्या स्वामी, मजपासून चुकी तरी काय घडली आणि माझ्याजवळ येण्याविषयीं इतकी वेळ कां लावली ? २. हरीला बोलावून आणणारी सखी मला जर भेटेल तर तिच्यावरून मी आपला देह ओंवाळून टाकीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या स्वामीचे पाय मी केव्हां पाहीन ? त्यानें माझ्याजवळ यावें व कधींहि परत जाऊं नये (किंवा, एकदां मी तुझ्या पायांजवळ आल्यानंतर पुनः संसाराकडे जाणार नाहीं ४. [३८०२]

नंदरायाचा मुलगा फार चांगला आहे, कारण त्यानें आमची लज्जा रक्षण केली १. जी महाराज कृष्णराया, तुम्ही अलीकडे या. तुमच्याकरितां मी मूळ स्वरूपाचें घर सोडून देहरूपी अरण्यांत आलें आहें २. माझा अहंकाररूपी नवरा खडतर आहे; त्याला न कळेल तोंवरच फार बरें ३. तुकाराम महाराज म्हणतात, हरि माझा स्वामी बलवान् आहे, म्हणून मी त्याच्या आड लपून जगताच्या वेगळी झालें आहें ४. [३८०३]

कृष्णरायाचा वियोग झाल्यानें मी संतप्त झालें आहें; म्हणून कोणतेंहि (चंदनाची उटी लावणें, विंझणवारा घालणें इत्यादि) उपचार माझ्या देहास करूं नका, मला ते सहन होत नाहींत. शीतळ पदार्थांनें देखील माझ्या ठिकाणीं फार उष्णता वाढत आहे. हें दुःख मनांत उत्पन्न होऊन त्याचा वेध अंतःकरणांत लागला आहे, म्हणून नंदरायाच्या पुत्रालाच कोणी तरी लवकर घेऊन या १. अगे सख्यांनो, मैत्रिणी हो, तुम्ही माझ्या जीवाच्या आवडत्या आहांत. कृष्णाच्या

मज माझ्या क्षोभा वो ॥ २ ॥ नये कळों नेदावी हे दुजियासी मात । घडावा तयासी उत्कंठा एकांत । एकाएकीं साक्षी येथें आपुलें चित्त । कोण्या काळें होईल नेणों भाग्य उदित वो ॥ ३ ॥ स्वाद सीण देहभान निद्रा खंडन । पाहिले तटस्थ उन्मळित लोचन । अवघें वोसाऊन उरले ते चरण । तुका म्हणे दर्शनापें आलें जीवन वो ॥ ४ ॥ [३८०४]

पडिली भूली धांवती सैराट । छंद गोविंदाचा चोजविती वाट । मागें सारूनी (सांडूनी) सकळ बोभाट । वंदीं पदांबुजें ठेवूनी ललाट वो ॥ १ ॥ कोणी सांगा या गोविंदाची शुद्धि । होतें वाहिलें लपाला आतां खांदीं । कोठें आड आली हे देहबुद्धि । धांवा आळवा करुणा कृपानिधी वो ॥ २ ॥ मागें बहुतांचा अंतरला संग । मुळें जयाचिया तेणें केला त्याग । पैल पाहतां तें हरपलें अंग । खुंटली वाट नाहींसें झालें जग वो ॥ ३ ॥ शोक वियोग घडला सकळांचा । गेल्या शरण हा अन्याय आमुचा ॥ केला उच्चार घडल्या दोषांचा । झाला प्रगट स्वामी तुकयाचा वो ॥ ४ ॥ [३८०५]

काय उणें कां करितोसि चोरी । किती सांगों तुज नाइकसी हरी ॥ परे परता तूं पळोनि जासी दुरी । अनावर लौकिका बाहेरी वो ॥ १ ॥ माया करुणा हे करिते बहुत । किती सोसूं या जनांचे आघात । न पुरे अवसरू हेंचि नित्यानित्य । तूंचि सोडवीं करूनी स्थिर चित्त वो ॥ २ ॥ बहुत कामें मी गुंतालियें घरीं । जासी डोळा तूं चुकवूनी हरी । करितां लागा न येसी चपळ भारी ।

लोभानें मी उत्कंठित झाल्यामुळें माझ्या अंतरांतील भाव तुम्हांस सांगितला. त्याच्या वेधानें माझ्या अंगावर सांवळें तेज उमटलें आहे. ही अवस्था खरी आहे असें माझ्या उत्कट इच्छेवरून मला समजलें २. ही माझी गोष्ट दुसऱ्यास सांगूं नका. त्याच्याशीं एकांत व्हावा अशी माझ्या ठिकाणीं आवड आहे. ह्यास एकटें एक आपलें चित्तच साक्षी आहे. माझें भाग्य उदयास येऊन कोणते काळीं इच्छा पूर्ण होईल, हें कळत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, रुचि, श्रम वगैरे देहांतील भावांचा व निद्रेचा नाश होऊन डोळे अर्धोन्मीलित तटस्थ झाले व स्वस्वरूपाकडे पाहूं लागले. त्या योगानें सकळ विश्व नाहींसें होऊन एका देवाचेच चरण पाहाण्याचें उरलें. तें जीवाला जगविणारें जीवन माझ्या दृष्टीसमोर आलें ४. [३८०४]

श्रीकृष्ण हे सर्व गोपींसह रासक्रीडा करतेवेळीं सर्वांना चुकवून एकीस घेऊन जात होते. तिच्या ठिकाणीं अभिमान उत्पन्न होऊन कृष्णानें आपणास खांद्यावर घ्यावें अशी इच्छा ती करूं लागल्यामुळें, तो अदृश्य झाला. मग तिला भूल पडून ती आडरानांत सैरावैरा धांवूं लागली आणि तिला गोविंदाचाच छंद लागून ती त्याचा मार्ग विचारूं लागली. सर्व प्रपंचाचा त्याग करून ज्या ज्या ठिकाणीं कृष्णरायाचीं पावलें उमटलेलीं दिसलीं त्या त्या ठिकाणीं मस्तक ठेवून ती त्यांचें वंदन करू लागली १. आणि रानांतील वृक्ष-लतांना म्हणूं लागली, कीं कोणी तरी मला गोविंदाचा पत्ता सांगा. तो मला आतां खांद्यावर घेत होता. तो एकाएकीं दिसेनासा झाला. त्यानें मला खांद्यावर घ्यावें, अशी देहबुद्धि माझ्या ठिकाणीं कोणीकडून उत्पन्न झाली? करुणेचा व कृपेचा समुद्र जो देव त्याला कोणीतरी धांवून येऊन हांका मारा २. ज्या देवाकरितां मागील सर्वांचा (घरांतील सर्व माणसांचा) संग अंतरला, त्यानेंहि मला टाकलें. पलीकडे पाहिलें असतां त्याचें अंग दृष्टीस पडेना व मागें जगत्‌हि नाहीसें झालें. आतां मार्ग कुंठित झाला (माझा उपाय कुंठित झाला) ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याप्रमाणें वियोगजन्य शोक सर्व गोपींच्या ठिकाणीं झाल्यामुळें त्या म्हणतात, कीं आम्ही देवास शरण गेलों असतां आमच्या ठिकाणीं देहाभिमान उत्पन्न व्हावा हा आमचा अपराध आहे, असा त्यांनीं घडलेल्या पातकाचा उच्चार केल्याबरोबर माझा स्वामी श्रीकृष्ण प्रगट झाला ४. [३८०५]

यशोदा म्हणते, अरे कृष्णा, तूं चोरी करतोस! आपल्या घरीं कांहीं कमी आहे काय? तूं चोरी कां करतोस? तुला किती जरी सांगितलें तरी तूं ऐकत नाहींस. तुला धरावें तर परात्पराचेच्या पलीकडे तूं पळून जातोस (तूं मायातीत होतोस). असा तूं लौकिकाच्या वेगळा अनावर आहेस १. अशी ती आई पुष्कळ कींव काकुळती भाकून म्हणते, कीं ह्या लोकांचे जाच मीं किती तरी सोसावे? त्यास कांहीं वेळ न पुरतां रोजचे रोज हीच कटकट लागली आहे. ह्यांतून कृष्णा, तूं नीट वागून मला सोडवून माझें चित्त स्थिर कर २. माझ्या ठिकाणीं अनेक प्रकारचीं कामें असल्यामुळें मी घरीं गुंतून राहातें, आणि हरि, तूं तर डोळा चुकवून जातोस. मोठ्या त्वरेनें धरावें तर आमचा कांहीं लाग चालत नाहीं (आमच्यानें तुझा

नाहीं सायासाची उरों दिली उरी वो ॥ ३ ॥ तुज म्हणीये मी न संगें अनंता । नको जाऊं या डोळियां परता । न लगे जोडी हे तुजविण आतां । तुकया स्वामी कान्होबा गुणभरिता वो ॥ ४ ॥ [३८०६]

आलियें धांवती धांवती भेट होईल म्हूण । तंव ते टळली वेळ वो माझा उरला सीण ॥ १ ॥ आतां काय करूं सांग वो मज भेटेल कैसा । हरिलागीं प्राण फुटे वो थोरी लागली आशा ॥ २ ॥ लावितो उशीर बहुतीं बहु ओढिनी ओढा । सांभाळितां सांग असांग दुःख पावले (पावल्यें) पीडा ॥ ३ ॥ जळो आतां संसारु वो कईं शेवट पुरे । तुकयाच्या स्वामी गोपाळालागीं जीव झुरे ॥ ४ ॥ [३८०७]

घाली कवाड टळली वाट राती । कामें व्यापिली कां पडली दुश्चित्तीं । कोणा लागला गे संदैवेचे हातीं । आजी शून्य शेज नाहीं दिसे पति वो ॥ १ ॥ बोले दूतिकेशीं राधा हें वचन । मशीं लाघव दाखवी नारायण । म्हणे कोमळ परी बहु गे निर्गुण । याशीं न बोलें कळला मज पूर्ण वो ॥ २ ॥ धाडिलें गरुडा आणिलें हनुमंता । तैं पाचारिलें होउनी ये वो सीता । लाजिनली रूप न ये पालटितां । झाला भीमकी आपण राम सीता वो ॥ ३ ॥ सत्यभामा दान करी नारदासी । तैं कळला वो मज हृषीकेशी । तुळे घालितां वो न ये कनकरासी । सम तुकें एक पान तुळसी वो ॥ ४ ॥ मज भुली पडली कैशापरी । आम्हां भोगूनी म्हणे मी ब्रह्मचारी । दिली वाट यमुने माये खरी । तुम्हां आम्हां न कळे अद्यापवरी वो ॥ ५ ॥ जाणे जीवीचें सकळ नारायण । असे व्यापूनी परी न दिसे लपून ।

पाठलाग करवत नाहीं) असा तूं फार चपळ आहेस. तुझ्या प्राप्तीविषयींच्या श्रमांची तुझ्यापुढें कांहीं उरी उरत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो अनंता, तुम्ही माझे स्वामी असून सकलगुणसंपन्न आहांत. आतां तुमच्यावांचून दुसरी प्राप्ति मला नको व मी कांहीं आपलें कामहि सांगणार नाहीं. फक्त तुम्ही माझ्या डोळ्यांवेगळे कोठें जाऊं नका ४. [३८०६]

श्रीकृष्णाची भेट होईल म्हणून धांवत धांवत आलें, तों भेट होण्याची वेळ निघून गेली व मला व्यर्थ श्रम झाले १. आतां तो श्रीहरि मला कसा भेटेल ? ह्याविषयीं उपाय तरी काय करूं ? त्याच्याकरितां माझा प्राण कासावीस होतो आहे. त्याची मला मोठी आशा लागली आहे २. पुष्कळ ओढाओढी करून श्रीहरीला भेटण्याविषयीं पुष्कळ लोक वेळ करितात; कर्मसांग-असांगतेचें संरक्षण करण्यांत त्यांना दुःखपीडा झाली. (*पाठभेद : दुःख पावल्यें पीडा*, घरांतील सर्वांचीं जेवणीं–खाणीं करणें, त्यांची मर्जी सांभाळणें ह्यांविषयीं माझी ओढाताण होते.) त्यामुळें मला उशीर झाला, कृष्णाची भेटी झाली नाहीं, त्यामुळें मी दुःखी-कष्टी झाल्यें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां संसाराला आग लागो. ह्याचा शेवट कधीं लागणार आहे ? म्हणून माझा स्वामी जो गोपाळ त्याच्याकरितां जीव झिजत आहे ४. [३८०७]

कृष्ण येण्याची वेळ टळली. पुष्कळ रात्र झाली, म्हणून राधेनें दार लावून घेतलें. तिचें हृदय श्रीहरिविषयीं कामनेनें व्याप्त होऊन उदासपणें ती पडली आहे. तिला झोंप येईना म्हणून ती सखीला म्हणते, अगे, श्रीहरि हा कोणत्या भाग्यवती गोपीच्या हातीं लागला. त्या योगानें आज त्या पतीवांचून ही शय्या शून्य दिसत आहे १. अशा प्रकारचे हे शब्द राधा ही दूतीबरोबर बोलत आहे. नारायण हा मला कौतुक दाखवितो. तो बोलण्यांत मोठा कोमल आहे, पण तो स्वस्वरूपानें गुणातीत आहे. त्याच्याशीं आतां मी बोलणार नाहीं. तो पूर्णपणें मला समजला २. द्वारकेंत हनुमंत आले त्या वेळेस श्रीहरीनें गरुडास त्याला बोलावण्यास पाठवून हनुमंतास बोलावून आणलें. मग श्रीहरीनें रामरूप धारण केलें व सत्यभामेस सीता होऊन येण्यास सांगितलें. पण तिला तें आपलें रूप बदलून सीता होतां येईना म्हणून ती लज्जित झाली. तेव्हां रुक्मिणी ही सीता होऊन आपण राम झाला ३. सत्यभामेनें नारदास श्रीहरीचें दान केलें त्या वेळेस हा हृषिकेशी कसा आहे तो मला समजला. श्रीकृष्णाची तुलना करण्याच्या वेळेस सोन्याच्या राशीच्या राशी सत्यभामेनें जरी घातल्या तरी त्याची तुलना होईना, मग रुक्मिणीनें एक तुळसीपत्र तराजूमध्यें घातल्याबरोबर तो बरोबर तुलनेस आला ४. दुर्वासादि ऋषींना अन्न घेऊन जाण्याच्या वेळेस तुमचा सर्वांचा उपभोग घेऊन मी ब्रह्मचारी आहें असें जें श्रीकृष्णानें म्हटलें, त्याचा मला कसा विसर पडला ? त्या वेळेस हें श्रीहरीनें सांगितलेलें वाक्य (मी जर नैष्ठिक ब्रह्मचारी असेन तर यमुना मला जाण्यास वाट करून देईल असें) म्हटल्याबरोबर यमुनेनें खरोखर वाट दिली. अजूनपर्यंत तुम्हांला व आम्हांला त्याची थोरवी कळत नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, नारायण हा सर्वांच्या अंतःकरणांतील सर्व विचार जाणतो, कारण तो सर्व ठिकाणीं व्यापून राहिला आहे; परंतु तो गुप्त असल्यामुळें दिसत नाहीं. त्यानें राधेचा आपणाविषयींचा कळवळा

राधा संबोखिली प्रीति आलिंगून । तुका म्हणे येथें भावचि कारण वो ॥ ६ ॥ [३८०८]

मिळोनि गौळणी देती यशोदे गाऱ्हाणीं। दहीं दूध तूप लोणी शिंकां नुरे कांहीं। मेळवूनी पोरें तेथें रिघे एकसरें। वेगीं आणोनी सामोरें तेथें लोणी खाय ॥ १ ॥ हरि सोंकला वो हरि सोंकला वो। सोंकला तो वारीं तुज लाज नाहीं तरी। आम्हां सांपडतां उरी तुज मज नाहीं ॥ २ ॥ तुज वाटतसे कोड यासी लागतसे गोड। काय हांसतेसी वेड तुज लागलें वो। आम्ही जाऊं तुजवरी पोरें चाळविल्या पोरी। काय सांगों भांडखोरी लाज वाटे आम्हां ॥ ३ ॥ मुख मळिण वदन उभा हाडतिये धोणे। तंव दसवंती म्हणे आणा शीक लावूं। थोर आणिला कांटाळा घरींदारीं लोकपाळां। डेरा रिघोनी गुसळा (घुसळा) तेथें लोणी खाय ॥ ४ ॥ मिळोनी सकळा दावें लावुनियां गळां। केशा बांधिती उखळा तेथें (येथें) राहे उगा। बरा सांपडलासी हरी आजिच्यानें करिसिल चोरी। डोळे घालूनियां येरी येरीकडे हांसे ॥ ५ ॥ फांकल्या सकळा उपडूनियां उखळा। मोडी वृक्ष विमळार्जुन दोन्ही। उठिला गजर दसवंती नव्हे धीर। धांवे तुकयाचा दातार आळंगिला वेगीं ॥ ६ ॥ [३८०९]

आंत हरि बाहेर हरि। हरिनें घरीं कोंडिलें ॥ १ ॥ हरिनें कामा घातला चिरा। चित्तवरा मुकविलें ॥ २ ॥ हरिनें जीवें केली साटी। पाडिली तुटी सकळांसी ॥ ३ ॥ तुका म्हणे वेगळा नव्हे। हरि हा भोंवे भोंवताला ॥ ४ ॥ [३८१०]

हरिनें माझें हरिलें चित्त। भार वित्त विसरलें ॥ १ ॥ आतां कैसी जाऊं घरा। नव्हे बरा

जाणून तिला प्रीतीनें आलिंगन देऊन तिची समजूत केली; म्हणून श्रीहरीचा योग होण्याला एक त्याच्याविषयींचा भावच कारण आहे ६. [३८०८]

सर्व गौळणी मिळून कृष्णानें केलेल्या खोड्यांचें गाऱ्हाणें सांगूं लागल्या, तें असें, कीं तुझा मुलगा आमच्या शिंक्यांवर दहीं, दूध, तूप, लोणी हें काहींच राहूं देत नाहीं. आपण खेळगडी जमा करून जेथें आमचीं दहीं-दुधाचीं व तुपाचीं शिंकीं असतील तेथें एकदम शिरतो व मोठ्या त्वरेनें आमच्या समोर तीं आणून लोणी खातो १. अशा प्रकारें हरि हा मोठा सवकला आहे, त्याचें तूं निवारण कर. असें न करशील तर तुला लाज नाहीं असें आम्ही समजूं. मग आमच्या हातांत जर सांपडला तर मग तुझा आमचा मोठेपणा कांहीं राहाणार नाहीं २. तुला ह्याचें मोठें कौतुक वाटतें व तें त्यालाहि मोठें गोड लागतें (असें गौळणींनीं म्हणतांक्षणींच यशोदा हंसली). तूं कां हंसतेस, तुला वेड लागलें आहे काय? आम्ही तुझ्या मोठेपणाकडे पाहून दुर्लक्ष करतों; पण ह्यानें आमच्या मुलांमुलींस नादीं लावलें. हे भांडखोरी, तुला काय सांगावें? आम्हांला ह्याची लाज वाटते ३. त्या वेळीं कृष्ण आपलें मुख म्लान करून खालीं मान घालून (गळ्याखालील हाडावर हनुवटी टेकवून) उभा राहिला. त्या वेळेस यशोदा म्हणूं लागली, त्याला इकडे आणा; आपण त्याला शिक्षा करूं. घरीं, दारीं, लोकांना त्रास देऊन ह्यानें आम्हांला मोठा कंटाळा आणला आहे. घरांत दहीं घुसळूं लागलें तर डेऱ्यांत शिरून तो तेथें लोणी खातो ४. मग सर्व जणींनीं मिळून कृष्णाच्या गळ्यास दावें घालून त्याला दाव्यानें उखळाशीं बांधलें. त्या ठिकाणीं तो उगीच राहिला. तेव्हां त्या सर्व म्हणूं लागल्या, आतां चांगला सांपडलास. आजपासून चोरी करशील? असें म्हणत डोळे मिचकावून एकमेकींकडे पाहून त्या हंसूं लागल्या ५. तुकाराम महाराज म्हणतात, त्या सर्व गौळणी आपापल्या घरीं गेल्यावर उखळ उपटून भगवान् रांगत गेले व द्वारामध्यें शापानें नळ व कुबेर हे विमल व अर्जुन असे वृक्ष झाले होते, त्या दोन्ही वृक्षांच्या सांधीमध्यें जाऊन त्यांनीं उखळ ओढलें, त्या वेळीं ते वृक्ष मोडले व त्याचा मोठा आवाज झाला. तो ऐकून यशोदेला दम निघेना. तिनें मोठ्या त्वरेनें धांवत येऊन माझ्या स्वामीला आलिंगन दिलें ६. [३८०९]

हृदयांत हरीचा बोध आहे, बाहेरहि हरिस्वरूपाचा बोध आहे, अशा प्रकारें हरीनें मला आपल्या स्वरूपाच्या घरांत कोंडलें आहे १. त्यायोगानें हरीनें माझ्या हृदयांतील वैषयिक कामनेवर दगड घातला (कामना नाहींशी केली) आणि धन व पति ह्यांपासून सुटका केली २. हरीनें माझा जीवभाव घेऊन सर्वांशीं असलेला संबंध तोडून टाकला ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्यापासून हरि वेगळा न होतां सभोंवतीं तोच फिरत आहे ४. [३८१०]

हरीनें माझ्या चित्ताचें हरण केलें; त्यायोगानें कुटुंब–धनादि भाराचा विसर पडला १. आतां जन्ममृत्यूच्या

लौकिक ॥ २ ॥ पारखियांसी सांगतां गोष्टी । घरची कुटी खातील ॥ ३ ॥ तुका म्हणे निवांत राहीं । पाहिलें पाहीं परतोनी ॥ ४ ॥ [३८११]

बाळपणीं हरि । खेळे मथुरेमाझारी । पायीं घागरिया सरी । कडदोरा वांकी । मुख पाहे माता । सुख न समाये चित्ता । धन्य मानवे संचिता । वोडवलें आजी ॥ १ ॥ बाळ चांगलें वो । बाळ चांगलें वो । म्हणतां चांगलें । वेळ लागे तया बोलें । जीवापरीस तें वाल्हें । मज आवडतें ॥ २ ॥ मिळोनियां याती । येती नारी कुमारी बहुती । नाहीं आठव त्यां चित्तीं । देहभाव कांहीं । विसरल्या घरें । तान्हीं पारठीं लेंकुरें । धाक सांडोनियां येरें । तान भूक नाहीं ॥ ३ ॥ एकी असतील घरीं । चित्त तयापाशीं परी । वेगीं करोनि वोसरी (वोसारी) । तेथें जाऊं पाहे । लाज सांडियेली वोज । नाहीं फजितीचें काज । सुख सांडोनियां सेज । तेथें धांव घाली ॥ ४ ॥ वेधियेल्या बाळा । नरनारी या सकळा । बाळा खेळती अबला । त्याही विसरल्या । कुमर कुमारी । नाहीं भाव हा शरीरीं । दृष्टी न फिरे माघारी । तया देखतां हे (देखतांही) ॥ ५ ॥ वैरभाव नाहीं । आपपर कोणी कांहीं । शोक मोह दुःख ठायीं । तया निरसलीं । तुका म्हणे सुखी । केलीं आपणासारिखीं । स्वामी माझा कवतुकीं । बाळवेषें खेळे ॥ ६ ॥ [३८१२]

होतें बहुत हें दिवस मानसीं । आजी नवस हे फळले नवसीं । व्हावी भेटी ते झाली गोविंदासीं । आतां सेवा करीन निश्चयेसीं वो ॥ १ ॥ स्थिर स्थिर मजचि साहे करा । बहु कष्ट सोसिलया येरझारा । येथें आड मज न साहावे वारा । देउनि कपाट आलें तें दुसरें वारा वो ॥ २ ॥ मूळ सत्ता हे सायासाची जोडी । नेदी वेगळें होऊं एकी घडी । नाहीं लौकिक स्मरला आवडी । आतां येणें काळें या लोभें

(किंवा, पतीच्या) घराकडे कशी जाऊं ? लौकिक बरा नाहीं [लौकिकसंबंध सुटला] २. परक्या हरीशीं [परपुरुषाशीं] बोललें तर घरचीं निंदा करतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, बाई गौळणी, तूं शांत राहून पाहिलेलाच हरि तृप्ति होईपर्यंत पाहा ४. [३८११]

कृष्ण हा लहानपणीं गोकुळामध्यें खेळत होता. तें गोकुळ मथुरेपैकींच असल्यामुळें मथुरेमध्यें खेळतो असें म्हणतात. त्या कृष्णाच्या पायांमध्यें लहान घागऱ्या व गळ्यांत सरी, कमरेस करदोटा (कडदोरा) व दंडांत वांक्या ह्याप्रमाणें अनेक प्रकारचे दागिने होते. त्याचें मुख आईनें (यशोदेनें) पाहिल्याबरोबर सुख तिच्या चित्तांत मावेनासें झालें आणि माझें असलेलें धन्य संचित आज मला प्राप्त झालें, असें ती म्हणूं लागली १. हें मूल चांगलें, तें चांगलें म्हणण्यास वेळ लागतो; आणि मला तें जीवाहिपेक्षां ज्यास्त आवडतें २. त्या बालकास पाहाण्याकरितां सर्व जातींच्या स्त्रिया व लहान मुली अशा पुष्कळ मिळून येतात. त्यांच्या ठिकाणीं देहभावाची आठवण नाहीं व त्यांनीं आपलीं लहानथोर मुलें घरींच टाकलीं व नवऱ्याचा वगैरे धाक न मानतां तहानभुकेची आठवण न करितां कृष्णास पाहाण्याकरितां त्या आल्या ३. कांहीं गोपी आपल्या घरीं होत्या, पण त्यांचें चित्त कृष्णाकडे लागल्यामुळें घरचीं कामें सारून त्यास पाहाण्यास जाऊं इच्छितात. त्यांना लौकिकाची लाज नाहीं व देहाची ओज नाहीं. त्यांची कोणी फजिती केल्यास तेंहि दुःख नाहीं आणि सुखशय्येवर निजल्या असतां ती टाकून त्या ठिकाणीं कृष्णाला पाहावयास धांवत येतात ४. ह्याप्रमाणें त्याला पाहाण्याचा वेध पुरुषांस व स्त्रियांस व लहान मुलींस सर्वांस लागला; वृद्ध स्त्रिया देखील देहभाव विसरून लहान मुलींसह खेळूं लागल्या; मी मुलगा आहें कीं मुलगी आहें, हा भाव त्यांच्या देहांत राहिला नाहीं आणि त्यांनीं कृष्णरायाला पाहिल्याबरोबर त्यांची दृष्टि परत फिरेनाशी झाली ५. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांच्या ठिकाणीं विषमत्वाचा भाव व आपपरावें हें राहिलें नाहीं आणि त्या शोकमोहादि दुःखांस विसरल्या. ह्याप्रमाणें माझ्या स्वामीनें कौतुकाचे खेळ खेळून त्या सर्वांस आपल्यासारखें सुखी केलें ६. [३८१२]

माझ्या मनांत गोविंदाची भेट व्हावी म्हणून पुष्कळ दिवस होतें व त्याविषयीं मीं नवसहि केले होते, ती आज भेट झाली म्हणून नवसहि पूर्ण झाले. आतां मी निश्चयानें सर्व काळ त्या गोविंदाची सेवा करीन १. त्या सेवेला तुम्ही हळूहळू साह्य करा. मागें जन्ममृत्यूच्या येरझारांचें दुःख मीं पुष्कळ सोसलें. आतां ह्या ठिकाणीं मला अहंतेचा वारा आडवा आलेला सहन होत नाहीं. मी त्यास आडवें कपाट लावून येथें आलें आहें. आतां दुसरेपणा उत्पन्न होईल तर त्याचा तुम्ही नाश करा २. ही स्वस्वरूपाची प्राप्ति सायासानें मला झाली. हिच्यावर आमची मूळचीच सत्ता आहे; आतां

वेडी वो ॥ ३ ॥ उदयीं उदयो साधिला अवकाश । निश्चिंतीनें निश्चिंती सावकाश । धरिये गोडी वहूत आला रस । तुका म्हणे हा मागुता न ये दिवस वो ॥ ४ ॥ [३८१३]

एकली राना गोविंदा सवें । गेलें ठावें तें झालें ॥ १ ॥ मज न म्हणा न म्हणा शिंदळी । नाहीं विषम जवळी आतळलें ॥ २ ॥ नव्हती देखिली म्यां वाट । म्हणोनी हा धीट संग केला ॥ ३ ॥ भेणें मिठी दिधली गळां । सेजे जवळा दडालें ॥ ४ ॥ सलगी धरी पयोधर । साहाती (तें) कुरमुर सवें ॥ ५ ॥ आहेव मी गर्भीणपणें । हें सांगणें कां लागे ॥ ६ ॥ तुका म्हणे शेवटा नेलें । संपादिलें उभयतां ॥ ७ ॥ [३८१४]

गोरस घेऊनी सातें निघाल्या गौळणी । तंव ती कृष्णाची करणी काय करी तेथें। झाला पानसरा मिठी घातली पदरा । आधीं दान माझें सारा मग चाला पंथें ॥ १ ॥ सर जाऊं दे रे । सर जाऊं दे रे । सर जाऊं दे रे परता । मुळीं भेटलासी आतां । नाट लागला संचिता (लागलें संचिता) । खेपा खुंटलिया ॥ २ ॥ आसुडी पदरा धरी आणीका दुसरा । येरी झोंबतील करा काय वेडा होसी। आलों गेलों बहू वेळां नेणों गोरा कीं सांवळा। सर परता गोवळा काय बोलतोसी ॥ ३ ॥ आम्ही येथें अधिकारी मागें केली तुम्ही चोरी। आतां कळलियावरी मागें केलें तयाचें। बोलिल्या हांसुनी आम्ही सासुरवासीनी। कां रे झोंबसी दुरूनी करीं मात कांहीं ॥ ४ ॥ वायां परनारी केशा धरिसी पदरीं। तयां कळलिया उरी तुज मज नाहीं। जडला जिव्हारीं फांकों नेदी तया नारी। जेथें वर्म तेथें (तें) धरी जाऊं पोहे तियेचें ॥ ५ ॥ तया हातीं सांपडल्या हाटीं पाटीं चुकविल्या।

ह्या प्राप्तीपासून मी घटकाभर देखील वेगळी होणार नाहीं. हें साधण्याविषयीं प्रीतीनें लौकिकाचें देखील स्मरण ठेवलें नाहीं; आतां त्याचाच लोभ उत्पन्न होऊन मला ह्या कालीं वेड लागलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, निजस्वरूपाच्या उदयानें निजस्वरूपाच्या उदयाची वेळ साधली. चिंतारहित होऊन त्या योगानें सावकाश चिंतारहित झालें; ज्या वस्तूची प्रीति धरली, तिचा रस अंतरांत पुष्कळ वाढला. आतां असा दिवस पुनः कधींहि मला मिळणार नाहीं ४. [३८१३]

गोविंदाबरोबर मी एकटी रानांत गेलें, हें तुम्हांला कळलें १. म्हणून मला तुम्ही शिंदळ म्हणूं नका. (हें द्विवार सांगतें), कारण माझ्या ठिकाणीं विषमता नाहीं व त्याच्याशीं मी संघट्टन केलें नाहीं २. रानांतील वाट मीं पाहिली नव्हती व (ब्रह्मरूपी शेतावर) एकटी जाण्यास भय वाटतें. ह्याकरितां तो धीट (सगुण) पुरुष पाहून त्याच्या सोबतीनें मी गेलें ३. रानांतील (काम–क्रोधरूपी) भयंकर जनावरें पाहून मला जन्म–मरणाचें भय वाटलें, म्हणून त्याच्या गळयाला मिठी घालून त्याच्या अंथरुणाजवळ मी लपून राहिलें ४. त्यानें माझ्या चित्तरूपी स्तनास हात लावला, असें तुमचें म्हणणें आहे, पण तें कृत्य त्यानें मस्करीनें केलें, आणि तें मी कुरकुरीनें सहन केलें ५. मी गरोदर कशी आहें, असें तुम्ही म्हणतां, त्यास मी नवऱ्याची स्त्री सौभाग्यपणानें आहें, मग तें सांगण्याचें काय कारण आहे ? ६. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याप्रमाणें हकीगत सांगून तिनें उभयतांचा लौकिक व आपलें कार्य (परमार्थ) कडेस नेलें ७. [३८१४]

दहींदूध घेऊन गौळणी बाजारामध्यें निघाल्या असतां, त्यावेळीं कृष्ण तेथें काय करू लागला ? तर त्यांच्या समोर झाला व त्यांच्या पदराला धरलें व म्हणूं लागला, कीं आधीं माझें दान द्या, मग वाटेनें जा १. अरे, बाजूला हो. आम्हांला जाऊं दे, असें त्या त्रिवार म्हणाल्या. अरे, मलाच भोवनीच्या वेळीं भेटलास. आतां आमच्या संचितकर्माला धक्का बसला, त्यायोगानें जन्ममृत्युरूपी येरझार चुकला २. कृष्णानें आणखी दुसरीच्याहि पदराला धरून हासडलें. त्या वेळीं इतर सर्व गौळणी त्याच्या हाताला झोंबूं लागल्या आणि म्हणूं लागल्या, कीं काय वेडा झालास, आम्ही किती वेळ इकडून गेलों आलों, पण तूं गोरा कीं काळा असा आम्हांला ठाऊक देखील नाहींस. हे इंद्रियरूपी गाईराख्या, बाजूला हो. भलतेंच काय बोलतोस ? ३. त्यांना देव म्हणूं लागले, कीं आम्ही ह्या ठिकाणचे अधिकारी आहोंत, ह्यापूर्वी तुम्ही आमच्याशीं लबाडी केली. आतां तुम्हीं पूर्वी केलेलें सर्व मला कळलें आहे. त्या वेळीं त्याला सर्व गौळणी हंसून म्हणाल्या, कीं आम्ही सासुरवासी आहोंत. आमच्या अंगाला कां रे झोंबतोस ? तुला कांहीं बोलावयाचें असेल तें दुरून बोल ४. व्यर्थ दुसऱ्यांच्या स्त्रियांच्या पदराला तूं कां धरतोस ? ही गोष्ट आमच्या घरच्यांना कळल्यावर तुझ्या आमच्यामध्यें बरेंपण राहाणार नाहीं. असें त्या बोलताहेत तोंच त्यांच्या अंतःकरणामध्यें श्रीहरि प्रकट होऊन त्या स्त्रियांना कोठेंहि जाऊं देईना. मर्मानें स्थान जें चित्त तेंच, ज्या कोणी त्याच्यापासून दूर जाण्यास पाहात होत्या, त्यांचें धरलें ५.

कृष्णमिळणीं मिळाल्या त्याही न फिरती। तुका म्हणे खंती वायां न धरावी चित्तीं। होतें तुमच्या संचितीं वोडवलें आजी ॥ ६ ॥ [३८१५]

हरी तुझी कांति रे सांवळी। मी रे गोरी चांपेकळी। तुझ्या दर्शनें होईन काळी। मग हें वाळी जन मज ॥ १ ॥ उगला राहें न करीं चाळा। तुज किती सांगों रे गोवळा। तुझा खडबड कांबळा। अरे नंदबाळा आलगटा ॥ २ ॥ तुझिये अंगीं घुरट घाणी। बहु खासी दूध तूप लोणी। घरिंचें बाहेरील आणोनी। मी रे चांदणी सुकुमार ॥ ३ ॥ मज ते हांसतील जन। धिःकारिती मज देखोन। अंगींचें तुझें देखोनी लक्षण। मग विटंबना होईल रे ॥ ४ ॥ तुज तंव लाज भय शंका नाहीं। मज तंव सज्जन पिशुन व्याही। आणीक मात बोलूं कांहीं। कसी भीड नाहीं तुज माझी ॥ ५ ॥ वजन मोडी नेदी हात। कळलें न साहेची भात। तुकयास्वामी गोपीनाथ। जीवन्मुक्त करूनी भोगी ॥ ६ ॥ [३८१६]

सात पांच गौळणी आलिया मिळोनी यशोदे गाऱ्हाणें देती कैसें। काय व्यालीस पोर चोरटें सिरजोर जनावेगळेंचि कैसें। दहीं दुध लोणी शिंकां नुरेचि कांहीं कवाड जैशाचें तैसें। चाळवूनी नाशिलीं कन्याकुमरें आमच्या सुनांसी लाविलें पिसें ग बाई ये ॥ १ ॥ अझुनी तरी यासी सांगें बरव्या परी नाहीं तरी नाहीं उरी जीवेंसाटी। मिळोनी सकळै जणी करूं वाखा सेखीं तुज मज होईल तुटी गे बाइये ॥ २ ॥ नेणे आपपर लौकिक वेव्हार भलते ठायीं भलतें करी पाळतुनी घरीं आम्हीं नसतां तेथें आपण संचार करी। सोगया चुंबन देतो आलिंगन आमच्या लोळे सेजाबाजावरी। शिंकीं कडाडा फोडी गोरसाचे डेरे धरितां न सांपडे करीं गे बाइये ॥ ३ ॥ आतां याची चाड नाहीं आम्हां भीड सांपडतां कोड पुरवूं मनींचें। सोसिलें बहु दिस

तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारें त्या भगवंताच्या हातीं सांपडल्यामुळें त्यांचे जन्माला येण्याजाण्याचे बाजार चुकले व त्या कृष्णस्वरूपाच्या ठिकाणीं मिळाल्या, त्या पुनः परत होत नाहींत. अहो, तुम्ही आतां व्यर्थ चित्तांत तळमळ करूं नका. तुमच्या प्रारब्धामध्यें होतें तें आतां प्राप्त झालें ६. [३८१५]

अरे हरि, तुझें तेज सांवळें आहे व मी चाफ्याच्या कळीप्रमाणें गोरी आहें. तुझें दर्शन झाल्यानें मीहि तुझ्यासारखी काळी होईन. मग माझा लोक धिःकार करतील १. म्हणून तूं उगीच राहा. असे भलतेसलते चाळे करूं नको. हे इंद्रियरूपी गाई राखणाऱ्या, तुला किती सांगूं? अरे नंदाच्या मुला, छांदिष्टा, तुझी घोंगडी खरबरीत आहे २. तुझ्या अंगाचा उग्रट वास येतो; कारण दूध, तूप, लोणी हें लोकांच्या घरचें बाहेर आणून खातोस. मी नाजूक चांदणीसारखी आहें ३. मला ते लोक हंसतील व पाहून माझा धिःकार करतील. हे देवा, तुझ्या दर्शनानें माझ्या अंगीं तुझें लक्षण आलेलें पाहून, अरे, त्या योगानें माझी विटंबना होईल ४. तुला तर लज्जा, भय, शंका नाहीं; मला तर सज्जन सोयरेधायरे, व्याही आहेत. आणखी किती मी तुला हकीगत सांगूं? तुला माझी भीड कशी वाटत नाहीं? ५. तुकाराम महाराज म्हणतात, माझा स्वामी गोपींचा पति त्यांचें वचन मोडतो व त्यांचा हात धरलेला सोडीत नाहीं. त्याला कांहीं सांगितलेलें सहन होत नाहीं, हें समजलें. त्यांचा देष अंगीकार करून त्यांना जीवनमुक्त स्थिति देऊन त्यांना भोग देतो ६. [३८१६]

पांचसात गौळणी मिळून कृष्णानें केलेल्या कृतीचें यशोदेजवळ गाऱ्हाणें देऊं लागल्या. लोकविलक्षण, चोरट्या, शिरजोर अशा पोराला तूं कां जन्म दिलास? आमचें दहीं, दूध, लोणी वगैरे शिक्यांवर राहूं देत नाहीं आणि दाराकडे पाहावें तों तें जसेंच्या तसेंच असतें. आमचीं मुलें व मुली ह्यांना फुसलावून त्यानें बिघडविलीं. अगे यशोदेबाई, आमच्या सुनांनाहि त्यानें वेड लावलें १. अजून तरी ह्याला तूं चांगल्या प्रकारानें सांग. नाहींतर आम्ही जीवाची देखील पर्वा करणार नाहीं; आम्ही सर्व जणी मिळून त्याला मारूं. मग अगे यशोदेबाई, तुझ्या आमच्या प्रेमामध्यें अंतर येईल २. तुझा मुलगा, आपलें परकें हा लौकिक व्यवहार कांहीं जाणत नाहीं. पाहिजे त्या ठिकाणीं पाहिजे तें करतो. पाळत ठेवून आम्ही कोणी घरीं नाहीं असें पाहून, तो आमच्या घरामध्यें शिरतो व आमच्या सासुरवासी मुलींचें चुंबन घेतो व त्यांना अलिंगन देऊन बाजेवरील अंथरुणावर लोळतो व आमच्या शिंक्यावर असलेले दह्यादुधाचे डेरे कडाडा फोडतो. अगे यशोदेबाई, त्याला धरावयास गेलों तर तो सांपडत नाहीं ३. आतां ह्याची आम्ही भीड मुरवत ठेवणार नाहीं.

नव्हता केला निस म्हणवूनि एकुलतें तुमचें । चरण खांबीं जीवें बांधेन सरिसा जंव न चले कांहीं याचें । अर्थ प्राण देतां न सोडी सर्वथा भलतें हो या जिवाचें गे बाईये ॥ ४ ॥ घेउनी जननी हातीं चक्रपाणी देतसे गौळणी वेळो वेळां । निष्ठुर वाद झणीं बोलाल सकळा क्षोभ जाईल माझ्या बाळा । जेथें लागे हात वाटतें नवनीत अमृताचा कल्लोळा । देखोनि तुकया स्वामी देश देहभाव विसरल्या सकळा गे बाइये ॥ ५ ॥ [३८१७]

विरहतापें फुंद छंद करिति जाती । हा गे तो गे सावधान सर्वेचि दुश्चिती । न सांभाळुनि अंग लोटी पाहे भोंवतीं । वेगळीच पडों पाहे कुळाहूनि याती वो ॥ १ ॥ खुंटलीसी झाली येथें अवघियांची गती । आपुलें परावें कोण नेणे भोंवतीं । त्याच्या नांवें बोंभे बोंभे हा हो श्रीपति । नवलाव हा येरां वाटोनियां हांसती ॥ २ ॥ बाहेरीच धांवे राना न धरीच घर । ना कळे बंधना झाला तेणें संचार । विसरूनी गेली सासुरें कीं माहेर । एका अवलोकी एका पडिला विसर ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही अवघ्या रहा निश्चळा । नये आतां येऊं येथें सर्वथा बळा । त्याचा त्याच्या मुखें अवघियांचा निर्वाळा । वहुतां मतें येथें तर्कवाद निराळा वो ॥ ४ ॥ [३८१८]

ये रे कृष्णा खुणाविती खेळों भातुकें । मिळालिया बाळा एके ठायीं कवतुकें । कळों नेदी माया त्यासीच तें ठाऊकें । खेळतोसें दावी लक्ष लक्ष्यापें भुकें ॥ १ ॥ अखंडित चटे त्यांनीं लावियेला कान्हा । आवडे तयाचे संकल्प वाहाती मना । काया वाचा मनें रूपीं गुंतल्या वासना । एकांताचें सुख जाती घेऊनियां राना ॥ २ ॥ अवघियांचा जाणे झाला मेळासा हरी । मिळोनियां जावें तेथें

आमच्या जर तो हाताला लागला, तर आमच्या मनाला वाटेल तसें करूं. आम्हीं पुष्कळ दिवस त्याचा ताप सोसला, कारण आम्ही निकराला आलों नव्हतों. पण आतां जरी तुझें एकुलतें एक मूल आहे तरी तें सांपडलें म्हणजे आम्ही त्याचे पाय जीवानें जवळच बांधूं. मग त्याचें कांहीं बळ चालावयाचें नाहीं व त्यानें आम्हांला द्रव्य व स्वतःचा प्राण जरी दिला तरी त्याला सोडणार नाहीं. अगे यशोदेबाई, ह्या आमच्या जीवांचें पाहिजे तें होवो ४. तुकाराम महाराज म्हणतात, यशोदामातेनें हातामध्यें चक्रपाणीला धरून गौळणींजवळ दिलें. तुम्ही सर्वजणी वेळोवेळीं निष्ठुर शब्दानें माझ्या बालकाला एखादें बोलाल त्या योगानें तुमची दातकिसाळी माझ्या बाळाला बाधेल. जेथें त्याचा हात लागतो, तेथें लोणी-दुधाचा पूर येतो. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या स्वामीला पाहून त्या सर्व आपल्या देशाला व देहभावाला विसरल्या ५. [३८१७]

एक गवळण हरीच्या विरहतापाच्या भरांत व त्याच्या नादांत बरळत होती; ती अशी, कीं अगे, हा हरि आहे. अगे, तो हरि आहे; पण लगेच सावध होऊन उदास झाली. ती आपलें अंग न सांभाळितां लोटून देई व सभोंवतीं पाहूं लागे. ती आपल्या कृतीनें जातिकुळांतून वेगळी झाली आहे कीं काय, असें दाखवी १. तिला स्थितीवर आणण्याविषयीं सर्वांची मति कुंठित झाली. ती आपल्या सभोंवतीं असणाऱ्या आपपरास जाणेनाशी झाली व एका श्रीपतीच्याच नांवानें ओरडूं लागली. हें पाहून तिच्या सभोंवतीं असणाऱ्या इतर गवळणींस नवल वाटून त्या हंसूं लागल्या २. ती घरामध्यें न राहातां, बाहेर रानांत धांवूं लागली. तिच्या चित्तांत भगवत्स्वरूपाचा वेधसंचार झाल्यामुळें तिला बांधतां येईना (ती बंधनांत सांपडेना). ती सासर आणि माहेर हीं दोन्ही विसरली, कारण एका श्रीहरीला पाहाण्यानें तिला इतरांचा विसर पडला ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही सर्व गौळणी स्वस्थ राहा. आतां ह्या ठिकाणीं (ह्या गौळणीला ताळ्यावर आणण्यासाठीं) सर्वथैव बळजबरी करूं नये. बहुमतानें व तर्कवादानें येथील सर्व निराळ्या प्रकारचा निर्णय त्यांचा त्यांच्या मुखानें झाला आहे. 'देव आहे' ह्याविषयींचा निर्णय देवाच्याच मुखानें गीतेंत सांगितला आहे) ४. [३८१८]

अरे कृष्णा, ये. आपण भातुकली खेळूं, असें ती खुणेनें सुचविते, सर्व गौळणी ह्या ठिकाणीं जमल्या आहेत; पण देव हे आपली माया कळूं देत नाहींत. ती त्यांची त्यांनाच अवगत आहे. आपण खेळतों आहों असें जरी तो (देव) दाखवीत होता, तरी त्याचें लक्ष स्वरूपीं होतें १. गवळणींनीं देवाला निरंतर चट लाविली, त्यांना ज्याची प्रीति आहे त्याविषयींचे संकल्प त्या आपल्या मनानें करूं लागल्या. त्या कायावाचामनानें भगवत्स्वरूपीं अनन्य झाल्या व त्यांची वासनाहि तेथेंच राहिली. एकांतीं मिळणारें हरिचिंतनाचें सुख त्या रानांत घेऊं लागल्या २. सर्वांचा जमाव झालेला जाणून

तयां भीतरीं । कळों नेदी घरिंच्या करी गोवूनी चोरी । हातोहातीं नेती परे परत्या दुरी ॥ ३ ॥ आनंदें निर्भय आपणाशीं आपण । क्रीडतील बाळा त्यजिलें पारिखें जन । एकाएकीं तेथें नाहीं दुसरें भिन्न । तुका म्हणे एका नारायणावांचून ॥ ४ ॥ [३८१९]

खेळतां मुरारी जाय सरोवरा तिरीं । तंव नग्नचि नारी तेथें देखियेल्या । मांडिलें विंदान ख्याल सुखाचें संधान । अंग लपवूनी मान पिलंगत चाले ॥ १ ॥ ख्याल मांडिला रे । ख्याल मांडिला रे । पायां पडतां न सोडी नेदी साउलां रे ॥ २ ॥ साड्या साउलीं पातळें गोंडे कसणिया चोळ्या । बुंथी घेऊनि सकळा कळंबावरी पळे । खांदी घालुनियां करीं दृष्टि घालोनि सामोरी । बैसे पाला ओटी वरी खदखदां हांसे ॥ ३ ॥ आनंदे कल्लोळ (ळां) बाळा खेळती सकळ देती उलटिया चपळा । एकी एकीहूनी म्हैस वेल सुरकाडी । एकी नागविती कोडीं । नाना परीच्या विकडी खेळ मांडियेला ॥ ४ ॥ एकी आलिया बाहेरी पाहे लुगडें तंव नारी । म्हणे नाहीं नेलें चोरीं काय जाणों केव्हां । केला सकळीं हाकारा तंव आलिया बाहेरा । आतां म्हणतील घरा जावें कैशापरी ॥ ५ ॥ तंव हांसे वनमाळी वरी पाहोनी सकळीं । लाजे रिघालिया जळीं मागें पुढें हात । लाज राखावी गोपाळा आम्हां जणींची सकळां । काय मागसी ये वेळां देऊं गुळवाटी ॥ ६ ॥ जोडोनियां कर या गे सकळा (ळी) समोर । वायां न बोलावें फार बडबड कांहीं । भातुकें भूषण नाहीं चाड नेघें धन । करा एक चित्त मन या गे मजपाशीं ॥ ७ ॥ एक एकीकडे पाहे लाज सांडुनियां राहे । म्हणे चला आतां सये जाऊं तयापाशीं । जोडोनियां हात कैशा राहिल्या निवांत । तुका म्हणे केली मात लाज राखिली तयांची ॥ ८ ॥ [३८२०]

त्यांच्यांत मिळवून घेऊन त्यांच्या घरांत प्रवेश करावा, असा हरीनें संकल्प केला व आपण घरांत शिरून घरांतील असणारांना कळूं न देतां त्यांच्या चित्तरूपी लोण्याची हातानें चोरी करून त्यांनीं परेच्या पलीकडे ती चित्तरूपी वस्तु हातोहातीं लांबवली ३. तुकाराम महाराज म्हणतात, आनंदानें भरलेल्या त्या गवळणी आपल्याशींच आपण खेळत होत्या. त्यांनीं परक्या लोकांचा (विजातीय अभक्तांचा) त्याग करून ज्या ठिकाणीं एका नारायणाखेरीज द्वैतसंबंध नाहीं, अशा एकाकी स्थितीमध्यें त्या होत्या ४. [३८१९]

एके दिवशीं देव हे खेळत खेळत यमुनेच्या तीरीं गेले. तों तेथें त्यांनीं नागव्या नहात असलेल्या स्त्रिया पाहिल्या. त्या वेळीं देवांनीं तेथें मौजेची क्रीडा आरंभिली. ती अशी, कीं देव हे आपलें अंग दिसूं न देतां, मान खालीं करून गेले १. त्यांचीं सर्व नदीच्या तीरीं असणारीं लुगडीं चोळयादि वस्त्रें भगवंतांनीं पळविलीं. अशा प्रकारची मौजेची क्रीडा भगवंतांनीं आरंभिली (असें द्विवार सांगतात). त्या स्त्रिया भगवंतांजवळ कींवकाकुलती येऊन पायां पडूं लागल्या, तरी देवांनीं त्यांचीं वस्त्रें त्यांना दिलीं नाहींत २. कोणाच्या नेसण्याच्या साड्या, कोणाचीं पातळें, कोणाच्या डोक्यांतील गोंडे, कोणाच्या कांचोळ्या, कोणाचीं तोंडावरून झांकून घेण्याचीं वस्त्रें हीं सर्व घेऊन देव पळाले व कळंबाच्या झाडावर चढून खांदी हातांत धरून बसले व त्यांनीं समोर असणाऱ्या त्या नग्न स्त्रियांकडे आपली दृष्टि वळविली. त्यांची ती धांदल पाहून झाडाच्या पाल्याच्या आड आपलें मुख लपवून देव खदखदां हंसूं लागले ३. आनंदानें त्या नग्न स्त्रिया पाण्यांत बालक्रीडा करीत होत्या. त्या अशा, कीं कित्येक पाण्यांत मोठ्या चपळाईनें उड्या मारीत होत्या. कित्येक आपसांमध्यें चढाओढीनें म्हशीसारख्या बुड्या मारून लांबवर निघत होत्या. कित्येक आपापसांमध्यें नानातऱ्हेच्या चलाखीनें फसवूं लागल्या. अशा प्रकारची ही जलक्रीडा त्या करीत होत्या ४. कित्येक पाण्याच्या बाहेर येऊन आपलीं लुगडीं पाहूं लागल्या तों तीं (लुगडीं वगैरे) दिसेनात. तेव्हां त्यांपैकीं एक दुसरीला म्हणूं लागली, कीं ह्या ठिकाणीं लुगडीं नाहींत. केव्हां चोरांनीं नेलीं कीं काय, हें कळत नाहीं. आतां घराकडे कसें जावें ? ५. इतक्यांत देव हंसूं लागले, तों त्यांची देवाकडे दृष्टि गेली व त्यायोगानें त्या लज्जित होऊन पाण्यामध्यें शिरल्या व मागें पुढें हात लावून देवाजवळ विनंति करूं लागल्या, कीं आमची सर्वांची लज्जा तूं रक्षण कर. ह्या वेळेस तूं मागशील तर तुला गुळवाटी देऊं ६. तुम्ही सर्व जणी हात जोडून देवाच्या समोर यावें. व्यर्थ फार बडबड करूं नये. देवाला कांहीं खाऊची व भूषणाची गरज नाहीं व तो धनहि घेत नाहीं. देवाचें म्हणणें आहे, कीं एकाग्रचित्त करून मजपाशीं या ७. तुकाराम महाराज म्हणतात, हें ऐकून, त्या एकमेकींकडे पाहूं लागल्या. निर्लज्ज होऊन चला आपण देवाजवळ जाऊं, असें म्हणून हात जोडून त्या शांत राहिल्या. त्या योगानें देवांनीं त्यांची लज्जा रक्षण केली ८. [३८२०]

धरिला पालव न सोडी माझा येणें। कांहीं करितां या नंदाचिया कान्हें। एकली न येतें मी ऐसें काय जाणें। कोठें भरलें या अवघड रानें रे ॥ १ ॥ सोडीं पालव जाऊं दे मज हरी। वेळ लागल्या रे कोपतील घरीं। सासू दारुण सासरा आहे भारी। तुज मज सांगतां नाहीं उरी रे ॥ २ ॥ त्या सखियावेशिया होत्या मजपाशीं। तुज फांवलें रे फांकतां तयांसी। होतें अंतर तैं सांपडतें कैसी। एकाएकीं अंगीं जडलासी रे ॥ ३ ॥ ऐसी भागली हें करितां उत्तर। शक्ति मावळल्या आसुडितां कर। स्वामी तुकयाचा भोगिया चतुर। भोग भोगी त्यांचा राखे लोकाचार वो ॥ ४ ॥ [३८२१]

गाई गोपाळ यमुनेचे तटीं। येती पाणिया मिळोनि जगजेटी। चेंडू चौगुणा खेळती वाळवंटीं। चला चला म्हणती पाहूं दृष्टीं वो ॥ १ ॥ ऐशा गोपिका त्या कामातुरा नारी। चित्त विव्हळतें देखावया हरी। मिस पाणियाचें करितील घरीं। बारा सोळा मिळोनी परस्परीं वो ॥ २ ॥ चिरें चोळिया त्या धुतां विसरती। उर्ध्व लक्ष लागलें कृष्णमूर्तीं। कोणा नाठवे हा कोण कुळ याती। झाल्या तटस्थ सकळां नेत्रपातीं वो ॥ ३ ॥ दंतधावनाचा मुखामाजीं हात। वाद्यें वाजती नायके जनमात। करी श्रवण श्रीकृष्णवेणुगीत। स्वामी तुकयाचा पुरवी मनोरथ वो ॥ ४ ॥ [३८२२]

कोठें मी तुझा धरूं गेलें संग। लावियेलें जग माझ्या पाठीं ॥ १ ॥ सर सर रे परता अवगुणाच्या गोवळा। नको लावूं चाळा खोटा येथें ॥ २ ॥ रूपाच्या लावण्यें गेली चित्तवृत्ति। न देखें भोंवतीं मी तें माझी ॥ ३ ॥ तुकयाचा स्वामी माझे जीवींच बैसला। बोलींच अबोला करूनियां ॥ ४ ॥ [३८२३]

एक गौळण म्हणते, देवानें माझा पदर धरला आहे. तो कांहीं केल्या सोडीत नाहीं. मला हें जर ठाऊक असतें, तर मी येथें एकटी आलें नसतें. ह्या कठिण रानांत कोठें येऊन पडलें १. हे हरि, तूं माझा पदर सोड, मला जाऊं दे. वेळ लागला तर माझ्या घरच्या माणसांना राग येईल. माझी सासू व सासरा हीं फार खाष्ट आहेत. त्यांना जर ही हकीगत सांगितली तर तुझी व माझी अब्रू राहाणार नाहीं २. माझ्या मैत्रिणी मजजवळ होत्या. त्या येथून गेल्यामुळें तुला माझा पदर धरण्यास सवड मिळाली. तुझ्यापासून जर मी दूर असतें, तर तुझ्या हाताला कशी लागली असतें? पण जवळ असल्यानें एकदम येऊन तूं माझ्या अंगाला झोंबलास ३. ह्याप्रमाणें देवाशीं बोलण्यानें ती श्रमी झाली, कारण देवानें तिच्या हातास हिसका दिल्यानें तिची शक्ति नाहींशी झाली होती. तुकाराम महाराज म्हणतात, माझा स्वामी भोग घेण्यांत फार चतुर आहे. तो ज्याचा भोग घेतो, त्याचा लौकिक रक्षण करितो ४. [३८२१]

गाई व गोपाळ यमुनेचे तीरीं पाणी पिण्याकरितां जगजेठी कृष्णासहवर्तमान येतात. त्या ठिकाणीं वाळवंटांत गुणत्रयातीत शुद्ध सत्त्वभावाचा चेंडू खेळतात, तें आपण पाहूं चला, असें त्या गोपिका म्हणूं लागल्या १. त्या गोपिका भगवंताविषयीं फार कामातुर असत, म्हणून त्यांचें चित्त भगवंताला पाहाण्याविषयीं फार तळमळ करीत असे. त्याकरितां त्या पाणी आणण्याच्या निमित्तानें बारा सोळा मिळून घरांतून बाहेर पडून त्या परस्पर मिळून जात २. यमुनेच्या नदीवर त्या चोळ्या धुण्याचें विसरत, कारण त्यांचें लक्ष वरतीं कृष्णरूपाकडे लागलें. अशी त्यांना आपली जात व कुळ स्मरेना. त्या सर्वांच्या डोळ्यांच्या पापण्या न मिटतां ताठ राहिल्या ३. कांहीं गवळणी दात घांशीत होत्या. ती क्रिया बंद होऊन त्यांचे हात तसेच्या तसेच तोंडांत राहिले. तेथें कांहीं वाद्यें वाजत होतीं व लोकांचाहि बोलण्याचा गलबला होत होता, पण हें त्यांच्या ऐकण्यांत येत नसे. श्रीकृष्णाचें वेणुगीत त्या ऐकत होत्या. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारें माझा स्वामी श्रीकृष्ण ह्यानें त्यांचे मनोरथ पूर्ण केले ४. [३८२२]

एक गवळण म्हणते, हे देवा, तुझी मी संगत कोठें केलीसें झालें; त्यायोगानें सर्व जग माझ्या मागें लाविलेंस (सारें जग मला 'वेडी, वेडी' म्हणून माझ्या पाठीस लाविलेंस) १. हे इंद्रियेंरूपी गाईंचें रक्षण करणाऱ्या देवा, तूं गुणातीत आहेस म्हणून तूं माझ्यापासून दूर हो. आम्हांला खोड्याचा नाद लावूं नकोस २. भगवंता, आपल्या लावण्यरूपाचा वेध मला लावून माझी चित्तवृत्ति तूं हरण केली आहेस, त्यायोगानें देहसंबंधीं मी व माझें हे भाव मला दिसेनासे झाले ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा स्वामी बोलण्यांतच अबोला करून (मला देखील बोलतां बोलतांच अबोल करून) माझ्या जीवीं अभेदानें बसला ४. [३८२३]

गोड लागे परी सांगतांचि नये। बैसे मिठी सये आवडीची ॥ १ ॥ वेधलें वो येणें श्रीरंगरंगें। मी हे माझीं अंगें हारपलीं ॥ २ ॥ परतेचि ना दृष्टि बैसली ते ठायीं। विसावोनी पायीं ठेलें मन ॥ ३ ॥ तुकयाच्या स्वामीसवें झाली भेटी। तेव्हां झाली तुटी मागिलाची ॥ ४ ॥ [३८२४]

पहावया माजी नभा। दिसे शोभा चांगली ॥ १ ॥ बैसला तो माझे मनीं। नका कोणी लाजवूं ॥ २ ॥ जीवा आवडे जीवाहूनी। नव्हे क्षण वेगळा ॥ ३ ॥ झाली विश्वंभरा ऐसी। तुकया दासी स्वामीची ॥ ४ ॥ [३८२५]

कोणी एकी भुलली नारी। विकितां गोरस म्हणे घ्या हरी ॥ १ ॥ देखिला डोळां बैसला मनीं। तोचि वदनीं उच्चारी ॥ २ ॥ आपुलियाचा विसर भोळा। गोविंदा कळा कौतुक ॥ ३ ॥ तुका म्हणे हांसे जन। नाहीं कान ते ठायीं ॥ ४ ॥ [३८२६]

करूनी आइती सत्यभामा मंदिरीं। वाट पाहे तों टळोनि गेली रात्री। न येचि देव येती कामलहरी। पडिली दुश्चिती तंव तो कवाड टिमकारी ॥ १ ॥ सर परता गा कळला तुझा भाव वो। कार्यापुरतें हें दाविसी लाघव। बोल बोलतोसी ते अवघी तुझी माव। जाणोनि आलासी उजडतां समयो रे ॥ २ ॥ मीच वेडी तुजलागीं बोल नाहीं। दानावेळे विटंबना झाली कायी। मागुती रुद्रासी भेटी दिली तई। विश्वासतें (विश्वास तो) तुझ्या बोला अजुनी तरी नाहीं रे ॥ ३ ॥ भ्रम होता तो अवघा कळों आला। मानवत होतें मी भला भला। नष्ट क्रिया नाहीं मां तुझ्या बोला। तुकया बंधु स्वामी कानड्या कौसाल्या रे ॥ ४ ॥ [३८२७]

तंव तो हरि म्हणे निजांगने वो। लाइ नीच कां देसी डोहणे वो। मजपें दुजें आलें तें देव

हरिस्वरूपाचा भोग घेण्यांत फार गोडी आहे, पण हे सखे, ती वाचेनें सांगतां येत नाहीं. त्या ठिकाणीं आवड झोंबलेली राहाते १. ह्या श्रीहरीनें स्वकीय रंगानें माझें हृदय वेधून टाकलें. त्या योगानें देह मी व देहसंबंधीं माझें हे भाव नाहींसे झाले २. श्रीहरिस्वरूपाकडे जी दृष्टि गेली आहे, ती माधारी परतत नाहीं. मन स्थिर करून त्याच्या चरणीं ठेविलें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा स्वामी जो श्रीकृष्ण त्याची भेट झाली, कीं पूर्वींच्याचा (संसाराचा) संबंध सुटतो ४. [३८२४]

आकाशासारखी ज्याची श्यामतनु आहे, त्या देवास पाहावयास गेलें तर त्याची शोभा फार सुंदर दिसते १. तो कृष्ण माझ्या मनांत बसला आहे म्हणून मला कोणी लाजवूं नका २. माझ्या जीवाला तो जीवापेक्षांहि जास्त आवडतो. तोहि माझ्यापासून एक क्षणभरहि वेगळा होत नाहीं ३. अशा ह्या स्थितीनें असणारी जी देवाची दासी (सेवक) ती गौळण तुकाराम महाराज म्हणतात, माझा स्वामी जो विश्वंभर त्याच्यासारखी झाली ४. [३८२५]

कोणी एक गवळण भगवंताच्या रूपमोहानें मोहित झाली म्हणून दूध विकतांना हरि घ्या, असें म्हणूं लागली १. तिनें हरीचें जें रूप डोळ्यानें पाहिलें तेंच तिच्या मनांत बसलें, म्हणून तोंडानेंहि त्याचाच उच्चार ती करूं लागली २. तिला आपलेपणाचा विसर पडून, एका गोविंदाच्याच स्वरूपज्ञानाच्या कौतुकांतच ती निमग्न झाली ३. तुकाराम महाराज म्हणतात, तिला जरी लोक हंसत होते तरी तिचे कान तिकडे नव्हते ४. [३८२६]

सर्व तयारी करून सत्यभामा ही आपल्या महालांत भगवंतांची वाट पाहात होती, पण तिची सर्व रात्र वाट पाहाण्यांतच गेली; भगवंत आले नाहींत. तिचें अंतःकरण कामातुर झाल्यामुळें ती उदासीन चित्तानें पडून राहिली. इतक्यांत देवानें दारास धक्का दिला १. त्या वेळेस सत्यभामा म्हणाली, कीं हे देवा, तुम्ही दूर व्हा. तुमच्या हृदयांतील जो भाव होता तो कळला. तुम्ही आपलें कार्य साधण्यापुरतें नाटक दाखवितां. जें तुम्ही बोलतां तें सर्व मायिक आहे. तुम्ही जाणूनबुजून उजाडते वेळीं आलां, ह्याचा बोल तुमच्यावर नाहीं. मीच वेडी आहें. तुम्हांला मी नारदाला दान दिलें होतें ते वेळीं व पुनश्च हनुमंतास भेटी दिली ते वेळीं माझी किती विटंबना झाली, ती मला ठाऊक असून अजून मी तुमच्या वचनावर विश्वास ठेवीत नाहीं काय? ३. आजपर्यंत जो कांहीं मला भ्रम होता, तो सर्व दूर झाला. तुम्ही फार चांगले आहांत असें मी मानीत होतें. तुमची बोलण्याप्रमाणें क्रिया नसल्यामुळें तुम्ही नष्ट आहांत. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, माझा स्वामी न कळणारा (लबाड) असून मोठा कुशल आहे ४. [३८२७]

हें सत्यभामेचें भाषण ऐकून, भगवंत म्हणाले, हे माझे प्रिय स्त्रिये, अति वाईट बोलण्याचे टोमणे मला कां मारितेस!

जाणे वो। शब्द काय हे बोलसी ते उणे वो ॥ १ ॥ पाहा मनीं विचारूनी आधीं वो। सांडूनि देहभ्रांति करीं स्थिर बुद्धि वो। तंट केलें हें माझें तुझें उपाधीं वो। उघडीं डोळे अझुनी तरी धरीं शुद्धि वो ॥ २ ॥ कोठें तरी दुनियांत वर्तलें वो। स्त्रियांनीं भ्रतारा दाना दिलें वो। कैसा मी भला नव्हे तें सोसिलें वो। रुसतेसी तूं उफराटें नवल झालें वो ॥ ३ ॥ काय सांग म्यां दैन्य केली कैसी वो। तुझ्या गर्वे आणविलें हनुमंतासी वो। कष्टी केलें मज गरुडा भीमकीसी वो। तुकयाबंधु म्हणे खरें खोटें नव्हे यासी वो ॥ ४ ॥ [३८२८]

तंव ते म्हणे ऐका हृषीकेशी वो। नावाजिलें तुम्ही म्हणा आपणांसी वो। तरी कां वंचनुक सुमनासी वो। नट नाट्य बरें संपादूं जाणतोसी वो ॥ १ ॥ सर हो परता आतां वो आतां हरी। म्हणे सत्राजिताची कुमरी। जाणतें मी या शब्दांच्या कुसरी। ऐसेंच करून ठकविलें आजीवरी ॥ २ ॥ भावें गेलें म्हूण न व्हावा वियोग। मनींची आर्त जन्मान्तरीं व्हावा संग। तंव त्वां केलें पाठमोरें हें जग। ऐसें काय जाणें हे तुझे रंग वो ॥ ३ ॥ काय करूं या नागविलें कामें। लागलें तयास्तव इतुकें सोसावें। नाहीं तरी कां नव्हतीं ठावीं वर्में। परद्वारीं ऐसा हाकलिती प्रसिद्ध नांवें वो ॥ ४ ॥ काय किती सांगावे तुझे गुण। न फुटे वाणी निष्ठुर ऐसा निर्गुण। आपपर न म्हणसी माय बहीण। सासुसुनांचें लावूनी पाहासी भांडण वो ॥ ५ ॥ इतुकियावरी म्हणे वैकुंठींचा राणा। होऊन गेलें तें नये आणूं मना। आतां न करीं तैसें करीं क्रिया आणा। भक्तवत्सल म्हणे तुकयाबंधु कान्हा ॥ ६ ॥ [३८२९]

कान्हो एकली रे एकली रे। तुजसवें चुकलें रे। भय वाटे जनीं मज। अबळा धाकली रे ॥ १ ॥ निघतां घरीं आई बा वारी। तुजसवें कां आलियें हरी ॥ २ ॥ लोक वाटा सांगती खोटा।

माझ्याकडे दुसरें कोणी आलें असेल तर कोण जागे! असे वाईट शब्द मला कां बोलतेस? १. तूं आपल्या मनांत आधीं विचार करून पाहा व देहभ्रम टाकून देऊन आपली बुद्धि स्थिर कर. आजपर्यंत माझें तुझें हीच बडबड केलीस, पण ती सर्व उपाधि आहे. आतां तरी तूं विवेकाची दृष्टि उघडून शुद्धीवर ये २. स्त्रियांनीं नवऱ्यांना दान दिलें असा प्रकार कोठें तरी जगांत झाला आहे काय? ही न होणारी गोष्ट तूं केली असून मीं ती सहन केली. मग मी किती चांगला आहें! असें असून तूंच उलटी रुसतेस हें मोठें नवल आहे ३. तुझी मीं कोणती कशी विटंबना केली ती सांग. तुझा गर्व-परिहार करण्याकरितां मी हनुमंताला आणिलें. त्या प्रसंगांत हनुमंताचा व गरुडाचा तंटा होऊन गरुडाला किती दुःख झालें? मला राम होण्याचे व रुक्मिणीस सीता होण्याचे किती कष्ट झाले! तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, झाला कांहीं खऱ्याखोट्याचा विचारच नाहीं ४. [३८२८]

हें देवाचें बोलणें ऐकून सत्यभामा म्हणते, हे देवा, तुम्ही ऐका, तुम्ही आपल्याला नावाजा अगर चांगलें म्हणा. आपली जर सर्वत्र समान दृष्टि आहे तर आपल्या ठिकाणीं अशी वंचना कां होते? तर हें तुमचें सर्व सोंग आहे आणि त्याची संपादणी करण्याचें तुम्ही फार चांगलें जाणत आहां १. देवा, आतां तुम्ही दूर व्हा, असें सत्राजित राजाची मुलगी सत्यभामा म्हणते. तुमचें शब्दकौशल्य मी चांगलें जाणतें. अशा कृतीनें आजपर्यंत तुम्हीं मला फसविलें २. हे देवा, तुमचा वियोग न व्हावा म्हणून मोठ्या भावानें मी तुमच्याकडे आलें. पूर्वजन्मांत माझी इच्छा अशी होती, कीं उत्तरजन्मांत आपली संगत राहावी, पण तूं मला जगाला विन्मुख केलेंस. असें कराल, हे तुमचे ढंग मी काय जाणत होतें? ३. काय करावें! माझ्या कामी हृदयानें मला फसविलें. त्याच्याकरितां मला इतकें दुःख सोसावें लागलें. नाहीं तर देवाची कृति मला ठाऊक नव्हती काय? कारण व्यभिचारी अशा नांवाची ह्याची हाकाटी (प्रसिद्धि) आहे ४. काय व किती म्हणून तुमचे गुण सांगावे! तुमच्या संबंधानें वाचा फुटत नाहीं, कारण तुम्ही निर्गुण निष्ठुर आहांत. तुमच्या ठिकाणीं आपलें, परकें, आई, बहीण हें कांहीं नाहीं, सासवांचें व सुनांचें भांडण लावून तें तुम्ही पाहातां ५. अशा प्रकारचें हें सत्यभामेचें बोलणें ऐकून वैकुंठाधिपति भगवान् म्हणतात, जी गोष्ट पूर्वी होऊन गेली ती पुन्हा मनांत आणूं नये. आतां मात्र मी तसें करणार नाहीं, असें शपथ वाहून सांगतों. हा भक्तावर दया करणारा देव असें म्हणाला, हें तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात ६. [३८२९]

अरे श्रीकृष्णा, मी एकटी आहें, म्हणून तुझ्याबरोबर चुकलें. ह्या वनामध्यें मला भय वाटत आहे. मी वयानें लहान स्त्री आहें १. घरून निघतांना आईबाप मनाई करीत असतांना हे हरि, मी तुझ्याबरोबर कां आलें? २.

परी मी चटा लागलियें ॥ ३ ॥ पिकल्या बोरी झालियें सामोरी । काय जाणों कोठें राहिला हरी ॥ ४ ॥ आड खुंट झालिया जाळी । काय जाणों कान्हें मांडिली रळी ॥ ५ ॥ तुका म्हणे जाऊं आलिया वाटा । पाहों हरी पायीं न मोडे कांटा ॥ ६ ॥ [३८३०]

क्याला मज आयो वारितेसी घरा । खेळतों सोकरा नंदाचा मी ॥ १ ॥ बहुतां दिसीं झाली यासीं मज भेटी । आतां वाटे तुटी न परावी ॥ २ ॥ कोंवळें बोलतो मना आवरतें । डोळियाचें पातें ढापवेना ॥ ३ ॥ आजी सकळांसी आलें चोलूनियां । कां गो पाठी वायां पुलविली ॥ ४ ॥ तुमचें तें काय खोळंबलें काज । बल्या कां गो मज कोंडा घलीं ॥ ५ ॥ तुकयाचा धनी वैकुंठनायक । सरा कांहीं एक बोलतों मी ॥ ६ ॥ [३८३१]

आतां न यें मागें । मी आलें याच्या रागें । काय माझें जगें । कोपोनियां करावें ॥ १ ॥ कां गो कलित्या कोल्हाल । तुम्ही भलत्याच सकल । वेचाल ते बोल । झुटे होती बोलिले ॥ २ ॥ याचे भेटीं माझें मन । स्वरूपीं ठाकले लोचन । वेगळें तें क्षण । आतां होऊं नावरे ॥ ३ ॥ काज काम नको झालें । बीजें नावरे बोलिलें । याचिया भेदिलें । कामबाणें अंतर ॥ ४ ॥ या वेगळें होणें । आतां जळो तैसें जिणें । घेतलें तें मनें । आतां मागें न फिरे ॥ ५ ॥ आतां मोटी वार । माझी नका धरूं चार । सेवें तुकयाचा दातार । सेजे तो मी सुतलों ॥ ६ ॥ [३८३२]

हरिरता चपळा नारी । लागवरी न रिघती ॥ १ ॥ अवघ्या अंगें सर्वोत्तम । भोगी काम भोगता ॥ २ ॥ वाचा वाच्यत्वासी न ये । कोठें काय करावें ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा ऐशा । देवपिशा उदारा ॥ ४ ॥ [३८३३]

वाटेनें लोक असें सांगत, कीं तूं लबाड आहेस. असें असूनहि मी तुझ्या संगतीला चटावलें. बोरीचे वृक्ष फळांनीं पिकलेले पाहून मी त्यांच्या समोर गेलें. इतक्यांत हरि कोठें राहिला हें कांहीं कळेना ४. पुढें लांकडाचे खुंट, वेलीच्या जाळ्या आल्या. न कळे, कृष्णानें काय चेष्टा मांडली ती ५. तुकाराम महाराज म्हणतात, संत आलेल्या वाटेनें आपण जाऊं आणि हरीला पाहूं, म्हणजे पायांत स्वर्ग-नरकाचा कांटा मोडणार नाहीं ६. [३८३०]

एक बालस्वभावी गौळण आपल्या आईला बोबड्या शब्दांत म्हणते, हे आई, मला घरीं जा असें कां म्हणतेस? माझेबरोबर नंदाचा मुलगा श्रीकृष्ण खेळत आहे १. फार दिवसांनीं त्याची व माझी गांठ पडली आहे, म्हणून ह्याचा व माझा वियोग न व्हावा असें मला वाटतें २. त्याचें मृदु भाषण माझ्या मनाला आवडतें आणि त्याला पाहाण्यांत डोळ्यांचें पातें हालत नाहीं ३. मी आज सकाळीं सर्वांना चोरून आलें आहें, तुम्हीं व्यर्थ कां माझी पाठ पुरविली? ४. ह्या ठिकाणीं तुमचें काय काम खोळंबलें आहे? तुम्ही चांगल्या असून मला घरीं कां कोंडतां? ५. तुकाराम महाराज म्हणतात, तुकयाचा स्वामी वैकुंठनायक, त्याशीं मी कांहीं एक बोलतें, तरी तुम्ही सर्व जणी बाजूला व्हा ६. [३८३१]

एक गवळण म्हणते, आतां मी परत येत नाहीं. देवाच्या प्रीतीनें मी येथें आलें आहें. ह्यासंबंधानें जग कितीहि रागावलें तरी तें माझें काय करील? १. तुम्ही सर्व परक्या (अभक्त अनधिकारी) अट्टाहास कां करितां? जे शब्द तुम्ही बोलाल ते सर्व खोटे होतील २. ह्या देवाच्या दर्शनानें माझें मन व डोळे देवाच्या स्वरूपीं स्थिर झाले. ते क्षणभर देखील तेथून वेगळे होणें आवडत नाहीं ३. कांहीं कामकाज करणें नकोसें वाटतें. दुसऱ्यानें बोललेलें आवडत नाहीं, माझें अंतःकरण श्रीहरीच्या कामबाणानें वेधून गेलें आहे ४. भगवंतापासून निराळें होऊन असणें म्हणजे त्या जगण्यास आग लागो, असें माझ्या मनानें बळकट घेतलें आहे, ह्यासंबंधानें मी कधींहि माघार घेणार नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, ती गवळण म्हणते, कीं आतां माझी मोठीशी इच्छा धरूं नका, कारण दाता देव आणि मी एके शय्येवर निजलों आहों ६. [३८३२]

हरिरत असणाऱ्या चपल स्त्रिया (गर्भधारण) स्थितीवर येत नाहींत (अथवा देह स्थितीवर येईनात) १. काम भोगणारा सर्वोत्तम देव सर्वांगानें भोग घेतो २. वाच्यत्वाचें वर्णन वाचेकडून होईना (श्रीहरिसुखाचें वर्णन वाणीनें करितां येईना.) ह्याविषयीं कोठें काय करावें? त्यांना कर्तव्य–अभाव स्थिति प्राप्त झाली होती. ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाचें वेड लागलेल्या त्या उदार गवळणी देवासारख्या सच्चिदानंदरूप झाल्या ४. [३८३३]

गौळणी आल्या वाज । म्हणती या गे राखों आज । सांपडवूनी माज–। घरांत धरुनी कोंडूं । उभें कवाड उभ्या काळोशाचे आड । साता पांचा एक भीड मौनेंचि ठेल्या ॥ १ ॥ नित्य सोंकवला नेदी । सांगों चित्त बोला । आतां सांपडतां याला । कोण सोडी जीवें ॥ २ ॥ जाणोनियां हरी त्याच घरा आला चोरी । गडियां ठेवूनी बाहेरी पूर्वद्वारें शिरे । त्यांच्या भयाभीत चाले पिलंगत भोंवतालें । पाहे तंव देखियेलें नवनीत पुढें ॥ ३ ॥ उतरोनियां शिंकें । पाहे चाखोनियां निकें । गोड तेंचि एका एकें हातीं लांबवितो । जाणे राखती तयांसी । तेथें अधिकचि नासी । माग लावी हात पुसी । चोरी जाणावया ॥ ४ ॥ जाणोनियां नारी मूळ वर्मद्वार धरी । माज कोंडूनी भीतरीं । घरांत धरियेला । कां रे नागवीसी माझें मुळीं लागलासी । आतां आणवीन तुजपाशीं । मागें खादलें तें ॥ ५ ॥ दोन्ही संधीं बाहे धरुनी नेती माते पाहे । काय नासी केली आहे । घरामाजी येणें । तुका म्हणे मुख । त्याचें वाटों नेदी दुःख । दसवंती कवतुक करूनी रंजविल्या ॥ ६ ॥ [३८३४]

: बालक्रीडेचे अभंग :

देवा आदिदेवा जगत्रयजीवा । परियेसीं केशवा विनंति माझी ॥ १ ॥ माझी वाणी तुझे वर्णी गुण नाम । ऐसें देईं प्रेम कांहीं कळा ॥ २ ॥ कळा तुजपाशीं आमुचें जीवन । उचित करून देईं आम्हां ॥ ३ ॥ आम्हां शरणांगतां तुझाचि आधार । तूं तंव सागर कृपासिंधु ॥ ४ ॥ सिंधु पायवाट होय तुझ्या नामें । जाळी महा कर्मे (जळतील कर्मे) दुस्तरें तीं ॥ ५ ॥ तें फळ उत्तम तुझा निजध्यास । नाहीं गर्भवास सेविलिया ॥ ६ ॥ सेविलिया रामकृष्ण नारायण । नाहीं त्या बंधन

मोठ्या श्रमानें सर्व गवळणी आल्या व त्या आपापसांत म्हणूं लागल्या, कीं आज आपण राखण करीत बसूं आणि कृष्णाला ओढून पकडूं व माजघरांत कोंडून ठेवूं. अशा भावनेनें दाराच्या आड काळोखांत पांच, सात मिळून चुप्प उभ्या राहिल्या १. देव नित्य (आमच्या घरीं चोरी करावयास) सवकला आहे. त्याला कितीहि सांगितलें तरी तो चित्त देत नाहीं (आमचें बोलणें मनावर घेत नाहीं.) आतां जर तो सांपडला तर त्याला जीवानें कोण सोडील? २. हा त्या गवळणींचा बेत जाणून तो देव त्यांच्या घरीं मुद्दाम चोरी करावयास आला. आपल्या व आपल्या बरोबरीच्या गड्यांना बाहेर ठेवून, देवानें पूर्वेकडील द्वारानें आंत प्रवेश केला व गवळणींच्या भीतीनें भोंवतालीं पाहात लपत चालूं लागला. इतक्यांत पाहातात तों त्याला लोणी पुढें दिसलें ३. मग देवानें शिंकें खालीं काढलें व त्यांतील तें लोणी देव चाखून पाहूं लागला व त्यांत जें गोड लागलें, तें एकमेकांच्या हातोहातीं लांबविलें. ज्या कोणी राखण बसल्या होत्या, त्यांना देवांनीं जाणून त्यांच्या घरची अधिक नासाडी केली व लोणी, दूध खाऊन त्यांना चोरीचा माग लागावा अगर चोरी कोणी केली असें समजावें म्हणून तेथें जवळच हात पुसले ४. मूळबंधाचें मर्मद्वार गवळणींनीं जाणून धरलें आणि भगवत्स्वरूपास हृदयरूपी घरांत कोंडून टाकलें. अहो देवा, तुम्हीं आमचें लोणी, दूध कां हरण केलें? आमच्या तुम्ही मूळावर आले आहांत. तुम्ही जें पूर्वी आमचें खालें आहे तें सर्व आज मी तुमच्याकडून परत आणवीन ५. दोन्ही खांद्यांच्या संधींमध्यें बकुटी धरून गौळणींनीं त्याच्या आईजवळ त्याला नेलें व त्या म्हणतात, कीं ह्यानें घरामध्यें किती नासाडी केली पाहा. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरीच्या मुखावलोकनानें त्यांना दुःख वाटेनासें झालें. त्याचें कौतुक यशोदेनें करून त्या गवळणींना रंजविलें ६. [३८३४]

हे केशवा, तूं सर्व देवांचा मूळ देव असून त्रैलोक्याचा जीव आहेस. त्या तुला माझी एक विनंति ऐकावी १. माझ्या वाणीनें तुझे गुणानुवाद व नाम वर्णन करावें अशा प्रकारचें प्रेमज्ञान दे २. आमची जीवनकळा तुझ्या हातीं आहे ती आम्हांस योग्य अधिकारानें दे ३. तूं तर कृपेचा समुद्र आहेस. म्हणून आम्ही तुला शरण आलों आहों. ह्याकरितां आम्हांला तूंच एक आधार आहेस ४. तुझ्या नामस्मरणानें भयंकर कर्माचें दहन होऊन भवसमुद्रावर पायरस्ता होतो ५. तुझ्या स्वरूपाचें ध्यान सतत करणें हेंच उत्तम फळ आहे व त्यायोगानें गृहवासादि दुःखें निवारण होतात ६. रामकृष्ण

संसाराचें ॥ ७ ॥ संसार ते काय तृणवतमय । अग्नि त्यासी खाय क्षणमात्रें ॥ ८ ॥ क्षणमात्रें जाळी दोषांचिया रासी । निंद्य उत्तमासी वंद्य करी ॥ ९ ॥ करीं ब्रीद साचें आपलें आपण । पतितपावन दीनानाथ ॥ १० ॥ नाथ अनाथाचा पति गोपिकांचा । पुरवी चित्तींचा मनोरथ ॥ ११ ॥ चित्तीं जें धरावें तुका म्हणे दासीं । पुरविता होशी मनोरथ ॥ १२ ॥ [३८३५]

मनोरथ जैसे गोकुळींच्या जना । पुरवावी वासना तयापरी ॥ १ ॥ ऋण फेडावया अवतार केला । अविनाश आला आकारासी ॥ २ ॥ सीण झाला वसुदेव देवकीस । वधी बाळें कंस दुराचारी ॥ ३ ॥ दुराचारियासी नाहीं भूतदया । आपपर तया पापपुण्य ॥ ४ ॥ पुण्यकाळ त्यांचा राहिलासे उभा । देवकीच्या गर्भी देव आले ॥ ५ ॥ गर्भासी तयांच्या आले नारायण । तुटलीं बंधनें आपें-आप ॥ ६ ॥ आपेंआप बेड्या तुटल्या शृंखळा । वंदाच्या आर्गळा कुलपें कोंडे ॥ ७ ॥ कोंडमार केला होता बहु दिस । सोडवी निमिष न लागतां ॥ ८ ॥ न कळे तो त्यासी सांगितला भाव । आपणासी ठाव नंदाघरीं ॥ ९ ॥ नंदाघरीं जातां येतां वसुदेवा । नाहीं जाला गोवा सवें देव ॥ १० ॥ सवें देव तया आड नये कांहीं । तुका म्हणे नाहीं भय चिंता ॥ ११ ॥ [३८३६]

चिंता ते पळाली गोकुळाबाहेरी । प्रवेश भीतरीं केला देवें ॥ १ ॥ देव आला घरा नंदाचिया गांवा । धन्य त्याच्या दैवा दैव आलें (देव आले) ॥ २ ॥ आलें अविनाश धरूनि आकार । दैत्यांचा संहार करावया ॥ ३ ॥ करावया भक्तजनांचें पाळण । आले रामकृष्ण गोकुळासी ॥ ४ ॥ गोकुळीं आनंद प्रगटलें सुख । निर्भर हे लोक घरोघरीं ॥ ५ ॥ घरोघरीं जाला लक्ष्मीचा वास । दैन्यदारिद्र्यास त्रास आला ॥ ६ ॥ आला नारायण तयांच्या अंतरा । दया क्षमा नरां नारीलोकां

नारायण हीं तुझीं नामें सर्वकाळ जपलीं असतां त्यांस संसाराची बाधा होत नाहीं ७. संसार हा केवळ वाळल्या गवताप्रमाणें आहे. त्यास जसा अग्नि लागला असतां एका क्षणांत भक्षण करितो ८. त्याप्रमाणें पातकांच्या राशि नामस्मरणानें दहन होऊन अति निंद्य लोक सुद्धां श्रेष्ठ वंद्य होतात ९. पतितपावन दीनानाथ हें तुमचें ब्रीद तुम्ही खरें करितां १०. अनाथ जीवांचे नाथ असल्यामुळें गोपिकांचा अंगीकार करून त्यांचे मनोरथ तुम्हीं पूर्ण केले ११. तुकाराम महाराज म्हणतात, तुमच्या सेवकांनीं जें कांहीं मनांत धरावें तें तुम्ही सर्व पूर्ण करितां १२. [३८३५]

गोकुळांतील सर्व लोकांचे जसे मनोरथ असतील तशी त्यांची वासना देवानें पूर्ण केली १. त्यांचें जन्मजन्मांतरींचें सेवेचें ऋण फेडण्याकरितां निराकार होता तो आकारास आला २. यादवांपैकीं वसुदेव आणि देवकी ह्या उभयतांस फार दुःख झालें, कारण त्यांचीं सहा मुलें दुष्ट कंसानें मारलीं ३. त्या कंसाचें आचरण वाईट असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं भूतदया नसून तो पापपुण्य अगर आपलें परावें हें कांहीं जाणत नव्हता ४. वसुदेवदेवकीच्या पूर्वार्जिताचा उदय झाल्यामुळें त्यांच्या पोटीं देवानें अवतार घेतला ५. नारायण हा देवकीच्या उदरीं राहिल्याबरोबर सर्व प्रकारचीं बंधनें आपोआप नाहींशीं झालीं ६. त्या उभयतांच्या पायांतील बेड्या व कवाडांचीं कुलपें, कड्या, अडसर हीं सर्व आपोआप नाहींशीं झालीं ७. त्यापूर्वी कंसानें वसुदेव देवकीस पुष्कळ दिवस कोंडून ठेविलें होतें त्यांना देवांनीं सोडविलें. त्यांस एक निमिष देखील लागलें नाहीं ८. अवतार घेतल्याबरोबर ह्या लहान बालकास कंसाच्या भयापासून कसें रक्षावें हा भाव वसुदेव देवकीस समजला नाहीं, ते वेळीं गोकुळांत नंदाचे घरीं मजला घालवावें असें देवांनीं सांगितलें ९. ते वेळीं वसुदेव हा बाळकृष्णास घेऊन गोकुळास गेला आणि तेथें नंदाचे घरीं त्यास ठेवून परत आला, पण वसुदेवास जातां येतांना मार्गांत कोणत्याहि प्रकारचा अडथळा झाला नाहीं १०. तुकाराम महाराज म्हणतात, त्याचें कारण, ज्याचे बरोबर देव आहे त्याला कोणत्याहि प्रकारचें विघ्न आड येत नाहीं, म्हणून त्यास भय नाहीं व काळजी करण्याचें कारणहि नाहीं ११. [३८३६]

गोकुळामध्यें देवांनीं रिघाव केल्याबरोबर तेथील लोकांची सर्व चिंता दूर पळून गेली १. नंदाचे घरीं प्रत्यक्ष देव आला, म्हणून त्याचें भाग्य धन्य आहे २. जो अविनाश देव तो दुष्टांचा नाश करण्यासाठीं आकारास आला ३. आणि आपल्या भक्तजनांचें रक्षण करावें ह्याकरितांच रामकृष्णांनीं गोकुळांत अवतार घेतला ४. गोकुळामध्यें मूर्तिमंत सुख प्रगट झालें, म्हणून त्या ठिकाणचे लोक आनंदमय व निर्भर झाले ५. तेव्हांपासून घरोघर लक्ष्मीचें वास्तव्य झालें; त्यायोगानें पूर्वीचें दारिद्र्य त्रासून पळून गेलें ६. त्यांच्या हृदयामध्यें नारायणाची वस्ती झाल्याकारणानें क्षमा व दया त्या नरनारींच्या

॥ ७ ॥ लोकां गोकुळींच्या झालें ब्रह्मज्ञान । केलियावांचून जपतपें ॥ ८ ॥ जपतपें काय करावीं साधनें । जंव नारायणें कृपा केली ॥ ९ ॥ केलीं नारायणें आपुलीं अंकित । तोचि त्यांचें हित सर्व जाणे ॥ १० ॥ सर्व जाणे एक विष्णु साच खरा । आणीक दुसरा नाहीं नाहीं ॥ ११ ॥ नाहीं भक्ता दुजें तिहीं त्रिभुवनीं । एका चक्रपाणीवांचूनि त्या ॥ १२ ॥ त्याच्या सुखसंगें घेती गर्भवास । तुका म्हणे आस त्यजूनियां ॥ १३ ॥ [३८३७]

त्यांच्या पूर्वपुण्या कोण लेखा करी । जिहीं तो मुरारी खेळविला ॥ १ ॥ जिहीं अंतर्बाह्य सुखें । मेळवूनि मुखें चुंबन दिलें ॥ २ ॥ दिलें त्यांसी सुख अंतरींचें देवें । जिहीं एका भावें जाणितला ॥ ३ ॥ जाणितला तिहीं कामातुर नारी । कृष्णभोगावरी चित्त ज्यांचें ॥ ४ ॥ ज्यांचें कृष्णीं तन मन जालें रत । गृह पति सुत विसरल्या ॥ ५ ॥ विष तयां जालें धन मान जन । वसविती वन एकांतीं त्या ॥ ६ ॥ एकांतीं त्या जाती हरिसी घेऊनी । भोग इच्छा धणी फेडावया ॥ ७ ॥ वयाच्या संपन्ना तैसा त्यांकारणें । अंतरींचा देणें इच्छाभोग ॥ ८ ॥ भोग त्याग नाहीं दोन्ही जयापासीं । तुका म्हणे जैसी स्फटिक शिळा ॥ ९ ॥ [३८३८]

शिळा स्फटिकाची न पालटे भेदें । दाऊनियां छंदें जैसी तैसी ॥ १ ॥ जैसा केला तैसा होय क्षणक्षणा । फेडावी वासना भक्तिभावें ॥ २ ॥ फेडावया आला अवघियांचा धणी । गोपाळ गौळणी मायबाप ॥ ३ ॥ मायबाप सोडविलें बंदीहुनी । चाणूर मर्दनीं कंसादिक ॥ ४ ॥ दिक नाहीं देणें अरिमित्रा एक । पूतना कंटक मुक्त केली ॥ ५ ॥ मुक्त केला मामा कंस महादोषी । बाळहत्या रासी पातकांच्या ॥ ६ ॥ पाप कोठें राहे हरी आठवितां । भक्ति द्वेषें चिंता जैसा तैसा ॥ ७ ॥ साक्षी तयापाशीं पूर्वील कर्माच्या । बांधला सेवेच्या ऋणें देव ॥ ८ ॥ देव भोळा धांवे भक्ता पाठेंवाटीं ।

ठिकाणीं वसल्या झाल्या ७. त्या गोकुळींच्या लोकांनीं जपतपादि साधनें कांहीं केलीं नसतांहि सर्वांस ब्रह्मज्ञान झालें ८. जर नारायणांनीं कृपा केली तर जपतपादि साधनें काय करावयाचीं आहेत? ९. ती सर्व मंडळी नारायणाची अंकित झाल्यामुळें त्यांचें सर्व हित तोच करीत आहे १०. सर्व विश्वामध्यें एक देवच व्यापक आहे, त्याच्याशिवाय दुसरा कोणी नाहीं असें भक्तांनीं जाणलें आहे ११. एका चक्रधर देवावांचून ह्या त्रैलोक्यांत भक्तांना दुसरें कोणी नाहीं १२. तुकाराम महाराज म्हणतात, असे भक्त देवाचें सुख भोगण्याकरितां सर्व आशा टाकून त्याच्याबरोबर पुनः पुनः जन्म घेतात १३. [३८३७]

जी मंडळी देवास घेऊन रात्रंदिवस खेळवितात त्यांच्या पूर्वपुण्याचें गणित कोणीं करावें? १. ज्यांनीं अंतर्बाह्य सुखानें देवास खेळविलें व त्याच्या मुखास मुख लावून चुंबन घेतलें २. ज्यांनीं एकभावानें देवास जाणलें आहे, त्यांना आपल्या अंतःकरणांतील सुख देवांनीं दिलें ३. ज्यांचें मन कृष्णास भोगण्याविषयीं तत्पर झालें आहे त्या विषयलोभी गवळणींनीं देवास ओळखिलें ४. ज्या ज्या गवळणींचा कृष्णाच्या ठिकाणीं मनःपूर्वक देह जडला त्या त्या गवळणी आपलें घर, मुलें व भ्रतार ह्यांस विसरल्या ५. द्रव्य, लौकिक आणि मान हीं सर्व ज्यांना विषवत् झालीं त्या गवळणी वनामध्यें एकांतवास करीत असत ६. भगवंतास घेऊन इच्छाभोगाची तृप्ति करण्याकरितां त्या एकांतीं जात ७. ज्या गवळणीचें जसें वय असेल व जिच्या मनांत जी इच्छा असेल तें जाणून त्याप्रमाणें देव भोग देत ८. तुकाराम महाराज म्हणतात, हा भोग व त्याग या दोहोंविरहित आहे, पण जशी स्फटिकाची शिळा ज्या रंगावर ठेवावी तशी दिसते, त्याप्रमाणें देवाचें कर्तव्य आहे ९. [३८३८]

ज्याप्रमाणें स्फटिकशाळा सर्व रंगांप्रमाणें दिसून अलिप्त असते, त्याप्रमाणें देव सर्व कर्में करून अलिप्त आहे १. भक्तांनीं भावार्थाच्या योगानें जसा करावा तसा तो होतो व त्यांची वासना पूर्ण करितो २. गौळणी व आईबाप ह्यांची इच्छा पुरविण्याकरितां देव गोकुळास आला ३. त्यानें कंसचाणूरादि दैत्य मारून आपले आईबाप बंधापासून सोडविले ४. तो भक्तजनांस व वैऱ्यांस सारखें पद देतो ही प्रचीत पूतनेचा वध करून त्यानें प्रत्यक्ष दाखविली ५. प्रत्यक्ष बालहत्येच्या पापाच्या राशि करणारा कंसमामा मुक्त केला ६. भक्तीनें अथवा द्वेषानें हरीचा आठव केला असतां पाप कोठें राहील? ७. त्यांच्या पूर्व कर्माचा साक्षी देवच असल्यामुळें सेवेच्या योगानें त्यांचा तो अंकित झाला आहे ८.

उच्चारितां कंठीं मागें मागें ॥ ९ ॥ मानाचा कंटाळा तुका म्हणे त्यासी । धांवतो (धांवें तो) घराशीं भाविकांच्या ॥ १० ॥ [३८३९]

चारी वेद ज्याची कीर्ति वाखाणिती । बांधवी तो हातीं गौळणीच्या ॥ १ ॥ गौळणिया गळा बांधिती धारणीं । पायां चक्रपाणी लागे तयां ॥ २ ॥ तयाघरीं रिघे चोरावया लोणी । रितें पाळतूनी शिरे माजी ॥ ३ ॥ माजी शिरोनियां नवनीत खाये । कवाड तें आहे जैसें तैसें ॥ ४ ॥ जैसा तैसा आहे अंतर्बाह्यात्कारीं । म्हणऊनि चोरी न संपडे ॥ ५ ॥ न संपडे तया करितां खटपट । वाउगे भोभाट वर्माविण ॥ ६ ॥ वर्म जाणती त्या एकल्या एकटा । बैसतील वाटा निरोधूनी ॥ ७ ॥ निवांत राहिल्या निःसंग होऊनी । निश्चळ ज्या ध्यानीं कृष्णध्यान ॥ ८ ॥ न ये क्षणभरी योगियांचे ध्यानीं । धरिती गौळणी भाविका त्या ॥ ९ ॥ भाविका तयांसी येतो काकुलती । शहाण्या मरती न संपडे ॥ १० ॥ न लगे वेंचावी टोली धनानांवें । तुका म्हणे भावें चाड एका ॥ ११ ॥ [३८४०]

चाड अनन्याची धरी नारायण । आपणासमान करी रंका ॥ १ ॥ रंक होती राजे यमाचिये घरीं । आचरणें बरीं नाहीं म्हूण ॥ २ ॥ न संपडे इंद्रचंद्रब्रह्मादिकां । अभिमानें एका तिळमात्रें ॥ ३ ॥ तिळमात्र जरी होय अभिमान । मेरु तो समान भार देवा ॥ ४ ॥ भार पृथिवीचा वाहिला सकळ । जड होती खळ दुष्ट लोक ॥ ५ ॥ दुष्ट अभक्त जे निष्ठुर मानसीं । केली हे तयांसी यमपुरी ॥ ६ ॥ यमदूत त्यांसी करिती यातना । नाहीं नारायणा भजले जे ॥ ७ ॥ जे नाहीं भजले एका भावें हरी । तयां दंड करी यमधर्म ॥ ८ ॥ यमधर्म म्हणे तया दोषियांसी । कां रे केशवासी चुकलेती ॥ ९ ॥ चुकलेती कथा पुराणश्रवण । होते तुम्हां कान डोळे मुख ॥ १० ॥ कान डोळे मुख संतांची संगति । न धराच चित्तीं सांगितलें ॥ ११ ॥ सांगितलें संतीं तुम्हां उगवुनी । गर्भासी येऊनी यमदंड ॥ १२ ॥

भक्तांनीं आपल्या कंठामध्यें नाम धारण केलें असतां त्यांच्या मागेंपुढें तो धांवतो असा तो भोळा आहे ९. तुकाराम महाराज म्हणतात, त्या देवास मानाची गरज नाहीं. ज्याच्या ठिकाणीं भाव आहे त्याचे घरीं तो धांवत जातो १०. [३८३९]

ज्या श्रीहरीची चारी वेद कीर्ति वर्णन करितात, तो स्वतःला गौळणीच्या (यशोदेच्या) हातानें उखळाला बांधवून घेतो! १. ज्याचा गळा गौळणी चोरी केल्याबद्दल घुसळखांबाला बांधीत त्या वेळीं तो चक्रपाणि त्यांच्या पायां पडतो! २. त्यांच्या घरीं ह्या वेळीं कोणी नाहीं अशी पाळत ठेवून लोणी चोरण्याकरितां माजघरांत शिरतो ३. माजघरांत शिरून लोणी खातो, पण गौळणी पाहातात तों दार जसेंच्या तसें लावलेलें दिसतें ४. प्रत्येकाच्या हृदयांत व बाहेर श्रीहरि जसाच्या तसा व्यापक असल्यामुळें चोरी सांपडत नाहीं ५. गौळणींनीं हरीला धरण्याकरितां कितीहि प्रयत्न केले, कितीहि आरडाओरड केली तरी तो हस्तगत होण्याचें मर्म न कळल्यामुळें तो हातीं सांपडत नाहीं ६. हरिप्राप्तीचें वर्म हरिभक्ति आणि संतसंगति हें ज्यांना कळलें त्या गौळणी एकट्या वाट रोखून बसतात ७. व त्या कृष्णाच्या नांवें कृष्णरूप होऊन निःसंग, निश्चल, अशा निवांत राहातात ८. क्षणभर देखील जो परमात्मा योग्याच्या ध्यानांत येत नाहीं त्याला भाविक गवळणी धरितात ९. त्या वेळीं त्यांच्या हातून सुटण्याकरितां प्रभु त्यांना कींवकाकुळत करतो, आणि शहाण्या यत्न करून मेल्या तरी त्यांस सांपडत नाहीं १०. तुकाराम महाराज म्हणतात, हरि प्राप्त करून घेण्यास एक टोलीच्या कवड्यांइतकें धन सुद्धां खर्च करावें लागत नाहीं. तेथें फक्त भावाचीच गरज आहे ११. [३८४०]

नारायण हा अनन्य भक्ताविषयीं इच्छा धरतो व तो रंक जरी असला तरी त्यास आपली पदवी देतो १. राजे हे आचरण शुद्ध नसल्यामुळें यमाच्या घरीं रंक होतात २. इंद्र, चंद्र, ब्रह्मादिकांनाहि, तिळप्राय अभिमान असल्यास, तो सांपडत नाहीं ३. तिळाएवढा अभिमान झाल्यास त्याचें ओझें देवास मेरुपर्वताएवढें होतें ४. सर्व पृथ्वीचा भार देवानें धारण केला आहे, तथापि जे लोक दुष्ट खळ आहेत त्यांचा भार देवास जड होतो ५. जे कोणी दुष्ट व भक्तिहीन असून ज्यांचें मन निर्दय आहे, त्यांच्याकरितां देवांनीं यमलोक केला आहे ६. जे नारायणाला भजले नाहींत, त्यांना त्या यमलोकामध्यें यमदूत यातना करितात ७. ज्यांनीं एका भावानें हरीचें भजन केलें नाहीं, त्यांना यमधर्म शिक्षा करितो ८. त्या पाप्यांना यमधर्म म्हणतो, अरे तुम्हीं केशवाचें भजन कां केलें नाहीं? ९. व कथा, पुराण, श्रवण कां केलें नाहीं? तुम्हांला कान डोळे, तोंड, हीं होतीं ना? १०. कान, डोळे, तोंड असूनहि संतांची संगति केली नाहीं व त्यांनीं सांगितलेला उपदेशहि चित्तांत घेतला नाहीं ११. तुम्हांला जन्माला येऊन एक दंड आहे, असें संतांनीं स्पष्ट सांगितलें आहे.

दंडूं आम्ही रागें म्हणे यमधर्म । देवा होय श्रम दुर्जनांचा ॥ १३ ॥ दुर्जनांचा येणें करूनी संहार । पूर्ण अवतार रामकृष्ण ॥ १४ ॥ रामकृष्णनामें रंगले जे नर । तुका म्हणे घर वैकुंठीं त्या ॥ १५ ॥ [३८४१]

वैकुंठींच्या लोकां दुर्लभ हरिजन । तथां नारायण समागमें ॥ १ ॥ समागम त्यांचा धरिला अनंतें । जिहीं चित्तवित्तें समर्पिलीं ॥ २ ॥ समर्थें तीं (समर्थ ते) गाती हरीचे पवाडे । येर ते बापुडे रावराणे ॥ ३ ॥ रामकृष्णें केलें कौतुक गोकुळीं । गोपाळांचे मेळीं गाई चारी ॥ ४ ॥ गाई चारी मोहोरी पांवा वाहे पाठीं । धन्य जाली काठी कांबळी ते ॥ ५ ॥ काय गौळियांच्या होत्या पुण्यरासी । आणीक त्या म्हैसी गाई पशु ॥ ६ ॥ सुख तें अमुप लुटिलें सकळीं । गोपिका गोपाळीं धणीवरी ॥ ७ ॥ धणीवरी त्यांसी सांगितली मात । जयाचें जें (जैसें) आर्त तयापरी ॥ ८ ॥ परी याचें तुम्ही आइका नवल । दुर्गम जो खोल साधनासी ॥ ९ ॥ शिक लावुनियां घालिती बाहेरी । पाहाती भीतरीं सवेंचि तो ॥ १० ॥ तोंडाकडे त्यांच्या पाहे कवतुकें । शिव्या देतां सुखें हांसतसे ॥ ११ ॥ हांसतसे शिव्या देतां त्या गौळणी । मरतां जपध्यानीं न बोले तो ॥ १२ ॥ तो जें जें करील तें दिसे उत्तम । तुका म्हणे वर्म दावी सोपें ॥ १३ ॥ [३८४२]

वर्म दावी सोपें भाविकां गोपाळां । वाहे त्यांच्या गळां पाले माळा ॥ १ ॥ मान देती आधीं मागतील डाव । देवा तें गौरव माने सुख (देव तें गौरव सुखें मानी) ॥ २ ॥ मानती ते मंत्र हमामा हुंबरी । सिंतोडिती वरी स्नान तेणें ॥ ३ ॥ वस्त्रें घोंगडिया घालूनियां तळीं । वरी वनमाळी बैसविती ॥ ४ ॥ तिहीं लोकांसी जो दुर्लभ चिंतना । तो धांवे गोधना वळतिया ॥ ५ ॥ त्यांच्या वचनांचीं पुष्पें वाहे शिरीं । नैवेद्य त्यांकरीं कवळ मागे ॥ ६ ॥ त्यांचिये मुखींचें हिरोनियां घ्यावें । उच्छिष्ट तें खावें

---

१२. आतां तुम्हांला आम्ही शिक्षा करूं असें मोठ्या रागानें यमधर्म त्यांना म्हणतो, कारण जे लोक दुराचारी आहेत त्यांचा देवाला ताप होतो १३. भगवंतांनीं दाशरथी राम व वासुदेव कृष्ण हे दोन पूर्ण अवतार घेऊन दुर्जनांचा संहार केला १४. तुकाराम महाराज म्हणतात, त्या रामकृष्ण नामाच्या चिंतनांत जे लोक रंगले आहेत त्यांना वैकुंठामध्यें घर मिळतें १५. [३८४१]

वैकुंठांतील लोकांना हरिभक्तांची प्राप्ति दुर्लभ आहे, कारण त्यांच्या बरोबर निरंतर नारायण असतो १. ज्या भक्तांनीं आपलें चित्त व धन श्रीहरीला अर्पण केलें आहे, त्यांची संगति तो धरतो २. जे कोणी हरीची कीर्ति वर्णन करितात ते समर्थ आहेत. बाकीचे श्रेष्ठ राजे जरी असले तरी ते दीन आहेत ३. रामकृष्णांनीं गोकुळामध्यें गोपाळांच्या मेळ्यांत गाई चारण्याचें कौतुक केलें ४. गाई चारतेवेळीं वेणु व मुरली पाठीवर घेतली, त्याच्या हातांतील काठी व अंगावरील कांबळी हीं धन्य आहेत ५. त्या गौळी लोकांच्या व गाई, म्हशी आदिकरून पशुमात्रांच्या पुण्याच्या राशी किती होत्या हें समजत नाहीं ६. कारण त्या गौळणींनीं व गोपाळांनीं अमित सुखाचा भोग तृप्त होईपर्यंत घेतला ७. आपण तृप्त होऊन ह्या गोष्टी ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें बाहेर प्रगट केल्या ८. परंतु त्या देवाचें एक नवल ऐकावें, कीं जो इतर साधनांनीं दुर्लभ आहे ९. त्या देवास शिक्षा करून गौळणीनें घराच्या बाहेर जरी त्याला घातला, तरीं तो परतून पाहिलें असतां, त्याच ठिकाणीं राहातो १०. त्या गौळणीनें त्यास शिव्या जरी दिल्या तरी तो तिच्या तोंडाकडे कौतुकानें पाहून हंसतो ११. नाना प्रकारचीं जपतपादि साधनें करून जरी कोणी मेले तरी तो देव त्यांच्या बरोबर भाषण देखील करीत नाहीं, पण तो गौळणींच्या शिव्या ऐकून हंसतो १२. तुकाराम महाराज म्हणतात, तो देव जें जें कांहीं करील तें सर्व चांगलेंच दिसतें. असें सोपें वर्म त्यानें दाखविलें आहे १३. [३८४२]

देवानें आपल्या प्राप्तीचें सोपें वर्म भाविक गोपाळांस दाखविलें; तें असें, कीं त्या गोपाळांनीं झाडपाल्याच्या माळा गळ्यामध्यें घालून त्याची पूजा करावी १. आणि ते गोपाळ कृष्णास, आधीं आमचा डाव दे, हाच मान तुझा आहे असें म्हणतात. त्या बोलाचें देव सुख मानतो २. हमामा व हुंबरी गोपाळ घालीत तेव्हां त्यांचा थुंका देवाच्या आंगावर येई पण तें मंत्रयुक्त स्नान ह्यांनीं मला घातलें असें देव मानतात ३. घोंगड्यांच्या व वस्त्रांच्या वड्या एकावर एक घालून त्यावर कृष्णास बसवितात ४. जो देव चिंतन करण्यास त्रैलोक्यास दुर्लभ आहे, तो गाई वळण्याकरितां धांवत जातो ५. गोपाळांनीं गाई वळून आणण्याचे बोल कृष्णाकडे खर्च केले म्हणजे तो देव असें समजतो, कीं त्यांनीं मला वाक्पुष्पांजलीच अर्पण केली; आणि त्यांस म्हणतो, कीं तुमच्या हातांतील घांस मला द्या, म्हणजे मी नैवेद्य अर्पण केला असें समजेन ६.

धणीवरी ॥ ७ ॥ वरी माथां गुंफे मोरपिसांवेटी । नाचे टाळी पिटी त्यांच्या छंदें ॥ ८ ॥ छंदें नाचतील जयासवें हरी । देहभाव वरी विसरलीं ॥ ९ ॥ विसरल्या वरी देहाची भावना । तेचि नारायणा सर्व-पूजा ॥ १० ॥ पूजा भाविकांची न कळतां घ्यावी । न मागतां दावी निज ठाव ॥ ११ ॥ ठाव पावावया हिंडे मागें मागें । तुका म्हणे संगें भक्तांचिया ॥ १२ ॥ [३८४३]

भक्तजनां दिलें निजसुख देवें । गोपिका त्या भावें आलिंगिल्या ॥ १ ॥ आलिंगिल्या गोपी गुणवंता नारी । त्यांच्या जन्मांतरीं हरि ऋणी ॥ २ ॥ रुसलिया त्यांचें करी समाधान । करविता आपण क्रिया करी ॥ ३ ॥ क्रिया करी तुम्हां न वजे पासुनी । अवघिया जणी गोपिकांसी ॥ ४ ॥ गोपिकांसी म्हणे वैकुंठींचा पति । तुम्ही माझ्या चित्तीं सर्व भावें ॥ ५ ॥ भाव जैसा माझ्या ठायीं तुम्ही धरा । तैसाचि मी खरा तुम्हांलागीं ॥ ६ ॥ तुम्हासी कळों द्या हा माझा साच भाव । तुमचाचि जीव तुम्हां ग्वाही ॥ ७ ॥ ग्वाही तुम्हां आम्हां असे नारायण । आपुलीच आण वाहातसे ॥ ८ ॥ सत्य बोले देव भक्तिभाव जैसा । अनुभव सरसा आणूनियां ॥ ९ ॥ त्यांसी बुझावितो वेगळाल्या भावें । एकीचें हें ठावें नाहीं एकी ॥ १० ॥ एकी क्रिया नाहीं अवघियांचा भाव । पृथक हा देव देतो तैसें ॥ ११ ॥ तैसें कळों नेदी जो मी कोठें नाहीं । अवघियांचे ठायीं जैसा तैसा ॥ १२ ॥ जैसा मनोरथ जये चित्तीं काम । तैसा मेघश्याम पुरवितो ॥ १३ ॥ पुरविले मनोरथ गोपिकांचे । आणीक लोकांचे गोकुळींच्या ॥ १४ ॥ गोकुळींच्या लोकां लावियेला छंद । बैसला गोविंद त्यांचे चित्तीं ॥ १५ ॥ चित्तें हीं चोरुनि घेतलीं सकळां । आवडी गोपाळावरी तया ॥ १६ ॥ तयासी आवडे वैकुंठनायक । गेलीं सकळीक विसरोनी ॥ १७ ॥ निंदा स्तुति कोणी न करी कोणाची । नाहीं या देहाची शुद्धि कोणा ॥ १८ ॥ कोणासी नाठवे कन्या पुत्र माया । देव म्हणुनि तया (म्हणुनियां) चुंबन देती ॥ १९ ॥ देती या टाकून भ्रतारांसी घरीं ।

त्यास घांस न देतां गोपाळ जर आपणच खाऊं लागले तर त्यांच्या तोंडांतील घांस बळानें घेऊन तृप्त होईतोंपर्यंत देव खातो ७. मोराच्या पंखांचा मुगुट करून ते कृष्णाच्या मस्तकीं घालितात; मग तो त्यांच्या छंदानें टाळी वाजवून नृत्य करितो ८. ज्यांच्या समागमें हरि आहे तेहि आनंदानें देहभाव विसरून नाचतात ९. जे कोणी देहभाव विसरून नामछंदानें नाचतात, त्यांची षोडशोपचार पूजा नारायणास अर्पण होते १०. भाविक जनांची पूजा त्यांस न समजतां देव घेतो आणि मागितल्याशिवाय त्यांस आपल्या निजपदाची प्राप्ति करून देतो ११. तुकाराम महाराज म्हणतात, तो देव भक्तजनांस उत्तम ठिकाण (निजस्वरूपाची प्राप्ति) मिळविण्यासाठीं त्यांच्या मागें मागें हिंडतो १२. [३८४३]

जें स्वस्वरूपाचें सुख भक्तजनांस दिलें तेंच आलिंगनाच्या निमित्तानें गवळणींस दिलें १. त्या गवळणी जरी गुणवंत होत्या तरी त्यांच्या जन्मजन्मांतरींच्या सेवेचें ऋण देवावर असल्यामुळें त्या गोपींस तो आलिंगन देई २. त्या जरी रुसल्या तरी त्यांचें समाधान करी आणि आपण कर्ता करविता असून त्यांच्या पुढें शपथ वाही ३. तो म्हणे, कीं तुमच्यापासून मी दूर नाहीं ४. तो वैकुंठवासी देव गोपींस म्हणतो, कीं अगे, तुमची आवड माझ्या मनास सर्व प्रकारें आहे ५. अगे, तुम्ही जसा भाव माझ्या ठिकाणीं ठेवाल, तसा मी तुम्हांस खरोखर प्राप्त होईन ६. अशा प्रकारचा खरा भाव माझ्या अंतःकरणांतील तुम्ही समजा. ह्याविषयीं तुमचाच जीव तुम्हांस साक्षी आहे ७. अगर उभयतांच्या प्रीतीस देव साक्षी आहे, अशी आपलीच शपथ आपण वाही ८. जसा ज्याचा भक्तिभाव असेल तसें त्याबरोबर खरें भाषण करून त्याच्या अनुभवास आणून दाखवितो ९. वेगवेगळ्या प्रकारें प्रत्येक गोपीची तो समजूत करतो पण एकमेकींचा प्रकार एकमेकींस समजूं देत नाहीं १०. त्याचें कारण सर्वांचें कर्तव्यकर्म व भावार्थ सारखा नसल्यामुळें ज्याच्या त्याच्या भावाप्रमाणें देव देणगी देतो ११. सर्वांच्या ठिकाणीं व्यापक असून प्रत्येकास मी सर्व व्यापून आहें असें कळूं देत नाहीं १२. पण जिच्या मनामध्यें जशी इच्छा असेल त्याप्रमाणें हा मेघःशाम काम (भोगवासना) पुरवितो १३. सर्व गवळणींचे व गोकुळांतील सर्व लोकांचे मनोरथ देव पूर्ण करितात १४. त्या गोकुळींच्या लोकांस आपला छंद लावून त्यांच्या चित्तामध्यें गोविंदानें वस्ती केली १५. सर्वांचें चित्त चोरून घेतल्यामुळें सर्वांचीच आवडी कृष्णावर बसली १६. लोकांना हा वैकुंठवासी देव आवडल्यामुळें सकळ प्रपंचाचा विसर झाला १७. ह्याकरितां कोणी कोणाची स्तुति अथवा निंदा करीत नसून आपल्या देहाची शुद्धि देखील कोणास नाहीं १८. कन्या, पुत्र, आई, बाप वगैरे आप्तत्व कोणासहि नसून सर्व देवच आहे असें समजून त्यांचें (सर्वांचें) प्रीतीनें चुंबन घेतात १९. त्या गवळणींच्या

लाज ते अंतरीं आथींच ना ॥ २० ॥ नाहीं कोणा धाक कोणाशीं कोणाचा । तुका म्हणे वाचा काया मनें ॥ २१ ॥ [३८४४]

मनें हरिरूपीं गुंतल्या वासना । उदास या सुना गौळियांच्या ॥ १ ॥ त्यांच्या भ्रतारांचीं धरूनियां रूपें । त्यांच्या घरीं त्यांपें भोग करी ॥ २ ॥ करी कवतुक त्यांचें तयापरी । एका दिसे हरि एका लेंक ॥ ३ ॥ एक भाव नाहीं सकळांच्या चित्तीं । म्हणऊनि प्रीति तैसें रूप ॥ ४ ॥ रूप याचें आहे अवघेंचि एक । परि कवतुक दाखविलें ॥ ५ ॥ लेंकरूं न कळे स्थूल कीं लहान । खेळे नारायण कवतुकें ॥ ६ ॥ कवतुक केलें सोंग बहुरूप । तुका म्हणे बाप जगाचा हा ॥ ७॥ [३८४५]

जगाचा हा बाप दाखविलें माये । माती खातां जाये मारावया ॥१॥ मारावया तिनें उगारिली काठी । भुवनें त्या पोटीं चौदा देखे ॥ २ ॥ देखे भयानक झांकियेले डोळे । मागुता तो खेळे तियेपुढें ॥ ३ ॥ पुढें रिघोनियां घाली गळां कव । कळों नेदी माव मायावंत ॥ ४ ॥ मायावंत हरीरूप काय जाणे । माझें माझें म्हणे देवा बाळ ॥ ५ ॥ बाळपणीं रिठा रगडिला दाढे । मारियेले गाढे काग बग ॥ ६ ॥ गळां बांधवूनी (बांधूनियां) उखळासी दावें । उन्मळी त्या भावें विमळार्जुन ॥ ७ ॥ न कळे जुनाट जगाचें जीवन । घातलें मोहन गौळियांसी ॥ ८ ॥ शिंकीं उतरूनी खाय नवनीत । न कळे वहुत होय तरी ॥ ९ ॥ तरी दुधें डेरे भरले रांजण । काय ते भरून दावी दुणी ॥ १० ॥ दुणी जालें त्याचा मानिती संतोष । दुभत्याची आस धरूनियां ॥ ११ ॥ आशाबद्ध देव असोनी जवळी । नेणती ते काळीं स्वार्थामुळें ॥ १२ ॥ मुळें याच (मूळ यांचा) देव न कळे तयांसी । चित्त आशापाशीं गोवियेलें

अंतःकरणामध्यें मुळींच लज्जा नसल्यानें आपआपल्या नवऱ्याला घरीं टाकून देऊन त्या कृष्णाकडे जातात २०. तुकाराम महाराज म्हणतात, काया-वाचा-मनानें कृष्णावर आवडी असल्यामुळें कोणाचाच कोणाला धाक नाहीं २१. [३८४४]

श्रीहरीचे रूपावर मनाची आवड बसल्यामुळें त्या गवळयांच्या सुना देहावर उदास झाल्या १. म्हणून हा देव त्यांच्या नवऱ्यांचें रूप धारण करून त्यांच्या घरीं जाऊन त्यांची भोगेच्छा पूर्ण करितो २. ज्याच्या त्याच्या भावाप्रमाणें कौतुक करून, कोणास कृष्ण आहे व कोणास आपला मुलगा आहे, असें भासवितो ३. कारण सर्वांच्या मनांत सारखा भाव नसल्यामुळें ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणें हा रूप धारण करितो ४. परंतु खरें पाहिलें असतां, ह्याचें रूप एकच असून कौतुक दाखविण्याकरितां त्यानें हा खेळ मांडिला ५. हा नारायण कौतुकानें खेळत आहे; पण ह्याचें रूप लहान आहे कीं मोठें आहे हें कोणासहि समजत नाहीं ६. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवापासून सर्व जग उत्पन्न झालें. तो बहुरूप्याप्रमाणें सोंग धारण करून कौतुकानें खेळत आहे ७. [३८४५]

एक वेळ कृष्णानें माती खाल्ल्यामुळें यशोदा मारावयास लागली. त्या वेळीं मी जगाचा बाप आहें, असें तिजला दाखविलें १. मारण्यास काठी उगारल्याबरोबर मी माती खाल्ली नाहीं असें म्हणून तोंड पसरून दाखविलें, त्यामध्यें मातेस सर्व ब्रह्मांड दृष्टीस पडलें २. असें भयंकर स्वरूप पाहून तिनें डोळे झांकले, मग तो तिच्यापुढें पूर्वीप्रमाणें खेळूं लागला ३. तिच्यापुढें जाऊन गळयास मिठी घातली आणि आपली माया त्या मायिक लोकांस कळूं दिली नाहीं ४. मायाविग्रही ह्याचें रूप आहे असें न जाणतां हें माझें लेंकरूंच आहे असें ती म्हणते ५. रिठासुर दैत्य कंठा होऊन आला, तो गळयांत बांधते वेळीं बाळपणींच ह्या देवानें त्याला दाढेंत चेंगरून मारलें व आणखीहि मोठमोठे दैत्य कागासुर, बकासुर वगैरे मारले ६. कुबेराच्या दोघां पुत्रांस नारदानें शाप दिल्यामुळें विमल, अर्जुन ह्या नांवाचे वृक्ष होऊन ते गोकुळांत राहिले होते. त्यांस उद्धरण्याकरितां कृष्णानें यशोदेच्या हातून आपणास उखळाला बांधून घेतलें; आणि तें उखळ घेऊन दोन वृक्षांच्या सांधींतून पलीकडे जात असतां त्याच्या ओढीनें वृक्ष मोडले, त्या वेळीं कुबेरपुत्र शापांतून मुक्त झाले ७. सर्व ब्रह्मांडास जगविणारा हा देव जुनाट आहे; पण त्या गवळी लोकांस मायेचें मोहन घातल्यामुळें हें कळत नाहीं ८. गवळणींच्या घरीं जाऊन शिंक्यावरील लोणी खाल्लें तरी तें गाडग्यामध्यें पूर्वीपेक्षां अधिक आहे असें दिसे, तरी ह्या देवाची माया त्यांस समजत नसे ९. दहीं दुधाचे डेरे, रांजण भरलेले खाऊन आपण त्यांस दुप्पट करून दाखवी १०. घरचें दुभतें दुप्पट झालें म्हणून त्या गवळयांस मोठा संतोष वाटे ११. आशेंत गुंतलेले लोक स्वार्थामुळें देव जवळ असतांनाहि त्यास ओळखीत नाहींत १२. हा देव विश्वाचें मूळ आहे, पण त्या गवळी लोकांचें चित्त आशेच्या

॥ १३ ॥ लेंकरूं आमचें म्हणे दसवंती । नंदाचिये चित्तीं तोचि भाव ॥ १४ ॥ भाव जाणावया चरित्र दाखवी । घुसळितां र्‍वी डेरियांत ॥ १५ ॥ डेरियांत लोणी खादलें रिघोनी । पाहे तों जननी हातीं लागे ॥ १६ ॥ हातीं धरूनियां काढिला बाहेरी । देखोनियां करी चोज त्यासी ॥ १७ ॥ सिकवी विचार नेणें त्याची गती । होता कोणे रीतीं डेरियांत ॥ १८ ॥ यांसी पुत्रलोभें न कळे हा भाव । कळों नेदी माव देव त्यांसी ॥ १९ ॥ त्यांसी मायामोहजाळ घाली फांसा । देव आपणसा कळों नेदी ॥ २० ॥ नेदी भाव राहों लोभिकांचे चित्तीं । जाणतांचि होती आंधळीं तीं ॥ २१ ॥ आंधळीं तीं तुका म्हणे संसारीं । जिहीं नाहीं हरी ओळखिला ॥ २२ ॥ [३८४६]

ओळखी तयांची (तयांसी) होय एकभावें । दुसरिया देवें न पविजे ॥ १ ॥ न पविजे कदा उन्मत्त जालिया । दंभ तोचि वायां नागवण ॥ २ ॥ वनवास देवा कारणें एकांत । करावीं हीं व्रततपें याग ॥ ३ ॥ व्रत याग यांसी फळलीं बहुतें । होतीं या संचितें गोळियांचीं ॥ ४ ॥ यांसी देवें तारियेलें न कळतां । मागील अनंता ठावें होतें ॥ ५ ॥ होतें तें द्यावया आला नारायण । मायबापां ऋण गोळियांचें ॥ ६ ॥ गोळियांचें सुख दुर्लभ आणिकां । नाहीं ब्रह्मादिकां तुका म्हणे ॥ ७ ॥ [३८४७]

नेणतियांसाठीं नेणता लहान । थिंकोनी भोजन मागे माये ॥ १ ॥ माया दोनी यास बाप नारायणा । सारखी भावना तयांवरी ॥ २ ॥ तयांवरी त्याचा समचित्त भाव । देवकी वसुदेव नंद दोघे ॥ ३ ॥ घेउनियां एके ठायीं अवतार । एकीं केला थोर वाढवूनी ॥ ४ ॥ उणा पुरा यासी नाहीं कोणी ठाव । सारिखाचि देव अवघियांसी ॥ ५ ॥ यासी दोनी ठाव सारिखे अनंता । आधील मागुता वाढला तो ॥ ६ ॥ वाढला तो सेवाभक्तिचिया गुणें । उपचार मिष्टान्नें करूनियां ॥ ७ ॥ करूनी सायास

पाशांमध्यें गुंतल्यामुळें हें त्यांस समजलें नाहीं १३. हा कृष्ण आमचें लेंकरूं आहे अशी समजूत नंदाची व यशोदेची होत असे १४. एक वेळ देवत्वाचा भाव दाखविण्याकरितां घुसळण्याच्या डेऱ्यामध्यें जाऊन कृष्ण बसला १५. आणि तेथें जाऊन लोणी खाऊं लागला ते वेळीं लोणी वरती कां येत नाहीं हें पाहावयास यशोदेनें डेऱ्यांत हात घातला तों तिच्या हातास कृष्ण लागला १६. मग त्याच्या हाताला धरून त्याला बाहेर काढला आणि त्याजकडे पाहून मोटें आश्चर्य करूं लागली १७. कृष्ण थोर असून ह्या लहानशा डेऱ्यामध्यें कसा गेला हें त्याचें लाघव न समजतां त्यास विचार शिकवूं लागली १८. पुत्रत्वाच्या लोभानें त्याचा देवपणा यशोदेला समजला नाहीं व देवहि आपली माव समजूं देत नाहीं १९. त्यांचेवर मोहमायाजालाचा फांसा घालून आपला देवपणा त्यांस समजूं देत नाहीं २०. त्याचें कारण लोभिष्टांचे मनामध्यें भाव कायम राहूं देत नाहीं व ते जाणत असतांहि आंधळे होतात २१. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांनीं श्रीहरीला ओळखिलें नाहीं ते सांसारिक लोक आंधळे आहेत असें समजावें २२. [३८४६]

एका भावार्थानें (भक्तिभावानेंच) देवाची ओळख होते. त्यावांचून दुसऱ्या साधनानें देवाची प्राप्ति होणार नाहीं १. उन्मत्त होऊन दंभाच्या योगानें नागवण होणार आहे; मग देवाची प्राप्ति कशी होईल ? २. एका देवाकरितां यज्ञ, याग, व्रतें, तपें वगैरे साधनें करितात व एकांतीं वनवासी होऊन राहातात ३. त्या गौळी लोकांस व्रततपादि साधनें पूर्वीं जन्मजन्मांतरीं पुष्कळ घडल्यामुळें तें संचित ह्या जन्मीं सफल झालें ४. गवळयांचें पूर्वजन्मींचें संचितकर्म देवास माहीत असल्यामुळें देवानें त्यांस तारलें ५. गवळी लोकांचें व आईबापांचें सेवाऋण देवावर होतें तें फेडावयाकरितां देव गोकुळास आला ६. तुकाराम महाराज म्हणतात, जें सुख गवळी लोकांस प्राप्त झालें तें इतर लोकांना दुर्लभ आहे व ब्रह्मादिकांस देखील प्राप्त होत नाहीं ७. [३८४७]

हा देव अज्ञान लोकांकरितां लहानसें रूप नेणतेपणाचें धारण करून यशोदेस रडून जेवावयास मागत आहे १. ह्या नारायणास वसुदेव देवकी व नंद यशोदा असे दोन आईबाप होते पण त्या उभयतांवर कृष्णाची सारखी प्रीति होती २. देवकी-वसुदेवावर व नंद-यशोदेवर कृष्णाच्या मनाची आवडी एकत्वानें होती ३. एका आईबापाच्या पोटीं जन्म घेतला व दुसऱ्यानें वाढवून थोर केला ४. ह्या देवास कोणतेंहि ठिकाण कमी जास्ती नाहीं. सर्व लोकांस हा सारखाच आहे ५. म्हणून ह्याला जन्म घेतलेला व थोर झालेला हीं दोन्ही ठिकाणें सारखींच आहेत ६. मिष्टान्नादि उपचार भक्तिभावार्थानें अर्पण केल्यामुळें देव लहानाचा थोर झाला ७. नाना प्रकारचे सायास

मेळविलें धन । तेंही कृष्णार्पण केलें तिहीं ॥ ८ ॥ कृष्णासी सकळ गाई घोडे म्हैसी । समर्पिल्या दासी जीवें भावें ॥ ९ ॥ जीवें भावें त्याची करितील सेवा । न विसंबती नांवा क्षणभरी ॥ १० ॥ क्षणभरी होतां वेगळा तयांस । होती कासावीस प्राण त्यांचे ॥ ११ ॥ त्यांचे ध्यानीं मनीं सर्वभावें हरि । देह काम करी चित्त त्यापें ॥ १२ ॥ त्यांचेंचि चिंतन कृष्ण कोठें गेला । कृष्ण हा जेविला नाहीं कृष्ण ॥ १३ ॥ कृष्ण आला घरा कृष्ण गेला दारा । कृष्ण हा सोयिरा भेटो कृष्ण ॥ १४ ॥ कृष्ण गातां (गाती) ओंव्या दळणीं कांडणीं । कृष्ण हा भोजनीं पाचारिती ॥ १५ ॥ कृष्ण तयां ध्यानीं आसनीं शयनीं । देखती त्या स्वप्नीं कृष्णरूप ॥ १६ ॥ कृष्ण त्यांस दिसे आभास दुश्चितां । धन्य माता पिता तुका म्हणे ॥ १७ ॥ [३८४८]

कृष्ण हा परिचारी कृष्ण हा व्यवहारी । कृष्ण घ्या वो नारी आणिकी म्हणे ॥ १ ॥ म्हणे कृष्णाविण कैसें तुम्हां गमे । वेळ हा करमे वायांविण ॥ २ ॥ वायांविण तुम्ही पिटितां चावटी । घ्या गे जगजेठी क्षणभरी ॥ ३ ॥ क्षणभरी याच्या सुखाचा सोहळा । पाहा एक वेळां घेऊनियां ॥ ४ ॥ याचें सुख तुम्हां कळलियावरी । मग दारोदारीं न फिराल ॥ ५ ॥ लटिकें हें तुम्हां वाटेल खेळणें । एका कृष्णाविणें अवघेंचि ॥ ६ ॥ अवघ्यांचा तुम्ही टाकाल सांगात । घेऊनी अनंत जाल राना ॥ ७ ॥ नावडे तुम्हांस आणीक बोलिलें । मग हें लागलें हरिध्यान ॥ ८ ॥ न करा हा मग या जीवा वेगळा । टोंकवाल बाळा आणिकही ॥ ९ ॥ आणिकही तुम्हां येती काकुलती । जवळी इच्छिती क्षण बैसों ॥ १० ॥ बैसौं चला पाहों गोपाळाचें मुख । एकी एक सुख सांगतील ॥ ११ ॥ सांगे जंव ऐसी मात दसवंती । तंव त्या धरिती चित्तीं बाळा ॥ १२ ॥ बाळा एकी घरा घेऊनियां जाती । नाहीं त्या परती तुका म्हणे ॥ १३ ॥ [३८४९]

करून भक्तांनीं द्रव्य जरी मिळविलें तरी तेंहि त्यांनीं कृष्णास अर्पण केलें ८. गाई, घोडे, म्हशी दास-दासी वगैरे सर्व संसार भक्तांनीं कृष्णास अर्पण केला ९. आणि जीवभावानें कृष्णाची सेवा ते गोप करितात व त्याच्या नांवास क्षणभर देखील विसरत नाहींत १०. एक घटकाभर त्यांच्यापासून देव वेगळा झाला तर त्यांचे प्राण कासावीस होतात ११. ह्याप्रमाणें त्यांच्या ध्यानांत व मनांत श्रीहरीची वस्ती झाल्यामुळें देह संसाराचें काम करतो पण सर्व लक्ष त्याच्याकडे आहे १२. त्या कृष्णाचें चिंतन ते सर्व काळ करितात. तें असें, कीं कृष्ण जेवला किंवा नाहीं, व कृष्ण कोठें गेला, तो अजून आला नाहीं १३. आमचे घरास कृष्ण आला आणि तो दारांत बसला आणि कृष्ण आमचा सोयरा आहे, तो आम्हांला भेटावा १४. त्याप्रमाणें कृष्णाच्या ओंव्या गौळणी दळण कांडण करतांना गातात व भोजन करतेवेळीं ग्रासोग्रासीं कृष्णाचें नाम घेतात १५. आसनावर व शेजेच्या ठिकाणीं असतांहि कृष्णाचें ध्यान सर्व काळ करितात व स्वप्नांत देखील कृष्णाचें रूप पाहातात १६. तुकाराम महाराज म्हणतात, त्या लोकांना आभासाच्या ठिकाणीं कृष्णाचें रूप दृष्टीस पडतें व ते (आईबाप, नंदयशोदा) जरी दुश्चित्त असले तरी तेंच ध्यान त्यांस दिसतें, म्हणून त्याचे आईबाप धन्य आहेत १७. [३८४८]

गवळणींस यशोदा म्हणते, कीं अगे, तुम्ही संसार करितांना लौकिक परिचारामध्यें (सासूसासऱ्यांची, पतीची सेवा करतांना) माझ्या कृष्णास घ्या १. कृष्णावांचून तुम्हांस करमतें तरी कसें ! व्यर्थ वेळ कां घालवितां ? २. कृष्णावांचून टवाळ गोष्टी सांगाव्या, त्याहून त्याचें नाम घटकाभर घेतलेलें बरें ३. एक घटकाभर तरी त्याच्या सुखाचा भोग तुम्ही घेऊन पाहा ४. जर तुम्हांस त्याच्या सुखाचा अनुभव आला तर तुम्ही अन्य योनींच्या दारोदार फिरणार नाहीं ५. मग तुम्हांस एका कृष्णावांचून सर्व प्रपंचाचा खेळ व्यर्थ वाटेल ६. आणि सर्व संग टाकून एकांतामध्यें कृष्णाचें सुख भोगाल ७. मग तुम्हांस दुसऱ्याचें बोलणें आवडणार नाहीं. एका हरीचेंच ध्यान चित्तांत ठसावेल ८. मग त्याला प्राणापासून वेगळें करावें असें वाटणार नाहीं आणि मग तुम्ही इतर मंडळी टुकटुक करीत बसाल ९. व इतर तुमच्याजवळ क्षणभर तरी बसावें अशी इच्छा करून तुम्हांस काकुळती येतील १०. आणखी इतर लोकांस कृष्णाचें श्रीमुख पाहाण्याविषयीं बोलावितील व आपल्या सुखाचा अनुभव सर्वांस सांगतील ११. ह्याप्रमाणें यशोदेनें गवळणींस हकीकत सांगितल्या-बरोबर त्यांनीं ती आपल्या चित्तांत बळकट धरली १२. तुकाराम महाराज म्हणतात, असें ऐकून त्याच वेळेला गवळणी यशोदेच्या घरीं जाऊन कृष्णास एकांतीं घेऊन गेल्या त्या योगानें त्यांची प्रपंचाची येरझार खुंटली १३. [३८४९]

तुका म्हणे पुन्हा न येती मागुत्या । कृष्णासीं खेळतां दिवस गमे ॥ १ ॥ दिवस राती कांहीं नाठवे तयांसी । पाहतां मुखासी कृष्णाचिया ॥ २ ॥ याच्या मुखें नये डोळयांसी वीट । राहिले हे नीट ताटस्थचि ॥ ३ ॥ ताटस्थ राहिलें सकळ शरीर । इंद्रियें व्यापार विसरलीं ॥ ४ ॥ विसरल्या तान भूक घरदार । नाहीं हा विचार असों कोठें ॥ ५ ॥ कोठें असो कोण जाला वेळ काळ । नाठवे सकळ विसरल्या ॥ ६ ॥ विसरल्या आम्ही कोणी ये जातीच्या । वर्णाही चहूंच्या एक जाल्या ॥ ७ ॥ एक जाल्या तेव्हां कृष्णाचिये सुखें । निःशंक भातुकें खेळतील ॥ ८ ॥ खेळती भातुकें कृष्णाच्या सहित । नाहीं आशंकित चित्त त्यांचें ॥ ९ ॥ चित्तीं तो गोविंद लटिकें दळण । करिती हें जन करी तैसें ॥ १० ॥ जन करी तैसा खेळतील खेळ । अवघा गोपाळ करूनियां ॥ ११ ॥ करिती आपला अवघा गोविंद । जना साच छंद लटिका त्यां ॥१२॥ त्यांनीं केला हरि सासुरें माहेर । बंधू हे कुमर दीर भावें ॥ १३ ॥ भावना राहिली एकाचिया ठायीं । तुका म्हणे पायीं गोविंदाचे ॥ १४ ॥ [३८५०]

गोविंद भ्रतार गोविंद मूळहारी । नामें भेद परि एकचि तो ॥ १ ॥ एकाचींच नामें ठेवियेलीं दोनी । कल्पितील मनीं यावें जावें ॥ २ ॥ जावें यावें तिहीं घरींचिया घरीं । तेथींची (येथींचि) सिदोरी तेथें न्यावी ॥ ३ ॥ विचारितां दिसे येणें जाणें खोटें । दाविती गोमटें लोकां ऐसें ॥ ४ ॥ लोक करूनियां साच वर्तताती । तैशा त्या खेळती लटिक्याची ॥ ५ ॥ लटिकीं करिती मंगळ दायकें । लटिकींच एकें एकां व्याही ॥ ६ ॥ व्याही भाई हरि सोयरा जांवई । अवघियांच्या ठायीं केला एक ॥ ७ ॥ एकासीच पावे जें कांहीं करिती । उपचार संपत्ती नाना भोग ॥ ८ ॥ भोग देती सर्व एका

तुकाराम महाराज म्हणतात, त्या गवळणी कृष्णाचें सुख सर्व काळ भोगूं लागल्या त्या योगानें त्यांना पुनः प्रपंचांत येण्याचें कारण राहिलें नाहीं. १. कृष्णाचें श्रीमुख पाहिल्याचे योगानें त्यांचे मनांत दिवस किंवा रात्र आहे हा आठव राहिला नाहीं २. त्याचें कारण तें श्रीमुख पाहिल्याबरोबर डोळ्यांच्या पापण्या लवण्याचें विसरून तटस्थ राहिल्या. असें तें अवीट आहे ३. आणि त्यांचा देहभाव विसरून इंद्रियांचा वरकड व्यापार देखील त्या विसरल्या ४. आपल्या घरादाराची व तहानभुकेची आठवण राहिली नाहीं व आपण कोणते ठिकाणीं आहोंत हेंहि भान नाहीं ५. आपण एका ठिकाणीं किती वेळ बसलों व कोणते ठिकाणीं आहोंत हा आठव त्यांना कांहींच राहिला नाहीं ६. आणि आपली जात कोणती आहे हें विसरून चार वर्णांच्या स्त्रिया एका ठिकाणीं खेळूं लागल्या ७. कृष्णाचे सुखाचा उपभोग मिळाल्याकारणानें निर्भय होऊन एका ठिकाणीं कृष्णाबरोबर खाण्याचे पदार्थ घेऊन खेळूं लागल्या ८. अशा त्या कृष्णाबरोबर खेळत असतां त्यांच्या मनांत कोणत्याच प्रकारचा संशय राहिला नाहीं ९. श्रीहरीची वस्ती त्यांच्या चित्तांत झाल्याकारणानें त्या जरी प्रपंचांत दळणकांडण वगैरे कामें करितात, तरी तें सर्व खोटें आहे १०. इतर जनांप्रमाणें प्रपंचाचा खेळ खेळतात, पण त्यांचें सर्व लक्ष गोपाळाकडे आहे ११. एक देवच सर्व प्रपंचामध्यें आहे अशा समजुतीनें त्यांना तो प्रपंच खोटा दिसतो व इतर लोक तो खरा मानितात १२. त्यांचें सासर व माहेर, दीर आणि भाऊ वगैरे सर्व आप्तपणा एक कृष्णच आहे १३. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांची सर्व भावना एका श्रीहरीच्याच चरणांच्या ठिकाणीं जडली आहे १४. [३८५०]

त्या गवळणींनीं एक कृष्णच आपला नवरा आहे व ज्याच्याकडून (माहेरीं) न्यावयास मूळ (नेण्याकरितां आलेला, आमंत्रण) येतें तोहि कृष्णच आहे. फक्त नांवांत भेद आहे. ह्यावांचून दुसरें नाहीं, असें त्यांनीं मानलें आहे १. आम्हांस माहेरीं न्यावयास मूळ आलें, आतां आम्हांला नवऱ्याकडे जावयाचें आहे, अशी दोन प्रकारची कल्पना करून एका देवावरच त्यांचें लक्ष आहे २. जाण्यायेण्याचा प्रकार आपल्या घरचे घरींच दाखवितात व पापपुण्यात्मक शिदोरी असेल ती कृष्णास अर्पण करितात ३. त्या कारणानें त्यांच्या जन्ममृत्यूच्या येरझारा विचार करून पाहिलें असतां खोट्या आहेत, पण त्या लोकांप्रमाणें खऱ्या दाखवितात ४. लोक जन्ममृत्यु खरे मानून वर्तणूक करितात आणि त्या गवळणी (जन्ममृत्यु, प्रपंच) खोटे मानून क्रीडा करितात ५. शुभदायक कृत्यें लोकांप्रमाणें करितात पण तीं खोटीं मानितात ६. व्याही, जांवई व आपला भाऊ वगैरे सर्व आप्त मंडळींच्या ठिकाणीं एक कृष्णच त्यांनीं मानिला आहे ७. त्या योगानें त्यांनीं नानाप्रकारचे भोग-उपचार जरी केले, तरी ते एका कृष्णास अर्पण होतात ८. एका नारायणास सर्व प्रकारचे भोग देतात

नारायणा । लटिक्या भावना त्याही भाई ॥ ९ ॥ लटिकाची त्यांनीं केला संवसार । जाणती साचार वेगळा त्या ॥ १० ॥ त्यांनीं मृत्तिकेचे करूनी अवघे । खेळतील दोघे पुरुषनारी ॥ ११ ॥ पुरुषनारी त्यांनीं ठेवियेलीं नांवें । कवतुक भावें विचरती ॥ १२ ॥ विचरती जैसें साच भावें लोक । तैसें नाहीं सुख खेळतींया (खेळती त्या) ॥ १३ ॥ यांनीं (त्यांनीं) जाणितलें आपआपणया । लटिकें हें वायां खेळतों तें ॥ १४ ॥ खेळतों ते आम्ही नव्हों नारीनर । म्हणोनी विकार नाहीं तयां ॥ १५ ॥ तयां ठावें आहे आम्ही अवघीं एक । म्हणोनि निःशंक खेळतील ॥ १६ ॥ तयां ठावें नाहीं हरिचिया गुणें । आम्ही कोणकोणें काय खेळों ॥ १७ ॥ काय खातों आम्ही कासया सांगातें । कैसें हें लागतें नेणों मुखीं ॥ १८ ॥ मुखीं चवी नाहीं तोंवरी अंगीं लाज । वर्ण यातीकाज न धरिती ॥ १९ ॥ न धरिती कांहीं संकोच त्या मना । हांसतां या जना नाइकती ॥ २० ॥ नाइकती बोल आणिकांचे कानीं । हरि ध्यानीं मनीं बैसलासे ॥ २१ ॥ बैसलासे हरी जयांचिये चित्तीं । तयां नावडती मायबापें ॥ २२ ॥ मायबापें त्यांची नेति पाचारूनी । बळें परि मनीं हरी वसे ॥ २३ ॥ वसतील बाळा आपुलाले घरीं । ध्यान त्या अंतरीं गोविंदाचें ॥ २४ ॥ गोविंदाचें ध्यान निजलिया जाग्या । आणिक वाउग्या न बोलती ॥ २५ ॥ न बोलती निजलिया हरिविण । जागृति स्वप्न एक जालें ॥ २६ ॥ एकविध सुख घेति नित्य बाळा । भ्रमर परिमळा लागीं तैसा ॥ २७ ॥ जैसा त्यांचा भाव घेतला त्यांपरी । तुका म्हणे हरि बाळलीला ॥ २८ ॥ [३८५१]

लीलाविग्रही तो लेववी खाववी । यशोदा बैसवी मांडीवरी ॥ १ ॥ मांडीवरी भार पुष्पाचिये परी । बैसोनियां करी स्तनपान ॥ २ ॥ नभाचाही साक्षी पाताळापरता । कुर्वाळिते माता हातें त्यासी

म्हणून त्यांची इतर आप्तपणाची भावना खोटी आहे ९. मग त्या जरी प्रपंच करितात तरी आम्ही त्यापासून वेगळ्या आहोंत असें समजतात १०. हें सर्व जग पंचभूतात्मक मातीचें करून प्रकृतिपुरुष हे उभयतां खेळ खेळतात ११. एक पुरुष, एक प्रकृति अशीं दोन नांवें ठेवून प्रपंचामध्यें कौतुकानें वर्तणूक करितात १२. तोच प्रपंच खरा आहे असें मानून लोक राहातात, आणि ह्यांचा खेळ त्याप्रमाणेंच आहे, पण त्याचें सुख ह्या मानीत नाहींत १३. कारण त्यांना आपण मूळचे कोण आहोंत हें समजल्यामुळें हा प्रपंच सर्व व्यर्थ आहे असें त्या मानितात १४. आम्ही ह्या ठिकाणीं खेळतों पण नारी अथवा नर हे नव्होंत असें जाणल्यामुळें देहादि प्रपंचाची बाधा त्यांना होत नाहीं १५. आणि आम्ही सर्व जण एक देवच आहोंत असें समजून निर्भयपणानें प्रपंचाचा खेळ त्या खेळतात १६. एका श्रीहरीच्या योगानें आम्ही कोणत्या ठिकाणीं आहोंत व काय खेळतों अशी आठवण त्यांना नाहीं १७. त्या जरी भोजन करीत असल्या तरी कोणता पदार्थ कशाबरोबर खातों आणि हें चांगलें किंवा वाईट हें भान त्यांचे ठिकाणीं नाहीं १८. चांगलें किंवा वाईट ही गोडी त्यांच्या मुखास समजत नाहीं, मग त्यांच्या ठिकाणीं लज्जा कोठून येईल, अगर वर्णाश्रमधर्माची गरज तरी काय ? १९. मग त्यांस पाहून लोक जरी हंसले तरी त्याविषयींचा संकोच त्या मनामध्यें मुळींच धरीत नाहींत २०. लोकांचें हंसणें व बोलणें त्या ऐकत नाहींत, कारण चित्तामध्यें श्रीहरीची वस्ती झाली आहे २१. ज्याच्या चित्तामध्यें हरीचें ध्यान लागलें, त्यास आपले आईबाप देखील आवडत नाहींत २२. अशा त्या आनंदरूप खेळत असतां त्यांच्या आईबापांनीं जरी बळानें घरीं बोलावून नेल्या तरी त्यांचें मन श्रीहरीच्या ठिकाणीं जडलेलें असतें २३. अंतःकरणामध्यें कृष्णाचें ध्यान करून आपापल्या घरीं त्या मुली आनंदरूप राहातील २४. निजल्या ठिकाणीं किंवा जाग्या असतांना देखील कृष्णावांचून दुसरें भाषण त्या करीत नाहींत २५. जी अवस्था जागृतीच्या ठिकाणीं तीच स्वप्नामध्यें लागल्यामुळें हरीवांचून व्यर्थ बोलणें त्या बोलत नाहींत २६. ज्याप्रमाणें भ्रमराला कमलांतील सुवासावांचून कांहीं आवडत नाहीं त्याप्रमाणें एकविध सुखाचा उपभोग त्या गवळणी भोगतात २७. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याप्रमाणें कृष्णानें बाळपणीं जसा ज्याचा भाव असेल तसें त्यांस सुख दिलें २८. [३८५१]

जो परमात्मा अनेक प्रकारचे खेळ खेळून अलिप्त आहे त्यास यशोदेनें मांडीवर बसवून भोजन घालावें व अंगावर अलंकार घालावे १. आणि ज्याच्या उदरामध्यें अनंत ब्रह्मांडें आहेत, तो यशोदेनें जरी मांडीवर घेतला तरी तिला फुलाप्रमाणें वाटावें व त्यास स्तनपान करवावें २. जो देव सप्त पाताळांपासून आकाशापेक्षांहि मोठा त्याच्या अंगावरून

॥ ३ ॥ हातें कुर्वाळूनी मुखीं घाली घास । पुरे म्हणे तीस पोट धालें ॥ ४ ॥ पोट धालें मग देतसे ढेंकर। भक्तीचें तें फार तुळसीदळ ॥ ५ ॥ तुळसीदळ भावें सहित देवा पाणी । फार तें त्याहुनी क्षीरसागरा ॥ ६ ॥ क्षीराचा कंटाळा असे एक वेळ । भक्तीचें तें जळ गोड देवा ॥ ७ ॥ देवा भक्त जिवाहुनी आवडती । सकळहि प्रीति त्यांच्याठायीं ॥ ८ ॥ त्यांचा हा अंकित सर्व भावें हरी । तुका म्हणे करी सर्व काज ॥ ९ ॥ [३८५२]

जयेवेळीं चोरूनियां नेलीं वत्सें । तयालागीं तैसें होणें लागे ॥ १ ॥ लागे दोहीं ठायीं करावें पाळण । जगाचा जीवन मायबाप ॥ २ ॥ माय झाला हरी अवघ्या वत्सांची । घरीं वत्सें जीचीं तैसा झाला ॥ ३ ॥ झाला तैसा जैसे घरींचे गोपाळ । आणिक सकळ मोहरी पांवे ॥ ४ ॥ मोहरी पांवे सिंगें वाहिल्या काहाळा । देखिला सोहळा ब्रह्मादिकीं ॥ ५ ॥ ब्रह्मादिकां सुख स्वप्नीं तेंहि नाहीं । तैसें दोहीं ठायीं वोसंडलें ॥ ६ ॥ वोसंडल्या क्षीर अमुप त्या गाई। जैसी ज्याची आई तैसा जाला ॥ ७ ॥ लाघव कळलें ब्रह्मयासी याचें । परब्रह्म साचें अवतरलें ॥ ८ ॥ तरले हे जन सकळही आतां । ऐसें तो विधाता बोलियेला ॥ ९ ॥ लागला हे स्तुति करूं अनंताची । चतुर्मुखें वाची भक्तिस्तोत्रें ॥ १० ॥ भक्तिकाजें देवें केला अवतार । पृथिवीचा भार फेडावया ॥ ११ ॥ पृथिवी दाटिली होती या असुरीं। ना साहावे (न सहावे) वरी भार तये ॥ १२ ॥ तया काकुलती आपल्या दासांची । तयांलागीं वेंची सर्वस्वही ॥ १३ ॥ स्वहित दासांचें करावया लागीं । अव्यक्त हे जगीं व्यक्ती आलें ॥ १४ ॥ लेखा कोण करी त्यांचिया पुण्याचा । जयासवें वाचा बोले हरी ॥ १५ ॥ हरी नाममात्रें पातकांच्या रासी । तो आला घरासी गौळियांच्या ॥ १६ ॥ गौळियें अवघीं झालीं कृष्णमय। नामें लोकत्रय तरतील ॥ १७ ॥ तरतील नामें कृष्णाचिया दोषी । बहुत ज्यापाशीं होईल पाप ॥ १८ ॥

यशोदेनें हात फिरवावा ३. व हातानें कुरवाळून तोंडांत घास घालावे. ते वेळीं माझें पोट भरलें, आतां पुरे, असें देवानें म्हणावें ४. पोट भरलें म्हणून ढेंकर द्यावी, कारण भक्तीच्या योगानें त्याला एक तुळशीचें पानसुद्धां पुष्कळ होत आहे ५. एका भावार्थानें तुळशीचें पान अथवा पाणी जरी अर्पण केलें तरी तें देवास क्षीरसागरापेक्षां जास्त वाटतें ६. एक वेळेस देवाला दुधाची गरज नाहीं पण भक्तियुक्त पाणी अर्पण केल्यास गोड लागतें ७. देवाला आपल्या जीवापेक्षांहि आपल्या भक्तांची आवड जास्त आहे, म्हणून सर्व प्रीति त्यांच्या ठिकाणींच आहे ८. तुकाराम महाराज म्हणतात, हा देव सर्व भावानें भक्तांच्या अंकित असून त्यांचें सर्व काम करतो ९. [३८५२]

ज्या वेळेस ब्रह्मदेवानें गाई, वासरें व गोपाळ सत्यलोकांत चोरून नेले त्या वेळीं त्यांचीं रूपें देवास घरावीं लागलीं १. त्याचें कारण आपणापासून जग उत्पन्न झालें व जगास जगविणाराहि मीच आहें असें समजून सत्यलोकीं व गोकुळांत या दोन्ही ठिकाणीं गाईगोपाळांचें सारखेंच रक्षण केलें २. सर्व वासरें व गाई ह्यांचीं रूपें ज्याच्या त्याच्या प्रमाणें सारखीं धारण केलीं ३. आणि प्रत्येक गोपाळ ज्या वयाचा व आकृतीचा होता त्याप्रमाणें आपण नटला व त्यांचीं वाजविण्याचीं वाद्येंहि आपणच झाला ४. वेणू, मुरली, शिंगें व झांजा वगैरे अनेक वाद्यें देवच नटला; तो उत्साह ब्रह्मादिक देवांनीं पाहिला ५. गोकुळांतील व सत्यलोकांत नेलेल्या गाईगोपाळांस जें सुख आहे तें ब्रह्मादिकांच्या स्वप्नांत सुद्धां नाहीं ६. त्या गोकुळांतील गाई पुष्कळ दूध देऊं लागल्या; आणि ज्या वासराची जशी आई होती तसा देव नटला ७. तें कौतुक ब्रह्मादिकांस समजलें, कीं हें परब्रह्मच गोकुळाला आलें आहे ८. आतां सर्व पृथ्वीवरील लोकांचा उद्धार सहजच होईल असें ब्रह्मदेव म्हणाला ९. मग तो कृष्णरायाची स्तुति चार तोंडांनीं भाव धरून करूं लागला १०. तो म्हणाला, कीं भक्तांच्या कामाकरितां व पृथ्वीवरील भार उतरण्याकरितां श्रीहरीनें अवतार घेतला आहे ११. पृथ्वीवर दैत्य पुष्कळ माजल्यामुळें तें ओझें तिला सहन होत नाहीं १२. म्हणून ती पृथ्वी देवास शरण जाऊन काकुलती आल्यामुळें आपलें सर्वस्व खर्च करून तिच्यावरील भार उतरण्यास देव आला आहे १३. तो मुळीं निराकार होता तो दासांचें हित करण्यासाठीं आकारास आला १४. ज्याच्याबरोबर देव प्रत्यक्ष बोलूं लागला त्याच्या पुण्याची गणती कोणीं करावी ? १५. ज्याच्या नामस्मरणानें दोषांच्या पर्वतांचें दहन होतें तो गवळ्यांच्या घरीं प्रत्यक्ष आला आहे १६. त्याच्या संगतीनें सर्व गवळी तन्मय झाले. आतां त्याच्या नामानें त्रैलोक्याचा उद्धार सहज होईल १७.

पाप ऐसें नाहीं कृष्णनामें राहे। धन्य तोचि पाहे कृष्णमुख ॥ १९ ॥ मुख माझें काय जो मी वर्णू पार। मग नमस्कार घाली ब्रह्मा ॥ २० ॥ ब्रह्मा नमस्कार घाली गोधनासी। कळला तयासी हाचि देव ॥ २१ ॥ देवचि अवघा जालासे सकळ। गाई हा गोपाळ वत्सें तेथें ॥ २२ ॥ तेथें पाहाणें जें आणीक दूसरें। मूर्ख त्या नंतरें दुजा नाहीं ॥ २३ ॥ दूजा भाव तुका म्हणे जया चित्तीं। रवरव भोगिती कुंभपाक ॥ २४ ॥ [३८५३]

कुंभपाक लागे तयासी भोगणें। अवघाचि नेणे देव ऐसा ॥ १ ॥ देव ऐसा ठावा नाहीं जया जना। तयासी यातना यम करी ॥ २ ॥ कळला हा देव तयासीच खरा। गाई वत्सें घरा धाडी ब्रह्मा ॥ ३ ॥ ब्रह्मादिकां ऐसा देव अगोचर। कैसा त्याचा पार जाणवेल ॥ ४ ॥ जाणवेल देव गौळियांच्या भावें। तुका म्हणे व्हावें संचित हें ॥ ५ ॥ [३८५४]

संचित उत्तम भूमि कसूनियां। जाऊं नेदी वायां पेरी त्यांचें ॥ १ ॥ त्यांचिया पिकासी आलीया घुमरी। आल्या गाईवरी आणिक गाई ॥ २ ॥ गाई दवडूनी घालिती बाहेरी। तंव म्हणे हरी बांधा त्याही ॥ ३ ॥ त्याही तुम्ही बांधा तुमच्या सारिख्या। भोवंडा पारिख्या वाड्यांतूनी ॥ ४ ॥ पारिख्या न येती कोणाचिया घरा। सूत्रधारी खरा नारायण ॥ ५ ॥ नारायण नांदे जयाचिये ठायीं। सहज तेथें नाहीं घालमेली ॥ ६ ॥ मेलीं हीं शहाणीं करितां सायास। नाहीं सुखलेश तुका म्हणे ॥ ७ ॥ [३८५५]

तुका म्हणे सुख घेतलें गोपाळीं। नाचती कांबळीं करूनी ध्वजा ॥ १ ॥ करुनियां टिरी आपल्या मांदळ। वाजविती टाळ दगडाचे ॥ २ ॥ दगडाचे टाळ कोण त्यांचा नाद। गीत गातां छंद ताल नाहीं

ज्याच्यापाशीं पापाचे डोंगर पुष्कळ आहेत ते प्राणी कृष्ण ह्या नामानें पुनीत होतील १८. कृष्ण हें नामस्मरण केल्याबरोबर कांहीं उरेल असें पापच नाहीं व श्रीकृष्णाचें मुख पाहाणारे धन्य आहेत १९. त्यांच्या पुण्याचा पार वर्णन करण्यास माझें मुख असमर्थ आहे असें बोलून ब्रह्मदेवानें नमस्कार केला २०. तेथील गाई, वासरें, गोपाळ वगैरे जीव देवच नटला आहे असें समजून त्यांना ब्रह्मदेव नमस्कार करीत आहे २१. गाई, वासरें व गोपाळ तद्रूप झाले आहेत, असा निश्चय ब्रह्मदेवानें मानला २२. त्या ठिकाणीं दुसरा भाव धरून जो कोणी इतर कल्पना करील त्याच्यासारखा मूर्ख कोणीच नाहीं २३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या चित्तांत भिन्न भाव आहे त्यास कुंभीपाक नरकांतील यातना सोसाव्या लागतात २४. [३८५३]

देव सर्वव्यापक आहे असें जो जाणत नाहीं त्यास कुंभीपाक ह्या नांवाचा नरक भोगावा लागतो १. सर्वांच्या ठिकाणीं देव आहे असें ज्यास माहीत नाहीं त्यास यमाची फार यातना होते २. गवळ्यांनाच देवाचें ऐश्वर्य समजल्यामुळें सत्य लोकास नेलेलीं गाईवासरें ब्रह्मदेवानें गोकुळास पाठवून दिलीं ३. हा देव ब्रह्मादिकांस दृष्टी पडत नाहीं मग त्याचें ऐश्वर्य सामान्य माणसांना कसें वर्णन करवेल ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, गौळी लोकांना फक्त भावार्थानें देवाचें ऐश्वर्य समजलें तसें समजण्यास जन्मांतरींचें पुण्य पाहिजे ५. [३८५४]

संचित कर्म शुद्ध करून चांगल्या देहरूपी जमिनींत देव पेरणी करितो तें कांहीं व्यर्थ जाऊं देत नाहीं १. गवळी लोकांच्या संचित कर्माचें पीक पुष्कळ झालें म्हणून त्यांच्या घरीं पहिल्या गाई असून आणखी ब्रह्मदेवानें पाठविल्या २. ते त्या गाई बाहेर घालवूं लागले तेव्हां श्रीहरीनें सांगितलें, कीं त्याहि आपल्याच आहेत ३. त्याचप्रमाणें बोहल्या (तुमच्या गाईसारख्या शांत) आल्या त्याहि तुम्ही बांधाव्यात, दुसऱ्या कोणाच्या येतील तर त्या बाहेर घालवाव्या ४. एका नारायणाच्या स्वाधीन सर्वांचें सूत्र आहे, मग एकमेकांच्या गाई एकमेकांच्या घराला जात नाहींत ५. ज्याच्या ठिकाणीं नारायणाची वस्ती आहे त्या ठिकाणीं मुळींच उलाघाल (चांगल्या वाईट गाईंचें एकत्र मिसळणें) होत नाहीं ६. तुकाराम महाराज म्हणतात, एका देवाकरितां अन्य साधनांचे सायास करून कित्येक शहाणे मेले तरी त्यांस गवळ्यांना मिळालेलें देवाचें सुख लेशमात्रदेखील मिळालें नाहीं ७. [३८५५]

तुकाराम महाराज म्हणतात, एक देवाचें सुख गोपाळांस मिळालें म्हणून ते कांबळ्यांचे ध्वज करून कृष्णाच्या संगतीनें नाचूं लागले १. व त्यांनीं आपले टिऱ्यांचे मृदंग व दगडाचे टाळ करून वाजविले २. पाहिलें असतां दगडाचे

॥ ३ ॥ ताल नाहीं गातां नाचतां गोपाळां । घननीळ सांवळा तयांमध्यें ॥ ४ ॥ मध्यें जयां हरी तें सुख आगळें । देहभाव काळें नाहीं तयां ॥ ५ ॥ तयांसी आळंगी आपुलिया करीं । जाती भूमीवरी लोटांगणीं ॥ ६ ॥ निजभाव देखे जयांचिये अंगीं । तुका म्हणे संगीं क्रीडे तयां ॥ ७ ॥ [३८५६]

तयांसवें करी काला दहींभात । सिदोऱ्या अनंत मेळवूनी ॥ १ ॥ मेळवुनी अवघियांचें एके ठायीं । मागें पुढें कांहीं उरों नेदी ॥ २ ॥ नेदी चोरी करूं जाणे अंतरींचें । आपलें ही साचें द्यावें तेथें ॥ ३ ॥ द्यावा दहीं भात आपले प्रकार । तयांचा व्यवहार सांडवावा ॥ ४ ॥ वांटी सकळांसी हातें आपुलिया । जैसें मागे तया तैसें द्यावें ॥ ५ ॥ द्यावें सांभाळूनी समतुक भावें । आपणहि खावें त्यांचे तुकें ॥ ६ ॥ तुक सकळांचे गोविंदाचे हातीं । कोण कोणें गति भला बुरा ॥ ७ ॥ राखी त्यास तैसें आपलाल्या भावें । विचारूनी द्यावें जैसें तैसें ॥ ८ ॥ तैसें सुख नाहीं वैकुंठींच्या लोकां । तें दिलें भाविकां गोपाळांसी ॥ ९ ॥ गोपाळांचे मुखीं देऊनी कवळ । घांस माखे लाळ खाय त्यांची ॥ १० ॥ त्यांचिये मुखींचे काढूनियां घांस । झोंबती हातांस खाय बळें ॥ ११ ॥ बळें जयाचिया ठेंगणें सकळ । तयांतें गोपाळ पाडितील ॥ १२ ॥ पाठीं उचलूनी वाहातील खांदीं । नाचतील मांदी मेळवूनी ॥ १३ ॥ मांदी मेळवूनी धणी दिली आम्हां । तुका म्हणे जमा केल्या गाई ॥ १४ ॥ [३८५७]

केला पुढें हरि अस्तमाना दिसे । मागें त्यासरिसे थाट चाले ॥ १ ॥ थाट चाले गाई गोपाळांची धूम । पुढें कृष्ण राम तयां सोयी ॥ २ ॥ सोयी लागलिया तयांचीया वृत्ती (देवाचे आवर्ती, तयांची अनंतीं) । न बोलावितां येती मागें तया ॥ ३ ॥ तयाचिये चित्तीं बैसला अनंत । घेति नित्य नित्य तेंचि सुख ॥ ४ ॥ सुख नाहीं कोणा हरीच्या वियोगें । तुका म्हणे जुगें (युगें) घडी जाय ॥ ५ ॥ [३८५८]

टाळास नाद कशाचा आहे व गाणें गाऊन नाचले त्यासहि तालछंद मुळींच नव्हता ३. गाण्यानाचण्यामध्यें तालछंद नाहीं पण त्यांच्यामध्यें देव प्रत्यक्ष उभा आहे ४. ज्यांच्या ठिकाणीं देवाची वस्ती आहे ते सर्वांहून श्रेष्ठ सुखाचा भोग घेतात व तें सुख भोगण्यास काळ, वेळ आणि देहभाव नाहीं ५. असे जे आहेत त्यांना देव आलिंगन देतो आणि ते देवास दंडवत घालतात ६. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांच्या ठिकाणीं ह्या प्रकारचा भाव आहे त्यांच्या बरोबरच देव क्रीडा करतो ७. [३८५६]

ती गोपाळ मंडळी मिळवून त्यांच्या शिदोऱ्या एकत्र करून दहींभाताचा काला देव करीत आहे १. सर्वांच्या शिदोऱ्या एका ठिकाणीं जमवून मागील जन्माचें पापपुण्य व पुढील संचित कांहीं उरूं देत नाहीं २. देव त्यांच्या अंतःकरणांतील सर्व जाणत असल्यामुळें त्यांस चोरी करूं देत नाहीं व आपला खरा प्रकार त्यांस देतो ३. दहींभाताचा प्रसाद आपला देऊन त्यांचा देहादि प्रपंच नाहींसा करितो ४. देव आपल्या हातानें काला वांटतेवेळीं जो जसें मागेल तसें त्यास देतो ५. सर्वत्रांस सारख्या भावानें देऊन त्यांच्याबरोबर आपणहि प्रसाद सेवन करितो ६. कोण चांगला, कोण वाईट ह्याची सर्व स्थिति देवास माहीत आहे ७. म्हणून ज्याच्या त्याच्या भावासारखें रक्षण करून त्याच्याप्रमाणें त्यास विचार करूं देतो ८. जें सुख वैकुंठींच्या लोकांस नाहीं तें भाविक गोपाळांस दिलें ९. आपल्या हातानें गोपाळांचे मुखांत घांस घालून लाळेनें भरलेले घांस त्यांच्या तोंडांतून काढून देव आपण खातो १०. त्या मुखांतील घांस काढतेवेळीं गोपाळ हातास ओरबाडतात तरी तो बळानें तसाच खातो ११. ज्याच्या बळापुढें ब्रह्मांड तुच्छ आहे, त्या देवास खालीं पाडून गोपाळ उरावर बसतात १२. व तेच वेळीं देवास उचलून खांद्यावर घेऊन समुदायानिशीं आनंदानें नाचतात १३. तुकाराम महाराज म्हणतात, असा त्या गोपाळांनीं समुदाय मिळवून त्या सुखाची तृप्ति आम्हांस दिली. मग अस्तमानाच्या वेळीं गाई जमा करून गोपाळांसुद्धां कृष्ण गोकुळास निघाला १४. [३८५७]

अस्तमानाच्या वेळीं रानांतून घरीं जात असतां कृष्ण पुढें आणि पाठीमागें गाईगोपाळांचा समुदाय चालत असे १. राम आणि कृष्ण पुढें चालत असतां मागें गाईगोपाळांचा समुदाय आपोआपच येत आहे २. ज्यांची देवाकडे वृत्ति लागली आहे ते न बोलावतां त्यांच्या पाठीमागें चालतात ३. त्यांचे मनामध्यें कृष्णाचें ध्यान लागल्यामुळें सर्व काल तेंच कृष्णाचें सुख भोगतात ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांना हरीचा वियोग झाला ते एकेक घटका युगासमान मानतात. हरिशिवाय त्यांना सुख वाटत नाहीं ५. [३८५८]

जाय फांकोनियां निवडोनी गाई। आपलाली सोयी घराचिये ॥ १ ॥ घराचिये सोयी अंतरला देव। गोपाळांचा जीव गोविंदापें ॥ २ ॥ गोविंदें वेधिलें तुका म्हणे मन। वियोगेंही ध्यान संयोगाचें ॥ ३ ॥ [३८५९]

संयोग सकळां असे सर्वकाळ। दुश्चित गोपाळ आला दिसे ॥ १ ॥ गोपाळ गुणाचा म्हणे गुणमय। निंबलोण मायें उतरिलें ॥ २ ॥ उतरूनी हातें धरी हनुवटी। ओंवाळुनी दिठी सांडियेली ॥ ३ ॥ दिठी घाली माता विश्वाच्या जनका। भक्तीचिया सुखा गोडावला ॥ ४ ॥ लहान हा थोर जीवजंतु भूतें। आपण दैवतें जाला देवी ॥ ५ ॥ देवी म्हैसासुर मुंजिया खेचर। लहानहि थोर देव हरि ॥ ६ ॥ हरि तुका म्हणे अवघा एकला। परि हा धाकुला भक्तीसाठीं ॥ ७ ॥ [३८६०]

भक्तीसाठीं केली यशोदेसी आळी। थिंकोनियां चोळी डोळे देव ॥ १ ॥ देव गिळूनियां धरिलें मोहन। माये म्हणे कोण येथें दुजें ॥ २ ॥ दुजें येथें कोणी नाहीं कृष्णाविण। निरुतें जाणोन पुसे देवा ॥ ३ ॥ देवापाशीं पुसे देव काय झाला। हांसें आलें बोला याचें हरि ॥ ४ ॥ यांचे मी जवळी देव तो नेणती। लटिकें मानिती साच खरें ॥ ५ ॥ लटिकें तें साच साच तें लटिकें। नेणती लोभिकें आशाबद्ध ॥ ६ ॥ सांग म्हणे माय येरू वासी तोंड। तंव तें ब्रह्मांड देखे माजी ॥ ७ ॥ माजी जया चंद्र सूर्य तारांगणें। तो भक्तांकारणें बाळलीळा ॥ ८ ॥ लीळा कोण जाणे याचें महिमान। जगाचें जीवन देवादिदेव (देवा देव) ॥ ९ ॥ देव कवतुक दाखविलें तयां। लागती ते पायां मायबाप ॥ १० ॥ मायबाप म्हणे हाचि देव खरा। आणीक पसारा लटिका तो ॥ ११ ॥ तोहि त्यांचा देव दिला नारायणें। माझें हें करणें तोहि मीच ॥ १२ ॥ मीच म्हणउनी जें जें जेथें ध्याती। तेथें मी श्रीपति भोगिता तें ॥ १३ ॥ तें मज वेगळें मी तया निराळा। नाहीं या सकळा ब्रह्मांडांत ॥ १४ ॥

आपापल्या गाई निवडून आपापल्या घरीं जातात १. घराच्या ओढीनें देव अंतरला पण गोपाळांचा जीव भाव सर्व काळ देवापाशीं असतो २. तुकाराम महाराज म्हणतात, कृष्णाचा वेध गोपाळांच्या मनास लागल्यामुळें जरी त्याचा वियोग झाला तरी त्या वेधानें संयोगच आहे ३. [३८५९]

ध्यानामुळें भक्तांना कृष्णाचा संयोग सर्वकाळच आहेः पण भक्ताचा वियोग झाल्या वेळीं दुश्चित्त होऊन कृष्ण उदास दिसला १. यशोदेनें कृष्ण आला हें पाहून माझें लेंकरूं गुणवान् आहे असें म्हणून त्यावरून लिंबलोण उतरलें २. आणि कृष्णाची हनुवटी धरून त्याची दृष्ट काढली ३. ज्यापासून सर्व जग उत्पन्न झालें त्याची दृष्ट यशोदा काढीत आहे, असा तो भक्तांच्या सुखास लांचावला आहे ४. लहान थोर जीवजंतु व इतर दैवतें वगैरे हे सर्व एक देवच नटला आहे ५. देवी, म्हैशासूर, म्हसोबा व क्षुद्र भूतें हे सर्व लहान थोर एका देवाचेच अंश आहेत ६. तुकाराम महाराज म्हणतात, हा एक श्रीहरि संपूर्ण विश्वांत व्यापक आहे पण भक्तीकरितां लहानसें लेंकरूं झाला आहे ७. [३८६०]

एके दिवशीं यशोदेची भक्ति पाहाण्याकरितां कृष्ण हट्ट करून यशोदेस रडून भोजन मागत आहे १. तेव्हां यशोदा म्हणाली, कीं देवास नैवेद्य दाखवून तुला जेवूं घालीन. हें ऐकून कृष्ण देवघरांत गेला व देव गिळून टाकून तेथें स्तब्ध उभा राहिला. हें यशोदेनें पाहिलें. कृष्णावांचून तेथें दुसरें कोणी नाहीं २. असें समजून ती कृष्णास विचारते, कीं तुजवांचून ह्या ठिकाणीं दुसरें कोणी नाहीं ३. मग देव्हाऱ्यांतील देव काय झाला? हें ऐकून कृष्ण हंसूं लागला ४. कारण मी एक देव ह्यांच्या जवळ असून हे मला जाणत नाहींत आणि खोट्या देवांस खरें मानतात ५. हे लोक आशाबद्ध लोभिक असल्यामुळें मला न जाणतां खोट्यास खरें व खऱ्यास खोटें मानितात ६. इतक्यांत यशोदा म्हणाली, कीं माझा देव कोठें आहे सांग. तेव्हां कृष्णानें मुख पसरलें, त्यामध्यें सर्व ब्रह्मांड तिच्या दृष्टीस पडलें ७. ज्याच्या पोटीं चंद्र, सूर्य, नक्षत्रें आदिकरून सर्व विश्व आहे तो देव भक्तांच्या स्वाधीन होऊन बाळक्रीडा करीत आहे ८. जो सर्व जगास जगविणारा व सर्व देवांचा देव आहे त्याच्या महिमेचें लाघव कोणीं जाणावें ? ९. असें कौतुक देवानें आपल्या आईबापांस दाखविलें, मग उभयतांनीं त्यास नमस्कार केला १०. नंदयशोदा म्हणतात, कीं हाच एक देव खरा. ह्यावांचून सर्व पसारा व्यर्थ आहे ११. मग नारायणांनीं त्यांचा देव त्यांस देऊन त्यांस सांगितलें, कीं मीच ही देव गिळण्याची कृति केली. हा देव असून तो माझाच अंश आहे १२. सर्व ठिकाणीं मीच आहें असें समजून जे ध्यान करितात त्यांचे सर्वोपचारांचे भोग मीच भोगतों १३. ते माझ्याहून निराळे व मी त्यांच्याहून निराळा असें या ब्रह्मांडांत आढळणार नाहीं १४

तद्भावना इच्छा भावीत ते (भावीतसे) त्यांचें। फळ देता साचें मीच एक ॥ १५ ॥ मीच एक खरा बोले नारायण। दाविलें निर्वाण निजदासां ॥ १६ ॥ निजदासां खूण दाविली निरुती। तुका म्हणे भूतीं नारायण ॥ १७ ॥ [३८६१]

नारायण भूतीं न कळे जयांसी। तयां गर्भवासीं येणें जाणें ॥ १ ॥ येणें जाण होय भूतांच्या मत्सरें। न कळतां खरें देव ऐसा ॥ २ ॥ देव ऐसा जया कळला सकळ। गेली तळमळ द्वेषबुद्धी ॥ ३ ॥ बुद्धीचा पालट नव्हे कोणे काळीं। हरि जळीं स्थळीं तयां चित्तीं ॥ ४ ॥ चित्त तें निर्मळ जैसें नवनीत। जाणिजे अनंत तयामाजी ॥ ५ ॥ तयामाजी हरि जाणिजे त्या भावें। आपलें परावें सारिखेंचि ॥ ६ ॥ चिंतनें तयाच्या तरती आणीक (चिंतनें जयाच्या तरती अनेक)। जो हें सकळीक देव देखे ॥ ७ ॥ देव देखे तोही देव कैसा नव्हे। उरला संदेह काय त्यासी ॥ ८ ॥ काया वाचा मनें पूजावे वैष्णव। म्हणऊनी भाव धरूनियां ॥ ९ ॥ यांसी कवतुक दाखविलें रानीं। वोणवा गिळुनी गोपाळांसी ॥ १० ॥ गोपाळांसी डोळे झांकविले हातें। धरिलें अनंतें विश्वरूप ॥ ११ ॥ पसरूनी मुख गिळियेले ज्वाळ। पाहाती गोपाळ बोटां सांदी (संधी) ॥ १२ ॥ संधि सारूनियां पाहिलें अनंता। म्हणती ते आतां कळलासी ॥ १३ ॥ कळला हा तुझा देवा नव्हे देहा। गिळिला वोणवा आणीक तो ॥ १४ ॥ तो तयां कळला आरुषां (आरुष) गोपाळां। दुर्गमा (दुर्गम) सकळां साधनांसी ॥ १५ ॥ सीण उरे तुका म्हणे साधनाचा। भाविकांसी साचा भाव दावी ॥ १६ ॥ [३८६२]

भाव दावी शुद्ध देखोनियां चित्ता। आपल्या अंकिता निजदासां ॥ १ ॥ सर्व गोपाळांसी काय पुण्य होतें। वांचलों जळते आगी हातीं ॥ २ ॥ आजी आम्हां येथें राखियेलें देवें। नाहीं तरी जीवें न वांचतों ॥ ३ ॥ न वांचत्या गाई जळतों सकळें। पूर्वपुण्यबळें वांचविलें ॥ ४ ॥ पूर्वपुण्य होतें तुमचिये गांठीं। बोले जगजेठी गोपाळांसी ॥ ५ ॥ गोपाळांसी म्हणे वैकुंठनायक। भले तुम्ही एक पुण्यवंत ॥ ६ ॥

पण ज्याच्या त्याच्या भावासारखें इच्छित फळ देणारा मीच एक आहें १५. सर्व विश्वामध्यें मीच एक खरा देव आहें हें निज गुह्य वर्म आपल्या दासांस त्यानें दाखविलें १६. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व भूतांच्या ठिकाणीं एका नारायणाची व्याप्ति आहे हें खरें वर्म आपल्या सेवकांस देव सांगतो १७. [३८६१]

सर्व ठिकाणीं एक नारायण व्यापक आहे, असें जे जाणत नाहींत त्यांना जन्ममृत्यूचें दुःख भोगावें लागतें १. व्यापक देव न समजून भूतांचा द्वेष केला असतां जन्ममृत्यूच्या येरझारा चुकत नाहींत २. सकळ व्यापक देव आहे असें जाणतात त्यांच्या ठिकाणीं कोणाच्या द्वेषाची बुद्धि व तळमळ नसते ३. जळाच्या व स्थळाच्या ठिकाणीं सर्व देवच आहे असें ज्याच्या मनांत ठसलें त्याची बुद्धि कधींहि पालटत नाहीं ४. ज्याचें चित्त लोण्याप्रमाणें निर्मळ आहे त्या ठिकाणीं देवाचें वास्तव्य आहे असें समजावें ५. ज्याला आपलें आणि परकें सारखेंच आहे त्याचे हृदयांत श्रीहरीची वस्ती आहे असें त्या भावार्थानें समजावें ६. सर्व ठिकाणीं देवच आहे असें जो पाहातो त्याच्या चिंतनानें इतर प्राण्यांचा उद्धार होतो ७. जो सर्व ठिकाणीं देवाची व्याप्ति पाहातो, तो तद्रूपच आहे ह्यांत संशय धरण्याचें कारणच नाहीं ८. असे जे वैष्णव आहेत, त्यांची पूजा कायावाचामनानें शुद्धभाव धरून करावी ९. त्या गोपाळांस रानामध्यें एके दिवशीं चोहोंकडे अग्नि लागला तो गिळण्याचें कौतुक दाखविलें १०. गोपाळांचे डोळे आपापल्या हातांनीं झांकावयास लावून देवानें मोठें भयंकर रूप धरलें ११. आणि भयंकर मुख पसरून तो अग्नि गिळला तें गोपाळांनीं बोटाच्या सांदींतून पाहिलें १२. व असें पाहून म्हणतात, कीं अरे कृष्णा, तूं आम्हांस समजलास १३. हे देवा, तूं देहधारी नव्हेस म्हणून त्वां असला अग्नि गिळलास १४. जो देव साधनाच्या योगें दुर्लभ आहे तो त्या अज्ञान गोपाळांस समजला १५. तुकाराम महाराज म्हणतात, हा देव आपला खरा भाव भाविकांस दाखवितो, म्हणून एका भावाखेरीज इतर साधनांची खटपट व्यर्थ आहे १६. [३८६२]

देव आपल्या सेवकाचें चित्त शुद्ध पाहून आपला खरा भाव दाखवितो १. त्या वेळीं देव गोपाळांस म्हणतो, कीं आपलें पूर्वार्जित कांहीं होतें, म्हणून आज आपण अग्नींतून वांचलों २. आज तुम्हां आम्हांस देवांनीं वांचविलें, नाहींपेक्षां आपण सर्व जळून मेलों असतों ३. सर्व गाईंसह आम्ही जळालों असतों; पण तुमच्या पूर्वपुण्यानें वांचलों ४. तुमच्या गांठीस पूर्वपुण्य पुष्कळ होतें असें कृष्ण गोपाळांस म्हणत आहे ५. वैकुंठींचा पति जो कृष्ण तो गोपाळांस म्हणतो, कीं

करी तुका म्हणे करविता आपण । द्यावें थोरपण सेवकांसी ॥ ७ ॥ [३८६३]

काय आम्हां चाळविशी वायांविण । म्हणती दुरून देखिलासे ॥ १ ॥ लावूनियां डोळे नव्हतों दुश्चित । तुज परचित्त माव होती ॥ २ ॥ होती दृष्टि आंत उघडी आमची । बाहेरी ते वायांचि (वांचि) कुंची झांकू ॥ ३ ॥ जालासी थोरला थोरल्या तोंडाचा । गिळियेला वाचा धूर आगी ॥ ४ ॥ आगी खातो ऐसा आमचा सांगाती । आनंदें नाचती भोंवतालीं ॥ ५ ॥ भोंवतीं आपणां मिळविलीं देवें । तुका म्हणे ठावें नाहीं ज्ञान ॥ ६ ॥ [३८६४]

नाहीं त्याची शंका वैकुंठनायका । नेणती ते एकाविण दुजा ॥ १ ॥ जाणतियां सवें येऊं नेदी हरि । तर्कवादी दुरी दुरावले ॥ २ ॥ वादियांसी भेद निंदा अहंकार । देऊनियां दूर दुराविले ॥ ३ ॥ दुराविले दूर आशाबद्ध देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥ ४ ॥ चित्तीं द्रव्य दारा पुत्रादिसंपत्ति । समान ते होती पशु नर ॥ ५ ॥ नरक साधिला विसरोनि देवा । बुडाले ते भवा नदीमाजी ॥ ६ ॥ जिहीं हरिसंग केला संवसारीं । तुका म्हणे खरी खेप त्यांची ॥ ७ ॥ [३८६५]

खेळींमेळीं आले घरा गोपीनाथ । गोपाळांसहित मातेपाशीं ॥ १ ॥ मातेपाशीं एक नवल सांगती । जाली तैसी ख्याति वोणव्याची ॥ २ ॥ ओवाळिलें तिनें करूनी आरती । पुसे दसवंती गोपाळांसी ॥ ३ ॥ पुसे पडताळूनी मागुती मागुती । गोपाळ सांगती कवतूक ॥ ४ ॥ कवतूक कानीं आइकतां त्याचें । बोलतां ये वाचे वीट न ये ॥ ५ ॥ नयन गुंतले श्रीमुख पाहतां । न साहे लवतां आड पातें ॥ ६ ॥ तेव्हां कवतूक कळों आलें कांहीं । हळूहळू दोहीं मायबापां ॥ ७ ॥ हळूहळू त्यांचें पुण्य जालें वाड । वारलें हें जाड तिमिराचें ॥ ८ ॥ तिमिर हें तेथें राहों शके कैसें ।

भले शाबास, आज एक तुम्हीच पुण्यवंत आहांत ६. तुकाराम महाराज म्हणतात, हा देव कर्ता करविता आपणच असून सेवकांस थोरपणा देत आहे ७. [३८६३]

गोपाळ म्हणतात, कीं अरे कृष्णा, तूं आम्हांस उगीच चाळवूं नकोस. तुला वणवा गिळतांना आम्हीं दुरून पाहिलें १. आम्ही कांहीं डोळे झांकून दुश्चित्त (गैरसावध) बसलों नव्हतों. तुजकडे लक्ष ठेवून उगीच डोळे झांकण्याचें निमित्त केलें होतें २. बाहेरून लबाडीनें नुसते हात लावून आंत आमचे डोळे उघडे होते ३. कृष्णा, तूं थोर होऊन तोंड मोठें पसरलेंस आणि धुरासुद्धां अग्नि गिळून टाकलास ४. असा आमचा अग्नि खाणारा सोबती आहे, असें म्हणून कृष्णाच्या सभोंवतीं गोपाळ आनंदानें नाचूं लागले ५. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांच्या अंगीं जाणतेपणा नाहीं असे ते गोपाळ देवांनीं आपल्या सभोंवतीं जमा केले आहेत ६. [३८६४]

त्या अज्ञान गोपाळांची देवास कांहीं शंका नाहीं, कारण ते एका वांचून दुसऱ्यास जाणत नाहींत १. अनेक वस्तु जाणणाऱ्या लोकांस देव बरोबर येऊं देत नाहीं व तर्कटी लोकांस तर दूर घालवितो २. तर्कटी वाद करणारांस निंदा, अहंकार आणि भेद हे देऊन टाकून त्यांस दूर घालवितो ३. जे कोणी आशाबद्ध लोक असतील त्यांनीं देवास टाकून आपल्या कुटुंबाची सेवा ते करीत बसले आहेत ४. ज्यांच्या चित्तामध्यें बायकामुलें, द्रव्य, संपत्ति वगैरे वस्तूंचें ध्यान आहे ते लोक पशुसमान समजावे ५. एका देवास विसरल्यामुळें संसारसमुद्रांत बुडून अखेर त्यांना नरक भोगावा लागतो ६. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांनीं संसारास येऊन एक श्रीहरि सखा करून घेतला आहे त्यांच्या जन्माचें सार्थक झालें ७. [३८६५]

कृष्ण सर्व गोपाळांसह खेळीमेळीनें रानांतून घरीं यशोदेपाशीं आला १. त्या वेळीं गोपाळांनीं, रानांत कृष्णानें अग्नि गिळल्याची हकीगत, यशोदेपाशीं सांगितली २. ती ऐकून तिनें कृष्णास आरती घेऊन ओवाळलें आणि ती गोपाळांस वरचेवर हकीगत विचारूं लागली ३. पुनः पुनः तेंच विचारते व गोपाळहि आनंदानें सांगतात ४. ह्या देवाचें कौतुक ऐकण्यास व तोंडानें सांगण्यास आनंद वाटतो, त्याचा कधींहि वीट येत नाहीं ५. कृष्णाच्या मुखाकडे यशोदा पाहात असतां डोळ्याची पापणी लवली तरी तें देखील सहन होत नाहीं ६. त्या वेळीं कृष्णाचें लाघव मायबापांस वरचेवर समजून येऊं लागलें ७. वरचेवर त्यांचें पुण्य वाढलें, त्या योगानें अज्ञानाचा अंधार नाहींसा झाला ८. ज्याच्या हृदयांत

जालिया प्रकाशें गोविंदाच्या ॥ ९ ॥ दावी तुका म्हणे देव ज्या आपणा । पालटे तें (पालटे तो) क्षणामाजी एका ॥ १० ॥ [३८६६]

आतां काय यासी म्हणावें लेंकरूं । जगाचा हा गुरू मायबाप ॥ १ ॥ माय याची यासी राहिली व्यापून । कळों नये क्षण एक होतां ॥ २ ॥ क्षण एक होतां विसरली त्यासी । माझें माझें ऐसें करी बाळा ॥ ३ ॥ करी कवतुक कलों नेदी कोणा । योजूनी कारणा तेंचि खेळे ॥ ४ ॥ तें सुख लुटिलें घरींचिया घरीं । तुका म्हणे परी आपुलाल्या ॥ ५ ॥ [३८६७]

आपुलाल्यापरी करितील सेवा । गीत गाती देवा खेळवूनी ॥ १ ॥ खेळ मांडियेला यमुने पावळीं । या रे चेंडूफळी खेळूं आतां ॥ २ ॥ आणविल्या डांगा चवगुणां काठी । बैसोनियां वांठी गडिया गडी ॥ ३ ॥ गडी जंव पाहे आपणासमान । नाहीं नारायण म्हणे दुजा ॥ ४ ॥ जाणोनी गोविंदें सकळांचा भाव । तयांसी उपाव तोचि सांगे ॥ ५ ॥ सांगे सकळांसी व्हा रे एके ठाईं । चेंडू राखा भाई तुम्ही माझा ॥ ६ ॥ मज हा न लगे आणीक सांगाती । राखावी बहुतीं हाल माझी ॥ ७ ॥ माझे हाके हाक मेळवा सकळ । न वजा बरळ एक एक ॥ ८ ॥ एका समतुकें अवघेचि रहा । जाईल तो पहा धरा चेंडू ॥ ९ ॥ चेंडू धरा ऐसें सांगतो सकळां । आपण निराळा एकलाची ॥ १० ॥ चिंतूनियां चेंडू हाणे ऊर्ध्वमुखें । ठेलीं सकळीक पाहतचि ॥ ११ ॥ पाहतचि ठेलीं न चलतां कांहीं । येरू लवलाहीं म्हणे धरा ॥ १२ ॥ धरावा तयानें त्याचें बळ ज्यासी । येरां आणिकांसी लाग नव्हे ॥ १३ ॥ नव्हे काम बळ बुद्धि नाहीं त्याचे । न धरावे निचें उंचाविण ॥ १४ ॥ विचारीं पडले देखोनी गोपाळ । या म्हणे सकळ माझ्यामागें ॥ १५ ॥ मार्ग देवावीण न दिसे आणिकां । चतुर होत कां बहुत जन ॥ १६ ॥ चतुर चिंतिती बहुत मारग । हरि जाय माग पाहोनियां ॥ १७ ॥ यामागें जे गेले

देवाचा उदय झाला त्या ठिकाणीं अज्ञानाचा अंधार कसा राहील? ९. तुकाराम महाराज म्हणतात, देवानें आपला अनुभव ज्यास दाखविला त्याचे अंतःकरणाचा पालट होण्यास एक घटका देखील लागणार नाहीं १० [३८६६]

हा देव सर्व जगाचा मायबाप व गुरु आहे. त्यास आतां लेंकरूं म्हणावें काय? १. ह्याची माया ह्याचे आड लपून राहाते म्हणून हा क्षणामध्यें समजून येत नाहीं (एक क्षण झाल्याबरोबर ह्याची माया मनुष्याला मोहित करते) २. नंदयशोदेस देवाचें वैभव समजलें पण एका क्षणांतच माया आड आल्याबरोबर हें माझें लेंकरूं आहे असें यशोदा म्हणूं लागली आणि देवाच्या अनुभवास विसरली ३. देव कौतुक करून कोणास तें समजूं देत नाहीं व आपल्या मनाप्रमाणें कारणाची (निमित्ताची) योजना करून ते खेळ खेळतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, कृष्णाचें सुख गोकुळांतील लोकांनीं घरचेघरीं आपापल्यापरीनें भोगलें ५. [३८६७]

सर्व गोपाळ कृष्णास खेळवितात व कोणी गाणें गातात, अशी आपापल्या परीनें कृष्णाची सेवा करितात १. सर्व गोपाळांनीं यमुनेच्या वाळवंटांत खेळ मांडला. त्यांस कृष्ण म्हणतो, कीं अरे, आतां तुम्ही आम्ही मिळून चेंडूचा डाव खेळूं या २. हें सांगून चार हात लांब काठ्या, कांहीं आंखूड काठ्या व चेंडू आणवून गड्यांची वांटणी करूं लागले ३. आपल्या बरोबरीचा कोणी गडी आहे काय असें पाहातांना दुसरा कोणी नाहीं हें कृष्णास समजलें ४. सर्वांच्या मनांतील भाव जाणून देव त्यांस युक्ति सांगत आहेत ५. अरे, तुम्ही सर्व गोपाळ एका बाजूला होऊन माझा चेंडू रक्षण करा ६. मला कोणी सोबती नको. माझ्या डावाचा पेंच सर्वांनीं सांभाळावा ७. माझे हांकेबरोबर हांक देऊन सारख्या स्वरानें हांका माराव्यात. त्यांत कोणी बरळूं नये ८. तुम्ही सर्व एका ठिकाणीं राहून माझा चेंडू वरतीं जाईल तो धरावा ९. चेंडू धरा असें पुन्हा एकदां सांगून कृष्ण एका बाजूला एकटा उभा राहिला १०. आणि पुढील कामाची योजना करून चेंडू आकाशांत फेंकला. तेव्हां सर्व गोपाळ उगीच पाहात उभे राहिले ११. त्यांचा कांहीं उपाय न चालतां उगीच पाहूं लागले, त्यांस चेंडू लौकर धरा म्हणून कृष्ण सांगतो १२. देवाचें ज्याला बळ आहे तोच त्याचा चेंडू धरील. त्यावांचून आणिकांचा लाग नाहीं १३. ज्यास बळ आणि बुद्धि साहाय्य नाहीं, त्याच्या हातून कोणतेंच काम होणार नाहीं. आकाशमार्गीं चेंडू गेला त्यास लहानांनीं कसा धरावा? १४. सर्व गोपाळ विचारांत पडले हें पाहून कृष्ण म्हणाला, अरे, तुम्ही माझ्या मागें या १५. पुष्कळ शहाणे जरी झाले तरी देवावांचून कोणासहि मार्ग दिसणार नाहीं १६. शहाणे होऊन मार्ग लक्षांत आणूं पाहातात; पण हरि ज्या वाटेनें गेला त्या मार्गानें जाणारा तोच चतुर समजावा १७.

गोविंदा गोपाळ । ते नेले सीतळ पंथें ठाया ॥ १८ ॥ पंथ जे चुकले आपले मतीचे । तयामागें त्यांचे तेचि हाल ॥ १९ ॥ हाल दोघां एक मोहरे मागिलां । चालतां चुकला वाट पंथ ॥ २० ॥ पंथ पुढिलांसी चालतां न कळे । मागिलांनीं डोळे उघडावे ॥ २१ ॥ वयाचा प्रबोध विचार ज्या नाहीं । समान तो देहीं बाळकासी ॥ २२ ॥ शिकविलें हित नाईके जो कानीं । त्यामागें भल्यांनीं जाऊं नये ॥ २३ ॥ न ये तेंचि करी श्रेष्ठाचिया मना । मूर्ख एक जाणा तोचि खरा ॥ २४ ॥ रानभरी जाले न कळे मारग । मग तो श्रीरंग आठविला ॥ २५ ॥ लाज सांडूनियां मारितील हाका । कळलें नायका वैकुंठींच्या ॥ २६ ॥ चारी वेद ज्याची कीर्ति वाखाणिती । तया अति प्रीती गोपाळांची ॥ २७ ॥ गोपाळांचा धांवा आइकिला कानीं । सोयी चक्रपाणि पावविलें (पालविलें) ॥ २८ ॥ सोयी धरूनियां आले हरिपाशीं । लहान थोरांशीं सांभाळिलें ॥ २९ ॥ सांभाळिलें तुका म्हणे सकळांही । सुखी जाल तेही हरिमुखें ॥ ३० ॥ [३८६८]

मुखें सांगे त्यांसी पैल चेंडू पहा । उदकांत डोहाचिये माथां ॥ १ ॥ माथां कळंबाचे अववडा ठायीं । दावियेला डोहीं जळामाजी ॥ २ ॥ जळांत पाहतां आडतीया (ये) दृष्टि । म्हणे जगजेठी ऐसें नव्हे ॥ ३ ॥ नव्हे साच चेंडू छाया दिसे आंत । खरा तेथें चित्त लावा वरी ॥ ४ ॥ वरी देखियेला अवघ्यांनीं डोळां । म्हणती गोपाळा आतां कैसें ॥ ५ ॥ कैसें करूनियां उतरावा खालीं । देखोनियां भ्यालीं अवघीं डोहो ॥ ६ ॥ डोहो बहु खोल काळ्या भीतरीं । सरलीं माघारीं अवघीं जणें ॥ ७ ॥ जयाचें कारण तयासीच ठावें । पुसे त्याच्या भावें त्यास हरी ॥ ८ ॥ त्यासी नारायण म्हणे राहा तळीं । चढे वनमाळी झाडावरी ॥ ९ ॥ वरी जातां हरि पाहाती गोपाळ । म्हणती सकळ आम्ही नेणों ॥ १० ॥ नेणों म्हणती हें करितोसी काई । आम्हां तुझी आई देईल शिव्या ॥ ११ ॥ आपुलिया कानां ठेवूनियां हात । सकळीं निमित्त टाळियेलें ॥ १२ ॥ निमित्याकारणें रचिलें कारण ।

त्याच्या मार्गानें जे गोपाळ गेले ते चांगल्या वाटेनें स्वस्थानीं पावले १८. आणि बुद्धीनें वाट चालणारे चुकले व त्यांच्या मागें जाणारांची तशीच फजिती होईल १९. जी फजिती पुढल्याची तीच मागल्याची होते, कारण खरी वाट दोघेहि चुकले २०. पुढें चालणारांस वाट समजत नाहीं, तर मागिलांनीं सावध झालें पाहिजे २१. ज्यास्त वय झालें असून जर विचार नाहीं तर तो प्राणी अज्ञान लेंकराप्रमाणें समजावा २२. जो कोणी हित शिकविलें असतां ऐकत नाहीं, त्याच्या मागें शहाण्यांनीं जाऊं नये २३. श्रेष्ठांच्या मनास येईल तसें जर वागत नाहीं तर तो खरोखर मूर्ख आहे असें समजावें २४. अशा प्रकारें वाट चुकून आड रानांत गेल्यावर खरी वाट समजेना. मग तेथें त्यांस देव आठवला २५. लाज टाकून कृष्णास हाका मारूं लागले. हें वैकुंठवासी देवास समजलें २६. चार वेद ज्याची कीर्ति वर्णन करितात त्या देवास गोपाळांची मोठी आवड आहे २७. गोपाळांनीं धांवा केला तो ऐकून आपल्या वाटेला त्यांना लावलें २८. मग तोच मार्ग धरून गोपाळ हरीजवळ आल्यामुळें लहान थोरांचें त्यानें रक्षण केलें २९. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व गोपाळ श्रीकृष्णाचें मुख पाहून सुखी झाले आणि देवांनींहि त्यांचें रक्षण केलें ३०. [३८६८]

त्या गोपाळांत कृष्ण सांगतो, कीं कळंबाच्या वृक्षाची फांदी यमुनेच्या डोहावर आली आहे तीवर चेंडू अडकला तो तुम्ही पाहा १. अशा अवघड ठिकाणीं डोहावर त्यांस चेंडू दाखविला २. तेव्हां ते गोपाळ खालीं दृष्टि करून पाण्यांत पाहूं लागले. त्यांस कृष्ण म्हणतो, कीं अरे, तसें पाहूं नका ३. वरील चेंडूची सांवली पाण्यांत पडली आहे. खरा चेंडू कळंबावर आहे तिकडे लक्ष देऊन पाहा ४. मग गोपाळांनीं वरतीं चेंडू पाहिला आणि कृष्णास म्हणाले, कीं आतां कसें करावें ? ५. तो चेंडू कोणत्या प्रकारें खालीं काढावा ? यमुनेचा डोह पाहून सर्व गोपाळ भ्याले ६. यमुनेचा डोह फार खोल असून आंत कालिया नांवाचा सर्प राहात आहे असें पाहून सर्व गोपाळ मागें सरले ७. ज्याला आपलें कार्य करून घेणें आहे त्या श्रीहरीस सर्व माहीत असून निमित्ताकरितां गोपाळांस विचारलें ८. त्यांस सांगितलें, कीं तुम्ही खालीं असा. मी झाडावर जाऊन चेंडू घेऊन येतों. असें सांगून कृष्ण वर चढूं लागले ९. कृष्ण वर चढले तें गोपाळांनीं पाहून गोपाळ म्हणाले, कीं हें काम आम्ही सांगत नाहीं १०. तूं हें काय करतोस, हें आम्हांस कांहीं समजत नाहीं. तुझी आई आम्हांस शिव्या देईल ११. आम्ही आपल्या कानांवर हात ठेविले आहेत, असें बोलून गोपाळांनीं आपल्यावरचें

गेला नारायण खांदीवरी ॥ १३ ॥ खांदीवरी पाव ठेवियेला देवें । पाडावा त्या भावें चेंडू तळीं ॥ १४ ॥ तळील नेणती तुका म्हणे भाव । अंतरींचें देव जाणों (कळों) नेदी ॥ १५ ॥ [३८६९]

नेदी कळों केल्याविण तें कारण । दाखवी आणून अनुभवा ॥ १ ॥ न पुरेसा हात घाली चेंडूकडे । म्हणितलें गडे सांभाळावें ॥ २ ॥ सांभाळ करितां सकळां जीवांचा । गोपाळांसी वाचा म्हणे बरें ॥ ३ ॥ बरें विचारूनी करावें कारण । म्हणे नारायण बऱ्या बरें ॥ ४ ॥ बरें म्हणऊनी तयांकडे पाहे । सोडविला जाय चेंडू तळा ॥ ५ ॥ तयासवें उडी घातली अनंतें । गोपाळ रडत येती घरा ॥ ६ ॥ येतां त्यांचा लोकीं देखिला कोल्हाळ । सामोरीं सकळ आलीं पुढें ॥ ७ ॥ पुसती ते मात तया गोपाळांसी । हरिदुःखें त्यांसी न बोलवे ॥ ८ ॥ न बोलवे हरि बुडालासें मुखें । कुटितील दुःखें उरमाथे ॥ ९ ॥ मायबापें तुका म्हणे न देखती । तैसें दुःख चित्तीं गोपाळांच्या ॥ १० ॥ [३८७०]

गोपाळां उभडु नावरे दुःखाचा । कुंटित हे वाचा जाली त्यांची ॥ १ ॥ जालें काय ऐसें न कळे कोणासी । म्हणती तुम्हांपाशीं देव होता ॥ २ ॥ देवासवें दुःख न पवतें ऐसें । कांहीं अनारिसें दिसे आजी ॥ ३ ॥ आजी दिसे हरि फांकला यांपाशीं । म्हणऊनी ऐशी परी जाली ॥ ४ ॥ जाणविल्याविण कैसें कळे त्यांसी । शाहाणे तयासी कळों आलें ॥ ५ ॥ कळों आलें तिहीं फुंद शांत केला । ठायींचाच त्याला थोडा होता ॥ ६ ॥ होता तो विचार सांगितला जना । गोपाळ शहाणा होता त्यानें ॥ ७ ॥ सांगे आतां हरी तुम्हां आम्हां नाहीं । बुडाला तो (बुडालासे) डोहीं यमुनेच्या ॥ ८ ॥ यासी अवकाश नव्हेचि पुसतां । जालिया अनंता कोण परी ॥ ९ ॥ परी त्या दुःखाची काय सांगों आतां । तुका म्हणे माता लोकपाळा ॥ १० ॥ [३८७१]

पाषाण फुटती तें दुःख देखोनी । करितां गौळणी शोक लोकां ॥ १ ॥ काय ऐसें पाप होतें

निमित्त काढलें (टाळलें) १२. पुढील कामाच्या निमित्तानें चेंडूचें निमित्त करून नारायण झाडाच्या फांदीवर चढला १३. तेथून चेंडू खालीं पाडावा अशा हेतूनें फांदीवर पाय टेविला १४. तुकाराम महाराज म्हणतात, खालीं राहाणाऱ्या गोपाळांस देवाचे अंतरांतील भाव समजला नाहीं व देवहि तो भाव कळूं देत नाहीं १५. [३८६९]

देव आपलें कार्य केल्यावांचून कोणास कळूं देत नाहीं. करून सर्वांच्या अनुभवास आणून दाखवितो १. चेंडूकडे न पुरेल अशा बेतानें हात लांबविला त्या वेळीं गोपाळ म्हणाले, कीं सांभाळून काम करावें २. जो देव सर्व जीवांचें रक्षण करणारा तो गोपाळांस बरें असें म्हणाला ३. चांगल्या विचारानें काम करावें हें गोपाळांचें बोलणें ऐकून कृष्ण बऱ्यास बरें आहे असें म्हणतो ४. असें बोलून गोपाळांकडे पाहात असतां मुद्दाम देवानें चेंडू खालीं पाण्यांत पाडला ५. त्याबरोबर कृष्णानें डोहांत उडी घातली. तें पाहून गोपाळ रडत घरीं निघाले ६. रडत आल्याचा आरडाओरडा गोकुळांतील लोकांनीं ऐकून सर्व त्यांच्या समोर आले ७. काय झालें म्हणून गोपाळांस पुसतात, पण त्यांस हरीच्या वियोगदुःखानें बोलवेनासें झालें ८. कृष्ण यमुनेंत बुडाला हें त्यांच्यानें सांगवेना ! कारण दुःखाच्या योगानें मस्तक आणि उर फुटूं लागतील ९. प्रत्यक्ष आईबाप पुढें आलेलेहि त्यांना दिसत नव्हते इतकें दुःख गोपाळांना झालें १०. [३८७०]

त्या दुःखाचा उमाळा गोपाळांस अनावर होऊन त्यांची वाचा कुंठित झाली १. काय झालें हें वर्तमान कोणासहि समजेना आणि तेथें जमलेले लोक त्या गोपाळांस म्हणाले, कीं तुमच्या बरोबर देव होता तो कोठें आहे ? २. देव बरोबर असल्यावर असलें दुःख झालें नसतें. आज कांहीं तरी वेगळा प्रकार असावा ३. आज ह्यांचा आणि कृष्णाचा वियोग झाल्यामुळें अशा दुःखाचा प्रकार दिसत आहे ४. सांगितल्यावांचून ह्या लोकांस कसें समजावें, असा विचार शहाण्या गोपाळांच्या मनांत आला ५. असें समजून त्यांनीं शोक कमी केला. त्यांच्या अंगीं जाणतेपणा असल्यामुळें त्यांस मुळींच शोक थोडा होता ६. मग त्या शहाण्या गोपाळांनीं झालेली सर्व हकीकत त्या लोकांस कळविली ७. कृष्ण यमुनेच्या डोहांत बुडाला, तो आतां तुम्हां आम्हांस मिळणार नाहीं ८. हें ऐकून तो कोणत्या प्रकारें बुडाला ही हकीगत न विचारतां ते सर्व लोक रडूं लागले ९. तुकाराम महाराज म्हणतात, आतां तें दुःख सर्व लोकांस व आईबापांस जें झालें तें किती प्रकारचें म्हणून सांगावें ? १०. [३८७१]

गौळणींसुद्धां सर्व लोक रडूं लागले असतां तें दुःख पाहून दगड देखील उकलूं लागले १. आणि ते लोक

आम्हांपाशीं । बोलती एकाशीं एक एका ॥ २ ॥ एकाचिये डोळां असूं बाह्यात्कारीं । नाहीं तीं अंतरीं जळतील ॥ ३ ॥ जळतील एकें अंतर्बाह्यात्कारें । टाकिलीं लेंकुरें कडियेहूनी ॥ ४ ॥ निवांतचि एकें राहिलीं निश्चिंत । बाहेरी ना आंत जीव त्यांचे ॥ ५ ॥ त्यांचे जीव वरी आले त्या सकळां । एक त्या गोपाळांवांचूनियां ॥ ६ ॥ वांचणें तें आतां खोटें संवसारीं । नव्हे भेटी जरी हरीसवें ॥ ७ ॥ सवें घेऊनियां चाललीं गोपाळां । अवघींच बाळा नर नारी ॥ ८ ॥ नर नारी नाहीं मनुष्याचें नांव । गोकुळ हें गांव सांडियेलें ॥ ९ ॥ सांडियेलीं अन्नें संपदा सकळ । चित्तीं तो गोपाळ धरूनी जाती ॥ १० ॥ तिरीं माना घालूनियां उभ्या गाई । तटस्थ या डोहीं यमुनेच्या ॥ ११ ॥ यमुनेच्या तिरीं झाडें वृक्ष वल्ली । दुःखें कोमाइलीं कृष्णाचिया ॥ १२ ॥ यांचें त्यांचें दुःख एक जालें तिरीं । मग शोक करी मायबाप ॥ १३ ॥ मायबाप तुका म्हणे सहोदर । तोंवरीच तीर न पवतां ॥ १४ ॥ [३८७२]

तीर देखोनियां यमुनेचें जळ । कांठींच कोल्हाळ करिताती ॥ १ ॥ कइवाड नव्हे घालावया उडी । आपणासी ओढी भय मागें ॥ २ ॥ मागें सरे माय पाउलापाउलीं । आपलेंच घाली धाकें अंग ॥ ३ ॥ अंग राखोनियां माय खेद करी । अंतरींचें हरी जाणवलें ॥ ४ ॥ जाणवलें मग देवें दिली बुडी । तुका म्हणे कुडी भावना हे ॥ ५ ॥ [३८७३]

भावनेच्या मुळें अंतरला देव । शिरला संदेह भयें पोटीं ॥ १ ॥ पोटीं होतें मागें जीव द्यावा ऐसें । बोलिल्या सरिसें न करवे ॥ २ ॥ न करवे त्याग जीवाचा या नास । नारायण त्यास अंतरला ॥ ३ ॥ अंतरला बहु बोलतां वाउगें । अंतरींच्या त्यागेंविण गोष्टी ॥ ४ ॥ गोष्टी सकळांच्या आइकिल्या देवें । कोण कोण्याभावें रडती तीं ॥ ५ ॥ तीं गेलीं घरास आपल्या सकळ । गोधनें गोपाळ लोक माय ॥ ६ ॥ मायबापांची तों ऐसी जाली गति । तुका म्हणे अंतीं कळों आलें ॥ ७ ॥ [३८७४]

म्हणाले, कीं आमचें पूर्वजन्मींचें काय पाप होतें म्हणून हरि अंतरला; असें एकमेकांस म्हणतात २. कित्येकांच्या अंतरांत दुःख नसून डोळ्यांस पाणी येत आहे व कित्येक डोळ्यांस पाणी न आणतां अंतर्बाह्य दुःखानें व्यापून कडेवरील मुलेंदेखील त्यांनीं टाकून दिलीं ४. कित्येक असे निवांत झाले, कीं त्यांचा प्राण बाहेरहि नाहीं व आंतहि नाहीं ५. एका कृष्णाच्या जीवावर सर्व सुख भोगतात, त्यावांचून त्यांना सुख नाहीं ६. आतां जर कृष्णाची भेट न होईल तर ह्या संसारांत वांचून काय करावयाचें आहे, असें एकमेकांस बोलूं लागले ७. गोपाळांसुद्धां सर्व नरनारी मिळून यमुनेच्या डोहाकडे निघाले ८. नर व नारी हीं मनुष्यांमध्येंच आहेत असें नाहीं. सर्व प्राणिमात्र गोकुळ सोडून निघाले ९. धान्यआदिकरून सर्व संपदा टाकून एक कृष्ण मनांत धरून निघाले १०. यमुनेच्या तीराला सर्व गाई खालीं माना घालून दुःखानें तटस्थ उभ्या राहिल्या आहेत ११. त्या ठिकाणीं वृक्षवल्लीआदिकरून तृणजाति देखील कृष्णाच्या दुःखानें कोमेजल्या १२. ह्या स्थावरादिकांचें आणि प्राणिजनांचें एकच दुःख झालें हें पाहून नंदयशोदा रडूं लागलीं १३. तुकाराम महाराज म्हणतात, आईबाप अथवा भाऊ वगैरे गोत, जोंवर शेवट झाला नाहीं, तोंवरच उपयोगीं पडतील १४. [३८७२]

आईबाप, हे यमुनेच्या तीरीं येऊन तें पाणी पाहून कांठावरच मोठ्यानें रडूं लागले १. डोहामध्यें उडी घालावी अशी कोणाची हिम्मत न होतां भयानें मागें सरूं लागले २. यशोदेनें तर पाउलानें पाऊल मागें सरून वाळवंटांत अंग टाकलें ३. आपली आई अंग राखून शोक करते हें कृष्णास समजलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशी त्यांची खोटी भावना असलेली समजून मग देवानें पाण्यांत बुडी मारली ५. [३८७३]

अशी खोटी भावना झाल्यामुळें देव अंतरला, कारण त्यांच्या पोटांत जीवाविषयीं भय व संशय उत्पन्न झाला १. कृष्णावांचून संसारांत न राहातां डोहांत जीव द्यावा, असें मनांत आणलें होतें पण तसें करवलें नाहीं २. ज्यांच्या हातून सर्वस्वाचा त्याग व जीवाचा नाश करवत नाहीं त्यांस देव अंतरला जातो ३. मनांत त्याग आल्याशिवाय वर तोंडानें व्यर्थ बोलून काय उपयोग आहे? ४. कोण कोणत्या भावानें रडतात व त्यांच्या वरपंगिस्तपणाच्या गोष्टी ऐकून देव अंतरांत समजले ५. आईबाप सुद्धां सर्व गाईगोपाळ मिळून आपापल्या घरास जाते झाले ६. तुकाराम महाराज म्हणतात, आईबापांची देखील ही अवस्था झाली असें अखेरीस समजून आलें ७. [३८७४]

आला त्यांचा भाव देवाचिया मना। अंतरीं कारणासाठीं होता ॥ १ ॥ होता भाव त्यांचा पाहोनी निराळा। नव्हता पाताळा गेला आधीं ॥ २ ॥ आधीं पाटीमोरीं जालीं तीं सकळें। मग या गोपाळें बुडी दिली ॥ ३ ॥ दिली हाक त्याणें जाऊनी पाताळा। जागविलें काळा भुजंगासी ॥ ४ ॥ भुजंग हा होता निजला मंदिरीं। निर्भय अंतरीं गर्वनिधि ॥ ५ ॥ गर्व हरावया आला नारायण। मिस या करून चेंडुवाचें ॥ ६ ॥ चेंडुवाचें मिसें काळया नाथावा। तुका म्हणे देवा कारण हें ॥ ७ ॥ [३८७५]

काळयाचे मागे चेंडु पत्नीपाशीं। तेजःपुंजराशी देखियेला ॥ १ ॥ लावण्यपुतळा मुखप्रभाराशी। कोटि रवि शशी उगवले ॥ २ ॥ उगवला खांब कर्दळीचा गाभा। ब्रीदें वांकी नभा देखे पायीं ॥ ३ ॥ पाहिला सकळ तिनें न्याहाळूनी। कोण या जननी विसरली ॥ ४ ॥ विसरु हा तीस कैसा याचा जाला। जीवाहूनी वाला (वाल्हा) दिसतसे ॥ ५ ॥ दिसतसे रूप गोजिरें लहान। पाहातां लोचन सुखावले ॥ ६ ॥ पाहिलें परतोनी काळा दुष्टाकडे। मग म्हणे कुडें जालें आतां ॥ ७ ॥ आतां हा उठोनी खाईल या बाळा। देईन वेल्हाळा माय जीव ॥ ८ ॥ जीव याचा कैसा वांचे म्हणे नारी। मोहिली अंतरीं हरिरूपें ॥ ९ ॥ रूपें अनंताचीं अनंत अपार। नकळे साचार तुका म्हणे ॥ १० ॥ [३८७६]

म्हणे चेंडू कोणें आणिला या ठाया। आलों पुरवाया कोड त्याचें ॥ १ ॥ त्याचें आइकोन निष्ठुर वचन। भयभीत मन जालें तिचें ॥ २ ॥ तिची चित्तवृत्ति होती देवावरी। आधीं ते माघारी फिरली वेगीं ॥ ३ ॥ वेगीं मन गेलें भ्रताराचे सोयी। विघ्न आलें कांहीं आम्हांवरी ॥ ४ ॥ वरी उदकास अंत नाहीं पार। अक्षोभ सागर भरलासे ॥ ५ ॥ संचार करूनी कोण्या वाटे आला। टायींच देखिला अवचिता ॥ ६ ॥ अवचिता नेणों येथें उगवला। दिसे तो धाकुला बोल मोठे ॥ ७ ॥

हा देव कांहीं कामाकरितां पाण्यांत गुप्त होता. ह्या लोकांचा भाव जाणून खालीं गेला १. त्यांचा भाव समजेपर्यंत देव पाताळास गेला नव्हता व प्रगटहि नसून थोड्या पाण्यांत गुप्त होता २. ती सर्व मंडळी माघारी फिरली हें पाहून कृष्णानें डोहांत बुडी मारली ३. तळीं जाऊन कालिया सर्पास उठविण्याकरितां कृष्ण मोठ्यानें गर्जना करूं लागला ४. तो सर्प केवळ गर्वाचा समुद्र निर्भय असा आपल्या घरांत निजला होता ५. चेंडूचें निमित्त करून त्याचा गर्व हरण्याकरितां नारायण तेथें आले आहेत ६. तुकाराम महाराज म्हणतात, चेंडूच्या निमित्तानें कालिया सर्पाचा नाश करावा हें तेथें देवाचें काम आहे ७. [३८७५]

कालिया सर्पाच्या स्त्रीजवळ कृष्ण चेंडू मागत आहे. तिनें तो रूपवान् घवघवीत पुतळा पाहिला १. तो केवळ लावण्याचा पुतळा तेजस्वी, सुंदर मुख व कोटि सूर्यचंद्रांप्रमाणें त्याच्या अंगाची कांति आहे २. त्याच्या पायांत ब्रीद (तोडे), हातांत वांकी असून कर्दळीस्तंभाप्रमाणें जणूं असा तिनें पाहिला ३. कृष्णाचें रूप न्याहाळून कालियाची स्त्री मनांत म्हणाली, कीं अशा पुतळ्याला ह्याची आई कशी विसरली? ४. हा जीवापेक्षांहि आवडता असावा असें दिसतें, पण ह्याचा विसर आईला कसा झाला? ५. तें गोजिरें सगुण रूप पाहून तिचे डोळे सुखावले ६. मग तिनें परतून आपल्या दुष्ट नवऱ्याकडे पाहून ती म्हणाली, कीं ह्या वेळेस फार वाईट झालें ७. कारण हा सर्प उठून त्या लेंकरास खाईल, मग त्याच्याकरितां त्याची आई जीव देईल ८. ह्याचा जीव आतां कसा वांचेल असें बोलून ती स्त्री कृष्णाच्या रूपानें मोहित झाली ९. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवाचीं रूपें अनंत प्रकारचीं आहेत तीं कोणासहि खरेपणानें समजून येत नाहींत १०. [३८७६]

कृष्ण म्हणाला, कीं माझा चेंडू ह्या ठिकाणीं कोणीं आणिला? त्याचें कोड पुरविण्यास (त्या कालियाचा गर्व हरण करण्यास) मी आलों १. हें निष्ठुर भाषण ऐकून त्या स्त्रीच्या मनांत भय उत्पन्न झालें २. अगोदर तिचें लक्ष जें देवावर होतें तें माघारीं फिरलें ३. आणि आपल्या नवऱ्याकडे मन जाऊन आमच्यावरच हें विघ्न आलें कीं काय असें तिला वाटलें ४. ह्या ठिकाणीं पाणी समुद्रासारखें भरलें असून त्याचा अंतपार लागत नाहीं ५. असें असून हा कोणत्या वाटेनें आला? मीं येथें ह्याला एकाएकींच पाहिलें? ६. किंवा एकाएकीं ह्याच ठिकाणीं हा उत्पन्न झाला असावा कीं काय? आणि

मोठ्यानें बोलतो भय नाहीं मनीं। केला उठवूनी काळ जागा ॥ ८ ॥ जागविला (लें) काळसर्पा तये वेळीं। उठिला कल्लोळीं विषाचिये ॥ ९ ॥ यमुनेच्या डोहावरी आला ऊत। काळया कृतांत धुधुकारें ॥ १० ॥ कारणें ज्या येथें आला नारायण। जालें दरुपण दोघांमध्यें ॥ ११ ॥ दोघांमध्यें झाले बोल परस्परें। प्रसंग उत्तरें युद्धाचिया ॥ १२ ॥ चिंतावला चित्तीं तोंडें बोले काळ। करीन सकळ ग्रास तुझा ॥ १३ ॥ जाला सावकाश झेंप घाली वरी। तंव म्हणे हरि मुष्टिघातें ॥ १४ ॥ तेणें काळें त्यासी दिसे काळ तैसा (तेणें काळ यासी दिसे काळ तैसा)। हरावया जैसा जीव आला ॥ १५ ॥ आठवलें काळा हाकारिलें गोत। मिळालीं बहुत नागकुळें ॥ १६ ॥ कल्हारीं संधानीं वेष्टियेला हरी। अवघा विखारी व्यापियेला ॥ १७ ॥ यास तुका म्हणे नाहीं भक्ताविण। गरुडाचें चिंतन केलें मनीं ॥ १८ ॥ [३८७७]

निजदास उभा तात्काळ पायापें। स्वामी देखे सर्पें वेष्टियेला ॥ १ ॥ लहानथोर होतीं मिळालीं अपारें। त्याच्या धुधुकारें निवारलीं ॥ २ ॥ निघतां आपटी धरूनी धांवांमधीं। एकाचेंचि वधी माथे पायें (माथां पाय) ॥ ३ ॥ एकीं जीव दिले येतांच त्या धाकें। येतील तीं एकें काकुलती ॥ ४ ॥ यथेष्ट भक्षिलें पोट धायेवरी। तंव म्हणे हरि पुरे आतां ॥ ५ ॥ आतां करूं काम आलों जयासाठीं। हरि घाली मिठी काळयासी ॥ ६ ॥ यासी नाथूनियां नाकीं दिली दोरी। चेंडू भार शिरीं कमळांचा ॥ ७ ॥ चालविला वरी बैसे नारायण। गरुडा आळंगून बहुडविलें ॥ ८ ॥ विसरू न पडे सवंगड्या गाई। यमुनेच्या डोहीं लक्ष त्यांचें ॥ ९ ॥ त्यांच्या गोष्टी कांठीं बैसोनी सांगती। बुडाला दाविती येथें हरि ॥ १० ॥ हरीचें चिंतन करितां आठव। तुका म्हणे देव आला वरी ॥ ११ ॥ [३८७८]

अवचित (अवचिता) त्यांनीं देखिला भुजंग। पळतील मग हाउ आला ॥ १ ॥ आला घेऊनियां

हा लहान दिसतो पण ह्याचें बोलणें भयंकर आहे ७. ह्याच्या मनांत कांहीं भय नसून हा मोठ्या गर्जना करीत आहे. अशी ती स्त्री गर्जना करीत आहे, इतक्यांत तो काळसर्प जागा झाला ८. देवानें मोठ्यानें गर्जना करून त्यास उठविलें. त्या वेळीं त्या सर्पाच्या तोंडांतून विषाचे उमाळे निघाले ९. त्या विषापासून काळ्याच्या फुसकाऱ्यानें यमुनेच्या डोहावर पाण्यांत ऊत आला १०. ज्या कामाकरितां कृष्ण येथें आला त्या काळसर्पाची समक्ष भेट झाली ११. आणि उभयतांचें बोलणें लढाईच्या निमित्तानें भयंकर होऊं लागलें १२. काळसर्पाच्या मनांत चिंता उत्पन्न झाली, पण तो तोंडानें म्हणाला, कीं अरे तूं कोण आहेस, तुला मी गिळून टाकीन १३. कृष्ण स्वस्थ राहिला, इतक्यांत त्या सर्पानें अंगावर झेप घातली. मग हरीनें त्यास बुक्की मारली १४. ते वेळीं त्या सर्पास वाटलें, कीं माझा प्राण घेणारा हा काळच आला कीं काय? व त्यास तें रूपहि भयंकर दिसलें १५. मग त्या सर्पानें आपल्या गोतास हाक मारली; ते वेळीं पुष्कळ सर्प जमा झाले १६. कांहीं नाग व कांहीं सर्प मिळून कृष्णाच्या अंगास वेढा घातला आणि विष ओकूं लागले १७. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवास भक्तावांचून कोणी साह्य नाहीं असें जाणून देवानें मनांत गरुडाचें स्मरण केलें १८. [३८७७]

देवानें स्मरण केल्याबरोबर तो आवडता सेवक गरुड त्याच वेळीं पायांजवळ येऊन उभा राहिला, तेव्हां आपल्या स्वामीस सर्पांनीं वेढलें आहे असें त्यानें पाहिलें १. लहान थोर पुष्कळ सर्प मिळाले होते; गरुडानें गर्जना केल्याबरोबर ते पळावयास लागले २. त्यानें कित्येकांस आपटून मारलें व कित्येक पायांखालीं रगडले ३. कित्येक सर्प त्याच्या धाकानें मेले व कित्येक आम्हांस वांचवा म्हणून त्यास काकुलती येऊं लागले ४. गरुडानें पोट भरेपर्यंत पुष्कळ सर्प खाल्ले; इतक्यांत कृष्ण म्हणाला, कीं आतां पुरे कर ५. आतां मी ज्याकरितां आलों तें काम करूं. असें बोलून कृष्णानें कालियास मिठी घातली ६. त्यास कांहीं वेळ पायाखालीं तुडवून त्याच्या नाकांत दोरीची वेसण घालून चेंडू हातांत घेऊन श्रीकृष्ण हे त्या कालियावर बसले ७. नारायण हे सर्पावर बसून कालियास चालवीत घेऊन निघाले व गरुडास आलिंगन देऊन जाण्यास निरोप दिला ८. इकडे यमुनेच्या तीरावर गाई आणि गोपाळ बसले होते. त्यांस कृष्णाचा विसर न पडतां त्यांचें सर्व लक्ष यमुनेच्या डोहाकडे होतें ९. यमुनेच्या कांठावर बसून ते कृष्णाच्या गोष्टी सांगतात आणि ह्याच ठिकाणीं हरि बुडाला असें एकमेकांस दाखवितात १०. तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणें कृष्णाचें स्मरण गोपाळ करीत आहेत इतक्यांत देव वर आले ११. [३८७८]

अकस्मात् त्या गोपाळांनीं कालियासर्प पाहिला व नंतर बाऊ आला असें समजून ते भिऊन पळूं लागले १.

यमुने बाहेरी। पालविती करीं (हरी) गडियांसी ॥ २ ॥ गडियांसी म्हणे वैकुंठनायक। या रे सकळीक मजपाशीं ॥ ३ ॥ मजपाशीं तुम्हां भय काय करी। जवळी या दुरी जाऊं नका ॥ ४ ॥ कानीं आइकिले गोविंदाचे बोल। म्हणती नवल चला पाहों ॥ ५ ॥ पाहों आले हरी जवळ सकळ। गोधनें गोपाळ आलिंगिले ॥ ६ ॥ आल्या गाई वरी घालितील माना। वोसरलें स्तना क्षीर लोटे (लोटे) ॥ ७ ॥ लोटती सकळें एकावरी एक। होऊनी पृथक कुर्वाळलीं ॥ ८ ॥ कुर्वाळलीं आनंदें घेती चारापाणी। तिहीं चक्रपाणी देखियेला ॥ ९ ॥ त्यांचेपाशीं होता परी केली माव। न कळे संदेह पडलिया ॥ १० ॥ याति वृक्ष वल्ली होत्या कोमेलिया। त्यांसी कृष्णें काया दिव्य दिली ॥ ११ ॥ दिलें गोविंदें त्या पदा नाहीं नाश। तुका म्हणे आस निरसली ॥ १२ ॥ [३८७९]

आस निरसली गोविंदाचे भेटी। संवसारा तुटी पुढिलीया ॥ १ ॥ पुढें पाठविलें गोविंदें गोपाळां (गोपाळ)। देऊनी चपळां हातीं गुढी (चपळ हातीं गुढी) ॥ २ ॥ हाका आरोळिया देऊनी नाचती। एक सादाविती हरि आला ॥ ३ ॥ आरंभीं (आरंधीं) पडिलीं होतीं तयां घरीं। संकीर्ण त्या नारी नरलोक ॥ ४ ॥ लोकां भूक तान नाहीं निद्रा डोळां। रूप वेळोवेळां आठविती ॥ ५ ॥ आहाकटा मग करिती गेलिया। आधीं ठावा तयां नाहीं कोणा ॥ ६ ॥ आधीं चुकी मग घडे आठवण। तुका म्हणे जन परिचयें ॥ ७ ॥ [३८८०]

जननी हे म्हणे आहा काय जालें। शरीर रक्षिलें काय काजें ॥ १ ॥ काय काज आतां हरिविण जिणें। नित्य दुःख कोणें सोसावें हें ॥ २ ॥ हें दुःख न सरे हरि न भेटे तों। त्यामागेंचि जातों एका वेळे ॥ ३ ॥ एक वेळ जरी देखतें मी आतां। तरी जीवापरता न करितें ॥ ४ ॥ करितां हे मात हरीचें चिंतन। शुभ तो शकुन तुका म्हणे ॥ ५ ॥ [३८८१]

श्रीकृष्ण हा कालिया सर्पाला यमुनेच्या बाहेर घेऊन आला व आपले जे गडी होते, त्यांना बोलावूं लागला २. वैकुंठींचा स्वामी गड्यांनो, तुम्ही सर्व माझ्या जवळ या रे, असें म्हणूं लागला ३. तुम्ही माझ्या जवळ आल्यावर तुम्हांला भय काय करणार आहे? ह्याकरितां जवळ या. दूर जाऊं नका ४. हें भगवंताचें बोलणें ऐकून ते म्हणाले, कीं काय चमत्कार आहे तो पाहूं चला ५. हरीच्या जवळ गाईगोपाळ हे सर्व पाहाण्याकरितां आले. त्या सर्वांना हरीनें आलिंगन दिलें ६. ज्या गाई आल्या त्यांनीं आपल्या माना प्रभूच्या अंगावर टाकल्या आणि मोठ्या प्रेमभराचा पान्हा त्यांच्या स्तनांस फुटला ७. त्या सर्वांच्या एकावर एक झुंडी पडूं लागल्या. श्रीहरीनें वेगळालीं रूपें धरून प्रत्येकीस हातानें कुरवाळलें ८. ज्यांना हरीनें कुरवाळलें त्या आनंदानें चारा पाणी खाऊं लागल्या व त्यांनीं चक्रपाणीला पाहिलें ९. त्यांच्या जवळच देव होता; पण त्यानें माया घातलेली त्यांना समजली नाहीं आणि संशयामध्यें पडले १०. वृक्ष व वेली ह्या सर्व कोमेजून गेल्या होत्या, त्यांना कृष्णानें दिव्य काया दिली ११. तुकाराम महाराज म्हणतात, गोविंदानें जें पद त्यांना दिलें त्या पदाला नाश नसून त्या योगानें त्यांची आशाहि नाहींशी झाली १२. [३८७९]

गोविंदाची भेट झाल्यानें सर्व आशा नाहींशी होऊन पुढच्या संसाराचाहि संबंध सुटला १. गोविंदानें चपळ गोपाळांच्या हातीं पताका देऊन पुढें पाठविलें २. मोठमोठ्यानें हांका आरोळ्या देऊन ते नाचूं लागले व एकमेकांना 'हरि आला' म्हणून सावध करूं लागले ३. आपापल्या घरीं ते स्त्रीपुरुष उद्विग्न होते ४. त्या लोकांना भूक, तहान व निद्रा हीं कांहीं नसून ते वेळोवेळीं हरीचें रूप आठवीत असत ५. हरि डोहांत गेल्यावर कृष्ण किती चांगला होता, म्हणून आक्रोश करूं लागले, परंतु पूर्वीं त्याचें मोठेंपण ते कोणी जाणत नव्हते ६. तुकाराम महाराज म्हणतात, आधीं चूक करून मग पश्चात्ताप पावावा असा जगाचा स्वभावच आहे ७. [३८८०]

माता यशोदा म्हणूं लागली, हाय हाय? हें काय झालें? मी आपलें शरीर कशाकरितां रक्षण केलें? १. हरीवांचून आतां जगण्यांत काय अर्थ आहे? त्याच्या वियोगाचें दुःख नित्य कोणीं सोसावें? २. हें वियोगदुःख हरि भेटेतोंपर्यंत नाहींसें होणार नाहीं. एक वेळ त्याच्या मागेंच जातें तर बरें होतें ३. आतां एक वेळ जर मी हरीला पाहीन तर त्याला जीवाहून बाजूला ठेवणार नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारची हरीविषयीं आई काळजी करीत आहे, तोंच शुभ शकुन झाला ५. [३८८१]

शुभ मात तिहीं आणिली गोपाळीं । चेंडू वनमाळी घेउनी आले ॥ १ ॥ आली दारा देखे हरुषाची गुढी । सांगितली पुढी (पुढें) हरुषें मात ॥ २ ॥ हरुषली माता केलें निंबलोण । गोपाळां वरून कुरवंडी ॥ ३ ॥ गोपाळां भोंवतें मिळालें गोकूळ । अवघीं सकळ लहान थोरें ॥ ४ ॥ थोर सुख जालें ते काळीं आनंद । सांगती गोविंद वरी आला ॥ ५ ॥ आले वरी बैसोनियां नारायण । काळ्या नाथून वहन केलें ॥ ६ ॥ नगराबाहेरी निघाले आनंदें । लावूनियां वाद्यें नाना घोष ॥ ७ ॥ नारायणापुढें गोपाळ चालती । आनंदें नाचती गाती गीत ॥ ८ ॥ तंव तो देखिला वैकुंठींचा पति । लोटांगणीं जाती सकळही ॥ ९ ॥ सकळही एका भावें आलिंगिले । अवघियां जाले अवघे हरि ॥ १० ॥ हरि आलिंगनें (आलिंगुनी) हरिरूप जालीं । आप विसरलीं आपणास ॥ ११ ॥ सकळांसी सुख एक दिलें देवें । मायबाप भावें लोकपाळां ॥ १२ ॥ मायबापा देवा नाहीं लोकपाळ । सारिखीं सकळ तुका म्हणे ॥ १३ ॥ [३८८२]

नेणे वर्ण धर्म जीं आलीं सामोरीं । अवघींच हरि अलिंगिलीं ॥ १ ॥ हरि लोकपाळ आले नगरांत । सकळांसहित मायबाप ॥ २ ॥ पारणें तयांचें जालें एका वेळे । देखिलें सांवळें परब्रह्म ॥ ३ ॥ ब्रह्मानंदें लोक सकळ नाचती । गुढिया उभवती घरोघरीं ॥ ४ ॥ घरोघरीं सुख आनंद सोहळा । सडे रंगमाळा चौकदारीं ॥ ५ ॥ दारीं वृंदावनें तुळसीचीं बनें । रामकृष्ण गाणें नारायण ॥ ६ ॥ नारायण तिहीं पूजिला बहुतीं । नाना पुष्पयाती करूनियां ॥ ७ ॥ यांचें ऋण नाहीं फिटलें मागील । पुढें भांडवल जोडिती हीं ॥ ८ ॥ हीं नव्हतीं कधीं या देवा वेगळीं । केला वनमाळी सेवाऋणी ॥ ९ ॥ सेवाऋणें तुका म्हणे रूपधारी । भक्तांचा कैवारी नारायण ॥ १० ॥ [३८८३]

नारायण आले निजमंदिरासी । जावया (झाले या) लोकांसी बहुडविते ॥ १ ॥ बहुडविले बहु केलें समाधान । विसरूं तो क्षण नका माझा ॥ २ ॥ मात सांगितली सकळ वृत्तांत ।

श्रीहरि हे डोहांतून बाहेर चेंडू घेऊन आल्याची शुभ वार्ता गोपाळांनीं आणली १. अशी ही दारामध्यें आलेली हर्षाची पताका माता पाहाती झाली. नंतर गोपाळांनीं मोठ्या आनंदानें तीस सर्व हकीगत सांगितली २. ती ऐकून यशोदा मातेनें आनंदभरित होऊन गोपाळांवरून लिंबलोण ओंवाळून टाकलें ३. गोपाळांसभोंवतीं गोकुळांतील सर्व लहानमोठे लोक जमा झाले ४. त्या वेळेस मोठा आनंद झाला व गोपाळ हे डोहाच्या बाहेर गोविंद आला आहे असें सांगूं लागले ५. कालियासर्पाचें मर्दन करून त्याचें वाहन केलें आणि त्याच्यावर बसून नारायण हे वर आले ६. तें पाहाण्याकरितां नाना प्रकारचीं वाद्यें लावून नगराबाहेर गोकुळांतील सर्व लोक निघाले ७. नारायणाच्या समोर गोपाळ आनंदानें चालत आहेत, गात व नाचत आहेत ८. त्या वेळेस वैकुंठाचा स्वामी पाहून सर्वांनीं लोटांगणें घातलीं ९. सर्वांनीं एका भावानें देवास आलिंगन दिलें. सर्वहि संपूर्ण हरि झाले १०. हरीला आलिंगन देण्यानें ते हरिरूप झाले व आपआपणास विसरले ११. आईबाप व सर्व लोक ह्यांना हरीनें एकच सुख दिलें १२. तुकाराम महाराज म्हणतात, देवाला आईबाप आणि इतर लोक हा कांहीं भेद नसून सर्व कांहीं सारखींच आहेत १३. [३८८२]

जीं हरीला सामोरीं आलीं त्यांचे वर्ण, धर्म कांहीं न पाहातां त्या सर्वांना हरीनें आलिंगन दिलें १. हरि व सर्व लोक आणि मायबाप (नंद-यशोदा) हीं सर्व मिळून नगरांत आलीं २. श्यामसुंदर श्रीकृष्ण परब्रह्म पाहून सर्वांच्या डोळ्यांचें पारणें एका वेळेसच फिटलें ३. ब्रह्मानंदानें सर्व लोक घरोघर नाचूं लागले व सर्वांनीं घरोघरीं पताका उभारल्या ४. घरोघर द्वारांत सडा टाकणें व चौकोनी रांगोळ्या घालणें असा आनंदसोहळा होऊं लागला ५. द्वारामध्यें वृंदावनें व तुळसीचीं वनें असून ते रामकृष्ण नारायण ह्या नामाचीं गाणीं गात आहेत ६. त्यांनीं नारायणाची नाना प्रकारच्या पुष्कळ फुलांनीं पूजा केली ७. देवाकडून त्यांचें मागील ऋण फिटलें नाहीं व पुढेंहि पुण्याईचें पुष्कळ भांडवल ते लोक जमा करीत आहेत ८. हीं कधींहि ह्या देवाहून निराळीं होत नाहींत, ह्यांनीं देवास आपलें सेवाऋणी केलें आहे ९. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांच्या सेवेच्या ऋणानें रूप धारण करणारा भक्तांचा कैवारी नारायण आहे १०. [३८८३]

नारायण हे आपल्या घरीं आले; आतां इतर लोकांस त्यानें आपापल्या घराकडे पाठविलें १. सर्वांना परतवून त्यांचें पुष्कळ समाधान केलें व मला क्षणभर देखील विसरूं नका असें सुचविलें २. देवानें सर्व झालेली हकीगत

केलें दंडवत सकळांनीं ॥ ३ ॥ सकळां भातुक वांटिल्या साखरा। आपलाल्या घरा लोक गेले ॥ ४ ॥ लोक गेले कामा गाईपें गोपाळ। वारलीं सकळ लोभापाठीं ॥ ५ ॥ लोभ दावूनियां आपला विसर। पाडितो कुमर धनआशा ॥ ६ ॥ आशेचे बांधले तुका म्हणे जन। काय नारायण ऐसा जाणे ॥ ७ ॥ [३८८४]

जाला कवतुक करितां रोकडें। आणीकही पुढें नारायण ॥ १ ॥ येऊनियां पुढें धरिला मारग। हरावया भाग इंद्रयाजीं ॥ २ ॥ इंद्रा दहीं दूध तूप नेतां लोणी। घेतलें हिरोनी वाटे त्यांचें ॥ ३ ॥ हिरोनी घेतल्या कावडी सकळा। म्हणती गोपाळा बरें नव्हे ॥ ४ ॥ नव्हे तेंचि करी न भे कळिकाळा। तुका म्हणे लीळा खेळे देव ॥ ५ ॥ [३८८५]

खेळ नव्हे बरा इंद्र कोपलिया। देव म्हणे तया भीऊं नका ॥ १ ॥ नका धरूं भय धाक कांहीं मनीं। बोले चक्रपाणि गौळियांसी ॥ २ ॥ गौळियांसी धीर नाहीं या वचनें। आशंकित मनें वेडावलीं ॥ ३ ॥ वेडावलीं त्यांस न कळतां माव। देवाआदिदेव नोळखतां ॥ ४ ॥ नोळखतां दुःखें वाहती शरीरीं (वाहातील शिरीं)। तुका म्हणे वरी भारवाही ॥ ५ ॥ [३८८६]

भारवाही नोळखती या अनंता। जवळी असतां अंगसंगें ॥ १ ॥ अंगसंगें तयां न कळे हा देव। कळोनी संदेह मागुताला ॥ २ ॥ मागुती पडती चिंतेचिये डोहीं। जयाची हे नाहीं बुद्धि स्थिर ॥ ३ ॥ बुद्धि स्थिर होऊं (राहों) नेदी नारायण। आशाबद्ध जन लोभिकांची ॥ ४ ॥ लोभिकां न साहे देवाचें करणें। तुका म्हणे तेणें दुःखी होती ॥ ५ ॥ [३८८७]

दुःखी होती लोभें करावें तें काई। बुडतील गाई म्हैसी आतां ॥ १ ॥ आणिकही कांहीं होईल अरिष्ट। नाइके हा धीट सांगितलें ॥ २ ॥ सांगों चला याच्या मायबापांपाशीं। निघाले घरासी

सांगितली तेव्हां सर्वांनीं त्याला नमस्कार केला ३. सर्वांना साखरा वांटल्या व आपापल्या घरास लोक गेले ४. लोक व गाई गोपाळ हे सर्व आपापल्या कामास गेले. सर्व लोभामागें लागले ५. देव हा मुलें व धनाशा ह्यांचा लोभ दाखवून त्यांच्यामध्यें आपल्याविषयींचा विसर पाडतो ६. तुकाराम महाराज म्हणतात, आशेनें बद्ध झालेले लोक नारायणासारख्यास काय जाणूं शकतील ? ७. [३८८४]

नारायण हे कालियादमनानंतर पुढें आणखी एक उघडें कौतुक (गोवर्धनधारण) करते झाले १. इंद्राचा भाग समर्पण करावयास जाणाऱ्या गोकुळांतील लोकांचा मार्ग देव रोखून बसले, कारण तो इंद्राचा भाग त्यांना हरण करावयाचा होता २. त्या मार्गानें इंद्राला दूध, तूप, लोणी नेतांना तें सर्व देवानें वाटेंतच हिसकावून घेतलें ३. त्यांच्या सर्व कावडी भगवंतांनीं हरण केल्या त्या वेळेस गोपाळ म्हणूं लागले, कीं देवा, हें तुझें करणें बरें नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, हा देव जें नाहीं तेंच करतो, काळाला देखील न भितां असले खेळ लीलेनें खेळतो ५. [३८८५]

ते सर्व गोपाळ म्हणूं लागले कीं, देवा, अशा ह्या तुझ्या खेळानें इंद्र कोपला तर बरें होणार नाहीं. देवांनीं त्यांना सांगितलें, कीं तुम्ही त्या इंद्राला भिऊं नका १. कांहीं त्याचा धाक व भय मनांत अणूं नका, असें चक्र ज्याच्या हातांत आहे अशा श्रीकृष्णानें गौळ्यांस सांगितलें २. परंतु ह्या भगवंताच्या बोलण्यानें त्यांस धीर धरवेना. त्यांचें मन संशययुक्त होऊन तीं वेडीं झालीं ३. देवाचाहि आद्य देव ह्याची माया त्यांना न कळल्यामुळें तीं वेडीं झालीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, हरीला न ओळखिल्यामुळें दुःख व संसाराचें ओझें ते शरीरावर वाहूं लागले ५. [३८८६]

जीं प्रपंचाचा भार वाहात आहेत, तीं देव हा देहांत अति जवळ असतांहि त्यास ओळखीत नाहींत १. अंगसंगतीनें असणारा देव त्यांना कळत नाहीं. यदाकदाचित् त्यांना देव समजला तरी त्याविषयीं संशय धरितात २. ज्यांची बुद्धि स्थिर नाहीं असे जे ते काळजीच्या डोहांत बुडतात ३. हा नारायण जे लोक आशाबद्ध लोभी आहेत, त्यांची बुद्धि स्थिर होऊं देत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, देवाचें कृत्य लोभी जनांना सहन होत नाहीं (पटत नाहीं), त्यामुळें ते दुःखी होतात ५. [३८८७]

लोभानें दुःखी झालेले गोकुळांतील लोक काय करावें ह्या चिंतेमध्यें पडले व म्हणूं लागले, कीं आतां आपल्या गाई म्हशी इंद्रादिदेव बुडवितील १. आणखीहि कांहीं अरिष्ट येईल, आणि हा कृष्ण तर सांगितलेलें कांहीं ऐकत नाहीं असा

देवारागें ॥ ३ ॥ रागें काला देतां न घेती कवळ । टोकवी गोपाळ क्रोधियांसी ॥ ४ ॥ क्रोध देवावरी धरियेला राग । तुका म्हणे भाग न लभती ॥ ५ ॥ [३८८८]

भाग त्या सुखाचे वांकड्यां बोबड्यां । आपुलिया गड्यां भाविकांसी ॥ १ ॥ भारवाही गेले टाकूनी कावडी । नवनीत गोडी भाविकांसी ॥ २ ॥ काला करूनियां वांटिला (वांटिती) सकळां । आनंदें गोपाळांमाजी खेळे ॥ ३ ॥ खेळेंमेळें दहीं दुध तूप (लोणी) खाती । भय नाहीं चित्तीं कवणाचें ॥ ४ ॥ कवणाचें चाले तुका म्हणे बळ । जयासी गोपाळ साह्य झाला (झाले) ॥ ५ ॥ [३८८९]

जाणवलें इंद्रा चरित्र सकळ । वांकुल्या गोपाळ दाविताती ॥ १ ॥ तातडीनें मेघां आज्ञा करी राव । गोकुळींचा ठाव उरों नेदा ॥ २ ॥ नेदाविया गाई म्हैसी वांचों लोक । पुरा सकळीक सिळाधारीं ॥ ३ ॥ धाक नाहीं माझा गौळियांच्या पोरां । सकळीक मारा म्हणे मेघां ॥ ४ ॥ म्हणविती देव आपणां तोंवरी । नाहीं जंववरी कोपलों मी ॥ ५ ॥ मीपणें हा देव न कळेचि त्यासी । अभिमान रासी गर्वाचिया ॥ ६ ॥ अभिमानराशि जयाचिये ठायीं । तुका म्हणे तईं देव दुरी ॥ ७ ॥ [३८९०]

देव त्यां फावला भाविकां गोपाळां । नाहीं तेथें कळा अभिमान ॥ १ ॥ नाडलीं आपल्या आपणाचि एकें । संदेहदायकें बहु फार ॥ २ ॥ फार चाळविलें नेदी कळों माव । देवाआदिदेव विश्वंभर ॥ ३ ॥ विश्वासा वांचूनी कळों नये खरा । अभक्तां अधीरां जैसा तैसा ॥ ४ ॥ जैसा भाव तैसा जवळी त्या दुरी । तुका म्हणे हरि देतो घेतो ॥ ५ ॥ [३८९१]

तो या साच भावें न कळेचि इंद्रा । म्हणउनी धारा घाली मेघ ॥ १ ॥ घाली मेघ धारा कडाडिला माथा । वरी अवचिता देखियेला ॥ २ ॥ देखती पाऊस वोळला गोपाळ । भ्याले हे सकळ विचारिती ॥ ३ ॥

धीट आहे २. आपण जाऊन त्यांच्या आईबापांना सांगूं असें म्हणून ते देवावर रागावून निघाले ३. देवांनीं त्यांना काल्याचा घांस दिला तरी ते रागानें घेईनात व श्रीकृष्णानें त्या क्रोधिष्टांना टोकावयास लावलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, क्रोधाविष्ट होऊन देवावर जे रागावले त्यांना काल्याचा वांटा मिळाला नाहीं ५. [३८८८]

वांकड्या व बोबड्या असे जे श्रीकृष्णाचे भाविक गडी होते त्यांना काल्याचा सुखाचा वांटा मिळाला १. जे प्रपंचाचा भार वाहात होते ते आपापल्या कावडी टाकून गेले, पण लोण्याची गोडी भाविकांना प्राप्त झाली २. भगवंतानें काला वांटला आणि आनंदानें गोपाळांच्या मेळ्यांत तो खेळूं लागला ३. खेळीमेळीनें सर्व दहीं, दूध, तूप (लोणी) हें, चित्तांत कोणाचेंहि भय न बाळगितां, खाऊं लागले ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांना श्रीकृष्ण गोपाळाचें साह्य झालें आहे त्यांच्यापुढें कोणाचें बळ चालणार आहे ? ५. [३८८९]

हें भगवंतानें गोकुळांत केलेलें सर्व कृत्य इंद्राला कळलें व गोपाळहि त्याला वांकुल्या दाखवूं लागले १. इंद्र राजा हा मोठ्या त्वरेनें मेघांना आज्ञा करिता झाला, कीं तुम्हीं अतिवृष्टि करून गोकुळाचा ठावठिकाणा नाहींसा करावा २. गाई, म्हशी व सर्व लोक हे न वांचतील अशी शिळाधारांची वृष्टि करा ३. ह्या गवळ्यांच्या पोरांना माझें भय नाहीं, ह्याकरितां हे मेघ हो, तुम्ही सर्वांना मारून टाका, असें इंद्र म्हणाला ४. जोंपर्यंत मी यांचेवर रागावलों नाहीं, तोंपर्यंत हे आपल्याला देव म्हणवून घेत आहेत ५. अशा मीपणानें इंद्राला श्रीकृष्ण हे साक्षात् देव आहेत, हें कळलें नाहीं. त्याच्या ठिकाणीं अभिमान व गर्व अतिशय होता ६. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचे ठिकाणीं अभिमान अतिशय आहे, त्याचेपासून देव दूर आहे ७. [३८९०]

गोपाळ हे भाविक असून त्यांच्या ठिकाणीं अभिमान नव्हता, म्हणून त्यांना देव प्राप्त झाला १. आपल्या ठिकाणीं असणाऱ्या संशयानें आपल्या ठिकाणींच आपण अशीं पुष्कळ फसलीं २. असा ज्यांच्या ठिकाणीं आपणाविषयींचा संशय आहे अशांना देवामध्यें आद्यदेव व संपूर्ण विश्वाचा पोषक अशा कृष्णानें फसवून आपली माया कळूं दिली नाहीं ३. देव हा विश्वासाखेरीज खरोखर कळत नाहीं. भक्तिहीन व अधीर ह्यांच्याशीं तो तसाच असतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या ठिकाणीं जसा भाव आहे तसा त्याच्या जवळ, दूर राहून हरि हा देवघेव करतो ५. [३८९१]

गोकुळांतला तो देव इंद्राला खरा खरा कळला नाहीं, म्हणून इंद्र मेघवृष्टि करूं लागला १. मेघवृष्टि करण्याच्या वेळेस वरच्या बाजूस तो गर्जना करूं लागला त्या वेळेस अकस्मात् सर्व गोपाळांनीं वरतीं पाहिलें २. तों त्या गोपाळांना पाऊस भरून आला आहे असें दिसलें व ते त्या योगानें सर्व भयभीत होऊन विचार करूं लागले ३.

विचारीं पडले विसरले खेळ। अन्याय गोपाळ म्हणती केला ॥ ४ ॥ लागलेंसे गोड न कळे ते काळीं। भेणें वनमाळी आठविती ॥ ५ ॥ आतां काय कैसा करावा विचार। गोधनासी थार आपणियां ॥ ६ ॥ यांचिया विचारें होणार तें काई। तुका म्हणे ठायीं वेडावलीं ॥ ७ ॥ [३८९२]

वेडावलीं काय करावें या काळीं। म्हणे वनमाळी गोपाळांसी ॥ १ ॥ शिरीं धरूं गोवर्धन उचलूनी (गोवर्धन धरूं शिरीं उचलूनी)। म्हणे तुम्ही कोणी भिऊं नका ॥ २ ॥ नका सांडूं कोणी आपला आवांका। मारितां या हाका आरोळिया ॥ ३ ॥ आशंकित चित्तें न वाटे त्यां खरें। धाकेंच ते बरें म्हणती चला ॥ ४ ॥ चित्तीं धाक परि जवळी अनंत। तुका म्हणे घात होऊं नेदी ॥ ५ ॥ [३८९३]

नेदी दुःख देखों दासां नारायण। टेवी निवारून आल्या आधीं ॥ १ ॥ आधीं पुढें शुद्ध करावा मारग। दासांमागें मग सुखरूप ॥ २ ॥ पर्वतासी हात लाविला अनंतें। तो जाये वरतें आपेंआप ॥ ३ ॥ आपल्या आपण उचलिला गिरी। गोपाळ हे करी निमित्यासी ॥ ४ ॥ निमित्य करूनी करावें कारण। करितां आपण कळों नेदी ॥ ५ ॥ दीनाचा कृपाळू पतितपावन। हें करी वचन साच खरें ॥ ६ ॥ सांगणें न लगे सुखदुःख दासा। तुका म्हणे ऐसा कृपावंत ॥ ७ ॥ [३८९४]

कृपावंतें हाक दिली सकळिकां। माजि या रे नका राहों कोणी ॥ १ ॥ निघाले या भेणें पाउसाच्या जन। देखे गोवर्धन उचलिला ॥ २ ॥ लाविले गोपाळ फेरीं चहूंकडे। हांसे फुंदे रडे कोणी धाकें ॥ ३ ॥ धाकें हीं सकळ निघालीं भीतरीं। उचलिला गिरी तयाखालीं ॥ ४ ॥ तयाखालीं गाई वत्सें आलीं लोक। पक्षी सकळीक जीवजाति ॥ ५ ॥ जिहीं म्हणविलें हरीचे अंकित। जातीचे ते होत कोणी तरी ॥ ६ ॥ जाति कुळ नाहीं तयासी प्रमाण। अनन्या अनन्य तुका म्हणे ॥ ७ ॥ [३८९५]

अशा प्रकारें विचारांत पडल्यामुळें ते गोपाळ खेळावयाचें सर्व विसरून जाऊन देवाला म्हणाले, कीं आम्हीं अन्याय केला ४. अन्याय करते वेळेस आम्हांला फार चांगलं वाटलें. त्याचा पुढें असा परिणाम होईल हें कांहीं कळलें नाहीं, अशा भीतीनें श्रीकृष्णाचा आठव करीत राहिले ५. आतां कसा काय विचार करावा? गाईंना व आपणाला आधार कसा मिळेल? ६. तुकाराम महाराज म्हणतात, ह्यांच्या विचारानें काय होणार म्हणून तीं जागच्या जागींच वेडीं झालीं ७. [३८९२]

सर्व लोक अगदीं वेडे होऊन म्हणूं लागले, कीं ह्या वेळेस काय करावें? अशा समयीं श्रीकृष्ण गोपाळांस म्हणाला १. आपण डोक्यावर गोवर्धन पर्वत उचलून धरूं व तुम्ही कोणी भिऊं नका २. हाका व आरोळ्या मारण्याच्या वेळीं तुम्ही आपला दम सोडूं नका ३. हें श्रीकृष्णाचें म्हणणें त्यांना खरें न वाटून ते चित्तांत साशंक राहिले व भयानेंच ते श्रीकृष्णाला 'बरें चला', असें म्हणूं लागले ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांच्या चित्तांत जरी भय होतें तरी त्यांच्या जवळ श्रीकृष्ण असल्यामुळें त्यानें त्यांचा घात होऊं दिला नाहीं ५. [३८०३]

नारायण हा आपल्या दासांना दुःखाचें दर्शन होऊं देत नाहीं. तो दुःखप्रसंग येण्याच्या पूर्वींच त्याचें निवारण करतो १. आरंभीं पुढचा मार्ग शुद्ध करून मग देव आनंदानें दासांच्या मागें राहातो २. गोवर्धन पर्वताला भगवंतानें हात लावल्याबरोबर तो आपोआप वर गेला ३. आपल्या आपण भगवंतांनीं पर्वत उचलला; तथापि गोपाळांना निमित्य करून देवानें कार्य करावें, तथापि आपण त्याचे कर्ते आहोंत असें कोणाला कळूं देऊं नये ५. देव हा दीनाविषयीं कृपाळु आहे. पतितांना पावन करणें हें आपलें वचन तो खरें करतो ६. तुकाराम महाराज म्हणतात, दासांनो, आपलें सुख-दुःख देवास सांगावयास नको. तोच होऊन त्याचें निवारण करतो असा तो कृपावंत आहे ७. [३८९४]

कृपावंत देवानें सर्व गोपाळांना हांक मारून सांगितलें, कीं अरे, तुम्ही सर्व जण पर्वताखालीं या, कोणी बाहेर राहूं नका १. भगवंतानें गोवर्धन उचललेला पाहून पावसाच्या भीतीनें सर्व लोक त्याखालीं निघाले २. गोपाळांना चहूंकडे फेरीनें उभें केलें. त्यांत कोणी पर्जन्याच्या भयानें हंसत होते, कोणी रडत होते व कोणी स्फुंदत होते ३. भगवंतानीं पर्वत उचललेला होता. त्याच्या खालीं सर्व भीतीनें शिरले ४. त्या पर्वताखालीं गाई, वांसरें, सर्व लोक व पक्षी यावत सर्व जीव आले ५. ज्यांनीं आपणाला हरीचे अंकितदास म्हणविलें आहे ते जातीचे कोणीहि असोत ६. तुकाराम महाराज म्हणतात, देवाला जात आणि कुळ हें मान्य नाहीं. जे कोणी अनन्य भक्त असतील त्यांच्या ठिकाणीं तोहि अनन्य असतो ७. [३८९५]

म्हणविती भक्त हरीचे अंकित। करितो अनंत हित त्यांचें ॥ १ ॥ त्यांसी राखे बळें आपुले जे दास। कळिकाळासी वास पाहों नेदी ॥ २ ॥ पाऊस न येतां केली यांची थार। लागला तुपार येऊं मग ॥ ३ ॥ येऊनी दगड बैसतील गिरीं। वरुषला धारीं शिळांचिये ॥ ४ ॥ शिळांचिये धारीं वरुषला आकांत। होता दिवस सात एकसरें ॥ ५ ॥ एकसरें गिरि धरिला गोपाळीं। होता भाव बळी आम्हीं ऐसे ॥ ६ ॥ ऐसें कळों आलें देवाचिया चित्ता। म्हणे तुम्ही आतां हात सोडा ॥ ७ ॥ हांसती गोपाळ करूनी नवल। आइकोनी बोल गोविंदाचे ॥ ८ ॥ दावितील डोया गुडघे कोंपर। फुटले ते भार उचलितां ॥ ९ ॥ भार आम्हांवरी घालूनी निराळा। राहिलासी डोळा चुकवूनी ॥ १० ॥ निमित्य अंगुळी लावियेली वरी। पाहों कसा गिरि धरितोसी ॥ ११ ॥ शिणले हे होते ठायींच्या त्या भारें। लटिकेंचि खरें मानूनियां ॥ १२ ॥ यांनीं (यांणीं) अंत पाहों आदरिला याचा। तुका म्हणे वाचा वाचाळ ते ॥ १३ ॥ [३८९६]

वाचाळ लटिके अभक्त जे खळ। आपुलें तें बळ वाखाणावें ॥ १ ॥ बळें हुंबरती सत्य त्यां न कळे। नुघडती डोळे आंधळ्यांचे ॥ २ ॥ आसुडिलिया माना हात पाय नेटें। तंव भार बोटें उचलिला ॥ ३ ॥ लटिकाचि आम्हीं सीण केला देवा। कळों आलें तेव्हां सकळांसी ॥ ४ ॥ आलें कळों तुका म्हणे अनुभवें। मग अहंभावें सांडवले ॥ ५ ॥ [३८९७]

सांडवले सकळांचे अभिमान। आणिले शरण लोटांगणीं ॥ १ ॥ लोटांगणीं आले होऊनियां दीन। मग नारायण म्हणे भलें ॥ २ ॥ भला आजी तुम्हीं केला साच पण। गिरि गोवर्धन उचलिला ॥ ३ ॥ लागती चरणा सकळ ते काळीं। आम्हांमध्यें बळी तूंचि एक ॥ ४ ॥ एका तुजविण न यों आम्हीं कामा। कळो कृष्णा रामा आलें आजी ॥ ५ ॥ आजिवरी आम्हां होता अभिमान।

जे भक्त आपण हरीच्या आधीन आहोंत असें म्हणवितात त्यांचें हित भगवंत करतो १. जे आपले दास आहेत त्यांचें देव बुद्धिपुरस्सर रक्षण करतो, त्यांच्याकडे काळादिकांना पाहूं देत नाहीं २. पाऊस येण्याच्या पूर्वीच त्यांची आश्रयाची व्यवस्था देवानें केली, नंतर पावसाचे तुषार येऊं लागले ३. शिळांच्या धारांची मेघवृष्टि होऊं लागल्यामुळें गोवर्धन पर्वतावर दगड पडूं लागले ४. सात दिवस एकसारखी शिळांच्या धारांची पर्जन्यवृष्टि आकांतकारक झाली ५. एकसारखा पर्वत गोपाळांनीं उचलून धरला व ते आपल्या मनांत म्हणूं लागले कीं, आमच्यासारखे बलाढ्य होते म्हणून हें घडलें ६. हा त्यांच्या हृदयांतील भाव देवाच्या चित्तास कळला. त्या वेळेस त्यांना देव म्हणाले, कीं आतां तुम्ही हात सोडा ७. हें गोविंदाचें भाषण ऐकून गोपाळ हंसूं लागले व त्याचा मोठा नवलाव करूं लागले ८. गोवर्धन पर्वताचें ओझें उचलण्यानें डोकीं, कोपरें, गुडघे फुटले ते देवास दाखवूं लागले ९. हे देवा, डोंगराचा सर्व भार आमच्यावर टाकून तूं आमचा डोळा चुकवून तसाच राहिलास १०. निमित्ताला आपलें बोट वर लावलेंस, एवढ्यानें पाहूं बरें कसा पर्वत धरतोस तें! ११. ते सर्व गोपाळ मूळच्या पर्वताच्या भारानें श्रमी झाले होते, कारण पर्वत खरोखरच उचलला नसतां आपण उचलला असें त्यांनीं खोटेंच मानलें १२. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या सर्व वाचाळ गोपाळांनीं भगवंताचा अंत पाहाण्याचें आरंभिलें १३. [३८९६]

जे वाचाळ खोटे भक्तिहीन नीच होते ते आपल्या बळाचें वर्णन करूं लागले १. त्यांना खरें न कळल्यामुळें ते आपल्याच घमेंडींत गुरगुरूं लागले. उघडच आहे, कीं आंधळ्याचे डोळे कोठून उघडणार! २. भगवंतांनीं आपल्या बोटाचा नेट किंचित् कमी केल्यामुळें गोपाळांच्या मानेला, हाताला, पायाला हिसके बसले. इतक्यांत देवानें तो सर्व पर्वताचा भार बोटानें उचलिला ३. त्या वेळेस सर्व गोपाळ म्हणूं लागले, कीं देवा, आम्हीं खोटेच श्रम केले. हें आतां आम्हां सर्वांना कळून चुकलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वांना अनुभवानें खरें तें कळल्यावर ते अभिमानरहित झाले ५. [३८९७]

देवांनीं सर्वांना अभिमानविरहित करून आपल्याला साष्टांग नमस्कारानें शरण आणविलें १. ह्याप्रमाणें त्यांनीं दीन होऊन देवास लोटांगण घातल्यावर नारायण म्हणाले, कीं उत्तम झालें २. आज तुम्हीं गोवर्धन पर्वत उचलिला हें खरें कृत्य तुम्हीं चांगलें केलें ३. त्या वेळेस सर्व गोपाळ देवाच्या पायां पडूं लागले व म्हणाले, कीं आमच्यामध्यें तूंच एक बलाढ्य आहेस ४. देवा, एक तुझ्यावांचून आम्ही कांहीं उपयोगी नाहीं. हे कृष्णा, हे बळरामा, हें आज आम्हांल

नेणतां चरणमहिमा तुझा ॥ ६ ॥ तुझा पार आम्ही नेणों नारायणा । नखीं गोवर्धना राखियेलें ॥ ७ ॥ राखियेलें गोकुळ आम्हां सकळांसी । दगडांच्या रासी वरुषतां ॥ ८ ॥ वर्णावें तें काय तुझें महिमान । धरिती चरण सकळही ॥ ९ ॥ सकळही तहान (तान) विसरली भूक । सकळही सुख दिलें त्यांसी ॥ १० ॥ त्यांसी कळों आला वैकुंठनायक । तुका म्हणे लोक निर्भर ते ॥ ११ ॥ [३८९८]

लोकां कळों आला देव आम्हांमधीं । टाकिली उपाधि तिहीं शंका ॥ १ ॥ शंका नाहीं थोरां लहानां जीवांसी । कळला हृषीकेशी तेव्हां मग ॥ २ ॥ मग मनीं झाले निर्भर सकळ । संगें लोकपाळ कृष्णाचिया ॥ ३ ॥ कृष्णाचिया ओंव्या गाणें गाती गीत । कृष्णमय चित्त झालें त्यांचें ॥ ४ ॥ त्यांसी ठावा नाहीं बाहेरील भाव । अंतरींच वाव सुख झालें ॥ ५ ॥ सुखें तया दीस न कळे हे राती । अखंड या ज्योति गोविंदाची ॥ ६ ॥ चिंतनेंचि धालीं न लगे अन्नपाणी । तुका म्हणे मनीं समाधान ॥ ७ ॥ [३८९९]

समाधान त्यांचीं इंद्रियें सकळ । तयां तो गोपाळ समागमें ॥ १ ॥ गोविंदाचा जाला प्रकाश भीतरीं । मग त्या बाहेरी काय काज ॥ २ ॥ काज काम त्यांचे सरले व्यापार । नाहीं आप पर माझें तुझें ॥ ३ ॥ माया सकळांची सकळांही वरी । विषम तें हरि दिसों नेदी ॥ ४ ॥ दिसे तयां आपपरावें सारिखें । तुका म्हणे सुखें कृष्णाचिया ॥ ५ ॥ [३९००]

कृष्णाचिया सुखें भूक नाहीं तान । सदा समाधान सकळांचें ॥ १ ॥ कळलेंचि नाहीं झाले किती दिस । बाहेरील वास विसरलीं ॥ २ ॥ विसरु कामाचा तुका म्हणे झाला । उद्वेग राहिला जावें यावें ॥ ३ ॥ [३९०१]

जावें बाहेरी हा नाठवे विचार । नाहीं समाचार ठावा कांहीं ॥ १ ॥ कांहीं न कळे तें कळों आलें देवा ।

कळून चुकलें ५. आजपर्यंत तुझा चरणमहिमा न कळल्यामुळें आम्हांला अभिमान होता ६. हे नारायणा, तुझ्या सामर्थ्याचा पार आम्हांस कळेना. तूं आपले नखावर गोवर्धन पर्वतास धारण केलेंस ७. व शिळांच्या वृष्टीपासून गोकुळाचें व आम्हां सर्वांचें रक्षण केलेंस ८. तुझें सामर्थ्य काय वर्णन करावें? असें म्हणून त्या सर्वांनीं भगवंताचे पाय धरले ९. सर्वच तहानभूक विसरलीं, असें सर्व सुख देवानें त्यांना दिलें १०. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांना वैकुंठींचा स्वामी कळल्यामुळें ते लोक निवांत झाले ११. [३८९८]

सर्व लोकांना कळून आलें, कीं कृष्ण हे आमच्यामध्यें देव आहेत. त्या योगानें त्यांनीं शंकेची उपाधि टाकली १. लहानमोठ्या जीवांची शंका नाहींशी झाली तेव्हां त्यांना कृष्ण हा देव असा कळला २. नंतर कृष्णाच्या संगतीनें सर्व गोपाळ मनामध्यें निर्भय (निवांत) झाले ३. अनेक कवितेंतून कृष्णाचेंच गायन गाऊं लागले. त्यांचें चित्त कृष्णमय झालें ४. त्यांना बाहेरचा प्रकार कांहींच माहीत नाहीं, कारण अंतर्यामींच सुखाचा विकास झाला ५. त्या सुखाच्या योगानें दिवस आणि रात्रहि त्यांना कळेना. अखंड दंडायमान गोविंदाचेंच अनुसंधान लागलें ६. तुकाराम महाराज म्हणतात, तीं सर्व श्रीहरीच्या चिंतनानेंच तृप्त झाल्यामुळें त्यांना अन्नपाणी नकोसें होऊन त्यांचीं मनें समाधानांत राहिलीं ७. [३८९९]

त्यांच्या बरोबर श्रीकृष्ण गोपाळ आहेत म्हणून त्या सर्वांचीं इंद्रियेंहि समाधान पावलीं १. ज्यांना अंतर्यामींच गोविंदाचा प्रकाश प्राप्त झाला आहे, त्यांना बाहेर काय काम (बाह्य विषयांची काय गरज) आहे! २. त्यांचें कामकाज वगैरे सर्व व्यापार नाहींसे झाले व माझें तुझें असा आपपर भावहि त्यांच्यामध्यें राहिला नाहीं ३. सर्वांची सर्वांवर सारखी माया असून श्रीहरि त्यांना विषम असें कांहींच दिसूं देत नव्हता ४. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीकृष्णाचें सुख त्यांना मिळाल्यामुळें आपपर हें सारखेंच दिसूं लागलें ५. [३९००]

श्रीकृष्णाच्या सुखाच्या योगानें भूक तहान नाहींशी होऊन ते सर्वहि सर्व काळ समाधानामध्यें राहिले १. किती दिवस झाले हेंहि त्यांना समजलें नाहीं व बाहेरचे सर्व विषय विसरले २. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांना कामाचा विसर होऊन त्यांची जन्म-मरणांची चिंता नाहींशी झाली. [३९०१]

ज्यांना कृष्णसुख प्राप्त झालें त्यांना बाहेर जावें हा विचारहि मनांत येईना व कांहींच बाहेरील हकीगत

मांडिला रिघावा कवतुकें (क) ॥ २ ॥ कवतुकासाठीं भक्त देहावरी । आणिताहे हरी बोलावया ॥ ३ ॥ यासी नांव रूप नाहीं हा आकार । कळला साचार भक्तांमुखें ॥ ४ ॥ मुखें भक्तांचिया बोलतो आपण । अंगसंगें भिन्न नाहीं दोघे ॥ ५ ॥ दोघे वेगळाले लेखील जो कोणी । तयाचा मेदिनी बहु भार ॥ ६ ॥ तयासी घडलीं सकळही पापें । भक्तांचिया कोपें निंदा द्वेषें ॥ ७ ॥ द्वेषियाचा संग न घडावा कोणा । विष जेवीं प्राणा नाश करी ॥ ८ ॥ करितां जो आइके निंदा या संतांची । तया होती तेचि अधःपात ॥ ९ ॥ पतन उद्धार संगाचा महिमा । त्यजावे अधमा संत सेवीं ॥ १० ॥ संतसेवीं जोडे महा लाभ रासी । तुका म्हणे यासी नाश नाहीं ॥ ११ ॥ [३९०२]

नाहीं नाश हरि आठवितां मुखें । जोडतील सुखें सकळही ॥ १ ॥ सकळही सुखें बोळलीं अंतरीं । मग त्यां बाहेरी काय काज ॥ २ ॥ येऊं विसरलीं बाहेरी गोपाळें । तल्लीन सकळें कृष्णसुखें ॥ ३ ॥ सुख तें योगियां नाहीं समाधीस । दिलें गाई वत्स पशु जीवां ॥ ४ ॥ वारला पाऊस कोणा नाहीं ठावा । तुका म्हणे देवावांचूनियां ॥ ५ ॥ [३९०३]

यांसी समाचार सांगतो (सांगतो) सकळां । चलावें गोकुळा म्हणे देव ॥ १ ॥ देव राखे तयां आडलिया काळें । देव सुखफळें देतो दासां ॥ २ ॥ दासां दुःख देखों नेदी आपुलिया । निवारी आलिया न कळतां ॥ ३ ॥ नाहीं मेघ येतां जातां देखियेला । धारीं वरुषला शिळांचिये ॥ ४ ॥ एवढें भक्तांचें सांकडें अनंता । होय निवारिता तुका म्हणे ॥ ५ ॥ [३९०४]

काकुलती एकें पाहाती बाहेरी । तया म्हणे हरि वोसरला ॥ १ ॥ वोसरला मेघ आला होता काळ । बाहेरी सकळ आले लोक ॥ २ ॥ कवतुक जालें ते काळीं आनंद । कळला गोविंद साच भावें ॥ ३ ॥ भावें तयापुढें नाचती सकळें । गातील मंगळें ओंव्या गीत ॥ ४ ॥ गीत गाती

त्यांना माहीत नव्हती १. ह्या सर्वांना आतां कांहीं समजत नाहीं, असें देवाला कळून चुकलें. मग देवाविषयींचें कौतुक त्यांच्या मनांत प्रवेश करूं लागलें २. कौतुकाकरितां व त्यांच्याशीं बोलण्याकरितां श्रीहरि हे भक्तांना देहावर आणीत आहेत ३. देवाला नांव, रूप, आकार हें कांहीं नाहीं. अशा प्रकारचा हा देव खरोखर भक्तांच्या मुखानें कळला ४. हा देव भक्तांच्याच मुखानें बोलतो; हे दोघेहि अंगसंगतीनें निराळे नाहींत ५. देव आणि भक्त ह्या दोघांना जो कोणी वेगळे समजेल त्याचें पृथ्वीला ओझें होतें ६. भक्तजनांचा राग, द्वेष, निंदा केल्यानें तसें करणारास सर्व पापें लागतात ७. भक्तद्वेषीयांची संगति कोणालाहि होऊं नये, कारण ज्याप्रमाणें विष हें प्राणनाशक आहे, तद्वत् ती होय ८. या संतांची निंदा करीत असतांना जो कोणी ऐकेल, तो त्यायोगानें नरकांत जातो ९. संगतीनें पतितांचा उद्धार होतो असें त्या संगतीचें महत्त्व आहे, म्हणून जे कोणी संतांची सेवा करणारे आहेत त्यांनीं त्या अधमांचा त्याग करावा १०. तुकाराम महाराज म्हणतात, संतांच्या सेवेनें ज्यांना नाश नाहीं अशा महत् लाभाच्या राशि प्राप्त होतात ११. [३९०२]

मुखानें हरीचें स्मरण करणारा अविनाशी होतो व त्याला सर्व सुखाची प्राप्ति होते १. सर्व सुखें त्याला अंतर्यामींच प्राप्त झालीं, आतां त्याचें बाहेर काय काम आहे ? २. सर्व गोपाळ कृष्णसुखानें तल्लीन झाल्यामुळें बाहेर येण्यास विसरले ३. योगिजनांना जें सुख समाधीमध्यें प्राप्त होत नाहीं, तें सुख देवानें गाई, वासरें आणि इतर पशु ह्या सर्व जीवांना दिलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, बाहेर पाऊस नाहींसा झालेला एका देवाशिवाय कोणालाहि कळला नाहीं ५. [३९०३]

देव हे बाहेरची खबर सर्वांना सांगूं लागले. आतां तुम्हीं गोकुळाला चलावें असें म्हणाले १. अडचणीच्या वेळीं देव त्यांचें रक्षण करतो व सुखाचीं फळें आपल्या दासांना देतो २. देव हा आपल्या दासांना दुःखदर्शन होऊं देत नाहीं. दुःखप्रसंग आल्यास तो त्यांना न कळतां देव नाहींसा करून टाकतो ३. शिळांच्या धारांनीं मेघांनीं वृष्टि केली पण तो प्रसंग केव्हां आला आणि केव्हां गेला हें गोपाळांनीं पाहिलें देखील नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचें हें भक्तांचें संकट निवारण करणारा एक हरि आहे ५. [३९०४]

कांहीं लोक केविलवाणें बाहेर पाहूं लागले, त्यांना कृष्ण म्हणाले, कीं पाऊस नाहींसा झाला १. काळासारखा आलेला पाऊस नाहींसा झाला, हें पाहून सर्व लोक बाहेर आले २. त्या वेळेस सर्वांना आनंद होऊन मोठें कौतुक वाटलें व श्रीकृष्ण हा देव आहे हें त्यांना कळलें ३. आणि मोठ्या प्रेमभावानें ते सर्व कृष्णापुढें नाचूं लागले व मंगल ओव्यांनीं

ओंव्या रामकृष्णावरी । गोपाळ मोहोरी वाहाती पांवे ॥ ५ ॥ वत्सें गाई पशु नाचती आनंदें । वेधलिया छंदें गोविंदाच्या ॥ ६ ॥ चित्त वेधियेलें गोविंदें जयाचें । कोण तें दैवाचें (ते दैवाचे) तयाहूनी ॥ ७ ॥ तयाहूनी कोणी नाहीं भाग्यवंत । अखंड सांगात गोविंदाचा ॥ ८ ॥ गोविंदाचा संग तुका म्हणे ध्यान । गोविंद ते जन गोकुळींचे ॥ ९ ॥ [३९०५]

गोकुळींची गति कोण जाली (जाणे) परी । पाहों आला वरी इंद्रराव ॥ १ ॥ इंद्रापाशीं मेघ बोलती बडिवार । सकळ संहार करुनी आलों ॥ २ ॥ आतां जीव नाहीं सांगाया ते रानीं । पुरिलें पाषाणीं शिळाधारीं ॥ ३ ॥ रिता कोठें नाहीं राहों दिला ठाव । जल्पती तो भाव न कळतां ॥ ४ ॥ न कळतां देव बळें हुंबरती । साच ते पावती अपमान ॥ ५ ॥ माव न कळतां केली तोंडपिटी । इंद्र आला दृष्टी पाहावया ॥ ६ ॥ पाहातां तें आहे जैसें होतें तैसें । नाचती विशेषें तुका म्हणे ॥ ७ ॥ [३९०६]

नाचतां देखिलीं गाई वत्सें जन । विस्मित होऊन इंद्र ठेला ॥ १ ॥ लागला पाऊस शिळांचिये धारीं । वांचलीं हीं परी कैसीं येथें ॥ २ ॥ येथें आहे नारायण संदेह नाहीं । विघ्न केलें ठायीं निर्विघ्न तें ॥ ३ ॥ विचारितां उचलिला गोवर्धन । अवतार पूर्ण कळों आला ॥ ४ ॥ आला गौळियांच्या घरा नारायण । करितो स्तवन इंद्र त्यांचें ॥ ५ ॥ त्यांच्या पुण्या पार कोण करी लेखा । नोहे चतुर्मुखा ब्रह्मयासी ॥ ६ ॥ सीणतां जो ध्याना न ये एक वेळा । तो तयां गोपाळां समागमें ॥ ७ ॥ समागमें गाई वत्स पुण्यवंता । देह कुर्वाळितां अंगसंग ॥ ८ ॥ संग जाला मायबापां लोकपाळा । आलिंगिती गळा कंठा कंठ ॥ ९ ॥ करिते हे झाले स्तुति सकाळिक । देव इंद्रादिक गोविंदाची ॥ १० ॥ करितील वृष्टि पुष्पवरुषाव । देवाआदिदेव पूजियेला ॥ ११ ॥ पुष्पांजुळी मंत्रघोष जयजयकार ।

गाणीं गाऊं लागले ४. बळराम व श्रीकृष्ण ह्यांचें गीत गाऊं लागले व सर्व गोपाळ मुरली व वेणू वाजवूं लागले ५. गाई, वासरें व इतर पशु ह्यांना गोविंदाचा वेध लागल्यामुळें तेहि आनंदानें नाचूं लागले ६. ज्यांचें चित्त गोविंदानें वेधलें आहे त्यांच्यापेक्षां कोण दैववान् आहे? ७. ज्यांना अखंड गोविंदाची संगति आहे त्यांच्यापेक्षां कोणीहि भाग्यवान् नाहीं ८. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांना गोविंदाचीच संगति व गोविंदाचेंच ध्यान असल्यामुळें गोकुळींचे सर्व लोक गोविंदच झाले ९. [३९०५]

गोकुळाची काय स्थिति झाली आहे हें पाहाण्याकरितां वरतीं इंद्र राजा आला १. त्या वेळेस इंद्रापाशीं मेघ आपला वडेजाव सांगूं लागले, कीं आम्ही सर्व संहार करून आलों २. त्या रानांत आम्ही एकहि जीव सांगण्यास ठेवला नाहीं. सर्व शिळांच्या वृष्टीखालीं दडपून गेले ३. वृष्टीवांचून मोकळी जागा ठेवलीच नाहीं. अशी बडबड तिकडील खरा प्रकार न जाणून करते झाले ४. देव न कळल्यामुळें बळानें गुरगुर करूं लागले ते खरोखरच अपमानास प्राप्त होतात ५. भगवंताची माया न कळतां मेघांनीं आपल्या सामर्थ्याची बडबड केली. त्याप्रमाणें इंद्र पाहाण्याकरतां खालीं आला ६. तुकाराम महाराज म्हणतात, इंद्र जों पाहूं लागला तों सर्व जसेंच्या तसेंच असून सर्व गोपाळ विशेष आनंदानें नाचत आहेत ७. [३९०६]

गाई, गोपाळ, वासरें आदिकरून सर्व नाचत आहेत हें पाहून इंद्रास मोठें नवल वाटलें १. ह्या ठिकाणीं शिळाधारांप्रमाणें सात दिवस पाऊस पडला असून हे लोक कसे वांचले? २. ह्या ठिकाणीं प्रत्यक्ष देव आहे, म्हणून केलेलें विघ्न नाहींसें होतें ह्यांत संशय नाहीं ३. शोध करून पाहिलें तर देवानें गोवर्धन पर्वत उचलला हें समजलें. ह्यावरून पूर्ण अवतार येथें आहे असें इंद्राच्या अनुभवास आलें ४. गवळ्यांच्या घरीं देव आहे असें जाणून इंद्र त्यांची स्तुति करूं लागला ५. ह्या गौळी लोकांची पूर्वार्जित पुण्याईची गणति कोणीं करावी? चार तोंडांच्या ब्रह्मदेवास देखील ती होणार नाहीं ६. आपल्या ध्यानांत जो देव एक वेळ यावा म्हणून ब्रह्मदेव श्रम करतो, पण तो येत नाहीं, तो देव गोपाळांच्या अंगसंघट्टणास नेहमीं आहे ७. हीं सर्व गाईवासरेंदेखील पुण्यवान् असल्यामुळें त्यांच्या संगतीस देव राहून सर्वांच्या अंगावरून हात फिरवीत असतो ८. ह्या सर्व लोकांना व आईबापांना देव जवळ असल्यामुळें ते त्याच्या गळ्याला गळा लावून आलिंगन देत आहेत ९. ह्याप्रमाणें इंद्रादिक सर्व देवांनीं भगवंताची स्तुति केली १०. आणि मंत्रघोष करून जयजयकार शब्दानें पुष्पवर्षाव करून भगवंताची पूजा केली ११. त्या मंत्रघोषाच्या जयजयकारानें आकाश दुमदुमूं लागलें. १२.

दुमदुमी अंबर तेणें नादें ॥ १२ ॥ नामाचा गजर गंधर्वांचीं गाणीं । आनंद त्रिभुवनीं न माये तो (न समाये) ॥ १३ ॥ तो सुखसोहळा अनुपम्य रासी । गोकुळीं देवांसी दोहीं ठायीं ॥ १४ ॥ दोहीं ठायीं सुख दिलें नारायणें । गेला दरुषणें वैरभाव ॥ १५ ॥ भावना भेदाची जाय उठाउठी । तुका म्हणे भेटी गोविंदाचे ॥ १६ ॥ [३९०७]

गोविंदाचें नाम गोड घेतां वाचे । तेथें राहे कइंचे वैरभाव ॥ १ ॥ भावें नमस्कार घातले सकळीं । लोटांगणें तळीं महीवरी ॥ २ ॥ वरी हात बाहे उभारिले देवें । कळलीया भावें सकळांच्या ॥ ३ ॥ सकळही वरी बहुडविले स्थळा । चलावें गोपाळां म्हणे घरा ॥ ४ ॥ राहिलीं हीं नाचों गोविंदाच्या बोलें । पडलीया डोलें छंदें हो तीं ॥ ५ ॥ छंद तो नावरे आपणा आपला । आनंदाचा आला होता त्यांसी ॥ ६ ॥ त्यांसी तुका म्हणे आनंद सकळां । ठेंगण्या गोपाळां समागमें ॥ ७ ॥ [३९०८]

समागमें असे हरि नेणतियां । नेदी जाऊं वायां अंकितासी ॥ १ ॥ अंकितां सावध केलें नारायणें । गोपाळ गोधनें सकळही ॥ २ ॥ सकळही जन आले गोकुळासी । आनंद मानसीं सकळांच्या ॥ ३ ॥ सकळांचा केला अंगीकार देवें । न कळतां भावें वांचवी त्यां ॥ ४ ॥ त्यां झाला निर्धार हरि आम्हांपासीं । निवांत मानसीं निर्भर तीं ॥ ५ ॥ निर्भर हे जन गोकुळींचे लोक । केले सकळीक नारायणें ॥ ६ ॥ नारायण भय येऊं नेदी गांवा । तुका म्हणे नांवा अनुसरे त्यां ॥ ७ ॥ [३९०९]

अनुसरे त्यासी (तया) फिरों नेदी मागें । राहे अंगसंगें समागमें ॥ १ ॥ अंगसंगें असे कर्मसाक्ष देव । जैसा ज्याचा भाव तैसें फळ ॥ २ ॥ फळपाकीं भोग देतील प्राणीये । तुका म्हणे नये सवें कांहीं ॥ ३ ॥ [३९१०]

नामाचा गजर करून गंधर्व गायन करूं लागले. तो आनंद त्रिभुवनांत देखील मावेनासा झाला १३. ह्याप्रमाणें सुखाचा सोहळा गोकुळांत व स्वर्गाच्या ठिकाणींहि अतिशय झाला. त्यास उपमा देतां येत नाहीं १४. असें दोन्ही ठिकाणीं देवानें सुख दिलें आणि त्याच्या दर्शनानें विषम भाव नाहींसा झाला १५. तुकाराम महाराज म्हणतात, गोविंदाचे दर्शन झाल्याबरोबर भेदाची कल्पना पळून जात आहे १६. [३९०७]

गोविंदाचें नामस्मरण वाणीस गोड लागतें आणि संसाराचें भय नाहींसें होतें १. भावार्थानें सकळ देव पृथ्वीवर येऊन त्यांनीं कृष्णास नमस्कार केला २. सर्वांच्या मनांतील भाव जाणून कृष्णानें वरतीं हात करून त्यांना जाण्याविषयीं निरोप दिला ३. त्याप्रमाणें सर्व देवांस निरोप देऊन आपापल्या पदास पाठविलें आणि गोपाळ मंडळीस गोकुळास चला असें कृष्ण म्हणाला ४. ते सर्व गोपाळ नाचत होते, ते कृष्णाच्या अशा बोलण्यावरून निवांत राहिले; तरी पूर्वीच्या छंदानें त्यांचें अंग डोलूं लागलें ५. आनंदाचा उद्गार वरचेवर येत आहे, तो त्यांचा त्यांना आवरेनासा झाला ६. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याप्रमाणें त्या लहान गोपाळांच्या संगतीनें सर्व लोकांस फार आनंद झाला आहे ७. [३९०८]

हरीच्या संगतीमध्यें असणाऱ्या अजाण दासास देखील देव वायां जाऊं देत नाहीं १. सर्व गाई गोपाळ आनंदमय होऊन सत्त्वावस्थेमध्यें बुडत होते, त्यांना वायां जाऊं न देतां देवानें सावध केलें २. असे कृष्णासह सर्व लोक गोकुळास आले, आणि त्यांचें मन आनंदभरित झालें आहे ३. कारण सर्वांचा अंगीकार देवानें केला व ते लोक पावसापासून वांचविले, पण कसे वांचविले ह्या प्रकार कोणास समजला नाहीं ४. श्रीहरि आमच्यापाशीं आहे असें त्यांस निश्चयानें समजून आल्यामुळें निवांत होऊन ते परिपूर्ण आनंदानें भरले ५. ह्याप्रमाणें गोकुळचे सर्व लोक नारायणांनीं निर्भय केले ६. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी श्रीहरीचें नामस्मरण करितात त्यांच्या गांवास देखील देव भय येऊं देत नाहीं ७. [३९०९]

जे देवाच्या ठिकाणीं रममाण झाले त्यांस देव मागें फिरूं न देतां त्यांच्याजवळ राहातो १. सर्वांच्या अंतर्यामीं कर्माचा साक्षी देव आहे, पण जसा ज्याचा भाव असेल तसें त्यास फळ देतो २. तुकाराम महाराज म्हणतात, हे सर्व प्राणी आपापल्या भावासारखें अखेरीस फळ भोगितात, एका संचितावांचून बरोबर कांहींच येत नाहीं ३. [३९१०]

ये दशे चरित्र केलें नारायणें । रांगतां गोधनें राखिताहे ॥ १ ॥ हें सोंग सारिलें या रूपें अनंतें । पुढेंही बहुतें करणें आहे ॥ २ ॥ आहे तुका म्हणे धर्मसंस्थापनें । केला नारायणें अवतार ॥ ३ ॥ [३९११]

अवतार केला संहाराया दुष्ट । करिती हे नष्ट परपीडा ॥ १ ॥ परपीडा करी दैत्य कंसराव । पुढें तोही भाव आरंभिला ॥ २ ॥ लाविलें लाघव पाहोनियां संधि । सकळांही वधी दुष्टजनां ॥ ३ ॥ दुष्टजन परपीडक जे कोणी । ते या चक्रपाणी न साहती ॥ ४ ॥ न साहावे दुःख भक्तांचें या देवा । अवतार घ्यावा लागे रूप ॥ ५ ॥ रूप हें चांगलें राम कृष्ण नाम । हरे भवश्रम उच्चारितां ॥ ६ ॥ उच्चारितां नाम कंस वैरभावें । हरोनियां जीवें कृष्ण केला ॥ ७ ॥ कृष्णरूप त्यासी दिसे अवघें जन । पाहे तों आपण कृष्ण झाला ॥ ८ ॥ पाहिलें दर्पणीं आधिल्या मुखासी । चतुर्भुज त्यासी तोचि झाला ॥ ९ ॥ झालीं कृष्णरूप कन्या पुत्र भाज । तुका म्हणे राज्य सैन्य जन ॥ १० ॥ [३९१२]

सैन्य जन हांसे राया झालें काई । वासपे तो ठायीं आपणासी ॥ १ ॥ आपणा आपण जाय सती तैसी (आपणा आपण जयास तीं तैशीं) । वैरभाव ज्यांसी भक्ति नाहीं ॥ २ ॥ नाहीं याचा त्याचा भाव एकविध । म्हणऊनी छंद वेगळाले ॥ ३ ॥ वेगळाल्या भावें ते तया हांसती । तयास दिसती अवघीं हरि ॥ ४ ॥ हरिला कंसाचा जीवभाव देवें । द्वेषाचिया भावें तुका म्हणे ॥ ५ ॥ [३९१३]

द्वेषाचिया भावें (ध्यानें) हरिरूप झाले । भाव हरपले देहादिक ॥ १ ॥ देहादिक कर्मे अभिमान वाढे । तया कैसा जोडे नारायण ॥ २ ॥ नारायण जोडे एकविध भावें । तुका म्हणे जीवें जाणें लागे ॥ ३ ॥ [३९१४]

जीवभाव त्याचा गेला अभिमान । म्हणऊनी जन हांसे कंसा ॥ १ ॥ सावध करितां न ये

ह्या बाळ अवस्थेमध्यें रांगत असतां व गाई राखीत असतां कृष्णानें नानाप्रकारचीं चरित्रें केलीं १. हें बाळ अवस्थेचें सोंग टाकून पुढें तरुण अवस्थेमध्यें पुष्कळ प्रकारचे खेळ करीत आहे २. तुकाराम महाराज म्हणतात, अधर्माचा नाश करून धर्मरक्षणाकरितां देवानें अवतार घेतला आहे ३. [३९११]

सर्व लोकांस त्रास देणारे दुष्ट जन मारण्याकरितां देवानें अवतार घेतला आहे १. मथुरेमध्यें कंसानें राहून सर्व लोकांस त्रास दिल्यामुळें त्यास मारण्याचा प्रकार देवानें आरंभिला २. पुढें संधि पाहून आपल्या युक्तीनें सर्व दुष्ट जनांचा नाश केला ३. जे जनांस पीडा करणारे दुष्ट लोक ते देवास सहन होत नाहींत ४. आपल्या भक्ताला जर कांहीं दुःख झालें तर तें देवाला सहन होत नाहीं म्हणून तो आकारास येतो ५. हें देवाचें रूप व रामकृष्ण हीं नामें चांगलीं आहेत. ह्या नामांचा उच्चार केला असतां संसाराचा भ्रम नाहींसा होतो ६. वैरभाव धरून कंसानें कृष्ण ह्या नामाचा उच्चार केला तरी त्याचा जीवभाव नाहींसा होऊन तो कृष्णरूप झाला ७. आणि त्या कंसास सर्व लोक कृष्णरूप दिसूं लागले, व आपला देहदेखील कृष्णरूपच दिसूं लागला ८. पूर्वीचें मुख पाहावें म्हणून आरशांत पाहूं लागला, पण तें न दिसतां चतुर्भुज कृष्णाचें रूप असा देह त्यास दिसूं लागला ९. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व राज्य, सैन्य व बायकामुलें वगैरे सर्व त्यास कृष्णरूप दिसूं लागलें १०. [३९१२]

तो कंस आपणास भिऊं लागला हें पाहून राजाला काय झालें असें म्हणून सैन्यादि लोक हंसूं लागले १. सतीचें वाण घेऊन जसें अग्नीत पडावें तसा प्रकार कृष्णाविषयीं भक्ति नसून ज्याच्या ठिकाणीं वैरभाव आहे त्यास होत असतो (*पाठभेद :* त्यास आपल्यासारखेच सर्व लोक सामान्य आहेत असें वाटतें) २. कंसाचा व सैन्याचा सारखा भाव नसल्यामुळें ते आपापल्या छंदानें वागतात ३. त्यावेगळाले भाव त्यांच्या ठिकाणीं असल्यामुळें कंसाला लोक हंसतात पण ते सर्व त्याला कृष्णरूप दिसतात ४. तुकाराम महाराज म्हणतात, असा त्या कंसाचा वैरभाव असून त्याचा जीवभाव देवानें नाहींसा केला ५. [३९१३]

अशा वैरभावानें जे कृष्णरूप झाले आहेत, त्यांचे देहसंबंधीं भाव नाहींसे होतात १. मी देही असा भाव ज्याच्या ठिकाणीं आहे त्याचा कर्माभिमान वाढतो; मग त्यास नारायणाची प्राप्ति होत नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, एकविध भावानें नारायणाची प्राप्ति होते, पण आपला जीवभाव त्याला अर्पण केला पाहिजे ३. [३९१४]

मी देही व देहसंबंधीं माझें हा अभिमान कंसाचा गेल्यामुळें त्यास सर्व लोक हंसूं लागले १. त्याला लोकांनीं जरी

देहावरी। देखोनियां दूरी पळे जन। जन वन हरि झालासे आपण। मग हे लोचन झांकियेले ॥ ३ ॥ झांकुनी लोचन मौन्येंचि राहिला। नाहीं आतां बोलायाचें काम ॥ ४ ॥ बोलायासी दुजें नाहीं हें उरलें। जन कृष्ण झाले स्वयें रूप ॥ ५ ॥ रूप पालटलें गुण नाम याति। तुका म्हणे भूतीं देव झाला ॥ ६ ॥ [३९१५]

झालों स्वयें कृष्ण आठव हा चित्तीं। भेदें (भेद) भयवृत्ति उरली आहे ॥ १ ॥ उरली आहे रूप नांव दिसे भिन्न। मी आणि कृष्ण आठवती ॥ २ ॥ तोंवरी हा देव नाहीं तयापासीं। आला दिसे त्यासी तोचि देव ॥ ३ ॥ देवरूप त्याची दिसे वरी काया। अंतरीं तो भयाभीत भेदें ॥ ४ ॥ तुका म्हणे भेदें अंतरे गोविंद। साचेंविण छंद वायां जाय ॥ ५ ॥ [३९१६]

वायां तैसे बोल हरिशीं अंतर। केले होते चार भयभेदें ॥ १ ॥ भेदभय गेलें नोळखे आपणा। भेटी नारायणा कंसा झाली ॥ २ ॥ झाली भेटी कंसा हरीशीं निकट। सन्मुखची नीट येरयेरां ॥ ३ ॥ येरयेरां भेटी युद्धाच्या प्रसंगीं। त्याचे शस्त्र अंगीं हाणितलें ॥ ४ ॥ त्याचें वर्म होतें ठावें या अनंता। तुका म्हणे सत्तानायक हा ॥ ५ ॥ [३९१७]

नारायणें कंस चाणूर मर्दिले। राज्यीं बैसविलें उग्रसेना ॥ १ ॥ उग्रसेन स्थापियेला शरणागत। पुरविला अंत अभक्तांचा ॥ २ ॥ अवघेंचि केलें कारण अनंतें। आपुलिया हातें सकळही ॥ ३ ॥ सकळही केलीं आपुलीं अंकित। राहे गोपीनाथ मथुरेसी ॥ ४ ॥ मथुरेसी आला वैकुंठनायक। झालें सकळीक एक राज्य ॥ ५ ॥ राज्य दिलें उग्रसेना शरणागता। सोडविलीं मातापिता दोन्ही ॥ ६ ॥ सोडवणें धांवे भक्तांच्या कैवारें। तुका म्हणे करें शस्त्र धरी ॥ ७ ॥ [३९१८]

सावध केलें तरी तो देहावर येत नसे. आणि जनांस पाहून दूर पळून जात असे २. जनांत अथवा एकांतांत जरी तो गेला तरी त्यास सर्व ठिकाणीं कृष्णाचें रूप दिसत असे, म्हणून त्यानें डोळे झांकले ३. डोळे झांकून कंस निवांतपणें बसला. आतां त्यास कांहीं बोलण्याचें कारण राहिलें नाहीं ४. त्याचा देह व जन त्यास हरिरूप दिसत आहेत तेव्हां दुसरेपणा मुळींच राहिला नाहीं, मग त्यानें कोणाशीं बोलावें? ५. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व भूतांच्या ठिकाणीं त्याला हरिरूप दिसत आहे म्हणून कंसाचे गुण, नाम, जात व त्याचा देह हीं सर्व पालटलीं आहेत ६. [३९१५]

तो कंस स्वतः हरिरूपच झाला पण भेदात्मक वृत्तीचा आठव राहिल्यामुळें त्याच्या ठिकाणीं भय उरलें आहे १. मी एक वेगळा व कृष्ण एक वेगळा आहे तो मला येऊन मारील अशी आठवण त्याच्या मनांत राहिली होती २. हा भिन्नभाव जोंपर्यंत आहे तोंपर्यंत कंसाला देवाची प्राप्ति नाहीं पण ध्यानाच्या योगानें जो मनुष्य त्याच्यासमोर येई तो देव समोर आल्याप्रमाणें त्यास भासतो ३. त्याचें शरीर त्याला हरिरूपच दिसतें पण अंतरांत भेद असल्यामुळें भय वाटत असे ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारच्या भेदानें देव दुरावतो. खरा छंद असल्याशिवाय त्याचें करणें (ध्यान, ज्ञान, योग, याग इत्यादि) व्यर्थ जातें ५. [३९१६]

कंस आणि हरि ह्यांच्यामध्यें अंतर आहे हें बोलणें व्यर्थ आहे, कारण जोंपर्यंत त्याच्या ठिकाणीं भेदभय होतें तोंपर्यंत त्यास देव दूर होता १. तें भेदभय नाहींसें होऊन जेव्हां त्याचें देहाचें भान गेलें तेव्हां मग त्यास देवाची भेट झाली २. त्याच्या समोर देव येऊन उभा राहिला. मग दोघांमध्यें परस्परें बोलणें होऊं लागलें ३. एकमेकांची भेट होऊन लढाईच्या प्रसंगाचें भाषण करून नारायणानें कंसाच्या अंगावर शस्त्राचा घाव मारिला आणि कंसाचा नाश केला ४. तुकाराम महाराज म्हणतात, हा देव सत्ताधारी असल्यामुळें कंसाचें मर्म त्यास माहीत होतें ५. [३९१७]

नारायणानें कंस आदिकरून चाणूर, मुष्टिकासुर वगैरे दैत्य मारून मथुरेचें राज्य उग्रसेन यादवास दिलें १. तो उग्रसेन शरणागत असल्यामुळें त्याला राज्यावर बसवून सर्व दुष्ट जनांचा नाश केला २. ह्याप्रमाणें आपल्या हातानें सर्व काम करून देव मथुरेमध्यें राहिले ३. तेथील सर्व लोक आपल्या अंकित करून कृष्ण मथुरेमध्यें राहिले ४. तो वैकुंठवासी देव मथुरेस आल्याकारणानें पृथ्वीवर एक सर्वभौम राज्य झालें ५. उग्रसेन शरणागतास राज्य देऊन त्यानें आपले आईबाप बंदींतून सोडविले ६. तुकाराम महाराज म्हणतात, हा देव भक्तांचा साहाकारी आहे म्हणून हातांत शस्त्रें घेऊन त्यांना सोडविण्याकरितां धांवत जातो ७. [३९१८]

धरी दोन्ही ठायीं सारखाची भाव । देवकी वसुदेव नंद दोघे ॥ १ ॥ दोन्ही एके ठायीं केल्या नारायणें (दोघे एके ठायीं केलें नारायणें) । वाढविला तिणें आणि व्याली ॥ २ ॥ व्याला वाढला हा आपल्या आपण । निमित्या कारणें मायबाप ॥ ३ ॥ माय हा जगाची बाप नारायण । दुजा करी कोण यत्न यासी ॥ ४ ॥ कोण जाणे याचे अंतरींचा भाव । तुका म्हणे माव कळों नेदी ॥ ५ ॥ [३९१९]

दीनाचा कृपाळू दुष्टजना काळ । एकला सकळ व्यापक हा ॥ १ ॥ हांसे बोले तैसा नव्हे हा अनंत । नये पराकृत (प्राकृत) म्हणों यासी ॥ २ ॥ यासी कळावया एक भक्तिभाव । दुजा नाहीं ठाव धांडोळितां ॥ ३ ॥ धांडोळितां श्रुति राहिल्या निश्चित । तो करी संकेत गोपींसवे ॥ ४ ॥ गोपिकांची वाट पाहे द्रुमातळीं । मागुना न्याहाळी न देखतां ॥ ५ ॥ न देखतां त्यांसी उठे बैसे पाहे । वेडावला राहे वेळोवेळां ॥ ६ ॥ वेळोवेळां पंथ पाहे गोपिकांचा । तुका म्हणे वाचा नातुडे तो ॥ ७ ॥ [३९२०]

तो बोले कोमळ निष्ठुर साहोनी । कोपतां गौळणी हास्य करी ॥ १ ॥ करावया दास्य भक्तांचें निर्लज्ज । कवतुकें रज माथां वंदी ॥ २ ॥ दिलें उग्रसेना मथुरेचें राज्य । सांगितलें काज करी त्याचें ॥ ३ ॥ त्यासी होतां कांहीं अरिष्ट निर्माण । निवारी आपण शरणागता ॥ ४ ॥ शरणागतां रक्षी सर्वभावें हरि । अवतार धरी तयांसाठीं ॥ ५ ॥ तयांसाठीं वाहे सुदर्शन गदा । उभा असे सदा सांभाळीत ॥ ६ ॥ तळमळ नाहीं तुका म्हणे चित्ता । भक्तांचा असतां भार माथां ॥ ७ ॥ [३९२१]

मारिले असुर दाटले (वाढल्या) मेदिनी । होते कोणा कोणी पीडीत ते ॥ १ ॥ ते हा (तया) नारायण पाठवी अघोरा । संतांच्या मत्सरा वातावरी ॥ २ ॥ वरिले ते दूतीं यमाचिया दंडीं ।

देवकी-वसुदेव आणि नंद-यशोदा ह्या दोन्ही आईबापांवर देवाची प्रीति सारखी होती १. एका आईबापांच्या पोटीं जन्म घेतला आणि एका आईबापांनीं वाढविलें. असें ते दोन्ही एका ठिकाणीं करून त्यांवर देवानें सारखी प्रीति ठेविली २. हा देव आपणच उत्पन्न होऊन आपणच वाढला, पण निमित्ताकरितां आईबाप आहेत ३. ह्या नारायणापासून सर्व जग उत्पन्न झाल्यामुळें सर्वांचा आईबाप हाच आहे, मग ह्याला कोणीं सांभाळावें ? ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवाच्या अंतरांतील भाव कोणासहि समजत नाहीं, कारण तो आपली माया समजूं देत नाहीं ५. [३९१९]

हा देव दीनजनांविषयीं कृपाळु व दुष्ट लोकांचा नाश करणारा आहे. तो सर्व ठिकाणीं व्यापक आहे १. सर्व लोकांबरोबर भाषण करून हास्य करतो, पण तो प्राकृत मनुष्याप्रमाणें आहे असें म्हणूं नये २. ह्या देवाचा शोध केला तर तो कोठेंहि सांपडणार नाहीं, पण एका भक्तिभावानें सांपडला जातो ३. ज्याचा शोध करतांना वेदश्रुति थकून निवांत राहिल्या तो देव गवळणींबरोबर अमुक वेळेस यावें म्हणून संकेताची खूण करतो ४. आणि एका झाडाखालीं बसून त्या गवळणींची वाट पाहातो, त्या वेळेस त्या जर आल्या नाहींत तर त्यांची वरचेवर वाट पाहातो ५. त्या गोपी जर दृष्टीस न पडल्या तर तो देव वेडा होऊन वरचेवर ऊठबैस करून त्यांची वाट पाहातो ६. तुकाराम महाराज म्हणतात, परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी ह्या चार वाणींना जो वर्णन करण्यास सांपडत नाहीं तो त्या गौळणींची वरचेवर वाट पाहातो ७. [३९२०]

त्या देवावर जरी गवळणी रागावल्या तरी तें सहन करून त्यांच्या बरोबर कोमल भाषण करून हास्य करितो १. आपल्या सेवकाचें काम करण्याविषयीं हा देव किती निलाजरा आहे हें पाहा बरें ! त्या सेवकाच्या पायाची माती देखील कौतुकानें मस्तकीं वंदन करितो २. उग्रसेन यादवाला मथुरेचें राज्य देऊन तो सांगेल तीं कामें करून देव राहिला आहे ३. त्याला कांहीं जरी संकट आलें तरी ता शरणागत असल्यामुळें देव तें निवारण करीत आहे ४. सर्व भावानें शरणागतांचें रक्षण करितो, कारण त्याच्याकरितांच देवानें अवतार घेतला आहे ५. चक्र, गदा, वगैरे हत्यारें शरणागतांकरितां हातांत घेऊन त्यांचा सांभाळ करण्याकरितां सर्व काळ उभा राहिला आहे ६. तुकाराम महाराज म्हणतात, भक्तजनांचा सर्व योगक्षेमाचा भार देवाच्या मस्तकावर आहे, म्हणून भक्तांना कोणत्याहि प्रकारची तळमळ अथवा चिंता करण्याचें कारण नाहीं ७. [३९२१]

ह्या पृथ्वीवर लोकांना त्रास देणारे दुष्ट पुष्कळ वाढले होते ते सर्व देवानें मारले १. त्या दुष्टांनीं संतांचा द्वेष केला म्हणून त्यांना देवानें अघोर नरकास पाठविलें २. जे नारायण ह्या नांवाचा उच्चार करीत नाहींत त्यांना यमदंड घेऊन

नुच्चारितां तोंडीं नारायण ॥ ३ ॥ नारायणनाम नावडे जयांसी । ते झाले मिरासी कुंभपाकीं ॥ ४ ॥ कुंभपाकीं सेल मान तो तयांचा । तुका म्हणे वाचा संतनिंदा ॥ ५ ॥ [३९२२]

वास नारायणें केला मथुरेसी । वधूनी दुष्टांसी तये ठायीं ॥ १ ॥ ठायीं पितियाचे (पितयाचे) मानी उग्रसेना । प्रतिपाळी जनांसहित लोकां ॥ २ ॥ लोकां दुःख नाहीं मागील आठव । देखियेला देव दृष्टीं त्यांनीं ॥ ३ ॥ देखोनियां देवा विसरलीं कंसा । ठावा नाहीं ऐसा होता येथें ॥ ४ ॥ येथें दुजा कोणी नाहीं कृष्णाविणें । ऐसें वाटे मनें काया वाचा ॥ ५ ॥ काया वाचा मन कृष्णीं रत झालें । सकळां लागलें कृष्णध्यान ॥ ६ ॥ ध्यान गोविंदाचें लागलें या लोकां । निर्भर हे तुका म्हणे चित्तीं ॥ ७ ॥ [३९२३]

चिंतिलें पावलीं जया कृष्णभेटी । एरवीं ते आटी वायांविण ॥ १ ॥ वासना धरिती कृष्णाविणें कांहीं । सीण केला तिहीं साधनांचा ॥ २ ॥ चालविलें डंबें एक अहंकारें । भोग जन्मांतरें न चुकती ॥ ३ ॥ न चुकती भोग तपें दानें व्रतें । एका त्या अनंतेंवांचूनियां ॥ ४ ॥ चुकवूनी जन्म दाखवी आपणा । भजा नारायणा तुका म्हणे ॥ ५ ॥ [३९२४]

भजल्या गोपिका सर्वभावें देवा । नाहीं चित्तीं हेवा दुजा कांहीं ॥ १ ॥ दुजा छंदु (छंद) नाहीं तयांचिये मनीं । जागृति स्वपनीं कृष्णध्यान ॥ २ ॥ ध्यान ज्यां हरीचें हरीसी तयांचें । चित्त ग्वाही ज्यांचें तैशा भावें ॥ ३ ॥ भाग्यें पूर्वपुण्य आठविती लोक । अवघे सकळीक मथुरेचे ॥ ४ ॥ मथुरेचे लोक सुखी केले जन । तेथें नारायण राज्य करी ॥ ५ ॥ राज्य करी गोपी यादवांसहित । कर्मिले बहुत काळ तेथें ॥ ६ ॥ तेथें दैत्यीं उपसर्ग केला लोकां । रचिली द्वारका तुका म्हणे ॥ ७ ॥ [३९२५]

यमाचे दूत शिक्षा करितात ३. ज्याला देवाचें नामस्मरण आवडत नाहीं ते कुंभीपाक ह्या नांवाच्या नरकामध्यें वतनदार होऊन राहातात ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या वाणीमध्यें सर्व काळ संतांची निंदा आहे त्याला कुंभीपाक नरकामध्यें श्रेष्ठ मान मिळतो ५. [३९२२]

मथुरेच्या ठिकाणीं दुष्ट दैत्य माजले होते. त्यांचा नारायणानें संहार करून त्या ठिकाणीं आपण राहिले १. उग्रसेन यादवाला देव आपल्या बापासारखें मानून सर्व लोकांचा सांभाळ करीत आहे २. त्या लोकांनी देव दृष्टि भरून पाहिल्या-मुळें पूर्वी दुष्ट जनांनीं त्रास दिला होता तें दुःख सर्व लोक विसरले ३. देवाला पाहून कंसानें दुःख दिलेलें विसरले तें असें, कीं पूर्वीं येथें कंस होता ही आठवण देखील त्यांस राहिली नाहीं ४. कृष्णावांचून ह्या ठिकाणीं दुसरें कोणी नाहीं असें कायावाचामनानें सर्व लोकांस वाटूं लागलें ५. सर्वांस कृष्णाचें ध्यान लागून ते कायावाचामनानें त्याच्या ठिकाणीं रममाण झालें ६. तुकाराम महाराज म्हणतात, कृष्णाचें ध्यान लागल्यामुळें ते लोक परिपूर्ण आनंदानें भरले आहेत ७. [३९२३]

ज्याला कृष्णाची भेट झाली त्याच्या सर्व मनकामना पूर्ण झाल्या. त्यावांचून इतर साधनांची खटपट करणें व्यर्थ आहे १. कृष्णावांचून कोणतीहि वासना जरी धरली तरी त्यांनीं साधनांचे श्रम व्यर्थ केले २. कित्येक लोक दंभ-अहंकारानें चाळवून मेले; पण त्यांच्या जन्ममृत्यूच्या येरझारा चुकल्या नाहींत ३. एका देवावांचून तप, दान, व्रतादि साधनें जरी केलीं तरी त्यांपासून संचित कर्मांचे भोग चुकणार नाहींत ४. तुकाराम महाराज म्हणतात, हा नारायण गर्भवासाचें दुःख निवारण करून आपण दर्शन देतो, म्हणून त्याचें तुम्ही भजन करा ५. [३९२४]

त्या गोपींनीं सर्वभावानें देवाचें भजन केलें. एका देवावांचून त्यांच्या चित्तांत दुसरा कांहीं सोस नव्हता १. रात्रंदिवस जागें असतां व स्वप्नामध्यें कृष्णाचेंच ध्यान त्या करीत होत्या. त्यावांचून दुसरा छंद त्यांच्या मनांत नव्हता २. ज्याला कृष्णाचें ध्यान सर्व काल आहे त्याचें ध्यान कृष्ण करतो ही साक्ष आपापल्या भावार्थाप्रमाणें ज्याचे त्याचे चित्तास आहे ३. पूर्वार्जितपुण्यानें ते मथुरेचे लोक देवाचा आठव करून भाग्यवान् झाले ४. ह्याप्रमाणें मथुरेंतील सर्व लोक सुखी करून त्या ठिकाणीं नारायण राज्य करूं लागले ५. गोपी व यादव मंडळीसुद्धां राज्य करून पुष्कळ दिवस त्या ठिकाणीं राहिली ६. तुकाराम महाराज म्हणतात, त्या ठिकाणीं दैत्य येऊन त्या लोकांना त्रास दिल्यामुळें देवानें द्वारका हें नगर निर्माण केलें ७. [३९२५]

रचियेला गांव सागराचे पोटीं । जडोनी गोमटीं नानारत्नें ॥ १ ॥ रत्नें खणोखणीं सोनियाच्या भिंती । लागलीया ज्योति रविकळा (नानाकळा) ॥ २ ॥ कळा सकळही गोविंदाचे हातीं । मंदिरें निगुतीं उभारिलीं ॥ ३ ॥ उभारिलीं दुर्गें दारवंटे फांजी । कोटि चर्या माजी शोभलिया ॥ ४ ॥ शोभलें उत्तम गांव सागरांत । सकळांसहित आले हरि ॥ ५ ॥ आले नारायण द्वारका नगरा । उदार या शूरां मुगुटमणी ॥ ६ ॥ निवडीना याति समानचि केलीं । टणक धाकुलीं नारायणें ॥ ७ ॥ नारायणें दिलीं अक्षयी मंदिरें । अभंग साचारें सकळांसी ॥ ८ ॥ सकळही धर्मशीळ पुण्यवंत । पवित्र विरक्त नारी नर ॥ ९ ॥ रचिलें तें देवें न मोडे कवणा । बळियांचा राणा नारायण ॥ १० ॥ बळबुद्धीनें तीं देवाच सारिखीं (बळ बुद्धि नीति देवाचसारखी) । तुका म्हणे मुखीं गाती ओंव्या ॥ ११ ॥ [३९२६]

गाती ओंव्या कामें करितां सकळें । हालवितां बाळें देवावरी ॥ १ ॥ ऋद्धिसिद्धि दासी दारीं ओळंगती । सकळ संपत्ति सर्वां घरीं ॥ २ ॥ घरीं बैसलिया जोडलें निधान । करिती कीर्तन नरनारी ॥ ३ ॥ नारीनर लोक धन्य त्यांची याति । जयांसी संगति गोविंदाची ॥ ४ ॥ गोविंदें गोविंद केले लोकपाळ । चिंतनें सकळ तुका म्हणे ॥ ५ ॥ [३९२७]

कांहीं चिंता कोणा नाहीं कोणेविशीं । करी द्वारकेसी राज्य देव ॥ १ ॥ द्वारकेसी राज्य करी नारायण । दुष्ट संहारून धर्म पाळी ॥ २ ॥ पाळी वेदआज्ञा ब्राह्मणांचा मान । अतीतपूजन वैष्णवांचें ॥ ३ ॥ अतीत अलिप्त अवघियां वेगळा । नाहीं हा गोपाळा अभिमान ॥ ४ ॥ अभिमान नाहीं तुका म्हणे त्यासी । नेदी आणिकासी धरूं देव ॥ ५ ॥ [३९२८]

धरियेलें रूप कृष्ण नाम बुंथी । परब्रह्म क्षितीं उतरलें ॥ १ ॥ उत्तम हें नाम राम कृष्ण जगीं ।

द्वारका नांवाचा गांव समुद्रांतील बेटावर नाना रत्नांनीं युक्त असा निर्माण केला १. प्रत्येक खणाच्या भिंतीसुद्धां रत्नखचित व सोन्याच्या केल्या. त्या योगानें अनेक प्रकारचा प्रकाश पडूं लागला २. सर्व प्रकारच्या कलाकुसरी देवाच्या स्वाधीन असल्यामुळें उत्तम प्रकारचीं घरें निर्माण केलीं ३. असे ते दुर्ग तयार करून सभोंवत्या वेशी निर्मिल्या आणि आंतमध्यें कोट्यवधि प्रकारची शोभा दिसूं लागली ४. असें तें गांव समुद्रामध्यें शोभायमान करून सर्व मंडळीसुद्धां देव तेथें आले ५. सर्व शूरांचा मुगुटमणि व सर्वांहून उदार तो देव द्वारका ह्या नांवाच्या नगरांत येऊन राहिला ६ अठरा जातींचीं घरें सारखीं केलीं. त्यांत कोणासहि लहान थोर ही निवड न करितां सर्वांना सारखीं दिलीं ७. नारायणानें सर्वांना राहावयास जीं घरें दिलीं तीं अक्षयीं व न मोडणारीं होतीं ८. सर्व लोक पुण्यवान्, धार्मिक असून विरक्त होऊन पवित्रपणानें तेथें राहिले ९. तें गांव देवानें निर्मिलें तें कोणासहि मोडणारें नव्हे, कारण तो नारायण सर्व बळवानांत श्रेष्ठ आहे १०. तुकाराम महाराज म्हणतात, तेथें जे राहिलेले लोक त्यांचें बळ, बुद्धि व वागणूक देवासारखीच असून ते सर्व काळ मुखानें देवाचें गाणें गात होते ११. [३९२६]

द्वारकेंत राहाणारे लोक दळण, कांडण व मुलांस पाळण्यांत घालून हालविणें वगैरे सर्व कामें करतांना कृष्णाचीं गाणीं गातात १. त्यांच्या घरीं रिद्धिसिद्धि ह्या दासी होऊन राबत असल्यामुळें सर्व संपत्तीची समृद्धि असे २. त्या लोकांस श्रीहरि हें निधान घरच्या घरीं प्राप्त झाल्यामुळें सर्व नरनारी आनंदानें कृष्णाच्या कथा करीत असत ३. ह्यांस प्रत्यक्ष भगवंताची संगति झाली आहे, म्हणून ते नरनारी धन्य व त्यांची जातहि धन्य आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, तेथील सर्व लोक देवानें आपणासमान केले आहेत ५. [३९२७]

द्वारकेमध्यें देव राज्य करीत असल्यामुळें तेथील राहाणारांस कोणतीहि काळजी कोणत्याहि प्रकारची कोणासहि करण्याचें कारण नाहीं १. द्वारकेंत राज्य करतेवेळीं पृथ्वीवरील दुष्टांचा नाश करून धर्माचें रक्षण केलें २. वेदांच्या आज्ञेप्रमाणें वर्तणूक करून अतिथि, अभ्यागत आणि वैष्णव ह्यांची पूजा करी व ब्राह्मणांचा मान वाढवी ३. इतर लोकांप्रमाणें संसाराची राहाटी करून देव सर्वांहून अलिप्त राहिला, आणि त्याच्या ठिकाणीं मी देही व देहसंबंधीं माझें हा अभिमान नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, तो अभिमान देवास नाहीं व तो कोणासहि धरूं देत नाहीं ५. [३९२८]

देवानें गोजिरें सगुण रूप धारण करून कृष्ण हें नांव ठेवून घेतलें, असें तें परब्रह्म ह्या पृथ्वीवर क्रीडा करीत आहे १.

तरावयालागीं भवनदी ॥ २ ॥ दीनानाथ ब्रिदें रुळती चरणीं । वंदितील मुनि देव ऋषि ॥ ३ ॥ ऋषीं मुनीं भेटी दिली नारायणें । आणीक कारणें बहु केलीं ॥ ४ ॥ बहु कासावीस झाला भक्तांसाठीं । तुका म्हणे आटी सोसियेली ॥ ५ ॥ [३९२९]

सोसियेली आटी गर्भवास फेरे । आयुधांचे भारे वागवितां ॥ १ ॥ वाहोनी सकळ आपुलिये माथां । भार दासां चिंता वाहों नेदी ॥ २ ॥ नेदी काळाचिये हातीं सेवकांसी । तुका म्हणे ऐसी ब्रीदावळी ॥ ३ ॥ [३९३०]

ब्रीदावळी ज्याचे रुळते चरणीं । पाऊलें मेदिनी सुखावे त्या ॥ १ ॥ सुखावे मेदिनी कृष्णाचिये चालीं । कुंकुमें शोभली होय रेखा ॥ २ ॥ होऊनी भ्रमर पाउलांचें सुख । घेती भक्त मुख लावूनियां ॥ ३ ॥ याचसाठीं धरियेला अवतार । सुख दिलें फार निज दासां ॥ ४ ॥ निजसुख तुका म्हणे भक्तां ठावें । तिहींच जाणावें भोगूं त्यासी ॥ ५ ॥ [३९३१]

भोगिला गोपिकां यादवां सकळां । गौळणी गोपाळां गाईवत्सां ॥ १ ॥ गाती धणीवरी केला अंगसंग । पाहिला श्रीरंग डोळेभरी ॥ २ ॥ भक्ति नवविधा तयांसी घडली । अवघींच केलीं कृष्णरूप ॥ ३ ॥ रूप दाखविलें होतां भिन्न भाव । भक्त आणि देव भिन्न नाहीं ॥ ४ ॥ नाहीं राहों दिलें जातां निजधामा । तुका म्हणे आम्हांसहित गेला ॥ ५ ॥ [३९३२]

गेला कोठें होता कोठूनियां आला । सहज व्यापला आहे नाहीं ॥ १ ॥ आहे साच भावें सकळव्यापक । नाहीं अभाविक लोकां कोठें ॥ २ ॥ कोठें नाहीं ऐसा नाहीं रिता ठाव । अनुभवी देव

ह्या देवास अनंत नामें आहेत, पण संसारसमुद्रांतून तरून जाण्याविषयीं रामकृष्ण हीं दोन नामें उत्तम आहेत २. ज्याच्या चरणांमध्यें दीनजनांचा उद्धार करण्याविषयीं दीनानाथ ह्या नांवाचें ब्रीद बांधलें आहे, त्या चरणांचें मननशील ऋषि व सर्व देव वंदन करितात ३. नारायणानें सर्व मननशील ऋषि, मुनि वगैरे भक्तांस दर्शन दिलें व आणखीहि त्यांचीं पुष्कळ कामें केलीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, हा देव भक्तांकरितां फार श्रमी झाला, आणि त्यांच्याकरितां त्यानें पुष्कळ मेहनत केली ५. [३९२९]

भक्तांकरितां देवानें गर्भवास देखील सोसले आणि पुष्कळ प्रकारचीं शस्त्रें घेऊन दैत्यांच्या नाशाकरितां मेहनत केली १. आपल्या सेवकांचा सर्व भार देवानें आपल्या मस्तकावर घेऊन त्यांना कोणत्याच प्रकारची काळजी करूं दिली नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, देव आपल्या सेवकांना काळाच्या स्वाधीन करीत नाहीं, असें त्याचें ब्रीदच आहे ३. [३९३०]

ज्या देवाचे चरणांमध्यें ब्रीदें, वाकी शोभतात तो देव लहानसें रूप घेऊन चालूं लागल्यावर त्याच्या पायांच्या स्पर्शानें पृथ्वीस फार सुख झालें १. अशीं तीं कुंकुममंडित पाउलें पृथ्वीवर उमटतात, त्या योगानें ती पृथ्वी सुखावते २. त्या चरणकमळांचें सुख घेण्याकरितां भक्त भ्रमर झाले आणि तेथील सुगंध ते मुखानें सेवन करूं लागले ३. त्या भक्तांकरितां देवानें अवतार घेऊन त्यांना फार सुख दिलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, देवाच्या स्वरूपाचें सुख भक्तांनाच ठाऊक आहे, म्हणून त्याचा भोग घेण्याविषयीं तेच जाणताहेत ५. [३९३१]

गौळणी, गाई, गोपाळ व यादव मंडळी वगैरे भक्तांनीं देवाचें सुख भोगलें १. त्या सर्वांनीं देवाबरोबर अंगसंग केला व त्याला डोळे भरून पाहिलें आणि तृप्ति होईतोंपर्यंत त्याचें गाणें गाइलें २. अशी श्रवण, कीर्तन वगैरे नवविधा भक्ति त्या सर्वांना प्राप्त झाली, म्हणून ती सर्व मंडळी कृष्णरूप झाली ३. कांहीं लोकांस वेगळ्या प्रकारचा भाव असल्यामुळें भक्त एक व देव एक अशीं दोन रूपें दाखविलीं, पण विचार केला असतां देव आणि भक्त वेगळे नाहींत ४. तुकाराम महाराज म्हणतात, निजधामास जाते वेळीं द्वारकेंत आपले भक्त कोणीहि ठेविले नाहींत. आम्हां सर्वांसहि वैकुंठास घेऊन गेले ५. [३९३२]

हा देव कोठून आला व कोठें गेला हें म्हणणें व्यर्थ आहे, कारण तो जगामध्यें व्यापक आहे व अलिप्त असल्यामुळें तो कोठेंच नाहीं १. ज्याचा खरा भाव आहे त्यास देव सर्व ठिकाणीं आहे आणि अभाविक लोकांस तो कोणत्याच ठिकाणीं मिळणार नाहीं २. तो देव अमके ठिकाणीं नाहीं अशी रिकामी जागा कोठेंच नाहीं, असा ज्यांचा अनुभव आहे ते स्वतः

स्वयें झाले ॥ ३ ॥ जातों येतों आम्ही देवाचे सांगात । तुका म्हणे गात देवनाम ॥ ४ ॥ [३९३३]

मना वाटे तैसीं बोलिलों वचनें । केली धीटपणें सलगी देवा ॥ १ ॥ वाणी नाहीं शुद्ध याति एक ठाव । भक्ति नेणें भाव नाहीं मनीं ॥ २ ॥ नाहीं झालें ज्ञान पाहिलें अक्षर । मानी जैसें (मानिजेसी) थोर थोरी नाहीं ॥ ३ ॥ नाहीं मनीं लाज धरिली आशंका । नाहीं भ्यालों लोकां चतुरांसी ॥ ४ ॥ चतुरांच्या राया मी तुझें अंकित । जालों शरणागत देवदेवा ॥ ५ ॥ देवा आतां करीं सरतीं हीं वचनें । तुझ्या कृपादानें बोलिलों तीं ॥ ६ ॥ तुझें देणें तुझ्या समर्पूनी पायीं । झालों उतराई पांडुरंगा ॥ ७ ॥ रंकाहूनी रंक दास मी दासांचें । सामर्थ्य हें कैसें (मज कैंचें) बोलावया ॥ ८ ॥ बोलावया पुरे वाचा माझी कायी । तुका म्हणे पायीं ठाव द्यावा ॥ ९ ॥ [३९३४]

: ओंव्यारूपी अभंग :

पांडुरंगा करूं प्रथम नमना (नमन)। दुसरें चरणां संतांचिया ॥ १ ॥ त्याच्या कृपादानें कथेचा विस्तारू । बाबाजीसद्‌गुरुदास तुका ॥ २ ॥ काय माझी वाणी मानेल संतांसी । रंजवूं चित्तासी आपुलिया ॥ ३ ॥ या मनासी लागो हरिनामाचा छंद । आवडी गोविंद गावयासी ॥ ४ ॥ सीण झाला मज संसारसंभ्रमें । सीतळ या नामें झाली काया ॥ ५ ॥ या सुखा उपमा नाहीं द्यावयासी । आलें (आला) आकारासी निर्विकार ॥ ६ ॥ नित्य धांवे तेथें नामाचा गजर । घोष जयजयकार आईकतां ॥ ७ ॥ तांतडी ते काय हरिगुण गाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥ ८ ॥ मूळ नरकाचें राज्य मदें माते । अंतरे बहुत देव दुरी ॥ ९ ॥ दुरी अंतरला नामनिंदकासी । जैसें गोचिडासी क्षीर राहे ॥ १० ॥

देवरूप झाले ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही नामस्मरण करीत देवाच्या बरोबर वैकुंठास जातों व तो प्रत्येक अवतार घेऊन येईल त्या वेळीं त्याच्याबरोबर येतों ४. [३९३३]

हे देवा, माझ्या मनास वाटले तसे शब्द बोलून धीटपणानें मीं तुझ्याशीं सलगी केली १. माझी जात शुद्ध नसून वाणीहि शुद्ध नाहीं व माझ्या मनांत भक्तिभाव देखील नाहीं २. माझ्या ठिकाणीं जाणतेपणा नसून कोणतीं अक्षरेंहि (शास्त्रव्युत्पत्ति व शास्त्रांचीं पुस्तकें) मीं पाहिलीं नाहींत व श्रेष्ठांनीं मानावें असा माझा थोरपणाहि नाहीं ३. असें असून तुझे गुण गातांना म्यां कोणाची लाज व संशय धरला नाहीं व चतुर पंडित लोकांचें भय धरलें नाहीं ४. हे पंडितांच्या राजा देवाधिदेवा, मी तुला शरण येऊन सेवक होऊन राहिलों आहें ५. हे देवा, तुझ्या कृपेनें आतां माझ्या वाणींतून निघालेलीं अक्षरें सरतीं करून घ्यावीं (स्वीकारावीं) ६. हे पांडुरंगा, तुम्हीं जी देणगी दिली ती तुमच्या चरणीं समर्पण करून मी उतराई झालों ७. मी सर्व दीनांहून दीन असून आपल्या दासांचा दास आहें, म्हणून माझ्या अंगीं बोलण्याचें सामर्थ्य कशाचें आहे? ८. तुकाराम महाराज म्हणतात, तुमचे गुण वर्णन करण्यास माझी वाचा पुरणार नाहीं, पण आवडीनें मला तुमच्या पायांजवळ आश्रय द्यावा ९. [३९३४]

कथेच्या आरंभास एक नमस्कार पांडुरंगाला व दुसरा संतचरणांना मी करीत आहें १. कारण पांडुरंगानें बाबाजी चैतन्य ह्या नांवाचे सद्गुरु होऊन मला कृपादान दिलें. त्या योगानें माझ्या मुखांतून हरिकथेचा विस्तार होत आहे. तुकाराम महाराज म्हणतात, मी बाबाजी सद्गुरूचा दास आहें २. माझी वाणी संतांस मान्य होईल अशी नाहीं पण मी आपले चित्तास रंजवणूक करीत आहें ३. माझ्या मनाला हरिनामाचा छंद लागावा व आवडीनें देवास गावें हा माझा हेतु आहे ४. जन्ममृत्युरूपी संसारभ्रमांच्या योगानें मला फार श्रम झाले होते. ते ह्या नामस्मरणानें नाहींसे होऊन माझी काया शीतळ झाली ५. निराकार देव होता तो नामस्मरणाच्या सुखाकरितां आकारास आला. त्या सुखास उपमा कोणती द्यावी? ६. नामस्मरणाचा जयजयकार व घोष ऐकिल्याबरोबर देव नेहमीं त्या वैष्णवाच्या घरीं धांवत जातो ७. ह्याकरितां मोठ्या वेगानें श्रीहरीचे गुणानुवाद गावे. त्यावेरीज इतर साधनें दुःखदायक आहेत ८. राज्य मिळाल्यावर अंगीं उन्मत्तपणा येतो त्यास राज्यमद असें म्हणतात, त्याच्या योगानें नरकप्राप्ति होते व देव दुरावतो ९. जसे गाईच्या स्तनाजवळ गोचीड असतात, ते दूध न सेवितां रक्त सेवन करितात, त्याप्रमाणें नामस्मरणाचा धिकार करणारे

हे वाट गोमटी वैकुंठासी जातां । रामकृष्णकथा दिंडी ध्वजा ॥ ११ ॥ जाणते तयांनीं सांगितलें करा । अहंतेसी वारा आडूनियां ॥ १२ ॥ यांसी आहे ठावें परी अंध होती । विषयांशी खंती वांटे जना ॥ १३ ॥ नाहीं त्या सुटलीं द्रव्य लोभ माया । भस्म दंड छाया तरुवराची ॥ १४ ॥ चित्त ज्याचें पुत्रपत्नीबंधूवरी । सुटेल हा परि कैसें (कैसा) जाणा ॥ १५ ॥ जाणते नेणते करा हरिकथा । तराल सर्वथा भाक माझी ॥ १६ ॥ माझी मज असे घडली प्रचित । नसेल पतित ऐसा कोणी ॥ १७ ॥ कोणी तरी कांहीं केलें आचरण । मज या कीर्तनेंवीण नाहीं ॥ १८ ॥ नाहीं भय भक्ता (भक्ता भय) तराया पोटाचें । देवासी तयाचें करणें लागे ॥ १९ ॥ लागे पाठोवाटी पाहे पायांकडे । पीतांबरें खडे वाट झाडी ॥ २० ॥ डिंकोनियां काय राहिले हे लोक । हेंचि कवतुक वांटे मज ॥ २१ ॥ जयानें तारिले पाषाण सागरीं । तो ध्या रे अंतरीं स्वामी माझा ॥ २२ ॥ माझिया जीवाची केली सोडवण । ऐसा नारायण कृपाळू हा ॥ २३ ॥ हाचि माझा नेम हाचि माझा धर्म । नित्य वाचे नाम विठोबाचें ॥ २४ ॥ चेतवला अग्नि तापत्रयज्वाळ । तो करी शीतळ रामनाम ॥ २५ ॥ मना एक करीं दृढ चित्तीं धरीं । तारील श्रीहरी मायबाप ॥ २६ ॥ बाप हा कृपाळु भक्तां भाविकांसी । घरीं होय दासी कामारी त्या ॥ २७ ॥ त्यांचा भार माथां चालवी आपुला । जिहीं त्या दिधला सर्व भाव ॥ २८ ॥ भावेंविण नाहीं तयाची ये प्राप्ति (भावेंविण जाणा नाहीं त्याची प्राप्ति) । पुराणें बोलती ऐसी मात ॥ २९ ॥ मात त्याची जया (सदा) आवडे जीवासी । तया गर्भवासीं नाहीं येणें ॥ ३० ॥ यावें गर्भवासीं तरीच विष्णुदासीं । उद्धार लोकांसी पूज्य होती ॥ ३१ ॥ होती आवडते जीवाचे ताईत । त्यां घडी अच्युत न विसंबे ॥ ३२ ॥ भेदाभेद नाहीं चिंता दुःख कांहीं । वैकुंठ त्या ठायीं सदा वसे ॥ ३३ ॥ वसे तेथें देव सदा सर्वकाळ । करिती निर्मळ नामघोष ॥ ३४ ॥ संपदा तयाची न सरे कल्पांतीं । मेळविला भक्तीं

देवास अंतरतात १०. हातामध्यें वीणा, खांद्यावर पताका घेऊन नामस्मरण व कीर्तन करणें ही वाट वैकुंठास जाण्याला फार चांगली आहे ११. जे कोणी शहाणे असतील त्यांनीं देहाभिमान टाकावा हें माझें सांगणें आहे १२. ह्या लोकांस माहीत असून विषयांत गुंतल्यामुळें ते बळानें आंधळे होतात १३. संसार टाकून अंगाला राख लावून हातांत दंड घेऊन रानांत झाडाच्या सावलीखालीं जरी बसले तरी त्यांस द्रव्याचा लोभ सुटत नाहीं १४. कारण ज्याचें चित्त आपल्या बायकापोरांवर व गणगोतावर आहे तो कोणत्या प्रकारानें सुटला जाईल? १५. सर्व जाणते अथवा नेणते लोकांस माझें सांगणें आहे, कीं तुम्ही श्रीहरीची कथा करा म्हणजे निश्चयानें संसारसमुद्रांतून तरून जाल, हें तुम्हांला मी भाक देऊन (प्रतिज्ञेनें) सांगतों १६. हा अनुभव माझा मला आहे, कारण माझ्याप्रमाणें पातकी दुसरा कोणी नसेल १७. मी कीर्तना-वांचून दुसरें साधन केलें नाहीं. बाकी इतर लोकांचा आचार कोणत्या प्रकारचा असेल तो असो १८. हरिकीर्तन करणारे भक्तांस पोट भरण्याची व तरणोपायाची काळजी करणें नको, कारण त्यांचा सर्व भार देव चालवीत आहे १९. भक्त जिकडे जातील तिकडे त्यांच्या मागें पुढें देव चालत आहे आणि त्यांच्या पायांना खडे टोंचतील म्हणून आपल्या पीतांबरानें वाट झाडीत आहे २०. असें असून हे लोक संसारामध्यें चिकटून काय म्हणून राहिले हें मला मोठें आश्चर्य वाटतें २१. अरे, ज्यानें दगड देखील पाण्यावर तारले त्या देवाचें ध्यान तुम्ही अंतरामध्यें करा २२. माझ्या जीवाची सोडवण त्यानेंच केली. असा तो नारायण फार कृपाळु आहे २३. विठोबारायाचें नामस्मरण वाचेनें सर्व काळ करावें, हाच माझा नेमधर्म आहे २४. त्रिविधतापाचा अग्नि देहामध्यें फार वाढल्यामुळें देह संतप्त झाला आहे; तो रामनामानें शीतळ होईल २५. हाच मनानें निश्चय करून नाम घेतल्यानें मायबाप श्रीहरि उद्धार करील २६. हा देव भाविक भक्तांविषयीं कृपाळु आहे, तो भक्तांच्या घरीं दास्यत्व करतो २७. ज्यांनीं कायवाचामनानें सर्व भाव देवास दिला त्यांचा सर्व भार देव चालवितो २८. एका भावावांचून त्याची प्राप्ति होत नाहीं, असें अठरा पुराणांचें म्हणणें आहे २९. ज्याला देवाची कीर्ति आवडते त्याला गर्भवास भोगावे लागत नाहींत ३०. वैष्णव हे गर्भवासाला येतात त्याचें कारण सर्व जनांचा उद्धार करून आपण पूज्य व्हावें हें होय ३१. ते वैष्णव देवास फार आवडल्यामुळें त्यांच्या घरीं तो सर्व काळ राहातो ३२. ज्यांच्या ठिकाणीं भेदाभेद व कोणतीहि काळजी नाहीं, त्यांच्या जवळ देव सर्व काळ राहातो ३३. जे निर्मळपणानें नामस्मरण करितात त्यांच्या घरीं देवाची वस्ती निरंतर आहे ३४. ह्याप्रमाणें भक्तांनीं देवाची प्राप्ति करून घेतल्यामुळें

देवलाभ ॥ ३५ ॥ लाभ तयां झाला संसारा येऊनी। भगवंत ऋणी भक्तीं केला ॥ ३६ ॥ लागलेंसे पिसें काय मूढ जनां। काय नारायणा विसरलीं ॥ ३७ ॥ विसरलीं तयां थोर झाली हानी। पचविलया खाणी चौऱ्यांसीच्या ॥ ३८ ॥ शिकवितों तरी नाहीं कोणा लाज। लागलीसे भाज धन गोड ॥ ३९ ॥ गोड एक आहे अविट गोविंद। आणिक ते छंद नाशिवंत ॥ ४० ॥ तळमळ त्याची कांहीं तरी करा। कां रे निदसुरा बुडावया ॥ ४१ ॥ या जनासी भय यमाचें कां नाहीं। सांडियेलीं तिहीं एकीं राज्य ॥ ४२ ॥ जेणें अग्निमाजी घातलासे पाव। नेणता तो राव जनक होता ॥ ४३ ॥ तान भूक जिहीं साहिले आघात। तयां पाय हात काय नाहीं ॥ ४४ ॥ नाहीं ऐसा तिहीं केला संवसार। दुःखाचे डोंगर तोडावया ॥ ४५ ॥ याच जन्में घडे देवाचें भजन। आणीक हें ज्ञान नाहीं कोठें ॥ ४६ ॥ कोठें पुढें नाहीं घ्यावया विसांवा। फिरोनियां गांवा आल्याविण ॥ ४७ ॥ विनवितां दिवस बहुत लागती। म्हणुनियां चित्तीं देव धरा ॥ ४८ ॥ धरा पाय तुम्हीं संतांचे जीवेंसी। वियोग तयासी देव नाहीं ॥ ४९ ॥ नाहीं चाड देवा आणीक सुखाची। आवडी नामाची त्याची तया ॥ ५० ॥ त्याचींच उच्छिष्ट बोलतों उत्तरें। सांगितलें खरें व्यासादिकीं ॥ ५१ ॥ व्यासें सांगितलें भक्ति हेंचि सार। भवसिंधु पार तरावया ॥ ५२ ॥ तरावया जना केलें भागवत। गोवळे गोपी भक्त माता पिता ॥ ५३ ॥ तारूनियां खरें नेलीं एक्यासरें (एकसरें)। निमित्त उत्तरें ऋषीचिया ॥ ५४ ॥ यासी वर्म ठावें भक्ता तारावया। जननी बाळ माया राखे तान्हें ॥ ५५ ॥ तान्हेलें भुकेलें म्हणे वेळोवेळां। न मागतां कळा जाणोनियां ॥ ५६ ॥ जाणोनियां वर्म देंठ लावियेला। द्रौपदीच्या

त्यांची सर्व संपत्ति कल्पांत झाला तरी संपणार नाहीं, कारण जेथें देव तेथें लक्ष्मी असतेच ३५. जन्माला येऊन भक्तीच्या योगानें ज्यांनीं देव ऋणी केला त्यांनाच खरा लाभ झाला ३६. असें असून ह्या मूढ लोकांना वेड कसें लागलें? हे लोक देवास कां विसरले? ३७. असे जे देवास विसरले त्यांचा मोठा नाश झाला. अखेर चौऱ्यांयशीं लक्ष योनि त्यांस भोगाव्या लागतील ३८. असें जरी मी शिकवितों तरी कोणी लाज धरीत नाहींत. आपल्या बायका-पोरांत व द्रव्यामध्यें गुंतून पडतात ३९. एका गोविंदाचें नाम गोड असून विटणारें नाहीं. त्यावांचून दुसरे छंद नाशिवंत आहेत ४०. अरे, तुम्ही त्या देवाच्या प्राप्तीविषयीं कांहीं तरी तळमळ ब . झोंपेमध्यें आयुष्य वायां दवडून उगीच कां बुडतां? ४१. ह्या लोकांना यमाचें भय कां वाटत नाहीं? त्याचे भीतीनें परमार्थाकरितां कित्येक राजे लोकांनीं राज्यें टाकिलीं ४२. जनक ह्या नांवाचा राजा रा य करीत असतां त्यानें देहाभिमान नष्ट करण्याकरितां आपला एक पाय अग्नीमध्यें घातला होता. मग त्यास अज्ञानी म्हणावें काय? ४३. आणखी इतर लोकांनीं तहानभुकेची पीडा सहन केली. तेव्हां त्यांस हातपाय नव्हते कीं काय? ४४. कित्येकांनीं दुःखाचे पर्वत नाहींसे करण्याकरितां संसाराचा त्याग करून ते अरण्यांत राहिले ४५. कारण ह्या मनुष्यजन्मामध्यें देवाचें भजन घडतें. हें ज्ञान इतर योनींमध्यें नाहीं ४६. अनेक योनि फिरून मनुष्यजन्मास आल्यावांचून कोणत्याहि ठिकाणीं विश्रांतीस जागा मिळणार नाहीं ४७. पुनः मनुष्यजन्मास येण्याला पुष्कळ दिवस लागतील. ह्याकरितां मनांत श्रीहरीचें ध्यान करा ४८. अथवा संतांचे पाय चित्तांत धरा, कारण संत व देव हे वेगळे नाहींत ४९. संतांवांचून देवाला इतर सुखाची गरज नाहीं व देवावांचून संतांना इतर इच्छा नाहीं. अशी परस्परें एकमेकांची आवडी आहे ५०. व्यासादिकांनीं श्रीमद्भागवतादि पुराणांत जें सांगितलें आहे त्याच आधारानें मी बोलत आहें ५१. संसारसमुद्र तरून जाण्याविषयीं एक भगवंताची भक्तिच सार आहे, असें व्यासांनीं सांगितलें ५२. ती भक्ति सांगण्याकरितां व्यासांनीं भागवत केलें त्यामध्यें देवानें आपले आईबाप, गवळणी, गौळी वगैरे भक्तजनांस तारलें ही कथा आहे ५३. वाल्मीकि ऋषींच्या वचनाचें (रामायणाचें) निमित्त करून भगवंतांनीं (प्रभु रामचंद्रांनीं) एकदम सर्व जनांस तारलें ५४. आई आपल्या तान्ह्या लेंकरास जशी सांभाळते तसें भक्तजनांस तारण्याचें वर्म देवास माहीत आहे ५५. माझ्या लेंकरास तहान अथवा भूक लागली असें ती आई वारंवार म्हणते आणि त्यानें तें न सांगतां त्याची मुखचर्या पाहून ती त्याचा लळा पुरविते (त्याला स्तनपान देते) ५६. तसें द्रौपदीच्या मनांतील वर्म जाणून देवानें ऋषींच्या वनांतील झाडाचें तुटलेलें जांभूळ जागच्या जागीं देठास चिकटविलें, व द्रौपदी ज्या वेळेस हाक मारील त्या वेळीं (द्रौपदीवस्त्रहरणप्रसंगीं व पांडव वनवासांत असतां दुर्योधनाच्या चिथावणीनें त्यांचें सत्त्व पाहावयास

बोलासवें धांवे ॥ ५७ ॥ धांवे सवें तानें (तान्हीं) धेनु जैसी वत्सा । भक्तालागीं तैसा नारायण ॥ ५८ ॥ नारायण व्हावा ही हांव ज्याच्या जीवा (हे हांव जया जीवा) । धन्य त्याच्या दैवा पार नाहीं ॥ ५९ ॥ पार नाहीं (नाहीं पार) सुखा तें दिलें तयासी । अखंड वाचेसी रामराम ॥ ६० ॥ रामनाम (रामराम) दोनी उत्तम अक्षरें । भवानी शंकरें उपदेशिलीं ॥ ६१ ॥ उपदेश करी विश्वनाथ कानीं । वाराणशी प्राणी मध्यें मरे ॥ ६२ ॥ मरणाचे अंतीं राम म्हणे जरी । न लगे यमपुरी जावें तया (जाणें तया) ॥ ६३ ॥ तयासी उत्तम ठाव पैं वैकुंठीं (तयासी तो ठाव केलासे वैकुंठीं) । वसे नाम कंठीं सर्वकाळ ॥ ६४ ॥ सर्वकाळ वसे वैष्णवांच्या घरीं । नसे क्षणभरी स्थिर कोठें ॥ ६५ ॥ कोठें नका पाहों करा हरिकथा । तेथें अवचिता सांपडेल ॥ ६६ ॥ सांपडे हा देव भाविकांचे हातीं । शाहाणे मरती तरी नाहीं ॥ ६७ ॥ नाहीं भली भक्ति केलियावांचूनी । अहंता पापिणी नागवण ॥ ६८ ॥ नागवला म्हणे देव जो (देव मी) आपणा । लाभ दिला जना ठकला तो ॥ ६९ ॥ तोचि देव येर नव्हे ऐसें कांहीं । जनार्दन ठायीं चहूं खाणी ॥ ७० ॥ खाणी भरूनियां राहिलासे आंत । बोलावया मात ठाव नाहीं ॥ ७१ ॥ ठाव नाहीं रिता कोणी देवाविण । ऐसी ते सज्जनसंतवाणी ॥ ७२ ॥ वाणी बोलूनियां गेले एक (एक गेले) पुढें । तयांसी वांकुडें जातां ठके ॥ ७३ ॥ ठकला नाहीं अर्थ ठाउका वेदांचा । होऊनी भेदाचा दास ठेला ॥ ७४ ॥ दास ठेला पोट अर्थ दंभासाठीं । म्हणउनि तुटी देवासवें ॥ ७५ ॥ सवें देव द्विजातीही दुराविला । आणिकांचा आला कोण पाड ॥ ७६ ॥ पाड करूनियां नागविलीं फार । पंडित व्यवहार खळवादी ॥ ७७ ॥ वादका निंदका देवाचें दर्शन । नव्हे झाला पूर्ण षडकर्मी ॥ ७८ ॥ षडकर्मी हीन रामनाम कंठीं । तयासवें भेटी सत्य देवा ॥ ७९ ॥ देवासी आवडे भाविक जो भोळा ।

आलेल्या दुर्वासानें रात्रीं भोजन मागितलें त्या वेळीं) देव धांवून जात असे ५७. नवीन व्यालेली गाय जशी आपल्या वासराकरितां धांवत जाते तसा देव आपल्या भक्ताकरितां धांवतो ५८. आपणास देवाची प्राप्ति व्हावी असा सोस ज्यास लागला तो प्राणी मोठा भाग्यवान् समजावा ५९. ज्याच्या वाचेला सर्व काळ रामनामाचा छंद आहे त्याला देव सुख देतो. त्या सुखास पार नाहीं ६०. राम ह्या दोन अक्षरांचा उत्तम उपदेश महादेवानें पार्वतीस केला ६१. जो प्राणी काशीक्षेत्रामध्यें मरतो त्याच्या कानांत त्याच दोन अक्षरांचा उपदेश महादेव करीत आहेत ६२. कोणत्याहि प्राण्यानें मरणाच्या वेळेस जर रामनामाचें स्मरण केलें तर त्यास यमलोकास जावें लागत नाहीं ६३. ज्याच्या कंठामध्यें सर्व काळ नाम आहे, त्यास वैकुंठीं उत्तम ठिकाण मिळतें ६४. देव हा कोणत्याहि ठिकाणीं क्षणभर राहात नाहीं, तो वैष्णवांच्या घरीं सर्व काळ राहातो ६५. ह्याकरितां त्या देवास तुम्ही दुसरीकडे हुडकूं नका. एक श्रीहरीचें कीर्तन केलें असतां तो लागलीच सांपडेल ६६. एका भावार्थावांचून शहाणपणानें पुष्कळ खटपट करून जरी शहाणे लोक मेले तरी त्यांस देव सांपडत नाहीं. तो भाविकांस सांपडतो ६७. श्रीहरीची भक्ति केल्यावांचून त्याची प्राप्ति होत नाहीं. भक्तीवांचून अभिमान करणें व्यर्थ आहे ६८. मी देवरूपच आहें असा जो अभिमान धरतो त्याची हानि होते. त्यानें इतर जनांचा फायदा केला पण तो स्वतः वायां गेला ६९. हा देव सर्व जगांत व्यापक आहे. मग त्या एकासच देवरूप म्हणण्याचें काय काम आहे? ७०. चारीहि (जारज, अंडज, स्वेदज, उद्भिज ह्या) खाणींच्या अंतर्यामीं भरून राहिला आहे, तो देव अमक्या ठिकाणीं नाहीं असें म्हणण्यास रिकामें ठिकाणच नाहीं ७१. एका देवावांचून अणुमात्र देखील जागा रिकामी नाहीं, अशी संत-सज्जन साक्ष देतात ७२. अशा प्रकारचें बोलणें बोलून संत महात्मे पुढें गेले आहेत. ती वाट सोडून गेलें असतां लोक ठकतात ७३. वेदांचा मुख्य अर्थ (जीव हाच ब्रह्म आहे हा) माहीत नसल्यामुळें ते लोक ठकले (फसले) आणि जीव-ब्रह्मांतील भेद सत्य मानून दास्यत्व करूं लागले ७४. दास्यत्व करण्याचें कारण पोट भरावें व दंभ वाढावा, पण ह्या इच्छेनें ते देवास अंतरले ७५. सर्व वर्णांत ब्राह्मण श्रेष्ठ असून (जीव-ब्रह्म) भेदानें ते देखील देवास अंतरले, मग दुसऱ्याची काय प्रतिष्ठा आहे? ७६. ह्या लोकाचारामध्यें प्रतिष्ठा व्हावी म्हणून पंडित हे खळाप्रमाणें वाद घालून वायां गेले ७७. यजनयाजनादि सहा कर्में करून ब्राह्मण श्रेष्ठ असून तो जर दुसऱ्याशीं वाद घालून (भेदवादी असून वेद-गुरु-संत-देव ह्यांची) निंदा करील तर त्यास देवाचें दर्शन कधींहि होणार नाहीं ७८. आणि कंठामध्यें सर्व काळ रामनाम असून तो जरी सहा कर्में करीत नसला तरी त्यास खरोखर देव भेट देईल ७९. जो भोळा भाविक आहे तो देवास आवडतो,

शुद्ध त्या चांडाळा करुनि मानी ॥ ८० ॥ मानियेला नाहीं उधार (विश्वास) या बोला । नाम घेतां मला युक्ति थोडी ॥ ८१ ॥ युक्ति थोडी मज दुर्बळाची वाचा । प्रताप नामाचा बोलावया ॥ ८२ ॥ बोलतां पांगल्या श्रुति नेति नेति । खुंटलिया युक्ति पुढें त्यांच्या ॥ ८३ ॥ त्याचा पुढें पार न कळेचि जातां । पाउलें देखतां ब्रह्मादिकां ॥ ८४ ॥ काय भक्तिपिसें लागलें देवासी । इच्छा ज्याची जैसी तैसा होय ॥ ८५ ॥ होय हा सगुण निर्गुण आवडी । भक्तिप्रिय गोडी फेडावया ॥ ८६ ॥ मायबापा पासीं बाळ बोले लाडें । करुनी वांकुडें मुख तैसें ॥ ८७ ॥ तैसें याचकांचें समाधानदाता । होय हा राखता सत्त्वकाळीं ॥ ८८ ॥ सत्त्वकाळीं कामा न येती आयुधें । सोयरीं संबंधें सैन्यलोक ॥ ८९ ॥ सैन्यलोक तया दाखवी प्रताप । लोटला हा कोप कोपावरी ॥ ९० ॥ कोपा मरण नाहीं शांत होय त्यासी । प्रमाण भल्यासी सत्त्वगुण ॥ ९१ ॥ सत्त्वरजतम आपण नासती । करितां या भक्ति विटोबाची ॥ ९२ ॥ चित्त रंगलिया चैतन्यचि होय । तेथें उणें काय निजसुखा ॥ ९३ ॥ सुखाचा सागरू आहे विटेवरी । कृपादान करी तोचि एक ॥ ९४ ॥ एक चित्त करूं विठोबाचे पायीं । तेथें उणें कांहीं एक आम्हां ॥ ९५ ॥ आम्हांसी विश्वास त्याचिया नामाचा । म्हणउनि वाचा घोष करूं ॥ ९६ ॥ करूं हरिकथा सुखाची समाधि । आणिकाची बुद्धि दुष्ट नासे ॥ ९७ ॥ नासे संवसार लोकमोहो (लोभ मोहो) माया । शरण जातां या विठोबासी ॥ ९८ ॥ शिकविलें मज मूढा संतजनीं । दृढ या वचनीं राहिलोंसें ॥ ९९ ॥ राहिलोंसें दृढ विठोबाचे पायीं । तुका म्हणे कांहीं न लगे आतां ॥ १०० ॥ [३९३५]

गाईन ओंविया पंढरीचा देव । आमुचा तो जीव पांडुरंग ॥ १ ॥ रंगलें हें चित्त माझें

मग तो महार जरी असला तरी त्यास शुद्ध करून देव मानतो ८०. हें माझें बोलणें कांहीं सांगोवांगीचें नाहीं. प्रत्यक्ष नामस्मरणाच्या योगानें मलाच हा अनुभव आला आहे ८१. मी दुर्बळ असून मतिहीन आहें, पण ह्या वाणीनें गुणवर्णन केलें; हें सामर्थ्य नामाचें आहे ८२. एरवीं देवाचे गुण वर्णन करतांना वेदश्रुति देखील थकल्या, त्यांची मति कुंठित होऊन (न इति न इति–देव असा नाहीं, असा नाहीं असें म्हणून) निवांत राहिल्या; त्यांचें चातुर्य कुंठित झालें ८३. ब्रह्मादिकांस सुद्धां देवाच्या गुणांचा पार लागत नाहीं म्हणून त्यांनीं पुढें ठेविलेला पाय मागें सारला ८४. एका भक्तीचें देवास वेड लागलें आहे, तें असें, कीं जो जशी इच्छा करील तसा हा देव होतो ८५. भक्तांच्या अतिशय आवडीकरितां हा देव सगुण व निर्गुण रूप धारण करितो ८६. आपल्या आईबापांशीं जसें लेंकरूं लाडानें वांकडें तोंड करून बोलतें ८७. त्याप्रमाणें शरण आलेल्या याचकांचे बोल ऐकून त्या सात्त्विक लोकांचें देव समाधान करितो (भक्तांच्या अंतकाळीं देव त्यांचें रक्षण करतो) ८८. ज्याच्या अंगीं सत्त्व अवस्था आहे (किंवा, यम जेव्हां सर्व हरण करतो तेव्हां सार्वभौम राजा जरी असला तरी) त्यास शस्त्रांसुद्धां सैन्य, परिवार व सोयरेधायरे हे कोणी उपयोगी पडणार नाहींत ८९. सैन्य परिवार जर असला तर भांडणानें भांडण उत्पन्न होईल, मग रागानें राग जास्त वाढेल ९०. एरवीं पाहिलें असतां क्रोधास मरण नाहीं. ज्याच्या अंगीं शांति आहे त्याच्या पुढें क्रोधाचें बळ चालत नाहीं. भले लोकांस सत्त्वगुण प्रमाण आहे ९१. एका विठोबारायाचें भजन केलें असतां सत्त्व, रज, तम ह्या तीन गुणांचा नाश आपोआप होत आहे ९२. श्रीहरीच्या भजनानें चित्त रंगलें असतां तें तद्रूप होत आहे. मग तेथें स्वस्वरूपाच्या सुखास (आत्मसुखास) कांहीं कमी आहे काय? ९३. सर्व सुखाचा समुद्र असा देव विटेवर उभा आहे, तो कौतुकानें भक्तजनांवर कृपा करतो ९४. सर्व विषयवृत्ति टाकून विठोबारायाच्या पायीं आम्ही आपलें चित्त अर्पण करूं, मग आम्हांला त्या ठिकाणीं कांहीं कमी आहे काय? ९५. श्रीहरीच्या नामाचा आम्हांला पूर्ण विश्वास आहे म्हणून आम्ही त्या नामाची वाचेनें सर्व काळ गर्जना करूं ९६. हरिकथा ही केवळ सुखाची समाधि आहे, तिच्या योगानें बुद्धींतील अनेक वाईट विकारांचा नाश होईल; म्हणून आम्ही कथा करतों ९७. विठोबारायाला शरण गेलें असतां संसारांतील मोहमाया वगैरे दुःखांचा नाश होईल ९८. मी अति मूढ असून माझा अंगीकार संतांनीं करून हें सर्व मला शिकविलें, म्हणून मी त्यांच्या वचनावर बळकट विश्वास ठेवून राहिलों आहें ९९. तुकाराम महाराज म्हणतात, त्या विश्वासानें विठोबारायाच्या पायांजवळ मी राहिलों आहें. आतां मी त्या पायांवांचून दुसरें कांहीं जाणत नाहीं १००. [३९३५]

पंढरपूरनिवासी विठोबा आहे, त्यास मी आनंदानें ओंव्या गाईन, कारण तो आमचा जीवप्राण आहे १. त्याच्या

तया पायीं । म्हणुनियां घेई हाचि लाहो ॥ २ ॥ लाहो करीन मी हाचि संवसारीं । राम कृष्ण हरि नारायण ॥ ३ ॥ नारायण नाम घालितां तुकासी । न येती या रासी तप तीर्थें ॥ ४ ॥ तीर्थें रज माथां वंदिती संतांचे । जे गाती हरीचे गुणवाद ॥ ५ ॥ गुणवाद ज्याचे गातां पूज्य झाले । बडिवार बोले कोण त्याचा ॥ ६ ॥ त्याचा नाहीं पार कळला वेदांसी । आणीकही ऋषि विचारितां ॥ ७ ॥ विचारितां तैसा होय त्यांच्या भावें । निजरूप (निजसुख) ठावें नाहीं कोणा ॥ ८ ॥ कोणा कवतुक न कळे हे माव । निजलीया जीव करी धंदा ॥ ९ ॥ करूनि कवतुक खेळे हाचि लीळा । व्यापूनी वेगळा पाहातसे ॥ १० ॥ शेवटीं आपण एकलाचि (वेगळाचि) खरा । सोंग हा पसारा नट केला ॥ ११ ॥ लावियेलें चाळा मीपणें हें जन । भोग तया कोण भोगवितो ॥ १२ ॥ विषयीं गुंतलीं विसरलीं तुज । कन्या पुत्र भाज धनलोभें ॥ १३ ॥ लोभें गिळी फांसा आमिषाच्या आशा । सांपडोनी मासा तळमळी ॥ १४ ॥ तळमळ त्यांची तरीच शमेल । जरी हा विठ्ठल आठविती ॥ १५ ॥ आठवे तरी देव संतांच्या सांगातें । किंवा हें संचित जन्मांतर ॥ १६ ॥ जन्मांतरें तीन भोगितां कळती । केलें तें पावती करितां पुढें ॥ १७ ॥ पुढें जाणोनियां करावें संचित । पूजावे अतीत देव द्विज ॥ १८ ॥ जन्म तुटे ऐसें नव्हे तुम्हां जनां । पुढिल्या पावना धर्म करा ॥ १९ ॥ करा जप तप अनुष्ठान याग । संतीं जे मारग स्थापियेले ॥ २० ॥ लावियेलीं कर्मे (कर्मां) शुद्ध आचरणें । कोणा एका जन्मीं केलें पावे ॥ २१ ॥ पावले सत्वर निष्काम उद्धार । जिंकिली अपार वासना हे ॥ २२ ॥ वासनेचें मूळ छेदिल्या-वांचून । तरलोंसें कोणी न म्हणावें ॥ २३ ॥ न म्हणावें झालों पंडित वाचक । करुनि मंत्रघोष अक्षरांचा ॥ २४ ॥ चाळविलीं एकें तेचि आवडीनें । लोक दंभमानें देहसुखें ॥ २५ ॥ सुख तरीच घेडे भजनाचें सार । वाचे निरंतर रामनाम ॥ २६ ॥ राम हा उच्चार तरीच बैसे वाचे । अनंता जन्मांचें

पायांजवळ माझें चित्त जडलें म्हणून मी त्याच्याच नांवाचा सोस करतों २. मी संसारामध्यें असून रामकृष्णहरि ह्या नांवाची हांव करीत आहें ३. ह्या नामाच्या बरोबरीला तपतीर्थादि साधनें येणार नाहींत ४. जे हरीचे गुण वर्णन करितात त्या संतांची पायधूळ तीर्थें देखील वंदन करितात ५. ज्याचे गुण गाऊन संत ह्या योग्यतेस आले, त्या देवाचें सामर्थ्य, कोणीं वर्णन करावें ? ६, तें वर्णन करण्याविषयीं पुष्कळ ऋषि विचार करितात; पण त्याचा पार वेदांस देखील लागला नाहीं, मग त्यांस कसा लागेल ? ७. देवाचें मूळचें स्वरूप कोणास माहीत नाहीं. तो देव एकभावानें ज्याच्या त्याच्या सारखा होतो ८. देवाचें कौतुक व माया कोणासहि समजत नाहीं. तो देव सर्व जीव निजले असतांहि उद्योग करीत असतो ९. कौतुकानें सर्व खेळ करून तोच एक खेळत आहे आणि सर्व जगामध्यें व्यापून अलिप्तपणानें जगाचा व्यवहार पाहातो आहे १०. बहुरूप्याप्रमाणें सोंग धरून देवानें सर्व पसारा वाढविला आहे; आणि तो अखेरीस आपण खरोखर वेगळा आहे ११. मी देह आणि देहसंबंधीं माझें ह्या अभिमानाच्या छंदांत लोक गुंतले आहेत, म्हणून संचितकर्मांचे भोग त्यांना भोगावयास लावणारा देवाशिवाय दुसरा कोण आहे ? १२. बायकामुलें व द्रव्य ह्या विषयांच्या लोभांत गुंतल्यामुळें हे लोक देवास विसरून गेले १३. गोड खाण्याच्या आशेनें मासा आमिषाचा घांस खात असतां घशांत गळ अडकला जातो, मग तो अति दुःखानें तळमळतो; तशी ह्या लोकांची वर्तणूक आहे १४. एक विठोबाचा आठव केला तरच सर्व लोकांची तळमळ नाहींशी होईल १५. एक संतांच्या संगतीनें अथवा मागील अनेक जन्मांचा पुण्यसंचय असेल तरच देवाचें स्मरण होईल १६. हल्लींच्या सुखदुःखाचे भोगांवरून लोकांस तीन जन्मांचें ज्ञान होतें. तें असें, कीं मागील जन्मीं जें केलें असेल तें ह्या जन्मीं व हल्लीं केलें तें पुढील जन्मीं भोगावें लागतें १७. असें समजून देव, ब्राह्मण, अतिथि ह्यांची पूजा करून पुण्याचा संचय करावा १८. गर्भवास नाहींसे करणें तुमच्या हातून होणार नाहीं, पण पुढें चांगला जन्म मिळावा ह्याकरितां धर्मानें वागणूक करा १९. जप, तप, अनुष्ठानादि ज्या वाटा संतांनीं दाखविल्या आहेत त्या वाटांनीं चालावें २०. चांगल्या कर्मांच्या वागणुकीनें चाललें असतां तें केलेलें पुण्य कोणत्या तरी एखाद्या जन्मीं उपयोगीं पडेल २१. निष्काम कर्मांचें पुण्य जर केलें तर त्याचा तात्काळ उद्धार होईल, पण सकामनेच्या वासनेनें पुष्कळ लोक जिंकले गेले २२. मूळासुद्धां वासना नाहींशी केल्याशिवाय आम्ही तरलों असें कोणींहि म्हणूं नये २३. वेदाक्षरें पाठ करून आम्ही पंडित झालों असें तुमचें म्हणणें व्यर्थ आहे २४. ह्याच प्रकारच्या अभिमानानें कितीएकांस फसविलें. दंभ, मान वाढवून आपल्या देहास सुख लागावें अशी इच्छा करितात २५. एक श्रीहरीचें सर्व काळ नामस्मरण वाचेनें केलें असतां

पुण्य होय ॥ २७ ॥ पुण्य ऐसें काय रामनामापुढें । काय ते बापुडे यागयज्ञ ॥ २८ ॥ यागयज्ञ तपें संसारदायकें । न सुटे (न तुटती) एके नामेंविण ॥ २९ ॥ नामेंविण भवसिंधु पावे पार । ऐसा हा विचार नाहीं दुजा ॥ ३० ॥ जाणती हे भक्तराज महामुनि । नाम सुखधणी अमृताची ॥ ३१ ॥ अमृताचें सार निज तत्त्व बीज । गुह्यांचें तें गुज रामनाम ॥ ३२ ॥ नामें असंख्यात तारिले अपार । पुराणीं हें सार प्रसिद्ध हो ॥ ३३ ॥ हेंचि सुख आम्ही घेऊं सर्वकाळ । करूं हे निर्मळ हरिकथा ॥ ३४ ॥ कथाकाळीं लागे सकळां समाधि । तात्काळ हे बुद्धि दुष्ट नासे ॥ ३५ ॥ नासे लोभ मोहो आशा तृष्णा माया । गातां गुण तया विठोबाचे ॥ ३६ ॥ विठोबाचे गुण मज आवडती । आणीक हें चित्तीं न लगे कांहीं ॥ ३७ ॥ कांहीं कोणी नका सांगों हे (हा) उपाव । माझ्या मनीं भाव नाहीं दुजा ॥ ३८ ॥ जाणोनियां आम्हीं दिला जीवभाव । दृढ याचे पाव धरियेले ॥ ३९ ॥ धरियेले आतां न सोडीं जीवेंसीं । केला येचविशीं निरधार (केला हा सेवेसी निरधार) ॥ ४० ॥ निरधारें आम्ही राहिलों या (ये) नेटीं । संसार (संवसार) तुटी करूनियां ॥ ४१ ॥ येणें अंगीकार केला पांडुरंगें । रंगविलों रंगें आपुलिया ॥ ४२ ॥ आपुली पाखर घालूनियां वरी । आम्हांसी तो करी यत्न देव ॥ ४३ ॥ देव राखे तया आणिकांचें काय । करितां उपाय चाले तेथें ॥ ४४ ॥ तेथें नाहीं रिघ कळिकाळासी येतां । दास म्हणवितां विठोबाचे ॥ ४५ ॥ विठोबाचे आम्ही लाडके डिंगर । कांपती असुर काळ धाकें ॥ ४६ ॥ धाक तिहीं लोकीं जयाचा दरारा । स्मरण हें करा त्याचें तुम्ही ॥ ४७ ॥ तुम्ही निदसुरे नका राहूं कोणी । चुकवा जाचणी गर्भवास ॥ ४८ ॥ गर्भवासदुःख यमाचें दंडण । थोर होय शीण येतां जातां ॥ ४९ ॥ तान भूक पीडा जीतां ते आघात । मेल्या यमदूत जाच करिती ॥ ५० ॥ जाच करिती हें कोणा आहे ठावें । नरकीं कौरवें बुडी दिली ॥ ५१ ॥ बुडी दिली कुंभपाकीं दुर्योधनें ।

खऱ्या सुखाची प्राप्ति होईल २६. निष्काम कर्माचें पुण्य अनंत जन्मांचें जर असेल तर त्याच्या वाचेला रामनाम येईल २७. रामनामासारखें दुसरें पुण्य नाहीं. ह्यापुढें यज्ञयागादि साधनें तुच्छ आहेत २८. कारण याग, यज्ञ, तपादि साधनें केलीं असतां संसारच मिळणार आहे आणि त्यापासून एका हरिनामाखेरीज सुटका होणार नाहीं २९. संसारसमुद्रांतून तरून जाण्याविषयीं एक नामरूपी नौका आहे. तीवांचून दुसरे विचार व्यर्थ आहेत ३०. एक श्रीहरीच्या नामामृताची गोडी भक्तराज जाणतात. त्यावांचून दुसऱ्यास ती माहीत नाहीं ३१. नाम हें अमृताचें सार असून निजस्वरूपाचें बीज आहे व सर्व गुह्यांमध्यें गुह्य आहे ३२. हरिनामाच्या योगानें पुष्कळ लोकांचा उद्धार झाला त्याची गणती नाहीं, असें पुराणांनीं वर्णन केलें आहे ३३. म्हणून आम्ही सर्व काळ त्या नामाचें सुख भोगण्याकरितां श्रीहरीची निर्मळ कथा करूं ३४. जे कोणी श्रीहरीची कथा करतील त्यांच्या वाईट वासनेचा नाश होऊन त्यांना तात्काळ समाधिसुख भोगावयास मिळेल ३५. विठोबारायाचे गुण गाइले असतां आशा, तृष्णा, माया, लोभ, मोह वगैरे सर्व विकारांचा नाश होईल ३६. विठोबाचे गुण मला फार आवडले आहेत, म्हणून त्यावांचून माझ्या चित्तांत दुसरें कांहीं नाहीं ३७. दुसरा भाव माझ्या मनांत नसल्यामुळें एका नामावांचून मला अन्य उपाय कोणी सांगूं नका ३८. असें समजून विठोबारायाचे पाय आम्हीं बळकट धरिले आहेत आणि आपला जीवभाव तेथें अर्पण केला आहे ३९. बळकटपणानें जे पाय धरिले ते आतां मी कधींहि सोडणार नाहीं. मग जीव जरी गेला तरी सेवेविषयीं माझा हाच निर्धार आहे ४०. सर्व संसाराचा नाश करून एक देवाची सेवा करावी ह्या निर्धारानें आम्ही राहिलों आहोंत ४१. पांडुरंगानें माझा अंगीकार करून त्यानें आपल्या रंगांत मला रंगविलें आहे ४२. आपली कृपा आम्हांवर करून तो देव आमचा सांभाळ करीत आहे ४३. ज्याला देव सांभाळतो त्यावर कांहीं विघ्न करण्याचा उपाय कोणाचा चालेल काय? ४४. जर आपण विठोबारायाचे दास म्हणविलें तर तेथें कळिकाळाचा देखील रिघाव होणार नाहीं ४५. आम्ही विठोबारायाचे लाडके सेवक आहोंत म्हणून आम्हांला पाहून असुर कळिकाळ हे थरथरां कांपत आहेत ४६. त्रैलोक्यामध्यें ज्या देवाचा धाक दरारा आहे त्याचें तुम्ही सर्व काळ स्मरण करा ४७. विनाकारण झोंपेमध्यें गुंतूं नका. नामस्मरण करून यमाची जाचणी व गर्भवासाचें दुःख नाहींसें करा ४८. जन्ममृत्यूच्या येरझारांनीं व यमयातनेच्या थोर दुःखानें लोक फार श्रमी झाले आहेत ४९. जिवंत असतेवेळीं तहानभुकेची पीडा होत आहे, व मेल्यावर यमदूत जाच करीत आहेत ५०. मेल्यावर यमाचा जाच होतो कीं नाहीं हें कोणास माहीत आहे

दाविना लाजेनें मुख धर्मा ॥ ५२ ॥ धर्म हा कृपाळू आलासे जवळी । बैसला पाताळीं वरी न ये ॥ ५३ ॥ न नये वरी कांहीं करितां उपाव । भोगवितो देव ज्याचें (त्याचें) त्यासी ॥ ५४ ॥ त्यासी अभिमान गर्व या देहाचा । नुच्चारिती वाचा नारायण ॥ ५५ ॥ नारायण जे विसरले संवसारीं । तयांसी अघोरीं वास सत्य ॥ ५६ ॥ सत्य मानूनियां संतांच्या वचना । जा रे नारायणा शरण तुम्ही ॥ ५७ ॥ तुन्ही नका मानूं कोणाचा विश्वास । पुत्र पत्नी आस धन वित्त ॥ ५८ ॥ धन वित्त लोभ माया मोहपाश । मांडियेले फांसे यमदूतीं ॥ ५९ ॥ दूतीं याच्या मुखा केलेंसे कुडण । वाचे नारायण येऊं नेदी ॥ ६० ॥ नेदी शुद्धबुद्धि आतळों चित्तासी । नाना कर्मे त्यासी दुरावती ॥ ६१ ॥ दुराविलीं एकें जाणतींच फार । निंदा अहंकार वादभेद ॥ ६२ ॥ वादभेद निंदा हे फंद काळाचे । गोंवितील वाचे रिकामिकें ॥ ६३ ॥ रिकामिक देहा होय नव्हे मना । चिंतेचिये घाणा जुंपिजेसी ॥ ६४ ॥ शेवटीं हे गळां लावूनियां दोरी । सांभाळीये करीं वासनेच्या ॥ ६५ ॥ वासनेचा संग होय अंतकाळीं । तरी तपोबळी जन्म धरी ॥ ६६ ॥ धरूनियां देव राहतील चित्तीं । आधींचिया गति आठवाया (आधींलियां गती आठवावा) ॥ ६७ ॥ आठवावा देव मरणाचे काळीं । म्हणऊनी बळी जीव दिले ॥ ६८ ॥ दिले टाकूनियां भोग ऋषेश्वरीं । खाती वनांतरीं कंदमुळें ॥ ६९ ॥ मुळें सुखाचिया देव अंतरला । अल्पासाठीं नेला अधोगती ॥ ७० ॥ गति हे उत्तम व्हावया उपाव । आहे धरा पाव विठोबाचे ॥ ७१ ॥ विठोबाचे पायीं राहिलिया भावें । न लगे कोठें जावें वनांतरा ॥ ७२ ॥ तरती दुबळीं विठोबाच्या नांवें । संचित ज्या सवें नाहीं शुद्ध ॥ ७३ ॥ शुद्ध तरे याचें (तरायाचें) काय तें नवल । म्हणतां विठ्ठल वेळोवेळां ॥ ७४ ॥ वेळकाळ नाहीं कवणाचे हातीं । न कळे हे गति भविष्याची ॥ ७५ ॥ भविष्य

असें लोकांचें म्हणणें आहे. त्याला प्रमाण भारतांतील इतिहास कौरव नरकांत पडल्या वेळचा आहे ५१. पूर्वदेहाचा अभिमान आठवून दुर्योधनास लाज वाटल्यामुळें त्यानें धर्मराजाला तोंड न दाखवितां तो नरकांत लपून बसला ५२. धर्मराजा कृपाळु असल्यामुळें त्याच्या जवळ आला, पण तो दुर्योधन खालीं गेला. तो लाजेनें वर येईनासा झाला ५३. धर्मराजानें पुष्कळ उपाय केले पण त्याचें संचितकर्म त्यास देव भोगवीत आहे ५४. त्या दुर्योधनाला आपला देहाभिमान असल्यामुळें त्यानें नारायण ह्या नांवाचा उच्चार केला नाहीं ५५. संसाराला येऊन जे नारायणास विसरले त्यांना अघोर नरकांत खरोखर वास करावा लागतो ५६. हें संतांचें बोलणें खरें मानून तुम्हीं नारायणास शरण जावें हें बरें ५७. त्या नारायणावांचून कोणाचा भरंवसा मानूं नका व बायका, मुलें, द्रव्य ह्यांच्या लोभामध्यें व्यर्थ गुंतून पडूं नका ५८. ह्या धनाचा लोभ व सर्व गोतांचा मोह हे यमदूतांचे फांसे आहेत ते त्यांनीं तुमच्यावर घातले आहेत ५९. अंतकाळीं यमदूत येऊन लोकांची वाचा बंद करितात. त्यांच्या मुखाला नांव घेऊं देत नाहींत ६०. अनेक प्रकारचीं केलेलीं वाईट कर्मे तीं त्यांच्या चित्तामध्यें चांगली बुद्धि उत्पन्न होऊं देत नाहींत, म्हणून ते देवास अंतरले ६१. बहुतकरून जाणते लोक तर फारच अंतरले, कारण त्यांच्या अंगीं अभिमान असून ते भेदात्मक वाद आणि निंदा करितात ६२. वाद, भेद, निंदा हीं सर्व काळाच्या चेष्टा आहेत. त्या योगानें लोक व्यर्थ वाचा शिणवितात ६३. एक वेळ देहास रिकामपणा होतो पण मनास कधींहि होत नाहीं, कारण तें चितारूपी घाण्यास जुंपलें आहे ६४. मरणसमयास देखील वासनेची दोरी गळ्याला लावून अनेक योनींमध्यें घालविणारें मनच आहे ६५. मोठ्या तपश्चर्येचें बळ जरी अंगीं असलें तरी अखेरीस जशी वासना उत्पन्न होईल तसा त्यास जन्म होतो ६६. ह्याकरितां अशा गतीची आठवण करून कित्येक लोक चित्तामध्यें अगोदर देव धरून राहिले आहेत ६७. मरणसमयास देवाची आठवण व्हावी म्हणून मोठ्या पराक्रमी लोकांनीं देखील प्राण खर्च केले ६८. त्याकरितांच ऋषि मंडळी सर्व भोग वगैरे टाकून रानामध्यें जाऊन कंदमुळें, पाला खात बसली आहेत ६९. कित्येक लोक संसारसुखामध्यें गुंतल्यामुळें देवास अंतरले. अशा थोड्या लाभाकरितां अखेरीस नरकामध्यें गेले ७०. चांगली गति होण्याचा उपाय आहे तो असा, कीं विठोबाच्या पायांचें ध्यान चित्तामध्यें करावें ७१. जर विठोबाच्या पायीं भाव राहिला तर त्याला आहार टाकून कोठें रानांत वगैरे जाणें नको ७२. पूर्वीचें संचितकर्म जरी वाईट असलें तरी ते अभागी लोक एका विठोबारायाच्या नामानें उद्धरतील ७३. मग नामस्मरणानें ज्यांचें संचितकर्म चांगलें आहे त्यांचा उद्धार होईल ह्यांत कांहीं नवल आहे काय ? ७४. काळाची गति कोणाच्या स्वाधीन नाहीं व पुढील होणारें भविष्य कोणासहि समजत नाहीं ७५. तें प्रारब्ध

न सुटे भोगिल्यावांचूनि । संचित जाणोनी शुद्ध करा ॥ ७६ ॥ करावे सायास आपुल्या हिताचे। येथें आलियाचें मनुष्यपण ॥ ७७ ॥ मनुष्यपण तरी साधी नारायण । नाहीं तरी हीन पशूहूनी ॥ ७८ ॥ पशु पाप पुण्य काय ते (हे) जाणती । मनुष्या या रीती ठाउकिया ॥ ७९ ॥ ठाउकें हें असे पापपुण्य लोकां । देखतील एका भोगितिया ॥ ८० ॥ भोगितील एक दुःख संवसारीं । काय सांगों परी वेगळाल्या ॥ ८१ ॥ ल्यावें खावें बरें असावें सदैव । हेचि करी हांव संवसारीं ॥ ८२ ॥ संवसारें जन गिळिले सकळ । भोगतील फळें गर्भवास ॥ ८३ ॥ वासनेचें मूळ छेदिल्यावांचून । नव्हे या खंडण गर्भवास ॥ ८४ ॥ सायास केलियावांचूनी तें नाहीं । भोगावरी (भविष्यावरी) कांहीं घालूं नये ॥ ८५ ॥ नये बळें धड घालूं कांट्यावरी । जाये जीवें धरी सर्प हातीं ॥ ८६ ॥ हातीं आहे हित करील तयासी । म्हणउनि ऋषीं सांगितलें ॥ ८७ ॥ सांगती या लोकां (सांगितलें लोकां) फजित करूनी । आपण जे कोणी तरले ते ॥ ८८ ॥ तेणें वाळवंटीं उभारिला कर । कृपेचा सागर पांडुरंग ॥ ८९ ॥ गंगा चरणीं करी पातकांची धुनी । पाउलें तीं मनीं चिंतिलिया ॥ ९० ॥ चिंतनें जयाच्या तारिले (तरती) पाषाण । उद्धरिले (उद्धरी) चरण लावूनियां ॥ ९१ ॥ लावूनियां टाळी न लगे बैसावें । प्रेमसुख घ्यावें संतसंगें ॥ ९२ ॥ संतसंगें कथा करावें कीर्तन । सुखाचें साधन रामनाम ॥ ९३ ॥ मग कोठें देव जाऊं न सके दुरी । बैसोनी भीतरीं कंठीं राहे ॥ ९४ ॥ राहे व्यापुनीयां सकळ शरीर । आपुला विसर पडों नेदी ॥ ९५ ॥ नेदी दुःख देखों आपुलिया दासा । वारी गर्भवासा यमदूता ॥ ९६ ॥ तान भूक त्यासी वाहों नेदी चिंता । दुश्चिंत हे घेतां नाम होती ॥ ९७ ॥ होती जीव त्यांचे सकळ ही जंत । परि ते अंकित संचिताचे ॥ ९८ ॥ चेवले जे कोणी देहअभिमानें । त्यांसी नारायणें कृपा केली ॥ ९९ ॥ कृपाळु हा देव अनाथा कोंवसा । आम्हीं त्याच्या आशा लागलोंसों ॥ १०० ॥

भोगल्यावांचून सुटत नाहीं असें समजून चांगल्या पुण्याचा संचय करावा ७६. आपलें हित होण्याविषयीं जर चांगले उपाय केले तर मनुष्यजन्माला आल्याचें सार्थक झालें ७७. जर मनुष्यदेहामध्यें देवाची प्राप्ति करून घेतली तर तें उत्तम. नाहींपेक्षां मनुष्यें जनावराहूनहि नीच आहेत असें समजावें ७८. कारण, जनावरें कांहीं पापपुण्य जाणत नाहींत आणि ते सर्व प्रकार मनुष्यांस माहीत आहेत ७९. पापपुण्य हें मनुष्यांस माहीत आहे आणि त्याची चांगली वाईट बाधा दुसऱ्यास होते ती दिसते ८०. कित्येक लोक संसारामध्यें दुःख भोगतात. त्याचे प्रकार वेगळाले काय सांगावयाचे आहेत ! ८१. संसारास येऊन चांगले अलंकार, वस्त्रें व उत्तम पक्वान्न खाण्यास असावें आणि आपण भाग्यवान् व्हावें, असा सर्वांचा हेतु आहे ८२. ह्याप्रमाणें सर्व लोक संसारानें गिळले आहेत. अखेरीस गर्भवासाचें दुःख भोगावें हेंच फळ त्यांना मिळतें ८३. मुळासुद्धां वासना नाहींशी केल्याशिवाय जन्ममृत्यूचें खंडन होणार नाहीं ८४. आमच्या प्रारब्धीं असेल तर होईल असें कोणीं म्हणूं नये. सायास केल्यावांचून देवाची प्राप्ति होणार नाहीं ८५. प्रारब्धासारखें होईल असें म्हणून धड पांघरूण कोणी कांट्यावर घालतो कीं काय? अथवा जिवंत सर्प कोणी धरील कीं काय? ८६. ह्याकरितां प्रारब्ध आड न करितां कोणीहि आपलें हित करील तर तें त्याच्या स्वाधीन आहे असें ऋषींनीं वर्णन केलें आहे ८७. जे कोणी मुक्त झाले त्यांनीं आपल्यासारखें आचरण करा म्हणून लोकांस रागें भरून सांगितलें आहे ८८. पांडुरंग लोकांस बोलावण्याकरितां हात उभारून वाळवंटांत उभा आहे. तो केवळ कृपेचा समुद्र आहे ८९. ज्याच्या चरणांपासून पातकांचा नाश करणारी गंगा उत्पन्न झाली आहे त्या चरणांचें मनांत चिंतन करावें ९०. ज्याचे चरण लागून समुद्रावर दगड देखील तरले त्यानें आपलें चिंतन करणाराचा उद्धार केला ९१. ह्याकरितां कोणी तोंड बंद करून मौन्य-पणानें बसूं नये. सर्व काळ संतांच्या संगतीनें प्रेमसुख घ्यावें ९२. संतांच्या संगतीनें नामसंकीर्तन करावें, हें साधन सुखाचें आहे ९३. ह्या योगानें देव कोठें दूर जात नाहीं. तो आपल्या हृदयांत सर्व काळ राहातो ९४. सर्व अंगांमध्यें देवाचा संचार होतो आणि तो दासाला आपला विसर पडूं देत नाहीं ९५. देव आपल्या भक्तांस कोणत्याहि प्रकारचें दुःख होऊं देत नाहीं व यमदूतापासून आणि गर्भवासापासून सोडवितो ९६. त्या भक्तांना तहानभुकेविषयींची काळजी करूं देत नाहीं, कारण ते नाम घेतांना संकोचित होतील म्हणून ९७. सर्व जीवजंतु देवाचेच आहेत, पण ते संचित कर्माच्या अंकित झाल्यामुळें त्यास अंतरले ९८. मी देही व देहसंबंधीं माझें हा अभिमान ज्यांनीं टाकला त्यांच्यावर नारायण कृपा करीत आहे ९९. हा देव दीनजनांविषयीं कृपेचें घर आहे, म्हणून त्याच्या आशेला आम्ही गुंतलों आहोंत १००.

लावियेलें कासे येणें पांडुरंगें । तुका म्हणे संगें भक्तांचिया (संतांचिया) ॥ १०१ ॥ [३९३६]

: तुकोबास कवित्व करण्याविषयीं दृष्टांत :

नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें । सवें पांडुरंगें येऊनियां ॥ १ ॥ सांगितलें काम करावें कवित्व । वाउगें निमित्य बोलों नको ॥ २ ॥ माप टाकी सळ (सळे) धरिली विठ्ठलें । थापटोनी केलें सावधान ॥ ३ ॥ प्रमाणाची संख्या सांगे शत कोटी । उरले ते शेवटीं लावी तुका ॥ ४ ॥ [३९३७]

द्याल ठाव तरी राहेन संगती । संतांचे पंगती पायांपाशीं ॥ १ ॥ आवडीचा ठाव आलोंसें टाकून । आतां उदासीन न धरावें ॥ २ ॥ शेवटील स्थळ नीच माझी वृत्ति । आधारें विश्रांती पावईन ॥ ३ ॥ नामदेवापायीं तुक्या स्वप्नीं भेटी । प्रसाद हा पोटीं राहिलासे ॥ ४ ॥ [३९३८]

: संतांनीं तुकोबास विचारलें, कीं तुम्हांस वैराग्य कसें झालें त्याचें उत्तर :

याती शूद्र वंश केला वेवसाव । आदि तो हा देव कुळपूज्य ॥ १ ॥ नये बोलों परि पाळिलें वचन । केलियाचा प्रश्न तुम्हीं संतीं ॥ २ ॥ संवसारें जालों अतिदुःखें दुःखी । मायबाप सेखीं क्रमिलिया ॥ ३ ॥ दुष्काळें आटिलें द्रव्य नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली ॥ ४ ॥ लज्जा वाटे जीव त्रासलों या दुःखें । वेवसाव देखें तुटी येतां ॥ ५ ॥ देवाचें देऊळ होतें जें भंगलें । चित्तासी तें आलें करावेंसें ॥ ६ ॥ आरंभीं कीर्तन करीं एकादशी । नव्हतें अभ्यासीं चित्त आधीं ॥ ७ ॥ कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें । विश्वासें आदरें करोनियां ॥ ८ ॥ गाती पुढें त्यांचें धरावें ध्रुपद । भावें चित्त शुद्ध करोनियां ॥ ९ ॥ संतांचें सेविलें तीर्थ पायवणी । लाज नाहीं मनीं येऊं दिली ॥ १० ॥ टाकला तो कांहीं केला उपकार । केलें हें शरीर कष्टवूनी ॥ ११ ॥ वचन मानिलें नाहीं सुहृदांचें ।

तुकाराम महाराज म्हणतात, ह्या पांडुरंगानें भवसागरांतून तारून नेण्याच्या आशेमध्यें आम्हांला गुंतवून आम्हांला भक्तजनांच्या स्वाधीन केलें आहे १०१. [३९३६]

पांडुरंगासहवर्तमान नामदेव स्वप्नामध्यें येऊन त्यांनीं मला स्वप्नांत जागें केलें १. आणि कवित्व कर, व्यर्थ कांहीं बोलूं नकोस, हें काम सांगितलें २. माप करते वेळीं हिशेब विठ्ठलांनीं ठेवून विठ्ठलांनीं थापटून सावध केलें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी शंभर कोटि अभंग करण्याचा संकल्प केला होता त्यांपैकीं शहाण्णव कोटि झाले व राहिलेले चार कोटि तूं करून संकल्प पूर्ण कर, असें नामदेवानें स्वप्नांत सांगितलें ४. [३९३७]

तुम्हीं आश्रय दिला तर तुमच्या संगतीनें राहीन व संतांच्या पंगतींत पायांजवळ आश्रय करीन १. प्रीतीच्या ठिकाणीं मी येऊन दाखल झालों आहें. आतां निराश करूं नये २. मी कनिष्ठ प्रतीचा असून माझा धंदाहि हलका आहे, परंतु तुमच्या आश्रयानें मी विश्रांतीला पावेन ३. तुकाराम महाराज म्हणतात, नामदेवाची स्वप्नामध्यें भेट झाल्यामुळें हृदयामध्यें कवित्वस्फूर्तीचा प्रसाद झाला आहे ४. [३९३८]

माझी जात शूद्र आहे आणि मीं धंदा वाण्याचा केला. मूळचाच कुळामध्यें पांडुरंग देव पूज्य होता १. ही गोष्ट बोलण्याची नाहीं, पण तुम्हीं संतांनीं प्रश्न केला म्हणून उत्तर दिलें २. संसाराच्या दुःखानें अति दुःखी झालों. अखेरीस आईबापहि निवर्तले ३. दुष्काळाच्या योगानें पैसे नाहींसे झाले. त्यामुळें मानहि गेला व त्या योगानें एक बायको अन्नान्न करून मेली ४. ह्या दुःखानें जीव अतिशय त्रासला व अति लाज वाटूं लागली व धंद्यामध्येंहि तोटा येतो असें पाहिलें ५. जें देवाचें देऊळ भंगलें (उकललें) होतें तें नीट करावें अशी इच्छा चित्तांत उत्पन्न झाली ६. त्या देवळांत एकादशीचे दिवशीं प्रथम कीर्तन केलें, पण त्या वेळेस कीर्तनाचा अभ्यास चित्ताला नव्हता त्यामुळें तें साधारण झालें ७. म्हणून विश्वासानें आणि मोठ्या आदरानें कांहीं संतांचीं वाक्यें पाठ केलीं ८. जे वारकरी संत कीर्तनांत अभंगादि गात असत त्यांच्या मागें भावानें चित्त शुद्ध करून मी ध्रुपद म्हणत असें ९. संतांच्या पायांचें तीर्थ सेवन केलें. त्याबद्दल मनांत कांहीं लज्जा येऊं दिली नाहीं १०. घडेल तेवढा कांहीं दुसऱ्यावर उपकार केला आणि असें करण्यांतच शरीर कष्टविलें ११.

समूळ प्रपंचें वीट आला ॥ १२ ॥ सत्यअसत्यासी मन केलें ग्वाही। मानियेलें नाहीं बहुमत (बहुमतां) ॥ १३ ॥ मानियेला स्वामी (स्वप्नीं) गुरूचा उपदेश। धरिला विश्वास दृढ नामीं ॥ १४ ॥ यावरी या झाली कवित्वाची स्फूर्ति। पाय धरिले चित्तीं विठोबाचे ॥ १५ ॥ निषेधाचा कांहीं पडिला आघात। तेणें मध्यें चित्त दुखविलें ॥ १६ ॥ बुडविल्या वह्या बैसलों धरणें। केलें नारायणें समाधान ॥ १७ ॥ विस्तारीं सांगतां बहुत प्रकार। होईल उशीर आतां पुरे ॥ १८ ॥ आतां आहे तैसा दिसतो विचार। पुढील प्रकार देव जाणे ॥ १९ ॥ भक्तां नारायण नुपेक्षी सर्वथा। कृपावंत ऐसा कळों आलें ॥ २० ॥ तुका म्हणे माझें सर्व भांडवल। बोलविले बोल पांडुरंगें ॥ २१ ॥ [३९३९]

ऐका वचन हें संत। मी तों आगळा पतित। काय काजें प्रीत। करीतसां आदरें ॥ १ ॥ माझें चित्त मज ग्वाही। सत्य तरलों मी नाहीं। एकाचिये वाहीं। एक देखी मानिती ॥ २ ॥ बहु पीडिलों संसारें। मोडीं पुसें (पिसें) पिटीं ढोरें। न पडतां पुरें। या विचारें राहिलों ॥ ३ ॥ सहज सरलें होतें कांहीं। द्रव्य थोडें बहु तेंही। त्याग केला नाहीं। दिलें द्विजां याचकां ॥ ४ ॥ प्रिया पुत्र बंधु। यांचा तोडिला संबंधु। सहज जालों मंदु। भाग्यहीन करंटा ॥ ५ ॥ तोंड न दाखवे जना। शिरें सांदी भरें राना। एकांत तो जाणा। तयासाठीं लागला ॥ ६ ॥ पोटें पिटिलों काहारें। दया नाहीं या विचारें। बोलावितां बरें। सहज म्हणे यासाठीं ॥ ७ ॥ सहज वडिलां होती सेवा। म्हणोनि पूजितों या देवा। तुका म्हणे भावा-। साठीं झणीं घ्या कोणी ॥ ८ ॥ [३९४०]

बरें झालें देवा निघालें दिवाळें। बरी या दुष्काळें पीडा केली ॥ १ ॥ अनुतापें तुझें राहिलें चिंतन। झाला हा वमन संवसार ॥ २ ॥ बरें झालें देवा बाईल कर्कशा। बरी हे दुर्दशा जनामध्यें

आपल्या आप्तसंबंध्यांचें सांगणें मानलें नाहीं. संसाराविषयीं चित्तास पूर्ण वीट आला १२. खऱ्या खोट्याबद्दल मनालाच साक्षी ठेवलें व अनेक मतांचा स्वीकार केला नाहीं १३. स्वप्नामध्यें गुरूनें (बाबाजी स्वामींनीं) केलेल्या उपदेशाचा स्वीकार करून हरिनामाच्या ठिकाणीं दृढ विश्वास ठेविला १४. ह्यानंतर कविता करण्याची स्फूर्ति झाली व विठोबाचे पाय मीं चित्तांत धरले १५. मध्यंतरीं मीं शूद्र असतां केलेल्या कवित्वाचा रामेश्वरभट्टानें निषेध करून तें इंद्रायणीच्या पाण्यांत बुडविलें १६. ह्या पाण्यांत बुडविलेल्या वह्यांसाठीं मी तेरा दिवस निश्चक्री उपोषण केलें (उपोषण करीत धरणें धरून बसलों). त्या वेळीं नारायणानें येऊन माझ्या वह्या माझ्या हातीं देऊन माझें समाधान केलें १७. सविस्तर हकीगत सांगण्यांत पुष्कळ विषय वाढेल व त्या योगानें उशीर होईल, म्हणून आतां पुरे १८. आतांची स्थिति जी आहे ती उघड दिसतच आहे, येथून पुढचा प्रकार देवाला माहीत १९. नारायण हा भक्ताची सर्वथैव उपेक्षा करीत नाहीं. तो कृपावंत आहे, असें आम्हांला समजून चुकलें २०. तुकाराम महाराज म्हणतात, माझें सर्व भांडवल एक पांडुरंग आहे. त्यानें माझ्याकडून हे शब्द बोलविले २१. [३९३९]

अहो संत, मी तर विशेष पातकी पतित आहें असें असून कोणत्या कारणाकरितां तुम्ही मजवर आदरबुद्धीनें प्रीति करतां हें मला कळत नाहीं १. ह्याबद्दल माझें चित्त माझ्या ठिकाणीं साक्षी आहे, खरोखर मी तरलों नाहीं. एक मला मानीत आहे असें पाहून दुसरा मानतो २. संसाराच्या योगेंकरून फार पीडित झालों. औत काठीच्या वेळीं औत न ओढणाऱ्या बैलांना मारावें, त्यांच्या शेंपट्या पिळाव्या असेंहि करून संसाराचें भागेना. तेव्हां ह्या परमार्थाच्या विचारानेंच स्वस्थ राहिलों ३. साहाजिकच जें थोडेंबहुत द्रव्य होतें तें सरलें. मी होऊन तें द्रव्य ब्राह्मणांना अथवा याचकांना देऊन त्याचा त्याग केला नाहीं ४. बायको, मुलें व भाऊ ह्यांचा संबंध तोडून टाकला. अर्थात् साहाजिकच भाग्यहीन मतिमंद करंटा झालों ५. मग लोकांना तोंड दाखवावें असें वाटेना, म्हणून सांदीकोंपऱ्याला अगर रानांत जाऊन बसावें. एकांतसेवन ह्याकरितां करावें लागलें असें तुम्ही समजा ६. पोटाच्या त्रासानें पीडित झालों ह्यामुळें सहजच दया नाहींशी झाली. ह्याकरतांच कोणी जेवायला बोलाविलें तर बरें आहे असें म्हणत असें ७. तुकाराम महाराज म्हणतात, सहजच ह्या पांडुरंगाची सेवा करणें हा माझा व माझ्या वडिलांचा संप्रदाय होता, म्हणून मी देवाची सेवा करीत आहें, मोठ्या भावानें व भक्तीनें मी देवाची पूजा करीत आहें असें मात्र कोणी मानूं नये ८. [३९४०]

हे देवा, माझें दिवाळें निघालें हें फार चांगलें झालें व दुष्काळानें पीडा केली हेंहि चांगलें झालें १. कारण ह्या पश्चात्तापाच्या योगानें सहजच तुझें चिंतन करीत राहिलों आणि संसार हा वांतीप्रमाणें भासूं लागला २. हे देवा, बायको

॥ ३ ॥ बरें झालें जगीं पावलों अपमान । बरें गेलें धन ढोरें गुरें ॥ ४ ॥ बरें झालें नाहीं धरिली लोकलाज । बरा आलों तुज शरण देवा ॥ ५ ॥ बरें झालें तुझें केलें देवाईल । लेंकरें बाईल उपेक्षिलीं ॥ ६ ॥ तुका म्हणे बरें व्रत एकादशी । केलें उपवासीं जागरण ॥ ७ ॥ [३९४१]

बोलावा विठ्ठल पाहावा विठ्ठल । करावा विठ्ठल जीवभाव ॥ १ ॥ येणें सोसें मन झालें हांवभरी । परत माघारी घेत नाहीं ॥ २ ॥ बंधनापासूनी उकलली गांठी । देत आलें (देतां आली) मिठी सावकाश ॥ ३ ॥ तुका म्हणे देह भरिला विठ्ठलें । काम क्रोधें केलें घर रितें ॥ ४ ॥ [३९४२]

जग अवघें देव । मुख्य उपदेशाची ठेव ॥ १ ॥ आधीं आपणयां नासी । तरी उतरे ये कसीं ॥ २ ॥ ब्रह्मज्ञानाचें कोठार । तें या (हें) निश्चयें उत्तर ॥ ३ ॥ तुका म्हणे उन्मनी । नासकार या कारणीं (नाश कारया कारणीं) ॥ ४ ॥ [३९४३]

मीचि मज व्यालों । पोटा आपुलिया आलों ॥ १ ॥ आतां पुरले नवस । निरसोनी गेली आस ॥ २ ॥ झालों बारा बळी । गेलों मरोनी ते काळीं ॥ ३ ॥ दोहींकडे पाहे । तुका आहे तैसा आहे ॥ ४ ॥ [३९४४]

साधनाच्या कळा आकार आकृती । कारण नवनीति मंथनाचें ॥ १ ॥ पक्षीयासी नाहीं मार्गीं आडताळा । अंतरिक्षीं फळासीची पावे ॥ २ ॥ भक्तीची जोडी ते उखत्याचि साठीं । उणें पुरें तुटी तेथें नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आलें सांचत सांचणी । आजी आली धणी एकसरें ॥ ४ ॥ [३९४५]

नाहीं येथें वाणी । सकळां वर्णीं घ्यावी धणी ॥ १ ॥ झालें दर्पणाचें अंग । ज्याचा त्यासी

त्रासदायक मिळाली हेंहि चांगलें आहे आणि जगांत दुर्दशा होते हेंहि उत्तमच आहे ३. लोकांमध्यें जो अपमान झाला हेंहि चांगलें झालें व पैसा व गुरें हीं नाहींशीं झालीं हेंहि चांगलें झालें ४. हे देवा, लोकांची लाज धरली नाहीं व तुम्हांला शरण आलों हें फार चांगलें ५. हे देवा, तुझें देऊळ बांधलें व बायकामुलांचा त्याग केला हें बरें झालें ६. तुकाराम महाराज म्हणतात, एकादशीमुळें जागरण व उपास होतो, म्हणून हें व्रत चांगलें आहे ७. [३९४१]

विठ्ठल बोलावा व विठ्ठल पाहावा आणि विठ्ठलच जीवाभावानें प्रिय करावा १. ह्या सोसानेंच मन हांवभरी झालें आहे. तें तेथून संसाराकडे परत होत नाहीं २. संसारबंधनाच्या गांठी सुटल्यामुळें मोकळा झालों व त्या योगानें स्वस्थपणें हरीला मिठी मारतां आली ३. तुकाराम महाराज म्हणतात, अंतःकरण हें विठ्ठलस्वरूपानें भरून गेल्यामुळें कामक्रोधादि वृत्ति अंतःकरणांतून नाहींशा झाल्या ४. [३९४२]

सर्व जग हें देवाचें स्वरूपच आहे, हीच मुख्य उपनिषदांची किंवा गुरूची उपदेश करण्याची रीत आहे १. अगोदर तुझ्या ठिकाणीं मीपणा आहे त्याचा नाश कर, म्हणजे कसाला उतरशील २. ब्रह्मज्ञानाचें भांडार ह्याच वचनामध्यें निश्चयानें आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या ठिकाणीं कार्यकारणांचा नाश होतो त्या अवस्थेस उन्मनी असें म्हणतात ४. [३९४३]

स्वस्वरूप भावनेनें (मी ब्रह्म आहें ह्या भावनेनें) मी प्रगट झालों हेंच आपल्या पोटाला आपण येणें होय १. आतां माझे नवस पूर्ण झाले व सर्व आशा नाहींशी झाली २. ज्या वेळेस स्वात्मभावाच्या अनुभवानें उत्तम बलाढ्य झालों (बारा बळी म्हणजे जन्मल्या दिवसापासून बारशापर्यंतचे क्रमानें होणारे सर्व विधि माझे पूर्ण झाले) त्या वेळेस देहात्मबुद्धीनें मी मेला गेलों ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी आत्मस्वरूपाकडे व प्रपंचाकडे पाहात असल्यामुळें जसा आहें तसाच आहें ४. [३९४४)

वेद-शास्त्रांत सांगितलेलीं हरिप्राप्तीचीं अनेक प्रकारचीं साधनें कळाकुसरीनें करावयाचीं असतात, परंतु जसें मंथन करून नवनीत काढावयाचें तसें सर्व साधनांचें साध्य हरिच आहे १. एखाद्या उंच ठिकाणीं वृक्षास फळ असतें त्या ठिकाणीं पक्ष्यांस जाण्याला वाटेवर कोणी हरकत करीत नाहीं. ते एकदम त्या फळास जाऊन पोहोंचतात २. त्याप्रमाणें श्रीहरीच्या भक्तीनें त्याची प्राप्ति एकदम होते; त्यांत कांहीं कमीजास्त होऊन तूट होत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, आजपर्यंत पुण्याचा संचय सांचत आला त्याचा लाभ एकदम मला आज मिळाला. त्या योगानें मी तृप्त झालों ४. [३९४५]

ह्या ठिकाणीं कांहीं तोटा नाहीं, म्हणून उंच नीच सकळ वर्णांनीं आपली भक्तीविषयींची इच्छा पूर्ण करून घ्यावी १. हें केवळ आरशाच्या अंगाप्रमाणें आहे, म्हणून ज्याचा रंग जसा असेल तसें त्यास तें दृष्टीस पडेल.

दावी रंग ॥ २ ॥ एका भावाचा एकांत । पीक पिकला अनंत ॥ ३ ॥ तुका म्हणे दाणी । करी बैसोनी वांटणी ॥ ४ ॥ [३९४६]

ठेविलें जतन । करूनियां निज धन ॥ १ ॥ जयापासाव उत्पत्ति । तें हें बीज धरिलें हातीं ॥ २ ॥ निवडिलें वरळा भूस । सार आईन (आडून) जिन्नस ॥ ३ ॥ तुका म्हणे नारायण । भाग संचिताचा गुण ॥ ४ ॥ [३९४७]

भ्रमणा पाडलें वेंचिताती पाव । प्रवेशाचा ठाव एका द्वारें ॥ १ ॥ सार तीं पाउलें विठोबाचीं जीवीं । कोणीं न विसंबावीं क्षणभरी ॥ २ ॥ सुलभ हें केलें सकळां जीवन । फुंकावेची कान न लगे कांहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें सकळही कोड । पुरे मूळ खोड विस्ताराचें ॥ ४ ॥ [३९४८]

कांहीं जाणों नये पांडुरंगावीण । पाविजेल सीण संदेहानें ॥ १ ॥ भलतिया नांवें आठविला पिता । तरी तो जाणता कळवळा ॥ २ ॥ अहंकार जातो गोरवितां वाणी । सर्व गात्रां धणी हरिकथा ॥ ३ ॥ तुका म्हणे उपजे वेल्हाळ आवडी । करावा तो घडोघडी लाहो ॥ ४ ॥ [३९४९]

दाता तो (चि) एक जाणा । नारायण स्मरवी ॥ १ ॥ आणीक नाशिवंतें काय । न सरे हाय ज्यांच्यानें ॥ २ ॥ यावें तयां काकुलती । जे दाविती सुपंथ ॥ ३ ॥ तुका म्हणे उरी नुरे । त्याचे खरे उपकार ॥ ४ ॥ [३९५०]

: लोहगांवीं शिवाजीघर परचक्र आलें ते अभंग : देवास उद्गार :

न देखवे डोळां ऐसा हा आकांत । परपीडे चित्त दुःखी होतें ॥ १ ॥ काय तुम्ही येथें नसालसें जालें ।

(जशी भक्ति असेल तसें फळ मिळेल) २. देवाविषयींचा एक भाव धरणारी मंडळी पुष्कळ जरी एका ठिकाणीं मिळाली तरी तो एकान्तच समजावयाचा आणि त्या ठिकाणीं देवाचें पीक अगणित पिकतें ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्या पिकाची रास करून मी दान देणारा आहें, म्हणून ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें बसून मी वांटणी करून देतों ४. [३९४६]

निजस्वरूपाचें नारायणरूपी धन मीं सांभाळून ठेविलें आहे १. ज्यापासून सर्व जग निर्माण झालें आहे तें बीज मीं हस्तगत करून घेतलें आहे २. सर्व उपाधींचें असत्-जड-दुःखरूपी भूस नाहींसें करून सारभूत वस्तु (देव) ऐनजिनसी मीं निवडून ठेविला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, नारायण हा माझ्या वांट्यास आला. हा संचिताचा (माझ्या पूर्वजन्मांतील पुण्याईचा) गुण आहे ४. [३९४७]

सर्व जग भ्रमलें आहे, म्हणून इतर साधनांच्या आडरस्त्यानें व्यर्थ पावलें खर्च करितात, पण हरिरूपी मुख्य ठिकाणीं जाण्याचें द्वार एकच आहे १. तें असें, कीं विठोबारायाचे पाय हेच सारभूत आहेत, म्हणून ते जीवाच्या ठिकाणीं धरावे. त्यांस कोणी क्षणभरहि विसंबूं नये २. कलियुगांत सर्वांना जगण्यास हेंच सोपें साधन केलें आहे, म्हणून गुरु करून कान फुंकून घेणें वगैरे कांहींच नको ३. तुकाराम महाराज म्हणतात, ते पाय सर्व जगाच्या विस्ताराचें मूळ बीज आहे म्हणून ह्या ठिकाणीं सर्वांची इच्छा पूर्ण होत आहे ४. [३९४८]

एका पांडुरंगावांचून कांहीं जाणूं नये. ह्याविषयीं कांहीं संशय धरला असतां तो जन्ममरणाच्या श्रमाला पात्र होईल १. सर्वांचा जो पिता देव त्यास कोणत्याहि नांवानें कळवळ्यानें हांक मारिली असतां ती तो जाणत आहे २. त्याच्या नांवानें वाचेला अलंकार घातला असतां अभिमानाचा नाश होतो व सर्वांगाच्या ठिकाणीं हरिकथेचा रंग स्थिरावून इच्छा पूर्ण होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या योगानें पांडुरंगाची सुशोभित आवड उत्पन्न होईल तो सोस घटके घटकेस करावा ४. [३९४९]

जो नारायणाचें स्मरण करवितो तोच एक दाता आहे असें समजावें १. ज्यांच्या देण्यानें याचकांची तळमळ नाहींशी होत नाहीं त्या इतर नाशवंतांची काय किंमत आहे ? २. जे सन्मार्ग दाखवितात अशा संतांनाच काकुळती यावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांच्या देणगीनें कांहीं कर्तव्य राहात नाहीं (जीवदशा राहात नाहीं, इच्छा निवृत्त होते) त्यांचेच उपकार खरे ४. [३९५०]

असा हा दुःखप्रसंग डोळ्यांनीं पाहावत नाहीं. दुसऱ्यांना पीडा झाल्यानें माझ्या चित्तास दुःख होतें १. हे देवा,

आम्ही न देखिलें पाहिजे हें ॥ २ ॥ परचक्र कोठें हरिदासाच्या वासें । न देखिजेत देशें राहातिया ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी लाजविली सेवा । हीनपणें देवा जिणें जालें ॥ ४ ॥ [३९५१]

भीत नाहीं आतां आपुल्या मरणा । दुःखी होतां (दुःख होतें) जनां न देखवें ॥ १ ॥ आमची तों जाती ऐसी परंपरा । कां तुम्ही दातारा नेणां ऐसें ॥ २ ॥ भजनीं विक्षेप तेंची पैं मरण । न वजावा क्षण एक वायां ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं आघाताचा वारा । ते स्थळीं दातारा ठाव मागें ॥ ४ ॥ [३९५२]

काय म्यां मानावें हरिकथेचें फळ । तरिजे सकळ जन (जनीं) ऐसें ॥ १ ॥ उच्छेद तो असे हा गे आरंभला । रोकडें विठ्ठला परचक्र ॥ २ ॥ पापाविण नाहीं पाप येत पुढें । साक्षीसी रोकडें साक्ष आलें ॥ ३ ॥ तुका म्हणे जेथें वसतील दास । तेथें तुझा वास कैसा आतां ॥ ४ ॥ [३९५३]

कोण जाणे कोणा घडे उपासना । कोण या वचनाप्रति पावे ॥ १ ॥ आतां माझा श्रोता वक्ता तूंचि देवा । करावी ते सेवा तुझीच म्यां ॥ २ ॥ कुशळ चतुर येथें न पवती (सरते) । करितील रिती (रिते) तर्क मतें ॥ ३ ॥ तुका म्हणे केणें झालें एके घरीं । मज आणि हरी तुम्हां गांठी ॥ ४ ॥ [३९५४]

: लोहगांवीं कीर्तनांत मेलेलें मूल आणून टाकलें तें उठविण्याविषयीं देवास उद्गार :

अशक्य तें तुम्हां नाहीं नारायणा । निर्जीवा चेतना आणावया ॥ १ ॥ मागें काय जाणों स्वामीचे पवाडे । आतां कां रोकडे दावूं नये ॥ २ ॥ थोर भाग्य आम्ही समर्थाचे कांसे । म्हणवितों दास काय थोडें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझे निववावे डोळे । दावूनि सोहळे सामर्थ्याचे ॥ ४ ॥ [३९५५]

तुम्ही येथें नाहीं असें वाटतें. अशा प्रकारचें दुःखसंकट आम्हांला दिसतां कामा नये २. भक्तांच्या ठिकाणीं परचक्र येणें (शत्रूनें वेढणें) असें कोठें संभवतें काय? ज्या देशांत हरिभक्त राहातात त्या देशांत राहाणाऱ्या लोकांनाहि तें (दुःख) दिसूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, मीं जी तुमची सेवा केली त्याला तुम्ही लाज आणली. त्या प्रसंगानें माझी हीनदशा झाली ४. [३९५१]

मरणाचें मला भय नाहीं पण लोकांना दुःख होतें तें पाहावत नाहीं १. परंपरेनें आमच्या हरिदासांची जातच अशी आहे. हे दात्या देवा, हें तुम्ही कां समजत नाहीं? २. भगवद्भजनामध्यें हरकत (अडथळा) येणें हेंच आम्ही मरण समजतों. हरीच्या भजनाखेरीज आमचा एक क्षणहि वायां जातां कामा नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे दात्या देवा, कोणत्याहि दुःखसंकटाचा जेथें वाराहि नाहीं असें ठिकाण मी तुमच्याजवळ मागतों ४. [३९५२]

हरिकीर्तनानें सर्व जनांचा तरणोपाय होणें हें अथवा त्याच्यावर दुःखसंकट येणें हें, ह्या उभयांपैकीं हरिकीर्तनाचें फळ मीं कोणतें समजावें? १. हे विठ्ठला, आजच्या प्रसंगीं परमार्थाचा नाश करावयाचें आरंभिलें आहे असें ह्या आलेल्य परचक्रावरून उघड होतें २. पूर्व जन्मांतील पाप असल्यावांचून तें पुढें येत नाहीं, त्याचा अनुभव ह्या प्रसंगानें उघड आला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, जेथें तुमचे दास राहातात तेथें तुमचें वास्तव्य असतें हें आतां कसें समजावें? ४. [३९५३]

कानावर हात ठेवून म्हणतात, कोणाला ठाऊक कोणास उपासना घडतील आणि कोण ह्या वचनाच्या ठिकाणीं प्राप्त होईल १. [ह्याच कडव्याचा दुसरा अर्थ] उपासनेला कोण जाणेल व ती कोणाला घडेल आणि कोण ह्या ठिकाणीं प्राप्त होईल तो होवो १. अरे देवा, माझा श्रोता आणि वक्ता तूंच आहेस अशा अभेद ज्ञानानें तुझी सेवा एक मीच करीन २. कुशल चतुर ह्या ठिकाणीं माझें कीर्तन ऐकण्यास प्राप्त होणार नाहींत, कारण ते आपल्या बुद्धीनें पोकळच तर्क करीत राहातील ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे हरि, तुझी आणि माझी वस्ती एकाच बोधाच्या घरांत झाली आहे, म्हणून तुझा माझा नित्य योग आहे ४. [३९५४]

अहो नारायणा, मृत प्राण्यास जिवंत करणें हें तुम्हांला अशक्य नाहीं १. स्वामींनीं अशा प्रकारची कीर्ति केलेली जी आम्हांला कांहीं ठाऊक आहे त्याप्रमाणें आतां प्रत्यक्ष कां दाखवीत नाहीं? २. समर्थाच्या कांसेला आम्ही लागलों आहोंत, हें आमचें थोर भाग्य आहे. आम्ही देवाचे दास आहोंत असें म्हणतों हें काय थोडें झालें? ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या सामर्थ्याचा उत्साह दाखवून माझे डोळे शांत करा ४. [३९५५]

: दुर्जनांनीं स्वामींच्या आंगावर ऊन पाणी घातलें ते वेळीं देवास करुणा :

जळे माझी काया लागला वोणवा । धांव रे केशवा मायबापा ॥ १ ॥ पेटली सकळ कांति रोमावळी । नावरे हे होळी दहन जालें ॥ २ ॥ फुटोनियां दोन्ही भाग होऊं पाहे । पाहातोसी काय हृदय माझें ॥ ३ ॥ घेऊनी जीवन धांवें लवलाहीं । कवणाचें कांहीं न चले येथें ॥ ४ ॥ तुका म्हणे माझी तूं होसी जननी । आणीक निर्वाणीं कोण राखे ॥ ५ ॥ [३९५६]

: ज्या योगानें रामेश्वरभटजींचा दाह शमला तो अभंग :

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्रही न खाती सर्प तया ॥ १ ॥ विष तें अमृत आघात तें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ॥ २ ॥ दुःख तें देईल सर्व सुख फळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ॥ ३ ॥ आवडेल जीवा जिवाचिये परी । सकळां अंतरीं एक भाव ॥ ४ ॥ तुका म्हणे कृपा केली नारायणें । जाणिजेत येणें अनुभवें ॥ ५ ॥ [३९५७]

रूपकें : डांकेचे अभंग :

चौक भरियेला आसनीं । पाचारिली कुळस्वामिनी । वैकुंठवासिनी । ये धांवोनी झडकरी ॥ १ ॥ रंगा येईं वो विठाई सांवळिये डोळसे । तुझें श्रीमुख साजिरें तें मी केधवां देखेन ॥ २ ॥ रजतम धूपारती । पंचप्राणांची आरती । अवघी सारोनी आइती । ये धांवती झडकरी ॥ ३ ॥ मन मारोनियां मेंढा मुठीं । आशा मनसा तृष्णा सुटी । भक्तिभाव नैवेद्य ताटीं । भरोनी केला हाकारा ॥ ४ ॥ डांका अनुहात गजरें । येऊनि आंगासी संचरे । आपुला घेऊनि पुरस्कार । आरोग्य करी तुकयातें ॥ ५ ॥ [३९५८]

हे केशवा मायबापा, माझा देह जळाला, त्याला वणवा लागल्यासारखा दाह होऊं लागला म्हणून तूं धांव घे १. अंगावरील सर्व केश व त्वचा पेटली आहे व हा दाह शांत होत नाहींसा झाला आहे २. तुटून दोन तुकडे होतात कीं काय, अशी माझ्या हृदयाची स्थिति होत आहे, तरी अजून तूं काय पाहातोस ? ३. ह्या ठिकाणीं पाणी घेऊन लवकर धांवत ये, कारण ह्या ठिकाणीं कोणाचा कांहीं उपाय चालत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, तूं माझी आई आहेस, म्हणून तुजवांचून ह्या निर्वाण प्रसंगीं माझें रक्षण करणारी तुझ्यावांचून कोण आहे ? ५. [३९५६]

जर आपलें मन सर्वांभूतीं भगवद्भावामुळें रागद्वेषरहित असें शुद्ध असलें तर वैरी असतील ते मित्र होतात आणि वाघ, साप वगैरे त्याला दुःख देणार नाहींत १. विष जरी असलें तरी तें मनाच्या निर्मळपणानें अमृतमय होईल. त्याचप्रमाणें सर्व आघात हितप्रद होतील आणि जें करूं नये तें कर्तव्य शुभदायक होईल २. ज्यामध्यें दुःख आहे त्यापासूनसुद्धां सुखप्राप्ति होईल व अग्नीच्या ज्वाळा शांत होतील ३. तो पुरुष आपल्या प्राणाप्रमाणें सर्व जनांस आवडेल असा एक आदरभाव सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणीं उत्पन्न होईल ४. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा अनुभव ज्याच्या ठिकाणीं आहे त्याच्यावर नारायणांनीं कृपा केली असें समजावें ५. [३९५७]

चित्ताच्या आसनावर चौक भरून आपल्या कुळस्वामिनीस हांक मारिली ती अशी, कीं अगे वैकुंठांत राहाणारे तूं लवकर धांवून ये १. हे विठाबाई, सांवळे डोळसे, तूं माझ्या अंतःकरणाच्या रंगांत ये. तुझें श्रीमुख शोभायमान आहे तें मी केव्हां पाहीन ! २. रज, तम गुणांची धूपारती व पंचप्राणांची आरती अशी सामग्री तयार करून वाट पाहातों, म्हणून तूं लवकर धांवून ये ३. मनरूपी बकरा एका बुक्कीनें मारून त्यांतील आशा, मनशा, तृष्णा ह्या काढून भक्तिभावानें ताटांत नैवेद्य भरून मी तुला हांक मारीत आहें ४. तुकाराम महाराज म्हणतात, अनुहात ध्वनीच्या (हरिनामाच्या) डांकाची गर्जना ऐकून देवीनें माझ्या अंगांत संचार केला आणि आपला पूजोपचार घेऊन मला भवरोगापासून वेगळें केलें ५. [३९५८]

साच माझा देव्हारा । भाक ठेवा भाव खरा । त्रिगुणांचा फुलवरा । आणा विनंति सांगतों ॥ १ ॥ माझें दैवत हें रंगीं । नाचे वैष्णवांच्या संगीं । भरलें मग अंगीं । निवाड करी दोहींचा ॥ २ ॥ तुझें आहे तुजपाशीं । परि तूं जागा चुकलासी । चिवडुनियां नाशी । तुझ्या घरिच्यांनीं केली ॥ ३ ॥ आतां न पडे ठावें । वांचूनियां माझ्या देवें । अंधकारें व्हावें । नासु ठाव शोधावा ॥ ४ ॥ आंधळयासी डोळे । देते पांगुळासी पाय । वांझा पुत्र फळे (होय) । नवस पुरविते विठाई ॥ ५ ॥ उगविलीं कोडीं । मागें कितेकांचीं बापुडीं । तुका म्हणे घडी । न लगे नवस द्या आधीं ॥ ६ ॥ [३९५९]

विनंति घातली अवधारीं । मज देईं वो अभय करीं । पीडिलों खेचरीं । आणीका वारीं नांवांची ॥ १ ॥ रंगा येईं वो एकला । रंग वोढवला । हरिनामें उठिला । गजर केला हाकारा ॥ २ ॥ देवांचे दैवते । तुज नमिलें आदिनाथे । ये दो कृपावंते । भोगा माझ्या धांवत ॥ ३ ॥ न लवीं आतां वेळ । आइती सारिली सकळ । तुका म्हणे कुळ । आमुचिये दैवते ॥ ४ ॥ [३९६०]

माझा देव्हारा साचा । नाहीं आणीक कोणाचा । त्रिभुवनीं याचा । ठसा न लगे पुसावें ॥ १ ॥ या रे लोटांगणीं । कांहीं करा विनवणी । होईल झाडणी । भूत काढी संसार ॥ २ ॥ पडिले विषयाचे गोंधळीं । ते त्रिगुण आकळीं । हरिनाम आरोळी । कानीं पडतां ते उठी ॥ ३ ॥ घेतला अहंकारें । काम क्रोध या मत्सरें । पळती प्रेमभरें अवघे ठाव सांडुनी ॥ ४ ॥ घेतलासे पुरा । माया ममता आसरा । अवघ्या एक सरा । पळती रंग देखोनी ॥ ५ ॥ तुका म्हणे द्यावा भाव । फिटेल मनींचा संदेह । आणीक न लगे ठाव । कांहीं कोठें हिंडावें ॥ ६ ॥ [३९६१]

पुढें येते देवी । तिची जती चालों द्यावी । मागील झाडावी । झाडा मान आसडी ॥ १ ॥ एकवीरा

माझा देव्हारा खरा आहे, म्हणून तुम्ही खऱ्या भावाची भाक (प्रतिज्ञा) बांधून ठेवा व त्रिगुणांनीं गुंफलेला फुलवरा घेऊन या, अशी माझी तुम्हांस विनंति आहे १. माझें दैवत वैष्णवांच्या संगतीनें कीर्तनरंगांत नाचत आहे. तें हृदयांत शिरलें म्हणजे सर्व विकार नाहींसे करून एकरूप होण्याचा निवाडा करीत आहे २. तुझी वस्तु तुझ्याजवळच आहे पण तूं जागा चुकलास, कारण तुझ्या हृदयरूपी घरांत कामक्रोधादि मंडळी मिळाली. त्यांनीं नाश केला ३. आतां माझ्या देवावांचून तुला तुझें खरें सुख माहीत होणार नाहीं, ह्याकरितां अज्ञान अंधाराचा नाश करून तो ठिकाणा शोधला पाहिजे ४. आंधळयाला डोळे व पांगळयाला पाय आणि वांझेला पुत्र माझी विठाबाई देत आहे पण तिला नवस केला पाहिजे ५. तुकाराम महाराज म्हणतात, माझ्या विठाबाई देवीनें पूर्वीं कित्येकांचीं संकटें निवारण केलीं, त्यास एक घटका देखील लागली नाहीं, म्हणून तुम्ही अगोदर नवस फेडा ६. [३९५९]

हे विठाबाई, मला अभयाच्या हस्तानें आश्वासन दे. कामक्रोधादि भूतांनीं मला फार पीडा केली आहे, ती तूं निवारण कर. ही माझी विनंति ऐकावी १. मी हरिनामाचा गजर करून तुला हांक मारीत आहें, तो रंग माझ्या हृदयांत स्थिरावला. त्या रंगांत त्वां एकट्यानें येऊन राहावें २. हे देवाचे देवते आदिनाथे, मी तुला नमस्कार करीत आहें, कारण माझ्या प्रारब्धकर्मापासून मला त्वां कृपेनें धांवत येऊन सोडवावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, आमची तूं कुळदेवी आहेस, म्हणून तुझी पूजा करण्याकरितां सर्व सामुग्री सिद्ध केली आहे; आतां तूं फार उशीर लावूं नको ४. [३९६०]

माझा देव्हारा खरा आहे, ह्याप्रमाणें दुसऱ्या कोणाचा नाहीं. ह्या देवाच्या कीर्तीचा डांगोरा त्रैलोक्यांत आहे, म्हणून माझ्या देव्हाऱ्यांत कोणता देव आहे, हें कोणास विचारणें नको १. अरे, तुम्ही ह्या देवास लोटांगण घालून कांहीं विनंति करा, म्हणजे संसाररूपी भूत तुम्हांस लागलें आहे तें नाहींसें होईल २. जे विषयाच्या गोंधळांत पडले ते त्रिगुणानें बांधले. त्यांनीं जर हरिनामाचा गजर ऐकिला तर ते बंधनापासून सुटतील ३. काम, क्रोध, मत्सर, अहंकार ह्या भूतांनीं जे झडपले आहेत, त्यांनीं जर हृदयांत हरिनामाचें प्रेम सांठविलें तर तीं भूतें ठिकाण सोडून पळतील ४. माया, ममता ह्या आसरांनीं (अप्सरांनीं, सटवायांनीं, देवतांनीं) ज्यांना तार केला आहे ते जर ह्या हरिनामरंगांत आले तर त्या आसरा तो रंग पाहिल्याबरोबर पळतील ५. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही अगोदर आपला भाव माझ्या देवाला अर्पण करा, मग तुमच्या मनांत कोणताहि संशय राहाणार नाहीं व तुम्हांला दुसऱ्या ठिकाणीं फिरण्याचें कारण नाहीं ६. [३९६१]

पुढें येणाऱ्या देवीची यात्रा (वारी) सर्व काळ चालू ठेवावी आणि मागील मान व आशा ही बाकी सर्व नाहींशी

आली अंगा । आतां निवारील रोगा । माझ्या भक्तापाशीं सांगा । पूजा भावें करावी ॥ २ ॥ मेंढा मारावा लोवाळ । पूजा पावली सकळ । तुम्हीं केलें बळ । मग मी ठायीं न पडें ॥ ३ ॥ तुका म्हणे मुळीं । लागली ते आली कुळीं । वंदूनी सकळीं । जीवें भावें ओंवाळा ॥ ४ ॥ [३९६२]

अवघ्या ज्येष्ठा देवी कोण पूजनाचा ठाव । धरितांचि भाव कोठें नाहींसें झालें ॥ १ ॥ दिसे सारिखें सारिखें परि तें कारणीं पारिखें । तळीं गेलें देखें वरि टोले न साहाती ॥ २ ॥ पट एका शिरीं यथाविधीनें त्या येरी । बसकोळ्या घागरी डेरे रांझण गाडगीं ॥ ३ ॥ तुका म्हणे माना येथें कोणी रुसावेना । आपुल्याला स्थानां जेथें त्याचि शोभल्या ॥ ४ ॥ [३९६३]

खेचर खडतर । काळ कांपती असुर । नांदे भीमातीर । पंढरपूर पाटणीं ॥ १ ॥ आतां करीं कां रे हाकारा । सहस्रनामें एकसरा । दवडिते खेचरा । अंगसंगें धरूनी ॥ २ ॥ सीते झाली झडपणी । राहाणें वासुगीच्या बनीं । पावली जननी । झोंटि मोकळीया केशी ॥ ३ ॥ लाविलें कावरें । प्रल्हादासी म्हसासुरें । आली एकसरें । दांत खात रंगासी ॥ ४ ॥ वसुदेवाचीं बाळें । सात खादलीं ज्या काळें । आली भोगवेळे । तया कारणें तेथें ॥ ५ ॥ पांडवें बापुडीं । वांज केलीं फिरती वेडीं । धांवोनियां काढी । अंगसंगें त्राहाटविलीं ॥ ६ ॥ नामाचें चिंतन । तेथें धांवते आपण । न विचारितां हीण । भाव देखे जयाचा ॥ ७ ॥ कुळींची कुळदेवता । तुका म्हणे आम्हां माता । काय भय भूतां । काळ यमदूतांचें ॥ ८ ॥ [३९६४]

करावी (मागील बोललेले नवस फेडावे, नाहीं तर ती देवी तुमच्या आयुष्यरूपी मानेला हिसका देईल) १. एकवीरा नांवाची देवी अंगांत संचरून म्हणते, कीं तुम्हीं भावार्थानें माझी पूजा करावी. असें वर्तमान माझ्या भक्ताला कळवावें २. मांसानें पुष्ट असलेला मनरूपी बकरा माझ्यापुढें मारावा (म्हणजे मला मन अर्पण करावें), त्या योगानें सर्व पूजा मला पोहोंचेल; ह्याखेरीज तुम्ही जें बळ खर्च कराल तेणेंकरून मी कधींहि सांपडणार नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जी देवी कुळाच्या ठिकाणीं लागली आहे (म्ह० कुळस्वामिनी आहे) ती प्रथम आरंभास आली आहे. तिला जीवभाव अर्पण करून, तिला आरती ओंवाळून सर्वांनीं नमस्कार करावा ४. [३९६२]

सर्व देवता समान आहेत असें जर धरून चाललें तर पूजा करण्याला योग्य ठिकाण कोणतें हा विचार करून एका ठिकाणीं भाव ठेवला असतां मग दुसरीकडे पूजा करण्याला योग्य असें नाहींसें झालें १. पाहिलें असतां चहूंकडे सारखें दिसतें पण ती परीक्षा कारणानिमित्तानें होते. जसें एका उतरंडीस पुष्कळ गाडगीं असतात, त्यांत खालील गाडग्यास हेंच काय जास्ती आहे असें वरील मानितात, पण त्याचें ओझें वरच्या गाडग्यांस सहन होत नाहीं २. त्याप्रमाणें राज्यपटाचा अधिकार एकाच्या शिरावर असतो. बाकीचे लोक आपापल्या अधिकारानें असतात; व एकाच मातीच्या लक्ष्म्या, घागरी, डेरे, रांजण आणि गाडगीं करितात, पण भाद्रपदांत महालक्ष्मी म्हणून पूज्यस्थानीं जशा बसक्या मडक्या-लक्ष्म्या आहेत तशीं बाकीचीं नाहींत ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्याकरितां मान घेण्याची इच्छा करून ह्या ठिकाणीं कोणी रुसूं नये. आपापल्या योग्यतेप्रमाणें आपापल्या ठिकाणीं ज्या त्या देवी शोभत आहेत ४. [३९६३]

एक मुख्य देवी भीमेच्या तटाकीं पंढरपूर नगराच्या ठिकाणीं नांदत आहे, तिच्या धाकानें असुर, काळ आणि खेचर (यक्ष गंधर्वादि) वगैरे खडतर दैवतें थरथरां कांपत आहेत १. अरे, तुम्ही आतां तिला हजार नांवांनीं एकदम हांका मारा, म्हणजे ती देवी तुमच्या अंगसंगाला राहून बाकीचीं दैवतें हाकलून लावील २. सीताबाईस रावण नांवाच्या भूतानें झडपिल्यामुळें तिचें वास्तव्य अशोकवनांत झालें ते वेळीं ही मुख्य आई मोकळे केंस सोडून धांवत गेली आणि तिनें तिला सोडविलें ३. हिरण्यकश्यपु ह्या महिषासुरानें प्रल्हादास त्रास दिला, त्या वेळीं एकदम दांत खात ती देवी धांवत आली आणि तिनें महिषासुरास मारिलें ४. जे वेळीं वसुदेवाचीं सात मुलें कंसानें मारलीं ते वेळीं वसुदेवाकरितां हिनें धांवत जाऊन त्याचें दुःख नाहींसें केलें ५. पांडव हे वांझ (राज्यहीन) केल्यामुळें वेडे होऊन गरिबासारखे अरण्यांत फिरूं लागले ते वेळीं ह्या देवीनें धांवत जाऊन आपल्या अंगसंगानें त्यांची प्रतिष्ठा वाढविली ६. ज्या ठिकाणीं कोणी भाव धरून नामस्मरण करितात, त्या ठिकाणीं ही देवी धांवत जाते. त्यांच्या कमीपणाचा (उच्च-नीचतेचा) विचार करीत नाहीं ७. तुकाराम महाराज म्हणतात, अशी ती देवी आमची आई असून वंशांतील कुळदैवत आहे, मग आम्हांला यमदूत, काळ वगैरे भूतांचें काय भय आहे ? ८. [३९६४]

देवी देव झाले भोग सरले यावरी। सांगाया दुसरी ऐसी नाहीं उरली ॥ १ ॥ हरिनाम देवनाम तुम्ही गाऊनियां जागा। पेंठवणी मागा नका ठेवूं लिगाड ॥ २ ॥ शेवटीं सुताळी बरवी वाजवावी डांक । ताळा घाली एक सरलियाचे शेवटीं ॥ ३ ॥ गुंडाळा देव्हारा मान नेती मानकरी। तुका म्हणे बरीं आजी कोडीं उगविलीं ॥ ४ ॥ [३९६५]

झाली झडपणी खडतर देवता । संचरली आतां निघों नये ॥ १ ॥ मज उपचार झणी आतां करा । न साहे दुसरा भार कांहीं ॥ २ ॥ नेऊनियां घाला चंद्रभागे तीरीं। जीवा नाहीं उरी कांहीं आतां ॥ ३ ॥ तुका म्हणे कळों आलें वर्तमान। माझें तों वचन आच्छादलें ॥ ४ ॥ [३९६६]

अंगीं देवी खेळे। कां रे तुम्हांसी न कळे। कोणाचे हे चाळे। सुख दुःख न मानितां ॥ १ ॥ मी तों आतां येथें नाहीं। ओळखी वचनाच्या ठायीं। पालटाचा घेई। भाव खरें लोपे ना ॥ २ ॥ आपुलाले तुम्ही पुसा। सोवा पेव्याच सरिसा। स्थिरावल्या कैसा। काय जाणों विचार ॥ ३ ॥ तुका म्हणे लाभकाळ। तेथें नसावें शीतळ। मग तैशी वेळ। कोठें जाते सांपडों ॥ ४ ॥ [३९६७]

: पांगुळ :

पांगुळ झालों देवा नाहीं हात ना पाय। बैसलों जयावरी सैराट तें जाय। खेटितां कुंप कांटीं खुंट दरडी न पाहे। आधार नाहीं मज कोणि। मज बाप ना माये (माय) ॥ १ ॥ दाते हो दान करा जाते पंढरपुरा। न्या मज तेथवरी अखमाचा सोयरा ॥ २ ॥ हिंडतां गव्हानें गा शिणलों येरझारीं। न मिळेची दाता कोणी जन्म दुःख निवारी। कीर्ति हे संतांमुखीं तोचि दाखवा हरी। पांगुळां पाय देतो नांदे पंढरपुरीं ॥ ३ ॥ या पोटाकारणें गा झालों पांगिला जना। न सरेचि मायबाप भिके

आतां ह्यावर देवी व देव संपल्यामुळें कोणतेंहि संचित कर्म राहिलें नाहीं; म्हणून दुसरी देवी सांगण्यास आम्हांला उरली नाहीं १. आतां तुम्ही देवाचें नामस्मरण करून सावध राहा आणि आपल्या मेहनतीप्रमाणें बिदागी मागा, त्याविषयींचें लिगाड (लचांड) ठेवूं नका २. शेवटच्या समयास चांगल्या तालावर उत्तम रीतीनें डांक वाजवावी आणि एक संपल्यावर अखेरीस जीव-ब्रह्मैक्याचा अनुभवाशीं चांगला मेळ घालावा ३. तुकाराम महाराज म्हणतात, आज ज्याचीं त्याचीं संकटें बरींच परिहार झालीं व मानकऱ्यांनीं आपापले मान नेले, आतां हा चौक गुंडाळून ठेवावा ४. [३९६५]

खडतर देवीनें (ह्या विठ्ठल देवतेनें) मला झडपिलें, ती माझ्या अंगांत संचरली, आतां ती निघूं शकत नाहीं १. आतां मला न जाणों, एखादे उपचार कराल पण ते मला सहन होणार नाहींत २. आतां माझ्या जीवाची उरी (जीवाचा भरंवसा) कांहीं राहाणार नाहीं, म्हणून मला चंद्रभागेच्या तीरास नेऊन पोहोंचवा ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें वर्तमान तुम्हांस कळविलें, इतक्यावर माझें तर बोलणें बंद झालें ४. [३९६६]

अरे, माझ्या अंगांत देवी संचारली आहे तें तुम्हांस कां समजत नाहीं? सुख-दुःखाची आठवण माझ्या ठिकाणीं नाहीं, हें कर्तव्य कोणाचें असावें? १. आतां मी तर देहावर नाहीं. ही ओळख बोलण्यावरून समजावी (संतवचन ऐकतांच मला आल्याची ओळख पटली). माझा जो भाव पालटला आहे तो खरोखर लोपणार नाहीं (झांकला जाणार नाहीं) २. लोक हो, आपापल्या मनांतल्या गोष्टी तुम्हीं विचाराव्या. एकदां हें दैवत स्थिर झालें म्हणजे मग कोणता विचार होईल तो मला समजत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, जो काळ लाभाचा आहे त्या समयीं ढिलेपणा करूं नये, कारण मग तशी संधी तुम्हांला कोठें सांपडणार आहे? ४. [३९६७]

अहो संत देवा, मला हात, पाय नाहींत असा मी पांगळा झालों आहें आणि ज्याच्यावर (ज्या मनावर) बसलों तें भलतीकडे धांवतें; व कांट्या कुंपणास, झाडास खेटतें, गार गडद्दोरे वगैरे कांहीं पाहात नाहीं आणि मला आईबापांचा वगैरे कोणाचा आधार नाहीं १. अहो दात्यांनो, तुम्ही पंढरीस जाणारे, मला दान द्या. तें असें, कीं तेथपर्यंत मला पावतें करा (न्या), कारण तुम्ही अधु अक्षमाचे (पंगु—असमर्थांचे) सोयरे आहांत २. चौऱ्यांयशीं लक्ष योनींच्या गांवास फिरून मी फार श्रमी झालों. जन्ममरणाचें दुःख निवारण करणारा दाता कोणी भेटला नाहीं, संतांच्या मुखानें ज्याची कीर्ति ऐकिली तो हरि मला दाखवा. तो पांगळ्यास पाय देणारा पंढरपुरांत नांदत आहे ३. ह्या पोटाच्या निमित्तानें मी जनांच्या

नाहीं खंडणा। पुढारा म्हणती एक तया नाहीं करुणा। श्वान हें लागे पाठीं आशा बहु दारुणा ॥ ४ ॥ काय मी चुकलों गा मागें नेणवेचि कांहीं। न कळेचि पापपुण्य येथें आठव नाहीं। मी माजी भुललों गा दीप पतंगासोई। द्या मज जीवदान संत महानुभाव कांहीं ॥ ५ ॥ दुरोनी आलों मी गा दुःख झालें दारुण। यावया येथवरी होतें हेंचि कारण। दुर्लभ भेटी तुम्हां पायीं झालें दरुषन। विनवितो तुका संतां दोन्ही कर जोडून ॥ ६ ॥ [३९६८]

देश वेष नव्हे माझा सहज फिरत आलों। करूं सत्ता कवणावरी कोठें स्थिर राहिलों। पाय डोळे म्हणतां माझे तिहीं कैसा मोकलिलों। परदेशीं नाहीं कोणी अंध पांगुळ झालों ॥ १ ॥ आतां माझी करीं चिंता दान देईं भगवंता। पाठी पोटीं नाहीं कोणी निरवीं सज्जन संतां ॥ २ ॥ चालतां वाट पुढें भय वाटतें चित्तीं। बहुत जणें गेलीं नाहीं आलीं मागुती। न देखें काय झालें कान तरी ऐकती। बैसलों संधिभागीं तुज धरूनी चित्तीं ॥ ३ ॥ भाकितों करुणा गा जैसा सांडिला ठाव। न भरे पोट कधीं नाहीं निश्चळ पाव। हिंडतां भागलों गा लक्ष चौऱ्यांशीं गांव। धरूनी राहिलों गा हाचि नसता ठाव ॥ ४ ॥ भरंवसा काय आतां कोण आणी अवचिता। तैशीच झाली कीर्ति तयामाजि बहुतां। म्हणऊनी मारी हांका सोयी पावें पुण्यवंता। लागली भूक थोरी तूंचि कृपाळू दाता ॥ ५ ॥ संचित सांडवलें कांहीं होतें तें जवळी। वित्त गोत पुत माया तुटली हे लागावळी। निष्काम झालों देवा होतें माझे कपाळीं। तुका म्हणे तूंचि आतां माझा सर्वस्वें बळी ॥ ६ ॥ [३९६९]

अंकित झालों. त्या योगानें प्रत्येकास आईबाबा (आयबाप) हें म्हणणें संपत नाहीं, व भीक मागणेंहि संपत नाहीं. त्या लोकांना माझी दया येत नसल्यामुळें ज्यांनीं त्यांनीं पुढें जा असें म्हणावें. आशा हेंच कुत्रें फार वाईट आहे. तें माझ्या मागें लागलें आहे ४. पूर्वीं माझ्या हातून काय चूक झाली ती समजत नाहीं व कोणतें पापपुण्य मीं केलें त्याची ह्या जन्मीं आठवण नाहीं. जसा दिव्याला पतंग भुलून आंत पडतो तसा मी देही व देहसंबंधीं माझें ह्यांत मी गुंतलों, आतां संत महानुभावांनीं मला कांहीं तरी जीवदान द्यावें ५. तुकाराम महाराज म्हणतात, अहो संत जन, दोन्ही हात जोडून तुम्हांला मी विनंति करतों ती अशी, कीं चौऱ्यांयशीं लक्ष खाणी हिंडून मी फार दुःखी झालों. तुमची भेटी होणें हें फार अवघड असून आज मला तुमच्या पायांचें दर्शन झालें. येथपर्यंत येण्याचें माझें हेंच कारण होतें (आतां मला पंढरपूरला नेऊन एकदां पांडुरंगाचें दर्शन घडवा हीच तुम्हांला हात जोडून माझी विनंति आहे ६. [३९६८]

माझा हा देश व वेष नसून ह्या ठिकाणीं मी सहज फिरत आलों. आतां मी कोणावर सत्ता करावी ? कोणत्याहि ठिकाणीं मी स्थिर होत नाहीं. पाय, डोळे हे जर माझे म्हणावे तर त्यांनीं मला टाकून दिलें, असा मी अंध, पांगुळ होऊन परदेशांत (ह्या जगांत) येऊन पडलों १. हे भगवंता, तुजवांचून मला पाठीं पोटीं कोणी नाहीं, म्हणून तूं माझी काळजी करून मला संतांच्या स्वाधीन कर, हेंच दान मी मागत आहें २. ह्या संसाराच्या वाटेनें पुढें चालत असतां माझ्या मनांत मरणाचें भय उत्पन्न झालें, कारण ह्या वाटेनें पुष्कळ लोक गेले पण ते परत आले नाहींत; त्यांची काय गति झाली ही मला दिसत नाहीं व कानांसहि ऐकूं येत नाहीं. ह्याकरितां देवा, तुला चित्तामध्यें धरून संसाराच्या व तुझ्या मध्यभागीं मी बसलों आहें ३. मूळ ब्रह्मरूप ठिकाण सोडल्यापासून मी तुझी करुणा भाकीत आहें. माझा एका ठिकाणीं पाय कधीं ठरला नाहीं व माझें मनाचें पोटहि भरलें नाहीं, आणि चौऱ्यांयशीं लक्ष गांवें (योनि) हिंडून मी फार श्रमी झालों. ह्याकरितां ही जागा धरून मी राहिलों आहें ४. आतां तरी कोणी अवचित भीक घेऊन येईल, असा मला भरंवसा नाहीं, कारण त्या पुष्कळ लोकांमध्यें तशा प्रकारचीच कीर्ति (पुढें हो म्हणण्याची) झाली आहे. ह्याकरितां मी तुला हांका मारीत आहें, मला भूक फार लागली, तूं तर कृपाळु दाता आहेस. माझ्याकरितां तूं लवकर धांवून ये ५. तुकाराम महाराज म्हणतात, पूर्वजन्मींचें माझें संचित कर्म कांहीं जवळ होतें त्याचा खर्च झाला व ह्या जन्मांतील बायकामुलें, धन व गोत ह्या मायेचा संबंध तुटला. अशा प्रकारें मी निष्काम झालों. हें माझे प्रारब्धीं होतें. आतां देवा, तूं सर्व प्रकारें माझा साह्यकारी आहेस, माझ्या पालन-पोषणाचा भार तुझ्यावर आहे, म्हणून (ध्रुवपदांत दर्शविल्याप्रमाणें) मला संतांच्या स्वाधीन करावें ६. [३९६९]

: आंधळा :

देखत होतों आधीं मागें पुढें सकळ । मग हे दृष्टि गेली वरी आलें पडळ । तिमिर कोंदलेंसे वाढे वाढतां प्रबळ । भीत मी झालों देवा काय झाल्याचें फळ ॥ १ ॥ आतां मज दृष्टि देईं पांडुरंगा मायबापा । शरण मी आलों तुज निवारुनियां पापा । अंजन लेववूनी करीं मारग सोपा । जाईन सिद्धपंथें अवघ्या चुकतील खेपा ॥ २ ॥ होतसे खेद चित्ता कांहीं नाठवे विचार । जात होतों जनामागें तोही सांडिला आधार । हा ना तो ठाव झाला अवघा पडिला अंधार । फिरलीं माझीं मज कोणी न देती आधार ॥ ३ ॥ जोंवरी चळण गा तोंवरी म्हणती माझा । मानिती लहान थोर देहसुखाच्या काजा । इंद्रियें मावळलीं आला बागुल आजा । कैसा विपरीत झाला तोचि देह नव्हे दुजा ॥ ४ ॥ गुंतलों या संवसारें कैसा झालोंसें अंध । मी माझें वाढवूनी मायातृष्णेचा बाध । स्वहित न दिसेचि केला आपुला वध । लागले काळ पाठीं सवें काम हे क्रोध ॥ ५ ॥ लागती चालतां गा गुणदोषांच्या ठेंसा । सांडिली वाट मार्ग झालों निराळा कैसा । पाहातों वाट (वास) तुझी थोर करुनी आशा । तुका म्हणे वैद्यराजा पंढरीच्या निवासा ॥ ६ ॥ [३९७०]

सहज मी आंधळा गा निजनिराकार पंथें । वृत्ति हे निवृत्ति झाली जन न दिसे तेथें । मी माझें हारपलें ठायीं जेथींच्या तेथें । अदृश्य तेंचि झालें कांहीं दृश्य जें होतें ॥ १ ॥ सुखें मी निजलों गा शून्य सारुनी तेथें । त्रिकूटशिखरीं गा दान मिळे आइतें ॥ २ ॥ टाकिली पात्र झोळी धर्म अधर्म आशा । कोल्हाळ चुकविला त्रिगुणांचा वोळसा । न मागें (मी) भीक आतां हाचि झाला भरंवसा । वोळली सत्रावी गा तिनें पुरविली इच्छा ॥ ३ ॥ उर्ध्वमुखें आळविला सोहं शब्दाचा नाद ।

सर्व जग चोहोंकडे देवरूप आहे असें पूर्वीं मला दिसत होतें, मग माझ्या डोळयांवर भ्रमाचें पटल येऊन दिसेनासें झालें, असा निबिड अंधार कोंडला; तो वरचेवर जास्त वाढूं लागला आहे. हे देवा, असा मी आंधळा झालों. आतां मनुष्यजन्माला येऊन वांचल्याचें काय सार्थक आहे? १. हे पांडुरंगा मायबापा, मी तुला शरण आलों आहें, तर मला दृष्टि द्यावी. माझीं सर्व पातकें नाहींशीं करून डोळ्यांत अंजन घालून रस्ता सोपा करावा, मग मी साधुसंत ज्या मार्गानें गेले त्या सिद्ध मार्गानें चालेन. त्या योगानें जन्ममृत्यूच्या येरझारा चुकतील २. आतां माझ्या मनाला फार दुःख वाटतें, कोणताहि विचार आठवत नाहीं, कारण मी जनांच्या मागें जात होतों त्यांनींहि मला सोडून दिलें. माझी गणगोत मंडळी माझ्यावर उलटली. असा त्यांचाहि आधार तुटला. आतां मला ना स्वार्थ ना परमार्थ होऊन ह्या उभय अंधारांमध्यें मी सांपडलों ३. जोंपर्यंत माझीं इंद्रियें प्रबळ होतीं, माझ्यांत कर्तृत्वशक्ति होती तोंपर्यंत आप्तवर्ग मंडळी मला आमचा असें म्हणत होती; आपापल्या देहास सुख होण्याकरितां लहान थोर मला मानीत होते. आतां माझीं इंद्रियें गलित झाल्यामुळें तीच मंडळी हा आजोबा बागुलबुवा आहे असें म्हणतात. माझा देह दुसरा नसून पहिलाच आहे; पण कसा विपरीत झाला आहे तें पाहा बरें ! ४. ह्या संसारामध्यें गुंतल्यामुळें मी आंधळा झालों. मी देही व देहसंबंधीं माझें ह्या मायेचा अभिमान माझ्या ठिकाणीं वाढला आहे, त्या योगानें माझें कांहीं हित होईल असें दिसत नाहीं. असा मीं आपला घात करून घेतला आणि काम, क्रोध हे काल माझ्या पाठीमागें लागले आहेत ५. तुकाराम महाराज म्हणतात, मी वाटेनें चालतांना गुणदोषांच्या ठेंचा लागत आहेत, म्हणून ती वाट सोडून मी कसा आड रानामध्यें पडलों! हे पंढरीनिवासा, तूं राजवैद्य आहेस ही आशा धरून मी तुझी फार वाट पाहात आहें, तर (ध्रुवपदांत दर्शविल्याप्रमाणें) ह्या दुःखांतून मला मुक्त करावें ६. [३९७०]

निजवस्तु निराकाराच्या ठिकाणीं मी सहजच आंधळा आहें. तेथें बाह्य वृत्ति नाहींशी झाल्याकारणानें हें विश्व दृष्टीस पडत नाहीं आणि मी देही व देहसंबंधीं माझें हा अभिमान जागचे जागींच नाहींसा झाला, म्हणून जेवढे दृश्य पदार्थ आहेत तितके अदृश्य झाले १. सर्व शून्याचा व त्रिपुटीचा निरास करून उंच स्थानीं मी सुखानें निजलों. त्या ठिकाणीं मला आयतें दान मिळत आहे २. धर्माची आणि अधर्माची आशारूपी झोळी हें पात्र होतें तें टाकून दिलें. त्या योगानें सत्त्व, रज, तम ह्या गुणांचा त्रास चुकला, आतां मला भीक मागण्याचें कारण नाहीं हा भरंवसा झाला आहे. त्याचें कारण जी सत्रावी जीवनकळा आहे तिनें माझी इच्छा पूर्ण केली ३. सोहं शब्दाच्या स्वरानें वरतीं मुख करून निराकार

अरूप जागविला दाता घेऊनी छंद। घेऊनी (यां) आला दान निजतत्त्व निजबोध। स्वरूपीं मेळविलें नांव ठेवियेला भेद ॥ ४ ॥ शब्द हा बहुसार उपकाराची राशी। म्हणोनि चालविला मागें येतील त्यासी। मागोनि आली वाट सिद्ध ओळीची तैसी। तरले (तरती) गा आणिकही विश्वासी ॥ ५ ॥ वर्म तें एक आहे दृढ धरावा भाव। जाणीव नागवण लागों नेदी ते ठाव। म्हणोनि संग टाकीं सेवीं अद्वैत भाव। तुका म्हणे हाचि संतीं मागें केला उपाव ॥ ६ ॥ [३९७१]

आंधळ्या पांगळ्यांचा एक विटोबा दाता। प्रसवला विश्व तोचि सर्व होय जाणता। घडी मोडी हेळामात्रें पापपुण्य संचिता। भवदुःख कोण वारी तुजवांचुनी चिंता ॥ १ ॥ धर्म गा जागो तुझा तूंचि कृपाळू राजा। जाणसी जिवींचें गा न सांगतां सहजा ॥ २ ॥ घातली लोळणी गा पुंडलीकें वाळवंटीं। पंढरी पुण्य ठाव नीरे भींवरे तटीं। न देखें दुसरें गा झाला अदृश्य दृष्टि। बोळला प्रेमदाता केली अमृतवृष्टि ॥ ३ ॥ आणीक उपमन्यु एक बाळ धाकुटें। न देखे न चालवे जना चालते वाटे। घातली लोळणी गा हरिनाम बोभाटें। पावला त्या कारणें धांव घातली नेटें ॥ ४ ॥ बैसोनी खोळीं शुक राहे गर्भी आंधळा। शीणला येरझारीं दुःख आठवी वेळा। मागील सोसिलें तें ना भीं म्हणे गोपाळा। पावला त्याकारण लाज राखिली कळा ॥ ५ ॥ न देखे जो या जना तया दावी आपणा। वेगळा सुखदुःखा मोहो नाठवी धना। आपपर तेंही नाहीं बंधुवर्ग सज्जना। तुकया तेचि परी झाली पावें नारायणा ॥ ६ ॥ [३९७२]

देवास आळविलें. त्या छंदानें तो दाता जागृत होऊन निजस्वरूपाचा बोध हेंच दान घेऊन मजकडे आला आणि त्यानें मला आपल्या स्वरूपांत मिळवून घेतलें. तो देव व मी भक्त एवढाच भेद त्यानें नांवांत ठेविला ४. देवाचें व धर्माधर्माचें ज्ञान शब्दानेंच होतें, म्हणून प्रत्यक्षादि प्रमाणांमध्यें शब्दप्रमाण श्रेष्ठ आहे. परमार्थदृष्टीनें व व्यवहारदृष्टीनें हा शब्द लोकांवर मोठा उपकार करणारा आहे. सर्वांमध्यें शब्द हा सारभूत असून परोपकाराची रास आहे, ह्याकरितां जे माझ्यामागें येणारे आहेत त्यांना हा शब्द दान दिला आहे. ही शब्दप्रामाण्याची वाट पूर्वीपासून चालत आलेली आहे व ह्या वाटेनें पुष्कळ सिद्ध मंडळी गेली व आणिकहि विश्वास धरून चालणारे तरले व पुढेंहि तरतील ५. तुकाराम महाराज म्हणतात, देवाच्या ठिकाणीं बळकट भाव ठेवावा हेंच मुख्य वर्म आहे. देव, गुरु व शब्दप्रमाण ह्यांच्यावर दृढ विश्वास ठेवावा. त्यावांचून जाणतेपणानें नागवण होत आहे व देवाचाहि ठिकाणा लागणार नाहीं, ह्याकरितां सर्व संग टाकून एक भाव धरावा. हाच उपाय पूर्वी संतांनींहि केला आहे. ६. [३९७१]

आंधळ्या पांगळ्यांस (मूढांना व पापांना) दान देणारा एक विठोबा आहे. त्याच्यापासून सर्व जग निर्माण झाल्यामुळें तोच सर्व जाणता आहे. तो एका क्षणामध्यें ब्रह्मांडाची घडामोड करीत आहे. पापपुण्य व संचितकर्म त्यानेंच उत्पन्न केलें आहे. त्या देवास मी विनंति करतों, कीं तुजवांचून संसाराचें दुःख व त्याविषयींची काळजी कोण दूर करील? १. देवा, तूं दयाळूंचा राजा आहेस. आम्ही कांहीं न सांगतां आमच्या अंतरांतील तूं जाणतोस, म्हणून आम्ही तुझा धर्म जागवितों २. नीरेभीवरेच्या तटाकाला पुण्यक्षेत्र पंढरी आहे, त्या वाळवंटामध्यें पुंडलीकानें अनुष्ठान केलें, त्यायोगानें त्याला देवावांचून दुसरे दृश्य पदार्थ दिसेनासे झाले, मग प्रेमदाता जो देव त्यानें पुंडलीकरायावर कृपामृताचा वर्षाव केला ३. आणखी एक उपमन्यु ह्या नांवाचें लेंकरूं होतें. त्यानें एकदां राजाच्या घरीं दूध प्यालें होतें. घरीं गरिबीमुळें त्याची आई त्याला पाण्यांत पीठ कालवून तें दूध म्हणून देत असे, पण त्या दिवशीं राजाच्या घरच्या दुधाची चव ह्या दुधास नाहीं, म्हणून त्यानें हट्ट घेतला. तेव्हां देवाची कृपा असल्याशिवाय असलें दूध मिळत नाहीं, असें आईनें सांगितलें. तेव्हां उपमन्यूनें देवाचा ध्यास घेतला. त्यास चार लोकांच्या मार्गानें जावेंसें वाटेना. मग त्यानें हरिनामाची गर्जना करून लोटांगण घातलें. त्या वेळीं हा कृपाळु देव त्याच्याकरितां धांवत गेला आणि त्याला दुधाचा सागरच देवानें दिला ४. शुकाचार्य आपल्या आईच्या पोटामध्यें जग न पाहावें अशा हेतूनें राहिला, कारण पूर्वी जन्ममृत्यूच्या येरझारांनीं त्याला फार दुःख झालें, तें त्यानें मागें सोसलें होतें; म्हणून त्याच्याकरितां देवानें धांवत जाऊन भिऊं नको म्हणून सांगितलें व त्याची लाज राखली ५. तुकाराम महाराज म्हणतात, जे सुखदुःखाच्या वेगळे व मोहाच्या वेगळे होऊन द्रव्याचा आठव करीत नाहींत व जनाकडे पाहात नाहींत, आणि ज्यांना बंधुवर्ग, आपलें व परावें हें नाहीं अशा सज्जनांना देव दर्शन देतो. तेच प्रकार माझ्या अंगीं आले आहेत, ह्याकरितां हे नारायणा, तूं मजवर कृपा कर ६. [३९७२]

भगवंत तुज कारणें मेली जीवाचि कैसी। निष्काम बुद्धि ठेली चळण नाहीं तयेसी। न चलती हात पाय दृष्टि फिरली कैसी। जाणतां न देखों गा क्षर आणि अक्षरासी ॥ १ ॥ विठोबा दान दे गा तुझ्या सारिखें नामा। कीर्ति हे वाखाणिली थोर वाढली सीमा ॥ २ ॥ भुक्ति मुक्ति तूंचि एक होसि सिद्धीचा दाता। म्हणोनि सांडवली शोक भय लज्जा चिंता। सर्वस्वें त्याग केला धांव घातली आतां। कृपादान देईं देवा येउनि सामोरा आतां ॥ ३ ॥ संसारसागरू गा भवदुःखाचें मूळ। जनवाद अंथरूण माजी केलें इंगळ। इंद्रियें वज्रघातें तपे उष्ण वरी ज्वाळ। सोसिले काय करूं दुर्भर हे चांडाळ ॥ ४ ॥ तिहीं लोकीं तुझें नाम वृक्ष पल्लव शाखा। वेंघलों वरि खोडा भाव धरूनी टेंका। जाणवी नरनारी जागो धर्म हा लोकां। पावती पुण्यवंत सोई आमुचिये हाका ॥ ५ ॥ नाठवे आपपर आतां काय बा करूं। सारिखा दोहींसवा हरपला विचारु। घातला योगक्षेम तुज आपुला भारु। तुकया शरणांगता देईं अभयकरु ॥ ६ ॥ [३९७३]

: वासुदेव :

मनु राजा एक देहपुरीं। असे नांदतु त्यासी दोघी नारी। पुत्रपौत्र संपन्न भारी। तेणें कृपा केली आम्हांवरी गा ॥ १ ॥ म्हणउनी आलों या देशा। होतों नाहीं तरी भुललों दिशा। दाता तो मज भेटला इच्छा। येउनी मारग दाविला सारिसा गा ॥ २ ॥ सवें घेउनि चौघेजण आला कुमर सुलक्षण। कडे चुकवूनि कांटेवण। ऐका आणिलीं तीं कोण कोण गा ॥ ३ ॥ पुढें भक्तीनें धरिलें हातीं। मागें ज्ञान वैराग्य धर्म येती। स्थिर केलीं जीं आचपळें होतीं। सिद्ध आणुनि लाविती पंथीं गा ॥ ४ ॥ केले उपकार सांगों काय। बाप न करी ऐसी माय। धर्में त्याच्या हे देखियेले पाय।

हे भगवंता, तुझी जर प्राप्ति होत नाहीं तर आम्ही जिवंत असून मेलों व बुद्धीच्या ठिकाणीं कामना नसल्यामुळें तिचें चलनवलन राहिलें आणि हातपाय चालावयास विसरले. देवा, तूं क्षररूपानें जगांत व्यापक व अक्षररूपानें अलिप्त आहेस असें आम्ही जाणत असून आम्ही तें पाहात नाहीं अशी आमची दृष्टि फिरली आहे (म्ह० अंध झाली आहे) १. हे विठोबाराया, तुझी कीर्ति अमर्याद वाढली आहे, म्हणून तूं आपल्या नामासारखें मला दान दे २. इहलोकींचे भोग व परलोकीं ऋद्धि, सिद्धि व मुक्ति हें दान तूंच देणारा आहेस म्हणून आम्हीं शोक, लज्जा, भय व चिंता हीं सोडून दिलीं आणि सर्वस्वाचा त्याग करून तुजकडे धांवत आलों. आतां हे देवा, तूं माझ्यासमोर येऊन मला कृपादान दे ३. संसारसमुद्र जन्मदुःखाचें बीज आहे, त्यामध्यें लौकिकाचाराचे शब्द इंगळाप्रमाणें आहेत व त्यांतून इंद्रियांचे आघात वज्राप्रमाणें असून उष्ण ज्वाळेचा भडका उठत आहे, असें हें भयंकर वाईट मीं सोसलें, त्यास काय करूं? ४. संसाररूपी वृक्षाच्या खांद्यापानांप्रमाणें त्रैलोक्यांत तुझें नाम विस्तारलें आहे. त्या संसाराच्या मूळ खोडावर भावाचा टेंका धरून मी चढलों आणि तेथें बसून नरनारी लोकांस तुझा धर्म जागविण्याविषयीं मी सांगत आहें, पण जे कोणी पुण्यवंत असतील ते आमची हांक ऐकून आमच्याकडे धांवत येतील ५. तुकाराम महाराज म्हणतात, मला आपलें व परावें ह्याची आठवण होत नाहीं, त्याला म्यां काय करावें? संसार व परमार्थ ह्या दोन्ही बाजूंचा विचार कांहीं आठवेनासा झाला, म्हणून मी आपल्या चरितार्थाचा भार तुजवर घालून तुला शरण आलों. आतां आपण माझ्या मस्तकावर अभयहस्त ठेवावा ६. [३९७३]

मनोरूपी राजा एका देहरूपी गांवांत नांदत आहे. त्याला दोन बायका आहेत आणि तो पुत्रपौत्रानें मोठा संपन्न आहे. त्यानें आमच्यावर फार कृपा केली १. म्हणून ह्या देशामध्यें आम्ही आलों. नाहींपेक्षां दिशाभूल होऊन भलतीकडे गेलों असतों. येथें आल्यावर इच्छादान देणाराची भेट झाली आणि तो मनोराजा आमच्या बरोबर आला व त्यानें आम्हांला चांगला रस्ता दाखविला २. मनोराजा आपले चार सुलक्षणी पुत्र घेऊन आमच्या बरोबर आला व त्यानें कांटे व खड्डे चुकवून आम्हांस आणलें आणि बरोबर जीं मुलें आणलीं त्यांचीं नांवें ऐका ३. भक्ति ही पुढें चालत आहे व तिच्या मागें ज्ञान, वैराग्य व धर्म हे येतात. जे अनावर होते ते स्थिरावले आणि त्यांनीं सिद्ध मंडळी आणवून रस्त्यास लाविली ४. त्यांनीं आमच्यावर जे उपकार केले तसे आईबाप देखील करीत नाहींत. ते मीं काय वर्णन करावे? त्यांच्या

दिलें अभय दान अक्षय गा (दिले अखय भय वारूनि दान गा) ॥ ५ ॥ होतों पीडत हिंडत गांव। पोट न भरे न राहावया ठाव। तो येणें अवघा संदेह। म्हणे फेडियला तुकयाचा बांधव गा ॥ ६ ॥ [३९७४]

गातों वासुदेव मी ऐका। चित्त ठेवुनि ठायीं भावें एका। डोळे झांकुनि रात्र करूं नका। काळ करीत बैसला लेखा गा ॥ १ ॥ राम राम स्मरा आधीं। लाहो करा गांठ घाला मूळबंदीं। सांडा वाउगिया उपाधी। लक्ष लावुनि राहा गोविंदीं गा ॥ २ ॥ अल्प आयुष्य मानवी देह। शत गणिलें तें अर्ध रात्र खाय। मध्यें (पुढें) बाल्यत्व पीडा रोग क्षय। काय भजनासी उरलें तें पाहें गा ॥ ३ ॥ क्षणभंगुर नाहीं भरंवसा। व्हा रे सावध तोडा (सीव्र) माया आशा। कांहीं न चले मग गळां पडले फांसा। पुढें हुशार थोर आहे ओळसा गा ॥ ४ ॥ कांहीं थोडें बहुत लागपाठ। करा भक्तिभाव धरा बळकट। तन मन ध्यान द्या लावुनियां नीट। जर असेल करणें गोड शेवट गा ॥ ५ ॥ विनवितों सकळां जनां। कर जोडुनि थोरां लहानां। दान इतुकें द्या मज दीना। म्हणे तुकया बंधु राम म्हणा गा ॥ ६ ॥ [३९७५]

गेले टळले पहार तीन। काय निदसुरा अझून। जागे होउनि करा कांहीं दान। नका ऐकोनी झांकूं लोचन गा ॥ १ ॥ हरी राम कृष्णा। वासुदेव जाणवितसे जना। चिपळ्या टाळ हातीं विणा। मुखीं घोष नाम नारायणा गा ॥ २ ॥ जें ठाकेल कोणा कांहीं। फळ पुष्प अथवा तोयी। द्या परी मीस घेऊं नका भाई। पुढें विन्मुख होतां बरें नाहीं गा ॥ ३ ॥ देवाकारणें भाव तस्मात। द्यावें न लगे फारसें वित्त। झालें एक चित्त तरी बहुत। येवढ्यासाठीं नका करूं वाताहात गा ॥ ४ ॥ आलों येथवरी बहु सायासें। करितां दान हेंचि मागावयास। नका भार घेऊं करूं निरास। धर्म सारफळ

धर्मानें देवाचे पाय आमच्या दृष्टीस पडले आणि आम्हांला अक्षयी अभयदान मिळालें (*पाठभेद :* त्यांनीं आमचें भय निवारण करून आम्हांला अक्षयी अभयदान दिलें) ५. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, ह्यापूर्वी अनेक योनींच्या गांवीं मी हिंडत होतों. तेथें कधीं पोट भरलें नाहीं व राहाण्याला एक ठिकाण मिळालें नाहीं अशी पीडा भोगली, इतक्यांत ह्या मनोराजानें सर्व संशयाचा नाश करून आम्हांला वाट दाखविली ६. [३९७४]

मी वासुदेव गात आहें तें तुम्ही एकचित्त करून एका भावानें ऐका. डोळे झांकून व्यर्थ आयुष्य गमावूं नका, त्याची गणति करीत काळ टपून बसला आहे १. ह्याकरितां अगोदर राम राम म्हणा. तो सोस घेऊन मूळ स्वरूपाशीं गांठ घाला. बाकीच्या संसारसंबंधीं व्यर्थ उपाधि टाकून द्या आणि एका देवाच्या ठिकाणीं लक्ष ठेवून राहा २. ह्या मानवदेहामध्यें आयुष्य थोडें आहे तें असें, कीं आयुष्याचीं शंभर वर्षें नेमलीं आहेत. त्यांपैकीं पन्नास झोंपेमध्यें गेलीं. बाकीच्या आयुष्यामध्यें बाळपण व कांहीं क्षयरोगादि करून पीडा भोगावी लागते. मग भजन करण्यास आयुष्य किती उरलें तें पाहा ३. कांहीं आयुष्य असेल तेंहि भरंवशाचें नसून क्षणभंगुर आहे, ह्याकरितां तुम्ही सावध होऊन आशेचे व मायेचे पाश तोडून टाका. नाहींपेक्षां अखेरीस यमानें पाश घातला म्हणजे तुमचें कांहीं चालणार नाहीं. पुढें फेऱ्यांमध्यें पडावें लागेल, म्हणून तुम्ही आधीं सावध व्हा ४. कांहीं तरी थोडाफार लागपाठ करून भक्तिभाव बळकट धरा. जर तुम्हांला शेवट गोड करावयाचा आहे तर तन-मन देवास अर्पण करून त्याचें ध्यान करा ५. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, मी हात जोडून सर्व लहानथोर लोकांस विनंति करतों, कीं तुम्ही राम राम म्हणा; एवढी देणगी मज गरिबाला द्या ६. [३९७५]

पहिला प्रहर गर्भवासाचा, दुसरा बाळपणाचा व तिसरा तरुणपणाचा असे अज्ञानरात्रीचे तीन प्रहर जाऊन चौथा प्रहर म्हातारपणाचा आला आहे. अजून तुम्ही कां जागे होत नाहीं? सावध होऊन कांहीं तरी दान द्या. उगीच ऐकून डोळे झांकूं नका १. ह्याप्रमाणें मी वासुदेव 'रामकृष्ण हरीचें भजन करा,' म्हणून जनांस सांगत आहें आणि आपल्या हातांमध्यें टाळ, चिपळ्या, वीणा घेऊन मुखानें नारायणनामाची मी गर्जना करीत आहें २. फळ, फूल अथवा पाणी ह्यांतून जें कांहीं कोणास मिळेल तें देवास अर्पण करा; पण झोंपेचें सोंग घेऊन निजूं नका, कारण ह्या मनुष्यदेहांत जर तुम्ही वंचना कराल तर पुढें तुमचें कल्याण होणार नाहीं ३. देवाला कांहीं द्रव्याची गरज नाहीं, एकचित्त करून एक भाव अर्पण केल्यास तें त्याला फार आहे. एवढ्याकरितां तुम्ही आपला नाश करून घेऊं नका ४. तुमच्याजवळ हेंच दान मागण्याकरितां मी फार सायासानें येथपर्यंत आलों. आतां माझी निराशा करून तुम्ही संसाराचें ओझें घेऊन बसूं नका.

संसारास गा ॥ ५ ॥ आतां मागुता येईल फेरा। हें तों न घडे या नगरा। म्हणे तुकयाबंधु भाव धरा। ओळखी नाहीं तरी जाल अघोरा गा ॥ ६ ॥ [३९७६]

राम राम दोनी अक्षरें। सुलभ आणि सोपारें। जागा मागिले पाहारें। सेवटींचें गोड तेंचि खरें गा ॥ १ ॥ रामकृष्ण वासुदेवा। जाणवी (जाणवीतसे) जनांसी वाजवी चिपळिया। टाळ घागऱ्याघोषें गा। रामकृष्ण वासुदेवा ॥ २ ॥ गाय वासुदेव वासुदेवा। भिन्न नाहीं आणिका नांवा। दान जाणोनियां करी यावा। न ठेवीं उरी कांहीं ठेवा गा ॥ ३ ॥ नीज घेऊनीयां फिरती। एक वेळा जाणविती। धरूनियां राहा चित्तीं। नेघें भार सांडीं कामा हातीं गा ॥ ४ ॥ सुपात्रीं सर्वभाव। मी तों सर्व वासुदेव। जाणती कृपाळु संत महानुभाव। जया भिन्न भेद नाहीं ठावा गा ॥ ५ ॥ शूर दान जीवें उदार। नाहीं वासुदेवीं विसर। कीर्ति वाढे चराचर। तुका म्हणे तया नमस्कार गा ॥ ६ ॥ [३९७७]

बोल अबोलणे बोले (बोल बोले अबोले)। जागे बाहेर आंत निजेले। कैसें घरांत घरकुल केलें। नेणों अंधार ना उजेडलें गा ॥ १ ॥ वासुदेव करितो फेरा। वाडियांत बाहेर द्वारा। कोणी कांहीं तरी दान पुण्य करा। जाब न द्याल तरी जातों माघारा गा ॥ २ ॥ हातीं टाळ दिंडी मुखीं नाम गाणें। गजर होतो बहु मोठ्यानें। नाहीं निवडलीं थोरलहानें। नका निजों भिकेच्या भेणें गा ॥ ३ ॥ मी तो वासुदेव तत्त्वता। कळों येईल विचारितां। आहे ठाउका सभाग्य संतां। नाहीं दुजा आणीक मागता गा ॥ ४ ॥ काय जागाचि निजलासी (कांहीं जागा कीं निजलासी)। सुनें जागवूनि दारापाशीं। तुझ्या हितापाठीं करी वसवसी। भेटी न देसी वासुदेवासी गा ॥ ५ ॥ ऐसें जागविलें अवघें जन।

ह्या प्रपंचांत कांहीं तरी धर्म करावा, तर त्याचें सार्थक आहे ५. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, आतां पुनः ह्या मनुष्यदेहरूपी नगराला येणें होईल असें घडणार नाहीं, म्हणून तुम्ही एक भाव धरा. जर देवाची ओळख करून न घ्याल तर तुम्हांस अघोर नरक भोगावा लागेल ६. [३९७६]

'राम राम' हीं दोन अक्षरें सोपीं आहेत. त्यांचा जप करून शेवटच्या प्रहरांत तुम्ही जागे राहा. शेवट गोड करावा तेंच उत्तम व गोड आहे १. असें वासुदेव रामकृष्णाचें नामस्मरण करून लोकांस जाणवीत आहे आणि त्यानें आपल्या पायांत घागऱ्या बांधून तो टाळ, चिपळ्या वाजवीत आहे २. वासुदेव आपलेंच नांव गात आहे, त्याच्या नांवामध्यें वेगळेपणा नाहीं असें जाणवून हेंच दान देण्याविषयीं तुम्ही हिंमत करा. कांहीं देहसंबंधीं पसाऱ्याची बाकी मागें ठेवूं नका ३. निजवस्तु (आत्मवस्तु) घेऊन दान देण्याविषयीं वासुदेव हिंडत आहे. ती वस्तु चित्तामध्यें धरून राहा, असें तो एक वेळ सांगत आहे. संसाराचें ओझें घेऊं नका व सर्व काम सोडून द्या ४. मी वासुदेव सर्व ठिकाणीं व्यापक आहें हा भाव चांगल्या अंतःकरणामध्यें राहील, असें कृपाळु महानुभाव संत जाणतात, त्यांच्या ठिकाणीं वेगळेपणाचा भाव नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, जे वासुदेवाला विसरत नाहींत तेच जीवानें उदार व दानशूर आहेत, म्हणून त्यांची कीर्ति चराचरामध्यें वाढली जाते. अशा संतांना माझा नमस्कार आहे ६. [३९७७]

मुखानें अनिर्वाच्या शब्दांच्या गोष्टी सांगतात (कांहीं शब्दज्ञानी बोलण्याचा विषय नसलेल्या ब्रह्मासंबंधानें पुष्कळ बोलतात), पण ते जसे बाहेर सावध आहेत तसे अंतरांत नाहींत. असें त्यांनीं जगद्रूपी घरांत घरकुल केलें आहे (किंवा, ईशसृष्टीच्या घरांत पुनः स्वतःला राहाण्याकरितां त्यांनीं एक घरकुल केलें आहे) मग त्यांच्या ठिकाणीं अंधार आहे कीं उजेड आहे हें समजत नाहीं १. वासुदेव हा देहरूपी वाड्यांत व बाहेर फेरा करीत आहे. अरे, तुम्ही कोणी कांहीं तरी दान देण्याचें पुण्य करा. नाहीं असा जबाब द्याल तर तो वासुदेव परत जात आहे २. हातांमध्यें टाळ व वीणा घेऊन मुखानें नामस्मरणयुक्त गाणें गात आहे. तो गजर मोठ्या अट्टाहासानें होत आहे; तें ऐकून दान देण्याच्या भीतीनें तुम्ही निजूं नका. त्यानें कांहीं लहानथोराची निवड केली नाहीं ३. मी निश्चयानें वासुदेवरूपच आहें, हें बुद्धीच्या रूपानें तुम्हांला समजून येईल. सभाग्य संतांना हा प्रकार माहीत आहे. माझ्याखेरीज दान मागणारा दुसरा कोणी येणार नाहीं ४. कामक्रोधरूपी कुत्रीं दाराबाहेर जागीं ठेवून तूं घरांत निजलास किंवा जागा आहेस हें समजत नाहीं. तीं कुत्रीं तुझ्या हिताच्या मागें वसवसून पाठीमागें लागतात आणि तूं तर वासुदेवाला भेट देत नाहींस ५. तुकाराम महाराज

होतें संचित तिहीं केलें दान। तुका म्हणे दुबळीं कोण कोण। गेलीं वासुदेवा विसरून गा॥ ६॥ [३९७८]

रामकृष्ण गीतीं गात। टाळ चिपळ्या वाजवीत। छंदें आपुलिया नाचत। नीज घेऊनी(यां) फिरत गा॥ १॥ जनीं वनीं हा अवघा देव। वासनेचा पुसावा ठाव। मग वोळगतो वासुदेव। ऐसा मनीं वसूं द्यावा भाव गा॥ २॥ निज दानाची (नामाची) थोर आवडी। वासुदेवासी लागली गोडी। मुखीं नाम उच्चारी घडोघडीं। ऐसी करा वासुदेवजोडी गा (वासुदेवीं जोडी गा)॥ ३॥ अवघा सारूनी शेवट झाला। प्रयत्न न चले कांहीं केला। जागा होईं सांडूनि झोंपेला। दान देईं वासुदेवाला गा॥ ४॥ तुका म्हणे रे धन्य त्याचें जिणें। जींहीं वासुदेवीं घातलें दान। तया न लगे येणें जाणें। झालें वासुदेवीं राहणें गा॥ ५॥ [३९७९]

: जोगी :

जग जोगी जग जोगी। जागे जागे बोलती॥ १॥ जागता जगदेव। राखा कांहीं भाव॥ २॥ अवघा क्षेत्रपाळ। पूजावा सकळ॥ ३॥ पूजा पत्र कांहीं। फल पुष्प तोय॥ ४॥ बहुतां दिसां फेरा। आला या नगरा॥ ५॥ नका घेऊं भार। धर्म तोचि सार॥ ६॥ तुका मागे दान। द्यावें जी अनन्य॥ ७॥ [३९८०]

: सरवदा अभंग :

ऐका गा ए भाई। सरवदा सांगतो काई। येथें नाडेल माई। दोघां पुत्रांची। ते करिती तिची विटंबना। अवघ्या प्रसिद्ध जना। एक न मारितां शाहाणा। तो जाणा सुख न पवे॥ १॥

म्हणतात, ह्याप्रमाणें वासुदेव सर्व जनांना सावध करीत आहे; पण ज्यांचें संचित होतें त्यांनीं वासुदेवाला दान दिलें आणि जे वासुदेवाला विसरून गेले ते दुबळे आहेत असें म्हणावें ६. [३९७८]

हा वासुदेव रामकृष्णाचें नामस्मरण करीत टाळ व चिपळ्या हातानें वाजवीत आपल्या छंदानें नाचत आहे व निजस्वरूप (आत्मवस्तु) दान देण्याविषयीं जगांत फिरत आहे १. सर्व जनावनाच्या ठिकाणीं व्यापक देवच आहे. तो पाहाण्याविषयीं मूळासुद्धां वासना नाहींशी करून मग त्या वासुदेवाला शरण जावें. असा भाव तुम्ही आपल्या मनांत बळकट धरा २. निजस्वरूप दान देण्याची गोडी वासुदेवाला फार लागली आहे; म्हणून तो घटकेघटकेला आपल्याच नामाचा उच्चार करीत आहे. ह्याप्रमाणें तुम्ही वासुदेवाची प्राप्ति करून घ्या ३. सर्व प्रकारें प्रयत्न करण्याचा शेवट झाला परंतु कांहीं उपयोग होत नाहीं. आतां तूं झोंप टाकून जागा हो आणि वासुदेवाला दान दे ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्यांनीं वासुदेवाला दान दिलें त्यांचा जन्म धन्य आहे व त्यांना जन्ममृत्यूच्या येरझारा करणें नको. एका वासुदेवाच्या ठिकाणीं त्यांचें वास्तव्य झालें ५. [३९७९]

जगांतील योगी हे सर्वांना आपल्या ठिकाणीं (स्वकर्तव्याविषयीं) जागत असा असें सांगतात १. जो जगन्नायक त्याच्या ठिकाणीं नित्य जागून कांहीं श्रद्धा ठेवा २. पूर्ण क्षेत्राच्या सर्व रक्षकांचें पूजन करावें (सर्व देहांतील जीवमात्रांची देव मानून पूजा करावी; किंवा, क्षेत्रांतील शिव-विष्णूंच्या प्रतिमांची पूजा करावी) ३. कांहीं फळ, फूल, पाणी अथवा पान ह्यानें त्यांची पूजा करावी ४. मनुष्यदेहाच्या नगरांत बहुत दिवसांनीं फेरी आली आहे ५. आपल्या मस्तकावर कोणत्याहि अभिमानाचें ओझें घेऊं नका. धर्मानें वागणें हेंच सार आहे ६. तुकाराम महाराज म्हणतात, मी दान मागत आहें. तुम्हीं मला अनन्यता द्यावी (अनन्यभावाचें दान द्यावें) ७. [३९८०]

शकुन सांगणारा सरवदा कांहीं एक शकुन सांगतो तें ऐका. जिला कामक्रोधरूपी दोन पुत्र आहेत अशी जी बुद्धिरूपी आई ती ह्यांच्याकडून फसली जाईल. ते तिची विटंबना करितात हें सर्व लोकांना माहीतच आहे. जो शहाणा आहे त्याला ह्या दोन पुत्रांपैकीं काम नांवाच्या पुत्राला मारल्याशिवाय सुख कधींहि मिळणार नाहीं १.

आणीक ऐका ऐका गा ए । सरवदा सांगतो काय । खरें बोले तो जाय । नरकामध्यें अधोगती । हें चौवांच्या मुखें। मना आणावें सुखें। अवघीं चुकतील दुःखें। खोटें बोला नरनारी ॥ २॥ आणीक नाडेल एक जाण । सरवदा बोलतो वचन । जागें माझें चित्त म्हणोन । पडिलें खान तया घरीं । म्हणोनी न म्हणा माझें कांहीं । निजीं निजा सुखें ठायीं । यत्न होईल तईं । चोराठायीं विश्वास ॥ ३ ॥ आणी एकी परी । सरवदा सांगतो थोरी । दुःख पावेल नारी । पतिव्रता यामधीं । पांचांनीं दिधली हातीं । म्हणोनि न मनावी निश्चिती । परपुरुषीं होय रती । सुखगती ते पावे ॥ ४ ॥ आणीक एकी परी । सरवदा सांगतो तें करीं । दान देतां जो वारी । नव्हे भला भला तो । तुका म्हणे आई । येथें नांव काई । सांगसी तें ठायीं । मरो रांडेचें ॥ ५ ॥ [३९८१]

मुंढा : मुसलमानी (हिंदी) अभंग :

संबाल यारा उपर तलें दोन्हों मारकी चोट । नजर करे सोही राखे पश्वा जावे लूट ॥ १ ॥ प्यार खुदाई प्यार खुदाई प्यार खुदाई प्यार खुदाई रे बाबा जिकिर खुदाई ॥ २ ॥ उडे कुदे ढुंग नचावे आगल भूलन प्यार । लडबड खडबड कांहे कांख चलावत भार ॥ ३ ॥ कहे तुका सुनो लोका हम जिन्होंके सात । मिलावे तो उसे देना तो ही चढावे हात ॥ ४ ॥ [३९८२]

अल्ला करे सो होय बाबा करतारका सिरताज । गाऊ बछरे तिस चलावे यारी बाघो न सात ॥ १ ॥ ख्याल मेरा साहेबका बाबा हुवा करतार । व्हांटें आवे चंढे पीठ आपे हुवा असवार

अहो जन हो, तुम्हांला आणखी कांहीं सांगतों तें ऐका. देहादि प्रपंच जो सत्य मानतो तो नरकामध्यें जातो. हें जें कांहीं म्यां सांगितलें तें तुम्ही चार वेदांच्या आधारानें पूर्ण लक्षांत आणून तुम्ही सर्व स्त्रीपुरुष देहादि प्रपंच मिथ्या आहे असें समजा, म्हणजे सर्व दुःखांपासून तुम्ही मुक्त व्हाल २. शकुन सांगणारा असें सांगत आहे, कीं दुसरा एक फसेल असें समज. तो हा जो माझें चित्त जागें आहे असें म्हणेल त्याच्या घरचें सर्व चोरीस जाईल, म्हणून त्यानें माझें असें कांहीं म्हणूं नये. निजात्मस्वरूपाच्या ठिकाणीं त्यानें सुखानें स्थिर व्हावें. सर्वांचें चित्त चोरणाऱ्या हरीच्या ठिकाणीं जर ते विश्वास ठेवतील तर आम्हीं सांगितलेले उपाय त्यांचेकडून होतील ३. मी शकुन सांगणारा आणखी एक मोठा प्रकार सांगतों. देहाहंकाररूपी पतीच्या ठिकाणीं सर्व काळ रत असणारी नारी पतिव्रता जी जीवदशा ती स्त्रियांमध्यें दुःखी होईल. पंचज्ञानेंद्रियांनीं, पंचकर्मेंद्रियांनीं, पंचप्राण इत्यादि प्रपंचानें जीवदशा ही स्त्री देहाहंकाराच्या हातीं दिली, म्हणून निष्काळजीपणा मानूं नये. परमात्मा जो परपुरुष त्याच्या ठिकाणीं ज्या वेळेस सर्व काळ जिची रति होईल तिला सुखप्राप्ति होईल ४. तुकाराम महाराज म्हणतात, शकुन सांगणारा आणखी एक प्रकार सांगतो तो तूं कर. कोणी दान देत असतां त्याचें जो निवारण करतो तो चांगला नाहीं. सरवदा जोशी म्हणतो, आई, तुमचें जन्मनांव (मूळ नांव) काय आहे तें सांगा. भलत्या ठिकाणीं सांगाल तर फसाल. ह्याप्रमाणें मी तुम्हांला भविष्य सांगितलें आहे. जे न ऐकतील ते मरोत रांडेचे! ५. [३९८१]

हे मित्रा, स्वर्गादि वरच्या गतीचे (किंवा, यमाचे) व पशुपक्ष्यादि खालच्या गतीचे भोगाचे तडाखे सांभाळण्यांत जो दक्षता ठेवील त्याचेंच रक्षण होईल. दुसरा नागवला जाईल १. देवावर प्रीति ठेव, देवावर प्रीति ठेव, देवावर प्रीति ठेव, देवावर प्रीति ठेव, अरे बाबा, ईश्वराविषयीं पायवाट (देवाच्या प्राप्तीचा प्रयत्न) कर २. प्रपंचामध्यें उड्या मारणें, ढुंगण हालविणें हें प्रिय. ह्या योगानें पुढें देवाला विसरशील. कांखेमध्यें झोळी, कृष्णाजिन ह्यांची लडबड आणि खडावांची खडबड हें ओझें कशाला वाढवितोस? ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो लोक हो, ऐका, आम्ही ज्याच्याशीं संबंध घालूं (संतांच्या स्वाधीन करूं) त्यालाच हात वर करून घ्यावा (संतांना तुम्ही सर्वस्व द्याल तरच तुमचा हात वर राहील. तुमचा नांवलौकिक आणि पारमार्थिक अधिकार वाढेल) ४. [३९८२]

अहो बाबांनो, देवानें केलें तर सामान्य मनुष्यदेखील देवाचा मुगुट होईल आणि गाई आपल्या वासरांसह वाघाबरोबर मित्रत्व करतील १. अहो बाबांनो, माझ्या देवाचा विचार करणारे जे (संत) ते पुढें निजपदावर आरूढ

(असिवार) ॥ २ ॥ जिकिर करो अल्लाकी बाबा सबल्यां अंदर भेस। तुका जो नर बुझे सोहि भया दरवेस ॥ ३ ॥ [३९८३]

तम भज्याय ते बुरा जिकीर तैं करे। सीर काटे ऊर कुटे ताहां झडकरे ॥ १ ॥ ताहां एक तु ही ताहां एक तुही। ताहां एक तु ही रे बाबा हम तुम्ह नहीं ॥ २ ॥ दिदार देखो भले नहीं किसे पछाने कोये। सचा नहीं पकड सके झुटा झुटे रोये ॥ ३ ॥ किसे कहे मेरा किन्हे सात लिया भास। नहीं मेलो मिले जीवना झूटा किया नास ॥ ४ ॥ सुनो भाई कैसा तो ही होय तैसा होय। बाट खाना अल्ला कहना एकबारां तो ही ॥ ५ ॥ भला लिया भेक मुंढे अपना नफा देख। कहे तुका सो ही सखा हाक अल्ला एक ॥ ६ ॥ [३९८४]

नजर करे सोहि जिंके बाबा दुरथी तमासा देख। लकडी फांसा लेकर बैठा आगले ठकण भेख ॥ १ ॥ काहे भुला एक देखत आंखो मारत डांगो बाजार ॥ २ ॥ दमरी चमरी जो नर भुला। सोत आघो हिलत खाय ॥ ३ ॥ नहि बुलावत किसे बाबा आपहि मत जाय। कहे तुका उस असाके संग फिरफिर गोते खाय ॥ ४ ॥ [३९८५]

सब संबाल म्याने लैंडे खडा केऊं गुंग। मदिरथी मता हुवा भुलि पाडी भंग ॥ १ ॥ आपसकुं संबाल आपसकुं संबाल। मुंढे खुब राख ताल। मुथिवोहि बोला नहीं तो करूंगा हाल ॥ २ ॥ आवलका तो पीछे नहीं मुदल बिसर जाय। फिरते नहीं लाज रंडी गधे (गद्धी) गोते खाय ॥ ३ ॥ जिन्हों खातिर इतना होता सो नहीं तुझे बेकाम। उचा जोरो लिया तुंबा तुंबा बुरा काम ॥ ४ ॥ निकल जावे चिकल जोरा मुंढे दिलदारी। जवानीकी छोड दे बात फीर एक तारी ॥ ५ ॥ कहे तुका फिसल (पिसल)

होतात २. सर्व भूतांचा अंतरात्मा जो देव त्याच्या गुणांची चर्चा करा. तुकाराम महाराज म्हणतात, जो कोणी हें समजतो तोच दरवेशी (संत) झाला ३. [३९८३]

तूं लोकांशीं जिकीर (लोकांचा द्वेष) करतोस हें वाईट आहे आणि लोकांचीं डोकीं फोडतोस आणि ऊर बडवितोस त्या योगानें सर्व लोक तुला भितात १. त्या ठिकाणीं तूंच आहेस (सर्वत्र एक हरिच आहे) असें त्रिवार सांगतात. आम्ही तुम्ही कोणी नाहीं २. ज्याला डोळे (ज्ञानदृष्टि) आहेत त्यांनीं पाहावें, विसरूं नये, कोणाला कोणी ओळखावें, सत्याला कोणी धरूं शकत नाहीं. तूं खोटें खोटें रडतोस ३. तूं माझें कोणाला म्हणतोस? कोणत्या भासाचें तूं सत्यत्वानें ग्रहण करतोस? आपल्या जीवनाला (हरीला) न मिळतां आपल्या आयुष्याचा व्यर्थ नाश केलास ४. ऐका बाबांनो, जसें होईल तसें होऊं द्या, जें मिळेल तें वाटून खावें आणि एकवार तरी देवाचें नांव घ्यावें ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे डोकें मुंडून घेतलेल्या गोसाव्या, तूं चांगला वेष घेतलास. एक देवच सर्वांचा सखा आहे त्याला हांक मार, आपलें हित पाहा ६. [३९८४]

हे बापा, जो साक्षी होईल तो जिंकील, म्हणून प्रपंचाचा तमाशा तूं साक्षित्वानें पाहा. (दुरूनच संसाराचा तमाशा पाहा). पुढें कांहीं कपटी लोक पाश हातांत घेऊन तुला फसविण्याकरितां वेषधारी बसले आहेत १. कितीएक वेषधारी मायेच्या बाजारामध्यें लोभानें आपल्या डोक्यावर तडाखे मारीत आहेत, असें तूं आपल्या डोळयांदेखत पाहात असतांना कां भुललास? २. दमडीचमडीकरितां जो मनुष्य भुलून गेला आहे तो पुढें लाथा खाईल ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे बापा, कोणालाहि तूं आशेनें घरीं बोलावूं नकोस व आपणहि कोणाच्या घरीं जाऊं नकोस, कारण पुनः पुनः आशेच्या संगतीनें तूं धक्का खाशील ४. [३९८५]

हे मुला, सर्व संभाळ. विषयांच्या ठिकाणीं गुंग होऊन उभा कां? मोहाच्या भांगेनें तूं मदोन्मत्त होऊन आपणा स्वतःला विसरला आहेस १. तूं आपल्याला सांभाळ, तूं आपल्याला सांभाळ. हे मूढा, ह्याविषयीं खूप खबरदारी ठेव. माझ्या बरोबर बोलला नाहींस तर मी तुझे हाल करीन २. प्रथमचा हा मनुष्यदेह तुला पुनः मिळणार नाहीं. ह्या मुद्दलाला तूं विसरून गेलास. ह्या योनींतून त्या योनींत फिरण्याची तुला लाज कशी नाहीं? हे गाढवा, तूं गोते खात आहेस ३. ज्यांच्याकरितां इतका व्यवहार होत आहे ते तुझ्या कांहीं कामाला येणार नाहींत, म्हणून तूं मोठ्या जोरानें भोंपळा घेऊन गोसावी झालास तरी तें करणें वाईटच आहे ४. हे मूर्खा, बायकापोरें हीं सर्व तुला सोडून जातील. ह्याकरितां त्यांच्यावर प्रेम ठेवणें हा मूर्खपणा होय. मी तरुण व दांडगा आहें ही गोष्ट टाकून दे, म्हणजे तुझें

रुका मेरेको तो दान देख। पकड (पक्कड) धका गांडगुढघी मार चलाऊं आलेख ॥ ६ ॥ [३९८६]

: वैद्यगोळी :

अल्ला देवे अल्ला दिलावे अल्ला दारू अल्ला खिलावे। अल्ला बिगर नही कोय अल्ला करे सोहि होय ॥ १ ॥ मर्द होये वो खडा फीर नामर्दकु नही धीर। आपने दिलकुं करना खुसी तीन दामकी क्या खुमासी ॥ २ ॥ सब रसोंका किया मार भजनगोली (भजनगाली) एक हि सार। इनाम तो सब ही सखा थोडी तो भी लेकर ज्या ॥ ३ ॥ जिन्हो पास नीत सोय वो हि बसकरी तेगेवे। सांतो पांचो मार चलावे उतार सो पीछे खावे ॥ ४ ॥ सब ज्वानी निकल जावे पीछे गधडी मट्टी खावे। गावढाल सो क्या लेवे हगवनी भरी नहीं धोवे ॥ ५ ॥ मेरी दारू जिन्हें खाया दिदार दरगा सोही पाया। तल्हे मुंढी घाल जावे बिगारी सोवे क्या लेवे ॥ ६ ॥ बजारका बुझे भाव वोही पुसत आवे ठाव। फुकट बाटु कहे तुका लेवे सो हि लेवो सखा ॥ ७ ॥ [३९८७]

आवल (आवल्ल) नाम अल्ला बडा लेते भूल न जाये। इलाम त्याकालजमुपरताही तुंब बजाये ॥ १ ॥ अल्ला एक तुं नबी एक तुं। काटतें सिर पावों हाते नहीं जीव डराये ॥ २ ॥ आगले देखो पिछे बुझो आपे हजुर आये ॥ ३ ॥ सब सवरी नचाव म्याने खडा आपनी सात। हात पाव रखते जबाव नहीं आगली बात ॥ ४ ॥ सुनो भाई बजार नहीं। सबहि नर चलावे। नन्हा बडा नहीं कोये एक ठोर मिलावे ॥ ५ ॥ एक तारी नहीं प्यार जीवतनकी आस। कहे तुका सोहि मुंढा राखलिये पायेनपास ॥ ६ ॥ [३९८८]

चित्त एकाग्र होईल ५. तुकाराम महाराज म्हणतात, अधोगतीला सांभाळ; इतकी मला देणगी दे. नाहीं तर पाहा. पकडून धक्के देऊन ढुंगणावर व गुडघ्यांवर खूप मार देऊं हें तूं पक्कें समज ६. [३९८६]

देव देणारा व दुसऱ्याकडून देवविणारा देव आहे. देव औषध आहे व देवच खावविणारा आहे. देवावांचून कोणी नाहीं. देव करील तें होईल १. जो कोणी मर्द आहे तोच औषध घेण्याला उभा राहील, पण जे कोणी नपुंसक व धीररहित आहेत ते तयार होणार नाहींत. आपल्या मनाला प्रसन्न करावें. तीन दमड्यांची काय बिशाद? २. सर्व औषधी नाहींशी करून एक भगवद्भजन हीच एक गोळी सार आहे. विश्वासानें सर्वतोपरि मित्र असणाऱ्या विश्वासानें ती भजनगोळी थोडी घेऊन जा ३. ज्याच्याजवळ नीति निजल्या आहेत तीस पुरे पुरे म्हणून रडतात. सप्तधातुमय व पंचभूतात्मक शरीरावर मात करणारी (जिंकणारी) अशा ह्या भजनगोळीनें ज्याच्या भवरोगावर उतार पडला आहे ते ती पुनः घेतात ४. हें सर्व गाढवी तारुण्य निघून गेल्यावर मग मातीच खावी लागेल. जे मूर्ख खेडवळ आहेत ते काय माझी भजनगोळी घेऊं शकतील? कारण त्यांची खरकटी बृहती त्यांच्याकडून धुतली जाईना (हगल्यानंतर ढुंगण धुण्याचीहि त्यांना अक्कल नाहीं) ५. माझी भजनगोळी ज्यानें खाल्ली आहे तो आत्मपदाच्या ठिकाणीं प्राप्त होतो. खालीं डोकें घालून जाणारा संसाराचा भार वाहाणारा हमाल तो ही गोळी काय घेईल? ६. तुकाराम महाराज म्हणतात, बाजारच्या भावानें समजतात, कोणत्याहि वस्तूची खरी किंमत ज्यांना कळते तेच माझी भजनगोळी घेण्याकरितां ठिकाण विचारीत येतील. त्यांना मी ती फुकट देईन. जे कोणी सज्जन सखे असतील तेच ती घेतात ७. [३९८७]

प्रथम देवाचें नांव श्रेष्ठ. तें घेण्याविषयीं विसरूं नकोस. देवाचें नांव मनापासून प्रेमपूर्वक वीणा वाजवीत मुखानें घे १. देवा, एक तूं आहेस. डोकें, पाय हे कांपावयास लागले. हातांस जीव राहाणार नाहीं (देवा, तूंच एक आमचा रक्षक आहेस. तुझें नाम घेतांना कोण्या दुष्टानें आमचें डोकें, हात, पाय जरी कापले तरी तूं आमचा रक्षणकर्ता असल्यामुळें आमचा जीव मुळींच भिणार नाहीं) २. अगोदर पाहा आणि मग समज म्हणजे आपोआप देव येईल. (पुराणांतील प्रल्हादादिकांचें चरित्र पाहा. हरिनामाविषयीं निर्धार असल्यावर देव आपल्या रक्षणाकरितां आपोआप धांवत येईल) ३. आपल्या बरोबर असणारीं आपलीं इंद्रियें सर्व परमार्थाकडे लाव. हातापायांचें रक्षण करून पुढें करीन असें बोलून (पुढें मी करीन असें म्हणणें) चालणार नाहीं ४. बाबांनो ऐका, नरदेहाचा बाजार नाहींसा होऊन सर्वांना सारखें चालावें लागेल. लहानमोठ्याची निवड न करितां सर्वांनीं एकत्र मिळून राहावें ५. तुकाराम महाराज म्हणतात, हरीच्या ठिकाणीं एकतानता प्रिय नसून जीवाचा लोभ धरणारे तेच मूढ आहेत, त्यांचें तूं आपल्या पायांपाशीं रक्षण कर ६. [३९८८]

: गोंधळ :

राजस सुंदर बाळा । पाहों आलिया सकळा वो ॥ बिंबीं बिंबोनि ठेली । माझी परब्रह्म वेल्हाळा वो ॥ कोटि रविशशि जिच्या आंगींचिया लिळा (किळा) वो ॥ १ ॥ राजस विठाबाई । माझें ध्यान तुझे पायीं वो ॥ त्यजूनियां चौघांसी । लावीं आपुलिये सोई वो ॥ २ ॥ सुकुमार साजिरीं । कैसीं पाउलें गोजिरीं वो । कंठीं तुळसीमाळा । उभी भीवरेच्या तिरीं वो ॥ दंत हिरया ज्योति । शंखचक्र मिरवे करीं वो ॥ ३ ॥ निर्गुण निराकार । वेदां न कळेचि आकार वो ॥ शेषादिक श्रमले । श्रुती न कळे तुझा पार वो ॥ उभारोनी बाहे । भक्तां देत अभयकर वो ॥ ४ ॥ येऊनी पंढरपुरीं (-पुरा) । अवतरली सारंगधरा वो ॥ देखोनी भक्तिभाव । वोसरली अमृतधारा वो । देऊनी प्रेमपान्हा । तुकया स्वामीनें किंकरा वो ॥ ५ ॥ [३९८९]

सुदिन सुवेळ । तुझा मांडिला गोंधळ वो । पंचप्राण दिवटे । दोनी नेत्रांचे हिलाळ वो ॥ १ ॥ पंढरपुरनिवासे । तुझे रंगीं नाचत असें वो । नवस पुरवीं माझा । मनींची जाणोनियां इच्छा वो ॥ २ ॥ मांडिला देव्हारा । तुझा त्रिभुवनामाझारी वो । चौक साधियेला । नाभिकळस ठेविला वरी वो ॥ ३ ॥ बैसली देवता । पुढें वैष्णवांचें गाणें वो । उद्गारें गर्जती । कंठीं तुळशीचीं भूषणें वो ॥ ४ ॥ स्वानंदाचे ताटीं । धूप दीप पंचारती वो । ओवाळिली माता । विठाबाई पंचभूतीं वो ॥ ५ ॥ तुझें तुज पावलें । माझा नवस पुरवीं आतां वो । तुका म्हणे राखें आपुलिया शरणागता वो ॥ ६ ॥ [३९९०]

सुंदर मुख साजिरें । कुंडलें मनोहर गोमटीं वो । नागर नागखोपा । केशर कस्तुरी मळवटीं वो ॥ विशाळ व्यंकट नेत्री वैजयंती तळपे कंठीं वो ॥ कास पितांबराची । चंदन सुगंध साजे उटी वो

उत्तम सुंदर जी विठाबाई ही सर्वांना पाहाण्यास आलेली आहे, (किंवा, विटेवर असणाऱ्या सुंदर सुकुमार विठाबाईला पाहाण्याकरितां सर्व भक्तरूपी स्त्रिया आल्या आहेत), विस्तृत असणारें असें आपलें परब्रह्मस्वरूप त्या ठिकाणीं प्रगट आहे, कोटि चंद्र-सूर्य हे जिच्या अंगाचा प्रभाव आहेत १. हे उत्तम विठाबाई, तुझ्या चरणीं माझें लक्ष असो. चारी देहांचा (स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण ह्या चार देहांचा) निरास करून आपल्या स्वरूपीं माझें चित्त ठेव २. तूं कोमल आणि सुशोभित असून तुझीं पावलें सुंदर आहेत. तुझ्या कंठामध्यें तुळशीची माळ असून तूं चंद्रभागेच्या तीरीं उभी आहेस. तुझ्या दांतांची ओळ हिऱ्यासारखी झळकत असून शंख, चक्र हीं हातांत शोभतात ३. तूं गुणरहित आणि आकाररहित असून वेदाला तुझ्या तात्त्विक स्वरूपाचा निर्देश करितां येत नाहीं. शेष आदिकरून तुझी स्तुति करतां करतां थकले. श्रुतीला (उपनिषदांना) सुद्धां तुझा अंत लागत नाहीं. असें असून आपल्या भक्तांना हात उभारून भिऊं नकोस असें तूं म्हणतेस ४. ही (शार्ङ्गधरा) देवी पंढरपुरीं प्रगट झाली, तिनें भक्तजनांचा भक्तिभाव पाहून अमृताचा वर्षाव केला व आपल्या सेवकांना प्रेमाचा पान्हा पाजला, असें तुकाराम महाराज म्हणतात ५. [३९८९]

हे विठाबाई देवी, उत्तम दिवशीं व उत्तम वेळेवर तुझ्या भक्तिरूपी गोंधळास आरंभ केला आहे; पंचप्राणांची दिवटी व दोन्ही नेत्रांचे हिलाल पेटविले आहेत १. हे पंढरपुरांत वास करणारे देवी, तुझ्या अंगणांत मी नाचत आहें, तर माझ्या मनांतील इच्छा जाणून माझा नवस पुरा कर २. ह्या त्रैलोक्यांत तुझा विश्वरूपानें देव्हारा मीं मांडला आहे. चित्त-चतुष्टयाचा चौक मांडून मध्यभागीं अंतःकरणाचा कळस मांडून टेवला आहे, किंवा, त्रैलोक्यांत प्रसिद्ध असलेल्या पंढरपुरांत तुझा देव्हारा मांडून पंढरीक्षेत्राचा चौक साधला आणि मध्यभागीं वीटरूपी कळस मांडून टेवला आहे ३. त्यावर देवी बसली आहे व पुढें वैष्णवांचें भजन चाललें आहे. त्यांच्या गळ्यांत तुळसीच्या माळा असून ते मोठ्यानें हरिनामाचा गजर करितात ४. आत्मानंदाच्या ताटामध्यें धूप, दीप, पंचारती घेऊन पंचभूतात्मक विठाबाई हीस आरती केली (अहंकाराचा धूप जाळून साक्षी चैतन्याचा दीप ओंवाळला आणि पंचभूतात्मक देहाच्या पंचारतीनें आईला ओंवाळिलें) ५. तुकाराम महाराज म्हणतात, तुझें तुला देऊन टाकलें, आतां माझा नवस पूर्ण कर. तुझा शरणागत जो मी त्याचें तूं आतां रक्षण कर ६. [३९९०]

जिचें मुख अति उत्तम आहे, जिच्या कानांत मनाला हरण करणारीं कुंडलें आहेत, जिच्या वेणीची आकृति नागासारखी आहे, जिच्या कपाळाला केशर आणि कस्तुरीचा मळवट आहे, जिचे नेत्र मोठे असून काण्या दृष्टीनें पाहात आहेत

॥ १ ॥ अतिबरवंटा बाळा । आली सुलक्षणा गोंधळा वो ॥ राजस तेजोराशी । मिरवी शिरोमणी वेल्हाळा वो ॥ कोटि रविशशिप्रभा । तेजें लोपल्या सकळा वो । न कळे ब्रह्मादिकां । अनुपम्य इची लीळा वो ॥ २ ॥ सांवळी सकुमार । गो ी भुजा शोभती चाऱ्ही वो । सखोल वक्षस्थळ । सुढाळ पदक झळके वरी वो । कटीं क्षुद्र घंटिका । शब्द करिताती माधुरी वो । गर्जत चरणीं वाकी । अभिनव संगीत नृत्य करी वो ॥ ३ ॥ अष्टांगीं मंडित काय । वर्णावी रूपठेवणी वो । शोधिव शुद्ध रसाची । ओतिली लावण्यखाणी वो । सर्वकळासंपन्न । मंजुळ बोले हास्यवदनीं वो । बहु रूपें नटली । आदिशक्ति नारायणी वो ॥ ४ ॥ घटस्थापना केली । पंढरपुरमहानगरीं वो । अस्मानी मंडप दिला । तिन्ही ताळांवरी वो । आरंभिला गोंधळ । इनें चंद्रभागेतिरीं वो । आली भक्तिकाजा । कृष्णाबाई योगेश्वरी वो ॥ ५ ॥ तेहतीस कोटि देव । चामुंडा अष्ट कोटि भैरव वो । आरत्या कुरवंड्या । करिती पुष्पांचा वरुषाव वो । नारद तुंबर गायन । ब्रह्मानंदें करिती गंधर्व वो । वंदी चरणरज । तेथें तुकयाचा बांधव वो ॥ ६ ॥ [३९९१]

: कैकई :

ऐक बाई तुज वो कांहीं सांगतें मी शकून । निजलिया भुर होसी जागें म्हणऊन ॥ १ ॥ मान्य माझें केलें सांगतें एका बोलें । न येतां हें भलें कळों कोणा लोकांसी ॥ २ ॥ सांगतें गुण जीवींची खुण ऐक माझी मात । बैस एका भावें माझे हातीं दे वो हात ॥ ३ ॥ बरवा घरचार तुज सांपडला ठाव । फळ नाहीं पोटीं येथें दिसे खोटा भाव ॥ ४ ॥ आहे तुझे हातीं एका नवसाचें फळ । भावा करीं साह्य चहूं अठरांच्या बळें ॥ ५ ॥ करीं लागपाठ चित्त वित्त नको पाहों । अखई तो चुडा तुज

व जिच्या गळयांत वैजयंती माला झळकत आहे, जिनें पीतांबराची कांस घातली आहे व जिच्या अंगाला चंदनाची उटी शोभते १. अशी अति उत्तम देवी सुलक्षणी गोंधळास आली आहे. जी महान् तेजस्वी अशी सर्वांत श्रेष्ठ शोभत आहे, जिच्या तेजानें कोटि चंद्रसूर्यांचा प्रकाश लोपून गेला आहे, तिची लीला निरुपम असून ब्रह्मादिकांसहि कळत नाहीं २. जी श्यामसुंदर अति तरुण असून जिच्या चारी भुजा सुशोभित आहेत, जिच्या छातीचा भाग सखोल असून त्यावर पदक झळकत आहे, कमरेस लहान लहान घुंगरें असून त्यांचा मधुर ध्वनि निघतो, जिच्या चरणींच्या वाग्ऱ्या वाजत असून जी उत्तम गाणीं गात आहे ३. तिचा अष्टांग सुशोभित बांधा किती वर्णन करावा? ती शुद्ध केलेल्या रसाची मूर्ति ओतली आहे, व सौंदर्याची ती केवळ खाण आहे. जी सकल गुणयुक्त असून जिचें हंसतमुख आहे व कोमल अशा शब्दांनीं जी बोलते ती नारायणी आद्य देवी बहुरूपानें नटली आहे ४. पंढरपूर नगरामध्यें तिची घटस्थापना केली आहे. त्रैलोक्यावर आकाशाचा मंडप दिला. हिनें चंद्रभागेच्या तीरावर गोंधळ आरंभिला. भक्तजनांच्या कार्याकरितां कृष्णाबाई योगेश्वरी देवी आली ५. तेहतीस कोटि देव व देवी व आठ कोटि भैरवांचा समुदाय मिळून आरत्या ओंवाळतात आणि फुलांचा वर्षाव करितात आणि मोठ्या आनंदानें नारद, तुंबर व गंधर्व तेथें गायन करतात. तुकाराम महाराजांचे बंधु कान्होबा म्हणतात, तिच्या चरण–रजाला मी वंदन करीत आहें ६. [३९९१]

(हात पाहून शुभ शकुन सांगणारी कैकई-कैकाडीण म्हणते) हे बाई, तूं ऐक. तुला मी कांहीं एक शकुन सांगतें. भगवद्भजनाच्या ठिकाणीं जर तूं निजशील तर तूं फजीत होशील, म्हणून श्रीहरिस्वरूपीं जागृत राहा १. मी जें कांहीं एक शब्दानें सांगत आहें तें संतांनीं मान्य केलें. माझें हें बोलणें व्यवहारांत चांगल्या असलेल्या लोकांना देखील समजत नाहीं २. मी ही तुला जीवांतल्या खुणेची गोष्ट सांगतें ती माझी तूं ऐक. एका श्रीहरीविषयींच्या भावनेनें तूं राहा व माझ्या हाताला हात मिळीव. मी तुझा हात (हस्तसामुद्रिक) पाहातें ३. तुला उत्तम गृहसंसाराचें ठिकाण प्राप्त झालें आहे. ह्या ठिकाणीं कांहीं एक फलप्राप्ति नसून सर्व कांहीं मिथ्या भास होत आहे ४. तुझ्या हातामध्यें एक नवसाचें फळ आहे, म्हणून चार वेद व अठरा पुराणें ह्यांच्या साह्यानें तूं आपल्यास भक्तिभावाची मदत घे ५. आम्हीं सांगितल्याप्रमाणें तूं गुरूचा पाठलाग कर. द्रव्य व त्याकडे असणारें चित्त ह्यांकडे तूं लक्ष देऊं नको. ह्या योगानें तुझ्या सुखसौभाग्याच्या बांगड्या

भोगवील नाहो ॥ ६ ॥ कुळींची हे मुळी तुझे लागलीसे देवी। पडिला विसर नेदी फळ नाहीं ठावी ॥७॥ तुका म्हणे नांद सुखें धरीं आठवण। माझे येतील कोणी त्यांचा राख बहु मान ॥ ८ ॥ [३९९२]

: स्फुट अभंग :

देव ते संत देव ते संत। निमित्य त्या प्रतिमा ॥ १ ॥ मी तों सांगतसें भावें। असो ठावें सकळां ॥ २ ॥ निराकारी ओस दिशा। येथें इच्छा पुरतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे रोकडें केणें। सेवितां येणें पोट धाय ॥ ४ ॥ [३९९३]

न कळे वो माव मुनि मागे एक अंतुरी। साठीं संवत्सरां जन्म तया उदरीं ॥ १ ॥ कैसा आकळ वो माये चपळ वो। त्रिभुवनव्यापक हरि सकळ वो ॥ २ ॥ हनुमंता भेटी गर्व हरिला दोहींचा। गरुडा विटंबना रूपा सत्यभामेच्या (चा) ॥ ३ ॥ द्रोपदीचा भेद पुरविला समयीं। ऋषि फळवनीं देंठीं लाविते ठायीं ॥ ४ ॥ अर्जुनाच्या रथीं कपि ध्वजस्तंभीं ठेविला। दोन्ही पैजा तेथें गर्व हरि हा दादुला ॥ ५ ॥ भावभक्ति सत्त्वगुण झाला दुर्जना। तुका म्हणे सकळां छंदें खेळे आपणा ॥ ६ ॥ [३९९४]

उदारा कृपाळा अगा देवांच्या देवा। तुजसवें पण आतां आमुचा दावा ॥ १ ॥ कैसा जासी सांग आतां मजपासूनी। केलें वाताहत दिलें संसारा पाणी ॥ २ ॥ अवघीं आवरूनी तुझे लाविलीं पाठीं। आतां त्या विसर सोहंकोहंच्या गोष्टी ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां चरणीं घातली मिठी। पडिली ते पडो तुम्हां आम्हांसी तुटी ॥ ४ ॥ [३९९५]

अखंड राहून तुला निजात्मपति भोगील ६. भगवद्देवी ही मूळचीच तुझ्या कुळाला लागलेली आहे. तिचा विसर तुला पडला म्हणून ती फळ देत नाहीं, हेंहि तुला ठाऊक नाहीं ७. तुकाराम महाराज म्हणतात, ती भगवती देवी म्हणते, तूं सुखानें राहा आणि माझी आठवण टेव आणि जे कोणी माझे भक्त तुझ्याकडे येतील त्यांचा तूं पुष्कळ सत्कार कर ८. [३९९२]

देव हाच संत आहे व संत हेच देव आहेत, आणि दोघांच्या मूर्ती ह्या उपाधीच्या निमित्ताला आहेत १. हें मी मोठ्या भावार्थानें सांगत आहें असें सर्वांना माहीत असावें २. निराकार स्वरूपाच्या ठिकाणीं सर्व शून्य आहे व सगुणाच्या ठिकाणीं (संतांजवळ) इच्छा पूर्ण होते ३. तुकाराम महाराज म्हणतात, सगुण स्वरूप (संत) हा रोकडा माल आहे. ह्याचें सेवन केल्यानें इच्छा पूर्ण होते ४. [३९९३]

हरीची माया न कळल्यामुळें नारदमुनि देवाजवळ त्याच्या बायकांपैकीं एक बायको मागूं लागले, त्या वेळेस नारदमुनीची नारदी स्त्री होऊन साठ संवत्सरें हीं मुलें झालीं १. हरि हा न आकळणारा असा असून चपळ आहे व त्यानें सर्व त्रैलोक्याला व्यापलें आहे २. द्वारकेमध्यें रामरूपानें हनुमंतास भेट देण्यांत गरुड व सत्यभामा ह्यांची विटंबना करून रूपाविषयींचा व बळाविषयींचा दोघांचा गर्व त्यानें हरण केला (एकदां हनुमंत द्वारकेंत आला तेव्हां गरुडास त्याला घेऊन येण्यास सांगितलें. गरुड आपली शक्ति दाखवूं लागला, तेव्हां हनुमंतानें एक तडाखा देतांच घाबरला व त्याचा बळाविषयींचा अभिमान गळाला. मारुतीला भेटण्याकरितां श्रीकृष्ण राम झाले. सत्यभामेला सीता होऊन येण्यास सांगितलें, पण कांहीं केल्या तिला सीता होतां येईना. शेवटीं ती लज्जित झाली व तिचा रूपाविषयींचा अभिमान गळाला) ३. द्रौपदीच्या अंतःकरणांतील कृष्णाच्या ईश्वरांशाविषयींचा विकल्प (शंका) ऋषींच्या वनांतील जांभूळ देंठाला लावण्याच्या वेळेस नाहींसा केला ४. अर्जुनानें सेतुबंधन पाहून मारुतीबरोबर प्रतिज्ञा केली, कीं ह्यापेक्षां बाणांचा सेतु टिकाऊ असतो. असें ऐकून मारुतीनेंहि तो मोडण्याविषयीं प्रतिज्ञा केली. त्या वेळीं देवानें दोघांची पैज खोटी करून मारुतीला अर्जुनाच्या रथाचे ध्वजावर युद्धसमयीं असण्याचें कायम केलें ५. तुकाराम महाराज म्हणतात, हा देव ज्याच्या ठिकाणीं भावभक्ति आहे त्यास सत्त्वगुणी होतो आणि दुर्जनाचा नाश करतो. अशा अनेक प्रकारच्या छंदानें आपणच खेळ खेळतो ६. [३९९४]

अगा देवांच्या देवा, तूं कृपाळु असून उदार आहेस. आतां तुझ्या बरोबर मी प्रतिज्ञा करून वैर करतों १. आतां तूं मजपासून कसा जाशील हें सांग, कारण मीं आपल्या सर्व कांहीं प्रपंचाचें अस्ताव्यस्त करून त्याचा त्याग केला २. माझ्या सर्व इंद्रियादि वृत्ति आंवरून तुझ्या पाठीशीं लावल्या. आतां तूं स्वरूपाच्या व देहाच्या अहंकृतीच्या गोष्टी सोडून दे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां माझ्या मनानें तुझ्या पायांस मिठी घातली आहे, म्हणून तुमची आमची तूट पडली तरी हरकत नाहीं ४. [३९९५]

करूनी विनवणी पायीं ठेवितों माथा। परिसावी विनंती माझी पंढरीनाथा ॥ १ ॥ अखंडित असावेंसें वाटतें पायीं। साहोनी संकोच ठाव थोडासा देईं ॥ २ ॥ असो नसो भाव आलों तुझिया ठाया। कृपादृष्टीं पाहे मजकडे पंढरीराया ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही तुझीं वेडीं वांकुडीं। नामें भवपाश होतें आपुल्या तोडीं ॥ ४ ॥ [३९९६]

झाली होती काया। बहु मळिण देवराया ॥ १ ॥ तुझ्या उजळली नामें। चित्त प्रक्षाळिलें प्रेमें ॥ २ ॥ अनुतापें झाला झाडा। प्रारब्धाचा नितोडा ॥ ३ ॥ तुका म्हणे देह पायीं। ठेवुनि झालों उतराई ॥ ४ ॥ [३९९७]

आजी आनंदु रे एकी परमानंदु रे। जया श्रुति नेति म्हणती गोविंदु रे ॥ १ ॥ विठोबाचीं वेडीं आम्हां आनंदु सदा। गाऊ नाचों वाहूं टाळी रंजवूं गोविंदा ॥ २ ॥ सदा सण साच (सांत) आम्हां नित्य दिवाळी। आनंदें निर्भर (निर्भय) आमचा कैवारी बळी ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं जन्ममरणाचा धाक। संत सनकादिक हे तें आमुचें कवतुक ॥ ४ ॥ [३९९८]

प्राणिया एक बीजमंत्र उच्चारीं। प्रतिदिनीं रामकृष्ण म्हणतां (म्हण कां) कां मुरारि ॥ १ ॥ हेंचि साधन रे तुझे सर्व सिद्धींचें। नाम उच्चारीं रे गोपाळाचें वाचे ॥ २ ॥ उपास पारणें न लगे वन सेवन। न लगे धूम्रपान पंचाग्नीतापन (पंचाग्निसाधन) ॥ ३ ॥ फुकाचें सुखाचें कांहीं न वेंचे भांडार। कोटी यज्ञांपरिस तुका म्हणे हें सार ॥ ४ ॥ [३९९९]

विठ्ठलकीर्तनाचे अंतीं। जय जय हरी जे म्हणती ॥ १ ॥ तेंचि सुकृताचें फळ। वाचा रामनामें निखळ ॥ २ ॥ बैसोनी हरिकथेसी। होय सावध चित्तासी ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याचा जन्म। सुफळ झाला भवभ्रम ॥ ४ ॥ [४०००]

हे पंढरिनाथा, मी तुम्हांस विनवून तुमच्या पायांवर मस्तक ठेवीत आहें. ही माझी विनंति तुम्ही ऐका १. तुमच्या पायांच्या ठिकाणीं सर्व काळ असावें असें मला वाटतें. ह्याकरितां संकोच सहन करून थोडीशी जागा द्या २. हे पंढरीराया, माझ्या ठिकाणीं भाव असो वा नसो पण मी तुजपाशीं आलों आहें, तर तुम्ही कृपादृष्टीनें मजकडे अवलोकन करा ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आम्ही तुझीं वेडींवांकडीं लेंकरें आहोंत, म्हणून तुम्ही आपल्या नामानें आमचे भवपाश तोडून टाका ४. [३९९६]

हे देवराजा, माझा देह फार मलिन झाला आहे १. त्याची शुद्धि तुझ्या नामचिंतनानें झाली व तुझ्याविषयींच्या प्रेमानें चित्त धुतलें गेलें २. वैराग्याच्या योगेंकरून सर्व पाप नाहींसें झालें व प्रारब्धाचाहि संबंध सुटला ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझ्या चरणांवर देह ठेवून मी उत्तीर्ण झालों ४. [३९९७]

आज आम्हांस परमानंदस्वरूपप्राप्तीचा आनंद झाला आहे. जें स्वरूप वेदश्रुतीला कळलें नाहीं तें एक गोविंदाच्या नामस्मरणानें आम्हांस प्राप्त झालें १. आम्ही विठोबारायाचीं वेडीं मुलें आहोंत, म्हणून सर्व काळ आम्हांस आनंद आहे. त्या योगानें त्याचें नाम मुखानें गाऊं व हातानें टाळी वाजवून नृत्य करूं. ह्या कर्तव्यानें त्या गोविंदास रंजवूं २. अशा आनंदाच्या दिवाळीचा सण आम्हांला सर्व काळ आहे आणि आमचा साहकारी प्रबळ देव असल्याकारणानें आमच्या ठिकाणीं आनंद परिपूर्ण भरलेला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हांला जन्ममृत्यूचें भय नाहीं. सनकादिक संत हे आमचे प्रिय विषय आहेत ४. [३९९८]

अरे प्राण्या, रामकृष्ण मुरारि ह्या बीजमंत्राचा उच्चार सर्व काळ कर १. हें साधन तुझ्या सर्व कार्यांची सिद्धि करणारें आहे. फक्त वाचेनें गोपाळाचें नामस्मरण करावें २. ह्यावांचून व्रताचें उपोषण, पारणें, अगर वनांत जाणें, अथवा चहूं बाजूंस चार अग्नींचीं कुंडें ठेवून पांचवा माध्यान्ह काळींचा सूर्य असे पंचाग्निसाधनाचे प्रकार कांहीं करणें नको ३. तुकाराम महाराज म्हणतात, हें नामस्मरण फुकटचें असून कांहीं खर्च न करतां सर्व सुखाची प्राप्ति करून देणारें आहे व कोट्यवधि यज्ञांपेक्षांहि हेंच सारभूत आहे ४. [३९९९]

हरिकीर्तनसमाप्तीच्या वेळीं जयजय विठ्ठल म्हणून जे नामस्मरण करतात १. तेच त्यांचें सर्व सुकृतांचें फळ आहे. वाचेनें केवळ नामस्मरण करावें २. हरिकथेच्या ठिकाणीं बसून चित्त सावध करावें ३. तुकाराम महाराज म्हणतात, त्यांचा संसार व जन्म सफळ झाला आणि त्यांच्या सर्व श्रमाचें सार्थक झालें ४. [४०००]

न चलवे पंथ वचन (वेंच) नसतां पालवीं । शरीर विटंबिलें वाटे भीक मागावी ॥ १ ॥ न करीं रे तैसें आपआपणां । नित्य राम राम तुम्ही सकळ म्हणा ॥ २ ॥ राम म्हणावितां रांडा पोरें निराविशी । पडशी यमाहातीं जाचविती चौऱ्यांशीं ॥ ३ ॥ मुखीं नाहीं राम तोही आत्महत्यारा । तुका म्हणे लाज नाहीं तया गव्हारा ॥ ४ ॥ [४००१]

थडियेसी निघतां पाषाणाच्या सांगडी । बुडतां मध्यभागीं तेथें कोण घाली उडी ॥ १ ॥ न करीं रे तैसा आपआपणिया । पतंग जाय वायां जीवें ज्योति घालूनियां ॥ २ ॥ सावधपणें सोमल वाटी भरोनियां प्याला । मरणाअंतीं वैद्य बोलावितो वहिला ॥ ३ ॥ तुका म्हणे करीं रे ठायींचाचि विचार । जंव नाहीं पातला यमाचा किंकर ॥ ४ ॥ [४००२]

शंख करिसी ज्याच्या नांवें । त्याचें तुज नाहीं ठावें । ऐक सांगतों एका भावें । सांपडे तें घरीं जीववूनि खावें । रे विठ्ठल ॥ १ ॥ टिळे माळा करंडी सोंग । धरूनी चाळविलें जग । पसरी हात नाहीं त्याग । दावी दगड पुजी भगल रे विठ्ठल ॥ २ ॥ राख लावुनि अंग मळी । वायां टोंके मी एक बळी । वासने हातीं बांधवी नळी । त्यासी येऊनी काळ गिळी उगळी । रे विठ्ठल ॥ ३ ॥ कोण तें राहडीचें सुख । वरते पाय हारतें मुख । करवी पीडा भोगवी दुःख । पडे नरकीं परि न कळेचि मूर्ख । रे विठ्ठल ॥ ४ ॥ सिकला फाक (फाग) मारी हाका । रांडा पोरें मेळवी लोकां । विटंबी शरीर मागे रुका । केलें तें गेलें अवघें फुका । रे विठ्ठल ॥ ५ ॥ कळावें जना मी एक बळी । उभा राहोनी मांडी फळी ।

अहो जन हो, नाम ह्या वचनाचें गांठोडें जवळ असल्याशिवाय मार्ग चालवणार नाहीं. तें नसेल तर जन्ममृत्यूच्या वाटेनें भिक्षा मागावी लागेल व देहाची फजिती होईल १. अरे, तुम्ही तसें आपापल्या ठिकाणीं न करितां नेहमीं रामनामाचा उच्चार करा २. एखाद्यानें जर (नामस्मरण कर म्हणून सांगितलें तर त्यास आपलीं बायकामुलें सांभाळा म्हणून तो सांगतो, पण जर त्यानें) नामस्मरण केलें नाहीं तर त्या योगानें त्यास यमाच्या हातीं सांपडून चौऱ्यांशीं लक्ष योनि भोगाव्या लागतील ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या मुखामध्यें रामनाम नाहीं त्यानें आपली आत्महत्या केली. असा तो गाढव निलाजरा आहे ४. [४००१]

पाषाणाच्या सांगडीच्या आश्रयानें जर कोणी नदीपार जात असतां मध्यभागीं बुडाला तर त्याला बाहेर काढण्यासाठीं तेथें कोण उडी घालील? १. पतंग दिव्याच्या ज्योतीवर उडी घालतो व त्या योगानें व्यर्थ जीवानिशीं मरतो. अरे, तसा तूं आपला आपण घात करून घेऊं नकोस २. सावध बुद्धीनें (बुद्धिपुरस्सर) सोमल वाटून जो प्याला व मरणाच्या वेळेस वैद्यानें लवकर येण्याकरितां जो बोलावणें पाठवितो (त्या वेळीं वैद्याच्या येण्याचा काय उपयोग होणार आहे?) ३. तुकाराम महाराज म्हणतात, अरे, जोंपर्यंत यमाचे दूत प्राप्त झाले नाहींत, तोंपर्यंत तूं सिद्ध आत्मस्वरूपाचा विचार कर (परमार्थाची घाई कर) ४. [४००२]

विठ्ठल म्हणून ज्याच्या नांवानें तूं ओरडत आहेस त्याच्याविषयीं तुला कांहीं ज्ञान नाहीं. ह्याकरितां मी तुला सांगतों तें तूं एकनिष्ठपणानें ऐक. तुझ्या देहरूपी घरामध्यें जें तुला विचारानें प्राप्त होईल त्याचा तूं उपभोग घे (किंवा, आपल्या घरीं दैववशात् जें अन्न शिजलें असेल त्यांतील कांहीं भाग दुसऱ्याला खाऊं घालून नंतर आपण जेवावें) १. विठ्ठल म्हणून द्वादश टिळे लावून गळ्यामध्यें माळा घालून हातांत देवपूजेची करंडी घेणें, अशा प्रकारच्या ढोंगानें तूं जगास फसविलेंस, कारण तुझ्या ठिकाणीं खरा त्याग नाहीं. आपल्याला कांहीं मिळावें अशा बुद्धीनें तूं लोकांजवळ हात पसरतोस व लोकांना दगडाची पूजा करून साधुपणाचें ढोंग दाखवितोस २. विठ्ठल म्हणून सर्वांगाला राख लावून तें मळवितोस आणि व्यर्थ मी एक मोठा बलाढ्य आहें असें म्हणवून घेतोस व वासनेकडून आपला गळा बांधून घेतोस. असे जे आहेत त्यांना काळ गिळतो (मरण येतें) आणि पुनः ओकतो (पुन्हां जन्म प्राप्त होतो) ३. विठ्ठल म्हणून चिखलांत डोकें घालून पाय वरतीं करतोस. त्याचें सुख काय आहे? उलट तें दुःख पीडाच भोगावयास लावतें व त्या योगानें अखेर नरकप्राप्ति होते. तरी पण तूं त्यापासून दूर पळून जात नाहींस ४. तो शिमग्यांतले उखाणे शिकून ओरडतो आणि स्त्रिया, पोरें व लोक ह्यांना जमवितो व नानाप्राकरचीं सोंगें घेऊन आपल्या शरीराची विटंबना करून लोकांजवळ पैसा मागतो ५. हे विठ्ठला, लोकांना मी एक बलाढ्य आहें असें कळावें म्हणून एखाद्या दुकानापुढें उभा राहून मोठ्यानें आरोळी मारून लोक जमवितो व

फोडोनी गुडघे कोंपर चोळी। आपला घात करोनी आपणाचि तळमळी। रे विठ्ठल ॥ ६ ॥ फुकट खेळें ठकलीं वायां। धरूनि सोंगें बोडक्या डोया। शिवों नये ती अंतरीं माया। संपादणीविण विटंबिली काया। रे विठ्ठल ॥ ७ ॥ धुळी माती कांहीं खेळोंच नका। जवादी चंदन घ्यावा बुका। आपणा परिमळ आणिकां लोकां। मोलाची महिमा फजिती ते फुका। रे विठ्ठल ॥ ८ ॥ बहुत दुःखी झालिया खेळें। अंगीं बुद्धि नाहींत बळें। पाठीवरी तोबा तोंड काळें। रसना द्रव्य उपस्थाच्या मुळें। रे विठ्ठल ॥ ९ ॥ काय सांगतो तें ऐका तुका। मोडा खेळ कांहीं अवगोंच नका। चला जेवूं आधीं पोटीं लागल्या भुका। घाल्यावरी मग बरा टाकमटिका। रे विठ्ठल ॥ १० ॥ [४००३]

: कावडे :

आहा आहा रे भाई प्रथम नमूं तो विनायक। ठेवूनि गुरुचरणीं मस्तक। वदेल प्रासादिक वाणी। हरिहरांचे पवाडे ॥ १ ॥ माझी ऐसी ब्रीदावळी। दासें दासत्वें आगळी। पान्हेरीनें मार्ग मळी। जीवन घ्या रे कापडी हो ॥ २ ॥ जें (या) शितळाहुनी शितळ। पातळाहुनी जें पातळ। प्रेमामृत रसाळ। तें हें सेवा अहो भाग्याचे नु ॥ ३ ॥ जिंकाल तरी जिंका रे अभिमान। दवडाल तरी दवडा लज्जा आणि मान। धराल तें धरा शंभूचें ध्यान (चरण)। दावाल पण ऐसा दावा तो ॥ ४ ॥ काळ घेऊं नेदी वाव। आला तो राखें घावडाव। शुद्ध सत्वीं राखोनी भाव। म्हणा महादेव हरिहर वाणी गर्जों द्या ॥ ५ ॥ पराविया नारी माउली समान। परधनीं बाटों नेदीं मन। जीवित्व तें तृणासमान। स्वामीकाजीं जाण शूर म्हणों तया आम्ही ॥ ६ ॥ शक्ति वेंचाविया परउपकारा। खोटें खोट्याचा पसारा।

आपलें कोंपर व गुडघे फोडून ते चोळीत जो बसतो तो अशा प्रकारें आपलाच घात आपण करून तळमळत राहातो ६. अशा ह्या फुकट खेळण्यानें कित्येक व्यर्थ फसले. संन्यासी, गोसावी इत्यादि नानाप्रकारचे वेष घेऊन आपलें डोकें बोडकें ठेवतात पण जिला शिवूं नये अशी जी माया ती अंतःकरणांत वागवितात; त्यामुळें जो वेष घेतला आहे त्या वेषानुरूप तनु नसल्यामुळें त्यांनीं आपल्या देहाची विटंबना करून घेतली आहे ७. म्हणून धुळीमातीप्रमाणें असणाऱ्या नानाप्रकारच्या ह्या ढोंगी वेषांत (संसाराच्या धुळींत) तुम्ही खेळूं नका. कस्तुरी, चंदन किंवा बुक्का ह्याप्रमाणें असणाऱ्या सत्य परमार्थाचें ग्रहण करा. त्या योगानें आपल्याला आनंदसुगंधाची प्राप्ति होईल, (तशीच इतरांनाहि होईल आणि अशा योगानें मोठ्या किंमतीची महती प्राप्त होईल), व वर सांगितल्याप्रमाणें केल्यानें फुकट फजिती मात्र होईल ८. वर सांगितलेल्या खेळण्यानें पुष्कळांना दुःखें प्राप्त झालीं, कारण त्यांच्या ठिकाणीं बुद्धिबल नाहीं, म्हणून त्यांच्या पाठीवर दुःखाचे तोबे बसून अखेर त्यांचें तोंड काळें झालें. ह्या सर्व फजितीचें कारण रसना, शिस्न व द्रव्य यांची आसक्ति हें होय ९. तुकाराम महाराज म्हणतात, मी काय सांगतों तें ऐका. अशा प्रकारचा हा फजीतखोर खेळ मोडून टाका. उगीच कांहीं तरी अचरटपणा करूं नका. आपल्या पोटांत सुखेच्छेची भूक लागली आहे, तरी चला, आधीं परमार्थाचें भोजन करूं, कारण त्या योगानें शांतीच्या अनुभवाची तृप्ति झाली म्हणजे मग वरच्या बाजूनें नटणें बरें दिसेल (होळीच्या सणांत बीभत्स शब्द बोलणारे व दांभिक लोक ह्यांना उद्देशून महाराजांनीं उपदेश केला आहे. दांभिक, पापी लोकांचीं दुष्कृत्यें वर्णन करतांना वाणीला पाप घडलें असें समजून प्रत्येक वाक्याच्या शेवटीं 'रे विठ्ठल' असें म्हटलें आहे.) १०. [४००३]

अरे भाईंनो, आरंभाला श्रीगुरूच्या चरणीं मस्तक ठेवून गणपतीस नमस्कार करूं. त्याच्या प्रसादानें हरिहराचे पवाडे मुखानें वर्णन करूं १. अशा प्रकारची दास्यत्व करण्याविषयीं माझी श्रेष्ठ ब्रीदावळी आहे. मागील वहिवाटीप्रमाणें मी वाट चालत आहें तें नामजीवन तुम्हीं साधकांनीं घ्यावें २. तें प्रेमामृत सर्व शीतळांहून शीतळ व पातळांहून पातळ असून गोड रसभरित आहे त्याचें भाग्यवंतांनीं सेवन करावें ३. अगोदर मान नाहींसा करून लाज व अभिमान बाहेर दवडून घालवावा व अंतरामध्यें महादेवाचें ध्यान करावें. हें सामर्थ्य दाखविणारांनीं दाखविलें पाहिजे ४. 'पुढें सावकाश परमार्थ करूं' असें म्हणाल तर काळ हा तुम्हांला इतका अवकाश घेऊं देणार नाहीं. अंगावर जे निंदेचे व लोकापवादाचे घावडाव येतील ते सर्व सहन करा. शुद्ध सत्त्वरूप विठोबारायाच्या ठिकाणीं भाव ठेवून वाणीनें हर महादेव अशी गर्जना करा ५. परनारी मातेसमान मानून परद्रव्याकडे मन बाटवूं नका. स्वामीच्या कामानिमित्त आपलें जीवित्व जो गवतासमान मानील तो शूर आहे असें आम्ही मानूं ६. अंगांतील बळ परोपकारास लावावें आणि सर्व प्रपंचाचा पसारा खोटा आहे असें मानावें.

सत्य तें भवनदीचा तारा। आळस तो न करा। येथें आले हो सांगतों ॥ ७ ॥ व्रत करा एकादशी सोमवार। कथा पूजन हरिजागर। पुण्य तें असे गातां नाचतां फार। पुन्हां बोलिला संसार नाहीं नाहीं सत्यत्वें ॥ ८ ॥ संग संतांचा करितां बरवा। उत्तमोत्तम कीर्तीचा ठेवा। पंथ तो सुपंथें चालावा। उगवा वासना लिगाड ॥ ९ ॥ तुका चालवितो कावडी। प्रवृत्ति निवृत्ति चोखडी। पुढती पुढती अधिक गोडी। भरूनि कळस भजन आवडी। केशवदास नटतसे ॥ १० ॥ [४००४]

आहा आहा रे भाई। हें अन्नदानाचें सत्र। पव्हे घातली सर्वत्र। पंथीं अवघे पंथ मात्र। इच्छाभोजनाचें आर्त पुरवावया ॥ १ ॥ यावें तेणें घ्यावें। न सरेसें केलें सदाशिवें। पात्र शुद्ध पाहिजे बरवें। मंगळभावें सकळ हर म्हणा रे ॥ २ ॥ नव्हे हें कांहीं मोकळें। साक्षी चौघांचिया वेगळें। नेदी नाचों मताचिया बळें। अणु अणोरणीया आगळें। महदि महदा साक्षित्वें हर म्हणा रे ॥ ३ ॥ हे हरिनामाची आंबिली। जगा पोटभरी केली। विश्रांति कल्पतरूची साउली। सकळां वर्णां सेवितां भली। म्हणा हर हर महादेद ॥ ४ ॥ तुका हरिदास तराळ। अवघे हाकारी सकळ। या रे वंदूं शिखरातळ। चैत्रमास पर्वकाळ महादेव दर्शनें ॥ ५ ॥ [४००५]

आहा आहा रे भाई तयावरी माझी ब्रीदावळी। भ्रष्ट ये कलीं क्रियाहीन ॥ १ ॥ थुंका थुंका रे त्याच्या तोंडावरी। वाणिली ते थोरी दवडा वायां बाहेरी ॥ २ ॥ बाइलेचा दास पित्रांस उदास। भीक भिकाऱ्यास न ये दारा ॥ ३ ॥ विद्याबळें वाद करूनियां छळी। आणिकांसी फळी मांडोनियां ॥ ४ ॥ गांवींचिया देवा नाहीं दंडवत। ब्राह्मण अतीत घडेचिना ॥ ५ ॥ सर्वकाळ करि संतांचिया निंदा।

संसारसमुद्र तरण्याविषयीं एक सत्य बोलावें. ह्या मनुष्यजन्मांत जे आले आहेत त्यांनीं हरिभजनाविषयीं आळस करूं नये असें मी सांगतों ७. एकादशी व सोमवार हीं व्रतें करावीं. ते दिवशीं देवाचें पूजन व हरिकथा करून जागर करावा. नाम गाऊन आनंदानें नाचलें असतां फार पुण्य आहे. त्याला खरोखरी पुनः जन्ममृत्यूस येणें नको ८. संतांचा समागम करणें हें उत्तम आहे. त्या योगानें उत्तमोत्तम कीर्ति वाढते आणि वासनेचें लिगाड (लटांबर) नाहींसें करून चांगल्या मार्गानें वागणूक करावी ९. तुकाराम महाराज म्हणतात, प्रवृत्ति व निवृत्ति ह्या मार्गानें चांगली कावड मी चालवीत आहें. भजनाचे कलश आवडीनें भरले आहेत, त्यांना अधिकाधिक गोडपणा येत आहे, म्हणून मी देवाच्या सेवेनें केशवदास म्हणून मिरवीत आहें १०. [४००४]

अरे भाईनो, चांगल्या मार्गावर सर्वत्र जनांस (सन्मार्गानें जाणाऱ्या यात्रेकरूंस ज्ञानाचें) अन्नदान देण्याविषयींचें हें सत्र घातलें आहे आणि हरिभजनाच्या पाणपोया त्यांची तहान भागविण्याकरितां घातल्या आहेत. येथें इच्छाभोजन मागणाराची इच्छा पूर्ण होत आहे १. येथें जे येतील ते तृप्त होतात. हें कधींहि संपणार नाहीं, असें सदाशिवांनीं केलें आहे, पण घेणाराचें पात्र शुद्ध पाहिजे. ह्याकरितां शुद्ध भावानें कल्याणकारक हरहर नामाचा उच्चार सर्वत्रांनीं करावा २. हें नाम कांहीं व्यर्थ नाहीं, हें चार वेदांच्या साक्षित्वानें असून त्यांहून वेगळें आहे, तें आपापल्या मताच्या बळानें नाचूं देत नाहीं. हें अणुरेणूंच्या अंतरांत साक्षित्वानें असून महदाकाश महत्तत्त्वाहून श्रेष्ठ आहे, म्हणून हर या नामाचा उच्चार सर्वांनीं करावा ३. ही हरिनामाची अंबील सर्व जनांना पोटभर पुरण्यासारखी केली असून विश्रांति देणारी केवळ कल्पतरूची छायाच आहे आणि सकळ वर्णांस सेवन करण्याला चांगली आहे. ह्याकरितां हरहर महादेव असें सर्वांनीं म्हणावें ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी श्रीहरीचा सेवक दवंडी देणारा असल्यामुळें सर्व जनांना हांका मारून सांगतों, कीं शिखराच्या तळवटीं महादेवाचें दर्शन घेण्याला हा चैत्रमासींचा शुद्ध द्वादशीचा पर्वकाळ उत्तम आहे, म्हणून येथें या. तुम्ही आम्ही मिळून शंभु महादेवास नमस्कार करूं ५. [४००५]

अरे भाईनो, जे ह्या कलियुगामध्यें क्रियाकर्महीन होऊन भ्रष्ट झाले आहेत त्यांचा उद्धार करण्याविषयीं मीं ब्रीद बांधलें आहे (मीं प्रतिज्ञा केली आहे, व्रत घेतलें आहे) १. त्या लोकांस चांगल्या मार्गाला लावण्याकरितां त्यांच्या तोंडावर थुंकावें, आणि त्यांनीं आपले अवगुण बाहेर घालवावे म्हणून त्यांच्या अपकीर्तीची थोरवी मी सांगत आहें २. ते आपल्या आईबापांवर उदास होऊन सर्व काळ बायकोची सेवा करितात व कधीं भिकाऱ्यांस भीक घालीत नाहींत. ३. कांहीं विद्या शिकून त्या गर्वानें दुसऱ्याबरोबर पैज मांडून छळणाचा वाद करितात ४. गांवांतील दैवतांस कधीं नमस्कार करीत नाहींत व घरास आलेल्या ब्राह्मणाचा सत्कार करीत नाहींत ५. सर्व काळ साधूंची निंदा करितात

स्वप्नींही गोविंदा आठवीना ॥ ६ ॥ खाचेमध्यें धन पोटासी बंधन । नेणे ऐसा दानधर्म कांहीं ॥ ७ ॥ तुका म्हणे नेटे दावूनियां सोंग । लवों नेदी अंग भक्तीभावें ॥ ८ ॥ [४००६]

आहा आहा रे भाई । नमो उदासीन झाले देहभावा । आळविती देवा तया नमो ॥ १ ॥ नमो तीर्थपंथें चालती तयांसी । येती बोळवित त्यांसी नमो ॥ २ ॥ नमो तयां संतवचनीं विश्वास । नमो भावें दास्य गुरूचें त्या ॥ ३ ॥ नमो तयां मातापित्यांचें पाळण । नमो त्या वचन सत्य वदे ॥ ४ ॥ नमो तयां जाणे आणिकांचें सुखदुःख । राखे तान भूक तया नमो ॥ ५ ॥ परोपकारी (परउपकारी) नमो पुण्यवंता । नमो त्या दमित्या इंद्रियांसी ॥ ६ ॥ तुका म्हणे नमो हरिचिया दासा । तेथें सर्व इच्छा पुरलीसे ॥ ७ ॥ [४००७]

आहा आहा रे भाई । गंगा नव्हे जळ । वृक्ष नव्हे वड पिंपळ । तुळसी रुद्राक्ष नव्हे माळ । श्रेष्ठ तनु देवाचिया ॥ १ ॥ समुद्र नदी नव्हे पैं गा । पाषाण म्हणों नये लिंगा । संत नव्हती जगा । माणसा त्या सारिखे ॥ २ ॥ काठी म्हणों नये वेतु । अन्न म्हणों नये सातु । राम राम हे मातु । नये म्हणों शब्द हे ॥ ३ ॥ चंद्र सूर्य नव्हती तारांगणें । मेरु तो नव्हे पर्वतासमान । शेष वासुकी नव्हे सर्प जाण । विखाराच्या सारिखे ॥ ४ ॥ गरूड नव्हे पाखरू । ढोर नव्हे नंदिकेश्वरु । झाड नव्हे कल्पतरु । कामधेनु गाय न म्हणावी ॥ ५ ॥ कूर्म नव्हे कांसव । डुकर नव्हे वराह । ब्रह्मा नव्हे जीव । स्त्री नव्हे लक्ष्मी ॥ ६ ॥ गवाक्ष नव्हे हाड । पाटाव नव्हे कापड । परीस नव्हे दगड । सगुण ते ईश्वराचे ॥ ७ ॥ सोनें नव्हे धातु । मीठ नव्हे रेतु । नाहीं नाहीं चर्माआंतु । कृष्णाजिन व्याघ्रांबर ॥ ८ ॥ मुक्ताफळें

आणि त्यांना स्वप्नांत देखील देवाची आठवण होत नाहीं ६. कांहीं मिळविलेलें द्रव्य आपलें पोट बांधून जमिनीमध्यें पुरून ठेवितात; त्यांना दानधर्म कसा करावा हें माहीत सुद्धां नाहीं ७. तुकाराम महाराज म्हणतात, संतांचें सोंग दाखवून मिरवितात, पण भक्तिभावानें आंगांत लीनता आणून कधीं देवाला व संतांना नमस्कार करीत नाहींत ८. [४००६]

अरे भाईंनो, जे कोणी आपल्या देहभावावर उदास आहेत व जे देवास आळवितात, त्यांना आपण नमस्कार करूं १. जे तीर्थाच्या रस्त्यानें चालतात व जे त्यांना गांवाबाहेर घालवीत येतात, त्यांना नमस्कार करूं २. संतांच्या वचनावर ज्यांचा विश्वास आहे आणि जे कायावाचामनानें भाव धरून श्रीगुरूची सेवा करितात त्यांना माझा नमस्कार आहे ३. जे आईबापांचें रक्षण करितात, किंवा त्यांच्या आज्ञेचें पालन करितात व जे सर्व काळ खरें बोलतात त्यांना मी नमस्कार करितों ४. जे दुसऱ्याचें सुखदुःख जाणून तहानभुकेची बाधा होऊं देत नाहींत त्यांस माझा नमस्कार आहे ५. जे दुसऱ्यावर उपकार करितात व ज्यांनीं आपल्या इंद्रियांचें दमन केलें आहे अशा पुण्यवंतांस मी नमस्कार करीत आहें ६. तुकाराम महाराज म्हणतात, जे कोणी श्रीहरीचे दास आहेत त्यांना मी नमस्कार करीत आहें, कारण त्या ठिकाणीं माझी सर्व इच्छा पूर्ण होत आहे ७. [४००७]

अरे भाईंनो, गंगेचें पाणी इतर पाण्यासारखें नव्हे, वडाचीं व पिंपळाचीं झाडें इतर झाडांसारखीं नाहींत; आणि तुळशीच्या रुद्राक्षांच्या माळा इतर माळांप्रमाणें नव्हत. हे सर्व प्रत्यक्ष श्रेष्ठ देवरूपच आहेत १. समुद्र हा इतर नद्यांप्रमाणें नव्हे. स्थापना केलेल्या लिंगास दगड म्हणूं नये, इतर मनुष्यांप्रमाणें संत आहेत असें म्हणूं नये. ते सर्व जगाहून श्रेष्ठ आहेत २. वेताची काठी इतर काठीसारखी नाहीं. सातू इतर धान्यांत जमा नाहींत आणि राम हीं अक्षरें इतर शब्दांप्रमाणें आहेत असें म्हणूं नये ३. सर्व तारांगणामध्यें चंद्रसूर्याची गणना करूं नये. इतर पर्वतांसारखा मेरुपर्वत म्हणूं नये आणि इतर विषारी सर्पांप्रमाणें शेष वासुकी आहे असें मानूं नये. ते देवाचे अंगभूत अंश आहेत ४. सर्व पांखरां-प्रमाणें गरुड नाहीं, इतर बैलांप्रमाणें नंदिकेश्वर नाहीं; इतर झाडांप्रमाणें कल्पतरु आहे व इतर गाईंसारखी कामधेनु आहे असें म्हणूं नये ५. श्रीहरीचे अवतार कूर्म आणि वराह हे इतर कांसवांत व डुकरांत जमा नाहींत व इतर जनांसारखा ब्रह्मदेव नव्हे, आणि लक्ष्मीस स्त्री म्हणूं नये ६. इतर कापडांसारखें महावस्त्र पाटाव (रेशमी वस्त्र) नाहीं, इतर हाडांत गवाक्ष (गोशृंग) जमा नाहीं. ते सर्व सगुण देवाचे अंश आहेत ७. इतर धातूंसारखें सोनें नव्हे व रेतीसारखें मीठ नव्हे, कृष्णाजिन आणि व्याघ्रांबर हीं इतर कातड्यांत जमा नाहींत (असें द्विवार सांगतों) ८. मुक्ताफळाची (मोत्याची)

नव्हेती गारा। खड्याऐसा नव्हे हिरा। जीव नव्हे सोइरा। बोळवीजे स्वइच्छेनें ॥ ९ ॥ गांव नव्हे द्वारावती। रणछोड नव्हे मूर्ति। तीर्थ नव्हे गोमती। मोक्ष घडे दर्शनें ॥ १० ॥ कृष्ण नव्हे भोगी। शंकर नव्हे जोगी। तुका पांडुरंगीं। हा प्रसाद लाधला ॥ ११ ॥ [४००८]

: सौऱ्या (स्वैरिणी) :

वेसन गेलें निष्काम झालें नर नव्हे नारी। आपुलया तुटी पारख्या भेटी सौरियांचे फेरी ॥ १ ॥ त्याचा वेध लागला छंद हरि गोविंद वेळोवेळां। आपुले मागें हांसत रागें सावलें घालिती गळां ॥ २ ॥ जनवेषा भीतें तोंडा आमुच्या भांडपणा (भांडणा)। कर कटीं भीमातटीं पंढरीचा राणा ॥ ३ ॥ वेगळ्या याति पडिलों खंतीं अवघ्या एका भावें। टाकियेली चाड देहभावें जीवें शिवें ॥ ४ ॥ सकळांमधीं आगळी बुद्धि तिची करूं सेवा। वायां तुवां मुंडासवें भक्तीं नाचों भावा ॥ ५ ॥ म्हणे तुका टाक रुका नाचों निर्लज्जा। बहु झालें सुख कामें चुकलों या काजा (चुकलिया काजा) ॥ ६ ॥ [४००९]

आणिकां उपदेशूं नेणें नाचों आपण। मुंडा वायां मार गेली वायां हांसे जन ॥ १ ॥ तैसा नव्हे चाळा आवरीं मन डोळा। पुढिलांच्या कळा कवतुक जाणोनि ॥ २ ॥ बाहिरलया वेषें आंत जैसें तैसें। झांकलें तों बरें पोट भरे तेणें वेषें ॥ ३ ॥ तुका म्हणे केला तरी करीं शुद्ध भाव। नाहीं तरी जासी वायां हा ना तोसा ठाव ॥ ४ ॥ [४०१०]

योग्यता गारगोटीस येत नाहीं, हिऱ्याची योग्यता वाळूच्या खड्यास येत नाहीं, आणि जीव हा देवाचा अंश आहे, तो आपला आहे असें म्हणून इच्छेस वाटेल त्या वेळीं इतर सोयऱ्यांसारखा घालवितां येत नाहीं ९. द्वारका ही इतर गांवांसारखी नाहीं, रणछोड मूर्तीहि इतर मूर्तींत जमा नाहीं. गोमती हें तीर्थ इतर तीर्थांसारखें नाहीं, तिचें दर्शन झालें असतां प्राण्यास मोक्ष मिळतो १०. तुकाराम महाराज म्हणतात, कृष्णानें सोळा हजार एकशें आठ स्त्रिया भोगल्या पण तो इतर जनांप्रमाणें भोगी नव्हे आणि शंकर हा स्मशानांत राहिला आहे पण तो इतर वेषधाऱ्यांप्रमाणें जोगी आहे असें म्हणूं नये. ह्याप्रमाणें पांडुरंगाच्या कृपेनें मला हा प्रसाद मिळाला ११. [४००८]

माझ्या ठिकाणीं सकामतेचें व्यसन नसून निष्काम झाल्यामुळें मी नारीहि नाहीं व नरहि नाहीं, तर मी तृतीय-प्रकृति आहें आणि आपलेपणाची तूट होऊन (आपल्या घरादाराचा संबंध तोडून) परपुरुषाची भेट झाली हे प्रकार वैष्णवांचे संगतीनें घडून आले १. त्या परपुरुषाचा मला वेध लागल्यामुळें वारंवार हरिगोविंद असें मी म्हणत आहें, तें ऐकून आप्तमंडळी रागानें हंसतात व गळ्यांत वस्त्र घालतात (कांहीं लोक आमच्यामागें लागून हंसतात, तर कांहीं रागावतात, कारण आम्ही लुगडें नेसून त्याचा पदर खांद्यावर घेतों) २. हा आमचा वेष पाहून लोक भितात, व आम्ही भांडखोर असल्यामुळें आमच्या तोंडाला लागत नाहींत. कटावर कर ठेवून भीमेच्या तटाकाला पंढरीराणा आहे. त्याशीं आम्ही रत झालों ३. त्याच्या ठिकाणीं भाव धरून आम्ही जातीहून वेगळ्या झालों व संसाराची काळजी नाहींशी झाली आणि जीवशिव हे ऐक्यपणास आल्यामुळें देहभावाची गरज टाकली ४. देहबुद्धि आणि जीवबुद्धि ह्यांहून ब्रह्मबुद्धि श्रेष्ठ तिची आम्ही सेवा करूं आणि आपल्या धन्याबरोबर भक्तिभावानें सर्व व्यर्थ आहे असें जाणून नृत्य करूं ५. तुकाराम महाराज म्हणतात, अगे, तूं देहाभिमान टाकून दे मग (किंवा, 'टाक पैसा टाक' असें म्हणून) आम्ही निर्लज्ज होऊन नाच करूं. सर्व संसारांतील कामकाज नाहींसें झालें, म्हणजे फार सुख होईल ६. [४००९]

दुसऱ्यांस उपदेश करतां येतो, पण त्यासारखें आपण वागत नाहीं त्या योगानें त्याचें मुंडणें व्यर्थ जाऊन त्यास लोक हंसतात १. त्याप्रमाणें खोटा चाळा न करतां आपलें मन व दृष्टि परस्त्री आणि परधन ह्यांपासून आंवरावी आणि पुढें जे गेले आहेत त्या संतरूपी सौऱ्यांच्या कौतुकाची कळा जाणून वागणूक करावी २. बाहेर चांगला वेष घेऊन आंतले विकार जसेच्या तसेच जर कायम ठेवले तर तें सोंग झांकलें आहे तोंपर्यंत बरें दिसेल आणि त्या बाहेरच्या वेषानें नुसतें पोट भरेल ३. तुकाराम महाराज म्हणतात, जर तुम्हीं पांडुरंगाचे ठिकाणीं आपला भाव शुद्ध केला तर बरें. नाहींपेक्षां ना स्वार्थ ना परमार्थ असें होऊन व्यर्थ वायां जाल ४. [४०१०]

टाक रुका चाल रांडे कां गे केली गोवी । पुसोनियां आलें ठाव म्हणोनी देते सिवी ॥ १ ॥ आतां येणें छंदें नाचों विनोदें । नाहीं या गोविंदें माझें मजसी केलें ॥ २ ॥ कोरडे ते बोल कां गे वेचितेसी वायां । वर्ते करुनी दावीं तुझ्या मुळींचिया ठाया ॥ ३ ॥ यांजसाठीं डौर म्यां धरियेला हातीं । तुका म्हणे तुम्ही गांठी सोडायाची खंती ॥ ४ ॥ [४०११]

मोकळी गुंते रिती कुंथे नाहीं भार दावें । धेडवाडा बैसली खोडा घेतली आपुल्या भावें ॥ १ ॥ ऐका बाई लाज नाहीं आणिकां त्या गरतीची । समाधानी उंच स्थानीं जाणे सेवा पतीची ॥ २ ॥ न बोलतां करी चिंता न मारितां पळे । दादला शेजे नावडे निजे जगझोडीचे चाळे ॥ ३ ॥ देखत अंध्र बहिर कानीं बोल बोलतां मुके । तुका म्हणे पतन सोयरीं ऐसीं जालीं एकें ॥ ४ ॥ [४०१२]

सातें चला काजळ घाला तेल फणी करा । दिवाण दारीं बैसले पारीं नाचों फेर धारा ॥ १ ॥ या साहेबाचें झालें देणें वेळोवेळां न लगे येणें । आतां हाटीं कशासाठीं हिंडों पाटी दुकानें ॥ २ ॥ अवघ्या जणीं मुंडा धणी नाचों एके घाई । सरसावलें सुख कैसा चाळा एके ठायीं ॥ ३ ॥ म्हणे तुका वोळगें एका तोड चिंता माया । देऊं (देउनियां) उद्गार आतां जाऊं मुळींचिया ठाया ॥ ४ ॥ [४०१३]

सौरी सुर झालें दूर डौर घेतला हातीं । माया मोह सांडवलें तीहीं लोकीं झालें सरती ॥ १ ॥ चाल विठाबाई अवघी पांच देहीं । न धरीं गुज कांहीं वाळवंटीं सांपडतां ॥ २ ॥ हिंडोनी चौऱ्यांशीं घरें आलें तुझ्या दारा । एक्या रुक्यासाठीं आंचवलें संसारा ॥ ३ ॥ लाज मेली शंका गेली नाचों

एक संत सौरी दुसऱ्या संसारी सौरीला म्हणते, अगे रांडे, तूं देहाभिमानामध्यें कां गुंतलीस? तो टाकून देऊन मजबरोबर चल. त्या देहाभिमानाचें ठिकाण मीं नाहींसें केलें, म्हणून तुला शिवी देत आहें १. आतां ह्या गोविंदानें आपला छंद लावून माझा मीपणा नाहींसा केला. ह्याकरितां त्याचें नाम घेऊन कौतुकानें नृत्य करूं २. अगे, तुझ्या अंतरांत ओलावा असल्यावांचून व्यर्थ कोरडें बोलणें कां खर्चतेस? तुझ्या मूळस्वरूपाचें ठिकाण प्रगट करून दाखीव ३. तुकाराम महाराज म्हणतात, देहसंबंधीं अभिमानाची गांठ तुम्हीं सोडावी व त्याविषयींची काळजीहि टाकावी असें सांगण्याकरितां मीं हातांमध्यें डमरू हें वाद्य घेतलें आहे ४. [४०११]

ही संसारी सौरी चऱ्हाटानें बांधल्यावांचून (परमार्थतः मुक्त असली तरी) गुंतली आहे व डोक्यावर कांहीं ओझें नसून कुंथत आहे. अशी आपल्या अहंभावानें देहरूपी वाड्याच्या खोड्यांत बसली आहे १. अगे बायांनो, तुम्ही ऐका. जी कोणी आपल्या नवऱ्याची सेवा जाणत आहे, ती श्रेष्ठ ठिकाणीं समाधानांत राहाते, त्या गरती स्त्रीची तुम्हांला लाज वाटत नाहीं काय? २. कोणी बोलत नसतांना काळजी करणें व कोणी मारीत नसतांना पळून जाणें आणि सेजेच्या ठिकाणीं आपला नवरा आवडूं नये हे सर्व अवगुण शिंदळ रांडेचे आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, देव दिसत नसल्याकारणानें पाहात असून आंधळे व त्याची कीर्ति ऐकत नसल्याकारणानें ऐकावयास येत असून बहिरे आणि तोंडांत नाम नसल्यामुळें पुष्कळ बोलले तरी मुके अशा प्रकारचे कित्येक लोक नरकाचे पाहुणे झाले आहेत ४. [४०१२]

अगे बायांनो, हरिविषयक स्नेहरूपी तेल केंसांना लावा, पश्चात्तापाच्या फणीनें अंतःकरणांतील विकार विंचरा, बुद्धीची वेणी चांगली बांधा आणि डोळ्यांत ज्ञानाचें काजळ घालून पंढरीच्या बाजारांत जाऊं चला, दारामध्यें पारावर संतरूपी दिवाण बसले आहेत, त्यांच्या समोर फेर धरून नाचूं या १. ह्या संतरूपी साहेबांचें आपल्यावर कर्ज झालें आहे तें त्यांच्यापुढें नाचून फेडलें म्हणजे वरचेवर त्यांच्याकडे येणें जाणें नको. त्यावांचून आतां संसाराच्या बाजारांत विषयांच्या दुकानोदुकानीं उभें राहून पै-पैसा मागत हिंडण्याचें काय कारण आहे! २. सर्व जणी मिळून आपल्या पांडुरंग धन्यासमोर एका घाईनें नाचूं या, म्हणजे एका ठिकाणीं जर सुख सिद्ध झालें (आत्मस्थिति प्राप्त झाली) आहे तर इतर चाळे करण्याचें कशाला सुचेल? ३. तुकाराम महाराज म्हणतात, एकाला शरण जाऊन चिंता, माया ही नाहींशी करावी आणि त्याच्यापाशीं गाऱ्हाणें देऊन आपल्या मूळस्वरूपाच्या ठिकाणीं (विदेह मुक्तीला) आपण जाऊं ४. [४०१३]

मी हातामध्यें डौर (डमरू) घेऊन सकळ सौऱ्यांमध्यें (स्वैरिणींमध्यें) शूर झालें. त्या योगानें मायामोहाचा त्याग करून संसारास दुरावलें, म्हणून त्रैलोक्यामध्यें मी श्रेष्ठ झालें १. अगे विठाबाई आई, तूं माझ्याबरोबर चल. सर्व देह पंचभूतात्मकच आहेत पण चंद्रभागेच्या वाळवंटामध्यें सांपडलें असतां कांहीं गुप्त गुज मनांत ठेवूं नको २. चौऱ्यांयशीं लक्ष योनि हिंडून तुझ्या घराला मी आलें आणि एक नामरुका (भक्तिप्रेमरूपी पैसा) मागण्याकरितां संसाराचा त्याग केला ३.

महाद्वारीं । भ्रांति सावलें फिटोनि गेलें आतां कैंची उरी ॥ ४ ॥ झालें भांडी जगा सांडी नाहीं भीड चाड । घालीन चरणीं मिठी पुरवीन जीवींचें तें कोड ॥ ५ ॥ तुका म्हणे रुका करी संसारतुटी । आतां तुम्हां आम्हां कैसी झाली जीवें साटी ॥ ६ ॥ [४०१४]

सम सपाट वेसनकाट निःसंग झालें सौरी । कूडपीयेला देश आतां येऊं नेदीं दुसरी ॥ १ ॥ गाऊं रघुरामा हेंचि उरलें आम्हां । नाहीं जीवतमा वित्तगोतासहित ॥ २ ॥ ठाव झाला रिता झांकूनि काय आतां । कोणासवें लाज कोण दुजें पाहतां ॥ ३ ॥ सौरीयांचा संग आम्हां दुरावलें जग । भिन्न झालें सुख भाव पालटला रंग ॥ ४ ॥ लाज भय झणीं नाहीं तजियेलीं दोन्ही (लाज भय शंका जनीं नाहीं तजियेलीं दोन्ही) । फिरविला वेष नव्हों कोणाचींच कोणी ॥ ५ ॥ तुका म्हणे हा आम्हां वेष दिला जेणें । जना प्राचित सवें असों एकपणें ॥ ६ ॥ [४०१५]

नव्हे नरनारी संवसारीं अंतरलों । निर्लज्ज निष्काम जना वेगळेचि ठेलों ॥ १ ॥ चाल रघुरामा ने आपुल्या गांवा । तुजविण आम्हां कोण सोयरा सांगाती ॥ २ ॥ जनवाद लोकनिंद्य पिशुनाचे रे । साहूं तुजसाठीं अंतरलीं सहोदरें ॥ ३ ॥ बहुतां पाठीं निरोप हाटीं पाठविला तुज । तुका म्हणे आतां सांडुनि लौकिकाची लाज ॥ ४ ॥ [४०१६]

: शेजारतीचे अभंग (ललित) :

आजी दिवस झाला । धन्य सोनियाचा भला ॥ १ ॥ जाल संतांचे पंगतीं । बरवें भोजन निगुती ॥ २ ॥ रामकृष्णनामें । बरवीं मोहियेलीं प्रेमें ॥ ३ ॥ तुका म्हणे आला । चवी रसाळ हा काला ॥ ४ ॥ [४०१७]

लाज ही नाहींशी झाली व कोणाची भीतिहि राहिली नाहीं. भ्रांतिरूपी वस्त्र फेडून टाकून मी महाद्वारामध्यें नाचत आहें, आतां देहभावाची उरी कशाची आहे ? ४. सर्व जगानें मला टाकलें अशी मी भांडखोर झालें. आतां मला कोणाची गरज नाहीं व भीड नाहीं. तुझ्या पायांला मिठी घालून आपल्या मनांतील इच्छा मी पूर्ण करून घेईन ५. तुकाराम महाराज म्हणतात, तुझ्यापासून नामरूपी रुका (पैसा) मला मिळाला म्हणजे संसार नाहींसा होईल, मग आतां जीवावर उदार होऊन कशी तरी तुमची आमची गांठ घालूं ६. [४०१४]

सर्व प्रकारचीं व्यसनें नाहींशीं करून व सर्व संग टाकून निःसंगपणानें मी सौरी झालें. आतां सर्व ठिकाणीं सारखा देवच पाहातें. सर्व देश मींच ब्रह्मरूपानें व्यापला आहे, आतां दुसऱ्या कोणास (द्वैतरूपास जवळ) येऊं देणार नाहीं १. रामाचें नाम गावें हेंच कर्तव्य आम्हांला उरलें आहे, ह्यावांचून द्रव्याची व आपल्या गोताची गरज राहिली नाहीं व जीवाची देखील परवा नाहीं २. हा देह रिकामा झाला आहे. ह्याला आतां वस्त्राची गरज नाहीं, कारण मीं कोणाची लाज धरावी ? पाहिलें असतां देवावांचून जगांत दुसरें कोणी नाहीं ३. सौरीयांच्या संगतीनें (म्हणजे वैष्णवांच्या संगतीनें) जग अंतरलें, त्या योगानें जगाच्या वेगळें आम्हांला सुख झालें आहे, म्हणून आमचा रंग पालटला व देहभाव पालटला ४. आतां जनाची लाज, भय व शंका हीं आम्हांला नाहींत, कारण पूर्वीचा वेष टाकून आम्हीं दुसरा वेष घेतल्यामुळें आम्हांला कोणाचाहि संबंध राहिला नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात ज्या पांडुरंगानें आम्हांला हा वेष दिला आहे, त्याच्या अनुभवानें आम्ही जनामध्यें ऐक्यपणानें राहूं ६. [४०१५]

आम्हीं संसार नाहींसा केल्यामुळें नरनारी हे नव्होंत (आम्ही पुरुषहि नव्होंत अथवा स्त्रीहि नव्होंत) व लाज टाकून निष्काम होऊन जनाच्या वेगळे राहिलों आहोंत १. हे रघुरामा ! तूं धांवून येऊन आम्हांला आपल्या गावाला घेऊन जा. तुजवांचून दुसरा कोणी सोयरा सखा आम्हांला नाहीं २. ह्या लोकांचे अपवाद व दायाद मंडळीचें उणेपणाचें बोलणें हें तुझ्याकरितां आम्ही सहन करून घेतों. आमचे भाऊ देखील तुजकरितां अंतरले ३. तुकाराम महाराज म्हणतात, आतां आम्हीं लौकिकाची लाज टाकून ह्या संसार-बाजारामध्यें राहून आजपर्यंत पुष्कळ लोकांबरोबर (संतांबरोबर) आम्हांला निजधामाला घेऊन जाण्याविषयीं निरोप तुजकडे पाठविला ४. [४०१६]

आजचा दिवस सोन्याचा (सुखाचा) असा चांगला उगवला आहे तो धन्य आहे १. संतांच्या पंगतीस उत्तम व्यवस्थित परमार्थाचें भोजन झालें २. रामकृष्ण नामाच्या चिंतनप्रेमानें भोजनांतील पक्वान्नें चांगलीं स्निग्ध आणि मधुर झालीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, हा भगवच्चिंतनाचा काला मोठा रसभरित झाला असून रुचकर झाला आहे ४. [४०१७]

तुम्ही (ये) तरी (वो) सांगा कांहीं। आम्हांविशीं रखुमाबाई ॥ १ ॥ कांहीं उरलें तें ठायीं। वेगीं पाठवूनी देई ॥ २ ॥ टोकत बैसलों देखा। इच्छीतसें ग्रासा एका ॥ ३ ॥ प्रेम देउनि बहुडा झाला। तुका म्हणे विठ्ठल बोला ॥ ४ ॥ [४०१८]

वाट पाहें बाहे निढळीं ठेवूनियां हात। पंढरीचे वाटे दृष्टि लागलेंसे चित्त ॥ १ ॥ कई येतां देखें (देखेन) माझा मायबाप। घटिका बोटें दिवस लेखीं धरूनियां माप ॥ २ ॥ डावा डोळा लवे उजवी स्फुरते (स्फुरतसे) बाहे। मन उताविळ भाव सांडूनियां देहे ॥ ३ ॥ सुखसेजे गोड चित्तीं न लगे आणीक। नाठवे घर दार तान पळाली भूक ॥ ४ ॥ तुका म्हणे धन्य दिवस ऐसा तो कोण। पंढरीचे वाटे येतां मूळ देखेन ॥ ५ ॥ [४०१९]

तुझें दास्य करूं आणिका मागों खावया। धिग् झालें जिणें माझें पंढरीराया ॥ १ ॥ काय गा विठोबा तुज आतां म्हणावें। शुभाशुभ गोड तुम्हां थोरांच्या दैवें ॥ २ ॥ संसाराचा धाक निरंतर आम्हांसी। मरण भलें परि काय अवकळा ऐसी ॥ ३ ॥ तुझे शरणांगत शरण जाऊं आणिकांसी। तुका म्हणे कवणा लाज हें कां नेणसी ॥ ४ ॥ [४०२०]

पुरविली आळी। जे जे केली ते ते काळीं ॥ १ ॥ माय तरी ऐसी सांगा। कृपाळुवा पांडुरंगा ॥ २ ॥ घेतलें नुतरी। उचलोनी कडियेवरी ॥ ३ ॥ तुका म्हणे घांस। मुखीं घाली ब्रह्मरस ॥ ४ ॥ [४०२१]

पतित पतित। परि मी त्रिवाचा पतित ॥ १ ॥ परि तूं आपुलिया सत्ता। मज करावें सरता ॥ २ ॥ नाहीं चित्तशुद्धि। स्थिर पायापाशीं बुद्धि ॥ ३ ॥ अपराधाचा केलों। तुका म्हणे किती बोलों ॥ ४ ॥ [४०२२]

हे रखुमाई, आमच्याविषयीं तुम्ही तरी देवाजवळ कांहीं सांगा १. देवाला म्हणावें, ताटांत काय उरलें असेल तें खालीं लवकर पाठवून दे २. एका घासाची इच्छा धरून मी वाट पाहात बसलों आहें असें समजा ३. तुकाराम महाराज म्हणतात, प्रेमाची देणगी देऊन परती झाली आहे. आतां विठोबाचें चिंतन करा ४. [४०१८]

कपाळावर हात ठेवून मी बाहेरच्या बाजूनें श्रीहरीची वाट पाहात आहें. माझें चित्त व दृष्टि पंढरीच्या मार्गाकडे लागली आहे १. माझा आईबाप पांडुरंग मजकडे येतांना मी कधीं पाहीन असें झालें आहे. घटका व दिवस जे जात आहेत ते मी बोटानें मोजीत आहें २. माझा डावा डोळा लवत असून उजवा बाहु स्फुरण पावत आहे. देहभावाचा परित्याग करून तुमच्या दर्शनाविषयीं मन उतावळें झालें आहे ३. अंथरुणावर पडलें असतां सुख वाटत नाहीं. दुसरें कांहीं चित्ताला गोड वाटत नाहीं. घरादाराचा आठव न होतां तहानभूकहि नाहींशी झाली आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, पंढरीच्या मार्गानें मला नेण्याकरिता आलेलें मूळ (आईबाप) मी कधीं पाहीन व असा धन्य दिवस केव्हां येईल? ५. [४०१९]

हे पंढरीराया, तुमचें मी दास्यत्व करून आणिकांचे जवळ खावयास मागावयाचा मला प्रसंग यावा! धिःक्कार असो आमच्या जगण्याला! १. अगा विठोबा, आतां तुला काय म्हणावें? तुमच्या थोराच्या दैवानें शुभाशुभ सुद्धां चांगलें होतें (तुम्हां थोरांच्या भाग्यानें आमचें भाग्य उजळावें, आमचें पाप जावें व आमचें कल्याण व्हावें) २. आमच्या हृदयांत निरंतर संसाराविषयींचें भय आहे. ह्यापेक्षां मरण चांगलें पण ही अशी विटंबना कशाला पाहिजे? ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुला आम्ही शरणागत आलों असून अन्याला शरणागत जाण्याचा प्रसंग यावा, ही लज्जा कोणाला आहे हें का तुम्ही जाणत नाहीं? ४. [४०२०]

हे पांडुरंगा, ज्या ज्या वेळीं आम्हीं जी जी इच्छा केली त्या त्या वेळीं ती तुम्हीं पूर्ण केली १. कृपाळु पांडुरंगासारखी आई कोठें आहे सांगा २. तिनें कडेवर उचलून घेतलें कीं कांहीं उतरत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ती माझ्या मुखांत ब्रह्मरसाचा घांस घालते ४. [४०२१]

मी पतित आहें असें त्रिवार सांगतों १. पण तूं आपल्या सत्तेनें मला पुनीत करावेंस २. माझें चित्त शुद्ध नाहीं. माझी बुद्धि तुमच्या पायांपाशीं स्थिर नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझा देह सर्व अपराधाचाच बनला आहे, आतां किती म्हणून सांगावें? ४. [४०२२]

कथेची सामग्री। देह अवसानावरी ॥ १ ॥ नको जाऊं देऊं भंगा। गात्रें माझीं पांडुरंगा ॥ २ ॥ आयुष्य करी उणें। परि मज आवडो कीर्तन ॥ ३ ॥ तुका म्हणे हानी। या वेगळी मना नाणीं ॥ ४ ॥ [४०२३]

गळित झाली काया। हेंचि ललित पंढरीराया ॥ १ ॥ आलें अवसानापाशीं। रूप राहिलें मानसीं ॥ २ ॥ वाइला (वाहिला) कळस। तेथें स्थिरावला रस ॥ ३ ॥ तुका म्हणे गोड झालें। नारायणीं पोट घालें ॥ ४ ॥ [४०२४]

: देवाचें ध्यान :

रत्नजडित सिंहासन। वरी बैसले आपण ॥ १ ॥ कुंचे ढळती दोहीं बाहीं। जवळी राही रखुमाई ॥ २ ॥ नाना उपचारीं। सिद्धि वोळगती कामारी ॥ ३ ॥ हातीं घेऊनी पादुका। उभा बंदिजन तुका ॥ ४ ॥ [४०२५]

हिरा शोभला कोंदणीं। जडित माणिकांची खाणी ॥ १ ॥ तैसा दिसे नारायण। मुख सुखाचें मंडण ॥ २ ॥ कोटि चंद्रलीळा। पूर्णिमेच्या पूर्ण कळा ॥ ३ ॥ तुका म्हणे दृष्टि धाये। परतोनि माघारी ते न ये ॥ ४ ॥ [४०२६]

उभारिला हात। जगीं जाणविली मात ॥ १ ॥ दैव बैसले सिंहासनीं। आल्या याचकांची होय (पुरे) धनी ॥ २ ॥ एकाच्या कैवाडें। उगवे बहुतांचें कोडें ॥ ३ ॥ दोहीं ठायीं तुका। नाहीं पडों देत चुका ॥ ४ ॥ [४०२७]

देहामध्यें अवसान असण्यावरच श्रीहरीच्या कथेचें साहित्य अवलंबून आहे १. पांडुरंगा, ह्याकरितां माझीं इंद्रियें निर्बल होऊं देऊं नका २. पाहिजे तर आयुष्यांतला कांहीं भाग कमी करा, परंतु माझी तुमच्या कीर्तनाच्या ठिकाणीं प्रीति राहूं द्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, कीर्तनसेवा न होणें ही जी हानि आहे यापरती दुसरी हानि मी मनावर घेत नाहीं ४. [४०२३]

जरावस्थेमध्यें देह गलित होणें हेंच ललित (उत्सवाच्या शेवटीं होणारा खेळ) आहे १. श्रीहरीचें रूप मनामध्यें राहिल्यामुळें तें आटोक्यांत आलें २. जो शेवट आहे त्या ठिकाणीं माझी प्रीति स्थिरावली गेली (मी माझ्या आयुष्यांत भजनाचा कळस गांठला आहे आणि तेथेंच माझें प्रेम स्थिर झालें) ३. तुकाराम महाराज म्हणतात, नारायणाचतनानें ब्रह्मरसाचें भोजन गोड झालें व माझें पोट भरलें ४. [४०२४]

रत्नजडित सिंहासनावर देव आपण स्वतः बसला १. व दोन्ही बाजूंनीं त्याच्या मस्तकावर मोर्चेलें हालत आहेत व राईरुक्मिणी जवळ आहेत २. नानाप्रकारचे उपचार अर्पण करणाऱ्या अष्ट महासिद्धि ह्या तेथें दास्यत्व करीत आहेत ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी हातांत श्रीहरीच्या पादुका घेऊन त्यांचा हुकूमबंदा असा मी उभा आहें ४. [४०२५]

हिरा हा कोंदणाच्या ठिकाणीं सुशोभित झाला अथवा जडलेल्या माणकाची खाणच असावी १. तसें नारायणाचें मुख सुखानें सुशोभित झालेलें दिसत आहे २. कोटयवधि पौर्णिमेच्या पूर्ण चंद्रांच्या तेजाप्रमाणें श्रीहरीची लीला (तेज) आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, तें स्वरूप पाहिल्यानें दृष्टि तृप्त होते व प्रपंचाकडे माघार घेत नाहीं ४. [४०२६]

हात वर करून मीं (ध्रुवपदांत दर्शविलेली) ही हकीकत जगतांत समजाविली १. देव हे सिंहासनावर बसले आहेत आणि जो कोणी याचक येत आहे त्याची तृप्ति होत आहे २. एका पुंडलिकाच्या निर्धारानें देव पंढरीस आले, त्यामुळें पुष्कळांची इच्छा पूर्ण होत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवाच्या ठिकाणीं (देवाच्या सेवेंत) व जगताच्या ठिकाणीं (जगाला, लोकांना देवाच्या सेवेला प्रवृत्त करण्यांत) मी आपलें कर्तव्य बजावीत आहें, त्यांत चूक पडूं देत नाहीं ४. [४०२७]

: आशीर्वाद–प्रार्थना :

जीवेंसाठीं यत्नभाव । त्याची नाव बळकट ॥ १ ॥ पैल तीरा जातां कांहीं । संदेह नाहीं भवनदी ॥ २ ॥ विश्वासाची धन्य जाती । तेथें वस्ती देवाची ॥ ३ ॥ तुका म्हणे भोळियांचा । देव साचा अंकित ॥ ४ ॥ [४०२८]

आशीर्वाद तया जाती । आवडी चित्तीं देवाची ॥ १ ॥ कल्याण तों असे क्षेम । वाढो प्रेम आगळें ॥ २ ॥ भक्तिभाग्य गांठीं धन । त्या नमन जीवासी ॥ ३ ॥ तुका म्हणे हरिचे दास । तेथें आस सकळ ॥ ४ ॥ [४०२९]

तयासाठीं वेचूं वाणी । आइकों कानीं वारता त्या ॥ १ ॥ क्षेम माझ हरिजन । समाधान पुसतां त्यां ॥ २ ॥ परत्रींचे जे सांगाती । त्यांची याती न विचारीं ॥ ३ ॥ तुका म्हणे धैर्यवंतें । निर्मळ चित्तें सरवीं तीं (सखीं तीं) ॥ ४ ॥ [४०३०]

अभय उत्तरीं संतीं केलें दान । जालें समाधान चित्त तेणें ॥ १ ॥ आतां प्रेमरसें न घडे खंडण । द्यावें कृपादान नारायणा ॥ २ ॥ आलें जें उचित देह विभागासी । तेणें पायांपाशीं उभीं असों ॥ ३ ॥ तुका म्हणे करी पूजन वैखरी । बोबडा उत्तरीं गातों गीत ॥ ४ ॥ [४०३१]

असो मंत्रहीन क्रिया । नका चर्या विचारूं ॥ १ ॥ सेवेमधें जमा धरा । कृपा करा शेवटीं ॥ २ ॥ विचारूनि ठाया ठाव । येथें भाव राहिला ॥ ३ ॥ आतां तुकयापाशीं हेवा । नाहीं देवा तातडी ॥ ४ ॥ [४०३२]

वचन ऐका कमळापति । मज रंकाची विनंती ॥ १ ॥ कर जोडितों कथेकाळीं । आपण असावें

कोणताहि यत्न आपला जीव समर्पण करून करणें त्यालाच दृढ प्रयत्न असें म्हणतात (किंवा, जीव अर्पण करायची तयारी ज्याची असेल त्याची दृढ प्रयत्नरूपी नौका बळकट समजावी) १. तो ह्या भवनदींतून निःसंशय पार पडेल २. श्रीहरीवर विश्वास ठेवणाराची जात धन्य आहे. तेथें देवाची वस्ती असते ३. तुकाराम महाराज म्हणतात, खरोखर भोळ्या भक्ताच्या स्वाधीन देव असतो ४. [४०२८]

ज्यांच्या चित्तांत देवाविषयींची प्रीति आहे त्यांना (ध्रुवपदांत दिलेला) माझा आशीर्वाद आहे १. त्यांचें कल्याण व कुशल असावें आणि देवाविषयींचें प्रेम जास्त वाढावें २. ज्याच्या पदरीं श्रीहरीविषयींच्या भक्तिभाग्याचें प्रेम असेल त्या जीवाला माझा नमस्कार आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी सर्व आशा हरीच्या दासांच्या ठिकाणीं आहे ४. [४०२९]

(ध्रुवपदांत दर्शविलेल्याच कार्याकरितां) संतांकरितां आम्ही आपल्या वाणीचा व्यय करूं आणि ते जी कांहीं हकीगत सांगतील ती कानांनीं ऐकूं १. माझे सर्व कांहीं कुशल हरिभक्त आहेत, त्यांना क्षेम-कुशल विचारण्यांतच मला समाधान आहे २. जे परलोकींचे सांगाती आहेत त्यांच्या जात-गोताचा मी विचार करणार नाहीं, हरिभक्त म्हणूनच त्यांचें क्षेम-कुशल विचारीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, ते सर्व हरिजन धैर्यवान् असून चित्तानें निर्मळ आहेत (*पाठभेदः* किंवा धैर्यवान् आणि निर्मळ चित्ताचे ते हरिभक्त माझे मित्र आहेत.) ४. [४०३०]

तूं भिऊं नकोस अशा शब्दांनीं संतांनीं माझें शांतवन केलें. त्यायोगानें माझ्या चित्तास समाधान झालें १. हे नारायणा, आपल्याविषयींचा जो प्रेमरूपी रस आहे तो नाहींसा न होईल अशी कृपा करावी २. आमच्या देहाच्या वांटणीस जें योग्य कर्तव्य आलें आहे, त्यामुळेंच आम्ही आपल्या पायांजवळ उभे आहोंत ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझी वैखरी (वाणी) तुमच्या गुणवर्णनाची पूजा करीत आहे व बोबड्या शब्दानें मी ती गात आहें. ४. [४०३१]

हे देवा, आम्ही मंत्रज्ञानरहित व सत्कर्मरहित आहोंत म्हणून आमच्या शुद्ध आचाराचा विचार करूं नका १. आम्हांला तुमच्या सेवेमध्यें जवळ घेऊन अखेरीस तुम्ही कृपा करा २. अन्य ठावठिकाणांचा शोध करून ह्या तुमच्या पायांच्या ठिकाणीं आमचा भाव राहिला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आतां माझ्यापाशीं अन्य कोणत्याहि प्रकारची हांव नाहीं, त्यामुळें मनुष्यदेहाचें कर्तव्य पूर्ण करण्याची तांतडहि नाहीं ४. [४०३२]

अहो लक्ष्मीपती, तुम्ही माझें एक वचन ऐका, अशी माझी गरिबाची विनंति आहे १. हरिकथेच्या वेळीं मी हात

जवळी ॥ २ ॥ घेईं घेईं माझी भाक । जरी कां मागेन आणीक ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे देवा । शब्द इतुकाची राखावा ॥ ४ ॥ [४०३३]

आली लळिताची वेळ । असा सावध सकळ ॥ १ ॥ लाहो करा वेगीं स्मरा । टाळी वाहोनी विश्वंभरा ॥ २ ॥ जालिया अवसान । न सांपडती चरण ॥ ३ ॥ तुकया बंधु म्हणे थोडें । अवधि उरली आहे पुढें ॥ ४ ॥ [४०३४]

नेणें गाऊं कांहीं धड बोलतां वचन । कायावाचामनेंसहित आलों शरण ॥ १ ॥ करीं अंगीकार नको मोकलूं हरी । पतितपावन ब्रीदें करावीं खरीं ॥ २ ॥ नेणें भक्तिभाव तुझा म्हणवितों दास । जरी देसी अंतर तरी लज्जा कोणास ॥ ३ ॥ म्हणे तुकयाबंधु तुझे धरियेले पाये । आतां कोण दुजा ऐसा आम्हांसी आहे ॥ ४ ॥ [४०३५]

तूंच मायबाप बंधु सखा आमचा । वित्त गोत जिवलग जीवाचा ॥ १ ॥ आणीक प्रमाण नाहीं दुसरें आतां । योगक्षेमभार तुझे घातला माथां ॥ २ ॥ तूंच क्रियाकर्म धर्म देव तूं कूळ । तूंच तप तीर्थ व्रत गुरु सकळ ॥ ३ ॥ म्हणे तुकयाबंधु करिता कार्यता देवा । तूंच भाव भक्ति पूजा पुनस्कार अवघा ॥ ४ ॥ [४०३६]

करूनी उचित । प्रेम घालीं हृदयांत ॥ १ ॥ आलों दान मागावयास । थोरी करूनियां आस ॥ २ ॥ चिंतनसमयीं । सेवा आपुलीच देईं ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे भावा । मज निरवावें देवा ॥ ४ ॥ [४०३७]

गाऊं वाहूं टाळी रंगीं नाचों उदास । सांडोनी भय लज्जा शंका आस निरास ॥ १ ॥ बळियाचा बळी तो कैवारी आमुचा । भुक्तिमुक्तिदाता सकळांही सिद्धींचा ॥ २ ॥ मारूं शब्दशस्त्रबाण निशंक

जोडीत आहें. तर आपण माझ्या जवळ असावें २. त्यावांचून दुसरें कांहीं मी मागत नाहीं. अशाबद्दल माझें तुम्ही वचन घ्या ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे देवा, इतकाच माझा शब्द रक्षण करा ४. [४०३३]

अहो जन हो, तुमची फजितीची वेळ आली आहे, ह्याकरितां तुम्ही सर्व सावध असा १. विश्वंभर देवाच्या स्मरणाचा छंद लगबगीनें करा आणि हातांनीं टाळी वाजवा २. तुमचा देह पडल्यावर देवाचे चरण पुनः सांपडणार नाहींत ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, ह्याविषयींची वेळ आतां थोडी उरली आहे ४. [४०३४]

हे देवा, मला सुस्वरानें कांहीं गातां येत नाहीं व धड बोलतां येत नाहीं. कायावाचामनासुद्धां मी सर्व भावानें तुम्हांस शरण आलों आहें १. हे हरि, तुझें पतितपावनपणाचें ब्रीद खरें करण्याकरितां माझा अंगीकार कर. मला दूर घालवूं नको २. मी कांहीं भक्तिभाव जाणत नाहीं, फक्त तुझा सेवक म्हणवीत आहें. असें असून तूं जर मला टाकशील तर ती लाज कोणाला आहे? ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे देवा, मीं तुझे पाय धरले आहेत, आतां तुझ्यासारखा दुसरा आम्हांला कोण आहे? ४. [४०३५]

हे देवा, तूंच आमची आई, बाप, भाऊ, सखा व जीवाचा जिवलग आप्त आहेस आणि सर्व वित्तहि तूंच आहेस १. आतां तुजवांचून मला दुसरें कांहीं प्रमाण नाहीं, म्हणून माझ्या चरितार्थाचा सर्व भार मीं तुझ्यावर घातला आहे २. क्रिया, कर्म, धर्म व कुलदैवत तूंच आहेस व तप, तीर्थ, व्रत, गुरु हें सर्व कांहीं तूंच आहेस ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे देवा, तूंच भाव, भक्ति व पूजानमस्कारादि सर्व आहेस व कार्यकर्ताहि तूंच आहेस ४. [४०३६]

हे देवा, तुझ्याविषयींचें प्रेम योग्य करून माझ्या हृदयामध्यें ठेवावें १. ह्याविषयींची थोर आशा करून मी तुला दान मागण्यास आलों आहें २. मी ज्या वेळीं तुझें चिंतन करीन त्या वेळीं सादरपणानें माझ्या हातून तुम्हीं सेवा घ्यावी ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे देवा, मला तुझ्याविषयींच्या भावार्थाच्या स्वाधीन कर ४. [४०३७]

हरीच्या रंगामध्यें टाळी वाजवून नाम गाऊं व त्या छंदानें उदासपणानें नृत्य करूं. ह्याविषयीं भय, लज्जा व शंका कोणाची धरणार नाहीं व सर्व आशा टाकून मी निराश झालों आहें १. सर्व बलवानांहून जो श्रेष्ठ आहे व सर्व भोग, सिद्धि व चार मुक्ति देणारा आहे, तो आमचा साह्यकारी झाला आहे २. आतां कोणाचीहि भीति न धरतां शब्दरूपी

अनिवार। कंटकांचा चूर फोडूं काळाचें शीर ॥ ३ ॥ म्हणे तुकयाबंधु नाहीं जीवाची चाड। आपुलिया येथें काय आणिकांची भीड ॥ ४ ॥ [४०३८]

सांडुनी वैकुंठ। उभा विटेवरी नीट ॥ १ ॥ आला आला रे जगजेठी। भक्ता पुंडलिकाचे भेटी ॥ २ ॥ पैल चंद्रभागे तिरीं। कट धरूनियां करीं ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे अंबर। गजर होतो जयजयकार ॥ ४ ॥ [४०३९]

कृपाळू भक्तांचा। ऐसा पति गोपिकांचा ॥ १ ॥ उभा न पाचारितां दारीं। न सांगतां काम करी ॥ २ ॥ भाव देखोनि निर्मळ। रजां वोडवी कपाळ ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे न भजा। कां रे ऐसा भोळा राजा ॥ ४ ॥ [४०४०]

केला अंगीकार पंढरीच्या देवें। आतां काय करितील काळ मशक मानवें ॥ १ ॥ घातलीं बाहेर तीं भय होतें ज्यानें। बैसला आपण तेथें घालुनियां ठाणें ॥ २ ॥ लागों नेदी वारा या दुजियाचा अंगासी। हा पुरता निर्धार कळों आला आम्हांसी ॥ ३ ॥ म्हणे तुकयाबंधु न लगे करावी चिंता। कोणेविशीं आतां बैसलों हस्तीवरी माथां ॥ ४ ॥ [४०४१]

अगोचरीं बोलिलों आज्ञेविण आगळें। परी तें आतां न संडावें राउळें ॥ १ ॥ जाईल रोकडा बोल न पुसती आम्हां। तुझा तुझें म्हणविलें पाहा पुरुषोत्तमा ॥ २ ॥ न व्हावा न वजावा न कळतां अन्याय। न धरावें तें मनीं भलता करा उपाय ॥ ३ ॥ म्हणे तुकयाबंधु हीन मी म्हणोनि लाजसी। वारा लागों पाहातोहे उंच्या झाडासी ॥ ४ ॥ [४०४२]

जाली (झाली) पाकसिद्धि वाट पाहे रखुमाई। उदक तापलें डेरां चीकसा मर्दूं द्या पाई ॥ १ ॥

शस्त्राचे तीक्ष्ण बाण मारूं. त्या योगानें दुर्जनांचा नाश करूं व कलिकाळाचें मस्तक फोडूं ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, आम्हांला जीवाची पर्वा नाहीं. तेथें दुसऱ्याची भीड कोण धरतो? ४. [४०३८]

हा देव आपल्या वैकुंठाचा त्याग करून विटेवर नीट उभा राहिला आहे १. जगामध्यें श्रेष्ठ पैलवान आहे तो देव पुंडलीकरायाच्या भेटीकरितां आला आहे (असें मी सांगतों) २. कटावर कर ठेवून चंद्रभागेच्या तीरावर तो उभा आहे. तो सर्वांहून पैल आहे (निराळा आहे) ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, त्याच्या नामगजरानें जयजयकार होत आहे, त्या योगानें आकाश दुमदुमलें आहे (भरलें आहे) ४. [४०३९]

सर्व गोपिकांचा पति भक्तजनांना अशा प्रकारचा कृपाळु आहे १. भक्तांनीं हांक न मारतां द्वारांत उभा राहून न सांगतां त्यांचीं सर्व कामें करतो २. ज्याच्या ठिकाणीं शुद्ध भाव आहे त्याच्या पायांची धूळ लागण्याकरितां तो आपलें कपाळ पुढें करितो ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, अरे तुम्ही अशा भोळ्या राजाचें–देवाचें भजन कां करीत नाहीं? ४. [४०४०]

पंढरीच्या देवांनीं माझा अंगीकार केला आहे. आतां काळास चिलटाप्रमाणें आम्ही मानतों, म्हणून तो आमच्यापुढें काय करणार आहे? १. कामक्रोधादि विकारांच्या योगानें जें भय उत्पन्न होतें तें सर्व देवानें माझ्या हृदयाच्या बाहेर घालवून त्या ठिकाणीं तो आपलें ठाणें घालून बसला आहे २. आतां तो दुसऱ्या कोणाचा वारा माझ्या आंगास लागूं देणार नाहीं हा निर्धार पुरतेपणानें आम्हांस समजून आला ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, असें मला श्रेष्ठ ठिकाणीं बसविलें आहे म्हणून आतां कोणत्या प्रकारची चिंता करण्याचें मला कारण नाहीं ४. [४०४१]

हे देवा, तुमच्या आज्ञेवांचून जें प्रगट होत नाहीं तें बोलणें मी अधिक बोललों, पण त्याचा आतां कृपाळु देवांनीं अव्हेर करूं नये १. अहो पुरुषोत्तमा, आम्हीं तुझे असें म्हणविलें असून तूं जर आम्हांला न विचारशील तर तुझा पतितपावनपणाचा बोल खरा आहे, तो व्यर्थ जाईल ह्याचा विचार करून पाहा २. जो अन्याय होऊन जाऊं नये तो न समजतां झाला आहे, तर तुम्ही तें मनांत न वागवितां निराळ्या उपायानें माझें रक्षण करा ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, मी फार वाईट आहें म्हणून तुला लज्जा वाटते पण जसें उंच असलेल्या झाडांसच वारा लागतो तशी गरिबाची झट धरावी लागते ४. [४०४२]

अहो देवा, स्वयंपाक तयार करून रुक्माबाई वाट पाहात आहे आणि हांडाभर पाणी तापलें आहे. तुमच्या पायांस

उठा पांडुरंगा उशीर जाला (झाला) भोजना। उभ्या आंचवणा गोपी कलश (कळस) घेऊनी ॥ २ ॥ अवघ्या सावचित सेवेलागीं सकळा। उद्धव अक्रूर आले पाचारूं मूळा ॥ ३ ॥ सांवरिली सेज सुमनयाति सुगंधा। रत्नदीप ताटीं वाळा विडिया विनोदा ॥ ४ ॥ तुका विनंती करी पाहे पंढरीराणा। असा सावचित्त सांगे सकळ जनां ॥ ५ ॥ [४०४३]

उठा सकळ जन उठिले नारायण। आनंदले मुनिजन तिन्ही लोक ॥ १ ॥ करा जयजयकार वाद्यांचा (वाद्यांचे) गजर। मृदंग विणे अपार टाळ घोळ ॥ २ ॥ जोडोनियां कर मुख पाहा सादर। पायावरी शिर ठेवूनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे काय पढियंतें मागा (पढियें तें तें मागा)। आपुलालें सांगा दुःख सकळ ॥ ४ ॥ [४०४४]

घडिया घालूनी तळीं चालती वनमाळी। उमटती कोमळीं (कोवळीं) कुंकुमाचीं ॥ १ ॥ वंदा चरणरज अवघे सकळ जन। तारियेले पाषाण उदकीं जेणें ॥ २ ॥ पैस धरूनी चला ठाकत ठायीं ठायीं। मौन धरूनी कांहीं न बोलावें ॥ ३ ॥ तुका अवसरु जाणवितो पुढें। उघडिलें महाल मंदिरें कवाडें ॥ ४ ॥ [४०४५]

भीतरी गेले हरी राहा क्षणभरी। होईल फळ धीर करावा ॥ १ ॥ न करीं त्वरा ऐकें मात। क्षण एक निवांत बैसावें ॥ २ ॥ करूनी मर्दन सारिलें पाणी। न्हाले देव अंग पुसी भवानी ॥ ३ ॥ नेसला सोनसळा विनवी रखुमाई। वाढिलें आतां ठायीं चलावें जी ॥ ४ ॥ करूनियां भोजन घेतलें आंचवण। आनंदें नारायण पहुडले ॥ ५ ॥ तुका मात जाणवी आतां। सकळां बहुतां होती चित्तीं ॥ ६ ॥ [४०४६]

सुगंधी पदार्थांचें मर्दन करूं द्या १. हे पांडुरंगा, तुम्हांस भोजनाला उशीर झाला आहे म्हणून लवकर उठावें. हातामध्यें पाण्याचा कलश घेऊन तुम्हांस आचमन घालण्याकरितां गोपिका तिष्ठत उभ्या आहेत २. त्या सर्व जणी सेवा करण्यास तत्पर आहेत आणि उद्धव व अक्रूर हे तुम्हांस पाचारण करण्यास आले आहेत ३. अनेक सुगंधी पुष्पांची शेज रचून तयार केली आहे आणि नाना प्रकारच्या रत्नांचे दीप लावले आहेत व तबकामध्यें वाळा वगैरे सुगंधी पदार्थांचे विडे तुम्हांस खुषमौजेकरितां ठेवले आहेत ४. तुकाराम महाराज म्हणतात, मी अशी विनंति करीत आहें. ते पंढरीराय मजकडे पाहातात. आतां सर्व जणांनीं सेवेविषयीं सावध असावें असें मी सांगतों ५. [४०४३]

अहो जन हो, नारायण उठून उभे राहिले आहेत म्हणून तुम्हीं सर्वांनीं उभें राहावें, कारण त्यांना पाहून मुनिजनांस व त्रैलोक्यास आनंद झाला आहे १. आतां तुम्ही अनेक टाळमृदंगांचा घोष करून अनेक वाद्यांचा गजर करा व जयजय शब्दाची गर्जना करा २. उभय हस्त जोडून पायांवर मस्तक ठेवून सादरपणानें श्रीमुख पाहा ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्ही आपापलें सुखदुःख देवाला सांगून ज्याला जें कांहीं आवडत असेल तें देवापाशीं मागा ४. [४०४४]

वस्त्राच्या घड्या खालीं अंथरून वर वनमाळी चालत आहेत, त्या ठिकाणीं कुंकुममंडित कोमल पावलें उमटतात १. अहो सर्व जन हो, ज्या पायांच्या योगानें पाण्यावर पाषाण तरले, त्या पायांचे रजःकण तुम्ही मस्तकीं वंदन करा २. देवास चालण्याला मध्यें पैस जागा ठेवून तुम्ही जागोजाग उभे राहात दोन्ही बाजूंनीं चाला व कांहीं व्यर्थ भाषण करूं नका ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी पुढें चालून वरचेवर वेळ जागवीत आहें (प्रत्येक वेळीं तुम्हीं कसें वागावयाचें ह्यासंबंधीं मी चोपदार तुम्हांला सूचना देत आहें) व शेजघराचीं कवाडें उघडलीं आहेत ४. [४०४५]

शेजघरामध्यें हरि गेले आहेत, त्याकरितां तुम्ही धीर धरून क्षणभर स्थिर व्हा म्हणजे तुम्हांस इच्छित फळाची प्राप्ति होईल १. तुम्हीं त्वरा न करतां एक क्षणभर निवांतपणानें बसावें. हें माझें वचन ऐका २. देवास उटणें लावून पाण्यानें अभ्यंग स्नान घातलें व लक्ष्मी वस्त्रानें अंग पुशीत आहे ३. सोनसळा पीतांबर देव नेसले आणि ताट वाढून ठिकाणीं ठेविल्यामुळें जी महाराज, लवकर चलावें अशी रुक्माबाई विनंति करीत आहे ४. मग नारायणांनीं भोजन केलें व नंतर ते आंचवले आणि नंतर त्यांनीं आनंदानें पलंगावर शयन केलें ५. तुकाराम महाराज म्हणतात, आतां जी सर्वांच्या मनांत गोष्ट होती तीच मी जाणवीत आहें ६. [४०४६]

द्या जी आम्हां कांहीं सांगा जी रखुमाई । शेष उरलें तें ठायीं सनकादिकांचें ॥ १ ॥ टोकत बाहेरी बैसलों आशा । पुराया ग्रासा एकमेकां ॥ २ ॥ येथवरी आलों तुझिया नांवें । आस करूनी आम्ही दातारा ॥ ३ ॥ प्रेम देऊनियां बहुडा आतां दिला । तुका म्हणे आतां विठ्ठल बोला ॥ ४ ॥ [४०४७]

बहुडविले जन मन झालें निश्चळ । चुकवूनी कोल्हाळ आला तुका ॥ १ ॥ पर्यंकीं निद्रा करावें शयन । रखुमाई आपण समवेत ॥ २ ॥ घेऊनियां आलों हातीं टाळ वीणा । सेवेसी चरणा स्वामीचिया ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां परिसावीं सादरें । बोबडीं उत्तरें पांडुरंगा ॥ ४ ॥ [४०४८]

नाच (नाचें) गाणें माझा जवळील ठाव । निरोपीन भाव होईल तो ॥ १ ॥ तुम्हां निद्रा मज आज्ञा ते स्वभावें । उतरूनी जिवें जाईन लोण ॥ २ ॥ एकाएकीं बहु करीन सुस्वरें । मधुर उत्तरें आवडीनें ॥ ३ ॥ तुका म्हणे तूं जगदानी उदार । फेडशील भार एक वेळे ॥ ४ ॥ [४०४९]

शिणलेती सेवकां देऊनि इच्छादान । केला अभिमानें अंगीकार ॥ १ ॥ अहो दीनानाथा आनंदमूर्ती । तुम्हांसी शोभतीं ब्रीदें ऐसीं ॥ २ ॥ बहुतांनीं विनविलें बहुतां प्रकारीं । सकळां ठायीं हरी पुरलेती ॥ ३ ॥ तुका म्हणे अगा कुटुंबवत्सला । कोण तुझी लीला जाणे ऐसी ॥ ४ ॥ [४०५०]

उठा भागलेती उजगरा । जाला स्वामी निद्रा करा ॥ १ ॥ वाट पाहाते रुक्मिणी । उभी मंचक सांवरूनी ॥ २ ॥ केली करा क्षमा । बडबड पुरुषोत्तमा ॥ ३ ॥ लागतो चरणा । तुकयाबंधु नारायणा ॥ ४ ॥ [४०५१]

अहो रखुमाबाई आई, आम्हांला सनकादिकांनीं जेवण करून जें अवशेष राहिलें आहे त्यांतील जी महाराज, कांहीं तरी द्या, असें आमच्याविषयीं तुम्ही सांगा १. आम्ही आशा धरून बाहेर टोकत आशेनें बसलों आहोंत, म्हणून आम्हां एकमेकांमध्यें पुरण्यासारखा असा एक घांस तरी द्या २. अहो दात्या देवा, आम्ही तुझ्या नांवावर आशा करून येथपर्यंत आलों आहोंत ३. तुकाराम महाराज म्हणतात, अशी आमची विनंति ऐकून देवांनीं प्रेम देऊन निरोप दिला, म्हणून अहो जन हो, आतां तुम्ही विठ्ठलनामाचा उच्चार करा ४. [४०४७]

ह्याप्रमाणें जनांस निरोप देऊन मन निश्चल झालें, तो सर्व कोलाहल (गवगवा) चुकवून तुका देवाजवळ आला १. आणि देवास प्रार्थना करीत आहे, कीं रखुमाबाईसहवर्तमान आपण पलंगावर शयन करावें २. हातामध्यें टाळ व वीणा घेऊन स्वामीची चरणसेवा करण्याकरितां मी आलों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, अहो पांडुरंगा, आतां सादरपणानें माझीं बोबडीं वचनें ऐका ४. [४०४८]

तुमच्या जवळ गाणें गाऊन नाचावें हाच माझा मुख्य आधार (हेंच माझें कलाकौशल्य) आहे व जो भाव अंतःकरणांत उत्पन्न होईल तो मी तुम्हांस निवेदन करीन १. तुम्हीं निद्रा घ्यावी आणि ती आज्ञा साहाजिक स्वभावानें मला आहे, म्हणून जीवानें मी तुमच्यावरून ओंवाळून जाईन २. असें एकांतस्थानीं फार प्रीतीनें मधुर वचनाचें सुस्वर गायन मी करीन ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तूं उदारपणें जगाला दान देण्याविषयीं समर्थ आहेस, म्हणून माझ्या डोक्यावरचें प्रपंचाचें ओझें एकदम नाहींसें करशीलच ४. [४०४९]

हे देवा, आपल्या दासांना इच्छित देणगी देऊन त्यांचा अभिमानानें अंगीकार केल्यामुळें तुम्हांस फार श्रम झाले आहेत १. अहो आनंदमूर्ति दीनानाथ, दीनजनांचा उद्धार करण्याचीं ब्रीदें तुम्हांस शोभत आहेत २. हे हरि, बहुतां प्रकारें बहुतांनीं तुम्हांस विनविलें. त्या त्याप्रमाणें तुम्ही सर्व ठिकाणीं जाण्यास पुरत आहांत ३. तुकाराम महाराज म्हणतात, अगा कुटुंबवत्सला देवा, असा तुझा महिमा कोण जाणणार आहे? ४. [४०५०]

अहो स्वामी, तुम्हांला बाहेरच्या येरझारांचे फार श्रम झाले आहेत, म्हणून उठा, निद्रा करा, चला १. पलंगावरील शेज तयार करून रुक्माबाई वाट पाहात उभी राहिली आहे २. हे पुरुषोत्तमा, मी जी बडबड केली आहे तिजबद्दल आपण क्षमा करा ३. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे नारायणा, मी तुमच्या चरणांवर मस्तक ठेवीत आहें ४. [४०५१]

पावला प्रसाद आतां उठोनी जावें। आपुलाले श्रम कळों येताती भावें। (पावला प्रसाद आतां विठो निजावें। आपला तो श्रम कळों येतसे भावें) ॥ १ ॥ आतां स्वामी सुखें निद्रा करा गोपाळा। पुरले मनोरथ जातों आपुलिया स्थळा ॥ २ ॥ तुम्हांसी जागवूं आम्ही आपुलिया चाडा। शुभाशुभ कर्मे दोष हराया (हरावया) पीडा ॥ ३ ॥ तुका म्हणे दिलें उच्छिष्टाचें भोजन। नाहीं निवडिलें आम्हां आपुलिया (आपणां) भिन्न ॥ ४ ॥ [४०५२]

शब्दाचीं पैं (शब्दांचीया) रत्नें करूनी अलंकार। तेणें विश्वंभर पूजियेला ॥ १ ॥ भावाचे उपचारें करूनी भोजन। तेणें नारायण जेवविला ॥ २ ॥ संसारा हातीं दिलें आंचवण। मुखशुद्धि मन समर्पिलें ॥ ३ ॥ रंगलीं इंद्रियें सुरंग तांबूल। माथां तुळसीदळ समर्पिलें ॥ ४ ॥ एकभाव दीप करूनी निरांजन। देऊनी आसन देहाचें या ॥ ५ ॥ न बोलोनी तुका करी चरणसेवा। निजविलें देवा माजघरीं ॥ ६ ॥ [४०५३]

उठोनियां तुका गेला निजस्थळा। उरले राउळामाजी देव ॥ १ ॥ निउल (नेऊल) जालें सेवका स्वामीचें। आज्ञे करुनी चित्त समाधान ॥ २ ॥ पहुडलिया हरी अनंतशयनावरी। तेथें नाहीं उरी कांहीं काम ॥ ३ ॥ अवघियांस बाहेर घालुनि गेला तुका। सांगितलें लोकां निजले देव ॥ ४ ॥ [४०५४]

पवित्र सुदिन उत्तम दिवस दसरा। सांपडला तो साधा आजि मुहूर्त बरा। गर्जा जयजयकार हरि हृदयीं धरा। आळस नका करूं लहानां सांगतों थोरां ॥ १ ॥ या हो या हो बाईयांनो निघाले हरी। सिलंगणा घेऊनी वेगीं आरत्या करीं। ओवाळूं श्रीमुख वंदूं पाउलें शिरीं। आम्हां दैव आलें येथें घरिंच्या घरीं ॥ २ ॥ अक्षय मुहूर्त औटामध्यें साधतें। मग येरी गर्जे जैसें तैसें होत जातें।

आतां आम्हांला प्रसाद मिळाला आहे, म्हणून उठून जावें हें बरें, कारण आपल्या भावार्थानें जे श्रम केले आहेत ते तुम्हांस समजून येतील *(पाठभेद :* म्हणून अहो विठोबा! तुम्ही निद्रा घ्या. तुमचे दिवसभराचे श्रम आम्हांला तुमच्या प्रेमामुळें कळून आले आहेत) १. अहो स्वामी गोपाळा, आतां तुम्ही सुखानें निद्रा करा. आमचे मनोरथ पूर्ण झाल्यामुळें आम्ही आपापल्या ठिकाणीं जातों २. शुभ व अशुभ कर्मांच्या दोषांची पीडा निवारण होण्याची गरज आम्हांला आहे म्हणून आम्ही तुम्हांला जागवीत आहोंत ३. तुकाराम महाराज म्हणतात, तुम्हीं जें भोजन केलें त्यांतील उच्छिष्ट प्रसाद मला दिला. उभयतांमध्यें वेगळेपणानें कांहीं निवड केली नाहीं (तुम्हीं आम्हांला परके मानलें नाहीं) ४. [४०५२]

भक्ति-ज्ञान-वैराग्यप्रतिपादक शब्दरूपी रत्नांचे अलंकार करून त्या योगानें मीं विश्वंभराची पूजा केली आहे १. भावार्थाचे उपचार करून नारायणास भोजन घातलें आहे २. मी सर्व संसार त्याच्या हातीं अर्पण करून त्या योगानें त्याला आंचवण घातलें आहे; आणि मुखशुद्धीकरितां मीं आपलें मन समर्पण केलें आहे ३. माझीं इंद्रियें श्रीहरीच्या रंगानें रंगलीं आहेत. हाच उत्कृष्ट रंगाचा तांबूल अर्पण करून मस्तकावर तुळशीदळ समर्पण केलें आहे ४. एकाग्र भावाच्या निरांजनाच्या प्रकाशानें ओंवाळून बैसावयास मी आपल्या देहाचें आसन दिलें आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, याप्रमाणें पूजा करून देवाला मीं आपल्या हृदयरूपी माजघरांत निजविलें आहे आणि मौन धरून मी त्याची चरणसेवा करीत आहें. [४०५३]

तुका हा उठून आपल्या राहाण्याच्या ठिकाणीं गेला, म्हणून देव राऊळामध्यें एकटे राहिले आहेत १. स्वामीच्या आज्ञेवरून चित्ताचें समाधान झालें ह्याचें मला सेवकाला नवल वाटतें २. शेषशय्येवर हरि निजले आहेत, त्या ठिकाणीं कांहीं कामाची उरी उरली नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, सर्व मंडळी बाहेर घालवून मीहि बाहेर गेलों व देव निजले आहेत म्हणून लोकांस सांगितलें ४. [४०५४]

दशइंद्रियांचा दसरा हा मुहूर्त प्राप्त झाला आहे तो आजचा मुहूर्त चांगला आहे, म्हणून हरीचें स्वरूप हृदयांत धरून त्याच्या नांवाचा जयजयकार करण्याविषयीं आळस करूं नका असें मी लहानथोरांस सांगत आहें १. प्रकृतीच्या स्वाधीन झालेल्या जेवढ्या तुम्ही बाया आहांत त्या हातांमध्यें आरत्या घेऊन या (असें द्विवार सांगतों), कारण हरि सीमा उल्लंघन करण्याकरितां निघाले आहेत. त्यांचें श्रीमुख ओंवाळूं व पावलांचें मस्तकानें वंदन करूं. आम्हांला घरच्या घरीं दैव प्राप्त झालें आहे २. साडेतीन सणांमध्यें दसरा हा सण अक्षय मुहूर्त आहे म्हणजे ह्या मुहूर्तावर जें कार्य करावें

म्हणोनि मागें पुढें कोणी न पहावें येथें। सांडा परतें काम जाऊं हरीसांगातें ॥ ३ ॥ बहुतां बहुतां रीतीं चित्तीं धरा हें मनीं। नका गई करूं आइकाल ज्या कानीं। मग हें सुख तुम्ही कधीं न देखाल स्वप्नीं। उरेल हाय हाय मागें होईल काहाणी ॥ ४ ॥ ऐसियास वंचिती त्यांच्या अभाग्या पार। नाहीं नाहीं नाहीं सत्य जाणा निर्धार। मग हे वेळ घटिका न ये अजरामर। कळलें असों द्या मग पडतील (पटतील) विचार ॥ ५ ॥ जयासाठीं ब्रह्मादिक झालेती पिसे। उच्छिष्टाकारणें देव जळीं झाले मासे। अर्धांगी विश्वमाता लक्षुमी वसे। तो हा तुकयाबंधु म्हणे आले अनायासें ॥ ६ ॥ [४०५५]

करूनी आरती। आतां ओंवाळूं श्रीपती (चक्रपाणी ओवाळिती) ॥ १ ॥ आजी पुरले नवस। धन्य जाला हा दिवस ॥ २ ॥ पाहा वो सकळा। पुण्यवंता तुम्ही बाळा ॥ ३ ॥ तुका वाहे टाळी। होता (उभा) सन्निध जवळी ॥ ४ ॥ [४०५६]

द्याल माळ तरी पडेन मी पायां। दंडवत वायां कोण वेंची ॥ १ ॥ आलें तें हिशोबें अवघियां प्रमाण। द्यावें (द्याल) तरी दान मान होतो ॥ २ ॥ मोकळिया मनें घ्याल जरी सेवा। प्रसाद पाठवा लवकरी ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही झालिया कृपण। नामाचें जतन मग कैंचें ॥ ४ ॥ [४०५७]

तुम्हीं जावें निजमंदिरा। आम्ही जातों आपुल्या घरा ॥ १ ॥ विठोबा लोभ असों देईं। आम्ही असों तुमचे पाईं ॥ २ ॥ चित्त करी सेवा। आम्ही जातों आपुल्या गांवा ॥ ३ ॥ तुका म्हणे दिशा भुललों। फिरोन पायांपाशीं आलों ॥ ४ ॥ [४०५८]

पाहें प्रसादाची वाट। द्यावें धुवोनियां ताट ॥ १ ॥ शेष घेऊनी जाईन। तुमचें झालिया भोजन

तें निर्विघ्नपणें शेवटास जातें. बाकीचे जे मुहूर्त आहेत ते जसेच्या तसे होतात जातात, म्हणून मागचा पुढचा कांहीं विचार न करितां सर्व काम टाकून हरीच्या साधनाला लागा ३. बहुत प्रकारें करून हें आपल्या चित्तामध्यें धरा. जो कोणी ह्याविषयीं श्रवण करील त्यानें सांगितल्याप्रमाणें हयगय करूं नये, कारण हें सुख स्वप्नांत देखील तुम्हांला केव्हांहि दिसणार नाहीं. हाय हाय करण्याची पश्चात् स्थिति राहील ४. अशा ह्या मुहूर्ताची जे वंचना करतात त्यांच्या अभाग्याला पार नाहीं (असें त्रिवार सांगतों) हें तुम्ही सत्य समजा. मग अशा प्रकारची अजरामर घटका येणार नाहीं हें तुम्हांला ठाऊक असूं द्या. नाहीं तर पुढें चिंतेंत पडाल ५. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, ज्या देवाकरितां ब्रह्मादि देव वेडे झाले आहेत व त्याचें उच्छिष्ट मिळावें म्हणून यमुनेमध्यें ते मासे झाले, विश्वाला निर्माण करणारी लक्ष्मी माताहि ज्याच्या अंगीं आहे, असा हा देवाचा योग अनायासें आला आहे (हा अभंग कोणी देहाकडे लावितात) ६. [४०५५]

आतां आरती करून लक्ष्मीपतीला ओंवाळा १. कारण आज नवस पूर्ण झाले आहेत म्हणून आजचा दिवस धन्य होय २. अहो तुम्ही सर्व पुण्यवंत, बाळरूप देवाला पाहा ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी तेथें देवाचे जवळच टाळी वाजवीत होतों ४. [४०५६]

देवा, आपला प्रसाद तुम्ही आपल्या गळ्यांतील माळ द्याल तर मी तुमच्या पायां पडेन, नाहींतर फुकट दंडवत करतो कोण ? १. जें हिशेबानें प्राप्त होतें तें सर्वांना कबूल असतें, म्हणून तुम्हीं जर दान दिलें तर त्यांत तुमचा मान होईल २. जर सर्व विकारांपासून मुक्त मनानें आमची सेवा घ्याल तर त्याचे बदला लवकर प्रसाद पाठवून द्या ३. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुम्हीं जर कृपणपणा धरलात तर तुमच्या दीनदयाळ व पतितपावन ह्या नामाचें रक्षण कसें होईल ? ४. [४०५७]

देवा, तुम्हीं आपल्या शयनमंदिरामध्यें जावें व आम्ही आपल्या घरीं जातों १. हे विठोबा, आतां आमच्यावर लोभ असूं दे. आम्ही तुमच्या पायांच्या ठिकाणीं राहिलों आहोंत २. आम्ही आपल्या गांवाला जातों. आमचें चित्त तुमच्या चिंतनाची सेवा करीत आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, मला दिशाभुली झाल्यामुळें मी फिरून तुमच्या पायांच्या जवळ आलों आहें ४. [४०५८]

देवा, मी तुमच्या प्रसादाची वाट पाहात आहें. ज्या ताटांत तुम्हीं भोजन केलेंत तें ताट धुवून त्याचें पाणी द्या १.

॥ २ ॥ झालों एकसवा । तुम्हां आडूनियां देवा ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्त । करोनी राहिलों निश्चिंत (निवांत) ॥ ४ ॥ [४०५९]

केली कटकट गाऊं नाचों नेणतां । लाज नाहीं भय आम्हां पोटाची चिंता ॥ १ ॥ बैसा सिणलेती पाय रगडूं दातारा । जाणवूं द्या वारा उब झाली शरीरा ॥ २ ॥ उशिरा उशीर किती काय म्हणावा । जननियें बाळका कोप कांहीं न धरावा ॥ ३ ॥ तुझिये संगतीं आम्ही करूं कोल्हाळ । तुका म्हणे बाळें अवघीं मिळोन गोपाळ ॥ ४ ॥ [४०६०]

आरुष शब्द बोलों मनीं न धरावें कांहीं । लडिवाळ बाळकें तूंचि आमुची आई ॥ १ ॥ देई गे विठाबाई प्रेमभातुकें । अवघिया कवतुकें लहानां थोरां सकळां ॥ २ ॥ सांडूनियां भीड धीटपणातें वाणी । घेतलें पाहिजें केलें लेंकुरें तें कानीं (असो नसो भाव आला तुझिया ठाया । पाहें कृपादृष्टीं आतां पंढरीराया) ॥ ३ ॥ तुका म्हणे थोड्यासाठीं काशाची आटी । झाली असे भेटी धुरेसंवसाटी (तुका म्हणे आम्ही तुझीं वेडीं वाकुडीं । नामें भवपाश आतां आपुले (आपुलिया) तोडीं) ॥ ४ ॥ [४०६१]

कळस वाहियेला शिरीं । सहस्रनामें पूजा करीं ॥ १ ॥ पीक पिकलें पिकलें । धन दाटोनियां आलें ॥ २ ॥ शेवटचें दान । भागा आला नारायण ॥ ३ ॥ तुका म्हणे पोट । भरलें वारला बोभाट ॥ ४ ॥ [४०६२]

आड केलें देवद्वार । व्यर्थ काय करकर ॥ १ ॥ आतां चला जाऊं घरा । नका करूं उजगरा ॥ २ ॥ देवा लागलीसे निज । तेथें उभ्या काय काज ॥ ३ ॥ राग येतो देवा । तुका म्हणे नेघे सेवा ॥ ४ ॥ [४०६३]

म्हणजे मी तो तुमच्या भोजनाचा शेष घेऊन जाईन २. हे देवा, आतां शेष मिळाला आहे. मी आतां तुमच्या पुढून एका बाजूला झालों आहें ३. तुकाराम महाराज म्हणतात, मी आपलें चित्त चिंतारहित करून राहिलों आहें ४. [४०५९]

हे देवा, तुमच्यापाशीं न समजून अज्ञानानें कटकट केली. आतां आम्ही तुमचें नाम गाऊं व त्या छंदांत नाचूं. आम्हांला पोटाविषयींची लाज, भय व चिंता नाहीं १. हे दात्या देवा, तुम्ही खालीं बसा. तुम्हांला श्रम झाले आहेत व आम्हांला पाय रगडूं द्या. तुमच्या देहास उकडत आहे म्हणून आम्हांला वारा घालूं द्या २. तुमची सेवा करण्यास आम्हांला उशीर झाला असतां उशीर कां झाला असें कां म्हणावें ? आईनें बालकावर कांहीं राग धरूं नये ३. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं सर्व बाळगोपाळ मिळून तुझ्या संगतींत तुझ्या नामाचा गजर करूं ४. [४०६०]

हे विठाबाई आई, आम्ही वेडेवांकडे शब्द बोलत आहोंत त्याबद्दल आपण कांहीं मनांत आणूं नये, कारण तुझीं आम्ही लाडकीं मुलें असून तूं आमची आई आहेस १. अगे विठाबाई आई, तूं आपल्या प्रेमाचा लहानमोठ्या सर्वांस कौतुकानें खाऊ दे २. तुम्हांला भीड घालून धीटपणानें वर्णन करीत आहें म्हणून आम्हीं बालकांनीं जें भाषण केलें आहे तें तूं कानावर घेतलें पाहिजे (*पाठभेद :* आम्हीं बालकें भीड न धरितां धीटपणानें जें बोललों तें तुम्हीं ऐकून घेतलें पाहिजे) ३. तुकाराम महाराज म्हणतात, माझें भाषण नीटसें जमलें नसेल तरी एवढ्या थोडक्याकरितां मला दूर ठेवण्याचा तुमचा खटाटोप कशाकरितां आहे ? श्रेष्ठ जो देव त्याची आत्मार्पणानें भेट झाली आहे (*पाठभेद :* आम्ही तुझीं बालकें वेडींवांकडीं कशींहि असलों, तरी आमच्या बोबड्या शब्दांनीं तुझें नाम घेतलें तेव्हां आमचा संसारपाश आतां तोड) ४. [४०६१]

कळस मस्तकावर ठेविला आहे. देवाची सहस्रनामांनीं मी पूजा करीत आहें १. पीक घनदाट पिकलें आहे २. अखेरचे दानांत नारायण आमच्या भागास आला आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, पोट भरल्यामुळें सर्व कामांचें निवारण झालें ४. [४०६२]

देवाचें द्वार लावलें आहे. आतां व्यर्थ कटकट कां करावी ? १. आतां आपण सर्व घराकडे जाऊं. येथें कटकट करून देवाला जागें करूं नका २. देवाला झोंप लागली आहे. येथें आतां उभें राहाण्याचें काय काम आहे ? ३. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या वेळीं कटकट करण्याचा देवाला राग येऊन तो आपली सेवा घेणार नाहीं ४. [४०६३]

: नाटाचे अभंग :

[नाट-नष्ट. प्रतिकूलता, अडचण दर्शविणारे अभंग]

विठ्ठल आमचें जीवन। आगमनिगमाचें स्थान। विठ्ठल सिद्धीचें साधन। विठ्ठल ध्यान विसांवा ॥ १ ॥ विठ्ठल कुळींचें दैवत। विठ्ठल वित्त गोत चित्त। विठ्ठल पुण्य पुरुषार्थ। आवडे मात विठ्ठला ॥ २ ॥ विठ्ठल विस्तारला जनीं। सप्तही पाताळें भरूनी। विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं। विठ्ठल मुनिमानसीं ॥ ३ ॥ विठ्ठल जीवाचा जिव्हाळा। विठ्ठल कृपेचा कोंवळा। विठ्ठल प्रेमाचा पुतळा। लावियेलें चाळा विश्व विठ्ठल ॥ ४ ॥ विठ्ठल बाप माय चुलता। विठ्ठल भगिनी भ्राता। विठ्ठलेंविण चाड नाहीं गोता। तुका म्हणे आतां नाहीं दुसरें ॥ ५ ॥ [४०६४]

बरवा झाला वेवसाव। पावलों चिंतिलाचि ठाव। दृढ पायीं राहिला भाव। पावला जीव विश्रांति ॥ १ ॥ बरवा फळला शकुन। अवघा निवारिला सीण। तुमचें झालिया दरुपण। जन्ममरण नाहीं आतां ॥ २ ॥ बरवें झालों या ठाया। होतें संचित ठायींचा (ठायींचें) पाया। देहभाव पालटली काया। पडली छाया ब्रह्मींची ॥ ३ ॥ जोडिलें हें न सरे धन। अविनाश आनंदघन। अमूर्तमूर्ति मधुसूदन। समचरण देखियेले (देखयिला) ॥ ४ ॥ जुनाट जुगादिचें नाणें। बहुता काळाचें ठेवणें। लोपलें होतें पारिखेपणें। ठावचळण चुकविला ॥ ५ ॥ आतां या जीवाचियासाठीं। न सोडीं (न सुटे) पडलिया मिठी। तुका म्हणे सीणलों जगजेठी। न लवीं दिठी दुसऱ्याची ॥ ६ ॥ [४०६५]

मी तंव अनाथ अपराधी। कर्महीन मतिमंदबुद्धि। तुज म्यां आठविलें नाहीं कधीं। वाचे कृपानिधि मायबापा ॥ १ ॥ नाहीं ऐकिलें गाईलें गीत। धरिली लाज सांडिलें हित। नावडे पुराणा

जें वेदशास्त्रांचें उत्पन्न होण्याचें ठिकाण तो विठ्ठल आमचें जीवन (जगण्याचा उपाय) आहे व सर्व साधनांची सिद्धि विठ्ठलच आहे आणि तोच आमचा ध्यानानें प्राप्त होणारा विसांवा आहे १. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चारी पुरुषार्थ विठ्ठल असून ते प्राप्त होण्याचें पुण्यहि तोच आहे, म्हणून त्याचीच गोष्ट मला आवडते व तोच विठ्ठल वित्त, गोत व चित्त असून आमचें कुळदैवत आहे. २. जो सप्त पाताळ भरून त्रिभुवनांतील जनांमध्यें व्यापकपणानें विस्तारला आहे तो विठ्ठल मननशील लोकांच्या मनामध्यें वास्तव्य करतो ३. तो विठ्ठल आमच्या जीवाचा जिव्हाळा असून कृपा करण्याविषयीं कोंवळा आहे व ज्यानें सकळ ब्रह्मांडास चलनवलन लावलें आहे तो विठ्ठल प्रत्यक्ष प्रेमाचीच मूर्ति आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, आमची आई, बाप, चुलता, बहीण, बंधु वगैरे सर्व गोत विठ्ठलच आहे. त्यावांचून आतां मला दुसऱ्या कोणाची गरज नाहीं. माझ्या मनांत विठ्ठलावांचून दुसरा विषयच नाहीं ५. [४०६४]

हे देवा, तुमचे पायाचे ठिकाणीं माझा भाव बळकटपणें राहिला व माझा जीव विश्रांति पावला आहे. जें ठिकाण प्राप्त व्हावें असें चिंतन मी करीत होतों, तें मला आज मिळालें, म्हणून मी जो परमार्थाचा व्यापार केला तो फार बरा झाला १. त्या योगानें सर्व शीण निवारण झाला. हा शकुन बराच फलद्रूप झाला. आतां मला तुमचें दर्शन झालें आहे म्हणून जन्ममरणाची काळजी राहिली नाहीं २. ह्या ठिकाणीं आलों हें बरें झालें. हें प्राप्त होण्याविषयीं संचिताचा पाया मूळचाच कांहीं शुद्ध असावा असें वाटतें, कारण माझा देहात्मभाव पालटून शरीरावर परब्रह्माची छाया पडली (शरीर ब्रह्मरूप झालें) ३. हें पारमार्थिक अविनाशक धन आनंदरूप असल्यानें मला प्राप्त झालें तें संपणार नाहीं व जो निराकार मधुसूदन तो सम चरण जोडलेला असा प्रत्यक्ष आकाररूपानें मीं पाहिला ४. हें धन युगपरत्वादि जुनाट असून ह्या ठिकाणीं पुष्कळ दिवस ठेविलें आहे, पण तें परीक्षकावांचून गुप्त होतें. त्याचें ठिकाण चंचल असल्यामुळें कोणास सांपडलें नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, आतां तें मला प्राप्त झालें आहे, म्हणून जी त्यास मीं मिठी घातली ती जीव गेला तरी सोडणार नाहीं. हे जगजेठी. मी फार श्रमी झालों आहें, म्हणून मला दुसऱ्याची दृष्ट लागूं देऊं नको ६. [४०६५]

हे कृपानिधि मायबापा, तुझा कधीं वाचेनें आठव केला नाहीं असा मी मतिमंद, अनाथ, अपराधी, कर्महीन आहें १. तुझें गाणें कधीं गाइलें नाहीं व संतमुखानें ऐकलेंहि नाहीं. त्या ठिकाणीं लाज धरून आपल्या हिताला अंतरलों

बैसले संत। केली बहुत परानिंदा ॥ २ ॥ नाहीं केला करविला परउपकार। नाहीं दया आली पिडितां पर। करूं नये तो केला व्यापार। वाहिला भार कुटुंबाचा ॥ ३ ॥ नाहीं केलें तीर्थांचें भ्रमण। पाळिला पिंड करं चरण। नाहीं संतसेवा घडलें दान। पूजावलोकन मूर्तीचें ॥ ४ ॥ असंगसंग घडले अन्याय। बहुत अधर्म उपाय। न कळे हित करावें तें काय। नये बोलूं आठवूं तें ॥ ५ ॥ आप आपणया घातकर। शत्रू झाला मी दावेदार। तूं तंव कृपेचा सागर। उतरीं पार तुका म्हणे ॥ ६ ॥ [४०६६]

आतां पावेन सकळ सुखें। खादलें कदा तें न देखें। अवघें सरलें पारिखें। सकळ देखें माहियेरें (र) ॥ १ ॥ जवळी विठ्ठलरखुमाई। बहिणी बंधु बाप आई। सकळ गोताचीच साई। पारखें काइ ऐसें नेणिजे ॥ २ ॥ जगदाकारीं झाली सत्ता। वारोनी गेली पराधीनता। अवघें आपुलेंचि आतां। लाज आणि चिंता दुऱ्हावली ॥ ३ ॥ वावरे इच्छा वसे घरीं। आपुले सत्तेचे माहेरीं। करवी तैसें आपण करी। भीड न धरीं चुकल्याची ॥ ४ ॥ सोसिला होता सासुरवास। बहुतांचा बहुत दिवस। बहु कामें पुरविला सोस। आतां उदास आपुल्यातें ॥ ५ ॥ करिती कवतुक लाडें। मज बोलविती कोडें। मायबाप उत्तरें गोडें। बोले बोवडें पुढें तुका ॥ ६ ॥ [४०६७]

सर्व सुखाचिया आशा जन्म गेला। क्षण एक मुक्ती यत्न नाहीं केला। हिंडतां दिशा शीण पावला। माया वेष्टिला जीव माझा ॥ १ ॥ माझें स्वहित नेणती कोणी। कांहींच न करितां (न करिती) मजवांचूनी। सज्जन तंव सुखमांडणी (सुखाची मांडणी)। नेणती कोणी आदि अंत ॥ २ ॥ काय सांगों गर्भींची यातना। मज भोगितां नारायणा। मांस मळमूत्र जाणा। तुज क्षणक्षणा

व कोणी संत पुराण ऐकावयास बसलेले मला आवडले नाहींत आणि मीं लोकांची फार निंदा केली २. परोपकार कोणावर केला नाहीं व करविला नाहीं व परक्यास पीडा करण्याविषयीं दया आली नाहीं आणि जो व्यापार करूं नये तो करून कुटुंबाचें पोषण केलें ३. कधीं तीर्थयात्रेस न जातां हातापायांसुद्धां देहपिंडाचें पाळण केलें व माझ्या हातून कांहीं संतांची सेवा व दान घडलें नाहीं आणि शिवाच्या किंवा विष्णूच्या मूर्तीचें दर्शन घेतलें नाहीं, कधीं त्यांची पूजाहि केली नाहीं ४. दुर्जनांच्या संगतीनें बहुत अधर्मांचे उपाय करून अपराध केले आणि मला आपलें हित करावयाचें समजलें नाहीं. असे माझे अपराध वाचेला सांगतां येत नाहींत व त्यांचा आठवहि करतां येत नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, असा मी आपला घात करणारा दावेदार शत्रु झालों आहें. आतां तूं तर देवा, कृपेचा सागर आहेस, याकरितां मला ह्या भवसमुद्रांतून पार उतरून ने ६. [४०६६]

आतां सर्व सुखाचे ठिकाणीं मी प्राप्त होईन. निजबोधाच्या सुखानें जो सकल दृश्याभास झाला आहे तो कधींहि पाहाणार नाहीं. परकीयत्वानें स्फुरणारा अनात्मभाव सर्व नाहींसा झाला. सर्वत्र श्रीविठ्ठलमायबापांसच पाहात आहें १. विठ्ठल-रखुमाई ही जवळ आहे. बहीण, बंधु, बाप व आई सर्व कांहीं गोताचा संबंध एक श्रीहरीशींच आहे. दुसरें म्हणून कांहीं जाणत नाहीं २. सर्व जगताच्या आकारानें एक आत्मसत्ताच प्रगट झाली आहे. ह्या बोधानें देहादि प्रपंचा-विषयींची परतंत्रता नाहींशी झाली. सर्व कांहीं एक आतां आपलें स्वरूप आहे, असा भाव प्रगट झाल्यामुळें लज्जा आणि चिंताही नाहींशी झाली ३. आतां स्वकीय चित्तसत्तेच्या घरांतच इच्छेचा व्यवहार होत आहे; ती जसें करील तसें आपलें आपणच करीत आहे. चुकल्याबद्दलची भीड कोणाची धरीत नाहीं ४. अनेक विकारांचा फार प्राचीनकालापासून आजपर्यंत सासुरवास सोसला; अनेक कामांची हांवरेपणानें पाठ पुरविली; पण आतां अनेक प्रकारच्या आपल्या म्हणून मानलेल्या विकारवृत्तींच्या ठिकाणीं उदासवृत्ति आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, माझे आईबाप लाडानें माझें कौतुक करतात व मला ते कौतुकानें गोड बोलावयास लावतात, म्हणून मी गोड अशा बोबड्या शब्दानें त्यांच्यापुढें बोलत आहें ६. [४०६७]

सर्व जन्म प्रापंचिक सुखाच्या आशेंतच गेला. क्षणभर देखील मुक्ति प्राप्त होण्याविषयींचा यत्न केला नाहीं. अनेक योनिरूपी दिशा जन्ममृत्यूच्या मार्गानें हिंडण्यांत माझा जीव दुःखी झाला. त्याचें कारण स्वस्वरूपाविषयींच्या अविवेक-रूपी अभिमानानें माझा जीव ग्रस्त झाला हें होय १. माझें स्वतःचें हित कोणी जाणत नाहींत व त्या हिताचा माझ्याखेरीज कोणीच कर्ता नाहीं. इष्टमित्रादि सज्जन वगैरे हे तर सर्व सुखाचेच सोबती आहेत. जन्ममरणादि दूर करण्याचें कोणी जाणत नाहीं २. हे नारायणा, मातेच्या गर्भामध्यें जी कांहीं मला यातना भोगावयास लागते ती तुम्हांला काय सांगूं ?

ध्यात असें ॥ ३ ॥ मज चालतां प्रयाण काळीं । असतां न दिसती जवळी । मृत्तिके मृत्तिका कवळी । एकले मेळीं संचिताचे ॥ ४ ॥ आतां मज ऐसें करीं गा देवा । कांहीं घडे तुझी चरणसेवा । तुका विनवितसे केशवा । चालवीं दावा संसारें ॥ ५ ॥ [४०६८]

अगा ए सांवळ्या सगुणा । गुणनिधि नाम नारायणा । आमची परिसा विज्ञापना । सांभाळीं दीना आपुलिया ॥ १ ॥ बहु या उदराचे कष्ट । आम्हांसी केलें कर्मभ्रष्ट । तुमची चुकविली वाट । करीं वटवट या निमित्तें ॥ २ ॥ झालों पांगिला जनासी । संसाराची आंदणी दासी । न कळे कधीं सोडविशी । दृढपाशीं बहु बांधलों ॥ ३ ॥ येथें तों न ये आठव कांहीं । विसांवा तो क्षण एक नाहीं । पडिलों आणिके प्रवाहीं । हित तों कांहीं दिसेचिना ॥ ४ ॥ जीवित्व वेंचिलें वियोगें । हिंडतां प्रवास वाउगें । कांहीं व्याधि पीडा रोगें । केलिया भोगें तडातोडी ॥ ५ ॥ माझा मीच झालों शत्रू । कैंचा पुत्र दारा कैंचा मित्र । कासया घातला पसरु । अहो जगद्गुरु तुका म्हणे ॥ ६ ॥ [४०६९]

आतां मज धरवावी शुद्धि । येथूनी परतवावी बुद्धि । ध्यावें सोडवूनी कृपानिधि । पडलों संधी काळचक्रीं ॥ १ ॥ करिसील तरी नव्हे काई । राईचा डोंगर पर्वत राई । आपुले करुणेची साई । करीं वो आई मजवरी ॥ २ ॥ मागील काळ अज्ञानपणें । सरला स्वभावें त्या गुणें । नेणें अयुष्य होतें उणें । पुढील पेणें अंतरलें ॥ ३ ॥ आतां मज वाटतसे भय । दिवसेंदिवस चालत जाय । येथें म्यां येउनी केलें काय । नाहीं तुझे पाय आठविले ॥ ४ ॥ करूनी अपराध क्षमा । होतील केले पुरुषोत्तमा ।

मांसानें व मळमूत्रानें सर्व देह वेष्टित झालेला असतो हें तूं समज. त्या वेळीं तुझा क्षणोक्षणीं ध्यास करीत होतों ३. माझा प्राणान्त होण्याचे समयीं जवळ असलेलीं देहसंबंधीं कोणीहि दिसत नाहींत. देहमृत्तिका ही पृथ्वीच्या मृत्तिकेनें आच्छादिली जाऊन माझा संबंध एकट्या संचित कर्माशींच येतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, अगा देवा, आतां माझ्याकडून तुमच्या चरणांची कांहीं सेवा होईल असें करा आणि हे केशवा, संसाराशीं माझा कायमचा वैरभाव चालेल असें तुम्ही करा ५. [४०६८]

ए श्यामसुन्दरा सगुण नारायणा, तूं गुणांचा केवळ ठेवाच आहेस. तूं आपल्या दीन दासांचा सांभाळ कर एवढी आमची विनंति ऐक १. ह्या उदरपोषणाविषयीं फार कष्ट झाले. त्यानें आम्हांला स्वकर्मापासून भ्रष्ट केलें व तुमच्या भजनमार्गांतहि अंतराय (अडथळा) केला. ह्याच कारणाकरितां मी तुमच्या दाराशीं कटकट करीत आहें २. ह्या पोटाकरितांच मी लोकांचे स्वाधीन झालों आहें व संसाराकडे तर आंदण दिलेल्या दासीप्रमाणें अर्पण झालों आहें. ह्यांतून तूं कधीं माझी सुटका करशील हें कळत नाहीं. संसाराच्या पाशानें मी बळकट बांधलों गेलों आहें ३. ह्या प्रपंचामध्यें तुझी आठवण कांहीं होत नाहीं व ह्या संसारामध्यें क्षणभर देखील विश्रांति नाहीं. अशा प्रकारें ह्या देहादि प्रपंचाच्या प्रवाहांत (एका मागून एक कामाच्या रगाड्यांत) वाहात चाललों आहें. त्या ठिकाणीं माझें हित असें कांहीं दिसत नाहीं ४. माझें आयुष्य तुझ्या वियोगामध्यें अनेक योनींतून जन्ममृत्युद्वारें प्रवास करण्यांतच नाहींसें झालें; व कांहीं व्याधिरोगपीडेच्या भोगानें जीवित्वाची ताडातोडी केली ५. तुकाराम महाराज म्हणतात, अहो जगद्गुरु देवा, माझा शत्रु मीच झालों. पुत्र, बायको व मित्र हे कसले आहेत? कशाकरितां हा तुम्हीं पसारा केलात? मला ह्यांतून एकदाचा सोडवा अशी मी विनंति करतों ६. [४०६९]

हे कृपानिधि देवा, माझ्या बुद्धीनें कांहीं शुद्ध विचार करावा व तिनें प्रपंचाचा मोह टाकून स्वस्वरूपाकडे वळावें असें कांहीं कर व मी ह्या कालचक्रांतून जन्ममृत्यूच्या मार्गानें फिरत आहें त्यांतून माझी सुटका कर १. हे आई, तूं करावयास लागलीस तर काय होणार नाहीं? मोहरीचा डोंगर करावासा वाटला किंवा पर्वताची मोहरी करावीशी वाटली तर तूं तें सहज करूं शकशील, म्हणून आपल्या कृपेची छाया तूं माझेवर कर २. ह्या पूर्वीचा बाल्याचा व तरुणपणाचा काल मूर्खपणाच्या स्वभावामुळें व्यर्थ गेला. परंतु ह्यांत माझें आयुष्य उणें होत आहे हें कांहीं मला समजलें नाहीं. त्यायोगानें पुढील मिळणाऱ्या मनुष्यजन्माच्या मुक्कामास (मोक्षास) मी आंचवलों ३. आतां मला भय वाटत आहे व आयुष्यांतील दिवस कमी होत आहेत. ह्या मनुष्यदेहांत येऊन मीं काय केलें? तुझ्या पायांचा आठव मीं केला नाहीं ४. हे देवा पुरुषोत्तमा, मीं पूर्वीं केलेले जे अपराध आहेत त्यांबद्दल क्षमा करा व

आपुले नामीं द्यावा प्रेमा । सोडवीं या भ्रमापासूनियां ॥ ५ ॥ हृदय बसो तुमच्या गुणीं । ठाव हा पायांपें चरणीं । करूं हा रस सेवन वाणी । फिटे तों धणी तुका म्हणे ॥ ६ ॥ [४०७०]

जेणें हा जीव दिला दान । तयाचें करीन चिंतन । जगज्जीवन नारायण । गाईन गुण तयाचे ॥ १ ॥ जो या भीवरेच्या तिरीं । कट धरूनियां करीं । पाउलें समचि साजिरीं । अंतरीं धरोनी राहेन ॥ २ ॥ जो या असुरांचा काळ । भक्तजनप्रतिपाळ । खेळे हा लाघवें सकळ । तयाच्या भाळ पायांवरी ॥ ३ ॥ जो या गोपाळांच्या मेळीं। खेळु खेळे वनमाळी । रसातळा नेला बळी । राहे पाताळीं स्वामी माझा ॥ ४ ॥ जो हा लावण्यपुतळा । जयाचे अंगीं सकळ कळा । जयाचे गळां वैजयंती माळा । तया वेळोवेळां दंडवत ॥ ५ ॥ जयाचें नाम पाप नासी । लक्ष्मी ऐसी जयाची दासी । तो हा तेजःपुंज रासी । सर्वभावें त्यासी तुका शरण ॥ ६ ॥ [४०७१]

काय मी उद्धार पावेन । काय कृपा करील नारायण । ऐसें सांगा तुम्ही संतजन । करा समाधान चित्त माझें ॥ १ ॥ काय हें खंडईल कर्म । पारुषतील धर्माधर्म । कासयानें तें कळेल वर्म । म्हणऊनी श्रम वाटतसे ॥ २ ॥ काय हे स्थिर राहेल बुद्धी । कांहीं अरिष्ट न येल मधीं । धरील (धरिलें) जाईल तें सिद्धि । शेवट कधीं तो मज न कळे ॥ ३ ॥ काय ऐसें पुण्य होईल गांठीं । घालीन पायीं देवाचे मिठी । मज तो कुरवाळील जगजेठी। दाटईन कंठीं सद्गदित ॥ ४ ॥ काय हे निवतील डोळे । सुख तें देखोनी सोहळे । संचित कैसें तें न कळे । होतील डोहळे वासनेसी ॥ ५ ॥ ऐसी चिंता करी सदा सर्वकाळ। रात्रीदिवस हेचि तळमळ। तुका म्हणे नाहीं आपुलें बळ। जेणें फळ पावे निश्चयेंसी ॥ ६ ॥ [४०७२]

तुमच्या नामचिंतनाविषयीं प्रेम द्या व ह्या संसारभ्रमापासून सोडवा ५. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, तुमच्या गुणांच्या ठिकाणीं माझें मन रत असावें व तुमच्या ठिकाणीं आश्रय मिळावा, म्हणजे आम्ही आपल्या वाणीनें तुमच्या नामचिंतनरूपी रसाचें पोट भरेतोंपर्यंत सेवन करूं ६. [४०७०]

ज्यानें हा शुद्ध पारमार्थिक जीव दान दिला आहे त्याचें मी चिंतन करीन. तो नारायण जगाचें जीवन आहे त्याचे मी गुण गाईन १. तो परमात्मा ह्या भीमेच्या तटाकावर कमरेवर हात ठेवून उभा आहे व ज्याचीं पावलें सम असून सुशोभित आहेत त्या विठ्ठलाला मी अंतःकरणांत धरून राहीन २. जो ह्या असुरजनांचा काळ आहे व भक्तजनांचा प्रतिपाळ करणारा आहे, तो हा मोठ्या कौशल्यानें सर्व खेळ खेळत आहे त्याच्या पायावर मीं मस्तक ठेविलें आहे ३. जो वनमाळी हरि या गोपाळांचे समुदायांत अनेक प्रकारचे खेळ खेळत आहे व ज्यानें बळीचे मस्तकावर पाय देऊन त्यास पाताळांत घातलें व तेथें माझा वामनावतारी स्वामी त्याचें दार रक्षण करीत राहिला ४. जो श्रीहरि लावण्याचा पुतळाच आहे, ज्याचे अंगीं सर्व कला (ज्ञान) आहे, ज्याचे गळ्यांत वैजयंती माळ आहे त्या भगवान् विष्णूला माझे वेळोवेळ दंडवत आहेत ५. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचें नामचिंतन पापाचा नाश करणारें आहे व सर्व ऐश्वर्याची स्वामिनी लक्ष्मी ही ज्याची दासी आहे तो हा सकळ तेजाची राशि असा तेजःपुंज आहे. त्या हरीला मी सर्वभावानें शरण आलों आहें ६. [४०७१]

अहो संतजन हो, माझा उद्धार होईल काय ? मजवर नारायण कृपा करील काय ? हें तुम्हीं मला सांगा व माझ्या चित्ताचें समाधान करा १. हें संचित प्रारब्धकर्म नाहींसें होईल काय व धर्माधर्म नष्ट होतील काय ? ज्यायोगानें हे नष्ट होतील तें वर्म कशानें कळेल म्हणून मला दुःख वाटत आहे २. माझी बुद्धि स्थिर होईल काय? ज्यायोगेंकरून तिची स्थिरता बिघडली आहे असें विघ्न मध्यंतरीं न येतां जें मीं मनांत धरलें आहे तें सिद्धीस जाईल काय? त्याचा परिणाम केव्हां होईल हें मला कळत नाहीं ३. ज्या योगानें मी देवाच्या पायांस मिठी देईन असें पुण्य माझ्या पदरीं आहे काय? तो जगजेठी देव मला कुरवाळील व त्यायोगेंकरून माझा कंठ सद्गदित होईल ४. ते श्रीहरीचे सुखसोहळे पाहून माझे डोळे शांत होतील काय? माझें प्रारब्ध कसें आहे हें मला कळत नाहीं, पण अशा प्रकारचे डोहाळे वासनेच्या ठिकाणीं होत आहेत ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशी मी सदासर्वकाळ चिंता करीत आहें, व रात्रंदिवस माझें हृदय तळमळ करीत आहे, पण खात्रीनें अशा प्रकारें तें फळ मी प्राप्त करून घेईन असें बळ माझे अंगीं नाहीं ६. [४०७२]

तूंचि अनाथांचा दाता । दुःख मोह नासावया चिंता । शरण आलों तुज आतां । तारीं कृपावंता मायबापा ॥ १ ॥ संतसंगति देईं चरणसेवा । जेणें हा तुझा विसर न पडावा । हाच भाव माझिया जीवा । पुरवीं देवा मनोरथ ॥ २ ॥ मज भाव प्रेम देईं कीर्ति (प्रीति) । गुण नाम वर्णावया स्तुति । विघ्ना सोडवूनी हातीं । विनंति माझी परिसावी हे ॥ ३ ॥ आणीक कांहीं नाहीं मागणें । सुखसंपत्तिराज्यचाड धनें । सांकडें न पडे तुज जेणें । दुजें भक्तीविणें मायबापा ॥ ४ ॥ जोडोनि कर पायीं ठेवितों (ठेवीं) माथा । तुका विनवी पंढरीनाथा । रंगीं वोढवावी रंगकथा । पुरवीं देवा मनोरथा (पुरवीं मनोरथा मायबापा) ॥ ५ ॥ [४०७३]

सेंदरीं हेंदरीं देवी दैवतें । कोण तीं पूजी भूतेंकेतें । आपुल्या पोटा जीं रडतें । मागती शितें अवदान ॥ १ ॥ आपुले इच्छे आणिकां पीडी । काय तें देईल बराडी । कळों ही आली तयाची जोडी । अल्प रोकडी बुद्धि अधिरा ॥ २ ॥ दासीचा पाहुणेर उखीतें । धणी देईल आपुल्या हातें । करुणाभाषण उचितें । हें तों रितें सतत शक्तिहीन ॥ ३ ॥ काय तें थिल्लरीचें पाणी । ओठ न भिजे फिटे धणी । सीण तरी आर्दीं अवसानीं । क्षोभे पुरश्चरणीं दिलें फळ ॥ ४ ॥ विलेपनें बुजविती तोंड । भार खोळ वाहाती उदंड । करविती आपणया दंड । ऐसियास भांड म्हणे देव तो ॥ ५ ॥ तैसा नव्हे नारायण । जगव्यापक जनार्दन । तुका म्हणे त्याचें करा चिंतन । वंदूं चरण येती सकळे ॥ ६ ॥ [४०७४]

विषयओढीं भुलले जीव । आतां यांची कोण करील कींव । नुपजे नारायणीं भाव । पावोनी

हे कृपावंता मायबापा, तूं ह्या अनाथ जीवांचा दाता आहेस, म्हणून आतां दुःख, मोह व चिंता ह्या सर्वांचा नाश होण्याकरितां मी तुला शरण आलों आहें. ह्याकरितां माझा उद्धार कर १. हे देवा, ज्या योगानें तुझा विसर न पडेल, अशा संतांची संगति व तुझी चरणसेवा मज द्यावी हाच भाव माझ्या जीवाचे ठिकाणीं आहे, ते मनोरथ तुम्ही पूर्ण करा २. तुझे गुण व नाम वर्णन करण्याकरितां मला प्रेमभाव व आवड द्यावी व त्याला आड येणाऱ्या विघ्नांपासून मला सोडवा ही विनंति तुम्ही ऐका ३. ह्यावांचून माझें दुसरें कांहीं मागणें नाहीं व धन, संपत्ति आदिकरून राज्याचे सुखाची मला गरज नाहीं. हे मायबापा, तुझ्या भक्तीवांचून दुसरें, ज्या योगानें तुला संकट पडेल असें, मी मागत नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा मायबापा, मी दोन्ही हात जोडून तुमच्या पायांवर मस्तक ठेवीत आहें, कारण माझ्या अंतरंगाचे ठिकाणीं तुमच्या कथेचा रंग स्थिर घ्हावा, असे माझे मनोरथ तुम्ही पूर्ण करा ही माझी विनंति आहे ५. [४०७३]

शेंदूर लावून हेंदरीं असणारीं दैवतें जीं आपल्या पोटाकरितां घांस व एखादे शीत मागणारीं भुतें त्यांची पूजा कोण करितो? १. जीं आपल्या प्राप्तीकरितां दुसऱ्यास त्रास देणारीं तीं भिकारी आम्हांस काय देणार आहेत? ज्याची बुद्धि थोडी असून ज्याला धैर्य नाहीं त्याची प्राप्ति कसली आहे ती आम्हांस समजून आली २. दासीपासून जर पाहुणचार मिळण्याची इच्छा केली तर त्या दासीनें आपल्या मालकाकडे जाऊन करुणा भाकली पाहिजे तेव्हां तो आपल्या हातानें तिच्या योग्यतेप्रमाणें देतो, मग ती आपल्या पाहुण्याची इच्छा पुरविते, अशीं हीं दैवतें रिकामीं असून सर्व काळ शक्तिहीन आहेत ३. जसें एखाद्या लेंडोऱ्यामध्यें (डबक्यांत) पाणी असतें त्या योगानें तहान जात नाहीं व ओंठदेखील भिजत नाहीं अथवा गायत्री मंत्राचें पुरश्चरण (अनुष्ठान) करीत असतां व्यंग पडल्यास क्षोभ उत्पन्न होऊन फळ प्राप्त होत नाहीं. मग त्या कर्माचा अखेर श्रम मात्र उरतो तसें त्या दैवतांच्या भजनानें होतें ४. तीं दैवतें शेंदराचें लेपण करून आपलें तोंड झांकून घेतात व त्या शेंदराच्या खोळेचें ओझें आंगावर वागवितात आणि तें एखादे वेळेस काढतेवेळीं आपल्या आंगावर आपणच शस्त्रानें घाव मारून घेतात, अशा दैवतांस देव म्हणेल तो मनुष्य भांडखोर आहे असें म्हणावें ५. तुकाराम महाराज म्हणतात, तशा प्रकारचा नारायण नाहीं. तो जगतामध्यें व्यापक आहे, म्हणून त्यास जनार्दन म्हणतात. त्याचें स्मरण तुम्ही करा म्हणजे तीं सर्व दैवतें तुमच्या पायां पडावयास येतील ६. [४०७४]

जीवनाविषयींची ओढ (प्रीति) असल्यामुळें हे सर्व जीव भुलून गेले आहेत (आपले आपल्याला जाणत नाहींत). आतां त्या जीवांची दया कोण करील? ह्यांना नरदेहासारखें ठिकाण प्राप्त होऊनहि त्यांच्यामध्यें नारायणाविषयींची

ठाव नरदेह ॥ १ ॥ कोण सुख धरलें संसारीं । पडोनी काळाच आहारीं । माप या लागलें शरीरीं । झालियावरी सळे वोढिती ॥ २ ॥ बापुडीं होतील शेवटीं । आयुष्यासवें झालिया तुटी । भोगिले मागें पुढें ही कोटी । होईल भेटी जन्माशीं ॥ ३ ॥ जुंतिलें घाणां बांधोनि डोळे । मागें जोडी आर तेणेंही पोळे । चालिलों किती तें न कळे । दुःखें आरंबळे भूक तान ॥ ४ ॥ एवढें जयाचें निमित्त । प्रारब्ध क्रियमाण संचित । तें हें देव मानूनी अनित्य । न करिती कां नित्य नामस्मरण ॥ ५ ॥ तुका म्हणे न वेंचतां मोल । तो हा यासी महाग विठ्ठल । वेंचितां फुकाचेचि बोल । केवढें खोल अभागिया ॥ ६ ॥ [४०७५]

आले हो संसारा तुम्ही एक करा । मुक्तिमार्ग (मारग) हळूचि धरा । काळदंड कुंभयातना थोरा । कां रे अघोरा दचकसी ना ॥ १ ॥ नाहीं त्या यमासी करुणा । बाहेर काढितां कुडी प्राणा । ओढाळ सांपडे जैं ते (जैसें) धान्या । चोर यातना धरिजे तो ॥ २ ॥ नाहीं दिलें पावैल कैसा । चालतां पंथ तेणें वळसा । नसेल ठाउकें ऐकतो कैसा । नेती बंद जैसा धरोनियां ॥ ३ ॥ क्षण एक नागीवा पायीं । न चलवे तया करितां कांहीं । ओढिती कांटवणा सोई । अग्निस्तंभ बाहीं कवटाळविता ॥ ४ ॥ देखोनि अंगें कांपती । तये नदीमाजी चालविती । लागे ठाव ना न चलवे बुडविती । वरी मारिती यमदंड ॥ ५ ॥ तानभूक न साहावे वेळ । तो राखिती कितीएक काळ । पिंड पाळूनी कैसा सीतळ । तो तप्तभूमीं ज्वाळ लोळविती ॥ ६ ॥ म्हणउनी करा कांहीं सायास । व्हावेल तर व्हा रे उदास । करवेल तर करा नामघोष । सेवा भक्तिरस तुका म्हणे ॥ ७ ॥ [४०७६]

श्रद्धा उत्पन्न होत नाहीं १. काळाच्या मुखीं पडले असतांना ह्या संसारांत कोणतें सुख मानून राहिले आहेत? ह्या शरीराच्या ठिकाणीं आयुष्याच्या मोजदादीचें माप पूर्ण झालें (आयुष्य संपलें) म्हणजे रागानें यमदूत ओढून नेतील २. सर्व आयुष्य संपल्यावर अखेरीस मरणाच्या वेळीं दीनवाणे होतील. पूर्वी अनेक खाणी भोगल्या. पुढेंहि जन्म घेऊन भोगाव्या लागतील ३. बैलाच्या डोळ्यांना ढापणें घालून तेली घाण्याला जुंपतात व तो फिरण्यास कसर करूं लागला म्हणजे आरी टोंचतात, त्यायोगानें त्याला फार त्रास होतो व आपण घाण्याच्या भोंवतीं किती फिरलों हेंहि त्याला कळत नाहीं व तहानभुकेच्या पीडेनें तो पीडित होतो ४. तसें प्रारब्ध, क्रियमाण, संचित हेंच त्रिविध कर्म एवढें अनेक योनींतून जीवात्म्याला फिरविण्यास निमित्त आहे. त्या देहास हे अनित्य जाणून नित्य श्रीहरीचें नामस्मरण कां करीत नाहींत? ५. तुकाराम महाराज म्हणतात, कांहीं द्रव्य न देतां ज्या विठ्ठलाचें चिंतन होतें त्या विठ्ठलाचें चिंतन ह्याला किती दुर्लभ झालें आहे! फुकटचें विठ्ठल विठ्ठल हें नाम घेण्याला ह्या अभाग्याला किती कठिण आहे! ६. [४०७५]

अहो, तुम्ही संसारामध्यें (मनुष्यदेहांत) आलेले आहांत तरी एक करा. तें हें, कीं ज्या मार्गापासून मुक्ति मिळत आहे त्या मार्गाचा आश्रय करा, नाहींतर अखेरीस काळ कुंभीपाक नरकयातनेची मोठी शिक्षा करील. म्हणून अरे दुराचाऱ्या, हें ऐकून तूं दचकत कसा नाहींस? १. देहापासून प्राण निराळा करतांना त्या यमाला कांहीं दया येत नाहीं. ओढाळ जनावर धान्य खातांना सांपडलें, कीं जशी त्याला मोठी यातना भोगावी लागते व चोरी करतांना चोर सांपडला म्हणजे त्यालाहि मोठें दुःख भोगावें लागतें. २. त्याप्रमाणें जर पूर्वजन्मांत तुम्हीं कांहीं दान दिलें नाहीं तर तें ह्या जन्मांत कसें प्राप्त होईल? तो पापाचा मार्ग चालतांना जें दुःख होतें तें तुला माहीत नसेल तर तें मीं सांगतों ऐक. जसे कैदी धरून नेतात तसे तुला यमदूत धरून नेतील ३. पायांतला जोडा काढून घटकाभरदेखील ज्यास कांहीं चालवत नव्हतें त्याला ते यमदूत कांट्यांवरून ओढीत नेतात व लोखंडाच्या अग्नीनें तापवून लाल केलेल्या खांबाला त्यास भेटवितात ४. जी नदी पाहिल्याबरोबर थरथरां अंग कांपतें त्या भयंकर मळमूत्राच्या नदींत चालवितात व तेथें जर न चालवेल आणि तिच्या खोलीचा पत्ता न लागेल तर त्यास आंत बुडवून वर यमदंडानें मार देतात ५. तहान व भूक लागली असतां घटकाभरदेखील इहलोकीं सहन होत नव्हतें, त्यास ते यमदूत कित्येक दिवस उपाशी मारतात व जो देहपिंड पाळून कसा खुशालींत राखला होता तो तापलेल्या भूमीवर अग्नीच्या ज्वाळा निघणाऱ्या ठिकाणीं लोळवितात ६. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितां तुम्हीं कांहींतरी सायास करून होणें असेल तर उदास व्हावें व कांहीं करणें असेल तर अन्य कांहीं न करितां श्रीहरीच्या नांवाचा घोष करा. त्याच भक्तिरसाचें सेवन करा म्हणजे यमयातना चुकतील ७. [४०७६]

न बोलसी तेंही कळलें देवा। लाजसी आपुलिया नांवा। तुज मी नाहीं घालीत गोवा। भीड केशवा कासयाची ॥ १ ॥ उतरीं आपुला हा भार। मजशीं बोलोनी उत्तर। माझा तुज नव्हे अंगीकार। मग विचार करीन मी ॥ २ ॥ दात्या आणि मागत्यासी। धर्मनीति तरी बोलिली ऐसी। यथानशक्ति टाकेल तैसी। बाधी दोघांसी विन्मुखता ॥ ३ ॥ म्हणोनी करितों मी आस। तुझिया वचनाची वास। धीर हा करूनी सायास। न टळें नेमास आपुलिया ॥ ४ ॥ तुझें म्यां घेतल्यावांचून। न वजें येथूनी वचन (येथूनी न वजें वचन)। हाचि माझा नेम सत्य जाण। आहे नाहीं म्हण तुका म्हणे ॥ ५ ॥ [४०७७]

आतां मी न पडें सायासीं। संसारदुःखाचिये पाशीं। शरण रिघेन संतांसीं। ठाव पायापाशीं मागेन त्यां ॥ १ ॥ न कळे संचित होतें काय। कोण्या पुण्यें तुझे लाधती पाय। आतां मज न विसंबें (वो) माय। मोकलूनी धाय विनवीतसें ॥ २ ॥ बहुत जाचलों संसारें। मोहमायाजाळाच्या विखरें। त्रिगुण येताती लहरें। तेणें दुःखें थोरें आक्रंदलों ॥ ३ ॥ आणीक दुःखें सांगों मी किती। सकळ संसाराची स्थिति। न साहे पाषाण फुटती। भय कांप चित्तीं भरलासे ॥ ४ ॥ आतां मज न साहवे सर्वथा। संसारगंधीची हे वार्ता। झालों वेडा असोनी जाणता। पावें अनंता तुका म्हणे ॥ ५ ॥ [४०७८]

आतां तुज कळेल तें करीं। तारिसी तरी तारीं मारीं। जवळी अथवा दुरी धरीं। घालीं संसारीं अथवा नको ॥ १ ॥ शरण आलों नेणतपणें। भाव आणि भक्ति कांहींच नेणें। मतिमंद सर्वज्ञानें। बहु रंक उणें रंकाहुनी ॥ २ ॥ मन स्थिर नाहीं माझिये हातीं। इंद्रियें धांवतां नावरती।

हे देवा, तूं माझ्याबरोबर कशाकरितां बोलत नाहींस तें मला समजलें. तुझें पतितपावन नाम आहे तशी करणी तुझ्या हातून होत नाहीं म्हणून तुला लाज वाटते; पण हे केशवा, मी तुला कोणतेंहि संकट घालीत नाहीं व कशाचीहि भीड घालीत नाहीं १. माझ्याबरोबर चार शब्द बोलून तूं आपल्यावरील भार उतर. जर माझा तुला अंगीकार करणें होत नसेल तर त्याविषयीं मग मी संतांना शरण जाण्याचा विचार करीन २. याचक हा यजमानाकडे दान मागण्यासाठीं गेला असतां शक्तीप्रमाणें त्यास यजमानानें दिलें पाहिजे व त्यानेंहि घेतलें पाहिजे. तसें न होतां दाता अगर याचक विन्मुख होईल तर दोघेहि पातकी होतात, अशी धर्मनीति आहे. ३. ह्याकरितां आशा धरून तुझ्या वचनाची मी वाट पाहात आहें व ह्याविषयींचाच सायासानें धीर धरला आहे त्या आपल्या नेमास मी टळणार नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, आतां तूं माझा अंगीकार करण्याविषयीं मी समर्थ आहें असें म्हण अगर नाहीं असें म्हण. असें तुझें कोणतें तरी एक वचन घेतल्याखेरीज मी येथून जाणार नाहीं हाच माझा खरा नेम आहे असें तूं समज ५. [४०७७]

हे देवा, आतां मी अन्य साधनांचा सायास करणार नाहीं व दुःखरूपी संसाराच्या पाशांत पडणार नाहीं. संतांना शरण जाऊन तुमच्या पायांचें ठिकाण मला प्राप्त व्हावें असें मी त्यांच्याजवळ मागेन १. त्यावांचून कोणत्या पुण्यानें तुझ्या पायांची प्राप्ति होईल व माझ्या हातून संचित काय होईल हें मला समजत नाहीं. हे विठाबाई आई, तूं आतां मला विसरूं नकोस म्हणून मी तुला शोकाकुलित होऊन मोठ्यानें ओरडून विनंति करीत आहें २. ह्या संसारामध्यें मोहमायाजाळरूपी सर्प आहेत त्यांनीं मला फार पीडा केली आहे. तें विष चढून सत्त्व, रज, तम ह्या गुणांच्या लहरी उत्पन्न होत आहेत, त्या योगानें मी फार दुःखी होऊन हंबरडा फोडीत आहें ३. ह्या संसाराच्या स्थितीमध्यें अनेक प्रकारचीं दुःखें आहेत तीं मीं किती तरी म्हणून सांगावीं? त्या योगानें पाषाणदेखील फुटतील म्हणून तीं मला सोसत नाहींत. माझ्या चित्तामध्यें फार भय वाटून माझें अंग थरथरां कांपत आहे ४. तुकाराम महाराज म्हणतात, त्या संसारांतील कश्मलघाणीचें वर्तमानसुद्धां आतां मला निश्चयात्मक सहन होत नाहीं, मूळचा शहाणा असून मी वेडा झालों आहें म्हणून हे अनंता, माझा अंगीकार करण्यास तूं धांवून ये ५. [४०७८]

हे देवा, खालील कडव्यांत दर्शविल्याप्रमाणें अशी माझी स्थिति आहे. इतक्यावर आतां तुला जसें वाटेल तसें कर. माझें रक्षण कर अगर मला मारून टाक. मला तुझ्याजवळ ठेव अगर दूर घालीव. वाटेल तर संसारांत ठेव अथवा ठेवूं नको १. मी तुला अज्ञानपणानें शरण आलों आहें, पण तुझी भक्ति अगर भाव हें मी कांहीं जाणत नाहीं. कोणत्याहि ज्ञानाविषयीं बुद्धिमंद असून सर्व रंकांपेक्षांहि मी फार नीच आहें २. माझें मन माझ्या स्वाधीन नाहीं व

सकळ खुंटलिया युक्ति। शांति निवृत्ति जवळी नाहीं ॥ ३ ॥ सकळ निवेदिला भाव। तुझिये पायीं ठेविला जीव। आतां करीं कळे तो उपाव। तूंचि सर्व ठाव माझा देवा ॥ ४ ॥ राहिलों धरूनि विश्वास। आधार नेटीं तुझी कास। आणिक नेणें मी सायास। तुका म्हणे यास तुझें उचित ॥ ५ ॥ [४०७९]

देवा तूं कृपाकरुणासिंधु। होसी मायबाप आमचा बंधु। जीवनसिद्धि साधनसिंधु। तोडिसी भवबंधु काळपाश ॥ १ ॥ शरणागता वज्रपंजर। अभयदाना तूं उदार। सकळां देवां तूं अगोचर। होसी अविकार अविनाश ॥ २ ॥ भागलीं स्तुति करितां फार। तेथें मी काय तें गव्हार। जाणावया तुझा हा विचार। नको अंतर देऊं आतां ॥ ३ ॥ नेणें भाव परी म्हणवितों तुझा। नेणें भक्ति परि करितों पूजा। आपुल्या नामाचिया काजा। तुज केशीराजा लागे धांवणें ॥ ४ ॥ तुझिया बळें पंढरीनाथा। झालों निर्भर तुटली व्यथा। घातला भार तुझिया माथां। न भीयें (भीं) सर्वथा तुका म्हणे ॥ ५ ॥ [४०८०]

कोण सुख धरोनी संसारीं। राहों सांग मज बा हरी। अवघ्या नाशिवंता परी। थिता दुरी तूंही अंतरसी ॥ १ ॥ प्रथम केला गर्भीं वास। काय ते सांगावे सायास। दुःख भोगिलें नवही मास। आलों जन्मास येथवरी ॥ २ ॥ बाळपण गेलें नेणतां। तारुण्यदशे विषयव्यथा। वृद्धपणीं प्रवर्तली चिंता। मरें मागुता जन्म धरीं ॥ ३ ॥ क्षण एक तोही नाहीं विसावा। लक्ष चौऱ्यांशीं घेतल्या धांवा। भोवंडिती पाठी लागल्या हांवा। लागो आगी नांवा माझ्या मीपणा ॥ ४ ॥ आतां पुरे ऐसी भरोवरी। रंक होउनी राहेन द्वारीं। तुझा दास मी दीन कामारी। तुका म्हणे करीं कृपा आतां ॥ ५ ॥ [४०८१]

इंद्रियें विषयाकडे धांवतात तीं माझ्यानें आवरत नाहींत व माझ्या ठिकाणीं शांति आणि निवृत्ति नाहीं. अशा प्रकारें त्याला आवरण्याच्या माझ्या सर्व युक्ति कुंठित झाल्या आहेत ३. मीं आपला जीव तुझ्या पायीं अर्पण करून अंतःकरणांतील जो भाव आहे तो तुला निवेदन केला. आतां हे देवा, तुझाच मला सर्व आश्रय आहे, मीं तुझ्याच पायांच्या ठिकाणीं जीवभाव ठेवला आहे, म्हणून माझ्या रक्षणाविषयीं तुला जसा वाटेल तसा उपाय कर ४. तुकाराम महाराज म्हणतात, मीं तुझ्या पायांच्या ठिकाणीं विश्वास ठेवून व तुझी कांस दृढ धरून त्या आधारानें राहिलों आहें. ह्यावांचून अन्य साधनांचा सायास मी जाणत नाहीं. ह्या कर्तव्याला तूं योग्य करणें असेल तें कर ५. [४०७९]

हे देवा, तूं कृपेचा व करुणेचा समुद्र आहेस व आमचा आईबाप, भाऊ तूंच आहेस. ज्या योगेंकरून जीवन साध्य होतें अशा साधनांचा तूं सागर आहेस. तूं संसारबंधनें व कालपाश तोडणारा आहेस १. जे तुला शरण आले आहेत त्यांचें रक्षण करण्याविषयीं तूं वज्राचा पिंजरा आहेस व अभयाचें दान देणारा तूं उदार आहेस. सर्व देवांना तूं न दिसणारा आहेस व विकाररहित अविनाशी आहेस २. तुझी स्तुति करतां वेद थकले तर त्या ठिकाणीं माझी मूर्खाची काय योग्यता आहे ? तुझा स्वरूपविचार मला कसा कळेल ? म्हणून हे देवा, आतां तुम्ही मला अंतर देऊं नका ३. खरोखर तुजविषयींचा भाव मी जाणत नाहीं, परंतु मी तुझा दास आहें असें मी आपल्याला म्हणवितों. तुझी भक्ति मला कळत नाहीं पण मी तुझी पूजा करितों. आम्ही तुझें नाम घेणारे असल्यामुळें आपल्या नामाकरितां हे केशवा, तुला आम्हांला सोडविण्याकरितां धांव घ्यावयाला पाहिजे ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा तुझ्या बलानेंच आम्ही निष्काळजी झालों आहोंत. आमची सर्व व्यथा नाहींशी झाली. आम्हीं आपल्या योगक्षेमाचा सर्व भार तुझ्या मस्तकावर टेविला. आतां मी सर्वथैव कोणालाहि भिणार नाहीं ५. [४०८०]

हे हरि, ह्या संसारामध्यें कोणतें सुख मानून राहूं हें तूं मला सांग. येथील प्रकार नाशवंत आहे. ह्याचा मोह धरल्यानें जवळ असलेला तूंहि दूर होतोस १. प्रथम आईच्या गर्भामध्यें वास्तव्य केलें. तेथें होणारे कष्ट काय सांगावेत ! तें दुःख नऊ महिनेपर्यंत सारखें भोगलें. नंतर जन्माला आलों २. बाल्यावस्था ही न समजण्यांतच गेली. तारुण्यावस्थेमध्यें विषयांची आसक्ति वाढल्यामुळें हृदय चिंताग्रस्त झालें. मेलें, कीं पुनः जन्म घ्यावा लागतो ३. अशा प्रकारें क्षणभरहि विसांवा नाहीं. चौऱ्यांशीं लक्ष योनींतून फिरत असतांना विषयांविषयींची जी हांव मागें लागली आहे ती फिरविते. ह्या सर्वाला मूळची देह मी आणि देहसंबंधीं माझें अशी जी माझी भावना तिला आग लागो ! ४. तुकाराम महाराज म्हणतात, आतां ही प्रपंचाची खटाटोप पुरे झाली. हे देवा, तुझ्या द्वारामध्यें दरिद्री होऊन राहीन. मी तुझा सांगितलेलें काम करणारा दीन दास आहें. आतां तूं मजवर कृपा कर ५. [४०८१]

सुख या संतसमागमें । नित्य दुणावे तुझिया नामें । दहन होती सकळ कर्में । सर्वकाळ प्रेमें डुल्लतसों ॥ १ ॥ म्हणोनी नाहीं कांहीं चिंता । तूंचि आमुचा मातापिता । बहिणी बंधु आणि चुलता । आणिकां गोतां सर्वां ठायीं ॥ २ ॥ ऐसा हा कळला निर्धार । माझा तुज न पडे विसर । असत्सी देऊनियां धीर । बाह्य अभ्यंतर मजजवळी ॥ ३ ॥ दुःख तें कैसें नये स्वप्नासी । भुक्तिमुक्ति झाल्या कामारी दासी । त्यांचें वर्म तूं आम्हापाशीं । सुखें राहिलासी प्रेमाचिया ॥ ४ ॥ जेथें तुझ्या कीर्तनाचा घोष । जळती पापें पळती दोष । काय तें उणें आम्हां आनंदास । सेवूं ब्रह्मरस तुका म्हणे ॥ ५ ॥ [४०८२]

देवा तूं आमचा कृपाळ । भक्तप्रतिपाळ दीनवत्सल । माय तूं माउली स्नेहाळ । भार सकळ चालविसी ॥ १ ॥ तुज लागली सकळ चिंता । राखणें लागे वांकडें जातां । पुढती निरविसी संतां । नव्हे विसंबतां धीर तुज ॥ २ ॥ आम्हां भय चिंता नाहीं धाक । जन्म मरण कांहीं एक । जाला इहलोकीं परलोक । आलें सकळैकवैकुंठ (सकळिक वैकुंठ) ॥ ३ ॥ न कळे दिवस कीं राती । अखंड लागलीसे ज्योति । आनंदलहरीची गति । वर्णूं किती तया सुखा ॥ ४ ॥ तुझिया नामाचीं भूषणें । तों यें मज लेवविलीं लेणें । तुका म्हणे तुझिया गुणें । काय तें उणें एक आम्हां ॥ ५ ॥ [४०८३]

न पवें सन्निध वाटते चिंता । वरि या बहुतांची सत्ता । नुगवे पडत जातो गुंता । कर्मा बळिवंता सांपडलों ॥ १ ॥ बहु भार पडियेला शिरीं । मी हें माझें मजवरी । उघड्या नागविलों चोरीं । घरिंच्या घरीं जाणत जाणतां ॥ २ ॥ तुज मागणें इतुलें आतां । मज या निरवावें संतां । झाला कंठस्फोट आळवितां । उदास आतां न करावें ॥ ३ ॥ अंति हा निकट समय । मग म्यां करावें

ह्या संतांच्या संगतींमध्यें राहाण्यांत सुख आहे. तेंच त्या समागमानें तुझें नामचिंतन केल्यानें दुप्पट होतें व त्या योगानें सर्व कर्में जळून जातात आणि आम्ही सर्व काळ प्रेमानें डुलत राहातों १. तूं आमचा आईबाप, बहीणभाऊ आणि चुलता सर्व कांहीं आमचा गोत्रज तूंच आहेस म्हणून आम्हांला कांहीं काळजी नाहीं २. अशा प्रकारचा हा विचार आम्हांला कळला आहे. हे देवा, मला तूं विसरत नाहींस. परमार्थाविषयींचें धैर्य देऊन आंत बाहेर माझ्याजवळच राहिला आहेस ३. दुःख म्हणून काय आहे हें स्वप्नांतदेखील येत नाहीं. भोग व चारी मुक्ति ह्या सांगितल्याप्रमाणें काम करणाऱ्या दासी आहेत. त्याचें कारण तूं सर्वांचा स्वामी मोठ्या प्रेमसुखानें आमच्या जवळ राहिला आहेस हें होय ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या ठिकाणीं तुझ्या कीर्तनाचा जे घोष करतात तेथें त्यांचीं सर्व पातकें जळतात व त्यांच्यामध्यें असणारे कामक्रोधादि दोष नाहींसे होतात. तूं आमचा मायबाप असल्यामुळें आम्हांला आनंदाची काय उणीव आहे? आम्ही निरंतर वाणीनें ब्रह्मरसाचें सेवन करूं ५. [४०८२]

हे देवा, तूं आमच्याविषयीं कृपाळु आहेस. भक्तजनाचें प्रतिपालन करणारा आहेस. दीनाविषयीं सदय आहेस. तूं प्रेम करणारी आई आहेस. आमच्या सर्व योगक्षेमाचें ओझें तूं चालवितोस. १. तुला आमची काळजी करावी लागते. आम्ही वांकडे वागूं लागलों तर तुला तेथें रक्षण करावें लागतें. नंतर आम्हांला संतांच्या स्वाधीन तूं करतोस. आम्हांला दूर करण्याचा तुझ्यामध्यें धीर होत नाहीं २. आम्हांला भय, दरारा किंवा जन्ममरणाविषयींची काळजी कांहीं एक नाहीं. आम्हांला इहलोकींच परलोकींचें सुख झालें आहे. सर्व कांहीं वैकुंठ ह्या ठिकाणीं आलें आहे ३. दिवस आहे किंवा रात्र आहे हें कांहीं समजत नाहीं. निरंतर स्वस्वरूपानुसंधानाची ज्योत लागली आहे. त्या आनंदाच्या लहरीच्या सुखाचें मी कोठपर्यंत वर्णन करूं? ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तूं आपल्या नामाच्याच अलंकाराचीं भूषणें मला घातलीं आहेस. तुझ्या योगानें आम्हांला काय कमी आहे? ५. [४०८३]

हे देवा, तुझें सान्निध्य प्राप्त होत नाहीं ह्याबद्दल मोठी काळजी वाटत आहे. ह्या देहावर पुष्कळांची सत्ता आहे. ह्यांतून सुटका करावयास जावें तों जास्त गुंताड्यांत पडतों. अशा प्रकारें बलाढ्य कर्मांच्या तडाख्यांत मी सांपडलों आहें १. माझ्या मस्तकावर पुष्कळ ओझें आहे. तें हें, कीं देह मी व देहसंबंधी माझें हें उघड उघड माहीत असून मी घरांतल्या चोरांकडून लुटला गेलों २. हे देवा, तुजपाशीं आतां इतकेंच मागणें आहे, कीं मला तूं ह्या संतांचे स्वाधीन कर. ह्याबद्दल तुला कींवकाकुळती करण्यानें माझा घसा फुटला ३. ही वेळ अगदीं शेवटची आहे. अशा वेळीं जर तूं माझी

तें काय। दिवस गेलिया ठाकईल छाय। उरईल हाय रातीकाळीं ॥ ४ ॥ होईल संचिताची सत्ता। अंगा येईल पराधीनता। ठाव तो न दिसे लपतां। बहुत चिंता प्रवर्तली ॥ ५ ॥ ऐसी या संकटांचे संधी। धांव घालावी कृपानिधी। तुका म्हणे माझी बळबुद्धि। सकळ सिद्धि पाय तुझे ॥ ६ ॥ [४०८४]

आतां धर्माधर्मीं कांहीं उचित। माझें विचारावें हित। तुज मी ठाऊका पतित। शरणागत परि झालों ॥ १ ॥ येथें राया रंका एकी सरी। नाहीं भिन्नाभिन्न तुमच्या घरीं। पावलों पाय भलत्या परी। मग बाहेरी न घालावें ॥ २ ॥ ऐसें हें चालत आलें मागें। नाहीं मी बोलत वाउगें। आपुलिया पडिल्या प्रसंगें। कीर्ति हे जगें वाखाणिजेती (ते) ॥ ३ ॥ घालोनियां माथां बैसलों भार। सांडिला लौकिक वेव्हार। आधीं हे विचारिली थार। अविनाशपर पद ऐसें ॥ ४ ॥ येथें एक वर्म पाहिजे धीर। परि म्यां लेखिलें असार। देह हा नाशिवंत जाणार। धरिलें सार नाम तुझें ॥ ५ ॥ केली आराणूक सकळां हातीं। धरावें तें धरिलें चित्तीं। तुका म्हणे सांगितलें संतीं। देईं अंतीं ठाव मज देवा ॥ ६ ॥ [४०८५]

बरवें झालें आलों या जन्मासी। जोड जोडिली मनुष्यदेहाऐसी। महालाभाची उत्तम रासी। जेणें सर्व सुखासी पात्र होईजे ॥ १ ॥ दिलीं इंद्रियें हात पाय कान। डोळे मुख बोलावया वचन। जेणें तूं जोडसी नारायण। नासे जीवपण भवरोग ॥ २ ॥ तिळेंतिळ पुण्य सांच पडे। तरि हें बहुतां जन्मीं जोडे। नाम तुझें वाचेसी आतुडे। समागम घडे संतांचा ॥ ३ ॥ ऐसिये पावविलों वो ठायीं। आतां मी कायी होऊं उतराई। येवढा जीव ठेवीन पायीं। तूं वो माझे आई पांडुरंगे ॥ ४ ॥ फेडियेला (फेडिला) डोळियांचा कवळ। धुतला गुणदोषांचा मळ। लावूनी स्तनीं केलों सितळ।

विनंति मान्य केली नाहींस तर मीं काय करावें? हा आयुष्यभानु अस्तास गेल्यावर रात्रीचे वेळीं अंधार राहील ४. मग संचित कर्मांची सत्ता चालेल. त्या योगानें ही मनुष्यदेहाची स्वतंत्रता जाऊन इतर योनींची परतंत्रता येईल व कोठें लपण्याला जागाहि मिळणार नाहीं. ह्याबद्दल मला फार काळजी लागली आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, मी अशा ह्या संकटाच्या पेचांत सांपडलों आहें. हे कृपानिधि देवा, तूं धांव घे, कारण माझें बळ, बुद्धि इत्यादि सर्व उपाय म्हणजे तुझे पाय आहेत ६. [४०८४]

हे देवा, आतां योग्य धर्माधर्म कांहीं जाणून माझ्या हिताविषयींचा विचार करावा. मी पतित आहें हें तुला ठाऊक आहे म्हणूनच मी तुला शरण आलों आहें १. हे देवा, तुझ्या घरीं राजा व रंक हे लहान मोठे भिन्नभिन्न प्रकार नाहींत. सर्व कांहीं एकाच योग्यतेचे आहेत असे तुझे पाय कोणात्याहि का मार्गानें होईना, पण मला प्राप्त झाले आहेत, आतां तुम्हीं मला बाहेर घालवूं नये २. अशा प्रकारचा हा ओघ पूर्वींपासून चालत आला आहे. मी कांहीं व्यर्थ बोलत नाहीं. तुमचा ज्याच्यापाशीं प्रसंग झाला त्याचा तुम्हीं अंगीकार केला. अशा प्रकारची कीर्ति जग वर्णन करीत आहे ३. म्हणून मी आपलें सर्व ओझें (योगक्षेमाचा भार) तुमच्या मस्तकावर ठेवून राहिलों आहें व सर्व लोकव्यवहाराचा त्याग केला आहे. आपलें स्वरूप हें अविनाश आणि प्रकृतिपर आहे ह्याचाहि आधीं विचार केला आहे ४. ह्या ठिकाणीं एक धैर्य हेंच मुख्यत्वेंकरून पाहिजे, पण माझा देह हा असार व नाशवंत आहे असें मीं जाणून तुझ्या सारभूत नामाचा आश्रय केला ५. तुकाराम महाराज म्हणतात, सर्वांच्या हातून मीं आपली सुटका करून समाधान करून घेतलें आणि जें कांहीं चित्तांत धरावयास पाहिजे तें धरलें. तेंच संतांनीं सांगितलें आहे. ह्याकरितां हे देवा, आतां अखेरीस मला तूं आश्रय दे ६. [४०८५]

मी मनुष्यदेहाला आलों हें फार चांगलें झालें. हा मनुष्यदेह महा लाभाचीच उत्तम रास आहे. त्या योगेंकरून परमात्म्याच्या सर्व सुखाविषयींची पात्रता येते १. हात, पाय, कान, डोळे व शब्द बोलण्याकरितां मुख इत्यादि सर्व इंद्रियें, हे देवा, तूं मला दिलीं आहेस. ज्याचा खरा विनियोग केल्यानें, हे नारायणा, तुझी प्राप्ति होऊन जीवपणा व संसारव्यथा नाहींशी होते २. ह्या परमार्थाच्या योगानें तिळतिळ पुण्याचा संचय होऊन अनेक जन्मानें वाणीला तुझ्या नामचिंतनाचा लाभ होतो व संतांची संगतिहि घडते ३. अशा ह्या ठिकाणीं तुम्हीं मला आणलें आहे. आतां मी ह्याबद्दल तुमचे उपकार कसे फेडूं ? हे माझे आई पांडुरंगे, माझा जीव तुझ्या पायीं अर्पण करीन ४. तूं डोळ्यांचा दोष नाहींसा केलास व अंतःकरणांत गुणदोषांचे मळ होते ते धुवून टाकलेस व तूं आपल्या प्रेमानें स्तनपान देऊन मला शांत केलेंस व मला

निजविलों बाळ निजस्थानीं ॥ ५ ॥ नाहीं या आनंदासी जोडा । सांगतां गोष्टी लागती गोडा । आलासी आकारा आमुच्या चाडा । तुका म्हणे भिडा भक्तीचिया ॥ ६ ॥ [४०८६]

अल्प भाव अल्प मति । अल्प आयुष्य नाहीं हातीं । अपराधाची वोळिलों मूर्ति । अहो वेदमूर्ति परियेसा ॥ १ ॥ किती दोषां देऊं परिहार । गुणदोषें मळिलें अंतर । आदि वर्तमान भविष्याकार । गेला अंतपार ऐसें नाहीं ॥ २ ॥ विविध कर्म चौऱ्यांशीं फेरा । त्रिविध भोग या शरीरा । कर्मकोठार पांजरा । जन्मजरामरण सांठवण ॥ ३ ॥ जीवा नाहीं कुडीचें लहातें । ये भिन्न भिन्न पंचभूतें । रचतें खचतें संचितें । असार रितें फलकट ॥ ४ ॥ पुत्र पत्नी सहोदर । मायबाप गोताचा पसर । मिळतां काष्ठें लोटतां पूर । आदळी दूर होती खल्लाळीं ॥ ५ ॥ म्हणोनी नासावें अज्ञान । इतुकें करीं कृपादान । कृपाळू तूं जनार्दन । धरूनी चरण तुका विनवी ॥ ६ ॥ [४०८७]

ऐसी हे गर्जवूं वैखरी । केशवा मुकुंदा मुरारी । राम कृष्ण नामें बरीं । हरी हरी दोष सकळ ॥ १ ॥ जनार्दना जगजीवना । विराटस्वरूपा वामना । महदादि मधुसूदना । भवबंधना तोडिंतिया ॥ २ ॥ चक्रपाणी गदाधरा । असुरमर्दना वीर्यवीरा । सकळमुगुटमणि शूरा । अहो दातारा जगदानिया ॥ ३ ॥ मदनमूर्ति मनमोहना । गोपाळगोपिकारमणा । नटनाट्यकौशल्य कान्हा । अहो संपन्ना सर्वगुणें ॥ ४ ॥ गुणवंता आणि निर्गुणा । सर्वसाक्षी आणि सर्वजाणा । करोनी अकर्ता आपणा । नेदीं अभिमाना आतळों ॥ ५ ॥ कासयानें घडे याची सेवा । काय एक समर्पावें

बालकाला निजस्वरूपीं निजविलें आहेस ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या आनंदाला दुसरी जोड नाहीं. ह्याची हकीगत सांगतांना गोड लागते. आमच्या लोभानें व भक्तीच्या भिडेनें तुम्ही आकारास आलां आहां ६. [४०८६]

अहो वेदमूर्ति देवा, माझ्या ठिकाणीं भाव थोडा व बुद्धिहि थोडी आहे व माझें आयुष्य थोडें असून स्वाधीन नाहीं आणि मी सकळ अपराधांची मूर्तिच बनलों आहें. हें माझें गाऱ्हाणें तुम्ही ऐका १. माझें अंतःकरण अनेक गुण-दोषांनीं मलिन झालें. त्या दोषांचा परिहार किती म्हणून देऊं? पूर्वींचें, सांप्रत काळचें व पुढील संचितकर्म किती आहे त्याचा अंतपार लागेल असें दिसत नाहीं २. तें कर्म अनेक प्रकारचें असून चौऱ्यांयशीं लक्ष योनींच्या फेऱ्यांत घालतें. त्या योगानें आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक असे त्रिविध भोग या शरीराला भोगावे लागतात. तें शरीर कर्माचें भांडारच असून त्यांत जन्म, जरा व मरण हें सांठविलें आहे ३. येथें जीवात्म्याचा आणि देहाचा कांहीं संबंध नसून पंचभूतें वेगवेगळीं आहेत; तीं कांहीं दिवस एका ठिकाणीं रचून त्यांचा संचय होतो व यथाकालानें तीं बिघडतात; असें हें शरीर फलकटाप्रमाणें व्यर्थ असार आहे ४. जसें पाण्याच्या ओघामध्यें कांहीं लांकडें एका ठिकाणीं मिळून कांहीं वेळ चालतात आणि त्यांना मोठ्या ओघाच्या खळाळाचा धक्का बसला म्हणजे तीं वेगवेगळीं दूर वाहून जातात, तसें आई, बाप, भाऊ, बायको, मुलगा ह्या गोताचा पसारा क्षणभंगुर आहे ५. तुकाराम महाराज म्हणात, हे जनार्दना, तूं कृपाळु आहेस, म्हणून ह्या प्रपंचाचें अज्ञान जें माझ्या ठिकाणीं आहे तें नासेल अशा प्रकारचें तुम्ही कृपादान करा, अशी विनंति मी तुमचे चरण धरून करीत आहें ६. [४०८७]

हे देवा, तुमचीं नामें केशव, मुकुंद, मुरारि, राम, कृष्ण, हरि हीं सर्व दोष हरण करणारीं उत्तम आहेत, म्हणून ह्याच नामांची गर्जना आम्ही आपल्या जिव्हेनें सर्व काळ करूं १. हे जनार्दना, तूं ह्या जगताचें जीवन आहेस (जगविणारा आहेस) व तूं विराटस्वरूप असून लहान वामनमूर्तीचें रूप धारण करतोस. हे मधुसूदना, तूं महदादि तत्त्वांचें बीज आहेस व संसाराचें बंधन छेदन करणारा आहेस २. हे दात्या देवा, तूं जगाला दान देणारा आहेस. चक्र, गदा हीं हत्यारें हातामध्यें घेऊन दैत्यांचा नाश करणारा आहेस आणि सर्व वीरांमध्यें वीरश्रेष्ठ असून सर्व शूरांमध्यें मुगुटमणि आहेस ३. तुमची मूर्ति मदनासारखी आहे. ती पाहाणाराचें मन मोहित करणारा तूं आहेस व तूं इंद्रियांचें रक्षण करणारा असून गोपिकांना रमविणारा आहेस. अहो कान्होबा, तुम्ही कौतुकाचे खेळ करणारे वेषधारी आहांत व सकल गुणांनीं संपन्न आहांत ४. तुम्ही सकल गुण धारण करणारे असून गुणरहित आहांत व सर्व जाणते असून सर्वांमध्यें साक्षीभूत आहांत आणि हा सर्व प्रपंच निर्माण करून त्या कर्तेपणाच्या अभिमानास स्पर्श न होऊं देतां अकर्ते आहांत ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या देवाची सेवा कोणत्या प्रकारानें घडणार आहे? ह्याला समर्पण म्हणून तरी काय करावें?

या देवा। वश्य तो नव्हे वांचूनी भावा। पाय जीवावेगळे न करी तुका (पायावेगळें जीवा न करी तुका) ॥ ६ ॥ [४०८८]

होतों तें चिंतित मानसीं। नवस फळले नवसीं। जोडिते (जोडी ते) नारायणा ऐसी। अविट ज्यासी नाश नाहीं ॥ १ ॥ धरिले जीवें न सोडीं पाय। आलें या जीवित्वाचें काय। कैं हे पाविजेती ठाव। लाविली सोय संचितानें ॥ २ ॥ मज तों पडिली होती भुली। चित्ताची अपसव्य चाली। होती मृगजळें गोवी केली। दृष्टि उघडली बरें झालें ॥ ३ ॥ आतां हा सिद्धि पावो भाव। मध्यें चांचल्यें न व्हावा जीव। ऐसी तुम्हां भाकीतसें कींव। कृपाळुवा जगदानिया ॥ ४ ॥ कळों येतें आपुले बुद्धि। ऐसें तों न घडतें कधीं। केवढे आघात ते मधीं। लज्जा रिद्धी उभी आड ठाके ॥ ५ ॥ कृपा या केली संतजनीं। माझी अळंकारिली वाणी। प्रीति हे लाविली कीर्तनीं। तुका चरणीं लोळतसे ॥ ६ ॥ [४०८९]

तुझिया पार नाहीं गुणां। माझी अल्प मति नारायणा। भवतारका जी सुजाणा। एक विज्ञापना पायापाशीं ॥ १ ॥ काय जाणावें म्यां दीनें। तुझिये भक्तीचीं लक्षणें। धड तें तोंड धुऊं नेणें। परि चिंतनें काळ सारीं ॥ २ ॥ न लवीं आणीक कांहीं पिसें। माझिया मना वायां जाय ऐसें। चालवीं आपुल्या प्रकाशें। हातीं सरिसें धरोनियां ॥ ३ ॥ तुज हे समर्पिली काया। जीवें भावें पंढरीराया। सांभाळीं समविषम डाया। करीं छाया कृपेची ॥ ४ ॥ चतुर तरी चतुरां राव। जाणता तरी जीवांचा जीव। न्यून तो कोण एक ठाव। आरुष भाव परि माझा ॥ ५ ॥ होतें तें माझें भांडवल। पायापें निवेदिले बोल। आदरा ऐसें पाविजे मोल। तुका म्हणे साच फोल तूं जाणसी ॥ ६ ॥ [४०९०]

हा एक भावावांचून वश होणार नाहीं. ज्यांच्या ठिकाणीं एक शुद्ध भाव आहे, त्या जीवांना हा देव आपल्या पायांवेगळें करीत नाहीं ६. [४०८८]

ज्याचें मी मनामध्यें आजपर्यंत चिंतन करीत होतों तें व जो नवस केला होता तो आज फलद्रूप झाला; ज्या लाभाला कधीं नाश नाहीं, व कधींहि तो विटणारा नाहीं त्या नारायणाची प्राप्ति मला झाली १. आतां त्याचे पाय मी जीवानें धरले आहेत ते कधींहि सोडणार नाहीं. त्याच्यापुढें मला जीवाचीसुद्धां पर्वा नाहीं, कारण मला ह्या स्थळाची प्राप्ति कधीं होणार आहे? माझें कांहीं संचित होतें त्यानें ही सोय मला दाखविली आहे २. माझ्या चित्ताची वागणूक उफराटी होती त्या योगानें मी फार भ्रमिष्ट झालों होतों व खोट्या प्रपंचरूपी मृगजळानें मला गुंतवून पाडलें होतें, आज माझी ज्ञानदृष्टि उघडली हें फार चांगलें झालें ३. अहो कृपाळु जगदानिया, जो माझ्या ठिकाणीं भाव उत्पन्न झाला आहे तो आतां तुम्हीं शेवटास न्यावा. मध्यंतरीं माझ्या जीवाच्या ठिकाणीं चंचलपणा उत्पन्न होऊं देऊं नका, अशा प्रकारें मी तुमची करुणा भाकीत आहें ४. पुढें कोणते व केवढे आघात येणार आहेत, हें माझ्या बुद्धीला आतां वर्तमानकाळांत कधींच कळणें शक्य नाहीं, कारण इहलोकींच्या ऐश्वर्याचें व लोकलाजेचें विघ्न परमार्थाच्या मार्गांत मध्यें आडवें उभें ठाकतें ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या संतजनांनीं मजवर कृपा करून माझ्या वाणीला हरिनामाचे अलंकार घातले व हरिकीर्तनाची प्रीति मला लावली म्हणून मी त्यांच्या चरणांवर लोळत आहें ६. [४०८९]

हें नारायणा, तुझे गुण असंख्य आहेत. माझी बुद्धि अल्प आहे. तुम्ही संसारांतून तारणारे आहांत व सर्वज्ञ आहांत. तुमच्या पायांजवळ माझी एक विनंति आहे १. देवा, तुझ्या भक्तीचीं लक्षणें मी दीन जीवानें कशीं जाणावीं? मला धड तोंड धुण्याचें कळत नाहीं; पण तुमचें चिंतन करण्यांत मी काळ घालवीत आहें २. हे देवा, माझ्या मनाला तें व्यर्थ जाईल अशा प्रकारचें कांहीं दुसरें वेड लावूं नका व आपल्या स्वरूपविचाराच्या प्रकाशांत त्याला तुम्ही हातांत धरून चालवा ३. हे पंढरीराया, जीवभावानें मीं आपला देह तुम्हांला अर्पण केला आहे. आतां आपल्या कृपेची छाया करून ह्याचे सम (चांगली कल्पना), विषम (वाईट कल्पना) कल्पनेच्या धक्क्यापासून रक्षण करा. ४. तूं इतका चतुर आहेस, कीं जे चतुर म्हणून आहेत त्यांचा राजा आहेस. ज्ञानी इतका आहेस, कीं सर्व जीवांचा तूं जीव आहेस. तुझ्या ठिकाणीं कोणतेंहि न्यूनत्व नाहीं; पण माझाच भाव वेडावांकडा आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, माझी जी कांहीं खरी स्थिति होती ती आपल्या पायांपाशीं निवेदन केली. जसा लोकांचा आदर असेल तशी त्या वस्तूला किंमत मिळेल. माझें बोलणें खरें आहे किंवा खोटें फोलकट आहे हें तूंच जाणतोस ६. [४०९०]

कां हो माझा मानियेला भार। ऐसा (तंव) दिसतसे फार। अनंत पावविलीं उद्धार। नव्हेचि थार मज शेवटीं ॥ १ ॥ पाप बळिवंत गाढें। तुज ही राहों सकतें पुढें। मागील कांहीं राहिलें ओढें। नवल केवढें (कोडें) देखियेलें ॥ २ ॥ काय मानिती संतजन। तुमचें हीनत्ववचन। कीं वृद्ध झाला नारायण। न चले पण आधील तो ॥ ३ ॥ आतां न करावी चोरी। बहुत न धरावें दुरी। पडदा काय घरच्या घरीं। धरिलें दुरी तेव्हां धरिलें ॥ ४ ॥ नको चाळवूं अनंता। कासया होतोसी नेणता। काय तूं धरीत नाहीं सत्ता। तुका म्हणे आतां होईं प्रगट ॥ ५ ॥ [४०९१]

मज ते हांसतील संत। जिहीं देखिलेती मूर्तिमंत। म्हणोनी उद्वेगलें चित्त। आहाच भक्त ऐसा दिसे ॥ १ ॥ ध्यानीं म्यां वर्णावेती कैसें। पुढें एकीं स्तुति केली असे। येथूनी जीव निघत असे। ऐसिये आसे लागलोंसे ॥ २ ॥ कासया पाडिला जी धडा। उगाचि वेडा आणि वांकडा। आम्हां लेंकरांसी पीडा। एका मागें जोडा दुसऱ्याचा ॥ ३ ॥ सांगा कोणाचा अन्याय। ऐसें मी धरितों पाय। तूं तंव समचि सकळां माय। काय अन्याय एक माझा ॥ ४ ॥ नये हा जरी कारणा। तरी कां व्यालेती नारायणा। वचन द्यावें जी वचना। मज अज्ञाना समजावीं ॥ ५ ॥ बहुत दिवस केला बोभाट। पाहातां श्रमलों या वाट। तुका म्हणे विस्तारलें ताट। काय वीट आला नेणों स्वामीया ॥ ६ ॥ [४०९२]

बरें झालें आजीवरी। नाहीं पडिलों मृत्यूचे आहारीं। वांचोन आलों एथवरी। उरलें तें हरी तुम्हां समर्पण ॥ १ ॥ दिला या काळें अवकाश। नाहीं पावलें आयुष्यनाश। कार्या कारण उरलें शेष। गेलें तें भूस जावो परतें ॥ २ ॥ बुडणें खोटें पावतां थडी। स्वप्नीं झाली ओढाओढी।

अहो देवा, माझा उद्धार करणें हें तुम्हांला फार ओझें झालें आहे असें मला दिसत आहे. आजपर्यंत तुम्हीं अनंत जीवांचा उद्धार केलात असें असून अखेरीस मला आश्रय मिळत नाहीं १. माझें बलाढ्य पाप तुझ्यापाशींहि राहूं शकतें व मागल्या संचिताची शिल्लक राहिली, हें मीं मोठ्या कौतुकानें नवल पाहिलें! २. कीं नारायण वृद्ध झाला, आतां त्याला पूर्वीचें सामर्थ्य नाहीं, असें जर तुम्ही बोलाल तर तें तुमचें कमीपणाचें भाषण संत मानतील काय? ३. आतां असलें चोरीचें वर्तन ठेवून मला आपल्यापासून दूर करूं नका. आतां मात्र घरचे घरीं पडदा आड ठेवणें हें योग्य नाहीं. आजपर्यंत दूर ठेवलें तें ठेवलें ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे अनंता, आतां तूं फसवूं नकोस. तूं जाणता असून नेणता कां होतोस? बरें, तुझ्या ठिकाणीं सत्ता नाहीं कीं काय? आतां तूं माझ्याकरितां लवकर प्रगट हो ५. [४०९१]

हे देवा, ज्या संतांनीं तुला प्रत्यक्ष मूर्तिमान् पाहिलें आहे ते मला 'इतके दिवस भक्ति करूनहि तुला देवदर्शन कसें घडलें नाहीं!' असें म्हणून हांसतील. ह्याकरितां माझें चित्त चिंतातुर झालें आहे आणि मी भक्त वायां गेलों असें दिसत आहे १. तुझें ध्यान वर्णन कसें करावें? आणि न करावें तर मागील कित्येक भक्तांनीं देव मूर्तिमान् आहे म्हणून स्तुति केली आहे अशा प्रकारच्या आशेस मी लागल्यामुळें माझा जीव तुझ्यापासून बाहेर निघत नाहीं २. जी महाराज, व्यर्थ वेडावांकडा धडा (रिवाज) कशाकरितां पाडला आहेस? आम्हां बालकांना त्रास होण्याकरितां एका आड एक पाप पुण्य कां उत्पन्न केलेंस? ३. हा अपराध कोणाचा आहे हें तुम्ही सांगा. ह्याविषयीं मी पायांस लागत आहें, कारण तूं माय सर्वांना सारखी आहेस तर माझा असा अपराध कोणता आहे? ४. हे नारायणा, माझा देह तुमच्या कांहीं उपयोगीं येत नव्हता मग तुम्ही कशाकरितां मला जन्मास घातलेंत? ह्या माझ्या वचनाला तुम्ही प्रत्युत्तर देऊन माझी अज्ञान्याची समजूत करा ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा प्रकारचा बोभाट करून पुष्कळ दिवस मी तुझी वाट पाहातांना श्रमलों आहें. जसें ताट वाढून ठेवलें असून त्याचा कांहीं कारणानें वीट यावा तसें मजविषयीं स्वामीला झालें कीं काय हें मला समजत नाहीं ६. [४०९२]

हे हरि, आजपर्यंत मी काळाच्या दाढेंत सांपडलों नाहीं. येथपर्यंत वांचून आलों हें फार बरें झालें. आतां जें कांहीं आयुष्य उरलें आहे तें मीं तुम्हांला अर्पण केलें आहे १. आजपर्यंत मला काळानें अवकाश दिल्यामुळें माझ्या सर्व आयुष्याचा नाश झाला नाहीं. आतां जें मागील आयुष्य फोलकटाप्रमाणें व्यर्थ गेलें तें जावो. जें कांहीं अवशेष उरलें आहे त्यायोगानें मी सच्चिदानंद पदवी मिळविण्याचें कार्य साधून घेईन २. एखादा कोणी पाण्यांत पडला असतां कडेस निघाल्यावर त्याचा बुडालेपणा खोटा झाला, अगर स्वप्नामध्यें अनेक प्रकारचें दुःख झालें तें जागृत झाल्यावर त्याचा नाश

नासली जागृतीची (जागृती) घडी। साच जोडी शेवटीं गोड घास ॥ ३ ॥ तुम्हांसी पावविली हांक। तेणें निरसला धाक। तुमचें भातें हें कवतुक। जे शरणागत लोक रक्षावे ॥ ४ ॥ रवीच्या नांवें निशीचा नाश। उदय होतांचि प्रकाश। आतां कैंचा आम्हां दोष। तूं जगदीश कैवारी ॥ ५ ॥ आतां जळो देह सुख दंभ मान। न करीं तयाचें साधन। तूं जगदीश नारायण। आलों शरण तुका म्हणे ॥ ६ ॥ [४०९३]

आतां माझा नेणों परतों भाव। विसावोनि पायीं ठेविला जीव। सकळ लाभांचा हा ठाव। ऐसा वाव झाला चित्ताठायीं ॥ १ ॥ भांडवल गांठीं तरि विश्वास। झालों तों झालों निश्चयें दास। न पाहें मागील ते वास। पुढती सोस सेवेचाचि ॥ २ ॥ आहे तें निवेदिलें सर्व। मी माझें हें मोडियेला गर्व (माझा मोडियेला गर्व)। अकाळीं काळ अवघें पर्व (अकाळीं काळ आघवें पर्व)। झाला भरंवसा कृपें लाभाचा ॥ ३ ॥ वेव्हारीं वेव्हारा अनंत। नाहीं यावांचूनी जाणत। तरी हें समाधान चित्त। लाभ हानि नाहीं येत अंतरा ॥ ४ ॥ करूनी नातळों संसारा। अंग भिन्न राखिला पसारा। कळवळा तो जीवनीं खरा। बीजाचा थारा दुरी आघात ॥ ५ ॥ बहु मतांपासूनि निराळा। होऊनी राहिलों सोंवळा। बैसला रूपाचा कळवळा। तुका म्हणे डोळां लेइलों तें ॥ ६ ॥ [४०९४]

तुळसी माळा घालूनी कंठीं। उभा विटेवरी जगजेठी। अवलोकोनी पुंडलीका दृष्टी। असे भीमातटीं पंढरीये ॥ १ ॥ भुक्तिमुक्ति जयाच्या कामारी। रिद्धिसिद्धि वोळंगती द्वारीं। सुदर्शन घरटी करी। काळ कांपे दुरी धाके तया ॥ २ ॥ जगज्जननी असे वाम भागीं। भीमकी शोभली अर्धांगीं। जैसी विद्युलता झळके मेघीं। दरुषणें भंगी महा दोष ॥ ३ ॥ सुखसागर परमानंदु।

होत आहे, किंवा भोजनसमयीं अखेरचा गोड घांस मिळाला म्हणजे जसा आनंद होतो, तसा तुमच्या खऱ्या प्राप्तीचा मला आनंद झाला आहे ३. तुम्हांला हांक मारली व ती तुम्हीं ऐकली त्यायोगानें माझें भय नाहींसें झालें, कारण जे कोणी शरण येतील त्या लोकांचें रक्षण करावें असें कौतुकाचें भांडवल तुमचेपाशीं आहे ४. जसा सूर्योदय झाल्याबरोबर अंधाराचा नाश सहज होतो त्याप्रमाणें तूं जगदीश जर आम्हांला साह्य झाला आहेस तर आतां आमचे ठिकाणीं दोष कसा राहील ? ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, तूं सर्व जगताचा स्वामी आहेस, म्हणून मी तुला शरण आलों आहें. आतां देहसंबंधी मानदंभ उपचाराचें जें सुख त्याला आग लागो! तें प्राप्त होण्याविषयींचा यत्न मी मुळींच करणार नाहीं ६. [४०९३]

माझा भाव देवाचे पायांजवळ ठेविल्यामुळें मला विश्रांति झाली. तो भाव आतां माघारीं फिरूं शकत नाहीं, म्हणून त्या ठिकाणीं मीं जीव अर्पण केला आह, कारण हें ठिकाण सकळ लाभ प्राप्त होण्याचें आहे. अशा प्रकारचा माझ्या चित्तामध्यें निश्चय झाला आहे १. माझे पदरीं विश्वास हेंच मुख्य भांडवल आहे म्हणून मी निश्चयानें सेवक झालों आहें. आतां मागील प्रपंचाकडे न पाहातां सर्व काळ देवाचीच सेवा करावी, ही हांव पुढें माझ्या मनानें घेतली आहे २. जें अंतःकरणांत आहे तें सर्व निवेदन केलें. त्याविषयींचा अभिमान माझ्या ठिकाणीं राहिला नाहीं. चांगला अथवा वाईट काळ ह्या सर्वांचा शुभ काळ झाला आहे, कारण देवाच्या कृपेचा लाभ होईल असा मला भरंवसा आला आहे ३. आतां सर्व व्यापारांमध्यें आनंदाचाच व्यापार मी करीत आहें. ह्यावांचून दुसरें कांहीं जाणत नाहीं. म्हणूनच माझें चित्त समाधान पावत आहे, त्या योगानें लाभहानींचें सुखदुःख माझ्या अंतःकरणांत उत्पन्न होत नाहीं ४. असा सर्व संसार करून त्यांत मी लिप्त होत नाहीं. तो प्रापंचिक पसारा अंगाच्या वेगळा ठेविला आहे व अंतःकरणाची प्रीति नामरूपी जीवनाचेच ठिकाणीं खरोखरी आहे. त्यायोगानें त्या नामरूपी बीजाची वस्ती हृदयांत होऊन घात आघात सर्व नाहींसे झाले ५. तुकाराम महाराज म्हणतात, अनेकांच्या मतांपासून मी वेगळा होऊन सोंवळेपणानें राहिलों आहें आणि अंतःकरणामध्यें देवाच्या स्वरूपाची प्रीति बसली आहे, म्हणून तेंच रूप माझ्या डोळ्यांत भरलें आहे ६. [४०९४]

गळ्यामध्यें तुळसीच्या माळा घालून जगजेठी देव पुंडलीकरायाकडे दृष्टीनें पाहात विटेवर उभा राहिला आहे. तो पंढरीमध्यें चंद्रभागेच्या तीराला आहे १. अष्ट महासिद्धि व रिद्धि म्हणजे ऐश्वर्याचे भोग व चार मुक्ति ज्याचे द्वारामध्यें दास्यत्व करितात व ज्याच्या नगरासभोंवतें सुदर्शन फिरत आहे, त्याच्या धाकानें कळिकाळसुद्धां कांपून दूर पळून जातो २. सकळ विश्वाची आई रुक्मिणी ज्याच्या डाव्या बाजूस अर्धांगी शोभत आहे ती जशी मेघाचे ठिकाणीं वीज चमकते तशी प्रकाशित आहे. तिच्या दर्शनानें प्राणिमात्रांच्या महा दोषांचा नाश होत आहे ३. तो देव सुखाचा समुद्र असून

गोपी गोपाळां गोधनां छंदु । पक्षिश्वापदां जयाचा वेधु । वाहे गोविंदु पावा छंदें ॥ ४ ॥ मुखमंडित चतुर्भुजा । मनमोहन गरुडध्वजा । तुका म्हणे स्वामी माझा । पावे भक्तकाजा लवलाही ॥ ५ ॥ [४०९५]

हातींचें न संडावें देवें । शरण आलों जीवें भावें । आपुलें ऐसें म्हणावें । करितों जीवें निंबलोण ॥ १ ॥ बैसतां संतांचे पंगती । कळों आलें कमळापति । आपुलीं कोणीच नव्हती । निश्चय चित्तीं दृढ झाला ॥ २ ॥ येती तुझिया भजना आड । दाविती प्रपंचाचें कोड । कनिष्ठीं रुचि टेवूनि गोड । देखत नाड कळतसे ॥ ३ ॥ मरती मेलीं नेणों किती । हाचि लाभ तयांचे संगती । म्हणोनि येतों काकुलती । धीर तो चित्तीं दृढ द्यावा ॥ ४ ॥ सुखें निंदोत हे जन । न करीं तयांशीं वचन । आदिपिता तूं नारायण । जोडी चरण तुमचे ते ॥ ५ ॥ आपलें आपण न करूं हित । करूं हें प्रमाण संचित । तरी मी नष्टचि पतित । तुका म्हणे मज संत हांसती ॥ ६ ॥ [४०९६]

बरवें झालों लागलों कारणीं । तुमचे राहिलों चरणीं । फेडीन संतसंगती धणी । गर्जइल गुणीं वैखरी ॥ १ ॥ न वंचे शरीर सेवेसी । काया वाचा आणि मनेंसी । झालों संतांची आंदणी दासी । केला याविशीं निर्धार ॥ २ ॥ जीवनीं राखिला जिव्हाळा । झालों मी मजसी निराळा । पंचभूतांचा पुतळा । सहज लीळा वर्ततसें ॥ ३ ॥ जयाचें जया होईल ठावें । लाहो या साधियेला भावें । ऐसें होतें राखियलें जीवें । येथूनी देवें भोवडुनी ॥ ४ ॥ आस निरसली ये खेपे । अवघे पंथ झाले सोपे ।

परमानंदस्वरूप आहे. ज्या गोविंदानें वृंदावनामध्यें सहज लीलेनें वेणु वाजविला त्या नादानें गौळणी-गोपाळांस त्याचा छंद लागला व गाई वगैरे पशुश्वापदें व पक्षीदेखील ज्याच्या नादानें वेधले (तल्लीन झाले) ४. तुकाराम महाराज म्हणतात, जो चतुर्भुज असून ज्याचें श्रीमुख सुशोभित आहे व जो सर्वांचें मन मोहित करणारा असून ज्याच्या रथाचे ध्वजावर गरुड आहे, तो माझा स्वामी अनेक भक्तांचीं कामें करण्याकरितां लगबगीनें धांवत जात आहे ५. [४०९५]

हे देवा, मी तुम्हांला जीवभावानें शरण आलों आहें मग मला तुमचेपासून दूर घालवूं नये. मी तुमचा आहें असें तुम्ही म्हणा, म्हणजे मी आपला जीव तुमच्यावरून ओंवाळून टाकीन १. हे लक्ष्मीपति, सर्व देहसंबंधी आप्तवर्ग हे कोणीहि माझ्या उपयोगीं पडणार नाहींत असें मला संतांचे संगतीनें बसल्यावर (स्थिरावल्यावर) समजून आलें. त्याविषयींचा निश्चय दृढतर (बळकट) झाला २. ती सर्व आप्त मंडळी प्रपंचाचें कौतुक दाखवून तुझ्या भजनास अडथळा करतात. त्या प्रपंचांतील गोडी तीच आहे. त्या योगानें पुढें फजिती होईल असें पाहून व समजून त्याच ठिकाणीं ते प्रीति टेवितात ३. त्यांपैकीं कित्येक मंडळी मागें मरण पावली व पुढेंहि मरतील, तें किती म्हणून सांगावें आणि मी त्यांची जर संगत धरली तर मलाहि तोच लाभ मिळणार आहे. ह्याकरितां मी तुम्हांला काकुळती येत आहें, कीं माझें चित्त त्या प्रपंचांत लिप्त होऊं नये. ह्याविषयीं मला दृढतर धीर द्यावा ४. हे लोक माझी खुशाल निंदा करोत पण मी त्यांच्याशीं भाषण करणार नाहीं, कारण सर्वांचा आदि (मूळ) निर्माण करणारा बाप तूं नारायण आहेस, म्हणून मला तुमच्या चरणांची प्राप्ति करून घ्यावयाची आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, जर मीं माझ्या प्रारब्धीं असेल तसें होईल असें मानून आपलें हित करण्यास आळस केला तर मी केवळ नष्ट पातकी आहें, असें समजून मला ते वैष्णव जन धिःकारून हांसतील ६. [४०९६]

हे देवा, मी तुमच्या चरणांजवळ राहिलों, ह्या सेवेच्या कारणास लागलों हें फार बरें झालें. आतां संतांच्या समागमानें तुमचे गुण जिव्हेनें वर्णन करून मी आपली इच्छा पूर्ण करून घेईन १. अशी तुमची सेवा करण्याविषयीं मी आपला देह झिजवीन. त्यांत कांहीं कायावाचामनानें प्रतारणा करणार नाहीं. आंदण दिल्याप्रमाणें मी संतांची दासी झालों. ह्याविषयीं पूर्ण निर्धार केला आहे. २. तुमच्या नामरूप जीवनाचे ठिकाणीं अंतःकरणाचा जिव्हाळा राखून मी देही व देहसंबंधी माझें ह्याच्या वेगळा झालों. आतां हा पंचभूतात्मक देह सहज कौतुकानें वर्तन करीत आहे ३. ज्याचें आम्ही भजन करतों त्याला हें आमचें कळेल अशी समजूत धरून जीवभावानें त्वरा केली. अशा स्थितींतून काढून बोधरूप स्थितींत ठेवून देवानें माझें रक्षण केलें ४. ह्या जन्माच्या खेपेस, अहो दीनबंधु, तुमच्या कृपेनें सर्व प्रापंचिक आशा नाहींशी झाली व पुढील सर्व मार्ग चालण्यास सुलभ झाले. आतां तुमच्या सत्तेच्या धाकानें इतर (यमादिक) माझ्या

तुमचे दीनबंधु कृपें । दुसरें कांपे सत्ताधाकें ॥ ५ ॥ अंकिलेपणें आनंदरूप । आतळों नये पुण्य पाप । सारूनी ठेविलें संकल्प । तुका म्हणे आपेआप एकाएकीं ॥ ६ ॥ [४०९७]

अवघ्या दशा येणें साधती । मुख्य उपासना सगुणभक्ति । प्रगटे हृदयींची मूर्ति । भावशुद्धि जाणोनियां ॥ १ ॥ बीज आणि फळ हरीचें नाम । सकळ पुण्य सकळ धर्म । सकळां कळांचें हें वर्म । निवारी श्रम सकळही ॥ २ ॥ जेथें कीर्तन हें नामघोष । करिती निर्लज्ज हरीचे दास । सकळ वोथंवले रस । तुटती पाश भवबंधाचे ॥ ३ ॥ येती अंगा वसती लक्षणें । अंतरीं देवें धरिलें ठाणें । आपणचि येती तयाचे गुणें । जाणें येणें खुंटे वस्तीचें ॥ ४ ॥ न लगे सांडावा आश्रम । उपजले कुळींचे धर्म । आणीक न करावे श्रम । एक पुरे नाम विटोबाचें ॥ ५ ॥ वेदपुरुष नारायण । योगियांचें ब्रह्म शून्य । मुक्त आत्मा परिपूर्ण । तुका म्हणे सगुण भोळ्या आम्हां ॥ ६ ॥ [४०९८]

श्रीअनंता मधुसूदना । पद्मनाभा नारायणा । जगव्यापका जनार्दना । आनंदघना अविनाशा ॥ १ ॥ सकळदेवाधिदेवा । कृपाळुवा जी केशवा । महानंदा महानुभावा । सदाशिवा सहजरूपा ॥ २ ॥ चक्रधरा विश्वंभरा । गरुडध्वजा करुणाकरा । सहस्रपादा सहस्रकरा । क्षीरसागरा शेषशयना ॥ ३ ॥ कमलनयना कमलापति । कामिनीमोहना मदनमूर्ति । भवतारका धरिल्या क्षिती । वामनमूर्ति त्रिविक्रमा ॥ ४ ॥ अगा ये सगुणा निर्गुणा । जगज्जनित्या जगज्जीवना । वसुदेवदेवकीनंदना ।

ठिकाणीं येण्यास थरथरां कांपत आहेत ५. तुकाराम महाराज म्हणतात, असा मी तुमचा अंकित होऊन आनंदरूप झालों. त्यायोगानें मला पापपुण्य स्पर्श करीत नाहीं; व सर्व संकल्पांचा नाश करून सारें देत गेल्यावर मी आपल्या आपण एकत्वानें एकटा असा राहिलों आहें ६. [४०९७]

श्रीहरीच्या सगुण स्वरूपाची भक्ति करणें हीच मुख्य उपासना आहे. ह्याच योगानें सर्व अवस्था साध्य होतात व त्यांचे ठिकाणीं शुद्ध भाव आहे असें जाणून त्या भक्तांच्या हृदयांत श्रीहरीची मूर्ति प्रगट होते १. श्रीहरीचें नाम हेंच मुख्य बीज असून फळहि तेंच आहे व सकळ पुण्य, सकळ धर्म व सर्व कळा प्राप्त होण्याचें वर्म नामच आहे आणि त्याच योगानें सर्व जन्ममृत्यूचे श्रम निवारण होतात २. ज्या ठिकाणीं श्रीहरीची कीर्ति वर्णन करून निर्लज्जपणानें हरीचे दास नामाची गर्जना करितात त्या ठिकाणीं नवरसादि सर्व रस पूर्णपणें प्राप्त होतात व त्याच योगानें संसारांतील अनेक पाशांचीं बंधनें सुटतात ३. ज्याचे हृदयांत देवांनीं ठाणें मांडून वास्तव्य केलें आहे त्या ठिकाणीं सर्व ज्ञानाचीं लक्षणें येऊन राहातात तीं त्याच्या गुणानें आपले आपण येऊन त्याचें जाणें येणें कुंठित होतें. असा ह्या वस्तीचा गुण आहे ४. हें कर्तव्य करण्यास वर्णाश्रम अथवा ज्या कुळांत उत्पन्न झाला तो कुळधर्म हें कांहीं टाकणें नको व अन्य साधनादिकांचा श्रम करणें नको. एक बिठोबारायाचे नामानेंच सर्व कार्य होणार आहे, म्हणून तेवढेंच पुरे आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, एक नारायण वेदांनीं प्रकृतीहून पर आहे असें मानलें व योगिजन तेंच ब्रह्म शून्य (कांहीं नाहीं) आहे असें मानतात, त्यालाच मुक्त असलेले लोक परिपूर्ण आत्मा आहे असें कल्पितात आणि आम्हां भोळ्या भाविकांना तोच देव प्रत्यक्ष सगुणरूपानें विटेवर उभा आहे असा दिसतो ६. [४०९८]

हे नारायणा, तुझें नाम, रूप व गुण अगणित आहेत व तुझी नाभिकमळाकृति आहे म्हणून तुला श्री, अनंत, पद्मनाभ असें म्हणतात. हे जनार्दना, तूं सर्व जगामध्यें व्यापक असून तुझें स्वरूप पूर्ण आनंदरूप अविनाश आहे १. तूं सर्व देवांचा मूळभूत देव असून कृपाळु आहेस. जी महाराज केशवा, तूं भक्तजनांना मोठा अनुभवजन्य आनंद आहेस व सर्वकाल मंगलदायक असून सहजस्वरूपी आहेस २. तूं हातामध्यें चक्र धारण करून संपूर्ण विश्वाचें रक्षण करतोस व तुझ्या रथाच्या ध्वजावर गरुड आहे आणि तूं करुणेचा सागर आहेस व तुझे अगणित हातपाय असून क्षीरसागरामध्यें शेषशयनावर तूं निद्रा करतोस ३. तुझे कमळासारखे नेत्र असून तुझी मूर्ति मदनासारखी कामिनींचें मन मोहित करणारी आहे असा तूं लक्ष्मीचा पति आहेस व तूं शेषाच्या किंवा वराहाच्या रूपानें (वराहावतारीं) पृथ्वी मस्तकावर धारण केली असून संसारांतून भक्तजनांना तारणारा आहेस व दोन पावलांमध्यें सर्व ब्रह्मांड आक्रमून तिसऱ्या पावलास जागा उरली नाहीं असा तूं त्रिविक्रम भक्तांकरितां लहानसें वामनरूप धरतोस ४. अगा सगुण निर्गुण देवा, तूं सर्व जगाचा बाप असून सर्व जगाला जीवन आहेस (जगविणारा आहेस) तो तूं देवकीवसुदेवाचा पुत्र होऊन बालवेषानें त्याच्या आंगणांत

बाळरांगणा बाळकृष्णा ॥ ५ ॥ तुका आला लोटांगणीं । मज ठाव द्यावा चरणीं । हेचि करीतसें विनवणी । भवबंधनीं सोडवावें ॥ ६ ॥ [४०९९]

आतां येणें बळें पंढरीनाथ । जवळी राहिला तिष्ठत । पाहतां न कळे जयाचा अंत । तोचि हृदयांत घालूं आतां ॥ १ ॥ विसरोनी आपुला देवपणभाव (देहपणभाव) । नामेंचि भुलविला पंढरीराव । न विचारी याती कुळ नांव । लागावया पाव संतांचे ॥ २ ॥ बरें वर्म आलें आमुचिया हातां । हिंडावें धुंडावें न लगतां । होय अविनाश साहाकारी दाता । चतुर्भुज संतां (सत्ता) परि धाकें ॥ ३ ॥ होय आवडी सानें (साना) थोर । रूप सुंदर मनोहर । भक्तिप्रिय लोभापर । करी आदर याचकपणें ॥ ४ ॥ तें वर्म आलें आमुच्या हाता । म्हणोनि शरण निघालों संतां । तुका म्हणे पंढरीनाथा । न सोडीं आतां जीवेंभावें ॥ ५ ॥ [४१००]

माझा तंव खुंटला उपाव । जेणें तुझे आतुडती पाव । करूं भक्ति तरि नाहीं भाव । नाहीं हातीं जीव कवणेविशीं ॥ १ ॥ धर्म करूं तरि नाहीं चित्त । दान देऊं तरि नाहीं वित्त । नेणें पुजों ब्राह्मण अतीत । नाहीं भूतदया पोटा हातीं ॥ २ ॥ नेणें गुरुदास्य संतसेवन । जप तप अनुष्ठान । नव्हे वैराग्य वनसेवन । नव्हे दमन इंद्रियांसी ॥ ३ ॥ तीर्थ करूं तरि मन नये सवें । व्रत करूं तरि विधि नेणें स्वभावें । देव जवळी आहे म्हणों मजसवें । तरि आपपरावें न वचे ॥ ४ ॥ म्हणोनि झालों शरणागत । तुझा दास मी अंकित । यास कांहीं न लगे संचित । झालों निश्चिंत तुका म्हणे ॥ ५ ॥ [४१०१]

रांगूं लागलास, म्हणून तुझें नांव बालकृष्ण आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, जी महाराज देवा, मी तुम्हांला लोटांगण घालून तुमचे चरणांजवळ ठाव मागत आहें. मला संसारांतल्या अनेक पाशांनीं बांधलें आहे त्यांतून तुम्ही सोडवा हीच माझी विनंति आहे ६. [४०९९]

आतां पंढरीनाथ भक्तीच्या बलानें जवळच वाट पाहात उभा राहिला आहे. विचार करावयास गेलें तर ज्याच्या स्वरूपाचा अंत लागत नाहीं, आतां त्यालाच हृदयामध्यें धारण करूं १. पंढरीराव हा आपल्या देवपणाला विसरला आहे. अशा प्रकारें भक्तजनांनीं त्याच्या नांवाचें चिंतन करून त्याला भुलविलें. संतांच्या चरणाला लागण्याच्या वेळीं त्याच्या जातिकुळाचा व नांवाचा विचार तो करीत नाहीं. (*पाठभेद :* आम्ही देह विसरून व त्याविषयींचा अभिमान घालवून केवळ नामस्मरणानेंच पंढरीरायाला भुलविलें आहे. आम्ही संतांच्या पायीं लागलों आहोंत. संत हे कधीं साधकाच्या यातिकुळांचा व गुणदोषांचा विचार करीत नाहींत) २. अशा प्रकारचें हें उत्तम साधन आमचे हस्तगत झालें. आतां कांहीं शोध करण्यास व हिंडावयास नको. जो श्रीहरि अविनाश आहे तोच दाता साह्य करणारा होतो. जरी श्रीहरि चतुर्भुज आहे तरी त्याला भक्तजनांचा मोठा धाक आहे ३. भक्तजनांच्या आवडीकरितां श्रीहरि लहान व थोर, सुंदर, मनाला हरण करणारें असें रूप धारण करतो, त्याला भक्ति प्रिय असून त्याविषयीं तो लोभिष्ठ आहे. आपण याचक होऊन भक्तांकडे जातो व त्यांचा सत्कार करतो ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे पंढरीनाथा, अशा प्रकारचें हें साधन आमच्या हस्तगत झालें म्हणून मी संतांना शरण आलों आहें. मी तुला जीवाभावानें (काया वाचा मनानें) सोडणार नाहीं ५. [४१००]

हे देवा, ज्यायोगेंकरून तुझे पाय आकळले जातात (प्राप्त होतात) असले उपाय मजकडून होईनासे झाले, कारण तुझी भक्ति करावी तर मजजवळ भाव नाहीं. कोणत्या विषयाविषयीं माझा जीव माझ्या स्वाधीन असा स्वतंत्र नाहीं १. धर्माचरण करावें तर चित्ताचें साहाय्य नाहीं, दान द्यावें तर पैसा नाहीं, ब्राह्मण अगर पांथस्थ ह्यांचें पूजन कसें करावें हेंहि मी जाणत नाहीं आणि भूतांविषयीं दयाहि माझे हृदयांत नाहीं व हातानें ती सहज घडत नाहीं २. गुरूची व संतांची संगति कशी करावी हें मी जाणत नाहीं, त्याचप्रमाणें जप, तप व अनुष्ठान हेंहि मला कळत नाहीं. वैराग्य धारण करून वनामध्यें वस्ती करणें हेंहि होत नाहीं व इंद्रियांचें दमनहि होत नाहीं ३. तीर्थयात्रा करावयास गेलें तर मन बरोबर येत नाहीं, व्रताचरण करावें तर त्याचा शास्त्रोक्त विधि समजत नाहीं, देव माझ्याजवळ हृदयांत आहे अशा समजुतीनें राहावें तर आपपर भाव जात नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, ह्याकरितांच, हे देवा, तुला शरणागत येऊन तुझ्या आज्ञेंत राहाणारा असा तुझा दास बनलों. अशा ह्या स्थितीस कांहीं संचिताची जरूरी नाहीं हें जाणून मी निश्चिंत झालों आहें. ५. [४१०१]

तरि म्यां आळवावें कोणा । कोण (हे) पुरवील वासना । तुजवांचूनी नारायणा । लावी स्तना कृपावंते ॥ १ ॥ आपुला न विचारीं सीण । न धरीं अंगसंगें भिन्न । अंगिकारिलें राखें दीन । देईं जीवदान आवडीचें ॥ २ ॥ माझिया मनासी हे आस । नित्य सेवावा ब्रह्मरस । अखंड चरणींचा वास । पुरवीं आस याचकाची ॥ ३ ॥ माझिया संचिताचा ठेवा । तेणें हे वाट दाविली देवा । एवढ्या आदराचा हेवा । मागें सेवादान आवडीनें ॥ ४ ॥ आळवीन करुणावचनीं । आणीक गोड न लगे मनीं । निद्रा जागृति आणि स्वप्नीं । धरिलें ध्यानीं मनीं रूप ॥ ५ ॥ आतां भेट न भेटतां आहे । किंवा नाहीं ऐसें विचारूनी पाहें । लागला झरा अखंड आहे । तुका म्हणे साहे केलें अंतर ॥ ६ ॥ [४१०२]

हेंचि भवरोगाचें औषध । जन्म जरा तुटे व्याध । आणीक कांहीं नव्हे बाध । करील वध षड्वर्गा ॥ १ ॥ सांवळें रूप ल्यावें डोळां । सा चौ अठरांचा गोळा (मेळा) । पदर लागों नेदी खळा । नाममंत्र माळा विष्णुसहस्र ॥ २ ॥ भोजन न द्यावें अन्न । जेणें चुके अनुपान । तरीच घेतल्याचा गुण । होईल जाण सत्य भाव ॥ ३ ॥ नये निघों आपुलिया घरा । बाहेर लागों नये वारा । बहु बोलणें तें सारा । संग दुसरा वर्जावा ॥ ४ ॥ पासी तें एक द्यावें वरी । नवनीताची होईल परी । होईल घुसळिलें तें निवारी । सार भीतरी नाहीं तया ॥ ५ ॥ न्हायें अनुतापीं पांघरें दिशा । स्वेद निघों दे अवघी आशा । होसील आधीं होतासी तैसा । तुका म्हणे दशा भोगीं वैराग्य ॥ ६ ॥ [४१०३]

हे नारायणा, तुम्हीं जर मला दूर धरलें तर मी कोणाला हांक मारावी ? तुमच्यावांचून स्तनपान देऊन माझी वासना पूर्ण करणारा असा हे कृपावंते आई, कोण आहे ? १. आपल्याला मी बालकाच्या संबंधानें होणाऱ्या त्रासाचा तूं विचार करूं नकोस व आपल्या अंगसंगतीपासून मला दूर धरूं नकोस. ज्या दीन भक्तजनांचा तुम्हीं अंगीकार केला आहे त्यांचें तुम्ही रक्षण करा इतकेंच प्रेमाचें जीवदान द्या. २. नित्य ब्रह्मरसाचें सेवन करावें हीच माझ्या मनास आशा आहे आणि निरंतर तुझ्या पायांजवळ असावें, असें वाटत आहे. ही एवढी माझी याचकाची वासना पूर्ण करा. हे देवा, माझ्या प्रारब्धकर्माचा जो ठेवा होता त्यानें ही तुमची वाट दाखविली आहे ३. व त्या आदराविषयींचीच एवढी हांव माझ्यामध्यें त्या प्रारब्धाचेच योगानें आहे व परम प्रीतीनें मी त्या सेवेविषयींचें दान मागत आहें ४. तुला कींव काकुळती येऊन मी हांका मारीन त्याशिवाय दुसरें कांहीं माझ्या मनाला आवडत नाहीं. जागृतींत, स्वप्नांत अथवा निद्रेंत व ध्यानींमनीं तुझेंच स्वरूप धरलें आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, आतां अशा स्थितींत तुझी शरीरानें भेट न होतांहि आत्मरूपानें भेट आहे किंवा नाहीं ह्याचा तूंच विचार करून पाहा. आतां तुझ्या स्वरूपानुसंधानाचा अखंड झरा माझ्या मनांत लागला आहे. अशाच प्रकारचें मी आपल्या अंतःकरणास साह्य करून घेतलें आहे ६. [४१०२]

(ध्रुवपदांत जें दर्शविलें आहे) हेंच संसारव्यथा नाहींसें करणारें औषध आहे. त्या योगानें जन्मजरादि देहाचे षड्विकार नाहींसे होतात व आणखी कोणतीहि बाधा न होतां कामक्रोधादि षड्रिपूंचाहि तें नाश करतें १. श्रीहरीचें सांवळें स्वरूप डोळ्यांत धारण करावें. तें चार वेद, सहा शास्त्रें व अठरा पुराणें ह्यांचाच सर्व बनलेला गोळा आहे. खळाचा स्पर्शहि होऊं देऊं नकोस व विष्णुसहस्रनाममालिकेचा नित्य जप करीत जा २. जें दिल्यानें अनुपानांत चूक येत आहे असलें खावयास देऊं नये. तरच ह्या वर सांगितलेल्या औषधसेवनाचा गुण येईल हें तुम्ही सत्य समजा ३. स्वात्मस्वरूप घरांतून कधीं बाहेर येऊं नये व बाहेरील देहअहंकाराचा वारा लागूं देऊं नये व इतर वायफळ बडबड फार करूं नये व अन्य मायावी जगताचा संबंध टाकावा ४. जें आपल्याजवळ चित्त आहे तें श्रीहरीस द्यावें म्हणजे तें लोणी दिल्याप्रमाणें होईल व घुसळिलेल्या ताकरूपी असार प्रपंचाचा तूं त्याग कर. कारण त्याच्यांत कांहीं सार नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, वैराग्याच्या पाण्यानें स्नान करून दिशारूपी वस्त्र सर्व आशारूपी घाम बाहेर पडेपर्यंत पांघर म्हणजे तूं जसा शुद्धबुद्ध परब्रह्मस्थितीनें आधीं पुष्ट होतास तशी ब्रह्मपुष्टि तुला प्राप्त होईल, म्हणून तूं वैराग्यावस्थेचा स्वीकार कर ६. [४१०३]

मागुता हाचि जन्म पावसी। भोगिलें सुखदुःख जाणसी। हें तों न घडे रे सायासीं। कां रे अंध होसी जाणोनियां ॥ १ ॥ लक्ष चौऱ्यांशीं न चुके फेरा। गर्भवासीं यातना थोरा। येऊनी पडसी संदेहपुरा। वोळसा थोर मायाजाळीं ॥ २ ॥ पशु काय पापपुण्य जाणती। उत्तम मध्यम भोगिती। कांहीं एक उपजतां मरती। बहिरीं अंध होती पांगुळ मुकीं ॥ ३ ॥ नरदेह निधान लागलें हातीं। उत्तम सार उत्तम गति। होईन देवचि म्हणती ते होती। तरि कां चित्तीं न धरावें ॥ ४ ॥ क्षण एक मन स्थिर करूनी। सावध होईं डोळे उघडोनी। पाहें वेद बोलिले पुराणीं। तुका विनवणी करीतसे ॥ ५ ॥ [४१०४]

दास्य करी दासांचें। उणें न साहे तयांचें। वाढिलें ठायींचें। भाणें टाकोनियां धांवे ॥ १ ॥ ऐसा कृपेचा सागर। विटे उभा कटीं कर। सर्वस्वें उदार। भक्तांलागीं प्रगट ॥ २ ॥ हृदयीं श्रीवत्सलांछन। मिरवी भक्तांचें भूषण। नाहीं तयाचा सीण। सुख धरिलें लातेचें ॥ ३ ॥ सत्यभामा दान करी। उजुर नाहीं अंगीकारी। सेवकाच्या शिरीं। धरूनी चाले पादुका ॥ ४ ॥ राखे दारवंटा बळीचा। सारथी झाला अर्जुनाचा। दास सेवकांचा। होय साचा अंकित ॥ ५ ॥ भिडे (भिडा) न बोलवे पुंडलीकाशीं। उभा मर्यादा पाठीशीं। तुका म्हणे ऐशी। कां रे न भजा माउली ॥ ६ ॥ [४१०५]

हरि तैसे हरिचे दास। नाहीं तयां भय मोह चिंता आस। होऊनि राहाती उदास। बळकट कांस भक्तीची ॥ १ ॥ धरूनी पाय त्यजिलें जन। न लगे मान मृत्तिका धन। कंठीं नामामृताचें पान (नामामृत पान)। न लगे आन ऐसें झालें ॥ २ ॥ वाव तरी उदंडच पोटीं। क्षीरसिंधु ऐसे

मीं ह्या जन्मांत सुखदुःख भोगलें आहे म्हणून मला पुढचा जन्महि मनुष्याचाच येईल असें तूं समजत असशील तर ती गोष्ट पुष्कळ यत्नानेंदेखील घडणार नाहीं. अरे, असें तूं जाणत असून आंधळा कां होत आहेस? १. चौऱ्यांयशीं लक्ष योनींतून जन्ममृत्युद्वारा फिरण्याचें कधींहि चुकणार नाहीं. त्या ठिकाणीं गर्भवासाची अतिशय यातना भोगावयास पाहिजे; नंतर जन्मास आल्यावर संशयाचे पुरामध्यें सांपडून देहादि प्रपंचरूपी मायाजाळाच्या मोठ्या भोंवऱ्यांत फिरत राहाशील २. पशूंना पाप व पुण्य ह्याचें काय ज्ञान आहे व त्यांना उत्तम मध्यम भोग भोगण्याचेंहि काय समजत आहे? कित्येक जन्मल्याबरोबरच मरतात व कित्येक बहिरे, आंधळे, पांगळे होतात व कित्येक मुके असतात ३. नरदेहासारखा ठेवा हस्तगत झाला आहे तो उत्तम सारभूत आहे व उत्तम गति देणारा आहे. मी देव होईन असें कोणीं या देहांत म्हटलें व त्यानें श्रीहरीची योग्य भक्ति केली तर तो देवहि होईल, असें जर आहे तर श्रीहरीविषयीं चित्तांत प्रेम कां ठेवूं नये? ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे नरा, क्षणभर तूं आपलें मन स्थिर कर व सावध होऊन डोळे उघडून वेदपुराणें काय म्हणत आहेत तें पाहा अशी मी विनंति करीत आहें ५. [४१०४]

श्रीहरि हा आपल्या सेवकांची सेवा करतो. त्यांचें कांहीं कमी पडलेलें त्याला सहन होत नाहीं. त्यांचें कार्य करण्याकरितां त्या देवाला इतकी त्वरा असते, कीं जेवणाचें पुढलें ताटदेखील तो टाकून त्यांकडे धांव घेतो १. असा तो कृपेचा समुद्रच आहे व विटेवर उभा राहून ज्यानें कमरेवर हात ठेवले आहेत व सर्वस्व देणारा असा तो उदार असून भक्तांकरितां प्रगट होतो २. तो हृदयावर भृगूच्या लत्ताप्रहारानें उमटलेलें श्रीवत्स नामक चिन्ह एक प्रकारचें भक्तांचें भूषणच म्हणून मिरवीत असतो. त्याबद्दलचें दुःख श्रीहरीला नसून उलट त्या लत्ताप्रहाराचें त्यानें सुखच मानलें आहे ३. सत्यभामेनें देवाला नारदाला दान दिलें आणि त्याबद्दल देवाची रुजवात नसतांनाहि देवांनीं ती गोष्ट कबूल करून नारदाच्या पादुका आपल्या मस्तकावर वागविल्या ४. बळीचें द्वार रक्षण करणारा झाला व अर्जुनाचेंहि ज्यानें सारथ्य केलें. अशा प्रकारचे आपले जे कोणी सेवक आहेत, त्यांचा खरोखर दास बनून त्यांच्या आज्ञेंत तो वागतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या देवाला पुंडलीकाची भीड असल्यामुळें त्याच्याशीं बोलवलें नाहीं, त्यानें आज्ञा केल्याप्रमाणें मोठ्या मर्यादेनें त्याच्या पाठीमागें तो उभा राहिला. अशा प्रकारच्या पांडुरंग आईचें भजन तुम्ही कां रे करीत नाहीं? ६. [४१०५]

जसे हरि सच्चिदानंद आहेत तसेच हरीचे दासहि आहेत. त्यांनाहि हरीप्रमाणें भय, मोह, चिंता व आशा नाहीं. उदास स्थितीनें राहून त्यांनीं भक्तीचा कांचा बळकट घातला आहे १. श्रीहरीचे पाय त्यांनीं बळकट धरून लोकांचा त्याग केला आहे, लोकांकडून मान मिळावा अशी त्यांना जरूरी नाहीं व पैसा हा त्यांना मातीप्रमाणें भासत आहे. निरंतर ते श्रीहरीच्या नामामृताचेंच पान करीत आहेत. ह्याखेरीज दुसरें कांहीं नको असें त्यांस वाटत आहे २. त्यांच्या

जगजेठी । कामक्रोधा न सुटे मिठी । गिन्हे तरी वेठीं राबविती ॥ ३ ॥ बळें तरी नागवती काळा । लीन तरी सकळांच्या तळा । उदार (तरी) देहासी सकळां । जाणोनी कळा सर्व नेणते ॥ ४ ॥ संसार तो तयांचा दास । मोक्ष तो पाहातसे वास । रिद्धिसिद्धि देशवटा त्रास । न शिवती यास वैष्णवजन ॥ ५ ॥ जन्ममृत्यु स्वप्नांसारिखें । आप त्यां न दिसे पारखें । तुका म्हणे अखंडित सुखें । वाणी वदे मुखें प्रेमामृताची ॥ ६ ॥ [४१०६]

बहुत जाचलों संसारीं । वसें गर्भी मातेच्या उदरीं । लक्ष चौऱ्यांशीं योनिद्वारीं । झालों भिकारी याचक ॥ १ ॥ जिणें पराधीन आणिकां हातीं । दृढ पाशीं बांधलों संचितीं । प्रारब्ध क्रियमाण सांगाती । भोवंडिती सत्ता आपुलिया ॥ २ ॥ न भरे पोट नाहीं विसांवा । नाहीं नेम एक ठाव गांवा । नाहीं सत्ता न फिरे ऐसी देवा । लाही जीवा खापरीं तडफडी ॥ ३ ॥ काळ बहुत गेले ऐसिया रीती । आणीक पुढेंही नेणों किती । खंडणा नाहीं पुनरावृत्ति । मज कल्पांतीं तरी वेगळें ॥ ४ ॥ ऐसें दुःख कोण हरील माझें । कोणा भार घालूं आपुलें ओझें । भवसिंधुतारक नाम तुझें । धांवसी काजें आडलिया ॥ ५ ॥ आतां धांव घालीं नारायणा । मजकारणें रंका दीना । गुण न विचारीं अवगुणा । तुका करुणा भाकीतसे ॥ ६ ॥ [४१०७]

जंव हें सकळ सिद्ध आहे । हात चालावया पाय । तंव तूं आपुलें स्वहित पाहें । तीर्थयात्रे जायें चुकों नको ॥ १ ॥ जंव काळ असे दुरी ठेला । तंव तूं हरिगुण गायें आइक वहिला । मन भाव धरूनी भला । न वंचें त्याला चुकों नको ॥ २ ॥ जोडोनी धन न घालीं माती । ब्रह्मवृंद पूजन यती ।

हृदयांत अवकाश पुष्कळ आहे. ते सिंधूप्रमाणें धैर्यवंत असे जगतांत मल्ल आहेत, त्यांनीं जी श्रीहरीच्या चरणांना मिठी मारली आहे ती कामक्रोधांनादेखील सुटत नाहीं. हे कामक्रोध जरी मोठे ग्रह आहेत तरी त्यांना ते बिगारीला राबवितात ३. ते हरिदास इतके बलाढ्य आहेत, कीं त्यांच्यापुढें काळाचेंहि कांहीं चालत नाहीं. ते इतके नम्र असतात, कीं ते सर्वांच्या खालीं असतात. सर्व देहाविषयीं ते उदार आहेत; चौसष्ट कला जाणून सर्व कांहीं न जाणल्यासारखे आहेत ४. संसार हा हरिदासांचा दास आहे, मोक्ष हा त्यांची वाट पाहात आहे, रिद्धिसिद्धि तर त्यांनीं आपल्या देशाचे हद्दपार केल्या आहेत. इतका त्यांना त्यांचा त्रास आहे. वैष्णव जन हे त्यांना स्पर्श करीत नाहींत ५. तुकाराम महाराज म्हणतात, ते हरिदास जन्ममृत्यु हे स्वप्नाप्रमाणें मानतात. आपलें आणि परकें हें त्यांना भासत नाहीं. निरंतर ते सुखी असतात व त्या स्थितींत त्यांची वाणी प्रेमामृतस्वरूप जें हरीचें नांव त्याचें स्मरण करीत असते ६. [४१०६]

मी संसारामध्यें अतिशय त्रस्त झालों, आईच्या उदरांत गर्भावस्थेंत वास केला, चौऱ्यांयशीं लक्ष योनींतून सुखाकरितां फिरणारा मी भिकारी याचक झालों १. माझें जगणें हें दुसऱ्याच्या स्वाधीन झालें आहे. संचितकर्माच्या बळकट पाशानें मी बांधला गेलों. प्रारब्धकर्म व क्रियमाण कर्म हीं तर माझ्याबरोबर असून मला आपल्या सत्तेनें फिरवीत आहेत २. अनेक योनींतून फिरण्यानेंहि पोट भरत नाहीं (तृप्ति नाहीं) व विश्रांतिहि नाहीं व गांवांत एका ठिकाणीं राहाण्याचा नेमहि नाहीं. कोठेंहि फिरूं नये, एका जागीं राहावें असें, हे देवा, माझ्या अंगीं सामर्थ्यहि नाहीं. जोंधळे भाजण्याच्या खापरामध्यें लाही जशी तडफड करते तशी माझ्या जीवाची स्थिति झाली आहे ३. अशा प्रकारें पुष्कळ काळ गेला, आणि पुढें किती जाईल हेंहि कळत नाहीं. कल्पांत जरी झाला तरी पुनः पुनः जन्मणें आणि मरणें ह्याला खंड नाहीं ४. अशा प्रकारचें हें माझें दुःख कोण नाहींसें करील? मी आपलें ओझें तुमच्यावांचून कोणावर घालूं? तुझें नामचिंतन हें संसारसमुद्रांतून तारणारें आहे, म्हणजे जो कोणी तुझें नांव घेईल त्याच्या संकटसमयीं तुम्ही त्याला सोडविण्याकरितां धांव घेतां ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे नारायणा, मज गरीब दीनाकरितां आतां तुम्ही धांव घ्या व माझ्या ठिकाणीं असलेल्या गुणावगुणांचा विचार करूं नका. अशा प्रकारची मी करुणा भाकीत आहें ६. [४१०७]

अहो जन हो, जोंपर्यंत तुमचें हातापायांसुद्धां शरीर सुदृढ व कार्यक्षम आहे, तोंपर्यंत तुम्ही आपलें स्वहित करून घ्या व तीर्थयात्रेस जा; ह्यांत चुकूं नका १. जोंपर्यंत तुमचा नाश करणारा काळ दूर आहे तोंपर्यंत हरीचे गुणानुवाद उच्चारा व ऐका. ह्याविषयीं मोठी त्वरा करा आणि शुद्ध भाव मनांत धरून त्या हरीची सेवा करण्यास अंगचोरपणा करून चुकूं नका २. धनाची प्राप्ति करून घेऊन गार खणून त्यांत तें पुरून ठेवूं नये. तें धन ब्राह्मणाचे समुदाय अथवा संन्याशांचे

सत्य आचरण दया भूतीं । करी सांगाती चुकों नको ॥ ३ ॥ दशा यौवन बाणली अंगीं । पांगिला नव्हे विषयसंगीं । काम क्रोध लोभ मोह त्यागीं । राहें संतसंगीं चुकों नको ॥ ४ ॥ मग तेथें न चले कांहीं । सत्ता संपदा राहील (राहेल) ठायींच्या ठायीं । पुढें संचित जाईल ग्वाही । तुका म्हणे तेही (तई) यमआज्ञा ॥ ५ ॥ [४१०८]

ऐक (आइक) पांडुरंगा एक मात । कांहीं बोलणें आहे एकांत । आम्हां जरी तारील संचित । तरी उचित काय तुझें ॥ १ ॥ उसनें फेडितां धर्म तो कोण । काय तया मानवेल जन । काय गा मिरवूनी भूषण । वायां थोरपण जनामध्यें ॥ २ ॥ अन्न जरी न मिळे तयासी देणें । आगांतुक पात्र उचित दान । उपकार तरी धन मंत्रीपणें (धन्वंतरीपणें) । जरी देणें घेणें नाहीं आशा ॥ ३ ॥ शूर तो तयासी बोलिजे जाणा । पाठीशीं घालून राखे दीना । पार पुण्या नाहीं त्या भूषणा । ऐक नारायणा वचन हें ॥ ४ ॥ आतां पुढें बोलणें तें काई (कांहीं) । मज तारिसी तरीच सही । वचन आपुलें सिद्धी नेईं । तुका म्हणे तईं मज कळसी ॥ ५ ॥ [४१०९]

चांगलें नाम गोमटें रूप । निवती डोळे हरती ताप । विठ्ठल विठ्ठल हा जप । प्रगट स्वल्प अति सार ॥ १ ॥ शस्त्र हें निर्वाणींचा बाण । निकट समय अवसान । कोठें योजेल दश दान । खंडी नारायण दुःख चिंतनें ॥ २ ॥ सकळ श्रेष्ठांचें हें मत । पावे सिद्धी पाववी अनंत । म्हणोनी व्हावें शरणागत । आहे उचित एवढेंचि ॥ ३ ॥ म्हणोनी रुसलों संसारा । सर्प विखार हा पांढरा । तुजशीं अंतर रे दातारा । याचि दावेदारानिमित्त ॥ ४ ॥ येणें मज भोगविलया खाणी । नसता छंद लाविला मनीं । माजलों मी माझे भ्रमणीं । झाली बोडणी विटंबना ॥ ५ ॥ पावलों केलियाचा दंड ।

पूजाउपचार करण्याकडे खर्चावें अथवा शुद्ध आचरण करून सर्व भूतांवर दया करण्याच्या कामांत लावावें. असें संचित साह्य करून घेण्यांत तुम्ही चुकूं नका ३. जोंपर्यंत तारुण्यावस्था तुमच्या अंगांत आहे तोंपर्यंत विषयांच्या संगतीनें अंकित होऊं नका. काम, क्रोध, लोभ व मोह वगैरे विकारांचा त्याग करून संतांच्या संगतीनें राहा. त्याविषयीं चुकूं नका ४. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या वेळीं यमाचे आज्ञांकित तुम्ही व्हाल त्या वेळीं तुमचें कांहीं चालणार नाहीं. सर्व सत्ता तुमची असेल ती, अपार द्रव्य व संपत्ति जागचे जागीं राहील आणि केलेलें संचित तुमची साक्ष भरण्याकरितां पुढें जाईल. मग यमाच्या आज्ञेप्रमाणें तुम्हांस वर्तन करावें लागेल ५. [४१०८]

हे पांडुरंगा, तुमच्याशीं कांहीं हकीगत एकांतांत बोलावयाची आहे, ती ही, कीं आमचें शुद्ध प्रारब्ध जर आम्हांला तारील तर त्यांत तुझें योग्य कर्तव्य (महत्त्व) काय आहे? १. घेतलेलें उसनें परत देणें त्यांत धर्म कोणता आहे? तें करणें जनाला मानेल काय? अगा देवा, जगामध्यें थोरपणाचें भूषण व्यर्थ कशाला मिरवावें? २. अन्न हें ज्यास मिळत नाहीं त्यास द्यावें, म्हणजे एखादा आगंतुक आला असल्यास त्यास योग्य दान करावें. जर कांहीं देण्याघेण्याची आशा नसेल तर वैद्यानें औषधादि फुकट देण्याचे उपकार करावे ३. जो दीन अनाथ जीवांस पाठीला घालून रक्षण करतो तो शूर होय. हे नारायणा, त्याच्या पुण्याईला व भूषणाला पार नाहीं असें माझें बोलणें ऐका ४. तुकाराम महाराज म्हणतात, आतां ह्यापुढें बोलावयाचें तरी काय आहे? मला जर तूं तारशील तरच खरें. आपलें पतिताला पावन करण्याचें ब्रीद सिद्धीला ज्या वेळीं नेशील त्या वेळेस तूं पतितपावन आहेस असें मला कळेल ५. [४१०९]

श्रीहरीचें रूप व नाम हें चांगलें आहे. तें पाहातांक्षणीं डोळे शांत होऊन त्रिविधताप नाहींसे होतात. विठ्ठल-नामाचा जप उघड असून अतिशय सारभूत आहे १. श्रीहरीचें चिंतनरूपी शस्त्र हें निर्वाणप्रसंगीं म्हणजे अगदीं देहावसानाच्या समयीं योजण्याचें आहे. त्याच्यापुढें गो, भूमि, सुवर्ण इत्यादि दहा दानें देणें इत्यादि योजनेची किंमत काय आहे? नारायण हा भक्तांनीं आपलें चिंतन केल्याबरोबर त्यांचें संकट निरसन करतो २. असें सर्व श्रेष्ठांचें मत आहे. फलसिद्धीपर्यंत अनंतच नेऊन पोहोंचवितो, म्हणून भक्तजनांनीं त्याला शरण जाणें एवढेंच त्यांचें योग्य कर्तव्य होय ३. संसार हा पांढरा विषारी साप असून, हे दात्या देवा, असा ह्या दावेदाराच्या संगतीनें तुझा वियोग झाला आहे म्हणून मी ह्या संसारावर रागावलों आहें ४. ह्या संसारानेंच मला अनेक योनींत फिरावयास लावलें, तत्त्वतः देहादि-प्रपंचाचा छंद माझ्या मनाला लावला, त्या योगानें मी देह व देहसंबंधी माझें ह्या भ्रमानें मी मस्त झालों. त्याचें फळ माझी पुष्कळ विटंबना झाली हें होय ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, आजपर्यंत मी ह्या संसारछंदानें वागलों.

खाणी भोगिल्या याती उदंड। आतां केला पाहिजे खंड। तुका दंडवत घाली देवा ॥ ६ ॥ [४११०]

चांगला तरी पूर्णकाम। गोड तरी याचें नाम। दयाळु तरी अवघा धर्म। भला तरी दासा श्रम होऊं नेदी ॥ १ ॥ उदार तरी लक्ष्मीयेसी। झुंझार तरी कळिकाळासी। चतुर तरी गुणांचीच रासी। जाणतां तयासी तो (तोचि) एक ॥ २ ॥ जुनाट तरी बहु काळा। न कळे जयाची लीळा। नेणतां गोवळीं गोवळा। लाघवी अबलाभुलवणा ॥ ३ ॥ गांढ्या तरी भावाचा अंकित। बराडी तरी उच्छिष्ठाची प्रीत। ओंगळ तरी कुब्जेशीं रत। भ्याड अनंत बहु पापा ॥ ४ ॥ खेळ तो येणेंचि खेळावा। नट तो येणेंचि आवगावा। लपोनी जीवीं न कळे जीवा। धरितां देवा नातुडसी ॥ ५ ॥ उंच तरी बहुतचि उंच। नीच तरी बहुतचि नीच। तुका म्हणे बोलिलों साच। नाहीं आहाच पूजा केली ॥ ६ ॥ [४१११]

काय आम्ही भक्ति करणें कैसी। काय एक वाहावें तुम्हांसी। अवघा भरोनी उरलासी। वाणीं खाणीं रसीं रूपीं गंधीं ॥ १ ॥ कसें करूं इंद्रियां बंधन। पुण्यपापाचें खंडण। काय व्रत करूं आचरण। काय तुजविणें उरलें तें ॥ २ ॥ काय डोळे झांकूनियां पाहूं। मंत्रजप काय ध्याऊं। कवणे ठायीं धरूनी भाव। काय तें वाव तुजविण ॥ ३ ॥ काय हिंडों कवण दिशा। कवणे ठायीं पाय ठेवूं कैसा। काय तूं नव्हेसी न कळे ऐसा। काय मी कैसा पाहों आतां ॥ ४ ॥ तुझिया नामाची सकळ। पूजा अर्चन मंत्र माळ। धूप दीप नैवेद्य फळ तांबूल। वाहूं पुष्पांजुळ तुका म्हणे ॥ ५ ॥ [४११२]

त्याबद्दल अनेक जातींच्या योनींतून जन्मादि दुःख पुष्कळ भोगलें. आतां त्याचा निरास केला पाहिजे, म्हणून मी तुम्हांला नमस्कार करतों ६. [४११०]

देव चांगला म्हणून सांगावें तर तो पूर्णकाम असून त्याचेंच नाम गोड आहे व सर्व धर्मांमध्यें दया हें लक्षण मुख्य आहे. तिचा तर तो केवळ समुद्र आहे व तो आपल्या भक्ताला कोणत्याहि प्रकारचे श्रम होऊं देत नाहीं असा तो श्रेष्ठ आहे, म्हणून त्याचें चांगलेपणाचें वर्णन किती बरें करावें? १. श्रीमंत उदार म्हणून सांगावा तर लक्ष्मी त्याची दासी आहे व शूरत्वाचें वर्णन करावें तर तो कळिकाळाहून श्रेष्ठ आहे व चतुरपणा सांगावा तर तो सर्व गुणांची केवळ रास आहे आणि त्याला जाणावें तर त्याचा तोच एक जाणेल; दुसरें कोणी जाणूं शकणार नाहीं २. देव किती पुरातन आहे म्हणून सांगावें तर सर्वांहून तो आदि असून ज्याचें कौतुक कोणास कळत नाहीं. तो बाळवेष घेऊन नेणतेपणानें गवळ्यांचीं गुरें राखीत आहे व त्यानें गौळणी आपल्या रूपानें मोहित केल्या, असा तो लाघवी आहे ३. तो अनंत ज्याच्याजवळ भाव आहे त्याचा सेवक होतो इतका वेडा आहे; व त्याला भक्तजनाचें उच्छिष्ट खाण्याची फार आवड आहे इतका तो भिकारी असून आठ ठिकाणीं जी वांकडी कुब्जादासी तिच्याशीं तो रममाण झाला इतका कश्मल आहे आणि तो पातकी जनाला फार भित्रा (भेकड) आहे ४. नानाप्रकारचे खेळ ह्या देवानेंच खेळावे व अनेक प्रकारचे वेष त्यानेंच धारण करावे. तो देव सर्व जीवांच्या ठिकाणीं व्याप्त असून कोणालाहि कळत नाहीं आणि तुझा शोध करून धरावा तर तूं कोणालाच सांपडत नाहींस ५. तुकाराम महाराज म्हणतात, श्रेष्ठ किती म्हणून सांगावा तर तो देव सर्वांहून वरिष्ठ आहे व तोच लहान अणुरेणूपेक्षांहि लहान आहे असें मीं सांगितलें आहे तें सर्व खरेपणानें सांगितलें, उगीच फाजील स्तुति केली नाहीं व अशी वाङ्मयी पूजा केली आहे ६. [४१११]

अहो देवा, आम्हीं तुझी भक्ति काय व कशी म्हणून करावी? तुम्हांला उपचारांपैकीं म्हणून काय अर्पण करावें? कारण तुम्ही सर्व रसांच्या ठिकाणीं व अनेक रूपांच्या ठिकाणीं व गंधमात्रीं व अनेक खाणींमध्यें सर्वपणानें भरून उरले आहांत १. आम्हीं आपल्या इंद्रियांचें बंधन कसें करावें व पापपुण्याचा नाश करून कोणतें व्रत आचरण करावें? कारण तुजवांचून रिकामें असें कोणतें स्थळ उरलें आहे? २. मी डोळे झांकून काय पाहून, कोणत्या मंत्राचा जप करून मनामध्यें तुझें ध्यान कशा रीतीनें करावें व तुजवांचून कोणतें स्थळ व्यर्थ आहे असें जाणून म्यां कोणत्या ठिकाणीं भाव धरावा? ३. मीं कोणत्या दिशेला कसें फिरावें? कोणतें स्थळ तुजवांचून ओस आहे तें मला समजत नाहीं. मग म्यां कोणत्या ठिकाणीं कसा पाय ठेवावा व मीं तुला कशा रीतीनें कोणत्या ठिकाणीं आतां पाहावें? ४. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तुझे उपचार करण्याविषयीं तुझ्या नामाचा उपयोग करून धूप, दीप, नैवद्य, फल, तांबूलादि सर्व उपचार नामाचेच करीन; तुळसी व पुष्पांच्या माळाहि नामाच्याच करून तुझ्या कंठामध्यें घालीन व नाम हींच पुष्पें भावाच्या अंजुळीमध्यें घेऊन नामाच्या मंत्रानेंच तुला अर्पण करीन ५. [४११२]

शरीर दुःखाचें कोठार। शरीर रोगाचें भांडार। शरीर दुर्गंधीची थार। नाहीं अपवित्र शरीरा ऐसें ॥ १ ॥ शरीर उत्तम चांगलें। शरीर सुखाचें घोसुलें। शरीरें साध्य होय केलें। शरीरें साधलें परब्रह्म ॥ २ ॥ शरीर विटाळाचें आळें। मायामोहपाश जाळें। पतन शरीराच्यामुळें। शरीर काळें व्यापिलें ॥ ३ ॥ शरीर सकळ ही शुद्ध। शरिर निधींचाही निध। शरीरें तुटे भवबंध। वसे मध्यभागीं देव शरीरा ॥ ४ ॥ शरीर अविद्येचा बांधा। शरीर अवगुणांचा रांधा। शरीरीं वसे बहुत बाधा। नाहीं गुण सुधा एक शरीरीं ॥ ५ ॥ शरीरा सुख नेदावा भोग। न द्यावें दुःख न करीं त्याग। शरीर वोखटें ना चांग। तुका म्हणे वेग करीं हरिभजनीं ॥ ६ ॥ [४११३]

इतुलें करीं भलत्यापरी। परद्रव्य परनारी। सांडुनी अभिलाष अंतरीं। वर्ते वेव्हारीं सुखरूप ॥ १ ॥ न करीं दंभाचा सायास। शांती राहें बहुवस। जिव्हे सेवीं सुगंधरस। न करीं आळस रामनामीं ॥ २ ॥ जनमित्र होईं सकळांचा। अशुभ न बोलावी वाचा। संग न धरावा दुर्जनाचा। करीं संतांचा सायास ॥ ३ ॥ करिसी देवाविणा आस। अवघी होईल निरास। तृष्णा वाढविसी बहुवस। कधीं सुखास न पवसी ॥ ४ ॥ धरूनी विश्वास करीं धीर। करितां देव हाचि निर्धार। तयाचा वाहे योगक्षेमभार। नाहीं अंतर तुका म्हणे ॥ ५ ॥ [४११४]

संसारसिंधु हा दुस्तर। तुलंववे उलंघितां पार। बहुत वाहाविलें दूर। न लगेचि तीर पैल थडी ॥ १ ॥ किती जन्म झाला फेरा। गणित नाहीं जी दातारा। पडिलों आवर्ती भोंवरा। बहुतां थोरा वोळसिया ॥ २ ॥ वाढलों परि नेणती बुद्धि। नाहीं परतली धरिली शुद्धि। मग म्यां विचारावें कधीं। ऐसी संधी सांडुनियां ॥ ३ ॥ अनेक खाणी आहार निद्रा। भयमैथुनाचाचि थारा। बालत्व तारुण्य जरा। प्रधान पुरा भोग तेथें ॥ ४ ॥ ऐसीं उलंघूनी आलों स्थळें। बहु या भोवंडिलों काळें।

शरीर हें दुःखाचें कोठार आहे, शरीर हें रोगांचें भांडारगृह आहे, शरीर हें दुर्गंधीला आधार आहे. शरीराप्रमाणें दुसरें कांहीं अपवित्र नाहीं १. मनुष्याचें शरीर हें परमार्थ करायला अति उत्तम आहे. शरीर हें सुखाचा घड आहे. शरीर ज्याची प्राप्ति करून घेईल तें होईल. शरीरानें परब्रह्माची प्राप्ति होते २. शरीर हें केवळ स्त्रीच्या विटाळाचेंच गोठलेलें असून अधोगतीला मूळ तेंच आहे व तें मोहमायारूपी पाशाचें जाळें आहे. त्यास काळानें व्यापलें आहे ३. शरीर हें अति निर्मळ आहे व तें परमार्थ धनाचा ठेवा आहे व शरीरामध्यें देव वसत आहे, म्हणून त्याच्या योगानें संसाररूपी पाशाचें छेदन होतें ४. शरीर अविद्येचाच बांधा असून सर्व वाईट गुणांचाच काला करून निर्माण केलें आहे व त्या शरीरामध्यें अनेक प्रकारच्या दुर्गुणांच्या बाधा आहेत. त्यामध्यें एकदेखील चांगला गुण नाहीं ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा ह्या शरीराला अनेक प्रकारचे विषयभोग करून सुख देऊं नये व त्यांचा त्याग करून दुःखहि देऊं नये, कारण हें शरीर वाईटहि नाहीं व चांगलेंहि नाहीं, म्हणून त्याचा श्रीहरीच्या भजनाकडे मोठ्या त्वरेनें उपयोग करावा ६. [४११३]

कोणत्याहि प्रकारानें परद्रव्य व परस्त्री ह्यांविषयींची इच्छा अंतःकरणांतून काढून टाक. एवढें कर, मग तूं ह्या प्रपंच-व्यवहारांत सुखानें वाग १. दांभिकपणाचे यत्न करूं नकोस, पुष्कळ शांत स्थितीनें राहा व जिव्हेनें रामनामरूपी सुगंध रसाचें सेवन कर. हें करण्याविषयीं आळस करूं नकोस २. सर्व जगाचा मित्र हो, वाचेनें अशुभ बोलूं नकोस, दुर्जनाची संगति करूं नकोस. जे संतांनीं पारमार्थिक यत्न केले, ते तूं कर ३. देवावांचून जी आशा करशील ती सर्व निष्फळ होईल. अतिशय तृष्णा वाढविल्यानें तुला कधींहि सुख होणार नाहीं ४. तुकाराम महाराज म्हणतात, श्रीहरीवर मोठ्या धैर्यानें विश्वास ठेव आणि सर्व कांहीं कर्ता एक देव आहे असा निश्चय ठेव; म्हणजे देव त्याचा योगक्षेम चालवितो, ह्यांत कांहीं तूट येऊं देत नाहीं ५. [४११४]

संसारसमुद्र हा तरण्यास मोठा कठिण आहे; त्यांतून पार पडण्याविषयीं कोणी यत्न करूं लागला तर त्याचें पार पडणें होत नाहीं. आजपर्यंत पुष्कळ ह्या संसारसमुद्रांतून लांब वाहून गेले परंतु त्यांना पलीकडची कड लागली नाहीं १. हे दात्या देवा, आजपर्यंत किती जन्मांचे फेरे झाले त्यांची संख्या नाहीं. मोठ्या थोरल्या जन्ममृत्यूच्या भोंवऱ्यामध्यें सांपडून फिरत आहें २. माझा देह वाढला आहे, परंतु बुद्धि अज्ञानीच आहे; तिनें परमार्थाकडे वळण्याची शुद्धि धरली नाहीं. अशा प्रकारचा हा मनुष्यदेह टाकून मग मीं परमार्थाचा कधीं विचार करावा? ३. अनेक योनींतून आहार, निद्रा, भय, मैथुन ह्यांचीच वस्ती आहे, बालत्व (बाल्यावस्था), तारुण्यावस्था आणि वृद्धावस्था हे सर्व योनींत मुख्य भोग

आतां हें उगवावें जाळें। उजेडाचे बळें दिवसाच्या ॥ ५ ॥ सांडूं या संसाराची वाट। बहु येणें भोगविले कष्ट। दावी सत्य ऐसें नष्ट। तुका म्हणे भ्रष्ट झालों देवद्रोही ॥ ६ ॥ [४११५]

विठ्ठल भीमातीरवासी। विठ्ठल पंढरीनिवासी। विठ्ठल पुंडलीकापासीं। कृपादानाविसीं (कृपादानासी) उदार ॥ १ ॥ विठ्ठल स्मरणा कोंवळा। विठ्ठल गौरवीं आगळा। आधार ब्रह्मांडा सकळा। विठ्ठल लीलाविग्रही ॥ २ ॥ उभाचि परि न मानी सीण। नाहीं उद्धरितां भिन्न। समर्थाचे घरीं एकचि अन्न। आर्तभूतां क्षणोक्षणा सांभाळी ॥ ३ ॥ रुचीचे प्रकार। आणितां तीं आदरें। कोठेंही न पडे अंतर। थोरांसी थोर धाकुट्यां धाकुटा ॥ ४ ॥ करितां बळ धरितां नये। झोंबतां डोळे मनेंच (मनच) होय। अपुल्या उद्देशाची सोय। जाणे हृदयनिवासी ॥ ५ ॥ पान्हा तरी आल्या अंतर तेथें। तों नाहीं भरिलें रितें। करितों सेवन आइतें। तुका म्हणे चित्तें चित्त मेळवूनी ॥ ६ ॥ [४११६]

ताप हें हरण श्रीमुख। हरे भवरोगा ऐसें दुःख। अवलोकितां उपजे सुख। उभें सन्मुख दृष्टीपुढें ॥ १ ॥ न पुरे डोळियांची धणी। सखोल कृपेचीच खाणी। स्तवितां न पुरे वेदवाणी। तो हा समचरणीं कृपानिधि ॥ २ ॥ रामकृष्ण ध्यान वामननारसिंहीं। उग्र आणि सौम्य कांहींच नाहीं। सांपडे भरलीये वाही। भाव शुद्ध पाहीं याचें भातुकें ॥ ३ ॥ गुणगंभीर चतुर सुजाण। शूर धीर उदार नारायण। व्यापक तरी त्रिभुवन। मनमोहन लावण्य हें ॥ ४ ॥ टाण हें साजिरें सुंदर। अविनाश

आहेत ४. अशा प्रकारच्या अनेक योनींचीं ठिकाणें मागें टाकीत आलों. आजपर्यंत काळानें पुष्कळ फिरविलें. आतां ह्या देहादि प्रपंचाच्या जाळ्यांतून ह्या मनुष्यदेहरूपी दिवसाच्या साह्यानें आपली सुटका करून घ्यावी ५. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या संसाराचा मार्ग आतां मी टाकीन. त्यानें आजपर्यंत पुष्कळ दुःख भोगावयास लावलें. हा संसार सर्व खोटा असून खऱ्यासारखा आपल्याला भासवितो असा हा वाईट आहे. परमार्थापासून भ्रष्ट व देवद्रोही ह्याच्याच संगतीनें झालों ६. [४११५]

भीमेच्या तीरीं असणाऱ्या पंढरपूर नामक गांवामध्यें विठ्ठल देव हा वास्तव्य करीत आहे. विठ्ठल देव हा पुंडलिकाच्या जवळ उभा असून भक्तजनावर कृपा करण्याविषयीं उदार आहे १. विठ्ठल देव हा स्मरण करण्याला मृदु आहे. विठ्ठलाचा मोठेपणा सर्वांत श्रेष्ठ आहे. तो सर्व ब्रह्मांडाला आधार आहे व विठ्ठलाची तनु ही लीलाविग्रही (स्वेच्छेनें शरीर धारण करणारी) भक्तांवर अनुग्रह करण्यासाठीं आहे २. विटेवर उभा आहे पण त्याचें कांहीं दुःख मानीत नाहीं. भक्तजनांचा उद्धार करण्याविषयीं कांहीं भेदाभेद ठेवीत नाहीं. ज्याप्रमाणें समर्थाच्या घरीं थोरापासून लहानापर्यंत भोजनाच्या वेळीं एकच पक्वान्न वाढतात, क्षुधेनें जे पीडित आहेत त्यांचा क्षणोक्षणीं सांभाळ करतात ३. जे पदार्थ रुचकर आहेत ते समर्थाचे घरीं मोठ्या आदरानें वाढावयास आणतात. त्यांत कोणत्याहि ठिकाणीं वाढण्यांत जे मोठे आहेत त्यांना मोठे व जे लहान आहेत त्यांना लहान अशा प्रकारची निवड करीत नाहीं ४. कितीहि जोर केल्यानें सांपडत नाहीं तें स्वरूप डोळ्यांत बिंबलें असतां मनच तदाकार होतें. आपला जो उद्देश आहे तो हृदयांत वास करणारा श्रीहरि जाणतो ५. तुकाराम महाराज म्हणतात, जो कोणी भक्त येईल त्यास प्रेमपान्हा सोडण्याविषयीं हरीच्या ठिकाणीं चूक नाहीं. सदा सर्वकाळ तो रिता होत नाहीं; अशा त्या आयत्या प्रेमाचें सेवन श्रीहरीच्या चित्तास मी आपलें चित्त मिळवून करतों ६. [४११६]

श्रीहरीचें मुख इतकें सुंदर आहे, कीं पाहाणाराचे त्रिविध ताप नाहींसे करतें; आणि संसारव्यथेसारखेंहि दुःख नाहींसें करतें. तें समोर दृष्टीपुढें उभें आहे आणि त्याला पाहिल्याबरोबर सुख होतें १. त्याला पाहाण्यांत डोळ्यांची तृप्ति होत नाहीं; श्रीहरीचें स्वरूप ही मोठी कृपेची खाणच आहे. त्याची स्तुति करण्याला वेदवाणी पुरी पडली नाहीं २. राम कृष्ण हें ध्यान वामन नरसिंह ह्या ध्यानासारखें उग्र आणि सौम्य असें कांहींच नाहीं. त्याच्या भावभक्तीकडे जे प्रवृत्त झाले आहेत त्यांनाच त्याची प्राप्ति होते, कारण भक्तांच्या ठिकाणीं असणारा शुद्ध भाव हेंच त्याचें खाजें (खाद्य, खाऊ) आहे. ३. नारायण हा गुणानें गंभीर असून चतुर व सर्वज्ञ आहे आणि शूरत्व, धैर्य व औदार्य हें त्याचे ठिकाणीं वसत आहे व सर्व त्रैलोक्याच्या अंतरबाह्य तो व्यापक आहे व त्याचें लावण्य हें प्राणिमात्राचे मनाला मोहित करणारें आहे ४.

अविकार । अनंत आणि अपरंपर । तो हा कटीं कर धरिताहे ॥ ५ ॥ जयाची वाणी सुमनमाळा । परमामृत जिव्हाळा । अनंता अंगीं अनंत कळा । तुका जवळा चरणसेवक ॥ ६ ॥ [४११७]

अगा ये वैकुंठनायका । अगा ये त्रैलोक्यतारका । अगा जनार्दना जगव्यापका । अगा पालका भक्तांचिया ॥ १ ॥ अगा ये वसुदेवदेवकीनंदना । अगा ये गोपिकारमणा । अगा बळिबंधा वामना । अगा निधाना गुणनिधि ॥ २ ॥ अगा ये द्रौपदीबांधवा । अगा ये सखया पांडवा । अगा जीवाचिये जीवा । अगा माधवा मधुसूदना ॥ ३ ॥ अगा महेश्वरा महाराजा । अगा श्रीहरि गरुडध्वजा । अगा सुंदरा सहस्रभुजा । पार मी तुझा काय वर्णूं ॥ ४ ॥ अगा अंबऋषिपरंपरा । निरालंबा निर्विकारा । अगा गोवर्धनधरणीधरा । अगा माहेरा दीनाचिया ॥ ५ ॥ अगा धर्मराया धर्मशीळा । अगा कृपासिंधु कृपाळा । अगा प्रेमाचिया कल्लोळा । सकळकळाप्रवीणा ॥ ६ ॥ अगा चतुरा सुजाणा । मधुरगिरा सुलक्षणा । अगा उदारा असुरमर्दना । राखें शरणा तुकयाबंधु ॥ ७ ॥ [४११८]

उभा देखिला भीमातीरीं । कर मिरविले कटावरी । पाउलें तरी समचि साजिरीं । नाम तरी अनंत अति गोड ॥ १ ॥ शंखचक्रांकित भूषणें । जडितमेखळा चिद्रत्नें । पीतांबर उटी शोभे गोरेपणें । लोपलीं तेणें रवितेजें ॥ २ ॥ श्रवणीं कुंडलें देती ढाळ । दशांगुळीं मुद्रिका माळ । दंत ओळी हिरे झळाळ । मुख निर्मळ सुखरासी ॥ ३ ॥ कडीं कडदोरा वांकी वेळा । बाहीं बाहुघटे पदक गळां । मृगनाभी रेखिला टिळा । लवती डोळां विद्युल्लता ॥ ४ ॥ सुंदरपणाची साम्यता । काय वर्णूं ते

श्रीहरीच्या शरीराची ठेवण ही मोठी सुशोभित आणि नाशरहित व विकाररहित आहे. प्रकृतीच्या पार अनंत होय असा जो परमात्मा तोच हा कमरेवर हात ठेवून उभा आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याची वाचा ही पुष्पांच्या मालेप्रमाणें असून जी परमामृताचा केवळ झराच आहे. अनंत श्रीहरीच्या अंगीं अनंत कला आहेत. त्याचे जवळ मी त्याची चरणसेवा करणारा सेवक उभा आहें. [४११७]

अगा हे हरि वैकुंठच्या स्वामी, अगा हे त्रैलोक्य तारणाऱ्या हरि, अगा जगांत व्यापून असणाऱ्या जनार्दना, अगा भक्तजनांचें पालन करणाऱ्या १. अगा वसुदेवदेवकीच्या बालका, अगा गोपिकांचें मन रमविणाऱ्या, अगा बळीच्या अंकित राहाणाऱ्या वामना, अगा सर्व गुणांचे आश्रयस्थाना २. अगा द्रौपदीच्या बांधवा, अगा पांडवांच्या साह्य करणाऱ्या मित्रा, अगा हे सर्व जीवांचे जीवा, अगा (लक्ष्मीच्या पति) माधवा, अगा मधुसूदना (मधु कैटभ राक्षसांचा नाश करणाऱ्या) ३. अगा श्रेष्ठ ईश्वरा व श्रेष्ठ राजा, अगा शोभासंपन्न हरि, अगा (गरुड आहे ज्याच्या ध्वजावर अशा) गरुडध्वजा, अगा सुंदरा सहस्रभुजा, तुझ्या स्वरूपाची थोरवी मी काय वर्णन करूं? ४. अंबऋषीच्या भक्तिसंप्रदायाचे मूळ पीठा, अगा अमर्यादित विकाररहिता, अगा गोवर्धन पर्वत धारण करणाऱ्या धरणीधरा, अगा दीनभक्त जनांचें मन हरण करणाऱ्या ५. अगा धर्मराजा, धर्मानें वागणें हेंच ज्याचें शील आहे अशा, अगा कृपेच्या समुद्रा, कृपा करणाऱ्या अगा, ये. प्रेमाचीच तूं लाट आहेस अशा अगा, सर्व कलांमध्यें प्रवीण आहेस अशा ६. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, अगा चतुरा, सर्व जाणत्या, अगा मधुर बोलणाऱ्या, अगा चांगल्या लक्षणानें संपन्न आहेस अशा, अगा औदार्यवाना, असुर दैत्यांचा नाश करणाऱ्या तूं मज शरणागताचें रक्षण कर ७. [४११८]

भीमेच्या तटाकावर कमरेवर हात ठेविलेल्या व विटेवर सुशोभित अशीं समान पावलें ठेवून उभा राहिलेल्या देवा, तुला मीं पाहिलें. अनंत हें तुझें नांव अति गोड आहे १. शंखचक्रादि आयुधांचीं भूषणें तुम्हीं धारण केलीं आहेत, व रत्नें जडलेला शेला कमरेला बांधला आहे, व पीतांबर नेसून स्वच्छ पांढरी चंदनाची उटी आंगाला लाविलेली शोभत आहे. तिच्या प्रकाशानें सूर्याचें तेज लोपत आहे २. कानाचे ठिकाणीं कुंडलें झळकत आहेत, दाही बोटांतून मुद्रांकित आंगठ्या घातल्या आहेत व गळ्यामध्यें माळ शोभत आहे; हिऱ्यासारखी चमकणारी दातांची ओळ आहे. अशा प्रकारचें श्रीहरीचें मुख हें शुद्ध केवळ सुखाचीच रास आहे ३. कमरेला दोरा बांधला आहे, व दंडामध्यें वांक्या धारण केल्या आहेत व बाहुभूषणें धारण केलीं आहेत व गळ्यांत पदक आहे, व मृगाच्या नाभीमध्यें उत्पन्न होणाऱ्या कस्तुरीचा टिळक लावला आहे, ज्याचे नेत्र विजेप्रमाणें चमकताहेत ४. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, जी आतां आम्हांला श्रीहरीचे सौंदर्याची

पावे आतां । तुकयाबंधु म्हणे रे अच्युता । धन्य ते मातापिता प्रसवली ॥ ५ ॥ [४११९]

एक मागणें हृषीकेशी । चित्त द्यावें सांगतों वचनासी । मज अंतर तुझ्या चरणासी । न पडे ऐसी कृपा करीं ॥ १ ॥ नको दुजी बुद्धि आणीक । रिद्धिसिद्धि परलोक । तूं स्वामी मी सेवक । खंडणा नको करूं ऐसी ॥ २ ॥ मना येईल तो जन्म देई । भलते कुळीं भलते ठायीं । तें मी सांकडें घालीत नाहीं । हृदयींहुनी तुवां नव जावें (न वजावें) ॥ ३ ॥ इतुकें करीं भलत्या परी । भलत्या भावें तुझे द्वारीं । राहेन दास होऊनी कामारी । वदो वैखरी नित्य नाम ॥ ४ ॥ नको विचारूं दुसरें आतां । शरण आलों (जी) पंढरीनाथा । तुकयाबंधु म्हणे रे अच्युता । आहेसी तूं दाता दानशूर ॥ ५ ॥ [४१२०]

कई देखता होईन डोळीं । सकळां भूतीं मूर्ति सांवळी । जीवा नांव भूमंडळीं । जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं ॥ १ ॥ ऐसी कृपा करील नारायण । जीव जगाचा होईन । प्रेमसागरीं बुडईन । होईल स्नान अनुतापीं ॥ २ ॥ ऐसा कई येईन दैवास । दृश्य नासोनी जाईल आस । सदा संतचरणीं देहाचा वास । सेवीन शेष धणीवरी ॥ ३ ॥ कई नवसा येतील अंकुर । सुखा नाहींसा होईल पार । अमृत तें पृथ्वीजळ सागर । वाहाती पूर आनंदाचे ॥ ४ ॥ प्रसन्न दया क्षमा शांति । कई नवविधा होईल भक्ति । भोगीन वैराग्यसंपत्ति । मनोरथ कळती तई पुरले ॥ ५ ॥ तुकयाबंधु म्हणे सांग । नव्हे तुजविण निरसेना पांग । म्हणोनी घातलें साष्टांग । पांडुरंगा चरणावरी ॥ ६ ॥ [४१२१]

तूं बळिया शिरोमणी । आहेसी माजी ये त्रिभुवनीं । रिघालों पाठीं तुझीं म्हणउनी । आतां करीन मी असेल तें ॥ १ ॥ तूं देवा प्रतापदिनकर । सुरा असुरांचा सुर । महावीरां वीर धनुर्धर ।

शोभा पाहातां झाली त्या श्रीहरीच्या अप्रतिम सुंदरपणाचें मी कसें वर्णन करूं? अरे अच्युता, ज्या आईबापानें तुला जन्म दिला ते धन्य होत ५. [४११९]

हे हृषीकेशी, तुझ्याजवळ एक मागणें आहे, तें आतां मी मागेन. त्या माझ्या शब्दाकडे लक्ष द्यावें. तुमच्या चरणांचा व माझा कधींहि वियोग होऊं नये एवढी तुम्हीं कृपा करावी १. ह्यावांचून इहपरलोकींचें ऐश्वर्य आणि अष्टमहासिद्धि ह्यांची इच्छा करणारी बुद्धि मला देऊं नको. तूं माझा धनी व मी तुझा सेवक असाच संबंध ठेव. ह्यामध्यें कधींहि अंतराय आणूं नको २. हे देवा, तुझ्या मनाला वाटेल तो हव्या त्या कुळांत हव्या त्या ठिकाणीं जन्म दे, त्याच्याबद्दलचें मी तुला संकट घालीत नाहीं; परंतु तूं मात्र माझ्या हृदयांतून जाऊं नये ३. पाहिजे त्या भावनेनें तुझ्या दारांत तूं सांगितलेलें काम करणारा सेवक होऊन राहीन आणि माझी वाणी तुझें नाम वदेल असें हवें त्या मार्गानें तूं कर ४. तुकाराम महाराजांचे बंधु कान्होबा म्हणतात, हे अच्युता, त्यासंबंधानें दुसरा कांहीं विचार करूं नको. हे पंढरीनाथा, मी तुला शरण आलों आहें. तूं दान देण्याविषयीं मोठा शूर आहेस ५. [४१२०]

हे देवा, सर्व भूतांचे ठिकाणीं तुझी सांवळी मूर्ति मी डोळ्यानें केव्हां पाहीन? जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं, ह्या सर्व भूमंडळामध्यें अशेष जीवमात्राचे ठिकाणीं तुझें रूप मी केव्हां पाहीन? १. ह्या सर्व जगाचा मी जीव होऊन अनुतापानें स्नान करून प्रेमाच्या समुद्रांत बुडी द्यावी अशा प्रकारची कृपा नारायण माझ्यावर करील काय? २. जेवढा दृश्य पदार्थ आहे त्याचा नाश होऊन सर्व आशा नाहींशी व्हावी आणि संतांचे चरणांजवळ वास्तव्य करून त्यांचें उच्छिष्ट इच्छा तृप्त होईतोंपर्यंत सेवन करावें अशा प्रकारचें भाग्य मला केव्हां प्राप्त होईल? ३. असें भाग्य प्राप्त झाल्यावर त्या सुखाचा अंतपार लागणार नाहीं आणि त्या आनंदामृताचे पूर पृथ्वीतळ भरून वाहूं लागतील. ह्याबद्दल मी जे नवस केले आहेत त्याला फळ केव्हां येईल? ४. दया, क्षमा, शांति प्रसन्न होऊन नवविधा भक्तींची प्राप्ति मला केव्हां होईल? मग मी वैराग्याची संपत्ति भोगीन, त्या वेळेस सर्व मनोरथ पूर्ण झाले असें समजेन ५. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, हे पांडुरंगा, तुजवांचून कोणतेंहि कृत्य सांग होणार नाहीं व आमच्या दारिद्र्याचाहि नाश होणार नाहीं; ह्याकरितां तुमच्या चरणांवर मी साष्टांग नमस्कार घालीत आहें ६. [४१२१]

हे देवा, ह्या त्रिभुवनामध्यें सर्व बलवानांहून तूंच श्रेष्ठ आहेस ह्याकरितां आम्ही तुझे म्हणवून तुझे पाठीशीं शिरलों. आतां मनास वाटेल तसें करा १. हे देवा, तूं केवळ प्रतापाचा सूर्य आहेस व सकळ सुरासुरांमध्यें श्रेष्ठ आहेस व

मी तों पामर काय तेथें ॥ २ ॥ कृपासिंधु दीनवत्सल । फोडिली देवांची बंदीशाळ । संहारुनी राक्षसदळ शरणागत राज्यीं स्थापिला ॥ ३ ॥ उपक्रम करावा बहुत । तरी तूं जाणसी धर्मनीत । उचित काय तें अनुचित । राखे शरणागत आलों आतां ॥ ४ ॥ किती स्यां काय विनवावें । शरण आलों जीवेंभावें । तुकयाबंधु म्हणे करावें । क्षेम अवघें येणें काळें ॥ ५ ॥ [४१२२]

देवा मी चांडाळ चांडाळ । म्हणतां लागताहे वेळ । नसे पाहातां भूमंडळ । ऐसा अमंगळ खळ दुसरा ॥ १ ॥ जन्मा उपजलियापासूनी । असत्य कर्म तें अझूनी । सत्य आचरण नेणें स्वप्नीं । निखळ खाणी अवगुणांची ॥ २ ॥ भक्ति दया अथवा कथा । कानीं न साहवे वार्ता । अखंड विषयांची वेथा । अधम पुरता अधमाहुनी ॥ ३ ॥ काम क्रोध दंभ अहंकार । गर्व ताठा मद मत्सर । यांचें तरी माहेरघर । परउपकार वैरी जैसा ॥ ४ ॥ निंदा द्वेष घात विश्वास । करितां नाहीं केला आळस । करूं नये ते केले संतउपहास । अभक्ष तेंही भक्षिलें ॥ ५ ॥ पाळिलें नाहीं पितृवचन । सदा परद्वारीं परधनीं ध्यान । बोलों नये घडलें ऐसें अन्योन्यविण । दासीगमन आदिकरूनी ॥ ६ ॥ काया मनें वाचा इंद्रियांशीं । सकळ पापांचीच राशी । तुकयाबंधु म्हणे ऐसियासी । आलों हृषीकेशी तुज शरण ॥ ७ ॥ [४१२३]

काय काय करितों या मना । परि नाइके नारायणा । करूं नये त्याची करी विवंचना । पतना नेऊं आदरिलें ॥ १ ॥ भलतिया सवें धांवे सैराट । वाट आडवाट दरे दरकुट । न विचारी कुडें कांहीं कपट । घात बळकट मांडियेला ॥ २ ॥ न पुरती भ्रमणा दाही दिशा । सप्तही पाताळें आकाशा ।

महावीरांमध्यें धनुर्धारी वीर आहेस. त्या ठिकाणीं माझा पामराचा काय पाड आहे? २. तूं कृपेचा समुद्र असून दीन जनांना कृपाळु आहेस व बिभीषण तुला शरण असल्यामुळें सर्व राक्षसांसहवर्तमान रावणाचा नाश करून त्याला राज्यावर स्थापिलें व रावणाच्या बंदीमध्यें देव होते ते सोडविले ३. जर आम्हीं तुला कांहीं सांगण्यास आरंभ करावा तर तूं सर्व धर्म नीति जाणत आहेस, म्हणून मी तुला शरण आलों आहें. आतां तुझा योग्यायोग्य धर्म काय असेल तो रक्षण कर ४. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, मीं किती म्हणून तुला काय विनवावें? तुझें वर्णन होत नाहीं म्हणून जीवाभावानें मीं तुला शरण आलों आहें. आतां ह्या वेळेस तूं माझें रक्षण कर ५. [४१२२]

हे देवा, मी किती म्हणून चांडाळ आहें हें सांगावें तर उशीर लागत आहे. मज दुष्टाप्रमाणें दुसरा अमंगळ ह्या पृथ्वींत पाहिला असतां मुळींच सांपडणार नाहीं १. जन्माला आल्या दिवसापासून आजपर्यंत असत्य (पापकर्म) मी करीत आहें आणि सत्य कर्म स्वप्नांतदेखील केलें नाहीं. असा मी सर्व अवगुण उत्पन्न होण्याची खाणच आहें २. श्रीहरीची भक्ति व कथा व कोणावर दया करणें ह्याचें वर्तमान कानानें ऐकलें असतां तें मला सहन होत नाहीं आणि सर्व काळ विषयसुख मिळावें, हेंच वेड माझ्या ठिकाणीं आहे व तें न मिळालें म्हणजे अंतरांत दुःख वाटतें. असा मी सर्व अधमांपेक्षांहि अधम आहें ३. काम, क्रोध, दंभ, अहंकार, गर्व, ताठा, मद, मत्सर हे सर्व उत्पन्न होण्याचें स्थळ माझें शरीर आहे व दुसऱ्यावर उपकार करणें तर मला आवडतच नाहीं; पण कोणी कोणावर उपकार केलेले पाहून ते लोक मी वैऱ्याप्रमाणें मानतों ४. कोणाचीहि निंदा अगर द्वेष (द्रोह) व विश्वासघात करण्याविषयीं मीं कधींहि आळस केला नाहीं आणि संतांची हेळणा कधीं करूं नये ती मीं केली व जे पदार्थ खाऊं नयेत ते मीं खाल्ले ५. बापाची आज्ञा मीं कधीं मानली नाहीं; व सर्व काळ दुसऱ्यांच्या स्त्रिया व द्रव्य मिळण्याविषयीं मीं हव्यास केला व बटकीबरोबरहि व्यभिचार केला. असें जें वाचेनें उच्चार करूं नये तसलें वाईट कर्म माझे हातून घडलें ६. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, अहो हृषीकेशी देवा, काया, वाचा, मन व राग, इंद्रियें यांसहित मी पापांची रासच आहें. ह्याकरितां मी तुला शरण आलों आहें ७. [४१२३]

हे नारायणा, माझें मन स्थिर होण्याविषयीं मी पुष्कळ यत्न करतों पण तें माझें ऐकत नाहीं. जे कांहीं विचार करूं नयेत ते करून माझें मन मला अधोगतीमध्यें घालावयास पाहातें १. तें मन सैराटपणें भलत्याबरोबर धांवत जाण्याविषयीं चांगला किंवा वाईट मार्ग व त्या ठिकाणीं असलेले खांचखळगे ह्यांचा विचार करीत नाहीं व वाईट कपट करून बळकटपणें त्यानें माझा घात मांडला आहे २. त्या मनाला भ्रमण करण्याविषयीं सप्त पाताळ, दश दिशा व आकाश हीं पुरत नाहींत.

घाली उडी बळेंचि देखोनी फांसा । केलों या देशा पाहुणा ॥ ३ ॥ चेतवूनी इंद्रियें सकळ । आशा तृष्णा कल्पना काम क्रोध काळ । दुराविली शुद्ध बुद्धि केली राळ । ऐसें चांडाळ अनिवार हें ॥ ४ ॥ आतां काय ऐसें करावें यासी । बहु जाचिलों केलों कासाविसी । तुकयाबंधु म्हणे हृषीकेशी । धांव मज ऐसी परी झाली ॥ ५ ॥ [४१२४]

नव्हों आम्ही आजि कालीचीं । काचीं कुचीं चाळवणी ॥ १ ॥ एकेठायीं मूळडाळ । ठावा सकळ आहेसी ॥ २ ॥ तुमचें आमचेंसें कांहीं । भिन्न नाहीं वाटलें ॥ ३ ॥ तुका म्हणे जेथें असें । तेथें दिसे तुमचासा ॥ ४ ॥ [४१२५]

खाणोरियांची पुसों घरें । जीं हीं बरीं पावती ॥ १ ॥ सांगती त्या जावें वाटा । धरोनी पोटामध्यें गोष्टी ॥ २ ॥ आली गेली होती ठाया । सत्य छाया कळली ॥ ३ ॥ तुका म्हणे आपुलें बळ । युक्तिकाळ कारण ॥ ४ ॥ [४१२६]

बैसो आतां मनीं । आलें तैसेंची वदनीं ॥ १ ॥ मग अवघेंची गोड । पुरे सकळही कोड ॥ २ ॥ बाहेरील भाव । तैसा अंतरींही वाव ॥ ३ ॥ तुका म्हणे मणी । शोभा दाविली कोंदणीं ॥ ४ ॥ [४१२७]

यत्न आतां तुम्ही करा । मज दातारा सत्तेनें ॥ १ ॥ विश्वास तो पायांवरी । ठेवुनी हरी राहिलों ॥ २ ॥ जाणतची दुजें नाहीं । आणीक कांहीं प्रकार ॥ ३ ॥ तुका म्हणे शरण आलों । नेणें बोलों विनवितां ॥ ४ ॥ [४१२८]

एखादे ठिकाणीं घात होणारा फांसा पाहून त्यांत तें मोठ्या आग्रहानें उडी घालतें. अशा सर्व प्रकारानें मला दोषांचे अंकित केलें आहे ३. त्या मनानें माझीं सर्व इंद्रियें उत्तेजित करून हृदयांत आशा, तृष्णा, कल्पना, काम, क्रोध हे दुष्ट वाढविले आहेत आणि चांगली बुद्धि दूर करून तिची फजिती केली. अशा प्रकारचें हें दुष्ट मन अनिवार आहे ४. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, त्या मनानें फार जाच करून मला कासावीस केलें. आतां अशाला काय करावें ? अहो हृषीकेशी देवा, अशा प्रकारची माझी फार फजिती झाली आहे, म्हणून तुम्ही त्वरेनें धांवत येऊन माझें रक्षण करा ५. [४१२४]

हे देवा, आम्ही आजकालचीं गल्लीकुच्चीं चाळविलीं जाणारीं मूर्खे नव्होंत १. देवा, तुमचें आमचें मूळपाळ एके ठिकाणचें आहे म्हणून तूं आम्हांस पूर्ण माहीत आहेस २. तुमच्या आमच्या स्वरूपस्थितींत कांहीं भेद नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, ज्या ठिकाणीं आम्ही आहोंत त्या ठिकाणीं तुमच्या स्वरूपस्थितीनें आहोंत असा आमचा अनुभव आहे ४. [४१२५]

ज्यांनीं दरवडा घालून देवाच्या स्वरूपाची पाळत बऱ्या रीतीनें घेतली आहे त्यांचीं घरें आम्ही विचारीत जाऊं १. ते जसें सांगतील त्या गोष्टी पोटामध्यें धरून त्या मार्गानें आम्हीं जावें हें बरें २. कारण त्या स्वरूपाच्या ठिकाणीं ते संत गेले आलेले असतात म्हणून त्यांना खरोखरी देवाच्या कृपेची माहिती असते ३. तुकाराम महाराज म्हणतात, आपल्या ठिकाणीं बुद्धि व बळाचें साहित्य असून अनुकूल काळ येतांच सर्व साधनें सफळ होतात ४. [४१२६]

हरिनाम मुखामध्यें जसें भक्ति, ज्ञान, वैराग्य आलें तसें मनामध्यें असावें १. मग सर्व कांहीं गोड होऊन सर्व इच्छा कौतुकानें पूर्ण होतील २. जसा बाहेर भाव आहे तसा अंतःकरणांत तो वसला पाहिजे ३. तुकाराम महाराज म्हणतात, जसें कोंदण करून हिरा बसविला म्हणजे तो विशेष शोभा दाखवितो तसें अंतःकरणपूर्वक भक्ति-ज्ञान-वैराग्याचें कर्तव्य शोभतें ४. [४१२७]

हे दात्या देवा, तुम्ही आपल्या सत्तेनें माझ्या रक्षणाविषयीं प्रयत्न करा १. मी आपल्या चरणांचा भरवसा धरून आहें २. आपल्यावांचून मी दुसरी कोणतीहि गोष्ट जाणत नाहीं ३. तुकाराम महाराज म्हणतात, देवा, मी तुम्हांस शरण आलों आहें ह्यावर मी कांहीं बोलणें जाणत नाहीं. रक्षण करा हीच विनंति करीत आहें ४. [४१२८]

: आरत्या :

जगदीश जगदीश तुज म्हणती । परि या जगामाजी अससील युक्ति । पुण्यपापाविरहित सकळां अधिपती । दुष्ट परी नळणी अलिप्त गति ॥ १ ॥ जय देव जय देव जय पंढरीनाथा श्रीपंढरीनाथा । नुरे पाप विठ्ठल म्हणतां सर्वथा ॥ २ ॥ आगम निगम तुज नेणती कोणी । परि तूं भाव भक्ति जवळीच दोन्ही । नेणतां विधियुक्त ईश्वरातें पूजनीं । न माये ब्रह्मांडीं संतुष्टशयनीं (संपुष्टासनीं) ॥ ३ ॥ असुरां काळ भासे विक्राळ पुढें । पसरी मुख एक चावितो धुडें । भक्तां शरणागतां चालतो पुढें । दावी वाट जाऊं नेदी वांकडें ॥ ४ ॥ एकाएकीं बहु विस्तरला सुखें । खेळे त्याची लीला तोचि कवतुकें । तेथें (हे) नरनारी कवण बाळकें । काय पापपुण्य कवण सुखदुःखें ॥ ५ ॥ सकळां वर्मां तूंचि जाणशी एक । बद्ध मोक्ष प्राप्त आणि सुखदुःख । जाणों म्हणतां तुज ठकलीं बहुतेक । तुका म्हणे शरण आलों मज राख ॥ ६ ॥ [४१२८]

दैत्यभारें पीडिली पृथ्वी बाळा । म्हणोनि तुज येणें जालें गोपाळा । भक्तप्रतिपाळक उत्सव सोहळा । मंगळें तुज गाती अबळा बाळा ॥ १ ॥ जय देव जय देव जय गरुडध्वजा । श्रीगरुडध्वजा । आरती ओंवाळूं तुज भक्तिकाजा ॥ २ ॥ गुण रूप नाम नाहीं जयासी । चिंतितां तैसाची होसी तयांसी । मत्स्य कूर्म वराह नरसिंह जालासी । असुरां काळ मुनि ठाके ध्यानासी ॥ ३ ॥ सहस्र रूपें नाम सांवळा ना गोरा । श्रुति नेति म्हणती तुज विश्वंभरा । जीवना जीवन तूंचि होसी दातारा । न कळे पार ब्रह्मादिकां सुरवरां ॥ ४ ॥ संतां महंतां घरीं म्हणवी म्हणियारा ।

जगाचा मालक तूं आहेस म्हणून तुला जगदीश म्हणतात परंतु तूं ह्या जगामध्यें व्यापून आहेस व सर्व पुण्यपापाचा मालक आहेस. तूं सर्व पाहातोस परंतु कमलाप्रमाणें तुझे ठिकाणीं असंगपणा आहे १. हे देवा पंढरीनाथा, तूं सर्वोत्कर्षानें वर्तन कर अशी मी त्रिवार प्रार्थना करतों. हे श्रीपंढरीनाथा, तुझें विठ्ठल हें नाम घेतलें असतां यत्किंचित्हि पाप उरत नाहीं २. वेद आणि शास्त्रें हीं तुला कोणी जाणण्यास समर्थ नाहींत, परंतु भाव व भक्ति ह्या दोहींच्या तूं जवळ आहेस. अज्ञान असा मी यथाविधि ईश्वराची पूजा करीन. तूं असा आहेस, कीं ब्रह्मांडरूप संपुष्टांतदेखील मावत नाहींस ३. दैत्यांना तूं भयंकर काळ भासतोस व तोंड पुढें पसरून दैत्यांचीं धेंडेंचीं धेंडें चावून टाकतोस व शरण आलेल्या भक्तांच्या पुढें चालून त्यांना वाट दाखवितोस व वांकडें जाऊं देत नाहींस ४. परमात्मा एकटा असून आपल्या सुखोपभोगाकरितां अनेक नामरूपात्मक जगताचे रूपानें विस्तारला आहे. तो ईश्वर कौतुकानें आपली लीला खेळतो. त्या ठिकाणीं पुरुष, स्त्रिया व मुलें हा भेद कोठचा आहे? पुण्य व पाप, सुख व दुःख हाहि भेद तेथें कसला आहे? ५. तुकाराम महाराज म्हणतात, तूंच एक सर्व सूक्ष्म प्रकार जाणणारा आहेस. बंध कशाला म्हणतात, मोक्षाचें स्वरूप काय आहे, कृतार्थ पुरुष कसे असतात, बद्ध जीवांना सुखदुःखें कां प्राप्त होतात, हें सर्व तुलाच समजतें. 'देवाला मी जाणतों' असें म्हणणारे कित्येक अभिमानी लोक फसतात, कारण ते तुझें स्वरूप जाणत नाहींत. म्हणून मी तुला शरण आलों आहें म्हणून माझें तूं रक्षण कर ६. [४१२९]

दैत्यांच्या भारानें पृथ्वीरूपी स्त्री ही पीडित झाली, म्हणून हे इंद्रियांचे पालका, तूं अवतार घेतलास. भक्तांचा सांभाळ करणें हाच जो तुझा उत्साह सोहळा त्या मंगलाचें अबला स्त्रिया गायन करतात १. हे गरुडध्वजा, तुझा जयजयकार असो असें मी त्रिवार म्हणतों. हे भक्तकार्य करणाऱ्या, तुला आम्ही अतिप्रेमानें ओंवाळूं २. ज्याच्या ठिकाणीं गुण, रूप व नाम हें कांहीं नाहीं पण जो कोणी ज्या रूपानें तुझा ध्यास धरतो त्याच्या ठिकाणीं तूं तसा होतोस. मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह इत्यादि अवतारहि तूं त्याचकरितां घेतलेस. राक्षसांना तूं काळ आहेस; व नित्य मनन करणाऱ्या मुनींच्या ध्यानामध्यें तूं राहातोस ३. हे विश्वपालका, असंख्य रूपानें व नामानें तूंच असून सांवळाहि नाहींस व गोराहि नाहींस. श्रुति प्रत्येक वस्तूचा निषेध मुखानें वर्णन करीत तुझ्या ठिकाणीं थांबल्या. हे दातारा, सर्व जीवांचा निर्वाहक तूंच आहेस; तुझा अंत ब्रह्मादिक देवांना लागत नाहीं ४. संत महंतांच्या घरीं तूं आपल्याला दास म्हणवितोस. शंख–चक्र–गदादि

शंखचक्रगदाआयुधांचा भारा। सुदर्शन घरटी फिरे अवश्वरा (अवसरा)। सकुमार ना स्थूळ होसी गोजिरा ॥ ५ ॥ भावेंविण तुझें न घडे पूजन। सकळही गंगा जाल्या तुजपासून। उत्पत्ति प्रलय तूंचि करिसी पाळण। धरूनि राहिला तुका निश्चयें चरण ॥ ६ ॥ [४१३०]

कनकाच्या परियेळीं उजळुनी आरती। रत्नदीपशोभा कैशा पाजळल्या ज्योती ॥ १ ॥ ओंवाळूं गे माये सबाह्य साजिरा। राहीरखुमाई सत्यभामेच्या वरा ॥ २ ॥ मंडित चतुर्भुज दिव्य कानीं कुंडलें। श्रीमुखाची शोभा पाहातां तेज फांकलें ॥ ३ ॥ वैजयंती माळ गळां शोभे श्रीमंत। शंख चक्र गदा पद्म आयुधें शोभत ॥ ४ ॥ सांवळा सुकुमार जैसा कर्दळीगाभा। चरणींचीं नेपुरें वांकी गर्जती नभा ॥ ५ ॥ ओंवाळितां मन हें उभें टाकलें ठायीं। समदृष्टि समाधि (समान) तुकया लागली पायीं ॥ ६ ॥ [४१३१]

काय तुझा महिमा वर्णूं मी किती। नाममात्रें भवपाश तुटती। पाहतां पाउलें हे विष्णुमूर्ती। कोटिकुळांसहित जड जीव उद्धरती ॥ १ ॥ जय देव जय देव जय पंढरिराया। श्रीपंढरिराया। करूनियां कुरवंडी सांडीन काया ॥ २ ॥ मंगळ आरतीचा थोर महिमा। आणीक द्यावया नाहीं उपमा। श्रीमुखासहित देखे जो कर्मा- । पासुन सुटे जैसा रवि नासी तमा ॥ ३ ॥ धन्य व्रतकाळ हे एकादशी। जागरण उपवास घडे जयांसी। विष्णूचें पूजन एकाभावेंसी। नित्यमुक्त पूज्य तिहीं लोकांसी ॥ ४ ॥ न वजे वायां काळ जे तुज ध्याती। अखंड तुझा वास तयांच्या चित्तीं। धाले सुखें सदा प्रेमें डुलती। तीर्थें मलीन वास तयांचा पाहती ॥ ५ ॥ देव भक्त तूंचि जालासी दोन्ही। वाढावया सुख भक्ति हे जनीं। जड जीवां उद्धार होय लागोनी। शरण तुका वंदी पाउलें दोन्ही ॥ ६ ॥ [४१३२]

आयुधांच्या समुदायासह तेथें फिरतोस. विघ्ननाशाकरितां सुदर्शन हें भक्तांच्या भोंवतीं फिरत आहे. हे गोजिऱ्या देवा, तूं सुकुमार (सूक्ष्म)हि नाहींस व मोठाहि नाहींस ५. तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, भावावांचून तुझें पूजन होत नाहीं. स्वर्गांतील मंदाकिनी, मृत्युलोकांतील भागीरथी व पाताळांतील भोगवती (किंवा, गंगा, गोदावरी, चंद्रभागा) ह्या तिन्हीहि तुझ्यापासूनच निर्माण झाल्या आहेत. उत्पत्ति, पालन आणि संहार हें सर्व कांहीं करणारा तूंच आहेस; म्हणून मी तुझे पाय धरून राहिलों आहें ६. [४१३०]

सोन्याच्या ताटामध्यें आरती लाविली आहे; तिच्या ज्योतींची शोभा रत्नदीपाप्रमाणें असून ती कशी प्रकाशित झाली आहे पाहा १. हे आई, अशा ह्या आरतीनें अंतर्बाह्य सुशोभित अशा राई-रखुमाई-सत्यभामेच्या पतीस ओंवाळूं २. जो चतुर्भुज आहे व ज्याच्या कानांत तेजस्वी कुंडलें आहेत त्या योगानें तो सुशोभित आहे. ज्याचें सुशोभित मुख पाहूं गेलें असतां मुखशोभेचें तेज चोहींकडे पसरलेलें आहे असें दिसतें ३. ज्याच्या गळ्यांत वैजयंती माळ आहे, त्या योगानें तो ऐश्वर्यवान् देव सुशोभित आहे. तसेंच शंख, चक्र, गदा व पद्म हीं आयुधें त्याचे हातांत शोभत आहेत ४. ज्याची श्याम तनु असून ती कर्दळीच्या गाभ्याप्रमाणें सुकुमार आहे व पायांतील घागऱ्या व वाळे ह्यांचा शब्द आकाशांत होत आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, त्याला आरती ओंवाळण्यानें माझें मन स्थिर झालें व समदृष्टीची समाधि त्याच्या चरणीं मला लागली ६. [४१३१]

हे देवा, तुझा महिमा मी किती वर्णन करूं? तुझ्या नामचिंतनमात्रेंकरून संसारपाश तुटतात; विष्णुमूर्तीचीं पावलें पाहाणाऱ्या जडजीवांचा कोटिकुळांसहित उद्धार होतो १. हे पंढरीराया, तूं सर्वोत्कर्षानें वर्तन कर (अशी त्रिवार प्रार्थना करतों). मी आपलें शरीर तुझ्यावरून ओंवाळून टाकीन २. तुझ्या मंगल आरतीचा महिमा मोठा आहे, त्याला दुसरी उपमा द्यावयास नाहीं. जो श्रीमुखासहित आरती पाहातो, सूर्य हा जसा अंधकाराचा नाश करतो तसा तो सर्व कर्मबंधनांपासून मुक्त होतो. ३. एकादशी हें व्रत व हा काल धन्य आहे, ह्या दिवशीं जो उपवास करून जागरण करतो (हरिकीर्तनाच्या ठिकाणीं जागत राहातो) व एकनिष्ठ भावनेनें विष्णूचें पूजन करतो, तो नित्य मुक्त असून त्रैलोक्याला पूज्य आहे ४. हे पांडुरंगा, तुझें ध्यान करणारांच्या कालाचें सार्थक होतें, आणि त्यांच्या चित्तामध्यें निरंतर तुझी वस्ती होते; स्वसुखानें तृप्त होऊन ते परमानंदांत डोलत राहातात व सर्व तीर्थांचें मलिनपण वैष्णव संतांच्या चरणरजानें धुवून जातें, म्हणून तीं त्यांच्या पायापाशीं वास करीत असतात ५. ह्या जगामध्यें शाश्वत सुख आणि भक्तिभाव ह्यांचा उत्कर्ष व्हावा ह्यासाठीं आणि जडजीवांचा उद्धार होण्यासाठीं देव आणि भक्त ह्या उभय स्वरूपानें आपणच नटलां आहां, म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, मी आपल्या चरणीं शरण आलों आहें. ६. [४१३२]

कंसरायें गर्भ वधियेले सात। म्हणोनि गोकुळासी आले अनंत। घ्यावया अवतार झालें हेंचि निमित्त। असुर संहारूनी तारावे भक्त॥ १ ॥ जय देव जय देव जय विश्वरूपा। श्रीविश्वरूपा। ओंवाळीन तुज देहदीपें बापा ॥ २ ॥ स्थूळरूप होउनि धरितसे सानें। जैसा भाव तैसा तयाकारणें। दैत्यांसी भासला सिंह गजानें। काळासी महाकाळ यशोदेसी तान्हें ॥ ३ ॥ अनंत वर्णीं कोणा न कळेचि पार। सगुण कीं निर्गुण हाही निर्धार। पांगलीं साही अठरा करितां वेव्हार। तो वळितसे गौळियांचें खिल्लार ॥ ४ ॥ तेहतीस कोटि तिहीं देवांसी श्रेष्ठ। पाउलें पाताळीं स्वर्गीं मुगुट। गिळिलीं चौदा भुवनें तरि न भरेचि पोट। तो खाऊन धाला गोपाळांचें उच्छिष्ट ॥ ५ ॥ महिमा वर्णूं तरी पांगलिया श्रुति। सिणला शेष चिरल्या जिव्हा करितां स्तुति। भावेंविण कांहीं न चलेचि युक्ति। राखें शरण तुकयाबंधु करी विनंति ॥ ६ ॥ [४१३३]

परमानंदा परमपुरुषोत्तमा रामा। अच्युता अनंता हरि मेघश्यामा। अविनाशा अलक्षा परता परब्रह्मा। अकळकळा कमळापति न कळे महिमा ॥ १ ॥ जय देव जय देव जय जी श्रीपति। मंगळशुभदायका करीन आरती ॥ २ ॥ गोविंदा गोपाळा गोकुलरक्षणा। गिरिधरकर भवसागरतारका दधिमथना। मधुसूदन मुनिजीवन धरणीश्रमहरणा। दीनवत्सल सकळां मूळ जय जय निधाना ॥ ३ ॥ विश्वंभरा सर्वेश्वरा जगदाधारा। चक्रधर करुणाकर पावन गजेंद्रा। सुखसागर गुणआगर मुगुटमणी शूरा। कल्याणकैवल्यमूर्ती मनोहरा ॥ ४ ॥ गरुडासना शेषशयना नरहरी।

कंसानें देवकी भगिनीचीं सात मुलें मारलीं म्हणून गोकुळामध्यें अनंत प्रगट झाले. मुख्यत्वेंकरून अवतार घेण्याचें हेंच कारण आहे, कीं असुरराक्षसांचा संहार करून भक्तजनांचें रक्षण करणें १. हे देवा विश्वरूपा, तुम्ही सर्वोत्कर्षानें वर्तन करा (अशी मी त्रिवार प्रार्थना करतों). हे बापा, तुला देहरूपी दीपानें ओंवाळीन २. मोठें रूप होऊन लहान रूपहि आपण धारण करतां. जो जशी भावना करील त्याकरितां तुम्ही तसे होतां. हत्तीनें सिंह पाहिल्याबरोबर त्याची जशी स्थिति होते तसे तुम्ही राक्षसांना भासलां. देव हे काळाला महाकाळ दिसतात व यशोदेला तोच देव तान्हें मूल दिसलें ३. असंख्य वर्णन करितात परंतु त्या श्रीहरीच्या महिमेचा कोणाला पार लागत नाहीं. हरि हे सगुण आहेत कीं निर्गुण आहेत, ह्याचा विचार करून निश्चय करण्यांत सहा शास्त्रें व अठरा पुराणें ह्यांची पांगापांग झाली. तो देव गौळ्यांच्या मुलांबरोबर गाईंचे कळप राखीत आहे ४. तेहतीस कोटि देव व ब्रह्मा, विष्णु, महेश या तिन्ही देवांहून जो श्रेष्ठ आहे, ज्याचे चरण पाताळामध्यें असून स्वर्गामध्यें मुगुट आहे व अधोर्ध्व चवदा भुवनें जरी त्यानें गिळून टाकलीं तरी त्याचें पोट भरत नाहीं, तोच देव गोपाळांचें उच्छिष्ट खाऊन तृप्त झाला ५. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, श्रीहरीचें माहात्म्य वर्णन करावें तर जेथें वेदांची पांगापांग झाली, शेष हा स्तुति करूं लागला परंतु त्याच्या जिव्हा फाटल्या. एका भावावांचून हरीच्या ठिकाणीं कोणतीहि युक्ति चालत नाहीं, म्हणून मज शरणागताचें रक्षण कर अशी मी तुला विनंति करीत आहें ६. [४१३३]

हे रामा, तूं परमानंदस्वरूप आहेस. क्षराक्षर ह्या उभय पुरुषांपलीकडील उत्तम पुरुष आहेस व तूं च्युतिरहित असा अच्युत आहेस आणि अनंत (मर्यादारहित), हरि (सर्व उपाधींचें हरण करणारा), मेघःशाम (मेघासारखी ज्याची श्याम तनु आहे असा) व अविनाश आहेस व लक्षांत न येण्यासारखा असा अलक्ष आहेस. सर्व उपाधींच्या पलीकडील असा परब्रह्म आहेस. अकलकला (ज्याचें कृत्य न समजण्यासारखें आहे असा) व कमलापति (जो लक्ष्मीचा पति) ज्याचें माहात्म्य कळत नाहीं १. अहो जी श्रीपति, तुम्ही सर्वोत्कर्षानें वर्तन करा (अशी मी त्रिवार प्रार्थना करतों). तुम्ही मंगलरूप असून शुभदान करणारे आहांत, म्हणून तुम्हांला मी प्रीतीनें ओंवाळीन २. तूं सकल इंद्रियांचा जाणता व रक्षण करणारा आहेस व गोकुळ ग्रामाला रक्षीत आहेस. गोवर्धन पर्वत करांगुलीवर धारण करणारा व भवसमुद्र हेंच कोणी एक दहीं तें मंथन करून (घुसळून) लोकांना तारणारा आहेस, तूं मधु-कैटभ दैत्यांचा वध करणारा व मननशीलांचें जीवन असून पृथ्वीचे श्रम हरण करणारा आहेस. गरीब लोकांना कृपालु व सर्वांचें मूळभूत तूंच असून सर्वोत्कर्षाचा ठेवा आहेस ३. विश्वाचें पोषण करणारा व संपूर्ण विश्वामध्यें श्रेष्ठ ईश्वर असून जगताचा उद्धार करणारा आहेस आणि सुदर्शन धारण करून गजेंद्राचें रक्षण करणारा (पावन करणारा) असा तूं करुणाकर आहेस. सकल सुगुणांचा तूं समुद्र असून सकळ शूरांमध्यें मुगुटमणि आहेस व कल्याणरूप कैवल्यमूर्ति तूं असून पाहाणारांचें

नारायणा ध्याना सुरवरहरगौरी । नंदानंदन वंदन त्रिभुवनाभीतरीं । अनंतनामीं ठसा अवतारांवरी ॥ ५ ॥ सगुणनिर्गुणसाक्ष श्रीमंत संतां । भगवाना भगवंता कालकृतांता । उत्पत्तिपालनापासून संहारणसत्ता । शरण तुकयाबंधु तारीं रीती बहुतां ॥ ६ ॥ [४१३४]

पंढरी पुण्यभूमी भीमा दक्षिणवाहिनी । तीर्थ हें चंद्रभागा महा पातकां धुनी । उतरलें वैकुंठ महासुख मेदिनीं ॥ १ ॥ जय देवा पांडुरंगा जय अनाथनाथा । आरती ओंवाळीन तुम्हां लक्ष्मीकांता ॥ २ ॥ नित्य नवा सोहळा हो महावाद्यांचा गजर । सन्मुख गरुड पारीं उभा जोडुनियां कर । मंडित चतुर्भुज कटीं मिरवती कर ॥ ३ ॥ हरिनामकीर्तन हो आनंद महाद्वारीं । नाचती प्रेमसुखें नर तेर्थींच्या नारी । जीवन्मुक्त लोक नित्य पाहाती हरी ॥ ४ ॥ आषाढी कार्तिकी हो गरुडटकयांचे भार । गर्जती नामघोष महावैष्णववीर । पापासी रीग नाहीं असुर कांपती सुर ॥ ५ ॥ हें सुख पुंडलिकें कैसें आणिलें बापें । निर्गुण साकारलें आम्हांलागिं हें सोपें । म्हणोनि चरण धरोनी तुका राहिला सुखें ॥ ६ ॥ [४१३५]

अवतार गोकुळीं हो जन तारावयासी । लावण्यरूपडें हें तेजःपुंजाळरासी । उगवतां कोटि बिंबें रवि लोपले शशी । उत्साह सुरवरां मही थोर मानसीं ॥ १ ॥ जय देवा कृष्णनाथा जय रखुमाईकांता (रुक्मिणीकांता) । आरती ओंवाळीन तुम्हां देवकीसुता । जय देवा कृष्णनाथा ॥ २ ॥ वसुदेव-देवकीची बंद फोडिली शाळ । होउनी विश्वजनिता तयां पोटींचा बाळ । दैत्य हे त्रासियेले समूळ

मन हरण करणारा आहेस ४. तुझें वाहन गरुड आहे व शेषावर तूं शयन करणारा आहेस व नर आणि सिंहाकृति रूप तूं धरलेंस म्हणून तुझें नांव नरहरि आहे. तुझें स्थान पाण्यामध्यें आहे म्हणून तुझें नांव नारायण आहे, त्या तुझें ध्यान तेहतीस कोटि देव व महादेव आणि पार्वती करितात. तूं नंदगौळ्याचा पुत्र होऊन त्रिभुवनांत वंद्य असा झालास. ह्याप्रमाणें अगणित नामाचा डांगोरा प्रत्येक अवतारावर झाला आहे ५. तुकाराम महाराजांचे बंधु म्हणतात, तूं सगुण आणि निर्गुण ह्यांचा साक्षी असून सकल ऐश्वर्यवंत आहेस आणि सकळ ऐश्वर्यवान् तूं भगवंत आहेस आणि तूं असा काळ कृतांत आहेस, कीं सकळ ब्रह्मांड उत्पन्न करून त्याचें पाळण व प्रळयकाळीं नाश करण्याची सत्ता सर्व तुझी आहे. म्हणून मी तुला शरण आलों आहें, तर बहुत प्रकारानें माझा तूं उद्धार कर ६. [४१३४]

पंढरी हें धर्मक्षेत्र व तेथील भूमि पुण्यरूप आहे आणि तेथें भीमा हें तीर्थ दक्षिणमुख वाहात असून चंद्राकृति असल्यामुळें तीस चंद्रभागा म्हणतात. त्या ठिकाणीं जे स्नान करतील त्यांच्या पातकांचा नाश होईल. असें हें श्रेष्ठ सुखाचें वैकुंठ ह्या पृथ्वीवर उतरलें आहे १. अहो देवा पांडुरंगा, तुम्ही सर्वोत्कर्षानें वर्तन करा (असें द्विवार विनवितों) व तुम्ही अनाथ जीवांचे रक्षणकर्ते आहांत आणि तुम्ही लक्ष्मीचे भ्रतार आहांत म्हणून मी तुम्हांला प्रीतीनें ओंवाळीन २. ह्या ठिकाणीं नित्य नवा उत्साह होत असून श्रेष्ठ वाद्यांचे गजर होतात आणि समोरचे पारावर गरुड हात जोडून उभा आहे आणि तुम्ही शोभिवंत चतुर्भुज असून दोन हात कमरेवर ठेविले आहेत ते शोभतात ३. महाद्वाराचे ठिकाणीं वैष्णव हे महदानंदानें हरिनामकीर्तन करितात त्या ठिकाणीं प्रेमसुखानें नर आणि नारी नृत्य करितात. ते सर्व अविनाश हरीला सर्व काळ पाहातात म्हणून ते लोक जिवंत असून मुक्त आहेत ४. आषाढीचे व कार्तिकीचे यात्रेस महा वैष्णवांचे समुदाय गरुडटके (गरुडचिन्हांकित ध्वज) व पताका घेऊन येतात. ते वैष्णववीर हरिनामाची गर्जना करितात. त्या ठिकाणीं पातकाचा रिघाव होत नाहीं व त्यांना पाहून सुरासुर थरथरां कांपतात ५. तुकाराम महाराज म्हणतात, असें सुख माझा बाप पुंडलीकराय त्यानें कसें आणलें आहे तें पाहा. जें निराकार होतें तें आम्हांकरितां साकार रूप सुलभ असें उभें राहिलें आहे, म्हणून मी सुखानें त्याचे पाय धरून राहिलों आहें ६. [४१३५]

प्रभूंनीं जडमूढांचा उद्धार करण्याकरितां गोकुळांत अवतार घेतला. तें रूप अति सुंदर असून तेजाची केवळ रासच आहे. कोट्यवधि सूर्य उगवले तरी त्या तेजांत नाहींसे होतात व कोट्यवधि चंद्र उगवले तरीहि त्या तेजांत नाहींसे होतात. कृष्णावतारामुळें देवादिकांना आनंद होतो व देवांच्या मनांत पृथ्वींत न मावण्यासारखा आनंद होतो १. हे कृष्णनाथा देवा, रखुमाईच्या पति, तूं सर्वोत्कर्षानें वर्तन कर (अशी मी त्रिवार प्रार्थना करतों). हे देवकीपुत्रा श्रीकृष्णस्वामी, तुला मी प्रीतीनें ओंवाळीन २. कारागृहांत असतांना वसुदेवदेवकीला बंदींतून मुक्त केलेंत व आपण स्वतः विश्वाला निर्माण करणारे असून त्यांच्या पोटीं जन्म घेऊन मूल बनलांत व दैत्यांना अतिशय जर्जर करून कंसाचा तर

कंसासी काळ । राज्या उग्रसेना केला मथुरापाळ ॥ ३ ॥ राखतां गोधनें हो इंद्र कोपला भारी । मेघ जो कडाडिला वर्षतां धारीं । राखिलें गोकुळ हें नखीं धरिला गिरी । निर्भय लोकपाळ अवतरले हरी ॥ ४ ॥ कौतुक पाहावया माव ब्रह्मयानें केली । वत्सेंही चोरुनियां सत्यलोकासी नेलीं । गोपाळ गाईवत्सें दोहीं ठायीं राखीलीं । सुखाचा प्रेमसिंधु अनाथांची माउली ॥ ५ ॥ तारिलें भक्तजनां दैत्य निर्दाळूनि । पांडवां साहकारी आडल्या निर्वाणीं । गुण मी काय वर्णूं मति केवढा वाणी । विनविती दास तुका ठाव मागे चरणीं ॥ ६ ॥ [४१३६]

सुंदर अंगकांती मुख भाळ सुरेख । बाणली उटी अंगीं टिळा साजिरा रेख । मस्तकीं मुगुट कानीं कुंडलें तेज फांके । आरक्त दंत हिरे कैसे शोभले निके ॥ १ ॥ जय देवा चतुर्भुजा जय लावण्यतेजा । आरती ओंवाळीन भवतारिया हा वोजा ॥ २ ॥ उदार जुंझार हा जया वाणिती श्रुति । परतल्या नेति म्हणती तयां न कळे गति । भाट हा चतुर्मुखें अनुवाद करिती । पांगलीं साही अठरा रूप न कळे गति । ॥ ३ ॥ ऐकोनी रूप ऐसें तुजलागीं धुंडिती । बोडके नग्न एक निराहार यति । साधनें योग नाना तपें दारुण किती । सांडिलें सुख दिलें संसाराचिया शांती (संसाराची त्या शांती) ॥ ४ ॥ भरूनि माजी लोकां तिहीं नांदसी एक । कामिनीमनमोहना रूप नाम अनेक । नासती नामपात्रें भवपातकें शोक । पाउलें वंदिताती सिद्ध आणि साधक ॥ ५ ॥ उपमा द्यावयासी दुजें काय हें तुज । तत्त्वासी तत्त्वसार मूळ झालासी बीज । खेळसी बाळलीला अवतार सहज । विनविती दास तुका कर जोडुनी तुज ॥ ६ ॥ [४१३७]

सुकुमार मुखकमळ निजसारनिर्मळ । सांवळी सुनीळ तनु भ्रमरांग कुरळ । झळकति दिव्य

समूळ काळ झालांत आणि उग्रसेनाला राज्य देऊन मथुरेच्या गादीवर बसविलें ३. वनांत गाई रक्षण करीत असतांना इंद्रानें अतिशय रागानें मेघाला आज्ञा केली त्या योगानें तो मेघ मोठ्यानें कडाडून दगडांप्रमाणें धारा वर्षूं लागला. त्या वेळेस गोवर्धन पर्वत श्रीहरीनें नखाग्रीं धारण करून सर्वांचें (गोकुळवासी जनांचें) रक्षण केलें. हरि हे साक्षात् गोकुळामध्यें अवतरलेले जाणून सर्व लोक निर्भय झाले ४. प्रभूचें कौतुक पाहाण्याकरितां ब्रह्मदेवानें कांहीं माया प्रगट केली व गाईंचीं वासरें चोरून ब्रह्मलोकास नेलीं. त्या वेळीं श्रीहरीनें गोपाळ, गाई, वासरें आपण होऊन दोन्ही ठिकाणीं आपणच रक्षण केलें. प्रेमसुखाचा तर प्रभु समुद्र असून अनाथ जीवांची तर तो आई आहे ५. तुकाराम महाराज म्हणतात, दैत्यांचा नाश करून भक्तांचा ज्यानें प्रतिपाळ केला व निर्वाण प्रसंगीं पांडवांना साह्य केलें त्याचे गुण मी काय वर्णन करूं ? माझी ती बुद्धि केवढी ? मी यथामति वर्णन केलें. आपल्या चरणांपाशीं मला ठाव मिळावा एवढी माझी दासाची विनंति आहे ६. [४१३६]

श्रीहरीची अंगकांति सुंदर असून मुख व कपाळ सुरेख आहे. सर्वांगाला चंदनाची उटी लावली आहे व कपाळीं सुंदर कस्तुरीचा टिळा लाविला आहे. मस्तकावर मुगुट व कानांत कुंडलें असून त्यांचें तेज फांकत आहे. दांत हिऱ्यासारखे चमकणारे असून त्यांच्यावर आरक्ततेची छाया आहे. अशा प्रकारचे ते दांत सुशोभित आहेत १. हे चतुर्भुज देवा, तुम्ही सर्वोत्कर्षानें वर्तन करा (अशी मी द्विवार प्रार्थना करतों). तुमचें तेज अति सुंदर आहे. तुम्हांला मी परम प्रीतीनें ओंवाळीन. ह्या संसारसागरांतून तुम्ही आम्हांला व्यवस्थित रीतीनें तारा २. हा देव उदार आणि मोठा योद्धा आहे. ज्या देवाचें वर्णन श्रुति करते; पण तिनें निषेधरूपानें हें नाहीं तें नाहीं असें म्हणून स्वरूपाच्या ठिकाणीं मौन धरून ती परतली. चारी मुखांनीं वर्णन करणारे ब्रह्मदेव हे भाट झाले. सहा शास्त्रें व अठरा पुराणें ह्यांचा हरिस्वरूपीं कांहीं प्रवेश न झाल्यामुळें त्यांची पांगापांग झाली ३. अशा प्रकारचें तुझें स्वरूप ऐकून मी तुझा शोध करीत आहें. कितीएक बोडके (मुंडलेले), नग्न (नागवे), निराहारी व संन्यासी आहेत. नाना प्रकारचीं योगादिसाधनें व मोठीं कठिण तपें कितीएक करतात. कित्येकांनीं संसारसुखाचा त्याग करून संसार नाहींसा केला ४. त्रैलोक्याच्या अंतर्बाह्य तूं व्यापून राहिला आहेस. हे गोपिकांचें मन मोहित करणाऱ्या व अनेक नामरूपांनीं असणाऱ्या, संसारांतील पातकें व शोक तुझ्या नामचिंतनमात्रेंकरून नाहींसे होतात. तुमच्या चरणांचें सिद्ध आणि साधक हे वर्णन करीत आहेत ५. तुकाराम महाराज म्हणतात, तुला उपमा देण्यासारखें असें दुसरें काय आहे ? तत्त्वांचें सारभूत तत्त्व जें मूळबीज तें तूंच झाला आहेस. अवतार घेऊन सहज बाळलीलेनें तुम्ही क्रीडा करितां, त्या तुमचा दास मी हात जोडून विनंति करीत आहें ६. [४१३७]

मुखकमल हें सुकुमार असून स्वरूप फार निर्मळ आहे व उत्तम श्यामतनु असून केश कुरळे आहेत व दांत

तेजें दंत माज पातळ। मिरवलीं मयूरपत्रें मुगुट कुंडलें माळ ॥ १ ॥ जय देवा जगदीश्वरा। धन्य रखुमाईवरा। आरती करीन काया। ओवाळीन सुंदरा ॥ २ ॥ गोजिरें ठाणमाण भुजा मंडित चारी। शोभती शंख चक्र गदा पद्म मोहरी। हृदयीं ब्रह्मपद बाणलें शृंगारीं। गर्जती चरणीं वांकी कंठ कोकिळ स्वरीं ॥ ३ ॥ घवघवित उटी अंगीं बावन चंदनाची। ललाटीं कस्तुरीचा कांस पितांबराची। कटिसूत्र वरि साजिरें प्रभा वर मोतियांची। संगीत सकळ मुद्रा पाउलें कुंकुमाचीं ॥ ४ ॥ सौभाग्यसुखसागर गुणलावण्यखाणी। लाघवी दीनवत्सल विश्व लाविलें ध्यानीं। आश्चर्य देव करिती ऋषि राहिले मुनि। धन्य ते प्रसवली ऐसिया नंदपत्नी ॥ ५ ॥ वर्णितां ध्यान महिमा श्रुति राहिल्या नेति। रविकोटि चंद्र तारा प्रकाशा न तुळती। उदार सुर गंभीर पूर्ण आनंदमूर्ति। तुकयाबंधु म्हणे स्तवूं मी काय किती ॥ ६ ॥ [४१३८]

गाऊं वाणूं तुज विठो तुझा करूं अनुवाद। जिकडे पाहें तिकडे सर्वमय गोविंद ॥ १ ॥ आनंद रे विठोबा झाला माझे मनीं। देखिलीं लोचनीं विटेसहित पाउलें ॥ २ ॥ न करीं तपसाधनें रे मुक्तीचे सायास। हाचि जन्मोजन्मीं गोड भक्तीचा रस ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हां प्रेमा उणें तें काई। पंढरीचा राणा सांठविला हृदयीं ॥ ४ ॥ [४१३९]

धन्य दिवस आजी दर्शन संतांचें। नांदे तयां घरीं दैवत पंढरीचें ॥ १ ॥ धन्य पुण्यरूप कैसा जाला संसार। देव आणि भक्त दुजा नाहीं विचार ॥ २ ॥ धन्य पूर्व पुण्य वोढवलें निरुतें। संतांचें दर्शन झालें भाग्यें बहुतें ॥ ३ ॥ तुका म्हणे धन्य आम्हां जोडली जोडी। संतांचे चरण आतां जीवें न सोडीं ॥ ४ ॥ [४१४०]

चमकत आहेत आणि कमर बारीक आहे. मुगुटावर मोरांचीं पिसें शोभत आहेत व कानांमध्यें कुंडलें व गळ्यामध्यें माळ शोभत आहे १. हे जगदीश्वरा देवा, तूं सर्वोत्कर्षानें वर्तन कर (अशी प्रार्थना करतों). तुझ्या सुंदर स्वरूपावरून मी आपली काया परम प्रीतीनें ओंवाळीन २. तुमची स्वरूपाकृति ही गोजिरी असून चार हातांनीं युक्त आहे व त्यांतून शंख, चक्र, गदा व पद्म हीं आयुधें शोभत असून हातांत मुरलीही आहे आणि हृदयावर श्रीवत्सलांछनाची शोभा आहे. पायांमध्यें वाळे वाजत असून कंठ कोकिळाचे स्वराप्रमाणें मंजुळ आहे ३. सर्व अंगावर उत्तम बावन चंदनाची ढळढळीत उटी आहे. कपाळावर कस्तुरीचा टिळक असून पीतांबराची कांस घालून कडदोराही सुंदर आहे. त्याच्यावर मोत्यासारखें तेज आहे. सर्व चिन्हांनीं युक्त अशीं आरक्त पावलें आहेत ४. सौभाग्यसुखाचा समुद्र असून गुण व लावण्याचें स्वरूप ह्यांची केवळ खाण आहे. हा लाघवी देव दीनांवर दया करणारा असून ह्यानें आपल्या ध्यानाकडे सर्व विश्व लावलें. इंद्रादि देव व ऋषि व मुनि हे आश्चर्य करीत राहिले. आतां ह्या श्रीहरीला जिनें जन्म दिला ती नंदाची बायको धन्य होय ५. तुकाराम महाराज म्हणतात, अशा ह्या ध्यानाचें माहात्म्य वर्णन करतां करतां श्रुतिहि 'हें नाहीं, तें नाहीं' म्हणून स्तब्ध राहिल्या. कोट्यवधि रवि व चंद्र आणि तारे हे त्याच्या प्रकाशाची बरोबरी करूं शकत नाहींत. देव हा आनंदरूप असून उदार आणि पूर्ण गंभीर आहे. त्याचें मी यःकश्चितानें वर्णन किती करावें ? ६. [४१३८]

हे विठोबा, तुझे गुणानुवाद गाऊं व त्याच छंदामध्यें नाचूं व वेळोवेळीं त्याचाच अनुवाद करूं, कारण जिकडे पाहावें तिकडे सर्व गोविंदानें व्यापलें असें भासत आहे १. अरे विठोबा, विटेसहवर्तमान मीं तुझीं पावलें पाहिल्यानें माझ्या मनास आनंद झाला आहे २. तपादि अनेक साधनें मी करणार नाहीं व ज्यायोगेंकरून मृत्यु प्राप्त होतो तेंहि करणार नाहीं. जन्मोजन्मीं तुझ्या भक्तीचा रस सेवन करणें हेंच मला प्रिय आहे ३. तुकाराम महाराज म्हणतात, पंढरीचा राजा आम्हीं हृदयांत सांठविल्यामुळें आतां आम्हांला भक्तिप्रेमाचें काय कारण आहे ? ४. [४१३९]

संतदर्शन झाल्यामुळें आजचा दिवस धन्य आहे, कारण त्यांच्या घरीं पंढरीचें दैवत पांडुरंग वास करीत आहे १. त्यांचा संसार धन्य आहे परंतु पुण्यरूप आहे. देव आणि भक्त ह्यांच्यामध्यें दुसरा विचार नाहीं २. पूर्वीचें यथार्थ पुण्य फलोन्मुख झालें म्हणून तें धन्य आहे. त्यायोगानें म्हणजे बहुत भाग्यानें संतांचें दर्शन झालें ३. तुकाराम महाराज म्हणतात, संतांच्या चरणांची प्राप्ति आम्हांस झाली हें भाग्य आहे, म्हणून त्यांच्या चरणांना सोडून घटकाभर देखील मी दूर राहाणार नाहीं ४. [४१४०]

मागणें तें एक तुजप्रति आहे। देशी तरि पाहें पांडुरंगा ॥ १ ॥ या संतांसी निरवीं हेंचि मज देई। आणिक दुजें कांहीं न मागें तुज ॥ २ ॥ तुका म्हणे आतां उदार तूं होई। मज ठेवीं पायीं संतांचियां ॥ ३ ॥ [४१४१]

: श्री निळोबारायांचे अभंग :

नाम वाचे श्रवणीं कीर्ति। पाउलें चित्तीं समान ॥ १ ॥ काळ सार्थक केला त्यांनीं। धरिला मनीं विठ्ठल ॥ २ ॥ कीर्तनाचा समारंभ। निर्दंभ सर्वदा ॥ ३ ॥ निळा म्हणे स्वरूप सिद्धी। नित्य समाधी हरीनामीं ॥ ४ ॥ [४१४२]

संदेह गमला। रेडा कैसा बोलविला ॥ १ ॥ सांगा देव कां न होती। निर्जीव चालविली भिंति ॥ २ ॥ कोरडे कागद। उदकीं लागों नेदी बुंद ॥ ३ ॥ निळा म्हणे बरा। द्यावा संतांपायीं थारा ॥ ४ ॥ [४१४३]

: रामेश्वर भट्ट ह्यांचे अभंग :

पंडित वैदिक अथवा दशग्रंथी। परी सरी न पवती तुकयाची ॥ १ ॥ शास्त्रही पुराणें गीता नित्य नेम। वाचिताती वर्म न कळे त्यांसी ॥ २ ॥ कर्म–अभिमानें वर्ण–अभिमानें। नाडले ब्राह्मण कलियुगीं ॥ ३ ॥ तैसा नव्हे तुका वाणी व्यवसाई। भाव त्याचा पायीं विठोबाचे ॥ ४ ॥ अमृताची वाणी वरुषला शुद्ध। करी त्या अशुद्ध ऐसा कोण ॥ ५ ॥ चहूं वेदांचें हें केलें विवरण। अर्थही गहन करूनिया ॥ ६ ॥ उत्तम मध्यम कनिष्ठ वेगळे। करूनि निराळे ठेविले ते ॥ ७ ॥ भक्तिज्ञानें आणि वैराग्यें आगळा। ऐसा नाहीं डोळां देखियेला ॥ ८ ॥ जपतप यज्ञ लाजविलीं दानें। हरीनाम कीर्तन करूनियां ॥ ९ ॥ मागें कवीश्वर झाले थोर थोर। नेलें कलेवर कोणें सांगा ॥ १० ॥ म्हणे रामेश्वर सकळां पुसोनि। गेला तो विमानीं बैसोनियां ॥ ११ ॥ [४१४४]

माझी मज आली रोकडी प्रचीत। होऊनि फजित दुःख पावें ॥ १ ॥ कांहीं द्वेष त्याचा करितां अंतरीं। व्यथा या शरीरीं बहुत झाली ॥ २ ॥ ज्ञानेश्वरें मज केला उपकार। स्वप्नीं सविस्तर सांगितलें ॥ ३ ॥ तुका सर्वां श्रेष्ठ प्रिय आम्हां थोर। कां जो अवतार नामयाचा ॥ ४ ॥ त्याची तुज कांहीं घडली रे निंदा। म्हणूनि हे बाधा जडली तुज ॥ ५ ॥ आतां एक करीं सांगेन तें तुला। शरण जाई त्याला निश्चयेंसी ॥ ६ ॥ दर्शनेंचि तुझ्या दोषा परिहार। होय तो विचार सांगितला ॥ ७ ॥ तोचि हा विश्वास धरोनि मानसीं। जाय कीर्तनासी नित्यकाळ ॥ ८ ॥ म्हणे रामेश्वर त्याच्या समागमें। झालें हें आराम देह माझें ॥ ९ ॥ [४१४५]

वैष्णवांची याती वाणी जो आपण। भोगी तो पतन कुंभपाकीं ॥ १ ॥ ऐशी वेदश्रुति बोलती पुराणें। नाहीं तीं दूषणें हरीभक्तां ॥ २ ॥ उंच निंच वर्ण न म्हणावा कोणी। जे कां नारायणीं प्रिय झाले ॥ ३ ॥ चहूं वर्णांशीं हा असे अधिकार। करितां नमस्कार दोष नाहीं ॥ ४ ॥ जैसा शालिग्राम न म्हणावा पाषाण। होय पूज्यमान सर्वत्रांसी ॥ ५ ॥ गुरु परब्रह्म देवाचा तो देव। त्यासी तों मानव म्हणूं नये ॥ ६ ॥ म्हणे रामेश्वर नामीं जे रंगले। स्वयेंचि ते झाले देवरूप ॥ ७ ॥ [४१४६]

हे पांडुरंगा, तुझ्याजवळ आम्हांला कांहींएक मागावयाचें आहे तें देशील तर पाहा १. ह्या संतांच्या स्वाधीन तूं मला कर हीच देणगी दे. ह्यावांचून मी दुसरें कांहीं तुजजवळ मागत नाहीं २. तुकाराम महाराज म्हणतात, हें देण्याविषयीं तूं उदार हो आणि मला संतांच्या चरणीं ठेव ३. [४१४१]


भक्त भागवत जीवन्मुक्त संत। महिमा अत्यद्भुत चराचरीं ॥१॥ ऐसिया अनंता माजी तूं अनंत लीलावेश होत जगत्राता ॥ २ ॥ ब्रह्मानंद तुकें तुळे आला तुका । तो हा विश्वसखा क्रीडे जनीं ॥ ३ ॥ शास्त्र शिष्टाचार अविरुद्ध क्रिया। तुझी भक्तराया देखियेली ॥ ४ ॥ देऊनि तिळांजळी काम्यनिषिद्धासी। विधिविणें योगेशीं ब्रह्मार्पण ॥ ५ ॥ संतग्रहमेळीं जगधंद्या (जगदांध्या) गिळी । पैल उदयाचळीं भानु तुका ॥ ६ ॥ संतवृंदें तीर्थ गौतमी हरिकथा। तुकया नरसिंहस्था भेटों आली ॥ ७ ॥ शांति पतिव्रते झालें परिनयन (परिणयन) । काम संतर्पण निष्कामता ॥ ८ ॥ क्षमा क्षमापणें प्रसिद्ध या जगीं । तें तो तुझ्या अंगीं मूर्तिमंत ॥ ९ ॥ दया दीननाथा तुवां जीवविली। विश्वीं विस्तारली कीर्ति तुझी ॥ १० ॥ वेदवाक्य बाहो उभारिला हात (ध्वज) । पूजिलें देवद्विज सर्व भूतें (सर्वभावें) ॥ ११ ॥ अधर्म क्षयव्याधि धर्माशीं स्पर्शला। तो त्वां उपचारिला अनन्य भक्ति ॥ १२ ॥ ब्रह्मऐक्यभावें भक्ति विस्तारली। वाक्यें सफळ केलीं वेदविहितें ॥ १३ ॥ देहबुद्धि जात्या अभिमानें वंचलों । तो मी उपेक्षिलों न पाहिजे ॥ १४ ॥ न घडो याचे पायीं बुद्धीचा व्यभिचार । मागे रामेश्वर रामचंद्र ॥ १५ ॥ [४१४७]

: निळोबाकृत तुकाराममहाराजांची आरती :

प्रपंचरचना सर्वही भोगुनि त्यागिली। अनुतापाचे ज्वाळीं देह बुद्धि हविली । वैराग्याची निष्ठा प्रगटुनि दाखविली । अहंता ममता दवडुनि निजशांति वरिली ॥ १ ॥ जय जय जी सद्गुरू स्वामी तुकया दातारा । तारक तूं सकळांचा जीवलग सोयरा ॥ ध्रु० ॥ हरिभक्तीचा महिमा विशेष वाढविला। विरक्ति ज्ञानाचा ठेवा उघडुनि दाखविला । जगदोद्धारालागीं उपाय सुचविला । निंदक दुर्जनांचा संदेह निरसिला ॥ जय० ॥ २ ॥ तेरा दिवस वह्या रक्षुनियां उदकीं । कोरड्याचि काढूनि दाखविल्या शेखीं । अपार कविता शक्ति मिरवुनि विधि अंकीं । कीर्तन श्रवणें तुमच्या तरिजे जन लोकीं ॥ जय० ॥ ३ ॥ बाळवेष घेऊनि श्रीहरि भेटला । विधिचा जनिता तूंचि आठव हा दिधला। तेणें ब्रह्मानंदें प्रेमा रूढविला । न तुके म्हणूनि तुका नामें गौरविला ॥ जय० ॥ ४ ॥ प्रयाणकाळीं देवें विमान पाठविलें। कलिच्या काळामाजी अद्‌भुत वर्तविलें। मानवदेह घेऊनि निजधामा गेले । निळा म्हणे सकळां संतां तोषविलें। जय जय जी सद्‌गुरु तुकया दातारा ॥ तारक० ॥ ५ ॥ [४१४८]

: रामेश्वर भट्टकृत तुकाराम महाराजांची आरती :

आरती तुकारामा । स्वामि सद्गुरुधामा। सच्चिदानंद मूर्ति। पाय दाखवीं आम्हां ॥ १ ॥ आरती० ॥ राघवें सागरांत । पाषाण तारिले । तैसे हे तुकोबाचे । अभंग रक्षिले ॥ २ ॥ आरती० ॥ तुकितां तुळणेसी । ब्रह्म तुकासी आलें । म्हणोनि रामेश्वरें । चरणीं मस्तक ठेविलें ॥ ३ ॥ आरती० ॥ [४१४९]



॥ पुंडलीक वरदा हरि विठ्ठल ॥

क्षेपक अभंग*

ज्यां जैसी आवडी त्यां तैसा विभाग। देत पांडुरंग तृप्ति झाली ॥ १ ॥ मुखींचें उच्छिष्ट हिरोनियां खातां। विस्मित विधाता देखोनियां ॥ २ ॥ दिलें जें गोपाळां तें नाहीं कोणासी। विस्मित मानसीं सुरवर ॥ ३ ॥ देव ऋषि मुनि सिद्ध हे चारण। शिव मरुद्गण चंद्र सूर्य ॥ ४ ॥ तुका म्हणे आले सकळही सुरवर। आनंदें निर्भर पाहावया ॥ ५ ॥ [१]

सद्गुरूनें मज आशीर्वाद दिला। हरुष भरला हृदयीं माझे ॥ १ ॥ हृदयींचा भाव कळला गुरूसी। आनंदउल्हासीं बोले मज ॥ २ ॥ बोले मज गुरु कृपा तो करूनि। तुका म्हणे मनीं आनंदलों ॥ ३ ॥ [२]

सद्गुरुवांचूनि प्रेतरूप वाणी। बोलती पुराणीं व्यासऋषि ॥ १ ॥ म्हणोनि तयाचें पाहूं नये तोंड। निगुरा अखंड सुतकाळा ॥ २ ॥ कोणेपरी तया नव्हेचि सुटका। देह त्याचा लटिका जाणा तुम्ही ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसीं बोलती पुराणें। संतांचीं वचनें मागिलीं हो ॥ ४ ॥ [३

समर्थाचे सेवे बहु असे हित। विचार हृदयांत करुनी पाहें ॥ १ ॥ वरकडा ऐसा नव्हे हा समर्थ। क्षणेंचि घडित सृष्टि नासे ॥ २ ॥ ज्याची कृपा होतां आपणा ऐसें करी। उरों नेदी उरी दारिद्र्याची ॥ ३ ॥ ऐशालागीं मन वोळगे अहर्निशीं। तेणें वंद्य होशी ब्रह्मादिकां ॥ ४ ॥ तुका म्हणे हेंचि आहे पैं मुद्दल। सत्य माझा बोल हाचि माना ॥ ५ ॥ [४]

समश्रुळित असतां वाचा। घोष न करिसी कां नामाचा ॥ १ ॥ कां रे वैष्णव नव्हेसी। कवण्या दंभें नागवलासी ॥ २ ॥ हरि हरि म्हणतां लाजसी। गर्वे फुगोनी चालसी ॥ ३ ॥ तारुण्यें उताणा। पुंसेविण बांडा सुना ॥ ४ ॥ जालेंसि महिमेचें वेडें। नाचों लाजसी दिंडीपुढें ॥ ५ ॥ अळंकारांच्यानि बळें। वेंचलासी तुळसीमाळें ॥ ६ ॥ कैसा सकुमार जालासी। म्हणसी न टकें एकादशी ॥ ७ ॥ स्नान न करिसी आंघोळी। विभूति न लाविसी कपाळीं ॥ ८ ॥ वरिवरि न्याहाळिसी त्वचा। उपयोग नाहीं मांसाचा ॥ ९ ॥ पद्मनाभी विश्वनाथ। तुका अझून रडत ॥ १० ॥ [५]

समुद्र हा पिता बंधु हा चंद्रमा। भगिनी ते रमा शंखाचीया ॥ १ ॥ मेहुणा जयाचा द्वारकेचा हरि। शंख दारोदारीं भीक मागे ॥ २ ॥ दृष्ट हें जाणावें आपुलें स्वहित। तुका म्हणे मात ऐसी आहे ॥ ३ ॥ [६]

सर्वांपरी तुझे गुण गा उत्तम। तुझे ठायीं प्रेम राहो माझें ॥ १ ॥ माउलीपरिस आहेसी उदार। तरी कां निष्टुर मन केलें ॥ २ ॥ गजेंद्राकारणें केलें त्वां धावणें। तरी कां निर्वाण पाहातोसी ॥ ३ ॥

---

* हे अभंग श्रीतुकाराम महाराजांचेच आहेत अशाबद्दल मतभेद असून ते विशेष दुर्बोधहि नाहींत म्हणून त्यांचा अर्थ दिला नाहीं.

प्रल्हादा संकटीं रक्षिलें त्वां देवा । तरी कां केशवा सांडी केली ॥ ४ ॥ अन्यायी अजामेळ तो झाला पावन । ऐसें हें पुराण हांका मारी ॥ ५ ॥ तुका म्हणे माझे थोर अपराध । नाम करी छेद क्षणमात्रें ॥ ६ ॥ [७]

खरे आम्हांपाशीं एक शुद्धभाव । नाहीं तरी वाव उपचार ॥ १ ॥ कोण मानी वरी रसाळ बोलणें । नाहीं झाली मनें ओळखी तों ॥ २ ॥ तुका म्हणे आम्हां जाणिवेचें दुःख । न पाहों त्या मुख दुर्जनाचें ॥ ३ ॥ [८]

साही शास्त्रां अति दुरी । तो परमात्मा श्रीहरि । तो दशरथाचे घरीं । क्रीडतो राम ॥ १ ॥ शिवाचें निजध्येय । वाल्मिकाचें निजगुह्य । तो भिल्लटीचीं फळें खाय । श्रीराम तो ॥ २ ॥ योगियांचे मनीं । नातुडे चिंतनीं । तो वानरांचे कानीं । गोष्टी सांगे ॥ ३ ॥ चरणें शिळा उद्धरी । नामें गणिका तारी । तो कोळिया घरीं । पाहुणा राम ॥ ४ ॥ क्षण एक सुरवरां । नातुडे नमस्कारा । तो रिसां आणि वानरां । क्षेम दे राम ॥ ५ ॥ राम सांवळा सगुण । राम योगियांचें ध्यान । राम राजीवलोचन । तुका चरण वंदितो ॥ ६ ॥ [९]

सांग पांडुरंगा मज हा उपाव । जेणें तुझे पाव आतुडती ॥ १ ॥ न कळे हा निर्धार ब्रह्मादिकां पार । कायसा विचार माझा तेथें ॥ २ ॥ तुका म्हणे आतां धरूनियां धीर । राहूं कोठवर मायबापा ॥ ३ ॥ [१०]

सांडियेलें रूप विक्राळ भ्यासुर । झालें सकुमार कोडिसवाणें ॥ १ ॥ श्याम चतुर्भुज मुकुट कुंडलें । सुंदर दंडलें नव बाळ ॥ २ ॥ गोपाळ म्हणती कैसें रे बा कृष्णा । रूप नारायणा धरियेलें ॥ ३ ॥ कैसा वाढलासी विक्राळ झालासी । गटगटा ज्वाळांसी गिळियेलें ॥ ४ ॥ तुका म्हणे भावें पुसती गोपाळ । अनाथवत्सल म्हणोनियां ॥ ५ ॥ [११]

सांवळें सुंदर पाहें दृष्टीभरी । ऐसें कांहीं करीं मन माझें ॥ १ ॥ मना तुज ठाव दिला त्याचे पायीं । राहें विटाबाईसवें सदा ॥ २ ॥ मना नको धरूं आणिकांचा संग । नाहीं पांडुरंग जया मनीं ॥ ३ ॥ वरपंग भाव नको म्हणे तुका । करीं प्राणसखा नारायण ॥ ४ ॥ [१२]

सेकीं हें ना तैसें झालें । बोलणें तितुकें वायां गेलें ॥ १ ॥ स्वयें आपणचि रिता । रडे पुढिलांच्या हिता ॥ २ ॥ सुखसागरीं नेघे वस्ती । अंगीं ज्ञानपणाची मस्ती ॥ ३ ॥ तुका म्हणे गाढव लेखा । जेथें भेटेल तेथें ठोका ॥ ४ ॥ [१३]

सुख वाटे तुझे वर्णितां पवाडे । प्रेम मिठी पडे वदनासी ॥ १ ॥ व्याले दोन्ही पक्षी एका वृक्षावरी । आला दुराचारी पारधी तो ॥ २ ॥ वृक्षाचिया माथां सोडिला ससाणा । धनुष्यासि बाणा लावियेलें ॥ ३ ॥ तये काळीं तुज पक्षी आठविती । धांवें गा श्रीपती मायबापा ॥ ४ ॥ उडोनियां जातां ससाणा मारील । बैसतां विंधील पारधी तो ॥ ५ ॥ ऐकोनियां धांवा तयां पक्षियांचा । धरिला सर्पाचा वेश वेगीं ॥ ६ ॥ डंखोनि पारधी भूमीसी पाडिला । बाण तो लागला ससाण्यासी ॥ ७ ॥ ऐसा तूं कृपाळु आपुलिया दासा । होशील कोंवसा संकटींचा ॥ ८ ॥ तुका म्हणे तुझी कीर्ति त्रिभुवनीं । वेदाचिये वाणी वर्णवेना ॥ ९ ॥ [१४]

गाबाळाचे ग्रंथीं कां रे पडा सदा । मिथ्या भेदवादा वागवितां ॥ १ ॥ संसारगाबाळीं पडसी निखळ । झालासी तूं खळ तेणें मानें ॥ २ ॥ साधनसंकटीं गुंतसी कासया । व्यर्थ गा अपायामाजी गुंती ॥ ३ ॥ निर्मळ फुकाचें नाम गोविंदाचें । अनंतजन्मांचे फेडी मळ ॥ ४ ॥ तुका म्हणे नको करूं कांहीं कष्ट । नाम वाचे स्पष्ट हरि बोलें ॥ ५ ॥ [१५]

गरुडावरी बैसोनि येतो जगजेठी । त्याचे चरणीं मिठी घालूं चला ॥ १ ॥ सांवळें रूपडें देखिलें लोचनीं । शंख चक्र दोन्ही शोभताहे ॥ २ ॥ पीतांबर झळके हेंचि त्याची खूण । वांकी रुणझुण करीताती ॥ ३ ॥ गरुडाचा चपेटा येत असे नेटें । कस्तुरीमळवट शोभताहे ॥ ४ ॥ पदक एकावळी शोभताहे कंठीं । तुका म्हणे मिठी घालूं चला ॥ ५ ॥ [१६]

गव्हांच्या घुगऱ्या । नाचणयांच्या पुऱ्या । बऱ्या त्याचि बऱ्या । पाधाणी त्या पाधाणी ॥ १ ॥ काय थोरपण । वायां जाणावा तो शीण । कारणापें भिन्न । निवडे तें निराळें ॥ २ ॥ रुचि वोजेपाशीं । गरज ते जैशी तैशी । करूं नका नाशी । खावें खाणें झालें तें ॥ ३ ॥ तुका म्हणे मोटा । काय करावा तो ताठा । नाहीं वीण नीटा । पाविजेत मारग ॥ ४ ॥ [१७]

गव्हाराचें ज्ञान अवघा रजोगुण । सुखवासी होऊन विषय भोगी ॥ १ ॥ त्यासी जरी ज्ञानउपदेश केला । संगेंविण त्याला राहावेना ॥ २ ॥ तुका म्हणे संग उत्तम असावा । याविण उपावा काय सांगों ॥ ३ ॥ [१८]

गणेश शारदा करिती गायना । आणि देवांगना रंभे ऐशा ॥ १ ॥ तेथें (आम्हीं) मानवांहीं विनवावें तें काय । सुरवर पाय वंदिती जेथें ॥ २ ॥ ज्याच्या गायनासीं तटस्थ शंकर । त्याहि परि पार न कळे तुझा ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही किंकर ते किती । इंद्राचीहि मति नागविशी ॥ ४ ॥ [१९]

कोण तो उपाव करूं भेटावया । जाळावी हे काया ऐसें वाटे ॥ १ ॥ सोडोनियां गांव जाऊं वनांतरा । रुक्मादेवीवरा पाहावया ॥ २ ॥ करूं उपवास शोधूं हें शरीर । न धरवे धीर नारायणा ॥ ३ ॥ जाती आयुष्याचे दिवस हे चारी । मग केव्हां हरी भेटशील ॥ ४ ॥ तुका म्हणे कांहीं सांगा विचारोनी । विठो तुझे मनीं असेल तें ॥ ५ ॥ [२०]

कोणाही केंडावें हा आम्हां अधर्म । जो जो पावे श्रम तो तो देव ॥ १ ॥ म्हणउनि चित्ता शिकविलें वोजें । आतां हेंचि दुजें न बोलावें ॥ २ ॥ हालविलें जरी परउपकारें । जिव्हे पाप खरें उपाधीचें ॥ ३ ॥ तुका म्हणे जीव प्रारब्धा आधीन । कोण वाहे सीण करुणा शोभे ॥ ४ ॥ [२१]

सद्गुरूचे चरणीं ठेविला मस्तक । देउनियां हस्तक उठविलें ॥ १ ॥ उठविलें मज देउनियां प्रेम । भावार्थें सप्रेम नमस्कारीं ॥ २ ॥ नमस्कारीं त्याला सद्गुरुरायाला । तुका म्हणे बोला नाम वाचे ॥ ३ ॥ [२२]

कोणी निंदा कोणी वंदा । आम्हां स्वहिताचा धंदा ॥ १ ॥ काय तुम्हांसी गरज । आम्ही भजूं पंढरिराज ॥ २ ॥ तुम्हासारिखें चालावें । तेव्हां स्वहिता मुकावें ॥ ३ ॥ तुका म्हणे हो कां कांहीं । गळा दिला विठ्ठलपायीं ॥ ४ ॥ [२३]

कोपोनियां पिता बोले प्रल्हादासी । सांग हृषीकेशी कोठें आहे ॥ १ ॥ येरु म्हणे काष्ठीं पाषाणीं सकळीं । आहे वनमाळी जेथें तेथें ॥ २ ॥ खांबावरी लात मारिली दुर्जनें । खांबीं नारायण म्हणतांचि ॥ ३ ॥ तुका म्हणे कैसा खांब कडाडिला । ब्रह्मा दचकला सत्यलोकीं ॥ ४ ॥ [२४]

कोरडिया गोष्टी नावडती मना । नाहीं ब्रह्मज्ञानाविण चाड ॥ १ ॥ दाखवीं आपुलें सगुण रूपडें । वंदीन मी कोडें पाय तुझे ॥ २ ॥ न लगे तो मोक्ष मज सायुज्यता । नावडे हे वार्ता शून्याकारी ॥ ३ ॥ तुका म्हणे चाड धरीन श्रीमुखें । येशील कवतुकें जवळीक ॥ ४ ॥ [२५]

कृपा करावी भगवंतें । ऐसा शिष्य द्यावा मातें ॥ १ ॥ माझें व्रत जो चालवी । त्यासी द्यावें त्वां पालवी ॥ २ ॥ व्हावा ब्रह्मज्ञानी गुंडा । तिहीं लोकीं ज्याचा झेंडा ॥ ३ ॥ तुका तुका हाका मारी । माझ्या विठोबाच्या द्वारीं ॥ ४ ॥ [२६]

गोपाळ प्रीतीनें कैसे विनविती । विक्राळ श्रीपति होऊं नको ॥ १ ॥ नको रे बा कृष्णा धरूं ऐसें रूप । आम्हां चळकांप सुटलासे ॥ २ ॥ होईं बा धाकुटा श्याम चतुर्भुज । बैसोनियां गुज सुखें बोलों ॥ ३ ॥ वोणव्याच्या रागें गिळिशील आम्हां । तुका मेघश्यामा पायां लागे ॥ ४ ॥ [२७]

चित्त गुंतलें प्रपंचें । झालें वेडें ममतेचें ॥ १ ॥ आतां सोडवीं पांडुरंगा । आलें निवारीं तें अंगा ॥ २ ॥ गुंतली चावटी । नामीं रूपीं झाली तुटी ॥ ३ ॥ तुका म्हणे चाली । पुढें वाट खोळंबली ॥ ४ ॥ [२८]

चाल माझ्या राघो डोंगरीं दिवा लागो ॥ १ ॥ घर केलें दार केलें घरीं नाहीं वरो । सेजारणी पापिणीचीं पांच पोरें मरो ॥ २ ॥ घरीं पांच पोरें तीं मजहुनि आहेत थोरें । पांचांच्या बळें खादलीं बावन केळें ॥ ३ ॥ घर केलें दार केलें दुकान केला मोटा । पाटाची राणी धांगडधिंगा तिचा मोटा ॥ ४ ॥ दुकान केला मोटा तर पदरीं रुका खोटा । हिजडा म्हणसी जोगी तर सोळा सहस्र भोगी । तुका म्हणे वेगीं तर हरि म्हणा जगीं ॥ ५ ॥ [२९]

चारी वेद ज्याची कीर्ति वाखाणिती । प्रत्यक्ष हे मूर्ति विठोबाची ॥ १ ॥ चहूं युगांचें हें साधन साधिलें । अनुभवा आलें आपुलिया ॥ २ ॥ एवढें करूनि आपण निराळा । प्रत्यक्ष हें डोळा दाखविलें ॥ ३ ॥ दावूनि सकळ प्रमाणांच्या युक्ति । जयजयकार करिती अवघे भक्त ॥ ४ ॥ भक्ति नवविधा पावली मूळची । जनार्दन नामाची संख्या झाली ॥ ५ ॥ नवसें ओंव्या आदरें वाचितां । त्याच्या मनोरथा कार्यसिद्धि ॥ ६ ॥ सीमा न करवे आणीकही सुखा । तुका म्हणे देखा पांडुरंगा ॥ ७ ॥ [३०]

चहूंकडूनियां येती ते कल्लोळ । सभोंवते ज्वाळ जवळीं आले ॥ १ ॥ सकुमार मूर्ति श्रीकृष्ण धाकुटी । घोंगडी आणि काठी खांद्यावरी ॥ २ ॥ लहान लेंकरूं होतें तें सगुण । विक्राळ वदन पसरिलें ॥ ३ ॥ जाभाड तें एक गगनीं लागलें । एक तें ठेविलें भूमीवरी ॥ ४ ॥ तये वेळीं अवघे गोपाळही भ्याले । तुकेंही लपालें भिऊनियां ॥ ५ ॥ [३१]

चला वळूं गाई । दूर अंतरल्या भाई ॥ १ ॥ खेळ खेळतां झाला शीण । कोण करी वणवण ॥ २ ॥ गाई हाकारीं कान्हया । म्हणोनि लागती ते पायां ॥ ३ ॥ तुका म्हणे द्यावें । नामसंकीर्तन बरवें ॥ ४ ॥ [३२]

चला आळंदीला जाऊं । ज्ञानदेवा डोळां पाहूं ॥ १ ॥ होतिल संतांचिया भेटी । सुखाचिया सांगों गोष्टी ॥ २ ॥ ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर । मुखीं म्हणतां चुकती फेर ॥ ३ ॥ तुम्हां जन्म नाहीं एक । तुका म्हणे माझी भाक ॥ ४ ॥ [३३]

चलती आड वाटा । आणिका दाविती जे नीटा ॥ १ ॥ न मनीं तयांचे उपकार । नाहीं जोडा तो गव्हार ॥ २ ॥ विष सेवूनि वारी मागें । प्राण जातां जेणें संगें ॥ ३ ॥ बुडतां हाक मारी । ठाव नाहीं आणिकां वारी ॥ ४ ॥ तुका म्हणे न करी हेका । गुण घेऊन अवगुण टाका ॥ ५ ॥ [३४]

चरणीं नमन सद्गुरूच्या पूर्ण । नित्य हरिगुण गाऊं सदा ॥ १ ॥ गोवर्धन जेणें नखीं हो धरिला । काळया नाथिला महाबळी ॥ २ ॥ ऐसे हरिगुण गातों वाचेवरी । पतितासी तारी जनार्दन ॥ ३ ॥ तुका म्हणे हेंचि सज्जना जीवन । वाचेसी स्मरण गोविंदाचें ॥ ४ ॥ [३५]

ग्रासोग्रासीं भाव । तरी देहींच जेवी देव ॥ १ ॥ धरीं स्मरण तें सार । नाहीं दुरी तें अंतर ॥ २ ॥ भोगितां तूं भावें । देव जेवूं बैसे सवें ॥ ३ ॥ तुज पावो देवा । भावें अंतरींची सेवा ॥ ४ ॥ गुंतला साधनीं । देव नाहीं त्रिभुवनीं ॥ ५ ॥ तुका म्हणे हातीं । न धरितां गमाविती ॥ ६ ॥ [३६]

गोपाळांचें कैसें केलें समाधान । देऊनि आलिंगन निववि‌ले ॥ १ ॥ ज्वाळाबरोबरी तुम्हां कां ग्रासीन । अवतार घेणें तुम्हांसाठीं ॥ २ ॥ निर्गुण निर्भय मी सर्वांनिराळा । प्रकृतिवेगळा गुणातीत ॥ ३ ॥ चिन्मय चिद्रूप अवघें चिदाकार । तुका म्हणे पार नेणे ब्रह्म ॥ ४ ॥ [३७]

गुळ सांडुनि गोडी घ्यावी । मीठ सांडुनि चवि चाखावी ॥ १ ॥ ऐसा प्रपंच सांडुनि द्यावा । मग परमार्थ जोडावा ॥ २ ॥ साकरेचा नव्हे ऊंस । आम्हां कैंचा गर्भवास ॥ ३ ॥ बीज भाजुनि केली लाही । जन्ममरण आम्हां नाहीं ॥ ४ ॥ आकारासी कैंचा ठाव । देह प्रत्यक्ष जाला वाव ॥ ५ ॥ तुका म्हणे अवघें जग । सर्वां घटीं पांडुरंग ॥ ६ ॥ [३८]

गुरुपादाग्रींचें जळ । त्यास मानी जो घिटाळ ॥ १ ॥ संतीं वाळिला जो खळ । नरकीं पचे चिरकाळ ॥ २ ॥ गुरुतीर्थी अनमान । यथासांग मद्यपान ॥ ३ ॥ गुरुअंगुष्ठा न चोखी । मुख घाली वेश्येमुखीं ॥ ४ ॥ तुका म्हणे सांगों किती । मुखीं पडो त्याचे माती ॥ ५ ॥ [३९]

गुरुचिया मुखें होईल ब्रह्मज्ञान । न कळे प्रेमखुण विठोबाची ॥ १ ॥ वेदांतें विचारा पुराणांतें पुसा । विठोबाचा कैसा प्रेमभाव ॥ २ ॥ तुका म्हणे सांडा जाणींवेचा शीण । विठोबाची खूण जाणती संत ॥ ३ ॥ [४०]

गांवलोकीं कांहीं लावियेलें पिसें । काय सांगों ऐसें तुजपाशीं ॥ १ ॥ तोंड काळें केलें फिरविलें मज । नाहीं धरिली लाज पांडुरंगा ॥ २ ॥ काय तुजपाशीं सांगों हें गाऱ्हाणें । मग काय जिणें तुझें माझें ॥ ३ ॥ कोणासाठीं आतां करावा संसार । केली वारावार आपणचि ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्ही मोडिला घरचार । धरियेला धीर तुझ्या पायीं ॥ ५ ॥ [४१]

ज्याचें जैसें भावी मन । त्यासी देणें दरूषण ॥ १ ॥ पुरवूं जाणे मनिंची खुण । समाधान करोनी ॥ २ ॥ आपणियातें प्रगट करी । छाया बरी कृपेची ॥ ३ ॥ तुका म्हणे केलें दान । मन उन्मन हरिनामीं ॥ ४ ॥ [४२]

छळी विष्णुदासां कोणी । त्याची अमंगळवाणी ॥ १ ॥ येऊं न द्यावा समोर । अभागी तो दुराचार ॥ २ ॥ नावडे हरिकथा । त्याची व्यभिचारीण माता ॥ ३ ॥ तुका म्हणे याति । भ्रष्ट तयाची ते मति ॥ ४ ॥ [४३]

झालासी पंडित पुराण सांगसी । परी तूं नेणसी मी हें कोण ॥ १ ॥ गाढवभरी पोथ्या उलथिसी पानें । परी गुरुगम्यखुणे नेणशी बापा ॥ २ ॥ तुका कुणबियाचा नेणे शास्त्रमत । एक पंढरिनाथ विसंबेना ॥ ३ ॥ [४४]

जुनाट हें धन अंत नाहीं पार । खात आले फार सरलें नाहीं ॥ १ ॥ नारद हा मुनि शुकसनकादिक । उरलें अमूप तुम्हां आम्हां ॥ २ ॥ येथूनियां धना खाती बहुत जन । वाल गुंज उणें झालें नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे धना नाहीं अंतपार । कुंठित हे चार वाचा तेथें ॥ ४ ॥ [४५]

जीवशिवाच्या मांडुनि हाला । अहं सोहं दोन्ही भेटती मला ॥ १ ॥ घाली सुतुतू (हुतुतू) फिरोनी पाही आपणासी । पाही बळिया तो मागिला तुटी पुढिलासी ॥ २ ॥ खेळिया तो हाल सांभाळी । धूम घाली तो पडे पाताळीं ॥ ३ ॥ बळिया गांढ्या तोचि खेळे । दम पुरे तो वेळोवेळां खेळे ॥ ४ ॥ हातीं पडे तोचि ढांग । दम पुरे तो खेळिया चांग ॥ ५ ॥ मागें पुढें पाहे तो जिंके । हातीं पडे तोचि आधार फिके ॥ ६ ॥ आपल्या बळें खेळे रे भाई । गडियाची सांडोनी सोई ॥ ७ ॥ तुका म्हणे मी खेळिया नव्हें । जिकडे पडें त्याची सवें ॥ ८ ॥ [४६]

जाली गाढवी दुधाळ । महिमा गाईची पावेल ॥ १ ॥ श्वान झालेंसे चांगलें । तरी का सांगातें जेवील ॥ २ ॥ झाली सिंदळा चांगली । तरी का पतिव्रता झाली ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐशा जाति । काय उंचपण पावती ॥ ४ ॥ [४७]

जातीचा ब्राह्मण । न करितां संध्यास्नान ॥ १ ॥ तो एक नांवाचा ब्राह्मण । होय हीनाहूनि हीन ॥ २ ॥ सांडुनियां शाळिग्राम । नित्य वेश्येचा समागम ॥ ३ ॥ नेघे संतांचें जो तीर्थ । अखंड वेश्येचा जो आर्त ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐसे पापी । पाहूं नका पुनरपि ॥ ५ ॥ [४८]

जातां पंढरीच्या मार्गें । काय वर्णूं सुखा मग ॥ १ ॥ घडे लाभ लक्षकोटि । परब्रह्मीं होईल भेटी ॥ २ ॥ नाम गर्जत येती संत । त्यांच्या दर्शनें होईजे मुक्त ॥ ३ ॥ जो अलक्ष्य ब्रह्मादिकां । आला सन्निध म्हणे तुका ॥ ४ ॥ [४९]

जागा घरटी फिरे । तस्कराची दिवसाराती ॥ १ ॥ नीदसुरें नाडिलीं । असो ऐसीं मागें किती ॥ २ ॥ हाटकरी सकळ जन । वस्तु करा रे जतन ॥ ३ ॥ हुशार व्हा ठायीं । निजनिजेलिया पाहीं ॥ ४ ॥ सावचित्त असे खरा । लाभ घेऊन जाय घरा ॥ ५ ॥ तराळ बोंबें उतराई । राखा आपुलिया भाई ॥ ६ ॥ हरिच्या नामीं घालूं जागा । तुका म्हणे हुशार गा ॥ ७ ॥ [५०]

जळो जळो तें गुरुपण । जळो जळो तें चेलेपण ॥ १ ॥ गुरु आला वेशीद्वारीं । शिष्य पळतो खिंडोरीं ॥ २ ॥ काशासाठीं झालें येणें । त्याचें आलें वर्षासन ॥ ३ ॥ तुका म्हणे चेला । गुरु दोघेहि नरकाला ॥ ४ ॥ [५१]

जरी न भरे पोट । तरी सेवूं दरकूट ॥ १ ॥ परी न घालूं तुज भार । हाचि आमुचा निर्धार ॥ २ ॥ तुझें नाम अमोलिक । नेणती हे ब्रह्मादिक ॥ ३ ॥ ऐसें नाम तुझें खरें । तुका म्हणे भासे पुरें ॥ ४ ॥ [५२]

जरी तुझा मज नसता आधार । कैसा हा संसार दुऱ्हावता ॥ १ ॥ ऐसा बळी कोण होईल पुरता । जो हे वारी चिंता आशापाश ॥ २ ॥ मायामोहफांसा लोकलाज बेडी । तुजविण तोडी कोण एक ॥ ३ ॥ हें तों मज कळों आलें अनुभवें । बरें माझ्या जीवें पांडुरंगा ॥ ४ ॥ तुका म्हणे यास तूंचि माझा ग्वाही । परी भाव नाहीं जना लोकां ॥ ५ ॥ [५३]

जयजय म्हणा राम । हातें टाळी वाचे नाम ॥ १ ॥ आटाअटी नाहीं ज्यास । न वेंचे मोल न पडे खांस ॥ २ ॥ आपण म्हणे आणिकां हातीं । यज्ञादिकीं नये ते गति ॥ ३ ॥ आसन भोजन करितां काम । ध्यानसमाधि म्हणतां राम ॥ ४ ॥ मंत्र जपा हाचि सार । वर्णां याती जयजयकार ॥ ५ ॥ म्हणतां राम म्हणे तुका । वेळोवेळां चुकों नका ॥ ६ ॥ [५४]

जन्मोजन्मींचें संचित । भेटी झाली अकस्मात ॥ १ ॥ आतां सोडितां सुटेना । तंतु प्रीतीचा तुटेना ॥ २ ॥ माझें चित्त तुझ्या पायां । मिठी पडिली पंढरीराया ॥ ३ ॥ तुका म्हणे अंतीं । तुझी माझी एक गति ॥ ४ ॥ [५५]

जन्मा आलिया गेलिया परी भक्ति नाहीं केली । माझें माझें म्हणोनियां गुंतगुंतों मेलीं ॥ १ ॥ येथें कांहीं नाहीं लव गुरूच्या पायीं । चाल रांडे टाकीं रुका नको करूं बोल । गुरुविण मार्ग नाहीं करिसी तें फोल ॥ २ ॥ खाऊनी जेउनी लेउनी नेसुनी म्हणती आम्ही बऱ्या । साधु संत घरा आल्या होती पाठमोऱ्या ॥ ३ ॥ वाचोनि पढोनी झाले शहाणे म्हणती आम्ही संत । परनारी देखोनि त्यांचें चंचळ झालें चित्त ॥ ४ ॥ टिळा टोपी घालूनी माळा म्हणती आम्ही साधु । दयाधर्म चित्तीं नाहीं ते जाणावे भोंदु ॥ ५ ॥ कलियुगीं घरोघरीं संत झाले फार । वीतिभरी पोटासाठीं हिंडती दारोदार ॥ ६ ॥ संत म्हणती केली निंदा निंदा नव्हे भाई । तुका असे अनन्य भावें शरण संतापायीं ॥ ७ ॥ [५६]

जनाचिया मना जावें कासि(शी)येसी । माझी वाराणसी पांडुरंग ॥ १ ॥ तेथें भागीरथी येथें भीमरथी । अधिक म्हणती चंद्रभागा ॥ २ ॥ तेथें माधवराव तेथें यादवराव । जाणोनियां भाव पुंडलिकाचा ॥ ३ ॥ विष्णुपद गया तेचि येथें आहे । प्रत्यक्ष हें पाहें विटेवरी ॥ ४ ॥ तुका म्हणे हेंचि प्रपंच उद्धरी । आतां पंढरपुरी घडो बापा ॥ ५ ॥ [५७]

जगीं ऐसा बाप व्हावा । ज्याचा वंश मुक्तिस जावा ॥ १ ॥ पोटा येतां हरलें पापा । ज्ञानदेवा मायबापा ॥ २ ॥ मुळीं बाप होता ज्ञानी । तरी आम्ही लागलों ध्यानीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मी पोटींचें बाळ । माझी पुरवा ब्रह्मींची आळ ॥ ४ ॥ [५८]

तुझें नाम गाया नसे पेंडवळा । गाऊं कळवळा प्रेमाचिया ॥ १ ॥ येईल आवडी जैसी अंतरींची । तैसी नामाची कीर्ति गाऊं ॥ २ ॥ माझें मुख नामीं रंगो सर्वकाळ । गोविंद गोपाळ राम कृष्ण ॥ ३ ॥ अबद्ध चांगलें गाऊं जैसें तैसें । बाहे बाळ जैसें मायबापा ॥ ४ ॥ तुका म्हणे मज न लावीं वांकडें । मी तुझें बोबडें बाळ तान्हें ॥ ५ ॥ [५९]

तुझे म्हणों आम्हां । मग उणें पुरुषोत्तमा ॥ १ ॥ ऐसा धर्म काय । अमृतानें मृत्यु होय ॥ २ ॥ कल्पवृक्षातळीं । गांठीं बांधलिया झोळी ॥ ३ ॥ तुका म्हणे परिस । सांपडल्या उपवास ॥ ४ ॥ [६०]

तुझे पाय माझी काशी । कोण जाय माझें काशी ॥ १ ॥ तुझें रूप तेंचि ध्यान । तेंचि माझें अनुष्ठान ॥ २ ॥ तुझे चरण तेचि गया । झालें गयावर्जन देहा ॥ ३ ॥ तुका म्हणे सकळ तीर्थें । तुझे पायीं वसती येथें ॥ ४ ॥ [६१]

तुझी माझी आहे जुनी सोयरीक । आधीं बंधु लेंक मग जाले ॥ १ ॥ वांटेकरी म्हूण न पुसती आतां । परी आहे सत्ता करीन ते ॥ २ ॥ लेंकीचें लेंकरूं नातु जाल्यावरी । मंगळाही दुरि अंतरलों ॥ ३ ॥ बाइलेचा भाऊ पिसुन सोयरा । म्हणउनि करा विनोद हा ॥ ४ ॥ आकुळीं तों करूं नये तेंचि केलें । न बोलावें भलें तोंचि आतां ॥ ५ ॥ न म्हणसी लेंकी माऊसी बहिणी । आम्हां केलें धणी पापाचे त्या ॥ ६ ॥ बहु पांचांजणीं केली विटंबना । नये दाऊं जना तोंड ऐसें ॥ ७ ॥ तुका म्हणे आधीं मूळ तेंच धरूं । मागील तें करूं उरी आतां ॥ ८ ॥ [६२]

तुझी कीर्ति सांगों तुजपुढें जरी । ब्रह्मांडींही हरी माईना तें ॥ १ ॥ मेरूची लेखणी सागराची शाई । कागद हा मही न पुरेचि ॥ २ ॥ अनंत अपार आपंगिले भक्त । माझेंचि संचित ओढवेना ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्हां बोल नाहीं देवा । पामरें म्यां सेवा केली नाहीं ॥ ४ ॥ [६३]

तुझिया नामाचा विसर न पडावा । ध्यानीं तो रहावा पांडुरंग ॥ १ ॥ सांगितला मंत्र श्रीरामनामाचा । सर्वकाळ वाचा हेंचि बोले ॥ २ ॥ उफराटें नाम वाल्मीक बोलिला । तोही वंद्य केला नारायणें ॥ ३ ॥ तुका म्हणे मज तुझाचि भरंवसा । धांवुनियां कैसा येसी देवा ॥ ४ ॥ [६४]

तुझा म्हणविलों दास । केली उच्छिष्टाची आस ॥ १ ॥ मुखीं घालावा कवळ । जरी तूं होशील कृपाळ ॥ २ ॥ सीण भाग माझा पुसें । तुका म्हणे न करीं हांसें ॥ ३ ॥ [६५]

तुजविण तिळभरी रिता ठाव । नाहीं ऐसें विश्व बोलतसे ॥ १ ॥ बोलियेले योगी मुनी साधु संत । आहेसी या आंत सर्वांठायीं ॥ २ ॥ मी तया विश्वासें आलों शरणागत । पूर्वीचें अपत्य आहें तुझें ॥ ३ ॥ अनंत ब्रह्मांडें भरोनि उरलासी । मजला झालासी कोठें नाहीं ॥ ४ ॥ अंतपार नाहीं माझिया रूपासी । काय सेवकासी भेट देऊं । ऐसें विचारिलें म्हणोनि न येशी । सांग हृषीकेशी मायबापा ॥ ६ ॥ तुका म्हणे काय करावा उपाय । जेणें तुझे पाय आतुडती ॥ ७ ॥ [६६]

तुजविण चाड आणिकांची कांहीं। धरीन हें नाहीं तुज ठावें ॥ १ ॥ तरणउपाय योगक्षेम माझा। ठेवियेला तुझ्या पायीं देवा ॥ २ ॥ कोण मज आळी काय हे तांतडी। सोनियाची घडी जाय दिस ॥ ३ ॥ तुझिया नामाचें ल्यालोंसे भूषण। कृपा संतजन करितील ॥ ४ ॥ तुका म्हणे झाला आनंदाचा वास। हृदया या नास नव्हे कधीं ॥ ५ ॥ [६७]

तुजवांचून कोणा शरण। जाऊं आतां कर जोडून ॥ १ ॥ कोण करील माझें साहे। चित्तीं विचारूनी पाहें ॥ २ ॥ तूं तव कृपेचा सागर। दीनबंधु जगदोद्धार ॥ ३ ॥ तुका म्हणे निका। भवसिंधुतारक नौका ॥ ४ ॥ [६८]

तुज मज ऐसी परी। जैसे तरंग सागरीं ॥ १ ॥ दोहींमाजीं एक जाणा। विठ्ठल पंढरीचा राणा ॥ २ ॥ देव भक्त ऐसी बोली। जंव भ्रांति नाहीं गेली ॥ ३ ॥ तंतु पट जेवीं एक। तैसा विश्वेंसीं व्यापक ॥ ४ ॥ [६९]

तुज केलिया नव्हे ऐसें काई। डोंगराची राई क्षणमात्रें ॥ १ ॥ मज या लोकांचा न साहे आघात। देखणें प्राचित जीव घेती ॥ २ ॥ सहज विनोदें बोलियेलों गोष्टी। आरंभीं तों पोटीं न धरावी ॥ ३ ॥ दीनरूप मज करावें नेणता। याहुनी अनंता आहे तैसा ॥ ४ ॥ तुका म्हणे जेणें मज तूं भोगसी। तें करीं जनांसी चाड नाहीं ॥ ५ ॥ [७०]

तुका उतरला तुकीं। नवल आलें तिन्ही लोकीं ॥ १ ॥ नित्य करितों कीर्तन। हेंचि माझें अनुष्ठान ॥ २ ॥ तुका बैसला विमानीं। संत पाहाती लोचनीं ॥ ३ ॥ देव भावाचा भुकेला। तुका वैकुंठासी नेला ॥ ४ ॥ [७१]

तीर्थें फळती काळें जन्में आगळिया। संतदृष्टी पाया हेळामात्रें ॥ १ ॥ सुखाचे सुगम वैष्णवांचे पाय। अंतरींचा जाय महाभेव ॥ २ ॥ काळेंही न सरे तपें समाधान। कथे मूढजन समाधिस्थ ॥ ३ ॥ उपमा द्यावया सांगतां आणीक। नाहीं तिन्ही लोक धुंडाळितां ॥ ४ ॥ तुका म्हणे मी राहिलों येणें सुखें। संतसंगें दुःखें नासावया ॥ ५ ॥ [७२]

डोळियांचें दैव आजि उभें ठेलें। निधान देखिलें पंढरीये ॥ १ ॥ काय तें वानावें वाचेचे पालवें। वेदा न बोलवे रूप ज्याचें ॥ २ ॥ आनंदाच्या रसें ओतीव चांगलें। देखतां रंगलें चित्त माझें ॥ ३ ॥ तुका म्हणे मी तों सगळाच विरालों। विठ्ठलचि झालों दर्शनानें ॥ ४ ॥ [७३]

डिवेना डसेना बुजेना निर्मळ। परी अमंगळ स्वीकारीना ॥ १ ॥ परंतु गर्दभ अपवित्र जाणा। पर्वकाळीं दाना देऊं नये ॥ २ ॥ डिवी लात्री बुजे बहु नेदी दुध। मुखीं नाहीं शुद्ध विष्ठा खाय ॥ ३ ॥ परंतु ते गाय पवित्र हो जाणा। पर्वकाळीं दाना देऊंजेते (देऊं येतें) ॥ ४ ॥ ब्राह्मणें ब्राह्मणा सद्गुरु करावा। परी न करावा शूद्रादिक ॥ ५ ॥ तुका म्हणे देवें सांगितली सोय। म्हणोनि त्याचे पाय धरिले जीवें ॥ ६ ॥ [७४]

डळमळिला मेरु आणि तो मांदार। पाताळीं फणिवर डोई झाडी ॥ १ ॥ लोपे तेजें सूर्य आणीक हा चंद्र। कांपतसे इंद्र थरथरां ॥ २ ॥ ऐसें रूप उग्र हरीनें धरीलें। दैत्या मारियेलें मांडीवरी ॥ ३ ॥ तुका म्हणे भक्ताकारणें श्रीहरि। बहु दुराचारी निर्दाळिले ॥ ४ ॥ [७५]

ठाव देऊनियां राखें पायांपासीं। मी तों आहें राशी पातकांची ॥ १ ॥ पातकांची राशी म्हणतां लागे वेळ। ऐके तो कृपाळ नारायण ॥ २ ॥ नारायणनामें अवघें सांग झालें। असंगचि केलें एकमय ॥ ३ ॥ एकमय झालें विठोबाच्या नामें। भेदाभेद कर्मे आणिक कांहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे चित्तीं चिंतिलें जें होतें। तें होय अर्पेतें नामें याच्या ॥ ५ ॥ [७६]

त्रैलोकींचा नाथ सकळांचा आधार । बळीचें तुवां घर धरियेलें ॥ १ ॥ आम्हां मोकलिलें कोणां निरविलें । कोणा हातीं दिले तिन्ही लोक ॥ २ ॥ अनाथांचा बंधु दासांचा कैवारी । ब्रीदें तुझीं हरी जाती वायां ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसें बोलिला दुर्वास । वाटला संतोष पांडुरंगा ॥ ४ ॥ [७७]

ते काय पवाडे नाहीं म्यां ऐकिले । गोपाळ रक्षिले वनांतरीं ॥ १ ॥ मावेचा वोणवा होऊनि राक्षस । लागला वनास चहूंकडे ॥ २ ॥ गगनासी ज्वाळा लागती तुंबळ । गोधनें गोपाळ वेडावलीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तेथें पळावया वाट । नाहीं बा निपट ऐसें झालें ॥ ४ ॥ [७८]

तुम्ही साधु संत कैवल्यसागर । मोक्षाचें आगर तुम्हां घरीं ॥ १ ॥ तेथें मतिमंद काय बोलों वाणी । अमृताचे धणी पाणी कां घ्या ॥ २ ॥ कोटि भानुतेजीं खद्योत बापुडें । तैसा तुम्हांपुढें काय बोलों ॥ ३ ॥ तुम्ही अवघे चिंतामणि कल्पतरुचीं वनें । त्यापुढें धांवणें मशकांनीं ॥ ४ ॥ वाराणशी क्षेत्र गंगा वाहे कोड । काय तेथें पाड कोंकणाचे ॥ ५ ॥ पल्लवाचा वारा हिमकरीं काय । गगनावरी छाय कोण करी ॥ ६ ॥ समुद्राची तृषा हरी ऐसा कोण । जगाची जी तान्ह निववितो ॥ ७ ॥ मेरूचा पाटार अवघी ते क्षिती । मशकाचे हातीं मुष्टि फावे ॥ ८ ॥ सिंहापुढें काय जंबूक आरोळी । मोतियांचे वोळी कांच काय ॥ ९ ॥ कापुरासी काय लावूनी उटावें । काय ओंवाळावें दीपकासी ॥ १० ॥ तैसे तुम्ही निरे ज्ञानाचे भरीव । तेथें म्यां बोलावें पाड काय ॥ ११ ॥ कृपानिधि तुम्हीं वोलविलें बोला । सुखें न्याय केला तुमचा मीं ॥ १२ ॥ अज्ञान मी वेडें म्हणवितों बाळ । माझा प्रतिपाळ करणें तुम्हां ॥ १३ ॥ बोबडें बोलणें न धरावा कोप । क्षमा करा बाप कृपासिंधु ॥ १४ ॥ तुका म्हणे तुम्ही संत बापमाय । भयें धरिले पाय कृपानिधि ॥ १५ ॥ [७९]

तुम्ही गोपीबाळा मज कैशा नेणा । इंद्र अमरराणा म्यांचि केला ॥ १ ॥ इंद्र चंद्र सूर्य ब्रह्म तिन्ही लोक । माझे सकळीक यमधर्म ॥ २ ॥ मजपासूनियां झाले जीव शिव । देवांचाही देव मीच कृष्ण ॥ ३ ॥ तुका म्हणे त्यांसी बोले नारायण । व्यर्थ मी पाषाण जन्मा आलों ॥ ४ ॥ [८०]

तुम्हां सांगतों कलयुगफळ । पुढें होईल ब्रह्मघोळ ॥ १ ॥ आम्हां म्हणतील कंटक । ऐसा पाडिती दंडक ॥ २ ॥ भक्तिभाविका उच्छेद । शब्दज्ञानें करिती छंद ॥ ३ ॥ स्त्रिया पुजूनि सरे देती । भलते स्त्रियेसी भलते जाती ॥ ४ ॥ श्रेष्ठ वर्ण वेदविद्वांस । अंगिकारिति मद्यमांस ॥ ५ ॥ चारी वर्ण अठरा याती । केवळ करिती एक पंक्ती ॥ ६ ॥ म्हणती अंबेचा क्रीडाकल्लोळ । शिवरूप प्राणी सकळ ॥ ७ ॥ ऐसें होईल शकून देतों । अगोदर सांगून जातों ॥ ८ ॥ तुका सद्गुरुदास्य करी । सिद्धि पाणी वाहे घरीं ॥ ९ ॥ [८१]

तुम्हांपाशीं आम्ही येऊनियां काय । वृथा सीण आहे चालण्याचा ॥ १ ॥ मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर । वस्त्रासी हे थार चिंध्या बिदीं ॥ २ ॥ निद्रेसी आसन उत्तम पाषाण । वरी आवरण आकाशाचें ॥ ३ ॥ तेथें काय करणें कवणाची आस । वायां होय नाश आयुष्याचा ॥ ४ ॥ राजगृहा यावें मानाचिया आसे । तेथें काय वसे समाधान ॥ ५ ॥ रायाचिये घरीं भाग्यवंतां मान । इतरां सामान्यां मान नाहीं ॥ ६ ॥ देखोनियां वस्त्रें भूषणांचें जन । तात्काळ मरण येतें मज ॥ ७ ॥ ऐकोनियां मानाल उदासता जरी । तरी आम्हां हरि उपेक्षीना ॥ ८ ॥ आतां हेंचि तुम्हां सांगणें कौतुक । भिक्षेऐसें सुख नाहीं नाहीं ॥ ९ ॥ तप व्रत याग महा भले जन । आशाबद्ध हीन वर्तताती ॥ १० ॥ तुका म्हणे तुम्ही श्रीमंत मानाचे । पूर्वींच दैवाचे हरिभक्त ॥ ११ ॥ [८२]

तुळसीवृंदावनीं उपजला कांदा । नावडे गोविंदा कांहीं केल्या ॥ १ ॥ तैसे वंशामध्यें झाले जे मानव । जाणावे दानव अभक्त ते ॥ २ ॥ केवड्यामधील निर्गंध कणसें । तैशीं तीं माणसें भक्तिहीन ॥ ३ ॥ तुका म्हणे जेवीं चंदनांतील आळी । न चढे निढळीं देवाचिया ॥ ४ ॥ [८३]

तुटे मायाजाळ विघडे भवसिंधू । जरि लागे छंदु हरिनामें ॥ १ ॥ येर कर्म धर्म करितां ये कळी-माजी तरला बळी कोण सांगा ॥ २ ॥ न पढवे वेद नव्हे शास्त्रबोध । नामाचे प्रबंध पाठ करा ॥ ३ ॥ न साधवे योग न करवे वैराग्य । साधा भक्तिभाग्य संतसंगें ॥ ४ ॥ नव्हे अनुष्ठान न कळे ब्रह्मज्ञान । करावी सोपान कृष्णकथा ॥ ५ ॥ तुका म्हणे वर्म दाविंयेलें संतीं । यापरती विश्रांति आणिक नाहीं ॥ ६ ॥ [८४]

तुझें वर्म आम्हां कळों आलें सुखें । संतांचिया मुखें पांडुरंगा ॥ १ ॥ अवघाचि नट वाउगा पसारा । चेईला तो खरा तूंचि एक ॥ २ ॥ म्हणऊनि देहबुद्धि नासिवंता । नातळे या चित्ता नेदावया ॥ ३ ॥ सोय हे लागली पुढिलांची वाट । पावले जे नीट तुजपाशीं ॥ ४ ॥ तुका म्हणे नाहीं कोणासवें काज । बोलायाचें मज अंतरींचें ॥ ५ ॥ [८५]

तुझें रूप पाहतां देवा । सुख झालें माझ्या जीवा ॥ १ ॥ हें तों वाचे बोलवेना । काय सांगों नारायणा ॥ २ ॥ जन्मोजन्मींचें सुकृत । तुझे पायीं रमे चित्त ॥ ३ ॥ जरी योगाचा अभ्यास । तेव्हां तुझा निजध्यास ॥ ४ ॥ तुका म्हणे भक्त । गोड गाऊं हरीचें गीत ॥ ५ ॥ [८६]

तुझें प्रेम माझ्या हृदयीं आवडी । चरण न सोडीं पांडुरंगा ॥ १ ॥ कासया सिणविसी थोरीवा-कारणें । काय तुझें उणें होईल देवा ॥ २ ॥ चातकाची चिंता हरली जळधरें । काय त्याचें सरे थोरपण ॥ ३ ॥ चंद्र चकोरांचा पुरवी सोहळा । काय त्याची कळा न्यून होय ॥ ४ ॥ तुका म्हणे मज अनाथा सांभाळीं । हृदयकमळीं स्थिर राहें ॥ ५ ॥ [८७]

तुझे पाय माझें भाळ । एकत्रता सर्वकाळ ॥ १ ॥ हेंचि देईं विठाबाई । पांडुरंगे माझे आई ॥ २ ॥ नाहीं मोक्ष मुक्ति चाड । तुझी सेवा लागे गोड ॥ ३ ॥ सदा संग सज्जनांचा । नको वियोग पंढरीचा ॥ ४ ॥ नित्य चंद्रभागे स्नान । करीं क्षेत्रप्रदक्षण ॥ ५ ॥ पुंडलिक पाहोनि दृष्टीं । हर्षें नाचों वाळवंटीं ॥ ६ ॥ तुका म्हणे पांडुरंगा । तुझें स्वरूप चंद्रभागा ॥ ७ ॥ [८८]

तुझें नाम मुखीं असो देवा । विनवितो राघवा दास तुझा ॥ १ ॥ तुझ्या नामबळें तरले पतित । म्हणोनि माझें चित्त तुझे पायीं ॥ २ ॥ तुका म्हणे तुझें नाम हें सादर । गातां निरंतर सुख वाटे ॥ ३ ॥ [८९]

तुझें नाम पंढरिनाथा । भावेंविण न ये हाता ॥ १ ॥ दाहां न ये विसां न ये । पंनासां साठां न ये ॥ २ ॥ शतां न ये सहस्त्रां न ये । लक्ष कोटीलागीं न ये ॥ ३ ॥ तुका म्हणे पंढरिनाथा । भावेंविण न ये हाता ॥ ४ ॥ [९०]

तुझे नामीं दीनानाथा । आम्हीं उघडा घातला माथा ॥ १ ॥ आतां न धरावें दुरी । बोल येईल ब्रीदावरी ॥ २ ॥ पतित होतों ऐसा ठावा । आधीं कां न विचारावा ॥ ३ ॥ तुका म्हणे तुझे पायीं । आम्ही मिरास केली पाहीं ॥ ४ ॥ [९१]

दों दिवसांचा पाहुणा चालसी उताणा । कां रे नारायणा न भजसी ॥ १ ॥ तूं अखंड दुश्चिता तुज नेती अवचितां । मग पंढरीनाथा भजसी केव्हां ॥ २ ॥ तुका म्हणे ऐसे आहेत उदंड । तयां केशव प्रचंड केवीं भेटे ॥ ३ ॥ [९२]

देहीं असोनियां देव । वृथा फिरतो निर्दैव ॥ १ ॥ देव आहे अंतर्यामीं । व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं ॥ २ ॥ नाभीं मृगाचे कस्तुरी । व्यर्थ हिंडे वनांतरीं ॥ ३ ॥ साखरेचें मूळ उंस । तैसा देहीं देव दिसे ॥ ४ ॥ दुधीं असतां नवनीत । नेणें तयाचें मथित ॥ ५ ॥ तुका सांगे मूढजना । देहीं देव कां पाहाना ॥ ६ ॥ [९३]

देवीं आणि दैतीं सिंधु घुसळिला । भार पृथ्वीस झाला साहावेना ॥ १ ॥ झालासी कासव धरिली पाठीवरी । चिंता तुज हरी सकळांची ॥२॥ तये काळीं देव करिताती स्तुति । कृपाळु श्रीपति म्हणोनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसे उदंड पवाडे । ज्यासी सहस्र तोंडें सिणला तोही ॥ ४ ॥ [९४]

देवासी पैं भांडों एकचित्त करूनी । आम्हांसी सज्जनीं सांगितलें ॥ १ ॥ आम्हां काय आतां देवें आडो परी । भेटी नेदी तरी सुखें नेदो ॥ २ ॥ तोचि नांदो सदा हरि पैं वैकुंठीं । आम्हां देशवटी देवो सुखें ॥ ३ ॥ देवें अभिमान चित्तांत धरिला । तरी तो एकला राहो आतां ॥ ४ ॥ चित्तीं धरोनि नाम असों सुखें येथें । हर्षें गाऊं गीत गोविंदाचें ॥ ५ ॥ तुका म्हणे सर्व देवाची नष्टाई । आम्ही सुखें पाहीं डुलतसों ॥ ६ ॥ [९५]

देवा बोलें आतां बोला । त्वां कां धरिला अबोला ॥ १ ॥ भेऊं नको देई भेटी । तूं कां पडिलासी संकटीं ॥ २ ॥ तुझ्या जीवींचें मी जाणें । म्हणसी मुक्ती आम्हां देणें ॥ ३ ॥ तुका म्हणे न लगे कांहीं । चित्त राहो तुझे पायीं ॥ ४ ॥ [९६]

देवाचिये पायीं वेंचों सर्व शक्ती । होतील विपत्ति ज्या ज्या कांहीं ॥ १ ॥ नेंघे माझी वाचा पुढें कांहीं वाव । आणि दुजे भाव बोलायाचे ॥ २ ॥ मनाची वांटणी चित्ताचा विक्षेप । राहो हा अनुताप आहे तैसा ॥ ३ ॥ तुका म्हणे घेईं विठ्ठलाचा छंद । आनंदाचा कंद विस्तारेल ॥ ४ ॥ [९७]

देवा ऐसा शिष्य देईं । ब्रह्मज्ञानी निपुण पाहीं ॥ १ ॥ जो कां भावाचा आगळा । भक्तिप्रेमाचा पुतळा ॥ २ ॥ ऐशा युक्ति ज्याला बाणे । तेथें वैराग्याचें ठाणें ॥ ३ ॥ ऐसा झाला हो शरीरीं । तुका लिंबलोण करी ॥ ४ ॥ [९८]

देव धरी नाना सोंगें । नाम श्रेष्ठ पांडुरंग ॥ १ ॥ तो हा गवळियांचे घरीं । नाम सारितो मुरारि ॥ २ ॥ धन्य यशोदेचें प्रारब्ध । नाचे अंगणीं गोविंद ॥ ३ ॥ ऐशीं भक्तांसाठीं देवें । नाना धरियेलीं नांवें ॥ ४ ॥ होय दासांचा जो दास । तुका म्हणे विठ्ठलास ॥ ५ ॥ [९९]

देव जडला जाइना अंगा । यासी काय करूं सांगा ॥ १ ॥ वरकड देव येती जाती । हा देव जन्माचा सांगाती ॥ २ ॥ अंगीं भरलें देवाचें वारें । देव जगचि दिसे सारें ॥ ३ ॥ भूत न बोलें निरुतें । कांहीं केल्या न सुटे तें ॥ ४ ॥ जीव खादला दैवतें । माझा येणें महाभूतें ॥ ५ ॥ तुका म्हणे वाडें कोडें । उभें पुंडलिकापुढें ॥ ६ ॥ [१००]

देव गावा ध्यावा ऐसें झालें । परदेशी नाहीं उगलें । वडील आणि धाकुलें । नाहीं ऐसें झालें दुसरें तें ॥ १ ॥ नाहीं लागत मुळींहूनि । सुहृद जन आणि जननी । लागल्या लागें त्यागें सांडुनी । लोभिये मांडणी संयोगाची ॥ २ ॥ शिव बाटला जीवदशे । बहुत ओतत आलें ठसें । हीन झालें भूषणांचे इच्छे । निवडती कैसे गुणागुण ॥ ३ ॥ आतां हें हुतांश तों बरें । अवघें एकच मोहरें । पिटिलियाविण नव्हे खरें । निवडे बरें जांति शुद्ध ॥ ४ ॥ तुका उताविळ याजसाठीं । आहे तें निवेदीन पोटीं । आवडी द्यावी जी येथें लाठी । तुझी जगजेठी कीर्ति वाखाणीन ॥ ५ ॥ [१०१]

देव आतां आम्ही केला असे ऋणी । आणिकावांचूनि काय गुंता ॥ १ ॥ एकाचें आर्जव करूं एकनिष्ठ । आणिकांचा बोभाट कामा नये ॥ २ ॥ बहुतांचे आर्जव केलिया खटपट । नाहीं हा शेवट शुद्ध होत ॥ ३ ॥ पुरता विचार आणोनि मानसीं । अंतरलों सर्वांसी पई देखा ॥ ४ ॥ तुका म्हणे देवा चरणीं असो भाव । तेणें माझा जीव संतोषे हा ॥ ५ ॥ [१०२]

दुर्वासें निरोप आणिला ये रीतीं। मग वाढलेती नारायणा ॥ १ ॥ ठेविले चरण बळीचिये द्वारीं। शिर अंगावरी लांबविलें ॥ २ ॥ पाडियेलें द्वार द्वारावतियेसी। वरी हृषीकेशी निघालेती ॥ ३ ॥ तेथूनियां नाम पडिलें द्वारका। वैकुंठनायका तुका म्हणे ॥ ४ ॥ [१०३]

दुर्वासया स्वामी गुंतलों भाकेसी। पुसा जा बळीसी निरोप द्यावा ॥ १ ॥ त्याचे आज्ञेविण आम्हां यतां नये। द्वारपाळ राहें होऊनियां ॥ २ ॥ पुसे दुर्वासया बळीसी जाऊनी। येरू म्हणे झणीं बोलों नका ॥ ३ ॥ तुका म्हणे केला अन्यत्राचा त्याग। तेव्हां पांडुरंग सखा झाला ॥ ४ ॥ [१०४]

दिवाळखोर नारायण। यावरी बहुतांचें ऋण ॥ १ ॥ उठतांचि उभे द्वारीं। अवघे दे दे म्हणती हरी ॥ २ ॥ माजघरीं दडे हरी। माया तडकी आड करी ॥ ३ ॥ युगायुगींचें हें ऋण। म्हणउनि धरिलें मौन्य ॥ ४ ॥ रोखापत्र पाहीं। वेदशास्त्र देती ग्वाही ॥ ५ ॥ धनको नाम तुका वाणी। रिणको नाम विठ्ठल धणी ॥ ६ ॥ [१०५]

दिवसा व्यापारचावटी। रात्रीं कुटुंबचिंता मोठी ॥ १ ॥ काय करूं या मनासी। नाठवे कां हृषीकेशी ॥ २ ॥ वेश्येपाशीं रात्रीं जागे। हरिकीर्तनीं निद्रा लागे ॥ ३ ॥ तुका म्हणे काय झालासी। वृथा संसारा आलासी ॥ ४ ॥ [१०६]

दारिद्रानें विप्र पीडिला अपार। तया पोटीं पोर एक असे ॥ १ ॥ बाहेरी मिष्टान्न मिळे एके दिशीं। घेऊनी छंदासी त्याचि बैसे ॥ २ ॥ क्षुधाकाळीं रडे देखिलें तें मागें। कांहीं केल्या नेघे दुजें कांहीं ॥ ३ ॥ सहज कौतुकें बोले बापमाये। देवापाशीं आहे मागशी तें ॥ ४ ॥ तेव्हां तुजलागीं स्मरे नारायणा। जीवींच्या जीवना पांडुरंगा ॥ ५ ॥ लागली हे क्षुधा जात असे प्राण। काय हें निर्वाण पाहातोसी ॥ ६ ॥ ब्रह्मांडनायक विश्वाचा पाळक। वरी तिन्ही लोक पोसितोसी ॥ ७ ॥ प्राण हा उत्कर्ष जाहला विव्हळ। तेव्हां तो कृपाळ धांव घाली ॥ ८ ॥ सांडुनि वैकुंठ धांव घाली तई। आळंगिला बाहीं कृपावंतें ॥ ९ ॥ तुका म्हणे दिला क्षीराचा सागर। राहे निरंतर तयापासीं ॥ १० ॥ [१०७]

दामाजीपंताची रसद गुदरली। लज्जा सांभाळिली देवरायें ॥ १ ॥ तयाचें चरित्र परिसा हो सादरें। करितों नमस्कार संतजनां ॥ २ ॥ मंगळवेढा असे वस्ति कुटुंबेंसी। व्यापारी सर्वांसी मान्य सदा ॥ ३ ॥ कर्म काय करी ठाणाचा हवाला। तों कांहीं पडला कठिण काळ ॥ ४ ॥ धान्याचीं भांडारें होतीं तीं फोडिलीं। पंढरी रक्षिली दुष्काळांत ॥ ५ ॥ दुबळीं अनाथ तींही वांचविलीं। राष्ट्रांत ते झाली कीर्ति मोठी ॥ ६ ॥ मुजुम करीत होता कानडा ब्राह्मण। फिर्याद लिहून पाठविली ॥ ७ ॥ अविंदाचें राज्य बेदरीं असतां। कागद पाहतां तलब केली ॥ ८ ॥ दामाजीपंतासी धरोनि चालविलें। इकडे या विठ्ठलें माव केली ॥ ९ ॥ विकते धारणे सवाईचें मोल। धान्याचें सकळ द्रव्य केलें ॥ १० ॥ दामाजीपंताच्या नांवें अर्जदास्त। लिहून खलेती मुद्रा केली ॥ ११ ॥ विठो पाडेवार भक्तां साह्य झाला। बेदरासी गेला रायापासीं ॥ १२ ॥ जोहार मायबाप पुसती कोठील। तंव तो म्हणे स्थळ मंगळवेढें ॥ १३ ॥ दामाजीपंतांनीं रसद पाठविली। खलेती ओतिली अर्जदास्त ॥ १४ ॥ देखोनियां राजा संतोष पावला। म्हणे व्यर्थ त्याला तलब केली ॥ १५ ॥ काय तुझें नांव पुसती यंत्रधारी। म्हणे बेगारी विठा कीं जी ॥ १६ ॥ पावल्याचा जाब द्यावा मायबाप। करोनि घेतों माप म्हणती तैं ॥ १७ ॥ पावल्याचा जाब दिधला लिहून। तसरीफ देऊन पाठविला ॥ १८ ॥ छत्री घोडा शिबिका आभरणांसहित। दिला सवें दूत पाठवूनी ॥ १९ ॥ वाटे चुकामुक झाली याची त्यांची। ते आले तैसेचि मंगळवेढीं ॥ २० ॥ दामाजीपंतासी बेदरासी नेलें। राजा म्हणे झालें कवतुक ॥ २१ ॥ काल गेला विठा बेगारी देऊन। तसरीफ देऊन जाब दिला ॥ २२ ॥ काय तुमचें काज सांगा जी म्हार।

बोलाजी निर्धार वचनाचा ॥ २३ ॥ कैंचा विठा कोण पाठविला कधीं । काढोनिया आधीं जाब दिला ॥ २४ ॥ पाहातांचि जाब हृदय फुटलें । नयन निडारलें राजा देखे ॥ २५ ॥ सांवळें सकुमार रूप मनोहर । माथां तेणें भार वाहियेला ॥ २६ ॥ दामाजीपंतासी रायें सन्मानिलें । तो म्हणे आपुलें कर्म नव्हे ॥ २७ ॥ आतां तुमची सेवा पुरे जी स्वामिया । शिणविलें सखया विठोबासी ॥ २८ ॥ निरोप घेऊनी आला स्वस्थळासी । उदास सर्वांसीं होता झाला ॥ २९ ॥ दामाजीपंतांनीं सेविली पंढरी । ऐसा त्याचा हरि निकटवृत्ति ॥ ३० ॥ तुका म्हणे विठो अनाथ कैवारी । नुपेक्षी हा हरि दासालागीं ॥ ३१ ॥ [१०८]

दर्दुराचें पिलूं म्हणे रामराम । नाहीं उदक उष्ण होऊं दिलें ॥ १ ॥ कढेमाजी बाळ करी तळमळ । गोविंद गोपाळ पावें वेगीं ॥ २ ॥ आज्ञा तये काळीं केली पावकासी । झणी पिलीयासी तापवीसी ॥ ३ ॥ तुका म्हणे तुझे ऐसे हे पवाडे । वर्णितां निवाडे सुख वाटे ॥ ४ ॥ [१०९]

आतां तुज मज नाहीं दुजेपण । दाखवीं चरण पांडुरंगा ॥ १ ॥ तुज रूप रेखा नाम गुण नाहीं । एक स्थान पाहीं गांव सींव ॥ २ ॥ नावडे संगती तुज दुजयाची । आपुल्या भक्तांची प्रीति तुम्हां ॥ ३ ॥ परि आम्हांसाठीं होसील सगुण । स्तंभासी फोडून जयापरि ॥ ४ ॥ तुका म्हणे तैसें तुज काय उणें । देईं दर्शन (दरुषण) चरणांचें ॥ ५ ॥ [११०]

आतां एक योग साधावा हा नीट । भल्याचा तो वीट मानूं नये ॥ १ ॥ जेणें योगें तुम्हां घडों पाहे दोष । ऐसा हा सायास करूं नये ॥ २ ॥ निंदक दुर्जन संग्रहीं असती । त्यांची युक्ति चित्तीं आणूं नका ॥ ३ ॥ परीक्षावे कोण राज्याचे रक्षक । विवेकाविवेक पाहोनियां ॥ ४ ॥ सांगणें न लगे सर्वज्ञ तूं राजा । अनाथांच्या काजा साह्य व्हावें ॥ ५ ॥ हेंचि ऐकोनियां चित्त समाधान । आणीक दर्शनें चाड नाहीं ॥ ६ ॥ घेऊनियां भेटी कोण हा संतोष । आयुष्याचे दिस गेले गेले ॥ ७ ॥ एकदोनी कर्मे जाणोनियां वर्मे । आपुलिया भ्रमें राहूं आतां ॥ ८ ॥ कल्याणकारक अर्थ याचा एक । सर्वां भूतीं देख एक आत्मा ॥ ९ ॥ आत्मारामीं मन ठेवूनियां राहें । रामदासीं पाहे आपणेया ॥ १० ॥ तुका म्हणे राया धन्य जन्म क्षितीं । त्रैलोकीं हे ख्याति कीर्ति तुझी ॥ ११ ॥ [१११]

आतां आम्हां हेंचि काम । वाचे स्मरों रामराम (आम्हां हेंचि काम । वाचे गाऊं तुझें नाम) ॥ १ ॥ ऐसे मोलाची हे घडी (आयुष्य मोलाची हे घडी) । धरूं पायांची आवडी ॥ २ ॥ अमृताची खाणी । तये ठायीं वेंचूं वाणी ॥ ३ ॥ तुका म्हणे पांडुरंगा । माझ्या जीवींच्या जिवलगा ॥ ४ ॥ [११२]

आतां आम्हां भय नाहीं बा कोणाचें । बळ विठोबाचें झालें असे ॥ १ ॥ धीर दिला आम्हां येणें पांडुरंगें । न पांगों या पांगें संसाराच्या ॥ २ ॥ तुका म्हणे माझा कैवारी हा देव । नाहीं भवभेव त्याच्या संगें ॥ ३ ॥ [११३]

आणीक कोणापुढें वासूं मुख सांग । माझें अंतरंग कोण जाणे ॥ १ ॥ पाहें तुजकडे येऊनी जाऊनी । पांडुरंगा मनीं विचारावें ॥ २ ॥ भय चिंता अवघे उद्योग सांडिले । आठवुनी पाउलें असें तुझीं ॥ ३ ॥ नका विसरूं मज वैकुंठनायका । विनवीतसे तुका बंदीजन ॥ ४ ॥ [११४]

न गमे न गमे न गमे हरिविण । न गमे न गमे न गमे मेळवा शाम कोणी गे ॥ १ ॥ तळमळ करी तैसा जीव जळाविण मासा । दिसती दिशा ओस वो ॥ २ ॥ नाठवे भूक तान विकळ जालें मन । घडी जाय प्रमाण जुगा एकी वो ॥ ३ ॥ जरी तुम्ही नोळखा सांगतों ऐका । तुकयाबंधूचा सखा जगजावन ॥ ४ ॥ [११५]

विठ्ठला रे तुझें वर्णितां गुणवाद। विठ्ठला रे दग्ध जालीं पापें ॥ १ ॥ विठ्ठला रे तुझें पाहातां श्रीमुख। विठ्ठला रे सुख जालें नयना ॥ २ ॥ विठ्ठला रे तुज देतां आलिंगन। विठ्ठला तनमन निवाल्या बाह्या ॥ ३ ॥ विठ्ठला रे तुझी ऐकतां कीर्ति। विठ्ठल हे विश्रांति पावले स्मरणें ॥ ४ ॥ विठ्ठला रे तुकयाबंधु म्हणे देहभाव। विठ्ठला जीवीं पाव धरितां गेला ॥ ५ ॥ [११६]

आकारवंत मूर्ति। जेव्हां देखेन मी दृष्टीं ॥ १ ॥ मग मी राहेन निवांत। ठेवुनियां तेथें चित्त ॥ २ ॥ श्रुति वाखाणिती। तैसा येसील प्रचिती ॥ ३ ॥ म्हणे तुकयाचा सेवक। उभा देखेन सन्मुख ॥ ४ ॥ [११७]

म्हणसी दावीन अवस्था। तैसें नको रे अनंता ॥ १ ॥ होऊनियां सहाकार। रूप दाखवीं सुंदर ॥ २ ॥ मृगजळाचियापरी। तैसें न करावें हरी ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे हरी। कामा नये बाह्यात्कारी ॥ ४ ॥ [११८]

अनंत जन्में जरी केल्या तपरासी। तरी हा न पवसी म्हणे देह ॥ १ ॥ ऐसें जें निधान लागलेंसे हातीं। त्याची केली माती भाग्यहीना ॥ २ ॥ उत्तमाचें सार वेदाचें भांडार। ज्याच्यानें पवित्र तीर्थे होती ॥ ३ ॥ म्हणे तुकयाबंधु आणीक उपमा। नाहीं या तों जन्मा द्यावयासी ॥ ४ ॥ [११९]

तुम्हांआम्हांसी दरुषण। जालें दुर्लभ भाषण ॥ १ ॥ म्हणऊनि करितों आतां। दंडवत घ्या समस्तां ॥ २ ॥ भविष्याचे माथां देह। कोण जाणे होईल काय ॥ ३ ॥ म्हणे तुकयाचा बांधव। आमचा तो जाला भाव ॥ ४ ॥ [१२०]

उदार कृपाळ सांगसी जना। तरी कां त्या रावणा मारियेलें। नित्य नित्य पूजा करी श्रीकमळीं। तेणें तुझें काय केलें ॥ १ ॥ काय बडिवार सांगसी वायां। ठावा पंढरिराया आहेसि आम्हां ॥ एकलाचि जरी देऊं परिहार। आहे दुरिवरी सीमा ॥ २ ॥ कर्णाऐसा वीर उदार जुंझार। तो तुवां जर्जर केला बाणीं। पडिला भूमी परी न येचि करुणा। दांत पाडियेले दोन्ही ॥ ३ ॥ श्रियाळ बापुडें सात्विकवाणी। खादलें कापूनि त्याचें पोर। ऐसा कठिण कोण होईल दुसरा। उखळीं कांडविलें शिर ॥ ४ ॥ शिबी चक्रवर्ती करितां यज्ञयाग। त्याचें चिरिलें अंग ठायीं ठायीं। जाचउनि प्राण घेतला मागें-। पुढें न पाहतां कांहीं ॥ ५ ॥ बळीचा अन्याय सांग होता काय। बुडविला तो पाय देउनी माथां। कोंडिलें दार हा काय कहार। सांगतोसी चित्र कथा ॥ ६ ॥ हरिश्चंद्राचें राज्य घेऊनियां सर्व। विकविला जीव डोंबाघरीं। पाडिला विघड नळ दमयंती मधीं। ऐसी तुझी बुद्धि हरि ॥ ७ ॥ आणिकही गुण सांगावे किती। केलिया विपत्ति माउसीच्या। वधियेला मामा सखा पुरुषोत्तमा। म्हणे बंधु तुकयाचा ॥ ८ ॥ [१२१]

आतां मोकलावें नव्हे हें उचित। तरी कृपावंत म्हणवावें ॥ १ ॥ पूर्वीं भक्त झाले सर्व आपंगिले। नाहीं उपेक्षिले तुम्हीं कोणीं ॥ २ ॥ माझिया वेळेसी कां गा लपलासी। विश्व पोसितोसी लपोनियां ॥ ३ ॥ कराशी म्हणावी सर्वांभूतीं दया। तरी भेटावया येईन मी ॥ ४ ॥ तरी माझे हातीं देईं मनबुद्धि। जरी दयानिधि येशील तूं ॥ ५ ॥ तुका म्हणे तूंचि अवघा सूत्रधारी। माझी सत्ता हरी काय आहे ॥ ६ ॥ [१२२]

आपुली बुटबुट घ्यावी। माझी परताप परत द्यावी ॥ १ ॥ आपुला मंत्र नव्हे बरा। माझा बईल चुकला मोरा ॥ २ ॥ तुका म्हणे ऐशा नरा। परिस न झोंबे खापरा ॥ ३ ॥ [१२३]

आपुलिया ऐसें करी। संग धरी ज्याचा हो ॥ १ ॥ म्हणउनि परपरते। वरवरतें पळतसें ॥ २ ॥ लोभिक तें लोभा लावी। बांधल्या गोवी वांचूनी ॥ ३ ॥ तुका म्हणे नामगोठी। पुरे भेटी तुझी देवा ॥ ४ ॥ [१२४]

आनंदाचा कंद गाइयेला गीतीं। पाहियेला चित्तीं देवराव ॥ १ ॥ देवराव तोही आहे निश्चयेंसी अखंड नामासी बोलवितो ॥ २ ॥ बोलवितो मज कृपा तो करूनि । तुका म्हणे मनीं धरा भाव ॥ ३ ॥ [१२५]

आधीं देह पाहतां वाव । कैंचा प्रारब्धासी ठाव ॥ १ ॥ कां रे रडतोसी माना । लागें विठ्ठलचरणा ॥ २ ॥ दुर्जेवण जालें वाव । त्रिभुवनीं नाहीं ठाव ॥ ३ ॥ तुका म्हणे खरें पाहें। विठ्ठल पाहोनियां राहें ॥ ४ ॥ [१२६]

आधीं कां मज लावियेली सवे। आतां न राहावे तुजवीण ॥ १ ॥ पहिलेंचि तोडक कां गा नाहीं केलें। आतां उपेक्षिलें न सोडीं मी ॥ २ ॥ कृपेच्या सागरा न पाहें निर्वाण। झालों तुजविण कासावीस ॥ ३ ॥ तुका म्हणे कोठें गुंतलेती हरी। येईं झडकरी पांडुरंगा ॥ ४ ॥ [१२७]

आतां हे विनवणी प्रधान अष्टक। प्रभूसी विवेक समजावा ॥ १ ॥ प्रतिनिधि मानरक्षक चतुर। सात्त्विकाचें घर तुम्हांपाशीं ॥ २ ॥ मजुमूचे धणी लेखनकारक। पत्रींचा विवेक समजावा ॥ ३ ॥ पेशवे सुरनिस चिटनिस डबीर। राजाज्ञा सुमंत सेनापति ॥ ४ ॥ भूषण पंडितराय विद्याधन। वैद्यराजा नमन माझें असे ॥ ५ ॥ पत्राचा हा अर्थ अंतरीं जाणोनी। विवंचोनी श्रवणीं घाला तया ॥ ६ ॥ सात्त्विक प्रेमळ दृष्टांताच्या मतें। बोलिलों बहुत कळावया ॥ ७ ॥ यथास्थित निरोप सांगणें हा राया। अर्थ पाहा वायां जाऊं नेदा ॥ ८ ॥ भिडेसाठीं बोला गाळूनी अर्थातें। अनर्थकारी तुमतें होइल तेणें ॥ ९ ॥ तुका म्हणे तुम्हां नमन अधिकाऱ्यां। सांगणें तें राया पत्र माझें ॥ १० ॥ [१२८]

आतां बरें झालें। सकाळींच कळों आलें ॥ १ ॥ मज न ठेवीं इहलोकीं। आलों तेव्हां झाली चुकी ॥ २ ॥ युगमहिमा ठावा। नव्हता ऐसा पुढें देवा ॥ ३ ॥ तुका म्हणे ठेवीं। भोगासाठीं निरयगांवीं ॥ ४ ॥ [१२९]

आतां नेम जाला। याच कळसीं विठ्ठला ॥ १ ॥ हातीं न धरीं लेखणी। काय भुसकट ते वाणी ॥ २ ॥ जाणें तेणें काळ। उरला सारीन सकळ ॥ ३ ॥ तुका म्हणे घाटी। चाटूं कोरडा शेवटीं ॥ ४ ॥ [१३०

अखंडकर्माकर्मप्रकाशका। मजसाठीं कां रे झालासी मुका। धर्माधर्मप्रतिपाळका। सर्वचाळक सर्वातीता ॥ १ ॥ न देखसी वर्णाश्रममर्यादा। त्याचा सर्वस्वें करिसी कामधंदा। कधीं न लाजसी गोविंदा। कां रे मुकुंदा बोल आतां ॥ २ ॥ मत्स्यकूर्मादि अवतारांसाठीं। श्रमले असतील जगजेठी करितां घडामोड सृष्टी। झालासी कष्टी काय जाणें ॥ ३ ॥ किती म्यां विनवावें श्रीमती। पुन्हां पुन्ह यावें काकुळती। पुरे आतां तुझी संगति। करुणामूर्ति काय झालें ॥ ४ ॥ काय म्यां तुजर करावें आतां। कां रे कोपलासी पंढरीनाथा। सकळ दुःखनिवारिता। पावन पति तुका म्हणे ॥ ५ ॥ [१३१

अनंत लक्षणें वाणितां अपर। संतांचें तें घर सांपडेना ॥ १ ॥ जये घरीं संत राहाती आपण तें तुम्हां ठिकाण आतुडेना ॥ २ ॥ ठिकाण धरूनी पाहावे ते संत। उगाच आकांत करूं नये ॥ ३ संत होऊनियां संतांसी पहावें। तरिच तरावें तुका म्हणे ॥ ४ ॥ [१३

(वाघ्याः) अनंत जुगाचा देव्हारा। निजबोधाचा घुमारा। अवचित भरला वारा। या मह देवाचा ॥ १ ॥ शुद्धसत्वाचा कवडा मोठा। बोधबिरडें बांधला गांठा। गळां वैराग्याचा पः वाटा दावूं भक्तीच्या ॥ २ ॥ हृदय कोटंबा सांगातें। घोळ वाजवूं अनुहातें। ज्ञानभंडाराचें पो

रितें नव्हे कल्पांतीं ॥ ३ ॥ लक्ष चौऱ्यांशीं घरें चारी । या जन्माची केली वारी । प्रसन्न झाला देव मल्लारी । सोहंभावीं राहिलों ॥ ४ ॥ या देवाचें भरतां वारें । अंगीं प्रेमाचें फेंफरें । गुरुगुरू करी वेडेचारें । पाहा तुकें भुंकविलें ॥ ५ ॥ [१३३]

अनाथाचा सखा एकिला प्रताप । होसी कृपावंत मजवरी ॥ १ ॥ माझिया गा चित्ता करीं शिकवण । जेणें तुझे चरण जोडतील ॥ २ ॥ जोडोनियां कर येतों काकुलती । रखुमाईच्या पति कृपावंता ॥ ३ ॥ हरुपें निर्भर करीं माझें मन । दाखवीं चरण पांडुरंगा ॥ ४ ॥ तुझे भेटीविण जन्म गेला वायां । भजन कराया शक्ति नाहीं ॥ ५ ॥ न घडे तुझी सेवा न घडे पूजन । जन्मोनी निष्कारण जाऊं पाहे ॥ ६ ॥ तुका म्हणे हरि करावें या काय । भजनासी साह्य होई बापा ॥ ७ ॥ [१३४]

अंधळें तें सांगे सांगितल्या खूणा । अनुभव देखणा प्रगट त्या ॥ १ ॥ नांदणूक सांगे वडिलांचें बळ । कैसा तो दुबळ सुख पावे ॥ २ ॥ तुका म्हणे नांदों आपल्या प्रतापें । तयाची लोकांपें स्तुती सांगों ॥ ३ ॥ [१३५]

अतित्याई देतां जीव । नये कींव देवासी ॥ १ ॥ थोड्यासाठीं राग आला । जीव दिला गंगेंत ॥ २ ॥ त्यासि परालोकीं नाहीं मुक्ति । अधोगति चुकेना ॥ ३ ॥ तुका म्हणे कृष्णराम । स्मरतां श्रम वारती ॥ ४ ॥ [१३६]

अग्निकुंडामाजीं घातला प्रल्हाद । तरी तो गोविंद विसरेना ॥ १ ॥ पितियासी म्हणे व्यापक श्रीहरी । नांदतो मुरारी सर्वां ठायीं ॥ २ ॥ अग्निरूपें माझा सखा नारायण । प्रल्हाद गर्जून हांक मारी ॥ ३ ॥ तुका म्हणे अग्नि जाहला शीतळ । प्रताप सबळ विठो तुझा ॥ ४ ॥ [१३७]

अंगीं ज्वर तया नावडे साकर । जन तो इतर गोडी जाणे ॥ १ ॥ एकाचिये तोंडीं पडियेली माती । अवघे ते खाती पोटभरी ॥ २ ॥ चारितां बळें येत असे दांतीं । मागोनियां घेती भाग्यवंत ॥ ३ ॥ तुका म्हणे नसे संचित हें बरें । तयासि दुसरें काय करी ॥ ४ ॥ [१३८]

अगा ये मधुसूदना माधवा । अगा ये कमळापति यादवा । अगा श्रीधरा केशवा । अगा बांधवा द्रौपदीच्या ॥ १ ॥ अगा विश्वव्यापका जनार्दना । गोकुळवासी गोपिकारमणा । अगा गुणनिधि गुणनिधाना । अगा मर्दना कंसाचिया ॥ २ ॥ अगा सर्वोत्तमा सर्वेश्वरा । गुणातीता विश्वंभरा । अगा निर्गुण निराकारा । अगा आधारा दीनाचिया ॥ ३ ॥ अगा उपमन्युसहाकारा । अगा शयना फणिवरा । अगा काळकृतांत असुरा । अगा अपारा अलक्षा ॥ ४ ॥ अगा वैकुंठनिवासा । अगा अयोध्यापति राजहंसा । अगा ये पंढरीनिवासा । अगा सर्वेशा सहजरूपा ॥ ५ ॥ अगा परमात्मा परमपुरुषा । अगा अव्यया जगदीशा । अगा कृपाळुवा आपुलया दासा । तोडीं भवपाशा तुका म्हणे ॥ ६ ॥ [१३९]

अगा पंढरीच्या राया । वेगीं येईं तूं सखया ॥ १ ॥ दीनबंधु तुझें नाम । देईं आपुलें आम्हां प्रेम ॥ २ ॥ जीवनकळा तूं विश्वाची । तूंचि माउली अनाथांची ॥ ३ ॥ तुका म्हणे पुंडलीका ठेवीं मस्तकीं पादुका ॥ ४ ॥ [१४० ॥

अखंड क्षीराब्धी भरितें आलें । अध्यात्मविद्येचें भांडार उघडिलें । सूर्यकोटीस तेज फांकलें । ध्यानीं प्रगटलें भक्तांचिया ॥ १ ॥ अनादि ब्रह्मज्ञानाचें गुज । श्रवणीं अवचित पडिलें सहज । परम निर्वाणाचें बीज । गुंडाळिलें निज सर्वभाग्यें ॥ २ ॥ मंत्र महामंत्र मंगळनिधि । सत्संग दर्शनें प्रगटलें आधीं । वैराग्यविवेकाची बुद्धि । नामामृतसिद्धी साधिलें तें ॥ ३ ॥ क्षमा दया शांतीचें निजसुख ।

सच्चित्सुखें बोलिला पुंडलीक । अनंतसुखांचा हरिख । उगवला देख पंढरिये ॥ ४ ॥ नेणें भवभक्तीची निरपेक्षता । नेणें भूतदयेची ममता । तुका म्हणे पंढरीनाथा । संग साधुसंतां देईं आतां ॥ ५ ॥ [१४१]

आले सुरवर नाना पक्षी झाले । सकळ अवतरले श्वापदवेषें ॥ १ ॥ श्वानखररूपी होऊनियां आले । उच्छिष्ट केवळ वेंचिताती ॥ २ ॥ होऊनियां दीन हात पसरिती । मागोनियां घेती उष्टावळी ॥ ३ ॥ अभिमान आड घालोनि बाहेरी । तयां म्हणे हरी घ्या रे धणी ॥ ४ ॥ तुका म्हणे धणी लाधली अपार । तया सुखा पार काय सांगों ॥ ५ ॥ [१४२]

आलिया संसारीं देखिली पंढरी । कीर्ति महाद्वारीं वाणूं तुझी ॥ १ ॥ पातकांचे भार नामाचे गजर । देखिल्या संसार सफळ झाला ॥ २ ॥ साधुसंतांचिया धन्य झाल्या भेटी । सांपडली लुटी मोक्षाची हे ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां हेंचि पैं मागणें । पुढती नाहीं येणें संसारासी ॥ ४ ॥ [१४३]

आयुष्य वेंचूनि कुटुंब पोसिलें । काय हित केलें सांग बापा ॥ १ ॥ फुकाचा चाकर झालासी काबाडी । नाहीं सुख घडी भोगावया ॥ २ ॥ दुर्लभ मनुष्यजन्म कष्टें पावलासी । दिला कुटुंबासी कामभोग ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसें आयुष्य नाशिलें । पाप तें सांचिलें पतनासी ॥ ४ ॥ [१४४]

आम्ही हरिचे हरिचे । शूर कळिकाळा यमाचे ॥ १ ॥ नामघोष बाण साचे । भाले तुळसी-मंजरीचे ॥ २ ॥ आम्ही हरिचे हरिचे दास । कळिकाळावरी घालूं कास ॥ ३ ॥ आम्ही हरिचे हरिचे दूत । पुढें पळती यमदूत ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्हांवरी । सुदर्शन घरटी करी ॥ ५ ॥ [१४५]

आम्ही रामाचे राऊत । वीर झुंझार बहुत ॥ १ ॥ मनपवनतुरंग । हातीं नामाची फिरंग ॥ २ ॥ वारू चालवूं चहूंखुरीं । घाला घालूं यमपुरी ॥ ३ ॥ तुका म्हणे पेणें । आम्हां वैकुंठासी जाणें ॥ ४ ॥ [१४६]

आम्ही भाग्याचे भाग्याचे । आम्हां तांबे भोपळ्याचे ॥ १ ॥ लोकां घरीं गाई म्हैसी । आम्हां घरीं उंदिरघुसी ॥ २ ॥ लोकां घरीं हत्ती घोडे । आम्हां आघोडीचे जोडे ॥ ३ ॥ लोकां घरीं तांबे थाळे । आम्हां घरीं परळ काळे ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्ही सुडके । आम्हां देखोनि काळ धाके ॥ ५ ॥ [१४७]

आम्ही जातों आपुल्या गांवा । आमचा रामराम घ्यावा ॥ १ ॥ तुमची आमची हेचि भेटी । येथूनियां जन्मतुटी ॥ २ ॥ आतां असों द्यावी दया । तुमच्या लागतसें पायां ॥ ३ ॥ येतां निजधामीं कोणी । विठ्ठल विठ्ठल बोला वाणी ॥ ४ ॥ रामकृष्ण मुखीं बोला । तुका जातो वैकुंठाला ॥ ५ ॥ [१४८]

आम्ही आलों गांवगुंड । अवघ्या पुंड भूतांसी ॥ १ ॥ दुसरें तें खेळों आलें । एका बोलें तो मियां ॥ २ ॥ अवघियांचा येऊं लाग । नेदूं अंग शिवाया ॥ ३ ॥ तुका म्हणे खुंटूं नाद । जिंतूं वाद सतीनें ॥ ४ ॥ [१४९]

आम्हां हेंचि काम । वाचे गाऊं तुझें नाम ॥ १ ॥ आयुष्य मोलाची हे घडी । धरूं पायांची आवडी ॥ २ ॥ अमृताची खाणी । याचे ठायीं वेचूं वाणी ॥ ३ ॥ तुका म्हणे पांडुरंगा । माझ्या जीवाच्या जिवलगा ॥ ४ ॥ [१५०]

आमुचे दंडवत पायांवरी डोई । व्हावें उतराई ठेवूनियां ॥ १ ॥ कराल तें काय नव्हे जी विठ्ठला । चित्त द्यावें बोला बोबडिया ॥ २ ॥ तुका म्हणे आम्ही लडिवाळें अनाथें । म्हणोनि दीनानाथें सांभाळावें ॥ ३ ॥ [१५१]

आपुल्या पोटासाठीं । करी लोकांचिया गोष्टी ॥ १ ॥ जेणें घातलें संसारीं । विसरला तोचि हरी ॥ २ ॥ पोटा घाली अन्न । न म्हणे पतितपावन ॥ ३ ॥ मी कोटील आणि कोण । हें न कळे ज्यालागून ॥ ४ ॥ तुका म्हणे नरस्तुति । करितो भाट त्रिजगतीं ॥ ५ ॥ [१५२]

उपजोनी मरों किती वेळोवेळां । कोणा कळवळा येत माझा ॥ १ ॥ म्हणवुनी धांवा करी काकुलती । यावें बा श्रीपती सोडावया ॥ २ ॥ बहुत या काळें केलों भयाभीत । येतों गिवसीत पाठीलागीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही दावितां स्वरूप । माझें कांहीं पाप निरसतें ॥ ४ ॥ [१५३]

उपजला प्राणी न राहे संसारीं । बैसला शेजारीं काळ उसां ॥ १ ॥ पाहा तो उंदिर घेउनि जाय बोका । तैसा काळ लोकां नेत असे ॥ २ ॥ खाटिकाचे घरीं अजापुत्र पाहें । कसाबाची गाय वांचे कैसी ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं करा काढाकाढी । जाती ऐसी घडी पुन्हां न ये ॥ ४ ॥ [१५४]

उधानु काटीवरी चोपड्रची आस । नवरा राजस मिरवतसे ॥ १ ॥ जिव्हाळ्याच्या कांठीं उबाळ्याच्या मोठा । नवरा चोहटा मिरवतसे ॥ २ ॥ तुळशीची माळ नवरीचे कंठीं । नोवरा वैकुंठीं वाट पाहे ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐशी नोवऱ्याची कथा । परमार्थ वृथा बुडविला ॥ ४ ॥ [१५५]

उदार कृपाळ पतितपावना । ब्रिदें नारायणा जाती वायां ॥ १ ॥ वर्णितातीं श्रुति नेणें तुझा पार । राहे मौनाकार नेति ऐसें ॥ २ ॥ तेथें माझा धांवा पावे कोणीकडे । अदृष्ट हें पुढें वोढवलें ॥ ३ ॥ कोण ऐसा भक्त लाधला भाग्यासी । आठवण ऐसी द्यावी तुज ॥ ४ ॥ तुका म्हणे नको पाहों माझा अंत । जाणोनि हे मात उडी घालीं ॥ ५ ॥ [१५६]

उच्चारूं यासाठीं । आम्ही नाम तुझें कंठीं ॥ १ ॥ येसी धांवत धांवत । माउलिये कृपावंत ॥ २ ॥ पाय चित्तीं धरूं । क्रीडा भलते ठायीं करूं ॥ ३ ॥ तुका म्हणे माझे गंगे । प्रेमभरित पांडुरंगे ॥ ४ ॥ [१५७]

अज्ञान हा देह स्वरूपीं मिनला । सर्व वोसावला देहपात ॥ १ ॥ ज्ञानस्वरूपाची सांगड मिळाली । अंतरीं पाहिली ज्ञानज्योति ॥ २ ॥ तुका म्हणे चित्त स्वरूपीं राहिलें । देह विसावलें तुझ्या पायीं ॥ ३ ॥ [१५८]

अवतारनामभेद गणा आदि अगाध । जयासी पार नाहीं पुढें खुंटला वाद । एकचि दंत शोभे मुख विक्राळ दोंद । ब्रह्मांडामाजी दावी अनंत हे छंद ॥ १ ॥ जयजया गणपति ओंवाळीन आरती । साजिऱ्या सरळ भुजा फरशकमळ शोभती ॥ २ ॥ हे मही टेंगणी हो तुज नृत्यनायका । भोंवरी फेर देतां असुर मर्दिले एकां । घातले तोडरीं हो भक्तजनपालका । सहस्र नाम तुज भुक्तिमुक्तिदायका ॥ ३ ॥ सुंदर शोभला हो रूपें लोपलीं तेजें । उपमा काय देऊं असे आणिक दुजें । रविशशितारांगणें जयामाजी सहजें । उदरीं सामावलीं जया ब्रह्मांडबीजें ॥ ४ ॥ वर्णितां शेष लीला तया भागलीं मुखें । पांगुळले वेद चारी कैसे राहिले मुके (सुखें) । अवतार जन्मला हो लिंगनामीं या मुखें । अमूर्त मूर्तिमंत होय भक्तीच्या सुखें ॥ ५ ॥ विश्व हें रूप तुझें हस्तपाद मुखडें । ऐसाचि भाव देईं तया नाचतां पुढें । धूप दीप पंचारति ओंवाळिन निवाडें । राखें या शरणांगता तुका खेळतां लाडें ॥ ६ ॥ [१५९]

अवघाच अन्यायी । तेथें ऐकल्याचें काई ॥ १ ॥ आतां अवघें एक वेळे । जळोनि सरो तें निराळें ॥ २ ॥ काय माझें खरें । एवढेंच राखों बरें ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां । परिहार न लगे चित्ता ॥ ४ ॥ [१६०]

अवघ्या कोल्ह्यांचें वर्म अंडीं। धरितां तोंडीं खीळ पडे ॥ १ ॥ भुंकूं नका भुंकूं नका। आला तुका विष्णुदास ॥ २ ॥ कवणे ठायीं सादर व्हावें। नाहीं ठावें गाढवा ॥ ३ ॥ दुर्जनासी पंचानन। तुका रजेरेण सतांचा ॥ ४ ॥ [१६१]

अरे कृष्णा तुवां काळिया नाथिला। दाढे रगडिला रिठासुर ॥ १ ॥ अरे कृष्णा तुवां पूतना शोषिली। दुर्बुद्धि कळली अंतरींची ॥ २ ॥ गोपाळ करुणा ऐसी नानापरी। भाकिती श्रीहरी तुजपुढें ॥ ३ ॥ तुझें नाम कामधेनु करुणेची। तुका म्हणे त्यांची आली कृपा ॥ ४ ॥ [१६२]

अनाथांचा नाथ पतितपावन। दीनांचें रक्षण करीतसे ॥ १ ॥ ऐसें जाणोनियां नामीं विश्वासलों। भीमातीरा आलों धांवतचि ॥ २ ॥ स्नान हें करितां त्रिताप निवाले। महाद्वारा आलें मन माझें ॥ ३ ॥ तेथें अणुमात्र रीग नव्हे याचा। परतलों साचा तेथूनियां ॥ ४ ॥ पुंडलिकापाशीं येऊनि पुसिलें। चिन्मय दाटलें जनार्दन ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां दुजा धर्म नाहीं। बाप तरी आई तोचि विठो ॥ ६ ॥ [१६३]

अरे कृष्णा आम्ही तुझे निजगडी। नवनीत आवडीं देत होतों ॥ १ ॥ अरे कृष्णा आतां राखें कैसें तरी। संकटाभीतरी पडियेलों ॥ २ ॥ वरुषला इंद्र जेव्हां शिळाधारीं। गोवर्धन गिरी उचलिला ॥ ३ ॥ तुका म्हणे तुझे पवाडे गोपाळ। वर्णिती सकळ नारायणा ॥ ४ ॥ [१६४]

अर्थेंविण पाठांतर कासया करावें। व्यर्थचि मरावें घोकूनियां ॥ १ ॥ घोकूनियां काय वेगीं अर्थ पाहें। अर्थरूप राहें होऊनियां ॥ २ ॥ तुका म्हणे ज्याला अर्थी आहे भेटी। नाहीं तरी गोष्टी बोलों नका ॥ ३ ॥ [१६५]

अपराध झाले जरी असंख्यात। तरी कृपावंत नाम तुझें ॥ १ ॥ तुझें लडिवाळ तुज कृपा यावी। म्यां वाट पाहावी कवणाची ॥ २ ॥ मायबाप माझा रुक्मादेवीवर। हा दृढ निर्धार अंतरींचा ॥ ३ ॥ तुका म्हणे कोणे गोष्टीचें संकट। न घालीं मज भेट नारायणा ॥ ४ ॥ [१६६]

एकली वना चालली राना। चोरुनि जना घराचारी ॥ १ ॥ कोणी नाहीं संगीसवें। देहभावें उदास ॥ २॥ जाऊनि पडे दुर्घट वनीं। श्वापदांनीं वेढिली ॥ ३ ॥ मार्ग न चले जातां पुढें। भय गाढें उदेलें ॥ ४ ॥ मागील मागें अतरला। पुढील चालीं खोळंबा ॥ ५॥ तुका म्हणे चिंतीं यासी। हृदयस्थासी आपुल्या ॥ ६ ॥ [१६७]

ऐसा मी अपार पार नाहीं अंत। परि कृपावंत भाविकांचा ॥ १ ॥ दुर्जनां चांडाळां करीं निर्दाळण। करीं संरक्षण अंकिताचें ॥ २ ॥ भक्त माझे सखे जिवलग सांगाती। सर्वांग त्यांप्रती वोडवीन ॥ ३ ॥ पीतांबरछाया करीन त्यावरी। सदा त्यांचे घरीं दारीं उभा ॥ ४ ॥ माझे भक्त मज सदा जे रातले। त्यां घरीं घेतलें धरणें म्यां ॥ ५॥ कोठें हें वचन ठेविलें ये वेळे। तुका म्हणे डोळे झांकियेले ॥ ६ ॥ [१६८]

एक वेळे तरी जाईन माहेरा। बहुजन्म फेरा झालयावरी ॥ १ ॥ चित्ता हे बैसली अविट आवडी। पालट ती घडी नेघे एकी ॥ २ ॥ करावें तें करी कारण शरीर। अंतरीं त्या धीर जीवनाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे तरी होईल विलंब। परी माझा लाभ खरा झाला ॥ ४ ॥ [१६९]

एक म्हणती मुख वासीं नारायणा। पाहों दे वदना डोळेभरी ॥ १ ॥ वासूनिया मुख पाहाती सकळ। अवघे गोपाळ व्योमाकार ॥ २ ॥ म्हणती गोपाळ बेटे हो हा देव। स्वरूपाचा ठाव न कळे याच्या ॥ ३ ॥ तुका म्हणे अवघे विठोबाभोंवते। मिळाले नेणते लहानथोर ॥ ४ ॥ [१७०]

एक म्हणती कृष्णा वासिलें त्वां मुख । तेव्हां थोर धाक पडिला आम्हां ॥ १ ॥ गिळों लागलासी अग्नीचे कल्लोळ । आम्ही चळचळां कांपतसों ॥ २ ॥ ज्वाळांबरोबरी गिळशील आम्हां । ऐसें मेघश्यामा भय वाटे ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसे भाग्याचे गोपाळ । फुटकें कपाळ आमुचेंचि ॥ ४ ॥ [१७१]

एकमेकीं घेती थडका । पाडी धडका देऊनी ॥ १ ॥ एकमेकां पाठीवरी । बैसोनी करिती टवाळी ॥ २ ॥ हात हात हाणे लाही । पळतां घाई चुकविती ॥ ३ ॥ तुका म्हणे लपणी चपणी । एका हाणी पाठीवरी ॥ ४ ॥ [१७२]

एक प्रेमगुज ऐकें जगजेठी । आठवली गोष्टी सांगतसें ॥ १ ॥ एक मृगी दोन्ही पाडसांसहित । आनंदें चरत होती वनीं ॥ २ ॥ अवचितां तेथें पारधी पातला । घेऊनियां आला श्वानें दोन्ही ॥ ३ ॥ एकीकडे त्याणें चिरिल्या वाघुरा । ठेविलें श्वानपुत्रां एकीकडे ॥ ४ ॥ एकीकडे तेणें वोणवा लाविला । आपण राहिला एकीकडे ॥ ५ ॥ चहूंकडोनियां मृगें वेढियेलीं । स्मरों तीं लागलीं नाम तुझें ॥ ६ ॥ रामा कृष्णा हरी गोविंदा केशवा । देवांचिया देवा पावें आतां ॥ ७ ॥ कोण रक्षी आतां ऐशिये संकटीं । बापा जगजेठी तुजविण ॥ ८ ॥ आइकोनी तुम्ही तयांचीं वचनें । कृपाअंतःकरणें कळवळिलां ॥ ९ ॥ आज्ञा तये काळीं केली पर्जन्यासी । वेगीं पावकासी विझवावें ॥ १० ॥ ससें एक तेथें उठवुनी पळविलें । तया पाठीं गेलीं श्वानें दोन्ही ॥ ११ ॥ मृगें चमकोनी सत्वर चाललीं । गोविंदें रक्षिलीं म्हणोनियां ॥ १२ ॥ ऐसा तूं कृपाळु दयाळू आहेसी । आपुल्या भक्तांसी जीवलग ॥ १३ ॥ ऐसी तुझी कीर्ति जीवीं आवडती । रखुमाईच्या पती तुका म्हणे ॥ १४ ॥ [१७३]

एक ते गाढव मनुष्याचे वेष । हालविती पुंस पुढें दाढी ॥ १ ॥ निंदा हें भोजन जेवण तयांसी । जोडी घरीं रासी पातकांच्या ॥ २ ॥ तुका म्हणे सुखें बैसोनियां खाती । कुंभिपाकीं होती नर्कवासी ॥ ३ ॥ [१७४]

उमा रमा एक सरी । वाराणसी ते पंढरी ॥ १ ॥ दोघे सारिखे सारिखे । विश्वनाथ विठ्ठल सखे ॥ २ ॥ तेथें असे भागीरथी । येथें जाणा भीमरथी ॥ ३ ॥ वाराणसी त्रिशुलावरी । सुदर्शनावरी पंढरी ॥ ४ ॥ मनकर्णिका मनोहर । चंद्रभागा सरोवर ॥ ५ ॥ वाराणसी भैरवकाळ । पुंडलीक क्षेत्रपाळ ॥ ६ ॥ धुंडिराज दंडपाणी । उभा गरुड कर जोडुनी ॥ ७ ॥ गया तेचि गोपाळपुर । प्रयाग निरा-नरसिंगपुर ॥ ८ ॥ तेथें असती गयावळ । येथें गाई आणि गोपाळ ॥ ९ ॥ शमीपत्रपिंड देती । येथें काला निज सुखप्राप्ति ॥ १० ॥ संतसज्जनीं केला काला । तुका प्रसाद लाधला ॥ ११ ॥ [१७५]

उभय भाग्यवंत तरीच समान । स्थळीं समाधान तरीच राहे ॥ १ ॥ युक्तीचें गौरव नसतां जिव्हाळा । सांचवणी जळापरी नाश ॥ २ ॥ लोखंडा परीस ज्ञानिया तो शठ । नांवाचा पालट दगड खरा ॥ ३ ॥ तुका म्हणे अवघे विनोदाचे ठाव । एकात्मक भाव नाहीं तेथें ॥ ४ ॥ [१७६]

कळे परि न सुटे गांठी । जालें पोटीं कुपथ्य ॥ १ ॥ अहंकाराचें आंदणें जीव । राहें कींव केली ते ॥ २ ॥ हेंकडाची एकीच वोढी । तेही खोडी सांगती ॥ ३ ॥ तुका म्हणे सांगों किती । कांहीं चित्तीं न राहे ॥ ४ ॥ [१७७]

करोनि स्नानविधि आणि देवधर्म । क्रिया नित्य नेम तुजसाठीं ॥ १ ॥ तुजलागीं दानें तुजलागीं तीर्थें । सकळही व्रतें तुजलागीं ॥ २ ॥ सकळ चित्तवृत्ति दिवस आणि राती । आवडशी प्रीती नारायणा ॥ ३ ॥ तुका म्हणे या हो पवित्रांच्या राया । प्राणविसांविया पांडुरंगा ॥ ४ ॥ [१७८]

कटावरी कर कासया ठेविले । जननी विठ्ठले जीवलगे ॥ १ ॥ शंख चक्र गदा कमळमंडित । आयुधें मंडित कृष्णाबाई ॥ २ ॥ क्षण एक धीर होत नाहीं चित्ता । केव्हां पंढरीनाथा भेटशील ॥ ३ ॥ तुका म्हणे हेंचि करीं देईं क्षेमा । तईंच विश्रामा पावईन ॥ ४ ॥ [१७९]

कवण दिस येईल कैसा । न कळे संपत्तीचा भरंवसा ॥ १ ॥ चौदा चौकडिया लंकापति । त्याची कोण झाली गति ॥ २ ॥ लंकेसारिखें भुवन । त्याचें त्यासी पारखें जाण ॥ ३ ॥ तेहतीस कोटी बांदवडी । राज्य जातां न लगे घडी ॥ ४ ॥ ऐसे अहंतेनें नाडिले । तुका म्हणे वायां गेले ॥ ५ ॥ [१८०]

कलियुगामाजी थोर झालें बंड । नष्ट लोक लंड झाले फार ॥ १ ॥ न धरिती सोय न पुसती कोणा । येतें जैसें मना तैसें चाले ॥ २ ॥ सज्जनाचा वारा टेंकों नेदी द्वारा । ऐसिया पामरा तारी कोण ॥ ३ ॥ विश्वास तयाचा बैसेना कोठेंही । स्तुति निंदा पाहीं जीवीं धरी ॥ ४ ॥ तुका म्हणे कैसें केलें नारायणें । जाणावें हें कोणें तयाविण ॥ ५ ॥ [१८१]

ओंवाळूं आरती पंढरीराया । सर्व भावें चरण आलों तुझिया पायां ॥ १ ॥ सर्व व्यापून कैसें रूप आकळ । तो हा गौळ्यांघरीं झाला कृष्ण बाळ ॥ २ ॥ स्वरूप गुणातीत झाला अवतारधारी । तो हा पांडुरंग उभा विटेवरी ॥ ३ ॥ भक्तीचिया काजा कैसा रूपासी आला । ब्रीदाचा तोडर चरणीं मिरविला ॥ ४ ॥ आरतें आरती कैसी ओवाळिली । वाखाणितां कीर्ति वाचा परतली ॥ ५ ॥ भावभक्तीबळें होसी कृपाळू देवा । तुका म्हणे पांडुरंगा तुझ्या न कळती मावा ॥ ६ ॥ [१८२]

पैल आली आगी कान्हो काय रे करावें । न कळे तें कैसें आजी वांचों आम्हीं जावें ॥ १ ॥ धांव रे हरी सांपडलों संधी । वोणव्याचे मधीं बुद्धि कांहीं करावी ॥ २ ॥ अवचितां जाळ येतां देखियेला वरी । परतोनि पाहतां आधीं होतों पाठमोरी ॥ ३ ॥ सभोंवता फेर रीग न होय पळतां । तुका म्हणे जाणसी तें करावें अनंता ॥ ४ ॥ [१८३]

हांका मारी ज्याच्या नांवें । त्याचें गांवचि नाहीं ठावें ॥ १ ॥ काय गातो हें कळेना । राग आळवितो नाना ॥ २ ॥ आशा करूनीयां मनीं । कांहीं देईल म्हणउनी ॥ ३ ॥ वितीभरी पोटासाठीं । तुका म्हणे पडिली मिठी ॥ ४ ॥ [१८४]

जेणें तुझी कास भावें धरियेली । त्याची नाहीं केली सांडी देवा ॥ १ ॥ काय माझा भोग आहे तो न कळे । सुखें तुम्ही डोळे झांका देवा ॥ २ ॥ राव रंक तुम्हां सारिखेची जाणा । नाहीं थोर साना तुम्हांपाशीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्हीं आपंगिले भक्तां । माझिया संचिता कृपा न ये ॥ ४ ॥ [१८५]

जो का निर्गुण निराकार । तेणें धरियेले अवतार ॥ १ ॥ निर्गुण होता तो सगुणासी आला । भक्तीसाठीं प्रगटला ॥ २ ॥ जो का त्रिभुवनचाळक । तो हा नंदाचा बाळक ॥ ३ ॥ सोडविलें वसुदेव-देवकींसी । अवतार धरिला तिचे कुशीं ॥ ४ ॥ मारियेला कंसराणा । राज्यीं स्थापिलें उग्रसेना ॥ ५ ॥ तुका म्हणे देवाधिदेव । तो हा उभा पंढरिराव ॥ ६ ॥ [१८६]

ज्यासी विषयाचें ध्यान । त्यासी कैंचा नारायण ॥ १ ॥ साधु कैंचा पापीयासी । काय चांडाळासी काशी ॥ २ ॥ काय पतितासी पिता । काय अधमासी गीता ॥ ३ ॥ तुका म्हणे निरंजनीं । शठ कैंचा ब्रह्मज्ञानी ॥ ४ ॥ [१८७]

ज्यासी नावडे एकादशी । तो जिताचि नरकवासी ॥ १ ॥ ज्यासी नावडे हें व्रत । त्यासी नरक नाहीं भीत ॥ २ ॥ ज्यासी मान्य एकादशी । तो जिताची मुक्तवासी (मुक्तिवासी) ॥ ३ ॥ ज्यासी घडे एकादशी । जाणें लागे विष्णूपाशीं ॥ ४ ॥ तुका म्हणे पुण्यराशी । तोचि करी एकादशी ॥ ५ ॥ [१८८]

कोठें गुंतलासी योगीयांचे ध्यानीं। आनंदकीर्तनीं पंढरीच्या ॥ १ ॥ काय काज कोठें पडलीसे गुंती। कानीं न पडती बोल माझे ॥ २ ॥ काय शेषशयनीं सुखनिद्रा आली। सोय कां सांडिली तुम्हीं देवा ॥ ३ ॥ तुका म्हणे कोठें गुंतलेती सांगा। किती पांडुरंगा वाट पाहूं ॥ ४ ॥ [१८९]

ओले मातीचा भरंवसा। कां रे धरीशी मानसा ॥ १ ॥ डोळे चिरीव चांगले। वृद्धपणीं सरक्या झाले ॥ २ ॥ नाक सरळ चांगलें। येऊन हनवटीं लागलें ॥ ३ ॥ तुका म्हणे आलें नाहीं। तंव हरिला भज रे कांहीं ॥ ४ ॥ [१९०]

ऐसें काय उणें झालें तुज देवा। भावेंविण सेवा घेसी माझी ॥ १ ॥ काय मज द्यावा न लगे मुशारा। पाहावें दातारा विचारूनि ॥ २ ॥ करितों पाखांडें जोडून अक्षरें। नव्हे ज्ञान खरें भक्तिरस ॥ ३ ॥ गुणवाद तुझे न बोलवे वाणी। आणिका छळणी वाद सांगें ॥ ४ ॥ तरी आतां मज राखें तुझे पायीं। देखसील कांहीं प्रेमरस ॥ ५ ॥ तुका म्हणे तुज हांसतील लोक। निष्काम सेवक म्हणोनियां ॥ ६ ॥ [१९१]

ऐसी माझी वाणी दीनरूप पाहे। हे त्या करुणा आहे हृदयस्थाची ॥ १ ॥ न हों कीविलवाणें नाहीं आम्ही दीन। सर्वदा शरण पांडुरंगीं ॥ २ ॥ पांडुरंग आम्हां पाळिता पोसिता। आणिकांची कथा काय तेथें ॥ ३ ॥ तुझी भेट घेणें काय हें मागणें। आशेचें हें शून्य केलें आम्ही ॥ ४ ॥ निराशेचा गांव दिधला आम्हांसी। प्रवृत्तिभागासी सांडियेलें ॥ ५ ॥ पतिव्रतेचें हें मन पति भेटो। तैसे आम्ही विठोमाजी नांदों ॥ ६ ॥ विश्व हें विठ्ठल नाहीं दुजें कांहीं। देखणें तुझेंही तयामाजी ॥ ७ ॥ तुजही विठ्ठल ऐसेंचि वाटलें। परि एक आलें आडवें हें ॥ ८ ॥ सद्गुरु श्रीराम दासाचें भूषण। तेथें घालीं मन चळों नको ॥ ९ ॥ बहुतां ठायीं वृत्ति चाळवली जेव्हां। राभदास्य तेव्हां घडे कैसें ॥ १० ॥ तुका म्हणे बापा चातुर्यसागरा। भक्तिभाव तारा भाविकांसी ॥ ११ ॥ [१९२]

ऐसा सर्व भाव तुज निरोपिला। तूं मज एकला सर्व भावें ॥ १ ॥ अंतरींची कां हे नेणसील गोष्टी। परी सुखासाठीं बोलविसी ॥ २ ॥ सर्व माझा भार तुज चालवणें। तेथें म्यां बोलणें काय एक ॥ ३ ॥ स्वभावें स्वहित हिताचें कारण। कौतुक करून निवडिसी ॥ ४ ॥ तुका म्हणे तूं हें जाणसी गा देवा। आमुच्या स्वभावा अंतरींच्या ॥ ५ ॥ [१९३]

कोटिजन्म पुण्यसाधन साधिलें। तेणें हातां आलें हरिदास्य ॥ १ ॥ रात्रीं दिवस ध्यान हरीचें भजन। कायावाचामन भगवंतीं ॥ २ ॥ ऐसिया प्रेमळा म्हणताती वेडा। संसार रोकडा बुडविला ॥ ३ ॥ एकवीस कुळें जेणें उद्धरिलीं। हे तों न कळे खोली भाग्यमंदा ॥ ४ ॥ तुका म्हणे त्याची पायधुणी मिळे। भवभय पळे वंदितांचि ॥ ५ ॥ [१९४]

कैसी करूं तुझी सेवा। ऐसें सांगावें जी देवा। कैसा आणूं अनुभवा। होसी ठावा कैशापरी ॥ १ ॥ कर्मभ्रष्ट माझें मन। नेणें जप तप अनुष्ठान। नाहीं इंद्रियांसी दमन। नव्हे मन एकविध ॥ २ ॥ नेणें यातींचा आचार। नेणें भक्तीचा विचार। मज नाहीं संतांचा आधार। नाहीं स्थिर बुद्धि माझी ॥ ३ ॥ न सुटे मायाजाळ। नाहीं वैराग्याचें बळ। न जिंकवती सबळ। काम क्रोध शरीरीं ॥ ४ ॥ आतां राख कैसें तरी। मज नुपेक्षावें हरी। तुझीं ब्रीदें चराचरीं। तैसीं साच करीं तुका म्हणे ॥ ५ ॥ [१९५]

कुरंगीपाडस चुकलेंसे वनीं। फुटे दुःखेंकरोनि हृदय त्याचें ॥ १ ॥ तैसा परदेशी झालों तुजविण। नको हो निर्वाण पाहूं माझें ॥ २ ॥ अपराधाच्या कोटि घालीं सर्व पोटीं। नको या शेवटीं उपेक्षूं गा ॥ ३ ॥ तुका म्हणे असों द्यावी माझी चिंता। कृपाळु अनंता पांडुरंगा ॥ ४ ॥ [१९६]

कीर्तनाचा विकरा मातेचें गमन । भाड खाई धन विटाळ तो ॥ १ ॥ हरिभक्ताची माता हे हरिगुणकीर्ति । इजवर पोट भरिती चांडाळ ते ॥ २ ॥ अंत्यज हा ऐसें कल्पांतीं करीना । भाड हे खाईना जननीची ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याचें दर्शनही खोटें । पूर्वजांसी नेटें नरका धाडी ॥ ४ ॥ [१९७]

किती लाजिरवाणा । मेरे उपजोनि शाहाणा ॥ १ ॥ एका घाईं न करी तुटी । न निघे देवासोई भेटी ॥ २ ॥ सोसूनि आबाळी । घायाळ तें ढुंग चोळी ॥ ३ ॥ सावध करी तुका । म्हणे निजले हो आइका ॥ ४ ॥ [१९८]

किती एका दिवशीं । बुद्धी जाली होती ऐसी ॥ १ ॥ कांहीं करावें स्वहित । तों हें न घडे उचित ॥ २ ॥ अवलंबूनी भीक । लाज सांडली लौकिक ॥ ३ ॥ तुका म्हणे दीन । जालों मनुष्यपणा हीन ॥ ४ ॥ [१९९]

किडा अन्नाचें माणूस । त्याचा म्हणविलया दास ॥ १ ॥ तेंही त्यासी उपेक्षीना । बोल आपुला सांडीना ॥ २ ॥ तो तूं नराचा नरेंद्र । तुजपासूनि इंद्र चंद्र ॥ ३ ॥ तुका म्हणे विश्वंभर । तुज वर्णी फणीवर ॥ ४ ॥ [२००]

कासयासी व्यर्थ घातलें संसारीं । होतें तैसें जरी तुझे चित्तीं ॥ १ ॥ तुझिये भेटीची थोर असे आस । दिसोनी निरास आली मज ॥ २ ॥ आतां काय जिणें झालें निरर्थक । वैकुंठनायक भेटेचि ना ॥ ३ ॥ आडलासी काय कृपेच्या सागरा । रखुमादेवीवरा सोईरिया ॥ ४ ॥ तुका म्हणे देईं चरणांची सेवा । नुपेक्षीं केशवा मायबापा ॥ ५ ॥ [२०१]

काशीयात्रा पांच द्वारकेच्या तीन । पंढरीची जाण एक यात्रा ॥ १ ॥ काशी देह विटंबणें द्वारके जाळणें । पंढरीशीं होणें ब्रह्मरूप ॥ २ ॥ अठरा पगड याती सकळहि वैष्णव । दुजा नाहीं भाव पंढरीसी ॥ ३ ॥ तुका म्हणे असो अथवा नसो भाव । दर्शनें पंढरीराव मोक्ष देतो ॥ ४ ॥ [२०२]

काय मागें आम्ही गुंतलों काशांनीं । पुढें वाहों मनीं धाक देवा ॥ १ ॥ कीर्ति चराचरीं आहे तैसी आहे । भेटोनियां काय द्यावें आम्हां ॥ २ ॥ वेउनी धरणें बैसती उपवासी । हट आम्हांपासीं नाहीं तैसा ॥ ३ ॥ तांतडी तयांनीं केली बिटंबना । आम्हां नारायणा काय उणें ॥ ४ ॥ नाहीं मुक्तिचाड वास वैकुंठींचा । जीवभाव आमुचा देऊं तुज ॥ ५ ॥ तुका म्हणे काय मानेल तें आतां । तूं घेईं अनंता सर्व माझें ॥ ६ ॥ [२०३]

काय बा करीसी सोंवळें ओंवळें । मन नाहीं निर्मळ वाउगेंचि ॥ १ ॥ काय बा करीसी पुस्तकाची मोट । घोकितां हृदयस्फोट हाता न ये ॥ २ ॥ काय बा करीशी टाळ आणि मृदंग । जेथें पांडुरंग रंगला नाहीं ॥ ३ ॥ काय बा करीसी ज्ञानाचीया गोष्टी । करणी नाहीं पोटीं बोलण्याची ॥ ४ ॥ काय बा करीसी दंभ लौकिकातें । हित नाहीं मात तुका म्हणे ॥ ५ ॥ [२०४]

काय फार जरी झालों मी शहाणा । तरी नारायणा नातुडसी ॥ १ ॥ काय झालें जरी मानी मज जन । परि नातुडती चरण तुझे देवा ॥ २ ॥ काय झालें जरी झालों उदासीन । परि वर्म भिन्न तुझें देवा ॥ ३ ॥ काय झालें जरी केले म्यां सायास । म्हणवितों दास भक्त तुझा ॥ ४ ॥ तुका म्हणे तुज दाविल्यावांचुन । तुझें वर्म कोण जाणे देवा ॥ ५ ॥ [२०५]

काय पाहातोसी कृपेच्या सागरा । नराच्या नरेंद्रा पांडुरंगा ॥ १ ॥ नामाचा प्रताप ब्रिदाचा बडिवार । करावा साचार नारायणा ॥ २ ॥ कलीमाजी देव बौद्धरूप झाला । जगाचिया बोला लागूं नका ॥ ३ ॥ माय पुत्रा काय मारूं पाहे कळी । जगाची ढवाळी क्राय काज ॥ ४ ॥ तुका म्हणे या हो कृपेच्या सागरा । रुकुमादेवीवरा मायबापा ॥ ५ ॥ [२०६]

काय तुझी थोरी वर्णूं मी पामर । होसी दयाकर कृपासिंधु ॥ १ ॥ तुजऐसी दया नाहीं आणिकांसी । ऐसे हृषीकेशी नवल एक ॥ २ ॥ कुरुक्षेत्र भूमीवरी पक्षी व्याले । तृणामाजीं केलें कोटें त्यांनीं ॥ ३ ॥ अकस्मात तेथें रणखांब रोविला । युद्धाचा नेमिला ठाव तेथें ॥ ४ ॥ कौरव पांडव दळभर दोन्ही । झुंजावया रणीं आले तेथें ॥ ५ ॥ तये काळीं तुज पक्षी आठवीती । पाव बा श्रीपती म्हणोनियां ॥ ६ ॥ हस्ती घोडे रथ तेथें धांवतील । पाषाण होतील शतचूर्ण ॥ ७ ॥ ऐशिये आकांतीं वांचों कैसे परी । धांव बा श्रीहरी लवलाहें ॥ ८ ॥ टाकोनियां पिलीं कैसें जावें आतां । पावें जगन्नाथा लवलाहीं ॥ ९ ॥ आली तिये काळीं कृपा तुझ्या चित्ता । अनाथांच्या नाथा नारायणा ॥ १० ॥ एका गजाचिया कंठीं घंटा होती । पाडिली अवचिती तयावरी ॥ ११ ॥ अठरा दिवस तेथें द्वंद्वयुद्ध झालें । वारा ऊन लागलें नाहीं तयां ॥ १२ ॥ झुंज झाल्यावरी दाविलें अर्जुना । तुम्हीं नारायणा पक्षियांसी ॥ १३ ॥ पाहें आपुलिया दासां स्यां रक्षिलें । रणीं वांचविलें कैशा परी ॥ १४ ॥ ऐसी तुज माया आपुल्या भक्तांची । माउली आमुची तुका म्हणे ॥ १५ ॥ [२०७]

कां रे दाटोन होतां वेडे । देव आहे तुम्हांपुढें ॥ १ ॥ ज्यासी पाठ नाहीं पोट । करी त्रैलोक्याचा घोंट ॥ २ ॥ तुमची तुम्हां नाहीं सोय । कोणाचें बा काय ॥ ३ ॥ तुका गातो नामीं । तेथें नाहीं तुम्ही आम्ही ॥ ४ ॥ [२०८]

कां रे पुंड्या मातलासी । उभें केलें विठ्ठलासी ॥ १ ॥ वस्ति क्षीरसागरवासी । आला उभा पंढरीसी ॥ २ ॥ भक्ति देखोनी निकट । देवें सोडिलें वैकुंठ ॥ ३ ॥ तुका म्हणे बळी । तूंचि एक भूमंडळीं ॥ ४ ॥ [२०९]

कामिनीसी जैसा आवडे भ्रतार । इच्छीत चकोर चंद्र जैसा ॥ १ ॥ तैसी हे आवडी विठ्ठलाचे पायीं । लागलीया नाहीं गर्भवास ॥ २ ॥ दुष्काळें पीडिल्या आवडे भोजन । आणिक जीवन तृषाक्रांता ॥ ३ ॥ कामातुर जैसा भय लज्जा सांडोनी । आवडे कामिनी सर्व भावें ॥ ४ ॥ तुका म्हणे तैसी राहिली आवडी । पांडुरंग थडी पाववील ॥ ५ ॥ [२१०]

काम क्रोध आड पडले पर्वत । राहिला अनंत पलीकडे ॥ १ ॥ नुलंघवे मज न सांपडे वाट । दुस्तर हा घाट वैरियांचा ॥ २ ॥ आतां कैंचा मज सखा नारायण । गेला अंतरोन पांडुरंग ॥ ३ ॥ तुका म्हणे व्यर्थ मोलाचें शरीर । गेलें हा विचार कळों आला ॥ ४ ॥ [२११]

नाहीं संसाराची चाड । गाऊं हरिचें नाम गोड ॥ १ ॥ हो कां प्राणाचाही घात । परि हा न सोडीं अनंत ॥ २ ॥ जन्मोजन्मीं हाचि धंदा । संतसंग राहो सदा ॥ ३ ॥ तुका म्हणे भाव । तो हा जाणा पंढरिराव ॥ ४ ॥ [२१२]

नाहीं संतांशीं शरण । काय वाचोनी पुराण ॥ १ ॥ म्हणे विठ्ठलाचा दास । देखोनी हांसे परनारीस ॥ २ ॥ करिती विटोवाची भक्ति । दयाधर्म नाहीं चित्तीं ॥ ३ ॥ तेथें नाहीं माझा देव । व्यर्थ श्रमवी हा जीव ॥ ४ ॥ अंगीं नाहीं क्षमा दया । म्हणती भेट पंढरीराया ॥ ५ ॥ नाहीं धर्माची वासना । काय करोनी प्रदक्षिणा ॥ ६ ॥ ऐसें नव्हे भक्तिवर्म । तेथें नाहीं माझा राम ॥ ७ ॥ न ये कृपा कांहीं केल्या । न ये धाम जीव गेल्या ॥ ८ ॥ जैसी खड्गाची धार । विठ्ठलचरणीं तुका शूर ॥ ९ ॥ [२१३]

नाहीं रिकामीक परि वाहे मनीं । तया चक्रपाणि साह्य होय ॥ १ ॥ उद्वेग जीवासी पंढरीचें ध्यान । तया नारायण साह्य करी ॥ २ ॥ शरीरासी बळ नाहीं स्वतां भाव । तया पंढरीराव साह्य करी ॥ ३ ॥ असो नसो बळ राहे पराधीन । तरी अनुमान करूं नका ॥ ४ ॥ तुका म्हणे येणें करोनी चिंतन । तया नारायण जवळीक ॥ ५ ॥ [२१४]

नामाचें सामर्थ्य कां रे दवडिसी । कां रे विसरसी पवाडे हे ॥ १ ॥ खणखणां हाणती खर्गें प्रल्हादासी । न रुपे आंगासी किंचितही ॥ २ ॥ राम कृष्ण हरि ऐसी मारी हांक । तेणें पडे धाक बळियासी ॥ ३ ॥ असों द्या सामर्थ्यें ऐसीया कीर्तीचीं । आवडी तुक्याची भेटी देईं ॥ ४ ॥ [२१५]

नामाचा डांगोरा फिरवीं घरोघरीं । म्हणा हरी हरी सर्व भावें ॥ १ ॥ नामें हरती कर्में वैकुंठींची पैं वस्ति । संनिध श्रीपति सदोदित ॥ २ ॥ नामाचा महिमा बहुतां कळला । नामें उद्धरिला अजामेळ ॥ ३ ॥ गजेंद्राची स्थिती पुराणीं बोलती । नामेंचि श्रीपति पावलासे ॥ ४ ॥ तुका म्हणे नाम घेतां मुक्ति आहे । नामें सर्व पाहें आकळिलें ॥ ५ ॥ [२१६]

नाम पावन पावन । त्याहून पवित्र आहे कोण ॥ १ ॥ शिव हालाहलें तापला । तोही नामें शीतळ जाला ॥ २ ॥ शिवास नामाचा आधार । केला कळिकाळ किंकर ॥ ३ ॥ मरण जालें काशीपुरीं । तेथें नामचि उद्धरी ॥ ४ ॥ तुका म्हणे अवघीं चोरें । एक हरिनाम सोइरें ॥ ५ ॥ [२१७]

नामधारकासी नाहीं वर्णावर्ण । लोखंड प्रमाण नाना जात ॥ १ ॥ शस्त्र अथवा गोळे भलता प्रकार । परिसीं संस्कार सकळ हेम ॥ २ ॥ पर्जन्य वर्षतां जीवना वाहावट । तैं समसकट गंगे मिळे ॥ ३ ॥ सर्व तें हें जाय गंगाचि होऊन । तैसा वर्णावर्ण नाहीं नामीं ॥ ४ ॥ महापुरीं जैसें जातसे उदक । मध्यें ते तारक नाव जैसी ॥ ५ ॥ तये नावेसंगें ब्राह्मण तरती । केवीं ते बुडती अनामिक ॥ ६ ॥ नाना काष्ठजात पडतां हुताशनीं । ते जात होउनी एकरूप ॥ ७ ॥ तेथें निवडेना घुरे कीं चंदन । तैसा वर्णावर्ण नामीं नाहीं ॥ ८ ॥ पूर्वानुवोळख तेंचि पैं मरण । जरि पावे जीवन नामामृत ॥ ९ ॥ नामामृतें झालें मुळीचें स्मरण । सहज साधन तुका म्हणे ॥ १० ॥ [२१८]

नाम तारक भवसिंधु । विठ्ठल तारक भवसिंधु ॥ १ ॥ नामधारक तया अरि मित्रु । समता त्यागुनियां क्रोधु ॥ २ ॥ नामधारक तया । कदापि न घडे विषयाचा बाधु ॥ ३ ॥ ज्या नामें तरले शुकादिक । नारद संत मुनिजन साधु ॥ ४ ॥ जाणूनियां जें न सरे । तें नेणती जैसा गज अंधु ॥ ५ ॥ सहज तुकया । नामचि जपतां स्वरूपीं वेधु ॥ ६ ॥ [२१९]

नाम आहे जयापाशीं । जेथें राहे तेथेंची काशी ॥ १ ॥ ऐसा नामाचा महिमा । जाणे वाल्मीक शंकर उमा ॥ २ ॥ नाम प्रल्हादबाळ । जाणे पापी अजामेळ ॥ ३ ॥ नाम जाणे तो नारद । नामें ध्रुवा अक्षय पद ॥ ४ ॥ नाम गणिकेतें तारी । पशु गजेंद्र उद्धरी ॥ ५ ॥ नाम जाणे हनुमंत । जाणताती महासंत ॥ ६ ॥ नाम जाणे शुकमूर्ति । जाणे राजा परिक्षिती ॥ ७ ॥ नाम जाणे तुका । नाहीं संसाराचा धोका (नाम जाणे तुका वाणी । दिलें संसाराला पाणी) ॥ ८ ॥ [२२०]

नव्हे हें कवित्व टांकसाळी नाणें । घेती भले जन भले लोक ॥ १ ॥ लागलासे झरा पूर्ण नवनीतें । सेविलिया हित फार होय ॥ २ ॥ तुका म्हणे देवा केला बलात्कार । अंगा आलें फार महंतपण ॥ ३ ॥ [२२१]

नव्हे निष्ठावंत तुज काय बोल । सेवेविण मोल मागतसें ॥ १ ॥ न घडे भजन शुद्ध भावनिष्ठा । आपुल्या अदृष्टावरी बोल ॥ २ ॥ पूर्वीं झाले भक्त असंख्य विरक्त । काम क्रोध अहंते निर्दाळिलें ॥ ३ ॥ ऐसी अंगवण नाहीं मज देवा । करीतसें हेवा भेटावया ॥ ४ ॥ कृपा करोनियां पुरवीं असोसी । आपुल्या ब्रीदासी राखावया ॥ ५ ॥ तुका म्हणे एक बाळक अज्ञातें (अज्ञात) । त्यासी हे पोसिते (पोसीत) मायबापें ॥ ६ ॥ [२२२]

न म्हणे वो आम्ही आपुलेनि चित्तीं । निःशेष अतिप्रीति विषयीं तो ॥ १ ॥ खोटा तो विटाळ म्हणोनि गाबाळ सांडियेलें ॥ २ ॥ भांगतमाखूचा चित्ताचा आदर । कोरडें उत्तर चाटावें तें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही नव्हों फजितखोर । तुटीचा व्यापार करावया ॥ ४ ॥ [२२३]

न लागावी दिठी । माझी तुझे मुखवटी ॥ १ ॥ आधीं पाउलें पाउलें । तें मी पाहेन तें भलें ॥ २ ॥ देईन हे काया । वरी सांडणें सांडाया ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । बहु आवडसी जीवा ॥ ४ ॥ [२२४]

नरदेह वायां जाय । सेवीं सद्गुरूचे पाय ॥ १ ॥ सांडोनियां अहंभाव । वरीं (धरीं) भक्ति पूजीं देव ॥ २ ॥ थोराचिये वाटे । जातां भवशोक आटे ॥ ३ ॥ प्रल्हादातें तारी । तुका म्हणे कंठीं धरीं ॥ ४ ॥ [२२५]

नको विद्या वयसा आयुष्य फारसें । नाहीं मज पिसें मुक्तीचेंही ॥ १ ॥ रामकृष्ण म्हणतां जावो माझा प्राण । हेंचि कृपादान मागतसें ॥ २ ॥ नको धन मान न वाढो संतान । मुखीं नारायण प्राण जावा ॥ ३ ॥ तुका म्हणे दीन काकुलती येतों । तुज निरवितों पांडुरंगा ॥ ४ ॥ [२२६]

नको येऊं लाजे होय तूं परती । भजों दे श्रीपती सखा माझा ॥ १ ॥ तुझे संगतीनें मोठा झाला घात । झालों मी अंकित दुर्जनाचा ॥ २ ॥ तुका म्हणे रांडे घेइन काटीवरी। धनी सहाकारी राम केला ॥ ३ ॥ [२२७)

न कळे महिमा वेद मौनावले । जेथें पांगुळले मनपवन ॥ १ ॥ चंद्र सूर्य ज्याचें तेज वागविती । तेथें माझी मती कोणीकडे ॥ २ ॥ काय म्यां वानावें तुझ्या थोरपणा । सहस्रवदना वर्णवेना ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही बाळ तूं माउली । कृपेची साउली करीं देवा ॥ ४ ॥ [२२८]

धांवोनियां आलों पहावया मुख । गेलें माझें दुःख जन्मांतरिंचें ॥ १ ॥ ऐकिलेंहि होतें तैसेंचि पाहिलें । मन स्थिरावलें तुझ्या पायीं ॥ २ ॥ तुका म्हणे माझी इच्छा पूर्ण झाली । कांहीं न राहिली वासना हे ॥ ३ ॥ [२२९]

धिग तो दुर्जन नाहीं भूतदया । व्यर्थ तया माय प्रसवली ॥ १ ॥ कठिण हृदय तया चांडाळाचें । जो नेणे पराचें दुःख कांहीं ॥ २ ॥ आपुला हा प्राण तैसे सकल लोक । न करी विवेक पशु जैसा ॥ ३ ॥ तुका म्हणे सुखें कापीतसे गळे । आपुलिया वेळे रडतसे ॥ ४ ॥ [२३०]

धरोनियां फरश करीं । भक्तजनांचीं विघ्नें वारी ॥ १ ॥ ऐसा गजानन महाराजा । त्याचे चरणीं लाहो लागो माझा ॥ २ ॥ सेंदूर शमी बहुप्रिय ज्याला । तुरा दुर्वांचा शोभला ॥ ३ ॥ उंदिर असे जयाचें वहन । माथां जडितमुगुट पूर्ण ॥ ४ ॥ नागयज्ञोपवीत रुळे । शुभ्र वस्त्र शोभित साजिरें ॥ ५ ॥ भावमोदक हराभरी । तुका भावें हे पूजा करी ॥ ६ ॥ [२३१]

धरिल्या देहाचें सार्थक करीन । आनंदें भरीन तिन्ही लोक ॥ १ ॥ लावीन निशाण जावया वैकुंठा । माजवीन पेठा कीर्तनाच्या ॥ २ ॥ नामाचिया नौका करीन सहस्रवरि । नावाडा श्रीहरि पांडुरंग ॥ ३ ॥ भाविक हो येथें धरा रे आवांका । म्हणे दास तुका शुद्धयाती ॥ ४ ॥ [२३२]

धन्य आतां काय करूं । माझें तान्हुलें लेंकरूं ॥ १ ॥ धन्या अवचित मरण आलें । मज कोणासी निरविलें ॥ २ ॥ माझें दार नका पाडूं । त्याचे हातपाय तोडूं ॥ ३ ॥ एके हातीं धरली दाढी । दुजे हातीं घे कुऱ्हाडी ॥ ४ ॥ येरी घाव घालूं पाहे । तंव तो उठोनि उभा राहे ॥ ५ ॥ तुका म्हणे अवघीं चोरें । सेखीं रामनाम सोइरें ॥ ६ ॥ [२३३]

धन्य देहू गांव पुण्यभूमि ठाव । तेथें नांदे देव पांडुरंग ॥ १ ॥ धन्य क्षेत्रवासी लोक ते दैवाचे । उच्चारिती वाचे नामघोष ॥ २ ॥ कर कटीं उभा विश्वाचा जनिता । वामांगीं ते माता रखुमादेवी ॥ ३ ॥ गरुडपारीं उभा जोडूनियां कर । अश्वत्थ समोर उत्तरामुख ॥ ४ ॥ दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर । शोभे गंगानीर इंद्रायणी ॥ ५ ॥ लक्ष्मी नारायण बल्लाळाचें बन । तेथें अधिष्ठान सिद्धेश्वर ॥ ६ ॥ विघ्नराज द्वारीं बहिरव बाहेरी । हनुमंत शेजारीं सहित दोघे ॥ ७ ॥ तेथें दास तुका करितो कीर्तन । हृदयीं चरण विठोबाचे ॥ ८ ॥ [२३४]

धन्य त्या गौळणी इंद्राच्या पूजनीं । नैवेद्य हिरोनी खातो कृष्ण ॥ १ ॥ अरे कृष्ण इंद्र अमर इच्छिती । कोण तयांप्रति येईल आतां ॥ २ ॥ तुका म्हणे देव दाखवी विंदान । नैवेद्य खाऊन हांसों लागे ॥ ३ ॥ [२३५]

धन्य जालों हो संसारीं । आम्हीं देखिली पंढरी ॥ १ ॥ चंद्रभागे करूं स्नान । पुंडलीकाचें दर्शन ॥ २ ॥ करूं क्षेत्रप्रदक्षिणा । भेटूं संत या सज्जनां ॥ ३ ॥ उभे राहूं गरुडपारीं । डोळे भरुनी पाहों हरी ॥ ४ ॥ तुका म्हणे वाळवंटीं । महालाभ फुकासाठीं ॥ ५ ॥ [२३६]

धडकला अग्नि आम्हां येती वरी । गोपाळ श्रीहरी विनविती ॥ १ ॥ अरे कृष्णा काय विचार करावा । आला रे वोणवा जळों आतां ॥ २ ॥ अरे कृष्णा तुझें नाम बळिवंत । होय कृपावंत राख आतां ॥ ३ ॥ तुका म्हणे अरे कृष्णा नारायणा । गोपाळीं करुणा भाकितीलें ॥ ४ ॥ [२३७]

दोष करूनि आम्ही पतित सिद्ध झालों । पावन मागों (मागें) आलों ब्रीद तुझें ॥ १ ॥ आतां पतिता तारावें कीं ब्रीद हें सोडावें । यांत जें पुरवे तेंची सांगा ॥ २ ॥ उद्धार तुमच्यानें नव्हे हा श्रीहरि । सोडा झडकरी ब्रीद आतां ॥ ३ ॥ तें ब्रीद घेउनी हिंडों दारोदारीं । सांगूं तुझी हरि कीर्ति जगा ॥ ४ ॥ देवें हारविलें ब्रीद हें सोडिलें । पतितें जिंकिलें आम्हीं देवा ॥ ५ ॥ तुका म्हणे आम्ही उठलों दैन्यवरि । विचारा श्रीहरी तुम्ही आतां ॥ ६ ॥ [२३८]

पांडुरंगा तुझे काय वाणूं गुण । पवाडे हे धन्य जगीं तुझे ॥ १ ॥ दंडिलें दुर्वासा सुरा असुरानें । तो आला गाऱ्हाणें सांगावया ॥ २ ॥ बळीचिये द्वारीं तुम्ही बैसलेति । दुर्वास विनंति करी भावें ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपासागरा श्रीहरी । तुझी भक्तांवरी प्रेमछाया ॥ ४ ॥ [२३९]

पाप ताप माझे गुणदोष निवारीं । कृष्णा विष्णु हरी नारायणा ॥ १ ॥ काम क्रोध वैरी घालोनि बाहेरी । तूं राहें अंतरीं पांडुरंगा ॥ २ ॥ करिशील तरी नव्हे काई एक । निर्मिलें त्रैलोक्य हेळामात्रें ॥ ३ ॥ समर्थासी काय आम्हीं शिकवावें । तुका म्हणे यावें पांडुरंगा ॥ ४ ॥ [२४०]

प्रल्हादाकारणें नरसिंह झालासी । त्याचिया बोलासी सत्य केलें ॥ १ ॥ राम कृष्ण गोविंद नारायण हरि । गर्जे राजद्वारीं भक्तराज ॥ २ ॥ विठ्ठल माधव मुकुंद केशव । तेणें दैत्यराव दचकला ॥ ३ ॥ तुका म्हणे तयाकारणें सगुण । भक्ताचें वचन सत्य केलें ॥ ४ ॥ [२४१]

प्रपंचाची पीडा सोसीतो अघोरी । जया क्षणभरी नाम न ये ॥ १ ॥ नाम नाठवितो आत्मया रामाचें । धिग जिणें त्याचें भवा मूळ (भवमूळ) ॥ २ ॥ मूळ तें पापाचें आचरण तयाचें । नाहीं राघवाचें स्मरण त्या ॥ ३ ॥ स्मरण भजन नावडे जयासी । आंदणीया दासी यमदूतां ॥ ४ ॥ चिंतन रामाचें न करी तो दोषी । एकांत तयासी बोलों नये ॥५॥ नये त्याचा संग धरूं म्हणे तुका । धरितां पातका वांटेकरी ॥ ६ ॥ [२४२]

प्रथमारंभीं लंबोदर । सकळ सिद्धींचा दातार । चतुर्भुज फरशधर । न कळे पार वर्णितां ॥ १ ॥ तो देव नटला गौरीबाळ । पायीं बांधोनी घागऱ्या घोळ । नारदतुंबर सहित मेळ । सुटला पळ विघ्नासी ॥ २ ॥ नटारंभीं थाटियला रंग । भुजा नाचवी हालवी अंग । सेंदुरविलेपनें चांग । मुगुटीं नाग मिरविला ॥ ३ ॥ जया मानवती देव ऋषिमुनि । पाहातां न पुरे डोळियां धणी । असुर जयाच्या चरणीं । आदि अवसानीं तोचि एक ॥ ४ ॥ सकळां सिद्धींचा दातार । जयाच्या रूपा नाहीं पार । तुका म्हणे आमुचा दातार । भवसागर तारील हो ॥ ५ ॥ [२४३]

प्रथम नमन तुज एकदंता । रंगीं रसाळ वोढवीं कथा । मति सौरस करीं प्रबळता । जेणें फिटे आतां अंधकार ॥ १ ॥ तुझिये कृपेचें भरितें । आणीक काय राहिलें तेथें । मारग सिद्धाच्यानि पंथें ।

पावविसी तेथें तूंचि एक ॥ २ ॥ आरंभा आदि तुझें वंदन । सकळ करितां कारण । देव ऋषिमुनि आदिकरून । ग्रंथ पुराण निर्माणीं ॥ ३ ॥ काय वर्णूं तुझी गति । एवढी कैंची मज मति । दीनानाथ तुज म्हणती । करीं सत्य वचन हेंचि आपुलें ॥ ४ ॥ मज वाहावतां मायेच्या पुरीं । बुडतां डोहीं भवसागरीं । तुजवांचूनि कोण तारी । पाव झडकरी तुका म्हणे ॥ ५ ॥ [२४४]

प्रगट व्हावें हे अज्ञानवासना । माझी नारायणा हीन बुद्धि ॥ १ ॥ खाणीवाणी होसी काष्ठीं तूं पाषाणीं । जंतु जीवजनीं प्रसिद्ध हा ॥ २ ॥ ज्ञानहीन तुज पाहें अल्पमति । लहान हा चित्तीं धरोनियां ॥ ३ ॥ परि तूं कृपाळ होसी देवराणा । ब्रीदें तुझीं जना प्रसिद्ध हें ॥ ४ ॥ उतावीळ बहु भक्तांचिया काजा । होसी केशीराजा तुका म्हणे ॥ ५ ॥ [२४५]

पंधरा दिवसांमाजी साक्षात्कार झाला । विठोबा भेटला निराकार ॥ १ ॥ भांबगिरिपाठारीं वस्ति जाण केली । वृत्ति थिरावली परब्रह्मीं ॥ २ ॥ निर्वाण जाणोनि आसन घातलें । ध्यान आरंभिलें देवाजीचें ॥ ३ ॥ सर्प विंचू व्याघ्र आंगासी झोंबले । पीडूं जे लागले सकळिक ॥ ४ ॥ दीपकीं कर्पूर कैसा तो विराला । तैसा देह जाला तुका म्हणे ॥ ५ ॥ [२४६]

पंढरीस जाऊं म्हणती । यम थोर चिंता करि ती ॥ १ ॥ या रे नाचों ब्रह्मानंदें । विठ्ठल नामाचिया छंदें ॥ २ ॥ धरिली पंढरीची वाट । पापें रिगालीं कपाट ॥ ३ ॥ केलें भीवरेचें स्नान । यमपुरीं पडिले खान ॥ ४ ॥ दुरोनि देखिली पंढरी । पापें गेलीं दुरच्यादुरी ॥ ५ ॥ दुरोनि देखिलें राउळ । हरुषें नाचती गोपाळ ॥ ६ ॥ तुका म्हणे नाहीं जाणें । अखंड पंढरीये राहाणें ॥ ७ ॥ [२४७]

पंढरी पावन झालें माझें मन । आतां करूं ध्यान विठोबाचें ॥ १ ॥ आतां ऐसें करूं नाम गाऊं गीतीं । सुखाचा सांगाती विठो करूं ॥ २ ॥ संग करूं त्याचा तो सखा आमुचा । अनंता जन्मांचा मायबाप ॥ ३ ॥ परतोनि सोई धरीं कां रे मना । विठ्ठलचरणा घालीं मिठी ॥ ४ ॥ घातलीसे मिठी नाहीं भक्तिभाव । उदार पंढरिराव तुका म्हणे ॥ ५ ॥ [२४८]

पंढरी चोहटा मांडियेला खेळ । वैष्णव मिळोनी सकळ रे । टाळ टिपरी मांदळे एक नाद रे । झाला बसवंत देवकीचा बाळ रे ॥ १ ॥ चला तें कवतुक भाई रे । पाहों डोळां कामीं गुंतलेती काई रे । भाग्यवंत कोणी गेले सांगाती । ऐसें सुख त्रिभुवनीं नाहीं रे ॥ २ ॥ आनंदाचे वाद सुखाचे संवाद । एक एका दाखविती छंद रे । साही अठरा चारी घालूनियां घाई । नाचती फेरीं टाळशुद्ध रे ॥ ३ ॥ भक्तीचीं भूषणें मुद्रा आभरणें । शोभती चंदनाच्या उट्या रे । सत्व सुंदर कास घालुनि कुसरी । गर्जती नाम बोभाटीं रे ॥ ४ ॥ हरि हर ब्रह्मा तीर्थांसहित भीमा । देव कोटी तेहतीस रे । विस्मित होऊनि ठाकले सकळ जन । अमरावती केली ओस रे ॥ ५ ॥ वर्णितील थोरी वैकुंठींचि परी । न पवे पंढरीची सरी रे । तुकयाचा दास म्हणे नका आळस करूं । सांगतों नरनारींस रे ॥ ६ ॥ [२४९]

पंढरीची वारी जयांचिये घरीं । पायधुळी शिरीं वंदिन त्यांची ॥ १ ॥ दासाचा मी दास पोसणा डोंगर । आतां बहु फार काय बोलों ॥ २ ॥ जातीचें मी हीन न कळे भजन । म्हणोनि संतचरण इच्छीतसें ॥ ३ ॥ तुका म्हणे मज म्हणावें आपुलें । बहुतां तारिलें संतजनीं ॥ ४ ॥ [२५०]

पंढरीचा वारकरी । खेपा वैकुंठ बंदरीं ॥ १ ॥ तया नाहीं आणखी पेणें । सदा वैकुंठीं राहाणें ॥ २ ॥ आला गेला केल्या यात्रा । उद्धरिलें कुळा सर्वत्रा ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं । यासि संदेह कल्पांतींही ॥ ४ ॥ [२५१]

पंढरपुरींचें दैवत भजावें। काया वाचा जावें शरण त्या ॥ १ ॥ मनीं ध्यान करी अहंता धरूनी। तया चक्रपाणी दूर ठेला ॥ २ ॥ मान अभिमान सांडुनियां द्यावे। अवघ्या नीच व्हावें तरी प्राप्ति ॥ ३ ॥ तुका म्हणे हेंचि कोणासी सांगावें। सादर होऊनि भावें भजें देवा ॥ ४ ॥ [२५२]

पंचाग्निसाधन करूं धुम्रपान। काय तीर्थाटन करूं सांग ॥ १ ॥ सांग कोणे देशीं आहे तुझें गांव। घेऊनियां धांव येऊं तेथें ॥ २ ॥ सांग कांहीं वृत्त कोण करूं व्रत। जेणें कृपावंत होसील तूं ॥ ३ ॥ वाटतें शेवटीं झालासी निष्ठुर। न देसी उत्तर तुका म्हणे ॥ ४ ॥ [२५३]

पोट लागलें पाठीशीं। हिंडवितें देशोदेशीं ॥ १ ॥ पोटाभेणें जिकडे जावें। तिकडे पोट येतें सवें ॥ २ ॥ जप तप अनुष्ठान। पोटासाठीं झाले दीन ॥ ३ ॥ पोटें सांडियेली चवी। नीचापुढें तें नाचवी ॥ ४ ॥ पोट कांशियानें भरे। तुका म्हणे झुरझुरूं मरे ॥ ५ ॥ [२५४]

पूर्वी बहुतांचे केले प्रतिपाळ। तें मज सकळ श्रुत आहे ॥ १ ॥ अज अविनाश निर्गुण निरामय। विचारिलें काय त्यांचे वेळे ॥ २ ॥ तयांचिये वेळे होशी कृपावंत। माझाचि कां अंत पाहातोसी ॥ ३ ॥ नारद प्रल्हाद उपमन्यु धुरू। त्यांचा अंगीकारू कैसा केला ॥ ४ ॥ अंबऋषी साठीं गर्भवास झाले। कां गा मोकलिलें कृपासिंधु ॥ ५ ॥ धर्माचें उच्छिष्ट अर्जुनाचीं घोडीं। आणीक सांकडीं कितीएक ॥ ६ ॥ झालासी लुगडीं तया द्रौपदीचीं। न ये कां आमुची कृपा कांहीं ॥ ७ ॥ तुका म्हणे कां गा झालासी कठीण। माझा भाग सीण कोण जाणे ॥ ८ ॥ [२५५]

पांडुरंगा आतां ऐका हे विनंती। बहु माझे चित्तीं भय वाटे ॥ १ ॥ नाहीं आइकिलें संतांचियां मुखें। तें या मज लोकें भेडसाविलें ॥ २ ॥ विष्णुदासां गति नाहीं तरावया। म्हणती गेलें वायां कष्टतही ॥ ३ ॥ धिक्कारिती मज करितां कीर्तन। काय सांगों शीण ते काळींचा ॥ ४ ॥ तुका म्हणे मज वाटतें उदास। काय करूं यास पांडुरंगा ॥ ५ ॥ [२५६]

पायां लावुनियां दोरी। भृंग बांधिला लेंकुरीं ॥ १ ॥ तैसा पावसी बंधन। मग सोडवील कोण ॥ २ ॥ गळां बांधोनियां दोरी। वानर हिंडवी घरोघरीं ॥ ३ ॥ तुका म्हणे पाहें। रीस धापा देत आहे ॥ ४ ॥ [२५७]

पाया झाला नारू। तेथें बांधला कापरू ॥ १ ॥ तेथें बिबव्याचें काम। अधमासी तो अधम ॥ २ ॥ रुसला गुलाम। धणी करितो सलाम ॥ ३ ॥ तेथें चाकराचें काम। अधमासी तो अधम ॥ ४ ॥ रुसली घरची दासी। धणी समजावी तियेसी ॥ ५ ॥ तेथें बटकीचें काम। अधमासी तो अधम ॥ ६ ॥ देव्हाऱ्यावरी विंचू आला। देवपूजा नावडे त्याला ॥ ७ ॥ तेथें पैजारेचें काम। अधमासी तो अधम ॥ ८ ॥ तुका म्हणे जाती। जातीसाठीं खाती माती ॥ ९ ॥ [२५८]

पापी तो नाठवी आपुल्या संचिता। ठेवी भगवंतावरी बोल ॥ १ ॥ भेईना करितां पापाचे डोंगर। दुर्जन पामर दुराचारी ॥ २ ॥ नाठवी तो खळ आपुली करणी। देवासी निंदोनी बोलतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याच्या तोंडा लागो कांटी। नाहीं जगजेठी जया चित्तीं ॥ ४ ॥ [२५९]

पापाचीं संचितें देहासी दंडणा। तुज नारायणा बोल नाहीं ॥ १ ॥ पेरी कडू जिरें मागे अमृतफळें। अर्कवृक्षा केळें कैसीं येती ॥ २ ॥ सुख अथवा दुःख भोग हा देहाचा। नाश हा ज्ञानाचा न करावा ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां देवा कां रुसावें। मनासी पुसावें काय केलें ॥ ४ ॥ [२६०]

पापाची वासना नको दावूं डोळां। त्याहूनि अंधळा बराच मी ॥ १ ॥ निंदेचें श्रवण नको माझे कानीं। बधिर करोनि ठेवीं देवा ॥ २ ॥ अपवित्र वाणी नको माझ्या मुखा। त्याजहुनि मुका

बराच मी ॥ ३ ॥ नको मज कधीं परस्त्रीसंगति । जनांतून माती उठतां भली ॥ ४ ॥ तुका म्हणे मज अवघ्याचा कांटाळा । तूं एक गोपाळा आवडसी ॥ ५ ॥ [२६१]

पाण्या निघाली गुजरी । मन ठेविलें दो घागरीं । चाले मोकळ्या पदरीं । परी लक्ष तेथें ॥ १ ॥ वावडी उडाली अंबरीं । हातीं धरोनियां दोरी । दिसे दुरिच्या दुरी । परी लक्ष तेथें ॥ २ ॥ चोर चोरी करी । ठेवी वनांतरीं । वर्ततसे चराचरीं । परी लक्ष तेथें ॥ ३ ॥ व्यभिचारिणी नारी । घराश्रम करी । परपुरुष जिव्हारीं । परी लक्ष तेथें ॥ ४ ॥ तुका म्हणे असों । भलतिये व्यापारीं । लक्ष सर्वेश्वरीं । चुकों नेदीं ॥ ५ ॥ [२६२]

पक्षीयांचे घरीं नाहीं सामुगरी । त्यांची चिंत्ता करी नारायण ॥ १ ॥ अजगर जनावर वारुळांत राहे । त्याजकडे पाहे पांडुरंग ॥ २ ॥ चातक हा पक्षी नेघे भूमिजळ । त्यासाठीं घननीळ नित्य वर्षे ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही पिपीलिकांची जात । पुरवीं मनोरथ पांडुरंगा ॥ ४ ॥ [२६३]

पहावा नयनीं विठ्ठलचि एक । कांहीं तरी सार्थक संसाराचें ॥ १ ॥ कोठें पाहों तुज कां गा लपलासी । कांहीं बोल मशीं नारायणा ॥ २ ॥ वाटतें उदास मज दाही दिशा । तुजविण हृषीकेशा वांचोनियां ॥ ३ ॥ नको ठेवूं मज आपणा वेगळें । बहुत कळवळे तुजलागीं ॥ ४ ॥ तुका म्हणे भेटी देईं नारायणा । घडी कंठवेना तुजविण ॥ ५ ॥ [२६४]

पहावया तुझा जरी बोलें अंत । तरी माझे जात डोळे देवा ॥ १ ॥ स्तंभीं तुज नाहीं घातलें प्रल्हादें । आपुल्या आनंदें अवतार ॥ २ ॥ भक्ताचिया काजा झालासी सगुण । तुज नाहीं गुण रूप नाम ॥ ३ ॥ ऐसा कोण देवा अधम यातीचा । निर्धार हा साचा नाहीं तुझा ॥ ४ ॥ तुका म्हणे बोलों कवतुकें गोष्टी । नेदी येऊं पोटीं राग देवा ॥ ५ ॥ [२६५]

पसरोनी मुखें । कैसे धालों बा हरिखें ॥ १ ॥ ब्रह्मादिकां दुर्लभ वांटा । आम्हां फावला रानटां ॥ २ ॥ गोड लागे काय तरी । कृपावंत झाला हरी ॥ ३ ॥ उडती थेंबुटे । अमृताहुनी गोमटे ॥ ४ ॥ गोडाहुनी गोड । जिव्हा नाचे वाटे कोड ॥ ५ ॥ खुणावुनी तुका । दावी वर्म बोलों नका ॥ ६ ॥ [२६६]

पर्वकाळीं धर्म न करी नासरी । खर्ची राजद्वारीं द्रव्यरासी ॥ १ ॥ सोइऱ्यासी करी पाहुणेर बरा । कोंडितो ठोंबरा संतांलागीं ॥ २ ॥ बाइलेच्या गोता आवडीनें पोसी । मातापितरांसी दवडोनी ॥ ३ ॥ श्राद्धीं कष्टी होय सांगतां ब्राह्मण । गोवार मागून सावडीतो ॥ ४ ॥ नेतो पानें फुलें वेश्येला उदंड । ब्राह्मणासी खांड नेदी एक ॥ ५ ॥ हातें मोऱ्या शोधी कष्ट करी नाना । देवाच्या पूजना कांटाळतो ॥ ६ ॥ सारा वेळ धंदा कारितां श्रमेना । साधूच्या दर्शना जातां कुंथे ॥ ७ ॥ हरीच्या कीर्तनीं गुंगायासी लागे । येरवीं तो जागे उगलाची ॥ ८ ॥ पुराणीं बैसतां नाहीं रिकामटी । खेळतो सोंगटी अहोरात्र ॥ ९ ॥ देवाच्या विभूति न पाहे सर्वथा । करी पानवथा नेत्रभिक्षा ॥ १० ॥ गाईला देखोनी बदबदां मारी । घोड्याची चाकरी गोड लागे ॥ ११ ॥ ब्राह्मणाचें तीर्थ घेतां त्रास मोठा । प्रेमें घेतो घोटा घटघटां ॥ १२ ॥ तुका म्हणे ऐसे प्रपंचीं गुंतले । जन्मोनि मुकले विठोबासी ॥ १३ ॥ [२६७]

पय दधि घृत आणि नवनीत । तैसें दृश्यजात एकपणें ॥ १ ॥ कनकाचे पाहीं अलंकार केले । कनकत्वा आले एकपणें ॥ २ ॥ मृत्तिकेचे घट झाले नानापरी । मृत्तिका अवधारीं एकपणें ॥ ३ ॥ तुका म्हणे एक एक ते अनेक । अनेकत्वीं एक एकपणा ॥ ४ ॥ [२६८]

पडली घोर रजनी । संगीं कोणी नसेचि ॥ १ ॥ पाहा हो कैसें चालविलें । पिसें गोवलें लावुनी ॥ २ ॥ कोठें लपविलें तें अंग । होता संग दिला तो ॥ ३ ॥ मज कधीं नव्हतें ठावें । दोहीं भावें वाटोळें ॥ ४ ॥ तुका म्हणे कैंची उरी । दोहींपरी नाडिलें ॥ ५ ॥ [२६९]

नीत सांडोनि अवनीत चाले । भंडउभंड भलतेंचि बोले ॥ १ ॥ त्यांत कोणाचें काय बा गेलें । ज्याचें तेणें अनहित केलें ॥ २ ॥ ज्यासी वंदावें त्यासी निंदी । मैत्री सांडोनि होतसे दंदी ॥ ३ ॥ आन यातीचे संगती लागे । संतसज्जनामध्यें ना वागे ॥ ४ ॥ केल्याविण पराक्रम सांगे । जेथें सांगे तेथेंचि भीक मागे ॥ ५ ॥ करी आपुलाचि संभ्रम । परि पुढें कठीण फार यम ॥ ६ ॥ तुका म्हणे कांहीं नित्य नेम । चित्तीं न धरी तो अधम ॥ ७ ॥ [२७०]

नीट पाट करूनी थाट । दावीतसे तोरा । आपणाकडे पाहो कोणी । निघाली बाजारा ॥ १ ॥ ते सौरी नव्हे निकी । भक्तीविण फिकी ॥ २ ॥ चांग भांग करूनी सोंग । दावी माळा मुदी । रुक्याची आस धरूनी । हालवी ती फुदी ॥ ३ ॥ थेरे घरीं करी फेरी । तेथें नाचे बरी । जेथें निघे रुका तेथें हालवी टिरी ॥ ४ ॥ अंत मांग बाहेर चांग । सौरी ती नव्हे तेग । तुका दास नटतसे । न करी त्याचा संग ॥ ५ ॥ [२७१]

निंदक तो परउपकारी । काय वर्णूं त्याची थोरी । तो रजकाहुनि भला । परि सर्व गुणें आगळा ॥ १ ॥ नेघे मोल धुतो फुका । पाय वरच्यावरी देखा । करीतसे साधका । शुद्ध सरते तीहीं लोकीं ॥ २ ॥ मुखसंवदणी सांगातें । अवघें सांठविलें तेथें । जिव्हा साबण निरुतें । दोष काढी जन्माचे ॥ ३ ॥ तया ठाव यमपुरीं । वास करणें अघोरीं । त्यासी दंडण करी । तुका म्हणे न्हाणी ते ॥ ४ ॥ [२७२]

निजसेजेची अंतुरी । पादलिया कोण मारी ॥ १ ॥ तैसा आम्हांसी उबगतां । तुका विनवितो संतां ॥ २ ॥ मूल मांडीवरी हागलें । तें बा कोणें रे त्यागिलें ॥ ३ ॥ दासी कामासी चुकली । ते बा कोणें रे विकली ॥ ४ ॥ पांडुरंगाचा तुका पापी । संतसाह्यें काळासी दापी ॥ ५ ॥ [२७३]

मन उताविळ । झालें न राहे निश्चळ ॥ १ ॥ दे रे भेटी पंढरिराया । उभारोनि चारी बाह्या ॥ २ ॥ सर्वांग तळमळी । हात पाय रोमावळी ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे कान्हा । भूक लागली नयना ॥ ४ ॥ [२७४]

मणि पडिला दाढेसी मकरतोंडीं । सुखें हस्तेंचि काढवेल प्रौढी ॥ १ ॥ परी मूर्खाचें चित्त बोधवेना । दुधें कुर्मेच्या (कूर्मीच्या) पाळवेल सेना ॥ २ ॥ सकळ पृथ्वी हिंडतां कदाचित । ससीसिंगाची प्राप्ति होय तेथें ॥ ३ ॥ अतिप्रयत्नें गाळितां वाळुवेतें । दिव्य तेलाची प्राप्ति होय तेथें ॥ ४ ॥ अतिक्रोधें खवळला फणी पाही । धरूं येतो मस्तकीं पुष्पप्रायी ॥ ५ ॥ पाहा ब्रह्मानंदेंचि एकी हेळा । महापातकी तो तुका मुक्त केला ॥ ६ ॥ [२७५]

भोगियेल्या नारी । परी तो बाळब्रह्मचारी ॥ १ ॥ ऐसी ज्याचे अंगीं कळा । पार न कळे वेदाला ॥ २ ॥ बळी बळी थोर थोर । मोडोनियां केले चूर ॥ ३ ॥ वांकडी कुबजा । सरसी आणियेली वोजा ॥ ४ ॥ मल्ल रगडिला पायीं । गज झुगारिला बाहीं ॥ ५ ॥ जिवें मारियेला मामा । धांवे भक्तांचिया कामा ॥ ६ ॥ तुका म्हणे पूर्ण । दावी भक्तीची विंदानें ॥ ७ ॥ [२७६]

भूत नावरे कोणासी । पुंडलीकें खिळिलें त्यासी ॥ १ ॥ समचरण असे विटे । कटीं कर उभें नीट ॥ २ ॥ वाळुवंटीं नाचती संत । प्रेमामृतें डुल्लत ॥ ३ ॥ तुका म्हणे पुंडलिका । भक्तिबळें तूंचि निका ॥ ४ ॥ [२७७]

भीमातीरवासी । तेथें निश्चयेंसी काशी ॥ १ ॥ मुख्य मुक्तीचें माहेर । ऐसें जाणा पंढरपूर ॥ २ ॥ घडे भीवरेशीं स्नान । त्यासी पुन्हां नाहीं जन्म ॥ ३ ॥ भाव धरोनी नेटका । मोक्ष जवळी म्हणे तुका ॥ ४ ॥ [२७८]

भीमातीरींचा नाटक। यानें लावियेलें चेटक ॥ १ ॥ मन बुद्धि झाली ठक। नेणें संसाराची दुक ॥ २ ॥ कैशी प्रासंगीक वाणी। प्रत्यादर कडसणी ॥ ३ ॥ तुका म्हणे मोठा ठक। जेथें तेथें उभा ठाके ॥ ४ ॥ [२७९]

भावभक्तिवादें करावें कीर्तन। आशाबद्ध मन करूं नये ॥ १ ॥ अन्न पाणी धन द्रव्य नारायण। विठ्ठलावांचून बोलूं नये ॥ २ ॥ सप्रेम करावें देवाचें कीर्तन। भय द्या सोडून शरीराचें ॥ ३ ॥ तरी मग जोडे विठ्ठल निधान। केलिया कीर्तन सिद्धि पावे ॥ ४ ॥ देव जोडीलिया तया काय उणें। तुका म्हणे मन धीट करा ॥ ५ ॥ [२८०]

भाव धरिला चरणीं म्हणवितों दास। अहर्निशी ध्यास करितसें ॥ १ ॥ करितसें ध्यास हृदयीं सकळ। भाव तो सबळ धरियेला ॥ २ ॥ धरिले निश्चळ न सोडी ते पाय। तुका म्हणे सोय करीं माझी ॥ ३ ॥ [२८१]

भाते भरूनि हरिनामाचे। वीर गर्जती विठ्ठलाचे ॥ १ ॥ अनंत नामाची आरोळी। एक एकाहूनि बळी ॥ २ ॥ नाहीं आणिकांचा गुमान। ज्याचे अंकित त्यावांचून ॥ ३ ॥ रिद्धिसिद्धि ज्या कामारी। तुका म्हणे ज्याचे घरीं ॥ ४ ॥ [२८२]

भाग्यासाठीं गुरू केला। नाहीं आम्हांसी फळला ॥ १ ॥ याचा मंत्र पडतां कानीं। आमुच्या पेवांत गेलें पाणी ॥ २ ॥ गुरू केला घरवासी। आमुच्या चुकल्या गाईम्हशी ॥ ३ ॥ स्वामी आपुली बुटबुट घ्यावी। आमुची परताप (प्रताप) टाकुन द्यावी ॥ ४ ॥ तुका म्हणे ऐसे नष्ट। त्यांसी दुणे होती कष्ट ॥ ५ ॥ [२८३]

भाग्यालागीं लांचावले। देवधर्म ते राहिले ॥ १ ॥ कथे जातां आळसे मन। प्रपंचाचें मोठें ज्ञान ॥ २ ॥ अखंड प्रीति जाया। नेणें भजनाच्या ठाया ॥ ३ ॥ कथाकीर्तन धनाचें। सर्वकाळ विषयीं नाचे ॥ ४ ॥ तुका म्हणे पंढरीराया। ऐसे जन्मविले वायां ॥ ५ ॥ [२८४]

भ्रतारअंगसंगें सुखाची वेवस्था। आधीं तो सांगतां न ये कोणा ॥ १ ॥ तथापि सांगणें कुमारिकेपाशीं। ते काय मानसीं सुख मानी ॥ २ ॥ तैसा आत्मबोध आधीं बोलों नये। बोलासी तों काय सांपडेल ॥ ३ ॥ तथापि सांगणें बहिर्मुखापाशीं। तो काय संतोषासी मूळ होय ॥ ४ ॥ तुका म्हणे संत सुखाचे विभागीं। ब्रह्मानंद जगीं साधुरूपें ॥ ५ ॥ [२८५]

भवाचिया संगें बहुत नाडिले। कळिकाळें पाडिले तोंडघसीं ॥ १ ॥ तया भवसंगें गुंतलासी वायां। धन पुत्र जाया भुलों नको ॥ २ ॥ जे जे घडी जाय ते ते काळ खाय। प्राण्या तरणोपाय काय केला ॥ ३ ॥ तुका म्हणे करीं सर्वही तूं त्याग। अर्पीं हें सर्वांग जगदीशीं ॥ ४ ॥ [२८६]

भरणी आली मुक्त पेठा। करा लाटा व्यापार ॥ १ ॥ उधार घ्या रे उधार घ्या रे। अवघे या रे जातीचे ॥ २ ॥ येथें पंक्तीभेद नाहीं। मोठे कांहीं लहान ॥ ३ ॥ तुका म्हणे लाभ घ्यावा। मुद्दल भावा जतन ॥ ४ ॥ [२८७]

भक्तिवीण जिणें जळो लाजिरवाणें। संसार भोगणें दुःखमूळ ॥ १ ॥ वीस लक्ष योनी वृक्षामाजीं घ्याव्या। जलचरीं भोगाव्या नव लक्ष ॥ २ ॥ अकरा लक्ष योनी किड्यांमाजी घ्याव्या। दशलक्ष भोगाव्या पक्ष्यांमध्यें ॥ ३ ॥ तीस लक्ष योनि पशूंचिये घरीं। मानवांभीतरी चार लक्ष ॥ ४ ॥ एकएक योनी कोटि कोटि फेरा। मनुष्यदेहवारा मग लागे ॥ ५ ॥ तुका म्हणे तेव्हां नरदेह नरा। तयाचा मातेरा केला मूढें ॥ ६ ॥ [२८८]

भक्तीचिया पोटीं बोध कांकडा ज्योति । पंचप्राण जीवेंभावें ओंवाळूं आरती ॥ १ ॥ ओंवाळूं आरती माझ्या पंढरीनाथा । दोन्ही कर जोडोनी चरणीं ठेवीन माथा ॥ २ ॥ काय महिमा वर्णूं आतां सांगणें तें किती । कोटि ब्रह्महत्या मुख पाहातां जाती ॥ ३ ॥ राही रखूमाई दोहीं दो बाहीं । मयूर पिच्छचामरें ढाळिती ठायीं ठायीं ॥ ४ ॥ तुका म्हणे दीप घेऊनि उन्मन तीं शोभा । विटेवरी उभा दिसे लावण्यगाभा ॥ ५ ॥ [२८९]

भक्तिऋण घेतलें माझें । चरण गहाण आहेत तुझे ॥ १ ॥ प्रेमव्याज देईं हरी । माझा हिशेब लवकरी करीं ॥ २ ॥ माझें मी न सोडीं धन । नित्य करितों कीर्तन ॥ ३ ॥ तुझे नामीं आहे खत । सुखें करीं पंचाईत ॥ ४ ॥ तुका म्हणे गरुडध्वजा । यासी साक्ष श्रीगुरुराजा ॥ ५ ॥ [२९०]

भक्तांचीं सांकडीं स्वयें सोसी देव । त्यांपाशीं केशव सर्व काळ ॥ १ ॥ जये ठायीं कीर्तन वैष्णव करिती । तेथें हा श्रीपति उभा असे ॥ २ ॥ तुका म्हणे देव सर्वां ठायीं झाला । भरूनी उरला पांडुरंग ॥ ३ ॥ [२९१]

ब्राह्मणा न कळे आपुलें तें वर्म । गवसे परब्रह्म नामें एका ॥ १ ॥ लहानथोरांसी करितों प्रार्थना । दृढ नारायणा मनीं धरा ॥ २ ॥ सर्वांप्रति माझी हेचि असे विनंती । आठवा श्रीपती मनामाजी ॥ ३ ॥ केशव नारायण करितां आचमन । तेचि संध्या स्नान कर्म क्रिया ॥ ४ ॥ नामें नित्य करा भजन भोजन । ब्रह्मकर्म ध्यान याचे पायीं ॥ ५ ॥ तुका म्हणे हेंचि निर्वाणीचें शस्त्र । म्हणोनि सर्वत्र स्मरा वेगीं ॥ ६ ॥ [२९२]

ब्रह्मज्ञान जेथें आहे घरोघरीं । सर्व निरंतरीं चतुर्भुज ॥ १ ॥ पापा नाहीं रीग काळाचें खंडण । हरिनामकीर्तन परोपरी ॥ २ ॥ तुका म्हणे हाचि भाव माझ्या चित्तीं । नाहीं आणिकां गती चाड मज ॥ ३ ॥ [२९३]

ब्रह्मयाचे वेद शंखासुरें नेले । त्यासाठीं धरिलें मत्स्यरूप ॥ १ ॥ तेणें आत्मा नव्हता नेला ब्रह्मांडासी । काय ब्रह्मयासी नव्हतें ज्ञान ॥ २ ॥ परि तेणें धांवा केला आवडीनें । झाले नारायण कृपासिंधु ॥ ३ ॥ तुका म्हणे विठोबा मी नामधारक । पोसणें सेवक भेटी देईं ॥ ४ ॥ [२९४]

बौध्य अवतार माझिया अदृष्टा । मौन्य मुखें निष्ठा धरियेली ॥ १ ॥ लोकांचियेसाठीं शाम चतुर्भुज । संतांसवें गुज बोलतसां ॥ २ ॥ आलें कलियुग माझिया संचिता । डोळां हाकलितां न पडेसी ॥ ३ ॥ म्यांच तुझें काय केलें नारायणा । कां नये करुणा तुका म्हणे ॥ ४ ॥ [२९५]

बोले तैसा चाले । त्याचीं वंदीन पाउलें ॥ १ ॥ अंगें झाडीन अंगण । त्याचें दास्यत्व करीन ॥ २ ॥ त्याचा होईन किंकर । उभा ठाकेन जोडोनि कर ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्तीं देव । त्याचे चरणीं माझा भाव ॥ ४ ॥ [२९६]

बोलिले ते देव ऋषी दुर्वासया । जाय पुसावया मागत्यानें ॥ १ ॥ मागुता दुर्वास पुसे बळिराया । निरोप जावया देईं देवा ॥ २ ॥ बळी म्हणे त्यासी जाय मी न म्हणें । जाईल नारायण लागलाची ॥ ३ ॥ मजपाशीं राहें कोठें तरी जाय । तुका म्हणे पाय न सोडीं मी ॥ ४ ॥ [२९७]

बोली मैंदाची बरवी असे । वाटे अंतरीं घालावे फांसे ॥ १ ॥ कैसा वरिवरि दिसताहे चांग । नव्हे भाविक केवळ मांग ॥ २ ॥ टिळा टोपी माळा कंठीं । अंधारीं नेऊनि चेची (चेपी) घांटी ॥ ३ ॥ तुका म्हणे तो केवळ पुंड । त्यावरी वाजती यमदंड ॥ ४ ॥ [२९८]

बा रे पांडुरंगा केव्हां येशी भेटी । जाहलों हिंपुटी तुजवीण ॥ १ ॥ तुजवीण सखे न वाटे मज कोणी । वाटतें चरणीं घालूं मिठी ॥ २ ॥ ओंवाळावी काया चरणांवरोनी । केव्हां चक्रपाणी भेटशील ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी पुरवीं आवडी । वेगीं घालीं उडी नारायणा ॥ ४ ॥ [२९९]

बा रे कृष्णा तुझें मुख कीं कोमळ । कैसे येवढे ज्वाळ ग्रासियेले ॥ १ ॥ बा रे कृष्णा तुझी जिव्हा कीं कोंवळी । होईल पोळली नारायणा ॥ २ ॥ बैसें कृष्णा तुझें पाहूं मुखकमळ । असेल पोळलें कोणे ठायीं ॥ ३ ॥ घोंगडिया खालीं घालूनियां तळीं । वरी वनमाळी बैसविती ॥ ४ ॥ तुका म्हणे भावें आकळिला देव । कृपासिंधुराव त्रैलोक्याचा ॥ ५ ॥ [३००]

बारा वर्षे बाळपण । तेंही वेंचलें अज्ञानें ॥ १ ॥ ऐसा जन्म गेला वायां । न भजतां पंढरीराया ॥ २ ॥ बाकी उरलीं अठ्यायशीं । तीस वेंचिलीं कामासी ॥ ३ ॥ बाकी उरलीं अठ्ठावन्न । तीस वेंचलीं ममतेनें ॥ ४ ॥ बाकी उरलीं अठ्ठावीस । देहगेह विसरलास ॥ ५ ॥ तुका म्हणे ऐसा झाडा । संसार हा आहे थोडा ॥ ६ ॥ [३०१]

बाईल चालिली माहेरा । संगें दिधला म्हातारा ॥ १ ॥ सिधा सामग्री पोटाची । सवें स्वारी बइलाची ॥ २ ॥ जातां पाडिली ढोरानें । सिव्या देती अन्योविन्ये ॥ ३ ॥ न सांवरी आपणातें । नग्न सावलें वरतें ॥ ४ ॥ फजित केलें जन लोकीं । मेला म्हणे पडे नरकीं ॥ ५ ॥ गोहाची हे गेली लाज । गांजितां कां तुम्ही मज ॥ ६ ॥ तुका म्हणे जनीं । छी थू केली विटंबणी ॥ ७ ॥ [३०२]

बळी म्हणे आजी दुर्वासया स्वामी । मागों नका तुम्ही नारायण ॥ १ ॥ बहुतां प्रयासीं जोडला श्रीहरी । बैसविला द्वारीं राखावया ॥ २ ॥ पातला दुर्वास मग हो तेथूनी । चिंतातुर मनीं उद्वेगला ॥ ३ ॥ काय तूं एकाचा आहेसी अंकित । होईं कृपावंत तुका म्हणे ॥ ४ ॥ [३०३]

बहुजन्मां शेवटीं स्वामी तुझी भेटी । बहु मोह पोटीं थोर झाला ॥ १ ॥ बहु पुरें पाहिलीं बहु दिशा शोधिली । बहु चिंता वाहिली दुर्भराची ॥ २ ॥ बहु काळ गेले अनुचित केलें । बहु नाहीं गाइलें नाम तुझें ॥ ३ ॥ ऐसा मी अपराधी अगा कृपानिधि । बहु संतां संनिधि ठेवीं तुका ॥ ४ ॥ [३०४]

बहु क्लेशी झालों या हो नरदेहीं । कृपादृष्टीं पाहीं पांडुरंगा ॥ १ ॥ पांडुरंगा सर्व देवांचिया देवा । घ्यावी माझी सेवा दीनानाथा ॥ २ ॥ दीनानाथ ब्रीद त्रिभुवनीं तुझें । मायबापा ओझें उतरावें ॥ ३ ॥ उतरीं सत्वर पैलथडी नेईं । पूर्णसुख देईं पायांपाशीं ॥ ४ ॥ पायांपाशीं मज ठेवीं निरंतर । आशा तुझी फार दिवस केली ॥ ५ ॥ केली आस तुझी वाट मी पाहातों । निशिदिनीं ध्यातों नाम तुझें ॥ ६ ॥ नाम तुझें गोड स्वभक्तां आवडे । भक्तांलागीं कडे खांदां घेसी ॥ ७ ॥ घेसी खांद्यावरी खेळविसी लोभें । पाऊल तें शोभे विटेवरी ॥ ८ ॥ विटेवरी उभा देखिलासी डोळां । मनाचा सोहळा पुरविसी ॥ ९ ॥ पुरवीं सत्वर त्रैलोक्यस्वामिया । मिठी घाली पायां तुका भावें ॥ १० ॥ [३०५]

बरें झालीयाचे अवघे सांगाती । वाइटाचें अंतीं कोण नाहीं ॥ १ ॥ नोहे माता पिता नोहे कांता सुत । इतरांची मात काय सांगों ॥ २ ॥ तुका म्हणे जन दुतोंडी सावज । सांपडे सहज तिकडे धरी ॥ ३ ॥ [३०६]

बरवें दुकानीं बैसावें । श्रवण मनन असावें ॥ १ ॥ सारअसाराचीं पोतीं । ग्राहक पाहोनि करा रितीं ॥ २ ॥ उगेचि फुगवूं नका गाल । पूर्ण सांठवावा माल ॥ ३ ॥ सत्य तराजू पैं धरा । नका कृत्रिम विकरा ॥ ४ ॥ तुका झाला वाणी । चुकवूनि चौऱ्यांशींच्या खाणी ॥ ५ ॥ [३०७]

फस्याचे बडबडे चवी ना संवाद । आपुलाचि वाद आपणासी ॥ १ ॥ कोणें या शब्दाचे मरावें घसणी । अंतरें शाहाणी राहिजे हो ॥ २ ॥ गाढवाचा भुंक आइकतां कानीं । काय कोड वाणी ऐसियेचें ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्यासी करावें वचन । त्याचे येती गुण आंगास ते ॥ ४ ॥ [३०८]

प्रेम जडलें तुझे पायीं । आणीक न सुचे मजला कांहीं ॥ १ ॥ रात्री दिवस तुझें ध्यान । तेंचि माझें अनुष्ठान ॥ २ ॥ नामापरतें नेणें दुजें । ऐसें कळलें मजला निज ॥ ३ ॥ तुका म्हणे अंतकाळीं । आम्हां सोडवीं तात्काळीं ॥ ४ ॥ [३०९]

बहुत कृपाळू दीनांचा दयाळू । जगीं भक्तवत्सलू नाम तुझें ॥ १ ॥ मानियेला चित्तीं बळीचा उपकार । अझूनी त्याचें द्वार राखशील ॥ २ ॥ काय त्याच्या भेणें बैसलासी द्वारीं । नाहीं तुज हरी कृपा बहु ॥ ३ ॥ तुका म्हणे भक्तजनांची ममता । तुम्हांसी अनंता अलौकिक ॥ ४ ॥ [३१०]

संकल्पिला तूज सकळही भाव । कोण एक ठाव उरला तेथें ॥ १ ॥ इंद्रियव्यापार जें जें कांहीं कर्म । करितों ते धर्म सकळ तुझे ॥ २ ॥ माझें हित फार लागला विचार । तुज सर्व भार चालवणें ॥ ३ ॥ जो कांहीं लौकिक करिसी तो तुझा । अपमान पूजा कांहीं तरी ॥ ४ ॥ तुका म्हणे मी तों राहिलों निश्चिंत । तुज कळे हित तैसें करीं ॥ ६ ॥ [३११]

हात पाय मिळोनी मेळा । चला म्हणती पाहों डोळां ॥ १ ॥ देखणी नव्हे देखती कैसे । सकळांचा देखणा डोळाचि असे ॥ २ ॥ डोळ्याचा डोळा पाहों गेला । तुका म्हणे तो पाहों ठेला ॥ ३ ॥ [३१२]

सोइरे धाइरे दिल्या घेतल्याचे । अंत हे काळींचें नाहीं कोणी ॥ १ ॥ सख्या गोत्रबहिणी सुखाचे सांगाती । मोकलुनी देती अंतकाळीं ॥ २ ॥ आपुलें शरीर आपणा पारिखें । परावीं होतील (परावे सारिखे) नवल काई ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां सोड यांची आस । धरीं रे या कास पांडुरंगा ॥ ४ ॥ [३१३]

सोडियेल्या गाई नवलक्ष गोपाळीं । सवें वनमाळी चालियेला ॥ १ ॥ सुदिन सुवेळीं भाग्याच्या उदयीं । चरावया गाई वनामाजी ॥ २ ॥ गाईगोपाळांच्या संगें चाले हरि । क्रीडा नानापरि खेळताती ॥ ३ ॥ काठी कांबळीया ओहरिया पांवा (पोंवा) । सिदोरी गांजिवा खांद्यावरी ॥ ४ ॥ गोधनें संवगडे खेळे नानापरि । आले भीमातीरीं वेणूनादा ॥ ५ ॥ तेथें उभा ठेला गोपाळांसहित । सिदोरियां सोडीत बैसे तेथें ॥ ६ ॥ तुका म्हणे ज्यांनीं आणिल्या भाकरी । नेऊनियां हरी पुढें देती ॥ ७ ॥ [३१४]

संचित तैशी बुद्धि उपजे मनामधीं । सांगितलें सिद्धी नव जाय ॥ १ ॥ ज्याचा जैसा ठेवा तो त्यापाशीं धांवे । न लगती करावे उपदेश ॥ २ ॥ घेऊन उठती आपुलाले गुण । भविष्याप्रमाणें तुका म्हणे ॥ ३ ॥ [३१५]

संत कृपा जाली । इमारत फळा आली ॥ १ ॥ ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया ॥ २ ॥ नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ॥ ३ ॥ जनार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ॥ ४ ॥ भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ॥ ५ ॥ [३१६]

संतचरणीं नाहीं गोडी । ज्यासी विषयीं आवडी ॥ १ ॥ त्यासी कैंचा भेटे देव । संतचरणीं नाहीं भाव ॥ २ ॥ संतसेवेसी आंग चोरी । दृष्टि न पडो तयावरी ॥ ३ ॥ पाहे गुणदोष संतांचे । जळो काळें तोंड त्यांचें ॥ ४ ॥ तुका म्हणे संतसेवा । आमुच्या पूर्वजांचा ठेवा ॥ ५ ॥ [३१७]

संतजना माझी यावया करुणा। म्हणउनी दीन हीन जालों ॥ १ ॥ नेणें योग युक्ती नाहीं ज्ञान मति। गातसे या गीतीं पांडुरंगा ॥ २ ॥ भाव भक्ति नेणें तप अनुष्ठान। करितों कीर्तन विठ्ठलाचें ॥ ३ ॥ ब्रह्मज्ञान ध्यान न कळे धारणा। एका नारायणा वांचूनियां ॥ ४ ॥ तुका म्हणे माझा विठोबासी भार। जाणे हा विचार तोचि माझा ॥ ५ ॥ [३१८]

संतांपायीं विन्मुख जाला। तो जरि संगति मागों आला ॥ १ ॥ तरि त्याहुनि दुरी जावें। सुखें एकांतीं बैसावें ॥ २ ॥ आत्मचर्चा नाहीं जेथें। आगी लावुनि द्यावी तेथें ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं। चित्ता समाधान कांहीं ॥ ४ ॥ [३१९]

संवद्दड आपटा रानचारा। हा तों दसऱ्याचा तुरा ॥ १ ॥ एरवीं यासी पुसे कोण। एका देवासाठीं मान ॥ २ ॥ मातीची ते घागरी। पाण्यासाठीं बैसे शिरीं ॥ ३ ॥ तुका म्हणे माय जाण। धान्यासाठीं घेणें देणें ॥ ४ ॥ [३२०]

संसार करितो मोठ्या महत्वानें। दिसे लोकां उणें न कळे त्या ॥ १ ॥ पवित्रपण आपुलें घरच्यासींच दिसे। बाहेर उदास निंदिताती ॥ १ ॥ आपणा कळेना आपले अवगुण। पुढिलांचे दोष गुण वाखाणिती ॥ ३ ॥ विषयांचे ध्यासें जग बांधियेलें। म्हणोनी लागलें जन्ममृत्यु ॥ ४ ॥ तुका म्हणे माझें संचितचि असे। देवाजीचें पिसें सहजगुण ॥ ५ ॥ [३२१]

संसाराचें ओझें वाहता वाहविता। तुजविण अनंता नाहीं कोणी ॥ १ ॥ गीतेमाजी शब्द दुंदुभीचा गाजे। योगक्षेमकाज करणें त्याचें ॥ २ ॥ चतुर्भुजा करीं वारू श्रृंगारावे। सारथ्य करावें अर्जुनाचें ॥ ३ ॥ श्वपच अंत्यज भक्तिस्नेहें झाला। अचळपदीं केला ध्रुव तुका ॥ ४ ॥ [३२२]

संसारीं असतां हरिनाम घेसी। तरीच उद्धरसी पूर्वजेंसीं ॥ १ ॥ अवघींच इंद्रियें न येतील कामा। जिव्हे रामनामा उच्चारीं वेगीं ॥ २ ॥ शरीरसंपत्ति नव्हे रे आपुली। भ्रांतीची साउली अवघी व्यर्थ ॥ ३ ॥ तुका म्हणे सार हरिनाम उच्चार। येऱ्हवीं येरझार हरीविण ॥ ४ ॥ [३२३]

स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण। अंतरींची खूण पावूनियां ॥ १ ॥ पुंजाळिले नेत्र झाले अर्धोन्मीलित। कंठ सद्गदित रोमांच आले ॥ २ ॥ चित्त चाकाटलें स्वरूपामाझारी। न निघे बांहेरी सुखावलों ॥ ३ ॥ सुनीळ प्रकाश उदेजला दिन। अमृताचें पान जीवनकळा ॥ ४ ॥ शशिसूर्या झाली जीवें ओंवाळणी। आनंदा दाटणी आनंदाची ॥ ५ ॥ तुका म्हणे सुखें प्रेमेंसी डुल्लत। विरालों निश्चित निश्चितीनें ॥ ६ ॥ [३२४]

स्वप्नींच्या व्यवहारा काळांतर लेखा। जागृतीसी रुका गांठी नाहीं ॥ १ ॥ तेवीं शब्दज्ञानें करिती चावटी। ज्ञान पोटासाठीं विकूं नये ॥ २ ॥ बोलाचीच कढी बोलाचाचि भात। जेवुनियां तृप्त कोण झाला ॥ ३ ॥ कागदीं लिहिली नांवाची साखर। चाटितां मधुर केवीं लागे ॥ ४ ॥ तुका म्हणे जळो जळो त्याचें ज्ञान। यमपुरीं कोण दंड साहे ॥ ५ ॥ [३२५]

स्वगोत्रींचा पुत्र परगोत्रीं अर्पिला। विभागा मुकला पितृधना ॥ १ ॥ तैसें मजलागीं न धरावें दुरी। नव्हे परगोत्री पोटींचाचि ॥ २ ॥ सुतकासी त्याचे नाहीं प्रयोजन। जनिता म्हणोनि तीन दिवस ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं ठावें हें कोणासी। पुसावें वेदांसी देती ग्वाही ॥ ४ ॥ [३२६]

स्वप्नींचें धन चित्रींच्या ब्राह्मणा। जातकर्म जाणा वांटिती पैं ॥ १ ॥ तैसें शब्दज्ञान करिती चावटी। ज्ञान पोटासाठीं विकूनियां ॥ २ ॥ बोलाचीच कढी बोलाचाचि भात। जेवुनियां तृप्त

कोण झाला ॥ ३ ॥ कागदीं लिहीतां नामाची साखर। चाखतां मधुर केवीं लागे ॥ ४ ॥ तुका म्हणे जळो तैसें ज्ञानबंड। यमपुरीं दंड कठिण आहे ॥ ५ ॥ [३२७]

स्त्रिया धन बा हें खोटें। नागवले मोठे मोठे ॥ १ ॥ म्हणोनि सांडा दोनी। सुख पावाल निदानीं ॥ २ ॥ सर्व दुःखासी कारण। हींच दोन्हीच प्रमाण ॥ ३ ॥ आशा सर्वस्वें सांडावी। तेणें निजपदवी पावावी ॥ ४ ॥ देहलोभें नाडला। घाला यमाचा पडला ॥ ५ ॥ तुका म्हणे निरपेक्षा। कांहीं न धरावी अपेक्षा ॥ ६ ॥ [३२८]

स्वयें आपणाचि रिता। रडे पुढिलांच्या हिता ॥ १ ॥ सेखीं हें ना तैसें झालें। बोलणें तितुकें वायां गेलें ॥ २ ॥ सुखसागरीं नेघे वस्ती। अंगीं ज्ञानपणाची मस्ती ॥ ३ ॥ तुका म्हणे गाढव लेखा। जेथें भेटेल तेथें ठोका ॥ ४ ॥ [३२९]

स्वामिसेवा गोड। माते बाळकाचें कोड ॥ १ ॥ जें जें मागावें भातुकें। तें तें पुरवी कौतुकें ॥ २ ॥ खेळविलें कोडें। हरुषें बोले कीं बोबडें ॥ ३ ॥ तुका म्हणे लाड। तेथें पुरे माझें कोड ॥ ४ ॥ [३३०]

स्वामीच्या सामर्थ्यें। चाले बोलिला पुरुषार्थ ॥ १ ॥ पाठी देवाचें हें बळ। मग लाभे हातीं काळ ॥ २ ॥ देव ज्यासी साह्य। तेणें केलें सर्व होय ॥ ३ ॥ तुका म्हणे स्वामीसत्ता। मग नाहीं भय चिंता ॥ ४ ॥ [३३१]

स्वामी तूंही कैसा न पडसी डोळां। सुंदर सांवळा घवघवीत ॥ १ ॥ चतुर्भुज माळा रुळे एकावळी। कस्तुरी निढळीं रेखिलीसे ॥ २ ॥ शंख चक्र गदा रुळे वैजयंती। कुंडलें तळपती श्रवणीं दोन्ही ॥ ३ ॥ तुका म्हणे स्वामी आतां दावीं पाय। पांडुरंगे माये कृपावंते ॥ ४ ॥ [३३२]

हरीविण जिणें व्यर्थचि संसारीं। प्रेत अळंकारीं मिरवत ॥ १ ॥ देवाविण शब्द व्यर्थचि कारण। भांड रंजवण सभेसी गा ॥ २ ॥ आचार करणें देवाविण जो गा। सर्पाचिया अंगा मृदुपण ॥ ३ ॥ तुका म्हणे काय बहु बोले फार। भक्तीविण नर अभाग्य कीं ॥ ४ ॥ [३३३]

हातीं धरिलियाची लाज। देवा असों दे गा तुज ॥ १ ॥ आहें अमंगळ दुर्बळ। होईं दीन तूं दयाळ ॥ २ ॥ बाळ शेंबडें मातेसी। काय नावडे तियेसी ॥ ३ ॥ तुका म्हणे जाणें। करीन देहाचें सांडणें ॥ ४ ॥ [३३४]

हिरण्याक्ष दैत्य मातला जे काळीं। वरदानें बळी शंकराच्या ॥ १ ॥ इंद्रपदराज्य घेतलें हिरोनी। देवा चक्रपाणी म्हणती धांव ॥ २ ॥ तईं पांडुरंगा शूकर झालेती। तया दैत्यपती मारियेलें ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्यांचीं राज्यें त्यांसी दिलीं। ऐसी तूं माउली पांडुरंगा ॥ ४ ॥ [३३५]

हिरा ठेवितां काळें गाहाण। मोल न तुटे दुकाळीं जाण ॥ १ ॥ तैसें संतजन पाहीं। विनटले श्रीहरिपायीं ॥ २ ॥ तुका म्हणे तैसे भक्त। तयांसी जन हें निंदीत ॥ ३ ॥ [३३६]

हेचि वेळा देवा नका मागें घेऊं। तुम्हांविण जाऊं शरण कोणा ॥ १ ॥ नारायणा ये रे पाहें विचारून। तुजविण कोण आहे मज ॥ २ ॥ रात्रंदिवस तुज आठवूनि आहें। पाहातोसी काय सत्व माझें ॥ ३ ॥ तुका म्हणे किती येऊं काकुलती। कांहीं माया चित्तीं येऊं द्यावी ॥ ४ ॥ [३३७]

हीनवर बीजवर दोघी त्या गडणी। अखंड कहाणी संसाराची ॥ १ ॥ माझा पति बहु लहानाचि आहे। खेळावया जाय पोरांसवें ॥ २ ॥ माझें दुःख जरी ऐकशील सई। म्हातारा तो बाई खोकतसे ॥ ३ ॥ खेळे सांजवरी बाहेरी तो राहे। वाट मी हो पाहें सेजेवरी ॥ ४ ॥ पूर्व पुण्य माझें नाहीं बाई नीट। बहु होती कष्ट सांगों काई ॥ ५ ॥ जवळ मी जातें अंगा अंग लावूं। नेदी जवळ येऊं कांटाळतो ॥ ६ ॥ पूर्व सुकृताचा हाचि बाई ठेवा। तुका म्हणे देवा काय बोल ॥ ७ ॥ [३३८]

हेंचि मागणें विठाबाई । पायीं ठेवूनियां डोई ॥ १ ॥ शांति दया अंतःकरणीं । रंगो रामनामीं वाणी ॥ २ ॥ मूळ द्वंद्वाचें विघडो । निजानंदीं वृत्ति जडो ॥ ३ ॥ तुका म्हणे हरी । आतां आपुलेंसें करीं ॥ ४ ॥ [३३९]

होई आतां माझ्या भोगाचा भोगिता । सकळ अनंता शुभाशुभ ॥ १ ॥ आठवुनी पाय राहिलों हृदयीं । निवारली तई सकळ चिंता ॥ २ ॥ अचळ न चळे देहाचें चळण । आहे हें वळण प्रारब्धेंचि ॥ ३ ॥ तुका म्हणे जालें एकचि वचन । केलिया कीर्तन आराणूक ॥ ४ ॥ [३४०]

होतें तैसें पायीं केलें निवेदन । अंतरलों दिन बहुत होतों ॥ १ ॥ संबोखुनी केलें समाधान चित्त । वोगरूनि भातें प्रेमरसें ॥ २ ॥ नामरत्नमणी करूनी भूषण । अलंकारमंडण माळा दिली ॥ ३ ॥ तुका म्हणे सुखें जालों निरामय । नामीं नामसोय निमग्नता ॥ ४ ॥ [३४१]

क्षीराब्धिवासा शेषशयना। लीलाविग्रहा गोपिकारमणा। सगुणस्वरूप भक्तभूषणा। गुणनिधाना गुप्तरूपा ॥ १ ॥ अनंत अवतार धरितिया। अखंडस्वरूपा करुणालया। अमरपालका देवराया। हरीं भवभया भक्तांचिया ॥ २ ॥ सर्वव्यापका सर्वातीता। गजेंद्ररक्षका वैकुंठनाथा। भोळ्या भक्तांसी सौख्यदाता। तुजविण सर्वथा असेचि ना ॥ ३ ॥ चित्तचालका चैतन्यघना। भक्तकैवारी असुरमर्दना। भक्ताभिमानी नारायणा। जगज्जीवना पांडुरंगा ॥ ४ ॥ ब्रह्मादिकांचा निजजनिता । सकळकारण अकर्ता। अणुरेणु व्याप्यभरिता। पावन पतिता तुका म्हणे ॥ ५ ॥ [३४२]

षड्रसीं रांधिलें खापरीं घातलें। चोहटा ठेविलें मध्यरात्रीं ॥ १ ॥ त्यासी सदाचारी लोक न शिवती। श्वानासी निश्चिती फावलें तें ॥ २ ॥ तैसें दुष्टकर्म झालें हरिभक्ता। त्यागिली ममता विषयासक्ति ॥ ३ ॥ इहपरलोक उभय विटाळ। मानिती केवळ हरिचे दास ॥ ४ ॥ तुका म्हणे देवा आवडे हे सेवा। अनुदिनीं व्हावा पूर्ण हेतु ॥ ५ ॥ [३४३]

श्वानाचियापरी लोळें तुझ्या द्वारीं । भुंकों हरिहरि नाम तुझें ॥ १ ॥ भुंकीं उठीं बैसें न वजायें वेगळा। लुडबुडीं गोपाळा पायांपाशीं ॥ २ ॥ तुका म्हणे आम्हां वर्म आहे ठावें। मागेन तें द्यावें प्रेमसुख ॥ ३ ॥ [३४४]

सांग त्वां कोणासी तारिलें। संतांवेगळें उद्धरिलें ॥ १ ॥ संत शब्द उपदेशी। मग तूं हो म्हणशी ॥ २ ॥ तुका म्हणे नाहीं तुझा उपकार। करूं संतांचा उच्चार ॥ ३ ॥ [३४५]

यमधर्म आणिक ब्रह्मादिक देव। त्यांचा पूर्ण भाव तुझे पायीं ॥ १ ॥ करिती स्मरण पार्वती-शंकर। तेथें मी किंकर कोणीकडे ॥ २ ॥ सहस्रमुखेंसीं घोष फणिवराचा। मज किंकराचा पाड काय ॥ ३ ॥ चंद्र सूर्य आणि सर्व तारांगणें । फिरती भ्रमण प्रदक्षिणा ॥ ४ ॥ तुका म्हणे त्यांसी स्वरूप कळेना। तेथें मज दीना कोण पुसे ॥ ५ ॥ [३४६]

यातिगुणें रूपें काय ते वानर। तयांच्या विचारें वर्ते राम ॥ १ ॥ ब्रह्महत्यारासी पातकी अनेक। तो वंद्य वाल्मीक तिहीं लोकीं ॥ २ ॥ तुका म्हणे नव्हे चोरीचा व्यापार । म्हणा रघुवीर वेळोवेळां ॥ ३ ॥ [३४७]

येईल घरा देव न धरीं संदेहा । फकिराचा यावा व्हावा जेव्हां ॥ १ ॥ होईल फकीर योगी महानुभाव। घडी घडी देव सांभाळील ॥ २ ॥ तुका म्हणे ऐसें बोलती बहुत। येणें गुणें संत झाले राम ॥ ३ ॥ [३४८]

येऊनि संसारा काय हित केलें। आयुष्य नासिलें शिश्नोदरा ॥ १ ॥ विषय सेवितां कोण तृप्त झाला । इंधनीं निवाला अग्नि कोठें ॥ २ ॥ देखोनि मृगजल भांबावलीं वेडीं । विचाराची थडी न टाकिती ॥ ३ ॥ ऐसिया जीवांसी सोय न लाविसी । निष्ठुर कां होसी कृपाळुवा ॥ ४ ॥ तुका म्हणे देवा अगाध पैं थोरी । सर्वांचे अंतरीं पुरलासी ॥ ५ ॥ [३४९]

ये गा महाविष्णु अनंतभुजांच्या। आम्हां अनाथांच्या माहेरा ये ॥ १ ॥ भेटावया तुज ओढे माझा जीव। एकवेळां पाय दावीं डोळां॥ २ ॥ आणीक हें आर्त नाहीं नारायणा। ओढे हे वासना भेटावया ॥ ३ ॥ वाटे चित्तीं काय करावा विचार । चरण सुंदर पाहावया ॥ ४ ॥ तुका म्हणे माझे पुरवीं मनोरथ । येईं गा सांवरीत पांडुरंगा ॥ ५ ॥ [३५०]

राम कृष्ण गोविंद नारायण हरी । केशवा मुरारी पांडुरंगा ॥ १ ॥ लक्ष्मीनिवासा पाहें दीनबंधु । तुझा लागो छंदू सदा मज ॥ २ ॥ तुझे नामीं प्रेम देईं अखंडित । नेणें तप व्रत दान कांहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें हेंचि गा मागणें। अखंडही गाणें नाम तुझें ॥ ४ ॥ [३५१]

रामनाम हाचि मांडिला दुकान। आहे वानोवाण घ्या रे कोणी ॥ १ ॥ नका कोणी करूं घेतां रे आळस । वांटतों तुम्हांस फुकाचें हें ॥ २ ॥ संचितासारखें पडे त्याच्या हाता । फारसें मागतां तरी नये ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही सांठविलें सार। उरलिया थार विचारितां ॥ ४ ॥ [३५२]

रानामाचे पवाडे । अखंड ज्याची वाचा पढे ॥ १ ॥ धन्य तो एक संसारीं । रामनाम जो उच्चारी ॥ २ ॥ रामनाम गर्जे वाचा । काळ आज्ञाधारक त्याचा ॥ ३ ॥ तुका म्हणे रामनामीं । कृत्यकृत्य झालों आम्ही ॥ ४ ॥ [३५३]

: शिवाजी राजे स्वतः दर्शनास आले त्या वेळीं त्यांस केलेला उपदेश :

राया छत्रपती ऐकावें वचन । रामदासीं ध्यान लावा वेगीं ॥ १ ॥ रामदासस्वामी सोयरा सज्जन । यासि तूं नमन अर्पी बापा ॥ २ ॥ मारुती अवतार स्वामी प्रगटला । उपदेश केला तुजलागीं ॥ ३ ॥ रामनाम मंत्र तारक केवळ । झालासे सीतळ उमाकांत ॥ ४ ॥ उफराटीं नामें जपतां वाल्मीक। झाला पुण्यश्लोक तात्कालिक ॥ ५ ॥ तेंच बीज त्यासी वरिष्ठ (वसिष्ठ) उपदेश । त्याहूनी विशेष काय आहे ॥ ६ ॥ आतां धरूं नका भलत्याचा संग । राम पांडुरंग कृपा करी ॥ ७ ॥ धरूं नको आस आमुची भूपाळा । रामदासीं डोळा लावा वेगीं ॥ ८ ॥ तुझी चाड नाहीं आम्हां छत्रपति । आम्ही पत्रपती त्रैलोक्याचे ॥ ९ ॥ चारी दिशीं आम्हां भिक्षेचा अधिकार । न मिळे भाकर भक्षावया ॥ १० ॥ पांडुरंगीं आमुची झाली पूर्ण भेटी । हातांत नरोटी दिधली देवें ॥ ११ ॥ आतां पडूं नको आमुचिया काजा । पवित्र तूं राजा रामभक्त ॥ १२ ॥ विठ्ठलाचे दा केवळ भिकारी । आम्हांलागीं हरी उपेक्षीना ॥ १३ ॥ शरण असावें रामदासालागीं । नमन साष्टांगीं घालीं त्यासी ॥ १४ ॥ तुका म्हणे राया मुला असो कल्याण । सद्गुरु शरण असें बापा ॥ १५ ॥ [३५४]

रोगिया मिष्टान्न मर्कटा चंदन । कागासी लेपन कर्पूराचें ॥ १ ॥ निर्नासिका जैसा नावडे आरिसा । मूर्खालागीं तैसा शास्त्रबोध ॥ २ ॥ दास तुका म्हणे विठ्ठल उदारें । अज्ञान अंधारें दूरी केलें ॥ ३ ॥ [३५५]

लटिका प्रपंच वांझेची संतति । तत्वज्ञा हे भ्रांति बाधूं नेणे ॥ १ ॥ सूर्यबिंबी काय अंधार रिघेल। मृगजळें तिंबेल नभ काई ॥ २ ॥ तैसा दृश्यभास नाढळेचि डोळां । प्रकाश सोहळा भोगीतसे ॥ ३ ॥

भोग भोग्य भोक्ता नाढळेचि कांहीं । चैतन्यविग्रहीं पूर्णकाम ॥ ४ ॥ तुका ब्रह्मानंदीं अहेतुक ब्रह्म । प्रपंचाचें बंड न देखे डोळां ॥ ५ ॥ [३५६]

लाडें भाकितों करुणा । तूं रे उदारांचा राणा ॥ १ ॥ करिशी आमुचा सांभाळ । तूं रे माउली स्नेहाळ ॥ २ ॥ नाहीं चिंता रे आम्हांशीं । तूंचि भार चालविशी ॥ ३ ॥ आम्ही झालों उदासीन । तूंचि करिशी जतन ॥ ४ ॥ आम्हां नाहीं जीवनास । तूंचि पुरविशी आस ॥ ५ ॥ तुका म्हणे भलतें सवें । जातां मागें मागें धांवें ॥ ६ ॥ [३५७]

लेखी दुखण्यासमान । वेंचला नारायणीं क्षण । उद्यांचें आजिच मरण । आणोनि म्हणे हरि भोक्ता ॥ १ ॥ नाहीं कांहीं पडों येत तुटी । जाणे तों आहे शेवटीं । लाभ विचारोनि पोटीं । होई शेवटीं जागृत ॥ २ ॥ आहे तें उरे कटा । लावुनि चळे आपुला फाटा । पुरे हें न पुरे शेवटा । तरण्या बळकटा सदा वास ॥ ३ ॥ म्हणोनि मोडावा कांटाळा । अविद्यात्मक कोंवळा । होतील प्रबळा । आशा तृष्णा माया ॥ ४ ॥ क्षण या देहाच्या अंतीं । जड होउनि राहेल माती । परदेश ते परवर होती । चिळसविता नाकडोळे ॥ ५ ॥ जंव या नाहीं पातल्या विपत्ति । आयुष्य भविष्य आहे हातीं । लाभ विचारोनी गुंती । तुका म्हणे अंतीं सर्व पिशुनें ॥ ६ ॥ [३५८]

लोहो परिसासीं रुसलें । सोनेंपणासी मुकलें ॥ १ ॥ येथें कोणाचें काय गेलें । ज्याचें तेणें अनहित केलें ॥ २ ॥ गंगा आली आळशावरी । आळसी देखोनि पळे दूरी ॥ ३ ॥ गांवाखालील ओहळें । रागें गंगेसी न मिळे ॥ ४ ॥ तुका केशवाचा दास । गुरूसी न भजे शिष्य ॥ ५ ॥ [३५९]

वर्णाश्रम करिसी चोख । तरि तूं पावसी उत्तम लोक ॥ १ ॥ परि तें तुज नाहीं ठावें । जेणें अंगें ब्रह्म व्हावें ॥ २ ॥ जरि तूं जालासी पंडित । करिसी शब्दाचें पांडित्य ॥ ३ ॥ गासी तान मान बंध । हाव भाव गीत छंद ॥ ४ ॥ जाणसील तूं स्वतंत्र । आगमोक्त पूजायंत्र ॥ ५ ॥ साधनाच्या ओढी । डोळियांच्या मोडामोडी ॥ ६ ॥ तुका म्हणे देही । संत जाहले विदेही ॥ ७ ॥ [३६०]

वाटीभर विष दिलें प्रल्हादासी । निर्भय मानसीं तुझ्या बळें ॥ १ ॥ भोक्ता नारायण केलें तें प्राशन । प्रतापें जीवन झालें तुझ्या ॥ २ ॥ नामाच्या चिंतनें विषाचें तें आप । जाहालें देखत नारायण ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसे तुझे बडिवार । शिणला फणीवर वर्णवेना ॥ ४ ॥ [३६१]

वाराणसीपर्यंत असों सुखरूप । सांगावा निरोप संतांसी या ॥ १ ॥ येथूनियां आम्हां जाणें निजधामा । सवें असे आम्हां गरुड हा ॥ २ ॥ कृपा असों द्यावी मज दीनावरी । जातसों माहेरीं तुका म्हणे ॥ ३ ॥ [३६२]

वासुदेवा दीनानाथा । कमललोचना श्रीअच्युता । निजभक्तांसी सौख्यदाता । तुजविण सर्वथा असेचिना ॥ १ ॥ विठ्ठला अनंता विश्वपति । विराटस्वरूपा वामनमूर्ति । ब्रह्मादिकर्ता वैकुंठपति । अगम्यस्थिति वेदशास्त्रां ॥ २ ॥ अद्वैतअखंडभरिता । विश्वबाहू अपरिमिता । विश्वचक्षु विश्वदेवता । आदिपिता ब्रह्मयाचा ॥ ३ ॥ भक्ताधीना भवभयभंगा । परमपुरुषा पांडुरंगा । अनादि अखिल अंतरंगा । संगा असंगा वेगळाचि ॥ ४ ॥ हें विराटस्वरूप भोळिया भक्तासी । सर्वथा न कळे हृषीकेशी । सगुणरूप धरूनी त्यासी । लावी भजनासी तुका म्हणे ॥ ५ ॥ [३६३]

विटेवरी समचरण । तो हा रुक्मिणीरमण ॥ १ ॥ वेदशास्त्रां माहेर । केले दासां उपकार ॥ २ ॥ नामापाशीं चारी मुक्ति । पाहा हृदयीं प्रतीति ॥ ३ ॥ तुका म्हणे कळा । अंगीं जयाच्या सकळा ॥ ४ ॥ [३६४]

विठोबाचे पायीं जीव म्यां ठेविला । भक्तिभावें केला देव ऋणी ॥ १ ॥ देव माझा ऋणी आहे सहाकारी । परस्परें वारी भवभय ॥ २ ॥ भवभयडोहीं बुडों नेदी पाहीं । धरूनियां बाहीं तारी मज ॥ ३ ॥ तारियेले दास पाडिलया संकटीं । विष केलें पोटीं अमृतमय ॥ ४ ॥ अमृतातें सेवीतसे नामरसा । तोडियेला फांसा बंधनाचा ॥ ५ ॥ बंधनाचा फांसा आम्हीं कांहीं नेणों । पाय तुझे जाणों पद्मनाभा ॥ ६ ॥ पद्मनाभा नाभिकमळीं ब्रह्मादिक । त्रैलोक्यनायक म्हणविसी ॥ ७ ॥ म्हणविसी देवा दासांचा अंकित । मनाचा संकेत पाहोनियां ॥ ८ ॥ पाहोनियां दृढ निश्चय तयाचा । तोचि दास साचा जवळीक ॥ ९ ॥ जवळीक झाली ब्रह्मीं सुखावले । मार्ग दाखविले मूढां जनां ॥ १० ॥ मूढां जनांमाजी दास तुझा मूढ । कास तुझी दृढ धरियेली ॥ ११ ॥ धरियेले तुझे पाय रे विठ्ठला । तुका सुखी झाला तुझ्या नामें ॥ १२ ॥ [३६५]

विधवेसी एक सुत । अहर्निशीं तेथें चित्त ॥ १ ॥ तैसा तूं मज एकला । नको मोकलूं विठ्ठला ॥ २ ॥ सुपुत्रालागीं बाप । अवघे तेथेंचि संकल्प ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्तीं । पतिव्रते जैसा पति ॥ ४ ॥ [३६६]

विरंचीनें केलें ब्रह्मांड सकळ । तयामाजी खेळ नाना युक्ती ॥ १ ॥ युक्तीचा बाळक ब्रह्मनिष्ठ ज्ञानी । गुरुभक्ति मनीं विश्वासेंसी ॥ २ ॥ ऐसा तुझा प्रेमा कळे कांहीं एक । पाहूनियां लेख पत्रिकींचे ॥ ३ ॥ शिव तुझें नाम ठेविलें पवित्र । छत्रपति सूत्र विश्वाचें कीं ॥ ४ ॥ व्रत नेम तप ध्यानयोग कळा । करूनी मोकळा जालासी तूं ॥ ५ ॥ हा हेत लागला आमुचिये भेटी । पत्रामाजी गोष्टी हेचि थोर ॥ ६ ॥ याचें हें उत्तर ऐक गा भूपति । लिहिली विनंती हेताची हे ॥ ७ ॥ अरण्यवासी आम्ही फिरों उदासीन । दर्शनही हीन अमंगळ ॥ ८ ॥ वस्त्राविण काया जालीसे मळीण । अन्नरहित हीन फळाहारी ॥ ९ ॥ रोडके हातपाय दिसे अवकळा । काय तो सोहळा दर्शनाचा ॥ १० ॥ तुका म्हणे माझी विनंति सलगीची । वार्ता हे भेटीची करूं नका ॥ ११ ॥ [३६७]

वेढा वेढा रे पंढरी । मोर्चे लावा भीमातरीं ॥ १ ॥ चला चला संतजन । करा देवाशीं भांडण ॥ २ ॥ लुटा लुटा पंढरपूर । धरा रखुमाईचा वर ॥ ३ ॥ तुका म्हणे चला । घाव निशाणीं घातला ॥ ४ ॥ [३६८]

वेद नेले शंखासुरें । केलें ब्रह्यानें गाऱ्हाणें ॥ १ ॥ धांव धांव झडकरी । ऐसें कृपाळुवा हरी ॥ २ ॥ गजेंद्र नाडियें गांजिला । तेणें तुझा धांवा केला ॥ ३ ॥ तुका म्हणे पद्मनाभा । जेथें पाहें तेथें उभा ॥ ४ ॥ [३६९]

वैभव तें राज्य संपत्ती टाकावी । उदरार्थ मागावी माधोकरी ॥ १ ॥ आपुलें तें आधीं करावें स्वहित । ऐसी आहे नीत स्वधर्माची ॥ २ ॥ वर्ण कुळ जाती यांचा अभिमान । त्यजावा सन्मान लौकिकाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे राहें एकाकी निःशंक । देऊनियां हांक कंठीं काळ ॥ ४ ॥ [३७०]

रामा अयोध्येच्या राया । दीननाथा रे सखया ॥ १ ॥ पाप ताप विघ्न हरीं । दीनानाथा सुख करीं ॥ २ ॥ भिलटीचिया रे उच्छिष्टा । स्वीकारिसी रे तूं भ्रष्टा ॥ ३ ॥ मी तों सलगीचें मूल । तुका म्हणे तूं सखोल ॥ ४ ॥ [३७१]

यमाचे हे पाश नाटोपती कोणातें । आम्हां दीनानाथें रक्षियेलें ॥ १ ॥ यम नेतां तुम्हां रक्षील हें कोण । तुम्हां धन्य धन्य कोण म्हणती ॥ २ ॥ संतसज्जनमेळा पवित्र संतकीर्ति । त्यांनीं उत्तम स्थिति सांगितली ॥ ३ ॥ तेंचि धरोनि चित्तीं तुका हित करी । यमासी यापरी हाणे आतां ॥ ४ ॥ [३७२]

येईं गे विठ्ठले विश्वजीवनकळे । सुंदर घननीळे पांडुरंगे ॥ १ ॥ येईं गे विठ्ठले करुणाकल्लोळे । जीव कळवळे भेटावया ॥ २ ॥ न लगती गोड आणीक उत्तरें । तुझें प्रेम झुरें भेटावया ॥ ३ ॥ तुका म्हणे धांव घालीं कृष्णाबाई । क्षेम चहूं बाहीं देईं मज ॥ ४ ॥ [३७३]

मनीं भाव असे कांहीं । तेथें देव येती पाहीं ॥ १ ॥ पाहा जनाई सुंदरी । तेथें देव पाणी भरी ॥ २ ॥ शुद्ध पाहोनियां भाव । त्याचे हृदयीं वसे देव ॥ ३ ॥ तुका म्हणे विठोबासी । ठाव देईं चरणापासीं ॥ ४ ॥ [३७४]

मुखें सांगे ब्रह्मज्ञान । जनलोकांची कापितो मान ॥ १ ॥ ज्ञान सांगतो जनांसी । नाहीं अनुभव आपणासी ॥ २ ॥ कथा करितो देवाची । अंतरीं आशा बहु लोभाची ॥ ३ ॥ तुका म्हणे तोचि वेडा । त्याचें हाणूनि थोबाड फोडा ॥ ४ ॥ [३७५]

मस्तकीं सहावें टांकियासी जाण । तेव्हां देवपण भोगावें गा ॥ १ ॥ आपुलिये स्तुती निंदा अथवा मान । टाकावा थुंकोन पैलीकडे ॥ २ ॥ सद्गुरुसेवन तेंचि अमृतपान । करूनी प्राशन बैसावें गा ॥ ३ ॥ आपुल्या मस्तकीं पडोत डोंगर । सुखाचें माहेर टाकूं नये ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां सांगूं तुला किती । जिण्याची फजिती करूं नये ॥ ५ ॥ [३७६]

महा जी महादेवा महाकालमर्दना । मांडियेलें उग्र तप महादीप्त दारुणा । परिधान व्याघ्रांबर चिताभस्मलेपना । स्मशान क्रीडास्थळ तुम्हां जी त्रिनयना ॥ १ ॥ जय देवा (जय) हरेश्वरा जय पार्वतीवरा । आरती ओंवाळीन कैवल्यदातारा ॥ जय० ॥ ॥ २ ॥ रुद्र हें नाम तुम्हां उग्र संहारासी । शंकर शिव भोळा उदार सर्वस्वीं । उदक बेलपत्र टाळी वाहिल्या देसी । आपुलें पद दासां ठाव देईं कैलासीं ॥ ३ ॥ त्रैलोक्यव्यापका हो जन आणि विजन । विराट स्वरूप हें तुझें साजिरें ध्यान । करिती वेद स्तुति कीर्ति मुखें आपण । जाणतां नेणवे हो तुमचें महिमान ॥ ४ ॥ बोलतां नाममहिमा असे आश्चर्य जगीं । उपदेश केल्यानंतर पापें जळती वेगीं । हरहर वाणी गर्जे प्रेम संचरे अंगीं । राहिली दृष्टि चरणीं रंग मीनला रंगीं ॥ ५ ॥ पूजूनि लिंग उभा तुका जोडोनी हात । करितो विज्ञापन परिसावी हे मात । अखंड राहूं द्यावें माझें चरणीं चित्त । घातले साष्टांग मागें मस्तकीं हात ॥ ६ ॥ [३७७]

माझा घात पात अथवा हित फार । अवघा विचार तुझ्या हातीं ॥ १ ॥ ठेवुनि जीव भाव तुझ्या ठायीं चित्त । राहिलों निवांत पांडुरंगा ॥ २ ॥ चित्ताचा चाळक बुद्धीचा जनिता । काय नाहीं सत्ता तुझे हातीं ॥ ३ ॥ तुका म्हणे काय करिसी तें पाहीन । ठेविसी राहीन सुखें तेथें ॥ ४ ॥ [३७८]

माझिया जिवाचा मज निरधार । न करीं उत्तर जनासवें ॥ १ ॥ आपुलें कारण साधो जी विचार । करावा हा धीर धरूनियां ॥ २ ॥ काय कराविया आणिका या युक्ति । काय नव्हे भक्ति विठोबाची ॥ ३ ॥ एक पुढें गेले वाट दावूनियां । मारग तो वायां कोण सांडी ॥ ४ ॥ तुका म्हणे माझी विठोबासी चिंता । भेईना सर्वथा न घडे तें ॥ ५ ॥ [३७९]

माझिया तो जीवें घेतला हा सोस । पाहें तुझी वास भेटावया ॥ १ ॥ मातेवीण बाळ न मनी आणिकां । सर्वकाळ धोका स्तनपाना ॥ २ ॥ वोसंगा निघाल्यावांचूनि न राहे । त्याचें आर्त माय पुरवीते ॥ ३ ॥ तुका म्हणे माते भक्तां तूं कृपाळ । गिळियेले जाळ वनांतरीं ॥ ४ ॥ [३८०]

माझें कोण आहे तुजविण देवा । मुकुंदा केशवा नारायणा ॥ १ ॥ वाट पाहातसें कृपेच्या सागरा । गोपी मनोहरा पांडुरंगा ॥ २ ॥ साच करीं हरी आपुली ब्रीदावळी । कृपेनें सांभाळीं महाराजा

॥ ३ ॥ क्षमा करीं सर्व अपराध माझा । लडिवाळ मीं तुझा पांडुरंगा ॥ ४ ॥ साह्य होसी तरी जाती साही वैरी । मग सुखें अंतरीं ध्यान तुझें ॥ ५ ॥ कृपा करोनि देई दया क्षमा शांती । तेणें तुझी भक्ति लाभईल ॥ ६ ॥ माझें हें सामर्थ्य नव्हे नारायणा । जरी कांहीं करुणा येईल तुज ॥ ७ ॥ तुका म्हणे मज कैसें आपंगा जी । आपुलेंसें करा जी पांडुरंगा ॥ ८ ॥ [३८१]

सुखें सती इंद्रियें जाती । आणिक नेणें भाव भक्ती ॥ १ ॥ देवा हेचि दोन्ही पदें । येर गाइलीं विनोदें ॥ २ ॥ चित्ताचें आसन । तुका करितो कीर्तन ॥ ३ [३८२]

मुंगी होउनि साखर खावी । निजवस्तूची भेटी घ्यावी ॥ १ ॥ वाळवंटीं साकर पडे । गज येऊनि काग रडे ॥ २ ॥ झाला हरिदास गोसावा । अवघी मायिक क्रिया दावी ॥ ३ ॥ पाठ पाटांतरिक विद्या । जन रंजवणी संध्या ॥ ४ ॥ प्रेम नसतां अंगा आणी । दृढ भाव नाहीं मनीं ॥ ५ ॥ ब्रह्मज्ञान वाचे बोले । करणी पाहातां न निवती डोळे ॥ ६ ॥ मिथ्या भगल वाढविती । आपुली आपण पूजा घेती ॥ ७ ॥ तुका म्हणे धाकुटें व्हावें । निजवस्तूसी मागुनी घ्यावें ॥ ८ ॥ [३८३]

मुरु कृश दोन्ही मारिले असुर । दुर्वास ऋषीश्वर सुखी केला ॥ १ ॥ मारियेला मुरु म्हणोनी मुरारी । नाम तुझें हरि पडियेलें ॥ २ ॥ पूर्वीहूनी ऐसा भक्तप्रतिपाळ । केला त्वां सांभाळ नारायणा ॥ ३ ॥ तुका म्हणे येचि वेळे काय झालें । कां सोंग धरिलें मोहनाचें ॥ ४ ॥ [३८४]

मुसळाचें धनु नव्हे हो सर्वथा । पाषाण पिळितां रस कैंचा ॥ १ ॥ वांझे बाळा जैसें दूध नाहीं स्तनीं । गारा त्या आधणीं न सीजिती ॥ २ ॥ नवखंड पृथ्वी पिके मृगजळें । डोंगर भेटे बळें असमानासी ॥ ३ ॥ नैश्वर देह तैसें तेव्हां होय ब्रह्म । तुका म्हणे श्रम करुनी काय ॥ ४ ॥ [३८५]

मूर्तिमंत देव नांदतो पंढरीं । येर दिगंतरीं प्रतिमारूप ॥ १ ॥ जाउनियां वना करावें कीर्तन । मानुनी पाषाण विठ्ठलरूप ॥ २ ॥ तुका म्हणे मुख्य पाहिजे हा भाव । भावापासीं देव शीघ्र उभा ॥ ३ ॥ [३८६]

म्हणे विठ्ठल पाषाण । त्याच्या तोंडावरी वाहाण ॥ १ ॥ नको नको दर्शन त्याचें । गलितकुष्ट भरो वाचे ॥ २ ॥ शाळिग्रामासि म्हणे धोंडा । किडे पडोत त्याच्या तोंडा ॥ ३ ॥ भावी सद्गुरु मनुष्य । त्याचें खंडो कां आयुष्य ॥ ४ ॥ हरिभक्ताच्या करी चेष्टा । त्याचे तोंडीं पडो विष्टा ॥ ५ ॥ तुका म्हणे किती ऐकों । कोठवरी मर्यादा राखों ॥ ६ ॥ [३८७]

माझें म्हणतां याला कां रे नाहीं लाज । कन्या पुत्र भाज धन वित्त ॥ १ ॥ कोणी सोडवीना काळाचे हातींचें । एकाविण साचें नारायणा ॥ २ ॥ तुका म्हणे किती सांगावें चांडाळ । नेणें जीवकळा कोण्या जीतो ॥ ३ ॥ [३८८]

मायबापें केवळ काशी । तेणें न वजावें तीर्थासी ॥ १ ॥ पुंडलीकें काय केलें । परब्रह्म उभें ठेलें ॥ २ ॥ तैसा होईं सावधान । हृदयीं धरीं नारायण ॥ ३ ॥ तुका म्हणे मायबापें । अवघीं देवाचीं स्वरूपें ॥ ४ ॥ [३८९]

कोठें देवा बोलों । तुम्हां भीड घालूं गेलों ॥ १ ॥ करावया सत्वहानी । भांडवलाची टांचणी ॥ २ ॥ दुर्बळा मागतां । त्याच्या प्रवर्तला घाता ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं । मज कळलें ऐसें कांहीं ॥ ४ ॥ [३९०]

माय बाप बंधु सोयरा सांगाती । तूंचि माझी प्रीति गण गोत ॥ १ ॥ शरण आलीं त्यांचीं वारिलीं दुरितें । तारिले पतित असंख्यात ॥ २ ॥ इतर कोण जाणे पावले विश्रांति । न येतां तुजप्रति

शरणागत ॥ ३ ॥ तयामध्यें मज ठेवीं नारायणा । लक्ष्मीरमणा सोईरिया ॥ ४ ॥ तुका म्हणे देईं दर्शनाचा लाभ । जे पाय दुर्लभ ब्रह्मादिकां ॥ ५ ॥ [३९१]

मिथ्या आहे सर्व अवघें हें मायिक । न कळे विवेक मज कांहीं ॥ १ ॥ सर्व बाजागिरी वाटती ही खरी । पाहातां येथें उरी कांहीं नाहीं ॥ २ ॥ आतां मज दुःख वाटतें अंतरीं । उपाय झडकरी सांग कांहीं ॥ ३ ॥ पुढें कोण गति न कळे सर्वथा । तुझे पायीं माथा ठेवियेला ॥ ४ ॥ करणें तें करीं सुखें आतां हरी । तुज म्यां निर्धारीं धरियेलें ॥ ५ ॥ स्वहित तें काय न कळे सर्वथा। तरी तूं अनंता तुका म्हणे ॥ ६ ॥ [३९२]

वृंदावना केलें साकरेचें आळें । न संडे वेगळें कडुपण ॥ १ ॥ कावळ्याचें पिलूं कौतुकें पोशिलें। न राहे उगलें विष्टेविण ॥ २ ॥ क्षेम देतां अंगा गांधेलाची पोळी । करवी नादाळी महाशब्द ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसे न होती ते भले । घालिती ते घाले साधुजना ॥ ४ ॥ [३९३]

वृद्धपणीं आली जरा । शरीर कांपे थरथरा ॥ १ ॥ आयुष्य गेलें हें कळेना । स्मरा वेगें पंढरिराणा ॥ २ ॥ दांत दाढा पडिल्या ओस । हनुवटी भेटे नाकास ॥ ३ ॥ हात पाय राहिले कान। नेत्रा पाझर हाले मान ॥ ४ ॥ अंगकांति परतली। चिरगुटा ऐसी झाली ॥ ५ ॥ आड पडे जिव्हा लेटे। शब्द न ये मुखावाटे ॥ ६ ॥ लांब लोंबताती अंड। भरभरा वाजे गांड ॥ ७ ॥ तुका म्हणे आतां तरी । स्मरा वेगीं हरी हरी ॥ ८ ॥ [३९४]

वृद्धपणीं न पुसे कोणी । विटंबणी देहाची ॥ १ ॥ नव द्वारें झालीं मोकळीक । गांड सरली वाजती ॥ २ ॥ दंत दाढा गळे थुंका। लागे नाका हनुवटी ॥ ३ ॥ शब्द न ये मुखावाटा। करिती चेष्टा पोरें तीं ॥ ४ ॥ तुका म्हणे अजून तरी । स्मरें श्रीहरी सोडवील ॥ ५ ॥ [३९५]

शास्त्रज्ञ हो ज्ञाते असती बहुत । परि नाहीं चित्त हाता आलें ॥ १ ॥ क्षणा एकासाठीं न धरवे धीर । तेणें हा रघुवीर अंतरतो ॥ २ ॥ तोळाभर सोनें रतिभार राई । मेळविल्या पाहीं नास होतो ॥ ३ ॥ हरीचे अंकित असती विरळागत। तयांसी अच्युत कृपा करी ॥ ४ ॥ तुका म्हणे काय धुडवण्या गोष्टी । जंव नाही गांठीं चित्त आलें ॥ ५ ॥ [३९६]

शिकवणेसाठीं वाटते तळमळ । पुढें येईल काळ फोडों डोई ॥ १ ॥ तेव्हां त्यासी काय देशील उत्तर । मेळवूनि अंतर ठेवितोसी ॥ २ ॥ येथींचिया सोंगें भोरपियाचे परी । होईल तें दुरी शृंगारिलें ॥ ३ ॥ तुका म्हणे कां रे राखिलें खरकटें । रागेल्याचे तंटें रागेलें का ॥ ४ ॥ [३९७]

शिव शक्ति आणि सूर्य गणपति । एकचि म्हणती विष्णूसही ॥ १ ॥ हिरा गार दोनी मानिती समान । राजस भजनें वायां जाती ॥ २ ॥ अन्य देवतांसी देव म्हणऊन । तामस जीवन तमोयोग्या ॥ ३ ॥ वायां जायासाठीं केलासे हव्यास । अन्य देवतांस देवपण ॥ ४ ॥ आपुलियामुखें सांगतसे धणी । नव्हे माझी वाणी पदरींची ॥ ५ ॥ धन्य ते वैष्णव भजती केशव। सात्विक हे जीव मोक्षा योग्य ॥ ६ ॥ तुका म्हणे मोक्ष नाहीं कोणापासीं । एका गोविंदासीं शरण व्हा रे ॥ ७ ॥ [३९८]

शिष्या सांगे उपदेश । गुरुपूजा हे विशेष ॥ १ ॥ दावी आचार सोंवळें । दंड कमंडलु माळे ॥ २ ॥ छाटी भगवी मानसीं । व्यर्थ म्हणवी संन्यासी ॥ ३ ॥ तुका म्हणे लोभ । न सुटे नाहीं लाभ ॥ ४ ॥ [३९९]

शेवटींची विनंती । ऐका ऐका कमळापती ॥ १ ॥ काया वाचा मन । चरणीं असे समर्पण ॥ २ ॥ जीव परमात्मा ऐक्यासी । सदा वसो हृदयेंसी ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । कंठीं वसावें केशवा ॥ ४ ॥ [४००]

श्रीमुख वोणवा गिळीत चालिलें । भ्यासुर वासिलें वदनांबुज ॥ १ ॥ विक्राळ त्या दाढा भ्यानें पाहावेना । धावुनी रसना ज्वाळ गिळी ॥ २ ॥ जिव्हा लांब धांवे गोळा करी ज्वाळ । मोठें मुखकमळ त्यांत घाली ॥ ३ ॥ तुका म्हणे अवघा वोणवा गिळीला । आनंद जाहला गोपाळांसी ॥ ४ ॥ [४०१]

श्रीराम सखा ऐसा धरीं भाव । मीपणाचा ठाव पुसीं मना ॥ १ ॥ शरण निरंतर म्हण तूं गोविंदा । वाचे लावीं धंदा नारायण ॥ २ ॥ यापरि सोपान नाहीं रे साधन । वाहातसें आण तुझी मना ॥ ३ ॥ नको कांहीं करूं आळस अंतरीं । जपें निरंतरीं रघुपती ॥ ४ ॥ तुका म्हणे मोठा लाभ नरदेहीं । देहींच विदेही होती नामें ॥ ५ ॥ [४०२]

सकळतीर्थांहुनि । पंढरी हे मुगुटमणि ॥ १ ॥ काय सांगों तेथिल शोभा । रमावल्लभ जेथें उभा ॥ २ ॥ न लभे व्रततीर्थदानीं । तें या विठ्ठलदर्शनीं ॥ ३ ॥ साधु संत गाती नाम । सकळ भूतांचा विश्राम ॥ ४ ॥ तुका म्हणे स्तुती । करूं काय सांगों किती ॥ ५ ॥ [४०३]

सकळ तीर्थांहुनि । पंढरीनाथ मुगुटमणी ॥ १ ॥ धन्य धन्य पंढरी । जे मोक्षाची अक्षय पुरी ॥ २ ॥ विश्रांतीचा ठाव । तो हा माझा पंढरीराव ॥ ३ ॥ तुका म्हणे सांगें स्पष्ट । दुजी पंढरी वैकुण्ठ ॥ ४ ॥ [४०४]

सकळ हे माया नागवे कवणा । भांबविलें जना दाही दिशा ॥ १ ॥ आशा तृष्णा दंभ लागलीं हे पाठीं । नेदी बैसों हाटीं मोह ठायीं ॥ २ ॥ काम क्रोध घरा लावितील आगी । निंदा हिंसा दोघी पळतां खाती ॥ ३ ॥ लाज पुढें उभी राहिली आडवी । ते करी गाढवी थोर घात ॥ ४ ॥ तुका म्हणे चिंता घाली गर्भवासीं । ओढोनियां पाशीं चहूंकडे ॥ ५ ॥ [४०५]

सदा सर्वकाळ अंतरीं कुटिल । तेणें गळां माळ घालूं नये ॥ १ ॥ ज्यासी नाहीं धर्म दया क्षमा शांति । तेणें अंगीं विभूति लावूं नये ॥ २ ॥ जयासी न कळे भक्तीचें महिमान । तेणें ब्रह्मज्ञान बोलों नये ॥ ३ ॥ ज्याचें मन नाहीं लागलें हातासी । तेणें प्रपंचासी टाकूं नये ॥ ४ ॥ तुका म्हणे ज्यासी नाहीं हरिभक्ति । तेणें भगवें हातीं धरूं नये ॥ ५ ॥ [४०६]

सांडियेला गर्भ उबगोनि माउली । नाहीं सांभाळिली भूमि शुद्ध ॥ १ ॥ उष्ण तान भूक एवढिये आकांतीं । ओसंगा लाविती काय म्हूण ॥ २ ॥ खांद्यावरी शूळ मरणाचिये वाटे । अन्यायही मोठे केले साच ॥ ३ ॥ हातींचा हिरोनी घातला पाठीसीं । तुका म्हणे ऐसी परी झाली ॥ ४ ॥ [४०७]

गाथेच्या प्रतींत नसलेले तरी भक्तमंडळांत प्रचलित असलेले

दत्तावर अभंग

* तीन शिरें सहा हात । तया माझे दंडवत ॥ १ ॥ काखे झोळी पुढें श्वान । नित्य जाह्नवीचें स्नान ॥ २ ॥ माथां शोभे जटाभार । अंगीं विभूति सुंदर ॥ ३ ॥ शंख चक्र गदा हातीं । पायीं खडावा गर्जती ॥ ४ ॥ तुका म्हणे दिगंबर । तया माझा नमस्कार ॥ ५ ॥ [४०८]

* नमन माझें गुरुराया । महाराजा दत्तात्रेया ॥ १ ॥ तुझी अवधूत मूर्ती । माझ्या जीवाची विश्रांती ॥ २ ॥ जीवींचें सांकडें । कोण उगवील कोडें ॥ ३ ॥ अनसूयासुता । तुका म्हणे पाव आतां ॥ ४ ॥ [४०९]

* मूळ अभंगांत पाठभेद त्या त्या ठिकाणीं कंसांत दिले आहेत.

* अभंग २३८ चरण पहिला 'अधिकार तैसा दाविंयेला मार्ग ।' असा वाचावा.

* पुढील ५१० क्रमांकाचा अभंग असा वाचावा:—

दुःखाचे डोंगर लागती सोसावे । ऐसें तंव ठावें सकळांसी ॥ १ ॥ कांहीं न करिती विचार हिताचा । न करिती वाचा नामघोष ॥ २ ॥ भोग कळों येतो मागिल ते जन्म । उत्तम मध्यम कनिष्ठ ते ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें झांकितील डोळे । भोग देतेवेळे येइल कळों ॥ ४ ॥ [५१०]

* पृ. ७१७ (सद्गुरुयें' मध्य गुरुयें० ह्या अभंगाचा क्रमांक ३४२७ असा वाचावा.

* नव्हों आम्ही आजिकालीचीं०' हा अभंग अर्थासह दोनदां आला आहे : क्रमांक ८१२ व १४२५.

आरती विठ्ठलाची

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा ॥ पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा । चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय पांडुरंगा । रखुमाई वल्लभा राहीच्या वल्लभा पावें जिवलगा ॥ जय देव० ॥ ध्रु० ॥ तुळसी माळा गळां कर ठेवुनि कटीं । कांसे पीतांबर कस्तुरि लल्लाटीं ॥ देव सुरवर नित्य येती भेटी । गरुड-हनुमंत पुढें उभे राहती ॥ २ ॥ धन्य वेणुनाद अनुक्षेत्रपाळा । सुवर्णाचीं कमळें वनमाळा गळां ॥ राही-रखुमाबाई राणीया सकळा । ओंवाळिती राजा विठोबा सांवळा ॥ ३ ॥ ओंवाळूं आरत्या कुर्वंड्या येती चंद्रभागेमाजीं सोडुनियां देती ॥ दिंड्यापताका वैष्णव नाचती । पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ ४ ॥ आषाढी कार्तिकी भक्तजन येती । चंद्रभागेमाजीं स्नानें जे करिती ॥ दर्शनहेळामात्रें तयां होय मुक्ती । केशवासी नामदेव भावें ओंवाळिती ॥ ५ ॥ जय देव० ॥

आरती तुकारामाची

आरती तुकारामा । स्वामी सद्गुरुधामा ॥ सच्चिदानंदमूर्ति । पाय दाखवी आम्हां ॥ ध्रु० ॥
राघवें सागरांत । पाषाण तारिले ॥ तैसे हे तुकोबाचे । अभंग उदकीं रक्षीले ॥ १ ॥
तुकितां तुळणेसी । ब्रह्म तुकासि आलें ॥ म्हणुनी रामेश्वरें । चरणीं मस्तक ठेविलें ॥ २ ॥
आरती तुकारामा० ॥

॥ समाप्त ॥

अभंगांची सूची

आ

ख

ग

ध

प

भ

क्षेपक अभंगांची सूची

प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ।

आत्मशक्ती, न. खं. क्षीरसागर

श्रीशक्तिपीठ दर्शन–
महाराष्ट्रातील ३॥ शक्तिपीठे
आबासाहेब आचरेकर

पूजा करितो मी देवाची, दि. अ. घैसास

कुंडलिनीशक्ती व परमेश्वरसाक्षात्कार
वसंतराव मालपाठक

नामजपाचे महत्त्व, रा. कृ. कामत

नामचिंतामणि, रा. कृ. कामत

पातञ्जल योगदर्शन, कृ. के. कोल्हटकर

भक्तिमार्गप्रदीप, ल. रा. पांगारकर

मनोबोध, (सार्थ श्रीमनाचे श्लोक),
ल. रा. पांगारकर

नवविधाभक्ति, ल. रा. पांगारकर

वयोऽवस्थाभिधशान्तिसमुच्चयः ।
नारायणशास्त्री जोशी, आंजर्लेकर

सटीप श्रीदासबोध, शं. श्री. देव

सार्थ श्रीदासबोध,
ल. रा. पांगारकर व नारायणमहाराज रामदासी

श्रीसमर्थ ग्रंथ भांडार, ल. रा. पांगारकर

श्रीसमर्थावतार, शं. श्री. देव

श्रीगणेशाथर्वशीर्षविधानम् ।

सविधानं ब्रह्मणस्पति सूक्तम् ।
नारायणशास्त्री जोशी, आंजर्लेकर

सार्थ अष्टावक्रगीता, शांताराम थत्ते

सार्थ श्रीएकनाथी भागवत,
कृ. ना. आठल्ये व रा. कृ. कामत

सार्थ श्रीतुकारामाची गाथा,
विष्णुबुवा जोगमहाराज

आत्मोल्लास, विमला ठकार

जगावेगळं अध्यात्म, विमला ठकार

विश्व स्वधर्मसूर्ये पाहो, विमला ठकार

मंत्रशास्त्र, जगद्गुरु श्रीशंकराचार्य

सार्थ श्रीमद्भगवद्गीता, ना. वा. गुणाजी

सार्थ श्रीविष्णुसहस्रनाम, गुणाजी

सार्थ श्रीव्याडेश्वरी माहात्म

सार्थ श्रीज्ञानेश्वरी, बा. अ. भिडे

श्रीगुरुचरित्र, रा. कृ. कामत

श्रीगुरुलीलामृत, वा. रा. वैद्य

श्रीगुरुचरित्रकथामृत,
रा. कृ. कामत व दि. अ. घैसास

श्रीरामविजय (ग्रंथ), संपा० ना. रा. रानडे

श्रीशिवलीलामृत (सटीप व सचित्र)

स्वामी विवेकानंद समग्र ग्रंथ १ ते २१

मराठी शब्दरत्नाकर (मराठी-मराठी)
वा. गो. आपटे

स्टूडण्टस् मॉडर्न डिक्शनरी
इंग्लिश-इंग्लिश-मराठी

दि न्यू स्टॅण्डर्ड डिक्शनरी
मराठी-इंग्रजी-मराठी
खंड १ सरमोकदम, खंड २ व ३ खानोलकर

दि स्टूडण्टस् न्यू संस्कृत डिक्शनरी
संस्कृत-इंग्लिश-मराठी-गुजराती
देवस्थळी, जोशी व कुळकर्णी

विविध विषयांवरील पुस्तकांची यादी मागवा. विनामूल्य पाठवू.

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी,
गिरगाव, मुंबई ४०० ००४